॥ श्री ज्ञानेश्वर महाराज प्रसन्न ॥

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी
यांचेतर्फे प्रकाशित

श्री ज्ञानेश्वरी

आणि

तुकाराम गाथा

संयुक्त पारायण ग्रंथ

(आवृत्ती पहिली)

● प्रकाशक ●

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी,
आळंदी,
तालुका - खेड, जिल्हा - पुणे. (महाराष्ट्र)

प्रकाशक :
वैद्य प्रशान्त अनन्त सुरू
प्रमुख विश्वस्त
श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी,
आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे. (महाराष्ट्र)

विश्वस्त मंडळ :
श्री. सुधीर ज्ञानेश्वर पिंपळे
श्री. शामसुंदर शंकर मुळे
डॉ. शिवाजीराव नि. मोहिते

© सर्व हक्क आळंदी संस्थान कमिटीकडे

आवृत्ती पहिली : प्रती - २,०००

प्रकाशन :
ज्ञानेश्वर माऊली पालखी प्रस्थान सोहळा,
ज्येष्ठ वद्य ८, शके १९३३
दि. २३ जून २०११

विशेष सवलत मूल्य :
रुपये १२५ /- (रुपये एकशेपंचवीस फक्त)

मुद्रणस्थळ :
सॅप प्रिंट सोल्युशन्स प्रा. लि.
२८-ए, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट,
एस, एन. पथ, लोअर परेल,
मुंबई - ४०० ०१३.
फोन नं. ०२२-४०७४१०००

॥ श्री ॥

मनोगत प्रकाशकाचे

'संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥'

महाराष्ट्र ही खरोखरच संतांची भूमी ! कृषीप्रधान अशा या महाराष्ट्राला घडविण्यात आणि महाराष्ट्रीय संस्कृतीला आपल्या साहित्यलेण्यांनी मढविण्यात प्रत्येक संताचा मोलाचा वाटा आहेच. महाराष्ट्रातील जनसामान्यांचे आराध्यदैवत म्हणजे 'पंढरपूरचा विठोबा' ! या पांडुरंगाने देखील या संतांचे महत्त्व स्वत:च्या कृतीने अधोरेखित केले आहे.

भक्त पुंडलिकासाठी, त्याने फेकलेल्या विटेवर अठ्ठावीस युगे उभे राहून हा विठोबा आजही भाबड्या भक्तांचे तापनिवारण करतो आहे. दामाजीसाठी ओझी वाहणारा किंवा गोरोबाकाकांसाठी आव्याच्या भट्टीपाशी स्वत: राबणारा हा परमेश्वर ! संत जनाईसाठी काबाडकष्टांमध्ये हातभार लावताना, सावता माळ्याचा मळा पिकवताना, नरहरी सोनार, सेना न्हावी अशा साऱ्या भक्तांना कर्मयोगात साहाय्य करीत असतानाच, या सर्वांना 'स्वरूप प्राप्ती' करून देणारा हा देव ! नामदेवाचा लडिवाळ हट्ट पुरवण्यापासून ते एकनाथांना 'श्रीखंड्या' होऊन समचरणांशी एकत्व देणारा हा पांडुरंग !

एवढेच नव्हे तर लाडक्या ज्ञानदेवासाठी त्यांची 'संजीवन समाधी' घेण्याची आग्रही विनंतीही या विठोबाने नुसती मानलीच नाही तर, त्या साक्षात प्रसंगाला सपत्नीक उपस्थित राहिले. ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि निवृत्तीनाथ या तिन्ही भावंडांची 'संजीवन समाधी' आणि आदिमाया मुक्ताईचे 'तेजोमय लुप्तत्व' या साऱ्यांचा साक्षी म्हणून 'बापरखुमादेवीवरु' उभे राहिले. संत तुकारामांना सन्मानाने ग्रंथसंपदा परत केलीच, पण 'सदेह सरूपता' प्राप्त करून दिली. असा हा 'रत्नखाणी विठ्ठल' !

साऱ्या संतमंडळींनी देखील भगवद्भक्ती आणि खरे ज्ञान सर्वसामान्य जनतेसाठी आपल्या लेखणीतून उदारहस्ते उधळले. वारकरी संप्रदायाच्या प्रस्थानत्रयीत श्रीज्ञानेश्वरी, श्रीतुकाराम गाथा आणि श्रीएकनाथी भागवत यांना अनन्य-साधारण महत्त्व आहे. संप्रदायाच्या 'ज्ञानोबा-तुकाराम' या नामघोषात केवळ या संतांचा उल्लेख असला तरी त्याचा अर्थ फक्त हे दोनच संत असा नसून 'ज्ञानेश्वरांपासून सर्व संतांसह तुकारामांपर्यंत' असा मध्यमपदलोपी समासच अपेक्षित आहे.

या संतांनी केलेले उद्बोधनच आजही महाराष्ट्राची आध्यात्मिक शक्ती आहे. म्हणूनच श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने, **''ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीसह संत तुकाराम गाथा''** असा एकत्रित 'पारायणठेवा' प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. आधुनिक काळाच्या बदलत्या रूपामुळे ग्रंथाचा आकार आणि बाह्यस्वरूप थोडे वेगळे वाटले तरी अंतरंगीचा भाव बदललेला नाही. प्रकाशन समयीची भावना ही 'भाविकांच्या, भगवद्भक्तांच्या सेवेसाठी' अशीच आहे. आपण सर्वजण या उपक्रमाचे स्वागत कराल अशी मनोमन खात्री आहे. ह्या प्रकाशनामागे श्री. राजेश जातेगावकर, श्रीमती साधना बाकळे यांचे अफाट श्रम आहेत. ह्या प्रकल्पात मुद्रितशोधनास अपरंपार मदत करणारे ह. भ. प. नरहरी महाराज चौधरी, ह. भ. प. एकनाथ महाराज कोष्टी, पखवाजाचार्य, डॉ. नारायण महाराज जाधव या साऱ्यांचा ऋणनिर्देश करणे हे आमचे कर्तव्य आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे सर्व व्यवस्थापन, पालखी सोहळा मालक, चोपदार, भालदार, मानकरी, सेवेकरी, फडकरी, पुजारी या साऱ्यांनीच वेळोवेळी आपुलकीने साहाय्य दिले आहे. माझे सहविश्वस्त मा. सुधीरजी पिंपळे, मा. शामसुंदरजी मुळे, मा. डॉ. शिवाजीराव मोहिते यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. आम्हा साऱ्यांच्या ह्या उपक्रमास 'संतकृपा' लाभो आणि ही ईश्वरसेवा त्यांच्याच चरणी रुजू होवो, हेच मागणे !

'घेऊनिया गंगाजल, पूजितात गंगेला ॥' - इतिशम् ।

- शुभंभवतु । -

वैद्य प्रशान्त अनन्त सुरू
प्रमुख विश्वस्त
श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी
आळंदी देवाची, पुणे.

ज्येष्ठ वद्य ८, शके १९३३
पालखी प्रस्थान सोहळा,
दि. २३ जून २०११

गीता ध्यान

अथ ध्यानम्

ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं, व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् । अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीम् । अम्बत्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥ नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र । येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥ २ ॥ प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये । ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ ३ ॥ सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः । पार्थो वत्सः सुधीरभोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ४ ॥ वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् । देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥ ५ ॥ भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गान्धारनीलोत्पला । शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ॥ अश्वत्थामविकर्णघोर मकरा दुर्योधनावर्तिनी । सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥ ६ ॥ पाराशर्य वचः सरोजममलं गीतार्थगन्धोत्कटं, नानाख्यानककेसरं हरिकथा सम्बोधनाबोधितम् । लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयनमानं मुदा, भूयाद्भारतपंकजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥ ७ ॥ मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम् । यत्कृपा तमहं वन्दे परमानंदमाधवम् ॥ ८ ॥ यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै-र्वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः । ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥ ९ ॥

- इति ध्यानम् -

श्री ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह पद्धती

दिवस	पद्धती		ओव्या
१	पहिल्या अध्यायापासून चवथा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	११५०
२	पाचव्या अध्यायापासून आठवा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	११५८
३	नवव्या अध्यायापासून अकरावा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	१५७८
४	बाराव्या अध्यायापासून तेरावा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	१४१७
५	चौदाव्या अध्यायापासून पंधरावा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	१०१४
६	सोळाव्या अध्यायापासून सतरावा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	९०६
७	अठरावा अध्याय संपूर्ण होईपर्यंत	-	१८१०
			९०३३

(श्री ज्ञानेश्वरी पारायणाबरोबर या ग्रंथात दिलेल्या क्रमानुसारच गीतापारायण करावे.)

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय पहिला)

श्रीगणेशाय नमः । ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥ देवा तूंचि गणेशु । सकलार्थमतिप्रकाशु । म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ॥ २ ॥ हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष । तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ॥ ३ ॥ स्मृति तेचि अवयव । देखा आंगीक भाव । तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥ ४ ॥ अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें । पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नांचीं ॥ ५ ॥ पदबंध नागर । तेंचि रंगाथिलें अंबर । जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ॥ ६ ॥ देखा काव्यनाटका । जें निर्धारितां सकौतुका । त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥ ७ ॥ नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहतां कुसरी । दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भली ॥ ८ ॥ तेथ व्यासादिकांचीया मती । तेचि मेखळा मिरवती । चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ॥ ९ ॥ देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेचि भुजांची आकृती । म्हणऊनि विसंवादें धरिती । आयुधें हाती ॥ १० ॥ तरी तर्कु तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु । वेदान्तु तो महारसु । मोदकु मिरवे ॥ ११ ॥ एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु । तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा ॥ १२ ॥ मग सहजे सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु । धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ॥ १३ ॥ देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु । जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा ॥ १४ ॥ तरी संवादु तोचि दशनु । जो समताशुभ्रवर्णु । देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ॥ १५ ॥ मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं । बोधमदामृत मुनी- । अली सेविती ॥ १६ ॥ प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ । सरिसेपणे एकवटत इभ- । मस्तकावरी ॥ १७ ॥ उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदें । तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें । शोभती भलीं ॥ १८ ॥ अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल । मकार महामंडल । मस्तकाकारें ॥ १९ ॥ हे तिन्ही एकवटले । तेथें शब्दब्रह्म कवळलें । तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥ २० ॥ आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी । ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिली मियां ॥ २१ ॥ मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु । म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ॥ २२ ॥ जैसे डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे । मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ॥ २३ ॥ कां चिंतामणि आलया

हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम निवृत्ती । ज्ञानदेवो म्हणे ॥ २४ ॥ म्हणोनि जाणतेने गुरु भजिजे । तेणें कृतकार्या होईजे । जैसें मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती ॥ २५ ॥ कां तीर्थें जियें त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं । ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ॥ २६ ॥ तैसा पुढत पुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि । जो अभिलषित मनोरथु । पुरविता तो ॥ २७ ॥ आतां अवधारा कथा गहन । जे सकळां कौतुकां जन्मस्थान । कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ॥ २८ ॥ ना तरी सर्व सुखांची आदि । जे प्रमेयमहानिधि । नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ॥ २९ ॥ कीं परमधाम प्रकट । सर्व विद्यांचे मूळपीठ । शास्त्रजातां वसोट । अशेषांचे ॥ ३० ॥ ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनांचे जिव्हार । लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ ३१ ॥ नाना कथारूपें भारती । प्रकटली असे त्रिजगतीं । आविष्करोनी महामती । व्यासाचिये ॥ ३२ ॥ म्हणोनि हा काव्यां रावो । ग्रंथ गुरुवतीचा ठावो । एथूनि रसां झाला आवो । रसाळपणाचा ॥ ३३ ॥ तेवींचि आइका आणीक एक । एथूनी शब्दश्री सच्छास्त्रिक । आणि महाबोधीं कोवळीक । दुणावली ॥ ३४ ॥ एथ चातुर्य शहाणें झालें । प्रमेय रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥ ३५ ॥ माधुर्यीं मधुरता । शृंगारीं सुरेखता । रूढपण उचितां । दिसे भलें ॥ ३६ ॥ एथ कळाविदपण कळा । पुण्यासी प्रतापु आगळा । म्हणऊनि जनमेजयाचे अवलीळा । दोष हरले ॥ ३७ ॥ आणि पाहतां नावेक । रंगीं सुरंगतेची आगळीक । गुणां सगुणपणाचें बिक । बहुवस एथ ॥ ३८ ॥ भानुचेनि तेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळलें । तैसें व्यासमती कवळलें । मिरवे विश्व ॥ ३९ ॥ कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपुलियापरी विस्तारलें । तैसें भारतीं सुरवाडलें । अर्थजात ॥ ४० ॥ ना तरी नगरांतरीं वसिजे । तरी नागराचि होईजे । तैसें व्यासोक्तितेजें । धवळित सकळ ॥ ४१ ॥ कीं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रगटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ॥ ४२ ॥ ना तरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे । आदिलापासोनि अपाडें । जियापरी ॥ ४३ ॥ नाना घनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळिता साधारण । मग अलंकारीं बरवेपण । निवाडु दावी ॥ ४४ ॥ तैसे व्यासोक्ती अळंकारिलें । आवडे तें बरवेपण पातलें । ते जाणोनि काय आश्रयिलें । इतिहासीं ॥ ४५ ॥ नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं । सानीव धरूनी आंगीं । पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ॥ ४६ ॥ म्हणऊनि महाभारतीं जे नाहीं । तें नोहेचि लोकीं तिहीं । येणें कारणें म्हणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ ४७ ॥ ऐसी सुरस जगीं कथा । जे जन्मभूमि परमार्था । मुनि सांगे नृपनाथा । जनमेजया ॥ ४८ ॥ जे अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम । परम मंगलधाम । अवधारिजो ॥ ४९ ॥ आतां भारतीं कमळपरागु । गीताख्यु प्रसंगु । जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेंसीं ॥ ५० ॥ ना तरी शब्दब्रह्माब्धि । मथिलेया व्यासबुद्धि । निवडिलें निरवधि । नवनीत हें ॥ ५१ ॥ मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें । पद आलें परिपाकें ।

आमोदासी ॥ ५२ ॥ जें अपेक्षिजे विरक्तीं । सदा अनुभविजे संतीं । सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥ ५३ ॥ जें आकर्णिजे भक्तीं । जें आदिवंद्य त्रिजगतीं । ते भीष्मपर्वी संगती । सांगिजैल ॥ ५४ ॥ जें भगवद्गीता म्हणिजे । जें ब्रह्मेशांनीं प्रशंसिजे । जे सनकादिकीं सेविजे । आदरेंसीं ॥ ५५ ॥ जैसे शारदियेचे चंद्रकळे- । माजीं अमृतकण कोवळे । ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ॥ ५६ ॥ तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणुनियां ॥ ५७ ॥ हे शब्देविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोलाआधी झोंबिजे । प्रमेयासी ॥ ५८ ॥ जैसें भ्रमर परागु नेती । परी कमळदळें नेणती । तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ॥ ५९ ॥ कां आपुला ठावो न सांडितां । आलिंगिजे चंद्रु प्रगटतां । हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥ ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंत:करणें । आथिला तोचि जाणे । मानू इये ॥ ६१ ॥ अहो अर्जुनाचिये पांती । परिसणया योग्य होती । तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावे ॥ ६२ ॥ हे सलगी म्यां म्हणितलें । चरणां लागोनि विनविलें । प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणऊनिया ॥ ६३ ॥ जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ॥ ६४ ॥ तैसा तुम्हीं मी अंगीकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला । तरी उणें सहजें उपसाहला । प्रार्थूं कायी ॥ ६५ ॥ परी अपराधु तो आणीक आहे । जें मी गीतार्थ कवळूं पाहें । तें अवधारा विनवू लाहें । म्हणऊनियां ॥ ६६ ॥ हें अनावर न विचारितां । वायांचि धिंवसा उपनला चित्ता । येऱ्हवीं भानुतेजीं काय खद्योता । शोभा आथी ॥ ६७ ॥ कीं टिटिभू चांचुवरी । माप सूये सागरीं । मी नेणतु त्यापरी । प्रवर्ते येथ ॥ ६८ ॥ आइका आकाश गिंवसावें । तरी आणीक त्याहूनि थोर होआवें । म्हणऊनि अपाडु हें आघवें । निर्धारितां ॥ ६९ ॥ या गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी । जेथ भवानी प्रश्नु करी । चमत्कारोनी ॥ ७० ॥ तेथ हरु म्हणे नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ॥ ७१ ॥ हा वेदार्थसागरु । जया निद्रिताचा घोरु । तो स्वयें सर्वेश्वरु । प्रत्यक्ष अनुवादला ॥ ७२ ॥ ऐसें जें अगाध । जेथ वेडावती वेद । तेथ अल्प मी मतिमंद । काय होय ॥ ७३ ॥ हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें धवळावें । गगन मुठीं सुवावें । मशकें केवीं ॥ ७४ ॥ परी एथ असे एकु आधारु । तेणेंचि बोलें मी सधरु । जै सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे ॥ ७५ ॥ येऱ्हवीं तरी मी मुर्खू । जरी जाहला अविवेकु । तरी संतकृपादीपकु । सोज्वळु असे ॥ ७६ ॥ लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे । कीं मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धि ॥ ७७ ॥ जरी प्रकटे सिद्धसरस्वती । तरी मुकया आथी भारती । एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ॥ ७८ ॥ जयातें कामधेनु ऐसी माये । तयासी अप्राप्य कांहीं आहे । म्हणऊनि मी प्रवर्तो लाहें । ग्रंथीं इये ॥ ७९ ॥ तरी न्यून तें पुरतें । अधिक ते सरतें । करुनि घेयावें हें तुमतें । विनवितु असे ॥ ८० ॥ आतां देईजे अवधान । तुम्हीं बोलविल्या मी बोलेन । जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ॥ ८९ ॥ तैसा मी

अनुगृहीतु। साधुंचा निरूपितु। ते आपुला अलंकारितु। भलतयापरी॥ ८२॥ तंव श्रीगुरु म्हणती राहीं। हें तुज बोलावे नलगे कांहीं। आतां ग्रंथा चित्त देईं। झडकरी वेगा॥ ८३॥ या बोला निवृत्तिदासु। पावूनि परम उल्हासु। म्हणे परियेसा मना अवकाशु। देऊनियां॥ ८४॥

धृतराष्ट्र उवाच : धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः। मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय॥ १॥

तरी पुत्रस्नेहें मोहितु। धृतराष्ट्र असे पुसतु। म्हणे संजया सांगे मातु। कुरूक्षेत्रींची॥ ८५॥ जें धर्मालय म्हणिजे। तेथ पांडव आणि माझे। गेले असती व्याजें। जुंझाचेनि॥ ८६॥ तरी तिहीं येतुलां अवसरीं। काय किजत असे येरयेरीं। तें झडकरी कथन करीं। मजप्रती॥ ८७॥

संजय उवाच : दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा। आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत्॥ २॥
पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम्। व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता॥ ३॥

तिये वेळीं तो संजय बोले। म्हणे पांडवसैन्य उचललें। जैसें महाप्रळयीं पसरलें। कृतांतमुख॥ ८८॥ तैसें तें घनदाट। उठावलें एकवाट। जैसें उसळलें कालकूट। धरी कवण॥ ८९॥ ना तरी वडवानलु सांदुकला। प्रलयवातें पोखला। सागर शोषूनि उधवला। अंबरासी॥ ९०॥ तैसे दळ दुर्धर। नानाव्यूहीं परिकर। अवगमलें भयासूर। तिये काळीं॥ ९१॥ तें देखिलेयां दुर्योधनें। अव्हेरिलें कवणें मानें। जैसें न गणिजे पंचाननें। गजघटांतें॥ ९२॥ मग द्रोणापासीं आला। तयांते म्हणे हा देखिला। कैसा दळभारु उचलला। पांडवांचा॥ ९३॥ गिरिदुर्ग जैसे चालते। तैसे विविध व्यूह भंवते। हे रचिले आथि बुद्धिमंतें। द्रुपदकुमरें॥ ९४॥ जो का तुम्हीं शिक्षापिला। विद्या देऊनि कुरुठा केला। तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला। देखदेख॥ ९५॥

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि। युयुधानो विराटश्च द्रुपश्च महारथः॥ ४॥

आणीकही असाधारण। जें शस्त्रास्त्रीं प्रवीण। जे क्षात्रधर्मीं निपुण। वीर आहाती॥ ९६॥ बळें प्रौढी पौरुषें। जे भीमार्जुनांसारिखे। ते सांगे कौतुकें। प्रसंगेंचि॥ ९७॥ एथ युयुधानु सुभटु। आला असे विराटु। महारथी श्रेष्ठु। द्रुपद वीरु॥ ९८॥

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान्। पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः॥ ५॥
युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान्। सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः॥ ६॥

चेकितान धृष्टकेतु। काशीश्वरु विक्रांतु। उत्तमौजा नृपनाथु। शैब्य देख॥ ९९॥ हा कुंतिभोजु पाहें। एथ युधामन्यु आला आहे। आणि पुरुजितादि राय हे। सकळ देखें॥ १००॥ हा सुभद्राहृदय नंदनु। जो अपरु नवा अर्जुनु। तो अभिमन्यु म्हणे दुर्योधनु। देखें द्रोणा॥ १॥ आणीकही द्रौपदीकुमर। हे सकळही महारथी वीर। मिती नेणिजे परी अपार। मीनले असती॥ २॥

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम। नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते॥ ७॥
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः। अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च॥ ८॥

आतां आमुचां दळीं नायक । जे रूढ वीर सैनिक । ते प्रसंगे आइक । सांगिजती ॥ ३ ॥ उद्देशें एक दोनी । जायिजती बोलोनी । तुम्ही आदिकरुनी । मुख्य जे जे ॥ ४ ॥ हा भीष्मु गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु । रिपुगजपंचाननु । कर्ण वीरु ॥ ५ ॥ या एकेकाचेनि मनोव्यापारें । हे विश्व होय संहरे । हा कृपाचार्य न पुरे । एकलाचि ॥ ६ ॥ एथ विकर्ण वीरु आहे । हा अश्वत्थामा पैल पाहें । याचा अडदरु सदा वाहे । कृतांतु मनीं ॥ ७ ॥ समिंतिजयो सौमदत्ति । ऐसे आणिकहि बहुत आहाती । जयांचिया बळा मिती । धाताही नेणे ॥ ८ ॥

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः । नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

जे शस्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त । हो कां जे अस्त्रजात । एथूनि रूढ ॥ ९ ॥ हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रतापु अंगीं । परी सर्व प्राणें मजचिलागीं । आराईले असती ॥ ११० ॥ पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवाचूनि न स्पर्शे । मी सर्वस्व या तैसें । सुभटांसी ॥ ११ ॥ आमुचिया काजाचेनि पाडें । देखती आपुलें जीवित थोकडें । ऐसें निरवधि चोखडे । स्वामिभक्त ॥ १२ ॥ झुंजती कुळकणी जाणती । कळे कीर्तीसी जिती । हें बहु असो क्षात्रनीती । एथोनियां ॥ १३ ॥ ऐसें सर्वांपरी पुरते । वीर दळीं आमुतें । आतां काय गणूं यांतें । अपार हे ॥ १४ ॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् । पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

वरी क्षत्रियामांजि श्रेष्ठु । जो जगजेठी जगीं सुभटु । तया दळवैपणाचा पाटु । भीष्मासी पैं ॥ १५ ॥ आतां याचेनि बळें गवसलें । हें दुर्ग जैसें पन्नासिलें । येणें पाडें थेंकुलें । लोकत्रय ॥ १६ ॥ आधींच समुद्र पाहीं । तेथ दुवाडपण कवणा नाहीं । मग वडवानळु तैसेयाही । विरजा जैसा ॥ १७ ॥ ना तरी प्रलयवन्ही महावातु । या दोघां जैसा सांघातु । तैसा हा गंगासुतु । सेनापति ॥ १८ ॥ आता येणेंसि कवण भिडे । हें पांडव सैन्य कीर थोडें । वरचिलेनि पाडें । दिसत असे ॥ १९ ॥ वरी भीमसेन बेंथु । तो जाहला असे सेनानाथु । ऐसें बोलोनि हे मातु । सांडिली तेणें ॥ १२० ॥

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः । भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि ॥ ११ ॥

मग पुनरपि काय बोले । सकळ सैनिकांते म्हणितलें । आतां दळभार आपुलाले । सरसे करा ॥ २१ ॥ जया जिया अक्षौहिणी । तेणें तिया आयणी । वरगण कवणकवणी । महारथिया ॥ २२ ॥ तेणें तिया आवरिजे । भीष्मातळीं राहिजे । द्रोणातें म्हणे पारिसिजे । तुम्हीं सकळ ॥ २३ ॥ हाचि एकु रक्षावा । मी तैसा हा देखावा । येणें दळभारु आघवा । साचु आमुचा ॥ २४ ॥

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः । सिंहनादं विनद्योच्चैः शङ्खं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

या राजाचिया बोला । सेनापति संतोषला । मग तेणें केला । सिंहनादु ॥ २५ ॥ तो गाजत असे अद्भुतु । दोन्ही सैन्यांआतु । प्रतिध्वनि न समातु । उपजत असे ॥ २६ ॥ तयाचि तुलगासवें । वीरवृत्तीचेनि थावें । दिव्य शंख भीष्मदेवें । आस्फुरिला ॥ २७ ॥ ते दोन्ही नाद

मिनले । तेथ त्रैलोक्य बधिर जाहलें । जैसें आकाश कां पडिलें । तुटोनियां ॥ २८ ॥ घडघडीत अंबर । उचंबळत सागर । क्षोभलें चराचर । कांपत असे ॥ २९ ॥ तेणें महाघोषगजरें । दुमदुमिताती गिरिकंदरें । तंव दळामाजि रणतुरें । आस्फुरिली ॥ १३० ॥

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः । सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

उदंड सैंघ वाजतें । भयानकें खाखातें । महाप्रळयो जेथें । धाकडांसी ॥ ३१ ॥ भेरी निशाण मांदळ । शंख काहळा भोंगळ । आणि भयासुर रणकोल्हाळ । सुभटांचे ॥ ३२ ॥ आवेशें भुजा त्राहाटिती । विसणैले हांका देती । जेथ महामद भद्रजाती । आवरती ना ॥ ३३ ॥ तेथ भेडांची कवण मातु । कांचया केर फिटतु । जेणें दचकला कृतांतु । आंग नेघे ॥ ३४ ॥ एकां उभयांचि प्राण गेले । चांगांचे दांत बैसले । बिरुदांचे दादुले । हिंवताती ॥ ३५ ॥ ऐसा अद्भुत तूरबंबाळु । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु । देव म्हणती प्रलयकाळु । ओढवला आजी ॥ ३६ ॥ ऐसी स्वर्गीं मातु । देखोनि तो आकांतु । तंव पांडवदळांआंतु । वर्तलें कायी ॥ ३७ ॥ हो कां निजसार विजयाचें । कीं तें भांडार महातेजाचें । जेथ गरुडाचिये जावळियेचे । कांतले चान्ही ॥ ३८ ॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ । माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

की पाखांचा मेरु जैसा । रहंवरु मिरवतसे तैसा । तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ॥ ३९ ॥ जेथ अश्ववाहकु आपण । वैकुंठीचा राणा जाण । तया रथाचे गुण । काय वर्णू ॥ १४० ॥ ध्वजस्तंभावरी वानरु । तो मूर्तिमंत शंकरु । सारथी शार्ङ्गधरु । अर्जुनेसीं ॥ ४१ ॥ देखा नवल तया प्रभुचें । अद्भुत प्रेम भक्तांचें । जे सारथ्य पार्थाचें । करितु असे ॥ ४२ ॥ पाइकु पाठीसीं घातला । आपण पुढां राहिला । तेणें पांचजन्यु आस्फुरिला । अवलीळाचि ॥ ४३ ॥

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः । पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥

परी तो महाघोषु थोरु । गाजत असे गंहिरु । जैसा उदैला दिनकरु । लोपी नक्षत्रांतें ॥ ४४ ॥ तैसे तुरबंबाळु भवंते । कौरवदळीं गाजत होते । ते हारपोनि नेणों केउते । गेले तेथ ॥ ४५ ॥ तैसाचि देखें येरें । निनादें अति गहिरें । देवदत्त धनुर्धरें । आस्फुरिला ॥ ४६ ॥ ते दोन्ही शब्द अचाट । मिनले एकवट । तेथ ब्रह्मकटाह शतकूट । हों पाहत असे ॥ ४७ ॥ तंव भीमसेनु विसणैला । जैसा महाकाळु खवळला । तेणें पौंड्र आस्फुरिला । महाशंखु ॥ ४८ ॥

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

तो महाप्रळयजळधरु । जैसा घडघडिला गंहिरु । तंव अनंतविजयो युधिष्ठिरु । आस्फुरित असे ॥ ४९ ॥ नकुळें सुघोषु । सहदेवें मणिपुष्पकु । जेणें नादें अंतकु । गजबजला ठाके ॥ १५० ॥

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः । धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते । सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥

तेथ भूपती होते अनेक । द्रुपदद्रौपदेयादिक । हा काशीपति देख । महाबाहु ॥ ५१ ॥ तेथ

अर्जुनाचा सुतु । सात्यकि अपराजितु । धृष्टद्युम्नु नृपनाथु । शिखंडी हन ॥ ५२ ॥ विराटादि नृपवर । जे सैनिक मुख्य वीर । तिहीं नाना शंख निरंतर । आस्फुरिले ॥ ५३ ॥ तेणें महाघोषनिर्घातें । शेषकूर्म अवचितें । गजबजोनि भूभारातें । सांडूं पाहती ॥ ५४ ॥ तेथ तिहीं लोक डंडळित । मेरु मांदार आंदोळित । समुद्रजळ उसळत । कैलासवेरी ॥ ५५ ॥

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् । नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

पृथ्वीतळ उलथों पाहत । आकाश असे आसुडत । तेथ सडा होत । नक्षत्रांचा ॥ ५६ ॥ सृष्टि गेली रे गेली । देवां मोकळवादी जाहली । ऐशी एक टाळी पिटली । सत्यलोकीं ॥ ५७ ॥ दिहाचि दिन थोकला । जैसा प्रलयकाळ मांडला । तैसा हाहाकारु उठिला । तिहीं लोकीं ॥ ५८ ॥ तंव आदिपुरुष विस्मितु । म्हणे झणें होय अंतु । मग लोपिला अद्भुतु । संभ्रमु तो ॥ ५९ ॥ म्हणोनि विश्व सांवरलें । एऱ्हवीं युगान्त होतें वोडवलें । जैं महाशंख आस्फुरिले । कृष्णादिकीं ॥ १६० ॥ तो घोष तरी उपसंहरला । परी पडिसाद होता राहिला । तेणें दळभार विध्वंसिला । कौरवांचा ॥ ६१ ॥ जैसा गजघटाआंतु । सिंह लीला विदारितु । तैसा हृदयातें भेदितु । कौरवांचिया ॥ ६२ ॥ तो गाजत जंव आइकती । तंव उभेचि हियें घालिती । एकमेकांतें म्हणती । सावध रे सावध ॥ ६३ ॥

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः । प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पाण्डवः ॥ २० ॥

तेथे बळें प्रौढीपुरते । जे महारथी वीर होते । तिहीं पुनरपि दळातें । आवरिलें ॥ ६४ ॥ मग सरिसेपणें उठावले । दुणवटोनि उचलले । तया दंडी क्षोभलें । लोकत्रय ॥ ६५ ॥ तेथ बाणवरी धनुर्धर । वर्षताती निरंतर । जैसे प्रलयांत जलधर । अनिवार कां ॥ ६६ ॥ तें देखलिया अर्जुनें । संतोष घेऊनि मनें । मग संभ्रमें दिठी सेने । घालितसे ॥ ६७ ॥ तंव संग्रामीं सज्ज जाहले । सकळ कौरव देखिले । मग लीला धनुष्य उचलिलें । पंडुकुमरें ॥ ६८ ॥

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते । **अर्जुन उवाच :** सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥

ते वेळी अर्जुन म्हणतसे देवा । आतां झडकरी रथु पेलावा । नेऊनि मध्यें घालावा । दोहीं दळां ॥ ६९ ॥

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् । कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥ २२ ॥
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः । धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

जंव मी नावेक । हे सकळ वीर सैनिक । न्याहाळीन अशेख । झुंजते जे ॥ १७० ॥ एथ आले असती आघवे । परी कवणेंसीं म्या झुंजावें । हें रणीं लागे पहावें । म्हणऊनिया ॥ ७१ ॥ बहुतकरूनि कौरव । आतुर दुःस्वभाव । वांटिवावीण हांव । बांधिती झुंजीं ॥ ७२ ॥ झुंजाची आवडी धरिती । परी संग्रामीं धीर नव्हती । हें सांगोनि रायाप्रती । काय संजयो म्हणे ॥ ७३ ॥

संजय उवाच : एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत । सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥

आइका अर्जुन इतुकें बोलिला । तंव कृष्णें रथु पेलिला । दोहीं सैन्यामाजीं केला । उभा तेणें ॥ ७४ ॥

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् । उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥
तत्रापश्यत्स्थितान् पार्थः पितॄनथ पितामहान् । आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥
श्वशुरान् सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि । तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान् बन्धूनवस्थितान् ॥ २७ ॥

जेथ भीष्मद्रोणादिक । जवळिकेचि सन्मुख । पृथिवीपति आणिक । बहुत आहाति ॥ ७५ ॥ तेथ स्थिर करूनि रथु । अर्जुन असे पाहातु । तो दळभार समस्तु । संभ्रमेंसी ॥ ७६ ॥ मग देवा म्हणे देख देख । हे गोत्रगुरु अशेख । तंव कृष्णा मनीं नावेक । विस्मो जाहला ॥ ७७ ॥ तो आपणयां आपण म्हणे । एथ कायी कवण जाणे । हें मनीं धरिलें येणें । परि कांहीं आश्चर्य असे ॥ ७८ ॥ ऐसी पुढील से घेतु । तो सहजें जाणे हृदयस्थु । परि उगा असे निवांतु । तिये वेळीं ॥ ७९ ॥ तंव तेथ पार्थ सकळ । पितृपितामह केवळ । गुरुबंधुमातुळ । देखता जाहला ॥ १८० ॥ इष्टमित्र आपुले । कुमरजन देखिले । हे सकळ असती आले । तयांमाजीं ॥ ८१ ॥ सुहृज्जन सासरे । आणीकही सखे सोइरे । कुमर पौत्र धनुर्धरें । देखिले तेथ ॥ ८२ ॥ जयां उपकार होते केले । कां आपदीं जे राखिले । हे असो वडीलधाकुले - । आदिकरूनि ॥ ८३ ॥ ऐसें गोत्रचि दोहीं दळीं । उदित जालें असे कळीं । हें अर्जुनें तिये वेळीं । अवलोकिलें ॥ ८४ ॥

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

तेथ मनी गजबज जाहली । आणि आपैसी कृपा आली । तेणें अपमानें निघाली । वीरवृत्ति ॥ ८५ ॥ जिया उत्तम कुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथी । तिया आणिकीतें न साहती । सुतेजपणें ॥ ८६ ॥ नविये आवडीचेनि भरें । कामुक निजवनिता विसरे । मग पाडेंविण अनुसरें । भ्रमला जैसा ॥ ८७ ॥ कीं तपोबळें ऋद्धी । पातलिया भ्रंशे बुद्धी । मग तया विरक्ततासिद्धी । आठवेना ॥ ८८ ॥ तैसें अर्जुना तेथ जाहलें । असतें पुरुषत्व गेलें । जें अंतःकरण दिधलें । कारुण्यासि ॥ ८९ ॥ देखा मंत्रज्ञु बरळु जाये । मग तेथ कां जैसा संचारु होये । तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला ॥ १९० ॥ म्हणऊनी असता धीरु गेला । हृदया द्रावो आला । जैसा चंद्रकळीं सिंपिला । सोमकांतु ॥ ९१ ॥ तयापरी पार्थु । अतिस्नेहें मोहितु । मग सखेद असे बोलतु । अच्युतेसी ॥ ९२ ॥

अर्जुन उवाच : दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥ २८ ॥
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति । वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥
गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते । न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥

तो म्हणे अवधारीं देवा । म्यां पाहिला हा मेळावा । तंव गोत्रवर्गु आघवा । देखिला एथ ॥ ९३ ॥ हे संग्रामीं अति उद्यत । जाहाले असती कीर समस्त । पण आपणपेयां उचित ।

केवीं होय ॥ ९४ ॥ येणें नांवेंचि नेणों कायी । मज आपणपें सर्वथा नाहीं । मन बुद्धी ठायीं । स्थिर नोहे ॥ ९५ ॥ देखें देह कांपत । तोंड असे कोरडें होत । विकळता उपजत । गात्रांसी ॥ ९६ ॥ सर्वांगा कांटाळा आला । अति संतापु उपनला । तेथ बेंबळ हातु गेला । गांडिवाचा ॥ ९७ ॥ तें न धरतचि निष्टलें । परि नेणेंचि हातोनि पडिलें । ऐसें हृदय असे व्यापिलें । मोहें येणें ॥ ९८ ॥ जें वज्रापासोनि कठिण । दुर्धर अतिदारुण । तयाहून असाधारण । हें स्नेह नवल ॥ ९९ ॥ जेणें संग्रामीं हरु जिंतिला । निवातकवचांचा ठावो फेडिला । तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजीं ॥ २०० ॥ जैसा भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें । परि कळिकेमाजीं सांपडे । कोंवळिये ॥ १ ॥ तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परीं तें कमळदळ चिरूं नेणे । तैसें कठीण कोंवळेपणें । स्नेह देखा ॥ २ ॥ हें आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाहि न येचि आया । म्हणऊनी भुलविला ऐके राया । संजयो म्हणे ॥ ३ ॥ अवधारीं मग तो अर्जुनु । देखोनि सकळ स्वजनु । विसरला अभिमानु । संग्रामींचा ॥ ४ ॥ कैसी नेणों सदयता । उपनली तेथें चित्ता । मग म्हणे कृष्णा आतां । नसिजे एथ ॥ ५ ॥ माझें अतिशय मन व्याकुळ । होतसे वाचा बरळ । जे वधावे हे सकळ । येणें नावें ॥ ६ ॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव । न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥

या कौरवां जरी वधावें । तरी युधिष्ठिरादिक कां न वधावे । हे येरयेर आघवे । गोत्रज आमुचे ॥ ७ ॥ म्हणोनि जळो हें झुंज । प्रत्यया न ये मज । एणें काय काज । महापापें ॥ ८ ॥ देवा बहुतीं परीं पाहतां । एथ वोखटें होईल झुंजतां । वर कांही चुकवितां । लाभु आथी ॥ ९ ॥

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च । किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥
येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च । त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥ ३३ ॥

तया विजयवृत्ती कांहीं । मज सर्वथा काज नाहीं । एथ राज्य तरी कायी । हें पाहुनियां ॥ २१० ॥ या सकळांतें वधावें । मग जे भोग भोगावे । ते जळोत आघवे । पार्थु म्हणे ॥ ११ ॥ तेणें सुखेविण जे होईल । तें भलतेही साहिजेल । वरि जीवितही वेंचिजेल । याचिलागीं ॥ १२ ॥ परीं यांसी घातु कीजे । मग आपण राज्य भोगिजे । हें स्वप्नींही मन माझें । करूं न शके ॥ १३ ॥ तरी आम्हीं कां जन्मावें । कवणालागीं जियावें । जें वडिलां या चिंतावें । विरुद्ध मनें ॥ १४ ॥ पुत्रातें इच्छी कुळ । तयाचें कायि हेंचि फळ । जे निर्दाळिजे केवळ । गोत्र आपुलें ॥ १५ ॥ हें मनींचि केविं धरिजे । आपण वज्राचेंयां बोलिजे । वरी घडे तरी कीजे । भलें एयां ॥ १६ ॥ आम्हीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें । हें जीवितही उपकारावें । काजीं यांचा ॥ १७ ॥ आम्ही दिगंतीचे भूपाळ । विभांडूनि सकळ । मग संतोषविजे कुळ । आपुलें जे ॥ १८ ॥ तेचि हे समस्त । परी कैसें कर्म विपरीत । जे जाहले असती उद्यत । झुंजावया ॥ १९ ॥ अंतौरियां कुमरें । सांडोनियां भांडारें । शस्त्राग्रीं जिव्हारें । आरोपुनी ॥ २२० ॥ ऐसियांतें कैसेनि

मारूं । कवणावरी शस्त्र धरूं । निज हृदया करूं । घातु केवीं ॥ २१ ॥

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः । मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा ॥ ३४ ॥

हे नेणसी तूं कवण । परी पैल भीष्म द्रोण । जयांचे उपकार असाधारण । आम्हां बहुत ॥ २२ ॥ एथ शालक सासरे मातुळ । आणि बंधु कीं हे सकळ । पुत्र नातू केवळ । इष्टही असती ॥ २३ ॥ अवधारीं अति जवळिकेचे । हे सकळही सोयरे आमुचे । म्हणोनि दोष आथि वाचे । बोलतांचि ॥ २४ ॥

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोपि मधुसूदन । अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥

हे वरी भलतें करितु । आतांचि एथें मारितु । परि आपण मनें घातु । न चिंतावा ॥ २५ ॥ त्रैलोक्यींचें अनकळीत । जरी राज्य होईल प्राप्त । तरी हें अनुचित । नाचरें मी ॥ २६ ॥ जरी आजि एथ ऐसें कीजे । तरी कवणाचां मनीं उरिजे । सांगें मुख केवीं पाहिजे । तुझें कृष्णा ॥ २७ ॥

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन । पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

जरी वधु करूनि गोत्रजांचा । तरी वसौटा होऊनि दोषांचा । मज जोडलासि तू हातींचा । दूरी होसी ॥ २८ ॥ कुळहरणीं पातकें । तियें आंगीं जडती अशेखें । तये वेळीं तूं कवणें कें । देखावासी ॥ २९ ॥ जैसा उद्यानामाजीं अनळु । संचरला देखोनि प्रबळु । मग क्षणभरी कोकिळु । स्थिर नोहे ॥ २३० ॥ सकर्दम सरोवरु । अवलोकूनि चकोरु । न सेवितु अव्हेरु । करूनि निघे ॥ ३१ ॥ तयापरी तूं देवा । मज झकों न येसी मावा । जरी पुण्याचा वोलावा । नाशिजैल ॥ ३२ ॥

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबान्धवान् । स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥

म्हणोनि मी हें न करीं । इये संग्रामीं शस्त्र न धरी । हें किडाळ बहुतीं परीं । दिसतसे ॥ ३३ ॥ तुजसीं अंतराय होईल । मग सांगें आमचें काय उरेल । तेणें दुःखें हिय फुटेल । तुजविण कृष्णा ॥ ३४ ॥ म्हणवूनि कौरव हे वधिजती । मग आम्हीं भोग भोगिजती । हे असो मात अघडती । अर्जुन म्हणे ॥ ३५ ॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः । कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् । कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

हे अभिमानमदें भुलले । जरी पां संग्रामा आले । तन्ही आम्हीं हित आपुलें । जाणावें लागे ॥ ३६ ॥ हें ऐसें कैसें करावें । जे आपुले आपण मारावे । जाणत जाणतांचि सेवावें । काळकूट ॥ ३७ ॥ हां जी मार्गीं चालतां । पुढां सिंह जाहला अवचितां । तो तंव चुकवितां । लाभु आथी ॥ ३८ ॥ असता प्रकाशु सांडावा । मग अंधकूप आश्रावा । तरी तेथ कवणु देवा । लाभु सांगें ॥ ३९ ॥ का समोर अग्नि देखोनी । जरी न वचिजे वोसंडोनी । तरी क्षणा एका कवळुनि । जाळूं सके ॥ २४० ॥ तैसे दोष हे मूर्त । अंगीं वाजों असती पाहात । हें जाणतांही केवीं एथ । प्रवर्तावें ॥ ४१ ॥ ऐसें पार्थ तिये अवसरीं । म्हणे देवा अवधारीं । या कल्मषाची थोरी । सांगेन तुज ॥ ४२ ॥

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः । धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥

जैसें काष्ठें काष्ठ मथिजे । तेथ वन्हि एक उपजे । तेणें काष्ठजात जाळिजे । प्रज्वळलेनि ॥ ४३ ॥ तैसा गोत्रींची परस्परें । जरी वधु घडे मत्सरें । तरी तेणें महादोषें घोरें । कुळचि नाशे ॥ ४४ ॥ म्हणवूनि येणें पापें । वंशजधर्मु लोपे । मग अधर्मुचि आरोपे । कुळामाजीं ॥ ४५ ॥

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः । स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसङ्करः ॥ ४१ ॥

एथ सारासार विचारावें । कवणें काय आचरावें । आणि विधिनिषेध आघवे । पारुषती ॥ ४६ ॥ असता दीपु दवडिजे । मग अंधकारीं राहाटिजे । तरी उजूचि का आडळिजे । जयापरी ॥ ४७ ॥ तैसा कुळीं कुळक्षय होय । तये वेळीं तो आद्य धर्मु जाय । मग आन काहीं आहे । पापावांचुनी ॥ ४८ ॥ जैं यमनियम ठाकती । तेथ इंद्रियें सैरा विचरती । म्हणवूनि व्यभिचार घडती । कुळस्त्रियांसी । उत्तम अधर्मीं संचरती । ऐसे वर्णावर्ण मिसळती । तेथ समूळ उपडती । जातिधर्म ॥ २५० ॥ जैसी चोहटाचिये बळी । पाविजे सैरा काऊळीं । तैसीं महापापें कुळीं । प्रवेशती ॥ ५१ ॥

सङ्करो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च । पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ॥ ४२ ॥

मग कुळा तया अशेखा । आणि कुळघातकां । येरयेरां नरका । जाणें आथी ॥ ५२ ॥ देखें वंशवृद्धि समस्त । यापरी होत पतित । मग वोवांडिती स्वर्गस्थ । पूर्वपुरुष ॥ ५३ ॥ जेथ नित्यादि क्रिया ठाके । आणि नैमित्तिक कर्म पारुखे । तेथ कवणा तिळोदकें । कवण अर्पी ॥ ५४ ॥ तरी पितर काय करिती । कैसेनि स्वर्गीं वसती । म्हणोनि तेही येती । कुळापासीं ॥ ५५ ॥ जैसा नखाग्रीं व्याळु लागे । तो शिखांत व्यापी वेगें । तेवीं आब्रह्म कुळ अवघे । आप्लविजे ॥ ५६ ॥

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसङ्करकारकैः । उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन । नरकेऽनियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् । यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥

देवा अवधारीं आणिक एक । एथ घडे महापातक । जे संगदोषें हा लौकिक । भ्रंशु पावे ॥ ५७ ॥ जैसा घरीं आपुला । वानिवसें वन्ही लागला । तो आणिकांही प्रज्वळिला । जाळुनि घाली ॥ ५८ ॥ तैसिया तया कुळसंगती । जे जे लोक वर्तती । तेही बाधु पावती । निमित्तें येणें ॥ ५९ ॥ तैसें नाना दोषें सकळ । अर्जुन म्हणे तें कुळ । मग महाघोर केवळ । निरय भोगी ॥ २६० ॥ पडिलिया तिये ठायीं । मग कल्पांतींही उकलु नाहीं । येसणें पतन कुळक्षयीं । अर्जुन म्हणे ॥ ६१ ॥ देवा हें विविध कानीं ऐकिजे । परी अझुनिवरी त्रासु नुपजे । हृदय वज्राचें हें काय कीजे । अवधारीं पां ॥ ६२ ॥ अपेक्षिजे राज्यसुख । जयालागीं ते तंव क्षणिक । ऐसें जाणतांही दोख । अव्हेरूं ना ॥ ६३ ॥ जे हे वडिल सकळ आपुले । वधावया दिठी सूदले । सांग पां काय थेकुलें । घडलें आम्हां ॥ ६४ ॥

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः । धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

आतां यावरी जें जियावें । तयापासूनि हें बरवें । जे शस्त्रें सांडूनि साहावे । बाण यांचे ॥ ६५ ॥ तयावरी होय जितुके । तें मरणही वरी निकें । परी येणें कल्मषें । चाड नाहीं ॥ ६६ ॥ ऐसें देखोनि सकळ । अर्जुनें आपुलें कुळ । मग म्हणे राज्य तें केवळ । निरयभोगु ॥ ६७ ॥

संजय उवाच : एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

ऐसें तिये अवसरीं । अर्जुन बोलिला समरीं । संजयो म्हणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ६८ ॥ मग अत्यंत उद्वेगला । न धरत गहिंवरु आला । तेथ उडी घातली खालां । रथौनियां ॥ ६९ ॥ जैसा राजकुमरु पदच्युतु । सर्वथा होय उपहतु । कां रवि राहुग्रस्तु । प्रभाहीनु ॥ २७० ॥ नातरी महासिद्धिसंभ्रमें । जिंतिला तापसु भ्रमे । मग आकळुनि कामें । दीनु कीजे ॥ ७१ ॥ तैसा तो धनुर्धरु । अत्यंत दुःखें जर्जरु । जेथ रहंवरु । त्यजिला तेणें ॥ ७२ ॥ मग धनुष्यबाण सांडिले । न धरत अश्रुपात आले । ऐसें ऐकें राया तेथें वर्तलें । संजयो म्हणे ॥ ७३ ॥ आतां यावरी तो वैकुंठनाथु । देखोनि सखेद पार्थु । कवणेपरी परमार्थु । निरूपील ॥ ७४ ॥ ते सविस्तर पुढारी कथा । अति सकौतुक ऐकतां । ज्ञानदेव म्हणे आतां । निवृत्तिदासु ॥ २७५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
अर्जुनविषादयोगोनाम प्रथमोऽध्यायः ॥ (श्लोक ४७; ओव्या २७५)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय दुसरा)

संजय उवाच : तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् । विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

मग संजयो म्हणे रायातें । आइकें तो पार्थु तेथें । शोकाकुल रुदनातें । करितु असे ॥ १ ॥ तें कुळ देखोनि समस्त । स्नेह उपनलें अद्भुत । तेणें द्रवलें असे चित्त । कवणेपरी ॥ २ ॥ जैसे

लवण जळें झळंबलें । ना तरी अभ्र वातें हाले । तैसें सधीर परी विरमलें । हृदय तयाचें ॥ ३ ॥ म्हणोनि कृपा आकळिला । दिसतसे अति कोमाइला । जैसा कर्दमीं रुपला । राजहंस ॥ ४ ॥ तयापरी तो पांडुकुमरु । महामोहें अति जर्जरु । देखोनी श्रीशार्ङ्गधरु । काय बोले ॥ ५ ॥

श्रीभगवानुवाच : कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् । अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

म्हणे अर्जुना आधी पाहीं । हें उचित काय इये ठायीं । तू कवण हें कायी । करीत आहासी ॥ ६ ॥ तुज सांगें काय जाहलें । कवण उणें आलें । करितां काय ठेलें । खेदु कायिसा ॥ ७ ॥ तूं अनुचिता चित्त नेदिसी । धीरु कंहींच न संडिसी । तुझेनि नामें अपयशीं । दिशा लंघिजे ॥ ८ ॥ तूं शूरवृत्तीचा ठावो । क्षत्रियांमाजीं रावो । तुझिया लाठेपणाचा आवो । तिहीं लोकीं ॥ ९ ॥ तुवां संग्रामीं हरु जिंतिला । निवातकवचांचा ठावो फेडिला । पवाडा तुवां केला । गंधर्वासी ॥ १० ॥ हें पाहतां तुझेनि पाडें । दिसे त्रैलोक्यही थोकडें । ऐसें पौरुष चोखडें । पार्था तुझें ॥ ११ ॥ तो तूं कीं आजि एथें । सांडुनिया वीरवृत्तीतें । अधोमुख रुदनातें । करितु आहासी ॥ १२ ॥ विचारीं तू अर्जुनु । कीं कारुण्ये कीजसी दीनु । सांग पां अंधकारें भानु । ग्रासिला आथी ॥ १३ ॥ ना तरी पवनु मेघासी बिहे । कीं अमृतासी मरण आहे । पाहें पां इंधनचि गिळोनि जाये । पावकातें ॥ १४ ॥ कीं लवणेंचि जळ विरे । संसर्गें काळकूट मरे । सांग महाफणी दर्दुरें । गिळिजे कायी ॥ १५ ॥ सिंहासी झोंबे कोल्हा । ऐसा अपाडु आथि कां जाहला । परी तो त्वां साच केला । आजि एथ ॥ १६ ॥ म्हणोनि अझुनी अर्जुना । झणें चित्त देसी या हीना । वेगीं धीर करूनियां मना । सावधान होई ॥ १७ ॥ सांडीं हें मूर्खपण । उठीं घे धनुष्यबाण । संग्रामीं हे कवण । कारुण्य तुझें ॥ १८ ॥ हां गा तू जाणता । तरी न विचारिसी कां आतां । सांगें झुंजवेळे सदयता । उचित कायी ॥ १९ ॥ हे असतिये कीर्तीसी नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु । म्हणे जगन्निवासु । अर्जुनातें ॥ २० ॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

म्हणोनि शोकु न करीं । तूं पुरता धीरु धरीं । हे शोच्यता अव्हेरीं । पंडुकुमरा ॥ २१ ॥ तुज नव्हे हें उचित । येणें नासेल जोडलें बहुत । तूं अझुनि वरी हित । विचारीं पां ॥ २२ ॥ येणें संग्रामाचेनि अवसरें । एथ कृपाळुपण नुपकरे । हे आतांचि काय सोयरे । जाहले तुज ॥ २३ ॥ तूं आधींचि काय नेणसी । कीं हे गोत्रज नोळखसी । वायांचि काय करिसी । अतिशो आतां ॥ २४ ॥ आजिचें हे झुंज । काय जन्मा नवल तुज । हे परस्परें तुम्हा व्याज । सदाचि आथी ॥ २५ ॥ तरी आतां काय जाहलें । कायि स्नेह उपनलें । हें नेणिजे परि कुडें केलें । अर्जुना तुवां ॥ २६ ॥ मोह धरिलिया ऐसें होईल । जे असती प्रतिष्ठा जाईल । आणि परलोकही अंतरेल । ऐहिकेंसी ॥ २७ ॥ हृदयाचें ढिलेपण । एथ निकयासी नव्हे कारण । हें संग्रामी पतन जाण । क्षत्रियांसीं ॥ २८ ॥ ऐसेनि तो कृपावंतु । नानापरी असे शिकवतु । हें ऐकोनि पंडुसुतु । काय बोले ॥ २९ ॥

अर्जुन उवाच : कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन । इषुभिः प्रति योत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४॥

देवा हें येतुलेवरी । बोलावें नलगे अवधारीं । आधीं तूंचि चित्तीं विचारीं । संग्रामु हा ॥ ३० ॥ हें झुंज नव्हे प्रमादु । एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु । हा उघडा लिंगभेदु । वोढवला आम्हां ॥ ३१ ॥ देखें मातापितरें अर्चिजती । सर्वस्वें तोष पावविजती । तियें पाठीं केवीं वधिजती । आपुलां हातीं ॥ ३२ ॥ देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । हें वांचूनि केवीं निंदिजे । स्वयें वाचा ॥ ३३ ॥ तैसें गोत्रगुरु आमुचे । हे पूजनीय आम्हां नियमाचे । मज बहुत भीष्मद्रोणांचे । वर्ततसे ॥ ३४ ॥ जयांलागीं मनें विरु । आम्हीं स्वप्नीही न शकों धरूं । तया प्रत्यक्ष केवीं करूं । घातु देवा ॥ ३५ ॥ वर जळो हें जियालें । एथ आघवेयांसि हेंचि काय जाहलें । जे यांचां वधीं अभ्यासिलें । मिरविजे आम्हीं ॥ ३६ ॥ मी पार्थु द्रोणाचा केला । येणें धनुर्वेदु मज दिधला । तेणें उपकारें काय आभारैला । वधीं तयातें ॥ ३७ ॥ जेथींचियां कृपा लाभिजे वरु । तेथेंचि मनें व्यभिचारु । तरी काय मी भस्मासुरु । अर्जुन म्हणे ॥ ३८ ॥

गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥ ५॥

देवा समुद्र गंभीर आइकिजे । वर तोहि आहाच देखिजे । परी क्षोभु मनीं नेणिजे । द्रोणाचिये ॥ ३९ ॥ हें अपार जें गगन । वर तयाही होईल मान । परि अगाध भलें गहन । हृदय याचें ॥ ४० ॥ वरी अमृतही विटे । कीं काळवशें वज्र फुटे । परि मनोधर्मु न लोटे । विकरविला हा ॥ ४१ ॥ स्नेहालागीं माये । म्हणिपे तें कीरु होये । पण कृपा ते मूर्त आहे । द्रोणीं इये ॥ ४२ ॥ हा कारुण्याची आदि । सकळ गुणांचा निधि । विद्यासिंधु निरवधि । अर्जुन म्हणे ॥ ४३ ॥ हा येणें मानें महंतु । वरी आम्हालागी कृपावंतु । आतां सांग पां येथ घातु । चिंतूं येईल ॥ ४४ ॥ ऐसे हे रणीं वधावे । मग आपण राज्यसुख भोगावें । तें मना नये आघवें । जीवितेंसीं ॥ ४५ ॥ हें येणें मानें दुर्भर । जे याहीहुनि भोग सधर । ते असतु येथवर । भिक्षा मागतां भलीं ॥ ४६ ॥ ना तरी देशत्यागें जाइजे । कां गिरिकंदर सेविजे । परि शस्त्र आतां न धरिजे । इयांवरी ॥ ४७ ॥ देवा नवनिशतीं शरीं । वावरोनि यांचां जिव्हारीं । भोग गिंवसावे रुधिरीं । बुडाले जे ॥ ४८ ॥ ते काढूनि काय कीजती । लिप्त केवीं सेविजती । मज न ये हे उपपत्ति । याचिलागीं ॥ ४९ ॥ ऐसें अर्जुन तिये अवसरीं । म्हणे श्रीकृष्णा अवधारी । परि तें मना न येचि मुरारी । आइकोनियां ॥ ५० ॥ हें जाणोनि पार्थु बिहाला । मग पुनरपि बोलों लागला । म्हणे देवो कां चित्त या बोला । देतीचिना ॥ ५१ ॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६॥

येऱ्हवीं माझां चित्तीं जें होतें । तें मी विचारूनि बोलिलों एथें । परि निके काय यापरौतें । तें

तुम्ही जाणा ॥ ५२ ॥ पैं विरु जयांसी ऐकिजे । आणि या बोलींचि प्राणु सांडिजे । ते एथ संग्रामव्याजें । उभे आहाती ॥ ५३ ॥ आतां ऐसेयांतें वधावें । कीं अव्हेरूनिया निघावें । या दोहोंमाजीं काई बरवे । तें नेणों आम्ही ॥ ५४ ॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७ ॥

आम्हां काय उचित । तें पाहतां न स्फुरे एथ । जे मोहें येणें चित्त । व्याकुळ माझें ॥ ५५ ॥ तिमिरावरुद्ध जैसें । दृष्टींचें तेज भ्रंशे । मग पासींच असतां न दिसे । वस्तुजात ॥ ५६ ॥ देवा मज तैसे जाहलें । जें मन हें भ्रांती ग्रासिलें । आतां काय हित आपुलें । तेंही नेणें ॥ ५७ ॥ तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें । निकें तें आम्हां सांगावें । जे सखा सर्वस्व आघवें । आम्हासि तूं ॥ ५८ ॥ तूं गुरु बंधु पिता । तूं आमची इष्ट देवता । तूचि सदा रक्षिता । आपदीं आमुतें ॥ ५९ ॥ जैसा शिष्यांतें गुरु । सर्वथा नेणे अव्हेरु । कीं सरितांतें सागरु । त्यजी केवीं ॥ ६० ॥ नातरी अपत्यातें माये । सांडूनि जरी जाये । तरी तें कैसेंनि जिये । ऐकें कृष्णा ॥ ६१ ॥ तैसा सर्वांपरी आम्हांसि । देवा तूंचि एक आहासि । आणि बोलिलें जरी न मानिसी । मागील माझें ॥ ६२ ॥ तरी उचित काय आम्हां । जें व्यभिचरेना धर्मा । तें झडकरी पुरुषोत्तमा । सांगें आतां ॥ ६३ ॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद् यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥ ८ ॥

हें सकळ कुळ देखोनि । जो शोकु उपजलासे मनीं । तो तुझिया वाक्यावांचुनि । न जाय आणिकें ॥ ६४ ॥ एथ पृथ्वीतळ आपु होईल । हें महेंद्रपदही पाविजेल । परि मोह हा न फिटेल । मानसींचा ॥ ६५ ॥ जैसी बीजें सर्वथा आहाळलीं । तीं सुक्षेत्रीं जन्ही पेरिलीं । तरी न विरूढतीं सिंचलीं । आवडे तैसीं ॥ ६६ ॥ ना तरी आयुष्य पुरलें आहे । तरी औषधें कांहीं नोहे । एथ एकचि उपेगा जाये । परमामृत ॥ ६७ ॥ तैसे राज्यभोगसमृद्धि । उज्जीवन नोहे जीवबुद्धि । एथ जिव्हाळा कृपानिधि । कारुण्य तुझें ॥ ६८ ॥ ऐसें अर्जुन तेथ बोलिला । जंव क्षण एक भ्रांती सांडिला । मग पुनरपि व्यापिला । उर्मीं तेणें ॥ ६९ ॥ किं मज पाहतां उर्मी नोहे । हें अनारिसें गमत आहे । तो ग्रासिला महामोहें । काळसर्पें ॥ ७० ॥ सवर्म हृदयकल्हारी । तेथ कारुण्यवेळेचां भरीं । लागला म्हणोनि लहरी । भांजेचि ना ॥ ७१ ॥ हें जाणोनिं ऐसी प्रौढी । जो दृष्टिसवे विष फेडी । तो धावया श्रीहरी गारुडी । पातला कीं ॥ ७२ ॥ तैसिया पंडुकुमरा व्याकुळा । मिरवतसे श्रीकृष्ण जवळा । तो कृपावशें अवलीळा । रक्षील आतां ॥ ७३ ॥ म्हणोनि तो पार्थु । मोहफणिग्रस्तु । म्यां म्हणितला हा हेतु । जाणोनियां ॥ ७४ ॥ मग देखा तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती कवळुनु । जैसा घनपडळीं भानु । आच्छादिजे ॥ ७५ ॥ तयापरी तो धनुर्धरु । जाहलासे दुःखें जर्जरु । जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु । वणवला कां ॥ ७६ ॥ म्हणोनि

सहजे सुनीळु । कृपामृतें सजळु । तो वोळलासे श्रीगोपाळु । महामेघु ॥ ७७ ॥ तेथ सुदर्शनाची द्युति । तेचि विद्युल्लता झळकती । गंभीर वाचा ते आयती । गर्जनेची ॥ ७८ ॥ आतां तो उदार कैसा वर्षेल । तेणें अर्जुनाचळु निवेल । मग नवी विरूढी फुटेल । उन्मेषाची ॥ ७९ ॥ ते कथा आइका । मनाचिया आराणुका । ज्ञानदेवो म्हणे देखा । निवृत्तिदासु ॥ ८० ॥

संजय उवाच : एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप । न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ ९ ॥

ऐसें संजयो सांगतु । म्हणे राया तो पार्थु । पुनरपि शोकाकुलितु । काय बोले ॥ ८१ ॥ आइकें सखेदु बोले श्रीकृष्णातें । आतां नाळवावें तुम्हीं मातें । मी सर्वथा न झुंजें येथें । भरंवसेनि ॥ ८२ ॥ ऐसें येकि हेळां बोलिला । मग मौन करूनि ठेला । तेथ श्रीकृष्ण विस्मयो पावला । देखोनि तयातें ॥ ८३ ॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत । सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥ १० ॥

मग आपुलां चित्तीं म्हणे । एथ हें कायी आदरिलें येणें । अर्जुन सर्वथा कांही नेणे । काय कीजे ॥ ८४ ॥ हा उमजे आतां कवणेपरी । कैसेनि धीरु स्वीकारी । जैसा ग्रहातें पंचाक्षरी । अनुमानी कां ॥ ८५ ॥ ना तरी असाध्य देखोनि व्याधी । अमृतासम दिव्य औषधी । वैद्य सूची निरवधि । निदानींची ॥ ८६ ॥ तैसे विवरतु असे श्रीअनंतु । तया दोहीं सैन्याआंतु । जयापरी पार्थु । भ्रांति सांडी ॥ ८७ ॥ तें कारण मनीं धरिलें । मग सरोष बोलों आदरिलें । जैसे मातेचां कोपीं थोकलें । स्नेह आथी ॥ ८८ ॥ की औषधाचिया कडुवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी । ते आहाच न दिसे परी गुणीं । प्रकट होय ॥ ८९ ॥ तैसीं वरिवरि पाहतां उदासें । आंत तरी अतिसुरसें । तियें वाक्यें हृषिकेशें । बोलों आदरिलीं ॥ ९० ॥

श्रीभगवानुवाच : अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे । गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः ॥ ११ ॥

मग अर्जुनातें म्हणितलें । आम्हीं आजि हें नवल देखिलें । जें तुवां येथ आदरिलें । माझारींचि ॥ ९१ ॥ तूं जाणता तरी म्हणविसी । परी नेणिवेतें न संडिसी । आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी । बहुसाल नीति ॥ ९२ ॥ जात्यंधा लागे पिसें । मग तें सैरा धावे जैसें । तुझें शहाणपण तैसें । दिसतसे ॥ ९३ ॥ तूं आपणपें तरी नेणसी । परी या कौरवातें शोचूं पहासी । हा बहु विस्मय आम्हासीं । पुढतपुढती ॥ ९४ ॥ तरी सांग पां मज अर्जुना । तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना । हे अनादि विश्वरचना । तें लटकें कायी ॥ ९५ ॥ एथ समर्थु एक आथी । तयापासूनि भूतें होती । तरी हें वांयाचि काय बोलती । जगामाजीं ॥ ९६ ॥ हो कां सांप्रत ऐसें जहाले । जे हे जन्ममृत्यु तुवां सृजिले । आणि नाशु पावे नाशिले । तुझेनि कायी ॥ ९७ ॥ तूं भ्रमलेपणें अहंकृती । यांसि घातु न धरिसी चित्तीं । तरी सांगे कायि हे होती । चिरंतन ॥ ९८ ॥ कीं तू एक वधिता । आणि सकळ लोकु हा मरता । ऐसी भ्रांति झणें चित्ता । येवों देसी ॥ ९९ ॥ अनादिसिद्ध हें आघवें । होतजात स्वभावें । तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ १०० ॥ परी

मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी । आणि तूचि नीति सांगसी । आम्हांप्रति ॥ १ ॥ देखें विवेकी जे होती । ते दोहींतेंही न शोचती । जे होय जाय हे भ्रांती । म्हणऊनियां ॥ २ ॥

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः । न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥

अर्जुना सांगेन आइक । एथ आम्ही तुम्ही देख । आणि हे भूपति अशेख । आदिकरुनी ॥ ३ ॥ नित्यता ऐसेचि असोनी । ना तरी निश्चित क्षया जाउनि । हे भ्रांति वेगळी करूनी । दोन्हीं नाहीं ॥ ४ ॥ हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे । येऱ्हवीं तत्त्वता वस्तु जे असे । ते अविनाशचि ॥ ५ ॥ जैसें पवनें तोय हालविलें । आणि तरंगाकार जाहलें । तरी कवण कें जन्मलें । म्हणों ये तेथ ॥ ६ ॥ तेंचि वायूचें स्फुरण ठेलें । आणि उदक सहज सपाट जाहलें । तरी आतां काय निमालें । विचारीं पां ॥ ७ ॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा । तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

आइकें शरीर तरी एक । परी वयसा भेद अनेक । हें प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ॥ ८ ॥ एथ कौमारत्व दिसे । मग तारुण्यीं तें भ्रंशे । परी देहचि न नाशे । एकेकासवें ॥ ९ ॥ तैसीं चैतन्याचां ठायीं । इये शरीरांतरे होती जाती पाहीं । ऐसें जाणे तया नाहीं । व्यामोहदुःख ॥ ११० ॥

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः । आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥

एथ नेणावया हेंचि कारण । जे इंद्रियांआधीनपण । तिहीं आकळिजे अंतःकरण । म्हणऊनि भ्रमे ॥ ११ ॥ इंद्रियें विषय सेविती । तेथ हर्ष शोकु उपजति । ते अंतर आप्लविती । संगें येणें ॥ १२ ॥ जयां विषयांचां ठायीं । एकनिष्ठता कहीं नाहीं । तेथ दुःख आणि कांहीं । सुखहि दिसे ॥ १३ ॥ देखें हे शब्दाची व्याप्ति । निंदा आणि स्तुति । तेथ द्वेषाद्वेष उपजती । श्रवणद्वारें ॥ १४ ॥ मृदु आणि कठीण । हे स्पर्शाचे दोन्ही गुण । जे वपूचेनि संगें कारण । संतोषखेदां ॥ १५ ॥ भ्यासुर आणि सुरेख । हें रूपाचें स्वरूप देख । जें उपजवी सुखदुःख । नेत्रद्वारें ॥ १६ ॥ सुगंधु आणि दुर्गंधु । हा परिमळाचा भेदु । जो घ्राणासंगें विषादु - । तोषु देता ॥ १७ ॥ तैसाचि द्विविध रसु । उपजवी प्रीतित्रासु । म्हणूनि हा अपभ्रंशु । विषयसंगु ॥ १८ ॥ देखें इंद्रियांआधीन होईजे । तैं शीतोष्णांतें पाविजे । आणि सुखदुःखी आकळिजे । आपणपें ॥ १९ ॥ या विषयांवांचूनि कांहीं । आणीक सर्वथा रम्य नाहीं । ऐसा स्वभावोचि पाहीं । इंद्रियांचा ॥ १२० ॥ हे विषय तरी कैसे । रोहिणीचें जळ जैसें । कां स्वप्नींचा आभासे । भद्रजाति ॥ २१ ॥ देखें अनित्य तियापरी । म्हणऊनि तूं अव्हेरीं । हा सर्वथा संगु न धरीं । धनुर्धरा ॥ २२ ॥

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ । समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

हे विषय जयातें नाकळिती । तया सुखदुःखें दोन्ही न पवती । आणि गर्भवासुसंगती । नाहीं तया ॥ २३ ॥ तो नित्यरूपु पार्था । वोळखावा सर्वथा । जो या इंद्रियार्था नागवेचि ॥ २४ ॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः । उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

आतां अर्जुना आणिक कांही एक । सांगेन मी आइक । जें विचारें परलोक । वोळखिती ॥ २५ ॥ या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत । तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ॥ २६ ॥ सलिलीं पय जैसें । एक होऊनि मिनलें असे । परी निवडूनि राजहंसें । वेगळे कीजे ॥ २७ ॥ की अग्निमुखें किडाळ । तोडोनियां चोखाळ । निवडिती केवळ । बुद्धिमंत ॥ २८ ॥ ना तरी जाणिवेचिया आयणी । करितां दधि कडसणी । मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें ॥ २९ ॥ कीं भूस बीज एकवट । उपणितां राहे घनवट । तेथ उडे तें फलकट । जाणों आलें ॥ १३० ॥ तैसें विचारितां निरसलें । तें प्रपंचु सहजें सांडवलें । मग तत्त्वता तत्त्व उरलें । ज्ञानियांसी ॥ ३१ ॥ म्हणोनि अनित्याचां ठायीं । तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं । निष्कर्ष दोहींही । देखिला असे ॥ ३२ ॥

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् । विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

देखें सारासार विचारितां । भ्रांति ते पाहीं असारता । तरी सार तें स्वभावता । नित्य जाणें ॥ ३३ ॥ हा लोकत्रयाकारु । तो जयाचा विस्तारु । तेथ नाम वर्ण आकारु । चिन्ह नाहीं ॥ ३४ ॥ जो सर्वदा सर्वगतु । जन्मक्षयातीतु । तया केलियाहि घातु । कदाचि नोहे ॥ ३५ ॥

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता: शरीरिण: । अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥

आणि शरीरजात आघवें । हें नाशवंत स्वभावें । म्हणोनि तुवां झुंजावें । पंडुकुमरा ॥ ३६ ॥

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् । उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ १९ ॥

तूं धरूनि देहाभिमानातें । दिठी सूनि या शरीरातें । मी मारिता हे मरते । म्हणत आहासी ॥ ३७ ॥ तरी अर्जुना तूं हें नेणसी । जरी तत्त्वता विचारिसी । तरी वधिता तूं नव्हेसी । हे वध्य नव्हती ॥ ३८ ॥

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूय: ।
अजो नित्य: शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजव्ययम् । कथं स पुरुष: पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥ २१ ॥

जैसें स्वप्नामाजिं देखिजे । तें स्वप्नींचि साच आपजे । मग चेऊनियां पाहिजे । तंव कांहीं नाहीं ॥ ३९ ॥ तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वायां । शस्त्रें हाणितलिया छाया । जैसी आंगीं न रुपे ॥ १४० ॥ कां पूर्ण कुंभ उलंडला । तेथ बिंबाकारू दिसें भ्रंशला । परी भानु नाहीं नासलां । तयासवें ॥ ४१ ॥ ना तरी मठीं आकाश जैसें । मठाकृती अवतरलें असे । तो भंगलिया आपैसें । स्वरूपचि ॥ ४२ ॥ तैसें शरीराचां लोपीं । सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं । म्हणऊनि तूं हे नारोपीं । भ्रांति बापा ॥ ४३ ॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २२ ॥

जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे । तैसे देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ॥ ४४ ॥

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

हा अनादि नित्यसिद्धु । निरुपाधि विशुद्धु । म्हणऊनि शस्त्रादिकीं छेदु । न घडे यया ॥ ४५ ॥ हा प्रळयोदकें नाप्लवे । अग्निदाहो न संभवे । एथ महाशोषु न प्रभवे । मारुताचा ॥ ४६ ॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च । नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते । तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

अर्जुना हा नित्यु । अचळु हा शाश्वतु । सर्वत्र सदोदितु । परिपूर्णू हा ॥ ४७ ॥ हा तर्काचिये दिठी । गोचर नोहें किरीटी । ध्यान याचिये भेटी । उत्कंठा वाहे ॥ ४८ ॥ हा सदा दुर्लभु मना । आपु नोहे साधना । निःसीमु हा अर्जुना । पुरुषोत्तमु ॥ ४९ ॥ हा गुणत्रयरहितु । व्यक्तीसी अतीतु । अनादि अविकृतु । सर्वरूप ॥ १५० ॥ अर्जुना ऐसा जाणावा । हा सकळात्मकु देखावा । मग सहजें शोकु आघवा । हरेल तुझा ॥ ५१ ॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् । तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥

अथवा ऐसा नेणसी । तूं अंतवंतचि हें मानिसी । तऱ्ही शोचूं न पवसी । पंडुकुमरा ॥ ५२ ॥ जे आदि-स्थिती-अंतु । हा निरंतर असे नित्यु । जैसा प्रवाहो अनुस्यूतु । गंगाजळाचा ॥ ५३ ॥ जें आदि नाहीं खंडलें । समुद्रीं तरी असे मिनलें । आणि जातचि मध्यें उरलें । दिसे जैसें ॥ ५४ ॥ इयें तिन्ही तयापरी । सरसींच सदा अवधारीं । भूतांसि कवणीं अवसरीं । ठाकती ना ॥ ५५ ॥ म्हणोनि हें आघवें । एथ तुज नलगे शोचावें । जे स्थितीची हे स्वभावें । अनादि ऐसी ॥ ५६ ॥ ना तरी हें अर्जुना । नयेचि तुझिया मना । जे देखोनि लोकु अधीना । जन्मक्षया ॥ ५७ ॥ तरी येथ कांहीं । तुज शोकासि कारण नाहीं । जे जन्ममृत्यु हे पाहीं । अपरिहर ॥ ५८ ॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च । तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥

उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसें । हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा ॥ ५९ ॥ ना तरी उदोअस्तु आपैसे । अखंडित होत जात जैसे । हें जन्ममरण तैसें । अनिवार जगीं ॥ १६० ॥ महाप्रळयअवसरे । हें त्रैलोक्यही संहरे । म्हणोनि हा न परिहरे । आदि अंतु ॥ ६१ ॥ तूं जरी हें ऐसें मानसी । तरी खेदु कां करिसी । काय जाणतचि नेणसी । धनुर्धरा ॥ ६२ ॥ एथ आणीकही एक पार्था । तुज बहुतीं परीं पाहतां । दुःख करावया सर्वथा । विषो नाहीं ॥ ६३ ॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥

जें समस्तें इयें भूतें । जन्माआदि अमूर्ते । मग पातलीं व्यक्तीतें । जन्मलेया ॥ ६४ ॥ तियें क्षयासि जेथ जाती । तेथ निभ्रांत आनें नव्हती । देखें पूर्वस्थितीचे येती । आपुलिये ॥ ६५ ॥ येर मध्यें जें प्रतिभासे । तें निद्रिता स्वप्न जैसें । तैसा आकारु हा मायावशें । सत्स्वरूपीं ॥ ६६ ॥ ना तरी पवनें स्पर्शिलें नीर । पढियासे तरंगाकार । का परापेक्षां अळंकार - । व्यक्ती कनकीं ॥ ६७ ॥ तैसें सकळ हे मूर्त । जाण पां मायाकारित । जैसें आकाशीं बिंबत । अभ्रपटळ ॥ ६८ ॥

तैसें आदीचि जें नाहीं । तयालागीं तूं रुदसि कायी । तूं अवीट तें पाहीं । चैतन्य एक ॥ ६९ ॥ जयाची आर्तीचि भोगित । विषयीं त्यजिले संत । जयालागीं विरक्त । वनवासिये ॥ १७० ॥ दिठी सूनि जयातें । ब्रह्मचर्यादि व्रतें । मुनीश्वर तपातें । आचरताती ॥ ७१ ॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥

एक अंतरीं निश्चळ । जें निहाळितां केवळ । विसरले सकळ । संसारजात ॥ ७२ ॥ एकां गुणानुवादु करितां । उपरति होऊनि चित्ता । निरवधि तल्लीनता । निरंतर ॥ ७३ ॥ एक ऐकतांचि निवाले । ते देहभावीं सांडिले । एक अनुभवें पातले । तद्रूपता ॥७४॥ जैसे सरिताओघ समस्त । समुद्रामाजिं मिळत । परी माघौते न समात । परतले नाहीं ॥ ७५ ॥ तैसिया योगीश्वरांचिया मती । मिळणीसवें एकवटती । परी जे विचारूनि पुनरावृत्ति । भजतीचिना ॥ ७६ ॥

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत । तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥

जें सर्वत्र सर्वही देहीं । जया करितांही घातु नाहीं । तें विश्वात्मक तूं पाहीं । चैतन्य एक ॥ ७७ ॥ जयाचेनि स्वभावें । हें होत जात आघवें । तरी सांग काय शोचावें । एथ तुवां ॥ ७८ ॥ एऱ्हवीं तरी पार्था । तुज कां नेणों न मनें चित्ता । परी किडाळ हें शोचितां । बहुतीं परीं ॥ ७९ ॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि । धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥

तूं अझूनि कां न विचारिसी । काय हें चिंतितु आहासी । स्वधर्मु तो विसरलासी । तरावें जेणें ॥ १८० ॥ या कौरवां भलतें जाहलें । अथवा तुजचि कांहीं पातलें । कीं युगचि हें बुडालें । जऱ्हीं एथ ॥ ८१ ॥ तरी स्वधर्मु एक आहे । तो सर्वथा त्याज्य नोहे । मग तरिजेल काय पाहें । कृपाळूपणें ॥ ८२ ॥ अर्जुना तुझें चित्त । जऱ्ही जाहलें द्रवीभूत । तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ॥ ८३ ॥ अगा गोक्षीर जरी जाहलें । तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें । ऐसेनिहि विष होय सुदलें । नवज्वरीं देतां ॥ ८४ ॥ तैसें आनीं आन करितां । नाशु होईल हिता । म्हणऊनि तूं आतां । सावध होईं ॥ ८५ ॥ वायांचि व्याकूळ कायी । आपुला निजधर्मु पाहीं । जो आचरितां बाधु नाहीं । कवणें काळीं ॥ ८६ ॥ जैसें मार्गेंचि चालतां । अपावो न पवे सर्वथा । कां दीपाधारें वर्ततां । नाडळिजे ॥ ८७ ॥ तयापरी पार्था । स्वधर्मे राहटतां । सकळकामपूर्णता । सहजें होय ॥ ८८ ॥ म्हणोनि यालागीं पाहीं । तुम्हां क्षत्रियां आणीक कांहीं । संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणें ॥ ८९ ॥ निष्कपटा होआवें । उसिणां घाई जुंझावे । हें असो काय सांगावें । प्रत्यक्षावरी ॥ १९० ॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् । सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥

अर्जुना झुंज देखें आतांचें । हें हो का जे दैव तुमचें । कीं निधान सकळ धर्माचें । प्रगटलें असे ॥ ९१ ॥ हा संग्रामु काय म्हणिपे । कीं स्वर्गुचि येणें रूपें । मूर्त कां प्रतापें । उदो केला ॥ ९२ ॥ नातरी गुणाचेनि पतिकरें । आर्तीचेनि पडिभरें । हे कीर्तीचि स्वयंवरें । आली तुज ॥ ९३ ॥ क्षत्रियें

बहुत पुण्य कीजे । तैं झुंज ऐसें हें लाहिजें । जैसें मार्गे जातां आडळिजे । चिंतामणीसी ॥ ९४ ॥ ना तरी जांभया पसरे मुख । तेथ अवचटें पडे पीयूख । तैसा संग्रामु हा देख । पातला असे ॥ ९५ ॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि । ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

आतां हा ऐसा अव्हेरिजे । मग नाथिले शोचूं बैसिजे । तरी आपण आहाणा होईजे । आपणपेयां ॥ ९६ ॥ पूर्वजांचे जोडलें । आपणचि होय धाडिलें । जरी आजि शस्त्र सांडिलें । रणीं इये ॥ ९७ ॥ असती कीर्ति जाईल । जगचि अभिशापु देईल । आणि गिंवसित पावतील । महादोष ॥ ९८ ॥ जैसी भातारेहीन वनिता । उपहति पावे सर्वथा । तैशी दशा जीविता । स्वधर्मेंवीण ॥ ९९ ॥ ना तरी रणीं शव सांडिजें । तैं चौमेरीं गिधीं विदारिजे । तैसे स्वधर्महीना अभिभविजे । महादोषीं ॥ २०० ॥

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् । सम्भावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

म्हणोनि स्वधर्म हा सांडसील । तरी पापा वरपडा होसील । आणि अपेश तें न वचेल । कल्पांतवरी ॥ १ ॥ जाणतेनि तंवचि जियावें । जंव अपकीर्ति आंगा न पवे । आणि सांग पां केवीं निगावें । एथोनियां ॥ २ ॥ तूं निर्मत्सरु सदयता । येथूनि निघसी कीर माघौता । परी ते गति समस्तां । न मनेल ययां ॥ ३ ॥ हे चहूंकडून वेढितील । बाणवरी घेतील । तेथ पार्था न सुटिजेल । कृपाळुपणें ॥ ४ ॥ ऐसेनिहि प्राणसंकटें । जरी विपायें पां निघणें घटे । तरी तें जियालेंही वोखटें । मरणाहुनि ॥ ५ ॥

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः । येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥

तू आणीकही एक न विचारिसी । एथ संभ्रमें झुंजों आलासी । आणि सकणवपणें निघालासी । मागुता जरी ॥ ६ ॥ तरी तुझें तें अर्जुना । या वैरियां दुर्जनां । कां प्रत्ययां येईल मना । सांगे मज ॥ ७ ॥

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः । निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

हे म्हणतील गेला रे गेला । अर्जुन आम्हां बिहाला । हा सांगें बोलु उरला । निका कायी ॥ ८ ॥ लोक सायासें करूनि बहुतें । कां वेचिती आपुली जीवितें । परी वाढविती कीर्तितें । धनुर्धरा ॥ ९ ॥ ते तुज अनायासें । अनकळित जोडिली असे । हें अद्वितीय जैसें । गगन आहे ॥ २१० ॥ तैसी कीर्ती निःसीम । तुझां ठायीं निरुपम । तुझे गुण उत्तम । तिहीं लोकीं ॥ ११ ॥ दिगंतीचे भूपति । भाट होऊनि वाखाणिती । जे ऐकिलिया दचकती । कृतांतादिक ॥ १२ ॥ ऐसा महिमा घनवट । गंगा तैसी चोखट । जया देखी जगीं सुभट । वांठ जाहली ॥ १३ ॥ तैं पौरुष तुझें अद्भुत । आइकोनियां हे समस्त । जाहले आथि विरक्त । जीवितेंसी ॥ १४ ॥ जैसा सिंहाचिया हांका । युगांतु होय मदमुखा । तैसा कौरवां अशेखां । धाकु तुझा ॥ १५ ॥ जैसे पर्वत वज्रातें । ना तरी सर्प गरुडातें । तैसे अर्जुना हे तूंतें । मानिती सदा ॥ १६ ॥ तें अगाधपण जाईल । मग हिणावो

अंगा येईल । जरी मागुता निघसील । न झूंजतचि ॥ १७ ॥ आणि हे पळतां पळों नेदिती । धरूनि अवकळा करिती । न गणित कुटी बोलती । आइकतां तुज ॥ १८ ॥ मग ते वेळीं हिये फुटावें । आतां लाठेपणें कां न झुंजावें । हें जिंतलें तरी भोगावें । पृथ्वीतळ ॥ १९ ॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् । तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥

ना तरी रणीं एथ । झुंजतां वेंचलें जीवित । तरी स्वर्गसुख अनकळित । पावसील ॥ २२० ॥ म्हणोनि ये गोठी । विचारु न करीं किरीटी । आता धनुष्य घेऊनि उठीं । झुंजे वेगीं ॥ २१ ॥ देखें स्वधर्मु हा आचरतां । दोषु नाशे असता । तुज भ्रांति हे कवण चित्ता । एथ पातकाची ॥ २२ ॥ सांगें प्लवेंचि काय बुडिजे । कां मार्गीं जातां आडळिजे । परी विपायें चालों नेणिजे । तरी तेंही घडे ॥ २३ ॥ अमृतें तरीचि मरिजे । जरी विखेसीं सेविजे । तैसा स्वधर्में दोषु पाविजे । हेतुकपणें ॥ २४ ॥ म्हणोनि तुज पार्था । हेतु सांडोनि सर्वथा । क्षात्रवृत्ती झुंजतां । पाप नाहीं ॥ २५ ॥

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ । ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥

सुखीं संतोषा न यावें । दुःखीं विषादा न भजावें । आणि लाभालाभ न धरावे । मनामाजीं ॥ २६ ॥ एथ विजयपण होईल । कां सर्वथा देह जाईल । हें आधींचि कांही पुढील । चिंतावेना ॥ २७ ॥ आपणयां उचिता । स्वधर्मातेंचि रहाटतां । जें पावे तें निवांता । साहोनि जावें ॥ २८ ॥ ऐसेया मनें होआवें । तरी दोषु न घडे स्वभावें । म्हणोनि आतां झुंजावें । निभ्रांत तुवां ॥ २९ ॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु । बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

हे सांख्यस्थिति मुकुलित । सांगितली तुज एथ । आतां बुद्धियोगु निश्चित । अवधारीं पां ॥ २३० ॥ जया बुद्धियुक्ता । जाहालिया पार्था । कर्मबंधु सर्वथा । बाधूं न पवे ॥ ३१ ॥ जैसें वज्रकवच लेईजे । मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे । परी जैतेंसी उरिजे । अचुंबिता ॥ ३२ ॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते । स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

तैसें ऐहिक तरी न नशे । आणि मोक्षु तो उरला असे । जेथ पूर्वानुक्रम दिसे । चोखाळत ॥ ३३ ॥ कर्माधारें राहाटिजे । परी कर्मफळ न निरीक्षिजे । जैसा मंत्रज्ञु न बधिजे । भूतबाधा ॥ ३४ ॥ तियापरी जे सुबुद्धि । आपुलाल्या निरवधि । हा असतांचि उपाधि । आकळूं न सके ॥ ३५ ॥ जेथ न संचरे पुण्यपाप । जें सूक्ष्म अति निष्कंप । गुणत्रयादि लेप । न लगती जेथ ॥ ३६ ॥ अर्जुना ते पुण्यवशें । जरीं अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे । तरी अशेषही नाशे । संसारभय ॥ ३७ ॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन । बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रगटी । तैसी सद्बुद्धी हे थेकुटी । म्हणों नये ॥ ३८ ॥ पार्था बहुतीं परीं । हे अपेक्षिजे विचारशूरीं । जे दुर्लभ चराचरीं । सद्वासना ॥ ३९ ॥ आणिकासारिखा बहुवसु । जैसा न जोडे परिसु । कां अमृताचा लेशु दैवगुणे ॥ २४० ॥ तैसी दुर्लभ जे सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि । जैसा गंगेसी उदधि । निरंतर ॥ ४१ ॥ तैसी

ईश्वरावांचूनि कांहीं । जिये आणीक लाणी नाहीं । ते एकचि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ॥ ४२ ॥ येरी ते दुर्मति । जे बहुधा असे विकरती । तेथ निरंतर रमती । अविवेकिये ॥ ४३ ॥ म्हणोनि तया पार्था । स्वर्ग संसार नरकावस्था । आत्मसुख सर्वथा । दृष्ट नाहीं ॥ ४४ ॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः । वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥

वेदाधारें बोलती । केवळ कर्म प्रतिष्ठिती । परी कर्मफळीं आसक्ती । धरूनियां ॥ ४५ ॥ म्हणती संसारीं जन्मिजे । यज्ञादि कर्म कीजे । मग स्वर्गसुख भोगिजे । मनोहर ॥ ४६ ॥ एथ हें वांचूनि कांही । आणिक सर्वथा सुखचि नाहीं । ऐसें अर्जुना बोलती पाहीं । दुर्बुद्धि ते ॥ ४७ ॥

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् । क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥

देखें कामना अभिभूत । होऊनि कर्में आचरत । ते केवळ भोगीं चित्त । देऊनियां ॥ ४८ ॥ क्रियाविशेषें बहुतें । न लोपिती विधीतें । निपुण होऊनि धर्मातें । अनुष्ठिती ॥ ४९ ॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् । व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

परि एकचि कुडें करिती । जे स्वर्गकामु मनीं धरिती । यज्ञपुरुषा चुकती । भोक्ता जो ॥ २५० ॥ जैसा कर्पूराचा राशि कीजे । मग अग्नि लाऊनि दीजे । कां मिष्टान्नीं संचरविजे काळकूट ॥ ५१ ॥ दैवें अमृतकुंभ जोडला । तो पायें हाणोनि उलंडिला । तैसा नासिती धर्मु निपजला । हेतुकपणें ॥ ५२ ॥ सायासें पुण्य अर्जिजे । मग संसारु का अपेक्षिजे । परी नेणती ते काय कीजे । अप्राप्त देखें ॥ ५३ ॥ जैसी रांधवणी रससोय निकी । करूनियां मोलें विकी । तैसा भोगासाठी अविवेकी । धाडिती धर्मु ॥ ५४ ॥ म्हणोनि हे पार्था । दुर्बुद्धि देख सर्वथा । तयां वेदवादरतां । मनीं वसे ॥ ५५ ॥

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन । निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥

तिहीं गुणीं आवृत्त । हे वेद जाणें निभ्रांत । म्हणोनि उपनिषदादि समस्त । सात्त्विक ते ॥ ५६ ॥ येर रजतमात्मक । जेथ निरूपिजे कर्मादिक । जे केवळ स्वर्गसूचक । धनुर्धरा ॥ ५७ ॥ म्हणोनि तूं जाण । हे सुखदुःखासीच कारण । एथ झणें अंतःकरण । रिगों देसी ॥ ५८ ॥ तूं गुणत्रयातें अव्हेरी । मी माझें हें न करीं । एक आत्मसुख अंतरी । विसंब झणीं ॥ ५९ ॥

यावानर्थ उदपाने सर्वतः सम्प्लुतोदके । तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥

जरी वेदें बहुत बोलिलें । विविध भेद सूचिले । तऱ्ही आपण हित आपुलें । तेंचि घेपे ॥ २६० ॥ जैसा प्रकटलिया गभस्ती । अशेषही मार्ग दिसती । तरी तेतुलेही काय चालिजती । सांगे मज ॥ ६१ ॥ कां उदकमय सकळ । जऱ्ही जाहलें असे महीतळ । तरी आपण घेपे केवळ । आर्तीचजोगें ॥ ६२ ॥ तैसे ज्ञानीये जे होती । ते वेदार्थातें विवरिती । मग अपेक्षित तें स्वीकरिती । शाश्वत जें ॥ ६३ ॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

म्हणोनि आइकें पार्था । याचिपरी पाहतां । तुज उचित होय आतां । स्वकर्म हें ॥ ६४ ॥ आम्हीं समस्तही विचारिलें । तंव ऐसेंचि हें मना आलें । जे न सांडिजे तुवा आपुलें । विहित कर्म ॥ ६५ ॥ परी कर्मफळी आस न करावी । आणि कुकर्मी संगति न व्हावी । हें सत्क्रियाचि आचरावी । हेतूविंण ॥ ६६ ॥

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय । सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ४८ ॥

तूं योगयुक्त होउनी । फळाचा संग सांडुनी । मग अर्जुना चित्त देउनी । करीं कर्मे ॥ ६७ ॥ परी आदरिलें कर्म दैवें । जरी समाप्तीतें पावे । तरी विशेषें तेथ तोषावें । हेंही नको ॥ ६८ ॥ कां निमित्तें कोणें एकें । तें सिद्धी न वचतां ठाके । तरी तेथिंचेनि अपरितोखें । क्षोभावें ना ॥ ६९ ॥ आचरतां सिद्धी गेलें । तरी काजाचि कीर आलें । परि ठेलियाही सगुण जहालें । ऐसेंचि मानीं ॥ २७० ॥ देखें जेतुलाले कर्म निपजे । तेतुलें आदिपुरुषीं जरी अर्पिजे । तरी परीपूर्ण सहजें । जहाले जाणें ॥ ७१ ॥ देखें संतासंतीं कर्मीं । हें जें सरिसेपण मनोधर्मी । तेचि योगस्थिति उत्तमीं । प्रशंसिजे ॥ ७२ ॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय । बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते । तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥

अर्जुना समत्व चित्ताचें । तेंचि सार जाण योगाचें । जेथ मना आणि बुद्धीचें । ऐक्य आथी ॥ ७३ ॥ तो बुद्धियोग विवरितां । बहुतें पाडें पार्था । दिसे हा अरुता । कर्मभागु ॥ ७४ ॥ परी तेंचि कर्म आचरिजे । तरीच हा योगु पाविजे । जें कर्मशेष सहजे । योगस्थिति ॥ ७५ ॥ म्हणोनि बुद्धियोगु सधरु । तेथ अर्जुना होई स्थिरु । मनें करी अव्हेरु । फळहेतूचा ॥ ७६ ॥ जे बुद्धियोगा योजिले । तेचि पारंगत जाहले । इहीं उभयबंधी सांडिले । पापपुण्यीं ॥ ७७ ॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः । जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥ ५१ ॥

ते कर्मीं तरी वर्तती । परी कर्मफळा नातळती । आणि यातायाती लोपती । अर्जुना तयां ॥ ७८ ॥ मग निरामयभरित । पावती पद अच्युत । ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ॥ ७९ ॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति । तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥

तूं ऐसा तैं होसी । जैं मोहातें या सांडिसी । आणि वैराग्य मानसीं । संचरेल ॥ २८० ॥ मग निष्कळंक गहन । उपजेल आत्मज्ञान । तेणें निचाडें होईल मन । अपैसें तुझें ॥ ८१ ॥ तेथ आणिक कांही जाणावें । कां मागिलातें स्मरावे । हे अर्जुना आघवें । पारुषेल ॥ ८२ ॥

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला । समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥

इंद्रियांचिया संगती । जिये पसरु होतसे मती । ते स्थिर होईल मागुती । आत्मस्वरूपीं ॥ ८३ ॥ समाधिसुखीं केवळ । जैं बुद्धि होईल निश्चळ । तैं पावसी तूं सकळ । योगस्थिति ॥ ८४ ॥

अर्जुन उवाच : स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।

स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥

तेथ अर्जुन म्हणे देवा । हाचि अभिप्रावो आघवा । मी पुसेन आतां सांगावा । कृपानिधि ॥ ८५ ॥ मग अच्युत म्हणे सुखें । जें किरीटी तुज निकें । तें पूस पां उन्मेखें । मनाचेनि ॥ ८६ ॥ या बोला पार्थें । म्हणितलें सांग पां श्रीकृष्णातें । काय म्हणिपे स्थितप्रज्ञातें । वोळखों केवीं ॥ ८७ ॥ आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजे । तो कैसां चिन्हीं जाणिजे । जो समाधिसुख भुंजे । अखंडित ॥ ८८ ॥ तो कवणे स्थिती असे । कैसेनि रूपीं विलसे । देवा सांगावे हें ऐसें । लक्ष्मीपती ॥ ८९ ॥ तव परब्रह्मअवतरणु । जो षड्गुणाधिकरणु । तो काय तेथ नारायणु । बोलतु असे ॥ २९० ॥

श्रीभगवानुवाच : प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

म्हणे अर्जुना परियेसीं । जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं । तो अंतराय स्वसुखेंसी । करीत असे ॥ ९१ ॥ जो सर्वदा नित्यतृप्तु । अंतःकरणभरितु । परी विषयामाजि पतितु । जेणें संगें कीजे ॥ ९२ ॥ तो कामु सर्वथा जाये । जयाचे आत्मतोषीं मन राहे । तोचि स्थितप्रज्ञु होये । पुरुष जाणें ॥ ९३ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

नाना दुःखीं प्राप्तीं । जयासी उद्वेगु नाहीं चित्तीं । आणि सुखाचिया आर्ती । अडपैजेना ॥ ९४ ॥ अर्जुना तयाचां ठायीं । कामक्रोधु सहजें नाहीं । आणि भयातें नेणे कहीं । परिपूर्ण तो ॥ ९५ ॥ ऐसा जो निरवधि । तो जाण पां स्थिरबुद्धि । जो निरसूनि उपाधि । भेदरहितु ॥ ९६ ॥

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् । नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥

जो सर्वत्र सदा सरिसा । परिपूर्ण चंद्रु कां जैसा । अधमोत्तम प्रकाशा – । माजीं न म्हणे ॥ ९७ ॥ ऐसी अनवछिन्न समता । भूतमात्रीं सदयता । आणि पालटु नाहीं चित्ता । कवणे वेळे ॥ ९८ ॥ गोमटें कांहीं पावे । तरी संतोषें तेणें नाभिभवे । जो ओखटेनि नागवे । विषादासी ॥ ९९ ॥ ऐसा हरिखशोकरहितु । जो आत्मबोधभरितु । तो जाण पां प्रज्ञायुक्तु । धनुर्धरा ॥ ३०० ॥

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः । इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

कां कूर्म जियापरी । उवाइला अवेव पसरी । ना इच्छावशें आवरी । आपुले आपण ॥ १ ॥ तैसीं इंद्रियें आपैतीं होती । जयाचें म्हणितले करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पातली असे ॥ २ ॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः । रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥

आता अर्जुना आणिकही एक । सांगेन ऐकें कवतिक । या विषयांते साधक । त्यजिती नियमें ॥ ३ ॥ श्रोत्रादि इंद्रिये आवरिती । परि रसने नियमु न करिती । ते सहस्त्रधा कवळिजती । विषयीं इहीं ॥ ४ ॥ जैसी वरिवरी पालवी खुडिजे । आणि मुळीं उदक घालिजे । तरी कैसेनि

नाशु निपजे । तया वृक्षा ॥ ५ ॥ तो उदकाचेनि बळें अधिकें । जैसा आडवे नि आंगे फांके । तैसा मानसीं विषो पोखे । रसनाद्वारें ॥ ६ ॥ येरां इंद्रियां विषय तुटे । तैसा नियमूं न ये रस हटें । जे जीवन हें न घटे । येणेंविण ॥ ७ ॥ मग अर्जुना स्वभावें । ऐसियाही नियमातें पावे । जें परब्रह्म अनुभवें । होऊनि जाइजे ॥ ८ ॥ तैं शरीरभाव नासती । इंद्रिये विषय विसरती । जैं सोहंभावप्रतीति । प्रकट होय ॥ ९ ॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः । इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥ ६० ॥

येऱ्हवीं तरी अर्जुना । हें आया नये साधना । जे राहटताती जतना । निरंतर ॥ ३१० ॥ जयातें अभ्यासाची घरटी । यमनियमांची ताटी । जे मनातें सदा मुठी । धरूनि आहाती ॥ ११ ॥ तेही किजती कासाविसी । या इंद्रियांची प्रौढी ऐसी । जैसी मंत्रज्ञातें विवसी । भुलवी कां ॥ १२ ॥ देखें विषय हे तैसे । पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषें । मग आकळिती स्पर्शें । इंद्रियांचेनि ॥ १३ ॥ तिये संधीं मन जाये । मग अभ्यासीं ठोंटावलें ठाये । ऐसें बळकटपण आहे । इंद्रियांचें ॥ १४ ॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः । वशेहि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

म्हणोन आइकें पार्था । यांतें निर्दळी जो सर्वथा । सर्व विषयीं आस्था । सांडूनियां ॥ १५ ॥ तोचि तूं जाण । योगनिष्ठेसी कारण । जयाचें विषयसुखें अंतःकरण । झकवेना ॥ १६ ॥ जो आत्मबोधयुक्तु । होऊनि असे सततु । जो मातें हृदयाआंतु । विसंबेना ॥ १७ ॥ एऱ्हवीं बाह्य विषय तरी नाहीं । परी मानसीं होईल जरी कांही । तरी साद्यंतुचि हा पाहीं । संसारु असे ॥ १८ ॥ जैसा कां विषाचा लेशु । घेतलियां होय बहुवसु । मग निभ्रांत करी नाशु । जीवितासि ॥ १९ ॥ तैसी या विषयांची शंका । मनीं वसती देखा । घातु करी अशेखा । विवेकजाता ॥ ३२० ॥

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते । सङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥
क्रोधाद्भवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः । स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

जरी हृदयीं विषय स्मरती । तरी निसंगाही आपजे संगती । संगी प्रगटे मूर्ति । अभिलाषाची ॥ २१ ॥ जेथ कामु उपजला । तेथ क्रोधु आधींचि आला । क्रोधीं असें ठेविला । संमोह जाणें ॥ २२ ॥ संमोहा जालिया व्यक्ति । तरी नाशु पावे स्मृति । चंडवाते ज्योति । आहत जैसी ॥ २३ ॥ कां अस्तमानी निशी । जैसी सूर्यतेजातें ग्रासी । तैसी दशा स्मृतिभ्रंशी । प्राणियांसी ॥ २४ ॥ मग अज्ञानांध केवळ । तेणें आप्लविजे सकळ । तेथ बुद्धि होय व्याकुळ । हृदयामाजीं ॥ २५ ॥ जैसें जात्यंधा पळणी पावे । मग ते काकुळती सैरा धांवे । तैसे बुद्धीसी होती भवे । धनुर्धरा ॥ २६ ॥ ऐसा स्मृतिभ्रंशु घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे । तेथ समूळ हें उपडे । ज्ञानजात ॥ २७ ॥ चैतन्याचां भ्रंशी । शरीरा दशा जैशी । पुरुषा बुद्धिनाशीं । होय देखें ॥ २७ ॥ म्हणोनि आइकें अर्जुना । जैसा विस्फुलिंग लागे इंधना । मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना । पुरों शके ॥ २९ ॥ तैसें विषयांचे ध्यान । जरी विपायें वाहे मन । तरी येसणें हे पतन । गिंवसीत पावे ॥ ३३० ॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् । आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥

म्हणोनि विषय हे आघवे । सर्वथा मनौनि सांडावे । मग रागद्वेष स्वभावें । नाशतील ॥ ३१ ॥ पार्था आणिकही एक । जरी नाशले रागद्वेष । तरी इंद्रियां विषयीं बाधक । रमतां नाहीं ॥ ३२ ॥ जैसा सूर्य आकाशगतु । रश्मिकरीं जगाते स्पर्शतु । तरीं संगदोषें काय लिंपतु । तेथिंचेनि ॥ ३३ ॥ तैसा इंद्रियार्थीं उदासीन । आत्मरसेंचि निर्भिन्न । जो कामक्रोधविहीन । होऊनि असे ॥ ३४ ॥ तरी विषयांतुही कांही । आपणपेंवाचुनि नाहीं । मग विषय कवण कायी । बाधितील कवणा ॥ ३५ ॥ जरीं उदकें उदकीं बुडिजे । कां अग्नि आगीं पोळिजे । तरी विषयसंगे आप्लविजे । परिपूर्ण तो ॥ ३६ ॥ ऐसा आपणचि केवळ । होऊनि असे निखळ । तयाची प्रज्ञा अचळ । निर्भ्रांत मानीं ॥ ३७ ॥

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते । प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥

देखें अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥ ३८ ॥ जैसा अमृताचा निर्झरु । प्रसवे जयाचा जठरु । तया क्षुधेतृषेचा अडदरु । कहींचि नाहीं ॥ ३९ ॥ तैसें हृदय प्रसन्न होये । तरी दुःख कैचें कें आहे । तेथ आपैसी बुद्धि राहे । परमात्मरूपीं ॥ ३४० ॥ जैसा निर्वातीचा दीपु । सर्वथा नेणे कंपु । तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु । योगयुक्तु ॥ ४१ ॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना । न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

ये युक्तीची कडसणी । नाहीं जयाचां अंतःकरणीं । तो आकळिला जाण गुणीं । विषयादिकीं ॥ ४२ ॥ तया स्थिरबुद्धि पार्था । कहीं नाही सर्वथा । आणि स्थैर्याची आस्था । तेही नुपजे ॥ ४३ ॥ निश्चळत्वाची भावना । जरी नव्हेचि देखें मना । तरी शांति केवी अर्जुना । आपु होय ॥ ४४ ॥ आणि जेथ शांतीचा जिव्हाळा नाहीं । तेथ सुख विसरोनि न रिगे कहीं । जैसा पापियाचां ठायीं । मोक्षु न वसे ॥ ४५ ॥ देखें अग्निमाजी घापती । तियें बीजें जरी विरूढती । तरी अशांता सुखप्राप्ती । घडों शके ॥ ४६ ॥ म्हणोनि अयुक्तपण मनाचें । तेंचि सर्वस्व दुःखाचें । या कारणें इंद्रियांचें । दमन निकें ॥ ४७ ॥

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते । तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥ ६७ ॥

ये इंद्रियें जें जें म्हणती । तें तेंचि जे पुरुष करिती । ते तरलेचि न तरती । विषयसिंधु ॥ ४८ ॥ जैसी नाव थडिये ठाकितां । जरी वरपडी होय दुर्वाता । तरी चुकलाही मागौता । अपावो पावे ॥ ४९ ॥ तैसीं प्राप्तेंही पुरुषें । इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें । तरी आक्रमिला देख दुःखें । सांसारिकें ॥ ३५० ॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः । इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

म्हणोनि आपुलीं आपणपेया । जरी यें इंद्रियें येती आया । तरी अधिक कांहीं धनंजया । सार्थक असे ॥ ५१ ॥ देखें कूर्म जियापरी । उवाइला अवयव पसरी । ना तरी इच्छावशें

आवरी । आपणपेंचि ॥ ५२ ॥ तैसीं इंद्रियें आपैतीं होती । जयाचें म्हणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पातली असे ॥ ५३ ॥ आतां आणिक एक गहन । पूर्णाचें चिन्ह । अर्जुना तुज सांगेन । परिस पां ॥ ५४ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥

देखें भूतजात निदेलें । तेथेंचि जया पाहलें । आणि जीव जेथ चेईले । तेथ निद्रितु जो ॥ ५५ ॥ तोचि तो निरुपाधि । अर्जुना तो स्थिरबुद्धि । तोचि जाणें निरवधि । मुनीश्वर ॥ ५६ ॥

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं- समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥ ७० ॥

पार्था आणीकही परी । तो जाणों येईल अवधारीं । जैसी अक्षोभता सागरीं । अखंडित ॥ ५७ ॥ जरी सरिताओघ समस्त । परिपूर्ण होऊनि मिळत । तरी अधिक नोहे ईषत् । मर्यादा न संडी ॥ ५८ ॥ ना तरी ग्रीष्मकाळी सरिता । शोषूनि जाती समस्ता । परी न्यून नव्हे पार्था । समुद्रु जैसा ॥ ५९ ॥ तैसा प्राप्तीं ऋद्धिसिद्धी । तयासि क्षोभु नाहीं बुद्धी । आणि न पवतां न बाधी । अधृति तयातें ॥ ३६० ॥ सांगें सूर्याचां घरीं । प्रकाशु काय वातीवेरी । कीं न लविजे तरी अंधारीं । कोंडेल तो ॥ ६१ ॥ देखें ऋद्धिसिद्धि तयापरी । आली गेली से न करी । तो विगुंतला असे अंतरीं । महासुखीं ॥ ६२ ॥ जो आपुलेनि नागरपणें । इंद्रभुवनातें पाबळें म्हणे । तो केवि रंजे पालिवणें । भिल्लांचेनि ॥ ६३ ॥ जो अमृतासि ठी ठेवी । तो जैसा कांजी न सेवी । तैसा स्वसुखानुभवी । न भोगी ऋद्धि ॥ ६४ ॥ पार्था नवल हें पाही । जेथ स्वर्गसुख लेखनीय नाहीं । तेथ ऋद्धिसिद्धि कायी । प्राकृता होती ॥ ६५ ॥

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः । निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति ॥ ७१ ॥

ऐसा आत्मबोधे तोषला । जो परमानंदें पोखला । तोचि स्थिरप्रज्ञु भला । वोळख तूं ॥ ६६ ॥ तो अहंकारातें दंडुनी । सकळ कामु सांडोनी । विचरे विश्व होऊनि । विश्वाचि माजीं ॥ ६७ ॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति । स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥

हे ब्रह्मस्थिती निःसीम । जे अनुभवितां निष्काम । पातले परब्रह्म । अनायासें ॥ ६८ ॥ जे चिद्रूपीं मिळतां । देहांतीची व्याकुळता । आड ठाकों न शके चित्ता । प्राज्ञा जया ॥ ६९ ॥ तेचि हे स्थिति । स्वमुखें श्रीपति । सांगत अर्जुनाप्रति । संजय म्हणे ॥ ३७० ॥ ऐसें कृष्णवाक्य ऐकिलें । तेथ अर्जुनें मनीं म्हणितलें । आतां आमुचियाचि काजा आलें । उपपत्ती इया ॥ ७१ ॥ जें कर्मजात आघवे । एथ निराकारिलें देवें । तरी पारुषलें म्यां झुंजावें । म्हणूनिया ॥ ७२ ॥ ऐसा श्रीअच्युताचिया बोला । चित्तीं धनुर्धरु उवायिला । आता प्रश्नु करील भला । आशंकोनियां ॥ ७३ ॥ तो प्रसंगु असे नागरु । जो सकळ धर्मासि आगरु । कीं विवेकामृतसागरु । प्रांतहीनु ॥ ७४ ॥ जो आपण सर्वज्ञनाथु । निरूपिता

होईल श्रीअनंतु । ते ज्ञानदेवो सांगेल मातु । निवृत्तिदासु ॥ ३७५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
सांख्ययोगोनाम द्वितीयोऽध्यायः ॥ (श्लोक ७२; ओव्या ३७५)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय तिसरा)

अर्जुन उवाच : ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन । तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥

मग आइका अर्जुनें म्हणितलें । देवा तुम्हीं जें वाक्य बोलिलें । तें निकें म्यां परिसलें । कमळापती ॥ १ ॥ तेथ कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहतां । ऐसें मत तुझें अनंता । निश्चित जरी ॥ २ ॥ तरी मातें केवी हरी । म्हणसी पार्था संग्रामु करीं । इये लाजसी ना महाघोरीं । कर्मीं सुतां ॥ ३ ॥ हां गा कर्म तूंचि अशेष । निराकरिसी निःशेष । तरी मजकरवीं हें हिंसक । कां करविसी तूं ॥ ४ ॥ तरी हेंचि विचारीं हृषीकेशा । तूं मानु देसी कर्मलेशा । आणि येसणी हे हिंसा । करवीत आहासी ॥ ५ ॥

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे । तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥

देवा तुवांचि ऐसें बोलावें । तरी आम्हीं नेणतीं काय करावें । आतां संपलें म्हण पां आघवें । विवेकाचें ॥ ६ ॥ हां गा उपदेशु जरी ऐसा । तरी अपभ्रंशु तो कैसा । आतां पुरला आम्हीं धिंवसा । आत्मबोधाचा ॥ ७ ॥ वैद्य पथ्य वारूनि जाये । मग जरी आपणचि विष सुये । तरी योगिया कैसेनि जिये । सांगें मज ॥ ८ ॥ जैसें आंधळें सुईजे आव्हांटा । कां माजवण दीजे मर्कटा । तैसा उपदेशु हा गोमटा । वोढवला आम्हां ॥ ९ ॥ मी आधींचि कांहीं नेणें । वरी कवळिलों मोहें येणें । कृष्णा विवेकु या कारणें । पुसिला तुज ॥ १० ॥ तंव तुझी एकेकी नवाई । एथ उपदेशामाजीं गोवाई । तरी अनुसरलिया काई । ऐसें कीजे ॥ ११ ॥ आम्हीं तनुमनुजीवें । तुझिया बोला वोटंगावें । आणि तुवांचि ऐसें करावें । तरी सरलें म्हणे ॥ १२ ॥

आतां ऐसियापरी बोधिसी । तरी निकें आम्हा करिसी । एथ ज्ञानाची आस कायसी । अर्जुन म्हणे ॥ १३ ॥ तरी ये जाणिवेचें कीर सरलें । परी आणीक एक असें जाहलें । जें थितें हें डहुळलें । मानस माझें ॥ १४ ॥ तेवींचि कृष्णा हें तुझें । चरित्र कांही नेणिजे । जरी चित्त पाहसी माझें । येणें मिषें ॥ १५ ॥ ना तरी झकवीतुं आहासी मातें । कीं तत्त्वचि कथिले ध्वनितें । हें अवगमितां निरुतें । जाणवेना ॥ १६ ॥ म्हणोनि आइकें देवा । हा भावार्थु आतां न बोलावा । मज विवेकु सांगावा । मन्हाटा जी ॥ १७ ॥ मी अत्यंत जड असें । परी ऐसाही निकें परियसें । कृष्णा बोलावें तुवां तैसें । एकनिष्ठ ॥ १८ ॥ देखें रोगातें जिणावें । औषध तरी देयावें । परी तें अतिरुच्य व्हावें । मधुर जैसें ॥ १९ ॥ तैसें सकळार्थभरित । तत्त्व तरी सांगावे उचित । परी बोधे माझें चित्त । जयापरी ॥ २० ॥ देवा तुजऐसा निजगुरु । आणि आर्तीधणी कां न करूं । एथ भीड कवणाची धरूं । तूं माय आमुची ॥ २१ ॥ हां गा कामधेनूचें दुभतें । दैवें जाहलें जरी आपैतें । तरी कामनेची कां तेथें । वानी कीजे ॥ २२ ॥ जरी चिंतामणी हातां चढे । तरी वांछेचें कवण सांकडें । कां आपुलेनि सुरवाडें । इच्छावें ना ॥ २३ ॥ देखें अमृतसिंधुतें ठाकावें । मग ताहानाचि जरी फुटावें । तरी सायासु कां करावें । मागील ते ॥ २४ ॥ तैसा जन्मांतरी बहुतीं । उपासितां लक्ष्मीपती । तू दैवें आजि हातीं । जाहलासी जरी ॥ २५ ॥ तरी आपुलिया सवेसा । कां न मागावासि परेशा । देवा सुकाळु हा मानसा । पाहला असे ॥ २६ ॥ देखें सकळार्तीचें जियालें । आजि पुण्य यशासि आलें । हें मनोरथ जहाले । विजयी माझे ॥ २७ ॥ जी जी परममंगळधामा । सकळ देवदेवोत्तमा । तू स्वाधीन आजि आम्हां । म्हणऊनियां ॥ २८ ॥ जैसें मातेचां ठायीं । अपत्या अनवसरु नाहीं । स्तन्यालागूनि पाहीं । जियापरी ॥ २९ ॥ तैसें देवा तूतें । पुसिजतसें आवडे तें । आपुलेनि आर्ते । कृपानिधि ॥ ३० ॥ तरी पारत्रिकीं हित । आणि आचरितां तरी उचित । तें सांगें एक निश्चित । पार्थु म्हणे ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच : लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥

या बोला अच्युतु । म्हणतसे विस्मितु । अर्जुना हा ध्वनितु । अभिप्रावो ॥ ३२ ॥ जे बुद्धियोगु सांगतां । सांख्यमतसंस्था । प्रगटिली स्वभावता । प्रसंगें आम्हीं ॥ ३३ ॥ तो उद्देशु तूं नेणसीचि । म्हणोनि क्षोभलासि वायांचि । तरी आतां जाण म्यांचि । उक्त दोन्ही ॥ ३४ ॥ अवधारीं वीरश्रेष्ठा । ये लोकीं या दोन्ही निष्ठा । मजचिपासून प्रगटा । अनादिसिद्धा ॥ ३५ ॥ एकु ज्ञानयोगु म्हणिजे । जो सांख्यीं अनुष्ठिजे । जेथ ओळखीसवें पाविजे । तद्रूपता ॥ ३६ ॥ एक कर्मयोगु जाण । जेथ साधकजन निपुण । होऊनिया निर्वाण । पावती वेळे ॥ ३७ ॥ हे मार्गु तरी दोनी । परि एकवटती निदानीं । जैसीं सिद्धसाध्यभोजनीं । तृप्ती एकी ॥ ३८ ॥ कां पूर्वापर सरिता । भिन्न दिसती पाहतां । मग सिंधुमिळणी ऐक्यता । पावती शेखीं ॥ ३९ ॥ तैसीं दोनीं ये

मतें । सूचिती एका कारणातें । परी उपास्ति ते योग्यते - । आधीन असे ॥ ४० ॥ देखें उत्प्लवनासरिसा । पक्षी फळासि झोंबे जैसा । सांगें नरु केवीं तैसा । पावे वेगां ॥ ४१ ॥ तो हळूहळू ढाळेंढाळें । केतुकेनि एकें वेळें । मार्गाचेंनि बळे । निश्चित ठाकी ॥ ४२ ॥ तैसें देख पां विहंगममतें । अधिष्ठूनि ज्ञानातें । सांख्य सद्य मोक्षातें । आकळिती ॥ ४३ ॥ येर योगिये कर्माधारें । विहितेंचि निजाचारें । पूर्णता अवसरें । पावते होती ॥ ४४ ॥

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते । न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥

वांचोनि कर्मारंभ उचित । न करितांचि सिद्धवत । कर्महीना निश्चित । होईजेना ॥ ४५ ॥ कां प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि नैष्कर्म्य होईजे । हें अर्जुना वायां बोलिजे । मूर्खपणें ॥ ४६ ॥ सांगें पैलतीरा जावें । ऐसें व्यसन कां जेथ पावे । तेथ नावेतें त्यजावें । घडे केवीं ॥ ४७ ॥ ना तरी तृप्ति इच्छिजे । तरी कैसेनि पाकु न कीजे । कीं सिद्धुही न सेविजे । केवीं सांगे ॥ ४८ ॥ जंव निरार्तता नाहीं । तंव व्यापारु असे पाहीं । मग संतुष्टीचां ठायीं । कुंठे सहजें ॥ ४९ ॥ म्हणोनि आइकें पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था । तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ५० ॥ आणि आपुलालिया चाडें । आपादिलें हें मांडे । कीं त्यजिलें कर्म सांडे । ऐसें आहे ॥ ५१ ॥ हें वायांचि सैरा बोलिजे । उकलु तरी देखों पाहिजे । परी त्यजितां कर्म न त्यजे । निभ्रांत मानीं ॥ ५२ ॥

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥

जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । आपैसी असे ॥ ५३ ॥ देखें विहित कर्म जेतुलें । तें सळें जरी वोसंडिलें । तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ॥ ५४ ॥ सांगे श्रवणीं ऐकावें ठेलें । कीं नेत्रींचें तेज गेलें । हें नासारंध्र बुझाले । परिमळु नेघे ॥ ५५ ॥ ना तरी प्राणापानगति । कीं निर्विकल्प जाहली मति । कीं क्षुधातृषादि आर्ति । खुंटलिया ॥ ५६ ॥ हे स्वप्नावबोधु ठेले । कीं चरण चालों विसरले । हें असो काय निमाले । जन्ममृत्यू ॥ ५७ ॥ हें न ठकेचि जरी कांही । तरी सांडिलें तें कायी । म्हणोनि कर्मत्यागु नाहीं । प्रकृतिमंतां ॥ ५८ ॥ कर्म पराधीनपणें । निपजतसें प्रकृतिगुणें । येरीं धरीं मोकलीं अंतःकरणें । वाहिजे वायां ॥ ५९ ॥ देखें रथीं आरूढिजे । मग निश्चळा बैसिजे । तरी चळा होऊनि हिंडिजे । परतंत्रा ॥ ६० ॥ कां उचलिलें वायुवशें । चळे शुष्क पत्र जैसें । निचेष्ट आकाशे । परिभ्रमे ॥ ६१ ॥ तैसें प्रकृतिआधारें । कर्मेंद्रियविकारें । निष्कर्म्युही व्यापारे । निरंतर ॥ ६२ ॥ म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा । तंव त्यागु न घडे कर्माचा । ऐसियाहि करूं म्हणती तयांचा । आग्रहोचि उरे ॥ ६३ ॥

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् । इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥

जे उचित कर्म सांडिती । मग नैष्कर्म्य होऊं पाहती । परी कर्मेंद्रियप्रवृत्ती । निरोधुनी ॥ ६४ ॥ तयां कर्मत्यागु न घडे । जें कर्तव्य मनीं सांपडे । वरी नटती ते फुडें । दरिद्री जाण ॥ ६५ ॥ ऐसे ते पार्था । विषयासक्त सर्वथा । ओळखावे तत्त्वता । येथ भ्रांति नाहीं ॥ ६६ ॥

आतां देईं अवधान । प्रसंगें तुज सांगेन । या नैराश्याचें चिन्ह । धनुर्धरा ॥ ६७ ॥

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन । कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

जो अंतरीं दृढु । परमात्मरूपीं गूढु । बाह्य तरी रूढु । लौकिकु जैसा ॥ ६८ ॥ तो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचे भय न धरी । प्राप्त कर्म न अव्हेरी । उचित जें जें ॥ ६९ ॥ तो कर्मेंद्रियें कर्मीं । राहटतां तरी न नियमी । परी तेथिचेनि उर्मी । झांकोळेना ॥ ७० ॥ तो कामनामात्रें न धेपे । मोहमळें न लिंपे । जैसें जळीं जळें न शिंपे । पद्मपत्र ॥ ७१ ॥ तैसा संसर्गामाजि असे । सकळांसारिखा दिसे । जैसें तोयसंगें आभासे । भानुबिंब ॥ ७२ ॥ तैसा सामान्यत्वें पाहिजे । तरी साधारणुचि देखिजे । येरवीं निर्धारितां नेणिजे । सोय जयाची ॥ ७३ ॥ ऐसां चिन्हीं चिन्हितु । देखसी तोचि मुक्तु । आशापाशरहितु । वोळख पां ॥ ७४ ॥ अर्जुना तोचि योगी । विशेषिजे जो जगीं । म्हणोनि ऐसा होय यालागीं । म्हणिपे तूतें ॥ ७५ ॥ तू मानसा नियमु करीं । निश्चळु होय अंतरीं । मग कर्मेंद्रियें व्यापारीं । वर्ततु सुखें ॥ ७६ ॥

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः । शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८ ॥

म्हणशी नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे । आणि निषिद्ध केवीं राहाटावें । विचारीं पां ॥ ७७ ॥ म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त । तें कर्म हेतुरहित । आचरे तूं ॥ ७८ ॥ पार्था आणीकही एक । नेणसी तूं हें कवतिक । जें ऐसें कर्म मोचक । आपैसें असे ॥ ७९ ॥ देखें अनुक्रमाधारें । स्वधर्मु जो आचरे । तो मोक्ष तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ८० ॥

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः । तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर ॥ ९ ॥

स्वधर्मु जो बापा । तोचि नित्ययज्ञु जाण पां । म्हणोनि वर्ततां तेथ पापा । संचारु नाहीं ॥ ८१ ॥ हा निजधर्मु जैं सांडे । आणि कुकर्मी रति घडे । तैंचि बंधु पडे । संसारिकु ॥ ८२ ॥ म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञयाजन । जो करी तया बंधन । कंहीच नाहीं ॥ ८३ ॥ हा लोकु कर्मे बांधिला । जो परतंत्रा भुलला । तो नित्य यज्ञातें चुकला । म्हणोनियां ॥ ८४ ॥ आतां येचिविशीं पार्था । तुज सांगेन एकी मी कथा । जैं सृष्ट्यादि संस्था । ब्रह्मेनि केली ॥ ८५ ॥

सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

तैं नित्ययागसहितें । सृजिलीं भूतें समस्तें । परी नेणतीचि तिये यज्ञातें । सूक्ष्म म्हणउनी ॥ ८६ ॥ ते वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा । देवा आश्रयो काय एथ आम्हां । तंव म्हणे तो कमळजन्मा । भूतांप्रति ॥ ८७ ॥ तुम्हां वर्णविशेषवशें । आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे । यातें उपासा मग आपैसे । काम पुरती ॥ ८८ ॥ तुम्हीं व्रतें नियमु न करावे । शरीरातें न पीडावें । दुरी केंही न वचावें । तीर्थासी गा ॥ ८९ ॥ योगादिके साधनें । साकांक्ष आराधनें । मंत्रयंत्रविधानें । झणीं करा ॥ ९० ॥ देवतांतरा न भजावें । हे सर्वथा कांहीं न करावें । तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ॥ ९१ ॥ अहेतुकें चित्तें । अनुष्ठा पां ययातें । पतिव्रता पतीतें । जियापरी ॥ ९२ ॥ तैसा

स्वधर्मरूप मखु। हाचि सेव्यु तुम्हां एकु। ऐसें सत्यलोकनायकु। म्हणता जहाला॥ ९३॥ देखा स्वधर्मातें भजाल। तरी कामधेनु हा होईल। मग प्रजाहो न संडील। तुमतें सदा॥ ९४॥

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः। परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ॥ ११॥

जें येणेंकरूनि समस्तां। परितोषु होईल देवतां। मग ते तुम्हां ईप्सितां। अर्थातें देती॥ ९५॥ या स्वधर्मपूजा पूजितां। देवतागणां समस्तां। योगक्षेमु निश्चिता। करिती तुमचा॥ ९६॥ तुम्ही देवतांतें भजाल। देव तुम्हां तुष्टतील। ऐसी परस्परें घडेल। प्रीति जेथ॥ ९७॥ तेथ तुम्ही जें करू म्हणाल। तें आपैसें सिद्धी जाईल। वांछितही पुरेल। मानसींचें॥ ९८॥ वाचासिद्धी पावाल। आज्ञापक होआल। म्हणिये तुमतें मागतील। महाऋद्धि॥ ९९॥ जैसें ऋतुपतींचें द्वार। वनश्री निरंतर। वोळगे फळभार। लावण्येंसी॥ १००॥

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः। तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः॥ १२॥

तैसें सर्व सुखेंसहित। दैवचि मूर्तिमंत। येईल देखा काढत। तुम्हापाठीं॥ १॥ ऐसे समस्त भोगभरित। होआल तुम्हीं अनार्त। जरी स्वधर्मैकनिरत। वर्ताल बापा॥ २॥ कां जालिया सकल संपदा। जो अनुसरेल इंद्रियमदा। लुब्ध होऊनियां स्वादा। विषयांचिया॥ ३॥ तिहीं यज्ञभावितीं सुरीं। जे हे संपत्ति दिधली पुरी। तयां स्वधर्मी सर्वेश्वरीं। न भजेल जो॥ ४॥ अग्निमुखीं हवन। न करील देवतापूजन। प्राप्त वेळे भोजन। ब्राह्मणांचें॥ ५॥ विमुखु होईल गुरुभक्ती। आदरु न करील अतिथी। संतोषु नेदील ज्ञाती। आपुलिये॥ ६॥ ऐसा स्वधर्मुक्रियारहितु। आथिलेपणें प्रमत्तु। केवळ भोगासक्तु। होईल जो॥ ७॥ तया मग अपावो थोरु आहे। जेणें तें हातींचें सकळ जाये। देखा प्राप्तही न लाहे। भोग भोगूं॥ ८॥ जैसें गतायुषी शरीरीं। चैतन्य वासु न करी। कां निदैवाचां घरीं। न राहे लक्ष्मी॥ ९॥ तैसा स्वधर्मु जरी लोपला। तरी सर्व सुखांचा थारा मोडला। जैसा दीपासवें हरपला। प्रकाशु जाय॥ ११०॥ तैसी निजवृत्ति जेथ सांडे। तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे। आइका प्रजाहो हे फुडें। विरंचि म्हणे॥ ११॥ म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील। तयातें काळु दंडील। चोरु म्हणूनि हरील। सर्वस्व तयाचें॥ १२॥ मग सकळ भोग भंवते। गिंवसोनि घेती तयातें। रात्री समयीं स्मशानातें। भूते जैसीं॥ १३॥ तैशी त्रिभुवनींचीं दुःखे। आणि नानाविधे पातके। दैन्यजात तितुकें। तेथेंचि वसे॥ १४॥ ऐसें होय तया उन्मत्ता। मग न सुटे बापा रुदतां। परी कल्पांतींहीं सर्वथा। प्राणिगण हो॥ १५॥ म्हणऊनि निजवृत्ति हे न सांडावी। इंद्रियें बरळों नेदावीं। ऐसें प्रजातें शिकवी। चतुराननु॥ १६॥ जैसें जळचरा जळ सांडे। आणि तत्क्षणीं मरण मांडे। हा स्वधर्मु तेणें पाडें। विसंबों नये॥ १७॥ म्हणोनि तुम्हीं समस्तीं। आपुलालिया कर्मीं उचिती। निरत व्हावें पुढतपुढती। म्हणिपत असे॥ १८॥

यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः। भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्॥ १३॥

देखा विहित क्रियाविधी । निर्हेतुका बुद्धी । जो असतिये समृद्धी । विनियोगु करी ॥ १९ ॥ गुरु गोत्र अग्नि पूजी । अवसरीं भजे द्विजीं । निमित्तादिकीं यजी । पितरोद्देशें ॥ १२० ॥ या यज्ञक्रिया उचिता । यज्ञेंशीं हवन करितां । हुतशेष स्वभावतः । उरे जें जें ॥ २१ ॥ तें सुखें आपुलां घरीं । कुटुंबेसीं भोजन करी । कीं भोग्यचि तें निवारी । कल्मषातें ॥ २२ ॥ तें यज्ञावशिष्ट भोगी । म्हणोनि सांडिजे तो अघीं । जयापरी महारोगीं । अमृतसिद्धी ॥ २३ ॥ कीं तत्त्वनिष्ठु जैसा । नागवे भ्रांतिलेशा । तो शेषभोगी तैसा । नाकळे दोषा ॥ २४ ॥ म्हणोनि स्वधर्में जें अर्जे । तें स्वधर्मेंचि विनियोगिजे । मग उरे तें भोगिजे । संतोषेंसीं ॥ २५ ॥ हें वांचुनि पार्था । रहाटों नये अन्यथा । ऐसी आद्य हे कथा । मुरारी सांगे ॥ २६ ॥ जे देहचि आपणपें मानिती । आणि विषयांतें भोग्य म्हणती । यापरतें न स्मरती । आणिक कांहीं ॥ २७ ॥ हे यज्ञोपकरण सकळ । नेणत सांते बरळ । अहंबुद्धी केवळ । भोगूं पाहती ॥ २८ ॥ इंद्रियरुचीसारखे । करविती पाक निके । ते पापिये पातकें । सेविती जाण ॥ २९ ॥ जे संपत्तिजात आघवें । हें हवनद्रव्य मानावें । मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥ १३० ॥ हे सांडोनिया मूर्ख । आपणपेयांलागीं देख । निपजविती पाक । नानाविध ॥ ३१ ॥ जिहीं यज्ञु सिद्धी जाये । परेशा तोषु होये । तें हें सामान्य अन्न न होये । म्हणोनियां ॥ ३२ ॥ हें न म्हणावें साधारण । अन्न ब्रह्मरूप जाण । जे जीवनहेतु कारण । विश्वा यया ॥ ३३ ॥

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः । यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

अन्नास्तव भूतें । प्ररोह पावति समस्तें । मग वरिषु या अन्नातें । सर्वत्र प्रसवे ॥ ३४ ॥ तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञातें प्रगटी कर्म । कर्मासि आदि ब्रह्म । वेदरूप ॥ ३५ ॥

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् । तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

मग वेदांतें परात्पर । प्रसवतसे अक्षर । म्हणऊनि हें चराचर । ब्रह्मबद्ध ॥ ३६ ॥ परी कर्माचिये मूर्ती । यज्ञीं अधिवासु श्रुती । ऐकें सुभद्रापती । अखंड गा ॥ ३७ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः । अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

ऐशी हे आदि परंपरा । संक्षेपें तुज धनुर्धरा । सांगितली या अध्वरा । लागौनियां ॥ ३८ ॥ म्हणुनि समूळ हा उचितु । स्वधर्मरूप क्रतु । नानुष्ठी जो मत्तु । लोकीं इये ॥ ३९ ॥ तो पातकांची राशी । जाण भार भूमीसी । जो कुकर्में इंद्रियांसी । उपेगा गेला ॥ १४० ॥ तें जन्म कर्म सकळ । अर्जुना अति निष्फळ । जैसें कां अभ्रपटळ । अकाळींचे ॥ ४१ ॥ कां गळा स्तन अजेचे । तैसें जियालें देखें तयाचें । जया अनुष्ठान स्वधर्माचें । घडेचिना ॥ ४२ ॥ म्हणोनि ऐकें पांडवा । हा स्वधर्मु कवणे न संडावा । सर्वभावें भजावा । हाचि एकु ॥ ४३ ॥ हां गा शरीर जरी जाहलें । तरी कर्तव्य वोघें आलें । मग उचित कां आपुलें । वोसंडावें ॥ ४४ ॥ परिस पां सव्यसाची । मूर्ती लाहोनि देहाची । खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ॥ ४५ ॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः । आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७॥

देखें असतेनि देहधर्में । एथ तोचि एकु न लिंपे कर्में । जो अखंडित रमे । आपणपांचि ॥ ४६ ॥ जे तो आत्मबोधें तोषला । तरी कृतकार्यु देखें जाहला । म्हणोनि सहजे सांडवला । कर्मसंगु ॥ ४७ ॥

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन । न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥

तृप्ति झालिया जैसीं । साधनें सरती आपैसीं । देखें आत्मतुष्टी तैसीं । कर्में नाहीं ॥ ४८ ॥ जंववरी अर्जुना । तो बोध भेटेना मना । तंवचि यया साधना । भजावें लागे ॥ ४९ ॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर । असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥

म्हणऊनि तूं नियतु । सकळ कामरहितु । होऊनियां उचितु । स्वधर्में रहाटें ॥ १५० ॥ जे स्वकर्में निष्कामता । अनुसरले पार्था । ते कैवल्य परम तत्त्वतां । पातले जगीं ॥ ५१ ॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः । लोकसंग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

देख पां जनकादिक । कर्मजात अशेख । न सांडितां मोक्षसुख । पावते जाहले ॥ ५२ ॥ याकारणें पार्था । होआवी कर्मीं आस्था । हे आणिकाहि एकां अर्था । उपकारेल ॥ ५३ ॥ जे आचरतां आपणपेयां । देखी लागेल लोका यया । तरी चुकेल हा अपाया । प्रसंगेंचि ॥ ५४ ॥ देखें प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले । तयाही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ॥ ५५ ॥ मार्गीं अंधासरिसा । पुढें देखणाही चाले जैसा । अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा । आचरोनि ॥ ५६ ॥ हां गा ऐसें जरी न कीजे । तरी अज्ञानां काय उमजे । तिहीं कवणेपरी जाणिजे । मार्गातें या ॥ ५७ ॥

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

एथ वडील जें जें करिती । तया नाम धर्मु ठेविती । तेंचि येर अनुष्ठिती सामान्य सकळ ॥ ५८ ॥ हें ऐसें असे स्वभावें । म्हणोनि कर्म न संडावें । विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ ५९ ॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

आतां आणिकाचिया गोठी । तुज सांगो काई किरीटी । देखें मीचि इये राहाटी । वर्तत असें ॥ १६० ॥ काय सांकडें कांहीं मातें । कीं कवणें एकें आर्तें । आचरें मी धर्मातें । म्हणसी जरी ॥ ६१ ॥ तरी पुरतेपणालागीं । आणिक दुसरा नाहीं जगीं । ऐसी सामुग्री माझां अंगीं । जाणसी तूं ॥ ६२ ॥ मृत गुरुपुत्र आणिला । तो तुवां पवाडा देखिला । तोही मी उगला । कर्मीं वर्तें ॥ ६३ ॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः । मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

परी स्वधर्मीं वर्ते कैसा । साकांक्षु कां होय जैसा । तयाचि एका उद्देशा - । लागोनियां ॥ ६४ ॥ जे भूतजात सकळ । असे आम्हांचि आधीन केवळ । तरी न व्हावें बरळ । म्हणोनियां ॥ ६५ ॥

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् । संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥

आम्ही पूर्णकाम होऊनी । जरी आत्मस्थिती राहुनी । तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरेल

॥ ६६ ॥ इहीं आमुची वास पाहावी । मग वर्तती परी जाणावी । ते लौकिक स्थिति आघवी । नासिली होईल ॥ ६७ ॥ म्हणोनि समर्थु जो एथें । आथिला सर्वज्ञते । तेणें सविशेषें कर्मातें । त्यजावें ना ॥ ६८ ॥

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत । कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

देखें फळाचिया आशा । आचरे कामुकु जैसा । कर्मीं भरु होआवा तैसा । निराशाही ॥ ६९ ॥ जे पुढतपुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा । म्हणऊनियां ॥ १७० ॥ मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रति ॥ ७१ ॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् । जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥

जें सायासें स्तन्य सेवी । तें पक्वान्नें केवीं जेवी । म्हणोनि बाळका जैशीं नेदावीं । धनुर्धरा ॥ ७२ ॥ तैसी कर्मीं जया अयोग्यता । तयाप्रति नैष्कर्म्यता । न प्रगटावी खेळतां । आदिकरुनी ॥ ७३ ॥ तेथें सत्क्रियाचि लावावी । तेचि एकी प्रशंसावी । नैष्कर्मींही दावावी । आचरोनी ॥ ७४ ॥ तया लोकसंग्रहालागीं । वर्ततां कर्मसंगी । तो कर्मबंधु आंगीं । वाजेलना ॥ ७५ ॥ जैसी बहुरूपियाची रावो राणी । स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं । परीं लोकसंपादणी । तैशीच करिती ॥ ७६ ॥

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः । अहङ्कारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥

देखें पुढिलांचें वोझें । जरी आपुलां माथां घेईजे । तरी सांगें कां न दाटिजे । धनुर्धरा ॥ ७७ ॥ तैसीं शुभाशुभें कर्में । जियें निफजती प्रकृतिधर्में । तिये मूर्ख मतिभ्रमें । मी कर्ता म्हणे ॥ ७८ ॥ ऐसा अहंकाराधि रूढ । एकदेशी मूढ । तया हा परमार्थ गूढ । प्रगटावा ना ॥ ७९ ॥ हें असो प्रस्तुत । सांगिजेल तुज हित । तें अर्जुना देऊनि चित्त । अवधारीं पां ॥ १८० ॥

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः । गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

जे तत्त्वज्ञानियांचां ठायीं । तो प्रकृतिभावो नाहीं । जेथ कर्मजात पाहीं । निपजत असे ॥ ८१ ॥ ते देहाभिमानु सांडुनी । गुणकर्में वोलांडुनी । साक्षीभूत होउनी । वर्तती देहीं ॥ ८२ ॥ म्हणूनि शरीरी जरी होती । तरी कर्मबंधा नाकळती । जैसा कां भूतचेष्टा गभस्ती । घेपवेना ॥ ८३ ॥

प्रकृतेर्गुणसम्मूढाः सज्जन्ते गुणकर्मसु । तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥

एथ कर्मीं तोचि लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे । प्रकृतीचेनि आटोपें । वर्ततु असे ॥ ८४ ॥ इंद्रियें गुणाधारें । राहाटती निजव्यापारें । तें परकर्म बलात्कारें । आपादी जो ॥ ८५ ॥

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा । निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

तरी उचितें कर्में आघवीं । तुवां आचरोनि मज अर्पावीं । परी चित्तवृत्ति न्यासावीं । आत्मरूपीं ॥ ८६ ॥ हें कर्म मी कर्ता । कां आचरेन या अर्था । ऐसा अभिमानु झणें चित्ता । रिगों देसीं ॥ ८७ ॥ तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें । मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ ८८ ॥

आतां कोदंड घेऊनि हातीं। आरूढ पां इये रथीं। देईं आलिंगन वीरवृत्ती। समाधानें॥ ८९ ॥ जगीं कीर्ति रूढवीं। स्वधर्माचा मानु वाढवीं। यया भारापासोनि सोडवी। मेदिनी हे॥ १९० ॥ आतां पार्था निःशंकु होईं। या संग्रामा चित्त देईं। एथ हें वांचूनि कांहीं। बोलों नये॥ ९१ ॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः । श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥

हें अनुपरोध मत माझें। जिहीं परमादरें स्वीकारिजे। श्रद्धा पूर्वक अनुष्ठिजे। धनुर्धरा॥ ९२॥ तेही सकळ कर्मीं वर्ततु। जाण पां कर्मरहितु। म्हणोनि हें निश्चितु। करणीय गा॥ ९३ ॥

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् । सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

नातरी प्रकृतिमंतु होउनी। इंद्रियां लळा देउनी। जे हें माझें मत अव्हेरुनी। ओसंडिती॥ ९४ ॥ जे सामान्यत्वें लेखिती। अवज्ञा करूनि देखिती। कां हा अर्थवादु म्हणती। वाचाळपणें॥ ९५ ॥ ते मोहमदिरा भ्रमले। विषयविखें घारले। अज्ञानपंकीं बुडाले। निभ्रांत मानीं॥ ९६ ॥ देखें शवाचां हातीं दिधलें। जैसें कां रत्न वायां गेलें। ना तरी जात्यंधा पाहलें। प्रमाण नोहे॥ ९७ ॥ कां चंद्राचा उदयो जैसा। उपयोगा नवचे वायसा। मूर्खा विवेकु हा तैसा। रुचेल ना॥ ९८ ॥ तैसे ते पार्था। जे विमुख या परमार्था। तयांसी संभाषण सर्वथा। करावे ना॥ ९९ ॥ म्हणोनि ते न मानिती। आणि निंदाही करूं लागती। सांगें पतंग काय साहती। प्रकाशातें॥ २०० ॥ पतंगा दीपीं आलिंगन। तेथ त्यासी अचुक मरण। तेवीं विषयाचरण। आत्मघाता॥ १ ॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि । प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

म्हणोनि इंद्रियें एकें। जाणतेनि पुरुखें। लाळावीं ना कौतुकें। आदिकरुनी॥ २ ॥ हां गा सर्पेंसी खेळों येईल। कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल। सांगे हाळाहळ जिरेल। सेविलिया काई॥ ३ ॥ देखें खेळतां अग्नि लागला। मग तो न सांवरे जैसा उधवला। तैसा इंद्रियां लळा दिधला। भला नोहे ॥ ४ ॥ एऱ्हवीं तरी अर्जुना। या शरीरा पराधीना। कां नाना भोगरचना। मेळवावी॥ ५ ॥ आपण सायासेंकरूनि बहुतें। सकळहि समृद्धिजातें। उदोअस्तु या देहातें। प्रतिपाळावें का॥ ६ ॥ सर्वस्वें शिणोनि एथें। अर्जवावीं संपत्तिजातें। तेणें स्वधर्मु सांडूनि देहातें। पोखावें काई॥ ७ ॥ मग हें तंव पांचमेळावा। शेखीं अनुसरेल पंचत्वा। तें वेळीं केला कें गिंवसावा। शीणु आपुला॥ ८ ॥ म्हणुनि केवळ देहभरण। ते जाणें उघडी नागवण। यालागीं एथ अंतःकरण। देयावेंना॥ ९ ॥

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ । तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ ३४ ॥

एऱ्हवीं इंद्रियांचियां अर्था- । सारिखा विषयो पोखितां। संतोषु कीर चित्ता। आपजेल ॥ २१० ॥ परी तो संवचोराचा सांगातु। जैसा नावेक स्वस्थु। जंव नगराचा प्रांतु। सांडिजेना ॥ ११ ॥ बापा विषाची मधुरता। झणें आवडी उपजे चित्ता। परी तो परिणाम विचारितां। प्राणु हरी॥ १२ ॥ देखें इंद्रियीं कामु असे। तो लावी सुखदुराशे। जैसा गळीं मीनु आमिषें। भुलविजे गा॥ १३ ॥ परी तयामाजी गळु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये। तो जैसा ठाऊका

नोहे । झांकलेपणें ॥ १४ ॥ तैसें अभिलाषें येणें कीजेल । जरी विषयांची आशा धरिजेल । तरी वरपडा होईजेल । क्रोधानळा ॥ १५ ॥ जैसा कवळोनिया पारधी । घातेचिये संधी । आणी मृगातें बुद्धी । साधावया ॥ १६ ॥ एथ तैसीची परी आहे । म्हणूनि संगु हा तुज नोहे । पार्था दोन्ही कामक्रोध हे । घातुक जाणें ॥ १७ ॥ म्हणऊनि हा आश्रोचि न करावा । मनींही आठवो न धरावा । एकु निजवृत्तीचा वोलावा । नासों नेदी ॥ १८ ॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् । स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

अगा स्वधर्मु हा आपुला । जरी कां कठिणु जाहला । तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ॥ १९ ॥ येरु आचारु जो परावा । तो देखतां कीर बरवा । परी आचरतेनि आचरावा । आपुलाचि ॥ २० ॥ सांगें शूद्रघरीं आघवीं । पक्वान्नें आहाति बरवीं । तीं द्विजें केवीं सेवावी । दुर्बळु जरी जाहला ॥ २१ ॥ हें अनुचित कैसेनि कीजे । अप्राप्य केवीं इच्छिजे । अथवा इच्छिलेंही पाविजे । विचारीं पां ॥ २२ ॥ तरी लोकांचीं धवळारें । देखोनियां मनोहरें । असतीं आपुलीं तणारें । मोडावीं केवीं ॥ २३ ॥ हें असो वनिता आपुली । कुरूप जरी जाहली । तरी भोगितां तेचि भली । जियापरी ॥ २४ ॥ तेवीं आवडे तैसा सांकडु । आचरतां जरी दुवाडु । तरी स्वधर्मुचि सुरवाडु । पारत्रिकीचा ॥ २५ ॥ हां गा साकर आणि दूध । हें गौल्य कीर प्रसिद्ध । परी कृमिदोषीं विरुद्ध । घेपे केवीं ॥ २६ ॥ ऐसेनिही जरी सेविजेल । तरी ते आळुकीची उरेल । जे तें परिणामी पथ्य नव्हेल । धनुर्धरा ॥ २७ ॥ म्हणोनि आणिकांसी जें विहित । आणि आपणपेयां अनुचित । तें नाचरावें जरी हित । विचारिजे ॥ २८ ॥ या स्वधर्मातें अनुष्ठितां । वेचु होईल जीविता । तोहि निका वर उभयतां । दिसत असे ॥ २९ ॥ ऐसें समस्तसुरशिरोमणी । बोलिले जेथ शार्ङ्गपाणी । तेथ अर्जुन म्हणे विनवणी । असे देवा ॥ २३० ॥ हें जें तुम्हीं सांगितलें । तें सकळ कीर म्यां परिसलें । परी आतां पुसेन कांही आपुलें । अपेक्षित ॥ ३१ ॥

अर्जुन उवाच : अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः । अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥

तरी देवा हें ऐसें कैसें । जे ज्ञानियांचीही स्थिती भ्रंशे । मार्गु सांडुनि अनारिसें । चालत देखों ॥ ३२ ॥ सर्वज्ञुही जे होती । हेयोपादेयही जाणती । तेही परधर्में व्यभिचरति । कवणें गुणें ॥ ३३ ॥ बीजा आणि भुसा । अंधु निवाडु नेणे जैसा । नावेक देखणाही तैसा । बरळे कां पां ॥ ३४ ॥ जे असता संगु सांडिती । तेचि संसर्गु करिता न धाती । वनवासीही सेविती । जनपदातें ॥ ३५ ॥ आपण तरी लपती । सर्वस्वें पाप चुकविती । परी बलात्कारें सुइजती । तयाचि माजीं ॥ ३६ ॥ जयांची जीवें घेती विवसी । तेचि जडोनि ठाके जीवेंसीं । चुकविती ते गिंवसी । तयातेंचि ॥ ३७ ॥ ऐसा बलात्कारु एकु दिसें । तो कवणाचा एथ आग्रहो असे । हें बोलावें हृषीकेशें । पार्थु म्हणे ॥ ३८ ॥

श्रीभगवानुवाच : काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

तंव हृदयकमळआरामु । जो योगियांचा निष्कामकामु । तो म्हणतसे पुरुषोत्तमु । सांगेन आइक ॥ ३९ ॥ तरी हे काम क्रोधु पाहीं । जयांतें कृपेची साठवण नाहीं । हें कृतांताचां ठायीं । मानिजती ॥ २४० ॥ हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषयदरींचे वाघ । भजनमार्गींचे मांग । मारक जे ॥ ४१ ॥ हे देहदुर्गींचे धोंड । इंद्रियग्रामींचें कोंड । यांचें व्यामोहादिक बंड । जगावरी ॥ ४२ ॥ हे रजोगुण मानसाचे । समूळ आसुरियेचे । धायपण ययांचें । अविद्या केलें ॥ ४३ ॥ हे रजाचे कीर जाहले । परी तमासी पढियंते भले । तेणें निजपद यां दिधलें । प्रमादमोहो ॥ ४४ ॥ हे मृत्यूचां नगरीं । मानिजती निकियापरी । जे जीविताचे वैरी । म्हणऊनियां ॥ ४५ ॥ जयांसि भुकेलियां आमिषा । हें विश्व न पुरेचि घांसा । कुळवाडी यांची आशा । चाळीत असे ॥ ४६ ॥ कौतुकें कवळितां मुठी । जिये चवदा भुवनें थेकुटीं । ते भ्रांति तिये धाकुटी । वाल्हीदुल्ही ॥ ४७ ॥ जे लोकत्रयाचें भातुकें । खेळताचि खाय कवतिकें । तिच्या दासीपणाचेनि बिकें । तृष्णा जिये ॥ ४८ ॥ हें असो मोहें मानिजे । यांतें अहंकारें घेपे दीजे । जेणें जग आपुलेनि भोजें । नाचवीत असे ॥ ४९ ॥ जेणें सत्याचा भोकसा काढिला । मग अकृत्य तृणकुटा भरिला । तो दंभु रूढविला । जगीं इहीं ॥ २५० ॥ साध्वीं शांति नागविली । मग माया मांगी श्रृंगारिली । तियेकरवीं विटाळविलीं । साधुवृंदें ॥ ५१ ॥ इहीं विवेकाची त्राय फेडिली । वैराग्याची खाली काढिली । जितया मान मोडिली । उपशमाची ॥ ५२ ॥ इहीं संतोषवन खांडिलें । धैर्यदुर्ग पाडिले । आनंदरोप सांडिलें । उपडूनियां ॥ ५३ ॥ इहीं बोधाची चोपी लूसिली । सुखाची लिपी पुसिली । जिव्हारी आगी सूदली । तापत्रयाची ॥ ५४ ॥ हे आंगा तंव घडले । जीवींची आथी जडले । परी नातुडती गिंवसिले । ब्रह्मादिकां ॥ ५५ ॥ हे चैतन्याचे शेजारीं । वसती ज्ञानाचां एका हारीं । म्हणोनि प्रवर्तले महामारी । सांवरती ना ॥ ५६ ॥ हें जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती । बोलतां कवळिती । प्राणियांतें ॥ ५७ ॥ हें शस्त्रेंवीण साधिती । दोरेंवीण बांधिती । ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेउनी ॥ ५८ ॥ चिखलेंवीण रोंविती । पाशिकेंवीण गोंविती । हे कवणाजोगे न होती । आंतौटेपणें ॥ ५९ ॥

धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च । यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनी घेपे व्याळीं । ना तरी उल्बाची खोळी । गर्भस्थासी ॥ २६० ॥ कां प्रभावीण भानु । धूमेंवीण हुताशनु । जैसा दर्पण मळहीनु । कहींच नसे ॥ ६१ ॥ तैसें इहींवीण एकलें । आम्हीं ज्ञान नाहीं देखिलें । जैसे कोंडेनि पां गुंतलें । बीज निपजे ॥ ६२ ॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा । कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥

तैसें ज्ञान तरी शुद्ध । परी इहीं असे प्ररुद्ध । म्हणोनि तें अगाध । होऊनि ठेलें ॥ ६३ ॥ आधीं यातें जिणावें । मग तें ज्ञान पावावें । तंव पराभवो न संभवे । रागद्वेषां ॥ ६४ ॥ यांतें साधावयालागीं । जें बळ आणिजे आंगीं । तें इंधन जैसें आगी । सावावो होय ॥ ६५ ॥

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते । एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तैसे उपाय कीजती जे जे । ते यांसीच होती विरजे । म्हणोनि हटियांतें जिणिजे । इहींचि जगीं ॥ ६६ ॥ ऐसियांही सांकडां बोला । एक उपायो आहे भला । तो करितां जरी आंगवला । तरी सांगेन तुज ॥ ६७ ॥

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ । पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

यांचा पहिला कुरुठा इंद्रियें । एथूनि प्रवृत्ति कर्मातें विये । आधीं निर्दळूनि घालीं तियें । सर्वथैव ॥ ६८ ॥

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः । मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

मग मनाचि धांव पारुषेल । आणि बुद्धीची सोडवण होईल । इतुकेनि थारा मोडेल । या पापियांचा ॥ ६९ ॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना । जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥

हे अंतरीहूनि जरी फिटले । तरी निभ्रांत जाण निवटले । जैसें रश्मीवीण उरलें । मृगजळ नाहीं ॥ २७० ॥ तैसे रागद्वेष जरी निमाले । तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ॥ ७१ ॥ जे गुरुशिष्यांची गोठी । पदपिंडाची गांठी । तेथ स्थिर राहोनि नुठीं । कवणे काळीं ॥ ७२ ॥ ऐसें सकळ सिद्धांचा रावो । देवी लक्ष्मीयेचा नाहो । राया ऐक देवदेवो । बोलता जाहला ॥ ७३ ॥ आतां पुनरपि तो अनंतु । आद्य एकी मातु । सांगेल तेथ पंडुसुतु । प्रश्नु करील ॥ ७४ ॥ तया बोलाचा हन पाडु । का रसवृत्तीचा निवाडु । येणें श्रोतयां होईल सुरवाडु । श्रवणसुखाचा ॥ ७५ ॥ ज्ञानदेवो म्हणे निवृत्तीचा । चांग उठावा करूनी उन्मेषाचा । मग संवादु श्रीहरिपार्थाचा । भोगा बापा ॥ २७६ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
कर्मयोगोनाम तृतीयोऽध्यायः ॥ (श्लोक ४३; ओव्या २७६)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय चवथा)

आजि श्रवणेंद्रिया पिकलें । जे येणें गीतानिधान देखिलें । आतां स्वप्नचि हें तुकलें । साचासरिसें ॥ १ ॥ आधींचि विवेकाचि गोठी । वरी प्रतिपादी कृष्ण जगजेठी । आणि भक्तराजु किरीटी । परिसत असे ॥ २ ॥ जैसा पंचमालापु सुगंधु । कीं परिमळु आणि सुस्वादु । तैं भला जाहला विनोदु । कथेचा इये ॥ ३ ॥ कैसी आगळिक दैवाची । जै गंगा वोळली अमृताची । हो कां जपतपें श्रोतयांचीं । फळा आलीं ॥ ४ ॥ आतां इंद्रियजात आघवें । तिहीं श्रवणाचे घर रिघावें । मग संवादसुख भोगावें । गीताख्य हें ॥ ५ ॥ हा अतिसो अतिप्रसंगे । सांडूनि कथाचि ते सांगें । जे कृष्णार्जुन दोघे । बोलत होते ॥ ६ ॥ ते वेळीं संजयो रायातें म्हणे । अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें । जे अतिप्रीती नारायणें । बोलिजतु असे ॥ ७ ॥ जें न सांगेचि पितया वसुदेवासी । जें न सांगेचि माते देवकीसी । जें न सांगेचि बळिभद्रासी । तें गुह्य अर्जुनेशीं बोलत ॥ ८ ॥ देवी लक्ष्मीयेवढी जवळिक । तेही न देखे या प्रेमाचें सुख । आणि कृष्णस्नेहाचें बिक । यातेंचि आथी ॥ ९ ॥ सनकादिकांचिया आशा । वाढीनल्या होतिया कीर बहुवसा । परी त्याही येणें मानें यशा । येतीचिना ॥ १० ॥ या जगदीश्वराचें प्रेम । एथ दिसतसे निरुपम । कैसें पार्थें येणें सर्वोत्तम । पुण्य केलें ॥ ११ ॥ हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त हा आला व्यक्ती । मज एकवंकी याची स्थिती । आवडतु असे ॥ १२ ॥ एऱ्हवीं हा योगियां नाडळे । वेदार्थासी नाकळे । जेथ ध्यानाचेही डोळे । पावतीना ॥ १३ ॥ तें हा निजस्वरूप । अनादि निष्कंप । परी कवणें मानें सकृप । जाहला आहे ॥ १४ ॥ हा त्रैलोक्यपटाची घडी । आकाराची पैलथडी । कैसा याचिये आवडी । आवरला असे ॥ १५ ॥

श्रीभगवानुवाच : इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् । विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥

मग देव म्हणे अगा पंडुसुता । हाचि योगु आम्हीं विवस्वता । कथिला परी ते वार्ता । बहुता दिवसांची ॥ १६ ॥ मग तेणें विवस्वतें रवी । हे योगस्थिति आघवी । निरूपिली बरवी । मनूप्रती ॥ १७ ॥ मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुसि उपदेशिली । ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा ॥ १८ ॥

एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः । स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥

मग आणिकहि या योगातें। राजर्षि जाहले जाणते। परि तेथोनि आतां सांप्रतें। नेणिजे कोणीं ॥ १९ ॥ जे प्राणियां कामीं भरु। देहाचिवरी आदरु। म्हणोनि पडिला विसरु। आत्मबोधाचा ॥ २० ॥ अव्हांटलिया आस्थाबुद्धि। विषयसुखचि परमावधि। जीवु तैसा उपाधि। आवडे लोकां॥ २१ ॥ एऱ्हवीं तरी खवणेयांचां गांवीं। पाटाउवें काय करावीं। सांगें जात्यंधा रवी। काय आथी॥ २२ ॥ कां बहिरयांचां आस्थानीं। कवण गीतातें मानी। की कोल्हेया चांदणीं। आवडी उपजे ॥ २३ ॥ पैं चंद्रोदया आरौतें। जयांचे डोळे फुटती असते। ते काउळे केवी चंद्रातें। वोळखती॥ २४ ॥ तैसे वैराग्याची शिव न देखती। जे विवेकाची भाषा नेणती। ते मूर्ख केवीं पावती। मज ईश्वरातें ॥ २५ ॥ कैसा नेणों मोहो वाढीनला। तेणें बहुतेक काळु व्यर्थ गेला। म्हणोनि योगु हा लोपला। लोकीं इये ॥ २६ ॥

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः । भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३॥

तोचि हा आजि आतां। तुजप्रती कुंतीसुता। सांगितला आम्हीं तत्त्वता। भ्रांति न करीं ॥ २७॥ हें जीवींचें निज गुज। परी केवीं राखों तुज। जे पढियेसी तूं मज। म्हणऊनियां॥ २८ ॥ तूं प्रेमाचा पुतळा। भक्तीचा जिव्हाळा। मैत्रियेचि चित्कळा। धनुर्धरा ॥ २९ ॥ तूं अनुसंगाचा ठावो। आतां तुज काय वंचूं जावों। जरी संग्रामारूढ आहों। जाहलों आम्ही॥ ३० ॥ तरी नावेक हें सहावें। गाजाबज्यही न धरावें। परी तुझें अज्ञानत्व हरावें। लागे आधीं ॥ ३१ ॥

अर्जुन उवाच : अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः । कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४॥

तंव अर्जुन म्हणे हरी। माय आपुलेयाचा स्नेहो करी। एथ विस्मयो काय अवधारीं। कृपानिधी ॥ ३२ ॥ तूं संसारश्रांतांची साउली। अनाथा जीवांची माऊली। आमुतें कीर प्रसवली। तुझीच कृपा ॥ ३३ ॥ देवा पांगुळ एकादें विइजे। तरी जन्मौनि जोजारु साहिजे। हें बोलों काय तुझें। तुजचि पुढां॥ ३४ ॥ आतां पुसेन जें मी कांहीं। तेथ निकें चित्त देईं। तेवींचि देवें कोपावें ना काहीं। बोला एका ॥ ३५ ॥ तरी मागील जे वार्ता। तुवां सांगितली होती अनंता। ते नावेक मज चित्ता। मानेचिना॥ ३६ ॥ जे तो विवस्वतु म्हणजे कायी। ऐसें हें वडिलां ठाउवें नाहीं। तरी तुवांचि केवीं पाहीं। उपदेशिला॥ ३७॥ तो तरी आइकेजे बहुतां काळांचा। आणि तूं तंव कृष्ण सांपेचा। म्हणोनि गा इये मातुचा। विसंवादु॥ ३८ ॥ तेवींचि देवा चरित्र तुझें। आपण कांहीचि नेणिजे। हें लटिकें केवी म्हणिजे। एकिहेळां ॥ ३९ ॥ परी हेचि मातु आघवी। मी परियेसें तैशी सांगावी। जे तुवांचि तया रवी केवीं। उपदेशु केला॥ ४० ॥

श्रीभगवानुवाच : बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन । तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥

तंव कृष्ण म्हणे पंडुसुता। तो विवस्वतु जैं होता। तैं आम्ही नसों ऐसी चित्ता। भ्रांति जरी तुज ॥ ४१ ॥ तरी तूं गा हें नेणसी। पैं जन्में आम्हातुम्हांसी। बहुतें गेलीं परी तिये न स्मरसी। आपलीं तूं॥ ४२ ॥ मी जेणें जेणें अवसरें। जें जें होऊनि अवतरें। तें समस्तही स्मरें। धनुर्धरा॥ ४३ ॥

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् । प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया ॥ ६ ॥

म्हणोनि आघवें । मागील मज आठवें । मी अजुही परि संभवे । प्रकृतियोगें ॥ ४४ ॥ माझें अव्ययत्व तरी न नसे । परी होणें जाणें एक दिसे । तें प्रतिबिंबे मायावशें । माझांचि ठायीं ॥ ४५ ॥ माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीनु ऐसा आवडे । तेंही भ्रांतिबुद्धि तरी घडे । एऱ्हवीं नाहीं ॥ ४६ ॥ कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें । एऱ्हवीं काय वस्तुविचारें । दुजें आहे ॥ ४७ ॥ तैसा अमूर्तचि मी किरीटी । परी प्रकृति जैं अधिष्ठीं । तैं साकारपणें नटी । कार्यालागीं ॥ ४८ ॥

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥

जे धर्मजात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें । ऐसा ओघु हा स्वभावें । आद्य असे ॥ ४९ ॥ म्हणोनि अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्तपणही नाठवीं । जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्मु हा ॥ ५० ॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ ८ ॥

ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकारु होऊनि अवतरें । मग अज्ञानाचें आंधारें । गिळूनि घालीं ॥ ५१ ॥ अधर्माची अवधी तोडीं । दोषांचीं लिहिली फाडीं । सज्जनांकरवीं गुढी । सुखाची उभवीं ॥ ५२ ॥ दैत्यांची कुळें नाशीं । साधूंचा मानु गिंवशीं । धर्मासीं नीतीशीं । शेंज भरीं ॥ ५३ ॥ मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळीं । तैं योगियां पाहे दिवाळी । निरंतर ॥ ५४ ॥ स्वसुखें विश्व कोंदे । धर्मचि जगी नांदे । भक्तां निघती दोंदें । सात्त्विकाचीं ॥ ५५ ॥ तैं पापाचा अचळु फिटे । पुण्याची पहाट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ॥ ५६ ॥ ऐसेया काजालागीं । अवतरें मी युगीं युगीं । परि हेंचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ॥ ५७ ॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः । त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥

माझें अजत्वें जन्मणें । अक्रियताचि कर्म करणें । हें अविकार जो जाणे । तो परममुक्त ॥ ५८ ॥ तो चालिला संगें न चळे । देहींचा देहा नाकळे । मग पंचत्वीं तंव मिळे । माझांचि रूपीं ॥ ५९ ॥

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः । बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥

एऱ्हवीं परापर न शोचिती । जे कामनाशून्य होती । वाटा के वेळीं न वचती । क्रोधाचिया ॥ ६० ॥ जे सदा मियांचि आथिले । माझिया सेवा जियाले । कां आत्मबोधें तोषले । वीतराग जे ॥ ६१ ॥ जे तपोतेजाचिया राशी । कां एकायतन ज्ञानाशी । जे पवित्रता तीर्थांसी । तीर्थरूप ॥ ६२ ॥ ते मद्भावा सहजें आले । मी तेचि ते होऊनि ठेले । जे मज तयां उरले । पदर नाहीं ॥ ६३ ॥ सांगे पितळेची गंधिकाळिक । जैं फिटली होय निःशेख । तैं सुवर्ण काई आणिक । जोडूं जाईजे ॥ ६४ ॥ तैसे यमनियमीं कडसले । जे तपोज्ञानीं चोखाळले । मी तेचि ते जाहले ।

एथ संशयो कायसा ॥ ६५ ॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् । मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥

एन्हवीं तरी पाहीं । जे जैसे माझां ठाईं । भजती तया मीही । तैसाचि भजें ॥ ६६ ॥ देखें मनुष्यजात सकळ । हें स्वभावता भजनशीळ । जाहलें असे केवळ । माझां ठायीं ॥ ६७ ॥ परी ज्ञानेंवीण नाशिले । जे बुद्धिभेदासी आले । तेणेंचि या कल्पिलें । अनेकत्व ॥ ६८ ॥ म्हणऊनि अभेदीं भेदु देखती । यया अनाम्या नामें ठेविती । देवी देवो म्हणती । अचर्चातें ॥ ६९ ॥ जें सर्वत्र सदा सम । तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें संभ्रम । विवंचिती ॥ ७० ॥

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः । क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ १२ ॥

मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें । मानिलीं देवतांतरें । उपासिती ॥ ७१ ॥ तेथ जें जें अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त । परी तें कर्मफळ निश्चित । वोळख तूं ॥ ७२ ॥ वांचूनि देतें घेतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक । एथ कर्मचि फळसूचक । मनुष्यलोकीं ॥ ७३ ॥ जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तेंवांचूनि आन न निपजे । कां पाहिजे तेंचि देखिजे । दर्पणाधारें ॥ ७४ ॥ नातरी कडेयातळवटीं । जैसा आपुलाचि बोलु किरीटी । पडिसादु होऊनि उठी । निमित्तयोगें ॥ ७५ ॥ तैसा समस्तां यां भजनां । मी साक्षिभूतु पैं अर्जुना । एथ प्रतिफळे भावना । आपुलाली ॥ ७६ ॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ १३ ॥

आतां याचिपरी जाण । चान्ही आहेती हे वर्ण । सृजिले म्यां गुण- । कर्मभागें ॥ ७७ ॥ जे प्रकृतीचेनि आधारें । गुणाचेनि व्यभिचारें । कर्में तदनुसारें । विवंचिली ॥ ७८ ॥ एथ एकचि हे धनुष्यपाणी । परी जाहले गा चहूं वर्णीं । ऐसी गुणकर्मीं कडसणी । केली सहजें ॥ ७९ ॥ म्हणोनि आइकें पार्था । हे वर्णभेदसंस्था । मी कर्ता नव्हे सर्वथा । याचिलागीं ॥ ८० ॥

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा । इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥

हें मजचिस्तव जाहलें । परी म्यां नाहीं केलें । ऐसें जेणें जाणितलें । तो सुटला गा ॥ ८१ ॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः । कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

मागील मुमुक्षु जे होते । तिहीं ऐशियाचि जाणोनि मातें । कर्में केलीं समस्तें । धनुर्धरा ॥ ८२ ॥ परि तें बीजें जैसीं दग्धलीं । नुगवतीचि पेरिलीं । तैशीं कर्मेंचि परि तयां जाहलीं । मोक्षहेतु ॥ ८३ ॥ एथ आणिकही एक अर्जुना । हे कर्माकर्मविवंचना । आपुलिये चाडे सज्ञाना । योग्य नोहे ॥ ८४ ॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः । तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥

कर्म म्हणिजे तें कवण । अथवा अकर्मा काय लक्षण । ऐसें विचारितां विचक्षण । गुंफोनि ठेले ॥ ८५ ॥ जैसें कां कुडें नाणें । खऱ्याचेनि सारखेपणें । डोळ्याचेंहि देखणें । संशयीं घाली ॥ ८६ ॥ तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें । गिंवसिजत आहाती कर्में । जे दुजी सृष्टि मनोधर्में । करूं सकती ॥ ८७ ॥ वांचूनि मूर्खाची गोठी कायसी । एथ मोहले गा

क्रांतदर्शी । म्हणोनि आता तेचि परियेसीं । सांगेन तुज ॥ ८८ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मण: । अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गति: ॥ १७ ॥

तरी कर्म म्हणजे स्वभावें । जेणें विश्वाकारु संभवे । तें सम्यक आधीं जाणावें । लागे एथ ॥ ८९ ॥ मग वर्णाश्रमासि उचित । जें विशेष कर्म विहित । तेंहीं वोळखावें निश्चित । उपयोगेंसीं ॥ ९० ॥ पाठीं जें निषिद्ध म्हणिपे । तेंही बुझावें स्वरूपें । येतुलेनि येथ कांही न गुंफे । आपैसेंचि ॥ ९१ ॥ एन्हवीं जग हें कर्माधीन । ऐसी याची व्याप्ती गहन । परि ते असो आइकें चिन्ह । प्राप्ताचें गा ॥ ९२ ॥

कर्मण्यकर्म य: पश्येदकर्मणि च कर्म य: । स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्त: कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

जो सकळकर्मीं वर्ततां । देखे आपुली नैष्कर्म्यता । कर्मसंगें निराशता । फळाचिया ॥ ९३ ॥ आणि कर्तव्यतेलागीं । जया दुसरें नाहीं जगीं । ऐसिया नैष्कर्म्यता तरी चांगी । बोधला असे ॥ ९४ ॥ परि क्रियाकलापु आघवा । आचरतु दिसे बरवा । तरी तो इहीं चिन्हीं जाणावा । ज्ञानिया गा ॥ ९५ ॥ जैसा कां जळापाशीं उभा ठाके । तो जरी आपणपें जळामाजिं देखे । तरी तो निभ्रांत वोळखे । म्हणे मी वेगळा आहें ॥ ९६ ॥ अथवा नावे हन जो रिगे । तो थडियेचे रुख जातां देखे वेगें । तेचि साचोकारें जों पाहों लागे । तंव रुख म्हणे अचळ ॥ ९७ ॥ तैसें सर्व कर्मीं असणें । तें फुडें मानूनि वायाणें । मग आपणपें जो जाणे । नैष्कर्म्यु ऐसा ॥ ९८ ॥ आणि उदोअस्ताचेनि प्रमाणें । जैसें न चलतां सूर्याचें चालणें । तैसें नैष्कर्म्यत्व जाणे । कर्मींचि असतां ॥ ९९ ॥ तो मनुष्यासारिखा तरी आवडे । परी मनुष्यत्व तया न घडे । जैसें जळीं जळामाजीं न बुडे । भानुबिंब ॥ १०० ॥ तेणें न पाहतां विश्व देखिलें । न करितां सर्व केलें । न भोगितां भोगिलें । भोग्यजात ॥ १ ॥ एकेचि ठायीं बैसला । परि सर्वत्र तोचि गेला । हें असो विश्व जाहला । आंगेंचि तो ॥ २ ॥

यस्य सर्वे समारम्भा: कामसंकल्पवर्जिता: । ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहु: पण्डितं बुधा: ॥ १९ ॥

जया पुरुषाचां ठायीं । कर्माचा तरी खेदु नाहीं । परी फळापेक्षा कहीं । संचरेना ॥ ३ ॥ आणि हें कर्म मी करीन । अथवा आदरिलें सिद्धी नेईन । येणें संकल्पेंही जयाचें मन । विटाळेना ॥ ४ ॥ ज्ञानाग्नीचेनि मुखें । जेणें जाळिलीं कर्में अशेखें । तो ब्रह्मचि मनुष्यवेखें । वोळख तूं ॥ ५ ॥

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रय: । कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति स: ॥ २० ॥

जो शरीरीं उदासु । फळभोगीं निरासु । नित्यता उल्हासु । होऊनि असे ॥ ६ ॥ जो संतोषाचां गाभारां । आत्मबोधाचिया वोगरा । पुरे न म्हणेचि धनुर्धरा । आरोगितां ॥ ७ ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रह: । शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥

यदृच्छालाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सर: । सम: सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥ २२ ॥

कैसी अधिकाधिक आवडी । घेत महासुखाची गोडी । सांडोनियां आशा कुरोंडी ।

अहंभावेंसी ॥ ८ ॥ म्हणोनि अवसरें जें जें पावे । कीं तेणेंचि तो सुखावे । जया आपुलें आणि परावें । दोन्हीं नाहीं ॥ ९ ॥ तो दिठी जें पाहे । तें आपणचि होऊनि जाये । आइके तें आहे । तोचि जाहाला ॥ ११० ॥ चरणीं हन चाले । मुखें जें जें बोले । ऐसें चेष्टाजात तेतुलें । आपणचि जो ॥ ११ ॥ हें असो विश्व पाहीं । जयासि आपणपेंवाचूनि नाहीं । आतां कवण तें कर्म कायी । बाधी तयातें ॥ १२ ॥ हा मत्सरु जेथ उपजे । तेतुलें नुरेचि जया दुजें । तो निर्मत्सरु काइ म्हणिजे । बोलवरी ॥ १३ ॥ म्हणोनि सर्वांपरी मुक्तु । तो सकर्मुचि कर्मरहितु । सगुण परि गुणातीतु । एथ भ्रांति नाहीं ॥ १४ ॥

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः । यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥

तो देहसंगें तरी असे । परी चैतन्यासारिखा दिसे । पाहतां परब्रह्माचेनि कसें । चोखाळु भला ॥ १५ ॥ ऐसाही परी कौतुकें । जरी कर्मे करी यज्ञादिकें । तरी तियें लया जाती अशेखें । तयाचांचि ठायीं ॥ १६ ॥ अकाळींचीं अभ्रें जैशीं । उर्मीवीण आकाशीं । हारपती आपैशीं । उदयलीं सांतीं ॥ १७ ॥ तैशी विधिविधान विहितें । जरी आचरे तो समस्तें । तरी तियें ऐक्यभावें ऐक्यातें । पावतीचि गा ॥ १८ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् । ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥

जें हें हवन मी होता । कां इयें यज्ञीं हा भोक्ता । ऐसीया बुद्धीसी नाहीं भिन्नता । म्हणऊनियां ॥ १९ ॥ जे इष्टयज्ञ यजावे । तें हविर्मंत्रादि आघवें । तो देखतसे अविनाशभावें । आत्मबुद्धि ॥ १२० ॥ म्हणऊनि ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जया सम । तया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्धरा ॥ २१ ॥ आतां अविवेककुमारत्वा मुकले । जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहलें । मग उपासन जिहीं आणिलें । योगाग्नीचें ॥ २२ ॥

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते । ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥

जे यजनसील अहर्निशी । जिहीं अविद्या हविली मनेंसीं । गुरुवाक्यहुताशीं । हवन केलें ॥ २३ ॥ तिहीं योगाग्निकीं यजिजे । तो दैवयज्ञु म्हणिजे । जेणें आत्मसुख कामिजे । पंडुकुमरा ॥ २४ ॥ दैवास्तव देहाचें पाळण । ऐसा निश्चयो परिपूर्ण । जो चिंतीना देहभरण । तो महायोगी जाण । दैवयोगें ॥ २५ ॥ आतां अवधारीं सांगेन आणिक । जे ब्रह्माग्नी साग्निक । तयांतें यज्ञेंचि यज्ञु देख । उपासिजे ॥ २६ ॥

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति । शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

एक संयमाग्नीहोत्री । ते युक्तित्रयाचां मंत्रीं । यजन करिती पवित्रीं । इंद्रियद्रव्यीं ॥ २७ ॥ एकां वैराग्यरवि विवळे । तंव संयती विहार केले । तेथ अपावृत जाहले । इंद्रियानळ ॥ २८ ॥ तिहीं विरक्तीची ज्वाळा घेतली । तंव विकारांचीं इंधनें पळिपलीं । तेथ आशाधूमें सांडिलीं । पांचही कुंडें ॥ २९ ॥ मग वाक्यविधीचिया निरवडी । विषयआहुति उदंडी । हवन केलें कुंडीं ।

इंद्रियाग्नीचां ॥ १३० ॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे । आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥

एकीं ययापरी पार्था । दोषु क्षाळिले सर्वथा । आणिकीं हृदयारणीं मंथा । विवेकु केला ॥ ३१ ॥ तो उपशमें निहटिला । धैर्यें वरी दाटिला । गुरुवाक्यें काढिला । बळकटपणें ॥ ३२ ॥ ऐसें समरसें मंथन केलें । तेथ झडकरी काजा आलें । जे उज्जीवन जहालें । ज्ञानाग्नीचें ॥ ३३ ॥ पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रमु । तो निवर्तोनि गेला धूमु । मग प्रगटला सूक्ष्मु । विस्फुलिंगु ॥ ३४ ॥ तया मनाचें मोकळें । तेंचि पेटवण घातलें । जें यमदमीं हळुवारलें । आइतें होतें ॥ ३५ ॥ तेणें सादुकपणें ज्वाळा समृद्धा । मग वासनांतराचिया समिधा । स्नेहेंसि नानाविधा । जाळिलिया ॥ ३६ ॥ तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं । इंद्रियकर्मांचिया आहुती । तिये ज्ञानानळीं प्रदीप्तीं । दिधलिया ॥ ३७ ॥ पाठीं प्राणक्रियेचेनि स्रुवेनिशीं । पूर्णाहुती पडली हुताशीं । तेथ अवभृथ समरसीं । सहजें जाहलें ॥ ३८ ॥ मग आत्मबोधींचें सुख । जें संयमाग्नीचें हुतशेष । तोचि पुरोडाशु देख । घेतला तिहीं ॥ ३९ ॥ एक ऐशिया इहीं यजनीं । मुक्त ते जाहले त्रिभुवनीं । या यज्ञक्रिया तरी आनानी । परि प्राप्य तें एक ॥ १४० ॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे । स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥

एक द्रव्ययज्ञु म्हणिपती । एक तपसामग्रीया निपजती । एक योगयागुही आहाती । जे सांगितले ॥ ४१ ॥ एकीं शब्दीं शब्दु यजिजे । तो वाग्यज्ञु म्हणिजे । ज्ञानें ज्ञेय गमिजे । तो ज्ञानयज्ञु ॥ ४२ ॥ हें अर्जुना सकळ कुवाडें । जे अनुष्ठितां अतिसांकडें । परी जितेंद्रियासीचि घडे । योग्यतावशें ॥ ४३ ॥ ते प्रवीण तेथ भले । आणि योगसमृद्धी आथिले । म्हणोनि आपणपां तिहीं केलें । आत्महवन ॥ ४४ ॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे । प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥

मग अपानाग्नीचे मुखीं । प्राणद्रव्यें देखीं । हवन केलें एकीं । अभ्यासयोगें ॥ ४५ ॥ एक अपानु प्राणीं अर्पिती । एक दोहींतेंही निरुंधिती । ते प्राणायामी म्हणिपती । पंडुकुमरा ॥ ४६ ॥

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति । सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥

एक वज्रयोगक्रमें । सर्वाहारसंयमें । प्राणीं प्राणु संभ्रमें । हवन करिती ॥ ४७ ॥ ऐसें मोक्षकाम सकळ । समस्त हे यजनशीळ । जिहीं यज्ञद्वारां मनोमळ । क्षाळण केलें ॥ ४८ ॥ जया अविद्याजात जाळितां । जें उरलें निजस्वभावतां । जेथ अग्नि आणि होता । उरेचिना ॥ ४९ ॥ जेथ यजितयाचा कामु पुरे । यज्ञींचें विधान सरे । मागुतें जेथूनि वोसरे । क्रियाजात ॥ १५० ॥ विचार जेथ न रिगे । हेतु जेथ न निगे । जें द्वैतदोषसंगें । सिंपेचिना ॥ ५१ ॥

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् । नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

ऐसें अनादिसिद्ध चोखट । जें ज्ञान यज्ञावशिष्ट । तें सेविती ब्रह्मनिष्ठ । ब्रह्माहं मंत्रे

॥ ५२ ॥ ऐसे शेषामृतें धाले । कीं अमर्त्यभावा आले । म्हणोनि ब्रह्म ते जहाले । अनायासें ॥ ५३ ॥ येरां विरक्ति माळ न घालीचि । जयां संयमाग्नीची सेवा न घडेचि । जो योगुयागु न करितीचि । जन्मले सांते ॥ ५४ ॥ जयां ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई । म्हणोनि असो हे गोठी पाटी । पंडुकुमरा ॥ ५५ ॥

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे । कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥

ऐसें बहुतीं परीं अनेग । जे सांगितले तुज कां याग । ते विस्तारूनि वेदेंचि चांग । म्हणितले आहाती ॥ ५६ ॥ परि तेणें विस्तारें काय करावें । हेंचि कर्मसिद्ध जाणावें । येतुलेनि कर्मबंधु स्वभावें । पावेल ना ॥ ५७ ॥

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप । सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

अर्जुना वेदु जयांचें मूळ । जे क्रियाविशेषें स्थूळ । जयां नव्हाळियेचें फळ । स्वर्गसुख ॥ ५८ ॥ ते द्रव्यादियागु कीर होती । परी ज्ञानयज्ञाची सरी न पवती । जैशी तारातेजसंपत्ती । दिनकरापाशीं ॥ ५९ ॥ देखें परमात्मसुखनिधान । साधावया योगीजन । जें न विसंबिती अंजन । उन्मेषनेत्रीं ॥ १६० ॥ जें धांवतया कर्माची लाणी । नैष्कर्म्यबोधाची खाणी । जें भुकेलिया धणी । साधनाची ॥ ६१ ॥ जेथ प्रवृत्ति पांगुळ जाहली । तर्काची दिठी गेली । जेणें इंद्रियें विसरलीं । विषयसंगु ॥ ६२ ॥ मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचें बोलपण ठेलें । जयामाजि सांपडलें । ज्ञेय दिसे ॥ ६३ ॥ जेथ वैराग्याचा पांगु फिटे । विवेकाचाही सोसु तुटे । जेथ न पाहतां सहज भेटे । आपणपें ॥ ६४ ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥

तें ज्ञान पैं गा बरवें । जरी मनीं आथि आणावें । तरी संतां यां भजावें । सर्वस्वेंशीं ॥ ६५ ॥ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंटा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी ॥ ६६ ॥ तरी तनुमनुजीवें । चरणासीं लागावें । आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥ ६७ ॥ मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगती पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा न ये ॥ ६८ ॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव । येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥

जयाचेनि वाक्यउजिवडें । जाहलें चित्त निधडें । ब्रह्माचेनि पाडें । निःशंकु होय ॥ ६९ ॥ ते वेळीं आपणपेया सहितें । इयें अशेषेंही भूतें । माझां स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥ १७० ॥ ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकारु जाईल । जैं गुरुकृपा होईल । पार्था गा ॥ ७१ ॥

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः । सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥

जरी कल्मषांचा आगरु । तूं भ्रांतीचा सागरु । व्यामोहाचा डोंगरु । होऊनी अससी ॥ ७२ ॥ तन्हीं ज्ञानशक्तिचेनि पाडें । हें आघवेंचि गा थोकडें । ऐसें सामर्थ्य असे चोखडें । ज्ञानीं इये ॥ ७३ ॥ देखें विश्वभ्रमाऐसा । जो अमूर्ताचा कडवसा । जो जयाचिया प्रकाशा ।

पुरेचिना ॥ ७४ ॥ तया कायसें हें मनोमळ । हें बोलतांचि अति किडाळ । नाहीं येणें पाडें ढिसाळ । दुजें जगीं ॥ ७५ ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन । ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥

सांगे भुवनत्रयाची काजळी । जे गगनामाजि उधवली । तिये प्रळयींचे वाहटुळी । काय अभ्र पुरे ॥ ७६ ॥ की पवनाचेनि कोपें । पाणियेंचि जो पळिपे । तो प्रळयानळु दडपे । तृणें काष्ठें काइ ॥ ७७ ॥

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ ३८ ॥

म्हणोनि असो हें न घडे । तें विचारितांचि असंगडें । पुढती ज्ञानाचेनि पाडें । पवित्र न दिसे ॥ ७८ ॥ एथ ज्ञान हें उत्तम होये । आणिकही एक तैसें कें आहे । जैसें चैतन्य कां नोहे । दुसरें गा ॥ ७९ ॥ या महातेजाचेनि कसें । जरी चोखाळु प्रतिबिंब दिसे । कां गिंवसिलें गिंवसे । आकाश हें ॥ १८० ॥ नातरी पृथ्वीचेनि पाडें । कांटाळें जरी जोडे । तरी उपमा ज्ञानीं घडे । पंडुकुमरा ॥ ८१ ॥ म्हणुनि बहुतीं परीं पाहतां । पुढतपुढती निर्धारितां । हें ज्ञानाची पवित्रता । ज्ञानींचि आथि ॥ ८२ ॥ जैसी अमृताची चवी निवडिजे । तरी अमृताचिसारिखी म्हणिजे । तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेसींचि ॥ ८३ ॥ आतां यावरी जें बोलणें । ते वायांचि वेळु फेडणें । तंव सांचचि जी हें पार्थु म्हणे । जें बोलत असां ॥ ८४ ॥ परि तेंचि ज्ञान केवीं जाणावें । ऐसें अर्जुनें जंव पुसावें । तंव तें मनोगत देवें । जाणितलें ॥ ८५ ॥ मग म्हणतसे किरीटी । आता चित्त देई इये गोठी । सांगेन ज्ञानाचिये भेटी । उपाय तुज ॥ ८६ ॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः । ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥

तरी आत्मसुखाचिया गोडिया । विटे जो कां सकळ विषयां । जयांचा ठायीं इंद्रियां । मानु नाहीं ॥ ८७ ॥ जो मनासी चाड न सांगे । तो प्रकृतीचें केलें नेघे । जो श्रद्धेचेनि संभोगे । सुखिया जाहला ॥ ८८ ॥ तयातेंचि गिंवसित । हें ज्ञान पावे निश्चित । जयामाजि अचुंबित । शांति असे ॥ ८९ ॥ तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ॥ १९० ॥ मग जेउती वास पाहिजे । तेउती शांतीच देखिजे । तेथ आपपरु नेणिजे । निर्धारितां ॥ ९१ ॥ ऐसा हा उत्तरोत्तरु । ज्ञानबीजाचा विस्तारु । सांगतां असे अपारु । परि असो आतां ॥ ९२ ॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥

ऐकें जया प्राणियाचां ठायीं । इया ज्ञानाची आवडी नाहीं । जयाचें जियालें म्हणों काई । वरी मरण चांग ॥ ९३ ॥ शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह ॥ तैसें जीवित तें संमोह । ज्ञानहीन ॥ ९४ ॥ अथवा ज्ञान कीर आपु नोहे । परी ते चाड एकी जरी वाहे । तरी तेथ जिव्हाळा कांहीं आहे । प्राप्तीचा पैं ॥ ९५ ॥ वांचूनि ज्ञानाची गोठी कायसी । परि ते आस्थाही न धरी मानसीं ।

तरी तो संशयरूप हुताशीं । पडिला जाण ॥ ९६ ॥ जे अमृतही परि नावडे । ऐसें सावियाचि आरोचकु जैं पडे । तैं मरण आलें असे फुडें । जाणों यें कीं ॥ ९७ ॥ तैसा विषयसुखें रंजे । जो ज्ञानेंसींचि माजे । तो संशयें अंगीकारिजे । एथ भ्रांति नाहीं ॥ ९८ ॥ मग संशयीं जरी पडला । तरी निर्भ्रांत जाणें नासला । तो ऐहिकपरत्रा मुकला । सुखासि गा ॥ ९९ ॥ जया काळज्वरु आंगीं बाणे । तो शीतोष्ण जैशीं नेणे । आगी आणि चांदिणें । सरिसेंचि मानी ॥ २०० ॥ तैसें साच आणि लटिकें । विरुद्ध आणि निकें । संशयी तो नोळखे । हिताहित ॥ १ ॥ हा रात्रिदिवसु पाहीं । जैसा जात्यंधा ठाउवा नाहीं । तैसें संशयीं असतां काहीं । मना नये ॥ २ ॥ म्हणऊनि संशयाहूनि थोर । आणिक नाहीं पाप घोर । हा विनाशाची वागुर । प्राणियासी ॥ ३ ॥ येणें कारणें तुवां त्यजावा । आधीं हाचि एकु जिणावा । जो ज्ञानाचिया अभावा - । माजी असे ॥ ४ ॥ जैं अज्ञानाचें गडद पडे । तैं हा बहुवस मनीं वाढे । म्हणोनि सर्वथा मागु मोडे । विश्वासाचा । हृदयीं हाचि न समाये । बुद्धीतें गिंवसूनि ठाये । तेथ संशयात्मक होये । लोकत्रय ॥ ६ ॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् । आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥ ४१ ॥

ऐसा जरी थोरावे । तरी उपायें एकें आंगवे । जरी हातीं होय बरवें । ज्ञानखड्ग ॥ ७ ॥ तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखटें । निखळु हा निवटे । मग निःशेष खता फिटे । मानसींचा ॥ ८ ॥

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः । छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥

याकारणें पार्था । उठीं वेगीं वरौता । नाशु करोनि हृदयस्था । संशयासी ॥ ९ ॥ ऐसें सर्वज्ञानाचा बापु । जो कृष्ण ज्ञानदीपु । तो म्हणतसें सकृपु । ऐकें राया ॥ २१० ॥ तंव या पूर्वापर बोलाचा । विचारूनि कुमरु पंडूचा । कैसा प्रश्नु हन अवसरींचा । करिता होईल ॥ ११ ॥ ते कथेची संगति । भावाची संपत्ति । रसाची उन्नति । म्हणिपेल पुढां ॥ १२ ॥ जयाचिया बरवेपणीं । कीजे आठां रसांची ओवाळणी । जो सज्जनाचिये आयणी । विसांवा जगीं ॥ १३ ॥ तो शांतुचि अभिनवेल । ते परियसा मन्हाठे बोल । जे समुद्राहूनि खोल । अर्थभरित ॥ १४ ॥ जैसें बिंब तरी बचकें एवढें । परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें । शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ॥ १५ ॥ ना तरी कामितयाचिया इच्छा । फळे कल्पवृक्षु जैसा । बोलु व्यापकु होय तैसा । तरी अवधान द्यावें ॥ १६ ॥ हे असो काय म्हणावें । सर्वज्ञु जाणती स्वभावें । तरी निकें चित्त द्यावें । हे विनंति माझी ॥ १७ ॥ जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती । जैसी लावण्यगुणकुळवती । आणि पतिव्रता ॥ १८ ॥ आधींचि साखर आवडे । आणि तेचि जरी ओखदीं जोडे । तरी सेवावी ना कां कोडें । नावा नावा ॥ १९ ॥ सहजें प्रलयानिलु मंद सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु । आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ॥ २२० ॥ तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी । तेवींचि कानाकरवीं । म्हणवी बापु माझा ॥ २१ ॥ तैसें कथेचें इये ऐकणें । एक श्रवणासि होय पारणें । आणि संसारदुःख

मूळवणें । विकृतीविणें ॥ २२ ॥ जरी मंत्रेंचि वैरी मरे । तरी वायांचि कां बांधावीं कटारें । रोग जाय दुधें साखरे । तरी निंब कां पियावा ॥ २३ ॥ तैसा मनाचा मारु न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्षु असे आयता । श्रवणाचिमाजी ॥ २४ ॥ म्हणोनि आथिलिया आराणुका । गीतार्थु हा निका । ज्ञानदेवो म्हणे आइका । निवृत्तिदासु ॥ २२५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
ज्ञानकर्मसंन्यासयोगोनाम चतुर्थोऽध्यायः ॥ (श्लोक ४२; ओव्या २२५)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय पाचवा)

अर्जुन उवाच : संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥

मग पार्थु श्रीकृष्णातें म्हणे । हां हो हें कैसें तुमचें बोलणें । एक होय तरी अंतःकरणें । विचारूं ये ॥ १ ॥ मागां सकळ कर्माचा संन्यासु । तुम्हींचि निरोपिला होता बहुवसु । तरी कर्मयोगीं केवीं अतिरसु । पोखीतसां पुढती ॥ २ ॥ ऐसें द्व्यर्थ हें बोलतां । आम्हां नेणतयांचिया चित्ता । आपुलिये चाडे अनंता । उमजु नोहे ॥ ३ ॥ ऐकें एकसारातें बोधिजे । तरी एकनिष्ठचि बोलिजे । हें आणिकीं काय सांगिजे । तुम्हांप्रति ॥ ४ ॥ तरी याचिलागीं तुमतें । म्यां राउळासी विनविले होतें । जे हा परमार्थु ध्वनितें । न बोलावा ॥ ५ ॥ परी मागील असो देवा । आतां प्रस्तुतीं उकलु देखावा । सांगें दोहींमाजि बरवा । मार्गु कवण ॥ ६ ॥ जो परिणामींचा निर्वाळा । अचुंबितु ये फळा । आणि अनुष्ठितां प्रांजळा । सावियाचि ॥ ७ ॥ जैसें निद्रेचें सुख न मोडे । आणि मार्गु तरी बहुसाल सांडे । तैसें सोकासना सांगडें । सोहपें होय ॥ ८ ॥ येणें अर्जुनाचेनि बोलें । देवो मनीं रिझले । मग होईल ऐकें म्हणितलें । संतोषोनियां ॥ ९ ॥ देखा कामधेनुऐसी माये । सदैवा जया होये । तो चंद्रुही परी लाहे ।

खेळावया ॥ १० ॥ पाहें पां शंभूची प्रसन्नता । तया उपमन्यूचिया आर्ता । काय क्षीराब्धि दूधभाता । देईजेचिना ॥ ११ ॥ तैसा औदार्याचा कुरुठा । कृष्ण आपु जाहलिया सुभटा । कां सर्व सुखांचा वसौटा । तोचि नोहावा ॥ १२ ॥ एथ चमत्कारु कायसा । गोसावी लक्ष्मीकांताऐसा । आतां आपुलिया सवेसा । मागावा कीं ॥ १३ ॥ म्हणोनि अर्जुनें म्हणितलें । तें हांसोनि येरें दिधलें । तेंचि सांगेन बोलिलें । काय कृष्णें ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाच : संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥

तो म्हणे गा कुंतीसुता । हे संन्यासयोग विचारितां । मोक्षकर तत्त्वता । दोनीहि होती ॥ १५ ॥ तरी जाणा नेणा सकळां । हा कर्मयोगु कीर प्रांजळा । जैसी नाव स्त्रियां बाळां । तोयतरणीं ॥ १६ ॥ तैसें सारासार पाहिजे । तरी सोहपा हाचि देखिजे । येणें संन्यासफळ लाहिजे । अनायासें ॥ १७ ॥ आतां याचिलागी सांगेन । तुज संन्यासियाचें चिन्ह । मग सहजें हे अभिन्न । जाणसी तूं ॥ १८ ॥

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति । निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते ॥ ३ ॥

तरी गेलियाची से न करी । न पवतां चाड न धरी । जो सुनिश्चळु अंतरी । मेरु जैसा ॥ १९ ॥ आणि मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥ २० ॥ जो मनें ऐसा जाहला । संगी तोचि सांडिला । म्हणोनि सुखें सुख पावला । अखंडित ॥ २१ ॥ आतां गृहादिक आघवें । ते कांहीं नलगे त्यजावें । जें घेतें जाहलें स्वभावें । निःसंगु म्हणऊनि ॥ २२ ॥ देखें अग्नि विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळु होये । तैं ते कापुसें गिंवसू ये । जियापरी ॥ २३ ॥ तैसा असतेनि उपाधी । नाकळिजे तो कर्मबंधीं । जयाचिये बुद्धी । संकल्पु नाहीं ॥ २४ ॥ म्हणोनि कल्पना जैं सांडे । तैंचि गा संन्यासु घडे । या कारणें दोनी सांगडे । संन्यासयोगु ॥ २५ ॥

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः । एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥ ४ ॥

एन्हवीं तरी पार्था । जे मूर्ख होती सर्वथा । ते सांख्यकर्मसंस्था । जाणती केवीं ॥ २६ ॥ सहजें ते अज्ञान । म्हणोनि म्हणती हे भिन्न । एन्हवी दीपाप्रति काई आनान । प्रकाशु आहाती ॥ २७ ॥ पैं सम्यक् एकें अनुभवें । जिहीं देखिलें तत्त्व आघवें । ते दोन्हींतेंही ऐक्यभावें । मानिती गा ॥ २८ ॥

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते । एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥

आणि सांख्यीं जें पाविजे । तेंचि योगीं गमिजे । म्हणोनि ऐक्यता दोहींते सहजें । इयापरी ॥ २९ ॥ देखें आकाशा आणि अवकाशा । भेदु नाहीं जैसा । तैसे ऐक्य योगसंन्यासा । वोळखे जो ॥ ३० ॥ तयासींचि जगीं पाहलें । आपणपें तेणेंचि देखिलें ।

जया सांख्ययोग जाणवले । भेदेंविण ॥ ३१ ॥

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः । योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥

जो युक्तिपंथे पार्था । चढे मोक्षपर्वता । तो महासुखाचा निमथा । वहिला पावे ॥ ३२ ॥ येरा योगस्थिति जया सांडे । तो वायांचि गा हव्यासीं पडे । परि प्राप्ति कहीं न घडे । संन्यासाची ॥ ३३ ॥

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः । सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥

जेणें भ्रांतीपासूनि हिरतलें । गुरुवाक्यें मन धुतलें । मग आत्मस्वरूपीं घातलें । हारौनिया ॥ ३४ ॥ जैसें समुद्रीं लवण न पडे । तंव वेगळें अल्प आवडे । मग होय सिंधूचि एवढें । मिळे तेव्हां ॥ ३५ ॥ तैसें संकल्पोनि काढिलें । जयाचें मनचि चैतन्य जाहलें । तेणें एकदेशियें परी व्यापिलें । लोकत्रय ॥ ३६ ॥ आतां कर्ता कर्म करावें । हे खुंटलें तया स्वभावें । आणि करी जन्हीं आघवें । तन्हीं अकर्ता तो ॥ ३७ ॥

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् । पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ॥ ८ ॥

प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि । इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥ ९ ॥

जे पार्था तया देहीं । मी ऐसा आठऊ नाहीं । तरी कर्तृत्व कैचें काई । उरे सांगे ॥ ३८ ॥ ऐसे तनुत्यागेंवीण । अमूर्ताचे गुण । दिसती संपूर्ण । योगयुक्ता ॥ ३९ ॥ एन्हवीं आणिकांचिये परी । तोही एक शरीरी । अशेषेंही व्यापारी । वर्ततु दिसे ॥ ४० ॥ तोही नेत्री पाहे । श्रवणीं ऐकतु आहे । परि तेथींचा सर्वथा नोहे । नवल देखें ॥ ४१ ॥ स्पर्शासि तरी जाणे । परिमळु सेवी घ्राणें । अवसरोचित बोलणें । तयाहि आथी ॥ ४२ ॥ आहारातें स्वीकारी । त्यजावें ते परिहरी । निद्रेचिया अवसरीं । निदिजे सुखें ॥ ४३ ॥ आपुलेनि इच्छावशें । तोहि गा चालतु दिसे । पैं सकळ कर्म ऐसें । राहाटे कीर ॥ ४४ ॥ हें सांगों काई एकैक । देखें श्वासोश्वासादिक । आणि निमिषोन्मिष । आदिकरूनि ॥ ४५ ॥ पार्था तयाचां ठायीं । हें आघवेंचि आथि पाही । परी तो कर्ता नव्हे कांहीं । प्रतीतिबळें ॥ ४६ ॥ जैं भ्रांतिसेजे सुतला । तैं स्वप्नसुखें भुतला । मग तो ज्ञानोदयीं चेइला । म्हणोनिया ॥ ४७ ॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥ १० ॥

आतां अधिष्ठानसंगती । अशेषाही इंद्रियवृत्ती । आपुलालिया अर्थी । वर्तत आहाती ॥ ४८ ॥ दीपाचेनि प्रकाशें । गृहींचे व्यापार जैसे । देहीं कर्मजात तैसें । योगयुक्ता ॥ ४९ ॥ तो कर्मे करी सकळें । परी कर्मबंधा नाकळे । जैसें न सिंपे जळीं जळें पद्मपत्र ॥ ५० ॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि । योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वात्मशुद्धये ॥ ११ ॥

देखें बुद्धीची भाष नेणिजे । मनाचा अंकुर नुदैजे । ऐसा व्यापारु तो बोलिजे । शारीरु गा ॥ ५१ ॥ हेंचि मराठें परियेशीं । तरी बाळकाची चेष्टा जैशी । योगिये कर्मे करिती तैशीं । केवळ

तनू ॥ ५२ ॥ मग पांचभौतिक संचलें । जेव्हा शरीर असे निदेलें । तेथ मनचि राहाटे एकलें । स्वप्नीं जेवी ॥ ५३ ॥ नवल ऐकें धनुर्धरा । कैसा वासनेचा संसारा । देहा होऊं नेदी उजगरा । परी सुखदुःखे भोगी ॥ ५४ ॥ इंद्रियांच्या गांवीं नेणिजे । ऐसा व्यापारु जो निपजे । तो केवळ गा म्हणिजे । मानसाचा ॥ ५५ ॥ योगिये तोहि करिती । परी कर्मे तेणें न बंधिजती । जे सांडिली आहे संगती । अहंभावाची ॥ ५६ ॥ आतां जाहालिया भ्रमहत । जैसे पिशाचाचें चित्त । मग इंद्रियांचें चेष्टित । विकळु दिसे ॥ ५७ ॥ स्वरूप तरी देखे । आळविलें आइके । शब्दु बोले मुखें । परी ज्ञान नाहीं ॥ ५८ ॥ हें असो काजेंविण । जें जें कांही कारण । तें केवळ कर्म जाण । इंद्रियांचें ॥ ५९ ॥ मग सर्वत्र जें जाणतें । ते बुद्धीचें कर्म निरुतें । वोळख अर्जुनातें । म्हणे हरी ॥ ६० ॥ ते बुद्धि धुरे करूनी । कर्म करिती चित्त देउनी । परी ते नैष्कर्म्यापासुनी । मुक्त दिसती ॥ ६१ ॥ जे बुद्धीचिये ठावूनि देहीं । तयां अहंकाराची सेचि नाहीं । म्हणोनि कर्मेचि करितां पाहीं । चोखाळले ॥ ६२ ॥ अगा करितेनवीण कर्म । तेंचि तें निष्कर्म । हें जाणती सुवर्म । गुरुगम्य जें ॥ ६३ ॥ आतां शांतरसाचें भरितें । सांडित आहे पात्रातें । जे बोलणें बोलापरौतें । बोलवलें ॥ ६४ ॥ एथ इंद्रियांचा पांगु । जया फिटला आहे चांगु । तयासीचि आथि लागु । परिसावया ॥ ६५ ॥ हा असो अतिप्रसंगु । न संडी पां कथालागु । होईल श्लोकसंगतिभंगु । म्हणऊनियां ॥ ६६ ॥ जें मना आकळितां कुवाडें । घाघुसितां बुद्धी नातुडे । तें दैवाचेनि सुरवाडें । सांगवलें तुज ॥ ६७ ॥ जें शब्दातीत स्वभावें । तें बोलींचि जरी फावे । तरी आणिकें काय करावें । सांगें कथा ॥ ६८ ॥ हा आर्तिविशेषु श्रोतयांचा । जाणोनि दास निवृत्तिचा । म्हणे संवादु तया दोघांचा । परिसोनि परिसा ॥ ६९ ॥ मग कृष्ण म्हणे पार्थातें । आतां प्राप्ताचें चिन्ह पुरतें । सांगेन तुज निरुतें । चित्त देईं ॥ ७० ॥

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् । अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥ १२ ॥

तरी आत्मयोगें आथिला । जो कर्मफळाशीं विटला । तो घर रिघोन वरिला । शांती जगीं ॥ ७१ ॥ येरु कर्मबंधें किरीटी । अभिलाषाचिया गांठी । कळासला खुंटीं । फळभोगाचा ॥ ७२ ॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी । नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥

जैसा फळाचिये हावे । ऐसें कर्म करी आघवें । मग न कीजेचि येणें भावें । उपेक्षी जो ॥ ७३ ॥ तो जयाकडे वास पाहे । तेउती सुखाची सृष्टि होये । तो म्हणे तेथ राहे । महाबोधु ॥ ७४ ॥ नवद्वारें देहीं । तो असतुचि परि नाहीं । करितुचि न करी कांही । फलत्यागी ॥ ७५ ॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः । न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

जैसा कां सर्वेश्वरु । पाहिजे तंव निर्व्यापारु । परि तोचि रची विस्तारु । त्रिभुवनाचा ॥ ७६ ॥ आणि कर्ता ऐसें म्हणिपे । तरी कवणें कर्मी न शिंपे । जे हातुपावो न लिंपे । उदास वृत्तीचा ॥ ७७ ॥ योगनिद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा सळु न पडे । परी महाभूतांचें दळवाडें ।

उभारी भलें ॥ ७८ ॥ जगाचां जीवीं आहे । परी कवणाचा कहीं नोहे । जगाचि हें होये जाये । तो शुद्धीही नेणे ॥ ७९ ॥

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः । अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ १५ ॥

पापपुण्यें अशेषें । पासींचि असतु न देखे । आणि साक्षीही होऊं न ठके । येरी गोठी कायसी ॥ ८० ॥ पैं मूर्तीचेनि मेळें । तो मूर्तचि होऊनि खेळे । परि अमूर्तपण न मैळे । दादुलयाचें ॥ ८१ ॥ तो सृजी पाळी संहारी । ऐसें बोलती जें चराचरीं । तें अज्ञान गा अवधारी । पंडुकुमरा ॥ ८२ ॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः । तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥

तें अज्ञान जैं समूळ तुटे । तैं भ्रांतीचें मसैरें फिटे । मग अकर्तृत्व प्रगटे । मज ईश्वराचें ॥ ८३ ॥ एथ ईश्वरु एकु अकर्ता । ऐसें मानलें जरी चित्ता । तरी तोचि मी हें स्वभावता । आदीचि आहे ॥ ८४ ॥ ऐसेनि विवेकें उदो चित्तीं । तयासि भेदु कैंचा त्रिजगतीं । देखे आपुलिया प्रतीती । जगचि मुक्त ॥ ८५ ॥ जैशी पूर्वदिशेचां राऊळीं । उदया येतांचि सूर्यें दिवाळी । कीं येरींहि दिशा तियेचि काळीं । काळिमा नाहीं ॥ ८६ ॥

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः । गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥

बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान । ब्रह्मरूप भावी आपणा आपण । ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण । तत्परायण अहर्निशीं ॥ ८७ ॥ ऐसें व्यापक ज्ञान भलें । जयांचिया हृदयातें गिंवसित आलें । तयांचि समतादृष्टि बोलें । विशेषूं काई ॥ ८८ ॥ एक आपणपेंचि पां जैसें । ते देखती विश्व तैसें । हें बोलणें कायसें । नवलु एथ ॥ ८९ ॥ परी दैवे जैसें कवतिकें । कहींचि दैन्य न देखे । कां विवेकु हा नोळखे । भ्रांतीतें जेवीं ॥ ९० ॥ नातरी अंधकाराची वानी । जैसा सूर्यो न देखे स्वप्नीं । अमृत नायके कानीं । मृत्युकथा ॥ ९१ ॥ हें असो संतापु कैसा । चंद्रु न स्मरे जैसा । भूती भेदु नेणती तैसा । ज्ञानिये ते ॥ ९२ ॥

विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

मग हा मशकु हा गजु । कीं हा श्वपचु हा द्विजु । पैल इतरु हा आत्मजु । हें उरेल कें ॥ ९३ ॥ ना तरी हे धेनु हें श्वान । एक गुरु एक हीन । हें असो कैसें स्वप्न । जागतया ॥ ९४ ॥ एथ भेदु तरी कीं देखावा । जरी अहंभाव उरला होआवा । तो आधींचि नाहीं आघवा । आतां विषमु काई ॥ ९५ ॥

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः । निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥

म्हणोनि सर्वत्र सदा सम । ते आपणचि अद्वय ब्रह्म । हे संपूर्ण जाणे वर्म । समदृष्टीचें ॥ ९६ ॥ जिहीं विषयसंगु न सांडितां । इंद्रियांतें न दंडिता । परि भोगिली निसंगता । कामनेविण ॥ ९७ ॥ जिहीं लोकांचेनि आधारें । लौकिकेचि व्यापारें । पण सांडिलें निदसुरें । लौकिकु हें ॥ ९८ ॥ जैसा जनामाजि खेचरु । असतुचि जना नोहे गोचरु । तैसा शरीरी तो परि

संसारु । नोळखे तयांतें ॥ ९९ ॥ हें असो पवनाचेनि मेळें । जैसे जळींचि जळ लोळे । तें आणिकें म्हणती वेगळे । कल्लोळ हे ॥ १०० ॥ तैसें नामरूप तयाचें । एऱ्हवीं ब्रह्मचि तो साचें । मन साम्या आलें जयाचें । सर्वत्र गा ॥ १ ॥ ऐसेनि समदृष्टि जो होये । तया पुरुषा लक्षणही आहे । अर्जुना संक्षपें सांगेन पाहें । अच्युत म्हणे ॥ २ ॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् । स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥

तरी मृगजळाचेनि पूरें । जैसें न लोटिजे कां गिरिवरें । तैसा शुभाशुभीं न विकरे । पातलां जो ॥ ३ ॥ तोचि तो निरुता । समदृष्टि तत्त्वता । हरि म्हणे पंडुसुता । तोचि ब्रह्म ॥ ४ ॥

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् । स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ॥ २१ ॥

जया आपणपें सांडूनि कहीं । इंद्रियग्रामावरी येणेंचि नाहीं । तो विषय न सेवी हें काई । विचित्र येथ ॥ ५ ॥ सहजें स्वसुखाचेनि अपारें । सुरवाडलेनि अंतरें । रचिला म्हणऊनि बाहिरें । पाऊल न घाली ॥ ६ ॥ सांगे कुमुददळाचेनि तादें । जो जेविला चंद्रकिरणें चोखटें । तो चकोरु काई वाळुवंटें । चुंबितु आहे ॥ ७ ॥ तैसें आत्मसुख उपाइलें । जयासि आपणपांचि फावलें । तया विषय सहज सांडवले । सांगों काई ॥ ८ ॥ एऱ्हवीं तरी कौतुकें । विचारूनि पाहें पां निकें । या विषयांचेनि सुखें । झकवती कवण ॥ ९ ॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते । आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

जिहीं आपणपें नाहीं देखिलें । तेचि इहीं इंद्रियार्थी रंजले । जैसें रंक कां आळुकैलें । तुषांतें सेवी ॥ ११० ॥ नातरी मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरोनि जळांतें । मग तोयबुद्धी बरडीतें । ठाकूनि येती ॥ ११ ॥ तैसें आपणपें नाहीं दिठे । जयातें स्वसुखाचे सदा खरांटे । तयासीचि विषय हे गोमटे । नावडती ॥ १२ ॥ एऱ्हवीं विषयीं काई सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे । तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाजीं ॥ १३ ॥ सांगें वातवर्षआतपु धरे । ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे । तरी त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां ॥ १४ ॥ म्हणोनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे । जैसें महुर कां म्हणिजे । विषयकंदातें ॥ १५ ॥ नातरी भौमा नाम मंगळु । रोहिणीतें म्हणती जळु । तैसा सुखप्रवादु बरळु । विषयिकु हा ॥ १६ ॥ हे असो आघवी बोली । सांग पां सर्पफणीची साउली । ते शीतल होईल केतुली । मूषकासी ॥ १७ ॥ जैसा आमिषकवळु पांडवा । मीनु न सेवी तंवचि बरवा । तैसा विषयसंगु आघवा । निभ्रांत जाणें ॥ १८ ॥ हें विरक्तांचिये दिठी । जैं न्याहाळिजे किरीटी । तैं पांडुरोगाचिये पुष्टी । सारिखें दिसे ॥ १९ ॥ म्हणोनि विषयभोगीं जें सुख । तें साद्यंतचि जाण दुःख । परि काय करिती मूर्ख । न सेवितां न सरे ॥ १२० ॥ ते अंतर नेणती बापुडे । म्हणोनि अगत्य सेवणें घडे । सांगें पूयपंकींचे किडे । काय चिळसीं घेती ॥ २१ ॥ तयां दुःखियां दुःखचि जिव्हार । ते विषयकर्दमींचे दर्दुर । ते भोगजळातें जलचर । सांडिती केवीं ॥ २२ ॥

आणि दु:खयोनि जिया आहाती । तिया निरर्थका तरी नव्हती । जरी विषयांवरी विरक्ति । धरिती जीव ॥ २३ ॥ नातरी गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे कष्ट । हे विसांवेनवींण वाट । वाहावी कवणें ॥२४॥ जरी विषयीं विषयो सांडिजेल । तरी महादोषीं कें वसिजेल । आणि संसारु हा शब्दु नव्हेल । लटिका जगीं ॥ २५ ॥ म्हणोनि अविद्याजात नाथिलें । ते तिहींचि साच दाविलें । जिहीं सुखबुद्धी घेतलें । विषयदु:ख ॥ २६ ॥ या कारणें गा सुभटा । हा विचारितां विषय वोखटा । तूं झणें कहीं या वाटा । विसरोनि जाशी ॥ २७ ॥ पैं यातें विरक्त पुरुष । त्याजितीं कां जैसें विष । निराशां तयां दु:ख । दाविलें नावडे ॥ २८ ॥

शक्नोतीहैव य: सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् । कामक्रोधोद्भवं वेगं स युक्त: स सुखी नर: ॥ २३ ॥

ज्ञानियाचां हन ठायीं । यांची मातुही कीर नाहीं । देहीं देहभावो जिहीं । स्ववश केले ॥ २९ ॥ जयांतें बाह्याची भाष । नेणिजेचि नि:शेष । अंतरी सुख । एक आथि ॥ १३० ॥ परी तें वेगळेपणें भोगिजे । जैसें पक्षियें फळ चुंबिजे । तैसे नव्हे तेथ विसरिजे । भोगितेपणही ॥ ३१ ॥ भोगीं अवस्था एकी उठी । ते अहंकाराचा अचळु लोटी । मग सुखेंसि घे आंठी । गाढेपणें ॥ ३२ ॥ तिये आलिंगनमेळीं । होय आपेंआप कवळी । तेथ जळ जैसें जळीं । वेगळें न दिसे ॥ ३३ ॥ कां आकाशीं वायु हारपे । तेथ दोन्ही हे भाष लोपे । तैसें सुखचि उरें स्वरूपें । सुरतीं तिये ॥ ३४ ॥ ऐशी द्वैताची भाष जाये । मग म्हणों जरी एकचि होये । तरी तेथ साक्षी कवणु आहे । जाणतें जें ॥ ३५ ॥

योऽन्त:सुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव य: । स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषय: क्षीणकल्मषा: । छिन्नद्वैधा यतात्मान: सर्वभूतहिते रता: ॥ २५ ॥

म्हणोनि असो हें आघवें । एथ न बोलणे काय बोलावें । ते खुणचि पावेल स्वभावें । आत्माराम ॥ ३६ ॥ जे ऐसेनि सुखें मातले । आपणपांचि आपण गुंतलें । ते मी जाणें निखळ वोतले । सामरस्याचे ॥ ३७ ॥ ते आनंदाचे अनुकार । सुखाचे अंकुर । की महाबोधे विहार । केले जैसे ॥ ३८ ॥ ते विवेकाचे गांव । कीं परब्रह्मींचे स्वभाव । नातरी अळंकारले अवयव । ब्रह्मविद्येचे ॥ ३९ ॥ ते सत्त्वाचे सात्त्विक । कीं चैतन्याचे आंगिक । हें बहु असो एकैक । वानिसी काई ॥ १४० ॥ तूं संतस्तवनीं रतसी । तरी कथेची से न करिसी । कीं निराळीं बोल देखसी । सनागर ॥ ४१ ॥ परि तो रसातिशयो मुकुळीं । मग ग्रंथार्थदीपु उजळीं । करीं साधुहृदयराउळीं । मंगळ उखा ॥ ४२ ॥ ऐसा गुरूचां उवायिला । निवृत्तिदासासी पातला । मग तो म्हणे कृष्ण बोलिला । तेंचि आइका ॥ ४३ ॥ अर्जुना अनंत सुखाचां डोहीं । एकसरा तळुचि घेतला जिहीं । मग स्थिराऊनि तेही । तेंचि जाहले ॥ ४४ ॥ अथवा आत्मप्रकाशें चोखें । जो आपणपेंचि विश्व देखे । तो देहेंचि परब्रह्म सुखें । मानूं येईल ॥ ४५ ॥ जें साचोकारें परम । ना तें अक्षर नि:सीम ।

जिये गांवींचे निष्काम । अधिकारिये ॥ ४६ ॥ जें महर्षीं वाढलें । विरक्तां भागा फिटलें । जें नि:संशया पिकलें । निरंतर ॥ ४७ ॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् । अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥

जिही विषयांपासोनि हिरतले । चित्त आपुलें आपण जिंतिलें । तें निश्चित जेथ सुतले । चेतीचिना ॥ ४८ ॥ तें परब्रह्म निर्वाण । जें आत्मविदांचें कारण । तेंचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ॥ ४९ ॥ ते ऐसे कैसेनि जाहले । जे देहींचि ब्रह्मत्वा आले । हें ही पुससी तरी भलें । संक्षेपें सांगों ॥ १५० ॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो: । प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥ २७ ॥

तरी वैराग्याचेनि आधारें । जिहीं विषय दवडुनि बाहिरें । शरीरीं एकंदरें । केलें मन ॥ ५१ ॥ सहजें तिहीं संधी भेटी । जेथ भ्रूपल्लवां पडे गांठी । तेथ पाठिमोरी दिठी । पारखोनियां ॥ ५२ ॥ सांडूनि दक्षिणवाम । प्राणापान सम । चित्तेंसी व्योम - । गामिये करिती ॥ ५३ ॥

यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायण: । विगतेच्छाभयक्रोधो य: सदा मुक्त एव स: ॥ २८ ॥

तेथ जैसी रथ्योदकें सकळे । घेऊनि गंगा समुद्रीं मिळे । मग एकैक वेगळें । निवडूं नये ॥ ५४ ॥ तैसी वासनांतराची विवंचना । मग आपैसी पारुखे अर्जुना । जे वेळीं गगनीं लयो मना । पवनें कीजे ॥ ५५ ॥ जेथ हे संसारचित्र उमटे । तो मनोरूपु पटु फाटे । जैसें सरोवर आटे । मग प्रतिमा नाहीं ॥ ५६ ॥ तैसें मनपण मुदल जाये । मग अहंभावादिक कें आहे । म्हणोनि शरीरेंचि ब्रह्म होये । अनुभवी तो ॥ ५७ ॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् । सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥ २९ ॥

आम्हीं मागां हन सांगितलें । जें देहींचि ब्रह्मत्व पावले । ते येणें मार्गें आले । म्हणऊनियां ॥ ५८ ॥ आणि यमनियमांचे डोंगर । अभ्यासाचे सागर । क्रमोनि हे पार । पातले ते ॥ ५९ ॥ तिहीं आपणपें करूनि निर्लेप । प्रपंचाचें घेतलें माप । मग साच शांतीचेंचि रूप । होऊनि ठेले ॥ १६० ॥ ऐसा योगयुक्तीचा उद्देशु । जेथ बोलिला हृषीकेशु । तेथ अर्जुनु सुदंशु । म्हणोनि चमत्कारला ॥ ६१ ॥ तें देखिलिया कृष्णें जाणितलें । मग हांसोनि पार्थातें म्हणितलें । तें काई पां चित्त उवाईलें । इये बोलीं तुझे ॥ ६२ ॥ तंव अर्जुन म्हणे देवो । परचित्तलक्षणांचा रावो । भला जाणितला जी भावो । मानसु माझा ॥ ६३ ॥ म्यां जें काहीं विवरूनि पुसावें । तें आधींचि कळिलें देवें । तरी बोललें तेंचि सांगावें । विवळ करूनि ॥ ६४ ॥ एन्हवीं तरी अवधारा । जो दाविला तुम्हीं अनुसारा । तो पव्हण्याहूनि पायउतारा । सोहपा जैसा ॥ ६५ ॥ तैसा सांख्याहूनि प्रांजळा । आम्हांसारिखियां अबळां । एथ आहाति कांही परि काळा । तो साहों ये वर ॥ ६६ ॥ म्हणोनि एक वेळ देवा । तोचि पडताळा घेयावा । विस्तरेल तरी सांगावा । साद्यंतुचि ॥ ६७ ॥ तंव कृष्ण म्हणती हो कां । तुज हा मार्गु गमला निका । तरी काय जाहलें ऐकीजो कां । सुखें

बोलों ॥ ६८ ॥ अर्जुना तूं परिससी । परिसोनि अनुष्ठिसी । तरी आम्हासींचि वानी कायसी । सांगावयाची ॥ ६९ ॥ आधींच चित्त मायेचें । वरी मिष जाहलें पढियंतयाचे । आतां तें अद्‌भुतपण स्नेहाचें । कवण जाणे ॥ १७० ॥ ते म्हणों कारुण्यरसाची वृष्टी । कीं नवया स्नेहाची सृष्टि । हें असो नेणिजे दृष्टी । हरीची वानूं ॥ ७१ ॥ जें अमृताची वोतली । कीं प्रेमचि पिऊनि मातली । म्हणोनि अर्जुनमोहें गुंतली । निघों नेणे ॥ ७२ ॥ हें बहु जें जें जल्पिजेल । तेथें कथेसि फांकु होईल । परि तें स्नेह रूपा नयेल । बोलवरी ॥ ७३ ॥ म्हणोनि विसुरा काय येणें । तो ईश्वरु आकळावा कवणें । जो आपुलें मान नेणे । आपणचि ॥ ७४ ॥ तरी मागीला ध्वनीआंतु । मज गमला सावियाचि मोहितु । जे बलात्कारें असे म्हणतु । परिस बापा ॥ ७५ ॥ अर्जुना जेणें भेदें । तुझें कां चित्त बोधे । तैसें तैसें विनोदें । निरूपिजेल ॥ ७६ ॥ तो काइसया नाम योगु । तयाचा कवण उपेगु । अथवा अधिकारप्रसंगु । कवणा येथ ॥ ७७ ॥ ऐसें जें जें कांहीं । उक्त असे इये ठाईं । तें आघवेंचि पाहीं । सांगेन आतां ॥ ७८ ॥ तू चित्त देऊनि अवधारीं । ऐसें म्हणोनि श्रीहरी । बोलिजेल ते पुढारी । कथा आहे ॥ ७९ ॥ श्रीकृष्ण अर्जुनासी संगु । न सांडोनि सांगेल योगु । तो व्यक्त करूं प्रसंगु । म्हणें निवृत्तिदासु ॥ १८० ॥

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
कर्मसंन्यासयोगोनाम पञ्चमोऽध्यायः ॥ (श्लोक २९; ओव्या १८०)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय सहावा)

मग रायातें म्हणे संजयो । तोचि अभिप्रावो अवधारिजो । कृष्ण सांगती जो । योगरूप ॥ १ ॥ सहजें ब्रह्मरसाचें पारणें । केलें अर्जुनालागी नारायणें । कीं तेचि अवसरी पाहुणे । पातलों आम्ही ॥ २ ॥ कैसी दैवाची थोरी नेणिजे । जैसें तान्हेलिया तोय सेविजे । कीं तेंचि चवी करुनि पाहिजे । तंव अमृत आहे ॥ ३ ॥ तैसें आम्हां तुम्हां जाहलें । जें आडमुठीं तत्त्व फावलें । तंव धृतराष्ट्रें म्हणितलें । हें न पुसों तूंतें ॥ ४ ॥ तया संजया येणें बोलें । रायाचें हृदय

चोजवलें । जें अवसरीं आहे घेतलें । कुमारांचिया ॥ ५ ॥ हें जाणोनि मनीं हांसिला । म्हणे म्हातारा मोहें नाशिला । एऱ्हवीं बोलु तरी भला जाहला । अवसरीं इये ॥ ६ ॥ परि तें तैसें कैसेनि होईल । जात्यंधा कैसें पाहेल । तेवींचि येरु सें घेईल । म्हणोनि बिहे ॥ ७ ॥ परि आपण चित्तीं आपुलां । निकियापरी संतोषला । जे तो संवादु फावला । कृष्णार्जुनांचा ॥ ८ ॥ तेणें आनंदाचेनि धालेपणें । साभिप्राय अंत:करणें । आतां आदरेंसी बोलणें । घडेल तया ॥ ९ ॥ तो गीतेमाजि षष्ठींचा । प्रसंगु असे आयणीचा । जैसा क्षीरार्णवीं अमृताचा । निवाडु जाहला ॥ १० ॥ तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधूचें पार । नाना योगविभवभांडार । उघडलें कां ॥ ११ ॥ जें आदिप्रकृतीचें विसवणें । जें शब्दब्रह्मासि न बोलणें । जेथूनि गीतावल्लीचें ठाणें । प्ररोहो पावे ॥ १२ ॥ तो अध्याय हा सहावा । वरि साहित्याचिया बरवा । सांगिजेल म्हणोनि परिसावा । चित्त देऊनी ॥ १३ ॥ माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजासीं जिंकें । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १४ ॥ जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे । वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ १५ ॥ ऐसा रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा । बोलें इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ॥ १६ ॥ सहजें शब्दु तरी विषयो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसु आमुचा । घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥ १७ ॥ नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी । ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ॥ १८ ॥ जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें । बोलु भुजाही अविष्करे । आलिंगावयां ॥ १९ ॥ ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी । जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ॥ २० ॥ तैसे शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण । पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणींचे ॥ २१ ॥ हे असो तया बोलाचीं ताटें भली । वरी कैवल्यरसें वोगरलीं । ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥ २२ ॥ आतां आत्मप्रभा नीच नवी । तेचि करूनी ठाणदिवी । जो इंद्रियांतें चोरूनि जेवीं । तयासीचि फावे ॥ २३ ॥ येथ श्रवणाचेनि पांगें - । वीण श्रोतयां व्हावे लागे । हे मनाचेनि निजांगें । भोगिजे गा ॥ २४ ॥ आहाच बोलाचि वालीफ फेडिजे । आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे । मग सुखेंसी सुरवाडिजे । सुखाचिमाजि ॥ २५ ॥ ऐसें हळुवारपण जरी येईल । तरीच हे उपेगा जाईल । एरव्ही आघवी गोठी होईल । मुक्याबहिरयाची ॥ २६ ॥ परी तें असो आतां आघवें । नलगे श्रोतयांतें कडसावें । जे एथ अधिकारिये स्वभावें । निष्कामकाम ॥ २७ ॥ जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी । तेवांचूनि एथींची गोडी । नेणती आणिक ॥ २८ ॥ जैसा वायसीं चंद्र नोळखिजे । तैसा ग्रंथु हा प्राकृतीं नेणिजे । आणि तो हिमांशुचि जेविं खाजें । चकोराचें ॥ २९ ॥ तैसा सज्ञानासी तरी हा ठावो । आणि अज्ञानासी आन गांवो । म्हणोनि बोलावया विषय पाहा हो । विशेषें नाहीं

॥ ३० ॥ परि अनुवादला मीं प्रसंगें । तें सज्जनी उपसाहावें लागे । आतां सांगेन काय श्रीरंगें । निरोपिलें जें ॥ ३१ ॥ तें बुद्धीही आकळितां सांकडें । म्हणऊनि बोलीं विपायें सांपडे । परी निवृत्तिकृपादीपउजियेडें । देखेन मी ॥ ३२ ॥ जें दिठीही न पविजे । तें दिठीविण देखिजे । जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ॥ ३३ ॥ ना तरी धातुवादाही न जोडे । तें लोहींचि पंधरें सांपडे । जरी दैवयोगें चढे । परिसु हातां ॥ ३४ ॥ तैसी सद्गुरुकृपा होये । तरी करितां काय आपु नोहे । म्हणऊनि ते अपार मातें आहे । ज्ञानदेवो म्हणे ॥ ३५ ॥ तेणें कारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन । अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवीं ॥ ३६ ॥ आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य । वसती जेथ ॥ ३७ ॥ म्हणोनि तो भगवंतु । जो निःसंगाचा सांगातु । तो म्हणे पार्था दत्तचित्तु । होईं आतां ॥ ३८ ॥

श्रीभगवानुवाच : अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥

आईकें योगी आणि संन्यासी जनीं । हे एकचि सिनाने झणीं मानीं । एऱ्हवी विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ॥ ३९ ॥ सांडिजे दुजया नामाचा आभासु । तरी योगु तोचि संन्यासु । पाहतां ब्रह्मीं नाहीं अवकाशु । दोहींमाजी ॥ ४० ॥ जैसें नामाचेनि अनारिसेपणें । एका पुरुषातें बोलावणें । कां दोहीं मार्गीं जाणें । एकाचि ठाया ॥ ४१ ॥ ना तरी एकचि उदक सहजें । परि सिनानां घटीं भरिजे । तैसें भिन्नत्व हें जाणिजे । योगसंन्यासांचें ॥ ४२ ॥ आइकें सकळ संमतें जगीं । अर्जुना गा तोचि योगी । जो कर्मे करूनि रागी । नोहेचि फळीं ॥ ४३ ॥ जैसी मही हे उद्भिजें । जनी अहंबुद्धीवीण सहजें । आणि तेथिंचीं तियें बीजें । अपेक्षीना ॥ ४४ ॥ तैसा अन्वयाचेनि आधारें । जातीचेनि अनुकारें । जें जेणें अवसरें । करणें पावे ॥ ४५ ॥ तें तैसेंचि उचित करी । परी साटोपु नोहे शरीरीं । आणि बुद्धिही करोनि फळवेरीं । जायेचिना ॥ ४६ ॥ ऐसा तोचि संन्यासी । पार्था गा परियेसीं । तोचि भरंवसेनिसीं । योगीश्वरु ॥ ४७ ॥ वांचूनि उचित कर्म प्रासंगिक । तयातें म्हणे हें सांडावें बद्धक । तरी टांकोटांकीं आणिक एक । मांडीचि तो ॥ ४८ ॥ जैसा क्षाळुनियां लेपु एकु । सवेंचि लाविजे आणिकु । तैसेनि आग्रहाचा पाइकु । विचंबे वायां ॥ ४९ ॥ गृहस्थाश्रमाचें ओझें । कपाळीं आधींचि आहे सहजें । कीं तेंचि संन्याससवा ठेविजे । सरिसें पुढती ॥ ५० ॥ म्हणुनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ॥ ५१ ॥

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव । न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥

ऐकें संन्यासी तोचि योगी । ऐसी एकवाक्यतेची जे जगीं । गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरीं ॥ ५२ ॥ जेथ संन्यासिला संकल्पु तुटे । तेथेंचि योगाचें सार भेटे । ऐसें हें अनुभवाचेनि धटें । साचें जया ॥ ५३ ॥

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते । योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥

आतां योगाचळाचा निमथा । जरी ठाकावा आथि पार्था । तरी सोपाना या कर्मपथा । चुका झणीं ॥ ५४ ॥ येणें यमनियमांचेनि तळवटें । रिगे आसनाचिये पाऊलवाटे । येई प्राणायामाचेनि आडकंठें । वरौता गा ॥ ५५ ॥ मग प्रत्याहाराचा आधाडा । जो बुद्धिचियाहि पाया निसरडा । जेथ हटिये सांडिती होडा । कडेलग ॥ ५६ ॥ तरी अभ्यासाचेनि बळें । प्रत्याहारीं निराळे । नखी लागेल ढाळें ढाळें । वैराग्याची ॥ ५७ ॥ ऐसां पवनाचेनि पाठारें । येतां धारणेचेनि पैसारें । क्रमी ध्यानाचें चवरें । सांपडे तंव ॥ ५८ ॥ मग तया मार्गाची धांव । पुरेल प्रवृत्तीची हांव । जेथ साध्यसाधना खेंव । समरसें होय ॥ ५९ ॥ जेथ पुढील पैस पारुखे । मागील स्मरावें तें ठाके । ऐसिये सरिसीये भूमिके । समाधि राहे ॥ ६० ॥ येणें उपायें योगारूढु । जो निरवधि जाहला प्रौढु । तयांचिया चिन्हांचा निवाडु । सांगेन आइकें ॥ ६१ ॥

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते । सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥

तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा । जो आत्मबोधाचियां वोवरां । पहुडला असे ॥ ६२ ॥ जयाचें सुखदुःखाचेनि आंगें । झगटलें मानस चेवो नेघे । विषय पासींही आलिया से न रिघे । हें काय म्हणऊनि ॥ ६३ ॥ इंद्रिये कर्माचां ठायीं । वाढीनलीं परि कहीं । फळहेतूची चाड नाही । अंतःकरणी ॥ ६४ ॥ असतेनि देहें येतुला । जो चेतुचि दिसे निदेला । तोचि योगारूढु भला । वोळखें तूं ॥ ६५ ॥ तेथ अर्जुन म्हणे अनंता । हें मज विस्मो बहु आइकतां । सांगे तया ऐसी हे योग्यता । कवणें दीजे ॥ ६६ ॥

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥

तंव हांसोनि कृष्ण म्हणे । तुझें नवल ना हें बोलणें । कवणासि काय दीजेल कवणें । येथ अद्वैतीं इये ॥ ६७ ॥ पैं व्यामोहाचिया शेजे । बळिया अविद्या निद्रित होईजे । ते वेळीं दुःस्वप्न हा भोगिजे । जन्ममृत्यूंचा ॥ ६८ ॥ पाठी अवसांत ये चेवो । तैं तें अवघेंचि होय वावो । ऐसा उपजे नित्य सद्भावो । तोही आपणपांचि ॥ ६९ ॥ म्हणऊनि आपणचि आपणपेया । घातु कीजतु असे धनंजया । चित्त देऊनि नाथिलिया । देहाभिमाना ॥ ७० ॥

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः । अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥

हा विचारूनि अहंकारु सांडिजे । मग असतीच वस्तु होईजे । तरी आपली स्वस्ति सहजें । आपण केली ॥ ७१ ॥ एऱ्हवीं कोशकीटकाचिया परी । तो आपणपया आपण वैरी । जो आत्मबुद्धि शरीरीं । चारुस्थळीं ॥ ७२ ॥ कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा अंधळेपणाचे डोहळे । कीं असते आपुले डोळे । आपण झांकी ॥ ७३ ॥ कां कवण एकु भ्रमलेपणें । मी तो नव्हें गा चोरलों म्हणे । ऐसा नाथिला छंदु अंतःकरणें । घेऊनि ठाके ॥ ७४ ॥ एरव्ही होय तें तोचि आहे । परि काई कीजे बुद्धि तैशी नोहे । देखा स्वप्नींचेनि घायें । कीं मरे साचे ॥ ७५ ॥ जैसी ते

शुकाचेनि अंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरे । तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ॥ ७६ ॥ वायांचि मान पिळी । अटुवें हियें आवळी । टिटांतु नळी । धरूनि ठाके ॥ ७७ ॥ म्हणे बांधला मी फुडा । ऐसिया भावनेचिया पडे खोडां । कीं मोकळिया पायांचा चवडा । गोंवी अधिकें ॥ ७८ ॥ ऐसा काजेंवीण आंतुडला । तो सांग पां काय आणिकें बांधला । मग नोसंडी जन्ही नेला । तोडूनि अर्धा ॥ ७९ ॥ म्हणऊनि आपणपेया आपणचि रिपु । जेणें वाढविला हा संकल्पु । येर स्वयंबुद्धी म्हणे बापु । जो नाथिलें नेघें ॥ ८० ॥

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः । शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ७ ॥

तया स्वांतःकरणजिता । सकळकामोपशांता । परमात्मा परौता । दुरीं नाहीं ॥ ८१ ॥ जैसा किडाळाचा दोषु जाये । तरी पंधरें तेंचि होये । तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ॥ ८२ ॥ हा घटाकारु जैसा । निमालिया तया अवकाशा । नलगे मिळों जाणें आकाशा । आना ठाया ॥ ८३ ॥ तैसा देहाहंकारु नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला । आधीचि आहे ॥ ८४ ॥ आतां शीतोष्णाचिया वाहणी । तेथ सुखदुःखांची कडसणी । इयें न समाती कांही बोलणीं । मानापमानाचीं ॥ ८५ ॥ जे जया वाटा सूर्यु जाये । तेउतें तेजाचें विश्व होये । तैसें तया पावे तें आहे । तोचि म्हणउनि ॥ ८६ ॥ देखें मेघौनि सुटती धारा । तिया न रुपती जैसिया सागरा । तैशीं शुभाशुभें योगीश्वरा । नव्हती आनें ॥ ८७ ॥

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः । युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः ॥ ८ ॥

जो हा विज्ञानात्मकु भावो । तया विवरितां जाहला वावो । मग लागला जंव पाहो । तंव ज्ञान तें तोचि ॥ ८८ ॥ आतां व्यापकु कीं एकदेशी । हे ऊहापोही जे ऐसी । ते करावी ठेली आपैसी । दुजेनवीण ॥ ८९ ॥ ऐसा शरीरीचि परि कौतुकें । परब्रह्माचेनि पाडें तुके । जेणें जिंतलीं एकें । इंद्रिये गा ॥ ९० ॥ तो जितेंद्रियु सहजें । तोचि योगयुक्तु म्हणिजे । जेणें सानें थोर नेणिजे । कवणे काळीं ॥ ९१ ॥ देखें सोनियाचें निखळ । मेरुयेसणें ढिसाळ । आणि मातियेचें डिखळ । सरिसेंचि मानी ॥ ९२ ॥ पाहतां पृथ्वीचें मोल थोडें । ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें । देखें दगडाचेनि पाडें । निचाडु ऐसा ॥ ९३ ॥

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु । साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥

तेथ सुहृद आणि शत्रु । कां उदासु आणि मित्रु । हा भावभेद विचित्रु । कल्पूं कैंचा ॥ ९४ ॥ तया बंधु कोण काह्याचा । द्वेषिया कवणु तयाचा । मीचि विश्व ऐसा जयाचा । बोधु जाहला ॥ ९५ ॥ मग तयाचिये दिठी । अधमोत्तम असे किरीटी । काय परिसाचिया कसवटी । वानिया कीजे ॥ ९६ ॥ ते जैशी निर्वाण वर्णुचि करी । तैशी जयाची बुद्धि चराचरीं । होय साम्याची उजरी । निरंतर ॥ ९७ ॥ जे ते विश्वालंकाराचे विसुरे । जरी आहाती आनानें आकारें । तरी घडले एकेंचि भांगारें । परब्रह्में ॥ ९८ ॥ ऐसें जाणणें जें बरवें । तें फावलें तया आघवें । म्हणोनि

आहाचवाहाचें न झकवे । येणें आकारचित्रें ॥ ९९ ॥ घापे पटामाजीं दृष्टी । दिसे तंतूंची सैंघ सृष्टी । परि तो एकवांचूनि गोठी । दुजी नाहीं ॥ १०० ॥ ऐसेनि प्रतीती हे गवसे । ऐसा अनुभव जयातें असे । तोचि समबुद्धी हें अनारिसें । नव्हे जाणें ॥ १ ॥ जयाचें नांव तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तीसि ठावो । जयाचेनि संगें ब्रह्मभावो । भ्रांतासी ॥ २ ॥ जयाचेनि बोलें धर्मु जिये । दिठी महासिद्धीतें विये । देखें स्वर्गसुखादि इयें । खेळु जयाचा ॥ ३ ॥ विपायें जरी आठवलें चित्ता । तरी दे आपुली योग्यता । हें असो तयातें प्रसंसितां । लाभु आथि ॥ ४ ॥

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः । एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥

पुढती अस्तवेना ऐसें । जया पाहलें अद्वैतदिवसें । मग आपणपांचि आपण असे । अखंडित ॥ ५ ॥ ऐसिया दृष्टी जो विवेकी । पार्था तो एकाकी । सहजें अपरिग्रही जे तिहीं लोकीं । तोचि म्हणऊनि ॥ ६ ॥ ऐसियें असाधारणें । निष्पन्नाचीं लक्षणें । आपुलेनि बहुवसपणें । कृष्ण म्हणे ॥ ७ ॥ तो ज्ञानियांचा बापु । देखणेयांचे दिठीचा दीपु । जया दादुलयाचा संकल्पु । विश्व रची ॥ ८ ॥ प्रणवाचिये पेठे । जाहलें शब्दब्रह्म मांजिठें । तें जयाचिये यशा धाकुटें । वेढूं न पुरे ॥ ९ ॥ जयाचेनि आंगिकें तेजें । आवो रविशशीचिये वणिजे । म्हणऊनि जग हें वेसजे - । वीण असे तया ॥ ११० ॥ हां गा नांवचि एक जयाचें । पाहतां गगनही दिसे टांचें । गुण एकेक काय तयाचे । आकळशील तूं ॥ १ ॥ म्हणोनि हें वानणें । सांगो नेणे कवणाचीं लक्षणें । दावावीं मिषें येणें । कां बोलिलों तें ॥ १२ ॥ ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी । ते ब्रह्मविद्या कीजेल उघडी । तरि अर्जुनु पढिये हे गोडी । नासेल हन ॥ १३ ॥ म्हणोनि तें तैसें बोलणें । नव्हे सपातळ आड लावणें । केलें मनचि वेगळवाणें । भोगावया ॥ १४ ॥ जया सोहंभाव हा अटकु । मोक्षसुखालागोनि रंकु । तयाचिये दिठीचा झणें कळंकु । लागेल तुझिया प्रेमा ॥ १५ ॥ विपायें अहंभाव ययाचा जाईल । मी तेंचि हा जरी होईल । तरि मग काय कीजेल । एकलेया ॥ १६ ॥ दिठीचि पाहतां निविजे । कां तोंड भरोनि बोलिजे । नातरी दाटूनि खेंव दीजे । ऐसें कोण आहे ॥ १७ ॥ आपुलिया मना बरवी । असमाई गोठी जीवीं । ते कवणेंसि चावळावी । जरी ऐक्य जाहलें ॥ १८ ॥ इया काकुळती जनार्दनें । अन्योपदेशाचेनि हातासनें । बोलामाजीं मन मनें । आलिंगूं सरलें ॥ १९ ॥ हें परिसतां जरी कानडें । तरी जाण पां पार्थ उघडें । कृष्णसुखाचेंचि रूपडें । वोतलें गा ॥ १२० ॥ हें असो वयसेचिये शेवटीं । जैसें एकचि विये वांझोटी । मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लागे ॥ २१ ॥ तैसें जाहले अनंता । ऐसें तरि मी न म्हणतां । जरी तयाचा न देखतां । अतिशयो एथ ॥ २२ ॥ पाहा पां नवल कैसे चोज । कें उपदेशु केउते झुंज । परि पुढें वालभाचें भोज । नाचत असे ॥ २३ ॥ आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी । पिसें आणि न भुलवी । तरी तेंचि काइ ॥ २४ ॥ म्हणऊनि भावार्थु तो ऐसा । अर्जुन मैत्रियेचा कुवासा । कीं सुखें शृंगारलिया मानसा । दर्पणु तो ॥ २५ ॥ यापरी बाप पुण्यपवित्र । जगीं

भक्तिबीजासि सुक्षेत्र । तो कृष्णकृपे पात्र । याचिलागीं ॥ २६ ॥ हो कां आत्मनिवेदनातळींची । जे पीठिका आहे सख्याची । पार्थु अधिष्ठात्री तेथिंची । मातृका गा ॥ २७ ॥ पासींचि गोसावी वर न वानिजे । मग पाइकाचा गुण घेईजे । ऐसा अर्जुनचि तो सहजें । पढिये हरी ॥ २८ ॥ पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे । ते पतीहीहूनि काय न वर्णिजे । पतिव्रता ॥ २९ ॥ तैसा अर्जुनुचि विशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा । जे तो त्रिभुवनींचिया दैवा । एकायतनु जाहला ॥ १३० ॥ जयाचिया आवडीचेनि पांगें । अमूर्तुही मूर्ति आवगे । पूर्णाहि परी लागे । अवस्था जयाची ॥ ३१ ॥ तंव श्रोते म्हणती दैव । कैसी बोलाची हवाव । काय नादातें हन बरव । जिणोनी आली ॥ ३२ ॥ हां हो नवल नोहे देशी । मन्हाटी बोलिजे तरी ऐसी । वाणें उमटताहे आकाशीं । साहित्यरंगाचें ॥ ३३ ॥ कैसें उन्मेखचांदिणें तार । आणि भावार्थ पडे गार । हेचि श्लोकार्थकुमुदी तरी फार । साविया होती ॥ ३४ ॥ चाडचि निचाडां करी । ऐसी मनोरथीं ये थोरी । तेणें विवळलें अंतरीं । तेथ डोलु आला ॥ ३५ ॥ तें निवृत्तिदासें जाणितलें । मग अवधान द्या म्हणितलें । नवल पांडवकुळीं पाहलें । कृष्णदिवसें ॥ ३६ ॥ देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला । कीं शेखीं उपेगा गेला । पांडवासी ॥ ३७ ॥ म्हणऊनि बहु दिवस वोळगावा । कां अवसरु पाहोनि विनवावा । हाहीं सोसु तया सदैवा । पडेचिना ॥ ३८ ॥ हें असो कथा सांगे वेगीं । मग अर्जुन म्हणे सलगी । देवा इयें संतचिन्हें हन आंगी । न ठकती माझां ॥ ३९ ॥ एन्हवीं या लक्षणांचिया निजसारा । मी अपाडें कीर अपुरा । परि तुमचेनि बोलें अवधारा । थोरावें जरी ॥ १४० ॥ जी तुम्ही चित्त देयाल । तरी ब्रह्म मियां होईल । काय जहालें अभ्यासिजेल । सांगाल तें ॥ ४१ ॥ हां हो नेणों कवणाची कहाणी । आइकोनि श्लाघ्यत असों अंत:करणीं । ऐसी जाहलेपणाची शिरयाणी । कायसी देवा ॥ ४२ ॥ हें आंगें म्यां होईजो कां । येतुलें गोसावी आपुलेंपणें कीजो का । तंव हासोनि कृष्ण हो कां । करू म्हणती ॥ ४३ ॥ देखा संतोषु एक न जोडे । तंवचि सुखाचें सैंघ सांकडें । मग जोडिलिया कवणेकडे । अपुरें असें ॥ ४४ ॥ तैसा सर्वेश्वरु बळिया सेवकें । म्हणोनि ब्रह्महीं होय तो कौतुकें । परि कैसा भारें आतला पिके । दैवाचेनि ॥ ४५ ॥ जो जन्मसहस्त्रांचियांसाठीं । इंद्रादिकांही महागु भेटी । तो आधीनु केतुला किरीटी । जे बोलुही न साहे ॥ ४६ ॥ मग ऐका जें पांडवें । म्हणितलें ब्रह्म म्यां होआवें । तें अशेषही देवें । अवधारिलें ॥ ४७ ॥ तेथ ऐसेंचि एक विचारिलें । जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहले । परि उदरा वैराग्य आहे आलें । बुद्धीचिया ॥ ४८ ॥ एन्हवीं दिवस तरी अपुरे । परी वैराग्यवसंताचेनि भरें । जे सोहंभावमहुरें । मोडोनि आला ॥ ४९ ॥ म्हणोनि प्राप्तिफळें फळतां । यासि वेळु न लागेल आतां । होय विरक्तु ऐसा अनंता । भरंवसा जाहला ॥ १५० ॥ म्हणे जें जें हा अधिष्ठील । तें आतां आरंभीच यया फळेल । म्हणोनि सांगितला न वचेल । अभ्यासु वायां ॥ ५१ ॥ ऐसें विवरोनियां श्रीहरी । म्हणितलें तिये अवसरीं । अर्जुना हा अवधारीं । पंथराजु

॥ ५२ ॥ तेथ प्रवृत्तितरूचां बुडीं । दिसती निवृत्तिफळाचिया कोडी । जिये मार्गींचा कापडी । महेशु आझुनी ॥ ५३ ॥ पैं योगिवृंदें वहिलीं । अडवीं आकाशीं निघालीं । कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं । धोरणु पडिला ॥ ५४ ॥ तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें । धांव घेतली एकसरें । की येर सकळ मार्ग निदसुरे । सांडुनिया ॥ ५५ ॥ पाठीं महर्षी येणें आले । साधकांचे सिद्ध जाहाले । आत्मविद थोरावले । येणेचि पंथें ॥ ५६ ॥ हा मार्गु जैं देखिजे । तैं तहान भूक विसरिजे । रात्रिदिवसु नेणिजे । वाटे इये ॥ ५७ ॥ चालतां पाऊल जेथ पडे । तेथ अपवर्गाची खाणी उघडे । आव्हांटलिया तरी जोडे । स्वर्गसुख ॥ ५८ ॥ निगिजे पूर्वीलिया मोहरा । कीं येईजे पश्चिमेचिया घरा । निश्चळपणें धनुर्धरा । चालणें एथिंचें ॥ ५९ ॥ येणें मार्गें जया ठायां जाइजे । तो गांवो आपणचि होईजे । हें सांगों काय सहजें । जाणसी तूं ॥ १६० ॥ तेथ म्हणितलें देवा । तरी तेंचि मग केव्हां । कां आर्तिसमुद्रौनि न काढावा । बुडतु जी मी ॥ ६१ ॥ तंव कृष्ण म्हणती ऐसें । हें उत्सृंखळ बोलणें कायसें । आम्ही सांगतसों आपैसें । वरि पुशिलें तुवां ॥ ६२ ॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः । नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥

तरी विशेषें आतांचि बोलिजेल । परि तें अनुभवें उपेगा जाईल । म्हणोनि तैसें एक लागेल । स्थान पाहावें ॥ ६३ ॥ जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे । वैराग्यासी दुणीव चढे । देखिलिया जें ॥ ६४ ॥ जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सावावो । मना होय उत्सावो । धैर्याचा ॥ ६५ ॥ अभ्यासुचि आपणयातें करी । हृदयातें अनुभव वरी । ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥ ६६ ॥ जया आड जाता पार्था । तपश्चर्या मनोरथा । पाखांडियाही आस्था । समूळ होय ॥ ६७ ॥ स्वभावें वाटें येतां । जरी वरपडा जाहला अवचितां । तरी सकामुही परि माघौता । निघों विसरें ॥ ६८ ॥ ऐसें न राहतयातें राहावी । भ्रमतयातें बैसवी । थापटूनि चेववी । विरक्तीतें ॥ ६९ ॥ हें राज्य वर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे । ऐसें शृंगारियांहि उपजे । देखतखेवों ॥ १७० ॥ जें येणें मानें बरवंट । आणि तैसेंचि अति चोखट । जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥ ७१ । आणिकही एक पाहावें । जें साधकीं वसतें होआवें । आणि जनाचेनि पायरवें । मैळेचिना ॥ ७२ ॥ जेथ अमृताचेनि पाडें । मुळेंहीसकट गोडें । जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ॥ ७३ ॥ पाउला पाउला उदकें । परि वर्षाकाळींही चोखें । निझरें कां विशेखें । सुलभे जेथ ॥ ७४ ॥ हा आतपुही अळुमाळु । जाणिजे तरी शीतळु । पवनु अति निश्चळु । मंद झुळके ॥ ७५ ॥ बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिगे श्वापद । शुक हन षट्पद । तेउते नाहीं ॥ ७६ ॥ पाणिलगें हंसें । दोनी चारी सारसें । कवणें एके वेळे बैसे । तरी कोकिळही हो ॥ ७७ ॥ निरंतर नाहीं । तरि आलीं गेलीं कांहीं । होतु कां मयुरेंही । आम्ही ना न म्हणों ॥ ७८ ॥ परि आवश्यक पांडवा । ऐसा ठावो जोडावा । तेथ निगूढ मठ होआवा । कां शिवालय ॥ ७९ ॥ दोन्हीं माजि आवडें तें । जें मानलें होय चित्तें । बहुतकरूनि

एकांते। बैसिजे गा॥ १८०॥ म्हणोनि तैसें ते जाणावें। मन राहतें पाहावें। राहेल तेथ रचावें। आसन ऐसें॥ ८१॥ वरी चोखट मृगसेवडी। माजी धूतवस्त्राची घडी। तळवटीं अमोडी। कुशांकुर॥ ८२॥ सकोमळ सरिसे। सुबद्ध राहती आपैसे। एकें पाडें तैसे। वोजा घालीं॥ ८३॥ परि सावियाचि उंच होइल। तरि आंग हन डोलेल। नीच तरी पावेल। भूमिदोषु॥ ८४॥ म्हणोनि तैसें न करावें। समभावें धरावें। हें बहु असो होआवें। आसन ऐसें॥ ८५॥

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः। उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये॥ १२॥

मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण। करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे॥ ८६॥ तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्त्विकें भरे। जंव कठिणपण विरे। अहंभावाचें॥ ८७॥ विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे। मनाची घडी घडे। हृदयामाजीं॥ ८८॥ ऐसें ऐक्य हें सहजें। फावें तंव राहिजे। मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी॥ ८९॥ आतां आंगातें आंग करी। पवनातें पवनुचि धरी। ऐसे अनुभवाचि उजरी। होंचि लागे॥ १९०॥ प्रवृत्ति माघौति मोहरे। समाधि ऐलाडी उतरे। आघवें अभ्यासूं सरे। बैसतखेवो॥ ९१॥ मुद्रेची प्रौढी ऐशी। तेचि सांगिजेल आतां परियेसीं। तरी उरु या जघनासी। जडोनि घालीं॥ ९२॥ चरणतळें देव्हडीं। आधारद्रुमाचां बुडीं। सुघटितें गाढीं। संचरीं पां॥ ९३॥ सव्य तो तळीं ठेविजे। तेणें सिवणीमध्यु पीडिजे। वरी बैसे तो सहजें। वामचरणु॥ ९४॥ गुदमेढ्रांआंतौतीं। चारी अंगुळें निगुतीं। तेथ सार्ध सार्ध प्रांतीं। सांडुनियां॥ ९५॥ माजि अंगुळ एक निगे। तेथ टांचेचेनि उत्तरभागें। नेहटिजे वरि आंगें। पेललेनि॥ ९६॥ उचलिलें कां नेणिजे। तैसें पृष्ठांत उचलिजे। गुल्फद्वय धरिजे। तेणेंचि मानें॥ ९७॥ मग शरीरसंचु पार्था। अशेषही सर्वथा। पार्ष्णीचा माथा। स्वयंभू होय॥ ९८॥ अर्जुना हें जाण। मूळबंधाचें लक्षण। वज्रासन गौण। नाम यासी॥ ९९॥ ऐसी आधारीं मुद्रा पडे। आणि आधींचा मार्गु मोडे। तेथ अपानु आंतलीकडे। वोहोटों लागे॥ २००॥

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः। सम्प्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्॥ १३॥

तंव करसंपुट आपैसें। वामचरणीं बैसे। बाहूमूळीं दिसे। थोरीव आली॥ १॥ माजि उभारलेनि दंडें। शिरकमळ होय गाढें। नेत्रद्वारींची कवाडें। लागूं पाहती॥ २॥ वरचिलें पातीं ढळतीं। तळींचीं तळीं पुंजाळती। तेथ अर्धोन्मीलित स्थिती। उपजे तया॥ ३॥ दिठी राहोनी आंतुलीकडे। बाहेर पाऊल घाली कोडें। ते ठायीं ठावो पडे। नासाग्रपीठीं॥ ४॥ ऐसें आंतुच्या आंतुचि रचे। बाहेरी मागुतें न वचे। म्हणोनि राहणें आधिये दिठीचें। तेथेंचि होय॥ ५॥ आतां दिशांची भेटी घ्यावी। कां रूपाची वाट पाहावी। हे चाड सरे आघवी। आपैसया॥ ६॥ मग कंठनाळ आटे। हनुवटी हे हडौती दाटे। ते गाढी होवोनि नेहटे। वक्षस्थळीं॥ ७॥ माजि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपे। तो जालंधरु म्हणिपे। पंडुकुमरा॥ ८॥ नाभी वरी पोखे। उदर हें थोके। अंतरीं फांके। हृदयकोशु॥ ९॥ स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं।

नाभिस्थानातळवटीं । बंधु पडे किरीटी । वोढियाणा तो ॥ २१० ॥

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः। मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

ऐसी शरीराबाहेरलीकडे । अभ्यासाची पाखर पडे । तंव आंतु त्राय मोडे । मनोधर्माची ॥ ११ ॥ कल्पना निमे । प्रवृत्ती शमे । आंग मन विरमे । सावियाचि ॥ १२ ॥ क्षुधा काय जाहली । निद्रा केऊती गेली । हे आठवणही हारपली । न दिसे वेगां ॥ १३ ॥ जो मूळबंधें कोंडला । अपानु माघौता मुरडला । तो सवेंचि वरी सांकडला । फुगु धरी ॥ १४ ॥ क्षोभलेपणें माजे । उवाइला ठायीं गाजे । मणिपूरेंसीं झुंजे । राहोनियां ॥ १५ ॥ मग थांवली ये वाहटुळी । सैंघ घेऊनि घरडहुळी । बाळपणींची कुहीटुळी । बाहेर घाली ॥ १६ ॥ भीतरीं वळी न धरे । कोठ्यामाजी संचरे । कफपित्तांचे थारे । उरों नेदी ॥ १७ ॥ धातूंचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फोडी । आंतली मज्जा काढी । अस्थिगत ॥ १८ ॥ नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी । साधकातें भेडसावी । परि बिहावें ना ॥ १९ ॥ व्याधीतें दावी । सवेंचि हरवी । आपपृथ्वी कालवी । एकवाट ॥ २२० ॥ तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा । शक्ती करी उजगरा । कुंडलिनीये ॥ २१ ॥ नागाचें पिलें । कुंकुमें नाहलें । वळण घेऊनि आलें । सेजें जैसें ॥ २२ ॥ तैशी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी । अधोमुख सर्पिणी । निदैली असे ॥ २३ ॥ विद्युल्लतेची विडी । वह्निज्वाळांची घडी । पंधरेयाची चोखडी । घोंटीव जैशी ॥ २४ ॥ तैसी सुबद्ध आटली । पुटीं होती दाटली । तें वज्रासनें चिमुटली । सावध होय ॥ २५ ॥ तेथ नक्षत्र जैसें उलंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें । तेजाचे बीज विरूढलें । अंकुरेंशीं ॥ २६ ॥ तैशी वेढियातें सोडितीं । कवतिकें आंग मोडिती । कंदावरी शक्ती उठली दिसे ॥ २७ ॥ सहजें बहुतां दिवसांची भूक । वरि चेववियली तें होय मिष । मग आवेशें पसरी मुख । ऊर्ध्वा उजू ॥ २८ ॥ तेथ हृदयकोशातळवटीं । जो पवनु भरे किरीटी । तया सगळेयाचि मिठी । देऊनि घाली ॥ २९ ॥ मुखींचां ज्वाळीं । तळीं वरी कवळी । मांसाची वडवाळी । आरोगूं लागे ॥ २३० ॥ जे जे ठाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस । पाठी एकदोनी घांस । हियाही भरी ॥ ३१ ॥ मग तळवे तळहात शोधी । ऊर्ध्वींचे खंड भेदी । झाडा घे संधी । प्रत्यंगाचा ॥ ३२ ॥ अधोभान तरी न संडी । परि नखींचेंही सत्त्व काढी । त्वचा धुऊनि जडी । पांजरेंशीं ॥ ३३ ॥ अस्थींचे नळे निरपे । शिरांचें हीर वोरपे । तंव बाहेरी विरूढी करपे । रोमबीजांची ॥ ३४ ॥ मग सप्तधातूंचां सागरीं । ताहानेली घोट भरी । आणि सवेंचि उन्हाळा करी । खडखडीत ॥ ३५ ॥ नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळें बारा । तो गचिये धरूनि माघारा । आंतु घाली ॥ ३६ ॥ तेथ अध वरौतें आकुंचे । ऊर्ध्व तळौतें खाचे । तया खेवामाजि चक्रांचे । पदर उरती ॥ ३७ ॥ एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंडलिनी नावेक दुश्चित होती । ते तयातें म्हणे परौती । तुम्हीचि कायसीं एथें ॥ ३८ ॥ आइकें पार्थिव धातु आघवी । आरोगितां कांहीं नुरवी । आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ॥ ३९ ॥ ऐसी दोनी भूतें खाये । ते

वेळीं संपूर्ण धाये। मग सौम्य होऊनि राहे। सुषुम्नेपाशीं ॥ २४० ॥ तेथ तृप्तीचेनि संतोषें। गरळ जें वमी मुखें। तेणें तियेचेचि पीयूषें। प्राणू जिये ॥ ४१ ॥ तो आगीआंतूनि निघे। परि सबाह्य निववूंचि लागे। ते वेळीं कसु बांधिती आंगें। सांडिला पुढती ॥ ४२ ॥ मार्ग मोडती नाडीचे। नवविधपण वायूचें। जाय म्हणऊनि शरीराचे। धर्मु नाहीं ॥ ४३ ॥ इडा पिंगळा एकवटती। गाठी तिन्ही सुटती। साही पदर फुटती। चक्रांचे हे ॥ ४४ ॥ मग शशी आणि भानु। ऐसा कल्पिजें जो अनुमानु। तो वातीवरी पवनु। गिंवसितां न दिसे ॥ ४५ ॥ बुद्धीची पुळिका विरे। परिमळु घ्राणीं उरे। तोही शक्तीसवें संचरे। मध्यमेमाजी ॥ ४६ ॥ तंव वरिलेंकडोनि ढाळें। चंद्रामृताचें तळें। कानवडोनि मिळे। शक्तिमुखीं ॥ ४७ ॥ तेणें नातकें रस भरे। तो सर्वांगामाजीं संचरे। जेथिंचा तेथ मुरे। प्राणपवनु ॥ ४८ ॥ तातलिये मुसे। मेण निघोनि जाय जैसें। कोंदली राहे रसें। वोतलेनि ॥ ४९ ॥ तैसें पिंडाचेनि आकारें। ते कळाचि कां अवतरें। वरी त्वचेचेनि पदरें। पांगुरली असे ॥ २५० ॥ जैसी आभाळाची बुंथी। करूनि राहे गभस्ती। मग फिटलिया दीप्ति। धरूं नये ॥ ५१ ॥ तैसा आहाचवरि कोरडा। त्वचेचा असे पातवडा। तो झडोनि जाय कोंडा। जैसा होय ॥ ५२ ॥ मग काश्मीराचे स्वयंभ। कां रत्नबीजा निघाले कोंभ। अवयवकांतीची भांब। तैसी दिसे ॥ ५३ ॥ नातरी संध्यारागींचे रंग। काढुनि वळिलें तें आंग। कीं अंतर्ज्योतीचें लिंग। निर्वाळिलें ॥ ५४ ॥ कुंकुमाचें भरींव। सिद्धरसाचें वोतींव। मज पाहतां सावेव। शांतिचि ते ॥ ५५ ॥ ते आनंदचित्रींचे लेप। नातरी महासुखाचें रूप। कीं संतोषतरूचें रोप। थांवलें जैसे ॥ ५६ ॥ तो कनकचंपकाचा कळा। की अमृताचा पुतळा। नाना सासिंनला मळा। कोवळिकेचा ॥ ५७ ॥ हो कां जे शारदियेचिये वोले। चंद्रबिंब पाल्हेलें। कां तेजचि मूर्त बैसलें। आसनावरी ॥ ५८ ॥ तैसें शरीर होये। जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये। मग देहाकृती बिहे। कृतांतु गा ॥ ५९ ॥ वृद्धाप्य तरी बहुडे। तारुण्याची गांठी विघडे। लोपली उघडे। बाळदशा ॥ २६० ॥ वयसा तरी येतुलेवरी। एऱ्हवीं बळाचा बळार्थु करी। धैर्याची थोरी। निरुपम ॥ ६१ ॥ कनकद्रुमाचां पालवीं। रत्नकळिका नित्य नवी। नखें तैसीं बरवीं। नवीं निघती ॥ ६२ ॥ दांतही आन होती। परि अपाडें सानेजती। जैसीं दुबाही बैसें पांती। हिरेयांची ॥ ६३ ॥ मणिकुलियांचिया कणिया। सावियाचि अणुमानिया। तैसिया सर्वांगी उधवती अणिया। रोमांचियां ॥ ६४ ॥ करचरणतळें। जैसीं कां रातोत्पलें। पाखाळी होती डोळे। काय सांगो ॥ ६५ ॥ निडाराचेनि कोंदाटें। मोतिये नावरती संपुटें। मग शिवणी जैशी उतटे। शुक्तिपल्लवांची ॥ ६६ ॥ तैशी पातियांचे कवळिये न समाये। दिठी जाकळोनि निघों पाहे। आधिलीचि परी होये। गगना कवळिती ॥ ६७ ॥ आइकें देह होय सोनियाचें। परि लाघव ये वायूचें। जे आप आणि पृथ्वीचे। अंशु नाहीं ॥ ६८ ॥ मग समुद्रापैलाडी देखे। स्वर्गींचा आलोचु आइके। मनोगत वोळखें। मुंगियेचें ॥ ६९ ॥ पवनाचा वारिका वळघे। चाले तरी उदकीं पाऊल न लागे। येणें येणें प्रसंगें। येती बहुता सिद्धि ॥ २७० ॥

आइकें प्राणाचा हात धरूनि । गगनाची पाउटी करूनी । मध्यमेचेनि दादरेहूनि । हृदया आली ॥ ७१ ॥ ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तींची शोभा । जिया विश्वबीजाचिया कोंभा । साऊली केली ॥ ७२ ॥ जे शून्यालिंगाची पिंडी । जें परमात्मया शिवाची करंडी । जे प्राणाची उघडी । जन्मभूमि ॥ ७३ ॥ हें असो ते कुंडली । हृदयाआतु आली । तंव अनाहताचां बोलीं । चावळे ते ॥ ७४ ॥ शक्तीचिया आंगा लागलें । बुद्धीचें चैतन्य होतें आलें । तें तेणें आइकिलें । अळुमाळु ॥ ७५ ॥ घोषाचां कुंडीं । नादचित्रांचीं रूपडीं । प्रणवाचिया मोडी । रेखिलीं ऐसीं ॥ ७६ ॥ हेंचि कल्पावें तरी जाणिजे । परी आतां कल्पितें कैचें आणिजे । परी नेणों काय गाजे । तिये ठायीं ॥ ७७ ॥ विसरोनि गेलों अर्जुना । जंव नाशु नाहीं पवना । तंव वाचा आथी गगना । म्हणऊनि घुमे ॥ ७८ ॥ तया अनाहताचेनि मेघें । मग आकाश दुमदुमों लागे । तंव ब्रह्मस्थानींचें बेगें । सहज फिटें ॥ ७९ ॥ आइकें कमळगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें । जेथ चैतन्यें आधातुरें । करूनि असिजे ॥ २८० ॥ तया हृदयांचा परिवरीं । कुंडलिनिया परमेश्वरी । तेजाची शिदोरी । विनियोगिली ॥ ८१ ॥ बुद्धीचेनि शाकें । हातबोनें निकें । द्वैत जेथ न देखे । तैसें केलें ॥ ८२ ॥ ऐसी निजकांती हारविली । मग प्राणुचि केवळ जाहाली । ते वेळीं कैसी गमली । म्हणावी पां ॥ ८३ ॥ हो कां जे पवनाची पुतळी । पांघुरली होतीं सोनेसळी । ते फेडूनियां वेगळी । ठेविली तिया ॥ ८४ ॥ नातरी वारयाचेनि आंगें झगटली । दीपाची दिठी निमटली । कां लखलखोनि हारपली । वीजु गगनीं ॥ ८५ ॥ तैशी हृदयकमळवेन्हीं । दिसे सोनियाची जैसी सरी । नातरी प्रकाशजळाची झरी । वाहत आली ॥ ८६ ॥ मग तिये हृदयभूमी पोकळे । जिराली कां एके वेळे । तैसें शक्तीचें रूप मावळे । शक्तीचिमाजी ॥ ८७ ॥ तेव्हा तरी शक्तीचि म्हणिजे । एन्हवीं तो प्राणु केवळ जाणिजे । आतां नाद बिंदु नेणिजे । कला ज्योती ॥ ८८ ॥ मनाचा हन मारु । कां पवनाचा आधारु । ध्यानाचा आदरु । नाहीं परी ॥ ८९ ॥ हे कल्पना घे सांडी । ते नाहीं इये परवडी । हें महाभूतांची फुडी । आटणी देखा ॥ २९० ॥ पिंडें पिंडाचा ग्रासु । तो हा नाथसंकेतींचा दंशु । परि दाऊनि गेला उद्देशु । महाविष्णु ॥ ९१ ॥ तया ध्वनिताचें केणें सोडुनी । यथार्थाची घडी झाडुनी । उपलविली म्यां जाणुनी । ग्राहीक श्रोते ॥ ९२ ॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः । शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥

ऐकें शक्तीचें तेज लोपे । तेथ देहींचें रूप हारपे । मग तो डोळियांचि माजि लपे । जगाचिया ॥ ९३ ॥ एन्हवीं आधिलाचि ऐसें । सावयव तरी असे । परी वायूचें कां जैसें । वळिलें होय ॥ ९४ ॥ नातरी कर्दळीचा गाभा । बुंथी सांडोनी उभा । कां अवयवचि नभा । निवडला तो ॥ ९५ ॥ तैसें होय शरीर । तैं तें म्हणिजे खेचर । हें पद होतां चमत्कार । पिंडजनीं ॥ ९६ ॥ देखें साधकु निघोनि जाये । मागां पाऊलांची वोळ राहे । तेथ ठायीं ठायीं होये । हें अणिमादिक ॥ ९७ ॥ परि तेणें काय काज आपणपयां । अवधारीं ऐसा धनंजया । लोप आथी भूतत्रया ।

देहींचा देहीं ॥ ९८ ॥ पृथ्वीतें आप विरवी । आपातें तेज जिरवी । तेजातें पवनु हरवी । हृदयामाजीं ॥ ९९ ॥ पाठीं आपण एकला उरे । परि शरिराचेनि अनुकारें । मग तोही निगे अंतरें । गगना मिळे ॥ ३०० ॥ ते वेळी कुंडलिनी हे भाष जाये । मारुत ऐसें नाम होये । परि शक्तिपण तें आहे । जंव न मिळे शिवीं ॥ १ ॥ मग जालंधर सांडी । ककारांत फोडी । गगनाचिये पाहाडीं । पैठी होय ॥ २ ॥ ते ॐकाराचिये पाठी । पाय देत उठाउठी । पश्यंतीचिये पाउटी । मागां घाली ॥ ३ ॥ पुढां तन्मात्रा अर्धवेरी । आकाशाचां अंतरीं । भरती गमे सागरी । सरिता जैशी ॥ ४ ॥ मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी । सोहंभावाचिया बाह्या पसरूनीं । परमात्मलिंगा धांवोनी । आंगा घडे ॥ ५ ॥ तंव महाभूतांची जवनिक फिटे । मग दोहींसि होय झटें । तेथ गगनासकट आटे । समरसीं तिये ॥ ६ ॥ पैं मेघाचेनि मुखीं निवडला । समुद्र कां वोघी पडिला । तो मागुता जैसा आला । आपणपेयां ॥ ७ ॥ तेवीं पिंडाचेनि मिषें । पदीं पद प्रवेशें । तें एकत्व होय तैसें । पंडुकुमरा ॥ ८ ॥ आतां दुजें हन होतें । कीं एकचि हें आइतें । ऐशिये विवंचनेपुरतें । उरेचिना ॥ ९ ॥ गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होये । तो होऊनि ठाके ॥ ३१० ॥ म्हणोनि तेथिंची मातु । न चढेचि बोलाचा हातु । जेंणें संवादाचिया गांवाआंतु । पैठी कीजे ॥ ११ ॥ अर्जुना एऱ्हवीं तरी । इया अभिप्रायाचा जो गर्वु धरी । ते पाहें पां वैखरी । दुरी ठेली ॥ १२ ॥ भ्रूलता मागिलीकडे । तेथ मकराचेंचि आंग न मांडे । सडेया प्राणा सांकडें । गगना येतां ॥ १३ ॥ पाठीं तेथेंचि तो भेसळला । तव शब्दांचा दिवो मावळला । मग तयाहि वरी आटु भविन्नला । आकाशाचा ॥ १४ ॥ आतां महाशून्याचां डोहीं । जेथ गगनासीचि ठावो नाहीं । तेथ तागा लागेल काई । बोलाचा या ॥ १५ ॥ म्हणूनि आखरामाजि सांपडे । कीं कानावरी जोडे । हें तैसें नव्हे फुडें । त्रिशुद्धी गा ॥ १६ ॥ जैं कहीं दैवें । अनुभविलें फावे । तैं आपणचि हें ठाकावें । होऊनियां ॥ १७ ॥ पुढती जाणणें तें नाहींचि । म्हणोनि असो किती हेंचि । बोलावें आतां वायांचि । धनुर्धरा ॥ १८ ॥ ऐसें शब्दजात माघौतें सरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे । वाराही जेथ न शिरे । विचाराचा ॥ १९ ॥ जें उन्मनियेचें लावण्य । जे तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परमतत्त्व ॥ ३२० ॥ जें आकाराचा प्रांतु । जें मोक्षाचा एकांतु । जेथ आदि आणि अंतु । विरोनि गेले ॥ २१ ॥ जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ । जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ॥ २२ ॥ जें महाभूतांचें बीज । जें महातेजाचें तेज । एवं पार्था जे निज । स्वरूप माझें ॥ २३ ॥ ते हे चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रूपा आली । देखोनि नास्तिकीं नोकिलीं । भक्तवृंदें ॥ २४ ॥ ते अनिर्वाच्य महासुख । पैं आपणचि जाहले ते पुरुष । जयांचे कां निष्कर्ष । प्राप्तिवेरीं ॥ २५ ॥ आम्हीं साधन हें जें सांगितलें । तेंचि शरीर जिहीं केलें । तें आमुचेनि पाडें आलें । निर्वाळलेया ॥ २६ ॥ परब्रह्माचेनि रसें । देहाकृतीचिये मुसे । वोतींव जाहले तैसे । दिसती आंगें ॥ २७ ॥ जरि हे प्रतीति हन अंतरीं फांकें । तरी विश्वचि हे

अवघें झांके । तंव अर्जुन म्हणे निकें । साचचि जी हें ॥ २८ ॥ कां जे आपण आतां देवो । हा बोलिले जो उपावो । तो प्राप्तीचा ठावो । म्हणोनि घडे ॥ २९ ॥ इये अभ्यासीं जे दृढ होती । ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती । हें सांगतियाचि रीती । कळलें मज ॥ ३३० ॥ देवा गोठीचि हे ऐकतां । बोधु उपजतसे चित्ता । मा अनुभवे तल्लीनता । नव्हेल केवीं ॥ ३१ ॥ म्हणऊनि एथ कांहीं । अनारिसें नाहीं । परी नावभरी चित्त देई । बोला एका ॥ ३२ ॥ आता कृष्ण तुवां सांगितला योगु । तो मना तरी आला चांगु । परि न शके करूं पांगु । योग्यतेचा ॥ ३३ ॥ सहजें आंगिक जेतुली आहे । तेतुलियाची जरी सिद्धी जाये । तरी हाचि मार्गु सुखोपायें । अभ्यासीन ॥ ३४ ॥ नातरी देवो जैसें सांगतील । तैसें आपणपां जरी न ठकेल । तरी योग्यतेवीण होईल । तेंचि पुसों ॥ ३५ ॥ जीवींचिये ऐसी धारण । म्हणोनि पुसावया जाहलें कारण । मग म्हणे तरी आपण । चित्त देइजो ॥ ३६ ॥ हां हो जी अवधारिलें । हें जें साधन तुम्हीं निरूपिलें । ते आवडतयाहि अभ्यासिलें । फावों शके ॥ ३७ ॥ कीं योग्यतेवीण नाहीं । ऐसें हन आहे कांहीं । तेथ कृष्ण म्हणती तरी काई । धनुर्धरा ॥ ३८ ॥ हें काज कीर निर्वाण । परि आणिकही जें कांहीं साधारण । तेंहि अधिकाराचे वोडवेविण । काय सिद्धि जाय ॥ ३९ ॥ पैं योग्यता जे म्हणिजे । ते प्राप्तीची आधीन जाणिजे । कां जें योग्य होउनि कीजे । तें आरंभीं फळे ॥ ३४० ॥ तरी तैसी एथ कांहीं । सावियाचि केणी नाहीं । आणि योग्यांची काई । खाणी असे ॥ ४२ ॥ नावेक विरक्तु । जाहला देहधर्मीं नियतु । तरि तोचि नव्हें व्यवस्थितु । अधिकारिया ॥ ४२ ॥ येतुलालिये आयणीमाजि येवढें । योग्यपण तूंतेंही जोडे । ऐसें प्रसंगें सांकडें । फेडिलें तयाचें ॥ ४३ ॥ मग म्हणे गा पार्था । ते हे ऐसी व्यवस्था । अनियतासि सर्वथा । योग्यता नाहीं ॥ ४४ ॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः । न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥

जो रसनेंद्रियाचा अंकिला । कां निद्रेसी जीवें विकला । तो नाहीं एथ म्हणितला । अधिकारिया ॥ ४५ ॥ अथवा आग्रहाचिये बांदोडी । क्षुधा तृषा कोंडी । आहारातें तोडी । मारूनियां ॥ ४६ ॥ निद्रेचिया वाटा न वचे । ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे । तें शरीरचि नव्हें तयाचें । मा योगु कवणाचा ॥ ४७ ॥ म्हणोनि अतिशये विषय सेवावा । तैसा विरोध न व्हावा । कां सर्वथा निरोधु करावा । हेंही नको ॥ ४८ ॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु । युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥

आहार तरी सेविजे । परी युक्तीचेनि मापें मविजे । क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिती ॥ ४९ ॥ मपितलां बोलीं बोलिजे । मितलां पाऊलीं चालिजे । निद्रेही मानु दीजे । अवसरें एकें ॥ ३५० ॥ जागणें जरी जाहलें । तरी व्हावें तें मितलें । येतुलेनि धातुसाम्य संचलें । असेल सुखे ॥ ५१ ॥ ऐसे युक्तिचेनि हातें । जैं इंद्रियां वोपिजे भातें । तैं संतोषासी वाढतें । मनचि करी ॥ ५२ ॥

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते । निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥

बाहेर युक्तीची मुद्रा पडे । तंव आंत सुख वाढे । तेथें सहजेंचि योगु घडे । नाभ्यासितां ॥ ५३ ॥ जैसें भाग्याचिये भडसें । उद्यमाचेनि मिसें । मग समृद्धिजात आपैसें । घर रिगे ॥ ५४ ॥ तैसा युक्तिमंतु कौतुकें । अभ्यासाचिया मोहरा ठाके । आणि आत्मसिद्धीचि पिके । अनुभवु तयाचा ॥ ५५ ॥ म्हणोनि युक्ति हे पांडवा । घडे जया सदैवा । तो अपवर्गींचिये राणिवा । अळंकरिजे ॥ ५६ ॥

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता । योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥ १९ ॥

युक्ति योगाचें आंग पावे । ऐसें प्रयाग होय जेथ बरवें । तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावें । मानस जयाचें ॥ ५७ ॥ तयातें योगयुक्त म्हण । हेंही प्रसंगे जाण । तें दीपाचें उपलक्षण । निर्वातींचिया ॥ ५८ ॥ आतां तुझें मनोगत जाणोनि । कांही एक आम्ही म्हणोनि । तें निकें चित्त देऊनि । परिसावें गा ॥ ५९ ॥ तूं प्राप्तीची चाड वाहसी । परि अभ्यासीं दक्षु नव्हसी । तें सांग पां काय बिहसी । दुवाडपणा ॥ ३६० ॥ तरी पार्था हें झणें । सायास घेशी हो मनें । वायां बागुल इयें दुर्जनें । इंद्रियें करिती ॥ ६१ ॥ पाहें पां आयुष्याचा अढळ करी । जें सरतें जीवित वारी । तया औषधातें वैरी । काय जिव्हा न म्हणे ॥ ६२ ॥ ऐसें हितासि जें जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुखे । एऱ्हवीं सोपें योगासारिखें । कांही आहे ॥ ६३ ॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया । यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् । वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥

म्हणोनि आसनाचिया गाढिका । जो आम्ही अभ्यासु सांगितला निका । तेणें होईल तरी हो कां । निरोधु यया ॥ ६४ ॥ एऱ्हवीं तरी येणें योगें । जैं इंद्रियां विंदाण लागे । तैं चित्त भेटों रिगे । आपणपेयां ॥ ६५ ॥ परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियांतें आपण देखे । देखतखेंवो वोळखे । म्हणे तत्त्व तें मी ॥ ६६ ॥ तिये ओळखीचिसरिसें । सुखाचियां साम्राज्यीं बैसे । चित्तपण समरसें । विरोनि जाय ॥ ६७ ॥ जयापरतें आणिक नाहीं । जयातें इंद्रियें नेणती कहीं । तें आपणचि आपुलां ठायीं । होऊनि ठाके ॥ ६८ ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः । यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥

मग मेरूपासूनि थोरें । देह दुःखाचेनि डोंगरें । दाटिजो पां पडिभरें । चित्त न दटे ॥ ६९ ॥ कां शस्त्रवरी तोडिलिया । देह आगीमाजीं पडलिया । चित्त महासुखीं पहुडलिया । चेवोचि नये ॥ ३७० ॥ ऐसें आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वास न पाहे । आणिकचि सुख होऊनि जाये । म्हणूनि विसरे ॥ ७१ ॥

तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् । स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

जया सुखाचिया गोडी । मन आर्तीची सेचि सोडी । संसाराचिया तोंडीं । गुंतलें जें ॥ ७२ ॥ जें योगाची बरव । संतोषाची राणीव । ज्ञानाची जाणीव । जयालागीं ॥ ७३ ॥

तें अभ्यासिलेनि योगें । सावेव देखावें लागे । देखिलें तरी आंगे । होईजेल गा ॥ ७४ ॥

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः । मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ॥ २४ ॥

परि तोचि योगु बापा । एके परी आहे सोपा । जरी पुत्रशोकु संकल्पा । दाखविजे ॥ ७५ ॥ हा विषयांतें निमालिया आइके । इंद्रियें नेमाचिया धारणीं देखें । तरी हियें घालूनि मुके । जीवितासी ॥ ७६ ॥ ऐसें वैराग्य हें करी । तरी संकल्पाची सरे वारी । सुखे धृतीचिया धवळारीं । बुद्धि नांदे ॥ ७७ ॥

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया । आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिन्तयेत् ॥ २५ ॥

यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् । ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

बुद्धी धैर्या होय वसौटा । तरी मनातें अनुभवाचिया वाटा । हळु हळु करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ॥ ७८ ॥ याही एके परी । प्राप्ति आहे विचारीं । हें न ठके तरी सोपारी । आणिक ऐकें ॥ ७९ ॥ आतां नियमुचि हा एकला । जीवें करावा आपुला । जैसा कृतनिश्चयाचिया बोला- । बाहेरा नोहे ॥ ३८० ॥ जरी येतुलेनि चित्त स्थिरावे । तरी काजा आलें स्वभावें । न राहे तरी घालावें । मोकलुनी ॥ ८१ ॥ मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमुचि घेऊनि येईल । ऐसेनि स्थैर्यची होईल । सावियाचि की ॥ ८२ ॥

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् । उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥

पाठीं केतुलेनि एकें वेळें । तया स्थैर्याचेनि मेळें । आत्मस्वरूपाजवळें । येईल सहजें ॥ ८३ ॥ तयातें देखोनि आंगा घडेल । तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल । आणि ऐक्यतेजें उघडेल । त्रैलोक्य हें ॥ ८४ ॥ आकाशीं दिसें दुसरें । तें अभ्र जैं विरे । तैं गगनचि कां भरे । विश्व जैसें ॥ ८५ ॥ तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्यचि आघवें होये । ऐसी प्राप्ति सुखोपायें । आहे येणें ॥ ८६ ॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः । सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥ २८ ॥

या सोपिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुतीं । संकल्पाचिया संपत्ती । रुसोनियां ॥ ८७ ॥ ते सुखाचेनि सांगातें । आले परब्रह्मा आंतौते । तेथ लवण जैसें जळातें । सांडू नेणे ॥ ८८ ॥ तैसें होय तिये मेळीं । मग सामरस्याचियां राउळीं । महासुखाची दिवाळी । जगेंसि दिसे ॥ ८३ ॥ ऐसें आपुले पायवरी । चालिजे आपुले पाठी वरी । हें पार्था नागवे तरी । आन ऐकें ॥ ३९० ॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि । ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति । तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥

तरि मी तंव सकळ देहीं । असें एथ विचारु नाहीं । आणि तैसेंचि माझां ठायीं । सकळ असे ॥ ९१ ॥ हें ऐसेंचि संचलें । परस्परें मिसळलें । बुद्धी घेपे एतुलें । होआवें गा ॥ ९२ ॥ एन्हवीं तरी अर्जुना । जो एकवटलिया भावना । सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ ९३ ॥ भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें । केवळ एकत्वचि माझें जाणे । सर्वत्र जो

॥ ९४ ॥ मग तो एक हा मियां । बोलतां दिसतसे वायां । एऱ्हवीं न बोलिजे तरि धनंजया । तो मीचि आहें ॥ ९५ ॥ दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडु जैसा । तो माझां ठायीं तैसा । मी तयामाजीं ॥ ९६ ॥ जैसा उदकाचेनि आयुष्यें रसु । कां गगनाचेनि मानें अवकाशु । तैसा माझेनि रूपें रूपसु । पुरुष तो गा ॥ ९७ ॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः । सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

जेणें ऐक्याचिये दिठी । सर्वत्र मातेंचि किरीटी । देखिला जैसा पटीं । तंतु एकु ॥ ९८ ॥ कां स्वरूपें तरी बहुतें आहाती । परी तैसीं सोनीं बहुवें न होती । ऐसी ऐक्याचळाची स्थिती । केली जेणें ॥ ९९ ॥ ना तरी वृक्षाची पानें जेतुलीं । तेतुलीं रोपें नाहीं लाविली । ऐसी अद्वैतदिवसें पाहली । रात्री जया ॥ ४०० ॥ तो पंचात्मकी सांपडे । मग सांग पां कैसेनि अडे । जो प्रतीतीचेनि पाडें । मजसीं तुके ॥ १ ॥ माझें व्यापकपण आघवें । गवसलें तयाचेनि अनुभवें । तरी न म्हणतां स्वभावें । व्यापकु जाहला ॥ २ ॥ आतां शरीरीं तरी आहे । परि शरीराचा तो नोहे । ऐसें बोलवरी होये । तें करूं ये काई ॥ ३ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥

म्हणोनि असो तें विशेषे । आपणपयासारिखें । जो चराचर देखे । अखंडित ॥ ४ ॥ सुखदुःखादि वर्में । कां शुभाशुभें कर्में । दोनी ऐसी मनोधर्में । नेणेचि जो ॥ ५ ॥ हे समविषम भाव । आणिकही विचित्र जें सर्व । तें मानीं जैसे अवयव । आपुले होती ॥ ६ ॥ हें एकैक काय सांगावे । जया त्रैलोक्यचि आघवें । मी ऐसें स्वभावें । बोधा आलें ॥ ७ ॥ तयाही देह एकु कीर आथी । लौकिकी सुखदुःखी तयातें म्हणती । परी आम्हांतें ऐसीचि प्रतीती । परब्रह्मचि हा ॥ ८ ॥ म्हणोनि आपणपां विश्व देखिजे । आणि आपण विश्व होईजें । ऐसें साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ॥ ९ ॥ हें तूतें बहुतीं प्रसंगीं । आम्ही म्हणों याचिलागीं । जे साम्यापरौती जगीं । प्राप्ति नाही ॥ ४१० ॥

अर्जुन उवाच :

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन । एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥ ३३ ॥
चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥

अर्जुन म्हणे देवा । तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा । परी न पुरों जी स्वभावा । मनाचिया ॥ ११ ॥ हें मन कैसें केवढें । ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे । एऱ्हवीं राहाटावया थोडें । त्रैलोक्य यया ॥ १२ ॥ म्हणोनि ऐसें कैसे घडेल । जे मर्कट समाधी येईल । कां राहे म्हणतलिया राहेल । महावातु ॥ १३ ॥ जें बुद्धीतें सळी । निश्चयातें टाळी । धैर्येंसी हातफळी । मिळऊनि जाय ॥ १४ ॥ जें विवेकातें भुलवी । संतोषासी चाड लावी । बैसिजे तरी हिंडवी । दाही दिशा ॥ १५ ॥ जें निरोधलें घे उवावो । जया संयमुचि होय सावावो । तें मन आपुला

स्वभावो । सांडील काई ॥ १६ ॥ म्हणोनि मन एक निश्चळ राहेल । मग आम्हांसी साम्य येईल । हें विशेषेंहि न घडेल । तयालागीं ॥ १७ ॥

श्रीभगवानुवाच : असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् । अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥

तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि । यया मनाचा कीर चपळचि । स्वभावो गा ॥ १८ ॥ परि वैराग्याचेनि आधारें । जरि लाविलें अभ्यासाचिया मोहरे । तरि केतुलेनि एकें अवसरें । स्थिरावेल ॥ १९ ॥ कां जें यया मनाचें एक निकें । जे हें देखिले गोडीचिया ठाया सोके । म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें । दावीत जाइजे ॥ ४२० ॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः । वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥

एऱ्हवीं विरक्ति जयांसि नाहीं । जे अभ्यासीं न रिघती कहीं । तयां नाकळे हें आम्हीही । न मनूं कायी ॥ २१ ॥ परि यमनियमांचिया वाटा न वचिजे । कहीं वैराग्याची से न करिजे । केवळ विषयजळीं ठाकिजे । बुडी देउनी ॥ २२ ॥ या जालिया मानसा कहीं । युक्तीची कांबी लागली नाहीं । तरी निश्चल होईल काई । कैसेनि सांगे ॥ २३ ॥ म्हणोनि मनाचा निग्रहो होये । ऐसा उपाय जो आहे । तो आरंभी मग नोहे । कैसा पाहों ॥ २४ ॥ तरी योगसाधन जितुकें । तें अवघेंचि काय लटिकें । परि आपणपयां अभ्यासू न ठाके । हेंचि म्हणें ॥ २५ ॥ आंगी योगाचें होय बळ । तरी मन केतुलें चपळ । काय महदादि हें सकळ । आपु नोहे ॥ २६ ॥ तेथ अर्जुन म्हणे निकें । देवो बोलती तें न चुके । साच योगबळेंसीं न तुके । मनोबळ ॥ २७ ॥ परि तोचि योगु कैसा केवीं जाणों । आम्ही येतुले याचि मातुही नेणों । म्हणोनि मनातें जी म्हणों । अनावर हें ॥ २८ ॥ हा आतां आघवेया जन्मा । तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा । योगपरिचयो आम्हां । जाहला आजी ॥ २९ ॥

अर्जुन उवाच :

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः । अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥
कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति । अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥
एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः । त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥

परि आणिक एक गोसांविया । मज संशयो असे साविया । तो तूंवाचूनि फेडावया । समर्थु नाहीं ॥ ४३० ॥ म्हणोनि सांगें गोविंदा । कवण एकु मोक्षपदा । झोंबत होता श्रद्धा । उपायेंविण ॥ ३१ ॥ इंद्रियग्रामोनि निगाला । आस्थेचिया वाटा लागला । आत्मसिद्धीचिया पुढिला । नगरा यावया ॥ ३२ ॥ तंव आत्मसिद्धि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि । ऐसा अस्तु गेला माझारींचि । आयुष्यभानु ॥ ३३ ॥ जैसें अवकाळीं आभाळ । अळुमाळु सपातळ । विपायें आलें केवळ । वसे ना वर्षे ॥ ३४ ॥ तैसी दोन्ही दुरावलीं । जें प्राप्ति तव अलग ठेली । आणि अप्राप्तिही सांडवली । श्रद्धा तया ॥ ३५ ॥ ऐसा दोला अंतरला का जी ।

जो श्रद्धेचांचि समाजीं । बुडाला तया हो जी । कवण गति ॥ ३६ ॥

श्रीभगवानुवाच : पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते । न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥

तंव कृष्ण म्हणती पार्था । जया मोक्षसुखीं आस्था । तया मोक्षावांचुनि अन्यथा । गति आहे गा ॥ ३७ ॥ परि एतुलेंचि एक घडे । जें माझारीं विसवावें पडे । तेंहीं परि ऐसेनि सुरवाडें । जो देवां नाहीं ॥ ३८ ॥ एऱ्हवीं अभ्यासाचां उचलतां । पाउली जरी चालतां । तरि दिवसाआधीं ठाकिता । सोऽहंसिद्धीतें ॥ ३९ ॥ परि तेतुला वेगु नव्हेचि । म्हणऊनि विसांवा तरी निकाचि । पाठीं मोक्षु तंव तैसाचि । ठेविला असे ॥ ४४० ॥

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः । शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥

ऐकें कवतिक हें कैसें । शतमखा लोक सायासें । तें तो पावे अनायासें । कैवल्यकामु ॥ ४१ ॥ मग तेथिंचे जे अमोघ । अलौकिक भोग । भोगितांहि सांग । कांटाळे मन ॥ ४२ ॥ हा अंतरायो अवचितां । कां वोढवला भगवंता । दिविभोग भोगितां । अनुतापी नित्य ॥ ४३ ॥ पाठीं जन्में संसारीं । परी सकळ धर्माचिया माहेरीं । लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचां ॥ ४४ ॥ जयातें नीतिपंथे चालिजे । सत्यधूत बोलिजे । देखावें तें देखिजे । शास्त्रदृष्टी ॥ ४५ ॥ वेद तो जागेश्वरू । जया व्यवसाय निजाचारु । सारासारविचारु । मंत्री जयातें ॥ ४६ ॥ जयाचां कुळीं चिंता । जाली ईश्वराची पतिव्रता । जयातें गृहदेवता । आदि ऋद्धि ॥ ४७ ॥ ऐसी निजपुण्याचिया जोडी । वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी । तिये जन्मे तो सुरवाडी । योगच्युतु ॥ ४८ ॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् । एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् । यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥ ४३ ॥

अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मण्य श्रोत्री । महासुखक्षेत्रीं । आदिवंत ॥ ४९ ॥ जे सिद्धांताचां सिंहासनी । राज्य करिती त्रिभुवनीं । जे कूंजते कोकिळ वनीं । संतोषाचां ॥ ४५० ॥ जे विवेकग्रामिचां मुळीं । बैसले आहाति नित्य फळीं । तया योगियांचां कुळीं । जन्म पावे ॥ ५१ ॥ मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहांट फुटे । सूर्यापुढां प्रगटे । प्रकाशु जैसा ॥ ५२ ॥ तैशी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ ५३ ॥ तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ५४ ॥ ऐसें जें जन्म । जयालागीं देव सकाम । स्वर्गी ठेले जप होम । करिती सदा ॥ ५५ ॥ अमरीं भाट होईजे । मग मृत्युलोकातें वानिजे । ऐसें जन्म पार्था गा जें । तें तो पावे ॥ ५६ ॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः । जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

आणि मागील जे सद्बुद्धि । जेथ जीविता जाहाली होती अवधि । मग तेचि पुढती निरवधि । नवी लाहे ॥ ५७ ॥ तेथ सदैवा आणि पायाळा । वरि दिव्यांजन होय डोळां । मग देखे

जैसीं अवलीळा । पाताळधनें ॥ ५८ ॥ तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय । तेथ सौरसेंवीण जाय । बुद्धि तयाची ॥ ५९ ॥ बळिये इंद्रियें येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजें गगना । मिळोंचि लागे ॥ ४६० ॥ ऐसें नेणों काय आपैसें । तयातेंचि कीजे अभ्यासें । समाधि घर पुसे । मानसाचें ॥ ६१ ॥ जाणिजे योगपीठीचा भैरवु । काय हा आरंभरंभेचा गौरवु । की वैराग्यसिद्धीचा अनुभवु । रूपा आला ॥ ६२ ॥ हा संसार उमाणितें माप । कां अष्टांगसामग्रीचे दीप । जैसें परिमळेंचि धरिजे रूप । चंदनाचें ॥ ६३ ॥ तैसा संतोषाचा काय घडिला । कीं सिद्धभांडारींहूनि काढिला । दिसे तेणें मानें रूढला । साधकदशे ॥ ६४ ॥

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः । अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

जे वर्षशतांचियां कोडी । जन्मसहस्त्रांचिया आडी । लंघिता पातला थडी । आत्मसिद्धीची ॥ ६५ ॥ म्हणोनि साधनजात आघवें । अनुसरे तया स्वभावें । मग आयतिये बैसे राणिवे । विवेकाचिये ॥ ६६ ॥ पाठीं विचारितया वेगा । तो विवेकुही ठाके मागां । मग अविचारणीय तें आंगा । घडोनि जाय ॥ ६७ ॥ तेथ मनाचें मेहुडें विरे । पवनाचें पवनपण सरे । आपणपां आपण मुरे । आकाशही ॥ ६८ ॥ प्रणवाचा माथा बुडे । येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे । म्हणोनि आधींचि बोलु बहुडे । तयालागीं ॥ ६९ ॥ ऐसी ब्रह्माची स्थिती । जे सकळां गतींसी गती । तया अमूर्ताची मूर्ती । होऊनि ठाके ॥ ४७० ॥ तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं । विक्षेपांचीं पाणिवळें झाडिलीं । म्हणोनि उपजतखेवों बुडाली । लग्नघटिका ॥ ७१ ॥ आणि तद्रूपतेसी लग्न । लागोनि ठेलें अभिन्न । जैसें लोपलें अभ्र गगन । होऊनि ठाके ॥ ७२ ॥ तैसें विश्व जेथ होये । मागौतें जेथ लया जाये । तें विद्यमानेंचि देहें । जाहला तों गा ॥ ७३ ॥

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः । कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥

जया लाभाचिया आशा । करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा । घालीत षट्कर्मांचा धारसा । कर्मनिष्ठ ॥ ७४ ॥ कां जिये एकी वस्तूलागीं । बाणोनि ज्ञानाची वज्रांगी । झुंजत प्रपंचेशीं समरंगी । ज्ञानिये गा ॥ ७५ ॥ अथवा निलागें निसरडा । तपोदुर्गाचा आडकडा । झोंबती तपिये चाडा । जयाचिया ॥ ७६ ॥ जें भजतियांसी भज्य । याज्ञिकांचे याज्य । एवं जे पूज्य । सकळां सदा ॥ ७७ ॥ तेंचि तो आपण । स्वयें जाहला निर्वाण । जें साधकांचे कारण । सिद्ध तत्त्व ॥ ७८ ॥ म्हणोनि कर्मनिष्ठां वंद्यु । तो ज्ञानियांसि वेद्यु । तापसांचा आद्यु । तपोनाथु ॥ ७९ ॥ पैं जीवपरमात्मसंगमा । जयाचें येणें जाहलें मनोधर्मा । तो शरीरीचि परी महिमा । ऐसी पावे ॥ ४८० ॥ म्हणोनि याकारणें । तूंते मी सदा म्हणें । योगी होय अंतःकरणें । पंडुकुमरा ॥ ८१ ॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना । श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥

अगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देव जाणिजे । आणि सुखसर्वस्वे माझें । चैतन्य तो ॥ ८२ ॥ जया भजता भजन भजावें । हें भक्तिसाधन जें आघवें । तें मीचि जाहलों अनुभवें ।

अखंडित ॥ ८३ ॥ मग तया आम्हां प्रीतीचें । स्वरूप बोली निर्वचे । ऐसें नव्हे गा तो साचें । सुभद्रापती ॥ ८४ ॥ तया एकवटलिया प्रेमा । जरी पाडें पाहिजे उपमा । तरी मी देह तो आत्मा । हेचि होय ॥ ८५ ॥ ऐसें भक्तचकोरचंद्रें । तेथ त्रिभुवनैकनरेंद्रें । बोलिलें गुणसमुद्रें । संजयो म्हणे ॥ ८६ ॥ तेथ आदिलापासूनि पार्था । ऐकिजे ऐसीचि अवस्था । दुणावली हें यदुनाथा । पावों सरलें ॥ ८७ ॥ कीं सावियाचि मनीं तोषला । जे बोला आरिसा जोडला । तेणें हरिखें आतां उपलवला । निरूपील ॥ ८८ ॥ तों प्रसंगु आहे पुढां । जेथ शांतु दिसेल उघडा । तो पालविजेल मुडा । प्रमेयबीजांचा ॥ ८९ ॥ जे सात्त्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें । सहजें निडारले वाफे । चतुरचित्ताचे ॥ ४९० ॥ वरी अवधानाचा वाफसा । लाधला सोनयाऐसा । म्हणोनि पेरावया धिंवसा । निवृत्तीसी ॥ ९१ ॥ ज्ञानदेव म्हणे मी चाडें । सद्गुरूंनी केला कोडें । माथां हात ठेविला तें फुडें । बीचि वाइलें ॥ ९२ ॥ म्हणऊनि येणें मुखें जें निगे । तें संतांचां हृदयीं साचचि लागे । हें असो सांगे श्रीरंगे । बोलिलें जें ॥ ९३ ॥ परी तें मनाचां कानी ऐकावें । बोल बुद्धीचां डोळां देखावे । हे साटोवाटी घ्यावें । चित्ताचिया ॥ ९४ ॥ अवधानाचेनि हातें । नेयावे हृदया आंतौते । हे रिझवितील आयणीतें । सज्जनांचिये ॥ ९५ ॥ हे स्वहितातें निववितील । परिणामातें जीववितील । सुखाची वाहती । लाखोली जीवा ॥ ९६ ॥ आतां अर्जुनेसी मुकुंदे । नागर बोलिजेल विनोदें । तें वोंवियेचेनि प्रबंधें । सांगेन मी ॥ ४९७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
आत्मसंयमयोगोनाम षष्ठोऽध्यायः ॥ (श्लोक ४७; ओव्या ४९७)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय सातवा)

श्रीभगवानुवाच : मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः । असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥
ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः । यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥

आइकां मग तो अनंतु । पार्थातें असे म्हणतु । पैं गा तूं योगयुक्तु । जालासि आतां ॥ १ ॥ मज

समग्रातें जाणसी ऐसें। आपुलिया तळहातीचें रत्न जैसें। तुज ज्ञान सांगेन तैसें। विज्ञानेंसी॥ २॥ एथ विज्ञानें काय करावें। ऐसें घेसी जरी मनोभावें। तरी पैं आधीं जाणावें। तेंचि लागे॥ ३॥ मग ज्ञानाचिये वेळे। झांकती जाणिवेचे डोळे। जैसी तीरी नाव न ढळे। टेकली सांती॥ ४॥ तैसी जाणीव जेथ न रिघे। विचार मागुतां पाउलीं निघे। तर्कु आयती नेघे। आंगी जयाचां॥ ५॥ अर्जुना तया नांव ज्ञान। येर प्रपंचु हें विज्ञान। तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान। हेंही जाण॥ ६॥ आतां अज्ञान अवघें हरपे। विज्ञान निःशेष करपे। आणि ज्ञान तें स्वरूपें। होऊनि जाइजे॥ ७॥ ऐसें वर्म जें गूढ। तें कीजेल वाक्यारूढ। जेणें थोडेन पुरे कोड। बहुत मनींचे॥ ८॥ जेणें सांगतयाचें बोलणें खुंटे। ऐकतयाचें व्यसन तुटे। हें जाणणें सानें मोठें। उरों नेदी॥ ९॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये। यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥ ३॥

पैं गा मनुष्यांचिया सहस्त्रशां-। माजि विपाइलेयाची येथ धिंवसा। तैसे यां धिंवसेकरां बहुवसां-। माजि विरळा जाणे॥ १०॥ जैसा भरलेया त्रिभुवना। आंतु एकएकु चांगु अर्जुना। निवडूनि कीजे सेना। लक्षवरीं॥ ११॥ कीं तयाही पाठीं। जे वेळीं लोह मांसातें घांटी। ते वेळीं विजयश्रियेचां पाटीं। एकुचि बैसे॥ १२॥ तैसे आस्थेचां महापुरी। रिघताती कोटिवरी। परी प्राप्तीच्या पैलतीरी। विपाइला निगे॥ १३॥ म्हणऊनि सामान्य गा नोहे। हें सांगतां वडिल गोठी आहे। परी तें बोलों येईल पाहें। आतां प्रस्तुत ऐकें॥ १४॥

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च। अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा॥ ४॥

तरी अवधारी गा धनंजया। हे महदादिक माझी माया। जैसी प्रतिबिंबे छाया। निजांगाची॥ १५॥ आणि इयेतें प्रकृति म्हणिजे। जे अष्टधा भिन्न जाणिजे। लोकत्रय निपजे। इयेस्तव॥ १६॥ हे अष्टधा भिन्न कैसी। ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं। तरी तेचि गा आतां परियेसीं। विवंचना॥ १७॥ आप तेज गगन। मही मारुत मन। बुद्धि अहंकार हे भिन्न। आठै भाग॥ १८॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्। जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्॥ ५॥

आणि या आठांची जे साम्यावस्था। ते माझी परम प्रकृति पार्था। तिये नाम व्यवस्था। जीवु ऐसी॥ १९॥ जे जडातें जीववी। चेतनेतें चेतवी। मनाकरवी मानवी। शोक मोहो॥ २०॥ पैं बुद्धीचां अंगी जाणणें। तें जियेचिये जवळिकेचें करणें। जिया अहंकाराचेनि विंदाणे। जगचि धरिजे॥ २१॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय। अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा॥ ६॥

ते सूक्ष्म प्रकृति कोडें। जैं स्थूळाचिया आंगा घडे। तैं भूतसृष्टीची पडे। टांकसाळ॥ २२॥ चतुर्विधु ठसा। उमटों लागे आपैसा। मोला तरी सरिसा। परि थरचि आनान॥ २३॥ होती चौऱ्यांशी लक्ष थरा। येरा मिति नेणिजे भांडारा। भरे आदिशून्याचा गाभारा। नाणेयांसी॥ २४॥ ऐसे एकतुके पांचभौतिक। पडती बहुवस टांक। मग तिये समृद्धीचे लेख। प्रकृतीचि

धरी ॥ २५ ॥ जें आंखुनि नाणें विस्तारी । पाठीं तयांची आटणी करी । माजी कर्माकर्माचिया व्यवहारीं । प्रवर्तु दावी ॥ २६ ॥ हें रूपक परी असो । सांगें उघड जैसें परियेसों । तरी नामरूपाचा अतिसो । प्रकृतीच कीजे ॥ २७ ॥ आणि प्रकृति तंव माझां ठायीं । बिंबे येथ आन नाहीं । म्हणोनि आदि मध्य अवसान पाहीं । जगासि मी ॥ २८ ॥

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनंजय । मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

हें रोहिणीचें जळ । तयाचें पाहतां येईजे मूळ । तैं रश्मि नव्हती केवळ । होय तो भानु ॥ २९ ॥ तयाचिपरी किरीटी । इया प्रकृति जालिये सृष्टी । जैं उपसंहारूनि कीजेल ठी । तैं मीचि आहे ॥ ३० ॥ ऐसें होय दिसे न दिसे । हें मजचि माजिवडे असे । मियां विश्व धरिजे जैसे । सूत्रें मणि ॥ ३१ ॥ सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुती वोविले । तैसें म्यां जग धरिलें । सबाह्याभ्यंतरीं ॥ ३२ ॥

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः । प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥

पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ । जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

म्हणोनि उदकीं रसु । कां पवनीं जो स्पर्शु । शशिसूर्यीं जो प्रकाशु । तो मीचि जाण ॥ ३३ ॥ तैसाचि नैसर्गिकु शुद्धु । मी पृथ्वीचां ठायी गंधु । गगनीं मी शब्दु । वेदीं प्रणवु ॥ ३४ ॥ नराचां ठायी नरत्व । जें अहंभाविये सत्त्व । तें पौरुष मी हे तत्त्व । बोलिजत असे ॥ ३५ ॥ अग्नि ऐसें आहाच । तेजा नामाचें आहे कवच । तें परौतें केलिया साच । निजतेज तें मी ॥ ३६ ॥ आणि नानाविध योनीं । जन्मोनि भूतें त्रिभुवनीं । वर्ततें आहाति जीवनीं । आपुलालां ॥ ३७ ॥ एकें पवनेचि पिती । एकें तृणास्तव जिती । एकें अन्नाधारें राहती । जळें एकें ॥ ३८ ॥ ऐसें भूतांप्रति आनान । जें प्रकृतिवशें दिसे जीवन । तें आघवाठायीं अभिन्न । मीचि एक ॥ ३९ ॥

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् । बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥

बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् । धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

पैं आदिचेनि अवसरें । विरूढे गगनाचेनि अंकूरें । जें अंती गिळी अक्षरें । प्रणवपीठीचीं ॥ ४० ॥ जंव हा विश्वाकार असे । तंव जें विश्वाचिसारखें दिसे । मग महाप्रळयदशे । कैसेंही नव्हे ॥ ४१ ॥ ऐसे अनादि जे सहज । तें मी गा विश्वबीज । हें हातातळीं तुज । देइजत असे ॥ ४२ ॥ मग उघड करूनि पांडवा । जैं हें आणिसील सांख्याचिया गांवा । तैं ययाचा उपेगु बरवा । देखशील ॥ ४३ ॥ परी हे अप्रासंगिक आलाप । आता असतु न बोलो संक्षेप । जाण तपियांचां ठायीं तप । तें स्वरूप माझें ॥ ४४ ॥ बळियांमाजीं बळ । तें मी जाणें अढळ । बुद्धिमंतीं केवळ । बुद्धि ते मी ॥ ४५ ॥ भूतांचां ठायीं कामु । तो मी म्हणे आत्मारामु । जेणें अर्थास्तव धर्मु । थोरु होय ॥ ४६ ॥ एऱ्हवीं विकाराचेनि पैसें । करी कीर इंद्रियांचि ऐसें । परी धर्मासि वेखासें । जावों नेदी ॥ ४७ ॥ जे अप्रवृत्तीचा अव्हांटा । सांडूनि विधीचिया निघे वाटा ।

तेवींचि नियमाचा दिवटा । सवें चाले ॥ ४८ ॥ कामु ऐशिया वोजा प्रवर्ते । म्हणोनि धर्मासि होय पुरतें । मोक्षतीर्थींचें मुक्तें । संसारु भोगी ॥ ४९ ॥ जो श्रुतिगौरवाचां मांडवीं । काम सृष्टीचा वेलु वाढवी । जंव कर्मफळेंसी पालवी । अपवर्गी टेके ॥ ५० ॥ ऐसा नियतु कां कंदर्पु । जो भूतां यां बीजरूपु । तो मी म्हणे बापु । योगियांचा ॥ ५१ ॥ हें एकैक किती सांगावे । आतां वस्तुजातचि आघवें । मजपासूनि जाणावें । विकरलें असे ॥ ५२ ॥

ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये । मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥

जे सात्त्विक हन भाव । कां रजतमादि सर्व । ते ममरूपसंभव । वोळख तूं ॥ ५३ ॥ हें जाले तरी माझां ठायीं । परि तयामाजीं मी नाहीं । जैसी स्वप्नींचां डोहीं । जागृति न बुडे ॥ ५४ ॥ नातरी रसाचीचि सुघट । जैसी बीजकणिका तरी घनवट । परी तियेस्तव होय काष्ठ । अंकुरद्वारें ॥ ५५ ॥ मग तया काष्ठाचां ठायीं । सांग पां बीजपण असे काई । तैसा मी विकारीं नाहीं । जरी विकारला दिसें ॥ ५६ ॥ पैं गगनीं उपजे आभाळ । परि तेथ गगन नाहीं केवळ । अथवा आभाळीं होय सलिल । तेथ अभ्र नाही ॥ ५७ ॥ मग तया उदकाचेनि आवेशें । प्रगटलें तेज जें लखलखीत दिसे । तिये विजूमाजीं असे । सलिल कायी ॥ ५८ ॥ सांगें अग्नीस्तव धूम होये । तिये धूमीं काय अग्नी आहे । तैसा विकारु हा मी नोहें । जरी विकारला असें ॥ ५१ ॥

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् । मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥

परी उदकीं झाली बाबुळी । ते उदकातें जैसी झांकोळी । कां वायांचि आभाळीं । आकाश लोपे ॥ ६० ॥ हां गा स्वप्न हें लटिकें म्हणों ये । परि निद्रावशें बाणलें होये । तंव आठवु काय देत आहे । आपणपेयां ॥ ६१ ॥ हें असो डोळ्यांचें । डोळांचि पडळ रचे । तेणें देखणेपण डोळ्यांचे । न गिळिजे कायि ॥ ६२ ॥ तैसी हे माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउली । कीं मजचि आड वोडवली । जवनिका जैसी ॥ ६३ ॥ म्हणऊनि भूतें मातें नेणती । माझींच परी मी नव्हती । जैसीं जळींची जळीं न विरती । मुक्ताफळें ॥ ६४ ॥ पैं पृथ्वीयेचा घटु कीजे । सवेंचि पृथ्वीसि मिळे जरी मेळविजे । एन्हवीं तोचि आग्निसंगें सिजे । तरी वेगळा होय ॥ ६५ ॥ तैसें भूतजात सर्व । हे माझेचि कीर अवयव । परि मायायोगें जीव - । दशे आले ॥ ६६ ॥ म्हणोनि माझेचि मी नव्हती । माझेचि मज नोळखती । अहंममताभ्रांती । विषयांध झाले ॥ ६७ ॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ १४ ॥

आतां महदादि हे माझी माया । उतरोनियां धनंजया । मी होईजे हें आया । कैसेनि ये ॥ ६८ ॥ जिये ब्रह्माचळाचां आघाडां । पहिलिया संकल्पजळाचा उभडा । सवेंचि महाभूतांचा बुडबुडा । साना आला ॥ ६९ ॥ जे सृष्टिविस्ताराचेनि वोघें । चढत काळकलनेचेनि वेगें । प्रवृत्तिनिवृत्तिचीं तुंगें । तटें सांडी ॥ ७० ॥ जे गुणघनाचेनि वृष्टिभरें । भरली मोहाचेनि महापूरें । घेऊनि जात नगरें । यमनियमांचीं ॥ ७१ ॥ जे द्वेषाचां आवर्ती दाटत । मत्सराचे वळसे पडत । माजी प्रमादादि

तळपत । महामीन ॥ ७२ ॥ जेथ प्रपंचाचीं वळणें । कर्मा कर्मांचीं वोभाणें । वरी तरताती वोसाणें । सुखदु:खांचीं ॥ ७३ ॥ रतीचिया बेटा । आदळती कामाचिया लाटा । जेथ जीवफेन संघाटा । सैंघ दिसे ॥ ७४ ॥ अहंकाराचिया चळिया । वरि मदत्रयाचिया उकळिया । जेथ विषयोर्मीच्या आकळिया । उल्लाळे घेती ॥ ७५ ॥ उदोअस्ताचे लोंढे । पाडीत जन्ममृत्यूचे चोंढे । जेथ पांचभौतिक बुडबुडे । होती जाती ॥ ७६ ॥ संमोह विभ्रम मासे । गिळित धैर्याचीं आविसें । तेथ देव्हडे भोंवत वळसे । अज्ञानाचे ॥ ७७ ॥ भ्रांतीचेनि खडुळें । रेवले आस्थेचे अवगाळे ॥ रजोगुणाचेनि खळाळें । स्वर्गु गाजे ॥ ७८ ॥ तमाचे धारसे वाड । सत्त्वाचें स्थिरपण जाड । किंबहुना हे दुवाड । मायानदी ॥ ७९ ॥ पैं पुनरावृत्तीचेनि उभडें । झळंबती सत्यलोकींचे हुडे । घायें गडबडती धोंडे । ब्रह्मगोळकाचे ॥ ८० ॥ तया पाणियाचेनि वहिलेपणें । अझुनि न धरिती वोभाणें । ऐसा मायापूर हा कवणें । तरिजेल गा ॥ ८१ ॥ येथ एक नवलावो । जो जो कीजे तरणोपावो । तो तो अपावो । होय तें ऐक ॥ ८२ ॥ एक स्वयंबुद्धीचां बाहीं । रिगालें तयांची शुद्धीचि नाहीं । एक जाणिवेचां डोहीं । गर्वेंचि गिळिले ॥ ८३ ॥ एकीं वेदत्रयाचिया सांगडी । घेतलिया अहंभावाचिया धोंडी । ते मदमीनाचां तोंडीं । सगळेचि गेले ॥ ८४ ॥ एकीं वयसेचें जाड बांधलें । मग मन्मथाचिये कासे लागले । ते विषयमगरीं सांडिले । चघळुनियां ॥ ८५ ॥ आतां वृद्धाप्याचिया तरंगा - । माजीं मतिभ्रंशाचा जरंगा । तेणें कवळिजताती पैं गा । चहूंकडे ॥ ८६ ॥ आणि शोकाचां कडां उपडत । क्रोधाचां आवर्तीं दाटत । आपदागिधीं चुंबिजत । उधवलां ठायीं ॥ ८७ ॥ मग दु:खाचेनि बरबटें बोंबलें । पाठीं मरणाचिये रेवे रेवले । ऐसें कामाचिये कासे लागले । ते गेले वायां ॥ ८८ ॥ एकीं यजनक्रियेची पेटी । बांधोनि घातली पोटीं । ते स्वर्गसुखाचां कपाटीं । शिरकोनि ठेले ॥ ८९ ॥ एकीं मोक्षीं लागावयाचिया आशा । केला कर्मबाह्यांचा भरंवसा । परि ते पडिले वळसां । विधिनिषेधांचां ॥ ९० ॥ जेथ वैराग्याची नाव न रिगे । विवेकाचा तागा न लगे । वरि कांहीं तरों ये योगें । तरी विपायें तो ॥ ९१ ॥ ऐसें जीवाचिये आंगवणें । इये मायानदीचें तरणें । हे कासयासारिखें बोलणें । म्हणावें पां ॥ ९२ ॥ जरी अपथ्यशीळा व्याधी । कळे साधूसी दुर्जनाची बुद्धि । कीं रागी सांडी रिद्धी । आली सांती ॥ ९३ ॥ जरी चोरां सभा दाटे । अथवा मीना गळु घोटे । नातरी भेडा उलटे । विवसी जरी ॥ ९४ ॥ पाडस वागुर करांडी । जरी मुंगी मेरु वोलांडी । तरी मायेची पैलथडी । देखती जीव ॥ ९५ ॥ म्हणऊन गा पंडुसुता । जैसी सकामा न जिणवेचि वनिता । तैसीं मायामय हे सरिता । न तरवे जीवां ॥ ९६ ॥ येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तया ऐलीच थडिये सरलें । मायाजळ ॥ ९७ ॥ जयां सद्गुरु तारु पुढें । जे अनुभवाचिये कासे गाढे । जयां आत्मनिवेदनतरांडे । आकळलें ॥ ९८ ॥ जे अहंभावाचें वोझें सांडुनी । विकल्पाचिया झुळका चुकाउनि । अनुरागाचा निरूता होऊनी । पाणीढाळु ॥ ९९ ॥ जया ऐक्याचिया उतारा । बोधाचा जोडला तारा । मग निवृत्तीचिया पैल

तीरा । झेंपावले जे ॥ १०० ॥ ते उपरतीचां वांवी सेलत । सोहंभावाचेंनि थावे पेलत । मग निघाले अनकळित । निवृत्तितटीं ॥ १ ॥ येणें उपायें मज भजलें । ते हे माझी माया तरले । परि ऐसे भक्त विपाइले । बहुवस नाहीं ॥ २ ॥

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः । माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन । आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥

जे बहुतां एका अवांतरु । अहंकाराचा भूतसंचारु । जाहला म्हणोनि विसरु । आत्मबोधाचा ॥ ३ ॥ ते वेळीं नियमाचें वस्त्र नाठवें । पुढीले अधोगतीची लाज नेणवे । आणि करितात जें न करावें । वेदु म्हणे ॥ ४ ॥ पाहें पां शरीराचिया गांवा । जयालागीं आले पांडवा । तो कार्यार्थु आघवा । सांडूनियां ॥ ५ ॥ इंद्रियग्रामींचां राजबिदीं । अहंममतेचियां जल्पवादीं । विकारांतरांची मांदी । मेळवितातीं ॥ ६ ॥ दुःखशोकांचां घाईं । मारिलियाची सेचि नाहीं । हें सांगावया कारण काई । जे ग्रासिले माया ॥ ७ ॥ म्हणोनि ते मातें चुकले । आइकां चतुर्विध मज भजले । जिहीं आत्महित केलें । वाढतें गा ॥ ८ ॥ तो पहिला आर्तु म्हणिजे । दुसरा जिज्ञासु बोलिजे । तिजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानिया चौथा ॥ ९ ॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते । प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥

तेथ आर्तु तो आर्तीचेनि व्याजें । जिज्ञासु तो जाणावयाचिलागीं भजे । तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धि ॥ ११० ॥ मग चौथियाचां ठायीं । कांहींचि करणें नाहीं । म्हणोनि भक्तु एकु पाहीं । ज्ञानिया जो ॥ ११ ॥ जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें । फिटलें भेदाभेदांचें कडवसे । मग मीचि जाहला समरसें । आणि भक्तुही तेवींचि ॥ १२ ॥ परि आणिकांचिये दिठी नावेक । जैसा स्फटिकुचि आभासे उदक । तैसा ज्ञानी नव्हे कौतुक । सांगतां तो ॥ १३ ॥ जैसा वारा कां गगनीं विरे । मग वारेपण वेगळें नुरे । तेविं भक्त हे पैज न सरे । जरी ऐक्या आला ॥ १४ ॥ जरी पवन हालवूनि पाहिजे । तरी गगनावेगळा देखिजे । एऱ्हवीं गगन तो सहजें । असे जैसें ॥ १५ ॥ तैसें शरीरें हन कर्में । तो भक्त ऐसा गमे । परी अंतरें प्रतीतिधर्मे । मीचि जाहला ॥ १६ ॥ आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें । मी आत्मा ऐसें तो जाणे । म्हणऊनि मीहि तैसेंचि म्हणें । उचंबळला सांता ॥ १७ ॥ हा गां जीवापैलीकडिलिये खुणे । जो पावोनि वावरोंही जाणे । तो देहाचेनि वेगळेपणें । काय वेगळा होय ॥ १८ ॥

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् । आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥

म्हणोनि आपुलालिया हिताचेनि लोभें । मज आवडे तोही भक्त झोंबे । परी मीचि करी वालभें । ऐसा ज्ञानिया एकु ॥ १९ ॥ पाहें पां दुभतेयाचिया आशा । जगचि धेनूसि करीताहे फांसा । परि दोरेंविण कैसा । वत्साचा बळी ॥ १२० ॥ कां जे तनुमनुप्राणें । तें आणिक कांहीचि नेणे । देखे तयातें म्हणे । हे मायचि की माझी ॥ २१ ॥ तें येणें मानें अन्यन्यगती । म्हणूनि धेनूही

तैसीचि प्रीती। यालागीं लक्ष्मीपती। बोलिले साच॥ २२॥ हें असो मग म्हणितलें। जे कां तुज सांगितले। तेही भक्त भले। पढियंते आम्हां॥ २३॥ परि जाणोनियां मातें। जो पाहों विसरला मागौतें। जैसें सागरा येऊनि सरिते। मुरडावें ठेलें॥ २४॥ तैसीं अंत:करणकुहरीं उपजली। जयाची प्रतीतिगंगा मज मिनली। तो मी हें काय बोली। फार करूं॥ २५॥ एऱ्हवीं ज्ञानिया जो म्हणिजे। तो चैतन्यचि केवळ माझें। हें न म्हणावें परि काय कीजे। न बोलणें बोलों॥ २६॥

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते। वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ:॥ १९॥

जे तो विषयांची दाट झाडी -। माजीं कामक्रोधाचीं सांकडीं। चुकावूनि आला पाडी। सद्वासनेचिया॥ २७॥ मग साधुसंगें सुभटा। उजू सत्कर्माचिया वाटा। अप्रवृत्तीचा अव्हांटा। डावलूनि॥ २८॥ आणि जन्मशतांचा वाहतवणा। तेविंचि आस्थेचिया न लेचि वाहणा। तेथ फलहेतूचा उगाणा। कवणु चाळी॥ २९॥ ऐसा शरीरसंयोगाचिये राती -। माजीं धांवतां सडिया आयती। तंव कर्मक्षयाची पाहती। पाहांट जाली॥ १३०॥ तैसी गुरुकृपाउखा उजळली। ज्ञानाची वोतपली पडली। तेथ साम्याची ऋद्धि उघडली। तयाचिये दिठी॥ ३१॥ ते वेळी जयाकडे वास पाहे। तेउता मीचि तया एक आहे। अथवा निवांत जरी राहे। तरी मीचि तया॥ ३२॥ हें असो आणिक कांहीं। तया सर्वत्र मीवांचूनि नाहीं। जैसें सबाह्य जळ डोहीं। बुडालिया घटा॥ ३३॥ तैसा तो मजभीतरीं। मी तया आंतुबाहेरीं। हें सांगिजे बोलवरी। तैसें नव्हे॥ ३४॥ म्हणोनि असो हें यापरी। तो देखे ज्ञानाची वाखारी। तेणें संसरलेनि करी। आपु विश्व॥ ३५॥ हें समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो। म्हणोनि भक्तांमाजीं रावो। आणि ज्ञानिया तोचि॥ ३६॥ जयाचिये प्रतीतीचां वाखोरां। पवाडु होय चराचरा। तो महात्मा धनुर्धरा। दुर्लभु आथी॥ ३७॥ येर बहु जोडती किरीटी। जयांचीं भजनें भोगासाठीं। जे आशातिमिरें दृष्टी -। विषयांध जाले॥ ३८॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञाना: प्रपद्यन्तेऽन्यदेवता:। तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियता: स्वया॥ २०॥

आणि फळाचिया हांवा। हृदयीं कामा जाला रिगावा। कीं तयाचिये घसणी दिवा। ज्ञानाचा गेला॥ ३९॥ ऐसे उभयतां आंधारीं पडले। म्हणोनि पासींचि माते चुकले। मग सर्वभावें अनुसरले। देवतांतरां॥ १४०॥ आधींच प्रकृतीचे पाइक। वरी भोगालागीं तंव रंक। मग तेणें लोलुप्यें कौतुक। कैसे भजती॥ ४१॥ कवणी तिया नियमबुद्धि। कैसिया हन उपचारसमृद्धी। कां अर्पण यथाविधी। विहित करणें॥ ४२॥

यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति। तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्॥ २१॥

पैं जो जिये देवतांतरी। भजावयाची चाड करी। तयाची ते चाड पुरी। पुरविता मी॥ ४३॥ देवोदेवीं मीचि पाहीं। हाही निश्चय त्यासि नाहीं। भाव ते ते ठायीं। वेगळाला धरी॥ ४४॥

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते। लभते च तत: कामान्मयैव विहितान्हि तान्॥ २२॥

मग श्रद्धायुक्त । तेथिंचे आराधन जें उचित । ते सिद्धीवरी समस्त । वर्तों लागे ॥ ४५ ॥ ऐसें जेणें जें भाविजे । तें फळ तेणे पाविजे । परी तेंही सकळ निपजे । मजचिस्तव ॥ ४६ ॥

अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् । देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ॥ २३ ॥

परी ते भक्त मातें नेणती । जे कल्पनेबाहेरी न निघती । म्हणोनि कल्पित फळ पावती । अंतवंत ॥ ४७ ॥ किंबहुना ऐसें जें भजन । तें संसाराचेंचि साधन । येर फळभोग तो स्वप्न । नावभरी दिसे ॥ ४८ ॥ हें असो परौतें । मग हो का आवडते तें । परि यजी जो देवतांतें । तो देवत्वासीचि ये ॥ ४९ ॥ येर तनुमनप्राणीं । जे निरंतर माझेयाचि वाहणीं । ते देहाचां निर्वाणीं । मीचि होती ॥ १५० ॥

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः । परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥

परी तैसें न करिती प्राणिये । वायां आपुलां हितीं वाणिये । पैं पोंहताती पाणिये । तळहातींचेनि ॥ ५१ ॥ नाना अमृताचां सागरीं बुडिजे । मग तोंडा कां वज्रमिठी पाडिजे । आणि मनीं तरी आठविजे । थिल्लरोदकांतें ॥ ५२ ॥ हें ऐसें काइसेया करावें । जें अमृतींही रिगोनि मरावें । तें सुखें अमृत होऊनि कां नसावें । अमृतामाजीं ॥ ५३ ॥ तैसा फळहेतूचा पांजरा । सांडूनिया धनुर्धरा । कां प्रतीतिपाखीं चिदंबरा । गोसाविया नोहावें ॥ ५४ ॥ जेथ उंचावतेनि पवाडें । सुखाचा पैसारु जोडे । आपुलेनि सुरवाडें । उडों ये ऐसा ॥ ५५ ॥ तया उमपा माप कां सुवावें । मज अव्यक्ता व्यक्त कां मानावें । सिद्ध असतां कां निमावें । साधनवरी ॥ ५६ ॥ परी हा बोल आघवा । जरी विचारीजतसे पांडवा । तरी विशेषें या जीवां । न चोजवे गा ॥ ५७ ॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः । मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥

कां जे योगमायापडळें । हे जाले आहाती आंधळे । म्हणोनि प्रकाशाचेनिहि देहबळें । न देखती मातें ॥ ५८ ॥ एऱ्हवीं मी नसें ऐसें । कांहीं वस्तुजात असे । पाहें पां कवण जळ रसें - । रहित आहे ॥ ५९ ॥ पवन कवणातें न शिवेचि । आकाश कें न समायेचि । हें असो एक मीचि । विश्वीं असें ॥ १६० ॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन । भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥

येथें भूतें जियें अतीतलीं । तियें मीचि होऊनि ठेली । आणि वर्तत आहाति जेतुलीं । तींहि मीचि ॥ ६१ ॥ भविष्यप्रमाणें जियें ही । तीही मजवेगळीं नाहीं । हा बोलचि एऱ्हवीं कांहीं । होय ना जाय ॥ ६२ ॥ दोराचिया सापासी । डोंबा बडीया ना गव्हाळा ऐसी । संख्या न करवे कोण्हासी । तेवीं भूतांसी मिथ्यत्वें ॥ ६३ ॥ ऐसा मी पंडुसुता । अनुस्यूत सदा असतां । यां संसार जो भूतां । तो आनें बोलें ॥ ६४ ॥ आतां थोडी ऐसी । गोठी सांगिजेल परियेसीं । जैं अहंकारतनूंसी । वालभ पडिलें ॥ ६५ ॥

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वद्वमोहेन भारत । सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ॥ २७ ॥

तैं इच्छा हे कुमारी जाली । मग ते कामाचिया तारुण्या आली । तेथ द्वेषेंसीं मांडिली । वराडिक ॥ ६६ ॥ तया दोघांस्तव जन्मला । ऐसा द्वंद्वमोह जाला । मग तो आजेन वाढविला । अहंकारें ॥ ६७ ॥ जो धृतीसि सदां प्रतिकूळु । नियमाही नागवे सळु । आशारसें दोंदिलु । जाला सांता ॥ ६८ ॥ असंतुष्टीचिया मदिरा । मत्त होवोनी धनुर्धरा । विषयांचा वोवरां । विकृतीसी असे ॥ ६९ ॥ तेणें भावशुद्धीचिया वाटे । विखुरले विकल्पाचे कांटे । मग चिरिले अव्हांटे । अप्रवृत्तीचे ॥ १७० ॥ तेणें भूतें भांबावलीं । म्हणोनि संसाराचिया आडवामाजीं पडिलीं । मग महादुःखाचां घेतलीं । दांडेवरी ॥ ७० ॥

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् । ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ॥ २८ ॥

ऐसे विकल्पाचे वांयाणे । कांटे देखोनि सणाणे । जे मतिभ्रमाचें पासवणें । घेतीचिना ॥ ७२ ॥ उजू एकनिष्ठतेचां पाउलीं । रगडूनि विकल्पाचिया भालीं । महापातकांची सांडिली । अटवी जिहीं ॥ ७३ ॥ मग पुण्याचे धांवा घेतले । आणि माझी जवळीक पातले । किंबहुना ते चुकले । वाटवधेयां ॥ ७४ ॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये । ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ २९ ॥

एऱ्हवीं तरी पार्था । जन्ममरणाची निमे कथा । ऐसिया प्रयत्नातें आस्था । विये जयांची ॥ ७५ ॥ तयां तो प्रयत्नुचि एके वेळे । मग समग्रें परब्रह्मीं फळे । जया पिकलेया रसु गळे । पूर्णतेचा ॥ ७६ ॥ ते वेळीं कृतकृत्यता जग भरे । तेथ अध्यात्माचें नवलपण पुरे । कर्माचें काम सरे । विरमे मन ॥ ७७ ॥ ऐसा अध्यात्मलाभ तया । होय गा धनंजया । भांडवल जया । उद्यमीं मी ॥ ७८ ॥ तयातें साम्याचिये वाढी । ऐक्याची सांदे कुळवाडी । तेथ भेदाचिया दुबळवाडी । नेणिजे तो ॥ ७९ ॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः । प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥

जिहीं साधिभूता मातें । प्रतीतीचेनि हातें । धरूनि अधिदैवातें । शिवतलें गा ॥ १८० ॥ जया जाणिवेचेनि वेगें । मी अधियज्ञु दृष्टी रिगे । ते तनूचेनि वियोगें । विरहे नव्हती ॥ ८१ ॥ एऱ्हवीं आयुष्याचें सूत्र विघडतां । भूतांची उमटे खडाडता । काय न मरतयाचि चित्ता । युगांतु नोहे ॥ ८२ ॥ परी नेणों कैसें पैं गा । जे जडोनि गेले माझिया आंगा । ते प्रयाणींचिया लगबगा । न सांडितीच मातें ॥ ८३ ॥ एऱ्हवीं तरी जाण । ऐसे जे निपुण । तेचि अंतःकरण- । युक्त योगी ॥ ८४ ॥ तंव इये शब्दकुपिकेतळीं । नोडवेचि अवधानाची अंजुळी । जे नावेक अर्जुन तये वेळीं । मागांचि होता ॥ ८५ ॥ जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें । जियें नानार्थरसें रसाळें । बहकाते आहाती परिमळें । भावाचेनि ॥ ८६ ॥ सहज कृपामंदानिळें । कृष्णद्रुमाचीं वचनफळें । अर्जुनश्रवणाचिये खोळे । अवचित पडिलीं ॥ ८७ ॥ तियें प्रमेयाचींच हो कां वळलीं । कीं ब्रह्मरसाचां सागरीं चुबुकळलीं । मग तैसींच का घोळलीं । परमानंदें ॥ ८८ ॥ तेणें बरवेपणें

निर्मळें। अर्जुनाचे अनिमिष डोळे। घेताति गळाळे। विस्मयामृताचे॥ ८९॥ तिया सुखसंपत्ति जोडलिया। मग स्वर्गा वाती वांकुलिया। हृदयाचां जीवीं गुतकुलिया। होत आहाती॥ १९०॥ ऐसें वरचिलीचि बरवा। सुख जावों लागलें फावा। तंव रसस्वादाचिया हांवा। लाहो केला॥ ९१॥ झडकरी अनुमानाचेनि करतळें। घेऊनि तियें वाक्यफळें। प्रतीतिमुखीं एके वेळे। घालूं पाहिलीं॥ ९२॥ तंव विचाराचिया रसना न दाटती। परी हेतूचांहि दशनीं न फुटती। ऐसें जाणोनि सुभद्रापती। चुंबीचिना॥ ९३॥ मग चमत्कारला म्हणे। इयें जळींचीं मा तारांगणें। कैसा झकविलों असलगपणें। अक्षरांचेनि॥ ९४॥ इयें पदें नव्हती फुडिया। गगनाचियाचि घडिया। येथ आमुची मति बुडिया। थाव न निघे॥ ९५॥ वांचुनी जाणावयाची कें गोठी। ऐसें जीवीं कल्पूनि किरीटी। तिये पुनरपि केली दृष्टी। यादवेंद्रा॥ ९६॥ मग विनविलें सुभटें। हां हो जी यें एकवाटें। सातही पदें अनुच्छिष्टें। नवल आहाती॥ ९७॥ एऱ्हवीं अवधानाचेनि वहिलेपणें। नाना प्रमेयांचे उगाणे। काय श्रवणाचेनि आंगणें। बोलों लाहाती॥ ९८॥ परि तैसें हें नोहेचि देवा। देखिला अक्षरांचा मेळावा। आणि विस्मयाचिया जीवा। विस्मयो जाला॥ ९९॥ कानाचेनि गवाक्षद्वारें। बोलाचे रश्मी अभ्यंतरें। पाहेना तंव चमत्कारें। अवधान ठकलें॥ २००॥ तेविंचि अर्थाची चाड मज आहे। ते सांगतांही वेळु न साहे। म्हणुनि निरूपण लवलाहें। कीजो देवा॥ १॥ ऐसा मागील पडताळा घेउनी। पुढां अभिप्रावो दृष्टी सूनी। तेविंचि माजि शिरवुनी। आर्ती आपुली॥ २॥ कैसी पुसती पाहें पां जाणिव। भिडेचि तरी लंघों नेदी शिव। एऱ्हवीं कृष्णहृदयासी खेंव। देवों सरला॥ ३॥ अगा गुरूतें जैं पुसावें। तैं येणें मानें सावध होआवें। हें एकचि जाणे आघवें। सव्यसाचि॥ ४॥ आतां तयाचें तें प्रश्न करणें। वरीं सर्वज्ञा हरीचें बोलणें। हे संजयो आवडलेपणें। सांगेल कैसें॥ ५॥ तिये अवधान द्यावें गोठी। बोलिजेल नीट मऱ्हाटी। जैसी कानाचे आधीं दृष्टी। उपेगा जाये॥ ६॥ बुद्धीचिया जिभा। बोलाचा न चाखतां गाभा। अक्षरांचियाचि भांबा। इंद्रियें जिती॥ ७॥ पहा पां मालतीचे कळे। घ्राणासि कीर वाटले परिमळें। परि वरचिली बरवा काइ डोळे। सुखिये नव्हती॥ ८॥ तैसें देशियेचिया हवावा। इंद्रियें करिती राणिवा। मग प्रमेयाचिया गांवा। लेसा जाइजे॥ ९॥ ऐसेनि नागरपणें। बोलु निमे तें बोलणें। ऐका ज्ञानदेव म्हणे। निवृत्तीचा॥ २१०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
ज्ञानविज्ञानयोगोनाम सप्तमोऽध्यायः॥ (श्लोक ३०; ओव्या २१०)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय आठवा)

अर्जुन उवाच : किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम । अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥

मग अर्जुनें म्हणितले । हां हो जी अवधारिलें । जें म्यां पुसिलें । तें निरूपिजो ॥ १ ॥ सांगा कवण तें ब्रह्म । कायसया नाम कर्म । अथवा अध्यात्म । काय म्हणिपे ॥ २ ॥ अधिभूत तें कैसें । एथ अधिदैव तें कवण असे । हें उघड मी परियेसें । तैसें बोला ॥ ३ ॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन । प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥

देवा अधियज्ञ तो काई । कवण पां इये देहीं । हें अनुमानासि कांहीं । दिठी न भरे ॥ ४ ॥ आणि नियतां अंतःकरणीं । तूं जाणिजसी देहप्रयाणीं । तें कैसेनि शार्ङ्गपाणी । परिसवा मातें ॥ ५ ॥ देखा धवळारीं चिंतामणीचां । जरी पहुडला होय दैवाचा । तरी वोसणतांही बोलु तयाचा । परी सोपु न वचे ॥ ६ ॥ तैसें अर्जुनाचिया बोलासवें । आलें तेंचि म्हणितलें देवें । परियेसें गा बरवें । जें पुसिले तुवां ॥ ७ ॥ किरीटी कामधेनूचा पाडा । वरी कल्पतरूचा आहे मांदोडा । म्हणोनि मनोरथसिद्धीचिया चाडा । तो नवल नोहे ॥ ८ ॥ कृष्ण कोपोनि ज्यासी मारी । तो पावे ब्रह्मसाक्षात्कारीं । मा कृपेनें उपदेशु करी । तो कैशापरी न पवेल ॥ ९ ॥ जैं कृष्णाचेया होईजे आपण । कृष्ण होय आपुलें अंतःकरण । तैं संकल्पाचें आंगण । वोळगती सिद्धी ॥ १० ॥ परि ऐसें जें प्रेम । तें अर्जुनींचि आथि निस्सीम । म्हणऊनि तयाते काम । सदा सफल ॥ ११ ॥ या कारणे अनंतें । तें मनोगत तयाचें पुसतें । होईल जाणूनि आइतें । वोगरूनि ठेविलें ॥ १२ ॥ जें अपत्य थाणींहूनि निगे । तयाची भूक ते मायेसीच लागे । एऱ्हवीं तें शब्दें काय सांगे । मग स्तन्य दे येरी ॥ १३ ॥ म्हणोनि कृपाळुवा गुरूचिया ठायीं । हें नवल नोहे कांहीं । परि तें असो आइका काई । जें देवो बोलता झाला ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाच : अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते । भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

मग म्हणितलें सर्वेश्वरें । जें आकारीं इये खोंकरे । कोंदलें असत न खिरे । कवणे काळीं ॥ १५ ॥ एऱ्हवीं सपूरपण तयाचें पहावें । तरि शून्यचि नव्हे स्वभावें । वरि गगनाचेनि पालवें । गाळूनि घेतलें ॥ १६ ॥ जें ऐसेंही परि विरुळे । इये विज्ञानाचिये खोळे । हालवलेंही न गळे । तें परब्रह्म ॥ १७ ॥ आणि आकाराचेनि जालेपणें । जन्मधर्मातें नेणे । आकारलोपीं निमणें ।

नाहीं कहीं ॥ १८ ॥ ऐशिया आपुलियाची सहजस्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती । तया नाम सुभद्रापती । अध्यात्म गा ॥ १९ ॥ मग गगनीं जेविं निर्मळे । नेणो कैंचीं एके वेळे । उठती घनपटळें । नानावर्णें ॥ २० ॥ तैसें अमूर्तीं तिये विशुद्धे । महदादि भूतभेदें । ब्रह्मांडाचे बांधे । होंचि लागती ॥ २१ ॥ पैं निर्विकल्पाचिये बरडी । कीं आदिसंकल्पाची फुटे विरूढी । आणि ते सवेंचि मोडोनि ये ढोंढी । ब्रह्मगोळकांची ॥ २२ ॥ तया एकैकाचे भीतरीं पाहिजे । तंव बीजाचाचि भरिला देखिजे । माजीं होतियां जातियां नेणिजे । लेख जीवां ॥ २३ ॥ मग तया गोळकांचे अंशांश । प्रसवती आदिसंकल्प असमसहास । हें असो ऐसी बहुवस । सृष्टि वाढे ॥ २४ ॥ परि दुजेनविण एकला । परब्रह्मचि संचला । अनेकत्वाचा आला । पूर जैसा ॥ २५ ॥ तैसे समविषमत्व नेणों कैचें । वायांचि चराचर रचे । पाहतां प्रसवतिया योनींचे । लक्ष दिसती ॥ २६ ॥ येरी जीवाभावाचिये पालविये । कांहीं मर्यादाच करूं नये । पाहिजे कवण हें आघवें विये । तंव मूळ ते शून्य ॥ २७ ॥ म्हणूनि कर्ता मुदल न दिसे । आणि शेखीं कारणही कांहीं नसे । माजीं कार्यचि आपैसें । वाढो लागे ॥ २८ ॥ ऐसा करितेनवीण गोचरु । अव्यक्तीं हा आकारु । निपजे जो व्यापारु । तया नाम कर्म ॥ २९ ॥

अधिभूतं क्षरो भाव: पुरुषश्चाधिदैवतम् । अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥

आतां अधिभूत जे म्हणिपे । तेंहि सांगों संक्षेपें । तरी होय आणि हारपे । अभ्र जैसें ॥ ३० ॥ तैसें असतेपण आहाच । नाहीं होईजे हें साच । जयांतें रूपा आणिती पांचपांच । मिळोनियां ॥ ३१ ॥ भूतांतें अधिकरूनि असे । आणि भूतसंयोगें तरि दिसे । जें वियोगवेळे भ्रंशे । नामरूपादिक ॥ ३२ ॥ तयातें अधिभूत म्हणिजे । मग अधिदैव पुरुष जाणिजे । जेणें प्रकृतीचें भोगिजे । उपार्जिलें ॥ ३३ ॥ जो चेतनेचा चक्षु । जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु । जो देहास्तमानीं वृक्षु । संकल्पविहंगमाचा ॥ ३४ ॥ जो परमात्माचि परि दुसरा । जे अहंकारनिद्रा निदसुरा । म्हणोनि स्वप्नींचिया वोरबारा । संतोषे शिणे ॥ ३५ ॥ जीव येणें नावें । जयातें आळविजे स्वभावें । तें अधिदैव जाणावें । पंचायतनींचें ॥ ३६ ॥ आतां इयेचि शरीरग्रामीं । जो शरीरभावातें उपशमी । तो अधियज्ञु एथ गा मी । पंडुकुमरा ॥ ३७ ॥ येर अधिदैवाधिभूत । तेही मीचि कीर समस्त । परि पंधरें किडाळा मिळत । ते काय साकें नोहे ॥ ३८ ॥ तरि तें पंधरेपण न मैळे । आणि किडाळाचियाही अंशा न मिळे । परि जंव असे तयाचेनि मेळें । तंव साकेंचि म्हणिजे ॥ ३९ ॥ तैसें अधिभूतादि आघवें । हें अविद्येचेनि पालवें । झाकलें तंव मानावें । वेगळें ऐसें ॥ ४० ॥ तेचि अविद्येचि जवनिक फिटे । आणि भेदाभावाची अवधि तुटे । मग म्हणों एक होऊनि जरी आटे । तरी काय दोनी होती ॥ ४१ ॥ पैं केशांचा गुंडाळा । ठेविली स्फटिकशिळा । ते वरी पाहिली डोळां । तंव भेदली गमली ॥ ४२ ॥ पाठीं केश परौते नेले । आणि भेदलेपण काय नेणों जाहालें । तरि डांक देऊनि सांदिलें । शिळेतें काई ॥ ४३ ॥ ना ते

अखंडचि आयती । परि संगें भिन्न गमली होती । ते सारीलिया मागौती । जैसी का तैसी ॥ ४४ ॥ तेवीं अहंभावो जाये । तरी ऐक्य तें आधींचि आहे । हेंचि साचें जेथ होये । तो अधियज्ञु मी ॥ ४५ ॥ पैं गा आम्ही तुज । सकळ यज्ञ कर्मज । सांगितलें कां जें काज । मनीं धरूनि ॥ ४६ ॥ तो हा सकळ जीवांचा विसावा । नैष्कर्म्यसुखाचा ठेवा । परि उघड करूनि पांडवा । दाविजत असे ॥ ४७ ॥ पहिलें वैराग्यइंधन परिपूर्तीं । इंद्रियानळीं प्रदीप्तीं । विषयद्रव्याचिया आहुती । देऊनियां ॥ ४८ ॥ मग वज्रासन तेचि उर्वी । शोधूनि आधारमुद्रा बरवी । वेदिका रचे मांडवीं । शरीराचां ॥ ४९ ॥ तेथ संयमाग्नीचीं कुंडें । इंद्रियद्रव्याचेनि पवाडें । पूजिती उदंडें । युक्तिघोषें ॥ ५० ॥ मनप्राण आणि संयमु । हाचि हवनसंपदेचा संभ्रमु । येणें संतोषविजे निर्धूमु । ज्ञानानळु ॥ ५१ ॥ ऐसेनि हें सकळ ज्ञानी समर्पे । मग ज्ञान तें ज्ञेयीं हारपे । पाठीं ज्ञेयचि स्वरूपें । निखिल उरे ॥ ५२ ॥ तयां नांव गा अधियज्ञु । ऐसें बोलला जव सर्वज्ञु । तव अर्जुन अतिप्राज्ञु । तया पातलें तें ॥ ५३ ॥ हें जाणोनि म्हणितलें देवें । पार्था परिसतु आहासि बरवें । या कृष्णाचिया बोलासवें । येरु सुखाचा जाहला ॥ ५४ ॥ देखा बालकाचिया धणी धाईजे । कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे । हें सद्गुरूचि एकलेनि जाणिजे । कां प्रसवतिया ॥ ५५ ॥ म्हणोनि सात्त्विक भावांची मांदी । कृष्णाआंगीं अर्जुनाआधीं । न समातसे परी बुद्धी । सांवरूनि देवें ॥ ५६ ॥ मग पिकलिया सुखाचा परिमळु । कां निवालिया अमृताचा कल्लोळु । तैसा कोंवळा आणि रसाळु । बोलु बोलिला ॥ ५७ ॥ म्हणे परिसणेयांच्या राया । आइकें बापा धनंजया । ऐसी जळों सरलिया माया । तेथ जाळितें तेंहीं जळे ॥ ५८ ॥

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् । यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥

जें आतांचि सांगितलें होतें । अगा अधियज्ञ म्हणितला जयातें । जे आदींचि तया मातें । जाणोनि अंतीं ॥ ५९ ॥ ते देह झोळ ऐसें मानुनी । ठेले आपणपें आपणचि होऊनी । जैसा मठ गगना भरुनी । गगनींचि असे ॥ ६० ॥ ये प्रतीतीचिया माजघरीं । तयां निश्चयाची वोवरी । आली म्हणोनि बाहेरी । नव्हेचि से ॥ ६१ ॥ ऐसें सबाह्य ऐक्य संचलें । मीचि होऊनि असतां रचिलें । बाहेरी भूतांची पांचही खवलें । नेणतांचि पडिलीं ॥ ६२ ॥ उभयां उभेपण नाही जयाचें । मा पडिलिया गहन कवण तयाचें । म्हणोनि प्रतीतिचिये पोटींचें । पाणी न हाले ॥ ६३ ॥ ते ऐक्याची आहे वोतिली । कीं नित्यतेचिया हृदयीं घातली । जैसी समरससमुद्रीं धुतली । रुळेचिना ॥ ६४ ॥ पैं अथावीं घट बुडाला । तो आंतबाहेरीं उदकें भरला । पाठीं दैवगत्या जरी फुटला । तरी उदक काय फुटे ॥ ६५ ॥ नातरी सर्पें कवच सांडिलें । कां उबारेने वस्त्र फेडिलें । तरी सांग पां कांही मोडलें । अवेवामाजीं ॥ ६६ ॥ तैसा आकारु हा आहाच भ्रंशे । वांचुनि वस्तु ते सांचलीचि असे । तेचि बुद्धि जालिया विसुकुसे । कैसेनि आतां ॥ ६७ ॥ म्हणोनि यापरी मातें । अंतकाळीं

जाणत सांते । जे मोकलिती देहातें । ते मीच होती ॥ ६८ ॥ एन्हवीं तरी साधारण । उरीं आदळलिया मरण । जो आठवु धरी अंत:करण । तेंचि होईजे ॥ ६९ ॥ जैसा कवणु एकु काकुळती । पळतां पवनगती । दुपाउलीं अवचितीं । कुहामाजीं पडिला ॥ ७० ॥ आतां तया पडणयाआरौतें । पडण चुकवावयां परौतें । नाहीं म्हणोनि तेथें । पडावेंचि पडे ॥ ७१ ॥ तेविं मृत्यूचेनि अवसरें एकें । जें येऊनि जीवासमोर ठाके । तें होणें मग न चुके । भलतयापरी ॥ ७२ ॥ आणि जागता जंव असिजे । तंव जेणें ध्यानें भावना भाविजे । डोळां लागतखेवो देखिजे । तेंचि स्वप्नीं ॥ ७३ ॥

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् । तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावित: ॥ ६ ॥

तेविं जितेनि अवसरें । जें आवडोंनि जीवी उरे । तेंचि मरणाचिये मेरे । फार हों लागे ॥ ७४ ॥ आणि मरणीं जया जें आठवे । ते तेचि गतीतें पावे ।

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च। मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥ ७ ॥

म्हणोनि सदां स्मरावें । मातेंचि तुवां ॥ ७५ ॥ डोळां जें देखावें । कां कानीं हन ऐकावें । मनीं जे भावावें । बोलावें वाचे ॥ ७६ ॥ तें आंत बाहेरी आघवें । मीचि करूनि घालावें । मग सर्वीं काळीं स्वभावें । मीचि आहें ॥ ७७ ॥ अगा ऐसया जरी जाहालिया । मग न मरिजे देह गेलिया । मा संग्रामु केलिया । भय काय तुज ॥ ७८ ॥ तूं मन बुद्धि सांचेंसीं । जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी । तरी मातेंचि गा पावसी । हे माझी भाक ॥ ७९ ॥ हेंचि कायिसया वरी होये । ऐसा जरी संदेहो वर्तत आहे । तरी अभ्यासूनि आदीं पाहें । मग नव्हे तरी कोपें ॥ ८० ॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना । परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन् ॥ ८ ॥

येणेंचि अभ्यासेंसीं योगु । चित्तासि करीं पां चांगु । अगा उपायबळें पंगु । पहाड ठाकी ॥ ८१ ॥ तेंवि सदभ्यासें निरंतर । चित्तासि परमपुरुषाची मोहर । लावीं मग शरीर । असो अथवा जावो ॥ ८२ ॥ जें नानागती पावतें । तें चित्त वरील आत्मयातें । मग कवण आठवी देहातें । गेलें कीं आहे ॥ ८३ ॥ पैं सरितेचेनि ओघें । सिंधुजळा मीनलें घोघें । तें काय वर्तत आहे मागें । म्हणोनि पाहों येती ॥ ८४ ॥ ना तें समुद्रचि होऊन ठेलें । तेविं चित्ताचें चैतन्य जाहालें । जेथ यातायात निमालें । घनानंद जें ॥ ८५ ॥

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्य: ।
सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमादित्यवर्णं तमस: परस्तात् ॥ ९ ॥

जयाचें आकारावीण असणें । जया जन्म ना निमणें । जें आघवेंचि आघवेपणें । देखत असे ॥ ८६ ॥ जें गगनाहून जुनें । जें परमाणुहूनि सानें । जयाचेनि संन्निधानें । विश्व चळे ॥ ८७ ॥ जें सर्वांतें यया विये । सर्व जेणें जिये । हेतु जया बिहे । अचिंत्य जें ॥ ८८ ॥ देखें वोळंबा इंगळु न चरे । तेजीं तिमिर जेथ न सरे । जें दिहाचें आंधारें । चर्मचक्षूसीं ॥ ८९ ॥ सुसडा सूर्यकणांचां

राशी । जो नित्य उदो ज्ञानियांसी । अस्तमानाचें जयासी । आडनांव नाहीं ॥ ९० ॥

प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।

भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥

तया अव्यंगवाणेया ब्रह्मातें । प्रयाणकाले प्राप्ते । जो स्थिरावलेनि चित्तें । जाणोनि स्मरे ॥ ९१ ॥ बाहेरी पद्मासन रचुनी । उत्तराभिमुख बैसोनि । जीवीं सुख सूनि । कर्मयोगाचें ॥ ९२ ॥ आंतु मीनलेनि मनोधर्में । स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें । आपेंआप संभ्रमें । मिळावया ॥ ९३ ॥ आकळलेनि योगें । मध्यमामध्यमार्गें । अग्निस्थानौनि निगे । ब्रह्मरंध्रा ॥ ९४ ॥ तेथ अचेत चित्ताचा सांगातु । आहाचवाणा दिसे मांडतु । तेथ प्राणु गगनाआंतु । संचरे कां ॥ ९५ ॥ परी मनाचेनि स्थैर्यें धरिला । भक्तीचिया भावना भरला । योगबळें आवरला । सज्ज होऊनि ॥ ९६ ॥ तो जडाजडातें विरवितु । भ्रूलतामाजीं संरचतु । जैसा घंटानाद लयस्तु । घंटेसीच होय ॥ ९७ ॥ कां झांकलिये घटींचा दिवा । नेणिजे काय जाहला केव्हां । या रीती जो पांडवा । देह ठेवी ॥ ९८ ॥ तो केवळ परब्रह्म । जया परमपुरुष ऐसें नाम । तें माझें निजधाम । होऊनि ठाके ॥ ९९ ॥

यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।

यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेणः प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

सकळां जाणणेयां जे लाणी । तिये जाणिवेची जे खाणी । तयां ज्ञानियांचिये आयणी । जयातें अक्षर म्हणिपे ॥ १०० ॥ चंडवातेंही न मोडे । तें गगनचि कीं फुडें । वांचूनि जरी होईल मेहुडें । तरी उरेल कैचें ॥ १ ॥ तेविं जाणणेया जें आकळिलें । तें जाणवलेपणेंचि उमाणलें । मग नेणवेचि तयातें म्हणितलें । अक्षर सहजे ॥ २ ॥ म्हणोनि वेदविद नर । म्हणती जयातें अक्षर । जें प्रकृतीसी पर । परमात्मरूप ॥ ३ ॥ आणि विषयांचें विष उलंडूनि । जें सर्वेंद्रिया प्रायश्चित्त देऊनि । आहाति देहाचिया बैसोनि । झाडातळीं ॥ ४ ॥ ते यापरी विरक्त । जयांची निरंतर वाट पाहात । निष्कामासि अभिप्रेत । सर्वदा जें ॥ ५ ॥ जयाचिया आवडी । न गणिती ब्रह्मचर्याची सांकडीं । निष्ठुर होऊनि बापुडीं । इंद्रियें करिती ॥ ६ ॥ ऐसें जें पद । दुर्लभ आणि अगाध । जयाचिये थडियेचे वेद । चुबुकळिले ठेले ॥ ७ ॥ तें ते पुरुष होती । जे यापरी लया जाती । तरी पार्था हेचि स्थिती । एक वेळ सांगों ॥ ८ ॥ तेथें अर्जुनें म्हणितलें स्वामी । हेंचि म्हणावया होतों पां मी । तंव सहजें कृपा केली तुम्हीं । तरी बोलिजो कां जी ॥ ९ ॥ परि बोलावें तें अति सोहोपें । तेथें म्हणितलें त्रिभुवनदीपें । तुज काय नेणों संक्षेपें । सांगेन ऐक ॥ ११० ॥ तरी मना या बाहेरिलीकडे । यावयाची साविया सवें मोडे । हें हृदयाचिये डोहीं बुडे । तैसें कीजे ॥ ११ ॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च । मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥

परी हें तरीच घडे । जरी संयमाची अखंडे । सर्वद्वारी कवाडें । कळासती ॥ १२ ॥ तरी सहजें मन कोंदलें । हृदयींचि असेल उगलें । जैसें करचरणीं मोडलें । परिवरु न संडी

॥ १३ ॥ तैसें चित्त राहिलिया पांडवा । प्राणांचा प्रणवुचि करावा । मग अनुवृत्तिपंथें आणावा । मूर्ध्निवरी ॥ १४ ॥ तेथ आकाशीं मिळे न मिळे । तैसा धरावा धारणाबळें । जंव मात्रात्रय मावळे । अर्धबिंबी ॥ १५ ॥ तंववरीं तो समीरु । निराळीं कीजे स्थिरु । मग लग्नीं जेवीं ॐकारु । बिंबींचि विलसे ॥ १६ ॥

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् । यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥

तैसें ॐ हें स्मरों सरे । आणि तेथेंचि प्राणु पुरे । मग प्रणवांतीं उरे । पूर्णघन जें ॥ १७ ॥ म्हणोनि प्रणवैकनाम । हें एकाक्षर ब्रह्म । जे माझें स्वरूप परम । स्मरतसांता ॥ १८ ॥ यापरी त्यजी देहातें । तो त्रिशुद्धी पावे मातें । जया पावणया परौतें । आणिक पावणें नाहीं ॥ १९ ॥ येथ अर्जुना जरी विपायें । तुझां जीवीं हन ऐसें जाये । ना हें स्मरण मग होये । कासयावरी अंतीं ॥ १२० ॥ इंद्रियां अनुघडु पडलिया । जीविताचें सुख बुडालिया । आंतुबाहेरी उघडलिया । मृत्युचिन्हें । २१ ॥ ते वेळीं बैसावेंचि कवणें । मग कवण निरोधी करणें । तेथ काह्याचेनि अंतःकरणें । प्रणव स्मरावा ॥ २२ ॥ तरि अगा ऐसिया ध्वनी । झणें थारा देशी हो मनी । पैं नित्य सेविला मी निदानीं । सेवकु होय ॥ २३ ॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः । तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् । नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ १५ ॥

जे विषयांसि तीळांजळी देऊनि । प्रवृत्तीवरी निगड वाऊनि । मातें हृदयीं सूनि । भोगिताती ॥ २४ ॥ परि भोगितया आराणुका । भेटणें नाहीं क्षुधादिकां । तेथ चक्षुरादिकां । कवण पाडु ॥ २५ ॥ ऐसे निरंतर एकवटले । जे अंतःकरणीं मजसी लिगटले । मीचि होऊनि आटले । उपासिती ॥ २६ ॥ तयां देहावसान जैं पावे । तैं तिहीं मातें स्मरावें । मग म्यां जरी पावावें । तरि उपास्ति ते कायसी ॥ २७ ॥ पैं रंकु एक आडलेपणें । काकुळती अंतीं धांवां गा धांवां म्हणे । तरि तयाचिये ग्लानी धांवणें । काय न घडे मज ॥ २८ ॥ आणि भक्तांही तेचि दशा । तरी भक्तीचा सोसु कायसा । म्हणऊनि हा ध्वनी ऐसा । न वाखाणावा ॥ २९ ॥ तिहीं जे वेळीं मी स्मरावा । ते वेळीं स्मरला कीं पावावा । तो आभारुही जीवा । साहवेचि ना ॥ १३० ॥ तें ऋणवैपण देखोनि आंगीं । मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं । भक्तांचियां तनुत्यागीं । परिचर्या करीं ॥ ३१ ॥ देहवैकल्याचा वारा । झणें लागेल या सुकुमारा । म्हणोनि आत्मबोधाचां पांजिरां । सूयें तयातें ॥ ३२ ॥ वरि आपुलिया स्मरणाची उवाइली । हींव ऐसी करीं साउली । ऐसेनि नित्यबुद्धि संचली । मी आणीं तयातें ॥ ३३ ॥ म्हणोनि देहांतींचें सांकडें । माझिया कहींचि न पडे । मी आपुलियातें आपुलीकडे । सुखेंचि आणीं ॥ ३४ ॥ वरचील देहाची गंवसणी फेडूनी । आहाच अहंकाराचे रज झाडुनी । शुद्ध वासना निवडुनी । आपणपां मेळवीं ॥ ३५ ॥ आणि भक्तां तरी देहीं । विशेष एकवंकीचा ठाव नाहीं । म्हणऊनि

अव्हेरु करितां कांहीं । वियोगु ऐसा न वाटे ॥ ३६ ॥ नातरी देहांतींचि मियां यावें । मग आपणपयातें न्यावें । हेंही नाहीं स्वभावें । जे आधींचि मज मीनले ॥ ३७ ॥ येरी शरीराचिया सलिलीं । असतेपण हेचि साउली । वांचूनि चंद्रिका ते ठेली । चंद्रींच आहे ॥ ३८ ॥ ऐसे जे नित्ययुक्त । तयासी सुलभ मी सतत । म्हणऊनि देहांतीं निश्चित । मीचि होती ॥ ३९ ॥ मग क्लेशतरूची वाडी । जे तापत्रयाग्नीची सगडी । जे मृत्युकाकासि कुरोंडी । सांडिली आहे ॥ १४० ॥ जें दैन्याचें दुभतें । जें महाभयातें वाढवितें । जें सकळ दुःखाचें पुरतें । भांडवल ॥ ४१ ॥ जें दुर्मतीचें मूळ । जें कुकर्माचें फळ । जें व्यामोहाचें केवळ । स्वरूपचि ॥ ४२ ॥ जें संसाराचें बैसणें । जें विकारांचें उद्यानें । जे सकळ रोगांचें भाणें । वाढिलें आहे ॥ ४३ ॥ जे काळाचा खिचउशिटा । जें आशेचा आंगवठा । जन्ममरणाचा वोलिंवटा । स्वभावें जें ॥ ४४ ॥ जें भुलीचें भरिंव । जें विकल्पाचें वोतिंव । किंबहुना पेंव । विंचुवांचें ॥ ४५ ॥ जें व्याघ्राचें क्षेत्र । जें पण्यांगनेचें मैत्र । जें विषयविज्ञानयंत्र । सुपूजित ॥ ४६ ॥ जें लावेचा कळवळा । निवालिया विषोदकाचा गळाळा । जें विश्वासु आंगवळा । संवचोराचा ॥ ४७ ॥ जें कोढियाचें खेंव । जें काळसर्पाचें मार्दव । जें गोरीचें स्वभाव । गायन जें ॥ ४८ ॥ जें वैरियाचा पाहुणेरु । जें दुर्जनाचा आदरु । हें असो जें सागरु । अनर्थाचा ॥ ४९ ॥ जें स्वप्नीं देखिलें स्वप्न । जें मृगजळें सासिन्नलें वन । जें धूम्ररजांचें गगन । ओतलें आहे ॥ १५० ॥ ऐसें जें हें शरीर । तें ते न पवतीची पुढती नर । जे होऊनि ठेले अपार । स्वरूप माझें ॥ ५१ ॥

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन । मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥

एन्हवी ब्रह्मपणाचिये भडसे । न चुकतीचि पुनरावृत्तीचे वळसे । परि निवटलियांचे जैसें । पोट न दुखे ॥ ५२ ॥ नातरी चेइलियानंतरें । न बुडिजे स्वप्नींचेनि महापूरें । तेवीं मातें पावले ते संसारें । लिंपतीचि ना ॥ ५३ ॥ एन्हवीं जगदाकाराचें सिरें । जें चिरस्थायीयांचे धुरे । ब्रह्मभुवन गा चवरे । लोकाचळाचें ॥ ५४ ॥ जिये गांवींचा पहारु दिवोवरी । एका अमरेंद्राचें आयुष्य न धरी । विळोनि पांती उठी एकसरी । चवदाजणांची ॥ ५५ ॥

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः । रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ १७ ॥

जैं चोकडिया सहस्त्र जाये । तैं ठायेठावो विळुचि होये । आणि तैसेंचि सहस्त्रे वरिये पाहें । रात्री जेथ ॥ ५६ ॥ येवढे अहोरात्र जेथिंचे । तेणें न लोटती जे भाग्याचे । देखती ते स्वर्गींचे । चिरंजीव ॥ ५७ ॥ येरां सुरगणांची नवाई । विशेष सांगावी येथ काई । मुदला इंद्राचीचि दशा पाहीं । जे दिहाचे चौदा ॥ ५८ ॥ परि ब्रह्मयाचियाहि आठां प्रहारांतें । आपुलियां डोळां देखते । आहाति गा तयांतें । अहोरात्रविद म्हणिपे ॥ ५९ ॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे । रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते । रात्र्यागमेवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

तिये ब्रह्मभुवनीं दिवसें पाहे । ते वेळीं गणना केंही न समाये । ऐसें अव्यक्ताचें होये । व्यक्त विश्व ॥ १६० ॥ पुढती दिहाची चौपाहारी फिटे । आणि हा आकारसमुद्र आटे । पाठीं तैसाचि मग पाहांटे । भरों लागे ॥ ६१ ॥ शारदीयेचिये प्रवेशीं । अभ्रें जिरती आकाशीं । मग ग्रीष्मांतीं जैशीं । निघती पुढती ॥ ६२ ॥ तैशीं ब्रह्मदिनाचिये आदी । हे भूतसृष्टीची मांदी । मिळे जंव सहस्त्रावधी । निमित्त पुरे ॥ ६३ ॥ पाठीं रात्रींचा अवसरु होये । आणि विश्व अव्यक्तीं लया जाये । तोही युगसहस्त्र मोटका पाहे । आणि तैसेंचि रचे ॥ ६४ ॥ हे सांगावया काय उपपत्ती । जे जगाचा प्रळयो आणि संभूती । इये ब्रह्मभुवनींचिया होती । अहोरात्रामाजीं ॥ ६५ ॥ कैसें थोरिवेचें मान पाहें पां । तो सृष्टिबीजाचा साटोपा । परि पुनरावृत्तीचिया मापा । शीग जाहला ॥ ६६ ॥ एऱ्हवीं त्रैलोक्य हें धनुर्धरा । तिये गांवींचा गा पसारा । तो हा दिनोदयीं एकसरां । मांडत असे ॥ ६७ ॥ पाठी रात्रींचा समो पावे । आणि अपैसाचि सांठवे । म्हणिये जेथिंचें तेथ स्वभावें । साम्यासि ये ॥ ६८ ॥ जैसें वृक्षपण बीजासि आलें । कीं मेघ हें गगन जाहालें । तैसें अनेकत्व जेथ सामावलें । तें साम्य म्हणिपे ॥ ६९ ॥

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः । यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥

तेथ समविषम न दिसे कांहीं । म्हणोनि भूतें हे भाष नाहीं । जेंवि दूधचि जाहलिया दहीं । नामरूप जाय ॥ १७० ॥ तेविं आकारलोपासरिसें । जगाचें जगपण भ्रंशे । परि जेथे जाहालें तें जैसें । तैसेंचि असे ॥ ७१ ॥ तैं तया नांव सहज अव्यक्त । आणि आकारावेळीं तेंचि व्यक्त । हें एकास्तव एक सूचित । एऱ्हवीं दोनी नाहीं ॥ ७२ ॥ जैसें आटलिया रूपें । आटलेपण ते खोटी म्हणिपे । पुढती तो घनाकारु हारपे । जे वेळीं अळंकार होती ॥ ७३ ॥ इयें दोन्ही जैसीं होणीं । एकिं साक्षीभूत सुवर्णी । तैसी व्यक्ताव्यक्ताची कडसणी । वस्तूंचां ठायीं ॥ ७४ ॥ तें तरी व्यक्त ना अव्यक्त । नित्य ना नाशवंत । या दोहीं भावातीत । अनादिसिद्ध ॥ ७५ ॥ जें हें विश्वचि होऊनि असे । परी विश्वपण नासलेनि न नासे । अक्षरें पुसिल्या न पुसे । अर्थु जैसा ॥ ७६ ॥ पाहें पां तरंग तरी होत जात । परि तेथ उदक तें अखंड असत । तेवीं भूतभावीं नाशिवंत । अविनाश जें ॥ ७७ ॥ नातरी आटतिये अळंकारीं । नाटतें कनक असे जयापरी । तेवीं मरतिये जीवाकारीं । अमर जें आहे ॥ ७८ ॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् । यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया । यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

जयातें अव्यक्त म्हणों ये कोडें । म्हणतां स्तुति हे ऐसे नावडे । जे मना बुद्धी न सांपडे । म्हणऊनियां ॥ ७९ ॥ आणि आकारा आलिया जयाचें । निराकारपण न वचे । आकारलोपें न विसंचे । नित्यता गा ॥ १८० ॥ म्हणोनि अक्षर जें म्हणिजे । तेंवींचि म्हणता बोधुही उपजे । जयापरौता पैसु न देखिजे । या नाम परमगती ॥ ८१ ॥ पैं आघवा इहीं देहपुरीं । आहे

निजेलियाचे परी । जो व्यापारु करवी ना करी । म्हणऊनियां ॥ ८२ ॥ एऱ्हवीं जे शारीरचेष्टा । त्यांमाजी एकही न ठके गा सुभटा । दाहीं इंद्रियांचिया वाटा । वाहतचि आहाती ॥ ८३ ॥ उकलूं विषयांचा पेटा । होत मनाचां चोहटां । तो सुखदुःखाचा राजवांटा । भीतराहि पावे ॥ ८४ ॥ परि रावो पहुडलिया सुखें । जैसा देशींचा व्यापारु न ठके । प्रजा आपुलालेनि अभिलाखें । करितचि असती ॥ ८५ ॥ तैसें बुद्धींचें हन जाणणें । कां मनाचें घेणें देणें । इंद्रियांचे करणें । स्फुरण वायूचें ॥ ८६ ॥ हे देहक्रिया आघवी । न करवितां होय बरवी । जैसा न चलवितेनि रवी । लोकु चाले ॥ ८७ ॥ अर्जुना तयापरी । सुतला ऐसा आहे शरीरीं । म्हणोनि पुरुषु गा अवधारीं । म्हणिपे जयातें ॥ ८८ ॥ आणि प्रकृतिपतिव्रते । पडिला एकपत्निव्रतें । येणेंही कारणें जयातें । पुरुष म्हणों ये ॥ ८९ ॥ पैं वेदांचे बहुवसपण । देखेचिना जयाचे आंगण । हें गगनाचें पांघरूण । होय देखा ॥ १९० ॥ ऐसें जाणूनि योगीश्वर । जयातें म्हणती परमपर । जें अनन्यगतीचें घर । गिंवसीत ये ॥ ९१ ॥ जें तनूवाचाचित्तें । नाइकती दुजिये गोष्टीतें । तयां एकनिष्ठतेचें पिकतें । सुक्षेत्र जें ॥ ९२ ॥ हें त्रैलोक्यचि पुरुषोत्तमु । ऐसा साचु जयांचा मनोधर्मु । तयां आस्तिकांचा आश्रमु । पांडवा गा ॥ ९३ ॥ जें निगर्वाचें गौरव । जें निर्गुणाची जाणीव । जें सुखाची राणीव । निराशांसी ॥ ९४ ॥ जें संतोषियां वाढिलें ताट । जें अचिंतां अनाथांचें मायपोट । भक्तीसी उजू वाट । जया गांवा ॥ ९५ ॥ हें एकैक सांगोनि वाया । काय फार करूं धनंजया । पैं गेलिया जया ठाया । तो ठावोचि होईजे ॥ ९६ ॥ हिंवाचिया झळुका । जैसें हिंवचि पडे उष्णोदका । कां समोर जालिया अर्का । तमचि प्रकाशु होय ॥ ९७ ॥ तैसा संसारु जया गांवा । गेला सांता पांडवा । होऊनि ठाके आघवा । मोक्षाचाचि ॥ ९८ ॥ तरि अग्नीमाजीं आलें । जैसे इंधनचि अग्नि जाहलें । पाठीं न निवडेचि कांहीं केलें । काष्ठपण ॥ ९९ ॥ नातरी साखरेचा माघौता । बुद्धिमंतपणेंही करितां । परि ऊंस नव्हे पंडुसुता । जियापरी ॥ २०० ॥ लोहाचें कनक जहालें । हें एकें परिसें केलें । आतां आणिक कैचें तें गेलें । लोहत्व आणी ॥ १ ॥ म्हणोनि तूप होऊनि माघौते । जेवीं दूधपणा न येचि निरुतें । तेवि पावोनियां जयातें । पुनरावृत्ति नाहीं ॥ २ ॥ तें माझें परम । साचोकारें निजधाम । हें आंतुवट तुज वर्म । दाविजत असे ॥ ३ ॥

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः । प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥

तेंवींचि आणिकेंही एकें प्रकारें । हें जाणतां आहे सोपारें । तरि देह सांडितेनि अवसरें । जेथ मिळती योगी ॥ ४ ॥ अथवा अवचटें ऐसें घडे । जे अनवसरें देह सांडे । तरि माघौतें येणें घडे । देहासीचि ॥ ५ ॥ म्हणोनि काळशुद्धी जरी देह ठेविती । तरी ठेवितखेवीं ब्रह्मचि होती । एऱ्हवीं अकाळीं तरी येती । संसारा पुढती ॥ ६ ॥ तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ती । ये दोन्ही अवसराआधीन आहाती । तो अवसरु तुजप्रती । प्रसंगें सांगों ॥ ७ ॥ तरि ऐकें गा सुभटा ।

पातलिया मरणाचा माजिवटा। पांचै आपुलालिया वाटा। निघती अंतीं॥ ८॥ ऐसां वरिपडिलां प्रयाणकाळीं। बुद्धीतें भ्रमु न गिळी। स्मृति नव्हे आंधळी। न मरे मन॥ ९॥ हा चेतनावर्गु आघवा। मरणीं असे टवटवा। परि अनुभविलिया ब्रह्मभावा। गंवसणी होऊनि॥ २१०॥ ऐसा सावध हा समवावो। आणि निर्वाणवेन्हीं निर्वाहो। हें तरीच घडे जरी सावावो। अग्नीचा आथी॥ ११॥ पाहा पां वारेन कां उदकें। जें दिवियाचें दिवेपण झांके। तैं असतीच काय देखे। दिठी आपुली॥ १२॥ तैसें देहांतींचेनि विषमवातें। देह आंत बाहेरि श्लेष्मा आते। तैं विझोनि जाय उजितें। अग्नीचें जेव्हां॥ १३॥ ते वेळीं प्राणासीचि प्राणु नाहीं। तेथ बुद्धि असोनि करील काई। म्हणोनि अग्नीविण देहीं। चेतना न थरे॥ १४॥ अगा देहींचा अग्नि जरी गेला। तरी देह नव्हे चिखलु वोला। वायां आयुष्यवेळु आपुला। आंधारां गिंवसी॥ १५॥ आणि मागील स्मरण आघवें। तें तेणें अवसरें सांभाळावें। मग देह त्यजूनि मिळावें। स्वरूपीं कीं॥ १६॥ तंव तया देहश्लेष्माचां चिखलीं। चेतनाचि बुडोनि गेली। तेथ मागिली पुढिली हे ठेली। आठवण सहजें॥ १७॥ म्हणोनि आधीचि अभ्यासु जो केला। तो मरण न येतांचि निमोनि गेला। जैसें ठेवणें न दिसतां मालवला। दीपु हातींचा॥ १८॥ आतां असो हें सकळ। जाण पां ज्ञानासि अग्नि मूळ। तया अग्नीचें प्रयाणीं बळ। संपूर्ण आथी॥ १९॥

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम्। तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः॥ २४॥

आंत अग्निज्योतीचा प्रकाशु। बाहेरी शुक्लपक्ष परी दिवसु। आणि सामासांमाजीं मासु। उत्तरायण॥ २२०॥ ऐसिया समयोगाची निरुती। लाहोनि जे देह ठेवती। ते ब्रह्मविद होती। परब्रह्म॥ २९॥ अवधारीं गा धनुर्धरा। येथवरी सामर्थ्य यया अवसरा। तेवींचि हा उजू मार्ग स्वपुरा। यावयासी॥ २२॥ एथ अग्नी हें पहिलें पायतरें। ज्योतिर्मय हें दुसरें। दिवस जाणें तिसरें। चौथें शुक्लपक्ष॥ २३॥ आणि सामास उत्तरायण। तें वरचील गा सोपान। येणें सायुज्यसिद्धिसदन। पावती योगी॥ २४॥ हा उत्तम काळु जाणिजे। यातें अर्चिरा मार्गु म्हणिजे। आतां अकाळु तोही सहजें। सांगेन आईक॥ २५॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम्। तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते॥ २५॥

तरि प्रयाणाचेनि अवसरें। वातुश्लेष्मु सुभरे। तेणें अंतःकरणीं आंधारें। कोंदलें ठाके॥ २६॥ सर्वेंद्रियां लांकुड पडे। स्मृति भ्रमामाजीं बुडे। मन होये वेडें। कोंडे प्राण॥ २७॥ अग्नीचें अग्निपण जाये। मग तो धूमचि अवघा होये। तेणें चेतना गिंवसली ठाये। शरीरींची॥ २८॥ जैसें चंद्राआड आभाळ। सदट दाटे सजळ। मग गडद ना उजाळ। ऐसें झांवळें होय॥ २९॥ कां मरे ना सावध। ऐसें जीवितासि पडे स्तब्ध। आयुष्य मरणाची मर्याद। वेळु ठाकी॥ २३०॥ ऐसी मनबुद्धिकरणीं। सभोंवतीं धुमाकुळाची कोंडणी। जेथ जन्में जोडलिये वाहणी। युगचि बुडे॥ ३१॥ हां गा हातींचें जे वेळीं जाये। ते वेळीं आणिका लाभाची गोठी

कें आहे । म्हणऊनि प्रयाणीं तंव होये । येतुली दशा ॥ ३२ ॥ आणि देहाआंतु ऐसी स्थिती । बाहेरी कृष्णपक्षु वरि राति । आणि सामासही ते वोडवती । दक्षिणायन ॥ ३३ ॥ इये पुनरावृत्तीचीं घराणी । आघवीं एकवटती जयाचिया प्रयाणीं । तो स्वरूपसिद्धीची कहाणी । कैसेनि आइके ॥ ३४ ॥ ऐसा जयाचा देह पडे । तया योगी म्हणोनि चंद्रवरी जाणें घडे । मग तेथूनि मागुता बहुडे । संसारा ये ॥ ३५ ॥ आम्हीं अकाळु जो पांडवा । म्हणितला तो हा जाणावा । आणि हाचि धूम्रमार्गु गांवा । पुनरावृत्तीचिया ॥ ३६ ॥ येर तो अर्चिरा मार्गु । तो वसता आणि असलगु । साविया स्वस्त चांगु । निवृत्तीवरी ॥ ३७ ॥

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते । एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥ २६ ॥

ऐसिया अनादि या दोन्ही वाटा । एकी उजू एकी अव्हाटां । म्हणऊनि बुद्धिपूर्वक सुभटा । दाविलिया तुज ॥ ३८ ॥ कां जे मार्गामार्ग देखावे । साच लटिकें वोळखावें । हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥ ३९ ॥ पाहें पां नाव देखतां बरवी । कोणी आड घाली काय अथावीं । कां सुपंथ जाणोनिया अडवीं । रिगवत असे ॥ २४० ॥ जो विष अमृत वोळखे । तो अमृत काय सांडू शके । तेविं जो उजू वाट देखे । तो अव्हाटां न वचे ॥ ४१ ॥ म्हणोनि फुडें । पारखावें खरें कुडें । पारखिलें तरी न पडे । अनवसरें कहीं ॥ ४२ ॥ एऱ्हवीं देहांतीं थोर विषम । या मार्गाचे आहे संभ्रम । जन्में अभ्यासिलियाचें हन काम । जाईल वायां ॥ ४३ ॥ जरी आर्चिरा मार्गु चुकलिया । अवचटे धूम्रपंथें पडलिया । तरी संसारपांतीं जुंतलिया । भंवताचि असावें ॥ ४४ ॥ हे सायास देखोनि मोठे । आतां कैसेनि पां एकवेळ फिटे । म्हणोनि योगमार्ग गोमटे । शोधले दोन्ही ॥ ४५ ॥ तंव एकें ब्रह्मत्वा जाइजे । आणि एकें पुनरावृत्ती येइजे । परि दैवगत्या जो लाहिजे । देहांतीं जेणें ॥ ४६ ॥

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन । तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ २७ ॥

ते वेळीं म्हणितले हें नव्हे । वायां अवचटें काय पावे । देह जाऊनि वस्तु होआवे । मार्गेंचि कीं ॥ ४७ ॥ तरी आतां देह असो अथवा जावो । आम्हीं तों केवळ वस्तूचि आहों । कां जे दोरीं सर्पत्व वावो । दोराचिकडुनि ॥ ४८ ॥ मज तरंगपण असे का नसे । ऐसें हें उदकासी कहीं प्रतिभासे । ते भलतेव्हां जैसें तैसें । उदकचिं कीं ॥ ४९ ॥ तरंगाकारें न जन्मेचि । ना तरंगलोपें न निमेचि । तेविं देहीं जे देहेंचि । वस्तु जाहले ॥ २५० ॥ आतां शरीराचे तयाचिया ठाई । आडनांवही उरलें नाहीं । तरी कोणें काळें काई । निमे तें पाहें पां ॥ ५१ ॥ मग मार्ग तैं कासया शोधावे । कोणें कोठूनि कें जावें । जरी देशकालादि आघवें । आपणचि असिजे ॥ ५२ ॥ आणि हां गा घटु जे वेळीं फुटे । ते वेळीं तेथिंचे आकाश लागे नीट वाटे । वाटा लागे तरि गगना भेटे । एऱ्हवी चुके ॥ ५३ ॥ पाहें पां ऐसें हन आहे । की तो आकारुचि म्हणो जाये । येर गगन तें गगनींचि आहे । घटत्वाहि आधीं ॥ ५४ ॥ ऐसिया बोधाचेनि सुरवाडें ।

मार्गामार्गाचें सांकडें । तयां सोऽहंसिद्धा न पडे । योगियांसी ॥ ५५ ॥ याकारणें पंडुसुता । तुवां होआवें योगयुक्ता । येतुलेनि सर्वकालीं साम्यता । आपणपां होईल ॥ ५६ ॥ मग भलतेथ भलतेव्हां । देहबंधु असो अथवा जावा । परि अबंधा नित्य ब्रह्मभावा । विघड नाहीं ॥ ५७ ॥ तो कल्पादि जन्मा नागवे । कल्पांतीं मरणें नाप्लवे । माजि स्वर्गसंसाराचेनि लाघवें । झकवेना ॥ ५८ ॥ येणें बोधे जो योगी होये । तयासी या बोधाचेंचि नीटपण आहे । कां जे भोगातें पेलूनि पाहें । निजरूपा ये ॥ ५९ ॥ पैं गा इंद्रादिका देवा । जयां सर्वस्वें गाजती राणिवा । तें सांडणें मानूनि पांडवा । डावली जो ॥ २६० ॥

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥ २८ ॥

जरी वेदाध्ययनाचें जाले । अथवा यज्ञाचें शेतचि पिकलें । कां तपोदानांचे जोडलें । सर्वस्व हन जें ॥ ६१ ॥ तया आघवयांचि पुण्याचा मळा । भारु आंतौनि जया ये फळा । जें परब्रह्मा निर्मळा । सांठि न सरे ॥ ६२ ॥ जें नित्यानंदाचेनि मानें । उपमेचा कांटाळां न दिसे सानें । पाहा पां वेदयज्ञादि साधनें । जया सुखा ॥ ६३ ॥ जें विटे ना सरे । भोगितयाचेनि पवाडें पुरे । पुढती महासुखाचें सोयरें । भावंडचि ॥ ६४ ॥ ऐसें दृष्टीचेनि सुखपणें । जयासी अदृष्टाचें बैसणें । जे शतमखींहि आंगवणें । नोहेचि एका ॥ ६५ ॥ तयाते योगीश्वर अलौकिकें । दिठीचेनि हाततुकें । अनुमानिती कौतुकें । तंव हळुवार आवडे ॥ ६६ ॥ मग तया सुखाची किरीटी । करूनिया गा पाउटी । परब्रह्माचिये पाठीं । आरूढती ॥ ६७ ॥ ऐसें चराचरैकभाग्य । जें ब्रह्मेशां आराधनायोग्य । योगियांचे भोग्य । भोगधन जें ॥ ६८ ॥ जो सकळ कळांची कळा । जो परमानंदाचा पुतळा । जो जिवाचा जिव्हाळा । विश्वाचिया ॥ ६९ ॥ जो सर्वज्ञतेचा वोलावा । जो यादव कुळींचा कुळदिवा । तो कृष्ण जी पांडवा - । प्रती बोलिला ॥ २७० ॥ ऐसा कुरुक्षेत्रींचा वृत्तांतु । संजयो रायासी असे सांगतु । तेचि परिसया पुढां मातु । ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा ॥२७१ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
अक्षरब्रह्मयोगोनाम अष्टमोऽध्यायः ॥ (श्लोक २८; ओव्या २७१)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय नववा)

तरि अवधान एकवेळें दीजे । मग सर्व सुखासि पात्र होइजे । हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ॥ १ ॥ परि प्रौढी न बोलें हो जी । तुम्हां सर्वज्ञांचां समाजीं । देयावें अवधान हे माझी । विनवणी सलगीची ॥ २ ॥ कां जे लळेयांचें लळे सरती । मनोरथांचे मनोरथ पुरती । जरी माहेरें श्रीमंते होती । तुम्हां ऐसी ॥ ३ ॥ तुमचेया दिठिवेयाचिये वोले । सासिन्नले प्रसन्नतेचे मळे । ते साऊली देखोनि लोळें । श्रांतु जी मी ॥ ४ ॥ प्रभू तुम्ही सुखामृताचे डोहो । म्हणोनि आम्ही आपुलिया स्वेच्छा वोलावों लाहों । येथही जरी सलगी करूं बिहों । तरी निवों कें पां ॥ ५ ॥ नातरी बालक बोबडां बोलीं । कां वांकुडां विचुकां पाऊलीं । तें चोज करूनि माउली । रिझे जेवीं ॥ ६ ॥ तेवीं तुम्हा संतांचा पढियावो । कैसेनि तरि आम्हांवरी हो । या बहुवा आळुकिया जी आहों । सलगी करित ॥ ७ ॥ वांचूनि माझिये बोलतीये योग्यते । सर्वज्ञ भवादृश श्रोते । काय धड्यावरी सारस्वतें । पढो सिकिजे ॥ ८ ॥ अवधारा आवडे तेसणां धुंधुरु । परि महातेजीं न मिरवे काय करू । अमृताचिया ताटीं वोगरूं । ऐसी रससोय कैंची ॥ ९ ॥ अहो हिमकरासी विंजणें । कीं नादापुढें आइकवणें । लेणियासी लेणें । हें कहीं आथी ॥ १० ॥ सांगा परिमळें काय तुरंबावें । सागरें कवणे ठायीं नाहावें । हें गगनचि आडे आघवें । ऐसा पवाडु कैंचा ॥ ११ ॥ तैसें तुमचें अवधान धाये । आणि तुम्ही म्हणा हें होये । ऐसें वक्तृत्व कवणा आहे । जेणें रिझा तुम्ही ॥ १२ ॥ तरि विश्वप्रगटितया गभस्ती । हातिवेनि न कीजे आरती । कां चुळोदकें अपांपती । अर्घ्यु नेदिजे ॥ १३ ॥ प्रभु तुम्हीं महेशाचिया मूर्ती । आणि मी दुबळा अर्चितसें भक्ती । म्हणोनि बोल जन्ही गंगावती । तन्ही स्वीकाराल कीं ॥ १४ ॥ बाळक बापाचिये ताटीं रिगे । रिगौनि बापातेंच जेवऊं लागे । की तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोडवी ॥ १५ ॥ तैसा मी जरी तुम्हांप्रती । चावटी करीतसें बाळमती । तरी तुम्हीं संतोषिजे ऐसी जाती । प्रेमाची या ॥ १६ ॥ आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें । तुम्ही संत घेतले असा बहुवे । म्हणोनि केलिये सलगीचा नोहे । आभारु तुम्हां ॥ १७ ॥ अहो तान्ह्याचे लागे झटे । तरी अधिकचि पान्हा फुटे । रोषें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ॥ १८ ॥ म्हणऊनि मज लेंकुरवाचेनि बोले । तुमचें कृपाळूपण निदैलें । तें चेइलें हें जी जाणवलें । यालागीं बोलिलों मी ॥ १९ ॥ एन्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणीं । कीं वारया घापत आहे

वाहणीं । हां हो गगनासि गंवसणी । घालिजे केवी ॥ २० ॥ आइकां पाणी वोथिजावें न लगे । नवनीतीं माथुला न रिगे । तेविं लाजिलें व्याख्यान न निगे । देखोनि जयांतें ॥ २१ ॥ हें असो शब्दब्रह्म जिये बाजे । शब्द मावळलेया निवांतु निजे । तो गीतार्थु मन्हाटिया बोलिजे । हा पाडु काई ॥ २२ ॥ परि ऐसियाही मज धिंवसा । तो पुढतियाचि येकी आशा । जे धिटींवा करूनि भवादृशां । पढियंतया होआवें ॥ २३ ॥ परि आतां चंद्रापासोनि निववितें । जें अमृताहूनि जीववितें । तेणें अवधानें कीजो वाढतें । मनोरथा माझिया ॥ २४ ॥ कां जैं दिठिवा तुमचा वरुषे । तैं सकळार्थसिद्धि मती पिके । एऱ्हवीं कोंभेला उन्मेषु सुके । जरी उदास तुम्ही ॥ २५ ॥ सहजें तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा । तरी दोंदे पेलतीं अक्षरां । प्रमेयाचीं ॥ २६ ॥ अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावो अभिप्रायातें विये । भावाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ॥ २७ ॥ म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे । आणि श्रोता दुश्चित्ता तरि वितुळे । मांडला रसु ॥ २८ ॥ अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्रीं कीं आहे । म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनविण ॥ २९ ॥ परी आतां आमुतें गोड करावें । ऐसें हें तांदुळीं कासया विनवावें । साइखडियानें काइ प्रार्थावें । सूत्रधारातें ॥ ३० ॥ काय तो बाहुलियांचिया काजा नाचवी । कीं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी । म्हणऊनि आम्हां या ठेवाठेवी । काय काज ॥ ३१ ॥ तंव गुरु म्हणती काइ जाहलें । हें समस्तही आम्हां पावलें । आतां सांगें जें निरोपिलें । नारायणें ॥ ३२ ॥ येथ संतोषोनि निवृत्तिदासें । जी जी म्हणऊनि उल्हासें । अवधारा श्रीकृष्ण ऐसे । बोलते जाहले ॥ ३३ ॥

श्रीभगवानुवाच : इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे । ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १ ॥

ना तरि अर्जुना हें बीज । पुढती सांगिजेल तुज । जें हें अंत:करणींचें गुज । जीवाचिये ॥ ३४ ॥ येणें मानें जीवाचें हियें फोडावें । मग गुज कां पां मज सांगावें । ऐसें कांही स्वभावें । कल्पिशी जरी ॥ ३५ ॥ तरी परियेसीं प्राज्ञा । तूं आस्थेचीच संज्ञा । बोलिलिये गोष्टीची अवज्ञा । नेणसी करूं ॥ ३६ ॥ म्हणोनि गूढपण आपुलें मोडो । वरि न बोलावेंही बोलावें घडो । परि आमुचिये जीवींचें पडो । तुझां जीवीं ॥ ३७ ॥ अगा थानीं कीर दूध गूढ । परि थानासीचि नव्हे कीं गोड । म्हणोनि सरो कां सेवितयाची चाड । जरी अनन्य मिळे ॥ ३८ ॥ मुडाहूनि बीज काढिलें । मग निर्वाळलिये भूमी पेरिलें । तरि तें सांडीविखुरीं गेलें । म्हणों ये कायी ॥ ३९ ॥ यालागीं सुमनु आणि शुद्धमती । जो अनिंदकु अनन्यगती । पैं गा गौप्यही परी तयाप्रती । चावळिजे सुखें ॥ ४० ॥ तरि प्रस्तुत आतां गुणीं इहीं । तूं वांचूनि आणिक नाहीं । म्हणोनि गुज तरी तुझां ठायीं । लपवूं नये ॥ ४१ ॥ आतां किती नावानावा गुज । म्हणतां कानडें वाटेल तुज । तरि ज्ञान सांगेन सहज । विज्ञानेंसी ॥ ४२ ॥ परि तेंचि ऐसेनि निवाडें । जैसें भेसळलें खरें कुडें । मग काढिजे फाडोवाडें । पारखूनियां ॥ ४३ ॥ कां चांचूचेनि सांडसें । खांडिजे पय पाणी

राजहंसें । तुज ज्ञान विज्ञान तैसें । वाटूनि देऊं ॥ ४४ ॥ मग वारयाचियां धारसां । पडिला कोंडा कां नुरेचि जैसा । आणि अन्नकणाचा आपैसा । राशि जोडे ॥ ४५ ॥ तैसें जे जाणितलेयासाठीं । संसार संसाराचिये गांठी । लाऊनि बैसवी पाटीं । मोक्षश्रियेचां ॥ ४६ ॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् । प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥

जें जाणणेयां आघवेयांचां गांवी । गुरुत्वाची आचार्यपदवी । जें सकळ गुह्यांचा गोसावी । पवित्रां रावो ॥ ४७ ॥ आणि धर्माचें निजधाम । तेविंचि उत्तमाचें उत्तम । पैं जया येतां नाहीं काम । जन्मांतराचें ॥ ४८ ॥ मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे । आणि हृदयीं स्वयंभचि असे । प्रत्यक्ष फावों लागे तैसें । आपैसयाचि ॥ ४९ ॥ तेविंचि पैं गा सुखाचां पाउटीं । चढतां येइजे जयाचिया भेटी । मग भेटल्या कीर मिठी । भोगणेयाहि पडे ॥ ५० ॥ परि भोगाचिया ऐलीकडिलिये मेरे । चित्त उभे ठेंलेचि सुखा भरे । ऐसे सुलभ आणि सोपारें । वरि परब्रह्म ॥ ५१ ॥ पैं गा आणिकही एक याचें । जें हाता आलें तरी न वचे । आणि अनुभवितां कांही न वेचे । वरि विटेहि ना ॥ ५२ ॥ येथ जरी तूं तार्किका । ऐसी हन घेसी शंका । ना येवढी वस्तु हे लोकां । उरली केविं पां ॥ ५३ ॥ एकोत्तरेयाचिया वाढी । जें जळतिये आगीं घालिती उडी । ते अनायासें स्वगोडी । सांडिती केविं ॥ ५४ ॥ तरि पवित्र आणि रम्य । तेविंचि सुखोपायेंचि गम्य । आणि स्वसुख परि धर्म्य । वरि आपणपां जोडे ॥ ५५ ॥ ऐसा अवघाचि सुरवाडु आहे । तरी जनाहातीं केविं उरों लाहे । हा शंकेचा ठाव कीर होये । परि न धरावी तुवां ॥ ५६ ॥

अश्रद्धधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप । अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड । परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्ध काय न घेती ॥ ५७ ॥ कां कमलकंदा आणि दर्दुरी । नांदणूक एकेचि घरीं । परि परागु सेविजे भ्रमरीं । जवळिलां चिखलुचि उरे ॥ ५८ ॥ नातरी निदैवाचां परिवरीं । लोह्या रुतलिया आहाति सहस्त्रवरीं । परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ॥ ५९ ॥ तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्वसुखाचा आरामु । कीं भ्रांतासि कामु । विषयावरी ॥ ६० ॥ बहु मृगजळ देखोनि डोळां । थुंकिजे अमृताचा गिळितां गळाळा । तोडिला परिसु बांधिला गळा । शुक्तिकालाभें ॥ ६१ ॥ तैसीं अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडीं । म्हणोनि जन्ममरणाचिये दुथडी । डहुळितें ठेलीं ॥ ६२ ॥ एऱ्हवीं मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा । कहीं नसे न दिसे ऐसा । वाणीचा नव्हें ॥ ६३ ॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥

माझेया विस्तारलेपणाचेनि नांवें । हें जगचि नोहे आघवें । जैसें दूध मुरालें स्वभावें । तरि तेंचि दहीं ॥ ६४ ॥ कां बीजचि जाहलें तरु । अथवा भांगारचि अळंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ ६५ ॥ हें अव्यक्तपणें थिजलें । तेंचि मग विश्वाकारें

वोथिजलें । तैसें अमूर्तमूर्ति मियां विस्तारलें । त्रैलोक्य जाणें ॥ ६६ ॥ महदादि देहांतें । इयें अशेषेंही भूतें । परि माझां ठायीं बिंबते । जैसे जळीं फेण ॥ ६७ ॥ परि तया फेणांआंतु पाहतां । जेवीं जळ न दिसे पंडुसुता । नातरीं स्वप्नींची अनेकता । चेइलिया नोहिजे ॥ ६८ ॥ तैसीं भूतें इयें माझां ठायीं । बिंबती तयामाजि मी नाहीं । इया उपपत्ती तुज पाहीं । सांगितलिया मागां ॥ ६९ ॥ म्हणऊनि बोलिलिया बोलाचा अतिसो । न कीजे यालागीं हें असो । तरी मजआंत पैसो । दिठी तुझी ॥ ७० ॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् । भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

आमुचा प्रकृतीपैलीकडील भावो । जरी कल्पनेवीण लागसी पाहों । तरी मजमाजि भूतें हेंही वावो । जे मी सर्व म्हणउनी ॥ ७१ ॥ एऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे । नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे । म्हणोनि अखंडित परि झांवळें । भूतभिन्न ऐसें देखे ॥ ७२ ॥ तेचि संकल्पाची सांज जैं लोपे । तैं अखंडितचि आहे स्वरूपें । जैसें शंका जातखेंवो लोपे । सापपण माळेचें ॥ ७३ ॥ एऱ्हवीं तरी भूमीआंतूनि स्वयंभ । काय घडेयागाडगेयांचे निघती कोंभ । परि ते कुलालमतीचे गर्भ । उमटले कीं ॥ ७४ ॥ नातरी सागरींच्या पाणीं । काय तरंगाचिया आहाति खाणी । ते अवांतर करणी । वारियाची नव्हे ॥ ७५ ॥ पाहें पां कापसाचां पोटीं । काय कापडाची होती पेटी । तो वेढितयाचिया दिठी । कापड जाहला ॥ ७६ ॥ जरी सोनें लेणें होऊनि घडे । तरी तयाचें सोनेपण न मोडे । येर अळंकार हे वरचिलीकडे । लेतयाचेनि भावें ॥ ७७ ॥ सांगें पडिसादाचीं प्रत्युत्तरें । कां आरिसां जें आविष्करे । तें आपलें कीं साचोकारें । तेथेंचि होतें ॥ ७८ ॥ तैसी इये निर्मळे माझां स्वरूपीं । जो भूतभावना आरोपी । तयासि तयाचां संकल्पीं । भूताभासु असे ॥ ७९ ॥ तेचि कल्पिती प्रकृती पुरे । आणि भूताभासु आधींच सरे । मग स्वरूप उरे एकसरें । निखळ माझें ॥ ८० ॥ हें असो आंगीं भरलिया भवंडीं । जैशा भोंवत दिसती अरडीदरडी । तैशी आपुलिया कल्पना अखंडीं । गमती भूतें ॥ ८१ ॥ तेचि कल्पना सांडूनि पाहीं । तरि मी भूतीं भूतें माझियां ठायीं । हें स्वप्नींहीं परि नाहीं । कल्पावयाजोगें ॥ ८२ ॥ आतां मी एक भूतातें धर्ता । अथवा भूतांमाजि मी असता । या संकल्पसन्निपाता - । आंतुलिया बोलिया ॥ ८३ ॥ म्हणोनि परियेसीं गा प्रियोत्तमा । यापरी मी विश्वेंसीं विश्वात्मा । जो इया लटकिया भूतग्रामा । भाव्यु सदा ॥ ८४ ॥ रश्मीचेनि आधारें जैसें । नव्हतेंचि मृगजळ आभासे । माझां ठायीं भूतजात तैसें । आणि मातेंही भावीं ॥ ८५ ॥ मी ये परीचा भूतभावनु । परि सर्व भूतांसि अभिन्नु । जैसी प्रभा आणि भानु । एकचि ते ॥ ८६ ॥ हा आमुचा ऐश्वर्ययोगु । तुवां देखिला कीं चांगु । आतां सांगें कांहीं एथ लागु । भूतभेदाचा असे ॥ ८७ ॥ यालागीं मजपासूनि भूतें । आनें नव्हती हें निरुतें । आणि भूतावेगळिया मातें । कहींच न मनीं हो ॥ ८८ ॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् । तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

पैं गगन जेवढें जैसें । पवनु गगनीं तेवढाचि असे । सहजे हालविलिया वेगळा दिसे । एऱ्हवीं गगन तेंचि तो ॥ ८९ ॥ तैसें भूतजात माझां ठायीं । कल्पिजे तरी आभासे कांहीं । निर्विकल्पीं तरि नाहीं । तेथ मीच मी आघवें ॥ ९० ॥ म्हणऊनि नाहीं आणि असे । हें कल्पनेचेनि सौरसें । जे कल्पनालोपे भ्रंशे । आणि कल्पनेसवें होय ॥ ९९ ॥ तेंचि कल्पितें मुदल जाये । तैं असे नाहीं हें कें आहे । म्हणऊनि पुढती तूं पाहें । हा ऐश्वर्ययोगु ॥ ९२ ॥ ऐसिया प्रतीतिबोधसागरीं । तूं आपणपेयातें कल्लोळु एक करीं । मग जंव पाहासी चराचरीं । तंव तूंचि आहासी ॥ ९३ ॥ या जाणणेयाचा चेवो । तुज आला ना म्हणती देवो । तरी आतां द्वैतस्वप्न वावो । जालें कीं ना ॥ ९४ ॥ तरी पुढती जरी विपायें । बुद्धीसी कल्पनेची झोंप ये । तरी अभेदबोधु जाये । जैं स्वप्नीं पडिजे ॥ ९५ ॥ म्हणोनि ये निद्रेची वाट मोडे । निखळ उद्बोधाचेंचि आपणपें घडे । ऐसें वर्म जें आहे फुडें । तें दावों आतां ॥ ९६ ॥ तरी धनुर्धरा धैर्या । निकें अवधान देईं बा धनंजया । पैं सर्व भूतांतें माया । करी हरी गा ॥ ९७ ॥

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् । कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

जिये नांव गा प्रकृती । जे द्विविध सांगितली तुजप्रती । एकी अष्टधा भेदव्यक्ती । दुजी जीवरूपा ॥ ९८ ॥ हा प्रकृतीविखो आघवा । तुवां मागां परिसिलासे पांडवा । म्हणोनि असो काइ सांगावा । पुढतपुढती ॥ ९९ ॥ तरी ये माझिये प्रकृती । महाकल्पाचां अंतीं । सर्व भूतें अव्यक्तीं । ऐक्यासी येती ॥ १०० ॥ ग्रीष्माच्या अतिरसीं । सबीजें तृणें जैसीं । मागुती भूमीसी । सुलीनें होती ॥ १ ॥ कां वार्षिये ढेंढे फिटे । जेव्हां शारदीयेचा अनुघडु फुटे । तेव्हां घनजात आटे । गगनींचें गगनीं ॥ २ ॥ नातरी आकाशाचिये खोंपे । वायु निवांतुचि लोपे । कां तरंगता हारपे । जळीं जेवीं ॥ ३ ॥ अथवा जागिनलिये वेळे । स्वप्न मनींचें मनीं मावळे । तैसें प्राकृत प्रकृती मिळे । कल्पक्षयीं ॥ ४ ॥ मग कल्पांदीं पुढती । मीचि सृजीं ऐसी वदंती । तरी इयेविषयीं निरुती । उपपत्ती आइक ॥ ५ ॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः । भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

तरी हेचि प्रकृति किरीटी । मी स्वकीया सहजें अधिष्ठीं । तेथ तंतूसमवायपटीं । जेविं विणावणी दिसे ॥ ६ ॥ मग तिये विणावणीचेनि आधारें । लहानां चौकडियां पटत्व भरे । तैसी पंचात्मकें आकारें । प्रकृतिची होये ॥ ७ ॥ जैसें विरजणियाचेनि संगें । दूधचि आटेजों लागे । तैसी प्रकृति आंगा रिगे । सृष्टिपणाचिया ॥ ८ ॥ बीज जळाची जवळीक लाहे । आणि तेंचि शाखोपशाखी होये । तैसें मज करणें आहे । भूतांचें हें ॥ ९ ॥ अगा नगर हें रायें केलें । या म्हणणया साचपण कीर आलें । परि निरुतें पाहतां काय शिणले । रायाचे हात ॥ ११० ॥ आणि मी प्रकृति अधिष्ठीं तें कैसें । जैसा स्वप्नीं जो असे । मग तोचि प्रवेशे । जागृतावस्थे ॥ ११ ॥ तरी स्वप्नौनि जागृती येतां । काय पाय दुखती पंडुसुता । कीं स्वप्नामाजी असतां ।

प्रवासु होय ॥ १२ ॥ या आघवियाचा अभिप्रावो कायी । जे हें भूतसृष्टीचे कांहीं । मज एकही करणें नाहीं । ऐसाचि अर्थु ॥ १३ ॥ जैशी रायें अधिष्ठीली प्रजा । व्यापारे आपुलालिया काजा । तैसा प्रकृतिसंगु माझा । येर करणें तें इयेंचें ॥ १४ ॥ पाहें पां पूर्णचंद्राचिये भेटी । समुद्र भरतें अपार दाटी । तेथ चंद्रासि काय किरिटी । उपखा पडे ॥ १५ ॥ जड परि जवळिका । लोह चळे तरि चळो कां । कवण शीण भ्रामका । सन्निधानाचा ॥ १६ ॥ किंबहुना यापरी । मी निजप्रकृति अंगीकारी । आणि भूतसृष्टी एकसरी । प्रसवोंचि लागे ॥ १७ ॥ जो हा भूतग्रामु आघवा । असे प्रकृतिआधीन पांडवां । जैसी बीजाचिया वेलपालवा । समर्थ भूमि ॥ १८ ॥ नातरी बाळादिकां वयसां । गोसावी देहसंगु जैसा । अथवा घनावळी आकाशा । वार्षियें जेवीं ॥ १९ ॥ कां स्वप्नासि कारण निद्रा । तैशी प्रकृति हे नरेंद्रा । या अशेषाहि भूतसमुद्रा । गोसाविणी गा ॥ १२० ॥ स्थावरा आणि जंगमा । स्थूळा अथवा सूक्ष्मा । हें असो भूतग्रामा । प्रकृतिचि मूळ ॥ २१ ॥ म्हणोनि भूतें हन सृजावीं । कां सृजिलीं प्रतिपाळावीं । इयें करणीं न येती आघवीं । आमुचिया आंगा ॥ २२ ॥ जळीं चंद्रिकेचिया पसरती वेली । ते वाढी चंद्रें नाहीं वाढविलीं । तेंवि मातें पावोनि ठेलीं । दुरी कर्में ॥ २३ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय । उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥

आणि सुटलिया सिंधुजळाचा लोटु । न शके धरूं सैंधवाचा घाटु । तेवीं सकळ कर्मा मीच शेवटु । तीं काइ बांधती मातें ॥ २४ ॥ धूम्ररजांची पिंजरी । वाजतिया वायूतें जरी होकारी । कां सूर्यबिंबामाझारीं । आंधारें रिगें ॥ २५ ॥ हें असो पर्वताचिये हृदयींचें । जेविं पर्जन्यधारास्तव न खोंचे । तेविं कर्मजात प्रकृतीचें । न लगे मज ॥ २६ ॥ एऱ्हवीं इये प्रकृती विकारीं । एकु मीचि आहे अवधारीं । परि उदासीनाचिया परी । करीं ना करवी ॥ २७ ॥ दीपु ठेविला परिवरीं । कवणातें नियमी ना निवारी । आणि कवण कवणिये व्यापारीं । राहाटे तेंहि नेणे ॥ २८ ॥ तो जैसा का साक्षिभूतु । गृहव्यापारप्रवृत्तिहेतु । तैसा भूतकर्मीं अनासक्तु । मी भूतीं असें ॥ २९ ॥ हा एकचि अभिप्रावो पुढतपुढती । काय सांगों बहुतां उपपत्तीं । येथ एकवेळां सुभद्रापती । येतुलें जाण पां ॥ १३० ॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् । हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥

जे लोकचेष्टा समस्तां । जैसा निमित्तमात्र का सविता । तैसा जगत्प्रभवी पंडुसुता । हेतु मी जाणें ॥ ३१ ॥ कां जे मियां अधिष्ठिलिया प्रकृती । होती चराचराचिया संभूती । म्हणोनि मी हेतु हे उपपत्ती । घडे यया ॥ ३२ ॥ आतां येणें उजिवडें निरूतें । न्याहाळीं पां ऐश्वर्ययोगातें । जे माझां ठायीं भूतें । परी भूतीं मी नसें ॥ ३३ ॥ अथवा भूतें ना माझां ठायीं । आणि भूतांमाजि मी नाहीं । या खुणा तूं कही । चुकों नको ॥ ३४ ॥ हें सर्वस्व आमुचें गूढ । परि दाविलें तुज उघड । आतां इंद्रियां देऊनि कवाड । हृदयीं भोगीं ॥ ३५ ॥ हा दंशु जंव नये हातां । तंव माझें

साचोकारेपण पार्था । न संपडे गा सर्वथा । जेविं भुसीं कणु ॥ ३६ ॥ एऱ्हवीं अनुमानाचेनि पैसें । आवडे कीर कळलें ऐसें । परि मृगजळाचेनि वोलांशे । काय भूमि तिमे ॥ ३७ ॥ ते जाळ जळीं पांगिलें । तेथ चंद्रबिंब दिसे आंतुडलें । परि थडिये काढूनि झाडिलें । तेव्हां बिंब कें सांगें ॥ ३८ ॥ तैसें बोलवरि वाचाबळें । वायांचि झकविजती प्रतीतीचे डोळे । मग साचोकारें बोधावेळे । आथि ना होईजे ॥ ३९ ॥

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् । परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥

किंबहुना भवा बिहाया । आणि साचें चाड आथि जरी मियां । तरी तुम्हीं गा उपपत्ती इया । जतन कीजे ॥ १४० ॥ एऱ्हवीं वेधली दिठी कवळें । ते चांदणियातें म्हणे पिवळें । तेविं माझां स्वरूपीं निर्मळे । देखती दोष ॥ ४१ ॥ नातरी ज्वरें विटाळलें मुख । तें दुधातें म्हणे कडू विख । तेविं अमानुषा मानुष । मानाल मातें ॥ ४२ ॥ म्हणऊनि पुढती तूं धनंजया । झणें विसंबसी या अभिप्राया । जे इया स्थूलदृष्टी वायां । जाइजेल गा ॥ ४३ ॥ पैं स्थूलदृष्टी देखती मातें । तेंचि न देखणें जाण निरुतें । जैसें स्वप्नींचेनि अमृतें । अमरा नोहिजे ॥ ४४ ॥ एऱ्हवीं स्थूलदृष्टी मूढ । मातें जाणती कीर दृढ । परि तें जाणणेंचि जाणणेया आड । रिगोनि ठाके ॥ ४५ ॥ जैसा नक्षत्राचिया आभासा - । साठी घातु झाला तया हंसा - । माजीं रत्नबुद्धीचिया आशा । रिगोनियां ॥ ४६ ॥ सांगें गंगा या बुद्धी मृगजळ । ठाकोनि आलियाचें कवण फळ । काय सुरतरु म्हणोनि बाबुळ । सेविली करी ॥ ४७ ॥ हा निळयाचा दुसरा । या बुद्धी हातु घातला विखारा । कां रत्नें म्हणोनि गारा । वेंची जेवीं ॥ ४८ ॥ अथवा निधान हें प्रगटलें । म्हणोनि खदिरांगार खोळे भरिले । कां साउली नेणतां घातलें । कुहां सिंहें ॥ ४९ ॥ तेविं मी म्हणोनि प्रपंचीं । जिहीं बुडी दिधली कृतनिश्चयाची । तिहीं चंद्रासाठीं जेविं जळींची । प्रतिमा धरिली ॥ १५० ॥ तैसा कृतनिश्चय वायां गेला । जैसा कोण्ही एकु कांजी प्याला । मग परिणाम पाहों लागला । अमृताचा ॥ ५१ ॥ तैसें स्थूलाकारीं नाशिवंतें । भरंवसा बांधोनि चित्तें । पाहती मज अविनाशातें । तरी कैंचा दिसें ॥ ५२ ॥ काइ पश्चिमसमुद्राचिया तटा । निघिजत आहे पूर्विलिया वाटा । कां कोंडा कांडितां सुभटा । कणु आतुडे ॥ ५३ ॥ तैसें विकारलें हें स्थूळ । जाणितलेया मी जाणवतसें केवळ । काइ फेण पितां जळ । सेविलें होय ॥ ५४ ॥ म्हणोनि मोहिलेनि मनोधर्में । हेंचि मी मानूनि संभ्रमें । मग येथिंचीं जियें जन्मकर्में । तियें मजचि म्हणती ॥ ५५ ॥ येतुलेनि अनामा नाम । मज अक्रियासि कर्म । विदेहासि देहधर्म । आरोपिती ॥ ५६ ॥ मज आकारशून्या आकारु । निरुपाधिका उपचारु । मज विधिविवर्जिता व्यवहारु । आचारादिक ॥ ५७ ॥ मज वर्णहीना वर्णु । गुणातीतासि गुणु । मज अचरणा चरणु । अपाणिया पाणी ॥ ५८ ॥ मज अमेया मान । सर्वगतासी स्थान । जैसें सेजेमाजी वन । निदेला देखे ॥ ५९ ॥ तैसें अश्रवणा श्रोत्र । मज अचक्षूसी नेत्र । अगोत्रा गोत्र । अरूपा रूप ॥ १६० ॥ मज

अव्यक्तासि व्यक्ती । अनार्तासी आर्ती । स्वयंतृप्ता तृप्ती । भाविती गा ॥ ६१ ॥ मज अनावरणा प्रावरण । भूषणातीतासि भूषण । मज सकळकारणा कारण । देखती ते ॥ ६२ ॥ मज सहजातें करिती । स्वयंभावें प्रतिष्ठिती । निरंतरातें आव्हानिती । विसर्जिती गा ॥ ६३ ॥ मी सर्वदा स्वत:सिद्धु । तो कीं बाळ तरुण वृद्धु । मज एकरूपा संबंधु । जाणती ऐसे ॥ ६४ ॥ मज अद्वैतासि दुजें । मज अकर्तयासि काजें । मी अभोक्ता कीं भुंजें । ऐसे म्हणती ॥ ६५ ॥ मज अकुळाचें कुळ वानिती । मज नित्याचेनि निधनें शिणती । मज सर्वांतरातें कल्पिती । अरि मित्र गा ॥ ६६ ॥ मी स्वानंदाभिरामु । तया मज अनेकां सुखांचा कामु । अघवाचि मी असें समु । कीं म्हणती एकदेशी ॥ ६७ ॥ मी आत्मा एक चराचरीं । म्हणती एकाचा कैंपक्ष करीं । आणि कोपोनि एकातें मारीं । हेंचि वाढविती ॥ ६८ ॥ किंबहुना ऐसे समस्त । जे हे मनुष्यधर्म प्राकृत । तयाचि नांव मी ऐसें विपरीत । ज्ञान तयांचें ॥ ६९ ॥ जंव आकारु एक पुढां देखती । तंव हा देव येणें भावें भजती । मग तोचि विघडलिया टाकिती । नाहीं म्हणोनि ॥ १७० ॥ मातें येणें येणें प्रकारें । जाणती मनुष्य ऐसेनि आकारें । म्हणऊनि ज्ञानचि तें आंधारें । ज्ञानासि करी ॥ ७१ ॥

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतस: । राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता: ॥ १२ ॥

यालागीं जन्मलेचि ते मोघ । जैसे वार्षियेवीण मेघ । कां मृगजळाचे तरंग । दुरूनीच पाहावे ॥ ७२ ॥ अथवा कोल्हेरीचे असिवार । नातरी वोडंबरीचे अळंकार । की गंधर्वनगरीचे आवार । आभासती कां ॥ ७३ ॥ सांबरी वाढिन्नल्या सरळा । वरी फळ ना आंतु पोकळा । कां स्तन जाले गळां । शेळिये जैसे ॥ ७४ ॥ तैसें मूर्खांचे तयां जियालें । आणि धिग् कर्म तयांचें निपजलें । जैसें सांवरी फळ आलें । घेपे ना दीजे ॥ ७५ ॥ मग जें कांहीं ते पढिन्नले । तें मर्कटें नारळ तोडिले । कां आंधळ्या हातीं पडिलें । मोतीं जैसें ॥ ७६ ॥ किंबहुना तयांची शास्त्रें । जैशीं कुमारीहातीं दिधलीं शस्त्रें । कां अशौच्या मंत्रें । बीजें कथिलीं ॥ ७७ ॥ तैसें ज्ञानजात तया । आणि जें कांहीं आचरलें गा धनंजया । तें आघवेंचि गेलें वायां । जे चित्तहीन ॥ ७८ ॥ पैं तमोगुणाची राक्षसी । जे सद्बुद्धीतें ग्रासी । विवेकाचा ठावोचि पुसी । निशाचरी ॥ ७९ ॥ तिये प्रकृती वरपडे जाले । म्हणऊनि चिंतेचेनि कपोलें गेले । वरि तामसीयेचिये पडिले । मुखामाजीं ॥ १८० ॥ जेथ आशेचिये लाळे । आंतु हिंसा जीभ लोळे । तेवींचि संतोषाचे चाकळे । अखंड चघळी ॥ ८१ ॥ जे अनर्थाचे कानवेरी । आवाळुवें चाटीत निघे बाहेरी । जे प्रमादपर्वतींची दरी । सदाचि मातली ॥ ८२ ॥ जेथ द्वेषाचिया दाढा । खसखसां ज्ञानाचा करिती रगडा । जे अगस्ती गवसणी मूढां । स्थूलबुद्धी ॥ ८३ ॥ ऐसें आसुरिये प्रकृतीचां तोंडीं । जे जाले गा भूतोंडी । ते बुडोनि गेले कुंडीं । व्यामोहाचां ॥ ८४ ॥ एवं तमाचिये पडिले गर्तें । न पविजतीचि विचाराचेनि हातें । हें असो ते गेलें जेथें । ते शुद्धीचि नाहीं ॥ ८५ ॥ म्हणोनि असोतु इयें वायाणीं । कायशीं मूर्खांचीं बोलणीं । वायां वाढवितां वाणी । शिणेल हन ॥ ८६ ॥ ऐसें बोलिलें देवें । तेथ जी जी

म्हणितलें पांडवें । आइकें जेथ वाचा विसावे । ते साधुकथा ॥ ८७ ॥

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः । भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥

तरी जयांचिये चोखटे मानसीं । मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी । जयां निजेलियांतें उपासी । वैराग्य गा ॥ ८८ ॥ जयांचिया आस्थेचिया सद्भावा । आंतु धर्म करी राणिवा । जयांचें मन ओलावा । विवेकासी ॥ ८९ ॥ जे ज्ञानगंगे नाहाले । पूर्णता जेऊनि धाले । जे शांतीसि आले । पालव नवे ॥ १९० ॥ जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ । जे आनंदसमुद्रीं कुंभ । चुबकळोनि भरिले ॥ ९१ ॥ जयां भक्तीची येतुली प्राप्ती । जें कैवल्यातें परौते सर म्हणती । जयांचिये लीलेमाजीं नीति । जियाली दिसे ॥ ९२ ॥ जे आघवांचि करणीं । लेइले शांतीचीं लेणीं । जयांचें चित्त गवसणी । व्यापका मज ॥ ९३ ॥ ऐसे जे महानुभाव । जे दैविये प्रकृतीचें दैव । जे जाणोनियां सर्व । स्वरूप माझें ॥ ९४ ॥ मग वाढतेनि प्रेमें । मातें भजती जे महात्मे । परि दुजेपण मनोधर्मे । शिवतलें नाही ॥ ९५ ॥ ऐसे मीच होऊन पांडवा । करिती माझी सेवा । परि नवलावो तो सांगावा । असे आइक ॥ ९६ ॥

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः । नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ १४ ॥

तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे । जे नामचि नाहीं पापाचे । ऐसें केलें ॥ ९७ ॥ यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविली । यमलोकींची खुंटली । राहाटी आघवी ॥ ९८ ॥ यमु म्हणे काय यमावें । दमु म्हणे कवणातें दमावें । तीर्थें म्हणती काय खावें । दोष ओखदासि नाहीं ॥ ९९ ॥ ऐसे माझेनि नामघोषें । नाहीं करिती विश्वाचीं दुःखें । अवघे जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥ तें पहांटेवीण पाहावित । अमृतेंवीण जीववित । योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ॥ १ ॥ परी रायारंका पाड धरूं । नेणती सानेया थोरां कडसणी करूं । एकसरें आनंदाचें आवारु । होत जगा ॥ २ ॥ कहीं एकाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें । ऐसें नामघोषगौरवें । धवळलें विश्व ॥ ३ ॥ तेजें सूर्य तैसे सोज्वळ । परि तोहि अस्तवे हें किडाळ । चंद्र संपूर्ण एखादे वेळ । हे सदा पुरते ॥ ४ ॥ मेघ उदार परी वोसरे । म्हणऊनि उपमेसी न पुरे । हे निःशंकपणे सपांखरे । पंचानन ॥ ५ ॥ जयांचे वाचेपुढां भोजें । नाम नाचत असे माझें । जें जन्मसहस्त्रीं वोळगिजे । एक वेळ मुखासि यावया ॥ ६ ॥ तो मी वैकुंठी नसें । एक वेळ भानुबिंबींही न दिसें । वरी योगियांचींही मानसें । उमरडोनी जाय ॥ ७ ॥ परी तयांपाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोषु बरवा । करिती ते माझे ॥ ८ ॥ कैसे माझां गुणीं धाले । देशकाळातें विसरले । कीर्तनसुखें झाले । आपणपांचि ॥ ९ ॥ कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचे निखळ प्रबंध । माजी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ २१० ॥ हें बहु असो यापरी । कीर्तित मातें अवधारी । एक विचरती चराचरीं । पांडुकुमरा ॥ ११ ॥ मग आणिक ते अर्जुना । साविया बहुवा जतना । पंचप्राणा

मना । पाढाऊ घेऊनी ॥ १२ ॥ बाहेरी यमनियमांची कांटी लाविली । आंतु वज्रासनाची पौळी पन्नासिली । वरी प्राणायामांचीं मांडिलीं । वाहतीं यंत्रें ॥ १३ ॥ तेथ उल्हाटशक्तीचेनि उजिवडें । मनपवनाचेनि सुरवाडें । सतराविये चे पाणियाडें । बळियाविलें ॥ १४ ॥ तेव्हां प्रत्याहारें ख्याति केली । विकारांची संपिली बोहली । इंद्रियें बांधोनि आणिली । हृदयाआंतु ॥ १५ ॥ तंव धारणावारू दाटिले । महाभूतांते एकवटिलें । मग चतुरंग सैन्य निवटिलें । संकल्पाचें ॥ १६ ॥ तयावरी जैत रे जैत । म्हणोनि ध्यानाचें निशाण वाजत । दिसे तन्मयाचें झळकत । एकछत्र ॥ १७ ॥ पाठीं समाधिश्रियेचा अशेखा । आत्मानुभवराज्यसुखा । पट्टाभिषेकु देखां । समरसें जाहला ॥ १८ ॥ ऐसें हें गहन । अर्जुना माझें भजन । आतां ऐकें सांगेन । जे करिती एक ॥ १९ ॥ तरी दोन्ही पालववेरी । जैसा एक तंतू अंबरी । तैसा मीवांचूनी चराचरीं । जाणती ना ॥ २२० ॥ आदि ब्रह्मा करूनी । शेवटीं मशक धरूनी । माजी समस्त हें जाणोनी । स्वरूप माझें ॥ २१ ॥ मग वाड धाकुटें न म्हणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलिये वस्तू उजू लुंटिती । मीचि म्हणोनि ॥ २२ ॥ आपुलें उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य नेणवे । एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें । नमूंचि आवडे ॥ २३ ॥ जैसें उंची उदक पडिलें । तें तळवटवरी ये उगेलें । तैसें नमिजे भूतजात देखिलें । ऐसा स्वभावोचि तयांचा ॥ २४ ॥ कां फळलिया तरूची शाखा । सहजें भूमीसी उतरे देखा । तैसें जीवमात्रां अशेखां । खालावती ते ॥ २५ ॥ अखंड अगर्वता होऊनि असती । तयांतें विनय हेचि संपत्ती । जे जयजयमंत्रें अर्पिती । माझांचि ठायीं ॥ २६ ॥ नमितां मानाभिमान गळाले । म्हणोनि अवचितें ते मीचि जहाले । ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ॥ २८ ॥ अर्जुना हे गरुवी भक्ती । सांगितली तुजप्रती । आतां ज्ञानयज्ञें यजिती । ते भक्त आइकें ॥ २८ ॥ परि भजन करिती हातवटी । तूं जाणत आहासि किरीटी । जे मागां इया गोष्टी । केलिया आम्हीं ॥ २९ ॥ तंव आथि जी अर्जुन म्हणे । तें दैविकिया प्रसादाचें करणें । तरि काय अमृताचें आरोगणें । पुरे म्हणवें ॥ २३० ॥ या बोला अनंतें । लागटा देखिलें तयातें । कीं सुखावलेनि चित्तें । डोलतु असे ॥ ३१ ॥ म्हणे भलें केलें पार्था । एऱ्हवी हा अनवसरु सर्वथा । परि बोलवीतसे आस्था । तुझी मातें ॥ ३२ ॥ तंव अर्जुन म्हणे हें कायी । चकोरेंवीण चांदिणेंचि नाहीं । जग निवविजे हा तयाचां ठायीं । स्वभावो कीं जी ॥ ३३ ॥ येरें चकोरें तिये आपुलिये चाडे । चांचू करिती चंद्राकडे । तेविं आम्ही विनवूं तें थोकडें । देवो कृपासिंधु ॥ ३४ ॥ जी मेघ आपुलिये प्रौढी । जगाची आर्ति दवडी । वांचूनि चातकाची ताहान केवढी । तो वर्षावो पाहुनी ॥ ३५ ॥ परि चुळा एकाचिया चाडे । जेवि गंगेतेंचि ठाकावें पडे । तेविं आर्त बहु कां थोडे । तरि सांगावें देवा ॥ ३६ ॥ तेथें देवें म्हणितले राहें । जो संतोषु आम्हां जाहाला आहे । तयावरी स्तुति साहे । ऐसें उरलें नाहीं ॥ ३७ ॥ पैं परिसतु आहासि निकियापरी । तेंचि वक्तृत्वा वऱ्हाडीक करी । ऐसें पुरस्करोनि श्रीहरी । आदरिलें बोलों ॥ ३८ ॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते । एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ १५ ॥

तरी ज्ञानयज्ञु तो एवंरूपु । तेथ आदिसंकल्पु हा यूपु । महाभूतें मंडपु । भेदु तो पशु ॥ ३९ ॥ मग पांचांचे जे विशेष गुण । अथवा इंद्रियें आणि प्राण । हेचि यज्ञोपचारभरण । अज्ञान घृत ॥ २४० ॥ तेथ मनबुद्धीचिया कुंडा - । आंतु ज्ञानाग्नि धडफुडा । साम्य तेचि सुहाडा । वेदिका जाणें ॥ ४१ ॥ सविवेकमतिपाटव । तेचि मंत्रविद्यागौरव । शांति स्रुकस्त्रुव । जीव यज्वा ॥ ४२ ॥ तो प्रतीतीचेनि पात्रें । विवेकमहामंत्रें । ज्ञानाग्निहोत्रें । भेदु नाशी ॥ ४३ ॥ तेथ अज्ञान सरोनि जाये । आणि यजिता यजन हें ठाये । आत्मसमरसीं न्हाये । अवभृथीं जेव्हां ॥ ४४ ॥ तेव्हां भूतें विषय करणें । हें वेगळालें कांही न म्हणे । आघवें एकचि ऐसें । जाणे । आत्मबुद्धि ॥ ४५ ॥ जैसा चेइला तो अर्जुना । म्हणे स्वप्नींची हें विचित्र सेना । मीचि जाहालों होतों ना । निद्रावशें ॥ ४६ ॥ आतां सेना ते सेना नव्हे । हें मीच एक आघवें । ऐसें एकत्वें मानवे । विश्व तया ॥ ४७ ॥ मग तो जीवु हे भाष सरे । आब्रह्म परमात्मबोधें भरे । ऐसें भजती ज्ञानाध्वरें । एकत्वें येणें ॥ ४८ ॥ अथवा अनादि हें अनेक । जें आनासारिखें एका एक । आणि नामरूपादिक । तेंही विषम ॥ ४९ ॥ म्हणोनि विश्व भिन्न । परि न भेदे तयांचें ज्ञान । जैसें अवयव तरी आन आन । परि एकेचि देहींचे ॥ २५० ॥ कां शाखा सानिया थोरा । परि आहाति एकाचिये तरुवरा । बहु रश्मि परि दिनकरा । एकाचे जेवीं ॥ ५१ ॥ तेविं नानाविधा व्यक्ती । आनानें नामें आनानी वृत्ती । ऐसें जाणती भेदलां भूतीं । अभेदा मातें ॥ ५२ ॥ येणें वेगळालेपणें पांडवा । करिती ज्ञानयज्ञु बरवा । जे न भेदती जाणिवा । जाणते म्हणउनि ॥ ५३ ॥ ना तरी जेधवां जिये ठायीं । देखती कां जें जें कांहीं । तें मीवाचूनि नाहीं । ऐसाचि बोधु ॥ ५४ ॥ पाहें पां बुडबुडा जेऊता जाये । तेउतें जळचि एक तया आहे । मग विरे अथवा राहे । तन्ही जळाचिमाजि ॥ ५५ ॥ कां पवनें परमाणु उचलले । ते पृथ्वीपणावेगळे नाहीं गेले । आणि माघौतें जरी पडले । तरी पृथ्वीचिवरी ॥ ५६ ॥ तैसें भलतेथ भलतेणें भावें । भलतेंही न हो अथवा होआवें । परि तें मी ऐसें आघवें । होऊनि ठेलें ॥ ५७ ॥ अगा हे जेव्हडी माझी व्याप्ति । तेव्हढीचि तयांचि प्रतीति । ऐसें बहुधाकारीं वर्तती । बहुचि होउनि ॥ ५८ ॥ हें भानुबिंब आवडेतया । सन्मुख जैसें धनंजया । तैसें ते विश्व या । समोर सदा ॥ ५९ ॥ अगा तयांचिया ज्ञाना । पाठीपोट नाहीं अर्जुना । वायु जैसा गगना । सर्वांगीं असे ॥ २६० ॥ तैसा मी जेतुला आघवा । तेंचि तुक तयांचिया सद्भावा । तरी न करितां पांडवा । भजन जहालें ॥ ६१ ॥ एन्हवीं तरी सकळ मीचि आहें । तरी कवणीं कें उपासिला नोहें । एथ एकें जाणणेनविण ठाये । अप्राप्तासी ॥ ६२ ॥ परि तें असो येणें उचितें । ज्ञानयज्ञें यजितसांते । उपासिती मातें । ते सांगितले ॥ ६३ ॥ अखंड सकळ हें सकळां मुखीं । सहज अर्पत असे मज एकीं । नेणणेयासाठीं मूर्खीं । न पविजेचि मातें ॥ ६४ ॥

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् । मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥

तोचि जाणिवेचा उदयो जरी होये । तरी मुदल वेदु मीचि आहें । आणि तो विधानातें जया विये । तो क्रतुही मीचि ॥ ६५ ॥ मग तया कर्मापासूनि बरवा । जो सांगोपांगु आघवा । यज्ञु प्रगटे पांडवा । तोही मी गा ॥ ६६ ॥ स्वाहा मी स्वधा । सोमादि औषधी विविधा । आज्य मी समिधा । मंत्रु मी हवि ॥ ६७ ॥ होता मी हवन कीजे । तेथ अग्नि तो स्वरूप माझें । आणिक हुतक वस्तू जें जें । तेंहि मीचि ॥ ६८ ॥

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः । वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ॥ १७ ॥

पैं जयाचेनि अंगसंगें । इये प्रकृतीस्तव अष्टांगे । जन्म पाविजत असे जगें । तो पिता मी गा ॥ ६९ ॥ अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । तेविं मी चराचरीं । माताही होय ॥ २७० ॥ आणि जाहालें जग जेथ राहे । जेणें जीवित वाढत आहे । तें मीचि वाचूनि नोहे । आन निरुतें ॥ ७१ ॥ इयें प्रकृतिपुरुषें दोन्ही । उपजलीं जयाचिया अमनमनीं । तो पितामह त्रिभुवनीं । विश्वाचा मी ॥ ७२ ॥ आणि आघवेयां जाणणेयांचिया वाटा । जया गांवा येती गा सुभटा । जें वेदांचियां चोहटां । वेद्य जें म्हणिजे ॥ ७३ ॥ जेथ नाना मतां बुझावणी जाहली । एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली । चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं । जें पवित्र म्हणिजे ॥ ७४ ॥ पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु । घोषध्वनीनादाकारु । तयांचें गा भुवन जो ॐकारु । तोही मी गा ॥ ७५ ॥ जया ॐकाराचिये कुशी । अक्षरें होती अउमकारेंसी । जियें उपजत वेदेंसीं । उठलीं तिन्हीं ॥ ७६ ॥ म्हणोनि ऋग्यजुःसामु । हे तिन्ही म्हणे मी आत्मारामु । एवं मीचि कुलक्रमु । शब्दब्रह्माचा ॥ ७७ ॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् । प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥

हें चराचर आघवें । जिये प्रकृती आंत सांठवे । ते शिणली जेथ विसवे । ते परमगती मी ॥ ७८ ॥ आणि जयाचेनि प्रकृति जिये । जेणें अधिष्ठिली विश्व विये । जो येऊनि प्रकृती इये । गुणातें भोगी ॥ ७९ ॥ तो विश्वश्रियेचा भर्ता । मीचि गा पंडुसुता । मी गोसावी समस्ता । त्रैलोक्याचा ॥ २८० ॥ आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी उगें नसावें । पावकें दहावें । वर्षावें जळें ॥ ८१ ॥ पर्वतीं बैसका न संडावी । समुद्रीं रेखा नोलांडावी । पृथ्वीया भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ॥ ८२ ॥ म्या बोलविल्या वेदु बोले । म्यां चालविल्या सूर्यु चाले । म्यां हालविल्या प्राणु हाले । जो जगातें चाळिता ॥ ८३ ॥ मियांचि नियमिला सांता । काळु ग्रासितसे भूतां । इये म्हणियागतें पांडुसुता । सकळें जयाचीं ॥ ८४ ॥ ऐसा जो समर्थु । तो मी जगाचा नाथु । आणि गगनाऐसा साक्षिभूतु । तोहि मीचि ॥ ८५ ॥ इहीं नामरूपीं आघवा । जो भरला असे पांडवा । आणि नामरूपांचाहि वोल्हावा । आपणचि जो ॥ ८६ ॥ जैसे जळाचे कल्लोळ । आणि कल्लोळीं आथी जळ । ऐसेनि वसवीतसे सकळ । तो निवासु मी ॥ ८७ ॥

जो मज होय अनन्यशरण। त्याचें निवारीं मी जन्म मरण। यालागीं शरणागता शरण्य। मीचि एकु॥ ८८॥ मीचि एक अनेकपणें। वेगळालेनि प्रकृतिगुणें। जीत जगाचेनि प्राणें। वर्तत असें॥ ८९॥ जैसा समुद्र थिल्लर न म्हणतां। भलतेथ बिंबे सविता। तैसा ब्रह्मादि सर्वां भूतां। सुहृद तो मी॥ २९०॥ मीचि गां पांडवा। या त्रिभुवनासि वोलावा। सृष्टिक्षयप्रभावा। मूळ तें मी॥ ९१॥ बीज शाखातें प्रसवे। मग तें रूखपण बीजीं सामावे। तैसें संकल्पें होय आघवें। पाठीं संकल्पीं मिळे॥ ९२॥ ऐसें जगाचें बीज जो संकल्पु। अव्यक्त वासनारूपु। तया कल्पांती जेथ निक्षेपु। होय तें मी॥ ९३॥ इयें नामरूपें लोटती। वर्णव्यक्ती आटती। जातींचे भेद फिटती। जैं आकारू नाहीं॥ ९४॥ तैं संकल्पु वासनासंस्कार। माघौतें रचावया चराचर। जेथ राहोनि असती अमर। तें निधान मी॥ ९५॥

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च। अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन॥ १९॥

मी सूर्याचेनि वेषें। तपें तैं हें शोषें। पाठी इंद्र होऊनि वर्षें। तैं पुढती भरे॥ ९६॥ अग्नि काष्ठें खाये। तें काष्ठचि अग्नि होये। तेवि मरते मारितें पाहें। स्वरूप माझें॥ ९७॥ यालागी मृत्यूचां भागीं जें जें। तेंही पैं रूप माझें। आणि न मरतें तंव सहजें। अविनाशु मी॥ ९८॥ आतां बहु बोलोनी सांगावें। तें एकिहेळा घे पां आघवें। सतासतही जाणावें। मीचि पैं गा॥ ९९॥ म्हणोनि अर्जुना मी नसें। ऐसा कवणु ठाव असे। परि प्राणियांचें दैव कैसे। जे न देखती मातें॥ ३००॥ तरंग पाणियेंविण सुकती। रश्मि वातीविण न देखती। तैसे मीचि ते मी नव्हती। विस्मो देखें॥ १॥ हें आंतबाहेर मियां कोंदलें। जग निखिल माझेंचि वोतिलें। कीं कैसे कर्म तयां आलें। जे मीचि नाहीं म्हणती॥ २॥ परि अमृतकुहां पडिजे। कां आपणयातें कडिये काढिजे। ऐसें आथी काय कीजे। अप्राप्तासि॥ ३॥ ग्रासा एका अन्नासाठीं। अंधु धांवताहे किरीटी। आडळला चिंतामणि पायें लोटी। आंधळेपणें॥ ४॥ तैसें ज्ञान जैं सांडूनि जाये। तैं ऐसी हे दशा आहे। म्हणोनि कीजे तें केलें नोहे। ज्ञानेंविण॥ ५॥ आंधळेया गरुडाचे पांख आहाती। ते कवणा उपेगा जाती। तैसे सत्कर्माचे उपखे ठाती। ज्ञानेंवीण॥ ६॥

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते।
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान्॥ २०॥

देख पां गा किरीटी। आश्रमधर्माचिया राहाटी। विधिमार्गा कसवटी। जे आपणचि होती॥ ७॥ यजन करितां कौतुकें। तिहीं वेदांचा माथा तुके। क्रिया फळेंसि उभी ठाके। पुढां जयां। ऐसे दीक्षित जे सोमप। जे आपणचि यज्ञाचें स्वरूप। तिहीं तया पुण्याचेनि नांवे पाप। जोडिलें देखें॥ ९॥ जे श्रुतित्रयातें जाणोनि। शतवरी यज्ञ करूनि। यजिलिया मातें चुकोनि। स्वर्गु वरिती॥ ३१०॥ जैसें कल्पतरूतळवटी। बैसोनि झोळिये पाडी गांठी। मग निदैव निघे किरीटी। दैन्यचि करूं॥ ११॥ तैसें शतक्रतूं यजिलें मातें। कीं ईप्सिताति स्वर्गसुखांतें। आतां

पुण्य कीं हें निरुतें । पाप नोहे ॥ १२ ॥ म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्गु । तो अज्ञानाचा पुण्यमार्गु । ज्ञानिये तयातें उपसर्गु । हानि म्हणती ॥ १३ ॥ एऱ्हवीं तरी नरकींचें दुःख । पावोनि स्वर्गा नाम कीं सुख । वांचूनि नित्यानंद गा निर्दोष । तें स्वरूप माझें ॥ १४ ॥ मज येता पैं सुभटा । या द्विविधा गा अव्हांटा । स्वर्गु नरकु या वाटा । चोरांचिया ॥ १५ ॥ स्वर्गा पुण्यात्मकें पापें येईजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥ १६ ॥ आणि मजचिमाजीं असतां । जेणें मी दूरी होय पंडुसुता । तें पुण्य ऐसें म्हणतां । जीभ न तुटे काई ॥ १७ ॥ परि हें असो आतां प्रस्तुत । ऐकें यापरी ते दीक्षित । यजुनि मातें याचित । स्वर्गभोगु ॥ १८ ॥ मग मी न पाविजे ऐसें । जें पापरूप पुण्य असे । तेणें लाधलेनि सौरसें । स्वर्गा येती ॥ १९ ॥ जेथ अमरत्व हेंचि सिंहासन । ऐरावतासारिखें वाहन । राजधानीभुवन । अमरावती ॥ ३२० ॥ जेथ महासिद्धींची भांडारें । अमृताचीं कोठारें । जियें गांवीं खिल्लारें । कामधेनूंची ॥ २१ ॥ जेथ वोळगे देव पाइका । सैंघ चिंतामणीचिया भूमिका । विनोदवनवाटिका । सुरतरूंचिया ॥ २२ ॥ गंधर्वगात गाणीं । जेथ रंभेऐशिया नाचणी । उर्वशी मुख्य विलासिनी । अंतौरिया ॥ २३ ॥ मदन वोळगे शेजारें । जेथ चंद्र शिंपे सांबरे । पवना ऐसें म्हणियारें । धावणें जेथ ॥ २४ ॥ पैं बृहस्पति आपण । ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राह्मण । भाटियेचे सुरगण । बहुवस जेथें ॥ २५ ॥ लोकपाळ रांगेचें । राउत जिये पदींचे । उचैःश्रवा खांचे । खोलणिये ॥ २६ ॥ हें बहु असो जे ऐसे । भोग इंद्रसुखासरिसे । ते भोगिजती जंव असे । पुण्यलेशु ॥ २७ ॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥ २१ ॥

मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे । आणि येऊं लागती माघारें । मृत्युलोका ॥ २८ ॥ जैसा वैश्याभोगीं कवडा वेंचे । मग दारही चेपूं न ये तियेचें । तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें । काय सांगों ॥ २९ ॥ एवं थितिया मातें चुकले । जिहीं पुण्यें स्वर्ग कामिले । तयां अमरपण तें वावों जालें । अंती मृत्युलोकु ॥ ३३० ॥ मातेचिया उदरकुहरीं । पचूनि विष्ठेचां दाथरीं । उकडूनि नवमासवरी । जन्मजन्मोनि मरती ॥ ३१ ॥ अगा स्वप्नीं निधान फावे । परि चेइलिया हारपे आघवें । तैसें स्वर्गसुख जाणावें । वेदाज्ञाचें ॥ ३२ ॥ अर्जुना वेदु जऱ्ही जाहला । तरी मातें नेणतां वायां गेला । कणु सांडुनि उपणिला । कोंडा जैसा ॥ ३३ ॥ म्हणऊनि मज एकेंविण । हे त्रयीधर्म अकारण । आतां मातें जाणोनि काहीं नेण । तूं सुखिया होसी ॥ ३४ ॥

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥

पैं सर्वभावेंसी उखितें । जे वोपिले मज चित्तें । जैसा गर्भगोळु उद्यमातें । कोणाही नेणे ॥ ३५ ॥ तैसा मीवाचूनि कांही । आणीक गोमटेंचि नाहीं । मजचि नाम पाहीं । जिणेया ठेविलें ॥ ३६ ॥ ऐसे अनन्यगतिकें चित्तें । चिंतितसांते मातें । जे उपासिती तयांतें । मीचि सेवीं ॥ ३७ ॥

ते एकवटूनि जिये क्षणीं । अनुसरले गा माझिये वाहणी । तेव्हांचि तयांचि चिंतवणी । मजचि पडली ॥ ३८ ॥ मग तिहीं जें जें करावें । तें मजचि पडिलें आघवें । जैशी अजातपक्षांचेनि जीवें । पक्षिणी जिये ॥ ३९ ॥ आपुली तहानभूक नेणे । तान्हया निके ते माउलीसीचि करणें । तैसे अनुसरले जे मज प्राणें । तयांचेन काइसेनिहि न लजें मी ॥ ३४० ॥ तया माझिया सायुज्याची चाड । परि तेंचि पुरवीं कोड । कां सेवा म्हणती तरी आड । प्रेम सुयें ॥ ४१ ॥ ऐसा मनीं जो जो धरिती भावो । तो तो पुढां पुढां लागें तयां देवों । आणि दिधलियाचा निर्वाहो । तोही मीचि करीं ॥ ४२ ॥ हा योगक्षेमु आघवा । तयांचा मजचि पडिला पांडवा । जयांचिया सर्वभावां । आश्रयो मी ॥ ४३ ॥

येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः । तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥

आतां आणिकही संप्रदायें । परी मातें नेणती समवायें । जे अग्नि-इंद्र-सूर्य-सोमाये । म्हणऊनि यजिती ॥ ४४ ॥ तेंही कीर मातेंचि होये । कां जे हें आघवें मीचि आहें । परि ते भजती उजरी नव्हे । विषम पडे ॥ ४५ ॥ पाहें पां शाखा पल्लव वृक्षाचे । हे काय नव्हती एकाचि बीजाचे । परी पाणी घेणें मुळाचे । तें मुळींचि घापे ॥ ४६ ॥ कां दहाहीं इंद्रियें आहाती । इयें एकेचि देहींची होती । आणि इहीं सेविले विषयो जाती । एकाचि ठायां ॥ ४७ ॥ तरी करोनि रससोय बरवी । कानीं केविं भरावी । फुलें आणोनि बांधावीं । डोळां केविं ॥ ४८ ॥ तेथ रसु तो मुखेचि सेवावा । परिमळे तो घ्राणेंचि घ्यावा । तैसा मी तो यजावा । मीचि म्हणोनि ॥ ४९ ॥ येर मातें नेणोनि भजन । तें वायांचि गा आनेंआन । म्हणोनि कर्माचे डोळे ज्ञान । तें निर्दोष होआवें ॥ ३५० ॥

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च । न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ॥ २४ ॥

एऱ्हवीं पाहें पां पंडुसुता । या यज्ञोपहारां समस्तां । मीवांचूनि भोक्ता । कवणु आहे ॥ ५१ ॥ मी सकळां यज्ञांचा आदि । आणि यजना या मीचि अवधि । कीं मातें चुकोनि दुर्बुद्धि । देवां भजले ॥ ५२ ॥ गंगेचे उदक गंगे जैसें । अर्पिजे देवपितरोद्देशें । माझें मज देती तैसें । परि आनानीं भावीं ॥ ५३ ॥ म्हणऊनि ते पार्था । मातें न पवतीचि सर्वथा । मग मनीं वाहिली जे आस्था । तेथ आले ॥ ५४ ॥

यान्ति देवव्रता देवान्पितॄन्यान्ति पितृव्रताः । भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥ २५ ॥

मनें वाचा करणीं । जयांचीं भजनें देवांचिया वाहणी । ते शरीर जातियेक्षणीं । देवचि जाले ॥ ५५ ॥ अथवा पितरांचीं व्रतें । वाहती जयांचीं चित्तें । जीवित सरलिया तयांतें । पितृत्व वरी ॥ ५६ ॥ कां क्षुद्रदेवतादि भूतें । तियेंचि जयांचीं परमदैवतें । जिहीं अभिचारिकीं तयांतें । उपासिलें ॥ ५७ ॥ तयां देहाची जवनिक फिटली । आणि भूतत्वाची प्राप्ति जाहली । एवं संकल्पवशें फळली । कर्में तयां ॥ ५८ ॥ मग मीचि डोळां देखिला । जिहीं कानी मीचि

ऐकिली । मनीं मी भाविला । वानिला वाचा ॥ ५९ ॥ सर्वांगीं सर्वांठायीं । मीचि नमस्कारिला जिहीं । दानपुण्यादिकें जें कांही । तें माझियाचि मोहरा ॥ ३६० ॥ जिहीं मातेंचि अध्ययन केलें । जें आंतबाहेरि मियांचि धाले । जयां जीवित्व जोडलें । मजचिलागीं ॥ ६१ ॥ जे अहंकारु वाहत आंगीं । आम्ही हरीचे भूषावयालागीं । जे लोभिये एकचि जगीं । माझेनि लोभें ॥ ६२ ॥ जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम । जे माझिया भुली सभ्रम । नेणती लोक ॥ ६३ ॥ जयांचीं जाणती मजचि शास्त्रें । मी जोडें जयांचेनि मंत्रें । ऐसे जे चेष्टामात्रें । भजले मज ॥ ६४ ॥ ते मरणाऐलीचकडे । मज मिळोनि गेले फुडे । मग मरणीं आणिकीकडे । जातील केविं ॥ ६५ ॥ म्हणोनि मद्याजि जे जाहले । ते माझिया सायुज्या आले । जिहीं उपचारमिषें दिधलें । आपणपें मज ॥ ६६ ॥ पैं अर्जुना माझां ठायीं । आपणपेनवीण सौरसु नाहीं । मी उपचारी कवणाही । नाकळें गा ॥ ६७ ॥ एथ जाणीव करी तोचि नेणे । आथिलेपण मिरवी तेंचि उणें । आम्ही जाहलों ऐसें जो म्हणे । तो कांहीचि नव्हे ॥ ६८ ॥ अथवा यज्ञदानादि किरीटी । कां तपें हन जे हुटहुटी । ते तृणा एकासाठीं । न सरे एथ ॥ ६९ ॥ पाहें पां जाणिवेचेनि बळें । कोण्हीं वेदापासूनि असे आगळे । कीं शेषाहूनि तोंडागळें । बोलकें आथी ॥ ३७० ॥ तोही आंथरुणातळवटी दडे । येरु नेति नेति म्हणोनि बहुडे । एथ सनकादिक वेडे । पिसे जाहले ॥ ७१ ॥ करितां तापसांची कडसणी । कवणु जवळां ठेविजैल शूळपाणी । तोही अभिमानु सांडूनि पायवणी । माथां वाहे ॥ ७२ ॥ नातरी आथिलेपणें सरिसी । कवणी आहे लक्ष्मियेऐसी । श्रियेसारिखिया दासी । घरीं जियेतें ॥ ७३ ॥ तियां खेळतां करिती घरकुलीं । तयां नामें अमरपुरें जरि ठेविलीं । तरि न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ॥ ७४ ॥ तियां नावडोनि जेव्हा मोडती । तेव्हा महेंद्राचे रंक होती । तियां झाडां जेउते पाहती । ते कल्पवृक्ष ॥ ७५ ॥ ऐसें जियेचियां जवळिकां । सामर्थ्य घरींचियां पाइकां । ते लक्ष्मी मुख्यनायका । न मनेचि एथ ॥ ७६ ॥ मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमान सांडुनि पांडवा । ते पाय धुवावयाचिया दैवा । पात्र जाहाली ॥ ७७ ॥ म्हणोनि थोरपण पन्हांचि सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ ७८ ॥ अगा सहस्त्रकिरणाचिये दिठी । पुढां चंद्रुही लोपे किरीटी । तेथ खद्योत हा हुटहुटी । आपुलेनि तेजें ॥ ७९ ॥ तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे । जेथ शंभूचेंही तप न पुरे । तेथ येर प्राकृत हेंदरें । केविं जाणों लाहे ॥ ३८० ॥ यालागीं शरीरसांडोवा कीजे । सकळगुणांचें लोण उतरिजे । संपत्तिमदु सांडिजे । कुरवंडी करुनी ॥ ८१ ॥

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥

मग निस्सीमभावउल्हासें । मज अर्पावयाचेनि मिसें । फळ आवडे तैसें । भलतेयाचें हो ॥ ८२ ॥ भक्तु माझियाकडे दावी । आणि मी दोन्हीं हात वोडवीं । मग देठू न फेडितां सेवीं । आदरेंशी ॥ ८३ ॥ पैं गा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज द्यावें । तें लेखें तरि म्यां तुरंबावें । परि

मुखींचि घालीं ॥ ८४ ॥ हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडे तें जाहलें । तें साजूकही न हो सुकलें । भलतैसें ॥ ८५ ॥ परि सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखे । तैसें पत्रचि परि तेणें सुखें । आरोगूं लागें ॥ ८६ ॥ अथवा ऐसेंही एक घडे । जे पालाही परि न जोडे । तरि उदकाचें तंव सांकडें । नव्हेल कीं ॥ ८७ ॥ तें भलतेथ निमोलें । न जोडितां आहे जोडलें । तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज ॥ ८८ ॥ तेणें वैकुंठापासोनि विशाळें । मजलागीं केलीं राउळें । कौस्तुभाहुनि निर्मळें । लेणीं दिधलीं ॥ ८९ ॥ दुधाची शेजारें । क्षीराब्धीऐसीं मनोहरें । मजलागीं अपारें । सृजिलीं तेणें ॥ ३९० ॥ कर्पूर चंदन अगरु । ऐसेया सुगंधाचा महामेरु । मज हाती लाविला दिनकरु । दीपमाळे ॥ ९१ ॥ गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूंचीं उद्यानें । कामधेनूंचीं गोधनें । अर्पिली तेणें ॥ ९२ ॥ मज अमृताहूनि सुरसें । बोनीं वोगरिलीं बहुवसें । ऐसा भक्तांचेनि उदकलेशें । परितोषें गा ॥ ९३ ॥ हें सांगावें काय किरीटी । तुम्हींचि देखिलें आपुलिया दिठी । मी सुदामयाचिया सोडीं गांठी । पव्हयालागीं ॥ ९४ ॥ पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ सानें थोर न म्हणें । आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ॥ ९५ ॥ येर पत्र पुष्प फळ । तें भजावया मिस केवळ । वांचूनि आमुचा लाग निष्कळ । भक्तितत्त्व ॥ ९६ ॥ म्हणोनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धि एकी सोपारी करीं । तरी सहजें आपुलिया मनोमंदिरीं । न विसंबें मातें ॥ ९७ ॥

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥

जे जे कांही व्यापार करिसी । कां भोग हन भोगिसी । अथवा यज्ञीं यजिसी । नानाविधीं ॥ ९८ ॥ नातरी पात्रविशेषें दानें । कां सेवकां देसी जीवनें । तपादि साधनें । व्रतें करिसी ॥ ९९ ॥ तें क्रियाजात आघवें । जें जैसें निपजेल स्वभावें । तें भावना करोनि करावें । माझिया मोहरा ॥ ४०० ॥ परि सर्वथा आपुलां जीवीं । केलियाची शंका कांहींचि नुरवीं । ऐसी धुवोनि कर्में द्यावीं । माझिया हातीं । १ ॥

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः । संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥

मग अग्निकुंडी बीजें घातलीं । तियें अंकुरदशे जेविं मुकलीं । तेविं न फळतीचि मज अर्पिली । शुभाशुभें ॥ २ ॥ अगा कर्में जैं उरावें । तैं तिहीं सुखदुःखीं फळावें । आणि तयातें भोगावया यावें । देहा एका ॥ ३ ॥ तें उगाणिलें मज कर्म । तेव्हाचि पुसिलें मरण जन्म । जन्मासवें श्रम । वरचिलही गेले ॥ ४ ॥ म्हणऊनि अर्जुना यापरी । पाहेचा वेळु नव्हेल भारी । हे संन्यासयुक्ति सोपारी । दिधली तुज ॥ ५ ॥ या देहाचिया बांदोडी न पडिजे । सुखदुःखाचिया सागरीं न बुडिजे । सुखें सुखरूपा घडिजे । माझियाचि अंगा ॥ ६ ॥

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः । ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥

तो मी पुससी कैसा । तरि जो सर्वभूतीं सदा सरिसा । जेथ आपपरु ऐसा । भागु नाहीं ॥ ७ ॥ जे ऐसिया मातें जाणोनि । अहंकाराचा कुरुठा मोडोनि । जे जीवें कर्में करूनि । भजती मातें

॥ ८ ॥ ते वर्तत दिसती देहीं । परि ते देहीं ना माझां ठायीं । आणि मी तयांचां हृदयीं । समग्र असें ॥ ९ ॥ सविस्तर वटत्व जैसें । बीजकणिकेमाजीं असे । आणि बीजकणु वसे । वटीं जेवीं ॥ ४१० ॥ तेवीं आम्हां तयां परस्परें । बाहेरी नामाचींचि अंतरें । वांचूनि आंतुवट वस्तुविचारें । मी तेचि ते ॥ ११ ॥ आतां जायांचें लेणें । जैसें आंगावरी आहाचवाणें । तैसें देह धरणें । उदास तयाचें ॥ १२ ॥ परिमळु निघालिया पवनापाठीं । मागें वोस फुल राहे देठीं । तैसें आयुष्याचिये मुठी । केवळ देह ॥ १३ ॥ येर अवष्टंभु जो आघवा । तो आरूढोनि मद्भावा । मजचि आंतु पांडवा । पैठा जाहला ॥ १४ ॥

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥

ऐसे भजतेनि प्रेमभावें । जया शरीरही पाठीं न पवे । तेणें भलतया व्हावें । जातीचिया ॥ १५ ॥ आणि आचरण पाहतां सुभटा । तो दुष्कृताचा कीर सेल वांटा । परि जीवित वेचिलें चोहटां । भक्तीचिया कीं ॥ १६ ॥ अगा अंतींचिया मती । साचपण पुढिले गती । म्हणोनि जीवित जेणें भक्ती । दिधलें शेखीं ॥ १७ ॥ तो आधीं जरी अनाचारी । तरी सर्वोत्तमुचि अवधारीं । जैसा बुडाला महापूरीं । न मरतु निघाला ॥ १८ ॥ तयाचें जीवित ऐलथडिये आलें । म्हणोनि बुडालेपण जेवीं वायां गेलें । तेवीं नुरेचि पाप केलें । शेवटलिये भक्ती ॥ १९ ॥ यालागीं दुष्कृती जन्ही जाहला । तरि अनुतापतीर्थीं न्हाला । न्हाऊनि मजआंतु आला । सर्वभावें ॥ ४२० ॥ तरि आतां पवित्र तयाचेंचि कुळ । अभिजात्य तेंचि निर्मळ । जन्मलेया फळ । तयासीच जोडलें ॥ २१ ॥ तो सकळही पढिन्नला । तपें तोचि तपिन्नला । अष्टांग अभ्यासिला । योगु तेणें ॥ २२ ॥ हें असो बहुत पार्था । तो उतरला कर्में सर्वथा । जयाची अखंड गा आस्था । मचचिलागीं ॥ २३ ॥ अवघिया मनोबुद्धीचिया राहटी । भरोनि एकनिष्ठेचिया पेटी । जेणें मजमाजीं किरीटी । निक्षेपिली ॥ २४ ॥

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति । कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥

तो आतां अवसरें मजसारिखा होईल । ऐसाही भाव तुज जाईल । हां गा अमृताआंत राहील । तया मरण कैचें ॥ २५ ॥ पैं सूर्य जो वेळु नुदैजे । तया वेळा कीं रात्रि म्हणिजे । तेविं माझिये भक्तीविण जें कीजे । तें महापाप नोहे ॥ २६ ॥ म्हणोनि तयाचिया चित्ता । माझी जवळिक पांडुसुता । तेव्हांचि तो तत्त्वता । स्वरूप माझें ॥ २७ ॥ जैसा दीपें दीपु लाविजे । तेथ आदील कोण हें नोळखिजे । तैसा सर्वस्वें जो मज भजे । तो मी होऊनि ठाके ॥ २८ ॥ मग माझी नित्य शांती । तया दशा तेचि कांती । किंबहुना जिती । माझेनि जीवें ॥ २९ ॥ एथ पार्था पुढतपुढती । तेंचि तें सांगों किती । जरी मियां चाड तरी भक्ती । न विसंबिजे गा ॥ ४३० ॥ अगा कुळाचिया चोखटपणा नलगा । आभिजात्य झणीं श्लाघा । व्युत्पत्तीचा वाउगा । सोसु कां वाहावा ॥ ३१ ॥ कां रूपें वयसा माजा । आथिलेपणें कां गाजा । एक भाव नाही माझा ।

तरी पाल्हाळ तें ॥ ३२ ॥ कणेंविण सोपटें । कणसें लागलीं आथी एक दाटें । काय करावें गोमटें । वोस नगर ॥ ३३ ॥ नातरी सरोवर आटलें । रानीं दु:खिया दु:खी भेटलें । कां वांझ फुलीं फुललें । झाड जैसें ॥ ३४ ॥ तैसें सकळ तें वैभव । अथवा कुळजातिगौरव । जैसें शरीर आहे सावेव । परि जीवचि नाहीं ॥ ३५ ॥ माझिये भक्तीविण । जळो तें जियालेपण । अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काईं ॥ ३६ ॥ पैं हिंवराची दाट साउली । सज्जनीं जैसी वाळिली । तैसीं पुण्यें डावलूनि गेली । अभक्तांतें ॥ ३७ ॥ निंब निंबोळियां मोडोनि आला । तरी तो काउळियांसीचि सुकाळु जाहला । तैसा भक्तिहीनु वाढिन्नला । दोषांचिलागीं ॥ ३८ ॥ कां षड्रस खापरीं वाढिले । वाढूनि चोहटां रात्रीं सांडिले । ते सुणियांचेचि ऐसे झाले । जियापरी ॥ ३९ ॥ तैसें भक्तिहीनाचें जिणें । जो स्वप्नींही परि सुकृत नेणे । तेणे संसारदु:खासि आवंतणें । वोगरिलें गा ॥ ४४० ॥ म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाती अंत्य जरी व्हावें । वरि देहाचेनि नांवें । पशूचेंही लाभो ॥ ४१ ॥ पाहें पां सावजें हातिरूं धरिलें । तेणें तया काकुळती मातें स्मरिलें । कीं तयाचें पशुत्व वावो जाहलें । पातलिया मातें ॥ ४२ ॥

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ३२ ॥

अगा नांवें घेतां वोखटीं । जे आघवेया अधमांचिये शेवटीं । तिये पापयोनिही किरीटी । जन्मले जे ॥ ४३ ॥ ते पापयोनि मूढ । मूर्ख ऐसे जे दगड । परि माझां ठायीं दृढ । सर्वभावें ॥ ४४ ॥ जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टि भोगी माझेंचि रूप । जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ॥ ४५ ॥ माझिया कीर्तीविण । जयांचे रिते नाहीं श्रवण । जयां सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥ ४६ ॥ जयांचें ज्ञान विषों नेणे । जाणीव मजचि एकातें जाणे । जया ऐसें लाभे तरी जिणें । एऱ्हवीं मरण ॥ ४७ ॥ ऐसा आघवाचि परी पांडवा । जिहीं आपुलिया सर्वभावा । जियावयालागीं वोलावा । मीचि केला ॥ ४८ ॥ ते पापयोनीही होतु कां । ते श्रुताधीतही न होतु कां । परि मजसी तुकितां तुका । तुटी नाहीं ॥ ४९ ॥ पाहें पां भक्तीचेनि आथिलेपणें । दैत्यीं देवां आणिलें उणें । माझें नृसिंहत्व लेणें । जयाचिये महिमे ॥ ४५० ॥ तो प्रल्हादु गा मजसाठी । घेतां बहुतें सदा किरीटी । कां जें मियां द्यावें ते गोष्टी । तयाचिया जोडे ॥ ५१ ॥ एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें । परि इंद्रही सरी न लाहे उपरें । म्हणोनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण ॥ ५२ ॥ राजाज्ञेचीं अक्षरें आहाती । तियें चामा एका जया पडती । तया चामासाठीं जोडती । सकळ वस्तु ॥ ५३ ॥ वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे । तेचि चाम एक जैं लाहे । तेणें विकती आघवीं ॥ ५४ ॥ तैसें उत्तमत्व तैचि तरे । तैंचि सर्वज्ञता सरे । जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥ ५५ ॥ म्हणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण । एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ ५६ ॥ तेंचि भलतेणें भावें । मन मजआंतु येतें होआवें । आलें तरी आघवें । मागील वावो ॥ ५७ ॥ जैसे तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवती

गंगाजळ । मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ॥ ५८ ॥ कां खैर चंदन काष्ठें । हे विवंचना तंवचि घटे । जंव न घापती एकवटें । अग्नीमाजीं ॥ ५९ ॥ तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजा इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ ६० ॥ मग जातीव्यक्ती पडे बिंदुलें । जेव्हां भाव होती मज मीनले । जैसे लवणकण घातले । सागरामाजीं ॥ ६१ ॥ तंववरी नदानदींचीं नांवे । तंवचि पूर्वपश्चिमेचे यावे । जंव न येती आघवे । समुद्रामाजीं ॥ ६२ ॥ हेंचि कवणें एकें मिसें । चित्त माझां ठायीं प्रवेशे । येतुलें हो मग आपैसें । मी होणें असे ॥ ६३ ॥ अगा वरी फोडावयाचि लागीं । लोहो मिळो कां परिसाचां आंगी । कां जे मिळतिये प्रसंगी । सोनेंचि होईल ॥ ६४ ॥ पाहें पां वालभाचेनि व्याजें । तिया वज्रांगनांची निजें । मज मीनलिया काय माझें । स्वरूप नव्हतीचि ॥ ६५ ॥ नातरी भयाचेनि मिसें । मातें न पविजेचि काय कंसें । की अखंड वैरवशें । चैद्यादिकीं ॥ ६६ ॥ अगा सोयरेपणेंचि पांडवा । माझें सायुज्य यादवां । कीं ममत्वें वासुदेवा - । दिकां सकळां ॥ ६७ ॥ नारदा ध्रुवा अक्रूरा । शुका हन सनत्कुमारा । इयां भक्ती मी धनुर्धरा । प्राप्यु जैसा ॥ ६८ ॥ तैसाचि गोपीसि कामें । तया कंसा भयसंभ्रमें । येरा घातकें यां मनोधर्मे । शिशुपालादिकां ॥ ६९ ॥ अगा मी एकुलाणीचें खागें । मज येवों ये भलतेनि मार्गें । भक्ती कां विषयें विरागें । अथवा वैरें ॥ ४७० ॥ म्हणोनि पार्था पाहीं । प्रवेशावया माझां ठायीं । उपायांची नाहीं । वाणि एथ ॥ ७१ ॥ आणि भलतिया जाती जन्मावें । मग भजिजे कां विरोधावें । परि भक्त कां वैरिया व्हावें । माझियाचि ॥ ७२ ॥ अगा कवणें एकें बोलें । माझेपण जन्ही जाहालें । तरी मी होणें आलें । हाता निरुतें ॥ ७३ ॥ यापरी पापयोनीही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना । मातें भजतां सदना । माझिया येती ॥ ७४ ॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा । अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥

मग वर्णामाजीं छत्रचामर । स्वर्ग जयांचें अग्रहार । मंत्रविद्येसि माहेर । ब्राह्मण जे ॥ ७५ ॥ जेथ अखंड वसिजे यागीं । जे वेदांची वज्रांगी । जयाचिये दिठीचां उत्संगी । मंगळ वाढे ॥ ७६ ॥ जे पृथ्वीतळींचे देव । जे तपोवतार सावयव । सकळ तीर्थांसि दैव । उदयलें जे ॥ ७७ ॥ जयांचिये आस्थेचिये वोले । सत्कर्म पाल्हाळीं गेलें । संकल्पें सत्य जियालें । जयांचेनि ॥ ७८ ॥ जयांचेनि गा बोलें । अग्नीसि आयुष्य जाहालें । म्हणोनि समुद्रें पाणी आपुलें । दिधलें यांचिया प्रीती ॥ ७९ ॥ मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती । फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं । मग वोढविली वक्षस्थळाची वाखती । चरणरजां ॥ ४८० ॥ आझूनि पाउलाची मुद्रा । मी हृदयीं वाहें गा सुभद्रा । जे आपुलिया दैवसमुद्रा । जतनेलागी ॥ ८१ ॥ जयांचा कोप सुभटा । काळाग्निरुद्राचा वसौटा । जयांचां प्रसादीं फुकटा । जोडती सिद्धी ॥ ८२ ॥ ऐसे पुण्यपूज्य जे ब्राह्मण । आणि माझां ठायीं अतिनिपुण । आतां मातें पावती हें कवण । समर्थपणें ॥ ८३ ॥ पाहे पां चंदनाचेनि अंगानिळें । शिवतिले निंब होते जे जवळे । तिहीं निर्जिवीही देवांचीं निडळें ।

बैसणीं केली ॥ ८४ ॥ मग तो चंदनु तेथ न पवे । ऐसें मनीं कैसेनि धरावें । अथवा पातला हें समर्थावें । तेव्हां कायि साच ॥ ८५ ॥ जेथ निववील ऐसिया आशा । हरें चंद्रमा आधा ऐसा । वाहिजत असे शिरसा । निरंतर ॥ ८६ ॥ तेथ निववितां आणि सगळा । परिमळें चंद्राहूनि आगळा । तो चंदनु केविं अवलीळा । सर्वांगीं न बैसे ॥ ८७ ॥ कां रथ्योदकें जियेचिये कासे । लागलिया समुद्र जालीं अनायासें । तिये गंगेसि काय अनारिसें । गत्यंतर असे ॥ ८८ ॥ म्हणोनि राजर्षि कां ब्राह्मण । जयां गती मती मीचि शरण । तयां त्रिशुद्धी मीचि निर्वाण । स्थितिही मीचि ॥ ८९ ॥ यालागीं शतजजरि नावे । रिगोनि केविं निश्चिंत होआवें । कैसेनि उघडिया असावें । शस्त्रवर्षी ॥ ४९० ॥ अंगावरी पडतां पाषाण । न सुवावें केविं वोडण । रोगें दाटलिया आणि उदासपण । वोखदेंसीं ॥ ९१ ॥ जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केविं पांडवा । तेविं लोकां येऊनिया सोपद्रवां । केविं न भजिजे मातें ॥ ९२ ॥ अगा मातें न भजावयालागीं । कवण बळ पां आपुलां आंगीं । काइ घरीं कीं भोगीं । निश्चिंती केली ॥ ९३ ॥ नातरी विद्या कीं वसया । यां प्राणियांसि हा ऐसा । मज न भजतां भरंवसा । सुखाचा कोण ॥ ९४ ॥ तरी भोग्यजात जेतुलें । तें एका देहाचिया निकिया लागलें । आणि येथ देह तंव असे पडिलें । काळाचां तोंडीं ॥ ९५ ॥ बाप दुःखाचें केणें सुटलें । जेथ मरणाचे भरे लोटले । तिये मृत्युलोकींचिये शेवटिले । येणें जाहालें हाटवेळे ॥ ९६ ॥ आतां सुखेंसि जीविता । कैंची ग्राहिकी कीजेल पांडुसुता । काय राखोंडी फुंकितां । दीपु लागे ॥ ९७ ॥ अगा विषाचे कांदे वाटुनी । जो रस घेइजे पिळुनी । तया नाम अमृत ठेउनी । जैसें अमर होणें ॥ ९८ ॥ तेंवि विषयांचें जे सुख । तें केवळ परम दुःख । परि काय कीजे मूर्ख । न सेवितां न सरे ॥ ९९ ॥ कां शीस खांडुनि आपुलें । पायींचां खतीं बांधिलें । तैसें मृत्युलोकीचें भलें । आहे आघवें ॥ ५०० ॥ म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची काहणी । ऐकिजेल कवणाचां श्रवणीं । कैंची सुखनिद्रा आंथरुणीं । इंगळांचां ॥ १ ॥ जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी । जेथ उदयो होत अस्तालागीं । दुःख लेऊनी सुखाची आंगी । सळित जगातें ॥ २ ॥ जेथें मंगळाचां अंकुरीं । सवेंचि अमंगळाची पडे पोहरी । मृत्यु उदराचां परिवरीं । गर्भु गिंवसी ॥ ३ ॥ जें नाही तयांतें चिंतवी । तंव तेंचि नेईजे गंधर्वीं । गेलियाची कवणे गांवीं । शुद्धि न लभे ॥ ४ ॥ अगा गिंवसितां आघवां वाटीं । परतलें पाउलचि नाहीं किरीटी । सैंघ निमालियांचिया गोठी । तियें पुराणें जेथिंचीं ॥ ५ ॥ जेथींचिये अनित्यतेची थोरी । करितया ब्रह्मयाचें आयुष्यवेरी । कैसें नाही होणें अवधारीं । निपटूनियां ॥ ६ ॥ ऐसी लोकींची जिये नांदणूक । तेथ जन्मले अथि जे लोक । तयांचिये निश्चिंतीचें कौतुक । दिसत असे ॥ ७ ॥ पैं दृष्टादृष्टींचिये जोडी - । लागी भांडवल न सुटे कवडी । जेथ सर्वस्वें हानि तेथ कोडी । वेंचिती गा ॥ ८ ॥ जो बहुवें विषयविलासें गुंफे । तो म्हणती उवायें पडिला सापें । जो अभिलाषभारें दडपे । तयातें सज्ञान म्हणती ॥ ९ ॥ जयाचें

आयुष्य धाकुटें होय । बळ प्रज्ञा जिरौनि जाय । तयाचे नमस्कारिती पाय । वडिल म्हणोनि ॥ ५१० ॥ जंव जंव बाळ बळिया वाढे । तंव तंव भोजें नाचती कोडें । आयुष्य निमालें आंतुलियेकडे । ते ग्लानीचि नाहीं ॥ ११ ॥ जन्मलिया दिवसदिवसें । हों लागे काळाचियाचि ऐसें । कीं वाढती करिती उल्हासें । उभविती गुढिया ॥ १२ ॥ अगा मर हा बोलु न साहती । आणि मेलिया तरी रडती । परि असतें जात न गणिती । गहिंसपणें ॥ १३ ॥ दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा । कीं तो मासिया वेटाळी जिभा । तैसे प्राणिये कवणा लाभा । वाढविती तृष्णा ॥ १४ ॥ अहा कटकटा हें वोखटें । मृत्युलोकींचें उफराटें । एथ अर्जुना जरी अवचटें । जन्मलासी तूं ॥ १५ ॥ तरि झडझडोनि वहिला निघ । इये भक्तीचिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग । निजधाम माझें ॥ १६ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु । मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण: ॥ ३४ ॥

तूं मन हें मीचि करीं । माझां भजनीं प्रेम धरी । सर्वत्र नमस्कारीं । मज एकातें ॥ १७ ॥ माझेनि अनुसंधानें देख । संकल्पु जाळणें नि:शेख । मद्याजी चोख । याचि नांव ॥ १८ ॥ ऐसा मियां आथिला होसी । तेथ माझियाचि स्वरूपा पावसी । हें अंत:करणींचें तुजपासीं । बोलिजत असे ॥ १९ ॥ अगा आघवेया चोरिया आपुलें । जें सर्वस्व आम्हीं असे ठेविलें । तें पावोनि सुख संचलें । होऊनि ठासी ॥ ५२० ॥ ऐसें सांवळेनि परब्रह्में । भक्तकामकल्पद्रुमें । बोलिलें आत्मारामें । संजयो म्हणे ॥ २१ ॥ अहो ऐकिजत असे कीं अवधारा । तंव इया बोला निवांत म्हातारा । जैसा म्हैसा नुठी कां पुरा । तैसा उगाचि असे ॥ २२ ॥ तेथ संजयें माथा तुकिला । अहा अमृताचा पाऊस वर्षला । कीं हा एथ असतुचि गेला । सेजिया गांवा ॥ २३ ॥ तन्ही दातारु हा आमुचा । म्हणोनि हें बोलतां मैळेल वाचा । काइ झालें ययाचा । स्वभावोचि ऐसा ॥ २४ ॥ परि बाप भाग्य माझें । जे वृत्तांतु सांगावयाचेनि व्याजें । कैसा रक्षिलों मुनिराजें । श्रीव्यासदेवें ॥ २५ ॥ येतुलें हें वाड सायासें । जंव बोलत असे दृढें मानसें । तंव न धरवेचि आपुलिया ऐसें । सात्त्विकें केलें ॥ २६ ॥ चित्त चाकाटलें आटु घेत । वाचा पांगुळली जेथिंची तेथ । आपादकंचुकित । रोमांच आले ॥ २७ ॥ अर्धोन्मीलित डोळे । वर्षताति आनंदजळें । आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ॥ २८ ॥ पैं आघवांचि रोममूळीं । आली स्वेदकणिका निर्मळी । लेइला मोतियांचीं कडियाळीं । आवडे तैसा ॥ २९ ॥ ऐसा महासुखाचेनि अतिरसें । जेथ आटणी होईल जीवदशे । तेथें निरोविलें व्यासें । तें नेदीच हों ॥ ५३० ॥ आणि कृष्णार्जुनाचें बोलणें । घों करी आले श्रवणें । की देहस्मृतीचा तेणें । वापसा केला ॥ ३१ ॥ तेव्हा नेत्रींचे जळ विसर्जी । सर्वांगींचा स्वेदु परिमार्जी । तेवींच अवधान म्हणे हो जी । धृतराष्ट्रातें ॥ ३२ ॥ आतां कृष्णवाक्यबीजा निवाडु । आणि संजय सात्त्विकाचा बिवडु । म्हणोनि श्रोतया होईल सुरवाडु । प्रमेयपिकाचा ॥ ३३ ॥ अहो अळुमाळ अवधान देयावें । येतुलेनि आनंदाचिया

राशीवरी बैसावें । बाप श्रवणेंद्रिया दैवें । घातली माळ ॥ ३४ ॥ म्हणोनि विभूतींचा ठावो । अर्जुना दावील सिद्धांचा रावो । तो ऐका म्हणे ज्ञानदेवो । निवृत्तीचा ॥ ५३५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
राजविद्याराजगुह्ययोगोनाम नवमोऽध्यायः ॥ (श्लोक ३४, ओव्या ५३५)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय दहावा)

नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा । पराप्रमेयप्रमदा । विलासिया ॥ १ ॥ नमो संसारतमसूर्या । अप्रतिमपरमवीर्या । तरुणतरतूर्या- । लालनलीला ॥ २ ॥ नमो जगदखिलपालना । मंगळमणिनिधाना । स्वजनवनचंदना । आराध्यलिंगा ॥ ३ ॥ नमो चतुरचित्तचकोरचंद्रा । आत्मानुभवनरेंद्रा । श्रुतिगुणसमुद्रा । मन्मथमन्मथा ॥ ४ ॥ नमो सुभावभजनभाजना । भवेभकुंभभंजना । विश्वोद्भवभुवना । श्रीगुरुराया ॥ ५ ॥ तुमचा अनुग्रहो गणेशु । जैं दे आपुला सौरसु । तैं सारस्वतीं प्रवेशु । बाळकाही आथी ॥ ६ ॥ दैविकी उदार वाचा । जैं उद्देशु दे नाभिकाराचा । तैं नवरससुधाब्धि । थावो लाभे ॥ ७ ॥ जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी । जरी मुकेयातें अंगीकारी । तो वाचस्पतीशीं करी । प्रबंधुहोडा ॥ ८ ॥ हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकरु माथां पारुखे । तो जीवचि परि तुके । महेशेंशीं ॥ ९ ॥ एवढें जिये महिमेचें करणे । ते वाचाळपणें वानूं मी कवणें । का सूर्याचिया आंगा उटणें । लागत असे ॥ १० ॥ केउता कल्पतरूवरी फुलौरा । कायसेनि पाहुणेरु क्षीरसागरा । ऐसा कवणें वासीं कापुरा । सुवासु देवों ॥ ११ ॥ चंदनातें कायसेनि चर्चावें । अमृतातें केउतें रांधावें । गगनावरी उभवावें । घडे केवीं ॥ १२ ॥ तैसें श्रीगुरूचें महिमान । आकळितें कें असे साधन । हें जाणोनि मियां नमन । निवांत केलें ॥ १३ ॥ तरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें । श्रीगुरुसमर्था रूप करूं म्हणें । तरि मोतियासी भिंग देणें । तैसें होईल ॥ १४ ॥ कां साडेपंधरया

रजतवणी । तैशीं स्तुतीचीं बोलणीं । उगियाचि माथां ठेविजे चरणीं । हेंचि भलें ॥ १५ ॥ मग म्हणितलें जी स्वामी । भलेनि ममत्वें देखिलें तुम्हीं । म्हणोनि कृष्णार्जुनसंगमीं । प्रयागवटु जाहलों ॥ १६ ॥ मागां दूध दे म्हणतलियासाठीं । आघवियाचि क्षीराब्धीची करूनी वाटी । उपमन्यूपुढें धूर्जटी । ठेविली जैसी ॥ १७ ॥ ना तरी वैकुंठपीठनायकें । रुसला ध्रुव कवतिकें । बुझावला देऊनि भातुकें । ध्रुवपदाचें ॥ १८ ॥ तैसीं ब्रह्मविद्यारावो । सकळ शास्त्रांचा विसंवता ठावो । ते भगवद्गीता वोविया गावों । ऐसें केलें ॥ १९ ॥ जे बोलणियाचां रानीं हिंडतां । नायकिजे फळलिया अक्षरांची वार्ता । परि ते वाचाचि केली कल्पलता । विवेकाची ॥ २० ॥ होती देहबुद्धि एकसरी । ते आनंदभांडारा केली वोवरी । मन गीतार्थसागरीं । जळशयन जालें ॥ २१ ॥ तैसें एकैक देवांचे करणें । तें अपार बोलों केवीं मी जाणें । तऱ्हीं अनुवादलों धीटपणें । तें उपसाहिजो जी ॥ २२ ॥ आतां आपुलेनि कृपाप्रसादें । मिया भगवद्गीता वोवीप्रबंधें । पूर्वखंड विनोदें । वाखाणिलें ॥ २३ ॥ प्रथमीं अर्जुनाचा विषादु । दुजीं बोलिला योगु विशदु । परि सांख्यबुद्धीसि भेदु । दाऊनियां ॥ २४ ॥ तिजीं केवळ कर्म प्रतिष्ठिलें । तेंचि चतुर्थीं ज्ञानेंशीं प्रगटिलें । पंचमीं गव्हरिलें । योगतत्त्व ॥ २५ ॥ तेंचि षष्ठामाजीं प्रगट । आसनालागोनि स्पष्ट । जीवात्मभाव एकवाट । होती जेणें ॥ २६ ॥ तैसीचि जे योगस्थिति । आणि योगभ्रष्टां जे गति । ते आघवीचि उपपत्ती । सांगितली षष्ठीं ॥ २७ ॥ तयावरी सप्तमीं । प्रकृतिपरिहार उपक्रमीं । भजति जे पुरुषोत्तमीं । ते बोलिले चाऱ्ही ॥ २८ ॥ पाठीं सप्तमींची सप्तप्रश्नविधि । बोलोनि प्रयाणसमय बुद्धि । एवं ते सकळ वाक्यअवधि । अष्टमाध्यायीं ॥ २९ ॥ आतां शब्दब्रह्मीं असंख्याके । जेतुला कांही अभिप्राव पिके । तेतुला महाभारतें एकें । लक्षें जोडे ॥ ३० ॥ आतां अठरा पर्वीं भारतीं । तें लाभे कृष्णार्जुनवाचोक्तीं । आणि जो अभिप्रावो सातेंशतीं । तो एकलाचि नवमीं ॥ ३१ ॥ म्हणोनि नवमींचिया अभिप्राया । सहसा मुद्रा लावावया । बिहाला मी वायां । गर्व कां करूं ॥ ३२ ॥ अहो गूळा साखरे मालेयाचे । हे बांधे तरी एकाचि रसाचे । परि स्वाद गोडियेचे । आनआन जैसे ॥ ३३ ॥ एक जाणोनियां बोलती । एक ठायेंठावो जाणविती । एक जाणों जातां हारपती । जाणते गुणेंशीं ॥ ३४ ॥ हे ऐसे अध्याय गीतेचे । परि अनिर्वाच्यपण नवमाचें । तो अनुवादलों हें तुमचें । सामर्थ्य प्रभु ॥ ३५ ॥ कां एकाचि शाटी तपिन्नली । एकीं सृष्टीवरी सृष्टी केली । एकीं पाषाण वाऊनि उतरलीं । समुद्रीं कटकें ॥ ३६ ॥ एकीं आकाशीं सूर्यातें धरिलें । एकीं समुद्रा चुळीं भरिलें । तैसें मज नेणतयाकरवीं बोलविलें । अनिर्वाच्य तुम्हीं ॥ ३७ ॥ परि हें असो एथ ऐसें । रामरावण झुंजिन्नले कैसे । रामरावण जैसे । मीनले समरीं ॥ ३८ ॥ तैसें नवमीं कृष्णाचें बोलणें । तें नवमीचियाचि ऐसें मी म्हणें । या निवाडा तत्त्वज्ञु जाणे । जया गीतार्थु हातीं ॥ ३९ ॥ एवं नवही अध्याय पहिले । मियां मतीसारिखे वाखाणिले । आतां उत्तरखंड उपाइलें । ग्रंथाचें ऐका ॥ ४० ॥ येथ विभूती प्रतिविभूती । प्रस्तुत अर्जुना

सांगिजेती । ते विदग्धा रसवृत्ती । म्हणिपैल कथा ॥ ४१ ॥ देशियेचेनी नागरपणें । शांतु शृंगारातें जिणे । तरि ओंविया होती लेणें । साहित्यासी ॥ ४२ ॥ मूळग्रंथींचिया संस्कृता – । वरि मऱ्हाटी नीट पढतां । अभिप्राय मानलिया उचिता । कवण भूमी हें न चोजवे ॥ ४३ ॥ जैसें अंगाचेनि सुंदरपणें । लेणियासी आंगचि होय लेणें । अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ॥ ४४ ॥ तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाचां सुखासनीं । शोभती आयणी । चोखट आइका ॥ ४५ ॥ उठावलिया भावा रूप । करितां रसवृत्तीचें लागे वडप । चातुर्य म्हणे पडप । जोडलें आम्हां ॥ ४६ ॥ तैसें देशियेचें लावण्य । हिरोनि आणिलें तारुण्य । मग रचिलें अगण्य । गीततत्त्व ॥ ४७ ॥ तैसा चराचरपरमगुरु । चतुरचित्तचमत्कारु । तो ऐका यादवेश्वरु । बोलता जाहला ॥ ४८ ॥ ज्ञानदेव निवृत्तीचा म्हणे । काई बोलिलें श्रीहरी तेणें । अर्जुना आघवियाचि मातू अंत:करणें । धडौता आहासि ॥ ४९ ॥

श्रीभगवानुवाच : भूय एव महाबाहो शृणु मे परमं वच: । यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १ ॥

आम्हीं मागील जें निरूपण केलें । तें तुझें अवधानचि पाहिलें । तंव टांचे नव्हे भलें । पुरतें आहे ॥ ५० ॥ घटीं थोडेसें उदक घालिजे । तेणें न गळे तरी वरिता भरिजे । तैसा परिसौनि पाहिलासि तंव परिसविजे । ऐसेंचि होतसे ॥ ५१ ॥ पहिले अवचितयावरी सर्वस्व सांडिजे । चोख तरी तोचि भांडारी कीजे । तैसा तूं किरिटी आतां माझें । निजधाम कीं ॥ ५२ ॥ तैसें अर्जुना येऊतें सर्वेश्वरें । पाहोनि बोलिलें आदरें । गिरी देखोनि सुभरे । मेघु जैसा ॥ ५३ ॥ तैसा कृपाळुवांचा रावो । म्हणे आइकें गा महाबाहो । सांगितलाचि अभिप्रावो । सांगेन पुढती ॥ ५४ ॥ प्रतिवर्षीं क्षेत्र पेरिजे । पिकाची जंव जंव वाढी देखिजे । तंव तंव नुबगिजे । वाहो करितां ॥ ५५ ॥ पुढतपुढतीं पुटें देतां । जोडे वानियेची अधिकता । तें सोनें पांडुसुता । शोधूंचि आवडे ॥ ५६ ॥ तैसें एथ पार्था । तुज आभार नाहीं सर्वथा । आम्हीं आपुलियाचि स्वार्था । बोलौनि आम्ही ॥ ५७ ॥ अगा बाळका लेववविजे लेणें । तयाप्रमाणें तें काय शृंगाराते जाणे । तो सोहळा भोगणें । जननीयेसी दृष्टी ॥ ५८ ॥ तैसें तुझे हित आघवें । जंव जंव का तुज फावे । तंव तंव आमुचें सुख दुणावे । ऐसें असे ॥ ५९ ॥ आतां असो हे विकडी । मज उघड तुझी आवडी । म्हणोनि तृप्तीची सवडी । बोलतां न पडे ॥ ६० ॥ आम्हां येतुलियाचि कारणें । तेंचि तें तुजशीं बोलणें । परि असो हें अंत:करणें । अवधान दे ॥ ६१ ॥ ऐकें ऐकें गा सुवर्म । वाक्य माझें परम । जें अक्षरें लेऊनि परब्रह्म । तुज खेंवासि आलें ॥ ६२ ॥ तरी किरीटी तूं मातें । नेणसी ना निरुतें । तरि गा जो मी येथें । तें विश्वचि हें ॥ ६३ ॥

न मे विदु: सुरगणा: प्रभवं न महर्षय: । अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वश: ॥ २ ॥

एथ वेद मुके जाहाले । मन पवन पांगुळले । रातीविण मावळले । रविशशी ॥ ६४ ॥ उदरींचा गर्भु जैसा । नेणें मायेची वयसा । देवांसि मी तैसा । चोजवेना ॥ ६५ ॥ आणि जळचरां उदधीचें

मान । मशकां नोलांडावें गगन । तैसें महर्षींचे ज्ञान । नेणे मातें ॥ ६६ ॥ मी कवण केतुला । कवणाचा कैं जाहला । निरुती या करितां बोला । युगें गेलीं ॥ ६७ ॥ महर्षीं आणि या देवां । येरां भूतजातां सर्वां । मी आदि म्हणोनि पांडवा । जाणतां अवघड ॥ ६८ ॥ उतरलें उदक पर्वत वळघे । कां वाढतें झाड मुळीं लागे । तरी मियां जालेनि जगें । जाणिजे मी ॥ ६९ ॥ कां गाभेवनें वटु गिंवसवे । तरंगीं सागरु सांठवे । कां परमाणूमाजीं सामावे । भूगोलु हा ॥ ७० ॥ तरी मियां जालियां जीवां । महर्षी अथवा देवां । मातें जाणावया होआवा । अवकाशु गा ॥ ७१ ॥ ऐसाही जरी विपायें । सांडुनि पुढील पाये । सर्वेंद्रियांसि होये । पाठिमोरा जो ॥ ७२ ॥ प्रवर्तलाही वेगीं बहुडे । देह सांडुनि मागलीकडे । महाभूतांचिया चढे । माथयावरी ॥ ७३ ॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् । असम्मूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥

तैसा राहोनि ठायठिके । स्वप्रकाशें चोखें । अजत्व माझें देखे । आपुलिये डोळां ॥ ७४ ॥ मी आदीसि परु । सकळलोकमहेश्वरु । ऐसिया मातें जो नरु । यापरी जाणे ॥ ७५ ॥ तो पाषाणांमाजि परिसु । रसांमाजी सिद्धरसु । तैसा मनुष्याकृति अंशु । तो माझाचि जाण ॥ ७६ ॥ तो चालतें ज्ञानाचें बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ । परी माणुसपणाची भांब । लौकिक भागु ॥ ७७ ॥ अगा अवचिता कापुरा- । मार्जीं सांपडला हिरा । वरि पडलिया नीरा । न निगे केवीं ॥ ७८ ॥ तैसा मनुष्यलोकाआंतु । तो जरी जाहला प्राकृतु । तऱ्ही प्रकृतिदोषाची मातु । नेणिजे तेथ ॥ ७९ ॥ तो आपसयेंचि सांडिजे पापीं । जैसा जळत चंदनु सर्पी । तैसा मातें जाणे तो संकल्पीं । वर्जूनि घालिजे ॥ ८० ॥ तेंचि मातें कैसें जाणिजे । ऐसें कल्पी जरी चित्त तुझें । तरी मी ऐसा हे माझे । भाव ऐकें ॥ ८१ ॥ जे वेगळालां भूतीं । सारिखे होऊनि प्रकृती । विखुरले आहेति त्रिजगतीं । आघविये ॥ ८२ ॥

बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः क्षमा सत्यं दमः शमः । सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥ ४ ॥
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः । भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥

ते प्रथम जाण बुद्धि । मग ज्ञान जें निरवधि । असंमोह सहनसिद्धि । क्षमा सत्य ॥ ८३ ॥ मग शम दम दोन्ही । सुख दुःख वर्तत जनीं । अर्जुना भावाभाव मानी । भावाचिमाजीं ॥ ८४ ॥ आतां भय आणि निर्भयता । अहिंसा आणि समता । हे मम रूपचि पांडुसुता । ओळख तूं ॥ ८५ ॥ दान यश अपकीर्ति । हे जे भाव सर्वत्र वसती । ते मजचिपासूनि होती । भूतांचां ठायीं ॥ ८६ ॥ जैसीं भूतें आहाती सिनानीं । तैसेचि हे वेगळाले मानीं । एक उपजती माझां ज्ञानीं । एक नेणती मातें ॥ ८७ ॥ अगा प्रकाश आणि कडवसें । हे सूर्याचिस्तव जैसें । प्रकाश उदयीं दिसे । तम अस्तूसीं ॥ ८८ ॥ आणि माझें जें जाणणें नेणणें । तें तंव भूतांचिया दैवांचें करणें । म्हणोनि भूतीं भावाचें होणें । विषम पडे ॥ ८९ ॥ यापरी माझां भावीं । हें जीवसृष्टि आहे आघवी । गुंतली असे जाणावी । पंडुकुमरा ॥ ९० ॥ आतां इये

सृष्टीचे पालक । तयां आधीन वर्तती लोक । ते अकरा भाव आणिक । सांगेन तुज ॥ ९१ ॥

महर्षय: सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा । मद्भावा मानसा जाता येषां लोक इमा: प्रजा: ॥ ६ ॥

तरी आघवांचि गुणीं वृद्ध । जे महर्षींमाजि प्रबृद्ध । कश्यपादि प्रसिद्ध । सप्त ऋषी ॥ ९२ ॥ आणिकही सांगिजतील । जे चौदा आंतील । स्वायंभू मुख्य मुदल । चारी मनु ॥ ९३ ॥ ऐसें हे अकरा । माझां मनीं जाहाले धनुर्धरा । सृष्टीचिया व्यापारा - । लागोनिया ॥ ९४ ॥ जैं लोकांची ये व्यवस्था न पडे । जैं या त्रिभुवनाचें कांहीं न मांडे । तैं महाभूतांचें दळवाडें । अचुंबित असे ॥ ९५ ॥ तैंचि जे जाहाले । इहीं लोकपाळ केले । अध्यक्ष रचुनि ठेविले । इहीं जन ॥ ९६ ॥ म्हणोनि अकरा हे राजा । मग येर लोक यांचिया प्रजा । ऐसा हा विस्तारु माझा । ओळख तूं ॥ ९७ ॥ पाहें पां आरंभीं बीज एकलें । मग तेंचि विरूढलिया बुड जाहालें । बुडीं कोंभ निघाले । खांदियांचे । खांदियांपासूनि अनेका । पसरलिया शाखोपशाखा । शाखांस्तव देखा । पल्लवपानें ॥ ९९ ॥ पल्लवीं फूल फळ । एवं वृक्षत्व जाहालें सकळ । तें निर्धारितां केवळ । बीजचि तें ॥ १०० ॥ ऐसें मी एकचि पहिलें । मग मी तें मनातें व्यालें । तेथ सप्त ऋषी जाहाले । आणि चारी मनु ॥ १ ॥ इहीं लोकपाळ केले । लोकपाळीं विविध लोक स्त्रजिले । लोकांपासूनि निपजलें । प्रजाजात ॥ २ ॥ ऐसेनि हें विश्व येथें । मीचि प्रसवला हे निरुतें । परि भावाचेनि हातें । माने जया ॥ ३ ॥

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वत: । सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशय: ॥ ७ ॥

यालागीं सुभद्रापती । हे भाव इया माझिया विभूती । आणि यांचिया व्याप्ती । व्यापिलें विश्व ॥ ४ ॥ म्हणोनि गा यापरि । ब्रह्मादिपिपीलिकावरी । मीवांचूनि दुसरी । गोठी नाहीं ॥ ५ ॥ ऐसे जाणे जो साचें । तया चेईरें जाहालें ज्ञानाचें । म्हणोनि उत्तम मध्यम भेदाचें । दु:स्वप्न न देखें ॥ ६ ॥ मी माझिया विभूतीं । अधिळिलिया व्यक्ती । हें आघवें योगप्रतीती । एकचि मानी ॥ ७ ॥ म्हणोनि नि:शंकें येणें महायोगें । मज मीनला मनाचेनि आंगें । एथ संशय करणें न लगे । तो त्रिशुद्धी जाहला ॥ ८ ॥ कां जे ऐसें किरीटी । मातें भजे जो अभेदा दिठी । तयाचिये भजनाचिये नाटीं । सूती मज ॥ ९ ॥ म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगु । तेथ शंका नाही नये खंगु । करितां ठेला तरी चांगु । तें सांगितलें षष्ठीं ॥ ११० ॥ तोचि अभेदु कैसा । हें जाणावया मानसा । साद जाली तरी परियेसा । बोलिजेल ॥ ११ ॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्त: सर्वं प्रवर्तते । इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विता: ॥ ८ ॥

तरि मीचि एक सर्वा । या जगा जन्म पांडवा । आणि मजचिपासून आघवा । निर्वाहो यांचा ॥ १२ ॥ कल्लोळमाळा अनेगा । जन्म जळींचि पैं गा । आणि तयां जळचि आश्रयो तरंगा । जीवनही जळ ॥ १३ ॥ ऐसें आघवांचि ठायीं । तया जळचि जेविं पाहीं । तैसा मी वांचूनि नाहीं । विश्वीं इये ॥ १४ ॥ ऐसिया व्यापका मातें । मानूनि जे भजती भलतेथें ।

परि साचोकारें उदितें । प्रेमभावें ॥ १५ ॥ देशकाळवर्तमान । आघवें मजसीं करूनि अभिन्न । जैसा वायु होऊनि गगन । गगनींचि विचरे ॥ १६ ॥ ऐसेनि जे निजज्ञानीं । खेळत सुखें त्रिभुवनीं । जगद्रूपा मनीं । सांठवूनि मातें ॥ १७ ॥ जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ॥ १८ ॥

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् । कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥ ९ ॥

चित्तें मीचि जाहाले । मियांचि प्राणें धाले । जीवों मरों विसरलें । बोधाचिया भुली ॥ १९ ॥ मग तया बोधाचेनि माजें । नाचती संवादसुखाचीं भोजें । आतां एकमेकां घेपे दीजे । बोधचि वरी ॥ १२० ॥ जैशी जवळिकेंचीं सरोवरें । उचंबळलिया कालवती परस्परें । मग तरंगासि धवळारें । तरंगचि होती ॥ २१ ॥ तैसी येरयेरांचिये मिळणी । पडत आनंदकल्लोळांची वेणी । तेथ बोध बोधाचीं लेणीं । बोधेंचि मिरवी ॥ २२ ॥ जैसें सूर्यें सूर्यातें वोवाळिलें । की चंद्रें चंद्रम्या क्षेम दिधलें । नातरी सरिसेनि पाडें मीनले । दोनी वोघ ॥ २३ ॥ तैसें प्रयाग होत सामरस्याचें । वरी वोसाण तरत सात्त्विकाचें । ते संवादचतुष्पथींचे गणेश जाहले ॥ २४ ॥ तेव्हां तया महासुखाचेनि भरें । धांवोनि देहाचिये गांवाबाहेरें । मियां धाले तेणें उद्गारें । लागती गाजों ॥ २५ ॥ पैं गुरुशिष्यांचां एकांतीं । जे अक्षरा एकाची वंदती । ते मेघाचियापरी त्रिजगतीं । गर्जती सैंघ ॥ २६ ॥ जैसी कमळकळिका जालेपणें । हृदयींचिया मकरंदातें राखों नेणे । दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥ २७ ॥ तैसेनि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषे कथूं विसरत । मग तया विसरामाजीं विरत । आंगें जीवें ॥ २८ ॥ ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें । नाहीं राती दिवो जाणणें । केलें माझें सुख अव्यंगवाणें । आपणपेयां जिहीं ॥ २९ ॥

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥ १० ॥

तया मग जें आम्हीं कांहीं । द्यावें अर्जुना पाहीं । ते ठायींचीच तिहीं । घेतली सेल ॥ १३० ॥ कां जे ते जिया वाटा । निगाले गा सुभटा । ते सोय पाहोनि अव्हांटा । स्वर्गापवर्ग ॥ ३१ ॥ म्हणोनि तिहीं जें प्रेम धरिलें । तेंचि आमुचें देणें उपाइलें । परि आम्हीं देयावें हेंहि केलें । तिहींचि म्हणियें ॥ ३२ ॥ आतां यावरी येतुलें घडे । जें तेंचि सुख आगळें वाढे । आणि काळाची दिठी न पडे । हें आम्हां करणें ॥ ३३ ॥ लळेयाचिया बाळका किरीटी । गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी । जैसी खेळतां पाठोपाठीं । माउली धांवे ॥ ३४ ॥ तें जो जो खेळ दावी । तो तो पुढें सोनयाचा करूनि ठेवी । तैसी उपास्तीची पदवी । पोषित मी जायें ॥ ३५ ॥ जिये पदवीचेनि पोषकें । ते मातें पावती यथासुखें । हे पाळती मज विशेखें । आवडे करूं ॥ ३६ ॥ पैं गा भक्तासि माझें कोड । मज तयाचे अनन्यगतीची चाड । कां जे प्रेमळांचें सांकड । आमचें घरीं ॥ ३७ ॥ पाहें पां स्वर्ग मोक्ष उपायिले । दोन्ही मार्ग तयाचिये वाहणी केले । आम्हीं आंगही शेषा वेंचिलें । लक्ष्मीयेसीं ॥ ३८ ॥ परि आपणपेंवीण जें एक । तें

तैसेंचि सुख साजुक । सप्रेमळांलागीं देख । ठेविलें जतन ॥ ३९ ॥ हा ठायवरी किरीटी । आम्ही प्रेमळु घेवों आपणपयासाठीं । या बोलीं बोलिजत गोष्टी । तैसिया नव्हती गा ॥ १४० ॥

तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः । नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥

म्हणोनि मज आत्मयाचा भावो । जिहीं जियावया केला ठावो । एक मीवांचूनि वावो । येर मानिलें जिहीं ॥ ४१ ॥ तयां तत्त्वज्ञां चोखटां । दिवी पोतासाची सुभटा । मग मीचि होऊनि दिवटा । पुढां पुढां चालें ॥ ४२ ॥ अज्ञानाचिये राती - । माजीं तमाची मिळणी दाटती । ते नाशूनि घालीं परौती । करीं नित्योदयो ॥ ४३ ॥ ऐसे प्रेमळाचेनि प्रियोत्तमें । बोलिलें जेथ पुरुषोत्तमें । तेथ अर्जुन मनोधर्मे । निवालों म्हणतसें ॥ ४४ ॥ अहो जी अवधारा । भला केरु फेडिला संसारा । जाहलों जननीजठर जोहरा - । वेगळा प्रभु ॥ ४५ ॥ जी जन्मलेपण आपुलें । हें आजि मियां डोळां देखिलें । जीवित हाता चढलें । मज आवडतसे ॥ ४६ ॥ आजि आयुष्या उजवण जाहली । माझिया दैवा दशा उदयली । जे वाक्यकृपा लाधली । दैविकेनि मुखें ॥ ४७ ॥ आतां येणे वचनतेजाकारें । फिटलें आंतील बाहेरील आंधारें । म्हणोनि देखतसे साचोकारें । स्वरूप तुझें ॥ ४८ ॥

अर्जुन उवाच : परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् । पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १२ ॥

तरी होसी गा तूं परब्रह्म । जें या महाभूतां विसंवतें धाम । पवित्र तूं परम । जगन्नाथा ॥ ४९ ॥ तूं परम दैवत तिहीं देवां । तूं पुरुष जी पंचविसावा । दिव्य तूं प्रकृतीभावा - । पैलीकडील ॥ १५० ॥ अनादिसिद्ध तूं स्वामी । जो नाकळिजसी जन्मधर्मीं । तो तूं हें आम्हीं । जाणितलें आतां ॥ ५१ ॥ तूं या कालत्रयासि सूत्री । तूं जीवकळेची अधिष्ठात्री । तूं ब्रह्मकटाहधात्री । हें कळलें फुडें ॥ ५२ ॥

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा । असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १३ ॥

पैं आणिकही एके परी । इयेचि प्रतीतीची येतसे थोरीं । जे मागें ऐसेंचि ऋषीश्वरीं । सांगितलें तूंतें ॥ ५३ ॥ परि तया सांगितलियाचें साचपण । हें आतां देखतसे अंतःकरण । जे कृपा केली आपण । म्हणोनि देवा ॥ ५४ ॥ एऱ्हवीं नारदु अखंड जवळां ये । तोही ऐसींचि वचनें गाये । परि अर्थ न बुजोनि ठायें । गीतासुखाचि ऐकों ॥ ५५ ॥ हां गा आंधळ्यांचां गांवीं । आपणपें प्रगटले रवी । तरी तिहीं वोतपलीचि ध्यावी । वांचूनि प्रकाशु कैंचा ॥ ५६ ॥ येरवीं देवर्षिही अध्यात्म गातां । आहाच रागांगेंसी जे मधुरता । तेचि फावे येर चित्ता । नलगेचि कांहीं ॥ ५७ ॥ पैं असितादेवलाचेनिही मुखें । मी एवंविधा तूंतें आइकें । परि तैं बुद्धि विषयविखें । घारिली होती ॥ ५८ ॥ विषयविषाचा पडिपाडू । गोड परमार्थ लागे कडू । कडू विषय तो गोडू । जीवासी जाहला ॥ ५९ ॥ आणि हें आणिकांचें काय सांगावें । राउळा आपणचि येऊनि व्यासदेवें । तुझें स्वरूप आघवें । सर्वदा सांगिजे ॥ १६० ॥ परि तो आंधारीं

चिंतामणि देखिला । जेवीं नव्हे या बुद्धि उपेक्षिला । पाठीं दिनोदयीं वोळखिला । होय म्हणोनि ॥ ६१ ॥ तैसीं व्यासादिकांचीं बोलणीं । तिया मजपाशीं चिद्रत्नांचिया खाणी । परि उपेक्षया जात होतिया तरणी । तुजवीण कृष्णा ॥ ६२ ॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव । न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥ १४ ॥

ते आतां वाक्यसूर्यकर तुझे फाकले । आणि ऋषीं मार्ग होते जे कथिले । तयां आघवयांचेंचि फिटलें । अनोळखपण ॥ ६३ ॥ जी ज्ञानाचें बीज तयांचें बोल । माझिये हृदयभूमिके पडिले सखोल । वरि इये कृपेची जाहाली वोल । म्हणोनि संवादफळेंशीं उठले ॥ ६४ ॥ अहो नारदादिकां संतां । त्यांचिया उक्तिरूप सरिता । मी महोदधि जाहलो अनंता । संवादसुखाचा ॥ ६५ ॥ प्रभु आघवेंनि येणें जन्में । जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें । तयांचीं न ठकतीचि अंगीं कामें । सद्गुरु तुवां ॥ ६६ ॥ एऱ्हवीं वडिलवडिलांचेनि मुखें । मी सदा तूंतें कानीं आइकें । परि कृपा न किजेचि तुवा एकें । तंव नेणवेचि कांहीं ॥ ६७ ॥ म्हणोनि भाग्य जैं सानकुळ । जालिया केले उद्यम सदां सफळ । तैसें श्रुताधित सकळ । गुरुकृपा साच ॥ ६८ ॥ जी बनकरू झाडें सिंपी जीवेंसाटीं । पाडूनि जन्में काढी आटी । परि फळेंसी तैंचि भेटी । जैं वसंतु पावे ॥ ६९ ॥ अहो विषया जैं वोहट पडे । तैं मधुर तें मधुर आवडे । पैं रसायनें तैं गोडे । जेव्हा आरोग्य देहीं ॥ १७० ॥ कां इंद्रियें वाचा प्राण । यां जालियांचें तैंचि सार्थकपण । जैं चैतन्य येउनि आपण । संचरे माजीं ॥ ७१ ॥ तैसें शब्दजात आलोडिलें । अघवा योगादिक जें अभ्यासिलें । तें तैंचिं म्हणों ये आपुलें । जैं सानकूल गुरु ॥ ७२ ॥ ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजें । अर्जुन निश्चयाचीं नाचतुसे भोजें । तेवींचि म्हणे देवा तुझें । वाक्य मज मानलें ॥ ७३ ॥ तरि साचचि हे कैवल्यपती । मज त्रिशुद्धी आली प्रतीती । जे तूं देवदानवांचिये मती - । जोगा नव्हसी ॥ ७४ ॥ तुझें वाक्य व्यक्ती न येतां देवा । आपुलिया जाणे जाणिवा । तैसा कहींचि नाहीं हें मद्भावा । भरंवसेनि आलें ॥ ७५ ॥

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम । भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥

एथ आपुलें वाडपण जैसें । आपणचि जाणिजे आकाशें । कां मी येतुली घनवट ऐसें । पृथ्वीचि जाणे ॥ ७६ ॥ तैसा आपुलिये सर्वशक्ती । तुज तूंचि जाणूं लक्ष्मीपती । येर वेदादिक मती । मिरवती वायां ॥ ७७ ॥ हां गा मनातें मागां सांडावें । पवनातें वावीं मवावें । आदिशून्य उतरोनि जावें । केउतें बाही ॥ ७८ ॥ तैसें हें तुझे जाणणें आहे । म्हणोनि कोणाही ठावके नोहे । आतां तुझें ज्ञान होये । तुजचियोगें ॥ ७९ ॥ जी आपणपयातें तूंचि जाणसी । आणिकातें सांगावयाही तू समर्थ होसी । तरि आतां एकवेळ घाम पुसीं । आर्तीचिये निडळींचा ॥ १८० ॥ हें आइकिलें की भूतभावना । त्रिभुवनगजपंचानना । सकलदेवदेवतार्चना । जगन्नायका ॥ ८१ ॥ जरी थोरी तुझी पाहत आहों । तरी पासीं उभे ठाकावयाही योग्य नोहों । या शोच्यता विनवूं बिहों । तरी आन उपायो नाहीं ॥ ८२ ॥ भरले सरितासमुद्र चहूंकडे । परि ते बापियासि कोरडे ।

कां जैं मेघौनि थेंबुटा पडे । तैं पाणी कीं तया ॥ ८३ ॥ तैसें गुरु जी सर्वत्र आथी । परि कृष्णा आम्हां तूचि गती । हें असो मजप्रती । विभूती सांगें ॥ ८४ ॥

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतय: । याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १६ ॥

जी तुझिया विभूती आघविया । परि व्यापिती या शक्ती दिव्या जिया । तिया आपुलिया दावाविया । आपण मज ॥ ८५ ॥ जिहीं विभूतीं ययां समस्तां । लोकांतें व्यापूनि आहाती अनंता । तिया प्रधाना नामांकिता । प्रगटा करीं ॥ ८६ ॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् । केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥ १७ ॥

जी कैसें मियां तूंतें जाणावें । काय जाणोनि सदा चिंतावें । जरी तूंचि म्हणों आघवें । तरि चिंतनचि न घडे ॥ ८७ ॥ म्हणोनि मागां भाव जैसे । आपुले सांगितले तुवां उद्देशें । आतां विस्तारोनि तैसे । एक वेळ बोलें ॥ ८१ ॥ जयां जयां भावांचां ठायीं । तूंतें चिंतितां मज सायासु नाहीं । तो विवळ करूनि देईं । योगु आपुला ॥ ८९ ॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन । भूय: कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १८ ॥

आणि पुसलिया जिया विभूती । त्याही बोलाविया भूतपती । एथ म्हणसी जरी पुढतीं । काय सांगों ॥ १९० ॥ तरी हा भाव मना । झणें जाय हो जनार्दना । पैं प्राकृताही अमृतपाना । ना न म्हणवे जी ॥ ९१ ॥ जें काळकूटाचें सहोदर । जें मृत्युभेणें प्याले अमर । तरि दिहाचे पुरंदर । चौदा जाती ॥ ९२ ॥ ऐसा कवण एक क्षीराब्धीचा रसु । जया वायांचि अमृतपणाचा आभासु । तयाचाही मिठांशु । जे पुरे म्हणों नेदी ॥ ९३ ॥ तया पाबळेयाही येतुलेवरी । गोडियेची आथि थोरी । मग हें तंव अवधारीं । परमामृत साचें ॥ ९४ ॥ जें मंदराचळु न ढाळितां । क्षीरसागरु न डहुळितां । अनादि स्वभावता । आइतें आहे ॥ ९५ ॥ जें द्रव ना नव्हे बद्ध । जेथ नेणिजती रस गंध । जें भलतेयांही सिद्ध । आठवलेंचि फावे ॥ ९६ ॥ जयाची गोठीचि ऐकतखेवों । आघवा संसारु होय वावो । बळिया नित्यता लागे येवों । आपणपेयां ॥ ९७ ॥ जन्ममृत्यूंची भाख । हारपोनी जाय नि:शेख । आंत बाहेरी महासुख । वाढोंचि लागे ॥ ९८ ॥ मग दैवगत्या जरी सेविजे । तरी तें आपणचि होऊनि ठाकिजे । ते तुज देतां चित्त माझें । पुरे म्हणों न शके ॥ ९९ ॥ तंव तुझें नामचि आम्हां आवडे । वरि भेटी होय आणि जवळिक जोडे । पाठीं गोठी सांगसी सुरवाडें । आनंदाचेनि ॥ २०० ॥ आतां हें सुख कायिसयासारिखें । कांहीं निर्वचेना मज परितोखें । तरि येतुलें जाणें जें येणें मुखें । पुनरुक्तही हो ॥ १ ॥ हां गा सूर्य काय शिळा । अग्नि म्हणों येत आहे वोंविळा । कां नित्य वाहातया गंगाजळा । पारसेपण असे ॥ २ ॥ तुवां स्वमुखें जें बोलिलें । हें आम्हीं नादासि रूप देखिलें । आजि चंदतरूचीं फुलें । तुरंबीत आहों मा ॥ ३ ॥ या पार्थाचिया बोला । सर्वांगें कृष्ण डोलला । म्हणे भक्तिज्ञानासि जाहला । आगरु हा ॥ ४ ॥ ऐसा पतिकराचिया तोषाआंतु ।

प्रेमाचा वेग उचंबळतु । तो सायासें सांवरूनि अनंतु । काय बोले ॥ ५ ॥

श्रीभगवानुवाच : हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतय: ।
प्राधान्यत: कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥ १९ ॥

मी पितामहाचा पिता । हें आठवितांही नाठवे चित्ता । कीं म्हणतसे बा पांडुसुता । भलें केलें ॥ ६ ॥ अर्जुनातें बा म्हणे एथ कांहीं । आम्हां विस्मो करावया कारण नाहीं । अंगें तो लेंकरूं काईं । नव्हेचि नंदाचें ॥ ७ ॥ परि प्रस्तुत ऐसें असो । हें करवी आवडीचा अतिसो । मग म्हणे आइकें सांगतसों । धनुर्धरा ॥ ८ ॥ तरि तुवां पुसलिया विभूती । तयांचें अपारपण सुभद्रापती । ज्या माझियाचि परि माझिये मती । आकळती ना ॥ ९ ॥ अंगींचिया रोमा किती । जयाचिया तयासि न गणवती । तैसिया माझिया विभूती । असंख्य मज ॥ २१० ॥ एऱ्हवीं तरी मी कैसा केवढा । म्हणोनि आपणपयाही नव्हेचि फुडा । यालागीं प्रधाना जिया रूढा । तिया विभूती आइकें ॥ ११ ॥ जिया जाणितलियासाठीं । आघविया जाणितलिया होती किरीटी । जैसें बीज आलिया मुठीं । तरूचि आला होय ॥ १२ ॥ कां उद्यान हातां चढिलें । तरी आपैसीं सांपडलीं फळें फुलें । तेवीं देखिलिया जिया देखवलें । विश्व सकळ ॥ १३ ॥ एरव्हीं साचचि गा धनुर्धरा । नाहीं शेवटु माझिया विस्तारा । पैं गगना ऐसिया अपारा । मजमाजीं लपणें ॥ १४ ॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित: । अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥ २० ॥

आइकें कुटिलालकमस्तका । धनुर्वेदत्र्यंबका । मी आत्मा असें एकैका । भूतमात्रांचां ठायीं ॥ १५ ॥ आंतुलीकडे मीचि यांचां अंत:करणीं । भूतांबाहेरी माझीच गंवसणी । आदि मी निर्वाणीं । मध्यही मीचि ॥ १६ ॥ जैसें मेघां या तळीं वरीं । एक आकाशचि आंत बाहेरी । आणि आकाशींचि जाले अवधारीं । असणेंही आकाशीं ॥ १७ ॥ पाठीं लया जे वेळीं जाती । ते वेळीं आकाशचि होऊनि ठाती । तेवीं आदि स्थिती अंतगती । भूतांसि मी ॥ १८ ॥ ऐसें बहुवस आणि व्यापकपण । माझें विभूतियोगें जाण । तरी जीवचि करूनि श्रवण । आइकोनि आइक ॥ १९ ॥ याहीवरी त्या विभूती । सांगणें ठेलें तुजप्रती । सांगेन म्हणितलें तुज प्रीती । त्या प्रधाना आइकें ॥ २२० ॥

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् । मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ २१ ॥

हें बोलोनि तो कृपावंतु । म्हणे विष्णु मी आदित्यांआंतु । रवी मी रश्मिवंतु । सुप्रभांमाजीं ॥ २१ ॥ मरुद्गणांचां वर्गीं । मरीचि म्हणे मी शार्ङ्गी । चंद्र मी गगनरंगीं । तारांमाजीं ॥ २२ ॥

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासव: । इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥ २२ ॥

वेदाआंतु सामवेदु । तो मी म्हणे गोविंदु । देवांमाजीं मरुद्बंधु । महेंद्र तो मी ॥ २३ ॥ इंद्रियांआंतु अकरावें । मन तें मी हें जाणावें । भूतांमाजीं स्वभावें । चेतना ते मी ॥ २४ ॥

रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् । वसूनां पावकश्चास्मि मेरु: शिखरिणामहम् ॥ २३ ॥

अशेषांही रुद्रांमाझारीं । शंकर जो मदनारी । तो मी येथ न धरी । भ्रांति कांहीं ॥ २५ ॥ यक्षरक्षोगणांआंतु । शंभूचा सखा जो धनवंतु । तो कुबेरु मी हें अनंतु । म्हणता जाहला ॥ २६ ॥ मग आठांही वसूंमाझारीं । पावकु तो मीं अवधारीं । शिखराथिलियां सर्वोपरी । मेरु तो मी ॥ २७ ॥

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् । सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥
महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् । यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥

जो स्वर्गसिंहासना सावावो । सर्वज्ञते आदीचा ठावो । तो पुरोहितांमाजीं रावो । बृहस्पती मी ॥ २८ ॥ त्रिभुवनींचिया सेनापतीं - । आंत स्कंदु तो मी महामती । जो हरवीर्यें अग्निसंगती । कृत्तिकाआंतु जाहला ॥ २९ ॥ सकळिकां सरोवरांसी । माजी समुद्र तो मी जळराशी । महर्षीआंतु तपोराशी । भृगु तो मी ॥ २३० ॥ अशेषाही वाचा - । आंतु नटनाच सत्याचा । तें अक्षर एक मी वैकुंठींचा । वेल्हाळु म्हणे ॥ ३१ ॥ समस्तांही यज्ञांचां पैकीं । जपयज्ञु तो मी ये लोकीं । जो कर्मत्यागें प्रणवादिकीं । निफजविजे ॥ ३२ ॥ नामजपयज्ञु तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थें ॥ ३३ ॥ स्थावरां गिरिवरां आंतु । पुण्यपुंज जो हिमवंतु । तो मी म्हणे कांतु । लक्ष्मीयेचा ॥ ३४ ॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः । गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ २६ ॥
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् । ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥ २७ ॥

कल्पद्रुम हन पारिजातु । गुणें चंदनुही वाड विख्यातु । तरि ययां वृक्षजातां आंतु । अश्वत्थु तो मी ॥ ३५ ॥ देवऋषी आंतु पांडवा । नारदु तो मी जाणावा । चित्ररथु मी गंधर्वा । सकळिकांमाजीं ॥ ३६ ॥ ययां अशेषांही सिद्धां - । माजीं कपिलाचार्यु मी प्रबुद्धा । तुरंगजातां प्रसिद्धां - । आंत उच्चैःश्रवा मी ॥ ३७ ॥ राजभूषण गजांआंतु । अर्जुना मी गा ऐरावतु । पयोराशी सुरमथितु । अमृतांशु तो मी ॥ ३८ ॥ ययां नरांमाजीं राजा । तो विभुतिविशेष माझा । जयातें सकळ लोक प्रजा । होऊनि सेविती ॥ ३९ ॥

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् । प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ २८ ॥
अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् । पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥ २९ ॥

पैं आघवेंयां हातियेरां - । आंत वज्र तें मी धनुर्धरा । जें शतमखोत्तीर्णकरा । आरूढोनि असे ॥ २४० ॥ धेनूंमध्ये कामधेनु । ते मी म्हणे विश्वक्सेनु । जन्मवितयांआंत मदनु । तो मी जाणें ॥ ४१ ॥ सर्पकुळाआंतु अधिष्ठाता । वासुकी गा मी कुंतीसुता । नागांमाजी समस्तां । अनंतु तो मी ॥ ४२ ॥ अगा यादसांआंतु । जो पश्चिमप्रमदेचा कांतु । तो वरुण मी हें अनंतु । सांगत असे ॥ ४३ ॥ आणि पितृगणां समस्तां - । माजीं अर्यमा जो पितृदेवतां । तो मी हें तत्त्वतां । बोलत आहें ॥ ४४ ॥ जगाचीं शुभाशुभें लिहिती । प्राणियांचिया मानसाचा

झाडा घेती । मग केलियानुरूप होती । भोगनियम जे ॥ ४५ ॥ तयां नियमितयांमाजीं यमु । जो कर्मसाक्षी धर्मु । तो मी म्हणें रामु । रमापती ॥ ४६ ॥

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् । मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ ३० ॥

अगा दैत्यांचियां कुळीं । प्रल्हादु तो मी न्याहाळीं । म्हणोनि दैत्यभावादिमेळीं । लिंपेचिना ॥ ४७ ॥ पैं कळितयांमाजीं महाकाळु । तो मी म्हणे गोपाळु । श्वापदांआंतु शार्दुळु । तो मी जाण ॥ ४८ ॥ पक्षिजातीमाझारीं । गरुड तो मी अवधारीं । यालागीं जो पाठीवरी । वाहों शके मातें ॥ ४९ ॥

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् । झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥ ३१ ॥

पृथ्वीचिया पैसारा - । माजीं घडी न लगतां धनुर्धरा । एकेंचि उड्डाणें सातांही सागरां । प्रदक्षिणा करी जो ॥ २५० ॥ तयां वहिलियां गतिमंतां - । आंतु पवनु तो मी पांडुसुता । शस्त्रधरां समस्तां - । माजीं श्रीराम तो मी ॥ ५१ ॥ जेणें सांकडलिया धर्माचेनि कैवारें । आपणपयां धनुष्य करूनि दुसरें । विजयलक्ष्मीये एक मोहरें । केलें त्रेतीं ॥ ५२ ॥ पाठीं उभें ठाकूनि सुवेळीं । प्रतापलंकेश्वराचीं सिसाळीं । गगनीं उदो म्हणतया हस्तबळी । दिधलीं भूतां ॥ ५३ ॥ जेणें देवांचा मानु गिंवसिला । धर्मासि जीर्णोद्धारु केला । सूर्यवंशी उदेला । सूर्य जो कां ॥ ५४ ॥ तो हतियेरुपरजितयांआंतु । रामचंद्र मी जानकीकांतु । मकर मी पुच्छवंतु । जळचरांमाजीं ॥ ५५ ॥ पैं समस्तांही वोघां - । मध्यें जे भगिरथें आणितां गंगा । जन्हूनें गिळिली मग जंघा । फाडूनि दिधली ॥ ५६ ॥ ते त्रिभुवनैकसरिता । जान्हवी मी पांडुसुता । जळप्रवाहां समस्तां - । माझारीं जाणें ॥ ५७ ॥ ऐसेनि वेगळालां सृष्टीपैकीं । विभूती नाम सुतां एकेकी । सगळेन जन्मसहस्त्रें अवलोकीं । अर्ध्या नव्हती ॥ ५८ ॥

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन । अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ ३२ ॥

अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च । अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ॥ ३३ ॥

जैसी अवघीचि नक्षत्रें वेचावीं । ऐसी चाड उपजेल जैं जीवीं । तैं गगनाची बांधावी । लोथ जेवीं ॥ ५९ ॥ कां पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा । तरि भूगोलुचि काखे सुवावा । तैसा विस्तारु माझा पहावा । तरि जाणावें मातें ॥ २६० ॥ जैसें शाखांसी फूल फळ । एकिहेळां वेटाळूं म्हणिजे सकळ । तरि उपडुनियां मूळ । जेवीं हातीं घेपे ॥ ६१ ॥ तेवीं माझे विभूतिविशेष । जरीं जाणो पाहिजेती अशेष । तरी स्वरूप एक निर्दोष । जाणिजे माझें ॥ ६२ ॥ एऱ्हवीं वेगळालिया विभूती । कायिएक परिससी किती । म्हणोनि एकिहेळां महामती । सर्व मी जाण ॥ ६३ ॥ मी आघवीचि सृष्टी । आदिमध्यांतीं किरीटी । ओतप्रोत पटीं । तंतु जेवीं ॥ ६४ ॥ ऐसिया व्यापका मातें जैं जाणावें । तैं विभूतिभेदें काय करावें । परि हे तुझी योग्यता नव्हे । म्हणोनि असो ॥ ६५ ॥ कां जे तुवां पुसिलिया विभूती । म्हणोनि

तिया आईक सुभद्रापती । तरी आतां विद्यांमाजीं प्रस्तुती । अध्यात्मविद्या ते मी ॥ ६६ ॥ अगा बोलतियांचियां ठायीं । वादु तो मी पाहीं । जो सकलशास्त्रसंमतें कहीं । सरेचिना ॥ ६७ ॥ जो निर्वचूं जातां वाढे । आइकिलियां उत्प्रेक्षे सळु चढे । जयावरी बोलतयांचीं गोडें । बोलणीं होती ॥ ६८ ॥ ऐसा प्रतिपादनामाजीं वादु । तो मी म्हणे गोविंदु । अक्षरांआंतु विशदु । अकारु तो मी ॥ ६९ ॥ पैं गा समासांमाझारीं । द्वंद्व तो मी अवधारीं । मशकालागोनि ब्रह्मावेरीं । ग्रासिता तो मी ॥ २७० ॥ मेरुमंदरादिकीं सर्वीं । सहित पृथ्वीतें विरवी । जो एकार्णवातेंही जिरवी । जेथिंचा तेथें ॥ ७१ ॥ जो प्रलयतेजा देत मिठी । सगळिया पवनातें गिळी किरीटी । आकाश जयाचिया पोटीं । सामावलें ॥ ७२ ॥ ऐसा अपार जो काळु । तो मी म्हणे लक्ष्मीलीळु । मग पुढती सृष्टीचा मेळु । सृजिता तो मी ॥ ७३ ॥

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् । कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ ३४ ॥

आणि सृजिलिया भूतांतें मीचि धरीं । सकळां जीवनही मीचि अवधारीं । शेखीं सर्वांतें या संहारी । तेव्हां मृत्यूही मीचि ॥ ७४ ॥ आतां स्त्रीगणांचां पैकीं । माझिया विभूती सात आणिकी । तिया ऐक कवतिकीं । सांगिजतील ॥ ७५ ॥ तरी नीच नवी जे कीर्ति । अर्जुना ते माझी मूर्ती । आणि औदार्येंसी जे संपत्ती । तेही मीचि जाणें ॥ ७६ ॥ आणि ते गा मी वाचा । जे सुखासनीं न्यायाचां । आरूढोनि विवेकाचां । मार्गीं चाले ॥ ७७ ॥ देखिलेनि पदार्थें । जे आठवूनि दे मातें । ते स्मृतिही पैं एथें । त्रिशुद्धि मी ॥ ७८ ॥ पैं स्वहिता अनुयायिनी । मेधा ते गा मी इये जनीं । धृती मी त्रिभुवनीं । क्षमा ते मी ॥ ७९ ॥ एवं नारींमाझारीं । या सातही शक्ति मीचि अवधारी । ऐसें संसारगजकेसरी । म्हणता जाहला ॥ २८० ॥

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् । मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ ३५ ॥

वेदराशीचिया सामा - । आंत बृहत्साम जे प्रियोत्तमा । तें मी म्हणे रमा - । प्राणेश्वरु ॥ ८१ ॥ गायत्री छंद जें म्हणिजे । तें सकळां छंदांमाजि माझें । स्वरूप हें जाणिजे । निभ्रांत तुवां ॥ ८२ ॥ मासांआंत मार्गशीरु । तो मी म्हणे शार्ङ्गधरु । ऋतूंमाजीं कुसुमाकरु । वसंतु तो मी ॥ ८३ ॥

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् । जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ ३६ ॥
वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनंजयः । मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ ३७ ॥

छळितयां विंदाणा- । माजी जूं तें मी विचक्षणा । म्हणोनि चोहटां चोरी परि कवणा । निवारूं न ये ॥ ८४ ॥ अगा अशेषांही तेजसां - । आंत तेज तें मी भरंवसा । विजयो मी कार्योद्देशां । सकळांमाजीं ॥ ८५ ॥ जेणें चोखाळत दिसे न्याय । ते व्यवसायांत व्यवसाय । माझेंचि स्वरूप हें राय । सुरांचा म्हणे ॥ ८६ ॥ सत्त्वाथिलियां आंतु । सत्त्व मी म्हणे अनंतु । यादवामाजीं श्रीमंतु । तोचि तो मी ॥ ८७ ॥ जो देवकीवसुदेवास्तव जाहला । कुमारीसाठीं गोकुळीं गेला । तो मी प्राणासकट पियाला । पूतनेतें ॥ ८८ ॥ नुघडतां बाळपणाचि फुली ।

जेणें मियां अदानवी सृष्टि केली । करीं गिरी धरूनि उमाणिली । महेंद्रमहिमा ॥ ८९ ॥ कालिंदीचें हृदयशल्य फेडिलें । जेणें मियां जळत गोकुळ राखिलें । वासरुवांसाठीं लाविलें । विरंचीस पिसें ॥ २९० ॥ प्रथमदशेचिये पहांटे- । माजी कंसाऐशीं अचाटें । महाधेंडीं अवचटें । लीळाचि नासिलीं ॥ ९१ ॥ हें काय कितीएक सांगावें । तुवांही देखिलें ऐकिलें असे आघवें । तरि यादवांमाजी जाणावें । हेंचि स्वरूप माझें ॥ ९२ ॥ आणि सोमवंशीं तुम्हां पांडवां- । माजीं अर्जुन तो मी जाणावा । म्हणोनि एकमेकांचिया प्रेमभावा । विघडु न पडे ॥ ९३ ॥ संन्यासीं तुवां होऊनि जनीं । चोरूनि नेली माझी भगिनी । तऱ्ही विकल्पु नुपजे मनीं । मी तूं दोन्हीं स्वरूप एक ॥ ९४ ॥ मुनींआंत व्यासदेवो । तो मी म्हणे यादवरावो । कवीश्वरांमाजीं धैर्य ठावो । उशनाचार्य मी ॥ ९५ ॥

दण्डो दमयितामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् । मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ ३८ ॥

अगा दमितयांमाझारीं । अनिवार दंडु तो मी अवधारीं । जो मुंगियेलागोनि ब्रह्मावेरीं । नियमित पावे ॥ ९६ ॥ पैं सारासार निर्धारितयां । धर्मज्ञानाचा पक्षु धरितयां । सकळशास्त्रांमाजीं ययां । नीतिशास्त्र तें मी ॥ ९७ ॥ आघवियाची गूढां- । आंतु मौन तें मी सुहाडा । म्हणोनि न बोलतयां पुढां । स्त्रष्टाही नेण होय ॥ ९८ ॥ अगा ज्ञानियांचां ठायीं । ज्ञान तें मी पाहीं । आतां असो हें ययां कांहीं । पार न देखों ॥ ९९ ॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन । न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ३९ ॥

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप । एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ ४० ॥

पैं पर्जन्याचिया धारां । वरी लेख करवेल धनुर्धरा । कां पृथ्वीचिया तृणांकुरां । होईल ठी ॥ ३०० ॥ पैं महोदधीचिया तरंगां । व्यवस्था धरूं नये जेवीं गा । तेवीं माझिया विशेष लिंगां । नाहीं मिती ॥ १ ॥ ऐशियाही सातपांच प्रधाना । विभूती सांगितलिया तुज अर्जुना । तो हा उद्देशु जो गा मना । आहाच गमला ॥ २ ॥ येरां विभूतिविस्तारांसि कांहीं । एथ सर्वथा लेख नाहीं । म्हणौन परिससीं तूं काई । आम्हीं सांगों किती ॥ ३ ॥ यालागीं एकिहेळां तुज । दाऊं आतां वर्म निज । सर्वभूतांकुरें बीज । विरूढत असे तें मी ॥ ४ ॥ म्हणोनि सानें थोर न म्हणावें । उंच नीच भाव सांडावे । एक मीचि ऐसें मानावें । वस्तुजातातें ॥ ५ ॥ तरी यावरी साधारण । आईक पां आणिकही खुण । तरी अर्जुना ते तूं जाण । विभूती माझी ॥ ६ ॥

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ॥ ४१ ॥

जेथ जेथ संपत्ति आणि दया । दोन्ही वसती आलिया असती ठाया । ते ते जाण धनंजया । विभूती माझी । ७ ॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन । विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥

अथवा एकलें एक बिंब गगनीं । तरी प्रभा फांके त्रिभुवनीं । तेवीं एकाकियाची सकळ

जनीं । आज्ञा पाळिजे ॥ ८ ॥ तयांतें एकलें झणी म्हण । ते निर्धन या भाषा नेण । काय कामधेनूसवें सर्वस्व हन । चालत असे ॥ ९ ॥ तियेंतें जें जेधवां जो मागे । तें ते एकसरेंचि प्रसवों लागे । तेवीं विश्वविभव तया अंगें । होऊनि आहाति ॥ ३१० ॥ तयातें वोळखावया हेचि संज्ञा । जे जगें नमस्कारिजे आज्ञा । ऐसें आथि ते जाण प्राज्ञा । अवतार माझे ॥ ११ ॥ आतां सामान्य विशेष । हें जाणणें एथ महादोष । कां जे मीचि एक अशेष । विश्व आहे म्हणोनि ॥ १२ ॥ तरी आतां साधारण आणि चांगु । ऐसा कैसेनि पां कल्पावा विभागु । वायां आपुलियेचि मती वंगु । भेदाचा लावावा ॥ १३ ॥ एन्हवीं तरी तूप कासया घुसळावें । अमृत का रांधूनि अर्धें करावें । हा गां वायूसि काय डावे - । उजवें अंग आहे ॥ १४ ॥ पैं सूर्यबिंबासि पोट पाठीं । पाहतां नासेल आपुली दिठी । तेवीं माझां स्वरूपीं गोठी । सामान्यविशेषाची नाहीं ॥ १५ ॥ आणि सिनाना विभूती । मज अपारातें मविसील किती । म्हणोनि किंबहुना सुभद्रापती । असो हें जाणणें ॥ १६ ॥ आतां पैं माझेनि एके अंशें । हें जग व्यापिलें असे । यालागीं भेदु सांडूनि सरिसें । साम्यें भज ॥ १७ ॥ ऐसें विबुधवनवसंतें । तेणे विरक्तांचेनि एकांते । बोलिलें जेथ श्रीमंतें । श्रीकृष्णदेवें ॥ १८ ॥ तेथ अर्जुन म्हणे स्वामी । येतुलें हें रहस्य बोलिलेती तुम्ही । जे भेदु एक आणि आम्हीं । सांडावा तरी ॥ १९ ॥ हां हो सूर्य म्हणे काय जगातें । अंधारे दवडा कां परौतें । केवीं धसाळ म्हणो देवा तूंतें । तरी अधिक हा बोलु ॥ ३२० ॥ तुझें नांवचि एक कोण्ही वेळे । जयांचिये मुखासि कां काना मिळे । तयांचिया हृदयातें सांडुनि पळे । भेदु जी साच ॥ २१ ॥ तो तू परब्रह्मचि असकें । मज दैवें दिधलासि हस्तोदकें । तरी आतां भेदु कायसा कें । देखावा कवणें ॥ २३ ॥ जी चंद्रबिंबाचां गाभारां । रिगालियावरीही उबारा । परि राणेपणें शार्ङ्गधरा । बोला हें तुम्ही ॥२३ ॥ तेथ सावियाचि परितोषोनि देवें । अर्जुनाते आलिंगिलें जीवें । मग म्हणे तुवां न कोपावें । आमुचिया बोला ॥ २४ ॥ आम्हीं तुज भेदाचिया वाहाणीं । सांगितलीं जें विभूतींची कहाणी । ते अभेदें काय अंत:करणीं । मानिली कीं न मने ॥ २५ ॥ हेंचि पहावयालागीं । नावेंक बोलिलों बाहेरिसवडिया भंगीं । तंव विभूती तुज चांगीं । आलिया बोधा ॥ २६ ॥ येथ अर्जुन म्हणे देवें । हें आपुलें आपण जाणावें । परि देखतसें विश्व आघवें । तुवां भरलें ॥ २७ ॥ पैं राया तो पांडुसुतु । ऐसिये प्रतीतीसि जाहला वरैतु । या संजयाचिया बोला निवांतु । धृतराष्ट्र राहे ॥ २८ ॥ कीं संजयो दुखावलेनि अंत:करणें । म्हणतसे नवल नव्हे दैव दवडणें । हा जीवें धाडसा आहे मी म्हणें । तव आंतुही आंधळा ॥ २९ ॥ परि असो हें तो अर्जुनु । स्वहिताचा वाढवितसे मानु । कीं याहीवरी तया आनु । धिंवसा उपनला ॥ ३३० ॥ म्हणें हेचि हृदयाआंतुली प्रतीती । बाहेरी अवतरो कां डोळ्यांप्रती । इये आर्तीचां पाउलीं मती । उठती जाहली ॥ ३१ ॥ मियां इहींच दोन्हीं डोळां । झोंबावें विश्वरूपा सकळा । एवढी हांव तो

दैवाआगळा । म्हणऊनि करी ॥ ३२ ॥ आजि तो कल्पतरूची शाखा । म्हणोनि वांझोळें न लगती देखा । जें जें येईल तयाचिया मुखा । तें तें साच करीतसे येरु ॥ ३३ ॥ जो प्रल्हादाचिया बोला । विषाहीसकट आपण जाहला । तो सद्गुरु असे जोडला । किरीटीसी ॥ ३४ ॥ म्हणोनि विश्वरूप पुसावयालागीं । पार्थ रिघता होईल कवणें भंगी । तें सांगेन पुढिलिये प्रसंगीं । ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा ॥ ३३५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
विभूतियोगोनाम दशमोऽध्यायः ॥ (श्लोक ४२; ओव्या ३३५)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय अकरावा)

आतां यावरी एकादशीं । कथा आहे दोन्हीं रसीं । जेथ पार्था विश्वरूपेसीं । होईल भेटी ॥ १ ॥ जेथ शांताचिया घरा । अद्भुत आला आहे पाहुणेरा । आणि येरांहीं रसां पांतिकरां । जाहला मानु ॥ २ ॥ अहो वधुवरांचिये मिळणीं । जैशीं वरांडियांही लुगडीं लेणीं । तैसे देशियेचां सुखासनीं । मिरविले रस ॥ ३ ॥ परि शांताद्भुत बरवे । जे डोळियांचां अंजुळीं घ्यावे । जैसे हरिहर प्रेमभावें । आलें खेंवा ॥ ४ ॥ नातरी अंवसेचां दिवशीं । भेटलीं बिंबें दोनी जैशीं । तेवीं एकवळा रसीं । केला एथ ॥ ५ ॥ मीनले गंगेयमुनेचे ओघ । तैसें रसां जाहलें प्रयाग । म्हणोनि सुस्नात होत जग । आघवें एथ ॥ ६ ॥ माजीं गीता सरस्वती गुप्त । आणि दोनी रस ते ओघ मूर्त । यालागीं त्रिवेणी हे उचित । फावली बापा ॥ ७ ॥ एथ श्रवणाचेनि द्वारें । तीर्थीं रिघता सोपारें । ज्ञानेदव म्हणे दातारें । माझेनि केलें ॥ ८ ॥ तीरें संस्कृताचीं गहनें । तोडोनि मऱ्हाठियां शब्दसोपानें । रचिलीं धर्मनिधानें । निवृत्तिदेवें ॥ ९ ॥ म्हणौनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें । प्रयागमाधव विश्वरूप पहावें । येतुलेनि संसारासि द्यावें । तिलोदक ॥ १० ॥ हें असो ऐसे सावयव । जेथ सासिन्नले आथी रसभाव । जे श्रवणसुखाची राणीव । जोडली जगा ॥ ११ ॥

जेथ शांताद्भुत रोकडे । आणि येरां रसा पडप जोडे । हें अल्पचि परी उघडें । कैवल्य जेथ ॥ १२ ॥ तो हा अकरावा अध्यायो । जो देवाचा आपणपें विसंवता ठावो । परि अर्जुन सदैवांचा रावो । जे एथही पातला ॥ १३ ॥ एथ अर्जुनचि काय म्हणों पातला । आजि आवडतयाही सुकाळु जाहला । जे गीतार्थु हा आला मऱ्हाठिये ॥ १४ ॥ याचिलागीं माझें । विनविलें तें आइकिजे । तरी अवधान दीजे । सज्जनीं तुम्हीं ॥ १५ ॥ तेवींचि तुम्हां संतांचिये सभे । ऐसी सलगी कीर करूं न लभे । परि मानावें जी तुम्हीं लोभें । अपत्या मज ॥ १६ ॥ अहो पुंसा आपणचि पढविजे । मग पढे तरी माथा तुकिजे । कां करविलेनि चोजें न रिझे । बाळका माय ॥ १७ ॥ तेवीं मीं जें जें बोलें । तें प्रभु तुमचेंचि शिकविलें । म्हणोनि अवधारिजो आपुलें । आपण देवा ॥ १८ ॥ हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड । तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजो ॥ १९ ॥ मग हें रसभावफुली फुलेल । नानार्थफळभारें फळा येईल । तुमचेनि धर्में होईल । सुकाळ जगा ॥ २० ॥ या बोला संत रिझले । म्हणती तोषलों गा भलें केलें । आतां सांगें जें बोलिलें । अर्जुनें तेथ ॥ २१ ॥ तंव निवृत्तिदास म्हणे । जी कृष्णार्जुनांचें बोलणें । मी प्राकृत काय सांगों जाणें । परि सांगवा तुम्ही ॥ २२ ॥ अहो रानींचिया पालेखाइरा । नेवाणें करविलें लंकेश्वरा । एकला अर्जुन परि अक्षौहिणी अकरा । न जिणेची काई ॥ २३ ॥ म्हणोनि समर्थ जें जें करी । तें न हो कैसे चराचरी । तुम्हीं संत तयापरी । बोलवा मातें ॥ २४ ॥ आतां बोलिजतसे आइका । हा गीताभाव निका । जो वैकुंठनायका । मुखौनि निघाला ॥ २५ ॥ बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्ण वक्ता । जियें ग्रंथीं ॥ २६ ॥ तेथिंचें गौरव कैसें वानावें । जें शंभूचिये मति नागवे । तें आतां नमस्कारिजे जीवें भावें । हेंचि भलें ॥ २७ ॥ मग आइका तो किरीटी । घालूनि विश्वरूपीं दिठी । पहिली कैसी गोठी । करिता जाहला ॥ २८ ॥ हें सर्वही सर्वेश्वरु । ऐसा प्रतीतिगत जो पतिकरु । तो बाहेरी होआवा गोचरु । लोचनासी ॥ २९ ॥ हें जिवाआंतुली चाड । परि देवासि सांगतां सांकड । कां जे विश्वरूप गूढ । कैसेनि पुसावें ॥ ३० ॥ म्हणे मागां कवणीं कहीं । जें पढियंतेनें पुसिलें नाहीं । सहसा कैसें काई । सांगा म्हणों ॥ ३१ ॥ मी जरी सलगीचा चांगु । तरी काय आइसीहुनी अंतरंगु । परि तेही हा प्रसंगु । बिहाली पुसों ॥ ३२ ॥ माझी आवडे तैसी सेवा जाहली । तरी काय होईल गरुडाचिया येतुली । परी तोही हे बोली । करीचिना ॥ ३३ ॥ मी काय सनकादिकांहूनि जवळां । परि तयाही नागवेचि हा चाळा । मी आवडेन काय प्रेमळां । गोकुळींचिया ऐसा ॥ ३४ ॥ तयांतेंही लेकुरपणें झकविलें । एकाचे गर्भवासही साहिले । परि विश्वरूप हें राहविलें । न दावीच कवणा ॥ ३५ ॥ हा ठायवरी गुज । याचिये अंतरींचें हें निज । केवीं उराउरी मज । पुसों ये पां ॥ ३६ ॥ आणि न पुसेंचि जरी म्हणें । तरी विश्वरूप देखिलियाविणें । सुख नोहेचि परि जिणें । तेंही विपायें ॥ ३७ ॥ म्हणोनि आतां पुसों

अळुमाळसें। मग करूं देवा आवडे तैसें। येणे प्रवर्तला साध्वसें। पार्थु बोलों ॥ ३८ ॥ परी तेंचि ऐसेनि भावें। जें एका दों उत्तरांसवें। दावी विश्वरूप आघवें। झाडा देउनि ॥ ३९ ॥ अहो वांसरूं देखिलियासाठीं। धेनु खडबडोनि मोहें उठी। मग स्तनामुखाचिये भेटी। काय पान्हा न ये ॥ ४० ॥ पाहां पां तयां पांडवांचेनि नांवें। जो कृष्ण रानींही प्रतिपाळूं धांवे। तयांतें अर्जुनें जंव पुसावें। तंव साहील काई ॥ ४१ ॥ तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण। आणि येरु स्नेहा घातलें आहे माजवण। ऐसिये मिळणी वेगळेपण। उरे हेंचि बहु ॥ ४२ ॥ म्हणोनि अर्जुनाचिया बोलासरिसा। देव विश्वरूप होईल आपैसा। तोचि पहिला प्रसंगु ऐसा। ऐकिजो तरी ॥ ४३ ॥

अर्जुन उवाच : मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् । यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ १ ॥

मग पार्थु देवातें म्हणे। जी तुम्हीं मजकारणें। वाच्य केलें न बोलणें। कृपानिधे ॥ ४४ ॥ जैं महाभूतें ब्रह्मीं आटती। जीवमहदादींचे ठाव फिटती। तैं जें देव होऊनि ठाकती। तें विसवणें शेषींचें ॥ ४५ ॥ होतें हृदयाचां परीवरीं। रोंविलें कृपणाचिये परी। शब्दब्रह्मासिही चोरी। जयाची केली ॥ ४६ ॥ तें तुम्हीं आजि आपुलें। मजपुढां हियें फोडिलें। जया अध्यात्मा वोवाळिलें। ऐश्वर्ये हरें ॥ ४७ ॥ ते वस्तु मज स्वामी। एकिहेळां दिधली तुम्हीं। हें बोलों तरि आम्ही। तुज पावोनि भिन्न कैंचे ॥ ४८ ॥ परि साचचि महामोहाचां पुरीं। बुडालेया देखोनि सीसवरी। तुवां आपणपें घालोनि श्रीहरी। मग काढिलें मातें ॥ ४९ ॥ एक तूंवांचूनि कांहीं। विश्वीं दुजियाचि भाष नाहीं। कीं आमुचें कर्म पाहीं। जे आम्ही आथी म्हणों ॥ ५० ॥ मी जगीं एक अर्जुनु। ऐसा देहीं वाहें अभिमानु। आणि कौरवांतें इया स्वजनु। आपुले म्हणें ॥ ५१ ॥ याहीवरी यांतें मी मारीन। म्हणें तेणें पापें के रिगेन। ऐसें देखत होतों दुःस्वप्न। तों चेववविला प्रभु ॥ ५२ ॥ देवा गंधर्वनगरीची वस्ती। सोडूनि निघालों लक्ष्मीपती। होतों उदकाचिया आर्तीं। रोहिणी पीत ॥ ५३ ॥ जी किरडूं तरी कापडाचें। परी लहरी येत होतिया साचें। ऐसें वाया मरतया जीवाचें। श्रेय तुवां घेतलें ॥ ५४ ॥ आपुलें प्रतिबिंब नेणतां। सिंह कुहां घालील देखोनि आतां। ऐसा धरिजे तेवीं अनंता। राखिलें मातें ॥ ५५ ॥ एऱ्हवीं माझा तरी येतुलेवरी। एथ निश्चय होता अवधारीं। जे आतांची सातांही सागरीं। एकत्र मिळिजे ॥ ५६ ॥ हें युगचि आघवें बुडावें। वरि आकाशहि तुटोनि पडावें। परि झुंजणें न घडावें। गोत्रेंशीं मज ॥ ५७ ॥ ऐशिया अहंकाराचिये वाढी। मियां आग्रहजळीं दिधली होती बुडी। चांगचि जवळा तूं एऱ्हवीं काढी। कवणु मातें ॥ ५८ ॥ नाथिलें आपणपें एक मानिलें। आणि नव्हतया नाम गोत्र ठेविलें। थोर पिसें होतें लागलें। परि राखिलें तुम्हीं ॥ ५९ ॥ मागां जळत काढिलों जोहरीं। तैं तें देहासीच भय अवधारीं। आतां हे जोहरवाहर दुसरी। चैतन्यासकट ॥ ६० ॥ दुराग्रहें हिरण्याक्षें। माझी बुद्धिवसुंधरा सूदली काखे। मग मोहार्णवगवाक्षे। रिघोनि ठेला ॥ ६१ ॥ तेथ तुझेनि गोसावीपणें। एकवेळ बुद्धीचिया ठाया येणें। हें दुसरें वराह होणें।

पडिलें तुज ॥ ६२ ॥ ऐसें अपार तुझें केलें । एकी वाचा काय मी बोलें । परि पांचही पालव मोकलिले । मजप्रती ॥ ६३ ॥ तें कांहीं न वचेचि वायां । भले यश फावलें देवराया । जे साद्यंत माया । निरसिली माझी ॥ ६४ ॥ जी आनंदसरोवरींचीं कमळें । तैसे जे हे तुझे डोळे । आपुलिया प्रसादाचीं राऊळें । जयालागीं करिती ॥ ६५ ॥ हां हो तयाही आणि मोहाची भेटी । हे कायसी पाबळी गोठी । केउती मृगजळाची वृष्टी । वडवानळेंसी ॥ ६६ ॥ आणि मी तंव दातारा । कृपेचां ये रिघोनि गाभारां । घेत आहें चारा । ब्रह्मरसाचा ॥ ६७ ॥ तेणें माझा जी मोह जाये । एथ विस्मो कांहीं आहे । तरी उद्धरलों कीं तुझे पाये । शिवतले आहाती ॥ ६८ ॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया । त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥ २ ॥

पैं कमलायतडोळसा । सूर्यकोटितेजसा । मियां तुजपासोनि महेशा । परिसिलें आजि ॥ ६९ ॥ इयें भूतें जयापरी होती । अथवा लया हन जैसेनि जाती । ते मजपुढां प्रकृती । विवंचिली देवें ॥ ७० ॥ आणि प्रकृती कीर उगाणा दिधला । परि पुरुषाचाही ठावो दाविला । जयाचा महिमा पांघरोनि जाहला । धडौता वेदु ॥ ७१ ॥ जी शब्दराशी वाढे जिये । कां धर्माऐशिया रत्नातें विये । ते एथिंचे प्रभेचे पाये । वोळगे म्हणोनि ॥ ७२ ॥ ऐसें अगाध महात्म्य । जें सकळमार्गैंकगम्य । जें स्वात्मानुभवरम्य । तें इयापरी दाविलें ॥ ७३ ॥ जैसा केरु फिटलिया आभाळीं । दिठी रिगे सूर्यमंडळीं । कां हातें सारूनि बाबुळी । जळ देखिजे ॥ ७४ ॥ ना तरि उकलतयां सापाचे वेढे । जैसें चंदना खेंव देणें घडे । अथवा विवसी पळे मग चढे । निधान हातां ॥ ७५ ॥ तैसी प्रकृति हे आड होती । ते देवेंचि सारिली परौती । मग परतत्त्व माझिये मती । शेजार केलें ॥ ७६ ॥ म्हणोनि इयेविषयींचा मज देवा । भरंवसा कीर जाहला जीवा । परि आणिक एक हेवा । उपनला असे ॥ ७७ ॥ तो भिडां जरी म्हणों राहों । तरीं आना कवणा पुसों जावों । काइ तूंवांचोनि ठावो । जाणत आहों आम्हीं ॥ ७८ ॥ जळचरु जळाचा आभारु घरी । बाळक स्तनपानीं उपरोधु करी । तरी तया जिणयासी श्रीहरी । आन उपायो असे ॥ ७९ ॥ म्हणोनि भीडसांकडी न धरवे । जीवीं आवडे तेंही तुजपुढां बोलावें । तंव राहें म्हणितलें देवें । चाड सांगे ॥ ८० ॥

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर । द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥

मग बोलिला तो किरीटी । म्हणें तुम्हीं केली जे गोठी । तिया प्रतीतीची दिठी । निवाली माझी ॥ ८१ ॥ आतां जयाचेनि संकल्पें । हे लोकपरंपरा होय हारपे । जया ठायातें आपणपें । मी ऐसें म्हणसी ॥ ८२ ॥ तें मुद्दल स्वरूप तुझें । जेथूनि इयें द्विभुजें हन चतुर्भुजें । सुरकार्याचेनि व्याजें । घेवोंघेवों येसी ॥ ८३ ॥ पैं जळशयनाचिया अवगणिया । कां मत्स्य कूर्म इया मिरवणिया । खेळु सरलिया तूं गुणिया । सांठविसी जेथ ॥ ८४ ॥ उपनिषदें जें गाती । योगिये हृदयीं रिगोनि पाहाती । जयातें सनकादिक आहाती । पोटाळुनियां ॥ ८५ ॥ ऐसें अगाध जें तुझें । विश्वरूप कानीं ऐकिजे । तें देखावया चित्त माझें । उतावीळ देवा ॥ ८६ ॥

देवें फेडुनियां सांकड । लोभें पुसिली जरी चाड । तरि हेचि एकी वाड । आर्तीं जी मज ॥ ८७ ॥ तुझें विश्वरूपपण आघवें । माझिये दिठीसि गोचर होआवें । ऐसी थोर आस जीवें । बांधोनि आहें ॥ ८८ ॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो । योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥

परि आणीक एक एथ शार्ङ्गीं । तुज विश्वरूपातें देखावयालागीं । योग्यता माझां अंगीं । असे कीं नाहीं ॥ ८९ ॥ हें आपलें आपण मी नेणें । तें कां नेणसी जरी देव म्हणे । तरी सरोगु काय जाणे । निदान रोगाचें ॥ ९० ॥ आणि जी आर्तीचेनि पडिभरें । आर्तु आपुली ठाकी पैं विसरे । तान्हेला म्हणे न पुरे । समुद्र मज ॥ ९१ ॥ ऐसी सचाडपणाचिये भुली । न सांभाळवे समस्या आपुली । यालागी योग्यता जेवीं माउली । बाळकाची जाणे ॥ ९२ ॥ तयापरी जनार्दना । विचारिजो माझी संभावना । मग विश्वरूपदर्शना । उपक्रम कीजे ॥ ९३ ॥ तरी तैसी ते कृपा करा । एऱ्हवीं नव्हे हें म्हणां अवधारा । वायां पंचमालापें बधिरा । सुख केऊतें देणें ॥ ९४ ॥ एऱ्हवीं येकल्या बापियाचिया तृषे । मेघ जगापुरतें काय न वर्षे । परि जाहालीही वृष्टि उपखे । जऱ्ही खडकीं होय ॥ ९५ ॥ चकोरा चंद्रामृत फावलें । येरा आण वाहुनि काय वारिलें । परि डोळ्यांवीण पाहलें । वाया जाय ॥ ९६ ॥ म्हणोनि विश्वरूप तूं सहसा । दाविसी हा कीर भरंवसा । कां जे कडाडां आणि गहिंसां - । माजी नित्य नवा तूं कीं ॥ ९७ ॥ तुझें औदार्य जाणों स्वतंत्र । देतां न म्हणसी पात्रापात्र । पैं कैवल्याऐसें पवित्र । जे वैरियांही दिधलें ॥ ९८ ॥ मोक्षु दुराराध्यु कीर होय । परि तोही आराधी तुझे पाय । म्हणोनि धाडिसी तेथ जाय । पाइकु जैसा ॥ ९९ ॥ तुवां सनकादिकांचेनि मानें । सायुज्यीं सौरसु केला पुतने । जे विषाचेनि स्तनपानें । मारूं आली ॥ १०० ॥ हां गा राजसूयाचां सभासदीं । देखतां त्रिभुवनाची मांदी । कैसा शतधा दुर्वाक्य शब्दीं । निस्तेजिलासी ॥ १ ॥ ऐशिया अपराधिया शिशुपाळा । आपणपयां ठावो दिधला गोपाळा । आणि उत्तानचरणाचिया बाळा । काय ध्रुवपदीं चाड ॥ २ ॥ तो वना आला याचिलागीं । जे बैसावें पितयाचां उत्संगीं । कीं तो चंद्रसूर्यादिकांपरिस जगीं । श्लाघ्यु केला ॥ ३ ॥ ऐसा वनवासियां सकळां । देतां एकचि तूं धसाळा । पुत्रा आळवितां अजामिळा । आपणपें देसी ॥ ४ ॥ जेणें उरीं हाणितलासि पांपरा । तयाचा चरणु वाहासी दातारा । अझुनि वैरियांचिया कलेवरा । विसंबसी ना ॥ ५ ॥ ऐसा अपकारियां तुझा उपकारु । तूं अपात्रींही परि उदारु । दान मागोनि दारवंटेकरु । जाहलासी बळीचा ॥ ६ ॥ तूंतें आराधी ना आयके । होती पुंसा बोलावित कौतुकें । तिये वैकुंठीं तुवां गणिके । सुरवाडु केला ॥ ७ ॥ ऐसीं पाहूनि वायाणीं मिषें । लागलासी आपणपें देवों वानिवसें । तो तूं कां अनारिसें । मजलागीं करिसी ॥ ८ ॥ हां गां दुभतयाचेनि पवाडें । जे जगाचें फेडी सांकडें । तिये कामधेनूचे पाडे । काय भुकेले ठाती ॥ ९ ॥ म्हणोनि मियां जें विनविलें कांहीं । तें देव न दाखविती हें कीर नाहीं । परि देखावयालागीं देईं ।

पात्रता मज ॥ ११० ॥ तुझें विश्वरूप आकळे । ऐसे जरी जाणसी माझे डोळे । तरि आर्तीचे डोहळे । पुरवीं देवा ॥ ११ ॥ ऐसी ठायेंठावो विनंती । जंव करूं सरला सुभद्रापती । तंव तया षड्गुणचक्रवर्ती । साहवेचिना ॥ १२ ॥ तो कृपापीयूषसजळु । आणि येरु जवळां आला वर्षाकाळु । नाना कृष्ण कोकिळु । अर्जुन वसंतु ॥ १३ ॥ नातरी चंद्रबिंब वाटोळें । देखोनि क्षीरसागर उचंबळे । तैसा दुणेंही वरी प्रेमबळें । उल्लसितु जाहला ॥ १४ ॥ मग तिये प्रसन्नतेचेनि आटोपें । गाजोनि म्हणितलें सकृपें । पार्था देख देख उमपें । स्वरूपें माझीं ॥ १५ ॥ एकचि विश्वरूप देखावें । ऐसा मनोरथु केला पांडवें । कीं विश्वरूपमय आघवें । करूनि घातलें ॥ १६ ॥ बाप उदार देवो अपरिमितु । याचक स्वेच्छा सदोदितु । असे सहस्त्रवरी देतु । सर्वस्व आपुलें ॥ १७ ॥ अहो शेषाचेही डोळे चोरिले । वेद जयालागीं झकविले । लक्ष्मीयेही परि राहिलें । जिव्हार जें ॥ १८ ॥ तें आतां प्रकटुनी अनेकधा । करीत विश्वरूपदर्शनाचा धांदा । बाप भाग्या अगाधा । पार्थाचिया ॥ १९ ॥ जो जागता स्वप्नावस्थे जाये । तो जेवीं स्वप्नींचें आघवें होये । तेवीं अनंत ब्रह्मकटाह आहे । आपणचि जाहला ॥ १२० ॥ तेथिंची सहसा मुद्रा सोडिली । आणि स्थूळ दृष्टीची जवनिका फेडिली । किंबहुना उघडिली । योगऋद्धि ॥ २१ ॥ परि हा हें देखेल कीं नाहीं । ऐसी सेचि न करी कांहीं । एकसरा म्हणतसे पाहीं । स्नेहातुर ॥ २२ ॥

श्रीभगवानुवाच : पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रश: । नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥

अर्जुना तुवां एक दावा म्हणितलें । आणि तेंचि दावूं तरि काय दाविलें । आतां देखें आघवें भरिलें । माझांचि रूपीं ॥ २३ ॥ एकें कृशें एकें स्थूळें । एकें ह्रस्वें एकें विशाळें । पृथुतरें सरळें । अप्रांतें एकें ॥ २४ ॥ एकें अनावरें प्रांजळें । सव्यापारें एकें निश्चळें । उदासीनें स्नेहाळें । तीव्रें एकें ॥ २५ ॥ एकें घूर्णितें सावधें । असलगें एकें अगाधें । एकें उदारें अतिबद्धें । क्रुद्धें एकें ॥ २६ ॥ एकें संतें सदामदें । स्तब्धें एकें सानंदें । गर्जितें नि:शब्दें । सौम्यें एकें ॥ २७ ॥ एकें साभिलाषें विरक्तें । उन्निद्रितें एकें निद्रितें । परितुष्टें एकें आर्तें । प्रसन्नें एकें ॥ २८ ॥ एकें अशस्त्रें सशस्त्रें । एकें रौद्रें अतिमित्रें । भयानकें एकें पवित्रें । लयस्थें एकें ॥ २९ ॥ एकें जनलीलाविलासें । एकें पालनशीलें लालसें । एकें संहारकें सावेशें । साक्षिभूतें एकें ॥ १३० ॥ एवं नानाविधें परि बहुवसें । आणि दिव्यतेजप्रकाशें । तेवींचि एकएकाऐसें । वर्णेंही नव्हे ॥ १३१ ॥ एकें तातलें साडेपंधरें । तैसी कपिलवर्णें अपारें । एकें सरागें जैसे सेंदुरें । डवरलें नभ ॥ ३२ ॥ एके सावियाचि चुळुकीं । जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं । एकें अरुणोदयासारिखीं । कुंकुमवर्णें ॥ ३३ ॥ एकें शुद्धस्फटिकसोज्वळें । एकें इंद्रनीळसुनीळें । एकें अंजनाचलसकाळें । रक्तवर्णें एके ॥ ३४ ॥ एकें लसत्कांचनसम पिंवळीं । एकें नवजलदश्यामळीं । एकें चांपेगौरीं केवळीं । हरितें एकें ॥ ३५ ॥ एकें तप्ततामतांबडीं । एकें श्वेतचंद्र चोखडीं । ऐसीं नानावर्णें रूपडीं । देख माझीं ॥ ३६ ॥ हे जैसे कां आनान वर्ण । तैसें आकृतींही अनारिसेपण । लाजा कंदर्प रिघाला शरण । तैसें सुंदरें एकें

॥ ३७ ॥ एकें अतिलावण्यसाकारें । एकें स्निग्धवपुमनोहरें । शृंगारश्रियेचि भांडारें । उघडिलीं जैसी ॥ ३८ ॥ एकें पीनावयव मांसाळें । एकें शुष्कें अतिविक्राळें । एकें दीर्घकंठें विताळें । विकटें एकें ॥ ३९ ॥ एवं नानाविधाकृती । इयां पाहतां पारु नाहीं सुभद्रापती । ययांचा एकेकीं अंगप्रांतीं । देख पां जग ॥ १४० ॥

पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा । बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥

जेथ उन्मीलन होत आहे दिठी । तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी । पुढती निमीलनीं मिठी । देत आहाती ॥ ४१ ॥ वदनींचिया वाफेसवें । होत ज्वाळामय आघवें । जेथ पावकादिक पावे । समूह वसूंचे ॥ ४२ ॥ आणि भ्रूलतांचे शेवट । कोपें मिळों पाहती एकवाट । तेथ रुद्रगणांचे संघाट । अवतरत देखें ॥ ४३ ॥ पैं सौम्यतेचां वोलावां । मिती नेणिजे अश्विनौदेवां । श्रोत्रीं होती पांडवा । अनेक वायु ॥ ४४ ॥ यापरी एकेकाचिये लीळे । जन्मती सुरसिद्धांचीं कुळें । ऐसीं अपारें आणि विशाळें । रूपें इयें पाहीं ॥ ४५ ॥ जयांतें सांगावया वेद बोबडे । पहावया काळाचेंही आयुष्य थोडें । धातयाही परी न सांपडे । ठाव जयांचा ॥ ४६ ॥ जयांतें देवत्रयी कहीं नायके । तियें इयें प्रत्यक्ष देख अनेकें । भोगीं आश्चर्याचीं कवतिकें । महाऋद्धी ॥ ४७ ॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् । मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥

इया मूर्तिचिया किरीटी । रोममूळीं देखें पां सृष्टी । सुरुतरुतळवटीं । तृणांकुर जैसे ॥ ४८ ॥ आणि चंडवाताचेनि प्रकाशें । उडतां परमाणु दिसती जैसे । भ्रमत ब्रह्मकटाह तैसे । अवयवसंधीं ॥ ४९ ॥ एथ एकैकाचिया प्रदेशीं । विश्व देख विस्तारेंशीं । आणि विश्वाही परौतें मानसीं । जरी देखावें वर्ते ॥ १५० ॥ तरी तियेही विषयींचें कांहीं । एथ सर्वथा सांकडें नाहीं । सुखें आवडें तें माझां देहीं । देखसी तूं ॥ ५१ ॥ ऐसें विश्वमूर्ती तेणें । बोलिलें कारुण्यपूर्णें । तंव देखत आहे कीं नाहीं न म्हणे । निवांतुचि येरु ॥ ५२ ॥ एथ कां पां हा उगला । म्हणोनि कृष्णें जंव पाहिला । तंव आर्तीचें लेणें लेइला । तैसाचि आहे ॥ ५३ ॥

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा । दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥

मग म्हणे उत्कंठे वोहट न पडे । अझुनी सुखाची सोय न सांपडे । परि दाविलें तें फुडें । नाकळेचि यया ॥ ५४ ॥ हें बोलोनि देवो हांसिले । हांसोनि देखणिया म्हणितलें । आम्हीं विश्वरूप तरी दाविलें । परि न देखसीच तूं ॥ ५५ ॥ यया बोला येरें विचक्षणें । म्हणितलें हां जी कवणासी तें उणें । तुम्ही बकाकरवीं चांदिणें । चरऊं पाहा मा ॥ ५६ ॥ हां हो उटोनिया आरिसा । आंधळिया दाऊं बैसा । बहिरीयापुढें हृषीकेशा । गाणीव करा ॥ ५७ ॥ मकरंदकणाचा चारा । जाणतां घालूनि दर्दुरा । वायां धाडा शार्ङ्गधरा । कोपा कवणा ॥ ५८ ॥ जें अतींद्रिय म्हणोनि व्यवस्थिलें । केवळ ज्ञानदृष्टीचिया भागा फिटलें । ते तुम्हीं चर्मचक्षूंपुढें सूदलें । मी कैसेनि देखें ॥ ५९ ॥ परि हें तुमचें उणें न बोलावें । मीचि साहें तेंचि बरवें । एथ आथि म्हणितलें

देवें। मानूं बापा ॥ १६० ॥ साच स्वरूप जरीं आम्हीं दावावें। तरी आधीं देखावया सामर्थ्य कीं द्यावें। परि बोलत प्रेमभावें। धसाळ गेलों ॥ ६१ ॥ काय जाहलें न वाहतां भुई पेरिजे। तरी तो वेळु विलया जाइजे। तरी आतां माझें निजरूप देखिजे। ते दृष्टी देवों तुज ॥ ६२ ॥ मग तिया दृष्टी पांडवा। आमुचा ऐश्वर्ययोगु आघवा। देखोनियां अनुभवा। माजिवडा करीं ॥ ६३ ॥ ऐसें तेणें वेदांतवेद्यें। सकळलोकआद्यें। बोलिलें आराध्यें। जगाचेनि ॥ ६४ ॥

संजय उवाच : एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः । दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥

पैं कौरवकुळचक्रवर्ती। मज हाचि विस्मयो पुढतपुढती। जे श्रियेहुनि त्रिजगतीं। सदैव असे कवणी ॥ ६५ ॥ ना तरी खुणेचें वानावयालागीं। श्रुतीवांचूनि दावा पां जगीं। ना सेवकपण तरी अंगीं। शेषांचांचि आथि ॥ ६६ ॥ हां हो जयाचेनि सोसें। शिणत आठही पाहार योगी जैसे। अनुसरलें गरुडाऐसे। कवण आहे ॥ ६७ ॥ परि तें आघवेंचि एकीकडे ठेलें। सापें कृष्णसुख एकंदरें जाहलें। जिये दिउनि जन्मले। पांडव हे। ६८ ॥ परि पांचाही आंतु अर्जुना। कृष्ण सावियाचि जाहला अधीना। कामुक जैसा अंगना। आपैता कीजे ॥ ६९ ॥ पढविलें पाखिरूं ऐसें न बोले। यापरी क्रीडामृगही तैसा न चले। कैसें दैव एथ सुरवाडलें। तें जाणों न ये ॥ १७० ॥ आजि परब्रह्म हें सगळें। भोगावया सदैव याचेचि डोळे। कैसे वाचेचे हन लळे। पाळीत असे ॥ ७१ ॥ हा कोपे कीं निवांतु साहे। हा रुसे तरी बुझावीत जाये। नवल पिसें लागले आहे। पार्थाचें देवा ॥ ७२ ॥ एऱ्हवीं विषय जिणोनि जन्मलें। जे शुकादिक दादुले। ते विषयोचि वानितां जाहले। भाट ययाचे ॥ ७३ ॥ हा योगियांचें समाधिधन। कीं होऊनि ठेलें पार्थाअधीन। यालागीं विस्मयो माझें मन। करीतसे राया ॥ ७४ ॥ तेवींचि संजय म्हणे कायसा। विस्मयो एथ कौरवेशा। कृष्णें स्वीकारिजे तया ऐसा। भाग्योदय होय ॥ ७५ ॥ म्हणोनि तो देवांचा रावो। म्हणे पार्था ते तुज दृष्टि देवों। जया विश्वरूपाचा ठावो। देखसी तूं। ७६ ॥ ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें। निघती ना जंव एकसरें। तंव अविद्येचें आंधारें। जावोंचि लागे ॥ ७७ ॥ तीं अक्षरें नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका। अर्जुनालागीं चित्कळिका। उजळलिया कृष्णें ॥ ७८ ॥ मग दिव्यचक्षु प्रगटला। तया ज्ञानदृष्टी पाटा फुटला। ययापरी दाविता जाहला। ऐश्वर्य आपुलें ॥ ७९ ॥ हे अवतार जे सकळ। ते जिये समुद्रींचे कां कल्लोळ। विश्व हें मृगजळ। जया रश्मीस्तव दिसे ॥ १८० ॥ जिये अनादिभूमिके निटे। चराचर हें चित्र उमटे। आपणपें वैकुंठें। दाविलें तया ॥ ८१ ॥ मागां बाळपणीं येणें श्रीपती। जैं एकवेळ खादली होती माती। तैं कोपोनियां हातीं। यशोदा धरिला ॥ ८२ ॥ मग भेणें भेणें जैसें। मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें। चवदाही भुवनें सावकाशें। दाविलीं तिये ॥ ८३ ॥ ना तरी मधुबनीं ध्रुवासि केलें। जैसें कपोल शंखें शिवतलें। आणि वेदांचियेही मती ठेले। तें लागला बोलो ॥ ८४ ॥ तैसा अनुग्रहो पैं राया। श्रीहरी केला धनंजया। आतां कवणेकडेही माया। ऐसी भाष नेणे तो ॥ ८५ ॥ एकसरें

ऐश्वर्यतेजें पाहलें। तया चमत्काराचें एकार्णव जाहलें। चित्त समाजीं बुडोनि ठेलें। विस्मयाचां ॥ ८६ ॥ जैसा आब्रह्म पूर्णोदकीं। पव्हे मार्कंडेय एकाकी। तैसा विश्वरूपकौतुकीं। पार्थु लोळे ॥ ८७ ॥ म्हणे केवढें गगन एथ होतें। तें कवणें नेलें पां केउतें। ती चराचरें महाभूतें। काय जाहलीं ॥ ८८ ॥ दिशांचे ठावही हारपले। अधोर्ध्व काय नेणों जाहले। चेइलिया स्वप्न तैसें गेले। लोकाकार ॥ ८९ ॥ नाना सूर्यतेजप्रतापें। सचंद्र तारांगण जैसें लोपे। तैसी गिळिली विश्वरूपें। प्रपंचरचना ॥ १९० ॥ तेव्हां मनासी मनपण न स्फुरे। बुद्धि आपणपें न सांवरे। इंद्रियांचे रश्मी माघारे। हृदयवरी भरले ॥ ९१ ॥ तेथ ताटस्थ्या ताटस्थ्य पडिलें। टकासी टक लागलें। जैसें मोहनास्त्र घातलें। विचारजातां ॥ ९२ ॥ तैसा विस्मितु पाहे कोडें। तंव पुढां होतें चतुर्भुज रूपडें। तेंचि नानारूप चहूंकडे। मांडोनि ठेलें ॥ ९३ ॥ जैसें वर्षाकाळींचें मेघौडें। का महाप्रळयींचें तेज वाढे। तैसें आपणेनवीण कवणीकडे। नेदीचि उरों ॥ ९४ ॥ प्रथम स्वरूपसमाधान। पावोनि ठेला अर्जुन। सवेचि उघडी लोचन। तंव विश्वरूप देखे ॥ ९५ ॥ इहींचि दोहीं डोळां। पाहावें विश्वरूपा सकळा। तोहि श्रीकृष्णें सोहळा। पुरविला ऐसा ॥ ९६ ॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम्। अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥

मग तेथे सैंघ देखे वदनें। जैसीं रमानायकाचीं राजभुवनें। नाना प्रगटलीं निधानें। लावण्यश्रियेचीं ॥ ९७ ॥ की आनंदाचीं वनें सासिन्नलीं। जैसी सौंदर्या राणीव जोडली। तैसीं मनोहरें देखिलीं। हरीचीं वक्त्रें तेणें ॥ ९८ ॥ तयांही माजीं एकैकें। सावियाचि भयानकें। काळरात्रीचीं कटकें। उठावलीं जैसीं ॥ ९९ ॥ कीं यें मृत्यूसीचि मुखें जाहलीं। हो कां जे भयाचीं दुर्गें पन्नासिलीं। कीं महाकुंडें उघडलीं। प्रलयानळाचीं ॥ २०० ॥ तैसी अद्भुतें भयासुरें। तेथ वदनें देखिलीं वीरें। आणिकें असाधारणें साळंकारें। सौम्यें बहुतें ॥ १ ॥ पैं ज्ञानदृष्टीचेनि अवलोकें। परि वदनांचा शेवटु न टके। मग लोचन ते कवतिकें। लागला पाहों ॥ २ ॥ तंव नानावर्णें कमळवनें। कीं विकासिलीं तैसे अर्जुनें। डोळे देखिले पालिंगनें। आदित्यांचीं ॥ ३ ॥ तेथेंचि कृष्णमेघाचिया दाटी-। माजीं कल्पांत विजूंचिया स्फुटी। तैसिया वन्हि पिंगळा दिठी। भ्रूभंगातळी ॥ ४ ॥ हें एकैक आश्चर्य पाहतां। तिये एकेचि रूपीं पांडुसुता। दर्शनाची अनेकता। प्रतिफळली ॥ ५ ॥ मग म्हणे चरण ते कवणेकडे। केउते मुकुट कें दोर्दंडें। ऐसी वाढविताहे कोडें। चाड देखावयाची ॥ ६ ॥ तेथ भाग्यनिधि पार्था। कां विफलत्व होईल मनोरथा। काय पिनाकपाणीचां भातां। वायकांडे आहाती ॥ ७ ॥ ना तरी चतुराननाचिये वाचे। आहाती लटिकिया अक्षरांचें सांचे। म्हणोनि साद्यंतपण अपारांचें। देखिलें तेणें ॥ ८ ॥ जयाची सोय वेदा नाकळे। तयाचे सकळावयव एकेचि वेळे। अर्जुनाचे दोन्ही डोळे। भोगिते जाहले ॥ ९ ॥ चरणौनि मुकुटवरी। देखत विश्वरूपाची थोरी। जे नाना रत्न अलंकारीं। मिरवत असे ॥ २१० ॥ परब्रह्म आपुलेनि आंगें। ल्यावया आपणचि जाहला अनेगें। तियें लेणीं मी

सांगें । काइसयासारिखीं ॥ ११ ॥ जिये प्रभेचिये झळाळा । उजाळु चंद्रादित्यमंडळा । जे महातेजाचा जिव्हाळा । जेणें विश्व प्रगटे ॥ १२ ॥ तो दिव्यतेज शृंगारु । कोणाचिये मतीसी होय गोचरु । देव आपणपेंचि लेइले ऐसें वीरु । देखत असे ॥ १३ ॥ आपण आंग आपण अलंकार । आपण हात आपण हातियार । आपण जीव आपण शरीर । देखे चराचर कोंदलें देवें ॥ १४ ॥ मग तेथेंचि ज्ञानाचां डोळां । पहात करपल्लवां जंव सरळा । तंव तोडित कल्पांतीचिया ज्वाळा । तैसीं शस्त्रें झळकत देखे ॥ १५ ॥ जयांचिया किरणांचेनि निखरेपणें । नक्षत्रांचे होत फुटाणे । तेजें खिरडला वन्हि म्हणे । समुद्रीं रिघों ॥ १६ ॥ मग काळकूटकल्लोळीं कवळिलें । नाना महाविजूंचें दांग उमटले । तैसे अपार कर देखिले । उदितायुधीं ॥ १७ ॥

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् । सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥

कीं भेणें तेथूनि काढिली दिठी । मग कंठमुगुट पहातसे किरीटी । तंव सुरतरूंची सृष्टी । जयापासोनि कां जाहली ॥ १८ ॥ जियें महासिद्धींचीं मूळपीठें । शिणली कमळा जेथ वावटे । तैसीं कुसुमें अति चोखटें । तुरंबिलीं देखिलीं ॥ १९ ॥ मुगुटावरी स्तबक । ठायीं ठायीं पूजाबंध अनेक । कंठीं रुळताति अलौकिक । माळादंड ॥ २२० ॥ स्वर्गें सूर्यतेज वेढिलें । जैसें पंधरेनें मेरूतें मढिलें । तैसें नितंबावरी गाढिलें । पीतांबरु झळके ॥ २१ ॥ श्रीमहादेवो कापुरें उटिला । कां कैलासु पारदे डवरिला । नाना क्षीरोदकें पांघरविला । क्षीरार्णवो जैसा ॥ २२ ॥ जैसी चंद्रमयाची घडी उपलविली । मग गगनाकरवीं बुंथी घालविली । तैसी चंदनपिंजरी देखिली । सर्वांगी तेणें ॥ २३ ॥ जेणें स्वप्रकाशा कांतीं चढे । ब्रह्मानंदाचा निदाघु मोडे । जयाचेनि सौरभ्यें जीवित जोडे । वेदवतीये ॥ २४ ॥ जयाचे निर्लेप अनुलेपु करी । जे अनंगुही सर्वांगीं धरी । तया सुगंधाची थोरी । कवण वानी ॥ २५ ॥ ऐसी एकैक शृंगारशोभा । पाहतां अर्जुन जातसे क्षोभा । तेवींचि देवो बैसला कीं उभा । का शयालु हें नेणवे ॥ २६ ॥ बाहेर दिठी उघडोनि पाहे । तरि आघवें मूर्तिमय देखतु जाये । मग आतां न पाहे म्हणोनि उगा राहे । तरी आंतुही तैसेंचि ॥ २७ ॥ अनावरें मुखें समोर देखें । तयाभेणें पाठीमोरा जंव ठाके । तंव तयाहीकडे श्रीमुखें । करचरण तैसेचि ॥ २८ ॥ अहो पाहतां कीर प्रतिभासे । एथ कांहीं नवलावो काइ असे । परि न पाहतांही दिसे । चोज आइका ॥ २९ ॥ कैसें अनुग्रहाचें करणें । पार्थाचें पाहणें आणि न पाहणें । तयाहीसकट नारायणें । व्यापूनि घातलें ॥ २३० ॥ म्हणोनि आश्चर्याचां पुरीं एकीं । पडिला ठायेंठाव थडी ठाकी । तंव चमत्काराचिये आणिकीं । महार्णवीं पडे ॥ ३१ ॥ ऐसा अर्जुनु असाधारणें । आपुलिया दर्शनाचेनि विंदाणें । कवळूनि घेतला तेणें । अनंतरूपें ॥ ३२ ॥ तो विश्वतोमुख स्वभावें । आणि तेंचि दाखवावयालागीं पांडवें । प्रार्थिला आतां आघवें । होऊनि ठेला ॥ ३३ ॥ आणि दीपें कां सूर्यें प्रगटे । अथवा निमूटलिया देखावेंचि खुंटे । तैसी दिठी नव्हे जे वैकुंठें । दिधली आहे ॥ ३४ ॥ म्हणोनि किरीटीसि दोहीं परी । तें देखणें देखे आंधारीं । हें

संजयो हस्तिनापुरीं । सांगतसे राया ॥ ३५ ॥ म्हणे किंबहुना अवधारिलें । पार्थें विश्वरूप देखिलें । नाना आभरणीं भरलें । विश्वतोमुख ॥ ३६ ॥

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता । यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ १२ ॥

तिये अंगप्रभेचा देवा । नवलावो काइसयासारिखा सांगावा । कल्पांतीं एकुचि मेळावा । द्वादशादित्यांचा होय ॥ ३७ ॥ तैसे ते दिव्यसूर्य सहस्त्रवरी । जरी उदयजती कां एकेचि अवसरीं । तऱ्हीं तया तेजाची थोरी । उपमूं न ये ॥ ३८ ॥ आघवयाचि विजूंचा मेळावा कीजे । आणि प्रळयाग्नीची सर्व सामग्री आणिजे । तेवींचि दशकुही मेळविजे । महातेजांचा ॥ ३९ ॥ तऱ्ही तिये अंगप्रभेचेनि पाडें । हें तेज कांहीं कांहीं होईल थोडें । आणि तयाऐसें कीर चोखडें । त्रिशुद्धी नोहे ॥ २४० ॥ ऐसें माहात्म या हरीचे सहज । फांकतसे सर्वांगींचें तेज । तें मुनिकृपा की मज । दृष्ट जाहलें ॥ ४१ ॥

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा । अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ॥ १३ ॥

आणि तिये विश्वरूपीं एकीकडे । जग आघवें आपुलेनि पवाडें । जैसे महोदधीमाजीं बुडबुडे । सिनाने दिसती ॥ ४२ ॥ कां आकाशीं गंधर्वनगर । भूतळीं पिपीलिका बांधे घर । नाना मेरूवरी सपूर । परमाणु बैसले ॥ ४३ ॥ विश्व आघवेंचि तयापरी । तया देव चक्रवर्तीचिया शरीरीं । अर्जुन तिये अवसरीं । देखता जाहला ॥ ४४ ॥

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः । प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ॥ १४ ॥

तेथ एक विश्व एक आपण । ऐसें अळुमाळु होतें जें दुजेपण । तेंही आटोनि गेलें अंतःकरण । विरालें सहसा ॥ ४५ ॥ आंतुला महानंदा चेइरें जाहलें । बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें । आपाद पां गुंतलें । पुलकांचलें ॥ ४६ ॥ वार्षिये प्रथमदशे । वोहळलया शैलाचें सर्वांग जैसें । विरूढे कोमलांकुरीं तैसें । रोमांच आले ॥ ४७ ॥ शिवतला चंद्रकरीं । सोमकांतु द्रावो धरी । तैसिया स्वेदकणिका शरीरीं । दाटलिया ॥ ४८ ॥ माजीं सापडलेनि अलिकुळें । जळावरी कमळकळिका जेवीं आंदोळे । तेवीं आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ॥ ४९ ॥ कर्पूर केळीचीं गर्भपुटें । उकलतां कापुराचेनि कोंदाटें । पुलिका गळती तेवीं थेंबुटें । नेत्रोनि पडती ॥ २५० ॥ ऐसा सात्त्विकांही आठां भावां । परस्परें वर्ततसे हेवा । तेथ ब्रह्मानंदाची जीवा । राणीव फावली ॥ ५१ ॥ उदयलेनि सुधाकरें । जैसा भरलाचि समुद्र भरे । तैसा वेळोवेळां उर्मीभरें । उचंबळत असे ॥ ५२ ॥ तैसाचि तया सुखानुभवापाठीं । केला द्वैताचा सांभाळु दिठी । मग उसासोनि किरीटी । वास पाहिली ॥ ५३ ॥ तेथ बैठला होता जिया सवा । तयाचिकडे मस्तक खालविला देवा । जोडूनि करसंपुट बरवा । बोलतु असे ॥ ५४ ॥

अर्जुन उवाच : पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ १५ ॥

म्हणे जयजयाजी स्वामी । नवल कृपा केली तुम्हीं । जें हें विश्वरूप कीं आम्ही । प्राकृत देखों ॥ ५५ ॥ परि साचचि भलें केलें गोसाविया । मज परितोषु जाहला साविया । जी देखिलासि जो इया । सृष्टीसी तूं आश्रयो ॥ ५६ ॥ देवा मंदराचेनि अंगलगें । ठायीं ठायीं श्वापदांचीं दांगें । तैसीं इये तुझां देहीं अनेगें । देखतसें भुवनें ॥ ५७ ॥ अहो आकाशाचिये खोळे । दिसती ग्रहगणांचीं कुळें । कां महांवृक्षीं अविसाळें । पक्षिजातीचीं ॥ ५८ ॥ तयापरी श्रीहरी । तुझां विश्वात्मकीं इये शरीरीं । स्वर्गु देखतसें अवधारीं । सुरगणेंसीं ॥ ५९ ॥ प्रभु महाभूतांचें पंचक । येथ देखत आहें अनेक । आणि भूतग्राम एकैक । भूतसृष्टीचें ॥ २६० ॥ जी सत्यलोकु तुजमाजीं आहे । देखिला चतुराननु हा नोहे । आणि येरीकडे जंव पाहें । तंव कैलासुही दिसे ॥ ६१ ॥ श्रीमहादेव भवानियेशीं । तुझां दिसतसे एके अंशी । आणि तूंतेंही गा हृषीकेशी । तुजमाजीं देखें ॥ ६२ ॥ पैं कश्यपादि ऋषिकुळें । इयें तुझां स्वरूपीं सकळें । देखतसें पाताळें । पन्नगेंशीं ॥ ६३ ॥ किंबहुना त्रैलोक्यपति । तुझिया एकेकाचि अवयवाचिये भिंती । इये चतुर्दशभुवनें चित्राकृती । अंकुरलीं जाणों ॥ ६४ ॥ आणि तेथिंचे जे जे लोक । ते चित्ररचना जी अनेक । ऐसें देखतसें अलौकिक । गांभीर्य तुझें ॥ ६५ ॥

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् ।
नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥ १६ ॥

तया दिव्यचक्षूंचेनि पैसें । चहुंकडे जंव पाहत असें । तंव दोर्दंडी जैसें । आकाश कोंभैलें ॥ ६६ ॥ तैसे एकचि निरंतर । देवा देखतसें तुझें कर । करीत आघवेचि व्यापार । एकीं काळीं ॥ ६७ ॥ मग महाशून्याचेनि पैसारें । उघडलीं ब्रह्मकटाहाचीं भांडारें । तैसीं देखतुसें अपारें । उदरें तुझीं ॥ ६८ ॥ जी सहस्त्रशीर्षयाचें देखिलें । कोडीवरी होताति एकिवेळें । कीं परब्रह्मचि वदनफळें । मोडोनि आलें ॥ ६९ ॥ तैसीं वक्त्रें जी जेउतीं तेउतीं । तुझीं देखतसे विश्वमूर्ती । आणि तयाचिपरी नेत्रपंक्ति । अनेका सैंघ ॥ २७० ॥ हें असो स्वर्ग पाताळ । कीं भूमी दिशा अंतराळ । हे विवक्षा ठेली सकळ । मूर्तिमय देखतसें ॥ ७१ ॥ तुजवीण एकादियाकडे । परमाणुहि एतुला कोडें । अवकाशु पाहतसें परि न सांपडे । ऐसें व्यापिलें तुवां ॥ ७२ ॥ इहीं नाना भूतीं सहितें । जेतुलीं साठविलीं होतीं महाभूतें । तेतुलाहि पवाडु तुवा अनंतें । कोंदला देखतसें ॥ ७३ ॥ ऐसा कवणे ठायाहूनि तूं आलासी । एथ बैसलासि कीं उभा आहासि । आणि तूं कवणिये मायेचिये पोटीं होतासी । तुझें ठाण केवढें ॥ ७४ ॥ तुझें रूप वय कैसें । तुजपैलीकडे काय असे । तूं काइसयावरी आहासि ऐसें । पाहिलें मियां ॥ ७५ ॥ तंव देखिलें जी आघवेंचि । तरि आतां तुज देवा ठावो तूंचि । तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि । अनादि आयता ॥ ७६ ॥ तूं उभा ना बैठा । दिघडु ना खुजटा । तुज तळीं वरी वैकुंठा । तूंचि आहासी ॥ ७७ ॥ तूं रूपें आपणायांचि ऐसा । देवा तुझी तुंचि वयसा । पाठीं पोट परेशा । तुझें तूं गा ॥ ७८ ॥ किंबहुना आतां । तुज तूंचि

आघवें अनंता । हें पुढत पुढती पाहतां । देखिलें मियां ॥ ७९ ॥ परि या तुझिया रूपाआंतु । जी उणीव एक असें देखतु । जे आदि मध्य अंतु । तिन्हीं नाहीं ॥ २८० ॥ एन्हवीं गिंवसिलें आघवां ठायीं । परि सोय न लाहेचि कहीं । म्हणोनि त्रिशुद्धी हे नाहीं । तिन्हीं एथ ॥ ८१ ॥ एवं आदिमध्यांतरहिता । विश्वेश्वरा अपरिमिता । तूं देखिलासि जी तत्त्वतां । विश्वरूपा ॥ ८२ ॥ तुज महामूर्तींचां आंगीं । उमटलिया पृथक् मूर्ती अनेगी । लेइलासि वानें परींचीं आंगीं । ऐसा आवडतु आहासी ॥ ८३ ॥ नाना पृथक् मूर्ती तिया द्रुमवेली । तुझां स्वरूपमहाचळीं । दिव्यालंकारफुलीं फळीं । सासिन्नलिया ॥ ८४ ॥ हो कां जे महोदधी तूं देवा । जाहलासि तरंगीं मूर्ती हेलावा । कीं तूं वृक्षु एक बरवा । मूर्तिफळीं फळलासि ॥ ८५ ॥ जी भूतीं भूतळ मांडिलें । जैसें नक्षत्रीं गगन गुढलें । तैसें मूर्तिमय भरलें । तुझें देखतसें रूप ॥ ८६ ॥ जी एकेकीचां अंगप्रांतीं । होय जाय हें त्रिजगतीं । एवढियाहि तुझां आंगीं मूर्ती । कीं रोमां जालिया ॥ ८७ ॥ ऐसा पवाडु मांडूनि विश्वाचा । तूं कवण पां एथ कैचा । हें पाहिलें तंव आमुचा । सारथी तोचि तूं ॥ ८८ ॥ तरी मज पाहता मुकुंदा । तूं ऐसाचि व्यापकु सर्वदा । भक्तानुग्रहें तया मुग्धा । रूपातें धरिसी ॥ ८९ ॥ कैसें चहूं भुजांचें सांवळें । पाहतां वोल्हावती मन डोळे । खेंव देऊं जाइजे तरि आकळे । दोहींचि बाहीं ॥ २९० ॥ ऐसी मूर्ति कोडिसवाणी कृपा । करूनि होसी विश्वरूपा । कीं आमुचियाचि दिठी सलेपा । जे सामान्यत्वें देखती ॥ ९१ ॥ तरी आतां दिठीचा विटाळु गेला । तुवां सहजें दिव्यचक्षू केला । म्हणोनि यथारूपें देखवला । महिमा तुझा ॥ ९२ ॥ परि मकरतोंडामागिलेकडे । होतासि तोचि तूं एवढें । रूप जाहलासि हें फुडें । वोळखिलें मियां ॥ ९३ ॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् ।
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ १७ ॥

नोहे तोचि हा शिरीं । मुकुट लेइलासि श्रीहरी । परि आतांचें तेज आणि थोरी । नवल कीं बहुवें ॥ ९४ ॥ तेंचि हें वरिलिये हातीं । चक्र परिजितया आयती । सांवरितासि विश्वमूर्ती । ते न मोडे खुण ॥ ९५ ॥ येरीकडे तेंचि हे नोहे गदा । आणि तळिलिया दोनी भुजा निरायुधा । वागोरे सांवरावया गोविंदा । संसरिलिया ॥ ९६ ॥ आणि तेणेंचि वेगें सहसा । माझिया मनोरथासरिसा । जाहलासि विश्वरूपा विश्वेशा । म्हणोनि जाणें ॥ ९७ ॥ परि कायसें बा हें चोज । विस्मयो करावयाहि पवाडु नाहीं मज । चित्त होऊनि जात आहे निर्बुज । आश्चर्यें येणें ॥ ९८ ॥ हें एथ आथि कां येथ नाहीं । ऐसें श्वसोंही न ये कांहीं । नवल अंगप्रभेची नवाई । कैसी कोंदली सैंघ ॥ ९९ ॥ एथ अग्रीचीही दिठी करपत । सूर्य खद्योतु तैसे हारपत । ऐसें तीव्रपण अद्भुत । तेजाचें यया ॥ ३०० ॥ हो कां जे महातेजाचां महार्णवीं । बुडोनि गेली सृष्टि आघवी । कीं युगांतविजूंचां पालवीं । झांकलें गगन ॥ १ ॥ नातरी संहारतेजाचिया ज्वाळा । तोडोनि माचु बांधला अंतराळां । आतां दिव्य ज्ञानाचांहि डोळां । पाहवेना ॥ २ ॥

उजाळु अधिकाधिक बहुवसु । धडाडीत आहे अतिदाह । पडत दिव्यचक्षूंसही त्रासु । न्याहाळितां ॥ ३ ॥ हो कां जे महाप्रळयींचा भडाडु । होता काळाग्निरुद्राचां ठायीं गूढु । तो तृतीयनयनाचा मढु । फुटला जैसा ॥ ४ ॥ तैसें पसरलेनि प्रकाशें । सैंघ पांचवनिया ज्वाळांचे वळसे । पडतां ब्रह्मकटाह कोळिसे । होत आहाती ॥ ५ ॥ ऐसा अद्‌भुत तेजोराशी । जन्मा नवल म्यां देखिलासी । नाहीं व्याप्ती आणि कांतीसी । पारु जी तुझिये ॥ ६ ॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।

त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥

देवा तूं अक्षर । औटाविये मात्रेसि पर । श्रुति जयाचें घर । गिंवसीत आहाती ॥ ७ ॥ जें आकाराचें आयतन । जें विश्वनिक्षेपैकनिधान । तें अव्यय तूं गहन । अविनाश जी ॥ ८ ॥ तूं धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध तूं नित्य नवा । जाणें मीं सदतिसावा । पुरुष विशेष तूं ॥ ९ ॥

अनादिमध्यान्तमनन्तवीर्यमनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।

पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥ १९ ॥

तूं आदिमध्यांतरहितु । स्वसामर्थ्ये तूं अनंतु । विश्वबाहु अपरिमितु । विश्वचरण तूं ॥ ३१० ॥ पैं चंद्रचंडांशुडोळां । दावितासि कोपप्रसाद लीळा । एकां रुससी तमाचिया डोळां । एकां पाळितोसि कृपादृष्टी ॥ ११ ॥ जी एवंविधा तूंतें । मी देखतसें हें निरुतें । पेटलें प्रळयाग्नीचें उजितें । तैसें वक्त्र हें तुझें ॥ १२ ॥ वणिवेनि पेटले पर्वत । कवळूनि ज्वाळांचे उभड उठत । तैसी चाटीत दाढा दांत । जीभ लोळे ॥ १३ ॥ इये वदनींचिया उबा । आणि जी सर्वांगकांतिचिया प्रभा । विश्व तातलें अति क्षोभा । जात आहे ॥ १४ ॥

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।

दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥

कां जे भूर्लोक पाताळ । पृथिवी हन अंतराळ । अथवा दशदिशा समाकुळ । दिशाचक्र ॥ १५ ॥ तें आघवेंचि तुवां एकें । भरलें देखत आहे कौतुकें । परि गगनाहीसकट भयानकें । आप्लविजे जेवीं ॥ १६ ॥ ना तरी अद्‌भुतरसांचां कल्लोळीं । जाहलीं चवदाही भुवनांसि कडियाळी । तैसें आश्चर्यचि मग मी आकळीं । काय एक ॥ १७ ॥ नावरे व्याप्ती हे असाधारण । न साहवे रूपाचें उग्रपण । सुख दूरी गेलें परी प्राण । विपायें धरी जग ॥ १८ ॥ देवा देखोनियां तूंतें । नेणों कैसें आलें भयाचें भरितें । आतां दुःखकल्लोळीं झळंबतें । तिन्हीं भुवनें ॥ १९ ॥ एऱ्हवीं तुज महात्मयाचें देखणें । तरि भयदुःखासि कां मेळवणें । परि हें सुख नव्हेचि जेणें गुणें । तें जाणवत आहे मज ॥ ३२० ॥ जंव तुझें रूप नोहे दिठें । तंव जगासि संसारिक गोमटें । आतां देखिलासि तरी विषयविटें । उपनला त्रासु ॥ २१ ॥ तेवींचि तूंतें देखिलियासाठीं । काइ सहसा तुज देवों येईल मिठी । आणि नेदीं तरी शोक संकटीं ।

राहों केवीं ॥ २२ ॥ म्हणोनि मागां सरों तंव संसारु । आडवीत येतसे अनिवारु । आणि पुढां तूं तंव अनावरु । न येसि घेवों ॥ २३ ॥ ऐसा माझारिलीं सांकडां । बापुड्या त्रैलोक्याचा होतसे हुरडा । हा ध्वनि जी फुडा । चोजवला मज ॥ २४ ॥ जैसा आरंबळला आगी । समुद्रा ये निवावयालागीं । तंव कल्लोळपाणियाचां तरंगीं । आगळा बिहे ॥ २५ ॥ तैसें या जगासि जाहलें । तूंतें देखोनि तळमळित ठेलें । यामाजीं पैल भले । ज्ञानसुरांचें मेळावे ॥ २६ ॥

अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति ।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥ २१ ॥

हे तुझेनि आंगिकें तेजें । जाळूनि सर्व कर्मांचीं बीजें । मिळत तुजआंतु निजें । सद्भावेसीं ॥ २७ ॥ आणिक एक सावियां भयभीरु । सर्वस्वें धरूनि तुझी मोहरु । तुज प्रार्थितातिकरु । जोडोनियां ॥ २८ ॥ देवा अविद्यार्णवीं पडिलों । जी विषयवागुरें आंतुडलों । स्वर्गसंसाराचां सांकडलों । दोन्हीं भागीं ॥ २९ ॥ ऐसा आमुचें सोडवणें । तुजवांचोनि कीजेल कवणें । तुज शरण गा सर्वप्राणें । म्हणत देवा ॥ ३३० ॥ आणि महर्षी अथवा सिद्ध । कां विद्याधरसमूह विविध । हे बोलत तुज स्वस्तिवाद । करिती स्तवन ॥ ३१ ॥

रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥

हे रुद्रादित्यांचे मेळावे । वसु हन साध्य आघवे । अश्विनौदेव विश्वदेव विभवें । वायुहि हे जी ॥ ३२ ॥ अवधारा पितर हन गंधर्व । पैल यक्षरक्षोगण सर्व । जी महेंद्रमुख्य देव । कां सिद्धादिक ॥ ३३ ॥ हे आघवेची आपुलां लोकीं । सोत्कंठित अवलोकीं । हे महामूर्ती दैविकी । पाहत आहाती ॥ ३४ ॥ मग पाहात पाहात प्रतिक्षणीं । विस्मित होऊनि अंतःकरणीं । करित निजमुकटीं वोवाळणी । प्रभुजी तुज ॥ ३५ ॥ ते जय जय घोष कलरवें । स्वर्ग गाजविताती आघवे । ठेवित ललाटावरी बरवे । करसंपुट ॥ ३६ ॥ तिये विनयद्रुमाचिये आरवीं । सुरवाडली सात्त्विकांची माधवी । म्हणोनि करसंपुटपल्लवीं । तूं होतासि फळ ॥ ३७ ॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम् ॥ २३ ॥

जी लोचना भाग्य उदेलें । जीवा सुखाचें सुयाणें पाहलें । जे अगाध तुझें देखिलें । विश्वरूप इहीं ॥ ३८ ॥ हें लोकत्रयव्यापक रुपडे । पाहतां देवांही वचक पडे । याचे सन्मुखपण जोडे । भलतयाकडुनी ॥ ३९ ॥ ऐसें एकचि परि विचित्रें । आणि भयानकें तेवींची बहु वक्त्रें । बहुलोचन हे सशस्त्रें । अनंतभुजा ॥ ३४० ॥ हे अनंत चारु बाहु चरण । बहु उदर आणि नानावर्ण । कैसें प्रतिवदनीं मातलेपण । आवेशाचें ॥ ४१ ॥ हो कां जे महाकल्पांचां अंती । तवकलेनि यमें जेउततेउतीं । प्रळयाग्नींची उजिती । आंबुखिलीं जैसीं ॥ ४२ ॥ नातरी

संहारत्रिपुरारीचीं यंत्रें । कीं प्रळयभैरवांचीं क्षेत्रें । नाना युगांतशक्तीचीं पात्रें । भूतखिचा वोढविलीं ॥ ४३ ॥ तैसीं जियेतियेकडे । तुझी वक्त्रें जीं प्रचंडें । न समाती दरीमाजीं सिंहाडे । तैसे दांत दिसती रागीट ॥ ४४ ॥ जैसें काळरात्रीचेनि अंधारें । उल्हासत निघती संहारखेंचरें । तैसिया वदनीं प्रळयरुधिरें । काटलिया दाढा ॥ ४५ ॥ हें असो काळें अवंतिलें रण । कां सर्वसंहारें मातलें मरण । तैसें अतिभिंगुळवाणेपण । वदनीं तुझिये ॥ ४६ ॥ हे बापडीं लोकसृष्टी । मोटकीये येवि पाहिली दिठी । आणि दुःखकालिंदीचां तटीं । झाड होऊनि ठेली ॥ ४७ ॥ तुज महामृत्यूचां सागरीं । हे त्रैलोक्यजीविताची तरी । शोकदुर्वातलहरी । आंदोळत असे ॥ ४८ ॥ एथ कोपोनि जरी वैकुंठें । ऐसें हन म्हणिपैल अवचटें । जें तुज लोकांचें काइ वाटे । तूं ध्यानसुख हें भोगीं ॥ ४९ ॥ वरी जी लोकांचें कीर साधारण । वायां आड सूतसें वोडण । केवीं सहसा म्हणें प्राण । माझेचि कांपती ॥ ३५० ॥ ज्या मज संहाररुद्र वासिपे । ज्या मजभेणें मृत्यु लपे । तो मी अहाळबहाळी कांपें । ऐसें तुवां केलें ॥ ५१ ॥ परि नवल बापा हे महामारी । इया नाम विश्वरूप जरी । हे भ्यासुरपणें हारी । भयासि आणी ॥ ५२ ॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ॥ २४ ॥

ठेलीं महाकाळेंसि हटेंतटें । तैसीं कितीएकें मुखें रागिटें । इहीं वाढोनियां धाकुटें । आकाश केलें ॥ ५३ ॥ गगनाचेनि वाडपणें नाकळें । त्रिभुवनींचियाही वारिया न वेटाळे । ययाचेनि वाफा आगी जळे । कैसें धडाडीत असे ॥ ५४ ॥ तेवींचि एकसारिखें एक नोहे । एथ वर्णावर्णाचा भेदु आहे । हो कां जे प्रळयीं सावावो लाहे । वन्हि ययाचा ॥ ५५ ॥ जयाचिये आंगींची दीप्ती येवढी । जे त्रैलोक्य कीजे राखोंडी । कीं तयाही तोंडें आणि तोंडी । दांत दाढा ॥ ५६ ॥ कैसा वारया धनुर्वात चढला । समुद्र कीं महापुरीं पाडिला । विषाग्नि मारा प्रवर्तला । वडवानळासी ॥ ५७ ॥ हळाहळ आगीं पियालें । नवल मरण मारा पेटलें । तैसें संहारतेजा या जाहलें । वदन देखा ॥ ५८ ॥ परी कोणें मानें विशाळ । जैसें तुटिलिया अंतराळ । आकाशासि कव्हळ । पडोनि ठेलें ॥ ५९ ॥ नातरी काखे सूनि वसुंधरी । जै हिरण्याक्षु रिगाला विवरीं । तैं उघडलें हाटकेश्वरीं । जेवीं पाताळकुहर ॥ ३६० ॥ तैसा वक्त्रांचा विकाशु । माजीं जिव्हांचा आगळाचि आवेशु । विश्व न पुरे म्हणोनि घांसु । न भरीचि कोडें ॥ ६१ ॥ आणि पाताळव्याळांचां फूत्कारीं । गरळज्वाळा लागती अंबरीं । तैसी पसरलिये वदनदरी - । माजीं हे जिव्हा ॥ ६२ ॥ काढूनि प्रळयविजूंचीं जुंबाडें । जैसे पन्नासिले गगनाचे हुडे । तैसे आवाळुवांवरी आंकडे । धगधगीत दाढांचे ॥ ६३ ॥ आणि ललाटपटाचिये खोळे । कैसें भयातें भेडवितातीं डोळे । हो कां जे महामृत्यूचे उमाळे । कडवसां राहिले ॥ ६४ ॥ ऐसें वाऊनि महाभयाचें भोज । एथ काय निपजवूं पाहतोसि काज । तें नेणें परी मज । मरणभय आलें ॥ ६५ ॥ देवा विश्वरूप पहावयाचें डोहळे । केले तियें पावलों प्रतिफळें ।

बापा देखलासि आतां डोळे । निवावे तैसे निवाले ॥ ६६ ॥ अहो देहो पार्थिव कीर जाये । ययाची काकुळती कवणा आहे । परि आतां चैतन्य माझें विपायें । वांचे कीं न वांचे ॥ ६७ ॥ एऱ्हवीं भयास्तव आंग कांपे । नावेक आगळें तरी मन तापे । अथवा बुद्धिही वासिपे । अभिमानु विसरिजे ॥ ६८ ॥ परी येतुलियाही वेगळा । जो केवळ आनंदैककळा । तया अंतरात्मयाही निश्चळा । शियारी आली ॥ ६९ ॥ बाप साक्षात्काराचा वेधु । कैसा देशधडी केला बोधु । हा गुरुशिष्यसंबंधु । विपायें नांदे ॥ ३७० ॥ देवा तुझ्या ये दर्शनीं । जें वैकल्य उपजलें आहे अंत:करणीं । तें सांवरावयालागीं गंवसणी । धैर्याची करितसें ॥ ७१ ॥ तंव माझेनि नामें धैर्य हारपलें । कीं तयाहीवरी विश्वरूपदर्शन जाहलें । हें असो परि मज भले आतुडविलें । उपदेशासी ॥ ७२ ॥ जीव विसंवावयाचिया चाडा । धांवाधांवी करितसे बापुडा । परि सोय ही कवणेकडा । न लभे एथ ॥ ७३ ॥ ऐसें विश्वरूपाचिया महामारी । जीवित्व गेलें आहे चराचरीं । जी न बोलें तरि काय करी । कैसेंनि राहें ॥ ७४ ॥

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।
दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥

पैं अखंड डोळ्यांपुढें । फुटलें जैसें महाभयाचें भांडें । तैशीं तुझीं मुखें वितंडें । पसरलीं देखें ॥ ७५ ॥ असो दांतदाढांचीं दाटी । न झांकवे मा दों दों वोठीं । सैंघ प्रळयशस्त्रांचिया दाट कांटी । लागलिया जैशा ॥ ७६ ॥ जैसें तक्षका विष भरलें । कां जे काळरात्रीं भूत संचरलें । कीं अग्नेयास्त्र परजिलें । वज्राग्नि जैसें ॥ ७७ ॥ तैशीं तुझीं वक्त्रें प्रचंडे । वरी आवेश हा बाहेरी वोसंडे । आले मरणरसाचे लोंढे । आम्हावरी ॥ ७८ ॥ संहारसमयींचा चंडानिळु । आणि महाकल्पांत प्रळयानळु । या दोहीं जैं होय मेळु । तैं काय एक न जळे ॥ ७९ ॥ तैसीं संहारकें तुझीं मुखें । देखोनि धीरु कां आम्हां पारुखे । आतां भुललों मी दिशा न देखें । आपणपें नेणें ॥ ३८० ॥ मोटकें विश्वरूप डोळां देखिलें । आणि सुखाचें अवर्षण पडिलें । आता जापाणीं जापाणीं आपुलें । अस्ताव्यस्त हें ॥ ८१ ॥ ऐसें करिसी म्हणोनि जरि जाणें । तरि हे गोष्टि सांगावी कां मी म्हणें । आतां एक वेळ वाचवीं जी प्राणें । या स्वरूपप्रळयापासोनि ॥ ८२ ॥ जरी तूं गोसावी आमुचा अनंता । तरि सुईं वोडण माझिया जीविता । सांटवी पसारा हा मागुता । महामारीचा ॥ ८३ ॥ आइकें सकळ देवांचिया परदेवते । तुवां चैतन्यें गा विश्व वसतें । तें विसरलासी हें उपरतें । संहारूं आदरिलें ॥ ८४ ॥ म्हणोनि वेगीं प्रसन्न होईं देवराया । संहरीं संहरीं आपुली माया । काढीं मातें महाभया - । पासोनिया ॥ ८५ ॥ हा ठायवरी पुढतपुढती । तूंतें म्हणिजे बहुवा काकुळती । ऐसा मी विश्वमूर्ती । भेडका जाहलों ॥ ८६ ॥ जैं अमरावतीये आला धाडा । तैं म्यां एकलेनि केला उवेडा । जो मी काळाचियाही तोंडा । वसिपु न धरीं ॥ ८७ ॥ परि तया आंतुल नव्हे हे देवा । एथ मृत्यूसही करूनि चढावा । तुवां आमुचाचि घोटु भरावा ।

या सकल विश्वेंसीं ॥ ८८ ॥ कैसा नव्हता प्रळयाचा वेळु । गोखा तूंचि मिनलासि काळु । बापुडा हा त्रिभुवनगोळु । अल्पायु जाहला ॥ ८९ ॥ अहा भाग्या विपरीता । विघ्न उठिलें शांत करितां । कटकटा विश्व गेलें आतां । तूं लागलासि ग्रासूं ॥ ३९० ॥ हे नव्हे मा रोकडें । सैंघ पसरूनिया तोंडें । कवळितासि चहूंकडे । सैन्यें इयें ॥ ९१ ॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसङ्घैः ।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ २६ ॥

नोहेति हे कौरवकुळींचें वीर । आंधळिया धृतराष्ट्राचे कुमर । हे गेले गेले सपरिवार । तुझां वदनीं ॥ ९२ ॥ आणि जे जे यांचेनि सांवायें । आले देशोदेशींचे राये । तयांचें सांगावया जावों न लाहे । ऐसें सरकटितु आहासी ॥ ९३ ॥ मदमुखाचिया संघटा । घेत आहासि घटघटां । अधोरणीं हन थाटा । देतोसि मिठी ॥ ९४ ॥ जंत्रावरिचील मार । पदातींचे मोगर । मुखाआंत भार । हारपताति मा ॥ ९५ ॥ कृतांताचिया जावळी । जें एकचि विश्वातें गिळी । तियें कोटीवरील सगळीं । गिळितासि शस्त्रें ॥ ९६ ॥ चतुरंगा परिवारा । संजोडियां रहंवरां । दांत न लाविसी मा परमेश्वरा । कैसा तुष्टलासि बरवा ॥ ९७ ॥ हां गा भीष्माऐसा कवणु । सत्यशौर्यनिपुणु । तोही आणि ब्राह्मण द्रोणु । ग्रासिलासि कटकटा ॥ ९८ ॥ अहा सहस्त्रकरांचा कुमरु । एथ गेला गेला कर्णवीरु । आणि आमुचिया आघवयांचा केरु । फेडिला देखें ॥ ९९ ॥ कटकटा धातया । कैसें जाहलें अनुग्रहा यया । मियां प्रार्थूनि जगा बापुडिया । आणिलें मरण ॥ ४०० ॥ मागां थोडियां बहुवा उपपत्ती । येणें सांगितलिया विभूती । तैसा नसेचि मा पुढती । बैसलों पुसों ॥ १ ॥ म्हणोनि भोग्य तें त्रिशुद्धी न चुके । आणि बुद्धिही होणारासारिखी ठाके । माझां कपाळीं पिटावें लोकें । तें लोटेल काह्या ॥ २ ॥ पूर्वीं अमृतही हातां आलें । परि देव नसतीचि उगले । मग काळकूट उठविलें । शेवटी जैसें ॥ ३ ॥ परि तें एकबगीं थोडें । केलिया प्रतिकारामाजिवडें । आणि तिये अवसरींचें तें सांकडें । निस्तरविलें शंभू ॥ ४ ॥ आतां हा जळता वारा कें वेंटाळें । कोणाही विषा भरलें गगन गिळे । महाकाळेंसि खेळें । आंगवत असे ॥ ५ ॥ ऐसा अर्जुन दुःखें शिणतु । शोचित असे जिवाआंतु । परि न देखे तो प्रस्तुतु । अभिप्रावो देवाचा ॥ ६ ॥ जे मी मारिता हे कौरव मरते । ऐसेनि वेंटाळिला होता मोहें बहुतें । तो फेडावयालागीं अनंतें । हें दाखविलें निज ॥ ७ ॥ अरे कोण्ही कोणातें न मारी । एथ मीचि हो सर्व संहारीं । हें विश्वरूपव्याजें हरी । प्रकटित असे ॥ ८ ॥ परि वायांचि व्याकुळता । ते न चोजवेचि पंडुसुता । मग अहा कंपु नव्हता । वाढवित असे ॥ ९ ॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति दंष्ट्राकरालानि भयानकानि ।
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः ॥ २७ ॥

तेथ म्हणे पाहा हो एके वेळे । सासिकवचेंसि दोन्ही दळें । वदनीं गेलीं आभाळें । गगनीं कां जैसीं ॥ ४१० ॥ कां महाकल्पाचां शेवटीं । जैं कृतांतु कोपला होय सृष्टी । तैं एकविसाही

स्वर्गा मिठी । पाताळासकट दे ॥ ११ ॥ नातरी उदासीनें दैवें । संचकाचीं वैभवें । जेथींचीं तेथ स्वभावें । विलया जाती ॥ १२ ॥ तैसीं सांचलीं सैन्यें एकवाटें । इये मुखीं जाहलीं प्रविष्टें । परि एकही तोंडौनि न सुटे । कैसें कर्म देखा ॥ १३ ॥ अशोकाचे अंगवसे । चघळिले कन्हेनि जैसे । वक्त्रामाजीं तैसे । वायां गेले ॥ १४ ॥ परि सिसाळें मुकुटेंसीं । पडिलीं दाढांचां सांडसीं । पीठ होत कैसीं । दिसत आहाती ॥ १५ ॥ तियें रत्नें दांताचिये सवडी । कूट लागलें जिभेचां बुडीं । कांहीं कांहीं आगरडीं । द्रंष्ट्रांची माखलीं ॥ १६ ॥ हो कां जे विश्वरूपें काळें । ग्रासिलीं लोकांची शरीरें बळें । परि जीवदेहींचीं सिसाळें । अवश्य कीं राखिलीं ॥ १७ ॥ तैसीं शरीरामाजीं चोखडीं । होतीं उत्तमांगें इयें फुडीं । म्हणोनि महाकाळाचांहि तोंडीं । परि उरली शेखीं ॥ १८ ॥ मग म्हणे हें काई । जन्मलयां आन मोहरचि नाहीं । जग आपैसेंचि वदनडोहीं । संचरताहे ॥ १९ ॥ या आघवियाचि सृष्टी । लागलिया आहाति वदनाचां वाटीं । आणि हा जेथिंचिया तेथ मिठी । देतसे उगला ॥ ४२० ॥ ब्रह्मादिक समस्त । उंच मुखामाजीं धांवत । येर सामान्य हे भरत । ऐलीच वदनीं ॥ २१ ॥ आणीकही भूतजात । तें उपजलेचि ठायीं ग्रासित । परि याचिया मुखा निभ्रांत । न सुटेचि कांहीं ॥ २२ ॥

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।
तथा तवामी नरलोकवीरा विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ॥ २८ ॥

जैसे महानदीचे वोघ । वहिले ठाकिती समुद्राचें आंग । तैसें आघवांचिकडूनि जग । प्रवेशत मुखीं ॥ २३ ॥ आयुष्यपंथें प्राणिगणीं । करोनि अहोरात्रांची सोवाणी । वेगें वक्त्रमिळणीं । साधिजत आहाती ॥ २४ ॥

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा विशन्ति नाशाय समृद्धवेगाः ।
तथैव नाशाय विशन्ति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥ २९ ॥

जळतया गिरीचिया गवखा - । माजीं घापती पतंगाचिया झाका । तैसे समग्र लोक देखा । इये वदनीं पडत ॥ २५ ॥ परि जेतुलें येथ प्रवेशलें । तेतुलया लोहें पाणिचि पां गिळिलें । वहिवटींहि पुसिलें । नामरूप तयांचें ॥ २६ ॥

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥ ३० ॥

आणि येतुलाही आरोगण । करितां भुके नाहीं उणेपण । कैसें दीपन असाधारण । उदयलें यया ॥ २७ ॥ जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला । का भणगां दुष्काळु पाहला । तैसा जिभांचा लळलळाटु देखिला । आवाळुवें चाटितां ॥ २८ ॥ तैसें आहाराचेन नांवें कांहीं । तोंडापासूनि उरलेंचि नाहीं । कैसी समसमित नवाई । भुकेलेपणाची ॥ २९ ॥ काय सागराचा घोंटु भरावा । कीं पर्वताचा घांसु करावा । ब्रह्मकटाहो घालावा । आवघाचि दाढे ॥ ४३० ॥ दिशा सगळियाचि गिळाविया ।

चांदिणिया चाटूनि घ्याविया। ऐसें वर्तते आहे साविया। लौलुप्य बा तुज ॥ ३१ ॥ जैसा भोगीं कामु वाढे। कां इंधनें आगीसि हाकाक चढे। तैसीं खातखातांचि तोंडें। खाखातें ठेलीं ॥ ३३ ॥ कैसें एकचि केवढें पसरलें। त्रिभुवन जिव्हाग्रीं आहे टेकलें। जैसें कां कवींठ घातलें। वडवानळीं ॥ ३३ ॥ ऐसीं अपारें वदनें। आतां येतुलीं कैचीं त्रिभुवनें। कां आहारु न मिळतां येणें मानें। वाढविलीं असह्या ॥ ३४ ॥ अगा हा लोकु बापुडा। जाहला वदनज्वाळां वरपडा। जैसीं वणवेयाचिया वेढां। सांपडती मृगें ॥ ३५ ॥ आतां तैसें विश्वासि जाहालें। देवो नव्हे हें कर्म आलें। कीं जगजळचरां पांगिलें। काळजाळें ॥ ३६ ॥ आतां इये अंगप्रभेचिये वागुरे। कोणीकडूनि निगिजैल चराचरें। वक्त्रें नव्हतीं जोहरें। वोडवलीं जगा ॥ ३७ ॥ आगी आपुलेनि दाहकपणें। कैसेनि पोळिजे तें नेणे। परि जया लागे तया प्राणें। सुटिका नाहीं ॥ ३८ ॥ माझेनि तिखटपणें। कैसें निवटे हें शस्त्र कायि जाणे। कां आपुलिया मारा नेणे। विष जैसें ॥ ३९ ॥ तैसी तुज कांही। आपुलिया उग्रपणाची सेचि नाहीं। परि ऐलीकडे मुखीं खाई। हों सरली जगाची ॥ ४४० ॥ अगा आत्मा तूं एकु। सकळविश्वव्यापकु। तरी का आम्हां अंतकु। वोडवलासी ॥ ४१ ॥ तरि मियां सांडिली जीविताची चाड। आणि तुवांही न धरावी भीड। मनीं आहे तें उघड। बोल पां सुखें ॥ ४२ ॥ किती वाढविसी या उग्ररूपा। अंगीचें भगवंतपण आठवीं बापा। नाहीं तरि कृपा। मजपुरतीं पाहीं ॥ ४३ ॥

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ३१ ॥

परि एक वेळ वेदवेद्या। त्रिभुवनाचिया आद्या। विनवणी विश्ववंद्या। आइकें माझी ॥ ४४ ॥ ऐसें बोलोनि वीरें। चरण नमस्कारिलें शिरें। मग म्हणे तरि सर्वेश्वरें। अवधारिजो ॥ ४५ ॥ मियां होआवया समाधान। पुसिलें विश्वरूपध्यान। आणि एकें काळें त्रिभुवन। गिळितुचि उठिलासी ॥ ४६ ॥ तरि तूं कोण कां येतुलीं। इयें भ्यासुरें मुखें कां मेळविलीं। आघवांचि करीं परिजिलीं। शस्त्रें काह्या ॥ ४७ ॥ जी जंव तंव रागींटपणें। वाढोनि गगना आणितोसि उणें। कां डोळे करूनि भिंगुळवाणे। भेडसावीत आहासी ॥ ४८ ॥ एथ कृतांतेंसीं देवा। कासया किजतसे हेवा। हा आपुला तुवां सांगावा। अभिप्राय मज ॥ ४९ ॥ या बोला म्हणे अनंतु। मी कोण हे आहासी पुसतु। आणि कायिसयालागीं असे वाढतु। उग्रतेसीं ॥ ४५० ॥

श्रीभगवानुवाच : कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥ ३२ ॥

तरि मी काळु गा हें फुडें। लोक संहारावयालागीं वाढें। सैंघ पसरिलीं आथि तोंडें। आतां ग्रासीन हें आघवें ॥ ५१ ॥ तेथ अर्जुन म्हणे कटकटां। उबगिलों मागिल्या संकटा। म्हणोनि आळविला तंव वोखटा। उधाइला हा ॥ ५२ ॥ तेवींचि कठिण बोलें आसतुटी। अर्जुन होईल

हिंपुटी । म्हणोनि सवेंचि म्हणे किरीटी । परि आन एक असे ॥ ५३ ॥ तरि आतांचि ये संहारवाहरे । तुम्ही पांडव असा बाहिरे । तेथ जातजात धनुर्धरें । सांवरिले प्राण ॥ ५४ ॥ होता मरणमहामारीं गेला । तो मागुता सावधु जाहला । मग लागला बोला । चित्त देऊं ॥ ५५ ॥ ऐसें म्हणिजत आहे देवें । अर्जुना तुम्ही माझें हें जाणावें । येर जाण मी आघवें । सरलों ग्रासूं ॥ ५६ ॥ वज्रानळीं प्रचंडीं । जैसी घापे लोणियाची उंडी । तैसें जग हें माझां तोंडीं । तुवां देखिलें जें ॥ ५७ ॥ तरि तयामाझारीं कांहीं । भरंवसेनि उणें नाहीं । इयें वायांचि सैन्यें पाहीं । वल्गिजत आहाती ॥ ५८ ॥ हे जे मिळोनियां मेळे । कुंथती वीरवृत्तीचेनि बळें । यमावरी गजदळें । वाखाणिजताती ॥ ५९ ॥ म्हणती सृष्टीवरी सृष्टी करूं । आण वाहूनि मृत्यूतें मारूं । जगाचा भरूं । घोटु यया ॥ ४६० ॥ पृथ्वी सगळीचि गिळूं । आकाश वरिच्यावरि जाळूं । काई बाणवरी खिळूं । वारयातें ॥ ६१ ॥ ऐशा चतुरंगाचिया संपदा । करित महाकाळेंसीं स्पर्धा । वांटिवेचिया मदा । वळघले जे ॥ ६२ ॥ बोल हतियेराहूनि तिखट । दिसती अग्निपरिस दासट । मारकपणें काळकूट । महुर म्हणत ॥ ६३ ॥ तरि हे गंधर्वनगरींचें उमाळे । जाण पोकळीचे पेंडवळे । अगा चित्रींचीं फळें । वीर हे देखें ॥ ६४ ॥ हा मृगजळाचा पूर आला । दळ नव्हे कापडाचा साप केला । इया शृंगारूनियां खाला । मांडिलिया पैं ॥ ६५ ॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहता: पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥

येर चेष्टवितें जें बळ । तें मियां मागांचि ग्रासिलें सकळ । आतां कोलौरीचे वेताळ । तैसे निर्जीव हे आहाती ॥ ६६ ॥ हालविती दोरी तुटली । तरि तियें खांबावरील बाहुलीं । भलतेणें लोटिलीं । उलथोनि पडती ॥ ६७ ॥ तैसा सैन्याचा यया बगा । मोडतां वेळु न लागेल पैं गा । म्हणोनि उठीं उठीं वेगा । शाहाणा होई ॥ ६८ ॥ तुवां गोग्रहणाचेनि अवसरें । घातलें मोहनास्त्र एकसरें । मग विराटाचेनि महाभेडें उत्तरें । आसडूनि नागाविलें ॥ ६९ ॥ आतां हें त्याहूनि निपटारें जाहलें । निवटीं आयितें रण पडिलें । घेई यश रिपु जिंतिले । एकलेनि अर्जुनें ॥ ४७० ॥ आणि कोरडें यशचि नोहे । समग्र राज्यही आलें आहे । तूं निमित्तमात्रचि होये । सव्यसाची ॥ ७१ ॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥ ३४ ॥

द्रोणाचा पाडु न करीं । भीष्माचें भय न धरीं । कैसेनि कर्णावरी । परजूं हें न म्हण ॥ ७२ ॥ कोण उपायो जयद्रथा कीजे । हें न चिंतू चित्त तुझें । आणिकही आथि जे जे । नावाणिगे वीर ॥ ७३ ॥ तेही एक एक आघवे । चित्रींचे सिंहाडे मानावे । जैसे वोलेनि हातें घ्यावे । पुसोनियां ॥ ७४ ॥ यावरी पांडवा । कायसा झुंजाचा मेळावा । हा आभासु गा आघवा । येर ग्रासिलें मियां ॥ ७५ ॥ जेव्हां तुवां देखिले । हे माझां वदनीं पडिले । तेव्हाचि यांचें आयुष्य सरलें । आतां रितीं

सोपें ॥ ७६ ॥ म्हणोनि वहिला उठीं । मियां मारिले तूं निवटीं । न रिगे शोकसंकटीं । नाथिलिया ॥ ७७ ॥ आपणचि आडखिळा कीजे । तो कौतुकें जैसा विंधोनि पाडिजे । तैसें देखें गा तुझें । निमित्त आहे ॥ ७८ ॥ बापा विरुद्ध जें जाहलें । तें उपजतांचि वाघें नेलें । आतां राज्येंशीं संचलें । यश तूं भोगीं ॥ ७९ ॥ सावियांचि उतत होते दायाद । आणि बळिये जगीं दुर्मद । ते वधिलें विशद । सायासु न लागतां ॥ ४८० ॥ ऐसिया इया गोष्टी । विश्वाचां वाक्पटीं । लिहूनि घालीं किरीटी । विजयी होई ॥ ८१ ॥

संजय उवाच : एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी ।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ३५ ॥

ऐसी आघवीचि हे कथा । तया अपूर्णमनोरथा । संजयो सांगे कुरुनाथा । ज्ञानदेवो म्हणे ॥ ८२ ॥ मग सत्यलोकौनि गंगाजळ । सुटलिया वाजत खळाळ । तैशी वाचा विशाळ । बोलतां तया ॥ ८३ ॥ नातरी महामेघांचे उमाळे । घडघडीत एके वेळे । घुमघुमिला मंदराचळें । क्षीराब्धी जैसा ॥ ८४ ॥ तैसें गंभीरें महानादें । हें वाक्य विश्वकंदें । बोलिलें अगाधें । अनंतरूपें ॥ ८५ ॥ तें अर्जुनें मोटकें ऐकिलें । आणि सुख कीं भय दुणावलें । हें नेणों परि कापिन्नलें । सर्वांग तयाचें ॥ ८६ ॥ सखोलपणें वळली मोट । आणि तैसेचि जोडले करसंपुट । वेळोवेळां ललाट । चरणीं ठेवीं ॥ ८७ ॥ तेवींचि काहीं बोलों जाये । तंव गळा बुजालाचि ठाये । हें सुख कीं भय होये । हें विचारा तुम्ही ॥ ८८ ॥ परि तेव्हा देवाचेनि बोलें । अर्जुना हें ऐसें जाहलें । मियां पदांवरि देखिलें । श्लोकाचिया ॥ ८९ ॥ मग तैसाचि भेणभेण । पुढती जोहारूनि चरण । मग म्हणे जी आपण । ऐसें बोलिलेति ॥ ४९० ॥

अर्जुन उवाच : स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः ॥ ३६ ॥

ना अर्जुना मी काळु । आणि ग्रासिजे तो माझा खेळु । हा बोल कीर अढळु । मानूं आम्ही ॥ ९१ ॥ परि तुवां जी काळें । आजि स्थितीचिये वेळे । ग्रासिजे हें न मिळे । विचारासी ॥ ९२ ॥ कैसेनि आंगींचें तारुण्य मोडावें । कैचें नव्हे तें वार्धक्य काढावें । म्हणोनि करूं म्हणसी तें नव्हें । बहुतकरुनी ॥ ९३ ॥ हां जी चौपाहारी न भरतां । कोणेही वेळे श्रीअनंता । काय माध्यान्हीं सविता । मावळतु आहे ॥ ९४ ॥ पैं तुज अखंडिता काळा । तिन्ही आहाती जी वेळां । त्या तिन्ही परी सबळा । आपुलालां समयीं ॥ ९५ ॥ जे वेळीं हो लागे उत्पत्ती । ते वेळीं स्थिति प्रळयो हारपती । आणि स्थितिकाळीं न मिरविती । उत्पत्ति प्रळयो ॥ ९६ ॥ पाठीं प्रळयाचिये वेळे । उत्पत्ति स्थिति मावळे । हें कायसेनही न ढळे । अनादि ऐसे ॥ ९७ ॥ म्हणोनि आजि तरी भरें भोगें । स्थिति वर्तिजत आहे जगें । एक ग्रसिसी तूं हें नलगे । माझां जीवीं ॥ ९८ ॥ तंव संकेतें देव बोले । अगा या दोन्ही सैन्यांसीचि मरण पुरलें । तें प्रत्यक्ष तुज दाविलें । येर यथाकाळें

जाण ॥ ९९ ॥ हा संकेतु जंव अनंता । वेळु लागला बोलतां । तंव अर्जुनें लोकु मागुता । देखिला यथास्थिति ॥ ५०० ॥ मग म्हणतसे देवा । तूं सूत्री विश्वलाघवा । जग आला मा आघवा । पूर्वस्थिती पुढती ॥ १ ॥ परि पडिलिया दुःखसागरीं । तूं काढिसी कां जयापरी । ते कीर्ती तुझी हरी । आठवित असें ॥ २ ॥ कीर्ती आठवितां वेळोवेळां । भोगितसें महासुखाचा सोहळा । तेथ हर्षामृतकल्लोळा । वरि लोळत आहों ॥ ३ ॥ देवा जियालेपणें जग । धरी तुझां ठायीं अनुराग । आणि दुष्टां तयां भंग । अधिकाधिक ॥ ४ ॥ पैं त्रिभुवनींचिया राक्षसां । महाभय तूं हृषीकेशा । म्हणोनि पळताती दाही दिशां । पैलीकडे ॥ ५ ॥ येर सुर सिद्ध किन्नर । किंबहुना चराचर । ते तुज देखोनि हर्षनिर्भर । नमस्कारित असती ॥ ६ ॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनन्त देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥

एथ गा कवणा कारणा । राक्षस हे नारायणा । न लगतीची चरणा । पळते जाहले ॥ ७ ॥ आणि हें तूतें काइ पुसावें । येतुलालें आम्हांसिही जाणवे । तरी सुर्योदयीं राहावें । कैसेनि तमें ॥ ८ ॥ तूं स्वप्रकाशाचा आगरु । आणि जाला आहासि गोचरु । म्हणोनिया निशाचरां केरु । फिटला सहजे ॥ ९ ॥ हें येतुले दिवस आम्हां । कांहीं नेणवेचि श्रीरामा । आतां देखतसों महिमा । गंभीर तुझा ॥ ५१० ॥ जेथूनि नाना सृष्टीचिया वोळी । पसरती भूतग्रामाचिया वेली । तया महद्ब्रह्मातें व्याली । दैविकी इच्छा ॥ ११ ॥ देवो निःसीमतत्त्व सदोदितु । देवो निःसीमगुण अनंतु । देवो निःसीमसाम्य सततु । नरेंद्र देवांचा ॥ १२ ॥ जी तूं त्रिजगतिये वोलावा । अक्षर तूं सदाशिवा । तूंचि संतासंत देवा । तयाही अतीत तें तूं ॥ १३ ॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥ ३८ ॥

प्रकृतिपुरुषांचा आदी । जी महतत्त्वां तूंचि अवधी । स्वयें तूं अनादी । पुरातनु ॥ १४ ॥ सकळ विश्वजीवन । जीवांसि तूंचि निधान । भूतभविष्याचें ज्ञान । तुझांचि हातीं ॥ १५ ॥ जी श्रुतीचिया लोचना । स्वरूपसुख तूं अभिन्ना । त्रिभुवनाचिया आयतना । आयतन तूं ॥ १६ ॥ म्हणोनि जी परम । तूंतें म्हणिजे महाधाम । कल्पांतीं महद्ब्रह्म । तुजमाजी रिगे ॥ १७ ॥ किंबहुना देवें । विश्व विस्तारिलें आहे आघवें । अनंतरूपा वानावें । कवणें तूंतें ॥ १८ ॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ ३९ ॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ४० ॥

जी काय एक तूं नव्हसी । तूं कवणे ठायीं गा नससी । हें असो जैसा आहासी । तैसिया नमो

॥ १९ ॥ वायु तूं अनंता । यम तूं नियमिता । प्राणिगणीं वसता । अग्नि जी तूं ॥ ५२० ॥ वरुण तूं सोम । स्त्रष्टा तूं ब्रह्म । पितामहाचाही परम । आदिजनक तूं ॥ २१ ॥ आणिकही जें जें कांहीं । रूप आथि अथवा नाहीं । तया नमो तुज तैसयाही । जगन्नाथा ॥ २२ ॥ ऐसें सानुरागें चित्तें । स्तवन केलें पांडुसुतें । मग पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २३ ॥ पाठी तिये साद्यंतें । न्याहाळीं श्रीमूर्तीतें । आणि पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २४ ॥ पाहतां पाहतां प्रांतें । समाधान पावे चित्तें । आणि पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २५ ॥ इये चराचरीं समस्ते । अखंडिता देखे तयांतें । आणि पुढती म्हणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥२६ ॥ ऐसीं रूपें तियें अद्भुतें । आश्चर्ये स्फुरती अनंतें । तंव तंव नमस्ते । नमस्तेचि म्हणे ॥ २७ ॥ आणिक स्तुति नाठवे । आणि निवांताही न बसवे । नेणों कैसा प्रेमभावें । गाजोंचि लागे ॥ २८ ॥ किंबहुना इयापरी । नमन केलें सहस्त्रावरी । कीं पुढती म्हणे श्रीहरी । तुज सन्मुखा नमो ॥ २९ ॥ देवासि पाठीपोट आथि कीं नाहीं । येणें उपयोगु आम्हां काई । तरी तुज पाठिमोरेयाही । नमो स्वामी ॥ ५३० ॥ उभा माझिये पाठीसीं । म्हणोनि पाठीमोरें म्हणावें तुम्हांसी । सन्मुख विन्मुख जगेंसीं । न घडे तुज ॥ ३१ ॥ आतां वेगळालिया अवयवां । नेणें रूप करूं देवा । म्हणोनि नमो तुज सर्वा । सर्वात्मका ॥ ३२ ॥ जी अनंतबळसंभ्रमा । तुज नमो अमितविक्रमा । सकळकाळीं समा । सर्वदेवा ॥ ३३ ॥ आघवां अवकाशीं जैसें । अवकाशचि होऊनि आकाश असे । तूं सर्वपणें तैसें । पातलासि सर्व ॥ ३४ ॥ किंबहुना केवळ । सर्व हें तूंचि निखिळ । परि क्षीरार्णवीं कल्लोळ । पयाचे जैसे ॥ ३५ ॥ म्हणोनियां देवा । तूं वेगळा नव्हसी सर्वां । हें आलें मज सद्भावा । आतां तूंचि सर्व ॥ ३६ ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ४१ ॥

परि ऐसिया तूतें स्वामी । कहींच नेणों जी आम्ही । म्हणोनि सोयरे संबंधधर्मीं । राहाटलों तुजसीं ॥ ३७ ॥ अहा थोर वाउर जाहलें । अमृतें संमार्जन म्यां केलें । वारिकें घेऊनि दिधलें । कामधेनूतें ॥ ३८ ॥ परिसाचा खडवाचि जोडला । कीं फोडोनि गाडोरा आम्हीं घातला । कल्पतरू तोडोनि केला । कुंपु शेता ॥ ३९ ॥ चिंतामणीची खाणी लागली । तेणेंवरी वोढाळें वील्हांटिलीं । तैसी तुझी जवळिक धाडिली । सांगातीपणें ॥ ५४० ॥ हें आजिचेंचि पाहें पां रोकडें । कवण झुंज हें केवढें । परि परब्रह्म तूं उघडें । सारथी केलासी ॥ ४१ ॥ ययां कौरवांचिया घरा । शिष्टाई धाडिलासि दातारा । ऐसा वणिजेसाठीं जागेश्वरा । विकलासि आम्हीं ॥ ४२ ॥ तूं योगियांचें समाधिसुख । कैसा जाणेचिना मी मूर्ख । उपरोधु जी सन्मुख । तुजसीं करूं ॥ ४३ ॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥

तूं या विश्वाची अनादि आदी । बैससी जियें सभासदीं । तेथें सोयरीकीचिया शब्दीं । रळीं

बोलों ॥ ४४ ॥ विपायें राउळा येवों । तरि तुझेंनि अंगें मानु पावों । मानसी तरी जावों । रुसोनि सलगी ॥ ४५ ॥ पायां लागोनि बुझावणी । तुझां ठायीं शार्ङ्गपाणी । पाहिजे ऐशी करणी । बहु केली आम्हीं ॥ ४६ ॥ स्वजनपणाचिया वाटा । तुजपुढें बैसें उफराटा । हा पाडु काय वैकुंठा । परि चुकलों जी ॥ ४७ ॥ देवेंसि कोलकाठी धरूं । आखाडां झोंबीलोंबी करूं । सारी खेळतां अस्करूं । निकरेंही भांडों ॥ ४८ ॥ चांग तें उराउरीं मागों । देवासि कीं बुद्धि सांगों । तेवींचि म्हणों काय लागों । तुझें आम्ही ॥ ४९ ॥ ऐसा अपराधु हा आहे । जो त्रिभुवनीं न समाये । जी नेणेंचि कां पाये । शिवतिले तुझे ॥ ५५० ॥ देवो बोनयाचां अवसरीं । लोभें कीर आठवण करी । परि माझा निसुग गर्व अवधारीं । जे फुगूनचि बैसें ॥ ५१ ॥ देवाचिया भोगायतनीं । खेळतां आशंकेना मनीं । जी रिगोनियां शयनीं । सरिसा पहुडें ॥ ५२ ॥ 'कृष्णा' म्हणोनि हाकारिजे । यादवपणें तूतें लेखिजे । आपली आण घालिजे । जातां तुज ॥ ५३ ॥ मज एकासनीं बैसणें । कां तुझा बोलु न मानणें । हें वोळखिचेनि दाटपणें । बहुत घडलें ॥ ५४ ॥ म्हणोनि काय काय आतां । निवेदिजेल अनंता । मी राशि आहें समस्तां । अपराधांची ॥ ५५ ॥ यालागीं पुढां अथवा पाठीं । जियें राहटलों बहुवें वोखटीं । तियें मायेचिया परी पोटीं । सामावीं प्रभो ॥ ५६ ॥ जी कोण्ही एके वेळे । सरिता घेउनि येती खडुळें । तियें सामाविजेति सिंधुजळें । आन उपायो नाहीं ॥ ५७ ॥ तैसीं प्रीती कां प्रमादें । देवेंसी मज विरुद्धें । बोलविलीं तियें मुकुंदें । उपसाहावीं जीं ॥ ५८ ॥ आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा । आधारु जाली आहे या भूतग्रामा । म्हणोनि पुरुषोत्तमा । विनवूं तें थोडें ॥ ५९ ॥ तरि आतां अप्रमेया । मज शरणागता आपुलिया । क्षमा कीजो जी यया । अपराधांसी ॥ ५६० ॥

पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥ ४३ ॥

जी जाणितलें मियां साचें । महिमान आतां देवाचें । देवो होय चराचराचें । जन्मस्थान ॥ ६१ ॥ हरिहरादि समस्तां । देवा तूं परम देवता । वेदांतेंहीं पढविता । आदिगुरु तूं ॥ ६२ ॥ गंभीर तूं श्रीरामा । नानाभूतैकसमा । सकळगुणीं अप्रतिमा । अद्वितिया ॥ ६३ ॥ तुजसी नाहीं सरिसें । हें प्रतिपादनचि कायसें । तुवा जालेनि आकाशें । सामाविलें जग ॥ ६४ ॥ तया तुझेनि पाडें दुजे । ऐसें बोलतांचि लाजिजे । तेथ अधिकचि कीजे । गोठी केवीं ॥ ६५ ॥ म्हणोनि त्रिभुवनीं तूं एकु । तुजसरिसा न अधिकु । तुझा महिमा अलौकिकु । नेणिजे वानू ॥ ६६ ॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ४४ ॥

ऐसें अर्जुनें म्हणितलें । मग पुढती दंडवत घातलें । तेथे सात्त्विकाचें आलें । भरतें तया ॥ ६७ ॥ मग म्हणतसे प्रसीद प्रसीद । वाचा होतसे सद्गद । काढीं जी अपराध - । समुद्रौनि

मातें ॥ ६८ ॥ तुज विश्वसुहृदातें कहीं । सोयरेपणें न मनूंचि पाहीं । तुज ईश्वरेश्वराचां ठायीं । ऐश्वर्य केलें ॥ ६९ ॥ तूं वर्णनीय परी लोभें । मातें वर्णिसी पां सभे । तरि मियां वल्गिजे क्षोभे । अधिकाधिक ॥ ५७० ॥ आतां ऐसऐसेया अपराधां । मर्यादा नाहीं मुकुंदा । म्हणोनि रक्ष रक्ष प्रमादा । पसावो म्हणुनी ॥ ७१ ॥ जी हेंचि विनवावयालागी । कैंची योग्यता माझां आंगीं । परि अपत्य जैसें सलगीं । बापेंसिं बोले ॥ ७२ ॥ पुत्राचे अपराध । जरी जाहले अगाध । तरी पिता साहे निर्द्वंद्व । तैसें साहिजो जी ॥ ७३ ॥ सख्यातें उद्धत । सखा साहे निवांत । तैसें तुवां समस्त । साहिजो जी ॥ ७४ ॥ प्रियाचां ठायीं सन्मान । प्रिय न पाहे सर्वथा जाण । तेवीं उच्छिष्ट काढिलें आपण । ते क्षमा कीजो ॥ ७५ ॥ नातरी प्राणाचें सोयरें भेटे । मग जीवें भूतलीं जिये संकटें । तियें निवेदितां न वाटे । संकोचु कांहीं ॥ ७६ ॥ कां उखितें आंगें जीवें । आपणपें दिधलें जिया भावें । तिये कांतु मिनलिया न राहवें । हृदय जेवीं ॥ ७७ ॥ तयापरी जी मियां । हें विनविलें तुमतें गोसाविया । आणि कांही एक म्हणावया । कारण असे ॥ ७८ ॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देवरूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ४५ ॥

तरि देवेंसीं सलगी केली । जे विश्वरूपाची आळी घेतली । ते मायबापें पुरविली । स्नेहाळाचेनि ॥ ७९ ॥ सुरतरूंचीं झाडें । आंगणीं लावावीं कोडें । देयावें कामधेनुचें पाडें । खेळावया ॥ ५८० ॥ मियां नक्षत्रीं डाव पाडावा । चंद्र चेंडूवालागीं देयावा । हा छंदु सिद्धी नेला आघवा । माउलिये तुवां ॥ ८१ ॥ जया अमृतलेशालागीं सायास । तयाचा पाऊस केला चारी मास । पृथ्वी वाहून चासेचास । चिंतामणि पेरिले ॥ ८२ ॥ ऐसा कृतकृत्य केला स्वामी । बहुवे लळा पाळिला तुम्हीं । दाविलें जें हरब्रह्मीं । नायकिजे कानीं ॥ ८३ ॥ मग देखावयाची केउती गोठी । जयाची उपनिषदां नाहीं भेटी । ते जिव्हारींची गांठी । मजलागीं सोडिली ॥ ८४ ॥ जी कल्पादीलागोनी । आजिची घडी धरुनी । माझीं जेतुलीं होउनी । गेली जन्में ॥ ८५ ॥ तयां आघवियांचिआंतु । घरडोळी घेऊनि असें पाहतु । परि ही देखिली ऐकिली मातु । आतुडेचिना ॥ ८६ ॥ बुद्धीचें जाणणें । कहीं न वचेचि याचेनि आंगणें । हे सादही अंत:करणें । करवेचि ना ॥ ८७ ॥ तेथ डोळ्यां देखी होआवी । ही गोठीचि कायसया करावी । किंबहुना पूर्वीं । दृष्ट ना श्रुत ॥ ८८ ॥ तें हें विश्वरूप आपुलें । तुम्हीं मज डोळां दाविलें । तरि माझें मन झालें । हृष्ट देवा ॥ ८९ ॥ परि आतां ऐसी चाड जीवीं । जे तुजसी गोठी करावी । जवळीक हे भोगावी । आलिंगावयासी ॥ ५९० ॥ ते येचि स्वरूपीं करूं म्हणिजे । तरि कोणे एके मुखेंसी चावळिजे । आणि कोणा खेंव देइजे । तुज लेख नाहीं ॥ ९१ ॥ म्हणोनि वारियासवें धांवणें । न ठके गगना खेंव देणें । जळकेली खेळणें । समुद्रीं केउतें ॥ ९२ ॥ यालागीं जी देवा । एथिंचें भय उपजतसे जीवा । म्हणोनि येतुला लळा पाळावा । जे पुरे हें आतां ॥ ९३ ॥ पैं चराचर विनोदें पाहिजे । मग

तेणें सुखें घरीं राहिजे । तैसें चतुर्भुज रूप तुझें । तो विसावा आम्हां ॥ ९४ ॥ आम्हीं योगजात अभ्यासावें । तेणें याचि अनुभवा यावें । शास्त्रांतें आलोडावें । परि सिद्धांतु तो हाचि ॥ ९५ ॥ आम्हीं यजनें किजती सकळें । परि तियें फळावीं येणेंचि फळें । तीर्थें होतु सकळें । याचिलागीं ॥ ९६ ॥ आणीकही कांहीं जें जें । दान पुण्य आम्हीं कीजे । तया फळीं फळ हेंचि तुझें । चतुर्भुज रूप ॥ ९७ ॥ ऐसी तेथिंची जीवा आवडी । म्हणोनि तेंचि देखावया लवडसवडी । वर्तत असे ते सांकडी । फेडीं वेगां ॥ ९८ ॥ अगा जीवींचे जाणतेया । सकळ विश्ववसवितेया । प्रसन्न होईं पूजितया । देवांचिया देवा ॥ ९९ ॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥

कैसें नीलोत्पलातें रांवित । आकाशाही रंगु लावित । तेजाची वोज दावित । इंद्रनीळा ॥ ६०० ॥ जैसा परिमळ जाहला मरगजा । कां आनंदासीचि निघालिया भुजा । ज्याचें जानुवरी मकरध्वजा । जोडली बरव ॥ १ ॥ मस्तकीं मुकुटातें ठेविलें । की मस्तक मुकुट झालें । शृंगारा लेणें लाधलें । आंगाचेनि जया ॥ २ ॥ इंद्रधनुष्याचिये आडणी । माजीं मेघ गगनरंगणीं । तैसें आवरिलें शार्ङ्गपाणी । वैजयंतिया ॥ ३ ॥ कवणी ते उदार गदा । असुरां देत कैवल्य सदा । कैसें चक्र हन गोविंदा । सौम्यतेजें मिरवे ॥ ४ ॥ किंबहुना स्वामी । ते देखावया उत्कंठित पां मी । म्हणोनि आतां तुम्हीं । तैसया होआवें ॥ ५ ॥ हे विश्वरूपाचे सोहळे । भोगुनि निवाले जी डोळे । आतां होताति आधले । कृष्णमूर्तीलागीं ॥ ६ ॥ तें साकार कृष्णरूपडें । वांचूनि पाहों नावडे । तें न देखतां थोडें । मानिताती हे ॥ ७ ॥ आम्हां भोगमोक्षाचां ठायीं । श्रीमूर्तीवांचूनि नाहीं । म्हणोनि तैसाचि साकारु होईं । हे सांवरीं आतां ॥ ८ ॥

श्रीभगवानुवाच : मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ४७ ॥

या अर्जुनाचिया बोला । विश्वरूपा विस्मयो जाहला । म्हणे ऐसा नाहीं देखिला । धसाळ कोणी ॥ ९ ॥ कोण हे वस्तु पावला आहासी । तया लाभाचा तोषु न घेसी । मा भेणें काय नेणों बोलसी । हेकाडु ऐसा ॥ ६१० ॥ आम्हीं सावियाची जैं प्रसन्न होणें । तैं आंगचिवरी म्हणो देणें । वांचोनि जीव असे वेंचणें । कवणासि गा ॥ ११ ॥ तें हें तुझिये चाडे । आजि जिवाचेंचि दळवाडें । कामऊनियां येवढें । रचिलें ध्यान ॥ १२ ॥ ऐसी काय नेणों तुझिये आवडी । जाहली प्रसन्नता आमुची वेडी । म्हणोनि गौप्याचीही गुढी । उभविली जगीं ॥ १३ ॥ तें हें अपरां अपार । स्वरूप माझें परात्पर । एथूनि ते अवतार । कृष्णादिक ॥ १४ ॥ हें ज्ञानतेजाचें निखळ । विश्वात्मक केवळ । अनंत हें अढळ । आद्य सकळां ॥ १५ ॥ हें तुजवांचोनि अर्जुना । पूर्वीं श्रुत दृष्ट नाहीं आना । जे जोगें नव्हे साधना । म्हणोनियां ॥ १६ ॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।
एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥

याची सोय पातले । आणि वेदीं मौनचि घेतलें। यज्ञ की माघौते आले । स्वर्गौनीया ॥ १७ ॥ साधकीं देखिला आयासु । म्हणोनि वाळिला योगाभ्यासु । आणि अध्ययनें सौरसु । नाहीं एथ ॥ १८ ॥ सीगेचीं सत्कर्में । धाविन्नलीं संभ्रमें । तिही बहुतेकीं श्रमें । सत्यलोकु ठाकिला ॥ १९ ॥ तपीं ऐश्वर्य देखिलें । आणि उग्रपण उभयांचि सांडिलें । एवं तपसाधन जें ठेलें । अपारांतरीं ॥ ६२० ॥ तें हें तुवां अनायासें । विश्वरूप देखिलें जैसें । इये मनुष्यलोकीं तैसें । न फावेचि कवणा ॥ २१ ॥ आजि ध्यानसंपत्तीलागीं । तूंचि एकु आथिला जगीं । हें परमभाग्य आंगीं । विरंचीही नाहीं ॥ २२ ॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ४९ ॥

म्हणोनि विश्वरूपलाभें श्लाघ । एथिंचे भय नेघ नेघ । हें वांचूनि चांग । न मनीं कांहीं ॥ २३ ॥ हां गा समुद्रु अमृताचा भरला । आणि अवसांत वरपडा जाहला । मग कोणीही आथि वोसंडिला । बुडिजेल म्हणोनि ॥ २४ ॥ नातरी सोनयाचा डोंगरु । येसणा न चले हा थोरु । ऐसें म्हणोनि अव्हेरु । करणें घडे ॥ २५ ॥ दैवें चिंतामणि लेईजे । कीं हें ओझें म्हणोनि सांडिजे । कामधेनु दवडिजे । न पोसवे म्हणोनि ॥ २६ ॥ चंद्रमा आलिया घरा । म्हणिजे निगें करितोसि उबारा । पडिसायि पाडितोसि दिनकरा । परता सर ॥ २७ ॥ तैसें ऐश्वर्य हें महातेज । आजि हातां आलें आहे सहज । की एथ तुज गजबज । होआवी कां ॥ २८ ॥ परी नेणसीच गांवढिया । काय कोपों आतां धनंजया । आंग सांडोनि छाया । आलिंगितोसि मा ॥ २९ ॥ हें नव्हे जो मी साचें । एथ मन करूनिया काचें । प्रेम धरिसी अवगणियेचें । चतुर्भुज जें ॥ ६३० ॥ तरि आझुनिवरी पार्था । सांडी सांडी हें व्यवस्था । इयेविषयीं आस्था । करिसी झणें ॥ ३१ ॥ हें रूप जरी घोर । विकृति आणि थोर । तरी कृतनिश्चयाचें घर । हेंचि करीं ॥ ३२ ॥ कृपण चित्तवृत्ति जैसी । रोवोनि घाली ठेवयापासीं । मग नुसधेनि देहेंसी । आपण असे ॥ ३३ ॥ कां अजातपक्षिया जवळा । जीव बैसवूनि अविसाळां । पक्षिणी अंतराळा - । माजीं जाय ॥ ३४ ॥ नाना गाय चरे डोंगरीं । परि चित्त बांधिलें वत्सें घरीं । तैसें प्रेम एथिंचे करी । स्थानपती ॥ ३५ ॥ येरें वरिचिलेनि चित्तें । बाह्य सख्यसुखापुरतें । भोगिजो कां श्रीमूर्तीतें । चतुर्भुज ॥ ३६ ॥ परि पुढतपुढती पांडवा । हा एक बोलु न विसरावा । जे इये स्वरूपौनि सद्भावा । नेदावें निघों ॥ ३७ ॥ हें कहीं नव्हतें देखिलें । म्हणोनि भय जें तुज उपजलें । तें सांडी एथ संचलें । असों दे प्रेम ॥ ३८ ॥ आतां करूं तुजयासारिखें । म्हणितलें विश्वतोमुखें । तरि मागील रूप सुखें । न्याहाळीं पां तूं ॥ ३९ ॥

संजय उवाच : इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।
आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ५० ॥

ऐसें वाक्य जी बोलतखेंवो । मागुता मनुष्य जाहला देवो । हें ना परि नवलावो । आवडीचा तिये ॥ ६४० ॥ श्रीकृष्णचि कैवल्य उघडें । वरी सर्वस्व विश्वरूपायेवढें । हातीं दिधलें कीं नावडे । अर्जुनासी ॥ ४१ ॥ वस्तु घेऊनि वाळिजे । जैसें रत्नासि दूषण ठेविजे । नातरी कन्या पाहूनिया म्हणिजे । मना नये हे ॥ ४२ ॥ तया विश्वरूपायेवढी दशा । करितां प्रीतीचा वाढु कैसा । सेल दिधलीसे उपदेशा । किरीटीसि देवें ॥ ४३ ॥ मोडोनि भांगाराचा रवा । लेणें घडिलें आपलिया सवा । मग नावडे जरी जीवा । तरी आटिजे पुढती ॥ ४४ ॥ तैसें शिष्याचिये प्रीती जाहलें । कृष्णत्व होतें तें विश्वरूप केलें । तें मना नयेचि मग आणिलें । कृष्णपण मागुतें ॥ ४५ ॥ हा ठाववरी शिष्याची निकसी । सहाते गुरु आहाती कवणे देशीं । परी नेणिजे आवडी कैशी । संजयो म्हणे ॥ ४६ ॥ मग विश्वरूप व्यापुनी भोंवतें । जें दिव्य योगतेज प्रगटलें होतें । तेंचि सामावलें मागुतें । कृष्णरूपीं तिये ॥ ४७ ॥ जैसें त्वंपद हें आघवें । तत्पदीं सामावे । अथवा द्रुमाकारु साठवे । बीजकणिके जेवीं ॥ ४८ ॥ नातरी स्वप्नसंभ्रमु जैसा । गिळी चेइली जीवदशा । श्रीकृष्णें योगु तैसा । संहारिला तो ॥ ४९ ॥ जैसी प्रभा हारपली बिंबीं । की जळदसंपत्ती नभीं । नाना भरतें सिंधुगर्भीं । रिगालें राया ॥ ६५० ॥ हो कां जे कृष्णाकृतीचिये मोडी । होती विश्वरूपपटाची घडी । ते अर्जुनाचिये आवडी । उकलूनि दाविली ॥ ५१ ॥ तंव परिणामा रंगु । तेणें देखिला साविया चांगु । तेथ ग्राहकीये नव्हेचि लागु । म्हणोनि घडी केली पुढती ॥ ५२ ॥ तैसें वाढीचेनि बहुवसपणें । रूपें विश्व जिंतिलें जेणें । तें सौम्य कोडिसवाणें । साकार जाहलें ॥ ५३ ॥ किंबहुना अनंतें । धरिलें धाकुटपण मागुतें । परि आश्वासिलें पार्थातें । बिहालियासी ॥ ५४ ॥ तेथ जो स्वप्नीं स्वर्गा गेला । तो अवसांत जैसा चेइला । तैसा विस्मयो जाहला । किरीटीसी ॥ ५५ ॥ ना तरी गुरुकृपेसवें । वोसरलेया प्रपंचज्ञान आघवें । स्फुरे तत्त्व तेवीं पांडवें । श्रीमूर्ति देखिली ॥ ५६ ॥ तया पांडवा ऐसें चित्तीं । आड विश्वरूपाची जवनिका होती । ते फिटोनि गेली परौती । हें भलें जाहलें ॥ ५७ ॥ काय काळातें जिणोनि आला । की महावातु मागां सांडिला । आपुलिया बाहीं उतरला । सात सिंधु ॥ ५८ ॥ ऐसा संतोषु बहु चित्तें । घेइजत असे पांडुसुतें । विश्वरूपापाठीं कृष्णातें देखोनियां ॥ ५९ ॥ मग सूर्याचां अस्तमानीं । मागुती तारा उगवती गगनीं । तैसी देखों लागला अवनी । लोकांसहित ॥ ६६० ॥ पाहे तंव तें कुरुक्षेत्र । तैसेंचि दोहीं भागी झालें गोत्र । वीर वर्षताती शस्त्रास्त्र । संघाटवरी ॥ ६१ ॥ तया बाणांचिया मांडवाआंतु । तैसाचि रथु आहे निवांतु । धुरे बैसला लक्ष्मीकांतु । आपण तळीं ॥ ६२ ॥

अर्जुन उवाच : दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन । इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥

एवं मागील जैसें तैसें । तेणें देखिलें वीर्यविलासें । मग म्हणे जियालों ऐसें । जाहलें आतां

॥ ६३ ॥ बुद्धीतें सांडोनि ज्ञान । भेणें वळघलें रान । अहंकारेंसी मन । देशधडी जाहलें ॥ ६४ ॥ इंद्रियें प्रवृत्ती भुलली । वाचा प्राणा चुकली । ऐसी आपांपरी होती जाली । शरीरग्रामीं ॥ ६५ ॥ तियें आघवींचि मागुतीं । जिवंत भेटलीं प्रकृती । आतां जिताणें श्रीमूर्ती । जाहलें इया ॥ ६६ ॥ ऐसें सुख जीवीं घेतलें । मग कृष्णातें जी म्हणितलें । मियां तुमचें रूप देखिलें । मानुष हें ॥ ६७ ॥ हें रूप दाखवणें देवराया । कीं मज अपत्या चुकलिया । बुझावोनि तुवां माया । स्तनपान दिधलें ॥ ६८ ॥ जी विश्वरूपाचां सागरीं । होतों तरंग मवित वांवेवरी । तो इये निजमूर्तीचां तीरीं । निगालों आतां ॥ ६९ ॥ आइकें द्वारकापुरसुहाडा । मज सुकतीया जी झाडा । हे भेटी नव्हे बहुडा । मेघाचा केला ॥ ६७० ॥ सावियाची तृषा फुटला । तया मज अमृतसिंधु हा भेटला । आतां जिणयाचा फिटला । अभरंवसा ॥ ७१ ॥ माझां हृदयरंगणीं । होताहे हरिखलतांची लावणी । सुखेंसीं बुझावणी । जाहली मज ॥ ७२ ॥

श्रीभगवानुवाच : सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम । देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिण: ॥ ५२ ॥

यया पार्थाचिये बोलासवें । हे काय गा म्हणितलें देवें । तुवां प्रेम ठेवुनि यावें । विश्वरूपीं कीं ॥ ७३ ॥ मग इये श्रीमूर्ती । भेटावें सडिया आयती । ते शिकवण सुभद्रापती । विसरलासि मा ॥ ७४ ॥ अगा आंधळिया अर्जुना । हाता आलिया मेरूही होय साना । ऐसा आथी मना । चुकीचा भावो ॥ ७५ ॥ तरि विश्वात्मक रूपडें । जें दाविलें आम्हीं तुजपुढें । तें शंभूही परि न जोडे । तपें करितां ॥ ७६ ॥ आणि अष्टांगादिसंकटीं । योगी शिणताती किरीटी । परि अवसरु नाहीं भेटी । जयाचिये ॥ ७७ ॥ तें विश्वरूप एकादे वेळ । कैं देखों अळुमाळ । ऐसें स्मरतां काळ । जातसे देवां ॥ ७८ ॥ आशेचिया अंजुळी । ठेऊनि हृदयाचां निडळीं । चातक निराळीं । लागले जैसे ॥ ७९ ॥ तैसे उत्कंठानिर्भर । होउनियां सुरनर । घोकीत आठही पाहार । भेटी जयाची ॥ ६८० ॥ परि विश्वरूपासारिखें । स्वप्नींही कोण्ही न देखे । तें प्रत्यक्ष तुवां सुखें । देखिलें हें ॥ ८१ ॥

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया । शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ५३ ॥

पैं उपायासि वाटा । न वाहती एथ सुभटा । साहीसहित वोहटा । वाहिला वेदीं ॥ ८२ ॥ मज विश्वरूपाचिया मोहरा । चालावया धनुर्धरा । तपांचियाही सर्वभारा । नव्हेचि लागु ॥ ८३ ॥ आणि दाना कीर कानडें । मी यज्ञींही तैसा न सांपडें । जैसेनि कां सुरवाडें । देखिला तुवां ॥ ८४ ॥ तैसा मी एकीचि परी । आंतुडें गा अवधारीं । जरी भक्ति येऊनि वरी । चित्तातें गा ॥ ८५ ॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन । ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥

परि तेचि भक्ति ऐसी । पर्जन्याची सुटिका जैसी । धरावांचूनि अनारिसी । गतीचि नेणे ॥ ८६ ॥ कां सकळ जळसंपत्ती । घेऊनि समुद्रातें गिंवसिती । गंगा जैसी अनन्यगती । मिळालीचि मिळे ॥ ८७ ॥ तैसें सर्वभावसंभारें । न धरत प्रेम एकसरें । मजमाजीं संचरे । मीचि होऊनि ॥ ८८ ॥ आणि तेवींचि मी ऐसा । थडिये माझारीं सरिसा । क्षीराब्धि कां जैसा । क्षीराचाचि ॥ ८९ ॥ तैसें

मजलागुनि मुंगीवरी । किंबहुना चराचरीं । भजनासि कां दुसरी । भ्रांति नाहीं ॥ ६९० ॥ तयाचि क्षणासवें । एवंविध मी जाणावें । जाणितला तरी स्वभावें । दृष्ट होय ॥ ९९ ॥ मग इंधनीं अग्नि उद्दीपे । आणि इंधन हे भाष हारपे । तें अग्निचि होऊनि आरोपे । मूर्त जेवीं ॥ ९२ ॥ कां उदय न कीजे तेजाकारें । तंव गगनचि होऊनि असे आंधारें । मग उदेलियां एकसरें । प्रकाशु होय ॥ ९३ ॥ तैसें माझां साक्षात्कारीं । सरे अहंकाराची वारी । अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय ॥ ९४ ॥ मग मी तो हें आघवें । एक मीचि आथी स्वभावें । किंबहुना सामावें । समरसें तो ॥ ९५ ॥

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः । निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ॥ ५५ ॥

जो मजचि एकालागीं । कर्में वाहातसे आंगीं । जया मीवांचोनि जगीं । गोमटें नाहीं ॥ ९६ ॥ दृष्टादृष्ट सकळ । जयाचें मीचि केवळ । जेणें जिणयाचें फळ । मजचि नाम ठेविलें ॥ ९७ ॥ भूतें हे भाष विसरला । जे दिठी मीचि आहे बांधला । म्हणोनि निर्वैर जाहला । सर्वत्र भजे ॥ ९८ ॥ ऐसा जो भक्त होये । तयाचें त्रिधातुक हें जैं जाये । तैं मीचि होउनि ठाये । पांडवा गा ॥ ९९ ॥ ऐसें जगदुदरदोंदिलें । तेणें करुणारसरसाळें । संजयो म्हणे बोलिलें । श्रीकृष्णदेवें ॥ ७०० ॥ ययावरी तो पांडुकुमरु । जाहला आनंदसंपदा थोरु । आणि कृष्णचरणचतुरु । एक तो जगीं ॥ १ ॥ तेणें देवाचिया दोनही मूर्ती । निकिया न्याहाळिलिया चित्तीं । तंव विश्वरूपाहूनि कृष्णाकृती । देखिला लाभु ॥ २ ॥ परि तयाचिये जाणिवे । मानु न कीजेचि देवें । जे व्यापकाहूनि नव्हे । एकदेशी ॥ ३ ॥ हेंचि समर्थावयालागीं । एक दोन चांगी । उपपत्ती शार्ङ्गी । दाविता जाहला ॥ ४ ॥ तिया ऐकोनि सुभद्राकांतु । चित्ती आहे म्हणतु । तरी होय बरवें दोन्हींआंतु । तें पुढती पुसों ॥ ५ ॥ ऐसा आलोचु करूनि जीवीं । आतां पुसती वोज बरवी । आदरील ते परिसावी । पुढे कथा ॥ ६ ॥ प्रांजळ ओंवीप्रबंधें । गोष्टी सांगिजेल विनोदें । निवृत्तिपादप्रसादें । ज्ञानदेवो म्हणे ॥ ७ ॥ भरोनि सद्भावाची अंजुळी । मियां वोंवियाफुलें मोकळीं । अर्पिलीं अंघ्रियुगुलीं । विश्वरूपाचां ॥ ७०८ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
विश्वरूपदर्शनयोगोनाम एकादशोऽध्यायः ॥ (श्लोक ५५; ओव्या ७०८)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय बारावा)

जय जय शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदें । वर्षतिये ॥ १ ॥ विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी । ते तुझिये गुरुकृपादृष्टी । निर्विष होय ॥ २ ॥ तरि कवणातें तापु पोळी । कैसेनि वो शोकु जाळी । जरि प्रसादरसकल्लोळीं । पूरें येसी तूं ॥ ३ ॥ योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे । सोऽहंसिद्धीचे लळे । पाळिसी तूं ॥ ४ ॥ आधारशक्तीचां अंकीं । वाढविसी कौतुकीं । हृदयाकाशपल्लकीं । परिये देसी निजे ॥ ५ ॥ प्रत्यग्ज्योतीची वोवाळणी । करिसी मनपवनांचीं खेळणीं । आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेववसी ॥ ६ ॥ सतराविये चें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी । समाधिबोधें निजविसी । बुझाउनि ॥ ७ ॥ म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझां पाउलीं । या कारणें मी साउली । न संडीं तुझीं ॥ ८ ॥ अहो सद्गुरुचिये कृपादृष्टी । तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी । तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥ ९ ॥ म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापीं मातें । ग्रंथनिरूपणीं ॥ १० ॥ नवरसीं भरवीं सागरु । करवी उचित रत्नांचे आगरु । भावार्थाचे गिरिवरु । निफजवीं माये ॥ ११ ॥ साहित्य सोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया अक्षोणी । विवेकवेलीची लावणी । हों देई सैंघ ॥ १२ ॥ संवादफळनिधानें । प्रमेयाचीं उद्यानें । लावीं म्हणें गहनें । निरंतर ॥ १३ ॥ पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वाद अव्हांटे । कुतर्काचीं दुष्टें । सावजें फेडीं ॥ १४ ॥ श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें । राणिवे बैसवीं श्रोते । श्रवणाचिये ॥ १५ ॥ मऱ्हाठियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी । घेणेंदेणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥ १६ ॥ तूं आपुलेंनि स्नेहपल्लवें । मातें पांघुरविशील सदैवें । तरि आतांचि हें आघवें । निर्मीन माये ॥ १७ ॥ इये विनवणीयेसाठीं । अवलोकिलें गुरु कृपादृष्टी । म्हणे गीतार्थेंसी उठी । न बोलें बहु ॥ १८ ॥ तेथ जी जी महाप्रसादु । म्हणोनि साविया जाला स्वानंदु । आतां निरोपीन प्रबंधु । अवधान दीजे ॥ १९ ॥

अर्जुन उवाच : एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते । ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

तरी सकळवीराधिराजु । जो सोमवंशीं विजयध्वजु । तो बोलता जाहला आत्मजु । पांडुनृपाचा ॥ २० ॥ कृष्णातें म्हणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें । तंव नवल म्हणोनि बिहालें । चित्त माझें ॥ २१ ॥ आणि ये कृष्णमूर्तीची सवे । यालागीं सोय धरिली जीवें । तंव नको म्हणोनि देवें । वारिलें मातें ॥ २२ ॥ तरि व्यक्त आणि अव्यक्त । हें तूंचि एक

निभ्रांत । भक्ती पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ॥ २३ ॥ या दोनी जी वाटा । तूतें पावावया वैकुंठा । व्यक्ताव्यक्त दारवंठां । रिगिजे येथ ॥ २४ ॥ पैं जे वानी शातुका । तेचि वेगळिया वाला येका । म्हणोनि एकदेशिया व्यापका । सरिसा पाडु ॥ २५ ॥ अमृताचां सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेचि दे अमृतलहरी । चुळीं घेतलिया ॥ २६ ॥ हे कीर माझां चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती । परि पुसणें योगपती । तें याचिलागीं ॥ २७ ॥ जें देवा तुम्हीं नावेक । अंगिकारिलें व्यापक । तें साचचि कीं कवतिक । हें जाणावया ॥ २८ ॥ तरि तुजलागीं कर्म । तूंचि जयांचें परम । भक्तीसी मनोधर्म । विकोनि घातला ॥ २९ ॥ इत्यादि सर्वांपरीं । जे भक्त तूंतें हरी । बांधोनियां जिव्हारीं । उपासिती ॥ ३० ॥ आणि जें प्रणवापैलीकडे । वैखरीयेसि जें कानडें । कायिसयाहि सांगडें । नव्हे जें वस्तु ॥ ३१ ॥ तें अक्षर जी अव्यक्त । निर्देशदेशरहित । सोऽहंभावें उपासित । ज्ञानिये जे ॥ ३२ ॥ तयां आणि जी भक्तां । येरयेरांमाजीं अनंता । कवणें योगु तत्त्वता । जाणितला सांगा ॥ ३३ ॥ इया किरीटीचिया बोला । तो जगद्बंधु संतोषला । म्हणे हो प्रश्न भला । जाणसी करूं ॥ ३४ ॥

श्रीभगवानुवाच : मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते । श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

तरि अस्तुगिरीचां उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं । रश्मी जैसे किरीटी । संचरती ॥ ३५ ॥ वर्षाकाळीं सरिता । जैसी चढों लागे पांडुसुता । तैसी नित्य नवी भजतां । श्रद्धा दिसे ॥ ३६ ॥ परि ठाकिलियाहि सागरु । जैसा मागील यावा अनिवारु । तिये गंगेचिये ऐसा पडिभरु । प्रेमभावा ॥ ३७ ॥ तैसें सर्वेंद्रियासहित । मजमाजीं सूनि चित्त । जे रातिदिवो न म्हणत । उपासिती ॥ ३८ ॥ यापरी जे भक्त । आपणपें मज देत । तेचि मी योगयुक्त । परम मानीं ॥ ३९ ॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते । सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥

आणि येर तेही पांडवा । जे आरूढोनि सोऽहंभावा । झोंबती निरवयवा । अक्षरासी ॥ ४० ॥ मनाची नखी न लगे । जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे । इंद्रियां कीर जोगें । काई होईल ॥ ४१ ॥ परि ध्यानाही कुवाडें । म्हणोनि एके ठायीं न संपडे । व्यक्तीसि माजिवडें । कवणेही नोहे ॥ ४२ ॥ जया सर्वत्र सर्वपणें । सर्वांही काळीं असणें । जें पावूनि चिंतवणें । हिंपुटी जाहलें ॥ ४३ ॥ जें होय ना नोहे । जें नाहीं ना आहे । ऐसें म्हणोनि उपाये । उपजतीचिना ॥ ४४ ॥ जें चळे ना ढळे । सरे ना मैळे । तें आपुलेनिचि बळें । आंगविलें जिहीं ॥ ४५ ॥

संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः । ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

पैं वैराग्यमहापावकें । जाळूनि विषयांचीं कटकें । अधपलीं तवकें । इंद्रियें धरिलीं ॥ ४६ ॥ मग संयमाची धाटी । सूनि मुरडिलीं उफराटीं । इंद्रियें कोंडिलीं कपाटीं । हृदयाचां ॥ ४७ ॥ अपानींचिया कवाडा । लावोनि आसनमुद्रा सुहाडा । मूळबंधाचा हुडा । पन्नासिला ॥ ४८ ॥ आशेचे लाग तोडिले । अधैर्याचे कडे झाडिले । निद्रेचें शोधिलें । काळवखें ॥ ४९ ॥

वज्राग्नीचां ज्वाळीं । करूनि अपानधातूंची होळी । व्याधींचां सिसाळीं । पूजिलीं यंत्रें ॥ ५० ॥ मग कुंडलिनियेचा टेंभा । आधारीं केला उभा । तया चोजविलें प्रभा । निमथावरी ॥ ५१ ॥ नवद्वारांचां चौचकीं । बाणूनि संयतीची आडवंकी । उघडली खिडकी । ककारांतींची ॥ ५२ ॥ प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्प मेंढे । मनोमहिषाचेनि मुंडें । दिधलीं बळी ॥ ५३ ॥ चंद्रसूर्या बुझावणी । करूनि अनाहताची सुडावणी । सतराविये चें पाणी । जिंतिलें वेगें ॥ ५४ ॥ मग मध्यमामध्यविवरें । तेणें कोरिवें दादरें । ठाकिलें चवरें । ब्रह्मरंध्रीचें ॥ ५५ ॥ वरी मकारांत सोपान । तें सांडोनिया गहन । काखे सूनियां गगन । भरलें ब्रह्मीं ॥ ५६ ॥ ऐसेनि जे समबुद्धी । गिळावया सोऽहंसिद्धी आंगवितांति निरवधी । योगदुर्गें ॥ ५७ ॥ आपुलिया साटोवाटी । शून्य घेती उठाउठी । तेही मातेंचि किरीटी । पावती गा ॥ ५८ ॥ वांचूनि योगाचेनि बळें । अधिक कांहीं मिळे । ऐसें नाहीं आगळें । कष्टचि तया ॥ ५९ ॥

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

जिहीं सकळभूतांचां हितीं । निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ती । भक्तीवीण ॥ ६० ॥ तयां महेंद्रादि पदें । करितांति वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वें । पडोनि ठाती ॥ ६१ ॥ कामक्रोधांचे विलग । उठावती अनेग । आणि शून्येंसीं आंग । जुंझवावें कीं ॥ ६२ ॥ ताहाने ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावीं । मवावा वारा ॥ ६३ ॥ उनीदिहाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें । झाडासि साजणें । चाळावें गा ॥ ६४ ॥ शीत वेढावें । उष्ण पांघुरावें । वृष्टीचिया असावे । घराआंतु ॥ ६५ ॥ किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेशु नित्य नवा । भातारेंवीण करावा । तो हा योगु ॥ ६६ ॥ एथ स्वामींचें काज । ना बापिकें व्याज । परि मरणेसीं झुंज । नित्य नवें ॥ ६७ ॥ ऐसे मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख । डोंगर गिळितां मुख । न फाटे काई ॥ ६८ ॥ म्हणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि शेल वाटा । भागा आला ॥ ६९ ॥ पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें की प्राणें । शुद्धी म्हणों ॥ ७० ॥ म्हणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि केंहीं । कां गगनामाजीं पायीं । खोलिजतु असे ॥ ७१ ॥ वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी । सूर्याची पाउटी । कां होय गा ॥ ७२ ॥ यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेवीं देहवंता जीवां । अव्यक्तीं गति ॥ ७३ ॥ ऐसाही जरी धिंवसा । बांधोनिया आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ॥ ७४ ॥ म्हणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोटंगले ॥ ७५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः । अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ६ ॥

कर्मेंद्रिये सुखें । करिती कर्में अशेखें । जिये कां वर्णविशेखें । भागा आलीं ॥ ७६ ॥ विधीतें पाळित । निषेधातें गाळित । मज देऊनि जाळित । कर्मफळें ॥ ७७ ॥ ययापरी पाहीं । अर्जुना माझां ठाईं । संन्यासूनि नाही । करिती कर्में ॥ ७८ ॥ आणीकही जे जे सर्व । कायिक

वाचिक मानसिक भाव । तयां मीवांचूनि धांव । आनौती नाहीं ॥ ७९ ॥ ऐसे जे मत्पर । उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें झालें ॥ ८० ॥ जयांचिये आवडी । केली मजशीं कुळवाडी । भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ॥ ८१ ॥ ऐसे अनन्ययोगें । विकले जीवें मनें आंगें । तयांचें कायि एक सांगें । जें सर्व मी करीं ॥ ८२ ॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् । भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला पां ॥ ८३ ॥ तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां । कळिकाळ नोकोनियां । घेतला पटा ॥ ८४ ॥ एऱ्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥ ८५ ॥ तैसे ते माझे । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजें । तयांचेनि मी ॥ ८६ ॥ जन्ममृत्यूचां लाटीं । झळंबती इया सृष्टी । तें देखोनियां पोटीं । ऐसें जाहलें ॥ ८७ ॥ भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे । येथ जरी कीं माझे । बिहती हन । म्हणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवतु आलों ॥ ८९ ॥ नामाचिया सहस्त्रवरी । नावा इया अवधारीं । सजूनिया संसारी । तारू जाहलों ॥ ९० ॥ सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परिग्रही घातले । तरियावरी ॥ ९१ ॥ प्रेमाची पेटी । बांधली एकाचां पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचां ॥ ९२ ॥ परि भक्तांचेनि नांवें । चतुष्पादादि आघवे । वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥ म्हणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयातें समुद्धर्ता । आथि मी सदा ॥ ९४ ॥ आणि जेव्हांचि का भक्तीं । दिधली चित्तवृत्ती । तेव्हांचि मज सूती । तयांचिये नाटीं ॥ ९५ ॥ याकारणें गा भक्तराया । हा मंत्र तुवां धनंजया । शिकीजे जे यया । मार्गा भजिजे ॥ ९६ ॥

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय । निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशय: ॥ ८ ॥

अगा मानस हें एक । माझां स्वरूपीं वृत्तिक । करूनि घाली निष्टंक । बुद्धिनिश्चयेंसीं ॥ ९७ ॥ इये दोनी सरिसीं । मजमाजीं प्रेमेंसी । रिगाली तरी पावसी । मातें तूं गा ॥ ९८ ॥ जे मन बुद्धि इहीं । घर केलें माझां ठायीं । तरि सांगें मग काई । मी तूं ऐसें उरे ॥ ९९ ॥ म्हणोनि दिवा पालवे । सवेंचि तेज मालवे । कां रविबिंबासवें । प्रकाशु जाय ॥ १०० ॥ उचललेया प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं । तैसा मनोबुद्धिपाशीं । अहंकारु ये ॥ १ ॥ म्हणोनि माझां स्वरूपीं । मनबुद्धि इयें निक्षेपीं । येतुलेनि सर्वव्यापी । मीचि होसी ॥ २ ॥ यया बोला कांहीं । अनारिसें नाहीं । आपली आण पाहीं । वाहतु असें गा ॥ ३ ॥

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् । अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥

अथवा हें चित्त । मनबुद्धीसहित । माझां हाती अचुंबित । न शकसी देवों ॥ ४ ॥ तरि गा ऐसें करीं । यां आठां पाहारांमाझारीं । मोटकें निमिषभरी । देतु जाय ॥ ५ ॥ मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ॥ ६ ॥ जैसा शरत्कालु रिगे ।

आणि सरिता वोहटूं लागे । तैसें चित्त काढेल वेगें । प्रपंचौनि ॥ ७ ॥ मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसें दिसें । हारपत अंवसे । नाहींचि होय ॥ ८ ॥ तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाजीं रिगतां । हळूहळू पांडुसुता । मीचि होईल ॥ ९ ॥ अगा अभ्यासयोगु म्हणिजे । तो हा एकु जाणिजे । येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ॥ ११० ॥ पैं अभ्यासाचेनि बळें । एकां गति अंतराळे । व्याघ्र सर्प प्रांजळे । केले एकीं ॥ ११ ॥ विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें ॥ १२ ॥ म्हणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागीं माझां ठायीं । अभ्यासें मिळ ॥ १३ ॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव । मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

कां अभ्यासाही लागीं । कसु नाहीं तुझां आंगीं । तरी आहासी जया भागीं । तैसाचि असे ॥ १४ ॥ इंद्रिये न कोंडीं । भोगातें न तोडीं । अभिमानु न संडीं । स्वजातीचा ॥ १५ ॥ कुळधर्मु चाळीं । विधिविषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ॥ १६ ॥ परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापारु होये । तो मी करितु आहें । ऐसें न म्हणें ॥ १७ ॥ करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे । विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ॥ १८ ॥ उणयापुरेयाचें कांहीं । उरों नेदीं आपुलां ठायीं । स्वजातीचि करूनि घेईं । जीवित हें ॥ १९ ॥ माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें । तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा ॥ १२० ॥ एन्हवीं तरी सुभटा । उजू कां अव्हांटा । रथु काई खटपटा । करितु असे ॥ २१ ॥ म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ति । इयें वोझीं नेघें मती । अखंड चित्तवृत्ती । आठवी मातें ॥ २२ ॥ आणि जें जें कर्म निपजे । तें थोडें बहु न म्हणिजे । निवांतचि अर्पिजे । माझां ठायी ॥ २३ ॥ ऐसिया मद्भावना । तनुत्यागी अर्जुना । तूं सायुज्यसदना । माझिया येसी ॥ २४ ॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः । सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

ना तरी हेंही तुज । नेदवे कर्म मज । तरी गा तूं भज । पंडुकुमरा ॥ २५ ॥ बुद्धीचां पाठीं पोटीं । कर्माआदि कां शेवटीं । मातें बांधणें किरीटी । दुवाड जरी ॥ २६ ॥ तरि हेंही असो । सांडी माझा अतिसो । परि संयतिसीं वसो । बुद्धि तुझी ॥ २७ ॥ आणि जेणें जेणें वेळें । घडती कर्में सकळें । तयांची तियें फळें । त्यजितु जाय ॥ २८ ॥ वृक्ष का वेली । लोटती फळें आलीं । तैसीं सांडी निपजलीं । कर्में सिद्धें ॥ २९ ॥ परि मातें मनीं धरावें । कां मजउद्देशें करावें । हें कांही नको आघवें । जाऊं दे शून्यीं ॥ १३० ॥ खडकीं जैसें वर्षलें । कां आगीमाजीं पेरिलें । कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें ॥ ३१ ॥ अगा आत्मजेचां विषीं । जीवु जैसा निरभिलाषी । तैसा कर्मीं अशेषी । निष्कामु होईं ॥ ३२ ॥ वन्हीची ज्वाळा जैसी । वायां जाय आकाशीं । क्रिया जिरों दे तैसी । शून्यामाजी ॥ ३३ ॥ अर्जुना हा फळत्यागु । आवडे कीर असलगु । परि योगामाजीं योगु । धुरेचा हा ॥ ३४ ॥ येणें फलत्यागें सांडे । तें तें कर्म न विरूढे । एकचि वेळे वेळुझाडें ।

वांझे जैसीं ॥ ३५ ॥ तैसें येणेंचि शरीरे । शरीरा येणें सरे । किंबहुना येरझारे । चिरा पडे ॥ ३६ ॥ पैं अभ्यासाचां पाउटीं । ठाकिजे ज्ञान किरीटी । ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥ ३७ ॥ मग ध्यानासि खेंव । देती आघवेचि भाव । तेव्हां कर्मजात सर्व । दूरी ठाके ॥ ३८ ॥ कर्म जेथ दुरावे । तेथ फलत्यागु संभवे । त्यागास्तव आंगवे । शांति सगळी ॥ ३९ ॥ म्हणोनि यावया शांती । हाचि अनुक्रमु सुभद्रापती । म्हणोनि अभ्यासुचि प्रस्तुतीं । करणें एथ ॥ १४० ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते । ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ १२ ॥

अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान । ज्ञानापासोनि ध्यान । विशेषिजे ॥ ४१ ॥ मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासोनि चांगु । त्यागाहुनि भोगु । शांतिसुखाचा ॥ ४२ ॥ ऐसिया या वाटा । इहींच पेणां सुभटा । शांतीचा माजिवटा । ठाकिला जेणें ॥ ४३ ॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥

जो सर्व भूतांचां ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं । आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ॥ ४४ ॥ उत्तमातें धरिजे । अधम तरि अव्हेरिजे । हें कांहीच नेणिजे । वसुधा जेवीं ॥ ४५ ॥ कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं । हें न म्हणेचि कृपाळू । प्राणु पै गा ॥ ४६ ॥ गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेचि का करूं । तोय जैसें ॥ ४७ ॥ तैसी आघवांचि भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री । कृपेशीं धात्री । आपणपां जो ॥ ४८ ॥ आणि मी तूं हे भाष नेणे । माझें कांहीच न म्हणे । सुखदुःख जाणणें । नाहीं जया ॥ ४९ ॥ तेवींच क्षमेलागीं । पृथ्वीसि पवाडु आंगी । संतोषा उत्संगी । दिधलें घर ॥ १५० ॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः । मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥

वार्षियेंवीण सागरु । जैसा जळें नित्य निर्भरु । तैसा निरुपचारु । संतोषी जो ॥ ५१ ॥ वाहूनि आपुली आण । धरी जो अंतःकरण । निश्चया साचपण । जयाचेनि ॥ ५२ ॥ जीवू परमात्मा दोन्ही । बैसोनि ऐक्यासनीं । जयाचां हृदयभुवनीं । विराजती ॥ ५३ ॥ ऐसा योगसमृद्धि । होऊनि जो निरवधि । अर्पी मनोबुद्धि । माझां ठायीं ॥ ५४ ॥ आंतु बाहेरि योगु । निर्वाळलेयाही चांगु । तरि माझा अनुरागु । सप्रेम जया ॥ ५५ ॥ अर्जुना गा तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु । तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ॥ ५६ ॥ हें ना तो आवडे । मज जीवाचेनि पाडें । हेंही एथ थोडें । रूप करणें ॥ ५७ ॥ तरी पढियंतयाची कहाणी । हे भुलीची भारणी । इयें तंव न बोलणीं । परि बोलवी श्रद्धा ॥ ५८ ॥ म्हणोनि गा आम्हां । वेगा आली उपमा । एन्हवीं काय प्रेमा । अनुवादु असे ॥ ५९ ॥ आतां असो हें किरीटी । पै प्रियाचिया गोष्टी । दुणा थांव उठी । आवडी गा ॥ १६० ॥ तयाही वरी विपायें । प्रेमळु संवादिया होये । तिये गोडीसी आहे । कांटाळें मग ॥ ६१ ॥ म्हणोनि गा पांडुसुता । तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता । वरी प्रियाची वार्ता । प्रसंगें आली ॥ ६२ ॥ तरी आतां बोलों । भलें या सुखा मीनलों । ऐसें म्हणतखेंवी डोलों । लागले देवो

॥ ६३ ॥ मग म्हणे जाण । तया भक्तांचें लक्षण । जया मी अंत:करण । बैसों घालीं ॥ ६४ ॥

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च य: । हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो य: स च मे प्रिय: ॥ १५ ॥

तरी सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे । आणि जळचरीं नुबगिजे । समुद्रु जैसा ॥ ६५ ॥ तेवि उन्मत्तें जगें । जयासि खंती न लगे । आणि जयाचेनि आंगे । न शिणे लोकु ॥ ६६ ॥ किंबहुना पांडवा । शरीर जैसें अवयवां । तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ॥ ६७ ॥ जगचि देह जाहलें । म्हणोनि प्रियाप्रिय गेलें । हर्षामर्ष ठेले । दुजेनविण ॥ ६८ ॥ ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु । भयोद्वेगरहितु । याही वरि भक्तु । माझां ठायीं ॥ ६९ ॥ तरि तयाचा गा मज मोहो । काय सांगों तो पढियावो । हें असो जीवें जीवो । माझेनि तो ॥ १७० ॥ जो निजानंदें धाला । परिणामु आयुष्या आला । पूर्णते जाहला । वल्लभु जो ॥ ७१ ॥

अनपेक्ष: शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथ: । सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्त: स मे प्रिय: ॥ १६ ॥

जयाचां ठायीं पांडवा । अपेक्षे नाहीं रिगावा । सुखासि चढावा । जयाचें असणें ॥ ७२ ॥ मोक्ष देऊनि उदार । काशी होय कीर । परि वेचे शरीर । तिये गांवीं ॥ ७३ ॥ हिमवंतु दोष खाये । परि जीविताची हानी होये । तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचें ॥ ७४ ॥ शुचित्वें शुचि गंगा होये । आणि पापतापही जाये । परि तेथें आहे । बुडणें एक ॥ ७५ ॥ खोलिये पारु नेणिजे । तरी भक्तीं न बुडिजे । रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्षु ॥ ७६ ॥ संतांचेनि अंगलगें । पापातें जिणणें गंगें । तेणें संतसंगें । शुचित्व कैसें ॥ ७७ ॥ म्हणोनि असो जो ऐसा । शुचित्वें तीर्था कुवासा । जेणें लंघविलें दिशा । मनोमळ ॥ ७८ ॥ आंतु बाहेरि चोखाळु । सूर्य तैसा उजाळु । आणि तत्त्वार्थींचा पायाळु । देखणा जो ॥ ७९ ॥ व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश । तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ॥ १८० ॥ संसारव्यथे फिटला । जो नैराश्यें विनटला । व्याधाहातोनि सुटला । विहंगमु जैसा ॥ ८१ ॥ तैसा सतत जो सुखे । कोणीही टवंच न देखे । नेणिजे गतायुषें । लज्जा जेवीं ॥ ८२ ॥ आणि कर्मारंभालागीं । जया अहंकृती नाहीं आंगी । जैसा निरिंधन आगी । विझोनि जाय ॥ ८३ ॥ तैसा उपशमुचि भागा । जयासि आला पैं गा । जो मोक्षाचिया आंगा । लिहिला असे ॥ ८४ ॥ अर्जुना हा ठावोवरी । जो सोहंभावो सरोभरीं । तो द्वैताचां पैलतीरीं । निगों सरला ॥ ८५ ॥ कीं भक्तिसुखालागीं । आपणपेंचि दोही भागीं । वांटूनिया आंगी । सेवकै बाणे ॥ ८६ ॥ येरा नाम मी ठेवी । मग भजती वोज बरवी । न भजतया दावीं । योगिया जो ॥ ८७ ॥ तयाचें आम्हां व्यसन । आमुचें तो निजध्यान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ॥ ८८ ॥ तयालागीं मज रूपा येणें । तयाचेनि मज एथें असणें । तया लोण कीजे जीवें प्राणें । ऐसा पढिये ॥ ८९ ॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति । शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्य: स मे प्रिय: ॥ १७ ॥

जो आत्मलाभासारिखें । गोमटें कांहींचि न देखे । म्हणोनि भोगविशेखें । हरिखेजेना ॥ १९० ॥ आपणचि विश्व जाहला । तरि भेदभावो सहजचि गेला । म्हणोनि द्वेषु ठेला । जया पुरुषा

॥ ९१ ॥ पैं आपुलें जें साचें । ते कल्पांतींही न वचे । हें जाणोनि गताचें । न शोची जो ॥ ९२ ॥ आणि जयापरौतें कांही नाहीं । ते आपणपेंचि आपुलां ठायीं । जाहला यालागीं जो कांही । आकांक्षी ना ॥ ९३ ॥ वोखटें कां गोमटें । हें कांहींचि तया नुमटे । रात्रिदिवस न घटे । सूर्यासि जेवीं ॥ ९४ ॥ ऐसा बोधुचि केवळु । जो होऊनि असे निष्कळु । त्याहीवरी भजनशीळु । माझां ठायीं ॥ ९५ ॥ तरि तया ऐसें दुसरें । आम्हां पढियंतें सोयरें । नाहीं गा साचोकारें । तुझी आण ॥ ९६ ॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः । शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥ १८ ॥

पार्था जयाचां ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं । रिपुमित्रां दोहीं । सरिसा पाडु ॥ ९७ ॥ कां घरींचियां उजियेडु करावा । पारखियां आंधारु पाडावा । हें नेणेचि गा पांडवा । दीपु जैसा ॥ ९८ ॥ जो खांडावया घावो घाली । कां लावणी जयानें केली । दोघां एकचि साउली । वृक्ष दे जैसा ॥ ९९ ॥ नातरी इक्षुदंडु । पाळितया गोडु । गाळितया कडु । नोहेचि जेवीं ॥ २०० ॥ अरिमित्रीं तैसा । अर्जुना जया भावो ऐसा । मानापमानीं सरिसा । होतु जाय ॥ १ ॥ तिहीं ऋतूं समान । जैसें कां गगन । तैसें एकचि मान । शीतोष्णी जया ॥ २ ॥ दक्षिण उत्तर मारुता । मेरु जैसा पांडुसुता । तैसा सुखदुःखप्राप्ता । मध्यस्थु जो ॥ ३ ॥ माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां समु ॥ ४ ॥ आघविया जगा एक । सेव्य जैसें उदक । तैसें तयांतें तिन्ही लोक । आकांक्षिती ॥ ५ ॥ जो सबाह्यसंगु । सांडोनिया लागु । एकाकी असे आंगु । आंगीं सूनी ॥ ६ ॥

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् । अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥

जो निंदेतें नेघे । स्तुति न श्लाघे । आकाशा न लगे । लेपु जैसा ॥ ७ ॥ तैसें निंदे आणि स्तुती । मानु करूनि एके पांती । विचरे प्राणवृत्ती । जनीं वनीं ॥ ८ ॥ साच लटिकें दोन्ही । बोलोनि न बोले जाहला मौनी । जे भोगिता उन्मनी । आरायेना ॥ ९ ॥ जो यथालाभें न तोखे । अलाभें न पारुखे । पाउसेंवीण न सुके । समुद्र जैसा ॥ १२० ॥ आणि वायूसि एके ठायीं । बिढार जैसें नाहीं । तैसा न धरीच केंही । आश्रयो जो ॥ ११ ॥ आघवाचि आकाशस्थिति । जेवीं वायूसि नित्य वसति । तेवीं जगचि विश्रांति - । स्थान जया ॥ १२ ॥ हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला ॥ १३ ॥ मग याहीवरी पार्था । माझां भजनीं आस्था । तरी तयातें मी माथां । मुकुट करीं ॥ १४ ॥ उत्तमासी मस्तक । खालविजे हें काय कौतुक । परि मानु करिती तिन्ही लोक । पायवणिया ॥ १५ ॥ तरि श्रद्धावस्तूसि आदरु । करिता जाणिजे प्रकारु । जरी होय श्रीगुरु । सदाशिवु ॥ १६ ॥ परि हें असो आतां । महेशातें वानितां । आत्मस्तुति होता । संचारु असे ॥ १७ ॥ ययालागीं हें नोहे । म्हणितलें रमानाहें । अर्जुना मी वाहें । शिरीं तयातें ॥ १८ ॥ जे पुरुषार्थसिद्धी चौथी । घेउनि आपुलां हातीं । रिगाला भक्तिपंथी । जगा देतु ॥ १९ ॥ कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडी बांधी करी । कीं जळाचिये परी । तळवटु घे ॥ २२० ॥ म्हणोनि गा नमस्कारुं । तयातें आम्ही

माथां मुगुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आम्ही ॥ २१ ॥ तयाचिया गुणांची लेणीं । लेववूं आपुलिये वाणी । तयाची कीर्ति श्रवणीं । आम्ही लेऊं ॥ २४ ॥ तो पहावा हे डोहाळे । म्हणोनि अचक्षूसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पुजूं तयातें ॥ २३ ॥ दोंवरी दोनी । भुजा आलों घेउनि । आलिंगावयालागुनी । तयाचें आंग ॥ २४ ॥ तया संगाचेनि सुरवाडें । मज विदेहा देह धरणें घडे । किंबहुना आवडे । निरुपमु ॥ २५ ॥ तेणेंसीं आम्हां मैत्र । एथ कायसें विचित्र । परि तयाचें चरित्र । ऐकती जे ॥ २६ ॥ तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥ २७ ॥ जें हें अर्जुना साद्यंत । सांगितलें प्रस्तुत । भक्तियोगु समस्त । योगरूप ॥ २८ ॥ जे मी प्रीति करीं । कां मनीं शिरसा धरीं । येवढी थोरी । जया स्थितीये ॥ २९ ॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥

ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य । करिती प्रतीतिगम्य । आइकोनि जे ॥ २३० ॥ तैसीचि श्रद्धेचेनि आदरें । जयांचां ठायीं विस्तरे । जीवीं जया थारे । जे अनुष्ठिती ॥ ३१ ॥ परि निरूपली जैसी । तैसीच स्थिति मानसीं । मग सुक्षेत्रीं जैसी । पेरणीं केली ॥ ३२ ॥ परि मातें परम करूनि । इये अर्थीं प्रेम धरूनि । हेचि सर्वस्व मानूनि । घेती जे पैं ॥ ३३ ॥ पार्था गा जगीं । तेचि भक्त तेचि योगी । उत्कंठा तयालागीं । अखंड मज ॥ ३४ ॥ ते तीर्थ ते क्षेत्र । जगीं तेचि पवित्र । भक्तिकथेसी मैत्र । जयां पुरुषां ॥ ३५ ॥ आम्ही तयाचें करूं ध्यान । तो आमुचें देवतार्चन । तेवांचूनि आन । गोमटें नाहीं ॥ ३६ ॥ तयाचें आम्हां व्यसन । तो आमुचें निधिनिधान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ॥ ३७ ॥ पैं प्रेमळाची वार्ता । जे अनुवादती पांडुसुता । ते मानूं परमदेवता । आपुली आम्ही ॥ ३७ ॥ ऐसें निजजनानंदें । तेणें जगदादिकंदे । बोलिलें मुकुंदें । संजयो म्हणे ॥ ३९ ॥ राया जो निर्मळु । निष्कलंक लोककृपाळु । शरणागतां प्रतिपाळु । शरण्यु जो ॥ २४० ॥ जो धर्मकीर्तिधवळु । अगाध दातृत्वें सरळु । अतुलबळें प्रबळु । बळिबंधनु ॥ ४१ ॥ जो पैं सुरसहायशीळु । लोकलालनलीळु । प्रणतप्रतिपाळु । हा खेळु जयाचा ॥ ४२ ॥ जो भक्तजनवत्सलु । प्रेमळजनप्रांजलु । सत्यसेतु सरळु । कलानिधि ॥ ४३ ॥ तो कृष्णजी वैकुंठींचा । चक्रवर्ती निजांचा । सांगतुसे येरु दैवाचा । आइकतु असे ॥ ४४ ॥ आतां ययावरी । निरूपिती परी । संजयो म्हणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ४५ ॥ तेचि रसाळ कथा । मन्हाठिया प्रतिपथा । आणिजेल आतां । अवधारिजो ॥ ४६ ॥ ज्ञानदेव म्हणे तुम्ही । संत वोळगावेति आम्ही । हें पढविलों जी स्वामी । निवृत्तिदेवीं ॥ २४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
भक्तियोगोनाम द्वादशोऽध्यायः ॥ (श्लोक २०; ओव्या २४७)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय तेरावा)

आत्मरूप गणेशु स्मरण। सकळ विद्यांचे अधिकरण। तेचि वंदूं श्रीचरण। श्रीगुरूचे ॥ १ ॥ जयांचेनि आठवें। शब्दसृष्टी आंगवें। सारस्वत आघवें। जिव्हेसि ये ॥ २ ॥ वक्तृत्व गोडपणें। अमृतातें पारुखे म्हणे। रस होती वोळगणें। अक्षरांसी ॥ ३ ॥ भावाचें अवतरण। अवतरविती खूण। हाता चढे संपूर्ण। तत्त्वभेदें ॥ ४ ॥ श्रीगुरूचे पाय। जैं हृदय गिंवसूनि ठाय। तैं येवढें भाग्य होय। उन्मेषासी ॥ ५ ॥ ते नमस्कारूनि आतां। तो पितामहाचा पिता। लक्ष्मीयेचा भर्ता। ऐसें म्हणे ॥ ६ ॥

श्रीभगवानुवाच : इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते। एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ १ ॥

पार्था परिसिजे। देह हें क्षेत्र म्हणिजे। हेंचि जाणे तो बोलिजे। क्षेत्रज्ञु एथें ॥ ७ ॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत। क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥

तरि क्षेत्रज्ञु जो एथें। तो मी जाण निरुतें। जो सर्व क्षेत्रातें। संगोपोनि असे ॥ ८ ॥ क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें। जाणणें जें निरुतें। ज्ञान ऐसें तयातें। मानूं आम्ही ॥ ९ ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत्। स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ ३ ॥

तरि क्षेत्र येणें नावें। हें शरीर जेणें भावें। म्हणितलें तें आघवें। सांगो आतां ॥ १० ॥ हें क्षेत्र कां म्हणिजे। कैसें कें हें उपजे। कवणकवणीं वाढविजे। विकारीं एथ ॥ ११ ॥ हें औट हात मोटकें। कीं केवढें पां केतुकें। बरड कीं पिके। कोणाचें हें ॥ १२ ॥ इत्यादि सर्व। जे जे याचे भाव। ते बोलिजती सावेव। अवधान देई ॥ १३ ॥ पैं याचि स्थळाकारणें। श्रुति सदा बोबाणे। तर्कु येणेचि करणें। तोंडाळु केला ॥ १४ ॥ चाळितां हेचि बोली। दर्शनें शेवटा आलीं। तेवींचि नाहीं बुझाविलीं। अझुनि द्वंद्वें ॥ १५ ॥ शास्त्रांचिये सोयरिके। विचळिजे येणेंचि एकें। याचेनि एकवंकें। जगासि वादु ॥ १६ ॥ तोंडेंसीं तोंडा न पडे। बोलेंसी बोला न घडे। इया युक्ती बडबडे। त्राय जाहली ॥ १७ ॥ नेणों कोणाचें हें स्थळ। परि कैसें अभिलाषाचें बळ। जे घरोघरीं कपाळ। पिटवीत असे ॥ १८ ॥ नास्तिका द्यावया तोंड। वेदांचें गाढें बंड। तें देखोनि पाखांड। आनचि वाजे ॥ १९ ॥ म्हणे तुम्ही निर्मूळ। लटिकें हें वाग्जाळ। म्हणसी तरी पोफळ। घातलें आहे ॥ २० ॥ पाखांडाचे कडे। नागवीं लुंचिती मुंडे। नियोजिलीं वितंडें। ताळासि येती ॥ २१ ॥ मृत्युबळाचेनि माजें। हें जाईल वीण काजें। ते देखोनियां व्याजें।

निघाले योगी ॥ २२ ॥ मृत्यूनि आधाधिले । तिहीं निरंजन सेविलें । यमदमांचे केले । मेळावे पुरे ॥ २३ ॥ येणेंचि क्षेत्राभिमानें । राज्य त्यजिलें ईशानें । गुंति जाणोनि स्मशानें । वासु केला ॥ २४ ॥ ऐसिया पैजा महेशा । पांघुरणें दाहीं दिशा । लांचकरू म्हणोनि कोळसा । कामु केला ॥ २५ ॥ पैं सत्यलोकनाथा । वदनें आलीं बळार्था । तरी तो सर्वथा । जाणेचिना ॥ २६ ॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक् । ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ४ ॥

एक म्हणतीं हें स्थळ । जीवाचेंचि समूळ । मग प्राण हें कूळ । तयाचें एथ ॥ २७ ॥ जे प्राणाचां घरीं । अंगें राबते भाऊ चारी । आणि मना ऐसा आवारी । कुळवाडीकरू ॥ २८ ॥ तयातें इंद्रियबैलांची पेटी । न म्हणे अवसीं पाहाटीं । विषयक्षेत्रीं आटी । काढी भली ॥ २९ ॥ मग विधीची वाफ चुकवी । अन्यायाचें बीं वाफवी । कुकर्माचा करवी । राबु जरी ॥ ३० ॥ तरी तयाचिसारिखें । असंभाड पाप पिके । मग जन्मकोटी दुःखे । भोगी जीवु ॥ ३१ ॥ नातरी विधीचिये वाफे । सत्क्रियाबीज आरोपे । तरी जन्मशत मापें । सुखचि मविजे ॥ ३२ ॥ तंव आणिक म्हणती हें नव्हे । हें जिवाचेंचि न म्हणावें । आमुतें पुसा आघवें । शेताचें या ॥ ३३ ॥ अहो जीवु एथ उखिता । वस्तीकरु वाटे जातां । आणि प्राणु हा बलौता । म्हणोनि जागे ॥ ३४ ॥ अनादि जे प्रकृती । सांख्य जियेतें गाती । क्षेत्र हे वृत्ती । इयेचि जाणैं ॥ ३५ ॥ आणि इयेतेंचि आघवा । आथी घरमेळावा । म्हणोनि वाहिवा । घरीं वाहे ॥ ३६ ॥ वाह्याचिये राहटी । जे कां मुदल तिघे इये सृष्टी । ते इयेचांचि पोटीं । जहाले गुण ॥ ३७ ॥ रजोगुण पेरी । तेतुलें सत्व सोंकरी । एकलें तम करी । संवगणी ॥ ३८ ॥ रचूनि महतत्त्वाचें खळें । मळीं एकें काळुगेनि पोळें । तेथ अव्यक्ताची मिळे । सांज भली ॥ ३९ ॥ तंव एकीं मतिवंती । या बोलाचिया खंती । म्हणितलें या ज्ञप्ती । अर्वाचीना ॥ ४० ॥ हां हो परतत्त्वाआंतु । कें प्रकृतीची मातु । हा क्षेत्रवृत्तांतु । उगें आइका ॥ ४१ ॥ शून्यसेज साळिये । सुलीनतेचिये तुळिये । निद्रा केली होती बळिये । संकल्पें येणें ॥ ४२ ॥ तो अवसांत चेइला । उद्यमीं सदैव भला । म्हणोनि ठेवा झाला । इच्छेसवें ॥ ४३ ॥ निरालंबींची वाडी । त्रिभुवनायेवढी । हे तयाचिये जोडी । रूपा आली ॥ ४४ ॥ महाभूतांचे एकवाट । सैरा वेंटाळूनि भाट । भूतग्रामांचे आघाट । चिरिले चारी ॥ ४५ ॥ यावरी आदी । पांचभूतिकांची मांदी । बांधली प्रभेदीं । पंचभूतिकीं ॥ ४६ ॥ कर्माकर्माचे गुंडे । बांध घातले दोहींकडे । नपुंसकें बरडें । रानें केलीं ॥ ४७ ॥ तेथ येरझारेंलागीं । जन्ममृत्यूची सुरंगी । सुहाविली निलागी । संकल्पें येणें ॥ ४८ ॥ मग अहंकारासि एकलाधी । करूनि जीवितावधी । वहाविलें बुद्धी । चराचर ॥ ४९ ॥ यापरी निराळीं । वाढे संकल्पाची डाहाळी । म्हणोनि तो मुळीं । प्रपंचा यया ॥ ५० ॥ इया मतमुक्तकीं । तेथ पडिघायिलें आणिकीं । म्हणती हां हो विवेकी । तरी तुम्ही भले ॥ ५१ ॥ परतत्त्वाचां गांवी । संकल्पसेज देखावी । तरी का पां न मनावी । प्रकृति तयांची ॥ ५२ ॥ परि हें असो नव्हे । तुम्ही

या न लगावें । आतांचि हें आघवे । सांगिजेल ॥ ५३ ॥ तरि आकाशीं कवणें । केलीं मेघाचीं भरणें । अंतरिक्षीं तारांगणें । धरी कवण ॥ ५४ ॥ गगनाचा तडवा । कोणें वोढिला केधवां । वारा हिंडतु असावा । हें कवणाचें मत ॥ ५५ ॥ रोमां कवण पेरी । कोण समुद्र भरी । पर्जन्याचिया करी । धारा कवण ॥ ५६ ॥ तैसें क्षेत्र हें स्वभावें । हे वृत्ती कवणाची नव्हे । हें वाहे तया फावे । येरां तुटे ॥ ५७ ॥ तंव आणिकें एकें । क्षोभें म्हणितलें निकें । तरि भोगिजे एकें । काळें केवीं ॥ ५८ ॥ हें जाणो मृत्यू रागिटा । सिंहाडयाचा दरकुटा । परी काय वांजटा । पूरीजत असे ॥ ५९ ॥ तरि याचा मारु । देखतांति अनिवारु । परी स्वमतीं भरु । अभिमानियां ॥ ६० ॥ महाकल्पापरौती । कव घालुनि । सत्यलोक भद्रजाती । आंगीं वाजे ॥ ६१ ॥ लोकपाळ नित्य नवे । दिग्गज मेळावे । स्वर्गीचिये आडवे । रिगोनि मोडी ॥ ६२ ॥ येरें याचेनि अंगवातें । जन्ममृत्यूचिये गर्तें । निर्जीवें होऊनि भ्रमतें । जीवमृगें ॥ ६३ ॥ न्याहाळा पां केव्हडा । पसरलासे चवडा । जो करूनियां माजिवडा । आकारगजु ॥ ६४ ॥ म्हणोनि काळाची सत्ता । हा बोलु निरुता । ऐसे वादु पांडुसुता । क्षेत्रालागीं ॥ ६५ ॥ हे बहु उखिविखी । ऋषीं केली नैमिषीं । पुराणें इयेविषीं । मतपत्रिका ॥ ६६ ॥ अनुष्टुभादि छंदें । प्रबंधीं जियें विविधें । तें पत्रावलंबन मदें । करिताति अझुनी ॥ ६७ ॥ वेदींचें बृहत्सामसूत्र । देखणेपणें पवित्र । परी तयाही हें क्षेत्र । नेणवेचि ॥ ६८ ॥ आणीक आणीकींही बहुतीं । महाकवीं हेतुमंती । ययालागीं मती । वेंचिलिया ॥ ६९ ॥ परी ऐसें हें एवढें । कीं अमुकेयाचेचि फुडें । हें कोणाही वरपडें । होयचि ना ॥ ७० ॥ आतां यावरी जैसें । क्षेत्र हें असे । तुज सांगों तैसें । साद्यंतु गा ॥ ७१ ॥

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च । इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥ ५ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः । एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

तरि महाभूतपंचकु । आणि अहंकारु एकु । बुद्धि अव्यक्त दशकु । इंद्रियांचा ॥ ७२ ॥ आणीकही एकु । विषयांचा दशकु । सुख दुःख द्वेषु । संघात इच्छा ॥ ७३ ॥ आणि चेतना धृती । एवं क्षेत्रव्यक्ती । सांगितली तुजप्रती । आघवीचि ॥ ७४ ॥ आतां महाभूतें कवणें । कवण विषयो कैसीं करणें । हें वेगळालेपणें । एकैक सांगों ॥ ७५ ॥ तरी पृथ्वी आप तेज । वायु व्योम इयें तुज । सांगितलीं बुझ । महाभूतें पांचें ॥ ७६ ॥ आणि जागतिये दशे । स्वप्न लपालें असे । नातरी अंवसे । चंद्र गूढु ॥ ७७ ॥ नाना अप्रौढबाळकीं । तारुण्य राहे थोकीं । कां न फुलतां कळिकीं । आमोदु जैसा ॥ ७८ ॥ किंबहुना काष्ठीं । वन्हि जेवी किरीटी । तेवीं प्रकृतिचां पोटीं । गोप्यु जो असे ॥ ७९ ॥ जैसा ज्वरु धातुगतु । अपथ्याचें मिष पहातु । मग जालिया आंतु । बाहेरी व्यापी ॥ ८० ॥ तैसी पांचांही गांठी पडे । जैं देहाकारु उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकारु गा ॥ ८१ ॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठी । नाना संकटीं नाचवी ॥ ८२ ॥ आतां बुद्धि जे म्हणिजे । ते ऐसां चिन्हीं जाणिजे । बोलिलें

यदुराजें । तें आइकें सांगो ॥ ८३ ॥ तरी कंदर्पाचेनि बळें । इंद्रियें वृत्तींचेनि मेळें । विभांडुनि येती पाळे । विषयांचे ॥ ८४ ॥ तो सुखदुःखांचा नागोवा । जेथ उमाणों लागे जीवा । तेथ दोहींसीही बरवा । पाडु जे धरी ॥ ८५ ॥ हें सुख हें दुःख । हें पुण्य हें दोष । कां हें मैळ हें चोख । ऐसें निवडी ॥ ८६ ॥ जिये अधमोत्तम सुझे । जिये सानें थोर बुझे । जिया दिठी पारखिजे । विषो जीवें ॥ ८७ ॥ जे तेजतत्त्वाची आदी । जे सत्त्वगुणाची वृद्धी । जे आत्मया जीवाची संधी । वसवीत असे ॥ ८८ ॥ अर्जुना ते गा जाण । बुद्धि तूं संपूर्ण । आतां आइकें वोळखण । अव्यक्ताची ॥ ८९ ॥ पैं सांख्याचां सिद्धांतीं । प्रकृती जे महामती । तेचि एथें प्रस्तुतीं । अव्यक्त गा ॥ ९० ॥ आणि सांख्ययोगमतें । प्रकृती परिसविली तूंतें । ऐसी दोहीं परी जेथें । विवंचिली ॥ ९१ ॥ तेथ दुजी जे जीवदशा । तिये नांव वीरेशा । येथें अव्यक्त ऐसा । पर्यावो हा ॥ ९२ ॥ तऱ्ही पाहालया रजनी । तारा लोपती गगनीं । कां हारपे अस्तमानीं । भूतक्रिया ॥ ९३ ॥ नातरी देहो गेलिया पाठीं । देहादिक किरीटी । उपाधि लपे पोटीं । कृतकर्माचां ॥ ९४ ॥ कां बीजमुद्रेआंतु । थोके तरु समस्तु । कां वस्त्रपण तंतु - । दशे राहे ॥ ९५ ॥ तैसे सांडोनियां स्थूळधर्म । महाभूतें भूतग्राम । लया जाती सूक्ष्म । होऊनि जेथें ॥ ९६ ॥ अर्जुना तया नांवें । अव्यक्त हें जाणावें । आतां आइकें आघवे । इंद्रियभेद ॥ ९७ ॥ तरि श्रवण नयन । त्वचा घ्राण रसन । इयें जाणें ज्ञान - । करणें पांचें ॥ ९८ ॥ इये तत्त्वमेळापंकी । सुखदुःखाची उखिविखी । बुद्धि करिते मुखीं । पांचे इहीं ॥ ९९ ॥ मग वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार । पायु हे प्रकार । पांच आणिक ॥ १०० ॥ कर्मेंद्रिये म्हणिपती । तीं इयें जाणिजती । आइकें कैवल्यपती । सांगतसे ॥ १ ॥ पैं प्राणाची अंतोरी । क्रियाशक्ति जे शरीरीं । तियेचि रिगिनिगी द्वारीं । पांचें इहीं ॥ २ ॥ एवं दाहाही करणें । सांगितलीं देवो म्हणे । परिस आतां फुडेपणें । मन तें ऐसें ॥ ३ ॥ जें इंद्रियां आणि बुद्धी । माझारिलिये संधी । रजोगुणाचां खांदी । तरळत असे ॥ ४ ॥ नीळिमा अंबरीं । कां मृगतृष्णालहरी । तैसें वायांचि फरारी । वावो जाहलें ॥ ५ ॥ आणि शुक्रशोणिताचा सांधा । मिळतां पांचाचां बांधा । वायुतत्त्व दशधा । एकचि जाहलें ॥ ६ ॥ मग तिहीं दाहीभागीं । देहधर्माचां खैवंगी । अधिष्ठिलें आंगी । आपुलालां ॥ ७ ॥ तेथ चांचल्य निखळ । एकलें ठेलें निढाळ । म्हणोनि रजाचें बळ । धरिलें तेणें ॥ ८ ॥ तें बुद्धीसि बाहेरी । अहंकाराचिया उरावरी । ऐसां ठायीं माझारीं । बळियावलें ॥ ९ ॥ वायां मन हें नांव । एऱ्हवीं कल्पनाचि सावेव । जयाचेनि संगें जीव - । दशा वस्तू ॥ ११० ॥ जें प्रवृत्तीसी मूळ । कामा जयाचें बळ । जें अखंड सूये छळ । अहंकारासी ॥ ११ ॥ जें इच्छेतें वाढवी । आशेतें चढवी । जें पाठी पुरवी । भयासि गा ॥ १२ ॥ द्वैत जेथें उठी । अविद्या जेणें लाठी । जें इंद्रियातें लोटी । विषयांमाजी ॥ १३ ॥ संकल्पें सृष्टी घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी । मनोरथांचिया उतरंडी । उतरी रची ॥ १४ ॥ जें भुलीचें कुहर । वायुतत्त्वाचें अंतर । बुद्धीचें द्वार । झांकविलें जेणें ॥ १५ ॥ तें गा किरीटी मन । या बोला नाहीं आन । आतां

विषयाभिधान । भेदु आइकें ॥ १६ ॥ तरी स्पर्श आणि शब्दु । रूप रस गंधु । हा विषयो पंचविधु । ज्ञानेंद्रियांचा ॥ १७ ॥ एहींचि पांचैं द्वारीं । ज्ञानासि धांव बाहेरी । जैसा कां हिरवे चारीं । भांबावे पशु ॥ १८ ॥ मग स्वर वर्णु विसर्गु । अथवा स्वीकार त्यागु । संक्रमण उत्सर्गु । विण्मूत्राचा ॥ १९ ॥ हे कर्मेंद्रियांचे पांच । विषय गा साच । जे बांधोनिया माच । क्रिया धांवे ॥ १२० ॥ ऐसे हे दाहीं । विषय इये देहीं । आतां इच्छा तेही । सांगिजैल ॥ २१ ॥ तरि भूतलें आठवें । कां बोलें कानु झांकवें । ऐसियावरि चेतवे । जे गा वृत्ती ॥ २२ ॥ इंद्रियांविषयांचिये भेटी - । सरीसीच वेगें उठी । कामाची बाहुटी । धरूनियां ॥ २३ ॥ जियेचेनि उठिलेपणें । मना सैंघ धांवणें । न रिगावें तेथ करणें । तोंडें सुती ॥ २४ ॥ जिये वृत्तीचिया आवडी । बुद्धी होय वेडी । विषयां जिया गोडी । ते गा इच्छा ॥ २५ ॥ आणि इच्छिलिया सांगडें । इंद्रियां आमिष न जोडे । तेथ जोडे ऐसा जो डावो पडे । तोचि द्वेषु ॥ २६ ॥ आतां यावरी सुख । तें एवंविध देख । जेणें एकेंचि अशेष । विसरे जीवु ॥ २७ ॥ मना वाचे काये । जें आपुली आण वाये । देहस्मृतीची त्राये । मोडित जें ये ॥ २८ ॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळा होईजे प्राणें । सात्त्विकासी दुणें । वरीही लाभु ॥ २९ ॥ कां आघवियाची इंद्रियवृत्ती । हृदयाचां एकांती । थापटूनि सुषुप्ती । आणी जें गा ॥ १३० ॥ किंबहुना सोये । जीव आत्मयाची लाहे । तेथ जें होये । तया नाम सुख ॥ ३१ ॥ आणि ऐसी हे अवस्था । न जोडता पार्था । जीणे तेंचि सर्वथा । दुःख जाणें ॥ ३२ ॥ तें मनोरथसंगें नव्हे । एऱ्हवीं सिद्धी गेलेंचि आहे । हे दोनीचि उपाये । सुखदुःखासी ॥ ३३ ॥ आतां असंगा साक्षिभूता । देहीं चैतन्याची जे सत्ता । तिये नांव पांडुसुता । चेतना येथें ॥ ३४ ॥ जे नखौनि केशवरी । उभी जागे शरीरीं । जे तिहीं अवस्थांतरीं । पालटेना ॥ ३५ ॥ मनबुद्ध्यादि आघवीं । जियेचेनि टवटवी । प्रकृतिवनमाधवीं । सदांचि जे ॥ ३६ ॥ जडाजडीं अंशीं । राहाटे जे सरिसी । ते चेतना गा तुजसीं । लटिकें नाहीं ॥ ३७ ॥ पैं रावो परिवारु नेणे । आज्ञाचि परचक्र जिणें । कां चंद्राचेनि पूर्णपणें । सिंधू भरती ॥ ३८ ॥ नाना भ्रामकाचें सन्निधान । लोहो करी सचेतन । कां सूर्यसंगु जन । चेष्टवी गा ॥ ३९ ॥ अगा मुखमेळेंविण । पिलियाचें पोषण । करी निरीक्षण । कूर्मी जेवीं ॥ १४० ॥ पार्था तियापरी । आत्मसंगती इये शरीरीं । सजीवत्वाचा करी । उपेगु जडा ॥ ४१ ॥ मग तियेतें चेतना । म्हणिपे पैं अर्जुना । आतां धृतिविवंचना । भेदु आइक ॥ ४२ ॥ तरी तत्त्वा परस्परें । उघड जातिस्वभाववैरें । नव्हे पृथ्वीतें नीरें । न नाशिजे ॥ ४३ ॥ नीरातें आटी तेज । तेजा वायूसिं जुंझ । आणि गगन तंव सहज । वायू भक्षी ॥ ४४ ॥ तेवींचि कोणेही वेळे । आपण कायिसयाही न मिळे । आंत रिगोनि वेगळें । आकाश हें ॥ ४५ ॥ ऐसीं पांचही भूतें । न साहती एकमेकांतें । कीं तियेंही ऐक्यातें । देहासी येती ॥ ४६ ॥ द्वंद्वाची उखिविखी । सोडूनि वसती एकीं । एकेकातें पोखी । निजगुणें गा ॥ ४७ ॥ ऐसें न मिळे तयां साजणें । चळे धैर्य जेणें । तयां नांव म्हणें । धृती मी गा ॥ ४८ ॥ आणि जीवेंसीं पांडवा ।

या छत्तिसांचा मेळावा । तो हा एथ जाणावा । संघातु पैं गा ॥ ४९ ॥ एवं छत्तीसही भेद । सांगितले तुज विशद । यया येतुलेयातें प्रसिद्ध । क्षेत्र म्हणिजे ॥ १५० ॥ रथांगांचा मेळावा । जेवीं रथु म्हणिजे पांडवा । कां अधोर्ध्व अवेवां । नांव देहो ॥ ५१ ॥ करीतुरंगसमाजें । सेना नाम निफजे । कां वाक्यें म्हणिजती पुंजे । अक्षरांचे ॥ ५२ ॥ कां जळधरांचा मेळा । वाच्य होय आभाळा । नाना लोकां सकळां । नाम जग ॥ ५३ ॥ कां स्नेहसूत्रवन्ही । मेळू एके स्थानीं । धरिजे तो जनीं । दीपु होय ॥ ५४ ॥ तैसीं छत्तीसही इयें तत्त्वें । मिळती जेणें एकत्वें । तेणें समूहपरत्वें । क्षेत्र म्हणिपे ॥ ५५ ॥ आणि वाहतेनि भौतिकें । पापपुण्य येथें पिके । म्हणोनि आम्ही कौतुकें । क्षेत्र म्हणों ॥ ५६ ॥ एकाचेनि मतें । देह म्हणती ययातें । परि असो हें अनंतें । नामें यया ॥ ५७ ॥ पैं परतत्त्वाआरौतें आणि स्थावरां आंतौतें । जें कांही होतें जातें । तें क्षेत्रचि हें ॥ ५८ ॥ परि सुरनरउरगीं । घडत आहे योनिविभागीं । तें गुणकर्मसंगीं पडिलेंसातें ॥ ५९ ॥ हेचि गुणविवंचना । पुढां म्हणिपैल अर्जुना । प्रस्तुत आतां ज्ञाना । रूप दावूं ॥ १६० ॥ क्षेत्र तंव सविस्तर । सांगितलें सविकार । म्हणोनि आतां उदार । ज्ञान आइक ॥ ६१ ॥ जया ज्ञानालागीं । गगन गिळिताती योगी । स्वर्गाची आडवंगीं । उमरडोनि ॥ ६२ ॥ न करिती सिद्धीची चाड । न धरिती ऋद्धीची भीड । योगाऐसें दुवाड । हेळसिती ॥ ६३ ॥ तपोदुर्गे वोलांडित । क्रतुकोटि वोवांडित । उलथूनि सांडित । कर्मवल्ली ॥ ६४ ॥ नाना भजनमार्गीं । धांवत उघडां आंगीं । एक रिगताति । सुरंगीं सुषुम्नेचिये ॥ ६५ ॥ ऐसी जिये ज्ञानीं । मुनीश्वरांसी उतान्ही । वेदतरूचां पानोवानीं । हिंडताती ॥ ६६ ॥ देईल गुरुसेवा । इया बुद्धी पांडवा । जन्मशतांचा सांडोवा । टाकित जे ॥ ६७ ॥ जया ज्ञानाची रिगवणी । अविद्ये उणें आणी । जीवाआत्मया बुझावणी । मांडूनि दे ॥ ६८ ॥ जें इंद्रियांचीं द्वारें आडी । प्रवृत्तीचे पाय मोडी । जें दैन्यचि फेडी । मानसाचें ॥ ६९ ॥ द्वैताचा दुकाळु पाहे । साम्याचें सुयाणें होये । जया ज्ञानाची सोये । ऐसें करी ॥ १७० ॥ मदाचा ठावोचि पुसी । जें महामोहातें ग्रासी । नेदी आपपरु ऐसी । भाष उरों ॥ ७१ ॥ जें संसारातें उन्मूळी । संकल्पपंकु पाखाळी । अनावरा वेंटाळी । ज्ञेयातें जें ॥ ७२ ॥ जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे । जीवु दोंदावरी लोळे । आनंदाचिया ॥ ७३ ॥ ऐसें जे ज्ञान । पवित्रैकनिधान । जेथ विटाळलें मन । चोख कीजे ॥ ७४ ॥ आत्मया जीवबुद्धी । जे लागली होती क्षयव्याधी । जे जयाचिया सन्निधी । निरुजा करी ॥ ७५ ॥ तें अनिरुप्य कीं निरूपिजे । ऐकतां बुद्धी आणिजे । वांचुनी डोळां देखिजे । ऐसें नाहीं ॥ ७६ ॥ मग तेंचि इये शरीरीं । जैं आपुला प्रभावो करी । तैं इंद्रियांचां व्यापारीं । डोळांहि दिसे ॥ ७७ ॥ पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेनि साजेपणें । जाणिजे तेवीं करणें । सांगती ज्ञान ॥ ७८ ॥ अगा वृक्षासि पाताळीं । जळ सांपडे मुळीं । तें शाखांचिये बाहाळीं । बाहेर दिसे ॥ ७९ ॥ कां भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । नाना आचारगौरव । सुकुलीनाचें ॥ १८० ॥ अथवा संभ्रमाचिया आयती ।

स्नेहो जैसा ये व्यक्ति । कां दर्शनाचिये प्रशस्ती । पुण्यपुरुषु ॥ ८१ ॥ नातरी केळीं कापूर जाहला । जेवीं परिमळें जाणों आला । कां भिंगारीं दीपु ठेविला । बाहेरि फांके ॥ ८२ ॥ तैसें हृदयींचेनि ज्ञानें । जिये देहीं उमटती चिन्हें । तिये सांगों आतां अवधानें । चांगें आइक ॥ ८३ ॥

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् । आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥

तरी कवणेही विषयींचें । साम्य होणें न रुचे । संभावितपणाचें । वोझें जया ॥ ८४ ॥ आथिलेचि गुण वानितां । मान्यपणें मानितां । योग्यतेचें येतां । रूप आंगा ॥ ८५ ॥ तैं गजबजों लागे कैसा । व्याधें रुंधला मृगु जैसा । कां बाहीं तरतां वळसां । दाटला जेवीं ॥ ८६ ॥ पार्था तेणें पाडें । सन्मानें जो सांकडे । गरिमेतें आंगाकडे । येवोंचि नेदी ॥ ८७ ॥ पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी । हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ॥ ८८ ॥ तेथ सत्काराची गोठी । कें आदरा देईल भेटी । मरणेंसीं साटी । नमस्कारितां ॥ ८९ ॥ वाचस्पतींचेनि । पाडें सर्वज्ञता तरी जोडे । परि वेडिवेमाजीं दडे । महिमेभेणें ॥ १९० ॥ चातुर्य लपवी । महत्त्व हारवी । पिसेपण मिरवी । आवडोनि ॥ ९१ ॥ लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरी उबगु । उगेपणी चांगु । आथी भरु ॥ ९२ ॥ जगें अवज्ञाचि करावी । संबंधीं सोयचि न धरावी । ऐसी ऐसी जीवीं । चाड बहु ॥ ९३ ॥ तळौटेपण बाणे । आंगीं हिणावो खेवणें । तें तेंचि करणें । बहुतकरुनी ॥ ९४ ॥ हा जीतु ना नोहे । लोक कल्पी येणें भावें । तैसें जिणें होआवें । ऐसी आशा ॥ ९५ ॥ पैल चालतु कां नोहे । कीं वारेनि जातु आहे । जना ऐसा भ्रमु जाये । तैंसें होईजे ॥ ९६ ॥ माझें असतेपण लोपो । नांवरूप हारपो । मज झणें वासिपो । भूतजात ॥ ९७ ॥ ऐसीं जयाचीं नवसियें । जो नित्य एकांता जातु जाये । नांवेंचि जो जिये । विजनाचेनि ॥ ९८ ॥ वायू आणि जे पडे । गगनेसीं बोलों आवडे । जीवें प्राणें झाडें । पढियंतीं जया ॥ ९९ ॥ किंबहुना ऐसीं । चिन्हें जया देखसी । जाण तया ज्ञानेंसीं । शेज जाहली ॥ २०० ॥ पैं अमानित्व पुरुषीं । तें जाणावें इहीं मिषीं । आतां अदंभाचिया वोळखीसी । सौरसु देवों ॥ १ ॥ तरि अदंभित्व ऐसें । लोभियाचें मन जैसें । जीवु जावो परि नुमसे । ठेविला ठावो ॥ २ ॥ तयापरी किरीटी । पडिलाही प्राणसंकटीं । परि सुकृत न प्रकटी । आंगें बोलें ॥ ३ ॥ खडाणे आला पान्हा । पळवी जेवीं अर्जुना । कां लपवी पण्यांगना । वडिलपण ॥ ४ ॥ आढ्यु आतुडे आडवीं । मग आढ्यता जेवी हारवी । ना तरी कुळवधु लपवी । अवेवांतें ॥ ५ ॥ नाना कृषीवळु आपुलें । पांघुरवीं पेरिलें । तैसें झांकी निपजलें । दानपुण्य ॥ ६ ॥ वरिवरी देह न पूजी । लोकांतें न रंजी । स्वधर्मु वाग्ध्वजीं । बांधों नेणें ॥ ७ ॥ परोपकारु न बोले । न मिरवी अभ्यासिलें । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठीं ॥ ८ ॥ अंगभोगांकडे । पाहतां कृपणु आवडे । एऱ्हवीं धर्मविषयीं थोडें । बहु न म्हणे ॥ ९ ॥ घरीं दिसे साकड । देहींची आयती रोड । परी दानीं जया होड । सूरतरूसीं ॥ २१० ॥ किंबहुना स्वधर्मीं थोरु । अवसरीं उदारु । आत्मचर्चे चतुरु । एऱ्हवीं वेडा ॥ ११ ॥ केळींचें दळवाडें । हळू पोकळ

आवडें । परि फळोनिया गाढें । रसाळ जैसें ॥ १२ ॥ कां मेघाचें आंग झील । दिसे वारेनि जैसें जाईल । परि वर्षती नवल । घनवट तें ॥ १३ ॥ तैसा जो पूर्णपणीं । पाहतां धाती आयणी । एऱ्हवीं तरी वाणी । तोचि ठावो ॥ १४ ॥ हें असो या चिन्हांचा । नटनाचु ठायीं जयाचां । जाण ज्ञान तयाचिया । हाता चढलें ॥ १५ ॥ पैं गा अदंभपण । म्हणितलें तें हें जाण । आतां आईक खूण । अहिंसेची ॥ १६ ॥ तरी अहिंसा बहुतीं परी । बोलिली असे अवधारीं । आपुलालां मतांतरीं । निरूपितां ॥ १७ ॥ परि ते ऐसी देखा । जैसा खांडूनियां शाखा । मग तयांचिया बुडुखा । कुंप कीजे ॥ १८ ॥ कां बाहु तोडोनि पचविजे । मग भूकेची पीडा राखिजे । नाना देऊळ मोडूनि कीजे । पौळी देवा ॥ १९ ॥ तैसी हिंसाचि करूनि अहिंसा । निफजविजे हा ऐसा । पैं पूर्वमीमांसा । निर्णो केला ॥ २२० ॥ जे अवृष्टीचेनि उपद्रवें । गादलें विश्व आघवें । म्हणोनि पर्जन्येष्टी करावे । नाना याग ॥ २१ ॥ तंव तिये इष्टीचां बुडीं । पशुहिंसा रोकडी । मग अहिंसेची थडी । कैंची दिसे ॥ २२ ॥ पेरिजे नुसधी हिंसा । तेथ उगवेल काय अहिंसा । परि नवल बापा धिंवसा । या याज्ञिकांचा ॥ २३ ॥ आणि आयुर्वेदुही आघवा । याचि मोहोरा पांडवा । जे जीवाकारणें करावा । जीवघातु ॥ २४ ॥ नाना रोगीं अहाळलीं । लोळतीं भूतें देखिलीं । ते हिंसा निवारावया केली । चिकित्सा कां ॥ २५ ॥ तंव ते चिकित्से पहिलें । एकाचे कंद खणविले । एका उपडविलें । समूळीं सपत्रीं ॥ २६ ॥ एकें आड मोडविली । अजंगमाची खाल काढविली । एकें गर्भीं उकडविली । पुटामाजीं ॥ २७ ॥ अजातशत्रु तरुवरां । सर्वांगी देवविलिया शिरा । ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा । कोरडे केले ॥ २८ ॥ आणि जंगमाही हात । लाऊनि काढिलें पित्त । मग राखिले शिणत । आणिक जीव ॥ २९ ॥ अहो वसतीं धवळारें । मोडूनि केले देऊळ देव्हारे । नागौनि वेव्हारें । गवादी घातली ॥ २३० ॥ मस्तक पांघुरविलें । तंव तळवटीं उघडें पडलें । घर मोडोनि केले । मांडव पुढें ॥ ३१ ॥ नाना पांघुरणें । जाळूनि जैसें तापणें । जालें आंगधुणें । कुंजराचें ॥ ३२ ॥ बैल विकूनि गोठा । पुंसा लावोनि गांठा । इया करणीं कीं चेष्टा । काई हंसों ॥ ३३ ॥ एकीं धर्माचिया वाहणी । गाळूं आदरिलें पाणी । तंव गाळितया आहाळणीं । जीव मेले ॥ ३४ ॥ एक न पचिविती कण । इये हिंसेचे भेण । तेथ कदर्थले प्राण । हेचि हिंसा ॥ ३५ ॥ एवं हिंसाचि अहिंसा । कर्मकांडी हा ऐसा । सिद्धांतु सुमनसा । वोळखें तूं ॥ ३६ ॥ पहिलें अहिंसेचें नांव । आम्हीं केलें जंव । तंव स्फूर्ति बांधली हांव । इये मती ॥ ३७ ॥ तरि कैसेनि ययातें गाळावें । म्हणोनि पडिलें बोलावें । तेवींचि तुवांहीं जाणावें । ऐसा भावो ॥ ३८ ॥ बहुतकरूनि किरीटी । हाचि विषयो इये गोष्टी । एऱ्हवीं कां आडवाटीं । धांविजैल ॥ ३९ ॥ आणि स्वमताचिया निर्धारा - । लागोनियां धनुर्धरा । प्राप्तां मतांतरा । निर्वेचु कीजे ॥ २४० ॥ ऐसी हे अवधारीं । निरूपिती परी । आतां ययावरी । मुख्य जें गा ॥ ४१ ॥ तें स्वमत बोलिजेल । अहिंसे रूप किजैल । जेणें उठलिया आंतुल । ज्ञान दिसे ॥ ४२ ॥ परि तें अधिष्ठिलेनि आंगें । जाणिजे आचरतेनि बगें । जैसी कसवटी सांगे । वानियातें

॥ ४३ ॥ तैसें ज्ञानामनाचिये भेटी । सरिसेंचि अहिंसेचें बिंब उठी । तेंचि ऐसें किरीटी । परिस आतां ॥ तरि तरंगु नोलांडितु । लहरी पायें न फोडितु । सांचलु न मोडितु । पाणियाचा ॥ ४५ ॥ वेगें आणि लेसा । दिठी घालूनि आंविसा । जळीं बकु जैसा । पाऊल सुये ॥ ४६ ॥ कां कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार । कुचंबैल केसर । इया शंका ॥ ४७ ॥ तैसे परमाणु पां गुंतले । जाणुनि जीव सानुले । कारुण्यामाजीं पाउलें । लपवूनि चाले ॥ ४८ ॥ ते वाट कृपेची करितु । ते दिशाचि स्नेहा भरितु । जीवातळीं आंथरितु । आपुला जीवु ॥ ४९ ॥ ऐसिया जतना । चालणें जया अर्जुना । हें अनिर्वाच्य परिमाणा । पुरिजेना ॥ २५० ॥ पैं मोहाचेनि सांगडें । लासी पिलें धरी तोंडें । तेथ दांतांचे आगरडे । लागती जैसे ॥ ५१ ॥ कां स्नेहाळु माये । तान्हयाची वास पाहे । तिये दिठी आहे । हळुवार जें ॥ ५२ ॥ नाना कमळदळें । डोलाविजती ढाळें । तो जेणें पाडें बुबुळें । वारा घेपे ॥ ५३ ॥ तैसेनि मार्दवें पाय । भूमीवरी न्यसीतु जाय । लागती तेथ होय । जनां सुख ॥ ५४ ॥ ऐसिया लघिमा चालतां । कृमिकीटक पांडुसुता । देखे तरि माघौता । हळूचि निघे ॥ ५५ ॥ म्हणे पावो धडफडील । तरि स्वामीची निद्रा मोडैल । रचलेपणा पडैल । झोती हन ॥ ५६ ॥ इया काकुळती । वाहणी घे माघौती । कोणेही व्यक्ती । न वचे वरी ॥ ५७ ॥ जीवाचेनि नावें । तृणातेंही नोलांडवे । मग न लेखितां जावें । हे कें गोठी ॥ ५८ ॥ मुंगिये मेरु नोलांडवे । मशका सिंधु न तरवे । तैसा भेटलियां न करवे । अतिक्रमु ॥ ५९ ॥ ऐसी जयाची चाली । कृपाफळीं फळा आली । देखसी जियाली । दया वाचे ॥ २६० ॥ स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार । मुख मोहाचें माहेर । माधुर्या जाहले अंकुर । दशन तैसे ॥ ६१ ॥ पुढां स्नेह पाझरे । मागां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ ६२ ॥ तंव बोलणेंचि नाहीं । बोलों म्हणे जरी कांही । तरि बोल कोणाही । खुपेल कां ॥ ६३ ॥ बोलतां अधिकुही निघे । तरि कोण्हाही वर्मीं न लगे । कोण्हासि न रिगे । शंका मनी ॥ ६४ ॥ मांडिली गोठी हन मोडैल । वासिपैल कोणी उडैल । आइकोनि वोवांडिल । कोण्ही जरी ॥ ६५ ॥ तरि दुवाळी कोणा न व्हावी । कवणाची भंवई नुचलावी । ऐसा भावो जीवी । म्हणोनि उगा ॥ ६६ ॥ मग प्रार्थिला विपायें । जरि लोभें बोलों जाये । तरि परिसे तया होये । मायबापु ॥ ६७ ॥ कां नादब्रह्मचि मुसे आलें । कीं गंगापय असळलें । पतिव्रते आलें । वार्धक्य कां ॥ ६८ ॥ तैसे साच आणि मवाळ । मितले परि सरळ । बोल जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ ६९ ॥ विरोधु वादुबळु । प्राणितापढाळु । उपहासु चाळु । वर्मस्पर्शु ॥ २७० ॥ आटु वेगु विंदाणु । आशा शंका प्रतारणु । हे संन्यासिले अवगुणु । जिया वाचा ॥ ७१ ॥ आणि तयाचि परी किरीटी । थाउ जयाजिये दिठी । सांडलिया भ्रुकूटी । मोकळिया ॥ ७२ ॥ भूतीं वस्तु आहे । तियें रुपों शके विपायें । म्हणोनि वास न पाहे । बहुतकरूनि ॥ ७३ ॥ ऐसाही कोणे एके वेळे । आंतुली कृपेचेनि बळें । उघडोनिया डोळे । दिठी घाली ॥ ७४ ॥ तरि चंद्रबिंबौनि धारा । निघतां नव्हती गोचरा । परि एकसरे चकोरां । निघती दोंदें ॥ ७५ ॥

तैसें प्राणियांसि होये । जरी तो वास पाहे । तया अवलोकनाची सोये । कुर्मीही नेणे ॥ ७६ ॥ किंबहुना ऐसी । दिठी जयाची भूतांसी । करही देखसी । तैसेचि ते ॥ ७७ ॥ होऊनियां कृतार्थ । राहिले सिद्धाचे मनोरथ । तैसे जयाचे हात । निर्व्यापार ॥ ७८ ॥ अक्षमें आणि संन्यासिलें । कां निरिंधन आणि विझालें । मुकेनि घेतलें । मौन जैसें ॥ ७९ ॥ तयापरी कांहीं । जयां करां करणें नाहीं । जे अकर्तयाचां ठायीं । बैसो येती ॥ २८० ॥ आसुडैल वारा । नख लागेल अंबरा । इया बुद्धी करां । चळों नेदी ॥ ८१ ॥ तेथ आंगावरिलीं उडवावीं । कां डोळां रिगतें झाडावीं । पशुपक्ष्यां दावावी त्रासमुद्रा ॥ ८२ ॥ इया केउतिया गोठी । नावडे दंडुकाठी । मग शस्त्राचें किरीटी । बोलणें कें ॥ ८३ ॥ लीलाकमळें खेळणें । पुष्पमाळा झेलणें । न करी म्हणे गोफणें । ऐसें होईल ॥ ८४ ॥ हालवती रोमावळी । यालागी आंग न कुरवाळी । नखांची गुंडाळी बोटांवरी ॥ ८५ ॥ तंव करणेयाचाचि अभावो । परि ऐसाही पडे ठावो । तरि हातां हाचि सरावो । जोडिजती ॥ ८६ ॥ कां नाभिकारा उचलिजे । हातु पडिलिया देइजे । आर्तातें स्पर्शिजे । अळुमाळु ॥ ८७ ॥ हेंही उपरोधें करणें । तरी आर्तभय हरणें । नेणती चंद्रकिरणें । जिव्हाळा तो ॥ ८८ ॥ पावोनि तो स्पर्शु । मलयानिळु खरपुसु । तेणें मानें पशु । कुरवाळणें ॥ ८९ ॥ जे सदा रिते मोकळे । जैशीं चंदनांगें निसळें । न फळतांही निफळें । होतीचि ना ॥ २९० ॥ आतां असो हे वाग्जाळ । जाणें तें करतळ । सज्जनाचे शीळ । स्वभाव जैसे ॥ ९१ ॥ आतां मन तयाचें । सांगों म्हणों जरी साचें । तरी सांगितले कोणाचें । विलास हे ॥ ९२ ॥ काइ शाखा नव्हे तरु । जळेंवीण असे सागरु । तेज आणि तेजाकारु । आन काई ॥ ९३ ॥ अवयव आणि शरीर । हे वेगळाले काई कीर । कीं रसु आणि नीर । सिनी आथी ॥ ९४ ॥ म्हणोनि हे जे सर्व । सांगितले बाह्य भाव । ते मनचि गा सावयव । ऐसें जाणें ॥ ९५ ॥ जें बीज भुई खोंविलें । तेंचि वरी रुख जाहलें । तैसें इंद्रियाद्वारी फांकलें । अंतरचि ॥ ९६ ॥ पैं मानसींचि जरी । अहिंसेची अवसरी । तरी कैंची बाहेरी । वोसंडेल ॥ ९७ ॥ आवडे ते वृत्ती किरीटी । आधीं मनौनी उठी । मग ते वाचे दिठी । करांसी ये ॥ ९८ ॥ वांचूनि मनींचि नाहीं । तें वाचेसि उमटेल काई । बीजेंवीण भुईं । अंकुर असे ॥ ९९ ॥ उगमींचि वाळुनि जाये । ते वोघीं कैचें वाहे । जीवु गेलिया आहे । चेष्टा देहीं ॥ ३०० ॥ म्हणोनि मनपण मोडे । तैं इंद्रिया आधींच उबडें । सूत्रधारेंवीण साइखडें । वावो जैसें ॥ १ ॥ तैसें मन हें पांडवा । मूळ यया इंद्रियभावां । हेंचि राहटे आघवां । द्वारीं इहीं ॥ २ ॥ परि जियें वेळीं जैसें । जें होऊनि आंतु असे । बाहेरि ये तैसें । व्यापाररूपें ॥३ ॥ यालागीं साचोकारें । मनीं अहिंसा थांवे थोरें । पिकली द्रुती आदरें । बोभात निघे ॥ ४ ॥ म्हणोनि इंद्रियें तेचि संपदा । वेचितांही उदावादा । अहिंसेचा धंदा । करितें आहाती ॥ ५ ॥ समुद्रीं दाटे भरितें । तैं समुद्रचि भरी तरियांतें । तैसें स्वसंपत्ती चित्तें । इंद्रियां केलें ॥ ६ ॥ हें बहु असो पंडितु । धरूनि बाळकाचा हातु । वोळी लिही व्यक्तु । आपणचि ॥ ७ ॥ तैसें दयालुत्व आपुलें । मनें हातापायां आणिलें ।

मग तेथ उपजविलें । अहिंसेतें ॥ ८ ॥ याकारणें किरीटी । इंद्रियांचिया गोठी । मनाचियेचि राहाटी । रूप केलें ॥ ९ ॥ ऐसा मनें देहें वाचा । सर्व संन्यासु दंडाचा । जाहला ठायीं जयाचां । देखशील ॥ ३१० ॥ तो जाण वेल्हाळ । ज्ञानाचें वेळाउळ । हें असो निखळ । ज्ञानचि तो ॥ २२ ॥ जे अहिंसा कानें ऐकिजे । ग्रंथाधारें निरूपिजे । ते पाहावी हें उपजे । तैं तोचि पाहावा ॥ १२ ॥ ऐसें म्हणितलें देवें । तें बोलें एकें सांगावें । परि फांकला हें उपसाहावें । तुम्हीं मज ॥ १३ ॥ म्हणाल हिरवें चारीं गुरूं । विसरे मागील मोहर धरूं । कां वारेलगें पांखिरूं । गगनीं भरे ॥ १४ ॥ तैसिया प्रेमाचिया स्फूर्तीं । फावलिया रसवृत्ती । वाहविला मती । आकळेना ॥ १५ ॥ तरि तैसें नोहे अवधारा । कारण आहे विस्तारा । एऱ्हवीं पद तरी अक्षरां । तिहींचेंचि ॥ १६ ॥ अहिंसा म्हणतां थोडी । परि तेचि होय जी उघडी । जैं लोटिजती कोडी । मतांचिया ॥ १७ ॥ एऱ्हवीं प्राप्तें मतांतरे । थातंबूनि आंगभरें । बोलिजैल तें न सरे । तुम्हांपाशीं ॥ १८ ॥ रत्नपारखियांचां गांवीं । जाईल गंडकी तरि सोडावी । काश्मीरीं न करावी । मिडगणे जेवी ॥ १९ ॥ काइसा वासु कापुरा । मंद जेथ अवधारा । पिठाचा विकरा । तिये सातें ॥ ३२० ॥ म्हणोनि इये सभे । बोलकेपणाचेनि क्षोभें । लाग सर न लभे । बोला प्रभु ॥ २१ ॥ सामान्या आणि विशेषा । सकळे कीजेल देखा । तरी कानाचेया मुखा – । कडे नेयाल ना तुम्ही ॥ २२ ॥ शंकेचेनि गदळें । जैं शुद्ध प्रमेय मैळे । तैं मागुतां पाउलीं पळे । अवधान येतें ॥ २३ ॥ कां करूनि बाबुळियेची बुंथी । जळें जियें ठाती । तयांची वास पाहाती । हंस काई ॥ २४ ॥ कां अभ्रापैलीकडे । येत चांदिणें कोडें । तैं चकोरें चांचुवडें । उचलितीना ॥ २५ ॥ तैसे तुम्ही वास न पाहाल । ग्रंथु नेघा वरि कोपाल । जरी निर्विवाद नव्हैल । निरूपण ॥ २६ ॥ न बुझवितां मतें । न फिटे आक्षेपाचें लागतें । तें व्याख्यान जी तुमतें । जोडूनि नेदी ॥ २७ ॥ आणि माझें तंव आघवें । ग्रंथन येणेंचि भावें । जे तुम्हीं संती होआवें । सन्मुख सदा ॥ २८ ॥ एऱ्हवीं तरी साचोकारें । तुम्ही गीतार्थाचे सोइरे । जाणोनि गीता जीवसरें । धरिली मियां ॥ २९ ॥ जें आपुलें सर्वस्व द्याल । मग इयेतें सोडवुनि न्याल । म्हणोनि ग्रंथु नव्हे वोल । साचचि हे ॥ ३३० ॥ कां सर्वस्वाचा लोभु धरा । वोलीचा अव्हेरु करा । तरि गीते मज अवधारा । एकचि गती ॥ ३१ ॥ किंबहुना मज । तुमचिया कृपा काज । तियेलागीं व्याज । ग्रंथाचें केलें ॥ ३२ ॥ तरि तुम्हां रसिकांजोगें । व्याख्यान शोधावें लागे । म्हणूनि मतांगें । बोलों ठेलां ॥ ३३ ॥ तंव कथेसी पसरु जाहला । श्लोकार्थु दूरी गेला । कीजो क्षमा या बोला । अपत्या मज ॥ ३४ ॥ आणि घांसाआंतिल हरळु । फेडितां लागे वेळु । ते दूषण नव्हे खडळु । सांडावा कीं ॥ ३५ ॥ कां संवचोरा चुकवितां । दिवस लागलिया माता । कोपावें कीं जीविता । जिताणें कीजे ॥ ३६ ॥ परि यावरील हें नव्हे । तुम्हीं साहिलें तेंचि बरवें । आतां अवधारिजो देवें । बोलिलें ऐसें ॥ ३७ ॥ म्हणे उन्मेखसुलोचना । सावध होईं अर्जुना । करू तुज ज्ञाना । वोळखी आतां ॥ ३८ ॥ तरि ज्ञान गा तें एथें । वोळख तूं निरुतें । आक्रोशेंवीण जेथें । क्षमा असे ॥ ३९ ॥

अगाध सरोवरीं । कमळिणी जियापरी । कां सदैवाचां घरीं । संपत्ति जैसी ॥ ३४० ॥ पार्था तेणें पाडें । क्षमा जयातें वाढे । तेही लक्षे तें फुडें । लक्षण सांगों ॥ ४१ ॥ तरि पढियंतें लेणें । आंगीं भावें जेणें । धरिजे तेवीं साहणें । सर्वचि जया ॥ ४२ ॥ त्रिविध मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे । वरि पडिलिया नव्हे । वांकुडा जो ॥ ४३ ॥ अपेक्षित पावे । तें जेणें तोषें मानवे । अनपेक्षिताही करवे । तोचि मानु ॥ ४४ ॥ जो मानापमानातें साहे । सुखदु:ख जेथ सामाये । निंदास्तुती नोहे । दुखंडु जो ॥ ४५ ॥ उन्हाळेनि जो न तापे । हिमवंतीं न कांपे । कायसेनिही न वासिपे । पातलेया ॥ ४६ ॥ स्वशिखरांचा भारु । नेणे जैसा मेरु । की धरा यज्ञसुकरु । वोझें न म्हणे ॥ ४७ ॥ नाना चराचरीं भूतीं । दाटणी नव्हे क्षिती । तैसा नाना द्वंद्वीं प्राप्तीं । घामेजेना ॥ ४८ ॥ घेउनी जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट । करी वाड पोट । समुद्र जेवीं ॥ ४९ ॥ तैसें जयाचां ठायीं । साहणें कहींचि नाहीं । आणि साहतु असे ऐसेंही । स्मरण नुरे ॥ ३५० ॥ आंगा जें पातलें । तें करूनि घाली आपुलें । तेथ साहतेनि नवलें । घेपिजेना ॥ ५१ ॥ हे अनाक्रोश क्षमा । जयापाशीं प्रियोत्तमा । जाण तेणें महिमा । ज्ञानासि गा ॥ ५२ ॥ तो पुरुष पांडवा । ज्ञानाचा वोलावा । आतां परिस आर्जवा । रूप करूं ॥ ५३ ॥ तरि आर्जव तें ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें । आवडे तयाही दोषें । एकचि गा ॥ ५४ ॥ कां तोंड पाहूनि प्रकाशु । न नरी जेवीं चंडांशु । जगा एकुचि अवकाशु । आकाश जैसें ॥ ५५ ॥ तैसें जयाचें मन । माणुसाप्रती आन आन । नव्हे आणि वर्तन । ऐसें पैं तें ॥ ५६ ॥ जे जगचि सनोळख । जगेंसीं जुनाट सोयरिक । आपपर हे भाख । जाणणें नाही ॥ ५७ ॥ भलतेणेंसीं मेळु । पाणिया ऐसा ढाळु । कवणेविखीं आडळु । नेघे चित्त ॥ ५८ ॥ वारियाची धांव । तैसे सरळ भाव । शंका आणि हांव । नाहीं जया ॥ ५९ ॥ मायेपुढें बाळका । रिगतां न पडे आशंका । तैसें मन देतां लोकां । नालोची जो ॥ ३६० ॥ फांकलिया इंदीवरा । परिवारु नाहीं धनुर्धरा । तैसा कोनकोंपरा । नेणे जीव ॥ ६१ ॥ चोखाळपण रत्नाचें । रत्नावरी किरणाचें । तैसें पुढां मन जयाचें । करणें पाठी ॥ ६२ ॥ आलोचूं जो नेणे । अनुभवचि जोगावणें । धरी मोकली अंत:करणें । नव्हेचि जया ॥ ६३ ॥ दिठी नोहे मिणधी । बोलणें नाहीं संदिग्धी । कवणेंसीं हीनबुद्धी । राहाटीजे ना ॥ ६४ ॥ दाहाही इंद्रियें प्रांजळें । निष्प्रपंचें निर्मळें । पांचही पालव मोकळे । आठही पाहर ॥ ६५ ॥ अमृताची धार । तैसें उजू अंतर । किंबहुना जो माहेर । या चिन्हांचें ॥ ६६ ॥ तो पुरुष सुभटा । आर्जवाचा आंगवठा । जाण तेथेंचि घरटा । ज्ञानें केला ॥ ६७ ॥ आतां ययावरी । गुरुभक्तीची परी । सांगों गा अवधारीं । चतुरनाथा ॥ ६८ ॥ आघवियांचि दैवां । जन्मभूमि हे सेवा । जे ब्रह्म करी जीवा । शोच्यातें ॥ ६९ ॥ ते आचार्योपास्ती । प्रकटिजैल तुजप्रती । बैसों दे एकपांती । अवधानाची ॥ ३७० ॥ तरि सकळ जळसमृद्धी । घेऊनि गंगा रिगाली उदधी । कीं श्रुति हे महापदीं । पैठी जाहाली ॥ ७१ ॥ नाना वेंटाळूनि जीवितें । गुणागुण उखितें । प्राणनाथा उचितें । दिधलें प्रिया ॥ ७२ ॥ तैसें सबाह्य

आपुलें । जेणें गुरुकुळीं वोपिलें । आपणपें केलें । भक्तीचें घर ॥ ७३ ॥ गुरुगृह जिये देशीं । तो देशुचि वसे मानसीं । विरहिणी कां जैसी । वल्लभातें ॥ ७४ ॥ तियेकडोनि येतसें वारा । देखोनि धांवे सामोरा । आड पडे म्हणे घरा । बीजें कीजो ॥ ७५ ॥ साचा प्रेमाचिया भुली । तया दिशेसीचि आवडे बोली । जीवु थानापती करूनि घाली । गुरुगृहीं जो ॥ ७६ ॥ परि गुरुआज्ञा धरिलें । देह गांवी असे एकलें । वांसरुवा लाविलें । दावें जैसें ॥ ७७ ॥ म्हणे कैं हें बिरडें फिटेल । कैं तो स्वामी भेटेल । युगाहिहूनि वडिल । निमिष मानी ॥ ७८ ॥ ऐसेया गुरुग्रामींचें आलें । कां स्वयें गुरूंनींच धाडिलें । तरी गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ॥ ७९ ॥ कां सुकतया अंकुरा - । वरि पडिलिया पीयूषधारा । नाना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ॥ ३८० ॥ नातरी रंकें निधान देखिलें । आंधळिया डोळे उघडले । भणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ॥ ८१ ॥ तैसें गुरुकुळींचेनि नांवें । महासुखें अति थोरावे । जे कोडेंही पोटाळावें । आकाश कां ॥ ८२ ॥ पै गुरुकुळीं ऐसी । आवडी जया देखसी । जाण ज्ञान तयापासीं । पाइकी करी ॥८३ ॥ आणि अभ्यंतरिलियेकडे । प्रेमाचेनि पवाडें । श्रीगुरुचें रूपडें । उपासी ध्यानीं ॥ ८४ ॥ हृदयशुद्धीचां आवारीं । आराध्यु तो निश्चल धुरु करी । मग सर्व भावेंसी परिवारीं । आपण होय ॥ ८५ ॥ कां चैतन्याचिये पोवळी - । माजीं आनंदाचां राउळीं । गुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥ ८६ ॥ उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाळ सात्त्विका । भरोनि त्र्यंबका । लाखोली वाहे ॥ ८७ ॥ काळशुद्धी त्रिकाळीं । जीवदशाधूप जाळी । ज्ञानदीपें वोंवाळी । निरंतर ॥ ८८ ॥ सामरस्याची रससोय । अखंड अर्पितु जाय । आपण भराडा होय । गुरु तो लिंग ॥ ८९ ॥ नातरी जीवाचिये सेजे । गुरु कांतु करूनि भुंजे । ऐसीं प्रेमाचीं भोजें । बुद्धी वाहे ॥ ३९० ॥ कोणे एके अवसरीं । अनुरागु भरे अंतरीं । कीं तया नाव करी । क्षीराब्धी ॥ ९१ ॥ तेथ ध्येय ध्यान बहु सुख । तेचि शेषतुली का निर्दोख । वरि जलशयनु देख । भावी गुरु ॥ ९२ ॥ मग वोळगती पाय । लक्ष्मी आपण होय । गरुड होऊनि उभा राहे । आपणचि ॥ ९३ ॥ नाभीं आपणचि जन्मे । ऐसे गुरुमूर्तिप्रेमें । अनुभवी मनोधर्में । ध्यानसुख ॥ ६४ ॥ एकाधेनि वेळें । गुरु माय करी भावबळें । मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरी ॥ ९५ ॥ नातरी गा किरीटी । चैतन्यतरुतळवटीं । गुरु धेनु आपण पाठीं । वत्स होय ॥ ९६ ॥ गुरुकृपास्नेहसलिलीं । आपण होय मासोळी । कोणे एके वेळीं । हेंचि भावी ॥ ९७ ॥ गुरुकृपामृताचें वडप । आपण होय सेवावृत्तीचें रोप । ऐसेसे संकल्प । विये मन ॥ ९८ ॥ चक्षुपक्षेंवीण । पिलूं होय आपण । कैसें पैं अपारपण । आवडीचें ॥ ९९ ॥ गुरूतें पक्षिणी करी । चारा घे चांचूवरी । गुरु तारु धरी । आपण कास ॥ ४०० ॥ ऐसें प्रेमाचेनि थावें । ध्यानचि ध्यानाते प्रसवे । पूर्णसिंधू हेलावे । फुटती जैसे ॥ १ ॥ किंबहुना यापरी । श्रीगुरुमूर्ती अंतरीं । भोगी आतां अवधारीं । बाह्यसेवा ॥ २ ॥ तरि जीवीं ऐसें आवांके । म्हणे दास्य करीन निकें । जैसें गुरु कौतुकें । माग म्हणती ॥ ३ ॥ तैसिया साचा उपास्ती । गोसावी सुप्रसन्न होती । तेथ मी

विनंती । ऐसी करीन ॥ ४ ॥ म्हणेन तुमचा देवा । परिवारु जो आघवा । तेतुलें रूपें होआवा । मीचि एकु ॥ ५ ॥ आणि उपकरतीं आपुलीं । उपकरणें आथि जेतुलीं । माझीं रूपें तेतुलीं । होआवीं जी ॥ ६ ॥ ऐसा मागेन वरु । तेथ हो म्हणती गुरु । मग तो परिवारु । मीचि होईन ॥ ७ ॥ उपकरणजात सकळिक । तेंहि मीचि होईन एकैक । तेव्हा उपास्तीचें कवतिक । देखिजेल ॥ ८ ॥ गुरु बहुतांची माये । परि एकलौती होऊनि ठाये । तैसें करूनि आण वाये । कृपे तिये ॥ ९ ॥ तया अनुरागा वेधु लावीं । एकपत्नीव्रतचि घेववीं । क्षेत्रसंन्यासु करवीं । लोभाकरवीं ॥ ४१० ॥ चतुर्दिक्षु वारा । न लाहे निघों बाहिरा । तैसा गुरुकृपे पांजिरा । मीचि होईन ॥ ११ ॥ आपुलिया गुणांचीं लेणीं । करीन गुरुसेवे स्वामिणी । हें असो होईन गंवसणी । मीचि भक्तीसी ॥ १२ ॥ गुरुस्नेहाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटीं । ऐसिया मनोरथांचिया सृष्टी । अनंता रची ॥ १३ ॥ म्हणे गुरूचें भुवन । आपण मी होईन । आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिंचें ॥ १४ ॥ निर्गमागमीं दातारें । जे वोलांडिजती उंबरे । ते मी होईन आणि द्वारें । द्वारपाल ॥ १५ ॥ पाउवा मी होईन । तियां मीचि लेववीन । छत्र मी आणि करीन । बारीपण ॥ १६ ॥ मी तळ उपरु जाणविता । चंवरधरु हातु देता । स्वामीपुढां खोलता । होईन मी ॥ १७ ॥ मीचि होईन सागळा । करूं सुईन गुरुळां । सांडिती तो नेपाळा । पाडिघा मीचि ॥ १८ ॥ हडप मी वोळगेन । मीचि उगाळु घेईन । उळिग मी करीन । आंघोळीचें ॥ १९ ॥ होईन गुरूचें आसन । अलंकार परिधान । चंदानादि होईन । उपचार ते ॥ ४२० ॥ मीचि होईन सुआरु । वोगरीन उपहारु । आपणपेनि श्रीगुरु । वोंवाळीन ॥ २१ ॥ जे वेळी देवो आरोगिती । तेव्हां पांतीकरु मीचि पांती । मीचि होईन पुढती । देईन विडा ॥ २२ ॥ ताट मी काढीन । सेज मी झाडीन । चरणसंवाहन । करीन मीचि ॥ २३ ॥ सिंहासन होईन आपण । वरि श्रीगुरु करिती आरोहण । होईन पुरेपण । वोळगेचें ॥ २४ ॥ श्रीगुरूचें मन । जया देईल अवधान । तें मी पुढां होईन । चमत्कारु ॥ २५ ॥ तया श्रवणाचां अंगणी । होईन शब्दाचिया अक्षोहिणी । स्पर्श होईन घसणी । आंगाचिया ॥ २६ ॥ श्रीगुरूचे डोळे । अवलोकनें स्नेहाळें । पाहाती तिये सकळें । होइन रूपें ॥ २७ ॥ तिये रसने जो जो रुचेल । तो तो रसु म्यां होईजेल । गंधरूपें कीजेल । घ्राणसेवा ॥ २८ ॥ एवं बाह्यमनोगत । गुरुसेवा समस्त । वेंटाळीन वस्तुजात । होऊनियां ॥ २९ ॥ जंव देह हें असेल । तंव ऐसी वोळगी कीजेल । मग देहांती नवल । बुद्धि आहे ॥ ४३० ॥ इये शरीरींची माती । मेळवीन तिये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाती । आराध्याचे ॥ ३१ ॥ माझा स्वामी कवतिकें । स्पर्शति जियें उदकें । तेथ लया नेईन निकें । आपीं आप ॥ ३२ ॥ श्रीगुरु वोंवाळिजती । कां भुवनीं जे उजळिती । तयां दीपाचिया दीप्तीं । ठेवीन तेज ॥ ३३ ॥ चवरी हन विंजणा । तेथ लयो करीन प्राणा । मग आंगाचा वोळगणा । होईन मी ॥ ३४ ॥ जिये जिये अवकाशीं । गुरु असती परिवारेंसीं । आकाश लया आकाशीं । नेईन तिये ॥ ३५ ॥ परि जीतु मेला न संडीं । निमेषु लोका न धडीं । ऐसेनि गणाविया

कोडी । कल्पांचिया ॥ ३६ ॥ येतुलेंवरी धिंवसा । जयाचिया मानसा । आणि करूनियांहि तैसा । अपारु जो ॥ ३७ ॥ रात्री दिवो नेणे । थोडें बहु न म्हणे । म्हणियाचेनि दाटपणें । साजा होय ॥ ३८ ॥ तो व्यापारु येणें नांवे । गगनाहूनि थोरावे । एकला करी आघवें । एकेचि काळीं ॥ ३९ ॥ हृदयवृत्ती पुढां । आंगचि घे दवडा । काज करी होडा । मानसेंशी ॥ ४४० ॥ एकादिया आळामाळा । श्रीगुरूचिया खेळा । लोण करी सकळा । जीविताचें ॥ ४१ ॥ जो गुरुदास्यें कृशु । जो गुरुप्रेमें सपोषु । गुरुआज्ञे निजवासु । आपणचि जो ॥ ४२ ॥ जो गुरुकुळें सुकुलीनु । जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु । जो गुरुसेवाव्यसनें सव्यसनु । निरंतर ॥ ४३ ॥ गुरुसंप्रदायधर्म । ते जयाचे वर्णाश्रम । गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचें गा ॥ ४४ ॥ गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माय गुरु पिता । जो गुरुपूजेपरौता । मार्गु नेणे ॥ ४५ ॥ श्रीगुरुचें द्वार । तें जयाचें सर्वस्व सार । गुरुसेवकां सहोदर । प्रेमें भजे ॥ ४६ ॥ जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥ ४७ ॥ शिवतलें गुरुचरणीं । भलतैसे हो पाणी । तया तीर्थयात्रें आणी । तीर्थें त्रैलोक्यींचीं ॥ ४८ ॥ श्रीगुरूचें उशिटें । लाहे जैं अचचटें । तैं तेणें लाभें विटे । समाधीसी ॥ ४९ ॥ कैवल्यसुखासाठीं । परमाणु घे किरीटी । उधळती पायांपाठीं । चालतां जे ॥ ४५० ॥ हें असो सांगों किती । नाहीं पारु गुरुभक्ती । परी गा उत्क्रांतमती । कारण हें ॥ ५१ ॥ जया इये भक्तीची चाड । जया इये विषयींचें कोड । जो हे सेवेवांचून गोड । न मनी कांही ॥ ५२ ॥ तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आवो । हें असो तो देवो । ज्ञान भक्तु ॥ ५३ ॥ हें जाण पां साचोकारें । तेथ ज्ञान उघडेनि द्वारें । नांदत असे जगा पुरे । इया रीती ॥ ५४ ॥ जिये गुरुसेवेविखीं । माझा जीव अभिलाखी । म्हणोनि सोयचुकी । बोली केली ॥ ५५ ॥ एऱ्हवीं असतां हातीं खुळा । भजनावधानीं आंधळा । परिचर्येलागीं पांगुळा - । पासूनि मंदु ॥ ५६ ॥ गुरुवर्णनीं मुका । आळशी पोशिजे फुका । परि मनीं आथि निका । सानुरागु ॥ ५७ ॥ तेणेंचि पैं कारणें । हें स्थूळ पोखणें । पडलें मज म्हणे । ज्ञानदेवो ॥ ५८ ॥ परि तो बोलु उपसाहावा । आणि वोळगे अवसरु देयावा । आतां म्हणेन जी बरवा । ग्रंथार्थुची ॥ ५९ ॥ परिसा परिसा श्रीकृष्णु । जो भूतभारसहिष्णु । तो बोलतसे विष्णु । पार्थु ऐके ॥ ४६० ॥ म्हणे शुचित्व गा ऐसें । जयापाशीं दिसे । आंग मन जैसें । कापुराचें ॥ ६१ ॥ कां रत्नाचें दळवाडें । तैसें सबाह्य चोखडें । आंत बाहेरीं एकें पाडें । सूर्यु जैसा ॥ ६२ ॥ बाहेरी कर्में क्षाळला । भितरीं ज्ञाने उजळला । इहीं दोहीं परीं आला । पाखाळा एका ॥ ६३ ॥ मृत्तिका आणि जळें । बाह्य येणे मेंळें । निर्मळु होय बोलें । वेदाचेनि ॥ ६४ ॥ भलतेथ बुद्धी बळी । रजें आरिसा उजळी । सौंदणी फेडी थिगळी । वस्त्रांचिया ॥ ६५ ॥ किंबहुना इयापरी । बाह्य चोख अवधारीं । आणि ज्ञानदीपु अंतरीं । म्हणौनि शुद्ध ॥ ६६ ॥ एऱ्हवीं तरी पांडुसुता । आंत शुद्ध नसतां । बाहेरि कर्म तो तत्त्वतां । विटंबु गा ॥ ६७ ॥ मृत जैसा शृंगारिला । गाढव तीर्थीं न्हाणिला । कडुदुधिया माखिला । गुळें जैसा ॥ ६८ ॥

वोस गृहीं तोरण बांधिलें । कां उपवासी अन्नें लिंपिलें । कुंकुसेंदुर केलें । कांतहीनेने ॥ ६९ ॥ कळस ढिमाचे पोकळ । जळो वरील ते झळाळ । काय करूं चित्रींव फळ । आंतु शेण ॥ ४७० ॥ तैसें कर्मवरिचिलेकडां । न सरे थोर मोलें कुडा । नव्हे मदिरेचा घडा । पवित्र गंगे ॥ ७१ ॥ म्हणोनि अंतरीं ज्ञान व्हावें । मग बाह्य लाभेल स्वभावें । वरि ज्ञानकर्में संभवे । ऐसें कें जोडे ॥ ७२ ॥ यालागी बाह्य विभागु । कर्में धुतला चांगु । आणि ज्ञानें फेडिला वंगु । अंतरींचा ॥ ७३ ॥ तेथ अंतरबाह्य गेलें । निर्मळत्व एक जाहलें । किंबहुना उरलें । शुचित्वचि ॥ ७४ ॥ म्हणोनि सद्भाव जीवगत । बाहेरि दिसती फांकत । ते स्फटिकगृहींचें डोलत । दीप जैसे ॥ ७५ ॥ विकल्प जेणें जेणें उपजे । नाथिली विकृती निपजे । अप्रवृत्तीचीं बीजें । अंकुर घेती ॥ ७६ ॥ तें आइके देखे अथवा भेटे । परि मनीं कांहींचि नुमटे । मेघरंगें न कांटे । व्योम जैसें ॥ ७७ । एऱ्हवीं इंद्रियांचेनि मेळें । विषयांवरी तरी लोळे । परि विकाराचेनि विटाळें । लिंपिजेना ॥ ७८ ॥ भेटलेया वाटेवरी । चोखी आणि माहारी । तेथ नातळे तियापरी । राहाटों जाणे ॥ ७९ ॥ कां पतिपुत्रांतें आलिंगी । एकचि ते तरुणांगी । तेथ पुत्रभावाचा अंगीं । न लगेचि कामु ॥ ४८० ॥ तैसें हृदय चोख । संकल्पविकल्पीं सनोळख । कृत्याकृत्य विशेख । फुडें जाणे ॥ ८१ ॥ पाणियें हिरा न भिजे । आधणीं हरळ न शिजे । तैसी विकल्पजातें न लिंपिजे । मनोवृत्ती ॥ ८२ ॥ तया नांव शुचित्वपण । पार्था गा संपूर्ण । हें देखसी तेथ जाण । ज्ञान आहे ॥ ८३ ॥ आणि स्थिरता साचें । घर रिगाली जयाचें । तो पुरुष ज्ञानाचें । आयुष्य गा ॥ ८४ ॥ देह तरी वरिचिकडे । आपुलिया परि हिंडे । परि बैसका न मोडे । मानसींची ॥ ८५ ॥ वत्सावरूनि धेनूचें । स्नेह राना न वचे । नव्हती भोग सतियेचे । प्रेमभोग ॥ ८६ ॥ कां लोभिया दूर जाये । परि जीव ठेवाचि ठाये । तैसा देहो चाळितां नव्हे । चळु चित्ता ॥ ८७ ॥ जातया अभ्रासवें । जैसें आकाश न धांवे । भ्रमणचक्रीं न भंवे । ध्रुव जैसा ॥ ८८ ॥ पांथिकाचिया येरझारा । सवें पंथु न वचे धनुर्धरा । कां नाहीं जेवीं तरुवरां । येणें जाणें ॥ ८९ ॥ तैसा चळणवळणात्मकीं । असोनि ये पांचभौतिकीं । भूतोर्मी एकी । चळिजेना ॥ ४९० ॥ वाहुटळीचेनि बळें । पृथ्वी जैसी न ढळे । तैसा उपद्रवउमाळें । न लोटे जो ॥ ९१ ॥ दैन्यदुःखीं न तपे । भयशोकीं न कंपे । देहमृत्यु न वासिपे । पातलेनि ॥ ९२ ॥ आर्तिआशापडिभरें । वयव्याधीगजरें । उजू असतां पाठिमोरें । नव्हे चित्त ॥ ९३ ॥ निंदा निस्तेज दंडी । कामलोभा वरपडी । परी रोमा नव्हे वांकुडी । मानसाची ॥ ९४ ॥ आकाश हें वोसरो । पृथ्वी वरि विरो । परी नेणे मोहरों । हृदयवृत्ती ॥ ९५ ॥ हाती हाला फुलीं । पासवणा जेवीं न घाली । तैसा न लोटे दुर्वाक्यशेलीं । सेळिला सांता ॥ ९६ ॥ क्षीरार्णवाचां कल्लोळी । कंपु नाहीं मंदराचळीं । कां आकाश न जळे जाळीं । वणवियाचां ॥ ९७ ॥ तैशा आल्या गेल्या ऊर्मी । नव्हे गजबज मनोधर्मिं । किंबहुना धिरु क्षमी । कल्पातींही ॥ ९८ ॥ पैं स्थैर्य ऐशी भाख । बोलिले जे सविशेष । ते हे दशा गा देख । देखणेया ॥ ९९ ॥ हें स्थैर्य निधडें । जेथ आंगें जीवें जोडे । तें ज्ञानाचें

उघडें । निधान साचें ॥ ५०० ॥ आणि इसाळु जैसा घरा । कां दंदिया हतियेरा । न विसंबे भांडारा । बद्धकु जैसा ॥ १ ॥ एकलौतिया बाळका - । वरि पडौनि ठाके अंबिका । मधुविषीं मधुमक्षिका । लोभिणी जैसी ॥ २ ॥ अर्जुना जो यापरी । अंत:करण जतन करी । नेदी उभें ठाकों द्वारीं । इंद्रियांचां ॥ ३ ॥ म्हणे काम बागुल ऐकेल । हे आशा सियारी देखैल । तरि जीवा टेकैल । म्हणोनि बिहे ॥ ४ ॥ बाहेरी धीट जैसी । दाटुगा पति कळासि । करी टेहणी तैसी । प्रवृत्तीसीं ॥ ५ ॥ सचेतनीं वाणेपणें । देहासकट आटणें । संयमावरीं करणें । बुझूनि घाली ॥ ६ ॥ मनाचां महाद्वारीं । प्रत्याहाराचिया ठाणांतरी । जो यम दम शरीरीं । जागवी उभें ॥ ७ ॥ आधारीं नाभीं कंठीं । बंधत्रयाचीं घरटीं । चंद्रसूर्यसंपुटीं । सुये चित्त ॥ ८ ॥ समाधीचे शेजेपासीं । बांधोनि घाली ध्यानेंसी । चित्त चैतन्यसमरसीं । आंतु रते ॥ ९ ॥ अगा अंत:करणनिग्रहो जो । तो हा हें जाणिजो । हा आथि तेथ विजयो । ज्ञानाचा पैं ॥ ५१० ॥ जयाची आज्ञा आपण । शिरीं वाहे अंत:करण । मनुष्याकारें जाण । ज्ञानचि तो ॥ ११ ॥

इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च । जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम् ॥ ८ ॥

आणि विषयांविखीं । वैराग्याची निकी । पुरवणी मानसीं कीं । जिती आथि ॥ १२ ॥ वमिलेया अन्ना । लाळ न घोटी जेवीं रसना । आंग न सूये आलिंगना । प्रेताचिया ॥ १३ ॥ विष खाणें नागवे । जळत घरीं न रिगवे । व्याघ्रविवरां न वचवे । वस्ती जेवीं ॥ १४ ॥ धडाडीत लोहरसीं । उडी न घालवे जैसी । न करवे उशी । अजगराची ॥ १५ ॥ अर्जुना तेणे पाडें । जयासी विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचेनि तोंडें । काहींच जावों ॥ १६ ॥ जयाचां मनीं आलस्य । देही अतिकार्श्य । यमदमीं सामरस्य । जयासि गा ॥ १७ ॥ तपोव्रतांचा मेळावा । जयाचां ठायीं पांडवा । युगांत जया गांवा - । आंतु येतां ॥ १८ ॥ बहु योगाभ्यासीं हांव । विजनाकडे धांव । न साहे जो नांव । संघाताचें ॥ १९ ॥ नाराचाचीं आंथुरणें । पूयपंकीं लोळणें । तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें ॥ ५२० ॥ स्वर्गातें मानसें । ऐकोनि मानी ऐसें । कुहिलें पिशित जैसें । श्वानाचें कां ॥ २१ ॥ तें हें विषयवैराग्य । जें आत्मलाभाचें भाग्य । येणें ब्रह्मानंदा योग्य । जीव होती ॥ २२ ॥ ऐसा उभयभोगीं त्रासु । देखसी जेथ बहुवसु । तेथ जाण रहिवासु । ज्ञानाचा तूं ॥ २३ ॥ आणि सचाडाचिये परी । इष्टापूर्तें करी । परि केलेपण शरीरीं । वसों नेदी ॥ २४ ॥ वर्णाश्रमपोषकें । कर्में नित्यनैमित्तिकें । तयांमाजीं कांहीं न ठके । आचरतां ॥ २५ ॥ परि हें मियां केलें । कीं हें माझेनि जालें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजीं ॥ २६ ॥ जैसें अवचितपणें । वायूसि सर्वत्र विचरणें । कां निरभिमान उदैजणें । सूर्याचें जैसें ॥ २७ ॥ कां श्रुति स्वभावता बोले । गंगा काजेविण चाले । तैसें अवष्टंभहीन भलें । वर्तणें जयाचें ॥ २८ ॥ ऋतुकाळीं तरी फळती । परी फळलों हें नेणती । तयां वृक्षांचिये ऐसी वृत्ती । कर्मीं सदा ॥ २९ ॥ एवं मनीं कर्मीं बोली । जेथ अहंकारा उखी जाहली । एकावळीची काढिली । दोरी जैसी ॥ ५३० ॥ संबंधेंवीण जैसीं । अभ्रें असती आकाशीं । देहीं कर्में

तैसीं । जयासि गा ॥ ३१ ॥ मद्यपा आंगींचे वस्त्र । लेपाहातींचें शस्त्र । बैलावरी शास्त्र । बांधलें आहे ॥ ३२ ॥ तया पाडें देहीं । जया आहे हे सेचि नाहीं । निरहंकारता पाहीं । तया नांव ॥ ३३ ॥ हें संपूर्ण जेथें दिसे । तेथेंचि ज्ञान असे । इयेविषीं अनारिसें । बोलों नये ॥ ३४ ॥ आणि जन्ममृत्युदु:खें । व्याधिवार्धक्यकलुषें । इयें आंगा न येतां देखे । दुरूनि जो ॥ ३५ ॥ साधकु विवसिया । कां उपसर्गु योगिया । पावे उणेयापुरेया । वोथंबा जेवीं ॥ ३६ ॥ वैर जन्मांतरीचें । सर्पा मनौनि न वचे । तेवीं अतीता जन्माचें । उणें जो वाहे ॥ ३७ ॥ डोळां हरळ न विरे । घायीं कोत न जिरे । तैसें काळींचे न विसरे । जन्मदु:ख ॥ ३८ ॥ म्हणे पुयगर्ते रिगाला । अहा मूत्ररंध्रें निगाला । कटा मियां चाटिला । कुचस्वेदु ॥ ३९ ॥ ऐसिऐसियापरी । जन्माचा कांटाळा धरी । म्हणे आतां तें न करीं । जेणें ऐसें होय ॥ ५४० ॥ हारी उमचावया । जुंवारी जैसा ये डाया । कीं वैरा बापाचेया । पुत्र जचे ॥ ४१ ॥ मारिलियाचेनि रागें । पाठींचा जेवीं सूड मागे । तेणें आक्षेपें लागे । जन्मापाठीं ॥ ४२ ॥ परि जन्मती ते लाज । न सांडी जयाचें निज । संभाविता निस्तेज । न जिरे जेवीं ॥ ४३ ॥ आणि मृत्यु पुढें आहे । तोचि कल्पांतीं कां पाहे । परि आजीचि होये । सावधु जो ॥ ४४ ॥ माजी अथांव म्हणता । थडियेचि पांडूसुता । पोहणार आइता । कासे जेवीं ॥ ४५ ॥ कां न पवतां रणाचा ठावो । सांभाळिजे जैसा आवो । वोडण सुइजे घावो । न लगतांचि ॥ ४६ ॥ पाहेचा पेणा वाटबंधा । तंव आजीचि होईजे सावधा । जीव न निगतां औषधा । धांविजे जेवीं ॥ ४७ ॥ येऱ्हवीं ऐसें घडे । जो जळतां घरीं सांपडे । तो मग न पवाडे । कुहा खणों ॥ ४८ ॥ चोंढिये पाथरु गेला । तैसेनि जो बुडाला । तो बोंबेहि सकट निमाला । कोण सांगे ॥ ४९ ॥ म्हणोनि समर्थेसि वैर । जया पडिलें हाडखाइर । तो जैसा आठही पाहर । परजूनि असे ॥ ५५० ॥ नातरी केळवली नोवरी । का संन्यासी जियापरी । तैसा न मरतां जो करी । मृत्युसूचना ॥ ५१ ॥ पैं गा जो ययापरी । जन्मेंचि जन्म निवारी । मरणें मृत्यू मारी । आपण उरे ॥ ५२ ॥ तया घरीं ज्ञानाचें । सांकडें नाहीं साचें । जया जन्ममृत्यूचें । हृदयीं शल्य ॥ ५३ ॥ आणि तयाचिपरी जरा । न टेंकतां शरीरा । तारुण्याचिया भरा - । माजीं देखे ॥ ५४ ॥ म्हणे आजिचां अवसरीं । पुष्टि जे शरीरीं । ते पाहे होईल काचरी । वाळली जैसी ॥ ५५ ॥ निदैव्याचे व्यवसाय । तैसे ठाकती हातपाय । अमंत्रिया राज्याची परी आहे । बळा इया ॥ ५६ ॥ फुलांचिया भोगा - । लागीं प्रेम टांगा । तें करेयाचा गुडघा । तैसें होईल ॥ ५७ ॥ वोढाळाचां खुरीं । आखरु आते बुरी । ते दशा माझां शिरीं । पावेल गा ॥ ५८ ॥ पद्मदळेंसी इसाळे । भांडताति जे हे डोळे । ते होती पडवळें । पिकलीं जैसीं ॥ ५९ ॥ भंवईचीं पडळें । वोमथती सिनसाळें । उरु कुहिजेल जळें । आंसुवांचेनि ॥ ५६० ॥ जैसें बाभुळीचें खोड । गिरबडुनी जाती सरड । तैसें पिचडीं तोंड । सरकटिजेल ॥ ६१ ॥ रांधवणी चुलीपुढें । पऱ्हे उन्मादती खातवडे । तैसींचि यें नाकाडें । बिडबिडती ॥ ६२ ॥ तांबुलें ओंठ राऊं । हांसतां दांत दाऊं । सनागर मिरऊं । बोल जेणें ॥ ६३ ॥ तयाचि पाहे या तोंडा । येईल

जळंबटाचा लोंढा । इया उमळती दाढा । दातांसहित ॥ ६४ ॥ कुळवाडी रिणें दाटली । कां वांकडिया ढोरें बैसलीं । तैसी नुठील कांही केली । जीभचि हे ॥ ६५ ॥ कुसळें कोरडी । वारेनि जाती बरडीं । तैसी आपत्ति तोंडी । दाढियेसी ॥ ६६ ॥ आषाढींचेनि जळें । जैसी झिरपती शैलाचीं मौळें । तैसे खांडीहूनि लाळे । पडती पूर ॥ ६७ ॥ वाचेसि अपवाडु । कानीं अनुघडु । पिंड गरुवा माकडु । होईल हा ॥ ६८ ॥ तृणाचें बुजवणें । आंदोळे वारेगुणें । तैसें येईल कांपणें । सर्वांगासी ॥ ६९ ॥ पायां पडती वेंगडी । हात वळती मुरकुंडी । बरवेपणा बागडी । नाचविजैल ॥ ५७० ॥ मळमूत्रद्वारें । होऊनि ठाकती खोंकरें । नवसियें होती इतरें । माझां निधनीं ॥ ७१ ॥ देखोनि थुंकील जगु । मरणाचा पडैल पांगु । सोयरियां उबगु । येईल माझा ॥ ७२ ॥ स्त्रिया म्हणती विवसी । बाळें जाती मूर्च्छीं । किंबहुना चिळसी । पात्र होईन ॥ ७३ ॥ उभळीचा उजगरा । सेजिया साइलिया घरा । शिणवील म्हणती म्हातारा । बहुतांतें हा ॥ ७४ ॥ ऐसी वार्धक्याची सूचणी । आपणिया तरुणपणीं । देखे मग मनीं । विटे जो गा ॥ ७५ ॥ म्हणे पाहे हें येईल । आणि आतांचें भोगितां जाईल । मग काय उरेल । हितालागी ॥ ७६ ॥ म्हणोनि नाइकणें पावे । तंव आईकोनि घाली आघवें । पंगु न होता जावें । तेथ जाय ॥ ७७ ॥ दिठी जंव जाये । तंव पाहावें तेतुलें पाहे । मुकत्वा आधीं वाचा वाहे । सुभाषितें ॥ ७८ ॥ हात होती खुळे । हें पुढील मोटकें कळे । आणि करुनि घाली सकळें । दानादिकें ॥ ७९ ॥ तेव्हां ऐसी दशा येईल पुढें । तैं मन होईल वेडें । तंव चिंतूनि ठेवी चोखडें । आत्मज्ञान ॥ ५८० ॥ चोर पाहे झोंबती । तंव आजीचि रुसिजे संपत्ती । का झांकाझाकी वाती । न वचतां कीजे ॥ ८१ ॥ तैसें वार्धक्य यावें । मग जें वायां जावें । तें आतांचि आघवें । सवतें केलें ॥ ८२ ॥ आता मोडूनि ठेलीं दुर्गे । कां वळित धरिलें खगें । तेथ उपेक्षूनि जो रिगे । तो नागवला कीं ॥ ८३ ॥ तैसें वृद्धाप्य होये । आलेपणें वायां जाये । जे तो शतवृद्ध आहे । नेणो कैंचा ॥ ८४ ॥ झाडिलीं कोळें झाडी । तया न फळे जेवीं बोंडीं । जाहला अग्नि तरि राखोंडी । जाळील काई ॥ ८५ ॥ म्हणोनि वृद्धाप्याचेनि आठवें । वृद्धाप्या जो नागवे । तयाचां ठायीं जाणावें । ज्ञान आहे ॥ ८६ ॥ तैसेचि नाना रोग । पडिघाती पुढां आंग । तंव आरोग्याचे उपेग । करूनि घाली ॥ ८७ ॥ सापाचां तोंडीं । पडिली जे उंडी । ते लाऊनि सांडी । प्रबुद्धु जैसा ॥ ८८ ॥ तैसा वियोग जेणें दुःखें । विपत्ति शोक पोखे । तें स्नेह सांडूनि सुखें । उदासु होय ॥ ८९ ॥ आणि जेणें जेणें कडे । दोष सूतील तोंडें । तयां कर्मरंध्रा गुंडे । नियमाचे दाटी ॥ ५९० ॥ ऐसऐसिया आइती । जयाची परी असती । तोचि तो ज्ञानसंपत्ती – । गोसावी गा ॥ ९१ ॥ आतां आणीकही एक । लक्षण अलौकिक । सांगेन आइक । धनंजया ॥ ९२ ॥

असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु । नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

तरि जो या देहावरी । उदासु ऐसिया परी । उखिता जैसा बिढारीं । बैसविला आहे ॥ ९३ ॥ कां झाडाची साउली । वाटे जातां मीनली । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ॥ ९४ ॥ साउली सरिसीच

असे । परी असे हें नेणिजे जैसें । स्त्रियेचें तैसें । लोलुप्य नाहीं ॥ ९५ ॥ आणि प्रजा जे जाली । तियें वस्ती कीर आलीं । कां गोरुवें बैसलीं । रुखातळीं ॥ ९६ ॥ जो संपत्तीमाजी असतां । ऐसा गमे पांडुसुता । जैसा कां वाटे जातां । साक्षी ठेविला ॥ ९७ ॥ किंबहुना पुंसा । पांजरियामाजीं जैसा । वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ॥ ९८ ॥ एऱ्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाण पां धात्री । ज्ञानासि गा ॥ ९९ ॥ आणि महासिंधू जैसे । ग्रीष्मवर्षी सरिसे । इष्टानिष्ट तैसें । जयाचां ठायीं ॥ ६०० ॥ कां तिन्ही काळ होतां । त्रिधा नव्हे सविता । तैसा सुखदुःखीं चित्ता । भेदु नाहीं ॥ १ ॥ जेथ नभाचेनि पाडें । समत्वा उणें न पडे । तेथचि ज्ञान रोकडे । वोळख तूं ॥ २ ॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी । विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

आणि मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटें नाहीं । ऐसा निश्चयोचि तिहीं । जयाचां केला ॥ ३ ॥ शरीर वाचा मानस । पियाली कृतनिश्चयाचा कोश । एक मीवांचूनि वास । न पाहती आन ॥ ४ ॥ किंबहुना निकट निज । जयाचें जाहलें मज । तेणें आपणयां आम्हां सेज । एकी केली ॥ ५ ॥ रिगतां वल्लभांपुढे । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । एकसरला जो ॥ ६ ॥ मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजती ॥ ७ ॥ सूर्याचां होणां होईजे । कां सूर्यासवेंचि जाईजे । हें विकलेपण साजे । प्रभेसी जेवीं ॥ ८ ॥ पैं पाणियाचिये भूमिके । पाणी तळपे कौतुकें । ते लहरी म्हणती लौकिकें । एऱ्हवीं तें पाणी ॥ ९ ॥ जो अनन्य यापरी । मी जाहलाहि मातें वरी । तोचि तो मूर्तधारी । ज्ञान पैं गा ॥ ६१० ॥ आणि तीर्थें धौते तटें । तपोवनें चोखटें । आवडती कपाटें । वसवूं जया ॥ ११ ॥ शैलकक्षांची कुहरें । जळाशयपरिसरें । अधिष्ठी जो आदरें । नगरा न ये ॥ १२ ॥ बहु एकांतावरी प्रीति । जया जनपदावरी खंती । जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो ॥ १३ ॥ आणिकही पुढती । चिन्हें गा सुमती । ज्ञानाचिये निरुती - । लागीं सांगों ॥ १४ ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् । एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥

तरी परमात्मा ऐसें । जें एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव ॥ १५ ॥ तें एकवांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञाने । तें अज्ञान ऐसें मनें । निश्चयो करी ॥ १६ ॥ स्वर्गा जाणें हें सांडी । भवविषयीं कान झाडी । दे अध्यात्मज्ञानीं बुडी । सद्भावाची ॥ १७ ॥ भंगलिये वाटे । शोधूनिया अव्हांटे । निघिजे जेवीं नीटें । राजपंथें ॥ १८ ॥ तैसा ज्ञानजाता करी । आघवेंचि एकीकडे सारी । मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानीं ॥ १९ ॥ म्हणे एक हेंचि आथी । येर जाणणें ते भ्रांती । ऐसी निकुरेंसीं मती । मेरु होय ॥ ६२० ॥ एवं निश्चयो जयाचा । द्वारीं अध्यात्मज्ञानाचां । ध्रुव देवो गगनींचा । तैसा राहिला ॥ २१ ॥ तयाचां ठायीं ज्ञान । या बोला म्हणसी व्यवधान । जे ज्ञानीं बैसलें मन । तेव्हांचि तें तो ॥ २२ ॥ तरि बैसलेपणें जें होये । तें बैसतांचि बोलें न होये । तरि ज्ञाना तया आहे । सरिसा पाडु ॥ २३ ॥ आणि तत्त्वज्ञान निर्मळ ।

फळे जें एक फळ । तें ज्ञेयहीवरी सरळ । दिठी जया ॥ २४ ॥ एऱ्हवीं बोधा आलेनि ज्ञानें । जरी ज्ञेय न दिसेचि मनें । तरी ज्ञानलाभुही न मनें । जाहला सांता ॥ २५ ॥ आंधळेनि हातीं दिवा । घेऊनि काय करावा । तैसा ज्ञाननिश्चयो आघवा । वायां जाय ॥ २६ ॥ तरि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्त्वीं दिठी न पैसे । ते स्फूर्तींचि असे । अंध होऊनि ॥ २७ ॥ म्हणोनि जेतुलें ज्ञान दावी । तेतुली ही वस्तुचि आघवी । ते देखे ऐसी व्हावी । बुद्धि चोख ॥ २८ ॥ यालागीं ज्ञानें निर्दोखें । दाविलें ज्ञेय देखे । तैसेनि उन्मेखें । आथिला जो ॥ २९ ॥ जेवढी ज्ञानाची वृद्धी । तेवढीच जयाची बुद्धी । तो ज्ञान हें शाब्दीं । करणें न लगे ॥ ६३० ॥ पैं ज्ञानाचिये प्रभेसवें । जयाची मती ज्ञेयीं पावे । तो हातधरणिया शिवे । परतत्त्वातें ॥ ३१ ॥ तोचि ज्ञान हें बोलतां । विस्मो कवण पांडुसुता । काय सवितयातें सविता । म्हणावें असे ॥ ३२ ॥ तंव श्रोते म्हणितलें असो । न सांगे तियाचा अतिसो । ग्रंथोक्ती तेथ आडसो । घालिसी कां ॥ ३३ ॥ तुझा हाचि आम्हां थोरु । वक्तृत्वाचा पाहुणेरु । जे ज्ञानविषो फारु । निरोपिला ॥ ३४ ॥ रसु होआवा अतिमात्रु । हा घेतासि कविमंत्रु । तरि अवंतूनि शत्रु । करितोसि कां गा ॥ ३५ ॥ ठायीं बैसतिये वेळें । जे रससोय घेऊनि पळे । तियेचा येरु वोडव मिळे । कोणा अर्था ॥ ३६ ॥ आघवांचि विषयीं भादी । परि सांजवणी टेंकों नेदी । ते खुरतोडी नुसधी । पोषी कवण ॥ ३७ ॥ तैसी ज्ञानीं मती न फांके । येर जल्पती नेणों केतुकें । परि तें असो निकें । केलें तुवां ॥ ३८ ॥ जया ज्ञानलेशोद्देशें । कीजती योगादि सायासें । तें धणीचें आणि तुझिया ऐसे । निरूपण ॥ ३९ ॥ अमृताची सांतवांकुडी । लागों कां अनुघडी । सुखाचां दिसीं कोडी । गणिजतु कां ॥ ६४० ॥ पूर्णचंद्रेसीं राती । युग एक असो न पाहती । तरि काय पाहत आहाती । चकोरें ते ॥ ४१ ॥ तैसें ज्ञानाचें बोलणें । आणि येणें रसाळपणें । आतां पुरे कोण म्हणे । आकर्णितां ॥ ४२ ॥ आणि सभाग्यु पाहुणा ये । सुभागाचि वाढती होये । तै सरों नेणे रससोये । ऐसें आथी ॥ ४३ ॥ तैसा जाहला प्रसंगु । जे ज्ञानी आम्हांसि लागु । आणि तुजही अनुरागु । आथि येथ ॥ ४४ ॥ म्हणोनि यया वाखाणा - । पासीं से आली चौगुणा । ना म्हणों नये देखणा । होसी ज्ञानी ॥ ४५ ॥ तरी आतां ययावरी । प्रज्ञेचा माज धरीं । पदें साच करीं । निरूपणीं ॥ ४६ ॥ या संतवाक्यासरिसें । म्हणितलें निवृत्तिदासें । माझेंही जी ऐसें । मनोगत ॥ ४७ ॥ यावरी आतां तुम्हीं । आज्ञापिला स्वामी । वायां वाग् मी । वाढों नेदी ॥ ४८ ॥ एवं इयें अवधारा । ज्ञानलक्षणें अठरा । श्रीकृष्णें धनुर्धरा । निरूपिलीं ॥ ४९ ॥ मग म्हणे या नांवें । ज्ञान एथ जाणावें । हें स्वमत आणि आघवे । ज्ञानियेही म्हणती ॥ ६५० ॥ करतळावरी वाटोळा । डोलतु देखिजे आंवळा । तैसें ज्ञान आम्हीं डोळां । दाविलें तुज ॥ ५१ ॥ आतां धनंजया महामती । अज्ञान ऐसी वंदती । तेही सांगो व्यक्ती । लक्षणेंसीं ॥ ५२ ॥ एऱ्हवीं ज्ञान फुडें जालिया । अज्ञान जाणवे धनंजया । जें ज्ञान नव्हें तें अपैसया । अज्ञानचि ॥ ५३ ॥ पाहें पां दिवसु आघवा सरे । मग रात्रीची वारी उरे । वांचूनि कांही तिसरें । नाहीं जेवीं ॥ ५४ ॥ तैसें ज्ञान

जेथ नाहीं । तेंचि अज्ञानचि पाहीं । तरि सांगों कांहीं कांही । चिन्हें तियें ॥ ५५ ॥ तरि संभावने जिये । जो मानाची वाट पाहे । सत्कारें होये । तोषु जया ॥ ५६ ॥ गर्वें पर्वताचीं शिखरें । तैसा महत्त्वावरूनि नुतरे । तयाचां ठायीं पुरें । अज्ञान आहे ॥ ५७ ॥ आणि स्वधर्माची मांगळी । बांधे वाचेचां पिंपळीं । उभिला जैसा देऊळी । जाणोनि कुंचा ॥ ५८ ॥ घाली विद्येचा पसारा । सूये सुकृताचा डांगोरा । करी तेतुलें मोहरा । स्फीतीचिया ॥ ५९ ॥ आंग वरिवरी चर्ची । जनातें अभ्यर्चितां वंची । तो जाण पां अज्ञानाची । खाणी एथ ॥ ६६० ॥ आणि वन्ही वनीं विचरे । तेथ जळती जैसी जंगमें स्थावरें । तैसें जयाचेनि आचारें । जगा दु:ख ॥ ६१ ॥ कौतुकें जें जें जल्पे । तें सबळाहूनि तीख रुपे । विषाहुनि संकल्पें । मारकु जो ॥ ६२ ॥ तयातें बहु अज्ञान । तोचि अज्ञानाचें निधान । हिंसेसि आयतन । जयाचें जिणें ॥ ६३ ॥ आणि फुंकें भाता फुगे । रेचिलिया सवेंचि उफगे । तैसा संयोगवियोगें । चढे वोहटे ॥ ६४ ॥ पडली वारयाचा वळसां । धुळी चढे आकाशा । हरिखा वळघे तैसा । स्तुतीवेळे ॥ ६५ ॥ निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके । थेंबें विरे वारेनि शोखे । चिखलु जैसा ॥ ६६ ॥ तैसा मानापमानीं होये । जो कोण्हीही उर्मीं न साहे । तयाचां ठायीं आहे । अज्ञान पुरें ॥ ६७ ॥ आणि जयाचां मनीं गांठी । वरिवरी मोकळी वाचा दिठी । आंगें मिळे जीवें पाठी । भलतया दे ॥ ६८ ॥ व्याधाचें चारा घालणें । तैसें प्रांजळ जोगावणें । चांगाची अंत:करणें । विरु करी ॥ ६९ ॥ गार शेंवाळें गुंडाळली । कां निंबोळी जैसी पिकली । तैसी जयाची भली । बाह्य क्रिया ॥ ६७० । अज्ञान तयांचा ठायीं । ठेविलें असे पाहीं । या बोला आन नाहीं । सत्य मानीं ॥ ७१ ॥ आणि गुरुकुळें लाजे । जो गुरुभक्ती उभजे । विद्या घेऊनि माजे । गुरुसींचि ॥ ७२ ॥ तयाचें नांव घेणें । हें वाचे शूद्रान्न होणें । परि घडलें लक्षणें । बोलता इयें ॥ ७३ ॥ आता गुरुभक्ताचें नांव घेवों । तेणें वाचे प्रायश्चित्त देवों । गुरुसेवका नांव पाहा हो । सूर्य जैसा ॥ ७४ ॥ येतुलेनि पांगु पापाचा । निस्तरेल हे वाचा । जो गुरुतल्पगाचा । नामीं जाला ॥ ७५ ॥ हा ठायवरी । तया नांवाचें भय हरी । मग म्हणे अवधारीं । आणिकें चिन्हें ॥ ७६ ॥ तरी आंगें कर्में ढिला । जो मनें विकल्पें भरला । अडवींचा अवगळला । कुहा जैसा ॥ ७७ ॥ तया तोंडीं कांटिवडें । आंतु नुसतीं हाडें । अशुचि तेणे पाडें । सबाह्य जो ॥ ७८ ॥ जैसें पोटालागीं सुणें । उघडें झांकले न म्हणे । तैसें आपुलें परावें नेणे । द्रव्यालागीं ॥ ७९ ॥ एया ग्रामकुलाचां ठायीं । जैसा मिळणी ठावो अठावो नाहीं । तैसा स्त्रीविषयीं कांहीं विचारीना ॥ ६८० ॥ कर्माचा वेळु चुके । कां नित्य नैमित्तिक ठाके । तें जया न दुखे । जीवामाजीं ॥ ८१ ॥ पापी जो निसुगु । पुण्याविषयीं अति निलागु । जयाचां मनीं वेगु । विकल्पाचा ॥ ८२ ॥ जो जाण निखळा । अज्ञानाचा पुतळा । जो बांधोनि असे डोळां । वित्ताशेतें ॥ ८३ ॥ आणि स्वार्थें अळुमाळें । जो धैर्यापासोनि चळे । जैसें तृणबीज ढळे । मुंगियेचेनि ॥ ८४ ॥ पावो सूदलिया सवें । जैसें थिल्लर कालवे । तैसा भयाचेनि नांवें । गजबजे जो ॥ ८५ ॥

वायूचेनि सावायें । धू दिगंतवरी जाये । दु:खवार्ता होये । तैसें जया ॥ ८६ ॥ मनोरथांचिया धारसा । वाहणें जयाचिया मानसा । पूरीं पडिला जैसा । दुधिया पाहीं ॥ ८७ ॥ वाउधाणाचिया परी । जो आश्रो केहींचि न धरी । क्षेत्रीं तीर्थीं पुरीं । थारो नेणे ॥ ८८ ॥ कां मातलिया सरडा । पुढती बुड पुढती शेंडा । हिंडणवारा कोरडा । तैसा जया ॥ ८९ ॥ जैसा रोंविल्याविणें । रांजणु थारों नेणे । तैसा पडे तैं राहणें । एन्हवीं हिंडे ॥ ६९० ॥ तयाचां ठायी उदंड । अज्ञान असे वितंड । जो चांचल्यें भावंड । मर्कटाचें ॥ ९१ ॥ आणि पैं गा धनुर्धरा । जयाचिया अंतरा । नाहीं वोढावारा । संयमाचा ॥ ९२ ॥ लेंडिये आला लोंढा । न मनी वाळुवेचा वरंडा । तैसा निषेधाचिया तोंडा । बिहेना जो ॥ ९३ ॥ व्रतातें आड मोडी । धर्मातें पायें वोलांडी । नियमाची आस तोडी । जयाची क्रिया ॥ ९४ ॥ नाहीं पापाचा कंटाळा । नेदी पुण्यासी जिव्हाळा । लाजेचा पेंडवळा । खाणोनि घाली ॥ ९५ ॥ कुळेंसीं जो पाठमोरा । वेदाज्ञेसी दुन्हा । कृत्याकृत्यव्यापारा । निवाडु नेणे ॥ ९६ ॥ वसु जैसा मोकाटु । वारा जैसा अफाटु । फुटला जैसा पाटु । निरंजनींचा ॥ ९७ ॥ आंधळें हातिरूं मातलें । डोंगरीं जैसें पेटलें । तैसें विषयीं सुटलें । चित्त जयाचें ॥ ९८ ॥ पैं उबघडां काइ न पडे । मोकाटु कोणां नातुडे । ग्रामद्वारींचें आडें । नोलांडी कोण ॥ ९९ ॥ जैसें सत्रीं अन्न जालें । कीं सामान्या बीक आलें । वाणसियेचें उभविलें । कोण न रिगे ॥ ७०० ॥ तैसें जयाचें अंत:करण । तयाचां ठायीं संपूर्ण । अज्ञानाची जाण । ऋद्धि आहे ॥ १ ॥ आणि विषयांची गोडी । जो जितु मेला न संडी । स्वर्गींही खावया जोडी । येथौनिचि ॥ २ ॥ जो अखंड भोगा जचे । जया व्यसन काम्यक्रियेचें । मुख देखोनि विरक्ताचें । सचैल करी ॥ ३ ॥ विषो शिणोनि जाये । परि न शिणे सावधु नोहे । कुहिलां हातीं खाये । कोढी जैसा ॥ ४ ॥ खरी टेंकों नेदी उडे । लातौनि फोडी नाकाडें । तन्ही जेवीं न काढे । माघौता खरु ॥ ५ ॥ तैसा जो विषयांलागीं । उडी घाली जळतिये आगीं । व्यसनाचीं आंगीं । लेणीं मिरवी ॥ ६ ॥ फुटोनि पडे तंव । मृग वाढवी हांव । परि न म्हणे ते माव । रोहिणीची ॥ ७ ॥ तैसा जन्मोनि मृत्यूवरी । विषयीं त्रासितां बहुतीं परीं । तन्ही त्रासु नेघे धरी । अधिक प्रेम ॥ ८ ॥ पहिलिये बाळदशे । आई बा हेंचि पिसें । तें सरे मग स्त्रिमांसें । भुलोनि ठाके ॥ ९ ॥ मग स्त्री भोगितां थावो । वृद्धाप्य लागे येवो । तेव्हां तोचि प्रेमभावो । बाळकासि आणी ॥ ७१० ॥ आंधळें व्यालें जैसें । तैसा बाळें परिवसे । परि जी मरे तो न त्रासे । विषयांसि जो ॥ ११ ॥ जाण तयाचां ठायीं । अज्ञानासि पारु नाहीं । आतां आणीकें कांहीं । चिन्हें सांगों ॥ १२ ॥ तरि देह हेंचि आत्मा । ऐसेया जो मनोधर्मा । वळघोनिया कर्मा । आरंभु करी ॥ ९३ ॥ आणि उणें कां पुरें । जें जें कांहीं आचरे । तयाचेनि आविष्कारें । कुंथों लागे ॥ १४ ॥ डोईये ठेविलेनि भोजें । देवलविसें जेवीं फुंजे । तैसा विद्या वयसा माजे । उताणा चाले ॥ १५ ॥ म्हणे मीचि एकु आथी । माझांचि घरीं संपत्ती । माझी आचरती रीती । कोणा आहे ॥ १६ ॥ नाहीं माझेनि पाडें वाडु । मी सर्वज्ञु एकुचि रूढु । ऐसा गर्वतुष्टीगंडु । घेऊनि ठाके

॥ १७ ॥ व्याधि लागलिया माणुसा । नये भोग दाऊं जैसा । निकें न साहे जो तैसा । पुढिलांचें ॥ १८ ॥ पैं गुणु तेतुला खाय । स्नेह कीं जाळितु जाय । जेथ ठेविले तेथ होय । मसीऐसें ॥ १९ ॥ जीवनें शिंपिला तिडपिडी । विजिला प्राण सांडी । लागला तरी काडी । उरों नेदी ॥ ७२० ॥ आळुमाळु प्रकाशु करी । तेतुलेनीचि उबारा धरी । तैसिया दीपाचिया परी । सुविद्यु जो ॥ २१ ॥ औषधाचेनि नांवें अमृतें । नवज्वरु जैसा आंबुथे । कां विषचि होऊनि परतें । सर्पा दूध ॥ २२ ॥ तैसा सद्गुणीं मत्सरु । व्युत्पत्ती अहंकारु । तपोज्ञानें अपारु । ताठा चढे ॥ २३ ॥ अंत्यु राणिवे बैसविला । आरें धारणु गिळिला । तैसा गर्वें फुगला । देखसी जो ॥ २४ ॥ जो लाटणें ऐसा न लवे । पाथरु तेवीं न द्रवे । गुणियासि नागवे । फोडसें जैसें ॥ २५ ॥ किंबहुना तयापासी । अज्ञान आहे वाढीसी । हें निकरें गा तुजसीं । बोलत असों ॥ २६ ॥ आणिक पाहीं धनंजया । जो गृहदेह सामग्रिया । न देखे कालचेया । जन्मातें गा ॥ २७ ॥ कृतघ्ना उपकारू केला । का चोरा व्यवहारु दिधला । निसुगु अस्तविला । विसरे जैसा ॥ २८ ॥ वोढाळितां लाविलें । तें तैसेंचि कान पूंस वोलें । कीं पुढती वोढाळूं आलें । सुणें जैसें ॥ २९ ॥ बेडूक सापाचां तोंडीं । जातसें सबडबुडीं । तो मक्षिकांचिया कोडीं । स्मरेना कांहीं ॥ ७३० ॥ तैसीं नवही द्वारें स्त्रवती । आंगीं देहाची लुती जिती । जेणें जाली तें चित्तीं । सलेना जया ॥ ३१ ॥ मातृकोदरकुहरीं । सूनि विष्ठेचां दाथरीं । जठरीं नवमासवरी । उकडला जो ॥ ३२ ॥ ते गर्भींची व्यथा । कां जें जालें उपजतां । तें कांहींचि सर्वथा । नाठवी जो ॥ ३३ ॥ मलमूत्रपंकीं । लोळतें बाळ अंकीं । तें देखोनि जो न थुंकी । त्रासु नेघे ॥ ३४ ॥ कालचि ना जन्म गेलें । पाहेचि पुढती आलें । हें ऐसें कांहीं वाटलें । नाहीं जया ॥ ३५ ॥ आणि पैं तयाची परी । जीविताची फरारी । देखोनि जो न करी । मृत्युचिंता ॥ ३६ ॥ जिणेयाचेनि विश्वासें । मृत्यु एक एथ असे । हें जयाचेनि मानसें । मानिजेना ॥ ३७ ॥ अल्पोदकींचा मासा । हें नाटे ऐसिया आशा । न वचेचि कां जैसा । अगाध डोहा ॥ ३८ ॥ कां गोरीचिया भुली । मृग व्याधा दिठी न घाली । गळु न पाहतां गिळिली । उंडी मीनें ॥ ३८ ॥ दीपाचिया झगमगा । जाळील हे पतंगा । नेणवेचि पैं गा । जयापरी ॥ ७४० ॥ गव्हारु निद्रासुखें । घर जळत असे तें न देखे । नेणतां जेवीं विखें । रांधिले अन्न ॥ ४१ ॥ तैसा जीविताचेनि मिषें । हा मृत्युचि आला असे । हें नेणेचि राजसें । सुखें जो गा ॥ ४२ ॥ शरीरींची वाढी । अहोरात्रांची जोडी । विषयसुखप्रौढी । साचचि मानी ॥ ४३ ॥ परि बापुडा ऐसें नेणें । जें वेश्येचें सर्वस्व देणें । तेंचि नागवणें । रूप एथ ॥ ४४ ॥ संवचोराचें साजणें । तेंचि तें प्राण घेणें । लेपा स्नपन करणें । तेंचि नाशु ॥ ४५ ॥ पांडुरोगें आंग सुटलें । तें तयाचि नांवें खुंटलें । तैसें नेणे भुललें । आहारनिद्रा ॥ ४६ ॥ सन्मुख शूला । धांवतया पायें चपळा । प्रतिपदीं ये जवळा । मृत्यु जेवीं ॥ ४७ ॥ तेवीं देहा जंव जंव वाढु । जंव जंव दिवसांचा पवाडु । जंव जंव सुरवाडु । भोगांचा हा ॥ ४८ ॥ तंव तंव अधिकाधिकें । मरण आयुष्यातें जिंके । मीठ जैसे उदकें ।

घांसिजत असे ॥ ४९ ॥ तैसें जीवित जाये । तयास्तव काळु पाहे । हें हातोहातींचें नव्हे । ठाऊकें जया ॥ ७५० ॥ किंबहुना पांडवा । हा आंगींचा मृत्यु नित्य नवा । न देखे जो मावा । विषयांचिया ॥ ५१ ॥ तो अज्ञानदेशींचा रावो । या बोला महाबाहो । न पडे गा वाटावो । आणिकांचा ॥ ५२ ॥ पैं जीविताचेनि सुखें । जैसा कां मृत्यु न देखे । तैसाचि तारुण्यतोषें । जरा न गणी ॥ ५३ ॥ कडाडीं लोटला गाडा । शिखरौनि सुटला धोंडा । तैसा न देखे जो पुढां । वृद्धाप्य आहे ॥ ५४ ॥ कां आडवोहळा पाणी आलें । म्हैसयांचें झुंज मातलें । तैसें तारुण्याचें चढलें । भुरें जया ॥ ५५ ॥ पुष्टि लागे विघरों । कांति न पाहे निसरों । माथा आदरी शिरों । बागीबळ ॥ ५६ ॥ दाढी साऊळ धरी । मान हालौनि वारी । तरी जो न करी । प्रियेचा पैसु ॥ ५७ ॥ पुढील उरीं आदळे । तंव न देखें जेवीं आंधळें । कां डोळ्यावरलें निगळें । आळशी तोषे ॥ ५८ ॥ तैसें तरुणेपण आजिचें । भोगितां वृद्धाप्य पाहेचें । न देखे तोचि साचें । अज्ञानु गा ॥ ५९ ॥ देखे अक्षमें कुब्जें । कीं विटावूं लागे फुंजे । परि न म्हणे पाहे माझें । हेंचि भवे ॥ ७६० ॥ आणि आंगीं वृद्धतेचि । संज्ञा ये मरणाची । परि जया तारुण्याची । भुली न फिटे ॥ ६१ ॥ तो अज्ञानाचें घर । हें साचचि घे उत्तर । तेवींचि परियेसीं थोर । चिन्हें आणिक ॥ ६२ ॥ तरी वाघाचिये अडवे । चरोनि एक वेळ आला दैवें । तेणें विश्वासें पुढती धांवे । वसू जैसा ॥ ६३ ॥ कां सर्पघराआंतु । अवचटें ठेवा आणिला स्वस्थु । येतुलियासाठी निश्चितु । नास्तिक होय ॥ ६४ ॥ तैसेनि अवचटें हें । एकदोनी वेळां लाहे । एथ रोग एक आहे । हें मानीना जो ॥ ६५ ॥ वैरिया नीद आली । आतां द्वंद्वें माझीं सरलीं । हें मानी तो सपिलीं । मुकला जेवीं ॥ ६६ ॥ तैसी आहारनिद्रेची उजरी । रोग निवांतु जोंवरी । तंव जो न करी । व्याधीचिंता ॥ ६७ ॥ आणि स्त्रिपुत्रादिमेळें । संपत्ति जंव जंव फळे । तेणें रजें डोळे । जाती जयाचे ॥ ६८ ॥ सवेचि वियोगु पडैल । विळौनी विपत्ति येईल । हें दुःख पुढील । देखेना जो ॥ ६९ ॥ तो अज्ञान गा पांडवा । आणि तोही तोचि जाणावा । जो इंद्रियें अव्हासवा । चारी एथ ॥ ७७० ॥ वयसेचेनि उवायें । संपत्तीचेनि सावायें । सेव्यासेव्य जाये । सरकटितु ॥ ७१ ॥ न करावें तें करीं । असंभाव्य मनीं धरी । चिंतूं नये तें विचारी । जयाची मती ॥ ७२ ॥ रिघे जेथ न रिघावें । मागे जे न घ्यावें । स्पर्शे जेथ न लागावें । आंग मन ॥ ७३ ॥ न वचावें तेथ जाये । न पहावें तें जो पाहे । न खावें तें खाये । तेवींचि तोषे ॥ ७४ ॥ न धरावा तो संगु । न लगावें तेथ लागु । नाचरावा तो मार्गु । आचरे जो ॥७५ ॥ नायकावें ते आइके । न बोलावें तें भुंके । परि दोष होईल हें न देखे । प्रवर्ततां ॥७६ ॥ अंगा मनासि रुची यावे । येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे । जो करणेयाचेनि नांवें । भलतेंचि करी ॥ ७७ ॥ परि पाप मज होइल । कां नरकयातना येईल । हें कांहींचिं पुढील । देखेना जो ॥ ७८ ॥ तयाचेनि आंगलगें । अज्ञान जगीं दाटुगें । जें सज्ञानाही संगें । झोंबों सके ॥ ७९ ॥ असो हें आइक । अज्ञानचिन्हें आणिक । जेणें तुज सम्यक् । जाणवे तें ॥ ७८० ॥ तरी जयाची प्रीति पुरी । गुंतली

देखसी घरीं। नवगंधकेसरीं। भ्रमरी जैशी॥ ८१॥ साकरेचिया राशी। बैसली नुडे माशी। तैसेनि स्त्रीचित्त आवेशी। जयाचें मन॥ ८२॥ ठेला बेडूक कुंडीं। मशक गुंतला शेंबुडीं। ढोरु सबुडबुडीं। रुतला पंकीं॥ ८३॥ तैसें घरींहूनि निघणें। नाहीं जीवितें मरणें। जया साप होऊनि असणें। भाटीं तिये॥ ८४॥ प्रियोत्तमाचां कंठीं। प्रमदा घे आटी। तैशी जीवेंसी कोंपटी। धरूनि ठाके॥ ८५॥ मधुरसोद्देशें। मधुकरी जचे जैसें। गृहसंगोपन तैसें। करी जो गा॥ ८६॥ म्हातारपणीं जालें। माणिक एक विपायिलें। तयाचें कां जेतुलें। मातापितरां॥ ८७॥ तेतुलेनि पाडें पार्था। घरीं जया प्रेम आस्था। आणि स्त्रीवांचूनि सर्वथा। जाणेना जो॥८८॥ महापुरुषांचें चित्त। जालिया वस्तुगत। ठाके व्यवहारजात। जयापरी॥ ८९॥ तैसा स्त्रीदेहीं जो जीवें। पडोनिया सर्वभावें। कोण मी काय करावें। कांहीं नेणे॥ ७९०॥ हानि लाज न देखे। परापवादु नाइके। जयाची इंद्रियें एकमुखें। स्त्रिया केलीं॥ ९१॥ चित्त आराधी स्त्रीयेचें। स्त्रीयेचेनि छंदें नाचे। माकड गारुडियाचें। जैसें होय॥ ९२॥ आपणपेंही शिणवी। इष्टमित्र दुरावी। मग कवडाचि वाढवी। लोभी जैसा॥ ९३॥ तैसा दानपुण्यें खांची। गोत्रकुटुंबा वंची। परि गारी भरी स्त्रियेची। उणी हों नेदी॥ ९४॥ पूजितीं दैवतें जोगावी। गुरुतें बोलें झकवी। मायबापां दावी। निदारपण॥ ९५॥ स्त्रियेचां तरी विखीं। भोगुसंपत्ति अनेकीं। आणी वस्तु निकी। जे जे देखे॥ ९६॥ प्रेमाथिलेनि भक्तें। जैसेनि भजिजे कुळदैवतें। तैसा एकाग्रचित्तें। स्त्री जो उपासी॥ ९७॥ साच आणि चोख। तें स्त्रियेसीचि अशेख। येरीविषयीं जोगावणूक। तेही नाहीं॥ ९८॥ इयेतें हन कोणी देखैल। इयेसी वेखासें जाईल। तरि युगचि बुडैल। ऐसें जया॥ ९९॥ नायटेयां भेण। न मोडिजे नागांची आण। तैसी पाळी उणखुण। स्त्रीयेची जो॥ ८००॥ किंबहुना धनंजया। स्त्रीचि सर्वस्व जया। आणि तियेचिया जालिया -। लागीं प्रेम॥ १॥ आणिकही जें समस्त। तेथिंचें संपत्तिजात। तें जीवाहूनी आप्त। मानी जो गा॥ २॥ तो अज्ञानासी मूळ। अज्ञाना तेणें बळ। हें असो केवळ। तो तेंचि रूप॥ ३॥ आणि मातलिया सागरीं। मोकलिलिया तरी। लाटांचा येरझारीं। आंदोळे जेवीं॥ ४॥ तेवीं प्रिय वस्तु पावे। आणि सुखें जो उंचावे। तैसाचि अप्रियासवें। तळवटु घे॥ ५॥ ऐसेनि जयाचां चित्तीं। वैषम्यसाम्याची वोखती। वाहे तो महामती। अज्ञान गा॥ ६॥ आणि माझां ठायीं भक्ती। फळालागीं जया आर्ती। धनोद्देशें विरक्ती। नटणें जेवीं॥ ७॥ कां कांताचां मानसीं। रिगोनि स्वैरिणी जैसी। राहाटे जारेंसीं। जावयालागीं॥ ८॥ तैसा मातें किरीटी। भजती गा पाउटी। करूनि जो दिठी। विषो सूये॥ ९॥ आणि भजिन्नलियासवें। तो विषो जरी न पवे। तरी सांडी म्हणे आघवें। टवाळ हें॥ ८१०॥ कुणबट कुळवाडी। तैसा आन आन देव मांडी। आदिलाची परवडी। वरी तया॥ ११॥ तया गुरुमार्गा टेंके। जयाचा सुगरवा देखे। तरी तयाचा मंत्र शिके। येरु नेघे॥ १२॥ प्राणिजातेंसीं निष्ठुरु। स्थावरीं बहु भरु। तेवींचि नाहीं एकसरु।

निर्वाहो जया ॥ १३ ॥ माझी मूर्ति निफजवी । ते घराचां कोनीं बैसवीं । आपण देवो देवी । यात्रे जाय ॥ १४ ॥ नित्य आराधन माझें । काजीं कुळदेवता भजे । पर्वविशेषें कीजे । पूजा आना ॥ १५ ॥ माझें अधिष्ठान घरीं । आणि वोसे आनाचे करी । पितृकार्यावसरीं । पितरांचा होय ॥ १६ ॥ एकादशीचां दिवशीं । जेतुला पाडु आम्हांसी । तेतुलाचि नागांसी । पंचमीचां दिवशीं ॥ १७ ॥ चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चावदशी म्हणे माये । तुझाच वो दुर्गे ॥ १८ ॥ नित्य नैमित्तिकें कर्में सांडी । मग बैसे नवचंडी । आदित्यवारीं वाढी । भैरवां पात्रीं ॥ १९ ॥ पाठी सोमवार पावे । आणि बेलेंसी लिंगा धांवे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो ॥ ८२० ॥ ऐसा अखंड भजन करी । उगा नसे क्षणभरी । आघवेनि गांवद्वारीं । अहेव जैसी ॥ २१ ॥ तैसेनि जो गा भक्तु । सैरा देखसी धांवतु । जाण अज्ञानाचा मूर्तु । अवतार तो ॥ २२ ॥ आणि एकांतें चोखटें । तपोवनें तीर्थें तटें । देखोनि जो गा विटे । तोही तोचि ॥ २३ ॥ जया जनपदीं सुख । गजबजेचें कवतिक । वानूं आवडे लौकिक । तोहि तोचि ॥ २४ ॥ आणि आत्मा गोचरु होये । ऐसी जे विद्या आहे । ते आइकोनि डौर वाहे । विद्वांसु जो ॥ २५ ॥ उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे । अध्यात्मज्ञानीं जयाचें । मनचि नाहीं ॥ २६ ॥ आत्मचर्चा एकी आथी । ऐसिये बुद्धीची भिंती । पाडूनि जयाची मती । वोढाळ जाहली ॥ २७ ॥ कर्मकांड तरी जाणे । मुखोद्गत पुराणें । ज्योतिषीं तो म्हणे । तैसेंचि होय ॥ २८ ॥ शिल्पीं अति निपुण । सूपकर्मीही प्रवीण । विधि आथर्वण । हातीं आथी ॥ २९ ॥ कोकीं नाहीं ठेलें । भारत तरी म्हणितलें । आगम आफाविले । मूर्त होती ॥ ८३० ॥ नीतिजात सुझे । वैद्यकही बुझे । काव्यनाटकीं दुजें । चतुर नाहीं ॥ ३१ ॥ स्मृतींची चर्चा । दंशु जाणे गारुडियाचा । निघंटु प्रज्ञेचा । पाइकी करी ॥ ३२ ॥ व्याकरणीं चोखडा । तर्कीं अतिगाढा । परि एक अध्यात्मज्ञानीं फुडा । जात्यंधु जो ॥ ३३ ॥ तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं । सिद्धांतनिर्माणधात्री । परि जळो तें मूळनक्षत्रीं । न पाहें गा ॥ ३४ ॥ मोराचां आंगीं अशेषें । पिसें आहाति डोळसें । परी एकली दिठी नसे । तैसें तें गा ॥ ३५ ॥ जरी परमाणूएवढें । संजीवनीमूळ जोडे । तरी बहु काय गाडे । भरणें येरें ॥ ३६ ॥ आयुष्येंवीण लक्षणें । सिसेंवीण अळंकरणें । वोहरेंवीण वाधावणें । तो विटंबु गा ॥ ३७ ॥ तैसें शास्त्रजात जाण । आघवेंचि अप्रमाण । अध्यात्मज्ञानेंविण । एकलेनि ॥ ३८ ॥ यालागी अर्जुना पाहीं । अध्यात्मज्ञानाचां ठायीं । जया नित्यबोधु नाहीं । शास्त्रमूढा ॥ ३९ ॥ तया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बीं विरूढलें । तयाचें व्युत्पत्तित्व गेलें । अज्ञानवेलीं ॥ ८४० ॥ तो जें जें बोले । तें अज्ञानचि फुललें । तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञानचि गा ॥ ४१ ॥ आणि अध्यात्मज्ञान कहीं । जेणें मानिलेंचि नाहीं । तो ज्ञानार्थु न देखे काई । हें बोलावें असे ॥ ४२ ॥ ऐलीच थडी न पवतां । पळे जो माघौता । तया पैलद्वीपाची वार्ता । काय होय ॥ ४३ ॥ कां दारवंठांचि जयाचें । शीर रोंविलें खांचे । तो केवीं परिवरींचें । ठेविलें देखे ॥ ४४ ॥

तेवीं अध्यात्मज्ञानीं जया । अनोळख धनंजया । तया ज्ञानार्थु देखावया । विषो काई ॥ ४५ ॥ म्हणोनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें तत्त्व न देखे । हें सांगावें आंखेंलेखें । न लगे तुज ॥ ४६ ॥ जेव्हां सगर्भे वाढिलें । तेव्हांचि पोटींचें धालें । तैसे मागिलें पदें बोलिलें । हेंचि होय ॥ ४७ ॥ वांचूनियां वेगळें । रूप करणें हें न मिळे । जेवि अवंतिलें आंधळें । तें दुजेनसीं ये ॥ ४८ ॥ एवं इये उपरतीं । ज्ञानचिन्हें मागुती । अमानित्वादि प्रभृती वाखाणिलीं ॥ ४९ ॥ जें ज्ञानपदें अठरा । केलीयां येरी मोहरां । अज्ञान या आकारा । सहजें येती ॥ ८५० ॥ मागां श्लोकाचेनि अर्धार्धें । ऐसें सांगितलें मुकुंदें । ना उफराटीं इयें ज्ञानपदें । तेंचि अज्ञान ॥ ५१ ॥ म्हणोनि इया वाहणी । केली म्यां उपलवणी । वांचूनि दूधा मेळऊनि पाणी । फार कीजे ॥ ५२ ॥ तैसें जी न बडबडी । पदाची कोर न सांडीं । परि मूळध्वनींचिये वाढी । निमित्त जाहलो ॥ ५३ ॥ तंव श्रोते म्हणती राहें । कें परिहारा ठावो आहे । बिहिसी कां वाये । कविपोषका ॥ ५४ ॥ तूतें श्रीमुरारी । म्हणितलें प्रगट करीं । जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आम्हीं ॥ ५५ ॥ तें देवाचें मनोगत । दावित आहासी तूं मूर्त । हेंही म्हणतां चित्त । दाटैल तुझें ॥ ५६ ॥ म्हणोनि असो हें न बोलों । परि साविया गा तोषलों । जे ज्ञानतरिये मेळविलों । श्रवणसुखाचियें ॥ ५७ ॥ आतां इयावरी । जे तो श्रीहरी । बोलिला तें करीं । कथन वेगां ॥ ५८ ॥ इया संतवाक्यासरिसें । म्हणितलें निवृत्तिदासें । जी अवधारा तरी ऐसें । बोलिलें देवें ॥ ५९ ॥ म्हणती तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चयो आघवा । आयकिला तो जाणावा । अज्ञानभागु ॥ ८६० ॥ इया अज्ञानविभागा । पाठी देऊनि पैं गा । ज्ञानविखीं चांगा । दृढा होइजे ॥ ६१ ॥ मग निर्वाळिलेनि ज्ञानें । ज्ञेय भेदैल मनें । तें जाणावया अर्जुनें । आस केली ॥ ६२ ॥ तंव सर्वज्ञांचा रावो । म्हणे जाणोनि तयाचा भावो । परिसे ज्ञेयाचा अभिप्रावो । सांगों आतां ॥ ६३ ॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते । अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

तरि ज्ञेय ऐसें म्हणणें । वस्तूतें येणेंचि कारणें । जें ज्ञानेवांचूनि कवणें । उपायें नये ॥ ६४ ॥ आणि जाणितलेयावरौतें । कांहीं करणें नाहीं जेथें । जाणणेंचि तन्मयातें । आणी जयाचें ॥ ६५ ॥ जें जाणितलेयाचिसाठीं । संसाराची काढूनियां कांटी । जिरोनि जाइजे पोटीं । नित्यानंदाचां ॥ ६६ ॥ तें ज्ञेय गा ऐसें । आदि जया नसे । परब्रह्म आपैसें । नांव जया ॥ ६७ ॥ जें नाहीं म्हणों जाइजे । तंव विश्वाकार देखिजे । आणि विश्वचि ऐसें म्हणिजे । तरि हे माया ॥ ६८ ॥ रूप वर्ण व्यक्ती । नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती । तरि कोणें कैसें आथी । म्हणावें पां ॥ ६९ ॥ आणि साचचि जरी नाहीं । तरि महदादिक कोणें ठाई । स्फुरत कैचें काई । तेणेंवीण असे ॥ ८७० ॥ म्हणोनि आथी नाथी हे बोली । जें देखोनि मुकी जाहली । विचारासीं मोडली । वाट जेथें ॥ ७१ ॥ जैसीं भांडघटशरावीं । तदाकारें असे पृथ्वी । तैसें सर्व होऊनियां सर्वीं । असे जे वस्तु ॥ ७२ ॥

सर्वत:पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् । सर्वत:श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

आंघवांचि देशीं काळीं। नव्हतां देशकाळांवेगळी। जे क्रिया स्थूळास्थूळीं। तेचि हात जयाचे ॥ ७३ ॥ तयातें याकारणें। विश्वबाहू ऐसें म्हणणें। जें सर्वचि सर्वपणें। सर्वदा करी ॥ ७४ ॥ आणि समस्तांही ठायां। एके काळीं धनंजया। आलें असे म्हणोनि जया। विश्वांघ्रि नांव ॥ ७५ ॥ पैं सवितया आंग डोळे। नाहींत वेगळवेगळे। तैसें सर्वद्रष्टें सकळें। स्वरूपें जें ॥ ७६ ॥ म्हणोनि विश्वतश्चक्षु। हा अचक्षूचां ठायीं पक्षु। बोलावया दक्षु। जाहला वेदू ॥ ७७ ॥ जें सर्वांचिया शिरावरी। जे नित्य नांदे सर्वापरी। ऐसिये स्थितीवरी। विश्वमूर्धा म्हणिपे ॥ ७८ ॥ पैं गा मूर्ति तेंचि मुख। हुताशनीं जैसें देख। तैसें सर्वपणें अशेख। भोक्तें जें ॥ ७९ ॥ यालागीं तया पार्था। विश्वतोमुख हे व्यवस्था। आली वाक्पथा। श्रुतीचिया ॥ ८८० ॥ आणि वस्तुमात्रीं गगन। जैसें असे संलग्न। तैसें शब्दजातीं कान। सर्वत्र जया ॥ ८१ ॥ म्हणोनि आम्ही तयातें। म्हणों सर्वत्र आइकतें। एवं जें सर्वांतें। आवरूनि असे ॥ ८२ ॥ एन्हवीं तरी महामती। विश्वतश्चक्षु इया श्रुती। तयाचिये व्याप्ती। रूप केलें ॥ ८३ ॥ वांचूनि हस्त नेत्र पाये। हे भाष तेथ कें आहे। सर्व शून्यत्वाचा न साहे। निष्कर्षु जें ॥ ८४ ॥ पैं कल्लोळातें कल्लोळें। ग्रसिजत असे ऐसें कळे। परि ग्रसितें ग्रासावेगळें। आहे काई ॥ ८५ ॥ तैसें साचचि जें एक। तेथ कें व्याप्यव्यापक। परि बोलावया नावेक। करावें लागे ॥ ८६ ॥ पैं शून्य जैं दावावें जाहलें। तैं बिंदुलें एक पाहिजे केलें। तैसें अद्वैत सांगावें बोलें। तैं द्वैत कीजे ॥ ८७ ॥ एन्हवीं तरी पार्था। गुरुशिष्यसत्पथा। आडळु पडे सर्वथा। बोल खुंटे ॥ ८८ ॥ म्हणोनि गा श्रुती। द्वैतभावें अद्वैतीं। निरूपणाची वाहती। वाट केली ॥ ८९ ॥ तेंचि आतां अवधारीं। इये नेत्रगोचरे आकारीं। तें ज्ञेय जियापरी। व्यापक असे ॥ ८९० ॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् । असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥

तरी तें गा किरीटी ऐसें। अवकाशी आकाश जैसें। पटीं पटु होऊनि असे। तंतु जेवीं ॥ ९१ ॥ उदक होऊनि उदकीं। रसु जैसा अवलोकीं। दीपपणें दीपकी। तेज जैसें ॥ ९२ ॥ कर्पूरत्वें कापुरीं। सौरभ्य असे जयापरी। शरीर होऊनि शरीरीं। कर्म जेवीं ॥ ९३ ॥ किंबहुना जैसें पांडवा। सोनेंचि सोनयाचा रवा। तैसें जें या सर्वां। सर्वांगीं असे ॥ ९४ ॥ परी रवेपणामाजिवडे। तंव रवा ऐसें आवडे। वांचूनि सोनें सांगडें। सोनया जेवीं ॥ ९५ ॥ पैं गा वोघुचि वांकुडा। परि पाणी उजू सुहाडा। वन्हि आला लोखंडा। लोह नव्हे कीं ॥ ९६ ॥ घटाकारें वेटाळें। तेथ नभ गमे वाटोळें। मठीं तरी चौफळें। आयें दिसे ॥ ९७ ॥ परि ते अवकाश जैसे। नोहेजतीचि कां आकाशें। जें विकार होऊनि तैसें। विकारी नोहे ॥ ९८ ॥ मन मुख्य इंद्रियां। सत्त्वादि गुणा ययां - । सारिखें ऐसें धनंजया। आवडे कीर ॥ ९९ ॥ परि पैं गुळाची गोडी। नोहे बांधया सांगडी। तैसीं गुण इंद्रियें फुडीं। नाहीं तेथ ॥ ९०० ॥ अगा क्षीराचिये दशे। घृत क्षीराकारें असे। परि क्षीरचि नोहे जैसें। कपिध्वजा ॥ १ ॥ तैसें जें इये

विकारीं । विकार नोहे अवधारीं । पैं आकारा नाम भोंवरी । येर सोनें तें सोनें ॥ २ ॥ इया उघड मन्हाटिया । तें वेगळेपण धनंजया । जाण गुणइंद्रियां - । पासोनियां ॥ ३ ॥ नामरूपसंबंधु । जातिक्रियाभेदु । हा आकारासीच प्रवादु । वस्तूसि नाहीं ॥ ४ ॥ तें गुण नव्हे कहीं । गुणा तया संबंधु नाहीं । परि तयांचाचि ठायीं । आभासती ॥ ५ ॥ येतुलेयांसाठीं । संभ्रांताचां पोटीं । ऐसें जाय किरीटी । ना हेंचि धरी ॥ ६ ॥ तरि तें गा धरणे ऐसें । अभ्रातें जेवीं आकाशें । कां प्रतिवदन जैसें । आरसेनि ॥ ७ ॥ सूर्य प्रतिमंडळ । जैसेनि धरी सलिल । कां रश्मिकरीं मृगजळ । धरिजे जेवीं ॥ ८ ॥ तैसें गा संबंधेंवीण । यया सर्वांतें धरी निर्गुण । येरी तें वायां जाण । मिथ्यादृष्टी ॥ ९ ॥ आणि यापरी निर्गुणें । गुणातें भोगणें । रंका राज्य करणें । स्वप्नीं जैसें ॥ ९१० ॥ म्हणोनि गुणाचा संगु । अथवा गुणभोगु । हा निर्गुणीं लागु । बोलों नये ॥ ११ ॥

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च । सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥ १५ ॥

जें चराचर भूतां - । माजीं असे पांडुसुता । नाना वन्हीं उष्णता । अभेदें जैसी ॥ १२ ॥ तैसेनि अविनाशभावें । जें सूक्ष्मदशे आघवें । व्यापूनि असे तें जाणावें । ज्ञेय एथ ॥ १३ ॥ जें एक आंतु बाहेरी । जें एक जवळ दुरी । जें एकवांचूनि परी । दुजी नाहीं ॥ १४ ॥ क्षीरसागरींची गोडी । माजीं बहु थडिये थोडीं । हें नाहीं तया परवडी । पूर्ण जें गा ॥ १५ ॥ स्वेदजप्रभृती । वेगळालां भूतीं । जयाचिये अनुस्यूती । खोमणें नाहीं ॥ १६ ॥ पैं श्रोतेमुखटिळका । घटसहस्त्रा अनेकां - । माजीं बिंबोनि चंद्रिका । न भेदे जेवीं ॥ १७ ॥ नाना लवणकणाचिये राशी । क्षारता एकचि जैसी । कां कोडीं एकीं उसीं । एकचि गोडी ॥ १८ ॥

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् । भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १६ ॥

तैसें अनेकीं भूतजातीं । जें आहे एकी व्याप्ती । विश्वकार्या सुमती । कारण जें गा ॥ १९ । म्हणोनि हा भूताकारु । जेथौनि तेंचि तया आधारु । कल्लोळा सागरु । जियापरी ॥ ९२० ॥ बाल्यादि तिन्ही वयसीं । काया एकचि जैसी । तैसें आदिस्थितिग्रासीं । अखंड जें ॥ २१ ॥ सायंप्रातर्मध्यान्ह । होतां जातां दिनमान । जैसें कां गगन । पालटेना ॥ २२ ॥ अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा । जया नांव म्हणती ब्रह्मा । व्याप्ति जें विष्णुनामा । पात्र जाहलें ॥ २३ ॥ मग आकारु हा हारपे । जेव्हा रुद्र जें म्हणिपे । तेंही गुणत्रय जेंव्हां लोपे । तैं जें शून्य ॥ २४ ॥ नभाचें शून्यत्व गिळून । गुणत्रयातें नुरऊन । तें शून्य तें महाशून्य । श्रुतिवचनसंमत ॥ २५ ॥

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते । ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥ १७ ॥

जें अग्नीचें दीपन । जें चंद्राचें जीवन । सूर्याचे नयन । देखती जेणें ॥ २६ ॥ जयाचेनि उजियेडें । तारांगण उबडें । महातेज सुरवाडें । जेणें राहाटे ॥ २७ ॥ जें आदीची आदी । जें वृद्धीची वृद्धी । बुद्धीची जें बुद्धी । जीवाचा जीवु ॥ २८ ॥ जें मनाचें मन । जें नेत्राचे नयन । कानाचे कान । वाचेची वाचा ॥ २९ ॥ जें प्राणाचा प्राण । जें गतीचे चरण । क्रियेचें कर्तेपण ।

जयाचेनि ॥ ९३० ॥ आकारु जेणें आकारे । विस्तारु जेणें विस्तारे । संहारु जेणें संहारे । पांडुकुमरा ॥ ३१ ॥ जें मेदिनीची मेदिनी । जे पाणी पिऊनी असे पाणी । तेजा दिवेलावणी । जेणें तेजें ॥ ३२ ॥ जें वायूचा श्वासोश्वासु । जें गगनाचा अवकाशु । हें असो अघवाचि आभासु । आभासे जेणें ॥ ३३ ॥ किंबहुना पांडवा । जें आघवेंचि असे आघवा । जेथ नाहीं रिगावा । द्वैतभावासी ॥ ३४ ॥ जें देखिलियाचिसवें । दृश्य द्रष्टा हें आघवें । एकवाट कालवे । सामरस्यें ॥ ३५ ॥ मग तेंचि होय ज्ञान । ज्ञाता ज्ञेय हन । ज्ञानें गमिजे स्थान । तेंहि तेंचि ॥ ३६ ॥ जैसें सरलियां लेख । आंख होती एक । तैसें साध्यसाधनादिक । ऐक्यासि ये ॥ ३७ ॥ अर्जुना जिये ठायीं । न सरे द्वैताची वही । हें असो जें हृदयीं । सर्वांचां असे ॥ ३८ ॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः । मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥

एवं तुजपुढां । आदीं क्षेत्र सुहाडा । दाविलें फाडोवाडां । विवंचुनी ॥ ३९ ॥ तैसेंचि क्षेत्रापाठीं । जैसेनि देखसी दिठी । तैसें ज्ञान किरीटी । सांगितलें ॥ ९४० ॥ अज्ञानाही कौतुकें । रूप केलें निकें । जंव आयणी तुझी टेंके । पुरे म्हणे ॥ ४१ ॥ आणि आतां हें रोकडें । उपपत्तीचेनि पवाडें । निरूपिलें उघडें । ज्ञेय पैं गा ॥ ४२ ॥ हे आघवीच विवंचना । बुद्धि भरोनि अर्जुना । मत्सिद्धिभावना । माझिया येती ॥ ४३ ॥ देहादिपरिग्रहीं । संन्यासु करूनियां जिहीं । जीवु माझां ठाईं । वृत्तिकु केला ॥ ४४ ॥ ते मातें किरीटी । हेंचि जाणोनियां शेवटीं । आपणपयां साटोवाटीं । मीचि होती ॥ ४५ ॥ मीचि होती परी । हे मुख्य गा अवधारीं । सोहोपी सर्वापरी । रचिली आम्हीं ॥ ४६ ॥ कडां पायरी कीजे । निराळीं माचु बांधिजे । अथावीं सुइजे । तरी जैसी ॥ ४७ ॥ एऱ्हवीं अवघेंचि आत्मा । हें सांगों जरी वीरोत्तमा । तरी जे तुझिया मनोधर्मा । मिळेल ना ॥ ४८ ॥ म्हणोनि एकचि संचलें । चतुर्धा आम्हीं केलें । जें अदळपण देखिलें । तुझिये प्रज्ञे ॥ ४९ ॥ पैं बाळ जैं जेवविजे । तैं घांसु विसा ठायीं कीजे । तैसें एकचि चतुर्व्याजें । कथिलें आम्हीं ॥ ९५० ॥ एक क्षेत्र एक ज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान । हे भाग केले अवधान । जाणोनि तुझें ॥ ५१ ॥ आणि ऐसेनही पार्था । जरी हा अभिप्रावो तुज हाता । नये तरी हे व्यवस्था । एक वेळ सांगों ॥ ५२ ॥ आतां चौठायीं न करूं । एकही म्हणोनि न सरूं । आत्मानात्मया धरूं । सरिसा पाडु ॥ ५३ ॥ परि तुवां येतुलें करावें । मागौनि तें आम्हां देयावें । जे कानाचि नांव ठेवावें । आपण पैं गा ॥ ५४ ॥ या श्रीकृष्णाचिया बोला । पार्थु रोमांचितु जाला । तेथ देवो म्हणती भला । उचंबळेना ॥ ५५ ॥ ऐसेनि तो येतां वेगु । धरूनि म्हणे श्रीरंगु । प्रकृतिपुरुषविभागु । परिसें सांगों ॥ ५६ ॥

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि । विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान् ॥ १९ ॥

जया मार्गातें जगीं । सांख्य म्हणती योगी । जयाचिये भाटिवेलागीं । मी कपिल जाहलों ॥ ५७ ॥ तो आइक निर्दोखु । प्रकृतिपुरुषविवेकु । म्हणे आदिपुरुखु । अर्जुनातें ॥ ५८ ॥

तरी पुरुष अनादि आथी । आणि तैंचि लागोनि प्रकृती । संवसरिसी दिवोराती । दोनी जैसी ॥ ५९ ॥ कां रूप नोहे वायां । परी रूपा लागली छाया । निकणु वाढे धनंजया । कणेंसीं कोंडा ॥ ९६० ॥ तैसीं जाण जवटें । दोन्हीं इयें एकवाटें । प्रकृतिपुरुष प्रगटें । अनादिसिद्धें ॥ ६१ ॥ पैं क्षेत्र येणें नांवें । जें सांगितले आघवें । तेंचि एथ जाणावें । प्रकृति हे गा ॥ ६२ ॥ आणि क्षेत्रज्ञु ऐसें । जयातें म्हणितलें असे । तो पुरुष हें अनारिसें । न बोलों घेईं ॥ ६३ ॥ इयें आनानें नांवें । परि निरूप्य आन नोहे । हें लक्षण न चुकावें । पुढतपुढती ॥ ६४ ॥ तरी केवळ जे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृति तें समस्ता । क्रिया नांव ॥ ६५ ॥ बुद्धि इंद्रियें अंत:करण । इत्यादि विकारभरण । आणि ते तीन्ही गुण । सत्त्वादिक ॥ ६६ ॥ हा आघवाचि मेळावा । प्रकृति जाहला जाणावा । हेचि हेतु संभवा । कर्माचिया ॥ ६७ ॥

कार्यकरणकर्तृत्वे हेतु: प्रकृतिरुच्यते । पुरुष: सुखदु:खानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २० ॥ ।

तेथ इच्छा आणि बुद्धी । घडवी अहंकारेंसीं आधीं । मग तिया लाविती वेधीं । कारणाचां ॥ ६८ ॥ तेंचि कारण ठाकावया । जें सूत्र धरणें उपाया । तया नांव धनंजया । कार्य पैं गा ॥ ६९ ॥ आणि इच्छा मदाचां थावीं । लागली मनातें उठवी । तें इंद्रियें राहाटवी । हें कर्तृत्व पैं ॥ ९७० ॥ म्हणोनि तिन्ही या जाणा । कार्यकर्तृत्वकारणा । प्रकृति मूळ हे राणा । सिद्धांचा म्हणे ॥ ७१ ॥ एवं तिहींचेनि समवायें । प्रकृति कर्मरूप होये । परि जया गुणा वाढे त्राये । त्याचि सारिखी ॥ ७२ ॥ जें सत्त्वगुणें अधिष्ठिजे । तें सत्कर्म म्हणिजे । रजोगुणें निपजे । मध्यम तें ॥ ७३ ॥ जें कां केवळें तमें । होती जियें कर्में । निषिद्धें अधमें । जाण तियें ॥ ७४ ॥ ऐसेनि संतासंतें । कर्मे प्रकृतीस्तव होतें । तयापासोनि निर्वाळें तें । सुखदु:ख गा ॥ ७५ ॥ असंती दु:ख उपजे । सत्कर्मीं सुख निपजे । तया दोहींचा बोलिजे । भोगु पुरुषा ॥ ७६ ॥ सुखदु:खें जंववरी । निफजती साचोकारीं । तंव प्रकृति उद्यमु करी । पुरुष भोगी ॥ ७७ ॥ प्रकृतिपुरुषांची कुळवाडी । सांगता असंगडी । जे आंबुली जोडी । आंबुला खाय ॥ ७८ ॥ आंबुलया आंबुलिये । संगती ना सोये । कीं आंबुली जग विये । चोज ऐकें ॥ ७९ ॥

पुरुष: प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् । कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥

जे अनंगु तो पेंधा । निकवडा नुसधा । जीर्णु अतिवृद्धा - । पासोनि वृद्धु ॥ ९८० ॥ तया आडनांव पुरुषु । एन्हवीं स्त्री ना नपुंसकु । किंबहुना एकु । निश्चयो नव्हे ॥ ८१ ॥ अचक्षु अश्रवणु । अहस्तु अचरणु । रूप ना वर्णु । नाम आथी ॥ ८२ ॥ अर्जुना कांहींचि जेथ नाहीं । तो प्रकृतीचा भर्ता पाहीं । कीं भोगणें ऐसयाही । सुखदु:खाचें ॥ ८३ ॥ तो तरी अकर्ता । उदासु अभोक्ता । परि इया पतिव्रता । भोगविजे ॥ ८४ ॥ जियेतें आळुमाळु । रूपा गुणाचा चाळढाळु । ते भलतैसाही खेळु । लेखा आणी ॥ ८५ ॥ मा इये प्रकृती तंव । गुणमयी हेंचि नांव । किंबहुना सावेव । गुण तेचि हे ॥ ८६ ॥ हे प्रतिक्षणीं नित्य नवी । रूपाचीच आघवी ।

जडातेंही माजवी । इयेचा माजु ॥ ८७ ॥ नांवे इया प्रसिद्धें । स्नेहो इया स्निग्धें । इंद्रियें प्रबुद्धें । इयेचेनि ॥ ८८ ॥ कायि मन हें नपुंसक । कीं ते भोगवी तिन्ही लोक । ऐसें ऐसें अलौकिक । करणें इयेचें ॥ ८९ ॥ हे भ्रमाचें महाद्वीप । हे व्याप्तीचेंचि रूप । विकार उमप । इया केले ॥ ९९० ॥ हे कामाची मांडवी । हे मोहवनींची माधवी । इये प्रसिद्धचि दैवी । माया हे नांव ॥ ९१ ॥ हे वाङ्मयाची वाढी । हे साकारपणाची जोडी । प्रपंचाची धाडी । अभंग हे ॥ ९२ ॥ कळा एथुनि जालिया । विद्या इयेचिया केलिया । इच्छा ज्ञान क्रिया । वियाली हे ॥ ९३ ॥ हे नादाची टांकसाळ । हे चमत्काराचें वेळाउळ । किंबहुना सकळ । खेळु इयेचा ॥ ९४ ॥ जे उत्पत्ति प्रलयो होत । ते इयेचे सायंप्रात । हें असो अद्भुत । मोहन हे ॥ ९५ ॥ हे अद्वयाचें दुसरें । हें नि:संगाचे सोयरें । हे निराळेंसि घरें । नांदत असे ॥ ९६ ॥ इयेतें येतुलावरी । सौभाग्यव्याप्तीची थोरी । म्हणोनि तया आवरी । अनावरातें ॥ ९७ ॥ तयाचां तंव ठायीं । निपटुनि कांहींचि नाहीं । की तया आघवेंही । आपणचि होय ॥ ९८ ॥ तया स्वयंभाची संभूती । तया अमूर्ताची मूर्ती । आपण होय स्थिती । ठावो तया ॥ ९९ ॥ तया अनार्ताची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकुळाची जाती । गोत होय ॥ १००० ॥ निराकाराचा आकारु । तया निर्व्यापाराचा व्यापारु । निरहंकाराचा अहंकारु । होऊनि ठाके ॥ १ ॥ तया अचर्चाचें चिन्ह । तया अपाराचें मान । तया अमनस्काचें मन । बुद्धीही होय ॥ २ ॥ तया अनामाचें नाम । तया अजाचें जन्म । आपण होय कर्म । क्रिया तया ॥ ३ ॥ तया निर्गुणाचे गुण । तया अचरणाचे चरण । तया अश्रवणाचे श्रवण । अचक्षूचे चक्षु ॥ ४ ॥ तया भावातीताचे भाव । तया निरवयवाचे अवयव । किंबहुना होय सर्व । पुरुषाचें हे ॥ ५ ॥ ऐसेनि इया प्रकृति । आपुलिया सर्व व्याप्ती । अविकारातें विकृती - । माजीं कीजे ॥ ६ ॥ तेथ पुरुषत्व जें असे । तें ये इये प्रकृतिदशे । चंद्रमा अंवसे । पडिला जैसा ॥ ७ ॥ विदळ बहु चोखा । मीनलिया वाला एका । कसु होय पांचिका । जयापरी ॥ ८ ॥ कां साधूतें गोंधळी । संचरोनि सुये मैळीं । नाना सुदिनाचा आभाळीं । दुर्दिनु कीजे ॥ ९ ॥ तेथ पय पशूचां पोटीं । कां वन्ही जैसा काष्ठीं । गुंडूनि घेतला पटीं । रत्नदीपु ॥ १०१० ॥ राजा पराधीनु जाहला । कां सिंहु रोगें रुंधला । तैसा पुरुष प्रकृतीं आला । स्वतेजा मुके ॥ ११ ॥ जागता नरु सहसा । निद्रा पाडूनि जैसा । स्वप्नींचिया सोसा । वश्यु कीजे ॥ १२ ॥ तैसें प्रकृतिजालेपणें । पुरुषा गुण भोगणें । उदास अंतुरीगुणें । आतुडे जेवीं ॥ १३ ॥ तैसें अजा नित्या होये । आंगीं जन्ममृत्यूचें घाये । वाजती जैं लाहे । गुणसंगातें ॥ १४ ॥ परि तें ऐसें पंडुसुता । तातलें लोह पिटितां । जेवीं वन्हीसीचि घाता । बोलती तया ॥ १५ ॥ कां आंदोळलिया उदक । प्रतिमा होय अनेक । तें नानात्व म्हणती लोक । चंद्रीं जेवीं ॥ १६ ॥ दर्पणाचिया जवळिका । दुजेपण जैसें ये मुखा । कां कुंकुमें स्फटिका । लोहित्व ये ॥ १७ ॥ तैसा गुणसंगमें । अजन्मा हा जन्मे । पावतु ऐसा गमे । एन्हवीं नाहीं ॥ १८ ॥ अधमोत्तमा योनी । यासि ऐसिया मानीं ।

जैसा संन्यासी होय स्वप्नीं । अंत्यादि जाती ॥ १९ ॥ म्हणोनि केवळा पुरुषा । नाहीं होणें भोगणें देखा । येथ गुणसंगुचि अशेखा - । लागीं मूळ ॥ १०२० ॥

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः । परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥

हा प्रकृतिमाजीं उभा । परि जुई जैसा वोथंबा । यया प्रकृती पृथ्वीनभा । तेतुला पाडु ॥ २१ ॥ प्रकृतिसरितेचां तटीं । मेरु हा किरीटी । माजीं बिंबे परी लोटीं । लोटों नेणे ॥ २२ ॥ प्रकृति होय जाये । हा तो असतुचि आहे । म्हणोनि आब्रह्माचें होये । शासन हा ॥ २३ ॥ प्रकृति येणें जिये । याचिया सत्ता जग विये । इयालागीं इये । वरयतु हा ॥ २४ ॥ अनंत काळें किरीटी । जिया मिळती इया सृष्टी । तिया रिगती ययाचां पोटीं । कल्पांतसमयीं ॥ २५ ॥ हा महद्ब्रह्मगोसावी । ब्रह्मगोललाघवी । अपारपणें मवी । प्रपंचातें ॥ २६ ॥ पैं या देहामाझारीं । परमात्मा ऐसी जे परी । बोलिजे तें अवधारी । ययातेंचि ॥ २७ ॥ अगा प्रकृतिपरौता । एक आथी पंडुसुता । ऐसा प्रवादु तो तत्त्वता । पुरुषु हा पैं ॥ २८ ॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह । सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २३ ॥

जो निखळपणें येणें । पुरुषातें यया जाणे । आणि गुणाचें करणें । प्रकृतीचें तें ॥ २९ ॥ हें रूप हे छाया । पैल जळ हे माया । ऐसा निवाडु धनंजया । जेवीं कीजे ॥ १०३० ॥ तेणें पाडें अर्जुना । प्रकृतिपुरुषविवंचना । जयाचिया मना । गोचर जाहली ॥ ३१ ॥ तो शरीराचेनि मेळें । करूं कां कर्में सकळें । परि आकाश धुये न मैळे । तैसा असे ॥ ३२ ॥ आथिलेनि देहें । जो न घेपें देहमोहें । देह गेलिया नोहे । पुनरपि तो ॥ ३३ ॥ ऐसा तया एकु । प्रकृतिपुरुषविवेकु । उपकारु अलौकिकु । करी पैं गा ॥ ३४ ॥ परि हाचि अंतरीं । विवेकभानूचियापरी । उदैजे ते अवधारीं । उपाय बहुत ॥ ३५ ॥

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना । अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २४ ॥

कोणी एकु सुभटा । विचाराचां आगिटां । आत्मानात्मकिटा । पुटें देउनी ॥ ३६ ॥ छत्तीसही वानीभेद । तोडोनिया निर्विवाद । निवडिती शुद्ध । आपणपें ॥ ३७ ॥ तया आपणपयाचां पोटीं । आत्मध्यानाचिया दिठी । देखती गा किरीटी । आपणपेंचि ॥ ३८ ॥ आणिक पैं दैवबगें । चित्त देती सांख्ययोगें । एक ते अंगलगें । कर्माचेनि ॥ ३९ ॥

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते । तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २५ ॥

येणें येणें प्रकारें । निस्तरती साचोकारें । हें भवभेउरें । आघवेंचि ॥ १०४० ॥ परि ते करिती ऐसें । अभिमानु दवडुनि देशें । एकाचिया विश्वासें । टेंकती बोला ॥ ४१ ॥ जे हिताहित देखती । हानि कणवा घेपती । पुसोनि शिणु हरिती । देती सुख ॥ ४२ ॥ तयांचेनि मुखें निघे । तेतुलें आदरें चांगें । ऐकोनियां आंगें । मनें होती ॥ ४३ ॥ तया ऐकणेयाचि नांवे । ठेविती गा आघवें । तया अक्षरांसी जीवें । लोण करिती ॥ ४४ ॥ तेहीं अंती कपिध्वजा । इया मरणार्णवसमाजा - ।

पासूनि निघती वोजा । गोमटिया ॥ ४५ ॥ ऐसेसे हे उपाये । बहुवस एथें पाहे । जाणावया होये । एकी वस्तु ॥ ४६ ॥ आतां पुरे हें बहुत । पैं सर्वार्थाचें मथित । सिद्धांतनवनीत । देऊं तुज ॥ ४७ ॥ येतुलेनि पंडुसुता । अनुभव लाहाणा आयिता । येर तंव तुज होतां । सायास नाहीं ॥ ४८ ॥ म्हणोनि बुद्धि रचूं । मतवाद हे खाचूं । सोलींव निर्वचूं । फलितार्थचि ॥ ४९ ॥

यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् । क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २६ ॥

तरी क्षेत्रज्ञ येणें बोलें । तुज आपणपें जें दाविलें । आणि क्षेत्र सांगितलें । आघवें जें ॥ १०५० ॥ तया येरयेरांचां मेळीं । होइजे भूतीं सकळीं । अनिलसंगें सलिलीं । कल्लोळ जैसे ॥ ५१ ॥ कां तेजा आणि उखरा । भेटी जालिया वीरा । मृगजळाचिया पूरा । रूप होय ॥ ५२ ॥ नाना धाराधरधारीं । झळंबलिया वसुंधरी । उठिजे जेवीं अंकुरीं । नानाविधीं ॥ ५३ ॥ तैसें चराचर आघवें । जें कांहीं जीवु नावें । तें तों उभययोगें संभवें । ऐसें जाण ॥ ५४ ॥ इयापरी अर्जुना । क्षेत्रज्ञाप्रधाना - । पासूनि न होती भिन्ना । भूतव्यक्ति ॥ ५५ ॥

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् । विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥ २७ ॥

पैं पटत्व तंतु नव्हे । तरि तंतूसीचि तें आहे । ऐशां खोलीं डोळां पाहें । ऐक्य हें गा ॥ ५६ ॥ भूतें आघवींचि होती । एकाचिं एक आहाती । परी तू प्रतीतीं । यांची घे पां ॥ ५७ ॥ यांचीं नामेंही आनानें । अनारिसीं वर्तनें । वेषही सिनाने । आघवेयांचे ॥ ५८ ॥ ऐसे देखोनि किरीटी । भेद सूसी हन पोटीं । तरि जन्माचिया कोटी । न लाहसी निघों ॥ ५९ ॥ पैं नानाप्रयोजनशीळें । दीर्घें वक्रें वर्तुळें । होती एकीचींच फळें । तुंबिणीयेचीं ॥ १०६० ॥ होतु का उजू वांकुडें । परि बोरीचें हें न मोडे । तैसीं भूतें अवघडें । वस्तु उजू ॥ ६१ ॥ अंगारकणीं बहुतसीं । उष्णता समान जैसी । तैसा नाना जीवराशीं । परेशु असे ॥ ६२ ॥ गगनभरी धारा । परी पाणी एकचि वीरा । तैसा या भूताकारा । सर्वांगी तो ॥ ६३ ॥ हे भूतग्राम विषम । परी वस्तू ते एथ सम । घटमठीं व्योम । जियापरी ॥ ६४ ॥ हा नाशतां भूताभासु । एथ आत्मा तो अविनाशु । जैसा केयूरादिकीं कसु । सुवर्णाचा ॥ ६५ ॥ एवं जीवधर्महीनु । जो जीवासीं अभिन्नु । देखे तो सुनयनु । ज्ञानियांमाजीं ॥ ६६ ॥ ज्ञानाचा डोळां डोळसां - । माजीं डोळसु तो वीरेशा । हे स्तुति नोहे बहुवसा । भाग्याचा तो ॥ ६७ ॥

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् । न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ २८ ॥

जे गुणेंद्रियधोकटी । देह धातुंची त्रिकुटी । पांचमेळावा वोखटी । दारुण हे ॥ ६८ ॥ हे उघड पांचवेउली । पंचधा आंगीं लागली । जीवपंचानना सांपडली । हरिणकूटी हे ॥ ६९ ॥ ऐसा असोनि इये शरीरीं । कोण नित्यबुद्धीची सुरी । अनित्यभावाचां उदरीं । दाटीजेना ॥ १०७० ॥ परी इये देहीं असतां । जो नयेचि आपणया घाता । आणि शेखीं पंडुसुता । तेथेंचि मिळे ॥ ७१ ॥ जे योगज्ञानाचिया प्रौढी । वोलांडूनियां जन्मकोडी । न निगों इया भाषा बुडी । देती योगी

॥ ७२ ॥ जें आकाराचें पैल तीर । जें नादाची पैल मेर । तुर्येचें माजघर । परब्रह्म जें ॥ ७३ ॥ मोक्षासकट गती । जेथें येती विश्रांती । गंगादि आपांपती । सरिता जेवीं ॥ ७४ ॥ तें सुख येणेंचि देहें । पायपाखाळणिया लाहे । जो भूतवैषम्यें नोहे । विषमबुद्धी ॥ ७५ ॥ दीपांचां कोडी जैसें । एकचि तेज सरिसें । तैसा जो असे । सर्वत्र ईशु ॥ ७६ ॥ ऐसेनि समत्वें पंडुसुता । जिये तो देखतसांता । तो मरणा आणि जीविता । नागवे फुडा ॥ ७७ ॥ म्हणोनि तो दैवागळा । वानीत असों वेळोवेळां । जे साम्यसेजे डोळा । लागला तया ॥ ७८ ॥

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः । यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ २९ ॥

आणि मनोबुद्धिप्रमुखें । कर्मेंद्रियें अशेखें । करी प्रकृतीचि हें देखे । साचें जो गा ॥ ७९ ॥ घरींची रहाटती घरीं । घर कांहीं न करी । अभ्र धांवे अंबरीं । अंबर तें उगें ॥ १०८० ॥ तैसी प्रकृति आत्मप्रभा । खेळे गुणीं विविधारंभा । येथ आत्मा तो वोथंबा । नेणे कोण ॥ ८१ ॥ ऐसेनि येणें निवाडें । जयाचां जीवीं उजिवडें । अकर्तयातें फुडें । देखिलें तेणें ॥ ८२ ॥

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति । तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ॥ ३० ॥

एन्हवीं तैंचि अर्जुना । होईजे ब्रह्मसंपन्ना । जैं या भूताकृती भिन्ना । दिसती एकी ॥ ८३ ॥ लहरी जैसिया जळीं । परमाणुकणिका स्थळीं । रश्मीकर मंडळीं । सूर्याचां ॥ ८४ ॥ नातरी देहीं अवेव । मनीं आघवेचि भाव । विस्फुलिंग सावेव । वन्हीं एकी ॥ ८५ ॥ तैसे भूताकार एकाचे । हे दिठी रिगे जैं साचें । तैंचि ब्रह्मसंपत्तीचें । तारूं लागे ॥ ८६ ॥ मग जयातयाकडे । ब्रह्मोंचि दिठी उघडे । किंबहुना जोडे । अपार सुख ॥ ८७ ॥ येतुलेनि तुज पार्था । प्रकृतिपुरुषव्यवस्था । ठायेंठावो प्रतीतिपथा - । माजीं जाहली ॥ ८८ ॥ अमृत जैसें ये चुळा । कां निधान देखिजे डोळां । तेतुला जिव्हाळा । मानावा गा ॥ ८९ ॥ हा जी जाहलिये प्रतीती । घर बांधणें जें चित्तीं । तें आतां ना सुभद्रापती । इयावरी ॥ १०९० ॥ तरी एकदोन्ही ते बोल । बोलिजती सखोल । देईं मनातें वोल । मग तें घेईं ॥ ९१ ॥ ऐसे देवें म्हणितलें । मग बोलों आदरिलें । तेथे अवधानाचेंचि केले । सर्वांग येरें ॥ ९२ ॥

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः । शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥

तरी परमात्मा म्हणिपे । तो ऐसा जाण स्वरूपें । जळीं जळें न लिंपे । सूर्य जैसा ॥ ९३ ॥ कां जे जळा आदीं पाठीं । सूर्य असतुचि असे किरीटी । माजीं बिंबे तें दृष्टी । आणिकांचिये ॥ ९४ ॥ तैसा आत्मा देहीं । आथि म्हणिपे हें कांहीं । साचें तरी नाहीं । तो जेथिंचा तेथें ॥ ९५ ॥ आरिसां मुख जैसें । बिंबलिया नाम असे । देहीं बसणें तैसें । आत्मतत्त्वा ॥ ९६ ॥ तया देहा म्हणती भेटी । हे सपायी निर्जिव गोठी । वारिया वाळुवे गांठी । केंही आहे ॥ ९७ ॥ आगी आणि कापुसा । दोरा सुवावा कैसा । केउता सांदा आकाशा । पाषाणेंसीं ॥ ९८ ॥ एक निघे पूर्वेकडे । एक तें पश्चिमेकडे । तिये भेटीचेनि पाडें । संबंधु हा ॥ ९९ ॥ उजियेडा आणि अंधारेया ।

जो पाडु मृता उभेया। तोचि गा आत्मया। देहा जाण॥ ११००॥ रात्री आणि दिवसा। कनका आणि कापुसा। अपाडु कां जैसा। तैसाचि हा॥ १॥ देह तंव पांचाचें जालें। हें कर्माचां गुणीं गुंथलें। भंवतसे चाकीं सूदलें। जन्ममृत्यूचां॥ २॥ हें काळानळाचां कुंडीं। घातली लोणियाची उंडी। माशी पांखु पाखडी। तंव हें सरे॥ ३॥ हें विपायें आगी पडे। तरी भस्म होऊनि उडे। जाहलें श्वाना वरपडें। तरी ते विष्ठा॥ ४॥ या चुके दोन्हीं काजा। तरी होय कृमींचा पुंजा। हा परिणामु कपिध्वजा। कश्मलु गा॥ ५॥ या देहाची हें दशा। आणि आत्मा तो एथ ऐसा। पैं नित्य सिद्ध आपैसा। अनादिपणें॥ ६॥ सकळ ना निष्कळु। अक्रिय ना क्रियाशीळु। कृश ना स्थूळु। निर्गुणपणें॥ ७॥ आभासु ना निराभासु। प्रकाशु ना अप्रकाशु। अल्प ना बहुवसु। अरूपपणें॥ ८॥ रिता ना भरितु। रहितु ना सहितु। मूर्तु ना अमूर्तु। शून्यपणें॥ ९॥ आनंदु ना निरानंदु। एकु ना विविधु। मोकळा ना बद्धु। आत्मपणें॥ १११०॥ येतुला ना तेतुला। आइता ना रचिला। बोलता ना उगला। अलक्षपणें॥ ११॥ सृष्टीचां होणां न रचे। सर्वसंहारे न वेंचे। आथी नाथी या दोन्हींचें। पंचत्व तो॥ १२॥ मवे ना चर्चे। वाढे ना खांचे। विटे ना वेंचे। अव्ययपणें॥ १३॥ एवंरूप पै आत्मा। देहीं जें म्हणती प्रियोत्तमा। तें मठाकारें व्योमा। नाम जैसें॥ १४॥ तैसें तयाचिये अनुस्यूती। होती जाती देहाकृती। तो घे ना सांडी सुमती। जैसा तैसा॥ १५॥ अहोरात्रें जैशीं। येती जाती आकाशीं। आत्मसत्ते तैसीं। देहें जाण॥ १६॥ म्हणोनि इये शरीरीं। कांही करवी ना करी। आयताही व्यापारीं। सज्जु नव्हे॥ १७॥ यालागीं स्वरूपें। उणा पुरा न घेपे। हें असो तो न लिंपे। देहीं देहा॥ १८॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते। सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते॥ ३२॥

अगा आकाश कें नाहीं। हें न रिघेचि कवणे ठायीं। परि कायिसेनि कहीं। गादिजेना जैसें॥ १९॥ तैसा सर्वत्र सर्व देहीं। आत्मा असतुचि असे पाहीं। संगदोषें एकेंही। लिप्तु नव्हे॥ ११२०॥ पुढतपुढती एथें। हेंचि लक्षण निरुतें। जे जाणावें क्षेत्रज्ञातें। क्षेत्रविहिना॥ २१॥

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः। क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत॥ ३३॥

संसर्गें चेष्टिजे लोहें। परि लोह भ्रामक नोहे। क्षेत्रक्षेत्रज्ञां आहे। तेतुला पाडु॥ २२॥ दीपकाची अर्ची। राहाटी वाहे घरीची। परी वेगळीक कोडीची। दीपा आणि घरा॥ २३॥ काष्ठांचां पोटीं। वन्हि असे किरीटी। परि काष्ठ नोहे या दिठी। पाहिजे गा॥ २४॥ अपाडु नभा आभाळा। रवि आणि मृगजळा। तैसाचि हाही डोळां। देखसी जरी॥ २५॥ हें आघवेंचि असो एकु। गगनौनि जैसा अर्कु। प्रगटवी लोकु। नांवे नांवे॥ २६॥ एथ क्षेत्रज्ञु तो ऐसा। प्रकाशकु क्षेत्राभासा। यावरुतें हें न पुसा। शंका नेघा॥ २७॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा। भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम्॥ ३४॥

शब्दतत्त्वसारज्ञा। पैं देखणी तेचि प्रज्ञा। जे क्षेत्र क्षेत्रज्ञा। अपाडु देखे॥ २८॥ इया दोहींचे

अंतर । देखावया चतुर । ज्ञानियांचे द्वार । आराधिती ॥ २९ ॥ याचिलागीं सुमती । जोडिती शांतिसंपत्ती । शास्त्रांची दुभतीं । पोसितीं घरीं ॥ ११३० ॥ योगाचिया आकाशा । वळघिजे येवढाचि धिंवसा । याचियाचि आशा । पुरुषासि गा ॥ ३१ ॥ शरीरादि समस्त । मानिताति तृणवत । जीवें संतांचें होती । वाहणधरु ॥ ३२ ॥ ऐसैसियापरी । ज्ञानाचिया भरोवरी । करूनियां अंतरी । निरुते होत ॥ ३३ ॥ मग क्षेत्रज्ञा क्षेत्राचें । जे अंतर देखती साचें । ज्ञानें उन्मेख तयांचें । वोवाळूं आम्ही ॥ ३४ ॥ आणि महाभूतादिकीं । प्रभेदलीं अनेकीं । पसरलीसे लटिकी । प्रकृति जे हे ॥ ३५ ॥ ते शुकनळिकान्यायें । न लगती लागली आहे । हें जैसें तैसें होये । ठाउवें जयां ॥ ३६ ॥ जैसी माळा ते माळा । ऐसीचि देखिजे डोळां । सर्पबुद्धि टवाळा । उखी होउनि ॥ ३७ ॥ कां शुक्ति ते शुक्ति । हे साच होय प्रतीती । रुपेयाची भ्रांती । जाऊनिया ॥ ३८ ॥ तैसी वेगळी वेगळेपणें । प्रकृति जे अंत:करणें । देखती ते मी म्हणें । ब्रह्म होती ॥ ३९ ॥ जें आकाशाहूनि वाड । जें अव्यक्ताची पैल कड । जें भेटलिया अपाडा पाड । पडो नेदी ॥ ११४० ॥ आकारु जेथ सरे । जीवत्व जेथे विरे । द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ॥ ४१ ॥ तें परमतत्त्व पार्था । होती ते सर्वथा । जे आत्मानात्मव्यवस्था - । राजहंसु ॥ ४२ ॥ ऐसा हा जी आघवा । श्रीकृष्णें तया पांडवा । उगाणा दिधला जीवा । जीवाचिया ॥ ४३ ॥ येर कलशीचें येरी । रिचविजे जयापरी । आपणपें तया हरी । दिधलें तैसें ॥ ४४ ॥ आणि कोणा देता कोण । तो नर तैसा नारायण । वरी अर्जुनातें कृष्ण । हा मी म्हणे ॥ ४५ ॥ परि असो तें नाथिलें । न पुसतां कां मी बोलें । किंबहुना दिधलें । सर्वस्व देवें ॥ ४६ ॥॥ कीं तो पार्थु जी मनीं । अझुनी तृप्ती न मनी । अधिकाधिक उतान्ही । वाढवीतु असे ॥ ४७ ॥ स्नेहाचिया भरोवरी । आंबुथिला दीपु घे थोरी । चाड अर्जुना अंतरी । परिसतां तैसी ॥ ४८ ॥ तेथ सुगरणी उदारे । रसज्ञ आणि जेवणारे । मिळती मग अवतरे । हातु जैसा ॥ ४९ ॥ तैसें जी होतसे देवा । तया अवधानाचिया लवलवा । पाहातां व्याख्यान चढलें थांवा । चौगुणें वरी ॥ ११५० ॥ सुवायें मेघु सांवरे । जैसा चंद्रें सिंधु भरे । तैसा मातुला रसु आदरें । श्रोतयांचेनि ॥ ५१ ॥ आतां आनंदमय आघवें । विश्व कीजेल देवें । ते राये परिसावें । संजयो म्हणे ॥ ५२ ॥ एवं जे महाभारतीं । श्रीव्यासें अप्रांतमती । भीष्मपर्वी शांती । म्हणितली कथा ॥ ५३ ॥ तो कृष्णार्जुनसंवादु । नागरीं बोलीं विशदु । सांगोनि दाऊं प्रबंधु । वोवियेचा ॥ ५४ ॥ नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा । जे श्रृंगाराचां माथां । पाय ठेविती ॥ ५५ ॥ दाऊं वेल्हाळे देशी नवी । जे साहित्यातें वोजावी । अमृतातें चुकी ठेवी । गोडिसेपणें ॥ ५६ ॥ बोल वोल्हावतेनि गुणें । चंद्रासि घे उमाणे । रसरंगी भुलवणें । नादु लोपी ॥ ५७ ॥ खेचराचियाही मना । आणी सात्त्विकाचा पान्हा । श्रवणासवें सुमना । समाधि जोडे ॥ ५८ ॥ तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसीं विश्व भरूं । आनंदाचें आवारूं । मांडूं जगा ॥ ५९ ॥ फिटो विवेकाची वाणी । हो कानामनाची जिणी । देखो आवडे ते खाणी । ब्रह्मविद्येची

॥ ११६० ॥ दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोधसुकाळा - । माजीं विश्व ॥ ६१ ॥ हें निफजेल आतां आघवें । ऐसें बोलिजेल बरवें । जे अधिष्ठिला असें परमदेवें । निवृत्ती मी ॥ ६२ ॥ म्हणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमाश्लोक कोंदाकोंदी । झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ॥ ६३ ॥ हा ठावोवरी मातें । पुरतया सारस्वतें । केलें असे श्रीमंतें । श्रीगुरुरायें ॥ ६४ ॥ तेणें जी कृपासावायें । मी बोलें तेतुलें सामायें । आणि तुमचिये सभे लाहें । गीता म्हणों ॥ ६५ ॥ वरि तुम्हां संतांचे पाये । आजि मी पातला आहें । म्हणोनि जी नोहे । अटकु कांहीं ॥ ६६ ॥ प्रभु काश्मिरीं मुकें । नुपजे हें कौतुकें । नाहीं उणीं सामुद्रिकें । लक्ष्मीयेसी ॥ ६७ ॥ तैसा तुम्हा संतांपासीं । अज्ञानाची गोठी कायसी । यालागीं नवरसीं । वरुषेन मी ॥ ६८ ॥ किंबहुना आतां देवा । अवसरु मज देयावा । ज्ञानदेव म्हणे बरवा । सांगेन ग्रंथु ॥ ११६९ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगोनाम त्रयोदशोऽध्यायः ॥ (श्लोक ३४; ओव्या ११६९)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय चौदावा)

जय जय आचार्या । समस्तसुरवर्या । प्रज्ञाप्रभातसूर्या । सुखोदया ॥ १ ॥ जय जय सर्व विसांवया । सोऽहंभावसुहावया । नाना लोक हेलावया । समुद्रा तूं ॥ २ ॥ आइकें गा आर्तबंधू । निरंतरकारुण्यसिंधू । विशदविद्यावधू - । वल्लभा जी ॥ ३ ॥ तूं जयांप्रति लपसी । तया जग हें दाविसी । प्रगटु तैं करिसी । आघवेंचि तूं ॥ ४ ॥ कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे । हा दृष्टिबंधु निफजे । परी नवल लाघव तुझें । जें आपणपें चोरें ॥ ५ ॥ जे तूंचि तूं सर्वा यया । मा कोणा बोधु कोणा माया । ऐसिया आपेंआप लाघविया । नमो तुज ॥ ६ ॥ जाणों जगीं आप वोलें । तें तुझिया वोला सुरस जालें । तुझेंनि क्षमत्व आलें । पृथ्वीयेसीं ॥ ७ ॥ रविचंद्रादि शुक्ति । उदो करिती त्रिजगतीं । तें तुझिया दीप्तीं । तेज तेजा ॥ ८ ॥ चळवळिजे अनिळें । तें दैविकेनि जी

निजबळें । नभ तुजमाजीं खेळे । लपीथपी ॥ ९ ॥ किंबहुना माया असोस । ज्ञान जी तुझेनि डोळस । असो वानणें सायास । श्रुतिसि हें ॥ १० ॥ वेद वानूनि तंव चांग । जंव न दिसे तुझें आंग । मग आम्हां तया मूग । एकी पांती ॥ ११ ॥ जी एकार्णवाचां ठाई । पाहतां थेंबाचा पाडु नाहीं । मा महानदी काई । जाणिजती ॥ १२ ॥ कां उदयलिया भास्वतु । चंद्र जैसा खद्योतु । आम्हां श्रुती तुजआंतु । तो पाडु असे ॥ १३ ॥ आणि दुजया थांवो मोडे । जेथ परेशीं वैखरी बुडे । तो तूं मा कोणें तोंडें । वानावासी ॥ १४ ॥ यालागी आतां । स्तुति सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें ॥ १५ ॥ तरी तुज तैसिया । नमो जी श्रीगुरुराया । मज ग्रंथोद्यमु फळावया । वेव्हारा होईं ॥ १६ ॥ आतां कृपाभांडवल सोडीं । भरीं मति माझी पोतडी । करीं ज्ञानपद्यजोडी । थोरा मातें ॥ १७ ॥ मग मी संसरेण तेणें । करीन संतांसी कर्णभूषणें । लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ॥ १८ ॥ जी गीतार्थनिधान । काढू माझें मन सुयीं स्नेहांजन । आपलें तूं ॥ १९ ॥ हे वाक्सृष्टि एके वेळे । देखतु माझे बुद्धीचे डोळे । तैसा उदैजो जी निर्मळें । कारुण्यबिंबें ॥ २० ॥ माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सुफळ । तो वसंतु होय स्नेहाळ - । शिरोमणी ॥ २१ ॥ प्रमेयमहापूरें । हे मतिगंगा ये थोरे । तैसा वरिष उदारे । दिठीवेनी ॥ २२ ॥ अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादुचंद्रमा । करू मज पूर्णिमा । स्फूर्तीची जी ॥ २३ ॥ जी अवलोकिलिया मातें । उन्मेषसागरीं भरितें । वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तींचें ॥ २४ ॥ तंव तोषोनि गुरुराजें । म्हणितलें विनंतिव्याजें । मांडिलें देखो दुजें । स्तवनमिषें ॥ २५ ॥ हें असो आतां वांजटा । तो ज्ञानार्थ करूनि गोमटा । ग्रंथु दावीं उत्कंठा । भंगों नेदीं ॥ २६ ॥ हो कां जी स्वामी । हेंचि पाहतु होतों मी । जे श्रीमुखें म्हणा तुम्ही । ग्रंथु सांग ॥ २७ ॥ सहजें दुर्वेचा डिरु । आंगेंचि तंव अमरु । वरी आला पूरु । पीयूषाचा ॥ २८ ॥ तरी आतां येणें प्रसादें । विन्यासें विदग्धें । मुळशास्त्रपदें । वाखाणीन ॥ २९ ॥ परी जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणी बुडे । ना श्रवणीं तरी चाडे । वादु दिसे ॥ ३० ॥ तैसी बोली साचारी । अवतरो माझी माधुरी । माले मागूनि घरीं । गुरूकृपेचां ॥ ३१ ॥ तरी मागां त्रयोदशीं । अध्यायीं गोष्टि ऐसी । श्रीकृष्णु अर्जुनेसीं । चावळले ॥ ३२ ॥ जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें । होईजे येणें जगें । आत्मा गुणसंगें । संसारिया ॥ ३३ ॥ आणि हाचि प्रकृतिगतु । सुखदुःखभोगीं हेतु । अथवा गुणातीतु । केवळु हा ॥ ३४ ॥ तरी कैसा पां असंगा संगु । कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोगु । सुखदुःखादि भोगु । केवीं तया ॥ ३५ ॥ गुण ते कैसे किती । बांधिती कवणें रीती । नातरी गुणातीतीं । चिन्हें काई ॥ ३६ ॥ एवं यया आघवेया । अर्था रूप करावया । विषो एथ चौदाविया । अध्यायासी ॥ ३७ ॥ तरि तो आतां ऐसा । प्रस्तुत परियेसा । अभिप्रावो विश्वेशा । वैकुंठाचा ॥ ३८ ॥ तो म्हणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना । मेळौनि इया ज्ञाना । झोंबावें हो ॥ ३९ ॥ आम्हीं मागां तुज बहुतीं । दाविलें हें उपपत्तीं । तरी आझुनी प्रतीती - । कुशी न निघे ॥ ४० ॥

श्रीभगवानुवाच : परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्। यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥

म्हणोनि गा पुढती । सांगिजेल तुजप्रती । पर म्हण म्हणो श्रुतीं । डाहारिलें जें ॥ ४१ ॥ एऱ्हवीं ज्ञान हें आपुलें । परि पर ऐसेनि जालें । जे आवडोनि घेतलें । भवस्वर्गादिक ॥ ४२ ॥ अगा याचि कारणें । हें उत्तम सर्वांपरी मी म्हणें । जे वन्हि हें तृणें । येरें ज्ञानें ॥ ४३ ॥ जियें भवस्वर्गातें जाणती । यागचि चांग म्हणती । पारखी फुडी आथी । भेदीं जेयां ॥ ४४ ॥ तियें आघवींचि ज्ञानें । केलीं येणें स्वप्नें । जैशा वातोर्मी गगनें । गिळिजती अंती ॥ ४५ ॥ कां उदितें रश्मिराजें । लोपिलीं चंद्रादि तेजें । नाना प्रळयांबुमाजें । नदी नद ॥ ४६ ॥ तैसें हें येणें पाहलेया । ज्ञानजात जाय लया । म्हणोनियां धनंजया । उत्तम हें ॥ ४७ ॥ अनादि जे मुक्तता । आपुली असे पंडुसुता । तो मोक्षु हाता येता । होय येणें ॥ ४८ ॥ जयाचिया प्रतीती । विचारवीरीं समस्तीं । नेदिजेचि संसृती । माथां उधऊं ॥ ४९ ॥ मनें मन घालूनि मागें । विश्रांति जालिया आंगें । ते देहीं देहाजोगे । होतीचि ना ॥ ५० ॥ मग तें देहाचें बेळें । वोलांडूनि एकेचि वेळे । संवतुकी कांटाळें । माझें जाले ॥ ५१ ॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः । सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ॥ २ ॥

जे माझिया नित्यता । तेणें नित्य ते पंडुसुता । परिपूर्ण पूर्णता । माझियाचि ॥ ५२ ॥ मी जैसा अनंतानंदु । जैसाचि सत्यसिंधु । तैसेचि ते भेदु । उरेचि ना ॥ ५३ ॥ जें मी जेवढें जैसें । तेंचि ते जाले तैसें । घटभंगीं घटाकाशें । आकाश जेवीं ॥ ५४ ॥ नातरी दीपमूळकीं । दीपशाखा अनेकी । मीनलिया अवलोकीं । होय जैसें ॥ ५५ ॥ अर्जुना तयापरी । सरली द्वैताची वारी । नांदो नामार्थ एकाहारीं । मीतूंविण ॥ ५६ ॥ येणेंचि पैं कारणें । जैं पहिलें सृष्टीचें जुंपणें । तैं ही तया होणें । पडेचिना ॥ ५७ ॥ सृष्टीचिये सर्वादी । जेयां देहाची नाहीं बांधी । तें कैचे प्रलयावधी । निमतील पां ॥ ५८ ॥ म्हणोनि जन्मक्षयां - । अतीत तें धनंजया । मी जाले ज्ञाना यया । अनुसरोनी ॥ ५९ ॥ ऐसी ज्ञानाची वाढी । वानिली देवें आवडी । तेवींचि पार्थाही गोडी । लावावया ॥ ६० ॥ तंव तया जालें आन । सर्वांगीं निघाले कान । सपाई अवधान । आतला पां ॥ ६१ ॥ आतां देवाचिया ऐसें । जाकळीजतु असे वोरसें । म्हणोनि निरूपण आकाशें । वेंटाळेना ॥ ६२ ॥ मग म्हणे गा प्रज्ञाकांता । उजवली आजि वक्तृत्वता । जे बोलायेवढा श्रोता । जोडलासि ॥ ६३ ॥ तरि एकु मी अनेकीं । गोंविजे देहपाशकीं । त्रिगुणीं लुब्धकीं । कोणी परी ॥ ६४ ॥ कैसा क्षेत्रयोगें । वियें इयें जगें । तें परिस सांगें । कोणे परी ॥ ६५ ॥ पै क्षेत्र येणें व्याजें । हें यालागीं बोलिजे । जे मत्संगबीजें । भूतीं पिके ॥ ६६ ॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्। संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

एऱ्हवीं तरी महद्ब्रह्म । यालागीं हें ऐसें नाम । जे महदादिविश्राम - । शालिका हें ॥ ६७ ॥ विकारां बहुवस थोरी । अर्जुना हेंचि करी । म्हणोनि अवधारीं । महद्ब्रह्म ॥ ६८ ॥

अव्यक्तवादमतीं । अव्यक्त ऐसी वदंती । सांख्याचिया प्रतीती । प्रकृति हेचि ॥ ६९ ॥ वेदांतीं इयेतें माया । ऐसें म्हणिजे प्राज्ञराया । असो किती बोलों वायां । अज्ञान हें ॥ ७० ॥ आपुला आपणपेयां । विसरु जो धनंजया । तेंचि रूप यया । अज्ञानासी ॥ ७१ ॥ आणिकही एक असे । जें विचारावेळे न दिसे । वातीं पाहतां जैसें । अंधारें कां ॥ ७२ ॥ हालविलिया जाये । निश्चळीं तरी होये । दुधीं जैसी साये । दुधाची ते ॥ ७३ ॥ पैं जागरु ना स्वप्न । ना स्वरूपअवस्थान । ते सुषुप्ति कां घन । जैसी होय ॥ ७४ ॥ कां न वियतां वायूतें । वांझें आकाश रितें । तया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७५ ॥ पैल खांब कां पुरुखु । ऐसा निश्चयो नाहीं एकु । परी काय नेणो आलोकु । दिसत असे ॥ ७६ ॥ तेवीं वस्तु जैसी असे । तैसी कीर न दिसे । परी कांहीं अनारिसें । देखिजेना ॥ ७७ ॥ ना राती ना तेज । ते संधि जेवीं सांज । तेवीं विरुद्ध ना निज । अज्ञान आथी ॥ ७८ ॥ ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वादु अज्ञान ऐसा । तया गुंडलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञु नांव ॥ ७९ ॥ अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरी नेणिजे । तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ॥ ८० ॥ हाचि उभय योगु । बुझें बापा चांगु । सत्तेचा नैसर्गु । स्वभावो हा ॥ ८१ ॥ आतां अज्ञानासारिखें । वस्तु आपणपेंचि देखे । परि रूपें अनेकें । नेणों कोणें ॥ ८२ ॥ जैसा रंकु भ्रमला । म्हणे जा रे मी रावो आला । कां मूर्च्छितु गेला । स्वर्गलोका ॥ ८३ ॥ तेवीं लचकलिया दिठी । मग देखणें जें जें उठी । तया नांव सृष्टी । मीचि वियें पैं गा ॥ ८४ ॥ जैसें कां स्वप्नमोहा । तो एकाकी देखिजे बहुवा । तोचि पाडु आत्मया । स्मरणेंवीण असे ॥ ८५ ॥ हेंचि आनी भांति । प्रमेय उपलवूं पुढती । परि तूं प्रतीती । याचि घे पां ॥ ८६ ॥ तरी माझी हे गृहिणी । अनादि तरुणी । अनिर्वाच्यगुणी । अविद्या हे ॥ ८७ ॥ इये नाहीं हेंचि रूप । ठाणें हें अति उमप । हे निद्रितां समीप । चेता दुरी ॥ ८८ ॥ पैं माझेनिचि आंगें । पौढल्या हे जागे । आणि सत्तासंभोगें । गुर्विणी होय ॥ ८९ ॥ महद्ब्रह्मउदरीं । प्राकृतीं आठै विकारीं । गर्भाची करी । पेलोवेली ॥ ९० ॥ उभयसंगु पहिलें । बुद्धितत्त्व प्रसवलें । बुद्धितत्त्व भारैलें । होय मन ॥ ९१ ॥ तरुणी ममता मनाची । ते अहंकार तत्त्व रची । तेणें महाभूतांची । अभिव्यक्ती होय ॥ ९२ ॥ आणि विषयेंद्रियां गोसी । स्वभावें तंव भूतांसी । म्हणोनि येती सरिसीं । तियेंही रूपा ॥ ९३ ॥ जालेनि विकारक्षोभें । पाठीं त्रिगुणाचें उभें । तेव्हां ये वासनागर्भें । ठायें ठावो ॥ ९४ ॥ रुखाचा आवांका । जैसी बीजकणिका । जीवीं बांधे उदका । भेटतखेंवो ॥ ९५ ॥ तैसी माझेनि संगें । अविद्या नाना जगें । आर घेवों लागे । आपणयाची ॥ ९६ ॥ मग गर्भगोळा तया । कैसें रूप तैं ये आया । तें परियेसें राया । सुजनांचिया ॥ ९७ ॥ पैं मणिज स्वेदज । उद्भिज जारज । उमटती सहज । अवेव हे ॥ ९८ ॥ व्योमवायुवशें । वाढलेनि गर्भरसें । मणिजु उससे । अवेवु तो ॥ ९९ ॥ पोटीं सूनि तमरजें । आगळिकां तोय तेजें । उठितां निफजे । स्वेदजु गा ॥ १०० ॥ आपपृथ्वीउत्कटें । आणि तमोमात्रें निकृष्टें । स्थावरु उमटे । उद्भिजु हा ॥ १ ॥ पांचा पांचही विरजीं । होती मनबुद्ध्यादि साजीं । हीं

हेतु जारजीं । ऐसें जाण ॥ २ ॥ ऐसे चारी हे सरळ । करचरणतळ । महाप्रकृति स्थूळ । तेंचि शिर ॥ ३ ॥ प्रवृत्ति पेललें पोट । निवृत्ति ते पाठी नीट । सुरयोनी आंगें आठ । ऊर्ध्वाचीं ॥ ४ ॥ कंठु उल्हासता स्वर्गु । मृत्युलोक मध्यभागु । अधोदेशु चांगु । नितंबु तो ॥ ५ ॥ ऐसें लेंकरूं एक । प्रसवली हे देख । जयाचें तिन्हीं लोक । बाळसें गा ॥ ६ ॥ चौऱ्यांयशी लक्ष योनी । तियें कांडां पेरां सांदणी । वाढे प्रतिदिनीं । बाळक हें ॥ ७ ॥ नाना देह अवयवीं । नामाचीं लेणीं लेववी । मोहस्तन्यें वाढवी । नीच नवे ॥ ८ ॥ सृष्टी वेगळवेगळीया । तिया करांघ्रीं आंगोळियां । भिन्नाभिमान सूदलिया । मुदिया तेथें ॥ ९ ॥ हे एकलौतें चराचर । अविचारित सुंदर । प्रसवोनि थोर । थोरावली ॥ ११० ॥ पैं ब्रह्मा प्रातःकाळु । विष्णु तो माध्यान्ह वेळु । सदाशिव सायंकाळु । बाळा यया ॥ ११ ॥ महाप्रळयसेजे । खिळौनि आलें निजे । विषमज्ञानें उमजे । कल्पोदयीं ॥ १२ ॥ अर्जुना यापरी । मिथ्यादृष्टीचां घरीं । युगानुवृत्तीचीं करी । चोज पाउलें ॥ १३ ॥ संकल्पु जयाचा इष्टु । अहंकारु विनटु । ऐसिया होय तैं शेवटु । ज्ञानें यया ॥ १४ ॥ आतां असो हे बहु बोली । ऐसें विश्व माया व्याली । तेथ साह्य जाली । माझी सत्ता ॥ १५ ॥

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः । तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥

याकारणें मी पिता । महद्ब्रह्म माता । अपत्य पंडुसुता । जगडंबरु ॥ १६ ॥ आतां शरीरें बहुतें । देखोनि न भेद हो चित्तें । जें मनबुद्ध्यादि भूतें । एकेचि येथें ॥ १७ ॥ हा गा एकेचि देहीं । काय अनारिसे अवयव नाहीं । तेवीं विचित्र विश्व पाहीं । एकचि हें ॥ १८ ॥ पैं उंचानीचा डाहाळिया । विषमा वेगळालिया । येकाचि जेवीं जालिया । बीजाचिया ॥ १९ ॥ आणि संबंधु तोही ऐसा । मृत्तिके घटु लेंक जैसा । कां पटत्व कापुसा । नातू होय ॥ १२० ॥ नाना कल्लोळपरंपरा । संतती जैसी सागरा । आम्हां आणि चराचरा । संबंधु तैसा ॥ २१ ॥ म्हणोनि वन्हि आणि ज्वाळ । दोन्ही वन्हीचि केवळ । तेवीं मी गा सकळ । संबंधु वावो ॥ २२ ॥ जालेनि जगें मी झांकें । तरी जगत्वें कोण फांके । किळेवरी माणिकें । लोपिजे काई ॥ २३ ॥ अळंकारातें आलें । तरी सोनेपण काइ गेलें । कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुके ॥ २४ ॥ सांग पां धनंजया । अवयवीं अवयविया । आच्छादिजे की तया । तेंचि रूप ॥ २५ ॥ कीं विरूढलेया जोंधळा । कणिसाचा निर्वाळा । वेंचला कीं आगळा । दिसतसे ॥ २६ ॥ म्हणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें । तैसा नव्हे उखितें । आघवें मीचि ॥ २७ ॥ हा तूं साचोकारा । निश्चयाचा खरा । गांठी बांध वीरा । जीवाचिये ॥ २८ ॥ आतां मियां मज दाविला । शरीरीं वेगळाला । गुणीं मीचि बांधला । ऐसा आवडें ॥ २९ ॥ जैसें स्वप्नीं आपण । उठवूनियां आत्ममरण । भोगिजे गा जाण । कपिध्वजा ॥ १३० ॥ कां कवळातें डोळे । प्रकाशूनि पिवळें । देखती तेंही कळे । तयांसीचि ॥ ३१ ॥ नाना सूर्य प्रकाशें । प्रकटीं तैं अभ्र भासे । तो लोपला हेंही दिसे । सूर्येंचि कीं ॥ ३२ ॥ पैं आपणपेनि जालिया । छाया गा आपुलिया । बिहोनि बिहालिया । आन

आहे ॥ ३३ ॥ तैसीं इयें नाना देहें । दाऊनि मी नाना होयें । तेथ ऐसा बंधु आहे । तेंही देखें ॥ ३४ ॥ बंधु कां न बंधिजे । हें जाणणें मज माझें । नेणणेनि उपजे । आपलेनि ॥ ३५ ॥ तरी कोणें गुणें कैसा । मजचि मी बंधु ऐसा । आवडे तें परियेसा । अर्जुनदेवा ॥ ३६ ॥ गुण किती किंधर्म । कायि ययां रूपनाम । कें जालें हें वर्म । अवधारिजे ॥ ३७ ॥

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः । निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

तरी सत्त्वरजतम । तिघांसिही हें नाम । आणि प्रकृति जन्म - । भूमिका ययां ॥ ३८ ॥ येथ सत्त्व तें उत्तम । रज तें मध्यम । तिहींमाजीं तम । साविया धारें ॥ ३९ ॥ हें एकेचि वृत्तीचां ठायीं । त्रिगुणत्व आवडे पाहीं । वयसात्रय देहीं । येकीं जेवीं ॥ १४० ॥ कां मीनलेनि कीडें । जंव जंव तूक वाढे । तंव तंव सोनें हीन पडे । पांचिकां कसीं ॥ ४१ ॥ पैं सावधपण जैसें । वाहविलें आळसें । सुषुप्ति बैसे । घणावोनी ॥ ४२ ॥ तैसी अज्ञानांगीकारें । निगाली वृत्ति विखुरे । ते सत्त्वरजद्वारें । तमही होय ॥ ४३ ॥ अर्जुना गा जाण । ययां नाम गुण । आतां दाखऊं खूण । बांधिती ते ॥ ४४ ॥ तरी क्षेत्रज्ञदशे । आत्मा मोटका पैसे । हें देह मी ऐसें । मुहूर्त करी ॥ ४५ ॥ आजन्ममरणांतीं । देहधर्मीं समस्तीं । ममत्वाची सूती । घे ना जंव ॥ ४६ ॥ जैसी मीनाचां तोंडीं । पडेना जंव उडी । तंव गळ आसुडी । जळपारधी ॥ ४७ ॥

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् । सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ ॥ ६ ॥

तेवीं सत्त्वें लुब्धकें । सुखज्ञानाचीं पाशिकें । वोढिजती मग खुडके । मृगु जैसा ॥ ४८ ॥ मग ज्ञानें चरफडी । जाणिवेचे खुरखोडी । स्वयंसुख हें धाडी । हातीचें गा ॥ ४९ ॥ तेव्हा विद्यामानें तोखे । लाभमात्रें हरिखे । मी संतुष्ट हेंही देखे । श्लाघों लागे ॥ १५० ॥ म्हणे भाग्य ना माझें । आजि सुखियें नाहीं दुजें । विकाराष्टकें फुंजे । सात्त्विकाचेनि ॥ ५१ ॥ आणि येणेंही न सरे । लांकण लागे दुसरें । जें विद्वत्तेचें भरे । भूत आंगी ॥ ५२ ॥ आपणचि ज्ञानस्वरूप आहे । तें गेलें हें दुःख न वाहे । कीं विषयज्ञानें होये । गगनायेवढा ॥ ५३ ॥ रावो जैसा स्वप्नीं । रंकपणें रिघे धानीं । तो दों दाणां मानी । इंद्रु ना मी ॥ ५४ ॥ तैसें गा देहातीता । जालेया देहवंता । हों लागे पंडुसुता । बाह्यज्ञानें ॥ ५५ ॥ प्रवृत्तिशास्त्र बुझे । यज्ञविद्या उमजे । किंबहुना सुझे । स्वर्गवरी ॥ ५६ ॥ आणि म्हणे आजि आन । मीवांचूनि नाहीं सज्ञान । चातुर्यचंद्रा गगन । चित्त माझें ॥ ५७ ॥ ऐसें सत्त्व सुखज्ञानीं । जीवासि लावूनि कानी । बैलाची करी वानी । पांगुळाचिया ॥ ५८ ॥ आतां हाचि शरीरीं । रजें जियापरी । बांधिजे तें अवधारीं । सांगिजेल ॥ ५९ ॥

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम् । तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम् ॥ ७ ॥

हें रज याचि कारणें । जीवातें रंजऊ जाणे । हें अभिलाखाचें तरुणें । सदाचि गा ॥ १६० ॥ हें जीवीं मोटकें रिगे । आणि कामाचां मदीं लागे । मग वारया वळघे । चिंतेचिया ॥ ६१ ॥ घृतें आंबुखूनि आगियाळें । वज्राग्नीचें सादुकलें । आतां बहु थेंकुलें । आहे तेथ ॥ ६२ ॥ तैसी खवळे

चाड । होय दु:खासकट गोड । इंद्रश्रीहि सांकड । गमों लागे ॥ ६३ ॥ तैसी तृष्णा वाढिनलिया । मेरुही हाता आलिया । तन्ही म्हणे एखादिया । दारुणाहि वळघो ॥ ६४ ॥ आजि असतें वेंचिजेल । परी पाहे काय कीजेल । ऐसा पांगीं वडील । व्यवसाय मांडी ॥ ६५ ॥ जीविताची कुरोंडी । वोवाळूं लागे कवडी । मानी तृणाचिये जोडी । कृतकृत्यता ॥ ६६ ॥ म्हणे स्वर्गा हन जावें । तरी काय तेथें खावें । ययालागीं धांवे । याग करूं ॥ ६७ ॥ व्रतापाठीं व्रतें । आचरे इष्टापूर्तें । काम्यावांचूनि हातें । शिवणें नाहीं ॥ ६८ ॥ पैं ग्रीष्मांतींचा वारा । विसवों नेणे वीरा । तैसा न म्हणे व्यापारा । रातिदिवो ॥ ६९ ॥ काय चंचळु मासा । कामिनीकटाक्षु जैसा । लवलाहो तैसा । विजू नाहीं ॥ १७० ॥ तेतुलेनि गा वेगें । स्वर्गसंसारपांगें । आगीमाजीं रिगे । क्रियांचिये ॥ ७१ ॥ ऐसा देहीं देहावेगळा । लेईला तृष्णेचिया सांखळा । खटाटोपु वाहे गळां । व्यापाराचा ॥ ७२ ॥ हें रजोगुणाचें दारुण । देहीं देहियासि बंधन । परिस आतां विंदाण । तमाचें तें ॥ ७३ ॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् । प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

व्यवहाराचेहि डोळे । मंद जेणें पडळें । मोहरात्रीचें काळें । मेहुडें जें ॥ ७४ ॥ अज्ञानाचें जियालें । तया एका लागलें । जेणें विश्व भुललें । नाचत असे ॥ ७५ ॥ अविवेकमहामंत्र । जें मौढ्यमद्याचें पात्र । हें असो मोहनास्त्र । जीवांसि जें ॥ ७६ ॥ पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म । चौखुरी देहात्म - । मानियातें ॥ ७७ ॥ हें एकचि कीर शरीरीं । माजों लागे चराचरीं । आणि तेथ दुसरी । गोठी नाहीं ॥ ७८ ॥ सर्वेंद्रियां जाड्य । मनामाजीं मौढ्य । माल्हाती दाढर्य । आलस्याचें ॥ ७९ ॥ आंगे आंग मोडामोडी । कार्यजातीं अनावडी । नुसती परवडी । जांभयांची ॥ १८० ॥ उघडियाची दिठी । देखणें नाहीं किरीटी । नाळवितांचि उठी । वो म्हणौनि ॥ ८१ ॥ पडलिये धोंडी । नेणे कानी मुरडी । तयाचि परी मुरकुंडी । उकलूं नेणे ॥ ८२ ॥ पृथ्वी पाताळीं जावो । कां आकाशही वरी येवो । परी उठणें हा भावो । उपजों नेणे ॥ ८३ ॥ उचितानुचित आघवें । झांसुरतां नाठवे जीवें । जेथींचा तेथ लोळावें । ऐसी मेधा ॥ ८४ ॥ उभऊनि करतळें । पडिघाये कपोळें । पायाचें शिरियाळें । मांडू लागे ॥ ८५ ॥ आणि निद्रेविषयी चांगु । जीवीं आथि लागु । झोंपी जातां स्वर्गु । वावो म्हणे ॥ ८६ ॥ ब्रह्मायु होइजे । मग निजेलियाचि असिजे । हें वांचूनि दुजें । व्यसन नाहीं ॥ ८७ ॥ वाटा जातां वोघें । कल्हातांही डोळा लागे । अमृतही परी नेघे । जरी नीद आली ॥ ८८ ॥ तेवींचि आक्रोशबळें । व्यापारे कोणे एके वेळे । निगालें तरी आंधळें । रोषें जैसें ॥ ८९ ॥ केधवां कैसें राहाटावें । कोणेसीं काय बोलावें । हें ठाकतें कीं नागवे । हेंही नेणे ॥ १९० ॥ वणवा मियां आघवा । पांखेंचि पुसोनि घेयावा । पतंगु या हांवा । घाली जेवीं ॥ ९१ ॥ तैसा वळघे साहसा । अकरणीं धिंवसा । किंबहुना ऐसा । प्रमाद रुचे ॥ ९२ ॥ एवं निद्रालस्यप्रमादीं । तम इहीं त्रिविधीं । बांधे निरुपाधी । चोखटातें ॥ ९३ ॥ जैसा वन्ही काष्ठी भरे । तैं दिसे काष्ठाकारें । व्योम घटें आवरे । तें घटाकाश ॥ ९४ ॥ नाना

सरोवर भरले । तैं चंद्रत्व तेथें बिंबलें । तैसें गुणाभासीं बांधले । आत्मत्व गमे ॥ ९५ ॥

सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत । ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत । रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥ १० ॥

परि हरूनि कफवात । जैं देहीं आटोपे पित्त । तैं करी संतप्त । देह जेवीं ॥ ९६ ॥ कां वरिष आतप जैसें । जिणोनि शीतचि दिसे । तेव्हां होय हिंव ऐसें । आकाश हें ॥ ९७ ॥ नाना स्वप्न जागृती । लोपूनि ये सुषुप्ति । तैं क्षणु एक चित्तवृत्ती । तेचि होय ॥ ९८ ॥ तैसीं रजतमें हारवी । जैं सत्त्व माजु मिरवी । तैं जीवाकरवी म्हणवी । सुखिया ना मी ॥ ९९ ॥ तैसेंचि सत्त्व रज । लोपूनि तमाचें भोज । वळघे तैं सहज । प्रमादी होय ॥ २०० ॥ तयाचि गा परिपाठीं । सत्त्वतमातें पोटीं । घालुनि जेव्हां उठी । रजोगुण ॥ १ ॥ तेव्हां कर्मावांचूनि कांही । आन गोमटेचि नाहीं । ऐसें मानी देहीं । देहराजु ॥ २ ॥ त्रिगुणवृद्धिनिरूपण । तीं श्लोकीं सांगितलें जाण । आतां सत्त्वादिवृद्धिलक्षण । सादर परिसा ॥ ३ ॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते । ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥ ११ ॥

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा । रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च । तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥ १३ ॥

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् । तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते । तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥

पैं रजतमविजयें । सत्त्व गा देहीं इये । वाढतां चिन्हें तियें । ऐसीं होती ॥ ४ ॥ जे प्रज्ञा आंतुलीकडे । न समातीं बाहेरी वोसंडें । वसंती पद्मखंडें । दूती जैसी । सर्वेंद्रियांचां आंगणीं । विवेक करी राबणी । साचचि करचरणीं । होती डोळे ॥ ६ ॥ राजहंसापुढें । चांचूचें आगरडें । तोडी जेवीं झगडे । क्षीरनीराचे ॥ ७ ॥ तेवीं दोषादोषविवेकीं । इंद्रियेंचि होती पारखीं । नियमु बा रे पायिकी । वोळगे तें ॥ ८ ॥ नाइकणें तें कानचि वाळी । न पहाणें तें दिठीचि गाळी । अवाच्य तें टाळी । जीभचि गा ॥ ९ ॥ वाती पुढां जैसें । पळों लागे काळवसें । निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे ॥ २१० ॥ धाराधरकाळें । महानदी उचंबळे । तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ॥ ११ ॥ अगा पुनवेचां दिवशीं । चंद्रप्रभा धांवे आकाशीं । ज्ञानीं वृत्ति तैसी । फांके सैंघ ॥ १२ ॥ वासना एकवटे । प्रवृत्ति वोहटे । मानस विटे । विषयांवरी ॥ १३ ॥ एवं सत्त्व वाढे । तैं हे चिन्ह फुडें । आणि निधनही घडे । तेव्हाचि जरी ॥ १४ ॥ तरी जैसीचि घरींची संपत्ती । आणि तैसीच औदार्यधैर्यवृत्ती । मा परत्रा आणि कीर्ती । कां नोहावें ॥ १५ ॥ कां पाहालेनि सुयाणें । जालया परगुणें । पढियंतें ये पाहुणें । स्वर्गोनिया ॥ १६ ॥ मग गोमटेया तया । जावळी असे धनंजया । तेवीं सत्त्वीं जाणे देहा । कें आथि गा ॥ १७ ॥ जे स्वगुणीं उद्भट । घेऊनि सत्त्व चोखट । निगे सांडूनि कोपट । भोगक्षेम हें ॥ १८ ॥ अवचटें ऐसा जो जाये । तो सत्त्वाचाचि नवा होये । किंबहुना जन्म

लाहे। ज्ञानियांमाजीं ॥ १९ ॥ सांग पां धनुर्धरा। रावो रायपणें डोंगरा। गेलिया अपुरा। होय काई ॥ २२० ॥ नातरी येथिंचा दिवा। नेलिया सेजिया गांवा। तो तेथें तरी पांडवा। दीपचि कीं ॥ २१ ॥ तैसी ते सत्त्वशुद्धी। आगळी ज्ञानेंसी वृद्धी। तरंगावों लागे बुद्धी। विवेकावरी ॥ २२ ॥ पैं महदादि परिपाटी। विचारूनि शेवटीं। विचारासकट पोटीं। जिरोनि जाय ॥ २३ ॥ छत्तिसां सदतिसावें। चोविसां पंचविसावें। तिन्ही नुरोनि स्वभावें। चतुर्थ जें ॥ २४ ॥ ऐसें सर्व जें सर्वोत्तम। जालें असे जया सुगम। तयासवें निरुपम। लाहे देह ॥ २५ ॥ इयाचि परी देख। तमसत्त्व अधोमुख। बैसोनि जैं आगळिक । धरी रज ॥ २६ ॥ आपलिया कार्याचा । धुमाड गांवीं देहाचां । माजवी तैं चिन्हांचा। उदयो ऐसा ॥ २७ ॥ पांजरली वाहुटळी। करी वेगळ वेंटाळी। तैशी विषयीं सरळी। इंद्रियां होय ॥ २८ ॥ परदारादिक पडे। परी विरुद्ध ऐसें नावडे। मग शेळियेचेनि तोंडे। सैंघ चारी ॥ २९ ॥ हा ठायवरी लोभु। करी स्वैरत्वाचा राबु। वेंटाळितां अलाभु। तें तें उरे ॥ २३० ॥ आणि आड पडलिया। उद्यमजातां भलतेया। प्रवृत्ती धनंजया। हातु न काढी ॥ ३१ ॥ तेवींचि एखादा प्रासादु । कां करावा अश्वमेधु । ऐसा अचाट छंदु । घेऊनि उठी ॥ ३२ ॥ नगरेंचि रचावीं । जळाशयें निर्मावीं । महावनें लावावीं । नानाविधें ॥ ३३ ॥ ऐसैसां अफाटीं कर्मीं । समारंभु उपक्रमी। आणि दृष्टादृष्ट कामीं। पुरे न म्हणे ॥ ३४ ॥ सागरुही सांडी पडे। आगी न लाहे तीन कवडे। ऐसे अभिलाषीं जोडे। दुर्भरत्व ॥ ३५ ॥ स्पृहा मना पुढां पुढां। आशेचा घे दवडा। विश्व घापे चाडा । पायांतळीं ॥ ३६ ॥ इत्यादि वाढतां रजीं । इयें चिन्हें होती साजी । आणि ऐशा समाजीं। वेचें जरी देह ॥ ३७ ॥ तरी आघवांचि इहीं। परिवारला आनीं देहीं। रिगे परी योनिही मानुषीचि ॥ ३८ ॥ सुरवाडेंसि भिकारी। वसो पां राजमंदिरीं । तरी काय अवधारी। रावो होईल ॥ ३९ ॥ बैल तेथें करबाडें । हें न चुके गा फुडें । नेइजो कां वन्हाडें । समर्थाचेनी ॥ २४० ॥ म्हणोनि व्यापाराहातीं। उसंतु देहा ना राती। तैसयांचिये पांती। जुंपिजे तो ॥ ४१ ॥ कर्मजडाचां ठायीं। किंबहुना होय देही। जो रजोवृद्धीचां डोहीं। बुडोनि निमे ॥ ४२ ॥ मग तैसाचि पुढती। रजसत्त्ववृत्ती। गिळूनि ये उन्नती। तमोगुण ॥ ४३ ॥ तैंचि जियें लिंगें। देहींचीं सबाह्य सांगें। तियें परिस चांगें । श्रोत्रबळें ॥ ४४ ॥ तरी होय ऐसें मन । जैसें रविचंद्रहीन । रात्रींचें कां गगन । अवंसेचिये ॥ ४५ ॥ तैसें अंतर असोस । होय स्फूर्तिहीन उद्वस । विचाराची भाष । हारपे तैं ॥ ४६ ॥ बुद्धि मेचवेना धोंडीं। हा ठायवरी मवाळें सांडी। आठवो देशधडी। जाला दिसे ॥ ४७ ॥ अविवेकाचेनि माजें । सबाह्य शरीर गाजे । एकलेनि घेपे दीजे । मौढ्यें तेथ ॥ ४८ ॥ आचारभंगाचीं हाडे । रुपती इंद्रियापुढें । मरे जरी तेणेंकडे । क्रिया जाय ॥ ४९ ॥ पाहीं आणिकही एक दिसे। जे दुष्कृतीं चित्त उल्हासे। आंधारी देखणें जैसें। डुडुळाचें ॥ २५० ॥ तैसें निषिद्धाचेनि नांवें। भलतेंही भरे हावे। तियेविषयीं धांवे। घेती करणें ॥ ५१ ॥ मदिरा न घेतां डुले। सन्निपातेंवीण बरळे। निष्प्रेमेंचि भुले। पिसें जैसें ॥ ५२ ॥ चित्त तरी गेलें आहे।

परी उन्मनी ते नोहे । ऐसें माल्हातिजे मोहें । माजिरेनि ॥ ५३ ॥ किंबहुना ऐसैसीं । इयें चिन्हें तम पोषी । जैं वाढे आयतिसी । आपुलिया ॥ ५४ ॥ आणि हेंचि होय प्रसंगें । मरणाचें जरी खागें । तरी तेतुलेनि रिगे । तमेंसी तो ॥ ५५ ॥ राई राईपण बीजीं । सांठवूनियां अंग त्यजी । मग विरूढे तैं दुजी । गोठी आहे गा ॥ ५६ ॥ पैं होऊनि दीपकलिका । येरु आगी विझो कां । कां जेथ लागे तेथ असका । तोचि आहे ॥ ५७ ॥ म्हणोनि तमाचिये लोथे । बांधोनिया संकल्पातें । देह जाय तैं मागौतें । तमाचेंचि होय ॥ ५८ ॥ आतां काय येणें बव्हें । जो तमोवृद्धि मृत्यू लाहे । तो पशु कां पक्षी होये । झाड कां कृमी ॥ ५९ ॥

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् । रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

येणेंचि पैं कारणें । जें निपजे सत्त्वगुणें । ते सुकृत ऐसें म्हणे । श्रौतसमो ॥ २६० ॥ म्हणौनि तया निर्मळा । सुखज्ञानीं सरळा । अपूर्व ये फळा । सात्त्विक तें ॥ ६१ ॥ मग राजसा जिया क्रिया । तया इंद्रावणी पिकलिया । जे सुखें चितारूनियां । फळती दुःखे ॥ ६२ ॥ कां निंबोळियेचें पिक । वरि गोड आंत विख । तैसें तें राजस देख । क्रियाफळ ॥ ६३ ॥ तामस कर्म जितुकें । अज्ञानफळेंचि पिके । विषांकुर विखें । जियापरी ॥ ६४ ॥

सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च । प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ १७ ॥

म्हणौनि बा रे अर्जुना । येथ सत्त्वचि हेतु ज्ञाना । जैसा कां दिनमाना । सूर्य हा पैं ॥ ६५ ॥ आणि तैसेंचि हें जाण । लोभासि रज कारण । आपलें विस्मरण । अद्वैता जेवीं ॥ ६६ ॥ मोह-अज्ञान-प्रमादा । ययां मैळेया दोषवृंदा । पुढती पुढती प्रबुद्धा । तमचि मूळ ॥ ६७ ॥ ऐसें विचाराचां डोळां । तिन्हीं गुण हे वेगळवेगळां । दाविले जैसा आंवळा । तळहातींचा ॥ ६८ ॥ तंव रजतमें दोन्हीं । देखिलीं प्रौढ पतनीं । सत्त्वावाचूनि नाणी । ज्ञानाकडे ॥ ६९ ॥ म्हणौनि सात्त्विका वृत्ती । एक जाले गा जन्मव्रती । सर्वत्यागें चतुर्थी । भक्ति जैसी ॥ २७० ॥

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ १८ ॥

तैसें सत्त्वाचेनि नटनाचें । असणें जाणें जयांचे । ते तनुत्यागीं स्वर्गींचे । राय होती ॥ ७१ ॥ इयाचि परी रजें । जिहीं कां जीजे मरिजे । तिहीं मनुष्य होइजे । मृत्युलोकीं ॥ ७२ ॥ तेथ सुखदुःखाचें खिचटें । जेविजे एकेंचि ताटें । जेथ इये मरणवाटे । पडिलें नुठी ॥ ७३ ॥ आणि तयाचि स्थिति तमीं । जे वाढोनि निमती भोगक्षमीं । ते घेती नरकभूमी । मूळपत्र ॥ ७४ ॥ एवं वस्तूचिया सत्ता । त्रिगुणासी पंडुसुता । दाविली सकारणता । आघवीचि ॥ ७५ ॥ पैं वस्तु वस्तुत्वें असिकें । तें आपणपें गुणासारिखें । देखोनि कार्यविशेखें । अनुकरे गा ॥ ७६ ॥ जैसें कां स्वप्नींचेनि राजें । जैं परचक्र देखिजे । तैं हारी जैत होईजे । आपणचि ॥ ७७ ॥ तैसें मध्योर्ध्वअध । हे जे गुणवृत्तिभेद । दृष्टीवांचूनि शुद्ध । वस्तुचि असे ॥ ७८ ॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति । गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥

परी हे वाहणी असो। तरी आन न दिसो। परिसें तें सांगतसों। मागील गोठी ॥ ७९ ॥ तरी ऐसे निजनिजें। सामर्थ्यें तिन्ही सहजें। होती देहव्याजें। गुणचि हे ॥ २८० ॥ इंधनाचेनि आकारें। अग्नि जैसा अवतरे। कां अवगे तरुवरें। भूमिरसु ॥ ८१ ॥ नाना दहियांचेनि मिसें। परिणमे दूधचि जैसें। कां मूर्त होय ऊंसें। गोडी जेवीं ॥ ८२ ॥ तैसे हे सांत:करण। देहचि होती त्रिगुण। म्हणोनि बंधा कारण। घडे कीर ॥ ८३ ॥ परी चोज हें धनुर्धरा। जे एवढा गुंफिरा। मोक्षाचा संसारा। उणा नोहे ॥ ८४ ॥ गुण आपुलालेनि धर्मे। देहींचे मागुत साउमें। चाळितांही न खोमे। गुणातीतता ॥ ८५ ॥ ऐसी मुक्ति असे सहज। ते आतां परिसऊं तुज। जे तूं ज्ञानांबुज - । द्विरेफु कीं ॥ ८६ ॥ आणि गुणीं गुणाजोगें। चैतन्य नोहे मागे। बोलिलों तें खागें। तेवींचि हें ॥ ८७ ॥ तरी पार्था जैं ऐसें। बोधलेनि जींवें दिसे। स्वप्न कां जैसें। चेइलेनी ॥ ८८ ॥ नातरी आपण जळीं। बिंबलों तीरोनी न्याहाळी। चळण होतां कल्लोळीं। अनेकधा ॥ ८९ ॥ कां नटलेनि लाघवें। नटु जैसा न झकवे। तैसें गुणजात देखावें। न होनियां ॥ २९० ॥ पैं ऋतुत्रय आकाशें। धरूनियांही जैसें। नेदिजेचि येवों वोसें। वेगळेपणा ॥ ९१ ॥ तैसें गुणीं गुणापरौतें। जें आपणपें असे आयितें। तिये अहं बैसे अहंते। मूळकेचिये ॥ ९२ ॥ तैं तेथुनि मग पाहातां। म्हणे साक्षी मी अकर्ता। हे गुणचि क्रियाजातां। नियोजना ॥ ९३ ॥ सत्त्वरजतमांचा। भेदी पसरु कर्माचा। होत असे तो गुणांचा। विकारु हा ॥ ९४ ॥ ययामाजीं मी ऐसा। वनीं कां वसंतु जैसा। वनलक्ष्मीविलासा। हेतुभूत ॥ ९५ ॥ कां तारांगणी लोपावें। सूर्यकांतीं उद्दीपावें। कमळीं विकासावें। जावें तमें ॥ ९६ ॥ ये कोणाचीं काजीं कही। सविता जैसा नाहीं। तैसा अकर्ता मी देहीं। सत्तारूप ॥ ९७ ॥ मी दाऊनि गुण देखें। गुणता हे मियां पोखे। ययाचेनि नि:शेखे। उरे तें मी ॥ ९८ ॥ ऐसेनि विवेकें जया। उदो होय धनंजया। ये गुणातीतत्व तया। उर्धपंथें ॥ ९९ ॥

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान्। जन्ममृत्युजरादु:खैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥

आतां निर्गुण असे आणिक। तें तो जाणे अचुक। जे ज्ञानें केलें टीक। तयाचिवरी ॥ ३०० ॥ किंबहुना पंडुसुता। ऐसा तो माझी सत्ता। पावे जैशी सरिता। सिंधुत्व गा ॥ १ ॥ नळिकेवरून उठिला। जैसा शुक शाखे बैसला। तैसा मूळअहंते वेढिला। तो म्हणौनियां ॥ २ ॥ अगा अज्ञानाचिया निदा। जो घोरत होता बदबदा। तो स्वस्वरूपीं प्रबुद्धा चेइला कीं ॥ ३ ॥ पैं बुद्धिभेदाचा आरिसा। तया हातोनि पाडिला वीरेशा। म्हणौनि प्रतिमुखाभासा। मुकला तो ॥ ४ ॥ देहाभिमानाचा वारा। आतां वाजों ठेला वीरा। तैं ऐक्य वीचिसागरां। जीवेशां हें ॥ ५ ॥ म्हणोनि मद्भावेंसी। प्राप्ति पाविजे तेणेंसरिसी। वर्षांतीं आकाशीं। घनजात जेवीं ॥ ६ ॥ तेवीं मी होऊनि निरुता। मग देहींचि ये असतां। नागवे देहसंभूतां। गुणांसि तो ॥ ७ ॥ जैसा भिंगाचेंनि घरें। दीपप्रकाशु नावरे। कां न विझेचि सागरें। वडवानळे ॥ ८ ॥ तैसा आला गेला गुणांचा। बोधु न मैळे तयाचा। तो देहीं जैसा व्योमींचा। चंद्र जळीं ॥ ९ ॥

तिन्ही गुण आपुलालिये प्रौढी । देहीं नाचविती बागडीं । तो पाहोंही न घडी । अहंतेतें ॥ ३१० ॥ हा ठायेवरी । नेहटोनि ठेला अंतरीं । आतां काय वर्ते शरीरीं । कांही नेणे ॥ ११ ॥ सांडुनि आंगीची खोळी । सर्प रिगालिया पाताळीं । ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥ १२ ॥ कां सौरभ्यजीर्णु जैसा । आमोदु मिळोनि जाय आकाशा । माघारा कमळकोशा । नयेचि तो ॥ १३ ॥ पैं स्वरूपसमरसें । तयाही गा जालें तैसें । तेथ किंधर्म हें कैसें । नेणे देह ॥ १४ ॥ म्हणौनि जन्मजरामरण । इत्यादि जे साही गुण । ते देहींचि ठेले कारण । नाहीं तया ॥ १५ ॥ घटाचिया खापरिया । घटभंगी फेडिलिया । महदाकाश आपैसया । जालेंचि असे ॥ १६ ॥ तैसी देहबुद्धि जाये । जैं आपणपां आठौ होये । तैं आन कांही आहे । तेंवांचुनी ॥ १७ ॥ येणें थोर बोधलेपणें । तयासि गा देहीं असणें । म्हणूनि तो मी म्हणें । गुणातीत ॥ १८ ॥ यया देवाचिया बोला । पार्थु अति सुखावला । मेघें संबोखिला । मोरु जैसा ॥ १९ ॥

अर्जुन उवाच : कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो । किमाचार: कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥

तेणें तोषें वीर पुसे । जी कोण्हीं चिन्हीं तो दिसे । जयामाजी वसे । ऐसा बोधु ॥ ३२० ॥ तो निर्गुण काय आचरे । कैसेनि गुण निस्तरे । हें सांगिजो माहेरें । कृपेचेनि ॥ २१ ॥ तया अर्जुनाचिया प्रश्ना । तो षड्गुणांचा राणा । परिहारु आकर्णा । बोलतु असे ॥ २२ ॥ म्हणे पार्था तुझी नवाई । हें येतुलेंचि पुससी काई । तें नामचि तया पाहीं । साचें लटिकें ॥ २३ ॥ गुणातीत जया नांवें । तो गुणाधीन तरी नव्हे । ना होय तरी नागवे । गुणां यया ॥ २४ ॥ परी अधीन कां नागवें । हेंचि कैसेनि जाणावें । गुणांचिये उखरवे - । माजीं असतां ॥ २५ ॥ हा संदेह जरी वाहसी । तरी सुखें पुसों लाहसी । परिस आतां तयासीं । रूप करूं ॥ २६ ॥

श्रीभगवानुवाच : प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।
न द्वेष्टि सम्प्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥ २२ ॥

तरी रजाचेनि माजें । देहीं कर्माचें आणोजें । प्रवृत्ति जैं घेईजे । वेटाळूनि ॥ २७ ॥ तै मीचि कां कर्मठ । ऐसा न ये श्रीमाठ । का दरिद्रलिये बुद्धी वीट । तोही नाहीं ॥ २८ ॥ अथवा सत्त्वेंचि अधिकें । जैं सर्वेंद्रियीं ज्ञान फांके । तैं सुविद्यता तोखे । उभजेही ना ॥ २९ ॥ कां वाढिन्नलेनि तमें । न गिळेजेचि मोहभ्रमें । तैं अज्ञानत्वें न श्रमें । घेणेंही नाहीं ॥ ३३० ॥ पैं मोहाचां अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी । ज्ञानें कर्मे नादरी । होतां न दु:खी ॥ ३१ ॥ सायंप्रातर्मध्यान्हा । या तिही काळांची गणना । नाहीं जेवीं तपना । तैसा असे ॥ ३२ ॥ तया वेगळाचि काय प्रकाशें । ज्ञानित्व यावें असे । कायि जळार्णव पाउसें । साजा होय ॥ ३३ ॥ ना प्रवर्तलेनि कर्मे । कर्मठत्व तया कां गमे । सांगे हिमवंतु हिमें । कांपे कायि ॥ ३४ ॥ नातरी मोह आलिया । काइ पां ज्ञाना मुकिजेल तया । महाआगीतें उन्हाळेया । जाळवत असे ॥ ३५ ॥

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते । गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥ २३ ॥

तैसें गुणकार्य हें । आघवेंचि आपण आहें । म्हणौनि एकेका नोहे । तडातोडी ॥ ३६ ॥ येवढेया गा प्रतीती । तो देहा आलासे वस्ती । वाटे जातां गुंती - । माजीं जैसा ॥ ३७ ॥ तो जिणता ना हारवी । तैसा गुण नव्हे ना करवी । जैसी का श्रोणवी । संग्रामींची ॥ ३८ ॥ कां शरीराआंतील प्राणु । घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु । नाना चोहटाचा स्थाणु । उदासु जैसा ॥ ३९ ॥ आणि गुणाचा यावाजावा । ढळे चळे ना पांडवा । मृगजळाचा हेलावा । मेरू जैसा ॥ ३४० ॥ हें बहुत कायि बोलिजे । व्योम वारेनि न वचिजे । कां सूर्य ना गिळिजे । अंधकारें ॥ ४९ ॥ स्वप्न कां गा जियापरी । जागतयातें न सिंतरी । गुणीं तैसा अवधारी । न बंधिजे तो ॥ ४२ ॥ गुणां कीर नातुडे । परी दुरूनि जैं पाहे कोडें । तैं गुणदोष सायिखडें । सभ्यु जैसा ॥ ४३ ॥ सत्कर्में सात्त्विकीं । रज तें रजोविषयकीं । तम मोहादिकीं । वर्तत असे ॥ ४४ ॥ परिस तयाचिया गा सत्ता । होती गुणक्रिया समस्ता । हें फुडें जाणे सविता । लौकिका जेवीं ॥ ४५ ॥ समुद्रचि भरती । सोमकांतचि पाझरती । कुमुदें विकासती । चंद्रु तो उगा ॥ ४६ ॥ कां वाराचि वाजे विझे । गगनें निश्चळ असिजे । तैसा गुणाचिये गजबजे । डोलेना जो ॥ ४७ ॥ अर्जुना येणें लक्षणें । तो गुणातीतु जाणणें । परिस आतां आचरणें । तयाचियें ॥ ४८ ॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः । तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥

तरी वस्त्रासि पाठीं पोटीं । नाहीं सुतावांचूनि किरीटी । ऐसें सुये दिठी । चराचर मद्रूपें ॥ ४९ ॥ म्हणोनि सुखदुःखासरिसें । कांटाळें आचरे ऐसें । रिपुभक्तां जैसें । हरीचें देणें ॥ ३५० ॥ एऱ्हवीं तरी सहजें । सुखदुःख तैंचि सेविजे । देहजळी होईजे । मासोळी जैं ॥ ५१ ॥ आतां तें तंव तेणें सांडिलें । आहे स्वस्वरूपेसीचि मांडिले । सस्यांतीं निवडिलें । बीज जैसें ॥ ५२ ॥ कां वोघ सांडुनि गांग । रिघोनि समुद्राचें आंग । निस्तरली लगबग । खळाळाची ॥ ५३ ॥ तेवीं आपणापांचि जया । वस्ती जाली गा धनंजया । तया देहीं आपसया । सुख तैसें दुःख ॥ ५४ ॥ रात्रि तैसें पाहलें । हें धारणा जेवी एक जालें । आत्मारामा देहआतलें । द्वंद्व तैसें ॥ ५५ ॥ पैं निद्रिताचेनि आंगेशीं । सापु तैशी उर्वशी । तेवीं स्वरूपस्था सरिसीं । देहीं द्वंद्वें ॥ ५६ ॥ म्हणोनि तयाचां ठायी । शेणा सोनया विशेष नाहीं । रत्ना गुंडेया कांही । नेणिजे भेदु ॥ ५७ ॥ घरा येवों पां स्वर्ग । कां वरिपडो वाघ । परी आत्मबुद्धीसि भंग । कदा नव्हे ॥ ५८ ॥ निवटलें न उपवढे । जळीनलें न विरूढे । साम्यबुद्धी न मोडे । तयापरी ॥ ५९ ॥ हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो । कां नीच म्हणोनि निंदिजो । परी नेणे जळों विझों । राखोंडी जैसी ॥ ३६० ॥ तैसी निंदा आणि स्तुती । नये कोण्हेचि व्यक्ती । नाहीं अंधारे कां वाती । सूर्या घरीं ॥ ६१ ॥

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः । सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥

ईश्वरबुद्धी पूजिला । कां चोरु म्हणोनि गांजिला । वृषगजीं वेढिला । केला रावो ॥ ६२ ॥ कां सुहृद पासीं आले । अथवा वैरी वरपडे जाले । परी नेणे राती पाहालें । तेज जेवीं ॥ ६३ ॥ साही

ऋतु येतां आकाशें । लिंपिजेचि ना जैसें । तेवीं वैषम्य मानसें । जाणिजेना ॥ ६४ ॥ आणीकही एकु पाहीं । आचारु तयाचां ठायीं । तरी व्यापारासि नाहीं । जालें दिसे ॥ ६५ ॥ सर्वारंभा उटकलें । प्रवृत्तींचें तेथ मावळे । जळती गा कर्मफळें । ते तो आगी ॥ ६६ ॥ दृष्टादृष्टाचेनि नांवे । भावोचि जीवीं नुगवे । सेवी जें स्वभावें । पैठें होय ॥ ६७ ॥ सुखे ना शिणे । पाषाणु कां जेणें मानें । तैसी सांडीमांडी मनें । वर्जिली असे ॥ ६८ ॥ आतां किती हाचि विस्तारु । जाणें ऐसा आचारु । जया तोचि साचारु । गुणातीत ॥ ६९ ॥ गुणांतें अतिक्रमणें । घडे उपायें जेणें । तो आता आणिकु आईक म्हणे । श्रीकृष्णनाथु ॥ ३७० ॥

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥

तरी व्यभिचाररहितें चित्तें । भक्तियोगें मातें । सेवी तो गुणातें । जाकळूं शके ॥ ७१ ॥ तरी कोणु मी कैसी भक्ती । अव्यभिचारा काय व्यक्ती । हे आघवीचि निरुती । होआवी लागे ॥ ७२ ॥ तरी पार्था परियेसा । मी तंव येथ ऐसा । रत्नीं किळावो जैसा । रत्नचि तो ॥ ७३ ॥ कां द्रवपणाचि नीर । अवकाशुचि अंबर । गोडी तेचि साखर । आन नाहीं ॥ ७४ ॥ वन्हीं तेचि ज्वाळ । दळाचि नांव कमळ । रूख तेंचि डाळ । फळादिक ॥ ७५ ॥ आगा हिंव जें आकर्षले । तेंचि हिमवंत जेवीं जालें । नाना दूध मुराले । तेंचि दहीं ॥ ७६ ॥ तैसें विश्व येणे नांवें । हें मीचि पैं आघवें । घेईं चंद्रबिंब सोलावें । नलगे जेवीं ॥ ७७ ॥ घृताचे थिजलेपण । न मोडिता घृतचि जाण । कां नाटिता कांकण । सोनेंचि तें ॥ ७८ ॥ नुकलितां पटु । तंतुचि असे स्पष्टु । न विरवितां घटु । मृत्तिका जेवीं ॥ ७९ ॥ म्हणोनि विश्वपण जावें । मग मातें घेयावें । तैसा नव्हे आघवें । सकटचि मी ॥ ३८० ॥ ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचार भक्ति म्हणिजे । येथ भेदु कांही देखिजे । तरी व्यभिचारु तो ॥ ८१ ॥ याकारणें भेदातें । सांडूनि अभेदें चित्तें । आपणयासकट मातें । जाणावें गा ॥ ८२ ॥ पार्था सोनयाची टिक । सोनयासी लागली देख । तैसें आपणपें आणिक । मानावें ना ॥ ८३ ॥ तेजाचा तेजौनि निघाला । परी तेजींचि असे लागला । तया रश्मी ऐसा भला । बोधु होआवा ॥ ८४ ॥ पैं परमाणु भूतळीं । हिमकणु हिमाचळीं । मजमाजीं न्याहाळीं । अहं तैसे ॥ ८५ ॥ हो कां तरंगु लहानु । परी सिंधूसी नाहीं भिन्नु । तैसा ईश्वरीं मी आनु । नोहेचि मा ॥ ८६ ॥ ऐसेनि बा समरसें । दृष्टि जैं उल्हासे । ते भक्ति पैं ऐसें । आम्ही म्हणों ॥ ८७ ॥ आणि ज्ञानाचें चांगावें । इयेचि दृष्टि नांवें । योगाचेंही आघवें । सर्वस्व हें ॥ ८८ ॥ सिंधू आणि जळधरा - । माजीं लागली अखंड धारा । तैसी वृत्ति वीरा । प्रवर्ते ते ॥ ८९ ॥ कां कुहेसीं आकाशा । तोंडी सांदा नाहीं जैसा । तो परमपुरुषी तैसा । एकवटे गा ॥ ३९० ॥ प्रतिबिंबौनि बिंबवरी । प्रभेची जैसी उजरी । ते सोऽहंवृत्ती अवधारीं । तैसी होय ॥ ९१ ॥ ऐसेनि मग परस्परें । ते सोऽहंवृत्ति जैं अवतरे । तैं तियेहिसकट सरे । आपैसया ॥ ९२ ॥ जैसा सैंधवाचा रवा । सिंधूमाजीं पांडवा । विरालेया विरवावा । हेंही ठाके ॥ ९३ ॥ नातरी जाळुनि तृण । वन्हिही विझे

आपण । तैसें भेदु नाशुनि जाण । ज्ञान नुरे ॥ ९४ ॥ माझें पैलपण जाये । भक्त हें ऐलपण ठाये । अनादि ऐक्य जें आहे । तेंचि निवडे ॥ ९५ ॥ आतां गुणातें तो किरीटी । जिणे या नव्हती गोष्टी । जे एकपणाही मिठी । पडों सरली ॥ ९६ ॥ किंबहुना ऐसी दशा । तें ब्रह्मत्व गा सुदंशा । हें तो पावे जो ऐसा । मातें भजे ॥ ९७ ॥ पुढतीं इहीं लिंगीं । भक्तु जो माझा जगीं । हे ब्रह्मता तयालागीं । पतिव्रता ॥ ९८ ॥ जैसें गंगेचेनि वोघें । डळमळित जळ जें निघे । सिंधुपद तयाजोगें । आन नाहीं ॥ ९९ ॥ तैसा ज्ञानाचिया दिठी । जो मातें सेवी किरीटी । तो होय ब्रह्मतेचां मुकुटीं । चूडारत्न ॥ ४०० ॥ यया ब्रह्मत्वासीचि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था । याचि नांवें चौथा । पुरुषार्थु गा ॥ १ ॥ परी माझें आराधन । ब्रह्मत्वीं होय सोपान । येथ मी हन साधन । गमेन हो ॥ २ ॥ तरी झणें झणें ऐसें । तुझां चित्तीं पैसें । पैं ब्रह्म आन नसे । मीवांचूनि ॥ ३ ॥

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च । शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ॥ २७ ॥

अगा ब्रह्म या नांवा । अभिप्रायो मी पांडवा । मीचि बोलिजे आघवां । शब्दीं इहीं ॥ ४ ॥ पैं मंडळ आणि चंद्रमा । दोन्ही नव्हती सुवर्मा । तैसा मज आणि ब्रह्मा । भेदु नाहीं ॥ ५ ॥ अगा नित्य जें निष्कंप । अनावृत्त धर्मरूप । सुख जें उमप । अद्वितीय ॥ ६ ॥ विवेकु आपलें काम । सारूनि ठाकी जें धाम । निष्कर्षाचें नि:सीम । किंबहुना मी ॥ ७ ॥ ऐसेसें हो अवधारा । तो अनन्याचा सोयरा । सांगतसे वीरा । पार्थासी ॥ ८ ॥ येथ धृतराष्ट्र म्हणे । संजया हें तूतें कोणें । पुसलेनिविण वायाणें । कां बोलसी ॥ ९ ॥ माझी अवससरी ते फेडीं । विजयाची सांगें गुढी । येरू जीवीं म्हणे सांडीं । गोठी यिया ॥ ४१० ॥ संजयो विस्मयें मानसीं । आहा करूनि सरसीं । म्हणे कैसें पां देवेंसीं । द्वंद्व यया ॥ ११ ॥ तरी कृपाळु तो तुष्टो । यया विवेकु हा घोंटो । मोहाचा फिटो । महारोगु ॥ १२ ॥ संजयो ऐसें चिंतितां । संवादु तो सांभाळितां । हरिखाचा येतु चित्ता । महापूरू ॥ १३ ॥ म्हणोनि आतां येणें । उत्साहाचेनि अवतरणें । श्रीकृष्णाचें बोलणें । सांगिजैल ॥ १४ ॥ तया अक्षराआंतील भावो । पाववीन मी तुमचा ठावो । आइका म्हणे ज्ञानदेवो । निवृत्तीचा ॥ ४१५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
गुणत्रयविभागयोगोनाम चतुर्दशोऽध्याय: ॥ (श्लोक २७; ओव्या ४१५)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय पंधरावा)

आतां हृदय हें आपुलें । चौफाळुनियां भलें । वरी बैसऊं पाउलें । श्रीगुरूचीं ॥ १ ॥ ऐक्यभावाची अंजुळी । सर्वेंद्रियकुड्मुळीं । भरूनियां पुष्पांजुळी । अर्घ्यु देवों ॥ २ ॥ अनन्योदकें धुवट । वासना ते तन्निष्ठ । तें लागलेसे अबोट । चंदनाचें ॥ ३ ॥ प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि नूपरें । लेवऊं सुकुमारें । पदें तियें ॥ ४ ॥ घणावली आवडी । अव्यभिचारें चोखडी । तिये घालूं जोडी । आंगोळिया ॥ ५ ॥ आनंदामोदबहळ । सात्त्विकाचें मुकुळ । तें उमललें अष्टदळ । ठेऊं वरी ॥ ६ ॥ तेथें अहं हा धूप जाळूं । सोहंतेजें वोवाळूं । सामरस्यें पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥ माझी तनु आणि प्राण । इये दोनी पाउवा लेऊं श्रीचरण । करूं भोगमोक्षनिंबलोण । पायां तयां ॥ ८ ॥ इया गुरुचरणसेवा । हों पात्र तया दैवा । जें सकळार्थमेळावा । पाटु बांधे ॥ ९ ॥ ब्रह्मींचें विसवणेंवरी । उन्मेख लाहे उजरी । जें वाचेतें इये करी । सुधासिंधु ॥ १० ॥ पूर्णचंद्राचिया कोडी । वक्तृत्वा घापे कुरोंडी । तैसी आणी गोडी । अक्षरांतें ॥ ११ ॥ सूर्यें अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची । तैसी वाचा श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी ॥ १२ ॥ नादब्रह्म खुजें । कैवल्यही तैसें न सजे । ऐसा बोलु देखिजे । जेणें दैवें ॥ १३ ॥ श्रवणसुखाचां मांडवीं । विश्व भोगी माधवी । तैसी सासिन्नली बरवी । वाचावल्ली ॥ १४ ॥ ठावो न पवता जयाचा । मनेंसी मुरडली वाचा । तो देवो होय शब्दाचा । चमत्कारु । १५ ॥ जें ज्ञानासी न चोजवे । ध्यानासिही जें नागवे । तें अगोचर फावे । गोठीमाजीं ॥ १६ ॥ येवढें एक सौभग । वळघे वाचेचें आंग । गुरुपदपद्मपराग । लाहे जैं कां ॥ १७ ॥ तरी बहु बोलूं काई । आजि तें आनीं ठाईं । मातेंवाचूनि नाहीं । ज्ञानदेवो म्हणे ॥ १८ ॥ जे तान्हेनि मिया अपत्यें । आणि माझे गुरु एकलौते । म्हणोनि कृपेसि एकहातें । जाले तिये ॥ १९ ॥ पाहा पां भरोवरी आघवी । मेघ चातकांसी रिचवी । मजलागी गोसावीं । तैसें केलें ॥ २० ॥ म्हणोनि रिकामें तोंड । करूं गेलें बडबड । कीं गीता ऐसें गोड । आतुडलें ॥ २१ ॥ होय अदृष्ट आपैतें । तैं वाळूचि रत्नें परते । उजू आयुष्य तैं मारितें । लोभु करी ॥ २२ ॥ आधणीं घातलिया हरळ । होती अमृताचे तांदुळ । जरी भुकेची राखे वेळ । जगन्नाथु ॥ २३ ॥ तयापरी श्रीगुरु । करिती जैं अंगीकारु । तैं होऊनि ठाके संसारु । मोक्षमय आघवा ॥ २४ ॥ पाहा पां काइ नारायणें । तया पांडवांचें उणें । कीजेचि ना पुराणें । विश्ववंद्यें ॥ २५ ॥ तैसें श्रीनिवृत्तिराजें ।

अज्ञानपण हें माझें । आणिलें वोजे । ज्ञानाचिया ॥ २६ ॥ परि हें असो आतां । प्रेम रुळतसे बोलतां । कें गुरुगौरव वर्णितां । उन्मेष असे ॥ २७ ॥ आतां तेणेंचि पसायें । तुम्हां संतांचे मी पाये । वोळगेन अभिप्रायें । गीतेचेनि ॥ २८ ॥ तरी तोचि प्रस्तुतीं । चौदाविया अध्यायाचां अंतीं । निर्णयो कैवल्यपती । ऐसा केला ॥ २९ ॥ जें ज्ञान जयाचां हातीं । तोचि समर्थु मुक्ति । जैसा शतमख संपत्ती । स्वर्गीचिये ॥ ३० ॥ कां शत एक जन्मां । जो जन्मोनि ब्रह्मकर्मा । करी तोचि ब्रह्मा । आनु नोहे ॥ ३१ ॥ नाना सूर्याचा प्रकाशु । लाहे जेवीं डोळसु । तेवीं ज्ञानेंचि सौरसु । मोक्षाचा तो ॥ ३२ ॥ तरी तया ज्ञानालागीं । कवणा पा योग्यता आंगीं । हें पाहतां जगीं । देखिला एकु ॥ ३३ ॥ जें पाताळींचेही निधान । दावील कीर अंजन । परी होआवे लोचन । पायाळाचे ॥ ३४ ॥ तैसें मोक्ष देईल ज्ञान । येथ कीर नाहीं आन । परी तेंचि थारे ऐसें मन । शुद्ध होआवें ॥ ३५ ॥ तरी विरक्तीवांचूनि कहीं । ज्ञानासि तगणें नाही । हें विचारूनि ठाईं । ठेविलें देवें ॥ ३६ ॥ आतां विरक्तीची कवण परी । जे येऊनि मनातें वरी । हेंही सर्वज्ञें श्रीहरी । देखिलें असे ॥ ३७ ॥ जे विषें रांधिली रससोये । जैं जेवणारा ठाउवी होये । तैं तो ताटचि सांडूनि जाये । जयापरी ॥ ३८ ॥ तैसी संसारा या समस्ता । जाणिजे जैं अनित्यता । तैं वैराग्य दवडितां । पाठीं लागे ॥ ३९ ॥ आतां अनित्यत्व या कैसें । तेंचि वृक्षाकारमिषें । सांगिजत असे विश्वेशें । पंचदशीं ॥ ४० ॥ उपडिलें कवतिकें । झाड येरी मोहरा ठाके । तें वेगें जैसें सुके । तैसें तें नव्हे जाण ॥ ४१ ॥ याचि एकेपरी । रूपकाचिया कुसरी । सारितसे वारी । संसाराची ॥ ४२ ॥ करूनि संसार वावो । स्वरूपीं अहंते ठावो । होआवया अध्यावो । पंधरावा हा ॥ ४३ ॥ आतां हेंचि आघवें । ग्रंथगर्भींचें चांगावें । उपलविजेल जीवें । आकर्णिजे ॥ ४४ ॥ तरी महानंदसमुद्र । जो पूर्णपूर्णिमाचंद्र । तो द्वारकेचा नरेंद्र । ऐसें म्हणे ॥ ४५ ॥ अगा पैं पंडुकुमरा । येतां स्वरूपाचिया घरा । करीतसे आडवारा । विश्वाभासु जो ॥ ४६ ॥ तो हा जगडंबरु । नोहे येथ संसारु । हा जाणें महातरु । थांवला असे ॥ ४७ ॥ परी येरां रुखांसारिखा । तळीं मूळें वरी शाखा । तैसा नोहे म्हणोनि लेखा । नये कवणा ॥ ४८ ॥ आगी कां कुऱ्हाडी । होय रिगावा जरी बुडीं । तरी हो कां भलतेवढी । वरिचील वाढी ॥ ४९ ॥ जे तुटलिया मूळापाशी । उलंडेल कां शाखांशी । परी तैशी गोठी कायशी । हा सोपा नव्हे ॥ ५० ॥ अर्जुना हें कवतिक । सांगतां असे अलौकिक । जे वाढी अधोमुख । रूख यया ॥ ५१ ॥ जैसा भानु उंची नेणो कें । रश्मिजाळ तळीं फांके । संसार हें कावरुखें । झाड तैसें ॥ ५२ ॥ आणि आथी नाथी तितुकें । रुंधलें असें येणेंचि एकें । कल्पांतींचेनि उदकें । व्योम जैसें ॥ ५३ ॥ कां रवीचां अस्तमानीं । आंधारेनि कोंदे रजनी । तैसा हाचि गगनीं । मांडला असे ॥ ५४ ॥ यया फळ ना चुंबितां । फूल ना तुरंबितां । जें काही पंडुसुता । तें रुखुचि हा ॥ ५५ । हा उर्ध्वमूळ आहे । परी उन्मूळिला नोहे । येणेंचि हा होये । शाड्वळु गा ॥ ५६ ॥ आणि उर्ध्वमूळ ऐसें । निगदिलें कीर असे । परी अधींही असोसें । मूळें यया

॥ ५७ ॥ पैं बल्वचेचि महामारी । पिंपळा कां वडाचिया परी । जे पारंबियांमाझारीं । डहाळिया असती ॥ ५८ ॥ तेवींचि गा धनंजया । संसारतरु यया । आधींचि आथी खांदिया । हेंही नाहीं ॥ ५९ ॥ तरी उर्ध्वाहीकडे । शाखांचे मांदोडे । दिसताति अपाडें । सासिन्नले ॥ ६० ॥ जालें गगनचि पालविये । कां वारा मांडला रुखाचेनि आयें । नाना अवस्थात्रयें । उदयला असे ॥ ६१ ॥ ऐसा हा एकु । विश्वाकार विटंकु । उदयला जाण रूखु । ऊर्ध्वमूळु ॥ ६२ ॥ आतां ऊर्ध्व या कवण । येथें मूळ ते किं लक्षण । कां अधोमुखपण । शाखा कैसिया ॥ ६३ ॥ अथवा द्रुमा यया । अधीं जिया मूळिया । तिया कोण कैसिया । ऊर्ध्व शाखा ॥ ६४ ॥ आणि अश्वत्थु हा ऐसी । प्रसिद्धी कायसी । आत्मविदविलासीं । निर्णयो केला ॥ ६५ ॥ हें आघवेंचि बरवें । तुझिये प्रतीतीसी फावे । तैसेनि सांगों सोलिवें । विन्यासें गा ॥ ६६ ॥ परी ऐकें गा सुभगा । हा प्रसंगु असे तुजचि जोगा । कानचि करी हो सर्वांगा । हियें आथिलिया ॥ ६७ ॥ ऐसें प्रेमरसें सुरफुरें । बोलिलें जंव यादववीरें । तंव अवधान अर्जुनाकारें । मूर्त जालें ॥ ६८ ॥ देव निरुपिती तें थेंकुलें । येवढें श्रोतेपण फांकलें । जैसें आकाशा खेंव पसरिलें । दाहीं दिशीं ॥ ६९ ॥ श्रीकृष्णोक्तिसागरा । हा अगस्तीचि दुसरा । म्हणौनि घोंटु भरों पाहे एकसरा । अवघेयाचा ॥ ७० ॥ ऐसीं सोय सांडूनि खवळिली । आवडी अर्जुनीं देवें देखिली । तेथ जालेनि सुखें केली । कुरवंडी तया ॥ ७१ ॥

श्रीभगवानुवाच : ऊर्ध्वमूलमध:शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥

मग म्हणे धनंजया । तें उर्ध्व गा तरू यया । येणें रुखेंचि कां जया । ऊर्ध्वता गमे ॥ ७२ ॥ एऱ्हवीं मध्य ऊर्ध्व अध । हे नाहीं जेथ भेद । अद्वयासीं एकवद । जया ठायीं ॥ ७३ ॥ जो नाइकिजतां नादु । जो असौरभ्य मकरंदु । जो आंगाथिला आनंदु । सुरतेंविण ॥ ७४ ॥ जया जें आन्हां परौतें । जया जें पुढें मागौतें । दिसतेनविण दिसते । अदृश्य जें ॥ ७५ ॥ उपाधीचा दुसरा । घालितां वोपसरा । नामरूपाचा संसारा । होय जयातें ॥ ७६ ॥ ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसधेंचि जें ज्ञान । सुखा भरलें गगन । गाळींव जें ॥ ७७ ॥ जें कार्य ना कारण । जया दुजें ना एकपण । आपणया जें जाण । आपणचि ॥ ७८ ॥ ऐसें वस्तु जें साचें । तें ऊर्ध्व गा यया तरूचें । तेथ आर घेणें मूळाचें । तें ऐसें असे ॥ ७९ ॥ तरी माया ऐसी ख्याती । नसतीच तया आथी । कां वांझेची संतती । वानणें जैशी ॥ ८० ॥ तैशी सत् ना असत् होये । जे विचाराचें नाम न साहे । ऐसेया परीची आहे । अनादि म्हणती ॥ ८१ ॥ जे भवद्रुमबीजिका । जे प्रपंचाची भूमिका । विपरीतज्ञानदीपिका । सांचली जे ॥ ८२ ॥ जे नानाशक्तींची मांदुस । जगद्भ्रमाचें आकाश । जे आकारजाताचें दुस । घडी केलें ॥ ८३ ॥ ते माया वस्तूंचा ठायीं । असे जैसेनि नाहीं । मग वस्तुप्रभाचि पाही । प्रगट होय ॥ ८४ ॥ जेव्हां आपणया आली निद । करी आपणपें जेवीं मुग्ध । कां काजळी आणी मंद । प्रभा दीपीं ॥ ८५ ॥ स्वप्नीं प्रियापुढें तरुणांगी । निदेली

चेवऊनि वेगीं । आलिंगिलेनिवीण आलिंगीं । सकामु करी ॥ ८६ ॥ तैसी स्वरूपीं जाली माया । आणी स्वाश्रयों नेणणें धनंजया । तेंचि रुखा यया । मूळ पहिलें ॥ ८७ ॥ वस्तूसी आपुला जो अबोधु । तो ऊर्ध्वी आठुळैजे कंदु । वेदांतीही हाचि प्रसिद्धु । बीजभावो ॥ ८८ ॥ घन अज्ञानसुषुप्ती । तो बीजांकुरभावो म्हणती । येर स्वप्न हन जागृती । हा फळभावो तयाचा ॥ ८९ ॥ ऐसी यया वेदांती । निरूपणभाषाप्रतीती । परी तें असो प्रस्तुतीं । अज्ञान मूळ ॥ ९० ॥ तें ऊर्ध्व आत्मा निर्मळें । अधोर्ध्व सूचिती मूळें । बळिया बांधोनि आळें । मायायोगाचें ॥ ९१ ॥ मग आधिली सदेहांतरें । उठती जियें अपारें । तें चौपासि घेऊनि आगारें । खोलावती ॥ ९२ ॥ ऐसे भवद्रुमाचे मूळ । हें ऊर्ध्वी करी बळ । मग आणियांचें बेंबळ । अधीं दावी ॥ ९३ ॥ तेथ चिद्वृत्ति पहिलें । महत्तत्त्व उमललें । तें पान वाल्हें दुल्हें । एक निघे ॥ ९४ ॥ मग सत्त्वरजतमात्मकु । त्रिविध अहंकारू जो एकु । तो तिवणा अधोमुखु । डिरू फुटे ॥ ९५ ॥ तो बुद्धीची घेऊनि आगारी । भेदाची वृद्धि करी । तेथें मनाचें ढाळ धरी । साजेपणें ॥ ९६ ॥ ऐसा मूळाचिया गाढिका । विकल्परस कोंवळिका । चित्तचतुष्टय डाहाळिका । कोंभैजे तो ॥ ९७ ॥ मग आकाश वायु द्योतक । आप पृथ्वी हे पांच फोंक । महाभूतांचे सरोख । सरळे होती ॥ ९८ ॥ तैसींचि श्रोत्रादि तन्मात्रें । तियें अंगवसां गर्भपत्रें । लुळळुळितें विचित्रें । उमळती गा ॥ ९९ ॥ तेथ शब्दांकुर वरिपडी । श्रोत्रा वाढी देव्हडी । होता करित कांडीं । आकांक्षेचीं ॥ १०० ॥ अंगत्वचेचे वेलपल्लव । स्पर्शांकुरीं घेती धांव । तेथ बांबळ पडे अभिनव । विकारांचें ॥ १ ॥ पाठीं रूपपत्र पेलोवेलीं । चक्षु लांब तें कांडें घाली । तेथ व्यामोहता भली । पाहाळीं जाय ॥ २ ॥ आणि रसाचे आंगवसे । वाढतां वेगें बहुवसें । जिव्हे आर्तीचीं असोसें । निघती बेचें ॥ ३ ॥ तैसीचि कोंभैलेनि गंधें । घ्राणाची डिरी थांवु बांधे । तेथ तळु घे स्वानंदें । प्रलोभाचा ॥ ४ ॥ एवं महदहंबुद्धि । मनें महाभूतसमृद्धि । इया संसाराचिया अवधि । शासन जे ॥ ५ ॥ किंबहुना इहीं आठें । आंगीं हा अधिक फांटे । परि शिंपीचि एवढें उमटे । रुपे जेवीं ॥ ६ ॥ कां समुद्राचेनि पैसारें । वरि तरंगता असारे । तैसें ब्रह्मचि होय वृक्षाकारें । अज्ञानमूळ ॥ ७ ॥ आतां याचा हाचि विस्तारु । हाचि यया पैसारु । जैसा आपणपें स्वप्नीं परिवारु । येकाकिया ॥ ८ ॥ परी तें असों हें ऐसें । कावरें झाड उससे । यया महदादि आरवसें । अधोशाखा ॥ ९ ॥ आणि अश्वत्थु ऐसें ययातें । म्हणती जे जाणते । तेंही परिस हो येथें । सांगजेल ॥ ११० ॥ तरी श्वः म्हणिजे उखा । तोंवरी एकसारिखा । नाहीं निर्वाहो यया रुखा । प्रपंचरूपा ॥ ११ ॥ जैसा न लोटतां क्षणु । मेघु होय नानावर्णु । कां विजु नसे संपूर्णु । निमेषभरी ॥ १२ ॥ ना कांपतया पद्मदळा । वरीलिया बैसका नाहीं जळा । कां चित्त जैसें व्याकुळा । माणुसाचें ॥ १३ ॥ तैसीचि ययाचि स्थिती । नासत जाय क्षणाक्षणाप्रती । म्हणौनि ययातें म्हणती । अश्वत्थु हा ॥ १४ ॥ आणि अश्वत्थु येणें नांवें । पिंपळु म्हणती स्वभावें । परि तो अभिप्रावो

नव्हे। श्रीहरीचा ॥ १५ ॥ ऐन्हवी पिंपळु म्हणतां विखीं। मियां गति देखिली असे निकी। परी तें असो काय लौकिकीं। हेतु काज ॥ १६ ॥ म्हणोनि हा प्रस्तुतु। अलौकिकु परियेसा ग्रंथु। तरी क्षणिकत्वेंचि अश्वत्थु। बोलिजे हा ॥ १७ ॥ आणीकही एकु थोरु। यया अव्ययत्वाचा डगरु। आथी परी तो भीतरु। ऐसा असे ॥ १८ ॥ जैसा मेघांचेनि तोंडें। सिंधु एकें आंगें काढे। आणि नदी येरीकडे। भरतीचि असती ॥ १९ ॥ तेथे वोहटे ना चढे। ऐसा परिपूर्णचि आवडे। परी ते फुली जंव नुघडे। मेघांनदींची ॥ २० ॥ ऐसें या रुखाचें होणेंजाणें। न तर्के होतेनि वहिलेपणें। म्हणौनि लोकु यातें म्हणे। अव्ययु हा ॥ २१ ॥ ऐन्हवीं दानशीळु पुरुषु। वेंचकपणेंचि संचकु। तैसा व्ययेंही हा रुखु। अव्ययो गमे ॥ २२ ॥ जातां वेगें बहुवसें। न वचें कां भूमी रुतलें असे। रथाचें चक्र दिसे जियापरी ॥ २३ ॥ तैसें काळातिक्रमें जे वाळे। ते भूतशाखा जेथ गळे। तेथ कोडीवरी उमाळे। उठती आणिक ॥ २४ ॥ परी येकी केधवां गेली। शाखाकोडी केधवां जाली। हें नेणवें जेंवीं उमललीं। आषाढअभ्रें ॥ २५ ॥ महाकल्पाचां शेवटी। उदेलिया उमळती सृष्टी। तैसेंचि आणिखीचें दांग उठी। सासिन्नलें ॥ २६ ॥ संहारवातें प्रचंडे। पडती प्रळयांतीचीं सालडें। तंव कल्पादीचीं जुंबाडें। पाल्हेजती ॥ २७ ॥ रिगे मन्वंतर मनूपुढें। वंशावरी वंशांचें मांडे। जैशी इक्षुवृद्धी कांडेनकांडे। जिंके जेवीं ॥ २८ ॥ कलियुगांतीं कोरडीं। चहूं युगांचीं सालें सांडी। तंव कृतयुगाची पेली देव्हडी। पडे पुढती ॥ २९ ॥ वर्षतें वर्ष जाये। तें पुढिला मुळहारी होये। जैसा दिवस जात कीं येत आहे। हें चोजवेना ॥ १३० ॥ जैशा वारियाचां झुळकां। सांदा ठाउवा नव्हे देखा। तैसिया उठती पडती शाखा। नेणों किती ॥ ३१ ॥ एकी देहाची डिरी तुटे। तंव देहांकुरीं बहुवी फुटे। ऐसेनि भवतरु हा वाटे। अव्ययो ऐसा ॥ ३२ ॥ जैसें वाहतें पाणी जाय वेगें। तैसेंचि आणिक मिळे मागें। तेवीं असंतचि असिजे जगें। मानिजे संत ॥ ३३ ॥ कां लागोनि डोळा उघडे। तंव कोडीवरी घडे मोडे। तें नेणतया तरंगु आवडे। नित्यु ऐसा ॥ ३४ ॥ वायसा एकें बुबुळें दोहींकडे। डोळा चाळितां अपाडें। दोन्ही आथी ऐसा पडे। भ्रमु जेवीं जगा ॥ ३५ ॥ पैं भिंगोरी निधिये पडली। ते गमे भूमीसी जैसी जडली। ऐसा वेगातिशयो भुली। हेतु होय ॥ ३६ ॥ हें बहु असो झडती। आंधारे भोंवंडितां कोलती। ते दिसे जैसी आयती। चक्राकार ॥ ३७ ॥ हा संसारवृक्ष तैसा। मोडतु मांडतु सहसा। न देखोनि लोकु पिसा। अव्ययो मानी ॥ ३८ ॥ परि ययाचा वेगु देखे। जो हा क्षणिक ऐसा वोळखे। जाणे कोडिवेळां निमिखे। होत जात ॥ ३९ ॥ नाहीं अज्ञानावांचूनि मूळ। ययाचें असिलेपण टवाळ। ऐसें झाड सिनसाळ। देखिलें जेणें ॥ १४० ॥ तयातें गा पंडुसुता। मी सर्वज्ञुही म्हणें जाणता। पैं वाग्ब्रह्मसिद्धांता। वंद्यु तोचि ॥ ४१ ॥ योगजाताचें जोडलें। तया एकासीचि उपेगा गेलें। किंबहुना जियालें। ज्ञानही तेणें ॥ ४२ ॥ असो बहु हे बोलणें। वानिजेल तो कवणें। जो भवरुखु जाणे। उखि ऐसा ॥ ४३ ॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥ २॥

मग ययाचि प्रपंचरूपा । अधोशाखिया पादपा । डाहाळिया जाती उमपा । ऊर्ध्वाही उजू ॥ ४४ ॥ आणि अधीं फांकलीं डाळें । तियें होतीं मूळें । तयांहीं तळीं पघळे । वेल पालवु ॥ ४५ ॥ ऐसें जें आम्हीं । म्हणितलें उपक्रमीं । तेंही परिसें सुगमीं । बोलीं सांगों ॥ ४६ ॥ तरी बद्धमूळें अज्ञानें । महदादिकीं शासनें । वेदांचीं थोर वनें । घेउनियां ॥ ४७ ॥ परि आधी तंव स्वेदज । जारज उद्भिज मणिज । हे बुडौनि महाभुज । उठती चारी ॥ ४८ ॥ यया एकैकाचेनि आणगटें । चौऱ्यांशीं लक्षधा फुटे । ते वेळीं जीवशाखीं फांटे । सैंघ होतीं ॥ ४९ ॥ प्रसवती शाखा सरळीया । नानासृष्टि डहाळीया । आड फांटती माळिया । जातिचिया ॥ १५० ॥ स्त्री पुरुष नपुंसकें । हे व्यक्तिभेदांचे टके । आंदोळती आंगिकें । विकारभारें ॥ ५१ ॥ जैसा वर्षाकाळी गगनीं । पाल्हेजे नवघनीं । तैसें आकारजात अज्ञानीं । वेलीं जाय ॥ ५२ ॥ मग शाखांचेनि आंगभारें । लवोनि गुंफती परस्परें । गुणाक्षोभाचे वारे । उदयजती ॥ ५३ ॥ तेथ तेणें अचाटें । गुणांचेनि झडझडाटें । तिहीं ठायीं हा फांटे । ऊर्ध्वमूळ ॥ ५४ ॥ ऐसा रजाचिया झुळुका । झडाडितां आगळिका । मनुष्यजातीशाखा । थोरावती ॥ ५५ ॥ तिया ऊर्ध्वीं ना अधीं । माझारींचि कोंदाकोंदी । आड फुटती खांदी । चतुर्वर्णाचिया ॥ ५६ ॥ तेथ विधिनिषेधीं सपल्लव । वेदवाक्यांचे अभिनव । पालव डोलती बरव । नित्य नवे ॥ ५७ ॥ अर्थु कामु पसरे । अग्रवनें घेती थारे । तेथ क्षणिकें पदांतरें । इहभोगांचीं ॥ ५८ ॥ तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभें । खाकरेजती शुभाशुभें । नानाकर्मांचे खांबे । नेणों किती ॥ ५९ ॥ तेवींचि भोगक्षयें मागिलें । पडती देहांची बुडसळें । तंव पुढा वाढी पेले । नवेया देहांची ॥ १६० ॥ आणि शब्दादिक सुहावे । सहज रंगें हवावे । विषयपल्लव नवे । नित्यचि होती ॥ ६१ ॥ ऐसे रजोवातें प्रचंडें । मनुष्यशाखांचें मांदोडे । वाढती तो एथ रूढे । मनुष्यलोकु ॥ ६२ ॥ तैसाचि तो रजाचा वारा । नावेक धरी वोसरा । मग वाजों लागे घोरा । तमाचा तो ॥ ६३ ॥ तेधवां याचि मनुष्यशाखा । नीच वासना अधीं देखा । पाल्हेजती डहाळिका । कुकर्माचिया ॥ ६४ ॥ अप्रवृत्तींचे खणुवाळे । फोक निघती सरळे । घेत पान पालव डाळें । प्रमादाचीं ॥ ६५ ॥ बोलती निषेधनियमें । जिया ऋचा यजुःसामें । तो पाला तया घुमे । टकेयावरी ॥ ६६ ॥ प्रतिपादिती अभिचार । आगम जे परमार । तेही पानीं घेती प्रसर । वासना वेली ॥ ६७ ॥ तंव तंव होती थोराडें । अकर्माचीं तळबुडें । आणि जन्मशाखा पुढें पुढें । घेती धांव ॥ ६८ ॥ तेथ चांडाळादि निकृष्टा । दोषजातीचा थोर फांटा । जाळ पडे कर्मभ्रष्टां । भुलोनियां ॥ ६९ ॥ पशु पक्षी सूकर । व्याघ्र वृश्चिक विखार । हे आडशाखाप्रकर । थोरावती ॥ १७० ॥ परी ऐशा शाखा पांडवा । सर्वांगींहि नित्य नवा । निरयभोग यावा । फळाचा तो ॥ ७१ ॥ आणि हिंसाविषयपुढारी ।

कुकर्मसंगें धुरधुरी। जन्मवरी आगारी। वाढतीचि असे॥ ७२॥ ऐसे होती तरु तृण। लोह लोष्ट पाषाण। इया खांदिया तेवीं जाण। फळेंहि हेंचि॥ ७३॥ अर्जुना गा अवधारीं। मनुष्यालागोनि इया परी। वृद्धि स्थावरांतवरी। अधोशाखांची॥ ७४॥ म्हणोनि जीं मनुष्यडाळें। येंचि जाणावीं अधींचि मूळें। जे एथूनि मग पघळे। संसारतरु॥ ७५॥ एऱ्हवीं ऊर्ध्वीचें पार्था। मुद्दल मूळ पाहतां। अधींचिया मध्यस्था। शाखा इया॥ ७६॥ परी तामसीं सात्त्विकीं। सुकृतदुष्कृतात्मकीं। विरूढती या शाखीं। अधोर्ध्वींचां॥ ७७॥ आणि वेदत्रयीचिया पाना। नये अन्यत्र लागो अर्जुना। जे मनुष्यावांचूनि विधाना। विषो नाही॥ ७८॥ म्हणोनि तनु मानुषा। इया ऊर्ध्वमुळौनि जरी शाखा। तरी कर्मवृद्धीसी देखा। इयाचि मूळें॥ ७९॥ आणि आनी तरी झाडीं। शाखा वाढतां मुळें गाढीं। मूळ गाढें तंव वाढी। पैस आथी॥ १८०॥ तैसेंचि इया शरीरा। कर्में तंव देहा संसारा। आणि देह तंव व्यापारा। ना म्हणोंचि नये॥ ८१॥ म्हणोनि देहें मानुषें। इयें मुळें होती न चुके। ऐसें जगज्जनकें। बोलिलें तेणें॥ ८२॥ मग तमाचें तें दारुण। स्थिरावलेया वाउधाण। सत्त्वाची सुटे सत्राण। वाहुटळी॥ ८३॥ तैं याचि मनुष्याकारा। मुळीं सुवासना निघती आरा। घेऊनि फुटती कोंबारा। सुकृतांकुरीं॥ ८४॥ उकलतेनि उन्मेखें। प्रज्ञाकुशलतेचीं तिखें। डिरिया निघती निमिखें। बांबळैजुनी॥ ८५॥ मतीचे सोट वावे। घालिती स्फूर्तीचेनि थांवें। बुद्धि प्रकाश घे धांवें। विवेकाचेनि॥ ८६॥ तेथ मेधारसें सगर्भ। आस्थापत्रीं सबोंब। सरळ निघती कोंभ। सद्वृत्तीचे॥ ८७॥ सदाचाराचिया सहसा। टका उठती बहुवसा। घुमघुमिति घोषां। वेदपद्यांचां॥ ८८॥ शिष्टागमविधानें। विविधयागवितानें। इयें पानावरी पानें। पांजरती॥ ८९॥ ऐशा यमदमीं घोंसाळिया। उठती तपाचिया डाहाळिया। देती वैराग्यशाखा कवळिया। वेल्हाळपणें॥ १९०॥ विशिष्टां व्रतांचे फोक। धीराचां अणगटीं तिख। जन्मवेगें ऊर्ध्वमुख। उंचावती॥ ९१॥ माजीं वेदांचा पाला दाट। तो करी सुविद्येचा झडझडाट। जंव वाजे अचाट। सत्त्वानिळु तो॥ ९२॥ तेथ धर्मडाळ बाहाळी। दिसती जन्मशाखा सरळी। तिया आड फुटती फळीं। स्वर्गादिकीं॥ ९३॥ पुढा उपरति रागें लोहिवी। धर्ममोक्षाची शाखा पालवी। पाल्हाजत नित्य नवी। वाढतीचि असे॥ ९४॥ पैं रविचंद्रादि ग्रहवर। पितृ ऋषी विद्याधर। हे आडशाखा प्रकार। पैसु घेती॥ ९५॥ याहीपासून उंचवडे। गुढले फळाचेनि बुडें। इंद्रादिक ते मांदोडे। थोर शाखांचे॥ ९६॥ मग तयांही उपरी डाहाळिया। तपोज्ञानीं उंचावलिया। मरीचि कश्यपादि इया। उपरी शाखा॥ ९७॥ एवं माळोवाळी उत्तरोत्तरु। ऊर्ध्वशाखांचा हा पैसारु। बुडीं साना अग्रीं थोरु। फलाढ्यपणें॥ ९८॥ वरी उपरिशाखाही पाठीं। येती फळभार ते किरीटी। ते ब्रह्मेशांत अणगटीं। कोंभ निघती॥ ९९॥ फळाचेनि वोझेपणें। ऊर्ध्वीं वोवांडें दुणें। जंव माघौतें बैसणें। मूळींचि होय॥ २००॥ प्राकृताही तरी रुखा। जे फळे दाटली होय शाखा। ते

वोवांडली देखा । बुडासि ये ॥ १ ॥ तैसें जेथूनि हा आघवा । संसारतरूचा उठावा । तियें मूळीं टेंकती पांडवा । वाढतेंनि ज्ञानें ॥ २ ॥ म्हणौनि ब्रह्मेशानापरौतें । वाढणें नाहीं जीवातें । तेथूनि मग वरौतें । ब्रह्मचि कीं ॥ ३ ॥ परी हें असो ऐसे । ब्रह्मादिक ते आंगवसे । ऊर्ध्वमूळासरिसे । न तुकती गा ॥ ४ ॥ आणीकही शाखा उपरता । जिया सनकादिकनामें विख्याता । तिया फळीं मूळीं नाडळतां । भरलिया ब्रह्मीं ॥ ५ ॥ ऐसीं मनुष्यालागौनि जाणावी । ऊर्ध्वी ब्रह्मादिशेष पालवी । शाखांची वाढी बरवी । उंचावे पैं ॥ ६ ॥ पार्था ऊर्ध्वींचिया ब्रह्मादी । मनुष्यत्वचि होय आदी । म्हणौनि इयें अधीं । म्हणितलीं मूळें ॥ ७ ॥ एवं तुज अलौकिकु । हा अधोर्ध्वशाखु । सांगितला भवरुखु । ऊर्ध्वमूळु ॥ ८ ॥ आणि अधींची हीं मूळें । उपपत्ती परिसविलीं सविवळें । आतां परिस उन्मूळे । कैसेनि हा ॥ ९ ॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ ३ ॥

परी तुझां हन पोटीं । ऐसें गमेल किरीटी । जे एवढें झाड उत्पाटी । ऐसें कायि असे ॥ २१० ॥ के ब्रह्मयाचां शेवटवरी । ऊर्ध्व शाखांची थोरी । आणि मूळ तंव निराकारीं । ऊर्ध्वीं असे ॥ ११ ॥ हा स्थावराही तळीं । फांकत असे अधींचां डाळीं । माजीं धांवतसे दुजां मूळीं । मनुष्यरूपीं ॥ १२ ॥ ऐसा गाढा आणि अफाटु । आतां कोण करी यया शेवटु । तरी झणीं हा हळुवटु । धरिसी भावो ॥ १३ ॥ परी हा उन्मूळावया दोषें । येथ सायासचि कायिसे । काय बाळा बागूल देशें । दवडावा आहे ॥ १४ ॥ गंधर्वदुर्ग कायी पाडावे । काय शशविषाण मोडावें । होआवें मग तोडावें । खपुष्प कीं ॥ १५ ॥ तैसा संसारु हा वीरा । रुख नाहीं साचोकारा । मा उन्मूळणीं दरारा । कायिसा तरी ॥ १६ ॥ आम्हीं सांगितली जे परी । मूळडाळांची उजरी । ते वांझेची घरभरीं । लेंकुरें जैशीं ॥ १७ ॥ काय कीजती चेइलेपणीं । स्वप्नींचीं तियें बोलणीं । तैशी जाण ते काहाणी । दुगळीचि ते ॥ १८ ॥ वांचूनि आम्हीं निरूपिलें जैसें । ययाचें अचळ मूळ असे तैसें । आणि तैसाचि जरी हा असे । साचोकारा ॥ १९ ॥ तरी कोणाचेनि संतानें । निपजती या उन्मूळणें । काय फुंकलिया गगनें । जाइजेल गा ॥ २२० ॥ म्हणौनि पैं धनंजया । आम्हीं वानिलें रूप तें माया । कासवीचेनि तुपें राया । वोगरिलें जैसें ॥ २१ ॥ मृगजळाचीं गा तळीं । तियें दिठी दुरूनिचि न्याहाळीं । वांचूनि तेणें पाणियें साळीं केळी । लाविसी काई ॥ २२ ॥ मूळ अज्ञानचि तंव लटिकें । मा तयाचें कार्य हें केतुकें । म्हणौनि संसाररुख सत्य कें । वावोचि गा ॥ २३ ॥ आणि अंतु यया नाहीं । ऐसें बोलिजे जें कांहीं । तेंही साचचि पाहीं । परी येकी ॥ २४ ॥ तरी प्रबोधु जंव नोहे । तंव निद्रे काय अंतु आहे । कीं रात्री न सरे तंव न पाहे । तया आरौतें ॥ २५ ॥ तैसा जंव पार्था । विवेकु नुधवी माथा । तंव अंतु नाहीं अश्वत्था । भवरूपा या ॥ २६ ॥ वाजतें वारें निवांत । जंव न राहे जेथिंचें तेथ । तंव तरंगता अनंत । म्हणावीचि कीं ॥ २७ ॥ म्हणौनि सूर्य

जैं हारपे । तैं मृगजळाभासु लोपे । कां प्रभा जाय दीपे । मालवलेनि ॥ २८ ॥ तैसें मूळ अविद्या खाये । तें ज्ञान जैं उभें होये । तैंचि यया अंतु आहे । एऱ्हवीं नाहीं ॥ २९ ॥ तेवींचि हा अनादी । ऐसी आथी शाब्दी । तो आळु नोहे अनुरोधी । बोल तया ॥ २३० ॥ जे संसारवृक्षाचां ठायीं । साचोकार तंव नाहीं । मा नाहीं तया आदि काई । कोण होईल ॥ ३१ ॥ जो साच जेथूनि उपजे । तयातें आदि हें साजे । आतां नाहींचि तो म्हणिजे । कोठूनियां ॥ ३२ ॥ म्हणौनि जन्मे ना आहे । तैसिया सांगो कवण माये । यालागीं नाहीपणेंचि होये । अनादि हा ॥ ३३ ॥ वांझेचिया लेंका । कैंची जन्मपत्रिका । नभीं निळी भूमिका । कें कल्पूं पां ॥ ३४ ॥ व्योमकुसुमाचा पांडवा । कवणें देंठ तोडावा । म्हणोनि नाहीं ऐसिया भवा । आदि कैंची ॥ ३५ ॥ जैसें घटाचें नाहींपण । असतचि असे केलेनिवीण । तैसा समूळ वृक्ष जाण । अनादि हा ॥ ३६ ॥ अर्जुना ऐसेनि पाहीं । आद्यंतु ययासि नाहीं । माजीं स्थिती आभासे कांही । परी टवाळ तें गां ॥ ३७ ॥ ब्रह्मगिरीहूनि न निगे । आणि समुद्रींही कीर न रिगे । तरी माजीं दिसे वाउगें । मृगाम्बु जैसें ॥ ३८ ॥ तैसा आद्यंतीं कीर नाहीं । आणि साचही नोहे कहीं । परि लटिकेपणाची नवाई । पडिभासे गा ॥ ३९ ॥ नाना रंगी गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे । तैसा नेणतया आपजे । आहे ऐसा ॥ २४० ॥ ऐसेनि स्थितीचिये वेळे । भुलवी अज्ञानाचे डोळे । लाघवी हरी मेखळे । लोकु जैसा ॥ ४१ ॥ आणि नसतीचि श्यामिका । व्योमीं दिसे तैसी दिसो कां । तरी दिसणेंही क्षणा एका । होय जाय ॥ ४२ ॥ स्वप्नींही मानिलें लटिकें । तरी निर्वाहो कां एकसारिखें । तेवीं आभासु हा क्षणिके । रीताचा गा ॥ ४३ ॥ देखतां आहे आवडे । घेऊं जाइजे तरी नातुडे । जैसा टिकु कीजे माकडे । जळामाजीं ॥ ४४ ॥ तरंगभंगु सांडीं पडे । विजूही न पुरे होडे । आभासासि तेणें पाडें । होणें जाणें गा ॥ ४५ ॥ जैसा ग्रीष्मशेषींचा वारा । नेणिजे समोर की पाठीमोरा । तैसी स्थिती नाहीं तरुवरा । भवरूपा यया ॥ ४६ ॥ एवं आदि ना अंत स्थिती । ना रूप ययासि आथी । आतां कायसी कुंथाकुंथी । उन्मूळणीं गा ॥ ४७ ॥ आपुलिया अज्ञानासाठी । नव्हता थांवला किरीटी । तरी आतां आत्मज्ञानाचेनि लोटीं । खांडेनि गा ॥ ४८ ॥ वांचूनि ज्ञानेंवीण एकें । उपाय करिसी जितुके । तिहीं गुंफसि अधिकें । रुखीं इये ॥ ४९ ॥ मग किती खांदोखांदी । यया हिंडावें ऊर्ध्वीं अधी । म्हणौनि मूळचि अज्ञान छेदीं । सम्यग्ज्ञानें ॥ २५० ॥ एऱ्हवीं दोरीचिया उरगा । डांगा मेळवितां पैं गा । तो वावोचि भारु गा । केला होय ॥ ५१ ॥ तरावया मृगजळाची गंगा । डोणीलागीं धांवतां दांगा – । माजीं वोहळें बुडिजे पैं गा । साच जेवीं ॥ ५२ ॥ तेवीं नाथिलिया संसारा । उपायीं जाचतया वीरा । आपणपें लोपे वारा । विकोपीं जाय ॥ ५३ ॥ म्हणोनि स्वप्नींचेया घाया । ओखद चेवोचि धनंजया । तेवीं अज्ञानमूळा यया । ज्ञानचि खड्ग ॥ ५४ ॥ परि तेंचि लीला परजवे । तैसें वैराग्याचे नीच नवें । अभंगबळ होआवें । बुद्धीसी गा ॥ ५५ ॥ उठलेनि वैराग्यें जेणें । हा त्रिवर्गु ऐसा सांडणें । जैसें वमुनियां सुणें । आतांचि गेलें ॥ ५६ ॥ हा

ठायवरी पांडवा। पदार्थजातीं आघवा। विटवी तो होआवा। वैराग्यलाठु॥ ५७॥ मग देहाहंतेचें दळें। सांडूनि एकेचि वेळे। प्रत्यग्बुद्धी करतळें। हातवसावें॥ ५८॥ निसिलें विवेकसाहणे। जे ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें। मग पुरतेनि बोधें उटणें। एकलेंचि॥ ५९॥ परि निश्चयाचें मुष्टिबळ। पाहावें एकदोनी वेळ। मग तुळावें अति चोखाळ। मननवेरी॥ २६०॥ पाठीं हतियेरां आपणयां। निदिध्यासें एक जालिया। पुढां दुजें नुरेल घाया -। पुरतें गा॥ ६१॥ तें आत्मज्ञानाचें खांडें। अद्वैतप्रभेचेनि वाढे। नेदील उरों कवणेकडे। भववृक्षासि॥ ६२॥ शरदागमींचा वारा। जैसा केरु फेडी अंबरा। का उदयला रवीं आंधारा। घोटुं भरी॥ ६३॥ नाना उपवढ होतां खेंवो। नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो। स्वप्रतीतिधारेचा वाहो। करील तैसें॥ ६४॥ तेव्हां ऊर्ध्व कां ऊर्ध्वीचें मूळ। का अधींचे हन शाखाजाळ। तें काहींचि न दिसे मृगजळ। चांदिणां जेवीं॥ ६५॥ ऐसेनि गा वीरनाथा। आत्मज्ञानाचिया खड्गलता। छेदुनिया भवाश्वत्था। ऊर्ध्वमूळातें॥ ६६॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गाता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥४॥

मग इदंतेसि वाळलें। जें मीपणेंवीण डाहारलें। तें रूप पाहिजे आपलें। आपणचि॥ ६७॥ परि दर्पणाचेनि आधारे। एकचि करून दुसरें। मुख पाहाती गव्हारें। तैसें नको हें॥ ६८॥ हें पाहाणे ऐसें असे वीरा। जैसा न मोडलिया विहिरा। मग आपलिया उगमीं झरा। भरोनि ठाके॥ ६९॥ नातरी आटलिया अंभ। निजबिंबीं प्रतिबिंब। नेहटे कां नभीं नभ। घटाभावीं॥ २७०॥ ना ना इंधनांशु सरलेया। वन्हि परते जेवीं आपणपयां। तैसे आपेंआप धनंजया। न्याहाळणें जें गा॥ ७९॥ जिव्हे आपली चवी चाखणें। चक्षू निज बुबुळ देखणें। आहे तया ऐसें निरीक्षणें। आपुलें पैं॥ ७२॥ कां प्रभेसि प्रभा मिळे। गगन गगनावरी लोळे। नाना पाणी भरलें खोळे। पाणियाचिये॥ ७३॥ आपणचि आपणयातें। पाहिजे जें अद्वैतें। तें ऐसें होय निरुतें। बोलिजतु असे॥ ७४॥ जें पाहिजतेनवीण पाहिजे। कांहीं नेणणाचि जाणिजे। आद्यपुरुष कां म्हणिजे। जया ठायातें॥ ७५॥ तेथही उपाधीचा वोथंबा। घेऊनि श्रुति उभविती जिभा। मग नामरूपाचा बडंबा। करिती वायां॥ ७६॥ पैं भवस्वर्गा उबगले। मुमुक्षु योगज्ञाना वळघले। पुढती न यों इया निगाले। पैजा जेथ॥ ७७॥ संसाराचिया पायां पुढां। पळती वीतराग होडा। ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्मकडा। घालिती मागां॥ ७८॥ अहंतादिभावा आपुलिया। झाडा देऊनि आघवेयां। पत्र घेती ज्ञानिये जया। मूळघरासी॥ ७९॥ जियें कां वस्तूंचें नेणणें। आणिलें थोर जगा जाणणें। नाहीं तें नांदविलें जेणें। मी तूं जगी॥ २८०॥ पैं जेथुनि हे एवढी। विश्वपरंपरेची वेलांडी। वाढती आशा जैसी कोरडी। निदैवाची॥ ८१॥ पार्था तें वस्तु पहिलें। आपणपें पैं आपुले। पाहिजे जैसें हिंवलें। हिंव हिंवे॥ ८२॥ आणीकही एक तया। वोळखण असे धनंजया। तरी जयां कां भेटलिया। येणेंचि नाहीं॥ ८३॥

परी तया भेटती ऐसे । जे ज्ञानें सर्वत्र सरिसे । महाप्रळयांबूचें जैसें । भरलेपण ॥ ८४ ॥

निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

जया पुरुषांचे कां मन । सांडोनि गेले मोहमान । वर्षांतीं जैसें घन । आकाशातें ॥ ८५ ॥ निकवड्या निष्ठुरा । उबगिजे जेवीं सोयरा । तैसे नागवती विकारां । वेटाळूं जे ॥ ८६ ॥ फळली केळी उन्मुळे । तैसी आत्मालाभें प्रबळें । जयांचीं क्रिया ढाळेंढाळें । गळती आहे ॥ ८७ ॥ आगी लागलिया रुखीं । देखोनि सैरा पळती पक्षी । तैसे सांडिले अशेखीं । विकल्पीं जे ॥ ८८ ॥ आइकें सकळ दोषतृणीं । अंकुरिजती जिये मेदिनी । तिये भेदबुद्धीची काहाणी । नाहीं जयातें ॥ ८९ ॥ सूर्योदयासरिसी । रात्री पळोनि जाय आपैसी । गेली देहअहंता तैसी । अविद्येसवें ॥ २९० ॥ पैं आयुष्यहीना जीवातें । शरीर सांडीं जेवीं अवचितें । तेवीं निदसुरें द्वैतें । सांडिले जे ॥ ९१ ॥ लोहाचें सांकडें परिसा । न जोडे अंधारु रवि जैसा । द्वैतबुद्धीचा तैसा । सदा दुष्काळ जया ॥ ९२ ॥ अगा सुखदुःखाकारें । द्वंद्वें देहीं जियें गोचरें । तियें जयां कां सामोरें । होतीचिना ॥ ९३ ॥ स्वप्नींचे राज्य कां मरण । नोहे हर्षशोकासि कारण । उपवढलिया जाण । जियापरी ॥ ९४ ॥ तैसें सुखदुःखरूपीं । द्वंद्वीं जे पुण्यपापीं । न घेपिजती सर्पीं । गरुड जैसे ॥ ९५ ॥ आणि अनात्मवर्गनीर । सांडूनि आत्मरसाचें क्षीर । चरताति जे सविचार । राजहंस ॥ ९६ ॥ जैसा वर्षोनि भूतळीं । आपला रसु अंशुमाळी । मागौता आणी रश्मिजाळीं । बिंबासीची ॥ ९७ ॥ तैसें आत्मभ्रांतीसाठीं । वस्तु विखुरली बारावाटीं । ते एकवटिती ज्ञानदृष्टी । अखंड जे ॥ ९८ ॥ किंबहुना आत्मयाचां । निर्धारीं विवेकु जयांचा । बुडाला वोघु गंगेचा । सिंधूमाजी जैसा ॥ ९९ ॥ पैं आघवेंचि आपुलेपणें । नुरेचि जयां अभिलाषणें । जैसें येथूनि पऱ्हां जाणें । आकाशा नाहीं ॥ ३०० ॥ जैसा अग्नीचा डोंगरु । नेघे कोणी बीजअंकुरु । तैसा मनीं जयां विकारु । उदैजेना ॥ १ ॥ जैसा काढिलिया मंदराचळु । राहे क्षीराब्धि निश्चळु । तैसा नुठी जयां सळु । कामोर्मींचा ॥ २ ॥ चंद्रमा कळीं धाला । न दिसे कोणें आंगीं वोसावला । तेवीं अपेक्षेचा अवखळा । न पडे जयां ॥ ३ ॥ हें किती बोलूं असांगडें । जेवीं परमाणुं नुरे वायूपुढें । तैसें विषयांचें नावडे । नांवचि जयां ॥ ४ ॥ एवं जे जे कोणी ऐसे । केले ज्ञानाग्निहुताशें । ते तेथ मिळती जैसें । हेमीं हेम ॥ ५ ॥ तेथ म्हणिजे कवणे ठाईं । ऐसेंही पुससी कांहीं । तरी तें पद गा नाहीं । वेंचु जया ॥ ६ ॥ दृश्यपणें देखिजे । कां ज्ञेयत्वें जाणिजे । अमुकें ऐसें म्हणिजे । तें जें नव्हे ॥ ७ ॥

न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः । यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥

पैं दिपाचिया बंबाळीं । कां चंद्र हन जें उजळी । हें काय बोलो अंशुमाळी । प्रकाशी जें ॥ ८ ॥ तें आघवेंचि दिसणें । जयातें कां न देखणे । विश्व भासतसे जेणें । लपालेनि ॥ ९ ॥ जैसें शिंपीपण हारपे । तंव तंव खरें होय रुपें । कां दोरी लपतां सापें । फार होईजे ॥ ३१० ॥ तैसीं

चंद्रसूर्यादि थोरें । इयें तेजें जियें फारें । तियें जयाचेनि आंधारें । प्रकाशती ॥ ११ ॥ ते वस्तु कीं तेजोराशी । सर्वभूतात्मक सरिसी । चंद्रसूर्याचां मानसीं । प्रकाशे जे ॥ १२ ॥ म्हणौनि चंद्रसूर्य कडवसां । पडती वस्तूचिया प्रकाशा । यालागीं तेज जें तेजसा । तें वस्तूचें आंग ॥ १३ ॥ आणि जयांचा प्रकाशीं । जग हारपे चंद्रार्केसीं । सचंद्र नक्षत्रें जैसीं । दिनोदयीं ॥ १४ ॥ नातरी प्रबोधलिये वेळे । ते स्वप्नींची डिंडीमा मावळे । कां नुरेचि सांजवेळे । मृगतृष्णिका ॥ १५ ॥ तैसा जिये वस्तूंचां ठायीं । कोण्हीच कां आभासु नाहीं । तें माझें निजधाम पाहीं । पाटाचें गा ॥ १६ ॥ पुढती जे तेथ गेले । ते न घेतीचि माघौतीं पाउलें । महोदधीं कां मिनले । स्त्रोत जैसे ॥ १७ ॥ कां लवणाची कुंजरी । सूदलिया लवणसागरीं । होयचि ना माघारी । परती जैसी ॥ १८ ॥ नाना गेलिया अंतराळा । न येतीचि वन्हिज्वाळा । नाहीं तप्तलोहौनि जळा । निघणें जेवीं ॥ १९ ॥ तेवीं मजसीं एकवाट । जे जाले ज्ञानें चोखट । तयां पुनरावृत्तीची वाट । मोडली गा ॥ ३२० ॥ तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो । पार्थु म्हणे जी जी महापसावो । परी विनंती एकी देवो । चित्त देतु ॥ २१ ॥ तरी देवेंसि स्वयें एक होती । मग माघौते जे न येती । ते देवेंसि भिन्न आथी । कीं अभिन्न जी ॥ २२ ॥ जरी भिन्नचि अनादिसिद्ध । तरी न येती हें असंबद्ध । जे फुलां गेले षट्पद । ते फुलेंचि होतु पां ॥ २३ ॥ पैं लक्ष्याहूनि अनारिसे । बाण लक्ष्यीं शिवोनि जैसे । मागुते पडती तैसे । येतीचि ते ॥ २४ ॥ नातरी तूंचि ते स्वभावें । तरी कोणें कोणासि मिळावें । आपणयासी आपण रुपावें । शस्त्रें केवीं ॥ २५ ॥ म्हणोनि तुजसी अभिन्ना जीवां । तुझा संयोगवियोगु देवा । नये बोलों अवयवां । शरीरेंसी ॥ २६ ॥ आणि जे सदा वेगळे तुजसीं । तया मिळणी नाहीं कोणे दिवसीं । मा येती न येती हे कायसी । वायबुद्धि ॥ २७ ॥ तरी कोण गा तूतें । पावोनि न येती माघौते । हें विश्वतोमुखा मातें । बुझावीं जी ॥ २८ ॥ इये आक्षेपीं अर्जुनाचां । जो शिरोमणी सर्वज्ञांचा । तोषला बोध शिष्याचा । देखोनियां ॥ २९ ॥ मग म्हणे गा महामती । मातें पावोनि न येती पुढती । ते भिन्नाभिन्न रिती । आहाती दोनी ॥ ३३० ॥ जैं विवेकें खोलें पाहिजे । तरी मी तेचि ते सहजें । ना आहाचवाहाच तरी दुजे । ऐसेही गमती ॥ ३१ ॥ जैसें पाणियांहि वेगळ । तळपतां दिसती कल्लोळ । एन्हवीं तरी निखिळ । पाणीचि तें ॥ ३२ ॥ कां सुवर्णाहुनि आनें । लेणीं गमती भिन्नें । मग पाहिजे तंव सोनें । आघवेंचि तें ॥ ३३ ॥ तैसें ज्ञानाचिये दिठी । मजसी अभिन्नचि ते किरीटी । येर भिन्नपण तें उठी । अज्ञानास्तव ॥ ३४ ॥ आणि साचोकारेनि वस्तुविचारें । कैचें मज एकासी दुसरें । जें भिन्नाभिन्नव्यवहारें । उमसिजेल ॥ ३५ ॥ आघवेंचि आकाश सूनि पोटीं । बिंबचि जैं आते खोटी । तैं प्रतिबिंब कें उठी । कें रश्मि शिरे ॥ ३६ ॥ कां कल्पांतींचिया पाणिया । काय वोत भरताती धनंजया । म्हणौनि कैंचे अंश अविक्रिया । एका मज ॥ ३७ ॥ परी ओघाचेनि मेळें । पाणी उजू परी वांकुडें जालें । रवी दुजेपण आलें । तोयबगें ॥ ३८ ॥ व्योम चौफळें की

वाटोळें । हें ऐसें कायिसयाही मिळे । परी घटमठीं वेटाळें । तैसेंही आथी ॥ ३९ ॥ हां गां निद्रचेनि आधारें । काय एकलेनि जग न भरे । स्वप्नीचेनि जैं अवतरे । रायपणें ॥ ३४० ॥ कां मिनलेनि किडाळें । वानिभेदासि ये सोळें । तैसा स्वमाया वेंटाळें । शुद्ध जैं मी ॥ ४१ ॥ तैं अज्ञान एक रूढे । तेणें कोऽहंविकल्पांचें मांडे । मग विवरूनि कीजे फुडें । देहो मी ऐसें ॥ ४२ ॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥

ऐसें शरीराचि येवढें । जैं आत्मज्ञान वेगळें पडे । तैं माझा अंशु ऐसें आवडे । थोडेपणें ॥ ४३ ॥ समुद्र कां वायुवशें । तरंगाकार उल्लसे । तो समुद्रांशु ऐसा दिसे । सानिवा जेवीं ॥ ४४ ॥ तेवीं जडातें जीववितां । देहअहंता उपजवितां । मी जीव गमें पंडुसुता । जीवलोकीं ॥ ४५ ॥ पैं जीवाचिया बोधा । गोचरु जो हा धांदा । तो जीवलोकशब्दा । अभिप्रावो ॥ ४६ ॥ अगा उपजणें निमणें । हें साचचि जें कां मानणें । तो जीवलोकु मी म्हणें । संसारु हन ॥ ४७ ॥ एवंविध जीवलोकीं । तूं मातें ऐसा अवलोकीं । जैसा चंद्रु कां उदकीं । उदकातीत ॥ ४८ ॥ पैं काश्मीराचा रवा । कुंकुमावरी पांडवा । आणिका गमे लोहिवा । तो तरी नव्हे ॥ ४९ ॥ तैसें अनादिपण न मोडे । माझें अक्रियत्व न खंडे । परी कर्ता भोक्ता ऐसें आवडे । ते जाण गा भ्रांती ॥ ३५० ॥ किंबहुना आत्मा चोखटु । होऊनि प्रकृतीसी एकवटु । बांधे प्रकृतिधर्माचा पाटु । आपणपयां ॥ ५१ ॥ पैं मनादि साही इंद्रियें । श्रोत्रादि प्रकृतिकार्यें । तियें माझीं म्हणौनि होये । व्यापारारूढ ॥ ५२ ॥ जैसें स्वप्नीं परिव्राजें । आपणपयां आपण कुटुंब होईजे । मग तयाचेनि धांविजे । मोहें सैरा ॥ ५३ ॥ तैसा आपलिया विस्मृती । आत्मा आपणचि प्रकृती - । सारिखा गमोनि पुढती । तियेसीचि भजे ॥ ५४ ॥ मनाचां रथीं वळघे । श्रवणाचिया द्वारें निघे । मग शब्दाचिया रिघे । रानामाजीं ॥ ५५ ॥ तोचि प्रकृतीचा वागोरा । करी त्वचेचिया मोहरा । आणि स्पर्शाचिया घोरा । वना जाय ॥ ५६ ॥ कोणे एके अवसरीं । रिघोनि नेत्राचां द्वारीं । मग रूपाचां डोंगरीं । सैरा हिंडे ॥ ५७ ॥ कां रसनेचिया वाटा । निघोनि गा सुभटा । रसाचा दरकुटा । भरोंचि लागे ॥ ५८ ॥ नातरी येणेंचि घ्राणें । देहेशु करी निघणें । मग गंधाचीं दारुणें । आडवें लंघी ॥ ५९ ॥ ऐसेनि देहेंद्रियनायकें । धरूनि मन जवळिकें । भोगिजती शब्ददिकें । विषयभरणें ॥ ३६० ॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः । गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥ ८ ॥

परी कर्ता भोक्ता ऐसें । हें जीवाचें तैंचि दिसे । जैं शरीरीं का पैसे । येकाधिये ॥ ६१ ॥ जैसा आथिला आणि विलासिया । तैंचि वोळखों ये धनंजया । जैं राजसेव्या ठाया । वस्तीसि ये ॥ ६२ ॥ तैसा अहंकर्तृत्वाचा वाढु । कां विषयेंद्रियाचा धुमाडु । हा जाणिजे तै निवाडु । जैं देह पावे ॥ ६३ ॥ अथवा शरीरातें सांडी । तन्ही इंद्रियांची तांडी । हे आपणपयांसवें काढी । घेऊनि जाय ॥ ६४ ॥ जैसा अपमानिला अतिथि । ने सुकृताची संपत्ती । कां साइखडेयाची गति । सूत्रतंतू ॥ ६५ ॥ ना ना मावळतेनि तपनें । नेईजती लोकांचीं दर्शनें । हें असो द्रुति पवनें । नेईजे जैसी

॥ ६६ ॥ तेवीं मन:षष्ठां ययां । इंद्रियांतें धनंजया । देहराजु ने देहा - । पासूनि गेला ॥ ६७ ॥

श्रोत्रं चक्षु: स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च । अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥

मग येथ अथवा स्वर्गीं । जेथ जें देह आपंगी । तेथ तैसेंचि पुढती पांगी । मनादिक ॥ ६८ ॥ जैसा मालवलिया दिवा । प्रभेसीं जाय पांडवा । मग उजळिजे तेथ तेधवां । तैसाचि फांके ॥ ६९ ॥ परी ऐसैसिया राहाटी । अविवेकियांचिये दिठी । येतुलें हें किरीटी । गमेचि गा ॥ ३७० ॥ जे आत्मा देहा आला । आणि विषयों येणेंचि भोगिला । अथवा देहोनि गेला । हें साचचि मानी ॥ ७१ ॥ एन्हवी येणें आणि जाणें । कां करणें आणि भोगणें । हें प्रकृतीचें तेणें । मानियेलें ॥ ७२ ॥

उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुष: ॥ १० ॥

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् । यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतस: ॥ ११ ॥

परी देहाचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ उपलभे । तिये चळवळेचेनि लोभें । आला म्हणती ॥ ७३ ॥ तैसेंचि तयां संगती । इंद्रियें आपलालां अर्थी वर्तती । तया नांव सुभद्रापती । भोगणें जया ॥ ७४ ॥ पाठीं भोगक्षीण आपैसें । देह गेलिया तें न दिसे । तेथें गेला गेला ऐसें । बोभाती गा ॥ ७५ ॥ पैं रुखु डोलतु देखावा । तरी वारा वाजतु मानावा । रुखु नसे तेथें पांडवा । नाहीं तो गा ॥ ७६ ॥ कां आरसा समोर ठेविजे । आणि आपणपें तेथ देखिजे । तरी तेधवांचि जालें मानिजे । काय आधीं नाहीं ॥ ७७ ॥ कां परता केलिया आरिसा । लोपु जाला तया आभासा । तरी आपणपें नाहीं ऐसा । निश्चयो करावा ॥ ७८ ॥ शब्द तरी आकाशाचा । परी कपाळीं पिटे मेघांचां । कां चंद्री वेगु अभ्राचा । आरोपिजे ॥ ७९ ॥ तैसें होईजे जाईजे देहें । तें आत्मसत्तें अविक्रिये । निष्टंकिती गा मोहें । आंधळे ते ॥ ३८० ॥ येथ आत्मा आत्मयाचां ठायीं । देखिजे देहींचा धर्मु देहीं । ऐसें देखणें ते पाहीं । आन आहाती ॥ ८१ ॥ ज्ञानें कां जयांचे डोळे । देखोनि न राहाती देहींचे खोळे । सूर्यरश्मी आणियाळे । ग्रीष्मीं जैसे ॥ ८२ ॥ तैसी विवेकाचेनि पैसें । जयांची स्फूर्ती स्वरूपीं बैसे । ते ज्ञानिये देखती ऐसें । आत्मयातें ॥ ८३ ॥ जैसें तारांगणीं भरलें । गगन समुद्रीं बिंबलें । परी तें तुटोनि नाहीं पडिलें । ऐसें निवडे ॥ ८४ ॥ गगन गगनींचि आहे । हे आभासे तें वाये । तैसा आत्मा देखती देहें । गंवसिलाही ॥ ८५ ॥ खळाळाचां लगबगीं । फेडूनि खळाळाचां भागीं । देखिजे चंद्रिका कां उगी । चंद्रीं जेवीं ॥ ८६ ॥ कां नाडरचि भरे शोषे । सूर्यु तो जैसा तैसाचि असे । देह होतां जातां तैसें । देखती मातें ॥ ८७ ॥ घटु मठु घडले । तेचि पाठीं मोडले । परि आकाश तें संचलें । असतचि असे ॥ ८८ ॥ तैसें अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टिकल्पितें । हें देहचि होतें जातें । जाणती फुडें ॥ ८९ ॥ चैतन्य चढे ना वोहटे । चेष्टवी ना चेष्टे । ऐसें आत्मज्ञानें चोखटें । जाणती ते ॥ ३९० ॥ आणि ज्ञानही आपैतें होईल । प्रज्ञा परमाणुही उगाणा देईल । सकल शास्त्रांचे येईल । सर्वस्व हातां ॥ ९१ ॥ परी ते व्युत्पत्ति ऐसी । जरी विरक्ति न रिगे मानसीं । तरी सर्वात्मका मजसीं । नव्हेची भेटी ॥ ९२ ॥

पैं तोंड भरो कां विचारा । आणि अंत:करणीं विषयांसी थारा । तरी नातुडें धनुर्धरा । त्रिशुद्धीं मी ॥ ९३ ॥ हां गा वोसणतयाचा ग्रंथीं । काइ तुटती संसारगुंती । कीं परिवसिलेया पोथी । वाचिली होय ॥ ९४ ॥ नाना बांधोनियां डोळे । घ्राणीं लाविजती मुक्ताफळें । तरी तयांचे काय कळे । मोल मान ॥ ९५ ॥ तैसां चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो । ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परी न पविजें मातें ॥ ९६ ॥ जो एक मी कां समस्तीं । व्यापकु असें भूतजातीं । ऐक तिये व्याप्ती । रूप करूं ॥ ९७ ॥

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् । यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १२ ॥

तरी सूर्यासकट आघवी । हे विश्वरचना जे दावी । ते दीप्ती माझी जाणावी । आद्यंतीं आहे ॥ ९८ ॥ जळ शोषुनी गेलिया सविता । ओलांशु पुरवीतसे जे माघौता । ते चंद्रीं पंडुसुता । ज्योत्स्ना माझी ॥ ९९ ॥ आणि दहनपचनसिद्धी । करीतसे जें निरवधी । ते हुताशीं तेजोवृद्धी । माझीचि गा ॥ ४०० ॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा । पुष्णामि चौषधी: सर्वा: सोमो भूत्वा रसात्मक: ॥ १३ ॥

मी रिगालों असे भूतळीं । म्हणौनि समुद्रमहाजळीं । हे पांसूची ढेंपुळी । विरेचिना ॥ १ ॥ आणि भूतेंही चराचरें । हे धरितसे जियें अपारें । तियें मीचि धरीं धरे । रिगोनियां ॥ २ ॥ गगनीं मी पंडुसुता । चंद्राचेनि मिसें अमृता । भरला जालों चालता । सरोवरु ॥ ३ ॥ तेथुनि फांकती रश्मिकर । ते पाट पेलुनि अपार । सर्वौषधींचे आगर । भरितु असें मी ॥ ४ ॥ ऐसेनि सस्यादिका सकळां । करीं धान्यजाती सुकाळा । दें अन्नद्वारा जिव्हाळा । भूतजातां ॥ ५ ॥ आणि निपजविलें अन्न । तरी तैसें कैचें दीपन । जेणें जिरूनि समाधान । भोगिती जीव ॥ ६ ॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रित: । प्राणापानसमायुक्त: पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥

म्हणौनि प्राणिजाताचां घटीं । करूनि कंदावरी आगिठी । दीप्ति जठरीं किरीटी । मीचि जालों ॥ ७ ॥ प्राणापानाचां जोडभातीं । फुंकफुंकोनियां अहोरातीं । आटीतसें नेणों किती । उदरामाजीं ॥ ८ ॥ शुष्कें अथवा स्निग्धें । सुपक्वें कां विदग्धें । परी मीचि गा चतुर्विधें । अन्नें पचीं ॥ ९ ॥ एवं मीचि आघवें जन । जना जीववीतें मीचि जीवन । जीवनीं मुख्य साधन । वन्हिही मीचि ॥ ४१० ॥ आतां ऐसियाहीवरी काई । सांगो व्याप्तीची नवाई । येथ दुजें नाहींची घेईं । सर्वत्र मी गा ॥ ११ ॥ तरी कैसेनि पां वेखें । सदा सुखियें एकें । एकें तियें दु:खे । क्रांतें भूतें ॥ १२ ॥ जैसी सगळिये पाटणीं । एकेंचि दीपें दिवेलावणीं । जालिया कां न देखणीं । उरलीं एकें ॥ १३ ॥ ऐसी हन उखिविखी । करित आहासि मानसी कीं । तरी परिस तेही निकी । शंका फेडीं ॥ १४ ॥ पैं आघवा मीचि असें । येथ नाही कीर अनारिसें । परी प्राणियांचियां उल्लासें । बुद्धी ऐसा ॥ १५ ॥ जैसें एकचि आकाशध्वनि । वाद्यविशेषीं आनानीं । वाजावें पडे भिन्नीं । नादांतरीं ॥ १६ ॥ कां लोकचेष्टीं वेगळालां । जो हा एकचि

भानु उदैला । तो आनानी परी गेला । उपेगासी ॥ १७ ॥ नाना बीजधर्मानुरूप । झाडीं उपजवी आप । तैसें परिणमलें स्वरूप । माझें जीवां ॥ १८ ॥ अगा नेणा आणि चतुरा । पुढां निळ्यांचा दुसरा । नेणा सर्पत्वें जाला येरा । सुखालागीं ॥ १९ ॥ हे असो स्वातीचें उदक । शुक्तीं मोती व्याळीं विख । तैसा सज्ञानासी मी सुख । दुःख तों अज्ञानासी ॥ ४२० ॥

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥

एऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी आमुका आहें ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी ॥ २१ ॥ परी संतांसवें वसतां । योगज्ञानीं पैसतां । गुरुचरण उपासितां । वैराग्येंसी ॥ २२ ॥ येणेंचि सत्कर्मे । अशेषही अज्ञान विरमे । जयांचे अहं विश्रामे । आत्मरूपीं ॥ २३ ॥ ते आपेआप देखोनि देखीं । मियां आत्मेनि सदा सुखी । येथें मीवांचून अवलोकीं । आन हेतु असे ॥ २४ ॥ अगा सूर्योदयो जालिया । सूर्यें सूर्यचि पहावा धनंजया । तेवीं मातें मियां जाणावया । मीचि हेतु ॥ २५ ॥ ना शरीरपरातें सेवितां । संसारगौरवचि ऐकतां । देहीं जयाची अहंता । बुडोनि ठेली ॥ २६ ॥ ते स्वर्गसंसारालागीं । धांवतां कर्ममार्गीं । दुःखाचां सेलभागीं । विभागी होती ॥ २७ ॥ परी हेंही होणें अर्जुना । मजचिस्तव तया अज्ञाना । जैसा जागताचि हेतु स्वप्ना । निद्रेतें होय ॥ २८ ॥ पैं अभ्रें दिवसु हारपला । तोही दिवसेंचि जाणों आला । तेवीं मी नेणोनि विषयो देखिला । मजचिस्तव भूतीं ॥ २९ ॥ एवं निद्रा कां जागणिया । प्रबोधुचि हेतु धनंजया । तेवीं ज्ञाना अज्ञाना जीवांचियां । मीचि मूळ ॥ ४३० ॥ जैसें सर्पत्वा कां दोरा । दोरुचि मूळ धनुर्धरा । तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा । मियांचि सिद्ध ॥ ३१ ॥ म्हणौनि जैसा असें तैसया । मातें नेणोनि धनंजया । वेदु जाणों गेला तंव तया । जालिया शाखा ॥ ३२ ॥ तरी तिहीं शाखाभेदीं । मीचि जाणिजे त्रिशुद्धी । जैसा पूर्वापार नदी । समुद्रचि ठी ॥ ३३ ॥ आणि महासिद्धांतापासीं । श्रुति हारपती शब्देंसीं । जैसिया सगंधा आकाशीं । वातलहरी ॥ ३४ ॥ तैसें समस्तही श्रुतिजात । ठाके लाजिलें ऐसें निवांत । तें मीचि करीं यथावत । प्रकटोनियां ॥ ३५ ॥ पाठीं श्रुतिसकट अशेष । जग हारपे जेथ निःशेष । तें निजज्ञानही चोख । जाणता मीचि ॥ ३६ ॥ जैसें निदेलिया जागिजे । तेव्हां स्वप्नींचें कीर नाहीं दुजें । परी एकत्वही देखों पाविजे । आपलेंचि ॥ ३७ ॥ तैसें आपलें अद्वयपण । मी जाणतसें दुजेनवीण । तयाही बोधा कारण । जाणता मीचि ॥ ३८ ॥ मग आगी लागलिया कापुरा । ना काजळी ना वैश्वानरा । उरणें नाहीं वीरा । जयापरी ॥ ३९ ॥ तेवीं समूळ अविद्या खाये । तें ज्ञानही जैं बुडोनि जाये । तऱ्ही जें नाही कीर नोहे । आणि न साहे असणेंही ॥ ४४० ॥ पैं विश्व घेऊनि गेला मागेंसी । तया चोरातें कवण कें गिंवसी । जे कोणी एकी दशा ऐसी । शुद्ध ते मी ॥ ४१ ॥ ऐसें जडाजडव्याप्ती । रूप करितां कैवल्यपती । ठी केली निरुपहितीं । आपुलां रूपीं ॥ ४२ ॥ तो आघवाचि बोधु सहसा । अर्जुनीं उमटला कैसा ।

व्योमींचा चंद्रोदयो जैसा। क्षीरार्णवीं ॥ ४३ ॥ कां प्रतिभिंती चोखटे। समोरील चित्र उमटे। तैसा अर्जुनें आणि वैकुंठे। नांदतसे बोधु ॥ ४४ ॥ तरी बाप वस्तुस्वभावो। फावे तंव तंव गोडिये थांवो। म्हणौनि अनुभवियांचा रावो। अर्जुन म्हणे ॥ ४५ ॥ जी व्यापकपण बोलतां। निरूपाधिक जें आतां। स्वरूप प्रसंगता। बोलिले देवो ॥ ४६ ॥ ते एक वेळ अव्यंगवाणें। कीजो कां मज सांगणें। तेथ द्वारकेचा नाथु म्हणे। भलें केलें ॥ ४७ ॥ पैं अर्जुना आम्हांहि वाडेंकोडें। अखंड बोलों आवडे। परी काय कीजे न जोडे। पुसतें ऐसें ॥ ४८ ॥ आजि मनोरथांसि फळ। जोडलासि तूं केवळ। जे तोंड भरूनि निखळ। आलासि पुसों ॥ ४९ ॥ जें अद्वैतावरीही भोगिजे। तें अनुभवींचे तूं विरजें। पुसोनि मज माझें। देतोसि सुख ॥ ४५० ॥ जैसा आरिसा आलिया जवळा। दिसे आपणपें आपलां डोळां। तैसा संवादिया तूं निर्मळा। शिरोमणी ॥ ५१ ॥ तुवां नेणोनि पुसावे। मग आम्ही परिसऊं बैसावें। तो गा हा पाडु नव्हे। सोयरेया ॥ ५२ ॥ ऐसें म्हणौनि आलिंगिलें। कृपादृष्टी अवलोकिलें। मग देवो काय बोलिले। अर्जुनेंसीं ॥ ५३ ॥ पैं दोही वोठीं एक बोलणें। दोही चरणीं एक चालणें। तैसें पुसणें सांगणे। तुझें माझें ॥ ५४ ॥ एवं आम्ही तुम्ही येथें। देखावें एका अर्थातें। सांगतें पुसतें येथें। दोन्हीं एक ॥ ५५ ॥ ऐसा भुलला देवो मोहें। अर्जुनातें आलिंगुनि ठाये। मग बिहाला म्हणे नोहे। आवडी हे ॥ ५६ ॥ जाले इक्षुरसाचे ढाळ। तरी लवण देणें किडाळ। जे संवादसुखाचें रसाळ। नासेल थितें ॥ ५७ ॥ आधींच आम्हां यया कांही। नरनारायणा भिन्न नाहीं। परी आतां जिरो माझां ठाई। वेगु हा माझा ॥ ५८ ॥ इया बुद्धी सहसा। श्रीकृष्ण म्हणे वीरेशा। पैं गा तो तुवां कैसा। प्रश्नु केला ॥ ५९ ॥ जो अर्जुन कृष्णीं विरत होता। तो परतोनिया मागुता। प्रश्नावळीची कथा। ऐकों आला ॥ ४६० ॥ येथ सद्गदें बोलें। अर्जुनें जी जी म्हणितलें। निरुपाधिक आपुलें। रूप सांगा ॥ ६१ ॥ यया बोला तो शार्ङ्गी। तेंचि सांगावयालागीं। उपाधी दोहीं भागीं। निरूपीत असे ॥ ६२ ॥ पुसिलिया निरुपहित। उपाधि कां सांगे येथ। हें कोण्हाही प्रस्तुत। गमे जरी ॥ ६३ ॥ तरी ताकाचे अंश फेडणें। याचि नांव लोणी काढणें। चोखाचिये शुद्धी तोडणें। कीडचि जेवीं ॥ ६४ ॥ बाबुळीचि सारावी हातें। परी पाणी तंव असे आइतें। अभ्रचि जावें गगन तें। सिद्धचि कीं ॥ ६५ ॥ वरील कोंड्याचा गुंडाळा। झाडुनि केलिया वेगळा। कणु घेतां विरंगोळा। असे काई ॥ ६६ ॥ तैसा उपाधि उपहितां। शेवटु जेथ विचारितां। तें कोणातेंही न पुसतां। निरुपाधिक ॥ ६७ ॥ जैसें न सांगणेवरी। बाळा पतीसी रूप करी। बोलु निमालेपणें विवरी। अचर्चातें ॥ ६८ ॥ पैं सांगणेयाजोगें नव्हें। तेथिचें सांगणें ऐसें आहे। म्हणौनि उपाधि लक्ष्मीनाहें। बोलिजे आदीं ॥ ६९ ॥ पाडिव्याची चंद्ररेखा। निरुती दावावया शाखा। दाविजे तेवीं औपाधिका। बोली इया ॥ ४७० ॥

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥

मग तो म्हणे गा सव्यसाची। पैं इये संसारपाटणींची। वस्ती साविया टांची। दुपुरुषीं ॥ ७१ ॥ जैसी आघवांचि गगनीं। नांदतें दिवोरात्री दोन्ही। तैसे संसारराजधानीं। दोन्हीचि हे ॥ ७२ ॥ आणिकही तिजा पुरुष आहे। परी तो या दोन्हींचे नांव न साहे। जो उदेला गांवेंसीं खाये। दोहींतें ययां ॥ ७३ ॥ परीं ते तंव गोठी असो। आधीं दोहींचि ते परियेसों। संसारग्रामा वसों। आले असती ॥ ७४ ॥ एक आंधळा वेडा पंगु। येर सर्वांगें पुरता चांगु। परी ग्रामगुणें संगु। घडला दोघां ॥ ७५ ॥ तया एका नाम क्षरु। येरातें म्हणती अक्षरु। इहीं दोहींचि परी संसारु। कोंदला असे ॥ ७६ ॥ आतां क्षरु तो कवणु। अक्षरु तो किंलक्षणु। हा अभिप्रावो संपूर्णु। विवंचूं गा ॥ ७७ ॥ तरी महदहंकारा। लागुनियां धनुर्धरा। तृणांतींचा पांगोरा - । वरी पैं गा ॥ ७८ ॥ जें कांहीं सानें थोर। चालतें अथवा स्थिर। किंबहुना गोचर। मनबुद्धी जें ॥ ७९ ॥ जेंतुलें पांचभौतिक घडतें। जें नामरूपा सांपडतें। गुणत्रयाचां पडतें। कामठां जें ॥ ४८० ॥ भूताकृतींचें नाणें। घडत भांगारें जेणें। काळासि जूं खेळणें। जिहीं कवडां ॥ ८१ ॥ जाणणेंचि विपरीतें। जें जें कांही जाणिजतें। जें प्रतिक्षणीं निमतें। होऊनियां ॥ ८२ ॥ अगा काढूनि भ्रांतीचें दांग। उभवी सृष्टीचें आंग। हें असो बहु जग। जया नाम ॥ ८३ ॥ पैं अष्टधा भिन्न ऐसें। जें दाविलें प्रकृतिमिसें। जें क्षेत्रद्वारा छत्तिसें। भागीं केलें ॥ ८४ ॥ हें मागील सांगों किती। अगा आतांचि जें प्रस्तुती। वृक्षाकाररूपकरीती। निरूपिलें ॥ ८५ ॥ तें आघवेंचि साकारें। कल्पूनी आपणपयां पुरें। जालें असे तदनुसारें। चैतन्यचि ॥ ८६ ॥ जैसा कुहां आपणचि बिंबे। सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे। मग क्षोभला समारंभें। घाली तेथ ॥ ८७ ॥ कां सलिलीं असतचि असे। व्योमावरी व्योम बिंबें जैसें। अद्वैत होऊनि तैसें। द्वैतें घेपे ॥ ८८ ॥ अर्जुना गा यापरी। साकार कल्पूनि पुरी। आत्मा विस्मृतीची करी। निद्रा तेथ ॥ ८९ ॥ पै स्वप्नीं सेजार देखिजे। मग पहुडणें जैसें तेथ कीजे। तैसें पुरीं शयन जाणिजे। आत्मयासी ॥ ४९० ॥ पाठीं तिये निद्रेचेनि भरे। मी सुखी दुःखी म्हणत घोरे। अहंममतेचेनि थोरें। वोसणाये सादें ॥ ९१ ॥ हा जनकु हे माता। हा मी गौर हीन पुरता। पुत्र वित्त कांता। माझें हें ना ॥ ९२ ॥ ऐसिया वेंघौनि स्वप्ना। धांवता भवस्वर्गाचिया राना। तया चैतन्या नाम अर्जुना। क्षर पुरुषु गा ॥ ९३ ॥ आतां ऐक क्षेत्रज्ञु येणें। नामें जयातें बोलणें। जग जीवु कां म्हणे। जिये दशेतें ॥ ९४ ॥ जो आपुलेनि विसरें। सर्वभूततत्त्वें अनुकरे। तो आत्मा बोलिजे क्षरें। पुरुषनांवें ॥ ९५ ॥ जे तो वस्तुस्थिति पुरता। म्हणौनि आली पुरुषता। वरी देहपुरीं निदैजतां। पुरुषनांवें ॥ ९६ ॥ आणि क्षरपणाचा नाथिला। आळु यया ऐसेनि आला। जे उपाधीचि आतला। म्हणोनियां ॥ ९७ ॥ जैसी खळाळीचिया उदका - । सरसीं आंदोळे चंद्रिका। तैसा विकारां औपाधिकां। ऐसाचि गमे ॥ ९८ ॥ कां खळाळु मोटका शोषे। आणि चंद्रिका तैं सरिसींच भ्रंशे। तैसा उपाधिनाशीं न दिसे। उपाधिकु ॥ ९९ ॥ ऐसें उपाधीचेनि पाडें। क्षणिकत्व यातें जोडे। तेणें खोंकरपणें घडे। क्षर हें नांव ॥ ५०० ॥ एवं जीवचैतन्य

आघवें। हें क्षर पुरुष जाणावें। आतां रूप करूं बरवें। अक्षरासी ॥ १ ॥ तरी अक्षरु जो दुसरा। पुरुष पैं धनुर्धरा। तो मध्यस्थु गा गिरिवरां। मेरु जैसा ॥ २ ॥ जे तो पृथ्वी पाताळ स्वर्गीं। इहीं न भेदें तिहीं भागीं। तैसा दोहीं ज्ञानाज्ञानांगीं। पडेना जो ॥ ३ ॥ ना येथ यथार्थज्ञानें एक होणें। ना अन्यत्वें दुजें घेणें। ऐसें निखळ जें नेणणें। तेंचि तें रूप ॥ ४ ॥ पांडुसुता निःशेष जाये। ना घटभांडादिकें होये। तया मृत्पिंडा ऐसें आहे। मध्यस्थ जें ॥ ५ ॥ पैं आटोनि गेलिया सागरु। मग तरंगु ना नीरु। तया ऐशी अनाकारु। जे दशा गा ॥ ६ ॥ पार्था जागणें तरी बुडे। परी स्वप्नाचें कांही न मांडे। तैसिये निद्रे सांगडें। निहाळिजे ॥ ७ ॥ विश्व आघवेंचि मावळे। आणि आत्मबोधु तरी नुजळे। तिये अज्ञानदशे केवळे। अक्षरु नांव ॥ ८ ॥ अजामेकां अजा म्हणतां जन्म नाहीं। त्यासि नाशु कैचा कायी। यालागीं अक्षरु पाहीं। अज्ञानघन ॥ ५०८ अ ॥ सर्वां कळी सांडिलें जैसें। चंद्रपण उरे अंवसे। रूप जाणावें तैसें। अक्षराचें ॥ ९ ॥ पैं सर्वोपाधिविनाशें। हे जीवदशा जेथ पैसे। फळपाकांत जैसें। झाड बींजीं ॥ ५१० ॥ तैसें उपाधी उपहित। थोकोनि ठाके जेथ। तयातें अव्यक्त। बोलती गा ॥ ११ ॥ जयासी कां बीजभावो। वेदान्ती केला ऐसा आवो। तो तया पुरुषा ठावो। अक्षराचा ॥ १२ ॥ जेथूनि अन्यथाज्ञान। फांकोनि जागृति स्वप्न। नाना बुद्धीचें रान। रिगालें असे ॥ १३ ॥ जीवत्व जेथूनि किरीटी। विश्व उठवितचि उठी। ते उभय बोधांची मिठी। अक्षर पुरुषु ॥ १४ ॥ येरु क्षरु पुरुषु कां जनीं। जिहीं खेळे जागृतीं स्वप्नीं। तिया अवस्था जो दोन्ही। वियाला गा ॥ १५ ॥ पैं अज्ञानघनसुषुप्ती। ऐसैसी जे का ख्याती। या उणी येकी प्राप्ती। ब्रह्माची जे ॥ १६ ॥ साचचि पुढती वीरा। जरी न येतां स्वप्नजागरां। तरी ब्रह्मभावो साचोकारा। म्हणों येता ॥ १७ ॥ परी प्रकृतिपुरुषें दोनी। अभ्रें जालीं जिये गगनीं। क्षेत्रक्षेत्रज्ञु स्वप्नीं। देखिला जियें ॥ १८ ॥ हें असो अधोशाखा। या संसाररूपा रुखा। मूळ तें पुरुषा। अक्षराचें ॥ १९ ॥ हा पुरुष कां म्हणिजे। जे पूर्णपणेंचि निजें। पै मायापुरीं पहुडिजे। तेणेंही बोलें ॥ ५२० ॥ आणि विकारांची जे वारी। ते विपरीत ज्ञानाची परी। नेणिजे जिये माझारीं। ते सुषुप्ती गा हा ॥ २१ ॥ म्हणौनि यया आपैसें। क्षरणें पां नसे। आणिकहीं हा न नाशे। ज्ञानाउणें ॥ २२ ॥ यालागीं हा अक्षरु। ऐसा वेदान्तीं डगरु। केला देखसी थोरु। सिद्धांताचा ॥ २३ ॥ ऐसें जीवकार्यकारण। जया मायासंगुचि लक्षण। अक्षर पुरुषु जाण। चैतन्य तें ॥ २४ ॥

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः । यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥

आतां अन्यथाज्ञानीं। या दोनी अवस्था जया जनीं। तया हारपती घनीं। अज्ञानतत्त्वीं ॥ २५ ॥ तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया। ज्ञानें कीर्तिमुखत्व केलिया। जैसा वन्हि काष्ठ जाळुनियां। स्वयें जळे ॥ २६ ॥ तैसें अज्ञान ज्ञानें नेलें। आपण वस्तु देऊनि गेलें। ऐसे जाणणेनिवीण उरलें। जाणतें जें ॥ २७ ॥ तें तो गा उत्तम पुरुषु। जो तृतीय कां निष्कर्षु। दोहींहून आणिकु। मागिला जो ॥ २८ ॥ सुषुप्ती आणि स्वप्ना-। पासूनि बहुवें अर्जुना। जागणें जैसें आना। बोधाचेंचि

॥ २९ ॥ कां रश्मी हन मृगजळा- । पासूनि अर्कमंडळा । अफाटु तेवीं वेगळा । उत्तमु गा ॥ ५३० ॥ हें ना काष्ठींचा काष्ठाहुनी । अनारिसा जैसा वन्ही । तैसा क्षराक्षरापासुनी । आनचि तो ॥ ३१ ॥ पैं ग्रासुनी आपली मर्यादा । एक करीत नदीनदां । उठी कल्पांती उदावादा । एकार्णवाचा ॥ ३२ ॥ तैसें स्वप्न ना सुषुप्ती । ना जागराची गोठी आथी । जैसी गिळिली दिवोराती । प्रळयतेजें ॥ ३३ ॥ मग एकपण ना दुजें । असें नाहीं हें नेणिजे । अनुभव निर्बुजे । बुडाला जेथें ॥ ३४ ॥ ऐसें आथि जें कांही । तें तो उत्तम पुरुष पाहीं । जें परमात्मा इहीं । बोलिजे नामीं ॥ ३५ ॥ तेंही एथ न मिसळतां । बोलणें जीवत्वें पंडुसुता । जैसी बुडणेयाची वार्ता । थडियेचा कीजे ॥ ३६ ॥ तैसे विवेकाचिये कांठी । उभें केलेया किरीटी । पारावाराचिया गोठी । करणें वेदां ॥ ३७ ॥ म्हणौनि पुरुष क्षराक्षर । दोन्ही देखोनि अवर । यातें म्हणती पर । आत्मरूप ॥ ३८ ॥ अर्जुना ऐसिया परी । परमात्मा शब्दवरी । सूचिजे गा अवधारीं । पुरुषोत्तमु ॥ ३९ ॥ एन्हवीं न बोलणेनि बोलणें । जेथिंचें सर्व नेणिवा जाणणें । कांहींचि न होनि होणें । जे वस्तु गा ॥ ५४० ॥ सोऽहं तेंही अस्तवलें । जेथ सांगतेंचि सांगणे जालें । द्रष्टत्वेंसीं गेलें । दृश्य जेथ ॥ ४१ ॥ आतां बिंबा आणि प्रतिबिंबा - । माजी कैंची हें म्हणों नये प्रभा । जन्ही कैसेनि हे लाभा । जायेचि ना ॥ ४२ ॥ कां घ्राणा फुला दोहीं । द्रुती असे जे माझारिलां ठायीं । ते न दिसे तरी नाहीं । ऐसें बोलों नये ॥ ४३ ॥ तैसें द्रष्टा दृश्य हें जाये । मग कोण म्हणे काय आहे । हेंचि अनुभवें तेंचि पाहे । रूप तया ॥ ४४ ॥ जो प्रकाश्येंवीण प्रकाशु । ईशितव्येंवीण ईशु । आपणेनीचि अवकाशु । वसवीत असे जो ॥ ४५ ॥ जो नादें ऐकिजता नादु । स्वादें चाखिजता स्वादु । जो भोगिजतसे आनंदु । आनंदेंचि ॥ ४६ ॥ सुखासि सुख जोडिलें । जें तेज तेजासि सांपडलें । शून्यही बुडालें । महाशून्यीं जिये ॥ ४७ ॥ जो पूर्णतेचा परिणामु । पुरुषु गा सर्वोत्तमु । विश्रांतीचाही विश्रामु । विराला जेथें ॥ ४८ ॥ जो विकासाहीवरी उरता । ग्रासातेंही ग्रासुनि पुरता । जो बहुतें पाडें बहुतां - । पासूनि बहु ॥ ४९ ॥ पैं नेणतयाप्रती । रुपेपणाची प्रतीती । रूपें न होऊनि शुक्ती । दावी जेवीं ॥ ५५० ॥ का नाना अलंकारदशे । सोनें न लपत लपालें असे । विश्व न होनियां तैसें । विश्व जो धरी ॥ ५१ ॥ हें असो जलतरंगा । नाहीं सिनानेपण जेवीं गा । तेवीं दिसता प्रकाशु जगा । आपणचि जो ॥ ५२ ॥ आपुलिया संकोचविकासा । आपणचि रूप वीरेशा । हा जळीं चंद्र हन जैसा । समग्र गा ॥ ५३ ॥ तैसा विश्वपणें कांहीं होये । विश्वलोपीं केहीं न जाये । जैसा रात्री दिवसें नोहे । द्विधा रवि ॥ ५४ ॥ तैसा कहींचि कोणीकडे । कायिसेनिहि वेंचीं न पडे । जयाचें सांगडें । जयासीचि ॥ ५५ ॥

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः । अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥

जो आपणपेंचि आपणया । प्रकाशीतसे धनंजया । काय बहु बोलों जया । नाहीं दुजे ॥ ५६ ॥ तो गा मी निरुपाधिकु । क्षराक्षरोत्तमु एकु । म्हणोनि म्हणे वेद लोकु । पुरुषोत्तमु ॥ ५७ ॥

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम् । स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥

परी हें असो ऐसिया । मज पुरुषोत्तमातें धनंजया । जाणे जो पाहलेया । ज्ञानमित्रें ॥ ५८ ॥ चेइलिया आपुलें ज्ञान । जैसें नाहींचि होय स्वप्न । तैसें स्फुरतें जया त्रिभुवन । वावो जालें ॥ ५९ ॥ कां हाती घेतलिया माळा । फिटे सर्पाभासाचा कांटाळा । तैसा माझेनि बोधें टवाळा । नागवे जो ॥ ५६० ॥ लेणें सोनेंचि जो जाणे । तो लेणेपण तें वावो म्हणे । तेवीं मी जाणोनि जेणें । वाळिला भेदु ॥ ६१ ॥ मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु । मीचि एकु स्वत:सिद्धु । जो आपणेनसीं भेदु । नेणोनि जाणे ॥ ६२ ॥ तेणेंचि सर्व जाणितलें । हेंही म्हणणें थेंकुलें । जे तया सर्व उरलें । द्वैत नाहीं ॥ ६३ ॥ म्हणोनि माझिया भजना । उचितु तोचि अर्जुना । गगन जैसें आलिंगना । गगनाचिया ॥ ६४ ॥ क्षीरसागरा परगुणें । कीजे क्षीरसागरचिपणें । अमृतचि होऊनि मिळणें । अमृतीं जेवीं ॥ ६५ ॥ साडेपंधरा मिसळावें । तैं साडेपंधरेंचि होआवें । तेवीं मी जालिया संभवे । भक्ति माझी ॥ ६६ ॥ हां गा सिंधूसि आनी होती । तरी गंगा कैसेनि मिळती । म्हणौनि मी न होतां भक्ती । अन्वयो आहे ॥ ६७ ॥ ऐसियालागीं सर्व प्रकारी । जैसा कल्लोळु अनन्यु सागरीं । तैसा मातें अवधारीं । भजिन्नला जो ॥ ६८ ॥ सूर्या आणि प्रभे । एकवंकी जेणें लोभें । तो पाडु मानूं लाभे । भजना तया ॥ ६९ ॥

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ । एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥

एवं कथिलयादारभ्य । जें हें सर्व शास्त्रैकलभ्य । उपनिषदां सौरभ्य । कमळदळां जेवीं ॥ ५७० ॥ हें शब्दब्रह्माचें मथितें । व्यासप्रज्ञेचेनि हातें । मथूनि काढिलें आयितें । सार आम्हीं ॥ ७१ ॥ जे ज्ञानामृताची जान्हवी । जे आनंदचंद्रींची सतरावी । विचारक्षीरार्णवींची नवी । लक्ष्मी जे हे ॥ ७२ ॥ म्हणोनि आपुलेनि पदें वर्णें । अर्थाचेनि जीवेंप्राणें । मीवांचोनि हों नेणे । आन कांहीं ॥ ७३ ॥ क्षराक्षरत्वें समोर जालें । तयांचें पुरुषत्व वाळिलें । मग सर्वस्व मज दिधलें । पुरुषोत्तमीं ॥ ७४ ॥ म्हणौनि जगीं गीता । मियां आत्मेनि पतिव्रता । जे हे प्रस्तुत तुवां आतां । आकर्णिली ॥ ७५ ॥ साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र । पैं संसारु जिणतें हें शस्त्र । आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरें इयें ॥ ७६ ॥ परी तुजपुढा सांगितलें । तें अर्जुना ऐसें जालें । जें गौप्यधन काढिलें । माझे आजि ॥ ७७ ॥ मज चैतन्यशंभूचां माथां । जो निक्षेपु होता पार्था । तया गौतमु जालासि आस्था- । निधीं तू गा ॥ ७८ ॥ चोखटिवा आपुलिया । पुढिला उगाणा घेयावया । तया दर्पणाचीचि परी धनंजया । केली आम्हां ॥ ७९ ॥ कां भरलें चंद्रतारांगणीं । नभ सिंधू आपणयामाजीं आणी । तैसा गीतेसीं मी अंत:करणीं । सूदला तुवां ॥ ५८० ॥ जे त्रिविधमळकटा । तूं सांडिलासी सुभटा । म्हणौनि गीतेसीं मज वसौटा । जालासि गा ॥ ८१ ॥ परीं हें बोलों काय गीता । जे हे माझी उन्मेषलता । जाणे तो समस्ता । मोहा मुके ॥ ८२ ॥ सेविली अमृतसरिता । रोग दवडूनि पंडुसुता । अमरपणा उचिता । देऊनि घाली ॥ ८३ ॥ तैसी गीता हे जाणितलिया । काय विस्मयो मोह जावया । परी आत्मज्ञानें आपणपयां । मिळिजे येथ

॥ ८४ ॥ जया आत्मज्ञानाचां ठायीं । कर्म आपुलेया जीविता पाहीं । होऊनियां उतराई । लया जाय ॥ ८५ ॥ हारपलें दावूनि जैसा । मागु सरे वीरविलासा । ज्ञानचि कळस वळघे तैसा । कर्मप्रासादा ॥ ८६ ॥ म्हणौनि ज्ञानिया पुरुषा । कृत्य करूं सरलें देखा । ऐसा अनाथांचा सखा । बोलिला तो ॥ ८७ ॥ तें श्रीकृष्णवदनामृत । पार्थीं भरोनि असे वोसंडत । मग व्यासकृपा प्राप्त । संजयासी ॥ ८८ ॥ तो धृतराष्ट्राया । सूतसे पान करावया । म्हणौनि जीवितान्तु तया । नव्हे भारी ॥ ८९ ॥ ए-हवीं गीताश्रवणअवसरीं । आवडों लागतां अनधिकारी । परी शेखीं तेचि उजरी । पातला भली ॥ ५९० ॥ जेव्हा द्राक्षीं दूध घातलें । तेव्हां वायां गेलें गमलें । परी फळपाकीं दुणावलें । देखिजे जेवीं ॥ ९१ ॥ तैसीं हरीवक्त्रींचीं अक्षरें । संजयें सांगितलीं आदरें । तिहीं अंधु तोही अवसरें । सुखिया जाला ॥ ९२ ॥ तेंचि मन्हाटेनि विन्यासें । मियां उन्मेषें ठसेंठोंबसें । जाणें नेणें तैसें । निरोपिलें ॥ ९३ ॥ सेवंतीये अरसिकांही । आंग पाहतां विशेषु तरी नाही । परी सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं जाणिजे ॥ ९४ ॥ तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें तें मज देइजे । जें नेणणें हेंचि सहजें । रूप कीं बाळा ॥ ९५ ॥ परी नेणतें जन्ही होये । तन्ही देखोनि बाप कीं माये । हर्ष केंहि न समाये । चोज करिती ॥ ९६ ॥ तैसें संत माहेर माझे । तुम्ही मिनलिया मी लाडैजें । तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ॥ ९७ ॥ आतां विश्वात्मकु हा माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा । तो अवधारू वाक्यपूजा । ज्ञानदेवो म्हणे ॥ ५९८ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
पुरुषोत्तमयोगोनाम पञ्चदशोऽध्यायः ॥ (श्लोक २०; ओव्या ५९८)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय सोळावा)

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु । अद्वयाब्जिनीविकाशु । वंदुं आतां ॥ १ ॥ जो अविद्याराती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां । जो सुदिनु करी ज्ञानियां । स्वबोधाचा ॥ २ ॥ जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे । सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी

॥ ३ ॥ लिंगदेहकमळाचां । पोटीं वेंचतया चिद्भ्रमराचा । बंदीमोक्षु जयाचा । उदैला होय ॥ ४ ॥ शब्दाचिया आसकडीं । भेदनदींचां दोहीं थडीं । आरडाते विरहवेडीं । बुद्धिबोधु ॥ ५ ॥ तया चक्रवाकांचें मिथुन । सामरस्याचें समाधान । भोगवी जो चिद्गगन - । भुवनदिवा ॥ ६ ॥ जेणें पाहालिये पाहांटें । भेदाची चोरळी फिटे । रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ॥ ७ ॥ जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेखसूर्यकांतफुणगें । दीपले जाळिती दांगे । संसाराचीं ॥ ८ ॥ जयाचा रश्मिपुंजु निबरु । होतां स्वरूप उखरीं स्थिरु । ये महासिद्धीचा पूरु । मृगजळाचा तें ॥ ९ ॥ जो प्रत्यग्बोधाचिया माथया । सोऽहंतेचां मध्यान्हीं आलिया । लपे आत्मभ्रांति छाया । आपणपां तळीं ॥ १० ॥ तेव्हा विश्वस्वप्नासहितें । कोण अन्यथामतिनिद्रेतें । सांभाळी नुरेचि जेथें । मायाराती ॥ ११ ॥ म्हणौनि अद्वयबोधपाटणीं । तेथ महानंदाची दाटणी । मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं । मंदावों लागती ॥ १२ ॥ किंबहुना ऐसैसें । मुक्तकैवल्य सुदिवसें । सदा लाहिजे कां प्रकाशें । जयाचेनि ॥ १३ ॥ जो निजधामव्योमींचा रावो । उदैलाचि उदैजतखेंवो । फेडी पूर्वादि दिशांसी ठावो । उदोअस्तूचा ॥ १४ ॥ न दिसणें दिसणेंनसीं मावळवी । दोन्हीं झांकिलें तें सैंघ पालवी । काय बहु बोलों ते आघवी । उखाचि आनी ॥ १५ ॥ तो अहोरात्रांचा पैलकडु । कोणे देखावा ज्ञानमार्तंडु । जो प्रकाश्येंवीण सुरवाडु । प्रकाशाचा ॥ १६ ॥ तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमो म्हणों पुढतपुढती । जे बाधका येइजतसे स्तुती । बोलाचिया ॥ १७ ॥ देवाचें महिमान पाहोनियां । स्तुती तरी येईजे चांगावया । जरी स्तव्यबुद्धीसीं लया । जाइजे कां ॥ १८ ॥ जो सर्व नेणिवां जाणिजे । मौनाचिया मिठीया वानिजे । कांहींच न होनि आणिजे । आपणपयां जो ॥ १९ ॥ जया तुझिया उद्देशासाठीं । पश्यंती मध्यमा पोटीं । सूनि परेसींही पाठीं । वैखरी विरे ॥ २० ॥ तया तूतें मी सेवकपणें । लेववीं बोलकेया स्तोत्राचें लेणें । हे उपसाहावेंही म्हणतां उणें । अद्वयानंदा ॥ २१ ॥ परी रंकें अमृताचा सागरु । देखिलिया पडे उचिताचा विसरु । मग करूं धांवे पाहुणेरु । शाकांचा तया ॥ २२ ॥ तेथ शाकुही कीर बहुत म्हणावा । तयाचा हर्षवेगुचि तो घ्यावा । उजळोनि दिव्यतेजा हातिवा । ते भक्तीचि पाहावी ॥ २३ ॥ बाळा उचित जाणणें होये । तरी बाळपणचि कें आहे । परी साचचि येरी माये । म्हणोनि तोषे ॥ २४ ॥ हां गा गांवरसें भरलें । पाणी पाठीं पाय देत आलें । तें गंगा काय म्हणितलें । परतें सर ॥ २५ ॥ जी भृगूचा कैंसा अपकारु । कीं तो मानूनि प्रियोपचारु । तोषेचिना शार्ङ्गधरु । गुरुत्वासी ॥ २६ ॥ कीं आंधारें खतेलें अंबर । झालेया दिवसनाथासमोर । तेणें तयातें पन्हां सर । म्हणितलें काई ॥ २७ ॥ तेवीं भेदबुद्धीचिये तुळे । घालूनि सूर्यश्लेषाचें कांटाळें । तुकिलासी ते येकीं वेळे । अपसाहिजो जी ॥ २८ ॥ जिहीं ध्यानाचां डोळा पाहिलासी । वेदादि वाचां वानिलासी । जे उपसाहिलें तयांसी । तें आम्हांही करीं ॥ २९ ॥ परी मी आजि तुझां गुणीं । लाचावलों अपराधु न गणीं । भलतें करीं परी अर्धधणीं । नुठीं कदा ॥ ३० ॥

मियां गीतां येणें नांवें। तुझें पसायामृत सुहावें। वानूं लाधलो तें दुणेन थांवें। दैवलों दैवें॥ ३१ ॥ माझिया सत्यवादाचें तप। वाचा केलें बहुत कल्प। तया फळांचें हें महाद्वीप। पातली प्रभु ॥ ३२ ॥ पुण्यें पोषिलीं असाधारणें। तियें तुझे गुण वानणें। देऊनि मज उत्तीर्णें। जालीं आजी ॥ ३३ ॥ जी जीवित्वाचां आडवीं। आतुडलों होतों मरणगांवी। ते अवदसाची आघवी। फेडिली आजी॥ ३४ ॥ जे गीता येणें नांवें नावाणिगी। जे अविद्या जिणोनि दाटुगी। ते कीर्ती तुझी आम्हां जोगी। वानावया जाली ॥ ३५ ॥ पैं निर्धना घरीं वानिवसे। महालक्ष्मीचि येऊनि बैसे। तयातें निर्धन ऐसें। म्हणों ये काई॥ ३६ ॥ कां अंधकाराचिया ठाया। दैवें सूर्यु आलिया। तो अंधारुचि जगा यया। प्रकाशु नोहे॥ ३७ ॥ जया देवाची पाहतां थोरी। विश्व परमाणुही दशा न धरी। तो भावाचिये सरोभरी। नव्हेचि काई॥ ३८ ॥ तैसा मी गीता वाखाणीं। हे खपुष्पाची तुरंबणी। परी समर्थें तुवा शिरयाणी। फेडिली ते ॥ ३९ ॥ म्हणौनि तुझेनि प्रसादें। मी गीतापद्यें अगाधें। निरूपीन जी विशदें। ज्ञानदेवो म्हणें ॥ ४० ॥ तरी अध्यायीं पंधरावां। श्रीकृष्णें तया पांडवा। शास्त्रसिद्धांतु आघवा। उगाणिला॥ ४१ ॥ जे वृक्षरूपक परिभाषा। केलें उपाधि रूप अशेषा। सद्वैद्यें जैसें दोषा। अंगलीना॥ ४२ ॥ आणि कूटस्थु जो अक्षरु। दाविला पुरुषप्रकारु। तेणें उपहिताही आकारु। चैतन्या केला॥ ४३ ॥ पाठीं उत्तमपुरुष। शब्दाचें करूनि मिष। दाविलें चोख। आत्मतत्त्व ॥ ४४ ॥ आत्मविषयीं आंतुवट। साधन जें आंगदट। ज्ञान हेंही स्पष्ट। चावळला॥ ४५ ॥ म्हणौनि इये अध्यायीं। निरूप्य नुरेचि कांहीं। आतां गुरूशिष्यां दोहीं। स्नेहो लाहणा॥ ४६ ॥ एवं इयेविषयीं कीर। जाणते बुझावले अपार। परी मुमुक्षु इतर। साकांक्ष जाले ॥ ४७ ॥ त्या मज पुरुषोत्तमा। ज्ञानें भेटे जो सुवर्मा। तो सर्वज्ञु तोचि सीमा। भक्तीचीही॥ ४८ ॥ ऐसें हें त्रैलोक्यनायकें। बोलिलें अध्यायांत श्लोकें। तेथें ज्ञानचि बहुतेकें। वानिलें तोषें॥ ४९ ॥ भरूनि प्रपंचाचा घोंटु। कीजे देखतयाचि देखतां द्रष्टु। स्वानंदसाम्राज्यीं पाटु। बांधिजे जीवा ॥ ५० ॥ येवढेया लाठेपणाचा उपावो। आनु नाहींचि म्हणे देवो। हा सम्यग्ज्ञानाचा रावो। उपायांमाजीं ॥ ५१ ॥ ऐसे आत्मजिज्ञासु जे होते। तिहीं तोषलेनि चित्तें। आदरें तया ज्ञानातें। वोवाळिलें जीवें ॥ ५२ ॥ आतां आवडी जेथ पडे। तयाचि अवसरीं पुढे पुढें। रिगों लागे हें घडे। प्रेम ऐसे॥ ५३ ॥ म्हणौनि जिज्ञासूंचां पैकीं। ज्ञानीं प्रतीती होय ना जंव निकी। तंव योगक्षेमु ज्ञानविखीं। स्फुरेलचि कीं॥ ५४ ॥ म्हणोनि तेंचि सम्यग्ज्ञान। कैसेनि होय स्वाधीन। जालिया वृद्धिजतन। घडेल केवीं॥ ५५ ॥ कां उपजोंचि जें न लाहे। जें उपजलेंही अव्हांटा सूये। तें ज्ञानीं विरुद्ध काय आहे। हें जाणावें कीं ॥ ५६ ॥ मग जाणतया जें विरूं। तयाची वाट वाहती करूं। ज्ञाना हित तेंचि विचारूं। सर्वभावें ॥ ५७ ॥ ऐसा जिज्ञासु तुम्हीं समस्तीं। भावो जो धरिला असे चित्तीं। तो पुरवावया लक्ष्मीपती। बोलिजेल ॥ ५८ ॥ ज्ञानासी सुजन्म जोडे। आपली विश्रांतीही वरी वाढे। ते संपत्तीचे पवाडे। सांगिजेल दैवी ॥ ५९ ॥ आणि ज्ञानाचेनि

कामाकारें । जे रागद्वेषांसि दे थारे । तिये आसुरियेहि घोरे । करील रूप ॥ ६० ॥ सहज इष्टानिष्टकरणी । दोघीचि इया कवतुकिणी । हे नवमाध्यायीं उभारणी । केली होती ॥ ६१ ॥ तेथ साउमा घेयावा उवावो । तंव वोडवला आन प्रस्तावो । तरी तयां प्रसंगें आतां देवो । निरूपीत असे ॥ ६२ ॥ या निरूपणाचेनि नांवें । अध्यायपद सोळावें । लावणी पाहतां जाणावें । मागिलावरी ॥ ६३ ॥ परी हें असो आतां प्रस्तुतीं । ज्ञानाचां हिताहितीं । समर्था संपत्ती । इयाचि दोन्ही ॥ ६४ ॥ जे मुमुक्षुमार्गींची बोळावी । जे मोहरात्रीची धर्मदिवी । ते आधी तंव दैवी । संपत्ती ऐका ॥ ६५ ॥ जेथ एक एकातें पोखी । ऐसे बहुत पदार्थ येकीं । संपादिजती ते लोकीं । संपत्ती म्हणिजे ॥ ६६ ॥ ते दैवी सुख संभवी । तेथ दैवां गुणां येकोपजीवी । जाली म्हणौन दैवी । संपत्ती हे ॥ ६७ ॥

श्रीभगवानुवाच : अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः । दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १ ॥

आतां तयाचि दैवगुणां - । माजी धुरेचा बैसणा । बैसे तया आकर्णा । अभय ऐसें ॥ ६८ ॥ तरी न घालूनि महापुरीं । न घेपे बुडणयाची शियारी । कां रोगु न गणिजे घरीं । पथ्याचिया ॥ ६९ ॥ तैसा कर्माकर्मांचिया मोहरा । उठूं नेदुनि अहंकारा । संसाराचा दरारा । सांडणें येणें ॥ ७० ॥ अथवा ऐक्यभावाचेनि पैसें । दुजे मानूनि आत्मा ऐसें । भयवार्ता देशें । दवडणें जें ॥ ७१ ॥ पाणी बुडऊं ये मिठातें । तंव मीठचि पाणी आतें । तेवीं आपण जालेनि अद्वैतें । नाशे भय ॥ ७२ ॥ अगा अभय येणें नांवें । बोलिजे तें हें जाणावें । सम्यग्ज्ञानाचें आघवें । धांवणें हें ॥ ७३ ॥ आतां सत्त्वशुद्धी जे म्हणिजे । ते ऐसां चिन्हीं जाणिजे । तरी जळे ना विझे । राखोंडी जैसी ॥ ७४ ॥ कां पाडिवां वाढी न मगे । अंवसे तुटी सांडूनि मागें । माजीं अतिसूक्ष्म अंगें । चंद्रु जैसा राहे ॥ ७५ ॥ नातरी वार्षिया सांडिली । ग्रीष्में नाही मांडिली । माजीं निजरूपें निवडली । गंगा जैसी ॥ ७६ ॥ तैसी संकल्पविकल्पाची वोढी । सांडूनि रजतमाची कावडी । भोगितां निजधर्माची आवडी । बुद्धि उरे ॥ ७७ ॥ इंद्रियवर्गें दाखविलिया । विरुद्धा अथवा भलेया । विस्मयो कांहीं केलिया । नुठी चित्ती ॥ ७८ ॥ गांवा गेलिया वल्लभु । पतिव्रतेचा विरहक्षोभु । भलतेसणी हानिलाभु । न मनी जेवीं ॥ ७९ ॥ तेवीं सत्स्वरूप रुचलेपणें । बुद्धी जें ऐसें अनन्य होणें । ते सत्त्वशुद्धी म्हणे । केशिहंता ॥ ८० ॥ आतां आत्मलाभाविखीं । ज्ञानयोगामाजीं एकी । जे आपुलिया ठाकीं । हांवे भरे ॥ ८१ ॥ तेथ सगळिये चित्तवृत्ती । त्यागु करणें ऐशा रीती । निष्कामें पूर्णाहुती । हुताशीं जैसी ॥ ८२ ॥ कां सुकुळीनें आपुली । आत्मजा सत्कुळींचि दिधली । हें असो लक्ष्मी स्थिरावली । मुकुंदीं जैसी ॥ ८३ ॥ तैसेनि विकलेपणें । जे योगज्ञानींच या वृत्तिक होणें । तो तिजा गुण म्हणे । श्रीकृष्णनाथु ॥ ८४ ॥ आतां देहवाचाचित्तें । यथासंपन्नें वित्तें । वैरी जालियाही आर्तातें । न वंचणें जें कां ॥ ८५ ॥ पत्र पुष्प छाया । फळें मूळें धनंजया । वाटेचा न चुके आलिया । वृक्षु जैसा ॥ ८६ ॥ तैसें मनौनि धनवरी । विद्यमानें आल्या अवसरीं । श्रांताचिये मनोहारीं । उपेगा जाणें ॥ ८७ ॥ तयां नांव जाण दान । जें मोक्षनिधानाचें अंजन । हें असो

ऐक चिन्ह । दमाचें तें ॥ ८८ ॥ तरी विषयेंद्रियमिळणी । करूनि घापे वितुटणी । जैसें तोडिजे खड्गपाणी । पारकेया ॥ ८९ ॥ तैसा विषयजातांचा वारा । वाजों नेदिजे इंद्रियद्वारां । इये बांधोनि प्रत्याहारा । हातीं वोपी ॥ ९० ॥ आंतुला चित्ताचे अंगवरी । सांडोनि प्रवृत्ति पळे परबाहेरी । आगी सुयिजे दाहींहि द्वारीं । वैराग्याची ॥ ९१ ॥ श्वासोश्वासाहुनि बहुवसें । व्रतें आचरे खरपुसें । वोसंतिता रात्रिदिवसें । नाराणकु जया ॥ ९२ ॥ पैं दमु ऐसें म्हणिपे । तो हा जाण स्वरूपें । यागार्थुही संक्षेपें । सांगों ऐक ॥ ९३ ॥ तरी ब्राह्मण करुनि धुरे । स्त्रियादिक पैल मेरे । माझारीं अधिकारें । आपुलालेनि ॥ ९४ ॥ जया जे सर्वोत्तम । भजनीय देवताधर्म । ते तेणें यथागम - । विधी यजिजे ॥ ९५ ॥ जैसा द्विज षट्कर्में करी । शूद्र तयातें नमस्कारी । कीं दोहींसिही सरोभरी । निपजे यागु ॥ ९६ ॥ तैसें अधिकारपर्यालोचें । हें यज्ञ करणें सर्वांचें । परी विष फळाशेचें । न घापे माजीं ॥ ९७ ॥ आणि मी कर्ता ऐसा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जावों । ना वेदाज्ञेसि तरी ठावो । होईजे स्वयें ॥ ९८ ॥ अर्जुना एवं संज्ञु । सर्वत्र जाण यज्ञु । कैवल्यमार्गींचा अभिज्ञु । सांगाती हा ॥ ९९ ॥ आतां चेंडुवें भूमी हाणिजे । हें नव्हे तो हाता आणिजे । कीं शेतीं बीं विखुरजे । परि पिकीं लक्ष ॥ १०० ॥ नातरी ठेविलें देखावया । आदर कीजे दिविया । कां शाखा फळें यावया । सिंपिजे मूळ ॥ १ ॥ हें बहु असो आरिसा । आपणपें देखावया जैसा । पुढतपुढती बहुवसा । उटिजे प्रीती ॥ २ ॥ तैसा प्रतिपाद्यु जो ईश्वरु । तो होआवयालागीं गोचरु । श्रुतीचा निरंतरु । अभ्यासु करणें ॥ ३ ॥ तें द्विजांसीच ब्रह्मसूत्र । येरा स्तोत्र कां नाममंत्र । आवर्तणें पवित्र । पावावया तत्त्व ॥ ४ ॥ पार्था गा स्वाध्यावो । बोलिजे तो हा म्हणे देवो । आतां तप शब्दाभिप्रावो । आईक सांगो ॥ ५ ॥ तरी दानें सर्वस्व देणें । वेंचणें तें व्यर्थ करणें । जैसें फळोनि स्वयें सुकणें । औषधींचें जेवीं ॥ ६ ॥ नाना धुपाचा अग्निप्रवेशु । कनकीं तुकाचा नाशु । कां पितृपक्षु पोषिता न्हासु । चंद्राचा जैसा ॥ ७ ॥ तैसा स्वरूपाचिया प्रसरा - । लागीं प्राणेंद्रियशरीरां । आटणी करणें जें वीरा । तेंचि तप ॥ ८ ॥ अथवा अनारिसें । तपाचें रूप जरी असे । तरी जाण जेवीं दुधीं हंसें । सूदली चांचू ॥ ९ ॥ तैसें देहजीवाचिये मिळणी । जो उदयजत सूये पाणी । तो विवेक अंत:करणीं । जागवीजे ॥ ११० ॥ पाहतां आत्मयाकडे । परी बुद्धीचा पैसु सांकडे । सनिद्र स्वप्न बुडे । जागणीं जैसें ॥११ ॥ तैसा आत्मपर्यालोचु । प्रवर्ते जो साचु । तपाचा हा निर्वेचु । धनुर्धरा ॥ १२ ॥ आतां बाळाचां हितीं स्तन्य । जैसें नानाभूतीं चैतन्य । तैसें प्राणिमात्रीं सौजन्य । आर्जव तें ॥ १३ ॥

अहिंसा सत्यमक्रोधस्त्याग: शान्तिरपैशुनम् । दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ २ ॥

आणि जगाचिया सुखोद्देशें । शरीरें वाचा मानसें । राहाटणें तें अहिंसे । रूप जाण ॥ १४ ॥ आतां तीख होऊनी मवाळ । जैसें जातीचें मुकुळ । कां तेज परी शीतळ । शशांकाचें ॥ १५ ॥ शके दावितांचि रोगु फेडूं । आणि जिभे तरी नव्हे कडु । ते वोखदु नाहीं मा घडूं । उपमा कैंची ॥ १६ ॥

तरी मऊपणें बुबुळें । झगडतांही परी नाडळे । एऱ्हवीं फोडी कोंराळें । पाणी जैसें ॥ ७ ॥ तैसें तोडावया संदेह । तीख जैसे कां लोह । श्राव्यत्वें तरी माधुर्य । पायीं घाली ॥ १८ ॥ आइकतां कौतुकें । कानातेंचि निघती मुखें । जें साचारिवेचेनि बिकें । ब्रह्मही भेदी ॥ १९ ॥ किंबहुना प्रियपणें । कोणातेंही झकवूं नेणे । यथार्थ तरी खुपणें । नाहीं कवणा ॥ १२० ॥ एऱ्हवीं गोरी कोर काना गोड । परी साचाचां पाखाळीं कीड । आगीचें करणें उघड । परी जळो तें साच ॥ २१ ॥ कानीं लागतां महुर । अर्थें विभांडी जिव्हार । तें वाचा नव्हे सुंदर । लांवचि पां ॥ २२ ॥ परी अहितीं कोपोनि सोप । लालनीं मऊ जैसें पुष्प । तिये मातेचें स्वरूप । जैसें कां होय ॥ २३ ॥ तैसें श्रवणसुखचतुर । परिणमोनि साचार । बोलणें जें अविकार । तें सत्य येथें ॥ २४ ॥ आतां घालितांही पाणी । जैसी पाषाणी न निघे आणी । का मथिलिया लोणी । कांजी नेदी ॥ २५ ॥ त्वचा पायें शिरीं । हालेयाही फडे न करी । वसंतींही अंबरीं । न होती पुष्पें ॥ २६ ॥ नाना रंभेचेनिही रूपें । शुकीं नुठिजेचि कंदर्पें । कां भस्मीं वन्हि न उद्दीपे । घृतेंही जेवीं ॥ २७ ॥ तेवींचि कुमारु क्रोधें भरे । तैसिया मंत्राचीं बीजाक्षरें । तियें निमित्तेंही अपारें । मीनलिया ॥ २८ ॥ परि धातयाही पाया पडतां । नुठी गतायु पंडुसुता । तैसी नुपजे उपजवितां । क्रोधोर्मी गा ॥ २९ ॥ अक्रोधत्व ऐसें । नांव तें ये दशे । जाण श्रीनिवासें । म्हणितलें तया ॥ १३० ॥ आतां मृत्तिकात्यागें घटु । तंतुत्यागें पटु । त्यजिजे जेवीं वटु । बीजत्यागें ॥ ३१ ॥ कां त्यजुनि भिंतिमात्र । त्यजिजे आघवेंचि चित्र । कां निद्रात्यागें विचित्र । स्वप्नजाळ ॥ ३२ ॥ नाना जळत्यागें तरंग । वर्षात्यागें मेघ । त्यजिजती जैसे भोग । धनत्यागें ॥ ३३ ॥ तेवीं बुद्धिमंती देहीं । अहंता सांडूनि पाहीं । सांडिजे अशेषही । संसारजात ॥ ३४ ॥ तया नांव त्यागु । म्हणे तो यज्ञांगु । हें मानूनि सुभगु । पार्थु पुसे ॥ ३५ ॥ आतां शांतीचें जी लिंग । तें व्यक्त मज सांग । देवो म्हणती चांग । अवधान देईं ॥ ३६ ॥ तरी गिळोनि ज्ञेयातें । ज्ञाता ज्ञानही माघौतें । हारपे निरूतें । ते शांति पैं गा ॥ ३७ ॥ जैसा प्रळयांबूचा उभडु । बुडवूनि विश्वाचा पवाडु । होय आपणपें निबिडु । आपणपांचि ॥ ३८ ॥ मग उगम ओघ सिंधु । हा नुरेचि व्यवहारभेदु । परी जलैक्याचा बोधु । तोही कवणा ॥ ३९ ॥ तैसी ज्ञेया देतां मिठी । ज्ञातृत्वही पडे पोटीं । मग उरे तेंचि किरीटी । शांतीचें रूप ॥ १४० ॥ आता कदर्थवित व्याधी । बळीकरणाचिया आधीं । आपपरु न शोधी । सद्वैद्यु जैसा ॥ ४१ ॥ का चिखलीं रुतली गाये । धडभाकड न पाहे । जो तियेचिया ग्लानी होये । कालाभुला ॥ ४२ ॥ नाना बुडतयातें सकरुणु । न पुसे अंत्यजु कीं ब्राह्मणु । काढूनि राखे प्राणु । हेंचि जाणे ॥ ४३ ॥ कीं महावनीं पापियें । उघडी केली विपायें । ते नेसविल्यावीण न पाहे । शिष्टु जैसा ॥ ४४ ॥ तैसें अज्ञानप्रमादादिकीं । कां प्राक्तनींही सदोखीं । निंद्यत्वाचां सर्वविखीं । खिळिले जे ॥ ४५ ॥ तयां आंगीक आपुलें । देऊनिया भलें । विसरविजती सलें । सलतीं तियें ॥ ४६ ॥ अगा पुढिलाचा दोषु । करूनि आपुलिये दिठी चोखु । मग घापे अवलोकु । तयावरी ॥ ४७ । जैसा पुजूनि देवो

पाहिजे । पेरूनि शेता जाइजे । तोषोनि प्रसादु घेईजे । अतिथीचा ॥ ४८ ॥ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचे उणें । फेडुनियां पाहणें । तयाकडे ॥ ४९ ॥ वांचूनि न विंधिजे वर्मीं । नातुडविजे अकर्मीं । न बोलविजे नामीं । सदोषीं तिहीं ॥ १५० ॥ वरी कोणे एकें उपायें । पडिलें तें उभें होये । तेंचि कीजे परी घाये । नेदावे वर्मीं ॥ ५१ ॥ पैं उत्तमाचियासाठीं । नीच मानिजे किरीटी । हें वांचोनि दिठी । दोषु न घेपे ॥ ५२ ॥ अपैशून्याचें लक्षण । अर्जुना हें फुडें जाण । मोक्ष मार्गींचें सुखासन । मुमुक्षूं हें ॥ ५३ ॥ आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निववितां न कडसी । सानें थोर ॥ ५४ ॥ तैसें दुःखिताचें शिणणें । हिरतां सकणवपणें । उत्तमाधम नेणे । विवंचूं गा ॥ ५५ ॥ पैं जगी जीवनासारिखें । वस्तु अंगवरी उपखे । परी जातें जीवित राखे । तृणाचेंहि ॥ ५६ ॥ तैसें पुढिलाचेनि तापें । कळवळलिये कृपे । सर्वस्वेंसी दिधलें आपणपें । तरी थोडेंचि गमे ॥ ५७ ॥ निम्न भरलिया उणें । पाणी ढळोंचि नेणे । तेवीं श्रांता तोषौनि जाणें । सामोरेया ॥ ५८ ॥ पैं पायीं कांटा नेहटे । तंव व्यथा जीवीं उमटे । तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ॥ ५९ ॥ कां पावो शीतळता लाहे । कीं ते डोळ्यांचिलागीं होये । तैसा परसुखें जाये । सुखावतु ॥ १६० ॥ किंबहुना तृषितालागीं । पाणी आरायिलें असे जगीं । तैसें दुःखितांचां सेलभागीं । जिणें जयाचें ॥ ६१ ॥ तो पुरुषु वीरराया । मूर्तिमंत जाण दया । मी उदयजतांचि तया । ऋणिया लाभें ॥ ६२ ॥ आतां सूर्यासि जीवें । अनुसरलिया राजीवें । परी तें तो न शिवे । सौरभ्य जैसें ॥ ६३ ॥ कां वसंताचिया वाहाणी । आलिया वनश्रीचिया अक्षौहिणी । ते न करीतुचि घेणी । निगाला तो ॥ ६४ ॥ हें असो महासिद्धीसी । लक्ष्मीही आलिया पाशीं । परी महाविष्णु जैसी । गणीचिना ते ॥ ६५ ॥ तैसे ऐहिकींचे कां स्वर्गींचे । भोग पाईक जालिया इच्छेचे । परी भोगावे हें न रुचे । मनामाजीं ॥ ६६ ॥ बहुवें काय कौतुकीं । जीव नोहे विषयाभिलाखी । अलोलुप्त्वदशा ठाउकी । जाण ते हे ॥ ६७ ॥ आतां माशियां जैसें मोहळ । जळचरां जेवीं जळ । कां पक्षियां अंतराळ । मोकळें हें ॥ ६८ ॥ नातरी बाळकोद्देशें । मातेचें स्नेह जैसें । कां वसंतींचा स्पर्शे । मऊ मलयानिळु ॥ ६९ ॥ डोळ्यां प्रियाची भेटी । कां पिलियां कूर्मीची दिठी । तैसी भूतमात्रीं राहटी । मवाळ ते ॥ १७० ॥ स्पर्शें अतिमृदु । मुखीं घेता सुस्वादु । घ्राणासि सुगंधु । उजाळु आंगें ॥ ७१ ॥ तो आवडे तेवढा घेतां । भलतेया विरुद्ध जरी न होतां । तरी उपमे येता । कापूर कीं ॥ ७२ ॥ परी महाभूतें पोटीं वाहे । तेवींचि परमाणूमाजीं सामाये । या विश्वानुसार होये । गगन जैसें ॥ ७३ ॥ काय सांगों ऐसें जिणें । जें जगाचेनि जीवें प्राणें । तया नांव म्हणें । मार्दव मी ॥ ७४ ॥ आतां पराजयें राजा । जैसा कदर्थिजे लाजा । कां मानिया निस्तेजा । निकृष्टास्तव ॥ ७५ ॥ नाना चांडाळमंदिराशीं । अवचटें आलिया संन्यासी । मग लाज होय जैसी । उत्तमा तया ॥ ७६ ॥ क्षत्रिया रणीं पळोनि जाणें । तें कोण साहे लाजिरवाणें । कां वैधव्यें पाचारणें । महासतियेतें ॥ ७७ ॥ रूपसा उदयलें कुष्ट । संभाविता कुटीचें बोट । तया लाजा प्राणसंकट । होय जैसें ॥ ७८ ॥ तैसें औटहातपणें । जें शव

होऊनि जिणें । उपजों उपजों मरणें । नावां नावां ॥ ७९ ॥ तिये गर्भमेदमुसें । रक्तमूत्ररसें । वोंतीव होऊनि असे । तें लाजिरवाणें ॥ १८० ॥ हें बहु असो देहपणें । नांवारूपासि येणें । नाहीं लाजिरवाणें । याहूनि ॥ ८१ ॥ ऐसैसिया अवकळा । घेपे शरीराचा कंटाळा । ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ॥ ८२ ॥ आतां सूत्रतंतु तुटलिया । चेष्टाचि ठाके सायखडिया । तैसी प्राणजयें कर्मेंद्रियां । खुंटे गती ॥ ८३ ॥ की मावळलिया दिनकरु । सरे किरणांचा पसरु । तैसा मनोजयें प्रकारु । बुद्धीन्द्रियांचा ॥ ८४ ॥ एवं मनपवननियमें । होती दाही इंद्रियें अक्षमें । तें अचापल्य वर्में । येणें होय ॥ ८५ ॥

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता । भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

वोखटें मरणाऐसें । तेंही आलें अग्निप्रवेशें । परी प्राणेश्वरोद्देशें । न गणीचि सती ॥ ८६ ॥ तैसें आत्मनाथाचिया आधी । लाऊनि विषयविषाची बाधी । धांवो आवडे पाणधी । शून्याचिये ॥ ८७ ॥ न ठाके निषेधु आड । न पडे विधीची भीड । नुपजेचि जीवीं कोड । महासिद्धीचें ॥ ८८ ॥ ऐसें ईश्वराकडे निज । धांवे आपसया सहज । तयां नांव तेज । आध्यात्मिक तें ॥ ८९ ॥ आतां सर्वही साहातिया गरिमा । गर्वा न ये तेचि क्षमा । जैसें देह वाहोनि रोमा । वाहणें नेणें ॥ १९० ॥ आणि मातलिया इंद्रियांचे वेग । कां प्राचीनें खवळले रोग । अथवा योगवियोग । प्रियाप्रियांचे ॥ ९१ ॥ यया आघवियांचाचि थोरू । एके वेळे आलिया पूरु । तरी अगस्ति कां होऊनि धीरु । उभा ठाके ॥ ९२ ॥ आकाशीं धूमाची रेखा । उठिली बहुवा आगळिका । ते गिळी येकी झुळुका । वारा जेवीं ॥ ९३ ॥ तैसें अधिभूताधिदैवां । अध्यात्मादि उपद्रवां । पातलेया पांडवा । गिळुनि घाली ॥ ९४ ॥ आतां ईश्वरप्राप्तीलागीं । प्रवर्तता ज्ञानयोगीं । धिंवसेयाची आंगीं । उणीव नोहे ॥ ९५ ॥ ऐसें चित्तक्षोभाचां अवसरीं । उचलूनि धैर्या जे चांगावें करी । धृति म्हणिपे अवधारीं । तियेतें गा ॥ ९६ ॥ आतां निर्वाळूनि कनकें । भरिला गांगें पीयूखें । तया कलशाचियासारिखें । शौच असे ॥ ९७ ॥ जें आंगीं निष्काम आचारु । जीवीं विवेकु साचारु । तो सबाह्य घडला आकारु । शुचित्वाचा ॥ ९८ ॥ कां फेडित पाप ताप । पोखीत तीरींचे पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥ ९९ ॥ कां जगाचें आंध्य फेडितु । श्रियेचीं राउळें उघडितु । निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ॥ २०० ॥ तैसी बांधलीं सोडित । बुडालीं काढित । सांकडी फेडीत । आर्तांचिया ॥ १ ॥ किंबहुना दिवसराती । पुढिलांचें सुख उन्नती । आणित आणित स्वार्थीं । प्रवेशिजे ॥ २ ॥ वांचूनि आपुलिया काजालागीं । प्राणिजातांचा अहितभागी । संकल्पाचीही आडवंगी । न करणें जें ॥ ३ ॥ पैं अद्रोहत्व ऐशिया गोष्टी । ऐकसी जिया किरीटी । तें सांगितलें हें दिठी । पाहों ये तैसें ॥ ४ ॥ आणि गंगा शंभूचां माथां । पावोनि संकोचे जेवीं पार्था । तेवीं मान्यपणें सर्वथा । लाजणें जें ॥ ५ ॥ तें हें पुढतपुढती । अमानित्व जाण सुमती । मागां सांगितलेंसे किती । तेंचि तें बोलों

॥ ६ ॥ एवं इहीं सव्विसें । ब्रह्मसंपदा हे वसत असे । मोक्षचक्रवर्तीचें जैसें । अग्रहार होय ॥ ७ ॥ नाना हे संपत्ती दैवी । या गुणतीर्थांची नीच नवी । निर्विण्णसगरांची दैवी । गंगाचि आली ॥ ८ ॥ कीं गुणकुसुमांची माळा । हे घेऊनि मुक्तिबाळा । वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिंवसीत असे ॥ ९ ॥ कीं सव्विसें गुणज्योती । इहीं उजळूनि आरती । गीता आत्मया निपजती । नीरांजना आली ॥ २१० ॥ उगळितीं निर्मळें । गुण इयेंचि मुक्ताफळें । दैवी शुक्तिकळें । गीतार्णवींची ॥ ११ ॥ काय बहु वानूं ऐसी । अभिव्यक्ती ये अपैसी । केलें दैवी गुणराशी । संपत्तिरूप ॥ १२ ॥ आतां दुःखाची आंतुवट वेली । दोषकाट्यांची जरी भरली । तरी निजाभिधानीं घालीं । आसुरी ते ॥ १३ ॥ पैं त्याज्य त्यजावयालागीं । जाणावी जरी अनुपयोगी । तरी ऐका ते चांगी । श्रोत्रशक्ती ॥ १४ ॥ तरी नरकव्यथा थोरी । आणावया दोषीं अघोरीं । मेळु केला ते आसुरी । संपत्ति हे ॥ १५ ॥ नाना विषवर्गु एकवटु । तयां नांव जैसा बासटु । आसुरी संपत्ती हा खोटु । दोषांचा तैसा ॥ १६ ॥

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च । अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ॥ ४ ॥

तरी तयाचि आसुरां । दोषांमाजी जया वीरा । वाडपणाचा डांगोरा । तो दंभु ऐसा ॥ १७ ॥ जैसी आपुली जननी । नग्न दाविलिया जनीं । ते तीर्थचि परी पतनीं । कारण होय ॥ १८ ॥ कां विद्या गुरूपदिष्टा । बोभाइलियां चोहटां । इष्टदा परी अनिष्टा । हेतु होती ॥ १९ ॥ पैं आंगें बुडतां महापूरीं । जे वेगें काढी पैलतीरीं । ते नावचि बांधिलिया शिरीं । बुडवी जैसी ॥ २२० ॥ कारण जें जीविता । तें वानिलें जरी सेवितां । तरी अन्नचि पंडुसुता । होय विष ॥ २१ ॥ तैसा दृष्टादृष्टाचा सखा । धर्मु जाला तो फोकारिजे देखा । तरी तारिता तोचि दोखा - । लागीं होय ॥ २२ ॥ म्हणौनि वाचेचा चौबारा । घातलिया धर्माचा पसारा । धर्मुचि तो अधर्मु होय वीरा । तो दंभु जाणें ॥ २३ ॥ आतां मूर्खाचिये जिभे । अक्षराचा आंबुखा सुभे । आणि तो ब्रह्मसभे । न रिझे जैसा ॥ २४ ॥ कां मादुरी लोकांचा घोडा । गजपतिही मानी थोडा । कां कांटियेवरिलिया सरडा । स्वर्गुही नीच ॥ २५ ॥ तृणाचेनि इंधनें । आगी धांवे गगनें । थिल्लरबळें मीनें । न गणिजे सिंधु ॥ २६ ॥ तैसा माजे स्त्रिया धनें । विद्या स्तुती बहुतें मानें । एके दिवसींचेनि परान्नें । अल्पकु जैसा ॥ २७ ॥ अभ्रच्छायेचिया जोडी । निदैवु घर मोडी । मृगांबु देखोनि फोडी । पाणियाडें मूर्ख ॥ २८ ॥ किंबहुना ऐसैसें । उतणें जें संपत्तिमिसें । तो दर्पु गा अनारिसें । न बोलें घेईं ॥ २९ ॥ आणि जगा वेदीं विश्वासु । आणि विश्वासीं पूज्य ईशु । जगीं एक तेजसु । सूर्यचि हा ॥ २३० ॥ जगस्पृहे आस्पद । एक सार्वभौमपद । न मरणें निर्विवाद । जगा पढियें ॥ ३१ ॥ म्हणौनि जरी उत्साहें । यातें वानूं जाये । कीं तें आइकोनि मत्सरु वाहे । फुगों लागे ॥ ३२ ॥ म्हणे ईश्वरातें खायें । तया वेदा विष सूयें । गौरवामाजीं त्राये । भंगीत असे ॥ ३३ ॥ पतंगा नावडे ज्योती । खद्योता भानूची खंती । कां टिटिभेनें अपांपती । वैरी केला ॥ ३४ ॥ तैसा अहंनामाचेनि मोहें । ईश्वराचें नामही न

साहे । वेदातें म्हणे मज हे । सवती जाली ॥ ३५ ॥ ऐसा मान्यतेचा पुष्टगंडु । तो अभिमानी परमलंडु । रौरवाचा रूदु । मार्गुचि तो हा ॥ ३६ ॥ आणि पुढिलांचें सुख । देखणियाचें होय मिख । चढे क्रोधाचें विख । मनोवृत्ती ॥ ३७ ॥ शीतळाचिये भेटी । तातला तेलीं आगी उठी । चंद्रु देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ॥ ३८ ॥ विश्वाचें आयुष्य जेणें उजळे । तो सूर्यु उदैला देखोनि सवळे । पापिया फुटती डोळे । डडूळाचे ॥ ३९ ॥ जगाची सुखपहांट । चोरां मरणाहूनि निकृष्ट । दुधाचें काळकुट । होय व्याळीं ॥ २४० ॥ अगाधें समुद्रजळें । प्राशितां अधिकें जळे । वडवाग्नि न मिळे । शांति कहीं । ४१ ॥ तैसा विद्याविनोदविभवें । देखे पुढिलांचीं दैवें । तंव तंव रोषु दुणावे । क्रोधु तो जाण ॥ ४२ ॥ आणि मन सर्पाची कुटी । डोळे नाराचांची सुटी । बोलणें ते वृष्टी । इंगळांची ॥ ४३ ॥ येर जें क्रियाजात । तें तिखयाचें कर्वत । ऐसें सबाह्य खसासित । जयाचें गा ॥ ४४ ॥ तो मनुष्यांत अधमु जाण । पारुष्याचें अवतरण । आतां आइक खुण । अज्ञानाची ॥ ४५ ॥ तरी शीतोष्णस्पर्शा । निवाडु नेणे पाषाणु जैसा । कां रात्री आणि दिवसा । जात्यंधु तो ॥ ४६ ॥ आगी उठिला आरोगणें । जैसा खाद्याखाद्य न म्हणे । कां परिस पाडु नेणे । सोनया लोहा ॥ ४७ ॥ नातरी नानारसीं । रिघोनि दर्वी जैसी । परी रसस्वादासी । नेणो जेवीं ॥ ४८ ॥ कां वारा जैसा पारखी । नव्हेचि गा मार्गामार्गाविखीं । तैसें कृत्याकृत्यविवेकीं । अंधपण जें ॥ ४९ ॥ हें चोख हें मैळ । ऐसें नेणोनियां बाळ । देखे तें कवळ । मुखींचि घाली ॥ २५० ॥ तैसें पापपुण्याचें खिचटें । करोनि खातां बुद्धिचेष्टे । कडु महुर न वाटे । ऐसी जे दशा ॥ ५१ ॥ तिये नाम अज्ञान । या बोला नाहीं आन । एवं साही दोषांचें चिन्ह । सांगितलें ॥ ५२ ॥ इहींच साही दोषांगीं । हे आसुरी संपत्ति दाटुगी । जैसें थोर विषय सुभगे अंगीं । अंग सानें ॥ ५३ ॥ कां तिघां वन्हींची पांती । पाहतां थोडे ठाय गमती । परी विश्वही प्राणाहुती । करूं न पुरे ॥ ५४ ॥ धातयाही गेलिया शरण । त्रिदोषीं न चुके मरण । तया तिहींची दुणी जाण । साही दोष हे ॥ ५५ ॥ इही साही दोषीं संपूर्णीं । जाली इयेचि उभारणी । म्हणोनि आसुरी उणी । संपदा नव्हे ॥ ५६ ॥ परी क्रूरग्रहांची जैसी । मांदी मिळे एकेचि राशी । कां येती निंदकापासीं । अशेष पापें ॥ ५७ ॥ मरणाराचें आंग । पडिघाती आघवे रोग । कां कुमुहूर्ती दुर्योग । एकवटती ॥ ५८ ॥ कां आयुष्य जातिये वेळे । शेळिये सातवेउळि मिळे । तैसे साही दोष सगळे । जोडती तया ॥ ५९ ॥ विश्वासला आतुडवीजे चोरा । शिणला सुइजे महापुरा । तैसें दोषी इहीं नरा । अनिष्ट कीजे ॥ २६० ॥ मोक्षमार्गाकडे । जै यांचा आंबुखा पडे । तैं न निघेचि ऐसें म्हणौनि बुडे । संसारी तो ॥ ६१ ॥ अधमां योनींचा पाउटीं । उतरत जो किरीटी । स्थावरांहीं तळवटीं । बैसणें घे ॥ ६२ ॥ हें असो तयाचां ठायीं । मिळोनि साही दोषीं इहीं । आसुरी संपत्ति पाहीं । वाढविजे ॥ ६३ ॥ ऐसिया या दोनी । संपदा प्रसिद्धा जनीं । सांगितलिया चिन्हीं । वेगळालां ॥ ६४ ॥

दैवी सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता । मा शुचः सम्पदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव ॥ ५ ॥

इया दोन्हींमाजीं पहिली । दैवी जे म्हणितली । ते मोक्षसूर्ये पाहली । उखाचि जाण ॥ ६५ ॥ येरी जे दुसरी । संपत्ति कां आसुरी । ते मोहलोभाची खरी । सांखळी जीवां ॥ ६६ ॥ परि हें आइकोनि झणें । भय घेसी हो मनें । काय रात्रीचा दिने । धाकु धरिजे ॥ ६७ ॥ हे आसुरी संपत्ति तया । बंधालागी धनंजया । जो साही दोषां ययां । आश्रो होये ॥ ६८ ॥ तूं तंव पांडवा । सांगितलेया दैवा । गुणनिधी बरवा । जन्मलासी ॥ ६९ ॥ म्हणौनि पार्था तूं या । दैवी संपत्ती स्वामिया । होऊनि यावें उवाया । कैवल्याचिया ॥ २७० ॥

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च । दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥

आणि दैवां आसुरां । संपत्तिवंतां नरां । अनादिसिद्ध उजरा । राहाटीचा आहे ॥ ७१ ॥ जैसें रात्रीचां अवसरीं । व्यापारिजे निशाचरीं । दिवसा सुव्यवहारीं । मनुष्यादिकीं ॥ ७२ ॥ तैसिया आपुलालिया रहाटीं । वर्तती दोनी सृष्टी । दैवी आणि किरीटी । आसुरी येथ ॥ ७३ ॥ तेवींचि विस्तारूनि दैवी । ज्ञानकथनादि प्रस्तावीं । मागील ग्रंथीं बरवी । सांगितली ॥ ७४ ॥ आतां आसुरी जे सृष्टि । तेथिंची उपलऊं गोठी । अवधानाची दिठी । दे पां निकी ॥ ७५ ॥ तरी वाद्यें‌वीण नादु । नेदी कवणाही सादु । कां अपुष्पीं मकरंदु । न लभे जैसा ॥ ७६ ॥ तैसी प्रकृति हे आसुर । एकली नोव्हे गोचर । जंव एखाधें शरीर । माल्हाती ना ॥ ७७ ॥ मग आविष्कारला लांकुडें । पावकु जैसा जोडे । तैसी प्राणिदेहीं सांपडें । आटोपली हे ॥ ७८ ॥ ते वेळीं जे वाढी ऊंसा । तेचि आंतुला रसा । देहाकारु होय तैसा । प्राणियांचा ॥ ७९ ॥ आतां तयांचि प्राणियां । रूप करूं धनंजया । घडले जे आसुरीया । दोषवृद्धी ॥ २८० ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः । न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥

तरी पुण्यालागीं प्रवृत्ती । कां पापाविषयीं निवृत्ती । या जाणणेयाची राती । तयांचें मन ॥ ८१ ॥ निगणेया आणि प्रवेशा । चित्त नेदीतु आवेशा । कोशकिटु जैसा । जाचिन्नला पैं ॥ ८२ ॥ कां दिधलें मागुती येईल । कीं न ये हें पुढील । न पाहातां दे भांडवल । मूर्ख चोरां ॥ ८३ ॥ तैसिया प्रवृत्ति निवृत्ति दोनी । नेणिजती आसुरीं जनीं । आणि शुचित्व स्वप्नीं । न देखती ते ॥ ८४ ॥ काळिमा सांडील कोळसा । वरी चोखी होईल वायसा । राक्षसही मांसा । विटों शके ॥ ८५ ॥ परी आसुरां प्राणियां । शौच नाहीं धनंजया । पवित्रत्व जेवीं भांडियां । मद्याचिया ॥ ८६ ॥ वाढविती विधीची आस । का पाहाती वडिलांचीं वास । आचाराची भाष । नेणतीचि ते ॥ ८७ ॥ जैसें चरणें शेळियेचें । कां धांवणें वारियाचें । जाळणें आगीचें । भलतेउतें ॥ ८८ ॥ तैसें पुढां सूनि स्वैर । आचरती ते आसुर । सत्येंसि वैर । सदाचि तया ॥ ८९ ॥ जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया । तरी साचा बोलिया । बोलती ते ॥ २९० ॥ अपानाचेनि तोंडें । जरी सुगंधा येणें घडे । तरी सत्य तयां जोडे । आसुरांतें ॥ ९१ ॥ ऐसे ते न करितां कांहीं । आंगेंचि वोखटे पाहीं । आतां बोली ते नवाई । सांगिजेल ॥ ९२ ॥ एन्हवीं करेयाचां ठायीं चांग । तें तयासि कैचें

नीट आंग । तैसा आसुरांचा प्रसंग । प्रसंगें परिस ॥ ९३ ॥ उधवणीचें जेवीं तोंड । उगळी धुंवाचे उभड । हें जाणिजे तेवीं उघड । सांगों ते बोल ॥ ९४ ॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् । अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥

तरी विश्व हा अनादि ठावो । येथ नियंता ईश्वररावो । चावडिये न्यावो अन्यावो । निवडी वेदु ॥ ९५ ॥ वेदीं अन्यायी पडे । तो निरयभोगें दंडे । संन्यायी तो सुरवाडे । स्वर्गीं जिये ॥ ९६ ॥ ऐसी हे विश्वव्यवस्था । अनादि जे पार्था । इयेतें म्हणती ते वृथा । आवघेंचि हें ॥ ९७ ॥ यज्ञमूढ ठकिले यागीं । देवपिसे प्रतिमालिंगी । नागविले भगवे योगी । समाधिभ्रमें ॥ ९८ ॥ तेथ आपलेनि बळें । भोगिजे जें जें वेंटाळें । हें वाचोनि कें वेगळें । पुण्य आहे ॥ ९९ ॥ ना अशक्तपणें आंगिकें । वेगळवेंटाळी न टके । ऐसा गादिजे वीण विषयसुखें । तेंचि पाप ॥ ३०० ॥ प्राण घेपती संपन्नांचे । तें पाप जरी साचें । तरी सर्वस्व हाता ये तयांचें । हें पुण्यफळ कीं ॥ १ ॥ बळी अबळातें खाय । हेंचि बाधित जरी होय । तरी मासया कां न होय । निसंतान ॥ २ ॥ आणि कुळें शोधूनि दोन्ही । कुमारेंचि शुभलग्नीं । मेळवीजती प्रजासाधनीं । हेतु जरी ॥ ३ ॥ तरी पशुपक्ष्यादि जाती । जया मिती नाही संतती । तया कोणें प्रतिपत्ती विवाह केले ॥ ४ ॥ चोरियेचें धन आलें । तरी तें कोणासि विष जालें । वालभें परद्वार केलें । कोढी कोणी होय ॥ ५ ॥ म्हणोनि देवो गोसावी । तो धर्माधर्मु भोगवी । आणि परत्राचां गांवीं । करी तो भोगी ॥ ६ ॥ परी परत्र ना देवो । न दिसे म्हणोनि तें वावो । आणि कर्ता निमे मा ठावो । भोग्यासी कवणु ॥ ७ ॥ येथ उर्वशिया इंद्र सुखी । जैसा कां स्वर्गलोकीं । तैसाचि कृमिही नरकीं । लोळतु श्लाघे ॥ ८ ॥ म्हणोनि नरक स्वर्गु । नव्हे पापापुण्यभागु । जे दोहीं ठायीं सुखभोगु । कामाचाचि तो ॥ ९ ॥ याकारणें कामें । स्त्रीपुरुषयुग्में । मिळती तेथ जन्मे । आघवें जग ॥ ३१० ॥ आणि जें जें अभिलाषें । स्वार्थालागीं हें पोषे । पाठीं परस्परें द्वेषें । कामचि नाशी ॥ ११ ॥ एवं कामावांचूनि कांही । जगा मूळचि आन नाहीं । ऐसें बोलती पाहीं । आसुर ते ॥ १२ ॥ आतां असो हें किडाळ । बोली न करूं पघळ । सांगतांचि सफोल । होतसे वाचा ॥ १३ ॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः । प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥ ९ ॥

आणि ईश्वराचिया खंती । नुसधियाचि करिती चांथी । हेंही नाहीं चित्तीं । निश्चयो एकु ॥ १४ ॥ किंबहुना उघड । अंगीं भरूनियां पाखांड । नास्तिकपणाचें हाड । रोंविलें जीवीं ॥ १५ ॥ ते वेळीं स्वर्गालागी आदरु । कां नरकाचा अडदरु । या वासनांचा अंकुरु । जळोनि गेला ॥ १६ ॥ मग केवळ ये देहखोडां । अमेध्योदकाचा बुडबुडा । विषयपंकीं सुहाडा । बुडाले गा ॥ १७ ॥ जैं आटावे होती जळचर । तैं डोहीं मिळती ढीवर । कां पडावें होय शरीर । तैं रोगा उदयो ॥ १८ ॥ उदैजणें केतूचें जैसें । विश्वा अनिष्टाचि दोषें । जन्मती ते तैसे । लोकां आटूं ॥ १९ ॥ विरूढलिया अशुभ । फुटती तैं तें कोंभ । पापाचे कीर्तिस्तंभ । चालते ते ॥ ३२० ॥ आणि मागां पुढां

जाळणें । वांचूनि आगी कांहीं नेणे । तैसें विरुद्धचि एक करणें । भलतेयां ॥ २१ ॥ परी तेंचि गा करणें । आदरिती संभ्रमें जेणें । तो आइक पार्था म्हणे । श्रीनिवासु ॥ २२ ॥

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः । मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ॥ १० ॥

तरी जाळ पाणियें न भरे । आगी इंधन न पुरे । तयां दुर्भरांचिये धुरे । भुकाळु जो ॥ २३ ॥ तया कामाचा वोलावा । जीवीं धरुनिया पांडवा । दंभमानाचा मेळावा । मेळविती ॥ २४ ॥ मातलिया कुंजरा । आगळी जाली मदिरा । तैसा मदाचा ताठा तंव जरा । चढतां आंगीं ॥ २५ ॥ आणि आग्रहाचा तोचि ठावो । वरि मौढ्याऐसा सावावो । मग काय वानूं निर्वाहो । निश्चयाचा ॥ २६ ॥ जिहीं परोपतापु घडे । परावा जीवु रगडे । तिहीं कर्मीं होऊनि गाढे । जन्मवृत्ती ॥ २७ ॥ मग आपुलें केलें फोकारिती । आणि जगातें धिक्कारिती । दाहीं दिशीं पसरिती । स्पृहाजाळ ॥ २८ ॥ ऐसेनि गा आटोपें । थोरिये आणती पापें । धर्मधेनु खुरपे । सुटलें जैसें ॥ २९ ॥

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः । कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

याचि येका आयती । तयाचिया कर्मप्रवृत्ती । आणि जिणियाही परौती । वाहती चिंता ॥ ३३० ॥ पाताळाहूनि निम्न । जियेचिये उंचिये सानें गगन । जें पाहतां त्रिभुवन । अणुही नोहे ॥ ३१ ॥ ते योगपटाची मवणी । जीवीं अनियम चिंतवणी । जे सांडुं नेणे मरणीं । वल्लभा जैसी ॥ ३२ ॥ तैसी चिंता अपार । वाढविती निरंतर । जीवीं सूनि असार । विषयादिक ॥ ३३ ॥ स्त्रिया गाइलें आइकावें । स्त्रीरूप डोळां देखावें । सर्वेंद्रियीं आलिंगावें । स्त्रियेतेंचि ॥ ३४ ॥ कुरवंडी कीजे अमृतें । ऐसें सुख स्त्रियेपरौतें । नाहींचि म्हणौनि चित्तें । निश्चयो केला ॥ ३५ ॥ मग तयाचि स्त्रीभोगा - । लागीं पाताळस्वर्गा - । धांवती दिग्विभागा - । परौतेही ॥ ३६ ॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः । ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ॥ १२ ॥

आमिषकवळु थोरी आशा । न विचारितां गिळी मासा । तैसें कीजे विषयाशा । तयांसि गा ॥ ३६ ॥ वांछित तंव न पवती । मग कोरडियेची आशेची संतती । वाढऊं वाढऊं होती । कोशकिडे ॥ ३८ ॥ आणि पसरिला अभिलाषु । अपूर्णु होय तोचि द्वेषु । एवं कामक्रोधांहूनि अधिकु । पुरुषार्थु नाहीं ॥ ३९ ॥ दिहा खोलणें रात्रीं जागोवा । ठाणांतरियां जैसा पांडवा । अहोरात्रींही विसांवा । भेटेचिना ॥ ३४० ॥ तैसे उंचौनि लोटिले कामें । नेहटती क्रोधाचिये ढेमे । तरी रागद्वेष प्रेमें । न माती केंही ॥ ४१ ॥ तेंविंचि जीवींचिया हांवा । विषयवासनांचा मेळावा । केला परी तो भोगावा । अर्थें की ना ॥ ४२ ॥ म्हणोनि भोगावयाजोगा । पुरता अर्थु पैं गा । आणावया जगा । झोंबती सैरा ॥ ४३ ॥ एकातें साधूनि मारिती । एकाचि सर्वस्वें हरिती । एकालागीं उभारिती । अपाययंत्रें ॥ ४४ ॥ पाशिकें पोतीं वागुरा । सुणीं ससाणें चिकाटी खोंचरा । घेऊनि निघती डोंगरा । पारधी जैसे ॥ ४५ ॥ ते पोसावया पोट । मारूनि प्राणियांचे संघाट । आणिती ऐसें निकृष्ट । तेंही करिती ॥ ४६ ॥

परप्राणघातें । मेळविती वित्तें । मिनलयां चित्तें । तोषणें कैसें ॥ ४७ ॥

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् । इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १३ ॥

म्हणे आजि मियां । संपत्ति बहुतेकांचिया । आपुला हातीं केलिया । धन्यु ना मी ॥ ४८ ॥ ऐसा श्लाघों जंव जाये । तंव मन आणीकही वाहे । सवेंचि म्हणे पाहे । आणिकांचेंही आणूं ॥ ४९ ॥ हें जेतुलें असे जोडिलें । तयाचेनि भांडवलें । लाभा घेईन उरलें । चराचर हें ॥३५० ॥ ऐसेनि धना विश्वाचिया । मीचि होईन स्वामिया । मग दिठी पडे तया । उरों नेदी ॥ ५१ ॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि । ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ १४ ॥

हे मारिले वैरी थोडे । आणीकही साधीन गाढे । मग नांदेन पवाडें । येकलाचि मी ॥ ५२ ॥ माझीं होतील कामारीं । तियेंवाचूनि येरें मारी । किंबहुना चराचरीं । ईश्वरु तो मी ॥ ५३ ॥ मी भोगभूमीचा रावो । आजि सर्वसुखासी ठावो । म्हणोनि इंद्रुही वावो । मातें पाहुनि ॥ ५४ ॥ मी मनें वाचा देहें । करीं तें कैसें नोहे । कें मजवाचूनि आहे । आज्ञासिद्ध आन ॥ ५५ ॥ तंवचि बळिया काळु । जंव न दिसें मी अतुर्बळु । सुखाचा कीर निखळु । रासिवा मीचि ॥ ५६ ॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया । यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

कुबेरु आथिला होये । परी तो नेणे माझी सोये । संपत्ती मजसम नव्हे । श्रीनाथाही ॥ ५७ ॥ माझिया कुळाचा उजाळु । कां जातिगोतांचा मेळु । पाहतां ब्रह्माही हळु । उणाचि दिसे ॥ ५८ ॥ म्हणोनि मिरविती नांवें । वायां ईश्वरादि आघवे । नाहीं मजसीं सरी पावे । ऐसे कोण्ही ॥ ५९ ॥ आतां लोपला अभिचारु । त्याचा करीन मी जीर्णोद्धारु । प्रतिष्ठीन परमारु । यागवरी ॥ ३६० ॥ मातें गाती वानिती । नटनाचें रिझविती । तयां देईन मागती । ते ते वस्तु ॥ ६१ ॥ माजिरां अन्नपानीं । प्रमदांचां आलिंगनीं । मी होईन त्रिभुवनीं । आनंदाकारु ॥ ६२ ॥ काय बहु सांगो ऐसे । ते आसुरीप्रकृतीपिसें । तुरंबिती असोसें । गननौळें तियें ॥ ६३ ॥

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः । प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

ज्वराचेनि आटोपें । रोगी भलतैसें जल्पे । चावळती संकल्पें । जाण ते तैसे ॥ ६४ ॥ अज्ञान आतले धुळी । म्हणौनि आशा वाहटुळी । भोवंडीजती अंतराळीं । मनोरथांचां ॥ ६५ ॥ अनियम आषाढमेघ । कां समुद्रोर्मी अभंग । तैसे कामिती अनेग । अखंड काम ॥ ६६ ॥ मग पैं कामनाचि तयां । जीवीं जाल्या वेलरिया । वोरपिलीं कांटिया । कमळें जैसीं ॥ ६७ ॥ कां पाषाणाचिया माथां । हांडी फुटली पार्था । जीवी तैसे सर्वथा । कुटके जाले ॥ ६८ ॥ तेव्हा चढतिये रजनी । तमाची होय पुरवणी । तैसा मोहो अंतःकरणीं । वाढोंचि लागे ॥ ६९ ॥ आणि वाढे जंव जंव मोहो । तंव तंव विषयीं राहो । विषय तेथ ठावो । पातकांसी ॥ ३७० ॥ पापें आपलेनि थांवें । जंव करिती मेळावे । तंव जिताचि आघवे । येती नरका ॥ ७१ ॥ म्हणौनि गा सुमती । जे कुमनोरथां पाळिती । ते असुर येती वस्ती । तया ठाया ॥ ७२ ॥ जेथ असिपत्र

तरुवर। खदिरांगाराचें डोंगर। तातलां तेलीं सागर। उतताती॥ ७३॥ जेथ यातनांची श्रेणीं। हे नित्य नवी यमजाचणी। पडती तिये दारुणीं। नरकलोकीं॥ ७४॥ ऐसे नरकाचिया सेले। भागीन जे जे जन्मले। तेही देखों भुलले। यजिती यागीं॥ ७५॥ एन्हवीं यागादिक क्रिया। लाहणें तेंचि धनंजया। परी विफळती आचरोनियां। नाटकी जैसे॥ ७६॥ वल्लभाचिया उजरिया। आपणया पति कुस्त्रिया। जोडोनि तोषिती जैसिया। अहेवपणें॥ ७७॥

आत्मसम्भाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः। यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्॥ १७॥

तैसें आपणया आपण। मानिता महंतपण। फुगती असाधारण। गर्वें तेणें॥ ७८॥ मग लवों नेणती कैसे। आटिवा लोहाचे खांब जैसे। कां उधवले आकाशे। शिळाराशी॥ ७९॥ तैंसें आपुलिये बरवे। आपणाचि रिझतां जीवें। तृणाहीहूनि आघवें। मानिती नीच॥ ३८०॥ वरी धनाचिया मदिरा। माजूनि धनुर्धरा। कृत्याकृत्यविसरा। सवतें केलें॥ ८१॥ जया आंगी आयती ऐसी। तेथ यज्ञाची गोठी कायसी। तरी काय काय पिसीं। न करिती गा॥ ८२॥ म्हणौनि कोणे एके वेळे। मौढ्यमद्याचेनि बळें। यागाचींही टवाळें। आदरिती॥ ८३॥ ना कुंड मंडप वेदी। ना उचित साधनसमृद्धी। आणि तयांसि तंव विधी। द्वंद्वचि सदा॥ ८४॥ देवां ब्राह्मणांचेनि नांवें। आडवारेनहि नोहावें। ऐसें आथी तेथ यावें। लागे कवणा॥ ८५॥ पैं वासरुवाचा भोकसा। गाईपुढें ठेवूनि जैसा। उगाणा घेती क्षीररसा। बुद्धिवंत॥ ८६॥ तैसें यागाचेनि नांवें। जग वाऊनि हांवे। नागविती आघवें। अहेरावरी॥ ८७॥ ऐशा कांहीं आपुलिया। होमिती जे उजरिया। तेणें कामिती प्राणिया। सर्वनाशु॥ ८८॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः। मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः॥ १८॥

मग पुढां भेरी निशाण। लाउनी ते दीक्षितपण। जगीं फोकारिती आपण। वावो वावो॥ ८९॥ तेव्हां महत्त्वें तेणें अधमां। गर्वा चढे महिमा। जैसे लेवे दिधले तमा। काजळाचे॥ ३९०॥ तैसें मोढ्य घणावे। औद्धत्य उंचावे। अहंकारु दुणावे। अविवेकुही॥ ९१॥ मग दुजयाची भाष। नुरवावया विशेष। बळीयेपणा अधिक। होय बळ॥ ९२॥ ऐसा अहंकार बळा। जालिया एकवळा। दर्पसागरु वेळा। सांडुनि उते॥ ९३॥ मग वोसंडिलेनि दर्पें। कामाही पित्त कुरुपे। तया धगीं सैंघ पळिपे। क्रोधाग्नि तो॥ ९४॥ तेथ उन्हाळा आगी खरमरा। तेला तुपाचिया कोठारा। लागला आणि वारा। सुटला जैसा॥ ९५॥ तैसा अहंकारु बळा आला। दर्पु कामक्रोधीं गुढला। या दोहोंचा मेळु जाला। जयांचां ठायीं॥ ९६॥ ते आपुलियासवेशा। मग कोणी कोणी हिंसा। या प्राणियांतें वीरेशा। न साधिती गा॥ ९७॥ पहिलें तंव धनुर्धरा। आपुलिया मांसरुधिरा। वेंचु करिती अभिचारा-। लागोनियां॥ ९८॥ तेथ जाळिती जियें देहें। यांमाजीं जो मी आहें। तया आत्मया मज घाये। वाजती ते॥ ९९॥ आणि अभिचारकीं तिहीं। उपद्रविजे जेतुलें कांही। तेथ चैतन्य मी पाहीं। शीणु पावें॥ ४००॥ आणि अभिचारावेगळें।

विपायें जें अवगळे । तया टाकिती इटाळें । पैशुन्याचीं ॥ १ ॥ सती आणि सत्पुरुष । दानशीळ याज्ञिक । तपस्वी अलौकिक । संन्यासी जे ॥ २ ॥ कां भक्त हन महात्मे । इयें माझीं निजाचीं धामें । निर्वाळलीं होमधर्में । श्रौतादिकीं ॥ ३ ॥ तयां द्वेषाचेनि काळकूटें । बासटोनि तिखटें । कुबोलांची सदटें । सूति कांडें ॥ ४ ॥

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् । क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १९ ॥

ऐसे आघवांचि परीं । प्रवर्तले माझां वैरीं । तरी तयां पापियां जें मी करीं । तें आइक पां ॥ ५ ॥ तरी मनुष्यदेहाचा तागा । घेऊनि रुसती जे जगा । पदवी हिरोनि पैं गा । ऐसें ठेवीं ॥ ६ ॥ जे क्लेशगांवींचा उकरडा । भवपुरींचा पानवडा । ते तमोयोनि तयां मूढां । वृत्तीचि दें ॥ ७ ॥ मग आहाराचेनि नांवें । तृणही जेथ नुगवे । ते व्याघ्रवृश्चिक आडवे । तैसिये करीं ॥ ८ ॥ तेथ क्षुधादुःखे बहुतें । तोडूनि खाती आपणयातें । मरमारों मागुतें । होतचि असती ॥ ९ ॥ कां आपलां गरळजाळीं । जळतया आंगाचीं पेंदळी । ते सर्पचि करीं बिळीं । निरूंधला ॥ ४१० ॥ परी घेतला श्वासु घापे । येतुलेनही मापें । विसांवा तयां नाटोपे । दुर्जनांसी ॥ ११ ॥ ऐसेनि कल्पांचिया कोडी । गणितांही संख्या थोडी । तेतुला वेळु न काढीं । क्लेशौनि तयां ॥ १२ ॥ तरी तयांसी जेथ जाणें । तेथिंचें हें पहिलें पेणें । तें पावोनि येरें दारुणें । न होती दुःखें ॥ १३ ॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि । मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥ २० ॥

हा ठायवरी । संपत्ति ते आसुरी । अधोगती अवधारीं । जोडिली तिहीं ॥ १४ ॥ पाठीं व्याघ्रादि तामसा । योनी तो अळुमाळु ऐसा । देहाधाराचा उसासा । आथी जो ही ॥ १५ ॥ तोही मी वोल्हावा हिरें । मग तमचि होती एकसरें । जेथें गेलें आंधारें । काळवंडैजे ॥ १६ ॥ जयाची पापा चिळसी । नरक घेती विवसी । शीण जाय मूर्च्छी । शीणें जेणें ॥ १७ ॥ मळु जेणें मैळे । तापु जेणें पोळे । जयाचेनि नांवें सळे । महाभय ॥ १८ ॥ पापा जयाचा कंटाळा । उपजे अमंगळ अमंगळा । विटाळुहि विटाळा । बिहे जया ॥ १९ ॥ ऐसें विश्वाचेया वोखटेया । अधम जे धनंजया । तें ते होती भोगूनियां । तामसा योनि ॥ ४२० ॥ अहा सांगतां वाचा रडे । आठवितां मन खिरडे । कटारें मूर्खीं केवढे । जोडिले निरय ॥ २१ ॥ कायिसया ते असुर । संपत्ति पोषिती वाउर । जिया दिधलें घोर । पतन ऐसें ॥ २२ ॥ म्हणोनि तुवां धनुर्धरा । नोहावें गा तिया मोहरा । जेउता वासु आसुरा । संपत्तिवंता ॥ २३ ॥ आणि दंभादि दोष साही । हे संपूर्ण जयांचां ठायीं । ते त्यजावे हें काई । म्हणों कीर ॥ २४ ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ २१ ॥

परी काम क्रोध लोभ । या तिहींचेचि थोंब । थांवे तेथें अशुभ । पिकलें जाण ॥ २५ ॥ सर्व दुःखीं आपुलिया । दर्शना धनंजया । पाढाऊ हे भलतेया । दिधले आहाती ॥ २६ ॥ कां पापियां नरकभोगीं । सुवावयालागीं जगीं । पातकांची दाटुगी । सभाचि हे ॥ २७ ॥ ते रौरव गा

तंवचिवरी । आइकिजती पटांतरीं । जंव हे तिन्ही अंतरीं । उठती ना ॥ २८ ॥ अपाय इहीं आसलग । यातना इहीं सवंग । हाणी हाणी नोहे हे तिघ । हेचि हाणी ॥ २९ ॥ काय बहु बोलों सुभटा । सांगितलिया निकृष्टा । नरकाचा दारवंटा । त्रिशंकु हा ॥ ४३० ॥ या कामक्रोधलोभां- । माजीं जीवें जो होय उभा । तो निरयपुरीची सभा । सन्मानु पावे ॥ ३१ ॥ म्हणौनि पुढतपुढती किरीटी । हे कामादिदोषत्रिपुटी । त्यजावीचि गा वोखटी । आघवां विषीं ॥ ३२ ॥

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः । आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥

धर्मादिकां चौंहीआंतु । पुरुषार्थांचि तैंचि मातु । करावी जैं संघातु । सांडील हा ॥ ३३ ॥ हे तिन्ही जीवीं जंव जागती । तंववरी निकियाची प्राप्ती । हे माझे कान नाइकती । देवोही म्हणे ॥ ३४ ॥ जया आपणपें पढिये । आत्मनाशा जो बिहे । तेणें न धरावी हे सोये । सावधा होइजे ॥ ३५ ॥ पोटीं बांधोनि पाषाण । समुद्रीं बाहीं आंगवण । कां जियावया जेवण । काळकूटाचें ॥ ३६ ॥ इहीं कामक्रोधलोभेंसी । कार्यसिद्धि जाण तैसी । म्हणोनि ठावोचि पुसीं । ययांचा गा ॥ ३७ ॥ जैं कहीं अवचटें । हे तिकडी सांखळ तुटे । तैं सुखें आपुलिये वाटे । चालों लाभे ॥ ३८ ॥ त्रिदोषीं सांडिलें शरीर । त्रिकुटीं फिटलिया नगर । त्रिदाह निमालिया अंतर । जैसें होय ॥ ३९ ॥ तैसा कामादिकीं तिघीं । सांडिला सुख पावोनि जगीं । संगु लाहे मोक्षमार्गीं । सज्जनांचा ॥ ४४० ॥ मग सत्संगें प्रबळें । सत्शास्त्राचेनि बळें । जन्ममृत्यूचीं निमाळें । निस्तरे रानें ॥ ४१ ॥ ते वेळीं आत्मानंदें आघवें । जें सदा वसतें बरवें । तें तैसेंचि पाटण पावे । गुरुकृपेचें ॥ ४२ ॥ तेथ प्रियाची परमसीमा । तो भेटे माउली आत्मा । तये खेवीं आटे डिंडिमा । सांसारिक हे ॥ ४३ ॥ ऐसा जो कामक्रोधलोभां । झाडी करूनि ठाके उभा । तो येवढिया लाभा । गोसावी होय ॥ ४४ ॥

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः । न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३ ॥

ना हें नावडोनि कांहीं । कामादिकांचांचि ठायीं । दाटिली जेणें डोई । आत्मचोरें ॥ ४५ ॥ जो जगीं समान सकृपु । हिताहिता दाविता दीपु । तो अमान्यु केला बापु । वेदु जेणें ॥ ४६ ॥ न धरीचि विधीची भीड । न करीचि आपली चाड । वाढवीत गेला कोड । इंद्रियांचें ॥ ४७ ॥ कामक्रोधलोभांची कास । न सोडीच पाळिली भाष । स्वैराचारांचें असोस । वळघला रान ॥ ४८ ॥ तो सुटकेचिया वाहणीं । मग पिवों न लाहे पाणी । स्वप्नींही ते कहाणी । दूरीचि तया ॥ ४९ ॥ आणि परत्र तंव जाये । हें कीर तया आहे । परी ऐहिकही न लाहे । भोग भोगूं ॥ ४५० ॥ तरी माशालागीं भुलला । ब्राह्मण पाणबुडां रिघाला । कीं तेथही पावला । नास्तिकवादु ॥ ५१ ॥ तैसें विषयांचेनि कोडें । जेणें परत्रा केलें उबडें । तंव तोचि आणिकीकडे । मरणें नेला ॥ ५२ ॥ एवं परत्र ना स्वर्गु । ना ऐहिकही विषयभोगु । तेथ केउता प्रसंगु । मोक्षाचा तो ॥ ५३ ॥ म्हणोनि कामाचेनि बळें । जो विषयु सेऊं पाहे सळें । तया विषयो ना स्वर्ग मिळे । ना उद्धरे तो ॥ ५४ ॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ । ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥

याकारणें पैं बापा । जया आथी आपली कृपा । तेणें वेदांचिया निरोपा । आन न कीजे ॥ ५५ ॥ पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अनायासें आत्महिता । भेटेचि ते ॥ ५६ ॥ नातरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना । शिष्य आत्मभुवना - । माजीं पैसे ॥ ५७ ॥ हें असो आपुला ठेवा । हाता आथी जरी यावा । तरी आदरें जेवीं दिवा । पुढां कीजे ॥ ५८ ॥ तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणे पार्था । तेणें श्रुति स्मृति माथां । बैसणें घापे ॥ ५९ ॥ शास्त्र म्हणेल सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जे घेववी तें न म्हणावें । विषही विरुद्ध ॥ ४६० ॥ ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरी कें आहे अनिष्टा । भेटणें गा ॥ ६१ ॥ पैं अहितापासूनि काढिती । हित देउनी वाढविती । नाहीं श्रुतिपरौती । माउली जगा ॥ ६२ ॥ म्हणौनि ब्रह्मेंसीं मेळवी । तंव हे कोणें न संडावी । अगा तुवांही ऐसीचि भजावी । विशेषेंसी ॥ ६३ ॥ जे आजि अर्जुना तूं येथें । करावया सत्य शास्त्रें सार्थें । जन्मलासि बळार्थें । धर्माचेनि ॥ ६४ ॥ आणि धर्मानुज हें ऐसें । बोधेंचि आलें आपैसें । म्हणोनि अनारिसें । करूं नये ॥ ६५ ॥ कार्याकार्यविवेकीं । शास्त्रेंचि करावी पारखीं । अकृत्य कुडें तें लोकीं । वाळावें गा ॥ ६६ ॥ मग कृत्यपणें खरें निगे । तें तुवां आपुलेनि आंगें । आचरौनि आदरें चांगें । सारावें गा ॥ ६७ ॥ जे विश्वप्रामाण्याची मुदी । आजि तुझां हातीं असे सुबुद्धी । लोकसंग्रहासि त्रिशुद्धी । योग्यु होसी ॥ ६८ ॥ एवं आसुरवर्गु आघवा । सांगोनि तेथिंचा निगावा । तोहि देवें पांडवा । निरूपिला ॥ ६९ ॥ इयावरी तो पंडूचा । कुमर सद्भावो जीवींचा । पुसेल तो चैतन्याचां । कानीं ऐका ॥ ४७० ॥ संजयें व्यासाचिया निरोपा । तो वेळु फेडिला तया नृपा । तैसा मीहि निवृत्तिकृपा । सांगेन तुम्हां ॥ ७१ ॥ तुम्ही संत माझिया कडा । दिठीचा कराल बहुडा । तरी तुम्हां माने येवढा । होईन मी ॥ ७२ ॥ म्हणोनि निज अवधान । मज वोळगे पसायदान । दिजो जी समर्थ होईन । ज्ञानदेवो म्हणे ॥ ४७३ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
दैवासुरसम्पद्विभागयोगोनाम षोडशोऽध्यायः ॥ (श्लोक २४, ओव्या ४७३)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय सतरावा)

विश्वविकासितमुद्रा । जया सोडवी तुझी योगनिद्रा । तया नमो जीव गणेंद्रा । सद्‌गुरु तुज ॥ १ ॥ त्रिगुणत्रिपुरीं वेढिला । जीवत्वदुर्गीं आडिला । तो आत्मा शंभूनें सोडविला । तुझिया स्मृती ॥ २ ॥ म्हणोनि शिवेंसीं कांटाळा । गुरुत्वें तूंचि आगळा । तऱ्ही हळु मायाजळा - । माजीं तारूनी ॥ ३ ॥ जें तुझ्याविखीं मूढ । तयालागीं तूं वक्रतुंड । ज्ञानियांसि तरी अखंड । उजूचि आहासि ॥ ४ ॥ दैविकी दिठी पाहतां सानी । तऱ्ही मीलनोन्मीलनीं । उत्पत्तिप्रळयो दोन्ही । लीलाचि करिसी ॥ ५ ॥ प्रवृत्तिकर्णाचां चाळीं । उठिला मदगंधानिळीं । पूजीजसी नीलोत्पळीं । जीवभृंगाचां ॥ ६ ॥ पाठीं निवृत्तिकर्णचाळें । आहाळी ते पूजा विधुळे । तेव्हा मिरविसी मोकळें । आंगाचें लेणें ॥ ७ ॥ वामांगीचा लास्यविलासु । जो हा जगद्रूप आभासु । तो तांडवमिसें कळासु । दाविसी तूं ॥ ८ ॥ हें असो विस्मो दातारा । तूं होसी जयाचा सोयरा । सोइरिकेचिया व्यवहारा । मुकेचि तो ॥ ९ ॥ फेडितां बंधनाचा ठावो । तूं जगद्‌बंधु ऐसा भावो । धरूं वोळगे उवावो । तुझांचि आंगीं ॥ १० ॥ दुजयाचेनि नावें तया । देहही नुरेचि पैं देवराया । जेणें तूं आपणपयां । केलें दुजें ॥ ११ ॥ तूतें करूनि पुढें । जे उपायें घेती दवडे । तयां ठासी बहुवें पाडें । मागांचि तूं ॥ १२ ॥ जो ध्यानें सूये मानसीं । तयालागीं नाहीं तूं त्याचां देशीं । ध्यानही विसरे तेणेंसी । वालभ तुज ॥ १३ ॥ तूंतें सिद्धचि जो नेणे । तो नांदे सर्वज्ञपणें । वेदांही येवढे बोलणें । नेघसी कानीं ॥ १४ ॥ मौन गा तुझें राशिनांव । आतां स्तोत्रीं कें बांधों हाव । दिससी तेतुली माव । भजो काई ॥ १५ ॥ दैविकें सेवकु हों पाहों । तरी भेदितां द्रोहोचि लाहों । म्हणोनि आतां कांहीं नोहों । तुजलागीं जी ॥ १६ ॥ जैं सर्वथा सर्वही नोहिजे । तैं अद्वया तूतें लाहिजे । हें जाणें मी वर्म तुझें । आराध्यलिंगा ॥ १७ ॥ तरी नुरोनि वेगळेपण । रसीं भजिन्नलें लवण । तैसें नमन माझें जाण । बहु काय बोलों ॥ १८ ॥ आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे । तो उचंबळत भरोनि निगे । कां दशी दीपसंगें । दीपुचि होय ॥ १९ ॥ तैसा तुझिया प्रणती । मी पूर्ण जाहलों श्रीनिवृत्ती । आतां आणीन व्यक्ती । गीतार्थु तो ॥ २० ॥ तरी षोडशाध्यायशेखीं । तिये समाप्तीचां श्लोकीं । जो ऐसा निर्णयो निष्टंकीं । ठेविला देवें ॥ २१ ॥ जे कृत्याकृत्यव्यवस्था । अनुष्ठावया पार्था । शास्त्रचि एक सर्वथा । प्रमाण तुज ॥ २२ ॥ तेथ अर्जुन मानसें । म्हणें हें ऐसें कैसें । जे शास्त्रेंवीण नसे । सुटिका

कर्मा ॥ २३ ॥ तरी तक्षकांची फडे । ठाकोनि कैं तो मणि काढे । कैं नाकींचा केशु जोडे । सिंहाचिये ॥ २४ ॥ मग तेणें तो वोंविजे । तरीच लेणें पाविजे । एऱ्हवीं काय असिजे । रिक्तकंठीं ॥ २५ ॥ तैसी शास्त्रांची मोकळी । यां कैं कोण वेंटाळी । एकवाक्यतेचां फळीं । पैसिजे कैं ॥ २६ ॥ जालयाही एकवाक्यता । कां लाभे वेळु अनुष्ठितां । कैंचा पैसारु जीविता । येतुलालिया ॥ २७ ॥ आणि शास्त्रें अर्थें देशें काळें । या चहूंही जें एक फळे । तो विपावो कीं कां मिळे । आघवयांसीं ॥ २८ ॥ म्हणौनि शास्त्राचें घडतें । नोहे प्रकारें बहुतें । तरी मूर्खां मुमुक्षां येथें । काय गति पां ॥ २९ ॥ हा पुसावया अभिप्रावो । जो अर्जुन करी प्रस्तावो । तो सतराविया ठावो । अध्याया येथ ॥ ३० ॥ तरी सर्वविषयीं वितृष्णु । जो सकळकळीं प्रवीणु । कृष्णाही नवल कृष्णु । अर्जुनत्वें जो ॥ ३१ ॥ शौर्या जोडला आधारु । जो सोमवंशाचा शृंगारु । सुखादि उपकारु । जयाची लीला ॥ ३२ ॥ जो प्रज्ञेचा प्रियोत्तमु । ब्रह्मविद्येचा विश्रामु । सहचरु मनोधर्मु । देवाचा जो ॥ ३३ ॥

अर्जुन उवाच : ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥ १ ॥

तो अर्जुन म्हणे गा तमालश्यामा । इंद्रियां फांवलिया ब्रह्मा । तुझां बोलु आम्हा । साकांक्षु पैं जी ॥ ३४ ॥ जे शास्त्रेंवांचूनि आणिकें । प्राणिया स्वमोक्षु न देखे । ऐसें कां कैंपखें । बोलिलासी ॥ ३५ ॥ तरी न मिळेचि तो देशु । नव्हेचि काळा अवकाशु । जो करवी शास्त्राभ्यासु । तोही दुरी ॥ ३६ ॥ आणि अभ्यासीं विरजिया । होती जिया सामुग्रीया । त्याही नाहीं आपैतिया । तिये वेळीं ॥ ३७ ॥ उजू नोहेचि प्राचीन । नेदिची प्रज्ञा संवाहन । ऐसें ठेलें आपादान । शास्त्राचें जयां ॥ ३८ ॥ किंबहुना शास्त्रविखीं । एकहीं न लाहातीचि नखी । म्हणूनि उखिविखि । सांडिली जिहीं ॥ ३९ ॥ परी निर्धारूनि शास्त्रें । अर्थानुष्ठानें पवित्रें । नांदतात परत्रें । साचारें जे ॥ ४० ॥ तया ऐसें आम्हीं होआवें । ऐसी चाड बांधोनि जीवें । घेती तयांचे मागावे । आचरावया ॥ ४१ ॥ धड्याचियां आखरां । तळीं बाळ लिहे दातारा । कां पुढांसूनि पडिकरा । अक्षमु चाले ॥ ४२ ॥ तैसें सर्वशास्त्रनिपुण । तयांचें जें आचरण । तेंचि करिती प्रमाण । आपलिये श्रद्धे ॥ ४३ ॥ मग शिवादिकें पूजनें । भूम्यादिकें महादानें । अग्निहोत्रादि यजनें । करिती जे श्रद्धा ॥ ४४ ॥ तयां सत्त्वरजतमां - । माजीं कोण पुरुषोत्तमा । गति होय ते आम्हां । सांगिजो जी ॥ ४५ ॥ तंव वैकुंठपीठींचें लिंग । जो निगमपद्माचा पराग । जिये जयाचेनि हें जग । अंगच्छाया ॥ ४६ ॥ काळ सावियाचि वाढु । लोकोत्तर प्रौढु । अद्वितीय गूढु । आनंदघनु ॥ ४७ ॥ इयें श्लाघिजती जेणें बिकें । तें जयाचें आंगीं असिकें । तो श्रीकृष्ण स्वमुखें । बोलतु असे ॥ ४८ ॥

श्रीभगवानुवाच : त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।
सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥ २ ॥

म्हणे पार्था तुझा अतिसो । घेईं गा आम्ही जाणतसों । शास्त्राभ्यासाचा आडसो । मानितोसि कीं ॥ ४९ ॥ नुसधियाची श्रद्धा । झोंबों पाहसी परमपदा । तरी तैसें हें प्रबुद्धा । सोहोपें नोहे ॥ ५० ॥ श्रद्धा म्हणितलियासाठीं । पातेजो नये किरीटी । काय द्विजु अंत्यजघृष्टी । अंत्यचि नोहे ॥ ५१ ॥ गंगोदक जरी जालें । तरी मद्यभांडां आलें । तें घेवों ये कांहीं केलें । विचारीं पां ॥ ५२ ॥ चंदनु होय शीतळु । परी अग्नीसी पावे मेळु । तैं हाती धरिला जाळूं । न शके काई ॥ ५३ ॥ कां किडाचिये आटतिये पुटीं । पडिलें सोळें किरीटी । घेतलें चोखासाठीं । नागवीना ॥ ५४ ॥ तैसें श्रद्धेचें दळवाडें । आंगे कीर चोखडें । परी प्राणियांचां पडे । विभागीं जैं ॥ ५५ ॥ तैं प्राणिये तंव स्वभावें । अनादिमायाप्रभावें । त्रिगुणाचेचि आघवे । वळिले आहाती ॥ ५६ ॥ तेथही दोन गुण खांचती । मग एक धरी उन्नती । पैं तैसियाचि होती वृत्ती । जीवांचिया ॥ ५७ ॥ वृत्तीऐसें मन धरिती । मनाऐसी क्रिया करिती । केलियाऐसी वरिती । मरोनि देहें ॥ ५८ ॥ बीज मोडे झाड होये । झाड मोडे बीजीं सामाये । ऐसेनि कल्पकोडी जाये । परी जाति न नशे ॥ ५९ ॥ तियापरी ईयें अपारें । होतां जातां जन्मांतरें । परी त्रिगुणत्व न व्यभिचारे । प्राणियाचें ॥ ६० ॥ म्हणूनि प्राणियांचां पैकीं । पडिली श्रद्धा अवलोकीं । ते होय गुणासारिखी । तिहीं ययां ॥ ६१ ॥ विपायें वाढे सत्त्व शुद्ध । तेव्हां ज्ञानासी करी साद । परी एका दोघे वोखद । येर आहाती ॥ ६२ ॥ सत्त्वाचेनि आंगलगें । ते श्रद्धा मोक्षफळा रिगे । तंव रज तम उगे । कां पां राहाती ॥ ६३ ॥ मोडोनि सत्त्वाची त्राये । रजोगुण आकाशें जाये । तेव्हां तेचि श्रद्धा होये । कर्मकेरसुणी ॥ ६४ ॥ मग तमाची उठी आगी । तेव्हां तेचि श्रद्धाभंगी । हों लागे भोगालागीं । भलतेया ॥ ६५ ॥

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत । श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥

एवं सत्त्वरजतमा - । वेगळी श्रद्धा सुवर्मा । नाहीं गा जीवग्रामा - । माजीं यया ॥ ६६ ॥ म्हणोनि श्रद्धा स्वाभाविक । असे पैं त्रिगुणात्मक । रजतमसात्त्विक । भेदीं इहीं ॥ ६७ ॥ जैसें जीवनचि उदक । परी विषीं होय मारक । कां मिरयामाजीं तीख । ऊंसी गोड ॥ ६८ ॥ तैसा बहुवसें तमें । जो सदाचि होय निमे । तेथ श्रद्धा परिणमे । तेंचि होऊनि ॥ ६९ ॥ मग काजळा आणि मसी । न दिसे विवंचना जैसी । तेवीं श्रद्धा तामसी । सिनी नाहीं ॥ ७० ॥ तैसीच राजसीं जीवीं । रजोमय जाणावी । सात्त्विकीं आघवी । सत्त्वाचीच ॥ ७१ ॥ ऐसेनि हा सकळु । जगडंबरु निखिळु । श्रद्धेचाचि केवळु । वोतला असे ॥ ७२ ॥ परी गुणत्रयवशें । त्रिविधपणाचें लासें । श्रद्धे जें उठिलें असे । तें वोळख तूं ॥ ७३ ॥ तरी जाणिजे झाड फुलें । कां मानस जाणिजे बोलें । भोगें जाणिजे केलें । पूर्वजन्मींचें ॥ ७४ ॥ तैसीं जिहीं जिहीं चिन्हीं । श्रद्धेचीं रूपें तीन्ही । देखिजती ते वानी । अवधारी पां ॥ ७५ ॥

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः । प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥ ४ ॥

तरी सात्त्विकश्रद्धा । जयांचा होय बांधा । तयां बहुतकरूनि मेधा । स्वर्गीं आथी ॥ ७६ ॥

ते विद्याजात पढती । यज्ञक्रिये निवडती । किंबहुना पडती । देवलोकीं ॥ ७७ ॥ आणि श्रद्धा राजसा । घडेल जे वीरेशा । ते भजती राक्षसां । खेचरां हन ॥ ७८ ॥ श्रद्धा जे कां तामसी । ते मी सांगेन तुजपाशीं । जे कां केवळ पापराशी । अतिकर्कशी निर्दयत्वें ॥ ७९ ॥ जीववधें साधूनि बळी । भूतप्रेतकुळें मैळीं । स्मशानीं संध्याकाळीं । पूजिती ते ॥ ८० ॥ ते तमोगुणाचें सार । काढूनि निर्मिले नर । जाण तामसियेचें घर । श्रद्धेचें तें ॥ ८१ ॥ ऐसी इहीं तिहीं लिंगीं । त्रिविध श्रद्धा जगीं । पैं हें ययालागीं । सांगत असें ॥ ८२ ॥ जे हे सात्त्विक श्रद्धा । जतन करावी प्रबुद्धा । येरी दोनी विरुद्धा । सांडाविया ॥ ८३ ॥ हे सात्त्विक मति जया । निर्वाहती होय धनंजया । बागुल नोहे तया । कैवल्य तें ॥ ८४ ॥ तो न पढो कां ब्रह्मसूत्र । न लोढो सर्व शास्त्र । सिद्धान्त न होत स्वतंत्र । तयाचां हातीं ॥ ८५ ॥ परी श्रुतिस्मृतींचे अर्थ । जे आपण होऊन मूर्त । अनुष्ठानें जगा देत । वडील जे जे ॥ ८६ ॥ तयांचीं आचरतीं पाउलें । पाऊनि सात्त्विकी श्रद्धा चाले । तो तेंचि फळ ठेविलें । ऐसें लाहे ॥ ८७ ॥ पैं एक दीपु लावी सायासें । आणिक तेथें लाऊं बैसे । तरी तो काय प्रकाशें । वंचिजे गा ॥ ८८ ॥ कां येकें मोल अपार । वेंचोनि केले धवळार । तो सुरवाडु वस्तीकर । न भोगी काई ॥ ८९ ॥ हें असो जो तळें करी । तें तयाचीच तृषा हरी । कीं सुआरासीचि अन्न घरीं । येरा नोहे ॥ ९० ॥ बहुत काय बोलो पैं गा । येका गौतमासीचि गंगा । येरा समस्ता काय जगा । वोहोळ जाली ॥ ९१ ॥ म्हणोनि आपुलियापरी । शास्त्र अनुष्ठिती कुसरी । जाणे तयांतें श्रद्धाळू जो वरी । तो मूर्खुही तरे ॥ ९२ ॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः । दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥

ना शास्त्राचेनि कीर नावें । खाकरोंही नेणती जीवें । परी शास्त्रज्ञांही शिवे । टेंकों नेदिती ॥ ९३ ॥ वडिलांचिया क्रिया । देखोनि वाती वांकुलिया । पंडितां डाकुलिया । वाजविती ॥ ९४ ॥ आपलेनीचि आटोपें । धनित्वाचेनि दर्पें । साचचि पाखांडाचीं तपें । आदरिती ॥ ९५ ॥ आपुलिया पुढिलांचिया । आंगी घालूनि कातिया । रक्तमांसा प्रणीतया । भरभरों ॥ ९६ ॥ रिचविती जळतकुंडी । लाविती चेड्यांचां तोंडी । नवसियां देती उंडी । बाळकांची ॥ ९७ ॥ आग्रहांचिया उजरिया । क्षूद्र देवतां वरिया । अन्नत्यागें सातरिया । ठाकती एक ॥ ९८ ॥ अगा आत्मपरपीडा । बीज तमक्षेत्रीं सुहाडा । पेरिती मग पुढां । तेंचि पिके ॥ ९९ ॥ बाहू नाहीं आपलिया । आणि नावेतेंही धनंजया । न धरी होय तया । समुद्रीं जैसें ॥ १०० ॥ कां वैद्यातें करी सळा । रसु सांडी पायखोळा । तो रोगिया जेवीं विव्हळा - । सवता होय ॥ १ ॥ नाना पडिकराचेनि सळें । काढी आपलेचि डोळे । तें वानवसां आंधळें । जैसें ठाके ॥ २ ॥ तैसें तयां आसुरां होये । जे निंदूनि शास्त्रांची सोये । सैंघ धांवताती मोहें । आडवीं जे कां ॥ ३ ॥ कामु करवी तें करिती । क्रोधु मारवी तें मारिती । किंबहुना मातें पुरती । दुःखाचां गुंडां ॥ ४ ॥

कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः । मां चैवान्तः शरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥

आपुलां परावां देहीं । दुःख देती जें जें कांहीं । मज आत्मया तेतुलाही । होय शीणु ॥ ५ ॥ पैं वांचेचेनिही पालवें । पापियां तया नातळावें । परी पडिलें सांगावें । त्यजावया ॥ ६ ॥ प्रेत बाहिरें घालिजे । कां अंत्यजु संभाषणीं त्यजिजे । हें असो हातें क्षाळिजे । कश्मलातें ॥७ ॥ तेथ शुद्धीचिया आशा । तो लेपु न मनवे जैसा । तयांतें सांडावया तैसा । अनुवादु हा ॥ ८ ॥ परी अर्जुना तूं तयांतें । देखसी तैं स्मर हो मातें । जे आन प्रायश्चित्त येथें । मानेल ना ॥ ९ ॥ म्हणौनि श्रद्धा जे सात्त्विकी । पुढती तेचि पैं येकी । जतन करावी निकी । सर्वांपरी ॥ ११० ॥ तरी धरावा तैसा संगु । जेणें पोखे सात्त्विक लागु । सत्त्ववृद्धीचा भागु । आहारु घेपे ॥ ११ ॥ एऱ्हवीं तरी पाहीं । स्वभाववृद्धीचां ठाई । आहारावांचूनि नाहीं । बळी हेतु ॥ १२ ॥ प्रत्यक्ष पाहें पां वीरा । जो सावध घे मदिरा । तो होऊनि ठाके माजिरा । तियेचि क्षणीं ॥ १३ ॥ कां जो सावियां अन्नरसु सेवी । तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं । काय ज्वरु जालिया निववी । पयादिक ॥ १४ ॥ नातरी अमृत जयापरी । घेतलिया मरण वारी । कां आपुलियांऐसें करी । जैसें विष ॥ १५ ॥ तेवीं जैसा घेपे आहारु । धातु तैसाचि होय आकारु । आणि धातुऐसा अंतरु । भावो पोखे ॥ १६ ॥ जैसें भांडियाचेनि तापें । आंतुलें उदकही तापे । तैसी धातुवशें आटोपे । चित्तवृत्ती ॥ १७ ॥ म्हणोनि सात्त्विकु रसु सेविजे । तैं सत्त्वाचि वाढी पाविजे । राजसा तामसा होइजे । येरीं रसीं ॥ १८ ॥ तरी सात्त्विकु कोण आहारु । राजसा तामसा कायी आकारु । हें सांगों करीं आदरु । आकर्णनीं ॥ १९ ॥

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः । यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ ७ ॥

आणि एकसरें आहारा । कैसेनि तिनी मोहरा । जालिया तेही वीरा । रोकडें दाऊं ॥ १२० ॥ तरी जेवणाराचिया रुची । निष्पत्ति कीं बोनियांची । आणि जेविता तंव गुणांची । दासी येथ ॥ २१ ॥ जे जीव कर्ता भोक्ता । तो गुणास्तव स्वभावता । पावोनियां त्रिविधता । चेष्टे त्रिधा ॥ २२ ॥ म्हणौनि त्रिविध आहारु । यज्ञुही करित त्रिप्रकारु । तप दान हन व्यापारु । त्रिविधचि ते ॥ २३ ॥ पैं आहारलक्षण पहिलें । सांगों जें म्हणितलें । तें आईक गा भलें । रूप करूं ॥ २४ ॥

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः । रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ ८ ॥

तरी सत्त्वगुणाकडे । जैं दैवें भोक्ता पडे । तैं मधुरीं रसीं वाढे । मेचु तया ॥ २५ ॥ आंगेचि द्रव्यें सुरसें । जे आंगेंचि पदार्थ गोडसे । आंगेंचि स्नेहें बहुवसें । सुपक्वें जियें ॥ २६ ॥ आकारें नव्हती डगळें । स्पर्शें अति मवाळें । जिभेलागी स्नेहाळें । स्वादें जियें ॥ २७ ॥ रसें गाढीं वरी ढिलीं । द्रवभावें आथिलीं । ठायेंठावो सांडिलीं । अग्नितापें ॥ २८ ॥ आंगें सानें परिणामें थोरु । जैसें गुरुमुखींचें अक्षरु । तैशी अल्पीं जिहीं अपारु । तृप्ति राहे ॥ २९ ॥ आणि मुखीं जैसीं गोडें । तैसींचिहि तें आंतुलेहीकडे । तिये अन्नीं प्रीति वाढे । सात्त्विकांसी ॥ १३० ॥ एवंगुणलक्षण । सात्त्विक भोज्य जाण । आयुष्याचें त्राण । नीच नवें हें ॥ ३१ ॥

येणें सात्त्विक रसें । जंव देहीं मेहो वरिषे । तंव आयुष्यनदी उससे । देहाचि देहा ॥ ३२ ॥ सत्त्वाचिये कीर पाळती । कारण हाचि सुमती । दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ॥ ३३ ॥ आणि शरीरा हन मानसा । बळाचा पैं कुवासा । हा आहारु तरी दशा । कैंची रोगां ॥ ३४ ॥ हा सात्त्विकु होय भोग्यु । तैं भोगावया आरोग्यु । शरीरासी भाग्यु । उदयलें जाणों ॥ ३५ ॥ आणि सुखाचें घेणें देणें । निकें उवाया ये येणें । हें असो वाढे साजणें । आनंदेंसीं ॥ ३६ ॥ ऐसा सात्त्विकु आहारु । परिणमला थोरु । करी हा उपकारु । सबाह्यासी ॥ ३७ ॥ आतां राजसासि प्रीती । जिहीं रसीं आथी । करूं तयाही व्यक्ती । प्रसंगें गा ॥ ३८ ॥

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः । आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

तरी मारें उणें काळकूट । तेणें मानें जें कडुवट । कां चुनियाहूनि दासट । आम्लीं हन ॥ ३९ ॥ कणिकीतें जैसें पाणी । तैसेंचि मीठ बांधया आणी । तेतुलीच मेळवणी । रसांतरांची ॥ १४० ॥ ऐसें खारट अपाडें । राजसा तया आवडे । उन्हाचेनि मिषें तोंडें । आगीचि गिळी ॥ ४१ ॥ वाफेचिया सिगे । वातीही लाविल्या लागे । तैसे उन्ह मागे । राजसु तो ॥ ४२ ॥ वावदळ पाडुनि ठाये । साबळु डाहारला आहे । तैसें तीख तो खाये । जें घायेंवीण रुपे ॥ ४३ ॥ आणि राखेहूनि कोरडें । आंत बाहेरी येकें पाडें । तो जिव्हादंशु आवडे । बहु तया ॥ ४४ ॥ परस्परें दातां । आदळु होय खातां । तो गा तोंडीं घेतां । तोषों लागे ॥ ४५ ॥ आधींच द्रव्यें चुरमुरीं । वरि परिवडिजती मोहरी । जियें घेतां होती धुवारी । नाकें तोंडें ॥ ४६ ॥ हें असो उगें आगीतें । म्हणें तैसें राइतें । पढियें प्राणापरौतें । राजसासि गा ॥ ४७ ॥ ऐसा न पुरोनि तोंडा । जिभा केला वेडा । अन्नमिषें अग्नि भडाडा । पोटीं भरी ॥ ४८ ॥ तैसाचि लवंघा सुटे । मग भुई गा सेजे सांटे । पाणियाचें न सुटे । तोंडोनि पात्र ॥ ४९ ॥ ते आहार नव्हती घेतले । व्याधिव्याळ जे सुतले । ते चेववावया घातलें । माजवण पोटीं ॥ १५० ॥ तैसें एकमेकां सळें । रोग उठती एके वेळे । ऐसा राजसु आहारु फळे । केवळ दुःखें ॥ ५१ ॥ एवं राजसा आहारा । रूप केले धनुर्धरा । परिणामाचाही विसुरा । सांगितला ॥ ५२ ॥ आतां तया तामसा । आवडे आहारु जैसा । तेंहीं सांगों चिळसा । झणें तुम्ही ॥ ५३ ॥ तरी कुहिजलें उष्टें खातां । न मनिजे तेणें अनहिता । जैसें का उपहिता । म्हैसी खाय ॥ ५४ ॥

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् । उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १० ॥

निपजलें अन्न तैसें । दुपाहरीं कां येरें दिवसें । अतिकरें तैं तामसें । घेईजे तें ॥ ५५ ॥ नातरी अर्ध उकडिलें । कां निपट करपोनि गेलें । तैसेंही खाय चुकलें । रसा जें येवों ॥ ५६ ॥ जया का आथि निष्पत्ती । जेथ रसु धरी व्यक्ती । तें अन्न ऐसीं प्रतीती । तामसा नाहीं ॥ ५७ ॥ ऐसेनि कही विपायें । सदन्ना वरपडा होये । तरी घाणी सुटे तंव राहे । व्याघ्र जैसा ॥ ५८ ॥ का बहुवें दिवशीं वोलांडिलें । स्वादपणें सांडिलें । शुष्क अथवा सडलें । गाभिणेंही हो ॥ ५९ ॥ तेंही बाळाचे

हातवरी । चिवडिलें जैसी राडी करी । का सवें बैसोनि नारी । गोतांबील करी ॥ १६० ॥ ऐसेनि कश्मळें जैं खाय । तैं तया सुखभोजन ऐसें होय । परी येणेंही न धाय । पापिया तो ॥ ६१ ॥ मग चमत्कारु देखा । निषेधाचा आंबुखा । जया का सदोखा । कुद्रव्यासी ॥ ६२ ॥ तया अपेयांचां पानीं । अखाद्यांचां भोजनीं । वाढविजे उतान्ही । तामसें तेणें ॥ ५३ ॥ एवं तामस जेवणारा । ऐसैसी मेचु हे वीरा । याचें फल दुसरां । क्षणीं नाहीं ॥ ६४ ॥ जे जेव्हांचि हें अपवित्र । शिवे तयाचें वक्त्र । तेव्हांचि पापा पात्र । जाला तो कीं ॥ ६५ ॥ यावरतें जे जेवी । ते जेविती वोज न म्हणावी । पोटभरती जाणावी । यातना ते ॥ ६६ ॥ शिरच्छेदें काय होये । का आगीं रिगतां कैसें आहे । हें जाणावें काई पाहें । परी साहातुचि असे ॥ ६७ ॥ म्हणोनि तामसा अन्ना । परिणामु गा सिनाना । न सांगोंचि गा अर्जुना । देवो म्हणे ॥ ६८ ॥ आतां ययावरी । आहाराचिया परी । यज्ञुही अवधारीं । त्रिधा असे ॥ ६९ ॥ परी तिहींमाजीं प्रथम । सात्त्विक यज्ञाचें वर्म । आईक पां सुमहिम - । शिरोमणी ॥ १७० ॥

अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते । यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥ ११ ॥

तरी एकु प्रियोत्तमु - । वांचोनि वाढों नेदी कामु । जैसा का मनोधर्मु । पतिव्रतेचा ॥ ७१ ॥ नाना सिंधूतें ठाकोनि गंगा । पुढारां न करीचि रिगा । का आत्मा देखोनि उगा । वेदु ठेला ॥ ७२ ॥ तैसें जे आपुलां स्वहितीं । वेंचुनियां चित्तवृत्ती । नुरवितीची अहंकृती । फळालागीं ॥ ७३ ॥ पातलेया झाडाचें मूळ । मागुतें सरों नेणेचि जळ । जिरालें कां केवळ । तयाचांचि आंगीं ॥ ७४ ॥ तैसें मनें देहें दोहीं । यजननिश्चयाचां ठाईं । हारपोनि जे कांहीं । वांछितीना ॥ ७५ ॥ तिहीं फळवांच्छात्यागीं । स्वधर्मावांचूनि विरागीं । कीजे जो यज्ञु सर्वांगीं । अळंकृतु ॥ ७६ ॥ परी आरिसा आपणपें । डोळां जैसें घेपे । कां तळहातींचें दीपें । रत्न पाहिजे ॥ ७७ ॥ नाना उदितें दिवाकरें । गमावा मार्गु दिठी भरे । तैसा वेदनिर्धारें । देखोनिया ॥ ७८ ॥ तियें कुंडें मंडप वेदी । आणीकही संभारसमृद्धी । ते मेळवणी जैसी विधी । आपण केली ॥ ७९ ॥ सकळावयवउचितें । लेणीं पातलीं जैसीं आंगातें । तैसे पदार्थ जेथिंचे तेथें । विनियोगुनि ॥ १८० ॥ काय वानूं बहुतीं बोलीं । जैसीं सर्वाभरणीं भरलीं । तें यज्ञविद्याचि रूपा आली । यजनमिषें ॥ ८१ ॥ तैसा सांगोपांगु । निपजे जो यागु । नुठऊनियां लागु । महत्त्वाचा ॥ ८२ ॥ प्रतिपाळु करी पाटाचा । झाडीं कीजे तुळसीचा । परी फळा फुला छायेचा । आश्रयो नाहीं ॥ ८३ ॥ किंबहुना फळाशेवीण । ऐसेया निगुती यज्ञ निर्माण । होय तो यागु जाण । सात्त्विकु गा ॥ ८४ ॥

अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् । इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥ १२ ॥

आतां यज्ञु कीर वीरेशा । तरी पैं याचिऐसा । परी श्राद्धालागी जैसा । अवंतिला रावो ॥ ८५ ॥ जरी राजा घरासि ये । तरी बहुत उपेगा जाये । आणि कीर्तीही होये । श्राद्ध न ठके ॥ ८६ ॥ तैसा धरूनि आवांका । म्हणे स्वर्गु जोडेल असिका । दीक्षितु होईन मान्यु लोकां । घडेल यागु ॥ ८७ ॥

ऐसी केवळ फळालागीं। महत्त्व फोकारावया जगीं। पार्था निष्पत्ति जे यागीं। राजस पैं ते॥ ८८ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम्। श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३॥

पशुपक्षिविवाहीं। जोशी कामापरौता नाहीं। तैसा तामसा यज्ञा पाहीं। आग्रहोचि मूळ॥ ८९ ॥ वारया वाट न वाहे। कीं मरण मुहूर्त पाहे। निषिद्धांसी बिहे। आगी जरी ॥ १९० ॥ तरी तामसाचिया आचारा। विधीचा आथी वोढावारा। म्हणुनि तो धनुर्धरा। उत्सृंखळु॥ ९१ ॥ नाहीं विधीची तेथ चाड। नये मंत्रादिक तयाआड। अन्नजाता न सुये तोंड। मासिये जेवीं॥ ९२ ॥ वैराचा बोधु ब्राह्मणा। तेथ कें रिगेल दक्षिणा। अग्नि जाला वाउधाणा। वरपडा जैसा॥ ९३ ॥ तैसें वायांचि सर्वही वेंचे। मुख न देखतां श्रद्धेचें। नागविलें निपुत्रिकाचें। जैसें घर॥ ९४ ॥ ऐसा जो यज्ञाभासु। तया नाम यागु तामसु। आइकें म्हणे निवासु। श्रियेचा तो॥ ९५ ॥ आता गंगेचें एक पाणी। परी नेलें आनानीं वाहणीं। एक मळी एक आणी। शुद्धत्व जैसें॥ ९६ ॥ तैसें तिहीं गुणी तप। येथ जाहालें आहे त्रिरूप। तें एक केलें दे पाप। उद्धरी एक॥ ९७ ॥ तरी तेंचि तिहीं भेदीं। कैसेनि पां म्हणोनि सुबुद्धी। जाणों पाहासी तरी आधीं। तपचि जाण॥ ९८ ॥ येथ तप म्हणिजे काई। तें स्वरूप दाऊं पाहीं। मग भेदिलें गुणीं तिहीं। तें पाठीं बोलों॥ ९९ ॥ तरी तप जें कां सम्यक्। तेंही त्रिविध आइक। शारीर मानसिक। शाब्द गा॥ २०० ॥ आतां गा तिहींमाझारीं। शारीर तंव अवधारीं। तरी शंभु कां श्रीहरी। पढियंता होय॥ १ ॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्। ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४॥

तया प्रिया देवतालया। यात्रादिकें करावया। अष्टौ पाहार जैसे पायां। उळिग घापे॥ २॥ देवांगणमिरवणियां। अंगोपचार पुरवणियां। करावया म्हणियां। शोभती हात॥ ३॥ लिंग कां प्रतिमा दिठीं। देखतखेवों अंगेष्टी। लोटिजे कां काठी। पडली जैसी॥ ४॥ आणि विधिविनयादिकीं। गुणीं वडील जे लोकीं। तयां ब्राह्मणांची निकी। पाइकी कीजे॥ ५॥ अथवा प्रवासें कां पीडा। का शिणले जे सांकडां। ते जीव सुरवाडा। आणिजती॥ ६॥ सकल तीर्थांचिये धुरे। जियें कां मातापितरें। तया सेवेसि कीर शरीरें। लोण कीजे॥ ७॥ आणि संसाराऐसा दारुणु। जो भेटलाचि हरी शीणु। तो ज्ञानदानीं सकरुणु। भजिजे गुरु॥ ८॥ आणि स्वधर्माचां आगिठां। देहजाड्याचिया किटा। आवृत्तिपुटीं सुभटा। झाडी कीजे॥ ९॥ वस्तु भूतमात्रीं नमिजे। परोपकारीं भजिजे। स्त्रीविषयीं नियमिजे। नांवें नांवें॥ २१०॥ जन्मतेनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें। तेथूनि जन्म आघवें। सोंविळें कीजे॥ ११॥ भूतमात्राचेनि नांवें। तृणही नासुडावें। किंबहुना सांडावे। छेद भेद॥ १२॥ ऐसैसी जैं शरीरीं। राहाटीची पडे उजरी। तैं शारीर तप घुमरी। आलें जाण॥ १३॥ पार्था समस्तही हें करणें। देहाचेनि प्रधानपणें। म्हणौनि ययातें मी म्हणें। शारीर तप॥ १४॥ एवं शारीर जें तप। तयाचें दाविलें रूप। आतां आईक निष्पाप। वाङ्मय तें॥ १५॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् । स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥

तरी लोहाचें आंग तुक । न तोडितांचि कनक । केलें जैसें देख । परिसें तेणें ॥ १६ ॥ तैसें न दुखविता सेजे । जावळिया सुख निपजे । ऐसें साधुत्व कां देखिजे । बोलणां जिये ॥ १७ ॥ पाणी मुदल झाडा जाये । तृण ते प्रसंगेंचि जिये । तैसें एका बोलिलें होये । सर्वांहि हित ॥ १८ ॥ जोडे अमृताची सुरसरी । तैं प्राणांतें अमर करी । स्नानें पाप ताप वारी । गोडीही दे ॥ १९ ॥ तैसा अविवेकुही फिटे । आपुलें अनादित्व भेटे । आइकतां रुचि न विटे । पीयूषीं जैसी ॥ २२० ॥ जरी कोणी करी पुसणें । तरी होआवें ऐसें बोलणें । नातरी आवर्तवणें । निगमु का नाम ॥ २१ ॥ ऋग्वेदादि तिन्हीं । प्रतिष्ठीजती वाग्भुवनीं । केली जैसी वदनीं । ब्रह्मशाळा ॥ २२ ॥ नातरी एकाधें नांव । तेंचि शैव कां वैष्णव । वाचे वसें तें वाग्भव । तप जाणावें ॥ २३ ॥ आतां तप जें मानसिक । तेंही सांगों आइक । म्हणे लोकनाथनायक - । नायकु तो ॥ २४ ॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः । भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥

तरी सरोवर तरंगीं । सांडिलें आकाश मेघीं । का चंदनाचें उरगीं । उद्यान जैसें ॥ २५ ॥ नाना कळावैषम्यें चंद्रु । कां सांडिला आधीं नरेंद्रु । नातरी क्षीरसमुद्रु । मंदराचळें ॥ २६ ॥ तैसीं नाना विकल्पजाळें । सांडुनि गेलिया सकळें । मन राहे का केवळें । स्वरूपें जें ॥ २७ ॥ तपनेंवीण प्रकाशु । जाड्येंवीण रसीं रसु । पोकळीवीण अवकाशु । होय जैसा ॥ २८ ॥ तैसी आपली सोय देखे । आणि आपलिया स्वभावा मुके । हिवली जैसीं आंगिकें । हिवों नेदी निजांग ॥ २९ ॥ तैसें न चलतें कळंकेंवीण । शशिबिंब जैसें परिपूर्ण । तैसें चोखीं शृंगारपण । मनाचें जें ॥ २३० ॥ बुजाली वैराग्याची वोरप । जिराली मनाची धांप कांप । तेथ केवळ जाली वाफ । निजबोधाची ॥ ३१ ॥ म्हणौनि विचारावया शास्त्र । राहाटवावें जें वक्त्र । तें वाचेचेंही सूत्र । हातीं न धरी ॥ ३२ ॥ तें स्वलाभ लाभलेपणें । मन मनपणाही धरूं नेणे । शिवतलें जैसें लवणें । आपुलें निज ॥ ३३ ॥ तेथ कें उठिती ते भाव । जिहीं इंद्रियामार्गीं धांव । घेऊनि ठाकावे गांव । विषयांचे ते ॥ ३४ ॥ म्हणौनि तियें मानसीं । भावशुद्धीचि असे अपैसीं । रोमशुचि जैसी । तळहातासी ॥ ३५ ॥ काय बहु बोलों अर्जुना । जैं हे दशा ये मना । तैं मनस्तपोभिधाना । पात्र होय ती ॥ ३६ ॥ परी तें असो हें जाण । मानस तपाचें लक्षण । देवो म्हणे संपूर्ण । सांगितलें ॥ ३७ ॥ म्हणोनि देहवाचाचित्तें । जें पातलें त्रिविधत्वातें । तें सामान्य तप तूतें । परिसविलें गा ॥ ३८ ॥ आतां गुणत्रयसंगें । हेंचि विशेषीं त्रिविधीं रिगे । तेंही आइक चांगें । प्रज्ञाबळें ॥ ३९ ॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः । अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥ १७ ॥

तरी हेंचि तप त्रिविधा । जें दाविलें तुज प्रबुद्धा । तेंचि करी पूर्णश्रद्धा । सांडूनि फळ ॥ २४० ॥ जैं पुरतिया सत्त्वशुद्धी । आचरिजे आस्तिक्यबुद्धी । तैं तयातेंचि गा प्रबुद्धीं । सात्त्विक म्हणिपे ॥ ४१ ॥

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् । क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥

नातरी तपस्थापनेलागीं । दुजेपण मांडूनि जगीं । महत्त्वाचां शृंगीं । बैसावया ॥ ४२ ॥ त्रिभुवनींचिया सन्माना । न वचावें ठाया आना । धुरेचिया आसना । भोजनालागीं ॥ ४३ ॥ विश्वाचिया स्तोत्रा । आपण होआवया पात्रा । विश्वे आपलिया यात्रा । करावया यावें ॥ ४४ ॥ लोकांचिया विविधा पूजा । आश्रयो न धरावया दुजा । भोग भोगावे वोजां । महत्त्वाचिया ॥ ४५ ॥ अंग बोल माखुनि तपें । विकावया आपणपें । अंगहीन पडपे । जियापरी ॥ ४६ ॥ हें असो धनमानीं आस । वाढउनी तप कीजे सायास । तैं तेंचि तप राजस । बोलिजे गा ॥ ४७ ॥ परी पहुरणीं जें दुहिलें । तैं तें गुरूं न दुभेचि व्यालें । कां उभें शेत चारिलें । पिकावया नुरे ॥ ४८ ॥ तैसें फोकारितां तप । कीजे जें साक्षेप । तें फळीं तंव सोप । निःशेष जाय ॥ ४९ ॥ ऐसे निर्फळ देखोनि करितां । माझारीं सांडी पंडुसुता । म्हणौनि नाहीं स्थिरता । तपा तया ॥ २५० ॥ एऱ्हवीं तरी आकाश मांडी । जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी । तो अवकाळु मेघु काय घडी । राहात आहे ॥ ५१ ॥ तैसें राजस तप जें होये । तें फळीं कीर वांझ जाये । परी आचरणींही नोहे । निर्वाहतें गा ॥ ५२ ॥ आतां तेंचि तप पुढती । तामसाचिये रीती । पैं परत्रा आणि कीर्ति । मुकोनि कीजे ॥ ५३ ॥

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः । परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥

केवळ मूर्खपणाचा वारा । जीवीं घेऊनि धनुर्धरा । नाम ठेविजे शरीरा । वैरियाचें ॥ ५४ ॥ पंचाग्नींची दडगी । खोलविजती शरीरालागीं । का इंधन कीजे हें आगी - । आंतु लावी ॥ ५५ ॥ माथां जाळिजती गुगुळु । पाठीं घालिजती गळु । आंग जाळिती इंगळु । जळतभीतां ॥ ५६ ॥ दवडोनि श्वासोश्वास । कीजती वायांचि उपवास । कां घेपती धूमाचे घांस । अधोमुखें ॥ ५७ ॥ हिमोदकें आकंठें । खडकें सेविजती तटें । जितया मांसाचे चिमुटे । तोडिती जेथ ॥ ५८ ॥ ऐसी नानापरी हे काया । घाय सूतां पैं धनंजया । तप कीजे नाशावया । पुढिलातें ॥ ५९ ॥ आंगभारें सुटला धोंडा । आपण फुटोनि होय खंडखंडा । का आड जालियातें रगडा । करी जैसा ॥ २६० ॥ तेवीं आपलिया आटणिया । सुखें असतया प्राणिया । जियावया शिराणिया । कीजती गा ॥ ६१ ॥ किंबहुना हे वोखटी । घेऊनि क्लेशाची हातवटी । तप निफजे तें किरीटी । तामस होय ॥ ६२ ॥ एवं सत्त्वादिकांचां आंगीं । पाडिलें तप तिहीं भागीं । जालें तेंही तुज चांगी । दाविलें व्यक्ती ॥ ६३ ॥ आतां बोलतां प्रसंगा । आलें म्हणोनि पैं गा । करूं रूप दानलिंगा । त्रिविध तया ॥ ६४ ॥ येथ गुणाचेनि बोलें । दानही त्रिविध असे जालें । तेंचि आइक पहिलें । सात्त्विक ऐसें ॥ ६५ ॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥ २० ॥

तरी स्वधर्माआंतौतें । जें जें मिळे आपणयातें । तें तें दीजे बहुतें । सन्मानयोगें ॥ ६६ ॥

जालया सुबीजप्रसंगु । पडे क्षेत्रवाफेचा पांगु । तैसाचि दानाचा हा लागु । देखतसें ॥ ६७ ॥ अनर्घ्य रत्न हाता चढे । तैं भांगाराची वोढी पडे । दोनीं जाली तरी न जोडे । लेतें आंग ॥ ६८ ॥ परी सण सुहृद संपत्ती । हे तिन्ही येकीं मिळती । जे भाग्य धरी उन्नती । आपुलां विषीं ॥ ६९ ॥ तैसें निफजवावया दान । जैं सत्त्वासि ये संवाहन । तैं देश काळ भाजन । द्रव्यही मिळे ॥ २७० ॥ तरी आधीं तंव प्रयत्नेंसीं । होआवें कुरुक्षेत्र कां काशी । ना तरी तुके जो इहींसीं । तो देशही हो ॥ ७१ ॥ तेथ रविचंद्रराहुमेळु । होतां पाहे पुण्यकाळु । का तयासारिखा निर्मळु । आनुही जाला ॥ ७२ ॥ तैसां काळीं तिये देशीं । होआवी पात्रसंपत्ती ऐसी । मूर्ति आहे धरीली जैसी । शुचित्वेंचि का ॥ ७३ ॥ आचाराचें मूळपीठ । वेदांची उतारपेठ । तैसें द्विजरत्न चोखट । पावोनियां ॥ ७४ ॥ मग तयाचां ठाईं वित्ता । निवर्तवावी स्वसत्ता । परी प्रियापुढें कांता । रिगे जैसेनि ॥ ७५ ॥ का जयाचें ठेविलें तया । देऊनि होईजे उतराइया । नाना हडपें विडा राया । दिधला जैसा ॥ ७६ ॥ तैसेनि निष्कामें जीवें । भूम्यादिक अर्पावें । किंबहुना हांवे । नेदावें उठों ॥ ७७ ॥ आणि दान जया द्यावें । तयातें ऐसेया पाहावें । जया घेतलें नुमचवे । कायसेनही ॥ ७८ ॥ साद घातलिया आकाशा । नेदी प्रतिशब्दु जैसा । कां पाहिला आरसा । येरीकडे ॥ ७९ ॥ उदकाचिये भूमिके । आफळिलेनि कंदुकें । उधळौनि कवतिकें । न येइजे हाता ॥ २८० ॥ नाना वसो घातला चारु । माथां तुरंबिला बुरु । न करी प्रत्युपकारु । जियापरी ॥ ८१ ॥ तैसें दिधलें दातयाचें । जो कोणेंही आंगें नुमचे । अर्पिलिया साम्य तयाचें । कीजे पैं गा ॥ ८२ ॥ ऐसिया जे सामग्रिया । दान निफजे वीरराया । तें सात्त्विक दानवरिया । सर्वांही जाण ॥ ८३ ॥ आणि तोचि देशु काळु । घडे तैसाचि पात्रमेळु । दानभागुही निर्मळु । न्यायगतु ॥ ८४ ॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः । दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥ २१ ॥

परी मनीं धरूनि दुभतें । चारिजे जेवीं गाईतें । का पेंव करूनि आइतें । पेरूं जाइजे ॥ ८५ ॥ नाना दिठी घालुनि आहेरा । अवंतु जाइजे सोयिरा । का वाण धाडिजे घरा । वौसयाचिया ॥ ८६ ॥ पैं कळांतर गांठीं बांधिजे । मग पुढिलांचें काज कीजे । पूजा घेऊनि रसु दीजे । पीडितांसी ॥ ८७ ॥ ऐसें जया जें दान देणें । तो तेणेंचि गा जीवनें । पुढती भुंजावा भावें येणें । दीजे जें का ॥ ८८ ॥ अथवा कोणी वाटे जातां । घेतलें उमचों न शकता । मिळे जैं पंडुसुता । द्विजोत्तमु ॥ ८९ ॥ तरी कवड्या एकासाठीं । अशेषां गोत्रांचींच किरीटी । सर्व प्रायश्चित्तें सुये मुठी । तयाचिये ॥ २९० ॥ तेवींचि पारलौकिकें । फळें वांछिजती अनेकें । आणि दीजे तरी भुके । येकाही नोहे ॥ ९१ ॥ तेंही ब्राह्मणु नेवों सरे । कीं हाणिचेनि शिणें झांसूरे । सर्वस्व जैसें चोरें । नागऊनि नेलें ॥ ९२ ॥ काय बहु सांगो सुमती । जें दीजे या मनोवृत्ती । तें दान गा त्रिजगतीं । राजस पैं ॥ ९३ ॥

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते । असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

मग म्लेंच्छांचे वसौटे । दांगाणे हन कैकटे । का शिबिरें चौहटे । नगरींचे ते ॥ ९४ ॥ तेही

तेही ठाईं मिळणी। समयो सांजवेळु कां रजनी। तेव्हां उदार होणें धनीं। चोरियेचां॥ ९५॥ पात्रें भाट नागारी। सामान्य स्त्रिया कां जुवारी। जिये मूर्तिमंते भुररीं। भुले तया॥ ९६॥ रूपानृत्याची पुरवणी। ते पुढां डोळेभारणी। गीत भाटींव तो श्रवणीं। कर्णजपु॥ ९७॥ तयाहीवरी अळुमाळु। जैं घे फुलागंधाचा गुगुळु। तंव भ्रमाचा तो वेताळु। अवतरे तैसा॥ ९८॥ तेथ विभांडुनियां जग। आणिले पदार्थ अनेग। तेणें घालूं लागे मातंग –। गवादी जैसी॥ ९९॥ एवं ऐसेनि जें जें देणें। तें तामस दान मी म्हणें। आणि घडे दैवगुणें। आणिकही एक॥ ३००॥ विपायें घुणाक्षर पडे। टाळिये काउळा सांपडे। तैसें तामसां पर्व जोडे। पुण्यदेशीं॥ १॥ तेथ देखोनि तो आथिला। योग्यु मागोंही आला। तोही दर्पा चढला। भांबावे जरी॥ २॥ तरी श्रद्धा न धरी जीवीं। तया माथाही न खालवी। स्वयें न करी ना करवी। अर्घ्यादिक॥ ३॥ आलिया न घली बैसों। तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो। हा अप्रसंगु कीर असो। तामसीं नरीं॥ ४॥ पैं बोळविजे रिणाइतु। तैसा झकवी तयाचा हातु। तूं करणें याचा बहुतु। प्रयोगु तेथ॥ ५॥ आणि जया जें दे किरीटी। तयातें उमाणी तयासाठीं। मग कुबोलें का लोटी। अवज्ञाचि॥ ६॥ हें बहु असो यापरी। मोल वेंचणें जें अवधारीं। तया नांव चराचरीं। तामस दान॥ ७॥ ऐशीं आपुलालां चिन्हीं। अळंकृतें तिन्हीं। दानें दाविलीं अवधानीं। रजतमा या॥ ८॥ तेथ मी जाणत असें। विपायें तूं गा ऐसें। कल्पिसील मानसें। विचक्षणा॥ ९॥ जें भवबंधमोचक। येकलें कर्म सात्त्विक। तरी कां वेखासी सदोख। येर बोलावीं॥ ३१०॥ परी नोसंतितां विवसी। भेटी नाहीं निधीसी। का धूं न साहतां जैसी। वाती न लगे॥ ११॥ तैसें शुद्धसत्त्वाआड। आहे रजतमाचें कवाड। तें भेदणेयातें कीड। कां म्हणावें गा॥ १२॥ आम्हीं श्रद्धादिदानांत। जें समस्तही क्रियाजात। सांगितलें कां व्याप्त। तिहीं गुणीं॥ १३॥ तेथ भरंवसेनि तिन्ही। न सांगोंचि ऐसें मानीं। परी सत्त्व दावावयां दोन्ही। बोलिलों येरें॥ १४॥ जें दोहींमाजीं तिजें असे। ते दोन्हीं सांडिताचि दिसे। अहोरात्रत्यागें जैसें। संध्यारूप॥ १५॥ तैसें रजतमविनाशें। तिजें जें उत्तम दिसे। तें सत्त्व हें आपैसें। फावासि ये॥ १६॥ एवं दावावया सत्त्व तुज। निरूपिलें तम रज। तें सांडूनि सत्त्वें काज। साधीं आपुलें॥ १७॥ सत्त्वेंचि येणें चोखाळें। करीं यज्ञादिकें सकळें। पावसी तैं करतळें। आपुलें निज॥ १८॥ सूर्यें दाविलें सांतें। काय एक न दिसे तेथें। तेवीं सत्त्वें केलें फळातें। काय नेदी॥ १९॥ हे कीर आवडतांविखीं। शक्ति सत्त्वीं आथी निकी। परी मोक्षेंसी एकी। मिसळणें जें॥ ३२०॥ तें एक आनचि आहे। तयाचा सावावो जैं लाहे। तैं मोक्षाचांही होये। गांवीं सरतें॥ २१॥ पैं भांगार जन्हीं पंधरें। तन्ही राजावळीचीं अक्षरें। लाहे तैंचि सरे। जियापरी॥ २२॥ स्वच्छें शीतळें सुगंधें। जलें होतीं सुखप्रदें। परी पवित्रत्व संबंधें। तीर्थाचेनि॥ २३॥ नई हो कां भलतैसी थोरी। परी गंगा जैं अंगीकारी। तैंचि तिये सागरीं। प्रवेशु गा॥ २४॥ तैसें सात्त्विका कर्मा किरीटी। येतां मोक्षाचिये भेटी। न पडे आडकाठी। तें वेगळें आहे॥ २५॥ हा बोलु आइकतखेवीं।

अर्जुना आधि न माये जीवीं । म्हणे देवें कृपा करावी । सांगावें तें ॥ २६ ॥ तेथ कृपाळुचक्रवर्ती । म्हणे आईक तयाची व्यक्ती । जेणें सात्त्विक तें मुक्ती - । रत्न देखिलें ॥ २७ ॥

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः । ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥

तरी अनादि परब्रह्म । जें जगदादिविश्रामधाम । तयाचें एक नाम । त्रिधा पैं असे ॥ २८ ॥ तें कीर अनाम अजाती । परी अविद्यावर्गाचिये राती - । माजी वोळखावया श्रुती । खूण केली ते ॥ २९ ॥ उपजलिया बाळकासि । नांव नाहीं तयापासीं । ठेविलेनि नांवेंसीं । ओ देत उठी ॥ ३३० ॥ कष्टले संसारशीणें । जे देवों येती गाऱ्हाणें । तया ओ दे नावें जेणें । तो संकेतु हा ॥ ३१ ॥ ब्रह्माचा अबोला फिटावा । अद्वैतत्वें तो भेटावा । ऐसा मंत्रु देखिला कणवा । वेदें बापें ॥ ३२ ॥ मग दाविलेनि जेणें एकें । ब्रह्म आळविलें कवतिकें । मागां असत ठाके । पुढां उभें ॥ ३३ ॥ परी निगमाचळशिखरीं । उपनिषदार्थनगरीं । आहाति जे ब्रह्माचां येकाहारीं । तयांसीच कळे ॥ ३४ ॥ हेंही असो प्रजापती । शक्ति जे सृष्टिकरिती । ते जया एका आवृत्ती । नामाचिये ॥ ३५ ॥ पैं सृष्टीचिया उपक्रमा - । पूर्वी गा वीरोत्तमा । वेडा ऐसा ब्रह्मा । एकला होता ॥ ३६ ॥ मज ईश्वरातें नोळखे । ना सृष्टिही करूं न शके । तो थोरु केला एकें । नामें जेणें ॥ ३७ ॥ जयाचा अर्थ जीवीं ध्यातां । जे वर्णत्रयचि जपतां । विश्वसृजनयोग्यता । आली तया ॥ ३८ ॥ तेधवां रचिले ब्रह्मजन । तयां वेद दिधलें शासन । यज्ञाऐसें वर्तन । जीविकें केलें ॥ ३९ ॥ पाठीं नेणों किती येर । स्त्रजिले लोक अपार । जाले ब्रह्मदत्त अग्रहार । तिन्हीं भुवनें ॥ ३४० ॥ ऐसें नाममंत्रें जेणें । धातयां अढंच करणें । तयाचे स्वरूप आइक म्हणे । श्रीकांतु तो ॥ ४१ ॥ तरी सर्व मंत्रांचा राजा । तो प्रणवो आदिवर्णु बुझा । आणि तत्कारु जो दुजा । तिजा सत्कारु ॥ ४२ ॥ एवं ॐतत्सदाकारु । ब्रह्मनाम हें त्रिप्रकारु । हें फुल तुरंबी सुंदरु । उपनिषदाचें ॥ ४३ ॥ येणेंसीं गा होऊनि एक । जैं चाले कर्म सात्त्विक । तैं कैवल्यातें पाइक । घरींचें करी ॥ ४४ ॥ परी कापुराचें थळींव । आणून देईल दैव । लेवों जाणणेंचि आडव । तेथ असे बापा ॥ ४५ ॥ तैसें आदरिजेल सत्कर्म । उच्चारैल ब्रह्मनाम । परी नेणिजेल जरी वर्म । विनियोगाचें ॥ ४६ ॥ तरी महंताचिया कोडी । घरा आलियाही वोढी । मानूं नेणतां अपरवडी । मुद्दल तुटे ॥ ४७ ॥ कां ल्यावया चोखट । टीक भांगार एकवट । घालूनि बांधली मोट । गळां जेवीं ॥ ४८ ॥ तैसें तोंडीं ब्रह्मनाम । हातीं तें सात्त्विक कर्म । विनियोगेंवीण काम । विफळ होय ॥ ४९ ॥ अगा अन्न आणि भूक । पासीं असे परी देख । जेऊं नेणतां बाळक । लंघनचि कीं ॥ ३५० ॥ का स्नेहा सूत्रा वैश्वानरा । जालियाही संसारा । हातवटी नेणतां वीरा । प्रकाशु नोहे ॥ ५१ ॥ तैसें वेळे कृत्य पावे । तेथिंचा मंत्रुही आठवे । परी व्यर्थ तें आघवें । विनियोगेंवीण ॥ ५२ ॥ म्हणौनि वर्णत्रयात्मक । जें हें परब्रह्मनाम एक । विनियोग तूं आइक । याचा आतां ॥ ५३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः । प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥ २४ ॥

नामींची अक्षरें तिन्हीं । कर्मा आदिमध्यनिदानीं । प्रयोजावीं पैं स्थानी । इहीं तिन्हीं ॥ ५४ ॥ हेचि एकी हातवटी । घेउनि हन किरीटी । आले ब्रह्मविद भेटी । ब्रह्माचिये ॥ ५५ ॥ ब्रह्मेंसीं होआवया एकी । ते न वंचती यज्ञादिकीं । जे चावळले वोळखी । शास्त्रांचिया ॥ ५६ ॥ तो आदि तंव ॐकारु । ध्यानें करिती गोचरु । पाठीं आणिती उच्चारु । वाचेचाही तो ॥ ५७ ॥ तेणें ध्यानें प्रकटें । प्रणवोच्चारें स्पष्टें । लागती मग वाटे । क्रियांचिये ॥ ५८ ॥ आंधारीं अभंगु दिवा । आडवीं समर्थु बोळावा । तैसा प्रणवो जाणावा । कर्मारंभीं ॥ ५९ ॥ उचितदेवोद्देशें । द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें । द्विजद्वारां हन हुताशें । यजिती पैं ते ॥ ३६० ॥ आहवनीयादि वन्ही । निक्षेपरूपीं हवनीं । यजिती पैं विधानीं । फुडे होऊनि ॥ ६१ ॥ किंबहुना नाना याग । निष्पत्तीचें घेऊनि अंग । करिती नावडतेया त्याग । उपाधींचे ॥ ६२ ॥ कां न्यायें जोडला पवित्रीं । भूम्यादिकीं स्वतंत्रीं । देशकाळशुद्ध पात्रीं । देती दानें ॥ ६३ ॥ अथवा एकांतरां कृच्छ्रीं । चांद्रायणें मासोपवासीं । शोषोनि गा धातुराशी । करिती तपें ॥ ६४ ॥ एवं यज्ञदानतपें । जियें गाजती बंधरूपें । तिहींच होय सोपें । मोक्षाचें तयां ॥ ६५ ॥ स्थळीं नावा जिया दाटिजे । जळीं तियांचि जेवीं तरिजे । तेवी बंधकीं कर्मीं सुटिजे । नामें येणें ॥ ६६ ॥ परी हें असो ऐसिया । या यज्ञदानादि क्रिया । ॐकारें सावायिलिया । प्रवर्तती ॥ ६७ ॥ तिया मोटकिया जेथ फळीं । रिगों पाहती निहाळीं । प्रयोजिती तिये काळीं । तच्छब्दु तो ॥ ६८ ॥

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपःक्रियाः । दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ॥ २५ ॥

जें सर्वांही जगापरौतें । जें एक सर्वही देखतें । तें तच्छब्दें बोलिजे तें । पैल वस्तु ॥ ६९ ॥ तें सर्वादिकत्वें चित्तीं । तद्रूप ध्यावूनियां सुमती । उच्चारेंही व्यक्ती । आणिती पुढती ॥ ३७० ॥ म्हणती तद्रूपा ब्रह्मा तया । फळेंसीं क्रिया इयां । तेचि होतु आम्हां भोगावया । कांहींचि नुरो ॥ ७१ ॥ ऐसेनि तदात्मकें ब्रह्म । तेथ उगाणूनि कर्म । आंग झाडिती न मम । येणें बोलें ॥७२ ॥ आतां ॐकारें आदरिलें । तत्कारें समर्पिले । इया रिती जया आलें । ब्रह्मत्व कर्मा ॥ ७३ ॥ तें कर्म कीर ब्रह्माकारें । जालें तेणेंही न सरे । जे करी तेणेंसी दुसरें । आहे म्हणोनि ॥ ७४ ॥ मीठ आंगें जळीं विरे । परी क्षारता वेगळी उरे । तैसें कर्म ब्रह्माकारें । गमे ते द्वैत ॥ ७५ ॥ आणि दुजे जंव जंव घडे । तंव तंव संसारभय जोडे । हें देवो आपुलेनि तोंडें । बोलती वेदें ॥ ७६ ॥ म्हणोनि परत्वें ब्रह्म असे । ते आत्मत्वें परियवसे । सच्छब्द या रिणोद्देशें । ठेविला देवें ॥ ७७ ॥ तरी ॐकार तत्कारीं । कर्म केलें जें ब्रह्म शरीरीं । जे प्रशस्तादि बोलवरी । वाखाणिलें ॥ ७८ ॥ प्रशस्तकर्मीं तिये । सच्छब्दा विनियोग आहे । तोचि आइका होये । तैसा सांगो ॥ ७९ ॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते । प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ २६ ॥

तरी सच्छब्दें येणें । आटूनि असताचें नाणें । दाविजे अव्यंगवाणें । सत्तेचें रूप ॥ ३८० ॥ जें सतचि काळें देशें । होऊं नेणेचि अनारिसें । आपणपां आपण असे । अखंडित ॥ ८१ ॥ हें दिसते

जेतुलें आहे । तें असतपणें जें नोहे । देखतां रूपीं सोये । लाभे जयाची ॥ ८२ ॥ तेणेंसी प्रशस्त तें कर्म । जें जालें सर्वात्मक ब्रह्म । देखिजे करूनि सम । ऐक्यबोधें ॥ ८३ ॥ तरी ॐकारें तत्कारें । जें कर्म दाविलें ब्रह्माकारें । तें गिळुनि होइजे एकसरें । सन्मात्रचि ॥ ८४ ॥ ऐसा हा अंतरंगु । सच्छब्दाचा विनियोगु । जाण म्हणे श्रीरंगु । मी ना म्हणें हो ॥ ८५ ॥ ना मीचि जरी हो म्हणें । तरी श्रीरंगी दुजें हेंचि उणें । म्हणोनि हें बोलणें । देवाचेंचि ॥ ८६ ॥ आतां आणिकीही परी । सच्छब्दु हा अवधारीं । सात्त्विका कर्मा करी । उपकारु जो ॥ ८७ ॥ तरी सत्कर्में चांगें । चालिलीं अधिकारबगें । परी एकाधें का आंगें । हिणावती जैं ॥ ८८ ॥ तैं उणें एकें अवयवें । शरीर ठाके आघवें । कां अंगहीन भांडावे । रथाची गती ॥ ८९ ॥ तैसें एकेंचि गुणेंवीण । संतचि परी असंतपण । कर्म धरी गा जाण । जिये वेळे ॥ ३९० ॥ तेव्हां ॐकार तत्कारीं । सावायिला हा चांगी परी । सच्छब्दु कर्मा करी । जीर्णोद्धारु ॥ ९१ ॥ तें असतपण फेडी । आणी सद्भावाचिये रूढी । निजसत्त्वाचिये प्रौढी । सच्छब्दु हा ॥ ९२ ॥ दिव्यौषध जैसें रोगिया । कां सावावो ये भंगलिया । सच्छब्दु कर्मा व्यंगलिया । तैसा जाण ॥ ९३ ॥ अथवा कांहीं प्रमादें । कर्म आपुलिये मर्यादे । चुकोनि पडे निषिद्धे । वाटे हन ॥ ९४ ॥ चालतयाही मार्गु सांडे । पारखिया अखरें पडे । राहाटीमाजीं न घडे । काइ काइ ॥ ९५ ॥ म्हणौनि तैसी कर्मा । राभस्यें सांडे सीमा । असाधुत्वाचिया दुर्नामा । येवों पाहे जैं ॥ ९६ ॥ तेथ गा हा सच्छब्दु । येरां दोहींपरीस प्रबुद्धु । प्रयोजिला करी साधु । कर्मातें यया ॥ ९७ ॥ लोहा परिसाची घृष्टी । वोहळा गंगेची भेटी । कां मृता जैसी वृष्टी । पीयूषाची ॥ ९८ ॥ पैं असाधुकर्मा तैसा । सच्छब्दुप्रयोग वीरेशा । हें असो गौरवुचि ऐसा । नामाचा यया ॥ ९९ ॥ घेऊनि येथिंचें वर्म । जैं विचारिसी हें नाम । तैं केवळ हेंचि ब्रह्म । जाणसी तूं ॥ ४०० ॥ पाहें पां ॐतत्सत् ऐसें । हें बोलणे तेथ नेतसे । जेथूनि कां हें प्रकाशे । दृश्यजात ॥ १ ॥ तें तंव निर्विशिष्ट । परब्रह्म चोखट । तयाचें हें आंतुवट । व्यंजक नाम ॥ २ ॥ परी आश्रयो आकाशा । आकाशचि का जैसा । या नामा नामी आश्रयो तैसा । अभेदु असे ॥ ३ ॥ उदयिला आकाशीं । रवीचि रवीतें प्रकाशी । हे नामव्यक्ती तैसी । ब्रह्मा करी ॥ ४ ॥ म्हणौनि त्र्यक्षर हें नाम । नव्हे जाण केवळ ब्रह्म । ययालागीं कर्म । जें जें कीजे ॥ ५ ॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते । कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥

तें याग अथवा दानें । तपादिकें गहनें । तियें निफजतु कां न्यूनें । होऊनि ठातु ॥ ६ ॥ परी परिसाचां वरकलीं । नाहीं चोखाकिडाची बोली । तैसीं ब्रह्मीं अर्पिता केलीं । ब्रह्मचि होती ॥ ७ ॥ उणिया पुरियाची परी । नुरेचि तेथ अवधारीं । निवडूं न येती सागरीं । जैसिया नदी ॥ ८ ॥ एवं पार्था तुजप्रती । ब्रह्मनामाची हे शक्ती । सांगितली उपपत्ती । डोळसा गा ॥ ९ ॥ आणि येकेकाही अक्षरा । वेगळवेगळा वीरा । विनियोगु नागरा । बोलिलों रीती ॥ ४१० ॥ आतां ऐसें एवं सुमहिम । म्हणौनि हें ब्रह्मनाम । जाणितलें कीं सुवर्म । राया तुवां ॥ ११ ॥ तरी येथूनियाचि

श्रद्धा । उपलविली हो सर्वदा । जयाचें जालें बंधा । उरों नेदी ॥ १२ ॥ जिये कर्मीं हा प्रयोगु । अनुष्ठिजे सद्विनियोगु । तेथ अनुष्ठिला सांगु । वेदुचि जाणा ॥ १३ ॥

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् । असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥

ना सांडूनि हे सोये । मोडूनि श्रद्धेचि बाहे । दुराग्रहाची त्राये । वाढऊनियां ॥ १४ ॥ मग अश्वमेध कोडी कीजे । रत्नें भरोनि पृथ्वी दीजे । एकांगुष्ठींही तपिजे । तपसाहस्त्री ॥ १५ ॥ जळाशयाचेनि नांवें । समुद्र कीजती नवे । परी किंबहुना आघवें । वृथाचि तें ॥ १६ ॥ खडकावरी वर्षलें । जैसें भस्मीं हवन केलें । कां खेंव दिधलें । साउलिये ॥ १७ ॥ नातरी चडकणा । गगन हाणितलें अर्जुना । तैसा समारंभु सुणा । गेलाचि तो ॥ १८ ॥ घाणां गाळिले गुंडे । तेथ तेल ना पेंडी जोडे । तैसें दरिद्र तेवढें । ठेलेंचि आंगीं ॥ १९ ॥ गांठीं बांधली खापरी । येथें अथवा पैलतीरीं । न सरोनि जैसी मारी । उपवासी गा ॥ ४२० ॥ तैसें कर्मजातें तेणें । नाहीं ऐहिकीचें भोगणें । तेथ परत्रु तो कवणें । अपेक्षावा ॥ २१ ॥ म्हणौनि ब्रह्मनामश्रद्धा । सांडूनि कीजे जो धांदा । हें असो शिणु नुसधा । दृष्टादृष्टीं तो ॥ २२ ॥ ऐसें कलुषकरिकेसरी । त्रितापतिमिरतमारी । श्रीवीरवरनरहरी । बोलिलें तेणें ॥ २३ ॥ तेथ निजानंदा बहुवसा - । माजीं अर्जुन तो सहसां । हरपला चंद्रु जैसा । चांदिणेनि ॥ २४ ॥ अहो संग्रामु हा वाणिया । मापें नाराचांचिया अणिया । सूनि मांस घे मवणिया । जीवितेंसी ॥ २५ ॥ ऐसिया समयीं कर्कशे । भोगीजत स्वानंदराज्य कैसें । आजि भाग्योदयो हा नसे । आणिके ठाईं ॥ २६ ॥ संजयो म्हणे कौरवराया । गुणा रिझों ये रिपूचिया । आणि गुरुही हा आमुचिया । सुखाचा येथ ॥ २७ ॥ हा न पुसता हे गोठी । तरी देवो कां सोडिते गांठी । तरी कैसेनि आम्हां भेटी । परमार्थेंसी ॥ २८ ॥ होतों अज्ञानाचां आंधारां । वोसंतीत जन्मवाहरा । तों आत्मप्रकाशमंदिरा - । आंतु आणिलें ॥ २९ ॥ एवढा आम्हां तुम्हां थोरु । केला येणें उपकारु । म्हणोनि हा व्याससहोदरु । गुरुत्वें होय ॥ ४३० ॥ तेवींचि संजयो म्हणे चित्तीं । हा अतिशयो या नृपती । खुपेल म्हणौनि किती । बोलत असों ॥ ३१ ॥ ऐसी हे बोली सांडिली । मग येरीचि गोठी आदरिली । जे पार्थें कां पुसिली । श्रीकृष्णातें ॥ ३२ ॥ याचें जैसें कां करणें । तैसें मीही करीन बोलणें । ऐकिजो ज्ञानदेवो म्हणे । निवृत्तीचा ॥ ४३३ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगोनाम सप्तदशोऽध्यायः ॥ (श्लोक २८; ओव्या ४३३)

॥ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

॥ ज्ञानेश्वरी ॥

(अध्याय अठरावा)

जयजय देव निर्मळ। निजजनाखिलमंगळ। जन्मजराजलदजाळ - । प्रभंजन॥ १ ॥ जयजय देव प्रबळ। विदळितामंगळकुळ। निगमागमद्रुमफळ। फलप्रद ॥ २ ॥ जयजय देव सकळ। विगतविषयवत्सल । कलितकाळकौतूहल । कलातीत ॥ ३ ॥ जयजय देव निष्कळ । स्फुरदमंदानंदबहळ । नित्यनिरस्ताखिलमळ । मूलभूत ॥ ४ ॥ जयजय देव स्वप्रभ । जगदंबुदगर्भनभ । भुवनोद्भवारंभस्तंभ । भवध्वंस ॥ ५ ॥ जयजय देव निश्चळ । चलितचित्तपानतुंदिल । जगदुन्मीलनाविरल - । केलिप्रिय ॥ ६ ॥ जयजय देव विशुद्ध । विदुदयोद्यानद्विरद । शमदममदनमदभेद । दयार्णव ॥ ७ ॥ जयजय देवैकरूप । अतिकृतकंदर्पसर्पदर्प । भक्तभावभुवनदीप । तापापह ॥ ८ ॥ जयजय देव अद्वितीय । परिणतोपरमैकप्रिय । निजजनजित भजनीय । मायागम्य ॥ ९ ॥ जयजय देव श्रीगुरो । अकल्पनाख्यकल्पतरो । स्वसंविद्द्रुमबीजप्ररो - । हणावनी ॥ १० ॥ हें काय एकैक ऐसैसें । नानापरिभाषावशें । स्तोत्र करूं तुजोद्देशें । निर्विशेषा ॥ ११ ॥ जिहीं विशेषणीं विशेषिजे । तें दृश्य नव्हे रूप तुझें। हें जाणें मी म्हणोनि लाजें। वानणां इहीं॥ १२ ॥ परी मर्यादेचा सागरु। हा तंवचि तया डगरु। जंव न देखे सुधाकरु। उदया आला ॥ १३ ॥ सोमकांतु निजनिर्झरीं। चंद्रा अर्घ्यादिक न करी । तें तोंचि अवधारीं । करवीं कीं जी ॥ १४ ॥ नेणों कैसीं वसंतसंगें । अवचितिया वृक्षाची अंगें । फुटतीं तैं तयांही जोगें । धरणें नोहे ॥ १५ ॥ पद्मिनी रविकिरण । लाहे मग लाजे कवण। कां जळें शिवतलें लवण। आंग भुले॥ १६ ॥ तैसा तूंतें जेथ मी स्मरें। तेथ मीपण मी विसरें। मग जाकळिला ढेंकरें। तृप्तु जैसा ॥ १७ ॥ मज तुवां जी केलें तैसें। माझें मीपण धाडूनि देशें। स्तुतिमिषेच पां पिसें। बांधलें वाचे॥ १८ ॥ ना एन्हवीं तरी आठवीं। राहोनि स्तुति जैं करावी । तैं गुणागुणिया धरावी । सरोभरी कीं ॥ १९ ॥ तरी तूं जी एकरसाचें लिंग । केवीं करूं गुणागुणीं विभाग । मोतीं फोडोनि सांधिता चांग । कीं तैसेंचि भलें ॥ २० ॥ आणि तूं बापु तूंचि माय। इहीं बोलीं ना स्तुति होय। डिंभोपाधिक आहे। विटाळु तेथें॥ २१ ॥ जी जालेनि पाइकें आलें। तें गोसावीपण केवी बोलें। ऐसें उपाधी उशिटलें। काइ वानूं॥ २२ ॥ तरी आत्मा तूं एकसरा। हेंहीं म्हणतां दातारा। आंतुल तूं बाहेरा। घापतासी ॥ २३ ॥ म्हणूनि

साचा तुजलागीं । स्तुति न देखें जी जगीं । मौनावांचूनि लेणें आंगीं । सुसीना मा ॥ २४ ॥ स्तुति काहीं न बोलणें । पूजा कांहीं न करणें । सन्निधीं कांहीं न होणें । तुझां ठायीं ॥ २५ ॥ तरी जिंतलें जैसें भुली । पिसें आलापु घाली । तैसें वानूं तें माउली । उपसाहावे तुवां ॥ २६ ॥ आतां गीतार्थाची मुक्तमुदी । लावीं माझिये वाग्वृद्धी । जे माने हे सभासदीं । सज्जनांचां ॥ २७ ॥ येथ म्हणितले श्रीनिवृत्ती । नको हें पुढतपुढती । परिसीं लोहा घृष्टी किती । वेळोवेळां कीजे गा ॥ २८ ॥ तंव विनवी ज्ञानदेवो । म्हणे हो कां जी पसावो । तरी अवधान देतु देवो । ग्रंथा आतां ॥ २९ ॥ जी गीतारत्नप्रासादाचा । कळसु अर्थ चिंतामणीचा । सर्व गीतादर्शनाचा । पाढाऊ जो ॥ ३० ॥ लोकीं तरी आथी ऐसें । जे दुरूनि कळसु दिसे । आणि भेटीचि हातवसे । देवतेची तिये ॥ ३१ ॥ तैसेंचि एथही आहे । जे एकेंचि येणें अध्यायें । आघवाचि दृष्ट होये । गीतागमु हा ॥ ३२ ॥ मी कळसु याचि कारणें । अठरावा अध्यायो म्हणें । उवाइला बादरायणें । गीताप्रासादा ॥ ३३ ॥ नोहे कळसापरतें कांहीं । प्रसादीं काम नाहीं । तें सांगतसे गीता ही । संपलेपणें ॥ ३४ ॥ व्यासु सहजें सूत्री बळी । तेणें निगमरत्नाचळीं । उपनिषदर्थाची माळी । माजीं खांडिली ॥ ३५ ॥ तेथ त्रिवर्गाचा अणुआरु । आडऊ निघाला जो अपारु । तो महाभारतप्राकारु । भोंवता केला ॥ ३६ ॥ माजीं आत्मज्ञानाचें एकवट । दळवाडें झाडूनि चोखट । घडिलें पार्थवैकुंठ - । संवाद कुसरी ॥ ३७ ॥ निवृत्तिसूत्र सोडणिया । सर्व शास्त्रार्थ पुरवणिया । आवो साधिला मांडणिया । मोक्षरेखेचा ॥ ३८ ॥ ऐसेनि करितां उभारा । पंधरा अध्यायांत पंधरा । भूमी निर्वाळलिया पुरा । प्रासादु जाहला ॥ ३९ ॥ उपरि सोळावा अध्यायो । तो ग्रीवेघंटेचा आवो । सप्तदशु तोचि ठावो । पडघाणिये ॥ ४० ॥ तयाहीवरी अष्टादशु । तो अपैसा मांडला कळसु । उपरी गीतादिकीं व्यासु । ध्वजें लागला ॥ ४१ ॥ म्हणोनि मागील जे अध्याय । ते चढते भूमीचे आये । तयांचें पुरें दाविताहे । आपुलां आंगीं ॥ ४२ ॥ जालया कामा नाहीं चोरी । ते कळसें होय उजरी । तेवीं अष्टादशु विवरी । साद्यंत गीता ॥ ४३ ॥ ऐसा व्यासें विंदाणियें । गीताप्रासादु सोडणिये । आणूनि राखिले प्राणिये । नानापरी ॥ ४४ ॥ एक प्रदक्षिणा जपाचिया । बाहेरोनि करिती यया । एक ते श्रवणमिषें छाया । सेविती ययाची ॥ ४५ ॥ एक ते अवधानाचा पुरा । विडापाऊड भीतरां । देऊनि रिघती गाभारां । अर्थज्ञानाचां ॥ ४६ ॥ ते निजबोधे उराउरी । भेटती आत्मया श्रीहरी । परी मोक्षप्रसादीं सरी । सर्वांही आथी ॥ ४७ ॥ समर्थाचिये पंक्तिभोजनें । तळिल्या वरिल्या एक पक्वान्नें । तेवीं श्रवणें अर्थें पठणें । मोक्षुचि लाभे ॥ ४८ ॥ ऐसा गीता वैष्णवप्रासादु । अठरावा अध्याय कळसु विशदु । म्यां म्हणितला हा भेदु । जाणोनियां ॥ ४९ ॥ आतां सप्तदशापाठीं । अध्याय कैसेनि उठी । तो संबंधु सांगों दिठी । दिसे तैसा ॥ ५० ॥ न मोडतां दोन्ही आकार । घडिलें एक शरीर । हें अर्धनारीनटेश्वर - । रूपीं दिसे ॥ ५१ ॥ कां गंगायमुनाउदक । वोघबगें वेगळिक । दावी होऊनि एक । पाणीपणें ॥ ५२ ॥ नाना वाढिली दिवसें । कळा बिंबीं पैसे । परी

सिनानें लेवे जैसें। चंद्री नाहीं॥ ५३ ॥ तैसीं सिनानीं चारीं पदें। श्लोक श्लोकावच्छेदें। अध्यावो अध्यायभेदें। गमे कीर॥ ५३ ॥ परी प्रमेयाची उजरी। आनान रूप न धरी। नाना रत्नमणीं दोरी। एकचि जैसी ॥ ५५ ॥ मोतियें मिळोनि बहुवें। एकावळीचा पाडु आहे। परी शोभे रूप होये। एकचि तेथ ॥ ५६ ॥ फुलां फुलसरां लेख चढे। द्रुतीं दुजी अंगुळी न पडे। श्लोक अध्याय तेणें पाडें। जाणावे हे ॥ ५७ ॥ सात शतें श्लोक। अध्यायां अठरांचें लेख। परि देवो बोलिले एक। जें दुजें नाहीं ॥ ५८ ॥ आणि म्यांहीं न सांडूनि ते सोये। ग्रंथा व्यक्ती केली आहे। प्रस्तुत तेणें निवाहें। निरूपण आइका ॥ ५९ ॥ तरी सतरावा अध्यावो। पावतां पुरता ठावो। जें संपतां श्लोकीं देवो। ऐसें बोलिले ॥ ६० ॥ ना ब्रह्मनामाचां विखीं। बुद्धि सांडूनि आस्तिकीं। कर्में कीजती तितुकीं। असंतें होती ॥ ६१ ॥ हा ऐकोनि देवाचा बोलु। अर्जुना आला डोलु। म्हणे कर्मनिष्ठा मळु। ठेविला देखों॥ ६२ ॥ तो अज्ञानांधु तंव बापुडा। ईश्वरुचि न देखे एवढा। तेथ नाम एक पुढां। कां सुझे तया ॥ ६३ ॥ आणि रजतमें दोन्ही। गेलियावीण श्रद्धा सानी। ते कां लागे अभिधानीं। ब्रह्माचिये॥ ६४। मग कोता खेंव देणें। वार्तेवरील धांवणें। संडी पडे खेळणें। नागिणीचें तें ॥ ६५ ॥ तैसीं कर्में दुवाडें। तयां जन्मांतराची कडे। दुर्मेळावे येवढे। कर्मामाजीं ॥६६ ॥ ना विपायें हें उजू होये। तरी ज्ञानाचीच योग्यता लाहे। एऱ्हवीं येणेंचि जाये। निरयालया ॥ ६७॥ कर्मीं हा ठावोवरी। आहाती बहुवा अवसरी। आता कर्मठां कैं वारी। मोक्षाची हे ॥ ६८ ॥ तरी फिटो कर्माचा पांगु। कीजो अवघाचि त्यागु। आदरिजो अव्यंगु। संन्यासु तो ॥ ६९ ॥ कर्मबाधेची कहीं। जेथ भयाची गोष्टी नाहीं। तें आत्मज्ञान जिहीं। स्वाधीन होय ॥ ७० ॥ ज्ञानाचे आवाहनमंत्र। जें ज्ञानपिकतें सुक्षेत्र। ज्ञानआकर्षिते सूत्र –। तंतु जे का॥ ७१ ॥ ते दोनी संन्यास त्याग। अनुष्ठुनि सुटो जग। तरी हेंचि आतां चांग। व्यक्त पुसों ॥ ७२ ॥ ऐसें म्हणोनि पार्थें। त्यागसंन्यासव्यवस्थे। रूप होआवया जेथें। प्रश्नु केला ॥ ७३ ॥ तेथ प्रत्युत्तरें बोली। श्रीकृष्णें जे चावळिली। तया व्यक्ती जाली। अष्टादशा॥ ७४ ॥ एवं जन्यजनकभावें। अध्यायो अध्यायातें प्रसवे। आतां ऐका बरवें। पुसिलें तें ॥ ७५ ॥ तरी पंडुकुमरें तेणें। देवाचें सरतें बोलणें। जाणोनि अंत:करणें। काणी घेतली ॥ ७६ ॥ एऱ्हवीं तत्त्वविषयीं भला। तो निश्चितु असे कीर जाहला। परी देवो राहे उगला। तें साहावेना ॥ ७७ ॥ वत्स धालयाही वरी। धेनु न वचावी दुरी। अनन्य प्रीतीची परी। ऐसीच आहे ॥ ७८ ॥ तेणें काजेंवीणही बोलावें। तें देखिलें तरी पाहावें। भोगितां चाड दुणावे। पढियंताठायीं॥ ७९ ॥ ऐसी प्रेमाची हे जाती। पार्थ तंव तेचि मूर्ती। म्हणोनि करूं लाहे खंती। उगेपणाची ॥ ८० ॥ आणि संवादाचेनि मिषें। जे अव्यवहारी वस्तु असे। तेचि भोगिजे कीं जैसें। आरिसां रूप॥ ८१ ॥ मग संवादु तोही पारुखे। तरी भोगणें भोगिता थोके। हे कां साहावेल सुखें। लांचावलेया ॥ ८३ ॥ यालागीं त्याग संन्यास। पुसावयाचें घेऊनि मिस। परतविलेंचि दुस। गीतेचें तें॥ ८३ ॥ हा अठरावा अध्यायो

नोहे । हे एकाध्यायी गीताचि आहे । जैं वांसरूंचि गाय दुहे । तैं वेळु कायसा ॥ ८४ ॥ तैसी संपतां अवसरीं । गीता आदरविली माघारीं । स्वामिभृत्याचा न करी । संवादु काई ॥ ८५ ॥ परी हें असों ऐसें । अर्जुने पुसिजत असे । म्हणे विनंती विश्वेशें । अवधारिजो ॥ ८६ ॥

अर्जुन उवाच : संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् । त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥

हां जी संन्यासु आणि त्यागु । इयां दोहीं एक अर्थी लागु । जैसा संघातु आणि संघु । संघातेंचि बोलिजे ॥ ८७ ॥ त्यागें तैसा संन्यासें । त्यागुचि बोलिजतु असे । आमचेनि तंव मानसें । जाणिजे हेंचि ॥ ८८ ॥ ना कांहीं आथी अर्थभेदु । तो देव करोतु विशदु । येथ म्हणति मुकुंदु । भिन्नचि पैं ॥ ८९ ॥ एन्हवीं अर्जुना तुझां मनीं । त्याग संन्यास दोनी । एकार्थ गमले हें मानीं । मी ही साच ॥ ९० ॥ इहीं दोन्हीं कीर शब्दीं । त्यागुचि बोलिजे त्रिशुद्धी । परी कारण एथ भेदीं । येतुलेंचि ॥ ९१ ॥ जें निपटूनि कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यासु म्हणिजे । आणि फलमात्र का त्यजिजे । तो त्यागु गा ॥ ९२ ॥ तरी कोणा कर्माचें फळ । सांडिजे कोण कर्म केवळ । हेंही सांगों विवळ । चित्त दे पां ॥ ९३ ॥ तरी आपैसीं दांगीं डोंगर । झाडे लागती अपार । तैसे लांबे राजागर । नुठिती ते ॥ ९४ ॥ न पेरितां सैंघ तृणें । उठती तैसें साळीचें होणें । नाहीं गा राबाउणें । जयापरी ॥ ९५ ॥ कां अंग जाहले सहजें । परी लेणें उद्यमें कीजे । नदी आपैसी आपादिजे । विहिरी जेवीं ॥ ९६ ॥ तैसें नित्य नैमित्तिक । कर्म होय स्वाभाविक । परी न कामितां कामिक । न निफजे जें ॥ ९७ ॥

श्रीभगवानुवाच : काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥

कामनेचेंनि दळवाडें । जें उभारावया घडे । अश्वमेधादिक फुडे । याग जेथ ॥ ९८ ॥ वापी कूप आराम । अग्रहारें हन महाग्राम । आणीकही नानासंभ्रम । व्रतांचे ते ॥ ९९ ॥ ऐसें इष्टापूर्त सकळ । जया कामना एक मूळ । जें केलें भोगवी फळ । बांधोनियां ॥ १०० ॥ देहाचिया गांवा आलिया । जन्ममृत्यूचिया सोहळिया । ना म्हणों नये धनंजया । जियापरी ॥ १ ॥ का ललाटींचे लिहिले । न मोडे गा कांहीं केलें । काळेगोरेपण धुतलें । फिटों नेणे ॥ २ ॥ केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसें । न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना ॥ ३ ॥ कां कामनाही न करितां । अवसांत घडे पंडुसुता । तरी वायकांडें न झुंझतां । लागे जैसें ॥ ४ ॥ गूळ नेणतां तोंडीं । घातला देचि गोडी । आगी मानूनि राखोंडी । चेपिली पोळी ॥ ५ ॥ काम्यकर्मीं हें एक । सामर्थ्य आथी स्वाभाविक । म्हणोनि नको कौतुक । मुमुक्षूं एथ ॥ ६ ॥ किंबहुना पार्था ऐसें । जे काम्यकर्म गा असे । तें त्यजिजे विष जैसें । वोकूनियां ॥ ७ ॥ मग तया त्यागातें जगीं । संन्यासु ऐसिया भंगीं । बोलिजे अंतरंगीं । सर्वद्रष्टा ॥ ८ ॥ हें काम्यकर्म सांडणें । तें कामनेतेंचि उपडणें । धनत्यागें दवडणें । भय जैसें ॥ ९ ॥ आणि सोमसूर्यग्रहणें । येऊनि करविती पार्वणें । कां मातापितरमरणें । अंकित जे दिवस ॥ ११० ॥ अथवा अतिथी हन पावे । ऐसैसें पडे जें करावें ।

तें तें कर्म जाणावें । नैमित्तिक गा ॥ ११ ॥ वार्षिया क्षोभे गगन । वसंतें दुणावे वन । देहा शृंगारी यौवन - । दशा जैसी ॥ १२ ॥ का सोमकांतु सोमें पघळे । सूर्ये फांकती कमळें । एथ असे तेंचि पाल्हाळे । आन नये ॥ १३ ॥ तैसें नित्य जें का कर्म । तेंचि निमित्ताचें लाहे नियम । एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय ॥ १४ ॥ आणि सायंप्रातर्मध्यान्हीं । जें करणें तेंही प्रतिदिनीं । परि दृष्टि जैसी लोचनीं । अधिक नोहे ॥ १५ ॥ कां नापादितां गती । चरणीं जैसी आथी । नातरी ते दीप्ती । दीपबिंबीं ॥ १६ ॥ वासु नेदिता जैसें । चंदनीं सौगंध्य असे । अधिकाराचें तैसें । रूपचि जें ॥ १७ ॥ नित्य कर्म ऐसें जनीं । पार्था बोलिजे तें मानीं । एवं नित्य नैमित्तिक दोन्ही । दाविलीं तुज ॥ १८ ॥ हेंचि नित्यनैमित्तिक । अनुष्ठेय आवश्यक । म्हणौनि म्हणों पाहती एक । वांझ ययातें ॥ १९ ॥ परी भोजनीं जैसें होये । तृप्ति लाभे भूक जाये । तैसें नित्यनैमित्तिकीं आहे । सर्वांगीं फळ ॥ १२० ॥ कीड आगिठां पडे । तरी मळु तुटे वानी चढे । या कर्मा तया सांगडें । फळ जाणावें ॥ २१ ॥ जे प्रत्यवाय तंव गळे । स्वाधिकार बहुवें उजळें । तेथ हातोफळिया मिळे । सद्गतीसी ॥ २२ ॥ येवढेवरी ढिसाळ । नित्यनैमित्तिकीं आहे फळ । परी तें त्यजिजे मूळ । नक्षत्रीं जैसें ॥ २३ ॥ लता पिके आघवी । तंव चूत बांधे पालवी । मग हात न लावित माधवी । सोडूनि घाली ॥ २४ ॥ तैसी नोलांडितां रेखा । चित्त दीजे नित्यनैमित्तिका । पाठीं फळा कीजे अशेखा । वांताचे वानी ॥ २५ ॥ यया कर्मफलत्यागातें । त्यागु म्हणती पैं जाणते । एवं संन्यास त्याग तूतें । परिसविले ॥ २६ ॥ हा संन्यासु जैं संभवे । तैं काम्य बाधूं न पावे । निषिद्ध तंव स्वभावें । निषेधें गेलें ॥ २७ ॥ आणि नित्यादिक जें असें । तें येणें फळत्यागें नासे । शिर लोटलिया जैसें । येर आंग ॥ २८ ॥ मग सस्य फळपाकांत । तैसें निमालिया कर्मजात । आत्मज्ञान गिंवसित । अपैसें ये ॥ २९ ॥ ऐसिया निगुती दोनी । त्याग संन्यास अनुष्ठानीं । पडले गा आत्मज्ञानीं । बांधती पाटु ॥ १३० ॥ नातरी हे निगुती चुके । मग त्यागु कीजे हाततुकें । तैं काहीं न त्यजे अधिकें । गोविंचि पडे ॥ ३१ ॥ जें औषध व्याधी अनोळख । तें घेतलिया परतें विख । कां अन्न न मानितां भूक । न मारी काय ॥ ३२ ॥ म्हणोनि त्याज्य जें नोहे । तेथ त्यागातें न सुवावें । त्याज्यालागीं नोहावें । लोभापर ॥ ३३ ॥ चुकलिया त्यागाचें वेझें । केला सर्वत्यागुही होय वोझें । न देखति सर्वत्र जुंझे । वितराग ते ॥ ३४ ॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः । यज्ञदानतपः कर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

एकां फळाभिलाष न ठाके । ते कर्मांतें म्हणती बंधकें । जैसें आपण नग्न भांडकें । जगातें म्हणे ॥ ३५ ॥ का जिव्हालंपट रोगिया । अन्नें दूषी धनंजया । आंगा न रुसे कुष्टिया । मासियां कोपे ॥ ३६ ॥ तैंसे फळकाम दुर्बळ । म्हणती कर्मचि किडाळ । मग निर्णो देती केवळ । त्यजावें ऐसा ॥ ३७ ॥ एक म्हणती यागादिक । करावेचि आवश्यक । जे यावांचूनि शोधक । आन नाहीं ॥ ३८ ॥ मनशुद्धीचां मार्गीं । जैं विजयी व्हावें वेगीं । तैं कर्म सबळालागीं ।

आळसु न कीजे ॥ ३९ ॥ भांगार आथी शोधावें । तरी आगीं जेवीं नुबगावें । कां आरिसयालागीं सांचावें । अधिक रज ॥ १४० ॥ ना लुगडी चोखें होआवीं । ऐसें आथी जरी जीवीं । तरी संवदणी न मानावी । मलिन जैसी ॥ ४१ ॥ तैसीं कर्में क्लेशाकारें । म्हणोनि न न्यावीं अव्हेरें । कां अन्न लाभे अरुवारें । रांधितिये उणें ॥ ४२ ॥ इहीं इहीं गा शब्दीं । एक कर्मी बांधविती बुद्धी । ऐसा त्यागु विसंवादीं । पडोनि ठेला ॥ ४३ ॥ परी आतां विसंवादु तो फिटे । त्यागाचा निश्चयो भेटे । तैसें बोलों गोमटें । अवधान देईं ॥ ४४ ॥

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम । त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः ॥ ४ ॥

तरी त्यागु एथें पांडवा । त्रिविधु पैं जाणावा । तया त्रिविधाही बरवा । विभागु सांगों ॥ ४५ ॥ त्यागाचे तिन्ही प्रकार । कीजती जरी गोचर । तरी तूं इत्यर्थाचें सार । इतुलें जाण ॥ ४६ ॥ मज सर्वज्ञाचिये बुद्धी । जे आलोट माने त्रिशुद्धी । तें निश्चयतत्त्व आधीं । अवधारीं पां ॥ ४७ ॥ तरी आपुलिये सोडवणे । जो मुमुक्षु जागों म्हणे । तया सर्वस्वें करणें । हेंचि एक ॥ ४८ ॥

यज्ञदानतपः कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् । यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

जियें यज्ञदानतपादिकें । इयें कर्में जियें आवश्यकें । तियें न सांडावीं पांथिकें । पाउलें जैसीं ॥ ४९ ॥ हारपलें न देखिजे । तंव तयाचा मागु न सांडिजे । का न धातां न लोटिजे । भाणें जेंवीं ॥ १५० ॥ नाव थडी न पवतां । न सांडिजे केळी न फळतां । कां ठेविलें न दिसतां । दीपु जैसा ॥ ५१ ॥ तैसी आत्मज्ञानविखीं । जंव निश्चिती नाहीं निकी । तंव नोहावें यागादिकीं । उदासीना ॥ ५२ ॥ पैं स्वाधिकारानुरूपें । तियें दानें याग तपें । अनुष्ठावींचि आक्षेपें । अधिकेंवर ॥ ५३ ॥ जें चालणें वेगावत जाये । तो वेगु बैसावयाचि होये । तैसा कर्मातिशयो आहे । नैष्कर्म्यालागीं ॥ ५४ ॥ अधिकें जंव जंव औषधी । सेवेचि मांडी बांधी । तंव तंव मुकिजे व्याधी । तयाचिये ॥ ५५ ॥ तैसीं कर्में हातोपातीं । जैं कीजती यथानिगुती । तैं रजतमें झडती । झाडा देऊनि ॥ ५६ ॥ कां पाठोवाटीं पुटें । भांगारा खारु देणें घटे । तैं कीड झडकरी तुटे । निर्व्याजु होय ॥ ५७ ॥ तैसें निष्ठा केलें कर्म । झाडी करूनि रजतम । सत्त्वशुद्धीचें धाम । डोळां दावी ॥ ५८ ॥ म्हणोनिया धनंजया । सत्त्वशुद्धी गिंवसितया । तीर्थांचिया सावाया । आलीं कर्में ॥ ५९ ॥ तीर्थें बाह्यमळु क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळे । एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेंचि ॥ १६० ॥ तृषार्ता मरुदेशीं । झळे अमृतें वोळली जैसी । कीं अंधालागीं डोळ्यांसी । सूर्यु आला ॥ ६१ ॥ बुडतया नदीचि धाविन्नली । पडतया पृथ्वीच कळवळिली । निमतया मृत्यूनें दिधली । आयुष्यवृद्धी ॥ ६२ ॥ तैसें कर्में कर्मबद्धता । मुमुक्षु सोडविले पंडुसुता । जैसा रसरीती मरतां । राखिला विषें ॥ ६३ ॥ तैसीं एके हातवटिया । कर्में केलीं धनंजया । बंधकेंचि सोडवावया । मुख्यें होती ॥ ६४ ॥ आतां तेचि हातवटी । तुज सांगों गोमटी । जया कर्मासि किरीटी । कर्मचि रुसे ॥ ६५ ॥

एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च । कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥

तरी महायागप्रमुखें । कर्मे निफजतांही अचुकें । कर्तेपणाचें न ठाके । फुंजणें आंगीं ॥ ६६ ॥ जो मोलें तीर्था जाये । तया मी यात्रा करितु आहें । ऐसी श्लाघ्यतेचा नोहे । तोषु जीवीं ॥ ६७ ॥ का मुद्रा समर्थाचिया । जो एकटु झोंबे राया । तो मी जिणता ऐसिया । गर्वा नये ॥ ६८ ॥ जो कांसे लागोनि तरे । तया पोहती उर्मी नुरे । पुरोहितु नाविष्करे । दातेपणें ॥ ६९ ॥ तैसें कर्तृत्व अहंकारें । नेघोनि यथा अवसरें । कृत्यजाताचीं निरहरें । सारीजती ॥ १७० ॥ आणि केलां कर्मीं पांडवा । जो आथी फळाचा यावा । तया मोहरा हों नेदावा । मनोरथु ॥ ७१ ॥ आधींचि फळीं आस तुटिया । कर्मे आरंभावीं धनंजया । परावें बाळ धाया । पाहिजे जैसें ॥ ७२ ॥ पिंपरुवांचिया आशा । न शिंपिजे पिंपळु जैसा । तैसिया फळनिराशा । कीजती कर्मे ॥ ७३ ॥ सांडूनि दुधाची टकळी । गोवारी गांवगोधने वेंटाळी । किंबहुना कर्मफळीं । तैसें कीजे ॥ ७४ ॥ ऐसी हे हातवटी । घेऊनि जे क्रिया उठी । आपुलिया आपण गांठी । लाहेचि तो ॥ ७५ ॥ म्हणोनि फळीं लागु । सांडोनि देहसंगु । कर्मे करावी हा चांगु । निरोपु माझा ॥ ७६ ॥ जो जीव बंधें शिणला । सुटके जाचे आपलां । तेणें पुढतपुढती या बोला । आन न कीजे ॥ ७७ ॥

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते । मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७॥

ना आंधाराचेनि रोखें । जैसीं डोळां रोंविजती नखें । तैसा कर्मद्वेषें जो अशेखें । कर्मेंचि सांडी ॥ ७८ ॥ तयाचें जें कर्म सांडणें । तें तामस पैं मी म्हणें । शिसाराचां रागीं लोटणें । शिरचि जैसें ॥ ७९ ॥ हा गा मार्गु दुवाडु होये । तरी निस्तरितील पाये । कीं तेचि खांडणें आहे । मार्गापराधें ॥ १८० ॥ भुकेलियापुढें अन्न । हो का भलतैसें उन्ह । तरी बुद्धी न घेतां लंघन । भाणें पापरां हालयां ॥ ८१ ॥ तैसा कर्माचा बाधु कर्मे । निस्तरिजे करितेनि वर्मे । हें तामसु नेणे भ्रमें । माजविला ॥ ८२ ॥ कीं स्वभावें आलें विभागा । तें कर्मचि वोसंडी पैं गा । परी झणें आतळा त्यागा । तामसा तया ॥ ८३ ॥

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् । स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८॥

अथवा स्वाधिकारु बुझे । आपुलें विहितही सुजे । परी करितया उभजे । निबरपणा ॥ ८४ ॥ जे कर्मारंभाची कड । नावेक होय दुवाड । वाहतिये वेळे जड । शिदोरी जैसी ॥ ८५ ॥ निंब जिभे कडुवट । हिरडा पहिलें तुरटु । तैसा कर्मा ऐल शेवटु । खणुवाळा होय ॥ ८६ ॥ गाई दुवाड शिंग । शेंवतीये अडव आंग । भोजनसुख महाग । रांधितां ठाईं ॥ ८७ ॥ तैसें पुढतपुढती कर्म । आरंभींच अति विषम । म्हणौनि तो तें श्रम । करितां मानी ॥ ८८ ॥ एन्हवीं विहितत्त्वें मांडी । परी घालितां असुरवाडीं । येथ पोळला ऐसा सांडी । आदरिलेंही ॥ ८९ ॥ म्हणे वस्तु देहासारिखी । आली बहुवें भाग्यविशेखीं । मा जाचूं कां कर्मादिकीं । पापिया जैसा ॥ १९० ॥ केलां कर्मीं जें द्यावें । ते झणें मज होआवें । आजि भोगूं ना कां बरवे । हातींचे भोग ॥ ९१ ॥ ऐसा शरीराचिया क्लेशा - । भेणें कर्मे वीरेशा । सांडी तो परियेसा । राजसु त्यागु ॥ ९२ ॥

एऱ्हवीं तेथेंही कर्म सांडे । परी त्यागफळ न जोडे । जैसें उतलें आगीं पडे । तें होमा नलगे ॥ ९३ ॥ कां बुडोनि प्राण गेले । ते अर्धोदकीं निमाले । हें म्हणों नये जाहलें । दुर्मरणचि ॥ ९४ ॥ तैसें देहाचेनि लोभें । जेणें कर्मा पाणी सुभे । तेणें साच न लभे । त्यागाचें फळ ॥ ९५ ॥ किंबहुना आपुलें । जैं ज्ञान होय उदया आलें । तैं नक्षत्रातें पाहलें । गिळी जैसें ॥ ९६ ॥ तैशा सकारण क्रिया । हारपती धनंजया । तो कर्मत्यागु ये जया । मोक्षफळासी ॥ ९७ ॥ तें मोक्षफळ अज्ञाना । त्यागिया नाहीं अर्जुना । म्हणोनि त्यागु न माना । राजसु तो ॥ ९८ ॥ तरी कोणें पां एथ त्यागें । तें मोक्षफळ घर रिघे । हेंही आइक प्रसंगें । बोलिजेल ॥ ९९ ॥

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन । सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्याग: सात्त्विको मत: ॥ ९ ॥

तरी स्वाधिकाराचेनि नांवें । जें वाटियां आलें स्वभावें । तें आचरे विधिगौरवें । शृंगारोनि ॥ २०० ॥ परी हें मी करितु असें । ऐसा आठवु त्यजी मानसें । तैसेंचि पाणी दे आशे । फळाचिये ॥ १ ॥ पैं अवज्ञा आणि कामना । मातेचां ठायी अर्जुना । केलिया दोनी पतना । हेतु होती ॥ २ ॥ तरी दोनी यें त्यजावीं । मग माताचि ते भजावी । वांचुनि मुखालागीं वाळावी । गायचि सगळी ॥ ३ ॥ आवडतिये फळीं । असारें साली आंठोळी । त्यासाठीं अवगळी । फळातें कोण्ही ॥ ४ ॥ तैसा कर्तृत्वाचा मदु । आणि कर्मफळाचा आस्वादु । या दोहींचें नांव बंधु । कर्माचा कीं ॥ ५ ॥ तरी या दोहींचां विखीं । जैसा बापु नातळे लेंकी । तैसा हों न शके दु:खी । विहिता क्रिया ॥ ६ ॥ हा तो त्यागतरुवरु । जो गा मोक्षफळें ये थोरु । सात्त्विक ऐसा डगरु । यासीचि जगीं ॥ ७ ॥ जाळुनि बीज जैसें । झाडा कीजे निर्वंशें । फळ त्यागुनि कर्म तैसें । त्यजिलें जेणें ॥ ८ ॥ तया लागतखेंवो परिसीं । धातूची गंधिकाळिक जैसी । जाती रजतमें तैसीं । तुटलीं दोन्ही ॥ ९ ॥ मग सत्त्वें तेणें चोखाळें । उघडती आत्मबोधाचे डोळे । तेथ मृगाम्बु सांजवेळे । होय जैसें ॥ २१० ॥ तैसा बुद्ध्यादिकांपुढां । असतु विश्वाभासु हा एवढा । तो न देखे कवणीकडां । आकाशु जैसें ॥ ११ ॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते । त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशय: ॥ १० ॥

म्हणोनि प्राचीनाचेनि बळें । आलीं कृत्यें कुशलाकुशलें । तियें व्योमाआंगी आभाळें । जिरालीं जैसीं ॥ १२ ॥ तैसीं तयाचिये दिठी । कर्में चोखळलीं किरीटी । म्हणोनि सुखदु:खीं उठी । पडे ना तो ॥ १३ ॥ तेणें शुभकर्म जाणावें । मग तें हर्षें करावें । का अशुभालागीं होआवें । द्वेषिया ना ॥ १४ ॥ तरी इयाविषयींचा कांहीं । तया एकुही संदेहो नाहीं । जैसा स्वप्नाचां कां ठायीं । जागिन्नलियां ॥ १५ ॥ म्हणऊनि कर्म आणि कर्ता । या द्वैतभावाची वार्ता । नेणे तो पांडुसुता । सात्त्विक त्यागु ॥ १६ ॥ ऐसेनि कर्में पार्था । त्यजिलीं त्यजिती सर्वथा । अधिकें बांधती अन्यथा । सांडिलीं तरी ॥ १७ ॥

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषत: । यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ ११ ॥

आणि हां गा सव्यसाची । मूर्तिचि होउनि देहाची । खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ॥ १८ ॥

मृत्तिकेचा वीटु। घेऊनि काय करील घटु। केउता ताथु पटु। सांडील तो॥ १९॥ तेवींचि वन्हित्व आंगीं। आणि उबें उबगणें आगी। तो दीपु प्रभेलागीं। द्वेषु करील काई॥ २२०॥ हिंगु त्रासिला घाणी। तरी कैचें सुगंधत्व आणी। द्रवपण सांडूनि पाणी। केवीं राहे तें॥ २१॥ तैसा शरीराचेनि आभासें। नांदतु जंव असे। तंव कर्मत्यागाचें पिसें। काइसें तरी॥ २२॥ आपण लाविजे टिळा। म्हणोनि पुसों ये वेळोवेळा। मा घाली फेडी निडळा। कां करूं ये गा॥ २३॥ तैसें विहित स्वयें आदरिलें। म्हणोनि त्यजूं ये त्यजिलें। परी कर्मचि देह आतलें। तें कां सांडें॥ २४॥ जें श्वासोच्छ्वासवरी। होत निजेलियाही वरी। कांहीं न करणेंचि परी। होती जयाची॥ २५॥ या शरीराचेनि मिसकें। कर्मचि लागलें तें असिकें। जिता मेलया न ठाके। इया रीती॥ २६॥ यया कर्मातें सांडिती परी। एकीचि तें अवधारीं। जे करितां न जाइजे हारी। फळाशेचिया॥ २७॥ कर्मफळ ईश्वरीं अर्पे। तत्प्रसादें बोधु उद्दीपे। तेथ रज्जुज्ञानें लोपे। व्याळशंका॥ २८॥ तेणें आत्मबोधें तैसें। अविद्येसीं कर्म नाशे। पार्था त्यजिजे जै ऐसें। तैं त्यजिलें होय॥ २९॥ म्हणोनि इयापरी जगीं। कर्मे करितां मानूं त्यागी। येर मूर्च्छने नांव रोगीं। विसांवा जैसा॥ २३०॥ तैसा कर्मीं शिणे एकीं। कीं विसांवों पाहे आणिकीं। दांडेयाचे घाय बुकी। धाडणें जैसें॥ ३१॥ परी हें असो पुढती। तोचि त्यागी त्रिजगतीं। जेणें फळत्यागें निष्कृती। नेलें कर्म॥ ३२॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम्। भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित्॥ १२॥

एन्हवीं तरी धनंजया। त्रिविधा कर्मफळा गा यया। समर्थ ते कीं भोगावया। जे न सांडितीचि आशा॥ ३३॥ आपणचि विऊनि दुहिता। कीं न मम म्हणे पिता। तो सुटे कीं प्रतिग्रहिता। जांवाई शिरके॥ ३४॥ विषाचे आगरही वाहती। ते विकितां सुखे लाभें जिती। येर निमाले जे घेती। वेंचोनि मोलें॥ ३५॥ तैसें कर्ता कर्म करू। अकर्ता फळाशा न धरू। एथ न शके आवरूं। दोघातेंही कर्म॥ ३६॥ वाटे पिकलिया रूखाचें। फळ अपेक्षी तयाचें। तेवीं साधारण कर्माचें। फळ घे तया॥ ३७॥ परी करूनि फळ नेघे। तो जगाचां कामीं न रिघे। जे त्रिविध जग अवघें। कर्मफळ हें॥ ३८॥ देव मनुष्य स्थावर। यया नांव जगडंबर। तरि हे तंव त्रिप्रकार। कर्मफळ पैं॥ ३९॥ तेंचि एक गा अनिष्ट। एक तें केवळ इष्ट। आणि एक इष्टानिष्ट। त्रिविध ऐसें॥ २४०॥ परी विषयमंता बुद्धी। आंगीं सूनि अविधी। प्रवर्तती जे निषिद्धीं। कुव्यापारीं॥ ४१॥ तेथ कृमि कीट लोष्ट। हे देह लाहती निकृष्ट। तया नाम तें अनिष्ट। कर्मफळ॥ ४२॥ का स्वधर्मा मानु देतां। स्वाधिकारु पुढां सूतां। सुकृत कीजे पुसतां। आम्नायातें॥ ४३॥ तैं इंद्रादिक देवांचीं। देहें लाहिजती सव्यासाची। तया कर्मफळा इष्टाची। प्रसिद्धि गा॥ ४४॥ आणि गोड आंबट मिळे। तेथ रसांतर फरसाळें। उठी दोहीं वेगळें। दोहीं जिणतें॥ ४५॥ रेचकुचि योगवशें। होय स्तंभावया दोषें। तेवीं सत्यासत्य समरसें। असत्य जिणिजे॥ ४६॥ म्हणौनि समभागें शुभाशुभें। मिळोनि अनुष्ठानाचें उभें। तेणें मनुष्यत्व लाभे। तें मिश्र फळ

॥ ४७ ॥ ऐसें त्रिविध यया भागी । कर्मफळ मांडलेसे जगीं । हें न संडी तयासी भोगीं । जे सूदले आशा ॥ ४८ ॥ एथ जिव्हेचा हातु फांटे । तंव जेवितां वाटे गोमटें । परि परिणामीं शेवटें । अवश्य मरण ॥ ४९ ॥ संवचोरमैत्री चांग । जंव न पविजे तें दांग । सामान्या भली आंग । न शिवे तंव ॥ २५० ॥ तैसीं कर्में करितां शरीरीं । लाहती महत्त्वाची फरारी । पाठीं निधनीं एकसरी । पावती फळें ॥ ५१ ॥ समर्थु आणि ऋणिया । मागों आला बाइणिया । न लोटे तैसा प्राणिया । पडे तो भोगु ॥ ५२ ॥ मग कणिसौनि कणु झडे । तो विरूढला कणिसा चढे । पुढती भूमी पडे । पुढती उठी ॥ ५३ ॥ तैसें भोगीं जें फळ होय । तें फळांतरें वीत जाय । चालतां पावो पाय । जिणिजे जैसा ॥ ५४ ॥ उताराचिये सांगडी । ठाके ते ऐलीच थडी । तेवीं न मुकिजती वोढी । भोग्याचिये ॥ ५५ ॥ पैं साध्यसाधनप्रकारें । फळभोगु तो गा पसरे । एवं गोंविले संसारे । अत्यागी ते ॥ ५६ ॥ एन्हवीं जाईचियां फुलां फांकणें । त्याचि नाम जैसें सुकणें । तैसें कर्ममिषें न करणें । केलें जिहीं ॥ ५७ ॥ बीजचि वरोसि वेचे । तैं वाढती कुळवाडी खांचे । तेवीं फळत्यागें कर्माचें । सारिलें काम ॥ ५८ ॥ ते सत्त्वशुद्धी साहाकारें । गुरुकृपामृततुषारें । सासिन्नलेनि बोधें वोसरे । द्वैतदैन्य ॥ ५९ ॥ तेव्हां जगदाभासमिषें । स्फुरे तें त्रिविध फळ नाशे । येथ भोक्ता भोग्य आपैसें । निमालें हें ॥ २६० ॥ घडे ज्ञानप्रधानु हा ऐसा । संन्यासु जयां वीरेशा । ते फळभोगसोसा । मुकले गा ॥ ६१ ॥ आणि येणे कीर संन्यासें । जैं आत्मरूपीं दिठी पैसे । तैं कर्म एक ऐसें । देखणें आहे ॥ ६२ ॥ पडोनि गेलिया भिंती । चित्रांचि केवळ होय माती । कीं पाहालेया राती । आंधारें उरे ॥ ६३ ॥ जैं रूपचि नाहीं उभें । तैं साउली काह्याचीं शोभे । आरसेनवीण बिंबे । वदन कें पां ॥ ६४ ॥ फिटलिया निद्रेचा ठावो । कैंचा स्वप्नासि प्रस्तावो । मग तें साच का वावो । कोण म्हणे ॥ ६५ ॥ तैसें गा संन्यासें येणें । मूळ अविद्येसीचि नाहीं जिणें । मा तियेचें कार्य कोणें । घेपे दीजे ॥ ६६ ॥ म्हणोनि संन्यासीं ये पाहीं । कर्माची गोठी कीजेल काई । परी अविद्या आपुलां देहीं । आहे जैं कां ॥ ६७ ॥ जैं कर्तेपणाचेनि थांवें । आत्मा शुभाशुभीं धांवे । दृष्टि भेदाचिये राणिवे । रचलीसे जैं ॥ ६८ ॥ तैं तरी गा सुवर्मा । बिजावळी आत्मया कर्मा । अपाडें जैसी पश्चिमा । पूर्वेसि कां ॥ ६९ ॥ नातरी आकाशा का आभाळा । सूर्या आणि मृगजळा । बिजावळी भूतळा । वायूसि जैसी ॥ २७० ॥ पांघरोनि नईचें उदक । असे नईचिमाजीं खडक । परी जाणसी कां वेगळिक । कोडीचि ते ॥ ७१ ॥ हो कां उदकाजवळी । परी सीनानीचि ते बाबुळी । काय संगास्तव काजळी । दीपु म्हणों ये ॥ ७२ ॥ जरी चंद्रीं जाला कलंकु । तरीं चंद्रेंसीं नव्हे एकु । आहे दिठी डोळ्यां विवेकु । अपाडु जैसा ॥ ७३ ॥ नाना वाटा वाटे जातया । वोघा वोघीं वाहतया । आरिसया आरिसां पाहतया । अपाडु जेतुला ॥ ७४ ॥ पार्था गा तेतुलेनि मानें । आत्मेनिसीं कर्म सिनें । परी घेवविजे अज्ञानें । तें कीर ऐसें ॥ ७५ ॥ विकासें रवीतें उपजवी । द्रुती अलीकरवीं भोगवी । ते सरोवरी कां बरवी । अब्जिनी जैसी ॥ ७६ ॥ पुढतपुढती आत्मक्रिया ।

अन्यकारणकाचि तैशिया । करूं पांचांही तयां । कारणां रूप ॥ ७७ ॥

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे । सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १३ ॥

आणि पांचही कारणें तियें । तूंही जाणसील विपायें । जे शास्त्रें उभऊनी बाहे । बोलती तयांतें ॥ ७८ ॥ वेदरायाचिया राजधानीं । सांख्यवेदांताचां भुवनी । निरूपणाचां निशाणध्वनीं । गर्जती तियें ॥ ७९ ॥ जे सर्वकर्मसिद्धीलागीं । इयेंचि मुद्दलें हो जगीं । येथ न सुवावा अभंगीं । आत्मराजु ॥ २८० ॥ या बोलाची डांगुरटी । तियें प्रसिद्धी आली किरीटी । म्हणोनि तुझां हन कर्णपुटीं । वसो हे काज ॥ ८१ ॥ आणि मुखांतरीं आइकिजे । तैसें कायसें हें ओझें । मी चिद्रत्न तुझें । असतां हातीं ॥ ८२ ॥ आरिसा पुढां मांडलेया । कां लोकांचिया डोळ्यां । मानु द्यावा पहावया । आपुलें निकें ॥ ८३ ॥ भक्त जैसेनि जेथ पाहे । तेथ तें तेंचि होत जाये । तो मी तुझे जाहालों आहें । खेळणें आजि ॥ ८४ ॥ ऐसें प्रीतीचेनि वेगें । देवो बोलतां से नेघे । तंव आनंदामाजीं आंगें । विरतसे येरु ॥ ८५ ॥ चांदिणियाचा पडिभरु । जालयां सोमकांताचा डोंगरु । विघरोनि सरोवरु । हों पाहे जैसा ॥ ८६ ॥ तैसें सुख आणि अनुभूती । या भावांची मोडूनि भिंती । आतलें अर्जुनाकृती । सुखचि जेथ ॥ ८७ ॥ तेथ समर्थु म्हणोनि देवा । अवकाशु जाहला आठवा । मग बुडतयाचा धांवा । जीवें केला ॥ ८८ ॥ अर्जुनायेसणें धेंडें । प्रज्ञापसरेंसीं बुडे । आलें भरतें एवढें । तें काढूनि पुढती ॥ ८९ ॥ देवो म्हणे हां गा पार्था । तूं आपणपें देख सर्वथा । तंव श्वासूनि येरें माथा । तुकियेला ॥ २९० ॥ म्हणे जाणसी दातारा । मी तुजशी व्यक्तिशेजारा । उबगला आदीं एकाहारा । येवों पाहें ॥ ९१ ॥ तयाही हा ऐसा । लोभें देतसां जरी लालसा । तरी कां जी घालीतसां । आड आड जीवा ॥ ९२ ॥ तेथ श्रीकृष्ण म्हणती निकें । अद्यापि नाहीं मा ठाउकें । वेड्या चंद्रा आणि चंद्रिके । न मिळणें आहे ॥ ९३ ॥ आणि हाही बोलोनि भावो । तुज दांऊ आम्ही भिवो । जे रुसतां बांधे थांवो । तें प्रेम गा हें ॥ ९४ ॥ एथ एकमेकांचिये खुणे । विसंवादु तंवचि जिणें । म्हणोनि असो हें बोलणें । इयेविषयींचें ॥ ९५ ॥ मग कैशी कैशी ते आतां । बोलत होतों पंडुसुता । सर्व कर्मा भिन्नता । आत्मेनिसी ॥ ९६ ॥ तंव अर्जुन म्हणे देवें । माझिये मनींचेंचि स्वभावें । प्रस्ताविलें बरवें । प्रमेय तें जी ॥ ९७ ॥ जें सकळ कर्माचे बीज । कारणपंचक तुज । सांगिन ऐसी पैज । घेतली कां ॥ ९८ ॥ आणि आत्मया एथ कांहीं । सर्वथा लागु नाहीं । हें पुढारलासि तें देईं । लाहाणें माझें ॥ ९९ ॥ यया बोला विश्वेशें । म्हणितलें तोषें बहुवसें । इयेविषयीं धरणें बैसे । ऐसें के जोडे ॥ ३०० ॥ तरी अर्जुना निरूपिजेल । ते कीर भाषेआंतुल । परी मेचु हे होईजेल । ऋणिया तुज ॥ १ ॥ तंव अर्जुना म्हणे देवो । काई विसरले मागील भावो । इये गोठीं की राखत आहों । मीतूंपण जी ॥ २ ॥ एथ श्रीकृष्ण म्हणती हो का । आतां अवधानाचा पसरु निका । करूनियां आइका । पुढारलों तें ॥ ३ ॥ तरी साचचि गा धनुर्धरा । सर्व कर्मांचा उभारा । होये बाहिरबाहिरा । करणीं पांचें ॥ ४ ॥ आणि पंचकारणदळवाडें । जिहीं कर्माकारु मांडे । ते हेतु तंव उघडे । पांच आथी ॥ ५ ॥ येर

आत्मतत्त्व उदासीन । तें ना हेतु ना उपादान । ना अंगें करी संवाहन । कार्यसिद्धीचें ॥ ६ ॥ तेथ शुभाशुभी अंशीं । निफजती कर्में ऐसीं । राती दिवो आकाशीं । जियापरी ॥ ७ ॥ तोय तेज धूमु । ययां वायूसीं संगमु । जालिया होय अभ्रागमु । व्योम तें नेणे ॥ ८ ॥ नाना काष्ठीं नाव मिळे । ते नावाडेनि चळे । चालविजे अनिळें । उदक तें साक्षी ॥ ९ ॥ का कवणें एकें पिंडें । वेचितां अवतरे भांडें । मग भवंडीजे दंडें । भ्रमे चक्र ॥ ३१० ॥ आणि कर्तृत्व कुलालाचें । तेथ काय तें पृथ्वीयेचें । आधारावांचूनि वेंचे । विचारीं पां ॥ ११ ॥ हेंही असो लोकांचिया । राहाटी होतां आघविया । कोण काम सवितया । आंगा आलें ॥ १२ ॥ तैसें पांचहेतुमिळणीं । पांचेंचि इहीं कारणीं । कीजे कर्मलतांचि लावणी । आत्मा सिना ॥ १३ ॥ आतां तेंचि वेगळालीं । पांचही विवंचूं गा भलीं । तुकोनि घेतलीं । मोतियें जैसीं ॥ १४ ॥

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् । विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥ १४ ॥

तैसी यथालक्षणें । आइक पां कर्मकारणें । तरी देह हें मी म्हणें । पहिलें एथ ॥ १५ ॥ ययातें अधिष्ठान ऐसें । म्हणिजे तें याचि उद्देशें । जे स्वभोग्येंसीं वसे । भोक्ता येथ ॥ १६ ॥ इंद्रियांचां दाहीं हातीं । जाचोनियां दिवोराती । सुखदुःखें प्रकृती । जोडीजती जियें ॥ १७ ॥ तियें भोगावया पुरुखा । आन ठावोचि नाहीं देखा । म्हणोनि अधिष्ठानभाखा । बोलिजे देह ॥ १८ ॥ हें चोविसांही तत्त्वांचें । कुटुंब घर वस्तीचें । तुटे बंधमोक्षाचें । गुंतलें एथ ॥ १९ ॥ किंबहुना अवस्थात्रया । अधिष्ठान धनंजया । म्हणोनि देहा यया । हेंचि नाम ॥ ३२० ॥ आणि कर्ता तें दुजें । कर्माचें कारण जाणिजे । प्रतिबिंब म्हणिजे । चैतन्याचें जें ॥ २१ ॥ आकाशचि वर्षे नीर । तें तळवटीं बांधे नाडर । मग बिंबोनि तदाकार । होय जेवीं ॥ २२ ॥ कां निद्राभरें बहुवें । राया आपणपें ठाउवें नव्हे । मग स्वप्नींचिये सामावे । रंकपणीं ॥ २ ॥ तैसें आपुलेनि विसरें । चैतन्यचि देहाकारें । आभासोनि आविष्करे । देहपणें जें ॥ २४ ॥ जया विचाराचां देशीं । प्रसिद्धि गा जीवु ऐसी । जेणें भाक केली देहेंसी । आघवाविषयीं ॥ २५ ॥ प्रकृति करी कर्में । तीं म्या केलीं म्हणे भ्रमें । येथ कर्ता येणें नामें । बोलिजे जीवु ॥ २६ ॥ मग पातेयांचां केशीं । एकचि उठी दिठी जैशी । मोकळी चवरी ऐसी । चिरीव गमे ॥ २७ ॥ कां घरा आंतुल एकु । दीपाचा तो अवलोकु । गवाक्षभेदें अनेकु । आवडे जेवीं ॥ २८ ॥ तेवीं बुद्धीचें जाणणें । श्रोत्रादिभेदें येणें । बाहेरी इंद्रियपणें । फांकें जें कां ॥ २९ ॥ तें पृथग्विध करण । कर्माचें इया कारण । तिसरें गा जाण । नृपनंदना ॥ ३३० ॥ आणि पूर्वपश्चिमवाहणीं । निघालिया वोघाचिया मिळणी । होय नदी नद पाणी । एकचि जेवीं ॥ ३१ ॥ कां एकुचि पुरुष जैसा । अनुसरत नवां रसां । नवविधु ऐसा । आवडों लागे ॥ ३२ ॥ तैसी क्रियाशक्ति पवनीं । असे जे अनपायिनी । ते पडिली नाना स्थानीं । नाना होय ॥ ३३ ॥ जैं वाचे करी येणें । तैं तेंचि होय बोलणें । हाता आली तरी घेणें । देणें होय ॥ ३४ ॥ अगा चरणाचां ठायीं । तरी गति तेंचि पाहीं । अधोद्वारीं दोहीं । क्षरणें तेचि

॥ ३५ ॥ कंदौनि हृदयवरी । प्रणवाची उजरी । करितां तेचि शरीरीं । प्राणु म्हणिपे ॥ ३६ ॥ मग उर्ध्वींचिया रिगिनिगा । पुढती तेचि शक्ति पैं गा । उदानु ऐसिया लिंगा । पात्र जाहली ॥ ३७ ॥ अधोरंध्राचेनि वाहें । अपानु हें नाम लाहे । व्यापकपणें होये । व्यानु तेंचि ॥ ३८ ॥ आरोगिलेनि रसें । शरीर भरी सरिसें । आणि न सांडितां असे । सर्वसंधी ॥ ३९ ॥ ऐसिया इया राहटी । मग तेचि क्रिया पाठीं । समान ऐसी किरीटी । बोलिजे गा ॥ ३४० ॥ आणि जांभई शिंक ढेकर । ऐसैसा होतसे व्यापार । नाग कूर्म कृकर । इत्यादि होय ॥ ४१ ॥ एवं वायूचि हे चेष्टा । एकीचि परी सुभटा । वर्तनास्तव पालटा । येतसे जे ॥ ४२ ॥ ते भेदली वृत्तिपंथें । वायुशक्ति गा एथें । कर्मकारण चौथें । ऐसें जाण ॥ ४३ ॥ आणि ऋतु बरवा शारदु । शारदीं पुढती चांदु । चंद्री जैसा संबंधु । पूर्णिमेचा ॥ ४४ ॥ कां वसंतीं बरवा आरामु । आरामींही प्रियसंगमु । संगमीं आगमु । उपचारांचा ॥ ४५ ॥ नाना कमळीं पांडवा । विकासु जैसा बरवा । विकासींही यावा । परागाचा ॥ ४६ ॥ वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥ ४७ ॥ तैसी सर्ववृत्तिवैभवीं । बुद्धिचि एकली बरवी । बुद्धीही बरव नवी । इंद्रियप्रौढी ॥ ४८ ॥ इंद्रियप्रौढीमंडळा । शृंगारु एकचि निर्मळा । जै अधिष्ठात्रियां कां मेळा । देवतांचा जो ॥ ४९ ॥ म्हणुनि चक्षुरादिकीं दाहें । इंद्रियां पाठीं स्वानुग्रहें । सूर्यादिकां कां आहे । सुरांचें वृंद ॥ ३५० ॥ तें देववृंद बरवें । कर्मकारण पांचवें । अर्जुना एथ जाणावें । देवो म्हणे ॥ ५१ ॥ एवं माने तुझिये आयणी । तैसी कर्मजातांचि हे खाणी । पंचविध आकर्णीं । निरूपिली ॥ ५२ ॥ आतां हेचि खाणी वाढे । मग कर्माची सृष्टि घडे । जिहीं ते हेतुही उघडे । दाऊं पांचै ॥ ५३ ॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः । न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः ॥ १५ ॥

तरी अवसांत आली माधवी । ते हेतु होय नवपल्लवीं । पल्लव पुष्पपुंज दावी । पुष्प फळातें ॥ ५४ ॥ कां वार्षिये आणिजे मेघु । मेघें वृष्टीप्रसंगु । वृष्टीस्तव भोगु । सस्यसुखाचा ॥ ५५ ॥ नातरी प्राची अरुणातें विये । अरुणें सूर्योदयो होये । सूर्ये सगळा पाहे । दिवो जैसा ॥ ५६ ॥ तैसें मन हेतु पांडवा । होय कर्मसंकल्पभावा । तो संकल्पु लावी दिवा । वाचेचा गा ॥ ५७ ॥ मग वाचेचा तो दिवटा । दावी कृत्यजातांचिया वाटा । तेव्हा कर्ता रिगे कामठां । कर्तृत्वाचां ॥ ५८ ॥ तेथ शरीरादिक दळवाडें । शरीरादिका हेतुचि घडे । लोहकाम लोखंडें । निर्वाळिजे जैसें ॥ ५९ ॥ कां तांथुवाचां ताणां । तांथु घालितां वैरणा । तो तंतूचि विचक्षणा । होय पटु ॥ ३६० ॥ तैसें मनवाचादेहांचें । कर्म मनादि हेतुचि रचे । रत्नीं घडे रत्नाचें । दळवाडें जेवीं ॥ ६१ ॥ एथ शरीरादिकें कारणें । तेचि हेतु केवीं हें कोणें । अपेक्षिजे तरी तेणें । अवधारिजो ॥ ६२ ॥ आइका सूर्याचिया प्रकाशा । हेतु कारण सूर्युचि जैसा । कां ऊंसाचें कांडें ऊंसा । वाढी हेतु ॥ ६३ ॥ नाना वाग्देवता वानावी । तैं वाचाचि लागे कामवावी । कां वेदां वेदेंचि बोलावी । प्रतिष्ठा जे ॥ ६४ ॥ तैसें कर्मा शरीरादिकें । कारण हें कीर ठाउकें । परी हेंचि हेतु न चुके । हेंही एथ ॥ ६५ ॥ आणि

देहादिकीं कारणीं । देहादि हेतुमिळणी । होय जया उभारणी । कर्मजाता ॥ ६६ ॥ तें शास्त्रार्थें मानिलेया । मार्गा अनुसरे धनंजया । तरी न्याय तो न्याया । हेतु होय ॥ ६७ ॥ जैसा पर्जन्योदकाचा लोटु । विपायें धरी साळीचा पाटु । तन्ही जिरे परी अचाटु । उपयोगु आथी ॥ ६८ ॥ कां रोषें निघालें अवचटें । पडिलें द्वारकेचिया वाटे । तें शिणे परी सुनाटें । न वचती पदें ॥ ६९ ॥ तैसें हेतुकारणमेळें । उठी कर्म जें आंधळें । शास्त्राचे लाहे डोळे । तैं न्याय्य म्हणिपे ॥ ३७० ॥ ना दूध वाढितां ठावो न पावे । तंव उतोनि जाय स्वभावें । तोही वेंचु परी नव्हे । वेंचिलें तें ॥ ७१ ॥ तैसे शास्त्रसाह्येंवीण । केलें नोहे जरी अकारण । तरी लागो कां नागवण । दानलेखीं ॥ ७२ ॥ अगा बावन्ना वर्णांपरता । कोण मंत्रु आहे पंडुसुता । कां बावन्नही नुच्चारितां । जीवु आथी ॥ ७३ ॥ परी मंत्राची कडसणी । जंव नेणिजे कोदंडपाणी । तंव उच्चारफळ वाणी । न पवे जेवीं ॥ ७४ ॥ तेवीं कारणहेतुयोगें । जें बिसाट कर्म निगे । तें शास्त्राचिये न लगे । कांसे जंव ॥ ७५ ॥ कर्म होतचि असे तेव्हांही । परी तें होणें नव्हे पाहीं । तो अन्यायो गा अन्यायीं । हेतु जाणावा ॥ ७६ ॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः । पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १६ ॥

एवं पंचकारणा कर्मा । पांचही हेतु हे सुमहिमा । आता एथें पाहें पा आत्मा । सांपडला असे ॥ ७७ ॥ भानु न होनि रूपें जैसीं । चक्षुरूपातें प्रकाशी । आत्मा न होनि कर्में तैसीं । प्रकटित असे गा ॥ ७८ ॥ पाहीं प्रतिबिंब आरिसा । दोन्ही न होनि वीरेशा । दोहींतें प्रकाशीं जैसा । न्याहाळिता तो ॥ ७९ ॥ कां अहोरात्र सविता । न होनि करी पंडुसुता । तैसा आत्मा कर्मकर्ता । न होनि दावी ॥ ३८० ॥ परी देहाहंमानभुली । जयाची बुद्धि देहींच आतली । जया आत्मविषयीं जाली । मध्यरात्री ॥ ८१ ॥ जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा । देहचि केलें परमसीमा । तया आत्मा कर्ता हे प्रमा । अलोट उपजे ॥ ८२ ॥ आत्माचि कर्ता । हाही निश्चयो नाहीं तत्त्वतां । देहोचि मी कर्मकर्ता । मानी तो साच ॥ ८३ ॥ जे आत्मा मी कर्मातीतु । सर्वकर्मसाक्षिभूतु । हे आपली कहीं मातु । नायिकेचि कानीं ॥ ८४ ॥ म्हणोनि उमपा आत्मयातें । देहचिवरी मविजे एथें । विचित्र काई रात्रि दिवसातें । डुडुळ न करी ॥ ८५ ॥ पैं जेणें आकाशींचा कहीं । साचु सूर्यु देखिला नाहीं । तो थिल्लरींचें बिंब काई । मानूं न लाहे ॥ ८६ ॥ थिल्लराचेनि जालेपणें । सूर्यासि आणी होणें । तयाचां नाशीं नाशणें । कंपें कंपु ॥ ८७ ॥ अगा निद्रिता चेवो नये । तंव स्वप्न साच हों लाहे । रज्जु नेणतां सापा बिहे । विस्मो कवण ॥ ८८ ॥ जंव कवळ आथि डोळां । तंव चंद्रु देखावा कीं पिंवळा । काय मृगींहि मृगजळा । भाळावें नाहीं ॥ ८९ ॥ तैसा शास्त्रगुरूचेनि नांवें । जो वाराही टेंकों नेदी सिंवे । केवळ मौढ्याचेनिचि जीवें । जियाला जो ॥ ३९० ॥ तेणें देहात्मदृष्टीमुळें । आत्मया घापे देहाचें जाळें । जैसा अभ्राचा वेगु कोल्हें । चंद्रीं मानी ॥ ९१ ॥ मग तया मानणयासाठीं । देहबंदिशाळे किरीटी । कर्माचां वज्रगांठी । कळासे तो ॥ ९२ ॥ पाहें पां बंधभावना दृढा । नळियेवरी तो बापुडा । काय मोकळे पायाचाही चवडा ।

न ठकेचि पुंसा ॥ ९३ ॥ म्हणोनि निर्मळ आत्मस्वरूपीं । जो प्रकृतिचें केलें आरोपी । तो कल्पकोडीचां मापीं । मवीचि कर्में ॥ ९४ ॥ आतां कर्मामाजीं असे । परी तयातें कर्म न स्पर्शे । वडवानळातें जैसें । समुद्रोदक ॥ ९५ ॥ तैसेनि वेगळेपणें । जयाचें कर्मीं असणें । तो कीर जाणावा कवणें । तरी सांगों ॥ ९६ ॥ जे मुक्तातें निर्धारितां । लाभे आपलीच मुक्तता । जैसी दीपें दिसे पाहतां । आपली वस्तु ॥ ९७ ॥ नाना आरिसा जंव उटिजे । तंव आपणपयां आपण भेटिजे । कां पाणी पावता पाणी होइजे । लवणें जेवीं ॥ ९८ ॥ हें असो परतोनि मागुतें । प्रतिबिंब पाहे बिंबाते । तंव पाहणे जाउनी आयितें । बिंबचि होय ॥ ९९ ॥ तैसें हारपलें आपणपें पावे । तैं संतांतें पाहतां गिंवसावें । म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥ ४०० ॥ तरी कर्मीं असोनि कर्में । जो नावरे समेंविषमें । चर्मचक्षुंचेनि चामें । दृष्टि जैसी ॥ १ ॥ तैसा सोडवला जो आहे । तयाचें रूप आतां पाहें । उपपत्तीची बाहे । उभऊनि सांगों ॥ २ ॥

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥ १७ ॥

तरी अविद्येचिया निदा । विश्वस्वप्नाचा हा धांदा । भोगीत होता प्रबुद्धा । अनादि जो ॥ ३ ॥ तो महावाक्याचेनि नांवें । गुरुकृपेचेनि थांवें । माथां हातु ठेविला नव्हे । थापटिला जैसा ॥ ४ ॥ तैसा विश्वस्वप्नेंसीं माया । नीद सांडूनि धनंजया । सहसा चेइला अद्वया - । नंदपणें जो ॥ ५ ॥ तेव्हां मृगजळाचे पूर । दिसते एक निरंतर । हारपती कां चंद्रकर । फांकतां जैसे ॥ ६ ॥ कां बाळत्व निघोनि जाय । तैं बागुला नाहीं त्राय । पैं जळालिया इंधन न होय । रंधन जेवीं ॥ ७ ॥ नाना चेवो आलिया पाठीं । तैं स्वप्न न दिसे दिठी । तैसी अहंममता किरीटी । नुरेचि तया ॥ ८ ॥ मग सूर्य आंधारालागीं । रिघो कां भलते सुरंगीं । परी तो तयाचां भागीं । नाहींचि जैसा ॥ ९ ॥ तैसा आत्मत्वें वेढिला होये । तो जयातया दृश्यातें पाहे । तें दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये । तयाचेंचि रूप ॥ ४१० ॥ जैसा वन्हि जया लागे । तें वन्हिचि जालिया आंगें । दाह्यदाहकविभागें । सांडिजे तें ॥ ११ ॥ तैसा कर्माकारा दुजेया । तो कर्तेपणाचा आत्मया । आळु आला तो गेलिया । कांहीं बाहीं जें उरे ॥ १२ ॥ तिये आत्मस्थितीचा जो रावो । मग तो देहीं इये जाणेल ठावो । काय प्रलयांबूचा उन्नाहो । वोघु मानी ॥ १३ ॥ तैसी ते पूर्ण अहंता । काई देहपणें पंडुसुता । आवरे काई सविता । बिंबें धरिला ॥ १४ ॥ पैं मथूनि लोणी घेपे । ते मागुती ताकीं घापे । तरी तें अलिप्तपणें सिंपे । तेणेंसीं काई ॥ १५ ॥ नाना काष्ठौनि वीरेशा । वेगळाविलिया हुताशा । राहे काष्ठाचिया मांदुसा । कोंडलेपणें ॥ १६ ॥ कां रात्रीचिया पोटा आंतु । निगाला जो हा भास्वतु । तो रात्री ऐसी मातु । ऐके कायी ॥ १७ ॥ तैसें वेद्य वेदकपणेंसी । पडिलें कां जयाचां ग्रासीं । तया देह मी ऐसी । अहंता कैंची ॥ १८ ॥ आणि आकाशें जेथें जेथुनी । जाइजे तेथ असे भरोनि । म्हणोनि ठेलें कोंदोनि । आपेंआप ॥ १९ ॥ तैसें जें तेणें करावें । तो तेंचि आहे स्वभावें । मा कोणें कर्मीं वेठावें । कर्तेपणें ॥ ४२० ॥ नुरेचि गगनावीण ठावो । नोहेचि समुद्रा प्रवाहो । नुठीचि ध्रुवा जावों । तैसें जाहालें

॥ २१ ॥ ऐसेनि अहंकृतिभावो । जयाचां बोधीं जाहला वावो । तऱ्हीं देहा जंव निर्वाहो । तंव आथी कर्मे ॥ २२ ॥ अगा वारा जरी वाजोनि वोसरे । तरी तो डोल रुखीं उरे । कां सेंदें द्रुति राहे कापुरें । वेंचलेनी ॥ २३ ॥ का सरलेया गीताचा समारंभु । न वचे राहवलेपणाचा क्षोभु । भूमी लोळोनि गेलिया अंबु । वोल थारे ॥ २४ ॥ अगा मावळलेनि अर्कें । संध्येचिये भूमिके । ज्योतिदीप्ती कौतुकें । दिसे जैसी ॥ २५ ॥ पैं लक्ष भेदिलियाहीवरी । बाण धांवेचि तंववरी । जंव भरली आथी उरी । बळाची ते ॥ २६ ॥ नाना चाकीं भांडें जालें । तें कुंभारें परतें नेलें । परी भ्रमेचि तें मागिले । भोवंडिलेपणें ॥ २७ ॥ तैसा देहाभिमानु गेलिया । देह जेणें स्वभावें धनंजया । जालें तें अपैसया । चेष्टवीच तें ॥ २८ ॥ संकल्पेंवीण स्वप्न । न लावितां दांगीचें बन । न रचिता गंधर्वभुवन । उठीं जैसें ॥ २९ ॥ आत्मयाचेनि उद्यमेंवीण । तैसें देहादिपंचकारण । होय आपणयां आपण । क्रियाजात ॥ ४३० ॥ पैं प्राचीनसंस्कारवशें । पांचही कारणें सहेतुकें । कामवीजती गा अनेकें । कर्माकारें ॥ ३१ ॥ तया कर्मामाजीं मग । संहरो आघवें जग । अथवा नवें चांग । आन करो ॥ ३२ ॥ परी कुमुद कैसेनि सुके । तें कमळ कैसें फाकें । हीं दोन्हीं रवी न देखे । जयापरी ॥ ३३ ॥ कां वीजु वर्षोनि आभाळ । ठिकरिया आतो भूतळ । अथवा करू शाड्वळ । पर्जन्यवृष्टी ॥ ३४ ॥ परी तया दोहीतें जैसें । नेणिजेचि कां आकाशें । तैसा देहींच जो असे । विदेहदृष्टी ॥ ३५ ॥ तो देहादिकीं चेष्टीं । घडतां मोडतां हे सृष्टीं । न देखे स्वप्न किरीटी । चेइला जैसा ॥ ३६ ॥ एऱ्हवीं चामाचे डोळेवरी । जे देखती देहचिवरी । ते कीर तो व्यापारी । ऐसेंचि मानिती ॥ ३७ ॥ कां तृणाचा बाहुला । जो आगरामेरे ठेविला । तो साचचि राखता कोल्हा । मानिजे ना ॥ ३८ ॥ पिसें नेसलें कां नागवें । हें लोकीं येऊनि जाणावें । ठाणोरियाचे मवावे । आणिकीं घाय ॥ ३९ ॥ का महासतीचे भोग । देखे कीर सकळ जग । परी ते आगी ना आंग । ना लोकु देखे ॥ ४४० ॥ तैसा स्वस्वरूपें उठिला । जो दृश्येंसी द्रष्टा आटला । तो नेणे काय राहटला । इंद्रियग्रामु ॥ ४१ ॥ अगा थोरीं कल्लोळीं कल्लोळ साने । लोपतां तीरींचेनि जनें । एकी एक गिळिलें हे मनें । मानिजे जऱ्हीं ॥ ४२ ॥ तऱ्ही पाणियाकडे पाहीं । कोणें गिळिजत आहे काइ । तैसें पूर्णा दुजें नाहीं । जें तो मारी ॥ ४३ ॥ सोनयाचिया चंडिका । सुवर्णशूळेंचि देखा । सोनयाचिया महिखा । नाशु केला ॥ ४४ ॥ तो देवलवासिया कडा । व्यवहारु गमला फुडा । वांचूनि शूळ महिष चामुंडा । सोनेंचि आहे ॥ ४५ ॥ पैं चित्रीचें पाणी हुताशु । तो दिठीचि भागु आभासु । पटीं आगी वोलांशु । दोन्ही नाहीं ॥ ४६ ॥ मुक्ताचें देह तैसें । हालत संस्कारवशें । देखोनि लोक पिसे । कर्ता म्हणती ॥ ४७ ॥ आणि तया करणेयाआंतु । घडो तिहीं लोकां घातु । परी तेणें केली हे मातु । बोलोंचि नये ॥ ४८ ॥ तंव अंधारुचि देखावा तेजें । मा तें फेडी हें कें बोलिजे । तैसें ज्ञानिया नाही दुजें । जे तो मारील ॥ ४९ ॥ म्हणोनि तयाची बुद्धी । नेणे पापपुण्याची गंधी । गंगा मीनलिया नदी । विटाळु जैसा ॥ ४५० ॥ आगीसि आगी झगटलया ।

काय पोळे धनंजया। कीं शस्त्र रुपे आपणया। आपणचि ॥ ५१ ॥ तैसें आपणपयापरतें। जो नेणे क्रियाजातातें। तेथ काय लिंपवी बुद्धीतें। तयाचिये ॥ ५२ ॥ म्हणोनि कार्य कर्ता क्रिया। हें स्वरूपचि जाहालें जया। नाहीं शरीरादिकीं तया। कर्मीं बाधु ॥ ५३ ॥ जो कर्ता जीव विंदाणी। काढूनि पांचही खाणी। घडित आहे करणीं। आउतीं दाहें ॥ ५४ ॥ तेथ न्यावो आणि अन्यावो। हा द्विविधु साधूनि आवो। उभवितां न लवी खेवों। कर्मभुवनें ॥ ५५ ॥ या थोराडा कीर कामा। विरजा नोहे आत्मा। परी म्हणसी हन उपक्रमा। हातु लावी ॥ ५६ ॥ तो साक्षी चिद्रूपु। कर्मप्रवृत्तीचा संकल्पु। उठी तो कां निरोपु। आपणचि दे ॥ ५७ ॥ तरी कर्मप्रवृत्तीहीलागीं। तया आयासु नाहीं आंगीं। जे प्रवृत्तीचेही उळिगीं। लोकुचि आथी ॥ ५८ ॥ म्हणोनि आत्मयाचें केवळ। जो रूपचि जाहला निखिळ। तया नाहीं बंदिशाळ। कर्माची हे ॥ ५९ ॥ परी अज्ञानाचां पटीं। अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी। तेथ चितारणी हे त्रिपुटी। प्रसिद्ध जे कां ॥ ४६० ॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना। करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥

जें ज्ञान ज्ञाता ज्ञेय। हें जगाचें बीजत्रय। तें कर्माची निःसंदेह। प्रवृत्ति जाण ॥ ६१ ॥ आतां ययाचि गा त्रया। व्यक्ती वेगळालिया। आइकें धनंजया। करूं रूप ॥ ६२ ॥ तरी जीवसूर्यबिंबाचे। रश्मी श्रोत्रादिकें पांचें। धांवोनि विषयपद्माचे। फोडिती मढ ॥ ६३ ॥ कीं जीवनृपाचे वारु उपलाणें। घेऊनि इंद्रियांचीं केंकाणें। विषयदेशींचें नागवणें। आणीत जे ॥ ६४ ॥ हें असो इहीं इंद्रियीं राहटे। जें सुखदुःखेंसीं जीवा भेटे। तें सुषुप्तिकाळीं वोहटे। जेथ ज्ञान ॥ ६५ ॥ तया जीवा नांव ज्ञाता। आणि जें हें सांगितलें आतां। तेंचि एथ पंडुसुता। ज्ञान जाण ॥ ६६ ॥ जे अविद्येचिये पोटीं। उपजतखेंवों किरीटी। आपणयातें वांटी। तिहीं ठायीं ॥ ६७ ॥ आपुलिये धांवे पुढां। घालूनि ज्ञेयाचा गुंडा। उभारी मागिलीकडां। ज्ञातृत्वातें ॥ ६८ ॥ मग ज्ञातया ज्ञेया दोघां। तो नांदणुकेचा बगा। माजीं जालेनि पैं गा। वाहे जेणें ॥ ६९ ॥ ठाकूनि ज्ञेयाची शिंव। पुरे जयाचि धांव। सकळ पदार्था नांव। सूतसे जें ॥ ४७० ॥ तें गा सामान्यज्ञान। या बोला नाहीं आन। ज्ञेयाचेंही चिन्ह। आइक आतां ॥ ७१ ॥ तरी शब्द-स्पर्शु -। रूप-गंध-रसु। हा पंचविध आभासु। ज्ञेयाचा जो ॥ ७२ ॥ जैसें एकेंचि चूतफळें। इंद्रियां वेगळवेगळें। रसे वर्णे परिमळें। भेटिजे स्पर्शे ॥ ७३ ॥ तैसें ज्ञेय तरी एकसरें। परी ज्ञान इंद्रियद्वारें। घे म्हणोनि प्रकारें। पांचें जालें ॥ ७४ ॥ आणि समुद्रीं ओघाचें जाणें। सरे लाणीपासीं धांवणें। कां फळीं सरे वाढणें। सस्याचे जेवीं ॥ ७५ ॥ तैसें इंद्रियांचां वाहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ ठी। होय तें गा किरीटी। विषय ज्ञेय ॥ ७६ ॥ एवं ज्ञातया ज्ञाना ज्ञेया। तिहीं रूप केले धनंजया। हे त्रिविध सर्व क्रिया -। प्रवृत्ति जाण ॥ ७७ ॥ जे शब्दादि विषय। हें पंचविध जें ज्ञेय। तेंचि प्रिय कां अप्रिय। एके परीचें ॥ ७८ ॥ ज्ञान मोटकें ज्ञातया। दावी ना जंव धनंजया। तंव स्वीकारा की त्यजावया। प्रवर्तेचि तो ॥ ७९ ॥ परी मीनातें देखोनि बकु। जैसा निधानातें रंकु। कां स्त्री देखोनि कामुकु।

प्रवृत्ति धरी ॥ ४८० ॥ जैसें खालारा धांवे पाणी । भ्रमर फुलाचिये घाणीं । नाना सुटला सांजवणी । वत्सुचि पां ॥ ८१ ॥ अगा स्वर्गीची उर्वशी । ऐकोनि जेवीं माणुसीं । वारत्या लावीजती आकाशीं । यागांचिया ॥ ८२ ॥ पैं पारिवा जैसा किरीटी । चढला नभाचियेहि पाठीं । पारवी देखोनि लोटी । आंगचि सगळें ॥ ८३ ॥ हें ना घनगर्जनासरिसा । मयूर वोवांडें आकाशा । ज्ञाता ज्ञेय देखोनि तैसा । धांवचि घे ॥ ८४ ॥ म्हणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता । हे त्रिविध गा पंडुसुता । होयचि कर्मा समस्तां । प्रवृत्ति येथ ॥ ८५ ॥ परी तेंचि ज्ञेय विषायें । जरी ज्ञातायातें प्रिय होये । तरी भोगावया न साहे । क्षणही विलंबु ॥ ८६ ॥ नातरी अवचटें । ते विरू होऊनि भेटे । तरी युगांत वाटे । सांडावया ॥ ८७ ॥ व्याळा कां हारा । वरपडा जालेया नरा । हरिखु आणि दरारा । सरसाचि उठी ॥ ८८ ॥ तैसें ज्ञेय प्रियाप्रियें । देखिलेनि ज्ञातया होये । मग त्यागस्वीकारीं वाहे । व्यापारातें ॥ ८९ ॥ तेथ रागीं प्रतिमल्लाचा । गोसांवीं सर्वदळाचा । रथु सांडूनि पायांचा । होय जैसा ॥ ४९० ॥ तैसें ज्ञातेपणें जे असे । तें ये कर्ता ऐसिये दशे । जेवितें बैसलें जैसें । रंधन करूं ॥ ९१ ॥ कां भंवरेंचि केला मळा । वरकलुचि जाला अंकसळा । नाना देवो रिगाला देऊळा - । चिया कामा ॥ ९२ ॥ तैसा ज्ञेयाचिया हांवा । ज्ञाता इंद्रियांचा मेळावा । राहाटवी तेथ पांडवा । कर्ता होय ॥ ९३ ॥ आणि आपण होऊनि कर्ता । ज्ञाना आणी करणता । तेथें ज्ञेयचि स्वभावतां । कार्य होय ॥ ९४ ॥ ऐसा ज्ञानाचिये निजगती । पालटु पडे गा सुमती । डोळ्यांची शोभा रातीं । पालटे जैसी ॥ ९५ ॥ कां अदृष्ट जालिया उदासु । पालटे श्रीमंताचा विलासु । पुनिवेपाठीं शीतांशु । पालटे जैसा ॥ ९६ ॥ तैसा चळितां करणें । ज्ञाता वेठिजे कर्तेपणें । तेथिंचीं तियें लक्षणें । ऐक आता ॥ ९७ ॥ तरी बुद्धि आणि मन । चित्त अहंकार हन । हें चतुर्विध चिन्ह । अंतःकरणाचें ॥ ९८ ॥ बाहिरि त्वचा श्रवण । चक्षु रसना घ्राण । हें पंचविध जाण । इंद्रियें गा ॥ ९९ ॥ तेथ आंतुलें तंव करणें । कर्ता कर्तव्या घे उमाणें । मग तैं जरी जाणे । सुखा येतें ॥ ५०० ॥ तरी बाहेरिलें तियेंही । चक्षुरादिकें दहाही । उठौनि लवलाहीं । व्यापारा सूये ॥ १ ॥ मग तो इंद्रियकदंबु । करविजे तंव राबु । जंव कर्तव्याचा लाभु । हातासि ये ॥ २ ॥ ना तें कर्तव्य जरी दुःखें । फळेल ऐसें देखे । तो लावी त्यागमुखें । तियें दाहाही ॥ ३ ॥ मग फिटे दुःखाचा ठावो । तंव राहटवी रात्रिदिवो । विकणुवातें कां रावो । जयापरी ॥ ४ ॥ तैसेनि त्यागस्वीकारीं । वाहतां इंद्रियांची धुरी । ज्ञातयातें अवधारीं । कर्ता म्हणिपे ॥ ५ ॥ आणि कर्तयाचां सर्व कर्मीं । आउतांचिया परी क्षमी । म्हणोनि इंद्रियांतें आम्ही । करणें म्हणों ॥ ६ ॥ आणि हेंचि करणेंवरी । कर्ता क्रिया ज्या उभारी । तिया व्यापे तें अवधारीं । कर्म एथ ॥ ७ ॥ सोनाराचिया बुद्धी लेणें । व्यापे चंद्रकरीं चांदिणें । कां व्यापे वेल्हाळपणें । वेली जैसी ॥ ८ ॥ नाना प्रभा व्यापे प्रकाशु । गोडिया इक्षुरसु । हें असो अवकाशु । आकाशीं जैसा ॥ ९ ॥ तैसें कर्तयाचिया क्रिया । व्यापलें जें धनंजया । तें कर्म गा बोलावया । आन नाहीं ॥ ५१० ॥ एवं कर्ता कर्म करण । या तिहींचेंहि

लक्षण । सांगितलें तुज विचक्षण - । शिरोमणी ॥ ११ ॥ एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय । हें कर्माचें प्रवृत्तित्रय । तैसेंचि कर्ता करण कार्य । हा कर्मसंचयो ॥ १२ ॥ वन्हीं ठेविला असे धूमु । आथी बीजीं जेवीं द्रुमु । कां मनीं जोडे कामु । सदा जैसा ॥ १३ ॥ तैसा कर्ता क्रिया करणीं । कर्माचें आहे जिंतवणीं । सोनें जैसें खाणी । सुवर्णाचिये ॥ १४ ॥ म्हणोनि हें कार्य मी कर्ता । ऐसें आथि जेथ पांडुसुता । तेथ आत्मा दूरी समस्तां - । क्रियांपासीं ॥ १५ ॥ यालागीं पुढती । आत्मा वेगळाचि सुमती । आतां असो हें किती । जाणतासि तूं ॥ १६ ॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः । प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥ १९ ॥

परि सांगितलें जें ज्ञान । कर्म कर्ता हन । ते तिन्ही तिहीं ठायीं भिन्न । गुणीं आहाती ॥ १७ ॥ म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तया । पातेजों नये धनंजया । जे दोनी बांधती सोडावया । एकचि प्रौढ ॥ १८ ॥ तें सात्त्विक ठाउवें होये । तो गुणभेदु सांगों पाहें । जो सांख्यशास्त्रीं आहे । उवाइला ॥ १९ ॥ जें विचारक्षीरसमुद्र । स्वबोधकुमुदिनीचंद्र । ज्ञानडोळसां नरेंद्र । शास्त्रांचा जें ॥ ५२० ॥ कीं प्रकृतिपुरुष दोनीं । मिसळलीं दिवोरजनीं । तियें निवडितां त्रिभुवनीं । मार्तंडु जे ॥ २१ ॥ जेथ अपारा मोहराशी । तत्त्वाचां मापीं चोविसीं । उमाणा घेऊनि परेशीं । सुरवाडिजे ॥ २२ ॥ अर्जुना तें सांख्यशास्त्र । पढे जयाचें स्तोत्र । तें गुणभेदचरित्र । ऐसें आहे ॥ २३ ॥ जे आपुलेनि आंगिकें । त्रिविधपणाचेनि अंकें । दृश्यजात तितुकें । अंकित केलें ॥ २४ ॥ एवं सत्त्वरजतमा । तिहींची एवढी असे महिमा । जे त्रैविध्य आदि ब्रह्मा । अंतीं कृमी ॥ २५ ॥ परी विश्वींची आघवी मांदी । जेणें भेदलेनि गुणभेदीं । पडिली तें तव आदी । ज्ञान सांगों । २६ ॥ जे दिठी जरी चोख कीजे । तरी भलतेंही चोख सुजें । तैसें ज्ञानें शुद्धें लाहिजे । सर्वही शुद्ध ॥ २७ ॥ म्हणोनि तें सात्त्विक ज्ञान । आतां सांगों दे अवधान । कैवल्यगुणनिधान । श्रीकृष्ण म्हणे ॥ २८ ॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते । अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥ २० ॥

तरी अर्जुना गा तें फुडें । सात्त्विक ज्ञान चोखडें । जयाचां उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ॥ २९ ॥ जैसा सूर्य न देखे आंधारें । सरिता नेणिजती सागरें । कां कवळलिया न धरे । आत्मच्छाया ॥ ५३० ॥ तयापरी जया ज्ञाना । शिवादि तृणावसाना । इया भूतव्यक्ति भिन्ना । नाडळती ॥ ३१ ॥ जैसें हातें चित्र पाहातां । होय पाणियें मीठ धुतां । कां चेवोनि स्वप्ना येतां । जैसें होय ॥ ३२ ॥ तैसें ज्ञानें जेणें । करितां ज्ञातव्यातें पाहाणें । जाणता ना जाणणें । जाणावें उरे ॥ ३३ ॥ पैं सोनें आटूनि लेणीं । न काढिती आपुलिया आयणी । कां तरंग न घेपती पाणी । गाळूनि जैसें ॥ ३४ ॥ तैसी जया ज्ञानाचिया हाता । न लगेचि दृश्यकथा । तें ज्ञान जाण सर्वथा । सात्त्विक गा ॥ ३५ ॥ आरिसा पाहों जाता कोडें । जैसें पाहातेंचि कां रिगे पुढें । तैसें ज्ञेय लोटोनि पडे । ज्ञाताचि जें ॥ ३६ ॥ पुढतीं तेंचि सात्त्विक ज्ञान । जें मोक्षलक्ष्मीचें भुवन । हें असों ऐक चिन्ह । राजसाचें ॥ ३७ ॥

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् । वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥ २१ ॥

तरी पार्था परियेस । तें ज्ञान गा राजस । जे भेदाची कांस । धरूनि चाले ॥ ३८ ॥ विचित्रता भूतांचिया । आपण आंतोनि ठिकरिया । बहु चकै ज्ञातया । आणिली जेणें ॥ ३९ ॥ जैसें साचा रूपाआड । घालूनि विसराचें कवाड । मग स्वप्नाचें काबाड । वोपी निद्रा ॥ ५४० ॥ तैसें स्वज्ञानाचिये पौळी - । बाहेरि मिथ्याचे महीं खळीं । तिहीं अवस्थाचिया वह्याळी । दावी जें जीवा ॥ ४१ ॥ अलंकारपणें झांकले । बाळा सोनें कां वायां गेलें । तैसें नामीं रूपी दुरावलें । अद्वैत जया ॥ ४२ ॥ अवतरली गाडग्यां घडां । पृथ्वी अनोळख जाली मूढां । वन्हि जाला कानडा । दीपत्वासाठीं ॥ ४३ ॥ का वस्त्रपणाचेनि आरोपें । मूर्खाप्रति तंतु हारपे । नाना मुग्धा पटु लोपे । दाऊनि चित्र ॥ ४४ ॥ तैशी जया ज्ञाना । जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना । ऐक्यबोधाची वासना । निमोनि गेली ॥ ४५ ॥ मग इंधनीं भेदला अनळु । फुलावरी परिमळु । कां जळभेदें सकळु । चंद्रु जैसा ॥ ४६ ॥ तैसे पदार्थभेद बहुवस । जाणोनि लहान थोर वेष । आंतलें तें राजस । ज्ञान येथ ॥ ४७ ॥ आतां तामसाचेंही लिंग । सांगेन तें वोळख चांग । डावलावया मातंग - । सदन जैसें ॥ ४८ ॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् । अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

तरी किरीटी जें ज्ञान । हिंडे विधीचेनि वस्त्रेंहीन । श्रुति पाठमोरी नग्न । म्हणौनि तया ॥ ४९ ॥ येरींही शास्त्रबहिकरीं । जें निंदेचें विटाळवरी । बोळविलेंसे डोंगरीं । म्लेंच्छधर्माचां ॥ ५५० ॥ जे गा ज्ञान ऐसें । गुणग्रहें तामसें । घेतलें भोवें पिसें । होऊनियां ॥ ५१ ॥ जें सोयरिके बाधु नेणे । पदार्थी निषेधु न म्हणे । निरोविलें जैसें सुणें । शून्यग्रामीं ॥ ५२ ॥ तया तोंडीं जें नाडळे । कां खातां जेणें पोळे । तेंचि एक वाळे । येर घेणेंचि ॥ ५३ ॥ पाहीं सोनें चोरितां उंदिरु । न म्हणे थरुविथरु । नेणे मांसखाइरु । काळें गोरें ॥ ५४ ॥ नाना वनामाजीं बोहरी । कडसणी जेवीं न करी । कां जीत मेलें न विचारी । बैसतां माशी ॥ ५५ ॥ अगा वांता कां वाढिलेया । साजुक कां सडलिया । विवेकु कावळिया । नाहीं जैसा ॥ ५६ ॥ तैसें निषिद्ध सांडूनि द्यावें । कां विहित आदरें घ्यावें । हें विषयांचेनि नांवें । नेणेचि जें ॥ ५७ ॥ जेतुलें आड पडे दिठी । तेतुलें घे विषयाचि साठी । मग तें स्त्री द्रव्य वाटी । शिश्नोदरां ॥ ५८ ॥ तीर्थातीर्थ हे भाष । उदकीं नाही सनोळख । तहान वोळे तेंचि सुख । वांचुनियां ॥ ५९ ॥ तयाचिपरी खाद्याखाद्य । न म्हणें निंद्यानिंद्य । तोंडा आवडे तें मेध्य । ऐसाचि बोधु ॥ ५६० ॥ आणि स्त्रीजात तितुकें । त्वचेंद्रियेंचि वोळखे । तियेविषयीं सोयरिके । एकचि बोधु ॥ ६१ ॥ पैं स्वार्थीं जें उपकरे । तयाचि नाम सोयिरें । देहसंबंधु न सरे । जिये ज्ञानीं ॥ ६२ ॥ मृत्यूचें आघवेंचि अन्न । आघवेंचि आगी इंधन । तैसें जगचि आपलें धन । तामसज्ञाना ॥ ६३ ॥ ऐसेनि विश्व सकळ । जेणें विषोचि मानिलें केवळ । तया एक जाणैं फळ । देहभरण ॥ ६४ ॥ आकाशपतिता नीरा । जैसा सिंधूचि येक थारा । तैसें कृत्यजात उदरा - । लागींचि बुझे

॥ ६५ ॥ वांचूनि स्वर्गु नरकु आथी । तया हेतु प्रवृत्ति निवृत्ति । इये आघविर्येंचि राती । जाणिवेची जें ॥ ६६ ॥ जें देहखंडा नाम आत्मा । ईश्वर पाषाणप्रतिमा । ययापरौती प्रमा । ढळों नेणे ॥ ६७ ॥ म्हणोनि पडिलेनि शरीरें । केलेंनिसीं आत्मा विसरे । मा भोगावया उरे । कोण वेषें ॥ ६८ ॥ ना ईश्वरु पाहतां आहे । तो भोगवी हें जरी होये । तरी देवचि खाये । विकूनियां ॥ ६९ ॥ गांवींचे देवळेश्वर । नियामकचि होती साचार । तरी देशींचे डोंगर । उगे कां असती ॥ ५७० ॥ ऐसा विपायें देवो मानिजे । तरी पाषाणमात्रचि जाणिजे । आणि आत्मा तंव म्हणिजे । देहातेंचि ॥ ७१ ॥ येरें पापपुण्यादिकें । तें आघवेंचि करोनि लटिकें । हित मानी अग्निमुखें । चरणें जें कां ॥ ७२ ॥ जे चामाचे डोळे दाविती । जें इंद्रियें गोडी लाविती । तेंचि साच हे प्रतीती । फुडी जया ॥ ७३ ॥ किंबहुना ऐसी प्रथा । वाढती देखसी पार्था । धुंवाचि वेली वृथा । आकाशीं जैसी ॥ ७४ ॥ कोरडा ना वोला । उपेगा आथी गेला । तो वाढोनि मोडला । भेंडु जैसा ॥ ७५ ॥ नाना उंसांचीं कणसें । कां नपुंसकें माणुसें । वन लागलें जैसें । साबरीचें ॥ ७६ ॥ नातरी बाळकाचें मन । कां चोराघरींचें धन । अथवा गळास्तन । शेळियेचे ॥ ७७ ॥ तैसें जें वायाणें । वोसाळ दिसे जाणणें । तयातें मी म्हणे । तामसज्ञान ॥ ७८ ॥ तेंही ज्ञान इया भाषा । बोलिजे तो भावो ऐसा । जात्यंधाचा कां जैसा । डोळा वाडु ॥ ७९ ॥ कां बधिराचे नीट कान । अपेया नाम पान । तैसें आडनांव ज्ञान । तामसा तया ॥ ५८० ॥ हें असो किती बोलावें । तरी ऐसें जें देखावें । तें ज्ञान नोहे जाणावें । डोळस तम ॥ ८१ ॥ एवं तिहीं गुणीं । भेदलें यथालक्षणीं । ज्ञान श्रोतेशिरोमणी । दाविलें तुज ॥ ८२ ॥ आतां याचि त्रिप्रकारा । ज्ञानाचेनि धनुर्धरा । प्रकाशें होती गोचरा । कर्तयाच्या क्रिया ॥ ८३ ॥ म्हणोनि कर्म पैं गा । अनुसरे तिहीं भागां । मोहरें जालिया वोघा । पाणी जैसें ॥ ८४ ॥ तेंचि ज्ञानत्रयवशें । त्रिविध कर्म जें असे । तेथ सात्त्विक तंव ऐसें । परिस आधीं ॥ ८५ ॥

नियतं सङ्गरहितमरागद्वेषतः कृतम् । अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥ २३ ॥

तरी स्वाधिकाराचेनि मार्गें । आलें जें मानिलें आंगें । पतिव्रतेचेनि परिष्वंगें । प्रियातें जैसें ॥ ८६ ॥ सांवळ्या आंगा चंदन । प्रमदालोचनीं अंजन । तैसे अधिकारासी मंडण । नित्यपणें जें ॥ ८७ ॥ तें नित्य कर्म भलें । होय नैमितिकीं सावाइलें । सोनयासि जोडलें । सौरभ्य जैसें ॥ ८८ ॥ आणि आंगा जीवाची संपत्ती । वेंचूनि बाळाची करी पाळती । परी जीवें उबगणें हे स्थिती । न पाहे माय ॥ ८९ ॥ तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी । परी फळ न सूये दिठी । उखिती क्रिया पैठी । ब्रह्मींचि करी ॥ ५९० ॥ आणि प्रिय आलिया स्वभावें । सबळ उरे वेचे ठाउवें नव्हे । तैसें सत्प्रसंगें करावें । पारुषे जरी ॥ ९१ ॥ तरी अकरणाचेनि खेदें । द्वेषातें जिवीं न बांधे । जालियाचेनि आनंदें । फुंजों नेणे ॥ ९२ ॥ ऐसेऐसिया हातवटिया । कर्म निफजे जें धनंजया । जाण सात्त्विक हें तया । गुणनाम गा ॥ ९३ ॥ ययावरी राजसाचें । लक्षण सांगिजेल साचें । न करी अवधानाचें । वाणेपण ॥ ९४ ॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः । क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

तरी घरीं मातापितरां । धड बोली नाहीं संसारां । येर विश्व भरी आदरा । मूर्खु जैसा ॥ ९५ ॥ कां तुळशीचिया झाडा । दुरूनि न घापे सिंतोडा । द्राक्षीचिया तरी बुडा । दूधचि लाविजे ॥ ९६ ॥ तैसीं नित्यनैमित्तिकें । कर्में जियें आवश्यकें । तयांचेविषीं न शके । बैठला उठूं ॥ ९७ ॥ येरां काम्याचेनि तरी नांवें । देह सर्वस्व आघवें । वेंचितांही न मनवे । बहु ऐसें ॥ ९८ ॥ अगा देवढी वाढी लाहिजे । तेथ मोल देता न धाइजे । पेरितां पुरे न म्हणिजे । बीज जेवीं ॥ ९९ ॥ कां परिसु आलिया हातीं । लोहालागीं सर्वसंपत्ती । वेंचु करितां ये उन्नती । साधकु जैसा ॥ ६०० ॥ तैसीं फळें देखोनि पुढें । काम्यकर्में दुवाडें । करी परी तें थोकडें । केलेंही मानी ॥ १ ॥ तेणें फळकामुकें । यथाविधि नेटकें । काम्य कीजे तितुकें । क्रियाजात ॥ २ ॥ आणि तयाही केलियाचें । तोंडीं लावी दौंडीचें । कर्मीं या नांवपाटाचें । वाणें सारी ॥ ३ ॥ तैसा भरे कर्माहंकारु । मग पिता अथवा गुरु । ते मनी न काळज्वरु । औषध जैसें ॥ ४ ॥ तैसेनि साहंकारें । फळाभिलाषियें नरें । कीजे गा आदरें । जें जें कांहीं ॥ ५ ॥ परी तेंही करणे बहुवसा । वळघोनि करी सायासा । जीवनोपावो कां जैसा । कोल्हाटियांचा ॥ ६ ॥ एका कणालागीं उंदिरु । आसका उपसे डोंगरु । कां शेवाळोद्देशें दर्दुरु । समुद्रु डहुळी ॥ ७ ॥ पै भिकेपरतें न लाहे । तन्ही गारुडी सापु वाहे । काय कीजे शीणुचि होये । गोडु येकां ॥ ८ ॥ हें असो परमाणूचेनि लाभें । पाताळ लंघिती वोळंबे । तैसें स्वर्गसुखलोभें । विचंबणें जें ॥ ९ ॥ ते काम्य कर्म सक्लेश । जाणावें येथ राजस । आतां चिन्ह परिस । तामसाचें ॥ ६१० ॥

अनुबन्धं क्षयं हिंसामनवेक्ष्य च पौरुषम् । मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

तरी तें गा तामस कर्म । जें निंदेचें काळें धाम । निषेधाचें जन्म । साच जेणें ॥ ११ ॥ जें निपजविल्यापाठीं । कांहींच न दिसे दिठी । रेघ काढिलिया पोटीं । तोयाचां जेवीं ॥ १२ ॥ कां कांजी घुसळलियां । कां साररावखोंडी फुंकलिया । कांहीं न दिसे गाळिलिया । वाळु घाणां ॥ १३ ॥ नाना उपणिलिया भूंस । कां विंधिलिया आकाश । नाना मांडिलिया पाश । वारयासीं ॥ १४ ॥ हें अवघेंचि जैसें । वांझें होऊनि नासे । जें केलिया पाठीं तैसें । वायांचि जाय ॥ १५ ॥ एन्हवीं नरदेहाही येवढें । धन आटणीये पडे । जें निफजवितां मोडे । जगाचें सुख ॥ १६ ॥ जैसा कमळवनीं फांसु । काढिलिया कांटसु । आपण झिजे नाशु । कमळां करी ॥ १७ ॥ कां आपण आंगें जळे । आणि नागवी जगाचे डोळे । पतंगु जैसा सळें । दीपाचेनि ॥ १८ ॥ तैसें सर्वस्व वायां जावो । वरी देहाही होय घावो । परी पुढीलां अपावों । निफजविजे जेणें ॥ १९ ॥ मासी आपणयातें गिळवी । परी पुढीला वांती शिणवी । तें कश्मळ आठवी । आचरण जें ॥ ६२० ॥ तेंही करावया दोषें । मज सामर्थ्य असे कीं नसे । हेंही पुढील तैसें । न पाहतां करी ॥ २१ ॥ केवढा माझा उवावो । करितां कोण प्रस्तावो । केलियाही आवो । काय

येथ ॥ २२ ॥ इये जाणिवेची सोये । अविवेकाचेनि पायें । पुसोनियां होये । साटोप कर्मीं ॥ २३ ॥ आपुला वसौटा जाळुनी । बिसाटे जैसा वन्ही । कां स्वमर्यादा गिळोनि । सिंधु उठी ॥ २४ ॥ मग नेणे बहु थोडें । न पाहे मागें पुढें । मार्गामार्ग येकवढे । करीत चाले ॥ २५ ॥ तैसें कृत्याकृत्य सरकटित । आपपर नुरवित । कर्म होय तें निश्चित । तामस जाण ॥ २६ ॥ ऐसी गुणत्रयभिन्ना । कर्माची गा अर्जुना । हे केली विवंचना । उपपत्तींसीं ॥ २७ ॥ आतां ययाचि कर्मा भजतां । कर्माभिमानिया कर्ता । तो जीवुही त्रिविधता । पातला असे ॥ २८ ॥ चतुराश्रमवशें । एकु पुरुषु चतुर्धा दिसे । कर्तया त्रैविध्य तैसें । कर्मभेदें ॥ २९ ॥ परी तयां तिहींआतु । सात्त्विक तंव प्रस्ततु । सांगेन दत्तचित्तु । आकर्णीं तूं ॥ ६३० ॥

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः । सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥ २६ ॥

तरी फळोद्देशें सांडिलिया । वाढिती जेवीं सरळिया । शाखा कां चंदनाचिया । बावन्नया ॥ ३१ ॥ कां न फळतांही सार्थका । जैसिया नागलतिका । तैसिया करी नित्यादिकां । क्रिया जो कां ॥ ३२ ॥ परी फलशून्यता । नाहीं तया विफळता । पैं फळासीचि पांडुसुता । फळें कायिसी ॥ ३३ ॥ आणि आदरें करी बहुवसें । परि कर्ता मी हें नुमसे । वर्षाकाळींचें जैसें । मेघवृंद ॥ ३४ ॥ तेवींचि परमात्मलिंगा । समर्पावयाजोगा । कर्मकलापु पैं गा । निपजावया ॥ ३५ ॥ तया काळातें नुलंघणें । देशशुद्धिही साधणें । कां शास्त्रांचां वातीं पाहणें । क्रियानिर्णयो ॥ ३६ ॥ वृत्ती करणें येकवळा । चित्त जावों न देणें फळा । नियमांचिया सांखळा । वाहणें सदा ॥ ३७ ॥ हा निरोधु साहावयालागीं । धैर्याचिया चांगचांगी । चिंतवणी जिती आंगीं । वाहे जो कां ॥ ३८ ॥ आणि आत्मयाचिये आवडी । कर्में करितां वरपडीं । देहसुखाचिये परवडी । येवों न लाहे ॥ ३९ ॥ ऐसा निद्रा दुर्‍हावे । क्षुधा न बाणवे । सुरवाडु न पावे । आंगाचा ठावो ॥ ६४० ॥ तंव अधिकाधिक । उत्साहो धरी आगळीक । सोनें जैसें तुक । तुटलिया कसीं ॥ ४१ ॥ जरी आवडी आथी साच । तरी जीवितही सलंच । आंगीं घालितां रोमांच । देखिजती सतिये ॥ ४२ ॥ मा आत्मयायेवढीया प्रिया । वालभेला जो धनंजया । देहचि सिदतां तया । काय खेदु होईल ॥ ४३ ॥ म्हणौनि विषयसुरवाडु तुटे । जंव जंव देहबुद्धि आटे । तंव तंव आनंदु दुणवटे । कर्मीं जया ॥ ४४ ॥ ऐसेनि जो कर्म करी । आणि कोणे एके अवसरीं । तें ठाके ऐसी परी । वाहे जरी ॥ ४५ ॥ तरी कडाडी मोडे जैं गाडा । तो आपणपें न मनी अवघडा । तैसा ठाकलेनिही थोडा । नोहे जो कां ॥ ४६ ॥ नातरी आदरिलें । अव्यंग सिद्धी गेलें । तरी तेंही जिंतिलें । मिरवूं नेणे ॥ ४७ ॥ इया खुणा कर्म करितां । देखिजे जो पंडुसुता । तयातें म्हणिपे तत्त्वतां । सात्त्विकु कर्ता ॥ ४८ ॥ आतां राजसा कर्तेया । वोळखणें हें धनंजया । जे अभिलाषा जगाचिया । वसौटा तो ॥ ४९ ॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः । हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ २७ ॥

जैसा गांवींचिया कश्मळा । उकरडा होय येकवळा । कां स्मशानीं अमंगळा । आघवयांचि

॥ ६५० ॥ तयापरी जो अशेषा । विश्वाचिया अभिलाषा । पायपाखाळणिया दोषा । घरटा जाला ॥ ५१ ॥ म्हणोनि फळाचा लागु । देखे जिये असलगु । तिये कर्मीं चांगु । रोहो मांडी ॥ ५२ ॥ आणि आपण जालिये जोडी । उपखों नेदी कवडी । क्षणक्षणा कुरोंडी । जीवाची करी ॥ ५३ ॥ कृपणु चित्तीं ठेवा आपुला । तैसा दक्षु पराविया माला । बकु जैसा खुतला । मासेयासी ॥ ५४ ॥ आणि गोंवी गेलिया जवळी । झगटलिया अंग फाळी । फळे आंतु पोळी । बोरांटी जैसी ॥ ५५ ॥ तैसें मनें वाचा कायें । भलतया दुखवितु जाये । स्वार्थ साधितां न पाहे । पराचें हित ॥ ५६ ॥ तेवींचि आंगें कर्मीं । आचरणें नोहे क्षमी । न निघे मनोधर्मीं । अरोचकु ॥ ५७ ॥ कनकाचिया फळा । आंतु माज बाहेरी मौळा । तैसा सबाह्य दुबळा । शुचित्वें जो ॥ ५८ ॥ आणि कर्मजात केलिया । फळ लाहे जरी धनंजया । तरी हरिखें जगा यया । वांकुलिया वाये ॥ ५९ ॥ अथवा जें आदरिलें । हीनफळ होय केलें । तरी शोकें तेणें जिंतिलें । धिक्कारों लागे ॥ ६६० ॥ कर्मीं राहाटी ऐसी । जयातें होती देखसी । तोचि जाण त्रिशुद्धीसी । राजस कर्ता ॥ ६१ ॥ आतां यया पाठीं येरु । जो कुकर्माचा आगरु । तोही करूं गोचरु । तामस कर्ता ॥ ६२ ॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः । विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥ २८ ॥

तरी मी लागलिया कैसें । पुढील जळत असे । हें नेणिजे हुताशें । जियापरी ॥ ६३ ॥ पैं शस्त्रे मियां तिखटें । नेणिजे कैसेनि निवटे । कां नेणिजे काळकूटें । आपलें केलें ॥ ६४ ॥ तैसा पुढीलया आपुलया । घातु करीत धनंजया । आदरी वोखटिया । क्रिया जो का ॥ ६५ ॥ तिया करितांही वेळीं । काय जालें हें न सांभाळी । चळला वायू वाहटुळी । चेष्टे तैसा ॥ ६६ ॥ पैं करणिया आणि जया । मेळु नाहीं धनंजया । तो पाहुनी पिसेया । कैंची त्राय ॥ ६७ ॥ आणि इंद्रियांचें वोगरलें । चरोनि राखे जो जियालें । बैलातळीं लागले । गोचिड जैसे ॥ ६८ ॥ हांसया रुदना वेळु । नेणता आदरी बाळु । राहाटे उच्छृंखळु । तयापरी ॥ ६९ ॥ जो प्रकृती आंतलेपणें । कृत्याकृत्यस्वादु नेणे । फुगे केरे धालेपणें । उकरडा जैसा ॥ ६७० ॥ म्हणोनि मान्याचेनि नांवें । ईश्वराही परी न खालवे । स्तब्धपणें न मनवे । डोंगरासी ॥ ७१ ॥ आणि मन जयाचें कलाली । राहाटी फुडी चोरिली । दिठी कीर ते वोली । पण्यांगनेची ॥ ७२ ॥ किंबहुना कपटाचें देहचि वळिले तयाचें । ते जिणें की जुवाराचें । टिटेघर ॥ ७३ ॥ नोहे तयाचा प्रादुर्भावो । तो साभिलाष भिल्लांचा गांवो । म्हणोनि नये येवों जावों । तया वाटा ॥ ७४ ॥ आणि आणिकांचें निकें केलें । विरु होय जया आलें । जैसें अपेय पया मिनलें । लवण करी ॥ ७५ ॥ का हींव ऐसा पदार्थु । घातला आगीआंतु । तेचि क्षणी धडाडितु । अग्नि होय ॥ ७६ ॥ नाना सुद्रव्यें गोमटीं । जालिया शरीरीं पैठीं । होऊनि ठाती किरीटी । मळुचि जेवी ॥ ७७ ॥ तैसें पुढिलांचें बरवें । जयाचां भीतरीं पावे । आणि विरुद्धचि आघवें । होंऊनि निगे ॥ ७८ ॥ जो गुण घे दे दोष । अमृताचें करी विष । दूध पाजिलिया देख । व्याळु जैसा ॥ ७९ ॥ आणि ऐहिकीं जियावें । जेणें परत्रा साच यावें । तें उचित कृत्य पावे ।

अवसरीं जिये ॥ ६८० ॥ तेव्हां जया आपैसी । निद्रा ये ठेविली ऐसी । दुर्व्यवहारीं जैसी । विटाळें लोटे ॥ ८१ ॥ पैं द्राक्षरसा आम्ररसा । वेळे तोंड सडे वायसा । कां डोळे फुटती दिवसा । डडुळाचे ॥ ८२ ॥ तैसा कल्याणकाळु पाहे । तैं तयातें आळसु खाये । ना प्रमादीं तरी होये । तो म्हणे तैसें ॥ ८३ ॥ जेवींचि सागराचां पोटीं । जळे अखंड आगिठी । तैसा विषादु वाहे गांठीं । जिवाचिये जो ॥ ८४ ॥ लेंडोराआगीं धूमावधि । कां अपाना आंगीं दुर्गंधि । तैसा जो जीवितावधि । विषादें केला ॥ ८५ ॥ आणि कल्पांताचिया पारा । वेगळेंही जो विरा । सूत्रधरी व्यापारा । साभिलाषा ॥ ८६ ॥ अगा जगाही परौती । शुचा वाहे पैं चित्तीं । करितां विषीं हातीं । तृणही न लगे ॥ ८७ ॥ ऐसा जो लोकाआंतु । पापपुंजु मूर्तु । देखसी तो अव्याहतु । तामसु कर्ता ॥ ८८ ॥ एवं कर्म कर्ता ज्ञान । या तिहींचें त्रिधा चिन्ह । दाविलें तुज सुजन - । चक्रवर्ती ॥ ८९ ॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु । प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥

आता अविद्येचां गांवी । मोहाची वेढूनि मदवी । संदेहाचीं आघवीं । लेऊनि लेणीं ॥ ६९० ॥ आत्मनिश्चयाची बरव । जया आरिसां पाहे सावयव । तिये बुद्धीचीही धांव । त्रिधा असे ॥ ९१ ॥ अगा सत्त्वादि गुणीं इहीं । काइ एक तिहीं ठायीं । न कीजेचि येथ पाहीं । जगामाजीं ॥ ९२ ॥ आगी नसतां पोटीं । कवण काष्ठ असे सृष्टी । तैसें तें कैचें दृश्यकोटीं । त्रिधा जें नोहे ॥ ९३ ॥ म्हणौनि तिहीं गुणीं । बुद्धी केली त्रिगुणीं । धृतीसिही वांटणीं । तैसीचि असे ॥ ९४ ॥ तेंचि येक वेगळालें । तेथ चिन्हीं अळंकारलें । सांगिजेल उपाइलें । भेदलेपणें ॥ ९५ ॥ परी बुद्धि धृति इयां । दोहीं भागामाजी धनंजया । आधीं रूप बुद्धीचिया । भेदासि करूं ॥ ९६ ॥ तरी उत्तमा मध्यमा निकृष्टा । संसारासि गा सुभटा । प्राणियां येतियां वाटा । तिनी आथी ॥ ९७ ॥ जे अकरण काम्य निषिद्ध । ते हे मार्ग तिन्हीं प्रसिद्ध । संसारभयें सबाध । जीवां ययां ॥ ९८ ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये । बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३० ॥

म्हणौनि अधिकारें मानिलें । जें विधीचेनि वोघें आलें । तें येकचि येथ भलें । नित्य कर्म ॥ ९९ ॥ तेंचि आत्मप्राप्तिफळ । दिठी सूनि केवळ । कीजे जैसें कां जळ । सेविजे ताहने ॥ ७०० ॥ येतुलेनि तें कर्म । सांडी जन्मभय विषम । करूनि दे सुगम । मोक्षसिद्धि ॥ १ ॥ ऐसें कर्म करी तो भला । संसारभयें सांडिला । करणीयत्वें आला । मुमुक्षुभागा ॥ २ ॥ तेथ जे बुद्धि ऐसा । बळी बांधे भरंवसा । मोक्षु ठेविला ऐसा । जोडेल येथ ॥ ३ ॥ म्हणौनि निवृत्तीचि मांडिली । सूनि प्रवृत्तितळीं । इये कर्मीं बुडकुळी । द्यावी कीं ना ॥ ४ ॥ तृषार्ता पाणिये जिणें । कां पुरीं पडलिया प्रवाहणें । अंधकूपगता किरणें । सूर्याचेनि ॥ ५ ॥ नाना पथ्येसीं औषध लाहे । तरी रोगें दाटलाही जिये । कां मीना जिव्हाळा होये । जळाचा जरी ॥ ६ ॥ तरी तया जीविता । नाहीं जेवीं अन्यथा । तैसें कर्मीं इये प्रवर्ततां जोडेचि मोक्षु ॥ ७ ॥ हें करणीयाचिया कडे । जें ज्ञान आथी चोखडें । आणि अकरणीय हें फुडें । ऐसें जाण ॥ ८ ॥ जीं तियें काम्यादिकें । संसारभयदायकें ।

अकृत्यपणाचें आंबुखें । पडिलें जया ॥ ९ ॥ तिये कर्मीं अकार्यीं । जन्ममरणसमयीं । प्रवृत्ति पळवी पायीं । मागिलींचि ॥ ७१० ॥ पैं आगीमाजीं न रिघवे । अथावीं न घलवे । धगधगीत नागवे । शूळ जेवीं ॥ ११ ॥ कां काळयानागे धुंधुवातु । देखोनि न घलवे हातु । न वचवे खोंपेआंतु । वाघाचिये ॥ १२ ॥ तैसें कर्म अकरणीय । देखोनि महाभय । उपजे नि:संदेह । बुद्धी जिये ॥ १३ ॥ वाढिलें रांधूनि विखें । तेथें जाणिजे मृत्यु न चुके । तेवीं निषेधीं कां देखे । बंधातें जे ॥ १४ ॥ मग बंधभयभरितीं । तियें निषिद्धीं प्राप्तीं । विनियोगु जाणे निवृत्ती । कर्माचिये ॥ १५ ॥ ऐसेनि कार्याकार्यविवेकी । जे प्रवृत्तिनिवृत्तिमापकीं । खरा कुडी पारखी । जिया परी ॥ १६ ॥ तैसी कृत्याकृत्यशुद्धी । बुझे जे निरवधी । सात्त्विक म्हणिपे बुद्धी । तेंचि तूं जाण ॥ १७ ॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च । अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥

आणि बकाचां गांवीं । घेपे क्षीरनीर सकलवी । कां अहोरात्रींचीं गोंवी । आंधळें नेणे ॥ १८ ॥ जया फुलांचा मकरंदु फावे । तो काष्ठें कोरूं धांवे । परी भ्रमरपणा नव्हे । अव्हांटा जेवीं ॥ १९ ॥ तैसीं इयें कार्याकार्यें । धर्माधर्मरूपें जियें । तियें न चोजवितां जाये । जाणती जे कां ॥ ७२० ॥ अगा डोळांवीण मोतियें । घेतां पाडु मिळे विपायें । न मिळणें तें आहे । ठेविलें तेथें ॥ २१ ॥ तैसे अकरणीय अवचटें । नोडवे तरीच लोटे । एन्हवीं जाणे एकवटें । दोन्हीं जे कां ॥ २२ ॥ ते गा बुद्धि चोखविषीं । जाण येथ राजसी । अक्षत टाकिली जैसी । मांदियेसी ॥ २३ ॥

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता । सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥

आणि राजा जिया वाटा जाये । ते चोरांसि आडव होये । काय राक्षसां दिवो पाहे । राती होऊनि ॥ २४ ॥ नाना निधानचि निदैवा । होये कोळसयाचा उडवा । पैं असतें आपणपें जीवा । नाहीं जालें ॥ २५ ॥ तैसें धर्मजात तितुकें । जिये बुद्धीसी पातकें । साच तें लटिकें । ऐसेंचि बुझे ॥ २६ ॥ ते आघवेचि अर्थ । करूनि घाली अनर्थ । गुण ते ते व्यवस्थित । दोषचि मानी ॥ २७ ॥ किंबहुना श्रुतिजातें । अधिष्ठूनि केलें सरतें । तेतुलेंही उपरतें । जाणे जे बुद्धि ॥ २८ ॥ ते कोणातेंही न पुसतां । तामसी जाणावी पांडुसुता । रात्री काय धर्मार्था । साच करावी ॥ २९ ॥ एवं बुद्धीचे भेद । तिन्हीं तुज विशद । सांगितलें स्वबोध - । कुमुदचंद्रा ॥ ७३० ॥ आतां याचि बुद्धिवृत्ती । निष्टंकिलां कर्मजातीं । खांदु मांडिजे धृती । त्रिविधा जया ॥ ३१ ॥ तिये धृतीचेही विभाग । तिन्ही यथालिंग । सांगिजती चांग । अवधान दे ॥ ३२ ॥

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः । योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३३ ॥

तरी उदेलिया दिनकरु । चोरींसि थोके अंधारु । कां राजाज्ञा अव्यवहारु । कुंठवी जेवीं ॥ ३३ ॥ नाना पवनाचा साटु । वाजीनलिया नीटु । आंगेंसीं बोभाटु । सांडिती मेघ ॥ ३४ ॥ कां अगस्त्याचेनि दर्शनें । सिंधु घेऊनी ठाती मौनें । चंद्रोदयीं कमळवनें । मिठी देती ॥ ३५ ॥ हें असो पावो उचलिला । मदमुख न ठेविती खालां । गर्जोनि पुढां जाला । सिंहु जरी ॥ ३६ ॥

तैसा जो धीरु । उठलिया अंतरु । मनादिकें व्यापारु । सांडिती उभी ॥ ३७ ॥ इंद्रियविषयांचिया गांठी । अपैसया सुटती किरीटी । मना मायेचां पोटीं । रिगती दांही ॥ ३८ ॥ अधोर्ध्व गुढें काढी । प्राण नवांची पेंडी । बांधोनि घाली उडी । मध्यमेमाजीं ॥ ३९ ॥ संकल्पविकल्पांचें लुगडें । सांडूनि मन उघडें । बुद्धिही मागिलेकडे । उगीचि बैसे ॥ ७४० ॥ ऐसी धैर्यराजें जेणें । मन प्राण करणें । स्वचेष्टांचीं संभाषणें । सांडविजती ॥ ४१ ॥ मग आघवींचि सडीं । ध्यानाचां आंतुलां मढीं । कोंडिजती निरवडी । योगाचिये ॥ ४२ ॥ परी परमात्मया चक्रवर्ती । उगाणिती जंव हातीं । तंव लांचु न घेतां धृती । धरिजती जिया ॥ ४३ ॥ ते गा धृती येथें । सात्त्विक हें निरुतें । आईक अर्जुनातें । श्रीकांतु म्हणे ॥ ४४ ॥

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन । प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥

आणि होऊनियां शरीरी । स्वर्गसंसाराचां दोहीं घरीं । नांदे जो पोटभरी । त्रिवर्गोपायें ॥ ४५ ॥ तो मनोरथांचां सागरीं । धर्मार्थकामांचां तारू भरी । जेणें धैर्यबळें करी । क्रियावणिज ॥ ४६ ॥ जें कर्म भांडवला सूये । तयाची चौगुणी येती पाहे । येवढे सायास साहे । जया धृती ॥ ४७ ॥ ते गा धृती राजस । पार्था येथ परियेस । आतां आइक तामस । तिसरी जे ॥ ४८ ॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च । न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥

तरी सर्वाधमें गुणें । जयाचें कां रूपा येणें । कोळसा काळेपणें । घडला जैसा ॥ ४९ ॥ अहो प्राकृत आणि हीनु । तयाही कीं गुणत्वाचा मानु । परी न म्हणिजे पुण्यजनु । राक्षसु काई ॥ ७५० ॥ पैं ग्रहांमाजीं इंगुळु । तयातें म्हणिजे मंगळु । तैसा तमीं धसाळु । गुणशब्दु हा ॥ ५१ ॥ जे सर्वदोषांचा वसौटा । तमचि कामऊनि सुभटा । उभारिला आंगवठा । जया नराचा ॥ ५२ ॥ तो आळसु सूनि असे कांखे । म्हणौनि निद्रे कहीं न मुके । पापें पोषितां दुःखें । न सांडिजे जेवीं ॥ ५३ ॥ आणि देहधनाचिया आवडी । सदा भये तयातें न सांडी । विसंबूं न सके धोंडीं । काठिण्य जैसें ॥ ५४ ॥ आणि पदार्थजातीं स्नेहो । बांधे म्हणोनि तो शोकें ठावो । केला न शके पाप जावों । कृतघ्नौनि जैसें ॥ ५५ ॥ आणि असंतोष जीवेंसीं । धरूनि ठेला अहर्निशीं । म्हणौनि मैत्री तेणेंसीं । विषादें केली ॥ ५६ ॥ लसणातें न सांडी गंधी । कां अपथ्यशीळातें व्याधी । तैसी केली मरणावधी । विषादें तया ॥ ५७ ॥ आणि वयसा वित्तकामु । यांचा वाढवी संभ्रमु । म्हणोनि मदें आश्रमु । तोचि केला ॥ ५८ ॥ आगीतें न सांडी तापु । सळातें जातीचा सापु । कां जगाचा वैरी वासिपु । अखंडु जैसा ॥ ५९ ॥ नातरी शरीरातें काळु । न विसंबे कवणे वेळु । तैसा आथी अढळु । तामसीं मदु ॥ ७६० ॥ एवं पांचही हे निद्रादिक । तामसाचां ठाईं दोख । जिया धृती देख । धरिले आहाती ॥ ६१ ॥ तिये गा धृती नांवें । तामसी येथ हें जाणावें । म्हणितलें तेणें देवें । जगाचेनि ॥ ६२ ॥ एवं त्रिविध जे बुद्धि । कीजे कर्मनिश्चयो आधि । तो धृती या सिद्धि । नेइजो येथ ॥ ६३ ॥ सूर्यें मार्गु गोचरु होये । आणि तो चालती कीर पाये ।

परी चालणें तें आहे । धैर्यें जेवीं ॥ ६४ ॥ तैसी बुद्धि कर्मातें दावी । तें करणसामग्री निफजवी । परी निफजावया होआवी । धीरता जे ॥ ६५ ॥ ते हे गा तुजप्रति । सांगितली त्रिविध धृती । यया कर्मत्रया निष्पत्ति । जालिया मग ॥ ६६ ॥ येथ फळ जें एक निफजे । सुख जयातें म्हणिजे । तेंही त्रिविध जाणिजे । कर्मवशें ॥ ६७ ॥ तरी फळरूप तें सुख । त्रिगुणीं भेदलें देख । विवंचूं आतां चोख । चोखीं बोलीं ॥ ६८ ॥ परी चोखी ते कैसी सांगें । पैं घेवों जातां बोलबगें । कानींचियेही लागे । हातींचा मळु ॥ ६९ ॥ म्हणौनि जयाचेनि अव्हेरें । अवधानही होय बाहिरें । तेणें आईक हो आंतरें । जिवाचेनि जीवें ॥ ७७० ॥ ऐसें म्हणौनि देवो । त्रिविधा सुखाचा प्रस्तावो । मांडला तो निर्वाहो । निरूपितसे ॥ ७१ ॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ । अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ॥ ३६ ॥

म्हणे सुखत्रयसंज्ञा । सांगों म्हणौनि प्रतिज्ञा । बोलिलों तें प्राज्ञा । ऐक आतां ॥ ७२ ॥ तरी सुख तें गा किरीटी । दाविजेल तुज दिठी । जें आत्मयाचिये भेटी । जीवासि होय ॥ ७३ ॥ परी मात्रेचेनि मापें । दिव्यौषध जैसें घेपे । कां कथिलाचें कीजे रुपें । रसभावनीं ॥ ७४ ॥ नाना लवणाचें जळु । होआवया दोनी चार वेळु । देऊनि सांडिजती ढाळु । तोयाचे जेवीं ॥ ७५ ॥ तेवीं जालेनि सुखलेशें । जीवु भाविलिया अभ्यासें । जीवपणाचें नासें । दुःख जेथें ॥ ७६ ॥ तें येथ आत्मसुख । जालें असे त्रिगुणात्मक । तेंही सांगों एकैक । रूप आतां ॥ ७७ ॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् । तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥

आतां चंदनाचें बुड । सर्पीं जैसें दुवाड । कां निधानाचें तोंड । विवसिया जेवीं ॥ ७८ ॥ अगा स्वर्गींचें गोमटें । आडव यागसंकटें । कां बाळपण दासटें । त्रासकाळें ॥ ७९ ॥ हें असो दीपाचिये सिद्धी । अवघड धू आधीं । नातरी तो औषधीं । जिभेचा ठावो ॥ ७८० ॥ तयापरी पांडवा । जया सुखाचा रिगावा । विषम तेथ मेळावा । यमदमांचा ॥ ८१ ॥ देत सर्वस्नेहा मिठी । आंगीं ऐसें वैराग्य उठी । स्वर्गसंसारा कांटी । काढितची ॥ ८२ ॥ विवेकश्रवणें अतित्रासें । जेथ व्रताचरणें कर्कशें । करितां जाती भोकसे । बुद्ध्यादिकांचे ॥ ८३ ॥ सुषुम्नेचेनि तोंडें । गिळिजे प्राणापानाचे लोंढे । बोहणियेसीचि येवढे । भारी जेथ ॥ ८४ ॥ जें सारसांही विघडतां । होय वोहाहूनि वत्स काढितां । नव्हे भणंगु दवडितां । भाणयावरुनी ॥ ८५ ॥ पैं मायेपुढौनि बाळक । काळें नेता जें एक । होय का उदक । तुटतां मीना ॥ ८६ ॥ तैसें विषयांचें घर । इंद्रियां सांडितां थोर । युगांतु होय तें वीर । विराग साहाती ॥ ८७ ॥ ऐसा जया सुखाचा आरंभु । दावी काठिण्याचा क्षोभु । मग क्षीराब्धी लाभु । अमृताचा जैसा ॥ ८८ ॥ पहिलया वैराग्यगरळा । धैर्यशंभु वोडवी गळा । तरी ज्ञानामृतें सोहळा । पाहे जेथें ॥ ८९ ॥ पैं कोलिताही कोपे ऐसें । द्राक्षांचें हिरवेपण असे । तें परिपाकीं का जैसें । माधुर्य आते ॥ ७९० ॥ तें वैराग्यादिक तैसें । पिकलिया आत्मप्रकाशें । मग वैराग्येंसींही नाशे । अविद्याजात ॥ ९१ ॥ तेव्हां सागरीं गंगा जैसी । आत्मा

मीनल्या बुद्धि तैसी । अद्वयानंदाची आपैसी । खाणी उघडे ॥ ९२ ॥ ऐसें स्वानुभवविश्रामें । वैराग्यमूळ जें परिणमे । तें सात्त्विक येणें नामें । बोलिजे सुख ॥ ९३ ॥

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् । परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥

आणि विषयेंद्रियां । मेळु होतां धनंजया । जें सुख जाय थडिया । सांडुनि दोन्हीं ॥ ९४ ॥ अधिकारिया रिगतां गांवो । होय जैसा उत्साहो । कां रिणावरी विवाहो । विस्तारिला ॥ ९५ ॥ नाना रोगिया जिभेपासीं । केळें गोड साखरेसी । कां बचनागाची जैसी । महुरता पहिली ॥ ९६ ॥ पहिलें संवचोराचें मैत्र । हाटभेटीचें कलत्र । कां लाघवियाचे विचित्र । विनोद ते ॥ ९७ ॥ तैसें विषयेंद्रियदोखीं । जें सुख जिवातें पोखी । मग उपडिला खडकीं । हंसु जैसा ॥ ९८ ॥ तैसी जोडी आघवी आटे । जीविताचा ठावो फिटे । सुकृताचियाही सुटे । धनाची गांठी ॥ ९९ ॥ आणिक भोगिलें जें कांहीं । तें स्वप्न तैसें होय नाहीं । मग हानिचांचि घाई । लोळावें उरे ॥ ८०० ॥ ऐसें आपत्ती जें सुख । ऐहिकीं परिणमें देख । परत्रीं कीर विख । होऊनि परते ॥ १ ॥ जे इंद्रियजाता लळा । दिधलिया धर्माचा मळा । जाळूनि भोगिजे सोहळा । विषयांचा जेथ ॥ २ ॥ तेथ पातकें बांधिती थावो । तियें नरकीं देती ठावो । जेणें सुखें हा अपावो । परत्रीं ऐसा ॥ ३ ॥ पैं नामें विष महुरें । परि मारूनि अंतीं खरें । तैसें आदि जें गोडिरें । अंती कडू ॥ ४ ॥ पार्था तें सुख साचे । वळिलें आहे रजाचें । म्हणौनि न शिवें तयाचें । आंग कहीं ॥ ५ ॥

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः । निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥

आणि अपेयाचेनि पानें । अखाद्याचेनि भोजनें । स्वैरस्त्रीसंनिधानें । होय जें सुख ॥ ६ ॥ कां पुढीलांचेनि मारें । नातरी परस्वापहारें । जें सुख अवतरे । भाटांचां बोलीं ॥ ७ ॥ जें आलस्यावरी पोखिजे । निद्रेमाजीं जें देखिजे । जयाचां आद्यंतीं भुलिजे । आपुली वाट ॥ ८ ॥ तें गा सुख पार्था । तामस जाण सर्वथा । हें बहु न सांगोंचि जे कथा । असंभाव्य हे ॥ ९ ॥ ऐसें कर्मभेदें मुदलें । फळसुखही त्रिधा जालें । तें हें यथागमें केलें । गोचर तुज ॥ ८१० ॥ ते कर्ता कर्म कर्मफळ । ये त्रिपुटी येकी केवळ । वांचूनि कांहींचि नसे स्थूळ - । सूक्ष्मीं इये ॥ ११ ॥ आणि हें तंव त्रिपुटी । तिहीं गुणीं इहीं किरीटी । गुंफिली असे पटीं । तांतुवीं जैसी ॥ १२ ॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः । सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥

म्हणौनि प्रकृतीचां आलोकीं । न बंधिजे इहीं सत्त्वादिकीं । तैसी स्वर्गीं ना मृत्युलोकीं । आथी वस्तु ॥ १३ ॥ कैंचा लोंवेंवीण कांबळा । मातियेवीण मोदळा । कां जळेंवीण कल्लोळा । होणें आहे ॥ १४ ॥ तैसें न होनि गुणाचें । सृष्टीचिया रचना रचे । ऐसें नाहींच गा साचें । प्राणिजात ॥ १५ ॥ यालागीं हें सकळ । तिहीं गुणांचेंचि केवळ । घडलें आहे निखिळ । ऐसें जाण ॥ १६ ॥ गुणीं देवां त्रयी लाविली । गुणीं लोकीं तिकुटी पाडिली । चतुर्वर्णा घातलीं । सिनानीं उळिगें ॥ १७ ॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप । कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥

तेंचि चारी वर्ण । पुससी जरी कोण कोण । तरी जयां मुख्य ब्राह्मण । धुरेचे कां ॥ १८ ॥ येर क्षत्रिय वैश्य दोन्ही । तेही ब्राह्मणांचांचि मानिजे मानी । जे ते वैदिकविधानीं । योग्य म्हणौनि ॥ १९ ॥ चौथा शूद्रु जो धनंजया । वेदीं लागु कीर नाहीं तया । तऱ्ही वृत्ति वर्णत्रया- । अधीन तयाची ॥ ८२० ॥ तिये वृत्तीचिया जवळिका । वर्णा ब्राह्मणादिकां । शूद्रही कीं देखा । चौथा जाला ॥ २१ ॥ जैसा फुलाचेनि सांगातें । तांतु तुरंबिजे श्रीमंतें । तैसें द्विजसंगें शूद्रातें । स्वीकारी श्रुती ॥ २ ॥ ऐसेसी गा पार्था । चातुर्वण्यव्यवस्था । करूं आतां कर्मपथा । यांचिया रूपा ॥ २३ ॥ जिहीं गुणीं ते वर्ण चारी । जन्ममृत्यूंचिये कातरी । चुकोनियां ईश्वरीं । पैठे होती ॥ २४ ॥ जिये आत्मप्रकृतीचां इहीं । गुणीं सत्वादिकीं तिहीं । कर्में चौघा चहुं ठाईं । वांटिलीं वर्णा ॥ २५ ॥ जैसें बापें जोडिलें लेंका । वांटिलें सूर्यें मार्ग पांथिका । नाना व्यापार सेवकां । स्वामी जैसें ॥ २६ ॥ तैसी प्रकृतीचां गुणीं । जया कर्माची वेल्हावणी । केली आहे वर्णीं । चहूं इहीं ॥ २७ ॥ तेथ सत्त्वें आपलां आंगीं । समीननिमीन भागीं । दोघे केले नियोगी । ब्राह्मण क्षत्रिय ॥ २८ ॥ आणि रज परी सात्त्विक । तेथ ठेविले वैश्य लोक । रजचि तमभेसक । तेथ शूद्र ते गा ॥ २९ ॥ ऐसा येकाचि प्राणिवृंदा । भेद चतुर्वर्णधा । गुणींचि प्रबुद्धा । केला जाण ॥ ८३० ॥ मग आपलें ठेविलें जैसें । आइतेंचि दीपें दिसे । गुणभिन्न कर्म तैसें । शास्त्र दावी ॥ ३१ ॥ तेंचि आतां कोण कोण । वर्णविहिताचें लक्षण । हें सांगों ऐक श्रवण - । सौभाग्यनिधी ॥ ३२ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥

तरी सर्वेंद्रियांचिया वृत्ती । घेऊनि आपुलां हातीं । बुद्धि आत्मया मिळे कांतीं । प्रिया जैसी ॥ ३३ ॥ ऐसा बुद्धीचा उपरमु । तया नाम म्हणिपे शमु । तो गुण गा उपक्रमु । जया कर्माचा ॥ ३४ ॥ आणि बाह्येंद्रियांचें धेंडें । पिटूनि विधीचेनि दंडें । नेदिजे अधर्माकडे । कहींचि जावो ॥ ३५ ॥ तो पैं गा शमा विरजा । दम गुण तेथ दुजा । आणि स्वधर्माचिया वोजा । जिणें जें कां ॥ ३६ ॥ तेवींचि सटवीचिये राती । न विसंबिजे जेवी वाती । तैसा ईश्वरनिर्णयो चित्तीं । वाहणें सदा ॥ ३७ ॥ तया नाम तप । तें तिजया गुणाचें रूप । आणि शौचही निष्पाप । द्विविध जेथ ॥ ३८ ॥ मन भावशुद्धी भरलें । आंग क्रिया अळंकारिलें । ऐसें सबाह्य जियालें । साजिरें जें का ॥ ३९ ॥ तया नांव शौच पार्था । तो कर्मीं गुण जये चौथा । आणि पृथ्वीचिया परी सर्वथा । सर्व जें साहाणें ॥ ८४० ॥ ते गा क्षमा पांडवा । गुण जेथ पांचवा । स्वरांमाजी सुहावा । पंचमु जैसा ॥ ४१ ॥ आणि वांकडेनि वोघेंसी । गंगा वाहे उजूचि जैसी । कां पुटीं वळला ऊंसीं । गोडी जेवीं ॥ ४२ ॥ तैसा विषमांहि जीवां - । लागीं उजुकारु बरवा । तें आर्जव गा सहावा । जेथींचा गुण ॥ ४३ ॥ आणि पाणियें प्रयत्नें माळी । अखंड जचे झाडामुळीं । परी तें आघवेंचि फळीं । जाणे जेवीं ॥ ४४ ॥ तैसें शास्त्राचारें तेणें । ईश्वरुचि येक पावणें । हें फुडें जें कां जाणणें । तें येथ ज्ञान

॥ ४५ ॥ ते गा कर्मीं जिये । सातवा गुण होये । आणि विज्ञान हें पाहें । एवंरूप ॥ ४६ ॥ तरी सत्त्वशुद्धीचिये वेळे । शास्त्रें कां ध्यानबळें । ईश्वरतत्त्वींचि मिळे । निष्टंकबुद्धी ॥ ४७ ॥ हें विज्ञान बरवें । ते गुणरत्न जेथ आठवें । आणि आस्तिक्य जाणावें । नववा गुण ॥ ४८ ॥ पैं राजमुद्रा आथिलिया । प्रजा भजे भलतया । तेवीं शास्त्रें स्वीकारिलिया । मार्गमात्रातें ॥ ४९ ॥ आदरें जें कां मानणें । तें आस्तिक्य मी म्हणें । तो नववा गुण जेणें । कर्म ते साच ॥ ८५० ॥ एवं नवही शमादिक । गुण जेथ निर्दोष । तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥ ५१ ॥ तो नवगुणरत्नाकरु । यया नवरत्नांचा हारु । न फेडित ले दिनकरु । प्रकाशु जैसा ॥ ५२ ॥ नाना चांपा चांपौळी पूजिला । चंद्र चंद्रिका धवळला । कां चंदनु निजें चर्चिला । सौरभ्यें जेवीं ॥ ५३ ॥ तेवीं नवगुणटिकलग । लेणें ब्राह्मणाचें अव्यंग । कहींचि न संडी आंग । ब्राह्मणाचें ॥ ५४ ॥ आतां उचित तें क्षत्रिया । तेंही कर्म धनंजया । सांगों ऐके प्रज्ञेचिया । भरोवरी ॥ ५५ ॥

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् । दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥

तरी भानु हा तेजें । नापेक्षी जेवीं विरजें । कां सिंहें न पाहिजे । जावळिया ॥ ५६ ॥ ऐसा स्वयंभ जो जीवें लाठु । सावायेंवीण उद्भटु । तें शौर्य गा जेथ श्रेष्ठु । पहिला गुण ॥ ५७ ॥ आणि सूर्याचेनि प्रतापें । कोडीही नक्षत्र हारपे । ना तो तरी न लोपे । सचंद्रीं तिहीं ॥ ५८ ॥ तैसेनि आपुले प्रौढिगुणें । जगासि विस्मयो देणें । आपण तरी न क्षोभणें । कायसेनही ॥ ५९ ॥ तें प्रागल्भ्यरूप तेजा । जिये कर्मीं गुण दुजा । आणि धीरु तो तिजा । जेथींचा गुण ॥ ८६० ॥ वरि पडलिया आकाश । बुद्धीचे डोळे मानस । झांकी ना तें परियेस । धैर्य जेथें ॥ ६१ ॥ आणि पाणि हो भलतेतुकें । परी तें जिणौनि पद्म फांके । कां आकाश उंचिया जिंके । आवडे तयातें ॥ ६२ ॥ तेवीं विविधा अवस्था । पातलिया जिणौनि पार्था । प्रज्ञा फळतया अर्था । वेंझ देणें जें ॥ ६३ ॥ ते दक्षत्व गा चोख । जेथ चौथा गुण देख । आणि जुंझ अलौकिक । तो पांचवा गुण ॥ ६४ ॥ आदित्याचीं झाडें । सदा सन्मुख सूर्याकडे । तेवीं समोर शत्रूपुढें । होणें सदा ॥ ६५ ॥ माहेवणी प्रयत्नेंसीं । चुकविजे सेजे जैसी । रिपू पाठी नेदिजे तैसी । समरांगणीं ॥ ६६ ॥ क्षत्रियांचां आचारीं । पांचवा गुणेंद्रु अवधारीं । चहूं पुरुषार्थां शिरीं । भक्ति जैसी ॥ ६७ ॥ आणि जालेनि फुलें फळें । शाखिया जैसी मोकळे । का उदार परिमळें । पद्माकरु ॥ ६८ ॥ नाना आवडीचेनि मापें । चांदिणें भलतेणें घेपे । पुढिलांचेनि संकल्पें । तैसें जें देणें ॥ ६९ ॥ तें उमप गा दान । जेथ सहावें गुणरत्न । आणि आज्ञे एकायतन । होणें जें कां ॥ ८७० ॥ पोषूनि अवयव आपुले । करविजती मानविले । तेवीं पालणें लोभविलें । जग जें भोगणें ॥ ७१ ॥ तया नाम ईश्वरभावो । जो सर्वसामर्थ्याचा ठावो । तो गुणांमाजी रावो । सातवा जेथ ॥ ७२ ॥ ऐसें जें शौर्यादिकीं । इहीं सात गुणविशेखीं । अळंकृत सप्तऋषीं । आकाश जैसें ॥ ७३ ॥ तैसें सप्तगुणीं विचित्र । कर्म जें जगीं पवित्र । तें सहज जाण क्षात्र । क्षत्रियाचें ॥ ७४ ॥ नाना क्षत्रिय नव्हे नरु । तो

सत्त्वसोनयाचा मेरु । म्हणौनि गुणस्वर्गा आधारु । सातां इयां ॥ ७५ ॥ नातरी सप्तगुणार्णवी । परिवारली बरवी । हे क्रिया नव्हे पृथ्वी । भोगीतसे तो ॥ ७६ ॥ कां गुणांचे सातांही ओघीं । हे क्रिया ते गंगा जगीं । तया महोदधीचां अंगीं । विलसे जैसी ॥ ७७ ॥ परी हें बहु असो देख । शौर्यादि गुणात्मक । कर्म गा नैसर्गिक । क्षत्रजातीसी ॥ ७८ ॥ आतां वैश्याचिये जाती । उचित जे महामती । तें ऐकें गा निरुती । क्रिया सांगों ॥ ७९ ॥

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् । परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥

तरी भूमि बीज नांगरु । यया भांडवलाचा आधारु । घेऊनि लाभु अपारु । मेळवणें जें ॥ ८८० ॥ किंबहुना कृषी जिणें । गोधनें राखोनि वर्तणें । का समर्घींची विकणे । महाघी वस्तु ॥ ८१ ॥ येतुलाचि पांडवा । वैश्यातें कर्माचा मेळावा । हा वैश्यजातिस्वभावा - । आंतुला जाण ॥ ८२ ॥ आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । हे द्विजन्मे तिन्ही वर्ण । ययांचें जें शुश्रूषण । तें शुद्रकर्म ॥ ८३ ॥ पैं द्विजसेवेपरौतें । धांवणें नाहीं शूद्रातें । एवं चतुर्वर्णोचितें । दाविलीं कर्में ॥ ८४ ॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥ ४५ ॥

आतां इयेचि विचक्षणा । वेगळालिया वर्णा । उचित जैसें करणां । शब्दादिक ॥ ८५ ॥ नातरी जळदच्युता । पाणिया उचित सरिता । सरितेसीं पांडुसुता । सिंधु उचितु ॥ ८६ ॥ तैसें वर्णाश्रमवशें । जें करणीय आलें असे । गोरेया आंगा जैसें । गोरेपण ॥ ८७ ॥ तया स्वभावविहिता कर्मा । शास्त्राचेनि मुखें विरोत्तमा । प्रवर्तावयालागीं प्रमा । अढळ कीजे ॥ ८८ ॥ पैं आपुलेंचि रत्न थितें । घेपे पारखियाचेनि हातें । तैसें स्वकर्म आपैतें । शास्त्रें करावें ॥ ८९ ॥ जैसी दिठी असे आपुलां ठायीं । परी दीपेंवीण भोग नाहीं । मार्गु न लाहतां काई । पाय असतां होय ॥८९०॥ म्हणौनि ज्ञातिवशें साचारु । सहज असे जो अधिकारु । तो आपुलालिया शास्त्रें गोचरु । आपण कीजे ॥ ९१ ॥ मग घरींचाचि ठेवा । जेवी डोळयां दावी दिवा । तरी घेतां काय पांडवा । आडळु असे ॥ ९२ ॥ तैसें स्वभावें भागा आलें । वरी शास्त्रें खरें केलें । तें विहित जो आपुलें । आचरे गा ॥ ९३ ॥ परी आळसु सांडुनी । फळकाम दवडुनी । आंगें जीवें मांडुनी । तेथेंचि भरु ॥ ९४ ॥ वोघीं पडिलें पाणी । नेणे आनानी वाहाणी । तैसा जाय आचरणीं । व्यवस्थोनी ॥ ९५ ॥ अर्जुना जो यापरी । तें विहित कर्म स्वयें करी । तो मोक्षाचां ऐलद्वारीं । पैठा होय ॥ ९६ ॥ जे अकरणा आणि निषिद्धा । न वचेचि कांहीं संबंधा । म्हणौनि भवा विरुद्धा । मुकला तो ॥ ९७ ॥ आणि काम्यकर्माकडे । न परतेचि जेथ कोडें । तेथ चंदनाचेही खोडे । न लेचि तो ॥ ९८ ॥ येर नित्य कर्म तंव । फलत्यागें वेंचिलें सर्व । म्हणौनि मोक्षाची शिंव । ठाकूं लाहे ॥९९॥ ऐसेनि शुभाशुभीं संसारीं । सांडिला तो अवधारीं । वैराग्यमोक्षद्वारीं । उभा ठाके ॥ ९०० ॥ जें सकळ भाग्याची सीमा । मोक्षलाभाची जें प्रमा । नाना कर्ममार्गश्रमा । शेवटु जेथ ॥ १ ॥ मोक्षफळें दिधली वोल । जें सुकृततरूचें फूल । तये वैराग्यीं

ठेवी पाऊल । भंवरु जैसा ॥ २ ॥ पाही आत्मज्ञानसुदिनाचा । वाधावा सांगतया अरुणाचा । उदयो त्या वैराग्याचा । ठावो पावे ॥ ३ ॥ किंबहुना आत्मज्ञान । जेणें हाता ये निधान । तें वैराग्य दिव्यांजन । जीवें ले तो ॥ ४ ॥ ऐसी मोक्षाची योग्यता । सिद्धी जाय तया पांडुसुता । अनुसरोनि विहिता । कर्मा यया ॥ ५ ॥ हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा । आणि हेचि परम सेवा । मज सर्वात्मकाची ॥ ६ ॥ पैं आघवांचि भोगेंसी । पतिव्रता क्रीडे प्रियेंसीं । कीं तयाचीं नामें जैसीं । तपें तिया केलीं ॥ ७ ॥ कां बाळका एकी माये - । वांचोनि जिणें काय आहे । म्हणौनि सेविजे कीं तो होये । पाटाचा धर्मु ॥ ८ ॥ नाना पाणी म्हणौनि मासा । गंगा न सांडिता जैसा । सर्वतीर्थसहवासा । परपडा जाला ॥ ९ ॥ तैसें आपुलिया विहिता । उपावो असे न विसंबितां । ऐसा कीजे कीं जगन्नाथा । आभारु पडे ॥ ९१० ॥ अगा जया जें विहित । तें ईश्वराचें मनोगत । म्हणौनि केलिया निभ्रांत । सांपडेचि तो ॥ ११ ॥ पैं जीवाचां कसीं उतरली । ते दासी कीं गोसांवीण जाली । सिसे वेंची तया मविली । वही जेवीं ॥ १२ ॥ तैसें स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे हेचि परमसेवा । येर तें गा पांडवा । वणिजा करणें ॥ १३ ॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् । स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥ ४६ ॥

म्हणोनि विहित क्रिया केली । नव्हे तयाची खूण पाळिली । जयापासूनि कां आलीं । आकारा भूतें ॥ १४ ॥ जो अविद्येचिया चिंधिया । गुंडूनि जीव बाहुलिया । खेळवीतसे तिगुणिया । अहंकाररज्जू ॥ १५ ॥ जेणें जग हें समस्त । आंत बाहेरी पूर्ण भरित । जालें आहे दीपजात । तेजें जैसें ॥ १६ ॥ तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥ १७ ॥ म्हणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें । वैराग्यसिद्धि देईजे । पसाय तया ॥ १८ ॥ जिये वैराग्यदशे । ईश्वराचेनि वेधवशें । हें सर्वही नावडे जैसें । वांत होय ॥ १९ ॥ प्राणनाथाचिया आधी । विरहिणीतें जिणेंही बाधी । तैसें सुखजात बाधीं । दुःखाचां लागे ॥ ९२० ॥ सम्यग्ज्ञान नुदैजतां । वेधेंचि तन्मयता । उपजे ऐसी योग्यता । बोधाची लाहे ॥ २१ ॥ म्हणौनि मोक्षलाभालागीं । जो व्रतें वाहतसे आंगीं । तेणें स्वधर्मु आस्था चांगी । अनुष्ठावा ॥ २२ ॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् । स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४७ ॥

अगा आपुला हा स्वधर्मु । आचरणीं जरी विषमु । तरी पाहावा तो परिणामु । फळेल जेणें ॥ २३ ॥ जैं सुखालागीं आपणपयां । निंबचि आथी धनंजया । तैं कडुवटपणा तयाचिया । उबगिजेना ॥ २४ ॥ फळणया ऐलीकडे । केळीतें पाहतां आस मोडे । ऐसी त्याजिली तरी जोडे । तैसें कें गोमटें ॥ २५ ॥ तेवीं स्वधर्मु सांकडु । देखोनि केला जरी कडु । तरी मोक्षसुरवाडु । अंतरला कीं ॥ २६ ॥ आणि आपुली माये । कुब्ज जरी आहे । तरी जीजे तें नोहे । स्नेह कुन्हें कीं ॥ २७ ॥ येरी जिया पराविया । रंभेहूनि बरविया । तिया काय कराविया । बाळकें तेणें

॥ २८ ॥ अगा पाणियाहूनि बहुवें । तुपीं गुण कीर आहे । परी मीना काय होये । असणें तेथें ॥ २९ ॥ पैं आघविया जगा जें विख । तें विख कीडिया पीयूख । आणि जगा गुळ तें देख । मरण तया ॥ ९३० ॥ म्हणौनि जें विहित जया जेणें । फिटे संसाराचें धरणें । क्रिया कठोर तऱ्ही तेणें । तेचि करावी ॥ ३१ ॥ येरा पराचारा बरविया । ऐसें होईल टेंकलेया । पायांचें चालणें डोइया । केलें जैसें ॥ ३२ ॥ यालागीं कर्म आपुलें । जें जातिस्वभावें असे आलें । तें करी तेणें जिंतिलें । कर्मबंधातें ॥ ३३ ॥ आणि स्वधर्मुचि पाळावा । परधर्मु तो गाळावा । हा नेमुही पांडवा । न कीजेचि पै गा मा ॥ ३४ ॥ तरी आत्मा दृष्ट नोहे । तंव कर्म करणें कां ठाये । आणि करणें तेथ आहे । आयासु आधीं ॥ ३५ ॥

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् । सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता: ॥ ४८ ॥

म्हणौनि भलतिये कर्मीं । आयासु जऱ्ही उपक्रमीं । तरी काइ स्वधर्मीं । दोषु सांगें ॥ ३६ ॥ अगा उजू वाटा चालावें । तऱ्ही पायचि शिणवावे । ना आडरानें धावावें । तऱ्ही तेंचि ॥ ३७ ॥ पैं शिळा कां सिदोरिया । दाटणें एक धनंजया । परी जें वाहतां विसांवया । मिळिजे तें धेपे ॥ ३८ ॥ एऱ्हवीं कणा आणि भुसा । कांडितांही सोसु सरिसा । जेंचि रंधन श्वानमांसा । तेंचि हवी ॥ ३९ ॥ दधी जळाचिया घुसळणा । व्यापार सारिखेचि विचक्षणा । वाळुवे तिळा घाणा । गाळणें एक ॥ ९४० ॥ पैं नित्य होम देयावया । कां सैरा आगी सुवावया । फुंकिता धूम धनंजया । साहणें तेंचि ॥ ४१ ॥ परी धर्मपत्नी धांगडी । पोसितां जरी एकी वोढी । तरी कां अपरवडी । आणावी आंगा ॥ ४२ ॥ हां गा पाठीं लागला घायीं । मरण न चुकेचि पाहीं । तरी समोरला काई । आगळें न कीजे ॥ ४३ ॥ अकुळस्त्री दांड्याचे घाये । परघर रिगालीही जरी साहे । तरी स्वपतीतें वायें । सांडिलें कीं ॥ ४४ ॥ तैसें आवडतेंही करणें । न निपजे शिणल्याविणें । तरी विहित बा रे कोणें । बोलें भारी ॥ ४५ ॥ वरी थोडेंचि अमृत घेतां । सर्वस्व वेंचो कां पंडुसुता । जेणें जोडे जीविता । अक्षय्यत्व ॥ ४६ ॥ येर काह्यां मोलें वेचूनि । विष पियावें घेऊनि । आत्महत्येसि निमोनि । जायिजे जेणें ॥ ४७ ॥ तैसें जाचूनियां इंद्रियें । वेचूनि आयुष्याचेनि दियें । साचलां पापीं आन आहे । दु:खावांचूनि ॥ ४८ ॥ म्हणोनि करावा स्वधर्मु । जो करितां हिरोनि घे श्रमु । उचित देईल परमु । पुरुषार्थराजु ॥ ४९ ॥ याकारणें किरीटी । स्वधर्माचिये रहाटी । न विसंबिजे संकटीं । सिद्धमंत्र जैसा ॥ ९५० ॥ का नाव जैसी उदधीं । महारोगीं दिव्यौषधी । न विसंबिजे तया बुद्धी । स्वकर्म येथ ॥ ५१ ॥ मग ययाचि गा कपिध्वजा । स्वकर्माचिया महापूजा । तोषला ईशु तमरजा । झाडा करूनि ॥ ५२ ॥ शुद्धसत्त्वाचिया वाटा । आणी आपुली उत्कंठा । भव स्वर्गु काळकुटा । ऐसें दावी ॥ ५३ ॥ जिये वैराग्य येणें बोलें । मागां संसिद्धी रूप केलें । किंबहुना तें आपुलें । मेळवी खागें ॥ ५४ ॥ मग जिंतिलिया हे भोये । पुरुष सर्वत्र जैसा होये । कां जालाही जें लाहे । तें आतां सांगों ॥ ५५ ॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः । नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥

तरी देहादिक हे संसारें। सर्वही मांडलेंसे जें गुंफिरें। तेथ नातुडे तो वागुरें। वारा जैसा॥ ५६ ॥ पैं परिपाकाचिये वेळे। फळ देठें ना देठु फळें। न धरे तैसें स्नेह खुळें। सर्वत्र होय॥ ५७॥ पुत्र वित्त कलत्र। हे जालियाही स्वतंत्र। माझें न म्हणे पात्र। विषाचें जैसें॥ ५८॥ हें असो विषयजातीं। बुद्धी पोळली ऐसीं माघौती। पाउलें घेऊनि एकांतीं। हृदयाचां रिगे॥ ५९॥ ऐसया अंतःकरण। बाह्य येतां तयाची आण। न मोडी समर्था भेण। दासी जैसी॥ ९६०॥ तैसें ऐक्याचिये मुठी-। माजिवडें चित्त किरीटी। करूनि वेधीं नेहटी। आत्मयाचां॥ ६१॥ तेव्हा दृष्टादृष्ट स्पृहे। निमणें जालेंचि आहे। आगी दडपलिया धुयें। राहिजे जैसें॥ ६२॥ म्हणौनि नियमिलिया मानसीं। स्पृहा नासोनि जाय आपैसी। किंबहुना तो ऐसी। भूमिका पावे॥ ६३॥ पैं अन्यथा बोधु आघवा। मावळोनि तया पांडवा। बोधमात्रींचि जीवा। ठावो होय॥ ६४॥ धरवणी वेंचें सरे। तैसें भोगें प्राचीन पुरे। नवें तंव नुपकरे। कांहींचि करूं॥ ६५॥ ऐसी कर्मसाम्यदशा। होय तेथ वीरेशा। मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा॥ ६६॥ रात्रीची चौपाहरी। वेंचलिया अवधारीं। डोळ्यां तमारी। मिळे जैसा॥ ६७॥ का येऊनि फळाचा घडु। पारुषवी केळीची वाढु। गुरु भेटोनि करी पाडु। मुमुक्षा तैसा॥ ६८॥ मग आलिंगिला पूर्णिमा। उणीव सांडी चंद्रमा। तैसें होय वीरोत्तमा। गुरुकृपा तया॥ ६९॥ तेंव्हा अबोधुमात्र असे। तो तंव तया कृपा नासे। तेथ रात्रीसवें जैसें। आंधारें जाय॥ ९७०॥ तैसी अबोधाचिये कुशी। कर्म कर्ता कार्य ऐशी। त्रिपुटी असे ते जैसी। गाभिणी मारिली॥ ७१॥ तैसें अबोधनाशासवें। नाशे क्रियाजात आघवें। ऐसा समूळ संभवे। संन्यासु हा॥ ७२॥ येणें समूळज्ञानसंन्यासें। दृश्याचा ठावो जेथ पुसे। तेथ बुझावें तें आपैसें। तोचि आहे॥ ७३॥ चेइलियावरी पाहीं। स्वप्नींचिया तिये डोहीं। आपणयातें काई। काढूं जाइजे॥ ७४॥ तैं मी नेणें आतां जाणेन। हें सरलें तया दुःस्वप्न। जाला ज्ञातृज्ञेयाविहीन। चिदाकाश॥ ७५॥ मुखाभासेंसीं आरिसा। परौता नेलिया वीरेशा। पाहातेपणेंवीण जैसा। पाहाता ठाके॥ ७६॥ तैसें नेणणें जें गेलें। तेणें जाणणेंही नेलें। मग निष्क्रिय उरलें। चिन्मात्रचि॥ ७७॥ तेथ स्वभावें धनंजया। नाहीं कोणीचि क्रिया। म्हणौनि प्रवादु तया। नैष्कर्म्यु ऐसा॥ ७८॥ तें आपुलें आपणपें। असे तेंचि होऊनि हारपे। तरंगु कां वायुलोपें। समुद्रु जैसा॥ ७९॥ तैसें न होणें निपजे। ते नैष्कर्म्युसिद्धि जाणिजे। सर्व सिद्धींत सहजे। परम हेचि॥ ९८०॥ देऊळाचिया कामा कळसु। परम गंगेसी सिंधुप्रवेशु। कां सुवर्णशुद्धी कसु। सोळावा जैसा॥ ८१॥ तैसें आपुलें नेणणें। फेडिजे का जाणणें। तेंही गिळुनि असणें। ऐसी जे दशा॥ ८२॥ तियेपरतें कांहीं। निपजणें येथ नाहीं। म्हणौनि म्हणिपे पाहीं। परमसिद्धि ते॥ ८३॥ परी हेंचि आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधि। श्रीगुरुकृपालब्धि -। काळीं पावे॥ ८४॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे । समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥

उदयजतांचि दिनकरु । प्रकाशुचि आते आंधारु । कां दीपसंगें कापुरु । दीपुचि होय ॥ ८५ ॥ तया लवणाची कणिका । मिळतखेंवो उदका । उदकचि होऊनि देखा । ठाके जेवीं ॥ ८६ ॥ कां निद्रित चेवलिया । स्वप्नेंसि नीद वायां । जाऊनि आपणपयां । मिळे जैसा ॥ ८७ ॥ तैसें कोण्हासि दैवें । गुरुवाक्यश्रवणाचि सवें । द्वैत गिळोनि विसंवे । आपणया वृत्ती ॥ ८८ ॥ कानावचनाचिये भेटी – । सरिसाचि पैं किरीटी । वस्तु होऊनि उठी । कवणि एकु जो ॥ ८९ ॥ तयासी मग करणें । हें बोलिजैलचि कवणें । आकाशा येणें जाणें । आहे काई ॥ ९० ॥ म्हणौनि तयासी कांहीं । त्रिशुद्धि करणें नाहीं । परी ऐसें जरी हें कांहीं । नव्हे जया ॥ ९१ ॥ एऱ्हवीं स्वकर्माचेनि वन्ही । काम्यनिषिद्धाचां इंधनीं । रजतमें कीर दोन्ही । जाळिलीं आधीं ॥ ९२ ॥ पुत्र वित्त परलोकु । यया तिहींचा अभिलाखु । घरीं होय पाइकु । हेंही जालें ॥ ९३ ॥ इंद्रियें सैरा पदार्थीं । रिगतां विटाळलीं होतीं । तियें प्रत्याहारतीर्थीं । न्हाणिलीं कीर ॥ ९४ ॥ आणि स्वधर्माचें फळ । ईश्वरीं अर्पूनि बळ । घेऊनि केलें अढळ । वैराग्यपद ॥ ९५ ॥ ऐसी आत्मसाक्षात्कारीं । लाभे ज्ञानाची उजरी । ते सामुग्री कीर पुरी । मेळविली ॥ ९६ ॥ आणि तेचि समयीं । सद्गुरु भेटले पाहीं । तेवींचि तिहीं कांहीं । वंचिजेना ॥ ९७ ॥ परी वोखद घेतखेंवो । काय लाभे आपुला ठावो । का उदयजतांचि दिवो । मध्यान्ह होय ॥ ९८ ॥ सुक्षेत्रीं आणि वोलटे । बीजही पेरिलें गोमटें । तरी आलोट फळ भेटे । परी वेळे कीं गा ॥ ९९ ॥ जोडला मार्गु प्रांजळु । मिनला सुसंगाचाही मेळु । तरी पाविजे वांचूनि वेळु । लागेचि कीं ॥ १००० ॥ तैसा वैराग्यलाभु जाला । वरी सद्गुरुही भेटला । जीवीं अंकुरु फुटला । विवेकाचा ॥ १ ॥ तेणे ब्रह्म एक आथी । येर आघवीचि भ्रांती । हेही कीर प्रतीती । गाढी केली ॥ २ ॥ परी तेंचि जें परब्रह्म । सर्वात्मक सर्वात्तम । मोक्षाचेंही काम । सरे जेथ ॥ ३ ॥ यया तिन्ही अवस्था पोटीं । जिरवी जें गा किरीटी । यया ज्ञानासिही मिठी । दे जे वस्तु ॥ ४ ॥ ऐक्याचें एकपण सरे । जेथ आनंदकणुही विरे । कांहींचि नुरोनि उरे । जें कांहीं गा ॥ ५ ॥ तिये ब्रह्मीं ऐक्यपणें । ब्रह्मचि होऊनि असणें । तें क्रमेंचि करून तेणें । पाविजे पैं ॥ ६ ॥ भुकेलियापासीं । वोगरिलें षड्रसीं । तो तृप्ति प्रतिग्रासीं । लाहे जेवीं ॥ ७ ॥ तैसा वैराग्याचा वोलावा । विचाराचा तो दिवा । आंबुथितां आत्मठेवा । काढीची तो ॥ ८ ॥ तरी भोगिजे आत्मऋद्धी । येवढी योग्यतेचि सिद्धी । जयाचां आंगीं निरवधी । लेणें जाली ॥ ९ ॥ तो जेणें क्रमें ब्रह्म । होणें करी गा सुगम । तया क्रमाचें आतां वर्म । आईक सांगों ॥ १०१० ॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च । शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥

तरी गुरू दाविलिया वाटा । येऊनि विवेकतीर्थतटा । धुऊनियां मळकटा । बुद्धीचा तेणें ॥ ११ ॥ मग राहूनें उगळिली । प्रभा चंद्रें आलिंगिली । तैसी शुद्धत्त्वे जडली । आपणयां बुद्धि ॥ १२ ॥ सांडूनि कुळें दोन्ही । प्रियासी अनुसरे कामिनी । द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं । पडली तैसी ॥ १३ ॥ आणि ज्ञाना ऐसें जिव्हार । नेवों नेवों निरंतर । इंद्रियीं केलें थोर । शब्दादिक जे ॥ १४ ॥

ते रश्मिजाळ काढलेया । मृगजळ जाय लया । तैसेनि वृत्तिरोधें तयां । पांचांही केलें ॥ १५ ॥ नेणतां अधमाचिया अन्ना । खादलिया कीजे वमना । तैसीं वोकविलीं सवासना । इंद्रियें विषयीं ॥ १६ ॥ मग प्रत्यगावृत्ती चोखटें । लाविलीं गंगेचेनि तटें । ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें । केलीं येणें ॥ १७ ॥ पाठीं सात्त्विकें धीरें तेणें । शोधारलीं तियें करणें । मग मनेंसीं योगधारणे । मेळविलीं ॥ १८ ॥ तेवींचि प्राचीनें इष्टानिष्टें । भोगेंसीं येऊनि भेटे । तेथ देखिलियाहि वोखटें । द्वेषु न करी ॥ १९ ॥ ना गोमटेंचि विपायें । तें आणूनि पुढां सूये । तयालागीं न होये । साभिलाषु ॥ १०२० ॥ यापरी इष्टानिष्टीं । रागद्वेष किरीटी । त्यजूनि गिरिकपाटीं । निकुंजीं वसे ॥ २१ ॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः । ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥५२॥

गजबजा सांडिलिया । वसवी वनस्थळिया । अंगाचियाचि मांदिया । एकलेया ॥ २२ ॥ शमदमादिकीं खेळे । न बोलणेंचि चावळे । गुरुवाक्याचेनि मेळें । नेणे वेळु ॥ २३ ॥ आणि आंगा बळ यावें । नातरी क्षुधा जावें । कां जीभेचे पुरवावे । मनोरथ ॥ २४ ॥ भोजन करितांविखीं । यया तिहींतें न लेखी । आहारीं मिती संतोषीं । माप न सूये ॥ २५ ॥ आसनाचेनि पावकें । हारपतां प्राणु पोखे । याचि भागु मोटकें । अशन करी ॥ २६ ॥ आणि परपुरुषें कामिली । कुळवधू आंग न घाली । निद्रालस्या न मोकली । अशन तैसें ॥ २७ ॥ दंडवताचेनि प्रसंगें । भुयीं हन अंग लागे । वांचूनि येर नेघे । राभस्य तेथ ॥ २८ ॥ देहनिर्वाहापुरतें । राहाटवी हातापायांतें । किंबहुना आपैतें । सबाह्य केलें ॥ २९ ॥ आणि मनाचा उंबरा । वृत्तीसी देखों नेदी वीरा । तेथ कें वाग्व्यापारा । अवकाशु असे ॥ १०३० ॥ ऐसेनि देह वाचा मानस । हे जिणौनि बाह्यप्रदेश । आकळिलें आकाश । ध्यानाचें तेणें ॥ ३१ ॥ गुरुवाक्यें उठविला । बोधीं निश्चयो आपुला । न्याहाळी हातीं घेतला । आरिसा जैसा ॥ ३२ ॥ पैं ध्याता आपणचि परी । ध्यानरूप वृत्तिमाझारीं । ध्येयत्वें घे हे अवधारीं । ध्यानरूढी गा ॥ ३३ ॥ तेथ ध्यान ध्येय ध्याता । ययां तिहीं एकरूपता । होय तंव पंडुसुता । कीजे तें गा ॥ ३४ ॥ म्हणौनि तो मुमुक्षु । आत्मज्ञानीं जाला दक्षु । परी पुढां सूनि पक्षु । योगाभ्यासाचा ॥ ३५ ॥ अपानरंध्रद्वया - । माझारीं धनंजया । पाष्णीं पिडूनियां । कांवरुमूळ ॥ ३६ ॥ आकुंचूनि अध । देऊनि तिन्हीं बंध । करूनि एकवद । वायुभेदा ॥ ३७ ॥ कुंडलिनी जागवूनि । मध्यमा विकाशूनि । आधारादि भेदूनि । आज्ञावरी ॥ ३८ ॥ सहस्त्रदळाचा मेघु । पीयूषें वर्षोनि चांगु । तो मूळवरी वोघु । आणूनियां ॥ ३९ ॥ नाचतया पुण्यगिरी । चिद्भैरवाचां खापरीं । मनपवनाची खीचपुरी । वाढूनियां ॥ १०४० ॥ जालिया योगाचा गाढा । मेळावा सूनि हा पुढां । ध्यान मागिलीकडां । स्वयंभ केलें ॥ ४१ ॥ आणि ध्यान योग दोन्ही । इये आत्मतत्त्वज्ञानीं । पैठी होआवया निर्विघ्नीं । आधींचि तेणें ॥ ४२ ॥ वीतरागतेसारिखा । जोडूनि ठेविला सखा । तो आघवियाचि भूमिका - । सवें चाले ॥ ४३ ॥ पहावें तें दिसे तंववरी । दिठीतें न संडी दीप जरी । तरी कें आहे अवसरी । देखावया ॥ ४४ ॥ तैसें

मोक्षी प्रवर्तलया। वृत्तीं ब्रह्मी जया लया। तंव वैराग्य आथी तया। भंगु कैचा॥ ४५॥ म्हणौनि सवैराग्यु। ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु। करूनि जाला योग्यु। आत्मलाभा॥ ४६॥ ऐसी वैराग्याची अंगीं। बाणूनिया वज्रांगी। राजयोगतुरंगीं। आरूढला॥ ४७॥ वरी आड पडिलें दिठी। सानें थोर निवटी। ते बळी विवेकमुष्टीं। ध्यानाचें खांडें॥ ४८॥ ऐसेनि संसाररणाआंतु। आंधारीं सूर्य तैसा असे जातु। मोक्षविजयश्रिये वरैतु। होआवयालागीं॥ ४९॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्। विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते॥५३॥

तेथ आडवावया आले। दोषवैरी जे धोपटिले। तयांमाजीं पहिलें। देहाहंकारु॥ १०५०॥ जो न मोकली मारुनी। जीवों नेदी उपजवोनी। विचंबवी खोडां घालुनि। हाडांचिया॥ ५१॥ तयाचा देहदुर्ग हा थारा। मोडूनि घेतला तो वीरा। आणि बळ हा दुसरा। मारिला वैरी॥ ५२॥ जो विषयाचेनि नांवें। चौगुणेही वरी थांवे। जेणें मृतावस्था धांवे। सर्वत्र जगा॥ ५३॥ तो विषयविषाचा अथावो। आघविया दोषांचा रावो। परी ध्यानखड्गाचा घावो। साहेल कैंचा॥ ५४॥ आणि प्रियविषयप्राप्ती। करी जया सुखाची व्यक्ति। तेचि घालूनि बुंथी। आंगी जो वाजे॥ ५५॥ जो सन्मार्गु भुलवी। मग अधर्माचां आडवी। सूनि वाघां सांपडवी। नरकादिकां॥ ५६॥ तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु। आणि जयाचा अहा कंपु। तापसांसी॥ ५७॥ क्रोधा ऐसा महादोखु। जयाचा देखा परिपाकु। भरिजे तंव अधिकु। रितां होय जो॥ ५८॥ तो कामु कोणेच ठायीं। नसे ऐसें केलें पाहीं। कीं तेंचि क्रोधाही। सहजें जालें॥ ५९॥ मुळाचें तोडणें जैसें। होय कां शाखोद्देशें। कामु नाशलेनि नाशे। तैसा क्रोधु॥ १०६०॥ म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी। तेथ सरली वारी। क्रोधाचीही॥ ६१॥ आणि समर्थु आपुला खोडा। शिसें वाहवी जैसा होडा। तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो॥ ६२॥ जो माथांचि पालाणवी। अंगा अवगुण घालवी। जीवें दांडी घेववी। ममत्वाची॥ ६३॥ शिष्यशास्त्रादिविलासें। मठादिमुद्रेचेनि मिसें। घातले आहाती फांसे। निसंगा जेणें॥ ६४॥ घरीं कुटुंबपणें सरे। तरी वनीं वन्य होऊनि अवतरे। नागवीयाही शरीरें। लागला आहे॥ ६५॥ ऐसा दुर्जयो जो परिग्रहो। तयाचा फेडूनि ठावो। भवविजयाचा उत्साहो। भोगीतसे जो॥ ६६॥ तेथ अमानित्वादि आघवे। ज्ञानगुणांचे जे मेळावे। ते कैवल्यदेशींचे आघवे। रावो जैसे आले॥ ६७॥ तेव्हा सम्यग्ज्ञानाचिया। राणिवा उगाणूनि तया। परिवारु होऊनिया। राहत अंगें॥ ६८॥ प्रवृत्तीचिये राजबिंदीं। अवस्थाभेदप्रमदीं। कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लोण॥ ६९॥ पुढां बोधाचिये कांबीवरी। विवेकु दृश्याची मांदी सारी। योगभूमिका आरती करी। येती जैसिया॥ १०७०॥ तेथ ऋद्धिसिद्धींचीं अनेगें। वृंदें मिळती प्रसंगें। तये पुष्पवर्षीं आंगें। नाहातसे तो॥ ७१॥ ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें। स्वराज्य येतां जवळिकें। झळंबित आहे हरिखें। तिन्ही लोक॥ ७२॥ तेव्हां वैरिया कां मैत्रिया। तयासि माझें म्हणावया। समानता धनंजया।

उरेचिही ना ॥ ७३ ॥ हें ना भलतेणें व्याजें । तो जयातें म्हणे माझें । ते नोडवेचि कां दुजें । अद्वितीय जाला ॥ ७४ ॥ पैं आपुलिया एकी सत्ता । सर्वही कवळूनिया पंडुसुता । कही न लगती ममता । धाडिली तेणें ॥ ७५ ॥ ऐसा जिंतिलिया रिपुवर्ग । आपु मानलयां हें जग । अपैसा योगतुरंग । स्थिर जाला ॥ ७६ ॥ वैराग्याचें गाढलें । अंगीं त्राण होतें भलें । तेंही नावेक ढिलें । तेव्हां करी ॥ ७७ ॥ आणि निवटी ध्यानाचें खांडें । तें दुजें नाहींचि पुढें । म्हणूनि हातु आसुडे । वृत्तीचाही ॥ ७८ ॥ जैसें रसौषध खरें । आपुलें काज करूनि पुरें । आपणही नुरे । तैसें होतसे ॥ ७९ ॥ देखोनि ठाकिता ठावो । धांवता थिरावे पावो । तैसा ब्रह्मसामीप्यें थावो । अभ्यासु सांडी ॥ १०८० ॥ घडतां महोदधीसी । गंगा वेगें सांडिजे जैसी । कां कामिनी कांतापासी । स्थिर होय ॥ ८१ ॥ नाना फळतिये वेळे । केळीची वाढी मांटुळे । कां गांवापुढें वळे । मार्गु जैसा ॥ ८२ ॥ तैसा आत्मसाक्षात्कारु । होईल देखोनि गोचरु । ऐसा साधनहतियेरु । हळूचि ठेवी ॥ ८३ ॥ म्हणौनि ब्रह्मेंसीं तया । ऐक्याचा समो धनंजया । होतसे तैं उपाया । वोहटु पडे ॥ ८४ ॥ मग वैराग्याची गोंधळुक । जे ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य । योगफळाचाही परिपाक । दशा जे कां ॥ ८५ ॥ ते शांति पै गा सुभगा । संपूर्ण ये तयाचिया आंगा । तैं ब्रह्म होआवयाजोगा । होय तो पुरुष ॥ ८६ ॥ पुनवेहुनी चतुर्दशी । जेतुलें उणेपण शशी । कां सोळेयाऊनि जैसी । पंधरावी वानी ॥ ८७ ॥ सागरींही पाणी वेगें । संचरे तें रूप गंगे । येर निश्चळ जें उगें । तें समुद्रु जैसा ॥ ८८ ॥ ब्रह्मा आणि ब्रह्महोतिये । योग्यतें तैसा पाडु आहे । तेचि शांतीचेनि लवलाहें । होय तो गा ॥ ८९ ॥ पैं तेंचि होणेनवीण । प्रतीती आलें जें ब्रह्मपण । ते ब्रह्म होती जाण । योग्यता येथ ॥ १०९० ॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति । समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ ५४ ॥

ते ब्रह्मभावयोग्यता । पुरुषु तो मग पंडुसुता । आत्मबोधप्रसन्नता - । पदीं बैसे ॥ ९१ ॥ जेणें निपजे रससोय । तो तापुही जैं जाय । तैं ते कां होय । प्रसन्न जैसी ॥ ९२ ॥ नाना भरतिया लगबगा । शरत्काळीं सांडिजे गंगा । कां गीत राहतां उपांगा । वोहटु पडे ॥ ९३ ॥ तैसा आत्मबोधीं उद्यमु । करितां होय जो श्रमु । तोही जेथें समु । होऊनि जाय ॥ ९४ ॥ आत्मबोधप्रशस्ती । हे तिये दशेची ख्याती । ते भोगीतसे महामती । योग्यु तो गा ॥ ९५ ॥ तेव्हां आत्मत्वें शोचावें । कांहीं पावावया कामावें । हें सरलें समभावें । भरितें तया ॥ ९६ ॥ उदया येता गभस्ती । नाना नक्षत्रव्यक्ती । हारवीजती दीप्ती । आंगिका जेवीं ॥ ९७ ॥ तेवीं उठतिया आत्मप्रभा । हे भूतभेदव्यवस्था । मोडीत मोडीत पार्था । वास पाहे तो ॥ ९८ ॥ पाटियेवरील अक्षरें । जैसीं पुसतां येती करें । तैसीं हारपती भेदांतरें । तयाचिया दिठी ॥ ९९ ॥ तैसेनि अन्यथाज्ञानें । जियें घेपती जागरस्वप्नें । तियें दोन्ही केलीं लीनें । अव्यक्तामाजीं ॥ ११०० ॥ मग तेंही अव्यक्त । बोध वाढता झिजत । पुरलां बोधीं समस्त । बुडोनि जाय ॥ १ ॥ जैसी भोजनाचां व्यापारीं । क्षुधा जिरती अवधारीं । तृप्तीचां अवसरीं । नाहींच होय ॥ २ ॥ नाना चालीचिया वाढी । वाट होत जाय

थोडी। मग पातला ठायीं बुडी। देऊनि निमे ॥ ३ ॥ कां जागृती जंव उद्दीपे। तंव तंव निद्रा हारपे। मग जागीनलिया स्वरूपें। नाहींच होय ॥ ४ ॥ हें ना आपुलें पूर्णत्व भेटे। जेथ चंद्रासी वाढी खुंटे। तेथ शुक्ल पक्षु आटे। नि:शेषु जैसा ॥ ५ ॥ तैसा बोध्यजात गिळितु। बोधु बोधें ये मज आंतु। मिसळला तेथ साद्यंतु। अबोधु गेला ॥ ६ ॥ तेव्हा कल्पांताचिये वेळे। नदी सिंधूचें पेंडवळें। मोडूनि भरले जळें। आब्रह्म जैसें ॥ ७ ॥ नाना गेलिया घटमठ। आकाश ठाके एकवट। कां जळोनि काष्ठें काष्ठ। वन्हीचि होय ॥ ८ ॥ नातरी लेणियांचे ठसे। आटोनि गेलिया मुसे। नामरूपभेदें जैसें। सांडिजे सोनें ॥ ९ ॥ हेंहि असो चेइलया। तें स्वप्न नाहीं जालिया। मग आपणचि आपणयां। उरिजे जैसें ॥११९० ॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं। तया तयाहीसकट नाहीं। हे चौथी भक्ति पाहीं। माझी तो लाहे ॥ ११ ॥ येर आर्तु जिज्ञासु अर्थार्थी। हे भजती जिये पंथीं। ते तिन्ही पावोनि चौथी। म्हणिपत आहे ॥ १२ ॥ एऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती। पैं माझिये सहजस्थिती। भक्ति नांव ॥ १३ ॥ जें नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथात्वें मातें दाऊनि। सर्वही सर्वीं भजौनि। बुझावीतसे ॥ १४ ॥ जो जेथ जैसें पाहों बैसे। तया तेथ तैसेंचि असे। हे उजियेडें कां दिसे। अखंडे जेणें ॥ १५ ॥ स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसें आपलेनि असलेपणें। विश्वींचें आहे नाही जेणें। प्रकाशे तैसें ॥ १६ ॥ ऐसा हा सहज माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति या वोजा। बोलिजे गा ॥ १७ ॥ म्हणौनि आर्तांचां ठायीं। हे आर्ति होऊनि पाहीं। अपेक्षणीय जें कांहीं। तें मीचि केला ॥ १८ ॥ जिज्ञासुपुढां वीरेशा। हेचि होऊनि जिज्ञासा। मी कां जिज्ञास्यु ऐसा। दाखविला ॥ १९ ॥ हेचि होऊनि अर्थना। मीचि माझां अर्थीं अर्जुना। करूनि अर्थाभिधाना। आणी मातें ॥ ११२० ॥ एवं घेऊनि अज्ञानातें। माझी भक्ति जे हे वर्ते। ते दावी मज द्रष्टयातें। दृश्य करूनि ॥ २१ ॥ येथें मुखचि दिसे मुखें। या बोला काही न चुके। परी दुजेपण हें लटिकें आरिसा करी ॥ २२ ॥ दिठी चंद्रचि घे साचें। परी येतुलें हें तिमिराचें। जे एकचि असे तयाचे। दोनी दावी ॥२३ ॥ तैसा सर्वत्र मीचि मियां। घेपतसें भक्ति इया। परी दृश्यत्व हें वायां। अज्ञानवशें ॥ २४ ॥ तें अज्ञान आतां फिटलें। माझें द्रष्टृत्व मज भेटलें। निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें ॥ २५ ॥ पैं जेव्हांही असे किडाळ। तेव्हांही सोनेंचि अढळ। परी ते गेलिया केवळ। उरे जैसें ॥ २६ ॥ हां गा पूर्णिमेआधीं कायी। चंद्रु सावयवुचि नाहीं। परी तिये दिवशीं भेटे पाहीं। पूर्णता तया ॥ २७ ॥ तैसा मीचि ज्ञानद्वारें। दिसें परी हस्तांतरें। मग द्रष्टृत्वीं ते सरे। मियांचि मी लाभें ॥ २८ ॥ म्हणौनि दृश्यपथा - । अतीतु माझा पार्था। भक्तियोगु चवथा। म्हणितला गा ॥ २९ ॥

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वत: । ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥ ५५ ॥

या ज्ञानभक्ति सहज। भक्तु एकवटला मज। तो मीचि केवळ हें तुज। श्रुतही आहे ॥ ११३० ॥ जे उभऊनियां भुजा। ज्ञानिया आत्मा माझा। हें बोलिलों कपिध्वजा।

सप्तमाध्यायीं ॥ ३१ ॥ ते हे कल्पादीं भक्ति मियां । भागवतमिषें ब्रह्मया । उत्तम म्हणौनि धनंजया । उपदेशिली ॥ ३२ ॥ ज्ञानी इयेतें स्वसंविति । शैव म्हणती शक्ति । आम्ही परमभक्ति । आपुली म्हणों ॥ ३३ ॥ हे मज मिळतिये वेळे । तयां क्रमयोगियां फळे । मग समस्तही निखळें । मियांचि भरे ॥ ३४ ॥ तेथ वैराग्यविवेकेंसीं । आटे बंध मोक्षेंसीं । वृत्ती तये आवृत्तीसीं । बुडोनि जाय ॥ ३५ ॥ घेऊनि ऐलपणातें । परत्व हारपे जेथें । गिळूनि चान्ही भूतें । आकाश जैसें ॥ ३६ ॥ तया परी थडथांद । साध्यसाधनातीत शुद्ध । तें मी होऊनि एकवद । भोगी तो मातें ॥ ३७ ॥ घडोनि सिंधूचिया आंगा । सिंधूवरी तळपे गंगा । तैसा पाडु तया भोगा । अवधारिजो ॥ ३८ ॥ का आरिसयासि आरिसा । उटूनि दाविलिया जैसा । देखणा अतिशयो तैसा । भोगणां तिये ॥ ३९ ॥ चेइलिया स्वप्न नाशे । आपलें ऐक्यचि दिसे । तें दुजेनवीण जैसें । भोगिजे कां ॥ ११४० ॥ हें असो दर्पणु नेलिया । तो मुखबोधुही गेलिया । देखलेपण एकलेया । आस्वादिजे जेवीं ॥ ४१ ॥ तोचि जालिया भोगु तयाचा । न घडे हा भावो जयांचा । तिहीं बोले केवीं बोलाचा । उच्चारु कीजे ॥ ४२ ॥ तयांचां नेणों गांवी । रवी प्रकाशी हन दिवी । कीं व्योमालागीं मांडवी । उभिली तिहीं ॥ ४३ ॥ हां गा राजन्यत्व नव्हतां आंगीं । रावो रायपण काय भोगी । कां अंधारु हन आलिंगी । दिनकरातें ॥ ४४ ॥ आणि आकाश जें नव्हें । तया आकाश काय जाणवे । रत्नाचां रूपीं मिरवे । गुंजांचे लेणें ॥ ४५ ॥ म्हणौनि मी होणें नाहीं । तया मीचि आहें केहीं । मग भजेल हें कायी । बोलों कीर ॥ ४६ ॥ यालागी तो क्रमयोगी । मी जालाचि मातें भोगी । तारुण्य कां तरुणांगीं । जियापरी ॥ ४७ ॥ तरंगीं सर्वांगीं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबी । नाना अवकाश नभीं । लुंठतु जैसा ॥ ४८ ॥ तैसा रूप होऊनि माझें । मातें क्रियावीण तो भजे । अलंकारु का सहजें । सोनयातें जेवीं ॥ ४९ ॥ कां चंदनाची द्रुती जैसी । चंदनीं भजे अपैसी । कां अकृत्रिम शशीं । चंद्रिका ते ॥ ११५० ॥ तैसी क्रिया कीर न साहे । तन्ही अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचिजोगें नव्हे । बोलाऐसें ॥ ५१ ॥ तेव्हा पूर्वसंस्कारछंदें । जें कांहीं तो अनुवादे । तेणें आळविलेनि वो दें । बोलतां मीचि ॥ ५२ ॥ बोलतया बोलताचि भेटे । तेथें बोलिले हें न घटे । तें मौन तंव गोमटें । स्तवन माझें ॥ ५३ ॥ म्हणौनि तया बोलतां । बोली बोलतां मी भेटतां । मौन होय तेणें तत्त्वतां । स्तवी तो मातें ॥ ५४ ॥ तैसेंचि बुद्धी का दिठी । जें तो देखों जाय किरीटी । तें देखणें दृश्य लोटी । देखतेंचि दावी ॥ ५५ ॥ आरिसया आधीं जैसें । देखतेचि मुख दिसे । तयाचें देखणें तैसें । मेळवी द्रष्टें ॥ ५६ ॥ दृश्य जाऊनियां द्रष्टें । द्रष्ट्यासीचि जैं भेटे । तैं एकलपणें न घटे । द्रष्टेपणही ॥ ५७ ॥ तेथ स्वप्नींचिया प्रिया । चोवोनि झोंबों गेलिया । ठायिजे दोन्ही न होनियां । आपणचि जैसें ॥ ५८ ॥ का दोही काष्ठांचिये धृष्टी- । माजीं वन्हि एक उठी । तो दोन्ही हे भाष आटी । आपणचि होय ॥ ५९ ॥ नाना प्रतिबिंब हातीं । घेऊं गेलिया गभस्ती । बिंबताही असती । जाय जैसी ॥ ११६० ॥ तैसा मी होऊनि देखतें । तो घेऊं जाय दृश्यातें । तेथ

दृश्य ने तिथें। द्रष्टृत्वेंसीं ॥ ६१ ॥ रवि अंधारु प्रकाशिता। नुरेचि जेवीं प्रकाश्यता। तेवीं दृश्यीं नाही द्रष्टुता। मी जालिया ॥ ६२ ॥ मग देखिजे ना न देखिजे। ऐसी जे दशा निपजे। तें तें दर्शन माझें। साचोकारें ॥ ६३ ॥ तें भलतयाही किरीटी। पदार्थाचिया भेटी। द्रष्टृदृश्यातीता दृष्टी। भोगी तो सदा ॥ ६४ ॥ आणि आकाश हें आकाशें। दाटलें न ढळे जैसें। मिया आत्मेन आपणपें तैसें। जालें तया ॥ ६५ ॥ कल्पांती उदक उदकें। रुंधिलिया वाहों ठाके। तैसा आत्मेनि मियां येकें। कोंदला तो ॥ ६६ ॥ पावो आपणपयां वळघे। केवीं वन्हि आपणपयां लागे। आपणपां पाणी रिघे। स्नाना कैसें ॥ ६७ ॥ म्हणोनि सर्व मी जालेपणें। ठेलें तया येणेंजाणें। हेंचि गा यात्रा करणें। अद्वया मज ॥ ६८ ॥ पैं जळावरील तरंगु। जरी धांविन्नला सवेगु। तरी नाहीं भुमिभागु। क्रमिला जैसा ॥ ६९ ॥ जें सांडावें कां मांडावें। जें चालणें जेणें चालावें। तें तोयचि एक आघवें। म्हणोनियां ॥ ११७० ॥ गेलियाही भलतेउता। उदकपणें पांडुसुता। तरंगाची एकात्मता। न मोडेचि जेवीं ॥ ७१ ॥ तैसा मीपणें हा लोटला। तो आघवेयाचि मज आला। या यात्रा होय भला। कापडी माझा ॥ ७२ ॥ आणि शरीरस्वभाववशें। कांहीं येक करूं जरी बैसे। तरी मीचि तो तेणें मिषें। भेटें तया ॥ ७३ ॥ तेथ कर्म आणि कर्ता। हें जाऊनि पांडुसुता। मीच आत्मेनि मज पाहतां। मीचि होय ॥ ७४ ॥ पैं दर्पणातें दर्पणें। पाहिलिया होय न पाहणें। सोनें झांकिलिया सुवर्णें। न झांके जेवीं ॥ ७५ ॥ दीपातें दीपें प्रकाशिजे। ते न प्रकाशणेंचि निपजे। तैसें कर्म मियां कीजे। तें करणें कैंचें ॥ ७६ ॥ कर्महीं करितचि आहे। जैं करावें हें भाष जाये। तैं न करणेंचि होये। तयाचें केलें ॥ ७७ ॥ क्रियाजात मी जालेपणें। घडे कांहींचि न करणें। तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें ॥ ७८ ॥ म्हणौनि करीतयाही वोजा। तें न करणें हेंचि कपिध्वजा। निफजे तिया महापूजा। पूजी तो मातें ॥ ७९ ॥ एवं तो बोले तें स्तवन। तो देखे तें दर्शन। अद्वया मज गमन। तो चाले तेंचि ॥ ११८० ॥ तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जपु माझा। तो असे तेचि कपिध्वजा। समाधी माझी ॥ ८१ ॥ जैसें कनकेंसीं कांकणें। असिजे अनन्यपणें। तो भक्तियोगें येणें। मजसीं तैसा ॥ ८२ ॥ उदकीं कल्लोळु। कापुरीं परिमळु। रत्नीं उजाळु। अनन्यु जैसा ॥ ८३ ॥ किंबहुना तंतूसीं पटु। कां मृत्तिकेसीं घटु। तैसा तो एकवटु। मजसीं माझा ॥ ८४ ॥ इया अनन्यसिद्धा भक्ती। या आघवाचि दृश्यजातीं। मज आपणपेयां सुमती। द्रष्ट्यातें जाणे ॥ ८५ ॥ तिन्हीं अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहिताकारें। भावाभावरूप स्फुरे। दृश्य जें हें ॥ ८६ ॥ तें हें आघवेंचि मी द्रष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटा। अनुभवाचा सुभटा। धेंडा तो नाचे ॥ ८७ ॥ रज्जु जालिया गोचरु। आभासतां तो व्याळाकारु। रज्जुचि ऐसा निर्धारु। होय जेवीं ॥ ८८ ॥ भांगारापरतें कांहीं। लेणें गुंजहीभरी नाहीं। हें आटुनिया ठायीं। कीजे जैसें ॥ ८९ ॥ उदका येकापरतें। तरंग नाहींचि हें निरुतें। जाणोनि तया आकारातें। न घेपे जेवीं ॥ ११९० ॥ नातरी स्वप्नविकारा समस्तां। चेऊनियां उमाणें घेतां। तो आपणयापरौता। न दिसे जैसा

॥ ९१ ॥ तैसें जें काहीं आथी नाथी । येणें होय ज्ञेयस्फूर्ती । तें ज्ञाताचि मी हे प्रतीती । होऊनि भोगी ॥ ९२ ॥ जाणे अजु मी अजरु । अक्षयो मी अक्षरु । अपूर्व मी अपारु । आनंदु मी ॥ ९३ ॥ अचळु मी अच्युतु । अनंत मी अद्वैतु । आद्यु मी अव्यक्तु । व्यक्तुही मी ॥ ९४ ॥ ईश्य मी ईश्वरु । अनादि मी अमरु । अभय मी आधारु । आधेय मी ॥ ९५ ॥ स्वामी मी सदोदितु । सहजु मी सततु । सर्व मी सर्वगतु । सर्वातीतु मी ॥ ९६ ॥ नवा मी पुराणु । शून्यु मी संपूर्णु । स्थूल मी अणु । जें कांहीं तें मी ॥ ९७ ॥ अक्रियु मी येकु । असंगु मी अशोकु । व्याप्यु मी व्यापकु । पुरुषोत्तमु मी ॥ ९८ ॥ अशब्दु मी अश्रोत्रु । अरूपु मी अगोत्रु । समु मी स्वतंत्रु । ब्रह्म मी परु ॥ ९९ ॥ ऐसें आत्मत्वें मज एकातें । इया अद्वयभक्ती जाणोनि निरुतें । आणि याही बोधा जाणतें । तेंहीं मीचि जाणें ॥ १२०० ॥ पैं चेइलेयानंतरें । आपुलें एकपण उरे । तेंही तोंवरी स्फुरे । तयाशींचि जैसें ॥ १ ॥ कां प्रकाशतां अर्कु । तोचि होय प्रकाशकु । तयाही अभेदा द्योतकु । तोचि जैसा ॥ २ ॥ तैसा वेद्याचां विलयीं । केवळ वेदकु उरे पाहीं । तेणें जाणवे तयातेंही । हेंही जो जाणे ॥ ३ ॥ तया अद्वयपणा आपुलिया । जाणती ज्ञप्ती जे धनंजया । ते ईश्वरचि मी हे तया । बोधासि ये ॥ ४ ॥ मग द्वैताद्वैतातीत । मीचि आत्मा एकु निभ्रांत । हें जाणोनि जाणणें जेथ । अनुभवीं रिघे ॥ ५ ॥ तेथ चेइलयां येकपण । दिसे जें आपुलयां आपण । तेंही जातां नेणों कोण । होइजे जेवीं ॥ ६ ॥ कां डोळां देखतिये क्षणीं । सुवर्णपण सुवर्णीं । नाटितां होय आटणी । अळंकाराचीही ॥ ७ ॥ नाना लवण तोय होये । मग क्षारता तोयत्वें राहे । तेहीं जिरतां जेवीं जाये । जालेपण तें ॥ ८ ॥ तैसा मी तो हें जें असे । तें स्वानंदानुभवसमरसें । कालवूनियां प्रवेशे । मजचिमाजीं ॥ ९ ॥ आणि तो हे भाष जेथ जाये । तेथें मी हें कोण्हासी आहे । ऐसा मी ना तो तिये सामाये । माझांचि रूपीं ॥ १२१० ॥ जेव्हां कापुर जळों सरे । तयाचि नाम अग्नि पुरे । मग उभयातीत उरे । आकाश जेवीं ॥ ११ ॥ कां धाडलिया एका एकु । वाढे तो शून्य विशेखु । तैसा आहेनाहीचा शेखु । मीचि मग आथी ॥ १२ ॥ तेथ ब्रह्मा आत्मा ईशु । यया बोला मोडे सौरसु । न बोलणेयाही पैसु । नाहीं तेथ ॥ १३ ॥ न बोलणेंही न बोलोनी । तें बोलिजे तोंड भरुनी । जाणिव नेणिव नेणोनि । जाणिजे तें ॥ १४ ॥ तेथ बुझिजे बोधु बोधें । आनंदु घेपे आनंदें । सुखवरी नुसधें । सुखचि भोगिजे ॥ १५ ॥ तेथ लाभु जोडला लाभा । प्रभा आलिंगिली प्रभा । विस्मयो बुडाला उभा । विस्मयामाजीं ॥ १६ ॥ समु तेथ सामावला । विश्रामु विश्रांती आला । अनुभव वेडावला । अनुभूतिपणें ॥ १७ ॥ किंबहुना ऐसे निखळ । मीपणा जोडे तया फळ । सेवूनि वेली वेल्हाळ । क्रमयोगाची ते ॥ १८ ॥ पैं क्रमयोगिया किरीटी । चक्रवर्तीचां मुकुटीं । मी चिद्रत्न ते साटोवाटीं । होय तो माझा ॥ १९ ॥ कीं क्रमयोगप्रासादाचा । कळसु जो हा मोक्षाचा । तयावरील अवकाशाचा । उवावो जाला तो ॥ १२२० ॥ नाना संसारआडवीं । क्रमयोग वाट बरवी । जोडिली ते मदैक्यगांवीं । पैठी जालीसे ॥ २१ ॥ हें असो क्रमयोगवोघें । तेणें भक्तचित्तें गांगें ।

मी स्वानंदोदधी वेगें । ठाकिला कीं गा ॥ २२ ॥ हा ठायवरी सुवर्मा । क्रमयोगीं आहे महिमा । म्हणौनि वेळोवेळां तुम्हां । सांगतों आम्ही ॥ २३ ॥ पैं देशें काळें पदार्थें । साधूनि घेईजे मातें । तैसा नव्हे मी आयतें । सर्वांचें सर्वही ॥ २४ ॥ म्हणोनि माझां ठायीं । जाचावें न लगे कांहीं । मी लाभें इयें उपायीं । साचचि गा ॥ २५ ॥ एक शिष्य एक गुरु । हा रूढला साच व्यवहारु । तो मत्प्राप्तिकारु । जाणावया ॥ २६ ॥ अगा वसुधेचां पोटीं । निधान सिद्ध किरीटी । वन्हि सिद्ध काष्ठीं । वोहा दूध ॥ २७ ॥ परी लाभें तें असतें । तया कीजे उपायातें । येर सिद्धचि तैसा येथें । उपायीं मी ॥ २८ ॥ हा फळहीवरी उपावो । कां पां प्रस्तावीतसे देवो । हें पुसतां तरी अभिप्रावो । येथिंचा ऐसा ॥ २९ ॥ जे गीतार्थाचें चांगावें । मोक्षोपायपर आघवें । आणि शास्त्रोपाय कीं नव्हे । प्रमाणसिद्ध ॥ १२३० ॥ वारा आभाळचि फेडी । वाचूनि सूर्यातें न घडी । कां हातु बाबुळी धाडी । तोय न करी ॥ ३१ ॥ तैसा आत्मदर्शनीं आडळु । असे अविद्येचा जो मळु । तो शास्त्र नाशी येरु निर्मळु । मी प्रकाशें स्वयें ॥ ३२ ॥ म्हणौनि आघवींचि शास्त्रें । अविद्याविनाशाचीं पात्रें । वांचोनि न होती स्वतंत्रें । आत्मबोधीं ॥ ३३ ॥ तया अध्यात्मशास्त्रासीं । जैं साचपणाची ये पुसी । तैं येइजे जया ठायासी । ते हे गीता ॥ ३४ ॥ भानुभूषिता प्राचिया । सतेजा दिशा आघविया । तैसी शास्त्रेश्वरा गीता या । सनाथें शास्त्रें ॥ ३५ ॥ हें असो येणें शास्त्रेश्वरें । मागां उपाय बहुवें विस्तारें । सांगितला जैसा करें । घेवों ये आत्मा ॥ ३६ ॥ परी प्रथमश्रवणासवें । अर्जुना विपायें हें फावे । हा भावो सकणवे । धरूनि श्रीहरी ॥ ३७ ॥ तेंचि प्रमेय एक वेळ । शिष्यीं होआवया अढळ । सांगतसे मुकुळ - । मुद्रा आतां ॥ ३८ ॥ आणि प्रसंगें गीता । ठावोही हा संपता । म्हणौनि दावी आद्यंता । एकार्थत्व ॥ ३९ ॥ जे ग्रंथाचां मध्यभागीं । नाना अधिकारप्रसंगीं । निरूपण अनेगीं । सिद्धांतीं केलें ॥ १२४० ॥ तरी तेतुलेही सिद्धांत । इये शास्त्रीं प्रस्तुत । हें पूर्वापर नेणत । कोण्हीं जैं मानी ॥ ४१ ॥ तैं महासिद्धांताचा आवांका । सिद्धांतकक्षा अनेका । भिडऊनि आरंभु देखा । संपवितु असे ॥ ४२ ॥ एथ अविद्यानाशु हें स्थळ । तेणें मोक्षोपादान फळ । या दोन्ही केवळ । साधन ज्ञान ॥ ४३ ॥ हें इतुलेंचि नानापरी । निरूपिलें ग्रंथविस्तारीं । तें आतां दोहीं अक्षरीं । अनुवादावें ॥ ४४ ॥ म्हणौनि उपेयही हातीं । जालया उपायस्थिती । देव प्रवर्तले तें पुढती । येणेंचि भावें ॥ ४५ ॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः । मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥

मग म्हणे गा सुभटा । तो क्रमयोगी या निष्ठा । मी होऊनि होय पैठा । माझां रूपीं ॥ ४६ ॥ स्वकर्मांचां चोखाळीं । मज पूजा करूनि भली । तेणें प्रसादें आकळी । ज्ञाननिष्ठेतें ॥ ४७ ॥ ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्लासे । तिया मजसी समरसें । सुखिया होय ॥ ४८ ॥ आणि विश्वप्रकाशितया । आत्मया मज आपुलिया । अनुसरे जो करूनियां । सर्वत्रता हे ॥ ४९ ॥ सांडूनि आपला आडळ । लवण आश्रयी जळ । कां हिंडोनि राहे निश्चळ । वायु व्योमीं

॥ १२५० ॥ तैसा बुद्धी वाचा कायें । जो मातें आश्रऊनि ठाये । तो निषिद्धेंही विपायें । कर्में करूं ॥ ५१ ॥ परी गंगेचां संबंधी । बिदी आणि महानदी । एक तेवीं माझां बोधीं । शुभाशुभांसी ॥ ५२ ॥ कां बावनें आणि घुरें । हा निवाडु तंवचि सरे । जंव न घेपती वैश्वानरें । कवळुनि दोन्ही ॥ ५३ ॥ नाना पांचिकें आणि सोळें । हें सोनया तंवचि आलें । जंव परिसु आंगमेळें । एकवटीना ॥ ५४ ॥ तैसें शुभाशुभ ऐसें । हें तंवचिवरी आभासे । जंव येकु न प्रकाशें । सर्वत्र मी ॥ ५५ ॥ अगा रात्री आणि दिवो । हा तंवचि द्वैतभावो । जंव न रिगिजे गांवों । गभस्तीचा ॥ ५६ ॥ म्हणौनि माझिया भेटी । तयाचीं सर्व कर्में किरीटी । जाऊनि बैसे तो पाटीं । सायुज्याचां ॥ ५७ ॥ देशें काळें स्वभावें । वेंचु जया न संभवे । तें पद माझें पावे । अविनाशु तो ॥ ५८ ॥ किंबहुना पांडुसुता । मज आत्मयाची प्रसन्नता । लाहे तेणें न पविजतां । लाभु कवणु असे ॥ ५९ ॥

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः । बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥

याकारणें गां तुवां । सर्व कर्मा आपुलिया । माझां स्वरूपीं धनंजया । संन्यासु कीजे ॥ १२६० ॥ परी तोचि संन्यासु वीरा । करणीयेचा झणें करा । आत्मविवेकीं धरा । चित्तवृत्ति हे ॥ ६१ ॥ मग तेणें विवेकबळें । आपणपें कर्मावेगळें । माझां स्वरूपीं निर्मळे । देखिजेल ॥ ६२ ॥ आणि कर्माची जन्मभोये । प्रकृति जे कां आहे । ते आपणयाहूनि बहुवे । देखसी दूरीं ॥ ६३ ॥ तेथ प्रकृति आपणयां- । वेगळीं नुरे धनंजया । रूपेंवीण का छाया । जयापरी ॥ ६४ ॥ ऐसेनि प्रकृतिनाशु । जालया कर्मसंन्यासु । निफजेल अनायासु । सकारणु ॥ ६५ ॥ मग कर्मजात गलिया । मी आत्मा उरें आपणपयां । तेथ बुद्धि घापे करूनियां । पतिव्रता ॥ ६६ ॥ बुद्धि अनन्यें येणें योगें । मजमाजीं जैं रिगे । तैं चित्त चैत्यत्यागें । मातेंचि भजे ॥ ६७ ॥ ऐसें चैत्यजातें सांडिलें । चित्त माझां ठायीं जडलें । ठाके तैसें वहिलें । सर्वदा करी ॥ ६८ ॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि । अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥ ५८ ॥

मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियांचि भरेल जेव्हां । माझा प्रसादु जाण तेव्हां । संपूर्ण जाहला ॥ ६९ ॥ तेथ सकळदुःखधामें । भुंजीजती जियें मृत्युजन्में । तियें दुर्गमेंचि सुगमें । होती तुज ॥ १२७० ॥ सूर्याचेनि सांवायें । डोळा सावाइला होये । तैं आंधाराचा आहे । पाडु तया ॥ ७१ ॥ तैसा माझेनि प्रसादें । जीवकणु जयाचा उपमर्दे । तो संसाराचेनि बाधे । बागुलें केवी ॥ ७२ ॥ म्हणौनि धनंजया । तूं संसारदुर्गती यया । तरसील माझिया । प्रसादास्तव ॥ ७३ ॥ अथवा हन अहंभावें । माझें बोलणें हें आघवें । कानामनाचिये शिंवे । नेदिसी टेंकों ॥ ७४ ॥ तरी नित्य मुक्त अव्ययो । तूं आहासि तें होऊनि वावो । देहसंबंधाचा घावो । वाजेल आंगीं ॥ ७५ ॥ जया देहसंबंधाआंतु । प्रतिपदीं आत्मघातु । भुंजतां उसंतु । कहींच नाहीं ॥ ७६ ॥ येवढेनि दारुणें । निमणेनवीण निमणें । पडेल जरी बोलणें । नेघसी माझें ॥ ७७ ॥

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे । मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥

पथ्यद्वेषिया पोषी ज्वरु । कां दीपद्वेषिया अंधकारु । विवेकद्वेषें अहंकारु । पोषूनि तैसा ॥ ७८ ॥ स्वदेहा नाम अर्जुनु । परदेहा नाम स्वजनु । संग्रामा नाम मलिनु । पापाचारु ॥ ७९ ॥ इया मती आपुलियां । तिघां तीन नामें ययां । ठेऊनियां धनंजया । न जुंझें ऐसा ॥ १२८० ॥ जीवामाजीं निष्टंकु । करिसी जो आत्यंतिकु । तो वाया धाडील नैसर्गिकु । स्वभावोचि तुझा ॥ ८१ ॥ आणि मी अर्जुनु हे आत्मिक । ययां वधु करणें हें पातक । हें माया वांचूनि तात्त्विक । कांहीं आहे ॥ ८२ ॥ आधीं जुंझार तुवां होआवें । मग जुंझावया शस्त्र घेयावें । कां न जुंझावया करावें । देवांगण ॥ ८३ ॥ म्हणौनि न जुंझणें । म्हणसी तें वायाणें । ना मानूं लोकपणें । लोकदृष्टीही ॥ ८४ ॥ तऱ्ही न जुंझें ऐसें । निष्टंकिसी जें मानसें । तें प्रकृति अनारिसे । करवीलचि ॥ ८५ ॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा । कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६० ॥

पैं पूर्वे वाहतां पाणी । पव्हिजे पश्चिमेचे वाहणीं । तरी आग्रहो उरे तें आणी । आपुलिया लेखा ॥ ८६ ॥ का साळीचा कणु म्हणे । मी नुगवें साळीपणें । तरी आहे आन करणें । स्वभावासी ॥ ८७ ॥ तैसा क्षात्रसंस्कारसिद्धा । प्रकृती घडिलासी प्रबुद्धा । आतां नुठीं म्हणसी हा धांदा । परी उठविजसीचि तूं ॥ ८८ ॥ शौर्य तेज दक्षता । एवमादिक पंडुसुता । गुणदिधले जन्मतां । प्रकृती तुज ॥ ८९ ॥ तरी तयाचिया समवाया - । अनुरूप धनंजया । न करितां उगलिया । नयेल असों ॥ १२९० ॥ म्हणौनियां तिहीं गुणीं । बांधलासि तूं कोदंडपाणी । त्रिशुद्ध निघसी वाहणीं । क्षात्राचिया ॥ ९१ ॥ ना हें आपुलें जन्ममूळ । न विचारीतचि केवळ । न जुंझें ऐसें अढळ । व्रत जरी घेसी ॥ ९२ ॥ तरी बांधोनि हात पाये । जो रथीं घातला होये । तो न चले तरी जाये । दिगंता जेवीं ॥ ९३ ॥ तैसा तूं आपुलियाकडुनी । मी कांहींच न करीं म्हणौनि । ठासी परी भरंवसेनि । तूंचि करिसी ॥ ९४ ॥ उत्तर वैराटींचा राजा । पळतां तूं कां निघालासी जुंझा । हा क्षात्रस्वभावो तुझा । जुंझवील तुज ॥ ९५ ॥ महावीर अकरा अक्षौहिणी । तुवां येकें नागविलें रणांगणीं । तो स्वभावो कोदंडपाणी । जुंझवील तूतें ॥ ९६ ॥ हां गा रोगु कायी रोगिया । आवडे दरीद्र दरिद्रिया । परी भोगविजे बळिया । अदृष्टें जेणें ॥ ९७ ॥ तें अदृष्ट अनारिसें । न करील ईश्वरवशें । तो ईश्वरुही असे । हृदयीं तुझां ॥ ९८ ॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥ ६१ ॥

सर्व भूतांचां अंतरीं । हृदयमहाअंबरीं । चिद्वृत्तीचां सहस्त्रकरीं । उदयला असे जो ॥ ९९ ॥ अवस्थात्रय तिन्ही लोक । प्रकाशूनि अशेख । अन्यथादृष्टि पांथिक । चेवविले ॥ १३०० ॥ वेद्योदकाचां सरोवरीं । फांकतां विषयकल्हारीं । इंद्रियषट्पदा चारी । जीवभंवरातें ॥ १ ॥ असो रूपक हें तो ईश्वरु । सकल भूतांचा अहंकारु । पांघरोनि निरंतरु । उल्हासत असे ॥ २ ॥ स्वमायेचें आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र । बाहेरी नटी छाया विचित्र । चौऱ्यांशीं लक्ष ॥ ३ ॥ तया ब्रह्मादिकीटांता । अशेषाही भूतजातां । देहाकार योग्यता । पावोनि दावी ॥ ४ ॥

तेथ जें देह जयापुढें । अनुरूपपणें मांडे । तें भूत तिये आरूढे । हें मी म्हणौनि ॥ ५ ॥ सूत सूतें गुंतलें । तृण तृणेंचि बांधलें । कां आत्मबिंबा घेतलें । बाळकें जळीं ॥ ६ ॥ तयापरी देहाकारें । आपणपेंचि दुसरें । देखोनि जीव आविष्करे । आत्मबुद्धी ॥ ७ ॥ ऐसेनि शरीराकारीं । यंत्रीं भूतें अवधारीं । वाहूनि हालवी दोरी । प्राचीनाची ॥ ८ ॥ तेथ जया जें कर्मसूत्र । मांडूनी ठेविलें स्वतंत्र । तें तिये गती पात्र । होंचि लागे ॥ ९ ॥ किंबहुना धनुर्धरा । भूतांतें स्वर्गसंसारा – । माजीं भोवंडी तृणें वारा । आकाशीं जैसा ॥ १३१० ॥ भ्रामकाचेनि संगें । जैसें लोहो वेढा रिगे । तैसीं ईश्वरसत्तायोगें । चेष्टती भूतें ॥ ११ ॥ जैसे चेष्टा आपुलिया । समुद्रादिक धनंजया । चेष्टती चंद्राचिया । सन्निधी येकी ॥ १२ ॥ तया सिंधू भरितें दाटे । सोमकांता पाझरु फुटे । कुमुदांचकोरांचा फिटे । संकोचु तो ॥ १३ ॥ तैसीं बीजप्रकृतिवशें । अनेकें भूतें येकें ईशें । चेष्टविजती तो असे । तुझां हृदयीं ॥ १४ ॥ अर्जुनपण न घेतां । मी ऐसें जें पंडुसुता । उठतसे तें तत्त्वता । तयाचें रूप ॥ १५ ॥ यालागीं तो प्रकृतीतें । प्रवर्तवील हे निरुतें । आणि ते जुंझवील तूतें । न जुंझसी जन्ही ॥ १६ ॥ म्हणोनि ईश्वरु तो गोसावी । तेणें प्रकृती हे नेमावी । तिया सुखें राबवावीं । इंद्रियें आपुलीं ॥ १७ ॥ तूं करणें न करणें दोन्ही । लाऊनि प्रकृतीचां मानीं । प्रकृतीही का अधीनी । हृदयस्था जया ॥ १८ ॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत । तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ६२ ॥

तया अहं वाचा चित्त आंग । देऊनियां शरण रिग । महोदधी कां गांग । रिगालें जैसें ॥ १९ ॥ मग तयाचेनि प्रसादें । सर्वोपशांतिप्रमदे । कांतु होऊनियां स्वानंदें । स्वरूपींच रमसी ॥ १३२० ॥ संभूति जेणें संभवे । विश्रांति जेथें विसंवे । अनुभूतिही अनुभवे । अनुभवा जया ॥ २१ ॥ तिये निजात्मपदींचा रावो । होऊनि ठाकसी अव्ययो । म्हणे लक्ष्मीनाहो । पार्था तूं ॥ २२ ॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया । विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥

हें गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचें मथित । आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ॥ २३ ॥ ज्ञान ऐसिया रूढी । वेदांतें जयाची प्रौढी । वानितां कीर्ति चोखडी । पातली जगीं ॥ २४ ॥ बुद्ध्यादिकें डोळसें । हे जयाचे का कडवसे । मी सर्वद्रष्टाही दिसें । पाहला जये ॥ २५ ॥ तें हें गा आत्मज्ञान । मज गोप्याचेंही गुप्त धन । परी तूं म्हणूनि आन । केंवीं करूं ॥ २६ ॥ याकारणें गा पांडवा । आम्हीं आपला हा गुह्य ठेवा । तुज दिधला कणवा । जाकळिलेपणें ॥ २७ ॥ परी भुलली वोरसें । माय बोले बाळादोषें । प्रीति ही परी तैसें । न करूंचि हो ॥ २८ ॥ येथ आकाश आणि गाळिजे । अमृताही साली फेडिजे । का दिव्याकरवीं करविजे । दिव्य जैसें ॥ २९ ॥ जयाचेनि अंगप्रकाशें । पाताळींचा परमाणु दिसे । तया सूर्याहि कां जैसें । अंजन सूदलें ॥ १३३० ॥ तैसें सर्वज्ञेंही मियां । सर्वही निर्धारूनियां । निकें होय तें धनंजया । सांगितलें तुज ॥ ३१ ॥ आतां तूं ययावरी । निकें हे निर्धारीं । निर्धारूनि करीं । आवडे तैसें ॥ ३२ ॥ यया देवाचिया बोला । अर्जुनु

उगाचि ठेला। तेथ देवो म्हणती भला। अवंचकु होसी॥ ३३॥ वाढितया पुढे भुकेला। उपरोधें म्हणे मी धाला। तैं तोचि पीडे आपुला। आणि दोषुही तया॥ ३४॥ तैसा सर्वज्ञ श्रीगुरु। भेटलिया आत्मनिर्धारु। न पुसिजे जैं आभारु। धरूनियां॥ ३५॥ तैं आपणपेंचि वंचे। आणि पापही वंचनाचें। आपणयाचि साचें। चुकविलें तेणें॥ ३६॥ पैं उगेपणा तुझिया। हा अभिप्रावो की धनंजया। जें एकवेळ आवांकुनियां। सांगावें ज्ञान॥ ३७॥ तेथ पार्थु म्हणे दातारा। भलें जाणसी माझिया अंतरा। हें म्हणों तरी दुसरा। जाणता असे काई॥ ३८॥ येर ज्ञेय हें जी आघवें। तूं ज्ञाता एकचि स्वभावें। मा सूर्यु म्हणौनि वानावें। सूर्यातें काई॥ ३९॥ या बोला श्रीकृष्णें। म्हणितलें काय येणें। हेंचि थोडें गा वानणें। जें बुझतासि तूं॥ १३४०॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः। इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्॥ ६४॥

तरी अवधान पघळ। करूनियां आणिक एक वेळ। वाक्य माझें निर्मळ। अवधारीं पां॥ ४१॥ हें वाच्य म्हणौनि बोलिजे। कां श्राव्य मग आयिकीजे। तैसें नव्हे परी तुझें। भाग्य बरवें॥ ४२॥ कूर्मीचिया पिलियां। दिठी पान्हा ये धनंजया। आकाश वाहे बापिया। घरींचें पाणी॥ ४३॥ जो व्यवहारु जेथ न घडे। तयाचें फळचि तेथ जोडे। काय दैवें न सांपडे। सानुकूळें॥ ४४॥ एऱ्हवीं द्वैताची वारी। सारूनि ऐक्याचां परिवरीं। भोगिजे तें अवधारीं। रहस्य हें॥ ४५॥ आणि निरुपचारा प्रेमा। विषय होय जें प्रियोत्तमा। तें दुजें नव्हे कीं आत्मा। ऐसेंचि जाणावें॥ ४६॥ आरिसाचिया देखलिया। गोमटें कीजे धनंजया। तें तया नोहे आपणयां-। लागीं जैसें॥ ४७॥ तैसें पार्था तुझेनि मिषें। मी बोलें आपणयाचि दोषें। माझां तुझां ठायीं असे। मीतूंपण गा॥ ४८॥ म्हणौनि जिव्हारींचें गुज। सांगतसें जीवासि तुज। हें अनन्यगतीचें मज। आथी व्यसन॥ ४९॥ पैं जळा आपणपें देतां। लवण भुललें पंडुसुता। कीं आघवें तयाचें होतां। न लजेचि तें॥ १३५०॥ तैसा तूं माझां ठाईं। राखो नेणसीचि कांहीं। तरी आतां तुज काई। गोप्य मी करीं॥ ५१॥ म्हणौनि आघवींचि गूढें। जें पाऊनि अति उघडें। गोप्य माझें चोखडें। वाक्य आइक॥ ५२॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे॥ ६५॥

तरी बाह्य आणि अंतरा। आपुलिया सर्व व्यापारा। मज व्यापकातें वीरा। विषो करीं॥ ५३॥ आघवां आंगीं जैसा। वायु मिळोनि आहे आकाशा। तूं सर्व कर्मीं तैसा। मजसीचि अस॥ ५४॥ किंबहुना आपलें मन। करीं माझें एकायतन। माझेनि श्रवणें कान। भरूनि घालीं॥ ५५॥ आत्मज्ञानें चोखडीं। संत जे माझीं रुपडीं। तेथ दृष्टि पडों आवडी। कामिनी जैसी॥ ५६॥ मी सर्व वस्तीचें वसौटें। माझीं नामें जियें चोखटें। तियें जीवा यावया वाटे। वाचेचिये लावीं॥ ५७॥ हाताचें करणें। कां पायांचें चालणें। तें होई मजकारणें। तैसें करीं॥ ५८॥ आपुला अथवा परावा। ठायीं उपकरसी पांडवा। तेणें यज्ञें होईं बरवा। याज्ञिकु माझा॥ ५९॥

हें एकैक शिकऊं काई। पैं सेवकै आपुलां ठाईं। उरौनि येर सर्वही। मी सेव्यचि करीं॥ १३६०॥ तेथ जाऊनिया भूतद्वेषु। सर्वत्र नमवेन मीचि एकु। ऐसेनि आश्रयो आत्यंतिकु। लाहासी तूं माझा॥ ६१॥ मग भरलेया जगाआंतु। जाऊनिया तिजयाची मातु। होऊनि ठायील एकांतु। आम्हां तुम्हां॥ ६२॥ तेव्हा भलतिये अवस्थे। मी तूंतें तूं मातें। भोगिसीं ऐसें आइतें। वाढेल सुख॥ ६३॥ आणि तिजें आडळ करितें। निमालें अर्जुना जेथें। तैं मीचि म्हणौनि तूं मातें। पावसी शेखीं॥ ६४॥ जैसी जळींची प्रतिभा। जळनाशीं बिंबा। येतां गाभागोभा। कांहीं आहे॥ ६५॥ पैं पवनु अंबरा। कां कल्लोळु सागरा। मिळतां आडवारा। कोणाचा गा॥ ६६॥ म्हणौनि तूं आणि आम्हीं। हें दिसताहे देहधर्मीं। मग याचां विरामीं। मीचि होसी॥ ६७॥ यया बोलामाझारीं। होय न होय झणें करीं। येथ आन आथी तरी। तुझीच आण॥ ६८॥ पैं तुझी आण वाहणें। हें आत्मलिंगातें शिवणें। प्रितीची जाति लाजणें। आठवों नेदी॥ ६९॥ एऱ्हवीं वेदु निष्प्रपंचु। जेणे विश्वाभासु हा साचु। आज्ञेचा नटनाचु। काळातें जिणें॥ १३७०॥ तो देवो मी सत्यसंकल्पु। आणि जगाचा हितु बापु। मा आणेचा आक्षेपु। कां करावा॥ ७१॥ परी अर्जुना तुझेनि वेधें। मियां देवपणाची बिरुदें। सांडिलीं गा मी हें आधें। सगळेनि तुवां॥ ७२॥ पैं काजा आपुलिया। रावो आपुली आपणया। आण वाहे धनंजया। तैसें हें कीं॥ ७३॥ तेथ अर्जुन म्हणे देवें। अचाट हें न बोलावें। जी आमचें काज नांवें। तुझेनि एकें॥ ७४॥ यावरी सांगों बैससी। कां सांगता भाषही देसी। या तुझिया विनोदासी। पारु आहे जी॥ ७५॥ कमळवना विकाशु। करी रवीचा एक अंशु। तेथ आघवाचि प्रकाशु। नित्य दे तो॥ ७६॥ पृथ्वी निवऊनि सागर। भरीजती येवढें थोर। वर्षे तेथ मिषांतर। चातकु कीं॥ ७७॥ म्हणौनि औदार्या तुझेया। मज निमित्त ना म्हणावया। प्राप्ति असे दानीं राया। कृपानिधी॥ ७८॥ तंव देवो म्हणती राहें। या बोलाचा प्रस्तावो नोहे। पैं मातें पावसी उपायें। साचचि येणें॥ ७९॥ सैंधव सिंधु पडलिया। जो क्षणु धनंजया। तेणें विरेचि कीं उरावया। कारण कायी॥ १३८०॥ तैसें सर्वत्र मातें भजतां। सर्व मी होतां अहंता। निःशेष जाऊनि तत्त्वता। मीचि होसी॥ ८१॥ एवं माझिये प्राप्तीवरी। कर्मालागोनि अवधारीं। दाविली तुज उजरी। उपायांची॥ ८२॥ जे आधीं तंव पांडुसुता। सर्व कर्में मज अर्पितां। सर्वत्र प्रसन्नता। लाहिजे माझी॥ ८३॥ पाठीं माझां तिये प्रसादीं। माझें ज्ञान जाय सिद्धी। तेणें मिसळिजे त्रिशुद्धी। स्वरूपीं माझां॥ ८४॥ मग पार्था तियें ठायीं। साध्यसाधन होये नाहीं। किंबहुना तुज कांहीं। उरेचि ना॥ ८५॥ तरी सर्व कर्में आपुलीं। तुवां सर्वदा मज अर्पिलीं। तेणें प्रसन्नता लाधली। आजि हे माझी॥ ८६॥ म्हणौनि येणें प्रसादबळें। नव्हे झुंजाचेनि आडळें। न ठकेचि येकेवेळे। भाळलों तुज॥ ८७॥ जेणें सप्रपंच अज्ञान जाये। येकु मी गोचरु होये। तें उपपत्तीचेनि उपायें। गीतारूप हें॥ ८८॥ मियां ज्ञान तुज आपुलें। नानापरी उपदेशिलें। येणें अज्ञानजात सांडीं वियालें। धर्माधर्म जें॥ ८९॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ ६६ ॥

आशा जैसी दुःखातें । व्याली निंदा दुरितें । हें असो जैसें दैन्यातें । दुर्भगत्व ॥ १३९० ॥ तैसें स्वर्गनरकसूचक । अज्ञान व्यालें धर्मादिक । तें सांडूनि घालीं अशेख । ज्ञानें येणें ॥ ९१ ॥ हाती घेऊनि तो दोरु । सांडिजे जैसा सर्पाकारु । कां निद्रात्यागें घराचारु । स्वप्नींचा जैसा ॥ ९२ ॥ नाना सांडिलेनि कवळें । चंद्रीचें धुये पिवळें । व्याधित्यागें कडुवाळें - । पण मुखाचें ॥ ९३ ॥ अगा दिवसा पाठीं देउनी । मृगजळ घापे त्यजुनी । का काष्ठत्यागें वन्ही । त्यजिजे जैसा ॥ ९४ ॥ तैसें धर्माधर्माचें टवाळ । दावी अज्ञान जें कां मूळ । तें त्यजूनि त्यजीं सकळ । धर्मजात ॥ ९५ ॥ मग अज्ञान निमालिया । मीचि येकु असें अपैसया । सनिद्र स्वप्न गेलया । आपणपें जैसें ॥ ९६ ॥ तैसा मी एकवांचूनि कांही । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोऽहंबोधें तयाचां ठायीं । अनन्यु होय ॥ ९७ ॥ पैं आपुलेनि भेदेंविण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ ९८ ॥ म्हणौनि घटाचेनि नाशें । गगनीं गगन प्रवेशे । मज शरण येणें तैसें । ऐक्य करी ॥ ९९ ॥ सुवर्णमणि सोनया । ये कल्लोळु जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ १४०० ॥ वांचूनि सागराचां पोटीं । वडवानळु शरण आला किरीटी । जाळूं न ठाके तया गोठी । वाळूनि दे पां ॥ १ ॥ मजही शरण रिघिजे । आणि जीवत्वेंचि असिजे । धिग् बोली यिया न लजे । प्रज्ञा केवीं ॥ २ ॥ अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजया । तें दासिरूंही की तया । समान होय ॥ ३ ॥ मा मी विश्वेश्वरु भेटे । आणि जीवग्रंथी न सुटे । हे बोल नको वोखटे । कानीं लाऊं ॥ ४ ॥ म्हणौनि मी होऊनि मातें । सेवणें आहे आयितें । तें करी हाता येतें । ज्ञानें येणें ॥ ५ ॥ मग ताकौनिया काढिलें । लोणी मागौतें ताकीं घातलें । परी न घेपे कांहीं केलें । तेणें जेवीं ॥ ६ ॥ लोह उभें खाय माती । तें परिसाचिये संगती । सोनें जालया पुढती । न शिविजे मळें ॥ ७ ॥ हें असो काष्ठापासोनी । मथूनि घेतलिया वन्ही । मग काष्ठेंही कोंडोनि । न ठके जैसा ॥ ८ ॥ तैसें अद्वयत्वें मज । शरण रिगालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ना ॥ ९ ॥ अर्जुना काय दिनकरु । देखत आहे अंधारु । कीं प्रबोधीं होय गोचरु । स्वप्नभ्रमु ॥ १४१० ॥ तैसें मजसीं येकवटलेया । मी सर्वरूप वांचूनियां । आन कांहीं उरावया । कारण असे ॥ ११ ॥ म्हणोनि तयाचें कांहीं । चिंतीं ना आपुलां ठाईं । तुझें पापपुण्य पाहीं । मीचि होईन ॥ १२ ॥ जळीं पडिलिया लवणा । सर्वही जळ होय विचक्षणा । तुज मी अनन्यशरणा । होईन तैसा ॥ १३ ॥ तेथ सर्व बंधलक्षणें । पापें उरावें दुजेपणें । तें माझां बोधीं वायाणें । होऊनि जाईल ॥ १४ ॥ येतुलेनि आपैसया । सुटलाचि आहासी धनंजया । घेईं मज प्रकाशोनियां । सोडवीन तूतें ॥ १५ ॥ याकारणें पुढती । हे आधी न वाहें चित्तीं । मज एकासि ये सुमती । जाणोनि शरण ॥ १६ ॥ ऐसे सर्वरूपरूपसें । सर्वदृष्टिडोळसें । सर्वदेशनिवासें । बोलिले श्रीकृष्णें ॥ १७ ॥ मग सांवळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु । आलिंगिला स्वशरणु । भक्तराजु तो ॥ १८ ॥ न पवतां जयातें ।

काखे सूनि बुद्धीतें । बोलणें मागौतें । वोसरलें ॥ १९ ॥ ऐसें जें कांहीं एक । बोला बुद्धीसीही अटक । तें द्यावया मिख । खेवाचें केलें ॥ १४२० ॥ हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ॥ २१ ॥ दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला । द्वैत न मोडितां केला । आपणपें पार्थु ॥ २२ ॥ तेव्हां सुखाचा मग तया । पूरु आला जो धनंजया । तेथ वाडु तन्हीं बुडोनियां । ठेला देवो ॥ २३ ॥ सिंधु सिंधूतें पावों जाये । तें पावणें ठाके दुणा होये । वरी रिगे पुरवणिये । आकाशही ॥ २४ ॥ तैसें तया दोघांचें मिळणें । दोघां नावरे जाणावें कवणें । किंबहुना नारायणें । विश्व कोंदलें ॥ २५ ॥ एवं वेदाचें मूळसूत्र । सर्वाधिकारैकपवित्र । श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ॥ २६ ॥ येथ गीता मूळ वेदां । ऐसें पां केवीं आलें बोधा । हें म्हणाल तरी प्रसिद्धा । उपपत्ती सांगों ॥ २७ ॥ तरी जयाचां निश्वासीं । जन्म झालें वेदराशी । तो सत्यप्रतिज्ञ पैजेसीं । बोलिला स्वमुखें ॥ २८ ॥ म्हणौनि वेदां मूळभूत । गीता म्हणों हें होय उचित । आणिकही येकी येथ । उपपत्ति असे ॥ २९ ॥ जे न नशतु स्वरूपें । जयाचा विस्तारु जेथ लपे । तें तयाचें म्हणिपे । बीज जगीं ॥ १४३० ॥ तरी कांडत्रयात्मकु । शब्दराशी अशेखु । गीतेमाजीं असे रुखु । बीजीं जैसा ॥ ३१ ॥ म्हणौनि वेदाचें बीज । श्रीगीता होय हें मज । गमे आणि सहज । दिसतही आहे ॥ ३२ ॥ जे वेदाचे तिन्ही भाग । गीते उमटले असती चांग । भूषणरत्नीं सर्वांग । शोभलें जैसें ॥ ३३ ॥ तियेंचि कर्मादिकें तिन्हीं । कांडें कोणकोणे स्थानीं । गीते आहाति तें नयनीं । दाखऊं आईक ॥ ३४ ॥ तरी पहिला जो अध्यावो । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो । द्वितीयीं सांख्यसद्भावो । प्रकाशिला ॥ ३५ ॥ मोक्षदानीं स्वतंत्र । ज्ञानप्रधान हें शास्त्र । येतुलालें दुजीं सूत्र । उभारिलें ॥ ३६ ॥ मग अज्ञानें बांधलेयां । मोक्षपदीं बैसावया । साधनारंभु तो तृतीया - । ध्यायीं बोलिला ॥ ३७ ॥ जे देहाभिमानबंधें । सांडूनि काम्यनिषिद्धें । विहित परी अप्रमादें । अनुष्ठावें ॥ ३८ ॥ ऐसेनि सद्भावें कर्म करावें । हा तिजा अध्यावो जो देवें । निर्णय केला ते जाणावें । कर्मकांड येथ ॥ ३९ ॥ आणि तेंचि नित्यादिक । अज्ञानाचें आवश्यक । आचरतां मोचक । केवीं होय पां ॥ १४४० ॥ ऐसी अपेक्षा जालिया । बद्ध मुमुक्षुते आलिया । देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया । सांगितली ॥ ४१ ॥ जे देहवाचामानसें । विहित निपजे जें जैसें । तें एक ईश्वरोद्देशें । कीजे म्हणितलें ॥ ४२ ॥ हेंचि ईश्वरी कर्मयोगें । भजनकथनाचें खागें । आदरिलें शेषभागें । चतुर्थाचेनी ॥ ४३ ॥ तें विश्वरूप अकरावा । अध्यावो संपे जंव आघवा । तंव कर्में ईशु भजावा । हें जें बोलिलें ॥ ४४ ॥ तें अष्टाध्यायीं उघड । जाण येथें देवताकांड । शास्त्र सांगतसे आड । मोडूनि बोलें ॥ ४५ ॥ आणि तेणेंचि ईशप्रसादें । श्रीगुरुसंप्रदायलब्धें । साच ज्ञान उद्बोधे । कोंवळें जें ॥ ४६ ॥ अद्वेष्टादिप्रभृतिकीं । अथवा अमानित्वादिकीं । वाढविजे म्हणोनि लेखीं । बारावा गणूं ॥ ४७ ॥ तो बारावा अध्याय आदी । आणि पंधरावा अवधी । ज्ञानफळपाकसिद्धि । निरूपणासी ॥ ४८ ॥ म्हणौनि चहूंही

इहीं । ऊर्ध्वमूळांतीं अध्यायीं । ज्ञानकांड ये ठायीं । निरूपिजे ॥ ४९ ॥ एवं कांडत्रयनिरूपणी । श्रुतीचि हे कोडिसवाणी । गीतापद्यरत्नांचीं लेणीं । लेयिली आहे ॥ १४५० ॥ हें असो कांडत्रयात्मक । श्रुति मोक्षरूप फळ येक । बोभाये जें आवश्यक । ठाकावें म्हणौनि ॥ ५१ ॥ तयाचेनि साधनज्ञानेंसीं । वैर करी जो प्रतिदिवशीं । तो अज्ञानवर्ग षोडशीं । प्रतिपादिजे ॥ ५२ ॥ तोचि शास्त्राचा बोळावा । घेवोनि वैरी जिणावा । हा निरोपु तो सतरावा । अध्याय येथ ॥ ५३ ॥ ऐसा प्रथमालागोनि । सतरावा लाणी करूनी । आत्मनिश्वास विवरूनि । दाविला देवें ॥ ५४ ॥ तया अर्थजाता अशेषा । केला तात्पर्याचा आवांका । तो अठरावा हा देखा । कलशाध्यायो ॥ ५५ ॥ एवं सकळसांख्यसिंधु । श्रीभगवद्गीताप्रबंधु । हा औदार्ये आगळा वेदु । मूर्त जाण ॥ ५६ ॥ वेदु संपन्नु होय ठाईं । परी कृपणु ऐसा आनु नाहीं । जे कानीं लागला तिहीं । वर्णाचांचि ॥ ५७ ॥ येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां । अनवसरु मांडूनियां । राहिला आहे ॥ ५८ ॥ तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें । वेदु वेठला भलतेणें । सेव्य होआवया ॥ ५९ ॥ नव्हे अर्थें रिगोनि मनीं । श्रवणें लागोनि कानीं । जपमिषें वदनीं । वसोनियां ॥ १४६० ॥ गीतेचा पाठु जो जाणे । तयाचेनि सांगातीपणें । गीता लिहोनि वाहाणें । पुस्तकमिषें ॥ ६१ ॥ ऐसैसा मिसकटा । संसाराचां चोहटां । गवादी घालीत चोखटा । मोक्षसुखाची ॥ ६२ ॥ परी आकाशीं वसावया । पृथ्वीवरी बैसावया । रविदीप्ती राहाटावया । आवारु नभ ॥ ६३ ॥ तेवीं उत्तम अधम ऐसें । सेवितां कवणातेंही न पुसे । कैवल्यदानें सरिसें । निववीत जगा ॥ ६४ ॥ यालागीं मागिली कुटी । भ्याला वेदु गीतेचां पोटीं । रिगाला आतां गोमटी । कीर्ति पातला ॥ ६५ ॥ म्हणौनि वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्रीगीता । श्रीकृष्णें पांडुसुता । उपदेशिली ॥ ६६ ॥ परी वत्साचेनि वोरसें । दुभतें होय घरोद्देशें । जालें पांडवाचेनि मिषें । जगदुद्धरण ॥ ६७ ॥ चातकाचिये कणवे । मेघु पाणियेसिं धांवे । तेथ चराचर आघवें । निवालें जेवीं ॥ ६८ ॥ कां अनन्यगतीकमळा - । लागीं सूर्य ये वेळोवेळां । कीं सुखिया होईजे डोळां । त्रिभुवनींचां ॥ ६९ ॥ तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें । संसारायेवढें थोर ओझें । फेडिलें जगाचें ॥ १४७० ॥ सर्वशास्त्ररत्नदीप्ती । उजळिता हा त्रिजगती । सूर्यु नव्हे लक्ष्मीपती- । वक्त्राकाशींचा ॥ ७१ ॥ बाप कुळ तें पवित्र । जेथिंचा पार्थु या ज्ञाना पात्र । जेणें गीता केलें स्वतंत्र । आवारु जगा ॥ ७२ ॥ हें असो मग तेणें । सद्गुरुश्रीकृष्णें । पार्थाचें मिसळणें । आणिलें द्वैता ॥ ७३ ॥ पाठीं म्हणतसे पांडवा । शास्त्र हें मानलें कीं जीवा । तेथ येरु म्हणे देवा । आपुलिया कृपा ॥ ७४ ॥ तरी निधान जोडावया । भाग्य घडे गा धनंजया । परि जोडिलें भोगावया । विपायें होय ॥ ७५ ॥ पैं क्षीरसागरायेवढें । अविरजी दुधाचें भांडें । सुरा असुरां केवढें । मथितां जालें ॥ ७६ ॥ ते सायासही फळा आले । जें अमृतही डोळां देखिलें । परी वरिली चुकले । जतने ते ॥ ७७ ॥ तेथ अमरत्वा वोगरिलें । तें मरणाचिलागीं जालें । भोगों नेणतां जोडलें । ऐसें आहे ॥ ७८ ॥ नहुषु स्वर्गाधिपती

जाहला । परी राहाटीं भांबावला । तो भुजंगत्व पावला । नेणसी कायी ॥ ७९ ॥ म्हणौनि बहुत पुण्य तुवां । केलें तेणें धनंजया । आजि शास्त्रराजा इया । जालासि विषो ॥ १४८० ॥ तरी याचि शास्त्राचेनी । संप्रदायें पांघुरौनि । शास्त्रार्थु हा निकेनी । अनुष्ठीं हो ॥ ८१ ॥ एऱ्हवीं अमृतमंथना - । सारिखें होईल अर्जुना । जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ॥ ८२ ॥ गाय धड जोडे गोमटी । ते तैंचि पिवों ये किरीटी । जैं जाणिजे हातवटी । सांजवणीची ॥ ८३ ॥ तैसा गुरु प्रसन्नु होये । शिष्य विद्याही कीर लाहे । परी ते फळे संप्रदायें । उपासिलिया ॥ ८४ ॥ म्हणौनि शास्त्रीं जो इये । उचितु संप्रदायो आहे । तो ऐक आतां बहुवें । आदरेंसीं ॥ ८५ ॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन । न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥

तरी तुवां हें जें पार्था । गीताशास्त्र लाधलें आस्था । ते तपोहीना सर्वथा । सांगावें ना हो ॥ ८६ ॥ अथवा तापसुही जाला । परी गुरुभक्ती जो ढिला । तो वेदीं अंत्यजु वाळिला । तैसा वाळीं ॥ ८७ ॥ नातरी पुरोडाशु जैसा । न घापे वृद्ध तरी वायसा । गीता नेदी तैसी तापसा । गुरुभक्तिहीना ॥ ८८ ॥ का तपही जोडे देहीं । भजे गुरुदेवांचां ठायीं । परी आकर्णनीं नाहीं । चाड जरी ॥ ८९ ॥ तरी तो मागील दोन्हीं आंगीं । उत्तम होय कीर जगीं । परी या श्रवणालागी । योग्यु नोहे ॥ १४९० ॥ मुक्ताफळ भलतैसें । हो परी मुख नसे । तंव गुण प्रवेशे । तेथ कायी ॥ ९१ ॥ सागरु गंभीरु होये । हें कोण ना म्हणत आहे । परी वृष्टि वायां जाये । जाली तेथ ॥ ९२ ॥ धालिया दिव्यान्न सुवावें । मग जें वाया धाडावें । तें आर्ती कां न करावें । उदारपण ॥ ९३ ॥ म्हणौनि योग्य भलतैसें । होतु परी चाड नसे । तरी झणें वानिवसें । देसी हे तयां ॥ ९४ ॥ रूपाचा सुजाणु डोळा । वोडवूं ये कायि परिमळा । जेथ जें माने तें फळा । तेथचि ये गा ॥ ९५ ॥ म्हणौनि तपी भक्ति । पाहावे ते सुभद्रापति । परी शास्त्रश्रवणीं अनासक्ति । वाळावेचि ते ॥ ९६ ॥ नातरी तपभक्ति । होऊनि श्रवणीं आर्ति । आथी ऐसीही आयती । देखसी जरी ॥ ९७ ॥ तरी गीताशास्त्रनिर्मिता । जो मी सकळलोकशास्ता । तया मातें सामान्यता । बोलेल जो ॥ ९८ ॥ माझां सज्जनेसिं मातें । पैशून्याचेनि आव्हाते । येक आहाती तयांतें । योग्य न म्हण ॥ ९९ ॥ तयांची येर आघवी । सामग्री ऐसी जाणावी । दीपेवीण ठाणदिवी । रात्रीची जैसी ॥ १५०० ॥ अंग गोरें आणि तरुणें । वरि लेइलें आहे लेणें । परी येकलेनि प्राणें । सांडिलें जेवीं ॥ १ ॥ सोनयाचें सुंदर । निर्वाळिलें होय घर । परी सर्पांगना द्वार । रुंधलें आहे ॥ २ ॥ निपजे दिव्यान्न चोखट । परी माजीं असे काळकूट । हें असो मैत्री कपट - । गर्भिणी जैसी ॥ ३ ॥ तैसी तपभक्तिमेधा । तयाची जाण प्रबुद्धा । जो माझयांची कां निंदा । माझीचि करी ॥ ४ ॥ याकारणे धनंजया । तो भक्तु मेधावी तपिया । तरी नको बापा इया । शास्त्रा आतळों देवों ॥ ५ ॥ काय बहु बोलों निंदका । योग्य स्त्रष्टयाहीसारिखा । गीता हे कवतिका - । लागींही नेदी ॥ ६ ॥ म्हणौनि तपाचा धनुर्धरा । तळीं दाटोनि गाडोरा । वरी गुरुभक्तीचा पुरा । प्रासादु जो जाला ॥ ७ ॥ आणि

श्रवणेच्छेचा पुढां । दारवंटा सदा उघडा । वरी कलशु चोखडा । अनिंदारत्नांचा ॥ ८ ॥

य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति । भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशय: ॥ ६८ ॥

ऐशा भक्तालयीं चोखटीं । गीतारत्नेश्वरु हा प्रतिष्ठीं । मग माझिया संवसाटी । तुकसी जगीं ॥ ९ ॥ का जे एकाक्षरपणेंसी । त्रिमात्रकेचिये कुशीं । प्रणवु होता गर्भवासीं । सांकडला ॥ १५१० ॥ तो गीतेचिया बाहळीं । वेदबीज गेलें पाहाळीं । की गायत्री फुलीं फळीं । श्लोकांचां आली ॥ ११ ॥ ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्तां । अनन्यजीवना माता । बाळका जैसी ॥ १२ ॥ तैसी भक्तां गीतेसीं । भेटी करी जो आदरेंसीं । तो देहापाठीं मजसीं । येकचि होय ॥ १३ ॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तम: । भविता न च मे तस्मादन्य: प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥

आणि देहाचेंही लेणें । लेऊनि वेगळेपणें । असे तंव जीवेंप्राणें । तोचि पढिये ॥ १४ ॥ ज्ञानियां कर्मठां तापसां । यया खुणेचिया माणुसां – । माजीं तो एकु गा जैसा । पढिये मज ॥ १५ ॥ तैसा भूतळीं आघवां । आन न देखें पांडवा । जो गीता सांगे मेळावा । भक्तजनांचा ॥ १६ ॥ मज ईश्वराचेनि लोभें । हे गीता पढतां अक्षोभें । जो मंडन होय सभे । संतांचिये ॥ १७ ॥ नवपल्लवीं रोमांचितु । मंदानिळें कांपवितु । आमोदजळें वोलावितु । फुलांचे डोळे ॥ १८ ॥ कोकिळाकलरवाचेनि मिषें । सद्गद बोलवीत जैसें । वसंत कां प्रवेशे । मद्भक्तआरामीं ॥ १९ ॥ कां जन्माचें फळ चकोरां । होतु चंद्र ये अंबरा । नाना नवघन मयूरां । वो देत पावे ॥ १५२० ॥ तैसा सज्जनांचां मेळापीं । गीतापद्मरत्नीं उमपीं । वर्षे जो माझां रूपीं । हेतु ठेऊनि ॥ २१ ॥ मग तयाचेनि पाडें । पढियंतें मज फुडें । नाहींचि गा मागें पुढें । न्याहाळितां ॥ २२ ॥ अर्जुना हा ठायवरी । मी तयातें सूयें जिव्हारीं । जो गीतार्थाचें करी । परगुणें संतां ॥ २३ ॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयो: । ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्ट: स्यामिति मे मति: ॥ ७० ॥

पैं माझिया तुझिया मिळणीं । वाढीनली जे हे कहाणी । मोक्षधर्म कां जिणीं । आलासे जेथें ॥ २४ ॥ तो हा सकळार्थप्रदु । आम्हां दोघांचा संवादु । न करितां पदभेदु । पाठेंचि जो पढे ॥ २५ ॥ तेणें ज्ञानानळीं प्रदीप्तीं । मूळ अविद्येचिया आहुती । तोषविला होय सुमती । परमात्मा मी ॥ २६ ॥ घेऊनि गीतार्थ उगाणा । ज्ञानिये जें विचक्षणा । ठाकिती तें गाणावाणा । गीतेचा तो लाहे ॥ २७ ॥ गीतापाठकासि असे । फळ अर्थज्ञाचि सरिसें । गीतामाउलिये कीं नसे । जाणेंतान्हें ॥ २८ ॥

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नर: । सोऽपि मुक्त: शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ ७१ ॥

आणि सर्वमार्गीं निंदा । सांडूनिया आस्था पैं शुद्धा । गीताश्रवणीं श्रद्धा । उभारी जो ॥ २९ ॥ तयाचां श्रवणपुटीं । गीतेचीं अक्षरें जंव पैठीं । होतीना तंव उठाउठीं । पळेचि पाप ॥ १५३० ॥ अटवियेमाजीं जैसा । वन्हि रिघतां सहसा । लंघिती का दिशा । वनौकें तियें ॥ ३१ ॥ का

उदयाचळकुळीं । झळकतां अंशुमाळी । तिमिरें अंतराळीं । हारपती ॥ ३२ ॥ तैसा कानाचां महाद्वारीं । गीता गजर जेथ करी । तेथ सृष्टींचिये आदीवरी । जायचि पाप ॥ ३३ ॥ ऐसी जन्मवेली धुवट । होय पुण्यरूप चोखट । याहीवरी अचाट । लाहे फळ ॥ ३४ ॥ जे इये गीतेचीं अक्षरें । जेतुलीं कां कर्णद्वारें । रिघती तेतुले होती पुरे । अश्वमेध कीं ॥ ३५ ॥ म्हणौनि श्रवणें पापें जाती । आणि धर्म धरी उन्नती । तेणें स्वर्गराज्यसंपत्ति । लाहेचि शेखीं ॥ ३६ ॥ तो पैं मज यावयालागीं । पहिलें पेणें करी स्वर्गी । मग आवडे तंव भोगी । पाठीं मजचि मिळे ॥ ३७ ॥ ऐसी गीता धनंजया । ऐकतया आणि पढतया । फळे महानंदें मियां । बहु काय बोलों ॥ ३८ ॥ याकारणें हें असो । परी जयालागीं शास्त्रातिसो । केला तें तंव तुज पुसों । काज तुझें ॥ ३९ ॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा । कच्चिदज्ञानसम्मोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥

तरी सांग पां पांडवा । हा शास्त्रसिद्धांतु आघवा । तुज एकचित्तें फावा । गेला आहे ॥ १५४० ॥ आम्ही जैसें जया रीती । उगाणिलें कानांचां हातीं । येरीं तैसेंचि तुझां चित्तीं । पैठें केलें कीं ॥ ४१ ॥ अथवा माझारीं । गेलें सांडविखुरी । किंवा उपेक्षेवरी । वाळुनि सांडिलें ॥ ४२ ॥ जैसें आम्ही सांगितलें । तैसेंचि हृदयीं पावलें । तरी सांग पां वहिलें । पुसेन तें मी ॥ ४३ ॥ हां गा स्वाज्ञानजनितें । मागिलें मोहें तूतें । भुलविलें तो येथे । असे कीं नाहीं ॥ ४४ ॥ हें बहु पुसों काई । सांगे तूं आपलां ठाईं । कर्माकर्म कांहीं । देखतासी ॥ ४५ ॥ पार्थु स्वानंदैकरसें । विरेल ऐसा भेददशे । आणिला येणें मिषें । प्रश्नाचेनि ॥ ४६ ॥ पूर्णब्रह्म जाला पार्थु । तरी पुढील साधावया कार्यार्थु । मर्यादा श्रीकृष्णनाथु । उल्लंघों नेदी ॥ ४७ ॥ एऱ्हवीं आपुलें करणे । सर्वज्ञ काय तो नेणे । परी केलें पुसणें । याचिलागीं ॥ ४८ ॥ एवं करोनियां प्रश्न । नसतेंचि अर्जुनपण । आणूनियां जालें पूर्णपण । तें बोलवी स्वयें ॥ ४९ ॥ मग क्षीराब्धीतें सांडितु । गगनीं पुंजुमंडितु । निवडे जैसा न निवडितु । पूर्णचंद्र ॥ १५५० ॥ तैसा ब्रह्म मी हें विसरे । तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे । हेंही सांडी तरी विरे । ब्रह्मपणही ॥ ५१ ॥ ऐसा मोडतु मांडतु ब्रह्मे । तों दुःखे देहाचिये सीमे । मी अर्जुन येणें नामें । उभा ठेला ॥ ५२ ॥ मग कापतां करतळी । दडपूनि रोमावळी । पुलिका स्वेदजळीं । जिरऊनियां ॥ ५३ ॥ प्राणक्षोभें डोलतया । आंगा आंगचि टेंकया । सूनि स्तंभु चाळया । भुलौनियां ॥ ५४ ॥ नेत्रयुगुळाचेनि वोतें । आनंदामृताचें भरितें । वोसंडत तें मागुतें । काढुनियां ॥ ५५ ॥ विविधा औत्सुक्यांची दाटी । चीप दाटत होती कंठीं । ते करुनियां पैठी । हृदयामाजीं ॥ ५६ ॥ वाचेचें वितुळणें । सांवरूनि प्राणें । अक्रमाचें श्वसणें । ठेऊनि ठायीं ॥ ५७ ॥

अर्जुन उवाच : नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥

मग अर्जुन म्हणे काय देवो । पुसताति आवडे मोहो । तरी तो सकुटुंब गेला जी ठावो । घेऊनि आपला ॥ ५८ ॥ पासीं येऊनि दिनकरें । डोळ्यातें आंधारें । पुसिजे हें कायि सरे । कोणे गांवीं

॥ ५९ ॥ तैसा तूं श्रीकृष्णराया । आमुचिया डोळयां । गोचर हेंचि कायिसया । न पुरे तंव ॥ १५६० ॥ परी लोभें मायेपासूनी । तें सांगसी तोंड भरूनी । जें कायिसेनिही करूनी । जाणूं नयें ॥ ६१ ॥ आतां मोह असे कीं नाहीं । हें ऐसें जी पुससी काई । कृतकृत्य जाहलों पाहीं । तुझेपणें ॥ ६२ ॥ गुंतलों होतों अर्जुनगुणें । तो मुक्त जालों तुझेपणें । आतां पुसणे सांगणे । दोन्हीं नाहीं ॥ ६३ ॥ मी तुझेनि प्रसादें । लाधलेनि आत्मबोधें । मोहाचे तया कांदे । नेदीच उरों ॥ ६४ ॥ आतां करणें का न करणें । हें जेणें उठी दुजेपणें । ते तूं वांचूनि नेणें । सर्वत्र गा ॥ ६५ ॥ येविषयीं माझां ठायीं । संदेहाचें नुरेचि कांहीं । त्रिशुद्धी कर्म जेथ नाहीं । तें मी जालों ॥ ६६ ॥ तुझेनि मज मी पावोनि । कर्तव्य गेलें निपटूनि । परी आज्ञा तुझी वांचोनी । आन नाहीं प्रभो ॥ ६७ ॥ कां जें दृश्य दृश्यातें नाशी । जें दुजें द्वैतातें ग्रासी । जें एक परी सर्वदेशीं । वसवी सदा ॥ ६८ ॥ जयाचेनि संबंधें बंधु फिटे । जयाचिया आशा आस तुटे । जें भेटलिया सर्व भेटे । आपणपांचि ॥ ६९ ॥ तें तूं गुरुलिंग जी माझें । जें येकलेपणींचें विरजें । जयालागीं वोलांडिजे । अद्वैतबोधु ॥ १५७० ॥ आपणचि होऊनि ब्रह्म । सारिजे कृत्याकृत्यांचें काम । मग कीजे का निःसीम । सेवा जयाची ॥ ७१ ॥ गंगा सिंधु सेवूं गेली । पावतांचि समुद्र जाली । तेवीं भक्तां सेल दिधली । निजपदाची ॥ ७२ ॥ तो तूं माझा निरुपचारु । श्रीकृष्णा सेव्य सद्गुरु । मा ब्रह्मतेचा उपकारु । हाचि कां मानी ॥ ७३ ॥ जें मज तुम्हां आड । होतें भेदाचें कवाड । तें फेडोनि केलें गोड । सेवासुख ॥ ७४ ॥ तरी आतां तुझी आज्ञा । सकळदेवाधिदेवराज्ञा । करीन देईं अनुज्ञा । भलतियेविषीं ॥ ७५ ॥ यया अर्जुनाचिया बोला । देवो नाचे सुखें भुलला । म्हणे विश्वफळा जाला । फळ हा मज ॥ ७६ ॥ उणेनि उमचला सुधाकरु । देखुनि आपला कुमरु । मर्यादा क्षीरसागरु । विसरेचिना ॥ ७७ ॥ ऐसें संवादाचां बहुलां । लग्न दोघांचिया आंतुला । लागलें देखोनि जाला । निर्भरु संजयो ॥ ७८ ॥ तेणें उचंबळलेपणें । संजय धृतराष्ट्रातें म्हणे । जी कैसें बादरायणें । रक्षिलों दोघे ॥ ७९ ॥ आजि तुमतें अवधारा । नाहीं चर्मचक्षूही संसारा । कीं ज्ञानदृष्टिव्यवहारा । आणिलेती ॥ १५८० ॥ आणि रथींचिये राहाटी । घेईजो घोडेयासाठीं । तया आम्हां या गोष्टी । गोचरा होती ॥ ८१ ॥ वरी जुंझाचें निर्वाण । मांडलें असे दारुण । दोहीं हारीं आपण । हारपिजे जैसें ॥ ८२ ॥ येवढा जिये सांकडा । कैसा अनुग्रहो पैं गाढा । जे ब्रह्मानंदु उघडा । भोगवीतसे ॥ ८३ ॥ ऐसें संजय बोलिला । परी न द्रवे येरु उगला । चंद्रकिरणीं शिवतला । पाषाणु जैसा ॥ ८४ ॥ हे देखोनि तयाची दशा । मग करीचि ना सरिसा । परी सुखें जाला पिसा । बोलतसे ॥ ८५ ॥ भुलविला हर्षवेगें । म्हणौनि धृतराष्ट्रा सांगे । एऱ्हवीं नव्हे तयाजोगें । हें कीर जाणे ॥ ८६ ॥

संजय उवाच : इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः । संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥

मग म्हणे पैं कुरुराजा । ऐसा भ्रातृपुत्र तो तुझा । बोलिला तें अधोक्षजा । गोड जालें ॥ ८७ ॥ अगा पूर्वापर सागर । या नामासीचि सिनार । येर आघवें तें नीर । एक जैसें ॥ ८८ ॥ तैसा श्रीकृष्ण

पार्थ ऐसें । हें आंगाचिपासीं दिसे । मग संवादीं जी नसे । कांहींचि भेदु ॥ ८९ ॥ पैं दर्पणाहूनि चोखें । दोन्हीं होती सन्मुखें । तेथ येरीं येर देखे । आपणपें जैसें ॥ १५९० ॥ तैसा देवेंसीं पंडुसुतु । आपणपें देवीं देखतु । पांडवेंसीं देखे अनंतु । आपणपें पार्थी ॥ ९१ ॥ देवो देवभक्तालागीं । जिये विवरुनि देखे आंगीं । येरुही तियेची भागीं । दोन्ही देखे ॥ ९२ ॥ आणिक कांहींच नाहीं । म्हणौनि करिती काई । दोघे येकपणें पाहीं । नांदताती ॥ ९३ ॥ आतां भेदु जरी मोडे । तरी प्रश्नोत्तर का घडे । ना भेदुचि तरी जोडे । संवादसुख कां ॥ ९४ ॥ ऐसें बोलतां दुजेपणें । संवादी द्वैत गिळणें । तें ऐकिलें बोलणें । दोघांचें मियां ॥ ९५ ॥ उटूनि दोन्ही आरसे । वोडविलीया सरिसे । कोण कोणा पहातसे । कल्पावें पां ॥ ९६ ॥ कां दीपासन्मुखु । ठेविलया दीपकु । कोण कोणा अर्थिकु । कोण जाणे ॥ ९७ ॥ नाना अर्कापुढें अर्कु । उदयलिया आणिकु । कोण म्हणे प्रकाशकु । प्रकाश्य कवण ॥ ९८ ॥ हें निर्धारूं जातां फुडें । निर्धारासि ठक पडे । ते दोघे जाले येवढे । संवादें सरिसे ॥ ९९ ॥ जी मिळतां दोन्ही उदकें । माजीं लवण वारूं ठाके । कीं तयासीही निमिखें । तेंचि होय ॥ १६०० ॥ तैसें श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही । संवादले तें मनीं । धरिता मजही वानी । तेचि होतसे ॥ १ ॥ ऐसें म्हणे ना मोटकें । तंव हिरोनि सात्त्विकें । आठव नेला नेणों कें । संजयपणाचा ॥ २ ॥ रोमांच जंव फरके । तंव तंव आंग सुरके । स्तंभ स्वेदांतें जिंके । एकला कंपु ॥ ३ ॥ अद्वयानंदपरिसें । दिठी रसमय जाली असे । ते अश्रु नव्हती जैसें । द्रवत्वचि ॥ ४ ॥ नेणो काय न माय पोटीं । काय नेणों गुंफे कंठीं । वागर्था पडत मिठी । उससांचिया ॥ ५ ॥ किंबहुना सात्त्विकां आठां । चाचरू मांडतां उमेठा । संजयो जालासें चोहटा । संवादसुखाचा ॥ ६ ॥ तया सुखाची ऐसी जाती । जे आपणचि धरी शांती । मग पुढती देहस्मृती । लाधली तेणें ॥ ७ ॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् । योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥ ७५ ॥

तेव्हां बैसतेनि आनंदें । म्हणे जी जें उपनिषदें । नेणती तें व्यासप्रसादें । ऐकिलें मियां ॥ ८ ॥ ऐकतांचि ते गोठी । ब्रह्मत्वाची पडिली मिठी । मीतूंपणेंसीं दिठी । विरोनि गेली ॥ ९ ॥ हे आघवेचि का योग । जया ठाया येती मार्ग । तयाचें वाक्य सवंग । केलें मज व्यासें ॥ १६१० ॥ अहो अर्जुनाचेनि मिषें । आपणपेंचि दुजें ऐसें । नटोनि आपणया उद्देशें । बोलिले जें देव ॥ ११ ॥ तेथ कीं माझे श्रोत्र । पाटाचे जाले जी पात्र । काय वानूं स्वतंत्र । सामर्थ्य गुरूचें ॥ १२ ॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् । केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥

हें बोलतां विस्मित होये । तेणेंचि मोडावला ठाये । रत्नीं की रत्नकिळा ये । झांकोळित जैसी ॥ १३ ॥ हिमवंतींचीं सरोवरें । चंद्रोदयीं होती काश्मीरें । मग सूर्यागमीं माघारें । द्रवत्व ये ॥ १४ ॥ तैसा शरीराचिया स्मृती । तो संवादु संजय चित्तीं । धरी आणि पुढती । तेंचि होय ॥ १५ ॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः । विस्मयो मे महान्राजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥ ७७ ॥

मग उठोनि म्हणे नृपा । श्रीहरीचिया विश्वरूपा । देखिलया उगा कां पां । असो लाहासी

॥ १६ ॥ न देखणेनि जें दिसे । नाहींपणेंचि जें असे । विसरें आठवे तें कैसें । चुकवूं आतां ॥ १७ ॥ देखोनि चमत्कारु । कीजे तो नाहीं पैसारु । मजहीसकट महापुरु । नेत आहे ॥ १८ ॥ ऐसा श्रीकृष्णार्जुन - । संवादसंगमीं स्नान । करूनि देतसे तिळदान । अहंतेचें ॥ १९ ॥ तेथ असंवरें आनंदें । अलौकिकही कांहीं स्फुंदे । श्रीकृष्ण म्हणे सद्गदें । वेळोवेळां ॥ १६२० ॥ या अवस्थांची कांहीं । कौरवातें परी नाहीं । म्हणौनि रायें तें कांहीं । कल्पावें जंव ॥ २१ ॥ तंव जाला सुखलाभु । आपणपां करूनि स्वयंभु । बुझविला अवष्टंभु । संजयें तेणें ॥ २२ ॥ तेथ कोणी येकी अवसरी । होआवी ते करूनि दुरी । रावो म्हणे संजया परी । कैशी तुझी गा ॥ २३ ॥ तेणें तूतें येथें व्यासें । बैसविलें कासया उद्देशें । अप्रसंगामाजीं ऐसें । बोलसी काई ॥ २४ ॥ रानींचें राऊळा नेलिया । दाही दिशा मानी सुनिया । कां रात्री होय पाहलया । निशाचरां ॥ २५ ॥ जो जेथिंचे गौरव नेणे । तयासि तें भिंगुळवाणें । म्हणौनि अप्रसंगु तेणें । म्हणावा कीं तो ॥ २६ ॥ म्हणें सांगें प्रस्तुत । उदयलेंसे जें उत्कळित । तें कोणासि बा रे जैत । देईल शेखीं ॥ २७ ॥ एन्हवीं विशेषें बहुतेक । आमुचें ऐसें मानसिक । जे दुर्योधनाचे अधिक । प्रताप सदा ॥ २८ ॥ आणि येरांचेनि पाडें । दळही यांचें देव्हडें । म्हणौनि जैत फुडें । आणील ना तें ॥ २९ ॥ आम्हां तंव गमे ऐसे । मा तुझें जोतीष कैसें । तें नेणो संजया असे । तैसें सांग पां ॥ १६३० ॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥

यया बोला संजयो म्हणे । जी येरयेरांचें मी नेणें । परी आयुष्य तेथें जिणें । हें फुडें कीं गा ॥ ३१ ॥ चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथें अंबिका । संत तेथें विवेका । असणें कीं जी ॥ ३२ ॥ रावो तेथें कटक । सौजन्य तेथें सोइरीक । वन्हि तेथें दाहक । सामर्थ्य की ॥ ३३ ॥ दया तेथें धर्मु । धर्मु तेथें सुखागमु । सुखीं पुरुषोत्तमु । असे जैसा ॥ ३४ ॥ वसंत तेथें वनें । वन तेथे सुमनें । सुमनीं पालिंगनें । सारंगांचीं ॥ ३५ ॥ गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथी जैसें ॥ ३६ ॥ भाग्य तेथ विलासु । सुख तेथें उल्लासु । हें असो तेथ प्रकाशु । सूर्य जेथें ॥ ३७ ॥ तैसें सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी का सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । तेथ लक्ष्मी ॥ ३८ ॥ आणि आपलेनि कांतेंसीं । ते जगदंबा जयापासीं । अणिमादिकी काय दासी । नव्हती तयातें ॥ ३९ ॥ कृष्ण विजयस्वरूप निजांगें । तो राहिला असे जेणें भागें । तैं जयो लागेंवेगें । तेथेंचि आहे ॥ १६४० ॥ विजयी नामें अर्जुन विख्यातु । विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु । श्रियेसीं विजय निश्चितु । तेथेंचि असे ॥ ४१ ॥ तयाचिये देशींचां झाडीं । कल्पतरूतें होडी । न जिणावें कां येवढी । मायबापु असतां ॥ ४२ ॥ ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें कां नोहावे । तिये भूमिके कां न यावें । सुवर्णत्व ॥ ४३ ॥ तयाचिया गांवींचिया । नदी अमृतें वाहाविया । नवल कायि राया । विचारीं पां ॥ ४४ ॥ तयाचे बिसाट शब्द । सुखें म्हणों येती वेद । सदेह सच्चिदानंद । कां नोहावा तो ॥ ४५ ॥ पैं स्वर्गापवर्ग दोन्ही । इयें पदें तया अधीनीं । जे श्रीकृष्ण बाप जननी । कमळा जया

॥ ४६ ॥ म्हणौनि जिया बाहीं उभा । तो लक्ष्मियेचा वल्लभा । तेथ सर्वसिद्धी स्वयंभा । येर नेणों ॥ ४७ ॥ आणि समुद्राचा मेघु । उपेगें तयाहूनि चांगु । तैसा पार्थीं आजि लागु । आहे तये ॥ ४८ ॥ कनकत्वदीक्षागुरु । लोहा परिसु होय किरु । परी जगा पोसिता व्यवहारु । तेंचि जाणे ॥ ४९ ॥ येथ गुरुत्वा होतसे उणें । ऐसे झणें कोण्ही म्हणे । वन्हि प्रकाश दीपपणें । प्रकाशी आपला ॥ १६५० ॥ तैसा देवाचिया शक्ती । पार्थु देवासीचि बहुती । परी माने इये स्तुती । गौरव असे ॥ ५१ ॥ आणि पुत्रें मी सर्व गुणीं । जिणावा हे बापा शिराणी । तरी ते शार्ङ्गपाणी । फळा आली ॥ ५२ ॥ किंबहुना ऐसा नृपा । पार्थु जालासे कृष्णकृपा । तो जयाकडे साक्षेपा । रीती आहे ॥ ५३ ॥ तोचि गा विजयासि ठावो । येथ तुज कोण संदेहो । तेथ न ये तरी वावो । विजयोचि होय ॥ ५४ ॥ म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु । जेथ तो पांडुचा सुतु । तेथ विजय समस्तु । अभ्युदयो तेथ ॥ ५५ ॥ जरी व्यासाचेनि साचें । धिरे मन तुमचें । तरी या बोलाचें । ध्रुवचि माना ॥ ५६ ॥ जेथ तो श्रीवल्लभु । जेथ भक्तकदंबु । तेथ सुख आणि लाभु । मंगळाचा ॥ ५७ ॥ या बोला आन होये । तरी व्यासाचा अंकु न वाहे । ऐसें गाजोनि बाहे । उभिली तेणें ॥ ५८ ॥ एवं भारताचा आवांका । आणून श्लोका येका । संजयें कुरुनायका । दिधला हातीं ॥ ५९ ॥ जैसा नेणों केवढा वन्हि । परी गुणाग्रीं ठेऊनी । आणिजे सूर्याची हानी । निस्तरावया । १६६० ॥ तैसें शब्दब्रह्म अनंत । जालें सवालक्ष भारत । भारताचें शतें सात । सर्वस्व गीता ॥ ६१ ॥ तयाही सातां शतांचा । इत्यर्थु हा श्लोक शेषींचा । व्यासशिष्य संजयाचा । पूर्णोद्गारु जो ॥ ६२ ॥ येणें ऐकेंचि श्लोकें । राहे तेणें असकें । विद्याजाताचें निकें । जिंतिलें होय ॥ ६३ ॥ ऐसेयां श्लोकां शतें सात । गीतेचीं पदें आंगें वाहत । पदें म्हणों कीं परमामृत । गीताकाशींचें ॥ ६४ ॥ कीं आत्मराजाचिये सभे । गीते वोडवले खांबे । मज श्लोक प्रतिभे । ऐसे येत ॥ ६५ ॥ कीं गीता हे सप्तशती । मंत्रप्रतिपाद्य भगवती । मोहमहिषा मुक्ती । आनंदली असे ॥ ६६ ॥ म्हणौनि मनें कायें वाचा । जो सेवक होईल इयेचा । तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ॥ ६७ ॥ की अविद्यातिमिररोखें । श्लोक सूर्यातें पैजा जिंकें । ऐसे प्रकाशिले गीतामिखें । रायें श्रीकृष्णें ॥ ६८ ॥ कीं श्लोकाक्षरद्राक्षलता । मांडव जाली आहे गीता । संसारपथश्रांता । विसंवावया ॥ ६९ ॥ कीं सभाग्यसंतीं भ्रमरीं । केले ते श्लोककल्हारीं । श्रीकृष्णाख्यसरोवरीं । सासिन्नली हे ॥ १६७० ॥ की श्लोक नव्हती आन । गमे गीतेचें महिमान । वाखाणिते बंदिजन । उदंड जैसे ॥ ७१ ॥ कीं श्लोकाचिया आवारा । सात शतें करूनि सुंदरा । सर्वागम गीतापुरा । वसों आले ॥ ७२ ॥ कीं निजकांता आत्मया । आवडी गीता मिळावया । श्लोक नव्हती बाह्या - । पसरु का जो ॥ ७३ ॥ कीं गीताकमळींचे भृंग । हे गीतासागरतरंग । की हरीचे तुरंग । गीतारथींचे ॥ ७४ ॥ कीं श्लोक सर्वतीर्थसंघातु । आला श्रीगीतेगंगेआंतु । जे अर्जुन सिंहस्थु । जाला म्हणौनि ॥ ७५ ॥ कीं नोहे हे श्लोकश्रेणी । अचिंत्यचित्तचिंतामणी । कीं निर्विकल्पां लावणी । कल्पतरूंची

॥ ७६ ॥ ऐसियां शतें सात श्लोकां । परी आगळा येकयेका । आतां कोण वेगळिका । वानावा पां ॥ ७७ ॥ दीपा आगिलु मागिलु । सूर्य धाकटा वडिलु । अमृतसिंधु खोलु । उथळु कायसा ॥ ७८ ॥ तान्ही आणि पारठी । इया कामधेनूतें दिठी । सूनि जैसिया गोठी । कीजती ना ॥ ७९ ॥ तैसे पहिले सरते । श्लोक न म्हणावे गीते । जुनीं नवीं पारिजातें । आहाती काई ॥ १६८० ॥ आणि श्लोका पाडु नाहीं । हें कीर समर्थु काई । येथ वाच्य वाचकही । भागु न धरी ॥ ८१ ॥ जे इये शास्त्रीं येकु । श्रीकृष्णचि वाच्य वाचकु । हें प्रसिद्ध जाणे लोकु । भलताही ॥ ८२ ॥ येथें जें अर्थें तेंचि पाठें । जोडे येवढेंनि धटे । वाच्यवाचकें येकवटें । साधित शास्त्र ॥ ८३ ॥ म्हणौनि मज कांहीं । समर्थनीं आतां विषो नाहीं । गीता जाणा हे वाङ्मयी । श्रीमूर्ति प्रभूची ॥ ८४ ॥ शास्त्र वाच्यें अर्थें फळे । मग आपण मावळे । तैसें नव्हे हें सगळें । परब्रह्मचि ॥ ८५ ॥ तैसा विश्वाचिया कृपा । करूनि महानंद सोपा । अर्जुनव्याजें रूपा । आणिला देवें ॥ ८६ ॥ चकोराचेनि निमित्तें । तिन्ही भुवनें संतप्तें । निवविलीं कळावंतें । चंद्रे जेवीं ॥ ८७ ॥ कां गौतमाचेनि मिषें । कळिकाळज्वरितादोषें । पाणिढाळु गिरीशें । गंगेचा केला ॥ ८८ ॥ तैसें गीतेचें हें दुभतें । वत्स करूनि पार्थातें । दुभिनली जगापुरतें । श्रीकृष्णगाय ॥ ८९ ॥ येथें जीवें जरी नाहाल । तरी हेंचि कीर होआल । नातरी पाठमिषें तिंबाल । जीभचि जरी ॥ १६९० ॥ तरी लोह एकें अंशें । झगटलिया परिसें । येरीकडे आपैसें । सुवर्ण होय ॥ ९१ ॥ तैसी पाठाची ते वाटी । श्लोकपाद लावा ना जंव वोठीं । तंव ब्रह्मतेची पुष्टी । येईल आंगा ॥ ९२ ॥ ना येणेसीं तोंड वाकडें । करूनि ठाकाल कानवडें । तरी कानींही घेता पडे । तेचि लेख ॥ ९३ ॥ जे हे श्रवणें पाठें अर्थें । गीता नेदी मोक्षाआरौतें । जैसा समर्थ दाता कोणातें । नास्ति न म्हणे ॥ ९४ ॥ म्हणौनि जाणतया सवा । गीताचि येकी सेवा । काय कराल आघवां । शास्त्रीं येरीं ॥ ९५ ॥ आणि कृष्णार्जुनीं मोकळी । गोठी चावळिली जे निराळीं । ते श्रीव्यासें केली करतळीं । घेवों ये ऐसी ॥ ९६ ॥ बाळकातें वोरसें । माय जैं जेवऊं बैसे । तैं तया ठाकती तैसे । घांस करी ॥ ९७ ॥ कां अफाटा समीरणा । आपैतेपण शाहाणां । केलें जैसें विंजणा । निर्मूनियां ॥ ९८ ॥ तैसें शब्दें जें न लभे । तें घडूनियां अनुष्टुभें । स्त्रीशूद्रादि प्रतिभे । सामाविलें ॥ ९९ ॥ स्वातीचेनि पाणियें । न होती जरी मोतिये । तरी अंगीं सुंदराचिये । का शोभते तें ॥ १७०० ॥ नादु वाद्या न येतां । तरी कां गोचरु होता । फुलें न होतां घेपता । आमोदु केवीं ॥ १ ॥ गोडी न होतीं पक्वान्नें । तरी कां फावती रसनें । दर्पणावीण नयनें । नयनु का दिसे ॥ २ ॥ द्रष्टा श्रीगुरुमूर्ती । न रिगता दृश्यपंथी । तरी काह्या उपास्ती । आकळता तो ॥ ३ ॥ तैसें वस्तु जें असंख्यात । तया संख्या शतें सात । न होती तरी कोणा येथ । फावों शकतें ॥ ४ ॥ मेघ सिंधूचें पाणी वाहे । तरी जग तयातेंचि पाहे । कां उमप तें नोहे । ठाकतें कोण्हा ॥ ५ ॥ आणि वाचा जें न पवे । तें हे श्लोक न होते बरवे । तरी कानें मुखें फावे । ऐसें कां होतें ॥ ६ ॥ म्हणौनि व्यासाचा हा थोरु । विश्वासि जाला उपकारु । श्रीकृष्णउक्ती

आकारु । ग्रंथाचा केला ॥ ७ ॥ आणि तोचि हा मी आतां । व्यासांचीं पदें पाहतां पाहतां । आणिला श्रवणपथा । मन्हाठिया ॥ ८ ॥ व्यासादिकांचे उन्मेख । राहाटती जेथ साशंक । तेथ मीही रंक येक । वाचाळी करी ॥ ९ ॥ परी गीता ईश्वरु भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा । तरी माझिया दूर्वादळा । ना न म्हणे कीं ॥ १७१० ॥ आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा । तेथ काय मुरकुटा । वारिजतसे ॥ ११ ॥ पांख फुटे पाखिरुं । नुडे तरी नभींच थिरू । गगन क्रमी सत्वरु । तो गरुडही तेथ ॥ १२ ॥ राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शहाणें । आणिकें काय कोणें । चालावेंचिना ॥ १३ ॥ जी आपुलेनि अवकाशें । अगाध जळ घेपे कलशें । चुळीं चूळपणा ऐसें । भरूनि न निघे ॥ १४ ॥ दिवियेचां आंगीं थोरी । तरी ते बहु तेज धरी । वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ १५ ॥ जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाश आभासे । थिल्लरीं थिल्लराऐसें । बिंबेचि पैं ॥ १६ ॥ तेवीं व्यासादिक महामती । वावरों येती इये ग्रंथीं । मा आम्ही ठाकों ये युक्ती । न मिळे कीर ॥ १७ ॥ जिये सागरी जळचरें । संचरती मंदराकारें । तेथ देखों शफरें येरें । पोहों लाहती ॥ १८ ॥ अरुण आंगाजवळिके । म्हणौनि सूर्यातें देखे । मा भूतळींची न देखे । मुंगी काई ॥ १९ ॥ यालागीं आम्हां प्राकृतां । देशिकारें बंधें गीता । म्हणणें हें अनुचिता । कारण नोहे ॥ १७२० ॥ आणि बापु पुढां जाये । ते घेत पाऊलाचीं सोये । बाळ ये तरी न लाहे । पावों कायी ॥ २१ ॥ तैसा व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकारांतें वाट पुसतु । अयोग्यही मी न पवतु । के जाईन ॥ २२ ॥ आणि पृथ्वी जयाचिया क्षमा । नुबगे स्थावरजंगमा । जयाचेनि अमृतें चंद्रमा । निववी जग ॥ २३ ॥ जयाचें आंगिक अंशिकें । तेज लाहोनि अर्कें । आंधाराचें सावाइकें । लोटिजत आहे ॥ २४ ॥ समुद्रा जयाचें तोय । तोया जयाचें माधुर्य । माधुर्या सौंदर्य । जयाचेनि ॥ २५ ॥ पवना जयाचें बळ । आकाश जेणें पघळ । ज्ञान जेणें उजाळ । चक्रवर्ती ॥ २६ ॥ वेद जेणें सुभाष । सुख जेणें सोल्लास । हे असो रूपस । विश्व जेणें ॥ २७ ॥ तो सर्वोपकारी समर्थु । सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु । राहाटत असे मजही आंतु । रिगोनियां ॥ २८ ॥ आतां आयती गीता जगीं । मी सांगें मन्हाठिया भंगीं । येथ कें विस्मयालागीं । ठावो आहे ॥ २९ ॥ श्रीगुरूचेनि नांवें माती । डोंगरी जयापासी होती । तेणें कोळियें त्रिजगतीं । येकवद केली ॥ १७३० ॥ चंदनें वेधलीं झाडें । जालीं चंदनाचेनि पाडें । वशिष्ठें मांडली कीं भांडे । भानूसीं शाटी ॥ ३१ ॥ मा मी तव चित्ताथिला । आणि श्रीगुरु ऐसा दादुला । तो दिठीवेनि आपुलां । बैसवी पदीं ॥ ३२ ॥ आधींचि देखणी दिठी । वरी सूर्य पुरवी पाठी । ते न दिसे ऐसी गोठी । केंही आहे ॥ ३३ ॥ म्हणोनि माझे नीच नवे । श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे । गुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे ॥ ३४ ॥ याकारणें मियां । गीतार्थ मन्हाठिया । केला लोकां यया । दिठीचा विषो ॥ ३५ ॥ परी मन्हाठे बोल रंगें । कवळिता पैं गीतांगें । तैं गातयाचेनि पांगें । हे काडता नोहे ॥ ३६ ॥ म्हणौनि गीता गावों म्हणे । पैं गाणिवें होतीं लेणें । ना मोकळे तरी उणें ।

गीताही न आणिती ॥ ३७ ॥ सुंदर आंगी लेणें न सूये । तैं तो मोकळा शृंगारु होये । ना लेइलें तरी आहे । तैसें कें उचित ॥ ३८ ॥ कां मोतियांची जैसी जाती । सोनयाही मान देती । नातरी मानवती । अंगेंचि सडीं ॥ ३९ ॥ नाना गुंफिलीं कां मोकळीं । उणीं न होती परिमळीं । वसंतागमींचीं वाटोळीं । मोगरीं जैसीं ॥ १७४० ॥ तैसा गाणिवेते मिरवी । गीतेवीणही रंगु दावी । तो लाभाचा प्रबंधु ओवीं । केला मियां ॥ ४१ ॥ तेणें आबालसुबोधें । वोवीयेचेनि प्रबंधें । ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंथिलीं ॥ ४२ ॥ आतां चंदनाचां तरुवरीं । परिमळालागीं फूलवरी । पारुखणें जियापरी । लागेना कीं ॥ ४३ ॥ तैसा प्रबंधु हा श्रवणीं । लागतखेंवो समाधि आणी । ऐकिल्याही वाखाणी । काय व्यसन न लवी ॥ ४४ ॥ पाठ करितां व्याजें । पांडित्यें येती वेषजे । तैं अमृतातें नेणिजे । फावलिया ॥ ४५ ॥ तैसेनि आइतेपणें । कवित्व जालें हें उपेणें । मनन निदिध्यास श्रवणें । जिंतिलें आतां ॥ ४६ ॥ हे स्वानंदभोगाची सेल । भलतयासीचि देईल । सर्वेंद्रियां पोषवील । श्रवणाकरवीं ॥ ४७ ॥ चंद्रातें आंगवणें । भोगूनि चकोर शाहाणे । परी फावे जैसे चांदिणें । भलतेया ॥ ४८ ॥ तैसें अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये । परी लोकु वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ ४९ ॥ तैसें श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव आहे जी साचें । ग्रंथु नोहे हें कृपेचें । वैभव तिये ॥ १७५० ॥ क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीचां कर्णकुहरीं । नेणों कैं श्रीत्रिपुरारीं । सांगितलें जें ॥ ५१ ॥ तें क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरीं गुप्तु । होता तयाचा हातु । पैठें जालें ॥ ५२ ॥ तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगीं । भेटला तो कीं सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥ ५३ ॥ मग समाधि अव्यया । भोगावी वासना यया । ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥ ५४ ॥ तेणें योगाब्जिनीसरोवरु । विषयविध्वंसैकवीरु । तिये पदीं का सर्वेश्वरु । अभिषेकिले ॥ ५५ ॥ मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव । संपादिलें सप्रभव । गहिनीनाथा ॥ ५६ ॥ तेणें कळि कळितु भूतां । आला देखोनि निरुता । ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥ ५७ ॥ ना आदिगुरु शंकरा - । लागोनि शिष्यपरंपरा । बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ॥ ५८ ॥ तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां । सर्व प्रकारीं धावां । करीं पां वेगीं ॥ ५९ ॥ आधींच तंव तो कृपाळु । वरी गुरुआज्ञेचा बोलु । जाला जैसा वर्षाकाळु । खवळणें मेघा ॥ १७६० ॥ मग आर्ताचेनि वोरसें । गीतार्थग्रंथनमिसें । वर्षला शांतरसें । तो हा ग्रंथु ॥ ६१ ॥ तेथ पुढां मी बापिया । मांडला आर्तीं आपुलिया । कीं यासाठीं येवढिया । आणिलों यशा ॥ ६२ ॥ एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन जें आपुलें । तें ग्रंथें बांधौनि दिधलें । गोसावी मज ॥ ६३ ॥ वांचूनि पढे ना वाची । ना सेवाही जाणें स्वामीची । ऐसिया मज ग्रंथाची । योग्यता कें असे ॥ ६४ ॥ परी साचचि गुरुनाथें । निमित्त करूनि मातें । प्रबंधव्याजें जगातें । रक्षिलें जाणा ॥ ६५ ॥ तन्ही पुरोहितगुणें । मी बोलिलों पुरें उणें । ते तुम्हीं माउलीपणें । उपसाहिजो ॥ ६६ ॥ शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पां चढिजे । अळंकारु म्हणिजे । काय तें नेणें ॥ ६७ ॥ सायिखडेयाचें

बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चाले। तैसा मातें दावीत बोले। स्वामी तो माझा॥ ६८ ॥ यालागीं मी गुणदोष - । विषीं क्षमाविना विशेष। जे मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं॥ ६९ ॥ आणि तुम्हा संतांचिये सभें। जें उणिवेंसी ठाके उभें। तें पूर्ण नोहे तैं लोभें। तुम्हांसीचिं कोपें॥ १७७० ॥ सिवतलियाही परिसें। लोहत्वाचिये अवदसे। न मूकिजे आयसें। तैं कोणा बोलुं॥ ७१ ॥ वोहळें हेंचि करावें। जे गंगेचें आंग ठाकावें। मग गंगाचि नव्हे। तैं तो काइ करी ॥ ७२ ॥ म्हणौनि भाग्ययोगें बहुवें। तुम्हां संतांचे मी पाये। पातलों आतां कें लाहें। उणें जगीं ॥ ७३ ॥ अहो जी माझेनि स्वामी। मज संत जोडुनि तुम्हीं। दिधलेति ते सर्वकामीं। परिपूर्ण जालों॥ ७४ ॥ पाहा पां मातें तुम्हांसांगडें। माहेर तेणें सुरवाडें। ग्रंथाचें हें आळियाडें। सिद्धी गेलें॥ ७५ ॥ जी कनकाचे निखळ। वोतूं येईल भूमंडळ। चिंतारत्नीं कुळाचळ। निर्मूं येती ॥ ७६ ॥ सातांही हो सागरातें। सोपें भरितां अमृतें। दुवाड नोहे तारांतें। चंद्र करितां॥ ७७ ॥ कल्पतरूचे आराम। लावितां नाहीं विषम। परी गीतार्थाचें वर्म। निवडूं न ये ॥ ७८ ॥ तो मी येकु सर्वमुका। बोलोनि मऱ्हाठिया भाखा। करीं डोळेवरी लोकां। घेवों ये ऐसें॥ ७९ ॥ हा ग्रंथसागरु येव्हढा। उतरोनि पैलीकडा। कीर्तिविजयाचा धेंडा। नाचे जो का॥ १७८० ॥ गीतार्थाचा आवारु। कलशेंसीं महामेरु। रचुनि माजीं श्रीगुरू - । लिंग जें पूजीं॥ ८१ ॥ गीता निष्कपट माय। चुकोनि तान्हें हिंडे जें वाय। ते मायपूता भेटी होय। हा धर्म तुमचा॥ ८२ ॥ तुम्हां सज्जनांचें केलें। आकळुनी जी मी बोलें। ज्ञानदेव म्हणें थेंकुलें। तैसें तें नव्हे॥ ८३ ॥ ॥ काय बहु बोलों सकळां। मेळविलों जन्मफळा। ग्रंथसिद्धीचा सोहळा । दाविला जो हा ॥ ८४॥ मियां जैसजैसिया आशा । केला तुमचा भरंवसा। ते पुरवूनि जी बहुवसा। आणिलों सुखा॥ ८५ ॥ मजलागीं ग्रंथाची स्वामी। दुजी सृष्टी जे हे केली तुम्हीं। तें पाहोनि हांसों आम्ही। विश्वामित्रातेंही॥ ८६ ॥ जे असोनि त्रिशंकुदोषें। धातयाही आणावें वोसें। तें नासतें कीजे कीं ऐसें। निर्मावें नाहीं ॥ ८७॥ शंभू उपमन्यूचेनि मोहें। क्षीरसागरुही केला आहे। येथ तोही उपमे नोहे। जे विषगर्भ कीं ॥ ८८ ॥ अंधकारु निशाचरां। गिळितां सूर्यें चराचरां। धांवा केला तरी खरा। ताउनी कीं तो॥ ८९ ॥ तातलिया जगाकारणें। चंद्रें वेंचिलें चांदणें। तया सदोखा केवीं म्हणे। सारखें हें॥ १७९० ॥ म्हणौनि तुम्हीं मज संती। ग्रंथरूप जो हा त्रिजगती। उपयोग केला तो पुढती। निरुपम जी॥ ९१ ॥ किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें। येथ माझें जी उरलें। पाईकपण ॥ ९२॥ आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें। जे खळाची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥ ९४॥ दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछिल तो तें लाहो। प्राणिजात ॥ ९५॥ वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळीं। भेटतु भूतां ॥ ९६ ॥ चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणींचे गांव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे॥ ९७॥ चंद्रमे जे

अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ९८ ॥ किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ९९ ॥ आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ १८०० ॥ येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ १ ॥ ऐसें युगीं परी कळीं । आणि महाराष्ट्रमंडळीं । श्रीगोदावरीचां कूळीं । दक्षिणिलीं ॥ २ ॥ त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र । जेथ जगाचें जीवनसूत्र । श्रीमहालया असे ॥ ३ ॥ तेथ यदुवंशविलासु । जो सकळकळानिवासु । न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥ ४ ॥ तेथ महेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें । केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणें ॥ ५ ॥ एवं श्रीभारताचां गांवीं । भीष्मनाम प्रसिद्ध पर्वीं । श्रीकृष्णार्जुनीं बरवी । गोठी जे केली ॥ ६ ॥ जे उपनिषदांचें सार । सर्व शास्त्रांचें माहेर । परमहंसीं सरोवर । सेविजे जें ॥ ७ ॥ तये गीतेचा कलशु । संपूर्ण हा अष्टादशु । म्हणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ॥ ८ ॥ पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती । सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होईजे ॥ ९ ॥ शके बाराशतें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें । सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकु जाहला ॥ १८१० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
मोक्षसंन्यासयोगोनाम अष्टादशोऽध्यायः ॥ (श्लोक ७८; ओव्या १८१०)

श्रीएकनाथमहाराजांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथ संशोधन केल्यानंतर ज्ञानेश्वरीसंबंधानें केलेल्या ओंव्या :

श्रीशके पंधराशें साहोत्तरीं । तारणनामसंवत्सरीं । एकाजनार्दनें अत्यादरीं । गीता-ज्ञानेश्वरी प्रतिशुद्ध केली ॥ १ ॥ ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध । तो शोधूनियां एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥ २ ॥ नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वाचितां टीका । ज्ञान होय लोकां । अतिभाविका ग्रंथार्थियां ॥ ३ ॥ बहुकाळपर्वणी गोमटी । भाद्रपदमास कपिलाषष्ठी । प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखनकामासाठी संपूर्ण जाहली ॥ ४ ॥

॥ ॐ श्रीसच्चिदानन्दार्पणमस्तु ॥

वै. बाबुराव हरी देवडीकर

जन्म : १८३८ वैकुंठवास : १९२४

॥ श्री ॥

माझ्या पूर्वजांचा ठेवा

जय जयजी ज्ञानानंद श्री गुरु गंगु काका । तुम्हां कृपे दास बाबा ध्यानी श्री जगत्गुरु तुका ॥धृ०॥
श्रीवर वीर नरहरी प्रेमे भुलले भक्तीला । श्री नृसिंह सरस्वतीने स्वप्ं नी उपदेश केला ।
मछेंद्र गडी श्रीनाथे पूर्ण अनुग्रह दिधला । जडमुढ दोषी उद्धरण्या जाणे पंढरीला ॥१॥
समुळ संसाराचा करोनी विषय त्याग । श्री पुंडलीका स्वानिध्य केला नामजप याग ।
श्रीविठ्ठले कृपा आली साधला बरवा सुयोग । श्रीमंत बडवे हाती दिधला प्रसाद तुकवेद चांग ॥२॥
संत नामदेव प्रांगणी स्वफड आरंभीला । भाळे भोळे भक्त शिष्योत्तमांचा मेळा जमला ।
निष्ठावंत भक्तीने विठोबाचा धर्म जागवीला । नाम संकीर्तने दीन दुर्बलांचा उद्धार केला ॥३॥
अंधदास बाबा शिरी ठेवीला वरदहस्त । गुरुकृपे अंतरी प्रकाशली ज्ञानदीप जोत ।
संपूर्ण प्रसाद वहीचा पाठ केला मुखोद्गत । गुरु महिमा वाढविला भजने मासोच्छवास ॥४॥
कलीयुगी ख्याती केली अग्नीदिव्य घेतले । चार हजार ब्याण्णव प्रमाण तुकोनी तुकीले ।
सांप्रदायी देवडीकर पाठ प्रमाणभूत मानीले । कृष्णसुत विठ्ठल तुमचे चरणा हृदयी धरीले ॥५॥

माझे परम वंदनीय पितामह वैकुंठवासी ह. भ. प. बाबा महाराज देवडीकर यांनी निष्ठावंत भाव, निष्काम निश्चळ श्रद्धाम निर्धार हेच तत्त्व, अखंड अभंग सांप्रदायिक मार्गाने साक्षात्कारी व वारकरी संत होते. ते जन्मांध असूनही संतवचनी पूर्ण विश्वास ठेवून नित्यनेम साधना व गुरुकृपा यामुळे त्यांना श्री तुकाराम महाराज यांची संपूर्ण गाथा कंठस्थ होती. त्यांनी दिव्य अग्नी घेवून प्रसाद वही अभंगापैकी चार हजार ब्याण्णव अभंगांची निवड करून अभंगांचा देवडीकर पाठ श्री तुकाराम गाथा प्रसिद्ध केला. तोच वारकरी सांप्रदायिक म्हणून प्रमाणभूत मानला जातो. इ. स. १८३५ पासून आजतागायत हस्तलिखित छापील गाथा प्रती अनेक आवृत्तीतून लाखो प्रती प्रसिद्ध झालेल्या आहेत. माउलीचे निस्सीम भक्त वैकुंठवासी बाबुराव देवडीकर यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या आळंदी पंढरी सोहळ्यामध्ये इ. स. १९२४ मध्ये फलटण मुक्कामी रात्रभर पावसात जागर करून आषाढ शु. ४ रोजी सकाळी 'निरोप द्यावा, येतो आता. आता आपली कृपा असू द्यावी' म्हणून माऊली चरणी विलीन झाले. त्यांचा संस्थानने स्वाभिमान ठेवून देवडीकर प्रत तुकाराम गाथा दोन आवृत्ती यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या आहेतच.

चालू वर्ष हे तुकाराम महाराज त्रिशतोत्तर पुण्यस्मरण वर्ष आहे म्हणून श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानने खास तिसरी आवृत्ती काढली आहे, हे सर्व संप्रदायाचे भूषण आहे. तरी सांप्रदायिक भाविकांनी याचा लाभ घ्यावा अशी सकळांचे चरणी नम्र विनंती. ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी यांच्यातर्फे संतवाङ्मयाचा प्रचार सोहळा ना नफा ना तोटा हे ध्येय ठेवून तिसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. याचा माझ्या सर्व वारकरी बांधवांनी स्वीकार करावा अशी माझी नम्र विनंती आहे. ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी यांचा मी शतशः ऋणी आहे, हीच माझी वाक्पुष्पांजली श्री संत ज्ञानेश्वर महराज चरणी समर्पण.

श्रीक्षेत्र पंढरपूर,
२४२१, नातू वाडा, देवडीकर.
तुकाराम बीज, १५-३-९८

संतदास
विठ्ठलबुवा कृष्णाजीपंत देवडीकर

श्रीतुकारामांचे हस्ताक्षर



तुकारामाची गाथा

१. समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥ आणिक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥२॥ ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित्त झणी जडों देसी ॥३॥ तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ॥४॥

२. नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥ नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥२॥ देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥३॥ तुका म्हणें मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥४॥

३. सावध झालों सावध झालों । हरिच्या आलों जागरणा ॥१॥ जेथें वैष्णवांचे भार । जयजयकार गर्जतसे ॥२॥ पळोनियां गेली झोंप । होतें पाप आड तें ॥३॥ तुका म्हणे तया ठाया । वोल छाया कृपेची ॥४॥

४. आपुलिया हिता जो असे जागता । धन्य मातापिता तयाचिया ॥१॥ कुळीं कन्यापुत्र होती जीं सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ॥२॥ गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥३॥ तुका म्हणें मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥४॥

५. अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥१॥ देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ॥२॥ आपुल्याच वैभवें । शृंगारावें निर्मळें ॥३॥ तुका म्हणे जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥४॥

६. पावलें पावलें तुझें आम्हां सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ॥१॥ जेथें जेथें देखें तुझींच पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥२॥ भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशीं देऊं ॥३॥ तुका म्हणे अणु तुजविण नाहीं । नभाहुनि पाहीं वाढ आहे ॥४॥

७. सुखें वोळंबा दावी गोहा । माझें दुःख नेणा पाहा ॥१॥ आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा म्हणे भिडा ॥२॥ अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साखर तूप पथ्या ॥३॥ दो प्रहरा मज लहरी येती । शुद्ध नाहीं पडे सुपत्ती ॥४॥ नीज नये खालीं घाली फुलें । जवळीं न साहती मुलें ॥५॥ अंगीं चंदन लावितें भाळीं । सदा शूळ माझे कपाळीं ॥६॥ निपट मज न चले अन्न । पायली गहूं सांजा तीन ॥७॥ गेले वारीं तुम्ही आणिली साखर । सात दिवस गेली साडेदहा शेर ॥८॥ हाड गळोनि आलें मांस । माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें ॥९॥ तुका म्हणे जिता गाढव केला । मेलियावरि नरका नेला ॥१०॥

८. पुढें गेले त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आम्ही ॥१॥ वंदूं चरणरज सेऊं उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करूनियां ॥२॥ अमुप हें गांठीं बांधूं भांडवल । अनाथा विठ्ठल आम्हा जोगा ॥३॥ अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या

॥४॥ जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥५॥ तुका म्हणे घालूं जीवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥६॥

९. जेविले ते संत मागें उष्टावळी । अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ॥१॥ सोंवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा । पासूनि सकळां अवघ्या दुरीं ॥२॥ परें परतें मज न लगे सांगावें । हें तों बरें देवें शिकविलें ॥३॥ दुसऱ्यातें आम्ही नाहीं आतळत । जाणोनि संकेत उभा असे ॥४॥ येथें कांहीं कोणी न धरावी शंका । मज चाड एका भोजनाची ॥५॥ लांचावला तुका मारितसे झड । पुरविलें कोड नारायणें ॥६॥

१०. देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥१॥ ब्रह्मादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥२॥ अवघियांपुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ॥३॥ इच्छादानी येथें वोळला समर्थ । अवघेंचि आर्त पुरवितो ॥४॥ सरे येथें ऐसें नाहीं कदाकाळीं । पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें ॥५॥ तुका म्हणे पाक लक्षुमीच्या हाते । कामारी सांगातें निरुपम ॥६॥

११. अवगुणांचे हातीं । आहे अवघीच फजीती ॥१॥ नाहीं पात्रासवें चाड । प्रमाण तें फिकें गोड ॥२॥ विष तांब्या वाटी । भरली लाऊं नये होटीं ॥३॥ तुका म्हणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव ॥४॥

१२. हरीच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥१॥ कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेंचे फुकासाठीं ॥२॥ ज्यांची तुज गुंती । ते तों मोकलिती अंतीं ॥३॥ तुका म्हणे बरा । लाभ काय तो विचारा ॥४॥

१३. धर्माची तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ॥१॥ मज सोडवीं दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥२॥ करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ॥३॥ जिवींच्या जीवना । तुका म्हणे नारायणा ॥४॥

१३. धर्माची तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ॥१॥ मज सोडवीं दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥२॥ करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ॥३॥ जिवींच्या जीवना । तुका म्हणे नारायणा ॥४॥

१४. सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥१॥ तुळसीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥२॥ मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥३॥ तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥४॥

१५. सदा माझे डोळे जडो तुझे मूर्तीं । रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥२॥ विठो माउलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥३॥ तुका म्हणे कांहीं न मागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥४॥

१६. राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥१॥ कस्तुरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥२॥ मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचे ओतिलें सकळही ॥३॥ कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयांनो ॥४॥ सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥५॥

१७. कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥ ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥२॥ कटीं पितांबर कास मिरवली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥३॥ गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवे मानसीं तेंचि रूप ॥४॥ झुरोनि पांझरा होऊं पाहें आतां । येईं पंढरीनाथा भेटावया ॥५॥ तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंति उदास करूं नये ॥६॥

१८. गरुडाचे वारिकें कासे पितांबर । सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥ बरविया बरवंटा घनमेघ सांवळा । वैजयंतीमाळा गळां शोभे ॥२॥ मुगुट माथां कोटी सूर्याचा झळाळ । कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥३॥ वोतींव श्रीमुख सुखाचें सकळ । वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥४॥ उद्धव अक्रूर उभे दोहींकडे । वर्णिती पवाडे सनकादिक ॥५॥ तुका म्हणे नव्हे आणिकांसारिखा । तोचि माझा सखा पांडुरंग ॥६॥

१९. ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणें । बळिये आम्ही भले शरणागत ॥१॥ कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । झाला पद्मनाभ सेवाऋणी ॥२॥ कामधेनूचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावें ॥३॥ बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥४॥ हारि नाहीं आम्हां विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ॥५॥ तुका म्हणे बहु लाठे हें भोजन । नाहीं रिता कोण रहात राहों ॥६॥

२०. दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि । आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥१॥ इतुलें जाणावया जाणा । कोड तरीं मनें मना । पारधीच्या खुणा । जाणतेणेचि साधाव्या ॥२॥ देह आधीं काय खरा । देहसंबंधपसारा । बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥३॥ तुका करी जागा । नको वासपूं वाउगा । आहेसि तूं अंगा । अंगीं डोळे उघडी ॥४॥

२१. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥१॥ आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥२॥ कोणाही जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥३॥ तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥४॥

२२. आम्ही तरी आस । जालों टाकोनि उदास ॥१॥ आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥२॥ भलते ठायीं पडो । देह तुरंगीं हा चढो ॥३॥ तुमचें तुम्हांपाशीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ॥४॥ गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ॥५॥ तुका म्हणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ॥६॥

२३. निंदी कोण मारी । वंदी कोणी पूजा करी ॥१॥ मज हेंही नाही तेंही नाही । वेगळा दोहींपासुनी ॥२॥ देहभोग भोगें घडे । जें जें जोडें तें बरें ॥३॥ अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥४॥

२४. जन विजन झालें आम्हां । विठ्ठलनामाप्रमाण ॥१॥ पाहें तिकडें मायबाप । विठ्ठल आहे रखुमाई ॥२॥ वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता जाला ॥३॥ ठाव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कौतुकें ॥४॥

२५. हिरा ठेविता ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥१॥ तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥२॥ मोहरा तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥३॥ तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥४॥

२६. आलिंगन घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥ ऐसा संतांचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥२॥ तीर्थें पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥३॥ तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥४॥

२७. माझिया मीपणा । झाला यावरी उगाणा ॥१॥ भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ॥२॥ टाळिलें निमित्त । फार थोडे घात हित ॥३॥ यावें कामावरी । तुका म्हणे नाहीं उरी ॥४॥

२८. सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार समूळ आशा । निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥१॥ मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें । तीर्थांसी तीर्थ झाला तोचि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥२॥ मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी । हरीच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ॥३॥ तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची । तुका म्हणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ॥४॥

२९. आहे तें सकळ कृष्णासि अर्पण । न कळतां मन दुजें भावी ॥१॥ म्हणउनी पाठीं लागतील भूतें । येती गिवसीत पांचजणें ॥२॥ ज्याचें त्या वंचलें आठव न होतां । दंड या निमित्ताकारणें हा ॥३॥ तुका म्हणे काळें चेपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ॥४॥

३०. महारासी शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥१॥ तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥२॥ नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥३॥ ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो ते याती ॥४॥

३१. तेलणीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥१॥ आपुलें हित आपण पाहीं । संकोच तो न धरी कांहीं ॥२॥ नाडिलें लोकां टाकिला गोहो । बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥३॥ शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनी घर भरिलें मागें ॥४॥ पिसारागें भाजिलें घर ।

नागवली ते नेणे फार ॥५॥ तुका म्हणे वाच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ॥६॥

३२. मज दास करी त्याचा । संतदासाच्या दासाचा ॥१॥ मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ॥२॥ नीचवृत्तिकाम । परी मुखीं तुझे नाम ॥३॥ तुका म्हणे सेवे । माझे संकल्प वेचावे ॥४॥

३३. सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥१॥ त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवें ॥२॥ कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ॥३॥ नेणे शब्दपर । तुका म्हणे परउपकार ॥४॥

३४. जया नाहीं नेम एकादशीव्रत । जाणावें तें प्रेत सर्व लोकीं ॥१॥ त्याचें वय नित्य काळ लेखिताहे । रागें दांत खाय करकरा ॥२॥ जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणा ॥३॥ जये कुळीं नाहीं एकही वैष्णव । त्याचा बुडे भवनदीताफा ॥४॥ विठोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥५॥ तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरीचिया ॥६॥

३५. आम्ही सदैव सुडके । जवळी येतां चोर धाके । जाऊं पुढें भिके । कुतरीं घर राखती ॥१॥ नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वायां भागा । थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥२॥ अक्षई साचार । केलें सायासांनी घर । एरंडासी हार । दुजा भार न साहती ॥३॥ धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी । जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥४॥ जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती । झळझळीत भिंती । वृंदावनें तुळसीचीं ॥५॥ तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा । कुटुंबाची सेवा । तोचि करी आमुच्या ॥६॥

३६. पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥१॥ न करितां परनिंदा परद्रव्य अभिलास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥२॥ बैसलिये ठायीं म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥३॥ संतांचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥४॥ खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥५॥ तुका म्हणे देव जोडे याचसाठीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ॥६॥

३७. शुद्धबीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥१॥ मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥२॥ सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥३॥ तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥४॥

३८. चित्त समाधान । तरी विष वाटे सोनें ॥१॥ बहू खोटा अतिशय । जाणा भले सांगों काय ॥२॥ मनाच्या तळमळें । चंदनेंही अंग पोळे ॥३॥ तुका म्हणे दुजा । उपचार पीडा पूजा ॥४॥

३९. परिमळ म्हणुन चोळूं नये फूल । खाऊं नये मूल आवडतें ॥१॥ मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनि नाद पाहूं नये ॥२॥ कर्मफळ म्हणुनि इच्छूं नये काम । तुका म्हणे वर्म दावूं लोकां ॥३॥

४०. माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया । अंग आणि छाया जयापरी ॥१॥ तोडितां न तुटे

सारितां निराळी । लोटांगणतळीं हारपती ॥२॥ दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणीक ते आटी विचाराची ॥३॥ तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणें जैसीं तैसीं ॥४॥

४१. दुर्जनासि करी साहे । तोही लाहे दंड हे ॥१॥ शिंदळीचा कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ॥२॥ येर येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथूनी ॥३॥ तुका म्हणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥४॥

४२. वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चिती देव नाहीं ॥१॥ भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥२॥ देवपुजेवरी ठेवूनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥३॥ तुका म्हणे फळ चिंतिती आदर । लाघव हे चार शिंदळीचे ॥४॥

४३. पवित्र सोंवळीं । एक तींच भूमंडळीं ॥१॥ ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥२॥ तींच भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥३॥ तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥४॥

४४. आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥१॥ करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥२॥ भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥३॥ तुका म्हणे विषें । अन्न नाशियेलें जैसें ॥४॥

४५. ढेकरें जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥१॥ हेही बोल तेही बोल । कोरडें फोल रुचीविण ॥२॥ गव्हांचिया होती परी । फके वरी खाऊं नये ॥३॥ तुका म्हणे असे हातींचें कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ॥४॥

४६. करावी ते पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥१॥ कळावें तयासी कळे अंतरींचें । कारण ते साचें साच अंगीं ॥२॥ अतिशयाअंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजाऐसें ॥३॥ तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥४॥

४७. नव्हे आराणूक संसारा हातीं । सर्वकाळ चित्तीं हाचि धंदा ॥१॥ देवधर्म सांदीं पडिले सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ॥२॥ रात्रंदिवस न पुरे कुटुंबीं समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें ॥३॥ तुका म्हणे आत्महत्यारे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ॥४॥

४८. स्मशान ते भूमी प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥१॥ भरतील पोटें श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूतां ॥२॥ अपूज्य लिंग तेथें अतित ने घे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकांची ॥३॥ तुका म्हणे नाहीं ठावी तीथ मती । यमाची निश्चिती कुळवाडी ॥४॥

४९. एकादशी व्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होईल नेणों ॥१॥ काय करूं बहु वाटे तळमळ । आंधळीं सकळ बहिर्मुख ॥२॥ हरिहरासीं नाहीं बोटभर वाती । कोण त्यांची गति होईल नेणों ॥३॥ तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति । कोण त्यांची गति होईल नेणों ॥४॥

५०. आहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र झाला ॥१॥ गळेचि ना गर्भ

नव्हेचि कां वांज । माता त्याची लाजलावा पापी ॥२॥ परपीडे परद्वारीं सावधान । सादरचि मन अभाग्याचें ॥३॥ न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहावे दोष सकळही ॥४॥ परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचें तें किडें दुग्धीं मरे ॥५॥ तुका म्हणे विटाळाचीच तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥६॥

५१. श्वान शीघ्र कोपी । आपणा घातकर पापी ॥१॥ नाहीं भीड आणिक धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥२॥ माणसांसि भुंके । विजातीनें घ्यावे थुंके ॥३॥ तुका म्हणे चित्त । मळिण करा रे फजित ॥४॥

५२. देखोनि हरखली अंड । पुत्र झाला म्हणे रांड । तंव तो जाला भांड । चाहाड चोरटा शिंदळ ॥१॥ जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल थुंका । थोर झाला चुका । वर कां नाहीं घातली ॥३॥ भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें । बोले निष्ठुर उत्तरें । पापदृष्टि मळिण चित्त ॥३॥ दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ । तुका म्हणे खळ । म्हणोनियां निषिद्ध तो ॥४॥

५३. नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । घालूं तुज भार पांडुरंगा ॥१॥ नेणें राग वेळ काळ घात मात । तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥२॥ तुका म्हणे मज चाड नाहीं जना । तुज नारायणावांचूनियां ॥३॥

५४. माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥१॥ तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ॥२॥ उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ॥३॥ तुका म्हणे बाहेरमुदी । आहाच गोविंदीं न सरती ॥४॥

५५. उपाधीच्या नांवे घेतला शिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ॥१॥ काशासाठी हात भरूनि धुवावे । चालतिया गोवे मारगासि ॥२॥ कांहीं नाहीं देवें करूनि ठेविलें । असे तें आपुलें ते ते ठायीं ॥३॥ तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ॥४॥

५६. योगाचे ते भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ॥१॥ अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया ॥२॥ मिरासीचें म्हूण सेत । नाहीं देत पीक उगे ॥३॥ तुका म्हणे उचित जाणा । उगीं सिणा काशाला ॥४॥

५७. न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळकळ ॥१॥ तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥२॥ न फळे उत्तर । नाहीं स्वामी जों सादर ॥३॥ तुका म्हणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥४॥

५८. बाईल सवासिण आई । आपण पितरांचे ठायीं ॥१॥ थोर वेच जाला नष्टा । अवघ्या अपसव्य चेष्टा ॥२॥ विषयांचे चर्वणीं । केली आयुष्याची गाळणी ॥३॥ तुका म्हणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ॥४॥

५९. दानें कांपे हात । नावडे तेविशीं मात ॥१॥ कधी चावटीचे बोल । हिंग क्षीर मिथ्या फोल ॥२॥ नव जाती पाय । तीर्था म्हणे वेचूं काय ॥३॥ तुका म्हणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ॥४॥

६०. वळितें जें गाई । त्यासी फार लागे काई ॥१॥ निवे भावाचे उत्तरीं । भलते एके धणीवरी ॥२॥ न लगती प्रकार । कांहीं मनाचा आदर ॥३॥ सांडी थोरपणा । तुका म्हणे सवें दीना ॥४॥

६१. मैत्र केला महाबळी । कामा न ये अंतकाळीं ॥१॥ आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम । नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥२॥ धन मिळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥३॥ कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥४॥ तंववरी तुमचें बळ । जंव आला नाहीं काळ ॥५॥ तुका म्हणे बापा । चुकवी चौऱ्याशींच्या खेपा ॥६॥

६२. सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥१॥ धरीं धरीं आठवण । मानी संतांचें वचन ॥२॥ नेलें रात्रीनें तें अर्ध । बाळपण जराव्याध ॥३॥ तुका म्हणे पुढा । घाणा जुंतीतसी मूढा ॥४॥

६३. कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका न ये ॥१॥ तैसें मज नको करूं कमळापति । देईं या संगति सज्जनांची ॥२॥ तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण झाली आतां ॥३॥ तुका म्हणे येरा येरा जें विच्छिन्न । तेथें वाढे शीण सुखा पोटीं ॥४॥

६४. बोलायाचा त्यासीं । नको संबंध मानसीं ॥१॥ जया घडली संतनिंदा । तुज विसरूनि गोविंदा ॥२॥ जळो त्याचें तोंड । नको दृष्टीपुढें भांड ॥३॥ तुका म्हणे देवा । तया दुरी मज ठेवा ॥४॥

६५. तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसेचि खळ ॥१॥ कारे शिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥२॥ मानदंभ पोटासाठीं । केली अक्षरांची आटी ॥३॥ तप करूनि तीर्थाटण । वाढविला अभिमान ॥४॥ वांटिलें तें धन । केली अहंता जतन ॥५॥ तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ॥६॥

६६. संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥२॥ म्हणऊनि तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥२॥ बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥३॥ वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥४॥ बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दीस झालों कासाविस ॥५॥ तुका म्हणे आतां धांव घालीं वेगीं । ब्रीदें तुझें जगीं दीनानाथा ॥६॥

६७. भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच खरीं ॥१॥ मागें काय जाणों आइकिली वार्ता । कबिरा सातें जातां घड्या वांटी ॥२॥ माघारिया धन आणिलें

घरासी । ने घे केला त्यासी त्याग तेणें ॥३॥ नामदेवाचिया घरासी आणिलें । तेणें लुटियेलें द्विजां हातीं ॥४॥ प्रत्यक्षासी काय द्यावें हे प्रमाण । एकोबाचें ऋण फेडियलें ॥५॥ बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥६॥ तुका म्हणे ऐसा नाहीं ज्या निर्धार । नाडेल साचार तोचि एक ॥७॥

६८. भोगे घडे त्याग। त्यागें अंगा येती भोग॥१॥ ऐसें उफराटें वर्म। धर्माअंगींच अधर्म॥२॥ देव अंतरे तें पाप। कोठे उगवा संकल्प॥३॥ तुका म्हणे भीड खोटी। लाभ विचाराचे पोटीं॥४॥

६९. भोरप्याने सोंग पालटिलें वरी । बक ध्यान धरी मत्स्या जैसें ॥१॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखो नेदी जगीं फांसे जैसे ॥२॥ ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥३॥ खाटीक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तयासाठीं ॥४॥ तुका म्हणे तैसा भला मी लोकांत । परि तूं कृपावंत पांडुरंगा ॥५॥

७०. गेली वीरसरी। मग त्यासी रांड मारी॥१॥ मग नये तैसी सत्ता। गेली मागील आणितां ॥२॥ भंगलिया चित्ता। न ये काशाने सांधितां॥३॥ तुका म्हणे धीर। भंगलिया पाठीं कीर॥४॥

७१. युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥१॥ कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ॥२॥ न लगे लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ॥३॥ तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामेंविण ॥४॥

७२. कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥१॥ हो कां नर अथवा नारी । रांड तयें नांवें खरीं ॥२॥ नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ॥३॥ वाळियेलीं संतीं । केली बोडोनि फजिती ॥४॥ तुका म्हणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ॥५॥

७३. माया ब्रह्म ऐसें म्हणती धर्मठक । आपणासरिसे लोक नागविले ॥१॥ विषयीं लंपट शिकवी कुविद्या । मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥२॥ करुनी खातां पाक जिरे सुरण राई । करितां अतित्याई दु:ख पावे ॥३॥ औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनियां गुळा दृष्टीपुढें ॥४॥ तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांझट बोलणीं वारा त्याचीं ॥५॥ तुका म्हणे जयां पिंडाचें पाळण । न घडे नारायण भेटे तयां ॥६॥

७४. मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचें पिसें ऊर फोडी ॥१॥ जाणोनि कां करा आपुलाले घात। विचारा रे हित लवलाहीं॥२॥ संचित सांगातीं बोळवण सवें। आचरलें द्यावें फळ तेणें॥३॥ तुका म्हणे शेखीं स्मशान तें वरी। संबंध गोवरी आगीसवें॥४॥

७५. गौळियाचीं ताकपीरें । कोण पोरें चांगलीं ॥१॥ येवढा त्यांचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ॥२॥ काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ॥३॥ तुका म्हणे

कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ॥४॥

७६. आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥१॥ सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥२॥ हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥३॥ तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥४॥

७७. भक्ताविण देवा । कैचें रूप घडे सेवा ॥१॥ शोभविलें येर येरां । सोनें एके ठायीं हिरा ॥२॥ देवाविण भक्ता । कोण देतें निष्कामता ॥३॥ तुका म्हणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ ॥४॥

७८. विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसी माता ॥१॥ ऐसा भक्ताचा अंकीत । लागे तैसी लावी प्रीत ॥२॥ निष्काम निराळा । गोपी लावियेल्या चाळा ॥३॥ तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥४॥

७९. काय दिनकरा । कोंबड्यानें केला खरा ॥१॥ कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा ॥२॥ आडविलें दासी । तरी कां मरती उपवासी ॥३॥ तुका म्हणे हातीं । कळा सकळ अनंतीं ॥४॥

८०. जेवितांही धरी । नाक हागतियेपरी ॥१॥ ऐसियाचा करी चाळा । आपुलीच अवकळा ॥२॥ सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ॥३॥ तुका म्हणे करी । ताक दुधा एकीसरी ॥४॥

८१. हो कां पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ॥१॥ कळों आलें खट्याळसें । शिवों नये लिंपो दोषें ॥२॥ फोडावें मडकें । मेले लेखीं घायें एके ॥३॥ तुका म्हणे त्यागें - । विण चुकीजेना भोगें ॥४॥

८२. व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥१॥ कासया पाल्हाळ आणिकांचे देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसी ॥२॥ कुंथाच्या ढेंकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥३॥ तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥४॥

८२. जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥ येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती ती दुःखा पात्र शत्रु ॥२॥ प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥३॥ तुका म्हणे सर्व धर्म हरीचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥४॥

८४. मान अपमान गोवे । अवघे गुंडूनी ठेवावे ॥१॥ हेंचि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥२॥ शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ॥३॥ आली ऊर्मी साहे । तुका म्हणें थोडे आहे ॥४॥

८५. थोडें आहे थोडें आहे । चित्त साह्य जालिया ॥१॥ हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरले ते ॥२॥ अवघ्या साधनांचे सार । न लगे फार शोधावें ॥३॥ तुका म्हणे लटिकें पाहे । सांडी देह अभिमान ॥४॥

८६. आतां उघडी डोळे । जरी अद्यापि न कळे । तरी मातेचिया खोळे । दगड आला पोटासी ॥१॥ मनुष्यदेह ऐसा निध । साधील तें साधे सिद्ध । करूनि प्रबोध । संत पार उतरले

॥२॥ नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलिकाचे द्वारीं । कट धरूनियां करीं । उभाउभीं पालवी ॥३॥ तुका म्हणें फुकासाठीं । पायीं घातलिया मिठी । होतो उठाउठी । लवकरीच उतार ॥४॥

८७. न करीं रे संग राहें रे निश्चळ । लागों नेदी मळ ममतेचा ॥१॥ या नांव अद्वैत खरें ब्रह्मज्ञान । अनुभवावांचून बडबड ते ॥२॥ इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पाही न ये वरी मन ॥३॥ तुका म्हणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या थारा आनंदाचा ॥४॥

८८. पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ॥१॥ ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभीं भेटे ॥२॥ आहेति सकळ । तीर्थें काळें देती फळ ॥३॥ तुका म्हणे पेठ । भूमिवरी हें वैकुंठ ॥४॥

८९. तीर्थीं धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥१॥ मिळालिया संतसंग । समर्पिता भले अंग ॥२॥ तीर्थीं भाव फळे । येथें अनाड तें वळे ॥३॥ तुका म्हणे पाप । गेलें गेल्या फळे ताप ॥४॥

९०. घेऊनियां चक्र गदा । हाचि धंदा करीतो ॥१॥ भक्त राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥२॥ अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥३॥ तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥४॥

९१. देखोनि पुराणिकाची दाढी । रडे स्फुंदे नाक ओढी ॥१॥ प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥२॥ आवरितां नावरे । खूर आठवी नेवरे ॥३॥ बोलों नये मुखा वाटां । म्हणे होता ब्याचा तोटा ॥४॥ दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥५॥ मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥६॥ होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥७॥ तुका म्हणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥८॥

९२. दुर्जनाची गंधी विष्ठेचिये परी । देखोनियां दूरी व्हावें तया ॥१॥ आइका हो तुम्ही मात हे सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ॥३॥ दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्त्रवे तैसी ॥३॥ दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळल्यावरी धांवे श्वान ॥४॥ दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥५॥ तुका म्हणे किती सांगावें पृथक । अंग कुंभीपाक दुर्जनाचें ॥६॥

९३. अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अंत्यज वो ॥१॥ वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मनी जो ॥२॥ तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥३॥

९४. शब्दां नाहीं धीर । ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥१॥ त्याचें न व्हावें दर्शन । खळा पंगती भोजन ॥२॥ संतांसी जो निंदी । अधम लोभासाठीं वंदी ॥३॥ तुका म्हणे पोटीं । भाव आणीक जया ओंठीं ॥४॥

९५. चोरें चोरातें करावा उपदेश । आपुला अभ्यास असेल तो ॥१॥ शिंदळीच्या मागें

वेचितां पाउलें । होईल आपुलें तिच्या ऐसें ॥२॥ तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता । म्हणऊनि चिंता उपजली ॥३॥

९६. मांडवाच्या दारा । पुढें आणिला म्हातारा ॥१॥ म्हणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥२॥ समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥३॥ तुका म्हणे खरा । येथूनियां दूर करा ॥४॥

९७. कांही नित्यनेमाविण । अन्न खाय तो श्वान । वायां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥१॥ त्याचा होय भूमी भार । नेणें जातीचा आचार । झाला दावेदार । भोगावी अघोर पितरांसी ॥२॥ अखंड अशुभ वाणी । खरें न बोले स्वप्नीं । पापी तयाहुनी । नाहीं आणीक दुसरा ॥३॥ पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला । पाठीं लागे आल्या । अतिताचे द्वारेशीं ॥४॥ कांहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण । यमाचा आंदण । शीण थोर पावेल ॥५॥ तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी । देवा विसरूनि । गेलीं म्हणती मी माझें ॥६॥

९८. कन्या गौ करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥१॥ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा ॥२॥ आशाबद्ध नये करूं तें करिती । तुका म्हणे जाती नरकामधीं ॥३॥

९९. हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥१॥ एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥२॥ भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ॥३॥ उजवे वाम भाग । तुका म्हणे एकचि अंग ॥४॥

१००. वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन । श्रोता यति झाला जाण । तरी त्या नाहीं उचित ॥१॥ शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण । धर्माचें पाळण । सकळीं सत्य करावें ॥२॥ पट्ट पुत्र सांभाळी । पिता त्याची आज्ञा पाळी । प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ॥३॥ वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य । येर उपकरणें । सोनियाचीं परी नीच ॥४॥ सोनियाचा पैंजण । मुगुटमणि केला हीण । जयाचें कारण । तया ठायीं अळंकार ॥५॥ सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन । तुका म्हणे जाण । तुम्ही संत यदर्थीं ॥६॥

१०१. घरी रांड पोरें मरती उपवासीं । सांगे लोकांपासीं थोरपण ॥१॥ नेऊनियां घरा दाखवावें काय । काळतोंडा जाय चुकवूनि ॥२॥ तुका म्हणे आम्ही जाणों त्या प्रमाण । ठकावे हे जन तैसें नव्हों ॥३॥

१०२. जोहार जी मायबाप जोहार । सारा साधावया आलों वेसकर ॥१॥ मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा घालिती जी ॥२॥ फांकूं नका रुजू झालियावांचून । सांगा जी कोण धरती धण्या ॥३॥ आजी मायबाप करा तडातोडी । उद्यां कोण घडी राहेना हो ॥४॥ तुका म्हणे कांही न चले ते बोली । अखेर ते सालीं झाडा देती ॥५॥

१०३. येऊं द्या जी कांहीं वेसकरास । आंतून बाहेर वोजेचा घास ॥१॥ जो यावें तों हातचि

रिता नाहीं । कधीं तरी कांहीं द्यावें घ्यावें ॥२॥ तुका म्हणे उद्यां लावीन मनेरा । जे हे दारोदाराभोंवतीं फिरा ॥३॥

१०४. देती घेती परज गेली । घर खालीं करोनियां ॥१॥ धांवणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखी ॥२॥ अवघियांचें अवघें नेलें । कांहीं ठेविलें नाहीं मागें ॥३॥ सोंगें संपादुनि दाविला भाव । गेला आधीं माव वरि होती ॥४॥ घराकडे पाहूं नयेसेंचि जालें । अमानत केलें दिवाणांत ॥५॥ आतां तुका कोणा न लगेचि हातीं । जाली ते निश्चिती बोलों नये ॥६॥

१०५. शुकसनकादिकीं उभारिला बाहो । परिक्षिती लाहो दिसां सातां ॥१॥ उठाउठीं करी स्मरणाचा धांवा । धरवत देवा नाहीं धीर ॥२॥ त्वरा झाली गरुडा टाकियेलें मागें । दौपदीच्या लागें नारायणें ॥३॥ तुका म्हणे करी बहुत तांतडी । प्रेमाची आवडी लोभा पूर ॥४॥

१०६. बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ॥१॥ वाट दावी तया न लगे रुसावें । अतित्याई जीवें नाश पावे ॥२॥ निंब दिला रोग तुटावा अंतरीं । पोंभाळिता वरी आंत चरे ॥३॥ तुका म्हणे हित देखण्यासी कळे । पडती आंधळे कूपामाजी ॥४॥

१०७. माकडें मुठीसी धरिले फुटाणे । गुंतले ते नेणे हात तेथें ॥१॥ काय तो तयाचा लेखावा अन्याय । हित नेणे काय आपुलें तें ॥२॥ शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥३॥ तुका म्हणे एक ऐसे पशु जीव । न चले उपाव कांहीं तेथें ॥४॥

१०८. हरि तूं निष्ठुर निर्गुण । नाहीं माया बहु कठिण । नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ॥१॥ घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व । पुत्र पत्नी जीव । डोंबाघरीं वोपविलीं ॥२॥ नळदमयंतीचा वियोग । विघडिला त्यांचा संग । ऐसें जाणे जग । पुराणेंही बोलती ॥३॥ राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दयाळु भूतीं । तुळविलें अंतीं । तुळें मांस तयाचें ॥४॥ कर्ण भिडतां समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं । मागसी पाडोनी । तेथें दात तयाचे ॥५॥ बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर । करूनि काहार । तो पाताळीं घातला ॥६॥ श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी । मारविलें करीं । त्याचें बाळ त्या हातीं ॥७॥ तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति । ठाव नाहीं रे पुढती । तुका म्हणे करिसी तें ॥८॥

१०९. बाळ बापा म्हणे काका । तरि कां निपराध पारिखा ॥१॥ जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ॥२॥ साखरेसी म्हणतां धोंडा । तरि कां तोंडा न रुचे ॥३॥ तुका म्हणे आरुष बोल । नव्हे फोल आहाच ॥४॥

११०. चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥१॥ तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळी वसे ॥२॥ पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां नलगे घडी ॥३॥ केलीं मागें नको राहों । तुज जमान आम्ही आहों ॥४॥ करीं तुजसी करवती । आणिक नामें घेऊं

किती ॥५॥ तुका म्हणे काळा । रीघ नाहीं निघती ज्वाळा ॥६॥

१११. वित्तीं नाहीं तें जवळी असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥१॥ प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ॥२॥ तुका म्हणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥३॥

११२. काय काशी करिती गंगा । भीतरीं चांगा नाहीं तो ॥१॥ अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासी ॥२॥ काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥३॥ तुका म्हणे प्रेमेंविण । अवघा शीण बोले भुंके ॥४॥

११३. शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंबे ॥१॥ दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो म्हणे इतर लोक तैसे ॥२॥ तुका म्हणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥३॥

११४. अनुसरे तो अमर झाला । अंतरला संसार ॥१॥ न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे ॥२॥ विसंबेना माता बाळा । तैसा लळा पाळावा ॥३॥ त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तो रक्षिता झालिया ॥४॥

११५. आतां केशीराजा हेचि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसे ॥१॥ देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असों द्यावें ॥२॥ काळाचें खंडण घडावें चिंतन । तनमनधन विन्मुखता ॥३॥ कफवातपित्त देह अवसानीं । ठेवावी वारूनि दुरितें हीं ॥४॥ सावध तों माझीं इंद्रियें सकळ । दिली एक वेळ हाक आधीं ॥५॥ तुका म्हणे तूं या सकळाचा जनिता । येथें ऐक्यता सकळांसी ॥६॥

११६. चित्त तें चिंतन कल्पनेची धांव । जे जे वाढे हाव इंद्रियांची ॥१॥ हात पाव दिसे शरीर चालतां । नांवें भेद सत्ता जीवाची ते ॥२॥ रवीचिये अंगीं प्रकाश सकळां । वचनें निराळा भेद दिला ॥३॥ तुका म्हणे माप वचनाच्या अंगीं । सौख्य काय रंगीं निवडावें ॥४॥

११७. बोलोनियां काय दावूं । तुम्ही जीऊ जगाचे ॥१॥ हेचि आतां माझी सेवा । चिंतन देवा करितों ॥२॥ विरक्तासी देह तुच्छ । नाहीं आस काशाची ॥३॥ तुका म्हणे पायापाशीं । येईन ऐसी वासना ॥४॥

११८. धाकुट्याच्या मुखीं घांस घाली माता । वरी करी सत्ता शहाणिया ॥१॥ ऐसें जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ॥२॥ दोन्ही उभयतां आपणचि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न ॥३॥ तुका म्हणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें रडतें स्तनी ॥४॥

११९. उपदेश तो भलत्या हातीं । झाला चित्तीं धरावा ॥१॥ नये जाऊ पात्रावरी । कवटी सार नारळी ॥२॥ स्त्री पुत्र बंदीजन । नारायण स्मरविती ॥३॥ तुका म्हणे रत्नसार ।

परि उपकार चिंधीचे ॥४॥

१२०. देवाचे म्हणोनी देवीं अनादर । हें मोठें आश्चर्य वाटतसे ॥१॥ आतां येरा जना म्हणावें तें काई । जया भार डोई संसाराचा ॥२॥ त्यजुनी संसार अभिमान सांठा । जुलूम हा मोठा दिसतसे ॥३॥ तुका म्हणे आळस करूनियां साहे । बळें कैसें पाहे वांयां जाती ॥४॥

१२१. संतांचे गुणदोष आणितां या मना । केलिया उगाणा सुकृताचा ॥१॥ पिळोनियां पाहे पुण्याचा परिमळ । चिरोनि केळी केळ गाढव तो ॥२॥ तुका म्हणे गंगे अग्रीसि विटाळ । लावी तो चांडाळ दु:ख पावे ॥३॥

१२२. चुंबळीशीं करी चुंबळीचा संग । अंगीं वसे रंग क्रियाहीन ॥१॥ बीजाऐसें फळ दावी परिपाकीं । परिमळ लौकिकीं जातीऐसा ॥२॥ माकडाच्या गळां रत्न कुळांगना । सांडूनियां सुना बिदी धुंडी ॥३॥ तुका म्हणे ऐसा व्याली ते गाढवी । फजिती ते व्हावी आहे पुढें ॥४॥

१२३. सांपडला संदीं । मग बळिया पडे बंदीं ॥१॥ ऐसी कोणी वाहे वेळ । हातीं काळाच्या सकळ ॥२॥ दाता मागे दान । जाय याचका शरण ॥३॥ तुका म्हणे नेणां । काय सांगों नारायणा ॥४॥

१२४. सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ॥१॥ आला डोळ्यांसि कवळ । तेणें मळलें उजळ ॥२॥ अंगाचे भोवंडी । भोय झाडें फिरती धोंडी ॥३॥ तुका म्हणे नाड । पाप ठाके हिताआड ॥४॥

१२५. न देखोनि कांहीं । म्यां पाहिलें सकळही ॥१॥ जालों अवघियांपरी । मी हें माझें ठेलें दुरी ॥२॥ न घेतां घेतलें । हात पाय उसंतिलें ॥३॥ खादलें न खातां । रसना रस झाली घेतां ॥४॥ न बोलोनि बोलें । केलें प्रगट झांकिलें ॥५॥ नाइकिलें कानीं । तुका म्हणे आलें मनीं ॥६॥

१२६. शरणागत जालों । तेणें मीपणा मुकलों ॥१॥ आतां दिल्याचीच वाट । पाहों नाहीं खटपट ॥२॥ नलगे उचित । कांहीं पाहावें संचित ॥३॥ तुका म्हणे सेवा । माने तैसी करूं देवा ॥४॥

१२७. काखे कडासन आड पडे । खडबड खडबड हुसकलें ॥१॥ दाद करा दाद करा । फजितखोरा लाज नाहीं ॥२॥ अवघा झाला राम राम । कोणी कर्म आचरेना ॥३॥ हरिदासांच्या पडती पायां । म्हणती तयां नागवावें ॥४॥ दोहीं ठायीं फजित झाले । पारणें केलें अवकळा ॥५॥ तुका म्हणे नाश केला । विटंबिला वेश जेणें ॥६॥

१२८. कुटुंबाचा केला त्याग । नाहीं राग जंव गेला ॥१॥ भजन तें वोंगळवाणें । नरका जाणें चुकेना ॥२॥ अक्षराची केली आटी । जरी पोटीं संतनिंदा ॥३॥ तुका म्हणे मागें पाय । तया जाय स्थळासी ॥४॥

१२९. तारतिम वरि तोंडाच पुरतें । अंतरा हें येतें अंतरींचें ॥१॥ ऐसी काय बरी दिसे ठकाठकी । दिसतें लौकिकीं सत्या ऐसें ॥२॥ भोजनांत द्यावें विष कालवूनि । मोह चाळवणीं मारावया ॥३॥ तुका म्हणे मैंद देखों नेदी कुडें । आदराचें पुढें सोंग दावी ॥४॥

१३०. ब्रह्मनिष्ठ काडी । जरी जीवा नांवें मोडी ॥१॥ तया घडली गुरुहत्या । गेला उपदेश तो मिथ्या ॥२॥ सांगितलें कानीं । रूप आपलें वाखाणी ॥३॥ भूतांच्या मत्सरें । ब्रह्मज्ञान नेलें चोरें ॥४॥ शिकल्या सांगे गोष्टी । भेद क्रोध वाहे पोटीं ॥५॥ निंदास्तुति स्तवनीं । तुका म्हणे वेंची वाणी ॥६॥

१३१. इहलोकींचा हा देह । देव इच्छितातो पाहें ॥१॥ धन्य आम्ही जन्मा आलों । दास विठोबाचे झालों ॥२॥ आयुष्याच्या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ॥३॥ तुका म्हणे पावटणी । करूं स्वर्गाची निशाणी ॥४॥

१३२. पंडित वाचक जरी झाला पुरता । तरी कृष्णकथा ऐके भावें । क्षीर तुपा साखरे झालिया भेटी । तैसी पडे मिठी गोडपणें ॥१॥ जाणोनियां लाभ घेईं हा पदरीं । गोड गोडावरी सेवीं बापा । जाणिवेचें मूळ उपडोनि खोड । जरी तुज चाड आहे तुझी ॥२॥ नाना परिमळद्रव्यउपचार । अंगी उटी सार चंदनाची । जेविलियाविण शून्य ते शृंगार । तैसी गोडी हरिकथेविण ॥३॥ ज्याकारणें वेदश्रुति हीं पुराणें । तेंचि विठ्ठलनाणें तिष्ठे कथे । तुका म्हणे येर दगडाची पेवें । खळखळीचें अवघें मूळ तेथें ॥४॥

१३३. आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं ॥१॥ करिती बेटे उसणवारी । यमपुरीं भोगावया ॥२॥ सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासी ॥३॥ तुका म्हणे नाचती पोरें । खोडितां येरें अंग दुःखे ॥४॥

१३४. गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । कोठें चराचरीं त्याग केला ॥१॥ गायत्री स्वमुखें भक्षितसे मळ । मिळाल्या वोहोळ गंगाओघ ॥२॥ कागाचिये विष्ठे जन्म पिंपळासि । पांडवकुळासि पाहतां दोष ॥३॥ शकुंतला सूत कर्ण शृंगी व्यास । यांच्या नामें नाश पातकांसि ॥४॥ गणिका अजामेळ कुब्जा तो विदुर । पाहापां विचार पिंगळेचा ॥५॥ वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद । यांचें पूर्व शुद्ध काय आहे ॥६॥ न व्हावीं तीं कर्में जालीं नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥७॥ तुका म्हणे पूर्व नाठवी श्रीहरी । मूळ जो उच्चारी नरक त्यासी ॥८॥

१३५. सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वानालागीं ॥१॥ मुक्ताफळहार खरासि घातला । कस्तुरी सुकराला चोजविली ॥२॥ वेदपरायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खूण काय जाणे ॥३॥ तुका म्हणे ज्याचें तोचि एक जाणे । भक्तीचें महिमान साधु जाणे ॥४॥

१३६. ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ॥१॥ संसार करितां म्हणती हा

दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ॥२॥ आचार करितां म्हणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ॥३॥ संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं ॥४॥ धन नाहीं त्यासी ठायींचा करंटा । समर्थासि ताठा करिताती ॥५॥ बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥६॥ भेटिसि नवजातां म्हणती हा निष्ठूर । येतां जातां घर बुडविलें ॥७॥ लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपुंसक ॥८॥ निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ॥९॥ लोक जैसा ओक धरितां धरवेना । अभक्ता जिरे ना संतसंग ॥१०॥ तुका म्हणे आतां आइका वचन । त्यजुनियां जन भक्ति करा ॥११॥

१३७. धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हासि ॥१॥ वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥२॥ न बाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ॥३॥ तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥४॥

१३८. चवदा भुवनें जयाचिये पोटीं । तोचि आम्हीं कंठीं सांठविला ॥१॥ काय एक उणें आमुचिये घरीं । वोळंगती द्वारीं रिद्धिसिद्धी ॥२॥ असुर जयानें घातले तोडरीं । आम्हांसि तो जोडी कर दोन्ही ॥३॥ रूप रेखा नहीं जयासी आकार । आम्हीं तो साकार भक्तीं केला ॥४॥ अनंत ब्रह्मांडें जयाचिये अंगीं । समान तो मुंगी आम्हासाठीं ॥५॥ तुका म्हणे आम्ही देवाहूनी बळी । जालों हे निराळीं ठेवुनि आशा ॥६॥

१३९. केला मातीचा पशुपति । परि मातीसी काय महती । शिवपूजा शिवासि पावे । माती मातीमाजी सामावे ॥१॥ तैसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत । आम्ही किंकर संतांचे दास । संत पदवी नको आम्हांस ॥२॥ केला पाषाणाचा विष्णु । परी पाषाण नव्हे विष्णु । विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥३॥ केली कांशाची जगदंबा । परि कांसे नव्हे अंबा । पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसे राहे कांसेंपणें ॥४॥ ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली कांजी । ज्याची पूजा तेणेंचि घेणें । आम्हा पाषाणरूप राहणें ॥५॥

१४०. ते माझे सोयरे सज्जन सांगाती । पाय आठविती विठोबाचे ॥१॥ येरा मान विधिपाळणापुरते । देवाचीं तीं भूतें म्हणोनियां ॥२॥ सर्वभावें झालों वैष्णवांचा दास । करीन त्यांची आस उच्छिष्टाची ॥३॥ तुका म्हणे जैसे आवडती हरिदास । तैसी नाहीं आस आणिकांची ॥४॥

१४१. दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ॥१॥ धर्मनीतीचा हा ऐकावा वेव्हार । निवडिलें सार असार तें ॥२॥ पाप त्याचें नांव न विचारितां नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥३॥ तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥४॥

१४२. करावें गोमटें । बाळा माते तैं उमटे ॥१॥ आपुलिया जीवाहुनी । असे वाल्हें

तें जननी ॥२॥ वियोग तो तिस । त्याच्या उपचारें विष ॥३॥ तुका म्हणे पाय । डोळा सुखावे त्या न्यायें ॥४॥

१४३. कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनि पाहे ॥१॥ तैसें जालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ॥२॥ चुकलिया माय । बाळ हुरू हुरू पाहे ॥३॥ जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥४॥

१४४. हातीं होन दाविति बेणा । करिती लेंकीची धारणा ॥१॥ ऐसे धर्म झाले कलीं । पुण्य रंक पाप बळी ॥२॥ सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ॥३॥ टिळे लपविती पातडी । लेती विजार कातडीं ॥४॥ बैसोनियां तक्तां । अन्योविण पिडिती लोकां ॥५॥ मुदबख लिहिणें । तेल तूप साबण केणें ॥६॥ नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ॥७॥ राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी ॥८॥ वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक ॥९॥ अवघे बाह्य रंग । आंत हिरवें वरी सोंग ॥१०॥ तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धांवा ॥११॥

१४५. साळंकृत कन्यादान । पृथ्वीदानाच्या समान ॥१॥ परि तें न कळे या मूढा । येईल कळों भोग पुढां ॥२॥ आचरतां कर्म । भरे पोट राहे धर्म ॥३॥ सत्या देव साहे । ऐसें करूनियां पाहें ॥४॥ अन्न मान धन । हें तों प्रारब्धाआधीन ॥५॥ तुका म्हणे सोसे । सुख आतां पुढें नासे ॥६॥

१४६. दिवट्या वाद्य लावूनि खाणे । करूनि मंडण दिली हातीं ॥१॥ नवरा नेईल नवरी घरा । पूजन वरा पाद्याचें ॥२॥ गौरविली विहिण व्यावी । घडिलें कांहीं ठेवूं नका ॥३॥ करूं द्यावें व्हावें बरें । ठायींचें कारे न कळेचि ॥४॥ वऱ्हाडियांचे लागे पाठीं । जैसी उटी कातेली ॥५॥ तुका म्हणे जोडिला थुंका । पुढें नरका सामग्री ॥६॥

१४७. ब्रह्महत्या मारिल्या गाई । आणीक काई पाप केलें ॥१॥ ऐका जेणें विलिकी कन्या । पवाडे त्या सुण्याचे ॥२॥ नरमांस खादली भाडी । हाका हाडी म्हणोनी ॥३॥ अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिळासिलें ॥४॥ उच्चारितां मज तें पाप । जिव्हे कांप सुटतसे ॥५॥ तुका म्हणे कोरान्न रांड । बेटा भांड मागेना कां ॥६॥

१४८. याचा कोणी करी पक्ष । तोही त्याशीं समतुल्य ॥१॥ फुकासाठीं पावे दुःखाचा विभाग । पूर्वजाशीं लाग निरयदंडीं ॥२॥ ऐके राजा न करी दंड । जरि या लंड दुष्टासी ॥३॥ तुका म्हणे त्याचें अन्न । मद्यपानाचे समान ॥४॥

१४९. कपट कांही एक । नेणें भुलवावयाचे लोक ॥१॥ तुमचें करितों कीर्तन । गातों उत्तम ते गुण ॥२॥ दाऊं नेणें जडाबुटी । चमत्कार उठाउठी ॥३॥ नाहीं शिष्यशाखा । सांगों अयाचित लोकां ॥४॥ नव्हें मठपति । नाहीं चाहुरांची वृत्ति ॥५॥ नाहीं देवार्चन । असे मांडिलें दुकान ॥६॥

नाहीं वेताळ प्रसन्न । कांहीं सांगों खाणखूण ॥७॥ नव्हे पुराणिक । करणें सांगणें आणीक ॥८॥ नाहीं जाळीत भणदीं । उदो म्हणोनि आनंदी ॥९॥ नेणें वाद घटा पटा । करितां पंडित करंटा ॥१०॥ नाहीं हालवीत माळ । भोवतें मेळवूनि गबाळ ॥११॥ आगमीचें नेणें । कुडें स्तंभन मोहन उच्चाटण ॥१२॥ नोहे त्यांच्या ऐसा । तुका निरयवासी पिसा ॥१३॥

१५०. रडोनिया मान । कोण मागतां भूषण ॥१॥ देवें दिलें तरी गोड । राहे रुचि आणि कोड ॥२॥ लावितां लावणी । विके भीके केज्या दानी ॥३॥ तुका म्हणे धीरा । विण कैसा होतो हिरा ॥४॥

१५१. पूज्या एकासनीं आसनीं आसन । बैसतां गमन मातेशीं तें ॥१॥ सांगतों ते धर्म नीतीचे संकेत । सावधान हित व्हावें तरी ॥२॥ संता ठाया ठाव पूजनाची इच्छा । जीवनींच वळसा सांपडला ॥३॥ तुका म्हणे एकाएकीं वरासन । दुजें तेथें भिन्न अशोभ तें ॥४॥

१५२. जेणें मुखें स्तवी । तेंचि निंदेपाठीं लावीं ॥१॥ ऐसी अधमाची याती । लोपी सोनें खाय माती ॥२॥ गुदद्वारावाटे । मिष्टान्नाचा नरक लोटे ॥३॥ विंचु लाभेविण । तुका म्हणे वाहे शीण ॥४॥

१५३. अधमाची यारी । रंग पतंगाचे परी ॥१॥ विटे न लगतां क्षण । मोल जाय वांयांविण ॥२॥ सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ॥३॥ तुका म्हणे देवा । मज झणी ऐसे दावा ॥४॥

१५४. आणिकाची स्तुति आम्हां ब्रह्महत्या । एकावांचूनि त्या पांडुरंगा ॥१॥ आम्हां विष्णुदासां एकविध भाव । न म्हणों या देव आणिकासी ॥२॥ शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ॥३॥ तुका म्हणे मज आणिका संकल्पें । अवघींच पापें घडतील ॥४॥

१५५. तान्हेल्याची धणी । फिटे गंगा नव्हे उणी ॥१॥ माझे मनोरथ सिद्धी । पाववावे कृपानिधि ॥२॥ तूं तों उदाराचा राणा । माझी अल्पचि वासना ॥३॥ कृपादृष्टीं पाहें । तुका म्हणे होई साहे ॥४॥

१५६. संतांचा अतिक्रम । देव पूजा तो अधर्म ॥१॥ येती दगड तैसे वरी । मंत्रपुष्प देवाशिरीं ॥२॥ अतीतासी गाळी । देवा नैवेद्यासी पोळी ॥३॥ तुका म्हणे देवा । ताडन भेदकाची सेवा ॥४॥

१५७. करणें तें देवा । हेचि एक पावे सेवा ॥१॥ अवघें घडे येणें सांग । भक्त देवाचें तें अंग ॥२॥ हेंचि एक वर्म । काय बोलिला तो धर्म ॥३॥ तुका म्हणे खरें । खरें त्रिवाचा उत्तरें ॥४॥

१५८. मागें नेणपणें घडलें तें क्षमा । आतां देतों सीमा करूनियां ॥१॥ परनारीचें जया घडेल गमन । दावीतो वदन जननीरत ॥२॥ उपदेशावरी मन नाहीं हातीं । तो आम्हां पुढती पाहूं नये ॥३॥ तुका म्हणे साक्षी असों द्यावें मन । घातली ते आण पाळावया ॥४॥

१५९. आणिकाच्या घातें । ज्यांची निवतील चित्तें ॥१॥ तेचि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्रकोपी ॥२॥ जो कान पसरोनी । ऐके वदे दुष्ट वाणी ॥३॥ तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा ॥४॥

१६०. केली सीताशुद्धि । मूळ रामायणा आधीं ॥१॥ ऐसा प्रतापी गहन । सकळ भक्तांचें भूषण ॥२॥ जाऊनी पाताळा । केली देवीची अवकळा ॥३॥ राम लक्षुमण । नेले आणिले चोरून ॥४॥ जोडूनियां कर । उभा सन्मुख समोर ॥५॥ तुका म्हणे जपें । वायुसुता जातीं पापें ॥६॥

१६१. काम बांदवडी । काळ घातला तोडरी ॥१॥ तया माझे दंडवत । कपिकुळीं हनुमंत ॥२॥ शरीर वज्रा ऐसें । कवळी ब्रह्मांड जो पुच्छें ॥३॥ रामाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ॥४॥

१६२. हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ॥१॥ तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ॥२॥ करोनी उड्डाण । केलें लंकेचें शोधन ॥३॥ जाळियली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ॥४॥

१६३. शरण शरण जी हनुमंता । तुज आलों रामदूता ॥१॥ काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ॥२॥ शूर आणि धीर । स्वामिकाजीं तूं सादर ॥३॥ तुका म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ॥४॥

१६४. धिग जिणें तो बाईले आधीन । परलोक मान नाहीं दोन्ही ॥१॥ धिग जिणें ज्याचें लोभावरी मन । अतीत पूजन घडेचि ना ॥२॥ धिग जिणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ॥३॥ धिग जिणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मनालागीं साधुपणा ॥४॥ तुका म्हणे धिग ऐसे जाले लोक । निंदक वादक नरका जाती ॥५॥

१६५. अरे हें देह व्यर्थ जावें । ऐसें जरी तुज व्हावें । द्यूत कर्म मनोभावें । सारीपाट खेळावा ॥१॥ मग कैचें हरिचें नाम । निजलिया जागा राम । जन्मोजन्मींचा अधम । दुःख थोर साधिलें ॥२॥ विषयसुखाचा लंपट । दासीगमनीं अतिधीट । तया तेचि वाट । अधोगती जावया ॥३॥ अणीक एक कोड । नरका जावयाची चाड । तरी संतनिंदा गोड । करी कवतुकें सदा ॥४॥ तुका म्हणे ऐसें । मना लावी रामपिसें । नाहीं तरी आलिया सायासें । फुकट जासी ठकोनी ॥५॥

१६६. अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नव्हे ॥१॥ नाहीं भाव तया सांगावें तें किती । आपुलाल्या मती पाखांडिया ॥२॥ जया भावे संत बोलिले वचन । नाहीं अनुमोदन शाब्दिकांसि ॥३॥ तुका म्हणे संतीं भाव केला बळी । न कळतां खळी दूषिला देव ॥४॥

१६७. एक तटस्थ मानसीं । एक सहजचि आळसी ॥१॥ दोन्ही दिसती सारखीं । वर्म जाणे तो पारखी ॥२॥ एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोंप ॥३॥ एका

सर्वस्वाचा त्याग । एका पोटासाठीं जोग ॥४॥ एका भक्ति पोटासाठीं । एका देवासवें गांठी ॥५॥ वर्म पोटीं एका । फळें दोन सांगे तुका ॥६॥

१६८. काय कळे बाळा । बाप सदैव दुबळा ॥१॥ आहे नाहीं हें न कळे । हातीं काय कोण्या वेळे ॥२॥ देखिलें तें दृष्टी । मागे घालूनियां मिठी ॥३॥ तुका म्हणे भावें । माझें मज समजावें ॥४॥

१६९. भजन घाली भोगावरी । अकर्तव्य मनीं धरी ॥१॥ धिग त्याचें साधुपण । विटाळूनी वर्ते मन ॥२॥ नाहीं वैराग्याचा लेश । अर्थचाड जीवीं आस ॥३॥ हें ना तैसें जालें । तुका म्हणे वायां गेलें ॥४॥

१७०. एकादशीस अन्न पान । जे नर करिती भोजन । श्वानविष्टेसमान । अधम जन ते एक ॥१॥ ऐका व्रताचें महिमान । नेमें आचरती जन । गाती ऐकती हरिकीर्तन । ते समान विष्णूशीं ॥२॥ अशुद्ध विटाळसीचें खळ । विडा भक्षितां तांबूल । सांपडे सबळ । काळाहातीं न सुटे ॥३॥ सेज बाज विलास भोग । करिती कामिनीचा संग । तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥४॥ आपण न वजे हरिकीर्तना । आणिकां वारी जातां कोणा । त्याच्या पापें जाणा । ठेंगणा तो महा मेरु ॥५॥ तया दंडी यमदूत । जाले तयाचे अंकित । तुका म्हणे व्रत । एकादशी चुकलिया ॥६॥

१७१. करवितां व्रत अर्थ पुण्य लाभे । मोडवितां दोघें नरका जाती ॥१॥ शुद्ध बुद्धि होय दोघां एक मान । चोरासवें कोण जीवें राखे ॥२॥ आपुलें देउनी आपुलाचि घात । न करावा थीत जाणोनियां ॥३॥ देऊनियां वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ॥४॥ तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मार्ग मोडूं नये ॥५॥

१७२. इनामाची भरली पेंठ । वाहाती दाट मारग ॥१॥ अवघेचि येती वाण । अवघे शकुन लाभाचे ॥२॥ अडचणी केल्या दुरी । देण्या उरी घेण्याच्या ॥३॥ तुका म्हणे जोडी जाली । ते आपुली आपणा ॥४॥

१७३. वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोकां नाहीं येरा ॥१॥ विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एकसरें भवसिंधु ॥२॥ जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ । येर तो सकळ मूढ लोक ॥३॥ तुका म्हणे विधिनिषेध लोपला । उच्छेद या झाला मारगाचा ॥४॥

१७४. विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥१॥ मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसानीं अंतीं ॥२॥ बहु अतिशय खोटा । तर्कें होती बहु वाटा ॥३॥ तुका म्हणे भावें । कृपा करीजेते देवें ॥४॥

१७५. येथींचिया अलंकारें । काय खरें पूजन ॥१॥ वैकुंठींच्या लावूं वाटा । सर्व

सांठा ते ठायीं ॥२॥ येथींचिया नाशिवंतें । काय रितें चाळवूं ॥३॥ तुका म्हणे वैष्णवजन । माझे गण समुदाय ॥४॥

१७६. उजळावया आलों वाटा । खरा खोटा निवाडा ॥१॥ बोलविले बोलें बोल । धनी विठ्ठल सन्निध ॥२॥ तरी मनीं नाहीं शंका । बळें एका स्वामीच्या ॥३॥ तुका म्हणे नये आम्हां । पुढें कामा गाबाळ ॥४॥

१७७. बोलावें तें धर्मा मिळे । बरें डोळे उघडूनी ॥१॥ काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंके तें ॥२॥ दुजें ऐसें कोण बळी । जें या जाळी अग्नीसी ॥३॥ तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनीं बुरबुरी ॥४॥

१७८. बरें देवा कुणबी केलों । नाहीं तरि दंभें असतों मेलों ॥१॥ भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ॥२॥ विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥३॥ सेवा चुकतों संतांची । हेचि नागवण फुकाची ॥४॥ गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ॥५॥ तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥६॥

१७९. दाता नारायण । स्वयें भोगितां आपण ॥१॥ आतां काय उरलें वाचे । पुढें शब्द बोलायाचे ॥२॥ देखती जे डोळे । रूप आपुलें तें खेळे ॥३॥ तुका म्हणे नाद । जाला अवघा गोविंद ॥४॥

१८०. कृपा करुनि देवा । मज साच तें दाखवा ॥१॥ तुम्ही दयावंत कैसे । कीर्ति जगामाजी वसे ॥२॥ पाहोनियां डोळां । हातीं ओढवाल काळा ॥३॥ तुका म्हणे देवा । माझा करावा कुढावा ॥४॥

१८१. ठायींची ओळखी । येईल टाकूं टाका सुखी ॥१॥ तुमचें जाईल इमान । माझे कपाळीं पतन ॥२॥ ठेविला तो ठेवा । अभिळाशे बुडवावा ॥३॥ मनीं न विचारा । तुका म्हणे हे दातारा ॥४॥

१८२. तुझें वर्म ठावें । माझ्या पाडियेलें भाषें ॥१॥ रूप कासवीचे परी । धरूनि राहिलों अंतरीं ॥२॥ नेदी होऊं तुटी । मेळवीन दृष्टादृष्टी ॥३॥ तुका म्हणे देवा । चिंतन हे तुझी सेवा ॥४॥

१८३. गहूं एकजाती । परी त्या पाधाणी नासिती ॥१॥ वर्म जाणावें तें सार । कोठें काय थोडें फार ॥२॥ कमाईचें सार । जाती दाविती प्रकार ॥३॥ तुका म्हणे मोल । गुणा मिथ्या फिके बोल ॥४॥

१८४. पुण्यवंत व्हावें । घेतां सज्जनांचीं नांवें ॥१॥ नेघे माझी वाचा तुटी । महालाभ फुकासाठीं ॥२॥ विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ॥३॥ तुका म्हणे पापें । जाती संतांचिया जपें ॥४॥

१८५. देव होईजेत देवाचे संगती । पतन पंगती जगाचिया ॥१॥ दोहींकडे दोन्ही वाहातील वाटा । करितील सांठा आपुलाला ॥२॥ दुखविले परी नाहीं वरिंजिता । आला तोचि चित्ता भाग वरी ॥३॥ तुका म्हणे अंगीं आवडीचें बळ । उपदेश मूळ बीजपात्र ॥४॥

१८६. शोधिसील मूळें । त्याचें करीसी वाटोळें ॥१॥ ऐसे संतांचे बोभाट । तुझे बहु झाले तंट ॥२॥ लौकिका बाहेरी । घाली रोखी जया धरी ॥३॥ तुका म्हणे गुण । तुझा लागलिया शून्य ॥४॥

१८७. वैद्य वांचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥१॥ काय जाणो कैसी परी । प्रारब्ध तें ठेवी उरी ॥२॥ अंगीं दैवत संचरे । मग तेथे काय उरे ॥३॥ नवसें कन्यापुत्र होती । तरि कां करणें लागे पती ॥४॥ जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥५॥

१८८. मार्गीं बहुत । याचि गेले साधुसंत ॥१॥ नका जाऊं आडरानें । ऐसीं गर्जती पुराणें ॥२॥ चोखाळिल्या वाटा । न लगे पुसाव्या धोपटा ॥३॥ झळकती पताका । गरुड टके म्हणे तुका ॥४॥

१८९. कार्तिकीचा सोहळा । चला जाऊं पाहूं डोळां । आलें वैकुंठ जवळां । सन्निध पंढरीये ॥१॥ पीक पिकलें घुमरी । प्रेम न समाये अंबरीं । अवघी मातली पंढरी । घरोघरीं सुकाळ ॥२॥ चालती स्थिर स्थिर । गरुड टकयांचे भार । गर्जती गंभीर । टाळ श्रुति मृदंग ॥३॥ मिळालिया भद्रजाती । कैशा आनंदें डुल्लती । शूर उठावती । एक एक आगळे ॥४॥ नामामृत कल्लोळ । वृंदें कोंदलीं सकळ । आलें वैष्णवदळ । कळिकाळ कांपती ॥५॥ आस करिती ब्रह्मादिक । देखुनि वाळवंटींचें सुख । धन्य धन्य मृत्युलोक । म्हणती भाग्याचे कैसे ॥६॥ मरण मुक्ति वाराणसी । पितृऋण गया नासी । उधार नाहीं पंढरीसी । पायापाशीं विठोबाच्या ॥७॥ तुका म्हणे आतां । काय करणें आम्हां चिंता । सकळ सिद्धींचा दाता । तो सर्वथा नुपेक्षी ॥८॥

१९० जया दोषां परिहार । नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । ते हरती अपार । पंढरपूर देखिलिया ॥१॥ धन्य धन्य भीमातीर । चंद्रभागा सरोवर । पद्मतीर्थीं विठ्ठल वीर । क्रीडास्थळ वेणुनाद ॥२॥ सकळ तीर्थांचें माहेर । भूवैकुंठ निर्विकार । नामाचा गजर । असुरकाळ कांपती ॥३॥ नाहीं उपमा द्यावया । सम तुल्य आणिका ठाया । धन्य भाग्य जया । जे पंढरपुर देखती ॥४॥ उपजोनी संसारीं । एक वेळ पाहें पां पंढरी । महा दोषां कैंची उरी । देवभक्त देखिलिया ॥५॥ ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नर नारी । सुदर्शन घरटी करी । रीघ न पुरे कळिकाळा ॥६॥ तें सुख वर्णावया गति । एवढी कैंची मज मति । जे पंढरपुरा जाती । ते पावती वैकुंठ ॥७॥ तुका म्हणे या शब्दाचा । जया विश्वास नाहीं साचा । तो अधम जन्मांतरिंचा । जया पंढरी नावडे ॥८॥

१९१. एक नेणतां नाडलीं । एका जाणिवेची भुली ॥१॥ बोलों नेणें मुकें । वेडे वाचाळ काय

निकें ॥२॥ दोहीं सवानाड । विहीर एकीकडे आड ॥३॥ तुका म्हणे कर्म । तुझें कळों नेदी वर्म ॥४॥

१९२. म्हणवितों दास । मज एवढीच आस ॥१॥ परी तें अंगीं नाहीं वर्म । करीं आपला तूं धर्म ॥२॥ बडबडितो तोंडें । रितें भावेविण धेंडें ॥३॥ तुका म्हणे बरा । दावूं जाणतों पसारा ॥४॥

१९३. पूजा समाधान । अतिशय वाढे सीण ॥१॥ हें तों जाणां तुम्ही संत । आहे बोलिली ती नीत ॥२॥ पहिलें पाहिजे तें केलें । सहज प्रसंगीं घडलें ॥३॥ तुका म्हणे माथा । पायीं माझा तुम्हां संतां ॥४॥

१९४. स्वप्नींचिया गोष्टी । मज धरिलें होतें वेठी । जालिया सेवटीं । जागे लटिकें सकळ ॥१॥ वायां भाकिली करुणा । मूळ पावावया शीणा । राव रंक राणा । कैच्या स्थानावरी आहे ॥२॥ सोसिलें तें अंगें । खरें होतें नव्हतां जागें । अनुभवही सांगे । दुःखें डोळे उघडीले ॥३॥ तुका म्हणे संतीं । सावचित केलें अंतीं । नाहीं तरि होती । टाळी बैसोनि राहिली ॥४॥

१९५. आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ॥१॥ याति कुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असे अंगीं ॥२॥ काळेंकुट पितळ सोनें शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्षी देतें ॥३॥ तुका म्हणे बरी जातीसवें भेटी । नवनीत पोटीं सांठविलें ॥४॥

१९६. वासुगीच्या वनीं सीता शोक करी । कांहो अंतरलें रघुनाथ दुरी । येउनि गुंफेमाजी दुष्टें केली चोरी । कांहो मज आणिलें अवघड लंकापुरी ॥१॥ सांग वो त्रीजटे सखिये ऐसी मात । देईल कां नेदी भेटी रघुनाथ । मन उताविळ जाला दुरी पंथ । राहों न सकें प्राण माझा कुडी आंत ॥२॥ काय दुष्ट आचरण होते म्यां केलें । तीर्थ व्रत होतें कवणाचें भंगिलें । गाईवत्सा पत्नीपुरुषा विघडिलें । न कळे वो संचित चरण अंतरले ॥३॥ नाडियेलें आशा मृगकांतिसोनें । धाडिले रघुनाथा पाठिलागे तेणें । उल्लंघिली आज्ञा माव काय मी जाणें । देखुनी सुनाट घेउनि आलें सुनें ॥४॥ नाहीं मूळ मारग लागे आणीक सोय । एकाविण नामें रघुनाथाच्या माय । उपटी पक्षिया एक देउनी पाय । उदकवेढ्यामध्यें तेथें चाले काय ॥५॥ जनकाची नंदिनी दुःखें ग्लांती थोरी । चुकली कुरंगिणी मेळा तैशा परी । संबोखी त्रीजटा स्थिर स्थिर वो करी । येईल तुकयास्वामी राम लंकापुरी ॥६॥

१९७. विट नेघे ऐसें रांधा । जेणें बाधा उपजे ना ॥१॥ तरीच तें गोड राहे । निरें पाहे स्वयंभ ॥२॥ आणिका गुणां पोटीं वाव । दावी भाव आपुला ॥३॥ तुका म्हणे शुद्ध जाती । ते मागुती परतेना ॥४॥

१९८. नव्हतों सावचित्त । तेणें अंतरलें हित ॥१॥ पडिला नामाचा विसर । वाढविला संवसार ॥२॥ लटिक्याचे पुरीं । गेलों वाहोनियां दुरीं ॥३॥ तुका म्हणे नाव । आम्हां सांपडला भाव ॥४॥

१९९. अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥१॥ आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥२॥ देखोनि जीवन जरि जाय ताहान । तरि कां सांठवण घरोघरीं ॥३॥ देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥४॥ हित तरी होय गातां आइकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥५॥ तुका म्हणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची ॥६॥

२००. काय उणें आम्हां विठोबाचे पायीं । नाहीं ऐसें काई येथें एक ॥१॥ तें हें भोंवतालें ठायीं वांटूं मन । बराडी करून दारोदारीं ॥२॥ कोण बळी माझ्या विठोबावेगळा । आणीक आगळा दुजा सांगा ॥३॥ तुका म्हणे मोक्ष विठोबाचे गांवीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥४॥

२०१. सेवितों हा रस वांटितों आणिकां । घ्यारे होऊं नका रानभरी ॥१॥ विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तोचि एक दानशूर दाता ॥२॥ मनाचे संकल्प पाववील सिद्धी । जरी राहे बुद्धी याचे पायीं ॥३॥ तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥४॥

२०२. ऐसे ऐसियानें भेटती ते साधु । ज्याच्या दर्शनें तुटे भवबंधू । जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदु । जे कां मोक्षसिद्धी तीर्थ वंदू रे ॥१॥ भाव सर्व कारण मूळ बंदु । सदा समबुद्धि नास्तिक्य भेदु । भूतकृपा मोडी द्वेषकंदु । शत्रु मित्र पुत्र समकरीं बंधु रे ॥२॥ मन बुद्धि काया वाचा शुद्ध करी । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं । लघुत्व सर्व भावें अंगीकारीं । सांडी मांडी मीतूंपण ऐसी थोरी रे ॥३॥ अर्थकामचाड नाहीं चित्ता । मानामान मोह माया मिथ्या । वर्ते समाधानी जाणोनि नेणता । साधु भेट देती तया अवचिता रे ॥४॥ मनीं दृढ धरीं विश्वास । नाहीं सांडीमांडीचा सायास । साधुदर्शन नित्यकाळ त्यास । तुका म्हणे जो विटला जाणीवेस रे ॥५॥

२०३. भवसागर तरतां । कां रे करीतसां चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवूनियां ॥१॥ त्याचे पायीं घाला मिठी । मोल ने घे जगजेठी । भावा एकासाठीं । खांदां वाहे आपुल्या ॥२॥ सुखें करावा संसार । न संडावें दोन्ही वार । दया क्षमा घर । चोजवित येतील ॥३॥ भुक्तिमुक्तीची चिंता । दैन्य नाहीं दरिद्रता । तुका म्हणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ॥४॥

२०४. जें कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥१॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥२॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥३॥ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥४॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥५॥ तुका म्हणे सांगूं किती । त्याचि भगवंताच्या मूर्ती ॥६॥

२०५. याजसाठीं भक्ति । जगीं रूढवावया ख्यातिं ॥१॥ नाहीं तरी कोठें दुजें । आहे बोलावया सहजें ॥२॥ गौरवावयासाठीं । स्वामिसेवेची कसोटी ॥३॥ तुका म्हणे अळंकारा । देवभक्त लोकीं खरा ॥४॥

२०६. अमंगळ वाणी । नये आइकों ते कानीं ॥१॥ जो हे दूषी हरिची कथा । त्यासि क्षयरोगच्यथा ॥२॥ याति वर्ण श्रेष्ठ । परि तो चांडाळ पापिष्ठ ॥३॥ तुका म्हणे पाप । माय न आवडे ज्या बाप ॥४॥

२०७. कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ॥१॥ वाचे नुच्चारी गोविंदा । सदा करी परनिंदा ॥२॥ कैसा निरयगांवा । जाऊन पवे विसांवा ॥३॥ तुका म्हणे दंड । कैसा न पवे तो लंड ॥४॥

२०८. गर्भाचें धारण । तिनें वागविला शिण ॥१॥ व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वर न घालीच तोंडा ॥२॥ उपजला काळ । कुळा लाविला विटाळ ॥३॥ तुका म्हणे जाय । नरका अभक्ताची माय ॥४॥

२०९. पतनासि नेती । तिचा खोटा स्नेह प्रीती ॥१॥ विधिपुरतें कारण । बहू वारावें वचन ॥२॥ सर्वस्वासि नाडी । ऐसी लाघवाची वेडी ॥३॥ तुका म्हणे दुरीं । राखतां हे तेंचि बरी ॥४॥

२१०. देव आड आला । तो मी भोगितो उगला । अवघा निवारिला । शीण शुभअशुभाचा ॥१॥ जीवशिवाचे भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें । कैचीं येथें लोकें । हा आभास अनित्य ॥२॥ विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग । वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ ॥३॥ अवघी एकाचीच वीण । तेथें कैचें भिन्नाभिन्न । वेदपुरुष नारायण । तेणें केला निवाडा ॥४॥ प्रसादाचा रस । तुका लाधला सौरस । पायापाशीं वास । निकट नव्हे निराळा ॥५॥

२११. आचरणा ठाव । नाहीं अंगीं स्वतां भाव ॥१॥ करवी आणिकांचे घात । खोडी काढूनि पंडित ॥२॥ श्वानाचिया परी । मिष्टान्नासि विटाळ करी ॥३॥ तुका म्हणे ऐसा । सटवेचि ना पांचा दिसां ॥४॥

२१२. ध्यानीं योगीराज बैसले कपाटीं । लागे पाटोवाटीं तयांचिया ॥१॥ ताहान भूक त्यांचें राखे शीत उष्ण । जाले उदासीन देहभावें ॥२॥ कोण सखें तयां आणीक सोयरें । असे त्यां दुसरें हरीविण ॥३॥ कोण सुख त्यांच्या जीवासि आनंद । नाहीं राज्यमद घडी तयां ॥४॥ तुका म्हणे विष अमृतासमान । कृपा नारायण करितां होय ॥५॥

२१३. न व्हावें तें जालें देखियेले पाय । आतां फिरूं काय मागें देवा ॥१॥ बहुत दिस होतों करीत हे आस । तें आलें सायास फळ आजि ॥२॥ कोठवरी जिणे संसाराची आशा । उगवूं हा फांसा एथूनियां ॥३॥ बुडाले तयांचा मूळ ना मारग । लागला तो लाग सांडूनियां ॥४॥ पुढें उल्लंघितां दुःखाचे डोंगर । नाहीं अंतपार गर्भवासा ॥५॥ तुका म्हणे कास धरीन पीतांबरीं । तूं भवसागरीं तारूं देवा ॥६॥

२१४. वैकुंठा जावया तपाचे सायास । लागे जीवा नाश करणें बहु ॥१॥ तया

पुंडलिकें केला उपकार । फेडावया भार पृथ्वीचा ॥२॥ तुका म्हणे केली सोपी पायवाट । पंढरी वैकुंठ भूमीवरी ॥३॥

२१५. शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥१॥ येथें केलें नव्हे काई । लंडीपण खोटें भाई ॥२॥ करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ॥३॥ तुका म्हणे घडी । साधिलिया एक थोडी ॥४॥

२१६. म्हणउनि खेळ मांडियेला ऐसा । नाहीं कोणी दिशा वर्जीयली ॥१॥ माझिया गोतें हें वसलें सकळ । न देखिजे मूळ विटाळाचें ॥२॥ करूनि ओळखी दिली एकसरें । न देखों दुसरें विषमासी ॥३॥ तुका म्हणे नाहीं काळापाशीं गोवा । स्थिति मति देवावांचूनियां ॥४॥

२१७. वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥१॥ नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥२॥ पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥३॥ तुका म्हणे याती । हो कां तयाची भलती ॥४॥

२१८. करोत तपादि साधनें । कोणी साधोत गोरांजनें ॥१॥ आम्ही न वजों तया वाटा । नाचूं पंढरीचोहटां ॥२॥ पावोत आत्मस्थिति । कोणी म्हणोत उत्तम मुक्ति ॥३॥ तुका म्हणे छंद । आम्हा हरिच्या दासां निंद्य ॥४॥

२१९. देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥१॥ ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव ॥२॥ देवाची जतन । तया बाधूं न शके अग्र ॥३॥ तुका म्हणे हरी । प्रल्हादासि यत्न करी ॥४॥

२२०. भले म्हणवितां संतांचे सेवक । आइत्याची भीक सुखरूप ॥१॥ ठसावितां बहु लागती सायास । चुकल्या घडे नाश अल्प वर्म ॥२॥ पाकसिद्धी लागे संचित आइतें । घडतां सोई तें तेव्हां गोड ॥३॥ तुका म्हणे बऱ्या सांगतांचि गोष्टी । रणभूमि दृष्टी न पडतां ॥४॥

२२१. संतसमागम एखादिये परी । व्हावें त्यांचे द्वारीं श्वानयाती ॥१॥ तेथे रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥२॥ कामारीं बटीक सेवेचा सेवक । दीनपणें रंक तेथें भले ॥३॥ तुका म्हणे सर्व सुख त्या संगती । घडेल पंगती संतांचिया ॥४॥

२२२. वाघाचा कलभूत दिसे वाघाऐसा । परी नाहीं दशा साच अंगीं ॥१॥ बाहेरील रंग निवडी कसोटी । संघटणें भेटी आपेआप ॥२॥ शिकविलें तैसें नाचावें माकडें । न चले त्यापुढें युक्ति कांहीं ॥३॥ तुका म्हणे करी लटिक्याचा सांठा । फजित तो खोटा शीघ्र होय ॥४॥

२२३. सिंदळीचे सोइरे चोराचीया दया । तेही जाणा तया संवसर्गीं ॥१॥ फुकासाठीं भोगे दुःखाचा तो वांटा । उभारोनि कांटा वाटेवरी ॥२॥ सर्प पोसूनियां दुधाचाही नास । केलें थीतां विष अमृताचें ॥३॥ तुका म्हणे त्यासी न करितां दंडन । पुढिल्या खंडन नव्हे दोषा ॥४॥

२२४. तेणें सुखें माझें निवविलें अंग । विठ्ठल हें जग देखियेलें ॥१॥ कवतुकें करुणा भाकीतसें लाडें । आवडी बोबडें बोलोनियां ॥२॥ मज नाहीं दशा अंतरीं दुःखाची । भावना भेदाची सर्व गेली ॥३॥ तुका म्हणे सुख जालें माझ्या जीवा । रंगलों केशवा तुझ्या रंगें ॥४॥

२२५. विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा । जाइन त्याच्या गांवा भेटावया ॥१॥ शीण भाग त्यासी सांगेन आपुला । तो माझा बापुला सर्व जाणे ॥२॥ माय माउलिया बंधुवर्ग जाणा । भाकीन करुणा सकळिकांसी ॥३॥ संत महंत सिद्ध महानुभाव मुनि । जीवभाव जाऊनि सांगेन त्या ॥४॥ माझिये माहेरीं सुखा काय उणें । नलगे येणें जाणें तुका म्हणे ॥५॥

२२६. ध्याइन तुझें रूप गाइन तुझें नाम । आन न करी काम जिव्हामुखें ॥१॥ पाहिन तुझे पाय ठेवीन मी डोई । पृथक तें कांहीं न करीं आन ॥२॥ तुझेचि गुणवाद आइकेन कानीं । आणिकांची वाणी पुरे आतां ॥३॥ करिन सेवा करें चालेन मी पायीं । आणीक न वजे ठायीं तुजविण ॥४॥ तुका म्हणे जीव ठेवीन मी पायीं । आणीक ते कांहीं देऊं कवणा ॥५॥

२२७. माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं । धरोनियां बाहीं । भव हा तारीं दातारा ॥१॥ चतुरा तूं शिरोमणि । गुणलावण्याची खाणी । मुगुट सकळां मणि । धन्य तूंचि विठोबा ॥२॥ करीं तिमिरांचा नाश । उदयो होउनि प्रकाश । तोडीं आशापाश । करीं वास हृदयीं ॥३॥ पाहें गुंतलों नेणतां । माझी असो तुम्हा चिंता । तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥४॥

२२८. आमुचें उचित हेचि उपकार । आपुलाचि भार घालूं तुज ॥१॥ भूक लागलिया भोजनाची आळी । पांघुरण काळीं शीताचिये ॥२॥ जेणें काळीं उठी मनाची आवडी । तेचि मागों घडी आवडे तें ॥३॥ दुःख येवो नेदी आमुचिया घरा । चक्र करी फेरा भोंवताला ॥४॥ तुका म्हणे नाहीं मुक्तीसवें चाड । हेंचि आम्हां गोड जन्म घेतां ॥५॥

२२९. मी दास तयाचा जया चाड नाहीं । सुख दुःख दोहां विरहित जो ॥१॥ राहिलासे उभा भींवरेचे तीरीं । कट दोहीं करीं धरोनियां ॥२॥ नवल काय तरी पाचारितां पावे । न त्वरित धांवे भक्तिकाजें ॥३॥ सर्व भार माझा त्यासी आहे चिंता । तोचि माझा दाता स्वहिताचा ॥४॥ तुका म्हणे त्यास गाईन मी गीतीं । आणीक तें चित्तीं न धरीं कांहीं ॥५॥

२३०. यासी कोणी म्हणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तोचि एक ॥१॥ आड वाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीती तेही ऐसी आहे ॥२॥ नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ॥३॥ जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ॥४॥ तुका म्हणे निंब दीधल्यावांचून । अंतरींचा शीण कैसा जाय ॥५॥

२३१. निवडे जेवण शेवटीच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळही ॥१॥ न पाहिजे जाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांयां ॥२॥ संपादिलें व्हावें धरिलें तें सोंग । विटंबना व्यंग

पडिलिया ॥३॥ तुका म्हणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥४॥

२३२. दिली हाक मनें नव्हतें जतन । वेगळाले गुण धांव घेती ॥१॥ काम क्रोध मद मत्सर अहंकार । निंदा हिंसा फार माया तृष्णा ॥२॥ इंद्रियांचे भार फिरतील चोर । खाणें घ्यावया घर फोडूं पाहे ॥३॥ माझा तेथें कांहीं न चले पराक्रम । आहे त्याचें वर्म तुझे हातीं ॥४॥ तुका म्हणे आतां करितो उपाय । जेणें तुझे पाय आतुडती ॥५॥

२३३. कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा ॥१॥ कृष्ण माझा गुरु कृष्ण माझा तारूं । उतरी पैलतीरू भवनदीचा ॥२॥ कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोइरा सज्जन कृष्ण माझा ॥३॥ तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसांवा । वाटे न करावा परता जीवा ॥४॥

२३४. जातो वाराणसी । निरवी गाई घोडे म्हैसी ॥१॥ गेलों येतों नाहीं ऐसा । सत्य मानारे भरंवसा ॥२॥ नका काढूं माझीं पेवें । तुम्ही वरळा भूस खावें ॥३॥ भिकारियाचे पाठीं । तुम्ही घेउनि लागा काठी ॥४॥ सांगाल जेवाया ब्राह्मण । तरी कापाल माझी मान ॥५॥ वोकलिया वोका । म्यां खर्चिला नाहीं रुका ॥६॥ तुम्हीं खावें ताकपाणी । जतन करा माझें लोणी ॥७॥ नाहीं माझे मनीं । पोरें रांडा नागवणी ॥८॥ तुका म्हणे नष्ट । होतें तैसें बोले स्पष्ट ॥९॥

२३५. कास घालोनि बळकट । झालों कळिकाळावरी नीट । केली पायवाट । भवसिंधूवरूनि ॥१॥ या रे या रे लहान थोर । याति भलती नारीनर । करावा विचार । न लगे चिंता कोणासी ॥२॥ कामी गुंतले रिकामे । जपी तपी येथें जमे । लाविले दमामे । मुक्त आणि मुमुक्षा ॥३॥ एकंदर शिक्का । पाठविला येहीलोका । आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥४॥

२३६. आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥१॥ झाडू संतांचे मारग । आडरानें भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥२॥ अर्थ लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषयलोभी मने । साधन हें बुडविलें ॥३॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा । तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ॥४॥

२३७. बळियाचे अंकित । आम्ही जालों बळिवंत ॥१॥ लाताळिला संसार । केला षडऊर्मींचा मार ॥२॥ जन तन धन । केले तृणाही समान ॥३॥ तुका म्हणे आतां । आम्ही मुक्तीचिया माथा ॥४॥

२३८. मृत्युलोकीं आम्हां आवडती परी । नाहीं एका हरिनामेंविण ॥१॥ विटलें हे चित्त प्रपंचापासूनि । वमन तें मनीं बैसलेसें ॥२॥ सोनें रूपें आम्हां मृत्तिकेसमान । माणिक पाषाण खडे जैसे ॥३॥ तुका म्हणे तैशा दिसतील नारी । रिसाचियापरी आम्हांपुढें ॥४॥

२३९. स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या ॥१॥ नाठवे हा

देव न घडे भजन। लांचावलें मन आवरेना ॥२॥ दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें। लावण्य तें खरें दुःखमूळ ॥३॥ तुका म्हणे जरी अग्नि जाला साधु। तरी पडे बाधूं संघष्टणें ॥४॥

२४०. पराविया नारी रखुमाई समान। हें गेलें नेमून ठायींचेंचि ॥१॥ जाईं वो तूं माते न करीं सायास। आम्ही विष्णुदास तैसे नव्हों ॥२॥ न साहावे मज तुझें हें पतन। नको हें वचन दुष्ट वर्दो ॥३॥ तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार। तरी काय नर थोडे जाले ॥४॥

२४१. भक्तिप्रतिपाळे दीन वो वत्सले। विठ्ठले कृपाळे होसी माये ॥१॥ पडिला विसर माझा काय गुणें। कपाळ हें उणें काय करूं ॥२॥ तुका म्हणे माझें जाळूनि संचित। करीं वो उचित भेट देईं ॥३॥

२४२. तुजविण मज कोण वो सोयरें। आणीक दुसरें पांडुरंगा ॥१॥ लागलीसे आस पाहातुसें वास। रात्री वो दिवस लेखीं बोटीं ॥२॥ काम गोड मज न लगे हा धंदा। तुका म्हणे सदा हेंचि ध्यान ॥३॥

२४३. पढियें तें आम्हीं तुजपाशीं मागावें। जीवींचें सांगावें हितगुज ॥१॥ पाळशील लळे दीन वो वत्सले। विठ्ठले कृपाळे जननिये ॥२॥ जीव भाव तुझ्या ठेवियेला पायीं। तूंचि सर्वा ठायीं एक आम्हां ॥३॥ दुजियाचा संग लागों नेदीं वारा। नाहीं जात घरा आणिकाच्या ॥४॥ सर्वसत्ता एकी आहे तुजपाशीं। ठावें आहे देसी मागेन तें ॥५॥ म्हणउनि पुढें मांडियेली आळी। थिंकोनियां चोळी डोळे तुका ॥६॥

२४४. कोण पर्वकाळ पहासील तीथ। होतें माझें चित्त कासावीस ॥१॥ पाठवीं भातुकें प्रेरी झडकरी। नको राखों उरी पांडुरंगा ॥२॥ न धरावा कोप मजवरी कांहीं। अवगुणी अन्यायी म्हणोनियां ॥३॥ काय रडवीसी नेणतिया पोरा। जाणतिया थोराचिया परी ॥४॥ काय उभी कर ठेवूनियां कटीं। बुझावी धाकुटीं लडिवाळें ॥५॥ तुका म्हणे आतां पदरासी पिळा। घालोनि निराळा नव्हे मग ॥६॥

२४५. कां हो देंवा कांहीं न बोलाचि गोष्टी। कां मज हिंपुटी करीतसा ॥१॥ कंठीं प्राण पाहें वचनाची वास। तों दिसे उदास धरिलें ऐसें ॥२॥ येणें काळें बुंथी घेतलीसे खोळ। कां नये विटाळ होऊं माझा ॥३॥ लाज वाटे मज म्हणवितां देवाचा। न पुससी फुकाचा तुका म्हणे ॥४॥

२४६. उचित तें काय जाणावें दुर्बळें। थोरिवेचें काळें तोंड देवा ॥१॥ देतों हाका कोणी नाइकती द्वारीं। ओस कोणी घरीं नाहीं ऐसें ॥२॥ आलिया अतीता शब्दें समाधान। करितां वचन काय वेंचे ॥३॥ तुका म्हणे तुम्हां साजे हें श्रीहरी। आम्ही निलाजिरीं नाहीं ऐसीं ॥४॥

२४७. आम्ही मागों ऐसें नाहीं तुजपाशीं। जरी तूं भीतोसी पांडुरंगा ॥१॥ पाहें विचारूनि आहे तुज ठावें। आम्हीं धालों नांवें तुझ्या एका ॥२॥ ऋद्धिसिद्धि तुझें मुख्य भांडवल। हें तों

आम्हां फोल भक्तीपुढें ॥३॥ तुका म्हणे जाऊं वैकुंठा चालत । बैसोनि निवांत सुख भोगूं ॥४॥

२४८. न लगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान । गोजिरें सगुण रूप पुरे ॥१॥ लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासि या ॥२॥ जाळोनि संसार बैसलों अंगणीं । तुझें नाहीं मनीं मानसीं हें ॥३॥ तुका म्हणे नको रागेजूं विठ्ठला । उठीं देईं मला भेटी आतां ॥४॥

२४९. कुमुदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतसे ॥१॥ तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम । आम्हीच तें प्रेमसुख जाणों ॥२॥ माते तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥३॥ तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं । नाहीं त्याची भेटी भोग तिये ॥४॥

२५०. काय सांगों तुझ्या चरणीच्या सुखा । अनुभव ठाउका नाहीं तुज ॥१॥ बोलतां हें कैसें वाटें खरेपण । अमृताचे गुण अमृतासी ॥२॥ आम्ही एकएका ग्वाही मायपुतें । जाणों तें निरुतें सुख दोघें ॥३॥ तुका म्हणे आम्हां मोक्षाचा कांटाळा । कां तुम्ही गोपाळा नेणां ऐसें ॥४॥

२५१. देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ॥१॥ तेणें माझ्या चित्ता जालें समाधान । वाटतें चरण न सोडावे ॥२॥ मुखें गातों गीत वाजवितां टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ॥३॥ तुका म्हणे केलें तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळही ॥४॥

२५२. आतां येणेंविण नाहीं मज चाड । कोण बडबड करी वांयां ॥१॥ सुख तेंचि दुःख पुण्य पाप खरें । हें तों आम्हां बरें कळों आलें ॥२॥ तुका म्हणे वाचा वाहिली अनंता । बोलायाचें आतां काम नाहीं ॥३॥

२५३. बोलों अबोलणें मरोनियां जिणें । असोनि नसणें जनीं आम्हां ॥१॥ भोगी त्याग जाला संगीच असंग । तोडियेले लाग माग दोन्ही ॥२॥ तुका म्हणे नव्हें दिसतों मी तैसा । पुसणें तें पुसा पांडुरंगा ॥३॥

२५४. अधिकार तैसा दावियेला मार्ग । चालतां हें मग कळों येतें ॥१॥ जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥२॥ तुका म्हणे रोग वैद्याचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ॥३॥

२५५. संवसार तीहीं केला पाठमोरा । नाहीं द्रव्यदारा जयां चित्तीं ॥१॥ शुभाशुभ नाहीं हर्षामर्ष अंगीं । जनार्दन जगीं होउनि ठेला ॥२॥ तुका म्हणे देह दिला एकसरें । जयासि दुसरें नाहीं मग ॥३॥

२५६. देहबुद्धि वसे लोभ जयां चित्तीं । आपुले जाणती परावे जे ॥१॥ तयासि चालतां पाहिजे सिदोरी । दुःख पावे करी असत्य तो ॥२॥ तुका म्हणे धर्म रक्षायाकारणें । छाया इच्छी उन्हें तापला तो ॥३॥

२५७. काळें खादला हा अवघा आकार । उत्पत्ति संहार घडामोडी ॥१॥ बीज तो

अंकुर आच्छादिला पोटीं । अनंता सेवटीं एकाचिया ॥२॥ तुका म्हणे शब्दें व्यापिलें आकाश । गुढार हें तैसें कळों नये ॥३॥

२५८. आणीक या काळें न चले उपाय । धरावे ते पाय विठोबाचे ॥१॥ अवघेंचि पुण्य असे तया पोटीं । अवघिया तुटी होय पापा ॥२॥ अवघें मोकळें अवघिया काळें । उद्धरती कुळें नरनारी ॥३॥ काळ वेळ नाहीं गर्भवासदुःखें । उच्चारितां मुखें नाम एक ॥४॥ तुका म्हणे कांहीं न लगे सांडावें । सांगतसें भावें घेती तयां ॥५॥

२५९. न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥१॥ ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हेंचि सांगे ॥२॥ विटंबो शरीर होत कां विपत्ती । परि राहो चित्तीं नारायण ॥३॥ तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवी गोपाळ तेंचि हित ॥४॥

२६०. पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनियां ॥१॥ शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयाचिया ॥२॥ क्षणभंगुर हें जाय न कळतां । ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं ॥३॥ कर्वतिला देह कापियेलें मांस । गेले वनवासा शुकादिक ॥४॥ तुका म्हणे राज्य करितां जनक । अग्रीमाजी एक पाव जळे ॥५॥

२६१. जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ॥१॥ सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नका होऊं परतीं पांडुरंगा ॥२॥ आणिकांची मात नाइकावी कानीं । आणिकां नयनीं न पाहावें ॥३॥ चित्तातुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ॥४॥ चाला पाय हात हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबासी ॥५॥ तुका म्हणे तुम्हां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥६॥

२६२. करिसी तें देवा करीं माझें सुखें । परी मी त्यासी मुखें न म्हणे संत ॥१॥ जया राज्य द्रव्य करणें उपार्जना । वश दंभमाना इच्छे जाले ॥२॥ जग देव परी निवडीन निराळे । ज्ञानाचे आंधळे भारवाही ॥३॥ तुका म्हणे भय न धरी मानसीं । ऐसियाचे विशीं करितां दंड ॥४॥

२६३. म्हणविती ऐसे आइकतों संत । न देखिजे होत डोळां कोणीं ॥१॥ ऐसियांचा कोण मानितो विश्वास । निवडे तो रस घाईंडाईं ॥२॥ पर्जन्याचे काळीं वोहोळाचे नद । ओसरतां बुंद न थारेचि ॥३॥ हिऱ्याऐशा गारा दिसती दुरोन । तुका म्हणे घण न भेटे तों ॥४॥

२६४. अतिवादी लावी । एकाबोट सोंग दावी ॥१॥ त्याचा बहुरूपी नट । नव्हे वैष्णव तो चाट ॥२॥ प्रतिपादी वाळी । एका पुजी एका छळी ॥३॥ तुका म्हणे नाहीं । भूतदया ज्याचेठायीं ॥४॥

२६५. पोटाचे ते नट पाहों नये छंद । विषयाचे भेद विषयरूप ॥१॥ अर्थीं परमार्थ कैसा घडों सके । चित्त लोभी भीके सोंग वायां ॥२॥ देवाचें चरित्र दाखविती लीळा । लाघवाच्या

कळा मोहावया ॥३॥ तुका म्हणे चित्तीं राहे अभिलास । दोघां नरकवास सारिखाचि ॥४॥

२६६. भुंकती तीं द्यावीं भुंकों । आपण नये त्यांचें शिकों ॥१॥ भाविकांनीं दुर्जनाचें । कांहीं मानूं नये साचें ॥२॥ होईल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥३॥ तुका म्हणे त्याचें । पाप नाहीं ताडणाचें ॥४॥

२६७. जप करितां राग । आला जवळी तो मांग ॥१॥ नको भोंवतालें जगीं । पाहों जवळी राख अंगीं ॥२॥ कुड्याचे संगती । सदा भोजन पंगती ॥३॥ तुका म्हणे ब्रह्म । साधी विरहित कर्म ॥४॥

२६८. कां रे माझा तुज नये कळवळा । असोनि जवळा हृदयस्था ॥१॥ अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा । केला शोक नेणां कंठस्फोट ॥२॥ कां हें चित्त नाहीं पावत विश्रांती । इंद्रियांची गति खुंटेचि ना ॥३॥ तुका म्हणे कां हो धरियला कोप । सरलें नेणों पाप पांडुरंगा ॥४॥

२६९. दीनानाथा तुझीं ब्रीदें चराचर । घेशील कैवार शरणागता ॥१॥ पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आम्हां रोकडे कळों आले ॥२॥ आपुल्या दासाचें न साहासी उणें । उभा त्याकारणें राहिलासी ॥३॥ चक्र गदा हातीं आयुधें अपार । न्यून तेथें पुरें करूं धांवे ॥४॥ तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पूर्ण अवतार ॥५॥

२७०. वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा । न बोलवे साचा पार तुझा ॥१॥ ठायींची ही काया ठेविली चरणीं । आतां ओंवाळुनि काय सांडूं ॥२॥ नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा । जीव वाहूं देवा तोही तुझा ॥३॥ मज माझें कांहीं न दिसे पाहतां । जें तुज अनंता समर्पावें ॥४॥ तुका म्हणे आतां नाहीं मज थार । तुझे उपकार फेडावया ॥५॥

२७१. नाहीं सुख मज नलगे हा मान । न राहे हे जन काय करूं ॥१॥ देह उपचारें पोळतसे अंग । विषातुल्य चांग मिष्टान्न तें ॥२॥ नाइकवे स्तुति वाणीतां थोरीव । होतो माझा जीव कासावीस ॥३॥ तुज पावे ऐसी सांग कांहीं कळा । नको मृगजळा गोवूं मज ॥४॥ तुका म्हणे आतां करी माझें हित । काढावें जळत आगींतुनी ॥५॥

२७२. फिरंगी वाखर लोखंडाचे विळे । परि ते निराळे गुणामोल ॥१॥ पायरी प्रतिमा एकचि पाषाण । परि तें महिमान वेगळेंचि ॥२॥ तुका म्हणे तैसा नव्हतील परी । संत जना सरी सारखिया ॥३॥

२७३. कांहीच मी नव्हें कोणिये गांवींचा । एकटा ठायींचा ठायीं एक ॥१॥ नाहीं जात कोठें येत फिरोनियां । अवघेंचि वायांविण बोल ॥२॥ नाहीं मज कोणी आपुलें दुसरें । कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ॥३॥ नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत । आहों अखंडित जैसे तैसे ॥४॥ तुका म्हणे नाम रूप नाहीं आम्हां । वेगळा या कर्मा अकर्मासी ॥५॥

२७४. न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥१॥ काय तुम्ही येथें नसालसें जालें । आम्हीं न देखिलें पाहिजे हें ॥२॥ परचक्र कोठें हरिदासांच्या वासे । न देखिजे तद्देशे राहातिया ॥३॥ तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ॥४॥

२७५. काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जनी ऐसे ॥१॥ उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ॥२॥ पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडे साक्ष आलें ॥३॥ तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥४॥

२७६. भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःख होतें जनां न देखवे ॥१॥ आमची तो जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणां ऐसी ॥२॥ भजनीं विक्षेप तेंचि पैं मरण । न वजावा तो क्षण एक वायां ॥३॥ तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥४॥

२७७. कोण जाणे कोणा घडे उपासना । कोण या वचना प्रतिपावे ॥१॥ आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा । करावी ते सेवा तुझीच म्यां ॥२॥ कुशळ चतुर येथें न पवती । करितील रिती तर्क मतें ॥३॥ तुका म्हणे केणें जालें एके घरीं । मज आणि हरी तुम्हां गांठी ॥४॥

२७८. आमुचा विनोद तें जगा मरण । करिती भावहीन देखोवेखीं ॥१॥ न कळे सतत हिताचा विचार । तेही दारोदार खाती फेरे ॥२॥ वंदिले वंदावे निंदिले निंदावे । एक गेले जावें त्याचि वाटा ॥३॥ तुका म्हणे कोणी नाइके सांगतां । होती यमदूता वरपडे ॥४॥

२७९. दीप घेऊनियां धुंडिती अंधार । भेटे हा विचार अघटित ॥१॥ विष्णुदास आम्ही न भिओं कळिकाळा । भुलों मृगजळा न घडे तें ॥२॥ उधळितां माती रविकळा मळे । हें कैसें न कळे भाग्यहीना ॥३॥ तुका म्हणे तृणें झांके हुताशन । हें तंव वचन वाउगेंचि ॥४॥

२८०. नटनाट्य अवघें संपादिलें सोंग । भेद दाऊं रंग न पालटे ॥१॥ मांडियेला खेळ कौतुकें बहुरूप । आपुलें स्वरूप जाणतसों ॥२॥ स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे । भाव दावी पिंवळे लाल संगें ॥३॥ तुका म्हणे आम्ही या जनाविरहित । होउनि निश्चित क्रीडा करूं ॥४॥

२८१. तुजविण वाणीं आणिकाची थोरी । तरी माझी हरी जिव्हा झडो ॥१॥ तुजविण चित्ता नावडे आणीक । तरी हा मस्तक भंगो माझा ॥२॥ नेत्रीं आणिकासी पाहीन आवडी । जातु तेचि घडी चांडाळ हे ॥३॥ कथामृतपान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचें ॥४॥ तुका म्हणे काय वांचून कारण । तुज एक क्षण विसंबतां ॥५॥

२८२. भाव धरी तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ॥१॥ करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुंस । खापरा परीस काय करी ॥२॥ निंबाचिया झाडा साखरेचें आळें । बीज तैसी फळें येती तया ॥३॥ तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खळ तयाहूनी ॥४॥

२८३. इच्छावें तें जवळी आलें । काय बोलें कारण ॥१॥ नामरूपीं पडिली गांठी । अवघ्या गोष्टी सरल्या ॥२॥ मुकियाचे परी जीवीं । साकर जेवीं खादली ॥३॥ तुका म्हणे काय बोलों । आतां भलें मौन्यची ॥४॥

२८४. साधनें तरी हींच दोन्ही । जरी कोणी साधील ॥१॥ परद्रव्य परनारी । याचा धरी विटाळ ॥२॥ देव भाग्य घरा येती । संपत्ती त्या सकळा ॥३॥ तुका म्हणे तें शरीर । घर भांडार देवाचें ॥४॥

२८५. आम्हासाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ॥१॥ मोहें धांव घाली पान्हा । नांव घेतां पंढरीराणा ॥२॥ कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ॥३॥ सुख ठेवी आम्हासाठीं । दुःख आपणची घोंटी ॥४॥ आम्हां घाली पाठीकडे । आपण कळिकाळाशीं भिडे ॥५॥ तुका म्हणे कृपानिधी । आम्हां उतरीं नावेमधीं ॥६॥

२८६. रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ॥१॥ तैसा आम्हां जाला भाव । अंगीं जडोनि ठेला देव ॥२॥ गोडी साखरेपासुनी । कैसी निवडिती दोन्हीं ॥३॥ तुका म्हणे नाद उठी । विरोनि जाय नभा पोटीं ॥४॥

२८७. थोडें परी निरें । अविट तें घ्यावें खरें ॥१॥ घ्यावें जेणें नये तुटी । बीज वाढे बीजा पोटीं ॥२॥ चित्त ठेवीं ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥३॥ आपुलें तें हित फार । तुका म्हणे खरें सार ॥४॥

२८८. अवघे देव साध । परी या अवगुणांचा बाध ॥१॥ म्हणउनी नव्हे सरी । राहे एका एक दुरी ॥२॥ ऊंस कांदा एक आळां । स्वाद गोडीचा निराळा ॥३॥ तुका म्हणे नव्हे सरी । विष अमृताची परी ॥४॥

२८९. शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥१॥ म्हणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ॥२॥ खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधिव्याधी ॥३॥ तुका म्हणे त्रिविध ताप । मग जाती आपेंआप ॥४॥

२९०. गोडपणें जैसा गुळ । तैसा देव जाला सकळ ॥१॥ आतां भजों कवणे परी । देव सबाह्य अंतरीं ॥२॥ उदका वेगळा । नव्हे तरंग निराळा ॥३॥ हेम अळंकार नामीं । तुका म्हणे तैसे आम्ही ॥४॥

२९१. परमेष्ठिपदा । तुच्छ मानिती सर्वदा ॥१॥ हेंचि ज्याचें धन । सदा हरीचें चिंतन ॥२॥ इंद्रपदादिक भोग । भोग नव्हे तो भवरोग ॥३॥ सार्वभौमराज्य । त्यासि कांहीं नाहीं काज ॥४॥ पातळींचें अधिपत्य । तें तों मानिती विपत्य ॥५॥ योगसिद्धिसार । त्यासि वाटे तें असार ॥६॥ मोक्षायेवढें सुख । सुख नव्हे तेंचि दुःख ॥७॥ तुका म्हणे हरीविण । त्यासि

वाटे अवघा सिण ॥८॥

२९२. मोहोऱ्याच्या संगें । सुत नव्हे आगीजोगें ॥१॥ नाहीं तरी त्याचें भक्ष । काय सांगणें ते साक्ष ॥२॥ स्वामीचिया अंगें । रूप नव्हे कोणाजोगें ॥३॥ तुका म्हणे खोडी । देवमणी नेदिती दडी ॥४॥

२९३. मजसवें नको चेष्टा । नव्हे साळी कांहीं कोष्टा ॥१॥ बैस सांडोनि दिमाख । जाय काळें करीं मुख ॥२॥ येथें न सरे चार । हीण आणीक व्यापार ॥३॥ तुका विष्णुदास । रस जाणतो नीरस ॥४॥

२९४. भाव देवाचें उचित । भाव तोचि भगवंत ॥१॥ धन्यधन्य शुद्ध जाती । संदेह कैंचा तेथें चित्तीं ॥२॥ बहुत बराडी । देवावरी ते आवडी ॥३॥ तुका म्हणे हे रोकडे । लाभ अधिकारी चोखडे ॥४॥

२९५. गौरव गौरवापुरतें । फळ सत्याचें संकल्पें ॥१॥ कठिण योगाहुनी क्षेम । वोकलिया होतो श्रम ॥२॥ पावलें मरे सिवेपाशीं । क्लेश उतरती क्लेशीं ॥३॥ तुका म्हणे बहु आणी । कठिण निघालिया रणीं ॥४॥

२९६. न संडी अवगुण । वर्मे मानीतसे सिण ॥१॥ भोग देतां करिती काई । फुटतां यमदंडें डोई ॥२॥ पापपुण्याझाडा । देतां तेथें मोठी पीडा ॥३॥ तुका म्हणे बोला । माझ्या सिणती विठ्ठला ॥४॥

२९७. पावे ऐसा नाश । अवघियां दिला त्रास ॥१॥ अविटाचा केला संग । सर्व भोगी पांडुरंग ॥२॥ आइताच पाक । संयोगाचा सकळिक ॥३॥ तुका म्हणे धणी । सीमा राहिली होउनी ॥४॥

२९८. दुर्बळ हे अवघे जन । नारायणीं विन्मुख ॥१॥ सांडोनियां हात जाती । पात्र होती दंडासी ॥२॥ सिदोरी तें पापपुण्य । सवें सिण भिकेचा ॥३॥ तुका म्हणे पडिला वाहो । कैसा पाहो लटिक्याचा ॥४॥

२९९. वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ॥१॥ जिंकोनियां अहंकार । पावटणी केलें शिर ॥२॥ काळा नाहीं वाव । पराश्रमा कोठें ठाव ॥३॥ तुका म्हणे आतां । सोपें वैकुंठासी जातां ॥४॥

३००. झाड कल्पतरू । न करी याचकीं आव्हेरु ॥१॥ तुम्ही सर्वीं सर्वोत्तम । ऐसे विसरतां धर्म ॥२॥ परिसा तुमचें देणें । तो त्या जागे अभिमानें ॥३॥ गाऱ्हाण्यानें तुका । गर्जे मारुनियां हाका ॥४॥

३०१. वसवावें घर । देवें बरें निरंतर ॥१॥ संग आसनीं शयनीं । घडे भोजनीं गमनीं ॥२॥ संकल्प विकल्प । मावळोनि पुण्यपाप ॥३॥ तुका म्हणे काळ । अवघा गोविंदीं सुकाळ ॥४॥

३०२. येथील हा ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥१॥ धरीं देवाचा अबोला । त्यासि तेचि

सवे त्याला ॥२॥ नाहीं पहावें लागत । एकाएकींच तें रितें ॥३॥ तुका म्हणे जन । तयामध्यें एवढें भिन्न ॥४॥

३०३. करितां देवार्चन । घरा आले संतजन ॥१॥ देव सारावे परते । संत पूजावे आरते ॥२॥ शाळिग्राम विष्णुमूर्ती । संत हो का भलते याती ॥३॥ तुका म्हणे संधी । अधिक वैष्णवांची मांदी ॥४॥

३०४. ज्याची खरी सेवा । त्याच्या भय काय जीवा ॥१॥ करितां स्वामीसवें वाद । अधिक अधिक आनंद ॥२॥ असावा तो धर्म । मग साहों जातें वर्म ॥३॥ वदे वागदेवी । तुका विठ्ठली गौरवी ॥४॥

३०५. देवें जीव धाला । संसार तो कडू झाला ॥१॥ तेचि येताती ढेंकर । आनंदाचे हरिहर ॥२॥ वेधी आणिकांस । ऐसा जया अंगीं कस ॥३॥ तुका म्हणे भूक । येणें न लगे आणीक ॥४॥

३०६. नाम साराचेंही सार । शरणागत यमकिंकर ॥१॥ उत्तमा उत्तम । वाचे बोला पुरुषोत्तम ॥२॥ नाम जपतां चंद्रमौळी । नामें तरला वाल्हाकोळी ॥३॥ तुका म्हणे वर्णूं काय । तारक विठोबाचे पाय ॥४॥

३०७. गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं ॥१॥ परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ॥२॥ मुखें म्हणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ॥३॥ तुका म्हणे दावीं वेष । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥४॥

३०८. द्रव्य असतां धर्म न करी । नागवला राजद्वारीं ॥१॥ माय त्यासि व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हा ॥२॥ कथाकाळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ॥३॥ भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ॥४॥ तुका म्हणे जाण । नर गाढवाहुनी हीन ॥५॥

३०९. मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन आणि मान ॥१॥ ऐशियाची करितां सेवा । काय सुख होय जीवा ॥२॥ पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥३॥ विरळा ऐसा कोणी । तुका त्यासि लोटांगणीं ॥४॥

३१०. एक वेळ प्रायश्चित्त । केलें चित्त मुंडण ॥१॥ अहंकारा नांवें दोष । त्याचें वोस पाडिले ॥२॥ अनुतापें स्नानविधि । यज्ञ सिद्धि देहहोम ॥३॥ जीवशिवा होता चुका । तेथें तुका विनटला ॥४॥

३११. त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमुचें त्या काई असेल ओझें ॥१॥ पाषाणाचे पोटी बैसला दर्दुर । तया मुखीं चारा कोणी घाली ॥२॥ पक्षी अजगर न करी संचित । तयासी अनंत प्रतिपाळी ॥३॥ तुका म्हणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥४॥

३१२. करा नारायणा । माझ्या दुःखाची खंडणा ॥१॥ वृत्ति राखा पायांपाशीं । वस्ती धरूनि मानसीं ॥२॥ पाळोनियां लळा । आतां पावववावें फळा ॥३॥ तुका म्हणे दीन । त्याचा हरतिया सीण ॥४॥

३१३. दोष पळती कीर्तनें । तुझ्या नामसंकीर्तनें ॥१॥ हें कां करूं आदरिलें । खोटें वचन आपुलें ॥२॥ तुम्ही पापा भीतां । आम्हां उपजावया चिंता ॥३॥ तुका म्हणे सेवा । कळिकाळा जिंकी देवा ॥४॥

३१४. मी तों दीनाहूनि दीन । माझा तुज अभिमान ॥१॥ मी तों आलों शरणागत । माझें करावें स्वहित ॥२॥ दीनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ॥३॥ तुका म्हणे आतां । भलें नव्हे मोकलितां ॥४॥

३१५. नाहीं दुकाळलों अन्ना । परि या मान जनार्दना ॥१॥ देव केला सकळसाक्षी । काळीं आणि शुद्धपक्षीं ॥२॥ भोगीं भोगविता । बाळासवें तोचि पिता ॥३॥ कर्म अकर्म जळालें । प्रौढ तुका तें उरलें ॥४॥

३१६. काय खावें आतां कोणीकडे जावें । गांवांत रहावें कोण्या बळें ॥१॥ कोपला पाटील गांवींचे हे लोक । आतां घाली भीक कोण मज ॥२॥ आतां येणें चवी सांडिली म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ॥३॥ भले लोकीं याची सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ॥४॥ तुका म्हणे याचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥५॥

३१७. संत मागे पाणी नेदी एक चूळी । दासीस आंघोळी ठेवी पाणी ॥१॥ संतांसी देखोनी होय पाठीमोरा । दासीचिया पोरा चुंबन देतो ॥२॥ संतांसी देखोनि करितो टवाळ्या । भावें धुतो चोळ्या दासीचिया ॥३॥ तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥४॥

३१८. आशाबद्ध वक्ता । धाक श्रोतयाच्या चित्ता ॥१॥ गातो तेंचि नाहीं ठावें । तोंड वासी कांहीं द्यावें ॥२॥ जालें लोभाचें मांजर । पोट भरी दारोदार ॥३॥ वायां गेलें तें भजन । उभयतां लोभी मन ॥४॥ बहिरमुख एके ठायीं । तैसें जालें तया दोहीं ॥५॥ माप आणी गोणी । तुका म्हणे रितीं दोन्हीं ॥६॥

३१९. विठ्ठला रे तूं उदाराचा राव । विठ्ठला तूं जीव जगाचा या ॥१॥ विठ्ठला रे तूं उदाराचा रासी । विठ्ठला तुजपाशीं सकळ सिद्धी ॥२॥ विठ्ठला रे तुझें नाम बहू गोड । विठ्ठला तूं कोड पुरविसी ॥३॥ विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें । विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥४॥ विठ्ठला रे वाचे बोला बहुरस । विठ्ठला रे सोस घेतला जीवें ॥५॥ विठ्ठला रे शोक करीतसे तुका । विठ्ठला तूं ये का झडकरी ॥६॥

३२०. बाहिर पडिलों आपुल्या कर्तव्यें । संसारासि जीवें वेटाळिलों ॥१॥ एकामध्यें एक

नाहीं मिळों येत । ताक नवनीत निवडिलें ॥२॥ जालीं दोनी नामें एकाचि मथनीं । दुसरिया गुणीं वेगळालीं ॥३॥ तुका म्हणे दाखविलीं मुक्ताफळीं । शिंपलेचि स्वस्थळीं खुंटलिया ॥४॥

३२१. बरवा बरवा बरवा देवा तूं । जीवाहूनि आवडसी जीवा रे देवा तूं ॥१॥ पाहतां वदन संतुष्ट वचन । आले आइकतां गुण रे देवा ॥२॥ अष्ट अंगें तनु त्रिविध ताप गेला सीण । वर्णितां लक्षण रे देवा ॥३॥ मन जालें उन्मन अनुपम्य गहन । तुकयाबंधु म्हणे महिमा नेणे रे ॥४॥

३२२. सोयरिया करी पाहुणेर बरा । कांडितो ठोमरा संतांलागीं ॥१॥ गाईसी देखोनी बदबदा मारी । घोड्याची चाकरी गोड लागे ॥२॥ फुलेंपानें वेश्येसी नेतसे उदंड । देऊं नेदी खांड ब्राह्मणासी ॥३॥ बाइलेच्या गोता आवडिनें पोसी । मातापितयांसी दवडुनी ॥४॥ तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥५॥

३२३. सोलीव जें सुख अतिसुखाहुनी । उभें तें अंगणीं वैष्णवांच्या ॥१॥ वृंदावन सडे चौक रंगमाळा । नाच तो सोहोळा देखोनियां ॥२॥ भूषणमंडित सदा सर्वकाळ । मुद्रा आणि माळ तुळसी कंठीं ॥३॥ नामवोघ मुखीं अमृताचें सार । मस्तक पवित्र सहित रजें ॥४॥ तुका म्हणे मोक्ष भक्ताचिया मना । नये हे वासना त्याची करी ॥५॥

३२४. तीर्थें केलीं कोटीवरी । नाही देखिली पंढरी ॥१॥ जळो त्याचें जालेंपण । न देखेचि समचरण ॥२॥ योग याग अनंत केले । नाहीं समचरण देखिले ॥३॥ तुका म्हणे विठ्ठलपायीं । अनंत तीर्थें घडलीं पाहीं ॥४॥

३२५. कोणतें कारण राहिलें यामुळें । जें म्यां तुज बळें कष्टवावें ॥१॥ नाहीं जात जीव होत नाहीं हानी । सहज तें मनीं आठवलें ॥२॥ नाहीं कांहीं चिंता मरत उपवासी । अथवा त्या म्हैसी गाई व्हाव्या ॥३॥ हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लापणीक वरी साच भाव ॥४॥ तुका म्हणे देवा नाशिवंतासाठीं । पायांसवें तुटी करिती तुझ्या ॥५॥

३२६. आविसाचिये आशा गळ गिळी मासा । फुटोनियां घसा मरण पावे ॥१॥ मरणाचे वेळे करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ॥२॥ अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका म्हणे सुखा पार नाहीं ॥३॥

३२७. तुजवरी ज्याचें मन । दर्शन दे त्याचें ॥१॥ कैसा जाती शुद्ध भाव । हात पाव ना वृत्ती ॥२॥ अवघियांचा करुनि मेळा । तुज डोळां रोखिलें ॥३॥ तुका म्हणे तुज आड । लपोनि कोड दावी देवा ॥४॥

३२८. विश्वव्यापी माया । तिणें झाकुळली छाया ॥१॥ सत्य गेलें भोळ्यावरी । अविद्येची चाली थोरी ॥२॥ आपुलेंचि मन । करी आपणा बंधन ॥३॥ तुका म्हणे देवा ।

तुम्ही कोडीं हीं उगवा ॥४॥

३२९. पोटीं जन्मती रोग । तरि कां म्हणावें आप्तवर्ग ॥१॥ रानीं वसती औषधी । तरि कां म्हणाव्या निपराधी ॥२॥ तैसें शरीराचें नातें । तुका म्हणे सर्व आप्तें ॥३॥

३३०. नव्हे शब्द एक देशी । सांडी गिवशी कोणाला ॥१॥ जाली माझी वैखरी । विश्वंभरी व्यापक ॥२॥ मोकलिलें जावें बाणें । भाता जेणें वाहिला ॥३॥ आतां येथें कैंचा तुका । बोले सिक्का स्वामीचा ॥४॥

३३१. गायनाचे रंगीं । शक्ति अद्भुत हे अंगीं ॥१॥ हें तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥२॥ अंगीं प्रेमाचें भरतें । नेघे उतार चढतें ॥३॥ तुका म्हणे वाणी । प्रेम अमृताची खाणी ॥४॥

३३२. माप म्हणे मी मवितें । भरी धणी ठेवी रितें ॥१॥ देवा अभिमान नको । माझें ठायीं देऊं सकों ॥२॥ देशीं चाले सिक्का । रितें कोण लेखी रंका ॥३॥ हातीं सूत्रदोरी । तुका म्हणे त्याची थोरी ॥४॥

३३३. कोण सांगायास । गेलें होतें देशोदेश ॥१॥ जालें वाऱ्या हातीं माप । समर्थ तो माझा बाप ॥२॥ कोणाची हे सत्ता । जाली वाचा वदविता ॥३॥ तुका म्हणे या निश्चयें । माझें निरसलें भय ॥४॥

३३४. सकळांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥१॥ अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरें पारखून बांधा गांठी ॥२॥ फोडिले भांडार धन्याचा हा माल । तेथें मी हमाल भारवाही ॥३॥ तुका म्हणे चाली जाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥४॥

३३५. कोण त्याचा पार पाववे धुंडितां । पुढें विचारितां विश्वंभरा ॥१॥ अणुरेणु सूक्ष्मस्थूळा पार नाहीं । श्रुती नेती त्याही खुंटलिया ॥२॥ फळांत कीटक येवढें आकाश । ऐसीं तरुवरास अनेक किती ॥३॥ दाविलें अनंतें अर्जुनासी पोटीं । आणिक त्या सृष्टि कृष्णलोक ॥४॥ तुका म्हणे लागा संतांचिये कासे । ठाव घेतां कैसे वांचा जीवें ॥५॥

३३६. जें जें कांही करितों देवा । तें तें सेवा समर्पें ॥१॥ भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥२॥ आम्हीं दुजें नेणों कोणा । हेंचि मना मन साक्ष ॥३॥ तुका म्हणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हें कीं ॥४॥

३३७. स्तुति करूं तरी नव्हेचि या वेदा । तेथें माझा धंदा कोणीकडे ॥१॥ परी हे वैखरी गोडावली सुखें । रसना रस मुखें इच्छीतसे ॥२॥ रूप वर्णावया कोठें पुरें मती । रोमीं होती जाती ब्रह्मांडें हीं ॥३॥ तुका म्हणे तूंचि ऐसा एक साचा । ऐसी तंव वाचा जाली नाहीं ॥४॥

३३८. तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं । दुजा कोणी तीहीं त्रिभुवनीं ॥१॥ सहस्त्रमुखें शेष

सिणला बापुडा । चिरलिया धडा जिव्हा त्याच्या ॥२॥ अव्यक्ता अलक्षा अपारा आनंदा । निर्गुणा सच्चिदानंदा नारायणा ॥३॥ रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा । होसी भाव तैसा त्याकारणें ॥४॥ तुका म्हणे जरी दाविसी आपणा । तरिच नारायणा कळों येसी ॥५॥

३३९. पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥१॥ बांधूं विठ्ठलसांगडी । पोहुनि जाऊं पैल थडी । अवघे जन गडी । घाला उडी भाईनो ॥२॥ हें तों नाहीं सर्वकाळ । अमूप आनंदाचें जळ ॥३॥ तुका म्हणे थोरा पुण्यें । ओघ आला पंथें येणें ॥४॥

३४०. आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्तापासुनियां ॥१॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥२॥ पडिलें वळण इंद्रियां सकळा । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥३॥ तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ हें ध्यान विटेवरी ॥४॥

३४१. आतां मी अनन्य येथें अधिकारी । होइन कोणे परी नेणों देवा ॥१॥ पुराणींचा अर्थ आणितां मनास । होय कासावीस जीव माझा ॥२॥ इंद्रियांचीं आम्ही पांगिलों अंकित । त्याचे रंगी चित्त रंगलेंसें ॥३॥ येकाचेंही मज न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं राखों ॥४॥ तुका म्हणे जरी मोकलिसी आतां । तरी मी अनंता वायां गेलों ॥५॥

३४२. लक्षूनियां योगी पाहाती आभास । तें दिसे आम्हांस दृष्टीपुढें ॥१॥ कर दोनी कटी राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ॥२॥ व्यापूनि वेगळें राहिलेंसें दुरी । सकळा अंतरीं निर्विकार ॥३॥ रूप नाहीं रेखा नामही जयासी । आपुल्या मानसीं शिव ध्याय ॥४॥ अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार । कुळ याति शिर हस्त पाद ॥५॥ अचेत चेतलें भक्तीचिया सुखें । आपुल्या कौतुकें तुका म्हणे ॥६॥

३४३. कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावी मज याचकासी ॥१॥ कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ॥२॥ कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षा आणूं । जाणूं हा कवणू कैसा तुज ॥३॥ कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिति मती दावीं मज ॥४॥ तुका म्हणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥५॥

३४४. निगमाचें वन । नका शोधूं करूं सीण ॥१॥ या रे गौळियाचे घरीं । बांधलें तें दावें वरी ॥२॥ पीडलेती भ्रमें । वाटा न कळतां वर्मे ॥३॥ तुका म्हणे भार । माथा टाका अहंकार ॥४॥

३४५. मन वोळी मना । बुद्धि बुद्धि क्षणक्षणां ॥१॥ मीच मज राखण जालों । ज्यानें तेथेंचि धरिलों ॥२॥ जें जें जेथें उठीं । तें तें तया हातें खुंटी ॥३॥ भांजणी खांजणी । तुका साक्ष उरला दोन्ही ॥४॥

३४६. ब्रह्म न लिंपे त्या मळें । कर्म अकर्मावेगळें ॥१॥ तोचि एक तया जाणे । पावे अनुभविलें खुणें ॥२॥ शौच अशौचाचे संधी । तन आळा तनामधीं ॥३॥ पापपुण्या

नाहीं ठाव । तुका म्हणे सहज भाव ॥४॥

३४७. काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥१॥ तरी काय तेथें असतीं थोडीं । काय जोडी तयांसी ॥२॥ रिघतां धांवा पेंवामधीं । जोडे सिद्धि ते ठायीं ॥३॥ काय भस्म करील राख । अंतर पाख नाहीं तों ॥४॥ वर्णआश्रमाचे धर्म । जाती श्रम जालिया ॥५॥ तुका म्हणे सोंग पाश । निरसे आस तें हित ॥६॥

३४८. तेंहीं नव्हे जें करितां कांहीं । ध्याता ध्यायी तेंही नव्हे ॥१॥ तेंही नव्हे जें जाणवी जना । वाटे मना तेंही नव्हे ॥२॥ त्रास मानिजे कांटाळा । अशुभ वाचाळा तेंही नव्हे ॥३॥ तेंही नव्हे जें भोवतीं भोंवे । नागवें धांवे तेंही नव्हे ॥४॥ तुका म्हणे एकचि आहे । सहजिं पाहें सहज ॥५॥

३४९. बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ॥१॥ नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वाटे खरें ॥२॥ विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तोचि एक सोसी ॥३॥ तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥४॥

३५०. होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥१॥ हाचि माझा नेम धर्म । मुखीं विठोबाचें नाम ॥२॥ हेचि माझी उपासना । लागेन संतांच्या चरणा ॥३॥ तुका म्हणे देवा । हेचि माझी भोळी सेवा ॥४॥

३५१. सांठविला हरि । जींहीं हृदयमंदिरीं ॥१॥ त्यांची सरली येरझार । जाला सफळ व्यवहार ॥२॥ हरी आला हाता । मग कैंचीं भय चिंता ॥३॥ तुका म्हणे हरी । कांहीं उरों नेदी उरी ॥४॥

३५२. मोक्ष तुमचा देवा । तुम्ही दुर्लभ तो ठेवा ॥१॥ मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ॥२॥ आपल्या प्रकारा । करा जतन दातारा ॥३॥ तुका म्हणे भेटी । पुरे एकचि शेवटीं ॥४॥

३५३. नामपाठ मुक्ताफळांच्या वोबणी । हें सुख सगुणीं अभिनव ॥१॥ तरी आम्हीं जालों उदास निर्गुणा । भक्तांचिया मना मोक्ष नये ॥२॥ द्यावें घ्यावें ऐसा येथें उरे भाव । जाय ठाया ठाव पुसोनियां ॥३॥ तुका म्हणे आतां अभयदान करा । म्हणा विश्वंभरा दिलें ऐसें ॥४॥

३५४. भवसिंधूचें काय कोडें । दावी वाट चाले पुढें ॥१॥ तारूं भला पांडुरंग । पाय भिजों नेदी अंग ॥२॥ मागें उतरिले बहुत । पैल तिरीं साधुसंत ॥३॥ तुका म्हणे लागवेगें । जाऊं तयाचिया मागें ॥४॥

३५५. नाहीं साजत हा मोठा । मज अळंकार खोटा ॥१॥ असें तुमचा रजरेण । संतापायींची वाहाण ॥२॥ नाहीं स्वरूपीं ओळखी । भक्तिभाव करीं देखीं ॥३॥ नाहीं शून्याकारीं । क्षर ओळखी अक्षरीं ॥४॥ नाहीं विवेक या ठायीं । आत्मा अनात्मा तें

काई ॥५॥ कांहीं नव्हे तुका । पायां पडेन हें ऐका ॥६॥

३५६. सत्य साचें खरें । नाम विठोबाचें बरें ॥१॥ येणें तुटती बंधनें । उभयलोकीं कीर्ति जेणें ॥२॥ भाव ज्याचे गांठी । त्यासी लाभ उठाउठी ॥३॥ तुका म्हणे भोळा । जिंकूं जाणे कळिकाळा ॥४॥

३५७. सत्य तो आवडे । विकल्पानें भाव उडे ॥१॥ आम्ही तुमच्या कृपादानें । जाणों शुद्ध मंद सोनें ॥२॥ आला भोग अंगा । न लावूं उशीर त्या त्यागा ॥३॥ तुका म्हणे देवा । अंजन ते तुझी सेवा ॥४॥

३५८. करावे चिंतन । तेंचि बरें न भेटून ॥१॥ बरवा अंगीं राहे भाव । तंग तोचि जाणा देव ॥२॥ दर्शनाची उरी । अवस्थाचि अंग धरी ॥३॥ तुका म्हणे मन । तेथें सकळ कारण ॥४॥

३५९. जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥१॥ सहज पूजा याचि नांवें । गळित अभिमान व्हावें ॥२॥ अवघें भोगिता गोसावी । आदीं अवसानीं जीवीं ॥३॥ तुका म्हणे सिण । न धरितां नव्हे भिन्न ॥४॥

३६०. नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ॥१॥ देह पडो या चिंतनीं । विठ्ठलनामसंकीर्तनीं ॥२॥ दंभस्फोट भलत्या भावें । मज हरिजन म्हणवावें ॥३॥ तुका म्हणे काळांतरीं । मज सांभाळील हरी ॥४॥

३६१. नये जरी कांहीं । तरी भलतेंचि वाहीं ॥१॥ म्हणविल्या दास । कोणी न धरी वेठीस ॥२॥ समर्थाच्या नांवें । भलतैसें विकावें ॥३॥ तुका म्हणे सत्ता । वरी असे त्या बहुतां ॥४॥

३६२. न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥१॥ म्हणउनी नारायणा । कींव भाकितों करुणा ॥२॥ नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ॥३॥ तुका म्हणे थोडें । आयुष्य अवघेंचि कोडें ॥४॥

३६३. एकाची उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥१॥ ऐशा देवाच्या विभूती । भिन्न प्रारब्धाची गती ॥२॥ एकाचीं वचनें । कटु अत्यंत तीक्षणें ॥३॥ प्रकाराचे तीन । तुका म्हणे केले जन ॥४॥

३६४. वचनें ही नाड । न बोलतें मुकें खोड ॥१॥ दोहीं वेगळें तें हित । बोली अबोलणी नीत ॥२॥ अंधार प्रकाशी । जाय दिवस पावे निशी ॥३॥ बीज पृथिवीच्या पोटीं । तुका म्हणे दावी दृष्टी ॥४॥

३६५. विचारावांचून । न पविजे समाधान ॥१॥ देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुधा ॥२॥ देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ॥३॥ तुका म्हणे होतें । बहु गोमटें उचितें ॥४॥

३६६. तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ॥१॥ ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥२॥ वसों न सके पाप । जाय त्रिविध तो ताप ॥३॥ तुका म्हणे माया । होय दासी

लागे पायां ॥४॥

३६७. मुसावलें अंग । रंगीं मेळविला रंग ॥१॥ एकीं एक दृढ जालें । मुळा आपुलिया आलें ॥२॥ सागरीं थेंबुटा । पडिल्या निवडे कोण्या वाटा ॥३॥ तुका म्हणे नवें । नव्हे जाणावें हें देवें ॥४॥

३६८. अनुतापें दोष । जाय न लगतां निमिष ॥१॥ परि तो राहे विसावला । आदीं अवसानीं भला ॥२॥ हेंचि प्रायश्चित्त । अनुतापीं न्हाय चित्त ॥३॥ तुका म्हणे पापा । शिवों नये अनुतापा ॥४॥

३६९. चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥२॥ तैसी नव्हे भोळी सेवा । एक भावचि कारण देवा ॥२॥ तपें इंद्रियां आघात । क्षण एक वाताहात ॥३॥ मंत्र चळे थोडा । तरि धडचि होय वेडा ॥४॥ व्रत करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥५॥ धर्माधर्मा सत्वचि कारण । नाहीं तरी केला सिण ॥६॥ भूतदयेसि आघात । उंचनीच पाहे चित्त ॥७॥ तुका म्हणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ॥८॥

३७०. सोडिला संसार । माया तयावरि फार ॥१॥ धांवे चाले मागें मागें । सुखदुःख साहे अंगें ॥२॥ यानें घ्यावें नाम । तीसी करणें त्याचें काम ॥३॥ तुका म्हणे भोळी । विठ्ठलकृपेची कोंवळी ॥४॥

३७१. बैसूं खेळूं जेवूं । तेथें नाम तुझें गाऊं ॥१॥ रामकृष्णनाममाळा । घालूं ओवुनियां गळां ॥२॥ विश्वास हा धरूं । नाम बळकट करूं ॥३॥ तुका म्हणे आतां । आम्हां जीवन शरणागतां ॥४॥

३७२. पाठीं पोटीं देव । कैचा हरिदासां भेव ॥१॥ करा आनंदें कीर्तन । नका आशंकित मन ॥२॥ एथें कोठें काळ । करील देवापाशीं बळ ॥३॥ तुका म्हणे धनी । सपुरता काय वाणी ॥४॥

३७३. मनोमय पूजा । हेचि पढियें केशीराजा ॥१॥ घेतो कल्पनेचे भोग । न मानिती बाह्य रंग ॥२॥ अंतरींचे जाणे । आदिवर्तमान खुणें ॥३॥ तुका म्हणे कुडें । कोठें सरे त्याच्या पुढें ॥४॥

३७४. जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥१॥ आणिक नये माझ्या मना । हो का पंडित शाहाणा ॥२॥ नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥३॥ तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥४॥

३७५. याजसाठीं वनांतरा । जातों सांडुनिया घरा ॥१॥ माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल निष्काम ॥२॥ अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ॥३॥ तुका म्हणे अहंब्रह्म । आड येऊं नेदीं भ्रम ॥४॥

३७६. बुडतां आवरीं । मज भवाचे सागरीं ॥१॥ नको मानूं भार । पाहों दोषांचे डोंगर ॥२॥

आहे तें सांभाळीं । तुझी कैसी ब्रीदावळी ॥३॥ तुका म्हणे दोषी । मी तों पातकाची राशी ॥४॥

३७७. अक्षई तें झालें । आता न मोडे रचिलें ॥१॥ पाया पडिला खोले ठायीं । तेथें पुढें चाली नाहीं ॥२॥ होतें विखुरलें । ताळा जमे झडती आलें ॥३॥ तुका म्हणे बोली । पुढें कुंठितचि जाली ॥४॥

३७८. न मनावी चिंता । कांहीं माझेविशीं आतां ॥१॥ ज्याणें लौकिक हा केला । तो हा निवारिता भला ॥२॥ माझे इच्छे काय । होणार ते एके ठाय ॥३॥ सुखा आणि दु:खा । म्हणे वेगळा मी तुका ॥४॥

३७९. तुझे थोर थोर । भक्त करिती विचार ॥१॥ जपतपादि साधनें । मज चिंतवेना मनें ॥२॥ करुणावचनें । म्यां भाकावीं तुम्हां दीनें ॥३॥ तुका म्हणे घेईं । माझें थोडें फार ठायीं ॥४॥

३८०. लावूनि काहाळा । सुखें करितों सोहळा ॥१॥ सादावीत गेलों जना । भय नाहीं सत्य जाणा ॥२॥ गातां नाचतां विनोदें । टाळघागरियांच्या छंदें ॥३॥ तुका म्हणे भेव । नाहीं पुढें येतो देव ॥४॥

३८१. मुक्त कासया म्हणावें । बंधन तें नाहीं ठावें ॥१॥ सुखें करितों कीर्तन । भय विसरलें मन ॥२॥ देखिजेना नास । घालूं कोणावरी कास ॥३॥ तुका म्हणे साह्य । देवा आहे तैसा आहे ॥४॥

३८२. ओनाम्याच्या काळें । खडे मांडविले बाळें ॥१॥ तेंचि पुढें पुढें काई । मग लागलिया सोई ॥२॥ रज्जु सर्प होता । तोंवरीच न कळतां ॥३॥ तुका म्हणे साचें । भय नाहीं बागुलाचें ॥४॥

३८३. आतां पुढें धरी । माझे आठव वैखरी ॥१॥ नको बडबडूं भांडे । कांहीं वाउगें तें रांडे ॥२॥ विठ्ठल विठ्ठल । ऐसे सांडोनियां बोल ॥३॥ तुका म्हणे आण । तुज स्वामीची हे जाण ॥४॥

३८४. काय नव्हे करितां तुज । आतां राखे माझी लाज ॥१॥ मी तो अपराधाची रासी । शिखा अंगुष्ठ तोपाशीं ॥२॥ त्राहे त्राहे त्राहे । मज कृपादृष्टि पाहे ॥३॥ तुका म्हणे देवा । सत्य घ्यावी आतां सेवा ॥४॥

३८५. वंदीन मी भूतें । आतां अवघींच समस्तें ॥१॥ तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ॥२॥ गाळुनियां भेद । प्रमाण तो ऐसा वेद ॥३॥ तुका म्हणे मग । नव्हे दुजियाचा संग ॥४॥

३८६. पूज्या पूज्यमान । कथे उभे हरिजन ॥१॥ ज्याची कीर्ती वाखाणिती । तेथें ओतली ते मूर्ती ॥२॥ देहाचा विसर । केला आनंदें संचार ॥३॥ गेला अभिमान । लाज बोळविला मान ॥४॥ शोक मोह चिंता । यांची नेणती ते वार्ता ॥५॥ तुका म्हणे सखे । विठोबाचि ते सारिखे ॥६॥

३८७. भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥१॥ धांवे जातीपाशीं जाती । खूण येरयेरां चित्तीं ॥२॥ हिरा हिरकणी । काढी आतुनि आइरणीं ॥३॥ तुका म्हणे केलें । मन शुद्ध हें चांगलें ॥४॥

३८८. वरि वरि बोला रस । कथी ज्ञाना माजी फोस ॥१॥ ऐसे लटिके जे ठक । तयां इह ना परलोक ॥२॥ परिसे एक सांगे । अंगा धुळीही न लगे ॥३॥ तुका म्हणे हाडें । कुतऱ्या लाविले झगडे ॥४॥

३८९. हेचि तुझी पूजा । आतां करीन केशीराजा ॥१॥ अवघीं तुझींच हीं पदें । नमस्कारीन अभेदें ॥२॥ न वर्जित दिशा । जाय तेथेंचि सरिसा ॥३॥ नव्हे एकदेशी । तुका म्हणे गुणदोषी ॥४॥

३९०. आपुलें तों काहीं । येथें सांगिजेसें नाहीं ॥१॥ परि हे वाणी वायचळे । छंद करवितें बरळे ॥२॥ पंचमहाभूतांचा हा मेळा । देह सत्यत्वें निराळा ॥३॥ तुका म्हणे भुली । इच्या उफराट्या चाली ॥४॥

३९१. विठ्ठल नावाडा फुकाचा । आळविल्या साठीं वाचा ॥१॥ कटीं कर जैसे तैसे । उभा राहिला न बैसे ॥२॥ न पाहे सिदोरी । जाती कुळ न विचारी ॥३॥ तुका म्हणे भेटीं । हाक देतां उठाउठी ॥४॥

३९२. कृपावंत किती । दीन बहु आवडती ॥१॥ त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेमचिंता ॥२॥ भुलों नेदी वाट । करीं धरूनि दावीं नीट ॥३॥ तुका म्हणे जीवें । अनुसरल्या एक भावें ॥४॥

३९३. नेणती वेद श्रुति कोणी । आम्हां भाविकावांचुनी ॥१॥ रूप आवडे आम्हांसी । तैसा जोडी हृषीकेशी ॥२॥ आम्हा भावें बळिवंत । तुज घालूं हृदयांत ॥३॥ तुका म्हणे तुज धाक । देतां पावसील हाक ॥४॥

३९४. मन गुंतलें लूलया । जाय धांवोनि त्या ठाया ॥१॥ मागें परतवी तो बळी । शूर एक भूमंडळीं ॥२॥ येऊनियां घाली घाला । नेणों काय होईल तुला ॥३॥ तुका म्हणे येणें । बहु नाडिले शाहाणे ॥४॥

३९५. घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥१॥ तुम्ही घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥२॥ तुम्ही आइकारे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥३॥ मना तेथें धांव घेईं । राहें विठोबाचें पायीं ॥४॥ तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥५॥

३९६. धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टी न्याहाळितां ॥१॥ बरवा बरवा पांडुरंग । कांति सांवळी सुरंग ॥२॥ सकळ मंगळाचें सार । मुख सिद्धीचें भांडार ॥३॥ तुका म्हणे

सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥४॥

३९७. जरी मी पतित नव्हतों देवा । तरी तूं पावन कैंचा तेव्हां ॥१॥ म्हणोनि माझें नाम आधीं । मग तूं पावन कृपानिधी ॥२॥ लोहो महिमान परिसा । नाहीं तरी दगड जैसा ॥३॥ तुका म्हणे याचकभावें । कल्पतरु मान पावे ॥४॥

३९८. एक भाव चित्तीं । तरी न लगे कांहीं युक्ति ॥१॥ कळों आलें जीवें । मज माझियाचि भावें ॥२॥ आठवचि पुरे । सुख अवघें मोहरें ॥३॥ तुका म्हणे मन । पूजा इच्छी नारायण ॥४॥

३९९. मज संतांचा आधार । तूं एकलें निर्विकार ॥१॥ पाहा विचारूनी देवा । नको आम्हांसवें दावा ॥२॥ तुज बोल न बोलवे । आम्हां भांडायाची सवे ॥३॥ तुका म्हणे तरी । ऐक्यभावें नुरे उरी ॥४॥

४००. तुज मागणें तें देवा । आम्हां तुझी चरणसेवा ॥१॥ आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥२॥ संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥३॥ तुका म्हणे नाम । तेणें पुरे माझे काम ॥४॥

४०१. तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ॥१॥ आणीक नेणें कांहीं हेवा । तुजवांचूनि केशवा ॥२॥ हेंचि माझें गाणें । तुझें नामसंकीर्तन ॥३॥ तुझ्या नामाची भूषणें । तुका म्हणे ल्यालों लेणें ॥४॥

४०२. उतरलों पार । सत्य झाला हा निर्धार ॥१॥ तुझें नाम धरिलें कंठीं । केली संसाराची तुटी ॥२॥ आतां नव्हे बाधा । कोणेविशीं कांहीं कदा ॥३॥ तुका म्हणे कांहीं । आतां उरलें ऐसें नाहीं ॥४॥

४०३. क्रियामतिहीन । एक मी गा तुझे दीन ॥१॥ देवा करावा सांभाळ । वारीं माझी तळमळ ॥२॥ नको माझे ठायीं । गुणदोष घालूं कांहीं ॥३॥ अपराधाच्या कोटी । तुका म्हणे घाला पोटीं ॥४॥

४०४. नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥१॥ तैसें चित्त शुद्ध नाहीं । तेथें बोध करील काई ॥२॥ वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ॥३॥ वांझा न होती लेंकुरें । काय करावें भ्रतारें ॥४॥ नपुंसका पुरुषासी । काय करील बाइल त्यासी ॥५॥ प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ॥६॥ तुका म्हणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥७॥

४०५. नवां नवसांचीं । जालों तुम्हासी वाणीचीं ॥१॥ कोण तुझें नाम घेतें । देवा पिंडदान देतें ॥२॥ कोण होतें मागें पुढें । दुजें बोलाया रोकडें ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । कोणा घेतासि वोसंगा ॥४॥

४०६. एका बीजा केला नास । मग भोगिले कणीस ॥१॥ कळे सकळां हा भाव ।

लहानथोरांवरी जीव ॥२॥ लाभ नाहीं फुकासाठीं । केल्याविण जीवासाठीं ॥३॥ तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥४॥

४०७. आयुष्य गेलें वायांविण । थोर झाली नागवण ॥१॥ आतां धावाधाव करी । काय पाहातोसि हरी ॥२॥ माझे तुझे याचि गती । दिवस गेले तोंडीं माती ॥३॥ मन वाव घेऊं नेदी । बुडवूं पाहे भवनदी ॥४॥ पडला विषयाचा घाला । तेणें नागविलें मला ॥५॥ शरण आलों आतां धावें । तुका म्हणे मज पावें ॥६॥

४०८. सोसोनि विपत्ती । जोडी दिली तुझे हातीं ॥१॥ त्याचा हाचि उपकार । अंती आम्हाशीं वेव्हार ॥२॥ नामरूपा केला ठाव । तुज कोण म्हणतें देव ॥३॥ तुका म्हणे हरी । तुज ठाव दिला घरीं ॥४॥

४०९. आपुलें मागतां । काय नाहीं आम्हां सत्ता ॥१॥ परि या लौकिकाकारणें । उरी ठेविलें बोलणें ॥२॥ येचि आतां घडी । करूं बैसो तेची फडी ॥३॥ तुका म्हणे करितों तुला । ठाव नाहींसा विठ्ठला ॥४॥

४१०. असो आतां किती । तुज यावें काकुलती ॥१॥ माझें प्रारब्ध हें गाढें । तूं बापुडें तयापुढें ॥२॥ सोडवीन आतां । ब्रीद तुझें पंढरीनाथा ॥३॥ तुका म्हणे बळी । तो गांढ्याचे कान पिळी ॥४॥

४११. काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ॥१॥ सर्व साधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥२॥ योगयागतपें । केलीं तयानें अमुपें ॥३॥ तुका म्हणे जपा । मंत्र तीअक्षरी सोपा ॥४॥

४१२. हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ॥१॥ त्याचा दास मी अंकित । कायावाचामनेंसहित ॥२॥ नसो भाव चित्तीं । हरिचे गुण गातां गीतीं ॥३॥ करी अनाचार । वाचे हरिनामउच्चार ॥४॥ हो कां भलतें कुळ । शुचि अथवा चांडाळ ॥५॥ म्हणवी हरिचा दास । तुका म्हणे धन्य त्यास ॥६॥

४१३. हाकेसरिसी उडी । घालूनियां स्तंभ फोडी ॥१॥ ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥२॥ करितां आठव । धांवोनियां घाली कव ॥३॥ तुका म्हणे गीतीं गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥४॥

४१४. लोहचुंबकाच्या बळें । उभें राहिलें निराळें ॥१॥ तैसा तूंचि आम्हाठायीं । खेळतोसी अंतर्बाहीं ॥२॥ भक्ष अग्नीचा तो दोरा । त्यासि वांचवी मोहरा ॥३॥ तुका म्हणे अधीलपणें । नेली लांकडें चंदनें ॥४॥

४१५. डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥१॥ तरी ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥२॥ मेळवूनि नरनारी । शकुन सांगे नानापरी ॥३॥ तुका म्हणे

मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद ॥४॥

४१६. गाढवाचें घोडें । आम्हीं करूं दृष्टीपुढें ॥१॥ चघळी वाहाणा । माघारिया बांडा सुणा ॥२॥ सोंगसंपादणी । तरी करूं शुद्ध वाणी ॥३॥ तुका म्हणे खळ । करूं समयीं निर्मळ ॥४॥

४१७. बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥१॥ विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥२॥ बाइल मेली मुक्त जाली । देवें माया सोडविली ॥३॥ पोर मेलें बरें जालें । देवें मायेविरहित केलें ॥४॥ माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥५॥

४१८. नलगे मरावें । ऐसा ठाव दिला देवें ॥१॥ माझ्या उपकारासाठीं । वागविला म्हूण कंठीं ॥२॥ घरीं दिला ठाव । अवघा सकळही वाव ॥३॥ तुका म्हणे एके ठायीं । केलें माझें तुझें नाहीं ॥४॥

४१९. नाहीं लाग माग । न देखेंसें जालें जग ॥१॥ आतां बैसोनियां खावें । दिलें आइतें या देवें ॥२॥ निवारिलें भय । नाहीं दुसऱ्याची सोय ॥३॥ तुका म्हणे कांहीं । बोलायाचें काम नाहीं ॥४॥

४२०. तुझा दास मज म्हणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर ॥१॥ हेंचि आतां लागें करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ॥२॥ होउनी निर्भर राहिलों निश्चिंत । पावनपतित नाम तुझें ॥३॥ करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पात्या पातें ॥४॥ तुका म्हणे तुज काय तें अशक्य । तारितां मशक मज दीना ॥५॥

४२१. आम्ही ज्याचे दास । त्याचा पंढरिये वास ॥१॥ तो हा देवांचाही देव । काय कळिकाळाचा भेव ॥२॥ वेद जया गाती । श्रुति म्हणती नेति नेति ॥३॥ तुका म्हणे निज । रूपडें हें तत्त्वबीज ॥४॥

४२२. भक्तवत्सल दीनानाथ । तिहीं लोकीं ज्याची मात ॥१॥ तो हा पुंडलिकासाठीं । आला उभा वाळवंटीं ॥२॥ गर्भवास धरी । अंत्रऋषीचा कैवारी ॥३॥ सकळां देवां अधिष्ठान । एका मंत्रासी कारण ॥४॥ तुका म्हणे ध्यानीं । ज्यासि ध्यातो शूळपाणी ॥५॥

४२३. फटकळ देव्हारा फटकळ अंगारा । फटकळ विचारा चाळविलें ॥१॥ फटकळ तो देव फटकळ तो भक्त । करवितो घात आणिका जीवा ॥२॥ तुका म्हणे अवघें फटकळ हें जिणें । अनुभवि ये खुणें जाणतील ॥३॥

४२४. नेत्राची वासना । तुज पाहावें नारायणा ॥१॥ करीं याचें समाधान । काय पहातोसी अनुमान ॥२॥ भेटावें पंढरीराया । हेंचि इच्छिताती बाह्या ॥३॥ जावें पंढरीसी । हेंचि ध्यान या मनासी ॥४॥ चित्त म्हणे पायीं । तुझे राहीन निश्चयीं ॥५॥ म्हणे बंधु तुकयाचा । देवा भाव पुरवीं याचा ॥६॥

४२५. जेणें तुज आलें रूप आणि नांव । पतित हें दैव तुझें आम्ही ॥१॥ नाहीं तरी तुज कोण हो पुसतें । निराकारी तेथें एकाएकीं ॥२॥ अंधारें ते दीपा आणियेली शोभा । माणिकासीं प्रभा कोंदणाची ॥३॥ धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी काय चाडा जाणावें त्या ॥४॥ अमृतासी मोल विषाचिया गुणें । पितळ तरी सोनें उंच नीच ॥५॥ तुका म्हणे आम्ही असोनियां जाण । तुज देवपण आणियेलें ॥६॥

४२६. सुख वाटे येचि ठायीं । बहु पायीं संतांचें ॥१॥ म्हणऊनि केला वास । नाहीं नास ये ठायीं ॥२॥ न करवे हाली चाली । निवारली चिंता हे ॥३॥ तुका म्हणे निवे तनु । रजकणु लागतां ॥४॥

४२७. देउनियां कपाट । कोण काळ राखों वाट ॥१॥ काय येईल तें शिरीं । आज्ञा धरोनियां करीं ॥२॥ करूं कळे ऐसी मात । किंवा राखावा एकांत ॥३॥ तुका म्हणे जागों । किंवा कोणा नेदूं वागों ॥४॥

४२८. मायबापापुढें लेंकराची आळी । आणीक हे पाळी कोण लळे ॥१॥ सांभाळा जी माझीं विषमें अनंता । जवळी असतां अव्हेरू कां ॥२॥ आणिकांची चाले सत्ता आम्हावरी । तुमची ते थोरी काय मग ॥३॥ तुका म्हणे आलों दुरोनि जवळी । आतां टाळाटाळी करूं नये ॥४॥

४२९. योग तप याचि नांवें । गळित व्हावें अभिमानें ॥१॥ करणें तें हेंचि करा । सत्य बरा व्यापार ॥२॥ तरि खंडें येरझार । नेघे भार देहाचा ॥३॥ तुका म्हणे मानामान । हे बंधन नसावें ॥४॥

४३०. करी संध्यास्नान । वारी खाऊनियां अन्न ॥१॥ तया नाहीं लाभहानी । आदा वेंचाचिये मानीं ॥२॥ मजुराचें धन । विळा दोरचि जतन ॥३॥ तुका म्हणे नाहीं । अधिरासी देव कांहीं ॥४॥

४३१. वाखर घेउनि आले । त्यासी तरवारे नेहाले ॥१॥ नव्हे आपुलें उचित । करुनि टाकावें फजित ॥२॥ अंगुळिया मोडी । त्यासी काय सिलें घोडीं ॥३॥ नपुंसकासाठीं । तुका म्हणे नलगे जेठी ॥४॥

४३२. प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरी ॥१॥ मनेंसहित वाचा काया । अवघे दिलें पंढरीराया ॥२॥ सत्ता सकळ तया हातीं । माझी कींव काकुळती ॥३॥ तुका म्हणे ठेवी तैसें । आम्हीं राहों त्याचे इच्छे ॥४॥

४३३. पाववील ठाया । पांडुरंग चिंतिलिया ॥१॥ त्यासी चिंतिलिया मनीं । चित्ता करी गंवसणी ॥२॥ पावावया फळ । अंगीं असावें हें बळ ॥३॥ तुका म्हणे तईं । सिद्धि वोळगती पायीं ॥४॥

४३४. धन्य भावशीळ । ज्याचें हृदय निर्मळ ॥१॥ पूजी प्रतिमेचे देव । संत म्हणती तेथें भाव ॥२॥ विधिनिषेध नेणती । एक निष्ठा धरुनी चित्तीं ॥३॥ तुका म्हणे तैसें देवा । होणें लागे त्याच्या भावा ॥४॥

४३५. आधींच आळशी । वरी गुरूचा उपदेशी ॥१॥ मग त्या कैंची आडकाठी । विधिनिषेधाची भेटी ॥२॥ नाचरवे धर्म । न करवे विधिकर्म ॥३॥ तुका म्हणे ते गाढव । घेती मनासवें धांव ॥४॥

४३६. नाचे टाळी पिटी । प्रेमें अंग धरणीं लोटी ॥१॥ माझे सखे ते सज्जन । भोळे भाविक हरिजन ॥२॥ न धरिती लाज । नाहीं जानसवें काज ॥३॥ तुका म्हणे दाटे । कंठ, नेत्रीं जळ लोटे ॥४॥

४३७. कथा करोनियां दावी प्रेमकळा । अंतरीं जिव्हाळा कुकर्माचा ॥१॥ तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडी । लटिकी धरी बोंडी नासिकाची ॥२॥ टिळे टोपी माळा देवाचें गवाळें । वागवी ओंगळ पोटासाठीं ॥३॥ गोसाव्याच्या रूपें हेरी परनारी । तयाचे अंतरीं काम लोभ ॥४॥ कीर्तनाचे वेळीं रडे पडे लोळे । प्रेमेविण डोळे गळताती ॥५॥ तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥६॥

४३८. पाखांड्यांनीं पाठी पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥१॥ कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणे ॥२॥ न कळे तें मज पुसती छळूनी । लागतां चरणीं न सोडिती ॥३॥ तुझ्या पायांविण दुजें नेणें कांहीं । तूंचि सर्वांठायीं एक मज ॥४॥ तुका म्हणे खीळ पडो त्याच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकासीं ॥५॥

४३९. कलियुगीं कवित्व करिती पाषांड । कुशळ हे भांड बहु जाले ॥१॥ द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी । मुखें बडबडी कोरडेंचि ॥२॥ दंभ करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥३॥ वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । न होती अलिप्त देहाहुनी ॥४॥ तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥५॥

४४०. विषयाचें सुख एथें वाटे गोड । पुढें अवघड यमदंड ॥१॥ मारिती तोडिती झोडिती निष्ठुर। यमाचे किंकर बहुसाल ॥२॥ असिपत्र तरुवर खैराचे इंगळ । निघतील ज्वाळ तैलपाकीं ॥३॥ तप्तभूमीवरी चालविती पायीं । अग्निस्तंभ बाहीं कवटाळविती ॥४॥ म्हणऊनि तुका येतो काकुलती । पुरे यातायाती गर्भवास ॥५॥

४४१. अल्प माझी मती । म्हणोनि येतो काकुलती ॥१॥ आतां दाखवा दाखवा । तुमचीं पाउलें केशवा ॥२॥ धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥३॥ तुका म्हणे दया । मज करा अभागिया ॥४॥

४४२. वाटुली पाहतां सिणले डोळुले । दाविसी पाउलें कैं वो डोळां ॥१॥ तूं माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वास तुझी ॥२॥ कां बा मोकलिलें कोणा निरविलें । कठिण कैसें झालें हृदय तुझें ॥३॥ तुका म्हणे माझ्या आसावल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंगा ॥४॥

४४३. देह हा सादर पाहावा निश्चित । सर्व सुख एथें नाम आहे ॥१॥ ब्रह्म जें देखणें द्वैत जेव्हां गेलें । शरीर तें जालें ब्रह्मरूप ॥२॥ यजन याजन तप व्रतें करिती । विकल्पें नागविती शुद्ध पुण्या ॥३॥ तुका म्हणे सर्व सुख एथें आहे । भ्रांति दूर पाहें टाकुनियां ॥४॥

४४४. तुझे वर्णूं गुण ऐसी नाहीं मती । राहिल्या त्या श्रुती मौनपणें ॥१॥ मौनपणें वाचा थोंटावल्या चारी । ऐसें तुझें हरी रूप आहे ॥२॥ रूप तुझें ऐसें डोळां न देखवे । जेथें हे झकवे ब्रह्मादिक ॥३॥ ब्रह्मादिक देवा कर्मांची कचाटी । म्हणोनि आटाटी फार त्यांसी ॥४॥ तुका म्हणे तुझें गुण नाम रूप । आहेसी अमुप वाणूं काई ॥५॥

४४५. मनवाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनियां माप भक्ति केलें ॥१॥ भक्तीचिया मापें मोजितों अनंता । इतरानें तत्वतां न मोजवे ॥२॥ योग याग तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागें न सांपडसी ॥३॥ तुका म्हणे आम्ही भोळ्या भावें सेवा । घ्यावी जी केशवा करितों ऐसी ॥४॥

४४६. जंववरी नाहीं देखिली पंढरी । वर्णिसील थोरी वैकुंठींची ॥१॥ मोक्षसिद्धि तेथें हिंडे दारोदारीं । होऊनी कामारी दीनरूप ॥२॥ वृंदावन सडे चौक रंगमाळा । अभिनव सोहळा घरोघरीं ॥३॥ नामघोष कथापुराणकीर्तनी । ओविया कांडणीं पांडुरंग ॥४॥ सर्व सुख तेथें असे सर्वकाळ । ब्रह्म तें केवळ नांदतसे ॥५॥ तुका म्हणे जें न साधे सायासें । प्रत्यक्ष तें दिसे विटेवरी ॥६॥

४४७. दुःख वाटे ऐसी ऐकोनियां गोष्टी । जेणे घडे तुटी तुझ्या पायीं ॥१॥ येतो कळवळा देखोनियां घात । करितों फजित नाइकती ॥२॥ काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति । दंडुनि पुढती वाटे लावूं ॥३॥ तुका म्हणे मज दावूं नको ऐसे । दृष्टीपुढें पिसे पांडुरंगा ॥४॥

४४८. सूकरासी विष्ठा माने सावकाश । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥१॥ तेवीं अभक्तासी आवडे पाखांड । न लगे त्या गोड परमार्थ ॥२॥ श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरी ॥३॥ तुका म्हणे सर्पा पाजिलीया क्षीर । वमितां विखार विष जालें ॥४॥

४४९. रासभ धुतला महा तीर्थामाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥१॥ तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥२॥ सर्पासी पाजिलें शर्करापीयूष । अंतरींचें विष जाऊं नेणे ॥३॥ तुका म्हणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवेंचि वमन जेवीं तया ॥४॥

४५०. जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षीर विषातुल्य ॥१॥ तेवीं परमार्थ जीहीं दुराविला । तयालागीं झाला सन्निपात ॥२॥ कामीन जयाच्या जाहाली नेत्रासी । देखे तो

चंद्रासी पीतवर्ण ॥३॥ तुका म्हणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची ॥४॥

४५१. आतां असो मना अभक्ताची कथा । न होईं दुश्चिता हरिनामीं ॥१॥ नये त्याची कदा गोष्टी करूं मात । जिव्हे प्रायश्चित्त त्याच्या नांवें ॥२॥ प्रभातें न घ्यावें नांव माकडाचें । तैसें अभक्ताचें सर्वकाळ ॥३॥ तुका म्हणे आतां आठवूं मंगळ । जेणें सर्वकाळ सुखरूप ॥४॥

४५२. नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥१॥ रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांग ही गात्रीं प्रेम तुझें ॥२॥ सर्वही शरीर वेंचों या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ॥३॥ तुका म्हणे दुजें न करीं कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतांपायीं ॥४॥

४५३. जननी हे जाणे बाळकाचें वर्म । सुख दुःख धर्म जें जें कांहीं ॥१॥ अंधापुढें जेणें दिधला आधार । त्याचा हा विचार तोचि जाणे ॥२॥ शरणागता जेणें घातलें पाठीशीं । तो जाणे तेविशीं राखों तया ॥३॥ कासे लागे तया न लगती सायास । पोहोणार त्यास पार पावी ॥४॥ तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं । दिला त्याची गति तोचि जाणे ॥५॥

४५४. नका वांटूं मन विधिनिषेधासी । स्मरावा मानसीं पांडुरंग ॥१॥ खादलिया अन्ना मासी बोळों नये । अवघेंचि जाय एका घांसें ॥२॥ जोडी होते परी ते बहु कठीण । करितां जतन सांभाळावें ॥३॥ तुका म्हणे येथें न मना विषाद । निंबेंविण व्याध तुटों नये ॥४॥

४५५. नको होऊ देऊं भावी अभावना । याचि नांवे जाणा बहु दोष ॥१॥ मेघवृष्टि येथें होते अनिवार । जिव्हाळ्या उखर लाभ नाड ॥२॥ उत्तम विभागें कनिष्ठाची इच्छा । कल्पतरु तैसा फळे त्यासी ॥३॥ तुका म्हणे जिणें बहु थोडें आहे । आपुलिया पाहें पुढें बरें ॥४॥

४५६. त्याग तंव मज न वजतां केला । काहींच विठ्ठला मनांतूनि ॥१॥ भागलिया आला उबग सहज । न धरितां काज जालें मनीं ॥२॥ देह जड जालें ऋणाच्या आभारें । केलें संवसारें कासावीस ॥३॥ तुका म्हणे गेला आळस किळस । अकर्तव्य दोष निवारले ॥४॥

४५७. मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाची वाणी लवलाहो ॥१॥ तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ॥२॥ ओटीच्या परिस मुठीचें तें वाढे । यापरि कैवाडें स्वहिताचें ॥३॥ नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ॥४॥ तुका म्हणे पाहें आपुली सूचना । करि तो शाहाणा मृत्युलोकीं ॥५॥

४५८. राजा चाले तेथें वैभव सांगा तें । हें काय लागतें सांगावें त्या ॥१॥ कोणी कोणा तेथें न मानिजे फुका । कृपेविण एका देवाचिया ॥२॥ शृंगारिलें नाहीं तगों येत वरि । उमटे लौकरि जैसें तैसें ॥३॥ तुका म्हणे घरीं वसे नारायण । कृपेचि ते खूण दिसों येते ॥४॥

४५९. वत्स पळे धेनु धांवे पाठी लागे । प्रीतीचा तो अंगें आविर्भाव ॥१॥ शिकविलें काय

येईल कारणा। सूत्र ओढी मना आणिकाच्या ॥२॥ सांडिलें त नाहीं घेत मेळविता। म्हणऊनि लाता मागें सारी ॥३॥ तुका म्हणे आग्रह करावा न लगे। सांगतसे हा गे अनुभव ॥४॥

४६०. देवाच्या संबंधें विश्वचि सोयरें। सूत्र ओढे दोरें एका एक ॥१॥ आहाच हें नव्हे बिटायासारिखें। जीव जीवनी देखें सामावलें ॥२॥ आणिकाचें सुख दुःख उमटे अंतरीं। एथील इतरीं तेणें न्यावें ॥३॥ तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती। शोभाचि पुढती विशेषता ॥४॥

४६१. अवघा वेंचलों इंद्रियांचे ओढी। जालें ते ते घडी निरोपिलें ॥१॥ असावा जी ठावा सेवेसी विचार। आपुला म्यां भार उतरिला ॥२॥ कायावाचा मनें तोचि निजध्यास। एथें जालों ओस भक्तिभावें ॥३॥ तुका म्हणे करूं येईल धांवणें। तरि नारायणें सांभाळावें ॥४॥

४६२. राहों आतां हेंचि ध्यान। डोळां मन लंपट ॥१॥ कोंडकोंडुनि धरीन जीवें। देहभावें पूजीन ॥२॥ होईल येणें कळसा आलें। स्थिरावलें अंतरीं ॥३॥ तुका म्हणे गोजिरिया। विठोबाच्या पायां पडों द्या ॥४॥

४६३. आदि मध्य अंत दाखविलें दीपें। हा तों आपणापें यत्न बरा ॥१॥ दास्यत्वें दाविलें धन्याचें भांडार। तों तों नव्हे सार एथुनियां ॥२॥ उपायानें सोस नासला सकळ। सत्ते सत्ताबळ अंगा आलें ॥३॥ तुका म्हणे दृष्टी सकळांचे शिरीं। वचनेंचि करी बैसोनियां ॥४॥

४६४. सांठविला वाण। पैस घातला दुकान ॥१॥ जें ज्या पाहिजे जे काळीं। आहे सिद्धचि जवळी ॥२॥ निवडिलें साचें। उत्तममध्यमकनिष्ठाचें ॥३॥ तुका बैसला दुकानीं। दावी मोलाऐसी वाणी ॥४॥

४६५. अवगुण तों कोणीं नाहीं प्रतिष्ठिले। मागें होत आले शिष्टाचार ॥१॥ दुर्बळाच्या नांवें पिटावा डांगोरा। हा तो नव्हें बरा सत्यवाद ॥२॥ मद्य आणि मधु एकरासी नांवें। तरि कां तें खावें आधारें त्या ॥३॥ तुका म्हणे माझा उच्छिष्ट प्रसाद। निवडी भेदाभेद दृष्टिन्यायें ॥४॥

४६६. लागलिया मुख स्तना। घाली पान्हा माउली ॥१॥ उभयतां आवडी लाड। कोडें कोड पुरतसे ॥२॥ मेळवितां अंगें अंग। प्रेमरंग वाढतो ॥३॥ तुका म्हणे जड भारी। अवघें शिरीं जननीचे ॥४॥

४६७. भूतीं भगवंत। हा तों जाणतों संकेत ॥१॥ भारी मोकलितो बाण। ज्याचा त्यासी कळे गुण ॥२॥ करावा उपदेश। निवडोनि तरि दोष ॥३॥ तुका म्हणे वाटे। चुकतां आडरानें कांटे ॥४॥

४६८. आम्हां हें कौतुक जगा द्यावी नीत। करावे फजित चुकती ते ॥१॥ कासयाचा बाध एकाच्या निरोपें। काय व्हावें कोपें जगाचिया ॥२॥ अविद्येचा येथें कोठें परिश्रम। रामकृष्णनाम ऐसे बाण ॥३॥ तुका म्हणे येथें खऱ्याचा विकरा। न सरती येरा खोट्या परी ॥४॥

४६९. दर्पणासी नकटें लाजे। शुद्ध खिजे देखोनि ॥१॥ ऐसें अवगुणांचे बाधें। दिसे

सुधे विपरीत ॥२॥ अंधळ्यासी काय हिरा । गाराचि तो सारिखा ॥३॥ तुका म्हणे भुंके सुणें । ठाया नेणे ठाव तो ॥४॥

४७०. नावडे तरि कां येतील हे भांड । घेउनियां तोंड काळें येथें ॥१॥ नासोनियां जाय रस या संगती । खळाचे पंगती नारायणा ॥२॥ तोंडावाटे नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुणें ॥३॥ तुका म्हणे नाहीं संताची मर्यादा । निंदे तोचि निंदा मायझवा ॥४॥

४७१. लेकरा आइतें पित्याचें जतन । दावी निजधन सर्व जोडी ॥१॥ त्यापरि आमुचा जालासे सांभाळ । देखिलाची काळ नाहीं आड ॥२॥ भुकेचे सन्निध वसे स्तनपान । उपायाची भिन्न चिंता नाहीं ॥३॥ आळवूनि तुका उभा पैलथडी । घातली या उडी पांडुरंगें ॥४॥

४७२. शुद्धचर्या हें संतांचें पूजन । लागतचि धन नाहीं वित्त ॥१॥ सगुणाचे सोई सगुण विश्रांति । आपणचि येती चोजवीत ॥२॥ कीर्तनींच वोळे कृपेचा वोस । दुरीपणें वास सन्निधता ॥३॥ तुका म्हणे वर्म सांगतों सवेगें । मन लावा लागें स्वहिताच्या ॥४॥

४७३. जीवींचें जाणावें या नांवें आवडी । हेकड तें ओढी अमंगळ ॥१॥ चित्ताच्या संकोचें कांहीं च न घडे । अतिशयें वेडे चार तेचि ॥२॥ काळाविण कांहीं नाहीं रुचों येत । करूनि संकेत ठेवियेला ॥३॥ तुका म्हणे कळे वचनें चांचणी । काय बोलवूनि वेळोवेळां ॥४॥

४७४. कामातुर चवी सांडी । बरळ तोंडीं बरळें ॥१॥ रंगलें तें अंगीं दावी । विष देववी आसडे ॥२॥ धनसोसें लागे वेड । ते बडबड शमेना ॥३॥ तुका म्हणे व्यसनें दोन्ही । नर्कखाणी भोगावया ॥४॥

४७५. कृष्णांजनें जाले सोज्ज्वल लोचन । तेणें दिले वाण निवडुनी ॥१॥ निरोपाच्या मापें करी लडबड । त्याचें तेणें गोड नारायणें ॥२॥ भाग्यवंताघरीं करितां विश्वासें । कार्य त्यासरिसें होईजेतें ॥३॥ तुका म्हणे पोट भरे बऱ्या बोजा । निज ठाव निजा निजस्थानीं ॥४॥

४७६. मैंद आला पंढरीस । हातीं घेउनि प्रेमपाश ॥१॥ पुढें नाडियेलें जग । नेतो लागों नेदीं माग ॥२॥ उभारोनि बाहे । दृष्टादृष्टी वेधिताहे ॥३॥ वैकुंठीहुनि पेणें । केलें पंढरीकारणें ॥४॥ पुंडलिकें थारा । देउनि आणिलें या चोरा ॥५॥ तुका म्हणे चला । तुम्ही आम्ही धरूं त्याला ॥६॥

४७७. भांडवी माउली कवतुकें बाळा । आपणा सकळां साक्षित्वेसीं ॥१॥ माझी माझी म्हणे एकाएका मारी । हें तों नाहीं दुरी उभयतां ॥२॥ तुझें थोडें भातें माझें बहु फार । छंद करकर वाद मिथ्या ॥३॥ तुका म्हणे एके ठायीं आहे वर्म । हेंचि होय श्रम निवारितें ॥४॥

४७८. लटिकियाच्या आशा । होतों पडिलों वोळसा । होउनियां दोषां । पात्र मिथ्या अभिमानें ॥१॥ बरवी उघडली दृष्टी । नाहीं तरी होतों कष्टी । आक्रंदते सृष्टी । मात्र या चेष्टांनीं ॥२॥ मरणाची नाहीं शुद्धी । लोभीं प्रवर्तली बुद्धी । परती तों कधीं । घडेचि ना माघारीं

॥३॥ सांचवूनि मरे धन । लावी पोरांसी भांडण । नाहीं नारायण । तुका म्हणे स्मरला ॥४॥

४७९. जवळी मुखापाशीं । असतां नेघे अहर्निशीं ॥१॥ भवनिर्दाळण नाम । विठ्ठल विठ्ठल नासी काम ॥२॥ सुखाचें शेजार । करूं कां नावडे घर ॥३॥ तुका म्हणे ठेवा । कां हा न करीच बरवा ॥४॥

४८०. बरवें देशाउर जालों । काय बोलें बोलावें ॥१॥ लाभें लाभ दुणावला । जीव धाला दर्शनें ॥२॥ भाग्ये जाली संतभेटी । आवडी पोटीं होती ते ॥३॥ तुका म्हणे श्रम केला । अवघा आला फळासी ॥४॥

४८१. सांगतां हें नये सुख । कीर्ती मुख न पुरे ॥१॥ आवडीनें सेवन करूं । जीवींचें धरूं जीवींच ॥२॥ उपमा या देतां लाभा । काशा शोभा सारिखी ॥३॥ तुका म्हणे नुचलीं डोई । ठेविली पायीं संतांचे ॥४॥

४८२. आपुलाला लाहो करूं । केणें भरूं हा विठ्ठल ॥१॥ भाग्यें पावलों या ठाया । आतां काया कुरवंडी ॥२॥ पुढती कोठें घडे ऐसें । बहुतां दिसें फावलें ॥३॥ तुका म्हणे जाली जोडी । चरण घडी न विसंबें ॥४॥

४८३. उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ॥१॥ संतदर्शनें हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥२॥ संपुष्ट हें हृदयपेटी । करूनि पोटीं सांठवूं ॥३॥ तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥४॥

४८४. आम्हांसी आपुलें नावडे संचित । चरफडे चित्त कळवळ्यानें ॥१॥ न कळतां जाला खोळंबा मारगा । जगीं जालों जगा बहुरूपी ॥२॥ कळों आलें बरे उघडले डोळे । कर्णधार मिळे तरि बरें ॥३॥ तुका म्हणे व्हाल ऐकत करुणा । तरि नारायणा उडी घाला ॥४॥

४८५. बरगासाठीं खादलें शेण । मिळतां अन्न न संडी ॥१॥ फजित तो केला लाहे । ताडण साहे गौरव ॥२॥ ओढाळाची ओंगळ ओढी । उगी खोडी नवजाय ॥३॥ तुका फजीत करी बुच्या । विसरे कुच्या खोडी तेणें ॥४॥

४८६. धांव घालीं आई । आतां पाहातीस काई ॥१॥ धीर नाहीं माझे पोटीं । जालों वियोगें हिंपुटी ॥२॥ करावें सीतळ । बहु जाली हळहळ ॥३॥ तुका म्हणे डोई । कईं ठेवीन हे पायीं ॥४॥

४८७. तुम्हां ठावा होता देवा । माझे अंतरींचा हेवा ॥१॥ होती काशानें सुटका । तरि हे वैकुंठनायका ॥२॥ नसतें सांभाळिलें । जरि तुम्हीं आश्वासिलें ॥३॥ तुका म्हणे कृपाळुवा । बरवा केला सावाधावा ॥४॥

४८८. देऊं ते उपमा । आवडीनें पुरुषोत्तमा ॥१॥ पाहतां काशा तूं सारिखा । तिहीं लोकांच्या जनका ॥२॥ आरुष हे वाणी । गोड करूनि देतां कानीं ॥३॥ आवडीनें खेळे ।

तुका पुरवावे सोहळे ॥४॥

४८९. दर्शनाची आस । आतां न साहे उदास ॥१॥ जीव आला पायांपाशीं । येथें असें कलिवरेसीं ॥२॥ कांहींच नाठवे । ठायीं बैसलें नुठवे ॥३॥ जीव असतां पायीं । तुका ठकावला ठायीं ॥४॥

४९०. भोगावरि आम्हीं घातला पाषाण । मरणा मरण आणियेलें ॥१॥ विश्व तूं व्यापक काय मी निराळा । काशासाठीं बळा येऊं आतां ॥२॥ काय सारूनियां काढावें बाहेरी । आणूनि भीतरी काय ठेवूं ॥३॥ केला तरि उरे वादच कोरडा । बळें घ्यावी पीडा स्वप्नींची ते ॥४॥ अवघेचि वाण आले तुम्हां घरा । मजुरी मजुरा रोजकीर्दी ॥५॥ तुका म्हणे कांहीं नेणें लाभ हानी । असेल तो धनी राखो वाडा ॥६॥

४९१. कां हो एथें काळ आला आम्हां आड । तुम्हांपाशीं नाड करावया ॥१॥ कां हो विचाराचें पडिलें सांकडें । काय ऐसें कोडें उपजलें ॥२॥ कां हो उपजेना द्यावी ऐसी भेटी । काय द्वैत पोटीं धरिलें देवा ॥३॥ पाप फार किंवा जालासी दुर्बळ । मागिल तें बळ नाहीं आतां ॥४॥ काय जालें देणें निघालें दिवाळें । कीं बांधलासि बळें ऋणेंपायीं ॥५॥ तुका म्हणे कां रे ऐसी केली गोवी । तुझी माझी ठेवी निवडुनी ॥६॥

४९२. काय देह घालूं करवती कर्मरी । टाकूं या भितरीं अग्नीमाजी ॥१॥ काय सेवूं वन शीतउष्ण तहान । साहों कीं मोहन धरुनी बैसों ॥२॥ काय लावूं अंगीं भस्म उधळण । हिंडूं देश कोण खुंट चीरा ॥३॥ काय त्यजूं अन्न करूं मी उपवास । काय करूं नास जीवित्वाचा ॥४॥ तुका म्हणे काय करावा उपाव । ऐसा देई भाव पांडुरंगा ॥५॥

४९३. दंभें कीर्ति पोटभरे मानीजन । स्वहित कारण नव्हे कांहीं ॥१॥ अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां हे थोरी जाणिवेची ॥२॥ पिंडाच्या पाळणें धांवती विकार । आहे दावेदार मजमाजी ॥३॥ कैसा करूं घात आपुला आपण । धरूनि गुमान लोकलाज ॥४॥ तुका म्हणे मज दावीं तो सोहळा । देखें पाय डोळां तुझे देवा ॥५॥

४९४. धिग जिणें ज्याचा स्वामी हीन वर । मरण तें बरें भलें मग ॥१॥ आइकाजी देवा ऐसी आहे नीत । काय तें उचित सांभाळावें ॥२॥ देशोदेशीं धाक जयाच्या उत्तरें । तयाचें कुतरें परि भलें ॥३॥ तुका म्हणे हें कां सुचलें उत्तर । जाणोनि अंतर ओळखावें ॥४॥

४९५. आतां गाऊं तुज ओविया मंगळी । करूं गदारोळी हरिकथा ॥१॥ होसि निवारिता आमुचें सकळ । भय तळमळ पापपुण्य ॥२॥ भोगिले ते भोग लावूं तुझे अंगीं । अलिप्त या जगीं होउनि राहों ॥३॥ तुका म्हणे आम्ही लाडिकीं लेंकरें । न राहों अंतरें पायांविण ॥४॥

४९६. सर्व सुखें आजी एथेंचि वोळलीं । संतांचीं देखिलीं चरणांबुजें ॥१॥ सर्वकाळ

होतों आठवित मनीं । फिटली ते धणी येणें काळें ॥२॥ तुका म्हणे वाचा राहिली कुंठित । पुढें जालें चित्त समाधान ॥३॥

४९७. विठ्ठल सोयरा सज्जन सांगती । विठ्ठल या चित्तीं बैसलासे ॥१॥ विठ्ठलें हें अंग व्यापिली ते काया । विठ्ठल हे छाया माझी मज ॥२॥ बैसला विठ्ठल जिव्हेचिया माथां । न वदे अन्यथा आन दुजें ॥३॥ सकळां इंद्रियां मन हें प्रधान । तें ही करी ध्यान विठोबाचें ॥४॥ तुका म्हणे या हो विठ्ठलासी आतां । नये विसंबतां माझें मज ॥५॥

४९८. होय होय वारकरी । पाहें पाहें रे पंढरी ॥१॥ काय करावीं साधनें । फळ अवघेंचि येणें ॥२॥ अभिमान नुरे । कोड अवघेंचि पुरे ॥३॥ तुका म्हणे डोळां । विठो बैसला सांवळा ॥४॥

४९९. पंढरीसी जाय । तो विसरे बापमाय ॥१॥ अवघा होय पांडुरंग । राहे धरूनियां अंग ॥२॥ न लगे धन मान । देहभावें उदासीन ॥३॥ तुका म्हणे मळ । नासी तत्काळ तें स्थळ ॥४॥

५००. बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं जाला त्याग अंतरींचा ॥१॥ ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मानसी हा ठावा समाचार ॥२॥ जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातो विसरूनि सकळ ही ॥३॥ प्रपंचाबाहेरी नाहीं आलें चित्त । केले करी नित्य वेवसाव ॥४॥ तुका म्हणे मज बहुरुप्याचि परी । जालें सोंग वरी आंत तैसें ॥५॥

५०१. म्हणवितों दास ते नाहीं करणीं । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥१॥ गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥२॥ पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ॥३॥ भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासि ॥४॥ तुका म्हणे वांयां गेलों ऐसा दिसें । होईल या हांसें लौकिकाचें ॥५॥

५०२. न कळे तों काय करावा उपाव । जेणें राहे भाव तुझ्या पायीं ॥१॥ येऊनियां वास करिसी हृदयीं । ऐसें घडे कईं कासयानें ॥२॥ साच भावें तुझें चिंतन मानसीं । राहे हें करिसी कैं गा देवा ॥३॥ लटिकें हें माझें करूनियां दुरी । साच तूं अंतरीं येउनि राहें ॥४॥ तुका म्हणे मज राखावें पतिता । आपुलिया सत्ता पांडुरंगा ॥५॥

५०३. चिंतिलें तें मनिंचें जाणे । पुरवी खुणे अंतरींचें ॥१॥ रात्री न कळे दिवस न कळे । अंगीं खेळे दैवत हें ॥२॥ नवसियाचे पुरवी नवस । भोगी त्यास भिन्न नाहीं ॥३॥ तुका म्हणे समचि देणें । समचरणीं उभा असे ॥४॥

५०४. उद्धाराचा संदेह नाहीं । याच्या कांहीं सेवकां ॥१॥ पांडुरंग अभिमानी । जीवदानी कोंवसा ॥२॥ बुडतां जळीं जळतां आगीं । ते प्रसंगीं राखावें ॥३॥ तुका म्हणे आम्हांसाठीं । कृपा पोटीं वागवी ॥४॥

५०५. माय ते विरक्ति न कळेचि आम्हां । जाणों एका नामा विठोबाच्या ॥१॥ नाचेन

मी सुखें वैष्णवांचे मेळीं । दिंडी टाळघोळी आनंदें या ॥२॥ शांति क्षमा दया ते मी काय जाणें । विठ्ठलकीर्तनें वांचूनियां ॥३॥ कासया एकांत सेवूं तया वना । आनंदें या जनामाजी असो ॥४॥ कासया उदास होऊं देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ॥५॥ तुका म्हणे मज असे हा भरवसा । विठ्ठल सरसा चालतसे ॥६॥

५०६. जेथें वैष्णवाचा वास । धन्य भूमी पुण्य देश ॥१॥ दोष नाहीं ओखदासी । दूत सांगे यमापाशीं ॥२॥ गरुडटकयांच्या भारें । भूमि गर्जे जयजयकारें ॥३॥ सहज तया जना छंद । वाचे गोविंद गोविंद ॥४॥ तुळसीवनें रंगमाळा । अवघा वैकुंठ सोहळा ॥५॥ तुका म्हणे भेणें । काळ नये तेणें रानें ॥६॥

५०७. माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥१॥ पडियें देहभाव पुरवी वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥२॥ मागें पुढें उभा राहे सांभाळित । आलिया आघात निवारावे ॥३॥ योगक्षेम त्याचें जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥४॥ तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥५॥

५०८. सकळ धर्म मज विठोबाचें नाम । आणीक तें वर्म नेणें कांहीं ॥१॥ काय जाणों संतां निरविलें देवें । करिती या भावें कृपा मज ॥२॥ तुका म्हणे माझा कोण अधिकार । तो मज विचार कळों यावा ॥३॥

५०९. उदंड शाहाणे होती तर्कवंत । परि नेणवेचि अंत विठोबाचा ॥१॥ उदंडा अक्षरां करोत भरोवरी । परि नेणवेचि थोरी विठोबाची ॥२॥ तुका म्हणे नाहीं भोळेपणाविण । जाणीव ते शीण रितें माप ॥३॥

५१०. आधारावांचुनी । काय सांगसील काहाणी ॥१॥ ठावा नाहीं पंढरीराव । तोंवरी अवघेंचि वाव ॥२॥ मानिताहे कोण । तुझें कोरडें ब्रह्मज्ञान ॥३॥ तुका म्हणे ठेवा । जाणपण एक सवा ॥४॥

५११. अनाथाची तुम्हां दया । पंढरीराया येतसे ॥१॥ ऐसी ऐकोनियां कीर्ति । बहु विश्रांति पावलों ॥२॥ अनाथाच्या धांवा घरा । नामें करा कुडावा ॥३॥ तुका म्हणे सवघड हित । ठेवूं चित्त पायांपें ॥४॥

५१२. येथें नाहीं उरों आले अवतार । येर ते पामर जीव किती ॥१॥ विषयांचे झणी व्हाल लोलिंगत । चेवलिया अंत न लगे मग ॥२॥ वाहोनियां भार कुंथसील ओझें । नव्हे तेंचि माझें थीता त्याग ॥३॥ तुका म्हणे कैसी नाहीं त्याची लाज । संतीं केशीराज साधियेला ॥४॥

५१३. हींच त्याचीं पंचभूतें । जीवन भातें प्रेमाचें ॥१॥ कळवळा धरिला संतीं । ते निगुती कैवाड ॥२॥ हाच काळ वर्तमान । समाधान ही संपत्ती ॥३॥ तुका म्हणे दिवसरातीं ।

हेंचि खाती अन्न ते ॥४॥

५१४. दीप न देखे अंधारा । आतां हेंचि करा जतन ॥१॥ नारायण नारायण । गांठी धन बळकट ॥२॥ चिंतामणीपाशीं चिंता । तत्वता ही न येल ॥३॥ तुका म्हणे उभयलोकीं । हेचि निकी सामग्री ॥४॥

५१५. धन्य काळ संतभेटी । पायीं मिठी पडली तो ॥१॥ संदेहाची सुटली गांठी । जालों पोटीं शीतळ ॥२॥ भवनदीचा जाला तारा । या उत्तरा प्रसादें ॥३॥ तुका म्हणे मंगळ आतां । कोण दाता याहुनि ॥४॥

५१६. दिनरजनीं हाचि धंदा । गोविंदाचे पवाडे ॥१॥ संकल्पिला देह देवा । सकळ हेवा तेठायीं ॥२॥ नाहीं अवसान घडी । सकळ जोडी इंद्रिया ॥३॥ कीर्ति मुखें गर्जे तुका । करी लोकां सावध ॥४॥

५१७. खरें नानवट निक्षेपीचें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥१॥ मजुराच्या हातें मापाचा उकल । मी तों येथें फोल सत्ता त्याची ॥२॥ कुल्लाळाच्या हातें घटाच्या उत्पत्ति । पाठवी त्या जाती पाकस्थळा ॥३॥ तुका म्हणे जीवन तें नारायणीं । प्रभा ते किरणीं प्रकाशाची ॥४॥

५१८. गंगेचिया अंतेविण काय चाड । आपुलें तें कोड तृषेपाशीं ॥१॥ विठ्ठल हे मूर्ति साजिरी सुंदर । घालूं निरंतर हृदयपुटीं ॥२॥ कारण ते असे नवनीतापाशीं । गबाळ तें सोसी येर कोण ॥३॥ बाळाचे सोईतें घांस घाली माता । अट्टाहास चिंता नाहीं तया ॥४॥ गाऊं नाचूं करूं आनंदसोहळा । भावचि वेगळा नाहीं आतां ॥५॥ तुका म्हणे अवघें जालें एकमय । परलोकींची काय चाड आतां ॥६॥

५१९. स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ॥१॥ आतां सोडवणें धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ॥२॥ येउनियां आड ठाके लोकलाज । तों हें दिसे काज अंतरलें ॥३॥ तुका म्हणे आम्हां जेथें जेथें गोवा । तेथें तुम्हीं देवा सांभाळावें ॥४॥

५२०. पडिलों भोवणीं । होतों बहु चिंतवणी ॥१॥ होतों चुकलों मारग । लाहो केला लागवेग ॥२॥ इंद्रियाचे संदी । होतों सांपडलों बंदी ॥३॥ तुका म्हणे बरें जालें । विठ्ठलसें वाचे आलें ॥४॥

५२१. बरें जालें आलीं ज्याच्या त्याच्या घरा । चुकला पान्हेरा ओढाळांचा ॥१॥ बहु केलें दुःखी त्याचिया सांभाळें । आतां तोंड काळें तेणें लोभें ॥२॥ त्याचिया अन्यायें भोगा माझें अंग । सकळही लाग घ्यावा लागे ॥३॥ नाहीं कोठें स्थिर राहों दिलें क्षण । आजिवरी शिण पावलों तो ॥४॥ वेगळाल्या खोडी केली तडातोडी । सांगावया घडी नाहीं सुख ॥५॥ निरवूनि तुका चालिला गोवारें । देवापाशीं भार सांडवूनि ॥६॥

५२२. न करावी आतां पोटासाठी चिंता । आहे त्या संचिता माप लावूं ॥१॥ दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं । क्षुल्लका उपायीं शीण जाला ॥२॥ येथें तंव नाहीं घेइजेसें सवें । कांहीं नये जीवें वेचों मिथ्या ॥३॥ खंडणेंचि नव्हे उद्वेग वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ॥४॥ शेवटा पाववी नावेचें बैसणें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ॥५॥ तुका म्हणे आतां सकळाचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ॥६॥

५२३. आमुच्या हें आलें भागा । जिव्हार या जगाचें ॥१॥ धरूनियां ठेलों जिवें । बळकट भावें एकविध ॥२॥ आणूनियां केला रूपा । उभा सोपा जवळी ॥३॥ तुका म्हणे अंकित केला । खालीं आला वचनें ॥४॥

५२४. खरें भांडवल सांपडलें गांठी । जेणें नये तुटी उदिमासी ॥१॥ सवंगाचें केणें सांपडलें घरीं । भरूनि वैखरी सांठविलें ॥२॥ घेतां देतां लाभ होतसे सकळां । सदैवां दुर्बळा भाव तैसा ॥३॥ फडा आलिया तो न वजे निरास । जरि कांहीं त्यास न कळतां ॥४॥ तुका म्हणे आतां जालीसे निश्चिंती । आणीक तें चित्तीं न धरूं दुजें ॥५॥

५२५. पदोपदीं दिलें अंग । जालें सांग कारण ॥१॥ रुधवूनि ठेलों ठाव । जागा वाव सकळ ॥२॥ पुढती चाली मना लाहो । वाढे देहो संतोष ॥३॥ तुका म्हणे क्षरभागीं । जालों जगीं व्यापक ॥४॥

५२६. निवडुनि दिलें नवनीत । संचित ते भोगीते ॥१॥ आतां पुढें भाव सार । जीवना थोर पाहावया ॥२॥ पारखियाचे पडिलें हातीं । चांचपती आंधळीं ॥३॥ तुका म्हणे सेवन घडे । त्यासी जोडे लाभ हा ॥४॥

५२७. उचित न कळे इंद्रियाचे ओढी । मुखें बडबडी शिकलें तें ॥१॥ आपण जाऊन न्यावें नरकास । बळें बेताळीस कुळें जग ॥२॥ अबोलणें बोले डोळे झांकुनियां । बडबडी वांयां दंभासाठीं ॥३॥ तुका म्हणे आम्ही तेथील पारखी । नाचे देखोवेखीं जाणों खरें ॥४॥

५२८. एक मन तुझ्या अवघ्या भांडवला । वांटितां तें तुला येईल कैसें ॥१॥ म्हणउनि दृढ धरीं पांडुरंग । देहा लावीं संग प्रारब्धाचा ॥२॥ आणिका संकल्पा नको गोऊं मन । तरीच कारण साध्य होय ॥३॥ तुका म्हणे ऐसें जाणावें उचित । तरी सहज स्थित येईल कळों ॥४॥

५२९. गावे म्हणउनि गीत । धरुनि राहे तैसें चित्त ॥१॥ हेंचि थोर अवघड आहे । अन्न देखोनि भूक राहे ॥२॥ ऐकावी म्हूण कथा । राहे तैसें धरुनि चित्ता ॥३॥ तुका म्हणे धणी । नव्हे जेविल्यावांचूनि ॥४॥

५३०. कळेल हे खुण । तरि दावी नारायण ॥१॥ सत्य संतांपाशीं राहे । येरां भय आड आहे ॥२॥ अणुचिया ऐसें । असे भरलें प्रकाशें ॥३॥ इंद्रियांचे धनी । ते हे जाती समजूनि

॥४॥ तर्क कुतर्क वाटा । नागवण घटापटा ॥५॥ तुका म्हणे ल्यावें । डोळां अंजन बरवें ॥६॥

५३१. जातो न येतिया वाटा । काय निरवितो करंटा ॥१॥ कैसा जालासे बेश्रम । लाज नाहीं न म्हणे राम ॥२॥ पाहे वैरियाकडे । डोळे वासुनियां रडे ॥३॥ बांधुनियां यमा हातीं । दिला नाहीं त्याची खंती ॥४॥ नाहीं यांपें काम । ऐसें जाणे तो अधम ॥५॥ अझुन तरी मुका । कां रे जालासि म्हणे तुका ॥६॥

५३२. वांटा घेईं लवकरि । मागें अंतरसी दूरी । केली भरोवरी । सार नेती आणीक ॥१॥ ऐसीं भांबावलीं किती । काय जाणों नेणों किती । समय नेणती । माथां भार वाहोनी ॥२॥ नाहीं सरलें तोंवरी । धांव घेईं वेग करीं । घेतलें पदरीं । फावलें तें आपुलें ॥३॥ फटलंडी म्हणे तुका । एक न साहावे धक्का । तरिच या सुखा । मग कैसा पावसी ॥४॥

५३३. चालावा पंथ तों पाविजे त्या ठाया । ऐकलिया वांया वारता त्या ॥१॥ ऐका जी वोजे पडतसें पायां । भावचि ते जाया वाट नव्हे ॥२॥ व्याली कुमारीचा अनुभवें अनुभव । सांगतां तो भाव येत नाहीं ॥३॥ तुका म्हणे येथें पाहिजे आरालें । बिंबीं निवळलें तरि भासे ॥४॥

५३४. काय नाहीं लवत झाडें । विसरें वेडें देहभाव ॥१॥ जया न फळे उपदेश । धस ऐसें त्या नांव ॥२॥ काय नाहीं असत जड । दगड तो अबोलणा ॥३॥ तुका म्हणे कुचर दाणा । तैसा म्हणा डेंग हा ॥४॥

५३५. देखीचा दिमाख शिकोनियां दावी । हिऱ्याऐसी केवीं गारगोटी ॥१॥ मर्यादा ते जाणे अरे अभागिया । देवाच्या ऐसिया सकळ मूर्ति ॥२॥ काय पडिलासी लटिक्याचे भरी । वोंवाळुनि थोरी परती सांडीं ॥३॥ तुका म्हणे पुढें दिसतसे घात । करितों फजित म्हणउनि ॥४॥

५३६. संसाराचा माथां भार । कांहीं पर न ठेवीं ॥१॥ भक्तीची ते जाती ऐसी । सर्वस्वासी मुकावें ॥२॥ भिक्षा आणि वेवसाव । काला करी तो गाढव ॥३॥ करुनि वस्ती बाजारीं । म्हणवी कासया निस्पृही ॥४॥ प्रसादा आडुनि कवी । केलें तूप पाणी तेवीं ॥५॥ तुका म्हणे होईं शूर । किंवा निसुर मजूर ॥६॥

५३७. तेज्या इशारती । तट्टा फोकावरी घेती ॥१॥ काय सांगावें त्याहुनि । ऐका रे धरा मनीं ॥२॥ नव्हे भांडखोर । धरूं ओढुनि पदर ॥३॥ तुका म्हणे तोंड । काळें करा खाली मुंड ॥४॥

५३८. मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ॥१॥ आचारभ्रष्ट होती लोक कली । पुण्य क्षीण बळी जालें पाप ॥२॥ वर्णधर्म कोणी न धरी विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं ॥३॥ वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखति भेद विषयीं भांड ॥४॥ तुका म्हणे किती करावे फजित । तेचि छंद नित्य बहु होती ॥५॥

५३९. अक्षरांचा श्रम केला । फळा आला तेणें तो ॥१॥ अवघियाचा तळ धरी । जीवा

उरी नुरवुनी ॥२॥ फळलें तें लवे भारें । पिक खरें आलें तईं ॥३॥ तुका म्हणे हा गे देव । पुढें भाव सारावा ॥४॥

५४०. उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चित्त शुद्ध बुद्धी ठायीं स्थीर ॥१॥ न घालावी धांव मनाचिये ओढी । वचनीं आवडी संतांचिये ॥२॥ अंतरी या राहे वचनाचा विश्वास । न लगे उपदेश तुका म्हणे ॥३॥

५४१. जीवन्मुक्त ज्ञानी जरि जाले पावन । त्यजावा दुर्जन संग तिहीं ॥१॥ बहुत अन्न विष मोहरीच्या मानें । अवघेंचि तेणें विष होय ॥२॥ तुका म्हणे जेणें आपुलें स्वहित । तैसी करा नीत विचारुनि ॥३॥

५४२. द्रव्याचा तों आम्ही धरितों विटाळ । तया पाठी काळ लाग करीं ॥१॥ करोनिया हेंचि राहिलों जीवन । एक नारायण नाम ऐसें ॥२॥ तुका म्हणे हेंचि करुनि जतन । आलिया ही दान याचकासी ॥३॥

५४३. द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग । म्हणोनियां संग खोटा त्याचा ॥१॥ निरयाचें मूळ घालुनियां मागें । मांडिली प्रसंगें कथा पुढें ॥२॥ आजिच्या प्रसंगें हाचि लाभ घ्यावा । पुढील भार देवावरी घाला ॥३॥ प्रारब्ध कांहीं न पालटे सोसें । तृष्णेचें हें पिसें वायांविण ॥४॥ तुका म्हणे घेईं राहे ऐसें धन । सादर श्रवण करोनियां ॥५॥

५४४. रडे अळंकार दैन्याचिये कांती । उत्तमा विपत्तिसंग घडे ॥१॥ एकाविण एक अशोभ दातारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥२॥ रांधूं नेणें तया पुढील आइतें । केलें तें सोइतें वांयां जाय ॥३॥ तुका म्हणे चिंतामणि शेळी गळां । पावे अवकळा म्हणउनि ॥४॥

५४५. दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसीं ॥१॥ कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष ॥२॥ भोगें कळों येती मागिल ते जन्म । उत्तम मध्यम कनिष्ठ ते ॥३॥ तुका म्हणे येथें झांकितील डोळे । भोग देते वेळे येईल कळों ॥४॥

५४६. सदैव तुम्हां अवघें आहे । हातपाय चालाया ॥१॥ मुखीं वाणी कानीं कीर्ति । डोळे मूर्ति देखावया ॥२॥ अंध बहिर ठकलीं किती । मुकीं होती पांगुळ ॥३॥ घरा आगी लावुनि जागा । न पळे तो गा वांचेना ॥४॥ तुका म्हणे जागा हिता । कांहीं आतां आपुल्या ॥५॥

५४७. ऐसे पुढती मिळतां आतां । नाहीं सत्ता स्वतंत्र ॥१॥ म्हणउनि फावलें तें घ्यावें । नाम गावें आवडी ॥२॥ संचित प्रारब्ध गाढें । धांवे पुढें क्रियमाण ॥३॥ तुका म्हणे घुबडा ऐसें । जन्म सरिसें शुकराचें ॥४॥

५४८. सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडूं एक ॥१॥ संसाराची मज न साहेचि वार्ता । आणीक म्हणतां माझें कोणी ॥२॥ देहसुख कांहीं बोलिले उपचार ।

विष तें आदर बंध वाटे ॥३॥ उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ॥४॥ तुका म्हणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवाचे ॥५॥

५४९. आणीक कांहीं या उत्तराचें काज । नाहीं आतां मज बोलावया ॥१॥ भिन्न हे भावना स्वभाव । नव्हे कांहीं देव एकविध ॥२॥ गुण दोष कोणें निवडावे धर्म । कोण जाणे कर्म अकर्म तें ॥३॥ तरि भलें आतां न करावा संग । दुःखाचे प्रसंग तोडावया ॥४॥ तुका म्हणे गुण गाईं या देवाचे । घेईं माझे वाचे हेचि धणी ॥५॥

५५०. आपुला विचार करीन जीवाशीं । काय या जनाशीं चाड मज ॥१॥ आपलें स्वहित जाणती सकळ । निरोधितां बळें दुःख वाटे ॥२॥ आइको नाइको कथा कोणी तरी । जाऊनियां घरीं निजो सुखें ॥३॥ माझी कोण वोज जाला हा शेवट । देखोनियां वाट आणिकां लागे ॥४॥ तुका म्हणें भाकूं आपुली करुणा । जयाची वासना तया फळे ॥५॥

५५१. ध्याईं अंतरिंच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥१॥ विधिनिषेध ऊर फोडी । जंव नाहीं अनुभवगोडी ॥२॥ वाढे तळमळ उभयतां । नाहीं देखिलें अनुभवितां ॥३॥ आपुल्याला मतें पिसें । परि तें आहे जैसें तैसें ॥४॥ साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धि ॥५॥ तुका म्हणे वादें । वांयां गेली ब्रह्मवृंदें ॥६॥

५५२. कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा ॥१॥ कैसीं ठकलीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं ॥२॥ भूस उपणुनि केलें काय । हारपलें दोन्ही ठाय ॥३॥ तुका म्हणे लागे हातां । काय मथिलें घुसळितां ॥४॥

५५३. संतांची उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गंव्हारें जाणावें हें ॥१॥ विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ॥२॥ करितों कवित्व बोबड्या उत्तरीं । झणी मजवरी कोप धरा ॥३॥ काय माझी याती नेणा हा विचार । काय मी तें फार बोलों नेणें ॥४॥ तुका म्हणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तोचि जाणे ॥५॥

५५४. चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ॥१॥ साकरेची गोडी सारिखी सकळां । थोरां मोठ्यां बाळां धाकुटियां ॥२॥ तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि कां निंदिते जन मज ॥३॥

५५५. तुज ऐसा कोण उदाराचा रासी । आपुलेंचि देसी पद दासा ॥१॥ शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ॥२॥ भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्ताच्या परी नावडती ॥३॥ नवजासी जेथें दुरी दवडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ॥४॥ तुका म्हणे ऐसीं ब्रीदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ॥५॥

५५६. तरि कां नेणते होते मागें ऋषी । तीहीं या जनासी दुराविलें ॥१॥ वोळगती जया

अष्टमादि सिद्धी । ते या जनबुद्धी नातळती ॥२॥ कंदमुळें पाला धातूच्या पोषणा । खाती वास रानांतरीं केला ॥३॥ लावुनियां नेत्र उगेचि बैसले । न बोलत ठेले मौन्यरूप ॥४॥ तुका म्हणे ऐसें करीं माझ्या चित्ता । दुरावीं अनंता जन दुरी ॥५॥

५५७. कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देईल धीर माझ्या जीवा ॥१॥ शास्त्रज्ञ पंडित नव्हें मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ॥२॥ कलियुगीं बहु कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां ॥३॥ मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको ॥४॥ तुका म्हणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ॥५॥

५५८. काय उणें जालें तुज समर्थासी । ऐशा मजपाशीं कोण दोष ॥१॥ जो तूं माझा न करिसी अंगीकार । सांगेन वेव्हार संतांमधीं ॥२॥ तुजविण रत आणिकाचे ठायीं । ऐसें कोण ग्वाही दावीं मज ॥३॥ तुका म्हणे काय धरुनी गुमान । सांग उगवून पांडुरंगा ॥४॥

५५९. काय करूं आन दैवतें । एकाविण पंढरीनाथें ॥१॥ सरिता मिळाली सागरीं । आणिकां नांवा कैची उरी ॥२॥ अनेक दीपिका प्रकाश। सूर्य उगवतां नाश ॥३॥ तुका म्हणे नेणें दुजें । एकाविण पंढरीराजें ॥४॥

५६०. काय करूं कर्माकर्म । बरें सांपडलें वर्म ॥१॥ होसी नामाच सारिखा । समजाविली नाहीं लेखा ॥२॥ नाहीं वेचावेच जाला । उरला आहेसी संचला ॥३॥ तुका म्हणे माझें । काय होईल तुम्हां ओझें ॥४॥

५६१. एकी केली हातोफळी । ठाया बळी पावले ॥१॥ आम्ही दैवा शक्तिहीनें । भाखूं तेणें करुणा ॥२॥ पावटणी केला काळ । जया बळ होतें तें ॥३॥ तुका म्हणे वीर्यावीर । संतधीर समुद्र ॥४॥

५६२. पुढिलाचें इच्छी फळ । नाहीं बळ तें अंगीं ॥१॥ संत गेले तया ठाया । देवराया पाववीं ॥२॥ ज्येष्ठांची कां आम्हां जोडी । परवडी न लभों ॥३॥ तुका म्हणे करीं कोड । पुरवीं लाड आमुचा ॥४॥

५६३. कैवल्याच्या तुम्हां घरीं । रासी हरी उदंडा ॥१॥ मजसाठीं कां जी वाणी । नव्हे धणी विभागा ॥२॥ सर्वां गुणीं सपुरता । ऐसा पिता असोनि ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । जालों सांगा सन्मुख ॥४॥

५६४. आपुलाल्या तुम्ही रूपासी समजा । कासया वरजा आरसिया ॥१॥ हें तों नव्हे देहबुद्धीचें कारण। होइल नारायणें दान केलें ॥२॥ बब्रुचिया बाणें वर्मासि स्पर्शावें। हें तों नाहीं ठावें मोकलित्या ॥३॥ तुका म्हणे बहु मुख या वचना। सत्याविण जाणा चाली नाहीं ॥४॥

५६५. न मनावी चिंता तुम्ही संतजनीं । हिरा स्फटिकमणी केंवि होय ॥१॥ पडिला प्रसंग

स्थळा त्या सारिखा । देखिला पारिखा भाव कांहीं ॥२॥ बहुतांसी भय एकाचिया दंडें । बहुत या तोंडें वचनासी ॥३॥ तुका म्हणे नाहीं वैखरीं बासर । करावया चार वेडे वेडे ॥४॥

५६६. यथाविधि पूजा करी । सामोग्री तो वरी हे नाहीं ॥१॥ आतां माझा सर्व भार । तूं दातार चालविता ॥२॥ मंगळ तें तुम्ही जाणा । नारायणा काय तें ॥३॥ तुला म्हणे समर्पिला । तुज विठ्ठला देहभाव ॥४॥

५६७. भवसिंधूचें हेंचि तारूं । मज विचारू पाहतां ॥१॥ चित्तीं तुझे धरिन पाय । सुख काय तें तेथें ॥२॥ माझ्या खुणा मनापाशीं । तें या रसीं बुडालें ॥३॥ तुका म्हणे वर्म आलें । हातां भलें हें माझ्या ॥४॥

५६८. पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझ्या ॥१॥ जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥२॥ श्रवणाची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद निवारोनी ॥३॥ महामळें मन होतें जें गादलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥४॥ तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ॥५॥

५६९. हाचि परमानंद आळंगीन बाहीं । क्षेम देतां ठायीं द्वैत तुटे ॥१॥ बोलायासि मात मन निवे हर्षें चित्त । दुणी वाढे प्रीत प्रेमसुख ॥२॥ जनांत भूषण वैकुंठीं सरतां । फावलें स्वहिता सर्वभावें ॥३॥ तुटला वेव्हार माया लोकाचार । समूळ संसार पारुषला ॥४॥ तुका म्हणे तो हा विठ्ठलचि व्हावा । आणिक या जीवा चाड नाहीं ॥५॥

५७०. आमुची कृपाळू तूं होसी माउली । विठ्ठले साउली शरणागता ॥१॥ प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टि हे निर्मळ अमृताची ॥२॥ भूक तहान दुःख वाटों नेदी शीण । अंतरींचा गुण जाणोनियां ॥३॥ आशा तृष्णा माया चिंता दवडी दुरी । ठाव आम्हां करीं खेळावया ॥४॥ तुका म्हणे लावी संतांचा सांगात । तेथें न पवे हात कळिकाळाचा ॥५॥

५७१. जेथें जावें तेथें कपाळ सरिसें । लाभ तो विशेष संतसंगें ॥१॥ पूर्वपुण्यें जरि होतीं सानुकूळ । अंतरायमूळ नुपजे तेथें ॥२॥ भाग्य तरी नव्हे धन पुत्र दारा । निकट वास बरा संतापायीं ॥३॥ तुका म्हणे हेचि करावी मिरासी । बळी संतापाशीं द्यावा जीव ॥४॥

५७२. आतां कांहीं सोस न करीं आणीक । धरीन तें एक हेंचि दृढ ॥१॥ जेणें भवसिंधु उतरिजे पार । तुटे हा दुस्तर गर्भवास ॥२॥ जोडीन ते आतां देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ॥३॥ तुका म्हणे बरा जोडला हा देह । मनुष्यपण इहलोकां आलें ॥४॥

५७३. जतन करीन जीवें । शुद्ध भावें करूनी ॥१॥ विठ्ठल विठ्ठल हें धन । जीवन अंतकाळींचें ॥२॥ वर्दळ हें संचित सारूं । बरवा करूं उदिम हा ॥३॥ तुका म्हणे हृदय पोटीं । ये संपुटीं सांठवूं ॥४॥

५७४. एवढा प्रभू भावें । तेणें संपुष्टीं रहावें ॥१॥ होय भक्तीं केला तैसा । पुरवी धरावी ते इच्छा ॥२॥ एवढा जगदानी । मागे तुळसीदळ पाणी ॥३॥ आला नांवारूपा । तुका म्हणे झाला सोपा ॥४॥

५७५. भाग्य ऐसी जाली जोडी । आतां घडी न विसंबे ॥१॥ विटेवरी समचरण । संतीं खूण सांगितली ॥२॥ अवघें आतां काम सारूं । हाचि करूं कैवाड ॥३॥ तुका म्हणे खंडूं खेपा । पुढें पापापुण्याच्या ॥४॥

५७६. पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ॥१॥ सर्वभावें लोभ्या आवडे हें धन । आम्हां नारायण तैशापरी ॥२॥ तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥३॥

५७७. विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ध्यावा । विठ्ठल उभा पहावा विटेवरी ॥१॥ अनाथाचा बंधु विठ्ठल कृपासिंधु । तोडी भवबंधु यमपाश ॥२॥ तोचि शरणागतां विठ्ठल मुक्तिदाता । विठ्ठल या संतांसमागमें ॥३॥ विठ्ठल गुणनिधि विठ्ठल सर्व सिद्धि । लागली समाधि विठ्ठल नामें ॥४॥ विठ्ठलाचें नाम घेतां जालें सुख । गोडावलें मुख तुका म्हणे ॥५॥

५७८. विठो सांपडावया हातीं । ठावी झाली एक गती । न धरी भय चित्तीं । बळ किती तयाचें ॥१॥ लागे आपणचि हातीं । कींव भाकावी काकुलती । करी मग चित्तीं । असेल तें तयाचे ॥२॥ एकलिया भावबळें । कैं सांपडें तो काळें । वैष्णवाच्या मेळें । उभा ठाके हांकेसी ॥३॥ बांधा माझिया जीवासी । तुका म्हणे प्रेमपाशीं । न सोडी तयासी । सर्वस्वासी उदार ॥४॥

५७९. वाट वैकुंठीं पाहाती । भक्त कैं पां येथें येती । तयां जन्ममरणखंति । नाहीं चित्तीं परलोक ॥१॥ धन्य धन्य हरिचे दास । तया सुलभ गर्भवास । ब्रह्मादिक करिती आस । तीर्थें वास भेटीची ॥२॥ कथा श्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस । पाहे रात्रंदिवस । वाट कर जोडोनी ॥३॥ रिद्धिसिद्धी न पाचारितां । त्या धुंडिती हरिभक्ता । मोक्षसायुज्यता । वाट पाहे भक्ताची ॥४॥ असती जेथें उभे ठेले । सदा प्रेमसुखें धाले । आणीकही उद्धरिले । महादोषी चांडाळ ॥५॥ सकळ करिती त्याची आस । सर्वभावें ते उदास । धन्य भाग्य त्यास । तुका म्हणे दर्शनें ॥६॥

५८०. सोनें दावी वरी तांबें तयापोटीं । खरियाचेसाठीं विकूं पाहे ॥१॥ पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवडी दोहींचें वेगळालें ॥२॥ क्षीरा नीरा कैसें होय एकपण । स्वादी तोचि भिन्न भिन्न काढी ॥३॥ तुका म्हणे थीता आपणचि खोटा । अपमान मोठा पावईल ॥४॥

५८१. फोडूनि सांगडी बांधली माजासी । पैल थडी कैसी पावे सहजीं ॥१॥ आपला घात आपणचि करी । आणिकां सांगतां नाइके तरी ॥२॥ भुकेभेणें विष घेऊं पाहें आतां । आपलाचि घात करूं पाहे ॥३॥ तुका म्हणे एक चालतील पुढें । तयासी वांकडें जातां ठके ॥४॥

५८२. उपकारासाठीं केले हे उपाय । येणेंविण काय चाड आम्हां ॥१॥ बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणउनि ॥२॥ तुका म्हणे माझे देखतिल डोळे । भोग देते वेळे येईल कळों ॥३॥

५८३. आठवे देव तो करावा उपाव । येर त्यजीं वाव खटपटा ॥१॥ होईं बा जागा होईं बा जागा । वाउगा कां गा सिणसील ॥२॥ जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं । बुडसी तों कईं निघसि ना ॥३॥ तुका म्हणे देवा पावसील भावें । जाणतां तें ठावें कांहीं नव्हे ॥४॥

५८४. माझ्या मुखावाटा नयो हे वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणा ॥१॥ फुकाचा विभाग पतन दुःखासी । दोहींमुळें त्यासी तेंचि साधे ॥२॥ नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनियां ॥३॥ तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशामोहजाळीं गुंतलिया ॥४॥

५८५. चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई । स्वहित तें ठायीं आपणापें ॥१॥ मनासी विचार तोचि साच भाव । व्यापक हा देव अंतर्बाहीं ॥२॥ शुद्ध भावा न लगे सुचावा परिहार । उमटे साचार आणिके ठायीं ॥३॥ भोगित्यासी काज अंतरींचें गोड । बाहिरल्या चाड नाहीं रंगें ॥४॥ तुका म्हणे भाव शुद्ध हें कारण । भाट नारायण होईल त्याचा ॥५॥

५८६. नव्हती माझे बोल । अवघें करितो विठ्ठल ॥१॥ कांही न धरावी खंती । हित होइल धरा चित्तीं ॥२॥ खोटी ते अहंता । वाट टाकिली सांगतां ॥३॥ ज्याचें तोचि जाणे । मी मापाडें तुका म्हणे ॥४॥

५८७. वासनेच्या मुखीं आदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥१॥ या नांव अंतरा आला नारायण । चित्तसमाधान खूण त्याची ॥२॥ सर्वकाळ हाचि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥३॥ तुका म्हणे जों जों भजनासी बळे । अंगें तों तों कळे सन्निधता ॥४॥

५८८. चिंतनें अचिंत राहिलों निश्चळ । तेंचि किती काळ वाढवावें ॥१॥ अबोल्याचा काळ आतां ऐशावरी । वचनाची उरी उरली नाहीं ॥२॥ करूं आला तो तो केला लवलाहो । उरोंचि संदेहो दिला नाहीं ॥३॥ तुका म्हणे मोहो परतेचि ना मागें । म्हणउनि त्यागें त्याग झाला ॥४॥

५८९. निर्गुणाचे ध्यावें गुणासी दर्शन । एकाएकीं भिन्न भेद घडे ॥१॥ तुम्हां आम्हां आतां न पडे यावरी । आहों तेंचि बरी जेथें तेथें ॥२॥ आपणापासुनि नसावें अंतर । वेचिलें उत्तर म्हणउनि ॥३॥ तुका म्हणे अंगा आली कठिणता । आमच्या अनंता तुम्हा ऐसी ॥४॥

५९०. तुजचि पासाव जालोंसे निर्माण । असावें तें भिन्न कासयानें ॥१॥ पाहावा जी ठायीं करूनि विचार । न्यून कोठें फार असेचि ना ॥२॥ ठेविलिये ठायीं आज्ञेचें पाळण । करूनि जतन राहिलोंसें ॥३॥ तुका म्हणे आतां बोलतसें स्पष्ट । जालों क्रियानष्ट तुम्हा ऐसा ॥४॥

५९१. प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा । भक्तिरस सांगा कां जी तुम्ही ॥१॥ म्हणउनि कांहीं

न ठेवींची उरी। आलों वर्मावरी एकाएकीं ॥२॥ न देखोंचि कांहीं परती माघारी। उरली ते उरी नाहीं मुळीं ॥३॥ तुका म्हणे आला अंतरासी खंड। तरि माझें तोंड खवळिलें ॥४॥

५९२. लटिका देव म्हणतां ऐसा। संदेहसा वाटतसे ॥१॥ ऐसें आलें अनुभवा। मजही सेवा करितां ॥२॥ शून्याकारी बहु मोळा। भेंडोळा हे पवाडे ॥३॥ तुका म्हणे ताळी नाहीं। एके ठायीं चपळत्वें ॥४॥

५९३. जैशासाठीं तैसें व्हावें। हें बरवें कळलेंसें ॥१॥ उदास तुं नारायणा। मीही म्हणा तुम्हीच ॥२॥ ठका महाठका जोडा। हे धडफुडा लागासी ॥३॥ एकांगीच भांडे तुका। नाहीं धोका जीवित्वें ॥४॥

५९४. बहुतां रीति काकुलती। आलों चित्तीं न धराच ॥१॥ आतां काशासाठीं देवा। मिथ्या हेवा वाढवूं ॥२॥ तुम्हां आम्हां झाली तुटी। आतां भेटी चिंतनें ॥३॥ तुका म्हणे लाजिरवाणें। अधीर जिणें इच्छेचें ॥४॥

५९५. आश्चर्य तें एक जालें। मना आलें माझिया ॥१॥ मढ्यापाशीं करुणा केली। तैसी गेली वृथा हे ॥२॥ न यावा तो कैसा राग। खोटें मग देखोनि ॥३॥ तुका म्हणे कैंचा बोला। शोध विठ्ठला माझिया ॥४॥

५९६. मागायाची नाहीं इच्छा। जो मी ऐसा संकोचूं ॥१॥ लटकियाची न करूं स्तुति। इच्छा चित्तीं धरूनि ॥२॥ हिशोबें तें आलें घ्यावें। तें तों ठावें सकळांसी ॥३॥ तुका म्हणे स्वामि सेवा। येथें देवा काशाची ॥४॥

५९७. पावटणीं पडणें पायां। उद्धार वांया काशाचा ॥१॥ घडेल तें भेटीसवें। दिसेल बरवें सकळां हें ॥२॥ न घडतां दृष्टादृष्टी। काय गोष्टी कोरड्या ॥३॥ अबोल्यानें असे तुका। अंतर एका साक्षी तें ॥४॥

५९८. अभयाचें स्थळ। तें हें एक अचळ ॥१॥ तरि धरिला विश्वास। ठेलों होउनियां दास ॥२॥ पुरली आवडी। पायीं लागलीसे गोडी ॥३॥ तुका म्हणे कंठीं नाम। अंगीं भरलें सप्रेम ॥४॥

५९९. संदेह निरसे तरि रुचिकर। फिक्यासी आदर चवी नाहीं ॥१॥ आता नको मज खोट्यानें फटवूं। कोठें येऊं जाऊं वेळोवेळां ॥२॥ गेला तरी काय जीवाचें सांकडें। वांचउनि पुढें काय काज ॥३॥ तुका म्हणे कसीं निवडा जी बरें। केली तैसी पोरें आळी पायीं ॥४॥

६००. वदे वाणी परि दुर्लभ अनुभवो। चालिचाची वाहो बहुतेक ॥१॥ आम्ही ऐसें कैसें राहावें निश्चळ। पाठिलागा काळ जिंकितसे ॥२॥ वाढवितां पोट दंभाचे पसारे। येतील माघारे मुदला तोटे ॥३॥ तुका म्हणे बरें जागविता मना। तुमच्या नारायणा अभय करें ॥४॥

६०१. उगेंचि हें मन राहातें निश्चळ। तरि कां तळमळ साठ होती ॥१॥ काय तुमचीं नेणों

कवतुक विंदानें । सर्वोत्तमपणें खेळतसां ॥२॥ नानाछंदें आम्हां नाचवावें जीवां । वाढवाव्या हांवा भलत्यापुढें ॥३॥ तुका म्हणे तुम्ही आपुली प्रतिष्ठा । वाढावया चेष्टा करीतसां ॥४॥

६०२. आम्ही बळकट जालों फिराउनि । तुमच्या वचनीं तुम्हां गोवूं ॥१॥ जालें तेव्हां जालें मागील तें मागें । आतां वर्म लागें ठावें जालें ॥२॥ तोडावया अवघ्या चेष्टांचा संबंध । शुद्ध त्यासी शुद्ध बुद्ध व्हावें ॥३॥ तुका म्हणे आम्हां आत्मत्वाची सोय । आपणचि होय तैसाचि तूं ॥४॥

६०३. तुम्ही साच नुपेक्षाल हा भरंवसा । मज जाणतसां अधीरसें ॥१॥ कासया घातला लांबणी उद्धार । ठेवा करकर वारूनियां ॥२॥ सुटों नये ऐसें कळलें निरुतें । कां घ्यावें मागुतें आळवुनि ॥३॥ तुका म्हणे तुम्ही सभाग्य जी देवा । माझा तुम्हां केवा काय आला ॥४॥

६०४. तुम्हां होइल देवा पडिला विसर । आम्हीं तें उत्तर यत्न केलें ॥१॥ पतितपावन ब्रीदें मिरविसी । याचा काय देसी झाडा सांग ॥२॥ आहाच मी नव्हें अर्थाचें भुकेलें । भलत्या एका बोलें वारेन तें ॥३॥ तुका म्हणे देह देईन सांडणें । सहित अभिमानें ओवाळूनि ॥४॥

६०५. जडलों अंगाअंगीं । मग ठेवीं ये प्रसंगीं । कांही उरी जगीं । लोकीं आहे पुरती ॥१॥ ठेवीं निवारूनि आधीं । अवकाश तोचि बुद्धी । सांपडली संधी । मग बळ कोणासी ॥२॥ गळा बांधीन पायीं । हालों नेदीं ठायींचे ठायीं । निवाड तो तईं । अवकळा केलिया ॥३॥ तुका म्हणे ठावे । आम्हा असां जी बरवे । बोभाटाची सवे । मुळींहुनी विठोबा ॥४॥

६०६. आम्हीं शक्तिहीनें । कैसे कराल तें नेणें । लिगाडाच्या गुणें । खोळंबला राहिलों ॥१॥ माझें मज देईं देवा । असे ठेविला तो ठेवा । नाहीं करीत हेवा । कांहीं अधीक आगळा ॥२॥ नाहीं गळां पडलों झोंड । तुमचें तेंचि माझें तोंड । चौघा चार खंड । लांबणी हे अनुचित ॥३॥ नाहीं येत बळा । आतां तुम्हासी गोपाळा । तुका म्हणे गळा । उगवा पायां लागतों ॥४॥

६०७. काय कृपेविण घालावें सांकडें । निश्चिती निवाडें कोण्या एका ॥१॥ आहों तैसीं पुढें असों दीनपणें । वेंचुनि वचनें करुणेचीं ॥२॥ धरूनि भय आतां काय वाहों चिंता । काय करूं आतां आप्तपण ॥३॥ तुका म्हणे आम्ही भावहीन जीव । म्हणउनी देव दुरे दूर ॥४॥

६०८. नाहीं उल्लंघिलें कोणाचें वचन । मज कां नारायण दुरी झाला ॥१॥ आशंकित मनें करीं आळवण । नाहीं समाधान निश्चितीचें ॥२॥ दासाचा विसर हें तों अनुचित । असे सर्व नीत पायांपाशीं ॥३॥ तुका म्हणे तुम्हां लाज येत नाहीं । आम्हां चिंताडोहीं बुडवितां ॥४॥

६०९. जीव जायवरी सांडी करी माता । हें तों आश्चर्यता बाळकाची ॥१॥ दुर्बळ कीं नाहीं आइकत कानीं । काय नारायणीं न्यून झालें ॥२॥ क्षणक्षणा माझा नेघावा सांभाळ । अभाग्याचा काळ ऐसा आला ॥३॥ तुका म्हणे नाहीं वचनासी रुचि । फलकट वेंचि तें तें होय ॥४॥

६१०. म्हणउनी दास नव्हे ऐसा जालों । अनुभवें बोलों स्वामीपुढें ॥१॥ कां नाहीं वचन प्रतिउत्तराचें । मीच माझ्या वेचें अट्टाहासें ॥२॥ कासयानें गोडी उपजावा विश्वास । प्रीती कांहीं रस वांचुनियां ॥३॥ तुका म्हणे अगा चतुराशिरोमणी । विचारावें मनीं केशीराजा ॥४॥

६११. काय आम्हीं आतां पोटचि भरावें । जग चाळवावें भक्त म्हूण ॥१॥ ऐसा तरि एक सांगा जी विचार । बहु होतों फार कासावीस ॥२॥ काय कवित्वाची घालूनियां रूढी । करूं जोडाजोडी अक्षरांची ॥३॥ तुका म्हणे काय गुंफोनि दुकाना । राहों नारायणा करुनि घात ॥४॥

६१२. वर्म तरी आम्हां दावा । काय देवा जाणें मी ॥१॥ बहुतां रंगीं हीन जालों । तरि आलों शरण ॥२॥ द्याल जरि तुम्ही धीर । होईल स्थिर मन ठायीं ॥३॥ तुका म्हणे सत्ताबळें । लडिवाळें राखावी ॥४॥

६१३. सांगों देवा नेणा काय । बोलाची आवडी ॥१॥ वांयां मज चुकुर करा । विश्वंभरा विनोदें ॥२॥ आवडीच्या करा ऐसें । अंतर्वासें जाणतसा ॥३॥ तुका म्हणे समाधानें । होईन मनें मोकळा ॥४॥

६१४. निर्धाराचें अवघें गोड । वाटे कोड कौतुक ॥१॥ बैसलिया भाव पायीं । बरा तईं नाचेन ॥२॥ स्वामी कळे सावधान । तरि मन उल्हासे ॥३॥ तुका म्हणे आश्वासावें । प्रेम द्यावें विठ्ठलें ॥४॥

६१५. जाली तडातोडी । अवघीं पडिलों उघडीं ॥१॥ नव्हों कोणाचीच कांहीं । तुझे भरलिया वाहीं ॥२॥ पारुषला संवसार । मोडली बैसण्याची थार ॥३॥ आतां म्हणे तुका । देवा अंतरें राखों नका ॥४॥

६१६. आधार तो व्हावा । ऐसी आस करी देवा ॥१॥ तुम्हांपाशीं काय उणें । काय वेचे समाधानें ॥२॥ सेवेच्या अभिळासें । मन बहु जालें पिसें ॥३॥ अरे भक्तपराधीना । तुका म्हणे नारायणा ॥४॥

६१७. तुमचा तुम्हीं केला गोवा । आतां चुकवितां देवा ॥१॥ कैसें सरे चाळवणें । केलें काशाला शाहाणें ॥२॥ कासया हो रूपा । नांवा आलेति गा बापा ॥३॥ तुका म्हणे आतां । न सरे हवाले घालितां ॥४॥

६१८. माझी भक्ती भोळी । एकविध भावबळी ॥१॥ मी कां पडेन निराळा । ऐसा सांडूनि सोहळा ॥२॥ आतां अनारिसा । तेथें न व्हावें सहसा ॥३॥ तुका म्हणे जोडुनि पाय । पुढें उगा उभा राहें ॥४॥

६१९. आहे तरि सत्ता । ऐशा करितों वारता ॥१॥ अंगसंगाचीं उत्तरें । सलगीसेवन लेंकुरें ॥२॥ तरी निकटवासें । असो आशंकेच्या नासें ॥३॥ तुका म्हणे रुची । येथें भिन्नता कैंची ॥४॥

६२०. काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें । देवाचे पूजनें । प्रदक्षणा तुळसीच्या ॥१॥ युक्त आहार विहार । नेम इंद्रियांसी सार । नसावी बासर । निद्रा बहु भाषण ॥२॥ परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण । व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥३॥ देह समर्पिजे देवा । भार कांहीच न घ्यावा । होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥४॥

६२१. मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥१॥ मेले जीत असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥२॥ भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथां ॥३॥ मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रुहूनि ॥४॥ अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥५॥ तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । ज्याचें पुरे कोड त्याचेपरि ॥६॥

६२२. गाढवाचें ताने । पालटतें क्षणक्षणें ॥१॥ तैसे अधमाचे गुण । एकविध नाहीं मन ॥२॥ उपजतां बरें दिसे । रूप वाढतां तें नासे ॥३॥ तुका म्हणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ॥४॥

६२३. विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी तों सोंवळा ॥१॥ गद्य पद्य कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीनचि बुद्धि करुनी ठेवा ॥२॥ विचाराचें कांहीं करारे स्वहित । पापपुण्यातीत भांडवल ॥३॥ तुका म्हणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखेंचि ॥४॥

६२४. कल्पतरु रुया नव्हती बाभुळा । पुरविती फळा इच्छितिया ॥१॥ उदंड त्या गाई म्हैसी आणि शेळ्या । परि त्या निराळ्या कामधेनु ॥२॥ तुका म्हणे देव दाखविल दृष्टी । तयासवें भेटी थोर पुण्य ॥३॥

६२५. जळो तैसा प्रेम रंग । जाय भुलोनि पतंग ॥१॥ सासुसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥२॥ मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥३॥ जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥४॥ बक ध्यान धरी । दावी सोंग मत्स्य मारी ॥५॥ तुका म्हणे सर्प डुले । तैसा कथेमाजी खुले ॥६॥

६२६. वेशा नाहीं बोल अवगुणा दूषिलें । ऐशा बोला भले झणीं क्षोभा ॥१॥ कोण नेणे अन्न जीवाचें जीवन । विष मेळवण विष होय ॥२॥ सोनें शुद्ध नेणें कोण हा विचार । डांकें हीनवर केलें त्यासी ॥३॥ याती शुद्ध परि अधम लक्षण । वांयां गेलें तेणें सोंग हित ॥४॥ तुका म्हणे शूर तोचि पावे मान । आणीक मंडण भार वाही ॥५॥

६२७. अणुरेणुया थोकडा । तुका आकाशा एवढा ॥१॥ गिळुनी सांडिलें कळिवर । भवभ्रमाचा आकार ॥२॥ सांडिलीं त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥३॥ तुका म्हणे आतां । उरलों उपकारा पुरता ॥४॥

६२८. धन्य आजि दिन । जालें संतांचें दर्शन ॥१॥ जाली पापातापा तुटी । दैन्य गेलें उठाउठीं ॥२॥ जालें समाधान । पायीं विसावलें मन ॥३॥ तुका म्हणे आले घरा । तोचि दिवाळी दसरा ॥४॥

६२९. हेंचि माझें धन। तुमचें वंदावें चरण॥१॥ येणें भाग्यें असो जीत। एवढें समर्पूनी चित्त ॥२॥ सांभाळिलें देवा। मज अनाथा जी जीवा॥३॥ जोडुनियां कर। तुका विनवितो किंकर॥४॥

६३०. फजितखोरा मना किती तुज सांगों । नको कोणा लागों मागें मागें ॥१॥ स्नेहवादें दुःख जडलेंसे अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥२॥ निंदास्तुति कोणी करो दया माया । न धरीं चाड या सुखदुःखा ॥३॥ योगीराज कां रे न राहाती बैसोनि । एकिये आसनीं याचि गुणें ॥४॥ तुका म्हणे मना पाहें विचारून । होईं रे कठिण वज्राऐसें ॥५॥

६३१. जळो माझी ऐसी बुद्धी । मज घाली तुजमधीं । आवडी हे विधि । निषेधींच चांगली ॥१॥ तूं स्वामी मी सेवक । उंच पद नीच एक । ऐसें करावें कौतुक । नको करूं खंडणा ॥२॥ जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा । भोक्ता तो निराळा । तेणें गोडी निवडिली ॥३॥ हिरा शोभला कोंदणें । अळंकारीं मिरवीं सोनें । एक असतां तेणें । काय दुजें जाणावें ॥४॥ उष्णें छाये सुख वाटे । बाळे माते पान्हा फुटे । एका एक भेटे । कोण सुखे ते काळीं ॥५॥ तुका म्हणे हित । हेंचि मानी माझें चित्त । नव्हें आतां मुक्त । ऐसा झाला भरंवसा ॥६॥

६३२. मनीं वसे त्याचें आवडे उत्तर । वाटे समाचार घ्यावा ऐसें ॥१॥ जातीचें तें झुरे येरयेरासाठीं । वियोगेंही तुटी नेघे कधीं ॥२॥ भेटीची अपेक्षा वारता आदर । पुसे नव्हे धीर मागुतालें ॥३॥ तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । सोइरे हरिजन प्राणसखे ॥४॥

६३३. नव्हे आराणूक परि मनीं वाहे । होइल त्या साहे पांडुरंग ॥१॥ पंढरीसि जावें उद्वेग मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ॥२॥ नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ॥३॥ तुका म्हणे देह पडो या चिंतनें । पुढें लागे येणें याजसाठीं ॥४॥

६३४. कोठें देवा आलें अंगा थोरपण । बरें होतें दीन होतों तरी ॥१॥ साधन ते सेवा संतांची उत्तम । आवडीनें नाम गाईन तें ॥२॥ न पुसतें कोणी कोठेंही असतां । समाधान चित्ताचिया सुखें ॥३॥ तुका म्हणे जन अव्हेरितें मज । तरी केशीराज सांभाळितां ॥४॥

६३५. चतुर मी जालों आपुल्या भोंवता। भावेंवीण रिता स्फुंद अंगीं ॥१॥ आतां पुढें वायां जावें हें तें काईं। कामक्रोधें ठायीं वास केला ॥२॥ गुणदोष आले जगाचे अंतरा। भूताच्या मत्सरावरी बुद्धि ॥३॥ तुका म्हणे करूं उपदेश लोकां। नाहीं जालों एका परता दोषा ॥४॥

६३६. धन्य ते संसारीं। दयावंत जे अंतरीं ॥१॥ येथें उपकारासाठीं। आलें घर ज्यां वैकुंठीं ॥२॥ लटिकें वचन। नाहीं देहीं उदासीन ॥३॥ मधुरा वाणी होटीं। तुका म्हणे वाव पोटीं ॥४॥

६३७. कांडिल्या कुटिल्या होतो मांडा । अळसें धोंडा पडतसे ॥१॥ राग नको धरूं मनीं । गांडमणी सांगतों ॥२॥ तरटापुढें बरे नाचे । सुते काचें मुसळ ॥३॥ तुका म्हणे काठी सार । करी फार शाहाणें ॥४॥

६३८. कळों येतें तरि कां नव्हे । पडती गोवे भ्रमाचे ॥१॥ जाणतांचि होतो घात । परिसा मात देवा हे ॥२॥ आंविसासाठीं फासा मान । पाडी धनइच्छा ते ॥३॥ तुका म्हणे होणार खोटें । कर्म मोठें बळिवंत ॥४॥

६३९. मोकळें मन रसाळ वाणी । याचि गुणीं संपन्न ॥१॥ लक्ष्मी ते ऐशा नांवें । भाग्यें ज्यावें तरि त्यांनीं ॥२॥ नमन ते नम्रता अंगीं । नेघे रंगीं पालट ॥३॥ तुका म्हणे त्याच्या नांवें । घेतां व्हावें संतोषी ॥४॥

६४०. शेवटींची विनवणी । संतजनीं परिसावी ॥१॥ विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ॥२॥ पुढें फार बोलों कायी । अवघें पायीं विदित ॥३॥ तुका म्हणे पडिलों पायां । करा छाया कृपेची ॥४॥

६४१. करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥१॥ माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥२॥ काय मी पामर जाणें अर्थभेद । वदवी गोविंद तेंचि वदें ॥३॥ मिमित्त मापासी बैसविलों आहें । मी तो कांही नव्हे स्वामिसत्ता ॥४॥ तुका म्हणे आहें पाईकची खरा । वागवितों मुद्रा नामाची हे ॥५॥

६४२. आम्ही गावें तुम्हीं कोणीं कांहीं न म्हणावें । ऐसें तंव आम्हां सांगितलें नाहीं देवें ॥१॥ म्हणा रामनाम टाळी वाजवा हातें । नाचा डोला प्रेमें आपुलिया स्वहितें ॥२॥ सहज घडे तया आळस करणें तें काई । अग्रीचें भातुकें हात पाळितां कां पायीं ॥३॥ येथें नाहीं लाज भक्तिभाव लौकिक । हांसे तया घडे ब्रह्महत्या पातक ॥४॥ जया जैसा भाव निरोपण करावा । येथें नाहीं चाड ताल विताल या देवा ॥५॥ सदैव ज्या कथाकाळीं घडे श्रवण । तुका म्हणे येर जन्मा आले ते पाषाण ॥६॥

६४३. देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनी ॥१॥ देव नलगे देव नलगे । सांठवणाचें रुधले जागे ॥२॥ देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं ॥३॥ देव घ्या फुका देव घ्या फुका । नलगे रुका मोल कांहीं ॥४॥ दुबळा तुका भावेंवीण । उधारा देव घेतला ऋण ॥५॥

६४४. विष्णुमय सर्व वैष्णवांसी ठावें । येरांनीं वहावें भार माथां ॥१॥ साधन संकट सर्वांलागीं शीण । व्हावा लागे क्षीण अहंभाव ॥२॥ भाव हा कठिण वज्र हें भेदवे । परि न छेदवे मायाजाळ ॥३॥ तुका म्हणे वर्म भजनेंचि सांपडे । येरासी तों पडे वोस दिशा ॥४॥

६४५. कीर्तनाची गोडी। देव निवडी आपण ॥१॥ कोणी व्हारे अधिकारी। त्यासी हरि देईल ॥२॥ अंगीं वैराग्याचें बळ। साही खळ जिणावे ॥३॥ उरेल ना उरी। तुका करी बोभाट ॥४॥

६४६. कायावाचामन ठेविलें गहाण । घेतलें तुझें रिण जोडीलागीं ॥१॥ अवघें आलें आंत पोटा पडिलें थीत । सारूनि निश्चिंत जालों देवा ॥२॥ द्यावयासी आतां नाहीं तोळा मासा । आधील मवेशा तुज ठावी ॥३॥ तुझ्या रिणें गेले बहुते बांधोनि । जाले मजहूनि थोर थोर ॥४॥ तुका म्हणे तुझे खतीं जें गुंतलें । करूनी आपुलें घेईं देवा ॥५॥

६४७. आलें भरा केणें। येरझार चुके जेणें ॥१॥ उभें केलें विटेवरी। पेठ इनाम पंढरी ॥२॥ वाहाती मारग। अवघें मोहोरलें जग ॥३॥ तुका म्हणे माप। खरें आणा माझे बाप ॥४॥

६४८. लक्ष्मीवल्लभा । दीनानाथा पद्मनाभा ॥१॥ सुख वसे तुझे पायीं । मज ठेवीं तेचि ठायीं ॥२॥ माझी अल्प हे वासना । तूं तो उदाराचा राणा ॥३॥ तुका म्हणे भोगें । पीडा केली धांव वेगें ॥४॥

६४९. करीं ऐसें जागें। वेळोवेळां पायां लागें ॥१॥ प्रेमें झोंबे कंठीं। देह धरणिये लोटीं ॥२॥ राहो लोकाचार। पडो अवघा विसर ॥३॥ तुका म्हणे ध्यावें। तुज व्यभिचारभावें ॥४॥

६५०. टाळ दिंडी हातीं । वैकुंठींचे ते सांगाती ॥१॥ जाल तरी कोणी जा गा । करा सिदोरी ते वेगा ॥२॥ जाती सादावीत । तेथें असों द्यावें चित्त ॥३॥ तुका म्हणे बोल । जाती बोलत विठ्ठल ॥४॥

६५१. वांयां जातों देवा । नेणें भक्ती करूं सेवा ॥१॥ आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ॥२॥ करावें तें काय । न कळे अवलोकितों पाय ॥३॥ तुका म्हणे दान । दिलें पदरीं घेईन ॥४॥

६५२. जिवींचा जिव्हाळा । पाहों आपुलिया डोळां ॥१॥ आम्हां विठ्ठल एक देव । येर अवघेचि वाव ॥२॥ पुंडलिकाचे पाठीं । उभा हात ठेवुनि कटीं ॥३॥ तुका म्हणे चित्तीं । वाहूं रखुमाईचा पती ॥४॥

६५३. जीव खादला दैवतें । माझा येणें महाभूतें । झोंबलें निरुतें । कांहीं करितां न सुटे ॥१॥ आतां करूं काय । न करितां उपाय । तुम्हां आम्हां सये । विघडाविघड केली ॥२॥ बोलतां दुश्चिती । मी वो पडियलें भ्रांती । आठव हा चित्तीं । न ये म्हणतां मी माझें ॥३॥ भलतेंचि चावळे । जना अवघिया वेगळे । नाठवती बाळें । आपपर सारिखें ॥४॥ नका बोलो सये । मज वचन न साहे । बैसाल त्या राहें । उग्या वाचा खुंटोनी ॥५॥ तुम्हां आम्हां भेटी । नाहीं जाली जीवेंसाठीं । तुका म्हणे दृष्टी । पाहा जवळी आहे तों ॥६॥

६५४. माझें आराधन । पंढरपुरींचें निधान ॥१॥ तया एकाविण दुजें । कांहीं नेणें

पंढरीराजें ॥२॥ दास विठ्ठलाचा । अंकित अंकिला ठायींचा ॥३॥ तुका म्हणे आतां । नव्हे पालट सर्वथा ॥४॥

६५५. आतां आम्हां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम । वाहुनियां टाळी प्रेम । सुखें आनंदें नाचावें ॥१॥ अवघी जाली आराणूक । मागें पुढें सकळिक । त्रिपुटीचें दुःख । प्रारब्ध सारिलें ॥२॥ गोदातटे निर्मळें । देव देवांचीं देउळें । संत महंत मेळें । दिवस जाय सुखाचा ॥३॥ तुका म्हणे पंढरीनाथा । आणिक नाहीं मज चिंता । योगक्षेम माथां । भार तुझ्या घातला ॥४॥

६५६. चोरटें सुनें मारिलें टाळे । केऊं करी परि न संडी चाळे ॥१॥ ऐसे एक दुराचारी गा देवा । आपुलिया जीवा घात करी ॥२॥ नाक गेलें तरि लाज ना विचार । हिंडे फजितखोर दारोदारीं ॥३॥ तुका म्हणे कर्म बळिवंत गाढें । नेदी तया पुढें मागें सरो ॥४॥

६५७. मुनि मुक्त जाले भेणें गर्भवासा । आम्हां विष्णुदासां सुलभ तो ॥१॥ अवघाचि संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठलस्वरूप म्हणोनियां ॥२॥ पुराणीं उपदेश साधन उद्धट । आम्हां सोपी वाट वैकुंठींची ॥३॥ तुका म्हणे जनां सकळांसहित । घेऊं अखंडित प्रेमसुख ॥४॥

६५८. न करावी स्तुति माझी संतजनीं । होईल या वचनीं अभिमान ॥१॥ भारें भवनदी नुतरवे पार । दुरावती दूर तुमचे पाय ॥२॥ तुका म्हणे गर्व पुरवील पाठी । होईल माझ्या तुटी विठोबाची ॥३॥

६५९. तुमचिये दासीचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज ॥१॥ नवविधा काय बोलली जे भक्ती । द्यावी माझ्या हातीं संतजनीं ॥२॥ तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें । उतरेन खरें भवनदी ॥३॥

६६०. चोरटे काचे निघाले चोरी । आपलें तैसें पारखें घरीं ॥१॥ नाहीं नफा नागवे आपण । गमाविले कान हात पाय ॥२॥ बुद्धिहीन नये कांहींचि कारणा । तयासवें जाणा तेंचि सुख ॥३॥ तुका म्हणे नाहीं ठाउकें वर्म । तयासी तें कर्म वोढवलें ॥४॥

६६१. समर्थाचें बाळ केविलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ॥१॥ अवगुणी जरी जालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥२॥ तुका म्हणे तैसा मी एक पतित । परि मुद्रांकित जालों तुझा ॥३॥

६६२. गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवें भेटी केली तेणें ॥१॥ सहज गुण जयाचिये देहीं । पालट तो कांहीं नव्हे तया ॥२॥ माकडाचे गळां मोलाचा मणी । घातला चावुनी थुंकोनि टाकी ॥३॥ तुका म्हणे खळा नावडे हित । अविद्या वाढवित आपुलें मतें ॥४॥

६६३. नेणें सुणें चोर पाहुणा मागता । देखून भलता भुंकतसे ॥१॥ शिकविलें कांहीं न चलती तया । बोलियेले वांयां बोल जाती ॥२॥ क्षीर ओकुनियां खाय अमंगळ । आपुलीं तें

ढाळ जाऊं नेदी ॥३॥ वंदूं निंदूं काय अभक्त दुराचार । खळाचा विचार तुका म्हणे ॥४॥

६६४. जन मानवलें वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं जालों ॥१॥ म्हणउनी पंढरिनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ॥२॥ संतां ब्रह्मरूप झालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ॥३॥ तुका म्हणे मी तों आपणासी ठावा । आहें बरा देवा जैसा तैसा ॥४॥

६६५. काम क्रोध माझे जीताती शरीरीं । कोवळें तें वरी बोलतसें ॥१॥ कैसा सरता जालों तुझ्या पायीं । पांडुरंगा कांहीं न कळे हें ॥२॥ पुराणींची ग्वाही वदतील संत । तैसें नाहीं चित्त शुद्ध झालें ॥३॥ तुका म्हणे मज आणुनि अनुभवा । दाखवीं हें देवा साच खरें ॥४॥

६६६. स्तुति करिजेसा नाहीं अधिकार । न कळे विचार योग्यतेचा ॥१॥ तुमचें मी दास संतांचें दुर्बळ । करूनि सांभाळ राखा पायीं ॥२॥ राम कृष्ण हरी मंत्र उच्चारणा । आवडी चरणां विठोबाच्या ॥३॥ तुका म्हणे तुमचें सेवितों उच्छिष्ट । क्षमा करा धीट होउनीयां ॥४॥

६६७. बहु दूरवरी । वेठी ओझें होतें शिरीं ॥१॥ आतां उतरला भार । तुम्हीं केला अंगीकार ॥२॥ बहु काकुलती । आलों असें मागें किती ॥३॥ तुका म्हणे देवा । आजि सफल झाली सेवा ॥४॥

६६८. बुद्धीचा पालट धरा र कांहीं । मागुता हा नाहीं मनुष्यदेह ॥१॥ आपुल्या हिताचे न होती सायास । गृहदारा आस धनवित्त ॥२॥ अवचित निधान लागलें हें हातीं । भोगावी विपत्ति गर्भवास ॥३॥ यावें जावें पुढें ऐसेंचि कारण । भोगावें पतन नरकवास ॥४॥ तुका म्हणे धरीं आठव या देहीं । नाहीं तरि कांहीं बरें नव्हे ॥५॥

६६९. आम्हीं पतितांनीं घालावें सांकडें । तुम्हां लागे कोडें उगवणें ॥१॥ आचरतां दोष न धरूं सांभाळ । निवाड उकल तुम्हां हातीं ॥२॥ न घेतां कवडी करावा कुढावा । पाचारितां देवा नामासाठीं ॥३॥ दयासिंधु नाम पतितपावन । हें आम्हां वचन सांपडलें ॥४॥ तुका म्हणे करूं अन्यायाच्या कोटी । कृपावंत पोटीं तुम्ही देवा ॥५॥

६७०. जो भक्तांचा विसावा । उभा पाचारितो धांवा ॥१॥ हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें ॥२॥ भवसिंधु सुखें । उतरी कासे लावूनि ॥३॥ थोर भक्ताची आस । पाहे भोंवताली वास ॥४॥ तुका म्हणे कृपादानी । फेडी आवडीची धणी ॥५॥

६७१. अखंड जया तुझी प्रीति । मज दे तयाची संगति । मग मी कमळापति । तुज बा नाणीं कांटाळा ॥१॥ पडोन राहेन तये ठायीं । उगाचि संतांचिये पायीं । न मगें न करीं कांहीं । तुझी आण गा विठोबा ॥२॥ तुम्ही आम्ही पीडों जेणें । दोन्ही वारती एकानें । बैसलों धरणें । हाका देत दाराशीं ॥३॥ तुका म्हणे या बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला । न पाहिजे केला । अवघा माझा आव्हेर ॥४॥

६७२. पुनित केलें विष्णुदासीं । संगें आपुलिया दोषी ॥१॥ कोण पाहे तयांकडे । वीर

विठ्ठलाचे गाढे । अशुभ त्यांपुढें । शुभ होऊनियां ठाके ॥२॥ प्रेमसुखाचिया रासी । पाप नाहीं ओखदासी ॥३॥ तुका म्हणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ॥४॥

६७३. जन देव तरी पायाचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥१॥ अग्नीचें सौजन्य शीतनिवारण । पालवीं बांधोन नेतां नये ॥२॥ तुका म्हणे विंचू सर्प नारायण । वंदावे दुरोन शिवों नये ॥३॥

६७४. भूत भविष्य कळों यावें वर्तमान । हे तों भाग्यहीन त्याची जोडी ॥१॥ आम्हीं विष्णुदासीं देव ध्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धेंचि ॥२॥ जगरूढीसाठी घातला दुकान । जातो नारायण अंतरोनि ॥३॥ तुका म्हणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धि ॥४॥

६७५. सर्प भुलोन गुंतला नादा । गारुडियें फांदा घातलासे । हिंडवुनि पोट भरी दारोदारीं । कोंडुनि पेटारी असे रया ॥१॥ तैसी परी मज जाली पांडुरंगा । गुंतलों तो मी गा सोडवीं आतां । माझें मज कांहीं न चलेसें जालें । कृपा हे तुज न करितां ॥२॥ आविसें मीन लावियला गळीं । भक्ष हो गिळी म्हणूनियां । काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे । तेथें बाप माये कवण रया ॥३॥ पक्षी पिलयां पातलें आशा । देखोनियां फांसा गुंते बळें । मरण सायासें नेणें धांवोनि वोरसे । जीवित्वा नास जालीं बाळें ॥४॥ गोडपणें मासी लिगाडीं गुंतली । सांपडे फडाफडी अधिकाधिक । तुका म्हणे प्राण घेतला आशा । पंढरीनिवासा धांव घालीं ॥५॥

६७६. यातिहीन मज काय तो अभिमान । मानी तुज जन नारायण ॥१॥ काय सुख मज तयाची हे खंती । आपुलाला घेती गुणभाव ॥२॥ द्रव्यामुळें माथां वाहियेली चिंधी । होन जयामधीं होता गांठीं ॥३॥ तुका म्हणे जन वंदितो वेगळा । मजसी दुर्बळा काय चाड ॥४॥

६७७. शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥१॥ जाऊनि वोसंगा निघेन वोरस । लागेल तें इच्छे पीइन वरी ॥२॥ कृपा तनु माझी सांभाळी दुभोनि । अमृतसंजीवनी लोटलीसे ॥३॥ आनंदाचा ठाव नाहीं माझे चित्तीं । सागर तो किती उपमेसी ॥४॥ सैर जाय पडे तयेसी सांकडें । सांभाळित पुढें मागें आसे ॥५॥ तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हे विठाईचें ॥६॥

६७८. सुटायाचा कांहीं करितों उपाय । तों हे देखें पाय गोवियेले ॥१॥ ऐसिया दुःखाचे सांपडलों संदी । हारपली बुद्धि बळ माझें ॥२॥ प्रारब्ध क्रियमाण संचिताचे । वोढत ठायींचे आले साचे ॥३॥ विधिनिषेधाचे सांपडलों चेपे । एक एका लोपे निवडेना ॥४॥ सारावें तें वाढे त्याचियाची अंगें । तृष्णेचिया संगे दुःखी जालों ॥५॥ तुका म्हणे आतां करीं सोडवण । सर्वशक्तिहीन जालों देवा ॥६॥

६७९. भय वाटे पर । न सुटे हा संसार ॥१॥ ऐसा पडिलों काचणीं । करीं धांवा म्हणउनि

॥२॥ विचारितां कांहीं । तों हें मन हातीं नाहीं ॥३॥ तुका म्हणे देवा । येथें न पुरे रिघावा ॥४॥

६८०. येगा येगा पांडुरंगा । घेई उचलूनि वोसंगा ॥१॥ ऐसी असोनियां वेसी । दिसतों मी परदेसी ॥२॥ उगवूनि गोवा । सोडवूनि न्यावें देवा ॥३॥ तुज आड कांहीं । बळ करी ऐसें नाहीं ॥४॥ तुका म्हणे हृषीकेशी । काय उशीर लाविलासी ॥५॥

६८१. माझी विठ्ठल माउली । प्रेमपान्हा पान्हाइली ॥१॥ कुर्वाळूनि लावी स्तनीं । न वजे दुरी जवळूनि ॥२॥ केली पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळी ॥३॥ तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥४॥

६८२.आम्ही उतराई । भाव निरोपोनि पायीं ॥१॥ तुम्ही पुरवावी आळी । करावी ते लडिवाळीं ॥२॥ आमचा हा नेम । तुम्हां उचित हा धर्म ॥३॥ तुका म्हणे देवा । जाणों सांगितली सेवा ॥४॥

६८३. केलें पाप जेणें दिलें अनुमोदन । दोघांसि पतन सारिखेंचि ॥१॥ विष नवनीता विष करी संगें । दुर्जनाच्या त्यागें सर्व हित ॥२॥ देखिलें ओढाळ निघालिया सेता । टाळावें निमित्ता थैक म्हूण ॥३॥ तुका म्हणे जोडे केल्याविण कर्म । देखतां तो श्रम न मानितां ॥४॥

६८४. विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं । विठ्ठल विश्रांति भोग जया ॥१॥ विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥२॥ विठ्ठल जागृति स्वप्नसुषुप्ती । आन दुजें नेणती विठ्ठलाविण ॥३॥ भूषण अळंकार सुखाचे प्रकार । विठ्ठल निर्धार जयां नरां ॥४॥ तुका म्हणे तेही विठ्ठलचि झाले । संकल्प मुराले दुजेपणें ॥५॥

६८५. संतांचें सुख झालें या देवा । म्हणउनि सेवा करी त्यांची ॥१॥ तेथें माझा काय कोण तो विचार । वर्णावया पार महिमा त्यांचा ॥२॥ निर्गुण आकार झाला गुणवंत । घाली दंडवत पूजोनियां ॥३॥ तीर्थें त्यांची इच्छा करिती नित्यकाळ । व्हावया निर्मळ आपणांसी ॥४॥ अष्ट महा सिद्धींचा कोण आला पाड । वागों नेदी आड कोणी तया ॥५॥ तुका म्हणे ते हे बळिया शिरोमणी । राहिले चरणीं निकटवासें ॥६॥

६८६. जो मानी तो देईल काई । न मानी तो नेईल काई ॥१॥ आम्हां विठ्ठल सर्वभूतीं । राहो चित्तीं भलतैसा ॥२॥ साध्य न तें जना काई । जल्पे वांयांविण ठायीं ॥३॥ वंदीं निंदीं तुज तो गा । तुका म्हणे पांडुरंगा ॥४॥

६८७. भावबळें कैसा झालासी लहान । मागें संतीं ध्यान वर्णियेले ॥१॥ तें मज उचित करूनियां देवा । दाखवीं केशवा मायबापा ॥२॥ पाहोनियां डोळां बोलेन मी गोष्टी । आळिंगूनि मिठी देईन पायीं ॥३॥ चरणीं दृष्टि उभा राहेन समोर । जोडोनियां कर पुढें दोन्ही ॥४॥ तुका म्हणे उत्कंठित हे वासना । पुरवीं नारायणा आर्त माझें ॥५॥

६८८. कृपाळु म्हणोनि बोलती पुराणें । निर्धार वचनें याचीं मज ॥१॥ आणीक उपाय नेणेंचि मी कांहीं । तुझें वर्म ठायीं पडे तैसें ॥२॥ नये धड कांहीं बोलतां वचन । रिघालों शरण सर्व भावें ॥३॥ कृपा करिसी तरि थोडें तुज काम । माझा तरि श्रम बहु हरे ॥४॥ तुका म्हणे मज दाखवीं श्रीमुख । हरेल या भूक डोळियाची ॥५॥

६८९. सर्वभावें आलों तुजचि शरण । कायावाचामनसहित देवा ॥१॥ आणीक दूसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ॥२॥ माझिये जीवींचे कांहीं जडभारी । तुजविण वारी कोण दुजें ॥३॥ तुझे आम्ही दास आमुचा तूं ऋणी । चालत दूरुनी आलें मागें ॥४॥ तुका म्हणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेट देईं ॥५॥

६९०. कईं मात माझे ऐकती कान । बोलतां वचन संतां मुखीं ॥१॥ केला पांडुरंगें तुझा अंगीकार । मग होईल धीर माझ्या जीवा ॥२॥ म्हणउनि मुख अवलोकितों पाय । हेचि मज आहे थोरी आशा ॥३॥ माझिया मनाचा हाचि पैं विश्वास । न करीं सायास साधनांचें ॥४॥ तुका म्हणे मज होईल भरंवसा । तरलों मी ऐसा साच भावें ॥५॥

६९१. दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भीवरेच्या तटीं । कष्टलासी साठीं । भक्तिकाजें विठ्ठला ॥१॥ भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा । आम्हालागीं सोपा । दैत्या काळ कृतांत ॥२॥ होतासी क्षीरसागरीं । मही दाटली असुरीं । म्हणोनियां घरीं । गौळियाचे अवतार ॥३॥ केला पुंडलिकें गोवा । तुज पंढरीसि देवा । तुका म्हणे भावा- । साठीं हातीं सांपडसी ॥४॥

६९२. गोड झालें पोट धालें । अवचिता वाचे आलें । म्हणतां पाप गेलें । विठ्ठलसें वाचेसी ॥१॥ सत्य माना रे सकळ । उद्धरिला अजामेळ । महापातकी चांडाळ । नामासाठीं आपुलिया ॥२॥ चित्त पावलें आनंदा । सुखसमाधीतें सदा । म्हणतां गोविंदा । वेळोवेळां वाचेसी ॥३॥ हें जाणती अनुभवी । जया चाड तो चोजवी । तुका म्हणे दावी । रूप तेंचि अरूप ॥४॥

६९३. रवि दीप हिरा दाविती देखणें । अदृश्य दर्शनें संतांचिया ॥१॥ त्यांचा महिमा काय वर्णूं मी पामर । न कळे तो साचार ब्रह्मादिकां २॥ तापली चंदन निवविती कुडी । त्रिगुण तो काढी संतसंग ॥३॥ मायबापें पिंड पाळियेला माया । जन्ममरण जाया संतसंग ॥४॥ संतांच्या वचनें वारी जन्मदु:ख । मिष्टान्न तें भूकनिवारण ॥५॥ तुका म्हणे जवळी न पाचारितां जावें । संतचरणीं भावें रिघावया ॥६॥

६९४. हरि हरि तुम्हीं म्हणारे सकळ । तेणें मायाजाळ तुटईल ॥१॥ आणिक नका कांहीं गाबाळाचे भरी । पडों येते थोरी नागवण ॥२॥ भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । म्हणावें पतित वेळोवेळां ॥३॥ तुका म्हणे हा तंव कृपेचा सागर । नामासाठीं पार पावतील ॥४॥

६९५. गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ॥१॥ नाठेळाची भक्ति

कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ॥२॥ सांडोव्यासी घाली देवाची करंडी । विल्हाळ त्या धोंडी पूजा दावी ॥३॥ तुका म्हणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धिंदधिंद सिंदळीचे ॥४॥

६९६. ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजां ॥१॥ चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥२॥ त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥३॥ तुका म्हणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्या ॥४॥

६९७. आतां जागा रे भाई जागा रे । चोर निजल्या नाडूनि भाग रे ॥१॥ कैसें असोनि ठाउकें नेणां । दुःख पावाल पुढिले पेणा ॥२॥ आतां नका रे भाई नका रे । आहे गांठीं तें लुटवूं लोकां रे ॥३॥ तुका म्हणे एकाच्या घायें । कां रे जाणोनि न धरा भय ॥४॥

६९८. मुद्दल जतन जालें । मग लाभाचें काय आलें ॥१॥ घरीं देउनि अंतर गांठी । राखा पारख्यां न सुटे मिठी ॥२॥ घाला पडे थोडेंच वाटे । काम मैंदाचे चपेटे ॥३॥ तुका म्हणे वरदळ खोटें । फांसे अंतरिंच्या कपटें ॥४॥

६९९. मज अंगाच्या अनुभवें । कांहीं वाईट बरें ठावें ॥१॥ जालों देहींचा देखणा । नये मागें पुढेंही मना ॥२॥ वोस वसती ठावी । परि हे चाली दुःख पावी ॥३॥ तुका म्हणे घेऊं देवा । सवें करूनि बोळावा ॥४॥

७००. पाववावें ठाया । असे सवें बोलों तया ॥१॥ भावा ऐसी क्रिया राखे । खोट्या खोटेपणें वाखे ॥२॥ न ठेवूं अंतर । कांहीं भेदाचा पदर ॥३॥ तुका म्हणे जीवें भावें । सत्या मानविजे देवें ॥४॥

७०१. माझा पहा अनुभव । केला देव आपुला ॥१॥ बोलविलें तेंचि द्यावें । उत्तर व्हावें ते काळीं ॥२॥ सोडिलिया जग निंद । मग गोविंद म्हणियारा ॥३॥ तुका म्हणे धीर केला । तेणें याला गोंविलें ॥४॥

७०२. मोल देऊनियां सांठवावे दोष । नटाचे ते वेष पाहोनियां ॥१॥ हरिदासां मुखें हरिकथाकीर्तन । तेथें पुण्यापुण्य विशेषता ॥२॥ हरितील वस्त्रें गोपिकाच्या वेषें । पाप त्या सरिसें मात्रागमन ॥३॥ तुका म्हणे पाहा ऐसे झाले जन । सेवाभक्तिहीन रसीं गोडी ॥४॥

७०३. विठोबा विसांविया विसांविया । पडों देईं पायां ॥१॥ बहु खेद क्षीण । आलों सोसुनियां वन ॥२॥ बहुतां काकुलती । आलों सोसिली फजिती ॥३॥ केली तुजसाठीं । तुका म्हणे येवढी आटी ॥४॥

७०४. कां गा धर्म केला । असोन सत्तेचा आपुला ॥१॥ उभाउभीं पाय जोडीं । आतां फांको नेदीं घडी ॥२॥ नको सांडूं ठाव । आतां घेऊं नेदीं वाव ॥३॥ तुका म्हणे इच्छा । तैसा करीन सरसा ॥४॥

७०५. तुमची तों भेटी नव्हे ऐसी झाली । कोरडीच बोली ब्रह्मज्ञान ॥१॥ आतां न बोलावें ऐसें वाटे देवा । संग न करावा कोणासवें ॥२॥ तुम्हां मिमित्यासी सांपडलें अंग । नेदावा हा संग विचारिलें ॥३॥ तुका म्हणे माझी राहिली वासना । आवडी दर्शनाचीच होती ॥४॥

७०६. आहे तेंचि आम्ही मागों तुजपाशीं । नव्हों तुज ऐसीं क्रियानष्ट ॥१॥ न बोलावें तेंचि वर्म बरें दिसे । प्रकट ते कैसे गुण करूं ॥२॥ एका ऐसा एका द्यावयाचा मोळा । कां तुम्हा गोपाळा नाहीं ऐसा ॥३॥ तुका म्हणे लोकां नाहीं कळों आलें । करावें आपुलें जतन तों ॥४॥

७०७. आम्हीं याची केली सांडी । कोठें तोंडीं लागावें ॥१॥ आहे तैसें असो आतां । चिंतें चिंता वाढते ॥२॥ बोलिल्याचा मानी शीण । भिन्न भिन्न राहावें ॥३॥ तुका म्हणे आम्हापाशीं । धीरा ऐसी जतन ॥४॥

७०८. आम्हांपाशीं याचें बळ । कोण काळवरी तों ॥१॥ धरूनि ठेलों जीवेंसाठीं । होय भेटी तोंवरि ॥२॥ लागलों ते न फिरें पाठीं । पडिल्या गांठी वांचूनि ॥३॥ तुका म्हणे अवकाश । तुमच्या ऐसें व्हावया ॥४॥

७०९. बोलिलेंचि बोलें पडपडताळूनि । उपजत मनीं नाहीं शंका ॥१॥ बहुताची माय बहुत कृपाळ । साहोनि कोल्हाळ बुझाविसी ॥२॥ बहुताच्या भावें वांटिसी भातुकें । बहु कवतुकें खेळविसी ॥३॥ तुका म्हणे ऐसें जाणतसों वर्म । करणें तों श्रम न वजे वांयां ॥४॥

७१०. कोठें भोग उरला आतां । आठवितां तुज मज ॥१॥ आड कांहीं नये दुजें । फळ बीजें आणिलें ॥२॥ उद्वेग तो वांयांविण । कैंचा शीण चिंतनें ॥३॥ तुका म्हणे गेला भ्रम । तुमच्या धर्म पायाचा ॥४॥

७११. संसार तो कोण लेखे । आम्हां सखे हरिजन ॥१॥ काळ ब्रह्मानंदें सरे । आवडी उरे संचली ॥२॥ स्वप्नीं तेही नाहीं चिंता । रात्री जातां दिवस ॥३॥ तुका म्हणे ब्रह्मरसें । होय सरिसें भोजन ॥४॥

७१२. येईं गा विठ्ठला येईं गा विठ्ठला । प्राण हा फुटला आळविता ॥१॥ पडियेलों वनीं थोर चिंतवनीं । उशीर कां अझूनि लावियेला ॥२॥ काय तुज नाहीं लौकिकाची शंका । आपुल्या बाळका मोकलितां ॥३॥ तुका म्हणे बहु खंती वाटे जीवा । धरियेलें देवा दुरी दिसे ॥४॥

७१३. आपुलें गांवींचें न देखेसें झालें । परदेशी एकलें किती कंठूं ॥१॥ म्हणउनि पाहें मूळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ॥२॥ पाहतां अवघ्या दिसतील दिशा । सकळही वोसा दृष्टीपुढें ॥३॥ तुका म्हणे कोणी न सांगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ॥४॥

७१४. जन तरी देखें गुंतले प्रपंचें । स्मरण तें त्याचें त्यासी नाहीं ॥१॥ म्हणउनि मागें परतलें मन । घालणीचें रान देखोनियां ॥२॥ इंद्रियांचा गाजे गोंधळ ये ठायीं । फोडीतसे

डोई अहंकार ॥३॥ तुका म्हणे देवा वासनेच्या आटें । केलीं तळपटें बहुतांचीं ॥४॥

७१५. धांवे त्यासी फावे । दुजे उगवूनि गोवे ॥१॥ घ्यावें भरूनियां घर । मग नाहीं येरझार ॥२॥ धणी उभें केलें । पुंडलिकें या उगलें ॥३॥ तुका म्हणे ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥४॥

७१६. लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥१॥ ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥२॥ ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठिण ॥३॥ तुका म्हणे जाण । व्हावें लहानाहुनि लहान ॥४॥

७१७. नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही दावा ॥१॥ महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहती ॥२॥ येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥३॥ तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥४॥

७१८. उष्टया पत्रावळी करूनियां गोळा । दाखविती कळा कवित्वाची ॥१॥ ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरीं भ्रमती चंद्रसूर्य ॥२॥ तुका म्हणे एका नारायणा ध्याईं । वरकडा वाही शोक असे ॥३॥

७१९. आवडीच्या मतें करिती भोजना । भोग नारायणा म्हणती केला ॥१॥ अवघा देव म्हणे वेगळें तें काई । अर्थासाठीं डोई फोडूं पाहे ॥२॥ लाजे कमंडलु धरिता भोपळा । आणीक थीगळा प्रावरणासी ॥३॥ शाला गडवे धातुद्रव्यइच्छा चित्तीं । नैश्वर्य बोलती अवघें मुखें ॥४॥ तुका म्हणे त्यास देवा नाहीं भेटी । ऐसे कल्पकोटी जन्म घेतां ॥५॥

७२०. म्हणवितां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनासी महाराज म्हणसी हीना ॥१॥ काय ऐसें पोट न भरेसें झालें । हालविसी कुले सभेमाजी ॥२॥ तुका म्हणे पोटें केली विटंबना । दीन झाला जना कींव भाकी ॥३॥

७२१. रिद्धिसिद्धि दासी कामधेनु घरीं । परि नाहीं भाकरी भक्षावया ॥१॥ लोडें बालिस्तें पलंग सुपत्ति । परि नाहीं लंगोटी नेसावया ॥२॥ पुसाल तरि आम्हां वैकुंठींचा वास । परि नाहीं राह्यास ठाव कोठें ॥३॥ तुका म्हणे आम्ही राजे त्रैलोक्याचे । परि नाहीं कोणाचें उणें पुरें ॥४॥

७२२. घरोघरीं अवघें झालें ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥१॥ निरें कोणापाशीं होय एक रज । तरि द्या रे मज दुर्बळासी ॥२॥ आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दुरोनि दिसतसे ॥३॥ काम क्रोध लोभ शिणवी बहुत । मेळवूनि आंत काळकूट ॥४॥ निंदा अहंकार द्वेष बहु फार । माजी वरी धूर सारीयला ॥५॥ तुका म्हणे तेथें कांहीं हातां नये । आयुष्य मोलें जाये वायांविण ॥६॥

७२३. अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥१॥ अवघाचि काळ दिनरात्रशुद्धि । साधियेला विधि पर्वकाळ ॥२॥ अवघींच तीर्थें व्रतें केले याग ।

अवघेंचि सांग झालें कर्म ॥३॥ अवघेंचि फळ आलें आम्हां हातां । अवघेंचि अनंता समर्पिलें ॥४॥ तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥५॥

७२४. महुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती । पक्वदशे येती थोडीं । नास आढी वेचे तों ॥१॥ विरळा पावे विरळा पावें । अवघड गोवे शेवटीचे ॥२॥ उंच नीच परिवार देवी । धन्या ठावी चाकरी । झळके तेथें पावे आणी । ऐसे क्षणी बहु थोडे ॥३॥ पावेल तो पैल थडी । म्हणों गडी आपुला । तुका म्हणे उभान्यानें । खरें कोण मानितसे ॥४॥

७२५. अवघ्या उपचारा । एक मनचि दातारा ॥१॥ ध्यावी ध्यावी माझी सेवा । दीन दुर्बळाची देवा ॥२॥ अवघियाचा ठाव । पायांवरी जीवभाव ॥३॥ चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ॥४॥

७२६. आळी सलगी पायांपाशीं । होईल तैसी करीन ॥१॥ आणीक आम्हीं कोठें जावें । येथें जीवें वेचलों ॥२॥ अवघ्या निरोपणा भाव । हाचि ठाव उरलासे ॥३॥ तुका म्हणे पाळी लळे । कृपाळुवे विठ्ठले ॥४॥

७२७. देह आणि देहसंबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानशूकरें ॥१॥ येणें नांवें झाला मी माझ्याचा झाडा । मोह नांवे खोडा गर्भवास ॥२॥ गृह आणि वित्त स्वदेहा विटावें । इतरा भेटावें श्वापदाझाडां ॥३॥ तुका म्हणे मी हें माझें न यो वाचे । येणें नांवें साचे साधुजन ॥४॥

७२८. देवाचिये माथां घालुनियां भार । सांडीं कलेवर ओंवाळूनि ॥१॥ नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचे वेगीं सारीं ओझें ॥२॥ करुणावचनीं लाहो एकसरें । नेदावें दुसरें आड येऊं ॥३॥ तुका म्हणे सांडीं लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ॥४॥

७२९. देह नव्हे मी हे सरे । उरला उरे विठ्ठल ॥१॥ म्हणऊनि लाहो करा । काळ सारा चिंतनें ॥२॥ पाळणाचीं नाहीं चिंता । ठाव रिता देवाचा ॥३॥ तुका म्हणे जीवासाटीं । देव पोटीं पडेल ॥४॥

७३०. पृथक मी सांगों किती । धर्म नीती सकळां ॥१॥ अवघियांचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं ॥२॥ क्षराअक्षराचा भाग । करा लाग पंढरीये ॥३॥ तुका म्हणे आगमींचें । मथिलें साचें नवनीत ॥४॥

७३१. पुण्यविकरा तें मातेचें गमन । भाडी ऐसें धन विटाळ तो ॥१॥ आत्महत्यारा हा विषयांचा लोभी । म्हणावें तें नाभी करवी दंड ॥२॥ नागवला अल्प लोभाचिये साठीं । घेऊनि कांचवटि परिस दिला ॥३॥ तुका म्हणे हात झाडिलें परत्रीं । श्रम तोचि श्रोत्रीं ठेवी केली ॥४॥

७३२. अंतरींचे ध्यान । मुख्य या नांवें पूजन ॥१॥ उपाधि तें अवघें पाप । गोड निरसतां संकल्प ॥२॥ आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥३॥ तुका म्हणे

वृत्ति । अविट हे सहज स्थिति ॥४॥

७३३. मूळ कारण सत्ता । नाहीं मिळत उचिता ॥१॥ घडे कासयानें सेवा । सांग ब्रह्मांडाच्या जीवा ॥२॥ सागर सागरीं । सामावेसी कैंची थोरी ॥३॥ तुका म्हणे भावें । शरण म्हणवितां बरवें ॥४॥

७३४. बरवी नामावळी । तुझी महादोषा होळी ॥१॥ जालें आम्हांसी जीवन । धणीवरी हें सेवन ॥२॥ सोपें आणि गोड । किती अमृताही वाढ ॥३॥ तुका म्हणे अच्युता । आमुचा कल्पतरु दाता ॥४॥

७३५. तृषाकाळीं उदक भेटी । पडे मिठी आवडीची ॥१॥ ऐसियाचा हो कां संग । जिवलग संतांचा ॥२॥ मिष्टान्नाचा योग भुके । म्हणतां चुके पुरेसें ॥३॥ तुका म्हणे माते बाळा । कळवळा भेटीचा ॥४॥

७३६. कुचराचें श्रवण । गुणदोषावरी मन ॥१॥ असोनियां नसे कथे । मूर्ख अभागी तें तेथें ॥२॥ निरर्थक कारणीं । कान डोळे वेची वाणी ॥३॥ पापाचे सांगाती । तोंडीं ओढाळांचे माती ॥४॥ हिताचिया नांवें । वोस पडिले देहभावें ॥५॥ फजित करूनि सोडी । तुका करी बोडाबोडी ॥६॥

७३७. जग तरि आम्हां देव । परि हे निंदितों स्वभाव ॥१॥ येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हणुनी काळा ॥२॥ नाहीं कोणी सखा। आम्हां निपराध पारिखा ॥३॥ उपक्रमें वदे । तुका वर्मासी तें भेदे ॥४॥

७३८. सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा ॥१॥ समाधीचें सुख सांडा ओंवाळूनी । ऐसा या कीर्तनीं ब्रह्मरस ॥२॥ पुढती घडे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्य बळें निर्भरता ॥३॥ उपजोंचि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ॥४॥ तुका म्हणे मन पावोनि विश्रांती । त्रिविध नासती ताप क्षणें ॥५॥

७३९. गंगा न देखे विटाळ । तेंचि रांजणी ही जळ ॥१॥ अल्प महदा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी ॥२॥ काय खंडिली भूमिका । वर्णा पायरि कां लोकां ॥३॥ तुका म्हणे आगीविण । बीज वेगळें तों भिन्न ॥४॥

७४०. देवा वरिल भार। काढूं नये कांहीं पर ॥१॥ तहान भुके आठवण। घडे तें बरें चिंतन ॥२॥ देखावी निश्चिंती। तोंचि अंतर श्रीपती ॥३॥ वैभव सकळ। तुका मानितो विटाळ ॥४॥

७४१. थुंकोनियां मान । दंभ करितो कीर्तन ॥१॥ जालों उदासीन देहीं । एकाविण चाड नाहीं ॥२॥ अर्थ अनर्थासारिखा । करूनि ठेविला पारिखा ॥३॥ उपाधि वेगळा । तुका राहिला सोंवळा ॥४॥

७४२. काय ह्याचें घ्यावे । नित्य नित्य कोणें गावें ॥१॥ केलें हरिकथेनें वांज । अंतरोनि जाते निज ॥२॥ काम संसार । अंतरीं हे कर कर ॥३॥ तुका म्हणे हेंड । ऐसे मानिती ते लंड ॥४॥

७४३. वदे साक्षत्वेंसी वाणी । नारायणीं मिश्रित ॥१॥ नलगे कांहीं चाचपावें । जातो भावें पेरीत ॥२॥ भांडार त्या दातियाचें । मी कैचें ये ठायीं ॥३॥ सादावीत जातो तुका । येथें एकाएकीं तो ॥४॥

७४४. ऐसी जिव्हा निकी । विठ्ठल विठ्ठल कां न घोकी ॥१॥ जेणें पाविजे उद्धार । तेथें राखावें अंतर ॥२॥ गुंफोनि चावटी । तेथे कोण लाभ भेटी ॥३॥ तुका म्हणे काळ । देवाविण अमंगळ ॥४॥

७४५. साजे अळंकार । तरि भोगितां भ्रतार ॥१॥ व्यभिचारीचा टाकमटिका । उपहास होती लोकां ॥२॥ शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ॥३॥ तुका म्हणे जिणें । शर्तीविण लाजिरवाणें ॥४॥

७४६. मानामान किती । तुझ्या क्षुल्लक संपत्ती ॥१॥ जा रे चाळवीं बापुडीं । कोण धरितील ती गोडी ॥२॥ रिद्धिसिद्धि देसी । आम्ही चुंभळीं नव्हों तैसीं ॥३॥ तुका म्हणे ठका । ऐसें नागविलें लोकां ॥४॥

७४७. पाहातोसी काय । आतां पुढें करीं पाय ॥१॥ वरि ठेवूं दे मस्तक । ठेलों जोडोनि हस्तक ॥२॥ बरवें करीं सम । नको भंगों देऊं प्रेम ॥३॥ तुका म्हणे चला । पुढती सामोरे विठ्ठला ॥४॥

७४८. भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेलें आशापाश निवारूनि ॥१॥ विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन माता पिता ॥२॥ निर्वाणीं गोविंद असे मागेंपुढे । कांहींच सांकडें पडों नेदी ॥३॥ तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य । घातलिया भय नर्का जाणें ॥४॥

७४९. तोंचि हीं क्षुल्लकें सखीं सहोदरें । नाहीं विश्वंभरें वोळखी तों ॥१॥ नारायण विश्वंभर विश्वपिता । प्रमाण तो होतां सकळ मिथ्या ॥२॥ रवि नुगवे तों दीपिकांचें काज । प्रकाशें तें तेज सहज लोपे ॥३॥ तुका म्हणे देहसंबंधें संचितें । कारण निरुतें नारायणीं ॥४॥

७५०. यज्ञ भूतांच्या पाळणा । भेद कारिय कारणा । पावावया उपासना । ब्रह्मस्थानीं प्रस्थान ॥१॥ एक परी पडिलें भागीं । फळ बीजाचिये अंगी । धन्य तोचि जगीं । आदि अंत सांभाळी ॥२॥ अवश्यक तो शेवट । येर अवघी खटपट । चालों जाणें वाट । ऐसा विरळा एखादा ॥३॥ तुका होवोनि निराळा । क्षरा अक्षरा वेगळा । पाहे निगमकळा । बोले विठ्ठलप्रसादें ॥४॥

७५१. वेदपुरुष तरि नेती कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ॥१॥ तुझीं वर्में तूंचि दावूनि अनंता । होतोसी नेणता कोण्या गुणें ॥२॥ यज्ञाचा भोक्ता तरि कां नव्हे सांग । उणें पडतां अंग क्षोभ घडे ॥३॥ वससील तूं या भूतांचे अंतरीं । तरि कां भेद हरी दावियेला ॥४॥ तपतीर्थाटणें तुझी मूर्तिदान । तरि कां अभिमान आड येतो ॥५॥ आतां क्षमा कीजे विनवितो तुका । देऊनियां हाका उभा द्वारीं ॥६॥

७५२. जळे माझी काया लागला वोणवा । धांवरे केशवा मायबापा ॥१॥ पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें ॥२॥ फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसी काय हृदय माझें ॥३॥ घेउनी जीवन धांवें लवलाहीं । कवणाचें कांहीं न चले येथें ॥४॥ तुका म्हणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण राखे ॥५॥

७५३. नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥१॥ सांगितलें काम करावे कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥२॥ माप टाकी सळे धरिली विठ्ठलें । थापटोनी केलें सावधान ॥३॥ प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले ते शेवटीं लावी तुका ॥४॥

७५४. द्याल ठाव तरी राहेन संगती । संतांचे पंगती पायांपाशीं ॥१॥ आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ॥२॥ शेवटील स्थळ नीच माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ॥३॥ नामदेवापायीं तुकया स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥४॥

७५५. अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥१॥ वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ॥२॥ ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरींची ॥३॥ तुका म्हणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ॥४॥

७५६. त्रिपुटीच्या योगें । कांहीं नव्हे कोणाजोगें । एक जातां लागे । एक पाठी लागतें ॥१॥ मागें पुढें अवघा काळ । पळों नये न चले बळ । करितां कोल्हाळ । कृपें खांदा हरि वाहे ॥२॥ पापपुण्यात्म्याच्या शक्ती । असती योजिल्या श्रीपती । यावें काकुलती । तेथें सत्तानायका ॥३॥ तुका उभा पैल थडी । तरि हे प्रकार निवडी । घातल्या सांगडी । ताफे पेटे हाकारी ॥४॥

७५७. देखण्याच्या तीन जाती । वेठी वार्ता अत्यंती ॥१॥ जैसा भाव तैसें फळ । स्वातीतोय एक जळ ॥२॥ पाहे सांगे आणि जेवी । अंतर महदंतर तेवीं ॥३॥ तुका म्हणे हिरा । पारखियां मूढां गारा ॥४॥

७५८. अनुभवें अनुभव अवघाचि साधिला । तरि स्थिरावला मन ठायीं ॥१॥ पिटूनियां मुसे आला अळंकार । दग्ध तें असार होऊनियां ॥२॥ एकचि उरलें कायावाचामना । आनंद भुवनामाजी त्रयीं ॥३॥ तुका म्हणे आम्हीं जिंकिला संसार । होऊनि किंकर विठोबाचे ॥४॥

७५९. ऐसिया संपत्ती आम्हां संवसारीं । भोगाचिया परि काय सांगों ॥१॥ काम तो

कामना भोगीतसे देवा । आलिंगनें हेवा चरणचुंबीं ॥२॥ शांतीच्या संयोगें निरसला ताप । दुसरें तें पाप भेदबुद्धि ॥३॥ तुका म्हणे पाहें तिकडें सारिखें । आपुलें पारिखें निरसलें ॥४॥

७६०. राम राज्य राम प्रजा लोकपाळ । एकचि सकळ दुजें नाहीं ॥१॥ मंगळावांचूनि उमटेना वाणी । अखंडचि खाणी एकी रासी ॥२॥ मोडलें हें स्वामी ठायाठाव सेवा । वाढवावा हेवा कोणा अंगें ॥३॥ तुका म्हणे अवघें दुमदुमिलें देवें । उरलें तें गावें हेंचि आतां ॥४॥

७६१. निवडोनि बाण काढिले निराळे । प्रमाण डोहळे यावरि ते ॥१॥ जयाचा विभाग तयासीच फळे । देखणें निराळें कौतुकासी ॥२॥ शूर तो ओळखे घायडायहात । येरां होईल मात सांगायाची ॥३॥ तुका म्हणे माझी केवळ ते वाणी । केला निजस्थानीं जानवसा ॥४॥

७६२. याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥१॥ आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥२॥ कवतुक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥३॥ तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥४॥

७६३. भक्तिचिया पोटीं रत्नाचिया खाणी । ब्रह्मींची ठेवणी सकळ वस्तु ॥१॥ माउलीचे मागें बाळकांची हारी । एका सूत्रें दोरी ओढतसे ॥२॥ जेथील जें मागें तें रायासमोर । नाहींसें उत्तर येत नाहीं ॥३॥ सेवेचिये सत्ते धनीच सेवक । आपुलें तें एक न वंची कांहीं ॥४॥ आदि अंत ठाव असे मध्यभाग । भोवतें भासे जग उच्चासनीं ॥५॥ भावारूढ तुका झाला एकाएकीं । देवचि लौकिकीं अवघा केला ॥६॥

७६४. सांगतो दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी । अनुभव तो पोटीं कैंचा घडे ॥१॥ भजनाचे सोई जगा परिहार । नेणत्या सादर चित्त कथे ॥२॥ नाइकवे कानीं साधन उपाय । ऐके तो गाय हरुषें गीत ॥३॥ नव्हे आराणूक जावयासी वना । वेध कामिमना हरिकथेचा ॥४॥ काळाच्या साधना कोणा अंगीं बळ । चिंतना मंगळ अष्ट प्रहर ॥५॥ तुका म्हणे आम्ही खेळों भातुकलें । विभागासी मुलें भोळीं येथें ॥६॥

७६५. जाणपण बरें देवाचे ते शिरीं । आम्ही ऐसीं बरीं नेणतींच ॥१॥ देखणियापुढें रुचें कवतुक । उभयतां सुख वाढतसे ॥२॥ आशंकेची बाधा नाहीं लडिवाळां । चित्त वरि खेळा समबुद्धि ॥३॥ तुका म्हणे दिशा मोकळ्या सकळां । अवकाशीं खेळा ठाव जाला ॥४॥

७६६. वचनाचे मांडे दावावे प्रकार । काय त्या साचार कौतुकाचे ॥१॥ जातां घरा मागें उरों नेणें खंती । मिळाल्या बहुती फांकलिया ॥२॥ उदयींच अस्त उदये संपादिला । कल्पनेचा केला जागेपणें ॥३॥ जाणवूनि गेला हांडोरि या पोरां । सावध इतरांकरुनि तुका ॥४॥

७६७. याती शूद्र वैश्य केला वेवसाव । आधीं तो हा देव कुळपूज्य ॥१॥ नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्हीं संतीं ॥२॥ संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबापें

सेखीं क्रमिलिया ॥३॥ दुष्काळें आटिलें द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥४॥ लज्जा वाटे जीवा त्रासलो या दु:खें । वेवसाय देखे तुटी येतां ॥५॥ देवाचें देऊळ होतें जें भंगलें । चित्तासी तें आलें करावेंसें ॥६॥ आरंभीं कीर्तन करी एकादशीं । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥७॥ कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वास आदरें करोनियां ॥८॥ गाती पुढें त्याचें धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥९॥ संताचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥१०॥ ठाकला तो कांहीं केला परउपकार । केलें हे शरीर कष्टवूनी ॥११॥ वचनें मानिलीं नाहीं सुहृदांचीं । समूळ प्रपंचीं वीट आला ॥१२॥ सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥१३॥ मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥१४॥ यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥१५॥ निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥१६॥ बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥१७॥ विस्तारी सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥१८॥ आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥१९॥ भक्तां नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ॥२०॥ तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥२१॥

७६८. ऐका वचन हें संत । मी तों आगळा पतित । काय काजें प्रीत । करितसां आदरें ॥१॥ माझें चित्त मज ग्वाही । सत्य तरलों मी नाहीं । एकाचिये वाहीं । एक देखीं मानिती ॥२॥ बहु पीडिलों संसारें । मोडीं पिसें पिटीं ढोरें । न पडतां पुरें । या विचारें राहिलों ॥३॥ सहज सरलें होतें कांहीं । द्रव्य थोडे बहु तेंही । त्याग केला नाहीं । दिलें द्विजां याचकां ॥४॥ प्रियापुत्रबंधु । यांचा तोडिला संबंधु । सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा ॥५॥ तोंड न दाखवावें जना । शिरें सांदी भरें राना । एकांत तो जाणा । तयासाठीं लागला ॥६॥ पोटें पिडिलें काहारें । दया नाहीं या विचारें । बोलावितां बरें । सहज म्हणें यासाठीं ॥७॥ सहज वडिलां होती सेवा । म्हणोनि पूजितों या देवा । तुका म्हणे भावा- । साठीं झणी घ्या कोणी ॥८॥

७६९. बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥१॥ अनुतापें तुझें राहिलें चिंतन । झाला हा वमन संवसार ॥२॥ बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥३॥ बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥४॥ बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥५॥ बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥६॥ तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ॥७॥

७७०. बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥१॥ येणें सोसें मन जालें हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ॥२॥ बंधनापासूनी उकलली गांठी । देता आली मिठी

सावकाश ॥३॥ तुका म्हणे देह भरिला विठ्ठलें । कामक्रोधें केलें घर रितें ॥४॥

७७१. जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ॥१॥ आधीं आपणयां नासी । तरि उतरे ये कसीं ॥२॥ ब्रह्मज्ञानाचें कोठार । तें या निश्चयें उत्तर ॥३॥ तुका म्हणे ते उन्मनी । नाश कारया कारणीं ॥४॥

७७२. मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥१॥ आतां पुरले नवस । निरसोनी गेली आस ॥२॥ जालों बरा बळी । गेलों मरोनी ते काळीं ॥३॥ दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ॥४॥

७७३. साधनाच्या कळा आकार आकृति । कारण नवनीतीं मथनाचें ॥१॥ पक्षियासी नाहीं मारगीं आडताळा । अंतरिक्षीं फळासीचि पावे ॥२॥ भक्तीची जोडी ते उखत्याचि साठीं । उणें पुरें तुटी तेथें नाहीं ॥३॥ तुका म्हणे आलें सांचत सांचणी । आजी जाली धणी एकसरें ॥४॥

७७४. नाहीं येथें वाणी । सकळा वर्णीं घ्यावी धणी ॥१॥ जालें दर्पणाचें अंग । ज्याचा त्यासी दावी रंग ॥२॥ एका भावाचा एकांत । पीक पिकला अनंत ॥३॥ तुका खळे दाणीं । करी बैसोनि वांटणी ॥४॥

७७५. ठेविलें जतन । करूनियां निज धन ॥१॥ जयापासाव उत्पत्ति । तें हें बीज धरिलें हातीं ॥२॥ निवडिलें वरळा भूस । सार आइन जिन्नस ॥३॥ तुका म्हणे नारायण । भाग संचिताचा गुण ॥४॥

७७६. भ्रमणा पाउले वेचिताती वाव । प्रवेशाचा ठाव एका द्वारें ॥१॥ सार तीं पाउलें विठोबाचीं जीवीं । कोणीं न विसंबावीं क्षणभरी ॥२॥ सुलभ हें केलें सकळां जीवन । फुंकावेचि कान न लगे कांहीं ॥३॥ तुका म्हणे येथें सकळही कोड । पुरे मूळ खोड विस्ताराचें ॥४॥

७७७. कांही जाणों नये पांडुरंगाविण । पाविजेल शीण संदेहानें ॥१॥ भलतिया नांवें आळविला पिता । तरी तो जाणता कळवळा ॥२॥ अहंकार जातो गौरवितां वाणी । सर्व गात्रां धणी हरिकथा ॥३॥ तुका म्हणे उपजे विल्हाळ आवडी । करावा तो घडीघडी लाहो ॥४॥

७७८. बींजापोटीं पाहे फळ । विध न करिता सकळ ॥१॥ तया मूर्ख म्हणावें वेडे । कैसें तुटेल सांकडें ॥२॥ दाविलिया वाट । वेठी धरूं पाहे चाट ॥३॥ पुढिल्या उपाया । तुका म्हणे राखे काया ॥४॥

७७९. मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ॥१॥ वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकीया खळ ॥२॥ आगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ॥३॥ तुका म्हणे वर्म । येरा नाचवितो भ्रम ॥४॥

७८०. वेश वंदाया पुरते । कोण ब्राह्मण निरुते ॥१॥ ऐसें सांगा मजपाशीं । संतां

निरवितों येविशीं ॥२॥ असां जी प्रवीण । ग्रंथीं कळे शुद्ध हीण ॥३॥ तुका म्हणे लोपें । सत्याचिया घडती पापें ॥४॥

७८१. ज्या ज्या आम्हापाशीं होतील ज्या शक्ति । तेणें हा श्रीपती अळंकारूं ॥१॥ अवघा पायांपाशीं दिला जीवभाव । जन्ममरणा ठाव पुसियेला ॥२॥ ज्याचें देणें त्यासी घातला संकल्प । बंधनाचें पाप चुकविलें ॥३॥ तुका म्हणे येथें उरला विठ्ठल । खाय बोले बोल गाये नाचे ॥४॥

७८२. आम्हीं आळीकरें । प्रेमसुखाचीं लेंकरें ॥१॥ पायीं गोविली वासना । तुच्छ केलें ब्रह्मज्ञाना ॥२॥ येतां पाहें मुळा । वास पंढरीच्या डोळां ॥३॥ तुका म्हणे स्थळ । मग मी पाहेन सकळ ॥४॥

७८३. आइत्याची राशी । आली पाकसिद्धीपाशीं ॥१॥ आतां सोडोनि भोजन । भिके जावें वेडेपण ॥२॥ उसंतिली वाट । मागें परतावें फुकट ॥३॥ तुका म्हणे वाणी । वेचों बैसोन ठाकणीं ॥४॥

७८४. धन्य शुद्ध जाती । धरीं लौकरी परती ॥१॥ ऐकिलें तेंचि कानीं । होय परिपाक मनीं ॥२॥ कळवळा पोटीं । सावधान हितासाठीं ॥३॥ तुका म्हणे भाव । ज्याचा तोचि जाणा देव ॥४॥

७८५. जीवित्व तें किती । हेंचि धरितां बरें चित्तीं ॥१॥ संत सुमनें उत्तरें । मृदु रसाळ मधुरें ॥२॥ विसांवतां कानीं । परिपाक घडे मनीं ॥३॥ तुका म्हणे जोडी । होय जतन रोकडी ॥४॥

७८६. अभिमानाची स्वामिनी शांति । महत्व येती सकळ ॥१॥ कळोनिही न कळे वर्म । तरि श्रम पावती ॥२॥ सर्व सत्ता धरितां धीर । वीर्यां वीर आगळा ॥३॥ तुका म्हणे तिखट तिखें । मृद सखे आवडी ॥४॥

७८७. भोजन पा शांतीचें । उंच नीच उसाळी ॥१॥ जैशी कारंज्याची कळा । तो जिव्हाळा स्वहिताचा ॥२॥ कल्पना ते देवाविण । न करी भिन्न इतरीं ॥३॥ तुका म्हणे पावे भूतीं । ते निश्चिती आपली ॥४॥

७८८. दास जालों हरिदासाचा । बुद्धिकायामनें वाचा ॥१॥ तेथें प्रेमाचा सुकाळ । टाळमृदंगकल्लोळ । नासे दुष्टबुद्धि सकळ । समाधि हरिकीर्तनीं ॥२॥ ऐकता हरिकथा । भक्ति लागे त्या अभक्तां ॥३॥ देखोनि कीर्तनाचा रंग । कैसा उभा पांडुरंग ॥४॥ हें सुख ब्रह्मादिकां । नाहीं नाहीं म्हणे तुका ॥५॥

७८९. गति अधोगति मनाची हे युक्ति । मन लावा एकांतीं साधु संगें ॥१॥ जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥२॥ मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तेंचि करी ॥३॥ तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्यांशीचा ॥४॥

७९०. पंढरीस दुःख न मिळे ओखदा । प्रेमसुख सदा सर्वकाळ ॥१॥ पुंडलिकें हाट भरियेली पेंठ । अवघें वैकुंठ आणियेलें ॥२॥ उदिमासी तुटि नाहीं कोणा हाणी । घेऊनियां धणी लाभ घेती ॥३॥ पुरलें देशासी भरलें शीगेसी । अवघी पंचक्रोशी दुमदुमीत ॥४॥ तुका म्हणे संतां लागलीसे धणी । बैसले राहोनि पंढरीस ॥५॥

७९१. द्वारकेचें केणें आलें याचि ठाया । पुढें भक्तराया चोजवीत ॥१॥ गोविलें विसारें माप केलें खरें । न पाहे माघारें अद्यापवरी ॥२॥ वैष्णव मापारी नाहीं जाली सळें । पुढेंही न कळे पार त्याचा ॥३॥ लाभ जाला त्यांनीं धरिला तो विचार । आहिक्य परत्र सांठविलें ॥४॥ तुका म्हणे मज मिळाली मजुरी । विश्वास या घरीं संतांचिया ॥५॥

७९२. सुरवर येती तीर्थें नित्यकाळ । पेंठ त्या निर्मळ चंद्रभागा ॥१॥ साक्षभूत नव्हे सांगितली मात । महिमा अत्यद्भुत वर्णवेना ॥२॥ पंचक्रोशीमाजी रीघ नाहीं दोषा । जळती आपैसा अघोर ते ॥३॥ निर्विषय नर चतुर्भुज नारी । अवघा घरोघरीं ब्रह्मानंदु ॥४॥ तुका म्हणे ज्यापें नाहीं पुण्यलेश । जा रे पंढरीस घेई कोटि ॥५॥

७९३. विचार नाहीं नर खर तो तैसा । वाहे ज्ञान पाठी भार लगड जैसा ॥१॥ वादावाद करणें त्यासी तोंचि वरी । गुखाडीची चाड सरे तोंच बाहेरी ॥२॥ सौभाग्यसंपन्न हो कां वृद्ध प्रतिष्ठा । चिकरूनि सांडी पायां लागली ते विष्ठा ॥३॥ नाहीं याति कुळ फांसे ओढी तयासी । तुका म्हणे काय मुद्रासोंग जाळिसी ॥४॥

७९४. देव होसी जरी आणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ॥१॥ दुष्ट होसी तरी आणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ॥२॥ तुका म्हणे जें दर्पणीं बिंबलें । तें तया बाणलें निश्चयेसीं ॥३॥

७९५. कलिधर्म मागें सांगितलें संतीं । आचार सांडिती द्विजलोक ॥१॥ तेंचि कळों आतां येतसे प्रचिती । अधर्मा टेंकती धर्म नव्हे ॥२॥ तप व्रत करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे ॥३॥ देव म्हणऊनी न येती देऊळा । संसार वेगळा तरी कां नव्हे ॥४॥ तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसें कोणी जन नरका जाती ॥५॥

७९६. नमो विश्वरूपा विष्णु मायबापा । अपारा अमुपा पांडुरंगा ॥१॥ विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ॥२॥ तुझी स्तुति वेद करितां भागला । निवांतचि ठेला नेति नेति ॥३॥ ऋषि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां तुझे गुण न सरती ॥४॥ तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ॥५॥

७९७. अंतरींचा भाव जाणोनियां गुज । तैसें केलें काज पांडुरंगा ॥१॥ घातलें वचन न पडेचि खालीं । तूं आम्हां माउली अनाथांची ॥२॥ मज याचकाची पुरविली आशा ।

पंढरीनिवासा मायबापा ॥३॥ नाशिली आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं ॥४॥ तुका म्हणे आतां केलों मी निर्भर । गाईन अपार गुण तुझे ॥५॥

७९८. उदार कृपाळ अनाथांचा नाथ । ऐकसी मात शरणागतां ॥१॥ सर्व भार माथां चालविसी त्याचा । अनुसरले वाचा काया मनें ॥२॥ पाचारितां उभा राहासी जवळी । पाहिजे ते काळीं पुरवावें ॥३॥ चालतांही पंथ सांभाळीसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥४॥ तुका म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्वभावें ॥५॥

७९९. काय कीर्ति करूं लोक दंभ मान । दाखवीं चरण तुझे मज ॥१॥ मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयांविण ॥२॥ होइल थोरपणें जाणीवेचा भार । दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥३॥ अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एका देखोवेखीं ॥४॥ तुका म्हणे तुझे पाय आतुडती । त्या मज विपत्ति गोड देवा ॥५॥

८००. मानावया जग व्हावी द्रव्यमाया । नाहीं हे माझिया जीवा चाड ॥१॥ तुझ्या पायांसाठीं केली आराणूक । आतां कांहीं एक नको दुजें ॥२॥ करूनियां कृपा करीं अंगीकार । न लावीं उशीर आतां देवा ॥३॥ नव्हे साच कांहीं कळों आलें मना । म्हणोनि वासना आवरिली ॥४॥ तुका म्हणे आतां मनोरथ सिद्धी । माझे कृपानिधी पाववावे ॥५॥

८०१. आतां माझा सर्वभावें हा निर्धार । न करीं विचार आणिकांसी ॥१॥ सर्वभावें नाम गाईन आवडी । सर्व माझी जोडी पाय तुझे ॥२॥ लोटांगण तुझ्या घालीन अंगणीं । पाहेन भरोनि डोळे मुख ॥३॥ निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येऊं नेदीं मनीं शंका कांहीं ॥४॥ अंकित अंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका म्हणे ॥५॥

८०२. जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा तो वृत्तांत न कळे आम्हां ॥१॥ जन्म जरा मरण कवण भोगी भोग । व्याधि नाना रोग सुखदुःखें ॥२॥ पापपुण्यें शुद्धाशुद्ध आचरणें । हीं कोणाकारणें कवणें केलीं ॥३॥ आम्हां मरण नाश तूं तव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ॥४॥ तुका म्हणे तूंचि निवडीं हें गुढार । दाखवीं साचार तेंचि मज ॥५॥

८०३. यथार्थ वाद सांडूनि उपचार । बोलती ते अघोर भोगितील ॥१॥ चोरा धरितां सांगे कुठोऱ्याचें नांव । दोघांचेही पाव हात जाती ॥२॥ तुका म्हणे असे पुराणीं निवाड । माझी हे बडबड नव्हे कांहीं ॥३॥

८०४. धीर तो कारण । साह्य होतो नारायण । नेदी होऊं सीण । वाहूं चिंता दासांसी ॥१॥ सुखें करावें कीर्तन । हर्षें गावे हरिचे गुण । वारी सुदर्शन । आपणचि कळिकाळा ॥२॥ जीव वेची माता । बाळा जडभारी होतां । तो तों नव्हे दाता । प्राकृतां यांसारिखा ॥३॥ हें तों माझ्या अनुभवें । अनुभवा आलें जीवें । तुका म्हणे सत्य व्हावें । आहाच नये कारणा ॥४॥

८०५. पुढें आतां कैचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ॥१॥ सर्वथाही फिरों नये । ऐसी सोय लागलिया ॥२॥ पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भाव असतां ॥३॥ तुका म्हणे चुकती बापा । पुन्हां खेपा सकळा ॥४॥

८०६. दूध दहीं ताक पशूचें पाळण । त्यामध्यें कारण घृतसार ॥१॥ हेंचि वर्म आम्हां भाविकांचे हातीं । म्हणऊनि चित्तीं धरिला राम ॥२॥ लोह कफ गारा अग्रीचिया काजे । येन्हवीं तें ओझें कोण वाहे ॥३॥ तुका म्हणे खोरीं पाहारा जतन । जोंवरि हें धन हातीं लागे ॥४॥

८०७. वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥१॥ करिती घोष जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ॥२॥ क्षमा दया शांति । बाण अभंग हे हातीं ॥३॥ तुका म्हणे बळी । तेंचि एक भूमंडळीं ॥४॥

८०८. ऐक रे जना तुझ्या स्वहिताच्या खुणा । पंढरीचा राणा मनामाजी स्मरावा ॥१॥ मग कैचें रे बंधन वाचे गातां नारायण । भवसिंधु तो जाण येचि तीरीं सरेल ॥२॥ दास्य करील कळिकाळ बंध तुटेल मायाजाळ । होतील सकळ रिद्धिसिद्धी म्हणियाऱ्या ॥३॥ सकळशास्त्रांचें सार हें वेदांचें गव्हर । पाहातां विचार हाचि करिती पुराणें ॥४॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चांडाळाही अधिकार । बाळें नारीनर अदिकरोनि वेश्याही ॥५॥ तुका म्हणे अनुभवें आम्हीं पाडियलें ठावें । आणीकही दैवें सुख घेती भाविकें ॥६॥

८०९. न करीं तळमळ राहें रे निश्चळ । आहे हा कृपाळ स्वामी माझा ॥१॥ अविनाश सुख देईल निर्वाणी । चुकतील खाणी चौऱ्यांशीच्या ॥२॥ आणिकिया जीवा होईल उद्धार । तेही उपकार घडती कोटि ॥३॥ आहिक्य परत्रीं होसील सरता । वाचे उच्चारितां रामनाम ॥४॥ तुका म्हणे सांडीं संसाराचा छंद । मग परमानंद पावसील ॥५॥

८१०. कां रे दास होसी संसाराचा खर । दुःखाचे डोंगर भोगावया ॥१॥ मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या अगरीं । मसक भरल्यावरी स्वाद नेणें ॥२॥ आणीकही भोग आणिका इंद्रियांचे । नाहीं ऐसे साचे जवळी कांहीं ॥३॥ रूप दृष्टि धाय पाहातां पाहातां । न घडे सर्वथा आणि तृष्णा ॥४॥ तुका म्हणे कां रे नाशिवंतासाठीं । देवासवें तुटी करितासी ॥५॥

८११. बैसोनि निश्चळ करीं त्याचें ध्यान । देईल तो अन्नवस्त्रदाता ॥१॥ काय आम्हां करणें अधिक सांचुनि । देव झाला ऋणी पुरविता ॥२॥ दयाळ मायाळ जाणे कळवळा । शरणागतां लळा राखों जाणे ॥३॥ नलगे सांगणें मागणें तयासी । जाणे इच्छा तैसी पुरवी त्याची ॥४॥ तुका म्हणे लेईं अळंकार अंगीं । विठ्ठल हा जगीं तूंचि होसी ॥५॥

८१२. सोनियाचा कळस । माजी भरिला सुरारस ॥१॥ काय करावें प्रमाण । तुम्ही सांगा संतजन ॥२॥ मृत्तिकेचा घट । माजी अमृताचा सांठ ॥३॥ तुका म्हणे हित । तें

मज सांगावें त्वरित ॥४॥

८१३. सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ॥१॥ नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं म्हणियारा । सरिक नाहीं दुसरा । धनी सारा तुझा तूं ॥२॥ जपतप नांगरणी । न लगे आटी दुनवणी ॥३॥ कर्म कुळवणी । न लगे धर्मपाळी दान्ही ॥४॥ ज्ञानपाभारी ती फणी । न लगे करावी पेरणी ॥५॥ बीज न लगे संचिताचें । पीक पिकलें ठायींचें ॥६॥ नाहीं यमाचें चोरटें । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटें ॥७॥ पीक न वजे हा भरंवसा । करी उद्वेग तो पिसा ॥८॥ सराई सर्व काळ । वांयां न वजे घटिकापळ ॥९॥ प्रेम पिकलें अपार । नाहीं सांठवावया थार ॥१०॥ ऐसिये जोडी जो चुकला । तुका म्हणे धिग त्याला ॥११॥

८१४. वोणव्या सोंकरीं । सेत खादलें पाखरीं ॥१॥ तैसा खाऊं नको दगा । निदसुरा राहूनि जागा ॥२॥ चोरासवें वाट । चालोनि केलें तळपट ॥३॥ डोळे झांकूनी राती । कूपीं पडे दिवसा जोती ॥४॥ पोसी वांझ गाय । तेथें कैंची दूध साय ॥५॥ फुटकी सांगडी । तुका म्हणे न पवे थडी ॥६॥

८१५. सेत आलें सुगी सांभाळावे चारी कोन । पीक आलें परी केलें पाहिजे जतन ॥१॥ सोंकरीं सोंकरीं सोहंकरी । विसावा तोंवरी नको उभें आहे तों ॥२॥ गोफणीसी गुंडा घालीं पागोऱ्याच्या नेटें । पळती आहाकारे अवघी पाखरांचीं थाटें ॥३॥ पेटवूनी आगटी राहें जागा पालटूनी । पडिलिया मानी बळ बुद्धि व्हावी दोनी ॥४॥ खळे दानें विश्वसुखी करीं होतां रासी । सारा सारूनियां ज्याचे भाग देईं त्यासी ॥५॥ तुका म्हणे मग नाहीं आपुलें कारण । निज आलें हातां भूस सांडिलें निकण ॥६॥

८१६. नका घालूं दूध जयामध्यें सार । ताकाचे उपकार तरी करा ॥१॥ नेदा तरी हें हो नका देऊं अन्न । फुकाचें जीवन तरी पाजा ॥२॥ तुका म्हणे मज सगुणाची चाड । पुरवा कोणी कोड दुर्बळाचें ॥३॥

८१७. म्हणसी नाहीं रे संचित । न करीं न करीं ऐसी मात ॥१॥ लाहो घेईं हरिनामाचा । जन्म जाऊं नेदी साचा । गळा पडेल यमफासा । मग कैंचा हरि म्हणसी ॥२॥ पुरलासाठीं देहाडा । ऐसें न म्हणें न म्हणें मूढा ॥३॥ नरदेह दुबळा । ऐसें न म्हणें रे चांडाळा ॥४॥ तुका म्हणे सांगों किती । सेखीं तोंडीं पडेल माती ॥५॥

८१८. संतांचा महिमा तो बहु दुर्गम । शाब्दिकांचें काम नाहीं येथें ॥१॥ बहु दुधड जरी झाली म्हैस गाय । तरी होईल काय कामधेनु ॥२॥ तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण । तरीच महिमान येईल कळों ॥३॥

८१९. नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडता कपाटीं रानीं वनीं ॥१॥ नये मोल देतां

धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥२॥ तुका म्हणे मिळे जिवाचिये साठीं । नाहीं तरी गोष्टी सांगों नये ॥३॥

८२०. नामाची आवडी तोचि जाणा देव । न धरीं संदेह कांहीं देव मनीं ॥१॥ ऐसें मी हें नाहीं बोलत नेणतां । आणोनि संमता संतांचिया ॥२॥ नाम म्हणे तया आणीक साधन । ऐसें हें वचन बोलों नये ॥३॥ तुका म्हणे सुख पावे या वचनीं । ज्याचीं शुद्ध दोन्ही मायबापें ॥४॥

८२१. सुखें होतों कोठें घेतली सुती । बांधविला गळा आपुलें हातीं ॥१॥ काय करूं बहू गुंतलों आतां । नयेचि सरतां मागें पुढें ॥२॥ होतें गांठीं तें सरलें आतां । आणीक माथां ऋण जालें ॥३॥ सोंकरिलियाविण गमाविलीं पिकें । रांडापोरें भिके लावियेलीं ॥४॥ बहुतांची बहु घेतलीं घरें । न पडे पुरे कांहीं केल्या ॥५॥ तुका म्हणे कांही न धरावी आस । जावें हें सर्वस्व टाकोनियां ॥६॥

८२२. न मनावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरें तें । आड आला म्हणुनि फोडियेला डोळा । बळिनें आंधळा शुक्र केला ॥१॥ करी देव तरी काय नव्हे एक । कां तुम्ही पृथक सिणा वांयां ॥२॥ उल्लंघुनीयां भ्रताराची आज्ञा । अन्न ऋषिपत्न्या घेउनि गेल्या । अवघेंचि त्यांचें देवें केलें काज । धर्म आणि लाज राखियेली ॥३॥ पितयासी पुत्रें केला वैराकार । प्रल्हादें असुर मारवीला । बहुत विघ्नें केली तया आड । परि नाहीं कैवाड सांडियेला ॥४॥ गौळणी करिती देवाशीं व्यभिचार । सांडुनी आचार भ्रष्ट होती । तयां दिलें तें कवणासी नाहीं । अवघा अंतर्बाही तोचि जाला ॥५॥ देव जोडे तरी करावें अधर्म । अंतरें तें कर्म नाचरावें । तुका म्हणे हा तो जाणतो कळवळा । म्हणोनी अजामेळा उद्धरिलें ॥६॥

८२३. अरे गिळिलें हो संसारें । कांहीं तरि राखा खरें । दिला करुणाकरें । मनुष्यदेह सत्संग ॥१॥ येथें न घलीं न घलीं आड । संचितसा शब्द नाड । उठाउठीं गोड । बीजें बीज वाढवी ॥२॥ केलें तें क्रियमाण । झालें ते संचित म्हण । प्रारब्ध जाण । उर उरित उरलें तें ॥३॥ चित्त खोटें चालीवरि । रोग भोगाचे अंतरीं । रसना अनावरी । तुका म्हणे ढुंग वाहे ॥४॥

८२४. अग्नि तापलिया कायाचि होमे । तापत्रयें संतप्त होती । संचित क्रियमाण प्रारब्ध तेथें । न चुके संसार स्थिति । राहाट घटिका जैसी फिरतांचि राहिली । भरली जाली होती एके रितीं । साधीं हा प्रपंच पंचाय अग्र । तेणें पावशी निज शांतीरे ॥१॥ नारायण नाम नारायण नाम । नित्य करीं काम जिव्हा मुखें । जन्म जराव्याधि पापपुण्य तेथें । नासती सकळही दुःखें रे ॥२॥ शीत उष्ण वन सेवितां कपाट । आसन समाधी साधी । तप तीर्थ दान व्रत आचरण । यज्ञ नाना मन बुद्धी । भोगाभोग तेथें न चुकती प्रकार । जन्म जरादुःखव्याधी । साहोनि काम क्रोध अहंकार । आश्रमीं अविनाश साधीं रे ॥३॥ घोकितां

अक्षरें अभिमानविधि । निषेध लागला पाठी । वाद करितां निंदा घडती दोष । होय वज्रलेपो भविष्यति । दूषणाचें मूळ भूषण तुका म्हणे । सांडीं मिथ्या खंतीं । रिघोनि संतां शरण सर्वभावें । राहें भलतिया स्थिती रे ॥४॥

८२५. नव्हे गुरुदास्य संसारियां । वैराग्य तरी भेणें कांपे विषयां । तैसें नाम नव्हे पंढरीराया । जया सायास न लगती ॥१॥ म्हणोनि गोड सर्वभावें । आंघोळी न लगे तोंड धुवावें । आर्तचाड जीवें । नलगे भ्यावें संसारा ॥२॥ कर्मा तंव न पुरे संसारिक । धर्म तंव फळदायक । नाम विठ्ठलाचें एक । नाशी दुःख भवाचें ॥३॥ न लगे सांडणें मांडणें । आगमनिगमाचें देखणें । अवघें तुका म्हणे । विठ्ठलनामें आटलें ॥४॥

८२६. नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची । अवज्ञा देवाची घडे तेणें ॥१॥ देहाचा निग्रही त्याचा तो सांभाळी । मग नये कळि अंगावरी ॥२॥ आपलिया इच्छा माता सेवा करी । न बाधी ते थोरी येणें क्षोभें ॥३॥ तुका म्हणे सांडा देखीचा दिमाख । मोडसीचें दुःख गांड फाडी ॥४॥

८२७. सत्य सत्य देतो फळ । नाहीं लागतचि बळ ॥१॥ ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ॥२॥ करावीच चिंता । नाहीं लागत तत्वता ॥३॥ तुका म्हणे भावें । होतें सकळ बरवें ॥४॥

८२८. साधक जाले कळी । गुगुडीची लांब नळी ॥१॥ पचीं पडे मद्यपान । भांगभुर्का हें साधन ॥२॥ अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ॥३॥ चेल्यांचा सुकाळ । पिंडदंड भगपाळ ॥४॥ सेवा मानधन । बरे इच्छेनें संपन्न ॥५॥ सोंगाच्या नरकाडी । तुका बोडोनियां सोडी ॥६॥

८२९. मज पाहातां हें लटिकें सकळ । कोठें मायाजाळ दावीं देवा ॥१॥ कोणाचा कोणासीं न धरें संबंध । आहे शुद्धबुद्ध ठायींचे ठायीं ॥२॥ काढा जी आपुलें मोह बुंथी जाळें । नका लावूं बळें वेड आम्हां ॥३॥ जीव शिव कांहीं ठेवियेलीं नांवें । सत्य तुम्हां ठावें असोनियां ॥४॥ सेवेच्या अभिळासें न धराचि विचार । आम्हां दारोदार हिंडविलें ॥५॥ आहे तैसें आतां फळलियावरी । परतें सांडा दुरी दुजेपण ॥६॥ तुका म्हणे काय छायेच्या अभिळासें । हंस पावे नाश तारांगणीं ॥७॥

८३०. पंचभूतांचा गोंधळ । केला एके ठायीं मेळ । लाविला सबळ । अहंकार त्यापाठीं ॥१॥ तेथें काय मी तें माझें । कोण वागवी तें ओझें । देहा केवीं रिझे । हें काळाचें भातुकें ॥२॥ जीव न देखें मरण । धरी नवी सांडी जीर्ण । संचित प्रमाण । भोग शुभा अशुभासी ॥३॥ इच्छा वाढविते वेल । खुंटावा तो खरा बोल । तुका म्हणे मोल । झांकलें तें पावेल ॥४॥

८३१. पुसावेंसें हेंचि वाटे । जें जें भेटे तयासी ॥१॥ देव कृपा करील मज । काय लाज राखील ॥२॥ अवघियांचा विसर जाला । हा राहिला उद्योग ॥३॥ तुका म्हणे चिंता वाटे । कोण भेटे सांगेसा ॥४॥

८३२. जाळा तुम्ही माझें जाणतें मीपण । येणें माझा खून मांडियेला ॥१॥ खादलें तें पचे तरिच तें हित । ओकलिया थीत पिंड पीडी ॥२॥ तरि भलें भोगे जोडिलें तें धन । पडिलिया खाण जीवनासी ॥३॥ तुका म्हणे मज तारीं गा विठ्ठला । नेणताचि भला दास तुझा ॥४॥

८३३. याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ॥१॥ केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनियां ॥२॥ जें कांहीं करितों तें माझें स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ॥३॥ जालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ॥४॥ तुका म्हणे यासी नामाचा अभिमान । म्हणोनि शरण तारी बळें ॥५॥

८३४. बहु उतावीळ भक्तीचिया काजा । होसी केशीराजा मायबापा ॥१॥ तुझ्या पायीं मज जालासे विश्वास । म्हणोनियां आस मोकलिली ॥२॥ ऋषी मुनि सिद्ध साधक अपार । कळला विचार त्यांसी तुझा ॥३॥ नाहीं नास तें सुख दिलें तयांस । जाले जे उदास सर्वभावें ॥४॥ तुका म्हणे सुख न माय मानसीं । धरिलें जीवेंसी पाय तुझे ॥५॥

८३५. मायामोहजाळीं होतों सांपडला । परि या विठ्ठला कृपा आली ॥१॥ काढूनि बाहेरि ठेविलों निराळा । कवतुक डोळां दाखविलें ॥२॥ नाचे उडे माया करी कवतुक । नाशवंत सुखें साच केलीं ॥३॥ रडे फुंदे दुःखे कुटितील माथा । एकासी रडतां तेंही मरे ॥४॥ तुका म्हणे मज वाटतें नवल । मी हे माझे बोल ऐकोनियां ॥५॥

८३६. देहभाव आम्ही राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ॥१॥ आमुच्या हिताचा जाणोनि उपाव । तोचि पुढें देव करीतसे ॥२॥ म्हणउनी नाहीं सुख दुःख मनीं । ऐकलिया कानीं वचनाचें ॥३॥ जालों मी निःसंग निवांत एकला । भार त्या विठ्ठला घालूनियां ॥४॥ तुका म्हणे जालों जयाचे अंकित । तोचि माझें हित सर्व जाणे ॥५॥

८३७. आलें फळ तेव्हां राहिलें पिकोन । जरि तें जतन होय देंठीं ॥१॥ नामेंचि सिद्धि नामेंचि सिद्धि । व्यभिचारबुद्धि न पवतां ॥२॥ चालिला पंथ तो पावावील ठाया । जरि आड तया नये कांहीं ॥३॥ तुका म्हणे मध्यें पडती आघात । तेणें होय घात हानि लाभ ॥४॥

८३८. विरोधाचें मज न साहे वदन । बहु होतें मन कासावीस ॥१॥ म्हणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांती गोड वाटे ॥२॥ देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला याचा ॥३॥ तुका म्हणे देव अंतरे यामुळें । आशामोहजाळें दुःख वाढे ॥४॥

८३९. तुजशीं संबंध खोटा । परता परता रे तूं थोटा ॥१॥ देवा तुझें काय घ्यावें । आप आपणां ठकावें ॥२॥ जेथें मुद्दल न ये हातां । व्याजें मरावें लेखितां ॥३॥ तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं तुझा ठसा ॥४॥

८४०. याचि हाका तुझे द्वारीं । सदा देखों ऋणकरी ॥१॥ सदा करिती खंड दंड । देवा

बहु गा तूं लंड ॥२॥ सुखें गोविसी भोजना । लपवूनियां आपणां ॥३॥ एकें एक बुझाविसी । तुका म्हणे ठक होसी ॥४॥

८४१. आम्हीं जाणों तुझा भाव । दृढ धरियेले पाव ॥१॥ फांकूं नेदूं चुकवितां । नेघों थोडे बहू देतां ॥२॥ बहुतां दिसांचे लिगाड । आलें होत होत जड ॥३॥ तुका म्हणे आतां । नेघों सर्वस्वही देतां ॥४॥

८४२. ऋण वैर हत्या । हें तो न सुटे नेदितां ॥१॥ हें कां नेणों पांडुरंगा । तुम्ही सांगतसां जगा ॥२॥ माझा संबंध तो किती । चुकवा लोकांची फजिती ॥३॥ तुका म्हणे याचिसाठीं । मज घेतां नये तुटी ॥४॥

८४३. नाहीं मागितला । तुम्हां मान म्यां विठ्ठला ॥१॥ जे हे करविली फजिती । माझी एवढी जना हातीं ॥२॥ नाहीं केला पोट । पुढें घालूनि बोभाट ॥३॥ तुका म्हणे धरूनि हात । नाहीं नेलें दिवाणांत ॥४॥

८४४. तूं पांढरा स्फटिक मणी । करिसी आणिकां त्यांहुनि ॥१॥ म्हणोनि तुझ्या दारा । न येती ठकती दातारा ॥२॥ तुझे ठाई नांदणूक । अवघा बुडविला लौकिक ॥३॥ तुका म्हणे ज्याचें घेसी । त्यासी हेंचि दाखविसी ॥४॥

८४५. बोलतों निकुरें । नव्हतीं सलगीचीं उत्तरें ॥१॥ माझें संतापलें मन । परपीडा ऐकोन ॥२॥ अंगावरि आलें । तोंवरि जाईल सोसिलें ॥३॥ तुज भक्ताची आण देवा । जरि तुका येथें ठेवा ॥४॥

८४६. बुद्धीची जनिता लक्ष्मीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे ॥१॥ आणिकां उपाया कोण वांटी मन । सुखाचें निधान पांडुरंग ॥२॥ गीतीं गावों नाचों छंदें वाहों टाळी । वैष्णवांचे मेळीं सुखरूप ॥३॥ अनंत ब्रह्मांडें एके रोमावळी । आम्ही केला भोळीं भावें उभा ॥४॥ लटिका हा केला संसारसिंधु । मोक्ष करा बंधु नाहीं पुढें ॥५॥ तुका म्हणे ज्याच्या नामाचे अंकित । राहिलों निश्चिंत त्याच्या बळ ॥६॥

८४७. नलगे मायेसी बाळ निरवावें । आपल्या स्वभावें ओढे त्यासी ॥१॥ मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ॥२॥ गोड धड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥३॥ खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥४॥ त्याच्या दुःखें पडे आपण खापरीं । लाही तळी वरी होय जैसी ॥५॥ तुका म्हणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ॥६॥

८४८. ब्राह्मण तो नव्हे ऐसी ज्याची बुद्धि । पाहा श्रुतीमधीं विचारूनि ॥१॥ जयासी नावडे हरिनाम कीर्तन । आणीक नर्तन वैष्णवांचें ॥२॥ सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार । मातेसी

वेव्हार अंत्यजाचा ॥३॥ तुका म्हणे येथें मानी आनसारिखें । तत्काळ तो मुखें कुष्ठ होय ॥४॥

८४९. ब्राम्हण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्त्वतां निश्चयेसीं ॥१॥ रामकृष्णनामें उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ॥२॥ शांति क्षमा दया अळंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥३॥ तुका म्हणे गेल्या षडऊर्मी अंग । सांडुनियां मग ब्राह्मण तो ॥४॥

८५०. एक करिती गुरु गुरु । भोंवता भारु शिष्यांचा ॥१॥ पुंस नाहीं पाय चारी । मनुष्य परी कुतरीं तीं ॥२॥ परस्त्री मद्यपान । पेंडखाण माजविलें ॥३॥ तुका म्हणे निर्भर चित्तीं । अधोगती जावया ॥४॥

८५१. एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं ॥१॥ पाप नलगे धुंडावें । लागेल तेणें तेथें जावें ॥२॥ कांहीं दुसरा विचार । नलगे करावाचि फार ॥३॥ असत्य जे वाणी । तेथें पापाचीच खाणी ॥४॥ सत्य बोलें मुखें । तेथें उचंबळती सुखें ॥५॥ तुका म्हणे दोन्ही । जवळीच लाभहानी ॥६॥

८५२. जळतें संचित । ऐसी आहे धर्मनीत ॥१॥ माझ्या विठोबाचे पाय । वेळोवेळां मनीं ध्याय ॥२॥ नेदी कर्म घडों । कोठें आडरानें पडो ॥३॥ तुका म्हणे मळ । राहो नेदी तापजाळ ॥४॥

८५३. संतांपाशीं बहु असावें मर्यादा । फलकटाचा धंदा उरफोडी ॥१॥ बासर तो भुंके गाढवाचे परी । उडे पाठीवरी यमदंड ॥२॥ समयो नेणें तें वेडें चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ॥३॥ तुका म्हणे काय वांयां चाळवणी । पिट पिट घाणी हागवणीची ॥४॥

८५४. पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ॥१॥ कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ॥२॥ प्रारब्धीं हेवा । जोडी देवाची ते सेवा ॥३॥ तुका म्हणे बळ । बुद्धी वेंचूनि सकळ ॥४॥

८५५. घेसी तरी घेईं संतांची हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ॥१॥ सर्वभावें त्याचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ॥२॥ करिसील तो करी संतांचा सांगात । आणीक ते मात नको मना ॥३॥ बैससील तरी बैस संतांमधीं । आणिक ते बुद्धि नको मना ॥४॥ जासी तरी जाई संतांचिया गांवा । होईल विसावा तेथें मना ॥५॥ तुका म्हणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेईं ॥६॥

८५६. संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःख लेश ॥१॥ तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥२॥ संतांचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥३॥ संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥४॥ संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साठीं घेती देती ॥५॥ तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी । म्हणोनि भिकारी झालों त्यांचा ॥६॥

८५७. बहुतां जन्मांअंतीं । जोडी लागली हे हातीं ॥१॥ मनुष्यदेहा ऐसा ठाव । धरीं

पांडुरंगीं भाव ॥२॥ बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ॥३॥ तुका म्हणे जाणे । ऐसे दुर्लभ ते शाहाणे ॥४॥

८५८. लेंकराची आळी न पुरवी कैसी । काय तयापाशीं उणें जालें ॥१॥ आम्हां लडिवाळां नाहीं तें प्रमाण । कांहीं ब्रह्मज्ञान आत्मस्थिति ॥२॥ वचनाचा घेईन अनुभव पदरीं । जें हें जनाचारीं मिरवलें ॥३॥ तुका म्हणे माझी भोळिवेची आटी । दावीन शेवटी कौतुक हें ॥४॥

८५९. रूप नांव माया बोलावया ठाव । भागा आले भाव तयापरी ॥१॥ सींव वाटे परी न खंडे पृथिवी । शाहाणे ते जीवीं समजती ॥२॥ पोटा आलें तिच्या लोळे मांडीवरी । पारखी न करी खंती चित्तीं ॥३॥ तुका म्हणे भक्तिसाठीं हरिहर । अरूपीचे क्षरविभाग हे ॥४॥

८६०. आर्तभूतांप्रति । उत्तम योजाव्या त्या शक्ति ॥१॥ फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ॥२॥ अल्प तो संतोषी । स्थळीं सांपडे उद्देशीं ॥३॥ सहज संगम । तुका म्हणे तो उत्तम ॥४॥

८६१. मुळाचिया मुळें । दुःखें वाढती सकळें ॥१॥ ऐसा योगियांचा धर्म । नव्हे वाढवावा श्रम ॥२॥ न कळे आवडी । कोण आहे कैसी घडी ॥३॥ तुका म्हणे थीतें । दुःख पाववावें चित्तें ॥४॥

८६२. भाग्यवंतां हेंचि काम । मापी नाम वैखरी ॥१॥ आनंदाची पुष्टि अंगीं । श्रोते संगीं उद्धरती ॥२॥ पिकलें तया खाणें किती । पंगतीस सुकाळ ॥३॥ तुका करी प्रणिपात । दंडवत आचारितां ॥४॥

८६३. लटिकें तें रुचे । साच कोणाही न पचे ॥१॥ ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येइल सीण ॥२॥ वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ॥३॥ न मनी माकड । कांहीं उपदेश हेकड ॥४॥

८६४. कौतुकाची सृष्टी । कौतुकेंचि केलें कष्टी ॥१॥ मोडे तरी भले खेळ । फांके फांकिल्या कोल्हाळ ॥२॥ जाणणियासाठीं । भय सामावलें पोटीं ॥३॥ तुका म्हणे चेता । होणें तें तूंच आयता ॥४॥

८६५. भोवंडीसरिसे । अवघें भोंवतचि दिसे ॥१॥ ठायीं राहिल्या निश्चळ । आहे अचळीं अचळ ॥२॥ एके हाकेच्या कपाटीं । तेथें आणीक नाद उठी ॥३॥ अभ्रे धांवे शशी । असे ते तें दुसरें भासी ॥४॥

८६६. नव्हों आम्ही आजिकाळाचीं । कांची कुची चाळवणी ॥१॥ एके ठायीं मूळडाळ । ठावा सकळ आहेसी ॥२॥ तुमचें आमचेंसें कांहीं । भिन्न नाहीं वांटलें ॥३॥ तुका म्हणे जेथें असें । तेथें दिसें तुमचासा ॥४॥

८६७. योग्याची संपदा त्याग आणि शांति । उभयलोकीं कीर्ति सोहळा मान ॥१॥ येरयेरांवरी जायांचें उसणें । भाग्यस्थळीं देणें झाडा वेसीं ॥२॥ केलीया फावला ठायींचा तो लाहो । तृष्णेचा तो काहो काहवितो ॥३॥ तुका म्हणे लाभ अकर्तव्या नांवें । शिवपद जीवें भोगिजेल ॥४॥

८६८. मरणा हातीं सुटली काया । विचारें या निश्चयें ॥१॥ नासोनियां गेली खंती । सहज स्थिति भोगाचे ॥२॥ न देखेंसें झाले श्रम । आलें वर्म हाता हें ॥३॥ तुका म्हणे कैंची कींव । कोठें जीव निराळा ॥४॥

८६९. नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें ॥१॥ काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें आचावाचा ॥२॥ कांपवूनि टिरी शूरत्वाची मात । केलें वाताहात उचित काळें ॥३॥ तुका म्हणे करी जिव्हेसी विटाळ । लटिक्याची मूळ स्तुति होतां ॥४॥

८७०. नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥१॥ मातेचिये खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥२॥ नको गुंफों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरे अंगीं देवाचिया ॥३॥ तुका म्हणे नको पुसों वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥४॥

८७१. अवघी मिथ्या आटी । राम नाहीं जंव कंठीं ॥१॥ सावधान सावधान । उगवीं संकल्पीं हें मन ॥२॥ सांडिलें तें मांडे । आग्रह उरल्या काळ दंडे ॥३॥ तुका म्हणे आलें भागा । देउनि चिंतीं पांडुरंगा ॥४॥

८७२. न सांगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥१॥ उगीच लागतील पाठीं । होतीं रितींच हिंपुटीं ॥२॥ शिकविल्या गोष्टी । शिकोन न धरिती पोटीं ॥३॥ तुका म्हणे सीण । होइल अनुभवाविण ॥४॥

८७३. जातिविजातीची व्हावयासि भेटी । संकल्प तो पोटीं वाहों नये ॥१॥ होणार तें घडो होणाराच्या गुणें । होइल नारायणें निर्मिलें तें ॥२॥ व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय । याचें नांव काय पुण्य असे ॥३॥ तुका म्हणे न करी विचार पुरता । गरज्याची माता पिता खर ॥४॥

८७४. शाहाणियां पुरे एकचि वचन । विशारती खूण तेचि त्यासी ॥१॥ उपदेश असे बहुतांकारणें । घेतला तो मनें पाहिजे हा ॥२॥ फांसावेना तरि दु:ख घेतें वाव । मग होतो जीव कासावीस ॥३॥ तुका म्हणे नको राग धरूं झोंडा । नुघडितां पीडा होइल डोळे ॥४॥

८७५. अभिनव सुख तरि या विचारें । विचारावें बरें संतजनीं ॥१॥ रूपाच्या आठवें दोन्हीही आपण । वियोग तो क्षण होत नाहीं ॥२॥ पूजा तरि चित्तें कल्पावें ब्रह्मांड । अहाच तो खंड एकदेसी ॥३॥ तुका म्हणे माझा अनुभव यापरि । डोई पायांवरि ठेवीतसें ॥४॥

८७६. नटनाट्य तुम्हीं केलें याचसाठीं । कवतुकें दृष्टी निववावी ॥१॥ नाहीं तरि काय

कळलेंचि आहे । वाघ आणि गाय लांकडाची ॥२॥ अभेदचि असे मांडियेलें खेळा । केल्या दीपकळा बहु एकी ॥३॥ तुका म्हणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुसरें तें ॥४॥

८७७. रवीचा प्रकाश । तोचि निशी घडे नाश । जाल्या बहुवस । तरि त्या काय दीपिका ॥१॥ आतां हाचि वसो जीवीं । माझे अंतरीं गोसावी । होऊं येती ठावीं । काय वर्में त्याच्यानें ॥२॥ सवें असतां धनी । आड येऊं न सके कोणी । नलगे विनवणी । पृथकाची करावी ॥३॥ जन्माचिया गति । येणें अवघ्या खुंटती । कारण ते प्रीती । तुका म्हणे जवळी ॥४॥

८७८. ऐसे सांडुनियां धुरे । केविलवाणी दिसां कां रे । कामें उर भरे । हातीं नुरे मृत्तिका ॥१॥ उदार हा जगदानी । पांडुरंग अभिमानी । तुळसीदळ पानी । चिंतनाचा भुकेला ॥२॥ नलगे पुसावी चाकरी । कोणी वकील ये घरीं । त्याचा तोचि करी । पारपत्य सकळां ॥३॥ नाहीं आडकाठी । तुका म्हणे जातां भेटी । न बोलतां मिठी । उगीच पायीं घालावी ॥४॥

८७९. उपकारी असे आरोनी उरला । आपुलें तयाला पर नाहीं ॥१॥ लाभावरि घ्यावें सांपडलें काम । आपला तो श्रम न विचारी ॥२॥ जीवा ऐसें देखे आणिकां जिवांसी । निखळचि रासि गुणांचीच ॥३॥ तुका म्हणे देव तयाचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ॥४॥

८८०. कोण पुण्यें यांचा होईन सेवक । जींहीं द्वंद्वादिक दुरावितें ॥१॥ ऐसीं वर्में मज दावी नारायणा । अंतरींच्या खुणा प्रकटोनि ॥२॥ बहु अवघड असे संतभेटी । तरि जगजेठी करुणा केली ॥३॥ तुका म्हणे मग नयें वृत्तीवरी । सुखाचे शेजारीं पहुडईन ॥४॥

८८१. क्षणक्षणां सांभाळितों । साक्षी होतों आपुला ॥१॥ न घडवी पायीं तुटी । मनें मिठी घातली ॥२॥ विचार तो वचना आधीं । धरूनि शुद्धी ठेविली ॥३॥ तुका म्हणे मागें भ्यालों । तरी जालों जागृत ॥४॥

८८२. आणोनियां मना । अवघ्या धांडोळिल्या खुणा । देखिला तो राणा । पंढरपूरनिवासी ॥१॥ यासी अनुसरल्या काय । घडे ऐसें वायां जाय । देखिले ते पाय । सम जीवीं राहती ॥२॥ तो देखावा हा विध । चिंतनेंचि कार्य सिद्ध । आणिकां संबंध । नाहीं पर्वकाळासी ॥३॥ तुका म्हणे खळ । होती क्षणेंचि निर्मळ । जाऊनियां मळ । वाळवंटीं नाचती ॥४॥

८८३. धरितां पंढरीची वाट । नाहीं संकट मुक्तीचें ॥१॥ वंदूं येती देव पदें । त्या आनंदें उत्साहें ॥२॥ नृत्यछंदें उडती रज । जे सहज चालतां ॥३॥ तुका म्हणे गरुड टके । वैष्णव निके संभ्रम ॥४॥

८८४. नाम घेतां मन निवे । जिव्हे अमृतचि स्त्रवे । होताती बरवे । ऐसे शकुन लाभाचे ॥१॥ मन रंगलें रंगलें । तुझ्या चरणीं स्थिरावलें । केलिया विठ्ठलें । ऐसी कृपा जाणावी ॥२॥ जालें भोजनसें दिसे । चिरा पडोनि ठेला इच्छे । धालियाच्या ऐसे । अंगा येती उद्गार ॥३॥

सुख भेटों आलें सुखा । निध सांपडला मुखा । तुका म्हणे लेखा । आतां नाहीं आनंदा ॥४॥

८८५. रुची रुची घेऊं गोडी । प्रेमसुख जाली जोडी ॥१॥ काळ जाऊं नेदूं वांयां । चिंतूं विठोबाच्या पायां ॥२॥ करूं भजन भोजन । धणी घेऊं नारायण ॥३॥ तुका म्हणे जीव धाला । होय तुझ्यानें विठ्ठला ॥४॥

८८६. वेळोवेळा हेंचि सांगे । दान मागें जगासी ॥१॥ विठ्ठल हें मंगळ वाणी । घेऊं धणी पंगतीसी ॥२॥ वेचतसे पळें पळ । केलें बळ पाहिजे ॥३॥ तुका म्हणे दुश्चित नका । राहों फुका नाड हा ॥४॥

८८७. आणीक ऐसें कोठें सांगा । पांडुरंगासारिखें ॥१॥ दैवत ये भूमंडळीं । उद्धार कली पाववितें ॥२॥ कोठें कांहीं कोठें कांहीं । शोध ठायीं स्थळासी ॥३॥ अन्यत्रींचें तीर्थीं नासे । तीर्थीं वसे वज्रलेप ॥४॥ पांडुरंगींचें पांडुरंगीं । पाप अंगीं राहेना ॥५॥ ऐसें हरें गिरिजेप्रती । गुह्य स्थिती सांगितली ॥६॥ तुका म्हणे तीर्थ क्षेत्र । सर्वत्र हें दैवत ॥७॥

८८८. पुराणींचा इतिहास । गोड रस सेविला ॥१॥ नव्हती हे आहाच बोल । मोकळें फोल कवित्व ॥२॥ भावें घ्या रे भावें घ्या रे । एकदां जा रे पंढरिये ॥३॥ भाग्यें आलेति मनुष्यदेहा । तो हा पाहा विठ्ठल ॥४॥ पापपुण्या करिल झाडा । जाइल पीडा जन्माची ॥५॥ घ्यावी हातीं टाळदिंडी । गावे तोंडीं गुणनाद ॥६॥ तुका म्हणे घटापटा । नलगे वाटा शोधाव्या ॥७॥

८८९. कर्म धर्म नव्हती सांग । उण्या अंगें पतन ॥१॥ भलत्या काळीं नामावळी । सुलभ भोळी भाविका ॥२॥ प्रायश्चित्तें पडती पायां । गाती तयां वैष्णवां ॥३॥ तुका म्हणे नुपजे दोष । करा घोष आनंदें ॥४॥

८९०. पाहा रे हें दैवत कैसें । भक्तिपिसें भाविका ॥१॥ पाचारिल्यासरिसें पावे । ऐसी सवे बराडी ॥२॥ शुष्ककाष्ठीं गुरुगुरी । लाज हरि न धरितां ॥३॥ तुका म्हणे अर्धनारी । ऐसीं धरी रूपडीं हा ॥४॥

८९१. बहुत सोसिले मागें न कळतां । पुढती काय आतां अंध व्हावें ॥१॥ एकाचे अंगीं हें ठेवावें लावून । नये भिन्नाभिन्न चांचपडों ॥२॥ कोण होईल तो ब्रह्मांडचाळक । आपणचि हाक देईल हाके ॥३॥ तुका म्हणे दिलीं चेतवूनि सुनीं । कौतुकावांचूनि नाहीं छळ ॥४॥

८९२. आश्चर्य या वाटे नसत्या छंदाचें । कैचें दिलें साचें करोनियां ॥१॥ दुजियासी तव अकळ हा भाव । करावा तो जीव साक्षी येथे ॥२॥ एकीं अनेकत्व अनेकीं एकत्व । प्रकृतिस्वभावत्व प्रमाणेंचि ॥३॥ तुका म्हणे करूं उगवूं जाणसी । कुशळ येविशीं तुम्ही देवा ॥४॥

८९३. अस्त नाहीं आतां एकचि मोहोरा । पासूनि अंधारा दुरि जालों ॥१॥ साक्षत्वें या जालों

गुणाचा देखणा । करीं नारायणा तरी खरें ॥२॥ आठवू विसरु पडियेला मागें । आलें तेचि भागें यत्न केले ॥३॥ तुका म्हणे माझा विनोद देवासी । आम्ही तुम्हां ऐसीं दोन्ही नव्हों ॥४॥

८९४. क्षर अक्षर हे तुमचे विभाग । कासयानें जग दूरी धरा ॥१॥ तैसें आम्ही नेणों पालटोंच कांही । त्यागिल्याची नाहीं मागें चाड ॥२॥ प्रतिपादिता तूं समविषयाचा । प्रसाद तो याचा पापपुण्य ॥३॥ तुका म्हणे तुम्हां नाना अवगणीं । लागे संपादणी लटिक्याची ॥४॥

८९५. सर्वरसीं मीनलें चित्त । अखंडित आनंदु ॥१॥ गोत पति विश्वंभरा । जाला हरि सोयरा ॥२॥ वोळखी ते एका नांवें । इतर वाव खंडणा ॥३॥ तुका म्हणे नांवें रूपें । दुसरीं पापें हारपलीं ॥४॥

८९६. मी हें ऐसें काय जाती । अवघड किती पाहातां ॥१॥ नाहीं होत उल्लंघन । नसतां भिन्न दुसरें ॥२॥ अंधारानें तेज नेलें । दृष्टीखालें अंतर ॥३॥ तुका म्हणे सवें देव । घेतां ठाव दावील ॥४॥

८९७. कवीश्वरांचा तो आम्हांसी विटाळ । प्रसाद वोंगळ चिवडिती ॥१॥ दंभाची आवडी बहिरट अंधळे । सेवटासि काळें होइल तोंड ॥२॥ सोन्याशेजारी तों लाखेची जतन । सतत ते गुण जैसेतैसे ॥३॥ सेव्यसेवकता न पडतां ठावी । तुका म्हणे गोवी पावती हीं ॥४॥

८९८. वाढलिया मान न मनावी निश्चिंती । भूतांचिये प्रीती भूतपण ॥१॥ म्हणऊनि मना लावावी कांचणी । इंद्रियांचे झणी ओढी भरे ॥२॥ एका एकपणें एकाचिया अंगीं । लागे रंग रंगीं मिळालिया ॥३॥ तुका म्हणे देव निष्काम निराळा । जीवदशे चाळा चळणाचा ॥४॥

८९९. माया साक्षी आम्ही नेणों भीड भार । आप आणि पर नाहीं दोन्ही ॥१॥ सत्याचियेसाठीं अवघाचि भर । नावडे व्यापार तुटीचा तो ॥२॥ पोभाळितां चरे अंतरीचें दुःख । लासें फांसें मुख उघडावें ॥३॥ तुका म्हणे नव्हे स्फीतीचा हा ठाव । निवाड्यासी देव साक्षी केला ॥४॥

९००. संता आवडे तो काळाचाही काळ । समर्थाचें बाळ जेवीं समर्थ ॥१॥ परि सत्ता तेथें नाहीं एकेविणे । मोहें न पवे सीण ऐसें राखे ॥२॥ केले अन्याय ते सांडवी उपचारें । न देखें दुसरें नाशा मूळ ॥३॥ तुका म्हणे मुख्य कल्पतरुछाया । काय नाहीं दया तये ठायीं ॥४॥

९०१. संतांच्या धिक्कारें अमंगळ जिणें । विश्वशत्रु तेणें सांडी परि ॥१॥ कुळ आणि रूप वांयां संवसार । गेला भरतार मोकलिता ॥२॥ मूळ राखे तया फळा काय उणें । चतुर लक्षणें राखों जाणे ॥३॥ तुका म्हणे सायास तो एके ठायीं । दीप हातीं तईं अवघें बरें ॥४॥

९०२. ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥१॥ नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंच वरि ॥२॥ दोरें चिरा कापे पडिला

कांचणीं । अभ्यासें सेवनीं विष पडे ॥३॥ तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥४॥

९०३. अमर आहां अमर आहां । खरें कीं पहा खोटें हें ॥१॥ न म्हणा देह माझा ऐसा । मग भरंवसा कळेल ॥२॥ कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ॥३॥ देवचि बरे देवचि बरे । तुका म्हणे खरे तुम्ही ॥४॥

९०४. काम नाहीं काम नाहीं । जालों पाहीं रिकामा ॥१॥ फावल्या त्या करूं चेष्टा । निश्चळ द्रष्टा बैसोनि ॥२॥ नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदें विव्हळतसे ॥३॥ एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं निराळा ॥४॥

९०५. हातीं घेऊनियां काठी । तुका लागला कलेवरा पाठी ॥१॥ नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळी ते ठीकाणीं ॥२॥ काढिलें तें ओढें । मागील उपचाराचें पुढें ॥३॥ नाहीं वाटों आला भेव । सुख दुःख भोगिता देव ॥४॥ याजसाठीं हें निर्वाण । केलें कसियेलें मन ॥५॥ तुका म्हणे अनुभव बरा । नाहीं तरी हस्तपाय चोरा ॥६॥

९०६. कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ॥१॥ प्रेमें छंदें नाचे डोले । हारपले देहभाव ॥२॥ एकदेशीं जीवकळा । हा सकळां सोयरा ॥३॥ तुका म्हणे उरला देव । गेला भेव त्या काळें ॥४॥

९०७. न बोलसी करा वाचा । उपाधीचा संबंध ॥१॥ एका तुमच्या नामाविण । अवघा सीण कळतसे ॥२॥ संकल्पाचे ओढी मन । पापपुण्य सवेंचि ॥३॥ तुका म्हणे नारायणीं । पावो वाणी विसांवा ॥४॥

९०८. प्रारब्धा हातीं जन । सुख सीण पावतसे ॥१॥ करितां घायाळाचा संग । अंगें अंग माखावें ॥२॥ आविसा अंगीं पीडा वसे । त्यागें असे बहु सुख ॥३॥ तुका म्हणे जीव भ्याला । अवघ्या आला बाहेरी ॥४॥

९०९. आशा ते करविते बुद्धीचा तो लोप । संदेह तें पाप कैसें नव्हे ॥१॥ आपुला आपण करावा विचार । प्रसन्न तें सार मन ग्वाही ॥२॥ नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ । होतें तें निर्मळ शुद्ध बुद्ध ॥३॥ अंधळ्यासी नये देखण्याची चाली । चाले ऐसी बोली तुका बोले ॥४॥

९१०. जळों आतां नांव रूप । माझें पाप गांठीचें ॥१॥ संतांचिया चरणरजें । उतरूं ओझें मातीचें ॥२॥ लटिक्याचा अभिमान । होता सीण पावतीत ॥३॥ तुका म्हणे अरूपींचें । सुख साचें निनांवें ॥४॥

९११. निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ॥१॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥२॥ शृंगारिलें मढें । जीवेंवीण जैसें मुडें ॥३॥ तुका म्हणे रागें ।

भलतें चावळे वाउगें ॥४॥

९१२. भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें । ऐसियासी नारायणें । उपेक्षीजे सर्वथा ॥१॥ देवा पायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव । समर्पिला जीव । नाहीं तों हा व्यभिचार ॥२॥ जगा घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें । हेंचि अभाग्य रोकडें । मूळ आणि अविश्वास ॥३॥ काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार । तुका म्हणे सार । दृढ पाय धरावे ॥४॥

९१३. भावबळें विष्णुदास । नाहीं नाश पावत ॥१॥ योगभाग्यें घरा येती । सर्व शक्ति चालत ॥२॥ पित्याचें जें काय धन । पुत्रा कोण वंचील ॥३॥ तुका म्हणे कडे बैसों । तेणें असों निर्भर ॥४॥

९१४. कोरड्या गोष्टी चावट्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल ॥१॥ कोण याचें मना आणी । ऐकों कानीं नाइकोनि ॥२॥ घरोघरीं सांगती ज्ञान । भूस सीण कांडती ॥३॥ तुका म्हणे आपुल्या मति । काय रितीं पोकळ ॥४॥

९१५. नव्हतियाचा सोस होता । झडों आतां पदर ॥१॥ देखणें तें देखियलें । आतां भलें साक्षित्वें ॥२॥ लाभ कळों आली हानि । राहों दोन्हीं निराळीं ॥३॥ तुका म्हणे एकाएकीं । हा कां लोकीं पसारा ॥४॥

९१६. सोसें वाढे दोष । जाला न पालटे कस ॥१॥ ऐसें बरवें वचन । करिता तो नारायण ॥२॥ असे प्रारब्ध नेमें । श्रमचि उरे श्रमें ॥३॥ सुख देते शांती । तुका म्हणे धरितां चित्तीं ॥४॥

९१७. काय शरीरापें काम । कृपा साधावया प्रेम । उचिताचे धर्म । भागा आले ते करूं ॥१॥ देईन हाक नारायणा । ते तों नाकळे बंधना । पंढरीचा राणा । आइकोन धांवेल ॥२॥ सातांपांचांचें गोठलें । प्रारब्धें आकारलें । आतां हें संचलें । असो भोगा सांभाळीं ॥३॥ फावली ते बरवी संधि । सावधान करूं बुद्धि । तुका म्हणे मधीं । कोठें नेघें विसावा ॥४॥

९१८. नलगे देशकाळ । मंत्रविधान सकळ । मनचि निश्चळ । करूनि करुणा भाकावी ॥१॥ येतो बैसलिया ठाया । आसनें व्यापी देवराया । निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥२॥ कल्पनेचा साक्षी । तरि आदरेंचि लक्षी । आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ॥३॥ घेणें तरि भाव । लक्षी दासाचा उपाव । तुका म्हणे जीव । जीवीं मेळविल अनंत ॥४॥

९१९. भक्तिसुख आलें नाहीं अनुभवा । तों मी ज्ञान देवा काय करूं ॥१॥ नसावें जी तुम्हीं कांहीं निश्चितीनें । माझिया वचनें अभेदाच्या ॥२॥ एकाएकीं मन नेदी समाधान । देखिल्या चरण वांचूनियां ॥३॥ तुका म्हणे वाचा गुणीं लांचावली । न राहे उगली मौन्य मज ॥४॥

९२०. मागतां विभाग । कोठें लपाल जी मग ॥१॥ संत साक्षी या वचना । त्यांसी ठाऊकिया खुणा ॥२॥ होइन धरणेकरी । मग मी रिघों नेदीं बाहेरी ॥३॥ तुका म्हणे

मी अक्षर । तुज देवपणाचा भार ॥४॥

९२१. जिंकावा संसार । येणें नांवें तरी शूर ॥१॥ येर काय तीं बापुडीं । कीर अहंकाराचीं घोडीं ॥२॥ पण ऐशा नांवें । देव धरिजेतो भावें ॥३॥ तुका म्हणे ज्यावें । सत्कीर्तीनें बरवें ॥४॥

९२२. मिठवण्याचे धनी । तुम्ही व्यवसाय जनीं ॥१॥ कोण पडे ये लिगाडीं । केलीं तैसीं उगवा कोडीं ॥२॥ केलें सांगितलें काम । दिले पाळूनियां धर्म ॥३॥ तुका म्हणे आतां । असो तुमचें तुमचे माथां ॥४॥

९२३. समर्पिली वाणी । पांडुरंगीं घेते धणी ॥१॥ पूजा होते मुक्ताफळीं । रस वोविया मंगळीं ॥२॥ धार अखंडित । ओघ चालियेला नित्य ॥३॥ पूर्णाहुति जीव । तुका घेउनि ठेला भाव ॥४॥

९२४. अवघाचि आकार ग्रासियेला काळें । एकचि निराळें हरिचें नाम ॥१॥ धरूनि राहिलों अविनाश कंठी । जीवन हें पोटीं सांठविलें ॥२॥ शरीरसंपत्ति मृगजळभान । जाईल नासोन खरें नव्हे ॥३॥ तुका म्हणे आतां उपाधीच्या नांवें । आणियेला देवें वीट मज ॥४॥

९२५. बोलणेंचि नाहीं । आतां देवाविण कांहीं ॥१॥ एकसरें केला नेम । देवा दिले क्रोध काम ॥२॥ पाहेन ते पाय । जोंवरि हे दृष्टि धाय ॥३॥ तुका म्हणे मनें । हेचि संकल्प वाहाणें ॥४॥

९२६. येथूनियां ठाव । अवघे लक्षायाचे भाव ॥१॥ उंच देवाचे चरण । तेथें जालें अधिष्ठान ॥२॥ आघातावेगळा । असे ठाव हा निराळा ॥३॥ तुका म्हणे स्थळ । धरूनि राहिलों अचळ ॥४॥

९२७. भरला दिसे हाट । अवघी वाढली खटपट । संचिताची वाट । वाटा होऊनि फांकती ॥१॥ भोगा ऐसे ठायाठाव । कर्मा त्रिविधाचे भाव । द्रष्टा येथें देव । विरहित संकल्पा ॥२॥ दिला पाहूनियां धडा । पापपुण्याचा निवाडा । आचरती गोडा । आचरणें आपुलाल्या ॥३॥ तुका म्हणे पराधीनें । जालीं ओढलिया ऋणें । तुटती बंधनें । जरि देवा आळविती ॥४॥

९२८. आला भागासी तो करीं वेवसाव । परि राहों भाव तुझ्या पायीं ॥१॥ काय चाले तुम्हीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितो ॥२॥ शरीर तें करी शरीराचे धर्म । नको देऊं वर्म चुकों मना ॥३॥ चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो आळस चिंतनाचा ॥४॥ इंद्रियें करोत आपुले व्यापार । आवडीसी थार देईं पायीं ॥५॥ तुका म्हणे नको देऊं काळा हातीं । येतों काकुळती म्हणऊनि ॥६॥

९२९. आम्हां अवघें भांडवल । येक विठ्ठल एकला ॥१॥ कायावाचामनोभावें । येथें जीवें वेंचलों ॥२॥ परतें कांहीं नेणें दुजें । तत्वबीज पाऊलें ॥३॥ तुका म्हणे संतसंगें ।

येणें रंगें रंगलों ॥४॥

९३०. साहोनियां टोले उरवावें सार । मग अंगीकार खऱ्या मोलें ॥१॥ भोगाचे सांभाळीं द्यावें कलेवर । संचिताची थार मोडूनियां ॥२॥ महत्वाचे ठायीं भोगावी अप्रतिष्ठा । विटवावें नष्टां पंचभूतां ॥३॥ तुका म्हणे मग कैंचा संवसार । जयाचा आदर तेंचि व्हावें ॥४॥

९३१. निर्वैर होणें साधनाचें मूळ । येर ते विल्हाळ सांडीं मांडीं ॥१॥ नाहीं चालों येत सोंगसंपादणी । निवडे अवसानीं शुद्धाशुद्ध ॥२॥ त्याग नांव तरी निर्विषय वासना । कार्याकारणापुरता विधि ॥३॥ तुका म्हणे राहे चिंतनीं आवडी । येणें नांवें जोडी सत्यत्वेंसीं ॥४॥

९३२. पशु ऐसे होती ज्ञानी । चर्वणीं विषयांचे ॥१॥ ठेवूनियां लोभीं लोभ । जाला क्षोभ आत्मत्वीं ॥२॥ केला आणिका वाढी पाक । खाणें ताक मूर्खासी ॥३॥ तुका म्हणे मोठा घात । वाताहात हा देह ॥४॥

९३३. कां जी धरिलें नाम । तुम्ही असोनि निष्काम ॥१॥ कोणा सांगतसां ज्ञान । ठकाठकीचें लक्षण ॥२॥ आवडीनें नाचें । आहे तरी पुढें साचें ॥३॥ तुका म्हणे प्रेम । नाहीं भंगायाचें काम ॥४॥

९३४. खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी ॥१॥ ऐसे फुकाचे उपाय । सांडोनियां वांयां जाय ॥२॥ परउपकार । एका वचनाचा फार ॥३॥ तुका म्हणे मळ । मनें सांडितां शीतळ ॥४॥

९३५. दया क्षमा शांती । तेथें देवाची वसति ॥१॥ पावें धांवोनियां घरा । राहे धरोनियां थारा ॥२॥ कीर्तनाचे वाटे । बराडिया ऐसा लोटे ॥३॥ तुका म्हणे घडे । पूजा नामें देव जोडे ॥४॥

९३६. शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवासारिखें ॥१॥ त्याचा फळे उपदेश । आणिकां दोष उफराटे ॥२॥ त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभावीं ॥३॥ तुका म्हणे सत्य सांगें । येवोत रागें येतील ते ॥४॥

९३७. माझीं मेलीं बहुवरि । तूं कां जैसा तैसा हरी ॥१॥ विठो कैसा वांचलासी । आतां सांग मजपाशीं ॥२॥ तुज देखतांचि माझा । बाप गेला आजा पणजा ॥३॥ आम्हां लागलिसे पाठी । बालत्व तारुण्य काठी ॥४॥ तुज फावलें तें मागें । कोणी नसतां वादि लागें ॥५॥ तुका म्हणे तुझ्या अंगीं । मज देखतां लागलीं अवघीं ॥६॥

९३८. आणीक कोणाचा न करीं मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥१॥ विठ्ठलावांचूनि आणीक जे वाणी । नाइकें मी कानीं आपुलिया ॥२॥ समाधानासाठीं बोलावी हे मात । परि माझें चित्त नाहीं कोठें ॥३॥ जिवाहूनि मज तेचि आवडती । आवडे ज्या चित्तीं पांडुरंग ॥४॥ तुका म्हणे माझें तोचि जाणे हित । आणिकांच्या चित्त नेदीं बोला ॥५॥

९३९. आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें ॥१॥ नाहीं

तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥२॥ आशा मारूनिया जयवंत व्हावें । तेव्हांचि निघावें सर्वांतूनि ॥३॥ तुका म्हणे जरी योगाची तांतडी । आशेची बीबुडी करीं आधीं ॥४॥

९४०. निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥१॥ निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकाची ॥२॥ तुका म्हणे ऐसा कोण उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणी ॥३॥

९४१. नामाचें चिंतन प्रगट पसारा । असाल तें करा जेथें तेथें ॥१॥ सोडवील माझा स्वामी निश्चयेसीं । प्रतिज्ञा हे दासीं केली आम्हीं ॥२॥ गुण दोष नाहीं पाहात कीर्तनीं । प्रेमें चक्रपाणी वश्य होय ॥३॥ तुका म्हणे कडू वाटतो प्रपंच । रोकडे रोमांच कंठ दाटे ॥४॥

९४२. किती या काळाचा सोसावा वळसा । लागला सरिसा पाठोपाठीं ॥१॥ लक्ष चौऱ्यांशीची करा सोडवण । रिघा या शरण पांडुरंगा ॥२॥ उपजल्या पिंडा मरण सांगातें । मरतें उपजतें सवेंचि तें ॥३॥ तुका म्हणे माळ गुंतली राहाटीं । गाडग्याची सुटी फुटलिया ॥४॥

९४३. नाम म्हणतां मोक्ष नाहीं । ऐसा उपदेश करितील कांहीं । बधिर व्हावें त्याचे ठायीं । दुष्ट वचन वाक्य तें ॥१॥ जयाचे राहिलें मानसीं । तेचि पावले तयासी । चाचपडतां मेलीं पिसीं । भलतैसीं वाचाळें ॥२॥ नवविधीचा निषेध । जेणें मुखें करिती वाद । जन्मा आले निंद्य । शूकरयाती संसारा ॥३॥ काय सांगों वेळोवेळां । आठव नाहीं त्या चांडाळा । नामासाठीं बाळा । क्षीरसागरीं कोंडिलें ॥४॥ आपुलिया नामासाठीं । लाघे शंखासुरापाठीं । फोडोनियां पोटीं । वेद चारी काढिले ॥५॥ जगीं प्रसिद्ध हे बोली । नामें गणिका तारिली । आणिकेंही उद्धरिली । पातकी महादोषी ॥६॥ जे हे पवाडे गर्जती । नाम प्रल्हादाच्या चित्तीं । जळतां बुडतां घातीं । राखें हातीं विषाचे ॥७॥ काय सांगों ऐशी कीर्ति । तुका म्हणे नामख्याती । नरकाप्रती जाती । निषेधिती तीं एक ॥८॥

९४४. गासी तरी एक विठ्ठलचि गाई । नाहीं तरि ठायीं राहें उगा ॥१॥ अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण । जाणीवेचा सीण करिसी वांयां ॥२॥ तुका म्हणे किती करावी फजिती । लाज नाहीं चित्तीं निलाजिरा ॥३॥

९४५. जयाचिये वाचे नये हा विठ्ठल । त्याचे मज बोल नावडती ॥१॥ शत्रु तो म्यां केला न म्हणे आपुला । जो विन्मुख विठ्ठला सर्वभावें ॥२॥ जयासी नावडे विठोबाचें नाम । तो जाणा अधम तुका म्हणे ॥३॥

९४६. आम्हांसी तों नाही आणीक प्रमाण । नामासी कारण विठोबाच्या ॥१॥ घालूनियां कास करितो कैवाड । वागों नेदीं आड कळिकाळासी ॥२॥ अबद्ध वांकुडें जैशातैशापरी । वाचे

हरि हरि उच्चारावें ॥३॥ तुका म्हणे आम्हां सांपडलें निज । सकळ हें बीज पुराणाचें ॥४॥

९४७. जीव तोचि देव भोजन ते भक्ति । मरण तेचि मुक्ति पाषांड्याची ॥१॥ पिंडाच्या पोषकें नागविले जन । लटिकें पुराण केल वेद ॥२॥ मना आला तैसा करिती विचार । म्हणती संसार नाहीं पुन्हां ॥३॥ तुका म्हणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती ॥४॥

९४८. भक्ताचा महिमा भक्तचि जाणती । दर्लभ या गति आणिकांसी ॥१॥ जाणोनि नेणते जाले तेणें सेखें । न बोलोनि मुखें बोलताती ॥२॥ अभेदूनि भेदु राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥३॥ टाळघोळ कथा प्रेमाचा सुकाळ । मूढ लोकपाळ तरावया ॥४॥ तुका म्हणे हें तों आहे तयांठावें । तिहीं एक्याभावें जाणीतला ॥५॥

९४९. आशा तृष्णा माया अपमानाचें बीज । नासिलिया पूज्य होइजेतें ॥१॥ अधीरासी नाहीं चालों जाता मान । दुर्लभ दर्शन धीर त्याचें ॥२॥ तुका म्हणे नाहीं आणिकासी बोल । वांयां जाय मोल बुद्धि पाशीं ॥३॥

९५०. चिंतनें सरे तो धन्य धन्य काळ । सकळ मंगळ मंगळाचें ॥१॥ संवसारसिंधु नाहीं हरिदासां । गर्भवास कैसा नेणती ते ॥२॥ जनवन ऐसें कृपेच्या सागरें । दाटला आभारें पांडुरंग ॥३॥ तुका म्हणे देवाभक्तांचें बंधन । दाखविलें भिन्न परी एक ॥४॥

९५१. मोक्षाचें आम्हासी नाहीं अवघड । तो असे उघड गांठोळीस ॥१॥ भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥२॥ ज्याचें त्यासी देणें कोणतें उचित । मानूनियां हित घेतो सुखें ॥३॥ तुका म्हणे सुखें देईं संवसार । आवडीसी थार करीं माझे ॥४॥

९५२. चिंतनासी नलगे वेळ । सर्वकाळ करावें ॥१॥ सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥२॥ पढिये सर्वोत्तमा भाव । येर वाव पसारा ॥३॥ ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥४॥

९५३. अंतरायें पडे गोविंदीं अंतर । जो जो घ्यावा भार तो तो बाधी ॥१॥ बैसलिये ठायीं आठवीन पाय । पाहीन तो ठाय तुझा देवा ॥२॥ अखंड तें खंडें संकल्पीं विकल्प । मनोजन्य पाप रज्जुसर्प ॥३॥ तुका म्हणे विश्वीं विश्वंभर वसे । राहों ऐसे दशे सुखरूप ॥४॥

९५४. एकाचिया घाट्या टोके । एका फिके उपचार ॥१॥ ऐसी सवे गोवळिया । भाव तया पढियंता ॥२॥ एकाचें तें उष्टें खाय । एका जाय ठकूनि ॥३॥ तुका म्हणे बहु सोपें । बहु रूपें अनंता ॥४॥

९५५. कोठें नाहीं अधिकार । गेले नर वांयां ते ॥१॥ ऐका हें सोपें वर्म । नलगे श्रम चिंतना ॥२॥ मृत्याचिये अंगीं छाये । उपायचि खुंटतां ॥३॥ तुका म्हणे अवघे जन । येथें मन असों द्या ॥४॥

९५६. ज्यानें ज्यानें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळें ॥१॥ सगुण निर्गुणांचा ठाव । विटे पाव धरियेले ॥२॥ अवघे साकरेचें अंग । नये व्यंग निवडितां ॥३॥ तुका म्हणे जें जें करी । तें तें हरी भोगिता ॥४॥

९५७. आचरती कर्में । ते ते काळें धर्माधर्में ॥१॥ खेळे गोवळियांसवें । करिती तें त्यांचें साहावें ॥२॥ यज्ञमुखें घांस । मंत्रपूजेसी उदास ॥३॥ तुका म्हणे चोरी । योगियांही सवें करी ॥४॥

९५८. नामाचे पवाडे बोलती पुराणें । होऊनि कीर्तनें तोचि ठेला ॥१॥ आदिनाथा कंठीं आगळा हा मंत्र । आवडीचें स्तोत्र सदा घोकी ॥२॥ आगळें हें सार उत्तमा उत्तम । ब्रह्मकर्मा नाम एक तुझें ॥३॥ तिहीं त्रिभुवनीं गमन नारदा । हातीं विणा सदा नाम मुखीं ॥४॥ परिक्षिती मृत्यु सातां दिवसांचा । मुक्त जाला वाचा उच्चारितां ॥५॥ कोळियाची कीर्ति वाढली गहन । केलें रामायण रामाआधीं ॥६॥ सगुण निर्गुण तुज म्हणे वेद । तुका म्हणे भेद नाहीं नामीं ॥७॥

९५९. भूतदयापरत्वें जया तया परी । संत नमस्कारीं सर्वभावें ॥१॥ शिकल्या बोलाचा धरिशील ताठा । तरी जासी वाटा यमपंथें ॥२॥ हिरा परिस मोहरा आणीक पाषाण । नव्हे परी जन संतां तैसी ॥३॥ सरिता वोहोळ गंगा सागरा समान । लेखी तयाहून अधम नाहीं ॥४॥ आणीक अमुप होतीं तारांगणें । रवीसी समान लेखूं नये ॥५॥ तुका म्हणे नाहीं नम्रता अंगीं । नव्हे ते फिरंगी कठिण लोह ॥६॥

९६०. आणीक मज कांहीं नावडती मात । एका पंढरीनाथावांचूनियां ॥१॥ त्याचीच कथा आवडे कीर्तन । तें मज श्रवण गोड लागे ॥२॥ तुका म्हणे संत म्हणोत भलतें । विठ्ठलापरतें न मनीं कांहीं ॥३॥

९६१. ठेवा जाणीव गुंडून । येथें भावचि प्रमाण ॥१॥ एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥२॥ तर्कवितर्कासी । ठाव नलगे सायासीं ॥३॥ तुका म्हणे भावेंविण । अवघा बोलती तो सीण ॥४॥

९६२. येथें दुसरी न सरे आटी । देवा भेटी जावया ॥१॥ तोचि ध्यावा एक चित्तें । करूनि रितें कलेवर ॥२॥ षड्ऊर्मी हृदयांत । यांचा अंत पुरवूनि ॥३॥ तुका म्हणे खुंटे आस । तेथें वास करी तो ॥४॥

९६३. मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता ॥१॥ सुख पावे शांती धरूनि एकांत । दु:खी तो लोकांत दंभ करी ॥२॥ तुका म्हणे लागे थोडाच विचार । परी हे प्रकार नागविती ॥३॥

९६४. कानीं धरी बोल बहुतांचीं मतें । चाट त्यापरतें आणीक नाहीं ॥१॥ पावेल गौरव

वोढाळाचे परी । दंड पाठीवरी यमदूतांचे ॥२॥ शब्दज्ञानी एक आपुल्याला मतें । सांगती वेदान्त भिन्नभावें ॥३॥ तुका म्हणे एक भाव न धरिती । पडिली हे माती त्यांचे तोंडीं ॥४॥

९६५. देवा ऐकें हे विनंती । मज नको रे हे मुक्ति । तया इच्छा गति । हेंचि सुख आगळें ॥१॥ या या वैष्णवांचे घरीं । प्रेमसुख इच्छा करी । रिद्धिसिद्धि द्वारीं । कर जोडूनि तिष्ठती ॥२॥ नको वैकुंठींचा वास । असे तया सुखा नास । अद्भुत हा रस । कथाकाळीं नामाचा ॥३॥ तुझ्या नामाचा महिमा । तुज न कळे मेघश्यामा । तुका म्हणे आम्हां । जन्म गोड यासाठीं ॥४॥

९६६. न पूजीं आणिकां देवां न करीं त्यांची सेवा । न मनीं या केशवाविण दुजें ॥१॥ काय उणें जालें मज तया पायीं । तें मी मागों काई कवणासी ॥२॥ आणिकांची कीर्ति नाइके न बोलें । चाड या विठ्ठलेंविण नाहीं ॥३॥ न पाहें लोचनीं श्रीमुखावांचूनि । पंढरी सांडूनि नवजें कोठें ॥४॥ न करीं कांहीं आस मुक्तीचे सायास। न भे संसारास येतां जातां ॥५॥ तुका म्हणे कांहीं व्हावे ऐसें जीवा । नाहीं या केशवाविण दुजें ॥६॥

९६७. नव्हे खळवादी मताचि पुरता । सत्याची हे सत्ता उपदेश ॥१॥ साक्षत्वेंसि मना आणावीं उत्तरें । परिपाकीं खरें खोटें कळे ॥२॥ नव्हे एकदेशी शब्द हा उखता । ब्रह्मांडापुरता घेईल त्यासी ॥३॥ तुका विनवणी करी जाणतियां । बहुमतें वांयां श्रमों नये ॥४॥

९६८. कथा करोनियां द्रव्य देती घेती । तयां अधोगति नरकवास ॥१॥ रवरव कुंभपाक भोगिती यातना । नये नारायणा करुणा त्यांची ॥२॥ असिखड्गधारा छेदिती सर्वांग । तप्तभूमी अंग लोळविती ॥३॥ तुका म्हणे तया नरक न चुकती । सांपडले हातीं यमाचिया ॥४॥

९६९. नाइकावे कानीं तयाचे ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ॥१॥ वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण । दुःख पावे सीण श्रोता वक्ता ॥२॥ अहं ब्रह्म म्हणोनि पाळीतसे पिंडा । न बोलावें भांडा तयासवें ॥३॥ वेदबाह्य लंड बोले जो पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥४॥ तुका म्हणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठ त्याहूनि श्वपच तो ॥५॥

९७०. वेदविहित तुम्ही आइका हो कर्में । बोलतों तीं वर्में संतांपुढें ॥१॥ चारी वर्ण जाले एकाचिये अंगीं । पापपुण्य भागीं विभागिले ॥२॥ प्रथम पाउलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ॥३॥ आंबे बोरी वड बांभुळा चंदन । गुणागुण भिन्न अग्नि एक ॥४॥ तुका म्हणे मन उन्मन जों होय । तोंवरि हे सोय विधि पाळीं ॥५॥

९७१. तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥१॥ तें आम्हीं देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांचीं ॥२॥ जीवांचें जीवन सुखाचें शेजार । उभें कटीं कर ठेवूनियां ॥३॥ जगाचा जनिता कृपेचा सागर । दीनां लोभापर दुष्टां काळ ॥४॥ सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तोचि असे ॥५॥ तुका म्हणें

नाहीं श्रुती आतुडलें । आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥६॥

९७२. माझे मनोरथ पावले जैं सिद्धी । तईं पायीं बुद्धि स्थिरावली ॥१॥ समाधान जीव राहिला निश्चळ । गेली हळहळ स्मरणें हे ॥२॥ त्रिविध तापाचें जालेंसे दहन । सुखावलें मन प्रेमसुखें ॥३॥ महालाभ वाचे वसे पांडुरंग । अंगोअंगीं संग अखंडित ॥४॥ जीवनाचा जाला ओलावा अंतरीं । विश्व विश्वंभरीं मावळलें ॥५॥ तुका म्हणे माप भरूं आलें सिगे । धारबोळ गंगे पूर वाहे ॥६॥

९७३. कृपेचीं उत्तरें देवाचा प्रसाद । आनंदें आनंद वाढवावा ॥१॥ बहुतांच्या भाग्यें लागलें जहाज । येथें आतां काज लवलाहो ॥२॥ अलभ्य तें आलें दारावरी फुका । येथें आता चुका न पाहिजे ॥३॥ तुका म्हणे जिव्हाश्रवणाच्या द्वारें । माप भरा बरें सिगेवरी ॥४॥

९७४. पापपुण्यसुखदुःखाचीं मंडळें । एक एका बळें धांव घेती ॥१॥ कवतुक डोळां पाहिलें सकळ । नाचवितो काळ जीवांसी तो ॥२॥ स्वर्गाचिया भोगें सरता नरक । मागें पुढें एक एक दोन्ही ॥३॥ तुका म्हणे भय उपजलें मना । घेईं नारायणा कडिये मज ॥४॥

९७५. वचना फिरती अधम जन । नारायण तो नव्हे ॥१॥ केला असतां अंगीकार । न मनी भार समर्थ ॥२॥ संसाराचा नाहीं पांग । देवें सांग सकळ ॥३॥ तुका म्हणे कीर्ति वाणूं । मध्यें नाणूं संकल्प ॥४॥

९७६. कथा करोनियां मोल ज्यापें घेती । तेही दोघे जाती नरकामध्यें ॥१॥ ब्रह्म पूर्ण करा ब्रह्म पूर्ण करा । अखंड स्मरा रामराम ॥२॥ मधुरवाणीच्या नका पडों भरी । जाल यमपुरी भोगावया ॥३॥ तुका म्हणे करीं ब्रह्मांड ठेंगणें । हात पसरी जिणें धिग त्याचें ॥४॥

९७७. गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ॥१॥ तैसे जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीविण ॥२॥ रुची नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ॥३॥ अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचेंचि नाम ॥४॥ तुका म्हणे तारा । नाव तंबुऱ्याच्या सारा ॥५॥

९७८. नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥१॥ हेंचि शूरत्वाचें अंग । हारी आणिला श्रीरंग ॥२॥ अवघा जाला पण । लवण सकळां कारण ॥३॥ तुका म्हणे पाणी । पातळपणें तळा आणी ॥४॥

९७९. आपुल्या महिमानें । धातु परिसें केलें सोनें ॥१॥ तैसे न मनीं माझे आतां । गुणदोष पंढरिनाथा ॥२॥ गांवामागील वोहोळ । गंगा न मनी अमंगळ ॥३॥ तुका म्हणे माती । केली कस्तुरीनें सरती ॥४॥

९८०. तक्र शिष्या मान । दुधा म्हणे नारायण ॥१॥ ऐशीं ज्ञानाचीं डोंबडें । आशा विटंबिलीं मूढें ॥२॥ उपदेश तो जगा । आपण सोंवळा इतका मांगा ॥३॥ रसनाशिश्नाचे

अंकित । तुका म्हणे वरदळ स्फीत ॥४॥

९८१. ब्रह्मचारी धर्म घोकावीं अक्षरें । आश्रमीं विचार षट्कर्मीं ॥१॥ वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ॥२॥ परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें याति धर्म कुळ नाहीं ॥३॥ बोले वर्म जो चाले याविरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ॥४॥ तुका म्हणें कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ॥५॥

९८२. आम्ही क्षेत्रींचे संन्यासी । देह भरित हृषीकेशी । नाहीं केली ऐशी । आशाकामबाहेरी ॥१॥ आलें अयाचित अंगा । सहज तें आम्हां भागा । दाता पांडुरंगा । ऐसा करितां निश्चिती ॥२॥ दंड धरिला दंडायमान । मुळीं मुंडिलें मुंडण । बंदी बंदाची कौपीन । बहिरवास औटडें ॥३॥ काळें साधियेला काळ । मन करूनि निश्चळ । लौकिकीं विटाळ । धरूनि असों एकांत ॥४॥ कार्यकारणाची चाली । वाचावाचत्वें नेमिली । एका नेमें केली । स्वरूपींच वोळखी ॥५॥ नव्हे वेषधारी । तुका आहाच वरिवरि । आहे तैसीं बरीं । खंडें निवडी वेदांचीं ॥६॥

९८३. निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोपी गुहा ॥१॥ कोठेंही चित्तासी नसावे बंधन । हृदयीं नारायण सांठवावा ॥२॥ नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियदमीं ॥३॥ तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥४॥

९८४. याचि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिष ॥१॥ मना अंगीं पुण्य पाप । शुभ उत्तम संकल्प ॥२॥ बीजाऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें ॥३॥ तुका म्हणे चित्त । शुद्ध करावें हे हीत ॥४॥

९८५. कुशळ वक्ता नव्हे जाणीव तो श्रोता । राहे भाव चित्ता धरोनियां ॥१॥ धन्य तो जगीं धन्य तो जगीं । ब्रह्म तया अंगीं वसतसे ॥२॥ न धोवी तोंड न करी अंघोळी । जपे सदाकाळीं रामराम ॥३॥ जप तप ध्यान नेणे योग युक्ती । कृपाळु जो भूतीं दयावंत ॥४॥ तुका म्हणे होय जाणोनि नेणता । आवडे अनंता जीवाहूनि ॥५॥

९८६. म्हातारपणीं थेटें पडसें खोकला । हात कपाळाला लावुनि बैसे ॥१॥ खोबरीयाची वाटी जालें असे मुख । गळतसे नाक श्लेष्मपुरी ॥२॥ बोलों जातां शब्द नयेचि हा नीट । गडगडी कंठ कफ भारी ॥३॥ सेजारी म्हणती मरेना कां मेला । आणिला कांटाळा येणें आम्हां ॥४॥ तुका म्हणे आतां सांडुनि सर्व काम । स्मरा राम राम क्षणक्षणा ॥५॥

९८७. बाळपणीं ऐसीं वरुषें गेलीं बारा । खेळतां या पोरा नानामतें ॥१॥ विटी दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडीं । चंपे पेंड घडी एकीबेकी ॥२॥ हमामा हुंबरी पकव्याच्या बारे । खेळे जंगी भोंवरे चुंबाचुंबी ॥३॥ सेलडेरा आणि निरसभोंवडी । उचली बाळे धोंडीं अंगबळें ॥४॥ तुका म्हणे ऐसें बाळपण गेलें । मग तारुण्य आलें गर्वमूळ ॥५॥

९८८. तारुण्याच्या मदें न मानी कोणासी । सदा मुसमुसी धुळी जैसा ॥१॥ अठोनि

वेठोनि बांधला मुंडासा । फिरतसे म्हैसा जनामधीं ॥२॥ हातीं दीडपान वरती करी मान । नाहीं तो सन्मान भलियांसी ॥३॥ श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं । पाहे परनारी पापदृष्टी ॥४॥ तुका म्हणे ऐसी थोर हानी जाली । करितां टवाळी जन्म गेला ॥५॥

९८९. काय माझें नेती वाईट म्हणोन । करूं समाधान काशासाठीं ॥१॥ काय मज लोक नेतील परलोका । जातां कोणी एक निवारील ॥२॥ न म्हणें कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ॥३॥ सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥४॥ तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥५॥

९९०. काळाचिये सत्ता ते नाहीं घटिका । पंढरीनायका आठवितां ॥१॥ सदा काळ गणना करी आयुष्याची । कथेचे वेळेची आज्ञा नाहीं ॥२॥ याकारणें माझ्या विठोबाची कीर्ति । आहे हे त्रिजगतीं थोर वाट ॥३॥ तुका म्हणे जन्मा आलियाचें फळ । स्मरावा गोपाळ तेंचि खरें ॥४॥

९९१. घरोघरीं जाले कवि । नेणे प्रसादाची चवी ॥१॥ लंडा भूषणांची चाड । पुढें न विचारी नाड ॥२॥ काढावें आइतें । तेंचि जोडावें स्वहितें ॥३॥ तुका म्हणे कळे । अहाच झांकतील डोळे ॥४॥

९९२. नये पाहों मुख मात्रागमन्याचें । तैसें अभक्ताचें गुरुपुत्रा ॥१॥ म्हणऊनि बरें धरितां एकांत । तेणें नव्हे घात भजनासी ॥२॥ नये होऊं कदा निंदकाची भेटी । जया द्वैत पोटीं चांडाळाच्या ॥३॥ तुका म्हणे नका बोलों त्यासी गोष्टी । जयाचिया दृष्टी पाप वाढे ॥४॥

९९३. जैसीं तैसीं तरी । शरणागतें तुझीं हरी ॥१॥ आतां न पाहिजे केलें । ब्रीद लटिकें आपुलें ॥२॥ शुद्ध नाहीं चित्त । परी म्हणवितों भक्त ॥३॥ मज कोण पुसे रंका । नाम सांगे तुझें तुका ॥४॥

९९४. नाशिवंत देह नासेल हा जाणा । कां रे उच्चाराना वाचे नाम ॥१॥ नामेंचि तारिले कोट्यान हे कोटी । नामें हे वैकुंठीं बैसविले ॥२॥ नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं । तें कां तुम्हीं मनीं आठवाना ॥३॥ तुका म्हणे नाम वेदांसी आगळें । तें दिलें गोपाळें फुकासाठी ॥४॥

९९५. आळविती बाळें । माते तें सुख आगळें ॥१॥ द्यावें आवडी भातुकें । पाहे निवे कवतुकें ॥२॥ लेववूनि अळंकार । दृष्टी करावी सादर ॥३॥ आपुलिये पदीं । बैसवूनि कोडें वंदी ॥४॥ नेदी लागों दिठी । उचलोनि लावी कंठीं ॥५॥ तुका म्हणे लाभा । वारी घ्या वो पद्मनाभा ॥६॥

९९६. तप तीर्थ दान व्रत आचरण । गातां हरिगुण वारूं नये ॥१॥ कोटि कुळें त्याची वाटुली पाहाती । त्या तया घडती ब्रह्महत्या ॥२॥ आपुलिया पापें न सुटे सायासें । कोणा काळें ऐसें निस्तरेल ॥३॥ व्हावें साह्य तया न घालावें भय । फुकासाठीं पाहें लाभ घात ॥४॥ तुका म्हणे हित माना या वचना । सुख दुःख जाणा साधे फुका ॥५॥

९९७. देवासाठीं जाणा तयासीच आटी । असेल ज्या गांठीं पुण्यराशी ॥१॥ निर्बळा पाठवी बळें वाराणसी । मेला आला त्यासी अर्ध पुण्य ॥२॥ कथे निद्राभंग करावा भोजनीं । तया सुखा धणी पार नाहीं ॥३॥ यागी ऋण घ्यावें द्यावें सुख लाहीं । बुडतां चिंता नाहीं उभयतां ॥४॥ तुका म्हणे वर्म जाणोनि करावें । एक न घालावें एकावरी ॥५॥

९९८. अग्रीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे आंतु । होय शुद्ध न पावे घातु । पटतंतुप्रमाणें ॥१॥ बाह्यरंगाचें कारण । मिथ्या अवघेंचि भूषण । गर्व ताठा हें अज्ञान । मरण सवें वाहातसे ॥२॥ पुरें मातलिया नदी । लव्हाळा नांदे जीवनसंधी । वृक्ष उन्मळोनि भेदी । परि तो कधीं भंगेना ॥३॥ हस्ती परदळ जो भंगी । तया पायीं न मरे मुंगी । कोण जाय संगीं । पाणोवाणी तयाच्या ॥४॥ पिटितां घणें वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा । तैशा काय तगती गारा । तया थोरा होऊनि ॥५॥ लीन दीन हेंचि सार । भव उतरावया पार । बुडे माथां भार । तुका म्हणे वाहोनि ॥६॥

९९९. आम्ही वीर झुंझार । करूं जमदाढे मार । थापटिले भार । मोड जाला दोषांचा ॥१॥ जाला हाहाकार । आले अंकित जुंझार । शंखचक्राचे शृंगार । कंठीं हार तुळसीचे ॥२॥ रामनामांकित बाण । गोपी लाविला चंदन । झळकती निशाण । गरुडटके पताका ॥३॥ तुका म्हणे काळ । जालों जिंकोनि निश्चळ । पावला सकळ । भोग आम्हां आमुचा ॥४॥

१०००. आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना ॥१॥ आहे तें अधीन आपुले हातीं । आणिकां ठेविती काय बोला ॥२॥ जाणतिया पाठीं लागला उपाध । नेणता तो सिद्ध भोजनासी ॥३॥ तुका म्हणे भय बांधलें गांठीं । चोर लागे पाठी दुम तया ॥४॥

१००१. आणिकांसी तारी ऐसा नाहीं कोणी । धड तें नासोनि भलता टाकी ॥१॥ सोनें शुद्ध होतें अविट तें घरीं । नासिलें सोनारीं अळंकारीं ॥२॥ ओल शुद्ध काळीं काळें जिरें बीज । कैचे लागे निज हाता तेथें ॥३॥ एक गहू करिती अनेक प्रकार । सांजा दिवसीं क्षीर घुगरिया ॥४॥ तुका म्हणे विषा रुचि एका हातीं । पाधानी नासिती नवनीत ॥५॥

१००२. वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ॥१॥१॥ कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥२॥ काय मानुनियां राहिले निश्चिंती । काय जाब देती यमदूतां ॥३॥ कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥४॥ काय हातीं नाहीं करील तयासी । काय जालें यांसी काय जाणों ॥५॥ कां हीं नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ॥६॥ काय मोल यासी लागे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ॥७॥ तुका म्हणे कां हीं भोगितील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं ॥८॥

१००३. काय एकां जालें तें कां नाहीं ठावें । काय हें सांगावें काय म्हूण ॥१॥ देखतील

डोळां ऐकती कानीं । बोलिलें पुराणीं तेंही ठावें ॥२॥ काय हे शरीर साच की जाणार । सकळ विचार जाणती हा ॥३॥ कां हें कळों नये आपुलें आपणा । बाळत्व तारुण्य वृद्धदशा ॥४॥ कां हें आवडलें प्रियापुत्रधन । काय कामा कोण कोणा आलें ॥५॥ कां हें जन्म वांयां घातलें उत्तम । कां हें रामराम न म्हणती ॥६॥ काय भुली यांसी पडली जाणतां । देखती मरतां आणिकांसी ॥७॥ काय करिती हे बांधलिया काळें । तुका म्हणे बळें वज्रपाशीं ॥८॥

१००४. जुंझार ते एक विष्णुदास जगीं । पापपुण्य अंगीं नातळें त्यां ॥१॥ गोविंद आसनीं गोविंद शयनीं । गोविंद त्यां मनीं बैसलासे ॥२॥ ऊर्ध्वपुंड्र भाळ कंठीं शोभे माळ । कांपिजे कळिकाळ तया भेणें ॥३॥ तुका म्हणे शंखचक्रांचे शृंगार । नामामृतसार मुखामाजी ॥४॥

१००५. जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित । पुढिलांचा घात इच्छितसे ॥१॥ संचितासी जाय मिळोनियां खोडी । पतनांचे जोडीवरी हांव ॥२॥ बांधलें गांठीं तें लागतें भोगावें । ऐसियासी देवें काय कीजे ॥३॥ तुका म्हणे जया गांवां जाणें जया । पुसोनियां तया वाट चाले ॥४॥

१००६. मानी भक्तांचे उपकार । ऋणीया म्हणवी निरंतर । केला निर्गुणीं आकार । कीर्ति मुखें वर्णितां ॥१॥ म्हणोनि जया जे वासना । ते पुरवितो पंढरिराणा । जाला भक्तांचा आंदणा । ते उपकार फेडावया ॥२॥ अंबऋषीकारणें । जन्म घेतले नारायणें । एवढें भक्तीचें लाहाणें । दास्य करी दासाचें ॥३॥ म्हणियें करिता शंका न धरी । रक्षपाळ बळिच्या द्वारीं । भक्तीचा आभारी । रीघ न पुरे जावया ॥४॥ अर्जुनाचे रथवारु । ते वागवी सर्वेश्वरु । एवढे भक्तीचे उपकारु । मागें मागें हिंडतसे ॥५॥ पुंडलिकाचे द्वारीं । सम पाउलें विटेवरी । न वजे कट करीं । धरूनि तेथें राहिला ॥६॥ भाव भक्तीचा अंकित । नाम साजे दीनानाथ । म्हणोनि राहिला निवांत । तुका चरण धरोनि ॥७॥

१००७. सांगों जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ॥१॥ त्यांचा आम्हांसी कांटाळा । पाहों नावडती डोळां ॥२॥ रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ॥३॥ तुका म्हणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ॥४॥

१००८. ठाकलोंसें द्वारीं । उभा याचक भिकारी ॥१॥ मज भीक कांहीं देवा । प्रेम भातुकें पाठवा ॥२॥ याचकाचा भार । घेऊं नये येरझार ॥३॥ तुका म्हणे दान । सेवा घेतल्या वांचून ॥४॥

१००९. ऐसें कां जालें तें मजही न कळे । कीर्तनाचे रळेपळे जगीं ॥१॥ कैसें तुम्हां देवा वाटतसे बरें । संतांचीं उत्तरें लाजविलीं ॥२॥ भाविकां कंटक करिताती पीडा । हा तंव रोकडा अनुभव ॥३॥ तुका म्हणे नाम निर्वाणीचा बाण । याचा अभिमान नाहीं तुम्हां ॥४॥

१०१०. तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे । आम्हांसी कां डोळे कान दिले ॥१॥ नाइकवे तुझी अपकीर्ति देवा । अव्हेरिली सेवा न देखवे ॥२॥ आपुले पोटीं तों राखियेला

वाव । आम्हांसी कां भाव अल्प दिला ॥३॥ तुका म्हणे दुःखी असें हें कळों द्या । आपुलिया धंद्या मन नेघे ॥४॥

१०११. अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥१॥ विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ॥२॥ माझी कोणी न धरूं शंका । ऐसें हो कां निर्द्वंद्व ॥३॥ तुका म्हणे जें जें भेटें । तें तें वाटे मी ऐसें ॥४॥

१०१२. सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥१॥ सारा अवघें गाबाळ । डोळ्याआडील पडळ ॥२॥ शुद्ध भावावीण । जो जो केला तो तो सीण ॥३॥ तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ॥४॥

१०१३. सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥१॥ येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥२॥ अंतरींचे बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रह्मांडाचा ॥३॥ तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्त काळ घडी आल्याविण ॥४॥

१०१४. काय वानूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवितसे ॥१॥ थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे सिवों कैसें लोखंडासी ॥२॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती परउपकारें ॥३॥ भूताची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥४॥ तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्त्रवतसे ॥५॥

१०१५. जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥१॥ तुम्हीं सांभाळिलें संतीं । भय निरसली खंती ॥२॥ कृतकृत्य जालों । इच्छा केली ते पावलों ॥३॥ तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ॥४॥

१०१६. काय पुण्यराशी । गेल्या भेदूनि आकाशीं ॥१॥ तुम्ही जालेति कृपाळ । माझा केला जी सांभाळ ॥२॥ काय वोळलें संचित । ऐसें नेणों अगणित ॥३॥ तुका म्हणे नेणें । काय केलें नारायणें ॥४॥

१०१७. असे येथेंचि या दिनें । भाग्यहीनें सकळां ॥१॥ भांडवल एवढें गांठी । नाम कंठीं धरियेलें ॥२॥ आणिक तें दुजें कांहीं । मज नाहीं यावरी ॥३॥ तुका म्हणे केला कोणें । एवढा नेणें लौकिक ॥४॥

१०१८. गाय नाचें वाहें टाळी । साधन कळी उत्तम हें ॥१॥ काय जाणों तरले किती । नाव आइती या बैसा ॥२॥ सायासाचें नाहीं काम । घेतां नाम विठोबाचें ॥३॥ तुका म्हणे निर्वाणीचें । शस्त्र साचें हें एक ॥४॥

१०१९. सर्व काळ माझें चित्तीं । हेचि खंती राहिली ॥१॥ बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवें ॥२॥ वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ॥३॥ तुका म्हणे

वेध जाला । अंगा आला श्रीरंग ॥४॥

१०२०. जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥१॥ दुःख पावायाचें मूळ । राहाणी ठाव नाहीं ताळ ॥२॥ माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥३॥ तुका म्हणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥४॥

१०२१. अवघा तो शकुन । हृदयीं देवाचें चिंतन ॥१॥ येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥२॥ छंद हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥३॥ तुका म्हणे हरिच्या दासां । शुभ काळ अवघ्या दिशा ॥४॥

१०२२. ब्रह्मरूपाचीं कर्में ब्रह्मरूप । विरहित संकल्प होती जाती ॥१॥ ठेविलिया दिसे रंगाऐसी शिळा । उपाधि निराळा स्फटिक मणि ॥२॥ नानाभाषामतें आळविता बाळा । प्रबोध तो मूळा जननीठायीं ॥३॥ तुका म्हणे माझें नमन जाणतिया । लागतसें पायां वेळोवेळां ॥४॥

१०२३. नाहीं सुगंधाची लागत लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां ॥१॥ वाऱ्याहातीं माप चाले सज्जनाचें । कीर्ति मुख त्याचें नारायण ॥२॥ प्रभा आणि रवि काय असे आन । उदयीं तंव जन सकळ साक्षी ॥३॥ तुका म्हणे बरा सत्याचा सायास । नवनीता नाश नाहीं पुन्हां ॥४॥

१०२४. तीर्थाटणें एकें तपें हुंबरती । नाथिले धरिती अभिमान ॥१॥ तैसे विष्णुदास नव्हती साबडे । एकाचिया पडे पायां एक ॥२॥ अक्षरें आणिती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावें ॥३॥ तुका म्हणे विधिनिषेधाचे डोहीं । पडले त्यां नाहीं देव कधीं ॥४॥

१०२५. पट्टे ढाळूं आम्ही विष्णुदास जगीं । लाहों नेदूं अंगीं पापपुण्य ॥१॥ निर्भर अंतरीं सदासर्वकाळ । घेतला सकळ भार देवें ॥२॥ बळिवंत जेणें रचिलें सकळ । आम्हां त्याचें बळ अंकितासी ॥३॥ तुका म्हणे आम्ही देखतचि नाहीं । देवाविण कांहीं दुसरें तें ॥४॥

१०२६. कथेचा उल्लंघ तो अधमां अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो ॥१॥ कासया जीऊन जाला भूमीभार । अनउपकार माते कुसी ॥२॥ निद्रेचा आदर जागरणीं वीट । त्याचे पोटीं कीट कुपथ्याचें ॥३॥ तुका म्हणे दोन्हीं बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ॥४॥

१०२७. सांडोनियां दों अक्षरां । काय करूं हा पसारा । विधिनिषेधाचा भारा । तेणें दातारा नातुडसी ॥१॥ म्हणोनि बोबड्या उत्तरीं । वाचे जपें निरंतरीं । नाम तुझें हरी । भवसागरीं तारूं तें ॥२॥ सर्वमय ऐसें वेदाचें वचन । श्रुति गर्जती पुराणें । नाहीं आणीक ध्यान । साधनीं मज चाड ॥३॥ शेवटीं हे ब्रह्मार्पण । याचि मंत्राचें कारण । काना मात्रा वांयांविण । तुका म्हणे बिंदुलीं ॥४॥

१०२८. हरिनामाचें करूनि तारूं । भवसिंधु पार उतरलों ॥१॥ फावलें फावलें आतां । पायीं संतां विनटलों ॥२॥ हरिनामाचा शस्त्र घोडा । संसार गाढा छेदिला ॥३॥ हरिनामाचें धनुष्यकांडें । विन्मुख तोंडें कळिकाळ ॥४॥ येणेंचि बळें सरते आम्ही । हरिचे नामें लोकीं

तिहीं ॥५॥ तुका म्हणे जालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ॥६॥

१०२९. नव्हे हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी । ऐकावी कानीं संतजनीं ॥१॥ आरुष हा शब्द देवाचा प्रसाद । करविला वाद तैसा केला ॥२॥देहपिंड दान दिला एकसरें । मुळिचें तें खरें टांकसाळ ॥३॥ तुका म्हणे झरा लागला नवनीत । सेविलीया हित पोट धाय ॥४॥

१०३०. घटीं अलिप्त असे रवि । अग्नि काष्ठामाजी जेवीं । तैसा नारायण जीवीं । जीवसाक्षी वर्तनें ॥१॥ भोग ज्याचे तया अंगीं । भिन्न प्रारब्ध जगीं । विचित्र ये रंगीं । रंगें रंगला गोसावी ॥२॥ देह संकल्पासारिखें । एकएकांसी पारिखें । सुख आणि दु:खें । अंगीं कर्में त्रिविंध ॥३॥ तुका म्हणे कोडें । नकळे तयासी सांकडें । त्याचिया निवाडें । उगवे केलें विंदान ॥४॥

१०३१. सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय ॥१॥ चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥२॥ नेत्रीं जळ वाहों सदां । आनंदाचे रोमांच ॥३॥ तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥४॥

१०३२. जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥१॥ डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥२॥ सरसावलें मन । केले सोज्ज्वळ लोचन ॥३॥ तुका म्हणे सवें । आतां असिजेत देवें ॥४॥

१०३३. ताहाने तहान प्याली । भूक भुकेनें खादली ॥१॥ जेथें तेंच नाहीं झालें । झाडा घेतला विठ्ठलें ॥२॥ वास वासनेची नाहीं । मन पांगुळलें पायीं ॥३॥ शेष उरला तुका । जीवी जीवा जाला चुका ॥४॥

१०३४. पाणिमात्र दिगंबरा । हस्त करा सारिखे ॥१॥ आवश्यक देव मनीं । चिंतनींच सादर ॥२॥ भिक्षा कामधेनु ऐशी । अवकाशीं शयन ॥३॥ पांघरोनि तुका दिशा । केला वास अलक्षीं ॥४॥

१०३५. विषयीं विसर पडिला नि:शेष । अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥१॥ माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥२॥ लाभाचिया सोसें पुढें चाली मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ॥३॥ तुका म्हणे गंगासागरसंगमीं । अवघ्या जाल्या ऊर्मि एकमय ॥४॥

१०२६. राम कृष्ण नाम मांडीं पां वोळी । तेणें होईल होळी पापा धुनी ॥१॥ ऐसा मना छंद लावीं रे अभ्यास । जया नाहीं नास ब्रह्मरसा ॥२॥ जोडी तरी ऐसी करावी न सरे । पुढें आस उरे मागुताली ॥३॥ तुका म्हणे ऐसें धरा कांहीं मनीं । यातायाती खाणीं चुकतील ॥४॥

१०३७. परमार्थी तो न म्हणावा आपुला । सलगी धाकुला हेळूं नये ॥१॥ थोडासि स्फुलिंग बहुत दावाग्नि । वाढतां इंधनीं वाढविला ॥२॥ पितियानें तैसा वंदावा कुमर । जयाचें अंतर देव वसे ॥३॥ तुका म्हणे शिरीं वाहावें खापर । माजी असे सार नवनीत ॥४॥

१०३८. ऐसा ज्याचा अनुभव । विश्व देव सत्यत्वें ॥१॥ देव तया जवळी असे । पाप नासे दर्शनें ॥२॥ कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ॥३॥ तुका म्हणे भेदाभेद । गेला वाद खंडोनि ॥४॥

१०३९. सेवा ते आवडी उच्चारावे नाम । भेदाभेद काम निवारूनि ॥१॥ नलगे हालावें चालावें बाहेरी । अवघेंचि घरीं बैसलिया ॥२॥ देवाचीच नामें देवाचिये शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावीं ॥३॥ तुका म्हणे होय भावेंचि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ॥४॥

१०४०. ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठीलागे ॥१॥ म्हणोनि अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥२॥ वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकामधीं ॥३॥ पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥४॥ आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करती रागें गुरगुरु ॥५॥ तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥६॥

१०४१. पंढरीची वाट पाहें निरंतर । निढळावरी कर ठेवूनियां ॥१॥ जातियां निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरा सांडियेलें ॥२॥ पैल कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिकें चतुर्भुज ॥३॥ तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटसी केधवां पांडुरंगा ॥४॥

१०४२. ऐसी जोडी करा राम कंठीं धरा । जेणें चुके फेरा गर्भवास ॥१॥ नासिवंत आटी प्रियापुत्रधन । बीज ज्याचा सीण तेंचि फळ ॥२॥ नाव धड करा सहस्त्र नामांची । जे भवसिंधूची थडी पावे ॥३॥ तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी । भाता भरा हरिरामबाणीं ॥४॥

१०४३. पाहें मजकडे भरोनियां दृष्टी । बहुत हिंपुटी जालों माते ॥१॥ करावेंसें वाटे जीवा स्तनपान । नव्हे हें वचन शृंगारिक ॥२॥ सत्यासाठी माझी शब्दविवंचना । जोडिल्या वचनाचें तें नव्हे ॥३॥ तुका म्हणे माझी कळवळ्याची कींव । भागलासे जीव कर्तव्यानें ॥४॥

१०४४. तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥१॥ आझुनि कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहातोसि ॥२॥ आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तहानभूकें ॥३॥ प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवे वो विठाई वोरसोनि ॥४॥ तुका म्हणे माझें कोण हरिल दुःख । तुजविण एक पांडुरंगा ॥५॥

१०४५. भक्ति तों कठिण शुळावरिल पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥१॥ जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ॥२॥ कामावलें तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ॥३॥ तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥४॥

१०४६. पापी म्हणों तरि आठवितों पाय । दोष बळी काय तयाहूनि ॥१॥ ऐशा विचाराचे घालूनि कोंडणीं । काय चक्रपाणी निजलेती ॥२॥ एक वेळ जेणें पुत्राच्या उद्देशें । घेतल्याचें

कैसें नेलें दु:ख ॥३॥ तुका म्हणे अहो वैकुंठनायका । चिंता कां सेवका तुमचिया ॥४॥

१०४७. उगविल्या गुंती । ऐशा मागें नेणों किती ॥१॥ ख्याती केली अजामेळें । होतें निघालें दिवाळें ॥२॥ मोकलिला प्रायश्चित्ती । कोणी न धरिती हातीं ॥३॥ तुका म्हणे मुक्त वाट । वैकुंठींची घडघडाट ॥४॥

१०४८. सरळीं हीं नामें उच्चारावीं सदा । हरि बा गोविंदा रामकृष्ण ॥१॥ पुण्य पर्वकाळ तीर्थेंही सकळ । कथा सिंधुजळ न्हाऊं येती ॥२॥ अवघेचि लाभ बैसलिया घरा । येती भाव धरा एके ठायीं ॥३॥ शेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती म्हैसी । कामधेनु तैसी नव्हे एक ॥४॥ तुका म्हणे सुखें पाविजे अनंता । हें वर्म जाणतां सुलभचि ॥५॥

१०४९. पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ ॥१॥ तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकांच्या ॥२॥ देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥३॥ काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥४॥ तुका म्हणे देवभक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥५॥

१०५०. पाप ताप दैन्य जाय उठाउठी । जालिया भेटी हरिदासांची ॥१॥ ऐसें बळ नाहीं आणिकाचे अंगीं । तप तीर्थ जगीं दान व्रत ॥२॥ चरणींचें रज बंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्याचे माथां ॥३॥ भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥४॥ तुका म्हणे मना जालें समाधान । देखिल्या चरण वैष्णवांचे ॥५॥

१०५१. येणें बोधें आम्ही असों सर्वकाळ । करूं हे निर्मळ हरिकथा ॥१॥ आम्ही भूमीवरी एक दैवाचें । निदान हें वाचे सांपडलें ॥२॥ तरतील कुळें दोन्ही उभयतां । गातां आइकतां सुखरूप ॥३॥ न चळे हा मंत्र न म्हणें यातीकुळ । नलगे काळ वेळ विचारावी ॥४॥ तुका म्हणे माझा विठ्ठल विसांवा । सांठविला हांवा हृदयांत ॥५॥

१०५२. बहुतां जन्मींचें संचित । सबळ होय जरि बहुत । तरिचि होय हरिभक्त । कृपावंत मानसीं ॥१॥ म्हणवी म्हणियासा तयाचा । दास आपुल्या दासांचा । अनुसरले वाचा । काया मनें विठ्ठलीं ॥२॥ असे भूतदया मानसीं । अवघा देखें हृषीकेशी । जीवें न विसंबे त्यासी । मागें मागें हिंडतसे ॥३॥ तुका म्हणे निर्विकार । शरणागतां वज्रपंजर । जे जे अनुसरले नर । तयां जन्म चुकलें ॥४॥

१०५३. तारूं लागलें बंदरीं । चंद्रभागेचिये तिरीं ॥१॥ लुटा लुटा संतजन । अमुप हें रासी धन ॥२॥ जाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥३॥ तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ॥४॥

१०५४. आळवीन स्वरें । कैशा मधुरा उत्तरें ॥१॥ ये वो ये वो पांडुरंगें । प्रेमपान्हा मज दे गे

॥२॥ पसरूनि चोंची। वचनें हीं करुणेचीं ॥३॥ तुका म्हणे बळी। आम्ही लडिवाळें आळीं ॥४॥

१०५५. सकळिकांचें समाधान । नव्हे देखिल्यावांचून ॥१॥ रूप दाखवीं रे आतां । सहस्त्रभुजांच्या मंडिता ॥२॥ शंखचक्रपद्मगदा । गरुडासहित ये गोविंदा ॥३॥ तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयनां ॥४॥

१०५६. पतितपावना। दीनानाथा नारायणा ॥१॥ तुझें रूप माझे मनीं। राहो नाम जपो वाणी ॥२॥ ब्रह्मांडनायका। विश्वजनाच्या पाळका ॥३॥ जीवींचिया जीवा। तुका म्हणे देवदेवा ॥४॥

१०५७. करीं हेंचि काम । मन जपे राम राम ॥१॥ लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ॥२॥ तुका म्हणे मना । मज भीक द्यावी दीना ॥३॥

१०५८. आपुलिया लाजा । धांवे भक्ताचिया काजा ॥१॥ नाम धरिलें दीनानाथ । सत्य करावया व्रत ॥२॥ घात आघात निवारी । छाया पीतांबर करी ॥३॥ उभा कर कटीं । तुका म्हणे याजसाठीं ॥४॥

१०५९. साधावया भक्तिकाज । नाहीं लाज धरीत ॥१॥ ऐसियासी शरण जावें । शक्ती जीवें न वंची ॥२॥ भीष्मपण केला खरा । धनुर्धरा रक्षीलें ॥३॥ तुका म्हणे साक्ष हातीं । तो म्यां चित्तीं धरियेला ॥४॥

१०६०. धेनु चरे वनांतरीं। चित्त बाळकापें घरीं ॥१॥ तैसें करीं वो माझे आई। ठाव देउनि राखें पायीं ॥२॥ काढितां तळमळी । जिवनाबाहेरी मासोळी ॥३॥ तुका म्हणे कुडी । जीवप्राणांची आवडी ॥४॥

१०६१. हरिजनाची कोणा घडावी न निंदा । साहात गोविंदा नाहीं त्याचें ॥१॥ रूपा येऊनियां धरी अवतार। भक्तां अभयकर खळां कष्ट ॥२॥ दुर्वास हा छळूं आला आंबऋषी। सुदर्शन त्यासां जाळित फिरे ॥३॥ द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांति । होऊनि श्रीपति साह्य केली ॥४॥ न साहेचि बब्रु पांडवां पारिखा। दुराविला सखा बळिभद्र ॥५॥ तुका म्हणे अंगीं राखिली दुर्गंधि। अश्वत्थामा वधी पांडवपुत्रां ॥६॥

१०६२. ज्यासी आवडी हरिनामाची । तोचि एक बहु शुचि ॥१॥ जपे हरिनाम बीज । तोचि वर्णांमाजी द्विज ॥२॥ तुका म्हणे वर्ण धर्म । अवघे आहे सम ब्रह्म ॥३॥

१०६३. विठ्ठल हा चित्तीं । गोड लागे गातां गीतीं ॥१॥ आम्हां विठ्ठल जीवन । टाळ चिपुळिया धन ॥२॥ विठ्ठल विठ्ठल वाणी । अमृत हे संजीविनी ॥३॥ रंगला या रंगें । तुका विठ्ठल सर्वांगें ॥४॥

१०६४. विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा । करी पापा निर्मूळ ॥१॥ भाग्यवंता छंद मनीं । कोड कानीं ऐकती ॥२॥ विठ्ठल हें दैवत भोळें । चाड काळें न धरावी ॥३॥ तुका म्हणे

भलते याती । विठ्ठल चित्तीं तो धन्य ॥४॥

१०६५. म्हणे विठ्ठल ब्रह्म नव्हे । त्याचे बोल नाइकावे ॥१॥ मग तो हो का कोणी एक । आदि करोनि ब्रह्मादिक ॥२॥ नाहीं विठ्ठल जया ठावा । तोही डोळां न पहावा ॥३॥ तुका म्हणे नाही । त्याची भीड मज कांहीं ॥४॥

१०६६. एक पाहातसां एकाचीं दहनें । सावध त्या गुणें कां रे नव्हा ॥१॥ मारा हाक देवा भय अट्टाहासें । जंव काळाऐसें जालें नाहीं ॥२॥ मरणाची तंव गांठोडी पदरीं । जिणें तोचिवरी माप भरे ॥३॥ तुका म्हणे धिग वाहती मारग । अंगा आले मग हालों नेदी ॥४॥

१०६७. संतांसी तों नाहीं सन्मानाची चाड । परि पडे द्वाड अव्हेरि तों ॥१॥ म्हणऊनि तया न वजावें ठाया । होतसे घात या दुर्बळाचा ॥२॥ भावहीना आड येतसे आशंका । उचितासी चुका घालावया ॥३॥ तुका म्हणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ॥४॥

१०६८. संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ॥१॥ हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें गोडें निवडावीं ॥२॥ ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मूर्खत्व वचना येऊं पाहे ॥३॥ तुका म्हणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला शेवटीं विचार त्या ॥४॥

१०६९. पंढरिये माझें माहेर साजणी । ओविया कांडणी गाऊं गीती ॥१॥ राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥२॥ उद्धव अक्रूर व्यास आंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥३॥ गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचे कवतुक वाटे मज ॥४॥ मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ॥५॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥६॥ नागो जगमित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईरिया ॥७॥ परिसा भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळिकांसी ॥८॥ चोखामेळा संत जिवाचे सोइरे । न पडे विसर यांचा घडी ॥९॥ जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाठक हा कान्हा मिराबाई ॥१०॥ आणीकही संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ॥११॥ आनंदें ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥१२॥ तुका म्हणे माझा बळिया बापमाय । हर्षें नांदे सये घराचारी ॥१३॥

१०७०. जातीचें तें चढे प्रेम । पक्षी स्मरे राम राम ॥१॥ ते काय गुण लागती येरां । कागा न शोभे पिंजरा ॥२॥ शिकविलें तें सुजात सोसी । मग मोल चढे त्यासी ॥३॥ तुका म्हणे वेषधारी । हिजड्या नव्हती त्या नारी ॥४॥

१०७१. बसणें थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥१॥ नाहीं देखिला ना ठावा । तोंडपिटी करी हांवा ॥२॥ फुगतें काउळें । म्हणे मी राजहंसा आगळें ॥३॥ गजाहूनि खर । म्हणे चांगला मी फार ॥४॥ मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हे सोनें ॥५॥

१०७२. मुक्त होता परि बळें जाला बद्ध । घेउनियां छंद माझें माझें ॥१॥ पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता तो ॥२॥ तुका म्हणे गेलें व्यर्थ वायांविण । जैसा मृग सीण मृगजळीं ॥३॥

१०७३. वरतें करोनियां तोंड । हाका मारितो प्रचंड ॥१॥ राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ॥२॥ आशा धरोनि मनीं । कांहीं देईल म्हणऊनि ॥३॥ पोटा एका साठीं । तुका म्हणे जाले कष्टी ॥४॥

१०७४. जाळी महाकर्में । दावी निजसुखवर्मे ॥१॥ ऐसें कळलें आम्हां एक । झालों नामाचे धारक ॥२॥ तपाचे सायास । नलगे घेणें वनवास ॥३॥ तुका म्हणे येणें । कळिकाळ हें ठेंगणें ॥४॥

१०७५. ये हरि मज कृपा देईं दान। नासीं तिमिर दाखवीं चरण। आर्त पुरवावें भेटी देऊन। नको उपेक्षूं आलिया शरण ॥१॥ कामक्रोध अहंकार नको देहीं । आशा तृष्णा माया लज्जा चिंता कांहीं। वास पंढरीचा जन्म सदा देईं। आणीक दुजें मागणें तुज नाहीं ॥२॥ नाम अखंड हृदयीं राहो वाणी। न पडो विसर क्षण जागृतिं स्वप्नीं। संतसमागम ऐसा दे लावुनि। आणीक दुजें कांहीं नेणें तुजवांचूनि ॥३॥ पंथपुरिंचा रविसुत पुरे आतां । आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता। नाहीं अडथळा त्रैलोक्यामाजी सरता। विनवी तुकयाबंधु चरणीं ठेवूनि माथा ॥४॥

१०७६. तट्टाचे जातीला नाहीं भीड भार। लाता मारी थोर लहान नेणे ॥१॥ परी तो विषेश मनुष्य होऊन। करी खंड मान वडिलांचा ॥२॥ बेरसा गाढव माय ना बहिण। भुंके चवीविण भलतेंचि ॥३॥ तुकयाबंधु म्हणे बोकड मातले। न विचारितां आपुलें तोंडीं मुते ॥४॥

१०७७. मायझवा खर गाढवाचें बीज । तें ऐसें सहज कळों येतें ॥१॥ अपमानिलें जेणें श्रेष्ठांचे वचन । तेचि त्याची खूण ओळखावी ॥२॥ मद्यपी तो पुरा अधम जातीचा । तया उपदेशाचा राग वांयां ॥३॥ तुकयाबंधु म्हणे पिसाळलें सुनें। आप पर तेणें न विचारावें ॥४॥

१०७८. मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार । पृथिवीचा भार वाहावया ॥१॥ काय धाक आम्हां कासयाची चिंता । ऐसा तो असतां साहाकारी ॥२॥ शंखचक्रगदा आयुधें अपार । वागवितो भार भक्तांसाठीं ॥३॥ पांडवां जोहरी राखिलें कुसरी । तो हा बंधुचा कैवारी तुकयाच्या ॥४॥

१०७९. राम म्हणतां कामक्रोधाचें दहन । होय अभिमान देशधडी ॥१॥ राम म्हणतां कर्म तुटेल भवबंधन । नये श्रम सीण स्वप्नासही ॥२॥ राम म्हणतां जन्म नाहीं गर्भवास । नव्हे दारिद्रास पात्र कधीं ॥३॥ राम म्हणतां यम शरणागत बापुडें । अढळपद पुढें काय तेथे ॥४॥ राम म्हणतां धर्म घडती सकळ । तिमिरपडळ नासे हेळा ॥५॥ राम म्हणतां म्हणे

तुकयाचा बंधु । तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ॥६॥

१०८०. मरोनि जाईन गुणनामावरूनि । तुझ्या चक्रपाणी मायबापा ॥१॥ चुकविली दुःखें मायेचा वोळसा । तोडोनियां आशापाश तेणें ॥२॥ केली काया तनु हिंवसी शीतळ । चिंता तळमळ नाहीं ऐसी ॥३॥ काळें तोंड काळ करूनि राहिलें । भूतमात्र जालें सज्जनसखें ॥४॥ तुकयाबंधु म्हणे अवघ्या दशदिशा । मुक्त रे परेशा तुझ्या पुण्यें ॥५॥

१०८१. आतां मागतों तें ऐका नारायणा । भावपूर्वक मनापासूनियां ॥१॥ असों दे मोकळी जिव्हा जरि गाइल गुण । नाहीं तरी खिळून टाकीं परती ॥२॥ मातेचिया परी देखती परनारी । ठेवीं नेत्र तरी नाहीं तरि नको ॥३॥ तरी बरें कंटाळा करिती निंदास्तुतीचा । नाहीं तरि कानांचाही देखे प्रयत्न ॥४॥ सकळ इंद्रियांचा निग्रह करूनि एक । राखावीं पृथक तोडोनि भ्रम ॥५॥ तुकयाबंधु म्हणे तेचि वाट प्राणां । पडतां नारायणा विसर तुझा ॥६॥

१०८२. नमस्कारी भूतें विसरोनि याती । तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥१॥ परउपकारीं वेचियेल्या शक्ति । तेणें आत्मस्थिति जाणितली ॥२॥ द्वैताद्वैत भाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिती जाणितली ॥३॥ जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणितली ॥४॥ उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥५॥ तुकयाबंधु म्हणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥६॥

१०८३. चवदा भुवनें लोक तिन्ही दाढे जो कवळी । संपुट तो संबळीमध्यें देखा ॥१॥ उत्पत्तिसंहार करिता जो पाळण । तो नंदा नंदन म्हणवीतसे ॥२॥ असूर तोडरी दैत्यांचा काळ । जाला द्वारपाळ बळीचा तो ॥३॥ लक्षुमीचा स्वामी क्षीराच्या सागरा । उच्छिष्ट कवळा पसरी मुख ॥४॥ तुकयाबंधु म्हणे चतुरांचा रावो । भावें तों पाहा हो केला वेडा ॥५॥

१०८४. कोण या पुरुषार्थाची गति । आणियेला हातोहातीं । जाहाज पृथवीपति । केली ख्याति अद्भुत ॥१॥ भला पुंडलिका भला । महिमा नव जाय वर्णिला । दगा देऊनि अवघियांला । सांठविलें अविनाश ॥२॥ केलें एके घरीं केणें । भरलीं सदोदित दुकानें । दुमदुमिलीं सुखानें । हे भाग्याची पंढरी ॥३॥ तुकयाबंधु म्हणे किल्ल्या । संतांचे हातीं दिल्या । आंगावेगळें आपुल्या । टाकुनि जाला मेहेमान ॥४॥

१०८५. केली हार्णाळां अंघोळी । येऊनि बैसलों राउळीं ॥१॥ अजिचें जालें भोजन । राम कृष्ण नारायण ॥२॥ तुकयाबंधु म्हणे नास । नाहीं कल्पांतीं जयास ॥३॥

१०८६. तुजलागीं माझा जीव झाला पिसा । अवलोकितों दिशा पांडुरंगा ॥१॥ सांडिला व्यवहार माया लोकाचार । छंद निरंतर हाचि मनीं ॥२॥ आइकिलें कानीं तें रूप लोचन । देखावया सीण करिताती ॥३॥ प्राण हा विकळ होय कासावीस । जिवनाविण मत्स्य तयापरी

॥४॥ तुका म्हणे आतां कोणता उपाव । करूं तुझे पाव आतुडे तो ॥५॥

१०८७. कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुम्हां कोणा ॥१॥ लागतसें पायां येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची ॥२॥ गुण रूप याचे वर्णितां या संतां । मज क्षेम देतां सुख वाटे ॥३॥ सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग कोणी दावी तया ॥४॥ तुका म्हणे गाईवत्सा तडातोडी । तैसी जाते घडी एकी मज ॥५॥

१०८८. विठ्ठल माझा जीव विठ्ठल माझा भाव । कुळधर्म देव विठ्ठल माझा ॥१॥ विठ्ठल माझा गुरु विठ्ठल माझा तारूं । उतरील पारू भवनदीचा ॥२॥ विठ्ठल माझी माता विठ्ठल माझा पिता । विठ्ठल चुलता बहिणी बंधु ॥३॥ विठ्ठल हें जन विठ्ठल माझें मन । सोइरा सज्जन विठ्ठल माझा ॥४॥ तुका म्हणे माझा विठ्ठल विसावा । नस्वरित गावा जाइन त्याच्या ॥५॥

१०८९. एकाचिये सोई कवित्वाचे बांधे । बांधिलिया साधे काय तेथें ॥१॥ काय हातीं लागे भुसाचे कांडणीं । सत्यासि दाटणी करुनि काय ॥२॥ कवित्वाचे रूढी पायां पडे जग । सुखावोनि मग नरका जाय ॥३॥ तुका म्हणे देव केल्याविण साहे । फजिती ते आहे लटिक्या अंगीं ॥४॥

१०९०. भल्याचें दर्शन । तेथें शुभचि वचन ॥१॥ बोलावी हे धर्मनीत । शोभें होत नाहीं हित ॥२॥ मर्यादा ते बरी । वेळ जाणावी चतुरीं ॥३॥ तुका म्हणे बहु । लागे ऐसें बरें मऊ ॥४॥

१०९१. आवडीनें धरिलीं नांवें । प्रियभावें चिंतन ॥१॥ वेडा जाला वेडा जाला । लांचावला भक्तीसी ॥२॥ निचाड हा चाड धरी । तुळसी करीं दळ मागें ॥३॥ धरिला मग न करी बळ । तुका म्हणे कळ पायीं ॥४॥

१०९२. कंठीं राहो नाम । अंगीं भरोनियां प्रेम ॥१॥ ऐसें द्यावें कांहीं दान । आलों पतित शरण ॥२॥ संतांचिये पायीं । ठेवी वेळोवेळां डोई ॥३॥ तुका म्हणे तरे । भवसिंधु एकसरें ॥४॥

१०९३. विठ्ठल विठ्ठल येणें छंदें । ब्रह्मानंदें गर्जावें ॥१॥ वाये टाळ टाळ्या ठाळीं । होइल होळी विघ्नांची ॥२॥ विठ्ठल आदि अवसानीं । विठ्ठल मनीं स्मरावा ॥३॥ तुका म्हणे विठ्ठलवाणी । वदा कानीं आईका ॥४॥

१०९४. पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ॥१॥ पुंडलिका दिला वर । करुणाकरें विठ्ठलें ॥२॥ मूढ पापी जैसे तैसे । उतरी कासे लावूनि ॥३॥ तुका म्हणे खरें जालें । एका बोलें संताच्या ॥४॥

१०९५. अमृताचीं फळें अमृताची वेली । तेचि पुढें चाली बीजाचीही ॥१॥ ऐसियांचा संग देईं नारायणा । वोलावा वचना जयाचिया ॥२॥ उत्तम सेवन सीतळ कंठासी । पुष्ट कांती तैसी दिसे वरी ॥३॥ तुका म्हणे तैसें होईजेत संगें । वास लागे अंगें चंदनाच्या ॥४॥

१०९६. पंढरीसी जा रे आलेनो संसारा । दीनाचा सोयरा पांडुरंग ॥१॥ वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळु तांतडी उतावीळ ॥२॥ मागील परिहार पुढें नाहीं सीण । जालिया दर्शन एकवेळ ॥३॥ तुका म्हणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ॥४॥

१०९७. न कळे तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥१॥ न दिसे तें दिसों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥२॥ न बोलों ते बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठल एकाचिया ॥३॥ न भेटे तें भेटों येईल आपण । करिता चिंतन विठोबाचें ॥४॥ अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणतां वाचे ॥५॥ तुका म्हणे जीव आसक्त सर्वभावें । तरतील नांवें विठोबाच्या ॥६॥

१०९८. बहुजन्मीं केला लाग । तो हा भाग लाधलों ॥१॥ जीव देईन हा बळी । करीन होळी संसारा ॥२॥ गेलें मग नये हातां । पुढती चिंता वाटतसे ॥३॥ तुका म्हणे तांतड करूं । पाय धरूं बळकट ॥४॥

१०९९. भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥१॥ आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥२॥ तुका म्हणे कृपा करिल नारायण । तरीच हें वर्म पडे ठायीं ॥३॥

११००. दुधाळ गाढवी जरी जाली पाहें । पावेल ते काय धेनुसरी ॥१॥ कागाचिया गळां पुष्पांचिया माळा । हंसाचि तो कळा काय जाणे ॥२॥ मर्कटें अंघोळी लावियेले टिळे । ब्राह्मणाचे लीळे वर्तूं नेणे ॥३॥ जरी तो ब्राह्मण जाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥४॥

११०१. देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगे वारावार करोनि ठेवी ॥१॥ भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी ॥२॥ स्त्री द्यावी गुणवंती तीपें गुंते आशा । यालागीं कर्कशा करूनि ठेवी ॥३॥ तुका म्हणे साक्ष मज आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥४॥

११०२. वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊं द्यावें मला ॥१॥ अंतीं मरसी तें न चुके । मजही मारितोसि भुके ॥२॥ येरू म्हणे भला भला । निवाड तुझ्या तोंडें जाला ॥३॥ देह तों जाणार । घडेल हा परउपकार ॥४॥ येरू म्हणे मनीं । ऐसें जावें समजोनि ॥५॥ गांठी पडली ठका ठका । त्याचे वर्म जाणे तुका ॥६॥

११०३. जेथें आठवती स्वामीचे ते पाय । उत्तम ते ठाय रम्य स्थळ ॥१॥ रान अथवा घर एकांत लोकांत । समाधान चित्त ते ते घडी ॥२॥ धन्य तो हा काळ सरे आनंदरूप । वाहातां संकल्प गोविंदाचे ॥३॥ तुका म्हणे लाभकाळ तेंचि जिणें । भाग्य नारायण उत्तम तें ॥४॥

११०४. तुज न भें मी कळिकाळा । मज नामाचा जिव्हाळा ॥१॥ माझा बळिया नेणसी

कोण। संतां साहे नारायण ॥२॥ शंख वधिला सागरीं। वेद घेउनि आला चारी ॥३॥ कूर्में दैत्य वधिला जेठी। हात पाय लपवी पोटीं ॥४॥ वाराहरूप धरिलें गाढें। धरा प्रतापें धरिली दाढे ॥५॥ हिरण्यकश्यप विदारिला। भक्त प्रल्हाद रक्षिला ॥६॥ वामन जाला दीनानाथ। बळी पाताळीं घातला दैत्य ॥७॥ छेदुनियां सहस्त्र भुजा। कामधेनु आणिली वोजा ॥८॥ शिळा प्रतापें सागरीं तारी। स्थापी बिभीषण रावण मारी ॥९॥ मारोनियां कंसराव। पिता सोडविला वसुदेव ॥१०॥ पांचाळीसी गांजितां वैरी। वस्त्रें आपण जाला हरी ॥११॥ गजेंद्र स्मरे राम राम। त्यासी पावली वैकुंठधाम ॥१२॥ तुका म्हणे हरिरूप जाले। पुन्हा जन्मा नाहीं आले ॥१३॥

११०५. सर्वां भूतीं द्यावें अन्न। द्रव्य पात्र विचारोन। उपतिष्ठे कारण। तेथें बीज पेरीजे ॥१॥ पुण्य करितां होय पाप। दुग्ध पाजोनि पोशिला साप। करोनि अघोर जप। दु:ख विकत घेतलें ॥२॥ भूमी पाहातां नाहीं वेगळी। माळ बरड एक काळी। उत्तम निराळी। मध्यम आणि कनिष्ठ ॥३॥ म्हणोनि विवेकें। कांहीं करणें तें निकें। तुका म्हणे फिकें। रुची नेदी मिष्टान्न ॥४॥

११०६. देवावरी भार। वृत्ति अयाचित सार ॥१॥ देह देवाचे सांभाळी। सार योजे यथाकाळीं ॥२॥ विश्वासी निर्धार। विस्तारला विश्वंभर ॥३॥ तुका म्हणे व्हावें। बळ एकचि जाणावें ॥४॥

११०७. वर्ततां बासर। काय करावें शरीर ॥१॥ ठेवा नेमून नेमून। माझें तुमचे पायीं मन ॥२॥ नेदाविया वृत्ती। कोठें फांकोजी श्रीपती ॥३॥ तुका म्हणे भले। जन्मा येउनियां ज्याले ॥४॥

११०८. केली प्रज्ञा मनाशीं। तईं मी दान सत्यत्वेशीं। नेईन पायांपाशीं। स्वामी मूळ पंढरिये ॥१॥ तोंवरीं हें भरीं पोट। केला तो मिथ्या बोभाट। नाहीं सांपडली वाट। सइराट फिरतसें ॥२॥ ज्यावें आदराचें जिणें। स्वामी कृपा करी तेणें। पाळिल्या वचनें। सख्यत्वाचा अनुभव ॥३॥ घडे तैसें घडो आतां। मायबापाची सत्ता। तुका म्हणे चिंता। काय पाहें मारगा ॥४॥

११०९. नेत्र झांकोनियां काय जपतोसी। जंव नाहीं मानसीं प्रेमभाव ॥१॥ उघडा मंत्र जाणा राम कृष्ण म्हणा। तुटती यातना गर्भवास ॥२॥ मंत्र यंत्र कांहीं करिसी बुट बुटी। तेणें भूतसृष्टी पावशील ॥३॥ सार तुका जपे बीजमंत्र एक। भवसिंधुतारक रामकृष्ण ॥४॥

१११०. संत मारगीं चालती। त्यांची लागो मज माती ॥१॥ काय करावीं साधनें। काय एक नव्हे तेणें ॥२॥ शेष घेईन उच्छिष्ट। धाय धणीवरी पोट ॥३॥ तुका जपे संतां पायीं। जीव ठेविला निश्चयीं ॥४॥

१११. जैसें तैसें बाळ मातेसी आवडे। बोलतां बोबडे शब्द गोड ॥१॥ आपुली आवडी लेववी खाववी। पाहोनिया जीवीं सुख वाटे ॥२॥ तुका म्हणे काय देऊं परिहार। काय तें साचार जाणा संत ॥३॥

१११२. देवाचिया वस्त्रा स्वप्नींही नाठवी। स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥१॥ गाईचे पाळण

नयेचि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ॥२॥ लेंकराचीं गांड स्वयें धावे क्षाळूं । न म्हणे प्रक्षाळूं द्विजपाय ॥३॥ तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥४॥

१११३. उरा लावी ऊर आळंगितां कांता । संतांसी भेटतां अंग चोरी ॥१॥ अतीत देखोनि होय पाठिमोरा । व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ॥२॥ द्विजा नमस्कार मनीं भाव कैंचा । तुर्काचे दासींचा लेंक होय ॥३॥ तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणी ॥४॥

१११४. ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी । तरि कां हिंपुटी वेदशास्त्रें ॥१॥ शास्त्रांचे भांडण तप तीर्थाटन । पूर्वीचें भ्रमण याजसाठीं ॥२॥ याजसाठीं जप याजसाठीं तप । व्यासेंही अमुप ग्रंथ केले ॥३॥ याजसाठीं संतपाय हे सेवावे । तरिच तरावें तुका म्हणे ॥४॥

१११५. गायत्री विकोनी पोट जे जाळिती । तयां होय गती यमलोकीं ॥१॥ कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नरकपाता ॥२॥ नाम गाऊनियां द्रव्य जे मागती । नेणें तयां गति कैसी होय ॥३॥ कैसी होय गती तेच हो जाणती । आम्हासी संगती नलगे त्यांची ॥४॥ आमुचा सांगाती आहे तो श्रीहरि । नलगे दुराचारी तुका म्हणे ॥५॥

१११६. साधूच्या दर्शना लाजसी गव्हारा । वेश्येचिया घरा पुष्पें नेसी ॥१॥ वेश्या दासी मुरली जगाची वोवळी । ते तुज सोंवळी वाटे कैसी ॥२॥ तुका म्हणे आतां लाज धरीं बुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगीं ॥३॥

१११७. राउळासी जातां त्रास मानी मोठा । बैसतो चोहोटां आदरेंशीं ॥१॥ न करी स्नान संध्या न म्हणे रामराम । गुरुगुडीचें प्रेम अहर्निशीं ॥२॥ देवब्राह्मणांसी जाईना शरण । दासीचे चरण वंदी भावें ॥३॥ सुगंध चंदन सांडोनियां माशी । बैसे दुर्गंधीशीं अत्यादरें ॥४॥ तुका म्हणे अरे ऐक भाग्यहीना । कां रे रामराणा विसरसी ॥५॥

१११८. दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥१॥ आतां मज ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥२॥ उपजला भावो । तुझे कृपें सिद्धी जावो ॥३॥ तुका म्हणे आतां । लाभ नाहीं यापरता ॥४॥

१११९. तरुवर बीजापोटीं । बीज तरुवराशेवटीं ॥१॥ तैसें तुम्हां आम्हां जाले । एकीं एक सामावलें ॥२॥ उदकावरील तरंग । तरंग उदकाचें अंग ॥३॥ तुका म्हणे बिंबछाया । ठायीं पावली विलया ॥४॥

११२०. साकरेची गोणी बैलाचिया पाठीं । तयासी शेवटीं करबाडें ॥१॥ मालाचे पैं पेटे वाहाताती उंटें । तयालागीं कांटे भक्षावया ॥२॥ वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनियां देती यमाहातीं ॥३॥ ज्यासी असे लाभ तोचि जाणे गोडी । येर तीं बापुडीं सिणलीं वांयां ॥४॥ तुका म्हणे शहाणा होईं रे गव्हारा । चौऱ्यासीचा फेरा फिरों नको ॥५॥

११२१. चिरगुटें घालूनि वाढविलें पोट । गन्हवार बोभाट जनामध्ये ॥१॥ लटकेची डोहळे दाखवी प्रकार । दूध स्तनीं पोर पोटीं नाहीं ॥२॥ तुका म्हणे अंतीं वांज तेचि खरी । फजिती दुसरी जनामध्यें ॥३॥

११२२. माझी सर्व चिंता आहे विठोबासी । मी त्याच्या पायाशीं न विसंबें ॥१॥ विसरेना रूप क्षण एक चित्तीं । जिवलग मूर्ति सांवळी ते ॥२॥ विसरतां हरी क्षणएक घडी । अंतरेल जोडी लक्षलाभ ॥३॥ तुका म्हणे माझ्या विठोबाचे पाय । संजीवनी आहे हृदयामाजीं ॥४॥

११२३. काय तीं करावीं मोलाचीं माकडें । नाचताती पुढें संसाराच्या ॥१॥ झाडा देते वेळे विचकिती दांत । घेती यमदूत दंड वरी ॥२॥ हात दांत कान हलविती मान । दाखविती जन मानावया ॥३॥ तुका म्हणे किती जालीं हीं फजित । मागें नाहीं मित भारवाही ॥४॥

११२४. थोर ते गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥१॥ व्यर्थ भरोवरी केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥२॥ घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥३॥ तुका म्हणे बरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥४॥

११२५. जाय जाय तूं पंढरी । होय होय वारकरी ॥१॥ सांडोनियां वाळवंट । काय इच्छिसी वैकुंठ ॥२॥ खांद्या पताकांचे भार । तुळसीमाळा आणि अबीर ॥३॥ साधुसंतांच्या दाटणी । तुका जाय लोटांगणीं ॥४॥

११२६. संतांच्या हेळणें बाटलें जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥१॥ भेसळीचें वीर्य ऐशा अनुभवें । आपुलें परावें नाहीं खळा ॥२॥ संतांचा जो शोध करितो चांडाळ । धरावा विटाळ बहु त्याचा ॥३॥ तुका म्हणे केली प्रतिज्ञा याचसाठीं । कांहीं माझे पोटीं शंका नाहीं ॥४॥

११२७. बहु टाळाटाळी । होते भोवताहे कळी ॥१॥ बरें नव्हेल सेवटीं । भय असो द्यावें पोटीं ॥२॥ मुरगाळीतां कान । घुसमाडील सावधान ॥३॥ अबोलणा तुका । ऐसें कोणी लेखूं नका ॥४॥

११२८. जिव्हे जाला चळ । नाहीं अवसान तें पळ ॥१॥ हेंचि वोसणावोनी उठी । देव सांठविला पोटीं ॥२॥ नाहीं ओढा वारा । पडिला प्रसंग तो बरा ॥३॥ तुका म्हणे जाली । भय हे अनावर बोलीं ॥४॥

११२९. गोहो यावा गांवा । ऐसे नवस करी आवा ॥१॥ कैंचें पुण्य तिये गांठीं । व्रतें वेची लोभासाठीं ॥२॥ वाढावें संतान । गृहीं व्हावें धनधान्य ॥३॥ मागे गारगोटी । परिसाचीये साटोवाटी ॥४॥ तुका म्हणे मोल । देऊन घेतला सोमल ॥५॥

११३०. जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥१॥ बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ॥२॥ तट्टावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥३॥ तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥४॥

११३१. लंकेमाजी घरें किती तीं आइका । सांगतसे संख्या जैसी तैसी ॥१॥ पांच लक्ष घरें पाषाणांचीं जेथें । सात लक्ष तेथें विटबंदी ॥२॥ कोटि घरें जेथें काशा आणि तांब्याचीं । शुद्ध कांचनाची सप्त कोटी ॥३॥ तुका म्हणे ज्याची संपदा एवढी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥४॥

११३२. व्यभिचारिणी गणिका असतां कुंटणी । विश्वास तिचे मनीं राघोबाचा ॥१॥ ऐसीही पापिणी वाहिली विमानीं । अचळ भुवनीं ठेवियेली ॥२॥ पतितपावन तिहीं लोकीं ठसा । कृपाळू कोंवसा अनाथांचा ॥३॥ तुका म्हणे धरा विठोबाची सोय । आणिक उपाय नेणों किती ॥४॥

११३३. गजेंद्र तो हस्ती सहस्त्र वरुषें । जळामाजी नक्रें पीडिलासे ॥१॥ सुहृदीं सांडिलें कोणी नाहीं साहे । अंतीं वाट पाहे विठो तुझी ॥२॥ कृपेच्या सागरा माझ्या नारायणा । तया दोघांजणां तारियेलें ॥३॥ तुका म्हणे नेले वाहूनी विमानीं । मीही आइकोनी विश्वासलों ॥४॥

११३४. कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥१॥ जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥२॥ कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ॥३॥ कैं बसावें वहनीं । कैं पायीं अनवाणी ॥४॥ कैं उत्तम प्रावर्णें । कैं वसनें तीं जीर्णें ॥५॥ कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ॥६॥ कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ॥७॥ तुका म्हणे जाण । सुख दुःख ते समान ॥८॥

११३५. उंच नीच कांहीं नेणे भगवंत । तिष्ठे भावभक्त देखोनियां ॥१॥ दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी ॥२॥ चर्म रंगूं लागे रोहिदासासंगें । कबिराचे मागें शेले विणी ॥३॥ सज्जन कसाया विकूं लागे मांस । माळ्या सांवत्यास खुरपूं लागे ॥४॥ नरहरि सोनारा घडूं फुंकूं लागे । चोख्यामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥५॥ नामयाची जनी सवें वेची सेणी । धर्मा घरीं पाणी वाहे झाडी ॥६॥ नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगें ओढी ॥७॥ अर्जुनाचे रथीं होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीतीं सुदाम्याचे ॥८॥ गौळियांचे घरीं अंगें गाई वळी । द्वारपाळ बळीद्वारीं जाला ॥९॥ येकोबाचे ऋण फेडी हृषीकेशी । आंबऋषीचे सोशी गर्भवास ॥१०॥ मिराबाईसाठीं घेतो विष प्याला । दामाजीचा जाला पाडिवार ॥११॥ घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी त्या मेहत्याचीं अंगें भरी ॥१२॥ पुंडलिकासाठीं अझूनि तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥१३॥

११२६. भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥१॥ पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥२॥ दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पाहातसे वाटुली पंढरीची ॥३॥ भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परि माउलीची ॥४॥ तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥५॥

११३७. आले संत पाय ठेविती मस्तकीं । इही उभयलोकीं सरता केलों ॥१॥ वंदीन पाउलें लोळेन चरणीं । आजि इच्छाधणी फिटईल ॥२॥ अवघीं पूर्व पुण्यें जालीं सानुकूळ । अवघेंचि

मंगळ संतभेटी ॥३॥ तुका म्हणे कृतकृत्य जालों देवा । नेणें परि सेवा डोळां देखें ॥४॥

११३८. करीं धंदा परि आवडती पाय । प्रीती सांगों काय नेणां देवा ॥१॥ रूप डोळां देखें सदा सर्वकाळ । संपादितों आळ प्रपंचाचा ॥२॥ नेमून ठेविली कारया कारणीं । आमुची ते वाणी गुण वदे ॥३॥ मनासीं उत्कंठा दर्शनाचा हेवा । नाहीं लोभ जीवा धन धान्य ॥४॥ उसंतितों पंथ वेठीचिया परी । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढे ॥५॥ तुका म्हणे ऐसें करितों निर्वाण । जीव तुम्हां भिन्न नाहीं माझा ॥६॥

११३९. कां रे माझीं पोरें म्हणसील ढोरें । मायबाप खरें काय एक ॥१॥ कां रे गेलें म्हणोनि करिसी तळमळ । मिथ्याचि कोल्हाळ गेलियाचा ॥२॥ कां रें माझें माझें म्हणसील गोत । न सोडविती दूत यमाहातीं ॥३॥ कां रे मी बळिया म्हणविसी ऐसा । सरणापाशीं कैसा उचलविसी ॥४॥ तुका म्हणे न धरीं भरंवसा कांहीं । वेगीं शरण जाईं पांडुरंगा ॥५॥

११४०. अगा करुणाकरा करितसें धांवा । या मज सोडवा लवकरि ॥१॥ ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें । व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥ मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ॥३॥ उशीर तो आतां न पाहिजे केला । आहो जी विठ्ठला मायबापा ॥४॥ उरलें तें एक हेंचि मज आतां । अवघें विचारितां शून्य जालें ॥५॥ तुका म्हणे आतां करीं कृपादान । पाऊलें समान दावीं डोळां ॥६॥

११४१. न मनी ते ज्ञानी न मनी ते पंडित । ऐसे परीचे एकएका भावें ॥१॥ धातू पोसोनियां आणिकां उपदेश । अंतरीं तो लेश प्रेम नाहीं ॥२॥ न मनी ते योगी न मनी ते हरिदास । दर्शने बहुवस बहुतां परींचीं ॥३॥ तुका म्हणे तया नमन बाह्यात्कारी । आवडती परी चित्तशुद्धी ॥४॥

११४२. कासया पाषाण पूजितसां पितळ । अष्ट धातु खळ भावेविण ॥१॥ भावचि कारण भावचि कारण । मोक्षाचें साधन बोलियेलें ॥२॥ काय करिल जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषयजप ॥३॥ काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ॥४॥ माय करिशील कुशळ गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि ते ॥५॥ तुका म्हणे भाव नाहीं करिसी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ॥६॥

११४३. शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥१॥ होय जतन तें गोड । अंतराय येती नाड ॥२॥ देव जोडे भावें । इच्छेचें तें प्रेम घ्यावें ॥३॥ तुका म्हणे मोड दावी । तैशीं फळें आलीं व्हावीं ॥४॥

११४४. अंतरींचें गोड । राहे आवडीचें कोड ॥१॥ संघटणें येती अंगा । गुणदोष मनभंगा ॥२॥ उचिताच्या कळा । नाहीं कळत सकळा ॥३॥ तुका म्हणे अभावना । भावीं मूळ तें पतना ॥४॥

११४५. कासया जी ऐसा माझे माथां ठेवा । भार तुम्ही देवा संतजन ॥१॥ विचित्र विंदानी नानाकळा खेळे । नाचवी पुतळे नारायण ॥२॥ काय वानरांचे अंगींची ते शक्ति । उदका तरती वरी शिळा ॥३॥ तुका म्हणे करी निमित्यचि आड । चेष्टवूनि जड दावी पुढें ॥४॥

११४६. पायां पडावें हें माझें भांडवल । सरती हे बोल कोठें पायीं ॥१॥ तरि हे सलगी कवतुक केलें । लडिवाळ धाकुलें असें बाळ ॥२॥ काय उणें तुम्हां संतांचिये घरीं । विदित या परी सकळही ॥३॥ तुका म्हणे माझी उचित हे सेवा । नये करूं ठेवाठेवी कांहीं ॥४॥

११४७. वदवावी वाणी माझी कृपावंता । वागपुष्पें संतां समर्पीशी ॥१॥ सर्व संकटांचा तुम्हां परिहार । घालावा म्यां भार पांडुरंगा ॥२॥ एकसरें चित्त ठेवूनियां पायीं । जालों उतराई होतों तेणें ॥३॥ तुका म्हणे येथें जालें अवसान । काया वाचा मन वेचूनियां ॥४॥

११४८. नमावें पाय हें माझें उचित । आशीर्वादें हित तुमचिया ॥१॥ कृपेचा वोरस न समाये पोटीं । म्हणोनि उफराटीं वचनें हीं ॥२॥ तुमचीं उष्टावळी तें माझें भोजन । झाडावें अंगण केरपुंजे ॥३॥ परि ऐसें पुण्य नाहीं माझे गांठीं । जेणें पडे मिठी पायांसवें ॥४॥ तुका म्हणे राहे आठवण चित्तीं । ऐसी कृपा संतीं केली तुम्हीं ॥५॥

११४९. काय नाही माता गौरवीत बाळा । काय नाहीं लळा पाळीत ते ॥१॥ काय नाहीं त्याची करीत ते सेवा । काय नाहीं जीवा गोमटें तें ॥२॥ अमंगळपणें कंटाळा न धरी । उचलोनि करीं कंठीं लावी ॥३॥ लेववीं आपुले अंगें अळंकार । संतोषावे फार देखोनियां ॥४॥ तुका म्हणे स्तुति योग्य नाहीं परी । तुम्हां लाज थोरी अंकिताची ॥५॥

११५०. माझीया मीपणावरी पडो पाषाण । जळो हें भूषण नाम माझें । पापा नाहीं पार दुःखाचे डोंगर । जालों ये भूमीसी ओझें ॥१॥ काय विटंबना सांगों किती । पाषाण फुटती ऐसें दुःख । नर नारी सकळ उत्तम चांडाळ । न पाहाती डोळां माझें सुख ॥२॥ काया वाचा मनें अघटित करणें । चर्म चक्षु हात पाय । निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार । आणीक सांगों किती काय ॥३॥ लक्ष्मीमदें मातें घडले महा दोष । पत्नी दोनी भेदाभेद । पितृवचनीं घडली अवज्ञा अविचार । कुटिळ कुचरवादी निंद्य ॥४॥ आणीक किती सांगों तें अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन । भूतदया उपकार नाहीं शब्दा धीर । विषयीं लंपट शब्दहीन ॥५॥ संत महानुभाव ऐका हे उत्तर । अवगुण अविचार वृद्धि पापा । तुका म्हणे सरतें करा पांडुरंगीं । शरण आलों मायबापा ॥६॥

११५१. फिरविलीं दोनी । कन्या आणि चक्रपाणी ॥१॥ जाला आनंदी आनंद । अवतरले गोविंद ॥२॥ तुटलीं बंधनें । वसुदेवदेवकीचीं दर्शनें ॥३॥ गोकुळासी आलें । ब्रह्म अव्यक्त चांगलें ॥४॥ नंद दसवंती । धन्य देखिले श्रीपती ॥५॥ निशीं जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ ॥६॥ आनंदली मही । भार गेला सकळही ॥७॥ तुका म्हणे कंसा । आठ भोविला वळसा ॥८॥

११५२. सोडियेल्या गांठी । दरुषणें कृष्णभेटी ॥१॥ करिती नारी अक्षयवाणें । जीवभाव देती दानें ॥२॥ उपजल्या काळें । रूपें मोहिल्या सकळें ॥३॥ तुका तेथें वारी । एकी आडोनि दुसरी ॥४॥

११५३. मुख डोळां पाहे । तैशीच ते उभी राहे ॥१॥ केल्याविण नव्हे हातीं । धरोनि आरती परती ॥२॥ न धरिती मनीं । कांहीं संकोच दाटणी ॥३॥ तुका म्हणे देवें । ओस केल्या देहभावें ॥४॥

११५४. गोकुळींच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥१॥ बाळकृष्ण नंदा घरीं । आनंदल्या नरनारी ॥२॥ गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ॥३॥ तुका म्हणे छंदें । येणें वेधिलीं गोविंदें ॥४॥

११५५. विटंबिले भट । दिला पाठीवरी पाट ॥१॥ खोटें जाणोनी अंतर । न साहेचि विश्वंभर ॥२॥ तेंचि करी दान । जैसें आइके वचन ॥३॥ तुका म्हणे देवें । पूतना शोषियेली जीवें ॥४॥

११५६. प्रेम देवाचें देणें । देहभाव जाय जेणें । न धरावी मनें । शुद्धी देशकाळाची ॥१॥ मुक्त लज्जाविरहित । भाग्यवंत हरिभक्त । जाले वोसंडत । नामकीर्ति पवाडे ॥२॥ जोडी आली अविनाश । जन्मोनि जाले हरिचे दास । त्यांस नव्हे गर्भवास । परब्रह्मीं सौरस ॥३॥ हेचि वाहाती संकल्प । पुण्यप्रसंगाचे जप । तुका म्हणे पाप । गांवीं नाही हरिजना ॥४॥

११५७. तोचि लटिक्यामाजी भला । म्हणे देव म्यां देखीला ॥१॥ ऐशियाच्या उपदेशें । भवबंधन कैसें नासे । बुडवी आपणासरिसे । अभिमानें आणिकांस ॥२॥ आणिक नाहीं जोडा । देव म्हणवि तया मूढा ॥३॥ आणिकाचें न मनी साचें । तुका म्हणे या श्रेष्ठांचें ॥४॥

११५८. होईल जाला अंगें देव जो आपण । तयासी हे जन अवघे देव ॥१॥ येरांनीं सांगावी रेमट काहाणी । चित्ता रंजवणी करावया ॥२॥ धाला आणिकांची नेणे तहानभूक । सुखें पाहे सुख आपुलिया ॥३॥ तुका म्हणे येथें पाहिजे अनुभव । शब्दांचे गौरव कामा नये ॥४॥

११५९. कां नवजावें बैसोनि कथे । ऐसें ऐका हो श्रोते । पांडुरंग तेथें । उभा असे तिष्ठत ॥१॥ म्हणऊनि करी धीर । लक्ष लावूनि सादर । भवसिंधुपार । असेल ज्या तरणें ॥२॥ कथे कांहीं अणुमात्र । न बोलावा वृत्तांत । देवभक्तां चित्त । समरसीं खंडणा ॥३॥ कां वैष्णव पूजावे । ऐका घेईल जो भावें । चरणरजा शिवें । वोढविला मस्तक ॥४॥ ऐसें जाणा हो निभ्रांत । देव वैष्णवांचा अंकित । अलिप्त अतीत । परमित त्यासाठीं ॥५॥ घालोनि लोळणी । तुका आला लोटांगणीं । वंदी पायवणी । संतचरणींचें माथां ॥६॥

११६०. अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ॥१॥ नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरिंची ॥२॥ उतरूनि दिलें कशी । शुद्धरसीं सरतें ॥३॥ तुका म्हणे दुसरें नाहीं ।

ऐसी ग्वाही गुजरली ॥४॥

११६१. साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाही ॥१॥ लोलुप्यता काय निद्रेतें जिणावें । भोजन करावें परमित ॥२॥ एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण । प्राण गेल्या जाण बोलों नये ॥३॥ तुका म्हणे ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥४॥

११६२. अंतरींची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींची जे होती आच्छादिली ॥१॥ तेथींचा आनंद ब्रह्मांडीं न समाये । उपमेशीं काय देऊं सुखा ॥२॥ भावाचे मथिलें निर्गुण संचलें । तें हें उभें केलें विटेवरी ॥३॥ तुका म्हणे आम्हां ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी सांठवण ॥४॥

११६३. कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ॥१॥ कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ॥२॥ नामाविण माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियेलों ॥३॥ तुका म्हणे माझी जळो जळो काया । विठ्ठल सखया वांचूनियां ॥४॥

११६४. प्रारब्धेंचि जोडें धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥१॥ सोस करिसी वांयां । भजे मना पंढरीराया ॥२॥ प्रारब्धेंचि होय सुख । प्रारब्धेंचि पावे दुःख ॥३॥ प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥४॥

११६५. हीन माझी याति । वरि स्तुति केली संतीं ॥१॥ अंगीं वसूं पाहे गर्व । माझें हरावया सर्व ॥२॥ मी एक जाणता । ऐसें वाटतसे चित्ता ॥३॥ राख राख गेलों वांयां । तुका म्हणे पंढरीराया ॥४॥

११६६. माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ॥१॥ हें कां नेणां नारायणा । मज चाळवितां दीना ॥२॥ नागवी धांवणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥३॥ राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी ॥४॥ तुझ्या केल्याविण । स्थिर वश नव्हे मन ॥५॥ तुका म्हणे हरी । सूत्र तुझ्या हातीं दोरी ॥६॥

११६७. गाऊं नेणें परी मी कांहीं गाईन । शरण जाईन पांडुरंगा ॥१॥ ब्रह्मांडनायक मी त्याचा अंकित । काय यमदूत करिती काळ ॥२॥ वेश्या ज्याच्या नामें तारिली गणिका । अजामेळासारिखा पापरासी ॥३॥ चरणींच्या रजें अहिल्या तारिली । रूपवंत केली कुब्जा दासी ॥४॥ पृथिवी तारिली पाताळासी जातां । तुका म्हणे आतां आम्ही किती ॥५॥

११६८. गाजराची पुंगी । तैसे नवे जाले जोगी ॥१॥ काय करोनि पठण । केली अहंता जतन ॥२॥ अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥३॥ तुका म्हणे लंड । त्याचे हाणोनि फोडा तोंड ॥४॥

११६९. परद्रव्य परनारी । अभिळासूनि नाक धरी ॥१॥ जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥२॥ सोंवळ्याची स्फीति । क्रोधें विटाळला चित्तीं ॥३॥ तुका म्हणे सोंग ।

दावी बाहेरील रंग ॥४॥

११७०. टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥१॥ अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥२॥ मुद्रा लाविती कोरोनी । मान व्हावयासी जनीं ॥३॥ तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥४॥

११७१. ऐसे संत जाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥१॥ स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोढविली ॥२॥ भांगभुर्का हें साधन । पची पडें मद्यपान ॥३॥ तुका म्हणे अवघें सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥४॥

११७२. जातीची शिंदळी । तिला कोण कैसा वळी ॥१॥ आपघर ना बापघर । चिंतीं मनीं व्यभिचार ॥२॥ सेजे असोनियां धणी । परद्वार मना आणी ॥३॥ तुका म्हणे अस्सल जाती । जातींसाठीं खाती माती ॥४॥

११७३. अंधळ्याची काठी । हिरोनियां कडा लोटी ॥१॥ हे कां देखण्या उचित । लाभ किंवा कांहीं हित ॥२॥ चाळवूनि हातीं । साकर म्हणोनि द्यावी माती ॥३॥ तुका म्हणे वाटे । देवा पसरावे सराटे ॥४॥

११७४. प्रीतिचिया बोला नाहीं पेचपाड । भलतैसें गोड करूनि घेई ॥१॥ तैसें विठ्ठलराया तुज मज आहे । आवडीनें गाय नाम तुझें ॥२॥ वेडे वांकडे बाळकाचे बोल । करिती नवल मायबाप ॥३॥ तुका म्हणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जिवलगा ॥४॥

११७५. माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥१॥ आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥२॥ वाचा वदे परी करणें कठिण । इंद्रियां अधीन जालों देवा ॥३॥ तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥४॥

११७६. वर्णावी ती थोरी एका विठ्ठलाची । कीर्ति मानवाची सांगों नये ॥१॥ उदंडचि जाले जन्मोनियां मेले । होऊनियां गेले राव रंक ॥२॥ त्यांचें नाम कोणी नेघे चराचरीं । साही वेद चारी वर्णिताती ॥३॥ अक्षय अढळ चळेना ढळेना । तया नारायणा ध्यात जावें ॥४॥ तुका म्हणे तुम्ही विठ्ठल चित्तीं ध्यातां । जन्ममरणव्यथा दूर होती ॥५॥

११७७. नको देऊं देवा पोटी हें संतान । मायाजाळें जाण नाठविसी ॥१॥ नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्योग होय जीवा ॥२॥ तुका म्हणे करीं फकीराचे परी । रात्रंदिवस हरी येइल वाचे ॥३॥

११७८. जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥१॥ उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ॥२॥ परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥३॥ भूतदया गाईपशूचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥४॥ शांतिरूपें

नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥५॥ तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥६॥

११७९. हरि म्हणतां गति पातकें नासती । कळिकाळ कांपती हरि म्हणतां ॥१॥ हरि म्हणतां मुक्ति हरि म्हणतां मुक्ति । चुके यातायाती हरि म्हणतां ॥२॥ तपें अनुष्ठानें न लगती साधनें । तुटती बंधनें हरि म्हणतां ॥३॥ तुका म्हणे भावें जपा हरिचें नाम । मग काळयम शरण तुम्हां ॥४॥

११८०. नये वांटूं मन । कांहीं न देखावें तें भिन्न ॥१॥ पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावी दिवसराती ॥२॥ नये काकुळती । कोणा येवो हरिभक्ति ॥३॥ तुका म्हणे साई । करील कृपेची विठाई ॥४॥

११८१. सकळ देवांचें दैवत । उभें असे या रंगात ॥१॥ रंग लुटा माझे बाप । शुद्ध भावें खरें माप ॥२॥ रंग लुटिला बहुतीं । शुक नारदादि संतीं ॥३॥ तुका लुटिताहे रंग । साह्य जाला पांडुरंग ॥४॥

११८२. उशीर कां केला । कृपाळुवा जी विठ्ठला ॥१॥ मज दिलें कोणा हातीं । काय मानिली निश्चिंती ॥२॥ कोठवरी धरूं धीर । आतां मन करूं स्थिर ॥३॥ तुका म्हणे जीव । ऐसी भाकितसे कींव ॥४॥

११८३. तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥१॥ नित्य वाचे हाचि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ॥२॥ धरीं पांडुरंगीं भाव । आणीक नेणें दुजा देव ॥३॥ गुरुज्ञान सर्वा ठायीं । दुजें न विचारी कांहीं ॥४॥ बोल नाइके कोणाचे । कथे नागवाचि नाचे ॥५॥ संग उपचारें कांटाळे । सुखें भलते ठायीं लोळे ॥६॥ कांहीं उपदेशिलें नेणें । वाचे विठ्ठल विठ्ठल म्हणे ॥७॥ केला बहुतीं फजित । तरी हेंचि करी नित्य ॥८॥ अहो पंडित जन । तुका टाकावा थुंकोन ॥९॥

११८४. आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥१॥ अंतरीं पापाच्या कोडी । वरि वरि बोडी डोई दाढी ॥२॥ बोडिले तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ॥३॥ पाप गेल्याची काय खूण । नाहीं पालटले अवगुण ॥४॥ भक्तिभावेंविण । तुका म्हणे अवघा सीण ॥५॥

११८५. तुज घालोनियां पूजितों संपुटीं । परि तुझ्या पोटीं चौदा भुवनें ॥१॥ तुज नाचूनि दाखवूं कौतुक । परी रूपरेखा नाहीं तुज ॥२॥ तुजलागीं आम्हीं गात असों गीत । परी तूं अतीत शब्दाहूनि ॥३॥ तुज लागीं आम्हीं घातियेल्या माळा । परी तूं वेगळा कर्तृत्वासी ॥४॥ तुका म्हणे आतां होऊनि परमित । माझें कांहीं हित विचारावें ॥५॥

११८६. पापाची मी राशी । सेवाचोर पायांपाशीं ॥१॥ करा दंड नारायणा । माझ्या मानाची खंडणा ॥२॥ जना हातीं सेवा । घेतों लंडपणें देवा ॥३॥ तुझा ना संसार । तुका दोहींकडे चोर ॥४॥

११८७. दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ॥१॥ ध्यान लागो ऐसें हरी । तुझे चरणीं

तैशापरी ॥२॥ आवतण्याची आस । जैसी लागे दुर्बळास ॥३॥ लोभ्या कळांतराची आस । बोटें मोजी दिवस मास ॥४॥ तुका म्हणे पंढरीनाथा । मजला आणिक नको व्यथा ॥५॥

११८८. लागोनियां पायां विनवितों तुम्हाला । करें टाळी बोला मुखें नाम ॥१॥ विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुख सोहळा स्वर्गीं नाहीं ॥२॥ कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठींचा ॥३॥ सकळांसीं येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिनामें ॥४॥ तुका म्हणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुतां ग्रंथीं बोलियेलें ॥५॥

११८९. लटिकें हासें लटिकें रडें । लटिकें उडे लटिक्यापें ॥१॥ लटिकें माझें लटिकें तुझें । लटिकें ओझें लटिक्याचें ॥२॥ लटिकें गाय लटिकें ध्याय । लटिकें जाय लटिक्यापें ॥३॥ लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जगमाया ॥४॥ लटिका तुका लटिक्या भावें । लटिकें बोले लटिक्यासवें ॥५॥

११९०. जालों म्हणती त्याचें मज वाटें आश्चर्य । ऐका नव्हे धीर वचन माझें ॥१॥ शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात । जिव्हेंसी चाखतां न कळे कैसें ॥२॥ तापलिया तेला बावन चंदन । बुंदे एक क्षण शीतळ करी ॥३॥ पारखी तो जाणे अंतरींचा भेद । मूढ जना छंद लावण्याचा ॥४॥ तुका म्हणे कसीं निवडे आपण । शुद्ध मंद हीन जैसें तैसें ॥५॥

११९१. हेचि थोर भक्ति आवडती देवा । संकल्पाची माया संसाराची ॥१॥ ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥२॥ वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥३॥ तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥४॥

११९२. जन्मा येणें घडे पातकाचें मूळ । संचिताचें फळ आपुलिया ॥१॥ मग वांयांविण दुःख वाहों नये । रुसोनियां काय देवावरी ॥२॥ ठाऊकाचि आहे संसार दुःखाचा । चित्तीं सीण त्याचा वाहों नये ॥३॥ तुका म्हणे नाम त्याचें आठवावें । तेणें विसरावें जन्मदुःख ॥४॥

११९३. आतां माझे नका वाणूं गुणदोष । करितों उपदेश याचा कांहीं ॥१॥ मानदंभासाठीं छळीतसें कोणा । आण या चरणां विठोबाची ॥२॥ तुका म्हणें हें तों ठावें पांडुरंगा । काय कळे जगा अंतरींचें ॥३॥

११९४. वांझा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याती ॥१॥ ऐसें मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥२॥ चातक पाखरूं । त्यासी वर्षें मेघधारू ॥३॥ पक्षी राजहंस । अमोलिक मोतीं त्यास ॥४॥ तुका म्हणे देवा । कां गा खोंचलासी जीवा ॥५॥

११९५. परतें मी आहें सहजचि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा ॥१॥ नलगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ॥२॥ पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्त तेंचि देवें केलें ऐसें ॥३॥ तुका म्हणे तुम्ही आम्हां जी वेगळे । केले ते निराळे द्विज देवा ॥४॥

११९६. चिंतामणिदेवा गणपतीसी आणा । करवावें भोजना दुजे पात्रीं ॥१॥ देव म्हणती तुकया एवढी कैंची थोरी । अभिमानाभीतरी नागवलों ॥२॥ वाड वेळ जाला सिळें जालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥३॥ तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ॥४॥

११९७. भोक्ता नारायण लक्षुमीचा पति । म्हणोनि प्राणाहुति घेतलिया ॥१॥ भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ॥२॥ विश्वंभर कृपादृष्टी सांभाळीत । प्रार्थना करीत ब्राह्मणांची ॥३॥ कवळोकवळीं नाम घ्यावें गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका म्हणे ॥४॥

११९८. माझा स्वामी तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ॥१॥ तीर्थें तुमच्या चरणीं जाहलीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ॥२॥ तुका म्हणे तुम्ही देवा द्विज वंद्य । मी तों काय निंद्य हीन याती ॥३॥

११९९. वंदिलें वंदावें जीवाचियेसाठीं । किंवा बरी तुटी आरंभीच ॥१॥ स्वहिताची चाड ते ऐका हे बोल । अवघेंचि मोल धीरा अंगीं ॥२॥ सिंपलें तें रोप वरीवरी बरें । वाळलिया पुरें कोंभ नये ॥३॥ तुका म्हणे टाकीघायें देवपण । फुटलिया जन कुला पुसी ॥४॥

१२००. आम्हां विष्णुदासां हेंचि भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥१॥ वाणी नाहीं घ्यावें आपुलिया हातें । करोनियां चित्तें समाधान ॥२॥ तुका म्हणे द्रव्य मेळविलें मागें । हें तों कोणासंगें आलें नाहीं ॥३॥

१२०१. सुखाचे व्यवहारीं सुखलाभ जाला । आनंद कोंदला मागें पुढें ॥१॥ संगती पंगती देवासवें घडे । नित्य नित्य जोडे तेंचि साच ॥२॥ समर्थाचे घरीं सकळ संपदा । नाहीं तुटी कदा कासयाची ॥३॥ तुका म्हणे येथें लाभाचिया कोटी । बहु वाव पोटीं समर्थाचे ॥४॥

१२०२. काय देवें खातां घेतलें हातींचे । आलें हें तयाचें थोर भय ॥१॥ म्हणतां गजरें राम एकसरें । जळती पापें थोरें भयधाकें ॥२॥ काय खोळंबले हात पाय अंग । नाशिलें हें सांग रूप काय ॥३॥ कोण लोकीं सांग घातला बाहेरी । म्हणतां हरि हरि तुका म्हणे ॥४॥

१२०३. उत्तम त्या याति । देवा शरण अनन्यगति ॥१॥ नाहीं दुजा ठाव । कांहीं उत्तम मध्यम भाव ॥२॥ उमटती ठसे । ब्रह्मप्राप्ति अंगीं दिसे ॥३॥ भाविक विश्वासी । तुका म्हणे नमन त्यांसी ॥४॥

१२०४. भय हरिजनीं । कांहीं न धरावें मनीं ॥१॥ नारायणा ऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ॥२॥ चित्त वित्त हेवा । समर्पून राहा देवा ॥३॥ तुका म्हणे मन । असों द्यावें समाधान ॥४॥

१२०५. आयुष्य मोजावया बैसला मापारी । तूं कां रे वेव्हारीं संसाराच्या ॥१॥ नेईल ओढोनि ठाउकें नसतां । न राहे दुश्चिता हरिविण ॥२॥ कठिण हें दुःख यम जाचतील । कोण

सोडवील तया ठायीं ॥३॥ राहतील दुरी सज्जन सोयरीं । आठवीं श्रीहरी लवलाहीं ॥४॥ तुका म्हणे किती करिसी लंडायी । होईल भंडाई पुढें थोर ॥५॥

१२०६. होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥१॥ हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ॥२॥ आपुले आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरी जीवा घातक हें ॥३॥ तुका म्हणे झाले जे मना आधीन । तयांसी बंधन यम करी ॥४॥

१२०७. नामाविण काय वाउगी चावट । वांयां वटवट हरीविण ॥१॥ फुकटची सांगे लोकाचिया गोष्टी । राम जगजेठी वाचे नये ॥२॥ मेळवूनि चाट करी सुरापान । विषयांच्या गुणें मातलासे ॥३॥ बैसोनि टवाळी करी दुजयाची । नाहीं गोविंदाची आठवण ॥४॥ बळें यम दांत खाय तयावरी । जंव भरे दोरी आयुष्याची ॥५॥ तुका म्हणे तुला सोडवील कोण । नाहीं नारायण आठविला ॥६॥

१२०८. संत गाती हरिकीर्तनीं । त्यांचे घेइन पायवणी ॥१॥ हेंचि तप तीर्थ माझें । आणीक मी नेणें दुजें ॥२॥ काया कुरवंडी करीन । संत महंत ओंवाळीन ॥३॥ संत महंत माझी पूजा । आन भाव नाहीं दुजा ॥४॥ तुका म्हणे नेणें कांहीं । अवघें आहे संतांपायीं ॥५॥

१२०९. जालें भांडवल । अवघा पिकला विठ्ठल ॥१॥ आतां वाणी काशासाठीं । धीर धरावाच पोटीं ॥२॥ आपुल्या संकोचें । म्हणऊनि तेथें टांचे ॥३॥ घेतों खऱ्या मापें । तुका देखोनियां सोपें ॥४॥

१२१०. शुद्ध ऐसें ब्रह्मज्ञान । करा मन सादर ॥१॥ रवि रसां सकळां शोषी । गुणदोषीं न लिंपे ॥२॥ कोणासवें नाहीं चोरी । सकळांवरी समत्व ॥३॥ सत्य तरी ऐसें आहे । तुका पाहे उपदेशी ॥४॥

१२११. अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवें तोचि तापे जाऊनियां ॥१॥ उदक म्हणे काय या हो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥२॥ काय वस्त्र म्हणे या हो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वेढी ॥३॥ तुकया स्वामी म्हणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागूनियां ॥४॥

१२१२. भक्त देवाघरिंचा सुना । देव भक्ताचा पोसणा ॥१॥ येर येरां जडलें कैसें । जीवा अंग जैसें तैसें ॥२॥ देव भक्ताची कृपाळु माता । भक्त देवाचा जनिता ॥३॥ तुका म्हणे अंगें । एक एकाचिया संगें ॥४॥

१२१३. बरवयांबरवंट । विटे चरण सम नीट ॥१॥ ते म्यां हृदयीं धरिले । तापशमन पाउलें ॥२॥ सकळ तीर्थां अधिष्ठान । करी लक्ष्मी संवाहन ॥३॥ तुका म्हणे अंतीं । ठाव मागितला संतीं ॥४॥

१२१४. मांस चर्म हाड । देवा अवघींच गोड ॥१॥ जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न

वचे वांयां गेले ॥२॥ वेद खाय शंखासुर । त्याचें वागवी कलेवर ॥३॥ तुका म्हणे ऐसा । बराडी या भक्तिरसा ॥४॥

१२१५. कोण चिंता आड । कोणा लोकलाज नाड ॥१॥ कैंचा राम अभागिया । करी वटवट वांयां ॥२॥ स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ॥३॥ तुका म्हणे जडा । काय चाले या दगडा ॥४॥

१२१६. आपुलिया काजा । आम्हीं सांडियलें लाजा ॥१॥ तुम्हां असों जागवीत । आपुलिया हातीं हित ॥२॥ तुम्हीं देहशून्य । आम्हां कळे पापपुण्य ॥३॥ सांगायासी लोकां । उरउरीत उरला तुका ॥४॥

१२१७. सत्य आम्हां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ॥१॥ ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टाका मळ ॥२॥ देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ॥३॥ तुका म्हणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ॥४॥

१२१८. शिकवूनि हित । सोयी लावावे हे नीत ॥१॥ त्याग करूं नये खरें । ऐसें विचारावें बरें ॥२॥ तुमचिया तोंडें । धर्माधर्माचींच खंडें ॥३॥ मजसाठीं देवा । कांहो लपविला हेवा ॥४॥ जाला सावधान । त्यासी घालावें भोजन ॥५॥ तुका म्हणे पिता । वरी बाळाच्या तो हिता ॥६॥

१२१९. सुख सुखा भेटे । मग तोडिल्या न तुटे ॥१॥ रवि रश्मिकळा । नये घालितां पैं डोळां ॥२॥ दुरि तें जवळी । स्नेहें आकाशा कवळी ॥३॥ तुका म्हणे चित्त । माझें पायीं अखंडित ॥४॥

१२२०. तुम्हां न पडे वेच । माझा सरेल संकोच ॥१॥ फुकासाठीं जोडे यश । येथें कां करा आळस ॥२॥ कृपेचें भुकेलें । होय जीवदान केलें ॥३॥ तुका म्हणे शिकविलें । माझें ऐकावें विठ्ठलें ॥४॥

१२२१. लोक म्हणती मज देव । हा तो अधर्म उपाव ॥१॥ आतां कळेल तें करीं । सीस तुझे हातीं सुरी ॥२॥ अधिकार नाहीं । पूजा करिती तैसा कांहीं ॥३॥ मन जाणे पापा । तुका म्हणे मायबापा ॥४॥

१२२२. एका म्हणतां भलें । आणिका सहजचि निंदिलें ॥१ ॥ कांहीं न करितां सायास । सहज घडले ते दोष ॥२॥ बरेवाईटाचें । नाही मज कांहीं साचें ॥३॥ तुका म्हणे वाणी । खंडोनि राहावें चिंतनीं ॥४॥

१२२३. आणिलें सेवटा । आतां कामा नये फांटा ॥१॥ मज आपुलेंसें म्हणा । उपरि या नारायणा ॥२॥ वेचियेली वाणी । युक्ती अवघी चरणीं ॥३॥ तुका धरी पाय । क्षमा करवूनि अन्याय ॥४॥

१२२४. न करा टांचणी । येथें कांहीं आडचणी ॥१॥ जिव्हा अमुप करी माप । विठ्ठल

पिकला माझा बाप ॥२॥ आठही प्रहर । बारा मास निरंतर ॥३॥ तुका म्हणे वाणी । वर्जेना हे घेता धणी ॥४॥

१२२५. तुझ्या नामाची आवडी । आम्ही विठो तुझीं वेडीं ॥१॥ आतां न वजों आणिकां ठाया । गाऊं गीत लागों पायां ॥२॥ काय वैकुंठ बापुडें । तुझ्या प्रेमसुखापुढें ॥३॥ संतसमागममेळे । प्रेमसुखाचा सुकाळ ॥४॥ तुका म्हणे तुझ्या पायीं । जन्ममरणा ठाव नाहीं ॥५॥

१२२६. साकरेंच्या योगें वर्ख । राजा कागदातें देखे ॥१॥ तैसें आम्हां माणुसपण । रामनाम केण्यागुणें ॥२॥ फिरंगीच्या योगें करी । राजा काष्ठ हातीं धरी ॥३॥ रत्नकनका योगें लाख । कंठीं धरिती श्रीमंत लोक ॥४॥ देवा देवपाट । देव्हाऱ्यावरी बैसे स्पष्ट ॥५॥ ब्रह्मानंदयोगें तुका । पढीयंता जनलोकां ॥६॥

१२२७. धनवंतालागीं । सर्व मान्यता हे जगीं ॥१॥ माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ॥२॥ जंव चाले मोठा धंदा । तंव बहिण म्हणे दादा ॥३॥ सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ॥४॥ तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥५॥

१२२८. न विचारतां ठायाठाव । काय भुंके तो गाढव ॥२॥ केला तैसा लाहे दंड । खळ अविचारी लंड ॥३॥ करावें लाताळें । ऐसें नेणें कोण्या काळें ॥३॥ न कळे उचित । तुका म्हणे नीत हित ॥४॥

१२२९. कंठीं नामसिक्का । आतां कळिकाळासी धक्का ॥१॥ रोखा माना कीं सिक्का माना । रोखा सिक्का तत्समाना ॥२॥ रोखा न मना कां न मना । जतन करा नाक काना ॥३॥ सिक्का न मनी रावण । त्याचें केलें निसंतान ॥४॥ सिका मानी हळाहळ । जालें सर्वांग शीतळ ॥५॥ तुका म्हणे नाम सिक्का । पटीं बैसविलों निजसुखा ॥६॥

१२३०. भूतीं देव म्हणोनि भेटतों या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥१॥ जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । नलगे द्यावा साचा परिहार ॥२॥ दयेसाठीं केला उपाधिपसारा । जड जीवा तारा नाव कथा ॥३॥ तुका म्हणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनिया ॥४॥

१२३१. हारपल्याची नका चित्तीं । धरूं खंती वांयांच ॥१॥ पावलें तें म्हणा देवा । सहज सेवा या नांवें ॥२॥ होणार तें भोगें घडे । लाभ जोडे संकल्पें ॥३॥ तुका म्हणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ॥४॥

१२३२. नेसणें आलें होतें गळ्या । लोक रळ्या करिती ॥१॥ आपणियां सावरिलें । जग भलें आपण ॥२॥ संबंध तो तुटला येणें । जागेपणें चेष्टांच्या ॥३॥ भलती सवा होती अंगें । बासर वेगें पडिलें ॥४॥ सावरिलें नीट वोजा । दृष्टिलाजा पुढिलांच्या ॥५॥ बरे उघडिलें डोळे । हळहळेपासूनि ॥६॥ तुका म्हणे विटंबना । नारायणा चुकली ॥७॥

१२३३. जिव्हा जाणे फिकें मधुर कीं क्षार । येर मांस पर हातास न कळे ॥१॥ देखांवें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखे कळों येती ॥२॥ परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचें कारण एका नव्हे ॥३॥ एके देहीं भिन्न ठेवियेल्या कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥४॥ तुका म्हणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ॥५॥

१२३४. नलगे द्यावा जीव सहजचि जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं ॥१॥ मरण जो मागें गाढवाचा बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ॥२॥ तुका म्हणे कांहीं होईल स्वहित । निधान जो थीत टाकूं पाहे ॥३॥

१२३५. मोल वेचूनियां धुंडिती सेवका । आम्ही तरी फुका मागों बळें ॥१॥ नसतां जवळी हित फार करूं । जीवभाव धरूं तुझ्या पायीं ॥२॥ नेदु भोग आम्ही आपुल्या शरीरा । तुम्हांसी दातारा व्हावें म्हणून ॥३॥ कीर्ती तुझी करूं आमुचे सायास । तूं कां रे उदास पांडुरंगा ॥४॥ तुका म्हणे तुज काय मागों आम्ही । फुकाचे का ना मी म्हणसी ना ॥५॥

१२३६. काय लवणकणिकेविण । एके क्षीण सागर ॥१॥ मा हे येवढी अडचणी । नारायणीं मजविण ॥२॥ कुबेरा अट्टाहासें जोडी । काय कवडी कारणें ॥३॥ तुका म्हणे काचमणी । कोण गणी भांडारी ॥४॥

१२३७. तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥१॥ तूं माझा आकार । मी तों तूंची निर्धार ॥२॥ मी तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगे सेवा ॥३॥ मी तुजमाजी अचळ । मजमाजी तुझें बळ ॥४॥ तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ॥५॥ तुका म्हणे देवा । विपरीत ठायीं नांवा ॥६॥

१२३८. वैराग्याचें भाग्य । संतसंग हाचि लाग ॥१॥ संतकृपेचे हे दीप । करी साधका निष्पाप ॥२॥ तोचि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यांत ॥३॥ तुका प्रेमें नाचे गाय । गाणियांत विरोन जाय ॥४॥

१२३९. जप तप ध्यान नलगे धारणा । विठ्ठल कीर्तनामाजी उभा ॥१॥ राहें माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ॥२॥ कीर्तनीं समाधि साधन ते मुद्रा । राहतील थारा धरोनियां ॥३॥ तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । ओळगती चारी ऋद्धिसिद्धि ॥४॥

१२४०. नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असो द्यावी ॥१॥ सरलिया भोग येईन सेवटीं । पायापें या भेटी अनुसंधानें ॥२॥ आतां मजसाठीं याल आकारास । रोकडी हे आस नाहीं देवा ॥३॥ तुका म्हणे मुखीं असो तुझें नाम । देईल तो श्रम देवो काळ ॥४॥

१२४१. हितावरी यावें । कोणी बोलिलों या भावें ॥१॥ नव्हे विनोदउत्तर । केले रंजवाया चार ॥२॥ केली अटाअटी । अक्षरांची देवासाठीं ॥३॥ तुका म्हणे खिजों ।

नका जागा तेथें निजों ॥४॥

१२४२. संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघा झाला नारायण । नाहीं आम्हांसी संबंधु । जरा मरण कांहीं बाधु ॥२॥ द्वैताद्वैतभावें । अवघें व्यापियेलें देवें ॥३॥ तुका म्हणे हरि । आम्हांमाजी क्रीडा करी ॥४॥

१२४३. नेणें करूं सेवा । पांडुरंगा कृपाळुवा ॥१॥ धांवें बुडतों मी काढीं । सत्ता आपुलिया ओढीं ॥२॥ क्रियाकर्महीन । जालों इंद्रियां अधीन ॥३॥ तुका विनंती करी । वेळोवेळां पाय धरी ॥४॥

१२४४. जयापासोनि सकळ । महीमंडळ हें जालें ॥१॥ तो एक पंढरीचा राणा । नये अनुमाना श्रुतीसी ॥२॥ विवादती जयासाठीं । जगजेठी तो विठ्ठल ॥३॥ तुका म्हणे आकळ । आहे सकळ व्यापक ॥४॥

१२४५. नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठाव धराया ॥१॥ जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल मायबहीण ॥२॥ नाहीं आकार विकार । चराचर भरलेंसे ॥३॥ नव्हे निर्गुण सगुण । जाणे कोण तयासी ॥३॥ तुका म्हणे भावाविण । त्याचें मन वोळेना ॥५॥

१२४६. आहे सकळां वेगळा । खेळे कळा चोरोनि ॥१॥ खांब सूत्राचिये परी । देव दोरी हालवितो ॥२॥ आपण राहोनि निराळा । कैसी कळा नाचवी ॥३॥ जेव्हां आसुडितो दोरी । भूमीवरी पडें तेव्हां ॥४॥ तुका म्हणे तो जाणावा । सखा करावा आपुला ॥५॥

१२४७. आतां पुढें मना । चाली जाली नारायणा ॥१॥ येथें राहिलें राहिलें । कैसें गुंतुनि उगलें ॥२॥ भोंवतें भोंवणी । आलियाची जाली धणी ॥३॥ तुका म्हणें रंगें । रंगीं रंगलें श्रीपांडुरंगें ॥४॥

१२४८. आळस पाडी विषयकामीं । शक्ती देईं तुझ्या नामीं ॥१॥ आणिक वचना मुकी वाणी । तुमच्या गर्जों द्यावी गुणीं ॥२॥ हेचि विनवणी । विनविली धरा मनीं ॥३॥ तुका म्हणे पाय डोळां । पाहें एरवी आंधळा ॥४॥

१२४९. कोण वेची वाणी । आतां क्षुल्लका कारणीं ॥१॥ आतां हेंचि माप करूं । विठ्ठल हृदयांत धरूं ॥२॥ नेंदाविया वृत्ति । आतां उठोंचि बहुती ॥३॥ उपदेश लोकां । करुनी वेडा होतो तुका ॥४॥

१२५०. मागेन तें एक तुज । देईं विचारोनि मज ॥१॥ नको दुर्जनाचा संग । क्षणक्षणा चित्तभंग ॥२॥ जन्म घेईन मी नाना । बहु सोसीन यातना ॥३॥ रंक होईन दीनांचा । घायें देहपात साचा ॥४॥ तुका म्हणे हेंचि आतां । देईं देईं तूं सर्वथा ॥५॥

१२५१. जाणसी उचित । पांडुरंगा धर्मनीत ॥१॥ तरि म्यां बोलावें तें काई । सरे ऐसें तुझे पायीं ॥२॥ पालटती क्षण । संचित प्रारब्ध क्रियमाण ॥३॥ तुका म्हणे सत्ता ।

होसी सकळ करिता ॥४॥

१२५२. तुम्ही कांटाळलां तरी । आम्हां न सोडणें हरी ॥१॥ जावें कवणिया ठाया । सांगा विनवितों पाया ॥२॥ केली जिवा साठी । आतां सुखें लागों पाठी ॥३॥ तुका म्हणे ठाव । न सोडणें हाचि भाव ॥४॥

१२५३. येउनि संसारीं । मी तों एक जाणे हरी ॥१॥ नेणें आणिक कांहीं धंदा । नित्य ध्यातसें गोविंदा ॥२॥ कामक्रोधलोभस्वार्थ । अवघा माझा पंढरिनाथ ॥३॥ तुका म्हणे एक । धणी विठ्ठल मी सेवक ॥४॥

१२५४. सर्वपक्षीं हरि साहे सखा जाला । ओल्या अंगणीच्या कल्पलता त्याला ॥१॥ सहजचाली चालतां पायवाटे । चिंतामणीसमान होती गोटे ॥२॥ तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरीं वेदान्त वाहे पाणी ॥३॥

१२५५. आम्हां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥१॥ वान ते सांवळी नांव तें श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥२॥ वत्स नाहीं माय भलत्यासवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥३॥ चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धालें सनकादिक सिद्ध मुनी ॥४॥ तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोक ॥५॥

१२५६. काय पुण्य ऐसें आहे मजपाशीं । तांतडी धांवसी पांडुरंगा ॥१॥ काय ऐसा भक्त वांयां गेलों थोर । तूं मज समोर होसी वेगा ॥२॥ काय कष्ट माझी देखिली चाकरी । तो तूं झडकरी पाचारिशी ॥३॥ कोण मी नांवाचा थोर गेलों मोठा । अपराधी करंटा नारायणा ॥४॥ तुका म्हणे नाहीं ठाऊकें संचित । येणें जन्में हित नाहीं केलें ॥५॥

१२५७. आमुचिया भावें तुज देवपण । तें कां विसरोन राहिलासी ॥१॥ समर्थासी नाहीं उपकारस्मरण । दिल्या आठवण वांचोनियां ॥२॥ चळण वळण सेवकाच्या बळें । निर्गुणाच्यामुळें सांभाळावें ॥३॥ तुका म्हणे आतां आलों खंडावरी । प्रेम देउनि हरी बुझवावें ॥४॥

१२५८. आम्ही मेलों तेव्हां देह दिला देवा । आतां करूं सेवा कोणाची मी ॥१॥ सूत्रधारी जैसा हालवितो कळा । तैसा तो पुतळा नाचे छंदें ॥२॥ बोलतसें जैसें बोलवितो देव । मज हा संदेह कासयाचा ॥३॥ पाप पुण्य ज्याचें तोचि जाणे कांहीं । संबंध हा नाहीं आम्हांसवें ॥४॥ तुका म्हणे तुम्हीं आइका हो मात । आम्ही या अतीत देहाहूनी ॥५॥

१२५९. लागों नेदी बोल पायां तुझ्या हरी । जीव जावो परि न करीं आन ॥१॥ परनारी मज रखुमाईसमान । वमनाहूनि धन नीच मानी ॥२॥ तुका म्हणे याची लाज असे कोणा । साहाकारी दीना ज्याची तया ॥३॥

१२६०. हेचि भेटी साच रूपाचा आठव । विसावला जीव आवडीपैं ॥१॥ सुखाचे भातुकें करावें जतन । सेविल्या तहान भूक जाय ॥२॥ दुरील जवळी आपणचि होतें । कवळिलें चित्तें जीवनासी ॥३॥ तुका म्हणे नाम घेतां वेळोवेळा । होतील शीतळा सकळा नाडी ॥४॥

१२६१. आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥१॥ साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥२॥ काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥३॥ तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांविण ॥४॥

१२६२. हित सांगे तेणें दिलें जीवदान । घातकी तो जाण मनामागें ॥१॥ बळें हे वारावे अधर्म करितां । आंधळें चालतां आडरानें ॥२॥ द्रव्य देऊनियां धाडावें तीर्थासी । नेदावें चोरासी चंद्रबळ ॥३॥ तुका म्हणे ऐसें आहे हें पुराणीं । नाहीं माझी वाणी पदरींची ॥४॥

१२६३. ऐसा घेईं कां रे संन्यास । करीं संकल्पाचा नाश ॥१॥ मग तूं राहें भलते ठायीं । जनीं वनीं खाटे भोई ॥२॥ तोडीं जाणिवेची कळा । होई वृत्तीसी वेगळा ॥३॥ तुका म्हणे नभा । होईं अणूचाही गाभा ॥४॥

१२६४. सोळा सहस्त्र होऊं येतें । भरलें रितें आम्हां पैं ॥१॥ ऐसें तुम्हां ठायाठाव । म्हूण देव संपादे ॥२॥ कैंचीं चिरामध्यें चिरें । मना बरें आलें तैं ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । अंगसंगा भिन्न करा ॥४॥

१२६५. इहलोकीं आम्हां भूषण अवकळा । भोपळा वाकळा अन्न भिक्षा ॥१॥ निमोली संपदा भयविरहित । सर्वकाळ चित्त समाधान ॥२॥ छिद्राचा आश्रम उंदीरकुळवाडी । धन नाम जोडी देवाची ते ॥३॥ तुका म्हणे एके सेवटीं राहणें । वर्ततां या जनाविरहित ॥४॥

१२६६. गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि म्हणें हरी ॥१॥ माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥२॥ मज हंसतील लोक । परी मी गाईन निःशंक ॥३॥ तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥४॥ तुका म्हणे माझी विनंती । तुम्ही परिसा कमळापती ॥५॥

१२६७. विष पोटीं सर्पा । जन भीतें तया दर्पा ॥१॥ पंच भूतें नाहीं भिन्न । गुण दुःख देती सीण ॥२॥ चंदन प्रिय वासें । आवडती जाती ऐसें ॥३॥ तुका म्हणे दाणा । कुचर मिळों नये अन्ना ॥४॥

१२६८. देव अवघें प्रतिपादी । वंदी सकळां एका निंदी ॥१॥ तेथें अवघें गेलें वायां । विष घास एके ठायां ॥२॥ सर्वांग कुरवाळी । उपटो एक रोमावळी ॥३॥ तुका म्हणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ॥४॥

१२६९. मज माझा उपदेश । आणिकां नये याची रीस ॥१॥ तुम्ही अवघे पांडुरंग । मीच

दुष्ट सकळ चांग ॥२॥ तुमचा मी शरणागत । कांहीं करा माझें हित ॥३॥ तुका पाय धरी । मी हें माझें दूर करीं ॥४॥

१२७०. जाणे त्याचें वर्म नेणे त्याचें कर्म । केल्याविण धर्म नेणवती ॥१॥ मैथुनाचें सुख सांगितल्या खूण । अनुभवाविण कळों नये ॥२॥ तुका म्हणे जळो शाब्दिक हें ज्ञान । विठोबाची खूण विरळा जाणे ॥३॥

१२७१. अभिमानी पांडुरंग । गोवा काशाचा हो मग ॥१॥ अनुसरा लवलाहीं । नका विचार करूं काहीं ॥२॥ कोठें राहातील पापें । जालिया हो अनुतापें ॥३॥ तुका म्हणे येचि घडी । उभ्या पावईल थडी ॥४॥

१२७२. तुझें वर्म हातीं । दिलें सांगोनियां संतीं ॥१॥ मुखीं नाम धरीन कंठीं । अवघा सांठवीन पोटीं ॥२॥ नवविधा वेढिन आधीं । सांपडलासी भावासंधी ॥३॥ तुका म्हणे बळिये गाढे । कळिकाळ पायां पडे ॥४॥

१२७३. माझ्या मना लागो चाळा । पहावया विठ्ठल डोळां ॥१॥ आणिक नाहीं चाड । नलगे संसार हा गोड ॥२॥ तरिच फळ जन्मा आलों । सरता पांडुरंगीं जालों ॥३॥ तुका म्हणे देवा । देईं चरणाची सेवा ॥४॥

१२७४. अवघें जेणें पाप नासे । तें हें असे पंढरीसी ॥१॥ गात जागा गात जागा । प्रेम मागा विठ्ठला ॥२॥ अवघी सुखाचीच रासी । पुंडलिकाशीं वोळली ॥३॥ तुका म्हणे जवळी आलें । उभें ठेलें समचरणीं ॥४॥

१२७५. देह तुझ्या पायीं । ठेवूनि जालों उतराई ॥१॥ आतां माझ्या जीवा । करणें तें करीं देवा ॥२॥ बहुत अपराधी । मतिमंद हीन बुद्धि ॥३॥ तुका म्हणे नेणें । भावभक्तीचीं लक्षणें ॥४॥

१२७६. जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें । अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥१॥ जाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती । सांडोनियां पळती रांडापोरें ॥२॥ बाइल म्हणे खर मरता तरी बरें । नासिलें हें घर थुंकोनियां ॥३॥ तुका म्हणे माझीं नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वांचूनियां ॥४॥

१२७७. जाणोनि नेणतें करी माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां ॥१॥ मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळा आंत पद्मपत्र ॥२॥ ऐकोनि नाईकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनीं योगिराज ॥३॥ देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टीं । स्वप्नींचिया सृष्टि चेइल्या जेवीं ॥४॥ तुका म्हणे ऐसें जालियावांचून । करणें तो शीण वाटतसे ॥५॥

१२७८. विठ्ठला विठ्ठला । कंठ आळवितां फुटला ॥१॥ कारे कृपाळू न होसी । काय

जालें मजविशीं ॥२॥ जाल्या वेरझारा । जन्मा बहुतांचा फेरा ॥३॥ तुका म्हणे नष्टा । अबोलण्या तुझ्या चेष्टा ॥४॥

१२७९. प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो ॥१॥ ऐसें करीं गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावें रंगा ॥२॥ पुरे पुरे आतां । नको दुजियाचीं सत्ता ॥३॥ लटिकें तें फेडा । तुका म्हणे जाय पीडा ॥४॥

१२८०. बोलाचें गौरव । नव्हे माझा हा अनुभव ॥१॥ माझी हरिकथा माउली । नव्हे आणिकांसी पांगिली ॥२॥ व्याली वाढविलें । निजपदीं निजविलें ॥३॥ दाटली वोरसें । त्रिभुवन ब्रह्मरसें ॥४॥ विष्णु जोडी कर । माथां रज वंदी हर ॥५॥ तुका म्हणे बळ । तोडरीं हा कळिकाळ ॥६॥

१२८१. सेवट तो भला । माझा बहु गोड जाला ॥१॥ आलों निजाच्या माहेरा । भेटी रखुमाईच्या वरा ॥२॥ परिहार जाला । अवघ्या दुःखाचा मागिला ॥३॥ तुका म्हणे वाणी । गेली आतां घेऊं धणी ॥४॥

१२८२. तुझें नाम गाऊं आतां । तुझ्या रंगीं नाचों था था ॥१॥ तुझ्या नामाचा विश्वास । आम्हां कैंचा गर्भवास ॥२॥ तुझे नामीं विसर पडे । तरी कोटी हत्या घडे ॥३॥ नाम घ्यारे कोणी फुका । भावें सांगतसे तुका ॥४॥

१२८३. बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार ॥१॥ घडों नेदी तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ॥२॥ आपुलीच करवी सेवा । पुजवी देवासारिखें ॥३॥ तुका म्हणे गाढव पशु । केला नाशु आयुष्या ॥४॥

१२८४. बाइले अधीन होय ज्याचें जिणें । तयाच्या अवलोकनें पडिजे द्वाड ॥१॥ कासया ते जंत जिताती संसारीं । माकडाच्या परी गारोड्यांच्या ॥२॥ बाइलेच्या मना येईल तें खरें । अभागी तें पुरें बाइलेंचें ॥३॥ तुका म्हणे मेंग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगबगा ॥४॥

१२८५. जगीं मान्य केलें हा तुझा देकार । कीं कांहीं विचार आहे पुढें ॥१॥ करितों कवित्व जोडितों अक्षरें । येणें काय पुरें जालें माझें ॥२॥ तोंवरि हे माझी न सरे करकर । जों नव्हे विचार तुझ्या मुखें ॥३॥ तुका म्हणे तुज पुंडलिकाची आण । जरि कांहीं वंचन करिसी मज ॥४॥

१२८६. झड मारोनिया बैसलों पंगती । उठवितां फजिती दातयाची ॥१॥ काय तें उचीत तुम्हां कां न कळे । कांहो झांका डोळे पांडुरंगा ॥२॥ घेईन इच्छेचें मागोनि सकळ । नाहीं नव्हे काळ बोलायाचा ॥३॥ तुका म्हणे जालों गगनाधिकारी । नाहीं लोक परी लाज देवा ॥४॥

१२८७. माझ्या वडिलांची मिरासी गा देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा ॥१॥ उपवास

पारणीं राखिला दारवंटा । केला भोग वटा आम्हालागीं ॥२॥ वंशपरंपरा दास मी अंकिता । तुका मोकलितां लाज कोणां ॥३॥

१२८८. नाम न वदे ज्याची वाचा । तो लेंक दो बापांचा ॥१॥ हेचि ओळखी तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥२॥ ठावा नाहीं पांडुरंग । जाणा जातीचा तो मांग ॥३॥ ज्यासी विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ॥४॥ नाम न म्हणे ज्याचें तोंड । तेंचि चर्मकाचें कुंड ॥५॥ तुका म्हणे त्याचे दिवशीं । रांड गेली महारापाशीं ॥६॥

१२८९. पतित मिराशी शरण आलों तुज । राखीं माझी लाज पांडुरंगा ॥१॥ तारियेले भक्त नकळे तुझा अंत । थोर मी पतित पांडुरंगा ॥२॥ द्रौपदी बहिणी वैरीं गांजियेली । आपणाऐसी केली पांडुरंगा ॥३॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ॥४॥ सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । आपणाऐसा केला पांडुरंगा ॥५॥ तुका म्हणे तुज शरण निजभावें । पाप निर्दाळावें पांडुरंगा ॥६॥

१२९०. कस्तूरीचें रूप अति हीनवर । माजी असे सार मोल तया ॥१॥ आणीकही तैसीं चंदनाचीं झाडें । परिमळें वाढे मोल तयां ॥२॥ काय रूपें असे परीस चांगला । धातु केली मोला वाढ तेणें ॥३॥ फिरंगी आटितां नये बारा रूके । गुणें मोलें विके सहस्त्रवरी ॥४॥ तुका म्हणे नाहीं जातीसवें काम । ज्याचे मुखीं नाम तोचि धन्य ॥५॥

१२९१. नव्हे मी स्वतंत्र अंगाचा पाईक । जे हे सकळिक सत्ता वारूं ॥१॥ तुम्हां आळवावें पाउलापाउलीं । कृपेची साउली करीं मज ॥२॥ शक्तिहीन तरी जालों शरणागत । आपुला वृत्तांत जाणोनियां ॥३॥ तुका म्हणे भवाभेणें धरिले पाय । आणीक उपाय नेणें कांहीं ॥४॥

१२९२. पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं हातीं । नाहीं ऐशी मति अर्थ कळे ॥१॥ होईल तें हो या विठोबाच्या नांवें । अर्जिलें तें भावें जीवीं धरूं ॥२॥ एखादा अंगासी येईल प्रकार । विचारितां फार युक्ति वाढे ॥३॥ तुका म्हणे आळी करितां गोमटी । मायबापा पोटीं येते दया ॥४॥

१२९३. पाहातां रूप डोळां भरे । अंतर नुरे वेगळें । इच्छावशें खेळ मांडी । अवघें सांडी बाहेरी ॥१॥ तो हा नंदा नंदन बाइये । यासी काय परिचार वो ॥२॥ दिसतो हा नोहे तैसा । असे दिशाव्यापक । लाघव हा खेळासाठीं । होतां भेटी परतेना ॥३॥ म्हणोनि उभी ठाकलीये । परतलीये या वाटा । आड करोनियां तुका । जो या लोकां दाखवितो ॥४॥

१२९४. इंद्रियांचीं दीनें । आम्ही केलों नारायणें ॥१॥ म्हणऊनि ऐसे सोसी । काय सांगों कोणापाशीं ॥२॥ नाहीं अंगीं बळ । त्याग करिजेसा सकळ ॥३॥ तुका म्हणे

मोठें । प्रारब्ध हें होतें खोटें ॥४॥

१२९५. हातीं धरूं जावें । तेणें परतेंचि व्हावें ॥१॥ ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥२॥ देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥३॥ तुका म्हणे पीक । भूमि नेदी न मिळे भीक ॥४॥

१२९६. मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥१॥ तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥२॥ वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥३॥ काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे नलगे वाती ॥४॥

१२९७. तरिच जन्मा यावें । दास विठोबाचें व्हावें ॥१॥ नाहीं तरि काय थोडीं । श्वानसूकरें बापुडीं ॥२॥ ज्याल्याचें तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥३॥ तुका म्हणे भले । ज्याच्या नांवें मानवलें ॥४॥

१२९८. द्या जी माझा विचारोनियां विभाग । न खंडे हा लाग आहाचपणें ॥१॥ किती नेणों तुम्हां साहाते कटकट । आम्हीच वाईट निवडलों ते ॥२॥ करवितां कलह जिवाचियेसाठीं । हे तुम्हा वोखटी ढाळ देवा ॥३॥ तुका म्हणे धीर कारणा आपुला । तुम्हीं तों विठ्ठला मायातीत ॥४॥

१२९९. आमुचे ठाऊके तुम्हां गर्भवास । बळिवंत दोष केले भोग ॥१॥ काय हा सांगावा नसता नवलाव । मैंदपणें भाव भुलवणेचा ॥२॥ एका पळवूनि एका पाठी लावा । कवतुक देवा पहावया ॥३॥ तुका म्हणे जेणें असें चेतविलें । त्याच्यानें उगलें कैसें नव्हे ॥४॥

१३००. निर्दयासी तुम्ही करितां दंडण । तुमचें गाऱ्हाणें कोठें द्यावें ॥१॥ भाकितों करुणा ऐकती कान । उगलेंचि मौन्य धरिलें ऐसें ॥२॥ दीनपणें पाहें पाय भिडावोनि । मंजुळा वचनीं विनवीतसें ॥३॥ तुका म्हणे गांठी मनाची उकला । काय जी विठ्ठला पाहातसां ॥४॥

१३०१. नसतों किविलवाणें । कांही तुमच्या कृपादानें ॥१॥ हेचि तयाची ओळखीं । धालें टवटवित मुखीं ॥२॥ वांयां जात नाहीं । वचन प्रीतीचें तें कांहीं ॥३॥ तुका म्हणे देवा । सत्य येतें अनुभवा ॥४॥

१३०२. जालों तंव साचें । दास राहवणें काचें ॥१॥ हें कां मिळतें उचित । तुम्ही नेणां कृपावंत ॥२॥ सिंहाचें तें पिले । जाय घेऊनियां कोल्हें ॥३॥ तुका म्हणे नास । आम्हां म्हणविल्या दास ॥४॥

१३०३. देवाच्या उद्देशें जेथें जेथें भाव । तो तो वसे ठाव विश्वंभर ॥१॥ लोभाचे संकल्प पळालियावरी । कैंची तेथें उरी पापपुण्या ॥२॥ शुद्ध भक्ती मन जालिया निर्मळ । कुश्चळीं विटाळ वज्रलेप ॥३॥ तुका म्हणे ज्याचें तयासीच कळे । प्रांत येतो फळें कळों मग ॥४॥

१३०४. कडसणी धरितां अडचणीचा ठाव । म्हणऊनि जीव त्रासलासे ॥१॥ लौकिकाबाहेरि राहिलों निराळा । तुजविण वेगळा नाहीं दुजा ॥२॥ संकोचानें नाहीं होत धणीवरी । उरवूनी उरी काय काज ॥३॥ तुका म्हणे केले इच्छेचि सारिखें । नाहींसें पारिखें येथें कोणी ॥४॥

१३०५. हेंचि जतन करा दान । धरुनि चरण राहिलों ते ॥१॥ घ्यावी माझ्या हातें सेवा । हेचि देवा विनवणी ॥२॥ आणीक कांहीं न घालीं भार । बहुत फार सांकडें ॥३॥ तुका तुमचा म्हणवी दास । त्याची आस पुरवावी ॥४॥

१३०६. आपल्याच फुंदे । जेथें तेथें घेती छंदें ॥१॥ पडला सत्याचा दुष्काळ । बहु फार जाली घोंळ ॥२॥ विश्वाचे माठ । त्याचे कपाळीं तें नाट ॥३॥ तुका म्हणे घाणा । मूढा तीर्थीं प्रदक्षिणा ॥४॥

३०७. उद्योगाची धांव बैसली आसनीं । पडिलें नारायणीं मोटळें हें ॥१॥ सकळ निश्चिंती जाली हा भरंवसा । नाहीं गर्भवासा येणें ऐसा ॥२॥ आपुलिया सत्ते नाहीं आम्हां जिणें । अभिमान तेणें नेला देवें ॥३॥ तुका म्हणे चळे एकाचिया सत्ते । आपुलें मी रितेपणें असें ॥४॥

१३०८. बहुतां पुरे ऐसा वाण । आलें धन घरासी ॥१॥ घ्या रे फुका मोलेंविण । नारायण न भुला ॥२॥ ऐका निवळल्या मनें । बरव्या कानें सादर ॥३॥ तुका म्हणे करूनि अंतीं । निश्चिंती हे ठेवावी ॥४॥

१३०९. माझी मज जाती आवरली देवा । न व्हावा या गोवा इंद्रियांचा ॥१॥ कासया मी तुझा म्हणवितों दास । असतों उदास सर्व भावें ॥२॥ भयाचिये भेणें धरियेली कास । न पुरतां आस काय थोरी ॥३॥ तुका म्हणे आपआपलीं जतन । कैंचें थोरपण मग तुम्हां ॥४॥

१३१०. विनवितों तरी आणितोसि परी । याचकानें थोरी दातयाची ॥१॥ आमुचेही कांहीं असों द्या उपकार । एकल्यानें थोर कैंचे तुम्ही ॥२॥ न घ्यावी जी कांही बहुसाल सेवा । गौरव तो देवा यत्न कीजे ॥३॥ तुका म्हणे नाहीं आमुची मिरासी । असावेंसीं ऐसीं दुर्बळेंचि ॥४॥

१३११. एका ऐसें एक होतें कोणा काळें । समर्थाच्या बळें काय नव्हे ॥१॥ घालूनि बैसलों मिरासीस पाया । जिंको देवराया संदेह नाहीं ॥२॥ केला तो न संडीं आतां कइवाड । वारीन हे आड कामक्रोध ॥३॥ तुका म्हणे जाली आळसाची धाडी । नव्हती आली जोडी कळों साच ॥४॥

१३१२. झालें समाधान । तुमचे धरिले चरण ॥१॥ आतां उठावेंसें मना । येत नाहीं नारायणा ॥२॥ सुराडिकपणें । जेथें सांपडलें केणें ॥३॥ तुका म्हणे भोग । गेला निवारला लाग ॥४॥

१३१३. मुखाकडे वास । पाहे करूनियां आस ॥१॥ आतां होईल तें शिरीं । मनोगत आज्ञाधारी ॥२॥ तुम्हीं अंगीकार । केला पाहिजे हें सार ॥३॥ तुका म्हणे दारीं । उभें याचक मी हरी ॥४॥

१३१४. नाहीं माथा भार । तुम्हीं घेत हा विचार ॥१॥ जाणोनियां केलें । दुरिल अंगेस लाविलें ॥२॥ आतां बोलावें आवडी । नाम घ्यावें घडी घडी ॥३॥ तुका म्हणे दुरी । देवा खोटी ऐसी उरी ॥४॥

१३१५. माझें जड भारी । आतां अवघें तुम्हांवरी ॥१॥ जालों अंकित अंकिला । तुमचा मुकलों मागिला ॥२॥ करितों जें काम । माझी सेवा तुझें नाम ॥३॥ तुका पायां लागे । कांहीं नेदी ना न मागें ॥४॥

१३१६. तुम्ही आम्ही भले आतां । जालों चिंता काशाची ॥१॥ आपुलाले आलों स्थळीं । मौन कळी वाढेना ॥२॥ सहज जें मनीं होतें । तें उचित उघडलें ॥३॥ तुका म्हणे नसतें अंगा । येत संगा सारिखे ॥४॥

१३१७. चित्ता ऐसी नको देऊं आठवण । जेणें देवाचे चरण अंतरे तें ॥१॥ आलिया वचन रामनामध्वनि । ऐकावी कानीं ऐसी गोडी ॥२॥ मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेंविण जीवा दुःख देतो ॥३॥ तुका म्हणे राहे अंतरीं शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ॥४॥

१३१८. कोण पुण्य कोण गांठी । ज्यासी ऐसियांची भेटी ॥१॥ जिहीं हरी धरिला मनीं । दिलें संसारासी पाणी ॥२॥ कोण हा भाग्याचा । ऐसियासी बोले वाचा ॥३॥ तुका म्हणे त्याचे भेटी । होय संसारासी तुटी ॥४॥

१३१९. तरिच हा जीव संसारीं उदास । धरिला विश्वास तुम्हां सोई ॥१॥ एके जातीविण नाहीं कळवळा । ओढिली गोपाळा सूत्रदोरी ॥२॥ फुटतसे प्राण क्षणाच्या विसरें । हें तों परस्परें सारिखेंचि ॥३॥ तुका म्हणे चित्तीं राखिला अनुभव । तेणें हा संदेह निवारला ॥४॥

१३२०. किती विवंचना करीतसें जीवीं । मन धावंडवी दाहीं दिशा ॥१॥ कोणा एका भावें तुम्हीं अंगीकार । करावा विचार याचसाठी ॥२॥ इतर ते आतां लाभ तुच्छ जाले । अनुभवा आले गुणागुण ॥३॥ तुका म्हणे लागो अखंड समाधि । जावें प्रेमबोधीं बुडोनियां ॥४॥

१३२१. दिकचि या नाहीं संसारसंबंधा । तुटेना या बाधा भवरोगाची ॥१॥ तांतडी ते करीं म्हणऊनि तांतडी । साधिली ते घडी सोनियाची ॥२॥ संकल्पाच्या बीजें इंद्रियांची चाली । प्रारब्ध तें घाली गर्भवासीं ॥३॥ तुका म्हणे बीजें जाळुनि सकळ । करावें गोपाळें आपुले भाट ॥४॥

१३२२. आतां होईन धरणेकरी । भीतरीच कोंडीन ॥१॥ नाहीं केली जीवेंसाठीं । तों कां गोष्टी रुचे ते ॥२॥ आधीं निर्धार तो सार । मग भार सोसेना ॥३॥ तुका म्हणे खाऊं जेऊं ।

नेदूं होऊं वेगळा ॥४॥

१२२३. होईल तरि पुसापुसी । उत्तर त्यासी योजावें ॥१॥ तोंवरि मी पुढें कांहीं । आपुलें नाहीं घालीत ॥२॥ जाणोनियां अंतर देव । जेव्हां भेव फेडील ॥३॥ तुका म्हणे धरिल हातीं । करील खंतीवेगळें ॥४॥

१३२४. हा तों नव्हे कांहीं निराशेचा ठाव । भलें पोटीं वाव राखिलिया ॥१॥ विश्वंभरें विश्व सामाविलें पोटीं । तेथेंचि सेवटीं आम्ही असों ॥२॥ नेणतां चिंतन करितों अंतरीं । तेथें अभ्यंतरीं उमटेल ॥३॥ तुका म्हणे माझा स्वामी अबोलणा । पुरवूं खुणे खुणा जाणतसों ॥४॥

१३२५. निष्ठुर तो दिसे निराकारपणें । कोंवळा सगुणें प्रतिपाळी ॥१॥ केलाच करावा केला कइवाड । होईल तें गोड न सरते ॥२॥ मथिलिया लागे नवनीत हातां । नासे वितुळतां आहाच तें ॥३॥ तुका म्हणे आतां मनाशीं विचार । करावा तो सार एकचित्तें ॥४॥

१३२६. बहु देवा बरें जालें । नसतें गेलें सोंवळें ॥१॥ धोवटाशीं पडली गांठी । जगजेठीप्रसादें ॥२॥ गादल्याचा जाला झाडा । गेली पीडा विकल्प ॥३॥ तुका म्हणे वरावरी । निर्मळ करी निर्मळा ॥४॥

१३२७. स्वामित्वाचीं वर्में असोनि जवळी । वाहों जावें मोळी गुणासवें ॥१॥ काबाडापासूनि सोडवा दातारा । कांहीं नका भारा पात्र करूं ॥२॥ धनवंत्र्याचिये अंगी सत्ताबळ । व्याधी ते सकळ तोडावया ॥३॥ तुका म्हणे आलें मोड्यासी कोंपट । सांडोव्याची वाट विसरावी ॥४॥

१३२८. ऋणाच्या परिहारा जालों वोळगणा । द्यावी नारायणा वासलाती ॥१॥ जालों उतरायी शरीरसंकल्पें । चुकों द्यावीं पापें सकळही ॥२॥ आजिवरी होतों धरूनि जीवासी । व्याजें कासाविसी बहु केलें ॥३॥ तुका म्हणे मना आणिला म्यां भाव । तुमचा तेथें ठाव आहे देवा ॥४॥

१३२९. येणें पांगें पायांपाशीं । निश्चयेंसी राहेन ॥१॥ सांगितली करीन सेवा । सकळ देवा दासत्व ॥२॥ बंधनाची तुटली बेडी । हेचि जोडी मग आम्हां ॥३॥ तुका म्हणे नव्हे क्षण । पायांविण वेगळा ॥४॥

१३३०. आपुल्या आपण उगवा लिगाड । काय माझें जड करुन घ्याल ॥१॥ उद्धरासी काय उधाराचें काम । वाढवूंचि श्रम नये देवा ॥२॥ करा आतां मजसाठीं वाड पोट । ठावें नाहीं तंट जालें लोकीं ॥३॥ तुका म्हणे बाकी झडलियावरी । न पडे व्यवहारीं संचिताचे ॥४॥

१३३१. सर्व संगीं विट आला । तूं एकला आवडसी ॥१॥ दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडीं ॥२॥ बहु जालों खेदक्षीण । येणें सीण तो नासे ॥३॥ तुका म्हणे गंगे वास ।

बहु त्या आस स्थळाची ॥४॥

१३३२. शीतळ तें शीतळाहुनी । पायवणी चरणींचें ॥१॥ सेवन हें शिरसा धरीं । अंतरीं ही वरदळा ॥२॥ अवघेंचि नासी पाप । तीर्थ बाप माझ्याचें ॥३॥ बैसोनिया तुका तळीं । त्या कल्लोळीं डौरला ॥४॥

१३३३. गोदे काठीं होता आड । करूनि कोड कवतुकें ॥१॥ देखण्यांनी एक केलें । आइत्या नेलें जिवनापें ॥२॥ राखोनियां होतों ठाव । अल्प जीव लावूनि ॥३॥ तुका म्हणे फिटे धणी । हे सज्जनीं विश्रांति ॥४॥

१३३४. न पाहें माघारें आतां परतोनि । संसारापासूनि विटला जीव ॥१॥ सामोरा येऊनि कवळीं दातारा । काळाचा हाकारा न साहावे ॥२॥ सावधान चित्त होईल आधारें । खेळतांही बरें वाटईल ॥३॥ तुका म्हणे कंठ दाटला या सोसे । न पवेचि कैसें जवळीं हे ॥४॥

१३३५. मथनीचें नवनीत । सर्व हितकारक ॥१॥ दंडवत दंडापरी । मागें उरी नुरावी ॥२॥ वचनाचा तो पसरु काई । तांतडीं डोईपाशींच ॥३॥ तुका म्हणे जगजेठी । लावी कंठीं उचलूनि ॥४॥

१३३६. अवचिताचि हातीं ठेवा । दिला सेवा न करितां ॥१॥ भाग्य फळलें जाली भेटी । नेघें तुटी यावरी ॥२॥ दैन्य गेलें हरली चिंता । सदैव आतां यावरी ॥३॥ तुका म्हणे वांटा जाला । बोलों बोला देवासी ॥४॥

१३३७. समर्थाची धरिली कास । आतां नाश कशाचा ॥१॥ धांवे पावें करीन लाहो । तुमचा आहो विठ्ठला ॥२॥ नलगे मज पाहाणें दिशा । हाकेसरिसा ओढसी ॥३॥ तुका म्हणे नव्हे धीर । तुम्हां स्थिर दयेनें ॥४॥

१३३८. करूं तैसें पाठांतर । करुणाकर भाषण ॥१॥ जिहीं केला मूर्तिमंत । ऐसा संतप्रसाद ॥२॥ सोज्वळ केल्या वाटा । आइत्या नीटा मागीलां ॥३॥ तुका म्हणे घेऊं धांवा । करूं हांवा तें जोडी ॥४॥

१३३९. अचळ न चळे ऐसें झालें मन । धरूनि निज खूण राहिलोंसें ॥१॥ आवडी बैसली गुणांची अंतरीं । करूं धणीवरी सेवन तें ॥२॥ एकविध भाव नव्हे अभावना । आणिक या गुणां न मिळवे ॥३॥ तुका म्हणे माझे पडिलें आहारीं । ध्यान विटेवरी ठाकलें तें ॥४॥

१३४०. वैष्णवांसंगती सुख वाटे जीवा । आणीक मी देवा कांहीं नेणें ॥१॥ गायें नाचें उडें आपुलिया छंदें । मनाच्या आनंदें आवडीनें ॥२॥ लाज भय शंका दुराविला मान । न कळे साधन यापरतें ॥३॥ तुका म्हणे आतां आपुल्या सायासें । आम्हा जगदीशें सांभाळावें ॥४॥

१३४१. शरण शरण वाणी । शरण त्रिवाचा विनवणी ॥१॥ स्तुति न पुरे हे वाचा । सत्य

दास मी दासांचा ॥२॥ देह न सांभाळून । पायांवरी लोटांगण ॥३॥ विनवी संतां तुका दीन । नोहे गौरवीं उत्तीर्ण ॥४॥

१३४२. लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंतपार आवडीसी ॥१॥ कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ॥२॥ आरुषा उत्तरीं संतोषे माउली । कवळुनि घाली हृदयांत ॥३॥ पोटा आलें त्याचे नेणे गुणदोष । कल्याणचि आस असावी हे ॥४॥ मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघ गंगा काई परतों जाणें ॥५॥ तुका म्हणे कोठें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची ॥६॥

१३४३. युक्ति तंव झाल्या कुंठित सकळा । उरली हे कळा जीवनाची ॥१॥ संतचरणीं भावें ठेविलें मस्तक । जोडोनि हस्तक राहिलोंसें ॥२॥ जाणपणें नेणें कांहींच प्रकार । साक्षीतें अंतर अंतरासी ॥३॥ तुका म्हणे तुम्हीं केलें अभयदान । तेणें समाधान राहिलोंसे ॥४॥

१३४४. हागे आलों कोणी म्हणे बुडतिया । तेणें किती तया बळ चढे ॥१॥ तुम्हीं तव भार घेतला सकळ । आश्वासिलों बाळ अभयकरें ॥२॥ भुकेलिया आस दावितां निर्धार । किती होय धीर समाधान ॥३॥ तुका म्हणे दिली चिंतामणीसाठीं । उचित काचवटी दंडवत ॥४॥

१३४५. कैसा तूं देखिला होसील गोपाळीं । पुण्यवंता डोळीं नारायण ॥१॥ तेणें लोभें जीव जालासे बराडी । आम्ही ऐसी जोडी कईं लाभों ॥२॥ असेल तें कैसें दर्शनाचें सुख । अनुभवें श्रीमुख अनुभवितां ॥३॥ तुका म्हणे वाटे देसी आळिंगन । अवस्था ते क्षणक्षणा होते ॥४॥

१३४६. कासया या लोभें केलें आर्तभूत । सांगा माझें चित्त नारायणा ॥१॥ चातकाचे परी एकचि निर्धार । लक्षभेदी तीर फिरों नेणे ॥२॥ सांवळें रूपडें चतुर्भुज मूर्ति । कृष्णनाम चित्तीं संकल्प हा ॥३॥ तुका म्हणे करीं आवडीसी ठाव । नको माझा भाव भंगों देऊं ॥४॥

१३४७. काय माझा पण होईल लटिका । ब्रिदावळी लोकां दाविली ते ॥१॥ करी करूनियां देईं माझी आळी । येऊनि कुरवाळी पांडुरंगे ॥२॥ आणीक म्यां कोणा म्हणवावें हातीं । नये काकुलती दुजियासी ॥३॥ तुका म्हणे मज येथेंचि ओळखी । होईन तो सुखी पायांनींच ॥४॥

१३४८. तुम्हां आम्हां जंव जालिया समान । तेथें कोणां कोण सनमानी ॥१॥ उरी तों राहिलें गोमटें गौरव । ओढे माझा जीव पायांपाशी ॥२॥ नेणपणें आम्ही आळवूं वोरसें । बोलावितों रसें शब्दरत्नें ॥३॥ तुका म्हणे लळे पाळीं वो विठ्ठलें । कां हे उरविले भेदाभेद ॥४॥

१३४९. नको माझे मानूं आहाच ते शब्द । कळवळ्याचा वाद करीतसें ॥१॥ कासयानें बळ करूं पायांपासीं । भाकावी ते दासीं करुणा आम्हीं ॥२॥ काय मज चाड असे या लौकिकें । परी असे निकें अनुभवाचें ॥३॥ लांचावल्यासाठीं वचनाची आळी । टकळ्यानें घोळी जवळी मन ॥४॥ वाटतसे आस पुरविसी ऐसें । तरि अंगीं पिसें लावियेलें ॥५॥ तुका म्हणे माझी येथेंचि

आवडी। श्रीमुखाची जोडी इच्छीतसें ॥६॥

१३५०. जन्मा आलियाचा लाभ। पद्मनाभ दरुषणें ॥१॥ म्हणउनि लवलाहें। पाय आहें चिंतित ॥२॥ पाठीलागा येतो काळ। तूं कृपाळू माउली ॥३॥ बहु उसंतीत आलों। तया भ्यालों स्थळासी ॥४॥ कोण्या उपायें हें घडे। भव आंगडें सुटकेचें ॥५॥ तुका म्हणे तूं जननी। ये निर्वाणीं विठ्ठले ॥६॥

१३५१. जेणें वाढे अपकीर्ति। सर्वार्थी तें वर्जावें ॥१॥ सत्य रूचे भलेपण। वचन तें जगासी ॥२॥ होईजेतें शूर त्यागें। वाउगें तें सारावें ॥३॥ तुका म्हणे खोटें वर्म। निंद्यकर्म काळिमा ॥४॥

१३५२. याची सवे लागली जीवा। गोडी हेवा संगाचा ॥१॥ परतें न सरवे दुरी। क्षण हरीपासूनि ॥२॥ जालें तरी काय तंट। आतां चट न संडे ॥३॥ तुका म्हणे चक्रचाळें। वेड बळें लाविलें ॥४॥

१३५३. याचा तंव हाचि मोळा। देखिला डोळा उदंड ॥१॥ नेदी मग फिरो मागें। अंगा अंगे संचरे ॥२॥ कां गा याची नेणां खोडी। जीभा जोडी करितसे ॥३॥ पांघरें तें बहु काळें। घोंगडेंही ठायींचें ॥४॥ अंगीं वसेचि ना लाज। न म्हणे भाज लोणाची ॥५॥ सर्वसाक्षी अबोल्यानें। दुश्चित कोणें नसावें ॥६॥ तुका म्हणे धरीला हातीं। मग निश्चिती हरीनें ॥७॥

१३५४. प्रसिद्ध हा असे जगा। अवघ्या रंगारंगाचा ॥१॥ तरी वाटा न वजे कोणी। नारायणीं घरबुडीं ॥२॥ बहुतां ऐसें केलें मागें। लाग लागें लागेना ॥३॥ हो कां नर अथवा नारी। लाहान थोरीं आदर ॥४॥ जालें वेगळें लोकीं पुरे। मग नुरे समूळ ॥५॥ कळेना तो आहे कैसा। कोणी दिशा बहु थोडा ॥६॥ तुका म्हणे दुसऱ्या भावें। छाया नावें न देखवे ॥७॥

१३५५. न संडावा आतां ऐसा वाटे ठाव। भयासी उपाव रक्षणाचा ॥१॥ म्हणऊनि मनें वळियेलें मन। कारियाकारण चाड नाहीं ॥२॥ नाणावी उपाधि करूनियां मूळ। राखतां विटाळ तेंचि व्हावें ॥३॥ तुका म्हणे येथें न वेचें वचन। निजीं निजखूण सांपडली ॥४॥

१३५६. सत्तेचें भोजन समयीं आतुडे। सेवनही घडे रुचिनेसीं ॥१॥ वर्मे भ्रम नेला जालें एकमय। हृदयस्थीं सोय संग जाला ॥२॥ कोथळीस जमा पडिलें संचित। मापल्याचा वित्त नेम जाला ॥३॥ तुका म्हणे धणी ऐसा जालों आतां। करीन ते सत्ता माझी आहे ॥४॥

१३५७. देईल तें उणें नाहीं। याचें कांहीं पदरीं ॥१॥ पाहिजे तें संचित आतां। येथें सत्ता करावया ॥२॥ गुणां ऐसा भरणा भरी। जों जें चारी तें लाभे ॥३॥ तुका म्हणे देवीं देव। फळे भाव आपुला ॥४॥

१३५८. तेव्हां होतों भोगाधीन। तुम्हां भिन्न पासुनि ॥१॥ आतां बोलों नये ऐसें।

अनारिसे वेगळें ॥२॥ सन्मुख जालों स्वामीकडे । भव आंगडे निराळे ॥३॥ चिंतिलें तें चिंतामणी । फिटे धणी तों द्यावें ॥४॥ सहज स्थिति आहे अंगीं । प्रसंगीं ते वंचेना ॥५॥ तुमची देवा धरिली कास । केला नास प्रपंचा ॥६॥ तुका म्हणे जाणोनि वर्मे । कर्माकर्मे ठेविलीं ॥७॥

१३५९. केला कईवाड संतांच्या आधारें । अनुभवें खरें कळों आलें ॥१॥ काय जीवित्वाची धरुनियां आशा । व्हावें गर्भवासा पात्र भेणें ॥२॥ अबाळीनें जावें निश्चिंतीच्या ठायां । रांडा रोटा वांयां करूं नये ॥३॥ तुका म्हणे बळी देतां तें निधान । भिकेसाठीं कोण राज्य देतो ॥४॥

१३६०. संगतीनें होतो पंगतीचा लाभ । अशोभीं अनुभव असिजेतें ॥१॥ जैसीं तैसीं असों पुढिलांचे सोई । धरिती हातीं पायीं आचारिये ॥२॥ उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलाची सदा दया चित्तीं ॥३॥ तुका म्हणे तरी सज्जनाची कीर्ति । पुरवावी आर्ति निर्बळाची ॥४॥

१३६१. करितां विचार सांपडलें वर्म । समूळ निश्रम परिहाराचें ॥१॥ मज घेऊनियां आपणांसी द्यावें । साटीं जीवें भावें नारायणा ॥२॥ उरी नाहीं मग पडदा कां आला । स्वमुखेंचि भला करितां वाद ॥३॥ तुका म्हणे माझें खरें देणें घेणें । तुम्हीं साक्षी जाणें अंतरींचें ॥४॥

१३६२. आतां देह अवसान । हें जतन तोंवरीं ॥१॥ गाऊं नाचूं गदारोळें । जिंकों बळें संसार ॥२॥ याचि जीऊं अभिमानें । सेवाधनें बळकट ॥३॥ तुका म्हणे न सरें मागें । होईन लागें आगळा ॥४॥

१३६३. कुळींची हें कुळदेवी । केली ठावी संतांनीं ॥१॥ बरवें जालें शरण गेलों । उगविलों संकटीं ॥२॥ आणिला ही रूपा बळें । करूनि खळें हरिदासीं ॥३॥ तुका म्हणे समागमें । नाचों प्रेमें लागलों ॥४॥

१३६४. ज्यानें आड यावें कांहीं । त्याचें नाहीं बळ आतां ॥१॥ मन येथें साह्य जालें । हरिच्या धालें गुणवादीं ॥२॥ चुकुर तो गेला काळ । जालें बळ संगाचें ॥३॥ तुका म्हणे धरूं सत्ता । होईल आतां करूं तें ॥४॥

१३६५. देवासी तो पुरे एकभाव गांठीं । तोचि त्याचे मिठी देईल पायीं ॥१॥ पाहोनि राहीन कवतुकें निराळा । मी मजवेगळा होऊनियां ॥२॥ कांहीं नेघें शिरीं निमित्ताचा भार । नलगे उत्तर वेचावेंचि ॥३॥ तुका म्हणे जीवें पडिलिया गांठी । मग नाहीं मिठी सुटों येत ॥४॥

१३६६. लौकिकासाठीं या पसाऱ्याचा गोवा । कांहीं नाहीं देवा लागो येत ॥१॥ ठेवावा माथा तो नुचलावा पायीं । ठायींचिये ठायीं हालों नये ॥२॥ डहुळल्या मनें वितुळेल रूप । नांव ऐसें पाप उपाधीतें ॥३॥ तुका म्हणे देव प्रीतीनें कवळीं । ठेविल जवळी उठवूनि ॥४॥

१३६७. नाहीं होत भार घातल्या उदास । पुरवावी आस सकळही ॥१॥ ऐसा नाहीं मज एकाचा अनुभव । धरिला तो भाव उद्धरिले ॥२॥ उतावीळ असे शरणागत काजें । धांवा केशीराजें आइकतां ॥३॥ तुका म्हणे हितचिंतनीं भरंवसा । नेदी गर्भवासा येऊं देऊं ॥४॥

१३६८. उपजों मरों हें तों आमुची मिरासी । हें तूं निवारिसी तरी थोर ॥१॥ उभा राहे करीं खराखोटा वाद । आम्हीं जालों निंद्य लंडपणें ॥२॥ उभयतां आहे करणें समान । तुम्हां ऐसा म्हणे मीहि देवा ॥३॥ तुका म्हणे हातीं सांपडलें वर्म । अवघाचि भ्रम फेडिन आतां ॥४॥

१३६९. मेलियांचा रांडा इच्छिती लेंकरूं । लाज नाहीं धरूं प्रीत कैशी ॥१॥ मागिलां पुढिलां एक सरोवरी । काळाची पेटारी खांदां वाहे ॥२॥ आन दिसे परी मरणचि खरें । सांपळां उंदिरें सामाविलीं ॥३॥ तुका म्हणे जाली मनाची परती । निवळली ज्योती दिसों आली ॥४॥

१३७०. निष्ठुर मी जालों अतिवादागुणें । हें कां नारायणें नेणिजेल ॥१॥ सांडियेली तुम्ही गोत परिसोय । फोडविली डोय कर्माहातीं ॥२॥ सांपडूनि संदि केली जीवेंसाठीं । घ्यावयासी तुटी कारण हें ॥३॥ तुका म्हणे तुज काय म्हूण उणें । नाहीं अभिमानें चाड देवा ॥४॥

१३७१. माझें माझ्या हातां आलें । आतां भलें सकळ ॥१॥ काशासाठीं विषम थारा । तो अंतरा विटाळ ॥२॥ जालीं तया दुःखें तुटी । मागिल पोटीं नसावें ॥३॥ तुका म्हणे शुद्ध कुळ । तेथें मळ कशाचा ॥४॥

१३७२. समर्थपणें हे करा संपादणी । नसतेंचि मनीं धरिल्याची ॥१॥ दुसऱ्याचें येथें नाहीं चालों येत । तरी मी निवांत पाय पाहें ॥२॥ खोटियाचें खरें खरियाचें खोटें । मानलें गोमटें तुम्हांसी तें ॥३॥ तुका म्हणे तुम्हांसवें करितां वाद । होईजे तें निंद्य जनीं देवा ॥४॥

१३७३. तुम्हांआम्हांसवें न पडावी गांठी । आलेति जगजेठी कळों आतां ॥१॥ किती म्हणों आतां वाईटावाईट । शिवों नये वीट आल्यावरी ॥२॥ बोलिल्याची आतां हेचि परचित । भीड भार थीत उडवीली ॥३॥ तुका म्हणे आली रोकडी प्रचिती । झांकणें तें किती कोठें देवा ॥४॥

१३७४. सकळ सत्ताधारी । व्हावें ऐसें काय हरी ॥१॥ परी या कृपेच्या वोरसें । कुढावयाचेंचि पिसें ॥२॥ अंगें सर्वोत्तम । अवघाचि पूर्णकाम ॥३॥ तुका म्हणे दाता । तरि हा जीवदान देता ॥४॥

१३७५. कोणापाशीं द्यावें माप । आपेआप राहिलें ॥१॥ कासयाची भरोवरी । काय दुरी जवळी ॥२॥ एकें दाखविले दहा । फांटा पाहा पुसून ॥३॥ तुका म्हणे सरलें वोझें । आतां माझें सकळ ॥४॥

१३७६. नभोमय जालें जळ । एकीं सकळ हरपलें ॥१॥ आतां काय सारासरी । त्याच्या लहरी तयांत ॥२॥ कैंची तेथे यावा सांडी । आप कोंडी आपणां ॥३॥ तुका म्हणे कल्प जाला । अस्त गेला उदय ॥४॥

१३७७. राजा करी तैसे दाम । चाम तेही चालती ॥१॥ कारण ते सत्ता शिरीं । कोण करी अव्हेर ॥२॥ वाहिलें तें सुनें खांदी । चाले पदीं बैसविलें ॥३॥ तुका म्हणे विश्वंभरें । करुणाकरें रक्षिलें ॥४॥

१३७८. आम्ही देव तुम्ही देव । मध्यें भेव अधीक ॥१॥ कैवाडाच्या धांवा लागें । मागें मागें विठ्ठलें ॥२॥ भेडसाविलें हाके नादें । वोळखी भेदें मोडिली ॥३॥ तुका म्हणे उभा राहे । मागें पाहे परतोनि ॥४॥

१३७९. हीन शूर बुद्धीपासीं । आकृतीसी भेद नाहीं ॥१॥ एक दांडी एक खांदी । पदोपदीं भोगणें ॥२॥ एकाऐसें एक नाहीं । भिन्न पाहीं प्रकृती ॥३॥ तुका म्हणे भूमी खंडे । पीक दंडे जेथें तें ॥४॥

१३८०. काय बोलो सांगा । याउपरी पांडुरंगा ॥१॥ कांहीं आधारावांचून । पुढें न चले वचन ॥२॥ वाढे ऐसा रस । कांहीं करावा सौरस ॥३॥ भक्तिभाग्यसीमा । द्यावा जोडोनियां प्रेमा ॥४॥ कोरड्या उत्तरीं । नका गौरवूं वैखरी ॥५॥ करी विज्ञापना । तुका प्रसादाची दाना ॥६॥

१३८१. आहाच तो मोड वाळलिया मधीं । अधीराची बुद्धि तेणें न्यायें ॥१॥ म्हणऊनि संग न करीं दुसरें । चित्त मळिनद्वारें दोड पडे ॥२॥ विषासाठीं सर्पा भयाभीत लोक । हें तों सकळीक जाणतसां ॥३॥ तुका म्हणे काचें राहे कुळाकुड । अवगुण तो नाड ज्याचा तया ॥४॥

१३८२. क्षणक्षणां जीव वाटतसे खंती । आठवती चित्तीं पाय देवा ॥१॥ येईं वो येईं वो येईं लवलाहीं । आलिंगूनि बाही क्षेम देईं ॥२॥ उताविळ मन पंथ आवलोकीं । आठवती चुकी काय जाली ॥३॥ तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना । घाला नारायणा उडी वेगीं ॥४॥

१३८३. आळी करावी ते कळतें बाळका । बुझवावें हें कां नेणां तुम्ही ॥१॥ निवाड तो येथें असे पायापाशीं । तुम्हांआम्हांविशीं एकेठायीं ॥२॥ आणीक तें आम्हीं न देखोंसें जालें । जाणावें तें शिणलें भागलेसें ॥३॥ तुका म्हणे तुम्हां लागतें सांगावें । अंतरीचें ठावें काय नाहीं ॥४॥

१३८४. तातडीनें आम्हां धीरचि न कळे । पाळावे हे लळे लवलाहीं ॥१॥ नका कांहीं पाहों सावकाशीं देवा । करा एक हेवा तुमचा माझा ॥२॥ वोरसाचा यावा सांभाळावी प्रीत । नाहीं राहों येत अंगीं धंदा ॥३॥ तुका म्हणे मज नका गोवूं खेळा । भोजनाची वेळा राखियेली ॥४॥

१३८५. नाहीं लोपों येत गुण । वेधी आणिकां चंदन ॥१॥ न सांगतां पडे ताळा । रूप दर्पणीं सकळां ॥२॥ सारविलें वरी । आहाच तें क्षणभरी ॥३॥ तुका म्हणे वोहळें । सागराच्या ऐसें व्हावें ॥४॥

१३८६. वचनेंचि व्हावें आपण उदार । होईल विश्वंभर संतुष्टचि ॥१॥ सत्यसंकल्पाचीं फळें बीजाऐशीं । शुद्ध नाहीं नासी पावों येत ॥२॥ वंचिलिया काय येईल उपेगा । शरीर हें

नरकाचेंचि आळें ॥३॥ तुका म्हणे जीव जितां थारे लावा । पडिलिया गोवा देशधडी ॥४॥

१३८७. उखतें आयुष्य जायाचें कलेवर । अवघें वोडंबर विषयांचें ॥१॥ कोणासी हा लागे पुसणें विचार । मनचि सादर करूं आता ॥२॥ उत्पत्ति प्रळय पडिलें दळण । पाकाचें भोजन बीज वाढे ॥३॥ तुका म्हणे जाऊं अभयाच्या ठायां । रिघों देवराया शरण वेगीं ॥४॥

१३८८. बोलावें म्हणू बोलतों उपाय । प्रवाहें जाय गंगाजळ ॥१॥ भाग्ययोगें कोणां घडेल सेवन । कैचे येथें जन अधिकारी ॥२॥ मुखीं घेतां घांस पळविती तोंड । अंगींचिया भांड असुखानें ॥३॥ तुका म्हणे पूजा करितों देवाची । आपुलिया रुची मनाचिये ॥४॥

१३८९. लटिक्याची वाणी वचनाचा संवाद । नाहीं कोणा वाद रुचों येत ॥१॥ अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा । मायबापीं वेळां न साधिली ॥२॥ अनावर अंगीं प्रबळ अवगुण । तांतडीनें मन लाहो साधी ॥३॥ तुका म्हणे दोष आणि अवकळा । न पडतां ताळा घडतसे ॥४॥

१३९०. नये स्तवूं काचें होतें क्रियानष्ट । फुंदाचे ते कष्ट भंगा मूळ ॥१॥ नाहीं परमार्थ साधत लौकिकें । धरुन होतों फिकें अंगा आलें ॥२॥ पारखिया पुढें नये घालूं तोंड । तुटी लाभा खंड होतो माना ॥३॥ तुका म्हणे तरी मिरवतें परवडी । कामावल्या गोडी अविनाश ॥४॥

१३९१. कोण्या काळें येईल मना । नारायणा तुमचिया ॥१॥ माझा करणें अंगीकार । सर्व भार फेडूनि ॥२॥ लागलिये तळमळ चित्ता । तरी दुश्चित्ता संसारीं ॥३॥ मुखाचीच पाहे वास । मागें दोष सांभाळी ॥४॥ इच्छा पूर्ण जाल्याविण । कैसा सीण वारेल ॥५॥ लाहो काया मनें वाचा । दिवसाच्या भेटीचा ॥६॥ कंटाळा तो न धरावा । तुम्हीं देवा दासाचा ॥७॥ तुका म्हणे माझे वेळे । न कळे कां हें उफराटें ॥८॥

१३९२. घ्यावी तरी घ्यावी उदंडचि सेवा । द्यावें तरी देवा उदंडचि ॥१॥ ऐसीं कैंचीं आम्ही पुरतीं भांडवलें । आल्या करीं बोलें समाधान ॥२॥ व्हावें तरी व्हावें बहुतचि दुरी । आलिया अंतरीं बसवावें ॥३॥ तुका म्हणे तुझें सख्यत्व आपणीं । अससील ऋणी आवडीचा ॥४॥

१३९३. काय करूं जीव होतो कासावीस । कोंडिले दिस गमेचिना ॥१॥ पडिलें हें दिसे ब्रह्मांडचि वोस । दाटोनि उछ्वास राहातसे ॥२॥ तुका म्हणे अगा सर्व जाणतिया । विश्वंभरें काया निववावी ॥३॥

१३९४. सुकलिया कोंभा अत्यंत जळधरें । तेणेंचि प्रकारें न्याय असे ॥१॥ न चले पाउलीं सांडीं गरुडासन । मनाचें हो मन त्वरेलागीं ॥२॥ तुका म्हणे भूक न साहावे बाळा । जीवनाची कळा ओढलीसे ॥३॥

१३९५. शृंगारिक माझीं नव्हतीं उत्तरें । आळवितों खरें अवस्थेच्या ॥१॥ न घालावा

मधीं कामाचा विलंब । तुम्ही तों स्वयंभ करुणामूर्ति ॥२॥ तुका म्हणे केलें सन्मुख वदन । देखतां चरण पोटाळीन ॥३॥

१३९६. तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहातों वाटुली पांडुरंगे ॥१॥ तूं मज एकुला वडील धाकुला । तूं मज आपुला सोयरा जीव ॥२॥ तुका म्हणे जीव तुजपाशीं असे । तुझियानें ओस सर्व दिशा ॥३॥

१३९७. कराल तें करा । हातें आपुल्या दातारा ॥१॥ बळियाचीं आम्हीं बाळें । असो निर्भर या सळे ॥२॥ आतां कोठे काळ । मध्यें रिघेल ओंगळ ॥३॥ तुका म्हणे पंढरीराया । थापटितों ठोक बाह्या ॥४॥

१३९८. डोळां भरिलें रूप । चित्तीं पायांचा संकल्प ॥१॥ अवघीं घातलीं वांटणी । प्रेम राहिलें कीर्तनीं ॥२॥ जिव्हा केली माप । रासीं हरिनाम अमुप ॥३॥ भरूनियां भाग । तुका बैसला पांडुरंग ॥४॥

१३९९. आतां आहे नाहीं । न कळे आळीकरा कांहीं ॥१॥ देसी पुरवुनी इच्छा । आतां पंढरीनिवासा ॥२॥ नेणें भाग सीण । दुजें कोणी तुम्हांविण ॥३॥ आतां नव्हे दुरी । तुका पायीं मिठी मारी ॥४॥

१४००. संकल्पासी अधिष्ठान । नारायण गोमटें ॥१॥ अवघियाचें पुरे कोड । फिटे जड देहत्व ॥२॥ उभयलोकीं उत्तम कीर्ति । देव चित्तीं राहिलिया ॥३॥ तुका म्हणे जीव धाय । नये हाय जवळी ॥४॥

१४०१. भाग्यवंतां हेचि जोडी । परवडी संतांची ॥१॥ धन घरीं पांडुरंग । अभंग जें सरेना ॥२॥ जनाविरहित हा लाभ । टांचें नभ सांठवणें ॥३॥ तुका म्हणे विष्णुदासां । नाहीं आशा दुसरी ॥४॥

१४०२. जरी आलें राज्य मोळविक्या हातां । तरी तो मागुता व्यवसायी ॥१॥ तृष्णेचीं मजुरें नेणती विसांवा । वाढे हांव हांवा काम कामीं ॥२॥ वैभवांचीं सुखें नातळतां अंगा । चिंता करी भोगा विघ्न जाळी ॥३॥ तुका म्हणे वाहे मरणाचें भय । रक्षण उपाय करूनि असे ॥४॥

१४०३. कोण होईल आतां संसारपांगिलें । आहे उगवलें सहजचि ॥१॥ केला तो चालवीं आपुला प्रपंच । काय कोणां वेच आदा घे दे ॥२॥ सहजचि घडे आतां मोळ्याविण । येथें काय सीण आणि लाभ ॥३॥ तुका म्हणे जालों सहज देखणा । ज्याच्या त्यानें खुणा दाखविल्या ॥४॥

१४०४. आम्हां शरणागतां । एवढी काय करणें चिंता ॥१॥ परि हे कौतुकाचे खेळ । अवघे पाहातों सकळ ॥२॥ अभयदानवदें । आम्हां कैंचीं भयद्वंद्वें ॥३॥ तुका म्हणे आम्ही । हरिजन साधनाचे स्वामी ॥४॥

१४०५. देवाचिया चाडे प्रमाण उचित । नये वांटूं चित्त निषेधासी ॥१॥ नये राहों उभें कसमळापाशीं । भुंकतील तैसीं सांडावीं तीं ॥२॥ तुका म्हणे क्षमा सुखाची हे रासी । सांडूनि कां ऐसी दुःखी व्हावें ॥३॥

१४०६. खळा सदा क्षुद्र दृष्टी । करी कष्टी सज्जना ॥१॥ करिती आपुलाले परी । धणीवरी व्यापार ॥२॥ दया संतां भांडवल । वेंची बोल उपकार ॥३॥ तुका म्हणे आपुलालें । उसंतिलें ज्यांणीं तें ॥४॥

१४०७. जग ऐसें बहुनांवें । बहुभावें भावना ॥१॥ पाहों बोलों बहु नये । सत्य काय सांभाळा ॥२॥ कारियासी जें कारण । ते जतन करावें ॥३॥ तुका म्हणे संतजनीं । हेंचि मनीं धरावें ॥४॥

१४०८. निघालें तें आगीहुनी । आतां झणीं आतळे ॥१॥ पळवा परपरतें दूरी । आतां हरी येथूनि ॥२॥ धरिलें तैसें श्रुत करा हो । येथें आहो प्रपंचीं ॥३॥ अबोल्यानें ठेला तुका । भेउनि लोकां निराळा ॥४॥

१४०९. आतां दुसरें नाहीं मनीं । निरंजनीं पडिलों ॥१॥ तुमचीच पाहें वास । अवघी आस निरसली ॥२॥ मागिलांचा मोडला माग । घडला त्याग अरुची ॥३॥ तुका म्हणे करुणाकरा । तूं सोयरा दीनांचा ॥४॥

१४१०. धरुनियां सोई परतलें मन । अनुलक्षीं चरण करूनियां ॥१॥ येईं पांडुरंगें नेईं सांभाळूनी । करुणावचनीं आळवितों ॥२॥ बुद्धि जाली साह्य परि नाहीं बळ । अवलोकितों जळ वाहे नेत्रीं ॥३॥ न चलती पाय गळित जाली काया । म्हणऊनि दया येऊं द्यावी ॥४॥ दिशेच्या करितों वारियासी मात । जोडुनियां हात वाट पाहें ॥५॥ तुका म्हणे वेग करावा सत्वर । पावावया तीर भवनदीचें ॥६॥

१४११. कौलें भरियेली पेंठ । निग्रहाचें खोटें तंत्र ॥१॥ ऐसें माता जाणे वर्म । बाळा वाढवितां धर्म ॥२॥ कामवितां लोहो कसे । तांतडीनें काम नासे ॥३॥ तुका म्हणे खडे । देतां अक्षर तें जोडे ॥४॥

१४१२. चालिलें न वाटे । गाऊनियां जातां वाटे ॥१॥ बरवा वैष्णवांचा संग । येतो सामोरा श्रीरंग ॥२॥ नाहीं भय आड । कांहीं विषमाचें जड ॥३॥ तुका म्हणे भक्ति । सुखरूप आदीं अंतीं ॥४॥

१४१३. करितां विचार । तो हा दृढ संसार । ब्रह्मादिकां पार । नुलंघवे सामर्थ्यें ॥१॥ शरण शरण नारायणा । मज अंगीकारा दीनां । आलें तें वचना – । पाशीं माझ्या सामर्थ्य ॥२॥ पाठीवरी मोळी । तोचि कळवा पायीं तळीं । सांपडला जाळीं । मत्स्य जाला तो न्याय ॥३॥ आतां करीन

तांतडी । लाभाची ते याच जोडी । तुका म्हणे ओढी । पायां सोई मनाची ॥४॥

१४१४. बहुतां जातीचा केला अंगीकार । बहुतही फार सर्वोत्तमें ॥१॥ सरलाचि नाहीं कोणाचिये वेचें । अक्षोभ्य ठायींचें ठायीं आहे ॥२॥ लागतचि नाहीं घेतां अंतपार । वसवी अंतर अणूचेंही ॥३॥ तुका म्हणे केला होय ठाकी ऐसा । पुरवावी इच्छा धरिली ते ॥४॥

१४१५. पोट धालें आतां जीवनीं आवडी । पुरवावी परवडी बहुतांची ॥१॥ काय आंचवणा तांतडीचें काम । मागील ते श्रम न पवाची ॥२॥ वाढितियां पोटीं बहु असे वाव । सांभाळितां ठाव काय वेचे ॥३॥ दाविल्यावांचूनि नाहीं कळों येत । तेथेंही दुश्चित्त एकपण ॥४॥ नावेचा भार तो उदकाचे शिरीं । काय हळू भारी तये ठायीं ॥५॥ तुका म्हणे गीतीं गाऊनि गोविंदु । करूं ब्रह्मानंदू एकसरें ॥६॥

१४१६. एका हातीं टाळ एका हातीं चिपळिया । घालिती हुंबरी एक वाहाताती टाळिया ॥१॥ मातले वैष्णव नटती नाना छंदें । नाहीं मोक्षपदीं चाड भजनीं आवडी ॥२॥ हाका आरोळिया गीत वाद्य सुखसोहळे । जाय ते न कळे केव्हां रजनीं दिवस ॥३॥ तीर्थीं नाहीं चाड नलगे जावें वनांतरा । तुका म्हणे हरिहरात्मकचि पृथिवी ॥४॥

१४१७. देव सखा आतां केलें नव्हे काईं । येणें सकळही सोइरींच ॥१॥ भाग्यवंत जालों गोतें सपुरतीं । आतां पुण्या नीती पार नाहीं ॥२॥ पाहातां दिसती भरलिया दिशा । ठसावला ठसा लोकत्रयीं ॥३॥ अविनाश जोडी आम्हां भाग्यवंता । जाली होती सत्ता संचिताची ॥४॥ पायांवरी डोई ठेवाया आरोथा । जाली द्यावी सत्ता क्षेम ऐसी ॥५॥ तुका म्हणे जीव पावला विसावा । म्हणवितां देवा तुमचींसीं ॥६॥

१४१८. कोण आतां कळिकाळा । येऊं बळा देईल ॥१॥ सत्ता झाली त्रिभुवनीं । चक्रपाणी कोंवसा ॥२॥ लडिवाळांचा भार वाहे । उभा आहे कुढावया ॥३॥ तुका म्हणे घटिका दिस । निमिषही न विसंबे ॥४॥

१४१९. आम्हां आवडे नाम घेतां । तोही पिता संतोषे ॥१॥ उभयतां एकचित्त । तरी प्रीत वाढली ॥२॥ आम्ही शोभों निकटवासें । अनारिसें न दिसों ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगे । अवघीं अंगें निवालीं ॥४॥

१४२०. देह तंव असे भोगाचे अधीन । याचें सुख सीण क्षणभंगुर ॥१॥ अविनाश जोडी देवापायीं भाव । कल्याणाचा ठाव सकळही ॥२॥ क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा अवघें नासे ॥३॥ तुका म्हणे येथें सकळ विश्रांति । आठवावा चित्तीं नारायण ॥४॥

१४२१. आतां अवश्यक करणें समाधान । पाहिलें निर्वाण न पाहिजे ॥१॥ केलें तरी आतां सुशोभ्य करावें । दिसतें बरवें संतांमधीं ॥२॥ नाहीं भक्तराजीं ठेविला उधार । नामाचा आकार

त्यांचियानें ॥३॥ तुका म्हणे माझ्या वडिलांचें ठेवणें । गौप्य नारायणें न करावें ॥४॥

१४२२. काया वाचा मनें श्रीमुखाची वास । आणीक उदास विचारासी ॥१॥ काय आतां मोक्ष करावा जी देवा । तुमचिया गोवा दर्शनासी ॥२॥ केलिया नेमासी उभें ठाऊव्हावें । नेमलें तें भावें पालटेना ॥३॥ तुका म्हणे जों जों कराल उशीर । तों तों मज फार रडवील ॥४॥

१४२३. पुढीलांचे सोयी माझ्या मना चाली । मताची आणिली नाहीं बुद्धी ॥१॥ केलासि तों उभा आजिवरी संतीं । धरविलें हातीं कट देवा ॥२॥ आहे तेंचि मागों नाहीं खोटा चाळा । नये येऊं बळा लेंकराशीं ॥३॥ तुका म्हणे माझा साक्षीचा व्यवहार । कृपण जी थोर परी तुम्ही ॥४॥

१४२४. बहुता करूनि चाळवाचाळवी । किती तुम्ही गोवी करीतसां ॥१॥ लागटपणें मी आलों येथवरी । चाड ते दुसरी न धरूनि ॥२॥ दुजियाचा तंव तुम्हांसी कांटाळा । राहासी निराळा एकाएकीं ॥३॥ तुका म्हणे आतां यावरी गोविंदा । मजशीं विनोदा येऊं नये ॥४॥

१४२५. तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा । संत ते अधमा माणसा ऐसे ॥१॥ वांजेच्या मैथुनापरी गेलें वांयां । बांडेल्याचें जायां जालें पीक ॥२॥ अभाविक सदा सुतकी चांडाळ । सदा तळमळ चुकेचि ना ॥३॥ तुका म्हणे वरदळी ज्याची दृष्टि । देहबुद्धि कष्टी सदा दुःखी ॥४॥

१४२६. नव्हे मतोळ्याचा वाण । नीच नवा नारायण ॥१॥ सुख उपजे श्रवणें । खरें टांकसाळी नाणें ॥२॥ लाभ हातोहातीं । अधिक पुढतोंपुढती ॥३॥ तुका म्हणे नेणों किती । पुरोनि उरलें पुढती ॥४॥

१४२७. घातला दुकान । देती आलियासी दान ॥१॥ संत उदार उदार । भरलें अनंत भांडार ॥२॥ मागत्याची पुरे । धणी आणिकांसी उरे ॥३॥ तुका म्हणे पोतें । देवें भरिलें नव्हे रितें ॥४॥

१४२८. नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ॥१॥ ऐसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदाराचा ॥२॥ पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥३॥ भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ॥४॥ देहअभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥५॥ तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥६॥

१४२९. लौकिकापुरती नव्हे माझी सेवा । अनन्य केशव दास तुझा ॥१॥ म्हणऊनि करीं पायांसवें आळी । आणीक वेगळी नेणें परी ॥२॥ एकविध आम्ही स्वामिसेवेसाठीं । वरी तोचि पोटीं एकभाव ॥३॥ तुका म्हणे करीं सांगितलें काम । तुम्हां धर्माधर्म ठावे देवा ॥४॥

१४३०. ज्यांच्या संगें होतो पडिलों भोवणीं । ते केली धोवनी झाडोनियां ॥१॥ आतां एकाएकीं मनासीं विचार । करूं नाहीं भार दुजियाचा ॥२॥ प्रसादसेवनें आली उष्टावळी । उचित

ते काळीं अविचित ॥३॥ तुका म्हणे वर्म सांपडलें हातीं । सांडिली ते खंती चिंता देवा ॥४॥

१४३१. आवडी भोजन प्रकार परवडी । भिन्नभिन्न गोडी एका रसा ॥१॥ भोगित्या पंगती लाधलों प्रसाद । तिहीं नाहीं भेद राखियेला ॥२॥ पाकसिद्धि स्वहस्तकें विनियोग । आवडीचे भाग सिद्ध केले ॥३॥ तुका म्हणे आला उच्छिष्ट प्रसाद । तेणें हा आनंद माझ्या जीवा ॥४॥

१४३२. समर्थाचा ठाव संचलाचि असे । दुर्बळाची आस पुढें करी ॥१॥ फावलें घेईन पदरीं हें दान । एकांतीं भोजन करूं जाऊं ॥२॥ नलगे पाहावी उचिताची वेळ । अयाचित काळ साधला तो ॥३॥ तुका म्हणे पोट धालिया उपरी । गौरवा उत्तरीं पूजूं देवा ॥४॥

१४३३. आपुल्यांचा करीन मोळा । माझ्या कुळाचारांचा ॥१॥ अवघियांचें वंदिन पाय । ठायाठाय न देखें ॥२॥ नेदीं तुटों समाधान । थांबो जन सकळ ॥३॥ तुका म्हणे झाडा होय । तों हे सोय न संडीं ॥४॥

१४३४. जन्ममरणाची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबाप ॥१॥ होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसलीं ॥२॥ लिगाडाचे मुळीं होती पंचभूतें । ज्याचें त्यापुरतें विभागिलें ॥३॥ तुका म्हणे जाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंग ॥४॥

१४३५. उदार तूं हरी । ऐसी कीर्ति चराचरीं । अनंत हे थोरी । गर्जताती पवाडे ॥१॥ तुझें पायीं माझा भाव । पुसी जन्ममरण ठाव । देवाचा तूं देव । स्वामी सकळां ब्रह्मांडा ॥२॥ मागणें तें तुज मागों । जीवभाव तुज सांगों । लागों तरी लागों । पायां तुमच्या दातारा ॥३॥ दिसों देसी कीविलवाणे । तरी तुजचि हें उणें । तुका म्हणे जिणें । माझें तुज अधीन ॥४॥

१४३६. पाहा किती आले । शरण समानचि केले । नाहीं विचारिले । गुण दोष कोणाचे ॥१॥ मज सेंवटींसा द्यावा । ठाव तयांचिये देवा । नाहीं करीत हेवा । कांहीं थोरपणाचा ॥२॥ नाहीं पाहिला आचार । कुळगोत्राचा विचार । फेडूं आला भार । मग न म्हणे दगड ॥३॥ तुका म्हणे सर्व जाणा । तुझ्या आल्यावरि मना । केला तो उगाणा । घडल्या महादोषाचा ॥४॥

१४३७. आतां चुकलें बंधन । गेलें विसरोनि दान । आपुले ते वाण । सावकाश विकावे ॥१॥ लाभ जोडला अनंत । घरीं सापडलें वित्त । हातोहातीं थीत । उरों तळ नल्हाची ॥२॥ होतें गोविलें विसारें । माप जालें एकसरें । होतें होरें वारें । तोंचि लाहो साधिला ॥३॥ कराया जतन । तुका म्हणे निजधन । केला नारायण । साह्य नेदी विसंबों ॥४॥

१४३८. तुझ्या रूपें माझी काया । भरों द्यावी पंढरीराया । दर्पणींची छाया । एक रूपें भिन्नत्वें ॥१॥ सुख पडिलें सांठवणें । सत्ता वेचे शनें शनें । अडचणीचे कोन । चारी मार्ग उगवले ॥२॥ वसो डोळ्यांची बाहुली । कवळे भिन्न छाया आली । कृष्णांजन चाली । नव्हे परती माघारी ॥३॥ जीव ठसावला शिवें । मना आलें येथें जावें । फांटा पहिला नांवें । तुका म्हणे खंडलें ॥४॥

१४३९. सोसें सोसें मारूं हाका । होईल चुका म्हणऊनि । मागें पुढें क्षणभरी । नव्हे दुरी अंतर ॥२॥ नाम मुखीं बैसला चाळा । वेळोवेळां पडताळीं ॥३॥ तुका म्हणे सुखी केलें । या विठ्ठलें बहुतांसी ॥४॥

१४४०. धरूनियां चाली हांवा । येईल गांवा धांवत ॥१॥ पाठविसी मूळ तरी । लवकरी विठ्ठलें ॥२॥ नाचेन त्या प्रेमसुखें । कीर्तीमुखें गाईन ॥३॥ तुका म्हणे संतमेळीं । पायधुळी वंदीन ॥४॥

१४४१. मायबापाचिये भेटी । अवघ्या तुटी संकोचा ॥१॥ भोगिलें तें आहे सुख । आतां मुख मोकळें ॥२॥ उत्तम तें बाळासाठीं । लावी ओठीं माउली ॥३॥ तुका म्हणे जाली धणी । आनंद मनीं न समाये ॥४॥

१४४२. उदासीनाचा देह ब्रह्मरूप । नाहीं पुण्य पाप लागत त्या ॥१॥ अनुताप अंगीं अग्निचिया ज्वाळा । नाहीं मृगजळा विझों येत ॥२॥ दोष ऐशा नांवें देहाचा आदर । विटाळलें अंतर अहंभावें ॥३॥ तुका म्हणे जाय नासोनियां खंती । तंवचि हे चित्तीं बद्धता ते ॥४॥

१४४३. बंधनाचा तोडूं फांसा । देऊं आशा टाकोनि ॥१॥ नाहीं तेंच घेतां शिरीं । होईल दुरी निजपंथ ॥२॥ नाथिलेंचि माझें तुझें । कोण ओझें वागवी ॥३॥ तुका म्हणे अंतराय । देवीं जाणे जिणें तें ॥४॥

१४४४. तेंच किती वारंवार । बोलों फार बोलिलें ॥१॥ आतां माझे दंडवत । तुमच्या संत चरणांसी ॥२॥ आवडी ते नीच नवी । जाली जीवीं वसती ॥३॥ तुका म्हणे बरवें जालें । घरा आलें बंदरींचें ॥४॥

१४४५. उपासा सेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥१॥ पुरवीं वासना साच सर्व जाणा । आम्हां नारायणा अंकिताची ॥२॥ बहु दिसां पुत्रामातेसवें भेटी । तैसा दाटो पोटीं प्रीति उभड ॥३॥ तुका म्हणे धन कृपणा सोइरें । यापरि दुसरें नहो आतां ॥४॥

१४४६. रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐशा मज धीरें राखें आतां ॥१॥ संसारा हातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करीं नारायण ॥२॥ वागवितों तुझिया नामाचें हत्यार । हाचि बडिवार मिरवितों ॥३॥ तुका म्हणे मज फिरतां माघारें । तेथें उणें पुरें तुम्हीं जाणा ॥४॥

१४४७. सकळ पूजा स्तुति । करावी ते व्हावी याती ॥१॥ म्हणऊनि वारा जन । संत पूजा नारायणा ॥२॥ सेवावें तें वरी । दावी उमटूनि ढेंकरीं ॥३॥ तुका म्हणे सुरा । दुधा म्हणतां केवीं बरा ॥४॥

१४४८. धीर नव्हे मनें । काय तयापाशीं उणें ॥१॥ भार घातलियावरी । दासां नुपेक्षील हरी ॥२॥ याच्या ऐसी आटी । द्यावी द्रव्याचिये साटी ॥३॥ तुका म्हणे पोटें ।

देवा बहु केलें खोटें ॥४॥

१४४९. द्रव्याचिया कोटी । नये गांडीची लंगोटी ॥१॥ अंतीं बोळवणेसाठीं । पांडुरंगा धरा कंठीं ॥२॥ लोभाचीं लोभिकें । यांचें सन्निधान फिकें ॥३॥ तुका म्हणे हितें । जग नहो पडो रितें ॥४॥

१४५०. कोणापाशीं आतां सांगों मी बोभाट । कधीं खटपट सरेल हे ॥१॥ कोणां आराणूक होईल कोणे काळीं । आपुलालीं जाळीं उगवूनि ॥२॥ माझा येणें दु:खें फुटतसे प्राण । न कळतां जन सुखी असे ॥३॥ भोगा आधीं मनें मानिलासे त्रास । पाहे लपायास ठाव कोठें ॥४॥ तुका म्हणे देतों देवाचें गाऱ्हाणें । माझें ऋण येणें सोसियेलें ॥५॥

१४५१. राहिलों निराळा । पाहों कवतुक डोळां ॥१॥ करूं जगाचा विनोद । डोळां पाहोनियां छंद ॥२॥ भुललिया संसारें । आलें डोळ्यासी माजिरें ॥३॥ तुका म्हणे माथा । कोणी नुचली सर्वथा ॥४॥

१४५२. आम्हां एकविध पुण्य सर्वकाळ । चरणकमळ स्वामीचे ते ॥१॥ चित्ताचे संकल्प राहिलें चळण । आज्ञा ते प्रमाण करूनी असों ॥२॥ दुजिया पासाव परतलें मन । केलें घ्यावें दान होईल तें ॥३॥ तुका म्हणे आतां पुरला नवस । एकाविण ओस सकळही ॥४॥

१४५३. राहाणें तें पायापाशीं । आणिका रसीं विटोनि ॥१॥ ऐसा धीर देईं मना । नारायणा विनवितों ॥२॥ अंतरीं तो तुझा वास । आणिका नास कारणां ॥३॥ तुका म्हणे शेवटींचें । वाटे साचें राखावें ॥४॥

१४५४. चंदन तो चंदनपणें । सहज गुणें संपन्न ॥१॥ वेधलिया धन्य जाती । भाग्यें होती सन्मुख ॥२॥ परिसा अंगीं परिसपण । बाणोनि तें राहिलें ॥३॥ तुका म्हणे कैंची खंती । सुजाती ते टाकणी ॥४॥

१४५५. लय लक्षी मन न राहे निश्चळ । मुख्य तेथें बळ आसनाचें ॥१॥ हें तों असाध्य जी सर्वत्र या जना । भलें नारायणा आळवितां ॥२॥ कामनेचा त्याग वैराग्य या नांव । कुटुंब ते सर्व विषयजात ॥३॥ कर्म उसंतावें चालतां पाउलीं । होय जों राहिली देहबुद्धि ॥४॥ भक्ती ते नमावें जीवजंतुभूत । शांतवूनि ऊत कामक्रोध ॥५॥ तुका म्हणे साध्य साधन अवघड । देतां हें सांकडें देह बळी ॥६॥

१४५६. ऐसें कां हो न करा कांहीं । पुढें नाहीं नास ज्या ॥१॥ विश्वंभरा शरणागत । भूतजात वंदूनि ॥२॥ श्रुतीचें कां नेघा फळ । सारमूळ जाणोनि ॥३॥ तुका म्हणे पुढें कांहीं । वाट नाहीं यावरी ॥४॥

१४५७. जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥१॥ रडती रात्रंदिवस

कामक्रोधमाया । म्हणती हायहाय यमधर्म ॥२॥ वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि लागला ब्रह्मत्वेंसी ॥३॥ फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य ध्वनि बोंब जाली ॥४॥ दिली तिळांजुळी कुळनामरूपासी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥५॥ तुका म्हणे रक्षा जाली आपोआप । उजळला दीप गुरुकृपा ॥६॥

१४५८. आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ॥१॥ आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग जाला ॥२॥ एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याचा त्याग जाला सुकाळ हा ॥३॥ फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरीं जालों ॥४॥ नारायणें दिला वसतीसी ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥५॥ तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥६॥

१४५९. बोळविला देह आपुलेनि हातें । हुताशिलीं भूतें ब्रह्माग्नीसीं ॥१॥ एकवेळे जालें सकळ कारण । आतां नारायण नारायण ॥२॥ अमृतसंजीवनी विजविली खाई । अंगें तये ठायीं हारपलीं ॥३॥ एकादशीविध जागरण उपवास । बारावा दिवस भोजनाचा ॥४॥ अवघीं कर्में जालीं घटस्फोटापाशीं । संबंध एकेसी उरला नामीं ॥५॥ तुका म्हणे आतां आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु विस्तारला ॥६॥

१४६०. पिंडदान पिंडे ठेविलें करून । तिळीं तिळवण मूळत्रयीं ॥१॥ सारिले संकल्प एकाचि वचनें । ब्रह्मीं ब्रह्मार्पणें सेवटींच्या ॥२॥ सव्य अपसव्य बुडालें हें कर्म । एका एक वर्म एकोविष्णु ॥३॥ पित्यापुत्रत्वाचें झालें अवसान । जनीं जनार्दन अभेदेंसी ॥४॥ आहे तैसी पूजा पावली सकळ । सहज तो काळ साधियेला ॥५॥ तुका म्हणे केला अवघ्यांचा उद्धार । आतां नमस्कार सेवटींचा ॥६॥

१४६१. सरले आतां नाहीं । न म्हणे वेळकाळ कांहीं ॥१॥ विठ्ठल कृपाळु माउली । सदा प्रेमें पान्हायेली ॥२॥ सीण न विचारी भाग । नव्हे निष्ठुर नाहीं राग ॥३॥ भेदाभेद नाहीं । तुका म्हणे तिच्याठायीं ॥४॥

१४६२. तुज पाहावें हे धरितो वासना । परि आचरणा ठाव नाहीं ॥१॥ करिसी कैवार आपुलिया सत्ता । तरिच देखता होइन पाय ॥२॥ बाहिरल्या वेषें उत्तम दंडिलें । भीतरी मुंडलें नाहीं तैसें ॥३॥ तुका म्हणे वांयां गेलोंच मी आहें । जरि तुम्ही साह्य न व्हा देवा ॥४॥

१४६३. दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । मज ठावे गुण दोष माझे ॥१॥ आतां तुम्ही सर्व जाणा पांडुरंगा । पाहिजे प्रसंगाऐसें केलें ॥२॥ व्याह्याजांवयांचे पंगती दुर्बळ । वंचिजे तो काळ नव्हे कांहीं ॥३॥ तुका म्हणे आतां जालों शरणागत । पुढील उचित तुम्हां हातीं ॥४॥

१४६४. आतां भय नाहीं ऐसें वाटे जीवा । घडलीया सेवा समर्थाची ॥१॥ आतां माझ्या

मनें धरावा निर्धार । चिंतनीं अंतर न पडावें ॥२॥ येथें नाहीं जाली कोणाची मिरास । आल्या याचकास कृपेविशीं ॥३॥ तुका म्हणे येथें नाहीं दुजी परी । राया रंकासरी देवापायीं ॥४॥

१४६५. वैष्णव चोरटीं । आली घरासी करंटी ॥१॥ आजि आपुलें जतन । करा भांडें पांघरूण ॥२॥ ज्याचे घरीं खावें । त्याचें सर्वस्वही न्यावें ॥३॥ तुका म्हणे माग । नाहीं लागों देत लाग ॥४॥

१४६६. ऐकतों दाट । आले एकाचे बोभाट ॥१॥ नका विश्वासों यावरी । चोर देहाचे खाणोरी ॥२॥ हेचि यांची जोडी । सदा बोडकीं उघडीं ॥३॥ तुका म्हणे न्यावें । ज्याचें त्यासी नाहीं ठावें ॥४॥

१४६७. आणिकाची सेवा करावी शरीरें । ती येथें उत्तरें कोरडींच ॥१॥ ऐसा पांडुरंग सुलभ सोपारा । नेघे येरझारा याचकाच्या ॥२॥ आणिकांचें देणें काळीं पोट भरे । येथील न सरे कल्पांतींही ॥३॥ आणिकांचे भेटी आडकाठी पडे । येथें तें न घडे वचनही ॥४॥ आणिकें दंडिती चुकलिया सेवा । येथें सोस हेवा नाहीं दोन्ही ॥५॥ तुका म्हणे करी आपणासारिखें । उद्धरी पारिखें उंच नीच ॥६॥

१४६८. दुर्जनाची जाती । त्याचे तोंडीं पडे माती ॥१॥ त्याची बुद्धि त्यासी नाडी । वाचें अनुचित बडबडी ॥२॥ पाहे संतांकडे । दोषदृष्टी सांडी भिडे ॥३॥ उंच नीच नाहीं । तुका म्हणे खळा कांहीं ॥४॥

१४६९. न करीं उदास । माझी पुरवावी आस ॥१॥ ऐका ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ॥२॥ मायबाप बंधुजन । तूंचि सोयरा सज्जन ॥३॥ तुका म्हणे तुजविरहित । कोण करिल माझें हित ॥४॥

१४७०. जीवन उपाय । वैद्यवाणी तुझे पाय ॥१॥ ते मी नाठवीं घडिघडी । म्हणोनियां चरफडीं ॥२॥ तुटे भवरोग । जेथें सर्व सुख भोग ॥३॥ तुका म्हणे विटे । धरियेलें जें गोमटें ॥४॥

१४७१. ऐका हें वचन माझें संतजन । विनवितों जोडुनि कर तुम्हां ॥१॥ तर्क करूनियां आपुल्या भावना । बोलतिया जना कोण वारीं ॥२॥ आमुच्या जीवींचा तोचि जाणे भाव । रखुमाईचा नाहो पांडुरंग ॥३॥ चित्त माझें त्याचे गुंतलेंसे पायीं । म्हणऊनि कांहीं नावडे त्या ॥४॥ तुका म्हणे मज न साहे मीनती । खेद होय चित्ती भंग मना ॥५॥

१४७२. ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन ॥१॥ निंब घेती रोगी कवणिया सुखें । हरावया दु:खे व्याधि पीडा ॥२॥ काय पळे सुखें चोर लागे पाठीं । न घालावी काठी आड तया ॥३॥ जायाचें कारण तोचि जाणे करूं । नये कोणां वारूं आणिकासी ॥४॥ तुका म्हणे तरी सांपडे निधान । द्यावा ओंवाळून जीव बळी ॥५॥

१४७३. काय मी अन्यायी तें घाला पालवीं । आणिक वाट दावीं चालावया ॥१॥ माग पाहोनियां जातों तेच सोयी । नवजावें कायी कोणी सांगा ॥२॥ धोपट मारग लागलासे गाढा । मज काय पीडा करा तुम्ही ॥३॥ वारितांही भय कोण धरी धाक । परी तुम्हां एक सांगतों मी ॥४॥ तुका म्हणे शूर दोहीं पक्षीं भला । मरतां मुक्त जाला मान पावे ॥५॥

१४७४. नव्हती माझे बोल जाणां हा निर्धार । मी आहें मजूर विठोबाचा ॥१॥ निर्धारा वचनें सोडविलें माझ्या । कृपाळुत्वें लज्जा राखियेली ॥२॥ निर्भर मानसीं जालों आनंदाचा । गोडावली वाचा नामघोषें ॥३॥ आतां भय माझें नासलें संसारीं । जालोंसें यावरी गगनाचा ॥४॥ तुका म्हणे हा तों संतांचा प्रसाद । लाधलों आनंद प्रेमसुख ॥५॥

१४७५. जरा कर्णमुळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ॥१॥ आतां माझ्या मना होई सावधान । ॐ पुण्याची जाण कार्यसिद्धि ॥२॥ शेवटील घडी बुडतां नलगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥३॥ तुका म्हणे चिंतीं कुळींची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ॥४॥

१४७६. मागील ते आटी येणें घडे सांग । सुतविलें अंग एका सूत्रें ॥१॥ पहिपाहुणेर ते सोहळ्यापुरते । तेथूनि आरते उपचार ते ॥२॥ आवश्यक तेथें आगळा आदर । चाली थोडें फार संपादतें ॥३॥ तुका म्हणे ऋण फिटे एके घडी । अलभ्य ते जोडी हातां आल्या ॥४॥

१४७७. साधावा तो देव सर्वस्वाचे साठीं । प्रारब्ध तुटी क्रियमाण ॥१॥ मग कासयाने पुन्हां संवसार । बीजाचे अंकुर दग्ध होती ॥२॥ जिणें दिल्हे त्यासी द्यावा पिंडदान । उत्तीर्ण चरण धरूनि व्हावें ॥३॥ तुका म्हणे निज भोगईल निजतां । नाहीं होईल सत्ता दुजियाची ॥४॥

१४७८. जळो आगी पडो खाण । नारायण भोगिता ॥१॥ ऐसी ज्याची वदे वाणी । नारायणीं ते पावे ॥२॥ भोजनकाळीं करितां धंदा । म्हणा गोविंदा पावलें ॥३॥ तुका म्हणे नलगे मोल । देवा बोल आवडती ॥४॥

१४७९. संतांसी क्षोभवी कोण्याही प्रकारें । त्याचें नव्हे बरें उभयलोकीं ॥१॥ देवाचा तो वैरी शत्रु दावेदार । पृथ्वीही थार नेदी तया ॥२॥ संतांपाशीं ज्याचा नुरेची विश्वास । त्याचे जाले दोष बळिवंत ॥३॥ तुका म्हणे क्षीर वासराच्या अंगें । किंवा धांवें लागें विषमें मारूं ॥४॥

१४८०. उदकीं कालवी शेण मलमूत्र । तो होय पवित्र कासयानें ॥१॥ उद्धाराशी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणा संतांचिया ॥२॥ दुखवी तो बुडे सांगडीचा तापा । अतित्याई पापाचीच मूर्ति ॥३॥ तुका म्हणे जेव्हां फिरतें कपाळ । तरी अमंगळ योग होतो ॥४॥

१४८१. शोकवावा म्यां देहे । ऐसें नेणो पोटीं आहे ॥१॥ तरीच नेदां जी उत्तर । दुःखी राखिलें अंतर ॥२॥ जावें वनांतरा । येणें उद्देशें दातारा ॥३॥ तुका म्हणे गिरी ।

मज सेववावी दरी ॥४॥

१४८२. येइल तुझ्या नामा । लाज म्हूण पुरुषोत्तमा ॥१॥ धीर राहिलों धरूनि । त्रास उपजला मनीं ॥२॥ जगा कथा नाव । निराशेनें नुपजे भाव ॥३॥ तुम्ही साक्ष कीं गा । तुका म्हणे पांडुरंगा ॥४॥

१४८३. नेणें जप तप अनुष्ठान याग । काळें तंव लाग घेतलासे ॥१॥ रिघालों या भेणें देवाचे पाठीसी । लागे ज्याचें त्यासी सांभाळणें ॥२॥ मापें माप सळे चालिली चढती । जाली मग राती काय चाले ॥३॥ तुका म्हणे चोरा हातीं जें वांचलें । लाभावरी आलें वारिलेशु ॥४॥

१४८४. कळों आलें ऐसें आतां । नाहीं सत्ता तुम्हांसी ॥१॥ तरी वीर्य नाहीं नामा । जातो प्रेमा खंडत ॥२॥ आड ऐसें येतें पाप । वाढे ताप आगळा ॥३॥ तुका म्हणे गुण जाला । हा विठ्ठला हीन शक्ति ॥४॥

१४८५. लागों दिलें अंगा । ऐसें कांगा सन्निध ॥१॥ कोण्या पापें उदय केला । तो देखिला प्रळय ॥२॥ न देखवे पिडला सर्प । दया दर्प विषाचा ॥३॥ तुका म्हणे भलें । मज तों न वजे साहिलें ॥४॥

१४८६. धांवा शीघ्रवत । किंवा घ्यावें दंडवत ॥१॥ तुमचा जातो बडिवार । आम्ही होतों हीनवर ॥२॥ न धरावा धीर । धांवा नका चालों स्थिर ॥३॥ तुका म्हणे वाणी । माझी लाजली जी गुणीं ॥४॥

१४८७. सेवकासी आज्ञा निरोपासी काम । स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे ॥१॥ मनाचिये मुळीं रहावें बैसोन । आकर्षावे गुण पायांपाशीं ॥२॥ भेटीचे तातडी करितसें लाहो । ओंवाळावा देहो ऐसें वाटे ॥३॥ तुका म्हणे माझें करावें कारण । आपुलें जतन ब्रीद करा ॥४॥

१४८८. उद्वेगासी बहु फांकती मारग । नव्हे ऐसें अंग माझें होतें ॥१॥ आतां कोण यासी करणें विचार । तो देखा साचार पांडुरंगा ॥२॥ मज तो अत्यंत दर्शनाची आस । जाला तरी हो नाश जीवित्वाचा ॥३॥ तुका म्हणे आहे वचनाची उरी । करितों तोंवरि विज्ञापना ॥४॥

१४८९. दुःखाची संगति । तिच्या ठायीं कोण प्रीति ॥१॥ अवघें असों हें निराळें । करूं सोइरें सावळें ॥२॥ क्षणभंगुर ते ठाव । करूनि सांडावेचि वाव ॥३॥ तुका म्हणे बरा । ठाव पावलों हा थारा ॥४॥

१४९०. गेला तरी जावो सुखें नरकासी । कळंकी याविशीं शिवों नये ॥१॥ रजस्वला करी वेलासी आघात । अंतर तों हित दुरी बरें ॥२॥ उगीच कां आलीं नासवावीं फळें । विटाळ विटाळें कालवूनि ॥३॥ तुका म्हणे लोणी घालोनि शेणांत । उपेगाची मात काय असे ॥४॥

१४९१. वर्णावे ते किती । केले पवाडे श्रीपति ॥१॥ विश्वासिया घडे लाभ । देइल तरी पद्मनाभ ॥२॥ भाव शुद्ध तरी । सांगितलें काम करी ॥३॥ तुका म्हणे भोळा देव । परी हा नागवी संदेह ॥४॥

१९२. संचितावांचून । पंथ न चलवे कारण ॥१॥ कोरडी ते अवघी आटी । वांयां जाय लळ घोटी ॥२॥ धन वित्तें जोडे । देव ऐसें तों न घडे ॥३॥ तुका म्हणे आड । स्वहितासी बहु नाड ॥४॥

१४९३. अतित्याई बुडे गंगे । पाप लागे त्याचें त्या ॥१॥ हें तों आपुलिया गुणें । असें जेणें योजिलें ॥२॥ अवचटें अग्नि जाळी । न सांभाळी तो दुःख पावे ॥३॥ जैसें तैसें दावी आरसा । नकट्या कैसा पालटे ॥४॥

१४९४. हेंदऱ्याचे भरितां कान । हलवी मान भोंक रितें ॥१॥ नाहीं मी तेथें सांगो स्पष्ट । भावें नष्ट घेत नाहीं ॥२॥ अवगुणी वाटलें चित्त । तया हित आतळे ना ॥३॥ तुका म्हणे फजितखोरा । म्हणतां बरा उगा रहा ॥४॥

१४९५. माहीं सरो येत जोडिल्या वचनीं । कवित्वाची वाणी कुशळता ॥१॥ सत्याचा अनुभव वेधी सत्यपणें । अनुभवाच्या गुणें रुचों येते ॥२॥ काय आगीपाशीं शृंगारिलें चाले । पोटींचें उकले कसापाशीं ॥३॥ तुका म्हणे येथें करावा उकल । लागेचि ना बोल वाढवूनि ॥४॥

१४९६. लचाळाच्या कामा नाहीं ताळावाळा । न कळे ओंगळा उपदेश ॥१॥ वचनचर्येची न कळे चांचणी । ऐसीं संघष्टनी अमंगळ ॥२॥ समय न कळे वेडगळ बुद्धि । विजाती ते शुद्धि चांच चाट ॥३॥ तुका म्हणे याचा धिक्कारचि बरा । बहुमति खराहूनि हीन ॥४॥

१४९७. एक धरिला चित्तीं । आम्हीं रखुमाईचा पती ॥१॥ तेणें जालें अवघें काम । निवारला भवभ्रम ॥२॥ परद्रव्य परनारी । जाली विषाचिये परी ॥३॥ तुका म्हणे फार । नाहीं लागत व्यवहार ॥४॥

१४९८. भेणें पळे डोळसा । न कळे मृत्यू तो सरिसा ॥१॥ कैसी जाली दिशाभुली । नवजाति ये वाटचाली ॥२॥ संसाराची खंती । मावळल्या तरी शक्ति ॥३॥ तुका म्हणे हीणा । बुद्धि चुकली नारायणा ॥४॥

१४९९. अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ॥१॥ लाभ न्यावा हातोहातीं । तोंडीं माती पाडोनि ॥२॥ लागलीसे पाठी लाज । जाले काज नासाया ॥३॥ तुका म्हणे कुश्चळ मनीं । विटंबणीं पडिलीं तीं ॥४॥

१५००. चोराचिया धुडका मनीं । वसे ध्यानीं लांछन ॥१॥ यासी आम्हीं करणें काय । वर्षों न्यायें पर्जन्य ॥२॥ ज्याच्या बैसे खतावरी । ते चुरचुरी दाखवूनि ॥३॥ तुका म्हणे

त्याची खोडी । त्याची जोडी त्या पीडी ॥४॥

१५०१. बुद्धिहीना उपदेश । तें तें विष अमृतीं ॥१॥ हुंगो नये गोन्हवाडी । तेथें जोडी विटाळ ॥२॥ आळसियाचें अंतर कुडें । जैसें मढें निष्काम ॥३॥ तुका म्हणे ऐशा हातीं । मज श्रीपती वांचवा ॥४॥

१५०२. न करीं तुमची सेवा । बापुडें मीपणें देवा । बोलिलों तो पाववा । पण सिद्धी सकळ ॥१॥ आणीक काय तुम्हां काम । आम्हां नेदा तरी प्रेम । कैसे धर्माधर्म । निश्चयेंसी रहाती ॥२॥ आम्हीं वेचलों शरीरें । तुम्ही बीज पेरा खरें । संयोगाचें बरें । गोड होतें उभयतां ॥३॥ एका हातें टाळी । कोठें वाजते निराळी । जाला तरी बळी । स्वामीविण शोभेना ॥४॥ रूपा यावें जी अनंता । धरीन पुटाची त्या सत्ता । होईन सरता । संतांमाजी पोसणा ॥५॥ ठेविलें उधारा । वरी काय तो पातेरा । तुका म्हणे बरा । रोकडाचि निवाड ॥६॥

१५०३. भुके नाहीं अन्न । मेल्यावरी पिंडदान ॥१॥ हे तों चाळवाचाळवी । केलें आपणचि जेवी ॥२॥ नैवेद्याचा आळ । वेचे ठाकणीं सकळ ॥३॥ तुका म्हणे जड । मज न राखावें दगड ॥४॥

१५०४. सर्व भाग्यहीन । असें सांभाळिलों दीन ॥१॥ पायीं संतांचे मस्तक । असों जोडोनि हस्तक ॥२॥ जाणें तरी सेवा । दीन दुर्बळाची देवा ॥३॥ तुका म्हणे जीव । समर्पून भाकीं कींव ॥४॥

१५०५. भाग्याचा उदय । ते हे जोडी संतपाय ॥१॥ येथूनिया नुठवुं माथा । मरणावांचूनि सर्वथा ॥२॥ होईं बळकट । माझ्या मना तुं रे धीट ॥३॥ तुका आला लोटांगणीं । भक्तिभाग्या जाली धणी ॥४॥

१५०६. नाहीं तरी आतां कैंचा अनुभव । जालासी तूं देव घरघेण ॥१॥ जेथें देखें तेथें लांचाचे पर्वत । घ्यावें तरि चित्त समाधान ॥२॥ आधीं वरी हात या नांवें उदार । उसण्याचे उपकार फिटाफीट ॥३॥ तुका म्हणे जैसी तैसी करूं सेवा । सामर्थ्यानें देवा पायांपाशीं ॥४॥

१५०७. आम्ही सर्वकाळ कैंचीं सावधान । व्यवसायें मन अभ्यासलें ॥१॥ तरी म्हणा मोट ठेविली चरणीं । केलों गुणागुणीं कासावीस ॥२॥ याच कानसुलीं मारीतसे हाका । मज घाटूं नका मधीं आतां ॥३॥ तुका म्हणे निद्रा जागृति सुषुप्ति । तुम्ही हो श्रीपती साक्षी येथें ॥४॥

१५०८. नसताचि दाउनि भेव । केला जीव हिंपुटी ॥१॥ जालों तेव्हां कळलें जागा । वाउगा हा आकांत ॥२॥ गंवसिलों पुढें मागें । लागलागे पावला ॥३॥ तुका म्हणे केली आयणी । सलगीच्यांनीं सन्मुख ॥४॥

१५०९. हें का आम्हां सेवा दान । देखों सीण विषमाचा ॥१॥ सांभाळा जी ब्रीदावळी ।

तुम्ही कां कलासारिखे ॥२॥ शरणागतें वैऱ्या हातीं । हे निश्चिती देखिली ॥३॥ तुका म्हणे इच्छीं भेटी । पाय पोटीं उफराटे ॥४॥

१५१०. कां हो आलें नेणों भागा । पांडुरंगा माझिया ॥१॥ उफराटी तुम्हां चाली । क्रिया गेली सत्याची ॥२॥ साक्षी हेगे माझें मन । आर्त कोण होतें तें ॥३॥ तुका म्हणे समर्थपणें । काय नेणें करीतसां ॥४॥

१५११. शकुनानें लाभ हानि । येथूनिच कळतसे ॥१॥ भयारूढ जालें मन । आतां कोण विश्वास ॥२॥ प्रीत कळे आळिंगनीं । संपादणीं अत्यंत ॥३॥ तुका म्हणे मोकलिलें । कळों आलें बरवें हें ॥४॥

१५१२. न होय निग्रह देहासी दंडण । न वजे भूकतहान सहावली ॥१॥ तरि नित्य नित्य करीं आळवण । माझा अभिमान भिन्न असों द्यावा ॥२॥ नाहीं विटाळीलें कायावाचामन । संकल्पानें भिन्न आशेचिया ॥३॥ तुका म्हणे भवसागरीं उतार । करावया आधार इच्छीतसें ॥४॥

१५१३. आइकीली कीर्ति संतांच्या वदनीं । तरि हें ठाकोनि आलो स्थळ ॥१॥ मागिला पुढिला करावें सारिखें । पालटों पारिखें नये देवा ॥२॥ आम्हांसि विश्वास नामाचा आधार । तुटतां हे थार उरी नाहीं ॥३॥ तुका म्हणे येथें नसावेंचि दुजें । विनंति पंढरिराजें परिसावी हे ॥४॥

१५१४. मोलाचें आयुष्य वेचतसे सेवे । नुगवतां गोवे खेद होतो ॥१॥ उगवूं आलेति तुम्ही नारायणा । परिहार या सिणा निमिषांत ॥२॥ लिगाडाचे मासी न्यायें जाली परी । उरली ते उरी नाहीं कांहीं ॥३॥ तुका म्हणे लाहों साधीं वाचाबळें । ओढियेलों काळें धांव घाला ॥४॥

१५१५. म्हणऊनि जालों क्षेत्रींचे संन्यासी । चित्त आशापाशीं आवरूनि ॥१॥ कदापिही नव्हे सीमा उल्लंघन । केलें विसर्जन आव्हानींच ॥२॥ पारिखा तो आतां जाला दुजा ठाव । दृढ केला भाव एकविध ॥३॥ तुका म्हणे कार्यकारणाचा हेवा । नाहीं जीव देवा समर्पिला ॥४॥

१५१६. विभ्रंशिली बुद्धि देहांतीं जवळी । काळाची अवकाळीं वायचाळा ॥१॥ पालटलें जैसें देठ सांडी पान । पिकलें आपण तयापरी ॥२॥ न मारितां हीन बुद्धि दुःख पावी । माजल्याची गोवी तयापरी ॥३॥ तुका म्हणे गळ लागलिया मत्स्या । तळमळीचा तैसा लवलाहो ॥४॥

१५१७. नवजावा तो काळ वांयां । मुख्य दया हे देवा ॥१॥ म्हणऊनि जैसें तैसें । रहणी असें पायांचे ॥२॥ मोकळें हें मन कष्ट । करीं नष्ट दुर्जन ॥३॥ तुका म्हणे कांहीं नेणें । नवजें येणेंपरी वांयां ॥४॥

१५१८. कल्पतरूअंगीं इच्छिलें तें फळ । अभागी दुर्बळ भावी सिद्धी ॥१॥ धन्य त्या जाती धन्य त्या जाती । नारायण चित्तीं सांठविला ॥२॥ बीजाऐसा द्यावा उदकें अंकुर । गुणाचे प्रकार ज्याचे तया ॥३॥ तुका म्हणे कळे पारखिया हिरा । ओझें पाठीं खरा चंदनाचें ॥४॥

१५१९. उकारडा आधीं अंगीं नरकाडी । जातीची ते जोडी तेचि चित्तीं ॥१॥ कासयानें देखें अंधळें माणिकें । चवीविण फिके वांया जाय ॥२॥ काय जाणे विष पालटों उपचारें । मूर्खासी अंतर तोंचि बरें ॥३॥ तुका म्हणे काय उपदेश वेड्या । संग होतां रेड्यासवें कष्ट ॥४॥

१५२०. जया शिरीं कारभार । बुद्धि सार तयाची ॥१॥ वर्ते तैसें वर्ते जन । बहुतां गुण एकाचा ॥२॥ आपणीयां पाक करीं । तो इतरीं सेविजे ॥३॥ तुका म्हणे शूर राखे । गांडया वाखे सांगातें ॥४॥

१५२१. एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥१॥ कोण जाणे कैसी परी । पुढें उरी ठेवितां ॥२॥ अवघे धन्य होऊं आतां । स्मरवितां स्मरण ॥३॥ तुका म्हणे अवघी जोडी । ते आवडी चरणांची ॥४॥

१५२२. फलकट तो संसार । येथें सार भगवंत ॥१॥ ऐसे जागवितों मना । सरसें जनासहित ॥२॥ अवघें निरसूनि काम । ध्यावें नाम विठोबाचें ॥३॥ तुका म्हणे देवाविण । केला सीण तो मिथ्या ॥४॥

१५२३. शुद्धरसें ओलावली । रसना धाली न धाये ॥१॥ कळों नये जाली धणी । नारायणीं पूर्णता ॥२॥ आवडे ते तेचि यासी । ब्रह्म रसीं निरसें ॥३॥ तुका म्हणे बहुतां परी । करुणाकरीं सेवन ॥४॥

१५२४. असंतीं कांटाळा हा नव्हे मत्सर । ब्रह्म तें विकारविरहित ॥१॥ तरि म्हणा त्याग प्रतिपादलासे । अनादि हा असे वैराकार ॥२॥ सिजलें हिरवें एका नांवें धान्य । सेवनापें भिन्न निवडे तें ॥३॥ तुका म्हणे भूतीं साक्ष नारायण । अवगुणीं दंडण गुणीं पूजा ॥४॥

१५२५. आपुलें आपण जाणावें स्वहित । जेणें राहे चित्त समाधान ॥१॥ बहुरंगें माया असे विखुरली । कुंठितचि जाली होतां बरी ॥२॥ पूजा ते अबोला चित्ताच्या प्रकारीं । भाव विश्वंभरी समर्पावा ॥३॥ तुका म्हणे गेला फिटोनियां भेद । मग होतो देव मनाचाचि ॥४॥

१५२६. असोनि न कीजे अलिप्त अहंकारें । उगीच या भारें कुंथाकुंथी ॥१॥ धांवा सोडवणें वेगीं लवकरी । मी तो जालों हरी शक्तिहीन ॥२॥ भ्रमल्यानें दिसें बांधल्याचेपरी । माझें मजवरी वाहोनियां ॥३॥ तुका म्हणे धांव घेतलीसे सोई । आतां पुढें येईं लवकरी ॥४॥

१५२७. आपुल्याचा भोत चाटी । मारी करंटी पारिख्या ॥१॥ ऐसें जन भुललें देवा । मिथ्या हेवा वाढवी ॥२॥ गळ गिळी आमिषें मासा । प्राण आशा घेतला ॥३॥ तुका म्हणे बोकड मोहो । धरी पहा हो खाटिकाचा ॥४॥

१५२८. विषय तो मरणासंगीं । नेणे सुटिका अभागी ॥१॥ शास्त्राचा केला लुंडा । तोंडीं पाडियेला धोंडा ॥२॥ अगदीं मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ॥३॥ तुका

म्हणे ग्यानगंड । देवा सुखें पावो नाड ॥४॥

१५२९. मीच विखळ मीच विखळ । येर सकळ बहु बरें ॥१॥ पाहिजे हें क्षमा केलें । येणें बोलें विनवणी ॥२॥ मीच माझें मीच माझें । जालें ओझें अन्याय ॥३॥ आधीं आंचवला आधीं आंचवला । तुका जाला निर्मनुष्य ॥४॥

१५३०. येणें जाणें तरी । राहे देव कृपा करी ॥१॥ ऐसें तंव पुण्य नाहीं । पाहातां माझे गांठीं कांहीं ॥२॥ भय निवारिता । कोण वेगळा अनंता ॥३॥ तुका म्हणे बारे भोग । वारी तरी पांडुरंग ॥४॥

१५३१. भल्याचें कारण सांगावें स्वहित । जैसी कळे नीत आपणासी ॥१॥ परी आम्ही असों एकाचिये हातीं । नाचवितों चित्तीं त्याचें तैसें ॥२॥ वाट सांगे त्याच्या पुण्या नाहीं पार । होती उपकार अगणित ॥३॥ तुका म्हणे तुम्ही बहु कृपावंत । आपुलें उचित केलें संतीं ॥४॥

१५३२. लावूनियां पुष्टी पोरें । आणी करकर कथेमाजी ॥१॥ पडा पायां करा विनंती । दवडा हातीं धरोनियां ॥२॥ कुर्वाळूनि बैसे मोहें । प्रेम कां हे नासीतसे ॥३॥ तुका म्हणे वाटे चित्त । करा फजित म्हणऊनि ॥४॥

१५३३. पुण्य उभें राहो आतां । संताचें याकारणें ॥१॥ पंढरीचे लागा वाटे । सखा भेटे विठ्ठल ॥२॥ संकल्प हे यावे फळा । कळवळा बहुतांचा ॥३॥ तुका म्हणे होउनि क्षमा । पुरुषोत्तमा अपराध ॥४॥

१५३४. आइकिली मात । पुरविले मनोरथ ॥१॥ प्रेम वाढविलें देवा । बरवी घेऊनियां सेवा ॥२॥ केली विनवणी । तैसी पुरविली धणी ॥३॥ तुका म्हणे काया । रसा कुरोंडी वरोनियां ॥४॥

१५३५. संतांची स्तुति तें दर्शनाच्या योगें । पडिल्या प्रसंगें ऐसी कीजे ॥१॥ संकल्प ते सदा स्वामीचेचि चित्तीं । फांको नये वृत्ति अखंडित ॥२॥ दास्यत्वे तें असे एकविध नांवें । उरों नये जीवें भिन्नत्वेंसी ॥३॥ निज बीजा येथें तुका अधिकारी । पाहिजे तें पेरी तये वेळीं ॥४॥

१५३६. सेजेचा एकांत आगीपाशीं कळे । झांकलिया डोळे अध:पात ॥१॥ राहो अथवा मग जळो आगीमधीं । निवाड तो आधीं होउनि गेला ॥२॥ भेणें झडपणी नाहीं येथें दुजें । पादरधिटा ओझें हतियारें ॥३॥ तुका म्हणे मज नाहीं जो भरंवसा । तोंवरि सहसा निवाड तो ॥४॥

१५३७. न सरे भांडार । भरलें वेचितां अपार ॥१॥ भरित्याचें पोट भरे । पुढिलासी पुढें उरे ॥२॥ कारणापुरता । लाहो आपुल्याल्या हिता ॥३॥ तुका म्हणे देवा । पुढें केला चाले हेवा ॥४॥

१५३८. तरी हांव केली अमुप व्यापारें । व्हावें एक सरें धनवंत ॥१॥ जालों हरिदास शूरत्वाच्या नेमें । जालीं ठावीं वर्में पुढिलांची ॥२॥ जना वेगळे हे असे अभिनव । बळी दिला जीव म्हणऊनि ॥३॥ तुका म्हणे तरी लागलों विल्हेसी । चालतिया दिवसीं स्वामी ऋणी ॥४॥

१५३९. कोण दुजें हरी सीण । शरण दीन आल्याचा ॥१॥ तुम्हांविण जगदीशा । उदार ठसा त्रिभुवनीं ॥२॥ कोण ऐसें वारी पाप । हरि ताप जन्माचा ॥३॥ तुका म्हणे धांव घाली । कोण चाली मनाची ॥४॥

१५४०. ग्रंथाचे ते अर्थ नेणता हे खळ । बहु अनर्गळ जाले विषयीं ॥१॥ नाहीं भेद म्हणून भलतेंचि आचरे । मोकळा विचरे मनासवें ॥२॥ तुका म्हणे विषा नांव ते अमृत । पापपुण्या भीत नाहीं नष्ट ॥३॥

१५४१. कायावाचामनें जाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना ॥१॥ विश्वासी तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगिता होय त्याचें ॥२॥ तुका म्हणे चित्त करावें निर्मळ । येऊनि गोपाळ राहे तेथें ॥३॥

१५४२. येईं गा तूं मायबापा पंढरीच्या राया । तुजविण सीण वाटे क्षीण जाली काया ॥१॥ याती हीन मती हीन कर्म हीन माझें । सर्व लज्जा सांडोनियां शरण आलों तुज ॥२॥ दीनानाथ दीनबंधु नाम तुज साजे । पतितपावन नाम ऐसी ब्रीदावळी गाजे ॥३॥ विटेवरी उभा नीट कटावरी कर । तुका म्हणे हेंचि आम्हां ध्यान निरंतर ॥४॥

१५४३. हरिचें नाम कदाकाळीं कां रे नये वाचे । म्हणतां राम राम तुझ्या बाचें काय वेचे ॥१॥ पोटासाठीं खटपट करिसी अवघा वीळ । राम राम म्हणतां तुझी बसली दांतखीळ ॥२॥ द्रव्याचिया आशा तुजला दाही दिशा न पुरती । कीर्तनासी जातां तुझी जड झाली माती ॥३॥ तुका म्हणे ऐशा जीवा काय करूं आतां । राम राम न म्हणे त्याचा गाढव मातापिता ॥४॥

१५४४. गंगा आली आम्हांवरी । संत पाउलें साजिरीं ॥१॥ तेथें करीन अंघोळी । उडे चरणरज धुळी । येती तीर्थावळी । पर्वकाळ सकळ ॥२॥ पाप पळालें जळालें । भवदुःख दुरावलें ॥३॥ तुका म्हणे धन्य जालों । संतसागरीं न्हालों ॥४॥

१५४५. आम्हां सुकाळ सुखाचा । जवळी हाट पंढरीचा । सादाविती वाचा । रामनामें वैष्णव ॥१॥ घ्यारे आपुलाल्या परी । नका ठेवूं कांहीं उरी । ओसरतां भरी । तोंडवरी अंबर ॥२॥ वाहे बंदर द्वारका । खेप आली पुंडलिका । उभेचि विकीलें एका । सनकादिका सांपडलें ॥३॥ धन्य धन्य हे भूमंडळीं । प्रगटली नामावळी । घेती जीं दुबळी । तीं आगळी सदैव ॥४॥ माप आपुलेनि हातें । कोणी नाहीं निवारितें । पैस करूनि चित्तें । घ्यावें हितें आपुलिया ॥५॥ नाहीं वांटितां सरलें । आहे तैसेंचि भरलें । तुका म्हणे गेलें । वांयांविण न घेतां ॥६॥

१५४६. चुकलिया ताळा । वाती घालुनि बैसे डोळां ॥१॥ तैसें जागें करीं चित्ता । कांहीं आपुलिया हिता ॥२॥ विक्षेपिलें धन । तेथें गुंतलेंसें मन ॥३॥ नाशिवंतासाठीं । तुका म्हणे करिसी आटी ॥४॥

१५४७. करूनि जतन । कोणा कामा आलें धन ॥१॥ ऐसें जाणत जाणतां । कां रे होतोसी नेणता ॥२॥ प्रिया पुत्र बंधु । नाहीं तुज यांशीं संबंधु ॥३॥ तुका म्हणे एका । हरीविण नाहीं सखा ॥४॥

१५४८. आम्ही देतों हाका । कां रें जालासि तूं मुका ॥१॥ न बोलसी नारायणा । कळलासी क्रियाहीना ॥२॥ आधीं करूं चौघाचार । मग सांडूं भीडभार ॥३॥ तुका म्हणे शेवटीं । तुम्हां आम्हां घालूं तुटी ॥४॥

१५४९. नव्हे भिडा हें कारण । जाणे करूं ऐसें जन ॥१॥ जों जों धरावा लौकिक । रडवितोसी आणीक ॥२॥ चाल जाऊं संतांपुढें । ते हें निवडिती रोकडें ॥३॥ तुका म्हणे तूं निर्लज्ज । आम्हां रोकडी गरज ॥४॥

१५५०. बहु होता भला । परि ये रांडेनें नासिला ॥१॥ बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इचे वेळे ॥२॥ नव्हतें आळवितें कोणी । इनें केला जग ऋणी ॥३॥ ज्याचें त्यासी नेदी देऊं । तुका म्हणे धावे खाऊं ॥४॥

१५५१. काय करावें तें आतां । जालें नयेसें बोलतां ॥१॥ नाहीं दोघांचिये हातीं । गांठी घालावी एकांतीं ॥२॥ होय आपुलें काज । तों हे भीड सांडूं लाज ॥३॥ तुका म्हणे देवा । आधीं निवडूं हा गोवा ॥४॥

१५५२. केली सलगी तोंडपिटी । आम्ही लडिवाळें धाकुटीं ॥१॥ न बोलावें तेंचि आलें । देवा पाहिजे साहिलें ॥२॥ अवघ्यामध्यें एक वेडें । तेंचि खेळविती कोडें ॥३॥ तुका म्हणे मायबापा । मजवरी कोपों नका ॥४॥

१५५३. शिकवूनि बोल । केलें कवतुक नवल ॥१॥ आपणियां रंजविलें । बापें माझिया विठ्ठलें ॥२॥ हातीं प्रेमाचें भातुकें । आम्हां देउनियां निकें ॥३॥ तुका करी टाहो । पाहे रखुमाईचा नाहो ॥४॥

१५५४. तेथें सुखाची वसति । गाती वैष्णव नाचती । दिंड्या पताका झळकती । जे गर्जती हरिनामें ॥१॥ दोषा जाली घेघेमारी पळती भरले दिशा चारी । न येती माघारीं । नाहीं उरी परताया ॥२॥ विसरोनि देवपणा । उभा पंढरीचा राणा । विटोनि निर्गुणा । रूप धरिलें गोजिरें ॥३॥ पोट सेवितां न धाये । भूक भुकेलीच राहे । तुका म्हणे पाहे । कोण वास मुक्तीची ॥४॥

१५५५. शूद्रवंशीं जन्मलों । म्हणोनि दंभें मोकलिलों ॥१॥ अरे तूंच माझा आतां । मायबाप पंढरीनाथा ॥२॥ घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ॥३॥ सर्वभावें दीन । तुका म्हणे यातिहीन ॥४॥

१५५६. वेडें वाकडें गाईन । परि तुझाचि म्हणवीन ॥१॥ मज तारीं दीनानाथा । ब्रीद

साच करीं आतां ॥२॥ केल्या अपराधाच्या राशी । म्हणऊनि आलों तुजपाशीं ॥३॥ तुका म्हणे मज तारीं । सांडीं ब्रीद नाहीं तरी ॥४॥

१५५७. हरिभक्त माझे जिवलग सोइरे । हृदयीं पाउलें धरीन त्यांचीं ॥१॥ अंतकाळीं येती माझ्या सोडवणे । मस्तक बैसणें देईन त्यासी ॥२॥ आणिक सोइरे सज्जन वो कोणी । वैष्णवांवांचोनि नाहीं मज ॥३॥ देइन आलिंगण धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ॥४॥ कंठीं तुळशीमाळा नामाचे धारक । ते माझे तारक भवनदीचे ॥५॥ तयांचे चरणीं घालीन मी मिठी । चाड ही वैकुंठीं नाहीं मज ॥६॥ आळसे दंभें भावें हरिचें नाम गाती । ते माझे सांगाती परलोकींचे ॥७॥ कायावाचामनें देईन क्षेम त्यासी । चाड जीवित्वासी नाहीं मज ॥८॥ हरिचें नाम मज म्हणविती कोणी । तया सुखा धणी धणीवरी ॥९॥ तुका म्हणे तया उपकारें बांधलों । म्हणऊनि आलों शरण संतां ॥१०॥

१५५८. लटिका तो प्रपंच एक हरिनाम साच । हरिविण आहाच सर्व इंद्रियें ॥१॥ लटिकें तें मौन भ्रमाचें स्वप्न । हरिविण ध्यान नश्वर आहे ॥२॥ लटिकिया वित्पत्ति हरिविण करिती । हरी नाहीं चित्तीं तो शव जाणा ॥३॥ तुका म्हणे हरि हें धरिसी निर्धारीं । तरी तूं झडकरी जासी वैकुंठासी ॥४॥

१५५९. सर्वस्वासी मुकावें तेणें हरिसी जिंकावें । अर्थ प्राण जीवें देहत्याग ॥१॥ मोह ममता माया चाड चिंता । विषयकंदुवेथा जाळुनियां ॥२॥ लोकलज्जा दंभ आणि अहंकार । करूनि मत्सर देशाधडी ॥३॥ शांति क्षमा दया सखिया विनउनी । मूळ चक्रपाणी धाडी त्यांसी ॥४॥ तुका म्हणे याती अक्षरें अभिमान । सांडोनियां शरण रिघें संतां ॥५॥

१५६०. एकांताचें सुख देईं मज देवा । आघात या जीवा चुकवूनि ॥१॥ ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ॥२॥ मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैसी मज गोडी देईं देवा ॥३॥ कीर्ती ऐकोनियां जालों शरणागत । दासाचें तूं हित करितोसी ॥४॥ तुका म्हणे मी तों दीन पापराशी । घालावें पाठीशीं मायबापा ॥५॥

१५६१. लटिकें तें ज्ञान लटिकें ते ध्यान । जरि हरिकीर्तन प्रिय नाहीं ॥१॥ लटिकाचि दंभ घातला दुकान । चाळविलें जन पोटासाठीं ॥२॥ लटिकेंचि केलें वेदपारायण । जरि नाहीं स्फुंदन प्रेम कथे ॥३॥ लटिकें तें तप लटिका तो जप । आळस निद्रा झोप कथाकाळीं ॥४॥ नाम नावडे तो करील बोहरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ॥५॥ तुका म्हणे ऐसीं गर्जती पुराणें । शिष्टांचीं वचनें मागिलाही ॥६॥

१५६२. भूतीं भगवद्भाव । मात्रासहित जीव । अद्वैत तो ठाव । निरंजन एकला ॥१॥ ऐसीं गर्जती पुराणें । वेदवाणी सकळ जन । संत गर्जतील तेणें । अनुभवें निर्भर ॥२॥ माझें

तुझें हा विकार। निरसतां एकंकार। नलगे कांहीं फार। विचारचि करणें ॥३॥ तुका म्हणे दुजें। हें तों नाहींच सहजें। संकल्पाच्या काजें। आपेंआप वाढलें ॥४॥

१५६३. नेणें फुंको कान। नाहीं एकांतींचें ज्ञान ॥१॥ तुम्ही आइका हो संत। माझा सादर वृत्तांत ॥२॥ नाहीं देखिला तो डोळां। देव दाखवूं सकळां ॥३॥ चिंतनाच्या सुखें। तुका म्हणे नेणें दुःखें ॥४॥

१५६४. त्याग तरी ऐसा करा। अहंकारा दवडावें ॥१॥ मग जैसा तैसा राहें। काय पाहें उरलें तें ॥२॥ अंतरींचें विषम जाड। येऊं पुढें न द्यावें ॥३॥ तुका म्हणे शुद्ध मन। समाधान पाहिजे ॥४॥

१५६५. मातेचिये चित्तीं। अवघी बाळकाची व्याप्ति ॥१॥ देह विसरे आपुला। जवळी घेतां सीण गेला ॥२॥ दावी प्रेमभातें। आणि अंगावरी चढतें ॥३॥ तुका संतांपुढें। पायीं झोंबे लाडें कोडें ॥४॥

१५६६. कोणा पुण्या फळ आलें। आजि देखिलीं पाउलें ॥१॥ ऐसें नेणों नारायणा। संतीं सांभाळिलें दीना ॥२॥ कोण लाभकाळ। दीन आजिचा मंगळा ॥३॥ तुका म्हणे जाला। एवढा लाभ का विठ्ठला ॥४॥

१५६७. मान इच्छी तो अपमान पावे। अमंगळ सवें अभाग्याची ॥१॥ एकाचिये अंगीं दुजियाचा वास। आशा पुढें नाश सिद्ध करी ॥२॥ आधीक फळासी कोठें पावों शके। वासनेची भिकेवरी चाली ॥३॥ तुका म्हणे राजहंस ढोरा नांवें। काय तया घ्यावें अळंकाराचें ॥४॥

१५६८. संसारापासूनी कैसें सोडविशी। न कळे हृषीकेशी काय जालों। करितां न सरे कांहीं आधीक वाढ पाहीं। तृष्णा देशधडी केलों। भक्तिभजनभाव यांसी नाहीं ठाव। चरणीं तुझ्या अंतरलों। मागें पुढें रीघ न पुरेचि पाहतां। अवघा अवघीं वेष्टिलों ॥१॥ आतां माझी लाज राखें नारायणा। हीन दीन लीन याचकाची। करितां न कळे कांहीं असतील गुण दोष। करी होळी संचिताची ॥२॥ इंद्रियद्वारें मन धांवे सैरें। नागवे करितांचि कांही। हात पाय कान मुख लिंगस्थान। नेत्रद्वारें घ्राण पाहीं। जया जैसी सोय तया तैसें होय। क्षण एक स्थिर नाहीं। करिती तडातोडी ऐसी यांची खोडी। न चले माझें यास कांहीं ॥३॥ शरीरसंबंधु पुत्र पत्नी बंधु। धन लोभ मायावंतें। जन लोकपाळ मैत्र हे सकळ। सोइरीं सज्जनें बहुतें। नाना कर्म डाय करिती उपाय। बुडावया घातपातें। तुका म्हणे हरी राखे भलत्यापरी। आम्हीं तुझीं शरणागतें ॥४॥

१५६९. नाम घेतां उठाउठीं। होय संसारासी तुटी ॥१॥ ऐसा लाभ बांधा गांठी। विठ्ठलपायीं पडे मिठी ॥२॥ नामापरितें साधन नाहीं। जें तूं करिसी आणिक कांहीं ॥३॥ हाकारोनि सांगे तुका। नाम घेतां राहों नका ॥४॥

१५७०. प्राण समर्पिला आम्हीं । आतां उशीर कां स्वामी ॥१॥ माझें फेडावें उसणें । भार न मना या ऋणें ॥२॥ जाला कंठस्फोट । जवळी पातलों निकट ॥३॥ तुका म्हणे सेवा । कैसी बरी वाटे देवा ॥४॥

१५७१. येणें मार्गें गेले । त्याचें निसंतान केलें ॥१॥ ऐसी अवघड वाट । कोणा सांगावा बोभाट ॥२॥ नागविल्या थाटी । उरों नेदीच लंगोटी ॥३॥ तुका म्हणे चोर । तो हा उभा कटिकर ॥४॥

१५७२. जोंवरि तोंवरि जंबुक करी गर्जना । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं ॥१॥ जोंवरि तोंवरि सिंधु करि गर्जना । जंव त्या अगस्ति ब्राह्मणा देखिलें नाहीं ॥२॥ जोंवरि तोंवरि वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता दृष्टी पडली नाहीं ॥३॥ जोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टी देखिला नाहीं ॥४॥ जोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुकयाचें दर्शन जालें नाहीं ॥५॥

१५७३. जोंवरि तोंवरि शोभतील गारा । जंव नाहीं हिरा प्रकाशला ॥१॥ जोंवरि तोंवरि शोभती दीपिका । नुगवतां एका भास्करासी ॥२॥ जोंवरि तोंवरि सांगती संतपणाचिया गोष्टी । जंव नाहीं भेटी तुकयासवें ॥३॥

१५७४. धरोनि दोन्ही रूपें पाळणें संहार । करी कोप रुद्र दयाळ विष्णु ॥१॥ जटाजूट एका मुगुट माथां शिरीं । कमळापति गौरीहर एक ॥२॥ भस्म उद्धळण लक्ष्मीचा भोग । शंकर श्रीरंग उभयरूपीं ॥३॥ वैजयंती माळ वासुकीचा हार । लेणे अळंकार हरिहरा ॥४॥ कपाळ झोळी एका स्मशानींचा वास । एक जगन्निवास विश्वंभर ॥५॥ तुका म्हणे मज उभयरूपीं एक । सारोनि संकल्प शरण आलों ॥६॥

१५७५. उचिताचा भाग होतों राखोनियां । दिसती ते वांयां गेले कष्ट ॥१॥ वचनाची कांहीं राहेचि ना रुचि । खळाऐसें वाची कुची झाली ॥२॥ विश्वासाने माझें बुडविलें घर । करविला धीर येथवरी ॥३॥ तुका म्हणे येकीं थार नाहीं बुड । कैसें तुम्हीं कोड पुरविलें ॥४॥

१५७६. लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥१॥ खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा ॥२॥ सेवी भांग आफू तंबाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥३॥ तुका म्हणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥४॥

१५७७. अवघींच तीर्थें घडलीं एक वेळां । चंद्रभागा डोळां देखिलिया ॥१॥ अवघींच पापें गेलीं दिगांतरीं । वैकुंठ पंढरीं देखिलिया ॥२॥ अवघियां संतां एक वेळां भेटी । पुंडलिक दृष्टी देखिलिया ॥३॥ तुका म्हणे जन्मा आल्याचें सार्थक । विठ्ठलचि एक देखिलिया ॥४॥

१५७८. आम्ही असों निश्चिंतीनें । एका गुणें तुमचिया ॥१॥ दुराचारी तरले नामें । घेतों

प्रेमें म्हणोनि ॥२॥ नाहीं तुम्हां धांव घेता । कृपावंता आळस ॥३॥ तुका म्हणे विसरूं काईं । तुज वो आई विठ्ठले ॥४॥

१५७९. अनुभवें वदे वाणी । अंतर ध्यानीं आपुलें ॥१॥ कैंची चिका दुधचवी । जरी दावी पांढरे ॥२॥ जातीऐसा दावी रंग । बहु जग या नांव ॥३॥ तुका म्हणे खद्योत तें । ढुंगाभोंवतें आपुलिया ॥४॥

१५८०. परपीडक तो आम्हां दावेदार । विश्वीं विश्वंभर म्हणऊनि ॥१॥ दंडूं त्यागूं बळें नांवलोकूं डोळा । राखूं तो चांडाळा ऐसा दुरी ॥२॥ अनाचार कांहीं न साहे अवगुण । बहु होय मन कासावीस ॥३॥ तुका म्हणे माझी एकविध सेवा । विन्मुख ते देवा वाळी चित्तें ॥४॥

१५८१. कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ॥१॥ देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥२॥ भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥३॥ नाहीं नाहीं त्या समान । तुका म्हणे मी जमान ॥४॥

१५८२. नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥१॥ ऐसें धरोनियां ध्यान । मनें करावें चिंतन ॥२॥ ब्रह्मादिकां ध्याना नये । तो हा कीर्तनाचे सोये ॥३॥ तुका म्हणे सार घ्यावें । मनें हरिरूप पहावें ॥४॥

१५८३. आडलिया जना होसी साहाकारी । अंधळिया करीं काठी तूंचि ॥१॥ आडले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायण ॥२॥ प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुम्ही आपंगिला नानापरी ॥३॥ आपुलेंचि अंग तुम्हीं वोढविलें । त्याचें निवारलें महा दुःख ॥४॥ तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥५॥

१५८४. तपासी तें मन करूं पाहे घात । धरोनि सांगात इंद्रियांचा ॥१॥ म्हणोनि कीर्तन आवडलें मज । सांडोनियां लाज हेंचि करीं ॥२॥ पाहातां आगमनिगमाचे ठाव । तेथें नाहीं भाव एकविध ॥३॥ तुका म्हणे येथें नाही वो विकार । नाम एक सार विठोबाचें ॥४॥

१५८५. गुरुशिष्यपण । हें तों अधमलक्षण ॥१॥ भूतीं नारायण खरा । आप तैसाचि दुसरा ॥२॥ न कळतां दोरी साप । राहूं नेदावा तों कांप ॥३॥ तुका म्हणे गुण दोषीं । ऐसे न पडावें सोसीं ॥४॥

१५८६. अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेंहि तेणें वंद्य केलें ॥१॥ अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥२॥ ब्रह्महत्या राशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥३॥ तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥४॥

१५८७. अवीट हे क्षीर हरिकथा माउली । सेवितां सेविली वैष्णवजनीं ॥१॥ अमृत राहिलें लाजोनि माघारें । येणें रसें थोरें ब्रह्मानंदें ॥२॥ पतित पातकी पावनपंगती । चतुर्भुज

होती देवा ऐसे ॥३॥ सर्व सुखें तया मोहोरती ठाया । जेथें दाटणी या वैष्णवांची ॥४॥ निर्गुण हें सोंग धरिलें गुणवंत । धरूनियां प्रीत गायनाची ॥५॥ तुका म्हणे केली साधना गाळणी । सुलभ कीर्तनीं होऊनि ठेला ॥६॥

१५८८. धनवंता घरीं । करी धनचि चाकरी ॥१॥ होय बैसल्या व्यापार । नलगे सांडावेंचि घर ॥२॥ रानीं वनीं द्वीपीं । असतीं तीं होतीं सोपीं ॥३॥ तुका म्हणे मोल । देतां कांहीं नव्हे खोल ॥४॥

१५८९. हा गे माझा अनुभव । भक्तिभाव भाग्याचा ॥१॥ केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ॥२॥ घालोनियां भार माथा । अवघी चिंता वारली ॥३॥ तुका म्हणे वचनासाठीं । नाम कंठीं धरियेलें ॥४॥

१५९०. देव आहे सुकाळ देशीं । अभाग्यासी दुर्भिक्ष ॥१॥ नेणती हा करूं सांटा । भरले फांटा आडरानें ॥२॥ वसवूनि असे घर । माग दूर घातला ॥३॥ तुका म्हणे मन मुरे । मग जें उरे तेंचि तूं ॥४॥

१५९१. खुंटोनियां दोरी आपणियांपाशीं । वावडी आकाशीं मोकलिली ॥१॥ आपुलिया आहे मालासी जतन । गाहाणाचें तें ऋण बुडों नेणें ॥२॥ बीज नेलें तेथें येईल अंकुर । जतन तें सार करायाची ॥३॥ तुका म्हणे माझी निश्चितीची सेवा । वेगळें नाहीं देवा उरों दिलें ॥४॥

१५९२. शाहाणपणें वेद मुका । गोपिका त्या ताकटी ॥१॥ कैसें येथें कैसें तेथें । शहाणे ते जाणती ॥२॥ यज्ञमुखें खोडी काढी । कोण गोडी बोरांची ॥३॥ तुका म्हणे भावाविण । अवघा सीण केला होय ॥४॥

१५९३. मजुराचें पोट भरे । दाता उरे संचला ॥१॥ या रे या रे हातोहातीं । काम माती सारावी ॥२॥ रोजकीर्दी होतो झाडा । रोकडाचि पर्वत ॥३॥ तुका म्हणे खोल पाया । वेचों काया क्लेशेसीं ॥४॥

१५९४. स्मशानींच आम्हां न्याहालीचें सुख । या नांवें कौतुक तुमची कृपा ॥१॥ नाहीं तरी वांयां अवघेंचि निर्फळ । शब्द ते पोकळ बडबड ॥२॥ झाडें झुडें जीव सोइरे पाषाण । होती तईं दान तुम्हीं केलें ॥३॥ तुका म्हणे आतां पाहें अनुभव । घेऊनि हातीं जीव पांडुरंगा ॥४॥

१५९५. आमची जोडी ते देवाचे चरण । करावें चिंतन विठोबाचें ॥१॥ लागेल तरी कोणी घ्यावें धणीवरी । अमुपचि परि आवडीच्या ॥२॥ उभारिला कर प्रसिद्ध या जगें । करूं केला त्याग मागें पुढें ॥३॥ तुका म्हणे होय दरिद्र विच्छिन्न । ऐसें देऊं दान एक वेळां ॥४॥

१५९६. दधिमाजी लोणी जाणती सकळ । तें काढी निराळें जाणें मथन ॥१॥ अग्निकाष्ठामाजी ऐसें जाणे जन । मथिलियाविण कैसा जाळी ॥२॥ तुका म्हणे मुख मळीण

दर्पणीं। उजळिल्यावांचुनि कैसें भासे ॥३॥

१५९७. नको नको मना गुंतूं मायाजाळीं। काळ आला जवळी ग्रासावया ॥१॥ काळाची हे उडी पडेल बा जेव्हां। सोडविना तेव्हां मायबाप ॥२॥ सोडविना राजा देशींचा चौधरी। आणीक सोइरीं भलीं भलीं ॥३॥ तुका म्हणे तुला सोडविना कोणी। एका चक्रपाणी वांचूनियां ॥४॥

१५९८. पुढें जाणें लाभ घडे। तेचि वेडे नासती ॥१॥ येवढी कोठें नागवण। अंधारून विष घ्यावें ॥२॥ होणारासी मिळे बद्धि। नेदी शुद्धी धरूं ते ॥३॥ तुका म्हणे जना सोंग। दावी रंग आणीक ॥४॥

१५९९. ऐका गा हे अवघे जन। शुद्ध मन तें हित ॥१॥ अवघा काळ नये जरी। समयावरी जाणावा ॥२॥ नाहीं कोणी सवें येतां। संचिता या वेगळा ॥३॥ बरवा अवकाश आहे। करा साहे इंद्रियें ॥४॥ कर्मभूमी ऐसा ठाव। वेवसाव जाणावा ॥५॥ तुका म्हणे उत्तम जोडी। जाती घडी नरदेह ॥६॥

१६००. संतसेवेसी अंग चोरी। दृष्टी न पडो तयावरी ॥१॥ ऐसियासी व्याली रांड। जळो जळो तिचें तोंड ॥२॥ संतचरणीं ठेवितां भाव। आपेंआप भेटे देव ॥३॥ तुका म्हणे संतसेवा। माझ्या पूर्वजांचा ठेवा ॥४॥

१६०१. गेले पळाले दिवस रोज। काय म्हणतोसि माझें माझें ॥१॥ सळे धरोनि बैसला काळ। फांकों नेदी घटिका पळ ॥२॥ कां रे अद्यापि न कळे। केश फिरले कान डोळे ॥३॥ हित कळोनि असतां हातीं। तोंडीं पाडोनि घेसी माती ॥४॥ तुज ठाउकें मी जाणार। पाया शोधोनि बांधिसी घर ॥५॥ तुका म्हणे वेगें। पंढरिराया शरण रिघें ॥६॥

१६०२. आतां माझ्या मायबापा। तूं या पापा प्रायश्चित्त ॥१॥ फजित हे केले खळ। तो विटाळ निवारीं ॥२॥ प्रेम आतां पाजीं रस। करीं वास अंतरीं ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा। जिवलगा माझिया ॥४॥

१६०३. कां रे न पवसी धांवण्या। अंगराख्या नारायणा ॥१॥ अंगीं असोनियां बळ। होसी खट्याळ नाट्याळ ॥२॥ आम्ही नरका जातां। काय येइल तुझ्या हातां। तुका म्हणे कान्हा। क्रियानष्टा नारायणा ॥४॥

१६०४. माझे पाय तुझी डोई। ऐसें करीं गा भाक देईं ॥१॥ पाहतां दिसे उफराटें। घडे तईं भाग्य मोठें ॥२॥ बहु साधन मोलाचें। यासी जोडा दुजें कैंचें ॥३॥ नका अनुमानूं विठ्ठला। तुका म्हणे धडा झाला ॥४॥

१६०५. पवित्र तें अन्न। हरिचिंतनीं भोजन ॥१॥ येर वेठ्या पोट भरी। चाम मसकाचे परी ॥२॥ जेऊनियां तोचि धाला। हरिचिंतनीं केला काला ॥३॥ तुका म्हणे चवी आलें।

जें कां मिश्रित विठ्ठलें ॥४॥

१६०६. चरणाचा महिमा । हा तो तुझ्या पुरुषोत्तमा ॥१॥ अंध पारिखी माणिकें । बोलाविशी स्पष्ट मुकें ॥२॥ काय नाहीं सत्ता । हातीं तुझ्या पंढरीनाथा ॥३॥ तुका म्हणे मूढा । मज चेष्टविलें जडा ॥४॥

१६०७. बळिवंत कर्म । करी आपुला तो धर्म ॥१॥ पुढें घालूनियां सत्ता । न्यावें पतना पतिता ॥२॥ आचरणें खोटीं । केलीं सलताती पोटीं ॥३॥ तुका म्हणे देवा । नाहीं भजन केली सेवा ॥४॥

१६०८. जननिया बाळका रे घातलें पाळणा । पंचततत्त्वीं जडियेल्या वारतिया चहूं कोणा । अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा । वैखरी धरूनी हातीं भाव दावी खेळणा ॥१॥ निजीं रे निजीं आतां । म्हणोनि परिये दे माता । खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां ॥२॥ खेळतां बाहेरी रे मुला लोकांच्या सवें । बागुल काळतोंडा नाहीं नेतो तें ठावें । खेळतां दुश्चिता रे देखोनी तें न्यावें । म्हणोनि सांगे तुज शीघ्र वचन पाळावें ॥३॥ संचित मागें शुद्ध तुज होतें सांगाती । तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं । आणीक नेलीं मागें काय जाणों तीं किती । आलासी येथवरी थोर पुण्यें बहुतीं ॥४॥ खेळतां शुक देवा खोरे लागला पाठीं । लपाला वरुषें बारा तिये मातेचे पोटीं । रिघतां बाहेरी रे पळे घेऊनि कासोटी । तेचि परी जाली स्वामी भेणें रिघें कपाटीं ॥५॥ खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक । पडिलासे अग्निमाजी पाव जळत एक । भरलासे कांप अंगीं सुख नाठवे दु:ख । आप पर तें ही नाहीं देहभाव सकळीक ॥६॥ सिबीया चक्रवर्ती कव पडिली अवचिती । धीट तो नभे तया मांस कापिलें हातीं । टाकिलें तयावरी खुणें गोविला अंती । पावला मायबाप हिरोन घेतला हातीं ॥७॥ बांधलें अजामेळा वेश्यागणिका कैसीं । मारिलीं हांक धाकें कळलें मायबापासी । घातली धांव नेटें वेगीं पावला त्यासी हिरोनि नेलीं दोघें आपणयां तीं पासीं ॥८॥ धरूनि आठवूं रे बाळा राहे निश्चळ । खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ । टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ । मग नेदी आठवूं रे नेत्रीं घालीं पडळ ॥९॥ ऐसी तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त । सुस्वरें कंठ गाये मधुर आणि संगीत । तेणें तें चित्त राहे होऊनियां निवांत । पावती तुका म्हणे नाहीं विश्वास ते घात ॥१०॥

१६०९. देवें देऊळ सेविलें । उदक कोरडेंचि ठेविलें ॥१॥ नव्हे मत गूढ उमान कांहीं । तूं आपआपणापें पाहीं ॥२॥ पाटें पूर वोसंडला । सरिता सागर तुंबोनि ठेला ॥३॥ वांजे घरीं बाळ तान्हा । एक बाळी दो कानां ॥४॥ तुका म्हणे पैस । अनुभविया ठावा गोडी रस ॥५॥

१६१०. अशक्य तें तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥१॥ मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावुं नये ॥२॥ थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे ।

म्हणवितों दास काय थोडे ॥३॥ तुका म्हणे माझे निववावे डोळे। दावूनि सोहळे समर्थाचे ॥४॥

१६११. दाता तोचि एक जाणा। नारायणा स्मरवी ॥१॥ आणीक नाशिवंतें काय। न सरे हाय ज्याच्यानें ॥२॥ यावें तया काकुलती। जे दाविती सुपंथ ॥३॥ तुका म्हणे उरी नुरे। त्याचे खरे उपकार ॥४॥

१६१२. लेक लाडकी मी संतांची। मजवरी कृपा बहुतांची ॥१॥ अखई चुडा हातीं आला। आंकण मोती नाकाला ॥२॥ बोध मुराळी शृंगारिला। चौऱ्यांशीचा सिक्का केला ॥३॥ तुका तुकीं उतरला। साहानकेचा कौल दिला ॥४॥

१६१३. संतां नाहीं मान। देव मानी मुसलमान ॥१॥ ऐसे पोटाचे मारिले। देवा अशा विटंबिले ॥२॥ घाली लोटांगण। वंदी नीचाचे चरण ॥३॥ तुका म्हणे धर्म। न कळे माजल्याचा भ्रम ॥४॥

१६१४. अहो कृपावंता। होय बुद्धीचा ये दाता ॥१॥ जेणें पाविजे उद्धार। होय तुझे पायीं थार ॥२॥ वदवीं हे वाचा। भाव पांडुरंगीं साचा ॥३॥ तुका म्हणे देवा। माझें अंतर वसवा ॥४॥

१६१५. नाहीं म्यां वंचिला मंत्र कोणापाशीं। राहिलों जिवासीं धरूनि तो ॥१॥ विटेवरी भावें ठेवियेलें मन। पाउलें समान चिंतीतसें ॥२॥ पावविलों पार धरिला विश्वास। घालूनियां कास बळकट ॥३॥ तुका म्हणे मागें पावले उद्धार। तिहीं हा आधार ठेविलासे ॥४॥

१६१६. चंचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ। वाजवी खळाळ उदकासी ॥१॥ सोपें वर्म परि मन नाहीं हातीं। हा हा भूत चित्तीं भ्रम गाढा ॥२॥ रविबिंब नाहीं तुटत उदका। छायेची ते नका सरी धरूं ॥३॥ तुका म्हणे भय धरी रज्जूसाठीं। नाहीं साच पोटीं कळलें तों ॥४॥

१६१७. आवडी येते गुणें। कळों चिन्हें उमटती ॥१॥ पोटीचें ओठीं उभें राहे। चित्त साहे मनासी ॥२॥ डोहोळियाची भूक गर्भा। ताटीं प्रभा प्रतिबिंबे ॥३॥ तुका म्हणे मागून घ्यावें। मना खावें वाटे तें ॥४॥

१६१८. काय ऐसी वेळ। वोढवली अमंगळ ॥१॥ आजि दुखवलें मन। कथाकाळी जाला सीण ॥२॥ पापाचिया गुणें। त्याचिये वेळे दर्शनें ॥३॥ तुका म्हणे कानीं। घालूं आले दुष्ट वाणी ॥४॥

१६१९. किती वेळां जन्मा यावें। नित्य व्हावें फजीत ॥१॥ म्हणऊनि जीव भ्याला। शरण गेला विठोसी ॥२॥ प्रारब्ध हें पाठी गाढें। न सरे पुढें चालतां ॥३॥ तुका म्हणे रोकडी हे। होती पाहें फजीती ॥४॥

१६२०. होतों सांपडलों वेठी। जातां भेटी संसारा ॥१॥ तों या वाटे कृपा केली। भेटी जाली विठोसी ॥२॥ होता भार माथां माझे। बहु ओझें अमुप ॥३॥ तुका म्हणे केली चिंता।

कोण दाता भेटेल ॥४॥

१६२१. जा रे तुम्ही पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ॥१॥ गुण दोष नाणी मना । करी आपणासारिखें ॥२॥ उभारोनि उभा कर । भवपार उतराया ॥३॥ तुका म्हणे तांतड मोठी । जाली भेटी उदंड ॥४॥

१६२२. या रे हरिदासांनो जिंकों कळिकाळा । आमुचिया बळापुढें किती बापुडे ॥१॥ रंगसुरंग घमंडी नाना छंदें । हास्य विनोदें नामाची आवडी ॥२॥ येणें तेणें प्रकारें बहुतां सुख जोडे । पूजन तें घडे नारायणा अंतरीं ॥३॥ वांकुडिया माना बोल बोलावे आरूष । येईल तो त्यांस छंद पढीयें गोविंदा ॥४॥ आपुल्या आनंदें एकापुढें एक नटा । नाहीं थोर मोठा लहान ये प्रसंगीं ॥५॥ तुका म्हणे येथें प्रेम भंगूं नये कोणीं । देव भक्त दोन्ही निवडितां पातक ॥६॥

१६२३. देव जाणता देव जाणता । आपलीया सत्ता एकाएकीं ॥१॥ देव चतुर देव चतुर । जाणोनि अंतर वर्ततसे ॥२॥ देव निराळा देव निराळा । अलिप्त विटाळा तुका म्हणे ॥३॥

१६२४. माझ्या मुखें मज बोलवितो हरि । सकळांच्या अंतरीं नारायण ॥१॥ न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणों आम्ही ॥२॥ तुका म्हणे दोष नाहीं या विचारें । हिताचीं उत्तरें शिकवितां ॥३॥

१६२५. मांस खातां हाऊस करी । जोडोनि वैरी ठेवियेला ॥१॥ कोण त्याची करील कींव । जीवें जीव नेणती ॥२॥ पुढिलासाठीं पाजवी सुरू । आपुली चोरी अंगुळी ॥३॥ तुका म्हणे पुढें कुटिती हाडें । आपुल्या नाडें रडतील ॥४॥

१६२६. तुज जाणें तान्हें नाहीं पांडुरंगा । कां जी मज सांगा उपेक्षिलें ॥१॥ तुज ठावें होतें पातकी मी खरा । आधींच कां थारा दिला पायीं ॥२॥ अंक तो पडिला हरिचा मी दास । भेद पंगतीस करूं नये ॥३॥ तुका म्हणे आम्हीं जिंतीलें तें खरें । आतां उणें पुरें तुम्हा लागीं ॥४॥

१६२७. आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें । शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं ॥१॥ शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्द वांटूं धन जनलोकां ॥२॥ तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥३॥

१६२८. ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुलती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं ॥१॥ रिघों पाहे माजी बळेंचि त्याचें घर । दवडिती दूर म्हणोनियां ॥२॥ तुका म्हणे येथें न चले सायास । पडिलें उदास त्याच्या गळां ॥३॥

१६२९. कासया लागला यासी चौघाचार । मुक्तीचा वेव्हार निवडिला ॥१॥ ग्वाही भक्तांची घालूनियां वरि । महजर करीं आहे माझ्या ॥२॥ तुम्हां वेगळें आपुल्या ठायीं । होतें करूनि तेंही माझें माझें ॥३॥ भांडण शेवटीं जालें एकवट । आतां कटकट करूं नये ॥४॥

ठेविला ठेवा तो आला माझ्या हाता । आतां नसे सत्ता तुज देवा ॥५॥ तुका म्हणे वांयाविण खटपटा । राहिलों मी वांटा घेऊनियां ॥६॥

१६२०. जाती पंढरीस । म्हणे जाईन तयांस ॥१॥ तया आहे संवसार । ऐसें बोले तो महार ॥२॥ असो नसो भाव । जो हा देखे पंढरिराव ॥३॥ चंद्रभागे न्हाती । तुका म्हणे भलते याती ॥४॥

१६३१. धरियेलीं सोंगें । येणें अवघीं पांडुरंगें ॥१॥ तें हें ब्रह्म विटेवरी । उभें चंद्रभागे तिरीं ॥२॥ अंतर्व्यापी बाहीं । धांडोळितां कोठें नाहीं ॥३॥ योगयागतपें । ज्याकारणें दानजपें ॥४॥ दिलें नेदीजती । भोग सकळ ज्या होती ॥५॥ अवघी लीला पाहे । तुका म्हणे दासां साहे ॥६॥

१६३२. ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥१॥ तो हा पंढरीचा राणा । पुसा सहा चौं अठरां जणां ॥२॥ चिंतितां जयासी । भुक्तिमुक्ति कामारी दासी ॥३॥ वैकुंठासी जावें । तुका म्हणे ज्याच्या नांवें ॥४॥

१६३३. ज्याचे गर्जता पवाडे । श्रुतिशास्त्रां मौन पडे ॥१॥ तेथें माझी वाचा किती । पुरे करावया स्तुति ॥२॥ शिणला सहस्त्र तोंडें । शेष फणी ऐसें धेंडें ॥३॥ तुका म्हणे मही । पत्र सिंधु न पुरे शाई ॥४॥

१६२४. देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥१॥ न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तेंही अमृत पाहीं ॥२॥ न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं यमबाधा ॥३॥ तुका म्हणे नारायण । येतां गोळ्या वारी बाण ॥४॥

१६३५. कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ कां सखया लावियेला ॥१॥ दीनानाथ ब्रीद सांभाळीं आपुलें । नको पाहों केलें पापपुण्य ॥२॥ पतितपावन ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरिले ॥३॥ तुकयाबंधु म्हणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावें आतां ॥४॥

१६३५. कोठें गुंतलासी कोणाच्या धांवया । आली देवराया निद्रा तुज ॥१॥ कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटती मुखें गोपिकांचीं ॥२॥ काय पडिलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चलवे ॥३॥ काय माझे तुज गुणदोष दिसती । म्हणोनि श्रीपती कोपलासी ॥४॥ काय जालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका म्हणे ॥५॥

१६३७. परस्त्रीतें म्हणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ॥१॥ काय बोलोनियां तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥२॥ धर्मधारिष्टगोष्टी सांगे । उष्ट्या हातें नुडवी काग ॥३॥ जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥४॥ बोले तैसा चाले । तुका म्हणे तो अमोल ॥५॥

१६३८. असत्य वचन होतां सर्व जोडी । जरी लग्नघडी परउपकार ॥१॥ जाईल पतना यासि संदेह नाहीं । साक्ष आहे कांहीं सांगतों तें ॥२॥ वदविलें मुखें नारायणें धर्मा । अंगुष्ठ त्या कर्मासाठीं गेला ॥३॥ तुका म्हणे आतां सांभाळा रे पुढे । अंतरिंचे कुडें देईल दुःख ॥४॥

१६३९. जळो त्याचें तोंड । ऐसी कां तें व्याली रांड ॥१॥ सदा बोंवयासी गांठी । क्रोध धडधडीत पोटीं ॥२॥ फोडिली गोंवरी । ऐसी दिसे तोंडावरी ॥३॥ तुका म्हणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥४॥

१६४०. तोंडें खाय फार । पादे बोचा करी मार ॥१॥ एक ऐसे ते शाहाणे । आपुले अधीन तें नेणें ॥२॥ कुले घालूनि उघडे । रागें पाहे लोकां कडे ॥३॥ खेळे द्यूतकर्म । मग बोंबली जुलूम ॥४॥ निजतां आला मोहो । वीतां म्हणे मेला गोहो ॥५॥ तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥६॥

१६४१. पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ॥१॥ तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेंविणें दुजें ॥२॥ सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेंसी ॥३॥ तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकाचे नावडती ॥४॥

१६४२. पंडित म्हणतां थोर सुख । परि तो पाहतां अवघा मूर्ख ॥१॥ माय करावें घोकिलें । वेदपठण वांयां गेलें ॥२॥ वेदीं सांगितलें न करी । सम ब्रह्म नेणे दुराचारी ॥३॥ हा वेदींचा अनुभव । तुका देखे जीव शिव ॥४॥

१६४३. पंडित तोचि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥१॥ अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥२॥ रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ॥३॥ तुका म्हणे तोचि दास । त्या देखिल्या जाती दोष ॥४॥

१६४४. ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥१॥ नका करूं नरस्तुती । माझी परिसा हे विनंती ॥२॥ अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा अधीन ॥३॥ तुका म्हणे वाणी । सुखें वेचा नारायणीं ॥४॥

१६४५. विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥१॥ विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ॥२॥ विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ॥३॥ विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुखा विठ्ठल ॥४॥

१६४६. काय तुझें वेचें मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥१॥ काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी ॥२॥ काय तुझे आम्हां करावे वैकुंठ । भेवों नको भेट आतां मज ॥३॥ तुका म्हणे तुझी नलगे दसोडी । परि आहे आवडी दर्शनाची ॥४॥

१६४७. संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥१॥ त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ॥२॥ संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिताची नर्कवासी ॥३॥ तुका म्हणे नष्ट । जाणा गाढव तो स्पष्ट ॥४॥

१६४८. आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥१॥ हरिश्चंद्र तारारणी । वाहे

डोंबाघरीं पाणी ॥२॥ पांडवांचा साहाकारी । राज्याहुनि केले दुरी ॥३॥ तुका म्हणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥४॥

१६४९. निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥१॥ उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे हा गोविंद नाना छंदें ॥२॥ मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥३॥ तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाठीं ॥४॥

१६५०. काम क्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥१॥ आतां कोण पाहे मागें परतोनि । गेले हारपोनि देहभाव ॥२॥ रिद्धिदिद्धि सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥३॥ तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥४॥

१६५१. उठाउठीं अभिमान । जाय ऐसें स्थळ कोण ॥१॥ तें या पंढरीस घडे । खळां पाझर रोकडे ॥२॥ नेत्रीं अश्रुचिया धारा । कोठें रोमांच शरीरा ॥३॥ तुका म्हणे काला । कोठें अभेद देखिला ॥४॥

१६५२. पंढरी पंढरी । म्हणतां पापाची बोहरी ॥१॥ धन्य धन्य जगीं ठाव । होतो नामाचा उत्सव ॥२॥ रिद्धिसिद्धी लोटांगणीं । प्रेमसुखाचिया खाणी ॥३॥ अधिक अक्षरानें एका । भूवैकुंठ म्हणे तुका ॥४॥

१६५३. घालीं भार देवा । नलगे देश डोई घ्यावा ॥१॥ देह प्रारब्धा अधीन । सोसें अधिक वाढे सीण ॥२॥ व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ॥३॥ तुका म्हणे फिरे । भोवंडीनें दम जिरे ॥४॥

१६५४. भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ॥१॥ शांती धरणें जिवासाठीं । दशा उत्तम गोमटी ॥२॥ देह लेखावा असार । सत्य परउपकार ॥३॥ तुका म्हणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रह्मरसीं ॥४॥

१६५५. येथें बोलोनियां काय । व्हावा गुरु तरि जाय ॥१॥ मज न साहे वांकडें । ये विठ्ठलकथेपुढें ॥२॥ ऐकोनि मरसी वृथा । जंव आहेसि तूं जीता ॥३॥ हुरमतीची चाड । तेणें न करावी बडबड ॥४॥ पुसेल कोणी त्यास । जा रे करीं उपदेश ॥५॥ आम्ही विठ्ठलाचे वीर । फोडूं कळिकाळाचें शीर ॥६॥ घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्ती मुखें नाम ॥७॥ तुका म्हणे मुक्ती । नाहीं आसचि ये चित्तीं ॥८॥

१६५६. अनुहातीं गुंतला नेणें बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ॥१॥ मदें माते तया नाहीं देहभाव । आपुलें अवयव आवरितां ॥२॥ आणिकांची वाणी वदे तेणें मुखें । उपचारदु:खें नाठवती ॥३॥ तें सुख बोलतां आश्चर्य या जना । विपरीत मना भासतसे ॥४॥ तुका म्हणे बाह्य रंग जो विटला । अंतरीं निवाला ब्रह्मरसें ॥५॥

१६५७. ब्रह्मरसगोडी तयासी फावली । वासना निमाली समूळ ज्याची ॥१॥ नाहीं त्यां विटाळ अखंड सोंवळा । उपाधीवेगळा जाणिवेच्या ॥२॥ मन हें निश्चळ जालें एके ठायीं । तया उणें काई निजसुखा ॥३॥ तेचि पुण्यवंत तेचि परउपकारी । प्रबोधी त्या नारीनरलोकां ॥४॥ तुका म्हणे त्याचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ॥५॥

१६५८. जैसें तैसें राहे देवाचें हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ॥१॥ दासां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी ॥२॥ मागों नेणे परी माय जाणें वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ॥३॥ तुका म्हणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ॥४॥

१६५९. परद्रव्य परनारीचा अभिलास । तेथोनि हरास सर्वभाग्या ॥१॥ घटिका दिवस मास वर्षें लागे तीन । बांधलें पतन गांठोडीस ॥२॥ पुढें घात त्याचा रोकडा शकुन । पुढें करी गुण निश्चयेंसीं ॥३॥ तुका म्हणे एका थडताथवड । काळ लागे नाड परी खरा ॥४॥

१६६०. आम्हां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रयलोकीं ॥१॥ देव उभा मागें पुढें । उगवी कोडें संकट ॥२॥ जैसा केला तैसा होय । धावे सोय धरोनि ॥३॥ तुका म्हणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ॥४॥

१६६१. समर्थाचें केलें । मोडिलें कोणा जाईल ॥१॥ वायां करावी ते उरे । खटपट सोस पुरे ॥२॥ ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ॥३॥ ज्याचें त्याचे हातीं । भुके तयासी फजिती ॥४॥ तुका म्हणे कोटी । वाळे जाले शूळ पोटीं ॥५॥

१६६२. नेणे गति काय कवण अधोगति । मानिली निश्चिंती तुझ्या पायीं ॥१॥ कर्म धर्म कोण नेणें हा उपाव । तुझ्या पायीं भाव ठेवियेला ॥२॥ नेणें निरसूं पाप पुण्य नेणें काय । म्हणऊनि पाय धरिले तुझे ॥३॥ वेडा मी अविचारी न कळे विचार । तुज माझा भार पांडुरंगा ॥४॥ तुका म्हणे तुज करितां नव्हे काय । माझा तो उपाय कवण तेथें ॥५॥

१६६३. देवा हे माझी मिराशी । ठाव तुझ्या पायांपाशीं ॥१॥ याचा धरीन अभिमान । करीन आपुलें जतन ॥२॥ देऊनियां जीव । वडिलीं साधियेला हा ठाव ॥३॥ तुका म्हणे देवा । जुन्हाट हे माझी सेवा ॥४॥

१६६४. तुझा म्हणऊनि जालों उतराई । त्याचें वर्म काई तें मी नेणें ॥१॥ हातीं धरोनियां दावीं मज वाट । पुढें कोण नीट तेंचि देवा ॥२॥ देवभक्तपण करावें जतन । दोहीं पक्षीं जाण तूंचि बळी ॥३॥ अभिमानें तुज लागली हें लाज । शरणागतां काज करावया ॥४॥ तुका म्हणे बहु नेणता मी फार । म्हणऊनि विचार जाणविला ॥५॥

१६६५. मारगीं चालतां पाउलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ॥१॥ सर्व सुख लागे घेऊनियां पाठीं । आवडीचा कंठीं रस ओती ॥२॥ पीतांबर छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर

आवडीचें ॥३॥ तुका म्हणे हेंचि करावें जीवन । वाचे नारायण ताहान भूक ॥४॥

१६६६. जालों आतां दास । माझे तोडोनियां पाश ॥१॥ ठाव द्यावा पायांपाशीं । मी तो पातकाची राशी ॥२॥ सकळही गोवा । माझा उगवूनि देवा ॥३॥ तुका म्हणे भय । करा जवळी तें नये ॥४॥

१६६७. अंतरींचें जाणां । तरि कां येऊं दिलें मना ॥१॥ तुमची करावी म्यां सेवा । आतां अव्हेरितां देवा ॥२॥ नव्हती मोडामोडी । केली मागें तेचि घडी ॥३॥ तुका म्हणे दिला ठाव । पायीं लागों दिला भाव ॥४॥

१६६८. पवित्र होईन चरित्र उच्चारें । रूपाच्या आधारें गोजरिया ॥१॥ अपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठीं । पायीं घालीं मिठी पाहे डोळां ॥२॥ गाइन ओवीया शिष्टाच्या आधारें । सारिन विचारें आयुष्या या ॥३॥ तुका म्हणे तुझें नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ॥४॥

१६६९. काय ऐसा जन्म जावा वांयांविण । कांहीं तरी ऋण असो माथां ॥१॥ कोणे तरी काळें होईल आठव । नाहीं जरी भाव भार खरा ॥२॥ शता एका तरी जन्माच्या शेवटीं । कृपाळुवा पोटीं येईल दया ॥३॥ तुका म्हणे तरी नाहीं फांकों देत । सर्वांचें उचित सांपडलें ॥४॥

१६७०. नाहीं कोणी दिस जात वांयांविण । साध्य नाहीं सीण लटिकाची ॥१॥ एकाचिये माथां असावें निमित्त । नसों नाहीं हित कपाळीं तें ॥२॥ कांहीं एक तरी बोलायाचा जागा । नेदिती वाउगा उभा ठाकों ॥३॥ तुका म्हणे वर्म कळों येतें कांहीं । ओळखी जे ठायीं होईल ते ॥४॥

१६७१. करील तें काय नव्हे विश्वंभर । सेवकां दरिद्र लाज नाहीं ॥१॥ मजपासूनि हें पडिलें अंतर । काय तो अव्हेर करूं जाणे ॥२॥ नामाच्या चिंतनें नासी गर्भवास । नेदी करूं आस आणिकाची ॥३॥ तुका म्हणे नेणों किती वांया गेले । तयां उद्धरिलें पांडुरंगें ॥४॥

१६७२. संध्या करितोसी केशवाच्या नांवें । आरंभीं तें ठावें नाहीं कैसें ॥१॥ किती या सांगावें करूनि फजित । खळ नेणें हित जवळी तें ॥२॥ माजल्या न कळे उचित तें काय । न द्यावें तें खाय द्यावें सांडी ॥३॥ तुका म्हणे घेती भिंतीसवें डोकें । वावसी तें एकें अंधारली ॥४॥

१६७३. दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥१॥ तैसें खळा मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥२॥ काय करावीं तीं बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वांयां गेलीं ॥३॥ तुका म्हणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैसी संसर्गें ॥४॥

१६७४. सांगावें हें बरें असतें हें पोटीं । दुःख देते खोटी बुद्धि मग ॥१॥ आपला आपण करावा वेव्हार । जिंकोनि अंतर मन ग्वाही ॥२॥ नाहीं मागें येत बोलिलें वचन । पावावा तो सीण बरा मग ॥३॥ तुका म्हणे बहू भ्यालों खटपटें । आतां देवा खोटे शब्द पुरे ॥४॥

१६७५. परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवितसें ॥१॥ भागीरथी-महादोषनिवारणी । सकळां स्वामिणी तीर्थांचिये ॥२॥ जितां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तीरीं । अहिक्यपरत्रीं सुखरूप ॥३॥ तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाग्पुष्प तेणें पाठविलें ॥४॥

१६७६. तुम्ही विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥१॥ कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ॥२॥ काय उणें तुम्हांपाशीं । मी तों अल्पचि संतोषी ॥३॥ तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥४॥

१६७७. पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥१॥ माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥२॥ केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥३॥ तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ॥४॥

१६७८. मथुरेच्या राया । माझे दंडवत पायां ॥१॥ तुमचे कृपेचें पोसणें । माझा समाचार घेणें ॥२॥ नाम धरिलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ॥३॥ जीवींचे तें जाणां । तुका म्हणे नारायणा ॥४॥

१६७९. जाय तिकडे लागे पाठी । नाहीं तुटी आठवाची ॥१॥ हिरोनियां नेलें चित्त । माझें थीत भांडवल ॥२॥ दावूनियां रूप डोळां । मन चाळा लावियेलें ॥३॥ आणीक तोंडा पडिली मिठी । कान गोठी नाइकती ॥४॥ बोलिल्याचा आठव न घडे । वाणी ओढे ते सोई ॥५॥ तुका म्हणे प्रेमधगी । भरली अंगीं अखंड ॥६॥

१६८०. नको ऐसें जालें अन्न । भूक ताहान ते गेली ॥१॥ गोविंदाची आवडी जीवा । करिन सेवा धणीवरि ॥२॥ राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहींचे ॥३॥ देह धरिला त्याचें फळ । आणीक काळ धन्य हा ॥४॥ जाऊं नेदी करितां सोस । क्षमा दोष करवीन ॥५॥ तुका म्हणे याचे पाठी । आतां साटी जीवाची ॥६॥

१६८१. वाट पाहे हरि कां नये अझुनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥१॥ काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥२॥ नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥३॥ नाहीं कळों आलें अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतों ॥४॥ बहुतां दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥५॥ तुका म्हणे देईं एक वेळां भेटी । शीतळ हें पोटीं होईल मग ॥६॥

१६८२. नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर । तरी कां अंतर पडियेलें ॥१॥ म्हणऊनि आतां वियोग न साहे । लांचावलें देहे संघष्टणें ॥२॥ वेळोवेळां वाचे आठवितों नाम । अधिकचि प्रेम चढे घेतां ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगे जननिये । घेऊनि कडिये बुझाविलें ॥४॥

१६८३. आतां न करीं सोस । सेवीन हा ब्रह्मरस ॥१॥ सुखें सेवीन अमृत । ब्रह्मपदींचें निश्चित ॥२॥ तुमचा निज ठेवा । आम्ही पाडियेला ठावा ॥३॥ तुका म्हणे देवराया । आतां लपालेती वांयां ॥४॥

१६८४. जेथें जेथें जासी । तेथें मजचि तूं पाहासी ॥१॥ ऐसा पसरीन भाव । रिता नाहीं कोणी ठाव ॥२॥ चित्त जडलें पायीं । पाळती हें ठायीं ठायीं ॥३॥ तुका म्हणे पोटीं । देवा घालूनि सांगे गोष्टी ॥४॥

१६८५. मुक्तिपांग नाहीं विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती ॥१॥ बैसला गोविंद जडोनियां चित्तीं । आदि तेचि अंतीं अवसानीं ॥२॥ भोग नारायणा देऊनि निराळीं । ओविया मंगळीं तोचि गाती ॥३॥ बळ बुद्धि त्याची उपकारासाठीं । अमृत तें पोटीं सांठविलें ॥४॥ दयावंत तरी देवाच सारखीं । आपली पारखीं नोळखती ॥५॥ तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते ॥६॥

१६८६. सांपडला हातीं । तरी जाली हे निश्चिंती ॥१॥ नाहीं धांवा घेत मन । इंद्रियांचें समाधान ॥२॥ सांडियेला हेवा । अवघा संचिताचा ठेवा ॥३॥ तुका म्हणे काम । निरसुनियां घेतों नाम ॥४॥

१६८७. सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं । वैष्णवांचें न्हाणी होईन किडा ॥१॥ ऐसे जन्म आतां मज देईं देवा । आवडी हे जीवा सर्व काळ ॥२॥ त्यांचे चरणरज येती अंगावरी । वंदीन ते शिरीं जाईन मागें ॥३॥ तुका म्हणे येथें राहिलासे भाव । सकळही वाव जाणोनियां ॥४॥

१६८८. क्षेम देयाला हो । स्फुरताती दंड बाहो ॥१॥ आतां झडझडां चालें । देईं उचलोनी पाउलें ॥२॥ सांडीं हंसगती । बहु उत्कंठा हे चित्तीं ॥३॥ तुका म्हणे आई । श्रीरंगे विठाबाई ॥४॥

१६८९. जेणें वेळ लागे । ऐसें सांडीं पांडुरंगे ॥१॥ कंठ कंठा मिळों देईं । माझा वोरस तूं घेईं ॥२॥ नको पीतांबर । सांवरूं हे अळंकार ॥३॥ टाकी वो भातुकें । लौकिकाचें कवतुकें ॥४॥ हातां पायां नको । कांहीं वेगळालें राखों ॥५॥ तुका म्हणे यावरी । मग सुखें अळंकारी ॥६॥

१५९०. दावूनिया कोणा कांहीं । तेंचि वाहीं चाळविली ॥१॥ तैसें नको करूं देवा । शुद्धभावा माझिया ॥२॥ रिद्धिसिद्धी ऐसीं आड । येती नाड नागवूं ॥३॥ उदकाऐसी दावुनि ओढी । ऊर फोडी झळई ॥४॥ दर्पणींचें दिलें धन । दिसे पण चरफडी ॥५॥ तुका म्हणे पायांसाठीं । करितों आटी कळों द्या ॥६॥

१६९१. कृपेचा ओलावा । दिसे वेगळाचि देवा ॥१॥ मी हें इच्छीतसें साचें । न लगे फुकट साई काचें ॥२॥ जेणें जाय कळसा । पाया उत्तम तो तैसा ॥३॥ तुका म्हणे घरीं । तुझ्या अवघिया परी ॥४॥

१६९२. तरी आम्हीं तुझी धरियेली कास । नाहीं कोणी दास वांयां गेला ॥१॥ अगा पंढरीशा उभा विटेवरी । येईं लवकरी धांव नेटें ॥२॥ पालवितों तुज उभारोनि बाहे । कृपावंता पाहें मजकडे ॥३॥ तुका म्हणे तुज बहु कान डोळे । कां हे माझे वेळे ऐसी परी ॥४॥

१६९३. करावा कांटाळा नव्हे हें उचित। आधींच कां प्रीत लावियेली ॥१॥ जाणतसां तुम्हीं रूपाचें लाघव। आपुलें तें जीव घेतें ऐसा ॥२॥ काय म्हणऊनि आलेति आकारा। आम्हां उजगरा करावया ॥३॥ तुका म्हणे भीड होती आजिवरी। आतां देवा उरी कोण ठेवी ॥४॥

१६९४. धरूनि पालव असुडीन करें। मग काय बरें दिसे लोकीं ॥१॥ काय तें विचारा ठायींचें आपणां। जो हा नारायणा अवकाश ॥२॥ अंतर पायासी तोंवरी या गोष्टी। पडिलिया मिठी हालों नेदी ॥३॥ रुसलेति तरी होईल बुझावणी। तांतडी करूनि साधावें हें ॥४॥ सांपडलिया आधीं कारणासी ठाव। येथें करूं भाव दृढ आतां ॥५॥ तुका म्हणे तुझे ठाउके बोभाट। मग खटपट चुकली ते ॥६॥

१६९५. निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग। आहें लागमाग ठायींचाचि ॥१॥ तूं माझा जनिता तूं माझा जनिता। रखुमाईच्या कांता पांडुरंगा ॥२॥ मुळींच्या ठेवण्या आहे अधिकार। दुराऊनि दूर गेलों होतों ॥३॥ पोटींच्या आठवा पडिला विसर। कांही आला भार माथां तेणें ॥४॥ राखिला हा होता बहु चौघाचार। साक्षीनें वेव्हार निवडिला ॥५॥ तुका म्हणे कांहीं बोलणें नलगे। आतां पांडुरंगें तूं मी ऐसें ॥६॥

१६९६. सांगता गोष्टी लागती गोडा। हा तो रोकडा अनुभव ॥१॥ सुख जालें सुख जालें। नये बोले बोलतां ॥२॥ अंतर तों नये दिसों। आतां सोस कासया ॥३॥ तुका म्हणे जतन करूं। हेंचि धरूं जीवेंसी ॥४॥

१६९७. मजशीं पुरें न पडे वादें। सुख दोहींच्या संवादें ॥१॥ तूंचि आगळा काशानें। शिर काय पायांविणें ॥२॥ वाहों तुझा भार। दु:ख साहोनि अपार ॥३॥ तुका म्हणे नाहीं भेद। देवा करूं नये वाद ॥४॥

१६९८. तुज नाहीं शक्ति। काम घेसी आम्हां हातीं ॥१॥ ऐसें अनुभवें पाहीं। उरलें बोलिजेसें नाहीं ॥२॥ लपोनियां आड। आम्हां तुझा कैवाड ॥३॥ तुका म्हणे तुजसाठीं। आम्हां संवसारें तुटी ॥४॥

१६९९. तुझ्याठायीं ओस। दोन्हीं पुण्य आणि दोष ॥१॥ झडलें उरलें किती। आम्हीं धरियेलें चित्तीं ॥२॥ कळलासी नष्टा। यातिक्रियाकर्मभ्रष्टा ॥३॥ तुका म्हणे बोला। नाहीं ताळा गा विठ्ठला ॥४॥

१७००. भांडावें तों हित। ठायीं पडतें उचित ॥१॥ नये खंडूं देऊं वाद। आम्हां भांडवल भेद ॥२॥ शब्दासारसें भेटी। नये पडों देऊं तुटी ॥३॥ तुका म्हणे आळस। तोचि कारणांचा नास ॥४॥

१७०१. नव्हों गाढे आळसी। जो तूं आम्हांपुढें जासी ॥१॥ अरे दिलें आम्हां हातीं। वर्म वेवादाचें संतीं ॥२॥ धरोनियां वाट। जालो शिरोमणि थोंट ॥३॥ तुका म्हणे देवा।

वादें करीन खरी सेवा ॥४॥

१७०२. तुझा विसर नको माझिया हो जीवा । क्षण एक केशवा मायबापा ॥१॥ जावो राहो देह आतां येचि घडी । कायसी आवडी याची मज ॥२॥ कुश्चिळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणे कोण हित ॥३॥ पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरीं संग आतां ॥४॥ पिंड हा उसना आणिला पांचांचा । सेखीं लागे ज्याचा त्यासी देणें ॥५॥ तुका म्हणे नाहीं आणिक सोइरें । तुजविण दुसरें पांडुरंगा ॥६॥

१७०३. ऐसें सत्य माझें येईल अंतरा । तरिच मज करा कृपा देवा ॥१॥ वचनांसारिखें तळमळे चित्त । बाहेरि तो आंत होईल भाव ॥२॥ तरिच मज ठाव द्यावा पायांपाशीं । सत्यत्वें जाणसी दास खरा ॥३॥ तुका म्हणे सत्य निकट सेवक । तरिच भातुकें प्रेम द्यावें ॥४॥

१७०४. आदि वर्तमान जाणसी भविष्य । मागें पुढे नीस संचिताचा ॥१॥ आतां काय देऊं पायांपें परिहार । जाणा तो विचार करा देवा ॥२॥ आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात पुढें ॥३॥ तुका म्हणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ॥४॥

१७०५. सुखें न मनीं अवगुण । दु:ख भोगी त्याचें कोण ॥१॥ हें कां ठायींचें न कळे । राती करा झांकुनि डोळे ॥२॥ चालोनियां आड वाटे । पायीं मोडविले कांटे ॥३॥ तुका म्हणे कोणा । बोल ठेवितो शहाणा ॥४।

१७०६. आम्हीं न देखों अवगुणां । पापी पवित्र शहाणा ॥१॥ अवघीं रूपें तुझीं देवा । वंदूं भावें करूं सेवा ॥२॥ मज भक्तीसवें चाड । नेणें पाषाण धातु वाड ॥३॥ तुका म्हणे घोटीं । विष अमृत तुजसाठीं ॥४॥

१७०७. मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते चाड । घेतां वाटे गोड नाम तुझें ॥१॥ नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतों वचनें आवडीनें ॥२॥ भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥३॥ तुका म्हणे नाच निर्लज्ज होऊनि । नाहीं माझें मनीं दुजा भाव ॥४॥

१७०८. काय माझी संत पाहती जाणीव । सर्व माझा भाव त्यांचे पायीं ॥१॥ कारण सरतें करा पांडुरंगीं । भूषणाची जगीं काय चाड ॥२॥ बोबडया उत्तरीं म्हणे हरिहरि । आणीक भिकारी नेणें दुजें ॥३॥ तुका म्हणे तुम्ही विठ्ठलाचे दास । करितों मी आस उच्छिष्टाची ॥४॥

१७०९. जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रह्मांडभूषणु नारायण ॥१॥ सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजाचा निवांत नारायण ॥२॥ गोडाचेंही गोड हर्षाचेंही कोड । प्रीतीचाही लाड नारायण ॥३॥ भावाचा निज भाव नांवाचाही नांव । अवघा पंढरिराव अवतरलासे ॥४॥ तुका म्हणे जें हें साराचेंही सार । माझा अंगीकार तेणें केला ॥५॥

१७१०. आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ । यातिहीनकुळ दैन्यवाणा ॥१॥ माय रखुमाई

पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ॥२॥ बापुडा मी नव्हें दुर्बळ ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकासी ॥३॥ दुष्ट नव्हों आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ॥४॥ संवसार आम्हां सरला सकळ । लपोनियां काळ ठेला धाकें ॥५॥ तुका म्हणे जालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ॥६॥

१७११. केलें नाहीं मनीं तया घडे त्याग । उबग उद्वेग नाहीं चित्तीं ॥१॥ देवचि हा जाणे अंतरींचा भाव । मिथ्या तो उपाव बाह्य रंग ॥२॥ त्यागिल्याचें ध्यान राहिलें अंतरीं । अवघी ते परी विटंबना ॥३॥ तुका म्हणे आपआपणां विचारा । कोण हा दुसरा सांगे तुम्हां ॥४॥

१७१२. हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्तशुद्ध सेवा देवाची हे ॥१॥ आवडी विठ्ठल गाइजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥२॥ आणिकां अंतरीं न द्यावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥३॥ तुका म्हणे बाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥४॥

१७१३. हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरि ॥१॥ ते मज विठोबासमान । नमूं आवडी ते जन ॥२॥ ज्याचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ ॥३॥ त्यांचा संग सर्वकाळ । घडी मज हे मंगळ ॥४॥ तुका म्हणे प्राण । काया कुरवंडी करीन ॥५॥

१७१४. हरिची हरिकथा नावडे जया । अधम म्हणतां तया वेळ लागे । मनुष्यदेहीं तया नाट पैं लागलें । अघोर साधिलें कुंभपाक ॥१॥ कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं । उपजे मरोनि वेळोवेळां भांड । परि न धरी लंड लाज कांहीं ॥२॥ ऐसियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी । देवधर्माविण तो हा चांडाळ । न साहे भूमि भार क्षणभरी ॥३॥ राम म्हणतां तुझें काय वेचेल । कां हित आपुलें न विचारिसी । जन्माजन्मींचा होईल नरकीं । तुका म्हणे चुकी जरी यासी ॥४॥

१७१५. उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आईकिली ॥१॥ आतां काय ब्रीद सांडील आपुलें । ठायींचें धरिलें जाणोनियां ॥२॥ माझ्या दोषासाठीं होइल पाठमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ॥३॥ तुका म्हणे रूप आमच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतर्भुज ॥४॥

१७१६. आवडीसारिखें संपादिलें सोंग । अनंत हीं मग जालीं नामें ॥१॥ कळे ऐशा वाटा रचिल्या सुलभा । दुर्गम या नभाचाही साक्षी ॥२॥ हातें जेवी एक मुखें मागे घांस । माउली जयास तैसी बाळा ॥३॥ तुका म्हणे माझें ध्यान विटेवरी । तैसीच गोजिरी दिसे मूर्ति ॥४॥

१७१७. धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥१॥ धन्य जालों आतां यासि संदेह नाहीं । न पडे या वाहीं काळा हातीं ॥२॥ ब्रह्मरस करूं भोजन पंगती । संतांचे संगती सर्वकाळ ॥३॥ तुका म्हणे पोट धालेचि न धाय । खादेलेंचि खाय आवडीनें ॥४॥

१७१८. आवडी न पुरे सेवितां न सरे । पडियेली धुरेसवें गांठी ॥१॥ न पुरे हा जन्म हें सुख

सांठितां । पुढतीही आतां हेंचि मागों ॥२॥ मारगाची चिंता पालखी बैसतां । नाहीं उसंतितां कोस पेणी ॥३॥ तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । जाणे ते लागली भूक ताहान ॥४॥

१७१९. नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । म्हणऊनि मन स्थिरावलें ॥१॥ धरियेलीं जीवीं पाउलें कोंवळीं । कंठीं एकावळी नाममाळा ॥२॥ शीतळ होऊनी पावलों विश्रांती । न साहे पुढती चाली चित्ता ॥३॥ तुका म्हणे जाले सकळ सोहळे । पुरविले डोहळे पांडुरंगें ॥४॥

१७२०. मायबापापुढें लाडिकें लेंकरूं । तैसे बोल करूं कवतुकें ॥१॥ कृपावंता घालीं प्रेमरसपान्हा । वोळवी वोरस पांडुरंगें ॥२॥ नाहीं धीर खुंटीं जवळी हुंबरे । ठायींच पाखरें कवळिते ॥३॥ तुका म्हणे मज होऊं नेदी सीण । कळों नेदी भिन्न आहे तैसें ॥४॥

१७२१. उत्तम घालावें आमुचिये मुखीं । निवारावें दु:खी होऊं नेदी ॥१॥ न बैसे न वजे जवळूनि दूरी । मागें पुढें वारी घातपात ॥२॥ नाहीं शंका असो भलतिये ठायीं । मावळलें पाहीं द्वैताद्वैत ॥३॥ तुका म्हणे भार घेतला विठ्ठलें । अंतरीं भरलें बाह्य रूप ॥४॥

१७२२. आठवूंचि नेदी आवडी आणीक । भरूनियां लोक तिन्हीं राहे ॥१॥ मन धांवे तेथें तिचेंचि दुभतें । संपूर्ण आइतें सर्वकाळ ॥२॥ नलगे वळावीं इंद्रियें धांवतां । ठाव नाहीं रिता उरों दिला ॥३॥ तुका म्हणे समपाउलाचा खुंट । केला बळकट हालों नेदी ॥४॥

१७२३. आम्हां अळंकार मुद्रांचे शृंगार । तुळसीचे हार वाहों कंठीं ॥१॥ लाडिके डिंगर पंढरिरायाचे । निरंतर वाचे नामघोष ॥२॥ आम्हां आणिकांची चाड चित्तीं नाहीं । सर्व सुख पायीं विठोबाच्या ॥३॥ तुका म्हणे आम्ही नेघोंचि या मुक्ती । एकाविण चित्तीं दुजें नाहीं ॥४॥

१७२४. चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ॥१॥ डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥२॥ संतां महंतां होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥३॥ तें तीर्थांचें माहेर । सर्व सुखाचें भांडार ॥४॥ जन्म नाहीं रे आणीक । तुका म्हणे माझी भाक ॥५॥

१७२५. पैल घरीं जाली चोरी । देहा करी बोंब ॥१॥ हावा हावा करिसि काय । फिराऊनि नेट्यां वाय ॥२॥ सांडुनियां शुद्धी । निजलासी गेली बुद्धि ॥३॥ चोरीं तुझा काढिला बुर । वेगळें भावा घातला दूर ॥४॥ भलतियासी देसी वाव । लाहेसि तूं एवढा ठाव ॥५॥ तुका म्हणे अझुनि तरी । उरलें तें जतन करीं ॥६॥

१७२६. किती वेळां खादला दगा । अझून कां गा जागसी ना ॥१॥ लाज नाहीं हिंडतां गांवें । दु:ख नवें नित्य नित्य ॥२॥ सव चोरा हातीं फांसे । देखतां कैसे न देखती ॥३॥ तुका म्हणे सांडिती वाट । तळपट करावया ॥४॥

१७२७. मुदलामध्यें पडे तोटा । पैसा खोटा उदीम ॥१॥ आणिकांची कां लाज नाहीं । आळसा जिहीं जिंतिलें ॥२॥ एके सांते सारिखीं वित्तें । हाणि हिते वेगळालीं ॥३॥ तुका

म्हणे हित धरा । नोहे पुरा गांवढाळ ॥४॥

१७२८. निरोप सांगतां । न धरीं भय न करीं चिंता ॥१॥ असो ज्याचें त्याचे माथा । आपण करावी ते कथा ॥२॥ उतरावा भार । किंवा न व्हावें सादर ॥३॥ तुका म्हणे वाहे धाक । तया इह ना परलोक ॥४॥

१७२९. शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ॥१॥ केला न संडी कैवाड । जीवेंसाठीं तों हें होड ॥२॥ धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥३॥ तुका म्हणे हरि । दासां रक्षितो निर्धारीं ॥४॥

१७३०. हरिच्या दासां भय । ऐसें बोलों तेंही नये ॥१॥ राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ॥२॥ हरिच्या दासां चिंता । अघटित हे वार्ता ॥३॥ खावें ल्यावें द्यावें । तुका म्हणे पुरवावें ॥४॥

१७३१. दासां सर्व काळ । तेथें सुखाचे कल्लोळ ॥१॥ जेथें वसती हरीचे दास । पुण्य पिके पापा नास ॥२॥ फिरे सुदर्शन । घेऊनियां नारायण ॥३॥ तुका म्हणे घरीं । होय म्हणियारा कामारी ॥४॥

१७३२. आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥१॥ मायबापाचीं लाडकीं । कळों आलें हें लौकिकीं ॥२॥ नाहीं निपराध । कोणां आम्हांमध्यें भेद ॥३॥ तुका म्हणे नाम । अवघें आमचें हें धाम ॥४॥

१७३३. काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरासी लेपन चंदनाचें ॥१॥ नको नको देवा खळाची संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥२॥ काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नास करूनि टाकी ॥३॥ तुका म्हणे काय पाजुनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥४॥

१७३४. आनंदें एकांतीं प्रेमें वोसंडत । घेऊं अगणित प्रेममुख ॥१॥ गौप्य धन नये वारा लागों यास । पाहों नेदूं वास दुर्जनासी ॥२॥ झणी दृष्टि लागे आवडीच्या रसा । सेवूं जिरे तैसा आपणासी ॥३॥ तुका म्हणे हें बहु सुकुमार । न साहावे भार वचनाचा ॥४॥

१७३५. मोक्षपद तुच्छ केलें याकारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥१॥ विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस । पुढतापुढती आस सेवावें हें ॥२॥ देवा हातीं रूप धरविला आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥३॥ तुका म्हणे चित्त निवांत राहिलें । ध्याईं तीं पाउलें विटेवरि ॥४॥

१७३६. नको बोलों भांडा । खीळ घालून बैसा तोंडा ॥१॥ ऐकें विठोबाचे गुण । करीं सादर श्रवण ॥२॥ प्रेमसुखा आड । काय वाजतें चाभाड ॥३॥ तुका म्हणे हिता । कां रे नागविसी थीता ॥४॥

१७३७. अति जालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सवासीण न म्हणवी ॥१॥ उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणां मोल वाव थोरपण ॥२॥ शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं

आविर्भाव आणिलिया ॥३॥ तुका म्हणे सोंग पोटाचे उपाई । कारण कमाईविण नाहीं ॥४॥

१७३८. शूरां साजती हतियारें । गांढ्यां हांसतील पोरें ॥१॥ काय केली विटंबण । मोतीं नासिकावांचून ॥२॥ पतिव्रते रूप साजे । सिंदळ काजळ लेतां लाजे ॥३॥ दासी पत्नी सुता । नव्हे सरी एकचि पिता ॥४॥ मान बुद्धिमंता । थोर न मानिती पिता ॥५॥ तुका म्हणे तरी । आंत शुद्ध दंडे वरी ॥६॥

१७३९. काय केलें जळचरीं । ढीवर त्यांच्या घातावरी ॥१॥ हा तों ठायींचा विचार । आहे यातिवैराकार ॥२॥ श्वापदातें वधीं । निरपराधें पारधी ॥३॥ तुका म्हणे खळ । संतां पीडिती चांडाळ ॥४॥

१७४०. वाईटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ॥१॥ एकाविण एका । कैचें मोल होतें फुका ॥२॥ विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥३॥ काळिमेनें ज्योती । दिवसें कळों आली राती ॥४॥ उंच नीच गारा । हिरा परिस मोहरा ॥५॥ तुका म्हणे भले । ऐसे नष्टांनीं कळलें ॥६॥

१७४१. असो खळ ऐसे फार । आम्हां तयांचे उपकार ॥१॥ करिती पातकांची धुणी । मोल न घेतां साबणीं ॥२॥ फुकाचे मजूर । ओझें वागविती भार ॥३॥ पार उतरुन म्हणे तुका । आम्हां आपण जाती नरका ॥४॥

१७४२. संत पंढरीसी जाती । निरोप धाडी तया हातीं ॥१॥ माझा न पडावा विसर । तुका विनवितो किंकर ॥२॥ केरसुणी महाद्वारीं । ते मी असें निरंतरीं ॥३॥ तुमचे पायीं पायतन । मोचे माझें तन मन ॥४॥ तांबुलाची पिकधरणी । ते मी असें मुख पसरूनि ॥५॥ तुमची विष्ठा पंढरीराया । ते सारसुवी माझी काया ॥६॥ लागती पादुका । ते मी तळील मृत्तिका ॥७॥ तुका म्हणे पंढरिनाथा । दुजें न धरावें सर्वथा ॥८॥

१७४३. इच्छेचें पाहिलें । डोळीं अंतीं मोकलिलें ॥१॥ याचा विश्वास तो काई । ऐसें विचारूनि पाहीं ॥२॥ सुगंध अभ्यंगें पाळितां । केश फिरले जाणतां ॥२॥ पिंड पाळितां ओसरे । अवघी घेऊनि मागें सरे ॥४॥ करितां उपचार । कोणा नाहीं उपकार ॥५॥ अल्प जीवन करीं । तुका म्हणे साधे हरी ॥६॥

१७४४. यज्ञनिमित्त शरिरासी बंधन । कां रे तृष्णा वांयांविण वाढविली ॥१॥ नव्हे ते भक्ति परलोकसाधन । विषयांनी बंधन केलें तुज ॥२॥ आशा धरूनि फळाची । तीर्थीं व्रतीं मुक्ति कैंची । तुका म्हणे सिणसी वांयां । शरण न वजतां पंढरिराया ॥४॥

१७४५. संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें जोडे नाम उच्चारितां । न वेचे मोल कांहीं न लगती सायास । तरी कां आळस करिसी झणी ॥१॥ ऐसें हें सार कां नेघेसी फुकाचें । काय तुझें वेचें मोल तया ॥२॥ पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळी उभा ।

अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलोनि परलोकां ॥३॥ अंतकाळी गणिका पक्षियाच्या छंदे । राम राम पद उच्चारिलें । तंव त्या दीनानाथा कृपा आली कैसी । त्यानें तियेसी वैकुंठासी नेलें ॥४॥ अवचिता नाम आलिया हे गती । चिंतितां चित्तीं जवळी असे । तुका म्हणे भावें स्मरतां राम राम । कोण जाणे तये दशे ॥५॥

१७४६. दुष्टाचें चिंतन भिन्न अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला । पालथें घागरी घातलें जीवन । न धरीच जाण तेंही त्याला ॥१॥ जन्मा येऊनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा । जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हें आलें संवसारा ॥२॥ पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहतां अंतरीं कोरडा तो । कुचर मुग नयेचि पाका । पाहातां सारिखा होता तैसा ॥३॥ तुका म्हणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रयत्न कांहीं । म्हणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ॥४॥

१७४७. कासयानें पूजा करूं केशीराजा । हाचि संदेह माझा फेडीं आतां ॥१॥ उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेचे देवा ॥२॥ गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ॥३॥ फळदाता तूंच तांबोल अक्षता । तेथें काय आतां वाहों तुज ॥४॥ वाहूं दक्षिणा तरी धातु नारायणा । ब्रह्म तेंचि अन्न दुजें काई ॥५॥ गातां तूं ॐ कार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥६॥ तुका म्हणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरि ॥७॥

१७४८. गातां आइकतां कांटाळा जो करी । वास त्या अघोरीं कुंभपाकीं ॥१॥ रागें यमधर्म जाचविती तया । तुज दिलें कासया मुख कान ॥२॥ विषयांच्या सुखें अखंड जागसी । न वजे एकादशी जागरणा ॥३॥ वेचूनियां द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ॥४॥ तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिले शरीर पुष्ट लोभें ॥५॥ तुका म्हणे मग केला साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ॥६॥

१७४९. तुझें म्हणवितां काय नास जाला । ऐकें बा विठ्ठला कीर्ती तुझी ॥१॥ परी तुज नाहीं आमचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ॥२॥ समूळी संसार केला देशधडी । सांडिली आवडी ममतेची ॥३॥ लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यांसीं नाहीं थार ऐसें केलें ॥४॥ मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आपलें ते कोण पर नेणों ॥५॥ तुका म्हणे जालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ॥६॥

१७५०. जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥१॥ अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण तों केलें आपणया ॥२॥ वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचि ना ॥३॥ तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदां तुम्ही ॥४॥

१७५१. बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥१॥ येऊनि अंतरीं

राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥२॥ राम कृष्ण हरि मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥३॥ तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥४॥

१७५२. धन्य पुंडलिका बहु बरें केलें । निधान आणिलें पंढरिये ॥१॥ न करीं आळस आलिया संसारीं । पाहें पा पंढरीं भूवैकुंठ ॥२॥ न पविजे केल्या तपांचिया रासी । तें जनलोकांसी दाखविलें ॥३॥ सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव । शास्त्रांनी हा भाव निवडिला ॥४॥ विष्णुपद गया रामनाम काशी । अवघीं पायांपाशीं विठोबाच्या ॥५॥ तुका म्हणे मोक्ष देखिल्या कळस । तात्काळ हा नास अहंकाराचा ॥६॥

१७५३. धन्य ते पंढरी धन्य भीमातीर । आणियेलें सार पुंडलिकें ॥१॥ धन्य तोही लोक अवघा दैवांचा । सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ॥२॥ धन्य तेही भूमी धन्य तरुवर । धन्य तें सरोवर तीर्थरूप ॥३॥ धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान । आनंदें भुवन गर्जतसे ॥४॥ धन्य पशु पक्षी कीटक पाषाण । अवघा नारायण अवरतलासे ॥५॥ तुका म्हणे धन्य संसारा तीं आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥६॥

१७५४. मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ॥१॥ नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ॥२॥ वैष्णवांसंगती । हातीं पडलीं नेणों किती ॥३॥ कर्णद्वारें पुराणिक । भुलवी शब्दें लावी भीक ॥४॥ आम्हां कैंचा मग । करिसी उघडियांचा संग ॥५॥ तुका म्हणे जाणें नरका । त्यांचा उपदेश आइका ॥६॥

१७५५. मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥१॥ आतां तूं उदास नव्हें नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ॥२॥ धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥३॥ तुका म्हणे माझा नचले सायास । राहिलों हे आस धरुनि तुझी ॥४॥

१७५६. मागतियाचे दोनिच कर । अमित भांडार दातियाचें ॥१॥ काय करूं आतां कासयांत भरूं । हा मज विचारु पडियेला ॥२॥ एक सांठवण प्रेमें वोसंडलीं । जिव्हा हे भागली करितां माप ॥३॥ तुका म्हणे आतां आहे तेथें असो । अंकुनिया बैसों पायांपाशीं ॥४॥

१७५७. जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ ॥१॥ ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥२॥ सुखाची विश्रांती । उमटे मातेचिया चित्तीं ॥३॥ तुका म्हणे संत । तुम्ही बहु कृपावंत ॥४॥

१७५८. यावें माहेरास । हेच सर्वकाळ आस ॥१॥ घ्यावी उच्छिष्टाची धणी । तीर्थ इच्छी पायवणी ॥२॥ भोग उभा आड । आहे तोंवरीच नाड ॥३॥ तुका म्हणे देवें । माझें सिद्धी पाववावें ॥४॥

१७५९. लेंकुराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥१॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी

लाभाविण प्रीती ॥२॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥३॥ तुका म्हणे माझें । तुम्हां संतांवरी ओझें ॥४॥

१७६०. आम्हां गांजी जन । तरि कां मेला नारायण ॥१॥ जालों पोरटीं निढळें । नाहीं ठाव बुड आळें ॥२॥ आम्ही जना भ्यावें । तरि कां न लाजिजें देवें ॥३॥ तुका म्हणे देश । जाला देवाविण ओस ॥४॥

१७६१. तुम्हीं पाय संतीं । माझे ठेवियले चित्तीं ॥१॥ आतां बांधू न सके काळ । जालीं विषमें शीतळ ॥२॥ भय नाहीं मनीं । देव वसे घरीं रानीं ॥३॥ तुका म्हणे भय । आम्हां स्वप्नीं तेंही नये ॥४॥

१७६२. काळाचेही काळ । आम्ही विठोबाचे लडिवाळ ॥१॥ करूं सत्ता सर्वांठायीं । वसों निकटवासें पायीं ॥२॥ ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे सामोरी ॥३॥ तुका म्हणे बाण । हातीं हरिनाम तीक्ष्ण ॥४॥

१७६३. जन्मा येऊन उदार जाला । उद्धार केला वंशाचा । मेळवूनि धन मेळवी माती । सदा विपत्ति भोगितसे ॥१॥ नाम घेतां न मिळे अन्न । नव्हे कारण देखिलिया । धर्म करितां ऐके कानीं । बांधे निजोनि डोकियासी ॥२॥ घरा व्याही पाहुणा आला । म्हणे त्याला बरें नाहीं । तुमचे गांवीं वैद्य आहे । बैसोनि काय प्रयोजन ॥३॥ उजवूं किती होतील पोरें । मरतां बरें म्हणे यांसी । म्हणऊनि देवा नवस करी । दावी घरींहुनि बोनें ॥४॥ पर्वकाळीं भट घरासी आला । बोंब घाला म्हणे पोरां । तुमचा उणा होईल वांटा । काळ पिठासी पैं आला ॥५॥ दाढी करितां अडका गेला । घरांत आला वाइलेपें । म्हणे आतां उगवीं मोडी । डोई बोडीं आपुली ॥६॥ तीर्थ स्वप्नीं नेणें गंगा । पूजन लिंगा गांविंचिया । आडकुनि दार बैसें दारीं । आल्या घर म्हणे ओस ॥७॥ माझ्या भय वाटे चित्तीं । नरका जाती म्हणोनि । तुका म्हणे ऐसे आहेत गा हरी । याही तारीं जीवांसी ॥८॥

१७६४. जाणे वर्तमान । परि तें न वारे त्याच्यानें ॥१॥ तोही कारणाचा दास । देव म्हणवितां पावे नास ॥२॥ वेची अनुष्ठान । सिद्धी कराया प्रसन्न ॥३॥ तुका म्हणे त्याचें । मुद्दल गेलें हाटवेचें ॥५॥

१७६५. घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ॥१॥ आम्हीं भांडारी देवाचें । द्यावें घ्यावें माप वाचे ॥२॥ उगवूं जाणो मोडी । जाली नव्हे त्याची जोडी ॥३॥ तुका म्हणे पुडी । मोल तैसी खरी कुडी ॥४॥

१७६६. सादाविलें एका । सरें अवघियां लोकां ॥१॥ आतां आवडीच्या हातीं । भेद नाहीं ये पंगती ॥२॥ मोकळीच पोतीं । नाहीं पुसायाची गुंती ॥३॥ तुका म्हणे बरा । आहे

ढसाळ वेव्हारा ॥४॥

१७६७. तडामोडी करा । परि उत्तम तें भरा ॥१॥ जेणें खंडे एके खेपे । जाय तेथें लोभें वोपे ॥२॥ दाविल्या सारिखें । मागें नसावें पारिखें ॥३॥ मागें पुढें ऋण । तुका म्हणे फिटे हीण ॥४॥

१७६८. नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥१॥ जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥२॥ राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥३॥ व्हावा वाटे जना । तुका म्हणे साठीं गुणां ॥४॥

१७६९. चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र ही न खाती सर्प तया ॥१॥ विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥२॥ दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥३॥ आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥४॥ तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥५॥

१७७०. लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥१॥ मोजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी हे थोरी लाभाविण ॥२॥ कोमळ कंटक तीक्षण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ॥३॥ चित्रींचें ते लेप शृंगारिलें निकें । जीवेंविण फिकें रूप त्याचें ॥४॥ तुका म्हणे दिसें वांयां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥५॥

१७७१. बोलविसी माझे मुखें । परी या जना वाटे दुःख ॥१॥ जया जयाची आवडी । तयालागीं तें चरफडी ॥२॥ कठीण देतां काढा । जल्पें रोगी मेळवी दाढा ॥३॥ खाऊं नये तेंचि मागे । निवारितां रडों लागे ॥४॥ वैद्या भीड काय । अतित्याई जीवें जाय ॥५॥ नये भिडा सांगो आन । पथ्य औषधा कारण ॥६॥ धन माया पुत्र दारा । हें तों आवडीं नरका थारा ॥७॥ तुका म्हणे यांत । आवडे ते करा मात ॥८॥

१७७२. पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचारवचनीं ॥१॥ जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भले जगीं ॥२॥ सुख पुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ॥३॥ शूरा उल्हास अंगीं । गांढ्या मरण ते प्रसंगीं ॥४॥ शुद्ध सोनें उजळे अगी । हीन काळें धावे रंगीं ॥५॥ तुका म्हणे तोचि हिरा । घनघायें निवडे पुरा ॥६॥

१७७३. चालती आड वाटा । आणिकां दाविती जे नीटा ॥१॥ न मनीं तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गंव्हार ॥२॥ विष सेवुनि वारी मागें । प्राण जाता जेणें संगें ॥३॥ बुडतां हाका मारी । ठाव नाहीं आणिका वारी ॥४॥ तुका म्हणे न करीं हेका । गुण घेऊन अवगुण टाका ॥५॥

१७७४. कुळींचें दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईन दासीसुत त्याचे घरीं ॥१॥ शुद्ध यातिकुळवर्णा चाड नाहीं । करीं भलते ठायीं दास तुझा ॥२॥ पंढरीस कोणी जाती वारकरी । होईन त्याचे घरीं पशुयाति ॥३॥ विठ्ठलचिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईन पायतन त्याचे पायीं

॥४॥ तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होईन केरसुणी त्याचे घरीं ॥५॥ तुका म्हणे हाचि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिका गती चाड मज ॥६॥

१७७५. चंदनाचें गांवीं सर्पांची वसति । भोगिते ते होती द्वीपांतरीं ॥१॥ एका ओझें एका लाभ घडे देवा । संचिताचा ठेवा वेगळाला ॥२॥ क्षीराची वसति अशुद्ध सेवावें । जवळीं तें जावें भोगें दुरी ॥३॥ तुका म्हणे ऐसी बुद्धि ज्याची जड । त्याहुनी दगड बरे देवा ॥४॥

१७७६. अवघिया चाडा कुंटित करूनि । लावीं आपुलीच गोडी । आशा मनसा तृष्णा कल्पना । करूनियां देशधडी । मीतूंपणापासाव गुंतलों मिथ्या । संकल्प तो माझा तोडीं । तुझिये चरणीं माझे दोन्ही पक्ष । अवघी करूनि दाखवी पिंडी रे रे ॥१॥ माझें साच काय केलें मृगजळें । वर्ण याती कुळ अभिमान । कुमारी भातुकें खेळती कवतुकें । काय त्यांचें साचपण ॥२॥ वेगळाल्या भावें चित्ता तडातोडी । केलों देशधडी मायाजाळें । गोत वित्त माय बाप बहिणी सुत । बंधुवर्ग माझीं बाळें । एका एक न धरी संबंध पुरलिया । पातलिया जवळी काळें । जाणोनियां त्याग सर्वस्वें केला । सांभाळीं आपुलें जाळें ॥३॥ एका जवळी धरी आणिकां अंतरीं । तीं काय सोयरीं नव्हतीं माझीं । एकाचें पाळण एकासी भांडण । चाड कवणिये काजीं । अधिक असे उणें कवण कवण्या गुणें । हे माव न कळेचि तुझी । म्हणोनि चिंतनीं राहिलों श्रीपती । तुका म्हणे भाक माझी ॥४॥

१७७७. आणिकां छळावया जालासी शाहाणा । स्वहिता घातलें खान । आडिके पैके करूनि सायास । कृपणें सांचलें धन । न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण । तारुण्य दशे अधम मातला । दवडी हात पाय कान ॥१॥ काय जालें यांस वांयां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे । घेउनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ॥२॥ सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखें फळ । सिंपिला मोतीं जन्मलें स्वातीचें । वरुषलें सर्वत्र जळ । कापुस पट नयेचि कारणा । तयास पातला काळ । तेंचि भुजंगीं धरिलें कंठीं । मा विष जालें त्याची गरळ ॥३॥ भक्षुनि मिष्टान्न घृतसाकर । सहित सोलुनि केळें । घालूनियां घसां अंगोळिया । हातें वांती करूं पाहे बळें । कुंथावयाची आवडी ओवा । उन्हवणी रडवी बाळें । तुका म्हणे जे जैसें करिती । ते पावती तैसींच फळें ॥४॥

१७७८. तुज दिलें आतां करीं यत्न याचा । जीवभाव वाचाकायामन ॥१॥ भागलों दातारा सीण जाला भारी । आतां मज तारीं शरणागता ॥२॥ नेणतां सोसिली तयाची आटणी । नव्हतांही कोणी कांहीं माझीं ॥३॥ वर्म नेणें दिशा हिंडती मोकाट । इंद्रियें सुनाट दाही दिशा ॥४॥ येरझारी फेरा सिणलों सायासीं । आतां हृषीकेशी अंगीकारीं ॥५॥ तुका म्हणे मन इंद्रियांचे सोई । धांवे यासी काई करूं आतां ॥६॥

१७७९. स्वयें पाक करी। संशय तोचि धरी। संदेहसागरीं। आणिकां परी बुडविती ॥१॥ जाणे विरळा एक। जालें तेथेंचि हें सुख। देखिलें बहुतेक। पुसतां वाट चुकले ॥२॥ तोचि जाणे सोंवळें। शोधी विकल्पाचीं मुळें। नाचती पाल्हाळें। जे विटाळें कोंडिलें ॥३॥ तोचि साधी संधी। सावध त्रिकाळ जो बुद्धि। संदेहाच्या संधी। वेठी आणीक धरियेले ॥४॥ अखंड ते ध्यान। समबुद्धि समाधान। सोंग वांयांविण। ते झाकून बैसती ॥५॥ करणें जयासाठीं। जो नातुडे कवणे आटी। तुका म्हणे साटी। चित्तवित्तेंवांचूनि ॥६॥

१७८०. माझिया संचिता। दृढ देखोनि बळिवंता। पळसी पंढरीनाथा। भेणें आतां तयाच्या ॥१॥ तरि मज कळलासी। नव्हतां भेटी जाणीवेसी। एक संपादिसी। मान करिसी येकात ॥२॥ तरि हें प्रारब्ध जी गाढें। कांहीं न चले तयापुढें। काय तुज म्यां कोडें। रे सांकडें घालावें ॥३॥ भोगाधिपति क्रियमाण। तें तुज नागवें आझून। तरि कां वांयांविण। तुज म्यां सीण करावा ॥४॥ तुज न होतां माझें कांहीं। परि मी न संडीं भक्तिसोई। हो कां भलत्या ठायीं। कुळीं जन्म भलतैसा ॥५। तूं भितोसि माझिया दोषा। कांहीं मागणें ते आशा। तुका म्हणे ऐसा। कांहीं न धरी संकोच ॥६॥

१७८१. लोकमान देहसुख। संपत्तिउपभोग अनेक। विटंबना दुःख। तुझिया भेटीवांचूनि ॥१॥ तरि मज ये भेट ये भेट। काय ठाक्लासी नीट। थोर पुण्यें वीट। तुज दैवेंचि लाधली ॥२॥ काय ब्रह्मज्ञान करूं कोरडें। रितें मायेचें मापाडें। भेटीविण कुडें। तुझिया अवघें मज वाटे ॥३॥ आत्मस्थितीचा विचार। काय करूं हा उद्धार। न देखतां धीर। चतुर्भुज मज नाहीं ॥४॥ रिद्धिसिद्धी काय करूं। अथवा आगम विचारू। भेटीविण भारु। तुझिया वाटे मज यांचा ॥५॥ तुजवांचूनि कांहीं व्हावें। ऐसें नको माझिया जीवें। तुका म्हणे द्यावें। दरुषण पायांचें ॥६॥

१७८२. तुझा म्हणवून तुज नेणें। ऐसें काय माझें जिणें ॥१॥ तरि मज कवणाचा आधार। करोनियां राहों धीर ॥२॥ काय शब्दचि ऐकिला। भेटी नव्हतां गा विठ्ठला ॥३॥ तुका म्हणे आतां। अभय देईं पंढरिनाथा ॥४॥

१७८३. उद्धवअक्रूरासी। आणीक व्यासआंबऋषी। रुक्मांगदा-प्रल्हादासी। दाविलें तें दाखवीं ॥१॥ तरि मी पाहेन पाहेन। तुझे श्रीमुखचरण। उताविळ मन। तयाकारणें तेथें ॥२॥ जनकाश्रुतदेवा करीं। कैसा शोभलासी हरी। विदुराच्या घरीं। कण्या धरी कवतुकें ॥३॥ पांडवां अकांतीं। तेथें पावसी स्मरती। घातलें द्रौपदी। यागीं बिरडें चोळीचें ॥४॥ करीं गोपींचें कवतुक। गाईगोपाळांसी सुख। दावीं तेंचि मुख। दृष्टी माझ्या आपुलें ॥५॥ तरि तूं अनाथाचा दाता। मागतियां शरणागतां। तुका म्हणे आतां। कोड पुरवीं हे माझें ॥६॥

१७८४. मागता भिकारी जालों तुझें द्वारीं। देईं मज हरी कृपादान ॥१॥ प्रेम प्रीति नाम

उचित करावें । भावें संचरावें हृदयामाजी ॥२॥ सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजी एक ॥३॥ तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ॥४॥ संबंधीं जनवाद पीडलों परोपरी । अंतरलों दुरी तुजसी तेणें ॥५॥ तुका म्हणे आतां तुझा शरणागत । करावे सनाथ मायबापा ॥६॥

१७८५. न मनी नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ॥१॥ भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ॥२॥ नाहीं चाड देवाची कांहीं । छळण टोंकें तस्करघाई ॥३॥ तुका म्हणे त्याचा संग । नको शब्द स्पर्शअंग ॥४॥

१७८६. दिनें दिनें शंका वाढे । आयुष्य नेणवतां गाढें ॥१॥ कैसीं भुलली बापुडीं । दंभविषयाचे सांकडीं ॥२॥ विसरलीं मरण । त्याची नाहीं आठवण ॥३॥ देखत देखत पाहीं । तुका म्हणे आठव नाहीं ॥४॥

१७८७. माझें मज आतां न देखें निरसतां । म्हणऊन आधार केला । संसाराची आंस सांडुनि लौकिक । जीव भाव तुज दिला । नव्हतीं माझीं कोणी मी कवणांचा । आर्त मोहो सांडवला । तारीं मारीं करीं भलतें दातारा । होऊन आतां तुझा ठेलों रे ॥१॥ असों माझें कोडें तुज हें सांकडें । मी असेन निवाडें सुखरूप । बाळकासी चिंता काय पोटव्यथा । जया शिरीं मायबाप ॥२॥ पापपुण्य श्रुति आटल्या । शास्त्रांसी न लगेचि ठाव । विधिनिषेधें गोविलीं पुराणें । वेदासी तो अहंभाव । ओंकाराचें मूळ व्यापिलें माथा । तेथें न धरीच भाव । म्हणऊन काबाड । सांडिलें उपसतां । धरिलें तुझेंचि नांव ॥३॥ तनमनइंद्रियें ठेवूनि राहिलों । सर्व आशा तुझें पायीं । तप तीर्थ दान करवूं कवणा हातीं । अधीन तें मज काई । आहिक्य परत्र चाड नाहीं सर्वथा । जन्म सदा मज देईं । मायामोहपाश करीं विष तैसें । तुका म्हणे माझ्याठायीं ॥४॥

१७८८. नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळ ही ॥१॥ रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥२॥ आणिकां रसें मरण गांठीं । येणें तुटी संसारें ॥३॥ तुका म्हणे आहार जाला । हा विठ्ठल आम्हांसी ॥४॥

१७८९. धालों सुखें ढेंकर देऊं । उमटे जेवूं तोंवरी ॥१॥ क्रीडा करूं निरंजनीं । न पुरे धणी हरिसवें ॥२॥ अवघें खेळों अवघ्यामधीं । डाईं न पडो ऐसी बुद्धि ॥३॥ तुका म्हणे वांचवितां । आम्हा सत्ता समर्थ ॥४॥

१७९०. ऐकल्या नव्हे खेळ चांग । धरिला संग म्हणऊनि ॥१॥ उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेद निवडेना ॥२॥ दुसऱ्या परी एक ऐसा । न वजे रिसा निकुरेंही ॥३॥ तुका म्हणे कळत्यां कळे । येर खेळे खेळ म्हणो ॥४॥

१७९१. बोलविलें जेणें । तोचि त्याचें गुह्य जाणे ॥१॥ मी तो काबाडाचा धनी । जेवूं

मागावें थिंकोनि ॥२॥ मजुराच्या हातें । माप जालें गेलें रितें ॥३॥ जाला पुरविता । पांडुरंग माझा पिता ॥४॥ मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ॥५॥ जैसा करिती धंदा । तैसा पडोनियां छंदा ॥६॥ त्याच्या साच गाई म्हैसी । येणें खेळावें मातीशीं । तुका म्हणे बोल । माझा बोलतो विठ्ठल ॥८॥

१७९२. कां हो तुम्ही माझी वदविली वाणी । नेदा हे निवडूनि पांडुरंगा ॥१॥ आणीक म्यां कोणां पुसावा विचार । समूळ संसार दुराविला ॥२॥ स्वामिसेवा म्हूण घेतलीं पदरीं । सांगितलें करी कारण तें ॥३॥ तुका म्हणे नाहीं शिकविलें जेणें । तो याच्या वचनें उगा राहे ॥४॥

१७९३. सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी हा प्राण जाय त्याचा ॥१॥ आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं ढळों नये ॥२॥ समय सांभाळुनी आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तयापरी ॥३॥ तुका म्हणे तरी म्हणवावें सेवक । खादलें तें हाक अन्न होय ॥४॥

१७९४. नये पुसों आज्ञा केली एकसरें । आम्हांसी दुसरें नाहीं आतां ॥१॥ ज्याचा तो बळिवंत सर्व निवारिता । आम्हां काय चिंता करणें लागे ॥२॥ बुद्धीचा जनिता विश्वाचा व्यापक । काय नाहीं एक अंगीं तया ॥३॥ तुका म्हणे मज होईल वारिता । तरि काय सत्ता नाहीं हातीं ॥४॥

१७९५. बळिवंत आम्ही समर्थाचे दास । घातली या कास कळिकाळासी ॥१॥ तेथें माणसाचा कोण आला पाड । उल्लंघोनि जड गेलों आधीं ॥२॥ संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षडवर्ग ॥३॥ तुका म्हणे एक उरला धरिता ठाव । येर केले वाव तृणवत ॥४॥

१७९६. एक गावें आम्ही विठोबाचें नाम । आणीकांपें काम नाहीं आतां ॥१॥ मोडूनियां वाटा सुक्षम दुस्तर । केला राज्यभार चाले ऐसा ॥२॥ लावूनि मृदंग श्रुतिटाळघोष । सेवूं ब्रह्मरस आवडीनें ॥३॥ तुका म्हणे महापातकी पतित । ऐसियांचें हित हेळामात्रें ॥४॥

१७९७. वाचा चापल्यें बहु जालों कुशळ । नाहीं बीजमूळ हाता आलें ॥१॥ म्हणोनि पंढरिराया दु:खी होतें मन । अंतरींचें कोण जाणे माझें ॥२॥ पूज्य जालों अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ॥३॥ तुका म्हणे खूण न कळेचि निरुती । सांपडलों हातीं अहंकाराचे ॥४॥

१७९८. आतां काढाकाढी करीं गा पंढरिराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ॥१॥ जाणतां बैसलों दगडाचे नावे । तिचा तो स्वभाव प्राण घ्यावा ॥२॥ मनाचा स्वभाव इंद्रियांची ओढी । पतनाचे जोडी वरीं हांव ॥३॥ तुका म्हणे जाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावीं ॥४॥

१७९९. सज्जन तो शब्द सत्य जो मानी । छळी दुर्जन आणीकांसी ॥१॥ एक गुण तो केलासे दोंठायीं । ज्याचा त्यास पाहीं जैसा तैसा ॥२॥ भाविक शब्द बोले वाणीचा । लटिका वाचा वाचाळ तो ॥३॥ परउपकार घडे तोचि भला । नाठ्याळ तयाला दया नाहीं ॥४॥

जातीवंत तो पायरी जाणे । अधम तो नेणे खुंट जैसा ॥५॥ हित तें अनहित केलें कैसें । तुका म्हणे पिसें लागलें यासीं ॥६॥

१८००. तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा तेचि घडी झडो माझी ॥१॥ हेंचि मज देईं हेंचि मज देईं । आणिक दुजें कांहीं न मगें तुज ॥२॥ बहिर कान तुझी कीर्ति नाइकतां । पाय न देखतां जावोत डोळे ॥३॥ मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग तें चांडाळ जळो जळो ॥४॥ हात पाय तेणें पंथें न चालतां । जावोत अनंता गळोनियां ॥५॥ तुजविण जिणे नाहीं मज चाड । तुका म्हणे गोड नाम तुझें ॥६॥

१८०१. म्हणसी होऊनी निश्चिंता । हरूनियां अवघी चिंता । मग जाऊं एकांता । भजन करूं । संसारसंभ्रमें आशा लागे पाठी । तेणें जीवासाटी होईल तुझ्या ॥१॥ सेकीं नाडसील नाडसील । विषयसंगें तूं अवघा नाडसील । मागुता पडसील भवडोहीं ॥२॥ शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कदा अराणूक । करिती तडातोडी अंतर्बाह्यात्कारीं । ऐसे जाती चारी दिवस वेगीं ॥३॥ मोलाची घडी जाते वांयांविण । न मिळे मोल धन देतां कोडी । जागा होईं करी हिताचा उपाय । तुका म्हणे हाय करिसी मग ॥४॥

१८०२. पांडुरंगे ये वो पांडुरंगे । जीवाचे जीवलगे ये वो पांडुरंगे ॥१॥ कनवाळू कृपाळू भक्तालागीं मोही । गजेंद्राचा धांवा तुंवा केला विठाई ॥२॥ भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले । आंबऋषीकारणें जन्म दहा घेतले ॥३॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार केला । विदारूनि दैत्य प्रेमपान्हा पाजिला ॥४॥ उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाहीं । पाजी प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ॥५॥ कौरवीं पांचाळी सभेमाजी आणिली । वस्त्रहरणीं वस्त्रें कैसी जाली माउली ॥६॥ दुर्वास पातला धर्मा छळावया वनीं । धांवसी लवलाहीं शाखादेठ घेऊनि ॥७॥ कृपाळू माउली भुक्तिमुक्ति भांडार । करीं माझा अंगीकार तुका म्हणे विठ्ठले ॥८॥

१८०३. कवणाचें कारण नलगेचि कांहीं । सर्वीं सर्वांठायीं तूं मज एक ॥१॥ कायावाचामन ठेविलें तुझ्या पायीं । आतां उरले काई न दिसे देवा ॥२॥ कवणा पाषाणासी धरुनियां भाव । कवणावरी पाव ठेवूं आतां ॥३॥ म्हणऊनि निश्चिंत राहिलों मनीं । तूंचि सर्वां खाणीं देखोनियां ॥४॥ जळे जळ काय धोविलें एक । कवण तें पातक हरलें तेथें ॥५॥ पापपुण्य हे वासना सकळ । ते तुज समूळ समर्पिली ॥६॥ पितरस्वरूपी तूंचि जनार्दन । सव्य तें कवण अपसव्य ॥७॥ तुका म्हणे जीव पिंड तुझे हातीं । देऊनि निश्चिंती मानियेली ॥८॥

१८०४. सिणलों दातारा करितां वेरझारा । आतां सोडवीं संसारापासोनियां ॥१॥ न सुटेचि बाकी नव्हें झाडापाडा । घातलोंसें खोडा हाडांचिया ॥२॥ मायबापें माझीं जीवांची सांगाती । तीं देतील हातीं काळाचिया ॥३॥ पडताळूनि सुरी बैसली सेजारीं । यमफांसा करीं घेऊनियां ॥४॥

पाठीं पोटीं एकें लागलीं सरसीं । नेती नरकापाशीं ओढोनियां ॥५॥ जन साह्यभूत असे या सकळां । मी एक निराळा परदेशी ॥६॥ कोणा काकुलती नाहीं कोणे परी । तुजविण हरी कृपाळुवा ॥७॥ तुका म्हणे मज तुझाची भरंवसा । म्हणवूनि आशा मोकलिली ॥८॥

१८०५. देवाचा भक्त तो देवासीच गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची ॥१॥ कवणाचा सोइरा नव्हेच सांगाती । अवघियां हातीं अंतरला ॥२॥ निष्काम वेडें म्हणती बापुडें । अवघियां सांकडें जाला कैसा ॥३॥ माझें ऐसें तया न म्हणती कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ॥४॥ प्रात:स्नान करी विभूतिचर्चन । देखोनियां जन निंदा करी ॥५॥ कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा । म्हणती या चांडाळा काय जालें ॥६॥ गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आईबाप भाऊ ॥७॥ घरी बाइल म्हणे कोठें व्याली रांड । बरें होतें षंढ मरता तरी ॥८॥ जन्मोनि जाला अवघियां वेगळा । म्हणोनि गोपाळा दुर्लभ तो ॥९॥ तुका म्हणे जो संसारा रुसला । तेणेचि ठाकिला सिद्धपंथ ॥१०॥

१८०६. कस्तुरी भिनली जये मृत्तिकेसी । तये आणिकासी कैसी सरी ॥१॥ लोखंडाचे अंगीं लागला परिस । तया आणिकास कैसी सरी ॥२॥ तुका म्हणे मी नवजें यातीवरी । पूज्यमान करी वैष्णवासी ॥३॥

१८०७. अनुहात ध्वनि वाहे सकळां पिंडीं । राम नाहीं तोंडीं कैसा तरे ॥१॥ सकळां जीवामाजी देव आहे खरा । देखिल्या दुसरा विण न तरे ॥२॥ ज्ञान सकळांमाजी आहे हें साच । भक्तीविण तेंच ब्रह्म नव्हे ॥३॥ काय मुद्रा कळल्या कराव्या सागतां । दीप न लागतां उन्मनीचा ॥४॥ तुका म्हणे नका पिंडाचें पाळण । स्थापूं नारायण आतुडेना ॥५॥

१८०८. नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणीं ॥१॥ नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापूनियां ॥२॥ मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ॥३॥ राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारी । बोबड्या उत्तरीं हेंचि ध्यान ॥४॥ तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगे भार घेतला माझा ॥५॥

१८०९. देवासी लागे सकळांसी पोसावें । आम्हां नलगे खावें काय चिंता ॥१॥ देवा विचारावें लागे पापपुण्य । आम्हांसी हें जन अवघें भलें ॥२॥ देवासी उत्पत्ति लागला संहार । आम्हां नाहीं फार थोडें कांहीं ॥३॥ देवासी काम लागला धंदा । आम्हांसी ते सदा रिकामीक ॥४॥ तुका म्हणे आम्ही भले देवाहून । विचारितां गुण सर्वभावें ॥५॥

१८१०. घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥१॥ हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥२॥ आनंदे निर्भर असों भलते ठायीं । सुखदु:खा नाहीं चाड आम्हां ॥३॥ आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥४॥

मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । होय सांगों ऐसी तुका म्हणे ॥५॥

१८११. देवा तुज मज पण । पाहों आगळा तो कोण ॥१॥ तरी साच मी पतित । तूंच खोटा दीनानाथ । वाही साधुसंत जन । करून अंगीं लावीन ॥२॥ आम्ही धरिले भेदाभेद । तुज नव्हे त्याचा छेद ॥३॥ आम्हीं बळकाविले दोष । न चले तुझें कांहीं त्यास ॥४॥ दिशा भरल्या माझ्या मनें । लपालासी त्याच्या भेणें ॥५॥ तुका म्हणे चित्त । करी तुझी माझी नीत ॥६॥

१८१२. लापणिकशब्दें नातुडे हा देव । मनिंचा गुह्य भाव शुद्ध बोला ॥१॥ अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥२॥ तुका म्हणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चित्त शुद्ध भावें ॥३॥

१८१३. नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां हें सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं ॥१॥ काय करिसी वांयां लटिकाचि पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ॥२॥ मीच देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टाकोनियां ॥३॥ अमृताची गोडी पुढिलां सांगसी । आपण उपवासी मरोनियां ॥४॥ तुका म्हणे जरि राहील तळमळ । ब्रह्म तें केवळ सदोदित ॥५॥

१८१४. गंगाजळा पाहीं पाठी पोट नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी ॥१॥ रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिकां तिमिरा नाश तेणें ॥२॥ कर्पूरकांडणी काय कोंडा कणी । सिंधू मेळवणी काय चाले ॥३॥ परिस चिंतामणि आणिकाचा गुणी । पालटे लागोनि नव्हे तैसा ॥४॥ तुका म्हणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ॥५॥

१८१५. परिस काय धातु सोनें न करितु । फेडितो निभ्रांतु लोहपांगु ॥१॥ काय तयाहूनि जालासी बापुडें । फेडितां सांकडें माझें एक ॥२॥ कल्पतरु कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ॥३॥ चंदनाच्या वासें वसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाती ॥४॥ काय त्यांचें उणें जालें त्यासी देतां । विचारीं अनंता तुका म्हणे ॥५॥

१८१६. तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाती । बाभुळा राखिती करूनि सार ॥१॥ कोण हित तेणें देखिलें आपुलें । आणीक पाहिलें सुख काई ॥२॥ धान्य बीजें जेणें जाळोनि सकळें । पेरितों काळें जिरें बीज ॥३॥ मोडोनिया वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ॥४॥ विषाचें अमृत ठेवूनियां नाम । करितो अधम ब्रह्महत्या ॥५॥ तुका म्हणे त्यास नाइके सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ॥६॥

१८१७. संसाराच्या भेणें । पळों न लाहेसें केलें ॥१॥ जेथें तेथें आपण आहे । आम्हीं करावें ते काय ॥२॥ एकांतासी ठाव । तिहीं लोकीं नाहीं वाव ॥३॥ गांवा जातो ऐसें । नलगे म्हणावें तें कैसे ॥४॥ स्वप्नाचिये परी । जागा पाहे तंव घरीं ॥५॥ तुका म्हणे काय । तुझें घेतलें म्यां आहे ॥६॥

१८१८. आपण काय सादर । विशीं आम्हां कां निष्ठुर ॥१॥ केले भक्त तैसें देईं । तुझें प्रेम माझ्या ठायीं ॥२॥ काय पंगतीस कोंडा । एकांतासी साकरमांडा ॥३॥ काय एकपण । पोतां घालूनि गांठी खूण ॥४॥ काय घ्यावें तैसें । तया आपण अनारिसें ॥५॥ तुका म्हणे मधीं । आतां तोडूं भेद बुद्धी ॥६॥

१८१९. चित्त तुझ्या पायीं । ठेवुनि जालों उतराई ॥१॥ परि तूं खोटा केशीराजा । अंतपार न कळे तुझा ॥२॥ आम्हीं सर्वस्वें उदार । तुज देऊनि वेव्हार ॥३॥ इंद्रियांची होळी । संवसार दिला बळी ॥४॥ न पडे विसर । तुझा आम्हां निरंतर ॥५॥ प्रेम एकासाटीं । तुका म्हणे न वेचे गांठीं ॥६॥

१८२०. आम्ही पतित म्हणोनि तुज आलों शरण । करितों चिंतन दिवस रात्रीं । नाहीं तरी मज काय होती चाड । धरावया भीड तुझी चित्तीं ॥१॥ आम्हां न तारावें तुम्ही काय करावें । सांगीजो जी भावें नारायणा ॥२॥ अन्याय कोणाचा अंगीकार करणें । तया हातीं देणें लाज तेचि । काय तें शूरत्व मिरवूनि बोलणें । जनामाजी दावणें बळ रया ॥३॥ पोह्या अन्नछत्र घालूनियां घरीं । दंडितो बाहेरी आलियासी । नव्हे कीर्ती कांहीं न मानेचि लोकां । काय विटंबना तैसी तैसी ॥४॥ प्रत्यक्षासी काय द्यावें गा प्रमाण । पाहातां दर्पण साक्ष काई । तुका म्हणे तरी आम्हां कां न कळे । तरलों किंवा आम्ही नाहीं ॥५॥

१८२१. काग बग रिठा मारिले बाळपणीं । अवघी दैत्यखाणी बुडविली ॥१॥ तो मज दावा तो मज दावा । नंदानंदन जीवा आवडे तो ॥२॥ गोवर्धन गिरी उचलिला करीं । गोकुळ भीतरीं राखियेलें ॥३॥ वधुनि भौमासुरा आणिल्या गोपांगना । राज्य उग्रसेना मथुरेचें ॥४॥ पांडव जो हरीं राखिले कुसरी । विवराभीतरीं चालविलें ॥५॥ तुका म्हणे तो हा भक्तांचा कृपाळ । दुष्ट जना काळ नारायण ॥६॥

१८२२. तुजविण देवा । कोणा म्हणे माझी जिव्हा ॥१॥ तरि हो कां शतखंड । पडो झडोनियां रांड ॥२॥ कांहीं इच्छेसाठीं । करिल वळवळ करंटी ॥३॥ तुका म्हणे कर । कटीं तयाचा विसर ॥४॥

१८२३. आम्हां सर्वभावें हेंचि काम । न विसंबावें तुझें नाम ॥१॥ नलगे करावी हे चिंता । तरणें करणें काय आतां ॥२॥ आसनीं भोजनीं शयनीं । दुजे नाहीं ध्यानीं मनीं ॥३॥ तुका म्हणे कृपानिधी । माझी तोडिली उपाधी ॥४॥

१८२४. नव्हे कांही कवणाचा । भाव जाणवला साचा ॥१॥ म्हणोनि तुझ्या पायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥२॥ शरीर जायाचें कोंपट । याची काय खटपट ॥३॥ तुका म्हणे वांयावीण । देवा कळों आला सीण ॥४॥

१८२५. नेघें तुझें नाम । न करीं सांगितलें काम ॥१॥ वाढे वचनें वचन । दोष उच्चारितां गुण ॥२॥ आतां तुझ्या घरा । कोण करी येरझारा ॥३॥ तुका म्हणे ठायीं । मजपाशीं काय नाहीं ॥४॥

१८२६. रज्जु धरूनियां हातीं । भेडसाविलीं नेणतीं । कळों येतां चित्तीं । दोरी दोघां सारिखी ॥१॥ तुम्हांआम्हांमध्यें हरी । जाली होती तैसी परी । मृगजळाचे पुरीं । ठाव पाहों तरावया ॥२॥ सरी चिताकभोंवरीं । अळंकाराचिया परी । नामें जालीं दुरी । एक सोनें आटितां ॥३॥ पिसांचीं पारवीं । करोनि बाजेगिरी दावी । तुका म्हणे तेवीं । मज नको चाळवूं ॥४॥

१८२७. व्यवहार तो खोटा । आतां नवजों तुझ्या वाटा ॥१॥ एका नामा नाहीं ताळा । केली सहस्त्रांची माळा ॥२॥ पाहों जातां ठायीं । खेळसील लपंडाई ॥३॥ तुका म्हणे चार । बहु करितोसी फार ॥४॥

१८२८. लटिकाचि केला । सोंग पसारा दाविला ॥१॥ अवघा बुडालासी ऋणें । बहुतांचें देणें घेणें ॥२॥ लावियेला चाळा । बहु दावूनि पुतळा ॥३॥ तुका म्हणे हात । आम्हीं अवरिली मात ॥४॥

१८२९. दाखवूनि आस । केला बहुतांचा नास ॥१॥ थोंटा झोंडा शिरोमणी । भेटलासी नागवणी ॥२॥ सुखाचें उत्तर । नाहीं मुदलासी थार ॥३॥ तुका म्हणे काय । तुझें घ्यावें उरे हाय ॥४॥

१८३०. ठाव नाहीं बुड । घरें वसविसी कुड ॥१॥ भलते ठायीं तुझा वास । सदा एरवीं उदास ॥२॥ जागा ना निजला । होसी धाला ना भुकेला ॥३॥ न पुसतां भलें । तुका म्हणे तुझे बोलें ॥४॥

१८३१. लाज ना विचार । बाजारी तूं भांडखोर ॥१॥ ऐसें ज्याणें व्हावें । त्याची गांठी तुजसवें ॥२॥ फेडिसी लंगोटी । घेसी सकळांसी तुटी ॥३॥ तुका म्हणे चोरा । तुला आप ना दुसरा ॥४॥

१८३२. श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोवे ॥१॥ तैसी जाली मज परी । वसें निकट सेजारीं ॥२॥ जेवितां जवळी । येऊनियां पुस घोळी ॥३॥ कोपेल तो धणी । तुका म्हणे नेणें मनीं ॥४॥

१८३३. वटवट केली । न विचारितां मना आली ॥१॥ मज कराल तें क्षमा । कैसें नेणों पुरुषोत्तमा ॥२॥ उचित न कळे । जिव्हा भलतेंचि बरळे ॥३॥ तुका म्हणे कांहीं । लौकिकाची चाड नाहीं ॥४॥

१८३४. जीवें व्हावें साटी । पडे संवसारें तुटी ॥१॥ ऐसी बोलिलों वचनें । सवें घेउनि नारायण ॥२॥ येणें नाहीं जाणें । केलें कोणा न मागणें ॥३॥ नाहीं जन्मा आलों ।

करील ऐसें नेदी बोलों ॥४॥ ठाव पुसी सेणें । तुका म्हणे खुंटी येणें ॥५॥

१८३५. आतां पंढरीराया । माझ्या निरसावें भया ॥१॥ मनीं राहिली आशंका । स्वामिभयाची सेवका ॥२॥ ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ॥३॥ तुका म्हणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें ॥४॥

१८३६. कवतुकवाणें । बोलों बोबड्या वचनें ॥१॥ हें तों नसावें अंतरीं । आम्हां धरायाचें दुरी ॥२॥ स्तुति तैसी निंदा । माना समचि गोविंदा ॥३॥ तुका म्हणे बोलें । मज तुम्हीं शिकविलें ॥४॥

१८३७. असो मागें जालें । पुढें गोड तें चांगलें ॥१॥ आतां माझे मनीं । कांहीं अपराध न मनीं ॥२॥ नेदी अवसान । करितां नामाचें चिंतन ॥३॥ तुका म्हणे बोलें । तुज आधींच गोविलें ॥४॥

१८३८. मातेविण बाळा । आणीक न माने सोहळा ॥१॥ तैसें जालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरीनाथा ॥२॥ वाट पाहे मेघा बिंदु । नेघे चातक सरिता सिंधू ॥३॥ सारसाशीं निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥४॥ जीवनावीण मत्स्य । जैसें धेनूलागीं वत्स ॥५॥ पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्तमानें ॥६॥ कृपणाचें धन । लोभ्यालागीं जैसें मन ॥७॥ तुका म्हणे काय । तुजविण प्राण राहे ॥८॥

१८३९. तुज ऐसा कोणी न देखें उदार । अभयदानशूर पांडुरंगा ॥१॥ शरण येती त्यांचे न विचारिसी दोष । मागतां त्यांस अढळ देसी ॥२॥ धांवसी आडणी ऐकोनियां धांवा । कइवारें देवा भक्तांचिया ॥३॥ दोष त्यांचे जाळी कल्पकोटिवरी । नामासाटीं हरि आपुलिया ॥४॥ तुका म्हणे तुज वाणूं कैशा परी । एक मुख हरी आयुष्य थोडें ॥५॥

१८४०. काय तुझे उपकार पांडुरंगा । सांगों मी या जगामाजी आतां ॥१॥ जतन हें माझें करूनि संचित । दिलें अवचित आणूनियां ॥२॥ घडल्या दोषांचे न घलींच भरी । आली यास थोरी कृपा देवा ॥३॥ नव्हतें ठाऊकें आइकिलें नाहीं । न मागतां पाहीं दान दिलें ॥४॥ तुका म्हणे याच्या उपकारासाटीं । नाहीं माझें गांठी कांहीं एक ॥५॥

१८४१. वाळूनियां जन सांडी मज दुरी । करिसील हरी ऐसें कधीं ॥१॥ आठवीन पाय धरूनि अनुताप । वाहे जळ झोंप नाही डोळां ॥२॥ नावडती जीवा आणीक प्रकार । आवडी ते फार एकांताची ॥३॥ तुका म्हणे ऐसी धरितों वासना । होईं नारायणा साह्य मज ॥४॥

१८४२. सांगतों या मना तें माझें नाइकें । घातावरी टेंके चांडाळ हें ॥१॥ म्हणऊनि पाहे तरतें बुडतें । न लाहे पुरतें बळ करूं ॥२॥ काय तें संचित न कळे पाहातां । मतिमंदचिंता उपजते ॥३॥ तुका म्हणे ऐसें बळ नाहीं अंगीं । पावोनियां वेगीं पार ठाकीं ॥४॥

१८४३. आतां नको चुकों आपुल्या उचिता। कृपाळुवा कांता रखुमाईच्या ॥१॥ आचरावे दोष हें आम्हां उचित। तारावे पतित तुमचें तें ॥२॥ आम्ही तों आपुलें केलेंसें जतन। घडो तुम्हांकून घडेल तें ॥३॥ तुका म्हणे विठो चतुराच्या राया। आहे तें कासया मोडों देसी ॥४॥

१८४४. मुखें बोलावें तें जीविंचें जाणसी। विदित पायांपाशीं सर्व आहे ॥१॥ आतां हेंचि भलें भाकावी करुणा। विनियोग तो जाणां तुम्ही याचा ॥२॥ आपलें तों येथें केलें नव्हे कांहीं। साधनाच्या वाहीं पडों नये ॥३॥ तुका म्हणे देह दिला पिंडदान। वेळोवेळां कोण चिंता करी ॥४॥

१८४५. कामातुरा भय लाज ना विचार। शरीर असार तृणतुल्य ॥१॥ नवल हे लीळा कर्त्याचें लाघव। प्रारब्धें भाव दाखविले ॥२॥ लोभालोभ एका धनाचिये ठायीं। आणिकांची सोई चाड नाहीं ॥३॥ तुका म्हणे भूक न विचारी प्रकार। योजे तेंचि सार यथाकाळें ॥४॥

१८४६. बांधी सोडी हें तों धन्याचिये हातीं। हेंकड गोविती आपणां बळें ॥१॥ भुललियासी नाहीं देहाचा आठव। धोतऱ्यानें भाव पालटिला ॥२॥ घरांत रिघावें दाराचिये सोई। भिंतीसवें डोई घेऊनि फोडी ॥३॥ तुका म्हणे देवा गेलीं विसरोन। आतां वर्म कोण दावी यांसी ॥४॥

१८४७. कवण जन्मता कवण जन्मविता। न कळे कृपावंता माव तुझी ॥१॥ कवण हा दाता कवण हा मागता। न कळे कृपावंता माव तुझी ॥२॥ कवण भोगिता कवण भोगविता। न कळे कृपावंता माव तुझी ॥३॥ कवण ते रूपता कवण अरूपता। न कळे कृपावंता माव तुझी ॥४॥ सर्वां ठायीं तूंचि सर्वही जालासी। तुका म्हणे यासी दुजें नाहीं ॥५॥

१८४८. जेथें देखें तेथें तुझींच पाऊलें। विश्व अवघें कोंदाटलें ॥ रूप गुण नाम अवघा मेघश्याम। वेगळें तें काय उरलें ॥ जातां लोटांगणीं अवघीच मेदिनी। सकळ देवपाट जालें ॥ सदा सर्वकाळ सुदिन सवेळ। चित्त प्रेमें असे धालें ॥१॥ अवघा आम्हां तूंच जालासी देवा। संसार हेवा काम धंदा ॥ नलगे जाणें कोठें कांहींच करणें। मुखी नाम ध्यान सदा ॥२॥ वाचा बोले ते तुझेचि गुणवाद। मंत्रजप कथा स्तुति ॥ भोजन सारूं ठायीं फल तांबूल कांहीं। पूजा नैवेद्य तुज होती ॥ चालतां प्रदक्षिणा निद्रा लोटांगण। दंडवत तुजप्रति ॥ देखोनि दृष्टी परस्परें गोष्टी। अवघ्या तुझ्या मूर्ति ॥३॥ जाल्या तीर्थरूप बावी नदी कूप। अवघें गंगाजळ जालें ॥ महाल मंदिरें माड्या तनघरें। झोंपड्या अवघीं देव देवाइलें ॥ ऐकें कानीं त्या हरिनामध्वनी। नाना शब्द होत जाले ॥ तुका म्हणे आम्ही या विठोबाचे दास। सदा प्रेमसुखें धालों रे ॥४॥

१८४९. जे दोष घडले न फिटे करितां कांहीं। सरते तुझ्या पायीं जाले तैसे ॥१॥ माझा कां हो करूं नये अंगीकार। जालेती निष्ठुर पांडुरंगा ॥२॥ यातिहीन नये ऐकों ज्यां वेद। तयां दिलें पद वैकुंठींचें ॥३॥ तुका म्हणे कां रे एकाचा आभार। घेसी माथां भार वाहोनियां ॥४॥

१८५०. हरिकथेची आवडी देवा । करितो सेवा दासांची ॥१॥ म्हणोनि हिंडे मागें मागें । घरटी जागे घालितसे ॥२॥ निर्लज्ज भोजें नाचे रंगीं । भरतें अंगीं प्रेमाचें ॥३॥ तुका म्हणे विकलें देवें । आपणा भावें संवसाटी ॥४॥

१८५१. साधन संपत्ति हेंचि माझें धन । सकळ चरण विठोबाचे ॥१॥ शीतळ हा पंथ माहेराची वाट । जवळीच नीट सुखरूप ॥२॥ वैष्णवांचा संग रामनाम गाणें । मंडित भूषणें अळंकार ॥३॥ भवनदी आड नव्हतीसी जाली । कोरडीच चाली जावें पायीं ॥४॥ मायबाप दोघें पाहातील वाट । ठेवूनियां कटीं कर उभीं ॥५॥ तुका म्हणे केव्हां देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ॥६॥

१८५२. यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ॥१॥ वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोवीस ठेंगणीं धांडोळितां ॥२॥ आतां मज क्षमा करावें तें देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ॥३॥ सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदश्रुतीं ॥४॥ तो आम्हीं भावें केलासी लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ॥५॥ सहस्त्रमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रह्मा ठेला ॥६॥ तेथें माझी देहबुद्धि ते काई । थोर मी अन्यायी तुका म्हणे ॥७॥

१८५३. कृष्ण ध्यातां चित्तीं कृष्ण गातां गीतीं । तेही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥१॥ आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणा रे भोगितां नारायण ॥२॥ ओळिये दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ॥३॥ नर नारी याति हो कोणी भलतीं । भावें एका प्रती नारायणा ॥४॥ तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥५॥

१८५४. डोळियां पाझर कंठ माझा दाटी । येईं वो देईं भेटी पांडुरंगे ॥१॥ बहु दिस टाकिलें कां निरास केलें । कोठें वो गुंतलें चित्त तुझें ॥२॥ बहु धंदा तुज नाहीं वो आठव । राहिलासे जीव माझा कंठीं ॥३॥ पंढरीस जाती वारकरी संतां । निरोप बहुतां हातीं धाडीं ॥४॥ तुजविण कोण सांवा धांवा करी । येईं वो झडकरी पांडुरंगे ॥५॥ काय तुझी वाट पाहों कोठवरी । कृपाळुवा परी विसरलासी ॥६॥ एक वेळे माझा धरूनि आठव । तुका म्हणे ये वो न्यावयासी ॥७॥

१८५५. काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरिनाथा ॥ करि संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥१॥ अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥२॥ भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥३॥ बहुत चंचळ चपळ । जातां येतां नलगे वेळ ॥४॥ किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ॥५॥ मज राखें आतां । तुका म्हणे पंढरिनाथा ॥६॥

१८५६. कंथा प्रावर्ण । नव्हे भिक्षेचें तें अन्न ॥१॥ करीं यापरी स्वहित । विचारूनि धर्म नीत ॥२॥ देऊळ नव्हे घर । प्रपंच परउपकार ॥३॥ विधिसेवन काम । नव्हे शब्द रामराम ॥४॥

हत्या क्षात्रधर्म । नव्हे निष्काम तें कर्म ॥५॥ तुका म्हणे संतीं । करूनि ठेविली आइती ॥६॥

१८५७. पडोनियां राहीं । उगाच संतांचिये पायीं ॥१॥ नलगे पुसणें सांगावें । चित्त शुद्ध करी भावें ॥२॥ सहज ते स्फीती । उपदेश पर युक्ति ॥३॥ तुका म्हणे भाव । जवळी धरूनि आणी देव ॥४॥

१८५८. देवाचे घरीं देवें केली चोरी । देवें देव नागवूनि केला भिकारी ॥१॥ धांवणियां धांवा धांवणियां धांवा । मागचि नाहीं जावें कवणिया गांवा ॥२॥ सवेंचि होता चोर घरिचिया घरीं । अवघें केलें वाटोळें फांवलियावरी ॥३॥ तुका म्हणे येथें कोणीच नाहीं । नागवलें कोण गेलें कोणाचें काई ॥४॥

१८५९. जतन करा रे जतन करा । घालूं पाहे घरावरी घाला चोरटें ॥१॥ अवघेचि निजों नका अवघिये ठायीं । वेळ अवेळ तरी सांभाळावी कांहीं ॥२॥ सींतरलीं फार खाती भोंवताले फेरे । गेलें नये हाता सेकीं तळमळ उरे ॥३॥ तुका म्हणे आम्हीं करूं आपुलें जतन । नलगे कांहीं कोणां द्यावें उघडारे कान ॥४॥

१८६०. काळोखी खाऊन कैवाड केला धीर । आपुलिया हितें जाले जनामध्यें शूर ॥१॥ कां रे तुम्हीं नेणां कां तुम्हीं नेणां । अल्पसुखासाठीं पडशी विपत्तीचे घाणां ॥२॥ नाहीं ऐसी लाज काय तयांपें आगळें । काय नव्हे केलें आपुलिया बळें ॥३॥ तुका म्हणे तरी सुख अवघेंचि बरें । जतन करूं हीं आपुलालीं ढोरें ॥४॥

१८६१. जाय परते काय आणिला कांटाळा । बोला एक वेळा ऐसें तरी ॥१॥ कां हो केली तुम्ही निष्ठुरता देवा । मानेना हे सेवा करितों ते ॥२॥ भाग्यवंत त्यांसी सांगितल्या गोष्टी । तें नाहीं अदृष्टीं आमुचिया ॥३॥ तुका म्हणे तुम्हापासूनि अंतर । न पडे नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥४॥

१८६२. अनुभवें कळों येतें पांडुरंगा । रुसावें तें कां गा तुम्हांवरी ॥१॥ आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥२॥ अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । म्हणोनि अंतर तुझ्या पायीं ॥३॥ तुका म्हणे काय करूं नेणें वर्म । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ॥४॥

१८६३. तुजकरितां होतें आनाचें आन । तारिले पाषाण उदकीं देवा ॥१॥ कां नये कैवार करूं अंगीकार । माझा बहु भार जड जाला ॥२॥ चुकलासी म्हणों तरी जीवांचाही जीव । रिता नाहीं ठाव उरों दिला ॥३॥ तुका म्हणे ऐसें काय सत्ताबळ । माझें परी कृपाळ आम्हां तुम्ही ॥४॥

१६६४. फळ देंठींहून झडे । मग मागुतें न जोडे ॥१॥ म्हणउनि तांतडी खोटी । कारण उचिताचे पोटीं ॥२॥ पुढें चढे जरी हात । त्याग मागिलां उचित ॥३॥ तुका म्हणे रणीं । नये पाहो परतोनि ॥४॥

१८६५. आगी देखोनियां सती । अंगीं रोमांच उठती ॥१॥ हा तो नव्हे उपदेश । सुख

अंतरीं उल्हास ॥२। वित्तगोतांकडे। चित्त न घलीं न रडे ॥३॥ आठवूनि एका। उडी घाली म्हणे तुका ॥४॥

१८६६. फळ पिके देंठीं। निमित्य वारियाची भेटी ॥१। हा तों अनुभव रोकडा। कळों येतो खरा कुडा ॥२॥ तोडलियां बळें। वांयां जाती काची फळें ॥३॥ तुका म्हणे मन। तेथें सकळ कारण ॥४॥

१८६७. हालवुनि खुंट। आधीं करावा बळकट ॥१॥ मग तयाच्या आधारें। करणें तें अवघें बरें ॥२॥ सुखदुःख साहे। हर्षामर्षी भंगा नये ॥३॥ तुका म्हणे जीवें। आधीं मरोनि राहावें ॥४॥

१८६८. धांवे माते सोई। बाळ न विचारितां कांहीं ॥१॥ मग त्याचें जाणें निकें। अंग वोढवी कौतुकें ॥२॥ नेणें सर्प दोरी। आगी भलते हातीं धरी ॥३॥ तीविणें तें नेणें। आणीक कांही तुका म्हणे ॥४॥

१८६९. भोग द्यावे देवा। त्याग भोगींच बरवा ॥१॥ आपण व्हावें एकीकडे। देव कळेवरी जोडे ॥२॥ योजें यथाकाळें। उत्तम पाला कंद मुळें ॥३॥ वंचकासी दोष। तुका म्हणे मिथ्या सोस ॥४॥

१८७०. पायांच्या प्रसादें। कांहीं बोलिलों विनोदें ॥१। मज क्षमा करणें संतीं। नव्हे अंगभूत युक्ति ॥२॥ नव्हे हा उपदेश। तुमचें बडबडिलों शेष ॥३॥ तुमचे कृपेचें पोसणें। जन्मोजन्मीं तुका म्हणे ॥४।

१८७१. जायाचें अंगुलें लेतां नाहीं मान। शोभा नेदी जन हांसविलें ॥१॥ घुसळितां ताक कांडितां भूस। साध्य नाहीं क्लेश जाती वांयां ॥२॥ तुका म्हणे नाहीं स्वता भांडवल। भिकेचें तें फोल बीज नव्हे ॥३॥

१८७२. न बोलावें परी पडिला प्रसंग। हाकलितें जग तुझ्या नामें ॥१॥ लटिकेंचि सोंग मांडिला पसारा। भिकारी तूं खरा कळों आलें ॥२॥ निलाजिरीं आम्ही करोनियां धीर। राहिलों आधार धरूनियां ॥३॥ कैसा नेणों आतां करिसी शेवट। केली कटकट त्याची पुढें ॥४॥ तुका म्हणे कांहीं न बोलसी देवा। उचित हे सेवा घेसी माझी ॥५॥

१८७३. नाहीं जालें मोल कळे देतां काळीं। कोण पाहों बळी दोघांमध्ये ॥१॥ आम्ही तरी जालों जीवासी उदार। कैंचा हा धीर तुजपाशीं ॥२॥ बहु चाळविलें मागें आजिवरी। आतां पुढें हरी जाऊं नेदीं ॥३॥ नव्हती जों भेटी नामाची ओळखी। म्हणऊनि दुःखी बहु जालों ॥४॥ तुका म्हणे कांहीं राहों नेदीं बाकी। एक वेळां चुकी जाली आतां ॥५॥

१८७४. कैसा कृपाळु हें न कळसी देवा। न बोलसी सेवा घेसी माझी ॥१॥ काय ऐसें बळ

आहे तुजपाशीं । पाहों हरी घेसी कोणा आड ॥२॥ पाडियेला ठायीं तुझा थारा मारा । अवघा दातारा लपसी तो ॥३॥ आतां तुम्हां आम्हां उरी तोंचि बरें । काय हीं उत्तरें वाढवूनि ॥४॥ तुका म्हणे मज साह्य जाले संत । म्हणऊनि मात फावली हे ॥५॥

१८७५. चुकलियां आम्हां करितसां दंड । हक्कासी कां खंड पांडुरंगा ॥१॥ चाळविलीं एकें रिद्धिसिद्धीवरी । तैसा मी भिकारी नव्हें देवा ॥२॥ कां मी येथें गुंतों मांडूनि पसारा । मागुता दातारा दंभासाठीं ॥३॥ केलें म्यां जतन आपुलें वचन । ठायींचें धरून होतों पोटीं ॥४॥ तुका म्हणे ताळा घातला आडाखीं । ठावें होतें सेकीं आडविसी ॥५॥

१८७६. कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वक्रोक्ति स्तुती करूं ॥१॥ आम्ही तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी ते ॥२॥ अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुणा सच्चिता सर्वोत्तमा ॥३॥ चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवून । जालासी लाहान भक्तिकाजा ॥४॥ तुका म्हणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ॥५॥

१८७७. आतां तुझा भाव कळों आला देवा । ठकूनियां सेवा घेसी माझी ॥१॥ टाकूनि सांकडें आपुलिये माथां । घातला या संतांवरी भार ॥२॥ स्तुती करूनीयां पिटिला डांगोरा । तें कोण दातारा साच करी ॥३॥ जातींचे वाणी मी पोटींचें कुडें । नका मजपुढें ठकाठकीं ॥४॥ तुका म्हणे नाहीं आलें अनुभवा । आधींच मी देवा कैसा नाचूं ॥५॥

१८७८. जन पूजी याचा मज कां आभार । हा तुम्ही विचार जाणां देवा ॥१॥ पत्र कोण मानी वंदितील सिक्का । गौरव सेवका त्याचि मुळें ॥२॥ मी मीपणें होतों जनामधीं आधीं । कोणें दिलें कधीं काय तेव्हां ॥३॥ आतां तूं भोगितां सर्व नारायणा । नको आम्हां दीना पीडा करूं ॥४॥ आपुलिया हातें देसील मुशारा । तुका म्हणे खरा तोचि आम्हां ॥५॥

१८७९. आमची कां नये तुम्हासी करुणा । किती नारायणा आळवावें ॥१॥ काय जाणां तुम्ही दुर्बळाचें जिणें । वैभवाच्या गुणें आपुलिया ॥२॥ देती घेती करिती खटपटा आणिकें । निराळा कौतुकें पाहोनियां ॥३॥ दिवस बोटीं आम्हीं धरियेलें माप । वाहातों संकल्प स्वहिताचा ॥४॥ तुका म्हणे मग देसी कोण्या काळें । चुकुर दुर्बळें होतों आम्ही ॥५॥

१८८०. तुम्हां आम्हां तुटी होईल यावरी । ऐसें मज हरी दिसतसे ॥१॥ वचनाचा कांहीं न देखों आधार । करावा हा धीर कोठवरी ॥२॥ सारिलें संचित होतें गांठी कांहीं । पुढें ऋण तेंही नेदी कोणी ॥३॥ जावेंचि नलगे कोणाचिया घरा । उडाला पातेरा तुझ्या संगें ॥४॥ तुका म्हणे आम्हां हाचि लाभ जाला । मनुष्यधर्म गेला पांडुरंगा ॥५॥

१८८१. देव मजुर देव मजुर । नाहीं उजुर सेवेपुढें ॥१॥ देव गांढ्याळ देव गांढ्याळ । देखोनियां बळ लपतसे ॥२॥ देव तर काई देव तर काई । तुका म्हणे राई तरी मोठी ॥३॥

१८८२. देव दयाळ देव दयाळ । साहें कोल्हाळ बहुतांचा ॥१॥ देव उदार देव उदार । थोड्यासाठीं फार देऊं जाणे ॥२॥ देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ॥३॥

१८८३. देव बासर देव बासर । असे निरंतर जेथें तेथें ॥१॥ देव खोळंबा देव खोळंबा । मज झळंबा म्हुण कोंडी ॥२॥ देव लागट देव लागट । लाविलिया चट जीवीं जडे ॥३॥ देव बावळा देव बावळा । भावें जवळा लुडबुडी ॥४॥ देव न व्हावा देव न व्हावा । तुका म्हणे गोवा करी कामीं ॥५॥

१८८४. देव निढळ देव निढळ । मूळ नाहीं डाळ परदेशी ॥२ । देव अकुळी देव अकुळी । भलते स्थळीं सोयरिक ॥२॥ देव लिगाड्या देव लिगाड्या । तुका म्हणे भाड्या दंभें ठकी ॥३॥

१८८५. देव बराडी देव बराडी । घालीं देंठासाठीं उडी ॥१॥ देव भ्याड देव भ्याड । राखे बळींचे कवाड ॥२॥ देव भाविक देव भाविक । होय दासांचा सेवक ॥३॥ देव होया देव होया । जैसा म्हणे तैसा तया ॥४॥ देव लहान देव लहान । तुका म्हणे अनुरेण ॥५॥

१८८६. देव भला देव भला । मिळोनि जाय जैसा त्याला ॥१॥ देव उदार देव उदार । देतां नाही थोडें फार ॥२॥ देव बळी देव बळी । जोडा नाहीं भूमंडळीं ॥३॥ देव व्हावा देव व्हावा । आवडे तो सर्वां जीवां ॥४॥ देव चांगला देव चांगला । तुका चरणीं लागला ॥५॥

१८८७. देव पाहों देव पाहों । उंच ठायीं उभे राहों ॥१॥ देव देखिला देव देखिला । तो नाहीं कोणां भ्याला ॥२॥ देवासी कांहीं मागों मागों । जीव भाव त्यासी सांगों ॥३॥ देव जाणें देव जाणें । पुरवी मनींचिये खुणे ॥४ । देव कातर देव कातर । तुका म्हणे अभ्यंतर ॥५॥

१८८८. देव आमचा देव आमचा । जीव सकळ जीवांचा ॥१॥ देव आहे देव आहे । जवळी आम्हां अंतरबाहे ॥२॥ देव गोड देव गोड । पुरवी कोडाचेंही कोड ॥३॥ देव आम्हां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ॥४॥ देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ॥५॥

१८८९. जाऊं देवाचियां गांवां । देव देईल विसांवा ॥१॥ देवा सांगों सुखदुःख । देव निवारील भूक ॥२॥ घालूं देवासीच भार । देव सुखाचा सागर ॥३॥ राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ॥४॥ तुका म्हणे आम्ही बाळें । या देवाची लडिवाळें ॥५॥

१८९०. प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरी ॥१॥ प्रेमे यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ॥२॥ प्रेम पाठी लाग बळें । भक्त देखोनियां भोळे ॥३॥ प्रेम नवजे दडवितां । शिरे बळें जेथें कथा ॥४॥ तुका म्हणे थोर आशा । प्रेमा घरीं विष्णुदासां ॥५॥

१८९१. संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥१॥ तुम्ही कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥२॥ गोविलों थोरिवा । दुःख वाटतसे जीवा ॥३॥ तुका म्हणे माया । आवरा हे पंढरिराया ॥४॥

१८९२. नाहीं तुम्हीं केला । अंगीकार तो विठ्ठला ॥१॥ सोंगें न पवीजे थडी । माजी फुटकी सांगडी ॥२॥ प्रेम नाहीं अंगीं । भले म्हणविलें जगीं ॥३॥ तुका म्हणे देवा । मज वायां कां चाळवा ॥४॥

१८९३. आतां चक्रधरा । झणीं आम्हांस अव्हेरा ॥१॥ तुमचीं म्हणविल्यावरी । जैसीं तैसीं तरी हरी ॥२॥ काळ आम्हां खाय । तरी तुझें नाव जाय ॥३॥ तुका म्हणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ॥४॥

१८९४. मज ऐसें कोण उद्धरीलें सांगा । ब्रीदें पांडुरंगा बोलतसां ॥१॥ हातींच्या कांकणा कासया आरसा । उरलों मी जैसा तैसा आहें ॥२॥ धन्वंतरी हरी रोग्याचिये व्यथे । तें तों कांहीं येथें न देखिजे ॥३॥ तुका म्हणे नाहीं अनुभव अंगें । वचन वाउगें कोण मानी ॥४॥

१८९५. काय तें सामर्थ्य न चले या काळें । काय जाले बळ शक्तिहीन ॥१॥ माझिया संचितें आणिलासी हरी । जालें तुजवरी वरिष्ठ तें ॥२॥ काय गमाविली सुदर्शन गदा । त्या भेणें गोविंदा लाजतसां ॥३॥ तुका म्हणे काय ब्रीदाचे ते काम । सांडा परतें नाम दीनानाथा ॥४॥

१८९६. बळ बुद्धी वेचुनियां शक्ती । उदक चालवावें युक्ती ॥१॥ नाहीं चळण तया अंगीं । धांवें लवणामागें वेगीं ॥२॥ पाट मोट कळा । भरित पखाला सागळा ॥३॥ बीजा त्यासी द्यावें । तुका म्हणे तैसें व्हावें ॥४॥

१८९७. न म्हणे सान थोर । दुष्ट पापी अथवा चोर ॥१॥ सकळा द्यावी एकी चवी । तहान हरूनि निववी ॥२॥ न म्हणे दिवस राती । सर्व काळ सर्वां भूतीं ॥३॥ तुका म्हणे झारी । घेतां तांब्यानें खापरी ॥४॥

१८९८. इच्छा चाड नाहीं । न धरी संकोचही कांहीं ॥१॥ उदका नेलें तिकडे जावें । केलें तैसें सहज व्हावें ॥२॥ मोहरी कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस ॥३॥ तुका म्हणे सुख । पीडा इच्छा पावे दुःख ॥४॥

१८९९. तरले ते मागें आपुलिया सत्ता । कमाई अनंता करूनियां ॥१॥ उसणें फेडितां धर्म तेथें कोण । ते तुज अनन्य तुम्ही त्यांसी ॥२॥ मजऐसा कोण सांग वांयां गेला । तो तुम्हीं तारिला पांडुरंगा ॥३॥ तुका म्हणे नामासारखी करणी । न देखें हें मनीं समजावें ॥४॥

१९००. कवणाशी भांडों कोण माझें साहे । कोण मज आहे तुजविण ॥१॥ धरिलें उदास दुरदुरांतरें । सांडीं एकसरें केली माझी ॥२। आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनियां खोळबुंथी घेसी ॥३॥ तुका म्हणे एके गांवींची वसती । म्हणऊनि खंती वाटे देवा ॥४॥

१९०१. आळवितां कंठ शोकला भीतर । आयुष्य वेचे धीर नाहीं मना ॥१॥ अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दीनाच्या माहेरा पांडुरंगा ॥२॥ धन दिसे डोळा दगडाचे परी । भोग ते

शरीरीं विष जालें ॥३॥ चुकलों काय तें मज क्षमा करीं । आळिंगूनी हरी प्रेम द्यावें ॥४॥ अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरी सर्व काळ ॥५॥ तुका म्हणे माझे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ॥६॥

१९०२. नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥१॥ प्रेम प्रीतीचें बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥२॥ पदरीं घालीं पिळा । बाप निर्बळ साटी बाळा ॥३॥ तुका म्हणे भावें । भेणें देवें आकारावें ॥४॥

१९०३. भावाचिया बळें । आम्हीं निर्भर दुबळें ॥१॥ नाहीं आणिकाची सत्ता । सदा समाधान चित्ता ॥२॥ तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ॥३॥ एकछत्री राज । तुक्या पांडुरंगीं काज ॥४॥

१९०४. भावापुढें बळ । नाहीं कोणाचें सबळ ॥१॥ करी देवावरी सत्ता । कोण त्याहूनि परता ॥२॥ बैसें तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ॥३॥ तुका म्हणे राहे । तयाकडे कोण पाहे ॥४॥

१९०५. सत्ता वर्ते मन । पाळी विठ्ठलाची आण ॥१॥ आज्ञा वाहोनियां शिरीं । सांगितलें तेंचि करीं ॥२॥ सरलीसे धांव । नलगे वाढवावी हांव ॥३॥ आहे नाहीं त्याचें । तुका म्हणे कळे साचें ॥४॥

१९०६. खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ॥१॥ आतां चुकली खटपट । झाड्यापाड्याचा बोभाट ॥२॥ आहे नाहीं त्याचें । आम्हां काम सांगायाचें ॥३॥ तुका म्हणे चिंता । भार वाहे तुझ्या माथां ॥४॥

१९०७. आतां बरें जालें । माझे माथांचें निघालें ॥१॥ चुकली हे मरमर । भार माथाचे डोंगर ॥२॥ नसतां कांही जोडी । केली बहुतें तडातोडी ॥३॥ जाला झाडापाडा । तुका म्हणे गेली पीडा ॥४॥

१९०८. संचितचि खावें । पुढें कोणाचें न घ्यावें ॥१॥ आतां पुरे हे चाकरी । राहों बैसोनियां घरीं ॥२॥ नाहीं कामा हातीं । आराणूक दिवसराती ॥३॥ तुका म्हणे सत्ता । आतां पुरे पराधीनता ॥४॥

१९०९. ज्याचे गांवीं केला वास । त्यासी नसावें उदास ॥१॥ तरीच जोडिलें तें भोगे । कांहीं आघात नलगे ॥२॥ वाढवावी थोरी । मुखें म्हणे तुझे हरी ॥३॥ तुका म्हणे हे गोमटी । दासा न घालावी तुटी ॥४॥

१९१०. माझा तुम्ही देवा केला अंगीकार । हें मज साचार कैसें कळे ॥१॥ कांहो कांहीं माझ्या नये अनुभवा । विचारितां देवा आहें तैसा ॥२॥ लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्नभार दु:खाचा हा ॥३॥ तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ॥४॥

१९११. तोंडें बोलावें तें तरी वाटे खरें । जीवेंयेर येरें वंचिजे ना ॥१॥ हें तुम्हां सांगणें

काय उगवूनि । जावें समजोनि पांडुरंगा ॥२॥ जेवित्याची खूण वाढित्या अंतरीं । प्रीतीनें हे धरी चाली तेथें ॥३॥ तुका म्हणे बहु परीचे आदर । अत्यंत वेव्हार संपादणी ॥४॥

१९१२. न पालटे एक । भक्त भोळाचि भाविक ॥१॥ येरां नास आहें पुढें । पुण्य सरतां उघडें ॥२॥ नेणे गर्भवास । एक विष्णूचाचि दास ॥३॥ तुका म्हणे खरें । नाम विठोबाचें बरें ॥४॥

१९१३. मना एक करीं । म्हणे मी जाईन पंढरी । उभा विटेवरी । तो पाहेन सांवळा ॥१॥ करीन सांगसी तें काम । जरी जपसी हें नाम । नित्य वाचे राम । हरि कृष्ण गोविंद ॥२॥ लागे संतांचियां पायां । कथे उल्हास गावया । आलों मागावया । शरण देईं उचित ॥३॥ नाचें रंगीं वाहे टाळी । होय सादर ते काळीं । तुका म्हणे मळी । सांडूनियां अंतरींची ॥४॥

१९१४. न राहे क्षण एक वैकुंठीं । क्षीरसागर त्रिपुटीं । जाय तेथें दाटी । वैष्णवांची धांवोनि ॥१॥ भाविक गे माये भोळें गुणाचें । आवडे तयाचें नाम घेतां तयासी ॥२॥ जो नातुडे कवणिये परी । तपें दानें व्रतें थोरी । म्हणतां वाचे हरी । राम कृष्ण गोविंदा ॥३॥ चौदा भुवनें जया पोटीं । तो राहे भक्ताचिये कंठीं । करूनियां साटी । चित्त प्रेम दोहींची ॥४॥ जया रूप ना आकार । धरी नाना अवतार । घेतलीं हजार । नांवें ठेवूनि आपणां ॥५॥ ऐसा भक्तांचा हा ऋणी । पाहतां आगमीं पुराणीं । नाहीं तुका म्हणे ध्यानीं । तो कीर्तनीं नाचतसे ॥६॥

१९१५. स्वल्प वाटे चला जाऊं । वाचे गाऊं विठ्ठल ॥१॥ तुम्ही आम्ही खेळीमेळीं । गदारोळी आनंदें ॥२॥ ध्वजा कुंचे गरुडटके । शृंगार निके करोनि ॥३॥ तुका म्हणे हेचि नीट । जवळी वाट वैकुंठा ॥४॥

१९१६. आनंदाच्या कोटी । सांठवल्या आम्हां पोटीं ॥१॥ प्रेम चालिला प्रवाहो । नाम ओघ लवलाहो ॥२॥ अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ॥३॥ थडी अहिक्य परत्र । तुका म्हणे समतीर ॥४॥

१९१७. चाहाडाची माता । व्यभिचारीण तत्वता ॥१॥ पाहे संतांचें उणें । छिद्र छळावया सुनें ॥२॥ जाणों त्याच्या बाचें । कांहीं सोडिलें गांठीचें ॥३॥ तुका म्हणे घात । व्हावा ऐसी जोडी मात ॥४॥

१९१८. सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥१॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंके जन ॥२॥ विंचु हाणी नांगी । अग्र लावी आणिकां अंगीं ॥३॥ तुका म्हणे जाती । नरका पाउलीं चालती ॥४॥

१९१९. खडा रवाळी साकर । जाला नामाचाचि फेर । न दिसे अंतर । गोडी ठायीं निवडतां ॥१॥ तुम्ही आम्ही पांडुरंगा । भिन्न ऐसें काय सांगा । चाळविलें जगा । मी हें माझें यासाठीं ॥२॥ पायीं हातीं नाकीं शिरीं । हेम राहे अळंकारीं । मुसे आल्यावरी । काय निवडे वेगळें ॥३॥

निजलिया लाभ हानी। तोंच खरी ते स्वप्नीं। तुका म्हणे दोन्ही। निवारलीं जागतां ॥४॥

१९२०. आम्हीं जाणों तुझा भाव। कैंचा भक्त कैंचा देव। बीजा नाहीं ठाव। कैंचें फळ शेवटीं ॥१॥ संपादिलें बहु रूप। कैंचें पुण्य कैंचें पाप। नव्हतों आम्ही आप। आपणासी देखिलें ॥२॥ एके ठायीं घरिच्याघरीं। न कळतां जाली चोरी। तेथेंचि तें दुरी। जाणें येणें खुंटलें ॥३॥ तुका म्हणे धरूनि हातीं। उरी ठेविली मागुती। एकांतीं लोकांतीं। देवभक्तसोहळा ॥४॥

१९२१. कांहीं बोलिलों बोबडें। मायबापा तुम्हांपुढें। सलगी लाडें कोडें। मज क्षमा करावी ॥१॥ काय जाणावा महिमा। तुमचा म्या पुरुषोत्तमा। आवडीनें सीमा। सांडविली मज हातीं ॥२॥ घडे अवज्ञा सख्यत्वें। बाळें बापासी न भ्यावें। काय म्यां सांगावें। आहे ठावें तुम्हांसी ॥३॥ तुका म्हणे देवा। प्रेम लोभ न संडावा। पाळिला पाळावा। लळा पुढती आगळा ॥४॥

१९२२. बहु भितो जाणपणा। आड न यो नारायणा। घेईन प्रेमपान्हा। भक्तिसुख निवाडें ॥१॥ यासी तुळे ऐसें कांहीं। दुजें त्रिभुवनीं नाही। काला भात दहीं। ब्रह्मादिकां दुर्लभ ॥२॥ निमिषार्ध संतसंगती। वास वैकुंठी कल्पांतीं। मोक्षपदें येती। ते विश्रांती बापुडी ॥३॥ तुका म्हणे हेंचि देईं। मीतूंपणा खंड नाहीं। बोलिलें त्या नाहीं। अभेदाची आवडी ॥४॥

१९२३. देवा आतां ऐसा करीं उपकार। देहाचा विसर पाडीं मज ॥१॥ तरीच हा जीव सुख पावे माझा। बरें केशीराजा कळों आलें ॥२॥ ठाव देईं चित्ता राखें पायांपाशी। सकळ वृत्तींसी अखंडित ॥३॥ आस भय चिंता लाज काम क्रोध। तोडावा संबंध यांचा माझा ॥४॥ मागणें तें एक हेंचि आहे आतां। नाम मुखीं संतसंग देईं ॥५॥ तुका म्हणे नको वरपंग देवा। घेईं माझी सेवा भावशुद्ध ॥६॥

१९२४. तुज न करितां काय नव्हे एक। हे तों सकळिक संतवाणी ॥१॥ घेईं माझा भार करीं कइवार। उतरीं हा पार भवसिंधु ॥२॥ उचित अनुचित पापपुण्यकाला। हा तों नये मला निवडितां ॥३॥ कुंठित राहिली बोलतां बोलतां। पार न पवतां वाणी पुढें ॥४॥ पुसतांही कोणा न कळे हें गुज। राखें आतां लाज पांडुरंगा ॥५॥ तुका म्हणे बहु पाहिलें या जीवें। वर्म जालें ठावें नाम तुझें ॥६॥

१९२५. मज त्याची भीड नुल्लंघवे देवा। जो म्हणे केशवा दास तुझा ॥१॥ मज आवडती बहु तैसे जन। करिती कीर्तन कथा तुझी ॥२॥ सांडूनियां लाज नाचेन त्यांपुढें। आइकती कोडें नाम तुझें ॥३॥ नलगे उपचार होईन भिकारी। वैष्णवांच्या घरीं उष्टावळी ॥४॥ तुका म्हणे जाणो उचित अनुचित। विचारूनि हित तेंचि करूं ॥५॥

१९२६. जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती। चालविसी हातीं धरूनियां ॥१॥ चालों वाटे आम्ही तुझाचि आधार। चालविसी भार सवें माझा ॥२॥ बोलों जातां बरळ करिसी तें नीट। नेली

लाज धीट केलों देवा ॥३॥ अवघे जन मज जाले लोकपाळ । सोईरे सकळ प्राणसखे ॥४॥ तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥५॥

१९२७. तुझे पाय माझे राहियले चित्तीं । ते मज दाविती वर्म देवा ॥१॥ आम्हां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चालवितां ॥२॥ मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ॥३॥ पापपुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुणें शरीर सांडियेलें ॥४॥ तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥५॥

१९२८. जालें पीक आम्हां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख ॥१॥ जाली आराणूक अवघियांपासून । अवघा गेला सीणभाग आतां ॥२॥ अवघा जाला आम्हां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ॥३॥ अवघेचि आम्ही ल्यालों अळंकार । शोभलोंहि फार अवघ्यांवरी ॥४॥ तुका म्हणे आम्ही सदैवाचे दास । करणें नलगे आस आणिकांची ॥५॥

१९२९. साधनें आमुचीं आज्ञेचीं धारकें । प्रमाण सेवकें स्वामिसत्ता ॥१॥ प्रकाशिलें जग आपुल्या प्रकाशें । रवि कर्म रसें अलिप्त त्या ॥२॥ सांगणें तें नाहीं करणें आपण । मोलाही वचन वाढ जालें ॥३॥ तुका म्हणे आम्हां भांडवल हातीं । येरझार खाती केवटिये ॥४॥

१९३०. शुभ जाल्या दिशा अवघाचि काळ । अशुभ मंगळ मंगळाचें ॥१॥ हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजे कैसी आहे तेही ॥२॥ सुखदु:खाहूनि नाहीं विपरीत । देतील आघात हित फळें ॥३॥ तुका म्हणे आतां आम्हांसी हे भले । अवघेचि जाले जीव जंत ॥४॥

१९३१. पाप पुण्य दोन्ही वाहाती मारग । स्वर्गनर्कभोग यांचीं पेणीं ॥१॥ एका आड एक नलगे पुसावें । जेविल्या देखावें मागें भूक ॥२॥ राहाटीं पडिलीं भरोनियां रितीं । होतील मागुतीं येतीं जातीं ॥३॥ तुका म्हणे आम्ही खेळतों या मधीं । नाहीं केली बुद्धि स्थिर पाहों ॥४॥

१९३२. आमुची जिवलगें सज्जन सोयरीं । नांदतील तीरीं भिवरेच्या ॥१॥ तींच माझ्या चित्तीं वसती दिवसराती । भेटावया खंती वाटतसे ॥२॥ संपदा सोहळे सर्व सुख वसे । वैकुंठीं जें नसे सुरवरासी ॥३॥ ज्याच्या नामें पाप दु:ख नासे भय । विठ्ठल बाप माय रखुमाई ॥४॥ माझा जीव जीतो अमृत ते कळा । कंठीं वेळोवेळां ध्यात असें ॥५॥ तुका म्हणे वाट पाहतां शिणलें । त्या पंथें डोळुलें पंढरीच्या ॥६॥

१९३३. न्यावयासी मूळ पाठवील कधीं । मज कृपानिधि पांडुरंग ॥१॥ प्राण फुटे माझा त्याचिया वियोगें । घडी जाय युगें येकी येकी ॥२॥ त्याचिये गांवींची आवड ती जीवा । जीव हा सांडावा वोवाळुनी ॥३॥ दिनो दिन चिंता वाटते बहुत । नावडे संचित करावेंसें ॥४॥ तुका म्हणे आतां आहे तेंचि सरो । कोण करी भरोवरी मग ॥५॥

१९३४. पाळिला विध तो आजि फळा आला। ऐसा हा कळला साच भाव ॥१॥ नामाची आवडी लागलीसे चित्ता। पाय आठवितां सुख वाटे ॥२॥ धरिल्या देहाचें साधलें कारण। पुढिल्या खंडण गर्भवासा ॥३॥ तुका म्हणे लाभ झाला एकसरें। आणिक दुसरें नाहीं आतां ॥४॥

१९३५. हित तेंचि एक राम कंठीं राहे। नाठविती देहभाव देही ॥१॥ हाचि एक धर्म निज बीज वर्म। हेंचि जाळी कर्में केलीं महा ॥२॥ चित्त राहे पायीं रूप बैसे डोळां। जीवें कळवळा आवडीचा ॥३॥ अखंड न खंडे अभंग न भंगे। तुका म्हणे गंगे मिळणी सिंधु ॥४॥

१९३६. माझीये जातीचें मज भेटो कोणी। आवडीची धणी फेडावया ॥१॥ आवडे ज्या हरि अंतरापासूनि। ऐसियांचे मनीं आर्त माझें ॥२॥ तयालागीं जीव होतो कासावीस। पाहातील वास नयन हे ॥३॥ सुफळ हा जन्म होईल तेथून। देतां आलिंगन वैष्णवांसी ॥४॥ तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा। गाऊं या गोपाळा धणीवरि ॥५॥

१९३७. आमुचें जीवन हें कथा अमृत। आणिकही संत समागम ॥१॥ सारूं एके ठायीं भोजन परवडी। स्वादरसें गोडी पदोपदीं ॥२॥ धालिया ढेंकर येती आनंदाचें। वोसंडलें वाचे प्रेमसुख ॥३॥ पिकलें स्वरूप आलिया घुमरी। रासी ते अंबरीं न समाये ॥४॥ मोजितां तयाचा अंत नाहीं पार। खुंटला व्यापार तुका म्हणे ॥५॥

१९३८. जोडिलें तें आतां न सरे सारितां। जीव बळी देतां हाता आलें ॥१॥ संचित सारूनि बांधिलें धरणें। तुंबिलें जीवन अक्षेपे हें ॥२॥ शीत उष्ण तेथें सुखदुःख नाहीं। अंतर सबाहीं एक जालें ॥३॥ बीज तो अंकुर पत्र शाखा फळ। प्राप्तबीज मूळ अवघें नासे ॥४॥ तुका म्हणे नामीं राहिलीसे गोडी। बीजाच्या परवडी होती जाती ॥५॥

१९३९. भक्तिभावें आम्हीं बांधिलासे गांठी। सादावितों हाटीं घ्या रे कोणी ॥१॥ सुखाचिया पेठे घातला दुकान। मांडियेले वान रामनाम ॥२॥ सुखाचें फुकाचें सकळांचें सार। तरावया पार भवसिंधु ॥३॥ मागें भाग्यवंत जाले थोर थोर। तिहीं केला फार हाचि सांटा ॥४॥ खोटें कुडे तेथें नाहीं घातपात। तुका म्हणे चित्त शुद्ध तरी ॥५॥

१९४०. पर्जन्यें पडावें आपुल्या स्वभावें। आपुलाल्या दैवें पिके भूमि ॥१॥ बीज तेंचि फळ येईल शेवटीं। लाभहानि तुटी ज्याची तया ॥२॥ दीपाचिये अंगीं नाहीं दुजा भाव। धणी चोर साव सारिखेचि ॥३॥ काउळें ढोंपरा कंकर तित्तिरा। राजहंसा चारा मुक्ताफळें ॥४॥ तुका म्हणे येथें आवडी कारण। पिकला नारायण जयां तैसा ॥५॥

१९४१. धीर तो कारण एकविध भाव। पतिव्रते नाहो सर्वभावें ॥१॥ चातक हे जळ न पाहाती दृष्टी। वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥२॥ सूर्यविकासिनी नेघे चंद्रामृत। वाट पाहे अस्त उदयाची ॥३॥ धेनु येऊं नेदी जवळी आणिकां। आपुल्या बाळकाविण वत्सा ॥४॥ तुका म्हणे

नेम प्राणांसवसाटी । तरीच या गोष्टी विठोबाची ॥५॥

१९४२. देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥१॥ थोर असे दगा जाला त्यासी हाटीं । सोडोनियां गांठी चोरी नेली ॥२॥ गांठीचें जाऊनि नव्हे तो मोकळा । बांधविलासे गळा दंभलोभें ॥३॥ पुढिल्या उदिमा जालेंसे खंडण । दिसे नागवण पडे गांठी ॥४॥ तुका म्हणे ऐसे बोलतील संत । जाणूनियां घात कोण करी ॥५॥

१९४३. जिकडे जाय तिकडे सवें । आतां यावें यावरी ॥१॥ माझ्या अवघ्या भांडवला । तूं एकला जालासी ॥२॥ आतां दुजें धरा झणी । पायांहूनि वेगळें ॥३॥ तुका म्हणे आतां देवा । नका गोवा यावरी ॥४॥

१९४४ स्मरतां कां घडे नास । विष्णुदास यावरी ॥१॥ ऐसी सीमा जाली जगीं । तरी मी वेगीं अनुसरलों ॥२॥ धरिलें तें निवडे आतां । न घडे चित्ता वेगळें ॥३॥ तुका म्हणे नाश नाहीं । पुराणेंही गर्जती ॥४॥

१९४५. आधीं नाहीं कळों आला हा उपाय । नाहीं तरी काय चुकी होती ॥१॥ घालितों पायांसी मिठी एकसरें । नेदी तों दुसरें आड येऊं ॥२॥ कासया पडितों लटिक्याचे भरी । नव्हता कां शिरीं भार घेतों ॥३॥ संसाराचा हाटक फिरतों दुकानें । भरोवरी धन मेळवितों ॥४॥ तुका म्हणे कां हे घेतों गर्भवास । कां या होतो दास कुटुंबाचा ॥५॥

१९४६. आतां बरें जालें । माझें मज कळों आलें ॥१॥ खोटा ऐसा संसार । मज पायीं द्यावी थार ॥२॥ उघडल्या डोळे । भोग देताकाळीं कळे ॥३॥ तुका म्हणे जीवा । होतां तडातोडी देवा ॥४॥

१९४७. बोलिलों ते धर्म अनुभव अंगें । काय पांडुरंगें उणें केलें ॥१॥ सर्व सिद्धि पायीं वोळगती दासी । इच्छा नाहीं ऐसी व्हावें काहीं ॥२॥ संतसमागमें अळंकारूं वाणी । करूं हे पेरणी शुद्ध बीजें ॥३॥ तुका म्हणे रामकृष्णनामें गोड । आवडीचें कोड माळ ओऊं ॥४॥

१९४८. ज्याचे माथां जो जो भार । तोचि फार तयासी ॥१॥ मागें पुढें अवघें रितें । कळों येतें अनुभवें ॥२॥ परिसा अंगीं अमुप सोनें । पोटीं हीन धातूचें ॥३॥ आपुला तो करी धर्म । जाणे वर्म तुका तें ॥४॥

१९४९. निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपुलीं तीं फळें न संडीच ॥१॥ तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करूनि सांडी ॥२॥ परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ॥३॥ तुका म्हणे वेळू चंदना संगतीं । काय ते असती जवळिकें ॥४॥

१९५०. दुबळें सदैवा । म्हणे नागवेल केव्हां ॥१॥ आपणा ऐसें करूं पाहे । स्वभावासी करिल काय ॥२॥ मूढ सभे आंत । इच्छी पंडिताचा घात ॥३॥ गांढ्या

देखुनि शूर । उगीच करी बुरबुर ॥४॥ आणिकांचा हेवा । करीं शरण जाईं देवा ॥५॥ तुका म्हणे किती । करूं दुष्टाची फजिती ॥६॥

१९५१. माझी आतां लोक सुखें निंदा करू । म्हणती विचारू सांडियेला ॥१॥ कारण होय तो करीन विचार । काय भीड भार करूं देवा ॥२॥ तुका म्हणे काय करूं लापणिक । जनाचार सुख नासिवंत ॥३॥

१९५२. ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला साधु तैसा ॥१॥ ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥२॥ डांकाचे संगती सोनें हीन जालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥३॥ विषाने पक्कान्नें गोड कडू जालीं । कुसंगानें केलीं तैसी परी ॥४॥ भावें तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा ॥५॥

१९५३. नामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म । त्याचा भवश्रम निवारला ॥१॥ आणिकें दुरावली करितां खटपट । वाउगे बोभाट वर्मावि‍ण ॥२॥ रामनामीं जिहीं धरिला विश्वास । तिहीं भवपाश तोडियेले ॥३॥ तुका म्हणे केलें कळिकाळ ठेंगणें । नामसंकीर्तनें भाविकांनीं ॥४॥

१९५४. वैष्णवांची कीर्ति गाईली पुराणीं । साही अठरा जणीं चहूं वेदीं ॥१॥ ऐसे कोणी दावा ग्रंथांचे वाचक । कर्मठ धार्मिक पुण्यशील ॥२॥ आदिनाथ शंकर नारद मुनीश्वर । शुका ऐसा थोर आणिक नाहीं ॥३॥ तुका म्हणे मुगुटमणी हरि भक्ति । आणिक विश्रांति आरतिया ॥४॥

१९५५. बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुम्हां ठावें जातिकुळ ॥१॥ करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरी ॥२॥ वाचेचा चाळक जाला दावी वर्म । उचित ते धर्म मजपुढें ॥३॥ तुका म्हणे पुढें अपराध नेणतां । द्यावा मज आतां ठाव पायीं ॥४॥

१९५६. संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं पर्वरीं लोळतसें ॥१॥ चरणींचे रज लागती अंगास । तेणें बेताळीस उद्धरती ॥२॥ उच्छिष्ट हें जमा करूनि पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ॥३॥ तुका म्हणे मी आणीक विचार । नेणें हेंचि सार मानीतसें ॥४॥

१९५७. एक शेर अन्ना चाड । येर वाउगी बडबड ॥१॥ कां रे तृष्णा वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ॥२॥ औट हात तुझा जागा । येर सिणसी वाउगा ॥३॥ तुका म्हणे श्रम । एक विसरतां राम ॥४॥

१९५८. आलें भरा येच पेंठे । पुढें मागुतें न भेटे ॥१॥ होसी फजीती वरपडा । लक्ष चौऱ्यासीचे वेढां ॥२॥ नाहीं कोणाचा सांगात । दुःख भोगितां आघात ॥३॥ एका पाउलाची वाट । कोणा सांगावा बोभाट ॥४॥ जुंतिजेसी घाणां । नाहीं मारित्या करुणा ॥५॥ तुका म्हणे हित पाहे । जोंवरि हें हातीं आहे ॥६॥

१९५९. लाभ जाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी । मनुष्यदेहा ऐसी । उत्तम जोडी जोडिली ॥१॥ घेईं हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें । जालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा ॥२॥ घेउनि माप हातीं । काळ मोवी दिवस राती । चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ॥३॥ हित सावकासें । म्हणे करीन तें पिसें । हातीं काय ऐसें । तुका म्हणे नेणसी ॥४॥

१९६०. सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ॥१॥ मनें धरिला अभिळास । मिठी घातली पायांस ॥२॥ होतां दृष्टादृष्टीं । ताप गेला उठाउठी ॥३॥ तुका म्हणे जाला । लाभें लाभ दुणावला ॥४॥

१९६१. झरा लागला सुखाचा । ऐसा मापारी कइंचा ॥१॥ जो हें माप तोंडें धरी । सळे जाली ते आवरी ॥२॥ जाले बहु काळ । कोणा नाहीं ऐसें बळ ॥३॥ तुका म्हणे तळ । नाहीं पाहेसा सकळ ॥४॥

१९६२. आम्ही बोलों तें तुज कळे । एक दोहीं ठायीं खेळे ॥१॥ काय परिहाराचें काम । जाणे अंतरींचें राम ॥२॥ कळोनियां काय चाड । माझी लोकांसी बडबड ॥३॥ कारण सवें एका । अवघें आहे म्हणे तुका ॥४॥

१९६३. उमटे तें ठायीं । तुझे निरोपावें पायीं ॥१॥ आम्हीं करावें चिंतन । तुझें नामसंकीर्तन ॥२॥ भोजन भोजनाच्या काळीं । मागों करूनियां आळी ॥३॥ तुका म्हणे माथां । भार तुझ्या पंढरिनाथा ॥४॥

१९६४. केला पण सांडी । ऐसीयासी म्हणती लंडी ॥१॥ आतां पाहा विचारून । समर्थासी बोले कोण ॥२॥ आपला निवाड । आपणचि करितां गोड ॥३॥ तुम्हीं आम्हीं देवा । बोलिला बोल सिद्धी न्यावा ॥४॥ असे धुरे उणें । मागें सरे तुका म्हणे ॥५॥

१९६५. न व्हावें तें जालें । तुम्हां आम्हांसी लागलें ॥१॥ आतां हालमाकलमें । भांडोनियां काढूं वर्में ॥२॥ पाटोळ्यासंवसाटी । दिली रगट्याची गांठी ॥३॥ तुका म्हणे हारी । आणूनिया करिन सरी ॥४॥

१९६६. पतित मिरासी । ते म्यां धरिलें जीवेंसी ॥१॥ आतां बळिया सांग कोण । ग्वाही तुझें माझें मन ॥२॥ पावनाचा ठसा । दावीं मज तुझा कैसा ॥३॥ तुका म्हणे वाव जालें । रोख पाहिजे दाविलें ॥४॥

१९६७. करितां वेरझारा । उभा न राहासी वेव्हारा ॥१॥ हें तों झोंडाईचे चाळे । काय पोटीं तें न कळे ॥२॥ आरोगुनी मुग । बैसलासी जैसा बग ॥३॥ तुका म्हणे किती । बुडविलीं आळवितीं ॥४॥

१९६८. नाहीं देणें घेणें । गोवी केली अभिमानें ॥१॥ आतां कां हो निवडूं नेदां ।

पांडुरंगा येवढा धंदा ॥२॥ पांचांमधीं जावें । थोड्यासाठीं फजित व्हावें ॥३॥ तुज ऐसीं नाहीं । पांडुरंगा आम्हीं कांहीं ॥४॥ टाकूं तो वेव्हार । तुज बहु करकर ॥५॥ तुका म्हणे आतां । निवडूं संतां हे देखतां ॥६॥

१९६९. सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥१॥ नको पृथकाचे भरी । पडों एक सार धरीं ॥२॥ पाणचोऱ्याचें दार । वरिल दाटावें ते थोर ॥३॥ वश जाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ॥४॥ एक आतुडे चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ॥५॥ तुका म्हणे धांवा । आहे पंढरी विसावा ॥६॥

१९७०. करूं याची कथा नामाचा गजर । आम्हां संवसार काय करी ॥१॥ म्हणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें । कांपे तया भेणें कळिकाळ ॥२॥ आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ॥३॥ तुका म्हणे करूं ऐसियाचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥४॥

१९७१. काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ॥१॥ अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईट ॥१॥ काय उंदीर नाहीं धांवीं । राख न लावी गाढव ॥३॥ तुका म्हणे सुसर जळीं । काउळी कां न न्हाती ॥४॥

१९७२. मदें मातलें तें नागवेंचि नाचे । अनुचित वाचे बडबडी ॥१॥ आतां शिकवावा कोणासी विचार । कर्म तें दुस्तर करवी धीट ॥२॥ आलें अंगासी तें बळिवंत गाढें । काय वेड्यापुढें धर्मनीत ॥३॥ तुका म्हणे कळों येईल तो भाव । अंगावरि घाव उमटतां ॥४॥

१९७३. भाविकां हें वर्म सांपडलें निकें । सेविती कवतुकें धणीवरि ॥१॥ इच्छितील तैसा नाचे त्यांचें छंदें । वंदितील पदें सुकुमारें ॥२॥ विसरलें मुक्ती भक्तिच्या अभिळासें । ओढत सरिसें सुख आलें ॥३॥ तुका म्हणे नाहीं मागायाची आस । पांडुरंग त्यांस विसंबेना ॥४॥

१९७४. भक्त समागमें सर्व भावें हरी । सर्व काम करी न सांगतां ॥१॥ सांठवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥२॥ मागण्याची वास पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥३॥ तुका म्हणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मागती ॥४॥

१९७५. परमअमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ॥१॥ सकळही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥२॥ सकळ इंद्रियें जालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप माजी तया ॥३॥ तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥४॥

१९७६. कासया गुणदोष पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥१॥ काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥२॥ नष्टदुष्टपण कवणाचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥३॥ कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळां आपुलिये ॥४॥ तुका म्हणे मी या भांडवलें पुरता । तुजसी पंढरीनाथा लावियेलें ॥५॥

१९७७. काळ जवळचि उभा नेणां । घाली झांपडी खुंटी कानां ॥१॥ कैसा हुशार सावध राहीं । आपुला तूं आपुले ठायीं ॥२॥ काळ जवळिच उभा पाहीं । नेदि कोणासि देऊं कांहीं ॥३॥ काळें पुरविली पाठी । वरुषें जालीं तरी साठी ॥४॥ काळ भोंवताला भोंवे । राम येऊं नेदी जिव्हे ॥५॥ तुका म्हणे काळा । कर्म मिळे तें तें जाळा ॥६॥

१९७८. दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्यलाभ पुण्य त्याचें ॥१॥ धन्य ऐसा परउपकारी । जाय नरका आणिकां वारि ॥२॥ मळ खाये संवदणी । करी आणिकांची उजळणी ॥३॥ तुका म्हणे त्याचा । प्रीती आदर करा साचा ॥४॥

१९७९. साहोनि टांकीघाये । पाषाण देवचि जाला पाहें ॥१॥ तया रीती दृढ मन । करीं साधाया कारण ॥२॥ बाण शस्त्र साहोनि गोळी । शूरां ठाव उंच स्थळीं ॥३॥ तुका म्हणे सती । अग्र न देखे ज्या रीती ॥४॥

१९८०. तेणें वेशें माझीं चोरिलीं अंगें । मानावया जग आप्तपणें ॥ नाहीं चाड भीड संसाराचें कोड । उदासीन सर्व गुणें ॥ भय मोह लज्जा निरसली शंका । अवघियां एकचिपणें ॥ विठ्ठलाच्या पायीं बैसोनि राहिली । भागली नुठित तेणें ॥१॥ आतां त्यांसीं काय चाले माझें बळ । जालोंसें दुर्बळ सत्त्वहीन ॥ दग्ध पट दिसे संगीत बरवंट । काय त्याचें कारण ॥२॥ आळस दृष्टी न पाहे आपुलें । एकचि देखिलें सर्वरूप ॥ मानामान तेथें खुंटोनि राहिलें । पिशुन तो कोण बाप ॥ ज्योति ना अंधार अवघा एकंकार । तेथें काय पुण्यपाप ॥ विठ्ठलावांचुनि कांहींच नावडे । वेगळ्याला भावें रूप ॥३॥ बळबडिवार लौकिक वेव्हार । गेली आशा तृष्णा माया ॥ सुखदुःखाची वार्ता नाइके । अंतरलों दुरी तया ॥ मीतूंपणा निष्काम होऊनि । राहिलों आपुलिया ठाय ठायां । तुजविण आतां मज नाहीं कोणी । तुका म्हणे देवराया ॥४॥

१९८१. कथा पुराण ऐकतां । झोपें नाथिलें तत्त्वता । खाटेवरि पडतां । व्यापी चिंता तळमळ ॥१॥ ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती । जाले जाणते जे चित्तीं । कांहीं नेघे आपुल्या ॥२॥ उदक लावितां न धरे । चिंता करी केव्हां सरे । जाऊं नका धीरें । म्हणे करितां टवाळ्या ॥३॥ जवळी गोंचिड क्षीरा । जैसी कमळणी दर्दुरा । तुका म्हणे दुर । देशत्यागे तयासी ॥४॥

१९८२. संदेह बाधक आपआपणातें । रज्जुसर्पवत भासतसे ॥ भेऊनियां काय देखिलें येणें । मारें घायेंविण लोळतसे ॥१॥ आपणचि तारी आपणचि मारी । आपण उद्धरी आपणयां ॥ शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारूनि पाहें मोकळिया ॥२॥ पापपुण्य कैसे भांजिले अंक । दशकाचा एक उरविला । जाणोनियां काय होतोसि नेणता । शून्या ठाव रिता नाहीं नाहीं ॥३॥ दुरा दृष्टी पाहें न्याहाळूनि । मृगजळा पाणी न म्हणे चाडा । धांवतांचि फुटे नव्हे समाधान । तुका म्हणे जाण पावे पीडा ॥४॥

१९८३. कथे उभा अंग राखेल जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा ॥१॥ येथें तो पातकी न येताच भला । रणीं कुचराला काय चाले ॥२॥ कथे बैसोनी आणीका चर्चा । धिग त्याची वाचा कुंभपाक ॥३॥ तुका म्हणे ऐलपैल ते थडीचे । बुडतील साच मध्यभागीं ॥४॥

१९८४. नावडे ज्यां कथा उठोनियां जाती । ते यमा फावती बरे वोजा ॥१॥ तो असे जवळी गोंचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठाय तया दुरी ॥२॥ नव्हे भला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ॥३॥ तुका म्हणे तया करावें तें काई । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥४॥

१९८५. जवळी नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥१॥ कैसा पाहे चंद्रीदृष्टी । दीप स्नेहाच्या शेवटीं ॥२॥ कांतेलेंसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥३॥ त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका म्हणे ॥४॥

१९८६. दुर्बळा वाणीच्या एक दोन सिद्धि । सदैवा समाधि विश्वरूपीं ॥१॥ काय त्याचें वांयां गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्वकाळ ॥२॥ तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ॥३॥ तुका म्हणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ॥४॥

१९८७. परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें । आणीक नांवांचीं थोडीं । एक तीं कांतिवें उभविलीं धवलारें । एकाचिया कुड मेडी । एक दीनरूप आणिती मोळिया । एक ती बांधोनि माडी । अवघियां बाजार एकचि जाला । मा विकलीं आपुलाल्या पाडीं ॥१॥ गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार पीडीतसे ॥२॥ एक गुणें आगळे असती । अमोल्य नांवाचे खडे । एक समर्थ दुर्बळा घरीं । फार मोलाचे थोडे । एक झगझग करिती वाळवंटीं । कोणी न पाहाती तयांकडे । सभाग्य संपन्न आपुलाले परीं । मा येक दैन्यवाणें बापुडें ॥३॥ एक नामें रूपें सारिख्या असती । अनेक प्रकार याती । ज्याचिया संचितें जैसें आलें पुढें । तयासी तैसीच गति । एक उंचपदीं बैसोनि सुखें । दास्य करवी एका हातीं । तुका म्हणे कां मानिती सुख । चुकलिया वांयां खंती ॥४॥

१९८८. नाहीं आम्हां शत्रु सोईरें पिशुन । दाटलें हें धन माहियेर ॥१॥ पाहें तेथें पांडुरंग रखुमाई । सत्यभामा राही जननिया ॥२॥ लाज भय कांहीं आम्हां चिंता नाहीं । सर्वसुखें पायीं वोळगती ॥३॥ तुका म्हणे आम्ही सदैवाचीं बाळें । जालों लडिवाळें सकळांचीं ॥४॥

१९८९. गर्भीं असतां बाळा । कोण पाळी त्याचा लळा ॥१॥ कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥२॥ सर्प पिलीं वितांचि खाय । वाचवित्या कोण माय ॥३॥ गगनीं लागला कोंसरा । कोण पुरवीं तेथें चारा ॥४॥ पोटीं पाषाणांचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥५॥ तुका म्हणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ॥६॥

१९९०. न म्हणे कोणा सिद्ध साधक गंव्हार । अवघा विश्वंभर वांचूनियां ॥१॥ ऐसें माझें

बुद्धि काया वाचा मन । लावी तुझें ध्यान पांडुरंगा ॥२॥ गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावी ॥३॥ देईं चरणसेवा भूतांचें भजन । वर्ण अभिमान सांडवूनि ॥४॥ आशापाश माझी तोडी माया चिंता । तुजविण व्यथा नको कांहीं ॥५॥ तुका म्हणे सर्व भाव तुझे पायीं । राहे ऐसें देईं प्रेम देवा ॥६॥

१९९१. अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तेंच ठेलें ॥१॥ काय उरलें ताय पण । मागील तें नाम गुण ॥२॥ लोह लागे परिसा अंगीं । तोही भूषण जाला जगीं ॥३॥ सरिता ओहळा ओघा । गंगे मिळोनी जाल्या गंगा ॥४॥ चंदनाच्या वासें । तरु चंदन जाले स्पर्शें ॥५॥ तुका जवळा संतां पायी । दुजेपणा ठाव नाहीं ॥६॥

१९९२. ऐशा भाग्यें ज्यालों । तरी धन्य जन्मा आलों ॥१॥ रुळें तळील पायरी । संत पाय देती वरी ॥२॥ प्रेमामृतपान । होईल चरणरजें स्नान ॥३॥ तुका म्हणे सुखें । तया हरतील दुःखें ॥४॥

१९९३. करितां या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥१॥ माथां पडती संतपाय । सुख कैवल्य तें काय ॥२॥ ऐसा लाभ नाहीं । दुजा विचारितां कांहीं ॥३॥ तुका म्हणे गोड । तेथें पुरे माझें कोड ॥४॥

१९९४. वेद जया गाती । आम्हां तयाची संगती ॥१॥ नाम धरियेले कंठीं । अवघा सांठविला पोटीं ॥२॥ ॐ काराचे बीज । हातीं आमुचे तें निज ॥३॥ तुका म्हणे बहु मोठें । अणुरेणुयां धाकुटें ॥४॥

१९९५. तुम्ही तरी हो श्रीपती । माझी बहु हीन याती ॥१॥ दोघे असों एके ठायीं । माझा माथा तुझे पायीं ॥२॥ माझ्या दीनपणां पार । नाहीं बहु तूं उदार ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । मी ओहोळ तूं गंगा ॥४॥

१९९६. मी याचक तूं दाता । काय सत्य पाहों आतां ॥१॥ म्यां तों पसरिला हात । करीं आपुलें उचित ॥२॥ आम्हीं घ्यावें नाम । तुम्हां समाधान काम ॥३॥ तुका म्हणे देवराजा । वाद खंडीं तुझा माझा ॥४॥

१९९७. तुझे पोटीं ठाव । व्हावा, ऐसा माझा भाव ॥१॥ करीं वासनेसारिखें । प्राण फुटे येणें दुःखें ॥२॥ अहंकार खोटे । वाटे श्वापदांची थाटे ॥३॥ तुका म्हणे आई । हातीं धरून संग देईं ॥४॥

१९९८. दारी परवरी । कुडीं कवाडीं मी घरीं ॥१॥ तुमच्या लागलों पोषणा । अवघे ठायीं नारायणा ॥२॥ नेदीं खाऊं जेवूं । हातीं तोंडींचेंही घेऊं ॥३॥ तुका म्हणे अंगीं । जडलों ठायींचा सलगी ॥४॥

१९९९. मज कोणी कांहीं करी । उमटे तुमचे अंतरीं ॥१॥ व्याला वाढविलें म्हूण । मज मुख तुज सीण ॥२॥ माझें पोट धालें । तुझें अंगीं उमटलें ॥३॥ तुका म्हणे खेळें । तेथें तुमचिया बळें ॥४॥

२०००. जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ॥१॥ हेंचि माझें भांडवल । जाणे कारण विठ्ठल ॥२॥ भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ॥३॥ तुका म्हणे डोई । ठेवीं वेळोवेळां पायीं ॥४॥

२००१. आम्हीं घ्यावें तुझें नाम । तुम्हीं आम्हां द्यावें प्रेम ॥१॥ ऐसें निवडिलें मुळीं । संतीं बैसोनि सकळीं ॥२॥ माझी डोई पायांवरी । तुम्हीं न धरावी दुरी ॥३॥ तुका म्हणे केला । खंड दोघांचा विठ्ठला ॥४॥

२००२. वारिलें लिगाड । बहू दिसांचें हें जाड ॥१॥ न बोलावें ऐसें केलें । कांहीं वाउगें तितुलें ॥२॥ जाला चौघांचार । गेला खंडोनि वेव्हार ॥३॥ तुका म्हणे देवा । करीन ते घ्यावी सेवा ॥४॥

२००३. पायरवे अन्न । मग करी खेदक्षीण ॥१॥ ऐसे होती घातपात । लाभेंविण संगें थीत ॥२॥ जन्माची जोडी । वाताहात एके घडी ॥३॥ तुका म्हणे शंका । हित आड या लौकिका ॥४॥

२००४. आम्हां वैष्णवांचा । नेम काया मने वाचा ॥१॥ धीर धरूं जिवासाठीं । येऊं नेदूं लाभा तुटी ॥२॥ उचित समय । लाज निवारावें भय ॥३॥ तुका म्हणे कळा । जाणों नेम नाहीं बाळा ॥४॥

२००५. उल्लंघिली लाज । तेणें साधियेलें काज ॥१॥ सुखें नाचों पैलतीरीं । गेलों भवाचे सागरीं ॥२॥ नामाची सांगडी । सुखें बांधली आवडी ॥३॥ तुका म्हणे लोकां । उरली वाचा मारीं हाका ॥४॥

२००६. बैसलोंसें दारीं । धरणें कोंडोनि भिकारी ॥१॥ आतां कोठें हालों नेदी । बरी सांपडली संदी ॥२॥ किती येरझारा । मागें घातलिया घरा ॥३॥ माझें मज नारायणा । देतां कां रे नये मना ॥४॥ भांडावें तें किती । बहु सोसिली फजिती ॥५॥ तुका म्हणे नाहीं । लाज तुझें अंगीं काहीं ॥६॥

२००७. जालों द्वारपाळ । तुझें राखिलें सकळ ॥१॥ नाहीं लागों दिलें अंगा । आड ठाकलों मी जगा ॥२॥ करूनियां नीती । दिल्याप्रमाणें चालती ॥३॥ हातीं दंड काठी । उभा जिवाचिये साटीं ॥४॥ बळ बुद्धी युक्ती । तुज दिल्या सर्व शक्ती ॥५॥ तुका म्हणे खरा । आतां घेईन मुशारा ॥६॥

२००८. फळाची तों पोटीं । घडे वियोगेंही भेटी ॥१॥ करावें चिंतन । सार तेंचि

आठवण ॥२॥ चित्त चिंता ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥३॥ तुका म्हणे देवा । पावे अंतरींची सेवा ॥४॥

२००९. दुर्बळाचें कोण । ऐके घालुनियां मन । राहिलें कारण । तयावांचूनि काय तें ॥१॥ कळों आलें अनुभवें । पांडुरंगा माझ्या जीवें । न सांगतां ठावें । पडे चर्या देखोनि ॥२॥ काम क्रोध माझ्या देहीं । भेदाभेद गेले नाहीं । होतें तेथें कांहीं । तुज कृपा करितां ॥३॥ हें तों नव्हे उचित । नुपेक्षावें शरणागत । तुका म्हणे रीत । तुमची आम्हां न कळे ॥४॥

२०१०. आम्ही भाव जाणों देवा । न कळती तुझिया मावा । गणिकेचा कुढावा । पतना न्यावा दशरथ ॥१॥ तरी म्यां काय गा करावें । कोण्या रीती तुज पावावें । न सांगतां ठावें । तुम्हांविण न पडे ॥२॥ दोनी फाकविल्या वाटा । गोवा केला घटापटा । नव्हे धीर फांटा । आड रानें भरती ॥३॥ तुका म्हणे माझे डोळे । तुझे देखती हे चाळे । आतां येणें वेळे । चरण जीवें न सोडीं ॥४॥

२०११. वेरझारीं जाला सीण । बहु केलें खेदक्षीण । भांडणासी दिन । आजी येथें फावला ॥१॥ आतां काय भीड भार । धरूनियां लोकाचार । बुडवूनि वेव्हार । सरोबरी करावी ॥२॥ आलें बहुतांच्या मना । कां रे न होसी शाहाणा । मुळींच्या वचना । आम्ही जागों आपुल्या ॥३॥ तुका म्हणे चौघांमधीं । तुज नेलें होतें आधीं । आतां नाहीं मधीं । उरी कांहीं राहिली ॥४॥

१०१२. कल्पतरूखालीं । फळें येती मागितलीं ॥१॥ तेथें बैसल्याचा भाव । विचारूनि बोले ठाव ॥२॥ द्यावें तें उत्तर । येतो प्रीतीचा तो फेर ॥३॥ तुका म्हणे मनीं । आपुल्याची लाभहानि ॥४॥

२०१३. रंगलिया रंग पालट न धरी । खेवलें अंतरीं पालटेना ॥१॥ सावळें निखळ कृष्णनाम ठसे । अंगसंगें कैसे शोभा देती ॥२॥ पवित्र जालें तें न लिंपे विटाळा । नेदी बैसों मळा आडावरी ॥३॥ तुका म्हणे काळें काळें केलें तोंड । प्रकाश अभंड देखोनियां ॥४॥

२०१४. जगा काळ खाय । आम्हीं माथां दिले पाय ॥१॥ नाचों तेथें उभा राहे । जातां व्यंग करी साहे ॥२॥ हरिच्या गुणें धाला । होता खातचि भुकेला ॥३॥ तुका म्हणे हळु । जाला कढत शितळु ॥४॥

२०१५. ब्रह्मरस घेईं काढा । जेणें पीडा वारेल ॥१॥ पथ्य नाम विठोबाचें । आणीक वाचे न सेवी ॥२॥ भवरोगाऐसें जाय । आणीक काय क्षुल्लकें ॥३॥ तुका म्हणे नव्हे बाधा । आणीक कदा भूतांची ॥४॥

२०१६. अंगें अनुभव जाला मज । संतरजचरणांचा ॥१॥ सुखी जालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ॥२॥ निर्माल्याचें तुळसीदळ । विष्णुजळ चरणींचें ॥३॥ तुका म्हणे भावसार ।

करूनि फार मिश्रित ॥४॥

२०१७. वैद्य एक पंढरिराव । अंतर्भाव तो जाणे ॥१॥ रोगाऐशा द्याव्या वल्ली । जाणे जाली बाधा ते ॥२॥ नेदी रुका वेचों मोल । पाहे बोल प्रीतीचे ॥३॥ तुका म्हणे दयावंता । सदा चिंता दीनांची ॥४॥

२०१८. करितां कोणाचेंही काज । नाहीं लाज देवासी ॥१॥ बरें करावें हें काम । धरिलें नाम दीनबंधु ॥२॥ करूनि अराणूक पाहे । भलत्या साह्य व्हावया ॥३॥ बोले तैसी करणी करी । तुका म्हणे एक हरी ॥४॥

२०१९. उभे चंद्रभागे तीरीं । कट धरोनियां करीं । पाउलें गोजिरीं । विटेवरी शोभलीं ॥१॥ त्याचा छंद माझ्या जीवा । काया वाचा मनें हेवा । संचिताचा ठेवा । जोडी हातीं लागली ॥२॥ रूप डोळियां आवडे । कीर्ति श्रवणीं पवाडे । मस्तका नावडे । उठों पायांवरोनि ॥३॥ तुका म्हणे नाम । ज्याचें नासी क्रोध काम । हरी भवश्रम । उच्चारितां वाचेसी ॥४॥

२०२०. आम्हां हेंचि भांडवल । म्हणों विठ्ठल विठ्ठल ॥१॥ सुखें तरों भवनदी । संगें वैष्णवांची मांदी ॥२॥ बाखाराचें वाण । सांडूं हें जेवूं जेवण ॥३॥ नलगे वारंवार । तुका म्हणे वेरझार ॥४॥

२०२१. आतां माझ्या भावा अंतराय नको देवा ॥१॥ आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥२॥ दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥३॥ तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फांटे ॥४॥

२०२२. काय देवापाशीं उणें । हिंडें दारोदारीं सुनें ॥१॥ करी अक्षरांची आटी । एके कवडीचेसाठीं ॥२॥ निंदी कोणी स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥३॥ तुका म्हणे भांड । जळो जळो त्याचे तोंड ॥४॥

२०२३. मागणें तें मागों देवा । करूं भक्ती त्याची सेवा ॥१॥ काय उणें तयापाशीं । रिद्धिसिद्धी ज्याच्या दासी ॥२॥ कायावाचमन । करूं देवा हें अर्पण ॥३॥ तुका म्हणे विश्वंभर । ज्याच्यानें हें चराचर ॥४॥

२०२४. चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥१॥ असे भक्तांचिये घरीं । काम न सांगतां करी ॥२॥ अनाथाचा बंधु । अंगीं असे हा संबंधु ॥३॥ तुका म्हणे भावें । देवा सत्ता राबवावें ॥४॥

२०२५. कर्कशेसंगती । दुःख उदंड फजिती ॥१॥ नाहीं इह ना परलोक । मजुर दिसे जैसें रंक ॥२॥ वचन सेंटावरी । त्याचें ठेवूनि धिक्कारी ॥३॥ तुका म्हणे पायीं बेडी । पडिली कपाळीं कुऱ्हाडी ॥४॥

२०२६. बीज पेरी सेतीं । मग गाडेवरी वाहाती ॥१॥ वांयां गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ॥२॥ पाल्याची जतन । तरि प्रत्यया येती कण ॥३॥ तुका म्हणे आळा । उदक देतां लाभे फळा ॥४॥

२०२७. जाणावें तें सार । नाहीं तरी दगा फार ॥१॥ डोळे झांकलिया रवि । नाहीं ऐसा होय जेवीं ॥२॥ बहु थोड्या आड । निवारितां लाभे जाड ॥३॥ तुका म्हणे खरें । नेलें हातींचें अंधारें ॥४॥

२०२८. मुळीं नेणपण । जाला तरी अभिमान ॥१॥ वांयां जाय हेंचि खरें । केलें तेणेंचि प्रकारें ॥२॥ अराणूक नाहीं कधीं । जाली तरि भेदबुद्धि ॥३॥ अंतरली नाव । तुका म्हणे नाहीं ठाव ॥४॥

२०२९. संवसारसांतें आले हो आईका । तुटीचें तें नका केणें भरूं ॥१॥ लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते करा साह्य येथें ॥२॥ शृंगारिलें दिसे न कळे अंतर । गोविला पदर उगवेना ॥३॥ तुका म्हणे खोटें गुंफतां विसारें । हातिंचिया खरें हातीं घ्यावें ॥४॥

२०३०. सारावीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळूहळू ॥१॥ पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥२॥ वेचल्याचा पाहे वरावरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ॥३॥ तुका म्हणे जैसी दाखवावी वाणी । ते द्यावी भरोनी शेवट तों ॥४॥

२०३१. बुद्धिमंदा शिरीं । भार फजिती पदरीं ॥१॥ जाय तेथें अपमान । पावे हानि थुंके जन ॥२॥ खरियाचा पाड । मागें लावावें लिगाड ॥३॥ तुका म्हणे करी । वर्म नेणें भरोवरी ॥४॥

२०३२. पूर्वजांसी नरका । जाणें तें एक आइका ॥१॥ निंदा करावी चाहाडी । मनीं धरूनि आवडी ॥२॥ मात्रागमना ऐसी । जोडी पातकांची रासी ॥३॥ तुका म्हणे वाट । कुंभपाकाची ते नीट ॥४॥

२०३३. वेडी ते वेडी बहुतच वेडी । चाखतां गोडी चवी नेणे ॥१॥ देहा लावी वात । पालव घाली जाली रात ॥२॥ कडिये मूल भोंवतें भोंये । मोकलुनि रडे धाय ॥३॥ लेंकरें वीत पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ॥४॥ आपली शुद्धि जया नाहीं । आणिकाची ते जाणे काई ॥५॥ तुका म्हणे ऐसे जन । नरका जातां राखे कोण ॥६॥

२०३४. आवडींचे दान देतो नारायण । बाहे उभारोन राहिलासे ॥१॥ जें जयासी रुची तें करी समोर । सर्वज्ञ उदार मायबाप ॥२॥ ठायीं पडिलिया तेंचि लागे खावें । ठायींचेंचि घ्यावें विचारूनि ॥३॥ बीज पेरूनियां तेंचि घ्यावें फळ । डोरलीस केळ कैचें लागे ॥४॥ तुका म्हणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूंचि पाहीं शत्रु सखा ॥५॥

२०३५. अडचणीचें दार । बाहेर माजी पैस फार ॥१॥ काय करावें तें मौन । दाही दिशा

हिंडे मन ॥२॥ बाहेर दावी वेश । माजी वासनेचे लेश ॥३॥ नाहीं इंद्रियां दमन । काय मांडिला दुकान ॥४॥ सारविलें निकें । वरि माजी अवघें फिकें ॥५॥ तुका म्हणे अंतीं । कांहीं नलगेचि हातीं ॥६॥

२०३६. लक्ष लक्षूनियां जालों म्हणती देव । तोही नव्हे भाव सत्य जाणा ॥१॥ जालों बहुश्रुत नलगे आतां कांहीं । नको राहूं तेही निश्चितीनें ॥२॥ तपें दानें काय मानिसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ॥३॥ कर्म आचरण यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ॥४॥ तुका म्हणे जरी होईल निष्काम । तरिच होय राम देखे डोळां ॥५॥

२०३७. पुरली धांव कडिये घेईं । पुढें पायीं न चलवीं ॥१॥ कृपाळुवे पांडुरंगे । अंगासंगे जिवलगे ॥२ । अवघी निवारावी भूक । अवघ्या दु:ख जन्माचें ॥३॥ तुका म्हणे बोलवेना । लावीं स्तना ईश्वरे ॥४॥

२०३८. जें जें मना वाटे गोड । तें तें कोड पुरविसी ॥१॥ आंत तूंचि बाह्यात्कारीं । अवघ्यापरी जालासी ॥२॥ नाहीं सायासाचें काम । घेतां नाम आवडी ॥३॥ तुका म्हणे सर्व सांगे । पांडुरंगे दयाळे ॥४॥

२०३९. जेथें माझी दृष्टी जाय । तेथें पाय भावीन ॥१॥ असेन या समाधानें । पूजा मनें करीन ॥२॥ अवघाच अवघे देसी । सुखरासी संपन्न ॥३॥ तुका म्हणे बंधन नाहीं । ऐसें कांहीं तें करूं ॥४॥

२०४०. भला भला पुंडलिका । मानलासी जनलोकां । कोण्या काळें सुखा । ऐशा कोण पावत ॥१॥ नातुडे जो कवणे परी । उभा केला विटेवरी ॥२॥ अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥३॥ तुका म्हणे धन्य जालें । भूमीं वैकुंठ आणिलें ॥४॥

२०४१. अवघे चुकविले सायास । तप रासी जीवा नास ॥१॥ जीव देऊनियां बळी । अवघीं तारिलीं दुबळीं । केला भूमंडळीं । माजी थोर पवाडा ॥२॥ कांहीं न मगे याची गती । लुटवितो जगा हातीं ॥३॥ तुका म्हणे भक्तराजा । कोण वर्णी पार तुझा ॥४॥

२०४२. प्रमाण त्याच्या बोला । देव भक्ताचा अंकिला ॥१॥ न पुसतां जातां नये । खालीं बैसतांही भिये ॥२॥ अवघा त्याचा होय । जीव भावासहित ॥३॥ वदे उपचारें वाणी । कांहीं माग म्हणऊनि ॥४॥ उदासीनाच्या लागें । तुका म्हणे धांवे मागें ॥५॥

२०४३. कांहीं न मागती देवा । त्यांचि करूं धांवे सेवा ॥१॥ हळूहळू फेडी ऋण । होउनियां रूपें दीन ॥२॥ होऊं न सके वेगळा । क्षण एक त्यां निराळा ॥३॥ तुका म्हणे भक्तिभाव । तोचि देवाचाही देव ॥४॥

२०४४. जाणे अंतरींचा भाव । तोचि करितो उपाव ॥१॥ नलगे सांगावें मागावें । जीवें

भावें अनुसरावें । अविनाश घ्यावें । फळ धीर धरोनि ॥२॥ बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ॥३॥ तुका म्हणे तरी । एकीं लंघियेले गिरी ॥४॥

२०४५. आम्हीं नाचों तेणें सुखें । वाहुं टाळी गातों मुखे ॥१॥ देव कृपेचा कोंवळा । शरणागता पाळी लळा ॥२॥ आम्हां जाला हा निर्धार । मागें तारिले अपार ॥३॥ तुका म्हणे संतीं । वर्म दिलें आम्हां हातीं ॥४॥

२०४६. जालों निर्भर मानसीं । म्हणऊनि कळलासी ॥१॥ तुझे म्हणविती त्यांस । भय चिंता नाहीं आस । चुकविशी पाश । गर्भवासयातना ॥२॥ तुझें जाणोनियां वर्म । कंठीं धरियेलें नाम ॥३॥ तुका म्हणे तेणें सुखें । निरसलीं जन्मदु:खें ॥४॥

२०४७. नको दुष्टसंग । पडे भजनामधीं भंग ॥१॥ काय विचार देखिला । सांग माझा तो विठ्ठला ॥२॥ तुज निषेधितां । मज न साहे सर्वथा ॥३॥ एका माझ्या जीवें । वाद करूं कोणासवें ॥४॥ तुझे वर्णूं गुण । कीं हे राखों दुष्टजन ॥५॥ काय करूं एका । मुखें सांग म्हणे तुका ॥६॥

२०४८. विठ्ठल माझी माय । आम्हां सुखा उणें काय ॥१॥ घेतों अमृताची धणी । प्रेम वोसंडलें स्तनीं ॥२॥ क्रीडों वैष्णवांच्या मेळीं । करूं आनंदाच्या जळीं ॥३॥ तुका म्हणे कृपावंत । ठेवी आम्हांपाशीं चित्त ॥४॥

२०४९. भक्तिसुखें जें मातले । ते कळिकाळा शूर जाले ॥१॥ हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥२॥ महादोषां जाला त्रास । जन्ममरणां केला नास ॥३॥ सहस्त्रनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी ॥४॥ नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचें अंकित त्यावांचून ॥५॥ तुका म्हणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी ॥६॥

२०५०. पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ॥१॥ काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ॥२॥ स्वहित कारण मानवेल जन । हरिकथा पूजन वैष्णवांचें ॥३॥ थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ॥४॥ तुका म्हणे कां रे सुकुमार जालासी । काय जाब देसी यमदूतां ॥५॥

२०५१. कथा हें भूषण जनामध्यें सार । तरले अपार बहु येणें ॥१॥ नीचिये कुळींचा उंचा वंद्य होय । हरीचे जो गाय गुणवाद ॥२॥ देव त्याची माथां वंदी पायधुळी । दीप जाला कुळीं वंशाचिये ॥३॥ त्याची निंदा करी त्याची कुष्ट वाणी । मुख संवदणी रजकाची ॥४॥ तुका म्हणे नाहीं चोरीचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम घ्यावें ॥५॥

२०५२. टाळघोळ सुख नामाचा गजर । घोष जयजयकार ब्रह्मानंदु ॥१॥ गरुडटके दिंडीं पताकांचे भार । आनंद अपार ब्रह्मादिकां ॥२॥ आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं । एक एकाहूनि भद्रजाति ॥३॥ तेणें सुखें सुटे पाषाणा पाझर । नष्ट खळ नर शुद्ध होती ॥४॥ तुका म्हणे सोपें

वैकुंठासी जातां । रामकृष्ण कथा हेचि वाट ॥५॥

२०५३. देखोवेखीं करिती गुरु । नाहीं ठाउका विचारु ॥१॥ वर्म तें न पडे ठायीं । पांडुरंगाविण कांहीं ॥२॥ शिकों कळा शिकों येती । प्रेम नाहीं कोणा हातीं ॥३॥ तुका म्हणे सार । भक्ति नेणती गव्हार ॥४॥

२०५४. भाग्यवंत म्हणों तयां । शरण गेले पंढरिराया ॥१॥ तरले तरती हा भरंवसा । नामधारकाचा ठसा ॥२॥ भुक्तिमुक्तिचें तें स्थळ । भोळेभाविकां निर्मळ ॥३॥ गाईलें पुराणीं । तुका म्हणे वेदवाणी ॥४॥

२०५५. जैसें चित्त जयावरि । तैसें जवळी तें दुरीं ॥१॥ नलगे द्यावा परिहार । या कोरडें उत्तर । असे अभ्यंतर । साक्षभूत जवळी ॥२॥ अवघें जाणे सूत्रधारी । कोण नाचे कोणेपरी ॥३॥ तुका म्हणे बुद्धि । ज्याची तया तेच सिद्धि ॥४॥

२०५६. नाहीं पाइतन भूपतीशीं दावा । धिग त्या कर्तव्या आगी लागो ॥१॥ मुंगिचिया मुखा गजाचा आहार । न साहे भार जाय जीवें ॥२॥ तुका म्हणे आधीं करावा विचार । शूरपणें तीर मोकलावा ॥३॥

२०५७. तिन्ही लोक ऋणें बांधिले जयानें । सर्वसिद्धि केणें तया घरीं ॥१॥ पंढरीचोहोटां घातला दुकान । मांडियेलें वाण आवडीचे ॥२॥ आषाढी कार्तिकी भरियेले हाट । इनाम हे पेंठ घेतां देतां ॥३॥ मुक्ति तेथें कोणी हातीं नेघे फुका । लुटितील सुखा प्रेमाचिया ॥४॥ तुका म्हणे संतसज्जन भाग्याचे । अनंता जन्मींचे सांटेकरी ॥५॥

२०५८. दुःखाचिये साटीं तेथें मिळे सुख । अनाथाची भूक दैन्य जाय ॥१॥ उदाराचा राणा पंढरीस आहे । उभारोनि बाहे पालवितो ॥२॥ जाणतियाहूनि नेणत्याची गोडी । आळिंगी आवडी करूनियां ॥३॥ शीण घेऊनियां प्रेम देतो साटी । न विचारी तुटी लाभ कांहीं ॥४॥ तुका म्हणे असों अनाथ दुबळीं । आम्हांसी तो पाळी पांडुरंग ॥५॥

२०५९. आणीक मात माझ्या नावडे जीवासी । काय करूं यासी पांडुरंगा ॥१॥ मुखा तेंचि गोडी श्रवणीं आवडी । चित्त माझें ओढी तुझे पायीं ॥२॥ जये पदीं नाहीं विठ्ठलाचें नाम । मज होती श्रम आइकतां ॥३॥ आणिकाचें मज म्हणवितां लाज । वाटे हें सहज न बोलावें ॥४॥ तुका म्हणे मज तूंचि आवडसी । सर्वभावेविसीं पांडुरंगा ॥५॥

२०६०. कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनासवें काज काय माझें ॥१॥ करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥२॥ होऊनि निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करूनियां ॥३॥ काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका ॥४॥ तुका म्हणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥५॥

२०६१. तयास नेणतीं बहु आवडती । होय जयां चित्तीं एक भाव ॥१॥ उपमन्यु धुरु हे काय जाणती । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण ॥२॥ कोळी भिल्ल पशु श्वापदें अपारें । कृपेच्या सागरें तारियेलीं ॥३॥ काय तीं गोपाळें चांगलीं शाहाणीं । तया चक्रपाणी जेवी सवें ॥४॥ तुका म्हणे भोळा भाविक हा देव । आम्ही त्याचे पाव धरुनी ठेलों ॥५॥

२०६२. नलगे पाहावें अबद्ध वांकडें । उच्चारावें कोडें नाम तुझें ॥१॥ नाहीं वेळ काळ पंडितांचा धाक । होत कां वाचक वेदवक्ते ॥२॥ वेदीं जें प्रतिपाद्य न कळे पाहातां । तैशी या अनंता ठेवूं नामें ॥३॥ आपुलिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथेकाळीं ॥४॥ तुका म्हणे आम्ही आनंदेंचि धालों । आनंदचि ल्यालों अळंकार ॥५॥

२०६३. दैन्य दुःख आम्हां न येती जवळी । दहन हे होळी होती दोष ॥१॥ सर्व सुखें येती मानें लोटांगणीं । कोण यांसी आणी दृष्टीपुढें ॥२॥ आमुची आवडी संतसमागम । आणीक त्या नाम विठोबाचें ॥३॥ आमचें मागणें मागों त्याची सेवा । मोक्षाची निर्दैवा कोणा चाड ॥४॥ तुका म्हणे पोटीं सांठविला देव । न्यून तो भाव कोण आम्हां ॥५॥

२०६४. काळतोंडा सुना । भलतें चोरुनि करी जना ॥१॥ धिग त्याचें साधुपण । विटाळुनि वर्ते मन ॥२॥ मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ॥३॥ तुका म्हणे थीत । नागवला नव्हे हित ॥४॥

२०६५. विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलतां ॥१॥ मज न साहावे कानीं । विष उत्तर लागे मनीं ॥२॥ हरिकथेतें धिक्कारी । शत्रु माझा तोचि वैरी ॥३॥ सुना काळतोंडा । जो या देवा म्हणे धोंडा ॥४॥ अहं म्हणे ब्रह्म । नेणें भक्तीचें तें वर्म ॥५॥ तुका म्हणे क्षण । नको तयाचें दर्शन ॥६॥

२०६६. यमपुरी त्याणीं वसविली जाणा । उच्छेद भजना विधी केला ॥१॥ अवघड कोणी न करी सांगतां । सुलभ बहुतां गोड वाटे ॥२॥ काय ते नेणते होते मागें ऋषी । आधार लोकांसी ग्रंथ केले ॥३॥ द्रव्य दारा कोणें स्थापियलें धन । पिंडाचे पाळण विषयभोग ॥४॥ तुका म्हणे दोहीं ठायीं हा फजित । पावे यमदूत जना हातीं ॥५॥

२०६७. न कळतां कोणीं मोडियलें व्रत । तया प्रायश्चित्त चाले कांहीं ॥१॥ जाणतियां वज्रलेप जाले थोर । तयांस अघोर कुंभपाक ॥२॥ जातां जरी कोणी नाइके सांगतां । तया शिकवितां तेंचि पाप ॥३॥ काय करूं मज देवें बोलविलें । माझें खोळंबलें काय होतें ॥४॥ तुका म्हणे जना पाहा विचारूनी । सुख वाटे मनीं तेंचि करा ॥५॥

२०६८. वाचे विठ्ठल नाहीं । तोचि प्रेतरूप पाहीं ॥१॥ धिग त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन ॥२॥ न बैसें कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥३॥ जातां कांटाळे देउळा । तोचि

सुना मुखकाळा ॥४॥ हरिभक्तीविण । जळो त्याचें शहाणपण ॥५॥ तुका म्हणे तेणें । वंशा आणियेलें उणें ॥६॥

२०६९. तारिलीं बहुत चुकवूनि घात । नाम हें अमृत स्वीकारितां ॥१॥ नेणतां सायास शुद्ध आचरण । यातीकुळहीन नामासाठीं ॥२॥ जन्म नाम धरी भक्तीच्या पाळणा । आकार कारणा याचसाठीं ॥३॥ असुरीं दाटली पाप होतां फार । मग फेडी भार पृथिवीचा ॥४॥ तुका म्हणे देव भक्तपण सार । कवतुक वेव्हार तयासाठीं ॥५॥

२०७०. याचिया आधारें राहिलों निश्चिंत । ठेवूनियां चित्त पायीं सुखें ॥१॥ माझें सुख दुःख जाणे हित फार । घातलासे भार पांडुरंगा ॥२॥ कृपेची पोसणीं ठायींचीं अंकिलीं । म्हणऊनि लागली यास चिंता ॥३॥ मन राखे हातीं घेउनियां काठी । इंद्रियें थापटी फांकों नेदी ॥४॥ तुका म्हणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ॥५॥

२०७१. उभा उभी फळ । अंगीं मंत्राचिया बळ ॥१॥ म्हणा विठ्ठल विठ्ठल । गोड आणि स्वल्प बोल ॥२॥ कळिकाळाची बाधा । नव्हे उच्चारितां सदा ॥३॥ तुका म्हणे रोग । वारे भवाऐसा भोग ॥४॥

२०७२. पाहोनि अधिकार । तैसें बोलावें उत्तर ॥१॥ काय वाउगी घसघस । आम्ही विठोबाचे दास ॥२॥ आम्ही जाणों एका देवा । जैसी तैसी करूं सेवा ॥३॥ तुका म्हणे भावें । माझें पुढें पडेल ठावें ॥४॥

२०७३. न वजतां घरा । आम्ही कोणाच्या दातारा ॥१॥ कां हे छळूं येती लोक । दाट बळेंचि कंटक ॥२॥ नाहीं आम्ही खात । कांहीं कोणाचें लागत ॥३॥ कळे तैसी सेवा । तुका म्हणे करूं देवा ॥४॥

२०७४. मोहरोनि चित्ता । आणूं हळूचि वरि हिता ॥१॥ तों हे पडती आघात । खोडी काढिती पंडित ॥२॥ संसारा भेणें । कांहीं उसंतीतों पेणें ॥३॥ एखादिया भावें । तुका म्हणे जवळी यावें ॥४॥

२०७५. काय जाणों वेद । आम्ही आगमाचे भेद ॥१॥ एक रूप तुझें मनीं । धरूनि राहिलों चिंतनीं ॥२॥ कोठें अधिकार । नाहीं रानट विचार ॥३॥ तुका म्हणे दीना । नुपेक्षावें नारायणा ॥४॥

२०७६. धर्माचें पाळण । करणें पाखांड खंडण ॥१॥ हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥२॥ तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरे ॥३॥ नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर ॥४॥

२०७७. निवडावे खडे । तरी दळणा वोज घडे ॥१॥ नाहिं तरि नासोनि जाय । कारण

आळस उरे हाय ॥२॥ निवडावें तन । शेतीं करावें राखण ॥३॥ तुका म्हणे नीत । न विचारितां नव्हे हित ॥४॥

२०७८. दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥१॥ लाता हाणोनियां वारी । गुंडा वाट शुद्ध करी ॥२॥ बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥३॥ तुका म्हणे नखें । काढुनि टाकिजेती सुखें ॥४॥

२०७९. नका धरूं कोणी । राग वचनाचा मनीं ॥१॥ येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनि राखा चित्त ॥२॥ नाहीं केली निंदा । आम्हीं दूषिलेंसे भेदा ॥३॥ तुका म्हणे मज । येणेंविण काय काज ॥४॥

२०८०. काहीं जडभारी । पडतां ते अवसरीं ॥१॥ तुझें आठवावे पाय । आम्हीं मोकलूनि धाय ॥२॥ तहान पीडी भूक । शीत उष्ण वाटे दुःख ॥३॥ तुका म्हणे देहयोगें । वारंवार पिडिता भोगें ॥४॥

२०८१. होउनि कृपाळ । भार घेतला सकळ ॥१॥ तूंचि चालविसी माझें । भार सकळही ओझें ॥२॥ देह तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥३॥ कायावाचामनें । तुका म्हणे दुजें नेणें ॥४॥

२०८२. आतां होईं माझे बुद्धीचा जनिता । अवरावें चित्ता पांडुरंगा ॥१॥ येथूनियां कोठें न वजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥२॥ अनावर गुण बहुतां जातींचे । न बोलावें वाचे ऐसें करीं ॥३॥ तुका म्हणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ॥४॥

२०८३. नित्य मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी ॥१॥ आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हें जाळें उगवतां ॥२॥ सांपडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥३॥ तुका म्हणे मी तों अज्ञानचि आहें । परि तुझी पाहें वास देवा ॥४॥

२०८४. दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ॥१॥ तैसी परि मज झाली नारायणा । योगक्षेम जाणा तुम्ही आतां ॥२॥ खातां लेतां नये मिरवितां वरि । राजा दंड करी जन राग ॥३॥ तुका म्हणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ॥४॥

२०८५. मागें जैसा होता माझें अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां ॥१॥ ऐसें ग्वाही माझें मन मजपाशीं । तुटी मुदलेंसी दिसे पुढें ॥२॥ पुढिलांचे मना आणी गुणदोष । पूज्य आपणांस करावया ॥३॥ तुका म्हणे जालि कोंबड्याची परी । पुढेंचि उकरी लाभ नेणे ॥४॥

२०८६. किती तुजपाशीं देऊं परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥१॥ आतां माझे हातीं देईं माझें हित । करी माझें चित्त समाधान ॥२॥ राग आला तरी कांपूं नये मान । बाळा मायेविण कोण दुजें ॥३॥ तुका म्हणे तैसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ॥४॥

२०८७. लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशीं ॥१॥ चुकलिया कामा मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥२॥ पाय सांडूनियां फिरतों बासर । स्वामिसेवाचोर होऊनियां ॥३॥ तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हें घडलें न पाहिजें ॥४॥

२०८८. पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ॥१॥ हें तों वर्म असे माउलीच्या हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥२॥ खेळतां विसरे भूक तहान घर । धरूनियां कर आणी बळें ॥३॥ तुका म्हणे पाळी तोंडींचिया घांसे । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥४॥

२०८९. आतां गुण दोष काय विचारिसी । मी तों आहें रासी पातकाची ॥१॥ पतितपावनासवे समागम । आपुलाले धर्म चालवीजे ॥२॥ घणघायीं भेटी लोखंड परिसा । तरी अनारिसा न पालटे ॥३॥ तुका म्हणे माती कोण पुसे फुका । कस्तुरीच्या तुका समागमें ॥४॥

२०९०. कृपावंत दुजें नाहीं तुम्हां पोटीं । लाडें बोलें गोठी सुख मातें ॥१॥ घेउनि भातुकें लागसील पाठी । लाविसील ओंठीं ब्रह्मरस ॥२॥ आपुलिया पांखे घालिसी पाखर । उदार मजवर कृपाळू तूं ॥३॥ तुका म्हणे आम्हांकारणें गोविंदा । वागविसी गदा सुदर्शन ॥४॥

२०९१. पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ॥१॥ आतां काय माझा घडेल अव्हेर । मागें बहु दूर वागविलें ॥२॥ नेदी वारा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ॥३॥ तुका म्हणे बोल करितों आवडी । अविट तेचि गोडी अंतरींची ॥४॥

२०९२. पांडुरंगा कांहीं आईकावी मात । न करावें मुक्त आतां मज ॥१॥ जन्मांतरें मज तैसीं देईं देवा । जेणें चरणसेवा घडे तुझी ॥२॥ वाखाणीन कीर्ती आपुलिया मुखें । नाचेन मी सुखें तुजपुढें ॥३॥ करूनि कामारी दास दीनाहुनी । आपुल्या अंगणीं ठाव मज ॥४॥ तुका म्हणे आम्ही मृत्युलोकीं भले । तुझेचि अंकिले पांडुरंगा ॥५॥

२०९३. माझे अंतरींचें तोचि जाणे एक । वैकुंठनायक पांडुरंग ॥१॥ जीव भाव त्याचे ठेवियेला पायीं । मज चिंता नाहीं कवणेविशीं ॥२॥ सुखसमारंभें संतसमागम । गाऊं वाचे नाम विठोबाचें ॥३॥ गातां पुण्य होय आइकतां लाभ । संवसारबंद तुटतील ॥४॥ तुका म्हणे जीव तयासी विकिला । आणीक विठ्ठलाविण नेणें ॥५॥

२०९४. कथा सुख करी कथा मुक्त करी । कथा याची बरी विठोबाची ॥१॥ कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढजना ॥२॥ कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ॥३॥ कथा मंत्रजप कथा हरी ताप । कथाकाळीं कांप कळिकाळासी ॥४॥ तुका म्हणे कथा देवाचेंही ध्यान । समाधि लागोन उभा कथे ॥५॥

२०९५. काय ऐसा सांगा । धर्म मज पांडुरंगा ॥१॥ तुझें पायीं पावें ऐसा । जेणें उगवे हा फांसा ॥२॥ करीं कृपादान । तैसें बोलवीं वचन ॥३॥ तुका म्हणे देवा । माझें हृदय वसवा ॥४॥

२०९६. भला म्हणे जन । परि नाही समाधान ॥१॥ माझें तळमळी चित्त । अंतरलें दिसे हित ॥२॥ कृपेचा आधार । नाहीं दंभ जाला फार ॥३॥ तुका म्हणे कृपे । अंतराय कोण्या पापें ॥४॥

२०९७. शिकविलें ते बोल । बोले तैसी नाहीं ओल ॥१॥ आतां देवा संदेह नाहीं । वांयां गेलों यासी कांहीं ॥२॥ एकांताचा वास । नाहीं संकल्पाचा नास ॥३॥ बुद्धि नाहीं स्थिर । तुका म्हणे शब्दा धीर ॥४॥

२०९८. उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ॥१॥ कांरे न घालिसी धांव । तुझें उच्चारितां नांव ॥२॥ काय बळयुक्ति । नाहीं तुझे अंगीं शक्ति ॥३॥ तुका म्हणे तूं विश्वंभर । वोस माझें कां अंतर ॥४॥

२०९९. वाहावतों पुरीं । आतां उचित तें करीं ॥१॥ माझी शक्ति नारायणा । कींव भाकावी करुणा ॥२॥ आम्हां ओढी काळ । तुझें क्षीण झालें बळ ॥३॥ तुका म्हणे गोडी । जीवा मातेचिया ओढी ॥४॥

२१००. आतां घेईं माझें । भार सकळही ओझें ॥१॥ काय करिसी होई वाड । आलों पोटासीं दगड ॥२॥ तूंचि डोळे वाती । होईं दीपक सांगातीं ॥३॥ तुका म्हणे कांहीं । विचाराया चाड नाहीं ॥४॥

२१०१. असोत हे बोल । अवघें तूंचि भांडवल ॥१॥ माझा मायबाप देवा । सज्जन सोयरा केशवा ॥२॥ गाळियेले भेद । सारियेले वादावाद ॥३॥ तुका म्हणे मधीं । आतां न पडे उपाधि ॥४॥

२१०२. करीन कोल्हाळ । आतां हाचि सर्वकाळ ॥१॥ आतां ये वो माझे आई । देईं भातुकें विठाई ॥२॥ उपायासी नाम । दिले याचि पुढें क्षेम ॥३॥ बीज आणि फळ । तुका म्हणे हेंचि मूळ ॥४॥

२१०३. धनासींच धन । करी आपणा जतन ॥१॥ तुज आळवितां गोडी । पांडुरंगा खरी जोडी ॥२॥ जेविल्याचें खरें । वरी उमटे ढेंकरें ॥३॥ तुका म्हणे धाय । तेथें कोठें उरे हाय ॥४॥

२१०४. अनुभवा आलें । माझें चित्तींचें क्षरलें ॥१॥ असे जवळी अंतरे । फिरे आवडीच्या फेरें ॥२॥ खादलेंचि वाटे । खावें भेटलेंचि भेटे ॥३॥ तुका म्हणे उभें । आम्हीं राखियेलें लोभें ॥४॥

२१०५. पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ॥१॥ तैसें मज कांगा केलें पंढरिराया । लौकिक हा वांयां वाढविला ॥२॥ ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्यांची ॥३॥ तुका म्हणे मढें शृंगारिलें वरी । तेचि जाली परी मज देवा ॥४॥

२१०६. बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंग हें पितळ न देखतां ॥१॥ माझें चित्त मज

जवळीच ग्वाही । तुझी मज नाहीं भेटी ऐसी ॥२॥ दासीसुता नाहीं पितियाचा ठाव । अवघेंचि वाव सोंग त्याचें ॥३॥ तुका म्हणे माझी केली विटंबना । अनुभवे जना येईल कळों ॥४॥

२१०७. मजपुढें नाहीं आणीक बोलतां । ऐसे कांहीं चित्ता वाटतसे ॥१॥ याचा कांहीं तुम्हीं देखावा परिहार । सर्वज्ञ उदार पांडुरंगा ॥२॥ कामक्रोधें नाहीं सांडिलें आसन । राहिले वसोन देहामध्यें ॥३॥ तुका म्हणे आतां जालों उतराई । कळों यावें पायीं निरोपिलें ॥४॥

२१०८. सावित्रीची विटंबणा । रांडपणा करीतसे ॥१॥ काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥२॥ कुबेर नांव मोळी वाहे । कैसी पाहें फजिती ॥३॥ तुका म्हणे ठुणगुण देखें । उगीच मूर्खें फुंदतां ॥४॥

२१०९. न गमेसी जाली दिवसरजनी । राहिलों लाजोनी न बोलवे ॥१॥ रुचिविण काय शब्द वाऱ्या माप । अनादरें कोप येत असे ॥२॥ आपुलिया रडे आपुलेंचि मन । दाटे समाधान पावतसें ॥३॥ तुका म्हणे तुम्ही असां जी जाणते । काय करूं रिते वादावाद ॥४॥

२११०. मेल्यावरि मोक्ष संसारसंबंध । आरालिया बद्ध ठेवा आम्हां ॥१॥ वागवीत संदेह राहों कोठवरी । मग काय थोरी सेवकाची ॥२॥ गाणें गीत आम्हां नाचणें आनंदें । प्रेम कोठें भेदें अंगा येतें ॥३॥ तुका म्हणे किती सांगावे दृष्टांत । नसतां तूं अनंत सानुकूळ ॥४॥

२१११. एकाएकीं आतां असावेंसें वाटे । तरिच हे खोटे चाळे केले ॥१२॥ वाजवूनि तोंड घातलें बाहेरी । कल्पें करुनी दारीं माजी वसा ॥२॥ उजेडाचा केला दाटोनि अंधार । सवें हुद्देदार चेष्टविला ॥३॥ तुका म्हणे भय होतें तोंचि वरी । होती कांहीं उरी स्वामिसेवा ॥४॥

२११२. काय नव्हेसी तूं एक । देखों कासया पृथक ॥१॥ मुंग्या कैंचे मुंगळे । नटनाट्य तुझे चाळे ॥२॥ जाली तरी मर्यादा । किंवा त्रासावें गोविंदा ॥३॥ तुका म्हणे साचा । कोठें जासी हृदयींचा ॥४॥

२११३. कां जी वाढविलें । न लगतां हे उगलें ॥१॥ आतां मानितां कांटाळा । भोवतीं मिळालिया बाळा ॥२॥ लावूनिया सवे । पळतां दिसाल बरवे ॥३॥ तुका म्हणे बापा । येतां न कळाचि रूपा ॥४॥

२११४. क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ॥१॥ धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥२॥ द्रव्य आणि कन्या । तेथें कुळ कर्म शोधण्या ॥३॥ तुका म्हणे पुण्य गांठी । तरिच उचिताची भेटी ॥४॥

२११५. वेचावें तें जीवें । पूजा घडे ऐशा नांवें ॥१॥ बिगारीची ते बिगारी । साक्षी अंतरींचा हरी ॥२॥ फळ बीजाऐसें कार्यकारणासरिसें ॥३॥ तुका म्हण मान । लवणासारिखें लवण ॥४॥

२११६. मज नाहीं धीर । तुम्ही न करा अंगिकार ॥१॥ ऐसें पडिलें विषम । बळी देवाहूनि

कर्म ॥२॥ चालों नेणें वाट । केल्या न पवाचि बोभाट ॥३॥ वेचों नेणें जीवें । तुका उदास धरिला देवें ॥४॥

२११७. तळमळी चित्त दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ॥१॥ वचनींच संत पावलें स्वरूप । माझें नेदी पाप योगा येऊं ॥२॥ वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव । न पवेचि जीव समाधान ॥३॥ तुका म्हणे कईं देसील विसांवा । पांडुरंगीं धांवा घेतें मन ॥४॥

२११८. हागतांही खोडी । चळण मोडवितें काडी ॥१॥ ऐसे अनावर गुण । आवरावे काय म्हूण ॥२॥ नाहीं जरी संग । तरी बडबडती रंग ॥३॥ तुका म्हणे देवा । तुमची न घडेचि सेवा ॥४॥

२११९. देह निरसे तरी । बोलावया नुरे उरी ॥१॥ येर वाचेचें वाग्जाळ । अळंकारापुरते बोल ॥२॥ काचें तरी कढे । जाती ऐसें चित्त ओढे ॥३॥ विष्णुदास तुका । पूर्ण धणी जाले चुका ॥४॥

२१२०. खोट्याचा विकरा । येथें नव्हे कांच हिरा ॥१॥ काय दावायाचें काम । उगाच वाढवावा श्रम ॥२॥ परीक्षकाविण । मिरवो जाणें तें तें हीण ॥३॥ तुका पाया पडे । वाद पुरे हे झगडे ॥४॥

२१२१. पंढरीस घडे अतित्यायें मृत्य । तो जाय पतित अध:पाता ॥१॥ दुराचाऱ्या मोक्षसुखाची वसति । भोळी बाळमूर्ति पांडुरंग ॥२॥ कालियापें भेद मानितां निवाडे । श्रोत्रियांसी जोडे अंत्यजता ॥३॥ माहेरीं सलज्ज ते जाणा सिंदळी । काळिमा काजळी पाववितें ॥४॥ केला न सहावे तीर्थ उपहास । कथेविण दोषसाधन तें ॥५॥ तुका म्हणे तेथें विश्वास जतन । पुरे भीमास्नान सम पाय ॥६॥

२१२२. चातुर्याच्या अनंत कळा । सत्या विरळा जाणत ॥१॥ हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे ॥२॥ जळो ऐसे वांजट बोल । गुणां मोल भूस मिथ्या ॥३॥ तुका म्हणे अंधळ्याऐसें । वोंगळ पिसें कौतुकें ॥४॥

२१२३. नयो वाचे अनुचित वाणी । नसो मनी कुडी बुद्धि ॥१॥ ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि ॥२॥ कामक्रोधां पडो चिरा । ऐसा बरा सायास ॥३॥ तुका म्हणे नानाछंदें । या विनोदें न पडावें ॥४॥

२१२४. माझिया देहाची मज नाहीं चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥१॥ इच्छितातो मान मागा देवापाशीं । असा संचितासी गुंतले हो ॥२॥ देह आम्हीं केला भोगाचे सांभाळीं । राहिलों निराळीं मानामान ॥३॥ तुका म्हणे कोणें वेचावें वचन । नसतां तो सीण वाढवावा ॥४॥

२१२५. धरितां इच्छा दुरी पळे । पाठी सोहळे उदासा ॥१॥ म्हणऊनि असट मन । नका खूण सांगतों ॥२॥ आमिषापाशीं अवघें वर्म । सोसें श्रम पाववी ॥३॥ तुका म्हणे बीज न्यावें । तेथें यावें फळानें ॥४॥

२१२६. वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका ॥१॥ तार्किकाचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्यासारिखे वाईचाळे ॥२॥ माता निंदी तया कोण तो आधार । भंगलें खापर याच नांवें ॥३॥ तुका म्हणे आडरानें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ॥४॥

२१२७. कस्तुरीचे अंगीं मिनली मृत्तिका । मग वेगळी कां येईल लेखों ॥१॥ तयापरि भेद नाहीं देवभक्ती । संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या ॥२॥ इंधनें तें आगी संयोगाच्या गुणें । सागरा दरुषणें वोहोळ तोंचि ॥३॥ तुका म्हणे माझें साक्षीचें वचन । येथें तो कारण शुद्ध भाव ॥४॥

२१२८. भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥१॥ देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ॥२॥ उदक अग्नि धान्य जाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥३॥ तुका म्हणे मज कळते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥४॥

२१२९. श्रीसंतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हें करीं दंडवत ॥१॥ विश्रांती पावलों सांभाळा उत्तरीं वाढलें अंतरीं प्रेमसुख ॥२॥ डौरली हे काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरलों ॥३॥ तुका म्हणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोढवला ॥४॥

२१३०. नेणो काय नाड । आला उचित काळ आड ॥१॥ नाहीं जाली संतभेटी । येवढी हानी काय मोठी ॥२॥ सहज पायांपासीं । जवळी पावलिया ऐसी ॥३॥ चुकी जाली आतां काय । तुका म्हणे उरली हाय ॥४॥

२१३१. आणीक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ॥१॥ माझा न व्हावा विसर । नाहीं आणीक आधार ॥२॥ भांडवल सेवा । हाचि ठेवियेला ठेवा ॥३॥ करीं मान भावा । तुका विनंती करी देवा ॥४॥

२१३२. आरुष माझी वाणी बोबडीं उत्तरें । केली ते लेंकुरें सलगी पायीं ॥१॥ करावें कवतुक संतीं मायबापीं । जीवन देउनि रोपीं विस्तारिजे ॥२॥ आधारें वदली प्रसादाची वाणी । उच्छिष्टसेवनीं तुमचिया ॥३॥ तुका म्हणे हेचि करितों विनंती । मागेन पुढती सेवादान ॥४॥

२१३३. पुरुषा हाती कंकणचुडा । नवल दोडा वृत्ति या ॥१॥ पाहा कैसी विटंबणा । नारायणा देखिली ॥२॥ जळो ऐसी ब्रिदावळी । भाटवोळीपणाची ॥३॥ तुका म्हणे पाहों डोळां । अवकळा नये हे ॥४॥

२१३४. वितीयेवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥१॥ जळो त्याची विटंबना । भूक जना नाचवी ॥२॥ अभिमाना सिरीं भार । जाले खर तृष्णेचे ॥३॥ तुका म्हणे नरका जावें । हाचि जीवें व्यापार ॥४॥

२१३५. सेवटासी जरी आलें । तरी जालें आंधळें ॥१॥ स्वहिताचा लेश नाहीं । दगडा कांहीं

अंतरीं ॥२॥ काय परिसासवें भेटी । खापरखुंटी जालिया ॥३॥ तुका म्हणे अधम जन । अवगुणचि वाढवी ॥४॥

२१३६. प्रायश्चित्त देतो तुका । जातो लोकां सकळां ॥१॥ धरितील ते तरतील मनीं । जाती घाणी वांयां त्या ॥२॥ निग्रहअनुग्रहाचे ठाय । देतो घाय पाहोनि ॥३॥ तुका जाला नरसिंहीं । भय नाहीं कृपेनें ॥४॥

२१३७. दुर्जनाचें अंग अवघेंचि सरळ । नर्काचा कोथळ सांठवला ॥१॥ खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघष्टणें ॥२॥ सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळची ॥३॥ तुका म्हणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखट्यासी ॥४॥

२१३८. ऐका जी संतजन । सादर मन करूनि ॥१॥ सकळांचें सार एक । कंटक ते त्यजावे ॥२॥ विशेषता कांद्याहुनी । सेवित्या घाणी आगळी ॥३॥ तुका म्हणे ज्याची जोडी । ते परवडी बैसीजे ॥४॥

२१३९. आज्ञा पाळुनियां असें एकसरें । तुमचीं उत्तरें संतांचीं हीं ॥१॥ भागवूनि देह ठेवियेला पायीं । चरणावरि डोई येथूनचि ॥२॥ येणें जाणें हें तों उपाधीचें मूळ । पूजा ते सकळ अकर्तव्य ॥३॥ तुका म्हणे असें चरणींचा रज । पदींच सहज जेथें तेथें ॥४॥

२१४०. न संडावा ठाव । ऐसा निश्चयाचा भाव ॥१॥ आतां पुरे पुन्हां यात्रा । हेंचि सारूनि सर्वत्रा ॥२॥ सन्निधचि सेवा । असों करुनियां देवा ॥३॥ आज्ञेच्या पाळणें । असें तुका संतां म्हणे ॥४॥

२१४१. उपाधीचें बीज । जळोनि राहिलें सहज ॥१॥ आम्हां राहिली ते आतां । चाली देवाचिया सत्ता ॥२॥ पराधीन तें जिणें । केलें सत्ता नारायणे ॥३॥ तुका म्हणे जाणें पाय । खुंटले आणीक उपाय ॥४॥

२१४२. गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी । हगवण घाणी पिटपिट ते ॥१॥ मस्तक सांडुनि सिसफुल गुडघां । चार तो अवघा बावळ्याचा ॥२॥ अंगभूत म्हूण पूजितो वाहाणा । म्हणतां शहाणा येईल कैसा ॥३॥ तुका म्हणे वेश्या सांगे सवासिणी । इतर पूजनीं भाव तैसा ॥४॥

२१४३. कुतऱ्याऐसें ज्याचें जिणें । संग कोणें न करिजे ॥१॥ जाय तिकडे हाडहाडी । गोऱ्हवाडीच सोयरीं ॥२॥ अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें ॥३॥ तुका म्हणे कैंची लवी । ठेंग्या केवीं अंकुर ॥४॥

२१४४. सर्वथाही खोटा संग । उपजे भंग मनासी ॥१॥ बहु रंगें भरलें जन । संपन्नचि अवगुणी ॥२॥ सेविलिया निष्कामबुद्धि । मदें शुद्धि सांडवी ॥३॥ त्रासोनियां बोले तुका । आतां लोकां दंडवत ॥४॥

२१४५. उपचारासी वांझ जालों । नका बोलों यावरी ॥१॥ असेल तें असो तैसें । भेटीसरिसें नमन ॥२॥ दुसऱ्यामध्यें कोण मिळे । छंद चाळे बहुमतें ॥३॥ एकाएकीं आतां तुका । लौकिका या बाहेरी ॥४॥

२१४६. मीं तें मी तूं तें तूं । कुकुड हें लाडसी ॥१॥ वचनासी पडो तुटी । पोटींचें पोटीं राखावें ॥२॥ तेथील तेथें येथील येथें । वेगळ्या कुंथें कोण भारें ॥३॥ याचें यास त्याचें त्यास । तुक्याने कास घातली ॥४॥

२१४७. लाडाच्या उत्तरीं वाढविती कलह । हा तो अमंगळ जातिगुण ॥१॥ तमाचे शरीरीं विटाळचि वसे । विचाराचा नसे लेश तोही ॥२॥ कवतुकें घ्यावें लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ॥३॥ तुका म्हणे काय उपदेश खळा । न्हाउनि कावळा क्षतें धुंडी ॥४॥

२१४८. आतां मज देवा । इचे हातींचे सोडवा ॥१॥ पाठी लागलीसे लांसी । इच्छा जिते जैसी तैसी ॥२॥ फेडा आतां पांग । अंगीं लपवुनी अंग ॥३॥ दुजें नेणें तुका । कांहीं तुम्हांसी ठाउका ॥४॥

२१४९. बहु वाटे भय । माझे उडी घाला दये ॥१॥ फांसा गुंतलों लिगाडीं । न चले बळ चरफडी ॥२॥ कुंठितचि युक्ति । माझ्या जाल्या सर्व शक्ति ॥३॥ तुका म्हणे देवा । काममोहें केला गोवा ॥४॥

२१५०. विष्ठा भक्षी तया अमृत पारिखें । वोंगळासी सखें वोंगळचि ॥१॥ नये पाहों कांहीं गोऱ्हवाडीचा अंत । झणीं ठाका संत दुर्जनापें ॥२॥ भेंसळीच्या बीजा अमंगळ गुण । उपजवी सीण दरुषणें ॥३॥ तुका म्हणे छीथू जया घरीं धन । तेथें तें कारण कासयाचें ॥४॥

२१५१. चळलें तें काय न करी बडबड । न म्हणे फिकें गोड भुकेलें तें ॥१॥ उमजल्याविण न धरी सांभाळ । असो खळखळ जनाची हे ॥२॥ गरज्या न कळे आपुलिया चाडा । करावी ते पीडा कोणा काई ॥३॥ तुका म्हणे भोग भोगितील भोगें । संचित तें जोगें नाहीं कोणा ॥४॥

२१५२. आपुला तो देह आम्हां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा ॥१॥ कोण नाहीं दक्ष करितां संसार । आम्हीं हा विचार वमन केला ॥२॥ नाहीं या धरीत जीवित्वाची चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥३॥ तुका म्हणे असों चिंतोनियां देवा । मी माझे हा हेवा सारूनियां ॥४॥

२१५३. चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥१॥ धणी काढोनियां निजा । करील ये कामेंची पूजा ॥२॥ उचितावेगळें । अभिळासें तोंड काळें ॥३॥ सांगे तरी तुका । पाहा लाज नाहीं लोकां ॥४॥

२१५४. बरें सावधान । राहावें समय राखोन ॥१॥ नाहीं सारखिया वेळा । अवघ्या पावतां अवकळा ॥२॥ लाभ अथवा हानी । थोड्यामध्येंच भोवनी ॥३॥ तुका म्हणे राखा । आपणा

नाहीं तोंचि वाखा ॥४॥

२१५५. काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ॥१॥ जाली माकडाची परी । जातो तळा येतो वरी ॥२॥ घालीं भलते ठायीं हात । होती शिव्या बैसे लात ॥३॥ आदि अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका ॥४॥

२१५६. धर्म तो न कळे । काय झांकियले डोळे ॥१॥ जीव भ्रमले या कामें । कैसीं कळों येती वर्में ॥२॥ विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ॥३॥ तुका म्हणे लांसी । माया नाचविते कैसी ॥४॥

२१५७. दुर्जनाची जोडी । सज्जनाचे खेंटर तोडी ॥१॥ पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें ॥२॥ न म्हणे रामराम । मनें वाचे हेंचि काम ॥३॥ तुका म्हणे भागा । आली निंदा करी मागा ॥४॥

२१५८. शादीचें तें सोंग । संपादितां राजा व्यंग ॥१॥ पाहा कैसी विटंबना । मूर्खा अभाग्याची जना ॥२॥ दिसतें तें लोपी । झिंज्या वोडनियां पापी ॥३॥ सिंदळी त्या सती । तुका म्हणे थुंका घेती ॥४॥

२१५९. भक्त म्हणवूनि वंचावें तें जीवें । तेणें शेण खावें कशासाठीं ॥१॥ नासिले अडबंद कौपिन ते माळा । अडचण राउळामाजी केली ॥२॥ अंगीकारिले सेवे अंतराय । तया जाला न्याय खापराचा ॥३॥ तुका म्हणे कोठें तगों येती घाणी । आहाच ही मनीं अधीरता ॥४॥

२१६०. गयाळाचे काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ॥१॥ चित्ता न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ॥२॥ न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्त नाहीं त्यासी ॥३॥ तुका म्हणे दु:ख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ॥४॥

२१६१. बहु बरें एकाएकीं । संग चुकी करावा ॥१॥ ऐसें बरें जालें ठावें । अनुभवें आपुल्या ॥२॥ सांगावें तें काम मना । सलगी जना नेदावी ॥३॥ तुका म्हणे निघे आगी । दुजे संगीं आतळतां ॥४॥

२१६२. बरें आम्हां कळों आलें देवपण । आतां गुज कोण राखे तुझें ॥१॥ मारिलें कां मज सांग आजिवरी । आतां सरोबरी तुज मज ॥२॥ जें आम्ही बोलों तें आहे तुझ्या अंगीं । देईन प्रसंगी आजि शिव्या ॥३॥ निलाजिरा तुज नाहीं याति कुळ । चोरटा शिंदळ ठावा मज ॥४॥ खासी धोंडे माती जीव जंतु झाडें । एकलें उघडें परदेसीं ॥५॥ गाढव कुतरा ऐसा मज ठावा । बईल तूं देवा भारवाही ॥६॥ लटिका तूं मागें बहुतांसी ठावा । आलें अनुभवा माझ्या तेंही ॥७॥ तुका म्हणे मज खवळिलें भांडा । आतां धीर तोंडा न धरवे ॥८॥

२१६३. आम्ही भांडो तुजसवें । वर्मी धरूं जालें ठावें ॥१॥ होसी सरड बेडुक । वाघ

गांढ्याही पाइक ॥२॥ बळ करी तया भ्यावें । पळों लागे तया घ्यावें ॥३॥ तुका म्हणे दूर परता । नर नारी ना तूं भूता ॥४॥

२१६४. काय साहतोसी फुका । माझा बुडविला रुका ॥१॥ रीण घराचें पांगिलें । तें न सुटे कांहीं केलें ॥२॥ चौघांचिया मतें । आधीं खरें केलें होतें ॥३॥ तुका म्हणे यावरी । आतां भीड कोण धरी ॥४॥

२१६५. प्रीतीचा हेकळ । पदरासी घाली पीळ । सरों नेदी बाळ। मागें पुढें पित्यासी ॥१॥ काय लागे त्यासी बळ । हेडावितां कोण काळ । गोवितें सबळ । जाळी स्नेहसूत्राचीं ॥२॥ सलगी दिला लाड । केलें तें तें वाटे गोड । करी बुझावोनि कोड । हातीं देऊनि भातुकें ॥३॥ तुका म्हणे बोलों कोणा । हें कां नेणां नारायणा । सलगीच्या वचना । कैचें उपजे विषम ॥४॥

२१६६. भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ॥१॥ आले आले वैष्णववीर । काळ कांपती असुर ॥२॥ गरुडटकयाच्या भारें । भूमी गर्जे जयजयकारें ॥३॥ तुका म्हणे काळ । पळे देखोनियां बळ ॥४॥

२१६७. रंगीं रंगेरे श्रीरंगे । काय भुललासी पतंगें ॥१॥ शरीर जायाचें ठेवणें । धरिसी अभिळास झणें ॥२॥ नव्हे तुझा हा परिवार । द्रव्य दारा क्षणभंगुर ॥३॥ अंतकाळींचा सोइरा । तुका म्हणे विठो धरा ॥४॥

२१६८. जन्मा येउनि काय केलें । तुवां मुद्दल गमाविलें ॥१॥ का रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजिखोरा ॥२॥ केली गाठोळीची नासी । पुढें भीकचि मागसी ॥३॥ तुका म्हणे ठाया । जाई आपुल्या आलिया ॥४॥

२१६९. पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठनायका क्षेम सांगा ॥१॥ अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ॥२॥ ग्रासिलों भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां ॥३॥ कामक्रोधसुनीं श्वापदें बहुतीं । वेढलों आवर्तीं मायेचिये ॥४॥ मृगजळनदी बुडविना तारी । आणूनियां वरी तळा नेते ॥५॥ तुका म्हणे तुवां धरिलें उदास । तरी पाहों वास कवणाची ॥६॥

२१७०. कृपाळू सज्जन तुम्ही संतजन । हेंचि कृपादान तुमचें मज ॥१॥ आठवण तुम्हीं द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुलती ॥२॥ अनाथ अपराधी पतित आगळा । परि पायांवेगळा नका करूं ॥३॥ तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी । मग मज हरि उपेक्षीना ॥४॥

२१७१. संतांचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास झालों त्यांचा ॥१॥ तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ॥२॥ भागलिया मज वाहतील कडे ।

त्यांचियानें जोडे सर्व सुख ॥३॥ तुका म्हणे शेष घेईन आवडी। वचन न मोडी बोलिलें तें ॥४॥

२१७२. लाघवी सूत्रधारी। दोरी नाचवी कुसरी। उपजवी पाळूनि संहारी। नानापरीचें लाघव ॥१॥ पुरोनि पंढरिये उरलें। भक्तिसुखें लांचावलें। उभेंचि राहिलें। कर कटीं न बैसे ॥२॥ बहु काळें ना सांवळें। बहु कठिण ना कोवळें। गुणत्रया वेगळें। बहुबळें आथीलें ॥३॥ असोनि नसे सकळामधीं। मना अगोचर बुद्धी। स्वामी माझा कृपानिधि। तुज म्हणे श्रीविठ्ठल ॥४॥

२१७३. कीर्तन ऐकावया भुलले श्रवण। श्रीमुख लोचन देखावया ॥१॥ उदित हें भाग्य होईल कोणे काळीं। चित्त तळमळी म्हणऊनि ॥२॥ उतावीळ बाह्या भेटिलागीं दंड। लोटांगणीं धड जावयासी ॥३॥ तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं। होतील पारणीं इंद्रियांचीं ॥४॥

२१७४. नाम घेतां कंठ शीतळ शरीर। इंद्रियां व्यापार नाठवती ॥१॥ गोड हें गोमटें अमृतासी वाड। केला कईवाड माझ्या चित्तें ॥२॥ प्रेमरसें जाली पुष्ट अंगकांति। त्रिविध नासती ताप क्षणें ॥३॥ तुका म्हणे तेथें विकाराची मात। बोलों नये हित सकळांचें ॥४॥

२१७५. स्वामिकाज गुरुभक्ति। पितृवचन सेवा पति ॥१॥ हेचि विष्णूची महापूजा। आनुभाव नाहीं दुजा ॥२॥ सत्य बोलें मुखें। दुखवे आणिकांच्या दुःखें ॥३॥ निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंच फळ ॥४॥

२१७६. चित्त घेऊनियां तूं काय देसी। ऐसें मजपाशीं सांग आधीं ॥२॥ तरिच पंढरिराया करिन साटोवाटी। नेघें जया तुटी येईल तें ॥२॥ रिद्धिसिद्धि कांहीं दाविसी अभिळास। नाहीं मज आस मुक्तीचीही ॥३॥ तुका म्हणे तुझें माझें घडे तर। भक्तीचा भाव रे देणें घेणें ॥४॥

२१७७. तुझा संग पुरे संग पुरे। संगति पुरे विठोबा ॥१॥ आपल्यासारिखें करिसी दासां। भिकारीसा जग जाणे ॥२॥ रूपा नाहीं ठाव नांवा। तैसे आमुचें करिसी देवा ॥३॥ तुका म्हणे तोयें आपुलें भेंडोळें। करिसी वाटोळें माझें तैसें ॥४॥

२१७८. आतां मज तारीं। वचन हें साच करीं ॥१॥ तुझें नाम दीनानाथ। ब्रिदावळी जगविख्यात ॥२॥ कोण लेखी माझ्या दोषा। तुझा त्रिभुवनीं ठसा ॥३॥ वांयां जातां मज। तुका म्हणे तुम्हां लाज ॥४॥

२१७९. विठ्ठल आमुचा निजाचा। सज्जन सोयरा जीवाचा ॥१॥ माय बाप चुलता बंधु। अवघा तुजशीं संबंधु ॥२॥ उभय कुळीं साक्ष। तूंचि माझा मातुळपक्ष ॥३॥ समर्पिली काया। तुका म्हणे पंढरीराया ॥४॥

२१८०. वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनीं वाहावा भार माथां ॥१॥ खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं। भार धन वाही मजुरीचें ॥२॥ उत्पत्तिपाळणसंहाराचें निज। जेणें नेलें

बीज त्याचे हातीं ॥३॥ तुका म्हणे आम्हां सांपडलें मूळ । आपणचि फळ आलें हाता ॥४॥

२१८१. आमुचा तूं ऋणी ठायींचाचि देवा । मागावया ठेवा आलों दारा ॥१॥ वर्म तुझें आम्हां सांपडलें हातीं । धरियेले चित्तीं दृढ पाय ॥२॥ बैसलों धरणें कोंडोनियां द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं नेदी ॥३॥ तुज मज सरी होइल या विचारें । जळों भांडखोरें निलाजिरीं ॥४॥ भांडवल माझें मिरविसी जनीं । सहस्त्र वोवणी नाममाळा ॥५॥ तुका म्हणे आम्हीं केली जिवें साटी । तुम्हां आम्हां तुटी घालूं आतां ॥६॥

२१८२. काय धोविलें बाहेरी । मन मळलें अंतरीं । गादलें जन्मवरी । असत्यकाटें काटलें ॥१॥ सांडी व्यापार दंभाचा । शुद्ध करीं रे मन वाचा । तुझिया चित्ताचा । तूं ग्वाही आपुला ॥२॥ पापपुण्यविटाळ देहीं । करितां न विचारिसी कांहीं । काय चाचपसी मही । जी अखंड सोंवळी ॥३॥ कामक्रोधा वेगळा । ऐसा होईं कां रे सोंवळा । तुका म्हणे कळा । गुंडून ठेवीं या कुसरी ॥४॥

२१८३. सत्यकर्म आचरें रे । बापा सत्यकर्म आचरें रे । सत्यकर्म आचरें होईल हित । वाढेल दुःख असत्याचें ॥ध्रु०॥ ऊंस वाढवितां वाढली गोडी । गूळ साकर हे त्याची परवडी ॥१॥ साकरेच्या आळां लाविला कांदा । स्थूळ साना परी वाढे दुर्गंधा ॥२॥ सत्य असत्य हें ऐसिया परी । तुका म्हणे याचा विचार करीं ॥३॥

२१८४. पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥१॥ सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव तेचि झाले ॥२॥ उदका भिन्न पालट काई । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥३॥ तुका म्हणे हें भाविकांचें वर्म । येरें धर्माधर्म विचारावे ॥४॥

२१८५. जन्मा येऊनि कां रे निदसुरा । जाय भेटी वरा रखुमाईच्या ॥१॥ पाप ताप दैन्य जाईल सकळ । पावसी अढळ उत्तम तें ॥२॥ संतमहंतसिद्धहरिदासदाटणी । फिटती पारणीं इंद्रियांचीं ॥३॥ तुका म्हणे तेथें नामाचा गजर । फुकाचे अपार लुटी घेईं ॥४॥

२१८६. काय धोविलें कातडें । काळकूट भीतरि कुडें ॥१॥ उगा राहें लोकभांडा । चाळविल्या पोरें रांडा ॥२॥ घेसी बुंथी पानवथां । उगाच हालविसी माथा ॥३॥ लावूनि बैसे टाळी । मन इंद्रियें मोकळीं ॥४॥ हालवीत बैसे माळा । विषयजप वेळोवेळां ॥५॥ तुका म्हणे हा व्यापार । नाम विठोबाचें सार ॥६॥

२१८७. येईं वो येईं वो येईं धांवोनियां । विलंब कां वांयां लावियला कृपाळे ॥१॥ विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस माये विश्वव्यापके ॥२॥ न करीं न करीं आतां आळस अव्हेरु । व्हावया प्रगट कैंचा दूरी अंतरु ॥३॥ नेघें नेघें नेघें माझी वाचा विसांवा । तुका म्हणे हांवा हांवा हांवा साधावा ॥४॥

२१८८. तरी कां पवाडे गर्जती पुराणें । असता नारायण शक्तिहीन ॥१॥ कीर्तीविण नाहीं

नामाचा डांगोरा । येर कां इतरां वाणीत ना ॥२॥ तरीच म्हणतों आहे चिरंजीव । केलियाचा जीव सुखीं गुणें ॥३॥ चांगलेंपण हे निरुपायता अंगीं । बाणलें श्रीरंगीं म्हणऊनी ॥४॥ तरीच हा थोर सांगितलें करी । अभिमान हरीपाशीं नाहीं ॥५॥ तुका म्हणे तरी करिती याची सेवा । देवापाशीं हेवा नाहीं कुडी ॥६॥

२१८९. तेव्हां धालें पोट बैसलों पंगती । आतां आम्हां मुक्तिपांग काईं ॥१॥ धांवा केला आतां येईल धांवोन । येथें काईं करणें लागे संदेह ॥२॥ गायनाचा आतां कोठें उरला काळ । आनंद सकळ भरी आलें ॥३॥ देवाच्या सख्यत्वें विषमासी ठाव । मध्यें कोठें वाव राहों सके ॥४॥ तेव्हां जाली अवघी बाधा वाताहात । प्रेम हृदयांत प्रवेशलें ॥४॥ तुका म्हणे आम्हीं जिंतिलें भरंवसा । देव कोठें दासां मोकलितो ॥५॥

२१९०. हेचि याच्या ऐसें मागावें दान । वंदुनि चरण नारायणा ॥१॥ धीर उदारींव निर्मळ निर्मत्सर । येणें सर्वेश्वर ऐसें नांव ॥२॥ हाचि होईजेल याचिया विभागें । अनुभव अंगें अनुभवील्या ॥३॥ जोडे तयाचे कां न करावे सायास । झाला तरि आळस दीनपणें ॥४॥ फांवल्या मागें की न घालावी धांव । धरिल्या तरि हांव बळ येतें ॥५॥ तुका म्हणे घालूं खंडीमध्यें टांक । देवाचें हें एक करुनी घेऊं ॥६॥

२१९१. सत्ताबळें येतो मागतां विभाग । लावावया लाग निमित्य करूं ॥१॥ तुझें ऐसें मुखें करूं उच्चारण । बोलें नारायण सांपडवूं ॥२॥ आसेविण नाहीं उपजत मोहो । तरिच हा गोहो न पडे फंदीं ॥३॥ तुका म्हणे आतां व्हावें याजऐसें । सरिसें सरिसें समागमें ॥४॥

२१९२. करितां होय होय चित्तचि नाहीं । घटापटा कांहीं करूं नये ॥१॥ मग हालतचि नाहीं जवळून । करावा तो सीण सीणवितो ॥२॥ साहतचि नाहीं कांहीं पाकुळलें । उगल्या उगलें ढळत आहे ॥३॥ तुका म्हणे तरी बोलावें झांकून । येथें खुणे खूण पुरतेंचि ॥४॥

२१९३. संतसंगें याचा वास सर्वकाळ । संचला सकळ मूर्तिमंत ॥१॥ घालूनियां काळ अवघा बाहेरी । त्यासीच अंतरीं वास दिला ॥२॥ आपुलेंसें जिहीं नाहीं उरों दिलें । चोजवितां भलें ऐसीं स्थळें ॥३॥ तुका म्हणे नाहीं झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदनचि ॥४॥

२१९४. पुष्ट कांति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगीं ॥१॥ अंतर्बाहीं विलेपन । हें भूषण मिरवूं ॥२॥ इच्छेऐसी आवडी पुरे । विश्वंभरे जवळीं ॥३॥ तुका करी नारायण । या सेवन नामाचें ॥४॥

२१९५. सुकाळ हा दिवसरजनी । नित्य धणी नवीच ॥१॥ करुनि सेवूं नाना परी । राहे उरी गोडीनें ॥२॥ सरे ऐसा नाहीं झरा । पंक्तीकरा समवेत ॥३॥ तुका म्हणे बरवा पान्हा । कान्हाबाई माउलीचा ॥४॥

२१९६. पाहतां तव एकला दिसे । कैसा असे व्यापक ॥१॥ ज्याचे त्याचे मिळणीं मिळे । तरी खेळे बहुरूपी ॥२॥ जाणिवेचें नेदी अंग । दिसे रंग निवडेना ॥३॥ तुका म्हणे हेचि ठायीं । हें तों नाहीं सर्वत्र ॥४॥

२१९७. तुम्हांसाठीं आम्हां आपुला विसर । करितां अव्हेर कैसें दिसे ॥१॥ विचारा जी आतां ठायींचें हे देवा । आम्हां नये हेवा वाढवितां ॥२॥ आलों ठाकोनियां सुखाची वसती । पुढें माझ्या युक्ति खुंटलिया ॥३॥ तुका म्हणे जाला सकळ वृत्तांत । केला प्रणिपात म्हणऊनि ॥४॥

२१९८. करावा उध्दार हें तुम्हां उचित । आम्हीं केली नीत कळली ते ॥१॥ पाववीली हांक धांवा म्हणऊन । करावें जतन ज्याचें तेणें ॥२॥ दुश्चितासी बोल ठेवायासी ठाव । ऐसा आम्ही भाव जाणतसों ॥३॥ तुका म्हणे माझें कायावाचामन । दुसरें तें ध्यान करीत नाहीं ॥४॥

२१९९. संतांचा उपदेश आमुचे मस्तकीं । नाहीं मृत्युलोकीं राहाणेसा ॥१॥ म्हणऊनि बहु तळमळी चित्त । येईं वो धांवत पांडुरंगे ॥२॥ उपजली चिंता लागला उशीर । होत नाहीं धीर निढळ वाटे ॥३॥ तुका म्हणे पोटीं रिघालेंसे भय । करूं आतां काय ऐसे जालें ॥४॥

२२००. काळावरी घालूं तरि तो सरिसा । न पुरतां इच्छा दास कैसे ॥१॥ आतां नाहीं कांहीं उसिराचें काम । न खंडावें प्रेम नारायणा ॥२॥ देणें लागे मज विलंब कां आड । गोड तरि गोड आदि अंत ॥३॥ तुका म्हणे होइल दर्शनें निश्चिती । गाईन तें गीतीं ध्यान मग ॥४॥

२२०१. पर उपकारें कायावाचामन । वेची सुदर्शन रक्षी तया ॥१॥ याजसाठीं असें योजिलें श्रीपति । संकल्पाचे हातीं सर्व जोडी ॥२॥ परपीडे ज्याची जिव्हा मुडताळे । यमदूत टाळे करिती पूजा ॥३॥ तुका म्हणे अंबऋषी दुर्योधना । काय झालें नेणां दुर्वासया ॥४॥

२२०२. हागिल्याचे सिंके वोणवाचि राहे । अपशकुन पाहे वेडगळ ॥१॥ अतेता समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिक धरा ॥२॥ भोजनसमयीं ओकाचा आठव । ठकोनियां जीव कष्टी करी ॥३॥ तुका म्हणे किती सांगावें उगवून । अभाग्याचे गुण अनावर ॥४॥

२२०३. नारडे तरि काय नुजडे कोंबडें । करूनियां वेडें आग्रहो दावी ॥१॥ आइत्याचें साहे फुकाचा विभाग । विक्षेपानें जग छी थू करी ॥२॥ नेमूनि ठेविला करत्यानें काळ । न लाहेसें बळ करूं पुढें ॥३॥ तुका म्हणे देव साह्य जाल्यावरी । असंगाचें करी सर्व सांग ॥४॥

२२०४. तरी सदा निर्भर दास । चिंता आस विरहित ॥१॥ अवघाच एक ठाव । सर्व भाव विठ्ठलीं ॥२॥ निरविलें तेव्हां त्यास । जाला वास त्यामाजी ॥३॥ तुका म्हणे रूप ध्यावें । नाहीं ठावे गुणदोष ॥४॥

२२०५. वेडिया उपचार करितां सोहळे । काय सुख कळे तयासी तें । अंधापुढें दीप नाचती नाचणें । भक्तिभावेंविण भक्ति तैसी ॥१॥ तिमाणें राखण ठेवियलें सेता । घालुनियां माथां चुना

तया । खादलें म्हणूनि सेवटीं बोंबली । ठायींची कां भुली नेणां रया ॥२॥ मुकियापासाव सांगतां पुराण । रोगिया मिष्टान्न काय होय । नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसी होय ॥३॥ हात पाय नाहीं करिल तो काय । वृक्षा फळ आहे अमोलिक । हातां नये तैसा वांयांच तळमळी । भावेंविण भोळीं म्हणे तुका ॥४॥

२२०६. मेघवृष्टीनें करावा उपदेश । परि गुरुनें न करावा शिष्य । वांटा लाभे त्यास । केल्या अर्धकर्माचा ॥१॥ द्रव्य वेचावें अन्नछत्रीं । भूतीं द्यावें सर्वत्र । न घ्यावा हा पुत्र । उत्तम याती पोसणा ॥२॥ बीज न पेरावें खडकीं । ओल नाहीं ज्याचे बुडखीं । थीतां ठके सेखीं । पाठी लागे दिवाण ॥३॥ गुज बोलावे संतांसीं । पत्नी राखावी जैसी दासी । लाड देतां तयेसी । वांटा पावे कर्माचा ॥४॥ शुद्ध कसूनि पाहावें । वरिला रंगा न भुलावें । तुका म्हणे घ्यावें । जया नये तुटी तें ॥५॥

२२०७. नावडावे जन नावडावा मान । करूनि प्रमाण तूंचि होईं ॥१॥ सोडवूनि देहसंबंध व्यसनें । ऐसी नारायणें कृपा कीजे ॥२॥ नावडावें रूप नावडावा रस । अवघी राहो आस पायांपाशीं ॥३॥ तुका म्हणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता ठेवा ऐसें ॥४॥

२२०८. उपाधिवेगळे तुम्ही निर्विकार । कांहीच संसार तुम्हां नाहीं ॥१॥ ऐसें मज करूनि ठेवा नारायणा । समूळ वासना नुरवावी ॥२॥ नि:संग तुम्हांसी राहणें एकट । नाहीं कटकट साहों येत ॥३॥ तुका म्हणे नाहीं मिळों येत शिळा । रंगासी सकळा स्फटिकाची ॥४॥

२२०९. माहार मातेचे पणी भरे । न कळे खरें पुढील ॥१॥ वोंगळ अधमाचे गुण । जातां घडी नलगेचि ॥२॥ श्वान झोळी स्वामिसत्ता । कोप येतां उत्तर ॥३॥ तुका म्हणे गुमान कां । सांगों लोकां अधमासी ॥४॥

२२१०. डोळ्यामध्यें जैसें कणु । अणु तेंहि न समाये ॥१॥ तैसें शुद्ध करा हित । नका चित्त बाटवूं ॥२॥ आपुल्याचा कळवळा । आणिका बाळावरि न ये ॥३॥ तुका म्हणे बीज मुडा । जैशा चाडा पिकाच्या ॥४॥

२२११. मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांची ॥१॥ वैष्णवाचा माल खरा । तुरतुरा वस्तूसी ॥२॥ भस्म दंड नलगे काठी । तीर्थां आटी भ्रमण ॥३॥ तुका म्हणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ॥४॥

२२१२. आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ॥१॥ मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ॥२॥ जळो तें समूळ । धनसंपत्ति उत्तम कुळ ॥३॥ तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥४॥

२२१३. आतां न म्हणें मी माझें । नेघें भार कांहीं ओझें ॥१॥ तूंचि तारिता मारिता । कळों

आलासी निरुता ॥२॥ अवघा तूंचि जनार्दन । संत बोलती वचन ॥३॥ तुका म्हणे कांहीं । माझें तिळभरी नाहीं ॥४॥

२२१४. समुद्रवळकांकित पृथ्वीचें दान । करितां समान नये नामा ॥१॥ म्हणऊनि कोणी न करावा आळस । म्हणा रात्रीदिवस रामराम ॥२॥ सकळही शास्त्रें पठण करितां वेद । सरी नये गोविंदनामें एकें ॥३॥ सकळही तीर्थें प्रयागादि काशी । करितां नामाशीं तुळति ना ॥४॥ कर्वतीं कर्मरीं देहासी दंडण । करितां समान नये नामा ॥५॥ तुका म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । नाम हेंचि सार विठोबाचें ॥६॥

२२१५. अवघ्या वाटा जाल्या क्षीण । कळी न घडे साधन । उचित विधी विधान । न कळे न घडे सर्वथा ॥१॥ भक्तिपंथ बहु सोपा । पुण्य नांगवेया । येणें जाणें खेपा । येणेंचि एके खंडती ॥२॥ उभारोनि बाहे । विठो पालवित आहे । दासां मीचि साहे । मुखें बोले आपुल्या ॥३॥ भाविक विश्वासी । पार उतरिलें त्यासी । तुका म्हणे नासी । कुतर्क्याचे कपाळीं ॥४॥

२२१६. आम्ही नामाचे धारक । नेणों प्रकार आणीक । सर्व भावें एक । विठ्ठलचि प्रमाण ॥१॥ नलगे जाणावें नेणावें । गावें आनंदें नाचावें । प्रेमसुख घ्यावें । वैष्णवांचे संगती ॥२॥ भावबळें घालूं कास । लज्जा चिंता दवडूं आस । पायीं निजध्यास । म्हणवूं दास विष्णूचे ॥३॥ भय नाहीं जन्म घेतां । मोक्षसुखा हाणों लाता । तुका म्हणे सत्ता । करूं निकट सेवेची ॥४॥

२२१७. आम्ही हरिचे संवगडे । जुने ठायींचे वेडे बागडे । हातीं धरूनि कढे । पाठीसवें वागविलों ॥१॥ म्हणोनि भिन्न भेद नाहीं । देवा आम्हां एक देहीं । नाहीं जालों कईं । एका एक वेगळे ॥२॥ निद्रा करितां होतों पायीं । सवेंचि लंका घेतलीं तईं । वानर गोवळ गाई । सवें चारित फिरतसों ॥३॥ आम्हां नामाचें चिंतन । राम कृष्ण नारायण । तुका म्हणे क्षण । खातां जेवितां न विसंबों ॥४॥

२२१८. मागें बहुतां जन्मीं । हेंचि करित आलों आम्ही । भवतापश्रमी । दुःखें पीडिले निववूं त्यां ॥१॥ गर्जों हरिचे पवाडे । मेळवूं वैष्णव बागडे । पाझर रोकडे । काढूं पाषाणामध्यें ॥२॥ भाव शुद्ध नामावळी । हर्षें नाचों पिटूं टाळी । घालूं पायां तळीं । कळिकाळ या बळें ॥३॥ कामक्रोध बंदी खाणी । तुका म्हणे दिले दोन्ही । इंद्रियांचे धणी । आम्ही जालों गोसावी ॥४॥

२२१९. अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा ॥१॥ चाल जाऊं संतांपुढें । वाद सांगेन निवाडें ॥२॥ तुज नांव जरी नाहीं । तरी माझें दाव काई ॥३॥ तुज रूप जरी नाहीं । तरी माझें दाव काई ॥४॥ खेळसी तूं लीळा । तेयें मी काय वेगळा ॥५॥ साच तूं लटिका । तैसा मीही म्हणे तुका ॥६॥

२२२०. मंत्र चळे पिसें लागतें सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ॥१॥ अशौच तो बाधी

आणिकां अक्षरां । नाम निदसुरा घेतां तरे ॥२॥ रागज्ञानघात चुकतां होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक ॥३॥ आणिकां भजना विधी बोलिला निषेध । नाम तें अभेद सकळां मुखीं ॥४॥ तुका म्हणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरूनि नेली नामें ॥५॥

२२२१. नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥१॥ येथें नाहीं वेश सरते आडनांव । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥२॥ नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा प्रावरणासी ॥३॥ नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥४॥ नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥५॥ नव्हती ते संत करितां तप तीर्थाटन । सेविलिया वन नव्हती संत ॥६॥ नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ॥७॥ तुका म्हणे नाहीं निरसला देहें । तोंवरी आघवे संसारिक ॥८॥

२२२२. हेंचि दान देहा देवा । तुझा विसर न व्हावा ॥१॥ गुण गाइन आवडी । हेंचि माझी सर्व जोडी ॥२॥ नलगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देईं सदा ॥३॥ तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हासी ॥४॥

२२२३. भाग्यवंता हे परवडी । करिता जोडी जन्माची ॥१॥ आपुलाला लाहो भावें । जें ज्या व्हावें तें आहे ॥२॥ इच्छाभोजनाचा दाता । नलगे चिंता करावी ॥३॥ तुका म्हणे आल्या थोऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ॥४॥

२२२४. वंचुनियां पिंड । भाता दान करी लंड ॥१॥ जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ॥२॥ मेल्या राखे दिस । ज्यालेपण जालें वोस ॥३॥ तुका म्हणे देवा । लोभें न पुरेचि सेवा ॥४॥

२२२५. अधीरा माझ्या मना ऐक एक मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ॥१॥ हेचि चिंता काय खावें म्हणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ॥२॥ पाहा ते चातक नेघे भूमिजळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ॥३॥ सकळयातींमध्यें ठक हा सोनार । त्या घरीं व्यापार झारियाचा ॥४॥ तुका म्हणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय असे ॥५॥

२२२६. कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥१॥ बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥२॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥३॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥४॥ तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥५॥

२२२७. उदारा कृपाळा पतितपावना । ब्रिदें नारायणा साच तुझीं ॥१॥ वर्णिलासी जैसा जाणतां नेणतां । तैसा तूं अनंता साच होसी ॥२॥ दैत्यां काळ भक्तां मेघश्याममूर्ति । चतुर्भुज हातीं शंख चक्र ॥३॥ काम इच्छा तयां तैसा होसी रानीं । यशोदेच्या स्तनीं पान करी ॥४॥

होऊनि सकळ कांहींच न होसी। तुका म्हणे यासी वेद ग्वाही ॥५॥

२२२८. करूनि चिंतन खेळें भोंवतालें। चित्त येथें आलें पायांपाशीं ॥१॥ येथें नाहीं खोटा चालत परिहार। जाणसी अंतर पांडुरंगा ॥२॥ सुख दुःख तुज देऊनि सकळ। नाहीं ऐसा काळ केला आम्हीं ॥३॥ तुका म्हणे जाला देहाचा विसर। आतां आप पर नाहीं कोणी ॥४॥

२२२९. परिसाचे अंगें सोनें जाला विळा। वाकणिया कळाहीन नव्हे ॥१॥ अंतरीं पालट घडला कारण। मग समाधान तेंचि गोड ॥२॥ पिकलिया सेंद पूर्वकर्मा नये। अव्हेरु तो काय घडे मग ॥३॥ तुका म्हणे आणा पंगती सुरण। पृथक ते गुण केले पाकें ॥४॥

२२३०. पाहे तिकडे दिशा ओस। अवघी आस पायांपें ॥१॥ मनिंचें साच होइल कईं। प्रेम देईं भेटोनि ॥२॥ सर्वापरी पांगुळ असे। न कळे कैसें हें तुम्हां ॥३॥ तुका म्हणे कृपावंत। तूं तों दाता दीनाचा ॥४॥

२२३१. चाळवणें काय। ऐसें अगे माझे माय ॥१॥ धांव पाव लवलाहें। कंठीं प्राण वाट पाहे॥२॥ पसरूनि कर। तुज चालिलों समोर॥३। देशील विसांवा। तुका म्हणे ऐशा हांवा॥४॥

२२३२. मतिविण काय वर्णूं तुझें ध्यान। जेथें पडे मौन वेदश्रुती ॥१॥ करूनि गोजिरा आपुलिये मती। धरियेलें चित्तीं चरणकमळ ॥२॥ सुखाचें ओतिलें पाहों तें श्रीमुख। तेणें हरे भूक ताहान माझी ॥३॥ रसना गोडावली ओव्या गातां गीत। पावलेंसे चित्त समाधान ॥४॥ तुका म्हणे माझी दृष्टि चरणांवरी। पाउलें गोजिरीं कुंकुमाचीं ॥५॥

२२३३. ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणें। जीवलग नेणें मज कोणी ॥१॥ भय वाटे देखें श्वापदांचे भार। नव्हे मज धीर पांडुरंगा ॥२॥ अंधकार पुढें न चलवे वाट। लागतील खुंट कांटे अंगा ॥३॥ एकला निःसंग फांकती मारग। भितों नव्हे लाग चालावया ॥४॥ तुका म्हणे वाट दावुनि सद्गुरु। राहिलासे दुरु पांडुरंग ॥५॥

२२३४. जे केली आळी ते अवघी गेली वांयां। उरला पंढरिराया श्रम माझा ॥१॥ काय समाधान केलें कोणे वेळे। कोण माझे लळे पाळियेले ॥२॥ आभासही नाहीं स्वप्नीं दुश्चित्ता। प्रत्यक्ष बोलतां काय चिंता ॥३॥ आतां पुढें लाज वाटे पांडुरंगा। भक्त ऐसें जगामाजी जालें ॥४॥ तुका म्हणे आतां नाहीं भरंवसा। मोकलीसी ऐसा वाटतोसी ॥५॥

२२३५. भलते जन्मीं मज घालिसील तरी। न सोडीं मी हरी नाम तुझें ॥१॥ सुख दुःख तुज देईन भोगितां। मग मज चिंता कासयाची ॥२॥ तुझा दास म्हणवीन मी अंकिला। भोगितां विठ्ठला गर्भवास ॥३॥ कासया मी तुज भाकितों करुणा। तारीं नारायणा म्हणऊनि ॥४॥ तुका म्हणे तुज येऊं पाहे उणें। तारिसील तेणें आम्हां तया ॥५॥

२२३६. गातों नाचतों आनंदें। टाळघागरियाच्या छंदें ॥१॥ तुझीं तुजपुढें देवा। नेणों भाव

कैसी सेवा ॥२॥ नेणों ताल घात मात । भलते सवां पाय हात ॥३॥ लाज नाहीं शंका । प्रेमें धालों म्हणे तुका ॥४॥

२२३७. मरण माझें मरोन गेलें । मज केले अमर ॥१॥ ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभाव ॥२॥ आला होता गेला पूर । धरिला धीर जीवनीं ॥३॥ तुका म्हणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ॥४॥

२२३८. माझें लेखीं देव मेला । असो त्याला असेल ॥१॥ गोष्ट न करीं नांव नेघें । गेलों दोघें खंडोनी ॥२॥ स्तुतिसमवेत निंदा । केला धंदा उदंड ॥३॥ तुका म्हणे निवांत ठेलों । वेंचित आलों जीवित्व ॥४॥

२२३९. लवविलें तयासवें लवे जाती । अभिमाना हातीं सांपडेना ॥१॥ भोळिवेचें लेणें विष्णुदासां साजे । तेथें भाव दुजे हारपती ॥२॥ अर्चन वंदन नवविधा भक्ति । दया क्षमा शांति तये ठायीं ॥३॥ तये गांवीं नाहीं दु:खाची वसति । अवघाचि भूतीं नारायण ॥४॥ अवघेंचि जालें सोंवळें ब्रह्मांड । विटाळाचें तोंड न देखती ॥५॥ तुका म्हणे गाजे वैकुंठीं सोहळा । याही भूमंडळामाजी कीर्ति ॥६॥

२२४०. संपदा सोहळा नावडे मनाला । करीतें टकळा पंढरीचा ॥१॥ जावें पंढरिसी आवडी मनासी । कधीं एकादशी आषाढी हे ॥२॥ तुका म्हणे ऐसें आर्त ज्याचे मनीं । त्याची चक्रपाणी वाट पाहे ॥३॥

२२४१. पंढरीची वारी आहे माझे घरीं । आणीक न करीं तीर्थव्रत ॥१॥ व्रत एकादशी करीन उपवाशी । गाईन अहर्निशीं मुखीं नाम ॥२॥ नाम विठोबाचें घेईन मी वाचे । बीज कल्पांतींचें तुका म्हणे ॥३॥

२२४२. कथनी पठणी करूनि काय । वांचुनि रहणी वांयां जाय ॥१॥ मुखीं वाणी अमृतगोडी । मिथ्या भुकें चरफडी ॥२॥ पिळणीं पाक करितां दगडा । काय जडा होय तें ॥३॥ मधु मेळवूनी माशी । आणिका सांसी पारधिया ॥४॥ मेळवूनी धन मेळवी माती । लोभ्या हातीं तेंचि मुखीं ॥५॥ आपुलें केलें आपण खाय । तुका वंदी त्याचे पाय ॥६॥

२२४३. उमटती वाणी । वाटे नामाचिया ध्वनी ॥१॥ बरें सेवन उपकारा । द्यावें घ्यावें या उत्तरा ॥२॥ सरळ आणि मृद । कथा पाववीते ऊर्ध्व ॥३॥ गात जात तुका । हाचि उपदेश आइका ॥४॥

२२४४. कथाकाळींची मर्यादा । सांगतों ते भावें वंदा । प्रीतीनें गोविंदा । हेंचि एक आवडे ॥१॥ टाळ वाद्य गीत नृत्य । अंत:करण प्रेमभरित । वाणिता तो कीर्त । तद्भावने लेखावा ॥२॥ नये आळसें मोडूं अंग । कथे कानवडे ढुंग । हेळणेचा रंग । दावील तो चांडाळ ॥३॥ तोंडीं विडा

माने ताठा । थोरपणें घाली गेंठा । चित्त नेदी नामपाठा । गोष्टी लावी तो चांडाळ ॥४॥ कथे इच्छी मान । दावू नियां थोरपण । रजा संकोचून । लुगडीं सांवरी तो चांडाळ ॥५॥ आपण बैसे बाजेवरी । सामान्य हरीच्या दासां धरी । तरि तो सुळावरी । वाहिजेल निश्चयें ॥६॥ येतां न करी नमस्कार । कर जोडोनिया नम्र । न म्हणतां थोर । आणिकां खेटी तो चांडाळ ॥७॥ तुका विनवी जना । कथे नाणावें अवगुणा । करा नारायणा । ऋणी समर्पण भावें ॥८॥

२२४५. कथा देवाचें ध्यान कथा साधना मंडण । कथे ऐसें पुण्य आणिक नाहीं सर्वथा ॥१॥ ऐसा साच खरा भाव । कथेमाजी उभा देव ॥२॥ मंत्र स्वल्प जना । उच्चारितां वाचे मना । म्हणतां नारायणा । क्षणें जळती महा दोष ॥३॥ भावें करितां कीर्तन । तरे तारी आणीक जन । भेटे नारायण । संदेह नाहीं म्हणे तुका ॥४॥

२२४६. कथा त्रिवेणीसंगम । देव भक्त आणि नाम । तेथींचें उत्तम । चरणरज वंदितां ॥१॥ जळती दोषांचे डोंगर । शुद्ध होती नारी नर । गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ॥२॥ तीर्थें तया ठाया । येती पुनीत व्हावया । पर्वकाळ पायां । तळीं वसे वैष्णवां ॥३॥ अनुपम्य हा महिमा । नाहीं द्यावया उपमा । तुका म्हणे ब्रह्मा । नेणें वर्णूं या सुखा ॥४॥

२२४७. सांडूनि कीर्तन न करीं आणीक काज । नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगीं ॥१॥ आवडीचें आर्त पुरवीं पंढरिराया । शरण तुझ्या पायां याचि लागीं ॥२॥ टाळी वाहूनियां विठ्ठल म्हणेन । तेणें निवारीन भवश्रम ॥३॥ तुका म्हणे देवा नुपेक्षावें आम्हां । न्यावें निजधामा आपुलिया ॥४॥

२२४८. जळती कीर्तनें । दोष पळतील विघ्नें ॥१॥ हेचि बळिवंत गाढें । आनंद करूं दिंडीपुढें ॥२॥ कलि पापाची हे मूर्ति । नामखड्ग घेऊं हातीं ॥३॥ तुका म्हणे जाऊं । बळें दमामेही लावूं ॥४॥

२२४९. यमधर्म सांगे दूतां । तुम्हां नाहीं येथें सत्ता । जेथें होय हरिकथा । सदा घोष नामाचा ॥१॥ नका जाऊं तया गांवां । नामधारकाच्या शिवां । सुदर्शन यावा । घरटी फिरें भोंवतीं ॥२॥ चक्र गदा घेउनि हरि । उभा असे त्यांचें द्वारीं । लक्ष्मी कामारी । रिद्धिसिद्धीसहित ॥३॥ ते बळियाशिरोमणी । हरिभक्त ये मेदिनी । तुका म्हणे कानीं । यम सांगे दूताचे ॥४॥

२२५०. कान्हया रे जगजेठी । देई भेटी एक वेळे ॥१॥ काय मोकलिलें वनीं । सावजांनीं वेढिलें ॥२॥ येथवरी होता संग । अंगें अंग लपविलें ॥३॥ तुका म्हणे पाहिलें मागें । एवढ्या वेगें अंतरला ॥४॥

२२५१. आपुलें आम्हीं पुसिलें नाहीं । तुज कांहीं कारणें ॥१॥ मागें मागें धांवत आलों । कांहीं बोलों यासाठीं ॥२॥ बहुत दिस होतें मनीं । घ्यावी धणी एकांतीं ॥३॥ तुका म्हणे उभा राहें । कान्हो पाहें मजकडे ॥४॥

२२५२. धन्य बाया ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ॥१॥ चोरूनियां तुजपाशीं । येती त्यासी न कळतां ॥२॥ दोहीं ठायीं समाधान । सम कठिण बहुतांसी ॥३॥ तुका म्हणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ॥४॥

२२५३. उदासीना पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया ॥१॥ वेंटाळिला भोंवता हरी । मयूरफेरीं नाचती ॥२॥ मना आले करिती चार । त्या फार हा एकला ॥३॥ तुका म्हणे नारायणीं । निरंजनीं मीनलिया ॥४॥

२२५४. विषमाची शंका वाटे । सारिखें भेटे तरी सुख ॥१॥ म्हणऊनि चोरिले जना । आल्या रानां एकांतीं ॥२॥ दुजियासी कळों नये । जया सोय नाहीं हे ॥३॥ तुका म्हणे मोकळें मन । नारायण भोगासी ॥४॥

२२५५. आळिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ॥१॥ न घडे मागें परतें मन । नारायण संभोगी ॥२॥ वचनासी वचन मिळे । रिघती डोळे डोळियांत ॥३॥ तुका म्हणे अंतर ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या ॥४॥

२२५६. कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सतंता ॥१॥ अवघियांची जगनिंद । झाली धिंद सारखी ॥२॥ अवघ्या अवघ्या चोरा । विना वरा मायबापा ॥३॥ तुका म्हणे करा सेवा । आलें जीवावरी तरी ॥४॥

२२५७. येथील जे एक घडी । तये जोडी पार नाहीं ॥१॥ किती त्याचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ॥२॥ अवघे गेले दिवस कामा । नाहीं जन्मा खंडण ॥३॥ तुका म्हणे रतल्या जणीं । सोडा झणी कान्होबा ॥४॥

२२५८. चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ॥१॥ नारायण घरीं साठविलें धन । अवघेचि वाण तया पोटीं ॥२॥ सवंग सकळां पुरे धणीवरी । सेवावया नारी नर बाळा ॥३॥ तुका म्हणे येणें आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु पिकविला ॥४॥

२२५९. करिती तया वेवसाव आहे । येथें व्हा रे साहे एक एकां ॥१॥ गातां आइकतां समानचि घडे । लाभें लाभ जोडे विशेषता ॥२॥ प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटे टाळी रंगीं शूरत्वेंसी ॥३॥ तुका म्हणे बहुजन्मांचे खंडण । होईल हा सीण निवारोनि ॥४॥

२२६०. जीव जीती जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें ॥१॥ जया चित्तीं जैसा भाव । तयां जवळि तैसा देव ॥२॥ सकळां पढिये भानु । परि त्या कमळाचें जीवनु ॥३॥ तुका म्हणे माता । वाहे तान्हुल्याची चिंता ॥४॥

२२६१. मुंगिचियां घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥१॥ याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥२॥ उदक अन्न काय म्हणे मज खावें ।

भुकेला तो जाय चोजवीत ॥३॥ व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥४॥ तुका म्हणे जया आपुलें स्वहित । करणें तोचि प्रीत धरी कथे ॥५॥

२२६२. जन्मांतरिचा परिट न्हावी । जात ठावी त्यानें ते ॥१॥ वाखर जैसा चरचरी । तोंड करी संवदणी ॥२॥ पूर्व जन्मीं शिखासूत्र । मळ मूत्र अंतरीं ॥३॥ तुका म्हणे करिती निंदा । धुवटधंदा पुढिलांचा ॥४॥

२२६३. नाम दूषी त्याचें नको दरुषण । विष तें वचन वाटे मज ॥१॥ अमंगळ वाणी नाइकावी कानीं । निंदेची पोहणी उठे तेथें ॥२॥ काय साच लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही ॥३॥ काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं ॥४॥ तुका म्हणे संत न मानिती त्यास । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥५॥

२२६४. येऊनि नरदेहा झांकितील डोळे । बळेंचि अंधळे होती लोक ॥१॥ उजाडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनियां ॥२॥ बहु फेरे आले सोसोनि वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग ॥३॥ तुका म्हणे जाऊं सादावीत वाटे । भेटे तरी भेटे कोणी तरी ॥४॥

२२६५. नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥१॥ बळिया माझा पंढरिराव । जो ह्या देवांचाही देव ॥२॥ रंडी चंडी शक्ति । मद्यमांस भक्षिती ॥३॥ बहिरव खंडेराव । रोटी सुटीसाठीं देव ॥४॥ गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥५॥ मुंजा ह्यैसासुरें । हे तों कोण लेखी पोरें ॥६॥ वेताळें फेताळें । जळो त्याचें तोंड काळें ॥७॥ तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥८॥

२२६६. पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥१॥ मग तो होऊं नेदी सीण । आड घाली सुदर्शन ॥२॥ नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥३॥ तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥४॥

२२६७. मायें मोकलिलें कोठें जावें बाळें । आपुलिया बळें न वांचे तें ॥१॥ रुसोनियां पळे सांडुनियां ताट । मागें पाहे वाट यावी ऐसी ॥२॥ भांडवल आम्हां आळी करावी हे । आपणची धाये धांवशील ॥३॥ तुका म्हणे आळी करूनियां निकी । देसील भातुकीं बुझाऊनि ॥४॥

२२६८. नागर गोडें बाळरूप । तें स्वरूप काळीचें ॥१॥ गाईगोपाळांच्या संगें । आलें लागें पुंडलिका ॥२॥ तें हें ध्यान दिगंबर । कटीं कर मिरवती ॥३॥ नेणपणें उगेंचि उभें । भक्तिलोभें राहिलें ॥४॥ नेणे वरदळाचा मान । विटे चरण सम उभें ॥५॥ सहज कटावरी हात । दहीं भात शिदोरी ॥६॥ मोहरी पावा गांजिवा पाठीं । धरि काठी ज्याकाळें ॥७॥ रम्य स्थळ चंद्रभागा । पांडुरंगा क्रीडेसी ॥८॥ भीमा दक्षणमुख वाहे । दृष्टी पाहे समोर ॥९॥ तारावेसे मूढ लोक । दिली भाक पुंडलिका ॥१०॥ तुका म्हणे वैकुंठवासी । भक्तांपासीं राहिला ॥११॥

२२६९. विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें ॥१॥ तयासी बोलतां

होईल विटाळ। नव जाय तो जळस्नान करितां ॥२॥ विठ्ठलनामाची नाहीं ज्या आवडी। त्याची काळ घडी लेखिताहे ॥३॥ तुका म्हणे मज विठोबाची आण। जरी प्रतिवचन करिन त्यासी ॥४॥

२२७०. तया घडले सकळ नेम। मुखीं विठोबाचे नाम ॥१॥ कांहीं नलगें सिणावें। आणिक वेगळाल्या भावें ॥२॥ वाचे उच्चारावें। राम कृष्ण गोविंदा ॥३॥ फळ पावाल अवलिळा। भोग वैकुंठ सोहळा ॥४॥ तुका म्हणे त्याच्या नांवें। तोचि होईजे स्वभावें ॥५॥

२२७१. पुराणप्रसिद्ध सीमा। नामतारक महिमा ॥१॥ मागें जाळी महादोष। पुढें नाहीं गर्भवास ॥२॥ जें निदिलें शास्त्रें। वंद्य जालें नाममात्रें ॥३॥ तुका म्हणे ऐसा। त्रिभुवनीं नामठसा ॥४॥

२२७२. नाम घेतां नलगे मोल। नाममंत्र नाहीं खोल ॥१॥ दोंचि अक्षरांचें काम। उच्चारावें राम राम ॥२॥ नाहीं वर्णधर्मयाती। नामीं अवघींचि सरती ॥३॥ तुका म्हणे नाम। चैतन्य हें निजधाम ॥४॥

२२७३. नाम घेतां वांयां गेला। ऐसे कोणे आइकिला ॥१॥ सांगा विनवितों तुम्हांसी। संत महंत सिद्ध ऋषी ॥२॥ नामें तरला नाहीं कोण। ऐसा द्यावा निवडून ॥३॥ सलगीच्या उत्तरा। तुका म्हणे क्षमा करा ॥४॥

२२७४. फुकाचें तें लुटा सार। व्हारे अमर सदैव ॥१॥ नाहीं गर्भवास पुढती। डोंगर जळती दोषांचे ॥२॥ उदंड भावें उदंड घ्यावें। नाम गावें आवडी ॥३॥ तुका म्हणे घरिंच्या घरीं। देशाउरीं न सीणीजे ॥४॥

२२७५. इतुकें करीं देवा ऐकें हें वचन। समूळ अभिमान जाळीं माझा ॥१॥ इतुलें करीं देवा ऐकें हे गोष्टी। सर्व समदृष्टीं तुज देखें ॥२॥ इतुलें करी देवा विनवितों तुज। संतचरणरज वंदीं माथां ॥३॥ इतुलें करी देवा ऐकें हे मात। हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥४॥ भलतिया भावें तारीं पंढरीनाथा। तुका म्हणे आतां शरण आलों ॥५॥

२२७६. तुझा दास ऐसें म्हणती लोकपाळ। म्हणऊनी सांभाळ करीं माझा ॥१॥ अनाथाचा नाथ पतितपावन। हें आतां जतन करीं नाम ॥२॥ माझे गुण दोष पाहातां न लगे अंत। ऐसें माझें चित्त मज ग्वाही ॥३॥ नेणें तुझी कैसी करावी हे सेवा। जाणसी तूं देवा अंतरींचें ॥४॥ तुका म्हणे तूं या कृपेचा सिंधु। तोडीं भवबंधु माझा देवा ॥५।

२२७७. जाणावें तें काय नेणावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥१॥ करावें तें काय न करावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥२॥ बोलावें तें काय न बोलावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥३॥ जावें तें कोठें नव जावें तें आतां। बरवें आठवितां नाम तुझें ॥४॥ तुका म्हणे तूं करिसी तें सोपें। पुण्यें होतीं पापें आमुच्या मतें ॥५॥

२२७८. नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥१॥ दावीं रूप मज गोपिकारमणा । ठेवीन चरणांवरी माथा ॥२॥ पाहोनी श्रीमुख देईन आळिंगन । जीवें निंबलोण उतरीन ॥३॥ पुसतां सांगेन हितगुज मात । बैसोनी एकांत सुखगोष्टी ॥४॥ तुका म्हणे यासी न लावीं उशीर । माझें अभ्यंतर जाणोनियां ॥५॥

२२७९. मागें शरणागत तारिले बहुत । म्हणती दीनानाथ तुज देवा ॥१॥ पाहिले अपराध नाहीं याती कुळ । तारिला अजामेळ गणिका भिल्ली ॥२॥ अढळपदीं बाळ बैसविला धुरु । क्षीराचा सागरु उपमन्या ॥३॥ गजेंद्रपशु नाडिला जळचरें । भवसिंधुपार उतरिला ॥४॥ प्रह्लाद अग्नींत राखिला जळांत । विषाचें अमृत तुझ्या नामें ॥५॥ पांडवां संकट पडतां जडभारी । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥६॥ तुका म्हणे तूं या अनाथाचा नाथ । ऐकोनियां मात शरण आलों ॥७॥

२२८०. तुझा शरणागत जालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ॥१॥ पतित पावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळीं मायबापां ॥२॥ अनाथाचा नाथ बोलतील संत । ऐकोनियां मात विश्वासलों ॥३॥ न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ॥४॥ तुका म्हणे मी तों पातकांची रासी । देईं पायापासीं ठाव देवा ॥५॥

२२८१. सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥१॥ सत्यवादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥२॥ घडे ज्या उपकार भूतांची ते दया । आत्मस्थिति तया अंगी वसे ॥३॥ न बोले गुणदोष नाइके जो कानीं । वर्तोनी तो जनीं जनार्दन ॥४॥ तुका म्हणे वर्म जाणितल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ॥५॥

२२८२. कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन । कुळधर्मे निधान हाता चढे ॥१॥ कुळधर्म भक्ति कुळधर्म गति । कुळधर्म विश्रांति पाववील ॥२॥ कुळधर्म दया कुळधर्म उपकार । कुळधर्म सार साधनाचें ॥३॥ कुळधर्म महत्त्व कुळधर्म मान । कुळधर्म पावन परलोकींचें ॥४॥ तुका म्हणे कुळधर्म दावीं देव । यथाविध भाव जरी होय ॥५॥

२२८३. पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी ॥१॥ सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ॥२॥ गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ॥३॥ संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ॥४॥ तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥५॥

२२८४. न वजे वांयां कांहीं ऐकतां हरिकथा । आपण करितां वांयां न वजे ॥१॥ न वजे वांयां कांहीं देवळासी जातां । देवासी पूजितां वांयां न वजे ॥२॥ न वजे वांयां कांहीं केलिया तीर्थ । अथवा कां व्रत वांयां न वजे ॥३॥ न वजे वांयां जालें संतांचें दर्शन । शुद्ध आचरण वांयां न वजे ॥४॥ तुका म्हणे भाव असतां नसतां । सायास करितां वांयां न वजे ॥५॥

२२८५. चित्तीं धरीन मी पाउलें सुकुमार । सकळ बिढार संपत्तीचें ॥१॥ कंठीं धरीन नाम अमृताची वल्ली । होईल राहिली शीतळ तनु ॥२॥ पाहेन श्रीमुख साजिरें सुंदर । सकळां आगर लावण्याचें ॥३॥ करीन अंगसंग बाळकाचे परी । बैसेन तो वरी नुतरें कडिये ॥४॥ तुका म्हणे हा केला तैसा होय । धरिली मने सोय विठोबाची ॥५॥

२२८६. बाळ मातेपाशीं सांगे तहानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ॥१॥ तयापरी करीं पाळण हें माझें । घेऊनियां ओझें सकळ भार ॥२॥ कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायणा अपराधी ॥३॥ सेवाहीन दीन पातकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ॥४॥ जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त । निर्धार हें हित झालें ऐसें ॥५॥ तुका म्हणे तुम्हीं तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असों द्यावी ॥६॥

२२८७. जीवनावांचूनी तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥१॥ न संपडे झालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ॥२॥ मातेचा वियोग झालिया हो बाळा । हा तो कळवळा जाणा देवा ॥३॥ सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार । सकळांचें सार पाय दावीं ॥४॥ येचि चिंते माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा ॥५॥ तुका म्हणे तूं हें जाणसी सकळ । यावरी कृपाळ होईं देवा ॥६॥

२२८८. शरण आले त्यासी नेदावी जी पाठी । ऐका जगजेठी विज्ञापना ॥१॥ आळवी तयासी उत्तर झडकरी । द्यावें परिसा हरी विज्ञापना ॥२॥ गांजिलियाचें करावें धांवणें । विनंती नारायणें परिसावी हे ॥३॥ भागलियाचा होईं रे विसांवा । परसावी केशवा विज्ञापना ॥४॥ अंकिताचा भार वागवावा माथां । परिसावी अनंता विज्ञापना ॥५॥ तुका म्हणे आम्हां विसरावें ना देवा । परिसावी केशवा विज्ञापना ॥६॥

२२८९. कोण आम्हां पुसे सिणलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ॥१॥ कोणापाशीं आम्हीं सांगावें सुखदुःख । कोण तहानभूक निवारील ॥२॥ कोण या तापाचा करील परिहार । उतरील पार कोण दुजा ॥३॥ कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझावील ॥४॥ कोणावरी आम्हीं करावी हे सत्ता । होईल साहाता कोण दुजा ॥५॥ तुका म्हणे अगा स्वामी सर्व जाणा । दंडवत चरणां तुमच्या देवा ॥६॥

२२९०. प्रीति नाहीं राया वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी ॥१॥ तैसे दंभें जालों तरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहाती ॥२॥ राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल ॥३॥ बाहात्तर खोडी परी देवमण कंठीं । तैसा मी जगजेठी म्हणे तुका ॥४॥

२२९१. करावा उद्धार किंवा घ्यावी हारी । एका बोला स्थिरी राहें देवा ॥१॥ निरासेनें माझा होईल संदेह । अवघेंचि आहे मूळ पायीं ॥२॥ राहिलों डिंकोनी कांहींच न कळे । कोणा नेणों काळें

उदय भाग्य ॥३॥ तुका म्हणे बहु उद्वेगला जीव । भाकीतसे कींव देवराया ॥४॥

२२९२. आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ॥१॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥२॥ भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भले ॥३॥ तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥४॥

२२९३. भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥१॥ म्हणऊनी मनीं मानूं नये खेदू । म्हणावा गोविंदू वेळोवेळां ॥२॥ आणिकां रुसावें नलगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनियां ॥३॥ तुका म्हणे भार घातलियावरी । होईल कैवारी नारायण ॥४॥

२२९४. निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें । साधन बरवें हेंचि एक ॥१॥ तरीच अंगीकार करी नारायण । बडबड तो सीण येणेंविण ॥२॥ सोइरें पिशुन समानचि घडे । चित्त पर ओढे उपकारी ॥३॥ तुका म्हणे चित्त झालिया निर्मळ । तरिच सकळ केलें होय ॥४॥

२२९५. दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ॥१॥ रिद्धि सिद्धी येती घरा । त्याचा करिती पसारा ॥२॥ मानदंभासाठीं । पडे देवासवें तुटी ॥३॥ तुका म्हणे मेवा । कैंचा वेठीच्या निर्दैवां ॥४॥

२२९६. तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटूनियां सार उरलें तें ॥१॥ मग कदाकाळीं नव्हे शुद्ध जाति । नासें शत्रु होती मित्र तेचि ॥२॥ कलेवर बरें भोगूं द्यावें भोगा । फांसिलें तें रोगा हातीं सुटे ॥३॥ तुका म्हणे मन करावें पाठेळ । राहावेचि जाळ सिजेवरी ॥४॥

२२९७. पाठेळ करितां न साहावे वारा । साहेलिया ढोरा गोणी चाले ॥१॥ आपणां आपण हेचि कसवटी । हर्षामर्ष पोटीं विरों द्यावे ॥२॥ नवनीत तोंवरी कडकडी लोणी । निश्चळ होऊनी राहे मग ॥३॥ तुका म्हणे जरी जगे टाकीघाया । त्याच्या पडे पायां जन मग ॥३॥

२२९८. कावळिया नाहीं दया उपकार । काळिमें अंतर विटाळलें ॥१॥ तैसें कुजनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥२॥ कडु भोंपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥३॥ तुका म्हणे विष सांडूं नेणें साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥४॥

२२९९. लाभ खरा नये तुटी । नाहीं आडखळा भेटी ॥१॥ जाय अवघिया देशा । येथें संचलासी तैसा ॥२॥ मग नलगे पारखी । अवघीं सकट सारखीं ॥३॥ तुका म्हणे वोळे । रूपें भुलविले डोळे ॥४॥

२३००. नको आतां पुसों कांहीं । लवलाहीं उसंती ॥१॥ जाय वेगीं पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ॥२॥ वचनाचा न करीं गोवा । रिघें देवा शरण ॥३॥ तुका म्हणे कृपावंता । बहु चिंता दीनाची ॥४॥

२३०१. बुद्धिहीनां जडजीवां । नको देवा उपेक्षूं ॥१॥ परिसावी हे विज्ञापना । आम्हां

दीनां दासांची ॥२॥ चिंतूनियां आले पाय । त्यांसी काय वंचना ॥३॥ तुका म्हणे पुरुषोत्तमा । करा क्षमा अपराध ॥४॥

२३०२. म्हणऊनि काकुलती । येतों पुढत पुढती । तुमचिया असे हातीं । कमळापती भांडार ॥१॥ फेडूं आलेती दरिद्र । तरी नलगेचि उशीर । पुरे अभयकर । ठाया ठाव रंकासी ॥२॥ कोठें न घली धांव । याजसाठीं त्यजिली हांव । घेऊं नेदी वाव । मना केला विरोध ॥३॥ कारणांच्या गुणें । वेळ काळ तोही नेणें । तुमच्या कीर्तनें । तुका तुम्हां जागवी ॥४॥

२३०३. बहु नांवें ठेविलीं स्तुतीची आवडी । बहुत या गोडी आली रसा ॥१॥ बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु जाला दिस गोमट्याचा ॥२॥ बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नट ॥३॥ बहु तुका जाला बहु निकट वृत्ती । बहु काकुलती येऊनियां ॥४॥

२३०४. इहलोकीं आम्हां वस्तीचें तें पेणें । उदासीन तेणें देहभावीं ॥१॥ कार्यापुरतें कारण मारगीं । उलंघूनि वेगीं जावें स्थळा ॥२॥ सोंगसंपादणी चालवितो वेव्हार । अत्यंतीं आदर नाहीं गोवा ॥३॥ तुका म्हणे वेंचे लाविला संचिता । होइल घेतां देतां लाभ कोणा ॥४॥

२३०५. रोजकीर्दी जमा धरुनी सकळ । खताविला काळ वरावरी ॥१॥ नाहीं होत झाड्यापाड्याचें लिगाड । हुजराती गोड सेवा रुजू ॥२॥ चोरासाठीं रदबदल अट्टाहास्य । जळो जिणें दास्य बहुतांचें ॥३॥ सावधान तुका निर्भर मानसीं । सालझाड्यापाशीं गुंफों नेणें ॥४॥

२३०६. त्रिविधकर्माचे वेगळाले भाव । निवडूवि ठाव दाखविले ॥१॥ आलियाचा झाडा राहिल्याचा ठाव । सुख तो गौरव संतां अंगीं ॥२॥ हिशेबें आलें तें सकळांसी प्रमाण । तेथें नाहीं आन चालों येत ॥३॥ तुका म्हणे नाहीं पापपुण्य खंती । झाड्याची हुजुती हातां आली ॥४॥

२३०७. साकरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आम्हां जोडी वैष्णवांची ॥१॥ मोक्ष गांठी असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा ॥२॥ भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आम्हां तरी खेळावरि चित्त ॥३॥ तुका म्हणे आम्ही देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ॥४॥

२३०८. सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरें इहलोकीं ॥१॥ पंढरीचे वारकरी । होतां थोरी जोडी हे ॥२॥ हें तों आलें अनुभवा । पाहावें जीवावरूनि ॥३॥ तुका म्हणे केला त्याग । सर्वसंग म्हणऊनि ॥४॥

२३०९. करूं जातां सन्निधान । क्षण जन पालटे ॥१॥ आतां गोमटे ते पाय । तुझे माय विठ्ठले ॥२॥ हरिदासांचा समागम । अंगीं प्रेम विसांवा ॥३॥ तुका म्हणे हेंचि मन । इच्छादान मागतसे ॥४॥

२३१०. क्षीर मागे तया रायतेंचि वाढी । पाधानी गधडी ऐशा नांवें ॥१॥ समयो जाणां समयो जाणां । भलतें नाणां भलतेथें ॥२॥ अमंगळ वाणी वदवी मंगळी । अशुभ वोंगळी

शोभन तें ॥३॥ तुका म्हणे नेणें समयो ठाया ठाव । रहाडी ते वाव नरकाडी ॥४॥

२३११. विंचा पीडी नांगी । ज्याचा दोष त्याचे अंगा ॥१॥ केला पाहिजे विचार । मन मित्र दावेदार ॥२॥ मधुरा उत्तरीं । रांवा खेळे उराउरी ॥३॥ तुका म्हणे रेडा । सुखें जाती ऐशा पीडा ॥४॥

२३१२. तीर्थींची अपेक्षा स्थळीं वाढे धर्म । जाणावें तें वर्म बहु पुण्य ॥१॥ बहु बरी ऐसी भाविकांची जोडी । काळ नाहीं घडी जात वांयां ॥२॥ करूनी चिंतन करवावें आणिकां । तो या झाला लोकां नाव जगीं ॥३॥ तुका म्हणे ऐसे परउपकारी । त्यांच्या पायांवरी डोई माझी ॥४॥

२३१३. भयाची तों आम्हां चित्तीं । राहों खंती सकेचिना ॥१॥ समर्पिलों जीवें भावें । काशा भ्यावें कारणें ॥२॥ करीन तें कवतुकें । अवघें निकें शोभेल ॥३॥ तुका म्हणे माप भरूं । दिवस सारूं कवतुकें ॥४॥

२३१४. पाचारितां धावे । ऐसी ठायींची ही सवे ॥१॥ बोले करुणावचनीं । करी कृपा लावी स्तनीं ॥२॥ जाणे कळवळा । भावसिद्धींचा सोहळा ॥३॥ तुका म्हणे नाम । मागें मागें धांवे प्रेम ॥४॥

२३१५. कां जी माझे जीवीं । आळस ठेविला गोसावी ॥१॥ येवढा घात आणीक काय । चिंतनासी अंतराय ॥२॥ देह आत्मवादी । केला घात कुबुद्धी ॥३॥ तुका म्हणे मन । कळवळी वाटे सीण ॥४॥

२३१६. दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥१॥ आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ॥२॥ येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी ॥३॥ तुका म्हणे जाणवलें । आम्हां भले एवढेंचि ॥४॥

२३१७. बैसों पाठिमोरीं । मना वाटे तैसें करीं ॥१॥ परि तूं जाणसी आवडी । बाळा बहुतांची परवडी ॥२॥ आपुलाल्या इच्छा । मागों जया व्हावें तैसा ॥३॥ तुका म्हणे आई । नव्हेसी उदास विठाई ॥४॥

२३१८. विश्वंभरा वोळे । बहुत हात कान डोळे ॥१॥ जेथें असे तेथें देखे । मागितलें तें आईके ॥२॥ जें जें वाटे गोड । तैसें पुरवितो कोड ॥३॥ तुका म्हणे भेटी । कांहीं पडों नेदी तुटी ॥४॥

२३१९. दाटे कंठ लागे डोळियां पाझर । गुणाची अपार वृष्टि वरी ॥१॥ तेणें सुखें छंदें घेईन सोहळा । होऊनि निराळा पापपुण्यां ॥२॥ तुझ्या मोहें पडो मागील विसर । अलाप सुस्वर करिन कंठ ॥३॥ तुका म्हणे येथें पाहिजे सौरस । तुम्हांविण रस गोड नव्हे ॥४॥

२३२०. पसरूनि राहिलों बाहो । सोयी अहो तुमचीये ॥१॥ आतां यावें लागवेगें । पांडुरंगे धांवत ॥२॥ बैसायाची इच्छा कडे । चाली खडे रुपताती ॥३॥ तुका म्हणे कृपाळुवा ।

करणें सेवा लागली ॥४॥

२३२१. आम्ही झालों एकविध । सुध्या सुधें असावें ॥१॥ यावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अकळ ॥२॥ घेतलें तें उसणें द्यावें । कांहीं भावें विशेष ॥३॥ तुका म्हणे क्रियानष्ट । तरी कष्ट घेतसां ॥४॥

२३२२. आम्ही आर्तभूत जिवीं । तुम्ही गोसावी उदास ॥१॥ वादावाद समर्थाशीं । काशानशीं करावा ॥२॥ आम्ही मरों वेरझारीं । स्वामी घरीं बैसले ॥३॥ तुका म्हणे करिता वाद । कांहीं भेद कळेना ॥४॥

२३२३. पुसावें तें ठाईं आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनियां ॥१॥ येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ॥२॥ फळ तेंचि बीज बीज तेंचि फळ । उपनांवें मूळ न पालटे ॥३॥ तुका म्हणे अवघे गव्हांचे प्रकार । सोनें अळंकार मिथ्या नांव ॥४॥

२३२४. माझी आतां सत्ता आहे । तुम्हां पायां हे वरती ॥१॥ एकाविण नेणें दुजा । पंढरीराजा सर्वांगें ॥२॥ पुरवावी केली आळी । जे जे काहीं मागेन तें ॥३॥ तुका म्हणे सुटसी कैसा । धरूनि दिशा राहिलों ॥४॥

२३२५. फावलें तें तुम्हां मागें । नवतों लागें पावलों ॥१॥ आलों आतां उभा राहें । जवळी पाहें सन्मुख ॥२॥ घरीं होती गोवी जाली । कामें बोली न घडेचि ॥३॥ तुका म्हणे धडफुडा । जालों झाडा देईं देवा ॥४॥

२३२६. आतां नये बोलों अव्हेराची मात । बाळावरि चित्त असों द्यावें ॥१॥ तुज कां सांगणें लागे हा प्रकार । परि हें उत्तर आवडीचें ॥२॥ न वंचि वो कांहीं एकही प्रकार । आपणां अंतर नका मज ॥३॥ तुका म्हणे मोहो राखावा सतत । नये पाहों अंत पांडुरंगा ॥४॥

२३२७. करोनि राहों जरी आत्माचि प्रमाण । निश्चळ नव्हे मन काय करूं ॥१॥ जेविलिया विण काशाचे ढेंकर । शब्दाचे प्रकार शब्दचि ते ॥२॥ पुरे पुरे आतां तुमचें ब्रह्मज्ञान । आम्हांसी चरण न सोडवे ॥३॥ विरोधें विरोध वाढे पुढतोपुढती । वासनेचे हातीं गर्भवास ॥४॥ सांडीमांडी अंगीं वसे पुण्यपाप । बंधन संकल्प याची नांवें ॥५॥ तुका म्हणे नाहीं मुक्तता मोकळी । ऐसा कोण बळी निरसी देह ॥६॥

२३२८. तुमचे स्तुतियोग्य कोठें माझी वाणीं । मस्तक चरणीं ठेवितसें ॥१॥ भक्तिभाग्य तरी नेदीं तुळसीदळ । जोडूनि अंजुळ उभा असें ॥२॥ कैचें भाग्य ऐसें पाविजे सन्निध । नेणें पाळूं विध करुणा भाकीं ॥३॥ संतांचे शेवटीं उच्छिष्टाची आस । करूनियां वास पाहतसें ॥४॥ करीं इच्छा मज म्हणोत आपुलें । एखादिया बोलें निमित्याच्या ॥५॥ तुका म्हणे शरण आलों हें साधन । करितों चिंतन रात्रंदिवस ॥६॥

२३२९. सर्वविशीं आम्ही हेचि जोडी केली । स्वामिची साधिली चरणसेवा ॥१॥ पाहिलेंचि नाहीं मागें परतोनि । जिंकिला तो क्षणोक्षणीं काळ ॥२॥ नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पोटीं हेवा येऊं दिला ॥३॥ केली लागवेगीं अवघी तांतडी । भावना ते कुडी दुरावली ॥४॥ कोठें मग ऐसें होतें सावकाश । जळो तया आस वेव्हाराची ॥५॥ तुका म्हणे लाभ घेतला पालवीं । आतां नाहीं गोवी कासयाची ॥६॥

२३३०. येणे मुखें तुझें वर्णीं गुण नाम । तेंचि मज प्रेम देईं देवा ॥१॥ डोळे भरूनियां पाहेन तुझें मुख । तेंचि मज सुख देईं देवा ॥२॥ कान भरोनियां ऐकेन तुझी कीर्ती । ते मज विश्रांती देईं देवा ॥३॥ वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां सुख ॥४॥ तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥५॥

२३३१. तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूंचि माझें हित करितां देवा ॥१॥ तूंचि माझा देव तूंचि माझा जीव । तूंचि माझा भाव पांडुरंगा ॥२॥ तूं माझा आचार तूं माझा विचार । तूंचि सर्व भार चालविसी ॥३॥ सर्वभावें मज तूं होसी प्रमाण । ऐशी तुझी आण वाहातसें ॥४॥ तुका म्हणे तुज विकला जीवभाव । कळेल तो उपाव करीं आतां ॥५॥

२३३२. वारंवार तुज द्यावया आठव । आइक तो भाव माझा कैसा ॥१॥ गेला मग नये फिरोन दिवस । पुढिलांची आस गणित नाहीं ॥२॥ गुणांअवगुणांचे पडती आघात । तेणें होय चित्त कासावीस ॥३॥ कांहीं एक तुझा न देखों आधार । म्हणऊनि धीर नाहीं जीवा ॥४॥ तुका म्हणे तूं या ब्रह्मांडाचा जीव । तरि का आम्ही कींव भाकितसों ॥५॥

२३३३. असोत हे तुझे प्रकार सकळ । काय खळखळ करावी हे ॥१॥ आमुचे स्वहित जाणतसों आम्ही । तुझें वर्म नामीं आहे तुझ्या ॥२॥ विचारितां आयुष्य जातें वांयांविण । रोज नागवण पडतसे ॥३॥ राहेन मी तुझे पाय आठवूनी । आणिक तें मनीं येऊं नेदीं ॥४॥ तुका म्हणे येथें येसी अनायासें । थोर तुज पिसें कीर्तनाचें ॥५॥

२३३४. विष्णुदासा भोग । जरी आम्हां पीडी रोग ॥१॥ तरि हें दिसे लाजिरवाणें । काय तुम्हांसी सांगणें ॥२॥ आम्हां काळें खावें । बोलिलें तें वायां जावें ॥३॥ तुका म्हणे दास । आम्ही भोगूं गर्भवास ॥४॥

२३३५. भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ॥१॥ तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव ॥२॥ आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥३॥ मस्तक ठेंगणा । करीं संतांच्या चरणा ॥४॥ वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥५॥ तुका म्हणे फार । थोडा तरी परउपकार ॥६॥

२३३६. नहो आतां जीवीं कपटवसती । मग काकुलती कोणा यावें ॥१॥ सत्याचिये

मापें गांठीं नये नाड । आदि अंतीं गोड नारायण ॥२॥ चोखटीया नाहीं विटाळाचा आघात । साच तें साचत सांच पडे ॥३॥ विचारिली वाट उसंती शीतळ । बुद्धीपुढें बळ तृणतुल्य ॥४॥ आहाराच्या घासें पचोनियां जिरे । वासनाही उरे उर्वरीत ॥५॥ तुका म्हणे ताळा घालावा वचनीं । तूं माझी जननी पांडुरंगे ॥६॥

२३३७. नव्हती हीं माझीं जायाचीं भूषणें । ऐसें नारायणें उचित केलें ॥१॥ शब्दाच्या ओवणीं रत्नाचिया माळा । मुळींचा जिव्हाळा झरवणी ॥२॥ अर्थांतरीं असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ॥३॥ तुका म्हणे मज सरतें परतें । हें नाहीं अनंतें उरों दिलें ॥४॥

२३३८. सहज लीळा मी साक्षी याचा । नये वंचू वाचा ऐसें जालें ॥१॥ उमक्रमें वदे निशब्दाची वाणी । जे कोठें बंधनीं गुंफों नेणें ॥२॥ तमनासी परी वेव्हारा वेगळा । रविप्रभाकळा वर्ते जन ॥३॥ तुका म्हणे येथें गेला अतिशय । आतां पुन्हां नये तोंड दावूं ॥४॥

२३३९. बोलाल या आतां आपुल्या पुरतें । मज या अनंतें गोवियेलें ॥१॥ झाडिला न सोडीं हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ॥२॥ तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सवें मिठी अंगसंगें ॥३॥ तुका म्हणे तुम्हां होईल ये परी । अनुभवावरी येईल मग ॥४॥

२३४०. जैशा तुम्ही दुरी आहां । तैशा राहा अंतरें ॥१॥ नका येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ जडलासे ॥२॥ अवघा हाचि राखा काळ । विक्राळचि भोंवता ॥३॥ तुका म्हणे मज ऐशा । होतां पिशा जगनिंद्य ॥४॥

२३४१. सतीचें तें घेतां वाण । बहु कठीण परिणामीं ॥१॥ जिवासाठीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ॥२॥ जरि होय उघडी दृष्टि । तरी गोष्टी युद्धाच्या ॥३॥ तुका म्हणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची ॥४॥

२३४२. आडवा तो उभा । असे दाटोनियां प्रभा ॥१॥ देव नाहीं एकविध । एक भाव असे शुद्ध ॥२॥ भेदाभेद आटी । नाहीं फार कोठें तुटी ॥३॥ तुका म्हणे गोवा । उगवा वेव्हाराचा हेवा ॥४॥

२३४३. एका बोटाची निशाणी । परीपाक नाहीं मनीं ॥१॥ तरि तें संपादिलें सोंग । कारणावांचूनियां व्यंग ॥२॥ वैष्णवांचा धर्म । जग विष्णु नेणे वर्म ॥३॥ अतिशयें पाप । तुका सत्य करी माप ॥४॥

२३४४. सत्यत्वेंशीं घेणें भक्तीचा अनुभव । स्वामीचा गौरव इच्छीतसे ॥१॥ मग तें अवीट न भंगे साचार । पावलें विस्तार फिरों नेणे ॥२॥ वाणी वदे त्याचा कोणासी विश्वास । अभयकरें दास सत्य तईं ॥३॥ तुका म्हणे आधीं न करीं तांतडी । पायीं झाली जोडी तेणें शुद्ध ॥४॥

२३४५. सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो कोण ॥१॥ मनीं भक्तीची आवडी । हेवा व्हावी

ऐशी जोडी ॥२॥ घेईन जन्मांतरें । हेंचि करावया खरें ॥३॥ तुका म्हणे देवा । ऋणी करूनि ठेवूं सेवा ॥४॥

२३४६. आणितां त्या गती । हंस काउळे न होती ॥१॥ सांडा सांडा रे मठारे । एकी गांठी सवें धुरें ॥२॥ नाकेंविण मोती । उभ्या बाजारें फजिती ॥३॥ हुकुमदाज तुका । येथें कोणी फुंदों नका ॥४॥

२३४७. ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ॥१॥ होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ॥२॥ बोरामध्यें असे अळी । अठोळीच भोंवती ॥३॥ पोटासाठी वेंची चणे । राजा म्हणे तोंडें मी ॥४॥ बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर ॥५॥ तुका म्हणे तैसें आहे । काय पाहे त्यांत तें ॥६॥

२३४८. धांव धांव गरुडध्वजा । आम्हां अनाथांच्या काजा ॥१॥ बहु झालों कासावीस । म्हणोनि पाहें तुझी वास ॥२॥ पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥३॥ असोनियां ऐसा । तुज सारिखा कोंवसा ॥४॥ न लवा उशीर । नेणों कां हो केला धीर ॥५॥ तुका म्हणे चाली । नको चालूं धांव घालीं ॥६॥

२३४९. पांडुरंगे पांडुरंगे । माझे गंगे माउलिये ॥१॥ पान्हा घालीं प्रेमधारा । पूर क्षीरा लोटों दे ॥२॥ अंगें अंग मेळउनी । करीं धणी फेडावया ॥३॥ तुका म्हणे घेइन उड्या । सांडिन कुड्या भावना ॥४॥

२३५०. गजइंद्र पशु आप्तें मोकलिला । तो तुज स्मरला पांडुरंगा ॥१॥ त्यासाठीं गरुड सांडूनि धांवसी । माया झळंबसी दीनानाथा ॥२॥ धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडविलें ॥३॥ तुका म्हणे ब्रीद बांधला यासाठीं । भक्तांसी संकटीं रक्षावया ॥४॥

२३५१. चारी वेद जयासाठीं । त्याचें नाम धरा कंठीं ॥१॥ न करीं आणीक साधन । कष्टसी कां वांयाविण ॥२॥ अठरा पुराणांचे पोटी । नामाविण नाहीं गोठी ॥३॥ गीता जेणें उपदेशिली । ते ही विटेवरी माउली ॥४॥ तुका म्हणे सार धरीं । वाचे हरिनाम उच्चारी ॥५॥

२३५२. पाहतां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ॥१॥ नये वाटों गुणदोषीं । मना जतन येविशीं ॥२॥ त्रिविधदेह परिचारा । जनीं जनार्दन खरा ॥३॥ तुका म्हणे धीरें । विण कैसें होतें बरें ॥४॥

२३५३. नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥१॥ न लगती सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥२॥ ठायींच बैसोन करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥३॥ रामकृष्ण हरिविठ्ठलकेशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥४॥ याविण आणीक असतां साधन । वाहातसें आण विठोबाची ॥५॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि ।

शाहाणा तो धणी घेतो येथें ॥६॥

२३५४. भाविकाचें काज अंगें देव करी । काढी धर्माघरीं उच्छिष्ट तें ॥१॥ उच्छिष्ट तीं फळें खाय भिल्लटीचीं । आवडी तयाची मोठी देवा ॥२॥ काय देवा घरीं न मिळेची अन्न । मागे भाजीपान द्रौपदीसी ॥३॥ अर्जुनाचीं घोडीं धुतलीं अनंतें । संकटें बहुतें निवारिलीं ॥४॥ तुका म्हणे ऐसीं आवडती लडिवाळें । जाणीवेचें काळें तोंड देवा ॥५॥

२३५५. सावळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचे विटेवरी ॥१॥ डोळियांची धणी पाहतां न पुरे । तयालागीं झुरें मन माझें ॥२॥ प्राण रिघों पाहे कुडी ये सांडुनी । श्रीमुख नयनीं न देखतां ॥३॥ चित्त मोहियेलें नंदाच्या नंदनें । तुका म्हणे येणें गरुडध्वजें ॥४॥

२३५६. ऐका ऐका भाविकजन । व्हाल कोण कोण ते ॥१॥ तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ॥२॥ नका शोधूं मतांतरें । नुमगे खरें बुडाल ॥३॥ कलीमध्यें दास तुका । जातो लोकां सांगत ॥४॥

२३५७. आपुलिया अंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ॥१॥ रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ॥२॥ मुक्त जालों ऐसें बोलों जाय मुखें । तुका म्हणे दुःखें बांधला तो ॥३॥

२३५८. आलिया अतीता म्हणतसां पुढें । आपुलें रोकडें सत्त्व जाय ॥१॥ काय त्याचा भार घेऊनि मस्तकीं हीनकर्मी लोकीं म्हणावया ॥२॥ दारीं हाका कैसें करवतें भोजन । रुची तरि अन्न कैसें देतें ॥३॥ तुका म्हणे ध्वज उभारिला कर । ते शक्ति उदार काय झाली ॥४॥

२३५९. जेथें लक्ष्मीचा वास । गंगा आली पापा नाश ॥१॥ तुझीं पाउलें सुकुमार । तेथें मन माझें भ्रमर ॥२ । ठाव धरिला संतजनीं । सुखें राहिले लपोनी ॥३॥ तुका म्हणे वांकी । भाट झाली तिन्हीं लोकीं ॥४॥

२३६०. रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥१॥ देहभाव हरपला । तुज पाहतां विठ्ठला ॥२॥ कळों नये सुखदुःख । तहान हरपली भूक ॥३॥ तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥४॥

२३६१. जाणतें लेंकरूं । माता लागे दूर धरूं ॥१॥ तैसें न करीं कृपावंते । पांडुरंगे माझे माते ॥२॥ नाहीं मुक्ताफळा । भेटी मागुती त्या जळा ॥३॥ तुका म्हणे लोणी । ताक सांडी निवडूनि ॥४॥

२३६२. तुजविण कोणां । शरण जाऊं नारायणा ॥१॥ ऐसा न देखें मी कोणी । दुजा तिहीं त्रिभुवनीं ॥२॥ पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥३॥ तुका म्हणे ठायीं । जडून ठेलों तुझ्या पायीं ॥४॥

२३६३. ऐसें भाग्य कईं लाहता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥१॥ मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥२॥ शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥३॥ विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगित ज्वाळ अग्नि जैसा ॥४॥ भक्ति नवविधा भाव शुद्ध वरी । अळंकारावरी मुगुटमणी ॥५॥ तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ॥६॥

२३६४. कासया करावे तपाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी ॥१॥ कासया फिरावे अनेक ते देश । दावितील आस पुढें लाभ ॥२॥ कासया पूजावीं अनेक दैवतें । पोटभरे तेथें लाभ नाहीं ॥३॥ कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुकासाठीं ॥४॥ तुका म्हणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ॥५॥

२३६५. वैष्णवमुनिविप्रांचा सन्मान । करावा आपण घेऊं नये ॥१॥ प्रभु झाला तरी संसाराचा दास । विहित तयासी यांची सेवा ॥२॥ तुका म्हणे हे आशीर्वादें बळी । जाईल तो छळी नरका यांसीं ॥३॥

२३६६. देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥१॥ ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥२॥ हरिजनासी भेटी । नहो अंगसंगे तुटी ॥३॥ तुका म्हणे जिणें । भले संतसंघष्टणें ॥४॥

२३६७. भाग शीण गेला । माझा सकळ विठ्ठला ॥१॥ तुझा म्हणवितों दास । केली उच्छिष्टाची आस ॥२॥ राहिली तळमळ । तईं पासोनि सकळ ॥३॥ तुका म्हणे धालें । पोट ऐसें कळों आलें ॥४॥

२३६८. रायाचें सेवक । शेवटीचें पीडी रंक ॥१॥ हा तों हिनाव कवणा । कां हो नेणां नारायणा ॥२॥ परिसेंसी भेटी । नव्हे लोहोपणा तुटी ॥३॥ तुझें नाम कंठीं । तुक्या काळासवें भेटी ॥४॥

२३६९. सुखरूप ऐसें कोण दुजें सांगा । माझ्या पांडुरंगासारिखें तें ॥१॥ नलगे हिंडणें मुंडणें तें कांहीं । साधनाची नाहीं आटाआटी ॥२॥ चंद्रभागे स्नान विध तो हरिकथा । समाधान चित्ता सर्वकाळ ॥३॥ तुका म्हणे काला वैकुंठीं दुर्लभ । विशेष हा लाभ संतसंगें ॥४॥

२३७०. नसतां अधिकार । उपदेशाची बळात्कार । तरि ते केले चार । माकड आणि गारोडी ॥१॥ धन धान्य राज्य बोल । वृथा रंजवणें फोल । नाहीं तेथें ओल । बीज वेची मूर्ख तो ॥२॥ नये बांधों गांठी । पदरा आणी ऐसी तुटी । असोन कसोटी । शिष्टाचार अनुभव ॥३॥ उपदेशी तुका । मेघ वृष्टीनें आइका । संकल्पासी धोका । सहज तें उत्तम ॥४॥

२३७१. घालूनियां मापी । देव भक्त बैसले जपीं ॥१॥ तैसी होते सांडउलंडी । निजनिजांची मुर्कुंडी ॥२॥ अमुपीं उखतें । आपण वोस आपणयातें ॥३॥ देव आतां झाला ।

उगवी संकोच वहिला ॥४॥ अखंड नेलें वेठी । भार सत्याविण गांठी ॥५॥ आडविला झोंपा । रिता कलेवराचा खोंपा ॥६॥ गोदातीरीं आड । करिते करविते द्वाड ॥७॥ तुका म्हणे बळें । उपदेशाचें तोंड काळें ॥८॥

२३७२. उंबरांतील कीटका । हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा ॥१॥ ऐसीं उंबरें किती झाडीं । ऐसीं झाडें किती नव खंडीं ॥२॥ हेंचि ब्रह्मांड आम्हांसी । ऐसीं अगणित अंडें कैसी ॥३॥ विराटाचें अंगीं तैसे । मोजूं जातां अगणित केश ॥४॥ ऐशा विराटाच्या कोटी । सांठविल्या ज्याच्या पोटीं ॥५॥ तो हा नंदाचा बाळमुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ॥६॥ ऐशी अगम्य ईश्वरी लीला । ब्रह्मानंदीं गम्य तुक्याला ॥७॥

२३७३. ब्रह्मज्ञान तरी एके दिवसीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ॥१॥ अभिमान लागे शुकाचिये पाठी । व्यासें उफराटी दृष्टी केली ॥२॥ जनकभेटीसी पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ॥३॥ खोटें करूनियां लाविला अभ्यासीं । मेरुशिखरासी शुक गेला ॥४॥ जाऊनियां तेणें साधिली समाधी । तुका म्हणे तधीं होतों आम्ही ॥५॥

२३७४. सहज पावतां भगवंतीं । परि ही विकल्पें परतीं । फुकाची हे चित्तीं । आठवण न धरिती ॥१॥ हरि व्यापक सर्वगत । हा तंव मुख्यत्वें वेदान्त । चिंतनासी चित्त । असों द्यावें सावध ॥२॥ विरजाहोम याचि नांवें । देह नव्हें मी हें जाणावें । मग कां जी यावें । वरी लागे संकल्पा ॥३॥ कामक्रोधें देह मळिण । स्वाहाकारीं कैचें पुण्य । मंत्रीं पूजिलिया यज्ञानें । मन मुंडण नव्हेचि ॥४॥ अनन्यभक्तीचे उपाय । ते या विठोबाचे पाय । ध्याइल तो काय । चुकों जाणे मारग ॥५॥ आतां सांगे तुका । एक तुम्ही चुकों नका । सांडीमांडी धोका । शरण रिघतां गोमटें ॥६॥

२३७५. आम्हीं जाणावें तें काई । तुझें वर्म कोणे ठायीं । अंतपार नाहीं । ऐसें श्रुति बोलती ॥१॥ होई मज तैसा मज जैसा । साना सकुमार हृषीकेशा । पुरवी माझी आशा । भुजा चारी दाखवीं ॥२॥ खालता सप्तही पाताळा । वरता स्वर्गाहूनि ढिसाळा । तो मी मशक डोळां । कैसा पाहों आपुल्या ॥३॥ मज असे हा भरंवसा । पढीयें होसी तयां तैसा । पंढरीनिवासा । तुका म्हणे गा विठोबा ॥४॥

२३७६. वृक्षवल्ली आम्हां सोयरें वनचरें । पक्षीही सुस्वरें आळविती ॥१॥ येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ॥२॥ आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करूं ॥३॥ कंथाकमंडलू देहउपचारा । जाणवितो वारा अवसरु ॥४॥ हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥५॥ तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणांसी ॥६॥

२३७७. अनंत ब्रह्मांडें । एके रोमीं ऐसें धेंडें ॥१॥ तो या गौळियांचे घरीं । उंबरा चढतां

टेंका धरी ॥२॥ मारिले दैत्य गाढे । ज्यांचे पुराणीं पवाडे ॥३॥ तुका म्हणे कळा । अंगी जयाच्या सकळा ॥४॥

२३७८. सावधान ऐसें काय तें विचारा । आले हो संसारा सकळही ॥१॥ अंतीं समयाचा करणें विचार । वेचती सादर घटिका पळें ॥२॥ मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट ॥३॥ तुका म्हणे देव अंतरला दुरी । डोळिया अंधारी पडलीसे ॥४॥

२३७९. लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥१॥ तैसा समरस झालों । तुजमाजी हरपलों ॥२॥ अग्निकर्पूराच्या वेळीं । काय उरली काजळी ॥३॥ तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥४॥

२३८०. सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । वांयां हांवभरी होऊं नका ॥१॥ दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ॥२॥ चौदा कल्पेंवरी आयुष्य जयाला । परी तो राहिला ताटीखालीं ॥३॥ तुका म्हणे वेगीं जाय सुटोनियां । धरूनि हृदयामाजी हरि ॥४॥

२३८१ तुजकरितां होय ऐसें काय नाहीं । डोंगराची राई रंक राणा ॥१॥ अशुभाचें शुभ करितां तुज कांहीं । अवघड नाहीं पांडुरंगा ॥२॥ सोळा सहस्त्र नारी ब्रह्मचारी कैसा । निराहारी दुर्वासा नवल नव्हे ॥३॥ पंचभ्रतार द्रौपदी ते सती । करितां पितृशांती पुण्य धर्मा ॥४॥ दशरथ पातकी ब्रह्महत्यारासी । नवल त्याचे कुशीं जन्म तुझा ॥५॥ मुनेश्वरा नाहीं दोष अणुमात्र । भांडवितां सूत्र वध होती ॥६॥ तुका म्हणे माझे दोष ते कायी । सरता तुझे पायीं झालों देवा ॥७॥

२३८२. आवडीच्या ऐसें झालें । मुखा आलें हरिनाम ॥१॥ आतां घेऊं धणीवरि । मागें उरी नुरेतो ॥२॥ सांठवण मना ऐसी । पुढें रासी अमुप ॥३॥ तुका म्हणे कारण झालें । विठ्ठल या तीं अक्षरी ॥४॥

२३८३. उपजोनि मरें । परि हेंचि वाटे बरें ॥१॥ नाहीं आवडीसी पार । न म्हणवे झालें फार ॥२॥ अमृताची खाणी । उघडली नव्हे धणी ॥३॥ तुका म्हणे पचे । विठ्ठल हें मुखा रुचे ॥४॥

२३८४. लटिकेचि साच दाविलें अचळ । पीडीतसें काळ किती म्हूण ॥१॥ सत्य तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला । कांगा हा दाविला जगदाकार ॥२॥ सांभाळीं सांभाळीं आपुली हे माया । आम्हासी कां भयाभीत केलें ॥३॥ रूप नाहीं त्यासी ठेवियलें नाम । लटिकाचि भ्रम वाढविला ॥४॥ तुका म्हणे कांगा झालासी चतुर । होतासी निसूर निर्विकार ॥५॥

२३८५. आमच्या कपाळें तुज ऐसी बुद्धि । धरावी ते शुद्धी योगा नये ॥१॥ काय या राहिलें विनोदावांचून । आपुलिया भिन्न केलें आम्हां ॥२॥ कोठें मूर्तिमंत दावीं पुण्यपाप । काशासी संकल्प वाहाविसी ॥३॥ तुका म्हणे आतां आवरावा चेडा । लटिकी ते पीडा पांडुरंगा ॥४॥

२३८६. न बोलावें ऐसें जनासी उत्तर । करितों विचार बहु वेळां ॥१॥ कोण पाप आड

ठाकतें येऊन । पालटीत गुण अंतरींचा ॥२॥ संसारा हातीं सोडविला गळा । का हे अवकळा येती पुढें ॥३॥ तुका म्हणे सेवे घडे अंतराय । यासी करूं काय पांडुरंगा ॥४॥

२३८७. आतां हे उचित माझी जनाहातीं । पाहिजे फजीती केली कांहीं ॥१॥ मग मी तुमचे न सोडीं चरण । त्रासोनियां मन येईल ठाया ॥२॥ वाउगे वाणीचा न धरीं कांटाळा । ऐशी कां चांडाळा बुद्धि मज ॥३॥ तुका म्हणे जरि माथा बैसे घाव । तरि मग वाव नेघे पुढें ॥४॥

२३८८. मायेवरी सत्ता आवडीची बाळा । संकोचोनि लळा प्रतिपाळी ॥१॥ अपराध माझे न मनावे मनीं । तु ही संतजनीं मायबापीं ॥२॥ आरुषावचनीं लेंकुरांची आळी । साहोनि कवळी मागुताली ॥३॥ तुका म्हणे अंगीं काय नाहीं सत्ता । परि निष्ठुरता उपजेना ॥४॥

२३८९. कैसा होतो कृपावंत । बहु संत सांगती ॥१॥ पुसणें नाहीं याती कुळ । लागों वेळ नेदावी ॥२॥ ऐसी काय जाणों किती । उतरती उतरलीं ॥३॥ दावी वैकुंठींच्या वाटा । पहातां मोठा संपन्न ॥४॥ अभिमान तो नाहीं अंगीं । भक्तालागीं न बैसे ॥५॥ आलें घ्यावें भलत्या काळें । विठ्ठल बळें आगळा ॥६॥ तुका म्हणे आळस निद्रा । नाहीं थारा ते ठायीं ॥७॥

२३९०. सदैव हे वारकरी । जे पंढरी देखती ॥१॥ पदोपदीं विठ्ठल वाचा । तया कैंचा संसार ॥२॥ दोष पळाले पळाले । पैल आले हरिदास ॥३॥ प्रेमभातें भरलें अंगीं । निर्लज्ज रंगीं नाचती ॥४॥ गोपीचंदनाची उटी । तुळसी कंठीं मिरवती ॥५॥ दुर्बळा या शक्तिहीना । त्याही जना पुरता ॥६॥ तुका म्हणे देव चित्तीं । मोक्ष हातीं रोकडा ॥७॥

२३९१. ऐसीं ठावीं वर्में । तरी सांडवलों भ्रमें ॥१॥ सुखें नाचतों कीर्तनीं । नाहीं आशंकित मनीं ॥२॥ ऐसें आलें हाता । बळे तरी गेली चिंता ॥३॥ सुख येथे आलें तरी । नाहीं आणिकांची उरी ॥४॥ ऐसें केलें देवें । पुढें कांहींच न व्हावें ॥५॥ तुका म्हणे मन । आतां झालें समाधान ॥६॥

२३९२. चित्तीं बैसलें चिंतन । नारायण नारायण ॥१॥ नलगे गोड कांहीं आतां । आणीक दुसरें सर्वथा ॥२॥ हरपला द्वैतभाव । तेणें देहचि झाला वाव ॥३॥ तुका म्हणे आम्ही । झालों निष्काम ये कामीं ॥४॥

२३९३. नव्हें परि म्हणवीं दास । कांहीं निमित्तास मूळ केलें ॥१॥ तुमचा तो धर्म कोण । हा आपण विचारा ॥२॥ नाहीं शुद्ध आचरण । परी चरण चिंतितों ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । ऐसें कां गा नेणा हे ॥४॥

२३९४. व्यापिलें सर्वत्र । बाहेरी भीतरी अंतर ॥१॥ ऐसें गोविंदें गोविलें । बोले नवजाय बोलिलें ॥२॥ संचिताची होळी । करूनि जीव घेतला बळी ॥३॥ तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां संसारा उरी कांहीं ॥४॥

२३९५. आम्हांपाशीं सरे एक शुद्धभाव । चतुराई जाणीव नलगे कळा ॥१॥ सर्व जाण

माझा स्वामी पांडुरंग । तया अंगसंग गोपाळासी ॥२॥ तुका म्हणे कर्मे धर्मे नये हातां । तयावरी सत्ता भाविकांची ॥३॥

२३९६. प्रीति करी सत्ता । बाळा भिती माता पिता ॥१॥ काय चाले त्याशीं बळ । आळी करितां कोल्हाळ ॥२॥ पदरीं घाली मिठी । खेटी मागें पुढें लोटी ॥३॥ बोले मना आलें । तुका साहिलें विठ्ठलें ।४॥

२३९७. आवडीचे भेटी निवे । चित्त पावे विश्रांति ॥१ । बरवियाचा छंद वना । नारायणा अवीट ॥२॥ तुळणें कांहीं साम्या पुरे । हें तों नुरे ये रुचि ॥३॥ तुका म्हणे बरवें झालें । फावलें हें कळे त्या ॥४॥

२३९८. केलियाचें दान । करा आपुलें जतन ॥१॥ माझी बुद्धी स्थिर देवा । नाहीं विषयाचा हेवा ॥२॥ भावा अंतराय । अंतीं अंतरती पाय ॥३॥ तुका म्हणे जोडी । आदि अंतीं राहो गोडी ॥४॥

२३९९. माझे हातीं आहे करावें चिंतन । तुम्हीं कृपादान प्रेम द्यावें ॥१॥ मागतिया भांडवल आळवण । नामासी जतन दातियासी ॥२॥ बाळक धांवोनि आड रिघे स्तनीं । घालावा जननीं प्रेमपान्हा ॥३॥ तुका म्हणे करीं कासवीचे परी । आहे सूत्रदोरी तुझे हातीं ॥४॥

२४००. वाट दावी त्याचें गेलें काय । नागवला जो वारितां जाय ॥१॥ ऐसीं मागें ठकलीं किती । सांगतां खाती विषगोळा ॥२॥ विचारोनि पाहे त्यास । न वजे जीवा नव्हे नास ॥३॥ तुका म्हणे जो रुसला जीवा । तयासी केशवा काय चाले ॥४॥

२४०१. अनुभवावांचून सोंग संपादणें । नव्हें हें करणें स्वहिताचें ॥१॥ तैसा नको भुलों बाहिरल्या रंगें । स्वहित तेंचि वेगें करूनि घेईं ॥२॥ बहुरूपी रूपें नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ॥३॥ कनक झाड म्हूण वंदियेलें माथां । परि तेंही अर्था न मिळे माजी ॥४॥ पाषाणाचें नांव ठेवियलें देव । आणिका तारी भाव परि तो तैसा ॥५॥ तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास । अहंभावीं नास तोचि पावे ॥६॥

२४०२. मज नष्टा माया मोह नाहीं लोभ । अधिक तो क्षोभ आदराचा ॥१॥ धिग हें शरीर अनउपकारें । न मनीं आभार उपकाराचा ॥२॥ मजहून नष्ट आहे ऐसा कोण । नावडे मिष्टान्न बहुमोल ॥३॥ न दिसती मज आपलेसे गुण । संचित तें कोण जाणें मागें ॥४॥ तुका म्हणे माझें देखोनियां काई । पांडुरंगें पायीं राखियेलें ॥५॥

२४०३. उभ्या बाजारांत कथा । हे तों नावडे पंढरीनाथा ॥१॥ अवघें पोटासाठीं सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥२॥ लावी अनुसंधान । कांहीं देईल म्हणवून ॥३॥ काय केलें रांडलेंका । तुला राजी नाहीं तुका ॥४॥

२४०४. असोत लोकांचे बोल शिरावरी । माझी मज बरी विठाबाई ॥१॥ आपंगिलें मज आहे ते कृपाळू । बहुत कनवाळू अंतरींची ॥२॥ वेदशास्त्रें जिसीं वर्णिती पुराणें । तिचें मी पोसणें लडिवाळ ॥३॥ जिचें नाम कामधेनु कल्पतरू । तिचें मी लेंकरूं तुका म्हणे ॥४॥

२४०५. वाराणसी गया पाहिली द्वारका । परि नये तुका पंढरीच्या ॥१॥ पंढरीसी नाहीं कोणा अभिमान । पाया पडे जन एकमेकां ॥२॥ तुका म्हणे जाय एक वेळ पंढरी । तयाचिये घरीं यम नये ॥३॥

२४०६. सांडुनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥१॥ पाहुनियां झाडें ओरबडुनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥२॥ वेचुनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळोनि ढुंगा आळवावें ॥३॥ तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥४॥

२४०७. दह्याचिये अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ॥१॥ आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहोंशीं समान पाहों नये ॥२॥ पृथ्वीच्या पोटीं हिरा गारगोटी । दोहोंसीं संसाटी करूं नये ॥३॥ तुका म्हणे तैसें संत आणि जन । दोहोंसी समान भजूं नये ॥४॥

२४०८. काय धर्म नीत । तुम्हां शिकवावें हित ॥१॥ अवघें रचियेलें हेळा । लीळा ब्रह्मांड सकळा ॥२॥ नाम महादेव । येथें निवडला भाव ॥३॥ तुका म्हणे वेळे । माझें तुम्हां कां न कळे ॥४॥

२४०९. भांडावें तें गोड । पुरे सकळही कोड ॥१॥ ऐसा घरिचिया मोळा । ठावा निकटांजवळां ॥२॥ हांक देतां दारीं । येती जवळी सामोरीं ॥३॥ तुका म्हणे शिवें । मागितलें हातीं द्यावें ॥४॥

२४१०. तेरा दिवस झाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥१॥ पाषाणाची खोळ घेउनि बैसलासि । काय हृषीकेशी झालें तुज ॥२॥ तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥३॥ फार विठाबाई धरिली तुझी आस । करिन जीवा नाश पांडुरंगा ॥४॥ तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन तुजवरी ॥५॥

२४११. लोक फार वाखा अमंगळ झाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥१॥ विषयीं चेवलों मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा ॥२॥ घर दार अवघीं ज्यजिलीं नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥३॥ तुका म्हणे पडिलों पुंडलिकापाशीं । धांव हृषीकेशी आळिंगी मज ॥४॥

२४१२. करिसी कीं न करिसी माझा अंगीकार । हा मज विचार पडिला देवा ॥१॥ देसी कीं न देसी पायांचें दर्शन । म्हणऊनी मन स्थिर नाहीं ॥२॥ बोलसी कीं न बोलसी मजसवें देवा । म्हणोनियां जीवा भय वाटे ॥३॥ होईल कीं न होय तुज माझा आठव । पडिला संदेह हाचि मज ॥४॥ तुका म्हणे मी तों कमाईचा हीण । म्हणऊनी सीण करी देवा ॥५॥

२४१३. ऐसा माझा कोण आहे भीडभार । नांवाचा मी फार वांयां गेलों ॥१॥ काय सेवा रुजू आहे सत्ताबळ । जें मज राऊळ कृपा करी ॥२॥ काय याती शुद्ध आहे कुळ कर्म । तेणें पडे वर्म तुझे ठायीं ॥३॥ कोण तपोनिधी दानधर्मशीळ । अंगीं एक बळ आहे सत्ता ॥४॥ तुका म्हणे वांयां झालों भूमीभार । होईल विचार काय नेणों ॥५॥

२४१४. साच मज काय कळों नये देवा । काय तुझी सेवा काय नव्हे ॥१॥ करावें तें बरें जेणें समाधान । सेवावें हें वन न बोलावें ॥२॥ शुद्ध माझा भाव होईल तुझे पायीं । तरीच हें देईं निवडुनी ॥३॥ उचित अनुचित कळों आली गोष्टी । तुझे कृपादृष्टी पांडुरंगा ॥४॥ तुका म्हणे मज पायांसवें चाड । सांगसी तें गोड आहे मज ॥५॥

२४१५. नाहीं कांटाळलों परि वाटे भय । करावें तें काय न कळतां ॥१॥ जन वन आम्हां समानचि झालें । कामक्रोध केले पावटणी ॥२॥ षड्ऊर्मी शत्रु जिंकिले अनंता । नामाचिया सत्ताबळें तुझ्या ॥३॥ मुख्य धर्म आम्हां सेवकांचा ऐसा । स्वामी करील शिरसा पाळावें तें ॥४॥ म्हणऊनी तुका अवलोकूनी पाय । वचनाची पाहे वास एका ॥५॥

२४१६. वांयांविण हा वाढविला लौकिक । आणिला लटिका वाद दोघां ॥१॥ नाहीं ऐसा झाला देव माझ्या मतें । भुकेलें जेवितें काय जाणे ॥२॥ शब्दज्ञानें गौरविली हे वैखरी । साच तें अंतरीं बिंबेची ना ॥३॥ झालों परदेशी गेले दोन्ही ठाय । संसार ना पाय तुझे देवा ॥४॥ तुका म्हणे मागें कळों येतें ऐसें । न घेतों हें पिसें लावूनियां ॥५॥

२४१७. न कळे तत्त्वज्ञान मूढ माझी मति । परि ध्यातों चित्तीं चरणकमळ ॥१॥ आगमाचे भेद मी तो काय जाणें । काळ तो चिंतनें सारीतसें ॥२॥ कांहीं नेणें परि म्हणवितों दास । होईल त्याचा त्यास अभिमान ॥३॥ संसाराची सोय सांडिला मारग । दुरावलें जग एका घायें ॥४॥ मागिल लागाचें केलेंसें खंडन । एकाएकीं मन राखियेलें ॥५॥ तुका म्हणे अगा रखुमादेवीवरा । भक्तकरुणाकरा सांभाळावें ॥६॥

२४१८. संसार सोहळे भोगिती सकळ । भक्तां त्यांचें बळ विठोबाचें ॥१॥ भय चिंत्तीं धाक न मानिती मनीं । भक्ता चक्रपाणि सांभाळीत ॥२॥ पाप पुण्य त्यांचें धरूं न शके अंग । भक्तासी श्रीरंग सर्व भावें ॥३॥ नव्हती ते मुक्त आवडे संसार । देव त्यांचा भार सर्व वाहे ॥४॥ तुका म्हणे देव भक्तां वेळाईत । भक्त ते निश्चित त्याचियानें ॥५॥

२४१९. देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ॥१॥ भक्तांसीं सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगें सुख भोगी ॥२॥ देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्याचा पार वाखाणिला ॥३॥ एका अंगीं दोन्ही झालीं हे निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ॥४॥ तुका म्हणे येथें नाहीं भिन्नभाव । भक्त तोचि देव देव भक्त ॥५॥

२४२०. हुंबरती गाय तयांकडे कान । कैवल्यनिधान देउनी ठाके ॥१॥ गोपाळांची पूजा उच्छिष्ट कवळी । तेणें वनमाळी सुखावला ॥२॥ चोरोनियां खाय दूध दहीं लोणी । भावें चक्रपाणि गोविला तो ॥३॥ निष्काम तो झाला कामासी लंपट । गोपिकांची वाट पाहात बैसे ॥४॥ जगदानीं इच्छी तुळसी एक दळ । भावाचा सकळ विकिला तो ॥५॥ तुका म्हणे हेंचि चैतन्य सांवळें । व्यापूनी निराळें राहिलेंसे ॥६॥

२४२१. वाढविलें कांगा । तुम्ही एवढें पांडुरंगा ॥१॥ काय होती मज चाड । एवढी करावया बडबड ॥२॥ ब्रह्मसंतर्पण । लोकीं करावें कीर्तन ॥३॥ निमित्याचा धणी । तुका म्हणे नेणे कोणी ॥४॥

२४२२. आनंद अद्वय नित्य निरामय । जे कां निजध्येय योगियांचें ॥१॥ ते हे समचरण साजिरे विटेवरी । पाहा भीमातीरीं विठ्ठलरूप ॥२॥ पुराणासी वाड श्रुति नेणती पार । तें झालें साकार पुंडलिका ॥३॥ तुका म्हणे ज्यातें सनकादिक ध्यात । तें आमुचें कुळदैवत पांडुरंग ॥४॥

२४२३. वाचेचिया आळा कवळिलें ब्रह्म । चुकविला श्रम पृथक तो ॥१॥ सुलभ तें झालें सुलभ तें झालें । जवळीच आलें पंढरिये ॥२॥ नामरूपाचे बांधलें मोटळें । एक एका वेळे सारियेलें ॥३॥ तुका म्हणे वाटे चुकली वसती । उधार तो हातीं आणियेला ॥४॥

२४२४. सवंग झालें सवंग झालें । घरा आलें बंदरींचें ॥१॥ आतां हेवा करूं सोस । भक्तिरस बहु गोड ॥२॥ पाउल वेचे चिंता नाहीं । आड कांहीं मग नये ॥३॥ तुका म्हणे संचिताचें । नेणे काचे राहें तें ॥४॥

२४२५. तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ती वाणूं ॥१॥ अवतार तुम्हा धराया कारण । उद्धरावे जन जड जीव ॥२॥ वाढविलें सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥३॥ तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुम्ही जगीं संतजन ॥४॥

२४२६. पाठी लागे तया दवडी दुरी । घालीं बाहेरी संवसारा ॥१॥ येउनि दडें तुमच्या पायीं । धांवें तईं छो म्हणा ॥२॥ पारखियाचा वास पडे । खडबडे उठी तें ॥३॥ तुका म्हणे लाविला धाक । नेदी ताक खाऊं देऊं ॥४॥

२४२७. सांखळिलों प्रीती गळां । भुंके वेळां जाणोनियां ॥१॥ तुमचें मी केशीराजा । सुने या काजा पाळिलों ॥२॥ आलें गेलें कळे वाटा । कोण निटा वांकुडिया ॥३॥ तुका म्हणे आलें वारी । दुरि तें दुरी नातळतां ॥४॥

२४२८. पाळोनियां मोठें केलें । त्यासी बोलें ओळखी ॥१॥ जवळोनि नवजे दुरी । लाड करी कौतुकें ॥२॥ खूण उभा विटेवरी । कटीं कर ठेउनियां ॥३॥ तुका म्हणे घातली वरी । झुली थोरी मोलाची ॥४॥

२४२९. सुनियांची आवडी देवा । घेत सेवा नाहीं कांहीं ॥१॥ सिकविलें जवळी बैसों । जेथें असों तेथेंचि ॥२॥ नेदी दुजें बोल करूं । गुरुगुरु न साहे ॥३॥ तुका म्हणे कुर्वाळितां । अंग सत्ता संगाची ॥४॥

२४३०. शिळें खातां आला वीट । सुने धीट पाय धरी ॥१॥ कान्होबा ते जाणे खूण । उन उन घास घाली ॥२॥ आपुले ठायींचें घ्यावें । लाड भावें पाळावा ॥३॥ तुका म्हणे मी जुनाट सुनें । मोहो तेणें परतला ॥४॥

२४३१. लागलें भरतें । ब्रह्मानंदाही वरतें ॥१॥ झाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥२॥ बैसोनि सकळ । बाळ चालिले गोपाळ ॥३॥ तुका म्हणे वाट । बरवी सांपडली नीट ॥४॥

२४३२. धन वित्त कुळें । अवघियानें तें आगळें ॥१॥ ज्याचे नारायण गांठीं । भरला हृदय संपुटीं ॥२॥ अवघेंचि गोड । त्याचें पुरे सर्व कोड ॥३॥ तुका म्हणे अस्त । उदयो त्याच्या तेजानास्त ॥४॥

२४३३. बोलावें तें आम्ही आतां अबोलणें । एकाचि वचनें सकळासि ॥१॥ मेघवृष्टि कांहीं न विचारी ठाव । जैसा ज्याचा भाव त्यासी फळें ॥२॥ तुका म्हणे नाहीं समाधानें चाड । आपणाही नाड पुढिलासी ॥३॥

२४३४. अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥१॥ मुंगीवरी भार गजाचें पालाण । घालितां ते कोण कार्यसिद्धि ॥२॥ तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगीं ते काढी पारधी तो ॥३॥

२४३५. नव्हों वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाले भलत्यासी ॥१॥ कुपथ्य करूनि विटंबावे रोगी । काय हे सलगी भीड त्याची ॥२॥ तुका म्हणे लासूं फासूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ॥३॥

२४३६. मागें चिंता होती आस । केला नास या काळें ॥१॥ तुम्ही आम्हां उदासीन । भिन्नाभिन्न वारिलें ॥२॥ मोहजाळें दुःख वाढे । ओढे ओढे त्यास तें ॥३॥ तुका म्हणे कोण देवा । आतां हेवा वाढवी ॥४॥

२४३७. असो खटपट । आतां वाऊगे बोभाट ॥१॥ परिसा हे विनवणी । असो मस्तक चरणीं ॥२॥ अपराध करा । क्षमा घडले दातारा ॥३॥ तुका म्हणे व्यथा । तुम्हां कळे पंढरीनाथा ॥४॥

२४३८. अहो उभया विटेवरी । भरोवरी चुकविली ॥१॥ निवारलें येणें जाणें । कोणा कोणें रुसावें ॥२॥ संकल्पासी वेचे बळ । भारे फळ निर्माण ॥३॥ तुका म्हणे उभयतां । भेटी सत्ता लोभाची ॥४॥

२४३९. वारकरी पायांपाशीं । आले त्यांसी विनविलें ॥१॥ काय काय तें आइका । विसरों

नका रंकासी ॥२॥ चिंतावोनि चिंता केली । हे राहिली अवस्था ॥३॥ तुका म्हणे संवसारा । रुसलो खरा यासाठीं ॥४॥

२४४०. जीवींचें कां नेणां । परि हे आवडी नारायणा ॥१॥ वाढवावें हें उत्तर । कांहीं लाड करकर ॥२॥ कोठें वांयां गेले । शब्द उत्तम चांगले ॥३॥ तुका म्हणे बाळा । असतां तात्पर्य या खेळा ॥४॥

२४४१. वोढविले अंग । आतां करूनि घ्यावें सांग ॥१॥ काय पूजा ते मी नेणें । जाणावें जी सर्वजाणें ॥२॥ पोटा आलें बाळ । त्याचें जाणावें सकळ ॥३॥ तुका म्हणे हरी । वाहावें जी कडियेवरी ॥४॥

२४४२. शेवटींची हे विनंती । पाय चित्तीं रहावे ॥१॥ ऐसें करा कृपादान । तुम्हां मन सन्निध ॥२॥ भाग्येविण कैंची भेटी । नव्हे तुटी चिंतनें ॥३॥ तुका म्हणे कळसा आलें । हें विठ्ठलें परिसावें ॥४॥

२४४३. करूनियां शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥१॥ तरीच हा तरिजे सिंधु । भवबंधू तोडोनियां ॥२॥ येथें सरे शुद्ध साचें । अंतरींचें बीज तें ॥३॥ तुका म्हणे लवणकळी । पडतां जळीं तें होय ॥४॥

२४४४. जिकडे पाहे तिकडे देव । ऐसा भाव दे कांहीं ॥१॥ काय केलों एकदेशी । गुणदोषीं संपन्न ॥२॥ पडे तेथें तुझ्या पायां । करीं वांयां न वजेसें ॥३॥ तुका म्हणे विषमें सारी । ठाणें धरी जिवासी ॥४॥

२४४५. सरे ऐसें ज्याचें दान । त्याचे कोण उपकार ॥१॥ नको वाढूं ऐसें काचें । दे वो साचे विठ्ठले ॥२॥ रडत मागें सांडी पोर । ते काय थोर माउली ॥३॥ तुका म्हणे कीर्ति वाढे । धर्म गाढे ते ऐसे ॥४॥

२४४६. लोभावरी ठेवुनि हेत । करी असत्य न्याय नीत ॥१॥ त्याच्या पूर्वजां पतन । नरकीं किडे होती जाण ॥२॥ कोटिगोहत्यापातक । त्यासी घडेल निष्टंक ॥३॥ मासां स्त्रवे जे सुंदरा । पाजी विटाळ पितरां ॥४॥ तुका म्हणे ऐसियासी । यम गांजील सायासी ॥५॥

२४४७. देह जाईल जाईल । यासी काळ बा खाईल ॥१॥ कां रे नुमजसी दगडा । कैचे हत्ती घोडे वाडा ॥२॥ लोडें बालिस्तें सुपती । जरा आलिया फजिती ॥३॥ शरीरसंबंधाचें नातें । भोरड्या बुडविती सेतातें ॥४॥ अझुनि तरी होईं जागा । तुका म्हणे पुढें दगा ॥५॥

२४४८. मागें बहुतां जना राखिलें आडणी । धांवसी निर्वाणीं नाम घेतां ॥१॥ ऐसें ठावें झालें मज बरव्या परी । म्हणऊनि करीं धांवा तुझा ॥२॥ माझेविशीं तुज पडिला विसरू । आतां काय करूं पांडुरंगा ॥३॥ अझूनि कां नये तुम्हांसी करुणा । दुरि नारायणा धरिलें मज

॥४॥ तुका म्हणे जीव जाऊं पाहे माझा । आतां केशीराजा घालीं उडी ॥५॥

२४४९. कळलें माझा तुज नव्हे रे आठव । काय काजें जीव ठेवूं आतां ॥१॥ तूं काय करिसी माझिया संचिता । धिग हे अनंता झालें जिणें ॥२॥ पतितपावन राहिलों हे आशा । आइकोनि ठसा कीर्ति तुझी ॥३॥ आतां कोण करील माझा अंगीकार । कळलें निष्ठुर झालासी तूं ॥४॥ तुका म्हणे माझी मांडिली निरास । करितों जीवा नास तुजसाठीं ॥५॥

२४५०. तरि का मागें वांयां कीर्ति वाढविली । जनांत आपुली ब्रिदावळी ॥१॥ साच करितां आतां फिरसी माघारा । ठायींचें दातारा नेणवेचि ॥२॥ संतांसी श्रीमुख कैसें दाखविसी । पुढें मात त्यांसी सांगईन ॥३॥ घेईन डांगोरा तुझिया नामाचा । नव्हे अनाथांचा नाथ ऐसा ॥४॥ तुका म्हणे आम्ही राहिलों मरोनी । तूं कां होसी धनी निमित्याचा ॥५॥

२४५१. लाजती पुराणें । वेदां येऊं पाहे उणें ॥१॥ आम्ही नामाचे धारक । किविलवाणीं दिसों रंक ॥२॥ बोलिले ते संतीं । बोल वांयांविण जाती ॥३॥ तुका म्हणे देवा । रोकडे हे मोडे सेवा ॥४॥

२४५२. आम्ही तुझ्या दासीं । जरी जावें पतनासी ॥१॥ तरि हें दिसे विपरीत । कोठें बोलली हे नीत ॥२॥ तुझें नाम कंठीं । आम्हां संसार आटी ॥३॥ तुका म्हणे काळ । करिल आम्हांसी विटाळ ॥४॥

२४५३. आहार निद्रे नलगे आदर । आपण सादर तेचि होय ॥१॥ परिमितीविणें बोलणें तें वांयां । फार थोडें काया पिंड पीडी ॥२॥ समाधान त्याचें तोचि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनियां ॥३॥ तुका म्हणे होय पीडा ते न करीं । मग राहें परी भलतिये ॥४॥

२४५४. भूमि अवघी शुद्ध जाणा । अमंगळ हे वासना ॥१॥ तैसे वोपसले जीव । सांडी नसतां अंगीं घाव ॥२॥ जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ॥३॥ तुका म्हणे शुद्ध । मग तुटलिया भेद ॥४॥

२४५५. सरतें माझें तुझें । तरि हें उतरतें ओझें ॥१॥ नलगे सांडावें मांडावें । आहे शुद्धचि स्वभावें ॥२॥ घातला तो आशा । मोहोजाळें गळां फासा ॥३॥ सुखाचा तो मान । नाहीं दुःखाचा तो शीण ॥४॥ करितां नारायण । एवढें वेचितां वचन ॥५॥ तैसा मान अपमान । लाभ हानी हे समान ॥६॥ तुका म्हणे याचें । नांव सोवळें हें साचें ॥७॥

२४५६. तुज करितां होते ऐसे । मूढ चतुर पंडित पिसे ॥१॥ परि हें वर्म नेणती कोणी । पीडाखाणी भोगितील ॥२॥ उल्लंघिती पांगुळ गिरी । मुकें करी अनुवाद ॥३॥ पापी होती पुण्यवंत । न करी घात दुर्जन ॥४॥ अवघें हेळमात्रें हरि । मुक्त करी ब्रह्मांड ॥५॥ तुका म्हणे खेळे लीळा । पाहे वेगळा व्यापूनी ॥६॥

२४५७. पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥१॥ पुरोनि उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ॥२॥ खोलीं पडे ओली बीज । तरीच हातीं लागे निज ॥३॥ तुका म्हणे धणी । विठ्ठल अक्षरें या तिन्ही ॥४॥

२४५८. करिसी लाघवें । तूं हें खेळसी आघवें ॥१॥ केला अहंकार आड । आम्हां जगासी हा नाड ॥२॥ इत्थंभूत यावें । दावूं लपोंही जाणावें ॥३॥ तुका म्हणे हो श्रीपती । आतां चाळवाल किती ॥४॥

२४५९. घालिती पव्हया । वाटे अनाथाच्या दया ॥१॥ तैसें कां हो नये करूं । पांडुरंगा मज तारूं ॥२॥ रोगियासी काढा । देउनि वारिताती पीडा ॥३॥ बुडत्यासाठीं उडी । घालिताती काय जोडी ॥४॥ झाडिताती कांटे । पुढें मागिलांचे वाटे ॥५॥ तुका म्हणे भार । घेती भागल्यांचा फार ॥६॥

२४६०. नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥१॥ अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आम्हांपुढें ॥२॥ वरी कोण मानी रसाळ बोलणें । नाहीं झाली मनें वोळखीतों ॥३॥ निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥४॥ तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें । येर गाबाळाचें काय काम ॥५॥

२४६१. न करि त्याचें गांढेपण । नारायण सिद्ध उभा ॥१॥ भवसिंधुचा थडवा केला । बोलाविला पाहिजे ॥२॥ याचे सोई पाउल वेचे । मग कैचे अडथळे ॥३॥ तुका म्हणे खरें खोटें । न म्हणे मोठें लहान ॥४॥

२४६२. रिकामें तूं नको मना । राहों क्षणक्षणाही ॥१॥ वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ॥२॥ भ्रमणाच्या मोडीं वाटा । न भरें फाटा आडरानें ॥३॥ तुका म्हणे माझ्या जीवें । हेंचि घ्यावें धणीवरी ॥४॥

२४६३. पंचभूताचे सांपडलों संदीं । घातलोंसे बंदीं अहंकारें ॥१॥ आपल्या आपण बांधविला गळा । नेणेंचि निराळा असतांही ॥२॥ कासया हा सत्य मानिला संसार । कां हे केले चार माझें माझें ॥३॥ कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली ॥४॥ किंचित सुखाचा धरिला अभिळास । तेणें बहु नास केला पुढें ॥५॥ तुका म्हणे आतां देह देऊं बळी । करुनि सांडूं होळी संचिताची ॥६॥

२४६४. देव झाले अवघे जन । दोष गुण हारपले ॥१॥ बरवें झालें बरवें झालें । चित्त धालें महालाभें ॥२॥ दर्पणीचें दुसरें भासे । परि तें असे एक तें ॥३॥ तुका म्हणे सिंधुभेटी । उदका तुटी वोहोळासी ॥४॥

२४६५. बहुत प्रकार गव्हांचे । जिव्हा नाचे आवडी ॥१॥ सरले परि आवडी नवी । सिंधु

दावी तरंग ॥२॥ घेतलें घ्यावें वेळोवेळां । माय बाळा न विसंबे ॥३॥ तुका म्हणे रस वचनीं । पडताळूनि तोचि सेवी ॥४॥

२४६६. आम्हां सोयरे हरिजन । जन भाग्य निकिंचन ॥१॥ ज्यांच्या धैर्या नाहीं भंग । भाव एकविध रंग ॥२॥ भूक तहान चित्तीं । सदा देव आठविती ॥३॥ तुका म्हणे धन । ज्यांचें निज नारायण ॥४॥

२४६७. म्हणवितों दास न करितां सेवा । लंडपणें देवा पोट भरीं ॥१॥ खोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं । अंतर जाणसी पांडुरंगा ॥२॥ आचरण खोटें आपणासी ठावें । लटिकें बोलावें दुसरें तें ॥३॥ तुका म्हणे ऐसा आहें अपराधी । असो कृपानिधी तुम्हां ठावा ॥४॥

२४६८. जळो तें बाह्य सोंग । पडिलिया अंतर व्यंग ॥१॥ कारण तें अंतरलें । म्हणवितां वाइट भलें ॥२॥ तांतडीनें नासी । तांतडीनेंचि संतोषी ॥३॥ तुका म्हणे धीर । नाहीं बुद्धि एकी स्थिर ॥४॥

२४६९. चित्ताचें बांधलें जवळी तें वसे । प्रकाशीं प्रकाशे सर्वकाळ ॥१॥ अंतरी वसावी उत्तम ते भेटी । होऊं कांहीं तुटी न सकेची ॥२॥ ब्रह्मांड कवळे आठवणेसाठीं । धरावा तो पोटीं वाव बरा ॥३॥ तुका म्हणे लाभ घरिचिया घरीं । प्रेमतंतु दोरी न तुटतां ॥४॥

२४७०. दुखवलें चित्त आजिच्या प्रसंगें । बहु पीडा जगें केली देवा ॥१॥ कधीं हा संबंध तोडिसी तें नेणें । आठवूनि मनें पाय असें ॥२॥ आणिकांचीं येती अंतरा अंतरें । सुखदुःख बरेंवाइट तें ॥३॥ तुका म्हणे घडे एकांताचा वास । तरिच या नास संबंधाचा ॥४॥

२४७१. धनवंत एक बहिरट अंधळे । शुभ्र कुष्ठ काळे भोग अंगीं ॥१॥ प्रारब्धाची गति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र विठोबाचे ॥२॥ आणीक रोगांचीं नांवें सांगों किती । अखंड असती जडोनियां ॥३॥ तुका म्हणे नष्ट संचिताचे दान । खातां पावे पण सुख नेदी ॥४॥

२४७२. भेदाभेदताळा न घडे घालितां । आठवा रे आतां नारायण ॥१॥ येणें एक केलें अवघें होय सांग । अच्युताचा योग नाम छंद ॥२॥ भोंवरे खळाळ चोर वाटा घेती । पावलें मारिती सिवेपाशीं ॥३॥ तुका म्हणे येथें भावेंविण पार । न पविजे सार हेंचि आहे ॥४॥

२४७३. जे गाती अखंड विठ्ठलाचें गीत । त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी ॥१॥ जयांसी आवडे विठ्ठलाचें नाम । ते माझे परम प्राणसखे ॥२॥ जयासी विठ्ठल आवडे लोचनीं । त्यांचें पायवणी स्वीकारीन ॥३॥ विठ्ठलासी जिहीं दिला सर्व भाव । त्यांच्या पायीं जीव ठेवीन मी ॥४॥ तुका म्हणे रज होईन चरणींचा । म्हणविती त्यांच्या हरिचे दास ॥५॥

२४७४. काय तो विवाद असो भेदाभेद । साधा परमानंद एका भावें ॥१॥ निघोनि आयुष्य जातें हातोहात । विचारीं पां हित लवलाहीं ॥२॥ तुका म्हणे भावभक्ति हे कारण ।

नागवी भूषण दंभ तोचि ॥३॥

२४७५. देवकीनंदनें। केलें आपुल्या चिंतनें॥१॥ मज आपुलिया ऐसें। मना लावूनियां पिसें ॥२॥ गोवळे गोपाळा। केलें लावूनियां चाळा ॥३॥ तुका म्हणे संग। केला दूरि नव्हे मग ॥४॥

२४७६. माझिया जीवासी हेचि पैं विश्रांति। तुझे पाय चित्तीं पांडुरंगा ॥१॥ भांडवल गांठीं झालेंसें पुरतें। समाधान चित्तें मानियेलें ॥२॥ उदंड उच्चारें घातला पसरु। रूपावरी भरु आवडीचा ॥३॥ तुका म्हणे मज भक्तिची आवडी। अभेदीं तांतडी नाहीं म्हूण ॥४॥

२४७७. एकविध आम्ही न धरूं पालट। न संडूं हे वाट सांपडली ॥१॥ म्हणवूनी केला पाहिजे सांभाळ। माझें बुद्धीबळ पाय तुझे ॥२॥ बहुत न कळे बोलतां प्रकार। अंतरा अंतर साक्ष असे ॥३॥ तुका म्हणे अगा जीवींच्या जीवना। तूंचि नारायणा साक्षि माझा ॥४॥

२४७८. राहो येचि ठायीं। माझा भाव तुझे पायीं ॥१॥ करीन नामाचें चिंतन। जाऊं नेदी कोठें मन ॥२॥ देईन ये रसीं। आतां बुडी सर्वविशीं ॥३॥ तुका म्हणे देवा। साटी करोनियां जीवा ॥४॥

२४७९. तैसे नव्हों आम्ही विठ्ठलाचे दास। यावें आणिकांस काकुळती ॥१॥ स्वामिचिया सत्ता ठेंगणें सकळ। आला कळिकाळ हाताखालीं ॥२॥ अंकिताचा असे अभिमान देवा। समर्पूनी हेवा असों पायीं ॥३॥ तुका म्हणे आम्हां इच्छेचें खेळणें। कोड नारायणें पुरवावें ॥४॥

२४८०. मोक्ष देवापाशीं नाहीं। लटक्या घाईं विव्हळत ॥१॥ काय खर न धरी शुद्धी। गेली बुद्धी भ्रमलें ॥२॥ अहंकारा उरलें काई। पांचांठायीं हें वाटे ॥३॥ तुका म्हणे कुंथे भारें। लटिकें खरें मानुनियां ॥४॥

२४८१. आपला तो एक देव करुनि घ्यावा। तेणेंविण जीवा सुख नव्हे ॥१॥ येर तीं माइकें दुःखाचीं जनितीं। नाहीं आदिअंतीं अवसानीं ॥२॥ अविनाश करी आपुलिया ऐसें। लावीं मना पिसें गोविंदाचें ॥३॥ तुका म्हणे एका मरणेंचि सरे। उत्तमचि उरे कीर्ति मागें ॥४॥

२४८२. आजिचें हे मज तुम्हीं कृपादान। दिले संतजन मायबापीं ॥१॥ आलीं मुखावाटे अमृतवचनें। उत्तीर्णता येणें नव्हे जन्में ॥२॥ तुका म्हणे तुम्हीं उदार कृपाळ। शृंगारिलें बाळ कवतुकें ॥३॥

२४८३. स्तुती अथवा निंदा करावी देवाची। अधम तो वेचि व्यर्थ वाणी ॥१॥ आइकोनि होती बहिर हे बोल। वेचूनि ते मोल नरका जाती ॥२॥ इहलोकीं थुंका उडे तोंडावरी। करणे अघोरीं वास लागे ॥३॥ तुका म्हणे माप वाचेऐसें निकें। भरलें नरकें निंदेसाठीं ॥४॥

२४८४. लोह कफ गार सिद्ध हे सामुग्री। अग्नी टणत्कारी दिसों येतो ॥१॥ सांगावें तें काई

सांगावें तें काई। चित्ता होय ठायीं अनुभव तो ॥२॥ अन्नें सांगों येतो तृप्तीचा अनुभव। करूनि उपाव घेऊं हेवा ॥३॥ तुका म्हणे मिळे जीवनीं जीवन। तेथें कोणा कोण नांव ठेवी ॥४॥

२४८५. बाळाचें जीवन। माता जाणें भूक तहान ॥१॥ काय करूं विनवणी। असो मस्तक चरणीं ॥२॥ ठेविलिये ठायीं। चित्त ठेवूनि असे पायीं ॥३॥ करितों हे सेवा। चिंतन सर्वां ठायीं देवा ॥४॥ न्यून तेंचि पुरें । घ्यावें करोनि दातारें ॥५॥ तुका म्हणे बुद्धि। अल्प असे अपराधी ॥६॥

२४८६. जाणतों समय। परिमित कामा नये ॥१॥ तुम्हीं सांगावें तें बरें। देवा सकळ विचारें ॥२॥ फुकाचिये पुसी। चिंता नाहीं होते ऐसी ॥३॥ तुका म्हणे आहे। धर पाय मज साहे ॥४॥

२४८७. द्वारपाळ विनंती करी । उभे द्वारीं राऊळा ॥१॥ आपुलिया शरणागता । वाहों चिंता न द्यावी ॥२॥ वचना या चित्त द्यावें । असो ठावें तुम्हासी ॥३॥ तुका म्हणे कृपासिंधु। दीनबंधू केशवा ॥४॥

२४८८. दोहीं बाहीं आम्हां वास । असो कास घालूनि ॥१॥ बोल बोलों उभयतां । स्वामीसत्ता सेवेची ॥२॥ एकसरें आज्ञा केली । असों चाली ते नीती ॥३॥ तुका म्हणे जोहारितों। आहे होतों ते ठायीं ॥४॥

२४८९. ऐका जी देवा माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥१॥ सन्निध पातलों सांडुनियां शंका । सन्मुखचि एकाएकीं पुढें ॥२॥ जाणविलें कोठें पावे पायांपाशीं । केली या जिवासी साटी म्हूण ॥३॥ तुका म्हणे माझे हातीं द्या उद्धार। करीं करकर म्हणवूनि ॥४॥

२४९०. बैसलों तों कडियेवरी । नव्हे दुरी वेगळा ॥१॥ घडलें हें बहुतां दिसां । आतां इच्छा पुरवीन ॥२॥ बहु होता जाला सीण। नाहीं क्षण विसांवा ॥३॥ दुःखी केलें मी तूं पणें। जवळी नेणें होतें तें ॥४॥ पाहात जे होतों वास । तेचि आस पुरविली ॥५॥ तुका म्हणे मायबापा। झणी कोपा विठ्ठला ॥६॥

२४९१. तुझें नाम मुखीं तयासी विपत्ति । आश्चर्य हें चित्तीं वाटतसे ॥१॥ काय जाणों देवा होसील निजला। नेणों जी विठ्ठला मायबापा ॥२॥ भवबंधनाचे तुटतील फांसे। तें कां येथें ऐसें अव्हेरिलें ॥३॥ तुका म्हणे माझें दचकलें मन। वाटे वांयांविण श्रम केला ॥४॥

२४९२. सेवकें करावें सांगितलें काम। सिक्याचा तो धर्म स्वामी राखे ॥१॥ काय देवा नेणों आलें गांढेपण। तुम्ही शक्तिहीन झाले दिसा ॥२॥ विष्णुदास आम्ही निर्भर ज्या बळें। तें दिसे या काळें अव्हेरिलें ॥३॥ तुका म्हणे मूळ पाठवा लौकरी। किंवा करूं हरी काय सांगा ॥४॥

२४९३. खेळतां निजभावें समर्थाचें बाळ। तयाच्या सकळ सत्तेखालीं ॥१॥ तरी लेववीला शोभे अळंकार। नाहीं तरी भार मानाविण ॥२॥ अवघीच दिशा असावी मोकळी। मायबाप बळी म्हणऊनि ॥३॥ तुका म्हणे माझें ऐसें आहे देवा। म्हणऊनि सेवा समर्पिली ॥४॥

२४९४. निरंजनीं एकटवाणें । संग नेणें दुसरा ॥१॥ पाहा चाळविलें कैसें । लावूनि पिसें गोवळें ॥२॥ लपविलें अंगें अंग । दिला संग होता तो ॥३॥ तुका म्हणे नव्हतें ठावें । झालें भावें वाटोळें ॥४॥

२४९५. नव्हती भेटी तोंचि बरें । होता चोरें नाडिलें ॥१॥ अवघियांचा केला झाडा । रिता वाडा खोंकर ॥२॥ चिंतनाचें मूळ चित्त । नेलें वित्त हरुनि ॥३॥ तुका म्हणे मूळा आलें । होतें केलें तैसेंचि ॥४॥

२४९६. जये ठायीं आवडी ठेली । मज ते बोली न संडे ॥१॥ पुरवावें जीवींचें कोड । भेटी गोड तुज मज ॥२॥ आणियलें येथवरी । रूप दुरी न करावें ॥३॥ तुका म्हणे नारायणा । सेवाहीना धिग वृत्ति ॥४॥

२४९७. सरलियाचा सोस मनीं । लाजोनियां राहिलों ॥१॥ आवडीनें बोलावितों । येथें तें तों लपावें ॥२॥ माझें तेंचि मज द्यावें । होतें भावें जोडिलें ॥३॥ तुका म्हणे विश्वंभरा । आळीकरा बुझावा ॥४॥

२४९८. नाचावेंसें वाटे मना । छंद गुणा अधीन ॥१॥ चेष्टविलीं माझीं गात्रें । सत्तासूत्रें हालती ॥२॥ नामरूपें रंगा आली । तेचि चाली स्वभावें ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगें । अंग संगें कवळिलें ॥४॥

२४९९. खेळतों ते खेळ पायांच्या प्रसादें । नव्हती हीं छंदें नासिवंत ॥१॥ माझा मायबाप उभा विटेवरी । कवतुकें करी कृपादान ॥२॥ प्रसादाची वाणी वदती उत्तरें । नाहीं मतांतरें जोडियेलीं ॥३॥ तुका म्हणे रस वाढती या अंगें । छाया पांडुरंगें केली वरी ॥४॥

२५००. अखंड मुडतर । सासुरवास करकर ॥१॥ याची जाली बोळवण । आतां न देखों तो शीण ॥२॥ बहुतांची दासी । तये घरीं सासुरवासी ॥३॥ तुका म्हणे मुळें । खंड झाला एक वेळे ॥४॥

२५०१. अवघा भार वाटे देवा । संतसेवा न करितां ॥१॥ कसोटी हे असे हातीं । सत्य भूतीं भगवंत ॥२॥ चुकलोंसा दिसे पंथ । गेले संत तो ऐसा ॥३॥ तुका म्हणे सोंग वांयां । कारण या अनुभवें ॥४॥

२५०२. आतां तुम्ही कृपावंत । साधु संत जिवलग ॥१॥ गोमटें तें करा माझें । भार ओझें तुम्हांसी ॥२॥ वंचिलें तें पायांपाशीं । नाहीं यासी वेगळें ॥३॥ तुका म्हणे सोडिल्या गांठी । दिली मिठी पायांसी ॥४॥

२५०३. सुख वाटे परी वर्म । धर्माधर्म न कळे ॥१॥ गायें नाचें एवढें जाणें । विठ्ठल म्हणे निर्लज्ज ॥२॥ अवघें माझें एवढें धन । साधनही सकळ ॥२॥ तुका म्हणे पायां पडे ।

तुमच्या कोडें संताच्या ॥४॥

२५०४. धरिलीं जीं होतीं चित्तीं । डोळां तेचि दिसती ॥१॥ आलें आवडीसी फळ । झालें कारण सकळ ॥२॥ घेईन भातुकें । मागोनियां कवतुकें ॥३॥ तुका म्हणे लाड । विठोबा पुरवील कोड ॥४॥

२५०५. बहुतां दिसांची आजि झाली भेटी । झाली होती तुटी काळगती ॥१॥ येथें सावकाश घेईन ते धणी । गेली अडचणी उगवोनि ॥२॥ बहु दुःख दिलें होतें घरीं कामें । वाढला हा श्रमें श्रम होता ॥३॥ बहु दिस होता सांडिला मारग । क्लेशाचा त्या त्याग आजि झाला ॥४॥ बहु होती केली सोंगसंपादणी । लौकिकापासुनि निर्गमलें ॥५॥ तुका म्हणे येथें झालें अवसान । परमानंदीं मन विसावलें ॥६॥

२५०६. पुत्र झाला चोर । मायबापां हर्ष थोर ॥१॥ आतां कशासाठीं जोडी । हाट धांटे गुंडगे घडी ॥२॥ आइते अपहार । आणूनियां भरी घर ॥३॥ मानिली निश्चिंती । नरका जावया उभयतीं ॥४॥ झोंडाझोंडगीचे पोटीं । फळें विजाती करंटीं ॥५॥ तुका म्हणे बेट्या । भांडवल नलगे खट्या ॥६॥

२५०७. एवढी अपकीर्ति । ऐकोनियां फजिती ॥१॥ जरि दाविल वदन । थुंका थुंका तो देखोन ॥२॥ काळिमेचें जिणें । जीवोनियां राहे सुनें ॥३॥ तुका म्हणे गुण । दरुषणें अपशकून ॥४॥

२५०८. समर्थासी नाहीं वर्णावर्ण भेद । सामुग्री ते सिद्ध सर्व घरीं ॥१॥ आदराचे ठायीं बहुच आदर । मागीतले फार ते ते वाढी ॥२॥ न म्हणे सुहृद सोयरा आवश्यक । राजा आणि रंक सारिखेची ॥३॥ भाव देखे तेथें करी लडबड । जडा राखे जड निराळेंची ॥४॥ कोणा न विसंबे याचकाचा ठाव । विनवुनी देव शंका फेडी ॥५॥ तुका म्हणे पोट भरुनी उरवी । आलें ऐसें दावी अनुभवा ॥६॥

२५०९. पुंडलीक भक्तराज । तेणें साधियलें काज । वैकुंठीचें निज । परब्रह्म आणिलें ॥१॥ पांडुरंग बाळमूर्ति । गाई गोपाळ सांगाती । येऊनियां प्रीति । उभें समचि राहिलें ॥२॥ एका आगळें अक्षरें । भूवैकुंठचि दुसरें । म्हणविती येरें । परि तीं ऐसीं नव्हेती ॥३॥ पाप पंचक्रोशीमधीं । येऊं न सकेचि कधीं । कैंची तेथें विधि । निषेधाची वसति ॥४॥ पुराणें बोलती ऐसें । चतर्भुज तीं माणसें । सुदर्शनावरी वसे । न बुडे हे कल्पांतीं ॥५॥ अनुपम्य इची थोरी । महाक्षेत्र महीवरी । धन्य धन्य वारकरी । तुका म्हणे येथींचे ॥६॥

२५१०. देह मृत्याचें भातुकें । कळों आलें कवतुकें ॥१॥ काय मानियेलें सार । हेंचि वाटतें आश्चर्य ॥२॥ नानाभोगांचीं संचितें । करूनि ठेविलें आइतें ॥३॥ तुका म्हणे कोडीं ।

उगवूं न सकती बापुडीं ॥४॥

२५११. त्यागें भोग माझ्या येतील अंतरा । मग मी दातारा काय करूं ॥१॥ आतां असो तुझे पायीं हें मोटळें । इंद्रियें सकळ काया मन ॥२॥ सांडीमांडी विधिनिषेधाचा ठाव । न खळतां भाव जाइल वायां ॥३॥ तुका म्हणे आतां नको उजगरा । लपवीं दातारा अंगीं मज ॥४॥

२५१२. दावूनियां मांड । पुरे न करीती भांड ॥१॥ जळो जळो तैसें जिणें । फटमर लाजिरवाणें ॥२॥ घेतलें तें सोंग । बरवें संपादावें सांग ॥३॥ तुका म्हणे धीरें । देव नुपेक्षील खरें ॥४॥

२५१३. न पालटे जाती जीवाचिये साटीं । बाहे तेंचि पोटीं दावी वरी ॥१॥ अंतर सबाह्य सारिखाचि रंग । वीट आणि भंग नाहीं रसा ॥२॥ घणाचिया घायें पोटीं शिरे हिरा । सांडूं नेणें धीरा आपुलिया ॥३॥ तुका म्हणे कढे करावे शीतळ । ऐसें जातिबळ चंदनाचें ॥४॥

२५१४. दिली मान तरी नेघावी शत्रूसी । शरण आलें त्यासी जतन जीवें ॥१॥ समर्थांसी असे विचाराची आण । भलीं पाप पुण्य विचारावें ॥२॥ काकुळतीसाठीं सत्याचा विसर । पडिलें अंतर न पाहिजे ॥३॥ तुका म्हणे यश कीर्ति आणि मान । करितां जतन देव जोडे ॥४॥

२५१५. विचारिलें आधीं आपुल्या मानसीं । वांचों येथें कैसी कोण्या द्वारें ॥१॥ तंव साह्य जाला हृदयनिवासी । बुद्धि दिली ऐसी नाश नाहीं ॥२॥ उद्वेगाचे होतों पडिलों समुद्रीं । कोणे रीती तीरीं पाविजेल ॥३॥ तुका म्हणे दुःखें आला आयुर्भाव । झाला बहु जीव कासावीस ॥४॥

२५१६. आपुलें वेचूनि खोडा घाली पाव । ऐसा तो हा जीव हीनबुद्धि ॥१॥ विषयांच्या संगें आयुष्याचा नाश । पडियेलें ओस स्वहिताचें ॥२॥ भुलल्याचें अंग आपणा पारिखें । छंदाच सारिखें वर्ततसे ॥३॥ तुका म्हणे दुःख उमटे परिणामीं । लंपटासी कामीं रतलिया ॥४॥

२५१७. केलें शकुनें प्रयाण । आतां मागें फिरे कोण ॥१॥ होय तैसें हो आतां । देह बळी काय चिंता ॥२॥ पडिलें पालवीं । त्याचा धाक वाहे जीवीं ॥३॥ तुका म्हणे जीणें । देवा काय हीनपणें ॥४॥

२५१८. आळणी ऐसें कळों आलें । त्यासी भलें मौनचि ॥१॥ नये कांहीं वेचूं वाणी । वेडे घाणी सांगातें ॥२॥ वेगळें तें देहभावा । भ्रम जीवा माजिरा ॥३॥ तुका म्हणे कवतुक केलें । किंवा भलें दवडितां ॥४॥

२५१९. चित्ताचा चाळक । त्याचें उभय सूत्र एक ॥१॥ नाचवितो नाचेछंदें । सुखें आपुल्या विनोदें ॥२॥ चंद्र कमळणी । नाही धाडीत सांगोनि ॥३॥ तुका म्हणे उठी । लोह चुंबकाचे दृष्टी ॥४॥

२५२०. करितां तडातोडी । वत्स माते सोई ओढी ॥१॥ करित्याचा आग्रह उरे । एक

एकासाटीं झुरे ॥२॥ भुके इच्छी अन्न । तेंहीं त्यासाठीं निर्माण ॥३॥ तुका म्हणे जाती । एक एकाचिये चित्तीं ॥४॥

२५२१. निघालें दिवाळें । झालें देवाचें वाटोळें ॥१॥ आतां वेचूं नये वाणी । विचारावें मनिंच्या मनीं ॥२॥ गुंडाळिलीं पोतीं । भीतरी लावियेली वाती ॥३॥ तुका म्हणे करा । ऐसा राहे माजी घरा ॥४॥

२५२२. तीर्थाचिये आसे पंथें तो निदैव । पाविजेतो ठाव अंतराय ॥१॥ म्हणऊनि भलें निश्चळचि स्थळीं । मनाचिये मुळीं बैसोनियां ॥२॥ संकल्पारूढ तें पराधीन जिणें । कार्यचि कारणें वाढतसे ॥३॥ तुका म्हणे कामा नाहीं एक मुख । जिरवितां सुख होते पोटीं ॥४॥

२५२३. क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥१॥ नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥२॥ संतसमागमीं धरूनि आवडी । करावी तांतडी परमार्थीं ॥३॥ तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरें भरूनि राहों ॥४॥

२५२४. कोणाशीं विचार करावा शेवटीं । एवढ्या लाभें तुटी झाल्यांतरें ॥१॥ सांभाळितो शूर आला घावडाव । पुढें दिला पाव न करी मागें ॥२॥ घात तो या नांवें येथें अंतराय । अंतरल्या पाय गोविंदाचे ॥३॥ तुका म्हणे गडसंदीचा हा ठाव । केला तो उपाव कार्या येतो ॥४॥

२५२५. असां जी सोंवळे । आहां तैसेचि निराळे ॥१॥ आम्ही नयों तुमच्या वांटा । काय लटिकाची ताठा ॥२॥ चिंतनचि पुरे । काय सलगीसवें धुरे ॥३॥ तुका म्हणे देवा । नका नावडे ते सेवा ॥४॥

२५२६. अहंकार तो नासाभेद । जगीं निंद्य ओंवळा ॥१॥ नातळे तो धन्य यासी । झाला वंशीं दीपक ॥२॥ करवितो आत्महत्या । नेदी आप्ता आतळों ॥३॥ तुका म्हणे गुरुगुरी । माथां थोरी धरोनि ॥४॥

२५२७. इच्छिलें ते शकुनवंती । होय देती तात्काळ ॥१॥ क्षीरानीरा निवाड करीं । वरावरी विठ्ठल ॥२॥ भाग्याविण कैंचे फळ । अंतर मळमूत्राचें ॥३॥ तुका म्हणे संचित कुडें । तें बापुडें करीतसे ॥४॥

२५२८. काशासाटीं आम्ही जाळिला संसार । न करा विचार ऐसा देवा ॥१॥ कैसें नेणों तुम्हां करवतें उदास । माझा प्रेमरस भंगावया ॥२॥ समर्पूनि ठेलों देह हा सकळ । धरितां विटाळ न लजा माझा ॥३॥ तुका म्हणे अवघी मोकलूनि आस । फिरतों उदास कोणासाटीं ॥४॥

२५२९. नाहीं तुम्हां कांहीं लाविलें मागणें । कांटाळ्याच्या भेणें त्रासलेती ॥१॥ एखादिये परी टाळावी करकर । हा नका विचार देखों कांहीं ॥२॥ पायांच्या वियोगें प्राणासंवसाटीं । नघेवेसी तुटी झाली आतां ॥३॥ तुका म्हणे तुम्हां मागणें तें आतां ।

हेंचि कृपावंता चरणीं वास ॥४॥

२५३०. जग अमंगळ । लागे देखतां विटाळ ॥१॥ धर्म भूतांची ते दया । संत कारण ऐसीया ॥२॥ नव्हे माझें मत । साक्षी करूनि सांगे संत ॥३॥ तुका म्हणे जीवें । दावी उमटूनि अनुभवें ॥४॥

२५३१. दंड अन्यायाचे माथां । देखोनि करावा सर्वथा ॥१॥ नये उगे बहुतां घाटूं । सिसें सोनियांत आटूं ॥२॥ पापपुण्यासाटीं । नीत केली आतां खोटी ॥३॥ तुका म्हणे देवा । दोष कोणाचा तो दावा ॥४॥

२५३२. आम्ही पतित तूं पावन । हें तों पूर्वापार जाण ॥१॥ नवें करूं नये जुनें । सांभाळावें ज्याचें त्यानें ॥२॥ मिरासीचा ठाव । राखी करोनि उपाव ॥३॥ वादें मारी हाका । देवा आइकवितो तुका ॥४॥

२५३३. पाडावी ते बरी । गांठी धुरेसवें खरी ॥१॥ नये मरों लंडीपणें । काय बापुडें तें जिणें ॥२॥ लुटावें भांडार । तरी जया नाहीं पार ॥३॥ तुका म्हणे नांवें । कीर्ती आगळीनें ज्यावें ॥४॥

२५३४. भांडणचि झालें । मग जीवाचें काय आलें ॥१॥ येऊं नेदावी पुढती । आड भयाची ते जाती ॥१॥ करितां सरोबरी । कांहीं न ठेवावी उरी ॥३॥ तुका म्हणे शूर । व्हावें धुरेसींच धूर ॥४॥

२५३५. जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण । यालागीं चरण अंतरले । वोढवलें संचित येणें जन्म पाहतां । आतां पंढरिनाथा कृपा करीं ॥१॥ पतितपावन ब्रिद साच करीं देवा । यालागीं कुढावा करीं माझा ॥२॥ अपराधी पातकी दुष्ट दुराचारी । आहाळलों भारी संवसारें । कामक्रोध आधि कल्पनेच्या त्रासें । तुज न पवें ऐसें झालें देवा ॥३॥ हा ना तोसा ठाव झाला पांडुरंगा । नयेचि उपेगा काय करूं । आपुलिया नांवा धांवणिया धांवें । लवकरी यावें तुका म्हणे ॥४॥

२५३६. प्रथमभेटी आळिंगण । मग चरण वंदावे ॥१॥ ऐसा माझा भोळा बाप । हरी ताप कवळोनि ॥२॥ न सांगतां सीण भाग । पांडुरंग जाणतसे ॥३॥ तुका म्हणे कृपावंतें । द्यावें भातें न मागतां ॥४॥

२५३७. वचनाचा अनुभव हातीं । बोलविती देव मज ॥१॥ परि हें न कळे अभाविकां । जडलोकां जीवासी ॥२॥ अनुश्रुतं हे प्रासादिक । कृपा भीक स्वामीची ॥३॥ तुका म्हणे वरावरी । जातों तरी सांगत ॥४॥

२५३८. कां रे तुम्ही ठेवा बहुतां निमित्तें । माझिया संचितें वोढवलें ॥१॥ भक्तिप्रेमगोडी बैसली जिव्हारीं । आनंद अंतरीं येणें झाला ॥२॥ पुसिलें पडळ तिमिर विठ्ठलें । जगचि भरलें ब्रह्मानंदें ॥३॥ तुका म्हणे केलों कामनेवेगळा । आवडी गोपाळा असे वरी ॥४॥

२५३९. आसन शयन भोजन गोविंदें । भरलें आनंदें त्रिभुवन ॥१॥ अवघिया केली काळें तडातोडी । अवसर घडी पुरों नये ॥२॥ वांटणी घातले शरीराचे भाग । दुजियाचा लाग खंडियला ॥३॥ आवडीच्या आलें आहारासी रूप । पृथक संकल्प मावळले ॥४॥ काम तरी क्रोध बुद्धि मन नासे । भ्रमाचे वोळसे गिळिलें शांती ॥५॥ तुका म्हणे मना श्रीरंगाचा रंग । बैसला अभंग एकविध ॥६॥

२५४०. ज्वरल्यासी काढा औषध पाचन । मूढा नारायण स्मरवितो ॥१॥ भवव्याधि येणें तुटेल रोकडा । करूनियां झाडा निश्चयेंसी ॥२॥ आणिकां उपायां अनुपान कठिण । भोगें बरें सीण शीघ्रवत ॥३॥ तुका म्हणे केला उघडा पसारा । भाग्य आलें घरा दारावरी ॥४॥

२५४१. जपाचें निमित्त झोंपेचा पसर । देहाचा विसर पाडूनियां ॥१॥ ऐसें तें भजन अमंगळवाणी । सोंगसंपादणी बहुरूप्याची ॥२॥ सेवेसी विकळ देहाचिया आसे । तया कोठें असें उरला देव ॥३॥ तुका म्हणे मानदंभ जया चित्तीं । तयाची फजीती करूं आम्ही ॥४॥

२५४२. परद्रव्य परकांता । नातळे जयाचिये चित्ता । आणिक कर्मीं तो तत्वता । बांधला नवजाय ॥१॥ ऐसा अनुभव रोकडा । विश्वासीतो जीवा जोडा । एकांत त्या पुढां । अवघा करी उकल ॥२॥ सकट आंबलें तें अन्न । शोधी तेंचि मद्यपान । विषमानें भिन्न । केलें शुद्धाशुद्ध ॥३॥ तुका म्हणे नित । बरवें अनुभवें उचित । तरी काय हित । मोलें घ्यावें लागतें ॥४॥

२५४३. भूक पोटापुरती । तृष्णा भरवी वाखती । करवी फजीती । हांवें भार वाढला ॥१॥ कुळिकेसीं लांस फांस । डोई दाढी बोडवी दोष । अविहित नाश । करवीं वचन चुकतां ॥२॥ विधिसेवनें विहितें । कार्य कारणापुरतें । न बाटे जो चित्तें । अधर्माचा तो त्यागी ॥३॥ आज्ञा पाळणें ते सेवा । भय धरोनियां जीवा । तुका म्हणे ठेवा । ठेविला तो जतन ॥४॥

२५४४. कळे न कळे ज्या धर्म । ऐका सांगतों रे वर्म । माझ्या विठोबाचें नाम । अट्टाहासें उच्चारा ॥१॥ तो या दाखवील वाटा । जया पाहिजे त्या नीटा । कृपावंत मोठा । पाहिजे तो कळवळा ॥२॥ पुसतां चुका होतो वाटा । सवें बोळावा गोमटा । मोडों नेदी कांटा । घेऊं सांटा चोरासी ॥३॥ तुका म्हणे मोल । नलगे द्यावें वेचा बोल । विठ्ठल विठ्ठल । ऐसा छंद मनासी ॥४॥

२५४५. तरी कां वोळगणें । राजद्वारीं होती सुने ॥१॥ अंगीं दावूनि निष्कामता । पोकळ पोकळी ते वृथा ॥२॥ कासया मोकळ । भोंवतें शिष्यांचे गाबाळ ॥३॥ तुका म्हणे ढाळे । बाहेर मुदे तें निराळें ॥४॥

२५४६. हरिच्या दासां सोपें वर्म । सर्व धर्म पाऊलें ॥१॥ कडिये देव वाहे खांदी । वैष्णव मांदी क्रीडेसी ॥२॥ सरती येणें आटाआटी । नाहीं तुटी लाभाची ॥३॥ तुका म्हणे समाधान । सदा मन आमुचें ॥४॥

२५४७. भूतांचिये नांदे जीवीं । गोसावीच सकळां ॥१॥ क्षणाक्षणां जागा ठायीं । दृढ पायीं विश्वास ॥२॥ दावूनिया सोंग दुजें । अंतर बीजें वसतसें ॥३॥ तुका म्हणे जाणें धर्म । धरी तें वर्म चिंतन ॥४॥

२५४८. संत आले घरा । तों मी अभागी दातारा ॥१॥ कासयानें पूजा करूं । चरण हृदयींच धरूं ॥२॥ काया कुरवंडी । करून ओवाळून सांडी ॥३॥ तुका म्हणे भावें । हात जोडीं असो ठावें ॥४॥

२५४९. भेद तुटलियावरी । आम्ही तुमचींच हो हरी ॥१॥ आतां पाळावे पाळावे । आम्हां लडिवाळांचे लळे ॥२॥ आणिकांची देवा । नाहीं जाणतचि सेवा ॥३॥ तुका म्हणे हेवा । माझा हेत पायीं देवा ॥४॥

२५५०. आमुची विश्रांति । तुमचे चरण कमळापती ॥१॥ हेंचि एक जाणें । कायावाचा आणि मनें ॥२॥ पुढती पुढती नमन । घालूनियां लोटांगण ॥३॥ नीच जनालोकां । तळिल पायरीस तुका ॥४॥

२५५१. विनवितो शेवटीं । आहे तैसें माझे पोटीं ॥१॥ कंठीं राहावें राहावें । हेंचि मागतसें भावें ॥२॥ पुरली वासना । येणें होईल नारायणा ॥३॥ तुका म्हणे जो देहाडा । तोचि वर्णीन पवाडा ॥४॥

२५५२. आवडीची सलगी पूजा । विषम दुजा भाव तो ॥१॥ ऐसीं उफराटीं वर्में । कळों भ्रमें न येती ॥२॥ नलगें समाधाना मोला । रुचती बोल प्रीतीचे ॥३॥ तुका म्हणे एका जीवें । सूत्र व्हावें गुंतलें ॥४॥

२५५३. बाळ माते लातेवरीं । मारी तेणें संतोषे ॥१॥ सुख वसे चित्ता अंगीं । तें हें रंगीं मिळालें ॥२॥ भक्षी त्याचा जिवमाग । आला भाग तो बरा ॥३॥ तुका म्हणे ऋणानुबंधें । सांगें सुधें सकळांसी ॥४॥

२५५४. शिजल्यावरी जाळ । वायां जायाचें तें मूळ ॥१॥ ऐसा वारावा तो श्रम । अतिशयीं नाहीं काम ॥२॥ सांभाळावें वर्म । उचिताच्या काळें धर्म ॥३॥ तुका म्हणे कळे । ऐसें कारणाचे वेळे ॥४॥

२५५५. उभा ऐल थडी । तेणें घालूं नये उडी ॥१॥ पुढें गेल्याचे उपाय । करावे ते केले काय ॥२॥ दिसतें आहारीं । नये जाऊं ऐशावरी ॥३॥ आळसाची धाडी । तुका म्हणे बहु नाडी ॥४॥

२५५६. शक्ती द्याव्या देवा । नाहीं पार्थिवाची सेवा ॥१॥ मुख्य आहे ऐसा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥२॥ मना पोटीं देव । जाणा जैसा तैसा भाव ॥३॥ तुका म्हणे सोसें । लागे लाविल्याचें पिसें ॥४॥

२५५७. कार्यचि कारण । तृष्णा पाववितें सीण ॥१॥ काय करूनि ऐसा संग । सोसें चिंतूं पांडुरंग ॥२॥ रूपीं नाहीं गोडी । हांवे हांवे ऊर फोडी ॥३॥ तुका म्हणे पडे भरी । ऐशा वरदळाचे थोरी ॥४॥

२५५८. संसाराच्या नांवें घालूनियां शून्य । वाढता हा पुण्य धर्म केला ॥१॥ हरिभजनें हें धवळिलें जग । चुकविला लाग कळिकाळाचा ॥२॥ कोणाही न लगे साधनांचा पांग । करणें केला त्याग देहबुद्धि ॥३॥ तुका म्हणे सुख समाधि हरिकथा । नेणें भवव्यथा गाईल तो ॥४॥

२५५९. विश्वासिया नाहीं लागत सायास । अनायासें रस अंगा येतो ॥१॥ लेंकराच्या हातें घांस मागे माता । वोरसोनि चित्ता सुख पावे ॥२॥ गौरव तो मानी आरुषा वचनीं । भूषण ते वाणी मिरवावी ॥३॥ तुका म्हणे आहे सकळही साक्षी । माझा तो कइपक्षी पांडुरंग ॥४॥

२५६०. वैभवाचे धनी सकळ शरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें ॥१॥ नेदी उरों देव आपणावेगळें । भावाचिया बळें ठायाठाव ॥२॥ जाणोनि नेणोनि अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणची ॥३॥ तुका म्हणे बरें धाकुट्याचें जिणें । माता स्तनपानें वाढविते ॥४॥

२५६१. कईं ऐसी दशा येइल माझ्या अंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ॥१॥ नाठवूनि देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मधीं ॥२॥ कईं ऐसा पात्र होईन लाभासी । नेणों हृषीकेशी तुष्टईल ॥३॥ तुका म्हणे धन्य मानीन संचित । घेईन तें नित्य प्रेमसुख ॥४॥

२५६२. नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें । स्वामिसेवा काजें निर्धारु हा ॥१॥ आज्ञा ते प्रमाण हा मनीं निर्धार । येणें फिटे भार निश्चयेंसी ॥२॥ आळीकरें आम्ही एकविध चित्तें । तैसें होऊं येतें मायबापें ॥३॥ तुका म्हणे माझी ये जातीची सेवा । घातलासे देवावरी भार ॥४॥

२५६३. काय नाहीं माझे अंतरीं वसति । व्यापक हा भूतीं सकळां नांदे ॥१॥ चित्तासी प्रसाद होईल चळण । तेंचि तें वळण मनासही ॥२॥ सर्व शक्ति जीवीं राहिल्या कुंठित । नाहीं केलें होत आपुलें तें ॥३॥ तुका म्हणे दोरी खांब सूत्र्या हातीं । नाचवी नाचती जडें तैसीं ॥४॥

२५६४. देवाचें निर्माल्य कोण शिवे हातीं । संकल्पासी होती विकल्प ते ॥१॥ वाहिलें देह हें देवा एकसरें । होईल तें बरें तेणें द्वारें ॥२॥ होता भार त्याची निवारली खंती । येथें आतां रिती साठवण ॥३॥ तुका म्हणे इच्छे पाववितें कष्ट । म्हणऊनि नष्ट दुरावली ॥४॥

२५६५. देव तीर्थ येर दिसे जया ओस । तोचि तया दोष जाणतिया ॥१॥ तया बरें फावे देवा चुकवितां । संचिताची सत्ता अंतराय ॥२॥ शुद्धाशुद्धठाव पापपुण्यबीज । पाववील दुजे फळभोग ॥३॥ तुका म्हणे विश्वंभराऐसें वर्म । चुकलिया धर्म अवघे मिथ्या ॥४॥

२५६६. काय करूं सांगतांही न कळे तें वर्म । उपस्थित भ्रम उपजवितो ॥१॥ मन आधीं ज्याचें आलें होइल हातां । तयावरी सत्ता केली चाले ॥२॥ अभुकेचे अंगीं चवी

ना सवाद । मिथ्याऐसा वाद दुराग्रह ॥३॥ तुका म्हणे आप राखावें आपणा । संकोचोंचि कोणा नये आतां ॥४॥

२५६७. अमृत अव्हेरें उचंबळलें जातां । विष आर्तभूतां आवश्यक ॥१॥ आदरासी मोल नये लावूं केजें । धीर शुद्धबीजें गोमटा तो ॥२॥ खऱ्याचिये अंगीं आपणचि चाली । लावणी लाविली काय लागे ॥३॥ तुका म्हणे चाडे करा वेवसाव । आम्हांसी तो वाव धीर आहे ॥४॥

२५६८. अनुभवाचे रस देऊं आर्तभूतां । सोडूं चोजवितां पुढें पोतीं ॥१॥ देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी । शोभतील गुणीं आपुलिया ॥२॥ आधीं भाव सार शुद्ध हे भूमिका । बीज आणि पिका चिंता नाहीं ॥३॥ तुका म्हणे ज्याचें नाम गुणवंत । तें नाहीं लागत पसरावें ॥४॥

२५६९. काय मज एवढा भार । हे वेव्हार चालवाया ॥१॥ उकल तो जाणे धनी । मज भोजनीं कारण ॥२॥ चिंता ज्याची तया शिरीं । लेंकरीं तें खेळावें ॥३॥ तुका म्हणे शेवट झाला । देव या बोला भोगिता ॥४॥

२५७०. एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ । लेश तोही मळ नाहीं येथें ॥१॥ घ्यावें द्यावें आम्हीं आपुलिया सत्ता । न देखों पुसता दुजा कोणी ॥२॥ भांडाराची किल्ली माझे हातीं आहे । पाहिजे तो पाहे वाण येथें ॥३॥ तुका म्हणे आम्हां विश्वासाच्या बळें । ठेविलें मोकळे देवें येथें ॥४॥

२५७१. स्मरणाचें वेळें । व्हावें सावध न कळे ॥१॥ पडिलों विषयांचें ओढी । कोणी न दिसेसें काढी ॥२॥ भांडवल माझें । वेच झालें भूमि ओझें ॥३॥ तुका म्हणे कळे । तूंचि धावें ऐसे वेळे ॥४॥

२५७२. पाहा हो देवा कैसे जन । भिन्न भिन्न संचितें ॥१॥ एक नाहीं एकाऐसे । दावी कैसे शुद्ध हीन ॥२॥ पंचभूतें एकी राशी । सूत्रें कैसीं ओळखावीं ॥३॥ तुका म्हणे जो जे जाती । त्याची स्थिति तैशी ते ॥४॥

२५७३. कोणाचिया न पडो छंदा । गोविंदासी आळवूं ॥१॥ बहुतांचीं बहु मतें । अवघे रिते पोकळ ॥२॥ घटापटा डहुळी मन । होय सीण न करूं तें ॥३॥ तुका म्हणे पांडुरंग । भरूं भाग आला तो ॥४॥

२५७४. एक वेळ करीं या दुःखावेगळें । दुरिताचें जाळें उगवूनि ॥१॥ आठवीन पाय हा माझा नवस । रात्रींही दिवस पांडुरंगा ॥२॥ बहु दूरवरी भोगविलें भोगा । आतां पांडुरंगा सोडवावें ॥३॥ तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओंवाळूनि सांडीं मस्तक हें ॥४॥

२५७५. आणीक म्यां कोणा यावें काकुलती । कोण कामा येती अंतकाळीं ॥१॥ तूं वो माझी सखी येसी पांडुरंगे । लवकरी ये गे वाट पाहें ॥२॥ काया वाचा मनें हेचि आस करीं ।

पाउलें गोजिरीं चिंतीतसें ॥३॥ तुका म्हणे माझी पुरवीं हे आस । घालीं ब्रह्मरस भोजन हें ॥४॥

२५७६. आम्हांसी सकळ । तुझ्या नामाचेंचि बळ ॥१॥ करूं अमृताचें पान । दुजें नेणों कांहीं आन ॥२॥ जयाचा जो भोग । सुख दुःख पीडा रोग ॥३॥ तुका म्हणे देवा । तुझे पायीं माझा हेवा ॥४॥

२५७७. आर्त माझ्या बहु पोटीं । व्हावी भेटी पायांची ॥१॥ यासी तुम्ही कृपावंता । माझी चिंता असों द्या ॥२॥ तळमळ करी चित्त । अखंडित वियोगें ॥३॥ तुका म्हणे पंढरीनाथा । जाणे व्यथा अंतरिंची ॥४॥

२५७८. बहु जन्मांतरें फेरे । केले येरे सोडवीं ॥१॥ आळवितों करुणाकरे । विश्वंभरे दयाळे ॥२॥ वहावतों मायापुरीं । येथें करीं कुडावा ॥३॥ तुका म्हणे दुजा कोण । ऐसा सीण निवारी ॥४॥

२५७९. कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया ॥१॥ सोडवूनि न्यावें काळचक्राहातीं । बहुत विपत्ती भोगविल्या ॥२॥ ज्यालें जीवों नेदी मारिलेंचि मरे । प्रारब्ध तें उरे मागुतालें ॥३॥ तुका म्हणे दुजा खुंटला उपाय । म्हणवूनि पाय आठविले ॥४॥

२५८०. डौरलों भक्तिसुखें । सेवूं अमृत हें मुखें ॥१॥ संतसंगें सारूं काळ । प्रेमसुखाचा कल्लोळ ॥२॥ ब्रह्मादिकांसी शिराणी । तो हा आनंद मेदिनी ॥३॥ नाहीं वैकुंठींचा पांग । धांवे कथे पांडुरंग ॥४॥ मुक्त व्हावें काशासाठीं । कैची येणें रसें तुटी ॥५॥ तुका म्हणे गोड । हेंचि पुरे माझें कोड ॥६॥

२५८१. फोडिलीं भांडारें । माप घेऊनियां खरें ॥१॥ केली हरिनामाची वरो । मागील तें आतां सरो ॥२॥ देशांत सुकाळ । झाला हारपला काळ ॥३॥ घ्यावें धणीवरी । तुका म्हणे लहान थोरीं ॥४॥

२५८२. आनंदाचे डोहीं आनंदतरंग । आनंदचि अंग आनंदाचें ॥१॥ काय सांगों झालें कांहींचियाबाई । पुढें चाली नाहीं आवडीनें ॥२॥ गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ॥३॥ तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ॥४॥

२५८३. म्हणऊनि धरिले पाय । अवो माय विठ्ठले ॥१॥ आपुलेंचि करूनि घ्यावें । आश्वासावें ना भीसें ॥२॥ वाढली ते तळमळ चित्ता । शम आतां करावी ॥३॥ तुका म्हणे जीवीं वसे । मज नसे वेगळा ॥४॥

२५८४. कल्याण या आशीर्वादें । जाती द्वंद्वें नासोनि ॥१॥ आश्वासिलें नारायणें । प्रेमदानें अंतरिंच्या ॥२॥ गेली निवारोनि आतां । सकळ चिंता यावरी ॥३॥ तुका म्हणे गातां गीत । आलें हित सामोरें ॥४॥

२५८५. हरिनामवेली पावली विस्तार। फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥१॥ तेथें माझ्या मना होईं पक्षिराज। साधावया काज तृप्तीचें या ॥२॥ मुळींचिया बीजें दाखविली गोडी। लवकरचि जोडी झालियाची ॥३॥ तुका म्हणे क्षणक्षणा जातो काळ। गोडी ते रसाळ अंतरेल ॥४॥

२५८६. बरवें ऐसें आलें मना। नारायणा या काळें ॥१॥ देव आम्हा प्राणसखा। झालें दुःखा खंडण ॥२॥ जन्मांतरिंच्या पुण्यरासी। होत्या त्यांसी फळ आलें ॥३॥ तुका म्हणे निज ठेवा। होईल देवा लाधलों ॥४॥

२५८७. जरि आड येती लाज। कैसें काज साधतें ॥१॥ करणें केलें उठाउठी। पायीं मिठी घातली ॥२॥ समर्पिला जीव भाव। धरिला भाव अखंड ॥३॥ तुका म्हणे आड कांहीं। काळ नाहीं घातला ॥४॥

२५८८. पात्र शुद्ध चित्त ग्वाही। नलगे कांहीं सांगणें ॥१॥ शूर तरी सत्य व्हावें। साटी जीवें करूनि ॥२॥ अमुपचि सुखमान। स्वामी जन मानवे ॥३॥ तुका म्हणे जैसी वाणी। तैसा मनीं परिपाक ॥४॥

२५८९. प्रगटलें ज्ञान। नारायण भूतीं तें ॥१॥ अनुभवचि घेऊं हावा। विनंती देवा करूनियां ॥२॥ देखोवेखीं वदे वाणी। पडिल्या कानीं प्रमाण ॥३॥ तुका म्हणे योगक्षेम। घडे तें वर्म साधावें ॥४॥

२५९०. मुख्य आधीं विषयत्याग। विधी भाग पाळणें ॥१॥ मन पावे समाधान। हेंचि दान देवाचें ॥२॥ उदासीन वृत्ति देहीं। चाड नाहीं पाळणें ॥३॥ तुका म्हणे नाहीं भय। सम सोय विषमाची ॥४॥

२५९१. आतां हेंचि सार हेंचि सार। मूळबीज रे आइका ॥१॥ आवडीनें आवडी उरे। जें ज्या झुरे तें त्यासी ॥२॥ प्रेमाचिया सूत्रदोरी। नाहीं उरी उरवी ॥३॥ तुका म्हणे चिंतन बरें। आहे खरें खऱ्यापें ॥४॥

२५९२. केला तैसा अंगीकार। माझा भार चालवीं ॥१॥ होऊं अंतराय बुद्धी। कृपानिधी नेदावी ॥२॥ आम्ही तरी जडजीव। कैंचा भाव पुरता ॥३॥ अनन्यभावें घ्यावी सेवा। आम्हां देवा घडेसी ॥४॥ तुझीं आम्हीं शरणागतें। कृपावंतें रक्षीजे ॥५॥ तुका म्हणे भाकूं कींव। असों जीव जड आम्ही ॥६॥

२५९३. सोसें बहुगर्भवासी। मेलों असों उपवासीं। नाहीं सखीं ऐसीं। येथें कोण भेटलीं ॥१॥ करीं करीं रे स्वहित। देह तंव हे अनित्य। नाहीं दिलें चित्त। सोडवूं मोहापासोनि ॥२॥ पाळी तोंडींचिया घांसें। तेचि होय अनारिसे। ज्या नव्हे ऐसें। खेदी परि सोडवीना ॥३॥ तुका म्हणे धनमानें। माझ्या बाटलों मी पणें। नाहीं दिला मनें। देखों लाभें हा लाभ ॥४॥

२५९४. इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप। आम्हांसी स्वरूप स्थिती चाड ॥१॥ आतां नव्हे माझा भाव अनारिसा। पाउलांनीं इच्छा गोवियेली ॥२॥ लेंकरासी कोठें जाणत्याची परी। करूं येते दुरी धरावया ॥३॥ लागली न सुटे नामाची आवडी। माझी भावजोडी भंगूं नका ॥४॥ घेसी आढेवेढे मुक्तीच्या अभिळासें। चाळवी जा पिसे ब्रह्मज्ञानी ॥५॥ तुका म्हणे माझा कोठें भक्तिरस। पाडावया ओस चाळविसी ॥६॥

२५९५. आम्हां भाविकांची जाती। एकविध जी श्रीपती। अळंकारयुक्ति। सरों शकेचि ना ॥१॥ जाणे माउली त्या खुणा। क्षोभ उपजों नेदी मना। शांतवूनि स्तना। लावीं अहो कृपाळे ॥२॥ तुज अवघें होऊं येतें। परि मज बाटों नये चित्तें। उपासनेपरतें। नये कांहीं आवडों ॥३॥ करूं रूपाची कल्पना। मुखीं नाम नारायणा। तुका म्हणे जना। जळस्थळ देखता ॥४॥

२५९६. ज्यावें हीनपणें। कासयाच्या प्रयोजनें ॥१॥ प्रारब्धीं संसार। बरी हिमातीची थार ॥२॥ होणार तें कांहीं। येथें अवकळा नाहीं ॥३॥ तुका म्हणे देवें। कृपा केलिया बरवें ॥४॥

२५९७. किती रांडवडे। घालूनि व्हाल रे बापुडे। संसाराचे भिडे। कासावीस झालेती ॥१॥ माझ्या स्वामी शरण रिघा। कृपाळूवा पांडुरंगा। ठेवी अंगसंगा। विश्वासियां जवळी ॥२॥ कांहीं न मागतां भलें। होईल तेंचि काम केलें। नसावें आथिलें। कांहीं एका संकल्पें ॥३॥ तुका म्हणे भाव। पाववील ठायाठाव। एकविध जीव। ठेविलिया सेवेसी ॥४॥

२५९८. बाप करी जोडी लेंकराचे ओढी। आपुली करवंडी वाळवूनी ॥१॥ एकाएकीं केला मिरासींचा धनी। कडिये वागवूनी भार खांदीं ॥२॥ घालूनियां पाहे डोळा अळंकार। ठेवा दावी थोर करूनियां ॥३॥ तुका म्हणे नेदी गांजूं आणिकांसी। उदार जीवासी आपुलिया ॥४॥

२५९९. काय इंद्रावन माखियेलें गुळें। काय जिरें काळें उपचारिलें ॥१॥ तैसी अधमाची जातीच अधम। उपदेश श्रम करावा तो ॥२॥ न कळे विंचासी कुरवाळिलें अंग। आपले ते रंग दावीतसे ॥३॥ तुका म्हणे नये पाकासी दगड। शूकरासी गोड जैसी विष्ठा ॥४॥

२६००. स्तवूनियां नरा। केला आयुष्याचा मातेरा ॥१॥ नारायणाचिया लोपें। घडलीं अवघींच पापें ॥२॥ जीव ज्याचें दान। त्याचा खंडूनियां मान ॥३॥ तुका म्हणे वाणी। आइके त्या दोष कानीं ॥४॥

२६०१. मी तव बैसलों धरुनियां आस। न करीं उदास पांडुरंगा ॥१॥ नको आतां मज दवडूं श्रीहरी। मागाया भिकारी झालों दास ॥२॥ भुकेलों कृपेच्या वचनाकारणें। आशा नारायणें पुरवावी ॥३॥ तुका म्हणे येऊनियां देईं भेटी। कुरवाळुनी पोटीं धरीं मज ॥४॥

२६०२. आतां तुझें नाम गात असें गीतीं। म्हणोनि मानिती लोक मज ॥१॥ अन्नवस्त्रचिंता नाहीं या पोटाची। वारिली देहाची थोर पीडा ॥२॥ सज्जन संबंधी तुटली उपाधी। रोकडा या

बंदी सुटलोंसें ॥३॥ घ्यावा घ्यावा कोणें करावा सायास । गेले आशापाश वारोनियां ॥४॥ तुका म्हणे तुज कळेल तें आतां । करा जी अनंता मायबापा ॥५॥

२६०३. कामक्रोध माझे लावियेले पाठीं । बहुत हिंपुटी झालों देवा ॥१॥ आवरितां तुझे तुज नावरती । थोर वाटे चित्तीं आश्चर्य हें ॥२॥ तुझिया विनोदें आम्हां प्राणासाटी । भयाभीत पोटीं सदा दु:खी ॥३॥ तुका म्हणे माझ्या कपाळाचा गुण । तुला हांसे कोण समर्थांसी ॥४॥

२६०४. स्वमुखेंचि तुम्हीं सांगा मज सेवा । ऐसे माझे देवा मनोरथ ॥१॥ नेघों आम्ही कांहीं आपल्या उदारें । चित्तवित्त घरें जीवावरी ॥२॥ बोलें परस्परें वाढवावें सुख । पाहावें श्रीमुख डोळेभरी ॥३॥ तुका म्हणे सत्य बोलतों वचन । करुनी चरण साक्ष तुझे ॥४॥

२६०५. मज अनाथाकारणें । करीं येणें केशवा ॥१॥ जीव झुरे तुजसाठीं । वाट पोटीं पहातुसें ॥२॥ चित्त रंगलें चरणीं । तुजवांचूनि न राहे ॥३॥ तुका म्हणे कृपावंता । माझी चिंता असावी ॥४॥

२६०६. कासया वांचूनि झालों भूमिभार । तुझ्या पायीं थार नाहीं तरी ॥१॥ जातां भलें काय डोळियांचें काम । जंव पुरुषोत्तम न देखती ॥२॥ काय मुख पेंव श्वापदांची धांव । नित्य तुझें नांव नुच्चारितां ॥३॥ तुका म्हणे आतां पांडुरंगाविण । न वांचतां क्षण जीव भला ॥४॥

२६०७. नको मज ताठा नको अभिमान । तुजवीण क्षीण होतो जीव ॥१॥ दुर्धर हे माया न होय सुटका । वैकुंठनायका सोडवीं मज ॥२॥ तुका म्हणे तुझें झालिया दरूषण । मग निवारण होईल सर्व ॥३॥

२६०८. चाल घरा उभा राहें नारायणा । ठेवूं दे चरणांवरि माथा ॥१॥ वेळोवेळां देईं क्षेम आळिंगन । करीं अवलोकन कृपादृष्टी ॥२॥ प्रक्षाळूं दे पाय बैस माजघरीं । चित्त स्थिर करीं पांडुरंगा ॥३॥ आहे त्या संचितें करवीन भोजन । काय न जेवून करिसी आतां ॥४॥ करुणाकरें नाहीं कळों दिलें वर्म । दूरी होतां भ्रम कोण वारी ॥५॥ तुका म्हणे आतां आवडीच्या सत्ता । बोलिलों अनंता करवीन तें ॥६॥

२६०९. देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याचे पडे चिरा संसारासी ॥१॥ देवाची ते खूण करावें वाटोळें । आपणावेगळें राहों नेदी ॥२॥ देवाची ते खूण गुंतों नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवों नेदी ॥३॥ देवाची ते खूण करावें तोंडाळ । आणिक सकळ जग हरी ॥४॥ देवाची ते खूण झाला ज्यासी संग । त्याचा झाला भंग मनुष्यपणा ॥५॥ देवाची ते खूण गुंतों नेदी वाचा । लागों असत्याचा मळ नेदी ॥६॥ पहा देवें तेंची बळकाविलें स्थळ । तुक्यापें सकळ चिन्हें त्याचीं ॥७॥

२६१०. अनंताचे मुखीं होसील गाइला । अमुप विठ्ठला दास तुम्हां ॥१॥ माझें कोठें आलें

होईल विचारा । तरीच अव्हेरा योग्य झालों ॥२॥ सर्व काळ तुम्ही असां जी संपन्ना । चतुरा नारायणा शिरोमणी ॥३॥ तुका म्हणे असे कलियुगींचे जीव । तरी नये कींव बहुपापी ॥४॥

२६११. न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥१॥ दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥२॥ नलगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥३॥ न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ॥४॥

२६१२. भांडवल माझें लटिक्याचे गांठी । उदीमासी तुटी यावी हेचि ॥१॥ कैसी तुझी वाट पाहों कोण्या तोंडें । भोंवतालें भांडे गर्भवास ॥२॥ बहू खाणींचिया रंगलोंसें रंगें । सुष्ट दुष्ट अंगें धरूनियां ॥३॥ बहुतांचे बहु पालटलों साळे । बहु आला काळें रंग अंगा ॥४॥ उकलूनि नये दावितां अंतर । घडिचा पदर सारूनियां ॥५॥ तुका म्हणे आतां करीं गोळ्यासाटीं । आपणा पालटीं संगें देवा ॥६॥

२६१३. संतसंगतीं न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ॥१॥ मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ॥२॥ तुका म्हणे नमस्कारावे दुरून । अंतरीं धरून राहें रूप ॥३॥

२६१४. जें ज्याचें जेवण । तेंचि याचकासी दान ॥१॥ आतां जाऊं चोजवीत । जेथें वसतील संत ॥२॥ होतीं धालीं पोटें । मागें उरलीं उच्छिष्टें ॥३॥ तुका म्हणे धांव । पुढें खुंटईल हांव ॥४॥

२६१५. धरावा तो बरा । ठाव वसतीचा थारा ॥१॥ निजलिया जागविती । निज पुरवूनि देती ॥२॥ एक वेवसाव । त्याचा संग त्यांचा जीव ॥३॥ हितें कळे हित । ग्वाही एक एकां चित्त ॥४॥ विषमाचें कांहीं । आड तया एक नाहीं ॥५॥ तुका म्हणे बरीं । घरा येतील त्यापरी ॥६॥

२६१६. त्यांचिया चरणा माझे दंडवत । ज्यांचें धनवित्त पांडुरंग ॥१॥ तेथें माझा जीव पावला विसांवा । म्हणऊनि हांवा भुरलोंसे ॥२॥ चरणींचे रज लावीन कपाळा । जीं पदें राउळा सोई जाती ॥३॥ आणिक तीं भाग्यें येथें कुरवंडी । करूनियां सांडीं इंद्राऐसी ॥४॥ वैष्णवांचे घरीं देवाची वसति । विश्वास हा चित्तीं सर्वभावें ॥५॥ तुका म्हणे सखे हरिचे जे दास । आतां पुढें आस दुजी नाहीं ॥६॥

२६१७. धोंड्यासवें आदळितां फुटे डोकें । तो तों त्याच्या दुःखें गामेजेना ॥१॥ इंगळासी सन्निधान अतित्याई । क्षेम देतां काई सुख वाटे ॥२॥ सप्रेमें कुरवाळी महाफणी व्याळ । आपुले तो ढाळ सांडी केवीं ॥३॥ तुका म्हणे आम्हांसवें जो रुसला । तयाचा अबोला आकाशासीं ॥४॥

२६१८. आतां तळमळ । केली पाहिजे सीतळ ॥१॥ पहा करील तें देव । पायीं ठेवूनियां भाव ॥२॥ तोचि अन्नदाता । नाहीं आणिकांची सत्ता ॥३॥ तुका म्हणे दासा । नुपेक्षील हा भरंवसा ॥४॥

२६१९. लांब धांवे पाय चोरी । भरोवरी जनाच्या ॥१॥ आतां कैसें होय याचें । सिजतां काचें राहिलें ॥२॥ खाय ओकी वेळोवेळां । कैसी कळा राहेल ॥३॥ तुका म्हणे भावहीन । त्याचा सीण पावावा ॥४॥

२६२०. माझ्या इंद्रियांसीं लागलें भांडण । म्हणतील कान रसना धाली ॥१॥ करिती तळमळ हस्त पाद भाळ । नेत्रांसी दुकाळ पडिला थोर ॥२॥ गुण गाय मुख आइकती कान । आमचें कारण तैसें नव्हे ॥३॥ दरुषणें फिटे नेत्रांचा तो पांग । जेथें ज्याचा भाग घेतील तें ॥४॥ तुका म्हणे ऐसें करीं नारायणा । माझी ही वासना ऐसी आहे ॥५॥

२६२१. सिद्धीचा दास नव्हें श्रुतीचा अंकिला । होईन विठ्ठला दास तुझा ॥१॥ सर्व सुख असे माझिये मानसीं । राहिलें तयासी नाश नाहीं ॥२॥ नेणें पुण्य पाप न देखें लोचनीं । आणिका वांचूनि पांडुरंगा ॥३॥ न करीं मी आस साधनीं सायास । भक्तिप्रेमरस वांचुनियां ॥४॥ गर्भवासीं दुःख नाहीं येतां जातां । हृदयीं असतां नाम तुझें ॥५॥ तुका म्हणे तुझा होईन अंकिला । न भें मी विठ्ठला कळिकाळासी ॥६॥

२६२२. जन्मा येऊनि तया लाभ झाला । बिडवई भेटला पांडुरंग ॥१॥ संसारदुःखें नासियेलीं तेणें । उत्तम हें केणें नामघोष ॥२॥ धन्य तेचि संत सिद्ध महानुभाव । पंढरीचा ठाव ठाकियेला ॥३॥ प्रेमदाते तेच पतितपावन । धन्य दरुषण होय त्याला ॥४॥ पावटणि पंथें झालिया सिद्धी । वोळगे समाधि सायुज्यता ॥५॥ प्रेम अराणुक नाहीं भय धाक । मज तेणें सुख काय चिंता ॥६॥ ते दुर्लभ संसारासी । जडजीवउद्धार लोकासी ॥७॥ तुका म्हणे त्यासी । धन्य भाग्य दरुषणें ॥८॥

२६२३. काय दिस गेले अवघेचि वराडें । तें आलें सांकडें कथेमाजी ॥१॥ क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं । अराणूक कईं होईल पुढें ॥२॥ कथेचा विसर दोषामुळें होय । तरणोपाय कैंचा मग ॥३॥ काय सांचवुनि उरलें हें मागें । घटिका एक सांगें काय गेली ॥४॥ तेचि वाणी येथें करा उजळणी । काढावीं मथूनि शब्दरत्नें ॥५॥ तुका म्हणे हेंचि बोलावया चाड । नाम घेतां गोड हित असे ॥६॥

२६२४. शुद्धाशुद्ध निवडे कैसें । चर्म मांस भिन्न नाहीं ॥१॥ कांहीं अधिक नाहीं उणें । कवण्या गुणें देवासी ॥२॥ उदक भिन्न असे काई । वोहोळ बावी सरिता नई ॥३॥ सूर्य तेजें निवडे काय । रश्मी रसा सकळा खाय ॥४॥ वर्णां भिन्न दुधा नाहीं । सकळा गाईं सारखें ॥५॥ करितां भिन्न नाहीं माती । मडक्या गति भिन्न नांवें ॥६॥ वर्ते एकविध अग्नि । नाहीं मनीं शुद्धाशुद्ध ॥७॥ तुका म्हणे पात्र चाड । किंवा विष अमृत गोड ॥८॥

२६२५. न धरी प्रतिष्ठा कोणाचीही यम । म्हणतां कां रे राम लाजा झणी ॥१॥ सांपडे हातींचे

सोडवील काळा । तो कां वेळोवेळां नये वाचे ॥२॥ कोण लोक जो हा सुटला तो एक । गेले कुंभपाक रवरवांत ॥३॥ तुका म्हणे हित तों म्हणा विठ्ठल । न म्हणे तो भोगील कळेल तें ॥४॥

२६२६. म्हणवितां हरी न म्हणे तयाला । दरवडा पडिला देहामाजी ॥२॥ आयुष्यधन त्याचें नेलें यमदूतीं । भुलविला निश्चिती कामरंगें ॥२॥ नावडे ती कथा देउळासी जातां । प्रियधनसुता लक्ष तेथें ॥३॥ कोण नेतो तयां घटिका दिवसा एका । कां रे म्हणा तुका नागविसी ॥४॥

२६२७. कथे बैसोनि सादरें । सुखचर्चा परस्परें । नवल काय तो उद्धरे । आणीक तरे सुगंधें ॥१॥ पुण्य घ्यावें रे फुकांचें । पाप दुष्ट वासनेचें । पेरिल्या बीजाचें । फळ घेईं शेवटीं ॥२॥ कथा विरस पाडी आळस । छळण करूनि मोडवी रस । बुडवी आपणासरिसें । विटाळसी नावेसी ॥३॥ सज्जन चंदनाचिये परी । दुर्जन देशत्यागें दुरी । राहो म्हणे हरी । विनंति करी तुका हे ॥४॥

२६२८. कळों आलें तुझें जिणें । देवा तूं माझें पोसणें ॥१॥ वाट पाहासी आमुची । सत्ता सतत कईंची ॥२॥ बोलावितां यावें रूपा । सदा निर्गुणींच लपा ॥३॥ तुका म्हणे तूं परदेशी । येथें आम्हां अंगें जिसी ॥४॥

२६२९. आतां येथें लाजे नाहीं तुझें काम । जाय मज राम आठवूं दे ॥१॥ तुझे भिडे माझे बहु झाले घात । केलों या अंकित दुर्जनाचा ॥२॥ माझें केलें मज पारिखें माहेर । नष्ट तूं साचार चाळविलें ॥३॥ सुखासाठीं एक वाहियेलें खांदीं । तेणें बहु मांदी मेळविली ॥४॥ केला चौघाचार नेलों पांचामधीं । नाहीं दिली शुद्धी धरूं आशा ॥५॥ तुका म्हणे आतां घेईन कांठीवरी । धनी म्यां कैवारी केला देव ॥६॥

२६३०. आजिवरी होतों तुझे सत्तेखालीं । तोंवरी त्वां केली विटंबणा ॥१॥ आतां तुज राहों नेदी या देशांत । ऐसा म्यां समर्थ केला धनी ॥२॥ सापें रिग केला कोठें बाळपणीं । होतीसी पापिणी काय जाणों ॥३॥ तुका म्हणे हा म्यां बुडविला वेव्हार । तुझेचि ढोपर सोलावया ॥४॥

२६३१. देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा । लाजे नका थारा देऊं कोणी ॥१॥ मोडिले रांडेनें सुपंथ मारग । चालविलें जग यमपंथें ॥२॥ परिचारी केली आपुलीच रूढी । पोटींची ते कुडी ठावी नाहीं ॥३॥ तुका म्हणे आणा राउळा धरून । फजित करून सोडूं मग ॥४॥

२६३२. कां रे तुम्ही निर्मळ हरिगुण गाना । नाचत आनंदरूप वैकुंठासी जाना ॥१॥ काय गणिकेचा याती अधिकार मोठा । पापी अजामेळ ऐसा नेला वैकुंठा ॥२॥ ऐसे मागें नेणों किती अनंत अपार । पंच महादोषी त्यांच्या पातकां नाहीं थार ॥३॥ पुत्राचिया लोभें नष्ट म्हणे नारायण । कोण कर्तव्य तुका म्हणे त्याचें पुण्य ॥४॥

२६३३. बैसोनियां खाऊं जोडी । ओढाओढी चुकवूनि ॥१॥ ऐसें केलें नारायणें । बरवें जिणें सुखाचें ॥२॥ घरींच्या घरीं भांडवल । नलगे बोल वेचावे ॥३॥ तुका म्हणे आटाआटी ।

चुकली दाटी सकळ ॥४॥

२६३४. नाहीं भ्यालों तरी पावलों या ठाया । तुम्हां आळवाया जवळिकें ॥१॥ सत्ताबळें आतां मागेन भोजन । केलें तें चिंतन आजिवरी ॥२॥ नवनीतासाठीं खादला हा जीव । थोड्यासाठीं कींव कोण करी ॥३॥ तुका म्हणे ताक नलगे हें घाटे । पांडुरंगा खोटें चाळवणें ॥४॥

२६३५. सारीन तें आतां एकाचि भोजनें । वारीन मागणें वेळोवेळां ॥१॥ सेवटींचा घास गोड करीं माते । अगे कृपावंते पांडुरंगे ॥२॥ वंचूं नये आतां कांहींच प्रकार । धाकल्याचें थोर झाल्यावरी ॥३॥ तुका म्हणे पोटीं बहु झाला वाव । कांहीं नेदी ठाव उरों मागें ॥४॥

२६३६. पोट धालें मग नलगे पंगती । झालिया निश्चिंती खेळ गोड ॥१॥ आपुलिया हातें देईं वो कवळ । विठ्ठला शीतळ जीवन वरी ॥२॥ घराचा विसर होईल आनंदें । नाचेन मी छंदें प्रेमाचिया ॥३॥ तुका म्हणे तोंचिवरी करकर । मग हें उत्तर खंडईल ॥४॥

२६३७. बोलविसी तरी । तुझ्या येईन उत्तरीं ॥१॥ कांहीं कोड कवतुकें । हातीं द्यावया भातुकें ॥२॥ बोलविसी तैसें । करीन सेवन सरिसें ॥३॥ तुका म्हणे देवा । माझें चळण तुज सवा ॥४॥

२६३८. दिला जीवभाव । तेव्हां सांडिला म्यां ठाव ॥१॥ आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ अनंता ॥२॥ माझिया मरणें । तुम्हीं बैसविलें ठाणें ॥३॥ तुका म्हणे कांहीं । मी हें माझें येथें नाहीं ॥४॥

२६३९. एकाचिये वेठी । सांपडलों फुकासाठीं ॥१॥ घेतों काम सत्ताबळें । माझें करूनि भेंडोळें ॥२॥ धांवें मागें मागें । जाय तिकडे चालत लागे ॥३॥ तुका म्हणे नेलें । माझें सर्वस्व विठ्ठलें ॥४॥

२६४०. आतां द्यावें अभयदान । जीवन ये कृपेचें ॥१॥ उभारोनि बाहो देवा । हात ठेवा मस्तकीं ॥२॥ नाभी नाभी या उत्तरें । करुणाकरें शांतवीजे ॥३॥ तुका म्हणे केली आस । तो हा दिस फळाचा ॥४॥

२६४१. बराडियाची आवडी पुरे । जया झुरे साठीं ते ॥१॥ तैसें झालें माझ्या मना । नुठी चरणावरूनि ॥२॥ भागलिया पेणें पावे । विसांवे तें ठाकणीं ॥३॥ तुका म्हणे छाया भेटे । बरें वाटे तापे त्या ॥४॥

२६४२. बहुजन्में सोस केला । त्याचा झाला परिणाम ॥१॥ विठ्ठलसें नाम कंठीं । आवडीं पोटीं संचितें ॥२॥ येथुन तेथवरी आतां । नलगे चिंता करावी ॥३॥ तुका म्हणे धालें मन । हेंचि दान शकुनाचें ॥४॥

२६४३. उसंतिल्या कर्मवाटा । बहु मोठा आघात ॥१॥ शीघ्र यावें शीघ्र यावें । हातीं

न्यावें धरूनि ॥२॥ भागलों या खटपटे । घटपटें करितां ॥३॥ तुका म्हणे कृपावंता । माझी चिंता खंडावी ॥४॥

२६४४. तुम्हांसी हें अवघें ठावें । किती द्यावें स्मरण ॥१॥ कां बा तुम्ही ऐसें नेणें । निष्ठुरपणें टाळितसां ॥२॥ आळवितां मायबापा । नये कृपा अझूनि ॥३॥ तुका म्हणे जगदीशा । काय असां निजले ॥४॥

२६४५. नेलें सळेंबळें । चित्तावित्ताचें गांठोळें ॥१॥ साह्य झालीं घरिच्या घरीं । होतां ठायींच कुठोरी ॥२॥ मी पातलों या भावा । कपट तें नेणें देवा ॥३॥ तुका म्हणे उघडें केलें । माझें माझ्या हातें नेलें ॥४॥

२६४६. झाला हा डांगोरा । मुखीं लहानही थोरा ॥१॥ नागविलों जनाचारीं । कोणी बैसों नेदी दारीं ॥२॥ संचिताचा ठेवा । आतां आला तैसा घ्यावा ॥३॥ तुका म्हणे देवें । केलें आतां हें बरवें ॥४॥

२६४७. किती चौघाचारें । येथें गोविलें वेव्हारें ॥१॥ असे बांधविले गळे । होऊं न सकती निराळे ॥२॥ आपलें आपण । केलें कां नाहीं जतन ॥३॥ तुका म्हणे खंडदंडें । येरझारीं लपती लंडें ॥४॥

२६४८. पांडुरंगा सारिखा सांडुनि वेव्हारा । आणिकांची करा आस वायां ॥१॥ बहुतां दिधला उद्धार उदारें । निवडीना खरें खोटें कांहीं ॥२॥ याचिया अंकिता वैकुंठ बंदर । आणीक वेव्हार चालतीना ॥३॥ तुका म्हणे माझे हातींचें वजन । यासी बोल कोण ठेवूं सके ॥४॥

२६४९. ठेवूनि इमान राहिलों चरणीं । म्हणऊनि धनी कृपा करी ॥१॥ आम्हांसी भांडार करणें जतन । आला गेला कोण उंच नीच ॥२॥ करूनि सांभाळीं राहिलों निराळा । एक एक वेळा आज्ञा केली ॥३॥ तुका म्हणे योग्यायोग्य हे विनीत । देवा नाहीं चित्त येथें देणें ॥४॥

२६५०. आतां नव्हे गोड करितां संसार । आणीक संचार झाला माजी ॥१॥ ब्रह्मरसें गेलें भरूनियां अंग । आधील तो रंग पालटला ॥२॥ रसनेचिये रुची कंठीं नारायण । बैसोनियां मन निवविलें ॥३॥ तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ॥४॥

२६५१. आतां कशासाठीं दुरी । अंतर उरी राखिली ॥१॥ करीं लवकरी मूळा । लहान तळा मुळींचिया ॥२॥ दोहीं ठायीं उद्वेगवाणें । दरुषणें निश्चिती ॥३॥ तुका म्हणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ॥४॥

२६५२. पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ॥१॥ मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचें धन लाभ हेवा ॥२॥ देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेंसे ॥३॥ तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि आंधळे होऊं नका ॥४॥

२६५३. हित नाहीं ठावें जननीजनका । दाविला लौकिकाचार तिहीं ॥१॥ अंधळ्याचे काठी लागले अंधळे । घात एके वेळे पुढें मागें ॥२॥ न धरावी चाली करावा विचार । वरील आहारगळी लावी ॥३॥ तुका म्हणे केला निवाड रोकडा । राऊत हा घोडा हातोहातीं ॥४॥

२६५४. जेथें पाहें तेथें कांडिती भूस । चिपाडें चोखूनि पाहाती रस ॥१॥ काय सांगूं देवा भुलले जीव । बहु यांची येतसे कींव ॥२॥ वैकुंठींचें मोटळें लटिकेंची फुगे । पेणिया जाऊनि भिक्षा मागे ॥३॥ तुका म्हणे कां उगेचि खोल । जवळी दाखवी आपणां बोल ॥४॥

२६५५. जाणिवेच्या भारें चेंपला उर । सदा बुरबुर सरेचि ना ॥१॥ किती याचे बोल ऐकों कानीं । मारिलें घाणीं नाळेकरी ॥२॥ मिठेंविण काय आळणी हे बोल । कोरडीच फोल घसघस ॥३॥ तुका म्हणे डेंगा न कळे हित । किती फजित करूं तरी ॥४॥

२६५६. अनुतापयुक्त गेलिया अभिमान । विसरूं वचन मागिलांचें ॥१॥ त्याचे पाय माझे लागोत कपाळीं । भोगे उष्टावळी धन्यकाळ ॥२॥ षड् ऊर्मी जिहीं हाणितल्या लाता । शरण या संता आल्या वेगीं ॥३॥ तुका म्हणे जाती वोळे लवकरी । ठायींचि अंतरीं शुद्ध होती ॥४॥

२६५७. खोल ओली पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वांयां जाय ॥१॥ लटिक्याचे आम्ही नव्हों सांटेकरी । थीतें घाली भरी पदरींचें ॥२॥ कोणा इहलोकीं पाहिजे पसारा । दंभ पोट भरायाचे चाडे ॥३॥ तुका म्हणे कसीं अंगीं जें उतरे । तेंचि येथें सरे जाति शुद्ध ॥४॥

२६५८. गोमट्या बीजाचीं फळेंही गोमटीं । बाहे तेंचि पोटीं समतुक ॥१॥ जातीच्या संतोषें चित्तासी विश्रांति । परतोनि मागुती फिरों नेणें ॥२॥ खऱ्याचे पारखीं येत नाहीं तोटा । निवडे तो खोटा ढाळें दुरी ॥३॥ तुका म्हणे मज सत्यासी आवडी । करितां तांतडी येत नाहीं ॥४॥

२६५९. मन झालें भाट । कीर्ति मुखें घडघडाट । पडियेली वाट । येचि चाली स्वभावें ॥१॥ बोलें देवाचे पवाडे । नित्य नवेचि रोकडे । ज्यापरी आवडे । तैसी तैसा करूनि ॥२॥ रोखीं राहावें समोर । पुढें मागें चाले भार । करावें उत्तर । सेवा रुजू करूनि ॥२॥ पुरविला देकारें । संतोषाच्या अभय करें । अंगींच्या उत्तरें । तुकया स्वामी शृंगारी ॥४॥

२६६०. दूरि तोंचि होतों आपुले आशंके । नव्हते ठाऊके मूळ भेद ॥१॥ आतां जेथें तेथें येईन सांगातें । लपायापुरतें उरों नेदी ॥२॥ मिथ्या मोहो मज लाविला उशीर । तरी हें अंतर झालें होतें ॥३॥ तुका म्हणे कां रे दाखविसी भिन्न । लटिकाची सीण लपंडाईं ॥४॥

२६६१. कळों नये तोंचि चुकवितां बरें । मग पाठमोरें काय काज ॥१॥ धरिलेती आतां द्या जी माझा डाव । सांपडतां भाव ऐसा आहे ॥२॥ होतासी अंतरें झांकिलिया डोळीं । तोचि मी न्याहाळीं भरुनी दृष्टी ॥३॥ तुका म्हणे तुज रडीचीच खोडी । अहाच बराडी तो मी नव्हें ॥४॥

२६६२. विश्वास तो देव । म्हूण धरियेला भाव ॥१॥ माझी वदवितो वाणी । जेणें

धरिली धरणी ॥२॥ जोडिलीं अक्षरें । नव्हती बुद्धीच्या विचारें ॥३॥ नाहीं केली आटी । कांहीं मानदंभासाठीं ॥४॥ कोणी भाग्यवंत । तया कळे हें उचित ॥५॥ तुका म्हणे झरा । आहे मुळींचाचि खरा ॥६॥

२६६३. सुराणीचीं झालों लाडिकीं एकलीं । वडील धाकुलीं आम्ही देवा ॥१॥ म्हणऊनि कांहीं न घडे अव्हेर । गोमटें उत्तर भातुकेंही ॥२॥ कांहीं एक नाहीं वंचिलें वेगळें । मुळींचिया मुळें स्थिरावलें ॥३॥ लेवविलीं अंगीं आपुलीं भूषणें । अळंकार लेणें सकळही ॥४॥ सारितां न सरे अमुप भांडार । धना अंतपार नाहीं लेखा ॥५॥ तुका म्हणे आम्ही आळवूं आवडी । म्हणऊनी जोडी दाखविली ॥६॥

२६६४. एक वेळे केलें रितें कलेवर । आतां दिली थार पांडुरंगा ॥१॥ पाळण पोषण नलगे ते सोई । देहाचे ते काई सर्वभाव ॥२॥ माझीया मरणें झाली हे वसती । लागली ते ज्योती अविनाश ॥३॥ झाला ऐसा एका घायें येथें नाहीं । तुका म्हणे कांहीं बोलों नये ॥४॥

२६६५. पावतों ताडन । जरी हें मोकलितें जन ॥१॥ मग मी आठवितों दुःखें । देवा सावकाश मुखें ॥२॥ होती अप्रतिष्ठा । होतों वरपडा कष्टा ॥३॥ तुका म्हणे मान । होतां उत्तम खंडन ॥४॥

२६३६. धरावें तें भय । अंतरोनि जाती पाय ॥१॥ झाल्या तुटी देवासवें । काय वांचोनि करावें ॥२॥ कोणासी पारिखें । लेखूं आपणासारिखें ॥३॥ तुका म्हणे असो । अथवा हे आतां नसो ॥४॥

२६६७. आनंदाचा थारा । सुखें मोहरला झरा ॥१॥ ऐसी प्रभुची ज्या कळा । त्याच्या कोण पाहे बळा ॥२॥ अंकिता ऐसिया । होईल पाववितें ठाया ॥३॥ तुका म्हणे ऐसें । दिलें आभंड प्रकाशें ॥४॥

२६६८. आम्हांसी सांगाती । होती अराले ते होती ॥१॥ येती आइकतां हाक । दोनी मिळोन म्हणती एक ॥२॥ आणिका उत्तरीं । नसे गोविली वैखरी ॥३॥ तुका म्हणे बोला । खूण पहाती विठ्ठला ॥४॥

२६६९. काहे लकडा घांस कटावे । खोद हि जुमीन मठ बनावे ॥१॥ देवलवासी तरुवरछाया । घरघर माई खपरि सबमाया ॥२॥ कां छांडिये भार फेर सीर भागें । मायाको दुःख मिटलिये अंगें ॥३॥ कहे तुका तुम सुनो हो सिद्धा । रामबिन और झुटा कछु धंदा ॥४॥

२६७०. आणीक पाखांडें असती उदंडें । तळमळिती पिंडे आपुलिया ॥१॥ त्यांचिया बोलाचा नाहीं हा विश्वास । घातलीसे कास तुझ्या नामीं ॥२॥ दृढ एक चित्तें झालों या जीवासी । लाज सर्वविशीं तुम्हांसी ते ॥३॥ पीडों नेदी पशु आपुले अंकित । आहे जें उचित तैसें करा ॥४॥ तुका म्हणे किती भाकावी करुणा । कोप नारायणा येईल तुम्हां ॥५॥

२६७१. व्हावया भिकारी हेंचि आम्हां कारण । अंतरोनि जन जावें दुरी ॥१॥ संबंध तुटावा शब्दाचाही स्पर्श । म्हणउनि आस मोकलिली ॥२॥ तुका म्हणे दुःखें उबगला जीव । म्हणऊनी कींव भाकीं देवा ॥३॥

२६७२. कोरडिया ऐशा काय सारूं गोष्टी । करूं उठाउठीं हित आधीं ॥१॥ खोळंबला राहे आपुला मारग । पहावी ते मग तुटी कोठें ॥२॥ लौकिकाचा आड येईल पसारा । मग येरझारा दुःख देती ॥३॥ तुका म्हणे डांक लागे अळंकारें । मग नव्हे खरे पुटेविण ॥४॥

२६७३. ऐसें ठावें नाहीं मूढा । सोस काकुलती पुढां ॥१॥ माझी नका जाळूं भांडीं । पोटीं भय सोस तोंडीं ॥२॥ पातलिया काळ । तेव्हां काय चाले बळ ॥३॥ संचित तें करी । नरका जाया मेल्यावरी ॥४॥ परउपकार । न घडावा हा विचार ॥५॥ तुका म्हणे लांसी । आतां भेटों नये ऐसी ॥६॥

२६७४. काळाच सारिखीं वाहाती नक्षत्रें । करितां दुसरें फळ नाहीं ॥१॥ ऐसें करत्यानें ठेविलें करून । भरिलें भरून माप नेमें ॥२॥ शीतउष्णकाळीं मेघा वरुषाव । वरुषतां वाव होय शीण ॥३॥ तुका म्हणे विष अमृताचे किडें । पालट न घडे जीणें तया ॥४॥

२६७५. बोलणें तें आम्ही बोलों उपयोगीं । पडिले प्रसंगीं काळा ऐसें ॥१॥ जयामध्यें देव आदि मध्यें अंतीं । खोल पाया भिंती न खचेची ॥२॥ करणें तें आम्ही करूं एक वेळे । पुढिलिया बळें वाढी खुंटे ॥३॥ तुका म्हणे असो आज्ञेचीं धारकें । म्हणऊनि एकें बोलें सारूं ॥४॥

२६७६. तुझिया विनोदें आम्हांसी मरण । सोसियेला शीण बहु फेरे ॥१॥ आतां आपणचि येसी तें करीन । नाम हें धरीन तुझें कंठीं ॥२॥ वियोगेंचि आलों उसंतीत वनें । संकल्प हे मनें वाहोनियां ॥३॥ तुका म्हणे वर्म सांपडलें सोपें । गोवियलों पापें पुण्य होतों ॥४॥

२६७७. पाठीलागे काळ येतसे या लागें । मी माझें वाउगें मध्यें असे ॥१॥ आतां आगी लागो ऐसिया वेव्हारा । तूं माझा सोइरा पांडुरंगा ॥२॥ वागविला माथां नसताचि भार । नव्हतें साचार देखिलें तों ॥३॥ तुका म्हणे केलें जवळील दुरी । मृगजळ वरी आड आलें ॥४॥

२६७८. आपुलिये ठाकीं । करीन कांहीं तरी एकी ॥१॥ करीन पायांशीं वोळखी । करिसी तें करीं सुखीं ॥२॥ कायाक्लेश गंगाजळ । समर्पीन तुळसीदळ ॥३॥ तुका म्हणे देवा । कर जोडीन ते सेवा ॥४॥

२६७९. माझे तों स्वभाव मज अनावर । तुजही देतां भार कांहीं नव्हे ॥१॥ ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं ॥२॥ संपादितों तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥३॥ तुका म्हणे सत्या नाहीं पाठी पोट । असतें निघोंट एकी जाती ॥४॥

२६८०. न व्हावा तो बरा मुळींच संबंध । विश्वासि कां बद्ध बोलिलासे ॥१॥ आतां माझे

हित काय तें विचारा । सत्यत्वें दातारा पांडुरंगा ॥२॥ नाहीं भाव परी म्हणवितों दारा । नको देऊं यास उणें येऊं ॥३॥ तुका म्हणे कां हे उद्धरितां दीन । मानितसां सीण मायबापा ॥४॥

२६८१. काय तुमचि यास वेचते गांठोळी । माझी टाळाटाळी करीतसां ॥१॥ चतुराच्या राया अहो पांडुरंगा । ऐसें तरी सांगा निवडुनि ॥२॥ कोण तुम्हां सुख असे या कौतुकें । भोगितां अनेक दुःखें आम्ही ॥३॥ तुका म्हणे काय झालासी निर्गुण । आम्हां येथें कोण सोडवील ॥४॥

२६८२. निष्ठुर यासाठीं करितों भाषण । आहेसी सर्वज्ञ जाणता तूं ॥१॥ ऐसें दुःख कोण आहे निवारिता । तो मी जाऊं आतां शरण त्यासी ॥२॥ बैसलासि कोण करुनियां धीर । नाहीं येथ उरी दुसऱ्याची ॥३॥ तुका म्हणे आलों अवघेंच पायापें । आतां मायबापें नुपेक्षावें ॥४॥

२६८३. पायांपासीं चित्त । तेणें भेटी अखंडित ॥१॥ असे खेळे भलते ठायीं । प्रेमसूत्रदोरी पायीं ॥२॥ केलेंसे जतन । मुळीं काय तें वचन ॥३॥ तुका म्हणे सर्व जाणा । ठायीं विचारावें मना ॥४॥

२६८४. तुम्हां आम्हां सरी । येथें कइच्याया परी ॥१॥ स्वामिसेवा अळंकार । नाहीं आवडिये थार ॥२॥ खुंटलिया वाचा । मग हा आनंद कइचा ॥३॥ तुका म्हणे कोडें । आम्ही नाचों तुजपुढें ॥४॥

२६८५. कैचें भांडवल खरा हातीं भाव । कळवळ्यानें माव दावीतसें ॥१॥ आतां माझा अंत नको सर्वजाणा । पाहों नारायणा निवडूनि ॥२॥ संतांचें उच्छिष्ट मागिले पंगती । करावी संगती लागे ऐसी ॥३॥ तुका म्हणे आलों दावूनी विश्वास । संचित ते नास पावे ऐसें ॥४॥

२६८६. थोडे तुम्हीं मागें होते उद्धरिले । मज ऐसे गेले वांयां जीव ॥१॥ आतां याचा कांहीं न मनावा भार । कृपेचा सागर आहेसी तूं ॥२॥ तुज आळवितां पापाची वसति । राहे अंगीं किती बळ त्याचें ॥३॥ तुका म्हणे जैसे तारिले दगड । तैसा मीही जड एक देवा ॥४॥

२६८७. आम्ही म्हणों कोणी नाहीं तुज आड । दिसतोसी भ्याड पांडुरंगा ॥१॥ हा गे माझ्या भोगें केलासी परता । विश्वंभरीं सत्ता नाहीं ऐसी ॥२॥ आम्ही तुज असों देउनि आधार । नाम वारंवार उच्चारितों ॥३॥ तुका म्हणे मज धरियेलें काळें । पंचभूतीं खळें करूनियां ॥४॥

२६८८. आहे तें सकळ प्रारब्धाचे हातीं । यावें काकुलती यासी आतां ॥१॥ ऐसा माझ्या मनें सांगितला भाव । तोंवरीच देव दुजा नाहीं ॥२॥ अवघियांची जेव्हां सारावी करकर । भावबळें थार धरूं येसी ॥३॥ तुका म्हणे तुज ठेवावें पूजून । आणीक तो गुण नाहीं येथें ॥४॥

२६८९. शेवट तो होतो तुझियानें गोड । म्हणऊनि चाड धरीतसों ॥१॥ देऊं भोगाभोग

कलिवराचा भार। साहों तुज थार त्याजमधीं ॥२॥ तुझ्या बळें कांहीं खटपट काम। वाढवावा श्रम नलगे तो ॥३॥ तुका म्हणे आम्ही चेंपलों या भारें। तुमचें तें खरें देवपण ॥४॥

२६९०. ऐसाचि तो गोवा। न पाहिजे केला देवा ॥१॥ बहु आली दूरवरी। ओढत हे भरोवरी ॥२॥ आम्हांसी न कळे। तुम्ही झाकुं नये डोळे ॥३॥ तुका म्हणे संगें। असो एक एका अंगें ॥४॥

२६९१. मायलेंकरांत भिन्न । नाहीं उत्तराचा सीण ॥१॥ धाडीं धाडीं वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ॥२॥ करूनि नवल । याचें बोलिलों ते बोल ॥३॥ तुका म्हणे माते । पांडुरंगे कृपावंते ॥४॥

२६९२. आवडी कां ठेवूं । बैसोनियां संगें जेवूं ॥१॥ मागें नको ठेवूं उरी । माझी आण तुजवरी ॥२॥ देखिले प्रकार । त्याचे पाहेन साचार ॥३॥ तुका म्हणे बाळीं । केली चाहाडी सकळीं ॥४॥

२६९३. नव्हेसी तूं लांसी । माया आणिकां त्या ऐसी ॥१॥ जे हें वांयां जाती बोल । होती निर्फळचि फोल ॥२॥ नव्हेसी दुबळी । कांहीं नाहीं तें जवळी ॥३॥ तुका म्हणे खोटी । कांहीं नव्हेसी करंटी ॥४॥

२६९४. आम्हां बोल लावा । तुम्हां अनुचित हें देवा ॥१॥ ऐसें सांगा कां व्यालेती । काय नाहीं तुम्हां हातीं ॥२॥ आतां धरा दुरी । वांयां दवडाया थोरी ॥३॥ तुका म्हणे ठायीं । ऐसें विचारावें पाहीं ॥४॥

२६९५. मरोनियां गेली माया । मग तया कोण पुसे ॥१॥ पोरटियांची दाद कोणा । ऐसा जना प्रवाहो ॥२॥ निढळासी निढळ जोडा । होय कोडा कवतुक ॥३॥ तुका म्हणे देवा ऐसी । आहों सरसीं आपण ॥४॥

२६९६ संसाराची कोण गोडी । दिली जोडी करूनि ॥१॥ निष्ठुर तूं बहु देवा । पुरे हेवा न म्हणवी ॥२॥ पाहोनियां कर्म डोळां । निराळा तो वर्जीना ॥३॥ तुका म्हणे तुज माझें । म्हणतां ओझें फुकट ॥४॥

२६९७. नव्हतें तें कळों आलें । तरी बोलें अबोला ॥१॥ तुज मज घातली तुटी । एका भेटीपासूनि ॥२॥ आतां याची न धरीं चाड । कांहीं कोड कवतुकें ॥३॥ तुका म्हणे यावें जावें । एका भावें खंडलें ॥४॥

२६९८. आतां दोघांमध्यें काय । उरलें होय वाणीजेसें ॥१॥ निष्ठुर हें केलें मन । समाधान करूनि ॥२॥ झुरावें तें तेथींच्या परी । घरिच्याघरीं अवघिया ॥३॥ तुका म्हणे देवपण । गुंडाळून असों दे ॥४॥

२६९९. मागितल्यास आस करा। उरी धरा कांहींबाहीं ॥१॥ म्हणऊनि सारिली आस। होती

यास मूळ ते ॥२॥ माझ्या मोहें तुज पान्हा । लोटे स्तना वोरसे ॥३॥ तुका म्हणे आळवणें । माझ्या देणें उत्तरा ॥४॥

२७००. आतां बरें घरिच्याघरीं । आपली उरी आपणापें ॥१॥ वाईट बरें न पडे दृष्टी । मग कष्टी होइजेना ॥२॥ बोलों जातां वाढे बोल । वायां फोल खटपट ॥३॥ काकुलती यावें देवा । तो तो सेवा इच्छितो ॥४॥ हिशोबाचे खटपटे । चढे तुटे घडेना ॥५॥ तुका म्हणे कळों आलें । दुसरें भलें तों नव्हे ॥६॥

२७०१. आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां ते मग गोवी नाहीं ॥१॥ ऐसा चालोनियां आला शिष्टाचार । गोवीचा वेव्हार पापपुण्य ॥२॥ पळणें ते पळो सांडूनि कां बळें । उपाधीच्या मुळें लाग पावे ॥३॥ तुका म्हणे येथें शूर तो निवडे । पडिलें बापुडे काळचक्रीं ॥४॥

२७०२. उद्धत त्या जाती । द्रव्यें रंगल्या उद्धती ॥१॥ म्हणऊनि बहु फार । त्यासी असावें अंतर ॥२॥ कैंचें पाठी पोट । गोड विषासी सेवट ॥३॥ तुका म्हणे सापा । न कळे कुरवाळिलें बापा ॥४॥

२७०३. आम्हां कथा आवश्यक । येर संपादूं लौकिक ॥१॥ जैसी तैसी माय बरी । मानिल्या त्या माना येरी ॥२॥ व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा ॥३॥ कवतुकें वावरें । तुका म्हणे त्या आधारें ॥४॥

२७०४. पाळितों वचन । परि बहूं भीतें मन ॥१॥ करितों पायांशीं सलगी । नये बैसों अंगसंगीं ॥२॥ जोडोनियां कर । उभें असावें समोर ॥३॥ तुका म्हणे संत । तुम्ही मी बहु पतित ॥४॥

२७०५. जैसा तैसा आतां । मज प्रमाण अनंता ॥१॥ पायां पडणें न सोडीं । पोटीं तेंच वर तोंडीं ॥२॥ एका भावें चाड । आदि तेंचि अंतीं गोड ॥३॥ तुका म्हणे आम्हां । टाळणेंचि नाहीं नेमा ॥४॥

२७०६. चुकलों या ऐशा वर्मा । तरी कर्मा सांपडलों ॥१॥ पाठी लागे करी नास । गर्भवास भोगवी ॥२॥ माझें तुझें भिन्नभावें गळां दावें मोहाचें ॥३॥ तुका म्हणे पाठेळ केलों । नसत्या भ्यालों छंदासी ॥४॥

२७०७. देह प्रारब्धाचे शिरीं । असोनि करी उद्वेग ॥१॥ धांव घालीं नारायणा । माझ्या मना जागवीं ॥२॥ ऐसीं चुकोनियां वर्में । पीडा भ्रमें पावलों ॥३॥ तुका म्हणे कैंचा भोग । नव्हे रोग अंगींचा ॥४॥

२७०८. अनंताच्या ऐकों कीर्ती । ज्याच्या चित्तीं हरिनाम ॥१॥ उल्लंघूनि गेले सिंधु । हा भवसिंधु तोडोनियां ॥२॥ हळुहळु तेचि वाहीं । चालों कांहीं अधिकारें ॥३॥ खुंटूनियां गेले नावा । नाहीं हेवा खोळंबा ॥४॥ नलगे मोल द्यावा रुका । भाव एका कारणें ॥५॥ भीमातिरीं

थडवा केला। उठा चला लवलाहें ॥६॥ तुका म्हणे पाहतो वाट। उभा नीट पाउलीं ॥७॥

२७०९. तरीच म्यां देवां । साटी करूनियां जीवा ॥१॥ येथें बैसलों धरणें । दृढ कायावाचामनें ॥२॥ आवरिल्या वृत्ति। मन घेऊनियां हातीं ॥३॥ तुका म्हणे जरा। बाहेर येऊं नेदीं घरा ॥४॥

२७१०. हें तों एक संतांठायीं । लाभ पायीं उत्तम ॥१॥ म्हणवितां त्यांचे दास । पुढें आस उरेना ॥२॥ कृपादान केलें संतीं । कल्पांतींही सरेना ॥३॥ तुका म्हणे संतसेवा । हेचि देवा उत्तम ॥४॥

२७११. नारायण ऐसा। सेवूं नेणतील रसा ॥१॥ जेणें भवव्याध तुटे। दुःख मागुतें न भेटे ॥२॥ नलगे कांहीं आटी। बाधा राहों न सके पोटीं ॥३॥ कैवल्य तें जोडे। कृपा लवकरी घडे ॥४॥ जन्ममरणदुःख अटे। जाळें अवघेंचि तुटे ॥५॥ तुका म्हणे झाला। याचा गुण बहुतांला ॥६॥

२७१२. मार्ग चुकले विदेशी एकले। तयावरी झाले दिशाभुली। हातीं धरूनियां पावविले घरा। त्यांच्या उपकारा काय द्यावें ॥१॥ तैसा मी कुडकुडा होतों केशीराजा। सेवा न घडे लाजा म्हणऊनि ॥२॥ सांडियेला गर्भ उबगोनि माउली। नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध। उष्ण तहान भूक एवढे आकांतीं। वोसंगा लाविती काय म्हूण ॥३॥ खांद्यावरीं शूळ मरणाचे वाटे। अन्यायहि मोठे साच केले। हातींचा हिरोनि घातला पाठीसी। तुका म्हणे ऐसी परी जाली ॥४॥

२७१३. अनेक दोषांचे काट। जे जे गादले निघोंट। होती हरिनामें चोखट। क्षण एक न लगतां ॥१॥ तुम्ही हरि म्हणा हरि म्हणा। महादोषांचे छेदना ॥ध्रु०॥ अतिप्रीतीचा बांधला। नष्ट चांडाळी रतला। क्षण न लागतां नेला। वैकुंठासी हरि म्हणतां ॥२॥ अमित दोषांचें मूळ। झालें वाल्मीकासी सबळ। झाला हरिनामें निर्मळ। गंगाजळ पैं जैसा ॥३॥ हरि म्हणतां तरले। महादोषी उद्धरिले। पहा गणिकेसी नेलें। वैकुंठासी हरि म्हणतां ॥४॥ हरिविण जन्म नको वांया। जैसी दर्पणींची छाया। म्हणोनि तुका लागे पायां। शरण तया हरीसी ॥५॥

२७१४. भजन हें नासिलें हेंडी। दंभा लंडी आवडी ॥१॥ जेवीत ना आइता पाक। नासी ताक घुसळूनि ॥२॥ एकाएकीं इच्छी पाट। नेणे चाट काउळें ॥३॥ तुका म्हणे मुलाम्याचें। बंधन साचें सेवटीं ॥४॥

२७१५. जैसा निर्मळ गंगाओघ। तैसा भाग वोगरीं ॥१॥ प्रेम वाढे ग्रासोग्रासीं। ब्रह्मरसीं भोजन ॥२॥ तृप्तीवरि आवडी उरे। ऐसे बरे प्रकार ॥३॥ तुका म्हणे पाख मन। नारायण तें भोगी ॥४॥

२७१६. सुख सुखा विरजण झालें। तें मथिलें नवनीत ॥१॥ हाले डोले हरुषे काया। निवती बाह्या नयन ॥२॥ प्रबळ तो नारायण। गुणें गुण वाढला ॥३॥ तुका म्हणे भरली सीग।

वरी मग वोसंडे ॥४॥

२७१७. कां रे न भजसी हरी । तुज कोण अंगीकारी । होईल यमपुरीं । यमदंड यातना ॥१॥ कोण झाली लगबग । काय करिसि तेथें मग ॥२॥ कां रे भरला ताठा । करिती वोज नेतां वाटा ॥३॥ तोंडा पडिली खिळणी । जिव्हा पिटिती वोढूनि ॥४॥ कां रे पडिली जनलाज । कोण सोडवील तुज ॥५॥ लाज धरीं म्हणे तुका । नको वांयां जाऊं फुका ॥६॥

२७१८. क्षरला सागर गंगा ओघीं मिळे । आपणचि खेळे आपणाशीं ॥१॥ मधील ते वाव अवघी उपाधि । तुम्हां आम्हांमधीं तेचि परी ॥२॥ घट मठ झाले आकाशाचे पोटीं । वचनेंचि तुटी तेथेंचि ते ॥३॥ तुका म्हणे बीजें बीज दाखविलें । पत्र पुष्प आलें गेलें वांयां ॥४॥

२७१९. काय विनवावें कोण तो निवाड । केलें माझ्या कोड वचनाचें ॥१॥ अहो कृपानिधि गुणांच्या निधाना । माझ्या अनुमाना नयेचि हें ॥२॥ बहुत करुणा केलेंसे भाषण । एकही वचन नाहीं आलें ॥३॥ माझी कांहीं सेवा होईल पावली । निश्चिंती मानिली होती ऐसी ॥४॥ तुका म्हणे माझी उरली ते आटी । अभय कर कटी न देखेंचि ॥५॥

२७२०. लाजोनि या काळें राहिलें लिखित । नेदितांहि चित्त समाधान ॥१॥ कैसें सुख वाटे वचनांचे तुटी । प्रीतिविण भेटी रुचि नेदी ॥२॥ एकाचिये भेटी एकाचा कोंपर । मायेचा पदर कळों येतो ॥३॥ होत्या आपल्या त्या वेचूनियां शक्ती । पुढें झालों युक्तिकळाहीन ॥४॥ तुका म्हणे तुम्ही समर्थ जी देवा । दुर्बळाची सेवा कोठें पावें ॥५॥

२७२१. आशाबद्ध बहु असें निलाजिरें । होय म्हणें धीरें फळ टोंकें ॥१॥ कारणापें चित्त न पाहें अपमान । चित्त समाधान लाभासाठीं ॥२॥ तुका म्हणे हातें लोटिलें न कळे । झांकितसे डोळे पांडुरंगा ॥३॥

२७२२. सातां पांचा तरी वचनां सेवटीं । निरोप कां भेटी एक तरी ॥१॥ कां नेणें निष्ठुर केलें नारायणा । न देखें हें मना येतां कांहीं ॥२॥ तुका म्हणे ऐसा न देखें निवाड । कडू किंवा गोड फळ पोटीं ॥३॥

२७२३. कासया हो माझा राखिला लौकिक । निवाड कां एक केला नाहीं ॥१॥ मग तळमळ न करितें मन । झालें तें कारण कळों येतें ॥२॥ तुका म्हणे केला पाहिजे निवाड । वैद्यासी ते भीड मरण रोग्या ॥३॥

२७२४. वायां ऐसा जन्म गेला । हें विठ्ठला दुःख वाटे ॥१॥ नाहीं सरता झालों पायीं । तुम्ही जईं न पुसा ॥२॥ कां मी जीतों संवसारीं । अद्यापवरी भूमिभार ॥३॥ तुका म्हणे पंढरिनाथा । सबळ व्यथा भवरोग ॥४॥

२७२५. ऐसें कोण पाप बळी । जें जवळी येऊं नेदी ॥१॥ तुम्हां तंव होईल ठावें । नेदावें कां

कळों हें ॥२॥ कोण झाला अंतराय । कां ते पाय अंतरले ॥३॥ तुका म्हणे निमित्याचा । आला सुचा अनुभव ॥४॥

२७२६. ब्रह्मज्ञान भरोवरी । सांगे आपण न करी ॥१॥ थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ सिणविली वैखरी ॥२॥ कथा करी वरी वरी । प्रेम नसेचि अंतरीं ॥३॥ तुका म्हणे कवित्व करी । मान लोभ हे अंतरीं ॥४॥

२७२७. दगडाच्या देवा बगाडी नवस । बाईल कथेस जाऊं नेदी ॥१॥ वेची धनरासी बांधिलें स्मशान । दारीं वृंदावन द्वाड मानी ॥२॥ चोरें नागविला न करी त्याची खंती । परी द्विजा हातीं नेदी रुका ॥३॥ करी पाहुणेर व्याह्याजांवयासी । आल्या अतीतासी पाठीमोरा ॥४॥ तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें । भार वाही सीण धरातळीं ॥५॥

२७२८. करूनि विनवणी । माथा ठेवितों चरणीं ॥१॥ होतें तेंचि असों द्यावें । रूप सौम्यचि बरवें ॥२॥ भया भेणें तुमचा ठाव । तुमच्या कोपें कोठें जावें ॥३॥ तुका पायां लागे । दान समुदाय मागे ॥४॥

२७२९. प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे ॥१॥ कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंगें ॥२॥ पोटामध्यें कोणें सांगितलें सर्पा । उपजत लपा म्हणऊनि ॥३॥ बोलों नेणें परी जाणे गोड क्षार । अंतरीं विचार त्यासी ठावा ॥४॥ तुका म्हणे बरें विचारावें मनीं । आणिक भल्यांनीं पुसों नये ॥५॥

२७३०. आतां मी पतित ऐसा साच भावें । कळों अनुभवें आलें देवा ॥१॥ काय करावें तें रोकडेंचि करीं । राहिली हे उरी नाहीं दोघां ॥२॥ येर येरा दृष्टी द्यावया उत्तरा । यासी काय करा ग्वाही आतां ॥३॥ तुका म्हणे मेलों सांगतसांगतां । तेंचि आलें आतां कळों तुम्हां ॥४॥

२७३१. काय तुज मागें नाहीं जाणवलें । माझें नाहीं केलें हित कांहीं ॥१॥ डोळे झांकुनियां होसी अबोलणा । तेव्हां नारायण आतां कैसा ॥२॥ न कळे उचित न सांगता स्पष्ट । ऐसा क्रियानष्ट काय जाणे ॥३॥ तुका म्हणे माझा घात तुम्हां ठावा । तरि कां आधीं देवा वारूं नये ॥४॥

२७३२. नये ऐसें बोलों कठिण उत्तरें । सलगी लेंकुरें केली पुढें ॥१॥ अपराध कीजे घडला तो क्षमा । सिकवा उत्तमा आमुचिया ॥२॥ धरूं धावे आगी पोळेल तें नेणें । ओढिलिया हाणें माते बाळा ॥३॥ तुका म्हणे भार ज्याचा जार त्यासी । प्रवीण येविशीं असा तुम्ही ॥४॥

२७३३. लडिवाळ म्हणोनि निष्ठुर न बोला । परी सांभाळिला लागे घात ॥१॥ बहु वागवीत आणिलें दुरूनि । दीसांची पोसणी बहु आहे ॥२॥ नाहीं लागों दिला आघाताचा वारा । निष्ठुर उत्तरा कोमेजेना ॥३॥ तुका म्हणे तुम्ही कृपावंत हरि । शांतवा उत्तरीं अमृताच्या ॥४॥

२७३४. आत्मस्थिति मज नको हा विचार । देईं निरंतर चरणसेवा ॥१॥ जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा । हेचि गोडी आम्हां देईं देवा ॥२॥ काय सायुज्यता मुक्तिची हे चाड । देव भक्त कोड तेथें नाहीं ॥३॥ काय तें निर्गुण पाहों कैशा परी । वर्णूं तुझी हरी कीर्ति कैसी ॥४॥ गोड चरणसेवा देवभक्तपणें । मज देवा झणें दुराविसी ॥५॥ जाणिवेपासूनि सोडवी सत्वर । देईं निरंतर चरणसेवा ॥६॥ तुका म्हणे गोडा गोड नलगे प्रीति । सेवेविण चित्तीं सार नाहीं ॥७॥

२७३५. चालें दंडवत घालीं नारायणा । आपुल्या कल्याणा लागूनियां ॥१॥ बैसविला पदीं पुत्र राज्य करी । पिता वाहे शिरीं आज्ञा त्याची ॥२॥ तुका म्हणे आहे ठायींचाचि मान । आतां अनुमान कायसा तो ॥३॥

२७३६. समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हंसती सकळ लोक कोणा ॥१॥ समर्थासी लाज आपुल्या नांवाची । शरण आलियाची लागे चिंता ॥२॥ जरी तुज कांहीं होईल उचित । तरी हा पतित तारीं तुका ॥३॥

२७३७. न करीं रे मना कांहींच कल्पना । चिंतीं या चरणां विठोबाच्या ॥१॥ येथें सुखाचिया अमुपचि रासी । पुढें कल्पनेसी ठाव नाहीं ॥२॥ सुखाचें ओतिलें साजिरें श्रीमुख । शोक मोह दुःख पाहातां नासे ॥३॥ तुका म्हणे येथें होईल विसांवा । तुटतील धांवा पुढिलिया ॥४॥

२७३८. काय करूं मज नागविलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली ॥१॥ हिरोनियां नेला मुखींचा उच्चार । पडिलें अंतर जवळीच ॥२॥ द्वैताचिया कैसा सांपडलों हातीं । बहुत करती ओढाओढी ॥३॥ तुका म्हणे आतां आपुलिया सवा । न्यावें मज देवा सोडवूनि ॥४॥

२७३९. नाहीं देवाचा विश्वास । करीं संतांचा उपहास ॥१॥ त्याचे तोंडीं पडे माती । हीन शूकराची जाती ॥२॥ घोकुनी अक्षरें । वाद छळणा करीत फिरे ॥४॥ म्हणे देवासी पाषाण । तुका म्हणे भावहीन ॥४॥

२७४०. हेंचि सर्वसुख जपावा विठ्ठल । न दवडावा पळ क्षण वांयां ॥१॥ हेंचि एक सर्व साधनांचें मूळ । आतुडे गोपाळ येणें पंथें ॥२॥ न लगती कांहीं तपाचिया रासी । करणे वाराणसी । नाना तीर्थें ॥३॥ कल्पना हे तिळ देहीं अभिमान । नये नारायण जवळी त्याच्या ॥४॥ तुका म्हणे देव नामीं नेदी भेटी । म्हणे त्याचे होंटीं कुष्ट होय ॥५॥

२७४१. माझे विषयीं तुज पडतो विसर । नको धरूं दूर पांडुरंगा ॥१॥ तुझा म्हणवितों हेचि लाज तुला । आतां झणीं मला विसरसी ॥२॥ तुका म्हणे तुझी माझी नाहीं उरी । आतां केली खरी देवराया ॥३॥

२७४२. अभक्ताचे गांवीं साधु म्हणजे काय । व्याघ्रवाडां गाय सांपडली ॥१॥ कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण । बस्वण्णाची आण तया काई ॥२॥ मोतियाची गोणी माळे वोळी नेदी ।

पुसती केवढ्या केली पासरी हे ॥३॥ केळी आणी बोरी वसती सेजारीं। संवाद कोणे परी घडे येथें ॥४॥ तुका म्हणे खीर केली का-हेळ्याची। शुद्ध गोडी कैंची वसे तेथें ॥५॥

२७४३. भागल्यांचा तूं विसांवा। करीन नांवा निंबलोण ॥१॥ परमानंदा पुरुषोत्तमा। हरी या श्रमापासूनि ॥२॥ अनाथांचा अंगीकार। करितां भार न मानिसी ॥३॥ तुका म्हणे इच्छा पुरे। ऐसी धुरे हे विठ्ठले ॥४॥

२७४४. घालूनियां कास। बळें आलों मागायास ॥१॥ प्रेम देईं पाठवूनि। पांडुरंगा सेवाऋणी ॥२॥ होईं रे शाहाणा। कळों नेदावें या जना ॥३॥ तुका म्हणे पायीं। जडलों मग उरलें काई ॥४॥

२७४५. लागे तुझी सोय करी ऐसें कांहीं। माझे विठाबाई माऊलीये ॥१॥ पतितपावन म्हणविसी जरी। अव्हेर न करीं तरी माझा ॥२॥ नाहीं तरी ब्रीद टाकीं सोडूनियां। न धरिसी माया जरी माझी ॥३॥ बोलियला बोल करावा साचार। तरि लोक बरें म्हणतील ॥४॥ करावा संसार लोकलाजे भेणें। वचनासी उणें येऊं नेदीं ॥५॥ तुम्हां आम्हां तैसें नाहीं म्हणे तुका। होशिल तूं सखा जीवलग ॥६॥

२७४६. भेटीलागीं पंढरिनाथा। जीवा लागली तळमळ व्यथा ॥१॥ कधीं कृपा करिसी नेणें। मज दीनाचें धांवणें ॥२॥ सीणलें माझें मन। वाट पाहतां लोचन ॥३॥ तुका म्हणे भूक। तुझें पाहावया मुख ॥४॥

२७४७. सांडियेली काया। वरी ओवाळूनि पायां ॥१॥ शरण शरण नारायणा। मज अंगीकारा दीना ॥२॥ आलों लोटांगणीं। रुळें तुमचें चरणीं ॥३॥ तुका म्हणे शिर। ठेवियेलें पायांवर ॥४॥

२७४८. तुझे दारींचा कुतरा। नको मोकलूं दातारा ॥१॥ धरणें घेतलें द्वारांत। नको धरूनी उठवूं हात ॥२॥ घातली मुरकुंड। झालों शिरोमणी लंड ॥३॥ तुका म्हणे जगजीवना। ब्रीद पाहें नारायणा ॥४॥

२७४९. पाहातां हें बरवें झालें। कळों आलें यावरी ॥१॥ मागिलांचा झाला झाडा। त्या निवाडास्तव हे ॥२॥ विसांवलें अंग दिसे। सरिसे सरिसें अनुभवें ॥३॥ तुका म्हणे बरें झालें। देवें नेलें गवसूनी ॥४॥

२७५०. चक्रफेरीं गळीं गळा। होता गोवियेला माळा ॥१॥ फुटोनियां गेला कुंभ। झालों निष्काम स्वयंभ ॥२॥ धरितचि नाहीं थारा। वेठी भ्रमण खोंकरा ॥३॥ तुका म्हणे कोडें। आगी काय जाणे मढें ॥४॥

२७५१. श्रमपरिहारां। मूळ झालों दातारा ॥१॥ देह निवेदूनि पायीं। झालों निष्काम

उतराई ॥२॥ आपली ते सत्ता । येथें असों नेदी आतां ॥३॥ राहिला निराळा । तुका खटपटी वेगळा ॥४॥

२७५२. पाठवाल तेथें गर्जेन पवाडे । कांहीं देहाकडे नावलोकीं ॥१॥ म्हणउनि मागें कंठींचा सौरस । पावतील नाश विघ्नें पुढें ॥२॥ कृपेच्या कटाक्षें न भें कळिकाळा । येतां येत बळा शक्ती पुढें ॥३॥ तुका म्हणे गुढी आणीन पायांपें । होईल तें सोपें नाम तुझें ॥४॥

२७५३. उपजल्या काळें शुभ कां शकुन । आतां आवरोन राहिलेती ॥१॥ नाहीं मागितली वचनाची जोडी । निष्काम रोकडी वरिवरि ॥२॥ सत्याविण काय उगीच लांबणी । कारियाची वाणी येर भूस ॥३॥ तुका म्हणे ऐसी कोणा चाळवणी । न विचारा मनीं पांडुरंगा ॥४॥

२७५४. नव्हें मी आहाच आशेचें बांधलें । जें हें टोंकविलें नारायणें ॥१॥ अंतर तों तुम्हा बरें कळों येतें । वेव्हार उचितें चाळवीजे ॥२॥ मनें कल्पिलें तें आवरितां पाप । संकल्पी विकल्प याचि नांवें ॥३॥ तुका म्हणे आम्हां न सोसे जळजळ । सिजल्यावरी जाळ कढ खोटा ॥४॥

२७५५. ताकें कृपण तो जेवूं काय घाली । आहाच ते चालीवरी कळे ॥१॥ काय तुम्हां वेच घातलें सांकडें । माझें आलें कोडें आजिवरि ॥२॥ सेवेविण आम्ही न लिंपो त्या कार्या । झाला देवराया निर्धार हा ॥३॥ तुका म्हणे तुझीं राखावया ब्रीदें । येणें अनुवादें गर्जतसें ॥४॥

२७५६. वृत्तीवरी आम्हां येणें काशासाठीं । एवढी हे आटी सोसावया ॥१॥ जाणतसां परी नेणते जी देवा । भ्रमूचि बरवा राखावा तो ॥२॥ मोडुनि क्षरलों अभेदाची मूस । तुम्हा कां आळस वोढवला ॥३॥ तुका म्हणे होईं लवकरि उदार । लांबणीचें फार काम नाहीं ॥४॥

२७५७. सुलभ कीर्तन दिलें ठसावूनि । करितां धरणी उरी कोण ॥१॥ आतां न टळावें केलिया नेमासी । उदाराचा होसी हीन काय ॥२॥ एका नेमें कोठें दुसरा पालट । पादर तो धीट म्हणती त्यासी ॥३॥ तुका म्हणे किती बोलसील उणें । एकाच वचनें खंड करीं ॥४॥

२७५८. जेथें माझी दृष्टि राहिली बैसोन । तेथेंचि हें मन गुंडाळतें ॥१॥ टाळावी ते पीडा आपणापासून । दिठावलें अन्न ओकवितें ॥२॥ तुम्हांसी कां कोडें कोणीये विशीचें । नवलाव याचें वाटतसे ॥३॥ तुका म्हणे वेगीं उभारा जी कर । कीर्ति मुखें थोर गर्जईन ॥४॥

२७५९. इच्छेपाशीं आलों फिरोनि मागुता । स्वामीसेवकता आवडीचे ॥१॥ द्यावें लवकरी मागितलें दान । मुळींचे जतन करुनी असें ॥२॥ उपाय हे करीं एकाचि वचना । दावूनियां खुणा ठाया येतों ॥३॥ तुका म्हणे गांठी किती तुजपाशीं । जगाच्या तोडिसी चिंतनानें ॥४॥

२७६०. कोठें आम्ही आतां वेचावी हे वाणी । कोण मना आणी जाणोनियां ॥१॥ न करावी सांडी आतां टाळाटाळी । दैन हे कळी होईल माझी ॥२॥ घरोघरीं झाल्या ज्ञानाचिया गोष्टी । सत्यासवें गांठी न पडावी ॥३॥ तुका म्हणे आम्हां भाकितां करुणा । भलताचि

शाहाणा शोध काढी ॥४॥

२७६१. डगमगी मन निराशेच्या गुणें। हें तों नारायणें शांतवीजे ॥१॥ धीर तूं गंभीर जीवन जगाचें। जळो विभागाचें अहाच ते ॥२॥ भेईल जीव हे देखोनि कठीण। केला जातो सीण तो तो वांयां ॥३॥ तुका म्हणे आवश्यक हें वचन। पाळावेंचि दान समयो आहे ॥४॥

२७६२. आम्ही पहा कैसीं एकतत्त्वीं झालों। राखणे लागलों वासनेसी ॥१॥ तुम्हांविण कांहीं नावडे या जीवा। केला तोचि देवा दृढ पण ॥२॥ वर्म नेणों परि वृत्ति भंगों नेदूं। वंदिलेंचि वंदूं आवडीनें ॥३॥ तुका म्हणे केलें नामाचें जीवन। वारताही भिन्न नेणों आतां ॥४॥

२७६३. आपण तों असा। समर्थ जी हृषीकेशा ॥१॥ करा करा बुझावणी। काय विलंब वचनीं ॥२॥ हें घे ऐसें म्हणा। उठूनि लागेन चरणा ॥३॥ घेउनियां सुखें। नाचे तुका कवतुकें ॥४॥

२७६४. द्याल ऐसें दिसे। तुमचें साचपण इच्छे ॥१॥ म्हणऊनि न भंगे निर्धार। केले लोचन सादर ॥२॥ मुखाचीच वास। पुरला पाहे अवकाश ॥३॥ तुका म्हणे कळे। काय लाभ कोणे वेळे ॥४॥

२७६५. तुम्ही तों सदैव। अधीरपणें माझी हांव ॥१॥ जळो आशेचें तें जिणें। टोंकतसावें दीनपणें ॥२॥ येथूनि सोडवा। आतां अनुभवें देवा ॥३॥ तुका म्हणे झालें। एक मग हें निमालें ॥४॥

२७६६. कैसे भले देवा अनुभवा कां नये। उशीर तो काय तुम्हांपाशीं ॥१॥ आहे तें मागतों दिसतें जवळी। केल्यामध्यें कळि कोण साध्य ॥२॥ नाहीं सांडीत मी सेवेची मर्यादा। लाविला तो धंदा नित्य करीं ॥३॥ तुका म्हणे हात आवरिला गुंती। माझे तंव चित्तीं नाहीं दुजें ॥४॥

२७६७. हुंदकी पिसवी हलवितो दाढी। माळे मणी ओढी निंदेचे ते ॥१॥ त्याचें फळ पाकीं यमाचे ते दंड। घर केलें कुंड कुंभपाकीं ॥२॥ क्रोध पोटीं मांग आणिला अंतरा। भुंकोनि कुतरा जप करी ॥३॥ तुका म्हणे स्नान केलें मळमूत्रें। जेविलीं पितरें अमंगळें ॥४॥

२७६८. अंगीं भरला ताठा। नये वळणी जैसा खुंटा ॥१॥ कैसें न कळे त्या डेंगा। हित आदळलें अंगा ॥२॥ जीव जाते वेळे। भल्या कडे ताठी डोळे ॥३॥ मुसळाचें अनु। तुका म्हणे नव्हे धनु ॥४॥

२७६९. करूनि कडबिड। जमा घडिला लगड ॥१॥ होतें तेंचि झालें। नाम ठायींचें पडिलें ॥२॥ उतरलें डाईं। उत्तम सुलाख ते ताई ॥३॥ हिंडवितां देशोदेश। तुका म्हणे नाहीं नाश ॥४॥

२७७०. पढीये तें मागा पांडुरंगापाशीं। मज दुर्बळासी काय पीडा ॥१॥ याचसाठीं दुराविला संवसार। वाढे हे अपार माया तृष्णा ॥२॥ कांहीं करितां कोठें नव्हे समाधान। विचारितां पुण्य तेंचि पाप ॥३॥ तुका म्हणे आतां निश्चळचि भलें। तुज आठविलें पांडुरंगा ॥४॥

२७७१. नव्हें मी शाहाणा । तरी म्हणा नारायणा ॥१॥ तुम्हां बोलावया कांहीं । येच भरलोंसे वाहीं ॥२॥ आणावे ते रूपा । कोपलेती तरी कोपा ॥३॥ कळोनि आवडी । तुका म्हणे जाते घडी ॥४॥

२७७२. आम्ही भाविक हे काय जाणों खोडी । आइकोनि प्रौढी विनविलें ॥१॥ नाहीं ऐसें येथें झालेती असतां । वाढविली चिंता अधिक सोस ॥२॥ न कळेचि आधीं करितां विचार । न धरितां धीर आहाचता ॥३॥ तुका म्हणे आतां वचनें वचन । वाढलें तिक्षण बुद्धि झाली ॥४॥

२७७३. कोठें देवा बोलों । तुम्हां भीड घालूं गेलों ॥१॥ करावया सत्वहानी । भांडवलाची टांचणी ॥२॥ दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तला घाता ॥३॥ तुका म्हणे नाहीं । मज कळले ऐसें कांहीं ॥४॥

२७७४. पाहिजे तें आतां प्रमाण प्रत्यक्ष । आलियानें साक्ष खरें खोटें ॥१॥ काय त्या दिवस उचिताचा आला । मागील जो केला श्रम होता ॥२॥ ठेवियली खूण करोनि संकेत । तयापाशीं चित्त लागलेंसे ॥३॥ जाणसी गे माते लेंकराचा लाड । नये पडों आड निष्ठुरता ॥४॥ तुका म्हणे आम्हीं करावें वचन । तुम्हांसी जतन करणें तें ॥५॥

२७७५. पडिला प्रसंग कां मी ऐसा नेणें । संकल्प तें मनें जिरवले ॥१॥ चेष्टविलें तरी सांगावें कारण । भक्ती ते जीवन करावया ॥२॥ लावूनियां दृष्टि घातली सामोरी । बैसली जिव्हारीं डसोन ते ॥३॥ तुका म्हणे जीवा लाविला तो चाळा । करावें गोपाळा शीघ्र दान ॥४॥

२७७६. मागील विसर होईल सकळ । केली तळमळ दुःखाची ते ॥१॥ दोहींचें ऐक्य घालीं गडसंदीं । स्थिरावली बुद्धी पायांपाशीं ॥२॥ अहाच या केलों देहपरिचारें । तुमचें तें खरें वाटों नये ॥३॥ तुका म्हणे व्हावें लवकरी उदार । मी आहें सादर प्रतिग्रहा ॥४॥

२७७७. वाढवावा पुढें आणीक प्रकार । एकचि तें फार रुचि नेदी ॥१॥ निच नवें लेणें देह हा पवाडा । पालट रोकडा वरावरी ॥२॥ दिसे शोभिवंत सेवेनें सेवक । स्वामीची ते लोकत्रयीं कीर्ति ॥३॥ तुका म्हणे आजी पाववा संतोष । करूनि कीर्तिघोष नाचईन ॥४॥

२७७८. क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करुनि ठेवी ॥१॥ क्षणभंगुर ते उमजली चिंता । खरी अखंडिता आवडीची ॥२॥ सिकवूं जाणे ते गोमटियासाठीं । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसी ॥६॥ अवघेंचि मिथ्या समया आरतें । देतां तें उचितें काय जाणे ॥४॥ न करी अव्हेर गांजूं नेदी कोणा । भेडसावी तान्हा हाऊ आला ॥५॥ तुका म्हणे करी जिवासी जतन । दचकूनि मन जवळी आणी ॥६॥

२७७९. संसाराचे धांवे वेठी । आवडी पोटीं केवढी ॥१॥ हागों जातां दगड सांची । अंतरीं हे संकल्प ॥२॥ लाज तेवढी नारायणीं । वांकडी वाणी पोरांपें ॥३॥ तुका म्हणे बेशरमा ।

वरी श्रमा पडिभरू ॥४॥

२७८०. मी त्यांसी अनन्य तीं कोणा असती। ऐसें तंव चित्तीं विचारावें ॥१॥ आहे तो विचार आपणयापाशीं। कळा बिंबाऐसी प्रतिबिंबीं ॥१॥ शुभ शकुन तो शुभ लाभे फळे। पुढील तें कळे अनुभवें ॥३॥ तुका म्हणे माझा असेल आठव। तैसा माझा भाव तुझ्या पायीं ॥४॥

२७८१. बहु कृपावंतें माझीं मायबापें। मी माझ्या संकल्पें अंतरलों ॥१॥ संचितानें नाहीं चुकों दिली वाट। लाविलें अदट मजसवें ॥२॥ आतां मी रुसतों न कळतां वर्म। परी ठावे धर्म सर्व देवा ॥३॥ तुका म्हणे उभा राहिला न बैसे। आमुचिया आसे उद्वेग त्या ॥४॥

२७८२. कैसीं दिसों बरीं। आम्ही आळविता हरि ॥१॥ नाहीं सोंग अळंकार। दास झाला संवसार ॥२॥ दुःख आम्हां नाहीं चिंता। हरिचे दास म्हणवितां ॥३॥ तुका म्हणे देवा। ऐसीं झालों करितां सेवा ॥४॥

२७८३. आतां सांडूं तरी हातीं ना पदरीं। सखीं सहोदरीं मोकलिलों ॥१॥ जनाचारामध्यें उडाला पातेरा। झालों निलाजिरा म्हणवूनि ॥२॥ कोणाचिया दारा जावेनासें झालें। म्यांच विटंबिलें आपणासी ॥३॥ कोण झाला माझे बुद्धीसी संचार। नाहीं कोठें थार ऐसे झालें ॥४॥ तुका म्हणे तुज भक्त झाले फार। म्हणोनियां थार नाहा येथें ॥५॥

२७८४. जेथें जातो तेथें पडतो मतोळा। न देखिजे डोळां लाभ कांहीं ॥१॥ कपाळेंचि रेखा असती उत्तम। तरि कां हा श्रम पावतों मी ॥२॥ नव्हेचि तुम्हांस माझा अंगीकार। थीता संवसार अंतरला ॥३॥ भोग तंव झाला खरा भोगावा तो। भांडवल नेतो आयुष्य काळ ॥४॥ कोठें तुझी कीर्ति आइकिली देवा। मुकतों कां जीवा तुका म्हणे ॥५॥

२७८५. कां जी आम्हां होतें दोषाचें दर्शन। तुज समर्पून देहभाव ॥१॥ पांडुरंगा कृपाळुवा दयावंता। धरसील सत्ता सकळही ॥२॥ कां जी आम्हांवरि आणिकांची सत्ता। तुम्हांसी असतां जवळिके ॥३॥ तुका म्हणे पायीं केलें निवेदन। उचित तें दान करीं सत्ता ॥४॥

२७८६. निंदावें हें जग। ऐसा भागा आला भाग ॥१॥ होतें तैसें आलें फळ। गेलें निवडुनि सकळ ॥२॥ दुसऱ्याच्या मता। मिळेनासें झालें चित्ता ॥३॥ तुका झाला सांडा। विटंबिती पोरें रांडा ॥४॥

२७८७. माझे माथां तुझा हात। तुझे पायीं माझें चित्त ॥१॥ ऐसी पडियेली गांठी। शरीरसंबंधाची मिठी ॥२॥ येरयेरांपाशीं। सांपडोन गेलों ऐसी ॥३॥ तुका म्हणे सेवा। माझी कृपा तुझी देवा ॥४॥

२७८८. सत्य त्यागाचि समान। नलगे वेचावें वचन ॥१॥ नारायणा ऐसे दास। येरयेरांचीच आस ॥२॥ मळ नाहीं चित्ता। तेथें देवाचीच सत्ता ॥३॥ तुका म्हणे जाण।

तेंच भल्याचें वचन ॥४॥

२७८९. माझिये बुद्धीचा खुंटला उपाय । करिसील काय पाहणें तें ॥१॥ सूत्रधारी तूं हें सकळ चाळिता । कासया अनंता भार वाहों ॥२॥ वाहिले संकल्प न पवती सिद्धी । येऊं देहबुद्धीवरि नये ॥३॥ तुका म्हणे दु:खी करिती तरंग । चिंतूं पांडुरंग आवरूनी ॥४॥

२७९०. देखिलें तें धरिन मनें । समाधानें राहेन ॥१॥ भाव माझी सांठवण । जगजीवन कळावया ॥२॥ वोळवीन एकसरें । उत्तरें या करुणेच्या ॥३॥ तुका म्हणे न योन रूपा । काय बापा करिसील ॥४॥

२७९१. वांयां जाय ऐसा । आतां उगवावा फांसा ॥१॥ माझें परिसावें गाऱ्हाणें । सुखदु:खांचीं वचनें ॥२॥ हाचि आम्हां ठाव । पायीं निरोपाया भाव ॥३॥ तुका म्हणे जार । तुझा तुज देवा भार ॥४॥

२७९२. खादलेंच खावें वाटे । भेटलें भेटे आवडी ॥१॥ वीट नाहीं पांडुरंगीं । वाढे अंगीं आर्त तें ॥२॥ हृदयाची हांव पुरे । परि हें उरे चिंतन ॥३॥ तुका म्हणे पोट भरे । परि ते उरे भूक पुढें ॥४॥

२७९३. सत्य आठवितां देव । जातो भेव पळोनि ॥१॥ नलगे काहीं करणें चिंता । धरीं सत्ता सर्व तो ॥२॥ भावें भाव राहे पायीं । देव तै सन्निध ॥३॥ तुका म्हणे कृष्णनामें । शीतळ प्रेमें सर्वांसी ॥४॥

२७९४. ब्रीद ज्याचें जगदानी । तोचि मनीं स्मरावा ॥१॥ सम पाय कर कटी । उभा तटीं भींवरेच्या ॥२॥ पाहिलिया वेध लावी । बैसे जीवीं जडोनि ॥३॥ तुका म्हणे भक्तिकाजा । धांवे लाजा लवलाहें ॥४॥

२७९५. माझिया मनाची बैसली आवडी । अवसान घडी एकी नेघे ॥१॥ पाय चित्तीं रूप डोळांच बैसलें । चिंतनें गोविलें मुख सदा ॥२॥ अवघियांचा झाला विसरु हा मागें । वेध हा श्रीरंगें लावियेला ॥३॥ तुका म्हणे कानीं आइकिली मात । तोचि झाला घात जीवपणा ॥४॥

२७९६. याची कोठें लागली चट । बहु तंट झालेंसे ॥१॥ देवपिसी देवपिसी । मज ऐसी जग म्हणे ॥२॥ एकांताचें बाहेर आलें । लपविलें झांकेना ॥३॥ तुका म्हणे याचे भेटी । झाली तुटी आपल्यासी ॥४॥

२७९७. दीन आणि दुर्बळांसीं । सुखरासी हरिकथा ॥१॥ तारूं भवसागरींचें । उंचनीच अधिकारी ॥२॥ चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ॥३॥ तुका म्हणे आवडी धरीं । कृपा करी म्हणऊनी ॥४॥

२७९८. संतोषे माउली आरुषा वचनीं । वोरसोनि स्तनीं लावी बाळा ॥१॥ तैसें प्रेमळाचें

अवघेंचि गोड । पुरवितो कोड पांडुरंग ॥२॥ सेवा करी साहे निष्ठुर उत्तरें । त्याचे वाहे बरें तेंची मनीं ॥३॥ तुका म्हणे इच्छावसे खेळे खेळ । चिंता ते सकळ कांहीं नेणें ॥४॥

२७९९. विनविजे ऐसे कांहीं । उरले नाहीं यावरि ॥१॥ आतां असो पंढरीनाथा । पायीं माथां तुमचिये ॥२॥ माग सारियेली युक्ती । कांहीं होती जवळी ते ॥३॥ निराशेची न करी आस । तुका दास माघारी ॥४॥

२८००. आतां येथें झाली जीवा संवसाटी । होतें तैसें पोटीं फळ आलें ॥१॥ आतां धरिले ते न सोडी चरण । सांपडलें धन निजठेवा ॥२॥ आतां हा आळस असो परता दुरी । नेदावी ते उरी उरों कांहीं ॥३॥ आतां याचा मज न व्हावा विसर । भरोनी अंतर राहो रूप ॥४॥ आतां लोकलाज नयो येथें आड । बहु झाला गोड ब्रह्मरस ॥५॥ तुका म्हणे आतां जन्म हा सफळ । अंतरीं गोपाळ स्थिरावला ॥६॥

२८०१. अनंतां जीवांचीं तोडिलीं बंधनें । मज काळें येणें कृपा कीजे ॥१॥ अनंत पवाडे तुझे विश्वंभरा । भक्त करुणाकरा नारायणा ॥२॥ अंतरींचें कळों देईं गुह्य गुज । अंतरींचें बीज राखेन मी ॥३॥ समदृष्टी तुझीं पाहीन पाउलें । धरीन संचले हृदयांत ॥४॥ तेणें या चित्ताची राहील तळमळ । होतील शीतळ सकळ गात्रें ॥५॥ तुका म्हणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ॥६॥

२८०२. पराधीन माझें करूनियां जीणें । सांडी काय गुणें केली देवा ॥१॥ उदार हे कीर्ति असे जगामाजी । कां तें ऐसें आजि पालटिलें ॥२॥ आळवितों परी न पुरेचि रीघ । उचित तो त्याग नाहीं तुम्हां ॥३॥ तुका म्हणे कां बा मुळींच व्यालासी । ऐसें कां नेणसी पांडुरंगा ॥४॥

२८०३. नेणपणें केला नाहीं हा बोभाट । आतां आली वाट कळों खरी ॥१॥ आतां बहु शीघ्र यावें लवकरी । वाट पाहें हरी भेटी देईं ॥२॥ समर्थाच्या बाळा करुणेचें भाषण । तरी त्याची कोण नांदणूक ॥३॥ तुका म्हणे बहु बोलिले बडिवार । पडिलें अंतर लौकिकीं तें ॥४॥

२८०४. जें जें केलें तें तें साहे । कैसे पाहें भाविक ॥१॥ ओंवाळूनि माझी काया । सांडिली यावरूनि ॥२॥ काय होय नव्हे करूं । नेण धरूं सत्ता ते ॥३॥ तुका म्हणे कटीं कर । उभें धीर धरूनि ॥४॥

२८०५. नाहीं मज कृपा केली पांडुरंगें । संतांचिया संगें पोट भरीं ॥१॥ चतुराचे सभे पंडित कुशळ । मी काय दुर्बळ विष्णुदास ॥२॥ तुका म्हणे नेणें करूं समाधान । धरिले चरण विठोबाचे ॥३॥

२८०६. तुम्ही माझा देवा करा अंगीकार । हा नाहीं विचार मजपाशीं ॥१॥ आतां दोहीं पक्षीं लागलें लांछन । देवभक्तपण लाजविलें ॥२॥ एकांतीं एकलें न राहे निश्चळ । न बैसे

चपळ मन ठायीं ॥३॥ पायीं महत्त्वाची पडिला शृंखळा । बांधविला गळा स्नेहा हातीं ॥४॥ शरीर सोकलें देखिलिया सुखा । कदान्न हें मुखा रुचेचिना ॥५॥ तुका म्हणे झाला अवगुणांचा थारा । वाढली हे निद्रा आळस बहु ॥६॥

२८०७. बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत । देवा नाहीं होत हित तेथें ॥१॥ कवतुक तुझें नकळे यापरी । घेसील तें शिरीं काय नव्हे ॥२॥ नाहीं मिळों येत संतांचिया मता । पुराणीं पाहतां अघटित ॥३॥ तुका म्हणे पायीं निरोपिला भाव । न्याल तैसा जावो सिद्धी देवा ॥४॥

२८०८. हा तो नव्हता दीन । टाळायाचा ऐसा क्षण ॥१॥ कां जी नेणों राखा हात । कैसें देखावें रडत ॥२॥ दावूनियां आस । दूर पळवितां काशास ॥३॥ तुका म्हणे धांव । येतां न पुरेचि हांव ॥४॥

२८०९. लावुनियां गोठी । चुकवूं आदरिली दिठी । देउनियां मिठी । पळे महिया माथुले ॥१॥ पुढें तेचि करी आड । तिचा लोभ तिसी नाड । उरवी चरफड । हात गोऊनि पळावें ॥२॥ आधीं काकुलती । मोहो घालावा पुढती । तोंडीं पडे माती । फिरतां मग कैंचा तो ॥३॥ तुका म्हणे देवा । यासी रडवी याचा हेवा । भावें कां हे सेवा । सुखें तुम्हां नार्पिती ॥४॥

२८१०. आर्तभूतां द्यावें दान । खरें पुण्य त्या नांवें ॥१॥ होणार तें सुखें घडो । लाभ जोडो महाबुद्धि ॥२॥ सत्य संकल्पाचे साटीं । उजळा पोटीं रविबिंब ॥३॥ तुका म्हणे मनीं वाव । शुद्ध भाव राखावा ॥४॥

२८११. कवतुकवाणी बोलतसें लाडें । आरुष वांकडें करूनि मुख ॥१॥ दुजेपणीं भाव नाहीं हे आशंका । जननीबाळकामध्यें भेद ॥२॥ सलगी दुरूनि जवळी पाचारूं । धांवोनियां करूं अंगसंग ॥३॥ धरूनि पालव मागतों भातुकें । आवडीचें निकें प्रेमसुख ॥४॥ तुका म्हणे तुज आमचीच गोडी । ऐसी हे आवडी कळों आली ॥५॥

२८१२. ऐक पांडुरंगा वचन माझें एक । झालों मी सेवक दास तुझा ॥१॥ कळे तैसा आतां करावा उद्धार । खुंटला विचार माझा पुढें ॥२॥ दंभ मान माझा करूं पाहे घात । झालियाही थीत कारणाचा ॥३॥ हीन बुद्धि माझी अधम हे याती । अहंकार चित्तीं वसों पाहे ॥४॥ तुका म्हणे मज विघडतां क्षण । नलगे जतन करीं देवा ॥५॥

२८१३. जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं । अखंड तें देईं प्रेम सुख ॥१॥ देहभाव राखा दीन करूनियां । जनाचारी वांयां जाय तैसा ॥२॥ द्रव्य दारा नको मानाची आवडी । कवणेविशीं गोडी प्रपंचाची ॥३॥ तुझें नाम माझें धरूनियां चित्त । एकांत लोकांत सदा राहो ॥४॥ तुका म्हणे तुझे जडोनियां पायीं । झालों उतराई पांडुरंगा ॥५॥

२८१४. काय सांगो आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥१॥ काय द्यावें त्यासीं

व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥२॥ सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥३॥ तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥४॥

२८१५. आपण चाळक बुद्धीच्या संचारा । आम्हांसी वेव्हारा पात्र केलें ॥१॥ काय झालें तरी नेघा तुम्ही भार । आणीक कोणां थोर म्हणों सांगा ॥२॥ पंचभूतें तव चर्माचिया मोटा । येथें खरा खोटा कोण भाव ॥३॥ तुका म्हणे नाहीं बोलावया जागा । कां देवा वाउगा श्रम करूं ॥४॥

२८१६. एका एक वर्में लावूनिया अंगीं । ठेवितों प्रसंगीं सांभाळीत ॥१॥ नेघावा जी आम्हीं वाव बहु फार । धरूनि अंतर ठायाठाव ॥२॥ वेव्हारें आलें तें समानचि होतें । बळ नाहीं येथें चालों येत ॥३॥ तुका म्हणे आतां निवाड्याच साटीं । संसारें तुटी करुनि ठेलों ॥४॥

२८१७. आतां येथें खरें । नये फिरतां माघारें ॥१॥ होय तैसी हो आबाळी । देहनिमित्य या बळी ॥२॥ तुम्हांसवें गांठीं । देवा जीवाचिये साटीं ॥३॥ तुका म्हणे लंड । करूं चौघांमध्यें खंड ॥४॥

२८१८. कां हे वाढवितां देवा । मज घरींच समजावा । केवढा हो गोवा । फार केलें थोड्याचें ॥१॥ ठेवीन पायांवरी डोई । यासी तुमचें वेचे काई । झालों उतराई । जाणा एकएकांचे ॥२॥ निवाड आपणियांपाशीं । असोन कां व्हावें अपेसी । होती गांठी तैसी । सोडूनियां ठेविली ॥३॥ तुका म्हणे गोड । होतें झालिया निवाड । दर्शनेंही चाड । आवडीच वाढेल ॥४॥

२८१९. नव्हों सभाधीट । समोर बोलायाचें नीट । एकलीं एकट । दुजें नाहीं देखिलें ॥१॥ आतां अवघें तुम्ही जाणां । तुमचें माझें नारायणा । येईल करुणा । तेचि पहा तुम्हांसी ॥२॥ ताळ नाहीं माझे बुद्धी । धरली न धरवे शुद्धि । आतां बळ कधीं । कोण्या जन्में निवाड ॥३॥ आतां शेवटीचें । उत्तर हेंचि साचें । शरण आलें त्याचें । तुका म्हणे सांभाळा ॥४॥

२८२०. ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ॥१॥ मागत्याची टाळाटाळी । झिंज्या ओढोनि कपाळीं ॥२॥ नसेल ना नवें । ऐसें धरियेलें देवें ॥३॥ तुका म्हणे झाला । उशीर नाहीं तो विठ्ठला ॥४॥

२८२१. माझ्या कपाळाच्या गुणें । किंवा सरलेंसें नेणें ॥१॥ नये वचन बाहेरी । उभें तिष्ठतसें दारीं ॥२॥ काय सांगा यास वेचे । रितें आरंभीं ठायींचे ॥३॥ तुका म्हणे किती । भीड धरावी पुढती ॥४॥

२८२२. कांहीं एक तरी असावा आधार । कासयानें धीर उपजावा ॥१॥ म्हणविल्यासाठीं कैसें पडे रुजू । धणीं नाहीं उजू सन्मुख तो ॥२॥ वेचल्या दिसांचा कोणावरी लेखा । घालावा हा सुखासुखें आम्ही ॥३॥ नाहीं मनोगत तोंवरि हे देवा । तुका म्हणे सेवा नेघेजेतो ॥४॥

२८२३. मनाचिये साक्षी झाली सांगों मात । सकळ वृत्तांत आपला तो ॥१॥ तुम्हां परामृष घेतां सत्ताबळें । धरितां निराळें कैसीं वाचों ॥२॥ मी माझें सांडून यावया पसारा । आणीक दातारा काय काज ॥३॥ तुका म्हणे आम्ही तुजविण एका । निढळ लौकिका माजी असों ॥४॥

२८२४. उरलें तें भक्तिसुख । डोळां मुख पाहावें ॥१॥ अंतरींचें कां हो नेणां । नारायणा माझिया ॥२॥ पुरवा तैसी केली आळी । बळी जगदानिया ॥३॥ हातीं घेउनि चोरां भातें । दावा रितें बाळका ॥४॥ साजत हें थोरपण । नाहीं दीनवत्सला ॥५॥ शाहणें तरी लाड दावी । बाळ जेवीं मातेसी ॥६॥ तुका म्हणे पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ॥७॥

२८२५. तरी भलें वांयां गेलों । जन्मा आलों मागुता ॥१॥ म्हणऊनि ठेलों दास । सावकास निर्भय ॥२॥ उणें पुरें काय माझें । त्याचें ओझें तुम्हांसी ॥३॥ सांभाळावें तें म्यां काई । अवो आई विठ्ठले ॥४॥ भोग जया जाइन स्थळा । तुज गोपाळा विसरेंना ॥५॥ आपलें म्यां एकसरें । करुनि बरें घेतलें ॥६॥ तुका म्हणे नारायणा । आतां जाणा आपुलें ॥७॥

२८२६. घालूनी लोळणी पडलों अंगणीं । सिंचा सिंचवणी तीर्थवरी ॥१॥ वोल्हावेल तनु होईल शीतळ । झाली हळहळ बहुतापें ॥२॥ पावेन या ठाया कईं झालें होतें । आलों अवचितें उष्ट्यावरि ॥३॥ तुका म्हणे कोणी जाणवा राउळीं । येईल जवळी पांडुरंग ॥४॥

२८२७. धरूनि हें आलों जीवीं । भेटी व्हावी विठोसी ॥१॥ संकल्प तो नाहीं दुजा । महाराजाविण तो ॥२॥ पायांवरि ठेविन भाळ । येणें सकळ पावलों ॥३॥ तुका म्हणे डोळेभरी । पाहिन हरी श्रीमुख ॥४॥

२८२८. तुम्हां उद्धरणें फार । मज दुसरी नाहीं थार ॥१॥ आतां जैसें तैसें सोसा । काय करणें हृषीकेशा ॥२॥ बरें न दिसेल ओळी । एका अन्न एका गाळी ॥३॥ लावितां आभार । तुका विसरलेती फार ॥४॥

२८२९. न कळे जी भक्ती काय करूं सेवा । संकोचोनि देवा राहिलोंसें ॥१॥ जोडोनियां कर राहिलों निवांत । पायांपाशीं चित्त ठेवूनियां ॥२॥ दिशाभुली करीं स्थळीं प्रदक्षणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ॥३॥ तुका म्हणे झालों आज्ञेचा पाळक । जीवनासी एक ठाव केला ॥४॥

२८३०. एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणींच हरी विस्मृति हे ॥१॥ कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेंसी ॥२॥ न राहे निश्चळ जागवितां मना । किती क्षणक्षणा सावरावें ॥३॥ तुका म्हणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीव रंगलासे ॥४॥

२८३१. आतां सोडवणें न या नारायणा । तरि मी वांचेना काळा हातीं ॥१॥ ऐसें सांगोनियां झालों उतराई । आणीक तें काई माझे हातीं ॥२॥ केलियाचें माप न ये सेवटासी । करितील नासि अंतराय ॥३॥ तुका म्हणे भय वाटतसे जीवा । धांवणिया धांवा लवकरी ॥४॥

२८३२. सत्य माप वाढे । गाबाळाची चाली खोडे ॥१॥ उतरे तें न कळे कसीं । विखरोन सर्वदेशीं ॥२॥ घरामध्यें राजा । नोहे व्हावी पट्टपूजा ॥३॥ तुका म्हणे साचें । रूप तें दर्पणींचें ॥४॥

२८३३. नाहीं खंड झाला । माझा तुमचा विठ्ठला ॥१॥ कैसें कैसें हो दुश्चित । आहे चौघांपाशीं नीत ॥२॥ मुळींचें लिहिलें । मज आतां सांपडलें ॥३॥ तुका म्हणे मज । नलगे बोलणें सहज ॥४॥

२८३४. हेचि वादकाची कळा । नाहीं येऊ देत बळा ॥१॥ धीर करावा करावा । तरी तो आहे आम्हां देवा ॥२॥ रिघावें पोटांत । पायां पडोन घ्यावा अंत ॥३॥ तुका म्हणे वरी । गोडा आणावा उत्तरीं ॥४॥

२८३५. एक परि बहिरे बरे । परि तीं ढोरें ग्यानगंडें ॥१॥ कपाळासी लागली आगी । अभागी कां जीतसे ॥२॥ एक परि बरें वेडें । तर्की कुडें जळो तें ॥३॥ तुका म्हणे खातडवासी । अमृतासी नोळखे ॥४॥

२८३६. खेळों मनासवें जीवाच्या संवादें । कौतुकें विनोदें निरंजनीं ॥१॥ पचीं पडिलें तें रुचे वेळोवेळां । होतसे डोहळा आवडीसी ॥२॥ एकांताचें सुख जडलें जिव्हारीं । वीट परिचारीं बरा आला ॥३॥ जगा ऐसी बुद्धि नव्हे आतां कदा । लंपट गोविंदा झालों पायीं ॥४॥ आणिक ते चिंता नलगे करावी । नित्य नित्य नवी आवडी हे ॥५॥ तुका म्हणे धडा राहिला पडोन । पांडुरंगीं मन विसांवलें ॥६॥

२८३७. झाली झडपणी खडतर देवा । संचरली आतां निघों नये ॥१॥ मज उपचार झणीं आतां करा । न साहे दुसरा भार कांहीं ॥२॥ नेऊनियां घाला चंद्रभागे तिरीं । जीवा नाहीं उरी कांहीं आतां ॥३॥ तुका म्हणे कळों आलें वर्तमान । माझें तों वचन आच्छादलें ॥४॥

२८३८. अंगीं देवी खेळे । कां रे तुम्हांसी न कळे । कोणाचे हे चाळे । सुख दुःख न मानितां ॥१॥ मी तों आतां येथें नाहीं । ओळखी वचनाच्या ठायीं । पालटाच घेईं । भाव खरा लोपे ना ॥२॥ आपुलाले तुम्ही पुसा । सोवा पेव्याच सरिसा । स्थिरावल्या कैसा । काय जाणों विचार ॥३॥ तुका म्हणे लाभकाळ । तेथें नसावें शीतळ । मग तैशी वेळ । कोठें जाते सांपडो ॥४॥

२८३९. उचिताचा काळ । साधावया युक्तिबळ । आपलें सकळ । ते प्रसंगीं पाहिजे ॥१॥ नेम नाहीं लाभ हानि । अवचित घडीती दोनी । विचारूनि मनीं । पाहिजें तें प्रयोजावें ॥२॥ जाळा जाळा काळें । करपों नेदावें आगळ । जेवितां वेगळे । ज्याचे त्याचें तेथें शोभे ॥३॥ पाळी नांगर पाभारीं । तन निवडूनि सोंकरी । तुका म्हणे घरीं । सेज जमा सेवटीं ॥४॥

२८४०. पडिलिया ताळा । मग अवघा निर्वाळा । तेथें कोणी बळा । नाहीं येत कोणासी ॥१॥ जोडिलें तें लागे हातीं । आप आपलीं निश्चिंती । हर्ष आणि खंती । तेथें दोनी नासली ॥१॥

सहज सरलिया कारण । मग एकला आपण । दिसे तरी भिन्न । वचनाचा प्रसंग ॥३॥ करूनि झाडा पाडा । तुका वेगळा लिगाडा । निश्चिंतीच्या गोडा । गोष्टी म्हूण लागती ॥४॥

२८४१. जो वितो तो माझा पिता । उखता तो उखत्याचा ॥१॥ जनार्दनीं सरती कर्में । बाधा भ्रमे अन्यत्र ॥२॥ अपसव्य सव्यामधीं । ऐसी शुद्धी न धरितां ॥३॥ तुका म्हणे खांद्या पानें । सिंचितां भिन्न कोरडीं ॥४॥

२८४२. माउलीची चाली लेंकराचे ओढी । तयालागीं काढी प्राण प्रीती ॥१॥ ऐसी बळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभावा विनवितों ॥२॥ मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त । विसरु तो घेत नाहीं क्षण ॥३॥ तुका म्हणे दिला प्रेमाचा वोरस । सांभाळिले दास आपुले ते ॥४॥

२८४३. केवढा तो अहंकार । माझा तुम्हां नव्हे दूर ॥१॥ आतां कोण पडे पायां । तुमच्या अहो पंढरिराया ॥२॥ कां जी कृपेनें कृपण । वेचतसे ऐसें धन ॥३॥ तुका म्हणे देवें । दुजियाचें पोतें न्यावें ॥४॥

२८४४. अपराधी म्हणोन येतों काकुलती । नाहीं तरी होती काय चाड ॥१॥ येईल तारूं तरी तारी जो जी देवा । नाहीं तरी सेवा घ्यावी भार ॥२॥ कासया मी आतां वंचूं हें शरीर । आहें बारगीर जायजणें ॥३॥ तुका म्हणे मन करूनि मोकळें । आहें साळेंढाळें उदार तें ॥४॥

२८४५. माझे तों फुकाचे काय वेचे कष्ट । नव्हे क्रियानष्ट तुम्हां ऐसा ॥१॥ कांहींच न वंचीं आजिच्या प्रसंगीं । सकळाही अंगीं करीन पूजा ॥२॥ द्यावें तुम्हीं कांहीं हे तों नाहीं आस । असों या उदास देहभावें ॥३॥ तुका म्हणे माझी मावळली खंती । समाधान चित्तीं सर्वकाळ ॥४॥

२८४६. स्वामीचिया सत्ता । आधीं वर्में येती हाता । पुढती विशेषता । लाभें लाभ आगळा ॥१॥ करीं कवतुकाचे बोल । परि जिव्हाळ्याची ओल । आवडे रसाळ । मायबापा लाडाचें ॥२॥ मन मेळविलें मना । नाहीं अभावी शहाणा । अंतरींच्या खुणा । वरि दिल्या उमटोनि ॥३॥ पराश्रमें काळा । अवघ्या जागविल्या वेळा । देवासी निराळा । तुका क्षण न सोडी ॥४॥

२८४७. एके ठायीं अन्नपाणी । ग्रासोग्रासीं चिंतनीं ॥१॥ वेळोवेळां जागवितों । दुजें येइल म्हूण भीतों ॥२॥ नाहीं गुंतत उपचारीं । मानदंभाचे वेव्हारीं ॥३॥ तुका झालासे शहाणा । आड लपे नारायणा ॥४॥

२८४८. वैरागरापाशीं रत्नाचिया खाणी । हेचि घ्यावी धणी फावेल तों ॥१॥ येथें नाहीं तर्कवितर्काची चाड । होतसे निवाड खऱ्याखोट्या ॥२॥ उगाच सारावा वाढिला तो ठाव । वाढितीया भाव कळतसे ॥३॥ उगाच सारावा वाढिला तो ठाव । वाढितिया भाव कळतसे ॥३॥ तुका म्हणे नव्हे टांचणीचें पाणी । येथें झरवणी जैशा तैसें ॥४॥

२८४९. समर्थ या नांवें दीनांचा कृपाळ । हें तंव सकळ स्वामीअंगीं ॥१॥ मज काय लागे

करणें विनवणी । विदित चरणीं सकळ आहे ॥२॥ दयासिंधु तुम्हां भांडवल दया । सिंचावें आतां या कृपामृतें ॥३॥ तुका म्हणे अहो पंढरीनिवासे । बहु जीव आसे लागलासे ॥४॥

२८५०. लेखिलें कवित्व माझे सहज बोल । न लगेचि ओल जिव्हाळ्याची ॥१॥ नयेचि उत्तर कांहीं परतोनि । झालों नारायणें न सरतें ॥२॥ लाजिरवाणी कां वदली हे वाचा । नव्हेचि ठायींचा मननशीळ ॥३॥ तुका म्हणे फळ नयेचि सायासा । पंढरीनिवासा काय झालें ॥४॥

२८५१. येणें झाला तुझ्या पोतडीचा झाडा । केलासी उघडा पांडुरंगा ॥१॥ भरूनियां घरीं राहिलों वाखती । आपुली निश्चिती आपुल्यापें ॥२॥ आतां काय उरी उरली ते सांगा । आणिलेति जगाचिया साक्षी ॥३॥ तुका म्हणे कोठें पाहों जासी आतां । माझी झाली सत्ता तुम्हांवरी ॥४॥

२८५२. तुमच्या पाळणा ओढतसे मन । गेलों विसरोन आपणासी ॥१॥ लागेल पालटे फेडावें उसणें । येणेंचि प्रमाणें पांडुरंगा ॥२॥ तुमचे आवडी संबंधाचा त्याग । घेतलासे लाग जगनिंदा ॥३॥ तुका म्हणे जैसा माझा जीव ओढे । तैसेंचि तिकडे पाहिजेल ॥४॥

२८५३. नाहीं मज कोणी उरला दुर्जन । मायबापाविण ब्रह्मांडांत ॥१॥ कासया जिकीर करणें येविसीं । भयाची मानसीं चिंता खंती ॥२॥ विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । सत्तेनें ती चाली आपुलिये ॥३॥ तुका म्हणे माझें पाळण पोषण । करितां आपण पांडुरंगा ॥४॥

२८५४. मज कांहीं सीण न व्हावा यासाठीं । कृपा तुम्हां पोटीं उपजली ॥१॥ होतें तैसें केलें आपलें उचित । शिकविलें हित बहु बरें ॥२॥ आम्हीं न मनावी कोणाची आशंका । तुम्हां भय लोकां आहे मनीं ॥३॥ तुका म्हणे आतां संचिताचा ठेवा । वोढवला घ्यावा जैसा तैसा ॥४॥

२८५५. कोणाचें चिंतन करूं ऐशा काळें । पायांचिया बळें कंठीतसे ॥१॥ पाहातसें वाट येईंगा विठ्ठला । मज कां हा केला परदेश ॥२॥ बहुतांचे सत्ते झालों कासावीस । जाय रात्रंदिवस वैरियांचा ॥३॥ तुका म्हणे बैसे मनाचिये मुळीं । तरीच हीं जाळीं उगवती ॥४॥

२८५६. कां जी तुम्ही ऐसें नव्हा कृपावंत । निवे माझें चित्त ठायींच्या ठायीं ॥१॥ कांहीं शम नये विषम अंतरा । शांतीचा तो बरा ऐसा योग ॥२॥ दुःखी होतों पंचभूतांच्या विकारें । जडत्व दातारें दाखवीं तीं ॥३॥ तुका म्हणे मोडा अहंकाराची मान । धरितों चरण म्हणऊनि ॥४॥

२८५७. मागत्याची कोठें घडते निरास । लेंकरा उदास नाहीं होत ॥१॥ कासया मी होऊं उतावीळ जीवीं । जाणता गोसावी सर्व आहे ॥२॥ झाला तरी वेळ कवतुकासाठीं । निर्दया तों पोटीं उपजेना ॥३॥ तुका म्हणे त्यासी ठाउकें उचित । होईल संकेत नेमियेला ॥४॥

२८५८. आरुषा वचनीं मातेची आवडी । म्हणऊनि तांतडी घेत नाहीं ॥१॥ काय होइल माझें मांडिलें कवतुक । आदराची भूक रडारोवी ॥२॥ लपोनियां करी चुकुर माऊली । नाहीं होत केली निष्ठा सांडी ॥३॥ तुका म्हणे करी पारखीं वचनें । भेवउनि तान्हें आळवावें ॥४॥

२८५९. प्रीतीच्या भांडणा नाहीं शिरपाव। वचनाचेचि भाव निष्ठुरता ॥१॥ जीणें तरि एका जीवें उभयता। पुत्राचिया पिता दुखवे दुःखें ॥२॥ काय जाणे तुटों मायेचें लिगाड। विषम तें आड उरों नेणें ॥३॥ तुका म्हणे मज करुणा उत्तरें। करितां विश्वंभरें पाविजेल ॥४॥

२८६०. नको घालूं झांसां। मना उपाधिवोळसा ॥१॥ जे जे वाहावे संकल्प। पुण्य तरी तेंचि पाप ॥२॥ उपजतो भेव। होतो कासावीस जीव ॥३॥ तुका म्हणे पाहों। होइल तें निवांत साहों ॥४॥

२८६१. बीजीं फळाचा भरंवसा। जतन सिंचनासरिसा। चालविलिया आशा। काकुलती ते नाड ॥१॥ हा तों गढसंदीचा ठाव। पिके पिकविला भाव। संकोचोनि जीव। दशा केली जतन ॥२॥ माती घाली धनावरी। रांडा रोटा वरीवरी। सुखाचे सेजारीं। दुःख भ्रमें भोगीतसे ॥३॥ तुका म्हणे दिशाभुली। झाल्या उफराटी चाली। निवाड्याची बोली। अनुभवें साक्षीसी ॥४॥

२८६२. काय उरली ते करूं विनवणी। वेंचलों वचनीं पांडुरंगा ॥१॥ अव्हेरलों आतां कैचें नामरूप। आदर निरोप तरि तो नाहीं ॥२॥ माझा मायबाप ये गेलों सलगी। तों हे तुम्ही जगीं सोयरिका ॥३॥ तुका म्हणे आतां जोडोनियां हात। करी दंडवत ठायींचा ठायीं ॥४॥

२८६३. आवडी धरूनि करूं गेलों लाड। भक्ति प्रेमकोड न पुरेचि ॥१॥ म्हणऊनि जीव ठेला आसावोनि। खेद होतो मनीं बहुसाल ॥२॥ वेठीऐसें वाटे निर्फळ कारण। शीतळ होऊन खोडावलों ॥३॥ तुका म्हणे सरतें नव्हेंचि पायांपें। बळ केलें पापें नव्हे भेटी ॥४॥

२८६४. प्रीतीचा तो कळवळा। जिव्हाळाचि वेगळा ॥१॥ बहु नेदी रडों माता। दुश्चित होतां धीर नव्हे ॥२॥ वरी वरी तोंडापुरतें। मोहोरिते कळतसे ॥३। जाणोनियां नेणता तुका। नव्हे लोकांसारिखा ॥४॥

२८६५. हा गे आतां हाचि लाहो। माझा अहो विठ्ठला ॥१॥ दंडवत दंडवत। वेगळी मात न बोलें ॥२॥ वेगळाल्या कोठें भागें। लाग लागें लावावा ॥३॥ तुका म्हणे केल्या जमा। वृत्तिक्षमा भाजूनि ॥४॥

२८६६. तुम्हांसी न कळे सांगा काय एक। कासया संकल्प वागवूं मी ॥१॥ आहे तेथें सत्ता ठेविलों स्थापूनि। प्रमाणेंचि वाणी वदे आज्ञा ॥२॥ कृपा झाली मग नलगे अंगसंग। निजध्यासें रंग चढताहे ॥३॥ तुका म्हणे मागें बोलिलों तें वाव। आतां हाचि भाव दृढ झाला ॥४॥

२८६७. आवडी न पुरे मायबापापासीं। घडों का येविसीं सकईल ॥१॥ होईल नेमिलें आपुलिया काळें। आलीयाचें बळें आग्रहो उरे ॥२॥ जाणविलें तेथें थोडें एक वेळा। सकळ ही कळा सर्वोत्तमीं ॥३॥ तुका म्हणे निवेदिलें गुह्य गुज। आतां तुझी तुज सर्व चिंता ॥४॥

२८६८. झालें आतां साठे। कासयाचें लहान मोठे ॥१॥ एक एका पडिलों हातीं। जाली

तेव्हांची निश्चिती ॥२॥ नाहीं फिरों येत मागें । झालें साक्षीचिया अंगें ॥३॥ तुका म्हणे देवा । आतां येथें नाहीं हेवा ॥४॥

२८६९. वोखटा तरी मी विटलों देहासी । पुरे आतां ऐसी जोडी पुन्हां ॥१॥ किती मरमर सोसावी पुढती । राहिलों संगती विठोबाचे ॥२॥ आतां कोण याचा करील आदर । जावो कलेवर विटंबोनी ॥३॥ तुका म्हणे आतां सांडी तेचि सांडी । कोण फिरे लंडी यासी मागें ॥४॥

२८७०. हेंही ऐसें तेंही तैसें । उभय पिसें अविचार ॥१॥ अभिमानाचे ठेलाठेलीं । मधीं झालीं हिंपुटी ॥२॥ धीरा शांती ठाव नुरे । हाचि उरे आबाळ्या ॥३॥ कौतुक हें पाहे तुका । कढतां लोकां अधणीं ॥४॥

२८७१. हित जाणे चित्त । कळों येतसे उचित ॥१॥ परिहार ते संपादणी । सत्य कारणा कारणीं ॥२॥ वरदळ तें नुतरे कसीं । आगीमध्यें तेथें रसीं ॥३॥ तुका म्हणे करुनी खरें । ठेवितां तें पुढें बरें ॥४॥

२८७२. देवें दिला देह भजना गोमटा । तो या झाला फाटा बाधिकेचा ॥१॥ ताठोनियां मान राहिली वरती । अहंकारा हातीं लवों नेदी ॥२॥ दास म्हणावया न वळे रसना । सइर वचना बा सगळे ॥३॥ तुका म्हणे कोठें ठेवावा विटाळ । स्नानेंचि निर्मळ व्हावयासी ॥४॥

२८७३. काय करूं पोरा लागली चट । धरी वाट देउळाची ॥१॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ॥२॥ काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ॥३॥ आमचे कुळीं नव्हतें ऐसें । हेंच पिसें निवडलें ॥४॥ लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥५॥ तुका म्हणे नरका जाणें । या वचनें दुष्टांचीं ॥६॥

२८७४. कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ॥१॥ शूर मिरवे रणांगणीं । मरणींच संतोषे ॥२॥ पाहिजे तो कळवळा । मग बळा काय उणें ॥३॥ तुका म्हणे उदारपणें । काय उणें मनाचें ॥४॥

२८७५. नव्हती हे उसणे बोल । आहाच फोल रंजवण ॥१॥ अनुभव तो वरावरी । नाहीं दुरी वेगळा ॥२॥ पाहिजे तें आलें रुची । काचाकुची काशाची ॥३॥ तुका म्हणे लाजे आड । त्याची चाड कोणासी ॥४॥

२८७६. जों जों घ्यावा सोस । माझे वारीं गर्भवास । लटिक्याचा दोष । अधिक जडे अंगासीं ॥१॥ आतां आहे तैसें असो । अनुताप अंगीं वसो । येवढेंचि नसो । माझें आणि परावें ॥२॥ जागा झालेपणें काय असावें स्वप्नें । शब्दाचिया शिणें । कष्ट मिथ्या मानावे ॥३॥ छाये माकड विटे । धांवे कूपीं काय भेटे । तुका म्हणे फुटे । डोई गुडघे कोंपर ॥४॥

२८७७. गुणांचाचि सांठा । करूं न वजों आणिका वाटा ॥१॥ करिती छंद नानापरी ।

भरोनि सिणती आडभरी ॥२॥ नेमिली पंगती । आम्हां संतांची संगती ॥३॥ तुका म्हणे लीळा । येर कवतुक पाहों डोळां ॥४॥

२८७८. शिकल्या शब्दाचें उत्पादितों ज्ञान । दर्पणींचें धन उपर वांयां ॥१॥ अनुभव कईं होईन भोगिता । सांकडें ते आतां हेंचि आलें ॥२॥ गायें नाचें करीं शरीराचे धर्म । बीजनाम वर्म तुझें दान ॥३॥ तुका म्हणे केला उशीर न साहे । द्याल तरी आहे सर्व सिद्ध ॥४॥

२८७९. शिकविले तैसा पढों जाणे पुंसा । कैंची साच दशा तैसी अंगीं ॥१॥ स्वप्नींचीया सुखें नाहीं होत राजा । तैसा दिसे माझा अनुभव ॥२॥ कासया हा केला जिव्हे अळंकार । पायांसीं अंतर दिसतसे ॥३॥ दर्पणींचें धन हातीं ना पदरीं । डोळां दिसे परी सत्याचिये ॥४॥ आस केली तरी लाळचि घोटावी । ठकाठकी तेवीं दिसतसे ॥५॥ कवित्व रसाळ वदविली वाणी । साक्षही पुराणीं घडे ऐसी ॥६॥ तुका म्हणे गुरें राखोनि गोंवारी । माझीं म्हणे परि लाभ नाहीं ॥७॥

२८८०. अनुभव तो नाहीं तुमच्या दर्शनीं । अइकलें कानीं वदे वाणी ॥१॥ जेविल्याचा कैसा अनुभव अंतरीं । म्हणतां मांडे पुरी काय होतें ॥२॥ नाहीं नाहीं गेली तळमळ दातारा । कां जी हरिहरा चाळविलें ॥३॥ पत्रीं कुशलता भेटी अनादर । काय तें उत्तर येईल मानूं ॥४॥ अंतर सबाह्य कां नाहीं सारिखें । करूनि पारिखें वर्ततसां ॥५॥ आलों आलों ऐसी दाऊनियां आस । बुडो बुडत्यास काय द्यावें ॥६॥ तुका म्हणे अहो चतुरा शिरोमणि । किती माझी वाणी तुम्ही कोठें ॥७॥

२८८१. केलें तरी आतां साचचि करावे । विचारिलें द्यावें कृपादान ॥१॥ संकल्पासी नाहीं बोलिला विकल्प । तुम्हां पुण्यपाप कळे देवा ॥२॥ उदार विख्यात तुम्ही भूमंडळीं । ऐसी ब्रीदावळी गर्जतसे ॥३॥ तुका म्हणे अहो रखुमाईच्या वरा । उपरोध धरा माझा आतां ॥४॥

२८८२. अहो पुरुषोत्तमा । तुम्हां काशाची उपमा ॥१॥ सतत तो नाहीं बुद्धी । नाळवितां नाहीं शुद्धि ॥२॥ जागविलें तरी । तुम्हां व्यक्ति येणें हरी ॥३॥ तुका म्हणे देवा । तुम्हां नित्य दिस नवा ॥४॥

२८८३. मथनें भोगे सार । ताकें घडे उपकार ॥१॥ बरवी सायासाची जोडी । अनुभविया ठावी गोडी ॥२॥ पाक आणि रुची । जेथें तेथें ते कइंची ॥३॥ वाढितो पंगती । तुका आवडी संगती ॥४॥

२८८४. चिंतनाची जोडी । हाचि लाभ घडोघडी ॥१॥ तुम्ही वसूनि अंतरीं । मज जागवा निर्धारीं ॥२॥ जेथें जेथें जाय मन । आड घाला सुदर्शन ॥३॥ तुका म्हणे भोजें । मग मी नाचेन निलज्ज ॥४॥

२८८५. आवडीची न पुरे धणी । प्रीत मनीं बैसली ॥१॥ नित्य नवा कळवळा ।

मायबाळामध्यें तो ॥२॥ सुख सुखा भेटों आलें । होय वाल्हें पोटींचें ॥३॥ तुका म्हणे ब्रह्मानंदें । संतवृंदें चरणापें ॥४॥

२८८६. जडलों तों आतां पायीं । होऊं काई वेगळा ॥१॥ तुम्हीं संतीं कृपा केली । गंगे चाली ओघाची ॥२॥ सांभाळिलों मायबापा । केलों तापावेगळा ॥३॥ वोरसें या जीव धाला । तुका ठेला मौन्यचि ॥४॥

२८८७. काळावरी सत्ता । ऐशा करितो वारता ॥१॥ मी तो हीनाहूनि सांडें । देव दुऱ्हें काळतोंडें ॥२॥ मानूनी भरंवसा । होतों दास म्हणत ऐसा ॥३॥ तुका म्हणे मान । गेलों वाढवूं थोरपण ॥४॥

२८८८. समर्थाचे सेवे कोठें नाहीं घात । पाहों नये अंत पांडुरंगा ॥१॥ आहे तैसी नीत विचारावी बरी । येऊनी भीतरी वासकरा ॥२॥ निढळ राखिलें तरी भयाभीत । हर्षामर्ष चित्त पावतसे ॥३॥ तुका म्हणे तरी कळेल निवाड । दर्शनाची चाड शुभकीर्ति ॥४॥

२८८९. बहु धीर केला । जाण न होसी विठ्ठला ॥१॥ अतां धरीन पदरीं । तुज मज करीन सरी ॥२॥ झालों जीवासी उदार । उभा राहिलों समोर ॥३॥ तुका म्हणे संता । ऐसें सांगा पंढरिनाथा ॥४॥

२८९०. नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळां ॥१॥ सर्प शांतिरूप न म्हणावा भला । झोंबे खवळीला तात्काळ तो ॥२॥ तुका म्हणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ॥३॥

२८९१. अभयदान मज देईं वो दातारा । कृपेच्या सागरा मायबापा ॥१॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं दुजे नेणें ॥२॥ सेवाभक्तिहीन नेणता पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ॥३॥ तुका म्हणे तुझें नाम दीनानाथ । ते मज उचित करी आतां ॥४॥

२८९२. करावा वर्षाव । तृषाकांत झाला जीव ॥१॥ पाहें आकाशाची वास । जाणता तूं जगदीश ॥२॥ संयोगें विस्तार । वाढी लागतो अंकूर ॥३॥ तुका म्हणे फळ । चरणांबुज तें सकळ ॥४॥

२८९३. करीं ऐसी धांवाधांवी । चित्त लावी चरणापें ॥१॥ मग तो माझा मायबाप । घेईल तापहिरूनी ॥२॥ बहुतांच्या मतें गोवा । होऊं जीवा नेदावा ॥३॥ तुका म्हणे करुणाबोलें । धीर विठ्ठलें निघेना ॥४॥

२८९४. काय तुज कैसें जाणावेंगा देवा । आणावें अनुभवा कैशा परी ॥१॥ सगुण निर्गुण स्थूळ कीं लहान । न कळे अनुमान मज तुझें ॥२॥ कोण तो निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तरावया ॥३॥ तुका म्हणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥४॥

२८९५. एकविध नारायण । तेथें विषमाचा सीण । पालटोचि भिन्न । नये अणुप्रमाण ॥१॥ अवघें सारावें गाबाळ । चुकवूनियां कोल्हाळ । आनंदाचें स्थळ । एकाएकीं एकांत ॥२॥ कायावाचामन । स्वरूपींच अनुसंधान । लक्ष भेदी बाण । येणे पाडें लवलाहो ॥३॥ तुका म्हणे आळस निद्रा । येथें देउनिया चिरा । देऊनियां धीरा । मिठी जाणा जागृती ॥४॥

२८९६. हारपोनि गेली निशी । निद्रा कैसी न देखों ॥१॥ नारायणीं वसलें घर । निरंतर आनंद ॥२॥ अवघा रुधविला ठाव । नेला वाव मी माझें ॥३॥ तुका म्हणे एके ठायीं । असों नाहीं क्षण भिन्न ॥४॥

२८९७. देवें केले कैसे कैसे । उद्धरिलें अनायासें ॥१॥ ऐका नवलयाची ठेव । नेणतांही भक्तिभाव ॥२॥ कैलासासी नेला । भिल्ल पानेडी बैसला ॥३॥ पांखांच्या फडत्कारीं । उद्धरुनी नेली घारी ॥४॥ चोरें पिंडी दिला पाव । त्या पूजनें धाय देव ॥५॥ तुका म्हणे भोळा । स्वामी माझा हा कोंवळा ॥६॥

२८९८. अनुभव ऐसा । मज लागला सरिसा ॥१॥ पाठी बैसलीसे जारी । नव्हे शांत कोणे परी ॥२॥ कोठें नलगे जावें । कांहीं घालावया ठावें ॥३॥ तुका म्हणे कोटि । दुःखाच्याच तये पोटीं ॥४॥

२८९९. पाठीवरी भार । जातो वाहूनियां खर ॥१॥ संत नेतील त्या ठाया । माझी आधीन त्यां काया ॥२॥ मोठे चौफळ । अंगीं उच्छिष्टाचें बळ ॥३॥ न संडी मारग । येथें न चोरूनि अंग ॥४॥ आपुलिया सत्ता । चालविलें नाहीं चिंता ॥५॥ कळवळिला तुका । जनाचार येथें नका ॥६॥

२९००. मागें पुढें झालों लाठा । अवघा मोठा सरळ ॥१॥ नाहीं कोठें रितें अंग । नित्य रंग नवाचि ॥२॥ पोसिंद्याचे पडिलों हातीं । ओझें माती चूकली ॥३॥ जोगावलों पोटीं खर । पाठी भार वरि नाहीं ॥४॥ अवघिया मोकळ्या दिशा । नाहीं वोळसा कामाचा ॥५॥ संताचिये लोळे द्वारीं । पळती दुरी गोमाशा ॥६॥ पाहातोगे महाद्वारीं । वरि झुली वाकळा ॥७॥ कांहीं न साहेसा झाला । तुका नेला समर्थें ॥८॥

२९०१. सुनियाचा हाचि भाव । आपुला ठाव राखावा ॥१॥ दुजियाचा येऊं वारा । नेदूं घरावरी देऊं ॥२॥ केली याची फाडाफाडी । तडामोडी क्षेत्राची ॥३॥ पातेजत नाहीं लोकां । देव तुका वांचूनी ॥४॥

२९०२. धन्य तोचि ग्राम जेथें हरिचे दास । धन्य तोचि वंश भक्ति भाग्य ॥१॥ ब्रह्मज्ञान तेथें असे घरोघरीं । धन्य नरनारी चतुर्भुज ॥२॥ नाहीं पापा रिघ काळाचें खंडण । हरिनामकीर्तन घरोघरीं ॥३॥ तुका म्हणे तिहीं तारिलें सकळां । आपल्या कोटिकुळासहित पैं ॥४॥

२९०३. भय होतें आम्हीपणें । पाठी येणे घातलें ॥१॥ अवघा आपुलाचि देश । काळा लेश उरेचि ना ॥२॥ समर्थाचें नाम घेतां । मग चिंता काशाची । तुका म्हणे नारायणें । केलें जिणें सुखाचें ॥४॥

२९०४. मारूं नये सर्प संतांचिया दृष्टी । होतील ते कष्टी व्यापकपणें ॥१॥ एक सूत्र जीवशिवीं आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ॥२॥ नाहीं साहो येत दु:खाची ते जाती । परपीडा भूतीं साम्य झाली ॥३॥ तुका म्हणे दिला नीतीचा संकेत । पूजा नांवें चित्त सुखी तेणें ॥४॥

२९०५. विषम वाटे दूरवरी । चालूनि परती धरी । मागील ते उरी । उरली नाहीं भयाची ॥१॥ मुख्य न व्हावा तो नाड । सेवटाचे हातीं गोड । सरलिया चाड । मग कैंचे उद्योग ॥२॥ होता पहिला अभ्यास । समयीं घालावया कास । तेव्हां लटिके दोष । योगें अनुतापाच्या ॥३॥ तुका म्हणे आहे । बुद्धी केलियानें साहे । जवळीच पाहें । देव वाट स्मरणाची ॥४॥

२९०६. आतां कोठें धांवे मन । तुझे चरण देखिलिया ॥१॥ भाग गेला सीण गेला । अवघा झाला आनंदु ॥२॥ प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी ॥३॥ तुका म्हणे आम्हांजोगें । विठ्ठल घोगें खरें माप ॥४॥

२९०७. विश्वी विश्वंभर । बोले वेदान्ताचें सार ॥१॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥२॥ व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥३॥ जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥४॥ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥५॥

२९०८. निरोधितों परि न मोडे विकार । बहु हीं दुस्तर विषयद्वारें ॥१॥ राहातेति तुम्ही भरोनि अंतरीं । होतों तदाकारी निर्विषयची ॥२॥ कृपेचिया साक्षी असती जवळी । वचनें मोकळीं सरत नाहीं ॥३॥ तुका म्हणे ताळा मेळवणीपाशीं । विनंती पायांशीं हेचि करीं ॥४॥

२९०९. अद्वयचिद्वय झालेंचि कारण । धरिलें नारायणें भक्तिसुख ॥१॥ अपरोक्ष आकार झाला चतुर्भुज । एकतत्वी बीज भिन्न नाहीं ॥२॥ शून्य निरसूनि राहिलें निर्मळ । तें दिसे केवळ विटेवरी ॥३॥ सुखें घ्यावें नाम वदना ही चाड । सरिता वापी आड एक पाणी ॥४॥ तुका म्हणे मीच आहें तेणें सुखें । भेद नाहीं मुखें नाम गातां ॥५॥

२९१०. उदार चक्रवर्ती । वैकुंठींचा भूपति । पुंडलीकाचिया प्रीती । विटे उभा राहिला ॥१॥ सर्वसिद्धींचा दातार । सवें आणिला परिवार । भक्ता अभयकर । घ्या घ्या ऐसें म्हणतसे ॥२॥ जेणें हें विश्व निर्मिलें । महर्षी देवां संस्थापिलें । एकवीस स्वर्गांतें धरिलें । सत्तामात्रें आपुलिया ॥३॥ तुका म्हणे कृपावंत । इच्छिले पुरवी मनोरथ । रिद्धिसिद्धी मोक्ष देत । शेखीं संग आपुला ॥४॥

२९११. सकळ गुणें संपन्न । एक देवाचें लक्षण ॥१॥ वरकड कोठें कांहीं । एक आहे

एक नाहीं ॥२॥ षड्गुण ऐश्वर्य संपन्न । एक भगवंत जाण ॥३॥ तुका म्हणे जें जें बोला । तें तें साजे या विठ्ठला ॥४॥

२९१२. सुख पंढरिये आलें । पुंडलिकें सांठविलें ॥१॥ घ्या रे घ्या रे माझे बाप । जिव्हा घेउनि खरें माप । करा एक खेप । मग नलगे हिंडणें ॥२॥ विभव गुंडोनी पसारा । धांव घाला पंढरपूरा ॥३॥ आयुष्य वेंच जंव आहे । तोंचि धांवोनियां जाये ॥४॥ आळस न करीं या लाभाचा । तुका विनवी कुणबियाचा ॥५॥

२९१३. देवाचें चरित्र नाठवे सर्वथा । विनोदाची कथा गोड वाटे ॥१॥ हातावरि हात हासोनि आफळी । वाजवितां टाळी लाज वाटे ॥२॥ तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ॥३॥

२९१४. अद्वैतीं तों नाहीं माझें समाधान । गोड हे चरण सेवा तुझी ॥१॥ करूनी उचित देईं हेंचि दान । आवडे कीर्तन नाम तुझें ॥२॥ देवभक्तपण सुखाचा सोहळा । ठेवूनि निराळा दावी मज ॥३॥ तुका म्हणे आहे तुझें हें सकळ । कोण्या एका काळें देई मज ॥४॥

२९१५. हेंचि माझें तप हेंचि माझें दान । हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥१॥ हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥२॥ हेंचि माझे कर्म हाचि माझा धर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥३॥ हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेंचि तपध्यान नाम तुझें ॥५॥ हाचि कुळाचार हाचि कुळधर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥५॥ हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ॥६॥ तुका म्हणे दुजें सांगायासि नाहीं । नामेंविण कांहीं धनवित्त ॥७॥

२९१६. कोणे साक्षीविण । केलें उधारा भजन ॥१॥ ऐसें सांगा जी दातारा । माझी भक्ति परंपरा ॥२॥ कोणें केली नाहीं आळी । ब्रह्मज्ञानाहुनि वेगळी ॥३॥ कोणाचें त्वां कोड । नाहीं पुरविला लाड ॥४॥ कोणाच्या उद्धारा । केला विलंब माघारा ॥५॥ तुका म्हणे भिन्न । कां हे बोला साक्षीविण ॥६॥

२९१७. सुखरूप चाली । हळूहळू उसंतिली ॥१॥ बाळगोपाळांची वाट । सेव्य सेवकता नीट ॥२॥ जरी झाला श्रम । तरी पडों नये भ्रम ॥३॥ तुका म्हणे दासां । देव सरिसासरिसा ॥४॥

२९१८. चुकली ते वाट । पुढें सांपडली नीट ॥१॥ म्हणउनि गर्भवास । नेणती ते हरिचे दास ॥२॥ संचिताचा संग । काय जाणों पावे भंग ॥३॥ तुका म्हणे दृष्टी । उघडि तो नव्हे कष्टी ॥४॥

२९१९. कइं तो दिवस देखेन मी डोळां । कल्याण मंगळामंगळाचें ॥१॥ आयुष्या शेवटीं पायांसवें भेटी । काळवेळ तुटी झाल्या तरें ॥२॥ सरो हें संचित पदरींचा गोवा । उताविळ देवा मन झालें ॥३॥ पाउलापाउलीं करितां विचार । अनंत विकार चित्ता अंगीं ॥४॥ म्हणउनि भयाभीत होतो जीव । भाकितसे कींव अट्टाहासें ॥५॥ दुःखाच्या उत्तरीं आळविले पाय । पाहाणें तो काय

अजून अंत ॥६॥ तुका म्हणे होईल आइकिलें कानीं । तरि चक्रपाणी धांव घाला ॥७॥

२९२०. कळों येतें वर्म । तरी न पवतों श्रम ॥१॥ तुम्हा शिरीं होती भार । आम्हां कैंचा संसार ॥२॥ होतें अभयदान । तरी स्थिर होतें मन ॥३॥ तुका म्हणे पाहें । ऐसी वाट उभा आहें ॥४॥

२९२१. वारंवार हाचि न पडावा विसर । वसावें अंतर तुमच्या गुणीं ॥१॥ इच्छेचा ये दाता तूं एक समर्था । अगा कृपावंता मायबापा ॥२॥ लाभाचिये वोढी उतावीळ मन । त्यापरि चिंतन चरणाचें ॥३॥ तुका म्हणे जीवीं जीवन ओलावा । पांडुरंगे द्यावा शीघ्र आतां ॥४॥

२९२२. आइकावीं माझीं कवतुक उत्तरें । देऊनि सादरें चित्त देवा ॥१॥ वोरसें आवडी आलों पायापाशीं । होय तें मनेंसीं सुख कीजे ॥२॥ तुमचें न भंगे सर्वोत्तमपण । करितां समाधान लेंकराचें ॥३॥ तुका म्हणे जरी बोलतों बोबडें । तरी लाडें कोडें कवतुकें ॥४॥

२९२३. नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं । झाडितां प्रसंगीं वरावरी ॥१॥ निकटवासिया आळवितों धांवा । येथूनियां देवा सोडवूनी ॥२॥ उमटे अंतरीं तें करूं प्रगट । कळोनी बोभाट धांव घालीं ॥३॥ तुका म्हणे तरि वांचलों या काळें । समर्थाचें बळें सुखी असों ॥४॥

२९२४. आतां येणें पडिपाडे । रस सेवूं हा निवाडें । मुंगी नेली गोडें । ठेविलिये अडचणी ॥१॥ तैसें होय माझ्या जीवा । चरण न सोडीं केशवा । विषयबुद्धि हेवा । वोस पडो सकळ ॥२॥ भुकेलिया श्वाना । गांठ पडे सवें अन्ना । मुकों पाहें प्राणा । परि तोंडींचें न सोडी ॥३॥ काय जिंकियलें मन । जीवित्व कामातुरा तृण । मागे व्यभिचारिण । भक्ती तुका ये जाती ॥४॥

२९२५. न पवीजे तया ठाया । आलों कायाक्लेशेसीं ॥१॥ आतां माझें आणी मना । नारायणा ओजेचें ॥२॥ बहु रिणें पिडिलों फार । परिहार करावा ॥३॥ तुका म्हणे निर्बळशक्ति । काकुलती म्हूण येतों ॥४॥

२९२६. बहु फिरलों ठायाठाव । कोठें भाव पुरेचि ना ॥१॥ समाधान तों पावलों । उरलों बोलों यावरी ॥२॥ घे गा देवा आशीर्वाद । आमुच्या नांद भाग्यानें ॥३॥ तुका म्हणे जेवूं आधीं । खवखव मधीं सारावी ॥४॥

२९२७. कोण येथें रिता गेला । जो जो आला या ठाया ॥१॥ तातडी ते काय आतां । ज्याची चिंता तयासी ॥२॥ नांवासाठीं नेघें भार । नलगे फार वित्पत्ति ॥३॥ तुका म्हणे नलगे जावें । कोठें देवें सुचेना ॥४॥

२९२८. इंद्रियांचें पुरे कोड । तेंचि गोड पुढतीही ॥१॥ जावें म्हणती पंढरपुरा । हाचि बरा संसार ॥२॥ बैसलें तें मनामुळीं । सुख डोळीं देखिलें ॥३॥ तुका म्हणे देती कान ।

वाणावाण निवडुनी ॥४॥

२९२९. आतां देवा मोकलिलें । तुम्हीं भलें दिसेना ॥१॥ आतां नाहीं जीवभाव । उरला ठाव वेगळा ॥२॥ सांभाळून घ्यावें देवा । आपणासवा यावरि ॥३॥ तुका म्हणे नग्न भाज । तरि ते लाज स्वामीसी ॥४॥

२९३०. आशाबद्ध आम्ही भाकितसों कींव । तत्पर हा जीव कार्यापाशीं ॥१॥ प्रतिउत्तराची पाहातसें वाट । करूनि बोभाट महाद्वारीं ॥२॥ आपुल्या उचितें करूनियां ठेवीं । संबंध गोसावी तोडोनियां ॥३॥ तुका म्हणे एक झालिया निवाड । कोण बडबड करी मग ॥४॥

२९३१. खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तंव जग उभयतां ॥१॥ आपल्या आपण नाहीं शोभों येत । चार करी स्फीत दाखवूनि ॥२॥ खाणार ताकाचें असे तें मांजर । आपणचि अधीर कळों येतें ॥३॥ तुका म्हणे जळों मैंदाची मवाळी । दावूनियां नळी कापी सुखें ॥४॥

२९३२. नाहीं सरों येत कोरड्या उत्तरीं । जिव्हाळ्याची भरी बोली ठायीं ॥१॥ आपुलिया हिता मानिसी कारण । सत्या नारायण साह्य असे ॥२॥ निर्वाणीं निवाड होतो आगीमुखें । तप्त लोह सुखें धरितां हातीं ॥३॥ तुका म्हणे नेमा न टळतां बरें । खऱ्यासीच खरें ऐसें नांव ॥४॥

२९३३. आलों उल्लंघुनि दुःखाचे पर्वत । पायापाशीं हित तुमच्या तरी ॥१॥ न देखेची लासा दुःखी होतें मन । कठिणें कठिण वाटतसें ॥२॥ नव्हे सांडी परि वाटतें निरास । न ये माझ्या दिस संकल्पाचा ॥३॥ तुका म्हणे तुम्ही सदैव जी देवा । माझ्या हाचि जीवा एक ठाव ॥४॥

२९३४. किती सोसिती करंटीं । नेणों संसाराची आटी । सर्वकाळ पोटीं । चिंतेची हळहळ ॥१॥ रिकामिया तोंडें राम । काय उच्चारितां श्रम । उफराटा भ्रम । गोवी विषय माजिरा ॥२॥ कळतां न कळे । उघडे झांकियेले डोळे । भरलें त्याचे चाळे । अंगीं वारें मायेचें ॥३॥ तुका म्हणे जन । ऐसें नांवबुद्धिहीन । बहुरंगें भिन्न । एकीं एक न मिळे ॥४॥

२९३५. मंगळाचा मंगळ सांठा । विट तोटा नेणे तें ॥१॥ हें भरा सातें आलें । भलें भलें म्हणवावें ॥२॥ जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ॥३॥ तुका म्हणे बहुतां मुखें । खरें सुखें ठेवावें ॥४॥

२९३६. नामाचा महिमा बोलिलों उत्कर्ष । अंगीं कांहीं रस न येचि तो ॥१॥ कैसें समाधान राहे पांडुरंगा । नलगेचि अंगा आणी कांहीं ॥२॥ लाभाचिये अंगीं सोस कवतुकें । फिक्याचे ते फिके वेवसाव ॥३॥ तुका म्हणे करा आपुला महिमा । नका जाऊं धर्मावरी माझ्या ॥४॥

२९३७. हेंचि वारंवार । पडताळुनी उत्तर ॥१॥ करितों पायांसी विनंती । नुपेक्षावें कमळापती ॥२॥ गंगोदक गंगे । अर्घ्य द्यावें पांडुरंगे ॥३॥ जोडोनियां हात । तुका करी प्रणिपात ॥४॥

२९३८. अवचित या तुमच्या पायां । देवराया पावलों ॥१॥ बरवें झालें देशाउर ।

आल्या दूर सारिखें ॥२॥ राहोनियां जातों ठाया । आलियाची निशाणी ॥३॥ तुका म्हणे चरण सेवा । जोडी हेवा लाधली ॥४॥

२९३९. आतां पाविजेल घरा । या दातारा संगती ॥१॥ पायावरि ठेवूनि माथा । सर्वथा हा नुपेक्षी ॥२॥ येथून तेथवरि आतां । नाहीं सत्ता आणिकांची ॥३॥ तुका म्हणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ॥४॥

२९४०. बरवें माझ्या केलें मनें । पंथें येणें निघालें ॥१॥ अभयाचें जावें ठाया । देवराया प्रतापें ॥२॥ साधनाचा नलगे पांग । अवघें सांग कीर्तनें ॥३॥ तुका म्हणे सत्ता थोरी । कोण करी खोळंबा ॥४॥

२९४१. मागें पुढें नाहीं । दुजे यावेगळें कांहीं ॥१॥ नाहीं उरलें आणीक । केला झाडा सकळिक ॥२॥ विश्वासावांचून । नांवें दुजियाचें शून्य ॥३॥ तुका म्हणे कांहीं । बोलायाची उरी नाहीं ॥४॥

२९४२. वैराग्याचा अंगीं झालासे संचार । इच्छी वनांतर सेवावया ॥१॥ कां जी माझें करूं नये समाधान । वियोगानें मन सिणतसे ॥२॥ नयेचि न्यावया पंढरीचें मूळ । न देवेचि माळ कंठींचीही ॥३॥ तुका म्हणे झालें अप्रीतीचें जीणें । लाजिर हें वाणें सेवा करी ॥४॥

२९४३. आळिकरा कोठें साहातें कठीण । आपुला तें प्राण देऊं पाहे ॥१॥ सांभाळावें मायबापें कृपादृष्टी । पीडितां तें दृष्टी देखों नये ॥२॥ अंतरलों मागें संवसारा हातीं । पायापें सरती झालों नाहीं ॥३॥ तुका म्हणे तुम्हीं विचाराजी देवा । ठेवाल तें ठेवा कोणे परी ॥४॥

२९४४. स्वप्नींचें धन हातीं ना पदरीं । प्रत्यक्ष कां हरि होऊं नये ॥१॥ आजुनि का करा चाळवाचाळवी । सावकाशें द्यावी सत्य भेटी ॥२॥ बोलोनियां फेडा जीवींची काजळी । पाहेन कोवळीं चरणांबुजें ॥३॥ तुका म्हणे माझ्या जीवींचिया जीवा । सारूनियां ठेवा पडदा आतां ॥४॥

२९४५. येतील अंतरीं शिष्टांचे अनुभव । तळमळी जीव तया सुखा ॥१॥ आतां माझा जीव घेउनियां बळी । बैसवावे ओळी संतांचिये ॥२॥ विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडेचि बोल फोस वांझे ॥३॥ तुका म्हणे आलों निर्वाणाचे वरी । राहों नेदीं उरी नारायणा ॥४॥

२९४६. म्हणउनि काय जीऊं भक्तपणें । जायाची भूषणें अळंकार ॥१॥ आपुल्या कष्टाची करोनियां जोडी । निरवीन उघडीं इच्छावसें ॥२॥ तुके तरी तुके खऱ्याचें उत्तम । मुलाम्याचा भ्रम कोठवरी ॥३॥ तुका म्हणे पुढें आणि मागें फांस । पावे ऐसा नास न करीं देवा ॥४॥

२९४७. आपणचि व्हाल साहे । कार्य आहे निर्वाणींचें ॥१॥ भाकिली ते उरली कींव । आहे जीव जीवपणें ॥२॥ आहाच कैंचा बीजा मोड । प्रीति कोड वांचूनि ॥३॥ तुका म्हणे

दंडीन काया । याल तया धावणिया ॥४॥

२९४८. निश्चितीनें होतों करूनियां सेवा । कां जी मन देवा उद्वेगिलें ॥१॥ अनंत उठती चित्ताचे तरंग । करावा हा त्याग वाटतसे ॥२॥ कोण तुम्हांविण मनाचा चाळक । दुजे सांगा एक नारायणा ॥३॥ तुका म्हणे माझा मांडिला विनोद । करवूं नेणें छंद कराल काई ॥४॥

२९४९. आश्वासावे दास । तरी घडतो विश्वास ॥१॥ नाहीं चुकत चाकरी । पुटें लाडेशाची थोरी ॥२॥ स्वामीच्या उत्तरें । सुख वाटे अभय करें ॥३॥ न मगें परि भातें । तुका म्हणे निढळ रितें ॥४॥

२९५०. जेणें होय हित । तें तूं जाणसी उचित ॥१॥ मज नको लावूं तैसें । वांयां जाय ऐसें पिसें ॥२॥ धरितोसी सत्ता । होसी सकळ जाणता ॥३॥ चतुराच्या राया । अंगीकारावें तुकया ॥४॥

२९५१. राहे उभा वादावादीं । तरी फंदीं सांपडे ॥१॥ लव्हाळ्यासी कोठें बळ । करिल जळ आपुलें ॥२॥ कठिणासी बळजोडा । नम्र पीडा देखेना ॥३॥ तुका म्हणे सर्वरसीं । मिळे त्यासी गोत तें ॥४॥

२९५२. म्हणउनि झाली तुटी । नाहीं भेटी अहंकारें ॥१॥ दाखविलें देवें वर्म । अवघा भ्रम नासला ॥२॥ हातें मुरगाळितां कान । नाहीं भिन्न वेदना ॥३॥ तुका म्हणे एकांत सुखें । अवघीं गोतें गुंतलीं ॥४॥

२९५३. न पडो आतां हाडीं घाव । मध्यें कींव नासक ॥१॥ करविली आत्महत्या । जीवा कां त्या द्वंद्वाच्या ॥२॥ आशापाशीं गुंतला गळा । तेणें कळाहीन झालों ॥३॥ तुका म्हणे लावूं मुळी । जीवकुळी थारेसी ॥४॥

२९५४. सामावे कारण । नाहीं सोसत धरणें ॥१॥ लादी थीके लाजिरवाणी । हीन-कमाईची घाणी ॥२॥ पुष्प जवळी नाका । दुर्गंधीच्या नांवें थुंका ॥३॥ तुका म्हणे किती । उपदेशहीन जाती ॥४॥

२९५५. असाल ते तुम्ही असा । आम्ही सहसा निवडों ना ॥१॥ अनुसरलों एका चित्तें । हातोंहातें गिंवसीत ॥२॥ गुणदोष काशासाठीं । तुमचे पोटीं वागवूं ॥३॥ तुका म्हणे दुजें आतां । कोठें चित्ता आतळों ॥४॥

२९५६. सोंवळा होऊं तों वोंवळें जडलें । सांडीमांडी वोले तोंडीं बीजीं ॥१॥ एकसरीं केली कलेवरें साटी । आतां नका तुटीं पायांसवें ॥२॥ संकल्पीं विकल्प पापाचा सुकाळ । रज्जुसर्प मूळ मरणाचें ॥३॥ तुका म्हणे हें तूं ब्रह्मांड चाळिता । मी कां करूं चिंता पांडुरंगा ॥४॥

२९५७. आहें ऐसा आतां आहे ठायीं बरा । ठेविलों दातारा उचितें त्या ॥१॥ वचनाचा भार पडिलीया शिरीं । झालें मग भारी उतरेना ॥२॥ अबोल्याची सवे लावुनियां मना । फांकों नेदी

गुणा ऐसें करूं ॥३॥ तुका म्हणे आम्हां गोंवळ्याचा संग । राखावें तें अंग जाणतसों ॥४॥

२९५८. तूं माझा कोंवसा । परी न कळे या धसां ॥१॥ कूट खाती मागें पुढें । जाती निरयगांवा पुढें ॥२॥ मज म्हणताती कवी । निषेधुनि पापी जेवीं ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । आतां कोण लेखी जगा ॥४॥

२९५९. दर्पणासी बुझे । नकटें तोंड लपवी लाजे ॥१॥ गुण ज्याचे जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥२॥ चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥३॥ तुका म्हणे जन । देवा ऐसे भाग्यहीन ॥४॥

२९६०. म्हणउनि शरण जावें । सर्वभावें देवासी ॥१॥ तो हा उतरील पार भवदुस्तर नदीचा ॥२॥ बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ॥३॥ तुका म्हणे साक्षी आलें । तरी केलें प्रगट ॥४॥

२९६१. ऐसीं वर्में आम्हां असोनियां हातीं । कां होऊं नेणती दिशाभुली ॥१॥ पोटाळुनी पाय कवळीन उभा । कृपे पद्मनाभा हालों नेदीं ॥२॥ आपुले इच्छेचे घालोनी संपुटीं । श्रीमुख तें दृष्टी न्याहाळीन ॥३॥ तुका म्हणे बहु सांडियेलीं मतें । आपुल्या पुरतें धरूनी ठेलों ॥४॥

२९६२. रत्नाच्या वोवणी कांचे ऐशा धरी । आव्हेरूनी दुरी अधिकारें ॥१॥ जातीचा स्वभाव आला डोळ्यां आड । तया घडे नाड न कळतां ॥२॥ कामधेनु देखे जैशा गाई म्हैसी । आणिका त्या ऐसी करोनियां ॥३॥ तुका म्हणे काय बोलोनियां फार । जयाचा वेव्हार तया साजे ॥४॥

२९६३. तरीच हीं केलीं । दानें वाईट चांगलीं ॥१॥ एक एका शोभवावें । केलें कवतुक देवें ॥२॥ काय त्याची सत्ता । सूत्र आणीक चाळिता ॥३॥ तुका म्हणे धुरें । डोळे भरिले परि खरे ॥४॥

२९६४. करी आणिकांचा अपमान । खळ छळवादी ब्राह्मण । तया देतां दान । नरका जाती उभयतां ॥१॥ तैसें झालें दोघांजणां । मागतिया यजमाना । जाळियलें वना । आपणासहित कांचणी ॥२॥ घडतां दगडाची नाव । मोल क्लेश गेले वाव । तरता नाहीं ठाव । बुडवी तारूं तरतीया ॥३॥ चोरा दिधला सांटा । तेणें मारियेल्या वाटा । तुका म्हणे ताठा । हें तंव दोघे नाडती ॥४॥

२९६५. जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥१॥ जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थीर विठ्ठलपायीं ॥२॥ जळो हा लौकिक जळो दंभमान । लागो मना ध्यान विठ्ठलाचें ॥३॥ जळो हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या कंठीं ॥४॥ तुका म्हणे येथें अवघेंचि होय । धरीं मना सोय विठोबाची ॥५॥

२९६६. विश्वास धरूनि राहिलों निवांत । ठेवूनियां चित्त तुझे पायीं ॥१॥ तरावें बुडावें तुझिया वचनें । निर्धार हा मनें केला माझ्या ॥२॥ न कळें हें मज साच चाळविलें । देसी

तें उगलें घेइन देवा ॥३॥ मागणें तें सरे ऐसें करीं देवा । नाहीं तरी सेवा सांगा पुढें ॥४॥ करावें कांहीं कीं पाहावें उगलें । तुका म्हणे बोलें पांडुरंगा ॥५॥

२९६७. कोणी एकाचिया पोरें केली आळी । ठावे नाहीं पोळी मागे देखी ॥१॥ बुझाविलें हातीं देउनी खापर । छंद करकर वारियेली ॥२॥ तैसें नको करूं मज कृपावंता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥३॥ तुका म्हणे मायबापाचें उचित । करावें स्वहित बाळकाचें ॥४॥

२९६८. देवाचिये पायीं देईं मना बुडी । नको धांवों वोढी इंद्रियांचे ॥१॥ सर्व सुखें तेथें होती एकवेळे । न सरती काळें कल्पांतींही ॥२॥ जाणें येणें खुंटे धांव वेरझार । नलगे डोंगर उसंतावे ॥३॥ सांगणें तें तुज इतुलेंचि आतां । मानीं धन कांता विषतुल्य ॥४॥ तुका म्हणे तुझे हातीं उपकार । उतरों हा पार भवसिंधु ॥५॥

२९६९. आम्ही विठ्ठलाचे दास झालों आतां । न चलेचि सत्ता आणिकांची ॥१॥ नावरे तयासी ऐसें नाहीं दुजें । करितां पंढरिराजें काय नव्हे ॥२॥ कोठें तुज ठाव घ्यावयासी धांवा । मना तूं विसावा घेईं आतां ॥३॥ इंद्रियांची वोढी मोडिला व्यापार । ज्या अंगें संचार चाली तुज ॥४॥ तुका म्हणे आम्ही जिंकोनियां काळ । बैसलों निश्चळ होऊनियां ॥५॥

२९७०. सांगतों तुम्हांसी भजा रे विठ्ठला । नाहीं तरि गेला जन्म वांयां ॥१॥ करितां भरोवरी दुरावसी दुरी । भवाचिये पुरीं वाहावसी ॥२॥ कांहीं नलगे एक भावचि कारण । तुका म्हणे आण विठ्ठलाची ॥३॥

२९७१. शब्द झणी येऊं नेदीं दृष्टीपुढें । छळवादी कुडे अभक्त ते ॥१॥ जळो ते जाणीव जळो त्यांचें बंड । जळो तया तोंड दुर्जनाचें ॥२॥ तुका म्हणे येती दाटूनि छळाया । त्यांच्या बोडूं डोया न धरूं भीड ॥३॥

२९७२. भले लोक नाहीं सांडीत ओळखी । हे तों झालीं देखी दुसऱ्याची ॥१॥ असो आतां यासी काय चाले बळ । आपुलें कपाळ वोढवलें ॥२॥ समर्थासी काय कोणें हें म्हणावें । आपुलिया जावें भोगावरी ॥३॥ तुका म्हणे तुम्हां बोल नाहीं देवा । नाहीं केली सेवा मनोभावें ॥४॥

२९७३. देवाचें भजन कां रे न करीसी तैसें । अखंड हव्यासें पीडतोसी ॥१॥ देवासी शरण कां रे नवजासी तैसा । बक मीना जैसा मनुष्यालागीं ॥२॥ देवाचा विश्वास कां रे नाहीं तैसा । पुत्रस्नेहें जैसा गुंतलासी ॥३॥ कां रे नाहीं तैसी देवाची ते गोडी । नागवूनि सोडी पत्नी जैसी ॥४॥ कां रे नाहीं तैसे देवाचे उपकार । माया मिथ्या भार पितृपूजन ॥५॥ कां रे भय वाहासी लोकाचा तो धाक । विसरूनियां एक नारायण ॥६॥ तुका म्हणे कां रे घातलें हें वांयां । अवघें आयुष्य जाया भक्तिविण ॥७॥

२९७४. मुकें होतां काय पदरींचें जातें । मूर्ख तें भोगितें मीमीपण ॥१॥ आपुलिये घरीं मैंद होउनी बैसे । कोणासीही ऐसे बोलों नको ॥२॥ तुका म्हणे तुम्हां सांगतों मी खूण । देवासी तें ध्यान लावुनि बैसा ॥३॥

२९७५. आषाढी निकट । आला कीर्तिकीचा हाट ॥१॥ पुरे दोन्हीच बाजार । नलगे आणीक व्यापार ॥२॥ तेंचि घ्यावें तेंचि द्यावें । कैवल्याच्या रासी भावें ॥३॥ कांहीं कोणा नेणे । विठोवांचुनि तुका म्हणे ॥४॥

२९७६. देउनियां प्रेम मागितलें चित्त । झाली फिटाफिट तुम्हां आम्हां ॥१॥ काशानें उदार तुम्हांसी म्हणावें । एक नेसी भावें एक देसी ॥२॥ देउनियां थोडें नेसील हें फार । कुंठीसी विचार अवघीयांचा ॥३॥ तुका म्हणे आम्हां भांडवल चित्त । नेउनी दुश्चित पाडियेलें ॥४॥

२९७७. तांतडीची धांव आंगा आणी भाग । खोळंबा तो मग निश्चितीचा ॥१॥ म्हणउनि बरी विचाराची चाली । उरीची ते बोली कामा येते ॥२॥ कोरडें वैराग्य माजिरा बडिवार । उतरे तो शूर अंगींचें तें ॥३॥ तुका म्हणे बरी झऱ्याची ते चाली । सांठवण्या खोली कासयाची ॥४॥

२९७८. मी तों बहु सुखी आनंदभरित । आहें साधुसंतां मेळींकारी ॥१॥ कांहीं व्हावें ऐसें नाहीं माझ्या जीवा । आणीक केशवा तुजविण ॥२॥ नलगे वैकुंठ मोक्ष सायुज्यता । सुख वाटे घेतां जन्म ऐसें ॥३॥ मृत्युलोकीं कोण धरिल वासना । पावावया जनासवें दुःख ॥४॥ तुका म्हणे तुझा दास ऐसें लोकां । कांहीं सकळिकां कळों यावें ॥५॥

२९७९. घ्या रे लुटी प्रेमसुख । फेडा आजि धणी । चुकला तो मुकला । झाली वेरझारें हाणी ॥१॥ घाला घातला वैकुंठीं । करूनियां जीवें साटी । पुरविली पाठी । वैष्णवीं काळाची ॥२॥ अवघें आणिलें अंबर । विठोसहित तेथें धुर । भेदूनि जिव्हार । नामबाणीं धरियेला ॥३॥ संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघीं झालीं गहन । केलीं पापपुण्यें । देशधडी बापुडीं ॥४॥ आनंदें गर्जती निर्भर । घोष करिती निरंतर । कांपती असुर । वीर कवणा नागवती ॥५॥ जें दुर्लभ ब्रह्मादिकां । आजि सांपडलें फुका । घ्या रे म्हणे तुका सावचित्त होउनी ॥६॥

२९८०. तुझिया दासांचा हीन झालों दास । न धरीं उदास मायबापा ॥१॥ तुजविण प्राण कैसा राहों पाहे । वियोग न साहे क्षणभरी ॥२॥ आणिक माझ्या जीवें मोकलिली आस । पाहे तुझी वास पांडुरंगा ॥३॥ सर्वभावें तुज आणिला उचित । राहिलों निश्चिंत तुझे पायीं ॥४॥ तुका म्हणे तुज असे माझा भार । बोलतों मी फार काय जाणें ॥५॥

२९८१. तेचि करीं मात । जेणें होईल तुझें हित । काय बडबड निमित्य । सुख जिव्हारीं सिणविसी ॥१॥ जो मूळव्याधि पीडिला । त्यासी देखोन हांसे खरजुला ॥२॥ आराध करी सोसी । त्यासी हांसे तो आळसी ॥३॥ क्षयरोगी म्हणे परता । सर रोगिया कुष्ठता ॥४॥ वडस दोहीं

डोळां वाढले । आणिकां कानें कोंचें बोले ॥५॥ तुका लागे पायां । शुद्ध करा आपणियां ॥६॥

२९८२. कळों आला भाव माझा मज देवा । वांयांविण जीवा आट केली ॥१॥ जोडूनि अक्षरें केली तोंडपिटी । नलगे शेवटीं हातीं कांहीं ॥२॥ देव जोडे म्हणोन सांगतसे लोकां । माझा मीच देखा दुःख पावें ॥३॥ तुका म्हणे माझे गेले दोन्ही ठाय । संसार ना पाय तुझे देवा ॥४॥

२९८३. आतां तरी मज सांगा साच भावें । काय म्यां करावें ऐसें देवा ॥१॥ चुकलिया वर्म नोहे तें कारण । केला होय सीण अवघाचि ॥२॥ कळे म्हणवुनी करीतसें वाद । दिसे भेदाभेद अंतरींच ॥३॥ तुका म्हणे नको पाहूं तूं निर्वाण । देईं कृपादान याचकासी ॥४॥

२९८४. बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी । आम्हीं अविश्वासी सर्वभावें ॥१॥ दंभें करूं भक्ति सोंग दावूं जना । अंतरीं भावना वेगळिया ॥२॥ चित्ताचा तूं साक्षी तुज कळे सर्व । किती करूं गर्व आतां पुढें ॥३॥ तुका म्हणे देवा तूं काय करिसी । कर्मा दुस्तरासी आमुचिया ॥४॥

२९८५. कां हो पांडुरंगा न करा धांवणें । तरि मज कोणें सोडवावें ॥१॥ तुझा म्हणऊनि आणिकापें उभा । राहों हे तों शोभा नेदी आतां ॥२॥ काळें पुरविली पाठी दूरवर । पुढें पाय स्थिर राहों नेदी ॥३॥ नको आणूं माझें संचित मनासीं । पावन आहेसी पतित तूं ॥४॥ तुका म्हणे चाले आणिकांची सत्ता । तुज आठविता नवल हें ॥५॥

२९८६. कावळ्याच्या गळां मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला भूषण शोभे ॥१॥ गजालागीं केला कस्तुरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥२॥ बकापुढें सांगे भावार्थवचन । वाउगाचि सीण होय त्यासी ॥३॥ तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वायां सीण करूं नये ॥४॥

२९८७. न कळसी ज्ञाना न कळसी ध्याना । न कळसी दर्शना धांडोळितां ॥१॥ न कळसी आगमा न कळसी निगमा । न बोलवे सीमा ब्रह्मादिकां ॥२॥ तुका म्हणे तुझा नाहीं अंतपार । म्हणोनि विचार पडिला मज ॥३॥

२९८८. मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ॥१॥ तैसा नव्हे देवराव । याचा कृपाळू स्वभाव ॥२॥ मनासारिखें न होतां । बाळकासी मारी माता ॥३॥ तुका म्हणे सांगूं किती । बाप लेंकासी मारिती ॥४॥

२९८९. विनवितों चतुरा तुज विश्वंभरा । परियेसीं दातारा पांडुरंगा ॥१॥ तुझे दास ऐसें जगीं वाखाणिलें । आतां नव्हे भलें मोकलितां ॥२॥ माझे गुणदोष कोण जाणे मात । पावनपतित नाम तुझें ॥३॥ लोभ मोह माया आम्हां बाधवितां । तरी हा अनंता बोल कोणा ॥४॥ तुका म्हणे मी तों पतितचि खरा । परि आलों दातारा शरण तुज ॥५॥

२९९०. त्राहे त्राहे त्राहे सोडवीं अनंता । लागों दे ममता तुझे पायीं ॥१॥ एकचि मागणें देईं तुझी गोडी । नलवी आवडी आणिकांची ॥२॥ तुझे गुण नाम वर्णीन पवाडे । आवडीच्या कोडें

नाचों रंगीं ॥३॥ बापा विठ्ठलराया हेंचि देईं दान । जोडती चरण जेणें तुझे ॥४॥ आवडीसारिखें मागितलें जरी । तुका म्हणे करीं समाधान ॥५॥

२९९१. सुगरणीबाई थिता नास केला । गूळ तो घातला भाजीमध्यें ॥१॥ क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें बोळ । थितेंचि वोंगळ नाश केला ॥२॥ हिरयाचे पेटे आणियेल्या गारा । खांदीं शिरीं भारा व्यर्थ वाहे ॥३॥ दळण दळोनि भरीयेली पाळी । भरडोनि वोंगळी नास केला ॥४॥ कापुराचे सांते आणिला लसण । वागवितां सीण दुःख होय ॥५॥ रत्नाचा जोहरी रत्नचि पारखी । येर देखोवेखीं हातीं घेती ॥६॥ तुका म्हणे जरी योग घडे निका । न घडतां थुंका तोंडावरी ॥७॥

२९९२. धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ॥१॥ पानें खाशील उदंड । अंतीं जासी सुकल्या तोंड ॥२॥ पलंग न्याहाल्या सुपती । शेवटीं गोवऱ्या सांगाती ॥३॥ तुका म्हणे राम । एक विसरतां श्रम ॥४॥

२९९३. माझा बाप दीनानाथ । वाट भक्तांची पहात ॥१॥ कर ठेवूनियां कटीं । उभा चंद्रभागेतटीं ॥२॥ गळां वैजयन्तीमाळा । रूप डोळस सांवळा ॥३॥ तुका म्हणे भेटावया । सदा उभारिल्या बाह्या ॥४॥

२९९४. माझें जीवन तुझे पाय । कृपाळू तूं माझी माय ॥१॥ नेदीं दिसों किविलवाणें । पांडुरंगा तुझें तान्हें ॥२॥ जन्ममरण तुजसाठीं । आणीक नेणें दुजी गोठी ॥३॥ तुका म्हणे तुजविण । कोण हरिल माझा सीण ॥४॥

२९९५. कां रे प्रेमें मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥१॥ ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट ॥२॥ युगें झालीं अठ्ठावीस । अजुनी न म्हणसी बैस ॥३॥ भाव देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥४॥ तुका म्हणे पुंडलिका । तूंचि भक्त बळिया निका ॥५॥

२९९६. तुज पाहातां सामोरी । दृष्टि न फिरे माघारी ॥१॥ माझ्या चित्ता तुझ्या पायां । मिठी पडली पंढरिराया ॥२॥ नव्हे सारितां निराळें । लवण मेळवितां जळें ॥३॥ तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळीं ॥४॥

२९९७. उपदेश किती करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥१॥ शुद्ध कां वासना नव्हे चांडाळाची । होळी संचिताची केली तेणें ॥२॥ नाहीं भाव मनीं नाइके वचन । आपल्या आपण नाडियेलें ॥३॥ तुका म्हणे त्यासी काय व्याली रांड । करी बडबड रात्रंदिवस ॥४॥

२९९८. समर्थासी लाज आपुल्या नामाची । शरण आल्याची लागे चिंता ॥१॥ न पाहे तयाचे गुण दोष अन्याय । सुख देउनि साहे दुःख त्याचे ॥२॥ मान भलेपण नाहीं फुकासाठीं । जयावरि गांठी झीज साहे ॥३॥ तुका म्हणे हे तूं सर्वही जाणसी । मज अधिरासी धीर नाहीं ॥४॥

२९९९. आनंदें कीर्तन कथा करीं घोष । आवडीचा रस प्रेमसुख ॥१॥ मज या आवडे

वैष्णवांचा संग । तेथें नाहीं लाग कळिकाळाचा ॥२॥ स्वल्प मंत्र वाचे बैसलासे निका । रामकृष्ण सखा नारायण ॥३॥ उच्चारितां दुजें वाटे मज लाज । उपदेश काज आन नाहीं ॥४॥ तुका म्हणे मन रंगलेंसे ठायीं । माझें तुझ्या पायीं पांडुरंगा ॥५॥

३०००. आतां पाहाशील काय माझा अंत । आलों शरणागत तुज देवा ॥१॥ करीं अंगीकार राखें पायांपाशीं । झणी दिसों देसी कीविलवाणें ॥२॥ नाहीं आइकिली मागें ऐसी मात । जे त्वां शरणागत उपेक्षिले ॥३॥ तुका म्हणे आतां धरीं अभिमान । आहेसी तूं दानशूर दाता ॥४॥

३००१. होईल तो भोग भोगीन आपुला । न घलीं विठ्ठला भार तुज ॥१॥ तुम्हांपासाव हें इच्छीतसें दान । अंतरींचें ध्यान मुखीं नाम ॥२॥ नये काकुलती गर्भवासासाठीं । न धरीं हें पोटीं भय कांहीं ॥३॥ तुका म्हणे मज उदंड एवढें । नाचेन मी पुढें मायबापा ॥४॥

३००२. करावा संकोच चित्ताचि भोवता । होय तें बहुतां सुख कीजे ॥१॥ देवाची पूजा हे भूताचें पाळण । मत्सर तो सीण बहुताचा ॥२॥ रुसावें फुगावें आपुलिया वरी । उरला तो हरी सकळही ॥३॥ तुका म्हणे संतपण याचि नांव । जरी होय जीव सकळांचा ॥४॥

३००३. नाहीं जप तप जीवासी आटणी । मनासी दाटणी नाहीं केली ॥१॥ निजलिया ठायीं फोकारिला धांवा । सांकडें तें देवा तुज माझें ॥२॥ नाहीं आणूनियां समर्पिलें जळ । सेवा ते केवळ चिंतनाची ॥३॥ तुका म्हणे आम्हीं वेंचिली उत्तरें । घेतलीं उदारें मायबापें ॥४॥

३००४. देह तंव आहे प्रारब्धा अधीन । याचा मी कां सीण वाहूं भार ॥१॥ सरो माझा काळ तुझिया चिंतनें । कायावाचामनें इच्छीतसें ॥२॥ लाभ तो न दिसे याहूनि दुसरा । आणीक दातारा येणें जन्में ॥३॥ तुका म्हणे आलों सोसीत संकटें । मी माझें वोखटें आहे देवा ॥४॥

३००५. सकळ तुझे पायीं मानिला विश्वास । न करीं उदास आतां मज ॥१॥ वाचे गातां गोड आइकतां कानीं । पाहातां लोचनीं मूर्ती तुझी ॥२॥ मन स्थिर माझें झालेंसें निश्चळ । वारिले सकळ आशापाश ॥३॥ जन्मजराव्याधि निवारलें दु:ख । वोसंडलें सुख प्रेमधारी ॥४॥ तुका म्हणे मज झाला हा निर्धार । आतां वांयां फार काय बोलों ॥५॥

३००६. नये माझा तुम्हां होऊं शब्दस्पर्श । विप्र तुम्ही विद्वांस ब्राह्मणांसी ॥१॥ म्हणोनियां तुम्हां करितों विनंती । द्यावें शेष हातीं उरलें तें ॥२॥ वेदी कर्म जैसें बोलिलें विहित । करावी ते नीत विचारूनि ॥३॥ तुमचा स्वधर्म माझा अधिकार । भोजन उत्तर तुका म्हणे ॥४॥

३००७. बहुत असती मागें सुखीं केलीं । अनाथा माउली जिवांची तूं ॥१॥ माझिया संकटा न धरीं आळस । लावूनियां कासे पार पावीं ॥२॥ कृपावंता करा ज्याचा अंगीकार । तया संवसार नाहीं पुन्हा ॥३॥ विचारितां नाहीं दुजा बळिवंत । ऐसा सर्वगत व्यापी कोणी ॥४॥

म्हणउनि दिला मुळीं जीवभाव । देह केला वाव समाधिस्थ ॥५॥ तुका म्हणे नाहीं जाणत आणीक । तुजविण एक पांडुरंगा ॥६॥

३००८. आम्हां देणें धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे ॥१॥ तेणें माझे चित्ता होय समाधान । विलास मिष्टान्न नलगे सोनें ॥२॥ व्रत एकादशी दारीं वृंदावन । कंठीं ल्या रे लेणें तुळसीमाळा ॥३॥ तुका म्हणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण ॥४॥

३००९. आवडी धरोनी आलेती आकारा । केला हा पसारा याजसाठीं ॥१॥ तें मी तुझें नाम गाईन आवडी । क्षण एक घडी विसंबेना ॥२॥ वर्म जाणावें हा मुख्य धर्मसार । अवघे प्रकार तया पोटीं ॥३॥ वेगळ्या विचारें वेगळाले भाव । धरायासी ठाव बहु नाहीं ॥४॥ तुका म्हणे घालूं इच्छेचिये पोटीं । कवळुनी धाकुटी मूर्ती जीवें ॥५॥

३०१०. भागलों मी आतां आपुल्या स्वभावें । कृपा करोनि देवें आश्वासीजे ॥१॥ देउनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें । अंगें हीं दातारें निववावीं ॥२॥ अमृताची दृष्टी घालूनियां वरी । शीतळ हा करीं जीव माझा ॥३॥ घेईं उचलूनि पुसें तहानभूक । पुसीं माझें मुख पीतांबरें ॥४॥ बैसोनियां माझी धरीं हनुवटी । ओवाळुनी दिठी करूनी सांडीं ॥५॥ तुका म्हणे बाप्पा अहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ॥६॥

३०११. न सरे लुटितां मागें बहुता जनीं । जुनाट हे खाणी उघडिली ॥१॥ सिद्ध महामुनि साधक संपन्न । तीहीं हें जतन केलें होतें ॥२॥ पायाळाच्या गुणें पडिलें ठाऊकें । जगा पुंडलिकें दाखविलें ॥३॥ तुका म्हणे तेथें होतों मी दुबळा । आलें या कपाळा थोडें बहु ॥४॥

३०१२. भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ॥१॥ वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबु वेषा सहज स्थिति ॥२॥ कोरोनियां भूमी करी मध्यें वास । तरी उंदिरास काय वाणी ॥३॥ तुका म्हणे ऐसे कासया करावें । देहासी दंडावें वाउगेंचि ॥४॥

३०१३. धन्य दिवस आजि डोळियां लाधला । आनंद देखिला धणीवरी ॥१॥ धन्य झालें मुख निवाली रसना । नाम नारायणा घोष करी ॥२॥ धन्य हें मस्तक सर्वांगा शोभलें । संतांचीं पाउलें लागताती ॥३॥ धन्य आजि पंथें चालती पाउलें । टाळिया शोभले कर दोन्ही ॥४॥ धन्य तुका म्हणे आम्हांसी फावलें । पावलों पाउलें विठोबाचीं ॥५॥

३०१४. बरवी हे वेळ सांपडली संधि । साह्य झाली बुद्धि संचितासी ॥१॥ येणें पंथें माझीं चालिलीं पाउलें । दरुषण झालें संतां पायीं ॥१॥ त्रासिलें दरिद्रें दोषा झाला खंड । त्याचि काळें पिंड पुनीत झाला ॥३॥ तुका म्हणे झाला अवघा व्यापार । आली वेरझार फळासी हे ॥४॥

३०१५. आपणा लागे काम वाण्याघरीं गूळ । त्याचें याति कुळ काय कीजे ॥१॥ उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठायागुणें ॥२॥ गाईचा जो भक्ष अमंगळ

खाय । तिचें दुध काय सेवूं नये ॥३॥ तुका म्हणे काय सालपटासी काज । फणसांतील बीज कादुनि घ्यावें ॥४॥

३०१६. जयासी नावडे वैष्णवांचा संग । जाणावा तो मांग जन्मांतरींचा ॥१॥ अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं जया ॥२॥ मंजूळवदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीवप्राणा ॥३॥ तुका म्हणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ॥४॥

३०१७. वांझेनें दाविलें गन्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ॥१॥ तेवी शब्द झणी करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकूनियां ॥२॥ बोलाचीच कढी बोलाचाचि भात । जेवूनियां तृप्त कोण झाला ॥३॥ कागदीं लिहीतां नामाची साखर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥४॥ तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं निसुगाला ॥५॥

३०१८. जुंझायाच्या गोष्टी ऐकतांची सुख । करितां देहदुःख थोर आहे ॥१॥ तैसी हरिभक्ति सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥२॥ पिंड पोसिलिया विषयांचा पाइक । वैकुंठनायक कैंचा तेथें ॥३॥ तुका म्हणे व्हावें देहासी उदार । रखुमादेवीवर जोडावया ॥४॥

३०१९. अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे घरोघर चांडाळांचे ॥१॥ अंत्यजाची खिचडी घेताती मागून । गाळियाप्रदान मायबहिणी ॥२॥ उत्तमकुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कुळ उभयतां ॥३॥ तुका म्हणे ऐसी कलियुगाची चाली । स्वार्थें बुडविली आचरणें ॥४॥

३०२०. पाषाण प्रतिमा सोन्याच्या पादुका । हें तो हातीं एका समर्थाचे ॥१॥ अनामिका हातीं समर्थाचा शिक्का । न मानितां लोकां येइल कळों ॥२॥ तुका म्हणे येथें दुराग्रह खोटा । आपुल्या अदृष्टा शरण जावें ॥३॥

३०२१. बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी । ठाकोनियां मनीं आला सीण ॥१॥ आतां पायांपाशीं लपवावें देवा । नका पाहूं सेवा भक्ती माझी ॥२॥ बहु भय वाटे एकाच्या बोभाटें । आली घायवटे फिरोनियां ॥३॥ तुका म्हणे सिगे भरूं आलें माप । वियोग संताप झाला तुझा ॥४॥

३०२२. धरूनियां मनीं बोलिलों संकल्प । होसी तरि बाप सिद्धी नेई ॥१॥ उत्कंठा हे आजी झाली माझे पोटीं । मागील या गोठी टाळा टाळी ॥२॥ माझा मज असे ठाउका निर्धार । उपाधि उत्तर न साहे पैं ॥३॥ तुका म्हणे तुज दिली आठवण । तरि अभिमान धरीं माझा ॥४॥

३०२३. आजिवरी होतों संसाराच्या हातीं । आतां ऐसें चित्तीं उपजलें ॥१॥ तुम्हां शरणागत व्हावें नारायणा । अंगिकारा दीना आपुलिया ॥२॥ विसरलों काम याजसाठी धंदा । सकळ गोविंदा माझें तुझें ॥३॥ तुका म्हणे विज्ञापना परिसावी । आवडी हे जीवीं झाली तैसी ॥४॥

३०२४. धन्य धन्य ज्यांस पंढरीचा वास । धन्य ते जन्मास प्राणी आले ॥१॥ चहुं खाणींमध्यें होत कोणी एक । त्रिगुण कीटक पक्षिराज ॥२॥ उत्तम चांडाळ नर नारी बाळ । अवघेचि सकळ चतुर्भुज ॥३॥ अवघा विठ्ठल तेथें दुजें नाहीं । भरला अंतर्बाहीं सदोदित ॥४॥ तुका म्हणे तेथें होउनी राहेन । सांडोवा पाषाण पंढरीचा ॥५॥

३०२५. असंत लक्षण भूतांचा मत्सर । मनासी निष्ठुर अतिवादी ॥१॥ अंतरींचा रंग उमटे बाहेरी । वोळखि यापरी आपेंआप ॥२॥ संत ते समय वोळखती वेळ । संतुष्ट निर्मळ चित्त सदा ॥३॥ तुका म्हणे हित उचित अनुचित । मज लागे नित्य विचारावें ॥४॥

३०२६. विठ्ठलावांचोनि ब्रह्म जें बोलती । वचन तें संतीं मानूं नये ॥१॥ विठ्ठलावांचूनि ज्या ज्या उपासना । अवघिया जाणा श्रमचि तो ॥२॥ विठ्ठलावांचूनि सांगतील गोष्टी । वांयां ते हिंपुटी होती जाणा ॥३॥ विठ्ठलावांचूनि जें कांहीं जाणती । तितुल्या वित्पति वाउगीं या ॥४॥ तुका म्हणे एक विठ्ठलचि खरा । येर तो पसारा वाउगाचि ॥५॥

३०२७. सर्व काळ डोळां बैसो नारायण । नयो अभिमान आड पुढें ॥१॥ धाड पडो माझ्या थोरपणावरि । वाचे हरि हरि उच्चारीन ॥२॥ जळो अंतरींचें सर्व जाणपण । विवादवचन अहंतेचें ॥३॥ सकळां चरणीं गळित माझा जीव । तुका म्हणे भाव एकविध ॥४॥

३०२८. मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाढ प्रेम असो ॥१॥ प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥२॥ जननिंदा होय तो बरा व्यापार । थोरवीचा भार कामा नये ॥३॥ तुका म्हणे भाव निष्ठावंत चित्तीं । दया क्षमा शांती सर्वां भूतीं ॥४॥

३०२९. झाडें वोरपोनि खाऊनियां पाला । आठवी विठ्ठला वेळोवेळां ॥१॥ वल्कलें नेसूनि ढुंगा गुंडाळून । सांडी देहभान जवळूनी ॥२॥ लोकमान वमनासमान मानणें । एकांतीं राहणें विठोसाठीं ॥३॥ सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य । सेवावे अरण्य एकांतवास ॥४॥ ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका म्हणे त्याचा पांग फिटे ॥५॥

३०३०. भक्तिभावें करीं बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥१॥ एक दृढ करीं पंढरीचा राव । मग तुज उपाव पुढिल सुचे ॥२॥ नको करूं कांहीं देवतापूजन । जप तप ध्यान तेंही नको ॥३॥ मानिसिल झणीं आपलिक कांहीं । येरझारा पाहीं न चुके कदा ॥४॥ ऐसे जन्म किती पावलासी देहीं । अझुनि कां नाहीं कळली सोय ॥५॥ सोय धरीं आतां होय पां सावध । अनुभव आनंद आहे कैसा ॥६॥ सहज कैसें आहे तेथींचें तें गुज । अनुभवें निज पाहे तुकीं ॥७॥ तुका म्हणे आतां होई तूं सावध । तोडीं भवबंध एका जन्में ॥८॥

३०३१. दोराच्या आधारें पर्वत चढला । पाउलासी केला अपघात ॥१॥ अष्टोत्तरशें व्याधी वैद्यें दवडुनि । तो वैद्य मारूनि उत्तीर्णता ॥२॥ नव मास माया वाहिलें उदरीं । ते माता चौबारीं

नग्न केली ॥३॥ गायत्रीचें क्षीर पिळुनी घेउनी । उपवासी बांधोन ताडीतसे ॥४॥ तुका म्हणे गुरुनिंदकाचें तोंड । पाहातां नरककुंड पूर्वजांसी ॥५॥

३०३२. न कळे ब्रह्मज्ञान आचार विचार । लटिका वेव्हार करीतसे ॥१॥ विश्वामित्री पोटीं तयाचा अवतार । नांव महाखर चांडाळाचें ॥२॥ द्रव्यइच्छेसाठीं करीतसे कथा । काय त्या पापिष्टा न मिळे खाया ॥३॥ पोट पोसावया तोंडें बडबडी । नाहीं धडफुडी एक गोष्टी ॥४॥ तुका म्हणे तया काय व्याली रांड । येउनियां भाड जनामध्यें ॥५॥

३०३३. नित्य उठोनियां खावयाची चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥१॥ जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें ॥२॥ चातकांलागूनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवीं ॥३॥ पक्षी वनचरें आहेत भूमीवरि । तयांलागीं हरि उपेक्षीना ॥४॥ तुका म्हणे भाव धरुन राहे चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ॥५॥

३०३४. पूर्वीहूनि बहु भक्त सांभाळिले । नाहीं अव्हेरिले दास कोणी ॥१॥ जे जे शरण आले ते ते आपंगिले । पवाडे विठ्ठले ऐसे तुझे ॥२॥ मिरवे चरणीं ब्रीद ऐसीये गोष्टीचें । भक्तसांभाळाचें प्रेम ऐसें ॥३॥ तुका म्हणे आम्हांसाठीं येणें रूपा । माझ्या मायबापा पांडुरंगा ॥४॥

३०३५. भक्तकरुणा बहुत तुझिया अंतरा । मज विश्वंभरा कळों आलें ॥१॥ पक्षीयासी तुझें नाम जें ठेविलें । तयें उद्धरिलें गणिकेसी ॥२॥ कुंटिणी ते दोष बहु आचरली । नाम घेतां आली करुणा तुज ॥३॥ हृदय कोमळ तुझें नारायणा । ऐसें बहुतां जना तारियलें ॥४॥ तुका म्हणे सीमा नाहीं तुझे दये । कोमळ हृदय पांडुरंगा ॥५॥

३०३६. अजामीळा अंत मरणासी आला । तोंवरि स्मरला नाहीं तुज ॥१॥ प्राण जातेवेळे म्हणे नारायण । त्यासाठीं विमान पाठविलें ॥२॥ बहुत कृपाळु होसी जगन्नाथा । त्रैलोक्यसमर्था सोइरिया ॥३॥ तुका म्हणे भक्तकाज तूं कैवारी । तुज साही चारी वर्णिताती ॥४॥

३०३७. धर्म रक्षावया अवतार घेशी । अपुल्या पाळिसी भक्तजना ॥१॥ अंबऋषीसाठीं जन्म सोसियेले । दुष्ट निर्दाळिले किती एक ॥२॥ धन्य तुज कृपासिंधु म्हणतील । आपुला तूं बोल साच करीं ॥३॥ तुका म्हणे तुज वर्णिती पुराणें । होय नारायण दयासिंधु ॥४॥

३०३८. येउनी जाउनी पाहें तुजकडे । पडिल्या सांकडें नारायणा ॥१॥ आणीक कोणाचा मज नाहीं आधार । तुजवरि भार जीवें भावें ॥२॥ निष्ठुर अथवा होईं तूं कृपाळ । तुज सर्वकाळ विसरेना ॥३॥ आपुलें वचन राहें सांभाळून । तुम्हां आम्हां जाण पडिपाडु ॥४॥ ज्याच्या वचनासी अंतर पडेल । बोल तो येईल तयाकडे ॥५॥ तुम्हां आम्हां तैसें नाहीं म्हणे तुका । होशील तूं सखा जीवलग ॥६॥

३०३९. आईकें नारायणा वचन माझें खरें । सांगतों निर्धारें तुजपाशीं ॥१॥ नाहीं भाव मज

पडिली लोकलाज । राहिलेंसे काज तुझे पायीं ॥२॥ वरदळ भक्ती करितों मी नित्य । परि नाहीं चित्त तुझे पाईं ॥३॥ जरि तुज कांहीं करणें उचित । तारीं तूं पतित तुका म्हणे ॥४॥

३०४०. अनाथ परदेशी हीन दीन भोळें । उगलेंचि लोळे तुझे रंगीं ॥१॥ आपुलें म्हणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ॥२॥ कासविचे परी पाहे दृष्टीं मज । विज्ञानीं उमज देवुनियां ॥३॥ तुका म्हणे तुझा झालों शरणागत । काया वाचा चित्त दुजें नाहीं ॥४॥

३०४१. पावलों पंढरी वैकुंठभुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ॥१॥ पावलों पंढरी आनंदगजरें । वाजतील तुरें शंख भेरी ॥२॥ पावलों पंढरी क्षेम आळिंगनीं । संत या सज्जनीं निवविलों ॥३॥ पावलों पंढरी पार नाहीं सुखा । भेटला हा सखा मायबाप ॥४॥ पावलों पंढरी येरझार खुंटली । माउली वोळली प्रेमपान्हा ॥५॥ पावलों पंढरी आपुलें माहेर । नाहीं संवसार तुका म्हणे ॥६॥

३०४२. खिस्तीचा उदीम उदीमांत हीन । करिती ब्राह्मण कलियुगीं ॥१॥ वेवसाव करी पर्वत मांगापासीं । ते पैं विटाळासी न मानिती ॥२॥ मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा । तोंडावरि थुंका पडतसे ॥३॥ आशा माया रांडा नांव हें कागदीं । आठवीना कधीं नारायण ॥४॥ तुका म्हणे देह झाले पराधीन । पांडुरंगाविण गति नाहीं ॥५॥

३०४३. तूं आम्हां सोयरा सज्जन सांगाती । तुजमज प्रीति चालों सदा ॥१॥ तूं माझा जिव्हाळा जीवाचा जीवलग । होसी अंतरंग अंतरींचा ॥२॥ गण गोत मित्र तूं माझें जीवन । अनन्य शरण तुझ्या पायीं ॥३॥ तुका म्हणे सर्वगुणें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ॥४॥

३०४४. आवडेल तैसें तुज आळवीन । वाटे समाधान जीवा तैसें ॥१॥ नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड । तुजविण गोड देवराया ॥२॥ पुरवीं मनोरथ अंतरींचे आर्त । धाये वरि गीत गाय तुझें ॥३॥ तुका म्हणे लेंकी आळवी माहेरा । गाऊं या संसारा तुज तैसें ॥४॥

३०४५. माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ रामकृष्ण ॥१॥ अबद्ध चांगलें गाऊं भलतैसें । बाळ वदे जैसें मायबापा ॥२॥ तुका म्हणे मज न लावी वांकडें । मी तुझें बोबडें बाळ तान्हें ॥३॥

३०४६. यालागीं आवडी म्हणा रामकृष्ण । जोडा नारायण सर्व काळ ॥१॥ सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा राम हरि ॥२॥ न लागती कष्ट नलगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥३॥ नलगे तप तीर्थ करणें महादान । केल्या एक मन जोडे हरि ॥४॥ तुका म्हणे कांहीं न वेचितां धन । जोडे नारायण नामासाठीं ॥५॥

३०४७. पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयी आवडे गाणें त्याला ॥१॥ ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका लुटी धन ॥२॥ वीतभरि लंगोटी नेदी

अतिताला । भोरप्यासी शाला वांटीतसे ॥३॥ तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥४॥

३०४८. क्षुधार्थी दुष्काळें अन्नें पीडियेले । मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ॥१॥ तैसें तुझे पायीं लांचावलें मन । झुरे माझा प्राण भेटावया ॥२॥ मांजरें देखिला लोणियाचा गोळा । लावूनियां डोळां बैसलेंसे ॥३॥ तुका म्हणे आतां झडी घालूं पाहें । पांडुरंगे माय तुझे पायीं ॥४॥

३०४९. स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ॥१॥ दुखवीना चित्त तुझें नारायणा । कांहींच मागेना तुजपासीं ॥२॥ रिद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस यांची जीवें ॥३॥ तुका म्हणे एक वेळ देईं भेटी । वोरसोनि पोटीं आळिंगावें ॥४॥

३०५०. देव तिहीं बळें धरिला सायासें । करूनियां नास उपाधीचा ॥१॥ पूर्वपक्षी धातु धिक्कारिलें जन । स्वयें जनार्दन तेचि झाले ॥२॥ तुका म्हणे यासी न चले तांतडी । अनुभवें गोडी येईल कळों ॥३॥

३०५१. भेटीवांचोनियां दुजें नाहीं चित्तीं । येणे काकुलती याजसाठीं ॥१॥ भेटोनियां बोलें आवडीचें गुज । आनंदाच्या भोजे जेवूं संगें ॥२॥ मायलेंकरासी नाहीं दुजी परि । जेवूं बरोबरी बैसोनियां ॥३॥ तुका म्हणे ऐसें अंतरींचें आर्त । यावें जी त्वरित नारायणा ॥४॥

३०५२. जायाचें शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपीनाथ पावेचि ना ॥१॥ तुम्ही संत सारे कृपेचे सागर । निरोप हा फार सांगा देवा ॥२॥ अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला । पायापें विठ्ठला ठेवीं मज ॥३॥ तुका म्हणे ऐसी करा निरवण । मग तो रक्षण करील माझें ॥४॥

३०५३. त्रासला हा जीव संसारींच्या सुखा । तुजविण सखा नाहीं कोणी ॥१॥ ऐसें माझे मनीं वाटे नारायणा । घालावी चरणावरी मिठी ॥२॥ कइं तें सुंदर देखेन रूपडें । आवडीच्या कोडें आळंगीन ॥३॥ नाहीं पूर्वपुण्य मज पामरासी । म्हणोनि पायांसी अंतरलों ॥४॥ अलभ्य लाभ कैंचा संचितावेगळा । विनवी गोपाळा दास तुका ॥५॥

३०५४. मोलाचें आयुष्य वेचुनियां जाय । पूर्वपुण्यें होय लाभ याचा ॥१॥ अनंत जन्माचा शेवट पाहतां । नरदेह हातां आला तुझ्या ॥२॥ कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागीं ॥३॥ सांचलिया धन होईल ठेवणें । तैसी नारायण जोडी करा ॥४॥ करा हरिभक्ती परलोकीं कामा । सोडविल यमापासोनियां ॥५॥ तुका म्हणे करा आयुष्याचें मोल । नका वेंचूं बोल नामेंविण ॥६॥

३०५५. काय सुख आहे वाउगें बोलतां । ध्यातां पंढरीनाथा कष्ट नाहीं ॥१॥ सर्वकाळ वाचे उच्चारितां हरि । तया सुखा सरी पार नाहीं ॥२॥ रामकृष्णरंगीं रसना रंगली । अमृत उकली नाम तुझें ॥३॥ तुका म्हणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ॥४॥

३०५६. कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं असे ॥१॥ भक्त जाय सदा हरिकीर्ति गात । त्यासवें अनंत हिंडतसे ॥२॥ त्रैलोक्य भ्रमण फिरत नारद । त्यासवें गोविंद फिरतसे ॥३॥ नारद मंजूळ सुस्वरें गीत गाय । मार्गीं चालताहे संगें हरि ॥४॥ तुका म्हणे त्याला गोडी कीर्तनाची । नाहीं आणिकांची प्रीति ऐसी ॥५॥

३०५७. मायेविण बाळ क्षणभरि न राहे । न देखतां होय कासावीस ॥१॥ आणिक उदंड बुझाविती तरी । छंद त्या अंतरीं माउलीचा ॥२॥ नावडती तया बोल आणिकाचे । देखोनियां नाचे माय दृष्टी ॥३॥ तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । आणिकांचे बोलीं चाड नाहीं ॥४॥

३०५८. हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता । दुःख निवारिता नारायण ॥१॥ नलगे वाहणें संसार उद्वेग । जडों नेदी पांग देवराव ॥२॥ असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ॥३॥ तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥४॥

३०५९. दसरा दिवाळी तोचि माझा सण । सखे हरिजन भेटतील ॥१॥ अमुप जोडिल्या पुण्याचिया राशी । पार त्या सुखासी नाहीं लेखा ॥२॥ धन्य दिवस आजी झाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ॥३॥ तुका म्हणे काय होऊं उतराई । जीव ठेवूं पायीं संतांचिये ॥४॥

३०६०. हाचि माझा नेम धरिला हा धंदा । यावरि गोविंदा भेटी द्यावी ॥१॥ हाचि माझा ध्यास सदा सर्वकाळ । न्यावयासी मूळ येसी कधीं ॥२॥ डोळियांची भूक पाहतां श्रीमुख । आलिंगनें सुख निवती भुजा ॥३॥ बहु चित्त ओढे तयाचिये सोई । पुरेल हा कईं नवस नेणों ॥४॥ बहुबहु काळ झालों कासावीस । वाहिलें बहुवस कलेवर ॥५॥ तुका म्हणे आतां पडावें हें ओझें । पांडुरंगा माझें इयावरि ॥६॥

३०६१. जेणें माझें हित होईल तो उपाव । करिसील भाव जाणोनियां ॥१॥ मज नाहीं सुख दुःख तया खंती । भावना हे चित्तीं नाना छंदें ॥२॥ तोडीं हे संबंध तोडीं आशापाश । मज हो सायास न करितां ॥३॥ तुका म्हणे मी तों राहिलों निश्चिंत । कवळोनि एकांत सुख तुझें ॥४॥

३०६२. शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । तोवरि तूं जाण श्रुतिदास ॥१॥ त्याची तुज कांहीं चुकतांचि नीत । होसील पतित नरकवासी ॥२॥ बहु तूं झालासी चतुरशाहाणा । शुद्ध आचरणा चुकों नको ॥३॥ शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ॥४॥ तुका म्हणे तरि वर्तूनि निराळा । उमटती कळा ब्रह्मींचिया ॥५॥

३०६३. पतिव्रता ऐसी जगामध्यें मात । भोगी पांच सात अंधारीं ते ॥१॥ भ्रतारासी लेखी श्वानाचे समान । परपुरुषीं मन संभ्रम तो ॥२॥ तुका म्हणे तिच्या दोषा नाहीं पार । भोगील अघोर कुंभपाक ॥३॥

३०६४. सिंदळीस नाहीं पोराची पैं आस । राहे बीज त्यास काय करी ॥१॥ अथवा

सेतीं बीज पेरिलें भाजोन । सारा देईल कोण काका त्याचा ॥२॥ तुका म्हणे नाहीं राखायाची चाड । तरि कां लिगाड करूनि घेतो ॥३॥

३०६५. संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाय विठोबाचे ॥१॥ येणें होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश कांहीं ॥२॥ घेतील तयांसी सोपें आहे सुख । बोलयेले मुखें नारायण ॥३॥ सांगितली सोय करुणासागरें । तुम्हां कां हो बरें न वाटे तें ॥४॥ तुका म्हणे तेणें उपचार केला । भोळ्याभाविकांला तरायासी ॥५॥

३०६६. चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ॥१॥ देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नको ॥२॥ माणसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणो नये ॥३॥ वृक्षाचेही पानें हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥४॥ तुका म्हणे विठो भरला सबाह्य । उणें काय आहे चराचरीं ॥५॥

३०६७. मायारूपें ऐसे मोहिलेसे जन । भोगिती पतन नानाकर्में ॥१॥ काय याची प्रीती करितां आदर । दुरवितां दूर तेंचि भलें ॥२॥ नाना छंदें अंगीं वसती विकार । छळियेले फार तपोनिधी ॥३॥ तुका म्हणे ऐसें सिकवितों तुज । आतां धरीं लाज मना पुढें ॥४॥

३०६८. जे जे कांहीं मज होईल वासना । ते ते नारायणा व्हावें तुम्हीं ॥१॥ काय भाव एक निवडूं निराळा । जाणसी तूं कळा अंतरींची ॥२॥ तुजविण मज कोण आहे सखा । जें सांगों आणिका जीवभाव ॥३॥ अवघें पिशुन झालें असे जन । आपपर कोण नाठवे हें ॥४॥ तुका म्हणे तूंचि जीवांचें जीवन । माझें समाधान तुझे हातीं ॥५॥

३०६९. कैसी करूं आतां सांग तुझी सेवा । शब्दज्ञानें देवा नाश केला ॥१॥ आतां तुझें वर्म न कळे अनंता । तुज न सांगतां बुडूं पाहे ॥२॥ संध्या स्नान केली आचाराची नासी । काय तयापाशीं म्हणती एक ॥३॥ बुडविली भक्ति म्हणती ते पाषाण । पिंडाचे पाळण स्थापुनियां ॥४॥ न करावी कथा म्हणती एकादशी । भजनासी नासी मांडियेली ॥५॥ न जावें देउळा म्हणती देव घरीं । बुडविलें या परी तुका म्हणे ॥६॥

३०७०. नमोनमो तुज माझें हें करणे । काय झालें उणें करितां स्नान ॥१॥ संताचा मारग चालतों झाडूनि । हो कां लाभ हानि कांहीं तरी ॥२॥ न करिसी तरी हेंचि कोडें मज । भक्ति गोड काज आन नाहीं ॥३॥ करीं सेवा कथा नाचेन रंगणीं । प्रेमसुख धणी पुरेल तों ॥४॥ महाद्वारीं सुख वैष्णवांचे मेळीं । वैकुंठ जवळी वसे तेथें ॥५॥ तुका म्हणे नाहीं मुक्तिसवें चाड । हेंचि जन्म गोड घेतां मज ॥६॥

३०७१. होउनि संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयांची ॥१॥ निंदिती कदान्न इच्छिती देवान्न । पाहाताती मान आदराचा ॥२॥ तुका म्हणे ऐसें दांभिक भजन । तया

जनार्दन भेटे केवीं ॥३॥

३०७२. लांबवूनि जटा नेसोनि कासोटा । अभिमान मोठा करिताती ॥१॥ सर्वांगा करिती विभूतीलेपन । पाहाती मिष्टान्न भक्षावया ॥२॥ तुका म्हणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ॥३॥

३०७३. कान फाडूनियां मुद्रा ते घालिती । नाथ म्हणविती जगामाजी ॥१॥ घालोनियां फेरा मागती द्रव्यासी । परि शंकरासी नोळखती ॥२॥ पोट भरावया शिकती उपाय । तुका म्हणे जाय नरकलोका ॥३॥

३०७४. कौडीकौडीसाठीं फोडिताती शिर । काढूनि रुधिर मलंग ते ॥१॥ पांघरती चर्म लोहाची सांकळी । मारिती आरोळी धैर्यबळें ॥२॥ तुका म्हणे त्यांचा नव्हेचि स्वधर्म । न कळे तें वर्म गोविंदाचें ॥३॥

३०७५. दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व । पांघुरती बरवीं वस्त्रें काळीं ॥१॥ उफराटी काठी घेऊनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रांसी ॥२॥ चाळवुनि रांडा देऊनियां भेष । तुका म्हणे त्यास यमदंडी ॥३॥

३०७६. होउनि जंगम विभूति लाविती । शंख वाजविती घरोघरीं ॥१॥ शिवाचें निर्माल्य तीर्था न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं ॥२॥ तुका म्हणे त्यांसी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ॥३॥

३०७७. लावूनियां मुद्रा बांधोनियां कंठी । हिंडे पोटासाठीं देशोदेशीं ॥१॥ नेसोनि कोपीन शुभ्रवस्त्र जाण । पाहाती पक्वान्न क्षेत्रींचें तें ॥२॥ तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥३॥

३०७८. ऐसे नाना भेष घेउनी हिंडती । पोटासाठीं घेती प्रतिग्रह ॥१॥ परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांगा पां साचार नांव त्याचें ॥२॥ जन्मतां संसार त्यजियेला शुकें । तोचि निष्कळंक तुका म्हणे ॥३॥

३०७९. स्त्रिया पुत्र कलत्र हे तंव मायावंत । शेवटींचा अंत नपवे कोणी ॥१॥ यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणेंही घेती काढूनियां ॥२॥ ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका म्हणे ॥३॥

३०८०. न लगती मज शब्दब्रह्मज्ञान । तुझिया दर्शनावांचूनियां ॥१॥ म्हणऊनि तुझें करितों चिंतन । नावडे वचन आणिकांचें ॥२॥ काय तीं महत्त्वें करावी मान्यता । तुज न देखतां पांडुरंगा ॥३॥ तुका म्हणे तुज भेटल्यावांचून । न राहें त्याहून होइन वेडा ॥४॥

३०८१. तुझा म्हणवूनि दिसतों गा दीन । हाचि अभिमान सरे तुझा ॥१॥ अज्ञान बाळका

कोपली जननी । तयासी निर्वाणीं कोण पावे ॥२॥ तैसा विठो तुजविण परदेशी । नको या दुःखासी गोवूं मज ॥३॥ तुका म्हणे मज सर्व तुझी आशा । अगा जगदीशा पांडुरंगा ॥४॥

३०८२. आतां माझ्या दुःखा कोण हो सांगाती । रखुमाईचा पति पावेचि ना ॥१॥ काय विधात्यानें घातलीसे रेखा । सुटका या दुःखा न होयचि ॥२॥ तुका म्हणे माझी विसरूं नको चिंता । अगा पंढरीनाथा पाव वेगीं ॥३॥

३०८३. जन्म मृत्यु फार झाले माझ्या जीवा । ऐक माझा धांवा पांडुरंगा ॥१॥ सिणलों बहुत करितां येरझारा । रखुमाईच्या वरा पावें वेगीं ॥२॥ तुका म्हणे तूं गा पतित पावन । घेई माझा शीण जन्मांतर ॥३॥

३०८४. पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ॥१॥ नलगे त्याविण सुखाचा सोहळा । लागे मज ज्वाळा अग्निचिया ॥२॥ तुका म्हणे त्याचे पाहिलिया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ॥३॥

३०८५. तन मन धन दिलें पंढरिराया । आतां सांगावया उरलें नाहीं ॥१॥ आर्तचाड चिंता नाहीं मनीं आशा । तोडियेला फांसा उपाधीचा ॥२॥ तुका म्हणे एक विठोबाचें नाम । आहे जवळी दाम नाहीं रुका ॥३॥

३०८६. आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥१॥ देह हें काळाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥२॥ देता देवविता नेता नेवविता । येथें याची सत्ता काय आहे ॥३॥ निमित्याचा धनी केला असे प्राणी । तुका म्हणे म्हणोनि व्यर्थ गेला ॥४॥

३०८७. मायवर्णीं धाल्या धाय । गर्भ आंवतणें न पाहे ॥१॥ तैसे पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥२॥ पुत्राच्या विजयें । पिता सुखावत जाये ॥३॥ तुका म्हणे अमृतसिद्धि । हरे तृषा आणि व्याधि ॥४॥

३०८८. तुझें अंगभूत । आम्ही जाणतों समस्त ॥१॥ येरा वाटतसे जना । गुढारसें नारायणा ॥२॥ ठावा थारा मारा । घरचिया संवचोरा ॥३॥ तुका म्हणे भेदाभेद । करुनि करितसें वाद ॥४॥

३०८९. तुज दिला देह । आजूनि वागवितों भय ॥१॥ ऐसा विश्वासघातकी । घडली कळतां हे चुकी ॥२॥ बोलतों जें तोंडें । नाहीं अनुभविलें लंडें ॥३॥ दंड लाहे केला । तुका म्हणे जी विठ्ठला ॥४॥

३०९०. सर्वस्वाची साटी । तरिच देवासवें गांठी ॥१॥ नाहीं तरी जया तैसा । भोग भोगविल इच्छा ॥२॥ द्यावें तेंचि घ्यावें । म्हणउनि ज्यावें जीवें ॥३॥ तुका म्हणे उरी । मागें नुरवितां बरी ॥४॥

३०९१. गाढव शृंगारिलें कोडें । कांहीं केल्या नव्हे घोडें ॥१॥ त्याचें भुंकणें न राहे । स्वभावासी करील काय ॥२॥ श्वान शिबिके बैसविलें । भुंकतां न राहे उगलें ॥३॥ तुका म्हणे स्वभावकर्म । कांहीं केल्या न सुटे धर्म ॥४॥

३०९२. आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विषा तें समान ॥१॥ काय तया एका साठीं । कामें केलीं अवघीं खोटीं ॥२॥ दर्पण नलगे एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥३॥ तुका म्हणे खळा । उपदेशाचा कांटाळा ॥४॥

३०९३. अखंड संत निंदी । ऐसी दुर्जनाची बुद्धि ॥१॥ काय म्हणावें तयासी । तो केवळ पापरासी ॥२॥ जो स्मरे रामनामा । त्यासी म्हणती रिकामा ॥३॥ तीर्थव्रत करी । यासी म्हणताती भिकारी ॥४॥ तुका म्हणे विंचाची नांगी । तैसा दुर्जन सर्वांगीं ॥५॥

३०९४. या रे नाचों अवघे जण । भावें आनंदें करून ॥१॥ गाऊं पंढरीचा राणा । क्षेम देऊं संतजना ॥२॥ सुख फुकासाठीं । साधे हरिनाम बोभाटीं ॥३॥ प्रेम वांटितो उदार । देतां नाहीं सान थोर ॥४॥ पापें पळालीं बापुडीं । काळ झाला देशधडी ॥५॥ तुका म्हणे धन्य काळ । आजि प्रेमाचा सुकाळ ॥६॥

३०९५. उपजलें मनीं । हे तों स्वामीची करणी ॥१॥ होइल प्रसादाचें दान । तरि हें कवतुक पाहेन ॥२॥ येइल अभय जरि । तरि हे आज्ञा वंदिन शिरीं ॥ ३॥ भक्तिप्रयोजना । प्रयोजावें बंदीजना ॥ ४॥ यश स्वामिचिये शिरीं । दास्य करावें किंकरीं ॥ ५॥ तुका म्हणे आळीकरा । त्यासी योजावें उत्तरा ॥६॥

३०९६. माझें मन पाहे कसून । चित्त न ढळे तुजपासून ॥१॥ कापुनी देईन शिर । पाहा कृपण कीं उदार ॥ २॥ मजवरि घालीं घण । परि मी न सोडीं चरण ॥३॥ तुका म्हणे अंतीं । तुजवांचूनि नाहीं गति ॥४॥

३०९७. भूमीवरी कोण ऐसा । गांजूं शके हरिच्या दासा ॥१॥ सुखें नाचा हो कीर्तनीं । जयजयकारें गर्जा वाणी ॥२॥ काळा सुटे पळ । जाती दुरितें सकळ ॥३॥ तुका म्हणे चित्तीं । साच माना हे निश्चिती ॥४॥

३०९८. झाला जीवासी उदार । त्यासी काय भीडभार ॥१॥ करीन आडक्या घोंगडें । उभ्या बाजारीं उघडें ॥२॥ जों जों धरिली भीड । तों तों बहु केली चीड ॥३॥ तुका म्हणे मूळ । तुझें उच्चारीन कुळ ॥४॥

३०९९. मिळे हरिदासांसी दाटी । रीघ न होय शेवटीं ॥१॥ तेथें काय म्यां करावें । माझें कोणें आइकावें ॥२॥ कैसें तुज लाजवावें । भक्त म्हणोनियां भावें ॥३॥ नाचतां नये तालीं । वाजवितां नये टाळी ॥४॥ अति मंडित भूषणें । शरीर माझें दैन्यवाणें ॥५॥

तुका म्हणे कमळापति । मज द्यावें त्यांचे हातीं ॥६॥

३१००. जाणों नेणों काय । चित्तीं धरूं तुझे पाय ॥१॥ आतां हेंचि वर्म । गाऊं धरूनियां प्रेम ॥२॥ काय सांडूं मांडूं । भावें हृदयींच कोंडूं ॥३॥ तुका म्हणे देवा । जन्मोजन्मीं मागें सेवा ॥४॥

३१०१. जाळें घातलें सागरीं । बिंदु न राहे भितरी ॥१॥ तैसें पापियाचें मन । तया नावडे कीर्तन ॥२॥ गाढव गंगेसी न्हाणिलें । जाउनि उकरड्यावरि लोळे ॥३॥ प्रीतीं पोसिलें काउळें । जाउनि विष्ठेवरी लोळे ॥४॥ तुका म्हणे तैसी हरी । कीरव्या नावडे कस्तुरी ॥५॥

३१०२. तरलों म्हणुनि धरिला ताठा । त्यासी चळ झाला फांटा ॥१॥ वांयांविण तुटे दोड । मान सुख इच्छी भांड ॥२॥ ग्वाहीविण मात । स्थापी आपुली स्वतंत्र ॥३॥ तुका म्हणे ऐसीं किती । नरका गेलीं अधोगती ॥४॥

३१०३. कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरीचें चांग ॥१॥ तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥२॥ वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥३॥ मिठें रुचविलें अन्न । नये सतत कारण ॥४॥ ऊंस बाहेरी दिसे काळा । आंत रसाचा आगळा ॥५॥ तुका म्हणे मोल गोडी । काय चाड वरिल्या खोडी ॥६॥

३१०४. बाळ माते निष्ठुर होय । परि ते स्नेह करीत आहे ॥१॥ तैसा तूं गा पुरुषोत्तमा । घडी न विसंबसी आम्हां ॥२॥ नेणती भागली । कडे घेता अंग घाली ॥३॥ भूक साहे ताहान । त्याचें राखे समाधान ॥४॥ त्याच्या दुःखें धाये । आपला जीव देऊं पाहे ॥५॥ नांवें घाली उडी । तुका म्हणे प्राण काढी ॥६॥

३१०५. दाता लक्षुमीचा पति । माझे मागणें तें किती ॥१॥ जाणे तान्हेल्याची ताहान । पीतां गंगा नव्हे न्यून ॥२॥ कल्पतरु झाला देता । तेथें पोटाचा मागता ॥३॥ तुका म्हणे संतां ध्यातां । परब्रह्मचि आलें हातां ॥४॥

३१०६. कुरवंडी करीन काया । वरी पायां गोजिरिया ॥१॥ बैसलें तें रूप डोळां । मन चाळा लागलें ॥२॥ परतें न सरवी दुरी । आवडी पुरी बैसली ॥३॥ तुका म्हणे विसावलों । येथें धालों धणीवरी ॥४॥

३१०७. साधनाचे कष्ट मोठें । भय वाटे थोर हें ॥१॥ मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ॥२॥ दासा नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ॥३॥ तुका म्हणे आत्मनिष्ठा । भोग चेष्टा मनाची ॥४॥

३१०८. घेतां आणिकांचा जीव । तेव्हां कींव कराना ॥१॥ आपलें तें वरदळ नेदा । हे गोविंदा कृपणता ॥२॥ सेवा तरी इच्छा सांग । चोरिलें अंग साहेना ॥३॥ तुका म्हणे अरे धन्या ।

निसंतान्या विठोबा ॥४॥

३१०९. आम्हां केलें गुणवंत । तें उचित राखावें ॥१॥ तुम्हांसी तों चाड नाहीं । आणिकां कांहीं सुखदुःखा ॥२॥ दासांचें तों देखों नये । उणें काय होईल तें ॥३॥ तुका म्हणे विश्वंभरा । दृष्टि करा सामोरी ॥४॥

३११०. अगत्य ज्या नरका जाणें । वीट मानणें कीर्तनीं ॥१॥ नावडेनासा झाला बाप । आलें पाप वस्तीसी ॥२॥ नारायण नाहीं वाचे । ते यमाचें अंदणे ॥३॥ तुका म्हणे अभक्तासी । माता दासी जगझोडी ॥४॥

३१११. पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ॥१॥ प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ॥२॥ सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंगा ॥३॥ तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥४॥

३११२. जन्ममरणांची कायसी चिंता । तुझ्या शरणागतां पंढरीराया ॥१॥ वदनीं तुझें नाम अमृतसंजीवनी । असतां चक्रपाणी भय काय ॥२॥ हृदयीं तुझें रूप बिंबलें साकार । तेथें कोण पार संसाराचा ॥३॥ तुका म्हणे तुझ्या नामाची पाखर । असतां कळिकाळ पायां तळीं ॥४॥

३११३. क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥१॥ तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥२॥ तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥३॥

३११४. पानें जो खाईल बैसोनि कथेसी । घडेल तयासी गोहत्या ते ॥१॥ तमाखू ओढोनि काढील जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ॥२॥ कीर्तनीं बडबड करील जो कोणी । बेडुक होउनि येईल जन्मा ॥३॥ जयाचिये मनीं कथेचा कांटाळा । होती त्या चांडाळा बहु जाच ॥४॥ जाच होती पाठी उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका म्हणे ॥५॥

३११५. कामामध्यें काम । कांहीं म्हणा रामराम । जाइल भवश्रम । सुख होईल दुःखाचें ॥१॥ कळों येईल अंतकाळीं । प्राणप्रयाणाचे वेळीं । राहाती निराळीं । रांडापोरें सकळ ॥२॥ जीतां जीसी जैसा तैसा । पुढें आहेरे वोळसा । उगवुनि फांसा । काय करणें तें करीं ॥३॥ केलें होतें याचि जन्में । अवघें विठोबाच्या नामें । तुका म्हणे वर्में जाणोनियां तरती ॥४॥

३११६. माऊलीसी सांगे कोण । प्रेमें वाढवी तान्हें ॥१॥ अंतरींचा कळवळा । करीतसे प्रतिपाळा ॥२॥ मायबापांची उपमा । तुज देऊं पुरुषोत्तमा ॥३॥ तेही साजेना पाहातां । जीवलगा पंढरिनाथा ॥४॥ माय पाळीं संसारीं । परलोकीं राहे दूरी ॥५॥ तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ॥६॥ तुका म्हणे नारायणा । तुज बहुत करुणा ॥७॥

३११७. कोड आवडीचें । पुरविना बाळकाचें ॥१॥ तेव्हां कैसी ते माउली । जाणा

काशासाठीं व्याली ॥२॥ वत्साचिये आसे । धेनु धांवेना वोरसें ॥३॥ तुका म्हणे घरीं । बाळ टाकिलें वानरीं ॥४॥

३११८. अवघ्या पातकांची मीचि एक रासी । अवघा तूं होसी सर्वोत्तम ॥१॥ जैसा तैसा करणें लागे अंगीकार । माझा सर्व भार चालविणें ॥२॥ अवघेंचि मज गिळियेलें काळें । अवघींच बळें तुझे अंगीं ॥३॥ तुका म्हणे आतां खुंटला उपाय । अवघेचि पाय तुझे मज ॥४॥

३११९. सांवळें सुंदर रूप मनोहर । राहो निरंतर हृदयीं माझे ॥१॥ आणीक कांहीं इच्छा आम्हां नाहीं चाड । तुझें नाम गोड पांडुरंगा ॥२॥ जन्मोजन्मीं ऐसें मागितलें तुज । आम्हांसी सहज द्यावें आतां ॥४॥ तुका म्हणे तुज ऐसे जी दयाळ । धुंडितां सकळ नाहीं आम्हां ॥५॥

३१२०. भक्तांहूनि देवा आवडतें काइ । त्रिभुवनीं नाहीं आन दुजें ॥१॥ नावडे वैकुंठ क्षीराचा सागर । धरोनी अंतर राहे दासा ॥२॥ सर्वभावें त्याचें सर्वस्वही गोड । तुळसीदळ कोड करुनी घ्यावें ॥३॥ सर्वस्वही त्याचा म्हणवी विकिला । चित्त द्यावें बोला सांगितल्या ॥४॥ तुका म्हणे भक्तिसुखाचा बांधला । आणीक विठ्ठला धर्म नाहीं ॥५॥

३१२१. हरी तुझें नाम गाईन अखंड । याविण पाखंड नेणें कांहीं ॥१॥ अंतरीं विश्वास अखंड नामाचा । कायामनें वाचा हेंचि देईं ॥२॥ तुका म्हणे आतां देईं संतसंग । तुझे नामीं रंग भरो मना ॥३॥

३१२२. करणें तें हेंचि करा । नरका घोरा कां जातां ॥१॥ जयामध्यें नारायण । शुद्ध पुण्य तें एक ॥२॥ शरणागतां देव राखे । येरां वाखे विघ्नांचे ॥३॥ तुका म्हणे लीन व्हावें । कळे भावें वर्म हें ॥४॥

३१२३. आणीक नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडी ॥१॥ सुखें करा हरिकथा । सर्वथा हे तारील ॥२॥ अनाथाचा नाथ देव । अनुभव सत्य हा ॥३॥ तुका म्हणे बहुतां रीती । धरा चित्तीं सकळ ॥४॥

३१२४. सेट्या ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ॥१॥ जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ॥२॥ गाई म्हैसी हेड । तूप विकी महाद्वाड ॥३॥ तुका म्हणे पाहीं । तेथें पुण्या रीघ नाहीं ॥४॥

३१२५. मागें बहुत झाले खेळ । आतां बळ वोसरलें ॥१॥ हालों नये चालों आतां । घट रिता पोकळ ॥२॥ भाजल्याची दिसे घडी । पट ओढी न साहे ॥३॥ तुका म्हणे पाहतां घडी । जगा जोडी अंगारा ॥४॥

३१२६. आळस आला अंगा । धांव घाली पांडुरंगा ॥१॥ सोसूं शरीराचे भाव । पडती अवगुणांचे घाव ॥२॥ करावीं व्यसनें । दुरी येउनि नारायणें ॥३॥ जवळील दुरी । झालों देवा धरीं करीं ॥४॥ म्हणउनि देवा । वेळोवेळां करीं धांवा ॥५॥ तुका म्हणे पांडुरंगा ।

दुरी धरूं नको अंगा ॥६॥

३१२७. झविली महारें । त्याची व्याली असे पोरें ॥१॥ करी संतांचा मत्सर । कोपे उभारोनि कर ॥२॥ बीज तैसें फळ । वरी आलें अमंगळ ॥३॥ तुका म्हणे ठावें । ऐसें झालें अनुभवें ॥४॥

३१२८. जे जे वहावे संकल्प । तेंचि पुण्य तेंचि पाप ॥१॥ कारण ते मनापासीं । मेळविल्या मिळे रसीं ॥२॥ सांडी मांडी हाली चाली । राहे तरी भली बोली ॥३॥ तुका म्हणे सार । नांव जीवनाचे सागर ॥४॥

३१२९. त्या हरिदासांची भेटी घेतां । नरका उभयतांसी जाणें ॥१॥ माते परिस थोर कथा । भाड घेतां न लाजे ॥२॥ देतां घेतां नरकवासी । उभयतांसी खरव ॥३॥ तुका म्हणे नरकगांवा । जाती हांवा धरोनि ॥४॥

३१३०. भोगीं झाला त्याग । गीतीं गातां पांडुरंग । इंद्रियांचा लाग । आम्हांवरूनि चुकला ॥१॥ करूनि ठेविलों निश्चळ । भय नाहीं तळमळ । घेतला सकळ । अवघा भार विठ्ठलें ॥२॥ तळीं पक्षिणीचे परी । नखें चोंची चारा धरी । आणुनियां घरीं । मुखीं घाली बाळका ॥३॥ तुका म्हणे ये आवडी । आम्ही पायीं दिली बुडी । आहे तेथें जोडी । जन्मांतरींचें ठेवणें ॥४॥

३१३१. कुंकवाची ठेवाठेवी । बोडक्या देवी काशाला ॥१॥ दिवस गमा भरा पोट । कां गे नट नटावा ॥२॥ दिमाख हा कोणां दावा । लटिकी जीवा चरफड ॥३॥ तुका म्हणे झोडगीं हो । फुंदा कां हो कोरडी ॥४॥

३१३२. आम्ही आइते जेवणार । नलगे सोसावें डोंगर । सुखाचा वेव्हार । तेणेंचि वाढेल ॥१॥ ठेवा जोडला मिरासी । ठाव झाला पायांपासीं । नव्हे आणिकासी । रिघ तेथें यावया ॥२॥ बळी दिला जीवभाव । नेणें आणिकांचें नांव । धरिला एकभाव । तो विश्वास फळला ॥३॥ तुका म्हणे झालों बळी । आम्ही निकट जवळी । बोलिलों तें पाळी । वचन स्वामी आमुचें ॥४॥

३१३३. कोण आमचीं योगतपें । करूं बापें जाणावीं ॥१॥ गीत संतसंगें गाऊं । उभीं ठाऊं जागरणीं ॥२॥ आमुचा तो नव्हे लाग । करूं त्याग जावया ॥३॥ तुका म्हणे इंद्रियांसी । येचि रसीं रंगवूं ॥४॥

३१३४. आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा एका भावें ॥१॥ तरीच हरिदास म्हणवितां श्लाघीजे । निर्वासना कीजे चित्त आधीं ॥२॥ गाऊं नाचूं प्रेमें आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मागों तुज ॥३॥ सगुण निर्गुण एकचि आवडी । चित्तें दिली बुडी चिदानंदीं ॥४॥ वृत्तिसहित मन रिघे प्रेम डोहीं । नाठविती देहीं देहभाव ॥५॥ तुका म्हणे देवा ऐसीयाची सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ॥६॥

३१३५. उदंड पाहिलें उदंड ऐकिले । उदंड वर्णिले क्षेत्रमहिमे ॥१॥ ऐसी चंद्रभागा ऐसें

भीमातीर । ऐसा विटेवर देव कोठें ॥२॥ ऐसे संतजन ऐसे हरिदास । ऐसा नामघोष सांगा कोठें ॥३॥ तुका म्हणे आम्हां अनाथाकारणें । पंढरी निर्माण केली देवें ॥४॥

३१३६. पावलों हा देह कागटाळी न्याय । न घडे उपायें घडों आलें ॥१॥ आतां माझीं खंडीं देह देहांतरें । अभय दातारें देऊनियां ॥२॥ अंधळ्याचे पायीं धनाची चरवी । अघटित तेंवी घडों आलें ॥३॥ तुका म्हणे योग घडला बरवा । आतां कास देवा न सोडीं मी ॥४॥

३१३७. सांडावी हे भीड अधमाचे चाळे । मद्यपी बरळे भलत्या छंदें ॥१॥ ऐसे तंव तुम्ही नाहीं जी दिसत । कां हे अनुचित वदलेती ॥२॥ फांटा झाला त्यासी नाहीं वोडा वारा । बेरसाचा खरा हा तो गुण ॥३॥ तुका म्हणे नाहीं ज्याच्या बापा ताळ । तो देखे विटाळ संतां अंगीं ॥४॥

३१३८. आवडें हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥१॥ आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें । जों मी तुज पाहें पांडुरंगा ॥२॥ लांचावलें मन लागलीसे गोडी । ते जीवें न सोडीं ऐसें झालें ॥३॥ तुका म्हणे आम्ही मागावी लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें ॥४॥

३१३९. तिळ एक अर्ध राई । सीतबिंदु पावे काई । तया सुखा नाहीं । अंतपार पाहतां ॥१॥ म्हणउनी करा लाहो । नका मागें पुढें पाहों । अवघ्यामध्यें आहों । अवघे सावचित्त तों ॥२॥ तीर्थें न येती तुळणी । आजि या सुखा धणी । कासी गयेहुनी । जीं आगळीं असती ॥३॥ येंथें धरी लाज । वर्णा अभिमान काज । नाडला सहज । तुका म्हणे तो येथें ॥४॥

३१४०. विठोबाचें नाम ज्याचे मुखीं नित्य । त्या देखिल्या पतित उद्धरती ॥१॥ विठ्ठलविठ्ठल भावें म्हणे वाचे । तरी तो काळाचे दांत ठेंची ॥२॥ बहुत तारिले सांगों किती आतां । ऐसा कोणी दाता दुजा नाहीं ॥३॥ तुका म्हणे म्यां ही ऐकोनियां कीर्ती । धरिला एकांतीं हृदयामाजी ॥४॥

३१४१. आड पडे काडी । तरि ते बहुत पाणी खोडी ॥१॥ ऐसे दुर्जन संगती । बहुतांचे घात होती ॥२॥ एक पडे मासी । तरी ते बहु अन्न नासी ॥३॥ तुका म्हणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड ॥४॥

३१४२. पंढरीचें भूत मोठें । आल्या गेल्या झडपी वाटे ॥१॥ बहु खेचरीचें रान । जातां वेडें होय मन ॥२॥ तेथें जाऊं नका कोणी । गेले नाहीं आले परतोनि ॥३॥ तुका पंढरीसी गेला । पुन्हा जन्मा नाहीं आला ॥४॥

३१४३. काय करूं आतां या मना । न संडी विषयाची वासना । प्रार्थितांही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ॥१॥ आतां धांवें धांवें गा श्रीहरी । गेलों वायां नाहीं तरी । न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ॥२॥ न राहे एके ठायीं एक घडी । चित्त तडतडा तोडी । भरलें विषयभोवडीं । घालूं पाहे उडी भवडोहीं ॥३॥ आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला

माझा यांणीं । तुका म्हणे चक्रपाणी । काय अजोनि पाहातोसी ॥४॥

३१४४. पाषाण परिस भूमि जांबूनद । वंशाचा संबंध धातयाचा ॥१॥ सोनियाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा राक्षसांचा ॥२॥ ऐसी सहस्त्र ज्या सुंदर कामिनी । माजी मुखरणी मंदोदरी ॥३॥ पुत्रपौत्रांचा लेखा कोण करी । मुख्य पुत्र हरी इंद्रा आणी ॥४॥ चौदा चौकडीया आयुष्यगणना । बंधुवर्ग जाणा कुंभकर्ण ॥५॥ तुका म्हणे ज्याचे देव बांदवडी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥६॥

३१४५. लाभ पुढें करी । घात नारायण वारी ॥१॥ ऐसी भक्तांची माउली । करी कृपेची साउली ॥२॥ माय बाळकासी । जीव भाव वेची तैसी ॥३॥ तुका म्हणे नाड । नाहीं शरणागता आड ॥४॥

३१४६. तुजविण कांहीं । स्थिर राहे ऐसें नाहीं ॥१॥ कळों आलें बहुता रीती । पांडुरंगा माझ्या चित्तीं ॥२॥ मोकलोनी आस । सर्वभावें झालों दास ॥३॥ तुका म्हणे तूंचि खरा । येर वाउगा पसारा ॥४॥

३१४७. खोंकरी आधण होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शकेचि ना ॥१॥ खापराचे अंगीं घासितां परिस । न पालटे कीस काढिलीया ॥२॥ पालथे घागरी रिचवितां जळ । तुका म्हणे खळ तैसे कथे ॥३॥

३१४८. नागलें देखोनि चांगलें बोले । आपुलें वेचूनि त्यापुढें खुले ॥१॥ अधमाचे ओंगळ गुण । उचित नेणें तो धर्म कोण ॥२॥ आर्तभूता न घली पाण्याची चुळ । न मगे त्यासी घाली साकरगुळ ॥३॥ एकासी धड न बोले वाचा । एकासी म्हणे मी तुझे बांदीचा ॥४॥ एका देखोनि लपवी भाकरी । एकासी आड पडोनि होकरी ॥५॥ तुका म्हणे ते गाढवपशु । लाभेंविण केला आयुष्याचा नाशु ॥६॥

३१४९. पिंडपोषकाच्या जळो ज्ञानगोष्टी । झणी दृष्टिभेटी न हो त्याची ॥१॥ नाहीं संतचिन्हें उमटलीं अंगीं । उपदेशा लागीं पात्र झाला ॥२॥ पोहों नये कासे लावितो आणिका । म्हणावें त्या मूर्खा काय आतां ॥३॥ सिणलें तें गेलें सिणलियापासीं । झाली त्या दोघांसी एक गति ॥४॥ तुका म्हणे अहो देवा दीनानाथा । दरुषण आतां नको त्याचें ॥५॥

३१५०. संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥१॥ पडिले दुःखाचे सागरीं । वहावले भवपुरीं ॥२॥ कामक्रोधलोभ चित्तीं । वरि दाविती विरक्ती ॥३॥ आशापाशीं बांधोन चित्त । म्हणती झालों आम्हीं मुक्त ॥४॥ त्यांचे लागले संगती । झाली त्यांसी तेचि गति ॥५॥ तुका म्हणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥६॥

३१५१. राम कृष्ण ऐसीं उच्चारीन नामें । नाचेन मी प्रेमें संतांपुढें ॥१॥ काय घडेल तें घडो

या सेवटीं । लाभ आणि तुटी देव जाणे ॥२॥ चिंता मोह आशा ठेवीन निराळीं । देईन हा बळी जीव पायीं ॥३॥ तुका म्हणे कांहीं उरों नेदी उरी । सांडीन हे थोरी ओवाळोनी ॥४॥

३१५२. कांगा कोणी न म्हणे पंढरीची आई । बोलाविते पाहीं चाल नेटें ॥१॥ तेव्हां माझ्या मना होय समाधान । जाय सर्व सीण जन्मांतरिंचा ॥२॥ तुका म्हणे माझी होईल माउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा ॥३॥

३१५३. वेद अनंत बोलिला । अर्थ इतुलाचि शोधिला ॥१॥ विठोबासी शरण जावें । निजनिष्ठा नाम गावें ॥२॥ सकळशास्त्रांचा विचार । अंतीं इतुलाचि निर्धार ॥३॥ अठरापुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ॥४॥

३१५४. नाहीं पाक होत उफराटे चाली । बोलली ते केली व्हावी नीत ॥१॥ नाहीं मानूं येत वांजटाचे बोल । कोरडेच फोल चवी नहीं ॥२॥ तरुवरा आधीं कोठें आहे फळ । चावटा बरळ म्हणा त्यासी ॥३॥ तुका म्हणे किती ठकलीं तातडी । गव्हीं नाहीं गोडी मांडे पुऱ्या ॥४॥

३१५५. झाली हरिकथा रंग वोसरला । उचितासी आला पांडुरंग ॥१॥ वांटितो हें प्रेम उचिताचा दाता । घेईं रे तूं आतां धणीवरि ॥२॥ प्रेम देऊनियां अवघीं सुखी केलीं । जीं होतीं रंगलीं विठ्ठलीं तीं ॥३॥ तुकें हें दुर्बळ देखियेलें संतीं । म्हणउनि पुढतीं आणियेलें ॥४॥

३१५६. भय नाहीं भेव । अनुतापीं नव्हता जीव ॥१॥ जेथें देवाची तळमळ । तेथें काशाचा विटाळ ॥२॥ उच्चारितां दोष । नाहीं उरों देत लेश ॥३॥ तुका म्हणे चित्त । होय आवडी मिश्रित ॥४॥

२१५७. ध्यानीं ध्यातां पंढरिराया । मनासहित पालटे काया ॥१॥ तेथें बोला कैंची उरी । माझें मीपण झाला हरि ॥२॥ चित्तचैतन्यीं पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥३॥ तुका म्हणे सांगों काय । एकाएकीं वृत्ति हरिमय ॥४॥

३१५८. देव तिळीं आला । गोडें गोड जीव धाला ॥१॥ साधला हा पर्वकाळ । गेला अंतरींचा मळ ॥२॥ पापपुण्य गेलें । एका स्नानेंचि खुंटलें ॥३॥ तुका म्हणे वाणी । शुद्ध जनार्दन जनीं ॥४॥

३१५९. अन्यायासी राजा न करितां दंड । बहुत ते लंड पीडिती जना ॥१॥ न करितां निगा न काढितां तन । कैंचे येती कण हातासी ते ॥२॥ तुका म्हणे संतां करूं नये अनृत । पाप नाहीं नीत विचारितां ॥३॥

३१६०. काय उणें मज पांडुरंगा पायीं । रिद्धिसिद्धि ठायीं वोळगती ॥१॥ कोण पाहे सुखा नासिवंताकडे । तृष्णेचीं बापुडें नव्हों आम्ही ॥२॥ सर्व सुखें आम्हीं केलीं पावटणी । पापपुण्यें दोन्ही उडविलीं ॥३॥ तुका म्हणे घरीं आणिलें वैकुंठ । वसविली पेठ वैष्णवांची ॥४॥

३१६१. अर्भकाचे साठीं । पंतें हाती धरिली पाटी ॥१॥ तैसे संत जगीं । क्रिया करूनि दाविती अंगीं ॥२॥ बाळकाचे चाली । माता जाणूनि पाउल घाली ॥३॥ तुका म्हणे नाव । जनासाठीं उदकीं ठाव ॥४॥

३१६२. सारासार विचार करा उठाउठी । नाम धरा कंठीं विठोबाचे ॥१॥ तयाच्या चिंतनें निरसेल संकट । तराल दुर्घट भवसिंधु ॥२॥ जन्मोनियां कुळीं वाचे स्मरे राम । धरी हाचि नेम अहर्निशीं ॥३॥ तुका म्हणे कोटी कुळें तीं पुनीत । भावें गातां गीत विठोबाचें ॥४॥

३१६३. ज्याची जया आस । तया जवळी त्याचा वास । येर जवळीं तें दुरी । वत्स सांडी धेनु घरीं ॥२॥ गोडी प्रियापाशीं । सुख उपजे येरासी ॥३॥ तुका म्हणे बोल । घडे तया ठायीं मोल ॥४॥

३१६४. द्रव्य घेऊनियां कथा जरी करी । तरी भंगो हरी देह माझा ॥१॥ माझी कथा करा ऐसें म्हणे कोणा । तरी नारायणा जिव्हा झडो ॥२॥ साह्य तूं झालासी काय उणें तुपें । आणीक भूतांपें काय मागों ॥३॥ तुका म्हणे सर्व सिद्धि तुझे पायीं । तूं माझा गोसावी पांडुरंगा ॥४॥

३१६५. जरि हा हो कृपा करिल नारायण । तरी हेंचि ज्ञान ब्रह्म होय ॥१॥ कोठोनियां कांहीं नलगे आणावें । नलगे कोठें जावें तरावया ॥२॥ जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं । तरि हेचि होती दिव्य चक्षु ॥३॥ तुका म्हणे देव दावील आपणा । तरि जीवपणा ठाव नाहीं ॥४॥

३१६६. रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥१॥ जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य वारू ॥२॥ तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघियांचें काळें केलें तोंड ॥३॥

३१६७. होईन खडे गोटे । चरणरज साने मोठे । पंढरीचे वाटे । संतचरणीं लागेन ॥१॥ आणीक दुजें कांहीं । मी मागेन तुजपाशीं । आठवितां सुख । भय नास नाहीं ज्यासी ॥२॥ होईन मोचे वाहणा । पायीं सकळां संतजनां । मांजर सुकर सुणा । जवळी शेष घ्यावया ॥३॥ सांडोवा पायरी । वोहळ बावी गंगातिरीं । होईन तयावरी । संतसज्जन चालती ॥४॥ लागें संतां पायीं । ऐसा ठेवीं भलते ठायीं । तुका म्हणे देईं । धाक नाहीं जन्माचा ॥५॥

३१६८. कासयासी व्हावें आम्ही जीवन्मुक्त । सांडुनियां थीत प्रेमसुख ॥१॥ वैष्णवांचा दास झाला नारायण । काय त्या मिळोन असों सुखी ॥२॥ काय त्या गांठीचें पडलें सुटोन । उगेचि बैसोन धीर धरूं ॥३॥ सुख आम्हांसाठीं केलें हें निर्माण । निर्दैव तो कोण हाणे लाता ॥४॥ तुका म्हणे मज नलगे सायुज्यता । राहेन या संतां समागमें ॥५॥

३१६९. आवडे पंढरी भीमा पांडुरंगा । चंद्रभागा लिंग पुंडलीक ॥१॥ कामधेनु कल्पतरु चिंतामणी । आवडीची धणी पुरविती ॥२॥ तुका म्हणे जीवा थोर झालें सुख । नाठवे हे

भूक तहान कांहीं ॥३॥

३१७०. प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही । एकही निदानीं नव्हे त्यासी ॥१॥ दोहीं पेंवावरी ठेवूं जातां हात । होय अपघात शरीराचा ॥२॥ तुका म्हणे तया दोहींकडे धक्का । शेवटीं तो नरकामाजी पडे ॥३॥

३१७१. आम्हां भय धाक कोणाचा रे पाहें । काळ मशक काय मानव हे ॥१॥ आम्हांसी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥२॥ काय करावी हे कोणाची मान्यता । करितां अनंता कोण वारी ॥३॥ नाहीं शीण आम्हां झालें कवतुक । पुनीत हे लोक करावया ॥४॥ तुका म्हणे खातों आनंदाचे लाडु । नका चरफडूं घ्या रे तुम्ही ॥५॥

३१७२. तांबियाचें नाणें न चले खऱ्या मोलें । जरी हिंडविलें देशोदेशीं ॥१॥ करणीचें कांहीं न मने सज्जना । यावें लागे मना वृद्धांचिया ॥२॥ हिरियासारिखा दिसे शिरगोळा । पारखी ते डोळां न पाहाती ॥३॥ देऊनियां भिंग कमाविलें मोतीं । पारखिया हातीं घेता नये ॥४॥ तुका म्हणे काय नटोनियां व्यर्थ । आपुलें हें चित्त आपणा ग्वाही ॥५॥

३१७३. चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितें दूर तेंचि भलें ॥१॥ ऐसी परंपरा आलीसे चालत । भलत्याची नीत त्यागावरी ॥२॥ हो कां पिता पुत्र बंधु कोणी तेही । विजाति संग्रहीं धरूं नये ॥३॥ तुका म्हणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ॥४॥

३१७४. आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुटा ॥१॥ नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चितीनें चित्तसमाधान ॥२॥ लपविलें तेंही ढेंकरे उमटे । खोटियाचें खोटें उर फोडी ॥३॥ तुका म्हणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो ॥४॥

३१७५. आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःख दोष अंगीं लागे ॥१॥ ऐसे मनीं वाहूं न येते संकल्प । करूं नये पाप भांडवला ॥२॥ किल्मिषाची चित्तीं राहतां कांचणी । अंगीं तें जडोनी ठाव जाळी ॥३॥ तुका म्हणे कोपें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धेंची ॥४॥

३१७६. अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये चित्तीं बोध कैंचा ॥१॥ अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा ॥२॥ अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचें ॥३॥ अज्ञानाचे ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैंचें ॥४॥ तुका म्हणे जळो ऐसियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥५॥

३१७७. गुळें माखोनियां दगड ठेविला । वरी दिसे भला लोकाचारी ॥१॥ अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ॥२॥ ऐसिया दांभिकां कैंची हरिसेवा । नेणेचि सद्भावा कोणे काळीं ॥३॥ तुका म्हणे येणें कैसा होय संत । विटाळलें चित्त कामक्रोधें ॥४॥

३१७८. संतांचा पढियावो कैशापरि लाहो । नामाचा आठवो कैसा राहे ॥१॥ हेचि थोर चिंता लागली मानसीं । निजतां निद्रेसी नलगे डोळा ॥२॥ जेवितां जेवणीं नलगे गोड धड । वाटतें काबाड विषयसुख ॥३॥ ऐसिया संकटीं पावे कृपानिधि । लावीं संतपदीं प्रेमभावें ॥४॥ तुका म्हणे आम्हीं नेणों कांहीं हित । तुजविण अनाथ पांडुरंगा ॥५॥

३१७९. पंढरीचा वास धन्य तेचि प्राणी । अमृताची वाणी दिव्य देह ॥१॥ मूढ मतिहीन दुष्ट अविचारी । ते होती पंढरीं दयारूप ॥२॥ शांति क्षमा अंगीं विरक्ति सकळ । नैराश्य निर्मळ नारी नर ॥३॥ तुका म्हणे नाहीं वर्ण अभिमान । अवघेंचि जीवन्मुक्त लोक ॥४॥

३१८०. देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ॥१॥ इंद्रियांचे गोडी ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ॥२॥ युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥३॥ नाव नावलीतां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ॥४॥ तुका म्हणे बुद्धी आपुले अधीन । करी नारायण आतुडे तों ॥५॥

३१८१. नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करी देवा ॥१॥ न यो कामक्रोध द्वेष निंदा द्वंद्व । अवघा गोविंद निःसंदेह ॥२॥ असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ॥३॥ करोनियां साह्य पुरवीं मनोरथ । व्हावें कृपावंत तुका म्हणे ॥४॥

३१८२. जगीं कीर्ति व्हावी । म्हणोनि जालासी गोसावी ॥१॥ बहुत केलें पाठांतर । वर्म राहिलें तें दूर ॥२॥ चित्तीं नाहीं अनुताप । लटिकें भगवें स्वरूप ॥३॥ तुका म्हणे सिंदळीच्या । व्यर्थ श्रमविली वाचा ॥४॥

३१८३. प्राक्तनाच्या योगें आळशावरी गंगा । स्नान काय जगा करूं नये ॥१॥ उभी कामधेनु मांगाचे आंगणीं । तिसी काय ब्राह्मणी वंदूं नये ॥२॥ कोडियाचे हातें परिसें होय सोनें । अपवित्र म्हणोन घेऊं नये ॥३॥ यातिहीन झाला गांवींचा मोकासी । त्याच्या वचनासी मानूं नये ॥४॥ भावारूढ तुका मुद्रा विठोबाची । न मनी तयांचीं तोंडें काळीं ॥५॥

३१८४. बोलिलों उत्कर्षें । प्रेमरसें दासत्वें ॥१॥ साच करिता नारायण । जया शरण गेलों तो ॥२॥ समर्थ तो आहे ऐसा । धरिली इच्छा पुरवीतो ॥३॥ तुका म्हणे लडिवाळाचें । द्यावें साचें करूनियां ॥४॥

३१८५. विचा केला ठोबा । म्हणोनि नांव तो विठोबा ॥१॥ कां रे नेणां त्याचें नांव । काय वेदासि नाहीं ठावें ॥२॥ शेष स्तुती प्रवर्तला । जिव्हा चिरूनि पलंग झाला ॥३॥ तुका म्हणे सत्ता । ज्याची काळाचिये माथां ॥४॥

३१८६. चोरासी चांदणें वेश्येसी सेजार । परिसेसीं खापर काय होय ॥१॥ दुधाचे आधणीं वैरिले पाषाण । कदा काळीं जाण पाक नव्हे ॥२॥ तुका म्हणे जरि पूर्वपुण्यें सिद्धि । तरिच

राहे बुद्धि संतसंगीं ॥३॥

३१८७. मथनासाठीं धर्माधर्म । त्याचें वर्म नवनीत ॥१॥ तेंचि तें घाटूं नये । आलें जाय नासूनि ॥२॥ सांभाळावें वरावर । वर्म दूर नव जावें ॥३॥ तुका म्हणे धालें पोट । मग बोटचाटणी ॥४॥

३१८८. न घडे मायबापा बाळकाचा घात। आपणांदेखत होऊं नेदी ॥१॥ कां मी मनीं चिंता वाहूं भय धाक। काय नव्हे एक करितां तुज ॥२॥ वर्म जाणे त्याच्या हिताचे उपाय। तहान भूक वाहे कडिये खांदीं ॥३॥ तुका म्हणे तूं गा कृपावंत भारी। ऐसें मज हरी कळों आलें ॥४॥

३१८९. करावें कीर्तन । मुखें गावे हरिचे गुण ॥१॥ मग कांहीं नव्हे बाधा । काम दुर्जनाची क्रोधा ॥२॥ शांतिखर्ग हातीं । काळासी ते नागवती ॥३॥ तुका म्हणे दाता सखा । ऐसा अनंतासारिखा ॥४॥

३१९०. साधनाच्या कोटी । केल्या आटी होत्या त्या ॥१॥ देव कृपा करी जरी । होय उजरी स्वरूपीं ॥२॥ केले होती वृथा श्रम । चित्ता उपरम न होतां ॥३॥ तुका म्हणे कळों आलें । सर्व झालें आपरूप ॥४॥

३१९१. तुज काय करूं मज एक सार । अमृतनागर नाम तुझें ॥१॥ काय उणें आम्हां तयाचिये पोटीं । गोवितां हे कंठीं कामधेनु ॥२॥ नोळखे तानुलें माय ऐसी कोण । वोसरे देखून शोक त्याचा ॥३॥ जो नाहीं देखिला याचक नयनीं । तो पावे घेउनि लज्जा दान ॥४॥ नामासाठीं प्राण सांडियेला रणीं । शूर ते भांडणीं न फिरती ॥५॥ तुका म्हणे आम्हीं गातां गीतीं भला । भेटूनि विठ्ठला काय चाड ॥६॥

३१९२. कृपेचे सागर हेचि साधुजन । तिहीं कृपादान केलें मज ॥१॥ बोबडे वाणीचा केला अंगीकार । तेणें माझा स्थिर केला जीव ॥२॥ तेणें सुखें मन स्थिर झालें ठायीं । संतीं दिला पायीं ठाव मज ॥३॥ नाभी नाभी ऐसें बोलिले वचन । तें माझें कल्याण सर्वस्वही ॥४॥ तुका म्हणे झालों आनंदें निर्भर । नाम निरंतर घोष करूं ॥५॥

३१९३. भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांति क्षमा दया ॥१॥ अष्ट महा सिद्धि वोळगती द्वारीं । नवजती दूरी दवडितां ॥२॥ तेथें दुष्ट गुण न मिळे निःशेष । चैतन्याचा वास झाला माजी ॥३॥ संतुष्ट हें चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ॥४॥ तुका म्हणे त्याचा देव सर्व भार । चालवी कामार होउनियां ॥५॥

३१९४. साच हा विठ्ठल साच हें करणें । संत जीं वचनें बोलियेले ॥१॥ साच तें स्वहित साच ते प्रचित । साच वेदें नीत सांगितली ॥२॥ तुका म्हणे घेती साच साच भावें । लटिकें वर्म ठावें नाहीं त्यांसी ॥३॥

३१९५. संगें वाढे सीण संगें वाढे भजन । त्रिविध हें जन बहू देवा ॥१॥ याचिमुळें आला संगाचा कंटाळा । दिसताती डोळां नानाछंद ॥२॥ एकविध भाव राहावया ठाव । नेदीं हा संदेह राहों चित्तीं ॥३॥ शब्दज्ञानी हित नेणती आपुलें । आणीक देखिलें नावडे त्यां ॥४॥ तुका म्हणे आतां एकलेंचि भलें । बैसोनि उगलें राहावें तें ॥५॥

३१९६. पुण्यपापा ठाव नाहीं सुखदु:खा । हानिलाभशंका नासलिया ॥१॥ जितां मरण आलें आप पर गेलें । मूळ हें छेदिलें संसाराचें ॥२॥ अधिकार जात वर्णधर्मयात । ठाव नाहीं सत्य असत्याशीं ॥३॥ जन वन भिन्न अचेत चळण । नाहीं दुजेपण ठाव यासी ॥४॥ तुका म्हणे देह वाहिला विठ्ठलीं । तेव्हांच घडली सर्व पूजा ॥५॥

३१९७. संकोचित जीव महत्त्वाच्या भारें । दासत्वचि बरें बहु वाटे ॥१॥ कळावी जी माझी आवडी हे संतां । देणें तरि आतां हेंचि द्यावें ॥२॥ तुमचे चरण पावविलों सेवा । म्हणऊनि हेवा हाचि करीं ॥३॥ विनवुनी तुका वंदितो चरण । लेखा रजरेण चरणींचा ॥४॥

३१९८. देव कैंचा तया दुरी । भाका बरी करुणा ॥१॥ आळवित्या नलगे घर । माय जाणे रे भातुकें ॥२॥ नावेवरी ज्याचा भार । पैल पार जवळी त्या ॥३॥ आतां परदेशी तुका । झाला लोकां वेगळा ॥४॥

३१९९. भक्ति ज्याची थोडी । पूर्ण विषयाची गोडी ॥१॥ तो नरचि नव्हे पाहीं । खर जाणावा तो देहीं ॥२॥ भजन पूजनही नेणे । काय स्वरूपासी जाणे ॥३॥ तुका म्हणे त्याला । भोवंडून बाहेर घाला ॥४॥

३२००. संतांनीं सरता केलों तैशापरी । चंदनीं ते बोरी व्यापियेली ॥१॥ गुण दोष याती न विचारी कांहीं । ठाव दिला पायीं आपुलिया ॥२॥ तुका म्हणे आलें समर्थाच्या मना । तरि होय राणा रंक त्याचा ॥३॥

३२०१. चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम तुमचे वर्णावे गुण ॥१॥ हेंचि एक तुम्हां देवा मागणें दातारा । उचित तें करा माझा भाव जाणूनि ॥२॥ खुंटलें जाणीव माझें बोलणें आतां । कळों यावीं तैसी करा बाळाची चिंता ॥३॥ तुका म्हणे आता नको देऊं अंतर । न कळे पुढें काय बोलूं विचार ॥४॥

३२०२. संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ॥१॥ भजनविधि नेणें साधन उपाय । सकळ सिद्धि पाय हरिदासांचे ॥२॥ ध्यान गति मति आसन समाधि । हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ॥३॥ नेणता निर्लज्ज नेणें नादभेद । सुखें हा गोविंद गाऊं गीतीं ॥४॥ सर्व जोडी मज गोत आणि वित्त । तुका म्हणे संतमहंतपाय ॥५॥

३२०३. हरिजनां प्राण विकली हे काया । अंकित मी तया घरीं झालों ॥१॥ म्हणियें सत्वर

करीन सांगतां । घेईन मी देतां शेष त्यांचें ॥२॥ आस करूनियां राहेन अंगणीं । उच्छिष्टाची धणी घ्यावयासी ॥३॥ चालतां ते मार्गीं चरणींचे रज । उडती सहज घेइन आतां ॥४॥ दुरी त्यापासूनि न वजें दवडितां । तुका म्हणे लाता घेइन अंगें ॥५॥

३२०४. पुण्य फळलें बहुतां दिवसां । भाग्यउदयाचा ठसा । झालों सन्मुख तो कैसा । संतचरण पावलों ॥१॥ आजि फिटलें माझें कोडें । भवदुःखाचें सांकडें । कोंदाटलें पुढें । परब्रह्म सांवळें ॥२॥ आलिंगनें संतांचिया । दिव्य झाली माझी काया । मस्तकें हें पायां । वरी त्यांच्या ठेवितां ॥३॥ तुका म्हणे धन्य झालों । सुखें संतांचिया धालों । लोटांगणीं आलों । पुढें भार देखोनी ॥४॥

३२०५. भक्ति आम्हीं केली सांडूनी उद्वेग । पावलों हें संगसुख याचें ॥१॥ सुख आम्हां झालें धरितां याचा संग । पळाले उद्वेग सांडूनियां ॥२॥ तुका म्हणे सुख बहु झालें जीवा । घडली या सेवा विठोबाची ॥३॥

३२०६. इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं राम म्हणोनि काई ॥१॥ जेवीं मासीसंगें अन्न । सुख नेदी तें भोजन ॥२॥ कीर्तन करावें । तैसें करूनी दावावें ॥३॥ हें तों अंगीं नाहीं चिन्हें । गाइलें वेश्येच्या ढव्यानें ॥४॥ तुका म्हणे रागा । संत शिवूं नेदिती अंगा ॥५॥

३२०७. नलगे देवा तुझें आम्हांसी वैकुंठ । सायुज्यता पट्ट नलगे मज ॥१॥ देईं तुझें नाम मज सर्वकाळीं । मागणें वनमाळी हेंचि तुज ॥२॥ नारद तुंबर उद्धव प्रल्हाद । बळी रुक्मांगद नाम ध्याती ॥३॥ सिद्ध मुनिगण गंधर्व किन्नर । करिताती गजर रामनामें ॥४॥ तुका म्हणे हरी देईं तुझें नाम । अखंडित प्रेम हेंचि द्यावें ॥५॥

३२०८. पावलों प्रसाद इच्छा केली तैसी । झालें या चित्तासी समाधान ॥१॥ मायबाप माझा उभा कृपादानी । विटे सम जोडूनि पादांबुजें ॥२॥ सांभाळासी येऊं नेदीतां उणीव । अधिकारगौरव राखे तैसा ॥३॥ तुका म्हणे सर्व अंतर्बाह्य आहे । जया तैसा राहे कवळुनी ॥४॥

३२०९. मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैंचा भवभ्रम ॥१॥ चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ॥२॥ सुखें असों संसारीं । मग जवळीच हरि ॥३॥ मुक्ति वरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ॥४॥ मग देवभक्त झाला । तुका तुकीं उतरला ॥५॥

३२१०. क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नाठवे । पहावया धांवे कोल्हांटासी ॥१॥ कथेसी साक्षेपें पाचारिलें जरी । म्हणे माझ्या घरीं कोणी नाहीं ॥२॥ बलात्कारें जरी आणिला कथेसी । निद्रा घे लोडासी टेंकूनियां ॥३॥ तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥४॥

३२११. आतां वाटों नेदीं आपुलें हें मन । न सोडीं चरण विठोबाचे ॥१॥ दुजियाचा संग लागों नेदीं वारा । आपुल्या शरीरावरूनियां ॥२॥ यावें जावें आम्हीं देवाचे सांगातें । मागूनी

करित हेंचि आलों ॥३॥ काय वायां गेलों करूं तों उद्वेग । उभा पांडुरंग मागें पुढें ॥४॥ तुका म्हणे प्रेम मागतों आगळें । येथें भोगूं फळें वैकुंठींचीं ॥५॥

३२१२. आतां जावें पंढरीसी । दंडवत विठोबासी ॥१॥ चंद्रभागेचिया तिरीं । आम्ही नाचों पंढरपूरीं ॥२॥ जेथें संतांची दाटणी । त्यांचें घेऊं पायवणी ॥३॥ तुका म्हणे आम्ही बळी । जीव दिला पायांतळीं ॥४॥

३२१३. आम्हां नरका जातां काय येइल तुझ्या हातां । ऐसें तूं अनंता विचारीं पां ॥१॥ तुज शरण आलियाचें काय हेंचि फळ । विचारा दयाळ कृपानिधी ॥२॥ तुझे पावनपण न चले आम्हांसीं । ऐसें हृषीकेशी कळों आलें ॥३॥ आम्ही दुःख पावों जन्ममरण व्यथा । काय तुझ्या हाता येत असे ॥४॥ तुका म्हणे तुम्हीं खादली हो रडी । आम्हीं धरली सेंडी नाम तुझें ॥५॥

३२१४. पांडुरंगें पाहा खादलीसे रडी । परि नामसेंडी धरिली आम्हीं ॥१॥ आतां संतांनीं करावी पंचाईत । कोण हा फजितखोर येथें ॥२॥ कोणाचा अन्याय येथें आहे स्वामी । गर्जतसों आम्ही पातकीही ॥३॥ याचें पावनपण सोडवाजी तुम्ही । पतितपावन आम्ही आहों खरे ॥४॥ आम्ही तंव आहों अन्यायी सर्वथा । याची पावन कथा कैसी आहे ॥५॥ तुका म्हणे आम्ही मेलों तरी जाणा । परि तुमच्या चरणा न सोडावें ॥६॥

३२१५. घालूनियां मध्यवर्ती । दाटुनि उपदेश देती ॥१॥ ऐसे पोटभरे संत । तया कैंचा भगवंत ॥२॥ रांडापोरांतें गोविती । वर्षासनें ते लाविती ॥३॥ जैसे बोलती निरोपणीं । तैसी न करिती करणी ॥४॥ तुका म्हणे तयां । तमोगुणियांची क्रिया ॥५॥

३२१६. जीवें जीव नेणें पापी सारिखाची । नळी दुजयाची कापूं बैसे ॥१॥ आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशुमध्यें काय कळों नये ॥२॥ देखत हा जीव हुंबरे वोर्डत । निष्ठुराचे हात वाहाती कैसे ॥३॥ तुका म्हणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक महादुःखें ॥४॥

३२१७. भागल्याचें तारूं शिणल्याची साउली । भुकेलिया घाली प्रेमपान्हा ॥१॥ ऐसी ही कृपाळु अनाथांचे वेशी । सुखाचीच राशी पांडुरंग ॥२॥ सकळा सन्मुख कृपेचिया दृष्टी । पाहे बहु भेटी उतावीळ । तुका म्हणे येथें आतां उरे कैंचा । अनंता जन्मींचा शीणभाग ॥४॥

३२१८. काय न्यून आहे सांगा । पांडुरंगा तुम्हां पें ॥१॥ आमुची तों न पुरे इच्छा । पिता ऐसा मस्तकीं ॥२॥ कैसी तुम्हां होते सांडी । करुणा तोंडीं उच्चारें ॥३॥ आश्चर्यचि करी तुका । हे नायका वैकुंठींच्या ॥४॥

३२१९. परि आतां माझी परिसावी विनंती । रखमाईच्या पती पांडुरंगा ॥१॥ चुकलिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ॥२॥ तुका म्हणे तुझा म्हणताती मज । आतां आहे लाज हेचि तुम्हां ॥३॥

३२२०. पापाचिया मुळें । झालें सत्याचें वाटोळें ॥१॥ दोष झाले बळिवंत । नाहीं ऐसी झाली नीत ॥२॥ मेघ पडों भीती । पिकें सांडियली क्षिती ॥३॥ तुका म्हणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥४॥

३२२१. ऐसा दुस्तर भवसागर । नेणों कैसा उतरूं पार ॥१॥ कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर ॥२॥ मायाममतेचे भोंवरे । घेती भयानक फेरे ॥३॥ वासनेच्या लहरी येती । उद्योगहेलकावे बैसती ॥४॥ तरावया एक युक्ति असे । तुका नामनावेमधें बैसे ॥५॥

३२२२. हरिदासाचिये घरीं । मज उपजवा जन्मांतरीं ॥१॥ म्हणसी कांहीं मागा । हेंचि देगा पांडुरंगा ॥२॥ संतां लोटांगणीं । जातां लाज नको मनीं ॥३॥ तुका म्हणे अंगीं । शक्ती देईं नाचे रंगीं ॥४॥

३२२३. लटिक्याचे आवतणें जेविलिया साचे । काय त्या विश्वास तोचि खरा ॥१॥ कोल्हाटिणी लागे आकाशीं खेळत । ते काय पावत अमरपद ॥२॥ जळमंडप्याचे घोडे राउत नाचती । ते काय तगती युद्धालागीं ॥३॥ तुका म्हणे तैसें मतवादीचें जिणें । दिसे लाजिरवाणें बोलतांचि ॥४॥

३२२४. एक म्हणती आम्ही देवची पैं जालों । ऐसें नका बोलों पडाल पतनीं ॥१॥ एक म्हणती आम्ही देवाचीं पैं रूपें । तुमचिया बापें न चुके जन्म ॥२॥ देवें उचलिली स्वमुखें मेदिनी । तुमचेनी गोणी नुचलवे ॥३॥ देवें मारियेले दैत्य दानव मोठे । तुमचेनी न तुटे तृणमात्र ॥४॥ राया विठोबाचें पद जो अभिळासी । पातकाची राशी तुका म्हणे ॥५॥

३२२५. काय आम्हीं केलें ऐसें । नुद्धरीजेसें सांगावें ॥१॥ हरण कोल्हें वैकुंठवासी । कोण त्यासी अधिकार ॥२॥ गजा नाड्या सरोवरीं । नाहीं हरी विचारिलें ॥३॥ तुका म्हणे गणिका नष्ट । माझे कष्ट त्याहूनि ॥४॥

३२२६. गुणा आला विटेवरी । पितांबरधारी सुंदर जो ॥१॥ डोळे कान त्याच्या ठायीं । मन पायीं राहो हें ॥२॥ निवारोनि जाय माया । ऐसी छाया जयाची ॥३॥ तुका म्हणे समध्यान । ते हे चरण सुकुमार ॥४॥

३२२७. रंगीं रंगे नारायण । उभा करितों कीर्तन ॥१॥ हातीं घेऊनियां वीणा । कंठीं राहें नारायणा ॥२॥ देखिलीसे मूर्ती । माझ्या हृदयाची विश्रांति ॥३॥ तुका म्हणे देवा । देईं कीर्तनाचा हेवा ॥४॥

३२२८. तुझा भरंवसा आम्हां । फार होता पुरुषोत्तमा ॥१॥ भवसागरसंकटीं । तारिशील जगजेठी ॥२॥ नाम आदित्याचें झाड । त्याचा न पडे उजेड ॥३॥ सिलंगणीचें सोनें । त्यासी गहाण ठेवी कोण ॥४॥ नामासारखी करणी । कोठें नाहीं त्रिभुवनीं ॥५॥ तुका म्हणे देवा ।

ब्रीद सोडूनियां ठेवा ॥६॥

३२२९. विद्या अल्प परी गर्वशिरोमणि । मजहुनी ज्ञानी कोण आहे ॥१॥ अंगीं भरला ताठा कोणातें मानीना । साधूची छळणा स्वयें करी ॥२॥ साधूचे देहाचा मानी जो विटाळ । त्रिलोकीं चांडाळ तोचि एक ॥३॥ संतांची जो निंदा करी मुखें जपे । खतेला सकळ पापें तोचि एक ॥४॥ तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥५॥

३२३०. बैसतां चोरापाशीं तैसी होय बुद्धि । देखतांचि चिंधी मन धांवे ॥१॥ व्यभिचाऱ्यापाशीं बैसतां क्षणभरी । देखतांचि नारी मन धांवे ॥२॥ प्रपंचाचा छंद टाकुनियां गोवा । धरावें केशवा हृदयांत ॥३॥ सांडुनियां देईं संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावी गा ॥४॥ तुका म्हणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ॥५॥

३२३१. परिसें गे सुनेबाई । नको वेचूं दूध दहीं ॥१॥ आवा चालली पंढरपुरा । वेसीपासुनि आली घरा ॥२॥ ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ॥३॥ माझे हातींचा कलवडू । मजवांचुनि नको फोडूं ॥४॥ वळवटक्षिरीचें लिंपन । नको फोडूं मजवांचून ॥५॥ उखळ मुसळ जांतें । माझें मन गुंतलें तेथें ॥६॥ भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ॥७॥ भक्षीं मपित अहारु । नको फारसी वरूं सारूं ॥८॥ सून म्हणे बहुत निकें । तुम्हीं यात्रेसी जावे सुखें ॥९॥ सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ॥१०॥ सूनमुखींचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ॥११॥ सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ॥१२॥ आतां कासया यात्रे जाऊं । काय जाउनि तेथें पाहूं ॥१३॥ मुलें लेंकरें घर दार । माझें येथेंचि पंढरपुर ॥१४॥ तुका म्हणे ऐसें जन । गोवियेलें मायेंकरून ॥१५॥

३२३२. पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ॥१॥ आमुचें तों आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं ॥२॥ अंगें उणें बैसे त्याच्या टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे ॥३॥ तुका म्हणे आम्हीं काय करणें त्यासी । धका खवंदासी लागतसे ॥४॥

३२३३. आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभवावा ॥१॥ आवडी आवडी कलेवरा कलेवरीं । वरिलें अंतरीं ताळा पडे ॥२॥ अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडे मागे तुटी हर्षयोगें ॥३॥ तुका म्हणे एकें कळतें दुसरें । बरियानें बरें आहाचें आहाच ॥४॥

३२३४. हेचि माझे चित्तीं । राहों आतां भाव प्रीति । विठ्ठल सुषुप्तीं । जागृति स्वप्नासी ॥१॥ आणिक नाहीं मागणें । राज्यचाड संपत्ति धनें । जिव्हे सुख तेणें । घेतां देहीं नाम तुझें ॥२॥ तुझें रूप सर्वांठायीं । देखें ऐसें प्रेम देईं । ठेवावा हा पायीं । अनुभव चित्ताचा ॥३॥ जन्ममरणाचा बाध । समूळूनि तुटो कंद । लागो हाचि छंद । हरि गोविंद वाचेसी ॥४॥ काया पालटे दर्शनें । अवघें कोंदाटे चैतन्य । जीवशिव खंडण । होय तरे चिंतितां ॥५॥ तुका म्हणे

याचि भावें । आम्ही धालों तुझ्या नांवें । सुखें होत जन्में । भलते याती भलतैसी ॥६॥

३२३५. मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देईं माझ्या ॥१॥ तूं माझें संचित तूंचि पूर्वपुण्य । तूं माझें प्राचीन पांडुरंगा ॥२॥ तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूंचि नित्यनेम नारायणा ॥३॥ कृपावचनाची वाट पहातसें । करुणा वोरसें बोला कांहीं ॥४॥ तुका म्हणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोला सर्वोत्तमा मजसवें ॥५॥

३२३६. काय करूं आतां धरूनियां भीड । नि:शंक हें तोंड वाजविलें ॥१॥ नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोन नव्हे हित ॥२॥ आलें तें उत्तर बोलों स्वामीसवें । धीट नीट जीवें होउनियां ॥३॥ तुका म्हणे मना समर्थासी गांठी । घालावी हे मांडी थापटोनि ॥४॥

३२३७. भ्रतारासी भार्या बोले गुजगोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी ॥१॥ अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥२॥ जोडितसां तुम्ही खाती येरचोरें । माझीं तंव पोरें हळहळती ॥३॥ तुमची व्याली माझे डाईं हो पेटली । सदा दुष्ट बोली सोसवेना ॥४॥ दुष्ट वृत्ती नंदुली सदा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या सुखें ॥५॥ भावा दीर कांहीं धड हा न बोले । नांदों कोणा खालें कैसी आतां ॥६॥ माझ्या अंगसंगें तुम्हांसी विश्रांति । मग धड गति नाहीं तुमची ॥७॥ ठाकतें ठुमकतें जीव मुठी धरूनि । परि तुम्ही अजूनि न धरा लाज ॥८॥ वेगळें निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देतें आतां ॥९॥ तुका म्हणे झाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तैसा वर्ते ॥१०॥

३२३८. कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित । तूं कां हो दुश्चित निरंतर ॥१॥ माझीं मायबापें बंधु हो बहिणी । तुज करिती सीण त्यागीन मी ॥२॥ त्यांचे जरी तोंड पाहेन मागुता । तरी मज हत्या घडो तुझी ॥३॥ सकाळीं उठोन वेगळा निघेन । वाहतों तुझी आण निश्चयेंसी ॥४॥ वेगळें निघतां घडीन दोरे चुडा । तूं तंव माझा जोडा जन्माचा कीं ॥५॥ ताईत सांखळी गळाची दुलडी । बाजुबंदजोडी हातसर ॥६॥ वेणीचे जे नग सर्वही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥७॥ नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगींची कांचोळी जाळिया फुलें ॥८॥ तुका म्हणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ॥९॥

३२३९. उजळितां उजळे दीपकाची वाती । स्वयंभ ते ज्योती हिऱ्या अंगीं ॥१॥ एकीं महाकष्टें मेळविलें धन । एकासी जतन दैवयोगें ॥२॥ परिमळें कळे चंदनाचें चिन्ह । निवडी ते भिन्न गाढव तो ॥३॥ तुका म्हणे जया अंगीं नामठसा । तो तरे सहसा वंद्य होय ॥४॥

३२४०. सोवळा तो झाला । अंगिकार देवें केला ॥१॥ येर करिती भोजन । पोट पोसावया दुर्जन ॥२॥ चुकला हा भार । तयाचीच येरझार ॥३॥ तुका म्हणे दास । झाला तया नाहीं नास ॥४॥

३२४१. आजि शिवला मांग । माझें विटाळलें आंग ॥१॥ यासी घेऊं प्रायश्चित्त । विठ्ठलविठ्ठल हृदयांत ॥२॥ झाली क्रोधासवें भेटी । तोंडा वाटे नर्क लोटी ॥३॥ अनुतापी न्हाऊं । तुका म्हणे स्वी पाहूं ॥४॥

३२४२. ठाव तुम्हांपाशीं । झाला आतां हृषीकेशी ॥१॥ नलगे जागावें सतत । येथें स्वभावें हे नीत ॥२॥ चोरट्यासी थारा । येथें कैंचा जी दातारा ॥३॥ तुका म्हणे मन । आतां झालें समाधान ॥४॥

३२४३. पाळियेले लळे । माझे विठ्ठले कृपाळे ॥१॥ बहुजन्माचें पोसणें । सरतें पायांपाशीं तेणें ॥२॥ सवे दिली लागों । भातें आवडीचें मागों ॥३॥ तुका म्हणे भिन्न । नाहीं दिसों दिलें क्षण ॥४॥

३२४४. जो या गेला पंढरपुरा । आणीक यात्रा न मनी तो ॥१॥ सुलभ माय पंढरिराणा । पुरवी खुणा अंतरींच्या ॥२॥ जन्मांतरिंच्या पुण्यरासी । वारी त्यासी पंढरीची ॥३॥ बाहेर येतां प्राण फुटे । रडें दाटे गहिंवरें ॥४॥ दधिमंगल भोजन सारा । म्हणती करा मुरडींव ॥५॥ मागोता हा पावो ठाव । पंढरिराव दर्शनें ॥६॥ तुका म्हणे भूवैकुंठ । वाळुवंट भींवरा ॥७॥

३२४५. न मिळती एका एक । जये नगरींचे लोक ॥१॥ भलीं तेथें राहूं नये । क्षणें होईल न कळे काय ॥२॥ न करितां अन्याय । बळें करीती अपाय ॥३॥ नाहीं पुराणाची प्रीती । ठायीं ठायीं पंचाइती ॥४॥ भल्या बुऱ्या मारी । होतां कोणी न विचारी ॥५॥ अविचाऱ्या हातीं । देउनि प्रजा नागविती ॥६॥ तुका म्हणे दरी । सुखें सेवावी ते बरी ॥७॥

३२४६. शिकवणें नाक झाडी । पुढिल जोडी कळेना ॥१॥ निरयगांवीं भोग देता । तेथें सत्ता आणिकांची ॥२॥ अवगुणांचा सांठा करी । तेचि धरी जीवासी ॥३॥ तुका म्हणे जडबुद्धि । कर्म शुद्धी सांडवी ॥४॥

३२४७. गोपीचंदन मुद्रा धारणें । आम्हां लेणें वैष्णवां ॥१॥ मिरवूं अळंकार लेणें । ही भूषणें स्वामींचीं ॥२॥ विकलों ते सेवा जीवें । एक्या भावें एकविध ॥३॥ तुका म्हणे शूर झालों । बाहेर आलों संसारा ॥४॥

३२४८. विषयांचे लोलिंगत । ते फजीत होतील ॥१॥ न सरे येथें यातिकुळ । शुद्ध मूळ बीज व्हावें ॥२॥ शिखासूत्र सोंग वरी । दुराचारी दंड पावे ॥३॥ तुका म्हणे अभिमान । नारायणा न सोसे ॥४॥

३२४९. वडिलें दिलें भूमिदान । तें जो मागे अभिळासून ॥१॥ अग्रपूजेचा अधिकारी । श्रेष्ठ दंड यमा घरीं ॥२॥ उभयकुळ समवेत । नरकीं प्रवेशे अद्भुत ॥३॥ तप्तलोहा भेटी । तुका म्हणे कल्पकोटी ॥४॥

३२५०. लटिकी ग्वाही सभेआंत । देतां पतित आगळा ॥१॥ कुंभपाकीं वस्ती करूं । होय धुरु कुळेंसी ॥२॥ रजस्वला रुधिर स्त्रवे । तेंचि द्यावें तृषेसी ॥३॥ तुका म्हणे जन्मा आला । काळ झाला कुळासी ॥४॥

३२५१. आचरे दोष न धरी धाक । परीपाक दु:खाचा ॥१॥ चांडाळ तो दुराचारी । अंगीकारी कोण त्या ॥२॥ नव्हे संतान वोस घर । अंधकार कुळासी ॥३॥ तुका म्हणे त्याचें दान । घेतां पतन दु:खासी ॥४॥

३२५२. कींविलवाणा झाला आतां । दोष करितां न विचारी ॥१॥ अभिलाषी नारी धन । झकवी जन लटिकेंचि ॥२॥ विश्वासिया करितां घात । न धरी चित्त कांटाळा ॥३॥ तुका म्हणे नाहीं आला । वृथा गेला जन्मासी ॥४॥

३२५३. घेऊं नये तैसें दान । ज्याचें धन अभिलाषी ॥१॥ तो येथें कामा नये । नरका जाय म्हणोनि ॥२॥ विकी स्नानसंध्या जप । करी तप पुढिलांचें ॥३॥ तुका म्हणे दांभिक तो । नरका जातो स्वइच्छा ॥४॥

३२५४ सदा नामघोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ॥१॥ सर्वसुख ल्यालों सर्व अळंकार । आनंदें निर्भर डुल्लतसों ॥२॥ असों ऐसा कोठें आठवचि नाहीं । देहींच विदेही भोगूं दशा ॥३॥ तुका म्हणे आम्ही झालों अग्निरूप । लागों नेदूं पापपुण्य अंगा ॥४॥

३२५५. वरीवरी बोले युद्धाचिया गोष्टी । परसैन्या भेटी नाहीं झाली ॥१॥ पराव्याचे भार पाहुनियां दृष्टी । कांपतसे पोटीं थरथरा ॥२॥ धनाचा उदार रायाचा जुंझार । फिरंगीचा मार मारीतसे ॥३॥ धन्य त्याची माय धन्य त्याचा बाप । अंगीं अनुताप हरिनामें ॥४॥ तुका म्हणे साधु बोले खर्गधार । खोंचतें अंतर दुर्जनाचें ॥५॥

३२५६. गंधर्वनगरीं क्षण एक न रहावें । तैंचि करावें मूळक्षेत्र ॥१॥ खपुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावें ॥२॥ वंध्यापुत्राच्या लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळां पाहा वेगीं ॥३॥ मृगजळीं पोहे घालुनि सज्ञाना । तापलिया जना तोषवावें ॥४॥ तुका म्हणे मिथ्या देहेंद्रियकर्म । ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ॥५॥

३२५७. दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्कद्वारीं ॥१॥ ऐसें सांगों जातां जना । नये कोणाचिया मना ॥२॥ बरें विचारूनी पाहें । तुज अंतीं कोण आहे ॥३॥ तुका म्हणे रांडलेंका । अंतीं जासी यमलोकां ॥४॥

३२५८. भाग्यवंत आम्ही विष्णुदास जगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥१॥ नाहीं ते पुरवीत आणुनि जवळी । गाउनी माउली गीत सुखें ॥२॥ प्रीति अंगीं असे सदा सर्वकाळ । वोळलीं

सकळ सुखें ठायीं ॥३॥ आपुल्या स्वभावें जैसे जेथें असों । तैसे तेथें दिसों साजिरेचि ॥४॥ वासनेचा कंद उपडिलें मूळ । दुरितें सकळ निवारिलीं ॥५॥ तुका म्हणे भक्तजनांची माउली । करील साउली विठ्ठल आम्हां ॥६॥

३२५९. भोंदावया मीस घेऊनि संतांचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ॥१॥ मनुष्याचे परी बोल रावा करी । रंजवी नरनारी जगामध्यें ॥२॥ तिमयाचे बैल करी शिकविलें । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे ॥३॥ तुका म्हणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निसुंगातें ॥४॥

३२६०. अंगीं घेऊनियां वारें दया देती । तया भक्तां हातीं चोट आहे ॥१॥ देव्हारा बैसोनि हालविती सुपें । ऐसीं पापी पापें लिंपती तीं ॥२॥ एकीबेकीन्यायें होतसे प्रचित । तेणें लोक समस्त भुलताती ॥३॥ तयांचे स्वाधीन दैवतें असती । तरी कां मरती त्यांचीं पोरें ॥४॥ तुका म्हणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तोही नव्हे ॥५॥

३२६१. अधमाचें चित्त अहंकारी मन । उपदेश सीण तया केला ॥१॥ पापियाचें मन न करी आचार । विधवेसी शृंगार व्यर्थ केला ॥२॥ अधमाचे चित्त दुश्चित ऐकेना । वायांशीण मना करुनी काय ॥३॥ गर्दभासी दिली चंदनाची उटी । केशर ललाटी शूकराच्या ॥४॥ पतिवंचकेसी सांगतां उदंड । परि तें पाषांड तिचे मनीं ॥५॥ तुका म्हणे तैसें अभाविका सांगतां । वाउगाचि चित्ता सीण होय ॥६॥

३२६२. संत देखोनियां स्वयें दृष्टी टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ॥१॥ वीट ये कर्णासी संतवाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ॥२॥ कथेमाजी नीज वाढे नित्यक्षणीं । स्त्रियेचे कीर्तनीं प्रेमें जागे ॥३॥ तुका म्हणे तुम्हीं क्रोधासी न यावें । स्वभावा करावे काय कोणीं ॥४॥

३२६३. भोळे भाविक हे जुनाट चांगले । होय तैसें केलें भक्तिभावें ॥१॥ म्हणउनि चिंता नाहीं आम्हां दासां । न भ्यों गर्भवासा जन्म घेतां ॥२॥ आपुलिया इच्छा करूं गदारोळ । भोगूं सर्वकाळ सर्व सुखें ॥३॥ तुका म्हणे आम्हां देवाचा सांगात । नाहीं विसंबत येरयेरां ॥४॥

३२६४. नाहीं बळ योगअभ्यास कराया । न कळे ते क्रिया साधनाची ॥१॥ तुझिये भेटीचें प्रेम अंतरंगीं । नाहीं बळ अंगीं भजनाचें ॥२॥ काय पांडुरंगा करूं बा विचार । झुरतें अंतर भेटावया ॥३॥ तुका म्हणे सांगा वडिलपण बुद्धी । तुजविण दयानिधी पुसों कोणा ॥४॥

३२६५. हेंचि सुख पुढतीं मागतों आगळें । आनंदाचीं फळें सेवादान ॥१॥ जन्मजन्मांतरीं तुझाचि अंकिला । करूनि विठ्ठला दास ठेवीं ॥२॥ दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता नास त्याचा ॥३॥ अभय देऊनि करावें सादर । क्षण तो विसर पडों नेदीं ॥४॥ तुका म्हणे

आम्ही जे जे इच्छा करूं । ते ते कल्पतरू पुरविसी ॥५॥

३२६६. बहुतां जन्मां अंतीं जन्मलासी नरा । देव तो सोइरा करीं आतां ॥१॥ करीं आतां बापा स्वहिताचा स्वार्थ । अनर्थाचा अर्थ सांडीं परता ॥२॥ सांडीं आतां कुडी कल्पनेची वाट । मार्ग आहे नीट पंढरीचा ॥३॥ पंढरीसी जावें सर्व सुख घ्यावें । रूप तें पाहावें विटेवरी ॥४॥ विटेवरी नीट आनंदाचा कंद । तुका नाचे छंदें नामघोषें ॥५॥

३२६७. पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥१॥ कर्मधर्म त्यांचा झाला नारायण । त्यांचेनि पावन तिन्ही लोक ॥२॥ वर्णअभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥३॥ अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें । तयाची पुराणें भाट झालीं ॥४॥ वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ॥५॥ कबीर मोमीन लतिफा मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णुदास ॥६॥ कान्होपात्रा खोदु पिंजारी तो दादु । भजनीं अभेदू हरिचे पायीं ॥७॥ चोखामेळा बंका जातीचे महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥८॥ नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरीराव तियेसवें ॥९॥ मैराळ जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों ॥१०॥ यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥११॥ तुका म्हणे तुम्हीं विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणों किती ॥१२॥

३२६८. ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ॥१॥ अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनि करिती पाप ॥२॥ दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ॥३॥ तुका म्हणे सांगों किती । जळो तयांची संगती ॥४॥

३२६९. मानूं कांहीं आम्ही आपुलिया इच्छा । ना तरी सरिसा रंकरावो ॥१॥ आपुल्या उदास आहों देहभावीं । मग लज्जा जीवीं चाड नाहीं ॥२॥ तुका म्हणे आम्ही खेळों सहज लीळे । म्हणोनि निराळे सुखदुःखा ॥३॥

३२७०. फिरविलें देऊळ जगामाजी ख्याती । नामदेवा हातीं दूध प्याला ॥१॥ भरियेली हुंडी नरसीमेहत्याची । धनाजी चाट्याचीं सेतें पेरी ॥२॥ मिराबाईसाठीं प्याला तो विषाचा । लाख्या कोलाट्याचा ढोल पिटी ॥३॥ कबिराचे मागीं विणूं लागे शेले । मूल उठविलें कुंभाराचें ॥४॥ आतां तुम्ही दया करा पंढरिराया । तुका विनवी पायां वेळोवेळां ॥५॥

३२७१. निरंजनीं आम्हीं बांधियेलें घर । निराकारीं निरंतर राहिलोंसे ॥१॥ निराभासीं पूर्ण झालों समरस । अखंड ऐक्यास पावलों आम्ही ॥२॥ तुका म्हणे आतां नाहीं अहंकार । झालों तदाकार नित्य शुद्ध ॥३॥

३२७२. पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥१॥ जीवशिवा शेज रचिली आनंदें । आउटाविए पदीं आरोहण ॥२॥ निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहत

बाळका हळुरु गाती ॥३॥

३२७३. नाना मतांतरें शब्दाची व्युत्पत्ति । पाठांतरें होती वाचाळ ते ॥१॥ माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभावा ॥२॥ यज्ञ याग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान आलीकडे ॥३॥ तुका म्हणे होय उपरति चित्ता । अंगीं सप्रेमता येणें लागे ॥४॥

३२७४. नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रीं मंत्रीं अनुभव तो ॥१॥ हर्षामर्षा अंगीं आदळती लाटा । कामक्रोधें तटा सांडियेलें ॥२॥ न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं । उपरति नाहीं जेथें चित्ता ॥३॥ तुका म्हणे सुख देहनिरसनें । चिंतनें चिंतनें तद्रूपता ॥४॥

३२७५. शोधूनि अन्वय वंश वंशावळी । परस्परा कुळीं उच्चारण ॥१॥ म्हणविलें मागें पुढें चाले कैसें । केला सामरस्य अभिषेक ॥२॥ एकछत्र झळके उन्मनी निशाणी । अनुहात ध्वनी गगन गर्जे ॥३॥ तुकया स्वामी स्थापी निजपदीं दासा । करूनी उल्हासा सप्रेमता ॥४॥

३२७६. प्रवृत्तिनिवृत्तीचे आटूनियां भाग । उतरिलें चांग रसायन ॥१॥ ज्ञानाग्निहुताशीं कडशिले वोजा । आत्मसिद्धिकाजा लागूनियां ॥२॥ ब्रह्मीं ब्रह्मरस सिद्ध झाला पाक । घेतला रुचक प्रतीतीमुखें ॥३॥ स्वानुभव अंगीं झाला समरस । साधनीं निजध्यास ग्रासोग्रासीं ॥४॥ आरोग्यता तुका पावला अष्टांगीं । मिरविला रंगीं निजात्मरंगें ॥५॥

३२७७. पुराणिक म्हणविती । जाणोनि कांदे ते भक्षिती ॥१॥ अगस्तीचें मूत्र मळ । लावुनि म्हणती कृष्णावळ ॥२॥ श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणाचा । संग न सुटे शूद्रीचा ॥३॥ बदराईच्या पाडी दाढा । लागे तुकयाचा हुंदाडा ॥४॥

३२७८. स्वप्नीं तोही कैसा न पडसी डोळां । सुंदर सांवळा घवघवीत ॥१॥ चतुर्भुज माळा रुळे येकावळी । कस्तुरी निढळीं रेखिलीसे ॥२॥ शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणीं दोन्ही ॥३॥ तुका म्हणे स्वप्नीं दावी आतां पाय । पांडुरंगें माय कृपावंते ॥४॥

३२७९. साता दिवसांचा जरी झाला उपवासी । तरी कीर्तनासी टाकूं नये ॥१॥ फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । परी नामाचा गजर सोडूं नये ॥२॥ शरीराचे होत दोनी तेही भाग । परि कीर्तनाचा रंग सांडो नये ॥३॥ तुका म्हणे ऐसा नामीं झाला निर्धार । तेथें निरंतर देव वसे ॥४॥

३२८०. पहिली माझी ओवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ॥१॥ दुसरी माझी ओवी दुजें नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ॥२॥ तिसरी माझी ओवी तिला नाहीं ठाव । अवघाचि देव जनीं वनीं ॥३॥ चवथी माझी ओवी वैरिलें दळण । गाईन निधान पांडुरंग ॥४॥ पांचवी माझी ओवी माझिया माहेरा । गाईन निरंतरा पांडुरंगा ॥५॥ साहावी माझी ओवी साहाही आटली । गुरुमूर्ति भेटली पांडुरंग ॥६॥ सातवी माझी ओवी आठवी वेळोवेळां । बैसलासे डोळां पांडुरंग ॥७॥ आठवी माझी ओवी अठ्ठावीस युगें । उभा चंद्रभागे पांडुरंग ॥८॥ नववी

माझी ओवी सरलें दळण । चुकलें मरण संसारींचें ॥९॥ दहावी माझी ओवी दाहा अवतारा । न यावें संसारा तुका म्हणे ॥१०॥

३२८१. अनाथां जीवन । आम्हां तुमचे चरण । करूनि सांठवण । ते धरिले हृदयीं ॥१॥ पुष्ट झाली अंगकांति । आनंद न समाये चित्तीं । कवतुकें प्रीती । गाऊं नाचों उल्हासें ॥२॥ करुणाउत्तरीं । करूं आळवण हरी । जाऊं नेदूं दुरी । प्रेमप्रीतिपडिभरें ॥३॥ मोहो ममता करी गोवा । ऐसें आहे जी केशवा । तुका म्हणे सेवा । आणीक नाहीं जाणत ॥४॥

३२८२. घ्या रे भाई घ्या रे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥१॥ येच हाटीं येच हाटीं । बांधा गांठीं पारखून ॥२॥ वेच आहे वेच आहे । सरलें पाहें मग कोठें ॥३॥ उघडें दुकान उघडें दुकान । रात्री झाली कोण सोडी मग ॥४॥ तुका म्हणे अंतकाळीं । जाती टाळीं बैसोनी ॥५॥

३२८३. गुणांची आवडी वाचेचा पसरु । पडिला विसरु सर्व रसां ॥१॥ आदि मध्य अंतीं नाहीं अवसान । जीवनीं जीवन मिळोनि गेलें ॥२॥ रामकृष्ण नाममाळा हे साजिरी । ओविली गोजिरी कंठाजोगी ॥३॥ तुका म्हणे तनु झालीसे शीतळ । अवघी सकळ ब्रह्मानंदें ॥४॥

३२८४. जैसी तैसी तरि वाणी । मना आणि माउली ॥१॥ लेंकरांच्या स्नेहें गोड । करी कोड त्या गुणें ॥२॥ मागें पुढें रिघे पोटीं । साहे खेटी करी तें ॥३॥ तुका विनवी पांडुरंगा । ऐसें पैंगा आहे हें ॥४॥

३२८५. देवाची भांडारी । आदा विनियोग करी ॥१॥ आतां न माखे हातपाय । नेणों होतें कैसें काय ॥२॥ देवें नेली चिंता । झाला सकळ करिता ॥३॥ तुका म्हणे धणी । त्यासी अवघी पुरवणी ॥४॥

३२८६. पेणावलें ढोर मार खाय पाठी । बैसलें तें नुठी तेथूनियां ॥१॥ तैसी माझ्या मना परी झाली देवा । धांवें अहंभावा सांडवलों ॥२॥ कडां घाली उडी मागिलांच्या भेणें । पडणें मरणें न कळेचि ॥३॥ तुका म्हणे झालों त्यापरी दुःखित । असें बोलावीत पांडुरंगा ॥४॥

३२८७. झालिया दर्शन करीन मी सेवा । आणिक कांहीं देवा नलगे दुजें ॥१॥ प्रारब्धा अधीन अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवी पायीं ॥२॥ येगा येगा येगा कृपाळुवा हरी । निववीं अभ्यंतरीं देऊनि भेटी ॥३॥ आसावलें मन जीवनाचे ओढी । नामीं रूपीं गोडी लावियेली ॥४॥ काय तुम्हांपाशीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ॥५॥ काय लोखंडाचे पाहे गुणदोष । सिवोनि परिस सोनें करी ॥६॥ तुका म्हणे माझें अवघें असों द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच ॥७॥

३२८८. हरिः ॐ तत्सदिति सूत्राचें जें सार । कृपेचा सागर पांडुरंग ॥१॥ हरिः ॐ दत्त उदात्त अनुदात्त । प्रचुररहित पांडुरंग ॥२॥ सर्वस्व व्यापीलें सर्वाही निराळें । वेदांचें जें मूळ

तुका म्हणे ॥३॥

३२८९. किती सांगों तरी नाइकती बटकीचे । पुढें सिंदळीचे रडतील ॥१॥ नका नका करूं रांडेची संगती । नेईल अधोगती घाली यम ॥२॥ तुका म्हणे जरी देवीं नाहीं चाड । हाणोनि थोबाड फोडी काळ ॥३॥

३२९०. पिकलिया सेंद कडुपण गेलें । तैसें आम्हां केलें पांडुरंगें ॥१॥ काम क्रोध लोभ निमाले ठायींचि । सर्व आनंदाची सृष्टि झाली ॥२॥ आठव नाठव गेले भावाभाव । झाला स्वयमेव पांडुरंग ॥३॥ तुका म्हणे भाग्य या नांवें म्हणीजे । संसारीं जन्मीजे याचि लागीं ॥४॥

३२९१. कारणा कारण वारियेलें जेथें । जातों तेणें पंथें सादावीत ॥१॥ संतीं हें पईल लाविलें निशाण । ते खूण पाहोन नाम गर्जे ॥२॥ तुका म्हणे तुम्ही चला याचि वाटे । पांडुरंग भेटे भरंवसेनी ॥३॥

३२९२. आइत्या भाग्या धणी व्हावें । केणें घ्यावें न सरे तें ॥१॥ केणें आहे पंढरपुरीं । उद्धाराचें लाभिक ॥२॥ बाखराची करूनि रितीं । भरा पोतीं सकळ ॥३॥ तुका म्हणे संतांपाडें । करा पुढें वाखती ॥४॥

३२९३. सिंदळीचें चित्त परपुरुषावरी । पति चुरमुरी रात्रंदिवस ॥१॥ ऐसी ते वोंगळी जाय हो नरका । तिच्या दोषें देखा पति जाय ॥२॥ आपण बुडती पति बुडविती । दोन्ही कुळें नेती अध:पाता ॥३॥ तुका म्हणे तिची न करावी संगती । होइल फजिती मागें पुढें ॥४॥

३२९४. मायबाप सवें नये धनवित्त । करावें संचित भोगावें तें ॥१॥ म्हणऊनि लाभ काय तो विचारी । नको चालीवरी चित्त ठेवूं ॥२॥ आयुष्य शेवटीं सांडूनि जाणार । नव्हेचि साचार शरीर हें ॥३॥ तुका म्हणे काळें लावियेलें माप । जमा धरी पापपुण्याचींही ॥४॥

३२९५. मोटळें हाटीं सोडिल्या गांठी । विकऱ्या घातले कण । ज्याचे भाग त्यासी देऊनि निवारिले । सारूनि लिगाड दान । खरें माप हातीं बैसलों । मानिती तेचि चौघे जण । खरें वित्त तेथें आले चोजवित । गिऱ्हाईक संतजन ॥१॥ झाडिला पालव केला हाट वेच । झाली सकळींच अराणूक । याल तरि तुम्हीं करा लगबग । आमचे ते कोणी लोक ॥२॥ एक ते उत्तम मध्यम कनिष्ठ । वित्ताचे प्रकार तीन । बहुतां जनांचे बहुत प्रकार । वेगळाले वाण । लाभ हाणी कोणा मुद्दल झालें । कोणासी पडिलें खाण । अर्धमर्ध कोणी गुंतोनि राहिली । थोडे तैसे बहु जन ॥३॥ एक सांते आले एके गांवींहून । येकामेचि नव्हे जाणें । येतां जातां रुजू नाहीं दिवाणा । काळतोंडीं एकी तेणें । लाग भाग एकी एकानीं गोविली । मागील पुढिलां ऋणें । तुका म्हणे आतां पाहूं नये वास । साधावें आपुलें पेणें ॥४॥

३२९६. आम्हां कांही आम्हां कांही । आतां नाहीं या बोलें ॥१॥ मोल सांगा मोल सांगा ।

घेणें तिहीं गा पुसावें ॥२॥ कैसें घडे कैसें घडे । बडबड तुज मज ॥३॥ मुद्दलें साठीं मुद्दलें साठीं । लाभ पोटीं त्यामधीं ॥४॥ तुका म्हणे सांठवूं घरीं । आडल्या काळें पुसती तरी ॥५॥

३२९७. काय मागावें कवणासी । ज्यासी मागों तो मजपाशीं ॥१॥ जरी मागों पद इंद्राचें । तरी शाश्वत नाहीं त्याचें ॥२॥ जरी मागों ध्रुव पद । तरी त्यासी येथील छंद ॥३॥ स्वर्गभोग मागों पूर्ण । पुण्य सरल्या मागुती येणें ॥४॥ मागों जरी पद वैकुंठ । तें तव येकदेशी करंटें ॥५॥ आयुष्य मागों चिरंजीव । जीवा मरण नाहीं स्वभावें ॥६॥ तुका म्हणे एक मागें । एकपणा नाहीं भंग ॥७॥

३२९८. रुसलों या आम्हीं आपुल्या संसारा । तेथें जनाचारा कोण पाड ॥१॥ आम्हां इष्ट मित्र सज्जन सोयरे । नाहीं या दुसरें देवाविण ॥२॥ दुराविले बंधु सखे सहोदर । आणीक विचार काय तेथें ॥३॥ उपाधिवचन नाइकती कान । त्रासलें हें मन बहु माझें ॥४॥ तुका म्हणे करा ठाकेल ते दया । सुख दुःख वांया न धरावें ॥५॥

३२९९. सांडुनि सुखाचा वांटा । मुक्ति मागे तो करंटा ॥१॥ कां रे न घ्यावे हे जन्म । काय वैकुंठा जाऊन ॥२॥ येथें मिळतो दहीं भात । नाहीं वैकुंठीं ते मात ॥३॥ तुका म्हणे मुक्ति नलगे । राहेन संतांचिये संगें ॥४॥

३३००. तरिच शोभे वेडी । नग्न होय धड फाडी ॥१॥ काय बोलाचें गौरव । आंत वरी दोन भाव ॥२॥ मृगजळ न्याहाळितां । ताहान नवजे सेवितां ॥३॥ न पाहे आणिकांची वास । शूर बोलिजे तयास ॥४॥ तुका म्हणे या लक्षणें । संत अळंकार लेणें ॥५॥

३३०१. आग्रहा नांवें पाप । योगीं सारावें संकल्प ॥१॥ सहज ऐसें भांडवल । असोनि कां सारा बोल ॥२॥ तैं न भेटे तें काय । मना अंगींचे उपाय ॥३॥ तुका म्हणे धरीं सोय । वासनेची फोडा डोय ॥४॥

३३०२. न करी पठन घोष अक्षरांचा । बीजमंत्र आमुचा पांडुरंग ॥१॥ सर्वकाळ नामचिंतन मानसीं । समाधान मनासीं समाधि हे ॥२॥ न करी भ्रमण न रिघें कपाटीं । जाईन तेथें दाटी वैष्णवांची ॥३॥ आन नेणें कांहीं नवजें तपासी । नाचें दिंडीपाशीं जागरणीं ॥४॥ उपवास व्रत न करीं पारणें । रामकृष्ण म्हणे नारायण ॥५॥ आणिकांची स्तुती सेवा नेणें वाणूं । तुका म्हणे आनु दुजें कांहीं ॥६॥

३३०३. पुंडलिकाचे निकटसेवे । कैसा धांवें बराडी ॥१॥ आपुलें तें थोरपण । नारायण विसरला ॥२॥ उभा कटी ठेवुनि कर । न म्हणे पर बैससें ॥३॥ तुका म्हणे जगदीशा । करणें आशा भक्तांची ॥४॥

३३०४. बाळ काय जाणे जीवनउपाय । वाहे बापमाय सर्व चिंता ॥१॥ आइतें भोजन

खेळणें अंतरीं । अंकिताच्या शिरीं भार नाहीं ॥२॥ आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ॥३॥ तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ॥४॥

३३०५. काय करितील केलीं नित्य पापें । वसे नाम ज्यापें विठोबाचें ॥१॥ तृणीं हुताशन लागतां ते रासी । जळतील तैसीं क्षणमात्रें ॥२॥ विष्णुमूर्तिपाद पाहतां चरण । तेथें कर्म कोण राहूं शके ॥३॥ तुका म्हणे नाम जाळी महादोष । जेथें होय घोष कीर्तनाचा ॥४॥

३३०६. माकडा दिसती कंवटी नारळे । भोक्ता तो निराळे वरील सारी ॥१॥ एका रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ॥२॥ सुनियासी क्षीर चारिल्या ओकवी । भोक्ता तो सेवी धणीवरी ॥३॥ तुका म्हणे मूर्ख वागविती भार । नेतील तें सार परीक्षक ॥४॥

३३०२. भेटीची आवडी उताविळ मन । लागलेंसे ध्यान जीवीं जीवा ॥१॥ आतां आवडीचा पुरवा सोहळा । येऊनी गोपाळा क्षेम देईं ॥२॥ नेत्र उन्मळित राहिले ताटस्थी । गंगा अश्रुपाती वहावली ॥३॥ तुका म्हणे तुम्ही करा साचपणा । मुळींच्या वचना आपुलिया ॥४॥

३३०८. धवळलें जगदाकार । अंधार तो निरसला ॥१॥ लपों जातां ठाव नाहीं । प्रगट पाहीं पसारा ॥२॥ खरियाचा दिवस आला । वाढी बोला न पुरे ॥३॥ तुका म्हणे जीवें साठीं । पडिली मिठी धुरेसी ॥४॥

३३०९. मातेची अवस्था काय जाणे बाळ । तिसी तों सकळ चिंता त्याची ॥१॥ ऐसा परस्परें आहेजी विचार । भोपळ्याचा तार दगडासी ॥२॥ भुजंग पोटाळी चंदनांचें अंग । निवे परि संगें नव्हे तैसा ॥३॥ तुका म्हणे करा परिसाचे परी । मज ठेवा सरी लोखंडाचे ॥४॥

३३१०. लावूनि कोलित । माझा करितील घात ॥१॥ ऐसे बहुतांचे संधी । सांपडलों खोळेमधीं ॥२॥ पाहातील उणें । तेथें देती अनुमोदनें ॥३॥ तुका म्हणे रिघ । पुढें नाहीं झालें धींद ॥४॥

३३११. ऐसी एकां अटी । रितीं शिणती करंटीं ॥१॥ साच आपुल्या पुरतें । करूनि न घेती कांहीं हितें ॥२॥ कां हीं वेचितील वाणी । निरर्थकचि कारणीं ॥३॥ तुका म्हणे देवा । कांहीं समर्पूनि सेवा ॥४॥

३३१२. चालिले सोबती । काय मानिली निश्चिंती ॥१॥ काय करिसी एकला । काळ सन्निध पातला ॥२॥ कांहीं सावध तों बरवा । करीं आपुला काढावा ॥३॥ चालिले आगळे । हळूच कान केश डोळे ॥४॥ वोसरलें दांत । दाढा गडबडल्या आंत ॥५॥ एकली तळमळे । जिव्हा भलतेंचि चावळे ॥६॥ तुका म्हणे यांनीं । तुझी मांडिली घालणी ॥७॥

३३१३. नका मजपाशीं । वदों प्रपंचाचे विशीं ॥१॥ आतां नाइकवे कानीं । मज देवाविण वाणी ॥२॥ येऊनियां रूपा । कोण पाहे पुण्यपापा ॥३॥ मागें आजिवरी । जालें

माप नेलें चोरीं ॥४॥ सांडियेलीं पानें । पुढें पिका अवलोकनें ॥५॥ पडों नेदी तुका । आड गुंफूं कांहीं चुका ॥६॥

३३१४. माझें मज द्यावें । नाहीं करवीत नवें ॥१॥ सहस्त्र नामाचें रूपडें । भक्तकैवारी चोखडें ॥२॥ साक्षीवीण बोलें । तरि मज पाहिजे दंडिलें ॥३॥ तुका म्हणे माल । माझा खरा हा विठ्ठल ॥४॥

३३१५. आम्हा लडिवाळांचे बोल । करा कवतुकें नवल ॥१॥ करूं स्तुती तरि ते निंदा । तुम्ही जाणा हे गोविंदा ॥२॥ बोबड्या उत्तरीं । तुम्हां रंजवितो हरी ॥३॥ मागतों भातुकें । तुका म्हणे कवतुकें ॥४॥

३३१६. न लाहिजे जपें न लाहिजे तपें । आम्हांसी हें सोपें गीतीं गातां ॥१॥ न करितां ध्यान न करितां धारणा । तो नाचे कीर्तनामाजी हरी ॥२॥ जयासी नाहीं रूप आणि आकार । तोचि कटीं कर उभा विटे ॥३॥ अनंत ब्रह्मांडें जयाचिया पोटीं । तो आम्हां संपुष्टीं भक्तिभावें ॥४॥ तुका म्हणे वर्म जाणती लडिवाळें । जीं होतीं निर्मळ अंतर्बाहीं ॥५॥

३३१७. जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ॥१॥ केला घरांत रिघावा । ठायीं पाडियेला ठेवा ॥२॥ हातां चढें धन । ऐसें रचिलें कारण ॥३॥ तुका म्हणे मिठी । पायीं देउनी केली सुटी ॥४॥

३३१८. लागपाठ केला । आतां वांटा नीट त्याला ॥१॥ करा जोडीचा हव्यास । आलें दुरील घरास ॥२॥ फोडिलीं भांडारें । मोहोरलीं एकसरें ॥३॥ अवघियांपुरतें । तुका म्हणे घ्यावें हातें ॥४॥

३३१९. एकीं असे एक हेवा । येर अनावडी जीवां ॥१॥ देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती ॥२॥ प्रीतीसाठीं भेद । कोणी पूज्य कोणी निंद्य ॥३॥ तुका म्हणे लळा । त्याचा जाणे हा कळवळा ॥४॥

३३२०. स्वामीचें हें देणें । येथें पावलों दर्शनें ॥१॥ करूं आवडीनें वाद । तुमच्या सुखाचा संवाद ॥२॥ कळावया वर्म । हा तो पायांचाचि धर्म ॥३॥ तुका म्हणे सिद्धी । हेचि पावविली बुद्धी ॥४॥

३३२१. रुसलों संसारा । आम्ही आप आणि परा ॥१॥ म्हणऊनि केली सांडी । देउनि पडिलों मुरकुंडी ॥२॥ परतेचि ना मागें । मोहों निष्ठुर झालों अंगें ॥३॥ सांपडला देव । तुका म्हणे गेला भेव ॥४॥

३३२२. हें तों वाटलें आश्चर्य । तुम्हां धरवला धीर ॥१॥ माझा फुटतसे प्रण । धांवा धांवा म्हणऊन ॥२॥ काय नेणों दिशा । झाल्या तुम्हांविण वोसा ॥३॥ तुका म्हणे कांगा ।

नाइकिजे पांडुरंगा ॥४॥

३३२३. धांवा केला धांवा । श्रम होऊं नेदी जीवा ॥१॥ वर्षें अमृताच्या धारा । घेईं वोसंगा लेंकुरा ॥२॥ उशीर तो आतां । न करावा हेचि चिंता ॥३॥ तुका म्हणे त्वरें । वेग करीं विश्वंभरे ॥४॥

३३२४. जोडिले अंजुळ । असें दाना उताविळ ॥१॥ पहा पहा कृपादृष्टी । आणा अनुभवा गोष्टी ॥२॥ तूं स्वामी मी सेवक । आइक्य तो एका एक ॥३॥ करितो विनंती । तुका सन्मुख पुढती ॥४॥

३३२५. ऐका महिमा आवडीची । बोरें खाय भिल्लटीचीं ॥१॥ थोर प्रेमाचा भुकेला । हाचि दुष्काळ तयाला ॥२॥ पोहे सुदामदेवाची । फके मारी कोरडेचि ॥३॥ न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडें । तुका म्हणे भक्तीपुढें ॥४॥

३३२६. कुंभ अवघा एक आवा । पाकीं एकीं गू फेडावा ॥१॥ ऐसे भिन्न भिन्न साटे । केले प्रारब्धानें वांटे ॥२॥ हिरे दगड एक खाणी । कैंचें विजातीला पाणी ॥३॥ तुका म्हणे शिरीं । एक एकाची पायरी ॥४॥

३३२७. मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात । तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥१॥ ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण । रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥२॥ बोलो जाणे अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ॥३॥ तुका म्हणे बहु तोंडें जे वाचाळ । तें गे तेंचि मूळ लटिक्याचें ॥४॥

३३२८. न लगे चंदना पुसावा परिमळ । वनस्पतिमेळ हाकारुनी ॥१॥ अंतरींचें धांवे स्वभाव बाहेरी । धरितांही परी आवरेना ॥२॥ सूर्य नाहीं जागें करीत या जना । प्रकाशकिरणा कर म्हूण ॥३॥ तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ॥४॥

३३२९. चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥१॥ दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगीं साकर अवघी गोड ॥२॥ तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पहातां अवगुण मिळेचि ना ॥३॥

३३३०. मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण । मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥१॥ मनें प्रतिमा स्थापिली । मनें मन पूजा केली । मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥२॥ मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य । प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ॥३॥ साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात । नाहीं नाहीं आन दैवत । तुका म्हणे दुसरें ॥४॥

३३३१. मायबापें जरी सर्पीण कीं बोका । त्यांचे संगें सुखा नपवे बाळ ॥१॥ चंदनाचा

शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥२॥ तुका म्हणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥३॥

३३३२. शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ॥१॥ पंडित हे ज्ञानी करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥२॥ तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही । देतील हे ठावी नाहीं वस्तु ॥३॥

३३३३. प्रारब्ध क्रियमाण । भक्ता संचित नाहीं जाण ॥१॥ अवघा देवचि झाला पाहीं । भरोनियां अंतर्बाहीं ॥२॥ सत्वरजतम बाधा । नव्हे हरिभक्तांसी कदा ॥३॥ देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥४॥

३३३४. शास्त्रांचें जें सार वेदांची जो मूर्ति । तो आम्हां सांगाती प्राणसखा ॥१॥ म्हणउनि नाहीं आणिकांचा पांग । सर्व झालें सांग नामें एका ॥२॥ सगुण निर्गुण जयाचिये अंगें । तोचि आम्हांसंगें क्रीडा करी ॥३॥ तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभ आइते केले नव्हों ॥४॥

३३३५. कोणें तुझा सांग केला अंगीकार । निश्चिंति त्वां थोर मानियेली ॥१॥ कोणें ऐसा तुज उपदेश केला । नको या विठ्ठला शरण जाऊं ॥२॥ तेव्हां तुज कोण घालील पाठीसी । घांसील भूमीसी वदन यम ॥३॥ कारे नागवसी आयुष्य खातो काळ । दिवसेंदिवस बळ क्षीण होतें ॥४॥ तुका म्हणे यासी सांगा कोणी तरी । विसरला हरी मायबाप ॥५॥

३३३६. साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकातें डोळां न पहावे ॥१॥ साधुनी भुजंग धरतील हातीं । आणिकें कांपती देखोनियां ॥२॥ असाध्य तें साधे करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥३॥

३३३७. आमुची गोसावी अयाचित वृत्ती । करवी शिष्या हातीं उपदेश ॥१॥ दगडाची नाव आधींच ते जड । ते काय दगड तारूं जाणे ॥२॥ तुका म्हणे वेष विटंबिला त्यांनीं । सोंग संपादणी करिती परी ॥३॥

३३३८. मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैलथडी ॥१॥ खापराचे होन खेळती लेंकुरें । काय त्या वेव्हारें लाभ हानी ॥२॥ मंगळदायकें करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ॥३॥ स्वप्नींचें जें सुख दुःख झालें कांहीं । जागृती तो नाहीं साच भाव ॥४॥ सारी झाली मेलीं लटिकें वचन । बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ॥५॥

३३३९. अंधळ्यासी जन अवघेचि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥१॥ रोग्या विषतुल्य लागे हे मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ॥२॥ तुका म्हणे शुद्ध नाहीं जों आपण । तया त्रिभुवन सर्व खोटें ।३॥

३३४०. बोलविसी तैसें आणी अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ॥१॥ मिठेंविण काय

करावें मिष्टान्न । शव जीवेंविण शृंगारिलें ॥२॥ संपादणीविण विटंबिलें सोंग । गुणेंविण चांग रूप हीन ॥३॥ कन्यापुत्रेंविण मंगळदायकें । वेचिलें हें फिकें द्रव्य तरी ॥४॥ तुका म्हणे तैसी होते मज परी । न देखे अंतरीं प्रेमभाव ॥५॥

३३४१. नाहीं आम्ही विष्णुदास । करीत आस कोणाची ॥१॥ कां हे नष्ट करिती निंदा । नेणो सदा आमुची ॥२॥ असों भलते ठायीं मनें । समाधानें आपुल्या ॥३॥ तुका म्हणे करूं देवा । तुझी सेवा धंदा तो ॥४॥

३३४२. काय माता विसरे बाळा । कळवळा प्रीतीचा ॥१॥ आवडीनें गळां मिठी । घाली उठी बैसवी ॥२॥ लावूं धांवे मुख स्तना । नये मना निराळें ॥३॥ भावंडाचें भातें दावी । आपुलें लावी त्यास जी ॥४॥ माझें थोडें त्याचें फार । उत्तर हें वाढवी ॥५॥ तुका म्हणे नारायणा । तुम्ही जाणा बुझावूं ॥६॥

३३४३. वचन तें नाहीं तोडीत शरीरा । भेदतें अंतरा वज्राऐसें ॥१॥ कांही न सहावें काशाही कारणें । संदेह निधान देह बळी ॥२॥ नाहीं शब्द मुखीं लागत तिखट । नाहीं जड होत पोट तेणें ॥३॥ तुका म्हणे जरी गिळी अहंकार । तरी वसे घर नारायण ॥४॥

३३४४. मायेचा मारिला अंगीं नाहीं घाव । दुःखें तरी लव धडधडी ॥१॥ न लभे हा काळ न सुटे हातींचा । न बोलवे वाचा वेडावली ॥२॥ न पवे धांवणें न पवेचि लाग । न लगेचि माग धरावया ॥३॥ भेणें तरि अंगा लावियेल्या राखा । तरी त्यासी वाखा करितसें ॥४॥ तुका म्हणे हाका मारूं नेदी देवा । लोकांपाठी हेवा लागलासे ॥५॥

३३४५. ढालतरवारे गुंतले हे कर । म्हणे मी झुंजार कैसेा झुंजों ॥१॥ पोटीं पडदाळें सिले टोप ओझें । हें तों झालें दुजें मरणमूळ ॥२॥ बैसविलें मला येणें अश्वावरी । धांवूं पळूं तरी कैसा आतां ॥३॥ असोनि उपाय म्हणे हे अपाय । म्हणे हाय हाय काय करूं ॥४॥ तुका म्हणे हा तों स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणे वर्म संतचरण ॥५॥

३३४६. काय करूं न करी धंदा । चित्त गोविंदा तुझे पायीं ॥१॥ ऐशा संकल्पाचे संधी । माझे बुद्धी धीर द्यावा ॥२॥ कुटुंबाचा तुम्हां भार । मज व्यवहार निमित्त ॥३॥ तुका म्हणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ॥४॥

३३४७. येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गीं ॥१॥ चंचळ चित्तासी ठेवुनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें ॥२॥ भावाच्या पैं हातें धरावा निश्चय । तेणें भवभय देशधडी ॥३॥ नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥४॥ तुका म्हणे वंश धन्य त्या नराचा । ऐशा निश्चयाचा मेरू झाला ॥५॥

३३४८. बीज जाळुनि केली लाही । आम्हां जन्ममरण नाहीं ॥१॥ आकारासी कैंचा

ठाव । देह प्रत्यक्ष झाला देव ॥२॥ साकरेचा नोहे ऊस । आम्हा कैंचा गर्भवास ॥३॥ तुका म्हणे अवघा जोग । सर्वाघटीं पांडुरंग ॥४॥

३३४९. वैकुंठींचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक ॥१॥ धारिष्ट धैर्याचा वरिष्ठ भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ठ ॥२॥ पितृसेवापुण्यें लाधला निधान । ब्रह्म सनातन अंगसंगें ॥३॥ अंगसंगें रंग क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहुणा वैकुंठींचा ॥४॥ धन्य त्याची शक्ति भक्तीची हे ख्याती । तुका म्हणे मुक्ति पायीं लोळे ॥५॥

३३५०. रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदलें डोळां ॥१॥ तेणें अंजनगुणें दिव्यदृष्टि झाली । कल्पना निमाली द्वैताद्वैत ॥२॥ देशकाळवस्तुभेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ॥३॥ न झाला प्रपंच झाला परब्रह्म । अहंसोहं ब्रह्म आकळलें ॥४॥ तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंदी सांग । तेंचि झाला अंगें तुका आतां ॥५॥

३३५१. एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । हाणोनियां लाता पळालें तें ॥१॥ गाढवही गेलें ब्रह्मचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी ॥२॥ हें ना तैसें झालें हें ना तैसें झालें । तुका म्हणे गेलें वांयाचि तें ॥३॥

३३५२. पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । परि सरी न पवती तुकयाची ॥१॥ शास्त्रेंही पुराणें गीता नित्य नेम । वाचिताती वर्म न कळे त्यांसी ॥२॥ कर्मअभिमानें वर्णअभिमानें । नाडले ब्राह्मण कलियुगीं ॥३॥ तैसा नव्हे तुका वाणी व्यवसाई । भाव त्याचा पायीं विठोबाचे ॥४॥ अमृताची वाणी वरुषला शुद्ध । करित्या अशुद्ध ऐसा कोण ॥५॥ चहूं वेदांचें हें केलें विवरण । अर्थही गहन करूनियां ॥६॥ उत्तम मध्यम कनिष्ठ वेगळे । करूनि निराळे ठेविले ते ॥७॥ भक्ति ज्ञान आणि वैराग्य आगळा । ऐसा नाहीं डोळां देखियला ॥८॥ जपतप यज्ञ लाजविलीं दानें । हरिनाम कीर्तनें करूनियां ॥९॥ मागें कवीश्वर झाले थोरथोर । नेलें कलेवर कोणें सांगा ॥१०॥ म्हणे रामेश्वर सकळा पुसोनी । गेला तो विमानीं बैसोनियां ॥११॥

३३५३. माझी मज आली रोकडी प्रचित । होऊनि फजित दुःख पावे ॥१॥ कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं । व्यथा या शरीरीं बहुत झाली ॥२॥ ज्ञानेश्वरें मज केला उपकार । स्वप्नीं सविस्तर सांगितलें ॥३॥ तुका सर्वां श्रेष्ठ प्रिय आम्हां थोर । कां जो अवतार नामयाचा ॥४॥ त्याची तुज कांहीं घडली रे निंदा । म्हणोनि हे बाधा जडली तुज ॥५॥ आतां एक करीं सांगेन तें तुला । शरण जाईं त्याला निश्चयेंसी ॥६॥ दर्शनेंचि तुझ्या दोषा परिहार । होय तो विचार सांगितला ॥७॥ तोचि हा विश्वास धरोनि मानसीं । जाय कीर्तनासी नित्य काळ ॥८॥ म्हणे रामेश्वर त्याच्या समागमें । झालें हें आराम देह माझें ॥९॥

३३५४. वैष्णवांची याती वाणी जो आपण । भोगी तो पतन कुंभपाकीं ॥१॥ ऐशी वेदश्रुती

बोलती पुराणें। नाहीं तीं दूषणें हरिभक्ता ॥२॥ उंच नीच वर्ण न म्हणावा कोणीं। जे कां नारायणीं प्रिय झाले ॥३॥ चहूं वर्णासीही असे अधिकार । करितां मनस्कार दोष नाहीं ॥४॥ जैसा शालिग्राम न म्हणावा पाषाण। होय पूज्यमान सर्वत्रांसी ॥५॥ गुरु परब्रह्म देवाचाही देव। त्यासी तो मानव म्हणूं नये ॥६॥ म्हणे रामेश्वर नामीं जे रंगले। स्वयें तेचि झाले देवरूप ॥७॥

३३५५. भक्त भागवत जीवन्मुक्त संत। महिमा अत्यद्भुत चराचरीं ॥१॥ ऐसिया अनंतामाजी तूं अनंत। लीलावेश होत जगत्राता ॥२॥ ब्रह्मानंदे तुकें तुळे आला तुका। तो हा विश्वसखा क्रीडे जनीं ॥३॥ शास्त्र शिष्टाचार अविरुद्ध क्रिया। तुझी भक्तराया देखियेली ॥४॥ देउनि तिळांजुळी काम्य निषिद्धासी । विधिविनियोगेंशी ब्रह्मार्पण ॥५॥ संत-ग्रहमेळीं जगदांध्या गिळी । पैल ऊदयाचळीं भानु तुका ॥६॥ संतवृंदें तीर्थें गौतमी हरिकथा। तुकया नरसिंहस्ता भेटों आली ॥७॥ शांतिपतिव्रते झालें परिणयन। कामसंतर्पण निष्कामता ॥८॥ क्षमा क्षमेपणें प्रसिद्ध प्रथा जगीं। तें तों तुझ्या अंगीं मूर्तिमंत ॥९॥ दया दीनानाथा तुवां जीवविली। विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ॥१०॥ वेदवाक्य बाहो उभारिला ध्वज। पूजिले देव द्विज सर्व भावें ॥११॥ अधर्मक्षय व्याधी धर्माशीं स्पर्शला। तो त्वां उपचारिला अनन्य भक्ति ॥१२॥ ब्रह्म ऐक्यभावें भक्ति विस्तारिली। वाक्यें सफल केलीं वेदविहितें ॥१३॥ देहबुद्धि जात्याभिमानें वंचलों। तो मी उपेक्षिलों न पाहिजे ॥१४॥ न घडो याचे पायीं बुद्धीचा व्यभिचार। मागें रामेश्वर रामचंद्रा ॥१५॥

३३५६. स्वर्गींचे अमर इच्छिताती देवा । मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ॥१॥ नारायणनामें होऊं जीवन्मुक्त। कीर्तनीं अनंत गाऊं गीतीं ॥२॥ वैकुंठींचे जन सदा इच्छिताती। कइं येथें येती हरिचे दास ॥३॥ यमधर्म वाट पाहे निरंतर । जोडोनियां कर तिष्ठतसे ॥४॥ तुका म्हणे पावावया पैल पार। नाममंत्र सार भाविकासी ॥५॥

३३५७. आमुची मिरासी पंढरी । आमुचें घर भीमातिरीं ॥१॥ पांडुरंग आमुचा पिता । रखुमाई आमुची माता ॥२॥ भाऊ पुंडलीक मुनि । चंद्रभागा आमुची बहिणी ॥३॥ तुका जुनाट मिराशी। ठाव दिला पायांपाशीं ॥४॥

३३५८. गंगा गेली सिंधुपाशीं । जरी तो ठाव नेदी तिशी ॥१॥ तिणें जावें कवण्या ठाया । मज सांगा पंढरिराया ॥२॥ जळ क्षोभलें जळचरां । माता बाळा नेदी थारा ॥३॥ तुका म्हणे आलों शरण। देवा त्वां कां धरिलें मौन ॥४॥

३३५९. संदेह गमला । कैसा रेडा बोलविला ॥१॥ सांगा देव कां न होती । निर्जिव चालविली भिंती ॥२॥ कोरडे कागद । उदकीं न लागती बुंद ॥३॥ निळा म्हणे खरा । देवा संतापायीं थारा ॥४॥

३६६०. नाम वाचे श्रवणीं कीर्ती । पाउलें चित्तीं समान ॥१॥ काळ सार्थक केला

त्यांनीं । धरिला मनीं विठ्ठल ॥२॥ कीर्तनाचा समारंभ । निर्दंभ सर्वदा ॥३॥ निळा म्हणे स्वरूपसिद्धी । नित्य समाधी हरिनामें ॥४॥

३३६१. कामधेनूचें वासरूं । खाया न मिळे काय करूं ॥१॥ ऐसें आम्हा मांडियेलें । विठो त्वां का सांडियेलें ॥२॥ बैसुनी कल्पद्रुमातळीं । पोटासाठीं तळमळी ॥३॥ तुका म्हणे नारायणा । भलें लोकीं हें दिसेना ॥४॥

३३६२. वेठी ऐसा भाव । न करी आहाच उपाव ॥१॥ रूप डसवीन जीवा । अवघा येच ठायीं हेवा ॥२॥ कृपणाचे परी । लेखा पळनिमेषवरी ॥३॥ तुका म्हणे असा । सन्निधचि जगदीशा ॥४॥

३३६३. सर्वसुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम ॥१॥ सर्वांगीं तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ॥२॥ ऐशी उभविली बाहे । वेदीं पाहें पुराणीं ॥३॥ तुका म्हणे येथें कांहीं । संदेह नाहीं भरंवसा ॥४॥

३३६४. कोडियाचें गोरेपण । तैसें अहंकारी ज्ञान ॥१॥ त्यासी आतां रिझे कोण । जवळी जातां चिळसवाणें ॥२॥ प्रेत देह गौरविलें । तैसें विटंबवाणें झालें ॥३॥ तुका म्हणे खाणें विष्ठा । तैशा देहबुद्धिचेष्टा ॥४॥

३३६५. व्यापक हा विश्वंभर । चराचर ज्याचेनी ॥१॥ पंढरिराय विटेवरी । त्याचीं धरीं पाउलें ॥२॥ अवघियांचा हाचि ठाव । देवीं देव सकळ ॥३॥ तुका म्हणे न करीं सोस । भेदे दोष उफराटे ॥४॥

३३६६. भुंकुनियां सुनें लागे हत्तीपाठीं । होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥१॥ काय त्या मशकें तयासी करावें । आपुल्या स्वभावें पीडतसे ॥२॥ मातलें माकड विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणे तेणें ॥३॥ तुका म्हणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ॥४॥

३३६७. गर्जत जावी नामावळी । प्रेमें टाळी वाहोनि ॥१॥ येणें सुखें पुढती धांवे । भेटी सवें गोपाळ ॥२॥ लोटांगण घाला तळीं । वंदा धुळी संतांची ॥३॥ तुका म्हणे विठ्ठल लाहो । ऐसा बाहो उभारा ॥४॥

३३६८. पदोपदीं पायां पडणें । करुणा जाण भाकावी ॥१॥ ये गा ये गा विसांविया । करुणादयासागरा ।२॥ जोडोनियां करकमळ । नेत्रीं जळ भरोनि ॥३॥ तुका उभा दान पात्र । पुरवीं आर्त विठोबा ॥४॥

३३६९. मृगाचिया अंगीं कस्तुरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥१॥ भाग्यवंत घेती वेचूनियां मोल । भारवाही मेले वाहतां ओझें ॥२॥ चंद्रामृतें तृप्ति पारणें चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥३॥ अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षवंतां दृष्टी रत्न जैसें ॥४॥ तुका म्हणे काय अंधळिया हातीं । दिलें जैसें मोतीं वांयां जाय ॥५॥

३३७०. करा करा लागपाठ। धरा पंढरीची वाट। जंव नाहीं चपेट। घात पडिला काळाचा ॥१॥ दुजा ऐसा नाहीं कोणी। जो या काढी भयांतूनि। करा म्हणऊनि। हा विचार ठायींचा ॥२॥ होती गात्रें बेंबळीं। दिवस अस्तमान काळीं। हातें वाहे टाळी। जंव मोकळीं आहेती ॥३॥ कां रे घेतलासी सोस। तुज वाटताहे कैसें। तुका म्हणे ऐसें। पुढें कैं लाहासी ॥४॥

३३७१. सुखाची वस्ती झाली माझे जीवीं। तुमच्या गोसावी कृपादानें ॥१॥ रूप वेळोवेळां आठवीं अंतरीं। बैसोनि जिव्हारीं राहिलें तें ॥२॥ विसावलें मन विटलें प्रपंचा। गोडावली वाचा येणें रसें ॥२॥ तुका म्हणे कांहीं नाठवेसें झालें। दुसरें विठ्ठलें मज आतां ॥४॥

३३७२. येथें आड कांहीं न साहे आणीक। प्रमाण तें एक हेंचि झालें ॥१॥ गाऊं नाचूं टाळी वाहूं गीत छंदें। डोलवूं विनोदें अंग तेणें ॥२॥ मथुनियां सार काढिलें बाहेरी। उपाधि त्या येरी निवडिल्या ॥३॥ तुका म्हणे जना लाविली शिराणी। सेवितां हे धणी होत नाहीं ॥४॥

३३७३. तुझें मजपाशीं मन। माझी तूज भूक तहान ॥१॥ जिव्हा रते एके ठायीं। दुजें बोलायाचें काई ॥२॥ माझिया कवतुकें। उभा पाहासी भातुकें ॥३॥ तुका म्हणे साचें। तेथें मागील कईचें ॥४॥

३३७४. हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मीं तुझा दास ॥१॥ पंढरीचा वारकरी। वारी चुकों नेदी हरी ॥२॥ संतसंग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा सुकाळ ॥३॥ चंद्रभागे स्नान। तुका मागे हेंचि दान ॥४॥

३३७५. आतां हे शेवटीं असो पायांवरी। वदती वैखरी वागपुष्पें ॥१॥ नुपेक्षावें आम्हां दीनां पांडुरंगा। कृपादानी जगामाजी तुम्हीं ॥२॥ बोळवुनी देह सांडियेली शुद्ध। तोडियेले भेद जीवशिव ॥३॥ तुका म्हणे मन तुमचे चरणीं। एवढी आयणी पुरवावी ॥४॥

३३७६. तुजवांचुनी मागणें काय कोणा। महीमंडळीं व्यापक विश्व जाणा। जीवभावना पूरवूं कोण जाणे तूजवांचुनी होत कां रावराणे ॥१॥ नसे मोक्षदाता तिहींमाजि लोकां। भवतारकु तुजवांचूनि एका। मनीं मानसीं चिंतितां रूपनाम। पळे पाप ताप भयें नासे काम ॥२॥ हरी नाम हें साच तूझें पुराणीं। हरी हातिचें काळगर्भादियोनी। करूं मुखवाणी कसी देशधाडी। तुजवांचुनी वर्णितां व्यर्थ गोडी ॥३॥ भवभंजना व्यापका लोक तिन्ही। तुज वर्णितां शीणला शेषफणी। असो जीव भाव तुझ्या सर्व पायीं। दुजें मागणें आणिक व्यर्थ काई ॥४॥ दीनानाथ हे साक्ष तूझी जनासी। दिनें तारिलीं पातकी थोर दोषी। तुका राहिला पायिं तो राख देवा। असें मागतों तूमची पादसेवा ॥५॥

३३७७. उभा भींवरेच्या तिरीं राहिलाहे। असे सन्मुख दक्षिणे मूख वाहे। पळे पाप महा सुटे कांप थोर। कसे गर्जती घोष हे नामवीर ॥१॥ गुणगंभीर धीर हा हास्यमूख। वदे

वदनीं अमृत सर्वसूख । मुनि लागिं लागे बहू गोड चित्तीं । देहभावना तुटलियाचि खंती ॥२॥ ठसा घातला ये भूमिमाजी थोर । इच्छादान तें द्यावयासी उदार । सिद्धि वोळगती जया सर्वठायीं । तुझें नाम हें चांगलें गे विठाई ॥३॥ असे उघडा हा विटेवरि उभा । धरुनि कटसूत्र हें भक्तिलोभा । पुढें वाट दावी भवसागराची । विठो माउली सिद्ध हे साधकाची ॥४॥ करा वेगु हा तो धरा पंथ आधीं । जया पार नाहीं सुखा तें च साधीं । म्हणे तुका पंढरीये सर्व आलें । असे विश्व हें जीवनें त्याच ज्यालें ॥५॥

३३७८. धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेउनि हिंडवी दारोदारीं । मन हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही ठेंगणी परि तें तृप्ती नाहीं ॥१॥ पाहतां न दिसे निज शुद्ध मती । पुढें पडिलों इंद्रियां थोर घातीं । जिवा नास त्या संगतीं दंड बेडी । हरी शीघ्र या दुष्टसंगासि तोडी ॥२॥ असीं आणिकें काय सांगों अनंता । मोहो पापिणी दुष्टमायाममता । काम क्रोधही यातना थोर करी । तुजवांचुनी सोडवी कोण हरी ॥३॥ निज देखतां निज हे दूरि जाये । निज आळस दंभ या भीत आहें । तयां वस्ति देहीं नको देऊं देवा । तुजवांचुनी आणिक नास्ति हेवा ॥४॥ करीं घातपात भय लाज थोरी । असे सत्य भाव बहू भक्ति दूरी । नको मोकलूं दीनबंधु अनाथा । तुका विनवी ठेउनी पायीं माथा ॥५॥

३३७९. पैल सांवळे तेज पुंजाळ कैसें । सिरीं तुर्बिलीं साजिरीं मोरपीसें । हरे त्यासि देखतां ताप माया । भजा रे भजा यादवा योगिराया ॥१॥ जया कामिनी लुब्धल्या सहस्त्रसोळा । सुकुमार त्या गोपिका दिव्य बाळा । शोभे मध्यभागीं कळा चंद्रकोटी । रुपा मीनली साजिरी माळ कंठीं ॥२॥ तया यादवां श्रेष्ठ हा चक्रपाणी । जया वंदिती कोटी तेहतीस तीन्ही । महाकाळ हे कांपति दैत्य ज्यासी । पाहा सांवळें रूप हेणं पापनासीं ॥३॥ कसीं पाउलें साजिरीं कुंकमाचीं । कसी वीट हे लागली दैवाची । जया चिंतितां अग्नि हा शांति नीवे । धरावा मानसीं आपल्या दृढभावें ॥४॥ मुनी देखतां मूख हें चित्त माये । देह मांडला भाव हा बाप माय । तुक्या लागलें मानसीं देवपीसें । चित्त चोरटें सांवळें रूप कैसें ॥५॥

३३८०. असे नांदतु हा हरी सर्वजीवीं । असे व्यापुनी अग्नि काष्ठांत तेवीं । घटीं बिंबलें बिंब हें ठायिंठायीं । तया संगती नासु हा त्यासि नाहीं ॥१॥ तृण वाटितां क्षीर हें होत नाहीं । पशू भक्षितां पालटे तेंचि देहीं । तया वर्म तों जाणता एक आहे । असे व्यापक व्यापुनी अंतर्बाहे ॥२॥ फळ कर्दळीं सेवटीं येत आहे । असे शोधितां पोकळीमाजि काये । धीर नाहीं तें वाउगें धीग झालें । फळ पुष्प ना यत्न ते व्यर्थ गेले ॥३॥ असे नाम हें दर्पणें सिद्ध केलें । असे बिंब तें या मळासह ठेलें । कसें शुद्ध नाही दिसे माजि रूप । नका वाढवूं सीण हा पुण्यपाप ॥४॥ करा वर्म ठावें नका सोंग वांयां । तुका वीनवितो पडों काय पायां । त्यजी पुत्र

दारा धन वासना हे। मग ऊरलें शेवटीं काय पाहें ॥५॥

३३८१. मना सांडिं हे वासना दुष्ट खोडी। मती मानसीं एक हे व्यर्थ गोडी। असे हीत माझें तुज कांही एक। धरीं विठ्ठलीं प्रेम हें पायिं सूख ॥१॥ असा सर्वभावें तुज शरण आलों। देहदुःख हें भोगितां फार भ्यालों। भवतारितें दूसरें नाहीं कोणी। गुरु होत कां देव आणीक तिन्ही ॥२॥ जना वासना हे धना थोरि आहे। तुज लागली संगती तेचि सोये। करी सर्व संगीं परित्यागु ठायीं। तुका वीनवी ठेवूनि शीर पायीं ॥३॥

[धरणेकराचे अभंग]

३३८२. श्रीपंढरीशा पतिपावना। एक विज्ञापना पायांपाशीं ॥१॥ अनाथां जीवांचा तूं काजकैवारी। ऐसी चराचरीं ब्रीदावळी ॥२॥ न सांगतां कळे अंतरींचें गुज। आतां तुझी लाज तुज देवा ॥३॥ आळिकर त्याचें करिसी समाधान। अभयाचें दान देऊनियां ॥४॥ तुका म्हणे तूंचि खेळें दोहीं ठायीं। नसेल तो देईं धीर मना ॥५॥

३३८३. अगा ये उदारा अगा विश्वंभरा। रखुमाईच्या वरा पांडुरंगा ॥१॥ अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा। अगा मेघश्यामा विश्वजनित्या ॥२॥ अगा कृपावंता जीवन तूं दाता। अगा सर्वसत्ता धरतिया ॥३॥ अगा सर्वजाणा अगा नारायणा। करुणावचना चित्त द्यावें ॥४॥ तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी। सरती पायांपाशीं केली मागें ॥५॥

३३८४. नोहे दास खरा। परि हा झालासे डांगोरा ॥१॥ यासी काय करूं आतां। तूं हें सकळ जाणता ॥२॥ नाहीं पुण्य गांठीं। जें हें वेचूं कोणासाठीं ॥३॥ तुका म्हणे कां उपाधि। वाढविली कृपानिधि ॥४॥

३३८५. तुजविण सत्ता। नाहीं वाचा वदविता ॥१॥ ऐसे आम्ही जाणों दास। म्हणोनि जालों उदास ॥२॥ तुम्ही दिला धीर। तेणें मन झालें स्थिर ॥३॥ तुका म्हणे आड। केलें मीं हें तुझें कोड ॥४॥

३३८६. काय मी जाणता। तुम्हाहूनी जी अनंता ॥१॥ जो हा करूं अतिशय। कांहो तुम्हां दया नये ॥२॥ काय तुज नाहीं कृपा। विश्वाचिया मायबापा ॥३॥ तुका म्हणे वाणी। माझी वदे तुम्हाहूनी ॥४॥

३३८७. काय ज्ञानेश्वरीं उणें। तिहीं पाठविलें धरणें ॥१॥ ऐकोनियां लिखित। म्हुण जाणविली हे मात ॥२॥ जरी जाणे धणी। वदे सेवकाची वाणी ॥३॥ तुका म्हणे ठेवा। होतां सांभाळावा देवा ॥४॥

३३८८. ठेवोनियां डोई। पायीं झालों उतराई ॥१॥ कारण तें तुम्हीं जाणां। मी तराळ नारायणा ॥२॥ प्रसंगीं वचन। दिलें तेंचि खावें अन्न ॥३॥ तुका म्हणे भार।

तुम्ही जाणा थोडा फार ॥४॥

३३८९. नको कांहीं पडो ग्रंथाचिये भरी । शीघ्रवत करीं हेंचि एक ॥१॥ देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनिया ॥२॥ साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं नचुकती ॥३॥ उधाराचा मोक्ष होय नोहे ऐसा । पतनाची इच्छा आवश्यक ॥४॥ रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरी ॥५॥ तुका म्हणे घाली नामासाठीं उडी । पांडुरंग थडी पाववील ॥६॥

३३९०. नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें । आणूनी निराळें द्यावें हातीं ॥१॥ इंद्रियांचा जय साधूनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥२॥ उपवास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मां शेवटीं असे फळ ॥३॥ आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दु:ख जाणे ॥४॥ स्वप्नींचिया घायें विवळसी वायां । रडे रडतिया सवें मिथ्या ॥५॥ तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासी जाय वेगीं ॥६॥

३३९१. त्यजिलें भेटवीं आणुनी वासना । दाविल्याचें जना काय काज ॥१॥ आळवावें देवा भाकूनी करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥२॥ नाहीं यावें जावें दुरूनी लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥३॥ तुका म्हणे हा तो आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥४॥

३३९२. गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥१॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥२॥ आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥३॥ तुका म्हणे आळी । जीवें नुरेचि वेगळी ॥४॥

३३९३. ज्याचें जया ध्यान । तेंचि होय त्याचें मन ॥१॥ म्हणऊनी अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥२॥ सम खुण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥३॥ तुका म्हणे नभा । परता अणूचाही गाभा ॥४॥

३३९४. पाहूनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥१॥ नाहीं तरी वांयां केली तोंडपिटी । उरी ते शेवटीं उरलीसे ॥२॥ पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हां जालें ॥३॥ तपतीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥४॥ यज्ञयागादिक काय दान धर्म । तरी फल नाम कंठीं राहे ॥५॥ तुका म्हणे नको काबाडाचे भरी । पडों सार धरी हेंचि एक ॥६॥

३३९५. सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ॥१॥ त्याचें दिलें त्यासी । पावे फळ आपणासी ॥२॥ आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥३॥ नाहीं रिता ठाव । तुका म्हणे पसरीं भाव ॥४॥

३३९६. संकोचोनी काय झालासी लहान । घेई आपोशन ब्रह्मांडाचें ॥१॥ करोनी पारणें आंचवूं संसारा । उशीर उशीरा लावूं नको ॥२॥ घरकुलीनें होता पाडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥३॥ झुगारूनी दुरी लपविलें काखे । तुका म्हणे वाखे कौतुकाचे ॥४॥

३३९७. माझ्या बापें मज दिधलें भातुकें । म्हणोनी कवतुकें क्रीडा करीं ॥१॥ केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हे गुण आले त्याचे ॥२॥ घेऊनी विभाग जावें लवलाह्या । आलेती त्या ठाया आपुलिया ॥३॥ तुका म्हणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येईन वंदूं ॥४॥

३३९८. ज्ञानियांचा गुरु राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें ॥१॥ मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥२॥ ब्रह्मादिक जेथें तुम्हां वोळगणें । इतर तुळणे काय पुढें ॥३॥ तुका म्हणे नेणें युक्तीची ते खोली । म्हणोनी ठेवीली पायीं डोई ॥४॥

३३९९. बोलिलीं लेंकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥१॥ करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥२॥ नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥३॥ तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥४॥

३४००. काय तुम्ही जाणा । करूं अव्हेर नारायणा ॥१॥ तरी या लटिक्याची ग्वाही । निवडिली दुसरे ठायीं ॥२॥ कळों अंतरींचा गुण । नये फुटल्यावांचून ॥३॥ आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥४॥ आणिक कोणी भिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति ॥५॥ तुका म्हणे बीज पोटीं । फळ तैसेंचि शेवटीं ॥६॥

३४०१. अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाहे ॥१॥ काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥२॥ मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥३॥ तुका म्हणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं जाणा खोटा तैसा ॥४॥

३४०२. तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातलेसे ॥१॥ राज्यपदा आड सुखाची संपत्ति । उल्लंघूनि जाती निरयगांवा ॥२॥ इंद्रियें दमिलीं इच्छा जीती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ॥३॥ तुका म्हणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ॥४॥

३४०३. हरिकथेवीण इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घला तेथें ॥१॥ जाईल भंगोन आपुला विश्वास । अवघीया नास कारणांचा ॥२॥ ज्याचिया बैसावें भोजना पंगती । त्याचिया संगती तैसें खावें ॥३॥ तुका म्हणे काय झालेती जाणते । देवाही परते थोर तुम्ही ॥४॥

३४०४. सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हूंतूपण कामा नये ॥१॥ घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदीजेना ॥२॥ खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलें तें नीट उसंतावें ॥३॥ तुका म्हणे तो आहे ज्ञानाचा सागर । नेदीसी अगर भिजों भेदें ॥४॥

३४०५. जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥१॥ करील तें काय

नव्हे महाराज। परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥२॥ जयानें घातली मुक्तीची गवांदी। मेळविली मांदी वैष्णवांची ॥३॥ तुका म्हणे तेथें सुखा काय उणें। राहे समाधानें चित्ताचिया ॥४॥

३४०६. बहुतां छंदांचें बहु असे जन। नये वाठूं मन त्यांच्या संगें ॥१॥ करावा जतन आपुला विश्वास। अंगा आला रस आवडीचा ॥२॥ सुखाची समाधि हरिकथा माउली। विश्रांति साउली सिणलियांची ॥३॥ तुका म्हणे बुडे बांधोनी दगड। तेथें काय कोड धांवायाचें ॥४॥

३४०७. हरिकथे नाहीं। विश्वास ज्याचे ठायीं ॥१॥ त्याची वाणी अमंगळ। कान उंदराचें बीळ ॥२॥ सांडूनी हा रस। करि आणीक सायास ॥३॥ तुका म्हणे पिसीं। वांयां गेलीं किती ऐसीं ॥४॥

३४०८. अमृताची धार। वाहे देवाचे समोर ॥१॥ उर्ध्ववाहिनी हरिकथा। मुकुटमणि सकळां तीर्थां ॥२॥ शिवाचें जीवन। जाळी महादोष कीर्तन ॥३॥ तुका म्हणे हरि। इची स्तुति वाणी थोरी ॥४॥

३४०९. आतां माझ्या मना। ईची घडो उपासना ॥१॥ ऐसें करीं गा पांडुरंगा। प्रेम वोसंडेसें अंगा ॥२॥ सर्व काळ नये। वाचे वीट आड भये ॥३॥ तुका वैष्णवांसंगती। हेंचि भोजनपंगती ॥४॥

४३१०. उपास कराडी। तिहीं करावी बापुडीं ॥१॥ आम्ही विठोबाचे दास। चिंता झुगारिली आस ॥२॥ भक्तीच्या उत्कर्षें। नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥३॥ तुका म्हणे बळ। अंगीं आमुच्या सकळ ॥४॥

३४११. करविली तैसी केली कटकट। वांकडें कीं नीट देव जाणे ॥१॥ कोणाकारणें हें झालेंसे निर्माण। देवाचें कारण देव जाणे ॥२॥ तुका म्हणे मी तो अभिमाना वेगळा। घालुनि गोपाळा भार असें ॥३॥

३४१२. तुम्हीं येथें पाठविला धरणेकरी। त्याची झाली परी आइका ते ॥१॥ आतां काय पुढें वाढवूं विस्तार। झाला समाचार आइका तो ॥२॥ देवाचें उचित एकादश अभंग। महाफळ त्याग करूनी गेला ॥३॥ तुका म्हणे सेवा समर्पूनी पायीं। झालों उतराई ठावें असो ॥४॥

[शिवाजी राजे यांनी तुकोबास आपले येथें आणण्याकरितां अबदागिरी, घोडा, कारकून पाठविला त्या वेळचे अभंग.]

३४१३. दिवट्या छत्री घोडे। हें तों बऱ्यांत न पडे ॥१॥ आतां येथें पंढरिराया। मज गोविसी कायसा ॥२॥ मान दंभ चेष्टा। हे तो शूकराची विष्ठा ॥३॥ तुका म्हणे देवा। माझे सोडवणे धांवा ॥४॥

३४१४. नावडे जें चित्ता। तेंचि होसी पुरविता ॥१॥ कां रे पुरविली पाठी। माझी केली

जीवें साठी ॥२॥ न करावा संग । वाटे दुरवावें जग ॥३॥ सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ॥४॥ जन तन धन । वाटे लेखावें वमन ॥५॥ तुका म्हणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥६॥

३४१५. जाणोनी अंतर । टाळिसील करकर ॥१॥ तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहू कुडी ॥२॥ उठविसी दारीं । धरणें एखादिये परी ॥३॥ तुका म्हणे पाय । कैसे सोडीन तें पाहें ॥४॥

३४१६. नाहीं विचारीत । मेघ हगणदारी सेत ॥१॥ नये पाहों त्याचा अंत । ठेवी कारणापें चित्त ॥२॥ वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥३॥ तुका म्हणे मळ । नाहीं अग्निसी विटाळ ॥४॥

३४१७. मुंगी आणि राव । आम्हां सारिखाचि जीव ॥१॥ गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥२॥ सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ॥३॥ तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सांवळें ॥४॥

३४१८. सोन्याचे पर्वत करविती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरू ॥१॥ परिया दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥२॥ अमृतें सागर भरवती गंगा । म्हणवेल उगा राहे काळा ॥३॥ भूतभविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न ऋद्धि सिद्धी ॥४॥ ठानमान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रह्मांडासी ॥५॥ तुका म्हणे मोक्ष राहे ऐलीकडे । इतर बापुडें काय तेथें ॥६॥

३४१९. तिहीं त्रिभुवनीं । आम्ही वैभवाचे धनी ॥१॥ हातां आला घाव डाव । आमुचा मायबाप देव ॥२॥ काय त्रिभुवनीं बळ । अंगी आमुच्या सकळ ॥३॥ तुका म्हणे सत्ता । अवघी आमुचीच आतां ॥४॥

३४२०. काय दिला ठेवा । आम्हां विठ्ठलचि व्हावा ॥१॥ तुम्ही कळलेती उदार । साटीं परिसाची गार ॥२॥ जीव देतां तरी । वचना नये येका सरी ॥३॥ गोमांसासमान । तुका म्हणे आम्हां धन ॥४॥

३४२१. आम्हीं तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥१॥ तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥२॥ कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥३॥ म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥४॥

[व्यभिचाराचे अभंग]

३४२२. वाळो जन मज म्हणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥ सांडूनी लौकिक झालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥ नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे झालें तुका हरिरत ॥३॥

३४२३. आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥ रात्रंदिवस

मज पाहिजे जवळी । क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥ नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका म्हणे ॥३॥

३४२४. हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥ घररिघी झालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रह्म ॥२॥ बळियाचा अंगसंग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥३॥

३४२५. नाहीं काम माझें काज तुम्हांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ॥१॥ व्यभिचार माझा पडिला ठाऊका । न सरती लोकांमाजी झालें ॥२॥ न धरावा लोभ कांहीं माझेविशीं । जाले देवपिशी तुका म्हणे ॥३॥

२४२६. विसरलें कुळ आपुला आचार । पति भावे दीर घर सोय ॥१॥ सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥२॥ मज जातां कोणी आळवाल झणी । तुका म्हणे कानीं बहिर झालें ॥३॥

३४२७. न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरिचित्तीं ॥१॥ सासुरें माहेर मज नाहीं कोणीं । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥ आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥३॥

३४२८. दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंतापासूनियां ॥१॥ बळियाच्या आम्ही झालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥२॥ तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा । झालों प्रीतिकरा गोविंदासी ॥३॥

३४२९. क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥१॥ सांडीमांडी मागें केल्या भरोवरी । अधिकचि परी दुःखाचिया ॥२॥ तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥३॥

३४३०. आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥ फावला एकांत एकविध भाव । हरि आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥ तुका म्हणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजें कोणी ॥३॥

३४३१. सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥ याचसाठीं सांडियेले भरतार । रातलों या परपुरुषाशीं ॥२॥ तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥३॥

३४३२. एका जीवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥ नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पूर्वील हे भाक सांभाळिली ॥२॥ तुका म्हणे झालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥३॥

३४३३. हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥ सेवा सुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ॥२॥ तुका म्हणे आम्ही झालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥३॥

३४३४. मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयांनो ॥१॥ न साहावे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥२॥ तुका म्हण झालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही ॥३॥

३४३५. शिकविलें तुम्ही तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तो ॥१॥ प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥२॥ तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥३॥

३४३६. सांगतों तें तुम्ही आइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥ जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥२॥ तुका म्हणे काय वांयांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥३॥

३४३७. आजीवरी तुम्हां आम्हां नेणपणें । कौतुकें खेळणें संग होता ॥१॥ आतां अनावर झालों अगुणाची । करूं नये तेंचि करूं सुखें ॥२॥ तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥३॥

३४३८. सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावेचि ॥१॥ सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥२॥ न व्हावी ते झाली आमुची भंडाई । तुका म्हणे काई लाजों आतां ॥३॥

३४३९. मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केले मनीं होतें तैसें ॥१॥ आता तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ॥२॥ तुका म्हणे तुम्ही भयभीत नारी । कैसी संग सरी तुम्हां आम्हां ॥३॥

३४४०. परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनी करीं घ्यावें सीस ॥१॥ संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनी मागुतें पाहूं नये ॥२॥ तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपा सोई ॥३॥

३४४१. आइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडावी सोई भ्रताराची ॥१॥ नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥ तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥३॥

३४४२. आहाच वाहाच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आम्हां तैश्या ॥१॥ भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनी मना बंद द्यावा ॥२॥ तुका म्हणे कांहीं अभ्यासावांचूनी ।

नव्हे हे करणी भलतीची ॥३॥

३४४३. बहुतांच्या आम्ही न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥ विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥ तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥३॥

३४४४. त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठीण हें जिवा तोंचिवरी ॥१॥ मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें सांगा नेदी पुढें ॥२॥ तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणाती महिमान श्रुति ऐसें ॥३॥

३४४५. न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥१॥ मानेल त्या तुम्ही आइका स्वभावें । मी तों माझ्या भावें अनुसरलें ॥२॥ तुका म्हणे तुम्हीं फिरावें बहुतीं । माझी तों हे गति झाली आतां ॥३॥

३४४६. न बोलतां तुम्हां कळों ये जे गुज । म्हणऊनि लाज सांडियेली ॥१॥ आतां तुम्हां पुढें जोडीतसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥२॥ तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरि पाहों आतां ॥३॥

[तुकोबास मंबाजी गोसाव्याने मारलें त्याबद्दल देवाजवळ परिहार.]

३४४७. न सोडीं न सोडीं । विठोबा चरण न सोडीं ॥१॥ भलतें जड पडो भारी । जीवावरी आगोज ॥२॥ शतखंड देह शस्त्रधारी । करितां परी न भीयें ॥३॥ तुका म्हणे केली आधी । दृढ बुद्धि सावध ॥४॥

३४४८. बरवें बरवें । केलें विठोबा बरवें ॥१॥ पाहोनिबा अंत क्षमा । अंगीं कांटीवरी मारविलें ॥२॥ शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥३॥ तुका म्हणे क्रोधा हातीं । सोडवूनी घेतलें रे ॥४॥

३४४९. पावलों पावलों । देवा पावलों रे ॥१॥ बरवें संचित होतें तैसें झालें ते । आतां काय बोलों रे ॥२॥ सोज्वळा कंटकवाटा भावें करूं गेलों रे । तुका म्हणे करूनी वेगळा केलों रे ॥३॥

३४५०. कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥१॥ मुळीं वर्म नसतों चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ॥२॥ होणार तें होऊनि गेलें । मिथ्या आतां खंती रे ॥३॥ तुका म्हणे पुरे आतां । दुर्जनाची संगती रे ॥४॥

३४५१. सोडवा सोडवा सोडवा अनंता । तुजविण ऐसा कोण दुजा प्राणदाता ॥१॥ कोणा लाज नेणां ऐसें । आणिका शरण आम्ही जातां ॥२॥ तुका म्हणे सखया । माझ्या रखुमाईच्या कांता ॥३॥

३४५२. पुत्राचीया वार्ता । शुभ ऐके जेवीं माता ॥१॥ तैसें राहो माझें मन । गातां ऐकतां हरिगुण ॥२॥ नादें लुब्ध झाला मृग । देह विसरला अंग ॥३॥ तुका म्हणे पाहे । कासवीचें पिलें माय ॥४॥

[देवांनी बाबाजी चैतन्याचें रूप धरून स्वामीस स्वप्नामध्यें उपदेश केला तेंविषयी.]

३४५३. सत्यगुरुरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥२॥ भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥३॥ काय कळे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा झाली ॥४॥ राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥५॥ बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥६॥ माहो शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥७॥

३४५४. माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुरावो ॥१॥ आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नोहे गुंफा कांहीं कोठें ॥२॥ जाती पुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥३॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटे ॥४॥ तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरू पांडुरंग ॥५॥

३४५५. घालूनियां भार राहिलों निश्चिंतीं । निरविलें संतीं विठोबासी ॥१॥ लावूनियां हात कुरवाळिली माथा । सांगितलें चिंता न करावी ॥२॥ कटीं कर सम चरण साजिरे । राहिला भीवरेतीरीं उभा ॥३॥ खुंटले सायास आणीक या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ॥४॥ तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका म्हणे संतां लाज माझी ॥५॥

३४५६. माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासी उदार झालों आतां ॥१॥ तुजविण दुजें न धरीं आणिका । भय लज्जा शंका टाकियेली ॥२॥ ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ॥३॥ जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । हेचि आतां नाहीं लाज तुम्हां ॥४॥ तुका म्हणे संतीं घातला हवाला । न सोडीं विठ्ठला पाय तुझे ॥५॥

[शाक्तावर अभंग]

३४५७. टंवकारूनी दृष्टि लावूनिया रग । दावी झगमग डोळ्यापुढें ॥१॥ म्हणती शिष्यासी लागली समाधि । लटकीच उपाधि झकविती ॥२॥ दीपाचिया ज्योती कोंडियेलें तेज । उपदेश सांजरात्रीमाजी ॥३॥ रांगोळिया चौक शृंगारूनी वोजा । आवरणपूजा यंत्र करी ॥४॥ पडदा लावोनियां दीप चहूं कोनीं । बैसोनी आसनीं मुद्रा दावी ॥५॥ नैवेद्यासी म्हणे करावें पक्वान्न । पात्रासी दिव्यान्न परवडी ॥६॥ झाला उपदेश कवळ घ्या रे मुखीं । आपोशन शेखीं बुडविलें ॥७॥ पाषांड करोनी मांडिली जीविका । बुडवी भाविकां लोकाप्रती ॥८॥ कायावाचामनें सोडवी संकल्प । गुरु गुरु जप प्रतिपादी ॥९॥ शुद्ध परमार्थ बुडविला तेणें । गुरुत्वभूषणें मग भोगी

॥१०॥ विधीचाही लोप बुडविला वेद। शास्त्रांचाही बोध हरविला ॥११॥ योगाची धारणा नाहीं प्राणायाम। सांडी यम नेम नित्यादिक ॥१२॥ वैराग्याचा लोप हरिभजनीं विक्षेप। वाढविलें पाप मतिलंडें ॥१३॥ तुका म्हणे गेलें गुरुत्व गुखाडी। पूर्वजांसी धाडी नरकवासा ॥१४॥

३४५८. गुरुमार्गामुळें भ्रष्ट झाले सकळ। म्हणती यातीकुळ नाही ब्रह्मीं ॥१॥ पवित्राला म्हणती नको हा कंटक। मानिती आत्मिक अनामिका ॥२॥ डोहोर लोहार दासी बलुती बारा। उपदेशिती फारा रांडापोरें ॥३॥ कांहीं टाण्या टोण्या विप्रशिष्य होती। उघडी फजिती स्वधर्माची ॥४॥ नसता करूनी होम खातीं एके ठायीं। म्हणती पाप नाहीं मोक्ष येणें ॥५॥ इंद्रियांचे पेटे भला कौल देती। मर्यादा जकाती माफ केली ॥६॥ नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणें। उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ॥७॥ तुका म्हणे ऐसे गुरुशिष्य जाण। विठोबाची आण नरका जाती ॥८॥

३४५९. शाक्त गधडा जये देशीं। तेथें राशी पापाच्या ॥१॥ सुकृताचा उदो केला। गोंधळ घाला इंद्रियें ॥२॥ क्रोधरूपें वसे काम। तीचें नाम जपतसे ॥३॥ मद्यभक्षण मांगिणजाती। विटाळ चित्तीं सांठविला ॥४॥ स्तवूनियां पूजी रांड। न लगे भांड दाढीसी ॥५॥ तुका म्हणे भगवती। नेइल अंतीं आपणापें ॥६॥

३४६०. राजा प्रजा द्वाड देश। शाक्त वास करिती तो ॥१॥ अधर्माचें उघड पीक। धर्म रंक ते गांवीं ॥२॥ न पिके भूमि कांपे भारें। मेघ वारें पीतील ॥३॥ तुका म्हणे अवघीं दु:खें। येती सुखें वस्तीसी ॥४॥

३४६१. ऐका कलीचें हें फळ। पुढें होइल ब्रह्मघोळ ॥१॥ चारी वर्ण अठरा याती। भोजन करिती एके पंक्ती ॥२॥ पूजिती असुरा रांडा। मद्य प्राशितील पेंडा ॥३॥ वाम कवळ मार्जन। जन जाईल अध:पतन ॥४॥ तुका हरिभक्ती करी। शक्ति पाणी वाहे घरी ॥५॥

३४६२. ऐसें कलियुगाच्या मुळें। झालें धर्माचें वाटोळें ॥१॥ सांडुनियां रामराम। ब्राह्मण म्हणती दोमदोम ॥२॥ शिवों नये तीं निळीं। वस्त्रें पांघरती काळीं ॥३॥ तुका म्हणे वृत्ति। सांडुनि गदा मागत जाती ॥४॥

३४६३. अवघ्या पापें घडला एक। उपासक शक्तीचा ॥१॥ त्याचा विटाळ नको अंगा। पांडुरंगा माझिया ॥२॥ काम क्रोध मद्य अंगीं। रंगला रंगीं अवगुणी ॥३॥ करितां पाप न धरी शंका। म्हणे तुका कोणीही ॥४॥

३४६४. वारितां बळें धरितां हातीं। जुलुमें जाती नरकामधीं ॥१॥ रंडीदासाप्रति कांहीं। उपदेश तोही चालेना ॥२॥ जन्म गेला वाताहात। थोर घात ये ठायीं ॥३॥ तुका म्हणे पंढरीनाथा। तुझी कथा दूषीती ॥४॥

३४६५. शाक्ताची शूकरी माय। विष्ठा खाय बिदीची ॥१॥ तिची त्या पडली सवे।

मागें धांवे म्हणोनि ॥२॥ शाक्ताची गाढवी माय । भुंकत जाय वेसदारा ॥२॥ तुका म्हणे सिंदळीचे । बोलतां वाचे निंद्य ते ॥४॥

३४६६. हरिहर सांडूनि देव । भरिती भाव क्षुल्लकीं ॥१॥ ऐका त्याची विटंबना । देवपणा भक्तांची ॥१॥ अंगीं कवडे घाली गळां । परडी कळाहीन हातीं ॥३॥ गळा गाठा हिंडे द्वारीं । मनुष्य परी कुतरीं तीं ॥४॥ माथां सेंदुर दांत खाती । जेंगट हातीं सटवीचे ॥५॥ पूजिती विकट दोंद । पशु सोंड गजाची ॥६॥ ऐशा छंदें चुकलीं वाटा । भाव खोटा भजन ॥७॥ तुका म्हणे विष्णु शिवा । वांचुनि देवा भजती ते ॥८॥

३४६७. कांद्यासाठीं झालें ज्ञान । तेणें जन नाडिलें ॥१॥ काम क्रोध बुचबुची । भुंके पुची व्यालीची ॥२॥ पूजेलागीं द्रव्य मागे । काय सांगे शिष्यातें ॥३॥ तुका म्हणे कैंचें ब्रह्म । अवघा भ्रम विषयांचा ॥४॥

३४६८. सांडूनियां पंढरीराव । कवणातें म्हणों देव ॥१॥ बहु लाज वाटे चित्ता । आणिकांतें देव म्हणतां ॥२॥ सांडूनियां हिरा । कोणें वेचाव्या त्या गारा ॥३॥ तुका म्हणे हरिहर । ऐसी सांडूनियां धुर ॥४॥

३४६९. बहुत गेली वांयां । न भजतां पंढरीराया ॥१॥ करिती कामिकांची सेवा । लागोन मागोन खात्या देवा ॥२॥ अवघियांचा धनी । त्यासी गेलीं विसरोनी ॥३॥ तुका म्हणे अंतीं । पडती यमाचिया हातीं ॥४॥

३४७०. असो आतां ऐसा धंदा । तुज गोविंदा आठवूं ॥१॥ रक्षिता तूं होसी जरी । तरि काय येरीं करावें ॥२॥ काया वाचा मन पायीं । राहे ठायीं करूं तें ॥३॥ तुका म्हणे गाइन गीतीं । रूप तें चित्तीं धरूनियां ॥४॥

[भूपाळ्या अभंग]

३४७१. बोलोनियां दाऊं कां तुम्ही नेणा जी देवा । ठेवाल तें ठेवा ठायीं तैसा राहेन ॥१॥ पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय । म्हणऊनी पाय जीवीं धरूनी राहिलों ॥२॥ त्याग भोग दुःख काय सांडावें मांडावें । ऐसी धरियेली जीवें माझ्या थोर आशंका ॥३॥ तुका म्हणे माता बाळ चुकलिया वनीं । न पवतां जननी दुःख पावे विठ्ठले ॥४॥

३४७२. ऐसी वाट पाहे कांहीं निरोप कां मूळ । कांहो कळवळा तुम्हां उमटेचि ना ॥१॥ अहो पांडुरंगे पंढरीचे निवासे । लावुनियां आसे चाळवूनी ठेविलें ॥२॥ काय जन्मा येऊनियां केली म्यां जोडी । ऐसें घडोघडी चित्ता येते आठवूं ॥३॥ तुका म्हणे खरा न पवेचि विभाग । धिक्कारितें जग हेंचि लाहें हिशोबें ॥४॥

३४७३. कां गा किविलवाणा केलों दीनाचा दीन । काय तुझी हीन शक्ति जालीसे दिसे

॥१॥ लाज येते मना तुझा म्हणवितां दास । गोडी नाहीं रस बोलिलीयासारिखी ॥२॥ लाजविलीं मागें संतांचीं हीं उत्तरें । कळों येतें खरें दुजें एकावरूनी ॥३॥ तुका म्हणे माझी कोणी वदविली वाणी । प्रसादावांचूनी तुमचिया विठ्ठला ॥४॥

३४७४. जळो माझें कर्म वांयां केली कटकट । झालें तैसें तंट नाहीं आलें अनुभवा ॥१॥ आतां पुढें धीर काय देऊं या मना । ऐसें नारायणा प्रेरिलें तें पाहिजे ॥२॥ गुणवंत केलों दोष जाणायासाठीं । माझें माझें पोटीं बळकट दूषण ॥३॥ तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा । बरवा हा लळा पाळियेला शेवटीं ॥४॥

३४७५. कामें नेलें चित्त नेदी अवलोकूं मुख । बहु वाटे दुःख फुटों पाहे हृदय ॥१॥ कां गा सासुरवासी मज केलें भगवंता । आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं ॥२॥ प्रभातेसी वाटे तुमच्या यावें दर्शना । येथें न चले चोरी उरली राहे वासना ॥३॥ येथें अवघे वांयां गेले दिसती सायास । तुका म्हणे नास दिसे झाल्या वेचाचा ॥४॥

३४७६. जळोत तीं येथें उपजविती अंतराय । सायासाची जोडी माझी तुमचे पाय ॥१॥ आतां मज साह्य येथें करावें देवा । तुझी घेईं सेवा सकळ गोवा उगवूनी ॥२॥ भोगें रोगा जोडोनियां दिलें आणिकां । अरुचि ते हो कां आतां सकळांपासूनी ॥३॥ तुका म्हणे असो तुझें तुझे मस्तकीं । नाहीं ये लौकिकीं आतां मज वर्तणें ॥४॥

३४७७. न सांगतां तुम्हां कळों येतें अंतर । विश्वीं विश्वंभर परिहारचि नलगे ॥१॥ परि हे अनावर आवरितां आवडी । अवसान ते घडी पुरों एकी देत नाहीं ॥२॥ काय उणें मज येथें ठेविलीये ठायीं । पोटा आलों तईंपासूनियां समर्थें ॥३॥ तुका म्हणे अवघी आवरिली वासना । आतां नारायणा दुसरियापासूनी ॥४॥

३४७८. तुजसवें आम्ही अनुसरलों अबळा । नको अंगीं कळा राहों हरी हीन देऊं ॥१॥ सासुरवासा भीतो जीव ओढे तुजपाशीं । आतां दोहींविशीं लज्जा राखें आमुची ॥२॥ न कळतां संग झाला सहज खेळतां । प्रवर्तली चिंता मागिलाचि यावरी ॥३॥ तुका म्हणे असतां जैसें तैसें बरवें । वचन या भावें वेचूनियां विनटलों ॥४॥

[तुकोबाचे अभंगांतील नांव काढून सालोमालो यांनी आपलें नांव घातलें त्याबद्दल त्यांचा निषेध.]

३४७९. नाहीं घाटावें लागत । एका सितें कळे भात ॥१॥ क्षीर निवडितें पाणी । चोंची हंसाचिये आणी ॥२॥ आंगडें फाडुनि घोंगडें करीं । अवकळा तयापरी ॥३॥ तुका म्हणे कण । भुसीं निवडे कैंचा सीण ॥४॥

३४८०. सालोमालो हरिचे दास । म्हणउन केला अवघा नास ॥१॥ अवघें बचमंगळ केलें । म्हणती एकाचें आपुलें ॥२॥ मोडूनी संतांचीं वचनें । करिती आपणां भूषणें ॥३॥

तुका म्हणे कवी । जगामधीं रूढी दावी ॥४॥

३४८१. जायाचें अळंकार । बुडवूनी होती चोर ॥१॥ त्यांसी ताडणाची पूजा । योग घडे बऱ्या वोजा ॥२॥ अभिळासाच्या सुखें । अंती होती काळीं मुखें ॥३॥ तुका म्हणे चोरा । होय भूषण मातेरा ॥४॥

३४८२. कालवूनी विष । केला अमृताचा नास ॥१॥ ऐशी अभाग्याची बुद्धि । सत्य लोपी नाहीं शुद्धि ॥२॥ नाक कापुनि लावी सोनें । कोण अळंकार लेणें ॥३॥ तुका म्हणे बावी । मोडूनि मदार बांधावी ॥४॥

३४८३. कण भुसाच्या आधारें । परि तें निवडितां बरें ॥१॥ काय घोंगाणी पाधाणी । ताकामध्यें घाटी लोणी ॥२॥ सुइणीपुढें चेटा । काय लपविसी चाटा ॥३॥ तुका म्हणे ज्ञान । दिमाखाची भणभण ॥४॥

३४८४. विकाल तेथें विका । माती नांव ठेवूनि बुका ॥१॥ हा तो निवाड्याचा ठाव । खरा खोटा निवडे भाव ॥२॥ गऱ्हवारे हा विधी । पोट वाढविलें चिंधी ॥३॥ लाऊं जाणे विल्हे । तुका साच आणि कल्हे ॥४॥

३४८५. विषयीं अद्वय । त्यासी आम्हां शिवों नये ॥१॥ देव तेथूनि निराळा । असे निष्काम वेगळा ॥२॥ वासनेची बुंथी । तेथें कैंची ब्रह्मस्थिति ॥३॥ तुका म्हणे असतां देहीं । हा जमे ती तेथें नाहीं ॥४॥

३४८६. नमितों या देवा । माझी एके ठायीं सेवा ॥१॥ गुण अवगुण निवाडा । म्हैस म्हैस रेडा रेडा ॥२॥ जनीं जनार्दन । साक्ष त्यासी लोटांगण ॥३॥ तुका म्हणे खडे । निवडूं दळणीं घडघडे ॥४॥

[हिंदुस्थानी भाषेचे अभंग]

३४८७. क्या गाऊं कोई सुननेवाला । देखें तो सब जगही भुला ॥१॥ खेलों आपने रामहिसात । जैसी वैसी कररहूं मात ॥२॥ काहांसे लाऊं मधुरा बानी । रीझे ऐसी लोक बिरानी ॥३॥ गिरिधर लाल तो भावका भुका । राग कला नहिं जानत तुका ॥४॥

३४८८. छोडे धन मंदिर बन वसाया । मांगत टुका घरघर खाया ॥१॥ तीनसों हम करवों सलाम । ज्यामुख बैठा राजाराम ॥२॥ तुलसीमाला बभूत चऱ्हावे । हरजीके गुन निर्मल गावे ॥३॥ कहे तुका जो सांई हमारा । हिरनकश्यप जिन्हे मारहि डारा ॥४॥

३४८९. मंत्रतंत्र नहिं मानत साखी । प्रेमभाव नहिं अंतर राखी ॥१॥ राम कहे त्याके पग हूं लागूं । देखत कपट अभिमान दुर भागूं ॥२॥ अधिक जाती कुल नहिं जानूं । जाने नारायन सो मानी मानूं ॥३॥ कहे तुका जीव तन धन डारूं वारी । राम उपासिहुं बलियारी ॥४॥

३४९०. चुराचुराकर माखन खाया । गौलनीका नंद कुमर कन्हया ॥१॥ काहे बराई दिखावत मोहि । जानतहुं प्रभुपना तेरा सबही ॥२॥ और मात सुन उखलसुं गला । बांधलिया तूं आपना गोपाला ॥३॥ फिरत बनबन गाऊं धरावत । कहे तुकयाबंधु लकरी लेले हात ॥४॥

३४९१. हरिसूं मिल दे एकही बेर । पाछें तूं फेर नावे घर ॥१॥ मात सुनों दुति आवे मनावन । जाया करती भर जोवन ॥२॥ हरिसुखमोही कहिया न जाय । तव तूं बुझे आगो पाय ॥३॥ देखहि भाव कछु पकरी हात । मिलाई तुका प्रभुसात ॥४॥

३४९२. क्या कहूं नहिं बुझत लोका । लिजावे जम मारत धका ॥१॥ क्या जीवनेकी पकरी आस । हातों लिया नहिं तेरा घास ॥२॥ किसे दिवाने कहता मेरा । कछु जावे तब तूं सब ल्या न्यारा ॥३॥ कहे तुका तूं भया दिवाना । अपना विचार करले जना ॥४॥

३४९३. कब मरूं पाऊं चरण तुम्हारे । ठाकुर मेरे जीवन प्यारे ॥१॥ जग डरे ज्याकुं सो मोहि मीठा । मीठा दर आनंदसाहि पैठा ॥२॥ भला पाऊं जनम इन्हे बेर । सब मायाके असंग फेर ॥३॥ कहे तुका धन मानहि दारा । वोहि लिये गुंडली पसारा ॥४॥

३४९४. दासों पाछें दौरे राम । सोवे खडा आपे मुकाम ॥१॥ प्रेम रसडी बांधी गले । खैच चले तब मोही उधर ॥२॥ आपने जनसुं भुल न देवे । कर हि धर आगे बाट बतावे ॥३॥ तुकाप्रभु दीनदयाला । वारि रे तुज पर हुं गोपाला ॥४॥

३४९५. ऐसा कर घर आवे राम । और धंदा सब छोर हि काम ॥१॥ इतने गोते काहे खाता । जब तूं आपना भूल न होता ॥२॥ अंतरजामी जानत साचा । मनमे एक उपर वाचा ॥३॥ तुकाप्रभु देशविदेश । भरिया खाली नहि लेस ॥४॥

३४९६. मेरे रामको नाम जो लेवे बारोबार । त्याके पाऊं मेरे तनकी पैजार ॥१॥ हांसत खेलत चालत बाट । खाना खाते सोतें खाट ॥२॥ जातनसुं मुजे कछु नहिं प्यार । असतके नहिं हिंदु धेड चंभार ॥३॥ ज्याका चित्त लगा मेरे रामको नाम । कहे तुका मेरा चित्त लगा त्याके पाव ॥४॥

३४९७. आप तर त्याकी कोन बन्हाई । औरनकुं भलो नाम धराई ॥१॥ काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नहिं दुध चाखे ॥२॥ बरसत मेघ फलतहि विरखा । कोन काम आपनी उन्हो तिरखा ॥३॥ काहे चंदा सुरज खावे फेरा । खिन एक बैठ न पावत घेरा ॥४॥ काहे परिस कंचन करे धातु । नहिं मोल तुटत पावत घातु ॥५॥ कहे तुका उपकार हि काज । सब कर रहिया रघुराज ॥६॥

३४९८. जग चले उस घाट कोन जाय । नहिं समजत फिरफिर गोते खाय ॥१॥ नहिं एक दो सब संसार । जो बुझे सो आगला स्वार ॥२॥ उपर स्वार बैठे तृष्णापीठ । नहिं वाचे कोई

जावे लूट ॥३॥ देखहि डर फेर बैठा तुका । जोवत मारग रामहि एका ॥४॥

३४९९. भले रे भाई जिन्हें किया चीज । अच्छा नहिं मिलत बीज ॥१॥ फीरतफीरत पाया सारा । मीठत लोले धन किनारा ॥२॥ तीरथ बरत फिर पाया जोग । नहिं तलमल तुटत भवरोग ॥३॥ कहे तुका मैं ताको दास । नहिं सिरभार चलावे पास ॥४॥

३५००. लाल कंबली वोढे पेनाये । मोसु हरिथे कैसें बनाये ॥१॥ कहे सखि तुह्में करीते सोर । हिरदा हरिका कठिन कठोर ॥२॥ नहिं क्रिया सरम कछु लाज । और सुनाउं बहुत हे भाज ॥३॥ और नामरूप नहिं गोवलिया । तुका प्रभु माखन खाया ॥४॥

३५०१. राम कहो जीवना फल सो ही । हरिभजनसुं विलंब न पाई ॥१॥ कवनका मंदिर कनक झोपरी । एकरामबिन सबही फुकरी ॥२॥ कवनकी काया कवनकी माया । एक रामबिन सब हि जाया ॥३॥ कहे तुका सबहि चलनार । एक रामबिन नहिं वोसार ॥४॥

३५०२. काहे भुला धनसंपत्ती घोरे । रामनाम सुन गाउ हो बापु रे ॥१॥ राजे लोक सब कह तूं आपना । जब काल नहिं पाया ठाना ॥२॥ माया मिथ्या मनका सब धंदा । तेजो अभिमान भजो गोविंदा ॥३॥ राना रंक डोंगरकी राई । कहे तुका सब करहिलाई ॥४॥

३५०३. काहे रोवे आगले मरना । गंव्हार तूं भुला आपना ॥१॥ केते मालुम नहिं पडे । नन्हे बडे गये सो ॥२॥ बाप भाई लेखा नहिं । पाछें तूं हि चलनार ॥३॥ काले बाल सोपत भये । खबर पकरो तुका कहे ॥४॥

३५०४. क्या मेरे राम कवन सुख सारा । कहकर दे पुछूं दास तुम्हारा ॥१॥ तनजोवनकी कोन बन्हाई । व्याधिपीडा दिस काटहि खाई ॥२॥ कीर्त बधाऊं तों नाम न मेरा । काहे छुटा पछताऊं घेरा ॥३॥ कहे तुका नहिं समजत मात । तुम्हारे शरन जोरत ही हात ॥४॥

३५०५. देखत अखों झुटा कोरा । तो काहे छोरा घरबार ॥१॥ मनसुं किया चाहिये पाख । उपर खाक पसारा ॥२॥ कामक्रोधसो संसार । वो सिरभार चलावे ॥३॥ कहे तुका सो संन्यास । छोड आस तनकी हि ॥४॥

३५०६. रामभजन सब सार मिठाई । हरि संताप जनमदुख राई ॥१॥ दुधभात घृत साकरपारे । हरते भुक नहिं अंततारे ॥२॥ खावते जुग सब चलिजावे । खाटमिठा फिर परचत आवे ॥३॥ कहे तुकाराम रस जो पावे । बहुरी फेरा वो कबहु न खाये ॥४॥

३५०७. बारबार काहे मरत अभागी । बहुरी मरनसे क्या तोरे भागी ॥१॥ ये हि तन करते क्या ना होय । भजन भगति कर वैकुंठ जाय ॥२॥ रामनाम मोल नहिं बेचे कबरि । वो हि सब माया छुरावत झगरी ॥३॥ कहे तुका मनसुं मिल राखो । रामरस जिव्हा नित चाखो ॥४॥

३५०८. हूं दास तीन्हके सुनाऊ लोकां । रावण मार बिभीषन दिई लंका ॥१॥ गोवरधन

नखपर गोकुल राखा । बर्सन लगा जब मेंहुं फत्तरका ॥२॥ वैकुंठनायक काल कौंसासुरका । दैत डुबाय सब मंगाय गोपिका ॥३॥ स्तंभ फोड पेट चिरीया कश्यपका । प्रल्हादके लियें कहे भाई तुकया का ॥४॥

[हिंदुस्थानी दोहोरा]

३५०९. तुका बस्तर बिचारा क्या करो रे । अंतर भगवान होय । भीतर मैला कब मिटो रे । मरे उपर धोय ॥१॥ रामराम कहे रे मन । औरसुं नहिं काज । बहुत उतारे पार । आगें राखे तुकाकी लाज ॥२॥ लोभीके चित्त धन बैठे । कामिनीके चित्त काम । माताके चित्त पूत बैठें । तुकाके मन राम ॥३॥ तुका पंखि बहिर न मानुं । वोहि जनावर बाग । असंतनकुं संतन मानुं । जे वर्म कुंदाग ॥४॥ तुका राम बहुत मिठा रे । भर राखुं शरीर । तनकी करूं नावरि । उतारूं पैल तीर ॥५॥ संत पन्हयां लेखडा । राहुं ठाकुरद्वार । चलत पाछें हुं फिरों । रज उडत लेऊं सीर ॥६॥ तुका प्रभु बडो न मनूं न मानूं बडो । जिसपास बहु दाम । बलिहारी उस मुखकी । जिस्ते निकले राम ॥७॥ राम कहे सो मुख भलारे । खाये खीर खांड । हरिबिन मुखमो धूल परी रे । क्या जनी उस रांड ॥८॥ राम कहे सो मुख भला रे । बिन रामसे बीख । अब न जानूं मते बेरों । जब काल लगावे सीख ॥९॥ कहे तुका मैं सवदा बेचूं । लेवेके तन हार । मिठा साधुसंतजन रे । मुरखके सिर मार ॥१०॥ तुका दास तिनका रे । रामभजन निरास । क्या बिचारे पंडित करो रे । हात पसारे आस ॥११॥ तुका प्रीत रामसुं । तैसी मिठा राख । पतंग जाय दीपपरे । करे तनकी खाक ॥१२॥ कहे तुका जग भुला रे । कह्या न मानत कोय । हात परे जब कालके । मारत फोरत डोय ॥१३॥ तुका सुरा नहिं सबदका रे । जब कमाई न होय । चोट साहे घनकी रे । हिरा नीबरे तोय ॥१४॥ तुका सुर बहुत कहावे । लडत बिरला कोय । एक पावे ऊंच पदवी । एक खौंसा जोय ॥१५॥ तुका मान्या पेटका । और न जाने कोय । जपतां कछु रामनाम । हरिभगतनकी सोय ॥१६॥ काफर सोही आपन बुझे । अल्ला दुनियां भर । कहे तुका तुम्ही सुनो रे भाई । हिरदा जिन्हका कठोर ॥१७॥ भीस्त न पाइये मालथी । पढिया लोक रिझाये । निचा जथें कमतारिव । सोही सो फल खाये ॥१८॥ फळ पाया तो सुख भया । किन्होसो न करे वेवाद । बान न देखे मिरगी । चित्त मिलाया नाद ॥१९॥ तुका दास रामका । मनमें एक हि भाव । तो न पलटे आब । ये हित तन जाव ॥२०॥ तुका रामसुं चित्त बांधराखो । तैसा आपने हात । धेनु बछरा छोर जावे । प्रेम न सुटे सात ॥२१॥ चित्तसुं चित्त जब मिले । तब तन थंडा होय । तुका मिलना जिन्हेसुं । ऐसा बिरला कोय ॥२२॥ चित्त मिले तो सब मिले । नहिं तो फुकट संग । पानी पाथर एक ठोर । कोरा न भिजे अंग ॥२३॥ तुका संगत तिनसें कहिये । जिनसे मुख दुनाय । दुर्जन तेरा मुख काला । थीता प्रेम घटाये ॥२४॥ तुका मिलना तो भला । मनसुं मन मिल जाय । उपर उपर मट्टी घसनी । उनकी कोन बन्हाई ॥३५॥ तुका कुटुंब छोरे रे । लरके जोरों सिर मुंदाय । जबथे इच्छा

नहिं मुई । तब तूं किया काय ॥२६॥ तुका इच्छा मिटाई तो । काहा करे जट खाक । मथीया गोला डारदिया तो । नहिं मिले फेरन ताक ॥२७॥ ब्रीद मेरे साइंयाके । तुका चलावे पास । सुरा सु हि लरे हमसें । छोरे तनकी आस ॥२८॥ कहे तुका भला भया । हम हूं संतनका दास । क्या जानूं केते मरते । वोन मिटती मनकी आस ॥२९॥ तुका और मिठाई क्या करूं रे । पाले विकार पिंड । राम कहावे सो भली रुखी । माखनखीर खांड ॥३०॥

[तुकारामाचा स्त्रीस उपदेश]

३५१०. कोण येतें घरा आमुच्या काशाला । काय ज्याचा त्याला नाहीं धंदा ॥१॥ देवासाठीं जालें ब्रह्मांड सोईरें । कोवळ्या उत्तरें काय वेंचे ॥२॥ मानें पाचारितां नव्हे अराणूक । ऐसे येति लोक प्रीतीसाठीं ॥३॥ तुका म्हणे रांडे नावडे भूषण । कातेलें तें श्वान लागे पाठीं ॥४॥

३५११. देव पहावया करीं वो सायास । न धरीं हे आस नाशिवंत ॥१॥ दिन शुद्ध सोम सकाळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ॥२॥ द्विजां पाचारूनी शुद्ध करीं मन । देईं वो हें दान यथाविध ॥३॥ नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥४॥ तुका म्हणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आम्हां ॥५॥

३५१२. सुख हें नावडे आम्हां कोण्या बळें । नेणसी अंधळे झालीशी तूं ॥१॥ भूक ताहान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ॥२॥ द्रव्य जीवाहूनी आवडे या जना । आम्हांसी पाषाणाहूनी हीन ॥३॥ सोइरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥४॥ तुका म्हणे आम्हां जवळीच आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ॥५॥

३५१३. गुरुकृपे मज बोलविलें देवें । होईल हें घ्यावें हित कांहीं ॥१॥ सत्य देवें माझा केला अंगीकार । आणिक विचार नाहीं दुजा ॥२॥ होई बळकट घालुनियां कास । हाचि उपदेश तुज आतां ॥३॥ सडा समार्जन तुळसी वृंदावन । अतीतपूजन ब्राह्मणांचें ॥४॥ वैष्णवांची दासी होई सर्वभावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥५॥ पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला ॥६॥ तुका म्हणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ॥७॥

[कवित्वाचा निषेध व त्याचा परिहार]

३५१४. भूतबाधा आम्हां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ॥१॥ झाला भक्तीचा कळस । आले वसतीस दोष ॥२॥ जागरणाचें फळ दिली जोडोनी तळमळ ॥३॥ तुका म्हणे देवा । आहाच कळों आली सेवा ॥४॥

३५१५. नाहीं जो वेचलों जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों ॥१॥ जाणवलें आतां करी ये उद्देश । जोडी किंवा नाश तुमची जीवें ॥२॥ ठायींचेंचि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ झालें ॥३॥ तुका म्हणे मग वेचीन उत्तरें । उद्देशिलें खरें झाल्यावरी ॥४॥

३५१६. करूं कवित्व आतां काय नाहीं लाज। मज भक्तराज हांसतील ॥१॥ आतां आला एका निवाड्याचा दिस। सत्याविण रस विरसला ॥२॥ अनुभवाविण कोण करी पाप। रितेचि संकल्प लाज लावी ॥३॥ तुका म्हणे आतां न धरवे धीर। नव्हे जीव स्थिर माझा मज ॥४॥

३५१७. नाहीं आइकत तुम्ही माझे बोल। कासया हें फोल उपणूं भूस ॥१॥ येसी ते करीन बैसलिया ठाया। तूंचि बुझावया जवळी देवा ॥२॥ करावे ते केले सकळ उपाय। आतां पाहों काय अझुनी वास ॥३॥ तुका म्हणे आला आज्ञेसी शेवट। होऊनियां नीट पायां पडें ॥४॥

३५१८. नोहे तुम्हां जरी। येवढें कारण मुरारी ॥१॥ मग जैसा तैसा काळ। दाट सारावा पातळ ॥२॥ स्वामीचें तें सांडें। पुत्र होतां काळतोंडें ॥३॥ शब्दा नाहीं रुचि। मग कोठें तुका वेची ॥४॥

३५१९. केल्यापुरती आळी। कांही होते टाळाटाळी ॥१॥ सत्यसंकल्पाचें फळ। होतां न दिसेचि बळ ॥२॥ दळणाच्या ओंव्या। रित्या खड्या मापें घ्याव्या ॥३॥ जाती उखळें चाटूं। तुका म्हणे राज्य घाटूं ॥४॥

३५२०. पावावे संतोष। तुम्ही यासाठीं सायास ॥१॥ करीं आवडी वचनें। पालटूनी क्षणक्षणें ॥२॥ द्यावें अभयदान। भूमी न पडावें वचन ॥३॥ तुका म्हणे परस्परें। कांहीं वाढवी उत्तरें ॥४॥

३५२१. बोलतां वचन असा पाठमोरे। मज भाव बरे कळों आले ॥१॥ मागितलें नये अरुचिनें हातां। नाहीं बरी सत्ता आदराची ॥२॥ समाधानासाठीं लाविलासे कान। चोरलेंसे मन दिसतसा ॥३॥ तुका म्हणे आम्हां तुमचेचि फंद। वरदळ छंद कळों येती ॥४॥

३५२२. कशासाठीं बैसों करूनियां हाट। वाउगा बोभाट डांगोरा हा ॥१॥ काय आलें एका जीवाच्या उद्धारें। पावशी उच्चारें काय होतें ॥२॥ नेदी पट्ट परी अन्नें तो न मारी। आपुलिये थोरीसाठीं राजा ॥३॥ तुका म्हणे आतां अव्हेरिलें तरी। मग कोण करी दुकान हा ॥४॥

३५२३. माझा मज नाहीं। आला उबग तो कांहीं ॥१॥ तुमच्या नामाचें जतन। नव्हतां थोर वाटे सीण ॥२॥ न पडावी निंदा। कानीं स्वामीची गोविंदा ॥३॥ तुका म्हणे लाज। आम्हां स्वामीचें तें काज ॥४॥

३५२४. कांही मागणें हें आम्हां अनुचित। वडिलांची रीत जाणतसों ॥१॥ देह तुच्छ झालें सकळ उपाधी। सेवेपाशीं बुद्धि राहिलीसे ॥२॥ शब्द तो उपाधि अचळ निश्चय। अनुभव हा काय नाहीं अंगीं ॥ ३॥ तुका म्हणे देह फांकिला विभागीं। उपकार अंगीं उरविला ॥ ४॥

३५२५. मागितल्यास पसरी कर। पळतां भरी वाखती ॥१॥ काय आम्ही नेणों वर्म। केला श्रम नेणतां ॥२॥ बोलतां बरें येतां रागा। कठीण लागा मागेंमागें ॥३॥ तुका म्हणे येथें बोली।

असे चाली उफराटी ॥४॥

३५२६. असो तुझें तुजपाशीं । आम्हां त्यासी काय चाड ॥१॥ विरोधें कां कोंडूं मन । समाधान असोनी ॥२॥ करावा तो उरे आट । खटपट वाढतसे ॥३॥ तुका म्हणे येउनि रागा । कां मी विभागा मुकेन ॥४॥

३५२७. आहे तेंचि पुढें पाहों । बरें आहों येथेंचि ॥१॥ काय वाढवूनी काम । उगाच श्रम तृष्णेचा ॥२॥ स्थिरावतां ओघीं बरें । चाली पुरें पडेना ॥३॥ तुका म्हणे वळितां मन । आम्हां क्षण न लगे ॥४॥

३५२८. सांगा दास नोहे तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनी ॥१॥ कोणासाठीं केली प्रपंचाची होळी । या पाया वेगळी मायबापा ॥२॥ नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ॥३॥ तुका म्हणे आम्हां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं तुजविण ॥४॥

३५२९. अनन्यासी ठाव एक सर्वकाज । एकाविण दुजें नेणें चित्त ॥१॥ न पुरतां आळी देशधडी व्हावें । हें काय बरवें दिसतसे ॥२॥ लेंकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ॥३॥ तुका म्हणे किती घातली लांबणी । समर्थ होऊनी केवढ्यासाठीं ॥४॥

३५३०. स्तुती तरी काय करूं कोणापाशीं । कीर्ति तरी कैसी वाखाणावी ॥१॥ खोट्या तंव नाहीं अनुवादाचें काम । उरला तो भ्रम वरी बरा ॥२॥ म्हणवावें त्याची खूण नाहीं हातीं । अवकळा फजिती सावकाश ॥३॥ तुका म्हणे हें गे तुमचें माझें तोंड । होऊनिया लंड आळवितों ॥४॥

३५३१. कांहींच न लगे आदि अवसान । बहुत कठिण दिसतसा ॥१॥ अवघ्याच माझ्या वेचविल्या शक्ति । न चलेसी युक्ति झाली पुढें ॥२॥ बोलिलें वचन हारपलें नभीं । उरलों तों उभीं आहों तैसीं ॥३॥ तुका म्हणे कांहीं न करावेंसें झालें । थकितचि ठेलें चित्त उगें ॥४॥

३५३२. रूपीं गोवियेलें चित्त । पायीं राहिलें निश्चित ॥१॥ तुम्हीं देवा अवघेचि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे ॥२॥ झाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडित होती ॥३॥ तुका म्हणे भेटी । सुटली भवबंदाची गांठी ॥४॥

[कोरड्या कविता उदकांतून काढणें.]

३५३३. थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला । जनाचिया बोला । साठीं चित्त क्षोभविलें ॥१॥ भागविलासी केला सीण । अधम मी यातीहीन । झांकुनी लोचन । दिवस तेरा राहिलों ॥२॥ अवघें घालूनियां कोडें । तहानभुकेचें सांकडें । योगक्षेम पुढें । तुज करणें लागलें ॥३॥ उदकीं राखिले कागद । चुकविला जनवाद । तुका म्हणे ब्रीद । साच केलें आपुलें ॥४॥

३५३४. तूं कृपाळु माउली । आम्हां दीनाची साउली । न स्वरित आली । बाळवेषें जवळी

॥१॥ माझें केलें समाधान। रूप गोजिरें सगुण। निवविलें मन। आळिंगन देऊनी ॥२॥ कृपा केली जना हातीं। पायीं ठाव दिला संतीं। कळों नये चित्तीं। दुःख कैसे आहे तें ॥३॥ तुका म्हणे मी अन्यायी। क्षमा करी वो माझे आई। आतां पुढें काई। तुज घालूं सांकडें ॥४॥

३५३५. कापो कोणी माझी मान। सुखें पीडोत दुर्जन। तुज होय सीण। तें मी न करीं सर्वथा ॥१॥ चुकी जाली एकवेळा। मजपासूनी चांडाळा। उभें करोनियां जळा। माजी वह्या राखविल्या ॥२॥ नाहीं केला हा विचार। माझा कोण अधिकार। समर्थासी भार। न कळे कैसा घालावा ॥३॥ गेलें होऊनियां मागें। नये बोलों तें वाउगें। पुढिलिया प्रसंगें। तुका म्हणे जाणावें ॥४॥

३५३६. काय जाणें मी पामर। पांडुरंगा तुझा पार। धरिलीया धीर। काय एक न करिसी ॥१॥ उतावीळ झालों आधीं। मतिमंद हीन बुद्धि। परि तूं कृपानिधि। नाहीं केला अव्हेर ॥२॥ तूं देवाचाही देव। अवघ्या ब्रह्मांडाचा जीव। आम्हां दासा कींव। कां भाकणें लागली ॥३॥ तुका म्हणे विश्वंभरा। मी तो पतितचि खरा। अन्याय दुसरा। दारीं धरणें बैसलों ॥४॥

३५३७. नव्हती आली सीसा सुरी। अथवा घाय पाठीवरी। तों म्यां केला हरी। एवढा तुम्हां आकांत ॥१॥ वांटिलासी दोहीं ठायीं। मजपाशीं आणि डोहीं। लागों दिला नाहीं। येथें तेथें आघात ॥२॥ जीव घेती मायबापें। थोड्या अन्यायाच्या कोपें। हें तों नव्हे सोपें। साहों त्वांचि जाणितलें ॥३॥ तुका म्हणे कृपावंता। तुजऐसा नाहीं दाता। काय वाणूं आतां। वाणी माझी खुंटली ॥४॥

३५३८. तूं माउलीहून मायाळ। चंद्राहूनी शीतळ। पाणियाहूनि पातळ। कल्लोळ प्रेमाचा ॥१॥ देऊं काशाची उपमा। दुजी तुज पुरुषोत्तमा। ओंवाळूनी नामा। तुझ्यावरुनी टाकीलों ॥२॥ तुवां केलें रे अमृता। गोड त्याही तूं परता। पांचां तत्त्वांचा जनिता। सकळ सत्तानायक ॥३॥ कांहीं न बोलोनी आतां। उगाच चरणीं ठेवितों माथा। तुका म्हणे पंढरिनाथा। क्षमा करी अपराध ॥४॥

३५३९. मी अवगुणी अन्यायी। किती म्हणोन सांगो काई। आतां मज पायीं। ठाव देईं विठ्ठले ॥१॥ पुरे पुरे हा संसार। कर्म बळिवंत दुस्तर। राहों नेदी स्थिर। एके ठायीं निश्चळ ॥२॥ अनेक बुद्धीचे तरंग। क्षणक्षणा पालटती रंग। धरूं जाता संग। तंव तो होतो बाधक ॥३॥ तुका म्हणे आतां। अवघी तोडीं माझी चिंता। येऊनी पंढरीनाथा। वास करीं हृदयीं ॥४॥

[पंढरीस जाणाऱ्या वारकऱ्यांकडे देवांस पत्र.]

३५४०. कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात। चाल तुज पंढरिनाथ बोलावितो ॥१॥ मग मी न धरीं आस मागील बोभाट। वेगीं धरीन वाट माहेराची ॥२॥ निलाजिरें चित्त करी तळमळ। केधवां देखती मूळ आलें डोळे ॥३॥ तुका म्हणे कईं भाग्याची उजरी। होईल पंढरी देखावया ॥४॥

३५४१. कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥१॥ कैसा कंठूनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥२॥ नाहीं निरोपाची पावली वारता । न करावी ते चिंता ऐसी कांहीं ॥३॥ तुका म्हणे एक वेंचूनि वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥४॥

३५४२. कांहीं माझे कळों आले गुणदोष । म्हणऊनी उदास धरिलें ऐसें ॥१॥ नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ॥३॥ कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचें हें घ्यावें विचारूनी ॥३॥ तुका म्हणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥४॥

३५४३. नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरी कोप येऊं सुखें ॥१॥ कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनी ॥२॥ नाही तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ॥३॥ तुका म्हणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥४॥

३५४४. आतां पंथ पाहें माहेराची वाट । कामाचा बोभाट पडों सुखें ॥१॥ काय करूं आतां न गमेसें झालें । बहुत सोसिलें बहु दिस ॥२॥ घर लागे पाठी चित्ता उभें वारें । आपुलें तें झुरे पहावया ॥३॥ तुका म्हणे जीव गेला तरी जावो । धरिला तो देव भाव शुद्ध ॥४॥

३५४५. विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥१॥ धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणें थोडी मति माझी ॥२॥ जेथें वेदा तुझा न कळेचि पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥३॥ जैसे तैसे माझे बोल अंगीकारी । बोबड्या उत्तरीं गौरवितों ॥४॥ तुका म्हणे विटेवरी जीं पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥५॥

३५४६. देवाचिया देवा गोपिकांच्या पति । उदार हे ख्याति त्रिभुवनीं ॥१॥ पातकांच्या रासी नासितोसी नामें । जळतील कर्में महादोष ॥२॥ सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । रिद्धि सिद्धि ठायीं मुक्ति चारी ॥३॥ इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीतीं गातां छंद वाहतां टाळी ॥४॥ तुका म्हणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ॥५॥

३५४७. काय झालें नेणों माझिया कपाळा । न देखिजे डोळां मूळ येतां ॥१॥ बहु दिस पाहें वचनाची वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥२॥ नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठुर न पाहिजे ॥३॥ पडिला विसर किंवा कांहीं धंदा । याहूनी गोविंदा जरूरसा ॥४॥ तुका म्हणे आलें वेचाचें सांकडे । देणें घेणें पुढें तोही धाक ॥५॥

३५४८. एवढा संकोच तरी कां व्यालासी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं ॥१॥ कोण मज पुसे सिणलें भागलें । जरी मोकलिलें तुम्ही देवा ॥२॥ कवणाची वास पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥३॥ कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥४॥ तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिंती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ॥५॥

३५४९. देई डोळे भेटी न धरीं संकोच । न घलीं कांहीं वेच तुजवरी ॥१॥ तुज बुडवावें ऐसा

कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ॥२॥ फार थोडें कांहीं करुनी पातळ । त्याजमध्यें काळ कडे लावूं ॥३॥ आहे माझी तेचि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ॥४॥ तुका म्हणे आम्हां लेंकरांची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥५॥

३५५०. सीण भार हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ॥१॥ इंद्रियांची धांव होईल कुंठित । पावेल हें चित्त समाधान ॥२॥ माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥३॥ आस नाहीं परि उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥४॥ तुका म्हणे माझी अवीट आवडी । खंडणा तांतडी होऊं नेदी ॥५॥

३५५१. धरितों वासना परि न ये फळ । प्राप्तीचा तों काळ नाहीं आला ॥१॥ तळमळीं चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥२॥ प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥३॥ जातो तळा येतो मागुता लवकरी । वोळशाचे फेरी सांपडलों ॥४॥ तुका म्हणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढें ॥५॥

३५५२. कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ॥१॥ पाय पंथ कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥२॥ कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ॥३॥ कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥४॥ तुका म्हणे कईं जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥५॥

३५५३. काय पोरें झालीं फार । किंवा न साहे करकर ॥१॥ म्हणऊनी केली सांडी । घांस घेऊं न लाहे तोंडीं ॥२॥ करूं कलागती । तुज भांडणें भोवतीं ॥३॥ तुका म्हणे टांचें । घरीं झालेंसे वरोचें ॥४॥

३५५४. कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण ॥१॥ तरी हा पडिला विसर । माझा तुम्हां झाला भार ॥२॥ आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां गांठी ॥३॥ तुका म्हणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥४॥

३५५५. निरोपासी वेंचे । काय बोलतां फुकाचें ॥१॥ परि हें न घेवेचि यश । भिऊं नको सुखी आस ॥२॥ सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥३॥ न लगे निरोपासी मोल । तुका म्हणे वेचे बोल ॥४॥

३५५६. जोडीच्या हव्यासें । लागे धनाचेंचि पिसें ॥१॥ मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥२॥ पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥३॥ तुका म्हणे देवा । तुला बहुताचा हेवा ॥४॥

३५५७. मव्हिलें मविती । नेणों रासी पडिल्या किती ॥१॥ परि तूं धालाचि न धासी । आलें उभाउभीं घेसी ॥२॥ अवघ्या अवघा काळ । वाटा वाहाती सकळ ॥३॥ तुका म्हणे नाहीं ।

अराणूक तुज कांहीं ॥४॥

३५५८. न बैससी खालीं । सम उभाच पाउलीं ॥१॥ ऐसे झाले बहुत दिस । झालीं युगें अट्ठावीस ॥२॥ नाहीं भाग सीण । अराणूक एक क्षण ॥३॥ तुका म्हणे किती । मापें केलीं देती घेती ॥४॥

३५५९. जोडी कोणासाठीं । एवढी करितोसी आटी ॥१॥ जरी हें आम्हां नाहीं सुख । रडों पोरें पोटीं भूक ॥२॥ करूनी जतन । कोणा देसील हें धन ॥३॥ आमचे तळमळे । तुझें होईल वाटोळें ॥४॥ घेसील हा शाप । माझा होऊनियां बाप ॥५॥ तुका म्हणे उरी । आतां न ठेवी यावरी ॥६॥

३५६०. करूनी चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥१॥ जरी तूं होऊनी उदास । माझी बुडविसी आस ॥२॥ येथें न करीं काम । मुखें नेघें तुझें नाम ॥३॥ तुका म्हणे कुळ । तुझें बुडवीन समूळ ॥४॥

३५६१. समर्थाचे पोटीं । आम्ही जन्मलों करंटीं ॥१॥ ऐसी झाली जगीं कीर्ति । तुझ्या नामाची फजिती ॥२॥ येथें नाहीं खाया । न ये कोणी मूळ न्याया ॥३॥ तुका म्हणे जिणें । आतां खोटें जीवपणें ॥४॥

३५६२. पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ॥१॥ मज सांगोनियां धाडी । वाट पहातों बराडी ॥२॥ कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥३॥ तुका म्हणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥४॥

३५६३. कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥१॥ जें या मनासीं आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ॥२॥ कैंची शुद्ध मति । भांडवल असे हातीं ॥३॥ तुका म्हणे अंगा । कोण दशा आली सांगा ॥४॥

३५६४. समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥१॥ आतां भावें करूनी साचा । पायां पडिलों विठोबाच्या ॥२॥ न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥३॥ तुका म्हणे विनंती । विनविली धरा चित्तीं ॥४॥

३५६५. येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥१॥ घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥२॥ पत्र हातीं दिलें । तयां तेथें पाठविलें ॥३॥ तुका म्हणे येती । जाईन सामोरा पुढती ॥४॥

३५६६. रुळे महाद्वारीं । पायांखालील पायरी ॥१॥ तैसें माझें दंडवत । निरोप सांगतील संत ॥२॥ पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥३॥ तुका म्हणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥४॥

३५६७. तुम्ही संतजनीं । माझी करा विनवणी ॥१॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥२॥ भाका बहुतां रीती । माझी कींव काकुलती ॥३॥ न देखें पंढरी ।

तुका चरण विटेवरी ॥४॥

३५६८. होईल कृपा दान । तरी मी येईन धावोन ॥१॥ होतिल संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥२॥ रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥३॥ तुका म्हणे ताप । हरती देखोनियां बाप ॥४॥

३५६९. परिसोनी उत्तर । जाब देईं सत्वर ॥१॥ जरी तूं होसी कृपावंत । तरी हा बोलावीं पतित ॥२॥ नाणीं कांहीं मना । करूनी पापाचा उगाणा ॥३॥ तुका म्हणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥४॥

३५७०. ऐकोनियां कीर्ति । ऐसी वाटती विश्रांति ॥१॥ मा तें सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥२॥ बोलतां ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ॥३॥ तुका म्हणे धांवे । वासना ते रस घ्यावे ॥४॥

३५७१. किती करूं शोक । पुढें वाढें दुःखे दुःख ॥१॥ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥२॥ पुण्य होतें गांठी । तरी कां लागती हे आटी ॥३॥ तुका म्हणे बळ । माझी राहिली तळमळ ॥४॥

३५७२. करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥१॥ जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥२॥ घरीं लागे कळ । नाहीं जात तो शीतळ ॥३॥ तुका म्हणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥४॥

३५७३. आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ॥१॥ म्हणसी कोणे तरी काळें । आहेतसीं माझीं बाळें ॥२॥ दुरी दूरांतर । तरी घेसी समाचार ॥३॥ नेसी कधीं तरी । तुका म्हणे लाजे हरी ॥४॥

३५७४. आतां हे शेवटी । माझी आईकावी गोष्टी ॥१॥ आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥२॥ आतां करकर । पुढें न करीं उत्तर ॥३॥ तुका म्हणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥४॥

३५७५. बोलिलों तें आतां । कांहीं जाणतां नेणतां ॥१॥ क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥२॥ स्तुति निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥३॥ तुका म्हणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ॥४॥

[वारकरी परत येईतोंपर्यंतची मनाची स्थिति.]

३५७६. माहेरींचा काय येईल निरोप । म्हणऊनी झोंप नाहीं डोळां ॥१॥ वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निढळा हे ठेवीं वरी बाहे ॥२॥ बोटावरी माप लेखितों दिवस । होतो कासावीस धीर नाहीं ॥३॥ काय नेणों संतां पडिला विसर । कीं नव्हे सादर मायबाप

॥४॥ तुका म्हणे तेथें होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ॥५॥

३५७७. परि तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अंतर पडों नेदी ॥१॥ बहु कान दृष्टी आइके देखणा । पुरोनियां जना उरलासे ॥२॥ सांगितल्याविणें जाणे अंतरींचें । पुरवावें ज्याचें तैसें कोड ॥३॥ बहुमुखें कीर्ति आइकिली कानीं । विश्वासही मनीं आहे माझ्या ॥४॥ तुका म्हणे नाहीं जात वांयांविण । पाळितो वचन बोलिलों तें ॥५॥

३५७८. यावरी न कळे संचित आपुलें । कैसें वोढवलें होइल पुढें ॥१॥ करील विक्षेप धाडितां मुळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ॥२॥ जोंवरी हे डोळां देखें वारकरी । तों हें भरोवरी करी चित्त ॥३॥ आस वाढविते बुद्धीचे तरंग । चित्ताचे ते वेग वावडती ॥४॥ तुका म्हणे तेव्हा होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ॥५॥

३५७९. होईल निरोप घेतला यावरी । राऊळाभीतरी जाऊनियां ॥१॥ करूनियां दधिमंगळभोजन । प्रयाण शकुनसुमुहूर्तें ॥२॥ होतील दाटले सद्गदीत कंठीं । भरतें त्या पोटीं वियोगाचें ॥३॥ येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केलीं समाधानें होतीं संतीं ॥४॥ तुका म्हणे चाली न साहे मनास । पाहाती ते कळस परतोनी ॥५॥

३५८०. ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येत वारकरी होते वाटे ॥१॥ देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ॥२॥ केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ता होईल प्रेम ॥३॥ गरुडटके टाळ मृदंग पताका । सांगताती एकांएक सुख ॥४॥ तुका म्हणे आतां येती लवलाहीं । आलिंगूनी बाहीं देईन क्षेम ॥५॥

३५८१. क्षेम मायबाप पुसेन हें आधीं । न घलीं हें मधीं सुख दुःख ॥१॥ न करीं तांतडी आपणापासूनी । आइकेन कानीं सांगती ते ॥२॥ अंतरींचें संत जाणतील गुज । निरोप तो मज सांगतील ॥३॥ पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरें आलिंगून ॥४॥ तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओवाळून सांडीं त्यावरून ॥५॥

३५८२. होईल माझी संती भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ॥१॥ शृंगारूनी माझी बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ॥२॥ क्षेम आहे ऐसें होईल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ॥३॥ अवस्था जे माझी ठावी आहे संतां । होईल कृपावंता निरोपिली ॥४॥ तुका म्हणे सवें येईल मुन्हाळी । किंवा कांही उरी राखतील ॥५॥

३५८३. दोहींमध्यें एक घडेल विश्वासें । भातुके सरिसें मूळ तरी ॥१॥ करिती निरास निःशेष न घडे । कांहीं तरी ओढे चित्त माये ॥२॥ लौकिकाची तरी धरितील लाज । काय माझ्या काज आचरणें ॥३॥ अथवा कोणाचें घेणें लागे रीण । नाहीं तरी हीन कर्मीं कांहीं ॥४॥ व्यालीचिये अंगीं असती वेदना । तुका म्हणे मना मन साक्ष ॥५॥

३५८४. बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवरे हें मन तेचि सोई ॥१॥ घडीघडी मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी ॥२॥ न बोलावें ऐसा करितों विचार । पडतो विसर प्रसंगीं तो ॥३॥ इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली येचि ठायीं ॥४॥ एकसरें सोस माहेरासी जावें । तुका म्हणे जीवें घेतलासे ॥५॥

३५८५. नाहीं हाति परि न राहावे निसुर । न पडे विसर काय करूं ॥१॥ पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ॥२॥ आणीक या मना नावडे सोहळा । करिते टकळा माहेरींचा ॥३॥ बहु कामें केलें बहु कासावीस । बहु झालें दिस भेटी नाहीं ॥४॥ तुका म्हणे त्याचें न कळे अंतर । अवस्था ते फार होते मज ॥५॥

३५८६. तोंवरी म्यां त्यास कैसें निषेधावें । जों नाहीं बरवें कळों आलें ॥१॥ कोणाचिया मुखें तंट नाहीं नागें । वचन वाउगें बोलों नये ॥२॥ दिसे हानि परी निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव ॥३॥ आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरी कां धीर केला नाहीं ॥४॥ तुका म्हणे गोड करील सेवट । पाहिली तें वाट ठावी आहे ॥५॥

३५८७. माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करीन त्यासी ॥१॥ पायांवरी माथा आळिंगीन बाहीं । घेईन लवलाहीं पायवणी ॥२॥ सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ॥३॥ आपुले जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन आघवें आहे तैसें ॥४॥ तुका म्हणे वीट नेघें आवडीचा । बोलिलीच वाचा बोलवीन ॥५॥

३५८८. वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ॥१॥ विसर न पडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥२॥ कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणें फिकें ॥३॥ निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक नये मज ॥४॥ तुका म्हणे हित चित्तें ओढियलें । जेथें तें उगलें जावें येणें ॥५॥

३५८९. आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागलीसे ॥१॥ सांगितील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ॥२॥ काय लाभ झाला काय होतें केणें । काय काय कोणें सांठविलें ॥३॥ मागणें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसीं ॥४॥ तुका म्हणे काय सांगती ते कानीं । ऐकोनियां मनीं धरुनी राहें ॥५॥

३५९०. काय करावें म्यां केले ते विचार घडले साचार काय पाहों ॥१॥ काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धें जोडी तेचि खरी ॥२॥ काय म्यां तेथींचें रांधिलें चाखोनी । तें हें करी मनीं विवंचना ॥३॥ आणीकही त्यासी बहुत कारणें । बहु असे जिणें ओढीचेंही ॥४॥ तुका म्हणे आम्हां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ॥५॥

३५९१. आम्हां अराणूक संवसारा हातीं । पडिली नव्हती आजीवरी ॥१॥ पुत्रदाराधन होता

मनीं धंदा । गोवियेलों सदा होतों कामें ॥२॥ वोढवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनी ॥३॥ मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । येथूनियां चिंता उपजली ॥४॥ तुका म्हणे वाट पाह्याचें कारण । येथींचिया हीन झालें भाग्य ॥५॥

३५९२. बहु दिस नाहीं माहेरींची भेटी । जाली होती तुटी व्यवसायें ॥१॥ आपुलाल्या होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं त्या प्रसंगें आठवलें ॥२॥ तोडिलें तुटतें जडीतें जडलें । आहे तें आपुलें आपणापें ॥३॥ बहु निरोपाचें पावलें उत्तर । जवळीच फार एक तेंही ॥४॥ काय जाणों मोह होईल सांडिला । बहु दिस तुटला तुका म्हणे ॥५॥

३५९३. होतीं नेणों झालीं कठिणें कठीण । जवळीच मनें मन ग्वाही ॥१॥ आम्ही होतों सोई सांडिला मारग । घडलें तें मग तिकूनही ॥२॥ निश्चिंतीनें होते पुढिलांची सांडी । न चले ते कोंडी मायबापा ॥३॥ आम्हां नाहीं त्याचा घडला आठव । त्याचा बहु जीव विखुरला ॥४॥ तुका म्हणे झालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आम्हांकूनी ॥५॥

३५९४. आतां करावा कां सोस वांयांविण । लटिकाचि सीण मनासी हा ॥१॥ असेल तें कळों येईल लवकरी । आतां वारकरी आल्यापाठीं ॥२॥ बहु विलंभाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ॥३॥ चालिलें तें ठाव पावेल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ॥४॥ तुका म्हणे आसे लागलासे जीव । म्हणऊनी कींव भाकीतसें ॥५॥

[वारकरी परत आल्यानंतरचे अभंग.]

३५९५. भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ॥१॥ तुम्ही क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ॥२॥ मारगीं चालतां । श्रमलेती येतां जातां ॥३॥ तुका म्हणे कांहीं । कृपा आहे माझ्या ठायीं ॥४॥

३५९६. घालूनियां ज्योती । वाट पाहें दिवसराती ॥१॥ बहु उताविळ मन । तुमचें व्हावें दरुषण ॥२॥ आलों बोळवीत । तैसे याचि पंथें चित्त ॥३॥ तुका म्हणे पेणी । येतां जातां दिवस गणीं ॥४॥

३५९७. आजी दिवस धन्य । तुमचें झालें दर्शन ॥१॥ सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारें वृत्तांत ॥२॥ आइकतों मनें । करुनी सादर श्रवण ॥३॥ तुका म्हणे नाम । माझा सकळ संभ्रम ॥४॥

३५९८. बोलिलेती काय । माझा बाप आणि माय ॥१॥ ऐसें सांगा जी झडकरी । तुम्ही सखे वारकरी ॥२॥ पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ॥३॥ तुका म्हणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ॥३॥

३५९९. काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ॥१॥ आसे लागेलासे जीव । काय

केली माझी कींव ॥२॥ फेडिलें मुडतर । किंवा कांहीं जरजर ॥३॥ तुका म्हणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा ॥४॥

३६००. आजीचिया लाभे ब्रह्मांड ठेंगणें । सुखी झालें मन कल्पवेना ॥१॥ आर्तभूत माझा जीव जयांसाठीं । त्याच्या झाल्या भेटी पायांसवें ॥२॥ वाटुली पाहातां शिणले नयन । बहु होते मन आर्तभूत ॥३॥ माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होईल समाचार सांगती तो ॥४॥ तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळले संकल्प संत आले ॥५॥

३६०१. आजी बरवें झालें । माझें माहेर भेटलें ॥१॥ डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ॥२॥ धन्य झालों आतां । क्षेम देउनियां संतां ॥३॥ इच्छेचें पावलों । तुका म्हणे धन्य झालों ॥४॥

३६०२. वोरसोनि येती । वत्स धेनुवेचे चित्तीं ॥१॥ माझा करावा सांभाळ । वोरसोनियां कृपाळ ॥२॥ स्नेह भूक ताहान । विसरती झाले क्षीण ॥३॥ तुका म्हणे कवतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें ॥४॥

३६०३. आलें तें आधीं खाईन भातुकें । मग कवतुकें गाईन ओव्या ॥१॥ सांगितला आधीं आइकों निरोप । होईल माझा बाप पुसे तो तें ॥२॥ तुका म्हणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरींहून आजि ॥३॥

३६०४. अमुप जोडल्या सुखाचिया रासी । पार त्या भाग्यासी नाहीं आतां ॥१॥ काय सांगों सुख झालें आळिंगनें । निवाली दर्शनें कांति माझी ॥२॥ तुका म्हणे याच्या उपकारासाठीं । नाहीं माझे गांठीं कांहीं एक ॥३॥

३६०५. पवित्र व्हावया घालीन लोळणी । ठेवीन चरणीं मस्तक हें ॥१॥ जोडोनि हस्तक करीन विनवणी । घेईन पायवणी धावोनियां ॥२॥ तुका म्हणे माझें भांडवल सुचें । संतां हें ठायींचें ठावें आहे ॥३॥

[निर्याणाचे अभंग]

३६०६. शोधितांचि नये । म्हणोनी वोळगतों पाय ॥१॥ आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ॥२॥ परतोनी मन । गेलें ठायींच मुरोन ॥३॥ विसरला तुका । बोलों चालों झाला मुका ॥४॥

३६०७. रज्जुसर्पाकार । भासयलें जगडंबर ॥१॥ म्हणोनी आवडती पाय । घेतों आलाय बलाय ॥२॥ दृश्य द्रुमाकार लाणी । केलों सर्वस्वासी धनी ॥३॥ तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनी उरला लोकां ॥४॥

३६०८. म्हणवितों दास । परि मी असें उदास ॥१॥ हाचि निश्चय माझा । परी मी

निश्चयाहुनी दुजा ॥२॥ सरतें कर्तृत्व माझ्यानें । परि मी त्याहून असें भिन्न ॥३॥ तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनी निराळा ॥४॥

३६०९. घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ॥१॥ ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देव ऐसा ॥२॥ तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडू स्वर्गवास करिन भोग ॥॥ सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥४॥ भक्तिभाग्यसीमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥५॥ धन्य म्हणवीन येह लोकीं लोकां । भाग्य आम्हीं तुका देखियेला ॥६॥

३६१०. संसाराचे अंगीं अवघींच व्यसनें । आम्ही या कीर्तनें शुद्ध झालों ॥१॥ आतां हें सोंवळें झालें त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेलें ॥२॥ ब्रह्मपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ॥३॥ तुका म्हणे आम्हां एकांताचा वास । ब्रह्मीं ब्रह्मरस सेवूं सदा ॥४॥

३६११. गरुडाचे पायीं । ठेवीं वेळोवेळां डोई ॥१॥ वेगीं आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरीं ॥२॥ पाय लक्ष्मीच्या हातीं । म्हणोन येतों काकुलती ॥३॥ तुका म्हणे शेषा । जागें करा हृषीकेशा ॥४॥

३६१२. तुम्ही सनकादिक संत । म्हणवितां कृपावंत ॥१॥ एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ॥२॥ भाकावी करुणा । विनवा वैकुंठींचा राणा ॥३॥ तुका म्हणे मज आठवा । मूळ लवकरी पाठवा ॥४॥

३६१३. आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ॥१॥ सुख दुःख माझें आइकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥२॥ करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसे एकें न्यावयासी ॥३॥ त्याचि पंथें माझें लागलेंसे चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ॥४॥ तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥५॥

३६१४. चिन्हें उमटती अंगीं । शकुनाजोगीं उत्तम ॥१॥ आठवला बापमाय । येईल काय मूळ नेणों ॥२॥ उत्कंठित झालें मन । हीच खूण तेथींचि ॥३॥ तुका म्हणे कामा वारीं । आळस घरीं करमेना ॥४॥

३६१५. आरोनियां पाहें वाट । कटकट सोसेना ॥१॥ आलियास पुसें मात । तेथें चित्त लागलें ॥२॥ दळीं कांडीं लोकांऐसें । परि मी नसे ते ठायीं ॥३॥ तुका म्हणे येथें पिसे । येथें तैसें असेल ॥४॥

३६१६. येथीलिया अनुभवें । कळों जीवें येतसे ॥१॥ दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ॥२॥ भुके भूकची खाऊनि धाय । नाहीं हाय अन्नाची ॥३॥ तुका म्हणे सुख झालें । अंतर धालें त्यागुणें ॥४॥

३६१७. पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥१॥ गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरें ॥२॥ मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥३॥ मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥४॥ चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रूळती ॥५॥ पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥६॥ तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥७॥

३६१८. शंखचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥१॥ ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥२॥ दुरूनि येतां दिसे दृष्टीं । धाकें दोष पळती सृष्टी ॥३॥ तुका देखोनि एकला । वैकुंठींहुनि हरि आला ॥४॥

३६१९. पैल दिसतील भार । दिंड्या पताका अपार ॥१॥ आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा । सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ॥२॥ उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ॥३॥ तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥४॥

३६२०. चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥१॥ तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं । फेडावया धणी । प्रेमसुखाची आजी ॥२॥ पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥३॥ तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥४॥

३६२१. पाहुणे घरासी । आजी आले हृषीकेशी ॥१॥ काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ॥२॥ दरदरीत पाण्या- । माजी रांधियेल्या कण्या ॥३॥ घरीं मोडकिया बाजा । वरी वाकळांच्या शेजा ॥४॥ मुखशुद्धि तुळसीदळ । तुका म्हणे मी दुर्बळ ॥५॥

३६२२. संतीं केला अंगीकार । त्यांसी अभिमान थोर ॥१॥ कांहीं ठेविलें चरणीं । घेती तेंचि पुरवूनी । तुका पायवणी । घेउनियां निराळा ॥२॥ नसतां कांहीं संचित । भेटी झाली अवचित ॥३॥ देव मिळोनियां भक्त । तुका केलासे सनाथ ॥४॥

३६२३. अवघियांच्या आलों मूळ । एक वेळ न्यावया ॥१॥ सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥२॥ जोंवरी ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥३॥ मंगळाचे वेळे उभे । असा शोभे सावध ॥४॥ अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥५॥ तुका म्हणे पाहें वाट । बहु आट करूनी ॥६॥

३६२४. सकळही माझी वोळवण करा । परतोनी घरा जावें तुम्हीं ॥१॥ कर्मधर्में तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥२॥ वाढवूनि दिलें एकाचिये हातीं । सकळ निश्चिंती झाली तेथें ॥३॥ आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । मी माझीया भावें अनुसरलों ॥४॥ वाढवितां लोभ होईल उसीर । अवघींच, स्थिर करा ठायीं ॥५॥ धर्म अर्थ काम झाला एके ठायीं । मेळविला जिहीं हाताहात ॥६॥ तुका म्हणे तुम्हां आम्हां हेचि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥७॥

३६२५. बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण माझे गाठीं ॥१॥ जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी । काळक्षेप आम्ही करूं कोठें ॥२॥ न घडे यावरी न धरवे धीर । पीडतां हें राष्ट्र देखोनी जग ॥३॥ हातीं धरोनियां देवें नेला तुका । जेथें नाहीं लोकां पराश्रम ॥४॥

३६२६. करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ॥१॥ अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ॥२॥ दुजियाची सत्ता नचलेसी झाली आतां ॥३॥ आतां नाहीं तुका । पुन्हा हरपला या लोका ॥४॥

३६२७. आम्हीं जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंती माझी ॥१॥ वाड वेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥२॥ अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥३॥

३६२८. न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ॥१॥ कृपेचिये सिंहासनीं । अधिष्ठानीं बैसविलें ॥२॥ वाजतां तो नलगे वारा । क्षीरसागरा शयनीं ॥३॥ तुका म्हणे अवघे ठायीं । मज पायीं राखिलें ॥४॥

[पाईक अभंग]

३६२९. पाईकपणें जोतिला सिद्धांत । शूर धरी मात वचन चित्तीं ॥१॥ पाइकीवांचून नव्हे कधीं सुख । प्रजामध्यें दुःख न सरे पीडा ॥२॥ तरि व्हावें पाईक जिवाचे उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ॥३॥ पाइकीचें सूख जया नाहीं ठावें । धिग त्यांनीं ज्यावें वांयांविण ॥४॥ तुका म्हणे एका क्षणाचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥५॥

३६३०. पाईकीचें सुख पाइकासी ठावें । म्हणोनियां जीवें केली साटी ॥१॥ येतां गोळ्या बाण साहिले भडिमार । वर्षतां अपार वृष्टि वरी ॥२॥ स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडण शोभा दावी ॥३॥ पाईकांनीं सुख भोगिलें अपार । शूर आणि धीर अंतर्बाहीं ॥४॥ तुका म्हणे याही सिद्धांताच्या खुणा । जाणे तो शहाणा करी तो भोगी ॥५॥

३६३१. पाईक तो जाणे पाइकीचा भाव । लागबग ठाव चोरवाटा ॥१॥ आपणां राखोनी ठकावें आणीक । घ्यावें सकळीक हिरूनियां ॥२॥ येऊं नेदी लाग लागों नेदी माग । पाईका त्या जग स्वामी मानी ॥३॥ ऐसें जन केलें पाइकें पाईक । जया कोणी भीक न घालिती ॥४॥ तुका म्हणे ऐसें जयाचें पाईक । बळिया तो नाईक त्रैलोकींचा ॥५॥

३६३२. पाईकांनीं पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांठा मोडोनियां ॥१॥ पारखिये ठायीं घेऊनियां खाण । आपलें तें जन राखियेलें ॥२॥ आधारेंविण जें बोलतां चावळे । आपलें तें कळे नव्हे ऐसें ॥३॥ सांडितां मारग मारिती पाईक । आणिकांसी शीक लागावया

॥४॥ तुका म्हणे विश्वा घेऊनी विश्वास । पाईक तयास सुख देती ॥५॥

३६३३. पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ॥१॥ तो एक पाईक पाईका नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ॥२॥ तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाईका त्या भिन्न नाहीं स्वामी ॥३॥ विश्वासावांचूनी पाईकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोललिया ॥४॥ तुका म्हणे नये स्वामी उणेपण । पाईक जतन करी त्यासी ॥५॥

३६३४. धनी ज्या पाईका मानितो आपण । तया भितें जन सकळिक ॥१॥ जिवाचे उदार शोभती पाइक । मिरविती नाईक मुगुटमणी ॥२॥ आपुलिया सत्ता स्वामीचे वैभव । भोगिती गौरव सकळसुख ॥३॥ कमाईचीं हीणें पडिलीं उदंड । नाहीं तया खंड येती जाती ॥४॥ तुका म्हणे तरी पाईकीच भली । थोडीबहु केली स्वामिसेवा ॥५॥

३६३५. पाईकपणें खरा मुशारा । पाईक तो खरा पाईकीनें ॥१॥ पाईक तो जाणे मारितें अंग । पाईकासी भंग नाहीं तया ॥२॥ एके दोहीं घरीं घेतलीं खाणें । पाईक तो पणें निवडला ॥३॥ करूनी कारण स्वामी यश द्यावें । पाईका त्या नांवें खरेपण ॥४॥ तुका म्हणे ठाव पाईका निराळा । नाहीं स्वामिस्थळ गेल्याविण ॥५॥

३६३६. उंच नीच कैसी पाईकाची ओळी । कोण गांड्या बळी निवडिला ॥१॥ स्वामिकाजीं एक सर्वस्वें तत्पर । एक ते कुचर आशाबद्ध ॥२॥ प्रसंगावांचूनी आणिती आविर्भाव । पाईक तो नांव मिरवी वांयां ॥३॥ गणतीचे एक उंच नीच फार । तयांमध्यें शूर विरळा थोडा ॥४॥ तुका म्हणे स्वामी जाणे त्यांचा मान । पाईक पाहोन मोल करी ॥५॥

३६३७. एकाच स्वामीचे पाईक सकळ । जैसें तैसें बळ मोल तया ॥१॥ स्वामिपदीं एका ठाव उंच स्थळीं । एक तीं निराळी जवळी दुरी ॥२॥ हीन कमाईचा हीन आन ठाव । उंचा सर्व भाव उंच पद ॥३॥ पाईकपणें तो सर्वत्र सरता । चांग तरी परता गांड्या वाव ॥४॥ तुका म्हणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ॥५॥

३६३८. प्रजी तो पाईक ओळीचा नाईक । पोटासाठीं एक जैसे तैसे ॥१॥ आगळें पाऊल आणिकासी तारी । पळतीं माघारीं तोडिजेती ॥२॥ पाठीवरी घाय म्हणती फटमर । निधडा अंगें शूर मान पावे ॥३॥ घेईल दरवडा देहा तो पाईक । मारी सकळिक सर्व हरी ॥४॥ तुका म्हणे नव्हे बोलाचे कारण । कमाईचा पण सिद्धी पावे ॥५॥

३६३९. जातीचा पाईक ओळखे पाईका । आदर तो एका त्याचे ठायीं ॥१॥ धरितील पोटासाठीं हतियारें । कळती तीं खरें वेठीचींसीं ॥२॥ जातीचें तें असे खरें घायडाय । पारखिया काय पाशीं लोपे ॥३॥ तुका म्हणे नमूं देव म्हूण जना । झालियांच्या खुणा जाणतसों ॥४॥

[सीताशोक]

३६४०. रामा वनवास। तेणें वसे सर्व देश ॥१॥ केलें नामाचें जतन। समर्थ तो नव्हे भिन्न ॥२॥ वनांतरीं रडे। ऐसे पुराणीं पवाडे ॥३॥ तुका म्हणे ऋषिनेम। ऐसा कळोनी कां भ्रम ॥४॥

३६४१. राम म्हणे वाट चाली। यज्ञ पाउलापाउलीं ॥१॥ धन्य धन्य तें शरीर। तीर्थव्रतांचें माहेर ॥२॥ राम म्हणे करितां धंदा। सुखसमाधी त्या सदा ॥३॥ राम म्हणे ग्रासोग्रासीं। तोचि जेविला उपवासी ॥४॥ राम म्हणे भोगीं त्यागीं। कर्म न लिंपे त्या अंगीं ॥५॥ ऐसा राम जपे नित्य। तुका म्हणे तो जीवन्मुक्त ॥६॥

३६४२. तारी ऐसे जड। उदकावरी जो दगड ॥१॥ तो हा न करी तें काई। कां रे लीन व्हाना पायीं ॥२॥ शिळा मनुष्य झाली। ज्याच्या चरणाचे चाली ॥३॥ वानरां हातीं लंका। घेववविली म्हणे तुका ॥४॥

३६४३. राम म्हणतां रामचि होइजे। पदीं बैसोन पदवी घेईजे ॥१॥ ऐसें सुख वचनीं आहे। विश्वासें अनुभव पाहें ॥२॥ रामरसाचिया चवी। आन रस न रुचती केवीं ॥३॥ तुका म्हणे चाखोनी सांगें। मज अनुभव आहे अंगें ॥४॥

३६४४. रामराम उत्तम अक्षरें। कंठीं धरिलीं आपण शंकरें ॥१॥ कैसीं तारक उत्तम तिहीं लोकां। हळाहळ सीतळ केलें शिवा देखा ॥२॥ हाचि मंत्र उपदेश भवानी। तिच्या चुकल्या गर्भांधयोनि ॥३॥ जुनाट नागर नीच नवें। तुका म्हणे म्यां धरिलें जीवें भावें ॥४॥

३६४५. राम म्हणतां तरे जाणता नेणता। हो का यातिभलता कुळहीन ॥१॥ राम म्हणतां न लगे आणीक सायास। केले महा दोष तेही जळती ॥२॥ राम म्हणे तया नये जवळी भूत। कैंचा यमदूत म्हणतां राम ॥३॥ राम म्हणतां तरे भवसिंधुपार। चुके येरझार म्हणतां राम ॥४॥ तुका म्हणे हेंचि सुखाचे साधन। सेवीं अमृतपान एका भावें ॥५॥

३६४६. पैल आला राम रावणासी सांगती। काय निदसुरा निजलासी भूपति ॥१॥ अवघे लंकेमाजी झाले रामाचे दूत। व्यापिलें सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ॥२॥ अवघे अंगलग तुझे वधियेले वीर। होई शरणागत किंवा युद्धासी सादर ॥३॥ तुका म्हणे एक्या भावें रामासी भेटी। करूनी घेईं आतां या संबंधेंशीं तुटी ॥४॥

३६४७. समरंगणा आला। रामें रावण देखिला ॥१॥ कैसे भिडतील दोन्हीं। नांव सारूनियां रणीं ॥२॥ प्रेमसुखाचें संधान। बाणें निवारिती बाण ॥३॥ तुकयास्वामी रघुनाथ। वर्म जाणोनि केली मात ॥४॥

३६४८. केला रावणाचा वध। अवघा तोडिला संबंध ॥१॥ लंकाराज्य बिभीषणा। केली चिरकाळ स्थापना ॥२॥ औदार्याची सीमा। काय वर्णूं रघुरामा ॥३॥ तुका म्हणे

माझा दाता । रामें सोडविली सीता ॥४॥

३६४९. रामरूप केली । रामें कौसल्या माउली ॥१॥ राम राहिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासी । राम होय त्यासी । संदेह नाहीं भरंवसा ॥२॥ अयोध्येचे लोक । राम झाले सकळिक ॥३॥ स्मरतां जानकी । रामरूप झाले कपि ॥४॥ रावणेंशीं लंका । राम आपण झाला देखा ॥५॥ ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ॥६॥

३६५०. आनंद झाला अयोध्येसी आला रघुनाथ । अवघा जयजयकार आळंगिला भरत ॥१॥ आनंदले लोक नरनारी परिवार । शंखभेरीतुरें वाद्याचे गजर ॥२॥ करिती अक्षयवाणें ओंवाळिती रघुवीरा । लक्ष्मीसहित लक्ष्मण दुसरा ॥३॥ झालें रामराज्य आनंदलीं सकळें । तुका म्हणे गाईवत्सें नरनारी बाळें ॥४॥

३६५१. झालें रामराज्य काय उणें आम्हांसी । धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी ॥१॥ राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओविये । दळितां कांडितां जेवितां गे बाइये ॥२॥ स्वप्नींही दु:ख कोणी न देखे डोळां । नामाच्या गजरें भय सुटलें कळिकाळा ॥३॥ तुका म्हणे रामें सुख दिलें आपलें । तयां गर्भवासीं येणें जाणें खुंटलें ॥४॥

३६५२. अहल्या जेणें तारिली रामें । गणिका परलोका नेली नामें ॥१॥ रामहरे रघुराजहरे । रामहरे महाराजहरे ॥२॥ कंठ शीतळ जपतां शूळपाणी । राम जपे अविनाश भवानी ॥३॥ तारक मंत्र श्रवण काशी । नाम जपतां वाल्मिक ऋषि ॥४॥ नामजप बीजमंत्र नळा । सिंधु तरती ज्याच्या प्रतापें शिळा ॥५॥ नामजप जीवन मुनिजना । तुकयास्वामी रघुनंदना ॥६॥

३६५३. मी तो अल्प मतिहीन । काय वर्णुं तुझे गुण । उदकीं तारिले पाषाण । हें महिमान नामाचें ॥१॥ नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहों भलें । कपिकुळ उद्धरिलें । मुक्त केलें राक्षसां ॥२॥ द्रोणागिरि कपिहातीं । आणविला सीतापती । थोर केली ख्याती । भरतभेटीसमयीं ॥३॥ शिळा होती मनुष्य झाली । थोर कीर्ति वाखाणिली । लंका दहन केली । हनुमंते काशानें ॥४॥ राम जानकीजीवन । योगियांचें निजध्यान । राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥५॥

[घोंगडीचे अभंग]

३५५४. ठकिलें काळा मारिली दडी । दिली कुडी टाकोनि ॥१॥ पांघरलों बहु काळें । घोंगडें बळें सांडवलें ॥२॥ नये ऐसा लाग वरी । परतें दुरी लपालें ॥३॥ तुका म्हणे आड सेवा । लाविला हेवा धांदली ॥४॥

३६५५. घोंगडियांचा पालट केला । मुलांमुलां आपुल्यांत ॥१॥ कान्होबा तो मीच दिसें । लाविलें पिसें संवगडियां ॥२॥ तो बोले मी उगाच बैसें । अनारिसें न दिसे ॥३॥ तुका म्हणे दिलें सोंग । नेदी व्यंग जाऊं देऊं ॥४॥

३६५६. खेळों लागलों सुरकवडी । माझी घोंगडी हारपली ॥१॥ कान्होबाचे पडिलों गळां । घेईं गोपाळा देईं झाडा ॥२॥ मी तों हागे उघडा जालों । अवघ्या आलों बाहेरी ॥३॥ तुका म्हणे बुद्धि काची । नाहीं ठायींची मजपाशीं ॥४॥

३६५७. घोंगडियांची एकी राशी । त्याजपाशीं तेंही होतें ॥१॥ माझियाचा माग दावा । केला गोवा उगवूं द्या ॥२॥ व्हावें ऐसें निसंतान । घेईन आण तुजपाशीं ॥३॥ तुका म्हणे लहान मोठा । सांडा ताठा हा देवा ॥४॥

३६५८. नाहीं तुझे उगां पडत गळां । पुढें गोपाळा जाऊं नको ॥१॥ चाहाड तुझे दाविन घरीं । बोलण्या उरी नाहीं ऐसी ॥२॥ तुम्हां आम्हां पडदा होता । सरला आतां सरोवरी ॥३॥ तुका म्हणे उरती गोठी । पडिली मिठी न सुटे ॥४॥

३६५९. तुम्हां आम्हां उरी तोंवरी । जनाचारी आहे तैसी ॥१॥ माझें घोंगडें टाकुन देईं । एके ठायीं मग असों ॥२॥ विरोधानें पडे तुटी । कपट पोटीं नसावें ॥३॥ तुका म्हणे तूं जाणता हरी । मज वेव्हारीं बोलविसी ॥४॥

३६६०. मुळींचा तुम्हां लागला चाळा । तो गोपाळा न संडा ॥१॥ घ्यावें त्याचें देणेंचि नाहीं । येचि वाहीं देखतसों ॥२॥ माझी तरी घोंगडी मोठी । गांडीची लंगोटी सोडिशी ना ॥३॥ तुका म्हणे म्यां सांडिली आशा । हुंगिला फांसा येथुनियां ॥४॥

३६६१. घोंगडियास घातली मिठी । न सोडी साटी केली जीवें ॥१॥ हा गे चोर धरा धांवा कोणी । घरांत राहाटे चहूं कोनी ॥२॥ नोळखवे म्यां धरिला हातीं । देहा दीप माया लाविली वाती ॥३॥ न पवे धांवणें मारितो हाका । जनाचारीं तुका नागवला ॥४॥

३६६२. आतां मी देवा पांघरों काई । भिकेचें तेंही उरेचि ना ॥१॥ सदैव दुबळें नेणें चोर । देखोनि सुनाट फोडितो घर ॥२॥ नाहीं मजपाशीं पुटकी कवडी । पांचांनीं घोंगडी दिली होती ॥३॥ तुका म्हणे जना वेगळें जालें । एकचि नेलें एकल्याचें ॥४॥

३६६३. मी माझें करीत होतों जतन । भीतरल्या चोरें घेतलें खान ॥१॥ मज आल्याविण आधींच तो होता । मज न कळतां मजमाजी ॥२॥ घोंगडें नेलें घोंगडें नेलें । उघडें केलें उघडेंचि ॥३॥ तुका म्हणे चोरटाचि झाला साव । सहज न्याय नाहीं तेथें ॥४॥

३६६४. घोंगडें नेलें सांगो मी कोणा । दुबळें माझें नाणीती मना ॥१॥ पुढें तें मज न मिळे आतां । जवळी सत्ता दाम नाहीं ॥२॥ शेटे महाजन ऐका कोणी । घोंगडियाची करा शोधणी ॥३॥ घोंगडियाचा करा बोभाट । तुका म्हणे जंव भरला हाट ॥४॥

३६६५. माझें घोंगडें पडिलें ठायीं । माग तया पायीं सांपडला ॥१॥ चोर तो भला चोर तो भला । पाठिसी घातला पुंडलिकें ॥२॥ चोर कुठोरी एकेचि ठायीं । वेगळें पाहावें

न लगे कांहीं ॥३॥ आणिकांचीं चोरलीं आधीं । माझें तयामधीं मेळविलें ॥४॥ आपल्या आपण शोधिलें तिहीं । करीन मींहि तेचि परी ॥५॥ तुका म्हणे माझें हितचि झालें । फाटकें जाऊन धडकें आलें ॥६॥

[कलियुगातील लोकांचें वर्तन.]

३६६६. पाहा हो कलिचें महिमान । असत्यासी रिझलें जन । पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥१॥ ऐसें अधर्माचें बळ । लोक झकविले सकळ । केलें धर्माचें निर्मूळ । प्रळयकाळ आरंभला ॥२॥ थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार । सांडुनियां द्विजवर । दावलपीर स्मरताती ॥३॥ ऐसे यथार्थाचे अनर्थ । जाला बुडाला परमार्थ । नाहीं ऐसी झाली नीत । हाहा भूत पातलें ॥४॥ शांति क्षमा दया । भावभक्ति सत्क्रिया । ठाव नाहीं सांगावया । सत्त्वधैर्य भंगलें ॥५॥ राहिले वर्णावर्णधर्म । अन्योन्य विचरती कर्म । म्हणवितां रामराम । महा श्रम मानिती ॥६॥ येर भोरप्याचेविशीं । धांवती भूतें आमिषां तैसीं । कथा पुराण म्हणता सिसी । तिडिक उठे नकरियाची ॥७॥ विषयलोभासाठीं । सर्वार्थेसीं प्राण साटी । परमार्थी पीठ मुठीं । मागतां उठती सुनींसीं ॥८॥ धनाढ्य देखोनि अनामिक । तयातें मानिती आवश्यक । अपमानिले वेदपाठक । शास्त्रज्ञ सात्विक संपन्न ॥९॥ पुत्र ते पितियापाशीं । सेवा घेती सेवका ऐसी । सुनांचिया दासी । सासा झाल्या आंदण्या ॥१०॥ खोटें झालें आली विवसी । केली मर्यादा नाहींसी । भार्या ते भ्रतारासी । रंक तैसी मानिती ॥११॥ नमस्कारावया हरिदासां । लाजती धरिती कांहीं गर्वसा । पोटासाठीं खौंसा । वंदिती म्लेच्छाच्या ॥१२॥ बहुत पाप झालें उचंबळ । उत्तम न म्हणती चांडाळ । अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरिती कोणाचा ॥१३॥ कैसें झालें नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न । विडे घेऊनि ब्राह्मण । अविंधवाणी वदताती ॥१४॥ कामिनी विटंबिल्या कुळवंती । वदनें दासींचीं चुंबिती । सोंवळ्याच्या स्फीती । जगीं मिरविती पवित्रता ॥१५॥ मद्यपानाची शिराणी । नवनीता न पुसे कोणी । केळवल्या व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ॥१६॥ केवढी दोषाची सबळता । झाली पाहा हो भगवंता । पुण्य धुडावोनी संता । तीर्था हरी आणिली ॥१७॥ भेणें मंद झाली मेघवृष्टि । आकांतली कांपे सृष्टी । देव रिघाले कपाटीं । आटाआटी प्रवर्तली ॥१८॥ अपीकें धान्य दिवसेंदिवसें । गाई म्हैसी चेवल्या रसें । नगरें दिसती उदासें । पिकलें बहुवसें पाखांडें ॥१९॥ होम हरपलीं हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें । जपतपादि साधनें । आचरणें भ्रष्टलीं ॥२०॥ अठरा यातींचा व्यापार । करिती तस्कराई विप्र । सांडोनियां शुद्ध शुभ्र । वस्त्रें निळीं पांघरती ॥२१॥ गीता लोपली गायत्री । भरले चमत्कार मंत्रीं । अश्वाचियेपरी विकिती । कुमारी वेदवक्ते ॥२२॥ वेदाध्ययनसंहितारुचि । भकांद्या करिती तयांची । आवडी पंडितांची । मुसाफावरी बैसली ॥२३॥ मुख्य सर्वोत्तम साधनें । तीं उच्छेदुनि केलीं दीनें । कुडीं कपटी महा मोहनें । शठ दुर्जनें मिरविताती ॥२४॥ कळाकुशलता चतुराई ।

तर्कवादी भेदनिंदेठायीं । विधिनिषेधाच्या वाही । एकही ऐसी नाडलीं ॥२५॥ जे संन्यासी तापसी ब्रह्मचारी । होती वैरागी दिगांबरी । निस्पृही कामक्रोधें व्यापिलें भारी । इच्छेकरीं न सुटती ॥२६॥ कैसें विनाशकाळाचें कौतुक । राजे झाले प्रजांचे अंतक । पिते पुत्र सहोदर एकाएक । शत्रुघातें वर्तताती ॥२७॥ केवढी ये रांडेची अंगवण । भ्रमविलें अवघें जन । याती अठरा चाऱ्ही वर्ण । कर्दम करूनि विटाळविले ॥२८॥ पूर्वी होतें भविष्य केलें । संतीं तें यथार्थ झालें । ऐकत होतों तें देखिलें । प्रत्यक्ष लोचनीं ॥२९॥ आतां असो हें आघवें । गति नव्हे कळीमध्यें । करुणा भाका वेगें । देवासी स्मरावें अंतरीं ॥३०॥ अगा ये वैकुंठनायका । काय पाहातोसि या कौतुका । धांव कलीने गांजिलें लोकां । देतो हाका सेवक तुकयाचा ॥३१॥

[गति आणि अधोगतीचे उपाय]

३६६७. ऐका संतजन उत्तर माझे बोबडे बोल । करीं लाड तुम्हांपुढें हो कोणी झणी कोपाल ॥१॥ उपाय साधन आइका कोण गति अवगति । दृढ बैसोनि सादर तुम्हीं धरावें चित्तीं ॥२॥ धर्म तयासीच घडे रे ज्याचे स्वाधीन भाज । कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ॥३॥ पुण्य तें जाणा रे भाइनों परोपकाराचें । परपीडा परनिंदा रे खरें पाप तयाचें ॥४॥ लाभ तयासीच झाला रे मुखीं देव उच्चारी । प्रपंचा पाठी गुंतला रे हानी तयासी थोरी ॥५॥ सुख तें जाणा रे भाईंनो संतसमागम । दुःख तें जाणा रे भाइनों सम तेथें विषम ॥६॥ साधन तयासि साधे रे ज्याची स्वाधीन बुद्धि । पराधीना आहे घात रे थोर जाण संबंधी ॥७॥ मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें राखे । अपमानी तो अधररसस्वाद चाखे ॥८॥ जाणता तयासी बोलती जाणे सारलक्षण । नेणता तया बोलिजे वाद करी भूषण ॥९॥ भला तोचि एक जाणा रे गयावर्जन करी । बुरा नष्ट धन मेळवी परद्वार जो करी ॥१०॥ आचारी अन्न काढी रे गाई अतितविभाग । अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ॥११॥ स्वहित तेणेंचि केलें रें भूतीं देखिला देव । अनहित तयाचें झालें रे आणी अहंभाव ॥१२॥ धन्य तेचि जन्मा आले रे एक हरीचे दास । धिग ते विषयी गुंतले केला आयुष्याचा नाश ॥१३॥ जोहरी तोचि एक जाणा रे जाणे सिद्धलक्षणें । वेडसरु तो भुले रे वरदळभूषणें ॥१४॥ बळियाढा तोचि जाणा रे भक्ति दृढ शरीरीं । गांढ्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ॥१५॥ खोल तो वचन गुरुचें जो गिळूनी बैसे । उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें ॥१६॥ उदार तोचि जीवभाव रे ठेवी देवाचे पायीं । कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिठायीं ॥१७॥ चांगलें पण तेंचि रे ज्याचें अंतर शुद्ध । ओंगळ मळीन अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ॥१८॥ गोड तेंचि एक आहे रे सार विठ्ठल नाम । कडु तो संसार रे लक्षचौऱ्यांशीं जन्म ॥१९॥ तुका म्हणे मना धरीं रे संतसंगतिसोई । नलगे कांहीं करावें राहे विठ्ठल पायीं ॥२०॥

[एकाखडी]

३६६८. करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥१॥ स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनियां भाव

॥२॥ खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ॥३॥ गजर नामाचा । करा लवलाहें वाचा ॥४॥ घरटी चक्रफेरा । जन्ममृत्यूचा भोंवरा ॥५॥ नानाहव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥६॥ चरणीं ठेवा चित्त । म्हणवा देवाचें अंकित ॥७॥ छंदें नानापरी । कळा न पविजे हरी ॥८॥ जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचाही दाता ॥९॥ झणी माझें माझें । भार वागविसी ओझें ॥१०॥ यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची शुद्धि ॥११॥ टणक धाकुलीं । अवघीं सरती विठ्ठलीं ॥१२॥ ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणि ॥१३॥ डगमगी तो वांयां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥१४॥ ढळों नये जरी । लाभ घरींचिया घरीं ॥१५॥ नाहीं ऐसें राहे । कांहीं नासिवंत देहे ॥१६॥ तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ॥१७॥ थडी टाकी पैलतीर । बाहे ठोके होय वीर ॥१८॥ दया तिचें नांवें । अहंकार जाय जिवें ॥१९॥ धनधान्य हेवा । नाड कुटुंबाची सेवा ॥२०॥ नाम गोविंदाचें । घ्या रे हेंचि भाग्य साचें ॥२१॥ परउपकारा । वेंचा शक्ति निंदा वारा ॥२२॥ फळ भोग इच्छा । देव आहे जैसा तैसा ॥२३॥ बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ॥२४॥ भविष्याचे माथां । भजन नेदावें सर्वथा ॥२५॥ माग लागला न संडीं । आळस माती घालीं तोंडीं ॥२६॥ यश कीर्ति मान । तरी जोडे नारायण ॥२७॥ रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ॥२८॥ लकार लाविला । असतांनसतांचि उगला ॥२९॥ वासनेची धाडी । बंद खोड्या नाड्या बेडी ॥३०॥ सार तें न कळे । काय झांकियेले डोळे ॥३१॥ खंती ते न धरा । होणें गाढव कुतरा ॥३२॥ सायासाची जोडी । पिकें काढिलिया पडी ॥३३॥ हातीं हित आहे । परि न करिसी पाहें ॥३४॥ अलंकार लेणें । तुळसीमुद्रांचीं भूषणें ॥३५॥ ख्याति केली विष्णुदासीं । तुका म्हणे पाहा कैसी ॥३६॥

[काला]

३३६९. झेला रे झेला वरचेवरी झेला । हातिचें गमावी तो पाठीसी खाय टोला ॥१॥ त्रिगुणांचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळां ॥२॥ आगळा होऊनि धरी वरिचिया वरी । चपळ तो जिंके गांढ्या ठके येरझारीं ॥३॥ हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी । सोरीमागें सोरी घेती ओणवें करूनी ॥४॥ डाईं पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरीं भार उभा भोंवताही फेर ॥५॥ तुका म्हणे सुख पाहे तयाचें आगळें । जिंकी तो हरीसी कोणी एका तरी काळें ॥६॥

३६७०. अझुनि कां थीर पोरा न म्हणसी कीर । धरूनियां धीर लाजे बुर निघाला ॥१॥ मोकळा होतासी कां रे पडिलासी डाईं । वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं ॥२॥ मेळवूनी मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिल एक बहु बैसविलीं पाठीं ॥३॥ तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटें तोंवरी येथें गुंतलिया खेळा ॥४॥ सांडितां ठाव पुढें सईल धरी हात । चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात ॥५॥ तुका म्हणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥६॥

३६७१. पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई । रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई ॥१॥ कोडें रे कोडें ऐका हें कोडें । उगवूनी फार राहे गुंफोनियां थोडें ॥२॥ सांगतों हें मूळ कांहीं न धरावी खंती । ज्यालें जीवो मेलें मरों प्रारब्धा हातीं ॥३॥ तुका म्हणे अभिमान सांडावा सकळीं । नये अंगावरी वांयां येऊं देऊं कळी ॥४॥

३६७२. नुगवे तें उगवून सांगितलें भाई । घालूनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई ॥१॥ आतां कांहीं नाहीं राहिलें । म्यां आपणा आपण पाहिलें ॥२॥ कमाईस मोल येथें नका रीस मानूं । निवडूं नये मज कोणा येथें वानूं ॥३॥ तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ॥४॥

३६७३. हा रस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥१॥ पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित । होईल करीत । आला अधिकारी तो ॥२॥ काय पाहातां हे भाई । हरुषे नाचा धरा घाई । पोटभरी कांहीं । घेतां उरी न ठेवा ॥३॥ जें सुख दृष्टि आहे । तेंच अंतरीं जो लाहे । तुका म्हणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥४॥

३६७४. अवघे गोपाळ म्हणती या रे करूं काला । काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला । नका कांहीं मागें पुढें ठेवूं रे तुम्ही खरेंच बोला । वंची वंचला तोचि रे येथें भोवंडा त्याला ॥१॥ घेतल्यावांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं । एकां एक ग्वाही बहुत देती मोकळे नाहीं । ताक सांडी येकरे येक रे काला भात भाकरी दहीं । आलें घेतो मध्यें बैसला नाहीं आणवीत तें ही ॥२॥ एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनी मोटा । एक सोडितील गांठीं रे एक चालती वाटा । एक उभा भार वाहोनि पाहे उगाचि खोटा । एक ते करूनि आराले आतां ऐसेंचि घाटा ॥३॥ एकीं स्थिरावल्या गाई रे एक वळत्या देती । एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोवतीं घेती । एक चाराबोरा गुंतले नाहीं जीवन चित्तीं । एक एका चला म्हणती एक हुंबरी घेती ॥४॥ एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें । आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें । गांठींचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें । सांपडलें वेठी वोढी रे भार वाहतां मेलें ॥५॥ एक ते माया गुंतले घरीं बहुत कामें । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहींच ठावें । जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें । हातोहातीं गेलें वेचुनी मग पडिलें ठावें ॥६॥ एका हातीं पायीं पट्टे रे अंगी लाविल्या राखा । एक ते सोलिव बोडके सपाट केल्या शिखा । एक ते अळसी तळीं रे वरी वाढिल्या काखा । सीदोरी वांचून बुद्धि रे केल्या अवघ्यां वाखा ॥७॥ तुका म्हणे आतां कान्होबा आम्हां वांटोनी द्यावें । आहे नाहीं आम्हांपाशीं तें तुज अवघेंचि ठावें । मोकलितां तुम्हीं शरण आम्हीं कवणासी जावें । कृपावंतें कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥८॥

३६७५. बैसवूनी फेरी । गढिया मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥१॥

पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥२॥ बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥३॥ तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ॥४॥

३६७६. आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारिसें । कान्होबाचे अंतरीं ॥१॥ पीडती आपुल्याला भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥२॥ खेळ खेळे न पडे ठाईं । ज्याचा भार त्याच्या ठायीं । कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगविती ॥३॥ तुका म्हणे कवळ । हातीं घेउनी गोपाळ । देतों ज्याचें बळ । त्यासी तैसा विभाग ॥४॥

३६७७. काम सारूनी सकळ । आले अवघे गोपाळ । झाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ॥१॥ देती आपुलाला झाडा । गाई बैसविल्या वाडां । दोंदिल बोबडा । वांकड्याचा हरि मेळीं ॥२॥ आपुलाली ये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनि गोडी । हरी मेळवी त्यांत तें ॥३॥ भार वागविला खांदीं । नव्हती मिळाली तों मांदीं । सकळांचे संधी । ओझीं अवघीं उतरलीं ॥४॥ मागे जो तांतडी । त्यासी रागा येती गडी । तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ॥५॥ एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रह्मानंदें । तुका म्हणे पदें । या रे वंदूं हरीचीं ॥६॥

३६७८. यमुने पाबळीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी ॥१॥ अवघें एके ठायीं । करूनी स्वाद त्याचा पाहीं । मजपाशीं आहे तेंही । तुम्हांमाजी देतों ॥२॥ म्हणती बरवें गोपाळ । म्हणती बरवें गोपाळ । वाहाती सकळ । मोहरी पांवे आनंद ॥३॥ खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ॥४॥ एकापुढें एक । घाली हात पसरी मुख । गोळां पांवे तया सुख । अधिकचि वाटे ॥५॥ म्हणती गोड झालें । म्हणती गोड झालें । आणिक देईं धालें । नाहीं पोट आमुचें ॥६॥ हात नेतो मुखापासीं । येर आशा तोंड वासी । खाय आपण तयासी । दावी वांकुलिया ॥७॥ देऊनियां मिठी । पळे लागतील पाठीं । धरूनी काढितील ओठीं । मुखामाजी खाती ॥८॥ म्हणती ठकडा रे कान्हा । लावी घांस भरी राना । दुम करी तो शहाणा । पाठोवाठीं तयाच्या ॥९॥ अवघियांचे खाय । कवळ कृष्ण माझी माय । सुरवर म्हणती हाय हाय । सुखा अंतरलों ॥१०॥ एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी । गोळा न सहावे हरी । म्हणे पुरें आतां ॥११॥ येतो काकुलती । गोळा न सहावे श्रीपती । म्हणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ॥१२॥ आनंदाचे फेरी । माजी घालूनियां हरी । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पांवें ॥१३॥ वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडलीं पुढें । बहु भाविक तीं ॥१४॥ करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख । हरीसी वाटतें सुख । खदखदां हांसे ॥१५॥ एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट । केली लाजतांही

धीट । आपुलिया संगें ॥१६॥ नाहीं गेली ज्याची भूक । त्याचें पसरवितो मुख । अवघियां देतो सुख । सारिखें हरि ॥१७॥ म्हणती भला भला हरी । तुझी संगती रे बरी । आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ॥१८॥ गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार । झालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें ॥१९॥ देव पाहाती सकळ । मुखें घोटूनियां लाळ । धन्य म्हणती गोपाळ । धिग झालों आम्ही ॥२०॥ म्हणती कैसें करावें । म्हणती कैसें करावें । यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया ॥२१॥ सुरवरांचे थाट । भरले यमुनेचे तट । तंव अधिकचि होंट । मटमटां वाजती ॥२२॥ आनंदे गोपांसहित । क्रीडा करी गोपीनाथ । म्हणे यमुनेत हात । नका धुऊं कोणी ॥२३॥ म्हणती जाणे जीवींचें । लाजे त्यास येथें कैंचें । शेष या कृष्णाचें । लाभे थोरिवे ॥२४॥ धन्य दिवस काळ । आजी फावला गोपाळ । म्हणती धालों रे सकळ । तुझियानी हातें ॥२५॥ मानवले गडी । एक एकांचे आवडी । दहीं खादले परवडी । धणीवरी आजी ॥२६॥ तुझा संग बरवा । नित्य आम्हांसी द्यावा । ऐसें करूनियां जीवा । नित्य देवा चालावें ॥२७॥ तंव म्हणे वनमाळी । घ्यारे काठीया कांबळी । आता जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥२८॥ आजी झाला आनंदू । न वर्णवे ब्रह्मानंदू । चाले परमानंदू । सवें आम्हांसहित ॥२९॥ तुका म्हणे प्रेमें धालीं । कोणा न साहवे चाली । गाई गोपाळांसी केली । आपणयांसरी ॥३०॥

३६७९. या हो चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा ॥१॥ वाहिला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त झालें चंचळ ॥२॥ उरलें तें सांडा काम नका करूं गोवी । हीच वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥३॥ निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरींचें सोसूं वाईट ॥४॥ कृष्णभेटी आड कांहीं नावडे आणिक । लाज तरी लोक मन झालें उदास ॥५॥ एकाएकीं चालिल्या सादावीत सवें । तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ॥६॥

३६८०. फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे । लाज सांडोनी एकाएकी पाहे ॥१॥ फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ॥२॥ मागें जें शिकलीस होती पोटीं । तेंचि विचारूनी आतां उच्चारी ओठीं ॥३॥ त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनी धरी घाली मूळबंदीं गांठी ॥४॥ आगळें पाउल जिंकी एकाएक । पावसी मान हें मानवती तिन्ही लोक ॥५॥ तुका म्हणे तुजमजमध्यें एक भाव । सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव ॥६॥

३६८१. फुगडी फू सवती माझे तूं । हागुनी भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरी थू ॥१॥ फुगडी घेतां आली हरी । ऊठ जा वो जगनोवरी ॥२॥ हात पाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ॥३॥ सात पांच आणिल्या हरी । वांचूनी काय तगसी पोरी ॥४॥ सरला दम पांगले पाय । अझुनी तरी घोळिसी काय ॥५॥ तुका म्हणे अझुन तरी । सांगितलें तें गधडी करी ॥६॥

३६८२. तुशीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी । सहस्त्र मुखावरी हरी ।

शेष शिणविलें ॥१॥ चेंडुवासवें घातली उडी । नाथिला काळिया देऊनी बुडी ॥२॥ अशुद्ध पीता करुणा नाहीं । तुवां आपुली माउशीही मारियेली ॥३॥ रावणाचें घर बुडविलें सारें । त्याची रांडापोरें मारियेलीं ॥४॥ जाण तूं ठावा आहेसी आम्हां । तुवां आपुला मामा मारियेला ॥५॥ याशीं खेळतां नाश थोरू । तुकया स्वामी सारंग धरू ॥६॥

३६८३. मशीं पोरा घे रे बार । तुझे बुजीन खालील द्वार ॥१॥ पोरा हमामा रे हमामा रे ॥२॥ मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सांभाळी खालीं ॥३॥ तरीच मशीं बोल । पोरा जिव्हाळ्याची ओल ॥४॥ मशीं घेतां भाष । जीवा मीतूंपणा नास ॥५॥ मजसवें खरा । पण जाऊं नेदीं घरा ॥६॥ आमुचिये रंगीं । दुजें तगेना ये संगीं ॥७॥ तुकयासवें भास । हरी जीवा करी नास ॥८॥

३६८४. हमामा रे पोरा हमामा रे । हमामा घालितां ठकलीं पोरें । करी येरझार चौऱ्यांशींची ॥१॥ पहिले पहारा रंगासी आलें । सोहं सोहं सें बार घेतलें । देखोनि गडी तें विसरलें । डाईं पडिलें आपणचि ॥२॥ दुसऱ्या पहारा महाआनंदें । हमामा घाली छंदछंदें । दिसे वाढे तों गोड वाटे । परि पुढें नेणें पोर काय होतें तें ॥३॥ तिसऱ्या पहारा घेतला बार । अहंपणें पाय न राहे स्थिर । सोसे सोस करितां डाईं पडसी । सत्य जाणें हा निर्धार ॥४॥ चौथ्या पहारा हमामा घालिसी । कांपविसी हातपाय । सुऱ्यापाटिलाचा पोर यम्या । त्याचे पडसील डाईरे ॥५॥ हमामा घालितां भ्याला तुका । त्यानें सांडिली गड्याची सोई । यादवाचा मूल एक विठोबा । त्यासवें चारितो गाईरे ॥६॥

३३८५. सिद्ध करूनियां ठेविल कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ॥१॥ आठव हा धरीं मज जागें करीं । मागिलें पहारीं सेवटींचा गे ॥२॥ सम तुकें घाव घालीं वो साजणी । मी तुजमिळणी जिवें मिळें ॥३॥ एक कशी पाखडी दुसरी निवडी । नि:शेष ते सडी ओज करी ॥४॥ सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ॥५॥ उद्धव अक्रूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥६॥ तुका म्हणे मज माहेरीं आवडी । म्हणोनि तांतडी मूळ केलें ॥७॥

३६८६. सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ॥१॥ मुसळ आधारीं आवरूनी धरीं । सांवरोनी थोरी घाव घालीं ॥२॥ वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीतीं ॥३॥ कांडितां कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तो ॥४॥ तुका म्हणे रूप उमटे आरीसा । पाक त्यासरिसा सिद्ध झाला ॥५॥

३६८७. उपजोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥१॥ वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचे ॥२॥ एकमेकां देऊं मुखीं । सुखीं घालूं हुंबरी ॥३॥ तुका म्हणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ॥४॥

३६८८. याल तरी या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ॥१॥ आजी देतों पोटभरी ।

पुरें म्हणाल तोंवरी ॥२॥ हळूहळू चाला । कोणी कोणासीं न बोला ॥३॥ तुका म्हणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ॥४॥

३६८९. शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥१॥ तुम्ही व्हा रे दोहींकडे । मुख पसरूनी गडे ॥२॥ वाहाती त्या धारा । घ्यारे दोहींच्या कोंपरा ॥३॥ तुका म्हणे हातीं टोका । अधिक उणें नेदी एका ॥४॥

३६९०. पळाले ते भ्याड । त्यांसी येथें झाला नाड ॥१॥ धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ॥२॥ आपुलिया मतीं । पडली विचारीं तीं रितीं ॥३॥ तुका म्हणे घ्या रे पया । कैं पावाल या ठाया ॥४॥

३६९१. धालें मग पोट । केला गड्यांनी बोभाट ॥१॥ ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ॥२॥ खांद्यावरी भार । तीं शिणती बहु फार ॥३॥ तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ॥४॥

३६९२. पाहाती गौळणी । तंव ती पालथी दुधाणी ॥१॥ म्हणती नंदाचिया पोरें । आजी चोरी केली खरें ॥२॥ त्याविण हे नासी । नव्हे दुसरिया ऐसी ॥३॥ सवें तुकया मेला । त्याणें अगुणा आणिला ॥४॥

३६९३. आतां ऐसें करूं । दोघां धरूनियां मारूं ॥१॥ मग टाकितील हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ॥२॥ कोंडूं घरामधीं । न बोलोनी जागो बुद्धी ॥३॥ बोलावितो देवा । तुका गडियांचा मेळावा ॥४॥

३६९४. लये लये लखोटा । मूळबंदी कासोटा । भावा केलें साहें । आतां माझें पाहें ॥१॥ हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली । धीर माझा निका । सांडीं बोला फिका ॥२॥ अंगीकारी हरि । नको पडों फेरी । लाज धरीं भांडे । जगझोडी रांडे ॥३॥ बैस भावापाठीं । ऐक माझ्या गोष्टी । केला सांडीं गोहो । धरीं येथें मोहो ॥४॥ पाठिमोरा डोल । आवरीं ते बोल । पांगलीस बाळा । पुढें अवकळा ॥५॥ आतां उभी ठायीं । उभाउभीं पाहीं । नको होऊं डुकरी । पुढें गाढव कुतरी ॥६॥ नाम केलें खरें । आपुलें म्यां बरें । तुका म्हणे येरी । पांगविल्या पोरी ॥७॥

३६९५. गडी गेले रडी । कान्हो नेदीच तूं चढी ॥१॥ आम्ही न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ॥२॥ न साहावे भार । बहु लागतो उशीर ॥३॥ तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ॥४॥

३६९६. यमुनेतटीं मांडियेला खेळ । म्हणे गोपाळ गडियांसी ॥१॥ हाल मांडा हाल मांडा । वाऊगी सांडा मोकळी ॥२॥ नांवें ठेवूनि वांटा गडी । न वजे रडी मग कोणी ॥३॥ तुका म्हणे कान्हो तिळ्यातांदळ्या । जिंके तो करी आपुला खेळ्या ॥४॥

३६९७. बळें डाईं न पडे हरी । बुद्धि करी शाहाणा तो ॥१॥ मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ॥२॥ येतो जातो वेळोवेळां । न कळे कळा सांपडती ॥३॥ तुका म्हणे धरा ठायींच्या ठायीं । मिठी जीवें पायीं घालूनियां ॥४॥

३६९८. कवळाचिया सुखें । परब्रह्म झालें गोरखें । हात गोवूनि खाय मुखें । बोटांसादीं लोणचीं ॥१॥ कोण जाणे तेथें कोण लाभ । कां तें ब्रह्मादिकां दुर्लभ ॥२॥ घाली हमामा हुंबरी । पांवा वाजवी मोहरी । गोपाळांचे फेरी । हरी छंदें नाचतसे ॥३॥ काय नव्हतें त्या घरीं खावया । रिघे लोणी चोरावया । तुका म्हणे सवें तया । आम्हीही सोंकलों ॥४॥

३६९९. कान्होबा आतां तुम्ही आम्हीच गडे । कोणाकडे जाऊं नेदूं ॥१॥ वाहीन तुझी भारशिदोरी । वळतीवरी येऊं नेदूं ॥२॥ ढवळे गाईचें दूध काढूं । एकल्या एक ठोंबे मारूं ॥३॥ तुका म्हणे टोकवूं त्यांला । जे तुझ्या बोला मानिती ना ॥४॥

३७००. बहु काळीं बहु काळीं । आम्ही देवाची गोवळीं ॥१॥ नाहीं विट देतो भाते । जेवूं बैसवूं सांगातें ॥२॥ बहु काळें बहु काळें । माझें पांघरे कांबळें ॥३॥ तुका म्हणे नाहीं नाहीं । त्याचें आमचेंसें कांहीं ॥४॥

३७०१. बहु बरा बहु बरा । या सांगातें मिळे चारा ॥१॥ म्हणोनी जीवेंसाठीं । घेतली कान्होबाची पाठी ॥२॥ बरवा बरवा दिसे । समागम याचा निमिषें ॥३॥ पुढती पुढती तुका । सोंकला सोंकवितो लोकां ॥४॥

३७०२. घेती पाण्यासी हुंबरी । त्यांचें समाधान करी ॥१॥ ऐशी गोपाळांची सवे । जाती तिकडे मागें धांवे ॥२॥ स्थिरावली गंगा । पांगविली म्हणे उगा ॥३॥ मोहरी पांवा काठी । तुका म्हणे याजसाठीं ॥४॥

३७०३. वळत्या गाई धांवे घरा । आमच्या करी येरझारा ॥१॥ नांव घेतां तो जवळी । बहु भला कान्हो बळी ॥२॥ नेदी पडों उणें पुरें । म्हणे अवघेंचि बरें ॥३॥ तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ॥४॥

३७०४. म्हणती धालों धणीवरी । आतां नलगे शिदोरी । नये क्षणभरी । आतां यास विसंबों ॥१॥ चाल चालरे कान्होबा । खेळ मांडूं रानीं । बैसवूं गोठणी । गाई जमा करूनी ॥२॥ न लगे जावे घरा । चुकलिया येरझारा । सज्जन सोयरा । मायबाप तूं आम्हां ॥३॥ तुका म्हणे धालें पोट । आतां काशाचा बोभाट । पाहाणें ते वाट । मागें पुढें राहिली ॥४॥

३७०५. तुझिये संगती । झाली आमुची निश्चिंती ॥१॥ नाहीं देखिलें तें मिळे । भोग सुखाचे सोहळे ॥२॥ घरीं ताकाचें सरोवर । येथे नवनीताचे पूर ॥३॥ तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ॥४॥

३७०६. कामें पीडिलों माया । बहू मारी नाहीं दया ॥१॥ तुझ्या राहिलों आधारें । झालें अवघेंचि बरें ॥२॥ तुझे लागलों संगती । आतां येतो काकुलती ॥३॥ तुका म्हणे तुझ्या भिडा । कान्होबा हे गेली पीडा ॥४॥

३७०७. खेळ मांडियेला वाळवंटी घाईं । नाचती वैष्णव भाई रे । क्रोध अभिमान केला पावटणी । एक एका लागतील पायीं रे ॥१॥ नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळीरे । कळिकाळावरि घातली कास । एक एकाहुनी बळी रे ॥२॥ गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा । हार मिरवती गळारे । टाळ मृदंग घाई पुष्पांचा वरुषाव । अनुपम्य सुखसोहळा रे ॥३॥ लुब्धलीं नादीं लागली समाधि । मूढ जन नर नारी लोकारे । पंडित ज्ञानी योगी महानुभाव । एकचि सिद्धसाधकां रे ॥४॥ वर्णाभिमान विसरली याति । एक एकां लोटांगणीं जातीरे । निर्मळ चित्तें झालीं नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ॥५॥ होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले वैष्णव वीर रे । तुका म्हणे सोपी केली पायवाट । तरावया भवसागर रे ॥६॥

३७०८. एकें घाईं खेळतां न पडसी डाईं । दुचाळ्यानें ठकसील भाई रे । त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी । या चौघांची तरी धरीं सोई रे ॥१॥ खेळ खेळोनियां निराळाचि राहीं । सांडीं या विषयाची घाई रे । येणेंचि खेळे बसवंत होसी । ऐसें सत्य जाण माझ्या भाई रे ॥२॥ सिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बसवंत केला रे । आपुल्या सवंगडिया सिकवूनी घाईं । तेणें सतत फड जागविला रे । एके घाईं खेळता न चुकेचि कोठें । तया संत जन मानवले रे ॥३॥ ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपान आनंदें खेळती रे । कान्हो गोवारी त्यांनीं बसवंत केला । आपण भोंवतीं नाचती रे । सकळिकां मिळोनी एकचि घाईं । त्याच्या ब्रह्मादिक लागती पायीं रे ॥४॥ रामा बसवंत कबिर खेळिया । जोडा बरवा मिळाला रे । पांचा संवगडियां एकचि घाईं । तेथें नाद बरवा उमटला रे । ब्रह्मादिक सुरवर मिळोनियां त्यांनीं । तो ही खेळिया निवडिला रे ॥५॥ ब्राह्मणाचा पोर खेळिया एका भला । तेणें जन खेळकर केला रे । जनार्दन बसवंत करूनियां । तेणें वैष्णवांचा मेळ मेळविला रे । एकचि घाईं खेळतां खेळतां आपणचि बसवंत जाला रे ॥६॥ आणीक खेळिये होऊनियां गेले । वर्णावया वाचा मज नाहीं रे । तुका म्हणे गडे हो हुशारूनी खेळा । पुढिलांची धरूनियां सोई रे । एकचि घाईं खेळतां जो चुकला । तो पडे संसारडाईं रे ॥७॥

३७०९. बाराही सोळा गडियांचा मेळ । सतरावा बसवंत खेळियारे । जतिस्पद राखों जाणें टिपरिया घाईं । अनुहात वाय मांदळा रे ॥१॥ नाचत पंढरिये जाऊं रे खेळिया । विठ्ठल रखुमाई पाहूं रे ॥२॥ सा चहूं वेगळा अठरा निराळा । गाऊं वाजवूं एक चाळा रे । विसरती पक्षी चारा नेघे पाणी । तारुण्य देहभाव बाळा रे ॥३॥ आनंद तेथींचा मुकियासी वाचा । बहिरे ऐकती कानीं रे । आंधळ्यांसीं डोळे पांगुळांसी पाय । तुका म्हणे वृद्ध होती तरणे रे ॥४॥

३७१०. दोन्ही टिपरीं एकचि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे । कुसरी अंगें मोडितील परी । मेळविती एकएका छंदें रे ॥१॥ कांहींच न वजे वांयां रे खेळिया । एकचि बसवंत अवघियां रे । सम विषम तेथें होऊंच नेदी । जाणऊनि आगळिया रे ॥२॥ संत महंत सिद्ध खेळतील घाईं । तेच सांभाळी माझ्या भाई रे । हात राखोन हाणिती टिपऱ्या टिपरी । मिळोनि जाय त्याची सोई रे ॥३॥ वितालाचें अवघें जाईल वांयां । काय तें शृंगारूनि काया रे । निवडूनि बाहेर काढिती निराळा । जो न मिळे संतांचियां घाई रे ॥४॥ प्रकाराचें काज नाहीं सोडीं लाज । नि:शंक होऊनियां खेळें रे । नेणतीं नेणतींच एकें पावलीं मान । विठ्ठल नामाचिया बळें रे ॥५॥ रोमांच गुढिया डोलविती अंगें । भावबळें खेळविती सोंगें रे । तुका म्हणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगें रे ॥६॥

३७११. या रे गडे हो धरूं घाई जाणतांही नेणतां । नाम गाऊं टाळी वाहूं आपुलिया हिता ॥१॥ फावलें ते घ्यारे आतां प्रेमदाता पांडुरंग । आजी दिवस सोनियाचा वोडवला रंग ॥२॥ हिंडती रानोरान बुजंग ते कांट्यावन । सुख तयाहून आम्हां गातां नाचतां रे ॥३॥ तुका म्हणे ब्रह्मादिकां सांवळें दुर्लभ सुखा । आजी येथें आलें फुका नाम मुखा कीर्तनीं ॥४॥

३७१२. भीमातीरीं एक वसविलें नगर । त्याचें नांव पंढरपुर रे । तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाइला सोळा हजार रे ॥१॥ नाचत जाऊं त्याच्या गांवा रे खेळिया । सुख देईल विसावा रे । पुढें गेले ते निधाई झाले । वाणितील त्याची सीमा रे ॥२॥ बळियां आगळा पाळी लोकपाळां । रिघ नाहीं कळिकाळा रे । पुंडलिक पाटील केली कुळवाडी । तो झाला भवदु:खा वेगळा रे ॥३॥ संतसज्जनीं मांडिलीं दुकानें । जे जया पाहिजे तें आहे रे । भुक्ति मुक्ति फुकाच साठीं । कोणी तयाकडे न पाहे रे ॥४॥ दोन्हीच हाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे । न वजों म्हणती आम्ही वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ॥५॥ बहुत दिस होती मज आस । आजी घडलें सायासीं रे । तुका म्हणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायांसी रे ॥६॥

३७१३. ब्रह्मादिकां न कळे खोळ । ते हे आकळ धरियेली ॥१॥ मोहरी पांवा वाहे काठी । धांवे पाठीं गाईचे ॥२॥ उच्छिष्ट जें न लभे देवा । तें हें सदैवां गोवळ्यां ॥३॥ तुका म्हणे जोडी झाली । ते हे माउली आमुची ॥४॥

३७१४. शुद्ध दळणाचें सुख सांगों काईं । मानवत असे सईबाई ॥१॥ शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ॥२॥ शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ॥३॥ शुद्ध त्याचा पाक शुद्धचित्त चांगला । अविट तयाला नाश नाहीं ॥४॥ तुका म्हणे शुद्ध आवडे सकळां । भ्रतार वेगळा न करी जीवें ॥५॥

३७१५. कान्होबा तूं आलगट । नाहीं लाज बहु धीट । पाहिलें वाईट । बोलोनियां वोखटें

॥१॥ परि तूं न संडिसी खोडी । करिसी केली घडीघडी । पाडिसी रोकडी । तुटी माये आम्हांसी ॥२॥ तूं ठायींचा गोवळ । अविचारी अनर्गळ । चोरटा शिंदळ । ऐसा पिटूं डांगोरा ॥३॥ जरी तुझी आई । आम्ही घालूं सर्वा ठायीं । तुका म्हणे तेंहीं । तुज वाटे भूषण ॥४॥

३७१६. भोजनाच्या काळीं । कान्हो मांडियेली आळी । काला करी वनमाळी । अन्नें एकवटा । देईं निवडूनी । माते म्हणतो जननी । हात निपटूनी मेदिनी- । वरी अंग घाली ॥१॥ कैसा आळी घेसी । नव्हे तेंचि करिसी । घेईं दुसरें तयेसी । वारी म्हणे नको ॥२॥ आतां काय करूं । नये यासी हाणूं मारूं । नव्हे बुझावितां स्थिरू । कांहीं करितांही । हातेंचि केलें एके ठायीं । आतां निवडूनी खाईं । आम्हां जाचितोसी काईं । हरिसी म्हणे माता ॥३॥ त्याचे तयाकुन । करवितां तुटे भान । तंव झालें समाधान । उठोनियां बैसे । मातें बरें जाणविलें । अंग चोरूनी आपुलें । तोडियेलें एका बोलें । कैसें सुखदु:ख ॥४॥ ताट पालवें झाकिलें । होतें तैसें तेथें केलें । भिन्नाभिन्न निवडिलें । अन्नें वेगळालीं । विस्मित जननी । भाव देखोनियां मनीं । म्हणे नाहीं ऐसा कोणी । तुज सारिखा रे ॥५॥ हरुषली माये । सुख अंगीं न सामये । कवळुनी बाहे । देती आळिंगन । आनंद भोजनीं । तेथें फिटलीसे धणी । तुका म्हणे कोणी । सांडा शेष मज ॥६॥

३७१७. चला वळूं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ॥१॥ बहु केली वणवण । पायपिटी जाला सिण ॥२॥ खांदीं भार पोटीं भूक । काय खेळायाचें सुख ॥३॥ तुका म्हणे धावें । मग अवघें बरवें ॥४॥

३७१८. नेणों वेळ काळ । धालों तुझ्यानें सकळ ॥१॥ नाहीं नाहीं रे कान्होबा भय आम्हांपाशीं । वळूनी पुरविसी गाई पोटा खावया ॥२॥ तुजपाशीं भय । हें तों बोलों परी नये ॥३॥ तुका म्हणे बोल । आम्हां अनुभवें फोल ॥४॥

३७१९. सारा विटीदांडू । आणीक कांहीं खेळ मांडूं ॥१॥ बहु अंगा आले डाव । स्थिर नाहीं कोठें पाव ॥२॥ कोली हाणे टोला । झेली तेणे तो गोविला ॥३॥ एकमेकां हाका मारी । शेल जाळी एक धरी ॥४॥ राजी आलें नांव । फेरा न चुकेचि धांव ॥५॥ पुढें एक पाठी । एक एका दोघां आटी ॥६॥ एका सोस पोटीं । एक धांवे हात पिटी ॥७॥ तुका म्हणे आतां । खेळ मोडावा परता ॥८॥

३७२०. कोंडिला गे माज । निरोधुनि द्वार । राखण तें बरें । येथें करा कारण ॥१॥ हा गे हा गे हरी । करितां सांपडला चोरी । घाला गांठी धरी । जीवें माया त्रासाया ॥२॥ तेंचि पुढें आड । तिचा लोभ तिला नाड । लावुनी चरफड । हात गोउनि पळावें ॥३॥ संशयाचें बिरडें । याचे निरसलें भेटी । घेतली ते तुटी । आतां देतां घेतां फावेल ॥४॥ तुका येतो काकुळती । वाउगिया सोड । यासीचि निवाड । आम्ही भारवाहिका ॥५॥

३७२१. अनंत ब्रह्मांडें उदरीं । हरि हा बाळक नंदाघरीं ॥१॥ नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥२॥ पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासी यशोदा भोजन घाली ॥३॥ विश्वव्यापक कमळापती । त्यासी गौळणी कडिये घेती ॥४॥ तुका म्हणे नटधारी । भोग भोगून ब्रह्मचारी ॥५॥

३७२२. कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥१॥ होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ॥२॥ सदा नाम वाचे गाती । प्रेमें आनंदें नाचती ॥३॥ तुका म्हणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ॥४॥

३७२३. मेळउनि सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ॥१॥ जाऊं चोरू लोणी । आजी घेऊं चंद्रधणी । चला वेळु लाविला अझुनी । काय करितां गडे हो ॥२॥ वाट काढिली गोविंदीं । मागें गोपाळांची मांदी ॥३॥ अवघाचि वावरे । कळों नेदी कोणां खरें ॥४॥ घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ॥५॥ रिघे आपण भीतरी । पुरवी माथुलियाच्या हरी ॥६॥ बोलों नेदी म्हणे स्थीर । खुण दावी खा रे क्षीर ॥७॥ जोगावल्यावरी । तुका करितो चाकरी ॥८॥

३७२४. कां रे गमाविल्या गाई । आली वळती तुझी जाई । मागें झालें काई । एका तें कां नेणसी ॥१॥ केलासी फजित । मागें पुढेंही । बहुत । लाज नाहीं नित्य । नित्य दंड पावतां ॥२॥ वोला खोडा खिळ गाढी । ऐसा कोण तया काढी । धांवले कापडी । तुझी आधीं ओढाळा ॥३॥ चालें चाल धावें । मीही येतों तुजसवें । तुका म्हणे जंव । तेथें नाहीं पावली ॥४॥

३७२५. कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ॥१॥ काला वांटूं एकमेकां । वैष्णव निका संभ्रम ॥२॥ वांकुलिया ब्रह्मादिकां । उत्तम लोकां दाखवूं ॥३॥ तुका म्हणे भूमंडळीं । आम्ही बळी वीर गाढे ॥४॥

३७२६. पाहातां गोवळी । खाय त्यांची उष्टावळी ॥१॥ करिती नामाचें चिंतन । गडी कान्होबाचें ध्यान ॥२॥ आली द्यावी डाई । धांवे वळत्या मागें गाई ॥३॥ एके ठायीं काला । तुका म्हणे भाविकाला ॥४॥

३७२७. पैल आली आगी कान्हो कायरे करावें । नकळे तें कैसें आजी वांचों आम्हीं जीवें ॥१॥ धांव रे हरी सांपडलों संधी । वोणव्याचे मधीं बुद्धि काय करावी ॥२॥ अवचितां ज्वाळा येतां देखिल्या वरी । परतोनि पाहातां अवघे होतों पाठमोरी ॥३॥ सभोवतां फेर रीघ न होय पळतां । तुका म्हणे जाणसी तें करावें अनंता ॥४॥

३७२८. भिऊं नका बोले झांकुनियां राहा डोळे । वांचविल देव धाक नाहीं येणे वेळे ॥१॥ बापरे हा देवांचाही देव । कळों नेदी माव काय करी करवीतो ॥२॥ पसरूनि मुख विश्वरूप खाय ज्वाळ । सारूनियां संधि अवघे पाहाती गोपाळ ॥३॥ तुका म्हणे आम्ही मागें भ्यालों वांयांविण । कळों आलें आतां या सांगातें नाहीं शिण ॥४॥

३७२९. नेणती तयांसी साच भाव दावी हरी। लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥१॥ चला रे याच्या पायां लागो आतां। राखिलें जळतां महा आगीपासूनी ॥२॥ कैसीरे कान्होबा एवढी गिळियेली आगी। न देखों पोळला तुज तोंडीं कोठें अंगीं ॥३॥ तुका म्हणे कां रे तुम्ही करितां नवल। आमची सिदोरी खातो त्याचें आलें बळ ॥४॥

३७३०. त्यांनीं धणीवरी संग केला हरीसवें। देऊनी आपुलें तोचि देईल तें खावें ॥१॥ न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला। बहु दिस संग हाचि निर्धार त्याला ॥२॥ कान्होबा तूं जेवीं घासोघासीं। आरूष गोपाळे त्यांची बहु देवा प्रीति ॥३॥ तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा। तोये वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ॥४॥

३७३१. घ्या रे भोकरें भाकरी। दहींभाताची सिदोरी। ताक सांडा दुरी। असेल तें तयापें ॥१॥ येथें द्यावें तैसें घ्यावें। थोडें परि निरें व्हावें। सांगतों हें ठावें। असों द्या रे सकळां ॥२॥ माझें आहे तैसें पाहे। नाहीं तरी घरा जाये। चोरोनियां माये। नवनीत आणावें ॥३॥ तुका म्हणे घरीं। माझें कोणी नाहीं हरी। नका करूं दुरी। मज पायां वेगळें ॥४॥

३७३२. काल्याचिये आसे। देव जळीं जाले मासे। पुसोनियां हांसें। टिरीसांगातें हात ॥१॥ लाजे त्यासी वांटा नाहीं। जाणे अंतरींचें तें ही। दीन होतां कांहीं। होऊं नेदी वेगळें ॥२॥ उपाय अपाय यापुढें। खोटे निवडितो कुडे। जोडूनियां पुढें। हात उभे नुपेक्षी ॥३॥ तें घ्या रे सावकाशें। जया फावेल तें तैसें। तुका म्हणे रसें। प्रेमाचिया आनंदें ॥४॥

३७३३. गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों। आपुलाले आम्ही जीवींचे तया आवडी सांगों। एक म्हणती उगे रे उगे रे उगे मागेंचि लागों। निजों नका कोणी घरीं रे आजी अवघेचि जागों ॥१॥ जाणोनि नेणता हरि रे मध्यें उगाचि बैसे। नाइकोनी बोल आइके कोण कोणाचे कैसे। एक एकाच्या संवादें जाणे न मिळती ऐसें। पोटांतील होटा आणवी देतो तयांसी तैसें ॥२॥ एक म्हणती बहु रे आम्ही पीडियलों माया। नेदी दहींभातसिदोरी ताक घालिती पिया। तापलों वळितां गोधनें नाहीं जीवन छाया। आतां मागों पोटभरी रे याच्या लागोनि पायां ॥३॥ एक म्हणती तुमचें अरे पोट तें किती। मागों गाई म्हैसी घोडे रे धन संपत्ति। हातीं देव गडी कान्होबा आमुचा आम्हां काय विपत्ति। कन्याकुमरें दासी रे बाजावरी सुपती ॥४॥ एक म्हणती बेटे हो कोण करी जतन। गाढव तैसेंचि घोडें रे कोण तयाचा मान। लागे भवरोग खांदीं वाहतां चवघे जण। हातीं काठ्या डोया बोडक्या हिंडो मोकळें रान ॥५॥ एक म्हणती रानीं रे बहु सावजें फार। फाडफाडूं खाती डोळे रे पाय नेतील कर। राखोनि राखे आपणां ऐसा कइचा शूर। बैसोनी राहों घरीं रे कोण करी हे चार ॥४॥ घरीं बैसलिया बहुतें बहु सांगती कामें। रिकामें कोणासि नावडे ऐसें आम्हासी ठावें। चौघांमध्यें बरें दिसे तेथें नेमकें व्हावें। लपोनी

खेळतां सहज भलें गडियासवें ॥७॥ एक म्हणती गडी ते भले मिळती मता । केली तयावरी चाले रे बरी आपुली सत्ता । नसावे तेथें तैसे रे खेळ हाणिती लाता । रडी एकाएकीं गेलिया गोंधळ उडती लाता ॥८॥ एक म्हणे खेळतां उगीं राहती पोरें । ऐसें काय घडों शके रे कोणी लहान थोरें । अवघीं येती रागा एक म्हणती बरें । संगें वाढे कलह करावा एकाएकींच खरें ॥९॥ एक म्हणती एकला रे तूं जासील कोठें । सांडी मांडी हें वाउगें तुझे बोलचि खोटे । ठायीं राहा उगे ठायींच कां रे सिणसी वाटे । अवघियांची सिदोरी तुझी बरी भरियेली मोट ॥१०॥ तुका म्हणे अरे काहण्या काय सांगाल गोष्टी । चाटावे तुमचे बोल रे भुका लागल्या पोटीं । जागा करूं या रे कान्होबा मागों कवळ ताटीं । धाले गडी तुका ढेकर देतो विठ्ठल कंठीं ॥११॥

३७३४. आजी ओस अमरावती । काला पाहावया येती । देव विसरती । देहभाव आपुला ॥१॥ आनंद न समाये मेदिनी । चारा विसरल्या वाणी । तटस्थ त्या ध्यानीं । गाई जाल्या श्वापदें ॥२॥ जें देवांचें दैवत । उभें आहे या रंगांत । गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ॥३॥ जया सुखाची शिराणी । तींच पाउलें मेदिनी । तुका म्हणे मुनी । धुंडितांही न लभती ॥४॥

३७३५. चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं । मांडियेला काला भोंवतीं गोपाळांची दाटी ॥१॥ आनंदें कवळ देती एकामुखीं एक । न म्हणती सान थोर अवघीं सकळिक ॥२॥ हमामा हुंबरी पावा वाजविती मोहरी । घेतलासे फेरा माजी घालूनियां हरी ॥३॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरल्या देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥४॥ पुष्पांचा वरुषाव झाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनियां माळा घालितील कंठीं ॥५॥ यादवांचा राणा गोपी मनोहर कान्हा । तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ॥६॥

३७३६. माझे गडी कोण कोण । निवडा भिन्न यांतुनी ॥१॥ आपआपणामध्यें मिळों । एक खेळों एकाशीं ॥२॥ घाबरियांच्या मोडा काड्या । धाडा भ्याडा वळतियां ॥३॥ तुका म्हणे देवापाशीं । विटाळशी नसावी ॥४॥

३७३७. हेचि अनुवाद सदा सर्व काळ । करूनि गोपाळकाला सेवूं ॥१॥ वोरसलें कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आइतें गगनभरी ॥२॥ संत सनकादिक गोमट्या परवडी । विभाग आवडी इच्छेचिये ॥३॥ तुका म्हणे मधीं घालूं नारायण । मग नव्हे सीण कोणा खेळे ॥४॥

३७३८. अधिकाचा मज कांटाळा । तुम्हां गोपाळा संगती ॥१॥ काय नाहीं तुम्हांपाशीं । सकळांविशीं संपन्न ॥२॥ उद्वेगाचा नेघे भार । भागल्या सार पुरतें ।३॥ तुका म्हणे अधीर जिणें । नारायणें न करावें ॥४॥

३७३९. झालों आतां एके ठायीं । न वंचूं कांहीं एकमेकां ॥१॥ सरलों हेंगे देउनि मोट । कटकट काशाची ॥२॥ सोडोनियां गांठी पाहें । काय आहे त्यांत तें ॥३॥ तुका म्हणे झालों

निराळा । आतां गोपाळा देऊं बोभा ॥४॥

३७४०. या रे करूं गाई । जमा निजलेती काई । बोभाट्यानें आई । घरा गेल्या मारिल ॥१॥ घाला घाला रे कुकारे । ज्याची तेणेंचि मोहरे । एवढेंचि पुरे । केलियानें सावध ॥२॥ नेणोनियां खेळा । समय समयाच्या वेळा । दुश्चिताजवळा । मिळाले ते दुश्चित ॥३॥ तुका म्हणे शीक । न धरितां लागे भीक । धरा सकळिक । मनेरी धांवा वळतियां ॥४॥

३७४१. वोळलीचा दोहूं पान्हां । मज कान्हा सांगितलें ॥१॥ घ्या जी हेंगे क्षीर हातीं । निगुतीनें वाढावें ॥२॥ केलें सांगितलें काम । नव्हे धर्म सत्तेचा ॥३॥ तुका म्हणे नवें जुनें । ऐसें कोणें सोसावें ॥४॥

३७४२. येईल तें घेइन भागा । नव्हे जोगा दुसरिया ॥१॥ आवडी ते तुम्ही जाणा । बहु गुणांसारिखी ॥२॥ मज घेती डांगवरी । सवें हरि नसलिया ॥३॥ तुका म्हणे राबवा देवा । करीन सेवा सांगितली ॥४॥

३७४३. अंतरली खुटी मेटी । भय धरूनियां पोटीं । म्हणतां जगजेठी । धांवे करुणाउत्तरीं ॥१॥ बाप बळिया शिरोमणी । उताविळ या वचनीं । पडलिया कानीं । धांवा न करी आळस ॥२॥ बळ दुनी शरणागता । स्वामी वाहों नेदी चिंता । आइतेंचि दाता । पंगतीस बैसवी ॥३॥ वाहे खांदी पाववी घरा । त्याच्या करी येरझारा । बोबड्या उत्तरा । स्वामी तुकया मानवे ॥४॥

३७४४. शुद्धीचें सारोनी भरियेली पाळी । भरडोनी वोंगळी नाश केला ॥१॥ आडसोनी शुद्ध करीं वो साजणी । सिद्ध कां पापिणी नासियेलें ॥२॥ सुपीं तोंचि पाहें धड उगटिलें । नव्हता नासिलें जग झोडी ॥३॥ सुपीं तोंचि आहे तुज तें आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ॥४॥ सुपीं तोंची संग घेईं धडफुडी । एकसा गधडी नास केला ॥५॥ दळितां आदळे तुज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ॥६॥ सुपीं तोंचि वोज न करितां सायास । पडसी सांदीस तुका म्हणे ॥७॥

३७४५. धन्य तीं गोधनें कांबळी काष्ठिका । मोहरी पांवा निका ब्रीद वांकी ॥१॥ धन्य तें गोकुळ धन्य ते गोपाळ । नर नारी सकळ धन्य झाल्या ॥२॥ धन्य ते देवकी जसवंती दोहींचें । वसुदेवनंदाचें भाग्य झालें ॥३॥ धन्य त्या गोपिका सोळा सहस्त्र बाळा । यादवां सकळां धन्य झालें ॥४॥ धन्य म्हणे तुका जन्मा तींचि आलीं । हरिरंगीं रंगली सर्वभावें ॥५॥

३७४६. गौळणी बांधिती धारणासी गळा । खेळे त्या गोपाळामाजी ब्रह्म ॥१॥ धांवोनियां मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईपाठीं ॥२॥ तुका म्हणे सर्व कळा ज्याचे अंगीं । भोळेपणालागीं भीक मागे ॥६॥

३७४७. देखिलासी माती खातां । दावियानें बांधी माता ॥१॥ जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणू पाठीं ॥२॥ मोठें भावार्थाचें बळ । देव झाला त्याचें बाळ ॥३॥

तुका म्हणे भक्तासाठीं । देव धांवे पाठोवाठीं ॥४॥

३७४८. हा गे माझे हातीं । पाहा कवळ सांगती ॥१॥ देवें दिला खातों भाग । कराल तरी करा लाग ॥२॥ धालें ऐसें पोट । वरी करूनियां बोभाट ॥३॥ तुका म्हणे घरीं । मग कैंच्या या परी ॥४॥

३७४९. अवघे अवघीकडे । दिलें पाहें मजकडे । अशा संवगडे । सहित थोरी लागली ॥१॥ कां रे धरिला अबोला । माझा वांटा देईं मला । सिदोरीचा केला । झाडा आतां निवडेना ॥२॥ भूक लागली अनंता । कां रे नेणसी जाणतां । भागलों वळितां । गाई सैरा ओढाळा ॥३॥ तुका करुणा भाकी । हरि पाहे गोळा टाकी । घेता झाला सुखी । भीतरींवांटी आणीकां ॥४॥

३७५०. "अवघियां दिला गोर । मजकरे पाहीना" ॥१॥ फुंदे गोपाळ डोळे चोळी । ढुंगा थापली हाणे तोंडा ॥२॥ आवडती थोर मोटे । मी रे पोरटें दैन्यवाणें ॥३॥ तुका म्हणे जाणों भाव । जीवींचा देव बुझावूं ॥४॥

[मृदंग पाट्या]

३७५१. मागें पुढें पाहें सांभाळूनी दोनी ठाय । चुकावूनी जाय गडी राखे गडियांसी ॥१॥ मुरडे दंडा दोहीं तोंडा गडियां सावध करी । भेडतियासंगे तया हाल तुजवरी ॥२॥ गडियां गडी वांटुनी देईं ज्याचा सोडी तेचि ठायीं । आगळ्या बळें करील काय तुज देणें लागे डाय ॥३॥ नवां घरीं पाउला करीं सांपडे तो तेथें धरीं । जिंकोनी डाव करीं ठाव सत्ता आणिकांवरी ॥४॥ सांपडोनि डाईं बहु काळ गुंतलासी । बळिया गडी फळी फोडी न धरितां त्यांसी ॥५॥ चुकांडी जो खाय मिळोनी अंगी जाय । गुंतलासी काय तुका म्हणे अझूनी ॥६॥

३७५२. आम्ही गोवळीं रानटें । नव्हों जनांतील धीटें ॥१॥ सिदोरीचा करूं काला । एक वाटितो एकाला ॥२॥ खेळों आपआपणाशीं । आमचीं तीं आम्हांपाशीं ॥३॥ म्हणे मिळालें नेणतें । तुका कान्होबा भोंवते ॥४॥

३७५३. पाहा रे तमासा तुमचा नव्हे येथें लाग । देईन तो भाग आलियाचा बाहेरी ॥१॥ जागा रे गोपाळानों ठायीं ठायीं जागा । चाहुलीनें भागा दूर मजपासूनी ॥२॥ न रिघतां ठाव आम्हां ठावा पाळतियां । भयाभीत वांयां तेथें काय चांचपाल ॥३॥ तुका म्हणे हातां चढे जीवाचिये साटीं । मिटक्या देतां गोड मग लागतें शेवटीं ॥४॥

३७५४. डाईं घालूनियां पोरें । त्यांचीं गुरें चुकविलीं ॥१॥ खेळ खेळतां फोडिल्या डोया । आपण होय निराळा ॥२॥ मारिती माया घेती जीव । नाहीं कींव अन्याया ॥३॥ तुका कान्होबा मागें । तया अंगें कळों आलें ॥४॥

३७५५. आतां हेंचि जेऊं । सवें घेऊं सिदोरी ॥१॥ हरिनामाचा खिचडी काला । प्रेमें

मोहिला साधनें ॥२॥ चवीं चवीं घेऊं घास । ब्रह्मरस आवडी ॥३॥ तुका म्हणे गोड लागे । तों तों मागे रसना ॥४॥

३७५६. अवघेंचि गोड झालें । मागीलिये भरी आलें ॥१॥ साह्य झाला पांडुरंग । दिला अभ्यंतरीं संग ॥२॥ थडिये पावतां तो वाव । मागें पाहतां तो ठाव ॥३॥ तुका म्हणे गेलें । स्वप्नींचें जागें झालें ॥४॥

३७५७. तुज सवें येतों हरी । आम्हां लाज नाहीं तरी । उचलिला गिरी । चांग तईं वांचलों ॥१॥ मोडा आतां खेळ गाई । गेल्या झाला वेळ । फांकल्या ओढाळ । नाहीं तोचि आवरा ॥२॥ चांग दैवें यमुनेसी । वांचलों बुडतां । निलाजिरीं आम्ही नाहीं । भय धाक या अनंता ॥३॥ खातों आगी माती । आतां पुरें हा सांगाती । भोंवतां भोवेल । आम्हां वाटतें हें चित्तीं ॥४॥ तुका म्हणे उरी नाहीं तुजसवें । शाहाणिया दुरी छंद भोळियां भावें ॥५॥

३७५८. नको आम्हांसवें गोपाळा । येऊं ओढाळा तुझ्या गाई ॥१॥ कोण धांवे त्यांच्या लागें । मागें मागें येरझारी ॥२॥ न बैसती एके ठायीं । धांवती दाही दाहा वाटां ॥३॥ तुका म्हणे तूं राख मनेरी । मग त्या येरी आम्ही जाणों ॥४॥

३७५९. मागायास गेलों सिदोरी । तुझ्या मायेघरीं गांजियेलों ॥१॥ तुजविणें ते नेदी कोणा । सांगतां खुणा जिवें गेलों ॥२॥ वांयांविण केली येरझार । आतां पुरे घर तुझी माया ॥३॥ तुका म्हणे तूं आम्हां वेगळा । राहे गोपाळा म्हणउनी ॥४॥

३७६०. काकुलती येतो हरी । क्षणभरी निवडितां ॥१॥ तुमची मज लागली सवे । ठायींचें नवे नव्हों गडी ॥२॥ आणीक बोलावितो फार । बहु थोर नावडती ॥३॥ भाविकें त्याची आवडी मोठी । तुका म्हणे मिठी घाली जिवें ॥४॥

३७६१. वरता वेंघोनी घातली उडी । कळंबाबुडी यमुनेसी ॥१॥ हरी बुडाला बोंब घाला । घरचीं त्याला ठावा नाहीं ॥२॥ भवनदीचा न कळे पार । काळिया माजी थोर विखार ॥३॥ तुका म्हणे वाउग्या हाका । हातींचा गमावुनि थिंका ॥४॥

३७६२. अवघीं मिळोनि कोल्हाळ केला । आतां होता म्हणती गेला ॥१॥ आपुल्याला रडती भावें । जयासवें जयापरी ॥२॥ चुकलों आम्ही खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ॥३॥ तुका म्हणे धांवती थडी । न घली उडी आतां कोणी ॥४॥

३७६३. भ्यालीं जिवा चुकलीं देवा । नाहीं ठावा जवळी तो ॥१॥ अहाकटा करिती हाय । हात डोकीं पिटिती पाय ॥२॥ जवळी होतां न कळे आम्हां । गेल्या सीमा नाहीं दुःखा ॥३॥ तुका म्हणे हा लाघवी मोटा । पाहे खोटा खरा भाव ॥४॥

३७६४. काळिया नाथूनी आला वरी । पैल हरी दाखविती ॥१॥ दुसरीया भावें न कळे

कोणा । होय नव्हेसा संदेह मना ॥२॥ रूपा भिन्न पालट झाला । गोरें सांवळेंसा पैं देखिला ॥३॥ आश्वासीत आला करें । तुका खरें म्हणे देवा ॥४॥

३७६५. हरि गोपाळांसवें सकळां । भेटे गळ्या गळा मेळवूनी ॥१॥ भाविकें त्यांची आवडी मोठी । सांगे गोष्टी जीवींचिया ॥२॥ योगियांच्या ध्याना नये । भाकरी त्यांच्या मागोनी खाय ॥३॥ तुका म्हणे असे शाहाणियां दुरी । बोबडिया दासां हाका मारी ॥४॥

३७६६. धांव कान्होबा गेल्या गाई । न म्हणें मी कोणा काई ॥१॥ आपुलियांचें वचन देवा । गोड सेवा करीतसे ॥२॥ मागतां आधीं द्यावा डाव । बळिया मी तो नाहीं भाव ॥३॥ तुका म्हणे ऐशा सवें । अनुसरावें जीवेंभावें ॥४॥

३७६७. आणीकें काय थोडीं । परि तीं फार खोटीं कुडीं ॥१॥ सदा मोकळींच गुरें । होतीं फजीत तीं पोरें ॥२॥ सदा घालिती हुंबरी । एक एकाचें न करी ॥३॥ तुका म्हणे घरीं । माय वेळोवेळां मारी ॥४॥

३७६८. बहुतांचे संगती । बहु पावलों फजिती ॥१॥ बरें केलें नंदबाळें । मागिलांचें तोंड काळें ॥२॥ माझा करितील तंटा । लपती आलिया बोभाटा ॥३॥ तुका म्हणे काई । किती म्हणो बाप आई ॥४॥

३७६९. गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ॥१॥ चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्हीं गोपाळा छंद केले ॥२॥ मोहिल्या गोपिका पांवयाच्या छंदें । केली ते गोविंदें क्रीडा गाऊं ॥३॥ मायबापा लाडें दाविलें कौतुक । तें या आणूं सुख अंतरासी ॥४॥ निर्दाळिले दुष्ट भक्तां प्रतिपाळी । ऐसा म्हणों बळी आमुचा स्वामी ॥५॥ तुका म्हणे सरसी असों येणें बोधें । जाणोनी संबंध सर्वकाळ ॥६॥

३७७०. विचार करिती बैसोनि गौळणी । ज्या कृष्णकामिनी कामातुरा ॥१॥ एकांती एकल्या एकाच सुखाच्या । आवडती त्यांच्या गोष्टी त्याला ॥२॥ तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी । मौन त्या परि चोरी आरंभिली ॥३॥ कुशळा कवित्या कथित्या लोभिका । त्याही येथें नका आम्हापाशीं ॥४॥ बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं । त्यां चोरोनी तिहीं खेट केली ॥५॥ भेऊनियां जना एकीं सवा झाल्या । वाती विझविल्या दाटो बळें ॥६॥ कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं । निंदिती त्या त्यासी कृष्णरता ॥७॥ तो नये जवळी देखोनी कोल्हाळ । म्हणउनि समेळ मेळविला ॥८॥ अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा । तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ॥९॥ हरिरूपीं दृष्टि कानीं त्याची गोष्टी । आळंगिती कंठीं एकाएकीं ॥१०॥ न साहे वियोग करिती रोदना । भ्रमिष्ट भावना देहाचिया ॥११॥ विसरल्या मागें गृह सुत पती । अवस्था याचिती गोविंदाची ॥१२॥ अवस्था लागोनी निवळचि ठेल्या । एकाएकीं झाल्या

कृष्णरूपा ॥१३॥ कृष्ण म्हणवूनी देती आळिंगण । विरहताप तेणें निवारेना ॥१४॥ ताप कोण वारी गोविंदावांचूनी । साच तो नयनीं न देखतां ॥१५॥ न देखतां त्यांचा प्राण रिघों पाहे । आजी कामा सये उशिर केला ॥१६॥ रित्या ज्ञानगोष्टी तयां नावडती । आळिंगण प्रीति कृष्णाचिया ॥१७॥ मागें आम्हीं कांहीं चुकलों त्याची सेवा । असेल या देवा राग आला ॥१८॥ आठविती मागें पापपुण्यदोष । परिहार एकीस एक देती ॥१९॥ अनुतापें जाल्या संतप्त त्या बाळा । टाकिती विव्हळा धरणीं अंग ॥२०॥ जाणोनी चरित्र जवळीच होता । आली त्या अनंता कृपा मग ॥२१॥ होऊनि प्रगट दाखविलें रूप । तापत्रयताप निवविलें ॥२२॥ निवाल्या देखोनी कृष्णाचें श्रीमुख । शोक मोह दुःख दुरावला ॥२३॥ साच भाव त्यांचा आणूनियां मना । आळंगितो राणा वैकुंठींचा ॥२४॥ हरिअंगसंगें हरिरूप झाल्या । बोलों विसरल्या तया सुखा ॥२५॥ व्यभिचारभावें भोगिलें अनंता । वर्तोनी असतां घराचारी ॥२६॥ सकळां चोरोनी हरि जयां चित्तीं । धन्य त्या नांदती तयामध्यें ॥२७॥ उणें पुरें त्यांचें पडो नेदी कांहीं । राखे सर्वां ठायीं देव तयां ॥२८॥ न कळे लाघव ब्रह्मादिकां माव । भक्तिभावें देव केला तैसा ॥२९॥ तुका म्हणे त्याचा धन्य व्यभिचार । साधिलें अपार निजसुख ॥३०॥

३७७१. स्वयें सुखाचे झाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव । अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव । सर्वसाक्षी तेथेंचि त्याचा जीव वो ॥१॥ आपआपणाशीं करिती नवल । परि वादावाद न सांडिती बोल । एका मेघश्यामें जळधर वोल । रसीं उतावीळ हृदय सखोल वो ॥२॥ एक विषय तो सकळांचा हरि । त्याचा आवडीनें आवडी इतरीं । अंध बहिर हे प्रेतलोकाचारी । त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरीं वो ॥३॥ स्तुति पराविया मुखें रुचिकर । प्रीतिपात्राचा गौरवीं आदर । परस्परें हें सादरासादर । योग सज्जनाच्या सुखा नाहीं पार वो ॥४॥ भक्तिवालभ न तुटे चराचरीं । आप्त अनाप्त हे ऐशी नाहीं उरी । दुरी जवळी संचिताऐसें धरी । रंगा रंगा ऐसें होणें लागे हरि वो ॥५॥ तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन । आला बाहेरीं प्रेमें वोसंडून । कानीं पडिलें त्या जीवाचें जतन । धरी एका भावें हृदयीं चरण वो ॥६॥

३७७२. आजी कां वो तूं दिससी दुश्चिती । म्हणिये काम न लगे तुझ्या चित्तीं । दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो ॥१॥ सर सर परती झालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड । व्याली माय ते लाजविली रांड । नाहीं थारा दो ठायीं झाला खंड वो ॥२॥ होतें तैसें ते उमटलें वरी । बाह्य संपादणी अंतरींची चोरी । नाहीं मर्यादा निःसंग बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ॥३॥ नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें । नाहीं अचळ सावरावा ठावें । देखों उदासीन तुझे गे देहभाव वो ॥४॥ कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोंवतीं बहुत । दोघे एकवत बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ॥५॥ करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी

सासुसुना। परा भक्ति हे शुद्ध तुम्ही जाणा। तुका म्हणे ऐसें कळों यावें या जना वो ॥६॥

३७७३. भरिला उलंडूनी रिता करी घट। मीस पाणियाचें गोविंदाची चट। चाले झडझडां उसंतूनी वाट। पाहे पाळतूनी उभा तोंचि नीट वो ॥१॥ चाळा लावियेला गोप गोपीनाथें। जाणे आवडीचें रूप जेथें तेथें। दावी बहुतांच्या बहुवेषपंथें। गुणातीतें खेळ मांडियेला येथें वो ॥२॥ मनीं आवडे तें करावें उत्तर। कांहीं निमित्ताचा पाहोनी आधार। उगा राहे कां मारिसी कंकर। मात वाढविसी उत्तरा उत्तर वो ॥३॥ धरिली खोडी दे टाकोनियां मागें। न ये विनोद हा कामा मशीं संगें। मिठी घालीन या जीवाचिया त्यागें। नाहीं ठाउकीं पडिलीं तुझीं सोंगें वो ॥४॥ सुख अंतरींचें बाह्य ठसठसी। म्हणे विनोद हा काय सोंग यासी। तुज मज काय सोयरीक ऐसी। नंदानंदन या थोरपणें जासी रे ॥५॥ करी कारण तें कळों नेदी कोणा। सुख अंतरींचें बाह्य रंग जना। मन मिनलें रे तुका म्हणे मना। भोग अंतरींचा पावे नारायणा वो ॥६॥

३७७४. आजी नवल मी आलें येणें रानें। भेटी अवचिती नंदाचिया कान्हें। गोवी सांगती वो सकळ ही जन। होतें संचित आणियेलें तेणें वो ॥१॥ गेलें होऊनी न चले आतां कांहीं। साद घालितां जवळी दुजें नाहीं। अंगीं जडला मग उरलें तें काई। आतां राखतां गुमान भलें बाई वो ॥२॥ बहुत कामें मज नाहीं आराणूक। एक सारितां तों पुढें उभें एक। आजी मी टाकोनी आलें सकळीक। तंव रचिलें आणीक कवतुक वो ॥३॥ चिंता करितां हरिली नारायणें। संतसंगें मिनता दोघेजणें। सुखें निर्भर झालियें त्याच्या गुणें। तुका म्हणे खुंटलें येणें जाणें वो ॥४॥

३७७५. मैं भुली घरजानी बाट। गोरस बेचन आयें हाट ॥१॥ कान्हा रे मनमोहन लाल। सबही बिसरूं देखें गोपाल ॥२॥ काहां पग डारूं देखे आनेरा। देखें तो सब वोहिने घेरा ॥३॥ हुं तों थकित भइरे तुका। भागा रे सब मनका धोका ॥४॥

३७७६. हरिबिन रहियां न जाये जिहिरा। कबकी ठाडी देखें राहा ॥१॥ क्या मेरे लाल कवन चुकी भई। क्या मोहिपासिती बेर लगाई ॥२॥ कोई सखी हरी जावे बुलावन। वार हि डारूं उसपर तन ॥३॥ तुका प्रभु कब देखें पाऊं। पासीं आऊं फेर न जाऊं ॥४॥

३७७७. भलो नंदाजीको डिकरो। लाज राखीलीन हमारो ॥१॥ आगळ आवो देवजी कान्हा। मैं घर छोडी आये मान्हा ॥२॥ उनसुं कलना नव्हे तो भला। खसम अहंकार दादुला ॥३॥ तुका प्रभु परबली हरी। छेपी आहे हुं जगाथी न्यारी ॥४॥

३७७८. नका कांहीं उपचार माझ्या शरीरा। करूं न साहावे मज बहु होतो उबारा। मनोजन्य व्यथा वेध झाला अंतरा। लवकरी आणा नंदाचिया कुमरा वो ॥१॥ सखिया वेशिया तुम्ही प्राणवल्लभा। निवेदिला भाव आर्तभूत या लोभा। उमटली अंगीं वो सांवळी प्रभा। साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा वो ॥२॥ कळों नेदावी हें दुजियासी मात। घडावा तयासी

उत्कंठा एकांत। एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त। कोण्या काळें नेणों होईल भाग्य उदित वो ॥३॥ स्वाद सीण देहभान निद्रा खंडण। पाहिले तातस्थ उन्मळित लोचन। अवघें वोसाऊन उरले ते चरण। तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन वो ॥४॥

३७७९. पडिली भुली धांवती सैराट। छंद गोविंदाचा चोजविती वाट। मागें सारुनी सकळ बोभाट। वंदीं पदांबुजें ठेवूनी ललाट वो ॥१॥ कोणी सांगा या गोविंदाची शुद्धि। होतें वाहिलें लपाला आतां खांदीं। कोठें आड आली हे देहबुद्धि। धांवा आळवा करुणा कृपानिधि वो ॥२॥ मागें बहुतांचा अंतरला संग। मुळें जयाचिया तेणें केला त्याग। पैल पाहातां तें हरपलें अंग। खुंटली वाट नाहींसें झालें जग वो ॥३॥ शोक वियोग घडला सकळांचा। गेल्या शरण हा अन्याय आमुचा। केला उच्चार घडल्या दोषांचा। झाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ॥४॥

३७८०. काय उणें कां करितोसी चोरी। किती सांगों तूं नाइकसी हरी। परेपरता तूं पळोनी जासी दुरी। अनावर या लौकिका बाहेरी वो ॥१॥ माया करुणा हे करिते बहुत। किती सोसूं या जगाचे आघात। नपुरे अवसरु हेंचि नित्यानित्य। तूंचि सोडवीं करूनी स्थिर चित्त वो ॥२॥ बहुत कामें मी गुंतलियें घरीं। जासी डोळा तूं चुकवूनी हरी। करितां लाग न येसी चपळ भारी। नाहीं सायासाची उरों दिली उरी वो ॥३॥ तुज म्हणीयें मी न संगें अनंता। नको जाऊं या डोळियां परता। न लगे जोडी हे तुजविण आतां। तुकया स्वामी कान्होबा गुणभरिता वो ॥४॥

३७८१. आलिये धांवती धांवती भेट होईल म्हूण। तंव ते टळली वेळ वो माझा उरला सीण ॥१॥ आतां काय करूं सांगा वो मज भेटेल कैसा। हरिलागीं प्राण फुटे वो थोरी लागली आशा ॥२॥ लाविती उशीर बहु ओढिती ओढा। सांभाळितां सांग असांग दु:ख पावल्यें पीडा ॥३॥ जळो आतां संसारु वो कईं शेवट पुरे। तुकयाच्या स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ॥४॥

३७८२. घाली कवाड टळली वाड राती। कामें व्यापिली कां पडिली दुश्चिती। कोणे लागला गे सदैवेचे हातीं। आजी शून्य शेजे नाहीं दिसे पति वो ॥१॥ बोले दूतिकेशीं राधा हें वचन। मशीं लाघव दाखवी नारायण। म्हणे कोमळ परी बहु गे निर्गुण। याशीं न बोलें कळला मज पूर्ण वो ॥२॥ धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता। तैं पाचारिलें होउनि ये वो सीता। लाजिन्नली रूप न ये पालटितां। झाला भीमकी आपण राम सीता वो ॥३॥ सत्यभामा दान करी नारदासी। तैं कळला वो मज हृषीकेशी। तुळे घालितां वो न ये कनक रासी। सम तुकें एक पान तुळसी वो ॥४॥ मज भुली पडली कैशापरी। आम्हां भोगूनी म्हणे मी ब्रह्मचारी। दिली वाट यमुने माये खरी। तुम्हां आम्हां न कळे अद्यापवरी वो ॥५॥ जाणे जीवींचें सकळ नारायण। असे व्यापूनी परि न दिसे लपून। राधा संबोखिली प्रीती आळिंगून। तुका म्हणे येथें भावचि कारण वो ॥६॥

३७८३. मिळोनी गौळणी देती यशोदे गान्हाणीं। दहीं दूध तूप लोणी शिंका नुरेचि कांहीं।

मेळवूनी पोरें तेथें रिघे एकसरें वेगीं आणोनी सामोरें तेथें लोणी खाय ॥१॥ हरि सोंकला वो हरि सोकला वो । सोकला तो वारी तुज लाज नाहीं तरी । आम्हां सांपडतां उरी तुज मज नाहीं ॥२॥ तुज वाटतसे कोड यासी लागतसे गोड । काय हांसतेसी वेड तुज लागलें वो । आम्ही जाऊं तुजवरी पोरें चाळविल्या पोरी । काय सांगों भांडखोरी लाज वाटे आम्हांसी ॥३॥ मुख मळिण वदन उभा हाडतिये घोणे । तंव दसवंती म्हणे आणा शीक लावूं । थोर आणिला कांटाळा घरीं दारीं लोकपाळां । डेरा रिघोनि घुसळा तेथें लोणी खाय ॥४॥ मिळोनीयां सकळा दावें लावूनियां गळा । कैशा बांधिती उखळा येथें राहे उगा । बरा सांपडलासी हरी आजिच्यानें करिसिल चोरी । डोळे घालूनियां येरी येरीकडे हांसे ॥५॥ फांकल्या सकळा उपडूनियां उखळा । मोडी वृक्ष विमळार्जुन दोन्ही । उठिला गजर दसवंती नव्हे धीर । धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं ॥६॥

३७८४. आंत हरि बाहेर हरि । हरिनें घरीं कोंडिलें ॥१॥ हरिनें कामा घातला चिरा । वित्तवरा मुकविलें ॥२॥ हरिनें जीवें केली साटी । पाडिली तुटी सकळांसी ॥३॥ तुका म्हणे वेगळा नव्हे । हरि हा भोंवे भोंवताला ॥४॥

३७८५. हरिनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें ॥१॥ आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ॥२॥ पारखियासी सांगतां गोष्टी । घरची कुटी खातील ॥३॥ तुका म्हणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं परतूनी ॥४॥

३७८६. बाळपणीं हरी । खेळे मथुरेमाझारीं । पायीं घागरीया सरी । कडदोरा वांकी । मुख पाहे माता । सुख न समाये चित्ता । धन्य मानवे संचिता । वोढवलें आजी ॥१॥ बाळ चांगलें वो । बाळ चांगलें वो । म्हणतां चांगलें । वेळ लागे तया बोलें । जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ॥२॥ मिळोनियां याती । येती नारी कुमरी बहुती । नाहीं आठव त्यां चित्तीं । देहभाव कांहीं । विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेंकुरें । धाक सांडोनियां येरें । ताहान भूक नाहीं ॥३॥ एकी असतील घरीं । चित्त तयापासीं परी । वेगीं करोनी वोसारी । तेथें जाऊं पाहे । लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज । सुख सांडोनियां सेज । तेथें धांव घाली ॥४॥ वेधियेल्या बाळा । नर नारी या सकळा । बाळा खेळती अबला । त्याही विसरल्या । कुमर कुमरी । नाहीं भाव हा शरीरीं । दृष्टी न फिरे माघारी । तया देखतां ही ॥५॥ वैरभाव नाहीं । आप पर कोणी कांहीं । शोक मोह दुःख ठायीं । तया निरसलीं । तुका म्हणे सुखी । केलीं आपणासारिखीं । स्वामी माझा कवतिकीं । बाळवेषें खेळे ॥६॥

३७८७. होतें बहुत दिवस मानसीं । आजी नवस फळले नवसीं । व्हावी भेटी ते जाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसीं वो ॥१॥ स्थिर स्थिर मजसि साहे करा । बहु कष्ट सोसिल्या येरझारा । येथें आड मज न साहावे वारा । देऊनि कपाट आलें तें दुसरें वारा वो ॥२॥ मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदी वेगळें होऊं एकी घडी । नाहीं लौकिक स्मरला आवडी ।

आतां येणें काळें या लोभें वेडी वो ॥३॥ उदयीं उदयो साधिला अवकाश । निश्चिंतीनें निश्चिंती सावकाश । धरिये गोडी बहुत आला रस । तुका म्हणे हा मागुता न ये दिवस वो ॥४॥

३७८८. एकली राना गोविंदा सवें । गेलें ठावें तें झालें ॥१॥ मज न म्हणा न म्हणा शिंदळी । नाहीं विषम जवळी आतळलें ॥२॥ नव्हती देखिली म्यां वाट । म्हणोनी हा धीट संग केला ॥३॥ सलगी धरी पयोधर । साहाते कुरमुर सवें ॥४॥ भेणें मिठी दिधली गळां । सेजेजवळा दडालें ॥५॥ आहेव मी गर्भीणपणें । हें सांगणें कां लागे ॥६॥ तुका म्हणे सेवटा नेलें । संपादिलें उभयतां ॥७॥

३७८९. गोरस घेऊनी सातें निघाल्या गौळणी । तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें । झाला पानसरा मिठी घातली पदरा । आधीं दान माझें सारा मग चाला पंथें ॥१॥ सर जाऊं दे रे । सर जाऊं दे रे । सर जाऊं दे परता । मुळीं भेटलासी आतां । नाट लागलें संचिता । खेपा खुंटलिया ॥२॥ आसुडी पदरा धरी आणीक दुसरा । येरी झोंबतील करा काय वेडा होसी । आलों गेलों बहु वेळां नेणों गोरा कीं सांवळा । सर परता गोवळा काय बोलतोसी ॥३॥ आम्ही तेथें अधिकारी मागें केली तुम्हीं चोरी । आतां कळलियावरी मागें केलें तयाचें । बोलिल्या हांसुनी आम्ही सासुरवासिनी । कां रे झोंबसी दुरूनी करी मात कांहीं ॥४॥ वांयां परनारी कैसा धरिसी पदरीं । तयां कळलिया उरी तुज मज नाहीं । जडला जिव्हारीं फांको नेदी तया नारी । जेथें वर्म तेथें घरी जाऊं पाहे तियेचें ॥५॥ तया हातीं सांपडल्या हाटीं पाटीं चुकविल्या । कृष्णमिळणीं मिळाल्या त्याही न फिरती । तुका म्हणे खंती वांयां न धरावी चित्तीं । होतें तुमच्या संचितीं वोढवलें आजी ॥६॥

३७९०. हरी तुझी कांति रे सांवळी । मी रे गोरी चांपेकळी । तुझ्या दर्शनें होइन काळी । मग हें वाळी जन मज ॥१॥ उगला राहें न करीं चाळा । तुज किती सांगों रे गोवळा । तुझा खडबड कांबळा । अरे नंदबाळा आलगटा ॥२॥ तुझिये अंगीं घुरट घाणी । बहु खासी दूध तूप लोणी । घरिचें बाहेरिल आणोनी । मी रे चांदणी सुकुमार ॥३॥ मज ते हांसतील जन । धि:कारिती मज देखोन । अंगींचें तुझें देखोनी लक्षण । मग विटंबणा होईल रे ॥४॥ तुज तंव लाज भय शंका नाहीं । मज तंव सज्जन पिशुन व्याही । आणीक मात बोलूं कांहीं । कसी भीड नाहीं तुज माझी ॥५॥ वचन मोडी नेदी हात । कळलें न साहेची मात । तुकयास्वामी गोपीनाथ । जीवन्मुक्त करूनी भोगी ॥६॥

३७९१. सात पांच गौळणी आलिया मिळोनि यशोदे गान्हाणें देती कैसें । काय व्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळेंचि कैसें । दहीं दूध तूप लोणी शिंकां नुरेचि कांहीं कवाड जैसेंची तैसें । चाळवूनी नाशिलीं कन्याकुमरें आमुच्या सुनांसी लाविलें पिसें गे बाइये ॥१॥ अझुनी तरी यासी सांगे बरव्या परी । नाहीं तरी नाहीं उरी जीवेसाटी । मिळोनी सकळ जणी करूं

वाखा । सेखीं तुज मज होईल तुटी गे बाइये ॥२॥ नेणे आपपर लौकिक वेव्हार । भलते ठायीं भलतें करी । पाळतुनी घरीं आम्ही नसतां । तेथें आपण संचार करी । सोगया चुंबन देतो आळिंगन । लोळे आमुच्या सेजाबाजावरी । शिंकीं कडाडा फोडी गोरसाचे डेरे धरितां न सांपडे करीं गे बाइये ॥३॥ आतां याची चाड नाहीं आम्हां भीड । सांपडतां कोड पुरवूं मनींचें । सोसिलें बहु दिस नव्हता केला निस म्हणुनि एकुलतें तुमचें । चरण खांबीं बांधेन जीवें सरिसा जव न चले कांहीं याचें । अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा । भलतें हो या जिवाचें गे बाइये ॥४॥ घेउनी जननी हातीं चक्रपाणी देतसे गौळणी वेळोवेळां । निष्ठुर वाद झणीं बोलाल सकळा । क्षोभ जाइल माझ्या बाळा । जेथें लागे हात वाढतें नवनीत अमृताच्या कल्लोळा । देखोनि तुकयास्वामी देश देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ॥५॥

३७९२. विरहतापें फुंदे छंद करित जाती । हा गे तो गे सावधान सवेंचि दुश्चिती । न सांभाळुनि अंग लोटी पाहे भोंवतीं । वेगळीच पडों पाहे कुळाहुनि याती वो ॥१ । खुंटलीसी झाली येथें अवघियांची गती । आपले परावे कोण नेणें भोंवतीं । त्यांच्या नांवें बोभे बोभे हाहो श्रीपती । नवलाव हा येरां वाटोनियां हांसती ॥२॥ बाहेरीच धांवे रानां न धरीच घर । नाकळे बंधना झाला तेणें संचार । विसरूनी गेली सासुरें कीं माहेर । एक अवलोकी एका पडिला विसर ॥३॥ तुका म्हणे तुम्ही अवघ्या राहा निश्चळा । नये आतां येऊं येथें सर्वथा बळा । त्याचा त्याच्या मुखें अवघियांचा निर्वाळा । बहुतां मतें येथें तर्कवाद निराळा वो ॥४॥

३७९३. ये रे कृष्णा खुणाविती खेळों भातुकें । मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें । कळों नेदी माया त्यासचि तें ठाऊकें । खेळतोंसे दावी लक्षलक्षापें मुकें ॥१॥ अखंडित चटे त्यांनीं लावियेला कान्हा । आवडे तया ते संकल्प वहाती मना । काया वाचा मनें रूपीं गुंतल्या वासना । एकांताचें सुख जाती घेउनियां राना ॥२॥ अवघियांचा जाणें झाला मेळासा हरी । मिळोनियां जावें तेथें तया भीतरी । कळों नेदी घरिंच्या करी गोवूनियां चोरी । हातोहातें नेती परेपरत्या दुरी ॥३॥ आनंदें निर्भर आपणाशीं आपण । क्रीडतील बाळा त्यजिलें पारखें जन । एकाएकीं तेथें नाहीं दुसरें भिन्न । तुका म्हणे एका नारायणावांचून ॥४॥

३७९४. खेळतां मुरारी जाय सरोवरातिरीं । तंव नग्नचि नारी तेथें देखियेल्या । मांडिलें विंदान ख्याल सुखाचें संधान । अंग लपवूनी मान पिलंगत चाले ॥१॥ ख्याल मांडिला रे ख्याल मांडिला रे । पायां पडतां न सोडी नेदी साउलां रे ॥२॥ साड्या साउलीं पातळें गोंडे कसणियाच्या चोळ्या । बुंथी घेउनी सकळां कळंबावरी पळे । खांदी घालूनियां करीं दृष्टि घालोनि सामोरी । बैसे पाला ओढी वरी खदखदां हांसे ॥३॥ आनंदें कल्लोळा बाळा खेळती सकळा । देती उलटिया चपळा एकी एकीहूनी । म्हैस वेले सुरकाडी एकी नागविती कोडीं । नाना

परीच्या विकडी खेळ मांडियेला ॥४॥ एकी आलिया बाहेरी पाहे लुगडें तंव नारी । म्हणे नाहीं नेलें चोरी काय जाणों केव्हां । केला सकळीं हाकारा तंव आलिया बाहेरा । आतां म्हणतील घरा जावे कैशा परी ॥५॥ तंव हांसे वनमाळी वरी पाहोनी सकळी । लाजा रिघालिया जळीं मागें पुढें हात । लाज राखावी गोपाळा आम्हां जणींची सकळां । काय मागसी ये वेळां देऊं गुळवाटी ॥६॥ जोडोनियां कर या गे सकळी समोर । वांयां न बोलावें फार बडबड कांहीं । भातुकें भूषण नाहीं चाड नेघें धन । करा एक चित्त मन या गे मजपाशीं ॥७॥ एक एकीकडे पाहे लाज सोंडूनियां राहे । म्हणे चला आतां सये जाऊं तयापाशीं । जोडोनियां हात कैशा राहिल्या निवांत । तुका म्हणे केली मात लाज राखिली तयांची ॥८॥

३७९५. धरिला पालव न सोडी माझा येणें । कांहीं करितां या नंदाचिया कान्हें । एकली न येतें मी ऐसें काय जाणें । कोठें भरलें या अवघड रानें रे ॥१॥ सोडीं पालव जाऊं दे मज हरी । वेळ लागल्या रे कोपतील घरीं । सासू दारुण सासरा आहे भारी । तुज मज सांगतां नाहीं उरी रे ॥२॥ सखया वेशिया होत्या मजपाशीं । तुज फावलें रे फांकता तयांसी । होतें अंतर तईं सांपडतें कैसी । एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥३॥ ऐसी भागली हे करितां उत्तर । शक्ति मावळल्या आसुडितां कर । स्वामी तुकयाचा भोगिया चातुर । भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार वो ॥४॥

३७९६. गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणिया मिळोनि जगजेठी । चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं । चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ॥१॥ ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी । चित्त विव्हळतें देखावया हरी । मिस पाणियाचें करितील घरीं । बारा सोळा मिळोनि परस्परीं वो ॥२॥ चिरें चोळिया त्या धुतां विसरती । ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्तीं । कोणा नाठवे हा कोण कुळ याती । झाल्या तटस्थ सकळां नेत्रापातीं वो ॥३॥ दंतधावनाचा मुखामाजी हात । वाद्यें वाजती नाइके जनमात । करी श्रवण श्रीकृष्णवेणुगीत । स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ॥४॥

३७९७. कोठें मी तुझा धरूं गेलें संग । लावियेलें जग माझ्या पाठीं ॥१॥ सर सर रे परता अगुणाच्या गोवळा । नको लावूं चाळा खोटा येथें ॥२॥ रूपाच्या लावण्यें नेली चित्त वृत्ति । न देखें भोंवती मी ते माझी ॥३॥ तुकयाचा स्वामी माझे जीवींच बैसला । बोलींच अबोला करूनियां ॥४॥

३७९८. गोड लागे परी सांगतांचि नये । बैसे मिठी सये आवडीची ॥१॥ वेधलें वो येणें श्रीरंगरंगें । मी हे माझीं अंगें हारपलीं ॥२॥ परतेचि ना दृष्टि बैसली ते ठायीं । विसावोनी पायीं ठेलें मन ॥३॥ तुकयाच्या स्वामीसवें झाली भेटी । तेव्हां झाली तुटी मागिलाची ॥४॥

३७९९. पाहावया माजी नभा । दिसे शोभा चांगली ॥१॥ बैसला तो माझे मनीं । नका कोणी लाजवूं ॥२॥ जीवीं आवडे जीवाहूनी । नव्हे क्षण वेगळा ॥३॥ झालें विश्वंभरा ऐसी ।

तुकया दासी स्वामीची ॥४॥

३८००. कोणी एकी भुलली नारी । विकितां गोरस घ्या म्हणे हरी ॥१॥ देखिला डोळां बैसला मनीं । तोचि वदनीं उच्चारीं ॥२॥ आपुलियाचा विसरभोळा । गोविंद कळा कौतुकें ॥३॥ तुका म्हणे हांसे जन । नाहीं कान ते ठायीं ॥४॥

३८०१. करूनी आइती सत्यभामा मंदिरीं । वाट पाहे तंव टळोनी गेली रात्री । न येतां देव येती कामलहरी । पडिली दुश्चिती तंव तो कवाड टिमकारी वो ॥१॥ सर परता कळला तुझा भाव । कार्यापुरतें दाविसी लाघव । बोल बोलतोसी ते अवघी तुझी माव । जाणोनी आलासी उजडता समयो रे ॥२॥ मीच वेडी तुजलागी बोल नाहीं । दानावेळे विटंबना झाली काई । मागुती रुद्रासी भेटी दिली तईं । विश्वास तो तुझ्या बोला अझूनी तरी नाहीं रे ॥३॥ भ्रम होता तो अवघा कळों आला । मानवत होतें मी भला भला । नष्टा क्रिया नाहीं मा तुझिया बोला । तुकयाबंधु स्वामी कानड्या कौसाल्या रे ॥४॥

३८०२. तंव तो हरि म्हणे निजांगने वो । लइ नीच कां देसील दोहणे वो । मजपें दुजें आलें तें देव जाणें वो । शब्द काय बोलसील ते उणे वो ॥१॥ पाहा मनीं विचारूनी आधीं वो । सांडूनि देह भ्रांति करीं स्थिर बुद्धि वो । तंट केलें हें माझें तुझें उपाधि वो । उघडीं डोळे अझुनी तरी धरीं शुद्धि वो ॥२॥ कोठें तरी दुनियांत वर्तलें वो । स्त्रियांनी भ्रतारा दानासी दिलें वो । कैसा मी भला नव्हे तें सोसिलें वो । रुससी तें तूं उरफाटें नवल झालें वो ॥३॥ काय सांग म्यां दैन्य केली कैसी वो । तुझ्या गर्वें आणिलें हनुमंतासी वो । कष्टी केलें मज गरुडा भीमकेसी वो । तुकयाबंधु म्हणे खरें खोटें नव्हे यासी वो ॥४॥

३८०३. तंव ते म्हणे ऐका हृषीकेशी वो । नावाजलें तुम्ही म्हणा आपणांसी वो । तरी कां वंचनुक सुमनासी वो । नट नाट्य बरें संपादूं जाणसी वो ॥१॥ सर परता आतां वो हरी । म्हणे सत्राजिताची कुमरी । जाणतें मी या शब्दाच्या कुसरी । ऐसेंच करून ठकविलें आजीवरी वो ॥२॥ भावें गेलें म्हूण न व्हावा वियोग । मनींचें आर्त जन्मांतरीं व्हावा संग । तंव त्वां केलें पाटमोरे हें जग । ऐसें काय जाणें वो तुझे रंग ॥३॥ काय करूं मज या नागविलें कामें । लागलें तयास्तव इतुकें सोसावें । नाहीं तरी कां नव्हती ठायीं तुझीं वर्में । परद्वारींसा हाकलिती प्रसिद्ध नामें वो ॥४॥ काय किती सांगावे तुझे गुण । न फुटे वाणी ऐसा निष्ठुर निर्गुण । आप पर न म्हणसी माय बहीण । सासुसुनांस लावूनी पाहासी भांडण वो ॥५॥ इतुकियावरी म्हणे वैकुंठींचा राणा । होऊन गेलें तें नये आणूं मना । आतां न करीं तैसें करी क्रिया आणा । भक्तवत्सल म्हणे तुकयाबंधु कान्हा वो ॥६॥

३८०४. कान्हो ऐकली रे तुजसवें चुकलें रे । भय वाटे जनी मज अबळा धाकली रे ॥१॥

निघतां घरीं आई बा वारी । तुजसवें कां आलियें हरी ॥२॥ लोक वाटा सांगती खोटा । परी मी चटा लागलियें ॥३॥ पिकल्या बोरी झालें सामोरी । काय जाणों कोठें राहिला हरी ॥४॥ आड खुंटा झालिया जाळी । काय जाणो कान्हें मांडिली रळी ॥५॥ तुका म्हणे जाऊं आलिया वाटा । पाहों हरी पायीं न मोडें कांटा ॥६॥

३८०५. क्याला मज आयो वारितेसी घरा । खेळतों सोकरा नंदाचा मी ॥१॥ बहु दिसीं झाली यासीं मज भेटी । आतां वाटे तुटी न परावी ॥२॥ कोवळें बोलतो मना आवरतें । डोळियाचें पातें ढापवेना ॥३॥ आजी सकळांसी आलें चोलूनियां । कां गो पाठी वांयां पुलविली ॥४॥ तुमचें तें काय खोलंबलें काज । बल्या कां गो मज कोंडा घरीं ॥५॥ तुकयाचा धनी वैकुंठनायक । सरा कांहीं एक बोलतों मी ॥६॥

३८०६. आतां न यें मागें । मी आलें याच्या रागें । काय माझें जगें । कोपोनियां करावें ॥१॥ कां गो कलित्या कोल्हाळा । तुम्ही भलत्याच सकळ । वेचाल ते बोल । झुटे होती बोलिले ॥२॥ याचे भेटी माझें मन । स्वरूपीं ठाकले लोचन । वेगळें तें क्षण । आतां होऊं नावरे ॥३॥ काज काम नको झालें । बीजें नावरे बोलिलें । याचिया भेदिलें । कामबाणें अंतर ॥४॥ या वेगळें होणें । आतां जळो तैसें जिणें । घेतलें तें मनें । आतां मागें न फिरे ॥५॥ आतां मोटी वार । माझी नका धरूं चार । सवें तुकयाचा दातार । शेजे तो मी सुतलों ॥६॥

३८०७. हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ॥१॥ अवघ्या अंगें सर्वोत्तम । भोगी काम भोगता ॥२॥ वाचा वाच्यत्वासी न ये । कोठें काय करावें ॥३॥ तुका म्हणे देवा ऐशा । देवपिशा उदारा ॥४॥

३८०८. गौळणी आल्या वाज । म्हणती या गे राखों आज । सांपडवूनी माज । घरांत धरूं कोंडुनी ॥१॥ उभें कवाड । उभ्या काळोशाचे आड । साता पांचा एक भीड । मौनेंची ठेल्या ॥२॥ नित्य सोंकवला । नेदी सांगो चित्त बोला । आतां सांपडतां याला । कोण सोडी जीवें ॥३॥ जाणोनियां हरी । त्याच घरा आला चोरी । गडियां ठेवूनी बाहेरी । पूर्वद्वारें शिरे ॥४॥ त्यांच्या भयाभीत चाले । पिलंगत भोंवतालें । पाहें तंव देखियेलें । नवनीत पुढें ॥५॥ उतरोनी सिंकें । पाहे चाखोनियां निकें । गोड तेंचि एका एकें । हातीं लांबवितो ॥६॥ जाणे राखती तयांसी । तेथें अधिकचि नासी । माग लावी हात पुसी । चोरी जाणावया ॥७॥ जाणोनियां नारी । मूळ वर्मद्वार धरी । माज कोंडुनी भीतरी । घरांत धरियेला ॥८॥ कां रे नागविसी । माझे मुळीं लागलासी । आतां आणवीन तुजपाशीं । मागें खादलें तें ॥९॥ दोहीं संधी बाहे । धरूनी नेती माते पाहे । काय नासी केली आहे । घरामाजी येणें ॥१०॥ तुका म्हणे मुख । त्याचें वाटों नेदी दुःख । दसवंती कवतुक । करूनी रंजविल्या ॥११॥

[बाळक्रीडेचे अभंग]

३८०९. देवा आदिदेवा जगत्रया जीवा । परियेसी केशवा विनंती माझी ॥१॥ माझी वाणी तुझे वर्णी गुण नाम । ऐसें देईं प्रेम कांहीं कळा ॥२॥ कळा तुजपाशीं आमुचें जीवन । उचित करून देईं आम्हां ॥३॥ आम्हां शरणागतां तुझाचि आधार । तूं तंव सागर कृपासिंधु ॥४॥ सिंधु पायवाट होय तुझ्या नामें । जळतील कर्में दुस्तरें तीं ॥५॥ तें फळ उत्तम तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ॥६॥ सेविलिया रामकृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ॥७॥ संसार तो काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ॥८॥ क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥९॥ करीं ब्रीद साचें आपलें आपण । पतितपावन दीनानाथ ॥१०॥ नाथ अनाथाचा पति गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ॥११॥ चित्तीं जें धरावें तुका म्हणे दासीं । पुरविता होशी मनोरथ ॥१२॥

३८१०. मनोरथ जैसे गोकुळींच्या जना । पुरवावी वासना तयापरी ॥१॥ रीण फेडावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ॥२॥ सीण जाला वसुदेवदेवकीस । वधी बाळें कंस दुराचारी ॥३॥ दुराचारियासी नाहीं भूतदया । आप पर तया पाप पुण्य ॥४॥ पुण्यकाळ त्याचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भा देव आले ॥५॥ गर्भासी तयांच्या आले नारायण । तुटली बंधनें आपोआप ॥६॥ आपोआप बेड्या तुटल्या शृंखळा । बंदाच्या आर्गळा कुलुपें कोंडें ॥७॥ कोंडमारा केला होता बहु दिस । सोडवी निमिष नलगतां ॥८॥ न कळे तो तया सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ॥९॥ नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं झाला गोवा सवें देव ॥१०॥ सवें देव तया आड नये कांहीं । तुका म्हणे नाहीं भय चिंता ॥११॥

३८११. चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरी केला देवें ॥१॥ देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा देव आले ॥२॥ आले अविनाश धरूनी आकार । दैत्यांचा संहार करावया ॥३॥ करावया भक्तजनांचें पाळण । आले रामकृष्ण गोकुळासी ॥४॥ गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर ते लोक घरोघरीं ॥५॥ घरोघरीं झाला लक्षुमीचा वास । दैन्यदारिद्र्यास त्रास आला ॥६॥ आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरा नारीलोकां ॥७॥ लोकां गोकुळींच्या झालें ब्रह्मज्ञान । केलियावांचून जपतप ॥८॥ जपतप काय करावीं साधनें । जे त्या नारायणें कृपा केली ॥९॥ केली नारायणें आपुलीं अंकित । तोचि त्यांचें हित सर्व जाणें ॥१०॥ सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणीक दुसरा नाहीं नाहीं ॥११॥ नाहीं भक्त दुजा तिहीं त्रिभुवनी । एका चक्रपाणीवांचुनी त्यां ॥१२॥ त्याच्या सुखासंगें घेती गर्भवास । तुका म्हणे आस त्यजूनियां ॥१३॥

३८१२. त्यांच्या पूर्वपुण्या कोण लेखा करी । जिहीं तो मुरारी खेळविला ॥१॥ खेळविला

जिहीं अंतर्बाह्यसुखें । मेळवूनि मुखे चुंबन दिलें ॥२॥ दिलें सुख त्यांसी अंतरींचें देवें । जिहीं एका भावें जाणितला ॥३॥ जाणितला तिहीं कामातुरा नारी । कृष्ण भोगावरी चित्त ज्यांचें ॥४॥ ज्यांचें कृष्णीं तन मन झालें रत । गृह परि सुख विसरल्या ॥५॥ विष तयां झालें धन मान जन । वसविती वन एकांत त्या ॥६॥ एकांती त्या जाती हरिसी घेऊनी । भोगइच्छा धणी फेडावया ॥७॥ वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ॥८॥ भोग त्याग दोन्ही नाहीं तयापासीं । तुका म्हणे जैसि स्फटिकशिळा ॥९॥

३८१३. शिळा स्फटिकाची न पालटे भेदें । दाउनियां छंदे जैसी तैसी ॥१॥ जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ॥२॥ फेडावया आला अवघियांची धणी । गोपाळ गौळणी मायबाप ॥३॥ मायबाप सोडविलें बंदीहुनी । चाणूर मर्दनी कंसादिक ॥४॥ अधिक नाहीं देणें अरिमित्रा एक । पूतना कंटक मुक्त केली ॥५॥ मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या रासी पातकांच्या ॥६॥ पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ती द्वेषें चिंता जैसा तैसा ॥७॥ साक्षी तयापाशीं पूर्वील कर्माचा । बांधला सेवेचा ऋणी देव ॥८॥ देव भोळा धांवे भक्ता पाठोपाठी । उच्चारितां कंठीं मागेंमागें ॥९॥ मानाचा कांटाळा तुका म्हणे त्यासी । धांवतो घरासी भाविकांच्या ॥१०॥

३८१४. चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । बांधवी ती हातीं गौळणींच्या ॥१॥ गौळणी त्या गळा बांधिती धारणी । पायां चक्रपाणी लागे तया ॥२॥ तयाघरीं रिघे चोरावया लोणी । रितें पाळतुनी शिरे माजी ॥३॥ माजी शिरोनियां नवनीत खाय । कवाड तें आहे जैसें तैसें ॥४॥ जैसा तैसा आहे अंतर्बाह्यात्कारीं । म्हणउनि चोरी न संपडे ॥५॥ न संपडे तया करितां खटपट । वाउगे बोभाट वर्मावीण ॥६॥ वर्म जाणती त्या एकल्या एकटा । बैसतील वाटा निरोधूनी ॥७॥ निवांत राहिल्या नि:संग होऊनी । निश्चळ त्या ध्यानीं कृष्णध्यानें ॥८॥ न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । धरिती गौळणी भाविका त्या ॥९॥ भाविका तयांसी येतो काकुलती । शहाण्या मरती न संपडे ॥१०॥ नलगे वेचावी टोली धनानांवे । तुका म्हणे भावें चाड एका ॥११॥

३८१५. चाड अन्यायाची धरी नारायण । आपणासमान करी रंका ॥१॥ रंक होती राजे यमाचिये घरीं । आचरणें बरीं नाहीं म्हूण ॥२॥ नसंपडे इंद्रचंद्रब्रह्मादिकां । अभिमानें एका तिळमात्रें ॥३॥ तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ॥४॥ भार पृथिवीचा वाहिला सकळ । जड होती खळ दुष्ट लोक ॥५॥ दुष्ट अभक्त जे निष्ठुर मानसीं । केली हे तयांसी यमपुरी ॥६॥ यमदूत त्यांसी करिती यातना । नाहीं नारायणा भजले जे ॥७॥ जे नाहीं भजले एका भावें हरी । तयां दंड करी यमधर्म ॥८॥ यमधर्म म्हणे तयां दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ॥९॥ चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुम्हां कान डोळे मुख ॥१०॥

कान डोळे मुख संतांची संगती । न धराच चित्तीं सांगितलें ॥११॥ सांगितलें संतीं तुम्हां उगवूनी । गर्भासी येऊनी यमदंड ॥१२॥ दंडूं आम्हीं रागें म्हणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनांचा ॥१३॥ दुर्जनांचा येणें करूनी संहार । पूर्णअवतार रामकृष्ण ॥१४॥ रामकृष्णनामें रंजले जे नर । तुका म्हणे घर वैकुंठीं त्या ॥१५॥

३८१६. वैकुंठींच्या लोकां दुर्लभ हरिजन । तया नारायण समागमें ॥१॥ समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं चित्तवित्तें समर्पिलीं ॥२॥ समर्थ ते गाती हरीचे पवाडे । येर ते बापुडे रावराणे ॥३॥ रामकृष्णें केलें कवतुक गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ॥४॥ गाई चारी मोहोरी पांवा वाहे पाठीं । धन्य जाळी काठी कांबळी ते ॥५॥ काय गौळियांच्या होत्या पुण्यरासी । आणिक त्या म्हैसी गाई पशु ॥६॥ सुख तें अमुप लुटिलें सकळीं । गोपिका गोपाळीं धणीवरी ॥७॥ धणीवरी त्यांसी सांगितली मात । ज्याचें जैसें आर्त तयापरी ॥८॥ परी याचें तुम्ही आइका नवल । दुर्गम जो खोल साधनासी ॥९॥ शिक लावूनियां घालिती बाहेरी । पाहातां भीतरी सवेंची तो ॥१०॥ तोंडाकडे त्यांच्या पाहें कवतुकें । शिव्या देतां सुखें हांसतसे ॥११॥ हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां जपध्यानीं न बोले तो ॥१२॥ तो जें जें करी तें दिसे उत्तम । तुका म्हणे वर्म दावी सोपें ॥१३॥

३८१७. वर्म दावी सोपें भाविकां गोपाळां । वाहे त्यांच्या गळां पाले माळा ॥१॥ मान देती आधीं मागतील डाव । देव तें गौरव सुखें मानी ॥२॥ मानती ते मंत्र हमामा हुंबरी । सिंतोडिती वरी स्नान तेणें ॥३॥ वस्त्रें घोंगडिया घालूनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥४॥ तिहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे गोधना वळतियां ॥५॥ त्यांच्या वचनाचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरीं कवळ मागें ॥६॥ त्यांचिया मुखींचें हरोनियां घ्यावें । उच्छिष्ट तें खावें धणीवरी ॥७॥ वरी माथां गुंफे मोरपिसांवेटी । नाचे टाळी पिटी त्यांच्या छंदें ॥८॥ छंदें नाचतील जयासवें हरी । देहभाव वरी विसरली ॥९॥ विसरली वरी देहाची भावना । तेचि नारायणा सर्वपूजा ॥१०॥ पूजा भाविकांची न कळतां घ्यावी । न मागतां दावी निज ठाव ॥११॥ ठाव पहावया हिंडे मागें मागें । तुका म्हणे संगें भक्तांचिया ॥१२॥

३८१८. भक्तजना दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आळंगिल्या ॥१॥ आळंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या जन्मांतरीं हरि ऋणी ॥२॥ रुसलिया त्यांचें करी समाधान । करविता आपण क्रिया करी ॥३॥ क्रिया करी तुम्हां न वजे पासूनी । अवघिया जणी गोपिकांसी ॥४॥ गोपिकांसी म्हणे वैकुंठींचा पति । तुझी माझ्या चित्तीं सर्वभावें ॥५॥ भाव जैसा तुम्ही माझ्या ठायीं धरा । तैसाच मी खरा तुम्हांलागीं ॥६॥ तुम्हांसी कळों द्या माझा साच भाव । तुमचाचि जीव तुम्हां ग्वाही ॥७॥ ग्वाही तुम्हां आम्हा असे नारायण । आपुलीच आण वाहतसे

॥८॥ सत्य बोले देव भक्तिभाव जैसा । अनुभव सरसा आणूनियां ॥९॥ त्यासी बुझावितो वेगळाल्या भावें । एकींचें तें ठावें नाहीं एकी ॥१०॥ एक क्रिया नाहीं अवघियांचा भाव । पृथक ते देव देतो तैसें ॥११॥ तैसें कळों नेदी जो मी कोठें नाहीं । अवघियांचे ठायीं जैसा तैसा ॥१२॥ जैसा मनोरथ जया चित्तीं काम । तैसा मेघश्याम पुरवितो ॥१॥ पुरविले मनोरथ गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ॥१४॥ गोकुळींच्या लोकां लावियेला छंद । बैसला गोविंद त्यांचें चित्तीं ॥१५॥ चित्तें चोरूनियां घेतलीं सकळा । आवडी गोपाळावरी तयां ॥१६॥ तयांसि आवडे वैकुंठनायक । गेलीं सकळीक विसरोनी ॥१७॥ निंदा स्तति कोणी न करी कोणाची । नाहीं या देहाची शुद्धि कोणा । कोणासी नाठवे कन्या पुत्र माया । देव म्हणुनिया चुंबन देती ॥१९॥ देती टाकूनियां भ्रतारांसी घरीं । लाज ते अंतरीं आथीच ना ॥२०॥ नाहीं कोणा धाक कोणासी कोणाचा । तुका म्हणे वाचा काया मनें ॥२१॥

३८१९. मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास त्या सुना गौळियांच्या ॥१॥ त्यांच्या भ्रतारांचीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें भोग करी ॥२॥ करी कवतुक त्यांचें तयापरी । एका दिसे हरि एका लेंक ॥३॥ एक भाव नाही सकळांच्या चित्तीं । म्हणवूनि प्रीति तैसें रूप ॥४॥ रूप याचें आहे अवघेंचि एक । परि कवतुक दाखविलें ॥५॥ लेंकरू न कळे स्थूळ कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ॥६॥ कवतुक केलें सोंग बहु रूप । तुका म्हणे बाप जगाचा हा ॥७॥

३८२०. जगाचा हा बाप दाखविलें माय । माती खातां जाय मारावया ॥१॥ मारावया तिणें उगारिली काठी । भुवनें त्या पोटीं चौदा देखे ॥२॥ देखे भयानक झांकियेले डोळे । मागुता तो खेळे तियेपुढें ॥३॥ पुढें रिघोनियां घाली गळां कव । कळों नेदी माव मायावंता ॥४॥ मायावंत हरीरूप काय जाणे । माझें माझें म्हणे देवा बाळ ॥५॥ बाळपणीं रिठा दगडिला दाढे । मारियेले गाढे कागबग ॥६॥ गळा बांधूनियां उखळासी दावें । उन्मळी त्या भावेंविमळार्जून ॥७॥ न कळे जुनाट जगाचा जीवन । घातलें मोहन गौळियांसी ॥८॥ सिंकीं उतरूनी खाय नवनीत । न कळे बहुत होय तरी ॥९॥ तरी दुध डेरे भरले रांजण । खाय ते भरून दावी दुणी ॥१०॥ दुणी झालें त्याचा मानिती संतोष । दुभत्याची आस धरूनियां ॥११॥ आशाबद्ध देव असोनि जवळी । नेणती ते काळीं स्वार्थामुळें ॥१२॥ मूळ यांचा देव न कळे तयांसी । चित्त अशापाशीं गोंवियेलें ॥१३॥ लेंकरूं आमुचें म्हणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तोचि भाव ॥१४॥ भाव दावावया चरित्र दाखवी । घुसळितां रवी डेरियांत ॥१५॥ डेरियांत लोणी खादलें रिघोनी । पाहे तों गौळणी हातीं लागे ॥१६॥ हातीं धरूनियां काढिला बाहेरी । देखोनियां करी चोज त्यासी ॥१७॥ सिकवी विचार नेणे त्याची गती । होय कोणे रिती डेरियांत ॥१८॥ यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ॥१९॥ त्यांसी मायामोहजाळ घालीत फांसा । देव आपणसा कळों नेदी ॥२०॥ नेदी भाव राहों लोभिकांचे चित्तीं । जाणतांचि होतीं अंधळीं तीं ॥२१॥ अंधळीं तीं तुका म्हणे संवसारीं ।

जिहीं नाही हरी ओळखिला ॥२२॥

३८२१. ओळखी तयाची होय एका भावें । दुसरीया देवें न पविजे ॥१॥ न पविजे कदा उन्मत्त झालिया । दंभ तोचि वांयां नागवण ॥२॥ वनवास देवाकारणें एकांत । करावीं हीं व्रततपें याग ॥३॥ व्रत याग यांसी फळलीं बहुतें । होतीं या संचितें गौळियांचीं ॥४॥ यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठावें होतें ॥५॥ होतें तें द्यावया आला नारायण । मायबापां ऋण गौळियांचें ॥६॥ गौळियांचें सुख दुर्लभ आणिकां । नाहीं ब्रह्मादिकां तुका म्हणे ॥७॥

३८२२. नेणतियांसाठीं नेणता लहान । थिंकोनी भोजन मागे माये ॥१॥ माया दोनी यास बाप नारायणा । सारखी भावना तयांवरी ॥२॥ तयांवरी त्याचा समचित्त भाव । देवकीवसुदेव नंद दोघे ॥३॥ घेऊनियां एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनी ॥४॥ उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखाची देव अवघियांसीं ॥५॥ यासी दोनी ठाव सारिखे अनंता । आधील मागता वाढला तो ॥६॥ वाढला तो सेवाभक्तिचिया गुणें । उपचारमिष्टान्नें करूनियां ॥७॥ करूनी सायास मेळविलें धन । तेंही कृष्णार्पण केलें तिहीं ॥८॥ कृष्णासी सकळ गाई घोडे म्हैसी । समर्पिले दासीं जीवें भावें ॥९॥ जीवें भावें त्याची करितील सेवा । न विसंबती नांवा क्षणभरी ॥१०॥ क्षणभरी होता वेगळा तयांस । होती कासावीस प्राण त्यांचे ॥११॥ त्यांचे ध्यानीं मनीं सर्वभावें हरि । देह काम करी चित्त त्यापें ॥१२॥ त्याचेंचि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण ॥१३॥ कृष्ण आला घरा कृष्ण गेला दारा । कृष्ण हा सोयिरा भेटों कृष्ण ॥१४॥ कृष्ण गाती ओंव्या दळणी कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती ॥१५॥ कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । देखती त्या स्वप्नीं कृष्णरूप ॥१६॥ कृष्ण त्यांस दिसे आभास दुश्चित्ता । धन्य मातापिता तुका म्हणे ॥१७॥

३८२३. कृष्ण हा परिचारी कृष्ण हा व्यवहारी । कृष्ण घ्यावो नारी आणिकी म्हणे ॥१॥ म्हणे कृष्णाविण कैसें तुम्हां गमे । वेळ हा करमे वांयांविण ॥२॥ वांयांविण तुम्ही पिटितां चावटी । घ्या गे जगजेठी क्षणभरी ॥३॥ क्षणभरी याच्या सुखाचा सोहळा । पाहा एक वेळा घेऊनियां ॥४॥ याचें सुख तुम्हा कळलियावरी । मग दारोदारीं न फिराल ॥५॥ लटिकें हें तुम्हां वाटेल खेळणें । एका कृष्णाविण अवघेंचि ॥६॥ अवघ्याच तुम्ही टाकाल सांगात । घेऊनी अनंत जाल राना ॥७॥ नावडे हें तुम्हां आणीक बोलिलें । मग हें लागलें कृष्णध्यान ॥८॥ न करा हा मग या जीवा वेगळा । टोंकवाल बाळा आणिक ही ॥९॥ आणिक ही तुम्हां येती काकुलती । जवळी इच्छिती क्षण बैसों ॥१०॥ बैसों चला पाहों गोपाळाचें मुख । एकी एक सुख सांगतील ॥११॥ सांगे जंव ऐसी मात दसवंती । तंव त्या धरिती चित्तीं बाळा ॥१२॥ बाळा येती घरा घेऊनियां जाती । नाहीं त्या परती तुका म्हणे ॥१३॥

३८२४. तुका म्हणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासीं खेळतां दिवस गमे ॥१॥ दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहातां मुखासी कृष्णाचिया ॥२॥ याच्या मुखें नये डोळ्यासी वीट । राहिले हे नीट तटस्थचि ॥३॥ तटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रिये व्यापार विसरलीं ॥४॥ विसरलीं तहान भूक घर दार । नाहीं हा विचार असों कोठें ॥५॥ कोठें असों कोण झाला वेळ काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥६॥ विसरल्या आम्ही कोणीये जातीच्या । वर्णाही चहूंच्या एक झाल्या ॥७॥ एक झाल्या तेव्हां कृष्णाचिया सुखें । नि:शंक भातुकें खेळतील ॥८॥ खेळती भातुकें कृष्णाच्या सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ॥९॥ चित्तीं तो गोविंद लटिकें दळण । करिती हें जन करिती तैसें ॥१०॥ जन करीं तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनियां ॥११॥ करूनी आपला अवघा गोविंद । जना साच छंद लटिका त्या ॥१२॥ त्यांणीं केला हरी सासुरें माहेर । बंधु हे कुमर दीर भावें ॥१३॥ भावना राहिली एकाचिया ठायीं । तुका म्हणे पायीं गोविंदाचे ॥१४॥

३८२५. गोविंद भ्रतार गोविंद मूळहारी । नामें भेद परि एकचि तो ॥१॥ एकाचींच नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील मनीं यावें जावें ॥२॥ जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । येथींची सिदोरी तेथें न्यावी ॥३॥ विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोकां ऐसें ॥४॥ लोक करूनियां साच वर्तताती । तैशा त्या खेळती लटिक्याची ॥५॥ लटिकें करिती मंगळदायकें । लटिकींच एकें एकां व्याही ॥६॥ व्याही भाई हरि सोयरा जावयी । अवघियांच्या ठायीं केला एक ॥७॥ एकासीच पावे जें काहीं करिती । उपचार संपत्ति नाना भोग ॥८॥ भोग देती सर्व एका नारायणा । लटिक्या भावना व्याही भाई ॥९॥ लटिकाचि त्यांणीं केला संवसार । जाणती साचार वेगळा त्या ॥१०॥ त्यांणीं मृत्तिकेचें करूनी अवघें । खेळतील दोघे पुरुषनारी ॥११॥ पुरुषनारी त्यांणीं ठेवियेलीं नांवें । कवतुकभावें विचरती ॥१२॥ विचरती जैसे साच भावें लोक । तैसें नाहीं सुख खेळती त्या ॥१३॥ त्यांणीं जाणितलें आपआपणया । लटिकें हें वांयां खेळतों तें ॥१४॥ खेळतों ते आम्ही नव्हों नारीनर । म्हणोनी विकार नाहीं तयां ॥१५॥ तयां ठावें आहे आम्ही अवघीं एक । म्हणोनी नि:शंक खेळतील ॥१६॥ तयां ठावें नाहीं हरीचिया गुणें । आम्ही कोणकोण काय खेळों ॥१७॥ काय खातों आम्ही कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखीं ॥१८॥ मुखीं चवी नाहीं तोंवरी अंगी लाज । वर्ण याती काज न धरिती ॥१९॥ न धरिती कांहीं संकोच त्या मना । हांसता या जना नाइकती ॥२०॥ नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि ध्यानीं मनीं बैसलासे ॥२१॥ बैसलासे हरि जयांचिया चित्तीं । तयां नावडती मायबापें ॥२२॥ मायबापें त्यांचीं नेती पाचारूनी । बळें परि मनीं हरि वसे ॥२३॥ वसतील बाळा आपलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ॥२४॥ गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणीक वाउग्या न बोलती ॥२५॥ न बोलती निजलिया हरिविण । जागृति स्वप्न एक झालें ॥२६॥ एकविध सुख घेतील त्या बाळा । भ्रमर परिमळालागीं जैसा ॥२७॥ जैसा ज्याचा

भाव घेतला त्यांपरी । तुका म्हणे हरि बाळलीला ॥२८॥

३८२६. लीळाविग्रही तो लेववी खाववी । यशोदा बैसवी मांडीवरी ॥१॥ मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनियां करी स्तनपान ॥२॥ नभाचाही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासी ॥३॥ हातें कुर्वाळूनी मुखीं घाली घास । पुरे म्हणे तीस पोट धालें ॥४॥ पोट धालें मग देतसे ढेंकर । भक्तिचें तें फार तुळसीदळ ॥५॥ तुळसीदळ भावें सहित देवा पाणी । फार तें त्याहुनी क्षीरसागर ॥६॥ क्षीराचा कांटाळा असे एक वेळ । भक्तीचें तें जळ गोड देवा ॥७॥ देवा भक्त जिवांहुनी आवडती । सकळहि प्रीति त्यांच्या ठायीं ॥८॥ त्यांचा हा अंकित सर्व भावें हरि । तुका म्हणे करी सर्व काज ॥९॥

३८२७. जियेवेळीं चोरूनियां नेलीं वत्सें । तयालागीं तैसें होणें लागे ॥१॥ लागे दोहों ठायीं करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ॥२॥ माय झाला हरी अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जीची तैसा झाला ॥३॥ झाला तैसा जैसे घरींचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ॥४॥ मोहरी पांवे सिंगें वाहिल्या काहाळा । देखिला सोहळा ब्रह्मादिकीं ॥५॥ ब्रह्मादिकां सुख स्वप्नीं तेंही नाहीं । तैसें दोहीं ठायीं वोसंडलें ॥६॥ वोसंडल्या क्षीर अमुप त्या गायी । जैसी ज्याची आई तैसा झाला ॥७॥ लाघव कळलें ब्रह्मयासी याचें । परब्रह्म साचें अवतरलें ॥८॥ तरले हे जन सकळही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ॥९॥ लागला हे स्तुति करूं अनंताची । चतुर्मुखें वाची भक्तिस्तोत्रें ॥१०॥ भक्तिकाजें देवें केला अवतार । पृथिवीचा भार फेडावया ॥११॥ पृथिवी दाटिली होती या असुरीं । न साहावे वरी भार तये ॥१२॥ तया काकुलती आपल्या दासांची । तयालागीं वेंची सर्वस्वही ॥१३॥ स्वहित दासांचें करावया लागीं । अव्यक्त हें जगीं व्यक्ती आलें ॥१४॥ लेखा कोण करी त्यांचिया पुण्याचा । जयांसवें वाचा बोले हरी ॥१५॥ हरी नाममात्रें पातकांच्या रासी । तो आला घरासी गौळियांच्या ॥१६॥ गौळिये अवघीं झालीं कृष्णमय । नामें लोकत्रय तरतील ॥१७॥ तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यांपाशीं होइल पाप ॥१८॥ पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे । धन्य तोचि पाहे कृष्णमुख ॥१९॥ मुख माझें काय जो मी वर्णूं पार । मग नमस्कार घाली ब्रह्मा ॥२०॥ ब्रह्मा नमस्कार घाली गोधनासी । कळला तयासी हाचि देव ॥२१॥ देवचि अवघा झालासे सकळ । गाई हा गोपाळ वत्सें तेथें ॥२२॥ तेथें जें पाहाणें आणीक दुसरें । मूर्ख त्यानंतरें दुजा नाहीं ॥२३॥ दुजा भाव तुका म्हणे जया चित्तीं । रवरव भोगिती कुंभपाक ॥२४॥

३८२८. कुंभपाक लागे तयासी भोगणें । अवघाचि नेणे देव ऐसा ॥१॥ देव ऐसा ठावा नाहीं जया जना । तयासी यातना यम करी ॥२॥ कळला हा देव तयासीच खरा । गाई वत्सें घरा धाडी ब्रह्मा ॥३॥ ब्रह्मादिकां देव ऐसा अगोचर । कैसा त्याचा पार जाणवेल ॥४॥ जाणवेल देव गौळियांच्या भावें । तुका म्हणे व्हावें संचित हें ॥५॥

३८२९. संचित उत्तम भूमि कसूनियां । जाऊं नेदी वांयां पेरी त्याचें ॥१॥ त्याचिया पिकासी आलिया घुमरी । आल्या गाईवरी आणिक गाई ॥२॥ गाई दडवूनी घालिती बाहेर । तंव म्हणे हरि बांधा त्याही ॥३॥ त्याही तुम्ही बांधा तुमच्या सारिख्या । भोवंडा पारिख्या वाड्यांतुनी ॥४॥ पारिख्या न येती कोणाचिया घरा । सूत्रधारी खरा नारायण ॥५॥ नारायण नांदे जयाचिये ठायीं । सहज तेथें नाहीं घालमेली ॥६॥ मेलीं हीं शहाणीं करितां सायास । नाहीं सुखलेश तुका म्हणे ॥७॥

३८३०. तुका म्हणे सुख घेतलें गोपाळीं । नाचती कांबळीं करुनी ध्वजा ॥१॥ करूनियां टिरी आपुल्या मांदळ । वाजविती टाळ दगडांचे ॥२॥ दगडांचे टाळ कोण त्यांचा नाद । गीतीं गातां छंद ताल नाहीं ॥३॥ ताल नाहीं गातां नाचतां गोपाळा । घननीळ सांवळा तयांमध्यें ॥४॥ मध्यें जयां हरि तें सुख आगळें । देहभाव काळें नाहीं तयां ॥५॥ तयांसी आळंगी आपुलिया करीं । जाती भूमीवरी लोटांगणीं ।६॥ निजभाव देखे जयांचिये अंगीं । तुका म्हणे संगीं क्रीडे तयां ॥७॥

३८३१. तयांसवें करी काला दहींभात । सिदोऱ्या अनंत मेळवुनी ॥१॥ मेळवुनी अवघियांचे एके ठायीं । मागें पुढें कांहीं उरों नेदी ॥२॥ नेदी चोरी करूं जाणे अंतरींचें । आपलेंही साचें द्यावें तेथें ॥३॥ द्यावा दहींभात आपला प्रकार । तयांचा व्यवहार सांडवावा ॥४॥ वांटी सकळांसी हातें आपुलिया । जैसें मागे तया तैसें द्यावें ॥५॥ द्यावें सांभाळुनी सम तुकभावें । आपणहि खावें त्यांचे तुकें ॥६॥ तुक सकळांचें गोविंदाचे हातीं । कोण कोणे गति भला बुरा ॥७॥ राखी त्यांस तैसा आपुलाल्या भावें । विचारूनी द्यावें जैसें तैसें ॥८॥ तैसें सुख नाहीं वैकुंठींच्या लोकां । तें दिलें भाविकां गोपाळांसी ॥९॥ गोपाळांचे मुखीं देऊनी कवळ । घांस माखे लाळ खाय त्यांची ॥१०॥ त्यांचिये मुखींचे हिरोनियां घांस । झोंबती हातास खाय बळें ॥११॥ बळें जयाचिया ठेंगणें सकळ । तयातें गोपाळ पाडितील ॥१२॥ पाठीं उचलूनी वाहातील खांदीं । नाचतील मांदीं मेळवूनी ॥१३॥ मांदी मेळवूनी धणी दिली आम्हां । तुका म्हणे जमा केल्या गाई ॥१४॥

३८३२. केला पुढें हरि अस्तमाना दिसे । मागें त्यासरिसे थाट चाले ॥१॥ थाट चाले गाई गोपाळांची धूम । पुढें कृष्णराम तयां सोयी ॥२॥ सोयी लागलीया देवाची आवर्ती । न बोलावितां येती मागें तयां ॥३॥ तयांचिये चित्तीं बैसला अनंत । घेती नित्य नित्य तेंचि सुख ॥४॥ सुख नाहीं कोणा हरीच्या वियोगें । तुका म्हणे युगें घडी जाय ॥५॥

३८३३. जाय फांकोनियां निवडोनी गाई । आपलाले सोयी घराचिये ॥१॥ घराचिये सोयी अंतरला देव । गोपाळांचा जीव गोविंदापें ॥२॥ गोविंदें वेधिलें तुका म्हणे मन ।

वियोगेंही ध्यान संयोगाचें ॥३॥

३८३४. संयोग सकळां असे सर्वकाळ । दुश्चित गोपाळ आला दिसे ॥१॥ गोपाळ गुणाचा म्हणे गुणमय । निंबलोण मायें उतरिलें ॥२॥ उतरूनी हातें धरी हनुवटी । ओवाळुनी दिठी सांडियेली ॥३॥ दिठी घाली माता विश्वाच्या जनका । भक्तीचिया सुखा गोडावला ॥४॥ लहान हा थोर जीवजंतु भूतें । आपण दैवतें झाला देवी ॥५॥ देवी म्हैसासुर मुंजिया खेचर । लहान हा थोर देव हरि ॥६॥ हरी तुका म्हणे अवघा एकला । परी हा धाकुला भक्तीसाठीं ॥७॥

३८३५. भक्तीसाठीं करी यशोदेसी आळी । थुंकोनियां चोळी डोळे दैव ॥१॥ देव गिळूनियां धरिलें मोहन । माय म्हणे कोण येथें दुजा ॥२॥ दुजें येथें कोणी नाही कृष्णाविण । निरुते जाणोन पुसे देवा ॥३॥ देवापाशीं पुसे देव काय झाला । हांसें आलें बोला याचे हरि ॥४॥ यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ॥५॥ लटिकें तें साच साच तें लटिकें । नेणती लोभिकें आशाबद्ध ॥६॥ सांग म्हणे माय येरू वासी तोंड । तंव तें ब्रह्मांड देखे माजी ॥७॥ माजी जया चंद्र सूर्य तारांगणें । तो भक्तांकारणें बाळलीळा ॥८॥ लीळा कोण जाणे याचें महिमान । जगाचें जीवन देवा देव ॥९॥ देवें कवतुक दाखविलें तयां । लागतील पायां मायबाप ॥१०॥ मायबाप म्हणे हाचि देव खरा । आणीक पसारा लटिका तो ॥११॥ तोही त्यांचा देव दिला नारायणें । माझें हें करणें तोही मीच ॥१२॥ मीच म्हणउनी जें जें जेथें ध्याती । तेथें मी श्रीपती भोगिता तें ॥१६॥ तें मज वेगळें मी तयां निराळा । नाहीं या सकळा ब्रह्मांडांत ॥१४॥ तद्भावना इच्छा भावितसे त्यांचें । फळ देता साचें मीच एक ॥१५॥ मीच एक खरा बोले नारायण । दाविलें निर्वाण निजदासां ॥१६॥ निजदासां खूण दाविली निरुती । तुका म्हणे भूतीं नारायण ॥१७॥

३८३६. नारायण भूतीं न कळे जयांसी । तयां गर्भवासीं येणेंजाणें ॥१॥ येणें जाणें होय भूतांच्या मत्सरें । न कळतां खरें देव ऐसा ॥२॥ देव ऐसा जया कळला सकळ । गेली तळमळ देहबुद्धि ॥३॥ बुद्धिचा पालट नव्हे कदा काळीं । हरि जळीं स्थळीं तयां चित्तीं ॥४॥ चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजी ॥५॥ तयामाजी हरि जाणिजे त्या भावें । आपुलें परावें सारिखेंचि ॥६॥ चिंतनें तयाच्या तरती अनेक । जो हें सकळीक देव देखे ॥७॥ देव देखे तोही देव कैसा नव्हे । उरला संदेह काय त्यासी ॥८॥ काया वाचा मनें पूजावे वैष्णव । मनीं शुद्ध भाव धरूनीयां ॥९॥ यांसी कवतुक दाखविलें रानीं । वोणवा गिळूनी गोपाळांसीं ॥१०॥ गोपाळांचें डोळे झाकविले हातें । धरिलें अनंतें विश्वरूप ॥११॥ पसरूनी मुख गिळियेली ज्वाळ । पाहाती गोपाळ बोटां सांदी ॥१२॥ संधि सारूनियां पाहिलें अनंता । म्हणती ते आतां कळलासी ॥१३॥ कळला हा तुझा देह नव्हे देवा । गिळीला वोणवा आणीक तो ॥१४॥ तों तयां कळला आरुष गोपाळां । दुर्गम सकळां साधनांसी ॥१५॥ सीण उरे तुका म्हणे साधनाचा ।

भाविकासी साचा भाव दावी ॥१६॥

३७३७. भाव दावी शुद्ध देखोनियां चित्ता । आपल्या अंकिता निजदासां ॥१॥ सांगे गोपाळांसी काय पुण्य होतें । वांचलों जळते आगीहातीं ॥२॥ आजी आम्हां येथें वांचविलें देवें । नाहीं तरी जीवें न वांचतों ॥३॥ न वांचत्या गाई जळतों सकळें । पूर्वपुण्यबळें वांचविलें ॥४॥ पूर्वपुण्य होतें तुमचिया गांठीं । बोले जगजेठी गोपाळांसी ॥५॥ गोपाळांसी म्हणे वैकुंठनायक । भले तुम्ही एक पुण्यवंत ॥६॥ करी तुका म्हणे करवी आपण । द्यावें थोर पण सेवकांसी ॥७॥

३८३८. काय आम्हां चाळविसी वांयांविण । म्हणती दुरून देखिलासी ॥१॥ लावूनियां डोळे नव्हतों दुश्चित । तुज परचित्त माव होती ॥२॥ होती दृष्टि आंत उघडी आमची । बाहेरी ती वाची कुची झाकूं ॥३॥ झालासी तूं थोर थोरल्या तोंडाचा । गिळियेला वाचा धूर आगी ॥४॥ आगी खातो ऐसा आमचा सांगाती । आनंदें नाचती भोंवतालीं ॥५॥ भोंवतीं आपणा मिळविलीं देवें । तुका म्हणे ठावें नाहीं ज्ञान ॥६॥

३८३९. नाहीं त्याची शंका वैकुंठनायका । नेणती ते एकाविण दुजा ॥१॥ जाणतियां सवें येऊं नेदी हरि । तर्कवादी दुरी दुराविले ॥२॥ वादियांसीं भेद निंदा अहंकार । देऊनियां दूर दुराविले ॥३॥ दुराविले दूर आशाबद्ध देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥४॥ चित्तीं द्रव्यदारा पुत्रादि संपत्ती । समान ते होती पशु नर ॥५॥ नरक साधिला विसरोनी देवा । बुडाले ते भवनदीमाजी ॥६॥ जिहीं हरिसंग केला संवसारी । तुका म्हणे खरी खेप त्यांची ॥७॥

३८४०. खेळींमेळीं आले घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपाशीं ॥१॥ मातेपाशीं एक नवल सांगती । झाली तैसी ख्याती वोणव्याची ॥२॥ ओवाळिलें तिनें करूनी आरती । पुसे दसवंती गोपाळांसी ॥३॥ पुसे पडताळुनी मागुती मागुती । गोपाळ सांगती कवतुक ॥४॥ कवतुक कानीं आइकतां त्यांचे । बोलतां ये वाचे वीट नये ॥५॥ नयन गुंतले श्रीमुख पाहतां । न साहे लवतां आड पातें ॥६॥ तेव्हां कवतुक कळों आलें कांहीं । हळूहळू दोहीं मायबापां ॥७॥ हळूहळू त्यांचें पुण्य झालें वाड । वारलें हें जाड तिमिराचें ॥८॥ तिमिर हें तेथें राहों शके कैसें । झालिया प्रकाशें गोविंदाच्या ॥९॥ दावी तुका म्हणे देव ज्या आपणा । पालटे तो क्षणामाजी एका ॥१०॥

३८४१. काय आतां यासी म्हणावें लेंकरूं । जगाचा हा गुरु मायबाप ॥१॥ माया याची यासी राहिली लपून । कळों नये क्षण एक होतां ॥२॥ क्षण एक होतां विसरली त्यासी । माझें माझें ऐसें करी बाळा ॥३॥ करुनी कवतुक कळों नेदी कोणा । योजूनी कारणा तेंचि खेळे ॥४॥ तें सुख लुटिलें घरींचिया घरीं । तुका म्हणे परी आपुलाल्या ॥५॥

३८४२. आपुलाल्यापरी करितील सेवा । गीत गाती देवा खेळवूनी ॥१॥ खेळ मांडियेला यमुनेपाबळीं । या रे चेंडूफळी खेळूं आतां ॥२॥ आणविल्या डांगा चवगुणांतु काठी । बैसोनियां

वांटी गडियां गडी ॥३॥ गडी जंव पाहे आपणासमान । नाहीं नारायण म्हणे दुजा ॥४॥ जाणोनी गोविंदें सकळांचा भाव । तयांसी उपाव तोचि सांगे ॥५॥ सांगे सकळांसी व्हा रे एकीठाईं । चेंडू राखा भाई तुम्ही माझा ॥६॥ मज हा नलगे आणीक सांगाती । राखावी बहुतीं हाल माझी ॥७॥ माझे हाके हाक मेळवा सकळ । न वजा बरळ एकमेकां ॥८॥ एका समतुकें अवघेचि राहा । जाईल तो पाहा धरा चेंडू ॥९॥ चेंडू धरा ऐसें सांगतों सकळां । आपण निराळा एकलाचि ॥१०॥ चिंतूनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें । ठेलीं सकळिक पाहातचि ॥११॥ पाहातचि ठेलीं न चलतां कांहीं । यारे लवलाहीं म्हणे धरा ॥१२॥ धरावा तयानें त्याचें बळ त्यासी । येरा आणिकांसी लाग नव्हे ॥१३॥ नव्हे काम बळ बुद्धि नव्हे त्याचें । न धरवे नीचें उंचाविण ॥१४॥ विचारी पडिले देखोनी गोपाळ । या म्हणे सकळ माझ्या मागें ॥१५॥ मार्ग देवाविण न दिसे आणिका । चतुर होत का बहुत जन ॥१६॥ चतुर चिंतिती बहुत मारग । हरि जाय माग पाहोनियां ॥१७॥ यामागें जे आले गोविंदा गोपाळ । ते नेले सीतळ पंथ ठायां ॥१८॥ पंथ ते चुकले आपले मतीचे । तयांमागें त्यांचे तेचि हाल ॥१९॥ हाल दोघां एक मोहरे मागिलां । चालतां चुकला वाट पंथ ॥२०॥ पंथ पुढिलांसी चालतां न कळे । मागिलांनीं डोळे उघडावे ॥२१॥ वयाच्या प्रबोधें विचार ज्या नाहीं । समान तो देहीं बाळकासी ॥२२॥ सिकविलें हित नाइके जो कानीं । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये ॥२३॥ नये तेंचि करी श्रेष्ठाचिया मना । मूर्ख एक जाणा तोचि खरा ॥२४॥ रानभरी झाले न कळे मारग । मग तो श्रीरंग आठविला ॥२५॥ लाज सांडूनियां मारितील हाका । कळलें नायका वैकुंठींच्या ॥२६॥ चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणिती । तया अति प्रीति गोपाळांची ॥२७॥ गोपाळांचा धांवा आइकिला कानीं । सोयी चक्रपाणी पाववियेलें ॥२८॥ सोयी धरूनियां आले हरिपासीं । लहान थोरांसी सांभाळिलें ॥२९॥ सांभाळिलें तुका म्हणे सकळही । सुखी झाले तेही हरिमुखे ॥३०॥

३८४३. मुखें सांगे त्यांसी पैल चेंडू पहा । उदकांत डोहाचिया माथा ॥१॥ माथां कळंबाचे अवघडा ठायीं । दावियेला डोहीं जळामाजी ॥२॥ जळांत पाहाती हाडतीये दृष्टि । म्हणे जगजेठी ऐसें नव्हे ॥३॥ नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत । खरें तेथें चित्त लावा वरी ॥४॥ वरी देखियेला अवघ्यांनीं डोळां । म्हणती गोपाळा आतां कैसें ॥५॥ कैसें करूनियां उतरावा खालीं । देखोनियां भ्यालीं अवघीं डोहो ॥६॥ डोहो बहु खोल काळ्या भीतरीं । सरलीं माघारीं अवघीं जणें ॥७॥ जयाचें कारण तयासींच ठावें । पुसे त्याच्या भावें त्यास हरी ॥८॥ त्यासी नारायण म्हणे रहा तळीं । चढे वनमाळी झाडावरी ॥९॥ वरी जातां हरि पाहाती सकळ । म्हणती गोपाळ आम्ही नेणों ॥१०॥ नेणों म्हणती हें करितोसी काई । आम्हां तुझी आई देईल सिव्या ॥११॥ आपुलिया काना ठेवुनियां हात । सकळीं निमित्य टाळियेलें ॥१२॥ निमित्याकारणें रचिलें कारण । गेला नारायण खांदीवरी ॥१३॥ खांदीवरी पाव ठेवियेला देवें । पाडावा त्या

भावें चेंडू तळीं ॥१४॥ तळील नेणती तुका म्हणे भाव । अंतरींचा देव कळों नेदी ॥१५॥

३८४४. नेदी कळों केल्याविण तें कारण । दाखवी आणून अनुभवा ॥१॥ न पुरेसा हात घाली चेंडूकडे । म्हणितलें गडे सांभाळावें ॥२॥ सांभाळ करिता सकळ जीवांचा । गोपाळांसी वाचा म्हणे बरें ॥३॥ बरें विचारूनी करावें कारण । म्हणे नारायण बऱ्या बरें ॥४॥ बरें म्हणूनियां तयांकडे पाहे । सांडविला जाय चेंडू तळा ॥५॥ तयासवें उडी घातली अनंतें । गोपाळ रडत येती घरा ॥६॥ येता त्यांचा लोकीं देखिला कोल्हाळ । सामोरीं सकळ आलीं पुढें ॥७॥ पुसती ते मात तया गोपाळांसी । हरिदुःखें त्यांसी न बोलवे ॥८॥ न बोलवे हरि बुडालासें मुखें । कुटितील दुःखें ऊर माथे ॥९॥ मायबापें तुका म्हणे न देखती । तैसें दुःख चित्तीं गोपाळांच्या ॥१०॥

३८४५. गोपाळां उभडु नावरे दुःखाचा । कुंठित हे वाचा झाली त्यांची ॥१॥ झालें काय ऐसें न कळे कोणासी । म्हणती तुम्हांपासीं देव होता ॥२॥ देवासवें दुःख न पवतें ऐसें । कांही अनारिसें दिसे आजी ॥३॥ आजी दिसे हरि फांकला यांपाशीं । म्हणऊनि ऐशी परी झाली ॥४॥ जाणविल्याविण कैसें कळे त्यांसी । शहाणे तयांसी कळों आलें ॥५॥ कळों आलें तिहीं स्फुंद शांत केला । ठायींचाच त्याला थोडा होता ॥६॥ होता तो विचार सांगितला जना । गोपाळ शहाणा होता त्याणें ॥७॥ सांगे आतां हरि तुम्हां आम्हां नाहीं । बुडालासे डोहीं यमुनेच्या ॥८॥ यासी अवकाश नव्हेचि पुसता । झालिया अनंता कोण परी ॥९॥ परी त्या दुःखाची काय सांगों आतां । तुका म्हणे माता लोकपाळा ॥१०॥

३८४६. पाषाण फुटती तें दुःख देखोनी । करितां गौळणी शोक लोकां ॥१॥ काय ऐसें पाप होतें आम्हांपासीं । बोलती एकासी एक एका ॥२॥ एकांचिये डोळां असू बाह्यात्कारीं । नाहीं ती अंतरीं जळतील ॥३॥ जळतील एकें अंतर्बाह्यात्कारें । टाकिलीं लेंकुरें कडियेहूनी ॥४॥ निवांतचि एकें राहिलीं निश्चिंत । बाहेरी ना आंत जीव त्याचे ॥५॥ त्याचे जीवावरी आले त्या सकळा । एका त्या गोपाळावांचूनियां ॥६॥ वांचणें तें आतां खोटें संवसारीं । नव्हे भेटी जरी हरीसवें ॥७॥ सवें घेऊनियां चालले गोपाळां । अवघींच बाळा नर नारी ॥८॥ नर नारी नाहीं मनुष्याचें नांव । गोकुळ हें गांव सांडियेलें ॥९॥ सांडियेलीं अन्नें संपदा सकळ । चित्तीं तो गोपाळ धरुनी जाती ॥१०॥ तिरीं माना घालूनियां उभ्या गाई । तटस्थ या डोही यमुनेच्या ॥११॥ यमुनेच्या तिरीं झाडें वृक्ष वल्ली । दुःखें कोमाइलीं कृष्णाचिया ॥१२॥ यांचें त्यांचें दुःख एक झालें तिरीं । मग शोक करी मायबाप ॥१३॥ मायबाप तुका म्हणे सहोदर । तोंवरीच तीर न पवतां ॥१४॥

३८४७. तीर देखोनियां यमुनेचें जळ । कांठींच कोल्हाल करीताती ॥१॥ कइवाड नव्हे घालावया उडी । आपणासी ओढी भय मागें ॥२॥ मागें सरे माय पाउलापाउलीं । आपलेंच घाली धाकें अंग ॥३॥ अंग राखोनियां माय खेद करी । अंतरीं हें हरी जाणवलें ॥४॥ जाणवलें मग

देवें दिली बुडी । तुका म्हणे कुडी भावना हे ॥५॥

३८४८. भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भय पोटीं ॥१॥ पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ॥२॥ न करवे त्याग जीवाचा या नास । नारायण त्यास अंतरला ॥३॥ अंतरला बहु बोलतां वाउगें । अंतरींच्या त्यागेंविण गोष्टी ॥४॥ गोष्टी सकळांच्या आइकिल्या देवें । कोणकोणा भावें रडती तीं ॥५॥ तीं गेली घरासी आपल्या सकळ । गोधनें गोपाळ लोक माय ॥६॥ मायबापांची तों ऐसी झाली गति । तुका म्हणे अंतीं कळों आलें ॥७॥

३८४९. आला त्यांचा भाव देवाचिया मना । अंतरीं कारणांसाठीं होता ॥१॥ होता भाव त्यांचा पाहोनी निराळा । नव्हता पाताळा गेला आधीं ॥२॥ आधीं पाठीमोरीं झालीं तीं सकळें । मग या गोपाळें बुडी दिली ॥३॥ दिली हाक त्याणें जाऊनी पाताळा । जागविलें काळा बुजंगासी ॥४॥ भुजंग हा होता निजला मंदिरीं । निर्भर अंतरीं गर्वनिधि ॥५॥ गर्व हरावया आला नारायण । मिस या करून चेंडुवाचें ॥६॥ चेंडुवाचें मिसें काळया नाथावा । तुका म्हणे देवा कारण हें ॥७॥

३८५०. काळयाचे मागें चेंडू पत्नीपाशीं । तेज:पुंज रासी देखियेला ॥१॥ लावण्यपुतळा मुखप्रभाराशी । कोटि रवि शशी उगवले ॥२॥ उगवला खांब कर्दळीचा गाभा । ब्रीदें वांकी नभा देखे पायीं ॥३॥ पाहिला सकळ तिनें न्याहाळूनी । कोण या जननी विसरली ॥४॥ विसरु हा तीस कैसा याचा झाला । जीवाहुनी वाल्हा दिसतसे ॥५॥ दिसतसे रूप गोजिरें लहान । पाहातां लोचन सुखावले ॥६॥ पाहिलें परतोनी काळा दुष्टाकडे । मग म्हणे कुडें झालें आतां ॥७॥ आतां उठोनियां खाईल या बाळा । देईल वेल्हाळा माय जीव ॥८॥ जीव याचा कैसा वांचे म्हणे नारी । मोहिली अंतरीं हरिरूपें ॥९॥ रूपें अनंताचीं अनंत अपार । न कळे साचार तुका म्हणे ॥१०॥

३८५१. म्हणे चेंडू कोणें आणिला या ठाया । आलों पुरवावया कोड त्याचें ॥१॥ त्याचें आइकोन निष्ठुर वचन । भयाभीत मन झालें तिचें ॥२॥ तिची चित्तवृत्ति होती देवावरी । आधीं ते माघारी फिरली वेगीं ॥३॥ वेगीं मन गेलें भ्रताराचे सोयी । विघ्न आलें कांहीं आम्हांवरी ॥४॥ वरी उदकासी नाहीं अंतपार । अक्षोभ सागर भरलासे ॥५॥ संचार करूनि कोण्या वाटे आला । ठायींच देखिला अवचिता ॥६॥ अवचिता नेणों येथें उगवला । दिसे तो धाकुला बोल मोठे ॥७॥ मोठ्यानें बोलतो भय नाहीं मनीं । केला उठवूनी काळ जागा ॥८॥ जागविलें काळसर्पा तये वेळीं । उठिला कल्लोळीं विषाचिये ॥९॥ यमुनेच्या डोहावरी आला ऊत । काळयाकृतांत धुधुकारें ॥१०॥ कारणें ज्या येथें आला नारायण । झाले दरुषण दोघांमध्यें ॥११॥ दोघांमधें झालें बोल परस्परें । प्रसंग उत्तरें युद्धाचिया ॥१२॥ चिंतावला चित्तीं तोंडे बोले काळ । करीन सकळ ग्रास

तुझा ॥१३॥ झाला सावकाश झेंप घाली वरी। तव हाणे हरि मुष्टिघातें ॥१४॥ तेणें काळें त्यासी दिसे काळ तैसा। हरावया जैसा जीव आला ॥१५॥ आठवलें काळा हाकारिलें गोत। मिळाली बहुत नागकुळें ॥१६॥ कल्हारीं संघानीं वेष्टियेला हरि। अवघा विखारीं व्यापियेला ॥१७॥ यांस तुका म्हणे नाहीं भक्ताविण। गरुडाचें चिंतन केलें मनीं ॥१८॥

३८५२. निजदास उभा तात्काळ पायापें। स्वामी देखे सर्पें वेष्टियेला ॥१॥ लहानथोरें होतीं मिळालीं अपारें। त्याच्या धुधुकारें निवारलीं ॥२॥ निघातें आपटी धरुनी घावामधीं। एकातेचि वधी माथा पाय ॥३॥ एकीं जीव दिले येतांच त्या धाकें। येतील तीं एकें काकुलती ॥४॥ यथेष्ट भक्षिले पोट धाये वरी। तंव म्हणे हरि पुरे आतां ॥५॥ आतां करूं काम आलों जयासाठीं। हरि घाली मिठी काळयासी ॥६॥ यासी नाथूनियां नाकीं दिली दोरी। चेंडू भार शिरीं कमळांचा ॥७॥ चालविला वरी बैसे नारायण। गरुडा आळंगूनी बहुडविलें ॥८॥ विसरु न पडे सवंगड्या गाई। यमुनेच्या डोहीं लक्ष त्यांचें ॥९॥ त्यांच्या गोष्टी कांठीं बैसोनी सांगती। बुडाला दावितो येथें हरि ॥१०॥ हरीचें चिंतन करिता आठव। तुका म्हणे देव आला वरी ॥११॥

३८५३. अवचिता त्यांनीं देखिला भुजंग। पळतील मग हाउ आला ॥१॥ आला घेऊनियां यमुनेबाहेरी। पालवितो हरी गडियांसी ॥२॥ गडियांसी म्हणे वैकुंठनायक। या रे सकळीक मजपाशीं ॥३॥ मजपाशीं तुम्हां भय काय करी। जवळी या दुरी जाऊं नका ॥४॥ कानीं आईकिले गोविंदाचे बोल। म्हणती नवल चला पाहों ॥५॥ पाहों आलें हरीजवळी सकळ। गोधनें गोपाळ आळिंगिले ॥६॥ आल्या गाई वरी घालितील माना। ओरसलें स्तना क्षीर लोटे ॥७॥ लोटती सकळें एकावरी एक। होऊनी पृथक कुर्वाळलीं ॥८॥ कुर्वाळलीं आनंदें घेती चारा पाणी। तिहीं चक्रपाणी देखियेला ॥९॥ त्यांचपाशीं होता परी केली माव। न कळे संदेह पडलिया ॥१०॥ याति वृक्ष वल्ली होत्या कोमेलिया। त्यांसी कृष्णें काया दिव्य दिली ॥११॥ दिलें गोविंदें त्या पदा नाहीं नाश। तुका म्हणे आस निरसली ॥१२॥

३८५४. आस निरसली गोविंदाचे भेटी। संवसारा तुटी पुढिलिया ॥१॥ पुढें पाठविले गोविंदें गोपाळ। देऊनी चपळ हातीं गुढी ॥२॥ हाका आरोळिया देऊनी नाचती। एक सादावितो हरि आला ॥३॥ आरंभीं पडिलीं होतीं तया घरीं। संकीर्ण त्या नारी नर लोकां ॥४॥ लोकां भूक तहान नाहीं निद्रा डोळां। रूप वेळोवेळां आठविती ॥५॥ आहाकटा मग करिती गेलिया। आधीं ठावा तयां नाहीं कोणा ॥६॥ आधीं चुकी मग घडे आठवण। तुका म्हणे जन परिचय ॥७॥

३८५५. जननी हे म्हणे आहा काय झालें। शरीर रक्षिलें काय काजें ॥१॥ काय काज आतां हरिविण जिणें। नित्य दुःख कोणें सोसावें हें ॥२॥ हें दुःख न सरे हरि न भेटे तों। त्यामागेंचि जातों एका वेळे ॥३॥ एक वेळ जरी देखतें मी आतां। तरी जीवापरता न करितें ॥४॥ करिताहे माता

हरीचें चिंतन । शुभ तो शकुन तुका म्हणे ॥५॥

३८५६. शुभ मात तिहीं आणिली गोपाळीं । चेंडू वनमाळी घेउनी आले ॥१॥ आली दारा देखे हरुषाची गुढी । सांगितली पुढें हरुषें मात ॥२॥ हरुषली माता केलें निंबलोण । गोपाळा वरून कुरवंडी ॥३॥ गोपाळां भोंवतें मिळालें गोकुळ । अवघीं सकळ लहान थोर ॥४॥ थोर सुख झालें ते काळीं आनंद । सांगती गोविंद वरी आला ॥५॥ आले वरी बैसोनियां नारायण । काळया नाथून वहन केलें ॥६॥ नगराबाहेरी निघाले आनंदें । लावूनियां वाद्यें नाना घोष ॥७॥ नारायणापुढें गोपाळ चालती । आनंदें नाचती गाती गीत ॥८॥ तंव तो देखिला वैकुंठींचा पति । लोटांगणीं येती सकळही ॥९॥ सकळही एका भावें आळिंगिले । अवघियां झाले अवघे हरि ॥१०॥ हरि आळिंगुनी हरिरूप झालीं । आप विसरली आपणास ॥११॥ सकळांसी सुख एक दिलें देवें । मायबापभावें लोकपाळां ॥१२॥ मायबाप देवा नाहीं लोकपाळ । सारखीं सकळ तुका म्हणे ॥१३॥

३८५७. नेणे वर्ण धर्म जीं आलीं सामोरीं । अवघींच हरी आळिंगिलीं ॥१॥ हरि लोकपाळ आले नगरांत । सकळांसहित मायबाप ॥२॥ पारणें तयांचें झालें एक वेळे । देखिलें सांवळें परब्रह्म ॥३॥ ब्रह्मानंदें लोक सकळ नाचती । गुढिया उभविती घरोघरीं ॥४॥ घरोघरीं सुख आनंद सोहळा । सडे रंगमाळा चौकदारीं ॥५॥ दारीं वृंदावनें तुळसीचीं बनें । रामकृष्णगाणें नारायण ॥६॥ नारायण तिहीं पूजिला बहुतीं । नाना पुष्पयाती करूनियां ॥७॥ याचे ऋण नाहीं फिटलें मागील । पुढें भांडवल जोडिती हीं ॥८॥ हीं नव्हतीं कधीं या देवा वेगळीं । केला वनमाळी सेवाऋणी ॥९॥ सेवाऋणें तुका म्हणे रूप धरी । भक्तांचा कैवारी नारायण ॥१०॥

३८५८. नारायण आले निजमंदिरासी । जावया लोकांसी बहुडविले ॥१॥ बहुडविले बहु केलें समाधान । विसरूं हा क्षण नका माझा ॥२॥ मात सांगितली सकळ वृत्तांत । केलें दंडवत सकळांनीं ॥३॥ सकाळां भातुकें वांटिल्या साखरा । आपुलाल्या घरा लोक गेले ॥४॥ लोक गेले कामा गाईपें गोपाळ । वारली सकळ लोभासाठीं ॥५॥ लोभ दावूनियां आपला विसर । पाडितो कुमर धनआशा ॥६॥ आशेचे बांधले तुका म्हणे जन । काय नारायण ऐसा जाणे ॥७॥

३८५९. झाला कवतुक करिता रोकडें । आणीकही पुढें नारायण ॥१॥ येऊनियां पुढें धरिला मारग । हरावया भाग इंद्रयाजीं ॥२॥ इंद्रा दहीं दूध तूप नेतां लोणी । घेतले हिरोनी वाटे त्यांचें ॥३॥ हिरोनी घेतल्या कावडी सकळा । म्हणती गोपाळा बरें नव्हे ॥४॥ नव्हे तेंचि करी न भे कळिकाळा । तुका म्हणे लीळा खेळे देव ॥५॥

३८६०. खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया । देव म्हणे तयां भीऊं नका ॥१॥ नका धरूं भय धाक कांहीं मनीं । बोले चक्रपाणि गौळियांसी ॥२॥ गौळियांसी धीर नाहीं या वचनें ।

आशंकित मनें वेडावलीं ॥३॥ वेडावलीं त्यांस न कळतां माव । देवाआदिदेव नोळखतां ॥४॥ नोळखतां दु:खें वाहातील शिरीं । तुका म्हणे वरी भारवाही ॥५॥

३८६१. भारवाही नोळखती या अनंता । जवळी असतां अंगसंगें ॥१॥ अंगसंगें तयां न कळे हा देव । कळोनी संदेह मागुताला ॥२॥ मागुते पडती चिंतेचिये डोहीं । जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ॥३॥ बुद्धि स्थिर राहों नेदी नारायण । आशाबद्ध जन लोभिकांची ॥४॥ लोभिकां न साहे देवाचें करणें । तुका म्हणे तेणें दु:खी होती ॥५॥

३८६२. दु:खी होती लोभी करावें तें काई । बुडतील गाई म्हैसी आतां ॥१॥ आणीकही कांहीं होईल अरिष्ट । नाइके हा धीट सांगितलें ॥२॥ सांगों चला याच्या मायबापांपाशीं । निघाली घरासी देवा रागें ॥३॥ रागें काला देतां न घेती कवळ । टोकवी गोपाळ क्रोधियांसी ॥४॥ क्रोध देवावरी धरियेला राग । तुका म्हणे भाग न लभती ॥५॥

३८६३. भाग त्या सुखाचे वांकड्यां बोबड्यां । आपुलिया गड्यां भाविकांसी ॥१॥ भारवाही गेले टाकूनी कावडी । नवनीत गोडी भाविकांसी ॥२॥ काला करूनियां वांटिती सकळां । आनंदें गोपाळांमाजी खेळे ॥३॥ खेळींमेळीं दहीं दूध लोणी खाती । भय नाहीं चित्तीं कवणाचें ॥४॥ कवणाचें चाले तुका म्हणे बळ । जयासी गोपाळ साह्य झाले ॥५॥

३८६४. जाणवलें इंद्रा चरित्र सकळ । वाकुल्या गोपाळ दाविताती ॥१॥ तांतडीनें मेघां आज्ञा करी राव । गोकुळींचा ठाव उरों नेदा ॥२॥ नेदाविया गाई म्हैसी वांचों लोक । पुरावे सकळीक सिळाधारीं ॥३॥ धाक नाहीं माझा गौळियांच्या पोरां । सकळीक मारा म्हणे मेघां ॥४॥ म्हणविती देव आपणां तोंवरी । नाहीं जंव वरी कोपलों मी ॥५॥ मीपणें हा देव न कळेचि त्यांसी । अभिमान रासी गर्वाचिया ॥६॥ अभिमानराशि जयाचिये ठायीं । तुका म्हणे तईं देव दुरी ॥७॥

३८६५. देव त्यां फावला भाविकां गोपाळां । नाहीं तेथें कळा अभिमान ॥१॥ नाडलीं आपल्या आपणचि एकें । संदेहदायके बहुफार ॥२॥ फार चाळविलीं कळो नेदी भाव । देवाआदिदेव विश्वंभर ॥३॥ विश्वासावांचूनी कळों नये खरा । अभक्तां अधीरा जैसा तैसा ॥४॥ जैसा भाव तैसा जवळी त्या दुरी । तुका म्हणे हरि देतो घेतो ॥५॥

३८६६. तो या साच भाव न कळेचि इंद्रा । म्हणउनी धारा घाली मेघा ॥१॥ घाली मेघ धारा कडाडिला माथां । वरी अवचिता देखियेला ॥२॥ देखती पाऊस वोळला गोपाळ । भ्याले हे सकळ विचारिती ॥३॥ विचारीं पडलीं विसरलीं खेळ । अन्याय गोपाळ म्हणती केला ॥४॥ लागलेंसे गोड न कळे त्या काळीं । भेणें वनमाळी आठविती ॥५॥ आतां काय कैसा करावा विचार । गोधनासी थार आपणिया ॥६॥ यांचिया विचारें होणार तें काई ।

तुका म्हणे ठायीं वेडावलीं ॥७॥

३८६७. वेडावलीं काय करावें या काळीं । म्हणे वनमाळी गोपाळांसी ॥१॥ गोवर्धन धरूं शिरीं उचलूनी । म्हणे तुम्ही कोणी भिऊं नका ॥२॥ नका सांडूं कोणी आपला आवांका । मारितां या हाका आरोळिया ॥३॥ आशंकित चित्तें न वाटे त्या खरें । धाकेंच ते बरें म्हणती चला ॥४॥ चित्तीं धाक परि जवळी अनंत । तुका म्हणे घात होऊं नेदी ॥५॥

३८६८. नेदी दुःख देखों दासा नारायण । ठेवी निवारून आल्या आधीं ॥१॥ आधीं पुढें शुद्ध करावा मारग । दासांमागें मागें सुखरूप ॥२॥ पर्वतासी हात लाविला अनंतें । तो जाय वरतें आपेंआप ।३॥ आपल्या आपण उचलिला गिरी । गोपाळ हे करी निमित्यासी ॥४॥ निमित्य करूनी करावें कारण । करितां आपण कळों नेदी ॥५॥ दीनाचा कृपाळू पतितपावन । हें करी वचन साच खरें ॥६॥ सांगणें न लगे सुखदुःख दासा । तुका म्हणे ऐसा कृपावंत ॥७॥

३८६९. कृपावंतें हाक दिली सकळिकां । माजि या रे नका राहों कोणी ॥१॥ निघाले या भेणें पाउसाच्या जन । देखे गोवर्धन उचलिला ॥२॥ लाविले गोपाळ फेरीं चहूंकडे । हासे फुंदे रडे कोणी धाकें ॥३॥ धाकें ही सकळ निघाली भीतरीं । उचलिला गिरी तयाखालीं ॥४॥ तयाखालीं गाई वत्सें आलीं लोक । पक्षी सकळिक जीवजाति ॥५॥ जिहीं म्हणविलें हरीचे अंकित । जातीचे ते होत कोणी तरी ॥६॥ जाति कुळ नाहीं तयासी प्रमाण । अनन्या अनन्य तुका म्हणे ॥७॥

३८७०. म्हणविती भक्त हरीचे अंकित । करितो अनंत हित त्यांचें ॥१॥ त्यांसी राखे बळें आपुले जे दास । कळिकाळासी वास पाहों नेदीं ॥२॥ पाऊस न येतां केली यांची थार । लागला तुषार येऊं मग ॥३॥ येऊनी दगड बैसतील गिरी । वरुषला धारीं शिळांचिये ॥४॥ शिळांचिया धारी वरुषला आकांत । होता दिवस सात एक सरें ॥५॥ एक सरें गिरि धरिला गोपाळीं । होता भाव बळी आम्ही ऐसा ॥६॥ ऐसें कळों आलें देवाचिया चित्ता । म्हणे तुम्ही आतां हात सोडा ॥७॥ हांसती गोपाळ करूनी नवल । ऐकोनीयां बोल गोविंदाचे ॥८॥ दावितील डोया गुडघे कोपर । फुटले ते भार उचलितां ॥९॥ भार आम्हांवरी घालूनी निराळा । राहीलासी डोळा चुकवूनी ॥१०॥ निमित्य अंगुळी लावियेली वरी । पाहों कैसा गिरी धरितोसी ॥११॥ सिणले हे होते ठायींच्या त्या भारें । लटिकेंचि खरें मानूनियां ॥१२॥ याणीं अंत पाहों आदरिला याचा । तुका म्हणे वाचा वाचाळ ते ॥१३॥

३८७१. वाचाळ लटिके अभक्त जे खळ । आपुलें तें बळ वाखाणावें ॥१॥ बळें हुंबरती सत्य त्यां न कळे । नुघडती डोळे अंधळ्यांचे ॥२॥ आसुडिल्या माना हात पाय नेटें । तंव भार बोटें उचलिला ॥३॥ लटिकाचि आम्हीं सीण केला देवा । कळों आलें तेव्हां सकळांसी ॥४॥ आलें कळों तुका म्हणे अनुभवें । मग अहंभावें सांडवले ॥५॥

३८७२. सांडवले सकळांचे अभिमान । आणिले शरण लोटांगणीं ॥१॥ लोटांगणीं आले होऊनियां दीन । मग नारायण म्हणे भलें ॥२॥ भला आजी तुम्हीं केला साचपण । गिरी गोवर्धन उचलिला ॥३॥ लागती चरणा सकळ ते काळीं । आम्हांमध्यें बळी तूंचि एक ॥४॥ एका तुजविण न यों आम्ही कामा । कळों कृष्णा रामा आलें आजी ॥५॥ आजिवरी आम्हां होता अभिमान । नेणतां चरण महिमा तुझा ॥६॥ तुझा पार आम्ही नेणों नारायणा । नखीं गोवर्धना राखियेलें ॥७॥ राखियेलें गोकुळ आम्हां सकळांसी । दगडाच्या रासी वरुषतां ॥८॥ वर्णावें तें काय तुझें महिमान । धरिती चरण सकळही ॥९॥ सकळही तहान विसरली भूक । सकळही सुख दिलें त्यांसी ॥१०॥ त्यांसी कळों आला वैकुंठनायक । तुका म्हणे लोक निर्भर ते ॥११॥

३८७३. लोकां कळों आला देव आम्हांमधीं । टाकिली उपाधि तिहीं शंका ॥१॥ शंका नाहीं थोरां लहानां जीवासी । कळला हृषीकेशी तेव्हां मग ॥२॥ मग मनीं झाले निर्भर सकळ । संगे लोकपाळ कृष्णाचिया ॥३॥ कृष्णाचिया ओंव्या गाणें गाती गीत । कृष्णमय चित्त झालें त्यांचें ॥४॥ त्यासी ठावा नाहीं बाहेरील भाव । अंतरींच वाव झालें सुख ॥५॥ सुखें तया दीस न कळे हे राती । अखंड त्या ज्योती गोविंदाची ॥६॥ चिंतनेंचि धालीं न लगे अन्नपाणी । तुका म्हणे मनीं समाधान ॥७॥

३८७४. समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ । जयां ते गोपाळ समागमें ॥१॥ गोविंदाचा झाला प्रकाश भीतरीं । मग त्या बाहेरीं काय काम ॥२॥ काम काज त्यांचे सरले व्यापार । नाहीं आप पर माझें तुझें ॥३॥ माया सकळांची सकळांही वरी । विषम तें हरि दिसों नेदी ॥४॥ दिसे तया आपपरावें सारिखें । तुका म्हणे सुखें कृष्णाचिया ॥५॥

३८७५. कृष्णाचिया सुखें भूक नाहीं तहान । सदा समाधान सकळांचें ॥१॥ कळलेंचि नाहीं झाले किती दिस । बाहेरील वास विसरली ॥२॥ विसरू कामाचा तुका म्हणे झाला । उद्वेग राहिला जावें यावें ॥३॥

३८७६. जावें बाहेरी हा नाठवे विचार । नाहीं समाचार ठावा कांहीं ॥१॥ कांहीं न कळे तें कळों आलें देवा । मांडिला रिघावा कवतुक ॥२॥ कवतुकासाठीं भक्त देहावरी । आणिताहे हरि बोलावया ॥३॥ यांसी नांव रूप नाहीं हा आकार । कळला साचार भक्तां मुखें ॥४॥ मुखें भक्तांचिया बोलतो आपण । अंगसंग भिन्न नाहीं दोघां ॥५॥ दोघे वेगळाले लेखील जो कोणी । तयाचा मेदिनी बहु भार ॥६॥ तयासी घडलीं सकळही पापें । भक्तांचिया कोपें निंदा द्वेषें ॥७॥ द्वेषियाचा संग न घडावा कोणा । विष जेंवी प्राणा नाश करी ॥८॥ करितां जो आइके निंदा या संतांची । तया होती तेचि अध:पात ॥९॥ पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावें अधमा संत सेवीं ॥१०॥ सेवीं संत जोडे महा लाभरासी । तुका म्हणे यासी नाश नाहीं ॥११॥

३८७७. नाही नाश हरि आठवितां मुखें । जोडतील सुखें सकळही ॥१॥ सकळही सुखें वोळली अंतरीं । मग त्याबाहेरी काय काज ॥२॥ येऊं विसरलीं बाहेरी गोपाळें । तल्लीन सकळ कृष्णसुखें ॥३॥ सुख तें योगियां नाहीं समाधीस । दिलें गाई वत्स पशु जीवा ॥४॥ वारला पाऊस कोणा नाहीं ठावा । तुका म्हणे देवावांचूनियां ॥५॥

३८७८. यांसी समाचार सांगतों सकळां । चलावें गोपाळां म्हणे देव ॥१॥ देव राखे तया आडलिया काळें । देव सुखफळें देतो दासां ॥२॥ दासां दुःख देखों नेदी आपुलिया । निवारी आलिया न कळतां ॥३॥ नाहीं मेघ येतां जातां देखियेला । धारीं वरुषला शिळाचिये ॥४॥ येवढें भक्तांचें सांकडें अनंता । होय निवारिता तुका म्हणे ॥५॥

३८७९. काकुळती एकें पाहाती बाहेरी । तया म्हणे हरि वोसरला ॥१॥ वोसरला मेघ आला होता काळ । बाहेरी सकळ आले लोक ॥२॥ कवतुक झालें ते काळीं आनंद । कळला गोविंद साच भावें ॥३॥ भावें तयापुढें नाचती सकळें । गातील मंगळें ओंव्या गीत ॥४॥ गीत गाती ओंव्या रामकृष्णावरी । गोपाळ मोहरी वाहाती पांवे ॥५॥ वत्सें गाई पशु नाचती आनंदें । वेधलिया छंदें गोविंदाच्या ॥६॥ चित्त वेधियेलें गोविंदें जयाचें । कोण तें दैवाचें तयाहुनी ॥७॥ तयाहुनी कोणी नाहीं भाग्यवंत । अखंड सांगात गोविंदाचा ॥८॥ गोविंदाचा संग तुका म्हणे ध्यान । गोविंद ते जन गोकुळींचें ॥९॥

३८८०. गोकुळींची गति कोण झाली परी । पाहों आला वरी इंद्रराव ॥१॥ इंद्रापाशीं मेघ बोलती बडिवार । सकळ संहार करूनी आलों ॥३॥ आतां जीव नाहीं सांगावया रानीं । पुरिलें पाषाणीं शिळाधारीं ॥३॥ रिता कोठें नाहीं उरों दिला ठाव । जल्पती तो भाव न कळतां ॥४॥ न कळतां देव बळें हुंबरती । साच ते पावती अपमान ॥५॥ भाव न कळतां केली तोंडपिटी । इंद्र आला दृष्टी पाहावया ॥६॥ पाहातां तें आहे जैसें होतें तैसें । नाचती विशेषें तुका म्हणे ॥७॥

३८८१. नाचतां देखिली गाई वत्सें जन । विस्मित होऊन इंद्र ठेला ॥१॥ लागला पाऊस शिळांचिये धारीं । वांचलीं हीं परी कैसीं येथें ॥२॥ येथें आहे नारायण संदेह नाहीं । विघ्न केलें ठायीं निर्विघ्न तें ॥३॥ विचारितां उचलिला गोवर्धन । अवतार पूर्ण कळों आला ॥४॥ आला गौळियांच्या घरा नारायण । करितो स्तवन इंद्र त्याचें ॥५॥ त्यांच्या पुण्या पार कोण करी लेखा । नव्हे चतुर्मुखा ब्रह्मयासी ॥६॥ सीणतां जो ध्याना न ये एक वेळा । तो तया गोपाळां समागमें ॥७॥ समागमें गाई वत्स पुण्यवंता । देह कुर्वाळितां अंगसंग ॥८॥ संग झाला मायबापां लोकपाळा । आळिंगिती गळा कंठाकंठ ॥९॥ करिते हे झाले स्तुति सकळिक । देव इंद्रादिक गोविंदाची ॥१०॥ करितील वृष्टि पुष्पवरुषाव । देवाआदिदेव पूजियेला ॥११॥ पुष्पांजुळी मंत्रघोष जयजयकार । दुमदुमी अंबर तेणें नांदें ॥१२॥ नामाचा गजर गंधर्वांची

गाणीं । आनंद त्रिभुवनीं न समाये ॥१३॥ तो सुखसोहळा अनुपम्य रासी । गोकुळीं देवासी दोन्हीं ठायीं ॥१४॥ दोहीं ठायीं सुख दिलें नारायणें । गेला दरुषणें वैरभाव ॥१५॥ भावना भेदाची जाय उठाउठी । तुका म्हणे भेटी गोविंदाचे ॥१६॥

३८८२. गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे । तेथें राहे कइंचे वैरभाव ॥१॥ भावें नमस्कार घातला सकळीं । लोटांगणें तळीं महिवरी ॥२॥ वरी हातबाहे उभारिली देवें । कळलीया भावें सकळाच्या ॥३॥ सकळही वरी बहुडविले स्थळा । चलावें गोपाळां म्हणे घरा ॥४॥ राहिलीं हीं नाचों गोविंदाच्या बोलें । पडलीया डोल छंदें होतीं ॥५॥ छंद तो नावरे आपणा आपला । आनंदाचा आला होता त्यांसी ॥६॥ त्यांसी तुका म्हणे आनंद सकळां । ठेंगण्या गोपाळां समागमें ॥७॥

३८८३. समागमें असे हरि नेणतियां । नेदी जाऊं वांयां अंकितांसी ॥१॥ अंकितां सावध केलें नारायणें । गोपाळ गोधनें सकळही ॥२॥ सकळही जन आले गोकुळासी । आनंद मानसीं सकळांच्या ॥३॥ सकळांचा केला अंगीकार देवें । न कळतां भावें वांचवी त्यां ॥४॥ त्यां झाला निर्धार हरि आम्हांपासीं । निवांत मानसीं निर्भर ते ॥५॥ निर्भर हे जन गोकुळींचे लोक । केलें सकळीक नारायणें ।६॥ नारायण भय येऊं नेदी गांवा । तुका म्हणे नांवा अनुसरे त्या ॥७॥

३८८४. अनुसरे तया फिरों नेदी मागें । राहे अंगसंगें समागमें ॥१॥ अंगसंगें असे कर्म साक्ष देव । जैसा ज्याचा भाव तैसें फळ ॥२॥ फळपाकीं भोग देतील प्राणीये । तुका म्हणे नये सवें कांहीं ॥३॥

३८८५. ये दशे चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे ॥१॥ हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढेंहि बहुत करणें आहे ॥२॥ आहे तुका म्हणे धर्मसंस्थापणें । केला नारायणें अवतार ॥३॥

६८८६. अवतार केला संहाराया दुष्ट । करिती ते नष्ट परपीडा ॥१॥ परपीडा करी दैत्य कंसराव । पुढें तोही भाव आरंभिला ॥२॥ लाविलें लाघव पाहोनियां संधि । सकळांही वधी दुष्ट जना ॥३॥ दुष्टजन परपीडक जे कोणी । ते या चक्रपाणी न साहती ॥४॥ न साहावे दुःख भक्तांचें या देवा । अवतार घ्यावा लागे रूप ॥५॥ रूप हें चांगलें राम कृष्ण नाम । हरे भवश्रम उच्चारितां ॥६॥ उच्चारितां नाम कंस वैरभावें हरोनियां जीवें कृष्ण केला ॥७॥ कृष्णरूप त्यासी दिसे अवघे जन । पाहे तों आपण कृष्ण झाला ॥८॥ पाहिलें दर्पणीं आधिल्या मुखाची । चतुर्भुज त्यासी तोचि झाला ॥९॥ झालीं कृष्णरूप कन्या पुत्र भाज । तुका म्हणे राज्य सैन्य जन ॥१०॥

३८८७. सैन्य जन हांसे राया जालें काई । वासपे तो ठायीं आपणासी ॥१॥ आपणा आपण जाय सती जैसी । वैरभाव ज्यांसी भक्ति नाहीं ॥२॥ नाहीं याचा त्याचा भाव एकविध । म्हणऊनी

छंद वेगळाले ॥३॥ वेगळाल्या भावें ते तया हांसती । तयास दिसती अवघीं हरि ॥४॥ हरिला कंसाचा जीवभाव देवें । द्वेषाचिया भावें तुका म्हणे ॥५॥

३८८८. द्वेषाचिया भावें हरिरूप झाले । भाव हरपले देहादिक ॥१॥ देहादिक कर्म अभिमान वाढे । तया कैसा जोडे नारायण ॥२॥ नारायण जोडे एकविध भावें । तुका म्हणे जीवें जाणें लागे ॥३॥

३८८९. जीवभाव त्याचा गेला अभिमान । म्हणऊनी जन हांसे कंसा ॥१॥ सावध करितां नये देहावरी । देखोनियां दूरी पळे जन ॥२॥ जन वन हरि झालासे आपण । मग हे लोचन झांकियेले ॥३॥ झांकूनी लोचन मौन्येंचि राहिला । नाहीं आतां बोलायाचें काम ॥४॥ बोलायासी दुजें नाहीं हें राहिलें । जन कृष्ण झालें स्वयें रूप ॥५॥ रूप पालटलें गुण नाम याति । तुका म्हणे भूतीं देव झाला ॥६॥

३८९०. झालों स्वयें कृष्ण आठव हा चित्तीं । भेद भयवृत्ति उरली आहे ॥१॥ उरली आहे रूप नांव दिसे भिन्न । मी आणि कृष्ण आठवतो ॥२॥ तोंवरी हा देव नाहीं तयापासीं । आला दिसे त्यासी तोचि देव ॥३॥ देवरूप त्यासी दिसे वरी काया । अंतरीं तो भयाभीत भेदे ॥४॥ भेदे तुका म्हणे अंतरे गोविंद । साचविण छंद वांयां जाय ॥५॥

३८९१. वांयां तैसे बोल हरिसी अंतर । केले होती चार भयभेदें ॥१॥ भेदभय गेलें नोळखे आपणा । भेटी नारायणा कंसा झाली ॥२॥ झाली भेटी कंसा हरीशीं निकट । सन्मुखचि नीट येरयेरां ॥३॥ येरयेरां भेटी युद्धाच्या प्रसंगीं । त्याचें शस्त्र अंगीं हाणितलें ॥४॥ त्याचें वर्म होतें ठावें या अनंता । तुका म्हणे सत्तानायक हा ॥५॥

३८९२. नारायणें कंस चाणूर मर्दिले । राज्यीं स्थापीयेलें उग्रसेना ॥१॥ उग्रसेन स्थापीयेला शरणागत । पुरविला अंत अभक्ताचा ॥२॥ अवघेंचि केलें कारण अनंतें । आपुलिया हातें सकळही ॥३॥ सकळही केलीं आपुलीं अंकित । राहे गोपीनाथ मथुरेसी ॥४॥ मथुरेसी आला वैकुंठनायक । झालें सकळिक एक राज्य ॥५॥ राज्य दिलें उग्रसेना शरणागता । सोडविलीं मातापिता दोन्ही ॥६॥ सोडवणें धांवे भक्तांच्या कैवारें । तुका म्हणे करें शस्त्र धरी ॥७॥

३८९३. धरी दोहीं ठायीं सारखाचि भाव । देवकी वसुदेव नंद दोघे ॥१॥ दोघे एके ठायीं केलीं नारायणें । वाढविला तिणें आणि व्याली ॥२॥ व्याला वाढला हा आपणा आपण । निमित्या कारणें मायबाप ॥३॥ माय हा जगाची बाप नारायण । दुजा करी कोण यत्न यासी ॥४॥ कोण जाणे याचे अंतरींचा भाव । तुका म्हणे भाव कळों नेदी ॥५॥

३८९४. दीनाचा कृपाळू दुष्ट जना काळ । एकला सकळ व्यापक हा ॥१॥ हांसे बोले तैसा नव्हे हा अनंत । नये प्राकृत म्हणों यासी ॥२॥ यासी कळावया एक भक्तिभाव । दुजा नाहीं ठाव

धांडोळितां ॥३॥ धांडोळितां श्रुति राहिल्या निश्चित । तो करी संकेत गोपींसवें ॥४॥ गोपिकांची वाट पाहे द्रुमातळीं । मागुता न्याहाळी न देखतां ॥५॥ न देखतां त्यांसी उठे बैसे पाहे । वेडावला राहे वेळोवेळां ॥६॥ वेळोवेळां पाहे पंथ गोपिकांचा । तुका म्हणे वाचा नातुडे तो ॥७॥

३८९५. तो बोले कोमळ निष्ठुर साहोनी । कोपतां गौळणी हास्य करी ॥१॥ करावया दास्य भक्तांचें निर्लज्ज । कवतुकें रज माथां वंदी ॥२॥ दिलें उग्रसेना मथुरेचें राज्य । सांगितलें काज करी त्याचें ॥३॥ त्यासी कांहीं होतां अरिष्ट निर्माण । निवारी आपण शरणागतां ॥४॥ शरणागतां राखे सर्वभावें हरि । अवतार धरी तयांसाठीं ॥५॥ तयांसाठीं वाहे सुदर्शन गदा । उभा असे सदा सांभाळीत ॥६॥ तळमळ नाहीं तुका म्हणे चित्ता । भक्तांचा अनंता भार माथां ॥७॥

३८९६. मारिले असुर वाढल्या मेदिनी । होते कोणा कोणी पीडित ते ॥१॥ तया नारायण पाठवी अघोरा । संतांच्या मत्सरा घातावरी ॥२॥ वरिले ते दूतीं यमाचिये दंडीं । नुच्चारितां तोंडीं नारायण ॥३॥ नारायण नाम नावडे जयांसी । ते झाले मिरासी कुंभपाकीं ॥४॥ कुंभपाकीं सेल मान तो तयांचा । तुका म्हणे वाचा संतनिंदा ॥५॥

३८९७. वास नारायणें केला मथुरेसी । वधूनी दुष्टांसी तये ठायीं ॥१॥ ठायीं पितयाचे मानी उग्रसेना । प्रतिपाळी जनासहित लोकां ॥२॥ लोकां दुःख नाहीं मागील आठव । देखियेला देव दृष्टी त्यांणीं ॥३॥ देखोनियां देवा विसरली कंसा । ठावा नाहीं ऐसा होता येथें ॥४॥ येथें दुजा कोणी नाहीं कृष्णाविणें । ऐसें वाटे मनें काया वाचा ॥५॥ काया वाचा मनें कृष्णीं रत झाले । सकळां लागलें कृष्णध्यान ॥६॥ ध्यान गोविंदाचें लागलेंसे लोकां । निर्भर हे तुका म्हणे चित्तीं ॥७॥

३८९८. चिंतिलें पावलीं जया कृष्णभेटी । एरवीं ते आटी वांयांविण ॥१॥ वासना धरिती कृष्णाविणें कांहीं । सीण केला तिहीं साधनांचा ॥२॥ चाळविलीं दंभें एक अहंकारें । भोग जन्मांतरें न चुकती ॥३॥ न चुकती भोग तपें दानें व्रतें । एका त्या अनंतेंवांचूनियां ॥४॥ चुकवुनी जन्म दाखवी आपणा । भजा नारायणा तुका म्हणे ॥५॥

३८९९. भजल्या गोपिका सर्व भावें देवा । नाहीं चित्तीं हेवा दुजा कांहीं ॥१॥ दुजा छंद नाहीं तयांचिये मनीं । जागृती स्वप्नीं कृष्णध्यान ॥२॥ ध्यान ज्यां हरीचें हरीसी तयांचें । चित्त ग्वाही ज्याचें तैशा भावें ॥३॥ भाग्यें पूर्वपुण्यें आठविती लोक । अवघे सकळीक मथुरेचे ॥४॥ मथुरेचे लोक सुखी केले जन । तेथें नारायण राज्य करी ॥५॥ राज्य करी गोपी यादवांसहित । कर्मिले बहुत काळ तेथें ॥६॥ तेथें दैत्यीं उपसर्ग केला लोकां । रचिली द्वारका तुका म्हणे ॥७॥

३९००. रचियेला गांव सागराचे पोटीं । जडोनी गोमटीं नानारत्नें ॥१॥ रत्नें खणोखणी सोनियाच्या भिंती । लागलीया ज्योती नानाकळा ॥२॥ कळा सकळही गोविंदाचे हातीं । मंदिरें

निगुतीं उभारिलीं ॥३॥ उभारिलीं दुर्गें दारवंटे फांजी । कोटि चर्या माजी शोभलिया ॥४॥ शोभलें उत्तम गांव सागरांत । सकळांसहित आले हरि ॥५॥ आले नारायण द्वारकानगरा । उदार या शूरा मुगुटमणी ॥७॥ निवडीना याति समानचि केली । टणक धाकुलीं नारायणें ॥८॥ सकळही धर्मशीळ पुण्यवंत । पवित्र विरक्त नारीनर ॥९॥ रचिलें तें देवें न मोडे कवणा । बळियांचा राणा नारायण ॥१०॥ बळबुद्धीनिती देवाचसारिखीं । तुका म्हणे मुखीं गाती ओंव्या ॥११॥

३९०१. गाती ओंव्या कामें करितां सकळें । हालवितां बाळें देवावरी ॥१॥ ऋद्धिसिद्धि दासी द्वारीं ओळंगती । सकळ संपत्ति सर्वां घरीं ॥२॥ घरीं बैसलीया जोडलें निधान । करिती कीर्तन नारी नर ॥३॥ नारीनर धन्य धन्य त्यांची याति । जयांसी संगति गोविंदाची ॥४॥ गोविंदें गोविंद केले लोकपाळ । चिंतनें सकळ तुका म्हणे ॥५॥

३९०२. कांहीं चिंता कोणा नाहीं कोणेविशीं । करी द्वारकेसी राज्य देव ॥१॥ द्वारकेसी राज्य करी नारायण । दुष्ट संहारून धर्म पाळी ॥२॥ पाळी वेद आज्ञा ब्रह्मणांचा मान । अतीतपूजन वैष्णवांचें ॥३॥ अतीत अलिप्त अवघियां वेगळा । नाहीं या गोपाळा अभिमान ॥४॥ अभिमान तुका म्हणे नाहीं त्यासी । नेदी आणिकांसी धरूं देव ॥५॥

३९०२. धरियेलें रूप कृष्ण नाम बुंथी । परब्रह्म क्षिती उतरलें ॥१॥ उत्तम हें नाम राम कृष्ण जगीं । तरावयालागीं भवनदी ॥२॥ दीनानाथ ब्रिदें रुळती चरणीं । वंदितील मुनि देव ऋषि ॥३॥ ऋषी मुनी भेटी दिली नारायणें । आणीक कारणें बहु केलीं ॥४॥ बहु कासावीस झाला भक्तांसाठीं । तुका म्हणे आटी सोसियेली ॥५॥

३९०४. सोसियेली आटी गर्भवास फेरे । आयुधांचे भारे वागवितां ॥१॥ वाहोनी सकळ आपुलिये माथां । भार दासां चिंता वाहों नेदी ॥२॥ नेदी काळाचिये हातीं सेवकांसी । तुका म्हणे ऐसी ब्रीदावळी ॥३॥

३९०५. ब्रीदावळी ज्याचे रूळते चरणीं । पाउलें मेदिनी सुखावे त्या ॥१॥ सुखावे मेदिनी कृष्णाचिये चाली । कुंकुमें शोभली होय रेखा ॥२॥ होऊनी भ्रमर पाउलांचें सुख । घेती भक्त मुख लावूनियां ॥३॥ याचसाठीं धरियेला अवतार । सुख दिलें फार निज दासां ॥४॥ निजसुख तुका म्हणे भक्तां ठावें । तिहींच जाणावें भोगूं त्यासी ॥५॥

३९०६. भोगिला गोपिकां यादवां सकळां । गौळणी गोपाळां गाई वत्सां ॥१॥ गाती धणीवरी केला अंगसंग । पाहिला श्रीरंग डोळेभरी ॥२॥ भक्ति नवविधा तयांसी घडली । अवघींच झालीं कृष्णरूप ॥३॥ रूप दाखविलें होतां भिन्नभाव । भक्त आणि देव भिन्न नाहीं ॥४॥ नाहीं राहों दिलें जातां निजधामा । तुका म्हणे आम्हांसहित गेला ॥५॥

३९०७. गेला कोठें होता कोठूनियां आला । सहज व्यापला आहे नाहीं ॥१॥ आहे

साच भावें सकळव्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥२॥ कोठें नाहीं ऐसा नाहीं रिता ठाव । अनुभवी देव स्वयें झाले ॥३॥ जातों येतों आम्ही देवाचे सांगात । तुका म्हणे गात देवनाम ॥४॥

३९०८. मना वाटे तैसीं बोलिलों वचनें । केली धीटपणें सलगी देवा ॥१॥ वाणी नाहीं शुद्ध याति एक ठाव । भक्ति नेणें भाव नाहीं मनीं ॥२॥ नाहीं झालें ज्ञान पाहिलीं अक्षरें । मानिजेसी थोर थोरी नाहीं ॥३॥ नाहीं मनीं लाज धरिली आशंका । नाहीं भ्यालों लोकां चतुरांसी ॥४॥ चतुरांच्या राया मी तुझे अंकीत । झालों शरणागत देवदेवा ॥५॥ देवा आतां करीं सरतीं हीं वचनें । तुझ्या कृपादानें बोलिलों तीं ॥६॥ तुझें देणें तुझ्या समर्पूनी पायीं । झालों उतरायी पांडुरंगा ॥७॥ रंकाहूनी रंक दास मी दासांचें । सामर्थ्य मज कैचें बोलावया ॥८॥ बोलावया पुरे माझी वाचा कायी । तुका म्हणे पायीं ठाव द्यावा ॥९॥

३९०९. पांडुरंगा करूं प्रथम नमन । दुसरें चरणा संतांचिया ॥१॥ त्याच्या कृपादानें कथेचा विस्तारू । बाबाजीसद्गुरूदास तुका ॥२॥ काय माझी वाणी मानेल संतांसी । रंजवूं चित्तासी आपुलिया ॥३॥ या मनासी लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ॥४॥ सीण झाला मज संसारसंभ्रमें । सीतळ या नामें झाली काया ॥५॥ या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आला आकारासी निर्विकार ॥६॥ नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आइकतां ॥७॥ तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥८॥ मूळ नरकाचें राज्य मदें माते । अंतरे बहुत देव दुरी ॥९॥ दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोचिडासी क्षीर राहे ॥१०॥ हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ॥११॥ जाणतें तयांनीं सांगितलें करा । अहंतेसी वारा आडूनियां ॥१२॥ यांसी आहे ठावें परी अंध होती । विषयांची खंती वाटे जना ॥१३॥ नाहीं त्या सुटलीं द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची ॥१४॥ चित्त ज्याचें पुत्रपत्नीबंधूवरी । सुटेल हा परि कैसें जाणा ॥१५॥ जाणते नेणते करा हरिकथा । तराल सर्वथा भाक माझी ॥१६॥ माझी मज असे घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ॥१७॥ कोणी तरी कांहीं केलें आचरणें । मज या कीर्तनेंविण नाहीं ॥१८॥ नाहीं भक्ता भय तराया पोटाचें । देवासी तयाचें करणें लागे ॥१९॥ लागे पाठोवाठी पाहे पायांकडे । पीतांबरें खडे वाट झाडी ॥२०॥ डिंकोनियां काय राहिले हे लोक । हेंचि कवतुक वाटे मज ॥२१॥ जयानें तारिले पाषाण सागरीं । तो ध्या रे अंतरीं स्वामी माझा ॥२२॥ माझीया जीवाची केली सोडवण । ऐसा नारायण कृपाळू हा ॥२३॥ हाचि माझा नेम हाचि माझा धर्म । नित्य वाचे नाम विठोबाचें ॥२४॥ चेतवला अग्नि तापत्रयजाळ । तो करी शीतळ रामनाम ॥२५॥ मना एक करी चित्तीं दृढ धरीं । तारील श्रीहरि मायबाप ॥२६॥ बाप हा कृपाळू भक्तां भाविकांसी । घरीं होय दासी कामारी त्या ॥२७॥ त्याचा भार माथां चालवी आपुला । जिहीं त्या दिधला सर्व भाव ॥२८॥ भावेंविण नाहीं तयाची ते

प्राप्ति । पुराणें बोलती ऐसी मात ॥२९॥ मात त्याची सदा आवडे जयासी । तया गर्भवासी नाहीं येणें ॥३०॥ यावें विष्णुदासीं तरीच गर्भवासीं । उद्धार लोकांसी पूज्य होती ॥३१॥ होती आवडते जीवाचे ताइत । त्यां घडी अच्युं न विसंबे ॥३२॥ भेदाभेद कांहीं चिंता दुःख नाहीं । वैकुंठ त्या ठायीं सदा वसे ॥३३॥ वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नामघोष ॥३४॥ संपदा तयांची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्ती देवलाभ ॥३५॥ लाभ तयां झाला संसारा येऊनी । भगवंत ऋणी भक्तीं केला ॥३६॥ लागलेंसे पिसेंकाय मूढ जना । काय नारायणा विसरलीं ॥३७॥ विसरलीं तयां थोर झाली हाणी । पचतील खाणी चौऱ्यांसीच्या ॥३८॥ शिकवितां तरी नाहीं कोणा लाज । लागलीसे भाज धन गोड ॥३९॥ गोड एक आहे अविट गोविंद । आणीक ते छंद नाशिवंत ॥४०॥ तळमळ त्याची कांहीं तरी करा । कां रे निदसुरा बुडावया ॥४१॥ या जनासी भय यमाचें कां नाहीं । सांडियेलीं तिहीं एकीं राज्य ॥४२॥ जेणें अग्रिमाजी घातलासे पाव । नेणतां तो राव जनक होता ॥४३॥ तहान भूक जिहीं साहिले आघात । तयां पाय हात काय नाहीं ॥४४॥ नाहीं ऐसा तिहीं केला संवसार । दुःखाचे डोंगर तोडावया ॥४५॥ याच जन्में घडे देवाचें भजन । आणीक हें ज्ञान नाहीं कोठें ॥४६॥ नाहीं पुढें कोठें घ्यावया विसांवा । फिरोनी या गांवा आल्याविण ॥४७॥ विनवितां दिवस बहुत लागती । म्हणऊनी चित्तीं देव धरा ॥४८॥ धरा पाय तुम्ही संतांचे जीवेंसी । वियोग देवासी तयां नाहीं ॥४९॥ नाहीं चाड देवा आणिका सुखाची । आवडी तयाची त्याची तया ॥५०॥ त्याचींच उच्छिष्ट बोलतों उत्तरें । सांगितलें खरें व्यासादिकीं ॥५१॥ व्यासें सांगितलें भक्ति हेंचि सार । भवसिंधु पार तरावया ॥५२॥ तरावया जना केलें भागवत । गोवळें गोपी भक्त माता पिता ॥५३॥ तारूनियां खरें नेलीं एकसरें । निमित्तें उत्तरें ऋषीचिया ॥५४॥ यासी वर्म ठावें भक्त तरावया । जननी बाळ माया राखे तान्हें ॥५५॥ तान्हेलें भुकेलें म्हणे वेळोवेळां । न मागतां कळा जाणोनियां ॥५६॥ जाणोनियां वर्म देठ लावियेला । द्रौपदीच्या बोलासवें धांवे ॥५७॥ धांवें सवें तान्ही धेनु जैसी वत्सा । भक्तालागीं तैसा नारायण ॥५८॥ नारायण व्हावा हे हांव जया जीवा । धन्य त्याच्या दैवा पार नाहीं ॥५९॥ नाहीं पार सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामराम ॥६०॥ रामराम दोनी उत्तम अक्षरें । भवानीशंकरें उपदेशिलीं ॥६१॥ उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणसी प्राणी मध्यें मरे ॥६२॥ मरणाचे अंतीं राम म्हणे जरी । न लगे यमपुरी जावें तया ॥६३॥ तयासी उत्तम ठाव पैं वैकुंठीं । वसे नाम कंठीं सर्वकाळ ॥६४॥ सर्वकाळ वसे वैष्णवांच्या घरीं । नसे क्षणभरी स्थिर कोठें ॥६५॥ कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ॥६६॥ सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शाहाणे मरती तरी नाहीं ॥६७॥ नाहीं भक्ति भली केलियावांचूनी । अहंता पापिणी नागवण ॥६८॥ नागवला म्हणे देव मी आपणा । लाभ दिला जना ठकला तो ॥६९॥ तोचि देव येर नव्हे ऐसें कांहीं । जनार्दन ठायीं चहूं खाणी ॥७०॥ खाणी भरूनियां राहिलासे आंत । बोलावया मात ठाव

नाहीं ॥७१॥ ठाव नाहीं रिता कोणी देवाविण। ऐसी ते सज्जन संतवाणी ॥७२॥ वाणी बोलोनियां एक गेले पुढें। तयासी वांकुडें जातां ठके ॥७३॥ ठकला नाहीं अर्थ ठाउका वेदांचा। होऊनी भेदाचा दास ठेला ॥७४॥ दास ठेला पोट अर्थ दंभासाठीं। म्हणउनि तुटी देवासवें ॥७५॥ सवे देव द्विजातीही दुराविला। आणिकांचा आला कोण पाड ॥७६॥ पाड करूनियां नागविलीं फार ।पंडित वेव्हार खळवादी ॥७७॥ वादका निंदका देवाचे दर्शन। नव्हे झाल्या पूर्ण षडकर्मी ॥७८॥ षडकर्म हीन रामनाम कंठीं। तयासवें भेटी सत्य देवा ॥७९॥ देवासी आवडे भाविक जो भोळा। शुद्ध त्या चांडाळा करूनि मानी ॥८०॥ मानियेला नाहीं उदार या बोला। नाम घेतां मला युक्ति थोडी ॥८१॥ युक्ति थोडी माझी दुर्बळाची वाचा। प्रताप नामाचा बोलावया ॥८२॥ बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति। खुंटलिया युक्ति पुढें त्याच्या ॥८३॥ त्याचा पार पुढें न कळेचि जातां। पाउलें देखतां ब्रह्मादिकां ॥८४॥ काय भक्ति पिसें लागले देवासी। इच्छा ज्याची जैसी तैसा होय ॥८५॥ होय हा सगुण निर्गुण आवडी। भक्तिप्रिय गोडी फेडावया ॥८६॥ मायबापापाशीं बाळ बोले लाडें। करूनी वांकुडें मुख तैसें ॥८७॥ तैसें याचकाचें समाधानदाता। होय हा राखतां सत्वकाळीं ॥८८॥ सत्वकाळींकामा न येती आयुधें। सोयरीं संबंधें सैन्य लोक ॥८९॥ सैन्य लोक तया दाखवी प्रताप। लोटला हा कोप कोपावरी ॥९०॥ कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी। प्रमाण भल्यासी सत्व गुण ॥९१॥ सत्वरजतम आपण नासती। करितां या भक्ति विठोबाची ॥९२॥ चित्त रंगलिया चैतन्यचि होय। तेथें उणें काय निजसुखा ॥९३॥ सुखाचा सागरु आहे विटेवरी। कृपादान करी तोचि एक ॥९४॥ एक चित्त करूं विठोबाचे पायीं। तेथें उणें कांहीं एक आम्हां ॥९५॥ आम्हांसी विश्वास त्याचिया नामाचा। म्हणउनि वाचा घोष करूं ॥९६॥ करूं हरिकथा सुखाची समाधि। आणिकाची बुद्धि दुष्ट नासे ॥९७॥ नासे संवसार लोभमोहो माया। शरण जातां या विठोबासी ॥९८॥ सिकविलें मज मूढा संतजनीं। दृढ या वचनी राहिलोंसें ॥९९॥ राहिलोंसें दृढ विठोबाचे पायीं। तुका म्हणे कांही न लगे आतां ॥१००॥

३९१०. गाईन ओंविया पंढरीचा देव। आमुचा तो जीव पांडुरंग ॥१॥ रंगलें हें चित्त माझें तया पायीं। म्हणउनि घेईं हाचि लाहो ॥२॥ लाहो करीन मी हाचि संवसारीं। राम कृष्ण हरि नारायण ॥३॥ नारायण नाम घालितां तुकासी। न येती या रासी तप तीर्थें ॥४॥ तीर्थें माथां रज वंदिती संतांचें। जे गाती हरीचे गुणवाद ॥५॥ गुणवाद ज्याचे गातां पूज्य झाले। बडिवार बोले कोण त्यांचा ॥६॥ त्याचा नाहीं पार कळला वेदांसी। आणीकही ऋषि विचारितां ॥७॥ विचारितां तैसा होय त्यांच्या भावें। निजरूप ठावें नाहीं कोणा ॥८॥ कोणा कवतुक न कळे हे माव। निजलिया जीव करी धंदा ॥९॥ करूनि कवतूक खेळे हाचि लीळा। व्यापूनि वेगळा पाहतसे ॥१०॥ सेवटीं आपण वेगळाचि खरा। सोंग हा पसारा नट केला ॥११॥ लावियेलें चाळा

मीपणें हें जन। भोग तया कोण भोगवितो ॥१२॥ विषयीं गुंतलीं विसरलीं तुज। कन्या पुत्र भाज धनलोभें ॥१३॥ लोभें गिळी फांसा आमिषाच्या आशा। सांपडोनी मासा तळमळी ॥१४॥ तळमळ त्यांची तरीच शमेल। जरी हा विठ्ठल आठविती ॥१५॥ आठवे तरी देव संतांच्या सांगातें। किंवा हें संचित जन्मांतर ॥१६॥ जन्मांतरें तीन भोगितां कळती। केलें तें पावती करितां पुढें ॥१७॥ पुढें जाणोनियां करावें संचित। पूजावे अतीत देव द्विज ॥१८॥ जन्म तुटे ऐसें नव्हे तुम्हां जनां। पुढिल्या पावना धर्म करा ॥१९॥ करा जप तप अनुष्ठान याग। संतीं जे मारग स्थापियेले ॥२०॥ लावियेलीं कर्मीं शुद्ध आचरणीं। कोणा एका जन्मीं केलें पावे ॥२१॥ पावले सत्वर निष्काम उद्धार। जिंकिली अपार वासना हे ॥२२॥ वासनेचें मूळ छेदिल्यावांचूनी। तरलोंसें कोणीं न म्हणावें ॥२३॥ न म्हणावें झालों पंडित वाचक। करुनि मंत्रघोष अक्षरांचा ॥२४॥ चाळविलीं एकें तेचि आवडीनें। लोक दंभमानें देहसुखें ॥२५॥ सुख तरीच घडे भजनाचे सार। वाचे निरंतर रामनाम ॥२६॥ राम हा उच्चार तरीच बैसे वाचे। अनंता जन्मींचें होइल पुण्य ॥२७॥ पुण्य ऐसें काय रामनामापुढें। काय ते बापुडे यागयज्ञ ॥२८॥ यागयज्ञ तप संसारदायकें। न सुटे एके नामेंविण ॥२९॥ नामेंविण भवसिंधू पावे पार। अइसा हा विचार नाहीं दुजा ॥३०॥ जाणती हे भक्तराज महामुनी। नाम सुखधणी अमृताची ॥३१॥ अमृताचें सार निजतत्त्व बीज। गुह्याचें तें गुज रामनाम ॥३२॥ नामें असंख्यात तारिले अपार। पुराणीं हे सार प्रसिद्ध हे ॥३३॥ हेंचि सुख आम्ही घेऊं सर्वकाळ। करूं हे निर्मळ हरिकथा ॥३४॥ कथाकाळीं लागे सकळा समाधि। तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ॥३५॥ नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया। गातां गुण तया विठोबाचे ॥३६॥ विठोबाचे गुण मज आवडती। आणिक हे चित्तीं न लगे कांहीं ॥३७॥ कांहीं कोणी नका सांगों हा उपाव। माझ्या मनीं भाव नाहीं दुजा ॥३८॥ जाणोनियां आम्हीं दिला जीवभाव। दृढ याचे पाव धरियेले ॥३९॥ धरियेले आतां न सोडीं जीवेसीं। केला हा सेवेसीं निरधार ॥४०॥ निरधारें आम्हीं राहिलों ये नेटीं। संवसारतुटी करूनियां ॥४१॥ येणें अंगीकार केला पांडुरंगें। रंगविलें रंगें आपुलिया ॥४२॥ आपुली पाखर घालूनियां वरी। आम्हांसी तो करी यत्न देव ॥४३॥ देव राखे तया आणिकांचे काय। करितां उपाय चाले येथें ॥४४॥ तेथें नाहीं रिघ कळिकाळासी येतां। दास म्हणवितां विठोबाचे ॥४५॥ विठोबाचे आम्ही लाडिके डिंगर। कांपती असुर काळ धाकें ॥४६॥ धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा। स्मरण हें करा त्याचें तुम्ही ॥४७॥ तुम्ही निदसुरे नका राहूं कोणी। चुकवा जाचणी गर्भवास ॥४८॥ गर्भवासीं दुःख यमाचें दंडण। थोर होय शीण येतां जातां ॥४९॥ तहान भूक पीडा जीतां हे आघात। मेल्या यमदूत जाच करिती ॥५०॥ जाच करिती हें म्हणसी कोणा ठावें। नरकीं कौरवें बुडी दिली ॥५१॥ बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें। दाविना लाजेनें मुख धर्मा ॥५२॥ धर्म हा कृपाळू आलासे जवळी। बैसला पाताळीं वरी नये ॥५३॥ न ये वरी कांहीं करितां उपाव। भोगवितो देव तेंची

त्यासी ॥५४॥ त्यासी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायण ॥५५॥ नारायण जे विसरलीं संवसारीं । तयांसीं अघोरीं वास सत्य ॥५६॥ सत्य मानूनियां संतांच्या वचना । जा रे नारायणा शरण तुम्ही ॥५७॥ तुम्ही मानूं नका कोणी हा विश्वास । पुत्र पत्नी आस धन वित्त ॥५८॥ धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियेले फांसे यमदूतीं ॥५९॥ दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ॥६०॥ नेदी शुद्धबुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्मे त्यासी दुरावती ॥६१॥ दुराविलीं एके जाणतींच फार । निंदा अहंकार वादभेद ॥६२॥ वादभेद निंदा हे फंद काळाचे । गोवितील वाचे रिकामिकें ॥६३॥ रिकामिका देहा होय नव्हे मना । चिंतेचिये घाणा जुंपिजेसीं ॥६४॥ सेवटीं हे गळा लावूनियां दोरी । सांभाळ ये करीं वासनेचा ॥६५॥ वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळी जन्म धरी ॥६६॥ धरूनियां देव राहतील चित्तीं । आधींलिया गती आठवाया ॥६७॥ आठवावा देव मरणाचे काळीं । म्हणउनि बळी जीव दिले ॥६८॥ दिले टाकूनियां भोग ऋषेश्वरीं । खाती वनांतरीं कंदमुळें ॥६९॥ मुळें सुखाचिया देव अंतरला । अल्पासाठीं गेला अधोगती ॥७०॥ गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाय विठोबाचे ॥७१॥ विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा ॥७२॥ तरती दुबळीं विठोबाच्या नांवें । संचित ज्या सवें नाहीं शुद्ध ॥७३॥ शुद्ध तरायाचें काय तें नवल । म्हणतां विठ्ठल वेळोवेळां ॥७४॥ वेळकाळ नाहीं कवणाचे हातीं । न कळे हे गति भविष्याची ॥७५॥ भविष्य न सुटे भोगिल्यावांचूनी । संचित जाणोनी शुद्ध करा ॥७६॥ करावे सायास आपुल्या हिताचे । येथें आलियाचें मनुष्यपण ॥७७॥ मनुष्यपण तरी साधी नारायण । नाहीं तरी हीन पशुहूनी ॥७८॥ पशु पाप पुण्य काय हे जाणती । मनुष्या या रीति ठाउकिया ॥७९॥ ठाउकें हें असें पाप पुण्य लोकां । देखतील एकां भोगितिया ॥८०॥ भोगतील एक दुःख संवसारीं । काय सांगों परी वेगळाल्या ॥८१॥ ल्यावें खावें बरें असावें सदैव । हेचि करी हांव संवसारीं ॥८२॥ संवसारें जन गिळीले सकळ । भोगितील फळें गर्भवास ॥८३॥ वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे या खंडण गर्भवासा ॥८४॥ सायास केलियावांचूनी तें नाहीं । भविष्यावरी कांहीं घालूं नये ॥८५॥ नये बळें धड घालूं कांट्यावरी । जाय जीवें धरी सर्प हातीं ॥८६॥ हातीं आहे हित करील तयासी । म्हणउनि ऋषीं सांगितलें ॥८७॥ सांगितलें लोका फजित करूनी । आपण जे कोणी तरले ते ॥८८॥ तेणें वाळवंटीं उभारीला कर । कृपेचा सागर पांडुरंग ।८९॥ गंगाचरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ॥९०॥ चिंतने जयाच्या तरती पाषाण । उद्धरी चरण लावूनियां ॥९१॥ लावूनियां टाळीं नलगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥९२॥ संतसंगें कथा करावें कीर्तन । सुखाचें साधन रामनाम ॥९३॥ मग कोठें देव जाऊं न सके दुरी । बैसोनी भीतरीं कंठीं राहे ॥९४॥ राहे व्यापुनियां सकळ शरीर । आपुला विसर पडों नेदी ॥९५॥ नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा

यमदूता ॥९६॥ तहान भूक त्यासी वाहों नेदी चिंता । दुश्चित हे घेतां नाम होती ॥९७॥ होती जीव त्याचे सकळही जंत । परी ते अंकित संचिताचे ॥९८॥ चेविले जे कोणी देह अभिमानें । त्यांसी नारायणें कृपा केली ॥९९॥ कृपाळू हा देव अनाथा कोंवसा । आम्ही त्याच्या आशा लागलोंसे ॥१००॥ लावियेले आसे येणें पांडुरंगें । तुका म्हणे संगें भक्तांचिया ॥१०१॥

[डाकाचे अभंग]

३९११. चौक भरियेला आसनीं । पाचारिली कुळस्वामिनी । वैकुंठवासिनी । ये धांवोनी झडकरी ॥१॥ रंगा येई वो विठाई । सांवळिये डोळसे । तुझें श्रीमुख साजिरें । तें मी केधवां देखेन ॥२॥ रजतमधुपारती । पंचप्राणांची आरती । अवघी सारोनि आइती । ये धांवती इडकरी ॥३॥ मन मारोनि मेंढा मुठीं । आशा मनसा तृष्णा सुटी । भक्तिभाव नैवेद्य ताटीं । भरोनी केला हाकारा ॥४॥ डाका अनुहात गजरें । येउनि अंगासी संचरे । आपुला घेऊनी पुरस्कार । आरोग्य करी तुकयासी ॥५॥

३९१२. साच माझा देव्हारा । भाक ठेवा भाव खरा । त्रिगुणांचा फुलवरा । आणा विनंती सांगतों ॥१॥ माझें दैवत हें रंगीं । नाचे वैष्णवांच्या संगीं । भरलें मग अंगीं । निवाड करीं दोहींचा ॥२॥ तुझे आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलासी । चिवडूनियां नासी । तुझ्या घरिच्यांनीं केली ॥३॥ आतां न पडे ठावें । वांचूनियां माझ्या देवें । अंधकार व्हावें । नासु ठाव शोधावा ॥४॥ आंधळ्यासी डोळे । देते पांगुळासी पाय । वांजा पुत्र होय । नवस पुरविते विठाई ॥५॥ उगविलीं कोडीं । मागें कित्येकांचीं बापुडीं । तुका म्हणे घडी । न लगे नवस द्या आधीं ॥६॥

३९१३. विनंति घातली अवधारीं । मज देईं वो अभय करीं । पीडिलों खेचरीं । आणिका वारी नांवांची ॥१॥ रंगा येईं वो एकला । रंग वोढवला । हरिनामें उठिला । गजर केला हाकारा ॥२॥ देवांचे दैवते । तुज नमिलें आदिनाथें । ये वो कृपावंतें । भोगा माझ्या धांवत ॥३॥ न लवीं आतां वेळ । आइती सारिली सकळ । तुका म्हणे कुळ । आमुचिये दैवते ॥४॥

३९१४. माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा । त्रिभुवनीं याचा । ठसा नलगें पुसावें ॥१॥ या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी । करील झाडणी । भूत काढील संसार ॥२॥ पडिले विषयांचे गोंधळी । ते त्रिगुण आखळी । हरिनाम आरोळी । कानीं पडतां ते उठी ॥३॥ घेतला अहंकारें । काम क्रोध या मत्सरें । पळती प्रेमभरें । अवघी ठाव सांडूनी ॥४॥ घेतलासे पुरा । माया ममता आसरा । अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनी ॥५॥ तुका म्हणे द्यावा भाव । फिटेल मनींचा संदेह । आणीक नलगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ॥६॥

३९१५. पुढें येते देवी । तिची जती जालों द्यावी । मागील झाडावी । झाडा मान आसडी ॥१॥ एकवीरा आली अंगा । आतां निवारील रोगा । माझ्या भक्तापाशीं सांगा । पूजा भावें

करावी ॥२॥ मेंढा मारावा लोहाळ। पूजा पावली सकळ। तुम्हीं केलें बळ। मग मी ठायीं न पडें ॥३॥ तुका म्हणे मुळीं। लागली ते आली कुळीं। वंदूनी सकळीं। जीवें भावें ओवाळा ॥४॥

३९१६. अवघ्या ज्येष्ठा देवी। कोण पूजनाचा ठाव। धरितांचि भाव। कोठें नाहींसें झालें ॥१॥ दिसे सारिखें सारिखें। परि तें कारणीं पारिखें। तळीं गेलें देखें। वरी टोले न साहाती ॥२॥ पट एका शिरीं। यथाविधिनें त्या येरी। बसकोळ्या घागरी। डेरे रांजण गाडगीं ॥३॥ तुका म्हणे माना। येथें कोणी रुसावें ना। आपुलाल्या स्थानां। जेथें त्याची शोभल्या ॥४॥

३९१७. खेचर खडतर। काळ कांपती असुर। नांदें भीमातीर। पंढरपुरपाटणीं ॥१॥ आतां करी कां रे हाकारा। सहस्त्रनामें एकसरा। दवडिते खेचरा। अंगसंगें धरूनी ॥२॥ सीते झाली झडपणी। राहणें वासुगीच्या वनीं। पावलीं जननी। झोंटि मोकळीया केशी ॥३॥ लाविले कावरें। प्रल्हादासी म्हैसासुरें। आली येकसरें। दांत खात रंगासी ॥४॥ वसुदेवाची बाळें। सात खादलीं ज्या काळें। आली भोगवेळे। तया कारणें तेथें ॥५॥ पांडवें बापुडीं। वांज केलीं फिरती वेडीं। धांवोनियां काढी। अंगसंगें त्राहाटविलीं ॥६॥ नामाचें चिंतन। तेथें धांवते आपण। न विचारितां हीण। भाव देखे जयाचा ॥७॥ कुळींची कुळदेवता। तुका म्हणे आम्हां माता। काय भय भूतां। काळ यमदूताचें ॥८॥

३९१८. देवी देव झाले भोग सरले यावरी। सांगाया दुसरी ऐसी नाहीं उरली ॥१॥ हरिनाम देवनाम तुम्ही गाऊनियां जागा। पेंठवणी मागा नका ठेवूं लिगाड ॥२॥ शेवटीं सुताळी बरवी वाजवावी डांक। ताळा घाली एक सरलियाचे शेवटीं ॥३॥ गुंडाळा देव्हारा मान नेती मानकरी। तुका म्हणे बरीं आजी कोडीं उगविलीं ॥४॥

[पांगुळ]

३९१९. पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय। बैसलों जयावरी सैराट तें जाय। खेटितां कुंप कांटी खुंट दरडी न पाहे। आधार नाहीं मज कोणी बाप ना माय ॥१॥ दाते हो दान करा जाते पंढरपुरा। न्या मज तेथवरी अखमाचा सोयरा ॥२॥ हिंडतां गव्हानें गा शिणलों येरझारी। न मिळेचि दाता कोणी जन्मदु:ख निवारी। कीर्ति हे संतां मुखीं तोचि दाखवा हरी। पांगुळा पाय देतो नांदे पंढरपुरीं ॥३॥ या पोटाकारणें गा झालों पांगिला जना। न सरेचि मायबाप भीक नाहीं खंडणा। पुढारा म्हणती एक तया नाहीं करुणा। श्वान हें लागे पाठी आशा बहु दारुणा ॥४॥ काय मी चुकलो गा। मागें नेणवेचि कांहीं। न कळेचि पापपुण्य येथें आठव नाहीं। मी माजी भुललों गा दीप पतंगासोयी। द्या मज जीवदान संत महानुभाव कांहीं ॥५॥ दुरोनी आलों मी गा दु:ख झालें दारुण। यावया येथवरी होतें हेंचि कारण। दुर्लभ भेटी तुम्हां पायीं झालें दरुषण। विनवितो तुका संतां दोन्ही कर जोडून ॥६॥

३९२०. देखत होतों आधीं मागें पुढें सकळ । मग हे दृष्टि गेली वरी आलें पडळ । तिमिर कोंदलेंसे वाढे वाढतां प्रबळ । भीत मी झालों देवा काय ज्याल्याचें फळ ॥१॥ आतां मज दृष्टि देईं पांडुरंगा मायबापा । शरण मी आलों तुज निवारूनियां पापा । अंजन लेववूनी करीं मारग सोपा । जाईन सिद्धपंथें अवघ्या चुकतील खेपा ॥२॥ होतसे खेद चित्ता कांहीं नाठवे विचार । जात होतों जनामागें तो हि सांडिला आधार । हा ना तो ठाव झाला अवघा पडिला अंधार । फिरलीं माझीं मज कोणी न देती आधार ॥३॥ जोंवरी चळण गा तोंवरी म्हणती माझा । मानिती लहान थोर देहसुखाचीया काजा । इंद्रियें मावळलीं आला बागुल आजा । कैसा विपरीत झाला तोचि देह नव्हे दुजा ॥४॥ गुंतलों या संवसारें कैसा झालोंसे अंध । मी माझें वाढवूनी मायातृष्णेचा बाध । स्वहित न दिसेचि केला आपुला वध । लागले काळ पाठीं सवें काम हे क्रोध ॥५॥ लागती चालतां गा गुणदोषाच्या ठेंसा । सांडिली वाट मार्ग झालों निराळा कैसा । पाहातों वास तुझी थोर करूनी आशा । तुका म्हणे वैद्यराजा पंढरीच्या निवासा ॥६॥

३९२१. आंधळ्या पांगळ्यांचा एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तोचि सर्व होय जाणता । घडी मोडी हेळामात्रें पापपुण्यसंचिता । भवदुःख कोण वारी तुजवांचुनी चिंता ॥१॥ धर्म गा जागो तुझा तूंचि कृपाळू राजा । जाणसी जीवींचें गा न सांगतां सहजा ॥२॥ घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्य ठाव नीरे भींवरे तटीं । न देखें दुसरें गा झाली अदृश्यदृष्टि । वोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टि ॥३॥ आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटें । न देखे न चलवे जना चालते वाटे । घातली लोळणी गा हरिनाम बोभाटे । पावला त्या कारणें धांव घातली नेटें ॥४॥ बैसोनी खोळी शुक राहे गर्भीं आंधळा । शीणला येरझारी दुःख आठवी वेळा । मागील सोसिलें तें ना मीं म्हणे गोपाळा । पावला त्याकारणें लाज राखिली कळा ॥५॥ न देखे जो या जना तया दावी आपणा । वेगळा सुखदुःखा मोहो नाठवी धना । आपपर तेंही नाहीं बंधुवर्ग सज्जना । तुकया तेचि परी झाली पावें नारायणा ॥६॥

३९२२. सहज मी आंधळा गा । निजनिराकार पंथें । वृत्ति हे निवृत्ति झाली जन न दिसे तेथें । मी माझें हारपलें ठायी जेथींच्या तेथें । अदृश्य तेंचि झालें कांही दृश्य जें होतें ॥१॥ सुखें मी निजलों गा शून्य सारूनी तेथें । त्रिकूटशिखरीं गा दान मिळे आइतें ॥२॥ टाकिली पात्र झोळी धर्म अधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणांचा वोळसा । न मागें भीक आतां हाचि झाला भरंवसा । वोळली सत्रावी गा तिणें पुरविली इच्छा ॥३॥ ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला दाता घेऊनी छंद । घेऊनि आला दान निजतत्त्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें नांव ठेवियला भेद ॥४॥ शब्द हा बहुसार उपकाराची राशी । म्हणोनि चालविला मागें येतील त्यांसी । मागोनी आली वाट सिद्ध ओळीची तैसी । तरले तरती गा

आणिकही विश्वासी ॥५॥ वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव । जाणीव नागवण नेदी लागो ते ठाव । म्हणोनि संग टाकीं सेवीं अद्वैत भाव । तुका म्हणे हाचि संतीं मागे केला उपाव ॥६॥

३९२३. भगवंता तुजकारणें मेलों जीताचि कैसी । निष्काम बुद्धि ठेली चळन नाहीं तयेसी । न चलती हात पाय दृष्टि फिरली कैसी । जाणतां न देखों गा क्षर आणि अक्षरासी ॥१॥ विठोबा दान दे गा तुझ्या साररिखें नामा । कीर्ति हे वाखाणिली थोर वाढली सीमा ॥२॥ भुक्ति मुक्ति तूंचि एक होसि सिद्धीचा दाता । म्हणोनि सांडवली शोक भय लज्जा चिंता । सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां । कृपादान देई देवा येउनि सामोरा आतां ॥३॥ संसारसागरु गा भवदु:खाचें मूळ । जनवाद अंथरूण माजी काय केले इंगळ । इंद्रियें वज्रघातें तपेउष्ण वरी ज्वाळ । सोसिलें काय करूं दुर्भर हें चांडाळ ॥४॥ तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा । वेंधलो वरि खोडा भाव धरुनी टेंका । जाणवी नरनारी जागों धर्म लोकां । पावती पुण्यवंत सोई आमुचिये हाका ॥५॥ नाठवे आपपर आतां काय बा करूं । सारिखा दोहीसवा हारपला विचारु । घातला योगक्षेम तुज आपुला भारु । तुकया शरणागता देई अभयकरु ॥६॥

३९२४. देश वेष नव्हें माझा सहज फिरत आलों । करूं सत्ता कवणावरीं कोठें स्थिर राहिलों । पाय डोळे म्हणतां माझे तिहीं कैसा मोकलिलों । परदेशीं नाहीं कोणी अंध पांगुळ झालों ॥१॥ आतां माझी करीं चिंता दान देईं भगवंता । पाठीं पोटीं नाहीं कोणी निरवीं सज्जन संतां ॥२॥ चालतां वाट पुढें भय वाटतें चित्तीं । बहुत जन गेले नाहीं आले मागुती । न देखों काय झालें कान तरी ऐकती । बैसलों संधिभागीं तुज धरूनी चित्तीं ॥३॥ भाकितों करुणा गा जैसा सांडिला ठाव । न भरेचि पोट कधीं नाहीं निश्चळ पाव । हिंडतां भागलों गा लक्ष चौऱ्यांशीं गांव । धरूनी राहिलों गा हाचि वसता ठाव ॥४॥ भरंवसा काय आतां कोण आणी अवचिता । तैसीच झाली कीर्ति तया मज बहुतां । म्हणऊनी मारी हाका सोयी पावें पुण्यवंता । लागली भूक थोरी तूंचि कृपाळू दाता ॥५॥ संचित सांडवलें कांहीं होतें तें जवळी । वित्त गोत पुत माया तुटली हे लागावळी । निष्काम झालों देवा होतें माझे कपाळीं । तुका म्हणे तूंचि आतां माझा सर्वस्वें बळी ॥६॥

[वासुदेव]

३९२५. मनु राजा ऐक देहपुरी । असे नांदतु ज्यासी दोघी नारी । पुत्रपौत्र संपन्न भारी । तेणें कृपा केली आम्हांवरी गा ॥१॥ म्हणऊनी आलों या देशा । होतों नाहीं तरी भुललों दिशा । दाता तोही मज भेटला इच्छा । येऊनि मारग दाविला सरिसा गा ॥२॥ सवें घेऊनि चौघेजण आला कुमर सुलक्षण । कडे चुकवूनी कांटे वन । ऐका आणिलीं तीं कोणकोण गा ॥३॥ पुढें भक्तीनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येती । स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सिद्ध आणुनि

लाविलीं पंथी गा ॥४॥ केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय । धर्में त्यांच्या हे देखिले पाय । दिलें अखय अभय दान गा ॥५॥ होतों पीडित हिंडतां गांव । पोट न भरे न रहावया ठाव । तो येणें अवघा संदेह । म्हणे फेडियेला तुकयाचा बांधव गा ॥६॥

३९२६. गातों वासुदेव मी ऐका । चित्त ठायीं ठेवुनि भावें एका । डोळे झांकुनि रात्र करूं नका । काळ करीत बैसलासे लेखा गा ॥१॥ राम राम स्मरा आधीं । लाहो करा गांठ घाला मूळबंदीं । सांडा वाउगिया उपाधी । लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥२॥ अल्प आयुष्य मानवी देह । शत गणिलें तें अर्ध रात्र खाय । मध्यें बालत्व पीडा रोग क्षय । काय भजनासी उरलें तें पाहें गा ॥३॥ क्षणभंगुर नाहीं भरंवसा । व्हा रे सावध तोडा माया आशा । कांहीं न चले पडेल मग गळां फासा । पुढें हुशार थोर आहे ओळसा गा ॥४॥ कांहीं थोडा बहुत लागपाठ । करा भक्तिभाव धरा बळकट । तन मन ध्यान द्या लावुनियां नीट । जरी असेल करणें गोड शेवट गा ॥५॥ विनवितों सकळां जनां । कर जोडोनि थोरां लहानां । दान इतुलें द्या मज दीना । म्हणे तुकया बंधु राम म्हणा गा ॥६॥

३९२७. गेले टळले पहार तीन । काय निदसुरा अझून । जागे होउनि करा कांहीं दान । नका ऐकों झांकुनी लोचन गा ॥१॥ हरी राम कृष्णा । वासुदेव जाणवितसे जना । चिपळ्या टाळ हातीं विणा । मुखीं घोष नारायणा गा ॥२॥ जे ठाकेल कोणा कांहीं । फळ पुष्प अथवा तोयी । द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ॥३॥ देवाकारणें भाव तस्मात । द्यावें न लगे फारसें वित्त । झालें एक चित्त तरी बहुत । येवढ्यासाठीं नका करूं वाता हात गा ॥४॥ आलों येथवरी बहु सायास । करितां दान हेंचि मागावयास । नका भार घेऊं करूं निरास । धर्म सारफळ संसारास गा ॥५॥ आतां मागुतां येईल फेरा । हें तों न घडे या नगरा । म्हणे तुकयाबंधु राम धरा । ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ॥६॥

३९२८. राम राम दोनी अक्षरें । सुलभ आणिसोपारें । जागा मागिले पहारें । सेवटिचें गोड तेंचि खरें गा ॥१॥ राम कृष्ण वासुदेवा । जाणवीतसे जनासी वाजवी चिपळिया । टाळ घागऱ्याघोषें गा ॥२॥ गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाहीं आणिकां नांवा । दान जाणोनियां करीं हावा । न ठेवीं उरी कांहीं ठेवा गा ॥३॥ नीज घेउनीयां फिरती । एक वेळा जाणविती । धरूनियां राहा चित्तीं । नेघें भार सांडीं कामा हातीं गा ॥४॥ सुपात्रीं सर्व भाव । मी तो सर्व वासुदेव । जाणती कृपाळु संत महानुभाव । जया भिन्न भेद नाहीं ठाव गा ॥५॥ शूर दान जीवें उदार । नाहीं वासुदेवीं विसर । कीर्ति वाढे चराचर । तुका म्हणे तया नमस्कार गा ॥६॥

३९२९. बोल अबोलणें बोले । जागें बाहेर आंत निजेले । कैसें घरांत घरकुल केलें । नेणों अंधार ना उजेडलें गा ॥१॥ वासुदेव करितो फेरा । वाडियांत बाहेर दारा । कोणी

कांहीं तरी दान पुण्य करा । जाव नेदा तरी जातों माघारा गा ॥२॥ हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें । नाहीं निवडिलीं थोर लहानें । नका निजों भिकेच्या भेणें गा ॥३॥ मी वासुदेव तत्त्वतां । कळों येईल विचारितां । आहे ठाउका सभाग्य संतां । नाहीं दुजा आणीक मागता गा ॥४॥ कांहीं जागा कीं निजलासी । सुने जागवूनि दारापासीं । तुझ्या हितापाठी करी वसवसी । भेटी न घेसी वासुदेवासी गा ॥५॥ ऐसें जागविलें अवघें जन । होतें संचित तिहीं केलें दान । तुका म्हणे दुबळी कोणकोण । गेलीं वासुदेवासी विसरून गा ॥६॥

३९३०. राम कृष्ण गीतीं गात । टाळ चिपळ्या वाजवीत । छंदें आपुलीया नाचत । नीज घेऊनी फिरत गा ॥१॥ जनीं वनीं अवघा देव । वासनेचा पुसावा ठाव । मग वोळगा तो वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्या भाव गा ॥२॥ निज दानाची थोर आवडी । वासुदेवासी लागली गोडी । मुखीं नाम उच्चारीं घडोघडीं । ऐसी करा वासुदेवी जोडी गा ॥३॥ अवघा सारूनि सेवट झाला । प्रयत्न न चले कांहीं केला । जागा होईं सांडुनि झोपेला । दान देईं वासुदेवाला गा ॥४॥ तुका म्हणे धन्य त्याचें जिणें । जिहीं वासुदेवीं घातले दान । त्या न लगे येणें जाणें । झालें वासुदेवीं राहणें गा ॥५॥

३९३१. जग जोगी जग जोगी । जागेजागे बोलती ॥१॥ जागता जगदेव । राखा कांहीं भाव ॥२॥ अवघा क्षेत्रपाळ । पूजावा सकळ ॥३॥ पूजापत्र कांहीं । फल पुष्प तोय ॥४॥ बहुतां दिसां फेरा । आला या नगरा ॥५॥ नका घेऊं भार । धर्म तोचि सार ॥६॥ तुका मागे दान । द्यावें जी अनन्य ॥७॥

[सरवदा]

३९३२. ऐका गा ए भाई । सरवदा सांगतो काई । येथें नाडेल माई । दोघां पुत्रांची ॥१॥ ते करिती तिची विटंबना । अवघ्या प्रसिद्ध जना । एक न मारितां शाहाणा । तो जाणा सुख न पवे ॥२॥ आणीक ऐका गा ये । सरवदा सांगतो काय । खरें बोले तो जाय । नरकामध्यें अधोगती ॥३॥ हें चौघांच्या मुखें । मना आणावे सुखें । अवघीं चुकतील दुःखें । खोटें बोला नरनारी ॥४॥ आणीक नाडेल एक जाण । सरवदा बोलतो वचन । जागें माझें चित्त म्हणोन । पडिलें खान तया घरीं ॥५॥ म्हणोन न म्हणा माझें कांहीं । निजीं निजा सुखें ठायीं । यत्न होइल तईं । चोराठायीं विश्वास ॥६॥ आणीक एक परी । सरवदा सांगतो थोरी । दुःख पावेल नारी । परिव्रता यामध्यें ॥७॥ पांचांनीं दिधली हातीं । म्हणोनी न मनावी निश्चिंती । परपुरुषीं होय रती । सुखगती ते पावे ॥८॥ आणीक एकी परी । सरवदा सांगतो तें करीं । दान देतां जो वारी । नव्हे भला भला तो ॥९॥ तुका म्हणे आई । येथें नांव काई । सांगसी तें ठायीं । मरो रांडेचें ॥१०॥

[मुंढा]

३९३३. संबाल यारा उपर तलें दोन्हों मारकी चोट । नजर करे सो ही राखे पश्चा जावे लुट ॥१॥ प्यार खुदाई प्यार खुदाई प्यार खुदाई । प्यार खुदाईरे बाबा जिकिर खुदाई ॥२॥ उडे कुदे ढुंग नचावे आगल भुलन प्यार । लडबड खडखड कांहें कांख चलावत भार ॥३॥ कहे तुका सुनो एका हम जिन्होंके सात । मिलावे तो उसे देना तो ही चढावे हात ॥४॥

३९३४. सब संबाल म्याने लौंडे खडा केऊं गुंग । मदिरथी माता हुवा भुलि पाडी भंग ॥१॥ आपसकुं संवाल आपसकुं संवाल मुंढे खुब राख ताल । मुथिवोहि बोला नहीं तो करूंगा हाल ॥२॥ आवलका तो पीछें नहीं मुदल बिसर जाय । फिरते नहीं लाज रंडी गद्धी गोते खाय ॥३॥ जिन्हों खातिर इतना होता सो नहीं दुजे बेकाम । उचा जोरो लिया तुंबा तुंबा बुरा काम ॥४॥ निकल जावे चिकल जोरा मुंढे दिलदारी । जबानीकी छोड दे बात फिर एक तारी ॥५॥ कहे तुका पिसल रुका मेरेको तो दान देख । पक्कड धका गांडगुढघी मार चलाऊं आलेख ॥६॥

३९३५. नजर करे सो हि जिंके बाबा दुरथी तमासा देख । लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ॥१॥ काहें भुला एक देखत । आंखो मारतडांगो बाजार ॥२॥ दमरी चमरी जो नर भुला । सोत आघो हिलत खाय ॥३॥ नहि बुलावत किसे बाबा आप हि मत जाय । कहे तुका उस असाके संग फिरफिर गोते खाये ॥४॥

३९३६. अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज । गाऊ बछरे तिस चलावे यारी भाघो न सात ॥१॥ ख्याल मेरा साहेबका बाबा हुवा करतार । व्हांटें आघे चले पीठ आपे हुवा असिवार ॥२॥ जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्या अंदर भेस । कहे तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस ॥३॥

३९३७. अल्ला देवे अल्ला दिलावे । अल्ला दारु अल्ला खिलावे । अल्ला बिगर नहीं कोय । अल्ला करे सोहि होय ॥१॥ मर्द होय वो खडा फीर । नामर्दकुं नहीं धीर । आपने दिलकूं करना खुसी । तीन दामकी क्या खुमासी ॥२॥ सब रसोंका किया मार । भजनगांली एक हि सार । इमान तो सबहि सखा । थोडी तोभी लेकर ज्या ॥३॥ जिन्हों पास नीत सोय । वो हि बसकर ते रोवे । सांतो पांचो मार लगावे । उतार सो पीछे खावे ॥४॥ सब ज्वानी निकल जावे । पीछे गधडी मटी खावे । गांवढाल सो क्या लेवे । हगवनी भरी नहीं धोवे ॥५॥ मेरी दारु जिन्हें खाया । दिदार दरगां सो हि पाया । तल्हे मुढी झाल जावे । बिगारी सोवे क्या लेवे ॥६॥ बजारका बुझे भाव । वो हि पुसत आवे ठाव । फुकट बाटु कहे तुका । लेवे सोहि लेवो सखा ॥७॥

३९३८. अवल्ल नाम आल्ला बडा लेते भुल न जाये । इलाम त्याकालजमुपरताही तुंब बजाये ॥१॥ अल्ला एक तुं नबी एक तुं । काटतें सिर पावों हाते नहीं जीव डराये ॥२॥ आगले

देखे पिछे बुझो । आपे हुजुर आय ॥३॥ सब सवरी नचाव म्याने खडा आपनी सात । हात पाव रखते जबाब । नहीं आगली बात ॥४॥ सुनो भाई बजार नहीं सबहि नर चलावे । नन्हा बडा नहीं कोये एक ठोर मिलावे ॥५॥ एक तीर नहीं प्यार जीवनकी आस । कहे तुका सो हि मुंढा राखलिये पायेनपास ॥६॥

३९३९. तम भज्याय ते बुरा जिकीर तै करे । सीर काटे ऊर कुटे ताहां झडकरे ॥१॥ ताहां एक तु ही ताहां एक तु ही । ताहां एक तु ही रे बाबा हम तुम्ह नहीं ॥२॥ दिदार देखो भले नहीं किसे पछाने कोय । सच्चा नहीं पकड सके झुटा झुटे रोय ॥३॥ किसे कहे मेरा किन्हे सती लिया बास । नहीं मेलों मिले जीवना झुटा किया नास ॥४॥ सुनो भाई कैसा तो ही होय तैसा होय । बाट खाना अल्ला कहना एकबारां तो हे ॥५॥ भला लिया भेक मुंढे अपना नफा देख । कहे तुका सो ही सखा हाक अल्ला एक ॥६॥

[गोंधळ]

३९४०. राजस सुंदर बाळा पाहो आलिया सकळा वो । बिंबीं बिंबोनि ठेली माझी परब्रह्म वेल्हाळा वो । कोटि रविशशि जिच्या अंगींचिया किळा वो ॥१॥ राजस विठाबाई माझें ध्यान तुझे पायीं वो । त्यजूनियां चौघांसी लावी आपुलिये सोई वो ॥२॥ सुकुमार साजिरी कैसीं पाउलें गोजिरीं वो । कंठीं तुळसीमाळा उभी भीवरेच्या तिरीं वो । दंत हिरया ज्योति शंखचक्र मिरवे करीं वो ॥३॥ निर्गुण निराकार वेदां न कळेचि आकार वो । शेषादिक श्रमले श्रुति न कळे तुझा पार वो । उभारोनी बाहे भक्तां देत अभयकर वो ॥४॥ येऊनी पंढरपुरा अवतरली सारंगधरा वो । देखोनी भक्ति भाव वोसरली अमृतधारा वो । देऊनी प्रेमपान्हा तुकया स्वामिनें किंकरा वो ॥५॥

३९४१. सुदिन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ वो । पंच प्राण दिवटे दोनी नेत्रांचे हिल्लाळ वो ॥१॥ पंढरपूरनिवासे तुझे रंगीं नाचत असें वो । नवस पुरवीं माझा मनींची जाणोनियां इच्छा वो ॥२॥ मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवनामाझारी वो । चौक साधियेला नाभिकळस ठेविला वरी वो ॥३॥ बैसली देवता पुढें वैष्णवाचें गाणें वो । उद्गारें गर्जती कंठी तुळसीचीं भूषणें वो ॥४॥ स्वानंदाचे ताटीं धूप दिप पंचारती वो । ओवाळिली माता विठाबाई पंचभूतीं वो ॥५॥ तुझें तुज पावलें माझा नवस पुरवी आतां वो । तुका म्हणे राखें आपुलिया शरणागता वो ॥६॥

३९४२. सुंदर मुख साजिरें कुंडलें मनोहर गोमटीं वो । नागर नागखोपा केशर कस्तुरी मळवटीं वो । विशाळ व्यंकट नेत्र वैजयंती तळपे कंठीं वो । कास पितांबराची चंदन सुगंध साजे उटी वो ॥१॥ अतिबरवंटा बाळा आली सुलक्षणा गोंधळा वो । राजस तेजोराशी मिरवे

शिरोमणी वेल्हाळा वो । कोटि रविशशिप्रभा तेजें लोपल्या सकळा वो । न कळे ब्रह्मादिकां अनुपम्य इची लीळा वो ॥२॥ सावळी सुकुमार गोरी भुजा शोभती चारी वो । सखोल वक्षस्थळसुढाळ पदक झळके वरी वो । कटीं क्षुद्र घंटिका शब्द करिताती माधुरी वो । गर्जती चरणीं वाकी अभिनव संगीत नृत्य करी वो ॥३॥ अष्टांगी मंडित काय वर्णावी रूपठेवणी वो । सोलिव शुद्ध रसाची ओतिव लावण्याची खाणी वो । सर्वकळासंपन्न मंजुळ बोले हास्यवदनी वो । बहु रूपें नटली आदिशक्ति नारायणी वो ॥४॥ घटस्थापना केली पंढरपुरमहानगरीं वो । अस्मानी मंडप दिला तिन्ही तालांवरी वो । आरंभिला गोंधळ इनें चंद्रभागेतिरीं वो । आली भक्तिकाजा कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥५॥ तेहतीस कोटी देव चामुंडा अष्ट कोटि भैरव वो । आरत्या कुरवंड्या करिती पुष्पांचा वरुषाव वो । नारद तुंबर गायन ब्रह्मानंद करिती गंधर्व वो । वंदी चरणरज तेथें तुकयाचा बांधव वो ॥६॥

३९४३. ऐक बाई तुज वो कांहीं सांगते शकुन । निजलिया भुर होसी जागें म्हणऊन ॥१॥ मान्य माझें केलें सांगतें एका बोलें । न येतां हें भलें कळों कोणा लोकांसी ॥२॥ सांगते गुण जीवींची खूण ऐक माझी मात । बैस एका भावें माझें हातीं दे वो हात ॥३॥ बरवा घराचार तुज सांपडला ठाव । फळ नाहीं पोटीं येथें दिसे खोटा भाव ॥४॥ आहे तुझे हातीं एका नवसाचें फळ । भावा करी साह्य चहूं अठरांच्या बळें ॥५॥ करीं लागपाठ चित्त वित्त नको पाहों । अखई तो चुडा तुज भोगईल नाहो ॥६॥ कुळींची हे मुळी तुझे लागलीसे देवी । पडिला विसर नेदी फळ नाहीं ठावी ॥७॥ तुका म्हणे नांद सुखें धरीं आठवण । माझे येती कोणी त्यांचा राखे बहु मान ॥८॥

३०४४. देव ते संत देव ते संत । निमित्य त्या प्रतिमा ॥१॥ मी तों सांगतसें भावें । असो ठावें सकळां ॥२॥ निराकारी ओस दिशा । येथें इच्छा पुरतसे ॥३॥ तुका म्हणे रोकडें केणें । सेवितां येणें पोट धाय ॥४॥

३९४५. न कळे हो माव मुनि मागें एकी अंतुरीं । साठी संवत्सरा जन्म तया उदरीं ॥१॥ कैसा आकळ वो माय चपळ वो । त्रिभुवनव्यापक हरि सकळ वो ॥२॥ हनुमंता भेटी गर्व हरिला दोहींचा । गरुडा विटंबना रूपा सत्यभामेचा ॥३॥ द्रौपदीचा भेद पुरविला समयीं । ऋषि फळ वनीं देंठीं लावितां ठायीं ॥४॥ अर्जुनाच्या रथीं कपिध्वजा स्तंभी ठेविला । दोही पैज तेथें गर्व हरी हा दादुला ॥५॥ भावभक्ति सत्वगुण झाला दुर्जना । तुका म्हणे सकळां छंदें खेळे आपणा ॥६॥

३९४६. उदारा कृपाळा अगा देवांच्या देवा । तुजसवें पण आतां आमुचा दावा ॥१॥ कैसा जासी सांग आतां मजपासूनी । केलें वाताहात दिले संसारा पाणी ॥२॥ अवघीं आवरूनी तुझें लाविली पाठीं । आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी ॥३॥ तुका म्हणे आतां चरणीं घातली

मिठी । पडिली ते पडो तुम्हां आम्हांसी तुटी ॥४॥

३९४७. करूनी विनवणी पायीं ठेवितों माथा । परिसावी विनंती माझी पंढरीनाथा ॥१॥ अखंडित असावेसें वाटतें पायीं । साहोनी संकोच ठाव थोडासा देईं ॥२॥ असो नसो भाव आलों तुझिया ठाया । कृपादृष्टी पाहे मजकडे पंढरीराया ॥३॥ तुका म्हणे तुझीं आम्हीं वेडीं वाकुडीं । नामें बहुपाश हातें आपुल्या तोडी ॥४॥

३९४८. झाली होती काया । बहु मळीन देवराया ॥१॥ तुझ्या उजळली नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥२॥ अनुतापें झाला झाडा । प्रारब्धाचा नितोडा ॥३॥ तुका म्हणे देह पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥४॥

३९४९. आजी आनंदु रे एकी परमानंदु रे । जया श्रुति नेती नेति म्हणती गोविंदु रे ॥१॥ विठोबाची वेडीं आम्हां आनंदु सदा । गाऊं नाचूं वाहूं टाळी रंजवूं गोविंदा ॥२॥ सदा सण सांत आम्हां नित्य दिवाळी । आनंदें निर्भय आमचा कैवारी बळी ॥३॥ तुका म्हणे नाहीं जन्ममरणाचा धाक । संत सनकादिक हे तों आमचें कवतुक ॥४॥

३९५०. विठ्ठल कीर्तनाचे अंतीं । जय जय हरी जे म्हणती ॥१॥ तेंचि सुकृताचें फळ । वाचा रामनामें निखळ ॥२॥ बैसोनी हरिकथेसी । होय सावध चित्तासी ॥३॥ तुका म्हणे त्याचा जन्म । सुफळ झाला भवश्रम ॥४॥

३९५१. प्राणिया एक बीजमंत्र उच्चारी । प्रतिदिनीं रामकृष्ण म्हण कां मुरारी ॥१॥ हेंचि साधन रे तुज सर्व सिद्धींचें । नाम उच्चारीं रे गोपाळाचें वाचे ॥२॥ उपास पारणें नलगे वनसेवन । नलगे धूम्रपान पंचाग्नितापणें ॥३॥ सुखाचें फुकाचें कांहीं न वेचे भांडार । कोटियज्ञांपरिस तुका म्हणे हें सार ॥४॥

३९५२. न चलवे पंथ वचन नसतां पालवीं । शरीर विटंबिलें वाटे भीक मागावी ॥१॥ न करीं रे तैसें आपआपणां । नित्य राम राम तुम्ही सकळही म्हणा ॥२॥ राम म्हणवितां रांडा पोरें निरविशी । पडसी यमा हातीं जाचविती चौऱ्यांशीं ॥३॥ मुखीं नाहीं राम तोही आत्महत्यारा । तुका म्हणे लाज नाहीं तया गव्हारा ॥४॥

३९५३. थडियेसी निघतां पाषाणाच्या सांगडी । बुडतां मध्यभागीं तेथें कोण घाली उडी ॥१॥ न करीं रे तैसें आपआपणिया । पतंग जाय वांया जीवें ज्योति घालूनिया ॥२॥ सावधपणें सोमल वाटी भरोनियां प्याला । मरणाअंतीं वैद्य बोलावितो वहिला ॥३॥ तुका म्हणे करीरे ठायींचाचि विचार । जंव नाहीं पातला यमाचा किंकर ॥४॥

३९५४. शंख करिशी ज्याच्या नांवें । त्याचें तुज नाहीं ठावें । ऐक सांगतों एका भावें । सांपडे तें घरीं जीवऊनि खावें रे विठ्ठल ॥१॥ टिळे माळा करंडी सोंग । धरूनी चाळविलें जग । पसरी हात

नाहीं त्याग। दावितो दगड पुजीती भगल रे विठ्ठल ॥२॥ राख लावुनि अंग मळी। वांयां टोके मी एक बळी। वासने हातीं बांधवी नळी। त्यासी येऊनी काळ गिळी उगळी रे विठ्ठल ॥३॥ कोण तें राहडीचें सुख। वरते पाय आरतें मुख। करवी पीडा भोगवी दुःख। पडे नरकीं परि न बळेचि मूर्ख रे विठ्ठल ॥४॥ सिकला फाग मारी हाका। रांडा पोरें मेळवी लोकां। विटंबी शरीर मागे रुका। केलें तें गेलें अवघें फुका रे विठ्ठल ॥५॥ कळावें जनां मी एक बळी। उभा राहोनी मांडी फळी। फोडोनी गुडघे कोंपर चोळी। आपला घात करोनी आपणचि तळमळी रे विठ्ठल ॥६॥ फुकट खेळे ठकलीं वायां। धरूनि सोंगें बोडक्या डोया। शिवों नये ती अंतरीं माया। संपादणीविण विटंबिली काया रे विठ्ठल ॥७॥ धुळी माती कांहीं खेळोंच नका। जवादि चंदन घ्यावा बुका। आपणा परिमळ आणिकां लोकां। मोलाचा महिमा फजिती ते फुका रे विठ्ठल ॥८॥ बहु दुःखी झालियां खेळें। अंगीं बुद्धि नाहीं बळ। पाठीवरी तोबा तोंड काळें। रसना द्रव्य उपस्थाच्या मुळें रे विठ्ठल ॥९॥ काय सांगतो तें ऐका तुका। मोडा खेळ कांहीं अवगोंच नका। चला जेवूं आधीं पोटीं लागल्या भुका। धाल्यावरी मग बरा टाकमटिका रे विठ्ठल ॥१०॥

[कावडे]

३९५५. आहा आहा रे भाई प्रथम नमूं तो विनायक। ठेवूनि गुरुचरणीं मस्तक। वदेल प्रासादिक। वाणी हरिहरांचे पवाडे ॥१॥ माझी ऐसी ब्रीदावळी। दासें दासत्वें आगळी। पान्हेरीनें मार्ग मळी। जीवन घ्या रे कापडी हो ॥२॥ जें सितळाहुनी सीतळ। पातळाहुनी पातळ। प्रेमामृत रसाळ। तें आधीं सेवा हो भाग्याचे नु ॥३॥ जिंकाल तरी जिंका अभिमान। दवडाल तरी दवडा लज्जा आधी मान। धराल ते धरा शंभूचें ध्यान। दावाल पण ऐसा दावा तो ॥४॥ काळ घेऊं नेदीं वाव। आला तो राखें घावडाव। शुद्ध सत्वीं राखोनी भाव। म्हणा महादेव हरहर वाणी गर्जों द्या ॥५॥ पराविया नारी माउलीसमान। परधनीं बाटों नेदी मन। जीवित्व तें तृणासमान। स्वामीकाजीं जाण शूर म्हणों तया आम्ही ॥६॥ शक्ति वेचाविया पर उपकारा। खोटें खोट्याचा पसारा। सत्य तें भवनदीचा तारा। आळस तो न करा येथें आले हो सांगतों ॥७॥ व्रत करा एकादशी सोमवार। कथा पूजन हरिजागर। पुण्य तें असे गातां नाचतां फार। पुन्हा बोलिला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥८॥ संग संतांचा करतां बरवा। उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा। पंथ तो सुपंथें चालावा। उगवा वासना लिगाड ॥९॥ तुका चालवितो कावडी। प्रवृत्ति निवृत्ति चोखडी। पुढती पुढती अधिक गोडी। भरूनि कळस भजन आवडी। केशवदास नटतसे ॥१०॥

३९५६. आहा आहा रे भाई हें अन्नदानाचें सत्र। पव्हे घातली सर्वत्र। पंथीं अवघे पंथ मात्र। इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ॥१॥ यावें तेणें घ्यावें। न सरेसें केलें सदाशिवें। पात्र

शुद्ध पाहिजे बरवें । मंगळभावें सकळ हर म्हणा रे ॥२॥ नव्हे हें कांहीं मोकळें । साक्षी चौघांचिया वेगळे । नेदी नाचों मताचिया वळें । अणु अणोरणीया आगळें । महदि महदा साक्षित्वें हर म्हणा रे ॥३॥ हे हरि नामाची आंबिली । जगा पोटभरी केली । विश्रांति कल्पतरूची साउली । सकळां वर्णां सेवितां भली । म्हणा हर हर महादेव ॥४॥ तुका हरिदास तराळ । अवघे हाकारी सकळ । या रे वंदू शिखरातळ । चैत्रमास पर्वकाळ महादेवदर्शनें ॥५॥

३९५७. आहा आहा रे भाई तयावरी माझी ब्रीदावळी । भ्रष्ट ये कली क्रियाहीन ॥१॥ थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी । वाणिली ते थोरी दवडा वांयां बाहेरी ॥२॥ बाइलेचा दास पित्रांस उदास । भीक भिकाऱ्यास नये दारा ॥३॥ विद्याबळें वाद करूनियां छळी । आणिकांसी फळी मांडोनियां ॥४॥ गांवींचिया देवा नाहीं दंडवत । ब्राह्मण अतीत घडेचि ना ॥५॥ सर्वकाळ करि संतांचिया निंदा । स्वप्नींही गोविंदा आठवीना ॥६॥ खाचेमध्यें धन पोटासी बंधन । नेणें ऐसा दानधर्म कांहीं ॥७॥ तुका म्हणे नटें दावूनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ॥८॥

३९५८. आहा आहा रे भाई नमो उदासीन झाले देहभावा । आळविती देवा तया नमो ॥१॥ नमो तीर्थपंथें चालती तयांसी । येती बोळवित त्यांसी नमो ॥२॥ नमो तया संतवचनीं विश्वास । नमों भावें दास्य गुरूचें त्या ॥३॥ नमो तयां मात्यापित्यांचें पाळण । नमो त्या वचन सत्य वदे ॥४॥ नमो तया जाणे आणिकांचें सुखदुःख । राखे तहान भूक तया नमो ॥५॥ परोपकारी नमो पुण्यवंता । नमो त्या दमित्या इंद्रियांसी ॥६॥ तुका म्हणे नमो हरिचिया दासा । तेथें सर्व इच्छा पुरलीसे ॥७॥

३९५९. आहा आहा रे भाई गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ । तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठ तनु देवाचिया ॥१॥ समुद्र नदी नव्हे पैं गा । पाषाण म्हणों नये लिंगा । संत नव्हती जगा । माणसा त्या सारिखे ॥२॥ काठी म्हणों नये वेतु । अन्न म्हणों नये सातु । राम राम हे मातु । नये म्हणो हे शब्द ॥३॥ चंद्र सूर्य नव्हती तारांगणें । मेरु तो नव्हे पर्वतासमान । शेष वासुकी सर्प नव्हे जाण । विखाराच्या सारिखे ॥४॥ गरुड नव्हे पाखरूं । ढोर नव्हे नंदिकेश्वरू । झाड नव्हे कल्पतरु । कामधेनु गाय न म्हणावी ॥५॥ कूर्म नव्हे कासव । डुकर नव्हे वराह । ब्रह्मा नव्हे जीव । स्त्री नव्हे लक्ष्मी ॥६॥ गवाक्ष नव्हे हाड । पाटाव नव्हे कापड । परीस नव्हे दगड । सगुण ते ईश्वरीचे ॥७॥ सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु । नाहीं नाहीं चर्मांआतु । कृष्णाजिन व्याघ्रांबर ॥८॥ मुक्ताफळें नव्हेती गारा । खड्याऐसा नव्हे हिरा । जीव नव्हे सोइरा । बोळवीजे स्वइच्छेनें ॥९॥ गांव नव्हे द्वारावती । रणछोड नव्हे मूर्ति । तीर्थ नव्हे गोमती । मोक्ष घडे दर्शनें ॥१०॥ कृष्ण नव्हे भोगी । शंकर नव्हे जोगी । तुका म्हणे पांडुरंगीं । हा प्रसाद लाधला ॥११॥

[सौऱ्या]

३९६०. वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नारी । आपुल्या तुटी पारख्या भेटी सौरियांच्या फेरी ॥१॥ त्याचा वेध लागला छंद हरि गोविंद वेळोवेळां । आपुलेमागें हांसत रागें सांवले घालिती गळा ॥२॥ जनवेषा भीतें तोंडा आमुच्या भांडणा । कर कटीं भीमातटीं पंढरीचा राणा ॥३॥ वेगळ्या याति पडिलों खंतीं अवघ्या एका भावें । टाकियेली चाड देहभावें जीवें शिवें ॥४॥ सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा । वांया तुवां मुंडासवे भक्ती नाचो भावा ॥५॥ म्हणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा । बहु झालें सुख कामें चुकलिया काजा ॥६॥

३९६१. आणिकां उपदेशूं नेणें नाचों आपण । मुंडा वांयां मार गेली वांयां हांसे जन ॥१॥ तैसा नव्हे चाळा आवरीं मन डोळा । पुढिलांच्या कळा कवतुक जाणोनि ॥२॥ बाहिरल्या वेषें आंत जैसें तैसें । झांकलें तों पोट भरे तेणें वेसें ॥३॥ तुका म्हणे केला तरी करीं शुद्ध भाव । नाहीं तरी जासी वांयां हा ना तोसा ठाव ॥४॥

३९६२. टाक रुका चाल रांडे कां गे केली गोवी । पुसोनियां आलें ठाव म्हणोनी देतें सीवी ॥१॥ आतां येणें छंदें नाचों विनोदें । नाहीं या गोविंदें माझें मजसी केलें ॥२॥ कोरडे ते बोल कां गे वेचितेसी वांयां । वर्तें करूनि दावीं तुझ्या मुळींचिया ठाया ॥३॥ याजसाठीं डौर म्यां धरियेला हातीं । तुका म्हणे तुम्ही गांठी सोडायाची खंती ॥४॥

३९६३. मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें । धेडवाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें ॥१॥ ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची । समाधानीं उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ॥२॥ न बोलतां करी चिंता न मारितां पळे । दाल्ला सेजे नावडे निजे जगझोडीचे चाळे ॥३॥ देखत आंध बहिर कानीं बोल बोलतां मुके । तुका म्हणे पतन सोयरीं ऐसीं झालीं एकें ॥४॥

३९६४. सातें चला काजळ घाला तेल फणी करा । दिवाणदारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ॥१॥ या साहेबाचें झालें देणें वेळोवेळां न लगे येणें । आतां हाटीं कशासाठीं हिंडों पाटी दुकानें ॥२॥ अवघ्या जणी मुंडा धणी नाचों एके घाईं । सरसावलें सुख कैसा चाळा एके ठायीं ॥३॥ म्हणे तुका वोळगें एका तोड चिंता माया । देउनियां उद्गार जाऊं मुळींचिया ठाया ॥४॥

३९६५. सौरी सुर झालें दूर डौर घेतला हातीं । माया मोह सांडवलें तीहीं लोकीं झालें सरती ॥१॥ चाल विठाबाई अवघी पांच देहीं । न धरीं गुज कांहीं वाळवंटीं सांपडतां ॥२॥ हिंडोनी चौऱ्यांशीं घरे आलें तुझ्या दारा । एक्या रुक्यासाठीं आंचवलें संसारा ॥३॥ लाज मेली शंका गेली नाचों महाद्वारीं । भ्रांति सावलें फिटोनि गेलें आतां कैंची उरी ॥४॥ झालें भांडी जगा सांडी नाहीं भीड चाड । घालीन चरणीं मिठी पुरवीन जीवींचें तें कोड ॥५॥ तुका म्हणे रुका करी संसारतुटी । आतां तुम्हां आम्हां कैसी झाली जीवें साटी ॥६॥

३९६६. सम सपाट वेसनकाट निःसंग झालें सौरी । कुडपीयेला देश आतां येऊं नेदीं दुसरी ॥१॥ गाऊं रघुरामा हेंचि उरलें आम्हां । नाहीं जीवतमा वित्त गोतासहित ॥२॥ ठाव झाला रिता झाकुनि काय आतां । कोणासवें लाज कोण दुजें पाहतां ॥३॥ सौरीयांचा संग आम्हां दुरावलें जग । भिन्न झालें सुख देहभाव पालटला रंग ॥४॥ लाज भय शंका जनीं नाहीं तजियेलीं दोन्ही । फिराविला वेष नव्हों कोणाचींच कोणी ॥५॥ तुका म्हणे हा वेष दिला आम्हां जेणें । जना प्रतीत सवें असो एकपणें ॥६॥

३९६७. अहो नरनारी संवसारीं अंतरलों । निर्लज्ज निष्काम जना वेगळेचि ठेलों ॥१॥ चाल रघुरामा ने आपल्या गांवा । तुजविण आम्हां कोण सोयरा सांगाती ॥२॥ जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे । सांहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरे ॥३॥ बहुतां पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज । तुका म्हणे आतां सांडुनि लौकिकाची लाज ॥४॥

[लळित]

३९६८. आजी दिवस झाला । धन्य सोनियाचा भला ॥१॥ झालें संतांचे पंगती । बरवें भोजन निगुती ॥२॥ रामकृष्णनामें । बरवीं मोहियेलीं प्रेमें ॥३॥ तुका म्हणे आला । चवी रसाळ हा काला ॥४॥

३९६९. तुम्ही ये तरी सांगा काहीं । आम्हांविशीं रखुमाबाई ॥१॥ कांहीं उरलें तें ठायीं । वेगीं पाठवूनी देईं ॥२॥ टोंकत बैसलों देखा । इच्छीतसें ग्रासा एका ॥३॥ प्रेम देउनी बहुडा झाला । तुका म्हणे विठ्ठल बोला ॥४॥

३९७०. वाट पाहे बाहे निढळीं ठेवूनियां हात । पंढरीचे वाटे दृष्टि लागलेंसें चित्त ॥१॥ कईं येता देखेन माझा मायबाप । घटिका बोटें दिवस लेखीं धरूनियां माप ॥२॥ डावा डोळा लवे उजवी स्फुरतसे बाहे । मन उताविळ भाव सांडूनियां देहे ॥३॥ सुखसेज गोड चित्तीं न लगे आणीक । नाठवे घरदार तहान पळाली भूक ॥४॥ तुका म्हणे धन्य ऐसा दिवस तो कोण । पंढरीचें वाटे येतां मूळ देखेन ॥५॥

३९७१. तुझें दास्य करूं आणिका मागों खावया । धिग् झालें जिणें माझें पंढरीराया ॥१॥ काय गा विठोबा तुज आतां म्हणावें । शुभाशुभ गोड तुम्हां थोरांच्या दैवें ॥२॥ संसाराचा धाक निरंतर आम्हांसी । मरण भलें परि काय अवकळा ऐसी ॥३॥ तुझा शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका म्हणे लाज कवणा हें कां नेणसी ॥४॥

३९७२. पुरविली आळी । जे जे केली ते ते काळीं ॥१॥ माय तरी ऐसी सांगा । कृपाळुवा पांडुरंगा ॥२॥ घेतलें नुतरी । उचलोनी कडियेवरी ॥३॥ तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥४॥

३९७३. पतित पतित । परि मी त्रिवाचा पतित ॥१॥ परि तूं आपुलिया सत्ता । मज करावें सरता ॥२॥ नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ॥३॥ अपराधाचा केलों । तुका म्हणे किती बोलों ॥४॥

३९७४. कथेची सामग्री । देह अवसानावरी ॥१॥ नको जाऊं देऊं भंगा । गात्रें माझीं पांडुरंगा ॥२॥ आयुष्य करीं उणें । परि मज आवडो कीर्तन ॥३॥ तुका म्हणे हाणी । या वेगळी मना नाणीं ॥४॥

३९७५. गळित झाली काया । हेंचि लळित पंढरीराया ॥१॥ आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ॥२॥ वाहिला कळस । तेथें स्थिरावला रस ॥३॥ तुका म्हणे गोड झालें । नारायणीं पोट धालें ॥४॥

३९७६. रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ॥१॥ कुंचे ढळती दोहीं बाहीं । जवळी राही रखुमाई ॥२॥ नाना उपचारीं । सिद्धि वोळगती कामारी ॥३॥ हातीं घेउनी पादुका । उभा बंदिजन तुका ॥४॥

३९७७. हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांची खाणी ॥१॥ तैसा दिसे नारायण । मुख सुखाचें मंडण ॥२॥ कोटी चंद्रलीळा । पूर्णिमेच्या पूर्णकळा ॥३॥ तुका म्हणे दृष्टि धाये । परतोनी माघारी ते न ये ॥४॥

३९७८. उभारिला हात । जगीं जाणविली मात ॥१॥ देव बैसले सिंहासनीं । आल्या याचकासी पुरे धनी ॥२॥ एकाच्या कैवाडे । उगवे बहुतांचें कोडें ॥३॥ दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ॥४॥

३९७९. जीवेंसाठीं यत्नभाव । त्याची नाव बळकट ॥१॥ पैल तीरा जातां कांहीं । संदेह नाहीं भवनदी ॥२॥ विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥३॥ तुका म्हणे भोळियांचा । देव साचा अंकित ॥४॥

३९८०. आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥१॥ कल्याण तीं असो क्षेम । वाढो प्रेम आगळें ॥२॥ भक्तिभाग्य गांठी धन । त्या नमन जीवासी ॥३॥ तुका म्हणे हरिचे दास । तेथे आस सकळ ॥४॥

३९८१. तया साठीं वेचूं वाणी । आइकों कानीं वार्ता त्या ॥१॥ क्षेम माझे हरिजन । समाधान पुसतां त्यां ॥२॥ परत्रींचे जे सांगाती । त्यांची याती न विचारीं ॥३॥ तुका म्हणे धैर्यवंतें । निर्मळ चित्तें सखीं तीं ॥४॥

३९८२. उभय उत्तरीं संतीं केलें दान । झालें समाधान चित्त तेणें ॥१॥ आतां प्रेमरसें न घडे खंडण । द्यावें कृपादान नारायणा ॥२॥ आलें जें उचित देहविभागासी । तेणें पायांपासीं उभीं

असों ॥३॥ तुका म्हणे करी पूजन वैखरी । बोबड्या उत्तरीं गातों गीत ॥४॥

३९८३. असो मंत्रहीन क्रिया । नका चर्या विचारूं ॥१॥ सेवेमधीं जमा धरा । कृपा करा शेवटीं ॥२॥ विचारूनी ठायाठाव । येथें भाव राहिला ॥३॥ आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तांतडी ॥४॥

३९८४. ऐकें वचन कमळापति । मज रंकाची विनंती ॥१॥ कर जोडितों कथेकाळीं । आपण असावें जवळी ॥२॥ घेईं ऐसी भाक । मागेन जरी कांहीं एक ॥३॥ तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुकाचि राखावा ॥४॥

३९८५. आली लळिताची वेळ । असा सावध सकळ ॥१॥ लाहो करा वेगीं स्मरा । टाळी वाउनि विश्वंभरा ॥२॥ झालिया अवसान । न संपडती चरण ॥३॥ तुकयाबंधु म्हणे थोडे । अवधि उरली आहे पुढें ॥४॥

३९८६. नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन । कायावाचामनेंसहित आलों शरण ॥१॥ करीं अंगीकार नको मोकलूं हरी । पतितपावन ब्रीदें करावीं खरीं ॥२॥ नेणें भक्तिभाव तुझा म्हणवितों दास । जरी देसी अंतर तरी लज्जा कोणास ॥३॥ म्हणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाय । आतां कोण दुजा ऐसा आम्हांसी आहे ॥४॥

३९८७. तूंच मायबाप बंधु सखा आमचा । वित्त गोत जिवलग जीवाचा ॥१॥ आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां । योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥२॥ तूंच क्रियाकर्म धर्म देव तूं कुळ । तूंच तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥३॥ म्हणे तुकयाबंधु कर्ता कार्यता देवा । तूंच भावभक्ति पूजा नमस्कार आघवा ॥४॥

३९८८. करूनी उचित । प्रेम घालीं हृदयांत ॥१॥ आलों दान मागायास । थोर करूनियां आस ॥२॥ चिंतनसमयीं । सेवा आपलीच देईं ॥३॥ तुकयाबंधु म्हणे भावा । मज निरवावें देवा ॥४॥

३९८९. गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास । सांडोनी भय लज्जा शंका आस निरास ॥१॥ बळियाचा बळी तो कैवारी आमुचा । भुक्तिमुक्तिदाता सकळांही सिद्धींचा ॥२॥ मारूं शब्दशस्त्रें बाण नि:शंक अनिवार । कंटकांचा चूर शिर फोडूं काळाचें ॥३॥ म्हणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड । आपुलिया तेथें काय आणिकांची भीड ॥४॥

३९९०. सांडूनी वैकुंठ । उभा विटेवरी नीट ॥१॥ आला आला रे जगजेठी । भक्ता पुंडलिकाचे भेटी ॥२॥ पैल चंद्रभागे तिरीं । कट धरूनिया करीं ॥३॥ तुकयाबंधु म्हणे अंबर । गजर होतो जयजयकार ॥४॥

३९९१. कृपाळु भक्तांचा । ऐसा पति गोपिकांचा ॥१॥ उभा न पाचारितां दारीं । न संगतां

कामें करी ॥२॥ भाव देखोनि निर्मळ । रजां वोढवी कपाळ ॥३॥ तुकयाबंधु म्हणे न भजा । कां रे ऐसा भोळा राजा ॥४॥

३९९२. केला अंगिकार पंढरीच्या देवें । आतां काय करितील काळ मशक मानवें ॥१॥ घातलीं बाहेर तीं भयें होतें ज्याच्यानें । बैसला आपण तेथें घालुनियां ठाणें ॥२॥ लागों नेदी वारा दुजियाचा अंगासी । हा पुरता निर्धार कळों आला आम्हांसी ॥३॥ म्हणे तुकयाबंधु नलगे करावी चिंता । कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथां ॥४॥

३९९३. अगोचरीं बोलिलों आज्ञेविण आगळें । परी तें आतां न संडावें कृपाळु राउळें ॥१॥ जाईल रोकडा बोल न पुसती आम्हां । तुझा तुझें म्हणविलें पाहा पुरुषोत्तमा ॥२॥ न व्हावा न वजावा न कळतां अन्याय । न धरावें मनीं भलता करी उपाय ॥३॥ म्हणे तुकयाबंधु हीन मी म्हणोनि लाजसी । वारा लागों पाहताहे उंच्या झाडासी ॥४॥

३९९४. झाली पाकसिद्धि वाट पाहे रखुमाई । उदक तापलें डेरा चीकसा मर्दूंद्या पाईं ॥१॥ उठा पांडुरंगा उशीर झाला भोजनीं । उभ्या आंचवणा गोपिका कळस घेउनी ॥२॥ अवघ्या सावचित्त सेवेलागीं सकळा । उद्धव अक्रूर आले पाचारूं मूळा ॥३॥ सावरिली सेज सुमनयाति सुगंधा । रत्नदीप तार्टीं वाळा विडिया विनोदा ॥४॥ तुका विनंती करी पाहे पंढरीराणा । असा सावचित्त सांगे सकळ जनां ॥५॥

३९९५. उठा सकळ जन उठिले नारायण । आनंदले मुनिजन तिन्ही लोक ॥१॥ करा जयजयकार वाद्यांचे गजर । मृदंग अपार टाळ घोळ ॥२॥ जोडोनियां कर मुख पाहा सादर । पायांवरी शिर ठेवूनियां ॥३॥ तुका म्हणे काय पढियें तें तें मागा । आपुलालें सांगा सुख दुःख ॥४॥

३९९६. घडिया घालुनी तळीं चालती वनमाळी । उमटती कोवळीं कुंकुमाचीं ॥१॥ वंदा चरणरज अवघे सकळ जन । तारियेले पाषाण उदकीं जेणें ॥२॥ पैस धरूनी चाला ठाकत ठायीं ठायीं । मौन्य धरूनी कांहीं न बोलावें ॥३॥ तुका अवसरु जाणवितो पुढें । उघडलीं महाल मंदिरें कवाडें ॥४॥

३९९७. भीतरी गेले हरी रहा क्षणभरी । होइल फळ धीर करावा ॥१॥ न करीं त्वरा ऐकें मात । क्षण एक निवांत बैसावें ॥२॥ करूनियां मर्दन सारिलें पाणी । न्हाले देव अंग पुसी भवानी ॥३॥ नेसला सोनसळा विनवी रखुमाई । वाढिलें आतां ठायीं चलावें जी ॥४॥ करूनियां भोजन घातलें आंचवण । आनंदें नारायण पहुडले ॥५॥ तुका मात जाणवी आतां । सकळां बहुतां होती चित्तीं ॥६॥

३९९८. द्या जी आम्हां कांहीं सांगा जी रखुमाई । शेष उरलें तें ठायीं सनकादिकां ॥१॥

टोकत बाहेरी बैसलो आशा। पुराया ग्रासा एकमेकां ॥२॥ येथवरी आलों तुझिया नांवें। आस करूनी आम्ही दातारा ॥३॥ प्रेम देउनी बहुडा दिला। तुका म्हणे आतां विठ्ठल बोला ॥४॥

३९९९. बहुडविले जन मन झालें निश्चळ। चुकवूनी कोल्हाळ आला तुका ॥१॥ पर्यंकी निद्रा करावें शयन। रखुमाई आपण समवेत ॥२॥ घेउनियां आलों हातीं टाळ वीणा। सेवेसी चरणा स्वामीचिया ॥३॥ तुका म्हणे आतां परिसावीं आदरें। बोबडीं उत्तरें पांडुरंगा ॥४॥

४०००. नाचे गाणें माझा जवळील ठाव। निरोपिन भाव होईल तो ॥१॥ तुम्हां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें। उतरूनी जिवें जाइन लोण ॥२॥ एकाएकीं बहु करीन सुस्वरें। मधुर उत्तरें आवडीनें ॥३॥ तुका म्हणे तूं जगदानी उदार। फेडशील भार एक वेळे ॥४॥

४००१. शिणलेती सेविकां देऊनी इच्छादान। केला अभिमानें अंगिकार ॥१॥ अहो दीनानाथा आनंदमूर्ती। तुम्हांसी शोभती ब्रीदें ऐसीं ॥२॥ बहुतांनीं विनविलें बहुतां प्रकारीं। सकळां ठायीं हरी पुरलेती ॥३॥ तुका म्हणे अगा कुटुंबवत्सला। कोण तुझी लीळा जाणे ऐसी ॥४॥

४००२. उठा भागलेती उजगरा। चला स्वामी निद्रा करा ॥१॥ वाट पाहाते रुक्मिणी। उभी मंचक सांवरुनी ॥२॥ केली करा क्षमा। बडबड पुरुषोत्तमा ॥३॥ लागतो चरणा। तुकयाबंधु नारायणा ॥४॥

४००३. पावला प्रसाद आता उठोनी जावें। आपुलाले श्रम कळों येताती भावें ॥१॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा। पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥२॥ तुम्हांसी जागवूं आम्ही आपुलिया चाडा। शुभाशुभ कर्में दोष हरावया पीडा ॥३॥ तुका म्हणे दिल उच्छिष्टाचें भोजन। नाहीं निवडिलें आम्हां आपणा भिन्न ॥४॥

४००४. शब्दांचीया रत्नें करूनी अलंकार। तेणें विश्वंभर पूजियेला ॥१॥ भावाच्या उपचारें करूनी भोजन। तेणें नारायण जेवविला ॥२॥ संवसारा हातीं दिलें आंचवण। मुखशुद्धी मन समर्पिलें ॥३॥ रंगलीं इंद्रियें सुरंग तांबुलें। माथां तुळसीदळ समर्पिलें ॥४॥ एकभावदीप करूनी निरांजन। देऊनी आसन देहाचें या ॥५॥ न बोलोनी तुका करी चरणसेवा। निजविलें देवा माजघरीं ॥६॥

४००५. उठोनियां तुका गेला निजस्थळा। उरले राउळामाजी देव ॥१॥ नेउल झालें सेवका स्वामीचें। आज्ञे करूनी चित्त समाधान ॥२॥ पहुडले हरी अनंतशयनावरी। तेथें नाहीं उरी कांहीं काम ॥३॥ अवघियां बाहेर घालूनि गेला तुका। सांगितलें लोकां निजले देव ॥४॥

४००६. पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा। सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा। गर्जा जयजयकार हरि हृदयीं धरा। आळस नका करूं लहाना सांगतों थोरां ॥१॥ या हो या हो बाइयांनों

निघाले हरी। सिलंगणा वेगीं घेऊनी आरत्या करीं। ओवाळूं श्रीमुख वंदूं पाउलें शिरीं। आम्हां दैव आलें तेथें घरिंच्या घरीं।२॥ अक्षय मुहूर्त औटामध्यें साधतें। मग येरी गर्जे जैसें तैसें होत जातें। म्हणोनि मागें पुढें कोणी न पाहावें येथें। सांडा परतें काम जाऊं हरी सांगातें॥३॥ बहुतां बहुतां रीतीं चित्तीं धरा हे मनीं। नका गई करूं आइकाल ज्या कानीं। मग हें सुख तुम्ही कधीं न देखाल स्वप्नीं। उरेल हायाहाय मागें होईल काहाणी॥४॥ ऐसियास वंचता त्याच्या अभाग्या पार। नाहीं नाहीं नाहीं सत्य जाणा निर्धार। मग हे वेळ घटिका न ये अजरामर। कळलें असों द्या मग पडतील विचार॥५॥ जयासाठीं ब्रह्मादिक झाले ते पिसे। उच्छिष्टाकारणें देव जळीं झाले मासे। अर्धांगीं विश्वमाता लक्षुमी वसे। तो हा तुकयाबंधु म्हणे आलें अनायासें॥६॥

४००७. करूनी आरती। आतां ओवाळूं श्रीपती॥१॥ आजी पुरले नवस। धन्य काळ हा दिवस॥२॥ पाहा वो सकळा। पुण्यवंता तुम्ही बाळा॥३॥ तुका वाहे टाळी। होता सन्निध जवळी॥४॥

४००८. द्याल माळ तरी पडेन मी पायां। दंडवत वायां कोण वेंची॥१॥ आलें तें हिशोबें अवघिया प्रमाण। द्याल तरी दान मान होतो॥२॥ मोकळिया मनें घ्याल जरी सेवा। प्रसाद पाठवा लवकरी॥३॥ तुका म्हणे तुम्हीं झालिया कृपण। नामाचें जतन मग कैंचें॥४॥

४००९. तुम्हीं जावें निजमंदिरा। आम्ही जातों आपल्या घरा॥१॥ विठोबा लोभ असों देईं। आम्ही असों तुमचे पाईं॥२॥ चित्त करी सेवा। आम्ही जातों आपुल्या गांवा॥३॥ तुका म्हणे दिशा भुललों। फिरोन पायापाशीं आलों॥४॥

४०१०. पाहें प्रसादाची वाट। द्यावें धोवोनियां ताट॥१॥ शेष घेऊनी जाईन। तुमचें झालिया भोजन॥२॥ झालों एकसवा। तुम्हां आडूनियां देवा॥३॥ तुका म्हणे चित्त। करुनी राहिलों निश्चित॥४॥

४०११. केली कटकट गाऊं नाचों नेणतां। लाज नाहीं भय आम्हां पोटाची चिंता॥१॥ बैसा सिणलेती पाय रगडूं दातारा। जाणवूं द्या वारा उब झाली शरीरा॥२॥ उशिरा उशीर किती काय म्हणावा। जननिये बाळका कोप कांहीं न धरावा॥३॥ तुझिये संगतीं आम्ही करूं कोल्हाळ। तुका म्हणे बाळें अवघे मिळोन गोपाळ॥४॥

४०१२. आरुष शब्द बोलों मनीं न धरावें कांहीं। लडिवाळ बाळकें तूंचि आमुची आई॥१॥ देईं गे विठाबाई प्रेमभातुकें। अवघियां कवतुकें लहानां थोरां सकळां॥२॥ सांडूनियां भीड धीटपणातें वाणी। घेतलें पाहिजे केलें लेंकुरें तें कानीं॥३॥ तुका म्हणे थोड्यासाठीं काशाची अटी। झाली असे भेटी धुरेसंवसाटी॥४॥

४०१३. कळस वाहियेला शिरीं। सहस्त्रनामें पूजा करी॥१॥ पीक पिकलें पिकलें। घन

दाटोनियां आलें ॥२॥ शेवटचें दान । भागा आला नारायण ॥३॥ तुका म्हणे पोट । भरलें वारला बोभाट ॥४॥

४०१४. आड केलें देवद्वार । व्यर्थ काय करकर ॥१॥ आतां चला जाऊं घरा । नका करूं उजगरा ॥२॥ देवा लागलीसे निज । येथें उभ्या काय काज ॥३॥ राग येतो देवा । तुका म्हणे नेघे सेवा ॥४॥

[नाट]

४०१५. विठ्ठल आमुचें जीवन । आगम निगमाचें स्थान । विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यानविसावा ॥१॥ विठ्ठल कुळींचे दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त । विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥२॥ विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी । विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥३॥ विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा । विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियला चाळा विश्व विठ्ठलें ॥४॥ विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता । विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ॥५॥

४०१६. बरवा झाला वेवसाव । पावलों चिंतिलाचि ठाव । दृढ पायीं राहिला भाव । पावला जीव विश्रांती ॥१॥ बरवा फळला शकुन । अवघा निवारला सीण । तुमचें झालिया दरुषण । जन्ममरण नाहीं आतां ॥२॥ बरवें झालें आलों या ठाया । होतें संचित ठायींचें पाया । देहभाव पालटली काया । पडली छाया ब्रह्मींची ॥३॥ जोडिलें हें न सरें धन । अविनाश आनंदघन । अमूर्तमूर्ति मधुसूदन समचरणी देखियला ॥४॥ जुनाट जुगादिचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें । लोपलें होतें पारिखेपणें । ठाव चळणें चुकविला ॥५॥ आतां या जीवाचियासाठीं । न सोडीं पडलिया मिठी । तुका म्हणे सीणलों जगजेठी । न लवीं दिठी दुसऱ्याची ॥६॥

४०१७. मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धि । तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानिधि मायबापा ॥१॥ नाहीं ऐकिलें गाईलें गीत । धरिली लाज सांडिलें हित । नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥२॥ नाहीं केला करविला परोपकार । नाहीं दया आली पीडितां पर । करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ॥३॥ नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण । पाळिला पिंड कर चरण । नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मूर्तीचें ॥४॥ असंगसंग घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय । न कळे हित करावें तें काय । नये बोलूं आठवूं तें ॥५॥ आप आपण्या घातकर । शत्रु झालों मी दावेदार । तूं तंव कृपेचा सागर । उतरीं पार तुका म्हणे ॥६॥

४०१८. आतां पावेन सकळ सुखें । खादलें कदा तें न देखें । अवघें सरलें पारिखें । सकळ देखें माहियेर ॥१॥ जवळी विठ्ठल रखुमाई । बहिण बंधु बाप आई । सकळ गोताचीच साई ।

पारिखें काई ऐसें नेणिजे ॥२॥ जगदाकारीं झाली सत्ता । वारोनी गेली पराधीनता । अवघें आपुलेंचि आतां । लाज आणि चिंता दुरावली ॥३॥ वावरे इच्छा वसे घरीं । आपुले सत्तेचे माहेरीं । करवी तैसें आपण करीं । भीड न धरीं चुकल्याची ॥४॥ सोसिला होता सासुरवास । बहुतांचा बहुत दिवस । बहु कामें पुरविला सोस । आतां उदास आपुल्यातें ॥५॥ करिती कवतुक लाडें । मज बोलविती कोडें मायबाप उत्तरें गोडें । बोले बोबडें पुढें तुका ॥६॥

४०१९. सर्व सुखाचिया आशा जन्म गेला । क्षण एक मुक्ती यत्न नाहीं केला । हिंडता दिशा सीण पावला । माथा वेष्टिला जीव माझा ॥१॥ माझें स्वहित नेणती कोणी । कांहींच न करिती मजवांचूनी । सज्जन तंव सुखाची मांडणी । नेणती कोणी आदि अंत ॥२॥ काय सांगों गर्भींची यातना । मज भोगितां नारायणा । मांस मळ मूत्र जाणा । तुज क्षणक्षणा ध्यात असें ॥३॥ मज चालतां प्रयाणकाळीं । असतां न दिसती जवळी । मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ॥४॥ आतां मज ऐसें करीं गा देवा । कांहीं घडे तुझी चरणसेवा । तुका विनवीतसे केशवा । चालवी दावा संसारें ॥५॥

४०२०. अगा ए सांवळ्या सगुणा । गुणनिधिनाम नारायणा । आमची परिसावी विज्ञापना । सांभाळीं दीना आपुलिया ॥१॥ बहु या उदराचे कष्ट । आम्हांसी केलें कर्मभ्रष्ट । तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्यें ॥२॥ झालों पांगिला जनासी । संसाराची आदणी दासी । न कळे कधीं सोडविसी । दृढपाशीं बहु बांधलों ॥३॥ येथें तो नये आठव कांहीं । विसावा तो क्षण एक नाहीं । पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों कांहीं दिसेचि ना ॥४॥ जीवित्व वेचिलें वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें । कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें तडातोडी ॥५॥ माझा मीच झालों शत्रु । कैंचे पुत्र दारा कैंचा मित्रु । कासया घातला पसरु । अहो जगद्गुरु तुका म्हणे ॥६॥

४०२१. आतां मज धरवावी शुद्धि । येथूनी परतवावी बुद्धि । घ्यावें सोडवूनी कृपानिधि । सांपडलों संधीं काळचक्रीं ॥१॥ करिसील तरी नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई । आपुले करुणेची साई । करीं वो आई मजवरी ॥२॥ मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें । नेणें आयुष्य होतें उणें । पुढील पेणें अंतरलों ॥३॥ आतां मज वाटतसे भय । दिसेंदिवस चालत जाय । येथें म्यां येउनी केलें काय । नाहीं तुझे पाय आठविले ॥४॥ करूनी अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा । आपुले नामीं द्यावा प्रेमा । सोडवीं भ्रमापासूनियां ॥५॥ हृदय वसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपें चरणीं । करूं हा रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका म्हणे ॥६॥

४०२२. जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन । जगज्जीवन नारायण । गाईन गुण तयाचे ॥१॥ जो या भीवरेच्या तिरीं । कट धरुनियां करीं । पाउलें समचि साजिरीं । अंतरीं धरोनी राहेन ॥२॥ जो या असुरांचा काळ । भक्तजनप्रतिपाळ । खेळे हा लाघवें सकळ । तयाच्या

भाळ पायांवरी ॥३॥ जो या गोपाळांच्या मेळीं । खेळु खेळे वनमाळी । रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ॥४॥ जो हा लावण्यपुतळा । जयाचें अंगी सकळ कळा । जयाचे गळां वैजयंती माळा । तया वेळोवेळां दंडवत ॥५॥ जयाचें नाम पाप नासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी । जो हा तेज:पुंज रासी । सर्वभावें त्यासी तुका शरण ॥६॥

४०२३. काय मी उद्धार पावेन । काय कृपा करील नारायण । ऐसें तुम्ही सांगा संतजन । करा समाधान चित्त माझें ॥१॥ काय हें खंडईल कर्म । पारुषतील धर्माधर्म । कासयानें तें कळेल वर्म । म्हणउनी श्रम वाटतसे ॥२॥ काय हे स्थिर राहेल बुद्धि । कांहीं अरिष्ट न येल कीं मधीं । धरिलें जाईल तें सिद्धि । शेवट तो कधीं मज न कळे ॥३॥ काय ऐसें पुण्य होईल गांठीं । घालीन पायीं देवाचे मिठी । मज तो कुरवाळील जगजेठी । दाटईन कंठीं सद्गदित ॥४॥ काय हे निवतील डोळे । सुख तें देखोनी सोहळे । संचित कैसें तें न कळे । होतील डोहळे वासनेसीं ॥५॥ ऐसी चिंता करीं सदा सर्वकाळ । रात्रंदिवस हेचि तळमळ । तुका म्हणे नाहीं आपुलें बळ । जेणें फळ पावेन निश्चयेंसी ॥६॥

४०२४. अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका । अगा जनार्दना जगव्यापका । अगा पाळका भक्तांचिया ॥१॥ अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा । अगा बळिबंध वामना । अगा निधाना गुणनिधि ॥२॥ अगा ये द्रौपदी बांधवा । अगा ये सखया पांडवा । अगा जिवाचिये जीवा । अगा माधवा मधुसूदना ॥३॥ अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरी गरुडध्वजा । अगा सुंदरा सहस्त्रभुजा । पार मी तुझा काय वर्णूं ॥४॥ अगा आंबऋषिपरंपरा । निरालंबा निर्विकारा । अगा गोवर्धनधरणीधरा । अगा माहेरा दीनाचिया ॥५॥ अगा धर्मराया धर्मशीळा । अगा कृपासिंधु कृपाळा । अगा प्रेमाचिया कल्लोळा । सकळकळाप्रवीणा ॥६॥ अगा चतुरा सुजाणा । मधुरा गिरा सुलक्षणा । अगा उदारा असुरमर्दना । राखें शरण तुकयाबंधु ॥७॥

४०२५. तूंचि अनाथाचा दाता । दु:ख मोह नासावया चिंता । शरण आलों तुज आतां । तारी कृपावंता मायबापा ॥१॥ संतसंगति देईं चरणसेवा । जेणें हा तुझा विसर न पडावा । हाची भाव माझिया जीवा । पुरवीं देवा मनोरथ ॥२॥ मज भाव प्रेम देईं प्रीति । गुण नाम वर्णावया स्तुती । विघ्ना सोडवूनी हातीं । विनंती माझी परिसावी हे ॥३॥ आणीक कांहीं नाहीं मागणें । सुखसंपत्तिराज्यचाड धनें । सांकडें न पडे तुज जेणें । दुजें भक्तीविण मायबापा ॥४॥ जोडोनि कर पायीं ठेवितों माथा । तुका विनवी पंढरीनाथा । रंगीं वोढवावी रंगकथा । पुरवीं मनोरथा मायबापा ॥५॥

४०२६. सेंदरींहदरीं दैवतें । कोण तीं पूजी भूतेंखेतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती

शितें अवदान ॥१॥ आपुले इच्छे आणिकां पीडी । काय तें देईल बराडी । कळों ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधिरा ॥२॥ दासीचा पाहुणेर उखीतें । धणी देईल आपुल्या हातें । करुणाभाषण उचितें । हें तों रितें सतत शक्तिहीन ॥३॥ काय तें थिल्लरीचें पाणी । ओठे न भिजे न फिटे धणी । सीण तरी आदीं अवसानीं । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ॥४॥ विलेपनें बुजविती तोंड । भार खोळ वाहाती उदंड । करविती आपआपणयां दंड । ऐसियास भांड म्हणे देव तो ॥५। तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन । तुका म्हणे त्याचें करा चिंतन । वंदूं चरण येती सकळ ॥६॥

४०२७. विषयओढीं भुलले जीव । आतां यांची कोण करील कींव । नुपजे नारायणीं भाव । पावोनी ठाव नरदेह ॥१॥ कोण सुख धरिलें संसारीं । पडोनी काळाचे आहारीं । माप या लागलें शरीरीं । झालियावरी सळे ओढती ॥२॥ बापुडी होतील शेवटीं । आयुष्यासवें झालिया तुटी । भोगिलें मागें पुढें ही कोटी । होईल भेटी जन्मासी ॥३॥ जुंतिलें घाणां बांधोनी डोळे । मागें जोडी आर तेणेंही पोळे । चालिलों किती तें न कळे । दु:खें आरंबळे भूक तहान ॥४॥ एवढें जयाचें निमित्त । प्रारब्ध क्रियमाण संचित । तें हें देह मानूनी अनित्य । न करिती कां नित्यनामस्मरण ॥५। तुका म्हणे न वेचतां मोल । तो हा यासी महाग विठ्ठल । वेंचितां फुकाचें बोल । केवढें खोल अभागियां ॥६॥

४०२८. आले हो संसारा तुम्ही एक करा । मुक्तिमारग हळूचि धरा । काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा दचकसी ना ॥१॥ नाहीं त्या यमासी करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा । ओढाळ सांपडे जैसें धान्या । चोर यातना धरिजेतो ॥२॥ नाहीं दिलें पावईल कैसा । चालतां पंथे तेणें वळसा । नसेल ठाउकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनियां ॥३॥ क्षण एक नागीवा पायीं । न चलवे तया करितां कांहीं । ओढिती कांठवणा सोई । अग्निस्तंभ बाहीं कवटाळविती ॥४॥ देखोनी अंगें कांपती । तये नदीमाजी चालविती । लागे ठाव ना न चलवे बुडविती । वरि मारिती यमदंड ॥५॥ तहानभूक न सहावे वेळ । तो राखिती किती एक काळ । पिंड पाळूनी कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ॥६॥ म्हणउनी करा कांहीं सायास । व्हावेल तरी व्हा रे उदास । करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका म्हणे ॥७॥

४०२९. न बोलसी तेंही कळलें देवा । लाजसी आपुलिया नांवा । तुज मी घालीत नाहीं गोवा । भीड केशवा कासयाची ॥१॥ उतरीं आपुला हा भार । मजशीं बोलोनी उत्तर । माझा तुज नव्हे अंगीकार । मग विचार करीन मी ॥२॥ दात्या आणि मागत्यासी । धर्मनीति तरी बोलिली ऐसी । यथानशक्ति ठाकेल तैसी । बाधी दोघांसी विन्मुखता ॥३॥ म्हणोनी करितों मी आस । तुझिया वचनाची वास । धीर हा करूनि सायास । न टळें नेमास आपुलिया ॥४॥

तुझे म्यां घेतल्यावांचून । येथूनी न वजें वचन । हाचि माझा नेम सत्य जाण । आहे नाहीं म्हण तुका म्हणे ॥५॥

४०३०. आतां मी न पडें सायासीं । संसारदुःखाचिये पाशीं । शरण रिघेन संतांसी । ठाव पायांपाशीं मागेन त्यां ॥१॥ न कळे संचित होतें काय । कोण्या पुण्यें तुझे लाधती पाय । आतां मज न विसंबें वों माय । मोकलूनी धाय विनवीतसें ॥२॥ बहुत जाचलों संसारें । मोहमायाजाळाच्या विखारें । त्रिगुण येताती लहरें । तेणें दुःखें थोर आक्रंदलों ॥३॥ आणीक दुःखें सांगों मी किती । सकळ संसाराची स्थिति । न साहे पाषाण फुटती । भय कांप चित्तीं भरलासे ॥४॥ आतां मज न साहावे सर्वथा । संसारगंधीची हे वार्ता । झालों वेडा असोनी जाणता । पावे अनंता तुका म्हणे ॥५॥

४०३१. आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारीं मारीं । जवळी अथवा दुरी धरीं । घालीं संसारीं अथवा नको ॥१॥ शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें । मतिमंद सर्वज्ञानें बहु रंक उणें रंकाहुनी ॥२॥ मन स्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवता नावरती । सकळ खुंटलिया युक्ति । शांति निवृत्ति जवळी नाहीं ॥३॥ सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव । आतां करीं कळे तो उपाव । तूंचि सर्व ठाव देवा माझा ॥४॥ राहिलों धरूनी विश्वास । आधार नेटीं तुझी कास । आणीक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचित ॥५॥

४०३२. देवा तूं कृपाकरुणासिंधु । होसी मायबाप आमुचा बंधु । जीवनसिद्धि साधनसिंधु । तोडिसी भवबंधु काळपाश ॥१॥ शरणागता वज्रपंजर । अभयदाना तूं उदार । सकाळां देवा तूं अगोचर । होसी अविकार अविनाश ॥२॥ भागलीं स्तुति करितां फार । तेथें मी काय तें गव्हार । जाणावया तुझा विचार । नको अंतर देऊं आतां ॥३॥ नेणें भाव परि म्हणवितों तुझा । नेणें भक्ति परि करितों पूजा आपुलिया नामाचिया काजा । तुज केशीराजा लागे धांवणें ॥४॥ तुझिया बळें पंढरीनाथा । झालों निर्भर तुटली व्यथा । घातला भार तुझिया माथां । न मीं सर्वथा तुका म्हणे ॥५॥

४०३३. कोण सुख धरोनी संसारीं । राहों सांग मज बा हरी । अवघ्या नाशिवंता परी । थिता दुरी तूंही अंतरसी ॥१॥ प्रथम केला गर्भीं वास । काय ते सांगावे सायास । दुःख भोगिलें नवही मास । आलों जन्मास येथवरी ॥२॥ बाळपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा । वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरीं ॥३॥ क्षण एक तोही नाहीं विसावा । लक्ष चौऱ्यांशी घेतल्या धांवा । भोवंडिती पाठीं लागल्या हांवा । लागो आगी नांवा माझ्या मीपणा ॥४॥ आतां पुरे ऐसी भरोवरी । रंक होऊनी राहेन द्वारीं । तुझा दास मी

दीन कामारी । तुका म्हणे करीं कृपा आतां ॥५॥

४०३४. सुख या संतसमागमें । नित्य दुणावे तुझिया नामें । दहन होती सकळ कर्में । सर्वकाळ प्रेमें डुल्लतसों ॥१॥ म्हणोनी नाहीं कांहीं चिंता । तूंचि आमुचा मातापिता । बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोतां सर्वांठायीं ॥२॥ ऐसा हा कळला निर्धार । माझा तुज न पडे विसर । अससी देऊनियां धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळी ॥३॥ दुःख तें कैसें नये स्वप्नासी । भुक्तिमुक्ति झाल्या कामारी दासी । त्यांचें वर्म तूं आम्हांपाशीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ॥४॥ जेथें तुझ्या कीर्तनाचा घोष । जळती पापें पळती दोष । काय तें उणें आम्हां आनंदास । सेवूं ब्रह्मरस तुका म्हणे ॥५॥

४०३५. न पवे सन्निध वाटते चिंता । वरि या बहुतांची सत्ता । नुगवे पडत जातो गुंता । कर्मा बळिवंता सांपडलों ॥१॥ बहु भार पडियेला शिरीं । मी हें माझें मजवरी । उघड्या नागविलों चोरीं । घरिंच्याघरीं जाणतजाणतां ॥२॥ तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावें संतां । झाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ॥३॥ अति हा नकट समय । मग म्यां करावें तें काय । दिवस गेलिया ठाकईल छाय । उरईल हाय रातिकाळीं ॥४॥ होईल संचिताची सत्ता । अंगा येईल पराधीनता । ठाव तो न दिसे लपतां । बहु चिंता प्रवर्तली ॥५॥ ऐसी या संकटाचे संधी । धांव घालावी कृपानिधी । तुका म्हणे माझी बळबुद्धी । सकळ सिद्धी पाय तुझे ॥६॥

४०३६. देवा तूं आमचा कृपाळ । भक्तप्रतिपाळ दीनवत्सल । माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ॥१॥ तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वांकडें जातां । पुढतीं निरविसी संतां । नव्हे विसंबतां धीर तुज ॥२॥ आम्हां भय चिंता नाहीं धाक । जन्ममरण कांहीं एक । झाला इहलोकीं परलोक । आलें सकळिक वैकुंठ ॥३॥ न कळे दिवस कीं राती । अखंड लागलीसे ज्योती । आनंदलहरीची गती । वर्णूं मी किती तया सुखा ॥४॥ तुझिया नामाचीं भूषणें । तोयें मज लेववितीं लेणें । तुका म्हणे तुझिया गुणें । काय तें उणें एक आम्हां ॥५॥

४०३७. आतां धर्माधर्मीं कांहीं उचित । माझें विचारावें हित । तुज मी ठाउका पतित । शरणागत परि झालों ॥१॥ येथें राया रंका एकी सरी । नाहीं भिन्नाभिन्न तुमच्या घरीं । पावलों पाय भलत्या परी । मग बाहेरी न घालावें ॥२॥ ऐसें हें चालत आलें मागें । नाहीं मी बोलत वाउगें । आपुलिया पडिल्या प्रसंगें । कीर्ति हे जगें वाखाणिजेती ॥३॥ घालोनियां माथां बैसलों भार । सांडिला लौकिक वेव्हार । आधीं हें विचारिली थार । अविनाशपर पद ऐसें ॥४॥ येथें एक वर्म पाहिजे धीर । परि म्यां लेखिलें असार । देह हा नाशिवंत जाणार । धरिलें सार नाम तुझें ॥५॥ केली आराणूक सकळां हातीं । धरावें तें धरिलें चित्तीं । तुका म्हणे सांगितलें संतीं । देईं अंतीं ठाव मज देवा ॥६॥

४०३८. बरवें झालें आलों या जन्मासी । जोड जोडिली मनुष्यदेहाऐसी । महालाभाची उत्तम रासी । जेणें सर्व सुखासी पात्र होइजे ॥१॥ दिलें इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलावया वचन । जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ॥२॥ तिळेंतिळें पुण्य सांचा पडे । तरि हें बहुतां जन्मीं जोडे । नाम तुझें वाचेसी आतुडे । समागम घडे संतांचा ॥३॥ ऐसिये पावविलों ठायीं । आतां मी काय होऊं उतराई । येवढा जीव ठेवीन पायीं । तूं वो माझे आई पांडुरंगे ॥४॥ फेडिला डोळियांचा कवळ । धुतला गुणदोषांचा मळ । लावूनी स्तनीं केलों सीतळ । निजविलों बाळ निजस्थानीं ॥५॥ नाहीं या आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा । आलासी आकारा आमुच्या चाडा । तुका म्हणे भिडा भक्तीचिया ॥६॥

४०३९. अल्प भाव अल्प मती । अल्प आयुष्य नाहीं हातीं । अपराधाची ओळिलों मूर्ती । अहो वेदमूर्ति परियेसा ॥१॥ किती दोषा देऊं परिहार । गुणदोषें मळिलें अंतर । आदि वर्तमान भविष्याकार । लागे अंतपार ऐसें नाहीं ॥२॥ विविध कर्म चौऱ्यांशीं फेरा । त्रिविध भोग या शरीरा । कर्मकोठार पांजरा । जन्म जरा मरण सांठवण ॥३॥ जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये भिन्न भिन्न पंचभूतें । रचतें खचतें संचितें । असार रिते फलकट ॥४॥ पुत्र पत्नी सहोदर । मायाबाप गोताचा पसर । मिळती काष्ठें लोटतां पूर । आदळे दूर होती खल्लाळीं ॥५॥ म्हणोनि नासावें अज्ञान । इतुकें करीं कृपादान । कृपाळू तूं जनार्दन । धरूनी चरण तुका विनवी ॥६॥

४०४०. ऐसी हे गर्जवूं वैखरी । केशवा मुकुंदा मुरारी । राम कृष्ण नामें बरीं । हरी हरी दोष सकळ ॥१॥ जनार्दना जगजीवना । विराटस्वरूपा वामना । महदादि मधुसूदना । भवबंधना तोडितिया ॥२॥ चक्रपाणी गदाधरा । असुरमर्दना वीर्यवीरा । सकळमुगुटमणि शूरा । अहो दातारा जगदानिया ॥३॥ मदनमूर्ति मनमोहना । गोपाळगोपिकारमणा । नटनाट्यकौशल्य कान्हा । अहो संपन्ना सर्वगुणें ॥४॥ गुणवंता आणि निर्गुणा । सर्वसाक्षी सर्वजाणा । करोनी अकर्ता आपणा । नेदि अभिमाना आतळों ॥५॥ कासयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें या देवा । वश्य तो नव्हे वांचूनी भावा । पाया वेगळे जीवा न करी तुका ॥६॥

४०४१. होतों तें चिंतित मानसीं । नवस फळलें नवसीं । जोडी ते नारायणा ऐसी । अवीट ज्यासी नाश नाहीं ॥१॥ धरिलें जीवें न सोडी पाय । आलें या जीवित्वाचें काय । कैं हे पाविजेती ठाय । लाविली सोय संचितानें ॥२॥ मज तों पडिली होती भुली । चित्ताची अपसव्य चाली । होती मृगजळेंगोवी केली । दृष्टि उघडली बरवें झालें ॥३॥ आतां हा सिद्धि पावो भाव । मध्यें चांचल्य न व्हावा जीव । ऐसी तुम्हां भाकीतसे कींव । कृपाळुवा जगदानिया ॥४॥ कळों येतें आपुली बुद्धी । ऐसें तों न घडे कधीं । येवढे आघात ते मधीं । लज्जा रिद्धी उभी आड ठाके ॥५॥ कृपा या केली संतजनीं । माझी अळंकारिली वाणी । प्रीति हे लाविली कीर्तनीं ।

तुका चरणीं लोळतसे ॥६॥

४०४२. मज ते हांसतील संत । जिहीं देखिलेती मूर्तिमंत । म्हणोनी उद्वेगलें चित्त । आहाच भक्त ऐसा दिसें ॥१॥ ध्यानीं म्यां वर्णावेती कैसे । पुढें एकीं स्तुति केली असे । येथूनी जीव निघत नसे । ऐसिये आसे लागलोंसें ॥२॥ कासया पडिला जी धडा । उगाचि वेडा आणि वांकडा । आम्हां लेंकरांसी पीडा । एका मागें जोडा दुसऱ्याचा ॥३॥ सांगा कोणाचा अन्याय । ऐसें मी धरितों पाय । तूं तंव समचि सकळां माय । काय अन्याय एक माझा ॥४॥ नये हा जरी कारणा । तरी कां व्यालेती नारायणा । वचन द्यावें जी वचना । मज अज्ञाना समजावीं ॥५॥ बहुत दिवस केला बोभाट । पाहातां श्रमलों वाट । तुका म्हणे विस्तारलें ताट । काय वीट आला नेणों स्वामीया ॥६॥

४०४३. बरवें झालें आजीवरी । नाहीं पडिलों मृत्याचे आहारीं । वांचोन आलों एथवरी । उरलें तें हरि तुम्हां समर्पण ॥१॥ दिला या काळें अवकाश । नाहीं पावलें आयुष्या नाश । कार्या कारण उरलें शेष । गेलें तें भूस जावो परतें ॥२॥ बुडणें खोटें पावतां थडी । स्वप्नीं झाली ओढाओढी । नासली जागृती घडी । साच जोडी शेवटीं गोड घास ॥३॥ तुम्हां पावविली हाक । तेणें निरसला धाक । तुमचें भातें हें कवतुक । जे शरणागत लोक रक्षावे ॥४॥ रवीच्या नांवें निशीचा नाश । उदय होतांचि प्रकाश । आतां कैंचा आम्हां दोष । तूं जगदीश कैवारी ॥५॥ आतां जळो देह सुख दंभ मान । न करी तयाचें साधन । तूं जगदीश नारायण । आलों शरण तुका म्हणे ॥६॥

४०४४. आतां माझा नेणों परतों भाव । विसावोनी ठायीं ठेविला जीव । सकळ लाभांचा हा ठाव । ऐसा वाव झाला चित्ताठायीं ॥१॥ भांडवल गांठीं तरि विश्वास । झालों तें झालों निश्चयें दास । न पाहें मागील ते वास । पुढती सोस सेवेचाचि ॥२॥ आहे तें निवेदिलें सर्व । माझा मोडियेला गर्व । अकाळीं काळ आघवें पर्व । झाला भरंवसा कृपें लाभाचा ॥३॥ वेव्हारीं वेव्हारा अनंत । नाहीं यावांचुनी जाणत । तरीं हें समाधान चित्त । लाभहानी नाहीं येत अंतरा ॥४॥ करूनी नातळों संसारा । अंग भिन्न राखिला पसारा । कळवळा तो जीवनीं खरा । बीजाचा थारा दुरी आघात ॥५॥ बहु मतापासूनी निराळा । होऊनी राहिलों सोंवळा । बैसला रूपाचा कळवळा । तुका म्हणे डोळां लेईलों तें ॥६॥

४०४५. बरवें झालें लागलों कारणीं । तुमचे राहिलों चरणीं । फेडीन संतसंगती धणी । गर्जईल गुणीं वैखरी ॥१॥ न वंचे शरीर सेवेसी । काया वाचा आणि मनेसीं । झालों संतांची आंदणी दासी । केला येविशीं निर्धार ॥२॥ जीवनीं राखिला जिव्हाळा । झालों मी मजसी निराळा । पंचभूतांचा पूतळा । सहज लीळा वर्ततसे ॥३॥ जयाचें जया होईल ठावें । लाहो या साधियेला

भावें । ऐसें होतें राखियेलें जीवें । येथूनी देवे भोवंडूनी ॥४॥ आस निरसली ये खेपे । अवघे पंथ झाले सोपे । तुमचे दीनबंधु कृपें । दुसरें कांपे सत्ताधाकें ॥५॥ अंकिलेपणें आनंदरूप । आतळों नये पुण्यपाप । सारूनी ठेविले संकल्प । तुका म्हणे आपेंआप एकाएकीं ॥६॥

४०४६. अवघ्या दशा येणेंचि साधती । मुख्य उपासना सगुणभक्ति । प्रगटे हृदयींची मूर्ति । भावशुद्धि जाणोनियां ॥१॥ बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म । सकळा कळांचें हें वर्म । निवारी श्रम सकळही ॥२॥ जेथें कीर्तन हें नाम घोष । करिती निर्लज्ज हरीचे दास । सकळ वोथंबले रस । तुटती पाश भवबंधाचे ॥३॥ येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें । आपणचि येती तयाचे गुणें । जाणें येणें खुंटे ये वस्तीचें ॥४॥ न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म । आणीक न करावे श्रम । एक पुरें नाम विठोबाचें ॥५॥ वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य । मुक्त आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ॥६॥

४०४७. श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा । जगव्यापका जनार्दना । आनंदघना अविनाशा ॥१॥ सकळदेवाधिदेवा । कृपाळुवा जी केशवा । महानंदा महानुभवा । सदाशिवा सहजरूपा ॥२॥ चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा । सहस्त्रपादा सहस्त्रकरा । क्षीरसागरा शेषनयना ॥३॥ कमलनयना कमलापति । कामिनीमोहना मदनमूर्ति । भवतारका धरित्या क्षिती । वामनमूर्ति त्रिविक्रमा ॥४॥ अगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनित्या जगजीवना । वसुदेवदेवकीनंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ॥५॥ तुका आला लोटांगणीं । मज ठाव द्यावा जी चरणीं । हेचि करीतसे विनवणी । भवबंधनीं सोडवावें ॥६॥

४०४८. माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव । करूं भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं ॥१॥ धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त । नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥२॥ नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान । नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसी ॥३॥ तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें । देव जवळी आहे म्हणों मजसवें । तरि आपपरावे न वचे ॥४॥ म्हणोनि झालों शरणागत । तुझा दास मी अंकित । यास न लगे संचित । जालों निश्चित तुका म्हणे ॥५॥

४०४९. तरी म्यां आळवावें कोणा । कोण हे पुरवील वासना । तुज वांचून नारायणा । लावीं स्तना कृपावंतें ॥१॥ आपुला न विचारी सीण । न धरी अंगसंगें भिन्न । अंगिकारिलें राखें दीन । देईं जीवन आवडीचें ॥२॥ माझिया मनासी हे आस । नित्य सेवावा ब्रह्मरस । अखंड चरणींचा वास । पुरवी आस याचकाची ॥३॥ माझिया संचिताचा ठेवा । तेणें हे वाट दाविली देवा । एवढ्या आदराचा हेवा । मागें सेवादान आवडीचें ॥४॥ आळवीन करुणावचनीं । आणिक गोड नलगे मनीं । निद्रा जागृती आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ॥५॥ आतां भेट न भेटतां आहे । किंवा

नाहीं ऐसें विचारूनी पाहें । लागला झरा अखंड आहे । तुका म्हणे साहे केलें अंतरीं ॥६॥

४०५०. हेंचि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध । आणीक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ॥२॥ सांवळें रूप ल्यावें डोळां । सहा चौ अठरांचा मेळा । पदर लागों नेदी खळा । नाममंत्रमाळा विष्णुसहस्त्र ॥२॥ भोजना न द्यावें आन । जेणें चुके अनुपान । तरीच घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥३॥ नये निघों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा । बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ॥४॥ पासी तें एक द्यावें वरी । नवनीताची होईल परी । होईल घुसळिलें तें निवारी । सार भीतरी नाहीं तया ॥५॥ न्हायें अनुतापीं पांघरें दिशा । स्वेद निघों दे अवघी आशा । होसील आधीं होतासी तैसा । तुका म्हणे दशा भोगी वैराग्य ॥६॥

४०५१. मागुता हाचि जन्म पावसी । भोगिलें सुखदुःख जाणसी । हें तों न घडे रे सायासीं । कां रे अंध होसी जाणोनियां ॥१॥ लक्ष चौऱ्यांशीं न चुके फेरा । गर्भवासीं यातना थोरा । येऊनी पडसी संदेहपुरा । वोळसा थोर मायाजाळीं ॥२॥ पशु काय पापपुण्य जाणती । उत्तम मध्यम भोग भोगिती । काय एक उपजतां मरती । बहिरीं अंध होती पांगुळ मुकीं ॥३॥ नरदेह निधान लागलें हातीं । उत्तम सार उत्तम गती । देवचि होईन म्हणती ते होती । तरि कां चित्तीं न धरावें ॥४॥ क्षण एक मन स्थिर करूनी । सावध होईं डोळे उघडोनी । पाहें वेद बोलिले पुराणीं । तुका विनवणी करीतसे ॥५॥

४०५२. उभा देखिला भीमातीरीं । कर मिरविले कटावरी । पाउलें तरी समचि साजिरीं । नाम तरी अनंत अतिगोड ॥१॥ शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा चिद्रत्नें । पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपलें तेणें रवितेज ॥२॥ श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिका माळ । दंत ओळी हिरे झळाळ । मुख निर्मळ सुखरासी ॥३॥ कटीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहुवटे पदक गळां । मृगनाभी रेखिला टिळा । लवती डोळां विद्युल्लता ॥४॥ सुंदरपणाची साम्यता । काय वर्णूं ते पावे आतां । तुकया बंधु म्हणे रे अच्युता । धन्य ते माता पिता प्रसवली ॥५॥

४०५३. दास्य करी दासाचें । उणें न साहे तयाचें । वाढिलें ठायींचें । भाणें टाकोनियां धांवे ॥१॥ ऐसा कृपेचा सागर । विटे उभा कटीं कर । सर्वस्वें उदार । भक्तांलागीं प्रगटे ॥२॥ हृदयीं श्रीवत्सलांछन । मिरवी भक्तांचें भूषण । नाहीं तयाचा सीण । सुख धरिलें लातेचें ॥३॥ सत्यभामा दान करी । उजुर नाहीं अंगीकारी । सेवकाच्या शिरीं । धरूनी चाले पादुका ॥४॥ राखे दारवंटा बळीचा । सारथी झाला अर्जुनाचा । दास सेवकांचा । होय साचा अंकित ॥५॥ भिडा न बोले पुंडलीकाशीं । उभा मर्यादा पाठीशीं । तुका म्हणे ऐसी । कां रे न भजा माउली ॥६॥

४०५४. हरि तैसे हरीचे दास । नाहीं तयां भय मोह चिंता आस । होऊनी राहती उदास । बळकट कांस भक्तीची ॥१॥ धरूनी पाय त्यजिलें जन । न लगे मान मृत्तिका धन । कंठीं

नामामृत पान। न लगे आन ऐसें झालें ॥२॥ वाव तरी उदंडचि पोटीं। धीर सिंधु ऐसे जगजेठी। कामक्रोधा न सुटे मिठी। गिऱ्हे तरी वेठीं राबविती ॥३॥ बळ तरी नागवती काळा। लीन तरी सकळांच्या तळा। उदार तरी देहासी सकळां। जाणोनी कळा सर्व नेणते ॥४॥ संसार तो तयांचा दास। मोक्ष तो पाहातसे वास। रिद्धिसिद्धि देशवटा त्रास। न शिवती यास वैष्णवजन ॥५॥ जन्ममृत्युस्वप्नांसारिखें। आप त्यां न दिसे पारखें। तुका म्हणे अखंडित सुखें। वाणी वदे मुखें प्रेमामृताची ॥६॥

४०५५. बहुत जाचलों संसारीं। वसें गर्भीं मातेच्या उदरीं। लक्ष चौऱ्यांशीं योनिद्वारीं। झालों भिकारी याचक ॥१॥ जिणें पराधीन आणिकां हातीं। दृढ पाशीं बहु बांधलों संचितीं। प्रारब्ध क्रियमाण सांगाती। भोवंडिती सत्ता आपुलिया ॥२॥ न भरे पोट नाहीं विसांवा। नाहीं नेम एक ठाव गांवा। नाहीं सत्ता न फिरे ऐसी देवा। लाही जीवा खापरीं तडफडी ॥३॥ काळ बहुत गेले ऐसिया रीती। आणीक पुढेंही नेणों किती। खंडना नाहीं पुनरावृत्ति। मज कल्पांतीं तरी वेगळें ॥४॥ ऐसें दुःख कोण हरील माझें। कोणा भार घालूं आपुलें ओझें। भवसिंधुतारक नाम तुझें। धांवसी काजें आडलिया ॥५॥ आतां धांव घालीं नारायणा। मजकारणें रंका दीना। गुण न विचारीं अवगुणा। तुका करुणा भाकीतसे ॥६॥

४०५६. जंव हें सकळ सिद्ध आहे। हात चालावया पाय। तंव तूं आपुलें स्वहित पाहें। तीर्थयात्रे जाय चुकों नको ॥१॥ जंव काळ असे दुरी ठेला। तंव तूं हरिगुण गाय आइक वहिला। मनीं भाव धरूनी भला। न वंचें त्याला चुकों नको ॥२॥ जोडोनी धन न घालीं माती। ब्रह्मवृंदें पूजन यती। सत्य आचरण दया भूतीं। करीं सांगाती चुकों नको ॥३॥ दशा यौवन बाणली अंगीं। पांगिला नव्हें विषयसंगीं। काम क्रोध लोभ मोह त्यागीं। राहें संतसंगीं चुकों नको ॥४॥ मग तेथें न चले कांहीं। सत्ता संपदा राहेल ठायींच्या ठायीं। पुढें संचित जाईल ग्वाही। तुका म्हणे तईं यमआज्ञा ॥५॥

४०५७. चांगलें नाम गोमटें रूप। निवती डोळे हरती ताप। विठ्ठल विठ्ठल हा जप। प्रगट स्वल्प अति सार ॥१॥ शस्त्र हें निर्वाणींचा बाण। निकट समयो अवसान। कोठें योजेल दश दान। खंडी नारायण दुःख चिंतनें ॥२॥ सकळ श्रेष्ठाचें हें मत। पावे सिद्धि पाववी अनंत। म्हणोनी व्हावें शरणागत। आहे उचित एवढेंचि ॥३॥ म्हणोनी रुसलों संसारा। सर्प हा विखार पांढरा। तुजशीं अंतर रे दातारा। याचि दावेदारानिमित्त ॥४॥ येणें मज भोगविल्या खाणी। नसता छंद लाविला मनीं। माजलों मी माझे भ्रमणीं। झाली बोडणी विटंबना ॥५॥ पावलों केलियाचा दंड। खाणी भोगिल्या याती उदंड। आतां केला पाहिजे खंड। तुका दंडवत घाली देवा ॥६॥

४०५८. तुझिया पार नाहीं गुणां । माझी अल्पमति नारायणा । भवतारका जी सुजाणा । एक विज्ञापना पायांपाशीं ॥१॥ काय जाणावें म्यां दीनें । तुझिये भक्तीचीं लक्षणें । धड तें तोंड धुऊं नेणें । परि चिंतनें काळ सारीं ॥२॥ न लवीं आणीक कांहीं पिसें । माझिया मना वांयां जाय ऐसें । चालवीं आपुल्या प्रकाशें । हातीं सरिसें धरोनियां ॥३॥ तुज हे समर्पिली काया । जीवेंभावें पंढरीराया । सांभाळीं समविषम डाया । करीं छाया कृपेची ॥४॥ चतुर तरी चतुरां राव । जाणता तरी जीवांचा जीव । न्यून तो कोण एक ठाव । आरुष भाव परि माझा ॥५॥ होतें तें माझें भांडवल । पायापें निवेदिलें बोल । आदरा ऐसें पाविजे मोल । तुका म्हणे साच फोल तूं जाणसी ॥६॥

४०५९. कां हो माझा मानियेला भार । ऐसा तव दिसतसे फार । अनंत पावविलीं उद्धार । नव्हेचि थार मज शेवटीं ॥१॥ पाप बळिवंत गाढें । तुजही राहों सकतें पुढें । मागील कांहीं राहिलें ओढें । नवल कोडें देखियेलें ॥२॥ काय मानिती संतजन । तुमचें हीनत्व वचन । कीं वृद्ध झाला नारायण । न चले पण आधील तो ॥३॥ आतां न करावी चोरी । बहुत न धरावें दुरी । पडदा काय घरच्या घरीं । धरिलें दुरी तेव्हा धरिलें ॥४॥ नको चाळवूं अनंता । कायसा होतोसी नेणता । काय तूं नाहीं धरीत सत्ता । तुका म्हणे आतां होई प्रगट ॥५॥

४०६०. तुळसी माळा घालूनि कंठीं । उभा विटेवरी जगजेठी । अवलोकोनी पुंडलिका दृष्टी । असे भीमातटीं पंढरीये ॥१॥ भुक्तिमुक्ति जयाच्या कामारी । रिद्धिसिद्धि वोळगती द्वारीं । सुदर्शन घरटी करी । काळ कांपें दुरी धाकें तया ॥२॥ जगज्जननी असे वाम भागीं । भीमकी शोभली अर्धांगीं । जैसी विद्यल्लता झळके मेघीं । दर्शनें भंगी महा दोष ॥३॥ सुखसागर परमानंदु । गोपी गोपाळां गोधनां छंदु । पक्षिश्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पांवा छंदें ॥४॥ मुखमंडित चतुर्भुजा । मनमोहन गरुडध्वजा । तुका म्हणे स्वामी माझा । पावे भक्तकाजा लवलाहीं ॥५॥

४०६१. हातींचें न संडावें देवें । शरण आलों जीवें भावें । आपलें ऐसें म्हणावे । करितों जीवें निंबलोण ॥१॥ बैसतां संतांचे संगती । कळों आलें कमळापती । आपुलीं कोणीच नव्हती । निश्चय चित्तीं दृढ झाला ॥२॥ येती तुझिया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोड । कनिष्ठीं रुचि ठेवूनी गोड । देखत नाड कळतसे ॥३॥ मरती मेलीं नेणों किती । हाचि लाभ तयाचे संगती । म्हणोनि येतों काकुलती । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ॥४॥ सुखें निंदोत हे जन । न करीं तयांशीं वचन । आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे ते ॥५॥ आपलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण संचित । तरी मी नष्टचि पतित । तुका म्हणे मज संत हांसती ॥६॥

४०६२. आतां येणें बळें पंढरिनाथ । जवळी राहिला तिष्ठत । पाहातां न कळे जयाचा अंत । तोचि हृदयांत घालूं आतां ॥१॥ विसरोनि आपला देहपणभाव । नामेंचि भुलविला

पंढरीराव । न विचारी याती कुळ ठाव । लागावया पाव संतांचे ॥२॥ बरें वर्म आलें आमुचिया हातां । हिंडावें धुंडावें न लगतां । होय अविनाश साहाकारी दाता । चतुर्भुज सत्ता परि धाके ॥३॥ होय आवडी साना थोर । रूप सुंदर मनोहर । भक्तिप्रिय लोभापर । करी आदर याचकपणें ॥४॥ तें वर्म आलें आमुच्या हाता । म्हणोनि शरण रिघालों संतां । तुका म्हणे पंढरिनाथा । न सोडीं आता जीवें भावें ॥५॥

४०६३. आइक पांडुरंगा एक मात । कांहीं बोलणें आहे एकांत । आम्हां जरी तारील संचित । तरी उचित काय तुझें ॥१॥ उसणें फेडितां धर्म तो कोण । काय तया मानवेल जन । काय गा मिरवूनी भूषण । वांयां थोरपण जनामध्यें ॥२॥ अन्न जरी न मिळे तयासी देणें । आगांतुक पात्र उचित दान । उपकार तरी धन्वंतरीपणें । जरी देणें घेणें नाहीं आशा ॥३॥ शूर तो तयासी बोलिजे जाणा । पाठीसी घालुनी राखे दीना । पार पुण्या नाहीं त्या भूषणा । ऐक नारायणा वचन हें ॥४॥ आतां पुढें बोलणें तें कांहीं । मज तारिसील तरीच सहि । वचन आपुलें सिद्धी नेई । तुका म्हणे तईं मज कळसी ॥५॥

४०६४. चांगला तरी पूर्ण काम । गोड तरी याचेंचि नाम । दयाळु तरी अवघा धर्म । भला तरी दासां श्रम होऊं नेदी ॥१॥ उदार तरी लक्ष्मीयेसी । जुंजार तरी कळिकाळासी । चतुर तरी गुणांचीच रासी । जाणता तयासी तोचि एक ॥२॥ जुनाट तरी बहुकाळा । न कळे जयाची लीळा । नेणता गोवळीं गोवळा । लाघवी अबळा भुलवणा ॥३॥ गांढ्या तरी भावाचा अंकित । बराडी तरी उच्छिष्टाची प्रीत । ओंगळ तरी कुब्जेशीं रत । भ्याड अनंत बहु पापा ॥४॥ खेळ तो येणेंचि खेळावा । नट तो येणेंचि आवगावा । लपोनि जीवीं न कळे जीवा । धरितां देवा नातुडसी ॥५॥ उंच तरी बहुतचि उंच । नीच तरी बहुतचि नीच । तुका म्हणे बोलिलों साच । नाहीं आहाच पूजा केली ॥६॥

४०६५. काय आम्ही भक्ती करणें कैसी । काय एक वाहावें तुम्हांसी । अवघा भरोनी उरलासी । वाणीं खाणीं रसीं रूपीं गंधीं ॥१॥ कैसें करूं इंद्रियां बंधन । पुण्यपापाचें खंडण । काय व्रत करूं आचरण । काय तुजविण उरलें तें ॥२॥ काय डोळे झांकुनियां पाहो । मंत्र जप काय ध्यावो । कवणें ठायीं धरूनि भाव । काय तें वाव तुजविण ॥३॥ काय हिंडों कवण दिशा । कवणे ठायीं पाय ठेवूं कैसा । काय तूं नव्हेसी नकळे ऐसा । काय मी कैसा पाहों आतां ॥४॥ तुझिया नामाची सकळ । पूजा अर्चन मंत्र माळ । धूप दीप नैवेद्य फळ तांबूल । वाहूं पुष्पांजुळ तुका म्हणे ॥५॥

४०६६. शरीर दुःखाचें कोठार । शरीर रोगाचें भांडार । शरीर दुर्गंधीची थार । नाहीं अपवित्र शरीरा ऐसें ॥१॥ शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोसुलें । शरीरें साध्य

होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥२॥ शरीर विटाळाचें आळें । मायामोहपाश जाळें । पतन शरीराच्या मुळें । शरीर काळें व्यापिलें ॥३॥ शरीर सकळही शुद्ध । शरीर निधींचाही निध । शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यभागीं देव शरीरा ॥४॥ शरीर अविद्येचा बांधा । शरीर अवगुणांचा रांधा । शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुण सुधा एक शरीरीं ॥५॥ शरीरा दुःख नेदावा भोग । न द्यावें सुख न करीं त्याग । शरीर वोखटें ना चांग । तुका म्हणे वेग करीं हरिभजनीं ॥६॥

४०६७. इतुकें करी भलत्या परी । परद्रव्य परनारी । सांडुनी अभिलाश अंतरीं । वर्ते वेव्हारीं सुखरूप ॥१॥ न करीं दंभाचा सायास । शांती राहे बहुवस । जिव्हे सेवीं सुगंधरस । न करीं आळस रामनामीं ॥२॥ जनमित्र होईं सकळांचा । अशुभ न बोलावी वाचा । संग न धरावा दुर्जनाचा । करीं संतांचा सायास ॥३॥ करिसी देवाविण आस । अवघी होईल निरास । तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ॥४॥ धरूनी विश्वास करीं धीर । करितां देव हाचि निर्धार । तयाचा वाहे योगक्षेमभार । नाहीं अंतर तुका म्हणे ॥५॥

४०६८. संसारसिंधु हा दुस्तर । नुल्लंघवे उल्लंघितां पार । बहुत वाहाविले दूर । न लगेचि तीर पैल थडी ॥१॥ किती जन्म झाला फेरा । गणित नाहीं जी दातारा । पडिलों आवर्तीं भोंवरा । बहु थोरा वोळसिया ॥२॥ वाढलों परि नेणती बुद्धि । नाहीं परतली धरिली शुद्धि । मग म्यां विचारावें कधीं । ऐसी संधि सांडूनियां ॥३॥ अनेक खाणी आहार निद्रा । भयमैथुनाचाचि थारा । बालत्व तारुण्य जरा । प्रधान पुरा भोग तेथें ॥४॥ ऐसीं उल्लंघूनी आलों स्थळें । बहु या भोवंडिलों काळें । आतां उगवावें जाळें । उजेडावें बळें दिवसाच्या ॥५॥ सांडो या संसाराची वाट । बहु येणें भोगविले कष्ट । दावी सत्या ऐसें नष्ट । तुका म्हणे भ्रष्ट झालों देवद्रोही ॥६॥

४०६९. विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी । विठ्ठल पुंडलिकापासीं । कृपादानासीं उदार ॥१॥ विठ्ठल स्मरणा कोंवळा । विठ्ठल गौरवी आगळा । आधार ब्रह्मांडा सकळा । विठ्ठल लीळाविग्रही ॥२॥ उभाचि परि न मनी सीण । नाहीं उद्धरितां भिन्न । समर्थाचे घरीं एकचि अन्न । आर्तभूता क्षणोक्षणा सांभाळी ॥३॥ रुचीचे प्रकार । आणितातीं आदरें । कोठेंही न पडे अंतर । थोरासी थोर धाकुट्या धाकुटा ॥४॥ करितां बळ धरितां नये । झोंबतां डोळा मनच होय । आपुल्या उद्देशाची सोय । जाणे हृदयनिवासी ॥५॥ पान्हा तरी आल्या अंतर तेथें । तों नाहीं भरिलें रितें । करितों सेवन आइतें । तुका म्हणे चित्तें चित्त मेळवूनी ॥६॥

४०७०. ताप हें हरण श्रीमुख । हरी भवरोगाऐसें दुःख । अवलोकितां उपजे सुख । उभें सन्मुख दृष्टीपुढें ॥१॥ न पुरे डोळियांची धणी । सखोल कृपेचीच खाणी । स्तवितां न पुरे

वेदवाणी । तो हा समचरणी कृपानिधि ॥२॥ रामकृष्ण ध्यान वामननरसिंही । उग्र आणि सौम्य कांहींच नाहीं । सांपडे भरलीये वाही । भाव शुद्ध पाहीं याचें भातुकें ॥३॥ गुणगंभीर चतुर सुजाण । शूर धीर उदार नारायण । व्यापक तरी त्रिभुवन । मनमोहन लावण्य हें ॥४॥ ठाण हें साजिरें सुंदर । अविनाश अविकार । अनंत आणि अपरंपार । तो हा कटीं कर धरिताहे ॥५॥ जयाची वाणी सुमनमाळा । परमामृतजिव्हाळा । अनंता अंगीं अनंत कळा । तुका जवळा चरणसेवक ॥६॥

४०७१. एक मागणें हृषीकेशी । चित्त द्यावें सांगतों वचनासी । मज अंतर तुझ्या चरणासी । न पडे ऐसी कृपा करी ॥१॥ नको दुजी बुद्धि आणीक । रिद्धिसिद्धि परलोक । तूं स्वामी मी सेवक । खंडणा नको करूं ऐसी ॥२॥ मना येईल तो जन्म देईं । भलते कुळीं भलते ठायीं । तें मी सांकडें घालीत नाहीं । हृदयींहूनी तुवां नव जावें ॥३॥ इतुलें करी भलत्या परी । भलत्या भावें तुझे द्वारीं । राहेन दास होऊनी कामारी । वदो वैखरी नित्य नाम ॥४॥ नको विचारूं दुसरें आतां । शरण आलों जी पंढरीनाथा । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता । आहेसी तूं दाता दानशूर ॥५॥

४०७२. कईं देखता होईन डोळीं । सकळांभूतीं मूर्ती सांवळी । जीवा नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ॥१॥ ऐसी कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन । प्रेमसागरीं बुडईन । होईल स्नान अनुतापी ॥२॥ ऐसा कईं येईन दैवास । दृश्य हें नासोन जाईल आस । सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ॥३॥ कईं नवसा येतील अंकुर । सुखा नाहींसा होईल पार । अमृत तें पृथ्वीतळ सागर । वाहातील पूर आनंदाचे ॥४॥ प्रसन्न दया क्षमा शांती । कईं नवविधा होईल भक्ती । भोगईन वैराग्य संपत्ती । मनोरथ कळती तईं पुरले ॥५॥ तुकयाबंधु म्हणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग । म्हणोनी घातलें साष्टांग । पांडुरंगावरी चरणा ॥६॥

४०७३. तूं बळिया शिरोमणी । आहेसी माजी ये त्रिभुवनीं । रिघालों पाठीं तुझी म्हणउनी । आतां करी मनीं असेल तें ॥१॥ कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवांची बंदीशाळ । संहारूनी राक्षसदळ । शरणागत राज्यीं स्थापिला ॥२॥ उपक्रम करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत । उचित काय ते अनुचित । राखें शरणागत आलों आतां ॥३॥ तूं देवा प्रतापदिनकर । सुरा असुरांचा शूर । महावीरां वीर धनुर्धर । मी तों पामर काय तेथें ॥४॥ किती म्यां काय विनवावें । शरण आलों जीवें भावें । तुकयाबंधु म्हणे करावें । क्षेम आघवें येणें काळें ॥५॥

४०७४. देवा मी चांडाळ चांडाळ । म्हणतां लागताहे वेळ । नसें पाहातां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥१॥ जन्मा उपजलियापासूनी । असत्य कर्म तें अझूनी । सत्य आचरण नेणें

स्वप्नीं । निखळ खाणी अवगुणांची ॥२॥ भक्ति दया अथवा कथा । कानीं न सहावे वार्ता । अखंड विषयांची व्यथा । अधम पुरता अधमाहुनी ॥३॥ काम क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर । यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी जैसा ॥४॥ निंदा द्वेष घातविश्वास । करितां नाहीं केला आळस । करूं नये ते केले संतउपहास । अभक्षभक्ष तेंही भक्षिलें ॥५॥ पाळिलें नाहीं पितृवचन । सदा परद्वारीं परधनीं ध्यान । बोलों नये ऐसें घडलें अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी ॥६॥ कायामनें वाचा इंद्रियांशीं । सकळ पापांचीच राशी । तुकयाबंधु म्हणे ऐसियासी । आलों हृषीकेशी तुज शरण ॥७॥

४०७५. काय काय करितों या मना । परी नाइके नारायणा । करूं नये त्याची करी विवंचना । नेऊं पतना आदरिलें ॥१॥ भलतिया सवें धांवे सैराट । वाट आडवाट दरे दरकुट । न विचारी कांहीं कुडें कपट । घात बळकट मांडियला ॥२॥ न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्तही पाताळें आकाशा । घाली उडी बळेंचि देखोनी फांसा । केलों या दोषा पाहुणा ॥३॥ चेतवूनी इंद्रियें सकळ । आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ । दुराविली शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ॥४॥ आतां काय ऐसें करावें यासी । बहुत जाचिलों केलों कासाविसी । तुकयाबंधु म्हणे हृषीकेशी । धांव मजसी ऐसी परी झाली ॥५॥

४०७६. नोहे आजिकालिचे ऐसे । अनारिसें पालटे ॥१॥ आतां लागवेग करा । ज्याचें धरा ठाके ते ॥२॥ नका सांगो वाउग्या गोष्टी । चाहुल खोटी ये ठायीं ॥३॥ तुका म्हणे मोडा माग । आपुला लाग करूनी ॥४॥

४०७७. खाणोरियांचीं पुसों घरें । जींहीं बरे पाळती ॥१॥ सांगती त्या जावें वाटा । धरोनी पोटामध्यें गोष्टी ॥२॥ आली गेली होती ठाया । सत्य छाया कळली ॥३॥ तुका म्हणे आपुलें बळ । युक्ति काळ कारण ॥४॥

४०७८. बैसो आतां मनीं । आलें तैसेंचि वदनीं ॥१॥ मग अवघेंचि गोड । पुरे सकळहि कोड ॥२॥ बाहेरील भाव । तैसा अंतरींहि वाव ॥३॥ तुका म्हणे मणी । शोभा दाविली कोंदणीं ॥४॥

४०७९. यत्न आतां तुम्ही करा । मज दातारा सत्तेनें ॥१॥ विश्वास तो पायांवरी । ठेवुनि हरि राहिलों ॥२॥ जाणतचि दुजे नाहीं । आणीक कांहीं प्रकार ॥३॥ तुका म्हणे शरण आलों । नेणें बोलों विनवितां ॥४॥

[आरत्या प्रारंभ]

४०८०. जगदीश जगदीश तुज म्हणती । परि या जनामाजी असशील युक्ति । पुण्यपापाविरहित सकळां अधिपती । द्रष्टा परी नळणी अलिप्त गती ॥१॥ जय देव जय देव जय पंढरीनाथा, श्रीपंढरीनाथा । नुरे पाप विठ्ठल म्हणतां सर्वथा ॥२॥ आगम निगम तुज नेणती

कोणी। परि तूं भाव भक्ति जवळीच दोन्ही। नेणतां विधियुक्त ईश्वरातें पूजनीं। न माये ब्रह्मांडीं तो संपुष्टासनीं ॥३॥ असुरां काळ भासे विक्राळ पुढें। पसरीं मुख एक चावितो धुडें। भक्ता शरणागता चालतो पुढें। दावी वाट जाऊं नेदी वांकुडें ॥४॥ एकाएकीं बहु विस्तरला सुखें। खेळे त्याची लीला तोचि कवतुकें। तेथें हे नरनारी कवण बाळकें। काय पापपुण्य कवण सुखदुःखें ॥५॥ सकळ वर्मा तूंचि जाणशी एक। बद्ध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख। जाणों म्हणतां तुज ठकलीं बहुतेक। तुका म्हणे शरण आलों मज राख ॥६॥

४०८१. दैत्यभारें पीडिली पृथ्वी बाळा । म्हणोनि तुज येणें झाले गोपाळा । भक्तिप्रतिपाळक उत्साव सोहळा। मंगळें तुज गाती अबळा बाळा ॥१॥ जय देव जय देव जय गरुडध्वजा। आरती ओवाळूं तुज भक्तिकाजा ॥२॥ गुण रूप नाम नाहीं जयासी। चिंतितांची तैसा होसी तयांसी। मत्स्य कूर्म वराह नरसिंह झालासी। असुरां काळ मुनी ठाके ध्यानासी ॥३॥ सहस्त्र रूपें नाम सांवळा ना गोरा। श्रुति नेति म्हणती तुज विश्वंभरा। जीवना जीवन तूचि होसी दातारा। न कळे पार ब्रह्मादिकां सुरवरां ॥४॥ संतां महंतां घरीं म्हणवी म्हणियारा। शंख चक्रगदा आयुधांचा भारा। सुदर्शन घरटी फिरे अवसरा। सकुमार ना स्थूळ होसी गोजिरा ॥५॥ भावेंविण तुझें न घडे पूजन। सकळही गंगा झाल्या तुजपासून। उत्पत्ति प्रलय तूंचि करिसी पालन। धरूनि राहिला तुका निश्चयें चरण ॥६॥

४०८२. काय तुझा महिमा वर्णूं मी किती। नाममात्रें भवपाश तुटती। पाहातां पाऊलें हे विष्णुमूर्ती । कोटिकुळांसहित जडजीव उद्धरती ॥१॥ जय देव जय देव जय पंढरीराया, श्रीपंढरीराया। करुनियां कुरवंडी सांडीन काया ॥२॥ मंगळआरतीचा थोर महिमा। आणीक द्यावया नाहीं उपमा। श्रीमुखासहित देखे जो कर्मा- । पासुनी सुटे जैसा रवि नासी तमा ॥३॥ धन्य व्रतकाळ हे एकादशी । जागरण उपवास घडे जयांसी । विष्णूचें पूजन एकभावेंसी । नित्यमुक्त पूज्य तिहीं लोकांसी ॥४॥ न वजे वांयां काळ जे तुज ध्याती। आखंड तुझा वास तयांच्या चित्तीं। धाले सुखें सदा प्रेमें डुल्लती। तीर्थें मलीन वास तयांचा पाहाती ॥५॥ देव भक्त तूंचि झालासी दोन्ही। वाढावया सुख भक्ति हे जनीं। जड जीवां उद्धार व्हावया लागोनी। शरण तुका वंदी पाऊलें दोन्ही ॥६॥

४०८३. कंसरायें गर्भ वधियेले सात। म्हणोनि गोकुळासी आले अनंत। घ्यावया अवतार झालें हेंचि निमित्त । असुर संहारूनी तारावे भक्त ॥१॥ जय देव जय देव जय विश्वरूपा। ओंवाळीन तुज देहदीपें बापा ॥२॥ स्थूळरूप होउनि धरितसे सानें । जैसा भाव तैसा तयांकारणें। दैत्यांसी भासला सिंही गजाने। काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ॥३॥ अनंत वर्णी कोंणा न कळेचि पार। सगुण कीं निर्गुण हाही निर्धार। पांगलीं साही अठरा करितां

वेव्हार। तो वळितसे गौळियांचें खिल्लार ॥४॥ तेहतीस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ। पाउलें पाताळीं स्वर्गीं मुगुट। गिळिलीं चौदा भुवनें तरि न भरेचि पोट। तो खाउन धाला गौळियांचें उच्छिष्ट ॥५॥ महिमा वर्णूं तरि पांगलिया श्रुति। सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुति। भावेंविण कांहीं न चलेचि युक्ति। राखें शरण तुकयाबंधु करी विनंती ॥६॥

४०८४. परमानंदा परमपुरुषोत्तमा रामा। अच्युता अनंता हरि मेघश्यामा। अविनाशा अलक्षा परता परब्रह्मा। अकळकळा कमळापति न कळे महिमा ॥१॥ जय देव जय देव जय श्रीपति। मंगळशुभदायका करीन आरती ॥२॥ गोविंदा गोपाळा गोकुळरक्षणा। गिरिधरकर भवसागरतारक दधिमथना। मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा। दीनवत्सल सकळां मूळ जय जयनिधाना ॥३॥ विश्वंभर सर्वेश्वर जगदोद्धारा। चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा। सुखसगर गुणआगर मुगुटमणी शूरा। कल्याणकैवल्यमूर्ती मनोहरा ॥४॥ गरुडासना शेषशयना नरहरी। नारायणा ध्याना सुरवरहरगौरी। नंदा नंदनवंदन त्रिभुवनाभीतरी। अनंतनामें ठसा अवतारांवरी ॥५॥ सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंतां संतां। भगवाना भगवंता काळकृतांता। उत्पत्तिपालनापासुन संहारणसत्ता। शरण तुकया बंधु तारीं रिति बहुतां ॥६॥

४०८५. पंढरी पुण्यभूमी भीमा दक्षिणवाहिनी। तीर्थ हे चंद्रभागा महा पातकां धुनी। उतरलें वैकुंठमहासुख मेदिनी ॥१॥ जय देवा पांडुरंगा जय अनाथनाथा। आरती ओंवाळीन तुम्हां लक्ष्मीकांता ॥२॥ नित्य नवा सोहळा हो महावाद्यांचे गजर। सन्मुख गरुडपारीं उभा जोडुनियां कर। मंडितचतुर्भुज कटीं मिरवती कर ॥३॥ हरिनामकीर्तन हो आनंद महाद्वारीं। नाचती प्रेमसुखें नर तेथींच्या नारी। जीवन्मुक्त लोक नित्य पाहाती हरी ॥४॥ आषाढी कार्तिकी हो गुरुडटकयांचे भार। गर्जती नामघोषें महावैष्णववीर। पापासी रीग नाहीं असुर कांपती सुर ॥५॥ हें सुख पुंडलिकें कैसे आणिलें बापें। निर्गुण साकारलें आम्हालागिं हें सोपें। म्हणोनि चरण धरोनी तुका राहिला सुखें ॥६॥

४०८६. अवतार गोकुळीं हो जन तारावयासी। लावण्यरूपडें हें तेजःपुंजाळरासी। उगवतां कोटि बिंबें रवि लोपले शशी। उत्साव सुरवरां मही थोर मानसीं ॥१॥ जय देवा कृष्णनाथा जय रुक्मिणीकांता। आरती ओंवाळीन तुम्हां देवकीसुता। जय देवा कृष्णनाथा ॥२॥ वसुदेवदेवकीची बंद फोडिली शाळ। होउनी विश्वजनिता तया पोटींचे बाळ। दैत्य हे त्रासियेले समूळ कंसासी काळ। राज्यया उग्रसेना केला मथुरापाळ ॥३॥ राखतां गोधनें हो इंद्र कोपला भारी। मेघ जो कडाडिला शिळां वर्षतां धारीं। राखिलें गोकुळ हें नखीं धरूनियां गिरी। निर्भय लोकपाळ अवतरले हरी ॥४॥ कवतुक पहावया माव ब्रह्मयानें केली। वत्सेंही चोरुनियां सत्यलोकासी नेलीं। गोपाळ गाईवत्सें दोहीं ठायीं राखीलीं। सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची

माउली ॥५॥ तारिलें भक्तजना दैत्य निर्दाळूनि । पांडवा साहाकारी आडल्या निर्वाणीं । गुण मी काय वर्णूं मती येवढी वाणी । विनवितो दास तुका ठाव मागे चरणीं ॥६॥

४०८७. सुंदर अंगकांती मुख भाळ सुरेख । बाणली उटी अंगीं टिळा साजिरा रेख । मस्तकीं मुगुट कानीं कुंडलें तेज फांके । आरक्त दंत हिरे केस शोभले निके ॥१॥ जय देवा चतुर्भुजा जय लावण्य तेजा । आरती ओंवाळीन भवतारि हा वोजा । जय० ॥२॥ उदार जुंझार हा जया वाणिती श्रुति । परतल्या नेति म्हणता तयां न कळे गति । भाट हा चतुर्मुखें अनुवाद करिती । पांगलीं साही अठरा रूप न कळे गति ॥३॥ ऐकोनी रूप ऐसें तुजलागीं धुंडिती । बोडके नग्न एक निराहार यति । साधनें योग नाना तपें दारुण किती । सांडिलें सुख दिलें संसाराची त्या शांती ॥४॥ भरूनि माजी लोकां तिहीं नांदसी एक । कामिनीमनमोहना रूप नाम अनेक । नासती नाममात्रें भवपातकें शोक । पाउलें वंदिताती सिद्ध आणि साधक ॥५॥ उपमा द्यावयासी दुजें काय हें तुज । तत्त्वासी तत्त्वसार मूळ झालासी बीज । खेळसी बाळलीळा अवतार सहज । विनवितो दास तुका कर जोडुनी तुज ॥६॥

४०८८. सुकुमार मुखकमळ निजसार निर्मळ । सांवळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ । झळकति दिव्य तेजें दंत माज पातळ । मिरवती मयूरपत्रें मुकुट कुंडलें माळ ॥१॥ जय देवा जगदीश्वरा । धन्य रखुमाईवरा । आरती करीन काया । ओंवाळीन सुंदरा । जय० ॥२॥ गोजिरें ठाणमान भुजा मंडित चारी । शोभती शंखचक्रगदापद्म मोहरी । हृदयीं ब्रह्मपद बाणलें शृंगारीं । गर्जती चरणीं वांकी कंठ कोकिळस्वरीं ॥३॥ घवघवित उटी अंगीं बावन चंदनाची । लल्लाटीं कस्तूरीचा कास पितांबराची । कटिसूत्र साजिरें प्रभा वर मोतियांची । संगीत सकळ मुद्रा पाउलें कुंकुमाचीं ॥४॥ सौभाग्यसुखसागर गुणलावण्यखाणी । लाघवीं दीनवत्सल विश्व लाविलें ध्यानीं । आश्चर्य देव करिती ऋषी राहिले मुनि । धन्य ते प्रसवली ऐसिया नंदपत्नी ॥५॥ वर्णितां ध्यान महिमा श्रुति राहिल्या नेति । रविकोटि चंद्र तारा प्रकाशा न तुळती । उदार सुर गंभीर पूर्ण आनंदमूर्ति । तुकयाबंधु म्हणे स्तवूं मी काय किती ॥६॥

४०८९. कनकाच्या परियेळीं उजळुनि आरती । रत्नदीपप्रभा कैशा पाजळल्या ज्योती ॥१॥ ओंवाळूं गे माये सबाह्य साजिरा । राहिरखुमाबाई सत्यभामेच्या वरा ॥२॥ मंडितचतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें । श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकलें ॥३॥ वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत । शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥४॥ सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा । चरणींचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ॥५॥ ओवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं । समदृष्टि समान तुकया लागला पायीं ॥६॥

४०९०. गाऊं नाचूं विठो तुझा करू अनुवाद । जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥१॥

आनंद रे विठोबा झाला माझे मनीं । देखिलीं लोचनीं विटेसहित पाउलें ॥२॥ न करीं तपसाधन मुक्तीचे सायास । हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥३॥ तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें काई । पंढरीचा राणा सांठविला हृदयीं ॥४॥

४०९१. धन्य दिवस आजी दर्शन संतांचें । नांदे तया घरीं दैवत पंढरीचें ॥१॥ धन्य पुण्यरूप कैसा झाला संसार । देव आणि भक्त दुजा नाहीं विचार ॥२॥ धन्य पूर्व पुण्य वोढवलें निरुतें । संतांचें दर्शन झालें भाग्यें बहुतें ॥३॥ तुका म्हणे धन्य आम्हां जोडली जोडी । संतांचें चरण आतां जीवें न सोडीं ॥४॥

४०९२. मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहें पांडुरंगा ॥१॥ या संतांसी निरवीं हेंचि मज देईं । आणिक दुजें कांहीं न मागें तुज ॥२॥ तुका म्हणे आतां उदार तूं होई । मज ठेवी पायीं संतांचिया ॥३॥

[निळोबारायकृत श्रीतुकोबारायाची आरती]

प्रपंचरचना सर्वही भोगुनि त्यागिली । अनुतापाचे ज्वाळीं देहबुद्धि हविली । वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली । अहंता ममता दवडुनि निजशांती वरिली ॥१॥ जयजयजी सद्गुरु स्वामी तुकया दातारा । तारक तूं सकळांचा जिवलग सोयरा ॥धृ०॥ हरिभक्तीचा महिमा विशेष वाढविला । विरक्ती ज्ञानाचा ठेवा उघडिला । जगदोद्धारालागीं उपाय सुचविला । निंदक दुर्जनांचा संदेह निरसिला ॥२॥ तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं । कोरड्याचि काढूनि दाखविल्या शेखी । अपार कविता शक्ति मिरवुनि विधि अंकीं । कीर्तन श्रवणें तुमच्या तरिजे जन लोकीं ॥३॥ बाळवेष घेउनि श्रीहरी भेटला । विधिचा जनिता तूंची आठव हा दिधला । तेणें ब्रह्मानंदें प्रेमा रूढविला । न तुके म्हणूनि तुका नामें गौरविला ॥४॥ प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें । कलिच्या काळामाजी अद्भुत वर्तलें । मानव देह घेऊनि निजधामा गेले । निळा म्हणे सकळ संतां तोषविलें ॥५॥

[रामेश्वरकृत श्रीतुकोबारायाची आरती]

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरु धामा । सच्चिदानंद मूर्ति । पाय दाखवी आम्हां ॥१॥ राघवें सागरांत । पाषाण तारियेले । तैसे या तुकोबानें अभंग रचियेले ॥२॥ तुकिता तुळनेसी । ब्रह्म तुकासी आलें । म्हणोनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥३॥

समाप्त

तुकारामाची गाथा

अभंगांची वर्णानुक्रमणिका

अंक	अभंग
	अ
६७१	अखंड जया तुझी
२५००	अखंड मुडतर
३०९३	अखंड संत निंदी
३११०	अगत्य ज्या नरा
११४०	अगा करुणाकरा
२७६८	अंगी भरला ताठा
३३८३	अगा ये उदारा
४०२४	अगा ये वैकुंठनायका
४०२०	अगा ए सांवळ्या
१५८६	अंगीकार ज्याचा
३२६०	अंगी घेऊनियां
२८३८	अंगी देवी खेळे
३०१९	अंगी ब्रह्मक्रिया
२०१६	अंगें अनुभव
३९९३	अगोचरीं बोलिलों
८२४	अग्नि तापलिया
१९९१	अग्निमाजी गेलें
९९८	अग्नीमाजीं पडे
१३३९	अचळ न चळे
३०३६	अजामीळा अंत
३६७०	अझुनि कां धीर
२०३५	अडचणीचें दार
६२७	अणुरेणुया थोकडा
३७४३	अंतरलीं खुटीं
९५३	अंतरायें पडे गोविंदीं
७९७	अंतरीचा भाव
५	अंतरींची घेतो गोडी
११६२	अंतरींची ज्योती
११४४	अंतरीचें गोड
१६६७	अंतरीचें जाणां
७३२	अंतरींचे ध्यान
१७३७	अति जालें उत्तम
२६४	अतिवादी लावी
९३	अतिवादी नव्हे
२९०९	अद्वय चिद्वय
१५३	अधमाची यारी
३२६१	अधमाचें चित्त
११७३	अंधळ्याची काठी
३७३८	अधिकाचा मज
२५४	अधिकार तैसा
२२२५	अधीरा माझ्या
३७२१	अनंत ब्रह्मांडें
२३७७	अनंत ब्रह्मांडें
२६१०	अनंताचे मुखीं
२७०८	अनंताच्या ऐकों
२८०१	अनंता जीवांची
३५२९	अनन्यासी ठाव
३०४०	अनाथ परदेशी
५११	अनाथाची तुम्हां
३२८१	अनाथां जीवन
२६५६	अनुतापयुक्त
३६८	अनुतापें दोष
२८९८	अनुभव ऐसा
२८८०	अनुभव तो नाहीं
२१०४	अनुभवा आले
२५६८	अनुभवाचे रस
२४०१	अनुभवावांचून
७५८	अनुभवें अनुभव
११६०	अनुभवें आलें
१८६२	अनुभवें कळों
१५७९	अनुभवें वदे वाणी
११४	अनुसरे तो अमर
३८८४	अनुसरे त्यासी
१८०७	अनुहात ध्वनि
१६५६	अनुहातीं गुंतला
२७१३	अनेक दोषांचें
१९९	अन्नाच्या परिमळें
३१५९	अन्यायासी राजा
२८४४	अपराधी म्हणो
७५५	अभक्त ब्राह्मण
२७४२	अभक्ताचे गांवीं
३९८२	अभय उत्तरीं
२८९१	अभयदान मज
५९८	अभयाचें स्थळ
८७५	अभिनव सुख
७८६	अभिमानाची
१४९९	अभिमानाचें
१२७१	अभिमानी पांडुरंग
२०६	अमंगळ वाणीं
९०३	अमर आहां
२२१९	अमर तूं खरा
३६०४	अमूप जोडल्या
१५६७	अमृत अव्हेरें
३४०८	अमृताची धार
१०९५	अमृताचीं फळें
८२३	अरे गिळिलें हो
१६५	अरे हें देह व्यर्थ
३१६१	अर्भकाचे साठीं
४०३९	अल्प भाव अल्प
४४१	अल्प माझी मती
३९३६	अल्ला देवे अल्ला
४६५	अवगुण तों कोणीं
११	अवगुणांचे हातीं
९२४	अवघाचि आकार
१०२१	अवघा तो शकुन
२५०१	अवघा भार वाटे
४६१	अवघा वेंचलों
१७७६	अवघिया चाडा
३६२३	अवघियांच्या
३७५०	अवघियां दिला
१५७७	अवघींच तीर्थें
१०११	अवघीं भूतें साम्या
८७१	अवघीं मिथ्या
३७६२	अवघीं मिळोनि
३७४९	अवघें अवधीकडे
३६७४	अवघे गोपाळ
३७५६	अवघेंचि गोड
२०४१	अवघें चुकविले
१२७४	अवघें जेणें पाप
२८८	अवघें देव साध
१६६	अवघें ब्रह्मरूप
७२५	अवघ्या उपचा
३९१६	अवघ्या ज्येष्ठा
४०४६	अवघ्या दशा
३११८	अवघ्या पातकां
३४६३	अवघ्या पापें घ
७२३	अवघ्या भूतांचे
२२१५	अवघ्या वाटा
३८५३	अवचित त्यांनीं
२९३८	अवचित या तुम
१३३६	अवचिताचि हा
३८८६	अवतार केला
४०८६	अवतार गोकुळीं
३४०१	अविश्वासीयाचें
१५८७	अवीट हे क्षीर
१६१०	अशक्य तें तुम्हां
३०२५	असंत लक्षण भूतां
१५२४	असंती कांटाळा
१६२८	असत्य वचन
२५२५	असां जी सोंय
२९५५	असाल ते तुम्ही
३३८१	असे नांदतु हा
१०१७	असें येथेंचि या
३४७०	असो आतां ऐसा
४१०	असो आतां किती
२४३७	असो खटपट
१७४१	असो खळ ऐसे
३९८३	असो मंत्रहीन
१८३७	असो मागें जालें
२४०४	असोत लोकांचे
२३३३	असोत हे तुझे
२१०१	असोत हे बोल
१५२६	असोनि न कीजे
८९३	अस्त नाहीं आतां
२५२६	अहंकार तो नासा
३६५२	अहल्या जेणें
२४३८	अहो उभया
१६१४	अहो रुपावंता
२८८३	अहो पुरुषोत्तम
३७७	अक्षई तें झालें
५३९	अक्षरांचा श्रम
३१७६	अज्ञानाची भक्ति
	आ
४०६३	आइक पांडुरंगा

अंक	अभंग
२९२२	आइकावी माझीं
३०३९	आइकें नारायणा
३४४१	आइकाल परी
१५१३	आइकिली कीर्ति
१५३४	आइकिली मात
३२९२	आइत्या भाग्या
४५८४	आकारवंत मूर्ति
१८६५	आगी देखोनियां
२२१२	आगी लागो तया
३३०१	आग्रहा नांवें
२११	आचरणा ठाव
९५७	आचरतीं कर्मे
३२५१	आचरें दोष न
३७३४	आजि ओस
२४८२	आजिचें हें मज
३०२३	आविवरि होतों
३२४१	आजि शिवला
३९४९	आजी आनंदु रे
३७७२	आजी कां वो तूं
३६००	आजीचिया लाभे
३९६८	आजी दिवस झाला
३५९७	आजी दिवस धन्य
३७७४	आजी नवल मी
३६०१	आजी बरवें झालें
३४३७	आजीवरी तुम्हां
१७२२	आठवूंचि नेदी
५८३	आठवें देव तो
४०१४	आड केलें देव
३१४१	आड केलें देव
३१४१	आड पडे काडी
१५८३	आडलिया जना
२३४२	आडवा तो उभा
३९६१	आणिकां उपदेशूं
१४६७	आणिकाची सेवा
१५४	आणिकाची स्तुति
१३३	आणिकांच्या का
१५९	आणिकाच्या घातें
३१७५	आणिकांच्या घातें
१७७७	आणिका छळा
१००१	आणिकांसी तारी
२३४६	आणितां त्या गती
१२२३	आणिलें सेवटा
८८७	आणीक ऐसें
३७६८	आणीकें काय
५४९	आणीक कांहीं
९६०	आणीक मज कां
२१३१	आणीक कांहीं
९३८	आणीक कोणा
३४०	आणीक दुसरें
३१२३	आणीक नका
२६७०	आणीक पाखांडें
२०५९	आणीक मात
२५७५	आणीक म्यां कोणा
२५८	आणीक या काळें
८८२	आणोनियां मना
३७८४	आंत हरि बाहेर
१४२१	आतां अवश्यक
४५१	आतां असो मना
३५७३	आतां आशीर्वाद
१३९९	आतां आहे नाहीं
६५५	आतां आम्हां हेंचि
८६	आतां उघडी डोळे
३६९३	आतां ऐसें करूं
३५९४	आतां करावा
१७९८	आतां काढाकाढी
२६५१	आतां काशा
५७२	आतां काहीं
११५	आतां केशीराजा
२९०६	आतां कोठे धांवे
४९५	आतां गाऊं तुज
२०८९	आतां गुण दोष
२१००	आतां घेईं माझें
१८९३	आतां चक्रधरा
१४३७	आतां चुकलें
६९७	आतां जागा रे
३२१२	आतां जावें पढरीं
७६	आतां तरी पुढें
२९८३	आतां तरी मज
२६१८	आतां तळमळ
४०३१	आतां तुज कळे
१८७७	आतां तुझा भाव
२६०२	आतां तुझें नाम
२५०२	आतां तुम्ही कृपा
१४०९	आतां दुसरें नाहीं
२९२९	आतां देवा मोक
१३६२	आतां देह अवसान
२६१८	आतां दोघांस
२६४०	आतां द्यावें अभय
४०३७	आतां धर्माधर्मीं
१६८३	आतां न करीं
१८४३	आतां नको चुकों
२२१३	आतां न म्हणें
२३२६	आतां नये बोलों
३८०६	आतां न यें मागें
२६५०	आतां नव्हे गोड
१८३५	आतां पंढरीराया
३०००	आतां पाहाशील
२९३९	आतां पाविजेल
४०१८	आतां पावेन स
३५४४	आतां पंथ पाहे
३८३	आतां पुढें धरी
१२४७	आतां पुढें मना
२७००	आतां बरें धरिं
१९०७	आतां बरें जालें
१४६४	आतां भय नाहीं
२१७८	आतां मज तारीं
२१४८	आतां मज देवा
४०२१	आतां मज घर
१०८१	आतां मागतों तें
८०१	आतां माझा सर्व
११९३	आतां माझें नका
३५८९	आतां माझें सखे
१६०२	आतां माझ्या माय
२०२१	आतां माझ्या भा
३०८२	आतां माझ्या दुःख
३४०९	आतां माझ्या मना
३४१	आतां मी अनन्य
३६६२	आतां मी देवा
४०३०	आतां मी न पडे
२७३०	आतां मी पतित
१७१०	आतां मी सर्वथा
२९२४	आतां येणें पढी
४०६२	आतां येणें बळें
२५२	आतां येणेंविण
२८१७	आतां येथें खरें
२८००	आतां येथें झाली
२८००	आतां येथें लाजे
३२११	आतां वाटों नेदीं
२७८३	आतां सांडूं तरी
२८३१	आतां सोडवणे
२३८७	आतां हें उचित
३७५५	आतां हेंचि जेऊं
३३७५	आतां हें शेवटीं
३५७४	आतां हें शेवटीं
२५९१	आतां हेंचि सार
१३२२	आतां होईन धरणे
२०८२	आतां होईं माझे
२७३४	आत्मस्थिति मज
४६३	आदि मध्य अंत
१७०४	आदि वर्तमान
३९२१	आंधळ्या पांगें
३३३९	आंधळ्यासि जन
६१६	आधार तो व्हावा
५१०	आधारावांचूनी
३४२३	आधिल्या भ्रतारें
४३५	आधींच आळशी
१९४५	आधीं नाहीं कळों
२७०१	आधीं सोज्वळ
२४२२	आनंद अद्वय
३६५०	आनंद झाला
२६६७	आनंदाचा थारा
२५८२	आनंदाचें डोहीं
१९१६	आनंदाच्या कोटी
१७३४	आनंदें एकांतीं
२९९९	आनंदें कीर्तन
१८१८	आपण काय सादर
२८१५	आपण चाळक
२९४७	आपणचि व्हाल
२७६३	आपण तों असा
३०१५	आपणा लागे काम
२४८१	आपला तो एक
३९०	आपलें तों कांहीं
१३०६	आपल्याच फुंदे
२१५२	आपुला तो देह
४८२	आपुलाला लाहो
५५०	आपुला विचार
३८४२	आपुलाल्या परी
५६४	आपुलाल्या तुम्हीं
२३५७	आपुलिया अंगें
१२१६	आपुलिया काजा
१२६१	आपुलिया बळें
१०५८	आपुलिया लाजा

अंक	अभंग
४	आपुलिया हिता
२६७८	आपुलिये ठाकीं
३१७४	आपुली कसोटी
१५२५	आपुलें आपण
२२५१	आपुलें आम्हीं
७१३	आपुलें गांवीचें
३९०	आपुलें तों काहीं
१४५८	आपुलें मरण पाहि
४०९	आपुलें मागतां
२५१६	आपुलें वेंचूनि
१३३०	आपुल्या आपण
१४३३	आपुल्यांचा करीन
१५२७	आपुल्याचा भोत
९७९	आपुल्या महिमानें
३६१३	आपुल्या माहेरा
३४९७	आप तरे त्याकी
२१८१	आमुचा तूं ऋणी
२७८	आमुचा विनोद
१७३२	आमचा स्वदेश
१८७९	आमची का नये
१५९५	आमची जोडी
३३३७	आमुची गोसावी
५२३	आमुच्या हें आलें
२३८५	आमच्या कपाळें
१२५७	आमुचिया भावें
५७०	आमुची कृपाळु
१९३२	आमुचीं जिवलगें
३३५७	आमुची मिरास
२५५०	आमुची विश्रांति
२२८	आमुचें उचित
१९३७	आमुचें जीवन
१२९९	आमुचें ठाउके
४०७	आयुष्य गेलें
१२०५	आयुष्य मोजा
२१३२	आरुष माझी
४०१२	आरुष शब्द
२८५८	आरुषा वचनीं
३६१५	आरोनियां पाहें
२८१०	आर्तभूतां द्यावें
८६०	आर्तभूतांप्रति
२५७७	आर्त माझ्या बहु
३८४९	आला त्यांचा
९२८	आला भागासी
२६	आलिंगन घडे
२३५८	आलिया जनी
२२९२	आलिया भोगा
३०८३	आलिया संता
३७८१	आलिये धांवती
३९८५	आली लळिता
११८४	आली सिंहस्थ
३६०३	आलें तें आधीं
१६४८	आलें देवाचिया
८३७	आलें फळ तेव्हां
६४७	आले भरा केणें
१९५८	आले भरा येच पेंठे
११३७	आलें संत पाय
४०२७	आले हो संसारा
२९३३	आलों उल्लंघुनि
३३१७	आलों बळिवंत
२६९२	आवडी कां ठेवूं
२८८५	आवडीची न पुरे
२५५२	आवडीची सलगी
२३९७	आवडीचे भेटी
२०३४	आवडीचें दान
२३८२	आवडीच्या ऐसें
७१९	आवडीच्या मतें
२८६३	आवडी धरुनि
३००९	आवडी धरोनि
१७१८	आवडी न पुरे
२८६७	आवडी न पुरे
१०९१	आवडीनें धरिलीं
१४३१	आवडी भोजन
१६१७	आवडी येते
३१६९	आवडे पंढरी
१७१६	आवडीसारिखें संपा
३०४४	आवडेल तैसें
३०९२	आवडे सकळां
३१३८	आवडे हें रूप
३९३८	अवल्लल नाम
३२६	आविसाचिये आशा
९४९	आशा तृष्णा माया
९०९	आशा ते करविते
२९३०	आशाबद्ध आम्ही
४४	आशाबद्ध जन
१०००	आशाबद्ध तो
२७२१	आशाबद्ध बहु
३१८	आशाबद्ध वक्ता
९३९	आशा हे समूळ
३९८०	आशीर्वाद तया
५९५	आश्चर्य ते एक
८९२	आश्चर्य या वाटे
२९४९	आश्वासावे दास
२९७५	आषाढी निकट
२५३९	आसन शयन
३८५४	आस निरसली
१९५	आसुरी स्वभाव
३९५५	आहा आहा रे
३९५६	आहा आहा रे
३९५७	आहा आहा रे
३३५८	आहा आहा रे
३९५९	आहा रे भाई
५०	आहाकटा त्याचे
१३८१	आहाच तो मोड
३४४२	आहाच वाहाच
२४५३	आहार निद्रे नलगे
३२३३	आहे ऐसा देव
२९५७	आहे ऐसा आतां
६१९	आहे तरि सत्ता
७०६	आहे तेचि आ
३५२६	आहे तेचि पुढें
२६८८	आहे तें सकळ
२९	आहे तें सकळ
१२४६	आहे सकळां वेगळा
९२९	आम्हां अवघें भांड
३५९१	आम्हां अराणूक
१४१९	आम्हां आवडे नाम
३४३०	आम्हां आम्ही
१४५२	आम्हां एकविध
२७०४	आम्हां कथा आव
३२९६	आम्हां कांहीं
३१०९	आम्हां केलें गुणवंत
१७६०	आम्हां गांजी जन
१२५५	आम्हां घरीं एक
१६२७	आम्हां घरीं धन
३००८	आम्हां देणें धरा
३२१३	आम्हां नरका
३६७६	आम्हां निकटवासें
७०८	आम्हांपाशीं याचें
२३९५	आम्हांपाशीं सरे
२६९४	आम्हां बोल ला
३१७१	आम्हां भय धाक
२५९५	आम्हां भाविकां
३३१५	आम्हां लडिवाळां
१२००	आम्हां विष्णुदा
३१३४	आम्हां वैष्णवां
२००४	आम्हां वैष्णवां
१४०४	आम्हां शरणागतां
१८२३	आम्हां सर्वभावें
२८५	आम्हांसाठीं अ
४८४	आम्हांसीं आपुलें
९४६	आम्हांसी तों
५७६	आम्हांसी सक
२६६८	आम्हांसी सांग
१५४५	आम्हां सुकाळ
२४६६	आम्हां सोयरें
१६६०	आम्हां हरिच्या
४६८	आम्हां हे कौतुक
२०२०	आम्हां हेंचि
१५७८	आम्ही असों नि
३१३२	आम्ही आते
२३२२	आम्ही आर्तभूत
७८२	आम्ही आळीकरें
६८२	आम्ही उतराई
६४२	आम्हीं गावें तु
३७५२	आम्ही गोवळीं
२००१	आम्ही घ्यावें तु
२३७५	आम्ही जाणावे
८४१	आम्ही जाणों
१९२०	आम्हीं जाणों
३६२७	आम्हीं जातों
२३२१	आम्हीं झालों
४२१	आम्ही ज्याचे
२२	आम्ही तरी आस
२४५२	आम्ही तुझ्या
३४२१	आम्ही तेणें सुखी
१५४८	आम्ही देतों हाका
१३७८	आम्हीं देव तुम्ही
१७०६	आम्हीं न देखों
२०४५	आम्हीं नाचों
२२१६	आम्ही नामाचे
१८२०	आम्ही पतित
२५३२	आम्ही पतित

अंक	अभंग
६६९	आम्ही पतितां
२७६२	आम्ही पहा कैसीं
६०२	आम्ही बळकट
१९६२	आम्ही बोलो तें
२१६३	आम्ही भांडों तुज
२०१०	आम्ही भाव जाणों
२७७२	आम्ही भाविक
२४७	आम्ही मागों ऐसें
१२५८	आम्ही मेलों तेव्हा
२६८७	आम्ही म्हणो कोणी
७०७	आम्ही याची केली
२९६९	आम्ही विठ्ठला
९९९	आम्ही वीर झुंझार
२३६	आम्ही वैकुंठवासी
६०६	आम्ही शक्तिहीनें
३५	आम्ही सदैव सुडके
१५०७	आम्ही सर्वकाळ
२२१७	आम्ही हरिचे
९८२	आम्ही क्षेत्रींचे
२५१८	आळणी ऐसें
१९०१	आळविता कंठ
९९५	आळविती बाळें
१०५४	आळवीन स्वरें
३१२६	आळस आला
१२४८	आळस पाडी
२९४३	आळिकरा कोठें
२२५५	आळिंगन कंठी
१३८३	आळी करावी
७२६	आळी सलगी
२१३९	आज्ञा पाळुनि
	इ
१८९८	इच्छा चाड ना
२८३	इच्छावें तें ज
२५९४	इच्छिता तयां
२५२७	इच्छिलें तें श
१७४३	इच्छेचें पाहिलें
२७५९	इच्छेपाशीं अ
२२७५	इतुलें करीं देवा
४०६७	इतुलें करीं भल
१२९४	इंद्रियांचीं दिनें
२९२८	इंद्रियांचें पुरे
३२०६	इंद्रियांसी नेम
१७२	इनामाची भर
१२६५	इहलोकीं आम्हां
२३०४	इहलोकीं आम्हां
१३१	इहलोकींचा हा
	उ
१५१९	उकारडा आधीं
१३८७	उखतें आयुष्य
१०४७	उगविल्या गुंती
६०१	उगेचि हें मन
११३५	उंच निच कां
३६३६	उंच नीच कैसी
५४०	उचित जाणावे
२४६	उचित ते काय
५२७	उचित न कळे
२८३९	उचिताचा का
२०९८	उचिताचा दाता
१५७५	उचिताचा भाग
४८३	उजळलें भाग्य
१७६	उजळवाया आलों
३२३९	उजळिता उज
१६५१	उठाउठीं अमि
४००२	उठा मागलेती
३९९५	उठा सकळ ज
४००५	उठोनियां तुका
४०२	उतरलों पार
१७२१	उत्तम घालावें
१२०३	उत्तम त्या त्या
१४८०	उदकीं कालवीं
५०९	उदंड शहाणे
३१३५	उदंड पाहिले
७९८	उदार कृपाळ
२९१०	उदार चक्रवर्ती
१४३५	उदार तूं हरी ऐ
२२२७	उदारा कृपाळा
३९४६	उदारा कृपाळा
२२५३	उदासीना पाव
१४४२	उदासीनाचा
२७०२	उद्धत त्या जाती
१७८३	उद्धव अक्रुरासी
५०४	उद्धाराचा संदे
१३०७	उद्योगाची धांव
१४८८	उद्वेगासी बहु
५८२	उपकारासाठीं
८७९	उपकारी असे
२१४५	उपचारासी यां
३०९५	उपजलें मनिं
२७५३	उपकल्या काळें
३६८७	उपजोपनियां पुढें
२३८३	उपजोनि मरो
१३६८	उपजों मरो हे
२९९७	उपदेश किती
११९	उपदेश तो भलत्या
२२०८	उपाधिवेगळे तु
२१४१	उपाधीचें बीज
५५	उपाधीच्या नां
३४१०	उपास कराडी
४४५	उपासा सेवटीं
१७१५	उपेक्षिला येणें
२३७२	उंबरांतील कीं
२०७१	उमाउर्मी फळ
२५५५	उभा ऐल थडां
४०५२	उभा देखिला
३९७८	उभारिला हात
३३७७	उभा भींवरेच्या
२०१९	उभे चंद्रभागे
२४०३	उभ्या बाजारां
२२४३	उमटती वाणी
१९६३	उमटें तें ठायीं
२८२४	उरलें तें भक्ति
१११३	उरा लावी ऊर
२००५	उल्लंघिली लाज
११८२	उशीर कां के
७१८	उष्ट्या पत्रावळी
२६४३	उसंतिल्या कर्म
	ऋ
८४२	ऋण वैर हत्य
१३२८	ऋणाच्या परि
	ए
१५२१	एक एका साह्य
८५०	एक करितीं गु
१७९६	एक गांवें आम्हीं
१६७	एक तटस्थ मा
१४९७	एक धरिला चि
१९१	एक नेणतां ना
२८३५	एक परि वह्नि
१०६६	एक पाहतसां
३३५१	एक ब्रह्मचारी
३९८	एक भाव वित्तीं
५२८	एक मन तुझ्या
४०७१	एक मागणें हृषी
३२२४	एक म्हणती आ
३७८८	एकली राना
२४७७	एकविध आम्हीं
२८९५	एकविध नारायण
२८३०	एकविध वृत्ति
२५७४	एकवेळ करीं या
३१०	एकवेळ प्रायश्चित्त
२६६४	एकवेळे केलें
१९५७	एक शेर अन्ना
२८१६	एका एक वर्में
२१११	एकाएकीं आतां
१३११	एका ऐसें एक
३६३७	एकाच स्वामी
९५४	एकाचिया घा
२६३९	एकाचिये वेठीं
१०८९	एकाचिये सोहं
३६३	एकांचीं उत्तरें
३४३२	एका जिथें आतां
१५६०	एकांताचें सुख
२५७०	एकांती लोकां
४९	एकादशी व्रत
१७०	एकादशीस अन्न
८५१	एका पुरुषा दो
४०६	एका बीजा के
२३४३	एका बोटाची
१२२२	एकां म्हणतां भलें
१४१६	एका हातीं टा
५६१	एकीं केली हा
३३१९	एकी असें एक
३७०८	एके घाईं खेळ
२८४७	एके ठायीं अन्न
५७४	एवढा प्रभु भावें
३५४८	एवढा संकोच
२५०७	एवढी अपकीर्ति
	ऐ
१४६६	ऐकतों दाट
२८१२	ऐक पांडुरंगा
३९४३	ऐक बाई तुज
१७९०	ऐकल्या नव्हे
२३५६	ऐका ऐका भा

अंक	अभंग
३४६१	ऐका कलीचें हें
३९३२	ऐका गा ए
१५९९	ऐका गा हे अव
२४८९	ऐका जी देवा
२१३८	ऐकाजी संतज
३६३७	ऐका संतजन
१६४४	ऐका पंडितजन
३३२५	ऐका महिमा
७६८	ऐका वचन
१४७१	ऐका हें वचन
८०८	ऐकरे जना तु
३९८४	ऐके वचन कम
३५७०	ऐकोनियां कीं
१९९२	ऐशा भाग्यें
३४९५	ऐसा कर घर
१४७२	ऐसा कोणी ना
१२६३	ऐसा घेईं करि
२६९०	ऐसाचि तो गो
१०३८	ऐसा ज्याचा
२८२०	ऐसा तंव मोळा
३२२१	ऐसा दुस्तर
२४१३	ऐसा माझा को
१३६	ऐसा हा लौकिक
७५९	ऐसिया संपत्ती
३३११	ऐसी एकां अटी
७४४	ऐसी जिव्हा नि
१०४२	ऐसी जोडी क
२३९१	ऐसीं ठावीं वर्मे
३५८०	ऐसीं ते सांडि
२९६१	ऐसीं वर्मे आ
३४७२	ऐसीं वाट पाहे
४०४०	ऐसीं हे गर्जवूं
२०२	ऐसे ऐसियानें
३४६२	ऐसें कलियुगा
१००९	ऐसें कां झालें
१४५६	ऐसें कां हो न
६९६	ऐसें कुळीं पुत्र
३२६८	ऐसे कैसे झाले
२७२५	ऐसें कोण पाप
२६७३	ऐसें ठावें नाहीं
३०७८	ऐसें नाना भेष
५४७	ऐसे पुढती मि
२३६३	ऐसें भाग्य कईं
११७१	ऐसे संत झाले
१७०३	ऐसें सत्य माझें
८७८	ऐसे सांडुनियां

ओ

अंक	अभंग
३४६९	ॐतत्सदिति सू
३८२	ओनाम्याच्या
९०२	ओलें मूळ भेदी
२२३३	ओस जाल्या
३८२१	ओलखी तयांसी

क

अंक	अभंग
२९१९	कइचें कारण
२५६१	कईं ऐशी दशा
६९०	कईं मात माझे
४०७२	कईं देखता हो
३१०३	कठिण नारळा
७२	कंठीं कृष्णमणीं
३७२५	कंठी धरिला
१२२९	कंठीं नाम सि
१०९२	कंठीं राहो नाम
१३०४	कडसणी धरि
३४८३	कणमुसाच्या
२२४२	कथनीं पठणीं
४३७	कथा करोनियां
९६८	कथा करोनियां
२२४४	कथाकाळींची
२२४६	कथा त्रिवेणीसं
२२४५	कथा देवाचें
१९८१	कथा पुराण ऐ
२२९४	कथा मुख करी
१८५६	कंथा प्रावर्ण
२०५१	कथा हें भूषण
१९८३	कथे उभा अंग
१०२६	कथेचा उल्लंघ
३९७४	कथेची सामग्री
३६२७	कथे बैसोनि सा
४०८९	कनकाच्या प
९८	कन्या गौ करी
१४३	कन्या सासुऱ्या
१४९	कपट कांहीं ए
३४९३	कव मरूं पाउं
१७	कर कटावरी तु
१५७	करणें ते देवा
३१२२	करणें तै हेचि
१७१	करवितां व्रत
३४११	करविली तैसी
३३७०	कराकरा लाग
३१२	करा नारायणा
१३९७	कराल तें करा
२५७९	कराल तें काय
२१९८	करावा उद्धार
२२९१	करावा उद्धार
१६९३	करावा कांटाळा
३६६८	करावा कैवाड
२८९२	करावा वर्षाव
३००२	करावा संकोच
४६	करावी ते पूजा
३१८९	करावें कीर्तन
१४२	करावें गोमटें
३५८	करावें चिंतन
३६२६	करावें तें काम
२२५९	करिती तया
२०१८	करितां कोण
२५२०	करितां ताडतो
३०३	करितां देवार्चन
१९९३	करितां या सुखा
१४१३	करितां विचार
१३६१	करितां विचार
१९६७	करितां येरझारा
२१९२	करितां होय
६४१	करितों कवित्व
२४१२	करितों कीं न
२६२	करिसीं ते देवा
२४५८	करिसी लाघवें
२९६४	करी आणिकां
२८९३	करीं ऐसीं धां
६४९	करीं ऐसें जागें
११३८	करीं धंदा परि
२१०२	करीन कोल्हा
३५७२	करीन आबाळी
१६७१	करील तें काय
४३०	करी संध्यास्नान
१०५७	करी हेंचि काम
३५१६	करूं कवित्व
२३०९	करूं जातां स
१३३८	करूं तैसें पाठां
३९८८	करूनि उचित
२७६९	करूनि कडविड
१५४७	करूनि जतन
२४४३	करूनियां शुद्ध
२३२७	करूनि राहों
२७२८	करूनि विनव
३९४७	करूनि विनव
३८०१	करूनि आइती
४००७	करूनि आइती
३५६०	करूनि चाहाडी
२२२८	करूनि चिंतन
१९७०	करूं याचि क
२१८	करोन तपादि
२०२५	कर्कशसंगति
८८९	कर्म धर्म नव्ह
७९५	कलिधर्म मागें
४३९	कलियुगीं कवि
१५१८	कल्पतरू अंगीं
२०१२	कल्पतरूखाली
६२४	कल्पतरू रुपा
२५८४	कल्याण या आ
१८४७	कवण जन्मता
१८०३	कवणाचें कारण
१९००	कवणाशीं भां
२८११	कवतुकवाणी
१८३६	कवतुकवाणें
३६९८	कवणाचिया सु
८९७	कवेश्वरांचा तो
३५२२	कशासाठीं आ
४०८३	कंसरायें गर्भ
२१२७	कस्तुरीचे अंगीं
१२९०	कस्तुरीचें रूप
१८०६	कस्तुरी मिनली
२४४९	कळले माझा
४०१३	कळस वाहिये
२५४४	कळे न कळे
५३०	कळेल हे खूण
२०६०	कळेल हें तैसें
२९८२	कळों आला
१४८	कळों आलें ऐसें
२६२८	कळों आलें तुझें
२६६१	कळों नये तोंचि
६३८	कळों येतें तरि
२९२०	कळों येतें वर्म

अंक	अभंग
३८७९	काकुलती येके
३७६०	काकुलती येतो
१२७	कासे कडासन
१८२१	काग बग रिठा
३४७३	कां गा किविल
३१५२	का गा कोणी
७०४	कां गा धर्म के
२७८५	कां जी आम्हां
२८५६	कां जी तुम्ही
९३३	कां जी धरिलें
२३१५	कां जी माझें
२११३	कां जी वाढवि
६३७	कांडिल्या कुटिल्या
३४६७	कांद्यासाठीं जा
६३	कानडीनें केला
३०७३	कान फाडूनि
११५९	कां नवजावें
९६४	कानी धरि बोल
२२५०	कान्हयारे जग
३८०४	कान्हो एकलितु
३६९९	कान्होबा आतां
३७१५	कान्होबा तूं
३५३५	कापो कोणी
१६५०	काम क्रोध आ
६६५	काम क्रोध मा
२६०३	काम क्रोध या
३३६१	कामधेनूचें वा
९०४	काम नाहीं का
१६१	काम बांदवडीं
३६७६	काम करुनी
३२३८	कामाचा अंकित
३५४१	कां माझा विसर
३५५२	कां माझे पंढरी
४७४	कामातुर चवी
१८४५	कामातुरा भय
३११५	कामामध्यें काम
३४७५	कामें नेलें चि
३७०६	कामें पींडिलों
३८४१	काय आतां या
३८३८	काय आम्हां चा
६११	काय आम्ही आ
३२२५	काय आम्ही के
४०६५	काय आम्ही भय
२००	काय उणें आ
३७८०	काय उणें कां
५५८	काय उणें जालें
३१६०	काय उणें मज
२८६२	काय उरली ते
१००३	काय एकां जा
१६६९	काय ऐसा ज
२०९५	काय ऐसां सा
१६१८	काय ऐसी वेळ
३५९०	काय म्यां करावें
१५५१	काय करावें तें
३३०५	काय करितील ते
५५९	काय करूं आ
३१४३	काय करूं आ
३२३६	काय करूं आ
५६०	काय करूं कर्मा
२१५५	काय करूं जी
१३९३	काय करूं जीव
३३४६	काय करूं न
२८७३	काय करूं थोरा
२७३८	काय करूं मज
२८५५	काय करूं या
२५६६	माय करूं सांग
१६८	काय कळे बाळा
४०७५	काय काय करि
११२	काय काशी क
७९९	काय कीर्ति करूं
६०७	काय कृपेविण
१७३९	काय केलें जळ
३१६	काय सावें आतां
३५३६	काय जाणें मी
२०७५	काय जाणों वेद
३५४७	काय जालें ने
१७३३	काय ढोरापुढें
११२३	काय ती करा
२८९४	काय तुज कैसें
२७३१	काय तुज मागें
४०८२	काय तुझा महि
१८४०	काय तुझे उप
१६४६	काय तुझें वेचें
२६८१	काय तू नचि
३४००	काय तुझी ऐ
५०५	काय ते विरक्ति
१८८५	काय तें मास
२४७४	काय तो विवा
३४७	काय दरा करी
७९	काय दिनकरा
३४२०	काय दिला ठेवा
२६६३	काय दिस गे
२०२२	काय देवपाशीं
१२०२	काय देवें खातां
४९२	काय देह घालूं
२४०८	काय धर्म नीत
२१८२	काय धोविलें वा
२१८६	काय धोविलें कां
३८४	काय नव्हे क
४११	काय नव्ह केलें
२११२	काय नेहसी
११४९	काय नाहीं मा
२५६३	काय नाही मा
५३४	काय नाही लव
३२१८	काय न्यून आ
३५९९	काय पाठविंलें
१२५६	काय पुण्य ऐसें
१०१६	काय पुण्यरा
३५५३	काय पोरें जा
१३८०	काय बोलों सा
२५६९	काय मज एव
३२९७	काय मागावें क
१३४७	काय माझा पण
१७०८	काय माझी सम
९८९	काय माझें नेती
३३४२	काय माता वि
१४७३	काय मी अन्या
४०२३	काय मी उद्धार
३३८६	काय मी जाण
२७५	काय म्यां मा
१२३६	काय लवणक
१०१४	काय वाणूं आ
२५१९	काय विनवावें
२५९९	काय वृंदावन
९१७	काय शरीरा पें
१९७१	काय सर्प खातो
२८१४	काय सांगों आ
२५०	काय सांगों तु
२१६४	काय साहतोसी
३०५५	काय सुख आहे
७४२	काय ह्याचें घ्या
३३८७	काय ज्ञानेश्वरीं
६४६	काय वाचा म
१५४१	काय वाचामनें
१४२२	काय वाचा म
३२९१	कारणाकारण
२८७४	कारणापें अस
३७२४	कां रे गमवि
२५३८	कां रे तुम्ही ठे
२६३२	कां रे तुम्हीं नि
८१०	कां रे दास हो
१६०३	कां रे न पवसी
२७१७	कां रे न भजसी
२२२६	कां रे नाठवि
२९९५	कां रे प्रेमें
२६८	कां रे माझा तु
११३९	कां रे माझी पो
१८९	कार्तिकीचा
२५५७	कार्यचि कारण
३४८२	कालवूनि विष
३७३२	काल्याचिये आ
२२९८	कावळिया नाही
२९८६	कावळ्याच्या ग
३५२८	कशासाठीं आम्हीं
२३५	कास घालोन
२३६४	कासया करावे
११६३	कासया गा मज
१९७६	कासया गुणदो
११४५	कासया जी ऐ
११४२	कासया पाषाण
१३४६	कासया यालो
१६२९	कासया लाग
२६०६	कासया वांचून
३१६८	कासयासी व्हा
२७२३	कासया हो मा
१७४७	कासियानें पु
२८२२	कांही एक करी
३५३१	कांहींच न लगे
२७३	कांहींच मी न
३९०२	कांहीं चिंता को
३५५४	कांहीं चिंतेविणं
२०८०	कांहीं जडभारी

अंक	अभंग
७७७	कांहीं जाणोन
२०४३	कांहीं न माग
१५८१	कांहीं न मागे
९७	कांहीं नित्यने
१९२०	कांहीं बोलिलों
३५२४	कांहीं मागणें हे
३५४२	कांही माझे क
३५०२	काहे मुला धन
३५०३	काहे रोवें आ
२६६९	काहे लकडा
१५१०	कां हो आलें ने
४९१	कां हो येथें कां
३४५०	कां होती कां
१७९२	कां हो तुम्हीं
२४५	का हो देवा का
२९८५	कां हो पांडुरंगा
४०५९	कां हो माझा
२८१८	कां हो वाढवि
१९७७	काळ जवळिच
२०६४	काळतोंडी सुना
३८५०	काळ्याचे मागें
६२०	काळ सारावा
२६७४	काळाच सारि
९९०	काळाचिये स
१७६२	काळाचेही का
२२००	काळावरी घालूं
२८८७	काळावरी सत्ता
३७६४	काळिया नाथूनि
२५७	काळें खादला
१८६०	काळोखीं खाऊ
३५७१	किती करूं शो
२६४७	किति चौघाचा
२०८६	किती तुजपाशीं
९४२	किती या का
२५९७	किती रांडवडे
१३२०	किती विवंचना
१७२६	किती वेळा खा
१६१९	किती वेळां ज
३२८९	किती सांगो त
२९३४	किती सोसिती
२१७३	कीर्तन ऐक व
९०६	कीर्तन चांग
६४५	कीर्तनाची गो
३०५६	कीर्तनाच्या मु
३२५२	कीविलवाणा
३१२१	कुंकवाचा ठेवा
७३६	कुचराचें श्रव
१२८	कुटंबाचा केला
२१४३	कुतऱ्या ऐसें
३३२६	कुंभ आवघा ए
३८२८	कुंभपाक लागे
२४९	कुमुदिनी काय
३१०६	कुरुवंडी करीन
५५२	कुशल गुंतलें
९८५	कुशल वक्ता
२२८२	कुळधर्म ज्ञान
१३६३	कुळाची हे कु
१७७४	कुळींचे दैवत
१८०	कृपा करूनी देवा
३९२	कृपावंत किती
१८७६	कृपावंत कोप
२०९०	कृपावंत दुजे
३८६९	कृपावंतें हाक
६८८	कृपाळु म्हणोनी
३९९१	कृपाळु भक्तां
२१७०	कृपाळु सज्जन
१६९१	कृपेचा ओला
९७३	कृपेंचि उत्तरें
३१९२	कृपेचें सागर
३७२२	कृष्ण गोकुळीं
१८५३	कृष्ण ध्याता
२३३	कृष्ण माझी मा
३८२३	कृष्ण हा परीचा
३८७५	कृष्णाचिया सु
४७५	कृष्णांजनें जाले
३९९२	केला अंगीकार
१३५९	केला कईवाड
२५९२	केला तैसा अं
१९६४	केला पण सां
३८३२	केला पुढें हरि
१३९	केला मातीचा
३६४८	केला रावणाचा
२३९८	केलियाचें दान
४०११	केलीं कटकट
११०८	केलीं प्रज्ञा
१५५२	केलीं सलगी
१६०	केली सीता शु
१०८५	केली हाणीळां
२८८१	केलें तरी आ
१७११	केलें नाहीं मनी
६८३	केलें पाप जेणें
२५१७	केलें शकुनें प्र
३५१९	केल्या पुरती आ
२८४३	केवढा तों अहं
३५६३	कैचा मज धीर
२६८५	कैंचें भांडवल
५६३	कैवल्याच्या तु
११३४	कैं वहावें जी
१८७४	कैसा कृपाळु हे
१३४५	कैसा तू देखी
२०७	कैसा सिदळीचा
२३८९	कैसा होता कृ
३०६९	कैसी करूं आ
२७८२	कैसी दिसों ब
३४३	कैसें करूं
२७६६	कैसें भले देवा
२७६०	कोठें आम्ही आतां
१६३५	कोठें गुंतलासी
१६३६	कोठें गुंतलासी
६३४	कोठें देवा आ
२७७३	कोठें देवा वो
९५५	कोठें नाही अ
७१०	कोठें भोग उर
३७९७	कोठें मी तुझा
३११७	कोड आवडीचें
३३६४	कोडियाचें गो
३७२०	कोडिला गे मा
१४१८	कोण आतां क
३१३३	कोण आमची
२२८९	कोण आम्हां उ
२२७७	कोण जाणे को
३२५	कोणतें कारण
३३५	कोण त्याचा
१५३९	कोण दुजे हरी
२४४	कोण पर्वकाळ
१३१८	कोण पुण्य कोण
८८०	कोण पुण्यें यांचा
१०८४	कोण या पुरुषा
२९२७	कोण येथ रिता
३५१०	कोण येतें घरा
१२४९	कोण वेची वा
३३३	कोण सांगायास
४०३३	कोण सुख
१४०३	कोण होईल
१२१५	कोण चिंता आ
२५७३	कोणाचिया न
२८५५	कोणाचें चिंतन
५५७	कोणाच्या आ
१४५०	कोणापाशीं आ
१३७५	कोणापाशीं द्या
१५६६	कोण्या पुण्या क
३५४०	कोणा मुखें ऐसी
२५२४	कोणाशीं वि
२९६७	कोणी एकाचि
३८००	कोणी एकी भु
२२५६	कोणी सुना को
१०८७	कोणे गांवी आ
३३३५	कोणें तुझा सां
२९१६	कोणें साक्षी वि
१३९१	कोण काळ ये
२६७२	कोरडिया ऐसा
९१४	कोरडिया गो
३०७४	कौडीकौडी सा
८६४	कौतुकाची स
१४११	कौलें भरियेली
३४९२	क्या कहूं नहि
३४८७	क्या गाऊ कोई
३५०४	क्या मेरे राम
३८०५	क्याला मज
४०३	क्रियामतिहीन
	ख
१९१९	खडा रवाळी
२९३१	खद्योते फुलवि
५१७	खरें नानवट
९३४	खरें बोलें तरी
५२४	खरें भांडवल
१४०६	खळा सदा क्षू
४०७७	खाणेरियांची
२७९२	खादलेंच खावे
१९०६	खावें ल्यावें द्या
३०४२	खिस्तीचा उ
१५९१	खुंटोनिया दोरी

अंक	अभंग
३९१७	खेचर खडतर
२४९३	खेळतां निज
३७९४	खेळतां मुरारी
२४९९	खेळतों ते खेळ
३८६०	खेळ नव्हे बरा
३७०७	खेळ मांडिये
३८४०	खेळीं मेळीं आ
२८३६	खेळों मनासवें
३६५६	खेळों लागलो
३१४७	खोकरी आधण
२१२०	खोट्याचा वि
२६५७	खोली ओली प
	ग
१५४४	गंगा आली आ
३३५८	गंगा गेली सिंधु
१८१४	गंगाजळ पाही
७३९	गंगा न देखे
५१८	गंगेविया अंते
२३५०	गज इंद्र पशु
११३३	गजेंद्र तो हस्ती
३६९५	गडी गेले रडी
७८९	गति अधोगति
१३४	गंधर्व अग्नि सो
३२५६	गंधर्व नगरी क्ष
२१६०	गयाळाचें काम
३६११	गरुडाचे पायी
१८	गरुडाचे वारिके
३३६७	गर्जत जावी ना
२०८	गर्भाचें धारण
१९८९	गर्भी असतां
३९७५	गळित झाली
१८३	गळूं एक जाती
३७९६	गाई गोपाळ
३९१०	गाईन ओविया
३७६९	गाईन ते लीला
१२६६	गाऊं नेणे क
११६७	गाऊं नेणे परी
३९८९	गाऊं वाहूं टो
४०९०	गाऊं नाचूं तु
११६८	गाजराची पुं
६९५	गांठोळीस धन
३०९१	गांढव शृंगारि
६६२	गांढवाचे अंगी
४१६	गाढवाचें घोडे
६२२	गाढवाचें तानें
१७४८	गातां अइकता
३९०१	गाती ओव्यां
३९२६	गातों नाचतों
३०७	गातों भाव ना
२२३६	गातों वासुदेव
१११५	गायत्री विकोन
३३१	गायताचें रंगीं
१०१८	गायनाचे वा
५८९	गावे म्हणउनि
९४४	गासी तरी एक
३२२६	गुणा आला वि
२८७७	गुणांचाचि सां
३२८३	गुणांची आव
३५१३	गुरुकृपें मज
३४८५	गुरुमार्गामुळें
१५८५	गुरुशिष्यपण
३१७७	गळें माखोनि
३९०७	गेला कोठें हो
१४९०	गेला तरी जा
७०	गेली वीरसरी
३९२७	गेले टळले पा
१६०१	गेले पळाले दि
३८८०	गोकुळीचें ग
११५४	गोकुळींच्या सु
६९२	गोड जालें पो
९७७	गोड नांवें क्षीर
३७९८	गोड लागे परी
२९०	गोडपणें जैसा
१३३३	गोदेकांठीं हो
३७३३	गोपाळ म्हणतो
३८४५	गोपाळा उघड
३२४७	गोपिचंद मु
२६६८	गोमट्या बीजा
३७८९	गोरस घेउनी
३३९२	गोविंद गोविंद
३८३५	गोविंद भ्रतार
३८८२	गोविंदाचें नाम
२१४२	गोविंदावांचोनि
११२९	गोहो यावा गावा
२९५	गौरवां गौरवापु
३८०८	गौळणी आल्या
३७४६	गौळणी बांधिति
७५	गौळियाचिं ता
१५४०	ग्रंथाचे ते अर्थ
	घ
१०३०	घटीं अलिप्त अ
३९९६	घडिया घालुनी
१०१	घरीं रांड पोरें
७२२	घरोघरी अवघें
९९१	घरोघरीं जाले
१७६५	घातला दुकान
१४२७	घातला दुकान
२४५९	घालिती पव्ह
३७८२	घालीं कवाड ट
१६५३	घालीं भर
२३७१	घालुनियां मा
३२१५	घालुनियां का
३५९६	घालुनियां जो
३४५५	घालुनियां भार
२३७१	घालुनिया म
२८२६	घालुनि लोळ
१८१०	घेईन मी जन्म
३९५	घेईं घेईं माझे
३२५३	घेऊं नये तैसे
९०	घेऊनियां चक्र
३१०८	घेतां आणिकां
८५५	घेसी तरी घेईं
३६५५	घोंगडीयांचा
३६५७	घोंगडियांची
३६६१	घोंगडीयास धा
३६६४	घोंगडें नेलें सा
३६०९	घोटवीन लाळ
३२८२	घ्यारे भाई घ्या
३७३१	घ्यारे भोंकरें
२९७९	घ्यारे लुटीं प्रेम
१३९२	घ्यावी तरी घ्या
	च
२७५०	चक्र फरी गेलीं
१६१६	चंचळीं चंचळ
६३५	चतुर मी जालों
१४५४	चंदन तो चंद
१७७५	चंदनाचे गांवी
३३२९	चंदनाचें हात
५५४	चंदनाच्या या
१६०६	चरणाचा महि
३६२०	चला जाऊं रे
१७२४	चला पंढरीसी
३७३५	चला गाई पांडु
३७१७	चला वळूं गाई
१३८	चवदा भुवनें
१०८३	चवदा भुवनें
३६९	चहूं आश्रमाचे
२१५१	चळले तें काय
२१५३	चाकरीवांचून
४०६४	चांगला तरी
४७५७	चांगलें नाम
३८१५	चाड अनन्या
२१२२	चातुर्याच्यां अ
२३५१	चारी वेद ज्या
११०	चाल केलासी
२६०८	चाल घरा उभा
५३३	चालावा पंथ
१७७३	चालिती आड
१४१२	चालिले न वाटे
३१२	चालिले सोव
२७३५	चालें दंडवत
३०६६	चालें हें शरीर
२२३१	चावळणें काय
१९१७	चाहडाची मा
२८८४	चिंतनाची जो
९५२	चिंतनासी नल
५८८	चिंतनें अचिंत
९५०	चिंतनें सरे तो
३८११	चिंता ते पळा
२२५८	चिंता नाही गां
११९६	चिंतामणि देवा
३८९८	चिंतिलें पावलें
५०३	चिंतिलें ते मनिं
५८५	चित्त ग्वाही ते
२१७६	चित्त घेऊनियां
१८१९	चित्त तुझ्या पा
११६	चित्त ते चिंतन
१७६९	चित्त शुद्ध तरी
३८	चित्त समाधान
१३१७	चित्ता ऐसी न
२५१९	चित्ताचा चाळ
२४६९	चित्ताचे बांध

अंक	अभंग
३१७३	चित्ता मिळे त्या
३२०१	चित्तीं तुझे पा
२२८५	चित्तीं धरीन
२०२४	चित्तीं नाहीं
१११	चित्तीं नाहीं तें
२३९२	चित्तीं बैसलें
३६१५	चिन्हें उमटती
११२१	चिरगुटें घालू
१८७५	चुकलिया आ
१५४६	चुकलिया ता
२९१८	चुकली ते वाट
२७०६	चुकलों या ऐ
१२२	चुंबळीशीं करी
३४९०	चराचुराकर
६६०	चोरटें काचें नि
६५६	चोरटें सुने मा
१५००	चोराचिया धुड
३१८६	चोरासी चांद
९५	चोरें चोरातें क
३९११	चौका भरिये
	छ
३४८८	छोडे घन मंदि
	ज
२५३०	जग अमंगळ
७७१	जग आवघें देव
१४०७	जग ऐसे बहुना
३४९८	जग चले उस
३९३१	जग जोगी जग
७३७	जग तरि आम्हां
४०८०	जगदीश जगदी
२०१४	जगा काळ खाय
३८२०	जगाचा हा बा
३१८२	जगीं कीर्ति व्हा
१२८५	जगी मान्य के
६०५	जडलों अंगा अ
२८८६	जडलों तो आ
१८५९	जतन करा
५७३	जतन करीन
७१४	जन तरी देखें
६७३	जन देव तरी
१६०८	जननिया बाळ
४५३	जननी हे जाण
३८५५	जननी हे म्हणे
१८७८	जन पूजी या
६६४	जन मानवलें व
२४	जन विजन झा
१२७६	जन हें सुखाचें
८०२	जनीं जनार्दन
१४३४	जन्ममरणाची
३११२	जन्ममरणाची
३०८३	जन्ममृत्यु फार
१३५०	जन्मा आलिया
१०१५	जन्मा आलों
२२६२	जन्मांतरिंचा प
२५३५	जन्मातरीं शूद्र
१७६३	जन्मा येऊनि
२१८५	जन्मा येऊनि
२१६८	जन्मा येऊनि
२६२२	जन्मा येऊनि
११९२	जन्मा येणें घडे
२६७	जप करितां रा
१२३९	जप तप ध्यान
२५४१	जपाचें निमित्त
९४५	जयाचिये वाचे
१९०	जया दोषां परि
३४	जया नाही नेम
१२४४	जया पासोनि स
१५२०	जया शिरि कार
३०१६	जयासी नावडे
२४९६	जयें ठायी आव
१४७५	जया कर्णमूळी
३१६५	जरि हा हो रु
२५८७	जरि आड ये
१४०२	जरि आलें रा
२६१	जरी माझी को
३९७	जरी मी पतित
४४६	जंववरी नाही
४०५६	जंव हे सकळ
१९८५	जवळी नाही
४७९	जवळी मुखा
२२४८	जळसी कीर्तनें
८५२	जळतें संचित
७५२	जळे माझी का
१४७८	जळो अगी पडो
१६३९	जळो त्याचें तोंड
३४७६	जळोत ती येथे
२९६५	जळो ते जाणीव
२४६८	जळो ते
६२५	जळो तैसा प्रेम
६३१	जळो माझी ऐ
३४७४	जळो माझें कर्म
९१०	जळो आतां नांव
१८८९	जाऊं देवाची
१७५०	जाऊनियां तीर्था
२३६१	जाणतें लेंकरूं
२४८६	जाणतो समय
७६५	जाणपण बरें दे
३८६४	जाणवलें इंद्रा
१२५१	जाणसी उचित
२२७७	जाणावें तें काय
२०२७	जाणावें ते सार
२६५५	जाणिवेच्या मा
२०४४	जाणे अंतरींचा
१२७०	जाणे त्याचें वर्म
३७४	जाणे भक्तीचा
१७६४	जाणे वर्तमान
१२७७	जाणोनि नेणते
३४१५	जाणोन अंतर
३१००	जाणो नेणों
८७३	जाति विजाति
३६३९	जातिचा पाईक
११७२	जातीची सिंध
१०७०	जातींचें तेंच
१६३०	जाती पंढरीस
५३१	जातो न येती
२३४	जातो वाराणसी
११२५	जाय जाय तूं
१६७९	जाय तिकडे ला
१८६१	जाय परते का
३८३३	जाय फांकोनी
१८७१	जायांचें अंगुळ
३४८	जायाचें अले
३०५२	जायाचें शरीर
१६२१	जा रे तुम्ही पं
१४५७	जाला प्रेतरूप
६१५	जाली ताडातोडी
१६६६	जालों आतां
१९२८	जालें पीक आ
१२०९	जालें भांडवल
३७२	जालें रामराज्य
१३१२	जालें समाधान
१३०२	जालों तव
२००७	जालों द्वारपाळ
११९०	जालों म्हणती
२०४६	जालों निर्भर
३८८६	जावें बाहेरी हा
८३२	जाळा तुम्ही मा
१०७४	जाळी महा क
३१०	जाळें घातलें सा
१९४३	जिकडे जाय
२४४४	जिकडे पाहे ति
९२१	जिंकावा संसार
१७५७	जिचें पीडे बाळ
३८२७	जिये वेळीं
१२३	जिव्हा जाणे
११२८	जिव्हें जाला
६५३	जीव खादला
६०९	जीव जायवरी
२२६०	जीव जीती जी
९४७	जीव तोचि दै
१४७०	जीवन उपाय
५४१	जीवन्मुक्त
२२८७	जीव नावा
३८८९	जीवभाव त्या
१७०९	जीवाचें जीवन
७७५	जीवित्व तें कि
६५२	जीवींच्या जिव्हा
२४४०	जिवींचे कां ते
४७३	जीवींचे जाणा
३२१६	जीवें जीव नेणें
३९७९	जीवें साठी यत्न
१८३४	जीवें व्हावें सा
३०६८	जुंझायाच्या गो
१००४	जुंझार ते एक
२०४	जे कां रंजले
२२३४	जे केली आळी
२४७३	जे गाती अखंड
३३६	जें जें काहीं क
३७६८	जें जें कांही म
२८०४	जें जें केलें तें तें
३५९	जें जें तेथें पावे
२०३८	जें जें मना वा

अंक	अभंग
३१२८	जे जे वहावे
२६१४	जें ज्याचें जेवण
८३	जेणें घडे नारा
४२५	जेणें तुज आलें
१००५	जेणें नाहीं केलें
२८१३	जेणें माझें चि
३०६१	जेणें माझें हित
१५२	जेणें मुखें स्तवी
१३५१	जेणें वाढे अप
१६८९	जेणें वेळ लागे
४०२२	जेणें हा जीव
२९५०	जेणें होय हित
११०३	जेथें आठवती
११३०	जेथें कीर्तन क
१९२६	जेथें जातो तेथें
२७८४	जेथें जातो तेथें
५७१	जेथें जावें तेथें
१६८४	जेथें जेथें जासी
१०३२	जेथें देखें तेथें
१८४८	जेथें देखें तेथें
२६५४	जेथें पाहें तेथें
२७५८	जेथें माझी दृष्टी
२०३९	जेथें माझी दृष्टी
२३५९	जेथें लक्ष्मीचा
५०६	जेथें वैष्णवाचा
१८४९	जे दोष घडले
८०	जेवतांहि घरी
९	जेविले ते संत
४५०	जेवीं नवज्वरें
२३४०	जैसा तुम्ही दरी
५९३	जैशासाठी तैसें
२७०५	जैसा तैसा आ
२७१५	जैसा निर्मळ
३२८४	जैसी तैसी तरी
१११९	जैसी तैसी तरी
९९३	जैसी तैसी तरी
२०५५	जैसें चित्त ज
१६५८	जैसें तैसें राहे
१०२०	जैसें दावी तैसा
२८७६	जो जो ध्यावा
३३२४	जोडिले अंजुळ
१९३८	जोडिलें तें आ
३५५९	जोडी कोणासा
३५५६	जोडीच्या ह
२००	जोडोनियां कर
११७८	जोडोनियां धन
६७०	जो भक्तांचा
६८६	जो मानी तो
३२४४	जो या गेला पं
११०२	जो हार जी माय
१५७२	जोंवरि तोंवरि
१५७३	जोंवरि तोंवरि
२८४१	जो वितो तो
३८४	ज्याची खरी
३१६३	ज्याची जया
१६३२	ज्याचे गर्जतां
१९०९	ज्याचें गांवीं त
३३९३	ज्याचें जया
१९४८	ज्याचें माथां
१४३०	ज्यांच्या संगे
७८१	ज्या ज्या आम्हां
१३६४	ज्यानें आड या
९५६	ज्यानें ज्यानें जै
२५९६	ज्यावें हनिपणें
१०६२	ज्यासी आवडी
२५४०	ज्वरल्यासी का
	झ
१२८६	झड मारोनियां
१९६१	झरा लागला
३१२७	झवीली महारें
३०१	झाड कल्पतरु
३०२९	झाडें वोरपोनि
३८५९	झाला कवतुक
३०९८	झाला जीवासी
२६४६	झाला हा डां
३२८७	झालिया दर्शन
३९९४	झाली पाकसिद्धी
२८३७	झाली झडपणी
३११५	झाली हरिकथा
३९४८	झाली होती
२८६८	झाले आतिंसाठे
३६५१	झालें रामराज्य
१५९८	झालें समाधन
३७३९	झालों आतां एके
३८९०	झालों स्वयें कृ
३६६९	झेला रे झेलाव
	ट
३४५७	टवकारुनी दृं
३९६२	टाका रुका चा
२०५२	टाळ घोळ मुख
६५०	टाळ दिंडी हा
११७०	टिळा टोपी उंच
	ठ
३६५४	ठकिलें काळा
१००८	ठाकलोसें द्वारीं
१८१	ठायींची ओळखी
३२४२	ठाव तुम्हांपाशीं
१८३०	ठाव नाही बुड
९६१	ठेवा जाणीव
७७५	ठेविले जतन
२६४९	ठेवोनि इमान
३३८८	ठेवोनियां डोई
	ड
२७६१	डगमगी मग
३७५४	डाईं घालुनियां
४०५	डोई वाढवूनि
१३९८	डोळां भरिले
१८५४	डोळियां पाझर
२२१०	डोळ्यांमध्ये जैं
२५८०	डौरलों भक्तिसुख
	ढ
३३४५	ढाल तलवारे
१९५२	ढेंकणाचे संगें
२३४७	ढेंकणाची बाज
४५	ढेंकरें जेवण
	त
२८०	तक्र शिष्या मा
१०७६	तट्टाचे जातीला
१७६७	तडामोडी करा
३०८५	तन मन धन
९९६	तप तीर्थ दान
१५८४	तपासी तें मन
३९३९	तम भज्याय ते
२२७०	तया घडेल स
३८३१	तयींसवें करी
३९८१	तयांसाठीं वे
२०६१	तयास नेणती
१८९९	तरले ते मागें
३१०२	तरलों म्हणुनि
५५६	तरि कां नेणते
२४५०	तरि कां मागे
१२९७	तरिच जन्मा
१३१९	तरिच हा जीव
३३००	तरिच शोभे
४०४९	तरि म्यां आळ
१६९२	तरी आम्हीं तु
२१८८	तरी कां पवाडे
२५४५	तरी कां वळग
२७०९	तरीच म्यां
२९६३	तरीच हीं केलीं
२८२५	तरी भले वायां
२२०४	तरी सदा निर्भ
१५३८	तरी हांव गेली
१११९	तरुवर बीजा
३८०३	तव ते म्हणे ऐ
३९०२	तंव तो हरि
२११७	तळमळी चित्त
२७५५	ताकें कृपण तो
२९७७	तांतडींची धांव
१३८४	तांतडीनें आ
२२९६	तापल्यावांचून
४०७०	ताप हें हरण
३१७२	तांबियाचें नाणें
३४०२	तामसाची तपें
१२९	तारतिम वरि
२०६९	तारिलीं बहुतें
३६४२	तारी ऐसे जड
९८८	तारुण्याच्या म
१०५३	तारूं लागलें बं
१०३३	तान्हे लहान
१५५	तान्हेल्याची ध
३४१९	तिहीं त्रिभुवनीं
२०५७	तिन्ही लोक ऋ
३१३९	तिळ एक अर्ध
३८४७	तीर देखोनियां
१४२५	तीर्थ जळ देखे
२५२२	तीर्थाचिये आस
९७१	तीर्थांचें जें मूळ
१०२४	तीर्थाटणें एक
२३१२	तीर्थांची अपे
८९	तीर्थीं धोंडा पा
३२४	तीर्थें केली कों

अंक	अभंग
६५	तीळ जाळिलें
३५०९	तुका बस्तर वि
११८३	तुका वेडा अ
३८२४	तुका म्हणे पुन्हां
३८३०	तुका म्हणे सुख
१८३९	तुज ऐसा कोणी
५५५	तुज ऐसा को
२४५६	तुज करितां हो
१८६३	तुज करितां हो
२३८१	तुज करितां हो
३१९१	तुज काय करूं
११८५	तुज घालोनियां
५९०	तुजचि पासाव
१६२६	तुज जाणे ता
३०८९	तुज दिला देह
१७७८	तुज दिलें आतां
१९२४	तुज न करितां
११०४	तुज न भे मी
१६९८	तुज नाहीं श
२९९६	तुज पाहतां
१४६२	तुज पाहावें हें
१२३७	तुज मज ना
४००	तुज मागणें तेण
१०८६	तुजलागीं माझा
३२७	तुजवरी ज्याचें
३३८	तुज वर्णी ऐसा
३३७८	तुज वांचूनी मा
३१४६	तुजविण कांहीं
२३६२	तुजविण कोणां
१८२२	तुजविण देवा
२४२	तुजविण मज
२८१	तुजविण वाणी
३३८५	तुजविण सत्ता
८३९	तुजशी संबंध
३४७८	तुसवें आम्ही
३७५७	तुजसवें येतो
१०४४	तुज म्हणतील
२२७६	तुज दास ऐ
४२०	तुज दास मज
३२२८	तुझा भरंवसा
१७०२	तुझा विसर न
४०१	तुझा शरणागत
२२८०	तुझा शरणागत
२१७७	तुझा संग पुरे
१६६४	तुझा म्हणउनि
१७८२	तुझा म्हणउन
३०८१	तुज म्हणवूनि
२९८०	तुझिया दासां
४०५८	तुझिया पार
२६७६	तुझिया विनोदें
३७०५	तुझिये संगती
३०८८	तुझे अंगभूत
३७९	तुझं थोर थोर
२७४८	तुझे दारींचा
३९७१	तुझे दास्य करूं
१२८२	तुझे नाम गाऊं
१८००	तुझे नाम मुखीं
२४९१	तुझें नाम मुखीं
१९२७	तुझें पाय माझें
१९९७	तुझें पोटीं ठाव
३३७४	तुझें मजपाशीं
४४४	तुझें वर्णू गुण
१८२	तुझें वर्म ठावें
१२७२	तुज वर्म हातीं
१७४९	तुझें म्हणवितां
१६९९	तुझ्या ठायीं ओ
१२२५	तुझ्या नामाची
१४३८	तुझ्या रूपें मा
३६६	तुटे भवरोग
६१७	तुमचा तुम्ही
६५९	तुमचिये दासां
७०५	तुमची तों भेटी
२३२८	तुमचे स्तुतियो
२८५२	तुमच्या पाळ
३६८२	तुशीं कोण धा
३६५९	तुम्हां आम्हां उ
१३४८	तुम्हा आम्हां म
१८८०	तुम्हां आम्हां तु
२६८४	तुम्हा आम्हां स
१३७३	तुम्हा आम्हां सवें
२८२८	तुम्हां उद्धरणें
४८७	तुम्हां ठावा को
१२२०	तुम्हा न पडे चे
२१९७	तुम्हासाठीं आ
२८६६	तुम्हासी न कळे
२६४४	तुम्हांसीं हें अवय
६०४	तुम्हां होईल
१३१६	तुम्ही आम्ही भ
१२५२	तुम्ही कांटाळलां
४००९	तुम्ही जावें नि
३९६९	तुम्ही ये तरी असं
१९९५	तुम्ही तरी को
२७६५	तुम्हीं तो सदैव
१७६१	तुम्ही पाय संतीं
१०१०	तुम्ही बैसलेती
२८०६	तुम्ही माझा देव
३४१२	तुम्ही येथें पाठ
१६७६	तुम्ही विश्वनाथ
३५६७	तुम्ही संतजनीं
२४२५	तुम्हीं संतमाय
३६१२	तुम्ही सनकादि
६०३	तुम्ही साच नुपे
४०६०	तुळसीमाळा धा
३०४३	तूं आम्हां सोय
३५३४	तूं कृपाळु माउ
३९८७	तूच मायबाप बं
४०२५	तूंचि अनाथा
८४४	तू पं ढरा स्फ
४०७३	तूं बळिया शिरो
३५३८	तूं माउलीहून
२९५८	तूं माझा कोंव
२३३१	तूं माझा माय
१३९६	तूं माझी माउ
७३५	तृषाकाळी उद
१४४४	तेंच किती वारं
२९८१	तेचि करीं मात
३७	तेजा इशारती
१९८०	तेणें वेशें माझी
२२४	तेणें मुखें माझें
१५५४	तेथें सुखाची
१४०	ते माझे सोयरे
२४१०	तेरा दिवस जा
३१	तेलणीशी रुस
३४८	तेंही नव्हे जें
२१८९	तेव्हां धालें पो
१३५८	तेव्हा होतो भो
२४७९	तैसे नव्हों आ
७४९	तोचि हीं क्षुल्लकें
११५७	तोचि लटिक्या
१८१६	तडिनि पुष्पव
१६४०	तो हे साहे फार
१९११	तोंडें बोलावें तें
३८९५	तो बोलें कोमळ
३८६६	तो या साच भाव
३५८६	तोंवरी म्यां त्या
३३९१	त्यजिलें भेटवी
१५६४	त्याग करी ऐसा
४५६	त्याग तंव मज
२५११	त्यागें भोग मा
२६१६	त्याचिया चर
३४४४	त्याचें मुख ना
३८१२	त्यांच्या पूर्वपुण्यां
३७३०	त्यांनीं धणीव
३१२९	त्या हरिदासां
३०५३	त्रासला हा जी
२९९०	त्राहे त्राहे त्राहे
७५६	त्रिपुटीच्या यो
२३०६	त्रिविध कर्माचे
३११	त्रैलोक्य पाळि
	थ
३९५३	थडियेसी निघ
७४१	थुंकोनियां मा
८५	थोडें आहे थोडें
२६८६	थोडें तुम्ही मागें
२८७	थोडें परी निरें
३५३३	थोर अन्याय
११२४	थोर ते गळाली
	द
२५३१	दंड अन्याया
१५९६	दधिमाजी लो
४९२	दंभें कीर्ति पोट
१४१	दया तिचे नांव
९३५	दया क्षमा शां
४६९	दर्पणासी नकटें
२९५९	दर्पणासी बुजे
४८९	दर्शनाची आ
२३१६	दर्शनाचें आर्त
३७५९	दसरा दिवाळी
२४०७	दह्य चिये अं
२३१९	दाटे कंठ लागे
३०७५	दाढी डाई मुंडी
१६११	दाता तोचि एक

अंक	अभंग
१७९	दाता नारायण
३१०५	दाता लक्षुमीचा
५९	दानें कापे हात
१९९८	दारीं परवरी
१८९	दाउवनी आ
१६९०	दाउनिया कोणा
२५१२	दाखवूनियां मांड
७८८	दास झालों ह
१८३१	दासां सर्व का
३२५७	दासीचा जो सं
३४९४	दासों पाछें दौरे
४०५३	दास्य करी दा
१३२१	दिकचि या ना
१७८६	दिनें दिनें शंका
५१६	दिनरजनीं हा
२६३८	दिला जीवभाव
२२९५	दिली चाले वा
२५१४	दिली मान तरी
२३२	दिली हाक मनें
३४१३	दिवट्या छत्री
१४६	दिवट्या वाद्य
२७९७	दीन आणि दुर्ब
३८९४	दीनाचा कृपाळु
२६९	दीनानाथा तुझी
२७९	दीप घेउनियां
५१४	दीप न देखे अं
२४७०	दुखवलें चित्त
४४७	दु:ख वाटे ऐसी
२०५८	दु:खाचिये सा
१४८९	दु:खाची संग
५४५	दु:खाचे डोंग
३८६२	दु:खा होती लो
३४२८	दुजा ऐसा को
२१	दुजें खंड तरी
११८७	दुडीवरी दुडी
१६७३	दुधाचे घागरी
११००	दुधाळ गाढवी
१९५९	दुबळें सदैवा
२०७८	दुर्जनाचा मान
९२	दुर्जनाची गंधी
१४६८	दुर्जनाची जाती
२१५७	दुर्जनाची जोडी
२१३७	दुर्जनाचें अंग
४१	दुर्जनासी करी
२९८	दुर्बळ हे अवघे
२००९	दुर्बळाचे कोण
२०८४	दुर्बळाचे हातीं
१९८६	दुर्बळा वाणीच्या
१११८	दुर्बुद्धि ते मना
१४६३	दुष्ट आचरण
१९७८	दुष्ट भूषण स
१७४६	दुष्टाचें चिंतन
८०६	दुध दहीं ताक
२६६४	दूरी तोंचि हो
३५४९	देइ डोळे भेटीं
१३५७	देईल ते उणें
४२७	देउनियां कपाट
४८८	देऊं ते उपमा
७५७	देखण्याच्याती
३५०५	देखत अखों झूटा
३९२०	देखत होतों आ
३७४७	देखिलासी मा
२७९०	देखिलें तें धरी
५३५	देखिचा दिमाख
३१८०	देखीचें तें ज्ञान
९१	देखोनि पुराणि
२५१	देखोनिया तु
५२	देखोनि हरखली
२०५३	देखोवेसीं करि
१०४	देती घेती परज
१२६८	देव अवघें प्रती
२१०	देव आड आला
१८८८	देव आमचा
१५९०	देव आहे
२४७५	देवकीनंदन
३१९८	देव कैचा तया
६४३	देव घ्या कोणी
१६२३	देव जाणता दे
२४६४	देव झाले अवघ
३०५०	देव तिही बळें
३१५८	देव तिळीं आ
२५६५	देव तीर्थ येरदि
३९४४	देव ते संत देव
३८६५	देव त्यां फावला
१८८२	देव दयाळ देव
१८८४	देव निढळ देव
३५११	देव पहावया क
१८८७	देव पाहों देव
१८८५	देव बराडी देव
१८८३	देव बासर देव
११०१	देव भक्तालागीं
१८८६	देव भला दैव
१८८१	देव मुजर देव
१६३४	देव राखें तया
२३६६	देव वसे चित्तीं
१४१७	देव सखा आ
२१९	देव सखा जरी
१८५	देव होईजेत देवाचे
७९४	देव होसी जरी
१९२३	देव आता ऐसा
३८०९	देवा आदि देवा
९६५	देवा ऐकें हें वि
१८०५	देवाचा भक्त
३५४६	देवाचिया देवा
१११२	देवाचिया वस्त्रा
१४०५	देवाचिया चाडे
२९६८	देवाचिये पायीं
७२८	देवाचिया माथां
२६०९	देवाची ते खूण
३२८५	देवाची भांडा
१८५८	देवाचें घरीं देवें
२९१३	देवाचें चरित्र
२५६४	देवाचें निर्माल्य
२९७३	देवाचें भजन
१२०	देवाचे म्हणोनि
१३०३	देवाच्या उद्देशें
२६३१	देवाच्या निरो
१०	देवाच्या प्रसादें
४६०	देवाच्या संबंधें
१८११	देवा तुज मज
४०३६	देवा तूं आमचा
४०३२	देवा तूं कृपा क
४०७४	देवा मी चांडा
७४०	देवावरिल भार
११०६	देवावरि भार
९९७	देवासाठीं जा
२४१९	देवासीं अवतार
१३६२	देवासी तो पुरे
१८०९	देवासी लागे
१६६३	देवा हे माझी
३९१८	देवी देव झाले
२८९७	देवें केले
३०५	देवें जीव धाला
२८७२	देवें दिला देह
१६०९	देवें देऊळ से
३०९२	देश वेष नव्हे
७२७	देह आणि देह
२४४७	देह जाईल जा
१४२०	देह तंव असे
३००४	देह तंव आहे
१२७५	देह तुझ्या पा
७२९	देह नव्हे मी हे
२११९	देह निरसे तरी
२७०७	देह प्रारब्धा
१९४२	देह बद्धि वसे
२५६	देहबुद्धि वसे
८३६	देहभाव आम्ही
२५१०	देह मृत्याचे
४४३	देह हा सादर
४०८१	दैत्य भारें पीडि
२०६३	दैन्य दु:ख आ
३७१०	दोन्ही टिपरीं
६९१	दोन्ही हात ठे
३०३१	दोराच्या आ
३१३	दोष पळती की
२४८८	दोहीं बाहीं आ
३५८३	दोहींमध्यें एक
३९९८	द्या जी आम्हां
१२९८	द्या जी माझा
२७६४	द्याल ऐसें दिसे
७५४	द्याल ठाव तरी
४०८	द्याल माळ तरी
३०८	द्रव्य असतां
३१६४	द्रव्य घेऊनियां
५४२	द्रव्याचा तो
१४४९	द्रव्याचिया कोटी
५४३	द्रव्याचिया
७९१	द्वारकेचें केणें
२४८७	द्वारपाळ विनं
३८८८	द्वेषाचिया घ्या

ध

३९६	धणी न पुरे

अंक	अभंग
२९९२	धन मिळवुनी
२४७१	धनवंत एक
१५८८	धनवंता घरीं
१२२७	धनवंतालागीं
३३७८	धना गुंतलें चि
२१०३	धन साच धन
३६३४	धनीं ज्या पाई
२४३२	धन वित्त कुळें
६२८	धन्य आजि
५१५	धन्य काळ संत
१७५३	धन्य ते पंढरी
३७४५	धन्य ती गोधनें
७३६	धन्य ते संसारी
२९०२	धन्य तोचि ग्राम
४०९१	धन्य दिवस आ
३०१३	धन्य दिवस
३०२४	धन्य धन्य ज्या
१७५२	धन्य पुंडलिका
२२५२	धन्य बाया
४३४	धन्य भावशीळ
२६१५	धरावा तो बरा
२६६६	धरावें तों भय
२१२५	धरितां इच्छा
८८३	धरितां पंढरीची
३५५१	धरीतो वासना
१६३१	धरियेली सोंगें
३९०३	धरियेलें रूप
३७९५	धरिला पालव
२५०४	धरिली जीं
३८९३	धरी दोन्ही ठा
१६९४	धरूनि पालव
१४४०	धरुनियां चा
३०२२	धरुनियां मनीं
१४१०	धरुनियां सोई
२८२७	धरुनि हें आ
१५७४	धरोनि दोन्ही
२१५६	धर्म तो न कळे
३०३७	धर्म रक्षावया
१३७	धर्म रक्षावया
१३	धर्माची
२०७६	धर्माचे पाळण
३३०८	धवळलें जगदा
११८	धाकुट्याच्या
३६९१	धालें मग पोट
१७८९	धालों सुखें
३७७६	धांव कान्होबा
४८६	धांव घाली
२३४८	धांव धांव गुरु
३३२३	धांवा केला
१४८६	धांवा शीघ्रवत
७१५	धांवे त्यासी
१८६८	धांवोनियां आ
४९४	धिक जिणें
१६४	धिक जिणें तो
८०४	धीर तो कारण
१९४१	धीर तो कारण
१४४८	धीर नव्हे मनें
१०६०	धेनु चरे वना
२६१७	धोंड्यासवें आ
२२६	ध्यायिन तुझें
५५१	ध्याईं अंतरीच्या
३१५७	ध्याना ध्यातां
२१२	ध्यानीं योगीं
	न
१२२४	न करा टांच
५२२	न करावी आ
२६११	न करावी चिंता
६५८	न करावी स्तु
२४६१	न करीं त्याचें
१४६९	न करीं उदास
८०९	न करीं तळमळ
१५०२	न करीं तुमची
३३०२	न करीं पठन
२७३७	न करी रे मना
८७	न करीं रे संग
५०२	न कळे तों काय
२०६७	न कळतां को
२९८७	न कळसी ज्ञा
२८२९	न कळे जी
२४१७	न कळे तत्त्व
१०९७	न कळे ते कळों
३०३२	न कळे ब्रह्मज्ञा
३९४५	न कळे हो माव
३७७८	नका कांहीं
८१६	नका घालूं दूध
२४६०	नका दंतकथा
२०७९	नका धरूं कोणी
३३१३	नका मजपाशीं
४५४	नका वाटूं मन
२३००	नको आतां
३७५८	नको आम्हां सवें
१६८९	नको ऐसें जालें
३३८९	नको कांहीं
२८६०	नको घालूं
२०४७	नको दुष्टसंग
११७७	नको देऊं देवा
१५९७	नको धरूं आ
१७३६	नको बोलों
२२७८	नको ब्रह्मज्ञान
२६०७	नको मज ताठा
१३४९	नको माझे
८७०	नको सांडूं
४५५	नको होऊं देऊं
२१०९	न गमेची झाली
३१८८	न घडे माय
३९५२	न चलवे पंथ
३९३५	नजर करे सो
२८०	नटनाट्य
८७६	नटनाट्य तुम्ही
२७४	न देखवे डोळां
३६२८	न देखिजे ऐसे
३४२७	न देखें न
१२५	न देखोनि कां
२६२५	न धरी प्रतिष्ठा
२०५३	न पडो आतां
२९९५	न पवीजे तया
४०३५	न पवे सन्निध
१९१२	न पालटे एक
२५१३	न पालटे चा
१३३४	न पाहे माघारें
९६६	न पूजीं आणि
३५५८	न बैससी
३४४६	न बोलतां
४०२९	न बोलसी तेंही
२३८६	न बोलावें ऐसें
१८७२	न बोलावें परी
९०७	न बोलसी करा
१३७६	नभोमय जालें
८२२	न मानावें तैसें
१७८५	न मनी नाम
११४१	न मनी ते
१०८२	नमस्कारी भूतें
३७८	न मनावी
५६५	न मनावी चिंता
११४८	नमावे पाय हें
३४८६	नमितो या
३२४५	न मिळती एका
२५९	न मिळो खाव
३०७०	नमो नमो तुज
७९६	नमो विश्वरूपा
९७८	नम्र जाला भूता
१८९७	न म्हणे सान
८२६	नये इच्छूं सेवा
२७३२	नये ऐसें बोलों
३६१	नये जरी कां
२	न ये जरी तुज
५७	न ये नेत्रां ज
९९२	नये पाहों मुख
१७९४	नये पुसों आ
३००६	नये माझा तुम्हां
११८०	नये वाटूं मन
१३९०	नये स्तवूं काचें
२१२३	नयो वाचें अ
३१८१	नरनारी बाळें
१४२८	नरस्तुती आणि
३४४५	न राहे रसना
१९१४	न राहे क्षण
३०८०	न लगती मज
३३२८	न लगे चंदना
३२०७	न लगे देवा तुझें
९१८	न लगे देशकाळ
१२३४	न लगे द्यावा
२०६२	नलगे पहावें
४१८	नलगे मरावें
८४७	नलगे मायेसी
२४८	नलगे हें मज
३३१६	न लाहिजे
२०७३	न वजतां घरा
१५१७	न वजावा तो
२२८४	न वजे वायां
४०५	नवां नवसांची
१२२८	न विचारितां

अंक	अभंग
३६२	न संडवे अन्न
२१४०	न संडावा थाव
२९६	न संडी अवगुण
२३७०	नसतां अधिका
१५०८	नसताचि दा
१३०१	नसतो किविल
३०११	न सरे लुटितां
१५३७	न सरे भांडार
३४७७	न सांगतां
८७२	न सांगावें वर्म
१३५५	न संडावा आ
१७६८	नसावें ओशाळ
३६०	नसे तरी मनीं
३४४७	न सोडीं न
२३३६	नहो आतां
३९६७	न हो नरनारी
१५१२	न होय निग्रह
१९९०	न म्हणे कोणा
२४९५	नव्हता भेटी
९१५	नव्हतियाचा
३५३७	नव्हती आली
२२२१	नव्हती ते संत
१४७४	नव्हती माझे
५८६	नव्हती माझे
२३३७	नव्हती ही मा
२८७५	नव्हती हे उस
२६९७	नव्हतें तें कळों
१९८	नव्हतो साव
२६८०	न व्हावा तो
२१३	न व्हावें तें जा
१९६५	न व्हावें तें
४७	नव्हे आराणूक
६३३	नव्हे आराणूक
१८२४	नव्हे कांहीं
९६७	नव्हे खळवादी
८२५	नव्हे गुरुदास्य
२२६५	नव्हे जाखाई
३६४३	नव्हे धीर कां
२३९३	नव्हे परि म्हण
८६९	नव्हे ब्रह्मचर्य
१८१३	नव्हे ब्रह्मज्ञान
१५४९	नव्हे भिडा हें
१४२६	नव्हे मतोळ्या
२७५४	नव्हे मी आहा
२७७१	नव्हे मी शा
१२९१	नव्हे मी स्वतं
३३०	नव्हे शब्द
२६९३	नव्हेसी तु लां
१०२९	नव्हे हें गुरुत्व
८६६	नव्हों आम्ही
१७०१	नव्हो गांढे आ
२४३५	नव्हो वैद्य आ
२८१९	नव्हों सभाधीट
९६९	नाइकावे का
२२६८	नागर गोडें
३१४८	नागलें देखोनि
३८८१	नाचतां देखीलीं
२४९८	नाचावेसें वाटे
४०००	नाचे गाणें
४३६	नाचे टाळी पिटी
३२७३	नाना मतांतरें
४५२	नाम आठवि
१५८२	नाम उच्चारी
१७८८	नाम गोड
१५६९	नाम घेतां उठा
२१७४	नाम घेतां कंठ
२२७२	नाम घेतां नल
८८४	नाम घेतां मन
२२७३	नाम घेतां वा
२२६३	नाम दृषी त्या
७५३	नाम देवें केलें
१२८८	नाम न वदे
३५३	नाम पाठ मुक्ता
३३६०	नाम वाचें
२३५३	नामसंकीर्तन
३०६	नाम साराचेंही
९४३	नाम म्हणतां
२९३६	नामांचा महिमा
८२०	नामाची आव
९४१	नामाचें चिंतन
९५८	नामाचें पवाडें
१२०७	नामाविण का
१९५३	नामें स्नानसें
३८५	नारायण आले
३८३६	नारायण मूर्ती
२७११	नारायण ऐसा
३८९२	नारायणें कंस
२२०३	नारडे तरी काय
२२०७	नावडावे जन
३४१४	नावडे जेचि
१९८४	नावडें ज्यां क
४७०	नावडे तरी कां
९९४	नाशिवंत देह
३५१७	नाही आईकत
१९८८	नाहीं आम्हां
३३४१	नाहीं आम्ही
६०८	नाहीं उल्लंघिलें
२४१५	नाहीं कांटाळ
३४२५	नाही काम
१९०२	नाहीं काष्ठाचा
१६७०	नाहीं कोणी
२८३३	नाहीं खंड जा
२९२३	नाहीं गुणदोष
३४७९	नाहीं घाटावें
३००३	नाहीं जप तप
१८७३	नाहीं जालें
३५१५	नाहीं जों वेंच
१५०६	नाही तरी आ
१२४०	नाहीं तुज कां
३६५८	नाहीं तुझे उ
२५२९	नाहीं तुह्यां
१८९२	नाहीं तुम्ही के
३८३९	नाहीं स्याची
१७१९	नाहीं त्रिभुव
१६८२	नाहीं दिलें क
३१५	नाहीं दुकळलो
१९६८	नाहीं देणें घेणें
२७३९	नाही देवाचा
३३९०	नाहीं देवापा
३८७७	नाहीं नाश
४०४	नाहीं निर्मळ
२०५६	नाहीं पाइतण
३१५४	नाहीं पाक हो
३२६४	नाहीं बळयोग
२६६४	नाहीं भ्यालों
२८०५	नाहीं मज रु
२८५३	नाहीं मज कोणी
८४३	नाही मागित
१३१४	नाहीं माथां
१६१५	नाहीं म्यां वं
७७४	नाहीं येथें वा
१२४५	नाहीं रूप ना
४१९	नाहीं लाग मा
१३८५	नाहीं लापो
२६६२	नाहीं वागवित
३५१६	नाहीं विचारी
३२७४	नाहीं शब्दा
८१९	नाहीं संतपण
१४९५	नाहीं सरो ये
२९३२	नाहीं सरो येत
३५५	नाहीं साजत
२७१	नाहीं मुख मज
१०२३	नाही सुगंधा
३५८५	नाहीं हानि
१३६७	नाहीं होत भा
३४४	निगमाचें वन
१४०८	निघाले ते आ
२५२१	निघालें दिवाळें
३८५२	निजदास उभा
१६४९	निजळ्यानें
३०३३	नित्य उठोनि
२०८३	नित्य मनासी
२७८६	निंदावें हें जग
९११	निंदा स्तुति
२३	निंदी कोणी
१९४९	निंबाचिया झा
३२७१	निरंजनीं आम्ही
२४९४	निरंजनीं एक
२९०८	निरोधितों परि
१७२८	निरोप सांगतां
३५५५	निरोपासी वेचे
५८९	निर्गुणाचे घ्या
१३००	निर्दयासीं तु
६१४	निर्धाराचे अव
९८३	निर्वाहा पुरतें
९३१	निर्वैर होणे
२२९४	निर्वैर व्हावें
२०७७	निवडावे खडे
५२६	निवडुनि दिलें
२३१	निवडे जेवण
७६१	निवडोनि दाण
२९४८	निश्चितीने हो

अंक	अभंग
९४०	निष्ठावंत भाव
१३२५	निष्ठुर तो दिसे
१३७०	निष्ठुर मी जा
२६८२	निष्ठुर यासाठीं
१६९५	निष्ठुरा उत्तरीं
७१७	नीचपण बरें
३६७२	नुरवे तें उगवू
१८२५	नेघे तुझे नाम
३८८२	नेणतियासाठी
३७२९	नेणती तयासी
३९३	नेणती वेद
२८०३	नेणपणें केला
१८०८	नेणें अर्थ का
१६६२	नेणें गति काय
३०८६	नेणें गाऊं का
५३	नेणें गाणें कंठ
१४८३	नेणें जप तप
१५६३	नेणें फुंको का
३८५७	नेणें वर्ण धर्म
६६३	नेणें सुणें चोर
१२४३	नेणें करूं से
२१३०	नेणों काय ना
३७१८	नेणों वेळ का
११०९	नेत्र झांकोनि
४२४	नेत्राची वास
२८९०	नेदावी सलगी
३८४४	नेदी कळो के
३८६८	नेदी दुःख दे
२६४५	नेले सळे बळे
१२३२	नेसणें आले
३५१८	नोगे तुम्हां
३३८४	नोहे रास
४०७६	नोहे आजि
१९३३	न्यावयासी मु
	प
८३०	पंचभूतांचा
२४६३	पंचभूतांचे
१०२५	पठ्ठे ढाळूं आ
२२६६	पडतां जड
१६४३	पंडित तोचि भला
१३२	पंडित वाचक
३३५२	पंडित वैदिक
१६४२	पंडित म्हणतां
२७७५	पडिला प्रसंग
२८४०	पडिलिया ताळा
३७७९	पडिली भुली
२६५२	पडिली हे रूढी
५२०	पडिलो भावे
१८५७	पडोनियां राही
३१७९	पंढरीचा वास
४०८५	पंढरी पुण्य
८८	पंढरीचा महि
१०४१	पंढरीची वाट
२२४१	पंढरीची वारी
३१४२	पंढरीचे भूत
१०९४	पंढरीचे वारक
१६५२	पंढरी पंढरी
१०६९	पंढरीये माझे
२१२१	पंढरीस घडे
२१६९	पंढरीस जाते
७९०	पंढरीस दुःख
४९९	पंढरीसी जाय
१०९६	पंढरीसी जा रे
३०८४	पंढरीसी जावे
२४३	पढियें तें आम्हीं
२७७०	पढियें तें मागा
२०९	पतनासी नेती
३९७३	पतित पतित
१०५६	पतित पावना
१२८९	पतित मिरासी
३०६३	पतिव्रता नेणें
१७७२	पतिव्रते आनंद
३२३२	पतिव्रतेची कीर्ति
५७६	पतिव्रते जैसा
५२५	पदोपदीं दिलें
२०५०	पंधरा दिवसां
२२०१	परउपकारें
११९५	परतें मी आहे
२५४२	परद्रव्य पर कां
११६९	परद्रव्य परनारी
१६५९	परद्रव्य परनारी
१५८०	परपीडक तो
३४४०	परपुरुषाचे मुख
१९७५	परम अमृतें
४०८४	परमानंदा
१०३७	परमार्थी तो
२९१	परमेष्ठिपदा
१६३७	परस्त्रीतें म्हणतां
२८०२	पराधीन माझें
३६	पराविया नारी
२४०	पराविया नारी
३२१९	परि आतां मा
३५७७	परि तो आहे
३९	परिमळ म्हणू
१९८७	परिमळें काष्ठ
१८१५	परिस काय
२२२९	परिसाचें अंगें
३२३१	परिसें गे सुने
१६७५	परिसें वो माते
३५७०	परिसोनि उत्तर
१९४०	पर्जन्यें पडावे
१६०५	पवित्र तें अन्न
३२६७	पवित्र तें कुळ
१०४९	पवित्र तो देह
४००६	पवित्र सुदिन
४३	पवित्र सोवळीं
१६६६	पवित्र होईन
३६०५	पवित्र व्हावया
९३२	पशु ऐसे होती
२३२०	पसरूनी राहि
३१११	पाहाते पांडव
३७९९	पाहावया माजी
३२८०	पहिली माझी
३६९०	पळाले ते भ्याड
३६३१	पाईक तो जाणे
३६३३	पाईक तो प्रजा
३६२९	पाईकपणें
३६३५	पाईकपणें सरा
३६३२	पाईकांनी पंथ
३६३०	पईकीचें सुख
४३८	पाखांड्यांनीं
३९१९	पांगुळ झालों
२३१४	पाचारितां धावे
२७५२	पाठवाल तेथें
३७२	पाठीं पोटीं देव
२६७७	पाठी लाग का
२४२६	पाठी लागे तया
८९९	पाठीवरी भार
२२९७	पाठेळ करितां
२५३३	पाडावी ते बरी
३९०९	पांडुरंगा करूं
२०९२	पांडुरंगा कांहीं
२६४८	पांडुरंगा सारिखा
१८०२	पांडुरंगे
२३४९	पांडुरंगे
३२१४	पांडुरंगे पहा
३२७२	पांडुरंगे सत्य
१०३४	प्राणिमात्र दिगं
२५८८	पात्र शुद्ध चित्त
३११४	पानें जों खाईल
१०५०	पाप ताप दैन्य
१९३१	पाप पुण्य दो
९७४	पापपुण्यसुख
३२२०	पापाचिया मुळे
११८६	पापाची मी
३०४७	पापिया चांडाळा
१०४६	पापी म्हणों तरी
२००३	पायरवे अन्न
१८७०	पायांच्या प्रसा
११४६	पायां पडावें हें
२६८३	पायांपासी चि
५९७	पावटणी पडणें
२६६५	पावतो ताडन
४००३	पावला प्रसाद
६	पावलें पावलें
३०४१	पावलो पंडरी
३४४९	पावलों पावलों
३२०८	पावलों प्रसाद
३१३६	पावलो हा देह
४३३	पाववील ठाया
७००	पाववावें ठाया
३५२०	पावावे संतोष
२०९७	पावे ऐसा नाश
२१८४	पाषाण देव पा
३१४४	पाषाण परिस
३०२०	पाषाण प्रतिमा
३८४६	पाषाण फुटती
३७२६	पाहतां गोवळी
२३५२	पाहतां ठाया
२१९६	पाहतां तव ए
५६८	पाहतां श्रीमुख
१४३६	पाहा किती आ

अंक	अभंग
१२९३	पाहतां रूप
२७४९	पाहता हे बरवें
३६९२	पाहती गौळ
७४७	पाहातोसी काय
२०७२	पाहोनि अधिकार
३७५३	पाहा रे तमासा
८९०	पहा रे हें दैवत
३६६६	पाहा हो कली
२५७२	पहा हो देवा
२७७४	पाहिजे तें
३६२१	पाहुणें घरासी
३३९४	पाहुनियां ग्रंथ
२२३०	पाहें तिकडे दि
४०१०	पाहें प्रसादाची
१०४३	पाहें मजकडे
१२९२	पाहो ग्रंथ तरी
२७०४	पाळितों वचन
३२४३	पाळियेले लळे
१९३४	पाळिला विध
२०९१	पाळिलो पोसि
२४२८	पाळोनिया मोठे
३२९०	पिकलिया सेंद
२४५७	पिकवावें धन
१४६०	पिंडदान पिंडें
१६७७	पिंड पदावरी
३१४९	पिंड पोषकाच्या
२६०	पिंड पोसावे हें
३३०३	पुंडलिकाचे
२५०९	पुंडलिक भक्त
५६२	पुढिलाचें इच्छी
१४२३	पुढिलांचें सोयी
२०८८	पुढिलिया सुखे
८०५	पुढें आतां कैंचा
८	पुढें गेलें त्याचा
१५९८	पुढें जेणें लाभ
३५६२	पुढें तरी चित्ता
३९१५	पुढें येते देवी
१५३३	पुण्य उभें राहो
२२८३	पुण्य परउपकार
३१९६	पुण्य पापा ठाव
३२०४	पुण्य फळलें व
१८४	पुण्यवंत व्हावें
७३१	पुण्यविकारा तें
२५०६	पुत्र झाला चोर
३४५२	पुत्राची वार्ता
६७२	पुनीत केलें
२०३७	पुरली धांव क
३९७२	पुरविली आळी
२२७१	पुराणप्रसिद्ध
३२७७	पुराणीक म्हण
८८८	पुराणींचा इति
२१३३	पुरुषां हातीं
२१९४	पुष्ट कांती निव
३६७१	पुसतसे सांगा
२३२३	पुसावें तें ठाईं
८३१	पुसावेंसे हेंचि
३८६	पूज्या पूज्यमान
१९३	पूजा समाधान
१५१	पूजा एकास
३३९	पूर आला
२०३२	पूर्वजांसी नर
३०३४	पूर्वीहूनी बहु भ
७३०	पृथक मी सांगो
३२८६	पेणावलें ढोर
३०४६	पैल आला राम
३७२७	पैल आली आ
३६१७	पैल आले हरि
१७२५	पैल घरी जाली
३६१९	पैल दिसतील
३३७९	पैल सांवळें तेज
१४१५	पोट धालें आतां
२६३६	पोट धालें मग
२६५	पोटाचे ते नट
८५४	पोटापुरते काम
३२९	पोटा जन्मती रो
२१०५	पोटीं शूळ अंगीं
२५८९	प्रगटलें ज्ञान
३६३८	प्रजो तो पाइक
२५३६	प्रथम भेटी
३१७०	प्रपंच परमार्थ
१२७९	प्रपंच वोसरो
२०४२	प्रमाण त्या
३२७६	प्रवृत्तिनिवृत्ति
१३५४	प्रसिद्ध हा असे
३१८३	प्राक्तनाच्या योगें
१५७०	प्राण समर्पिला
३९५१	प्राणिया एक
२१३६	प्रायश्चित्त देतो
३३३३	प्रारब्ध क्रियमा
९०८	प्रारब्ध हाती ती
११६४	प्रारब्धेंची जोडे
२३९६	प्रीती करी स
२२९०	प्रीती नाही रा
५९१	प्रीतीभंग माझा
२८६४	प्रीतीचा तो
२१६५	प्रीतीचा हे कळ
११७४	प्रीतीचिया वो
२८५९	प्रीतीच्या भांड
१८९०	प्रेम तेथें वास
११५६	प्रेम देवाचें देणें
२७२९	प्रेम नये सांग
४३२	प्रेमसूत्र दोरी
	फ
६३०	फजितखोरा म
४२३	फटकाळ देव्हां
१५२२	फलकट तो सं
८६४	फळ देठीहून
१८६६	फळ पिके देठीं
२००८	फळाची तों पो
२३२५	फावलें तुम्हां
२७२	फिरंगी वाखर
३२७०	फिरविलें देऊळ
११५१	फिरविली दो
२२७४	फुकाचें तें लुटा
३६८०	फुगडी फू फुग
३१८१	फगडी फू सव
२५८१	फोडीली भांडारें
५८१	फोडूनि सांग
	ब
१४४३	बंधनाचा तोडूं
४८५	बरगासाठी खा
१२१३	बरवयांबरवंट
४०१६	बरवा झाला
३२१	बरवा बरवा वर
७३४	बरवी नामाव
३११४	बरवी हे वेळ
२५८६	बरवें ऐसें आलें
२९४०	बरवें माझ्या केलें
४८०	बरवें देशा उर
३४४८	बरवें बरवें केलें
२६४१	बराडियाची
४०४३	बरवें झालें
४०३८	बरवें झालें
५२१	बरें जालें आलीं
४०४५	बरवें झाले ला
७६९	बरें जालें देवा
१७८	बरें देवा कुणबी
२१५४	बरें सावधान
८३४	बहु उतावीळ
३७०९	बहु काळी बहु
२७८१	बहु कृपावंते
३५७८	बहु जन्मांतरें
१०९८	बहु जन्मी केला
२६४२	बहु जन्में सोस
११२७	बहु टाळाटाळी
३९९९	बहुडविलें जन
३००७	बहुत कृपाळु
४०५५	बहुत जाचलों
२४६५	बहुत प्रकार
८९१	बहुत सोसिलें
१४२४	बहुता करूनि
३७६८	बहुताचे संगती
३४४३	बहुतांच्या आ
३४०६	बहुता छंदांचें
८५७	बहुतां जन्मां अं
३२६६	बहुतां जन्मां अं
१०५२	बहुतां जन्मींचें
१४१४	बहुतां जातींचा
२५०५	बहुतां दिसांची
१३०८	बहुतां पुरे ऐसा
३५९४	बहुतां गेली
३४६९	बहुत गेलीं वां
३५९२	बहु दिस नाहीं
६६७	बहु दूरवरी
१३२६	बहु देवा बरें
२८८९	बहु धीर केला
२३०३	बहु नावें ठेवि
२९२६	बहु फिरलों
३७०१	बहु बरा बहु
२१६१	बहु बरें एकाए
१९२२	बहु भितो
३०२१	बहु या प्रपंचें

अंक	अभंग
२१४९	बहु वाटे भय
१५५०	बहु होता भला
१८९६	बळ बुद्धि वेचु
२३७	बळियांचे अंकित
१७९५	बळिवंत आम्ही
१६०७	बळिवंत कर्म
३६९७	बळें डाई न प
५००	बळें बाह्यात्कारें
२८३	बाईल तरी ऐ
१२८४	बाईले अधीन
५८	बाईल सवासि
१८४६	बांधीं सोडीं हें
२५९८	बाप करीं जो
४१७	बाप मेला न
३५०७	बारबार काहे
३७०९	बाराही सोळा
३२०	बाहीर पडिलों
३३०४	बाळ काय जा
३७८६	बाळपणीं हरि
९८७	बाळपणीं ऐसी
१०९	बाळ बापा म्हणे
२२८६	बाळ माते पाशीं
२५५३	बाळ माते ला
३१०४	बाळ मायेवीण
२४८५	बाळाचें जीवन
२०२६	बीज पेरें सती
३३४८	बीज जाळोनि
७७८	बीजापोटीं पाहे
२८६१	बीजों फळाचा
३७६	बुडतां आवरीं
२०३१	बुद्धिमंद शिरीं
२३०१	बुद्धिहीना जड
१५०१	बुद्धिहीना उप
८४६	बुद्धीचा जनि
६६८	बुद्धीचा पालट
२१०६	बेगडाचा रंग
३५८४	बैसतां कोणापे
३२३०	बैसता चोरा
२४९०	बैसलों तों क
२००६	बैसलोंसे दारीं
३६७५	बैसवूनि फरी
४०७८	बैसो आतां मनीं
३७१	बैसूं खेळू जेवू

अंक	अभंग
१७५१	बैसोनि निवांत
८११	बैसोनि निश्चळ
२६३३	बैसोनिया सा
२३१७	बैसों पाठमोरी
९२५	बोलणेंचि ना
२६७५	बोलणें ते आ
३५२१	बोलतां वचन
८४५	बोलतों निकुरें
२९८४	बोल नाही तु
३४९	बोल बोलतां
३९२९	बोल बोलणें अ
२६३७	बोलविसी तरी
३३४०	बोलविसी तरी
१७७१	बोलविसी माझे
१२८०	बोलाचें गौरव
६४	बोलायाचा त्या
२३३९	बोलाल या आ
७७०	बोलावा विठ्ठल
१७९१	बोलाविणें जेणे
२४३३	बोलावें तें आ
१७७	बोलावें तें धर्मा
१३८८	बोलावें म्हणू हे
२८०७	बोलिलिया गु
३३९९	बोलिली लेंकुरें
७०९	बोलिलेंचि बोलें
३५९८	बोलिलेंती काय
३१८४	बोलिलों उत्कर्ष
१९५५	बोलिलों जैसें
३६२५	बोलिलों तें आ
३५७५	बोलिलों तें आ
१०६	बोळिलो तें कां
१९४७	बोलिलो ते ध
२५३	बोलों अबोलणें
११७	बोलोनिया काय
३४७१	बोलोनिया दा
१४५९	बोळविला देह
९८१	ब्रह्मचारी धर्म
३४६	ब्रह्म न लिंपे
१३०	ब्रह्मनिष्ठ काही
१६५७	ब्रह्मरसगोडी
२०१५	ब्रह्मरस घेईं का
१०२२	ब्रह्मरूपाची
१४७	ब्रह्महत्या मारिल्या

अंक	अभंग
१११४	ब्रह्मज्ञान जरी
२३७३	ब्रह्मज्ञान तरी
१६२८	ब्रह्मज्ञान दारीं
२७२६	ब्रह्मज्ञान भरोवरी
१९	ब्रह्मादिक जया
३७१३	ब्रह्मादिकां न
८४८	ब्राह्मण तो न
८४९	ब्राह्मण तो या
२७९४	ब्रीद ज्याचें
३९०५	ब्रीदावळीच्या
	भ
६७	भक्त ऋणी देव
७४८	भक्त ऐसे जा
३०३५	भक्त करुणा
३८१८	भक्तजना दिलें
१२१२	भक्त देवाघरींचा
३३५५	भक्त भागवत
४२२	भक्तवत्सल दिना
२१५९	भक्त म्हणवूनि
९४८	भक्ताचा माहे
७७	भक्ताविण देवा
१९७४	भक्त समागमें
३१२०	भक्ताहूनि देवा
३२०५	भक्ति आम्ही
३१९९	भक्ति ज्याची
२१२८	भक्ति तें नमन
१०४५	भक्ति तों कठि
२४१	भक्तिप्रतिपाळे
१०९९	भक्ति प्रेम सुख
९१९	भक्ति सुख आलें
१९३९	भक्तिभावें आ
३०३०	भक्तिभावें करीं
२०४९	भक्तिसुखें जें
७६३	भक्तिचिया पो
३१९३	भक्ताचें तें वर्म
३८३५	भक्तीसाठी क
३९२३	भगवंता तुज
३०१२	भगवें तरी श्वा
१६५	भजन घाली
२७१४	भजन हे ना
३८९९	भजल्या गोपी
३१५६	भय नाही भेव
६७९	भय वाटे पर

अंक	अभंग
१२०४	भय हरिजनीं
२९०३	भय होतें आ
२३१३	भयाची तों आ
९२७	भरला दिसे हा
३७७३	भरीला उलंडू
२२३५	भलते जन्मीं
२०४०	भला भला
२०९६	भला म्हणे जन
३४९९	भले रे भाई चि
२९७२	भले लोक ना
२२०	भले म्हणविता
३७७७	भली नंदाजी
१५३१	भल्याचे कारण
१०९०	भल्याचें दर्शन
२०३	भवसागर तरतां
३५४	भवसिंधूचें
५६७	भवसिंधूचें हें
३८६३	भाग त्या सुखा
३५९५	भागलेती देवा
३०१०	भागलों मी आ
२७४३	भागल्यांचा तूं
३२१७	भागल्याचें ता
२३६७	भाग सीण गे
३२५८	भाग्यवंत आ
२०५४	भाग्यवंत म्हणों
८६२	भाग्यवंता हेंचि
१४०१	भाग्यवंता हे
२२२३	भाग्यवंता हे
१५०५	भाग्याचा उदय
५७४	भाग्यें ऐसीं जा
२५३४	भांडणचि झा
२६१२	भांडवल माझें
४७७	भांडवी माउली
२४०९	भांडावें तें गो
१७००	भांडावें तो ही
२१६६	भार देखोनि
३८६१	भारवाही नोळ
३८७	भाव तैसें फळ
३८३७	भाव दावी शुद्ध
२९४	भाव देवाचें उ
२८२	भाव धरी तया
२८४८	भावनेच्या मुळें
६८७	भावबळें कैसा

अंक	अभंग
९१३	भावबळें विष्णु
१९०३	भावाचियां बळें
१९०४	भावापुढें बळ
२३५४	भाविकाचें का
१९७३	भाविकां हे व
२३३५	भावें गावें गीत
३७२८	भिऊं नका वो
९१२	भिक्षापात्र अव
२७६	भीत नाही आ
३९९७	भीतरी गेले हरी
३७१२	भीमातीरीं एक
२६६	भुंकतीं ती या
३३६६	भुंकुनिया सुनें
१५०३	भुके नाहीं अन्न
२५४३	भूक पोटापुर
९५९	भूतदयापरत्वें
३५१४	भयबाधा आ
६७४	भूतभविष्य
२५४७	भूतांचिये नांदे
१२३०	भूतीं देव
४६७	भूतीं भगवंत
१५६२	भूतीं भगवद्भाव
२४५४	भूमी अवघी शु
३०९७	भूमीवरी कोण
३३०७	भेटीची आवडी
११३६	भेटीलागीं जी
२७४६	भेटीलागीं पंढरी
३०५१	भेटीवांचूनिया
१४९८	भेणें पडे डोळ
२५४९	भेद तुटलियाव
२४७२	भेदा भेदताळा
११९७	भोक्ता नारायण
२२९३	भोग तो न घ
१८६९	भोग द्यावे देवा
१६५४	भोग भोगावरी
४९०	भोगावरी आ
३९०६	भोगिला गोपी
३१३०	भोगी झाला
६८	भोगे घडे त्या
७८७	भोजन पा
३७१६	भोजनाच्या का
३२५९	भोंदावया मीस
६९	भोरप्यानें सोंग
८६५	भोवंडीसरिसें
३२६३	भोळे भाविक
३७६३	भ्यालीं जिवा
३२३७	भ्रतारासी मा
७७६	भ्रमणा पाउल
	म
६२१	मऊ मेणाहूनही
२९३५	मंगळाचा भंग
६९९	मज अंगाच्या
२६०५	मज अनाथा का
२८९४	मज ऐसें कोण
२८६४	मज कांहीं सी
१९९९	मज कोणी कां
४०४२	मज ते हांसतील
१९२५	मज त्याची भी
३२	मज दास करी
२४०२	मज नष्टा माया
१७०७	मज नाही तु
२११६	मज नाहीं धीर
८२९	मज पाहतां हें
२१०७	मजपुढें नाहीं
१२६९	मज माझा उप
१६९७	मजशीं पुरें न
३९९	मज संताचा
३४३४	मज सवें आतां
२९३	मजसवें नको
१५९३	मज मजुराचें पोट
४५७	मढें झांकुनियां
२२३२	मतिविण काय
२२२०	मंत्रचळें पिसें
३८८९	मंत्रतंत्र नहि
१०७८	मत्स्यकूर्मशेषा
३१८७	मंथनासाठीं
१३३५	मंथनांचें नव
२८८३	मंथतें भोगे सा
१६७८	मथुरेच्या राया
१९७२	मदें मातलें ना
३०२८	मधुरा उत्तरास
३९४	मन गुंतलें लु
२६५९	मज झालें भाट
१७५५	मन माझे चप
४४५	मन वाचातीत
३४५	मन वोळी म
३३३०	मन करारे प्र
१९१३	मन एक करीं
२८२३	मनाचिये सा
३९०८	मना वाटें तैसीं
३३८१	मना सांडि हें
६३२	मनी वसे त्या
३९२५	मनुराजा ऐक
३८१९	मनें हरिरूपीं
३७३	मनोमय पूजा
२२३७	मरण माझें म
८६८	मरणा हातीं
३४३९	मरणाही आधीं
१०८०	मरोनि जाईन
२६९५	मरोनियां गेली
३५५७	मविलें भविती
३६८३	मशी पोरा घेरे
३०	महाराशी शिवे
७२४	बहुरां ऐसी फ
२८४२	माउलीची चा
३११६	माउलीसी सां
३३०६	माकडा दिसती
१०७	माकडें मुठीसी
४०९२	मागणें ते एक
२०२३	मागणें ते मागो
१७८४	मागतां भिकारी
९२०	मागतां विभाग
१७५६	मागतियाचे दो
२८५७	मागत्याची कोठें
५९६	मागायाची ना
३७५९	मागावयास गे
२६९९	मागितल्यास
३५२५	मागितल्यास
१४७६	मागील ते आ
२७७६	मागील विसर
४०५१	मागुता हाचि
२४३६	मागें चिंता हो
२०८५	मागें जैसा हो
१५८	मागें नेणपणें
२९००	मागें पुढें जा
२९४१	मागें पुढें ना
३९५१	मागें पुढें पाहें
३१२५	मागे बहुत झा
२२१८	मागें बहुतां ज
२४४८	मागें बहुतां ज
२२७९	मागें शरणागत
५३८	मागें संतीं होते
१२५०	मागेन तें एक
४०४८	माझा तव खंट
१९१०	माझा तुम्ही दे
३९१४	माझा देव्हारा
७०१	माझा पहा अ
२९९३	माझा बाप
३५२३	माझा मज ना
११९८	माझा स्वामी
२४७६	माझिया जीवा
२१२४	माझिया देहाची
२७९५	माझिया मना
२७	माझिया मीप
११५०	माझिया मीप
१७८०	माझिया संचि
१९३६	माझिये जाती
२७८९	माझियें बुद्धीचा
३४५४	माझियें मनीं
३४५६	माझियें मनीं
१९५१	माझी आतां
२३२४	माझी आतां
५४	माझी पाठ क
६१८	माझी भक्ती
३३५३	माझी मज आली
१३०९	माझी मज जा
९३७	माझी मेलीं व
६८१	माझी विठ्ठल
११२२	माझी सव चि
२०९३	माझें अंतरींचें
६५४	माझें आराधान
३७३६	माझें गडी को
३६६५	माझें धोंगडें प
२२७	माझें चित्त तु
१३१५	माझें जड भा
२९९४	माझे जीवन तु
२८४५	माझें तो फुका
२६७९	माझें तों स्व
१६०४	माझे पाय तुझी
१७८७	माझें मज आ
११७५	माझें मज कळों
३३१४	माझें मज द्यावें

अंक	अभंग
३०९६	माझें मन पाहे
९७२	माझे मनोरथ
१३७१	माझें माझ्या
२७८७	माझें माथां तु
३०४५	माझें मुख ना
२२३८	माझें लेखीं देव
४७४१	माझेंविषयीं तु
२३९९	माझें हातीं आ
२६२०	माझ्या इंद्रियां
२८२१	माझ्या कपाळा
३३९७	माझ्या बापें
११७३	माझ्या मना
५८४	माझ्या मुखा
१६२४	माझ्या सुखें
१२८७	माझ्या वडिलां
५०७	माझ्या विठो
९६	मांडवाच्या दा
३३२७	मांडे पुऱ्या उ
११६६	माता कापा ग
१५६५	मातेचिये ची
७७९	मातेची जो था
३३०९	माते लेंकरांत
१८३८	मातेविण बाळा
८४	मानअपमान
१५६७	मन इच्छी तो
७४६	मानामान कि
८००	मानावया जग
१००६	मानी भक्तीचे
३२६९	मानू कांही आ
३३२	माप म्हणे मी
१०७७	मायझवा खर
१७५४	मायबाप करिती
३२९४	मायबाप सवें
१४४१	मायबापाचिये
४२८	मायबापापुढें
१७२०	मायबापापुढें
३३३१	मायबापें जरी
२९८८	मायबापें सांभा
३०६७	मायरूपें ऐसें
२६९१	मायलेंकरांत
३०८७	मायवणी धा
४०	माया तेंचि ब्र
७३	माया ब्रह्म ऐसें
८३५	मायामोह जाळी
८९९	मायासाक्षी
३३४४	मायेचा मारि
२२६७	माये मोकलिलें
२३८८	मायेवरी सत्ता
३०५७	मायेविण बाळ
१६६२	मारगीं चालतां
१८८	मार्गीं बहुत
३८९६	मारिले असुर
२९०४	मारूं नये सर्प
२७१२	मार्ग चुकलें
१६२५	मांस खातां
१२१४	मांस चर्म हाड
२२०९	माहार मातेचे
३६७६	माहेरींचा काय
३५८७	माहेरींचें आलें
९२२	मिठवण्याचे धा
३०९९	मिळे हरिदासा
३७८४	मिळोनि गौळ
३५३९	मी अवगुणी
१५२९	मीच विखळ
७७२	मीचि मज
४०१७	मीं तो अनाथ
२६०१	मी तंव बैसलों
२१४६	मी तें मी
३६५३	मी तो अल्प म
३१४	मी तों दीनाहू
२९७८	मी तों बहु मु
२७८०	मी त्यांसी
२२९	मी दास तया
३६६३	मी माझें करीत
१९९६	मी याचक
८१६	मी हें ऐसें
२९७४	मुकें होता
३८१	मुक्त कासया
९६३	मुक्त तो आ शं
१०७२	मुक्त होता परि
१६८५	मुक्ति पांग नाहीं
१३१३	मुखाकडे वास
२२११	मुखीं नाम हा
३२०९	मुखीं विठ्ठलाचें
११४४	मुखें बोलावें तें
३०९	मुखें बोलें ब्रह्म
३८४३	मुखें सांगें त्यासी
२५९०	मुख्य आधीं
२२६१	मुंगीचिया घरा
३४१७	मुंगी आणि राव
६९८	मुद्दल जतन
१७२७	मुदलामध्ये प
६५७	मुनि मुक्त जा
३६७	मुसावलें अंग
८६१	मुळाचिया मुळें
२०२८	मुळीं नेणपण
३६६०	मूर्तिमंत देव
७३३	मूळ कारण स
७४	मृगजळ दिसे
३३३८	मृगजळ काय
३३६९	मृगाचिया अं
२३८	मृत्युलोकीं आ
२२०६	मेघवृष्टीनें क
३४९६	मेरे राम को ना
१३६९	मेलियांच्या रांडा
२११०	मेल्यावरी मोक्ष
३७२३	मेळवूनि सकळ
६१	मैत्र केला महा
४७६	मैंद आला
३७७५	मैं भुली घर जा
३९६३	मोकळी गुंते
६३९	मोकळे मन र
३२९५	मोटळें हाटीं
१०२	मोल देऊनियां
१९३५	मोल वेंचूनियां
१५१४	मोलाचे आयु
३०५४	मोलाचें आयुष्य
१२९६	मोलें घातलें
२०७४	मोहरोनि चि
२९२	मोहऱ्याच्या
३५२	मोक्ष तुमचा देव
२४८१	मोक्ष देवापाशीं
१७३५	मोक्षपद तुच्छ
९५१	मोक्षाचें आम्हां
३२३५	मौन कां धरिलें
	य
४०७९	यत्न आतां तुम्ही
८०३	यथार्थ वाद
१८५२	यथार्थवादे तुज
५६६	यथाविधि पु ना
२२४९	यमधर्म सांगे
२०६६	यमपुरी त्यांनी
३६९६	यमुनेतटी मा
३६७८	यमुनेपाबळीं
१७४४	यज्ञनिमित्त
७५०	यज्ञभूतांच्या
१४८	याचा कोणी
१३५३	याचा तंव हा
९८४	याची नांवें दो
२०७०	याचिया आधा
८४०	याची हाका तु
२७९६	याची कोठें
१३५२	याची सवे ला
७६२	याजसाठीं के
३७५	याजसाठीं वनां
२०५	याजसाठीं भ
६७६	यातीहीन मग
७६७	याति शूद्र वैश्य
८३३	याती मतीहीन
३७४०	या रे करूं गा
३७११	या रे गडे हो
३०९४	या रे नाचों
१६२२	या रे हरिदा
३६८८	याल तरी या रे
३०४६	यालागीं आव
३५७८	यावरीं न कळे
१७५८	यावें माहेरास
२३०	यासी कोण
३८७८	यासी समाचार
३६७९	या हो या चला
७१	युक्ताहार न ल
१३४३	युक्ति तंव
१४८२	येईल तुझ्या
३७४२	येईल तें घेईन
७१२	येईं गा विठ्ठला
१५४२	येईं गा तूं
२१८७	येईं वो येईं
३०३८	येउनी जाउनी
१०३	येऊं द्या जी
१३४७	येऊनि नरदेहा
२२६४	येऊन नरदेहा
१२५३	येऊनि संसारीं

अंक	अभंग
६८०	येगा येगा पांडु
१५३०	येणें जाणें तरी
२८५१	येणें झाला तुझ्या
१३२९	येणें पांगें
१०५१	येणें बोधें आ
१५७१	येणें मार्गे गेले
२३३०	येणें मुखें तुझे
२९४५	येतील अंतरीं
३५६५	येती वारकरी
१७५	येथींचिया
२२५७	येथील जे एक
३०२	येथील हा ठसा
३६१६	येथीलिया अ
९२६	येथुनियां ठाव
३३७२	येथें आड कां
९६२	येथें दुसरी न
५१२	येथें नाही उरों
१६५५	येथें बोलोनियां
३८८५	ये दशे चरित्र
३७९३	येरे कृष्णा
१०७५	ये हरि मज
४२९	योग तप याजि
५६	योगाचें तें भ
८६७	योग्याची संप
	र
३३५०	रक्त श्वेत कृष्ण
२०१३	रंगलिया रंग
२१६७	रंगीं रंगे रे
३२२७	रंगीं रंगे रे
३९००	रचियेला गांव
१८२६	रज्जु धरूनिया
३६०७	रज्जु सर्पाकार
५४४	रडे अळंकार
१५०	रडोनियां मान
१४४६	रणीं निघता
३९७६	रत्नजडित
२९६२	रत्नाच्या वोव
६९३	रवी दीप हिरा
२८६	रवी रश्मीकळा
८७७	रवीचा प्रकाश
१११७	राऊळासी जातां
१६	राजस सुकुमार
३९४०	राजस सुंदर
१३७७	राजा करी तैसे
४५८	राजा चाले तेथें
३४६०	राजा प्रजा द्वा
३१६६	रात्री दिवस
३५०१	राम कहो जी
३१५१	राम कृष्ण ऐ
३९३०	रामकृष्ण गीतीं
१०३६	रामकृष्ण नाम
३५०६	राम भजन सब
७६०	राम राज्य राम
४६४४	रामराम उत्तम
३९२८	रामराम दोनी
३६४९	रामरूप केली
१०७९	राम म्हणतां
३६४३	राम म्हणतां
३६४५	राम म्हणतां
३६४१	राम म्हणे
३६४०	रामा वनवास
२३६८	रायाचे सेवक
४४९	रासभ धुतला
१४५३	राहणें तें
१४५१	राहिलों निरा
२९५१	राहिलों उभा
४६२	राहो आतां हें
२४७८	राहो हेचि ठा
२४६२	रिकामें तूं नको
७२१	रिद्धिसिद्धि दा
८८५	रुचा रूची घेऊं
३२९८	रुसलों या आ
३३२१	रुसलों संसारा
३५६६	रूळें महाद्वारीं
८५९	रूप नांव माया
२३६०	रूपीं जडले
३५३२	रोगिया मिष्टान्न
२३०५	रोज कीर्दी
	ल
११३१	लंकेमाजीं बरें
१४९६	लचाळाच्या
४७८	लटकियाच्या
१८२८	लटिकाचि केला
५९२	लटिका देव
१५५८	लटिका तो प्रपंच
३२५०	लटिकी ग्वाही
८६३	लटिकें तें रूचें
१५६१	लटिकें तें ज्ञान
११८९	लटिकें हांसें
२३८४	लटिकेंचि
३२२३	लटिक्याचे आव
१३८९	लटिक्याची वा
२७३३	लडिवाळ म्हणों
१४५५	लय लक्षी मन
२०३६	लय लक्षूनियां
३६९४	लये लये लखोटा
२३७	लवण मिळवितां
२२३९	लवविलें तयास
७१६	लहानपण दे गा
३४२	लक्षूनियां योगी
६४८	लक्ष्मीवल्लभा
३३१८	लाग पाठ केला
४६६	लागलिया मुख
२४३१	लागलें भरते
२७४५	लागे तुझी सोय
१४८५	लागों दिले अं
११८८	लागोनिया प
१२५९	लागों नेदी वो
२१७२	लाघवी सूत्रधार
२४५१	लाजती पुराणें
१८३१	लाज न विचा
२०८७	लाज वाटे पुढें
१७७०	लाज वाटे मज
२७२०	लाजोनियां का
१६१२	लाडकी लेक
२१४७	लाडाच्या उत्त
१८१२	लापणिक शब्दें
२६१९	लांब धांवे पाय
१५७६	लांब लांब जटा
३०७२	लांबवुनि जटा
२२९९	लाभ खरा नये
१९५९	लाभ झाला बहु
३१४५	लाभ पुढें करी
३५००	लाल कंबली वो
३८९	लावुनि काहा
३३१०	लावुनि कोलित
२८०९	लावुनियां गो
१५३२	लावुनियां पुष्टी
३०७७	लावूनियां मुद्रा
३८२६	लीलाविग्रही तो
४७१	लेंकरा आईतें
८५८	लेंकराची आ
१७५९	लेंकुराचें हित
१३४२	लेंकरा लेववी
२८५०	लेखिलें कवित्व
२४११	लोक कार वा
१७८१	लोकमान देह
१२२१	लोक म्हणती न
३८७३	लोकां कळों आ
२४४६	लोभावरी ठेवुं
२४८४	लोभ कफ गारा
४१४	लोभ चुंबका
१४२९	लौकिकापुरती
१३६५	लौकिकासाठी
	व
१००	वक्त्याआधी
३३४३	वचन तें नाही
३६४	वचनें ही नाड
२५३७	वचनाचा अनु
७६६	वचनांचे मांडे
९७५	वचना फिरती
१३८६	वचनेंचि व्हावें
२२२४	वंचुनियां पिंड
१८३३	वटवट केली
३२४९	वडिलें दिलें
४५९	वत्स पळ धेनु
११४७	वदवावी वाणी
११९९	वंदिलें वंदावें
३८५	वंदीन मी तूतें
६००	वदे वाणी परि
७४३	वदे साक्षत्वेंसी
३७६१	वरतां वेंधोनि
१०७३	वरतें करोनियां
३८८	वरि वरि बोला
३२५५	वरी वरी बोले
११७६	वरजावी ते थोरी
१४९१	वर्जावें ते किती
२७०	वर्जूं महिमा ऐ
११०७	वर्ततां वासर
६१२	वर्म तरी आम्हां
३८१७	वर्म दावी सोपें
३०१	वसवावें घर

अंक	अभंग
१०७१	वसणें थिल्लरीं
६०	वळितें जे गाई
३७०३	वळत्या गाई
१७४०	वाईटाने भले
४३१	वाखर घेउनि
२२२	वाचाचा कल
११०२	वाचें उपदेशिला
३८७१	वाचाळ लटिकें
२४२३	वाचेचिया आ
१७९७	वाचा चाप
२०६८	वाचें विठ्ठल गा
२९९	वाचतील तुरें
११९४	वांझा गाई दुभ
३०१७	वांझेनें लाविलें
२४००	वाट दावी त्या
३९७०	वाट वाहें वाहे
१६८१	वाट वाहे हरि
५७९	वाट वैकुंठीं
५३२	वाटा घेई लंबक
४४२	वाटुनि पाहतां
१००२	वाटे या जनाचें
८९८	वाढलिया नाम
२७७७	वाढवावा पुढें
२४२१	वाढविलें कांगा
२७२४	वांया ऐसा ज
६५१	वांयां जातो दे
२७९१	वांया जाय ऐ
३८९१	वांया तैसे बोल
२४१६	वांयाविण
२४३९	वारकरी पायां
२३३२	वारंवार तुज
२९११	वारंवार हाचि
२४०५	वाराणसी गया
३४६४	वारीता बळें ध
२००२	वरिलें लिगाड
३८९७	वास नारायणें
५८७	वासनेच्या मुखीं
१९६	वासुगीच्या बनी
२०९९	वाहवतों पुरीं
१८४१	वाळुनियां जन
३४२२	वाळो जन मज
३४८४	विकल तेथें वि
३१८५	विचा केला ठोबा
२३११	विंचा पिडी नां
३७७०	विचार करितिं
७९३	विचार नाहीं न
३६५	विचारावांचून
२५१५	विचारिलें आ
१९७	विट नेघें ऐसे
११५५	विटंबले भट
६२३	विटाळ तो पर
७०३	विठोबा विसांविया
३१४०	विठोबाचे नाम
५७८	विठो सांपडावया
४०१५	विठ्ठल आमुचें
२१७९	विठ्ठल आमुचा
३०५०	विठ्ठल कीर्तनाचे
५७७	विठ्ठल गीती गा
६८४	विठ्ठल गीतीं वि
१६४५	विठ्ठल टाळ वि
२२६९	विठ्ठल नामाचा
३९१	विठ्ठल नावाडा
४०६९	विठ्ठल भीमाती
१०८८	विठ्ठल माझा
२०४८	विठ्ठल माझी
२०६५	विठ्ठल मुक्तिदा
१०६४	विठ्ठल विठ्ठल
१०९३	विठ्ठल विठ्ठल
२२५	विठ्ठल सोयरा
४९७	विठ्ठल सोयरा
१०६३	विठ्ठल हा
३१९	विठ्ठल रे तूं
३०२६	विठ्ठलावांचूनि
१२७८	विठ्ठला विठ्ठला
२११४	वितीएवढेंसें पो
३२२९	विद्या अल्प परी
१७४	विधीनें सेवन
३९१३	विनती घातली
२७९९	विनविजे ऐसें
२९८९	विनवितों चतु
१३१०	विनवितों तरी
२५५१	विनवितों सेव
१५१६	विधंशिली बु
३५८८	वियोग न घडे
३७९२	विरहतांपे कुंदे
८३८	विरोधाचें मज
२३१८	विश्वंभर वोळे
३२८	विश्वव्यापी
७८	विश्वाचा जनि
२६६२	विश्वास तो देव
२९६६	विश्वास धरूनि
२५५९	विश्वासिया ना
२९०७	विश्वीं विश्वंभर
१२६७	विष पोटीं सर्पा
२९०५	विषम वाटे
२२५४	विषमाची
४०२७	विषय ओढी
१५२८	विषय तो
३२४८	विषयांचे लो
४४०	विषयांचें सुख
३४८५	विषयीं अद्वय
१०३५	विषयीं विसर
२१५०	विष्ठा भक्षी तया
२३३४	विष्णुदासा भो
२१	विष्णुमय जग
६०४	विष्णुमय सर्व
३४२६	विसरलें कुळ
८०७	वीर विठ्ठलाचे
४२	वृत्ती भूमि रा
२७५६	वृत्ती वरी आम्हां
२३७६	वृक्ष वल्ली आम्हां
२११५	वेचावें तें जावें
३३६२	वेठी ऐसा भाव
३८६७	वेडावली काय
२०३३	वेडी ते वेडी
१५५६	वेडें वांकडे गाई
२२०५	वेडिया उपचार
३१५३	वेद अनंत वो
१९९४	वेद जया गाती
७५१	वेदपुरुष तरी
९७०	वेदविहित तु
२१२६	वेद शास्त्र ना
२१८०	वेदाचा तो अर्थ
१७३	वेदाचें गव्हर
२०११	वेरझारी जाला
७८०	वेष वंदाया पुर
६२६	वशा नाही बोल
३९६०	वेसन गेलें
८८६	वेळो वेळां हेंचि
२१४	वैकुंठा जावया
३३४९	वैकुंठींचा देव
३८१६	वैकुंठीच्या लोकां
२०१७	वैद्य एक
१८७	वैद्य वांचविती
२५६०	वैभवाचे धनी
२८४८	वैरागरां पाशी
२९४२	वैराग्याचा अं
१२३८	वैराग्याचें भा
२१७	वैष्णव तो जया
२३६५	वैष्णवमुनिवि
३३५४	वैष्णवाची याती
१९५४	वैष्णवाची की
१३४०	वैष्णवां संगती
१४६५	वैष्णव चोरटीं
२८६९	वोसटा तरी
२४४१	वोडविले अंग
८१४	वोणव्या सोंग
३६०२	वोरसोनि येती
३७४१	वोळली चा
११३२	व्यभिचारिणी
१८२७	व्यवहार तो
३३६५	व्यापक व्हा
२३९४	व्यापिलें सर्वत्र
८२	व्याल्याविण
२६७१	व्हावया भिकारी
	श
१५११	शकुनानें लाभ
२५५६	शक्ती द्याव्या
३९५४	शंख करीसी
३६१८	शंखचक्रगदा
२९७१	शब्द झणी
४००४	शब्दांचियां
९४	शब्दां नाही
२२८८	शरण आलें
१६३	शरण शरण
१३४१	शरण शरण
१२६	शरणागत
४०६६	शरीर दुःखाचें
१५९२	शहाणपणें वेद
३४५९	शाक्त गधडा
३४६५	शाक्ताची शूक
२८९	शांतीपरते ना

अंक	अभंग
२१५८	तें सोंग
३३३४	शास्त्रांचें जे
८७४	शहाणिया पुरे
३३३२	शिकल्या
२८७८	शिकल्या श
३२४६	शिकविणे नाक
३५३४	शिकविलें तुम्ही
२०९७	शिकविलों ते बोल
१५५३	शिकवूनि बोल
१२१८	शिकवूनि हित
३६८९	शिकें लावियेलें
३०६२	शिखा सूत्र
२५५४	शिजल्यावरी
४००१	शिणलेति सव
११३	शिंदळा साल्या
९३६	शिष्याची जो
११४३	शिळा जया
३८१३	शिळा स्फटिका
२४३०	शिळें खातां
१३३२	शीतळ तें
६७७	शीतळ साउली
१०५	शुकसनकादि
१२१०	शुद्ध ऐसें
४७२	शुद्ध चर्या हें
३७१४	शुद्ध वळणाचें
३७	शुद्ध बीजापोटीं
२६२४	शुद्धाशुद्ध निव
१४२३	शुध्दारसें ओला
३७४४	शुद्धींचे सारी
१९३०	शुभ ज्या ज्या
३८५६	शुभ मात तिहीं
१६५	शूद्र वंशीं
१७२९	शूरत्वासी मोल
१७३८	शूरा साजती
१३९५	शृंगारिक माझी
२४४२	शेवटींची विनं
५४०	शेवटीची विन
१४८१	शोकवावा म्यां
२१५	शोकें शोक वाढें
३६०६	शोधितांचि
१८६	शोधितील मूळें
३२७५	शोधोनि अन्वय
४८	स्मशान ते भूमी

अंक	अभंग
२७५१	श्रमपरिहारा
४०४७	श्रीअनंता
३३८२	श्रीपंढरीशा
२१२९	श्रीसंताचिया
५१	श्वान शीघ्र कोपी
१८३२	श्वाना दिली स
	स
२९११	सकळ गुणे संप
१४००	संकल्पासी
२८	सकळ चिंता म
३०७५	सकळ तुझे
११८१	सकळ देवांचें
५०८	सकळ धर्म मज
१४४७	सकळ पूजा
१३७४	सकळ सत्ता
३६२४	सकळही माझी
१०५५	सकळीकांचे
३३४	सकळांच्या
४०८८	सुकुमार मुख
३१९७	संकोचित जीव
३३९६	संकोचोनि का
१३६०	संगतीनें होतों
३१९५	संगे वाढे सीण
३८२९	संचित उत्तम
१९०८	संचितचि सा
१२४२	संचित प्रारब्ध
१४९२	संचितांवांचून
१७९९	सज्जन तो शब्द
२५४८	संत आले घरा
१२०८	संत गाती
३१५०	संतचिन्हें लेऊ
३२६२	संत देखोनिया
१६४७	संतनिंदा ज्या
१७४२	संत पंढरीसी
३१७	संत मागे पाणी
१८९१	संत मानितील
१११०	संत मारगीं
२६१३	संतसंगतीं न
२१९३	संतसंगे याचा
२२१	संतसमागम
१६००	संतसेवेसी अंग
९००	संता आवडे तो
१५६	संतांचा अति

अंक	अभंग
३१७८	संताचा पडि
८१८	संताचा महि
८५६	संताचियें गां
२१७१	संताचिये पा
५५३	संतांची उच्छिं
१५३५	संताची स्तुती
२१९९	संतांचा उपदेश
१२१	संतांचे गुण
१९५६	संतांचे घरींचा
६८५	संतांचें मुख
९०१	संतांच्या धिक्का
३२०२	संतांच्या पादु
११२६	संतांच्या हेळणे
१६१३	संतां नाही
३२००	संतांनी सरता
८५३	संतांपाशी बहु
१०६७	संतांशीं तों
१४७९	संतांसीं क्षोभ
३६२२	संतीं केला
२३४१	सतीचें तें घेतां
२७९८	संतोषें माउली
२१९१	सत्ताबळे येतो
१९०५	सत्तावर्ते मन
१३५६	सत्तेंचे भोजन
२७९३	सत्य आठवितां
१२१७	सत्य आम्हां मनीं
२१८३	सत्य कर्म आचरें
३४५३	सत्य गुरुरायें
३५७	सत्य तो आवडे
३७८८	सत्य त्यागाची
२३४४	सत्यत्वेंशीं घेणें
१०१३	सत्य संकल्पाचा
८२७	सत्य सत्य देतो
३५६	सत्य साच खरें
२८३२	सत्य माप वाढे
३३	सदा तळमळ
३२५४	सदा नामघोष
१५	सदा माझे डोळे
३३५९	संदेह गमला
५९९	संदेह निरसे
१९८२	संदेह बावक
५४६	सदैव तुम्हां
२३९०	सदैव हे वार

अंक	अभंग
१०३१	सद्गदित कंठ
१६७२	संध्या करितो
१७४५	संध्याकर्म व्या
२२४०	संपदा सोहळा
३९३४	सब संबाल
३९३३	संवाल यारा
१	समचरणदृष्टि
३६४७	समरंगणा
१३७२	समर्थपणें हें
२८४९	समर्थ या नांवें
१४३२	समर्थाचा ठाव
१३३७	समर्थाची धरी
१६६१	समर्थाचें केलें
३५६१	समर्थाचे पोटीं
६६१	समर्थाचे बाळ
२७३६	समर्थाचे बाळ
२८८८	समर्थाचे सेवे
२५०८	समर्थ ती नाही
२९९८	समर्थासी लाज
३५६४	समर्पक वाणी
९२३	समर्पिली वाणी
३९६६	सम सपाट
३८८३	समागमे असे
३८७४	समाधान त्या
२२१४	समुद्रवलयांकि
३८३४	संयोग सकळां
२४५५	सरतें माझें तुझें
२४९७	सरलियाचा
१०४८	सरलीं हीं नामें
१४६१	सरलें आतां
२४४५	सरे ऐसें ज्याचें
६७५	सर्प भुलोन
१२४	सर्प विंचू दिसे
३०२७	सर्वकाळ डोळां
१०१९	सर्वकाळ माझे
३१४४	सर्वथाही खोटा
१२५४	सर्वपक्षीं हरि
१५०४	सर्व भाग्यहीन
६८९	सर्वभावें आलों
८९५	सर्वरसीं मिनले
५४८	सर्वविशीं आ
२३२९	सर्वाविशीं
१३३१	सर्व संगी वटि

अंक	अभंग
३४३०	सर्व सुख आ
३३६३	सर्व सुखा अधि
४०१९	सर्वसुखाचिया
४९३	सर्व सुखें आली
२२८१	सर्वस्वाचा त्या
३०९०	सर्वस्वाची सा
१५५९	सर्वस्वासी मुकावें
२३४५	सर्वात्मकपण
११०५	सर्वांभूतीं द्यावे
२४२४	सवंग झालें सवंग
२५५	संवसार तीहीं
२०२९	संवसार सांते
७११	संसार तो कोण
१०६८	संरास संगे पर
४०६८	संसारसिंधु हा
२४१८	संसार सोहळे
३०६५	संसारा आली
५३६	संसाराचा मा
२६९६	संसाराची को
३६१०	संसाराचें अंगीं
२७७९	संसाराचे धांवे
६६	संसाराच्या तापें
२५६८	संसाराच्या नांवें
१८१७	संसाराच्या भे
१५६८	संसारापासूनि
२३७४	सहज पावतां
३९२२	सहज मी आंध
२३३८	सहज लीला मी
११२०	सांकरेची गो
१२२६	सांकरेच्या योगें
२३०७	सांखरेचें नांव
२४२७	सांखळिलो मी
१६९६	सांगतां गोष्टी
७६४	सांगता दुर्लभ
४८१	सांगतां हे नवे
२४३६	सांगतों तें तुम्ही
२९७१	सांगतों तुम्हांसी
१८४२	सांगतों या मो
३५२८	सांगा दास न
१६७४	सांगावें ते बरें
६१३	सांगो देवा ने
१००७	सांगों जाणती
२४१४	साच मज काय
३९१२	साच माझा
३९९४	साच हा विठ्ठल
७४५	साजे अलंकार
३५१	सांठविला हरी
४६४	सांठविला वाण
३८७२	सांडवले नक
३१३७	सांडावी हे नी
२७४७	सांडियेली कां
३२९९	सांडूनि मुखा
२२४७	सांडूनि कीर्तन
३४३८	सांडूनिया
२४०६	सांडूनियां सर्व
३९९०	सांडूनि वैकुंठ
१०२७	सांडोनिया दों
३७९१	सात पांच गौ
३२७९	साता दिवसां
२७२२	साता पांचा
३९६४	सातें चला का
१७६६	सादाविलें एका
८२८	साधक जाले क
११६१	साधकाची द
१८५१	साधन संपत्ति
३१०७	साधनाचें कष्ट
७७३	साधनाच्या क
३१९०	साधकाच्या कोटी
१९२९	साधनें आमुची
२८४	साधनें तरी ही
१०५९	साधावया
१४७७	साधावा तो देव
१११६	साधुंच्या दर्श
३३३६	साधुंनी वचना
१२३	सांपडला संदी
१६८६	सांपडला हातीं
२९५४	सामावे कारण
३७१९	सारा विटूं दांडू
२०३०	सारावी लिगाडे
३१६२	सारासार विचार
२६३५	सारीन तें आतां
३४८०	सालोमालो ह
३६८६	सावंडी कांडण
३	सावध झालों
२३७८	सावधान ऐसें
२३५५	सांवळें रूपडें
३११९	सांवळें सुंदर
२१०८	सावित्रीची विटं
३४३८	सामुरिया वटी
१९७९	साहोनि टाकी
९३०	साहोनिया दो
१४५	साळंकृत कन्या
२८७९	सिकविलें तैसें
१९६९	सिंचन करितां
१८०४	सिणलों दातारा
३२९३	सिंदळीचें चित्त
२२३	सिंदळीचे सोई
३०६४	सिंदळीस ना
३६८५	सिद्ध करूनिया
२६२१	सिद्धीचा दास
३५५०	सीण भाग हरि
१३९४	सुकलिया को
२१९५	सुकाळ हा
११५३	सुख डोळां पाहे
२३८०	सुख नाही कोठें
२९१२	सुख पंढरिये
६२	सुख पाहतां
४०३४	सुख या संत
२३६९	सुखरूप ऐसे
२९११	सुखरूप चाली
२५०३	सुख वाटे परी
४२६	सुख वाटे येचि
१२१९	सुख सुखा भेटे
२७१६	सुख सुखा विर
३५१३	सुख हे नावडे
३३७१	सुखाची वस्ती
१९६०	सुखाचें ओतलें
१२०१	सुखाचें व्यवहा
३३९५	सुखें खावें अन्न
२३०८	सुखें घेऊं जन्मां
१७०५	सुखें न मनी
७	सुखें वोळंबा दा
८२१	सुखें होतो कोठें
२९९१	सुगरीण बाई धि
४६७८	सुटायाचा कां
४०८७	सुंदर अंगकांती
१३	सुंदर ते ध्यान
३९४२	सुंदर मुख सा
३९४१	सुदिन सुवेळ
२९०१	सुनियाचा हा
२४२९	सुनियांची आ
७९२	सुरवर येती ती
२६६३	सुराणीची जा
२७५७	सुलभ कीर्तन
४४८	सुकरासी विष्ठा
१५३६	सेजेचा एकांत
३१२४	सेट्याना चौधरी
८१५	सेत आलें सुगी
८१३	सेत करा रे
४०२६	सेंदरी हे दरी
१४८७	सेवकासी आ
१७९३	सेवकासी आ
२४९२	सेवकें करावें
३४०४	सेवकें करावें
१२८१	सेवट तो भला
२६८९	सेवट तो होतो
२१३५	सेवटासी जरी
१०३९	सेवा ते आवडी
२०१	सेवितो हा रस
१६८७	सेवीन उच्छिष्ट
३८८७	सैन्य जन हांसे
१०१२	सोंगें छंदे कांही
३४५१	तोडवा सोडवा
११५२	सोडियेल्या गां
३७०	सोडिला संसार
८१२	सोनियाचा क
१३५	सोनियाचे ताट
५८०	सोनें दावी बरी
३४१८	सोन्याचे पर्वत
१९१८	सोपें ज्यासी
७३८	सोपें वर्म आम्हां
३२२	सोयरिया करी
३२३	सोलीव जें सुख
३२४०	सोवळा तो झा
२९५६	सोवळां होऊं
३९०४	सोसियेली आटी
२५९३	सोसें बहु गर्भवा
९१६	सोसें वाढें दोष
१४३९	सोसें सोसें मा
४०८	सोसोनि विष
१२६४	सोळा सहस्र हो
३९६५	सौरी सुर झालें

अंक	अभंग
२६००	स्तवूनिया नरां
६६६	स्तुति करीजे
३३७	स्तुती करूं तरी
३५३०	स्तुती करूं तरी
२४८३	स्तुती अथवा
२३९	स्त्रियांचा तो सं
३०७९	स्त्रिया पुत्र कल
५१९	स्त्रिपुत्रादिकीं
२५७१	स्मरणाचें वेळें
१९४४	स्मरतां कां पडे
१५९४	स्मशानी आ
३२७८	स्वप्नीं तोही
१९४	स्वप्नींचिया गो
२९४४	स्वनींचे धन
२६०४	स्वमुखेचि तुम्ही
१७७९	स्वयें पाक करो
३७७१	स्वयें सुखाचें
३३५६	स्वर्गींचे अमर
१९१५	स्वल्प वाटें च
२१७५	स्वामिकाज
२८४६	स्वामिचिंया
१३२७	स्वामित्वाचीं व
३३२०	स्वामींचें हे देणें
३०४९	स्वामीची संकं
	ह
१६२	हनुमंत महाय
३६८४	हमामा रे पोरा
३२८८	हरि ॐ
१८५०	हरिकथेची आ
३४०७	हरिकथे नाही
३४०३	हरिकथेविण
३७६५	हरि गोपाळांस
३०५८	हरिचिया भ
१७१४	हरिची हरिक
१५४३	हरिचे नाम
१२	हरिच्या जागरणा
१५४६	हरिच्या दासां
१७३०	हरिच्या दासां
१०६१	हरिजनाची को
३२०३	हरिजना प्राण
१०८	हरि तूं निष्ठुर
४०५४	हरि तैसे हरिचें
३२२२	हरिदासाचिये
२५८५	हरिनामवेली
१०२८	हरिनामाचें क
१७८५	हरिने माझें ह
३७७६	हरिबिन रहिं
१५५७	हरिभक्त माझे
३४९१	हरिसुं मिलदे
११७९	हरि म्हणतां ग
३८०७	हरिरतां चपळां
३४४६	हरिहर सांडू
९९	हरिहरां भेद
३९४	हरि हरि तुम्ही
३१२१	हरि तुझें नाम
३७९०	हरी तुझी कां
३६७३	हारस आनंदा
४१३	हाकेसरिसी उडी
२११८	हागतांही खो
२२०२	हागिल्याचे सि
१३४४	हागें आलों को
१५८९	हा गे माझा
३७४८	हा गे माझा हा
२८६५	हा गे हाचि हा
३४२४	हाचि नेम आ
५६९	हाचि परमानंद
३०६०	हाचि माझा ने
९०५	हातीं घेऊनियां
४०६१	हातींचें न संडा
१२९४	हातीं धरूं जावें
१४४	हातीं होन दावितीं
२८०८	हा तो नव्हता
१३२४	हा तो नव्हे कां
१२३१	हारपल्याची न
२८९६	हारपोनि गेली
१८६७	हालवुनि खुंट
३४३३	हासो रुसो आ
२८७१	हित जाणे चि
१९३५	हित तेंचि एक
२६५३	हित नाहीं ठावें
१७१२	हित व्हावें तरी
१२६२	हित सांगें तेणें
१२४१	हितावरी यावे
२५	हिरा ठेवितां ऐ
३९७७	हिरा शोभला
५१३	हीच त्याची
११६५	हीन माझी या
१३७९	हीन शूर बुद्धि या
२७६७	हुंदकी पिसवी
२४२०	हुंबरती गाय
३५०८	हूं दास तीन्हके
१५०९	हें कां आम्हां
३७३७	हेचि अनुवाद
१३०५	हेचि जतन क
३८९	हेंचि तुझी पु
११९१	हेचि थो भय
२२२२	हेचि दान देगा
४०५०	होचि भवरोगा
१२६०	हेचि भेटी सा
३२३४	हेची माझें चि
२९१५	हेचि माझें तप
६२९	हेचि माझें धन
२१९०	हेचि याच्या
२८३४	हेचि वादकाची
२९३७	हेचि वारंवार
२७४०	हेचि सर्व सुख
३२६५	हेचि सुख पुढें
२७१०	हें तो एक
३३२२	हें तो वाटले
१४९४	हेंदऱ्याचे भरी
२८७०	हेंही ऐसें तेंही
३५०	होईन भिकारी
३५६८	होईल कृपादान
३१६७	होईल खडे गो
११५८	होईल जाला
१२३	होईल तरी
३००१	होईल तो भोग
३५७९	होईल निरोप
३५८२	होईल माझी
२०८१	होऊनि कृपाळ
३०७६	होऊनिया जग
३०७१	होऊनि संन्या
१२०६	होऊं नको कां
४१२	हो कां दुराचा
१७१३	हो का नर अ
८१	हो का पुत्र प
३७८८	होतें बहुत
४०४१	होतो तें चिंति
३५९३	होतों नेणों
१६२०	होतों सांपडलों
४९८	होय होय वार
२९४६	म्हणवुनि काय
२१६	म्हणउनि खेळ
२९५२	म्हणउनि झाली
२९६०	म्हणउनि शरण
६१०	म्हणउनि दास
२३०२	म्हणउनि काकु
१५१५	म्हणउनि जालों
२५८३	म्हणउनि धीर
३७०४	म्हणती धालों
२६२६	म्हणवितां हरि
२६३	म्हणविती ऐसे
३८७०	म्हणविती भक्त
१९२	म्हणवितों दास
५०१	म्हणवितों दास
७२०	म्हणवितों दास
२४६७	म्हणवितों दास
३६०८	म्हणवितो दास
८१७	म्हणसी नाही रे
१८०१	म्हणसी होऊन
३८५१	म्हणे चेंडू
१०६५	म्हणे विठ्ठल म
९८६	व्हावया भिका
	क्ष
३४२९	क्षणभरी आम्ही
१३८२	क्षणक्षणा जीवा
८८१	क्षणक्षणा सांभा
२५२३	क्षणक्षणा हाचि
३११३	क्षमाशस्त्र जया
८९४	क्षर अक्षर हे
२७१८	क्षरला सागर
२३१०	क्षीर मागें तया
३२१०	क्षुधा तृषा कां
३०४०	क्षुधार्थी अन्नें
२११४	क्षुधेलिया अन्न
१६८८	क्षेम देवाला हो
३५८१	क्षेम मायबाप
२७७८	क्षोभ आणि कृ
	ज्ञ
३३९८	ज्ञानियांचा रा
१०४०	ज्ञानियांचें घरीं